भाषांतर माला क्र. ३८

औरंगजेबाचा इतिहास

कै. सर जदुनाथ सरकार लिखित

"A SHORT HISTORY OF AURANGZIB"

या ग्रंथाचे भाषांतर

भाषांतरकार

कॅ. डॉ. भ. ग. कुंटे

एम्. ए., पी. एच्. डी. (इतिहास),
पी. एच् डी. (अर्थशास्त्र)

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई

१९७८

अनुक्रमणिका

भाषांतर माला क्र. ३८

औरंगजेबाचा इतिहास

कै. सर जदुनाथ सरकार लिखित

"A SHORT HISTORY OF AURANGZIB"

या ग्रंथाचे भाषांतर

भाषांतरकार

कॅ. डॉ. भ. ग. कुंटे
एम्. ए., पी. एच्. डी. (इतिहास),
पी. एच् डी. (अर्थशास्त्र)

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई
१९७८

अनुक्रमणिका

प्रथमावृत्ती – १९७८ (शके १९००)

प्रकाशक :
© सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

मूळ प्रकाशक :
सुप्रिया सरकार,
एम. सी. सरकार ॲण्ड सन्स प्रा. लि.,
१४, बंकीम चटर्जी स्ट्रीट,
कलकत्ता १२

Rs. 49-00

मुद्रक :
शं. ना. अंधृटकर,
महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय,
९१५।१, शिवाजीनगर, फर्ग्युसन कॉलेज रोड,
पुणे ४११ ००४

अनुक्रमणिका

निवेदन

१. आधुनिक शास्त्रे, ज्ञानविज्ञाने, तंत्र आणि अभियांत्रिकी इत्यादी विषयांत त्याचप्रमाणे भारतीय प्राचीन संस्कृती, इतिहास, कला इत्यादी विषयांत मराठी भाषेला विद्यापीठाच्या स्तरावर ज्ञानदान करण्याचे सामर्थ्य यावे हा उद्देश लक्षात घेऊन साहित्य-संस्कृती मंडळाने वाङ्मयनिर्मितीचा विविध कार्यक्रम हाती घेतला आहे. मराठी विश्वकोश, मराठी भाषेचा शब्दकोश, मराठी वाङ्मयकोश, विज्ञानमाला, भाषांतरमाला, आंतरभारती विश्वभारती, महाराष्ट्रेतिहास इत्यादी योजना मंडळाच्या या कार्यक्रमात अंतर्भूत केल्या आहेत.

२. मराठी भाषेला विद्यापीठीय भाषेचे प्रगत स्वरूप व दर्जा देण्याकरिता मराठीत विज्ञान, तत्त्वज्ञान, सामाजिक शास्त्रे आणि तंत्रविज्ञान या विषयांवरील संशोधनात्मक व अद्यावत माहितीने युक्त अशा ग्रंथांची रचना मोठ्या प्रमाणावर होण्याची आवश्यकता आहे. शिक्षणाच्या प्रसाराने भाषेचा विकास होईल ही गोष्ट तर निर्विवादच आहे. पण मराठी भाषेचा विकास होण्यास आणखीही एक साधन आहे आणि ते साधन म्हणजे मराठी भाषेत निर्माण होणारे उत्कृष्ट वाङ्मय हे होय. जीवनाच्या भाषेतच ज्ञान व संस्कृती यांचे अधिष्ठान तयार व्हावे लागते. जोपर्यंत माणसे परकीय भाषेच्याच आश्रयाने शिक्षण घेतात, कामे करतात व विचार व्यक्त करतात, तोपर्यंत शिक्षण सकस बनत नाही, संशोधनाला परावलंबित्व राहते व विचाराला अस्सलपणा येत नाही, एवढेच नव्हे तर वेगाने वाढणाऱ्या ज्ञानविज्ञानापासून सर्वसामान्य माणसे वंचित राहतात.

३. संस्कृत व अन्य भारतीय भाषांतील आणि त्याचप्रमाणे इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, इटालियन, रशियन, ग्रीक, लॅटिन इत्यादी पश्चिमी भाषांतील अभिजात ग्रंथाचे व उच्च साहित्यामधील विशेष निवडक पुस्तकांचे भाषांतर किंवा सारांश अनुवाद अथवा विशिष्ट विस्तृत ग्रंथांचा आवश्यक तेवढा परिचय करून देणे हा मंडळाच्या भाषांतरमालेचा उद्देश आहे.

४. भाषांतर योजनेतील पहिला कार्यक्रम मंडळाने आखून ज्यांना अग्रक्रम दिला पाहिजे अशी पाश्चात्य व भारतीय भाषांतील सुमारे ३०० पुस्तके निवडली आहेत. होमर, व्हर्जिल, एस्किलस, ऑरिस्टोफेनिस, युरिपिडिस, प्लेटो, ऑरिस्टॉटल, थॉमस ॲकाइनस, न्यूटन, डार्विन, रूसो, कॉन्ट, हेगेल, जॉन स्टुअर्ट मिल, गटे, शेक्सपीअर, टॉलस्टॉय्, दोस्तएव्स्की , कॉसेरेर, गार्डन व्ही. चाईल्ड इत्यादिकांचा भाषांतरमालेत समावेश केला आहे. संस्कृतमधील वेद, उपनिषदे, महाभारत, रामायण, भारताचे नाट्यशास्त्र, संगीत रत्नाकर, ध्वन्यालोक, प्राकृतातील गाथासप्तशती, त्रिपीटकातील निवडक भाग इत्यादिकांचाही भाषांतरमालेत समावेश केला आहे.

५. भाषांतरयोजनेखाली मंडळाने आतापर्यन्त ५४ अभिजात ग्रंथांची भाषांतरे प्रकाशित केली आहेत. जॉन स्टुअर्ट मिलचे "On Liberty", रूसोचे "Social Contract", एम्. एन्. रॉयचे "Reason, Romanticism & Revolution व "Letters from Jail", स्तानिस्लाव्स्कीचे "An Actor Prepares" व "Building a Character", तुर्गिनेव्हचे "Fathers & Sons", रायशेन्बाखचे "Rise of Scientific Philosophy", गन्नर मिरदालचे "Economic Theory & Underdeveloped Regions", कै. पां. वा. काणे यांचे, "History of Dharmashastra", कोपलँडचे "Music & Magination", बर्ट्रान्ड रसेलचे "Religion & Science", तेरझागीचे "Theoretical Soil Mechanics", विशाखादत्तचे "मुद्राराक्षसम्",

भरतमुनीचे “भरतनाट्यशास्त्र” (अध्याय ६ व ७ आणि अध्याय १८ व १९), निकोलाय मनुचीचे Storia Do Mogor,” ऑ. से. पिगू लिखित “Socialism Vs. Capitalism”, इझाडोरा डंकनचे “My Life”, स्ट्रॅविन्स्कीचे “Poetics of Music” इत्यादी ग्रंथांची भाषांतरे मंडळाने प्रकाशित केली आहेत.

६. कॅ. डॉ. भ. ग. कुंटे यानी मंडळाच्या भाषांतरमालेत अंतर्भूत असलेल्या सर जदुनाथ सरकार लिखित “A Short History of Aurangzib” या ग्रंथाचे मराठी भाषांतर मंडळास करून दिले. सदर भाषांतर “औरंगजेबाचा इतिहास” या शीर्षकाखाली मंडळाच्या भाषांतरमालेत प्रकाशित करण्यास मंडळास आनंद होत आहे. सदर मराठी भाषांतर प्रकाशित करण्यास मंडळास परवानगी दिल्याबद्दल ले. क. संतोषकुमार सरकार, कलकत्ता २९ यांचे मी आभार मानतो.

लक्ष्मणशास्त्री जोशी,

अध्यक्ष

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळ.

मुंबई– ४०० ०३२,

दिनांक १७ फेब्रुवारी, १९७८.

अनुक्रमणिका

लेखकाचे निवेदन

प्रास्ताविक

सर जदुनाथ सरकार यांनी औरंगजेबाचे चरित्र प्रथम पाच खंडात प्रसिद्ध केले. त्यानंतर १९३० मध्ये त्यांनी या पाच खंडांचे संकलन करून औरंगजेबाच्या चरित्र-ग्रंथाची एक छोटी आवृत्ती A Short History of Aurangzib या नावाखाली प्रसिद्ध केली. त्या ग्रंथाचा मराठीमध्ये केलेला हा अनुवाद आहे. ग्रंथाच्या मजकुराची मूळ इंग्रजी पाने ४६२ असून ग्रंथाची विभागणी २० प्रकरणात करण्यात आलेली आहे. औरंगजेबाची एकंदर हयात ८९ वर्षांच्या कालखंडावर पसरलेली असून त्याच्या प्रत्यक्ष कारकीर्दीचा कालखंड ४९ वर्षांएवढा आहे. औरंगजेबाचे खासगी जीवन, त्याची राजकीय कारकीर्द, त्याची राज्यकारभाराची पद्धत, तत्कालीन सामाजिक, अर्थिक आणि व्यावहारीक जीवन, त्याचप्रमाणे औरंगजेबाच्या कारकीर्दीचे आणि धोरणाचे हिंदुस्थानच्या इतिहासावर झालेले परिणाम या सर्वांचा अतिशय साकल्याने असा परामर्ष सर जदुनाथ यांनी आपल्या औरंगजेबाच्या या चरित्रग्रंथात घेतला आहे, हे चरित्र लिहिताना त्यांनी प्रचंड अशा निरनिराळ्या भाषांतील साधनग्रंथांचा उपयोग केला आहे. यामध्ये मराठी, इंग्रजी, फारशी, पोर्तुगीज, फ्रेंच वगैरे भाषांतील अव्वल दर्जाच्या साधनांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. या सर्व साधनांमध्ये सरकारांचा विशेष भर खाफीखान याच्या **"मुन्तखाब उल् लुबाब"**, साकी मुस्तैदखान याच्या **"मासिरि आलमगिरी"**, भीमसेन सक्सेना याच्या **"तारीखे दिलकुषा"**, ईश्वरदास नागर याच्या **"फुतुहाते आलमगिरी"**, जयपूर दरबारचे **"अखबार"**, इनायतुल्ला याच्या **"अहकाम"** वगैरे फारशी ग्रंथांवर अधिक आहे. अनुवादिलेल्या ग्रंथात तळटीपा फारच थोड्या आहेत. साहजिकच भाषांतर करताना सरकारांच्या वर उल्लेखिलेल्या पाच खंडांचा अधिकाधिक उपयोग केलेला आहे. फक्त सरकारांच्या औरंगजेब या ग्रंथापुरते बोलावयाचे झाल्यास तळटीपा दोन पद्धतीने दिलेल्या आहेत. पहिल्या पद्धतीत मजकुरातील घटनेचा उल्लेख सरकारांनी ज्या ग्रंथातून केला आहे, त्या ग्रंथाचा नामनिर्देश पानासहीत मजकुरानंतर तिथेच दिलेला आहे. दुसरी पद्धत म्हणजे तळटीपा खऱ्या अर्थाने तळटीपा म्हणून दिल्या आहेत. याचे कारण पुढीलप्रमाणे आहे. अनुवाद ज्या पुस्तकावरून केला ते पुस्तक म्हणजे औरंगजेबाच्या चरित्राची संक्षिप्त आवृत्ती आहे. साहजिकच अनुवाद करताना असे वाटत होते की, अमुक घटनेचा उल्लेख अधिक सविस्तर झाला असता किंवा अमुक प्रसंगाची चर्चा अधिक साकल्याने झाली असती तर बरे झाले असते. ही उणीव विशेषतः औरंगजेबाच्या दक्षिणेमधील मोहिमांबाबत अधिक भासली. म्हणून या प्रसंगांचे किंवा घटनांचे वर्णन केवळ त्या घटना आणि ते प्रसंग ज्या ग्रंथात आलेले आहेत त्यांचा केवळ नामनिर्देश न करता सरकारांच्या पाच खंडांतून त्या घटनांचा आणि प्रसंगांचा सुलभ असा अनुवाद तळटीपांच्या रूपाने दिलेला आहे. साहजिकच तसे पाहिले तर अनुवादाचे स्वरूप सरकारांच्या छोट्या ग्रंथापुरते मर्यादित राहिले नसून सरकारांच्या औरंगजेबाच्या चरित्राचे कथन करणाऱ्या पाचही खंडांचा त्यात समावेश झाला आहे.

तळटीपांची साधने

सरकारांचे पुस्तक हे सर्व दृष्टींनी परिपूर्ण आहे यात काहीच शंका नाही. परंतु कोणताही ग्रंथकार ग्रंथ लिहीत असताना नेहमी हातचे राखून लिहीत असतो. म्हणजे आधारभूत ग्रंथांचा उपयोग करताना आपल्याला पाहिजे असतील तेवढ्या आणि सोईस्कर वाटणाऱ्या घटनांचा उल्लेख करण्याची त्याची वृत्ती असते. सरकारांच्या ग्रंथाचा अनुवाद करताना विशेषतः मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धाची हकीकत सांगताना

त्यांची ही वृत्ती बऱ्याच वेळा जाणवली. अनुवाद करताना असे वाटले की अशा घटनांचा समग्र इतिहास मूळ ग्रंथातून आहे तसा द्यावा. म्हणून त्या त्या ठिकाणी खाफीखान, ईश्वरदास नागर, भीमसेन सक्सेना आणि साकी मुस्तैदखान यांच्या ग्रंथांतील हकीकती वर उल्लेखिलेल्या तळटीपांशिवाय सविस्तर अशा दिलेल्या आहेत. अर्थात एवढ्यावरच तळटीपा देण्याचे काम संपले असे नाही. अनुवाद करताना तो सरस कसा उतरेल हे जितके महत्त्वाचे आहे तितकेच तो परिपूर्ण कसा होईल यालाही महत्त्व आहे. अनुवाद करताना एक गोष्ट खटकली आणि ती म्हणजे सरकारांनी मराठी साधनांचा जितका उपयोग करावयास पाहिजे होता तितका तो केलेला नाही. याला कारणे म्हणजे सरकारांचे स्वतःचे असे मराठी भाषेचे तुटपुंजे जे ज्ञान आणि फारशी साधनांमधून उपलब्ध होणारी विपुल माहिती ही असावीत. त्याचा परिणाम असा होतो की अनुवाद करताना वेळोवेळी जाणीव होते की या माहितीत काहीतरी कमतरता आहे आणि प्रसंगांची घडण वाचताना कोठेतरी चुकते आहे. ही उणीव भरून काढण्यासाठी उपलब्ध असलेले सर्व प्रकाशित मराठी कागदपत्र वाचून त्यामधील महत्त्वाच्या कागदपत्रांचा उपयोग करणे जरूर वाटले. त्यासाठी मराठी बखर वाङ्मय, यादी नामे, काव्येतिहास संग्रह, भारत इतिहास संशोधक मंडळ यांचे त्रैमासिक, ऐतिहासिक पत्रव्यवहार, शकावल्या, राजवाड्यांचे मराठी इतिहासाच्या साधनांचे ग्रंथ वगैरेमधील माहितीचा, अनुवाद करताना तळटीपा देण्यासाठी भरपूर उपयोग केलेला आहे. आणखी एका गोष्टीचा या तळटीपांच्या बाबतीत आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. तो म्हणजे श्री. बेन्द्रे यांच्या अनेक ग्रंथांचा तळटीपा देण्यासाठी झालेला उपयोग. विशेषतः त्यांच्या छत्रपती संभाजी महाराज या चरित्र ग्रंथाचा. श्री. बेन्द्रे यांनी अनेक अप्रकाशित साधनांचा उपयोग केलेला आहे. त्यांचा आहे तसा उल्लेख अनुवाद करताना केलेला आहे.

आणखी एका गोष्टीचा उल्लेख तळटीपांच्या बाबतीत करावासा वाटतो. तो म्हणजे तळटीपा देताना त्या मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांतून दिलेल्या आहेत. मराठी साधनांचा उल्लेख बहुतेक ठिकाणी मराठीतूनच केला आहे, परंतु इतर भाषांतील साधनग्रंथांचा संदर्भ देताना तो इंग्रजी भाषेतून दिला आहे.

हे सर्व करण्यात सरकारांच्या पुस्तकाचा केवळ अनुवादच करावा हा हेतू नव्हता तर अनुवादाच्या निमित्ताने औरंगजेब आणि त्याच्या जीवनाचा ८९ वर्षांचा कालखंड याबद्दलची सर्व माहिती एकत्र आणावी हा होता.

तळटीपा देताना सरकारांच्या मूळ पुस्तकातील टीपा, त्याचप्रमाणे सरकारांच्या पाच खंडांतून त्या त्या घटनेची जी विस्तृत माहिती दिली आहे त्या संबंधीच्या टीपा आणि इतर ग्रंथांमधून घेतलेल्या माहितीच्या आधारावर दिलेल्या टीपा या अनुवाद करताना स्वतंत्रपणे दाखविल्या आहेत.

अनुवादाची पद्धती

अनुवाद करताना एक प्रश्न नेहमी उद्भवतो आणि तो म्हणजे अनुवाद शब्दशः करावयाचा, संकेताने करावयाचा की सारांशाने करावयाचा. शब्दशः अनुवाद केल्यास पुष्कळदा तो समजावयास कठीण होण्याची शक्यता असते. असे जरी असले तरी काही ठिकाणी शब्दशः अनुवाद करणे भाग पडते. पुष्कळदा भाषांतर करावयाचा मजकूर विषयाला धरून नसतो किंवा कल्पनारम्य असतो. अशावेळी अनुवाद हा संकेताने किंवा सारांशाने करावयाचा असतो. सरकारांच्या पुस्तकाचे भाषांतर करताना वरील तिन्ही पद्धतींचा अवलंब केला आहे.

औरंगजेबाचे व्यक्तिमत्त्व

या ठिकाणी औरंगजेबाच्या जीवनाचे थोडेसे परिशीलन करणे जरूर आहे. सर्व मोगल बादशहामध्ये औरंगजेबाला दीर्घायुष्य लाभले. अकबराचा अपवाद वगळल्यास त्याची कारकीर्द सर्वात मोठी अशी झाली. त्याच्या कारकिर्दीतील राजकीय घटनांनी सारा हिंदुस्थान हेलावून गेला. इतके जरी असले तरी त्याच्या मृत्यूबरोबर मोगल साम्राज्याचा प्रचंड डोलारा कोसळून पडला आणि वैभवाच्या शिखरावर असलेल्या मोगल साम्राज्याची छकले झाली. यातून असा एक अर्थ सहज निघू शकतो आणि तो म्हणजे औरंगजेबाची कारकीर्द व्हावी तितकी यशस्वी झाली नाही. याला कारण औरंगजेबाचे व्यक्तिमत्व आणि त्याचे राजकीय धोरण, या दोन गोष्टी प्रामुख्याने होत्या असे म्हणावे लागेल. त्याचे हे व्यक्तिमत्व त्याच्या जीवनातल्या अनेक घडामोडींवरून आपल्या सहज दृष्टीस पडते. हिंदुस्थानामधील मुसलमानी राजवटींचा विचार केल्यास आपल्याला असे दिसून येईल की या सर्व राजवटींना वारसाहक्काच्या युद्धाचा जणू काही शापच होता. घोरी घराणे, तुघलक घराणे, खिलजी घराणे आणि कालांतराने दिल्लीश्वर झालेले मोगल घराणे या सर्वांनाच हा शाप बाधला होता. औरंगजेब हा त्याला अपवाद असू शकतच नव्हता. सिंहासनासाठी भावांचा खून करणाऱ्या प्रत्यक्ष आपल्या बापाचे उदाहरण त्याच्या डोळ्यांसमोर होते. ही खुनी वेडाची लहर वारसाहक्क सांगणाऱ्या राजपुत्रांच्या मनात का यावी याचा विचार करणे मोठे स्वारस्यपूर्ण होईल. प्रस्तुत विषयाच्या चर्चेत जरी या गोष्टीचा संबंध नसला तरी एका गोष्टीचा उल्लेख करण्याचा मोह टाळता येत नाही. प्रत्येक मोगल सम्राटाला भरपूर आयुष्य मिळाले. साहजिकच प्रत्येकाची कारकीर्दही भरघोस झाली. त्याचा परिणाम असा झाला की राज्याचा वारसा सांगणाऱ्या राजपुत्रांचे ऐन उमेदीचे वय हे राज्योपभोग घेण्यात न जाता बापाच्या मृत्यूची वाट बघण्यात गेले. अशा परिस्थितीत मृत्यूचा घाला आपणावर पडण्याचे अगोदर बापाला ठार मारून गादी बळकाविण्याचे विचार अशा राजपुत्रांच्या मनात आल्यास त्यात काहीच नवल नाही. जहांगीर आणि शहाजहान यांच्या मनात हेच विचार घोळले असतील. औरंगजेबही त्याला बळी पडला. आपला बाप गादीवर राहिल्यास नातवंडे झालेल्या औरंगजेबाला आपल्या वयाची पन्नाशी उलटली तरी सिंहासन मिळण्याची सुतराम शक्यता नाही याची खात्री पटली. साहजिकच राज्य मिळविण्याच्या दृष्टीने पाऊले पुढे टाकण्यास त्याने सुरुवात केली. त्यासाठी लागणारे गुण आणि अवगुण हे सर्व त्याच्या ठिकाणी वास करीत होते. आपल्या दोन मोठ्या भावांचा काटा काढून टाकीपर्यंत मुरादला हाती धरणारा औरंगजेब राजकारणपटु नव्हता असे कोणीतरी म्हणू शकेल काय? आणि तोच उद्देश साध्य झाल्यानंतर आपल्या धाकट्या भावाची विल्हेवाट लावणाऱ्या औरंगजेबाचे वर्णन क्रूरकर्मा या शब्दांनी केल्याखेरीज कोणाला तरी राहवेल काय? सिंहासन मिळविण्यासाठी प्रत्यक्ष बापाला कैदेत टाकून त्याचे हालहाल करून त्याला ठार मारल्याची उदाहरणे इतिहासात फारच थोडी मिळतील. शहाजहान तुरुंगात पडल्यानंतर औरंगजेबाला जेव्हा परमेश्वराच्या अस्तित्वाची जाणीव देतो त्यावेळी, 'आपल्या बापाविरूद्ध बंड करताना आणि राज्यासाठी आपल्या भावांचा खून करताना तुमचा हा परमेश्वर कुठे गेला होता?' असे शहाजहानला खडसावून विचारणाऱ्या औरंगजेबाचे जितके कौतुक करावे तितके थोडेच आहे.

औरंगजेब : गुणावगुणांचा समुच्चय

औरंगजेब दयाळू होता. त्याच्या अंगी प्रामाणिकपणा होता. त्याच्या अंगी मानवता होती. त्याच्या अंगी मोठेपण होते. तो उदार होता. तो चारित्र्यवानही होता. परंतु त्याच्या अंगातले हे सारे गुण पक्षपाती होते. त्याचे मन हिंदूंच्या द्वेषाने भरलेले होते. दक्षिणेतून आपल्या जिवावर उदार होऊन त्याच्या भेटीला येणाऱ्या शिवाजीला ठार मारण्याचा विचार मनात आणताना औरंगजेबामध्ये या साऱ्या मानवतेचा लोप

झालेला होता. हीच गोष्ट संभाजीबाबत. देहाची कुरवंडी करताना हातात पडलेल्या शत्रूला अभय देण्याचे सोडून त्याऐवजी हालहाल करून त्याला ठार मारताना आणि जिवंतपणी त्याला नरकयातना भोगावयास लावताना औरंगजेबाने आणखी कोणते क्रौर्य दाखवावयाचे शिल्लक ठेवले असा विचार मनात येतो. पण मनुष्यस्वभावाची ज्याला पारख आहे त्याने औरंगजेबाकडून संभाजीबाबत दयेची अपेक्षाच का करावी असेही मनाला वाटते. प्रत्यक्ष बापाला तहानेने तडफडावयास लावणारा औरंगजेब मराठ्यांचा राजा छत्रपती संभाजी याच्याबाबत उदारतेचे धोरण स्वीकारील अशी अपेक्षा करणेच चूक होते. क्रौर्यातही आनंद असतो आणि सत्तेची धुंदी डोळ्यांवर आलेली असताना पायाशी तडफडणाऱ्या शत्रूवर आणखी प्रहार करण्यात माणसातली माणूसकीच मरून जाते. खाफीखान, भीमसेन सक्सेना, साकी मुस्तैदखान यांनी औरंगजेबाने संभाजीचे जे हाल केले त्याचे केलेले वर्णन वाचताना मन विषण्ण होते. हिंदुस्थानच्या सम्राट पदावर असलेला औरंगजेब बादशहा मनाच्या इतक्या नीच अवस्थेप्रत कसा जाऊ शकतो याचेच मनाला कुतूहल वाटते. संभाजीचे डोळे काढताना, त्याच्या शरीराची कातडी सोलताना, आपल्या धर्माचा गौरव गाणारी त्याची जीभ छाटताना आणि त्याच्या शरीराचे तुकडे करून ते कोल्ह्याकुत्र्यांपुढे टाकताना असे वाटते की, औरंगजेबाच्या मनात असा विचार आला नसेल का की या सर्वांचा झाडा आपल्याला आज ना उद्या द्यावा लागणार आहे. त्याच्या मनात असा विचार आला असो वा नसो, परंतु झाले मात्र अगदी तसेच. आपल्या बापाच्या मरणाच्या वेळी आपण त्याच्याजवळ असावे असा विचार आजमच्या मनात स्वार्थी हेतूने का होईना आला होता. परंतु 'तू माझ्याकडे येऊ नको' असे औरंगजेबाने त्याला सांगावे यामधेच नियतीने घेतलेला सूड आणि औरंगजेबाचा फार मोठा पराभव सामावलेला आहे. जगातले धर्म वेगळे असतील, धर्माच्या तत्त्वांचे अवलंबन करण्याची त्या त्या धर्मातील लोकांची पद्धती वेगळी असेल, परंतु जगातल्या प्रत्येक धर्माच्या मुख्य शिकवणीचे सार हे मात्र एकच असते. हे सार म्हणजे ज्यामध्ये त्या धर्माची सारी नीतिमत्ता आणि शिकवण साठविलेली असते ते होय. कोणत्याही धर्माच्या प्रेषिताने माणुसकीला काळीमा आणणारी कृत्ये करू नका असेच आपल्या अनुयायांना सांगितले. संभाजीचा आणि आपल्या भावांचा क्रूरपणे वध करणाऱ्या औरंगजेबाला आपल्या धर्माचा सोईस्करपणे विसर का बरे पडावा? काही जणांच्या मते लहानपणी त्याच्या मनावर झालेले संस्कार आणि तरुणपणात त्याचा झालेला प्रेमभंग या गोष्टींनी त्याच्या मनाला निराश बनविले आणि त्याच्या वागणुकीत विरक्तपणा आणविला. परिणामी त्याची बुद्धी ही सूड बुद्धी झाली. धर्म, नाते, गोते या सर्वांचा त्याला विसर पडला. फक्त एकाच गोष्टीचा त्याला विसर पडला नाही आणि ती गोष्ट म्हणजे स्वार्थ. याच स्वार्थापोटी त्याच्या मनात असीम अशा राज्यलालसेचा उगम झाला. कानाकोपऱ्यात त्याला संशयी वातावरण दिसू लागले. आपली मुले, आपली नातवंडे आणि पिढ्यान पिढ्या गादीची सेवा करणारे अमीर-उमराव यांच्याविषयी त्याच्या मनात अविश्वासाची भावना निर्माण झाली. या सर्व गोष्टींचा विचार करताना औरंगजेबाच्या स्वभावातील काही विशेष प्रामुख्याने नजरेस येतात. केवळ राजकारणी व्यक्ती म्हणूनच कदाचित औरंगजेबाचे व्यक्तिमत्त्व प्रभावी ठरेल. शहाजहानला कैदेत टाकल्यानंतर भावांच्या बंडांचा मोड करताना पुष्कळदा असे प्रसंग आले की त्याची हार होणार. परंतु औरंगजेब डगमगला नाही. शिवाजीच्या पुढारीपणाखाली निर्माण झालेल्या मराठी राज्याचा धोका प्रथम औरंगजेबाने ओळखला. आपले नामवंत आणि गाजलेले सरदार शिवाजीचा मोड करण्यासाठी त्याने पाठविले आणि अखेर आपला मुलगा अकबर याच्या बंडाचा उपशम करण्याच्या निमित्ताने त्याने वयाच्या ६४ व्या वर्षी दक्षिणेवर चाल करून जाण्याची जिद्द दाखविली. मृत्यूसमयी आयुष्यात घडलेली सर्व तऱ्हेची बरीवाईट कृत्ये डोळ्यांसमोर उभी राहिलेली असताना तो डगमगला नाही, तर अतिशय शांत चित्ताने त्याने परमेश्वराजवळ मरण मागितले. स्वतःच्या हाताखाली हजारोंच्या संख्येने सैनिक असताना मोगल दरबारातील कोणत्याही उमरावाची आरंगजेबाची अवज्ञा करण्याची हिम्मत झाली नाही. इतकेच नव्हे तर नातवंडे झालेला त्याचा मुलगा शहाआलम याचाही त्याच्यापुढे जाण्यास थरकाप होत असे. या सर्व गोष्टी

त्याचे प्रभावी व्यक्तिमत्त्व, त्याचा साहसपूर्ण स्वभाव, त्याच्या अंगातील बेडर वृत्ती, कसल्याही प्रसंगावर मात करणारे त्याचे अविचल मन आणि माया व मोह यांचे पाश तोडून टाकणारा त्याच्या मनातील कणखरपणा दाखवितात. आणि तरीदेखील त्याचे हे अष्टपैलू गुणांनी नटलेले व्यक्तिमत्व मनावर प्रभाव पाडू शकत नाही किंवा त्याच्याबद्दल आदराची भावना निर्माण करू शकत नाही. औरंगजेबाबद्दल जे वाटते ते अनुकंपा आणि दया यांच्या सदरात मोडते. त्याने केलेल्या दुष्कृत्यांबद्दल त्याचा राग येत नाही तर त्याची घृणा वाटते आणि त्याच्याबद्दल त्याची कीव कराविशी वाटते.

औरंगजेब – चुकलेले राजकारण

त्याच्या घराण्याचा दिडशे वर्षांचा इतिहास त्याच्यासमोर होता राजकारण आणि राजनीती याचे त्याला संपूर्ण ज्ञान होते. आपण काय केले असताना साम्राज्य वाढीला लागेल हे न कळण्याइतका औरंगजेब अनभिज्ञ खासच नव्हता. काळाची पाऊले जर त्याने ओळखली असती आणि त्यानुसार उत्तर हिंदुस्थान आणि दक्षिण हिंदुस्थान येथील राजकारण तो खेळला असता तर हिंदुस्थानचा आणि विशेषतः महाराष्ट्राचा इतिहास फार वेगळ्या तऱ्हेने लिहिला गेला असता. परंतु त्याने बुद्धिपुरस्सर समोर दिसणाऱ्या परिस्थितीकडे डोळेझाक केली. आपल्या भावांना देशोधडीला लावण्यात, आपल्या बापाचे तुरुंगात ठेवून हालहाल करण्यात आणि आपल्या मुलांना मुलांसारखे न वागवण्यात राजकारण आहे, परंतु माणुसकी नाही हे न ओळखण्याइतकी औरंगजेबाची बुद्धी मंद होती असे आपल्याला खासच म्हणता येणार नाही. हे झाले त्याचे कौटुंबिक राजकारण. परंतु हिंदुस्थानच्या राजकीय पटावरची मोहरी हलविताना किंवा पुढे मागे करताना औरंगजेबाने तोच अदूरदर्शीपणा दाखविला. केवळ विजापूर आणि गोवळकोंडा यांचा पंथ निराळा म्हणून त्यांचे राज्य नामशेष करण्यात औरंगजेबाने काय साधले? स्वतःच्या हाताने कुराणाची नक्कल करणारा औरंगजेब इतका धर्मान्ध कसा झाला याचेच नवल वाटते. सारा हिंदुस्थान आपल्या पायाखाली घातल्यानंतर आणि आयुष्याच्या उत्तरार्धात स्वतःच सुरू केलेल्या नरमेधात संभाजीची आहुती दिल्यानंतर औरंगजेबाने महाराष्ट्रात जो धुमाकूळ घातला तो धर्मवेडाच्या भावनेच्या आहारी जाऊनच. परंतु त्याला हे कळले नाही की संभाजीराजांनी आपले जे बलिदान केले आणि भयानक अत्याचाराला मान न वाकवता आपल्या प्राणाची जी कुर्बानी केली त्यामुळे साऱ्या महाराष्ट्रात औरंगजेबाविरुद्ध संतापाची एकच लाट उसळली. महाराष्ट्राची तरुणपिढी आपल्या धर्मान्ध शत्रूंचा प्रतिकार करण्यास पुढे सरसावली. संभाजीला ठार मारल्यानंतर आरंगजेबाच्या छावणीत आनंदाची एकच लाट उसळली. मराठ्यांचा राजा शाहू त्याच्या हातात पडल्यानंतर त्याच्या आनंदाला भरते आले. आता मराठे नामशेष झाले आणि महाराष्ट्र आपण जिंकला असे दर्पोक्तीचे विचार औरंगजेबाच्या मनात आले. त्याच्या कमकुवत आणि कोत्या मनोवृत्तीचे यामध्ये आपल्याला निश्चितच दर्शन घडते. परंतु औरंगजेबाचे हे सारे स्वप्न, स्वप्नच ठरले. वर्षे जात चालली आणि मराठ्यांचा प्रतिकार संपेना तेव्हा औरंगजेब निराश झाला. त्याची हुशारी, त्याचे राजकारणपटुत्व, त्याची अपार बुद्धिमत्ता ही सर्व त्याला सोडून गेली. एवढा मोठा बादशहा पण साधा माणूस बनला आणि तो देखील माणुसकीला पारखा झालेला. त्याच्या राजकारणाने राजकीय पातळी ओलांडली आणि धार्मिक पातळी गाठली. कदाचित् आपल्याला असे म्हणता येईल की संभाजीच्या मृत्यूपर्यंतचे औरंगजेबाचे राजकारण हे धर्माच्या प्रखर भावनेवर आधारलेले नव्हते. परंतु यानंतर मात्र औरंगजेब धर्मान्ध बनला आणि आपल्या आयुष्याच्या पुढील अठरा वर्षांत त्याने आपल्या राजकीय आकांक्षाना हिंदु-मुसलमानांच्या झगड्याचे स्वरूप दिले. संभाजी राजाच्या मृत्यूनंतर औरंगजेबाने आपल्या कैदेत असलेल्या शाहूला गादीवर बसवून त्याच्या हाती जर का मराठी राज्याचा कारभार सोपविला असता तर महाराष्ट्राच्या इतिहासाला अतिशय वेगळे वळण लागले असते, इतकेच नव्हे तर आपल्या राजाच्या क्रूर

अशा हत्येने चिडलेल्या मराठी मनाला दिलासा मिळाला असता. राष्ट्राराष्ट्रांमधे युद्धे होतात. या युद्धात हजारो लोकांची भयानक हत्या होते, शेकडो संसार उध्वस्त होतात, मालमत्तेची अपरिमित अशी हानी होते. परंतु इतिहास आपल्याला असे सांगतो की, काळाच्या ओघात या घटना व्यक्ती आणि राष्ट्रे विसरतात. महाराष्ट्रावर औरंगजेबाचे जे आक्रमण झाले होते आणि या आक्रमणाला तोंड देण्यासाठी महाराष्ट्राला जो अविरत लढा द्यावा लागला होता, त्या गोष्टीचाही महाराष्ट्रातील लोकांना विसर पडला असता. बदललेल्या परिस्थितीशी त्यांनी जुळते घेतले असते. परिणामी कदाचित् मोगलराज्य बराच काळ टिकले असते आणि त्याच्या वैभवालाही धोका निर्माण होण्याची पाळी आली नसती. परंतु नियतीच्या मनात वेगळे होते आणि म्हणून औरंगजेबाच्या आडमुठ्या स्वभावाने पुन्हा उचल खाल्ली. अगदी हाच आडमुठेपणा त्याने विजापूर आणि गोवळकोंडा या राज्यांवरील झालेल्या स्वाऱ्यांच्या वेळी दाखविला होता. या राज्यांचा झालेला नाश, हे एक मोगल साम्राज्याच्या नाशाला कारणीभूत झालेल्या अनेक कारणांपैकी एक कारण होते, असे विधान केल्यास त्यामध्ये अतिशयोक्ती होणार नाही. किंबहुना मांडलिक राजांचे अस्तित्व मानावयास मोगल सम्राटांची कधीच तयारी नव्हती, हे आपल्याला गुजरात, माळवा, खानदेश आणि अहमदनगर यांच्या भवितव्यावरून दिसून येते. आपल्या वाडवडिलांचा हा गुण म्हणा किंवा दुर्गुण म्हणा औरंगजेबाच्या अंगात उतरला होता. विजापूर आणि गोवळकोंडा यांचा पाडाव करण्यात मोगलांची जवळजवळ चाळीस-पन्नासपेक्षा अधिक वर्षे गेली आणि त्यामध्ये मोगल साम्राजाची प्रहार करण्याची शक्ती कमकुवत झाली. १६८६ आणि १६८७ या दोन वर्षांत विजापूर आणि गोवळकोंडा ही राज्ये जिंकल्यानंतर पुढील १८ वर्षांत मोगलांच्या महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर ज्या मोहिमा झाल्या त्यांचे स्वरूप पाहिल्यास या विधानाची सत्यता पटते.

औरंगजेब – विजापूर आणि गोवळकोंडा

या दोन्ही राज्यांच्या फौजेची एकंदर संख्या एक लाखाच्यावर होती. या राज्यांच्या पाडावानंतर त्या राज्यांचे मोठमोठे अमीर-उमराव मोगल फौजेत सामील करून घेण्यात आले. सर्वसामान्य शिपायांची परिस्थिती तशी नव्हती. त्यांचा सर्वच आधार तुटलेला होता. विजापूर आणि गोवळकोंडा या राज्यांच्या चाकरीतून मुक्त झालेले सैनिक हजारोंच्या संख्येने मराठ्यांना तरी मिळाले किंवा त्यांनी आपापल्या स्थानिक पुढाऱ्यांच्या हाताखाली बंडाळीचा माग स्वीकारला. औरंगजेबाच्या हयातीत त्याच्या साम्राज्यातील या नव्या प्रांतांना शांतता आणि स्वास्थ्य यांचा कधीच लाभ झाला नाही. १६८९ नंतर आपली मोहीम चालू ठेवण्याचा निर्णय ज्यावेळी औरंगजेबाने घेतला, त्यावेळी या गोष्टींचा विचार त्याने केला असता तर त्याचा मृत्यूच्या अगोदर गलितगात्र झालेल्या स्थितीत त्याला जी मानहानी सोसावी लागली, तो प्रसंग त्याच्यावर ओढवला नसता. परंतु प्रत्यक्षात घडले ते उलटेच. संभाजीचा मृत्यू आणि शाहूची कैद यामुळे विजयाची नशा चढलेल्या औरंगजेबाने मराठ्यांची पाळेमुळे निपटून काढण्याचा निश्चय केला. औरंगजेबाने त्या दृष्टीने जी पाऊले टाकली त्याला तोंड देण्याची मराठ्यांनी आपल्या परीने तयारी केली. औरंगजेबाने हा जो निर्णय घेतला, तो राजकीय आणि लष्करीदृष्या चुकीचा होता, असेच म्हणावे लागेल. या संदर्भात मिरजा राजा जयसिंग याने शिवाजीवर चढाई केल्यानंतर जे धोरण स्वीकारले त्याची आठवण येते. शत्रूच्या मुलखात आपल्या सैन्याचा विस्तार वाढवून आपली आक्रमणाची शक्ती कमी करण्याच्या ऐवजी शत्रूच्या मोक्याच्या जागा ताब्यात घेतल्यास शत्रूला त्वरित वठणीवर आणता येते या तत्त्वाचा अंगीकार राजा जयसिंगाने केला. त्याला अपेक्षेबाहेर यश मिळाले. हेच धोरण जर औरंगजेबाने अंगीकारले असते तर, मोगल–मराठा संघर्षाचा निकाल वेगळा लागला असता. परंतु औरंगजेबाला मराठ्यांच्या मुलखाची, त्यांच्या लढाऊबाण्याची आणि त्यांच्या इच्छा शक्तीची कल्पना आलेली नव्हती.

औरंगजेब आणि मराठे

आपण संभाजीला ठार मारले आहे, मराठ्यांचा राजा शाहू आपल्या कैदेत आहे, आणि आपल्या सामर्थ्याला भिऊन राजारामाने जिंजीकडे पळ काढला आहे, या भ्रमात राहून त्याने आपल्या युद्धाचे डावपेच आखले. गनिमी-काव्याच्या युद्धाची त्याला थोडी देखील कल्पना नव्हती, तर मराठ्यांना गनिमी-काव्याच्या युद्धाचे जणू काही बाळकडूच पाजलेले होते. स्वतंत्र मराठी राज्याची स्थापना झाल्यापासून एक-दोन प्रसंग सोडले असता मराठ्यांनी आपल्या शत्रूंना गनिमी-काव्याचे युद्ध खेळूनच जेरीस आणले होते. आता औरंगजेबाशी होणारा त्यांचा सामना हा अतितटीचा आणि त्यांच्या जीवन-मरणाचा होता. राष्ट्र म्हणून जगणे किंवा कायमचे दास्य पत्करणे, हे या युद्धाच्या निकालावर अवलंबून होते. औरंगजेबाने आपली सारी शक्ती आणि सामर्थ्य मराठ्यांचा नाश करण्यासाठी एकवटले होते. औरंगजेबाच्या या सामर्थ्याला तितक्याच कणखरपणे प्रतिकार करण्याची बाजी मराठ्यांनी केली. या लढ्याचे नेतृत्व राजारामाने केले, आणि त्याला साथ देण्यासाठी रामचंद्रपंत अमात्य, परशुरामपंत प्रतिनिधी, संताजी घोरपडे, धनाजी जाधव, हणमंतराव निंबाळकर, नेमाजी शिंदे, शंकराजी नारायण सचीव आदी मराठा मंडळ सज्ज झाले. स्वराज्याचा मंत्र महाराष्ट्राच्या घराघरांतून जपला गेला, आणि विलक्षण स्फूर्तीने मराठ्यांनी या रणसंग्रामात उडी घेतली. मराठ्यांनी प्राणपणाने लढल्या जाणाऱ्या या युद्धात आपले युद्ध-तंत्र आमूलाग्र बदलले. गनिमी-काव्याच्या युद्धाबरोबरच शत्रूशी समोरासमोर युद्ध खेळण्याचीही तयारी त्यांनीं दाखविली. अतिशय मोठा आणि महत्त्वाचा लष्करी डावपेच जो त्यांनी टाकला, तो म्हणजे औरंगजेबाचे लष्करी सामर्थ्य विभागून दुबळे करण्यासाठी त्यांनी आपल्या अनभिषिक्त राजाची म्हणजे राजारामाची मद्रास-कर्नाटककडे रवानगी केली. औरंगजेबासारखा कसलेला सेनानी देखील या डावाला सहजासहजी बळी पडला. राजारामाच्या पाठलागावर त्याने आपले नावाजलेले सेनापती रवाना केले आणि खुद्द महाराष्ट्रातील आपली फळी मराठ्यांच्या हल्ल्यापुढे कमकुवत केली. शत्रूला जेरीस आणावयाचे तर त्याच्या पुरवठ्याचे आणि रसदीचे मार्ग तोडणे आणि खुद्द त्याच्या मुलखात छापे घालणे, हे युद्धशास्त्रामधले एक फार महत्त्वाचे तंत्र असते. मराठ्यांनी या तंत्राचा पूर्णपणे अवलंब केला. मराठ्यांच्या सैन्याच्या टोळ्या मोगलांच्या मुलखात धुमाकूळ घालू लागल्या आणि राजरस्त्यावर हल्ले करून त्यांनी मोगलांची रसद तोडली. याचा परिणाम असा झाला की, साम्राज्यातील मुलखाचा बचाव करण्यासाठी आणि आपल्या रसदींच्या मार्गांचे संरक्षण करण्यासाठी औरंगजेबाला आपल्या सैन्याचा बराचसा भाग गुंतवून ठेवावा लागला. संताजी आणि धनाजी या मराठा सेनानींनी आपल्या शार्याची कमाल करून कासीमखान, शारजाखान, हिम्मतखान, अलिमर्दानखान, इस्माईलखान मखा आदी मोगल सेनापतींची धूळधाण उडविली. नुसत्या महाराष्ट्रातच नव्हे तर साऱ्या दक्षिण देशात मराठ्यांच्या फौजा धुमाकूळ घालू लागल्या. थोड्या कालावधीत युद्ध आटोपेल अशी आशा करीत असलेल्या औरंगजेबाची युद्ध रेंगाळल्यामुळे अतिशय निराशा झाली. दक्षिणेत आल्याला त्याला आता पंधराच्या वर वर्षे होऊन गेली होती. युद्धाचा शेवट नजीक वाटत नव्हता इतकेच नव्हे तर त्याचा अखेर निकाल काय लागेल याबद्दल आशंका देखील त्याच्या मनात निर्माण झाली होती. या साऱ्या युद्धात दक्षिणेमधील लोकांच्या आणि विशेषतः मराठ्यांच्या मनोवृत्तीचे विश्लेषण ज्याने केले होते आणि मनात असते तर जो या युद्धाला वेगळे वळण देऊ शकला असता असा एकच सेनानी औरंगजेबाच्या लष्करात होता आणि तो म्हणजे रायगड जिंकून मराठ्यांच्या भावी राजाला कैद करणारा जुलपीकारखान नुश्रतजंग हा होय. मोगल मुलखावर सातत्याने हल्ला करणाऱ्या मराठ्यांच्या तुफानी टोळ्यांच्या पाठलागावर राहण्याची कामगिरी जुलपीकारखानाकडे सोपविण्यात आली होती. त्याने ती कामगिरी किती यशस्वीपणे पार पाडली हे आपल्याला त्याच्या मराठ्यांबरोबर चाललेल्या युद्धातील अपराजित्वामुळे दिसून येते.

अनुक्रमणिका

मराठ्यांबरोबरच्या युद्धात त्याने मराठ्यांइतकेच साहस, मराठ्यांइतकीच चिकाटी, मराठ्यांइतकीच चपळाई इत्यादी सर्वकष गुण प्रकट केले. या सर्व युद्धात एकदाही त्याचा पराभव मराठ्यांना करता आला नाही. याउलट मराठ्यांनाच बऱ्याच वेळा त्याच्यासमोर माघार घ्यावी लागली. तसे पाहिले तर जुलपीकारखान हा देखील मोगलांच्या इतर सेनापतींसारखाच युद्धाला कंटाळलेला होता. औरंगजेबाने पहिल्या प्रथम मराठ्यांच्या पाठलागावर त्याला नेमले होते हे खरे. **मोगल – मराठा युद्धातील डावपेच :-** परंतु मराठ्यांचा जोर जेव्हा मद्रास-कर्नाटकात वाढू लागला तेव्हा औरंगजेबाने त्याची रवानगी तिकडे केली. परंतु जुलपीकारखानाने त्याच्यावर सोपविलेली कामगिरी पार पाडण्यात अतिशय ढिलाई दाखविली. त्याच्या साहाय्यामुळेच राजाराम जिंजीमधून निसटू शकला, आणि आता जर आपण जिंजी घेण्यात कुचराई दाखविली तर बादशहाच्या रोषाला आपण पात्र होऊ या जाणिवेने त्याने चढाई करून जिंजीचा किल्ला घेतला. परंतु ज्या प्रमाणात औरंगजेबाच्या पदरी यश पडावयास पाहिजे होते तितके ते पडले नाही. याला कारण वर सांगितल्याप्रमाणे मराठ्यांनी अवलंबिलेली नवी युद्धनीती व राजनीती. औरंगजेबाने मराठ्यांच्या राज्यातील प्रमुख ठिकाणी आपले सेना-विभाग एकवटले असते तर त्याला सहजपणे विजय प्राप्त झाला असता. तसे न करता त्याने आपल्या सेना विभागांना महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागात पाठवून आपली शक्ती कमकुवत करून घेतली त्याचा परिणाम असा झाला की, मराठ्यांनी त्याच्या सेना-विभागांवर आपल्या सर्व सामर्थ्यानिशी एकवटून हल्ले केले आणि त्यांची वाताहात लावली. संभाजीच्या मृत्यूनंतर जवळजवळ अकरा वर्षे अशा तऱ्हेने युद्ध चालले. या युद्धातील जमाखर्चाचा वाटा बघता मराठ्यांची बाजू जमेच्या दृष्टीने भरभक्कम होती, असेच म्हणावे लागेल.

राजारामाचा मृत्यू

सतराशे साल उजाडले आणि मराठ्यांचा आणखी एक मोहरा गळून पडला. तो म्हणजे मराठ्यांचा अनभिषिक्त राजा छत्रपती राजाराम. आपापसातील दुहीमुळे आणि औरंगजेबाच्या कुटिल नीतीमुळे संताजी घोरपडे याचा मृत्यू कसा ओढवला ही हकीकत सर्वश्रुत आहेच. राजारामाच्या मृत्यूच्या अगोदर काही वर्षे औरंगजेबाला कदाचित अशी जाणीव झाली असावी की, आपण हे युद्ध जिंकू शकणार नाही. त्याला असे वाटले की, मराठ्यांबरोबर समझोता घडवून आणावा. हा हेतू समोर ठेवून त्याने मराठ्यांबरोबर वाटाघाटीही सुरू केल्या. परंतु जितक्या झपाट्याने या वाटाघाटींना सुरुवात झाली तितक्याच झपाट्याने त्या वाटाघाटी बंदही झाल्या. याला कारण औरंगजेबाला मराठ्यांबद्दल आता नव्याने वाटावयास लागलेली भीती हे होते. औरंगजेब आणि मराठे यांच्या मनोभूमिकेत आता जमीनअस्मानाची तफावत होती. औरंगजेब आता वृद्ध झाला होता. त्याचे शरीर जीर्णझाले होते, आणि युद्धतंत्र खिळखिळे झाले होते. त्याच्या सरदारांमध्ये लढण्याची इच्छा उरलेली नव्हती, आणि त्यांचे सैनिक युद्धाला कंटाळून गेले होते. राज्यात सर्वत्र अंदाधुंदी माजली होती आणि लाचलुचपतीचा सुळसुळाट झाला होता. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे युद्ध जिंकण्यासाठी जी एक अस्मिता लागते तिचा मोगल सैन्यात अभाव होता. आपण हे युद्ध कशाकरिता लढत आहोत याची त्यांना यत्किंचितही जाणीव नव्हती. अठरा वर्षे अविरत चाललेल्या या संग्रामात त्यांचे शेकडो बांधव मृत्युमुखी पडले होते. सुख म्हणजे काय याची जाणीवच त्यांना उरलेली नव्हती. पराभव त्यांच्या डोळ्यांसमोर क्रूर काळासारखा उभा ठाकला होता. बादशहाची माघार घेण्याची तयारी नव्हती. अगदी याउलट मराठ्यांची परिस्थिती होती. औरंगजेबाने त्यांच्या छत्रपतीला ठार मारल्याबद्दल आणि भावी छत्रपतीला कैद केल्याबद्दल सूडाच्या भावनेने त्यांच्या मनांत घर केले होते. आपल्याला आता कोणी त्राता उरला नाही म्हणून त्यांची मने निराश झाली होती हे खरे, पण ती क्षणभरच. आपल्या राज्यात येऊन सर्वत्र नाशाचे साम्राज्य पसरविणाऱ्या मोगलांच्या सैन्याला देशाबाहेर हाकलून लावण्याची ईर्ष्या त्यांनी मनात

धरली. घराघरांतून एकेक मराठा सैनिक निर्माण झाला.

मराठ्यांची अस्मिता

आपल्या राज्यावरील प्रेमाने हा सैनिक भारलेला होता. त्याला आपल्या जीवाची पर्वा नव्हती, आणि म्हणूनच मारू किंवा मरू या हिरिरीने तो मोगलांवर तुटून पडला. अशा परिस्थितीत मराठा सैन्याला रामचंद्रपंत, संताजी आणि धनाजी यांच्या रणझुंजार नेतृत्वाची जोड मिळाली आणि त्यानी आपल्या पराक्रमाची शर्थ करून सोडली. वर्षांमागून वर्षे चालली होती. मराठ्यांचे काही मोहरे आणि त्याचप्रमाणे मोगलांकडील काही मातबर मंडळी या युद्धात कामी आली होती. युद्धाचे स्वरूप दिवसेंदिवस उग्र बनत चालले होते. दक्षिणेत औरंगजेब आल्याला वीस वष झाली होती. परंतु औरंगजेबाचीं जमेकडील बाजू शून्य होती. पदरी काहीच पडले नव्हते. यादवी युद्धात संताजीचा बळी पडल्यानंतर त्याचे मस्तक जेव्हा औरंगजेबापुढे नेण्यात आले तेव्हा औरंगजेबाने इतका भारी शत्रू धुळीला मिळविल्याबद्दल परमेश्वराचे आभार मानले. कदाचित् त्याच्या मनात असाही विचार आला असेल की संताजीसारखेच इतर मराठे सरदार असले तर आपली धडगत लागणे कठीण आहे आणि ही गोष्ट खरीही होती. संताजीचीच परंपरा धनाजीने चालविली. कदाचित् सताजीसारखा प्रतिस्पर्धी नाहीसा झाल्याने त्याच्या शौर्याला एक आगळीच धार आली. धनाजीने औरंगजेबाला त्राही भगवान करून सोडले परंतु औरंगजेबाने आशा सोडली नाही. त्याच्या वयाला ऐंशी पेक्षाही जास्त वर्षे उलटली होती. अजूनही मराठ्यांचा आपण पाडाव करू शकू असा विश्वास त्याला होता. राजारामाच्या मृत्यूने या विश्वासाला आशेचे खत–पाणी मिळाले. तो आणखी उत्साहाने आपल्या मोहिमेच्या आखणीला लागला. **औरंगजेबाची शेवटची मोहीम :** - औरंगजेबाचे मराठ्यांच्याबद्दल आणि त्यांच्या मुलखाबद्दल काही विचित्र असे विचार होते. सह्याद्रीच्या दऱ्या-खोऱ्यात राहणारा आणि शरीराने किरकोळ दिसणारा हा मावळा गडी माझ्या सुसज्ज सैन्याला तोंड कसा देईल ही औरंगजेबाची एक अतिशय भाबडी अशी कल्पना होती. या कल्पनेचा चक्काचूर मराठ्यांनी जो केला तो हेचि देही हेचि डोळा बघण्याचे त्याच्या नशिबी आले. औरंगजेबाची दुसरी कल्पना अशी की, मराठ्यांचा लष्करी बाणा हा त्यांचा राजा गेला की विलयाला जातो आणि ते युद्धातून पळ काढतात. पण औरंगजेबाच्या याही कल्पनेला मराठ्यांनी खो दिला. आपण संभाजीचा वध केला, मराठ्यांचा भावी राजा शाहू याला कैद केले तेव्हा मराठ्यांची लढण्याची हिंमतच यामुळे खच्ची झाली, अशा समजुतीत औरंगजेब असताना मराठ्यांनी संताजी आणि धनाजीच्या नेतृत्वाखाली त्याला लष्करी पराभवाचे रट्टे दिले. राजाराम मरण पावल्यावर मराठ्यांच्या हालचालींना पायबंद बसेल हे औरंगजेबाचे स्वप्न ताराबाई आणि रामचंद्रपंत यांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी खोटे पाडले. यावेळी औरंगजेबाने थोडा जरी सूज्ञपणा दाखवून मराठ्यांबरोबर सामोपचाराची बोलणी सुरू केली असती तर इतिहासाला वेगळे वळण लागण्याची शक्यता होती. परंतु याही वेळी औरंगजेबाचा निग्रही, हट्टी आणि क्रूर स्वभाव उसळून वर आला. आपला लष्करी पराभव झाला आहे एवढेच नव्हे तर मुत्सद्दीपणामध्येही मराठ्यांनी आपल्यावर मात केली आहे या गोष्टीची जाणीव होऊन देखील तसे कबूल करावयाला त्याचे मन तयार होईना मराठ्यांचा नाश केल्याखेरीज आणि त्यांची पाळेमुळे खणून काढल्या खेरीज येथून परतावयाचे नाही या भावनेला त्याने उजाळा दिला. त्याने आपल्या मनाची समजूत करून घेतली की, मराठ्यांचे मर्मस्थान म्हणजे त्यांचे डोंगरी किल्ले होत. ते जर आपण जिंकून घेतले तर मराठे सहजतया नामोहरम होतील. दक्षिणेतील मोहिमेच्या या शेवटच्या कालखंडात औरंगजेबाचा कोणावरच विश्वास उरला नव्हता. आपले सगळेसरदार आपल्या मरणाची वाट पाहात आहेत असे त्याला वाटत होते. सर्वांत जास्त भीती त्याला कोणाची वाटावयाला लागली होती तर ती त्याच्या मुलांची. आपण आपल्या बापावर जी पाळी आणली तशीच पाळी आपली मुले आपल्यावर कशावरून

आणणार नाहीत या विचाराने तो धास्तावला होता. म्हणून एका ठिकाणीछावणी करून राहण्याचा विचार त्याने आता सोडून दिला. मराठ्यांचे डोंगरी किल्ले काबीज करून त्यांची प्रतिकारशक्ती खिळखिळी करण्याच्या उद्देशाने बादशहाने नवीन मोहीम हाती घेतली आणि या मोहिमेचे चालकत्व त्याने आपल्याकडे घेतले. बादशहाचा हा प्रयत्न म्हणजे अगतिक झालेल्या माणसाने बेदरकार होऊन परिणामाची क्षिती न बाळगता पुढे उचललेले पाऊल होते. माणसाची लढण्याची ताकद ही त्याच्या वास्तूत नसून त्याच्या हृदयात असते ही गोष्ट औरंगजेब विसरला. मराठ्यांचे किल्ले हे त्यांच्या स्फूर्तीचे आणि अस्मितेचे स्थान आहे अशी औरंगजेबाने आपल्या मनाची समजूत करून घेतली. त्याचा त्याच्या सेनापतींवरील विश्वास उडाला होता ही गोष्ट मोहिमेची सूत्रे त्याने आपल्या स्वतःच्या हाती घेतली यावरून सिद्ध होते. या मोहिमेचा निकाल काय लागणार हे आधीच ठरलेले होते. जे वीस वर्षांमध्ये आपल्या प्रचंड शक्तीचा आणि सामर्थ्याचा उपयोग करूनही बादशहाला जमले नाही ते त्याच्या वृद्धापकाळात आणि सैन्याची सारी शक्ती खिळखिळी झाली असताना त्याच्या हातून पार पडणे अशक्य होते. मोगल सैनिक हा आता युद्धाला कंटाळलेला होता. आपल्या मायदेशी जाण्याला तो अतिशय उत्सुक होता. युद्धामध्ये त्याचे मन नव्हते. केवळ बादशहाची आज्ञा म्हणूनच तो युद्ध लढत होता. अशा मनःस्थितीत देशप्रेमाने वेड्या झालेल्या मराठा सैनिकांपुढे त्याचा टिकाव लागणे कठीण होते. बादशहाच्या या नव्या चढाईला तोंड देण्यासाठी मराठ्यांनी अगदी नवीन अशा युद्धतंत्राचा अवलंब केला. किल्ला जास्तीत जास्त काळ लढवावयाचा, शत्रूची जबर हानी करावयाची आणि नाईलाज झाला म्हणून नव्हे तर एका विशिष्ट धोरणाचा भाग म्हणून भरपूर लाच घेऊन किल्ला मोगलांच्या स्वाधीन करावयाचा. मराठा किल्लेदारांनी घेतलेली ही लाच व्यक्तिगत स्वार्थाच्या पोटी नव्हती तर राष्ट्राच्या रक्षणाकरिता होती. मोगलांनी दिलेल्या या लाचेतून मराठ्यांच्या नव्या सैनिकांची उभारणी होत होती. औरंगजेबाच्या या मोहिमेतील लक्षात येणारा एक भाग म्हणजे किल्ला घेण्यासाठी मराठा किल्लेदाराला लाच देण्यामध्ये मोगल सरदारामध्ये लागलेली चढाओढ. काही वर्षे चाललेल्या या मोहिमेत बहुतेक सर्व किल्ले बादशाहाने न लढता लाच देऊन घेतले. यावरून मोगलांची युद्धाची यंत्रणा किती खिळखिळी झाली होती याची कल्पना येते. त्याचप्रमाणे किल्ला जिंकून घेतल्याचा बादशहाला होणारा आनंद हाही क्षणभंगूर होता; कारण मोगलांची पाठ वळताच मराठे अचानक हल्ला करून किल्ला जिंकून घेत. अतिशय जबर हानी सोसून किल्ला घेण्यासाठी मोगल सैन्याने केलेले सर्व श्रम हे वाया जात. आरंगजेबासारखा कसलेला सेनापती या बाबतीत कसा फसला हे इतिहासाच्या दृष्टीने एक विलक्षण असे कोडे आहे असे म्हटल्यास त्यात काहीच वावगे होणार नाही. ज्या देशामध्ये युद्ध खेळावयाचे त्या देशातील भौगोलिक परिस्थिती आणि तत्सम युद्धतंत्र या दोन्ही गोष्टी आत्मसात केल्याखेरीज युद्ध जिंकणे शक्य होत नाही. युद्धाचा हा साधा नियम औरंगजेबासारख्या कुशल सेनानीने ध्यानात घेतला नाही आणि म्हणून त्याच्यावर पराजयाची पाळी आली. एकेका दिवसात चाळीस-पन्नास मैलांची मजल मारणाऱ्या सुटसुटीत आणि चपळ मराठा सैनिकांपुढे चैनीला चटावलेला आणि अवजड शस्त्रांनी सुसज्ज असलेला मोगल सैनिक टिकाव धरू शकला नाही यात आश्चर्य वाटण्याजोगे काहीच नाही. औरंगजेबाचा भारी आणि अवजड तोफखाना दक्षिणेमधील युद्धात निरुपयोगी ठरला. मराठ्यांचे किल्ले घेण्याची औरंगजेबाची मोहीम अशा तऱ्हेने फसली. शरीराने आणि मनाने तो आता दुबळा बनला होता. सारा हिंदुस्थान एकछत्री अंमलाखाली आणण्याचे त्याचे स्वप्न धुळीला मिळालेले होते. औरंगजेबाचे इतिहासकार काहीही म्हणोत परंतु ही गोष्ट निश्चित की, त्याच्या जीवनाच्या शेवटल्या वर्षात आपल्या योजना फसल्याची जाणीव त्याला निःसंशय झाली असली पाहिजे. त्याने आपली मोहीम आवरती घेतली आणि आयुष्याचे शेवटचे क्षण घालविण्यासाठी तो अहमदनगर येथे आला. तेथेच त्याचे देहावसान झाले.

औरंगजेब – काही स्वभावविशेष

अनुक्रमणिका

औरंगजेबाचे चरित्र हे अतिशय नानाविध अशा घटनांनी भरलेले आहे. या घटना पाहिल्यानंतर औरंगजेबाच्या अंगी असलेल्या अनेक गुणावगुणांची अनुभूती आपल्याला मिळते. यांतील काही घटना मनाला चटका लावून जातात, आणि प्रत्यक्ष हत्तीशीही झुंज देणारा हा बादशहा प्रसंगी किती कोमल बनू शकतो तर काही वेळा किती क्रूर आणि निर्घृण बनू शकतो याचे प्रत्यंतर येते. धर्मवेड्या औरंगजेबाचे प्रेमवेड याच सदरात मोडते. सर्वसामान्य वाचकाचा विश्वास बसणार नाही परंतु युवराज असलेल्या औरंगजेबाच्या जीवनात प्रेमापायी धुंद होण्याचा प्रसंग आला होता याबद्दल काहीच शंका नाही. या प्रेमाने औरंगजेबाला धुंद केले आणि आंधळे केले. परंतु औरंगजेबाच्या जीवनातील हा प्रणय इतका क्षणभंगर ठरला की त्यामुळे औरंगजेबाच्या जीवनात एक तऱ्हेची पोकळी आणि विफलता निर्माण झाली. प्रत्यक्ष कृतांत काळालाही आपल्या अट्टाहासाने नमविणारा औरंगजेब स्त्रियांच्या बाबतीत अतिशय कोमल आणि मृदू बनला. स्त्री जातीबद्दल त्याच्या मनात निर्माण झालेले हे प्रेम धर्मातीत राहिले. औरंगजेबाच्या कैदेत असलेल्या संभाजी महाराजांच्या सम्राज्ञीकडे-येसूबाईकडे-वाकडा डोळा करून पाहाण्याची देखील कोणाची हिंम्मत झाली नाही. इतकेच नव्हे तर बहादूर गडावर कैदेत ठेवलेल्या मराठा राजघराण्यातील एका कुल स्त्रीवर पापी नजर ठेवल्याबद्दल तेथील किल्लेदाराला जेरबंद करून आणण्याची शिक्षा औरंगजेबाने फर्मावली. या मायेच्या पोटीच त्याने शाहू राजांचे एखाद्या नातवाप्रमाणे पालनपोषण केले. इतिहासाच्या अभ्यासूला नेहमी असा प्रश्न पडतो की, जर का औरंगजेबाने शाहूला मुसलमान करून मराठ्यांवर राज्य करण्यास भाग पाडले असते तर केवढा मोठा अनवस्था प्रसंग ओढवला असता! हे शक्य असून देखील त्याने ते का केले नाही? अशी कोणती भुरळ त्याच्या मनाला यावेळी पडली? या कोणत्याच प्रश्नाचे उत्तर इतिहासातून आपल्याला मिळत नाही. किंबहुना बादशाही छावणीत शाहूचे लग्न लावून देऊन त्याच्या पत्नीला आपल्या मांडीवर बसवून तिच्या मुखात साखर भरवून तिच्या नावे खेडीपाडी आंदण देणारा औरंगजेब म्हणजे मानवी मनाला न उकलणारे एक कोडेच आहे असे म्हणावे लागेल. औरंगजेबाच्या स्वभावाच्या या दुसऱ्या बाजूचा प्रत्यय आपल्याला औरंगजेबाच्या जीवनाच्या अखेरच्या कालातही येतो. त्याची सारी स्वप्ने आता विलयाला गेलेली असतात. समोर दिसत असते दारुण निराशा, घनघोर अंधकार आणि जोपासून उभ्या केलेल्या साम्राज्याचा विनाश. अशा वेळी औरंगजेबाच्या खाजगी सेवकाच्या रूपाने जणू त्याला परमेश्वर दिसतो. साऱ्या आयुष्यभर केलेल्या पापांची भूते त्याला जणू भेडसावू लागतात. खून केलेले त्याचे भाऊ आणि त्यांच्या दारुण किंकाळ्या यांनी त्याच्या जणू काणठळ्या बसतात. संभाजी राजांचा छिन्नविछिन्न झालेला देह आणि दहा वर्षे तुरुंगात खितपत पडल्यामुळे जराजरजर झालेला शहाजहान डोळ्यासमोर उभे राहिल्याने जणू त्याचे डोळे मिटू पाहातात. अशा वेळी हातातल्या स्मरणीने सातत्याने, परमेश्वराचे नामस्मरण चाललेले असते. तोंडातून शब्द उमटत नसतात आणि देहावर ग्लानी आलेली असते. तेव्हा औरंगजेब आपल्या सेवकाला सांगतो की, “तुम्हाला क्षमा केली आहे असे तू तीन वेळा म्हण.” हे चित्र पाहिल्यानंतर औरंगजेबाच्या जीवनाच्या अखेरीला त्याला खरोखरच नियतीची आठवण झाली होती की काय असा संभ्रम मनात निर्माण होतो. खरोखर आपल्या मुलाने आपल्याला प्रतिरोध करून सवता सुभा स्थापन केला म्हणून त्याला देशोधडीला लावणारा औरंगजेब आणि त्याच मुलाच्या मुलीला दुर्गादासाकडून परत मिळविण्यासाठी पडेल ती किंमत द्यावयास तयार होणारा औरंगजेब ही एकच व्यक्ती आहे हे मनाला सांगून देखील पटत नाही. औरंगजेबाच्या या स्वभावाने वैचित्र्याचे अगदी दुसरे टोक गाठलेलेही आपल्याला त्याच्या जीवनातील अनेक प्रसंगांनी दिसून येते. १६८७ मध्ये गोवळकोंड्याचा वेढा चाललेला असताना मुआज्जम हा गोवळकाड्याच्या सुलतानाला फितूर आहे हा संशय आल्यावरून त्याला बायका-मुलांसह कैदेची शिक्षा देणारा औरंगजेब किंवा आपल्या मुलीच्या प्रियकराला उभ्या भट्टीत जाळणारा औरंगजेब किंवा पाणी-पाणी म्हणून आक्रोश करणाऱ्या आपल्या बापाला त्याच्या पूर्व जीवनातील काही घटनांची

आठवण करून देऊन हिणविणारा औरंगजेब म्हणजे क्रौर्य आणि कृतघ्नपणा यांची कमाल वाटते. कदाचित् जेकील आणि हाईड यांच्याप्रमाणे औरंगजेब म्हणजे विभिन्न प्रकृतींचा समन्वय तर नाही ना असा विचार मनाला चाटून जातो. औरंगजेबाच्या या स्वभाववैचित्र्याला दुसरे काही स्पष्टीकरण आहे असे वाटत नाही.

औरंगजेबाचे धर्मवेड

औरंगजेबाच्या स्वभावातील गुणदोषांची चर्चा, त्याचे राजकारण, त्याची राज्यव्यवस्था किंवा त्याच्या कारकिर्दीने काय साधले याची चर्चा या ठिकाणी अपरिहार्य वाटते. औरंगजेबाला लहानपणापासून राजकारणाचे जणूकाही बाळकडूच मिळालेले होते. शहाजहानने जेव्हा आपल्या बापाविरुद्ध बंड केले तेव्हा त्या बंडाचा खरा अर्थ आणि त्याचे परिणाम समजण्याइतके त्याचे वय नव्हते. राजकारण समजण्याइतके जेव्हा त्याचे वय झाले तेव्हा शहाजहान गादीवर आलेला होता. त्यावेळी त्याला कदाचित् शहाजहानने आपल्या बापाविरुद्ध केलेल्या बंडाचा गर्भितार्थ निश्चितच समजला असेल. शहाजहानचा तो सहावा मुलगा. शहाजहानने बंड केले त्यावेळी ओलीस म्हणून दारा आणि औरंगजेब यांना त्याला जहांगिरकडे सुपूर्द करावे लागले. राजपुत्राला आवश्यक असणारे सर्व शिक्षण त्याला मिळालेले होते. इतकेच नव्हे तर अगदी लहान वयात युद्धावर जाण्याचा प्रसंगही त्याच्यावर ओढवला होता. औरंगजेबाच्या अंगामध्ये इतके कडवे धर्मवेड कसे आणि केव्हा शिरले याची जाणीव औरंगजेबाच्या जीवनाचे परिशीलन करताना होत नाही. धर्माबद्दलचे प्रेम हे आपण समजू शकतो परंतु त्यामधून निर्माण होणारा जात्यांधपणा आणि इतर धर्मांविषयीचा द्वेष याचे आकलन मात्र आपल्याला होऊ शकत नाही. राजपुत्राला योग्य असे धार्मिक शिक्षण त्याला मिळालेले होते परंतु त्याहीपेक्षा अधिक अशी कुराणाचा सखोल अभ्यास करण्याची संधी देखील त्याला मिळाली होती. औरंगजेबाचे सर्व जीवन अभ्यासून पाहिल्यानंतर आपल्याला असे दिसून येईल की औरंगजेब हा गाढा विद्वान, वादविवादपटू आणि धर्मवेत्ता होता. असे असताना देखील हिन्दू धर्माविषयीचा द्वेष त्याच्या मनात का बाणावा याचा उलगडा होत नाही. कालांतराने प्रत्यक्ष सत्ता हातात आल्यावर आपल्या मनातील हिन्दूचा द्वेष त्याने हिन्दूवर जिजीया कर लादून प्रच्छन्नपणे प्रकट केला. इतकेच नव्हे तर काशी-विश्वेश्वराच्या मंदिराचा विध्वंस करण्यात आणि छत्रपती संभाजी यांना कैद केल्यानंतर राजकीय विरोधक म्हणून नव्हे तर हिन्दूधर्मीय म्हणून हाल हाल करून त्यांना ठार मारण्यात औरंगजेबाने धन्यता मानली.

दक्षिणेची पहिली सुभेदारी

औरंजेबाच्या जीवनातील पहिली आणि महत्त्वाची राजकीय घटना म्हणजे वयाच्या केवळ १८ व्या वर्षी दक्षिणेच्या सुभेदारीवर त्याची झालेली नेमणूक ही होय. अकबरापासूनच्या सर्वच मोगल बादशहांचे दक्षिण घेऊन साऱ्या हिंदुस्थानभर एकतंत्री अंमल स्थापन करण्याचे ध्येय होते. अकबराने मोगल साम्राज्य दक्षिणेमध्ये वृद्धिंगत करण्यास सुरुवात केली होती. जहांगिराच्या ऐषआरामी स्वभावामुळे मोगल साम्राज्याच्या विस्ताराला दक्षिणेमध्ये तेवढी चालना मिळाली नाही. शहाजहानने जेव्हा बंड केले तेव्हा मोगल फौजा पाठीवर असताना दक्षिणेतील राजकारण जवळून पाहण्याची संधी त्याला मिळाली. गादीवर आल्यानंतर दक्षिण जिंकून घेण्याचा मनसुबा त्याने तेव्हाच रचला असावा. या मनसुब्याची सुरुवात त्याने अहमदनगरचा संपूर्ण पाडाव करून १६३३ मध्ये केली. उरलेली दोन राज्ये म्हणजे विजापूर आणि गोवळकोंडा ही होती. शहाजहानला आपल्या सर्व मुलांची अतिशय योग्य अशी पारख होती. त्या सर्वांमध्ये औरंगजेब हा अतिशय कर्तृत्ववान आहे आणि म्हणूनच दक्षिण जिंकण्याच्या कामाला तो योग्य आहे या जाणिवेने त्याने त्याची रवानगी दक्षिणेचा सुभेदार म्हणून केली. दक्षिणेची ही सुभेदारी औरंगजेबाच्या दृष्टीने

फारशी सुखावह झाली नाही. शहाजहानची औरंगजेबाबरोबरची वागणूक ही निःपक्षपातीपणाची नव्हती. बादशहाचा ओढा हा दाराकडे होता. याचा परिणाम असा झाला की बादशहा आणि औरंगजेब यांच्यामध्ये तीव्र मतभेद निर्माण झाले. १६३६ मध्ये मोगल आणि विजापूर व गोवळकोंडा यांच्यामध्ये तह होऊन या दोन्ही सुलतानांनी मोगलांचे सार्वभौमत्व मान्य केल्यामुळे औरंगजेबाला मुलुखगिरी अशी हाती घ्यावी लागली नाही. परंतु या कालावधीमध्ये त्याने अतिशय चाणाक्षपणे दक्षिणेमधील राजकारणाचा अभ्यास करून बादशहा झाल्यानंतर किंवा संधी मिळाल्यास त्याअगोदर दक्षिणेत मोगल वर्चस्व कसे स्थापावयाचे याबद्दल मनाशी निश्चितच खूणगाठ बांधली. बादशहाबरोबर असलेले औरंगजेबाचे मतभेद हे इतके विकोपाला गेले की त्याची दक्षिणेतील नेमणूक रद्द करण्यात येऊन बाल्ख प्रांतात त्याची नियुक्ती करण्यात आली. औरंगजेबाने तेथे जी तीन-चार वर्षे काढली ती सारी युद्धाच्या वातावरणात. सेनापती म्हणून त्याचे कर्तृत्व यावेळी पणास लागले. युद्धाचा अतिशय मोलाचा असा अनुभव त्याला आला. हा अनुभव पुढील काळात त्याला अतिशय उपयोगी पडणारा असा होता. औरंगजेबाची आता तिशी उलटलेली होती. शहाजहान बादशहाने पुन्हा त्याची नेमणूक दक्षिणेच्या सुभेदारीवर करण्यामध्ये फार मोठा धूर्तपणा दाखविला. परंतु यावेळी दक्षिणेतील परिस्थिती पूर्णपणे बदललेली होती. गोवळकोंडा आणि विजापूर येथील सुलतानांचा दृष्टिकोन बदललेला होता. बादशाही तिजोरीची भर करण्यात दक्षिणेचा सारा पैसा ओतला गेल्यामुळे आर्थिकदृष्ट्या दक्षिणेतील परिस्थिती अगदी डबघाईला आलेली होती. साहजिकच औरंगजेबाला दोन आघाड्यांवर तोंड द्यावे लागणार होते. एक आर्थिक व दुसरी राजकीय. आणखी एक गोष्टही औरंगजेबाला विचारात घ्यावी लागणार होती आणि ती म्हणजे शिवाजीच्या नेतृत्वाखाली नव्याने पुढे येणारी मराठ्यांची सत्ता. याबाबत औरंगजेबाने जी पावले टाकली व जी धोरणे आखली त्यामध्ये औरंगजेबाच्या स्वभावातील गुण आणि दोष आपल्याला प्रकर्षाने दिसून येतात. **सुरुवातीचे राजकारण :-** दक्षिणेतील आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी औरंगजेबाने आपल्या परीने अतिशय कसोशीने प्रयत्न केले. आपला आर्थिक सल्लागार मुर्शीद कुलीखान याच्या मदतीने दक्षिणेतील सारा पद्धती त्याने आमूलाग्र बदलली. दक्षिणेतील खर्चाचा वाढता बोजा आणि येणारे उत्पन्न यामध्ये जेव्हा मेळ बसेना तेव्हा त्याने बादशहाकडे अधिक द्रव्याची मागणी केली. बादशहाने ही मागणी अमान्य तर केलीच परंतु एकंदर परिस्थितीबद्दल औरंगजेबालाच दोष दिला. भविष्यकाळात काय वाढून ठेवले आहे याची जाणीव औरंगजेबाला या क्षणापासूनच झाली असावी आणि त्या दृष्टीनेच त्याने जी पावले टाकली त्यामध्ये त्याचा दूरदर्शीपणा दिसून येतो. उत्तरेकडचा आपला डाव जिंकावयाचा असल्यास दक्षिणेची बाजू सुरक्षित राखणे इष्ट आहे हे त्याने ओळखले, आणि म्हणून विजापूर आणि गोवळकोंडा या राज्यांचा नाश करण्याचा मनसुबा त्याने रचला. हे करताना त्याने साम, दाम, दंड आणि भेद या सर्व मार्गांचा अवलंब केला. त्यावरून त्याच्या कुटील नीतीची आणि राजकारणपटुत्वाची आपल्याला साक्ष पटते. विजापूर आणि गोवळकोंडा ही राज्ये आणखी थोडी सवड मिळती तर औरंगजेबाने सहज जिंकून घेतली असती. याआड दोन गोष्टी आल्या. एक म्हणजे शहाजहानचे आजारीपण, आणि दुसरी गोष्ट म्हणजे ही राज्ये जिंकण्याचे कामी शहाजहानने घातलेला मोडता ही होय. औरंगजेबाचे मनसुबे आणि योजना याची इत्थंभूत बातमी शहाजहानला मिळत असे. दक्षिणेमध्ये औरंगजेबाचे वाढत जाणारे प्रस्थ आणि त्याची लष्करी दृष्ट्या झालेली प्रचंड तयारी याची बादशहाला खडान्खडा माहिती मिळत होती. अशा परिस्थितीत औरंगजेबाच्या हेतूबद्दल त्याच्या मनात संशय निर्माण होणे साहजिकच होते. शहाजहानच्या मनात औरंगजेबाबद्दल प्रेम जवळ जवळ नव्हते. त्याच्याबद्दल त्याच्या मनात जी काही भावना होती ती आदरयुक्त भीतीचीच. दारा, शुजा आणि मुराद हे शहाजहानचे तीन इतर मुलगे, बुद्धीने आणि कर्तृत्वाने यथातथाच होते. दाराबद्दल तर शहाजहानने उघड-उघड पक्षपाती धोरण स्वीकारलेले होते. शहाजहानचे मन त्याने औरंगजेबाविषयीच्या द्वेषाने भरवून दिलेले होते. तेव्हा शहाजहानाच्या मनात अशी शंका निर्माण झाली की, महत्त्वाकांक्षी असलेल्या आपल्या मुलाने

विजापूर आणि गोवळकोंडा ही राज्ये जिंकून सिंहासन मिळविण्यासाठी आपल्या बरोबरच लढा देण्याचा घाट घातला तर त्याला आवर घालणे अतिशय कठीण जाईल. औरंगजेब आणि शहाजहान यांच्यामध्ये औरंगजेबाच्या दक्षिणेतील सुभेदारीच्या दुसऱ्या कालखंडात अतिशय कटू असा पत्रव्यवहार झाला. विजापूर आणि गोवळकोंडा येथील शाह्यांनी मोगलांबरोबर थोडे ताठर धोरण स्वीकारावयास सुरुवात केली. शहाजहानने त्यांना अप्रत्यक्षपणे पाठिंबा दिला इतकेच नव्हे तर या दोन्ही शाह्यांबरोबर तह करून शांतता प्रस्थापित करण्याची त्याला आज्ञा दिली. औरंगजेबाने मनात आणले असते तर त्यावेळीच त्याला बापाविरूद्ध बंड पुकारता आले असते. परंतु त्याला एकंदर परिस्थितीचा अजून पूरा अंदाज घ्यावयाचा हाता. त्याची लष्करी तयारीही अजून पूर्ण झालेली नव्हती. परिणामी त्याने सबुरीचे धोरण स्वीकारले. जेव्हा त्याला शहाजहानच्या आजारीपणाविषयी आणि दाराच्या बेतांविषयी शंका उरली नाही तेव्हा मात्र त्याने दक्षिणेतले राजकारण जमेल तसे मिटवून सिंहासनाच्या लढ्यासाठी उत्तरेकडे कूच केले. या सर्व घडामोडीत औरंगजेबाला जर कशाची विशेषकरून जाणीव झाली असेल तर ती मराठ्यांच्या वाढत्या सत्तेची. उत्तरेकडे जाताना त्याने मनाशी अशी खूणगाठ बांधली असली पाहिजे की सिंहासनावर आल्यावर मराठ्यांच्या बंडाचा बिमोड करावयाचा. या ठिकाणी एक गोष्ट सांगणे जरूर आहे की, औरंगजेबाने स्थिर बुद्धीने, सापेक्षतेने आणि निःपक्षपातीपणाने मराठ्यांच्या प्रश्नाचा कधीच विचार केला नाही. विजापूर, गोवळकोंडा आणि मराठे यांना त्याने एकाच मापाने जोखले. अशा तऱ्हेने विचार करण्यात औरंगजेबाच्या पुढील पराजयाची बीजे रुजली गेली असे म्हटल्यास काहीही हरकत नाही. दोनशे वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या या शाह्या आपापसातील वैमनस्याने आणि मोगलांबरोबर चाललेल्या संघर्षाने खिळखिळ्या होऊन गेल्या होत्या. मोगलांच्या प्रचंड सत्तेबरोबर हिरिरीने लढा देण्याची ताकद त्यांच्यामध्ये उरलेली नव्हती. किंबहुना त्यांचे अस्तित्वच मोगलांच्या इच्छेवरती अवलंबून होते. मराठ्यांची परिस्थिती पूर्णपणे वेगळी होती. मराठ्यांचे राज्य एक स्वतंत्र राज्य म्हणून अस्तित्वात आलेले होते. तेराव्या शतकाच्या अखेरीला मुसलमानांचे पहिले आक्रमण दक्षिणेवर झाल्यापासून नंतरची तीनशे वर्षे आपण परकीय अमलाखाली रगडले गेलो आहोत आणि सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि आर्थिक दृष्ट्या आपली गळचेपी झालेली आहे याची पूर्ण जाणीव महाराष्ट्रातील लोकांना झालेली होती. ही जाणीव धर्मनिरपेक्ष होती. परकीय सत्तेचा अंमल झुगारून देऊन आपले राजकीय स्वातंत्र्य परत मिळविण्याची ईर्षा त्यांच्या मनात निर्माण झाली होती. ही ईर्षा निर्माण करणारा महापुरुष म्हणजे छत्रपती शिवाजी. स्वराज्य म्हणजे सुराज्य हा मंत्र त्याने साऱ्या महाराष्ट्राला दिला. यामुळे साऱ्या महाराष्ट्रात एक तऱ्हेची चेतना निर्माण झालेली होती. या शक्तीला आणि या चेतनेला औरंगजेबाने कमी आणि तुच्छतापूर्वक लेखले. **मराठ्यांविषयीचा विपरित दृष्टिकोन :-** उत्तरेकडे जाताना शिवाजीबरोबर त्याने तात्पुरता समझोता केला आणि गादीवर आल्यानंतर आपल्या लष्करी सामर्थ्याच्या जोरावर मराठ्यांच्या वाढत्या शक्तीला आपण सहज पायबंद घालू अशी त्याने आपल्या मनाची समजूत करून घेतली. त्याचे हे धोरण कसे चुकले याचा उल्लेख पुढे येईलच. औरंगजेबाने उत्तरेकडे जे कूच केले ते वारसा हक्काचे युद्ध आपण जिंकणारच या जाणिवेने. दारा, शुजा आणि मुराद यांचे सामर्थ्य आणि राजकारणपटूत्व औरंगजेबापुढे कोते पडले. भविष्यकाळात आपल्याला शत्रू राहू नये याची औरंगजेबाने खबरदारी घेतली आणि आपल्या भावांचा कुटुंबियासकट नायनाट केला. नैसर्गिकतया औरंगजेबाला सिंहासनाची प्राप्ती होणे हे जवळ-जवळ अशक्यप्राय होते. दारा आणि शुजा यांच्या अंगी जर कुटीलपणा असता आणि आपले हेतू शेवटाला नेण्याचे जर सामर्थ्य त्यांच्यामध्ये असते तर कदाचित औरंगजेबाने त्यांच्यावर जी पाळी आणली ती त्यांनी औरंगजेबावर आणून त्याला देशोधडीला लावले असते. सिंहासन आपण मिळवावयाचेच या दृष्टीने दुसऱ्यावेळी जेव्हा औरंगजेब दक्षिणेच्या सुभेदारीवर आला तेव्हा त्या दृष्टीने त्याची तयारी चाललेली होती आणि त्याची पावलेही त्याच वाटेने पडत होती. **चुकीचा मोठेपणा :-** आपले उद्दिष्ट साध्य झाल्यानंतर औरंगजेबाने मनाचा मोठेपणा आणि औदार्य हे आपले सख्खे भाऊ आणि

बाप यांच्याबाबत दाखविली नाहीत. त्याला अर्थात कारणही तसेच होते. औरंगजेबाच्या अगोदर गादीवर आलेल्या कोणत्याच मोगल बादशहाने मनाचे हे औदार्य प्रकट केलेले नव्हते. औरंगजेब त्याला अपवाद असणे अशक्य होते. औरंगजेबाला काही इतिहासकारांकडून फार असे मोठेपण दिले गेलेले आहे. परंतु औरंगजेबाची तुलना कोणत्याच मोठ्या माणसाबरोबर होऊ शकत नाही. कारण मोठेपणा मिळाल्याच्या अत्युच्य क्षणी त्याने मोठ्या माणसासारखे न वागता सर्वसामान्य माणसांप्रमाणे वागून आपल्या मोठेपणाला कमीपणा आणला. आपल्या भावांना ठार मारण्यात आणि बापाला कैद करण्यात त्याची खुनशी वृत्ती, द्वेषमूलक स्वभाव आणि क्रौर्य ही त्याच्या इतिहासकाराला प्रकर्षाने जाणवतात. मुरादबक्षाला ज्या पद्धतीने त्याने मारले ती घटना लांछनास्पद आणि घृणास्पद होती, इतकेच नव्हे तर माणुसकीला काळीमा आणणारी होती. युद्धामध्ये सर्व काही क्षम्य असते हा न्यायही या ठिकाणी लागू पडत नाही. तीच गोष्ट शहाजहानबरोबर त्याला कैदेत टाकल्यानंतर त्याने जे वर्तन केले त्याबाबत म्हणता येईल. वृद्ध आणि कैदी असलेला शहाजहान हा निरुपद्रवी होता. औरंगजेबाच्या दृष्टीने तो जवळ-जवळ मेलेलाच होता. मेलेल्याला मारण्यात काहीच अर्थ नव्हता. परंतु सिंहासनावर आल्यानंतर औरंगजेबाने शहाजहानला त्याच्या गत कृत्यांची जाणीव दिली. दोघांमध्ये अतिशय कटू असा पत्रव्यवहार झाला. शहाजहानचे कैदेमध्ये असताना जे हाल झाले तसे उदाहरण जगाच्या इतिहासात आपल्याला क्वचितच आढळेल.

पहिली पंचवीस वर्षे

गादीवर आल्यानंतरची पहिली पंचवीस वर्षे ही औरंगजेबाने उत्तरेकडच्या राजकारणात घालविली. उत्तर-पूर्व आणि पश्चिम या दिशांना मोगल साम्राज्याची वाढ झाली. या काळात प्रत्यक्ष अशी कोणतीही मोहीम औरंगजेबाने हाती घेतली नाही तर हे काम त्याने आपल्या अमीर-उमरावांवर सोपविले. दक्षिणेच्या राजकारणाबाबतही तोच दृष्टिकोण औरंगजेबाने ठेवला. गादीवर आलेला आणि मोठ्या महत्त्वाकांक्षेने प्रेरीत झालेला कोणताही सम्राट जे करील तेच औरंगजेबाने केले. परंतु हे करताना अतिशय विकृत असे स्वरूप औरंगजेबाने आपल्या राजकारणाला दिले. हे स्वरूप त्याच्या धर्मवेडेपणाचे आणि धर्मांध वृत्तीचे द्योतक होते. रजपुतांशी लढताना त्याने हीच वृत्ती प्रकट केली. ह्या धर्मांधतेपोटी त्याने काशी-विश्वेश्वराच्या मंदिराचा विध्वंस करून त्या ठिकाणी मशिदीची उभारणी केली. हिंदूंवर त्याने जो जिजिया कर बसविला त्याच्या मुळाशी त्या करापासून मिळणारे उत्पन्न हा हेतू नसून हिंदूंचे जीवन कसे संत्रस्त करता येईल हा होता. आपल्या प्रजाजनांना मग ते हिंदू असोत, मुसलमान असोत अगर ख्रिस्ती असोत, समानतेच्या भूमिकेवरून वागविण्याचा मोठेपणा औरंगजेबाने कधीच दाखविला नाही. औरंगजेबाची स्वतःची भूमिका आपण हिंदुस्थानात परके आहोत अशीच होती. या परकीयत्वाच्या किंवा श्रेष्ठत्वाच्या भूमिकेतून त्याच्या दृष्टीने हिंदूंचे स्थान दुय्यम आणि निकृष्ट दर्जाचे होते. शिवाजीला ही भूमिका पटणे शक्यच नव्हते. औरंगजेबाच्या या विद्वेषावर आधारलेल्या भूमिकेमुळे शिवाजी आणि औरंगजेब यांच्यामध्ये बराचसा पत्रव्यवहार झाला. दोघांनीही आपल्या भूमिका कायम राखल्या—शिवाजीने आपली धर्मनिरपेक्षपणाची आणि औरंगजेबाने आपली धर्मांधतेची. औरंगजेबाचे हे धर्मवेड किंवा पंथवेड किती पराकोटीला पोहोचले होते याची कल्पना आपल्याला औरंगजेबाने विजापूर आणि गोवळकोंडा या राज्यांच्या सुलतानाबरोबर जे विद्वेषी धोरण स्वीकारले त्यावरून येते. विजापूर आणि गोवळकोंडा या दोन शाह्यांचा नाश करण्यात औरंगजेबाने कोणते राजकारण साधले याचा इतिहासाच्या अभ्यासकाला उलगडा होत नाही.

शिवाजी आणि औरंगजेब

हिंदूंबद्दलच्या या विद्वेषाच्या पोटीच औरंगजेबाने शिवाजीबद्दल मनात फार मोठा आकस धरला. उत्तर हिंदुस्थानात जर त्याचे लक्ष गुंतलेले नसते तर शिवाजीच्या वाढत्या सामर्थ्याला आवर घालण्यासाठी तो स्वतःच दक्षिणेमध्ये उतरला असता, विजापूर आणि गोवळकोंडा यांची ताकत त्याने जोखली होती. आपल्याला खरा विरोध होणार आहे तो शिवाजीकडूनच याची त्याला जाणीव झाली. विजापूरकरांवर त्याने मिळविलेले विजय आणि अफजलखानासारख्या मातबर सरदाराची त्याने लावलेली विल्हेवाट यावरून शिवाजीच्या सामर्थ्याची त्याला कल्पना यावयाला पाहिजे होती, ती त्याला आली नाही. साहजिकच शिवाजी आणि औरंगजेब यांच्यामधील संघर्ष हा शिवाजीचा मृत्यू होईपर्यंतच्या कालखंडात बुद्धिबळाच्या पटावरील मोहोऱ्यांची हलवा हलव करणाऱ्या दोन बुद्धिबळपटू तज्ज्ञांमधील संघर्षाप्रमाणे झाला. औरंगजेबाने पहिल्याप्रथम आपला मामा शायस्ताखान याची शिवाजीवर रवानगी केली. शायस्ताखान हा कसलेला योद्धा होता पण मराठ्यांची युद्धनीती त्याला अवगत नव्हती. सुरुवातीला शिवाजीविरुद्ध मिळालेल्या विजयाने त्याची फसवणूक झाली. शिवाजीला आपण नेस्तनाबूत केले या संभ्रमात तो पुण्याला मुक्काम देऊन बसला आणि शिवाजीने नेमकी संधी साधली. खुद्द पुण्यात त्याच्या राहत्या वाड्यावर हल्ला करून शिवाजीने त्याची त्रेधातिरपीट उडविली. शिवाजीच्या चातुर्यासमोर शायस्ताखानाला कधीच यश मिळणार नाही हे औरंगजेबाने ओळखले आणि त्याची दक्षिणेच्या सुभेदारीवरून बंगालमधे रवानगी केली. शिवाजीच्या वाढत्या संकटाचा आता औरंगजेबानें गंभीरपणे विचार करावयास सुरुवात केली आणि शिवाजीला लवकर पायबंद न घातल्यास प्रत्यक्ष आपल्या गादीला धोका पोहोचेल या भीतीने त्याने शिवाजीचा कायमचा बंदोबस्त करण्याचे ठरविले. या कामी त्याने मिर्झा राजा जयसिंग याची नियुक्ती केली आणि दक्षिणेमधील मोहिमेचे सर्वाधिकार त्याला दिले. मिर्झा राजा जयसिंग याची नियुक्ती करण्यात औरंगजेबाने आपले कौशल्य आणि कुटिल नीती ही पुरेपूर उपयोगात आणली असे म्हटल्यास त्यात काहीच वावगे होणार नाही. राजा जयसिंग हा बादशहाच्या दरबारातील एक प्रतिष्ठित आणि बलाढ्य उमराव होता. त्याच्या निष्ठेबद्दल शंका घ्यावयास काहीच जागा नव्हती. सेवकाची जशी आपल्या धन्याबद्दल निष्ठा असते तद्वत्च धन्याचीहि आपल्या सेवकाच्या ठिकाणी असावी लागते. औरंगजेबाच्या बाबतीत हे विधान सर्वथैव लागू नव्हते. त्याच्या प्रत्येक सरदाराबद्दल त्याच्या मनात संशय असे. इतकेच नव्हे तर राजघराण्यातील प्रत्येक व्यक्तीबाबतदेखील त्याचे मन स्वच्छ नसे. आधुनिक हेर खात्याला खाली पाहावयाला लावील अशी त्याची गुप्तहेर संघटना होती आणि राज्यातील प्रत्येक लहानथोर आणि महत्त्वाच्या व्यक्तीबद्दल खडान्खडा माहिती त्याच्याकडे पुरविली जात असे. औरंगजेबाने जयसिंगाची नेमणूक जेव्हा दक्षिणेच्या मोहिमेवर केली तेव्हा त्यात त्याचे दोन हेतू होते. जयसिंग या मोहिमेत यशस्वी झाला तर शिवाजीसारखा शत्र नामोहरम होणार होता. पण त्याचबरोबर शिवाजीशी लढण्यात जयसिंगाची शक्ती खर्च होऊन त्याचे सामर्थ्य कमी होणार होते. याउलट शिवाजीला यश मिळाले असते तर जयसिंगासाख्या त्याच्या बलाढ्य उमरावाचा परस्पर काटा निघाला असता. दुहेरी नितीचे राजकारण औरंगजेबाने पुरेपूरपणे अमलात आणले. मिर्झा राजा जयसिंग हा शिवाजीवरील मोहिमेत यशस्वी झाला हे त्याच्या कर्तृत्वाचे गमक आणि औरंगजेबाच्या कुटिल नीतीचा पराभव होय यात काहीच संशय नाही. परंतु या ठिकाणी एक गोष्ट ध्यानात ठेवणे आवश्यक आहे आणि ती म्हणजे ही की, मिर्झा राजा जयसिंग याचे यश म्हणजे शिवाजीचा पूर्ण पराभव नव्हे. तसे मानणे चुकीचे ठरेल. बुद्धिबळाच्या पटावर ज्याप्रमाणे पुढील हालचाली यशस्वी व्हाव्या म्हणून खेळ खेळणारा ऐनवेळी माघार घेतो त्याप्रमाणे शिवाजीने परिस्थिती ओळखून माघार घेतली. **जयसिंगाचा शेवट :-** ज्या उद्देशाने जयसिंग दक्षिणेत आला होता तो उद्देश म्हणजे महाराष्ट्राची अस्मिता नाहीशी करणे आणि सर्वदूर संहार करणे, तो साध्य झाला नाही. त्याने शिवाजीची शरणागती मिळविली पण त्यासाठी शिवाजीला फार मोठी किंमत द्यावी लागली नाही. यशाच्या धुंदीत जयसिंगाने आपला मोर्चा विजापूरकडे

वळविला. पण विजापूरकरांनी त्याला शर्थीची झुंज दिली आणि गनिमी-काव्याचे युद्ध करून त्याचा नक्षा उतरविला. मनाने खचलेला औरंगजेबाचा हा कसलेला योद्धा विजापूरवरील मोहिमेनंतर उत्तरेकडे परतत असतानाच मरण पावला. ह्या नाही त्या मार्गाने का होईना औरंगजेबाचे कुटिल राजकारण यशस्वी झाले.

१६६५ मध्ये जयसिंगाबरोबर झालेल्या तहाच्या अटीनुसार शिवाजीला आग्रा येथे औरंगजेबाची भेट घेणे क्रमप्राप्त झाले होते. आग्रा येथे आपल्यापुढे काय वाढून ठेवले आहे याची शिवाजीला पूर्णपणे जाणीव होती. आग्र्याहून आपण जिवंत परत येऊ किंवा नाही याबद्दलही तो साशंक होता. पण आग्रा येथे न जाणे म्हणजे पुनश्च मोगल आक्रमणाला आमंत्रण देण्यासारखे होते. मृत्यूला तोंड देण्याची त्याची पूर्ण तयारी होती. आपले बरेवाईट झाल्यास राज्यव्यवस्थेत कोणताही बिघाड होऊ नये यादृष्टीनें त्याने सर्व व्यवस्था केली आणि आग्र्याकडे प्रयाण केले.

शिवाजीची आग्रा भेट

अफजलखान शिवाजीच्या भेटीला आला असताना शिवाजीला ठार मारण्याची उघड उघड प्रतिज्ञा करून आला होता. अशा उघड शत्रूबरोबर सामना देण्याची तयारी योजनापूर्वक करणे शक्य असते. पण औरंगजेबाच्या मनात काय आहे याचा थांग लागणे कठीण होते. बापाला हालहाल करून ठार मारणारा आणि आपल्या भावांचे निर्घृणपणे खून करणारा औरंगजेब आपल्या जीवाशी खेळ करण्यास मागेपुढे करणार नाही याची शिवाजीला जाणीव असावी. पण या गोष्टीची पर्वा न करता शिवाजीने औरंगजेबाच्या दरबारात पाऊल ठेवले. सम्राटाच्या अंगी शोभून दिसणारा मोठेपणा व मनाचे औदार्य औरंगजेबापाशी नव्हते. सुरुवातीपासूनच औरंगजेबाने शिवाजीची अवहेलना करण्यास सुरुवात केली. परंतु मराठा मनाची औरंगजेबाला कल्पना नव्हती झालेल्या अपमानाचा शिवाजीला भयंकर संताप आला आणि या संतापाचा स्फोट त्याच्या कडक शब्दांत दिसून आला. औरंगजेबाने जयसिंगाला वचन दिले होते की शिवाजी भेटीला आल्यानंतर त्याच्या जिवाला कोणताही अपाय होणार नाही. वचनाची मातब्बरी औरंगजेबाला कधीच वाटली नव्हती. यावेळीही ती वाटण्याचे कारण नव्हते. शिवाजीला आपण कसेही वागवू शकतो असा औरंगजेबाने विचार केला. शिवाजीने दरबारात जे क्षात्रतेज प्रकट केले होते त्याची औरंगजेबाला मातब्बरी वाटली नाही. त्याने शिवाजीला कैद करण्याचे आणि नंतर त्याला नाहीसे करण्याचे ठरविले. औरंगजेबाच्या या वागण्यात कुटिलपणा आणि विश्वासघात दिसून येतात. एवढेच नव्हे तर, त्याचा अदूरदर्शीपणाही त्यात दिसून येतो. औरंगजेबाला अशी जाणीव झाली नाही की शिवाजीला कैद केल्याने किंवा त्याला ठार मारल्याने महाराष्ट्रात निर्माण झालेले क्षात्रतेज नष्ट होणारे नव्हते. औरंगजेबाचा स्वभावच संशयी होता. आपल्याभोवती असलेली सारी मंडळी ही आपल्या नाशाकरता टपून बसली आहेत अशी त्याची धारणा होती. शिवाजीसारखा प्रबळ शत्रू हाती सापडल्यानंतर साहजिकच त्याला औरंगजेब सुखासुखी सोडील हे असंभवनीय होते. काळाची पावले औरंगजेबाला ओळखता आली नसती असे नाही. किंबहुना भविष्यकालीन इतिहासकार आपल्या कामगिरीचे मोल ठरविताना विश्वासघात आणि खून यांसारखे गंभीर आरोप आपल्यावर करतील याचीही त्याला कदाचित जाणीव झाली असेल. परंतु शिवाजी दरबारात आल्यानंतर औरंगजेबाला विवेक राहिला नाही. त्याची सारासार बुद्धी नष्ट झाली. त्याच्या डोळ्यापुढे फक्त एकच गोष्ट आता होती आणि ती म्हणजे हाती सापडलेल्या कट्टर शत्रूचा नाश ही होय. अफजलखान आणि शायस्ताखान यांचा शिवाजीने जो धुव्वा उडविला होता तो त्याच्या दृष्टीसमोर अगदी ताजा होता. अशा शत्रूला जर आपण जिवंत ठेवले तर त्यामध्ये केवढा प्रचंड धोका आहे ही जाणीव औरंगजेबाला झाली. परंतु जसे औरंगजेबाने मराठी मनाला ओळखले नव्हते तसेच त्याने शिवाजीलाही ओळखले नव्हते.

औरंगजेबाला आपल्या सामर्थ्याचा गर्व झाला होता. या सामर्थ्याच्या जोरावर जगातली कोणतीही गोष्ट आपल्याला असाध्य नाही अशी त्याला घमेंड झाली होती. या घमेंडीपोटीच त्याने आपल्या कारकीर्दीच्या उत्तरार्धात विजापूर आणि गोवळकोंडा यांच्यावर स्वारी केली आणि मराठ्यांची पाळेमुळे खणून काढण्याचा निश्चय करण्याची घोडचूक केली. याउलट शिवाजीला शक्तीचा उपयोग केव्हा करावयाचा आणि युक्तीचा उपयोग केव्हा करावयाचा याची पूर्ण जाणीव होती. शिवाजीने आकांडतांडव खूप केले. आपण अगदी अगतिक झाल्याचे त्याने दाखविले. जणू कांही त्याने निर्वाणाचीच तयारी केली आणि औरंगजेब नेमक्या याच गोष्टीला फसला. शिवाजीची आग्र्याची भेट आणि त्या काळात घडलेल्या घटना बघितल्यावर जगातली माणुसकी आणि विश्वास या गोष्टी नाहीशा झाल्या नव्हत्या याची खात्री मनाला पटते. अतिशय कडक अशा कैदेतून शिवाजीने पलायन केले ही गोष्ट असे दर्शविते की औरंगजेबाचे आततायी धोरण हे त्याच्याच दरबारातील हिंदू आणि मुसलमान मुत्सद्द्यांना पसंत नव्हते. शिवाजीने गरीब-गुरीबांना आणि फकिरांना मिठाई वाटली आणि अशाच एका मिठाईच्या पेटाऱ्यात बसून त्याने आपली सुटका करून घेतली, ही गोष्ट जरी खरी असली तरी खुद्द औरंगजेबाच्या दरबारातील मातब्बर अशा व्यक्तींचे साहाय्य असल्याखेरीज शिवाजीला आपली सुटका करून घेता आली नाही यात काहीच संशय नाही. पिंजऱ्यातून पक्षी पळाला याबद्दल औरंगजेबाने खूप अकांडतांडव केले. पण त्याची प्रत्येक गोष्टच चुकत गेली. तारुण्याच्या ऐन उमेदीत असताना आणि शिवाजीच्या पलायनापूर्वी काही वर्षे औरंगजेबाने शत्रूच्या मनात काय करावयाचे आहे हे ओळखून आपले पाऊल पुढे टाकले आणि प्रत्येक वेळी शत्रूवर मात करण्यात यश मिळवले. यावेळी मात्र त्याने टाकलेले फासे उलटेच पडत गेले. शिवाजीने त्याच्यावर पूर्णपणे मात केली आणि राजकारण, मुत्सद्दीपणा आणि डावपेच याबाबत आपण औरंगजेबापेक्षा कुठल्याही तऱ्हेने कमी नाही हे दाखवून दिले.

शिवाजीच्या आग्रा भेटीनंतरचे औरंगजेबाचे राजकारण

यानंतरचा पंधरा वर्षांचा काळ औरंगजेबाने उत्तरेमधे स्थिरस्थावर करण्यात घालविला तसे जर नसते तर पंधरा वर्षांनंतर दक्षिणेत उतरलेला औरंगजेब शिवाजीच्या पाठोपाठ दक्षिणेत आलेला आपल्याला दिसला असता. आग्र्याच्या भेटीनंतर शिवाजी आणि औरंगजेब यांचा प्रत्यक्ष संबंध असा कधी आलाच नाही. परंतु ही पंधरा वर्षे मात्र महाराष्ट्राच्या इतिहासाच्या दृष्टीने अतिशय महत्वाची होती. दक्षिणेबाबत औरंगजेबाने आता एक विशिष्ट धोरण स्वीकारले होते आणि ते म्हणजे शिवाजीचा आणि त्याबरोबरच विजापूर आणि गोवळकोंडा या दोन शाह्यांचा नाश करणे हे होय. वर उल्लेखिल्याप्रमाणे शक्य असते तर तो स्वतःच दक्षिणेत आला असता परंतु तसे न करता ही कामगिरी त्याने आपल्या सरदार मंडळीवर सोपविली. या घटनेचा दक्षिणेच्या इतिहासावर कोणता परिणाम झाला याची चर्चा करणे जरूर आहे. आग्र्याच्या भेटीनंतर शिवाजीने कांही काळतरी मोगलांबरोबर वर-वर का होईना, मित्रत्वाचे धोरण स्वीकारण्याचे ठरविले. जयसिंगाच्या विजापूरवरील स्वारीत त्याने भाग घेतला. शिवाजीने हे जे धोरण स्वीकारले त्यामुळे औरंगजेब फसला असे नव्हे परंतु त्याचे मन शिवाजीबद्दल पूर्वी इतके साशंक राहिले नाही. शिवाजीने देखील आपल्या कृतीने औरंगजेबाचा संशय बळावेल असे कांहीही केले नाही. आगामी संघर्षाची तयारी मात्र त्याने केली. औरंगजेबाबरोबरील पहिल्या फेरीत औरंगजेबाला अपयश पदरी घ्यावे लागले आहे आणि त्याचा सूड उगविल्याखेरीज तो राहणार नाही याची शिवाजीला पूर्ण जाणीव होती. आपली तयारी पूर्ण करून मगच औरंगजेबाशी उघड उघड सामना देण्याचे त्याने ठरविले. तीन-चार वर्षांनंतर त्याने आपल्या चढाईला सुरवात केली. पुरंदरच्या तहानुसार मोगलांना दिलेले बरेचसे किल्ले त्याने जिंकून घेतले. त्याशिवाय मोगल मुलखात वारंवार छापे घालण्याचे सत्रही त्याने चालू ठेवले. या चढाईच्या पहिल्या

पवित्र्यात त्याने सुरतेवर धाड घातली. शिवाजीच्या या पवित्र्याने औरंगजेबाला हादरा बसला. परंतु शिवाजीला जरब बसवेल असा मातब्बर सेनापती त्याच्याकडे उरला नव्हता. जसवंतसिंग, बहादूरखान, दिलेरखान वगैरे सेनांनी जरी नावाजलेले होते तरी शिवाजीबरोबर राजकारणाचे डावपेच करण्याची कुवत त्यांच्यामध्ये नव्हती. उत्तरेकडील राजकारण सोडून औरंगजेबाला दक्षिणेकडे शिवाजीच्या पाडावासाठी स्वतः येणे शक्य नव्हते. चार पाच वर्षांच्या या कालावधीत शिवाजीची चांगलीच तयारी झालेली होती. मोगलांबरोबर गनिमी काव्याचे युद्ध खेळून आता चालणार नाही हे त्याने ओळखले होते. स्वराज्य स्थापनेचा हेतू जर आपल्याला साध्य करावयाचा असेल तर समोरासमोरच्या लढाईत मोगलांना आपले सामर्थ्य दाखविणे जरूर होते. शिवाजीने त्या दृष्टीने तयारीही केली होती. १६७० नंतर शिवाजीने मी मी म्हणविणाऱ्या मोगल सेनापतींचा समोरासमोरच्या लढाईत धुव्वा उडविला. मुत्सद्दीपणामध्ये आणि त्याचप्रमाणे लष्करी डावपेचातही त्याने औरंगजेबावर मात केली.

औरंगजेब आणि शिवाजी—थोडे समीक्षण

ज्या मराठ्यांचा नाश व्हावा म्हणून औरंगजेबाने आपले सारे सामर्थ्य पणास लावले होते त्या मराठ्यांच्यामध्ये शिवाजीने एक अद्वितीय अशी अस्मिता निर्माण केली. साऱ्या साम्राज्याची ताकद पाठीशी असताना जो एकसूत्रीपणा आणि एकजिनसीपणा औरंगजेबाला आपल्या प्रजाजनांमध्ये निर्माण करता आला नाही तो शिवाजीने फारच थोड्या कालावधीत महाराष्ट्रामध्ये निर्माण केला. औरंगजेबाच्या प्रचंड सामर्थ्यापुढे शिवाजीची शक्ती म्हणजे काहीच नव्हती. इतके असून देखील शिवाजीबरोबरच्या लढ्यात इतकेच नव्हेतर पुढे शिवाजीच्या मृत्यूनंतर मराठ्यांबरोबर झालेल्या संघर्षात औरंगजेबाला अपयश आले. याला कारण काय झाले हे शोधण्यासाठी फार दूर जाण्याची आवश्यकता नाही. औरंगजेबाचे राजकारण हे धार्मिक विद्वेषावर आधारलेले होते, तर शिवाजीचे राजकारण हे धर्मनिरपेक्ष होते. शिवाजीची महत्त्वाकांक्षा शेकडो वर्षे परकीय अमलाखाली दडपल्या गेलेल्या प्रजेला मुक्त करण्याची होती. त्याचा पवित्रा हा आक्रमक नव्हता. त्याच्या महत्वाकांक्षेच्या पोटी कोणी देशोधडीला लागावयाचे नव्हते इतकेच नव्हे तर असंख्य जीवांची हत्याही या महत्त्वाकांक्षेच्या पूर्ततेच्या पोटी व्हावयाची नव्हती. औरंगजेबाचा पवित्रा हा मूलतःच आक्रमक होता. त्याच्या महत्त्वाकांक्षेच्या पोटी स्वार्थ दडलेला होता. त्या महत्त्वाकांक्षेत रक्तपात अभिप्रेत होता. शिवाजी हा एका विशिष्ट तत्त्वांकरिता झगडत होता. औरंगजेबाच्या आसुरी महत्त्वाकांक्षेच्या पाठीमागे कसलेही तत्त्व नव्हते. शिवाजीचा लढा हा गरीबांसाठी होता. त्या लढ्यात न्याय निष्ठूरता होती. एक विशिष्ट तऱ्हेचा समाज शिवाजीला निर्माण करावयाचा होता. याउलट औरंगजेबापुढे कुठल्याही नवीन समाजाच्या निर्मितीचे स्वप्न नव्हते. अन्याय, दुजाभाव आणि असमानता यावर आधारलेल्या समाजाचा पाठपुरावा करणारा औरंगजेब हा एक प्रेषित होता. या समाजाची उभारणी सूडबुद्धीवर झालेली होती. औरंगजेबाची ही वृत्ती एखाद्या हुकूमशहासारखी होती. व्यक्तीगत दृष्टीकोनातून जरी बघितले तरी देखील औरंगजेब आणि शिवाजी यांची तुलनाच होऊ शकत नव्हती. जे जे गुण औरंगजेबामध्ये होते ते ते सर्व गुण शिवाजीच्या अंगात प्रकर्षाने आणि वरचढपणाने होते. औरंगजेबाच्या अंगातील अवगुणांचा शिवाजीकडे अभाव होता. परंतु शिवाजीकडे असलेले सर्वच्या सर्व गुण औरंगजेबाकडे मात्र नव्हते. सहिष्णुता आणि दयाबुद्धी हे शिवाजीचे स्थायीभाव होते, तर औरंगजेबामध्ये त्यांचा पूर्णपणे अभाव होता. शिवाजीला महत्त्वाकांक्षा होती, पण ती राक्षसी नव्हती. औरंगजेबाच्या महत्त्वाकांक्षेचे स्वरूप हे राक्षसी होते. या सर्व गोष्टींचा विचार केल्यानंतर विजयश्री कोणाला माळ घालणार याबद्दल शंकाच नव्हती. खरा महाराष्ट्र धर्म-ज्याला मानवता धर्म असेही म्हणता येईल—तो स्थापन करण्यात शिवाजीने यश मिळविले. यशाचे भरपूर माप शिवाजीच्या पदरी पडले. जे सिंहासन मिळविण्यासाठी औरंगजेबाला खून आणि रक्तपात करावा

लागला ते सिंहासन शिवाजीने लोकमताची प्रचंड जागृती करून मिळविले. १६७४ मध्ये शिवाजीला झालेला राज्याभिषेक म्हणजे त्याच्या यशाचा परमोच्च बिंदू असे म्हटल्यास काहीच हरकत नाही. शिवाजीने राजाधिराज ही पदवी घेऊन स्वतःला करून घेतलेला राज्याभिषेक हा त्याने औरंगजेबाच्या स्वाभिमानाला दिलेला एक प्रचंड धक्काच होता. यानंतरची पुढील सहा वर्षे शिवाजीकडे विजयाने कधीच पाठ फिरविली नाही. औरंगजेबाच्या नाणावलेल्या सेनापतींवर त्याने सहजगत्या विजय मिळविले आणि गोवळकोंड्याच्या सुलतानाबरोबर संगनमत करून आपला दक्षिण दिग्विजय त्याने साजरा केला. शिवाजीच्या हयातीत मोगल-मराठा संघर्षाला पहिल्या प्रथम तोंड लागले आणि पहिल्या फेरीत औरंगजेबाला हार खावी लागली.

औरंगजेबकालीन समाज, संस्कृति व राजकारण

हिंदुस्थानच्या इतिहासात १६ व्या शतकात ज्याप्रमाणे अकबराच्या व्यक्तिमत्वाची छाप पडलेली आपल्याला दिसून येते त्याप्रमाणे १७ व्या शतकात औरंगजेबाच्या व्यक्तीमत्वाचा प्रभाव तत्कालिन समाजजीवनाच्या प्रत्येक अंगोपांगावर पडलेला आपल्याला दिसून येतो. औरंगजेबाच्या जीवनाचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासूला त्याकरिता औरंगजेबकालीन आणि अनुषंगाने मोगलकालीन समाजजीवन, अर्थव्यवस्था, राज्यकारभार, शिक्षणपद्धति, दरबारी चालीरिती, मोगल सम्राटाचे राज्यातील स्थान व अधिकार यांची माहिती करून घेणे अवश्य आहे. वरील आणि इतर संबंधित बाबींची चर्चा पुढे केलेली आहे.

मोगल सम्राट : त्याचे खास अधिकार

मोगल बादशहांना जे काही खास अधिकार असत त्यांची आणि त्यांच्या धार्मिक स्थानाची थोडक्यात पुढे माहिती दिली आहे. मोगल बादशहा हे स्वतःला सर्व सत्ताधीश समजत. साहजिकच त्यांना जे काही विशेष अधिकार कायद्याप्रमाणे अथवा रूढींनी मिळालेले असत, त्यांची ते कटाक्षाने जपणूक करीत. यांपैकी **पहिला अधिकार** म्हणजे सकाळच्या प्रहरी सर्वसामान्य जनतेला बादशहाने दर्शन देण्याचा. कालांतराने समाजात असा एक वर्ग निर्माण झाला की बादशहाचे दर्शन घेतल्याशिवाय या वर्गातील माणसे कोणत्याही कामाला सुरवात करीत नसत. औरंगजेबाने ही प्रथा आपल्या कारकीर्दीच्या अकराव्या वर्षी बंद केली. (k. k. ii. 213) बादशहाच्या **दुसऱ्या अधिकाराला चौकी** आणि **चौकीची तसलीम** असे म्हणत. याचा अर्थ असा की बादशहाच्या राजवाड्याभोवती दरबारातील विश्वासू मनसबदाराने पहारा देणे आणि बादशहाच्या निवासस्थानाला दिवसातून तीन वेळा ताजीम देणे. **तिसरा अधिकार** म्हणजे समाजातील कोणत्याही व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीला आपल्या समोर जमिनीला हाताने अगर कपाळाने स्पर्श करावयास न लावणे. (**तस्लीम** आणि **कुर्निश**) याचा अर्थ असा की अशा तऱ्हेची वंदना करून घेण्याचा अधिकार फक्त बादशहाचा होता. **चौथा अधिकार** म्हणजे बादशाही दरबारात गायक आणि वादक ज्या पद्धतीने हजर राहात तशी पद्धत कोणत्याही सुभेदाराने अनुसरावयाची नव्हती. बादशहाच्या मर्जीप्रमाणे हे गायक आणि वादक आपल्या कलेने बादशहाला प्रसन्न करीत. औरंगजेबाने ही प्रथा बंद केली. **पाचवा अधिकार** म्हणजे बादशहा जेव्हा प्रवासावर निघे त्यावेळी नगारे वाजविणे. याबाबत मनूची असे म्हणतो की औरंगजेब जेव्हा जेव्हा सिंहासनावर बसण्यासाठी जाई किंवा तंबूतून बाहेर पडे तेव्हा तेव्हा रणवाद्यांचा (दमदमा) गजर केला जाई. (Storia, ii 69) बादशहाचा **सहावा अधिकार** म्हणजे जेव्हा बादशहा एखादी वस्तू उदा. घोडा अगर हत्ती दुसऱ्याला नजर करीत असे तेव्हा त्या व्यक्तीने बादशहाला कुर्नीसात करणे. राज्यातल्या कुठल्याही अधिकाऱ्याला अशा तऱ्हेचा कुर्नीसात घेण्याची बंदी होती. बादशहाचा **सातवा अधिकार** म्हणजे

राज्यातील कोणत्याही व्यक्तीला पदवी अगर हुद्दा देणे. राज्यातील दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीला हा अधिकार नव्हता. बादशहाचा **आठवा अधिकार** म्हणजे बादशहाचा कोणताही उमराव राजघराण्यातील व्यक्तीला वा अधिकाऱ्याला आपल्या बरोबर पायी चालवू शकत नसे. हा अधिकार फक्त बादशहाचाच होता. बादशहा पालखीमधून जात असताना त्याचे पुत्र हे घोड्यावरून जात आणि इतर अधिकारी पायी. (Tavernier, i. 390 &392) बादशाहाचा **नववा अधिकार** म्हणजे शिक्का किंवा पंजा, पत्रे अथवा नेमणूका व बक्षीसपत्रे यावर वापरणे. हा अधिकार राज्यामधील इतर कोणत्याही अधिकाऱ्याला नसे. इतकेच नव्हे तर बादशाही फर्मानातील भाषेसारखी भाषा वापरण्याची त्यांना बंदी असे. औरंगजेबाने या कारणासाठी फिरोजजंग याला जाब विचारला होता. (Hamid–ud–din's **Ahkam** 35) बादशहाचा **दहावा अधिकार** म्हणजे गुन्हेगाराला आंधळे करण्याचा किंवा त्याचे नाक अगर कान कापण्याचा होय. अशा तऱ्हेची शिक्षा इतर कोणाही अधिकाऱ्याला देता येत नसे. बादशहाचा **अकरावा अधिकार** म्हणजे कोणी मुसलमान धर्माची दिक्षा घेतल्यास ती संमत करणे. पुष्कळ वेळा देहांताची शिक्षा झालेले किंवा जन्मठेपेची शिक्षा झालेले कैदी अथवा जहागिरीवर अधिकार सांगणाऱ्या व्यक्ती मुसलमान धर्म स्वीकारून आपला कार्यभाग साधीत असत. या गोष्टीला संमती देण्याचा अधिकार फक्त बादशहाचाच होता. बादशहाचा **बारावा अधिकार** म्हणजे हत्तींची झुंज घडवून आणण्याचा होय. या अधिकाराला मोगल बादशहा अतिशय जपत असत. एकदा राजपुत्र शहाअलमने या अधिकाराचे अतिक्रमण केल्याबद्दल औरंगजेबाने त्याची कडक शब्दांत हजेरी घेतल्याचे आढळून येते. एका अधिकाऱ्याला औरंगजेबाने याबद्दल कडक शिक्षा दिली होती. (Ishwardas, 1446) हत्तींच्या झुंजीची उत्कृष्ट वर्णने मनूची (**Storia**, ii 364), बर्नियर (276–277) वगैरे लेखकांनी दिलेली आहेत. बादशहाचा **तेरावा अधिकार** म्हणजे सिंहाची शिकार करणे. या अधिकाराचा उपभोग फक्त बादशहा आणि राजपुत्र यांच्याकडूनच घेतला जाई. बर्निअरने (pp, 378–380) सिंहाच्या शिकारीचे अतिशय उत्कृष्ट वर्णन दिलेले आहे. बादशहाचा **चौदावा अधिकार** म्हणजे उच्चासनावर बसण्याचा. कोणताही अधिकारी बादशहासमोर आल्यानंतर त्याच्यापेक्षा उच्चासनावर बसू शकत नसे. बंगालचा सुभेदार इब्राहीमखान (इ. स. १६९५) याने उच्चासनावर बसून दरबार भरविल्याबद्दल बादशहाने त्याला कडक पत्र पाठविले. (Hamid–ud din's **Ahkam**, 64) राजपुत्र देखील या नियमाला अपवाद नव्हते. बादशहाचा **पंधरावा अधिकार** म्हणजे शुक्रवारची प्रार्थना म्हणण्यासाठी मशिदीमध्ये पालखीतून जाण्याचा होता. गुजरातच्या सुभेदाराला या नियमाचा भंग केल्याबद्दल औरंगजेबाने खरमरीत पत्र पाठविले होते. (**Akham**, 65) बादशहाचा **सोळावा** आणि **शेवटचा अधिकार** म्हणजे सुवर्णतुला करण्याचा. कधी-कधी बादशहा हा अधिकार आपल्या आवडत्या राजपुत्राला बहाल करीत असे. (Abdul Hamid's **Padishahnama**, ii 377, **Tuzuk** 163)

बादशहाचे धार्मिक स्थान

वरील अधिकारांशिवाय बादशहा हा धमप्रमुख म्हणून मानला जाई. किंबहुना बादशहाला परमेश्वराचा प्रतिनिधी असे समजत. धर्माच्या बाबतीत औरंगजेब हा अतिशय सनातन होता. त्याने आपले व्यावहारीक जीवन अतिशय खडतर असे ठेवले. त्याच्या अंगी चमत्कार करण्याची शक्ती आहे असाही समज होता. त्याला आलमगीर जिंदापीर असे म्हणत. मोगल बादशहांकडे धर्माचे हे जे नेतेपद असे त्यामुळे त्यांना पैगंबराला ज्या उपमा देत त्यांनीही संबोधीत. उदा. **किवला** व **कबा**, **कुत्ब** आणि **पिर वा मुर्शीद–इ–आलम–वा–अलामियान** किंवा **दुजहान** किंवा **दिन वा दुनिया** वगैरे. पुष्कळदा मोगल बादशहांचा उल्लेख जगत्गुरू असा देखील होत असे. मोगल बादशहाची पत्नीही धार्मिक बाबतीत त्याची सहधर्मचारिणी असल्यामुळे तिचाही उल्लेख आपल्याला **जगत्-गोसाईनी** असा केलेला आढळतो. आरंगजेबाला स्वतःला

दर्वेश म्हणून म्हणवून घेणे अतिशय आवडे. त्या काळातील धर्माचा प्रेषित म्हणून आरंगजेब सुन्नी पंथ लोकांनी आचरणात आणावा म्हणून कटाक्ष ठेऊन असे. त्याचा अर्थ औरंगजेबाने शिया पंथीयांना थारा दिला नाही असा नाही. परंतु शिया पंथी लोक औरंगजेबाच्या हाताखाली सुखी नव्हते याबद्दल काहीच दुमत नाही. विशेषतः उतारवयात त्याच्या अंगातील हे पंथवेड वाढतच गेले. शिया म्हणजे त्याच्या दृष्टीने पाखंडी होते. पर्शियन लोकांचा उल्लेख तो सडके मांस खाणारे राक्षस (**इराणी घुल–इ–वयाबानी**) असा करी. तत्कालीन पत्रव्यवहारात आणि अधिकृत इतिहासात देखील शिया पंथीयांविषयी ही भावना आपल्याला आढळते. परंतु जरूर पडल्यामुळे आणि त्यांच्या अंगातील हुशारी व राजकारणीय चातुर्य यांमुळे त्यांना आपल्या पदरी ठेवणे इतकेच नव्हे तर मोठ्या जागा देणे त्याला भाग पडले. याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे मीरजुमला याचे होते. औरंगजेबाच्या हटवादीपणामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत सुन्नी लोकांच्या द्वेष भावनेची आणखी भर पडली. परस्परांमध्ये लग्नसंबंध होणे तर बाजूलाच राहिले परंतु सुन्नी पंथीय लोक शिया पंथीयांच्या मुली नाकारीत. याचे उदाहरण आपल्याला पुढील घटनेत मिळते. औरंगजेबाचा बक्षी पहिला रुहुल्लाखान हा होता. तो शिया पंथी होता. त्याने मृत्युसमयी शिया पंथाचा त्याग करून सुन्नी पंथ स्वीकारला आणि मरतेसमयी आपल्या दोन मुली सुन्नी पंथीयांना देण्याची बादशहाला विनंती केली. यापैकी एका मुलीबरोबर लग्न करण्याचे सियादतखान या सुन्नी सरदाराने नाकारले. त्याने अशी शंका काढली की, ती मुलगी सुन्नी पंथी असेल हे कशावरून? (Hamid–ud–din's **Ahkam** 69) बादशहाला देखील ही शंका आली आणि रुहुल्लाखानाने फसविल्याबद्दलचा प्रत्यय पुढे लवकरच आला. कारण खान मेल्यावर बादशहाने दफनविधीकरिता जेव्हा सुन्नी काजी पाठविला तेव्हा त्याला असे सांगण्यात आले की, खानाने आगाबेग नावाच्या आपल्या सेवकाकडे आपल्या दफनाचे काम सोपविले होते. हा सेवक शिया पंथीय होता. औरंगजेबाचा हा शिया द्वेष इतक्या पराकोटीला गेला की, लाहोरचा बक्षी आणि दोन नजीम हे शिया पंथीय आहेत असे आढळून आल्यावर त्याने ताबडतोब बक्षीची बदली करण्याचा हुकूम दिला. (**Kalimat–Tay**, 16 a) आपल्या कारकिर्दीच्या अखेरीला औरंगजेबाने शिया लोकांमधील मृत्यूनंतर अस्थी कर्बला आणि मशहद येथे दफनाकरिता पाठविण्याची जी प्रथा होती ती बंद केली. (**Kalimat Tay**, 12 a)

औरंगजेबकालीन अर्थव्यवस्था, न्यायखाते आणि इतर काही चालिरिती :

मध्ययुगीन कालखंडात राज्याचे उत्पन्न हे मुख्यतः जमिनीवरील करापासून मिळे. हिंदुस्थानातील शेतकरी हा कर देण्यास नाखूष असे. याला कारणे मुख्यतः दोन होती. एक म्हणजे वारंवार बदलणाऱ्या राजवटी आणि दुसरे म्हणजे दिलेल्या कराबद्दल सरकारकडून कसलाही मोबदला मिळणार नाही याची खात्री. साहजिकच महसुलाची वसूली म्हणजे रयत आणि सरकार यांच्या मधला झगडा ठरे. यामध्ये कर वसूल करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या हावरेपणाची भर पडे. कराशिवाय आणखी अनेक बेकायदेशीर वसुल्या जनतेकडून बळजबरीने केल्या जात. मोगल बादशहा याबद्दल अतिशय कडक उपाययोजना करीत. औरंगजेबाने महसूल अधिकारी आणि प्रांतिक सुभेदार देखील या कारणांसाठी बडतर्फ केल्याची उदाहरणे आहेत. महसूल खात्यामधील बहुतेक दुय्यम अधिकारी लाच खाऊ असत. याउलट एकादे दुसरे उदाहरण सोडल्यास बहुतेक वरिष्ठ अधिकारी न्यायी असत. बेकायदेशीरपणे जे कर वसूल केले जात त्याला कारणे कनिष्ठ अधिकाऱ्याने वरिष्ठ अधिकाऱ्याला भेट देण्याची प्रथा, रयतेची गुलामी वृत्ती आणि अधिकाऱ्यांचे अतिशय कमी पगार ही असावीत.

प्रत्यक्ष महसूल गोळा करणारा अधिकारी **करोरी** हा होता. याला असे म्हणण्याचे कारण की त्याच्या अधिकारातून त्याने १ कोटी **दाम** वसूल करावा अशी अपेक्षा असे. महसूल खात्यातील आणखी दोन

अधिकारी म्हणजे **अमीन** आणि **कानुंगो** हे होते. **अमीन** ह्या अधिकाऱ्याचे काम सरकार आणि रयत यांच्यामध्ये कोणाचीही बाजू न घेता मध्यस्त म्हणून काम करण्याचे होते. जमीनविषयक सर्व कायदेकानूंची माहिती त्याला असावी लागे. त्याचप्रमाणे धारा आकारणीचे कामही त्याला करावे लागे. याशिवाय त्याच्याकडे शेतीसाठी कर्ज देण्याचेही काम असे. **कानुंगो** या अधिकाऱ्याला सर्व प्रचलित कायदेकानूंची माहिती त्याचप्रमाणे सारा पद्धतीचा इतिहास आणि कामकाज यांचे ज्ञान असावे लागे. त्याचप्रमाणे जमिनीची किंमत, सारापद्धती, जमिनी बाबतचे सर्व व्यवहार वगैरेंची नोंद त्याला ठेवावी लागे.

आदवाब अथवा बेकायदेशीरपणे वसूल केले जाणारे कर :

अशा तऱ्हेने वसूल केले जाणारे जे कर होते त्यांची पुढीलप्रमाणे विभागणी करता येईल. १. वस्तूंच्या स्थानिक विक्रीवरील जकात. २. स्थावर मिळकतीच्या विक्रीवरील कर. ३. स्वतःच्या फायद्यासाठी अधिकाऱ्यांकडून वसूल करण्यात येणारी चिरीमिरी. ४. विशिष्ट धंदा करण्यासाठी द्यावा लागणारा परवाना कर. ५. बळजबरीने द्याव्या लागणाऱ्या देणग्या. आणि ६. हिंदूंवरील खास कर. औरंगजेबाने आपल्या कारकिर्दीत बेकायदा ठरविलेल्या अशा तऱ्हेच्या करांची संख्या ६३ होती.

कायदा आणि न्याय खाते

मोगल साम्राज्याच्या न्याय खात्याची आपल्याला पुढील तीन विभागांत विभागणी करता येईल. १. धार्मिक कायद्याची न्यायालये – यांचे मुख्य **काजी** हे अधिकारी असत. २. सामान्य कायद्याची न्यायालये – याबाबतचे अधिकार सुभेदार आणि सर्व दुय्यम अधिकारी यांजकडे सोपविलेले असत. ३. राजकीय बाबींचा परामर्श घेणारी न्यायालये– याबाबतचे निर्णय खुद्द बादशहा देत असे.

जरी न्याय खात्याची तीन भागांत विभागणी करण्यात आली असली तरी सर्व न्यायाचा उगम बादशहापासून होतो अशी समजूत होती, आणि त्यानुसार मोगल बादशहांचे वर्तन असे. मोगल बादशहाकडे कज्जे हे पहिल्या प्रथम सुनावले जात आणि त्याचप्रमाणे अपिलात देखिल. अर्थात पहिल्या तऱ्हेचे कज्जे मोगल सम्राटांच्या इतर व्यवधानामुळे त्यांच्या समोर क्वचितच जात. खटल्यांची सुनावणी ही जलद होत असे, आणि निकालाची अंमलबजावणीही. प्रत्येक प्रांतावर मुख्य **काजी**कडून **काजी**ची नेमणूक होई. त्याचप्रमाणे शहरात आणि खेड्यात देखिल **काजी**ची नेमणूक होत असे. ज्याठिकाणी **काजी** नसे, त्या खेड्यातील लोक दुसऱ्या खेड्यातील **काजी**कडे आपले कज्जे घेवून जात. **काजी**चे काम हे तसे पाहिले तर ज्यूरीचे होते. कज्जा पुढे आल्यावर कायद्याची छाननी मुफ्ती या अधिकाऱ्याकडून केली जाई. बहुतेक वेळा **काजी** हे विद्वान कायदे पंडित असत. प्रांतिक **काजी**च्या हाती अमर्याद सत्ता असे. **काजी** हा आपले खटले मशिदीमध्ये चालवी. कधी कधी हे काम त्याच्या घरीही चाले.

मुसलमानी न्याय पद्धतीनुसार गुन्हे तीन प्रकारचे मानले जात. १. परमेश्वराविरुद्धचा. २. राज्याविरुद्धचा. आणि ३. खाजगी व्यक्ती विरुद्धचा. मुसलमानी कायद्याप्रमाणे शिक्षा ही चार प्रकारांची असे. १. हद्द, २. तजीर, ३. किसास, आणि ४. तशहीर. पहिल्या प्रकारात काही विशिष्ट प्रकारची म्हणजे दगडाने चेचून मारणे, फटके देणे, वगैरे शिक्षा सांगितलेली असे. दुसऱ्या प्रकारात शिक्षेचा उद्देश गुन्हेगाराला सुधारण्याचा असे. तिसऱ्या प्रकारात शिक्षा ही ज्या व्यक्तीविरुद्ध गुन्हा झाला आहे त्या व्यक्तीच्या मर्जीनुसार दिली जाई. चवथ्या प्रकारात शिक्षेचा उद्देश व्यक्तीची मानहानी करण्याकडे असे.

औरंगजेबाच्या काळात **'फतवाई आलमगिरी '** या ग्रंथाशिवाय औरंगजेबाने १६ जून १६७२ रोजी गुजरातच्या दिवाणाला जे फर्मान पाठविले त्यामध्ये तत्कालीन कायद्याचे सार आले आहे. वरील ग्रंथ औरंगजेबाने आपल्या दरबारातील धर्म पंडितांकडून तयार करून घेतला होता.

मोगलकालीन उमराव

औरंगजेबकालीन अमीर उमरावांचे स्थान : मोगल काळात जहागिरीची पद्धत ही वंशपरंपरेच्या तत्त्वावर आधारलेली नव्हती. बादशहा हा राज्यातील सर्व जमिनींचा मालक समजला जाई. राज्याचे **बैत उलमाल** नावाचे स्वतंत्र खाते होते. या खात्याकडे ज्या व्यक्ती वारस न ठेवता मृत होत त्यांची आणि त्याचप्रमाणे अमीर उमराव आणि राज्याचे इतर अधिकारी मरण पावत त्यांची मालमत्ता सोपविली जाई. या पद्धतीचे मुख्य कारण असे होते की, प्रत्येक अधिकाऱ्याकडे सरकारी देणे थकलेले असे. मोगल साम्राज्यात प्रत्येक अधिकारी हा **मनसबदार** असे. त्याचा पगार त्याच्या जहागिरीच्या उत्पन्नातून त्याला मिळे. हा पगार हा त्याने ठेवलेल्या स्वारांच्या संख्येशी मिळता आहे किंवा नाही याची नोंद त्या स्वारांची मोजदाद केल्याशिवाय होत नसे. हे काम व्यवस्थित असे शांततेच्या काळातच होई औरंगजेबाची कारकीर्द सतत युद्धात गेल्यामुळे कोणत्याही अधिकाऱ्याचे हिशेब पुरे होत नसत. अशा परिस्थितीत प्रत्येक अधिकाऱ्याच्या मृत्यूनंतर तात्पुरती का होईना त्याची मालमत्ता सरकारकडून जप्त केली जाई. असे करण्यामध्ये बादशहाचा उद्देश मृत व्यक्ती सरकारचे जे देणे असे ते वसूल व्हावे असा असे. औरंगजेबाचे याबाबत हुकूम अगदी स्पष्ट होते. परंतु जेव्हा एखाद्या मृत अधिकाऱ्याचा वारस, देण्याबद्दल जामीन राही त्यावेळी मालमत्ता जप्त करण्यात येत नसे.

या पद्धतीचे मूळ काही असले तरी या पद्धतीचे परिणाम मात्र विघातक होते. आपल्या पाठीमागे आपण आपल्या कुटुंबींय मंडळींकरिता काहीही ठेवू शकत नाही, या जाणिवेने सरदार मंडळी आपल्या हयातीत पैशाची उधळमाधळ करीत, आणि आपली संपत्ती नाचरंग, दारू आणि स्त्रिया यांवर खर्च करीत. साहजिकच मोगल साम्राज्यातील एक महत्त्वाचा वर्ग समाजाच्या दृष्टीने कुचकामी ठरला. या पद्धतीचा आणखी एक वाईट परिणाम झाला, आणि तो म्हणजे खासगी भांडवलाची साठवणूक होईनाशी झाली आणि समाजाच्या आर्थिक विकासाला त्यामुळे खो बसला. राजकीय दृष्टिकोनातून देखील या पद्धतीचे अनेक दुष्परिणाम झाले. बादशहाच्या सत्तेला पायबंद घालणारा आणि सार्वजनिक स्वातंत्र्याचे रक्षण करणारा असा सरदार वर्ग अतिशय कमकुवत बनला. लढाईच्या काळात अथवा वारसा हक्काचे युद्ध चालू असताना जिथे जय असेल तिकडे जाऊन मिळण्याची सरदार वर्गाची वृत्ती बनली. परिणामी सरदार वर्गाप्रमाणेच सरकारही दुबळे आणि अस्थिर बनले.

अमीर उमरावांवर मोगल बादशहांची वरील पद्धतीमुळे अतिशय हुकमत चाले. त्याशिवाय बादशहाच्या हातात उमरावांवर सत्ता चालविण्यासाठी आणखी एक शस्त्र होते. औरंगजेबाच्या उमरावांमध्ये पुष्कळसे उमराव पर्शिया, मध्य अशिया आणि तुर्कस्तान यामधून आलेले होते. हिंदुस्थानातील मुसलमानांपेक्षा ते श्रेष्ठ आहेत असे औरंगजेब मानीत असे. आपल्या देशातील बादशहाच्या संतापाला बळी पडल्यामुळे जेव्हा अशी सरदार मंडळी हिंदुस्थानात येत तेव्हा मोगल दरबारात त्यांना अतिशय मान दिला जाई. त्यांनी येथील बादशहाजवळ प्रामाणिक राहावे म्हणून त्यांना फार मोठी किंमत द्यावी लागे. आपली बायकांमुले हिंदुस्थानात आणण्याची त्यांच्यावर सक्ती करण्यात येई. त्या खेरीज त्यांना मोठ्या जागेवर कायम करण्यात येत नसे किंवा स्वतंत्र अधिकार दिले जात नसत. त्याशिवाय जेव्हा जेव्हा ते सुभ्यामध्ये

कामगिरीवर जात तेव्हा तेव्हा त्यांना दरबारात आपला मुलगा प्रतिनिधी म्हणून ठेवावा लागे.

मोगलकालीन राज्यकारभार

मुसलमानी राज्याचे स्वरूप हे धार्मिक नसून राजकीय होते आणि या राज्याचा मोगल सम्राट हा सर्वसत्ताधीश असे. त्याला राज्यावरून काढून टाकणे आणि दुसऱ्याला बसविणे हे अशक्य होते. त्याला सल्ला देण्यासाठी नियमित असे सल्लागार मंडळ नसे. बादशहाच्या खालोखाल राज्याचा मोठा अधिकारी म्हणजे **वजीर** हा असे, परंतु त्याचा कोणताही अधिकार बादशहावर चालत नसे. बादशहा हा जसा राजकीय बाबतीत प्रमुख असे त्याचप्रमाणे त्याच्याकडे धार्मिक बाबतीतही सर्वाधिकार असत. थोडक्यात मोगल राज्यकारभार हा एकतंत्री होता.

बादशहाचा दैनंदिन कार्यक्रम हा पुढीलप्रमाणे असे. सकाळचे **नमाज** पढून झाल्यानंतर बादशहा हा लष्करी अधिकाऱ्यांचे अर्ज ऐकून त्यावर निकाल देई. हे अर्ज राज्याचा **बक्षी** याजकडून सादर केले जात. त्यानंतर राजपुत्र, **सुभेदार** आणि इतर प्रांतिक अधिकारी यांच्या अर्जाची सुनावणी होई. याच वेळी राज्याचा **सद्र** हा विद्वान, **सय्यद, शेख** वगैरेंचे अर्ज सादर करी. यानंतर **मनसबदार** आपापले घोडदळ आणि हत्तींचे दळ यांची बादशहाला सलामी देत. या सर्व गोष्टी **दिवाण-ई-आम** यामध्ये चालत. यानंतर बादशहा **दिवाण-ई-खास**मधे जाई. येथे बादशहा राज्याच्या प्रमुख मंत्र्यांबरोबर चर्चा करी. या ठिकाणी राज्याचा खासगी स्वरूपाचा पत्रव्यवहार उरकला जाई. दुपारी तीन वाजता काही काम असल्यास छोटा दरबार भरत असे. संध्याकाळी पुन्हा एकदा **दिवाण-ई-खास**मध्ये बादशहा जाई. येथे बराचसा वेळ करमणुकीमध्ये जात असे. औरंगजेब मात्र यावेळी राज्यकारभाराचे काम पाही. राज्यकारभाराची खाती आणि त्यांचे अधिकारी पुढीलप्रमाणे असत—

१] कोषागार आणि महसूल [**दिवाण**]
२] बादशाही घर कारभार [**खान-ई-सामान**]
३] पगार आणि हिशेब [**बक्षी**]
४] मुलकी आणि फौजदारी कायदा [**काजी**]
५] धार्मिक देणगी आणि दानधर्म [**सद्र**]
६] सार्वजनिक नीतिमत्तेचे नियमन [**मुहतसिब**]

वरील ६ खात्यांशिवाय आणखी २ दुय्यम खाती होती. ती पुढीलप्रमाणे—

७] तोफखाना [**मिर आतीश** अथवा **दारोगा-ई-तोफखाना**]
८] बातमी आणि डाक [**डाक चौकीचा दारोगा**].

वजीर आणि त्याची कामे

मोगल साम्राज्यात **वजीर** म्हणजे मुख्यमंत्री. याच्याकडे कोणत्याही विशिष्ट खात्याचा ताबा नसे. बहुधा तो महसूल खात्याचा प्रमुख असे परंतु **दिवाण** म्हणून. याचा अर्थ सर्व **दिवाण वजिर** होते असा नाही. **वजिराच्या** हातामध्ये प्रथम जरी महसूल खाते होते, तरी कालांतराने इतर खात्यांचा ताबाही गेला. जेव्हा

बादशहा अकार्यक्षम असे तेव्हा **वजीराची** हुकमत फौजेवर देखील चाले. मोगल दरबारातील इतर अधिकाऱ्यांप्रमाणे **वजीराला** देखील मोहिमांवर जावे लागे. परंतु बादशहाजवळ सतत राहण्याची जरुरी असल्यामुळे त्याला फार काळ दूर राहता येत नसे. **वजीराकडे** महसुलासंबंधीचे सर्व कागदपत्र येत. पुष्कळ प्रसंगी तो बादशहाचा प्रतिनिधी म्हणून जाई. पैशाचे मोठे व्यवहार त्याच्या खात्यातर्फे होत असत.

बक्षी आणि त्याची कामे

मोगल दरबारातील प्रत्येक मुलकी अधिकारी हा **मनसबदार** असे. **बक्षी** ह्या अधिकाऱ्याचे काम या सर्व अधिकाऱ्यांची वेतन-देयके तयार करून मंजूर करण्याचे होते.

खान-ई-सामान

हा अधिकारी बादशहाच्या घरगुती खात्याचा प्रमुख असून तो बादशहा बरोबर प्रवासात आणि मोहिमात हजर असे. बादशहाचे सर्व खाजगी नोकर याच्या हुकमती खाली असून बादशहाचा दैनंदिन खर्च, अन्नधान्य, छावणीचे सामान इत्यादींवर त्याची देखरेख असे.

न्यायखाते

तात्त्विक दृष्टीने बादशहा हा राज्यातील प्रमुख न्यायाधीश असे. प्रत्यक्षात मात्र बादशहाकडे जे दावे येत ते अपिलातील असत. धार्मिक बाबतीतील दावे **काजीकडे** जात. त्याला मदत करण्यासाठी **मुफ्ती** नावाचा अधिकारी असे. **काजीचा** अधिकार आणि जबाबदारी ही फार मोठी असत, आणि त्यामुळे तेथे लाचलुचपतीला फार मोठा वाव असे. प्रत्येक गावी एक **काजी** असे आणि त्याची नेमणूक मुख्य **काजी**कडून केली जाई. पुष्कळ वेळा लाच घेऊन **काजींची** नेमणूक केली जाई. न्यायखात्यातील आणखी एक अधिकारी म्हणजे **सद्र** हा होय. बादशहा किंवा राजपुत्र राज्यातील जमिनी साधुसंत किंवा फकीर आणि विद्वान मंडळी यांना देत, त्यावर या अधिकाऱ्याची देखरेख असे. बादशहातर्फे दान देण्यासाठी म्हणून ह्याच्याकडे फार मोठी रक्कम दिली जाई. **काजी** प्रमाणेच हा अधिकारी देखील हातातील सत्तेचा दुरुपयोग करीत असे. साम्राज्याचा जो मुख्य **सद्र** असे. त्याला **सद्र-उस-सदूर, सद्र-इ-जहान** अथवा **सद्र-इ-कुल** असे म्हणत. प्रांतिक **सद्र** जे असत त्यांची नेमणूक राज्याचा मुख्य **सद्र** या अधिकाऱ्याकडून केली जात असे.

मुहतसिब आणि त्याची कामे

या अधिकाऱ्याचे मुख्य काम म्हणजे पैगंबराच्या आज्ञांचे पालन होत आहे किंवा नाही ते पाहणे आणि त्याने निषिद्ध मानलेल्या गोष्टी कोणी केल्यास त्यांचा कडक बंदोबस्त करणे. या गोष्टीत दारू पिणे, भांगेचे सेवन करणे, जुगार खेळणे वगैरेंचा समावेश होई. आपल्या कामाची अंमलबजावणी हा अधिकारी स्वतः जातीने करी. मोगल साम्राज्याच्या उत्तरार्धात या अधिकाऱ्याकडे वस्तूंच्या किंमती ठरविणे आणि बाजारात खरी वजने आणि मापे वापरली जात आहेत किंवा नाही याबाबत कसून पाहणी करण्याचे काम होते. (Sanads and Letters, p. 81, Mirat, Sup. 174.)

मोगलांच्या काळामधील साम्राज्यातील सुभ्यांचा कारभार

प्रांतिक कारभाराचे स्वरूप हे हुबेहूब मध्यवर्ती कारभारासारखेच होते. प्रांताचा मुख्य हा **सुभेदार** असून प्रांताचे इतर अधिकारी म्हणजे **दिवाण, बक्षी, काजी, सद्र, बुयुतात** आणि **मुहतसिब** हे होते. प्रांतिक कारभार हा प्रांताच्या राजधानीमध्ये केन्द्रीत केलेला असे. या कारभाराची व्याप्ती शहरे आणि भोवतालचा प्रदेश यापुरती मर्यादित होती असे विधान केल्यास काहीच हरकत नाही. त्यामुळे खेड्यापाड्यांची आबाळ होई. मोगल अधिकारी खेड्यात जाण्यास नाखुष असत. **सुभेदार** हा फौजदार आणि इतर दुय्यम अधिकारी यांच्यातर्फे खेड्यांबरोबर संपर्क ठेवीत असे. अर्थात् या संपर्काचे स्वरूप असावे तितके घनिष्ठ कधीच नसे आणि खेड्यातील प्रजाजन आणि प्रांतिक सरकारे यांच्यामधे कायमचा दुरावा असे.

सुभेदार आणि त्याची कामे

सुभेदाराला **नाजीम** असेही म्हणत. त्याची कामे म्हणजे प्रांतामध्ये सुव्यवस्था राखणे, महसुलाच्या वसुलीसाठी मदत करणे आणि त्याच्याकडे पाठविण्यात आलेल्या बादशाही फर्मानांची अंमलबजावणी करणे ही असत. त्याचे आणखी काम म्हणजे त्याच्या प्रांतातील मांडलिक राजांकडून खंडणी वसूल करून ती बादशहाकडे सुरक्षित पोहोचती करणे.

प्रांतिक दिवाण आणि त्याची कामे

प्रांतामधला दुसरा अधिकारी म्हणजे **दिवाण** हा होता. एका दृष्टीने **सुभदार** आणि **दिवाण** हे जणू काही प्रतिस्पर्धी होते असे म्हणण्यास काहीच हरकत नाही. दोघेही परस्परांच्या कारभारावर लक्ष ठेवून असत प्रांतिक **दिवाणाची** नेमणूक केंद्रीय **दिवाणाकडून** होत असे. त्याच्याच हुकमतीखाली प्रांतिक **दिवाणाला** काम करावे लागे आणि त्याच्या बरोबर तो सतत पत्रव्यवहार करी. महिन्यातून दोन वेळा **सुभ्यामधील** घडामोडी आणि त्याच्या जवळील जमाखर्चाचा आराखडा त्याला केंद्रिय **दिवाणाकडे** पाठवावा लागे. शेतकऱ्यांकडून जमिनीचा वसूल कसलीही गडबड न होता वसूल व्हावा यासाठी योग्य असे **करोरी** आणि **तहसीलदार** त्याने नेमावे अशी आज्ञा केंद्रीय **दिवाणा**कडून त्याला दिली जाई.

फौजदार आणि त्याची कामे

प्रांतामध्ये शांतता राखण्याचे कामी आणि महत्त्वाची सरकारी कामे पार पाडण्यासाठी **सुभेदारा**चा साहाय्यक म्हणून **फौजदार** हा अधिकारी असे. प्रांतामध्ये असे अनेक **फौजदार** असत. **फौजदारा**ची नेमणूक प्रांताचे जे अनेक भाग पाडले जात त्यावर केली जात असे. वर उल्लेखिल्याप्रमाणे त्याची मुख्य कामे म्हणजे त्याच्या ताब्यातील प्रदेशात होणारी बंडे मोडणे. चोरट्यांच्या टोळ्यांचा बंदोबस्त करणे, गुन्ह्यांची दखल घेणे आाणि महसूल अधिकारी किंवा न्यायाधीश यांना विरोध झाल्यास विरोधकांना जरब बसविणे, ही होती.

कोतवाल आणि त्याची कामे

कोतवाल हा प्रामुख्याने नागरी अधिकारी असून शहरातील पोलीस दलाचा तो प्रमुख असे. ज्यावेळी बादशहा किंवा प्रांतिक **सुभेदार** शहराला भेट देत किंवा शहरामधून कूच करीत तेव्हा त्या प्रसंगी

हजर राहणे हे त्याचे काम असे. त्याच्या ताब्यातील घोडेस्वार आणि पायदळ यांची संख्या शहराच्या बंदोबस्ताला योग्य ती असून त्यांची शस्त्रसामुग्री व्यवस्थित आहे याची दक्षता त्याला घ्यावी लागे. तुरुंगामधल्या कैद्यांची मोजदाद घेणे आणि त्यांच्यावरील आरोपांची छाननी करून निरपराध असलेल्या कैद्यांची सुटका करणे हे त्याचे काम असे. गुन्हेगार असलेल्या कैद्याकडून दंडाची रक्कम वसूल करण्यासाठी त्याला वरिष्ठांचे हुकूम घ्यावे लागत. ज्या कैद्यांना फाशीची शिक्षा झाली असेल त्यांच्या शिक्षेची अंमलबजावणीही त्याला करावी लागे. रात्रीच्या वेळी हाताखालील शिपायांना बरोबर घेऊन त्याला गावात गस्त घालावी लागे. शहरामध्ये होणाऱ्या सर्व गोष्टींची नोंद घेऊन त्या संबंधीचा अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांना सादर करणे हाही त्याच्या कामाचा एक भाग होता.

वकाई नवीस (बातमीपत्रे पाठवणारा) आणि त्याची कामे

देशामध्ये होणाऱ्या घडामोडींची माहिती मध्यवर्ती सरकारकडे पाठविणारे अधिकारी म्हणजे (१) **वकाई नवीस** (२) **सवानी निगार** (३) **कुफीया नवीस** आणि (४) **हरकारा**. यांपैकी पहिले तिघेजण लेखी अहवाल तयार करीत आणि **हरकारा** हा तोंडी बातम्यांची ने-आण करी. **वकाई नवीस** हा नियमितपणे बातमीपत्रे पाठवी तर **सवानी निगार** हा महत्त्वाच्या बाबतीत गुप्त अहवाल पाठवीत असे. त्याचे काम **वकाई नवीसवर** नजर ठेवण्याचेही असे.

वकाई नवीस हा लहान लहान **परगण्यांमध्ये** आपापल्या माणसांच्या नेमणुका करी. **सुभेदार, दिवाण, फौजदार, न्यायकचेरी** या ठिकाणी तो आपल्या तर्फे कारकून नेमीत असे. ते त्याला तेथे घडणाऱ्या गोष्टींची माहिती पुरवीत. जेव्हा जेव्हा **सुभेदार** दरबार भरवीत असे तेव्हा **वकाई नवीस** तिथे हजर राही. प्रत्येक आठवड्याला बादशहाकडे त्याला अहवाल पाठवावा लागे. याउलट **सवानी निगर** याला ते काम महिन्यातून आठ वेळा करावे लागे. बहुतेक **प्रांतात** एकाच माणसाची **बक्षी** आणि **वकाई नवीस** म्हणून नेमणूक होत असे. आपले अहवाल प्रांतिक **सुभेदाराला** दाखवून मगच त्याला ते दरबारात रवाना करावे लागत. **कुफीया नवीसा**ची तुलना हल्लीच्या भाषेत गुप्त हेराबरोबर करता येईल. आपले अहवाल तो गुप्तपणे सादर करीत असे. पुष्कळदा त्याचे नाव स्थानिक अधिकाऱ्यांना माहीत नसे. याउलट **हरकाऱ्याचे** काम दरबाराकडे बातमीपत्रे पाठविण्याचे असे. **प्रांतात** घडणाऱ्या घडामोडींची माहिती प्रथम तो **सुभेदारा**कडे सादर करी. त्याची माणसे देखील बहुतेक अधिकाऱ्यांच्या कार्यालयात असत. ही बातमीपत्रे **डाक चौकीचा दारोगा** या अधिकाऱ्याकडे पाठविली जात. तो ती न उघडता **वजीराकडे** पाठवी. प्रांतातील वरील चारही अधिकारी या अधिकाऱ्याच्या हाताखाली असत. औरंगजेब या खात्याला अतिशय महत्त्व देत असे.

मोगलकालीन सैन्य आणि आरमार

मोगल साम्राज्यातील लष्करी खात्याचा प्रमुख **बक्षा उल्-मलिक उर्फ मीर बक्षी** हा असे. औरंगजेबाच्या काळात सैन्याचा व्याप वाढल्यानंतर आणखी तीन दुय्यम **बक्षी** नेमण्यात आले. **बक्षी** या अधिकाऱ्याचे काम सैनिकांची भरती करणे, त्यांच्या हजेरीची मोजदाद घेऊन त्यांच्या पगाराचे वाटप करणे आणि लढाईची वेळ आल्यास वेगवेगळ्या सैन्याधिकाऱ्यांना सैन्याची आघाडी, मध्यविभाग, दोन्ही फळ्या, पिछाडी वगैरे ठिकाणी जागा नेमून देणे, आणि युद्ध सुरू झाल्यावर बादशहाच्या पुढे दररोज सकाळी प्रत्येक सेनापतीच्या हाताखाली असलेल्या सैनिकांची बरोबर गणती देणे. (Irvine, p. 38), **बक्षी** हा अधिकारी जरी

लष्करी खात्याचा अधिकारी असला, तरी तो सैन्याचा सर सेनापती मात्र नसे. सैन्याचे सेनापतित्व हे बादशहाकडे असे. हे सेनापतिपद तो स्वतःला **खलिफा** म्हणून घेत असल्यामुळे आपोआपच येई. अशा परिस्थितीत प्रत्येक प्रांतामधील सेना-प्रमुख, प्रत्येक **उमराव** आणि मांडलिकराजा यांचा स्वतःचा असा **बक्षी** असे.

प्रत्येक **उमरावाला** विशिष्ट संख्येने सैनिकांची भरती करण्याचा हुकूम दिला जाई, आणि त्या प्रमाणात बादशहाकडून त्यांना नक्त रक्कम मिळे. जरी प्रत्येक शिपायाला आपण कोणाकडून पगार घेत आहोत आणि कोणाच्या हाताखाली काम करीत आहोत, हे माहीत असले तरी प्रत्यक्षात त्याला बादशहाची कामगिरी पार पाडावी लागे आणि त्याच्या आज्ञांचे पालन करावे लागे. वरील सैनिकांशिवाय बादशहा आपल्या स्वतःच्या अशा खास सैनिकांची अधिक वेतनावर भरती करीत असे. या सैनिकांना **अहदी** असे म्हणत. प्रत्येक सेनाधिकाऱ्याचा दर्जा हा त्याच्या **मनसबी**नुसार ठरविला जात असे. ही **मनसब** दहापासून **(मिरदाह)** सात हजारापर्यंत दिली जाई. राजघराण्यातील व्यक्तींना दहा हजाराची **मनसब** देण्याचा प्रघात असे.

वीसपासून चारशे शिपायांच्या अधिकाऱ्यांना **मनसबदार** असे म्हणत. पाचशेपासून पंचवीसशे सैनिकांच्या अधिकाऱ्यांना **उमरा** असे म्हणत. तीन हजार अथवा अधिक सैनिकांच्या अधिकाऱ्यांना **उमरा—ई—आजम** अथवा **उमदत—उल्मुल्क** असे म्हणत.

कोणत्याही **मनसबदाराचा** पगार हा त्याच्या हाताखाली जे सैनिक असत **(जात)** त्यावर ठरविला जाई. उदा० **हजारी जात**. बहुतेक अधिकाऱ्यांच्या बाबतीत आणखी एका **मनसबीची** यामध्ये भर घातली जाई, ती म्हणजे घोडेस्वारांच्या संख्येची **(सवार).** यामुळे कोणत्याही **मनसबदाराचा** पूर्ण हुद्दा सांगावयाचा झाल्यास तो पुढीलप्रमाणे सांगितला जाई : **हजारी जात, दो-सद्-सवार**. त्यानुसार त्याच्या पगारात वाढ केली जाई. यावरून कदाचित असे वाटण्याची शक्यता आहे की, मोगल सैन्याची संख्या फार प्रचंड होती. वस्तुस्थिती मात्र तशी नव्हती. कोणताही अधिकारी त्याच्या **मनसबीप्रमाणे** आणि त्याला मिळणाऱ्या पगारानुसार स्वार ठेवीतच असे, असे नाही. ज्यावेळी एखादी स्वारी असे त्यावेळी **मनसबदारांना** त्यांच्या **मनसबीच्या** चवथा किंवा पाचवा हिस्सा स्वार आणावयास सांगत. औरंगजेबाच्या कारकिर्दीच्या अखेरच्या वर्षात मोगल सैन्याची संख्या सर्व अधिकाऱ्यांच्या **मनसबींच्या** जेमतेम दहावा हिस्सा होती, असे म्हटल्यास त्यात अतिशयोक्ती होणार नाही. इतके जरी असले तरी **मनसबदाराला** मिळणारा पगार हा, तो प्रत्यक्ष **बक्षीच्या** हजेरीसाठी उत्तम घोड्यावर स्वार झालेले जितके सैनिक आणत असे त्यावर अवलंबून असे. प्रत्येक घोड्याला डाग देण्याची पद्धत होती आणि सैनिकांची ज्यावेळी भरती केली जाई, तेव्हा त्याच्या शारीरिक वर्णनाचे एक पत्रक ठेवले जाई. याबाबत तपासणी **दारोगा** हा अधिकारी करीत असे. या तपासणीला '**दाग**' व '**तशीहा**' असे म्हणत.

बादशाही लष्कराचे एकंदर पाच विभाग असत. (१) पायदळ (२) घोडदळ (३) बंदुका आणि तोफा चालविणारे (४) गजदळ (५) आरमारी जहाजे **(नव्वार)**

(१) **पायदळ** : मोगल पायदळ हा मोगल लष्करातील उपेक्षित असा भाग होता. पायदळ हे **'आहशाम'** या नावाने ओळखले जाई. या पायदळाची तुलना आधुनिक पायदळाबरोबर केल्यास ते चुकीचे ठरेल. या पायदळात लष्करी शिपाई, सशस्त्र पोलीस, आणि पुष्कळ वेळा लहान-सहान शस्त्रे बाळगणारे

चाकर यांचा देखील समावेश होत असे. लढण्याच्या दृष्टीने त्यांची किंमत शून्य असे. **आहशाम** यांच्याशिवाय **'सेहबंदी'** म्हणून आणखी विशिष्ट सैनिकांची भरती केली जाई. त्यांचा दर्जा दुय्यम असून त्यांचे काम **तहसीलदाराला** जमीन महसूल वसूल करण्याच्याकामी मदत करण्याचे असे. कधी कधी त्यांचा उपयोग बंडखोरांविरुद्ध केला जाई.

(२) **घोडदळ :** घोडदळाचे दोन प्रकार असत. एक म्हणजे सरकारकडून भरती केले जाणारे घोडेस्वार. यांना **'बारगीर'** असे म्हणत. दुसरा प्रकार म्हणजे आपले स्वतःचे घोडे आणि शस्त्रे आणणारे सैनिक. त्यांना **'सिलाहदार'** असे म्हणत. यांचा पगार **बारगीरांपेक्षा** दुप्पट किंवा तिप्पट असे.

(३) **बंदुका आणि तोफा चालविणारे** : बंदुका चालविणारे हे सैन्यामध्ये पायदळी सैनिकांपासून वेगळे असत. सैन्याचा हा विभाग **मिरआतीश** अथवा **दारोगा-ई-तोफखाना** या अधिकाऱ्याच्या हाताखाली असे. मोगल सैन्याच्या तोफखाना विभागात युरोपियन गोलंदाजांची भरती करीत. तोफखान्याच्या प्रत्येक विभागाचा अधिकारी **हजारी** हा असे. तोफखान्याची विभागणी ही **जिनसी** आणि **दस्ती** या विभागात केली जाई. पहिल्या विभागात भारी तोफा असत तर दुसऱ्यात हलक्या. दोन्ही विभागांची दारूची कोठारे आणि **दारोगा** हे वेगळे असत.

(४) **गजदळ** : हत्तींचा उपयोग सेनाधिकारी करीत. कारण, हत्तीवर बसल्यामुळे त्यांना सबंध युद्धभूमीवर चाललेल्या घटना दिसून येत. गजदळाच्या माऱ्यामुळे पायदळ आणि घोडदळ यांचा धुव्वा उडत असे. हत्तींचा उपयोग किल्ल्यांचे दरवाजे धडका मारून पाडण्यासाठी केला जाई. कालांतराने युद्धामध्ये तोफखान्याचा जसजसा जास्त उपयोग होऊ लागला, त्यानुसार हत्तींचा उपयोग कमी झाला. त्यांचे सैन्यातले स्थान फक्त मालवाहू जनावर एवढेच राहिले.

(५) **आरमार** : हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर आरमारी संरक्षणाची जबाबदारी मोगलांनी जंजिऱ्याच्या सिद्दीवर टाकली. बंगालमध्ये मात्र त्यांनी तोफा असलेले स्वतंत्र आरमार तयार केले. या आरमाराकरिता आणि त्यावरील नाविकांवर होणाऱ्या खर्चासाठी त्यांनी चौदा लक्ष रुपयांचा महसूल तोडून दिला. आरमारी खात्याला **नव्वार** असे म्हणत आणि त्या खात्याच्या मुख्याला **दारोगा** असे म्हणत. जहाजाचा कप्तान मात्र लष्करी अधिकारी असे. त्याचप्रमाणे जहाज चालविणारे खलाशी सोडल्यास बाकीचे सर्व लष्करातील शिपाई असत. साहजिकच मोगलांच्या आरमारी युद्धात फिरंगी हेच प्रामुख्याने भाग घेत, आणि मोगल आरमारी सैनिक किनाऱ्यावर उतरल्यानंतर लढत असत. आरमारामध्ये **मीरबहर** नावाचा आणखी एक अधिकारी असे. याची नेमणूक नदीकाठी असलेल्या प्रत्येक महत्त्वाच्या बंदरावर होत असे. जेव्हा बादशहाला किंवा सैन्याला नदी पार करून जावयाची असेल त्यावेळी पूल तयार करण्यासाठी जहाजे पुरविण्याचे त्याचे काम असे.

मोगल फौजेची विभागणी ही बारीक तुकड्यांमध्ये कधीच होत नसे. प्रत्येक **मनसबदार** हा आपल्यापेक्षा दर्जेदार असलेल्या तुकडीत सामील होई आणि असे **मनसबदार** एखाद्या मोठ्या सेनापतीच्या तुकडीत सामील होत. अशा तऱ्हेने एक प्रचंड सेना-संभार तयार होत असे. (Irvine, p. 57) इतके जरी असले तरी मोगल सैन्यातील सैनिकांचा पगार कधीच वेळेवर दिला जात नसे. पुष्कळदा ही पगाराची बाकी तीन वर्षांची देखील राही. अशा वेळी हे सैनिक उधार उसनवार करून किंवा आपल्या जवळील साधनसामग्री विकून काल हरण करीत. जेव्हा सैन्यातील शिपाई मोहिमेसाठी बाहेर पडत, तेव्हा त्यांना

आपल्या कर्जाची फेड करूनच बाहेर पडावे लागे. पुष्कळदा पायाखालचे घोडे मेले असल्यास किंवा म्हातारे झाले असल्यास त्याबदली दुसऱ्या घोड्याचीही खरेदी करावी लागे. औरंगजेबाच्या काळात सैन्याची परिस्थिती अतिशय खालावली. सरकार दिवाळखोर झाले होते. सतत चाललेल्या लढायांमुळे तिजोरी रिती पडली होती, आणि वसुलाचा दहावा हिस्सा देखील जमा होत नव्हता. या परिस्थितीत उपाशी असलेल्या सैन्यांकडून जलद हालचाल किंवा अत्याग्रहाची मोहीम होणे जवळजवळ अशक्य होते. मोगल दरबारचा भपका आणि त्यांच्या राजवाड्यातील वैभव यांच्याशी तुलना करता मोगल सैन्य हे दुर्बळ आणि कुचकामी होते.

मोगल साम्राज्याची स्थापना जेव्हा झाली तेव्हा मोगल सैन्याची सारी शक्ती त्यांच्या घोडदळात होती. चिलखत घातलेले त्यांचे घोडेस्वार शत्रूवर शरवर्षाव करून किंवा भाला फेकून त्यांची दाणादाण उडवीत, आणि त्यांच्या झालेल्या गोंधळात त्यांच्या पिछाडीला जात. अशा तऱ्हेने शत्रूला वेढून ते त्याचा पूर्ण धुव्वा उडवीत. परंतु महाराष्ट्रात मोगलांचे पायदळ कुचकामी ठरले. त्यातच तोफखान्याची भर पडल्यामुळे मोगल सैन्याचे चापल्य आणि सहज हालचालही नाहीशी झाली. परिणामी हालचालीच्या बाबतीत अतिशय चपळ असलेल्या मराठा सैनिकांनी मोगल सैन्याचा साफ धुव्वा उडविला. कोणत्याही शासनाचे कसब हे त्या शासनाच्या युद्ध जिंकण्याच्या तयारीवर अवलंबून असते. महाराष्ट्रात मोगलांना लष्करीदृष्ट्या जी हार खावी लागली त्याचा अर्थ असा की, मोगल शासन हे राज्यव्यवस्था आपल्या काबूत ठेवण्यास असमर्थ ठरले.

मोगलांच्या काळातील शहरांचा कारभार

हल्लीच्या काळात खेडे हे जसे लोकवस्तीचा लहानात लहान असा घटक असे समजले जाते त्याचप्रमाणे मोगल काळात लोकवस्तीच्या अतिशय लहान अशा घटकाला **कोरिआ** असे म्हणत. या ठिकाणी बहुतेक करून वस्ती शेतकऱ्यांची असे. तेथे बाजारपेठ क्वचितच असे. या ठिकाणांना फिरते बाजार आठवड्यातून विशिष्ट दिवशी भेट देत असत.

लोकवस्तीचा यापेक्षा मोठा घटक म्हणजे **कसबा**. **कसबा** म्हणजे एखाद्या मोठ्या खेड्यासारखे किंवा छोट्या शहरासारखे असे. याठिकाणी कायम स्वरूपाची बाजारपेठ असे व तऱ्हतऱ्हेचे कारागीर आणि अतिशय दुय्यम सरकारी अधिकारी यांची घरे तेथे असत. तरी देखील तेथील निम्मे लोक शेतीवर जगत. ज्यावेळी **कसब्या**तील निम्म्यापेक्षा अधिक लोक शेती सोडून दुसरे उद्योगधंदे करू लागले आणि सरकारच्या अधिकाऱ्यांची नियमितपणे नियुक्ती **कसब्या**मध्ये होऊ लागली; त्यावेळी **कसब्यांना** शहराचा दर्जा प्राप्त झाला.

मोठ्या शहरांची विभागणी अनेक पेठात करण्यात येई. यांना **मुहल्ला** असे म्हणत. हे **मुहल्ले** स्वतः सिद्ध असून त्यांमधील वस्ती विशिष्ठ कारागिरांची किंवा जातीची असे. शहराबाहेर उपनगरे असून उपनगरात विशिष्ट जमात किंवा विशिष्ट **उमरावाचे** कुटुंब आणि त्यांचे अनुचर यांचीच वस्ती असे. यावरूनच **वकिलपुरा**, **मोगलपुरा**, **जयसिंगपुरा** आणि **जसवंतपुरा** अशी नावे पडली. लाहोर शहरात अशा छत्तीस वस्त्या होत्या. जुन्नर शहरात तर अशा बावन्न वस्त्या होत्या. म्हणून जुन्नरला **बाहनपेठजुन्नर** असे नाव पडले.

या शहरांचा कारभार विशिष्ट पद्धतीने चाले. शहरवासियांना लागणाऱ्या सुखसोयी आणि शहराचा

कारभार याबाबत फक्त पुढील गोष्टींची जबाबदारी म्हणजे, कर आणि करवसुली, बाजारपेठेचे नियमन, अंतर्गत सुरक्षितता आणि मुख्य राजमार्गांबाबत व्यवस्था ही मोगल सरकारच्या अधिकारकक्षेत मोडत असे. परंतु रस्ते आणि गल्ल्या दुरुस्त करणे, दिवे लावणे, पिण्याचे पाणी पुरविणे, स्वच्छता राखणे, आणि गरीब-गुरिबांना मदत देणे ही कामे खासगीतील असे मानण्यात येत असे, आणि ती पार पाडण्याची जबाबदारी नागरिकांवर व्यक्तिशः टाकण्यात येत असे.

परंतु यामुळे शहरामध्ये कसलाही गोंधळ अगर अव्यवस्था मात्र होत नसे. कारण, शहराच्या वेगवेगळ्या भागात जे नागारिक राहात ते विशिष्ट व्यवसायातीलच असत आणि शासन आणि नियमन यांच्या बाबतीत हे भाग किंवा **मुहल्ले** स्वयंपूर्ण असत. पुष्कळ वेळा एखाद्या **उमरावाच्या** अगर साधुपुरुषाच्या निवासस्थानाभोवती अशा तऱ्हेची वस्ती गोळा होई. मोगल साम्राज्याच्या उतरत्या काळात अशा तऱ्हेच्या वस्त्या तटबंदी घालून मजबूत करण्यात आल्या. जेव्हा जेव्हा आक्रमण होई किंवा दंगे-धोपे होत त्यावेळी अशा वस्त्यांत प्रकाशबंदी करण्यात येई. या पद्धतीला **कच्चाबंदी** असे म्हणत.

जेव्हा मोगल बादशहाकडून एखाद्या शहराची स्थापना होई त्यावेळी शहरातील राजमार्गांची आखणी करणे आणि सांडपाणी वाहून नेण्यासाठी भुयारी गटारांची बांधणी करणे या गोष्टींचा शहर स्थापनेच्या योजनेत समावेश केला जात असे. दिल्ली आणि इतर अनेक मोगल शहरात या भुयारी गटाराचे अवशेष—**गंडानाला**— अजून शिल्लक आहेत. पुष्कळ वेळा नदी अथवा तलावापासून दूरवर शहराची स्थापना होई. त्यावेळी वीट आणि चुना किंवा दगड आणि चुना यांच्या बांधलेल्या पक्या नळातून पिण्यासाठी पाणी आणले जाई. अशा नळांचे अवशेष औरंगाबाद आणि जयपूर येथे आहेत. परंतु सर्वसाधारणपणे प्रत्येक विभागात पिण्याच्या पाण्याची सोय ही पक्या बांधलेल्या विहिरीतूनच — **बावली-बाव** — करण्यात येत असे. तहानेल्या माणसाला पिण्याचे पाणी नाकारणे म्हणजे पाप आहे असे मानण्यात येत असे. शहरातील जे हमरस्ते असत ते फरसबंदी असत कारण त्याकाळात मुरुम आणि खडीचे पक्के रस्ते करणे हे ठाऊक नव्हते. हे काम सरकारी पैशातून केले जाई. शहरातील गल्ल्या आणि बोळ हे त्या सभोवार राहणारा एखादा श्रीमंत **उमराव** किंवा व्यापारी फरसबंदी करून घेई नाहीतर ते तसेच राहात असत. शहरामध्ये सरकारतर्फे जी दिवाबत्ती केली जाई ती राजवाड्याचे दरवाजे, पोलिस-कचेरी आणि इतर एखादी दुसरी सरकारी इमारत यावरच. याशिवाय थोड्याफार ठिकाणी तेलाचे दिवे लावले जात. त्याचप्रमाणे शहरातील **उमरावाचे** जे घर असे तेथेही दिवाबत्ती दिसे.

सांडपाणी वाहून नेण्यासाठी प्रत्येक घरमालकाला खासगी सोय करून घ्यावी लागे. सर्वसाधारणपणे रात्रीच्या वेळी सांडपाणी हे नजीकच्या उघड्या गटारात अथवा रस्त्यावर ओतले जाई. संडासातील मैला हा दर आठवड्याला **मेहतर** लोक वाहून नेत असत. काही काही शहरांमध्ये खोल खड्डे खणून त्यामध्ये सांडपाणी आणि मैला यांचा निचरा करण्यात येई. साहजिकच तो उपसण्याची जरूर भासत नसे. थोड्या फार मोकळ्या जागा आणि नदीकाठ यांमध्ये बागबागायत होत असे. याठिकाणी लोकांना मज्जाव नसे. परंतु राजेरजवाडे आणि **अमीर उमराव** यांच्या हवेल्यांसमोर असलेल्या बागबगीच्यात सर्वसामान्य लोकांना प्रवेश नसे. प्रत्येक शहरामध्ये एखाद्या साधुसंताचे अगर अवलियाचे **थडगे** अगर **कबर** असे. त्याच्या अवतीभोवती पुष्कळदा मोठमोठ्या **राया** असत. त्यामध्ये सामान्यांना मज्जाव नसे.

धर्मार्थ दवाखाने, धर्मादाय आणि प्राथमिक शिक्षण यांची कोणतीही सोय सरकारतर्फे केली जात नसे. त्यासाठी खासगी प्रयत्नांवर जबाबदारी टाकली जाई. या कामामध्ये खासगी व्यक्ती किंवा संस्था पुढे

न आल्याची अथवा कमी पडल्याची उदाहरणे फारच थोडी आहेत.

शहरांमधील करपद्धती

मोगल काळामध्ये घरपट्टी, पाणीपट्टी किंवा संडासपट्टी आकारली जात नसे. याचे कारण त्याबाबतच्या कोणत्याच सोयी सरकार उपलब्ध करून देत नसे. घरपट्टी (**खानशुमारी**) किंवा **डोईपट्टी** ही लादली गेल्यास मोगल बादशहा ती बेकायदे शीर (**आदबाब**) ठरवीत. त्याचप्रमाणे निर्यात किंवा आयात होणाऱ्या मालावर (**राहदारी आणि चुगी**) जकात ही देखील पुष्कळदा बेकायदा म्हणून जाहीर करीत. तरीदेखील **जहागिरदार** आणि स्थानिक अधिकारी आपापल्या अधिकारात बेकायदा ठरविलेले कर किंवा जकाती गोळा करीत.

बाजारामध्ये वस्तूंच्या विक्रीसाठी जी लहान-लहान दुकाने उभी केली जात त्यावर मात्र बाजारपट्टी (**ताह बाजारी**) आकारली जाई. परंतु त्यापासून होणारा वसूल मात्र शहरी व्यवस्थेकडे न जाता सरकारात जमा होई. शहरी शासनाला अधिकाधिक उत्पन्न मिळवून देणारे कर म्हणजे धान्यबाजार, मीठबाजार आणि कापडबाजार. यांमधील हे कर गोळा करण्याची जबाबदारी एखाद्या सरकारी अधिकाऱ्यावर सोपविली जाई. त्याला फार मोठे अधिकार दिले जात. त्याला **गंजचाक्रोरी** (Krori of the ganj) असा हुद्दा असे.

शहरामधील वजने आणि मापे यांवर देखरेख करणे ही **मुहतसिब** या अधिकाऱ्याची जबाबदारी असे. त्याशिवाय त्याचे काम इस्लाम धर्माने मना केलेल्या गोष्टी म्हणजे दारू आणि भांग यांची विक्री आणि सेवन, जुगार वगैरेंचे उल्लंघन लोकांकडून होत नाही हे पाहण्याचे होते. औरंगजेबानंतरच्या काळात या जागेचे महत्त्व कमी होत गेले आणि या अधिकाऱ्याची जबाबदारी **कोतवालावर** पडली.

ज्यावेळी बादशहा किंवा एखादा ज्येष्ठ **सुभेदार** राजधानीत नसे त्यावेळी राजधानीवर **कोतवालाचाच** अंमल चालत असे. एखादे वेळी बादशहा हा आळशी किंवा जुलमी असल्यास राजधानीतील प्रजाजन हे **कोतवालाच्या** जुलमी कारभाराला नेहमी दबून राहात असत. लहानसहान फौजदारी खटले कोतवालापुढे चालत. त्यावर तडकाफडकी निकाल देण्याचे अधिकारही त्याला असत. **कोतवालांच्या** या जुलमी कारभारामुळे **कोतवाल** म्हणजे क्रूर हुकूमशहा असाच अर्थ हिंदुस्थानाबाहेरील मुसलमानी देशात रूढ झाला. दगडासारखे हृदय आणि गुन्हेगाराचे हालहाल करण्यात असलेल्या वाकबगिरीबद्दल कुप्रसिद्ध असलेल्या हबशी अधिकाऱ्यांचीच कोतवालीच्या जागी नेमणूक करण्यात येई. शहरातील गुप्तहेर खात्याचा तो प्रमुख असल्याने त्याच्यावर बादशहाची मर्जी असे.

मोगलकालीन शिक्षणपद्धती

मोगल काळात शिक्षण हे धर्माचे एक अंग समजले जाई. शिक्षणासाठी सरकारकडून जो पैसा खर्च केला जाई त्याची सोय धर्मादायासाठी केल्या जाणाऱ्या खर्चातून केली जात असे. हे खाते राज्याचा **सद्र–उस–सदुर** या अधिकाऱ्याकडे सोपविले जाई. राज्यामधील बिगर मुसलमान प्रजाजन ह्यांच्यावर धर्मादायातून खर्च केला जात नसे. औरंगजेबाचे या बाबतीतील एक **फर्मान** मार्गदर्शक ठरते. या **फर्माना**प्रमाणे त्याने गुजरातच्या दिवाणाला पुढील हुकूम पाठविला "प्रत्येक वर्षी तुम्ही शिक्षकांच्या नेमणुका करून त्यांच्यावर खर्च सरकारी खजिन्यातून करावा. प्रांताच्या **सद्रने** शिफारस केलेल्या विद्यार्थ्यांना तुम्ही

शिष्यवृत्त्या द्याव्यात. यासाठी लागणारा खर्च सरकारी खजिन्यातूनच करावा." वरील फर्मानानुसार तीन **मौलवींची** शिक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली आणि ४५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वेतन देण्यात आले. (Mirat—i—Ahmadi, i—258)

ज्याठिकाणी शिक्षण दिले जाई त्या संस्थांना जर का खासगी देणग्या मिळाल्या नाहीत तर त्यांना सरकार भरपूर अर्थसाहाय्य करीत असे. अशा संस्थांचे काम विद्यार्थ्यांना धर्मशास्त्र शिकविण्याचे आणि सर्वसामान्य शिक्षण देण्याचे होते. त्याचप्रमाणे विद्वान मंडळी असलेल्या कुटुंबांना सरकारकडून आर्थिक साहाय्य मिळत असे. अशी घराणी हिंदुस्थानात अनेक ठिकाणी विखुरलेली होती.

शिक्षणाच्या संदर्भात मोगल दरबारातील कवींचा उल्लेख करणे अवश्य आहे. हे कवी पर्शियन असून त्यांचे जन्मस्थान इराण हे होते. बादशहाकडून त्यांना भरपूर बिदागी आणि काव्यनिर्मितीबद्दल बक्षिसी दिली जाई. अशा प्रकारची काव्यनिर्मिती ही अनेक प्रसंगी होई. उदा. बादशहाला विजय मिळाल्यास, विवाहप्रसंगी, राज्याभिषेकाच्या वेळी, जन्माच्या वेळी, दरबारातील उत्सवांच्या वेळी वगैरे. केवळ एका विशिष्टप्रसंगी चार ओळींचे काव्य लिहिल्याबद्दल एका कवीला दहा हजारांची थैली मिळाल्याचा उल्लेख आहे. (Tazkira-i-Sarkhush).

सतराव्या शतकातील ही कवींची घराणी दरबारातील **हकिमां**च्या घराण्याबरोबर विवाह संबंधाने जोडली गेली होती. हे **हकीम** देखील इराण मधलेच पर्शियन होते. इराणच्या शहाच्या एका पळून आलेल्या **हकिमाचे** दिल्ली दरबारात स्वागत झाल्याचा उल्लेख आहे. (Abdul Hamid's Padishahnamah, ii. 367-368; Alamgirnamah, 45).

मोगल काळातील सरकारच्या मालकीचे कारखाने आणि उद्योगधंदे :

१६ व्या आणि १७ व्या शतकातला हिंदुस्थान हा आर्थिकदृष्ट्या अतिशय मागासलेला असल्यामुळे सरकारला लागणाऱ्या सर्व वस्तूंची निर्मिती सरकारलाच करावी लागे. औरंगजेबाच्या थोड्या अगोदरच्या काळातले वर्णन आपल्याला 'अबुलफजल' याच्याकडून मिळते. औरंगजेबाच्या काळातील परिस्थितीचे वर्णन आपल्याला बर्निअरच्या प्रवासवर्णनात सापडते. या उद्योगधंद्यांचे वर्णन फारशी लेखक **कारखाना** या शब्दात करतात. याशिवाय कारखान्यांच्या या यादीत आपल्याला आणखी दोन गोष्टींचा उल्लेख मिळतो. १) **जनावरे**, खाद्य आणि पेय वस्तू आणि सरकारने आपल्या ताब्यात घेऊन राजवाड्यामध्ये साठवलेला तयार माल यांची **गुदामे** आणि २) **कच्च्या** मालापासून सरकारी उपयोगासाठी ज्याठिकाणी पक्या मालाची उत्पत्ती होते असे **कारखाने**.

ह्याठिकाणी आपल्याला राजवाड्यामध्ये असलेल्या, परंतु वर उल्लेखिलेली गुदामे आणि कारखाने यांच्याशी संबंधित असलेल्या खजिन्याबद्दल थोडे स्पष्टीकरण देणे अवश्य आहे. अकबराचा चरित्रकार लिहितो की, अकबराच्या उत्पन्नाची रक्कम एवढी मोठी आहे की, द्रव्याचा संचय करण्यासाठी एकंदर बारा खजिने आहेत. यांपैकी नऊ वेगवेगळ्या प्रकारांनी जी पैशाची आवक होते त्यासाठी आहेत आणि उरलेले तीन मौल्यवान धातू, सोने आणि जडावांच्या वस्तूंसाठी आहेत. शाकिरखान नावाचा इतिहासकार बारा खजिन्यांची नावे पुढीलप्रमाणे देतो. (१) **आंदरुन—ई—महल** : अंतःपुरातील खजिना (२) **बकाया** : थकबाकी ठेवण्यासाठी खजिना (३) **जेब—ई—खास** : बादशहाला वरखर्चासाठी लागणाऱ्या पैशासाठी

खजिना (४) **जेब–ई–फैज** : धर्मादायासाठी खजिना (५) **खजिना–ई–रिकाब** : स्वारीच्या वेळी बादशहाबरोबर नेत असे तो खजिना (६, ७) **खजिना-ई-नजर व पेशकश** : खंडणी, भेटी यांसाठी किंवा बादशहावर अरिष्ट येऊ नये म्हणून प्रजाजनांनी दिलेल्या देणग्यांसाठी खजिना (८) **खजिना–ई–सर्फ–ई–खास** : बादशहाच्या वैयक्तिक खर्चासाठी खजिना (९) **बैत–उल–मान** : वारस नसलेल्या व्यक्तींची मालमत्ता ठेवण्यासाठी खजिना. याशिवाय आणखी तीन खजिने होते. त्यांचा उल्लेख वर आलेला आहे.

जवाबीत–ई–आलमगिरी या ग्रंथात एकंदर चोवीस खजिन्यांचा उल्लेख आहे. यामध्ये राज्याच्या मोठ्या तिजोरीचा समावेश असून तिचा उल्लेख **खजिना-ई-आमरा** असा करतात. **मिरात–ई–अहमदी** या ग्रंथात प्रत्येक प्रांतामध्ये चार खजिने असल्याचा उल्लेख सापडतो (१) **खजिना–ई–आमरा** यामध्ये बादशहाच्या जमिनीपासून येणारे उत्पन्न, खंडणी आणि हिंदूंच्या सामानावर लादलेल्या जकातीपासून मिळणारे उत्पन्न याचा भरणा होई. (२) **खजिना–ई–बकाया** यामध्ये तकावीसाठी असलेल्या भागाचा भरणा होत असे. (३) **खजिना–ई–सदका** यांमध्ये मुसलमानांपासून गोळा करण्यात येत असलेल्या अडीच टक्के कराचा भरणा होत असे आणि (४) **खजिना–ई–जझिया** यामध्ये बिगर मुसलमानांपासून गोळा करण्यात येत असलेल्या डोईपट्टीचा भरणा होत असे.

अशा तऱ्हेने राज्यात एकंदर बारा खजिने असत. त्याशिवाय **शाकिरखान** छत्तीस **कारखान्यांचा** उल्लेख करतो. **आईन–ई–अकबरी** यामध्येही छत्तीस **कारखान्यांचा** उल्लेख आहे. फक्त **जवाबति–ई–आलमगिरी** या ग्रंथात आपल्याला ६९ **कारखान्यां**चा उल्लेख आढळतो. या **कारखान्यांचे** अतिशय सुंदर असे वर्णन आपल्याला अनेक ग्रंथांत आढळते. या **कारखान्यांची** नावे पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) जनावरे : (१) पागा अथवा **अस्ताबलखाना (२) फिलखाना (३) गावखाना (४) शुतरखाना (५) अझरखाना (६) आहुखाना (७) शिकारखाना (८) चिताखाना (९) कुशखाना.**

(ब) गुदामे : (१०) कुरखाना (११) सिलाहखाना (१२) पालकीखाना (१३) चौडोलखाना (१४) रथखाना (१५) तख्त–ई–खाना (१६) शमा आणि **चिराग (१७) मशाल (१८) किताबखाना (१९) चिनीखाना (२०) खिलातखाना**

(क) कारखाने आणि **गुदामे : (२१) फराशखाना (२२) तोषकखाना (२३) झीनखाना (२४) किर–किराकी–खाना (२५) बिस्तारखाना** आणि **पेशखाना (२६) रखवत (२७) खवासेस** किंवा **बारिशखाना (२८) झरगरखाना (२९) आहंगरखाना (३०) जवाहीरखाना (३१) तेलाआलात (३२) नुक्राआलात (३३) मुरस्साआलात (३४) तांब्याची भांडी** आणि **कढया** तयार करण्याचा **कारखाना (३५) झरदोझखाना (३६) दंडान–ई–फिल (३७) खतमबंदीखाना (३८) खुश–बु–खाना (३९) गुलाबखाना (४०) रौघोन (४१) दारडल सर्ब (४२) नक्काशखाना** किंवा **तस्वीरखाना (४३) दवाईखाना** किंवा **शफाखाना (४४) शाली** तयार करण्याचा **कारखाना (४५) चिराबाफीखाना (४६) इल्कबंदीखाना (४७) कोठा** किंवा **कुठी–ई–पार्चा**

(ड) शासकीय कचेऱ्या किंवा विभाग आणि दरबारी राहाणी : (४८) नक्कारखाना (४९) तोफखाना (५०) इमारतखाना (५१) दफ्तर खाना (५२) जा-नमाजखाना किंवा **तसबीहखाना (५३) कोठाई बैत-उल-माल (५४) ईबतीयाखाना (५५) बुलधरखाना** किंवा **लंघरखाना (५६) तालीमखाना (५७) किराया** व

आजुरा (५८) चौघान चौपर वगैरे (५९) बेवाखाना

(इ) बादशहाच्या खाजगीकडील सेवा विभाग : (६०) मतबख किंवा **बवर्चीखाना (६१) आबदारखाना (६२) मेवाखाना (६३) भांडाखाना (६४) सहतखाना (६५) खर–मुहरा–खाना (६६) चर्खीखाना (६७) मजमुआखाना (६८) अंबारखाना (६९) झरयात** किंवा **जिन्सखाना (७०) नाटकखाना.**

वरील सर्व **कारखान्यांत** चालणारे काम १७ व्या शतकात फ्रेंच प्रवासी बर्निअर याने त्याच्या राजधानीच्या भेटीच्या वेळी पाहिले. तो म्हणतो, "किल्ल्यामध्ये अनेक ठिकाणी मोठमोठ्या खोल्या असून त्यामध्ये कारागिरांसाठी **कारखाने** आहेत. या **कारखान्यांत** सकाळच्या प्रहरी कारागीर हजर होतात आणि सर्व दिवसभर काम करून संध्याकाळी आपल्या घरी परततात. कारागिराचा मुलगा आपल्या बापाच्याच धंद्यात शिरतो. आपल्या धंद्याबाहेर कोणीही विवाह करीत नाही. ही पद्धत मुसलमान आणि हिंदू सारख्याच कर्मठपणे पाळतात." (Bernier, 259)

सुभ्यामध्ये पुढील ठिकाणी **कारखाने** होते : लाहोर, आग्रा, फत्तेपूर, अहमदाबाद, आणि बुऱ्हाणपूर. प्रांताचे **सुभेदार** हे तऱ्हतऱ्हेच्या कारागिरांना आसरा देत, आणि ते तयार करीत असलेल्या वस्तू बादशहाला पुरवीत. प्रत्येक प्रांतामध्ये बादशहाचे अधिकारी कोणत्या वस्तूंचे उत्पादन होत आहे त्यांच्यावर नजर ठेऊन असत आणि कोणत्या वस्तूंचे उत्पादन करता येईल याचीही चाचणी घेत. (Storia, ii 431).

हिंदुस्थानातील वेगवेगळ्या उद्योगधंद्यांची राजाश्रयाखाली कशी वाढ झाली त्याचे अतिशय चांगले वर्णन अबुलफजल याने केलेले आहे. तो म्हणतो, "बादशहा तऱ्हतऱ्हेच्या उत्पादनांकडे जातीने लक्ष देतात. लोकांना धंदे शिक्षण देण्यासाठी कसबी कारागीर सर्व ठिकाणी स्थायिक झालेले आहेत. अनेक शहरांमध्ये जे **कारखाने** आहेत त्यातून निर्माण होणाऱ्या वस्तूंचा दर्जा आणि प्रकार हे पाहून प्रवासी आश्चर्याने चकित होतात. इतर देशांत होणाऱ्या सर्व वस्तूंचे उत्पादन बादशाही **कारखान्यात** होते." (Ain. i. 87-88) 'अबुलफजल' याने केलेले हे वर्णन पुढील काळालाही लागू पडणारे आहे यात काहीच शंका नाही. गोवळकोंडा राज्यातील मसुलीपट्टम या शहरातील कारागिरांची कापडावर नक्षीची छपाई करण्यात इतकी वाकबगारी होती की, औरंगजेब दक्षिणेचा सुभेदार असताना त्याने या कामगारांना दिल्ली अथवा आग्रा येथील सरकारी कारखान्यात घेऊन जाण्याविषयी अनेकदा प्रस्ताव मांडले.

अशी जरी परिस्थिती असली तरी कामगारांची स्थिती ही चांगली नव्हती. इतकेच नव्हे तर देशाच्या अर्थिक विकासाला ती विघातक होती. खुद्द मोगलांच्या राजधानीत खाजगी **कारखाने** नव्हते. त्याचप्रमाणे कामगारांनी स्वतःच्या भांडवलावर चालविलेले उद्योगधंदेही नव्हते. याबाबत बर्निअर म्हणतो "जर का कारागिरांना आणि कारखानदारांना उत्तेजन दिले तर उत्तम कलांचा विकास होईल. परंतु प्रत्यक्षात परिस्थिती अशी आहे की, या कामगारांना अतिशय तुच्छतेने वागविण्यात येते आणि त्यांना पुरेसा पगारही दिला जात नाही. एखाद्या अमीराला किंवा मनसबदाराला एखादी वस्तू पाहिजे असल्यास तो कारागिराला बोलावून घेऊन सक्तीने त्याच्याकडून काम करवून घेतो. काम पुरे झाल्यावर कामाप्रमाणे मोबदला न देता त्याच्या इच्छेला येईल तसा मोबदला तो त्या गरीब कामगाराला देतो. आपल्याला चाबकाचे फटकारे वेतनादाखल मिळाले नाहीत यातच कारागीर समाधान मानतो..... अशा परिस्थितीत कारागीर अथवा **कारखानदार** यांच्यामध्ये चढाओढ निर्माण होईल अशी अपेक्षा करणेच चुकीचे होते. साहजिकच बादशहाच्या किंवा एखाद्या बलाढ्य **उमरावाच्या** आश्रयाने राहणारा कारागीर आपल्या धंद्यात पुढे येण्याची

शक्यता होती (Bernier, 255-256)."

मोगलकालीन अधिकृत पत्रव्यवहाराची आणि पत्रव्यवहार मोहोरबंद करण्याची पद्धती : मोगल बादशहांचा सरकारी पत्रव्यवहारासाठी एक स्वतंत्र विभाग अथवा खाते असे. या विभागाला **दार-उल-ईन्शा** असे म्हणत. यामध्ये असलेले जे कागद आज उपलब्ध आहेत त्यांचा मोगल इतिहासाच्या अभ्यासाचे कामी फार मोठा उपयोग होतो. ही पत्रे जतन करण्याचे काम बादशहाच्यातर्फे किंवा सरकारी दप्तर खान्यातर्फे झालेले नसून त्याबद्दलचे श्रेय त्याकाळी ही पत्रे लिहिणारांचा जो वर्ग होता त्यालाच दिले पाहिजे. यांना **मुनशी** असे म्हणत. आपल्या धन्यासाठी लिहिलेल्या पत्रांची नक्कल ते जतन करून ठेवीत आणि नंतर ती एकत्रित करून प्रसारित करीत. त्याकाळी छपाईची कला अवगत नसल्याने असे संकलन ज्यांच्या हाती येई ते हे संकलन वाचून त्याच्या नकला करून घेत. अशा संकलनातील अनेक पत्रे, पत्र लेखनाचा उत्कृष्ट नमुना म्हणून पाठ्य-पुस्तकात घातली जात. आज अशी जी पत्रे उपलब्ध आहेत ती ज्या मूळ संकलनातून घेतलेली आहेत त्या संकलनाचा अनेकदा सुगावा लागत नाही.

दरबारी **मुनशी** हे जे संकलन करीत त्याचा उद्देश ऐतिहासिक नसून वाङ्मयीन असे. ही पत्रे लिहिताना आपण पुढील पिढीसाठी ऐतिहासिक पुरावा ठेवीत आहोत ही जाणीव त्यांना कधीही नसे. त्यांचा उद्देश उत्तमपैकी लिहिण्याची शैली कशी असावी याचे उदाहरण समकालीन विद्यार्थ्यांपुढे ठेवण्याचा असे.

सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात मोगल दरबारामध्ये हिंदू **मुनशींचाच** भरणा अधिक होता. बहुतेक **उमरावांचे** आणि राजपुत्रांचे देखील **मुनशी** हे हिंदू होते. हे हिंदू **मुनशी** आणि त्यांच्याबरोबर काम करणारे मुसलमान **मुनशी** यांच्यामध्ये कालांतराने आत्मीयता निर्माण झाली. विशेषतः दोघांमध्येही **सुफी** तत्त्वज्ञानाची आवड असल्यामुळे या आत्मीयतेला अधिकच बळकटी आली. पुष्कळदा या **मुनशींनी** संकलन केलेल्या पत्रांच्या अखेरीला त्यांनी स्वतः रचलेल्या **सुफी** तत्त्वज्ञानाबाबतच्या अथवा त्यांच्या आवडत्या कवींच्या रचना असत.

हा जो अधिकृत पत्रव्यवहार असे, त्या पत्रव्यवहाराची एक विशिष्ट लेखनशैली असे. बादशहाकडून जाणारी पत्रे आणि त्याच्याकडे येणारे अर्ज आणि इतर पत्रव्यवहार यामधील भाषा ही अतिशय अलंकृत, पुष्कळवेळा कंटाळवाणी, एखाद्या कायदेशीर लेखी कराराप्रमाणे अतिरेकी आणि उपमा व उत्प्रेक्षा यांनी भरलेली असे. विशेषतः प्रत्येक राजपुत्र आणि अधिकारी यांच्या पदव्या पत्राच्या सुरुवातीला द्याव्याच लागत. पुष्कळदा ह्या पदव्या सहा-सहा ओळी इतक्या लांबलचक असत. त्याचप्रमाणे पत्राची सुरुवात आणि शेवट ही विशिष्ट मसुद्यानुसार असे. अशा तऱ्हेच्या लांबलचक पत्रांची नक्कल ही जेव्हा पुढील काळात झाली, तेव्हा त्यांनी ही लांबणावळ गाळून टाकली आणि पत्राच्या सुरुवातीला फक्त **'मी-रसानद-के'** म्हणजे माझी अशी अर्जी आहे असा मजकूर ठेवला.

सतराव्या शतकात प्रत्येक अधिकाऱ्याला कोणत्या पदवीने संबोधावयाचे ते ठरलेले असे आणि त्याची नोंद अधिकृत नियमावलीत (**दस्तुर-उल्-अम्ल**) झालेली असे. बादशहा आणि राजपुत्र यांचा उल्लेख त्यांच्या हयातीत **खलिफा** असा केला जाई. कारण राजवंशातील माणसे ही परमेश्वराची सावली आहेत असे समजले जात असे. बादशहा मेल्यावर त्याचा उल्लेख विशिष्ट नावाने करीत. शहाजहानला **आलाहजरत फिरदौसआश्यानी** आणि औरंगजेबाला **खुल्दमकान** या नावाने उल्लेखीत. याचा अर्थ स्वर्गामध्ये स्थान पावलेले असा होतो. याठिकाणी एक गोष्ट नमूद करण्याजोगी आहे आणि ती म्हणजे

बंडखोर किंवा बादशहाच्या मर्जीत नसलेल्या व्यक्तीचा उल्लेख त्या व्यक्तीला अपमानास्पद अशा नावाने करीत. उदा० राजपुत्र अकबराचा उल्लेख दरबारात आणि अधिकृत कागदपत्रांत बंडखोर **(बाघी)** आणि **अकबर-ई-आबतर** (सर्वश्रेष्ठ आणि नीच) असा केला जाई. बादशहा किंवा राजपुत्र यांच्याकडून जाणारे किंवा त्यांना पाठविले जाणारे पत्र हे नेहमी सहीशिवाय असे. प्रत्येक पत्रावर हे **शिक्कामोर्तब** केले जाई.

जेव्हा एखादे **फर्मान** बादशहाकडून काढले जाई तेव्हा **फर्मानाच्या** वरच्या बाजूला बादशहाचा **शिक्का** असे तर खालच्या बाजूला **वजीराचा शिक्का** असे. जेव्हा जमिनीबाबतचे करारपत्र केले जाई, त्याचप्रमाणे तह केला जाई किंवा एखाद्या व्यक्तीला खास शिफारस पत्र दिले जाई त्या वेळी अशा कागदपत्रावर बादशहाच्या पंजाचा **शिक्का** गुलालामध्ये बुडवून त्या कागदावर उठविला जाई. जेव्हा एखादे पत्र अथवा हुकूम बादशहा किंवा राजपुत्र यांच्याकडून संमत केले जाई तेव्हा बादशहा किंवा राजपुत्र मजकुराच्या शेवटच्या ओळीतील शेवटच्या शब्दानंतर **'सद'** असे लिहीत. पुष्कळदा पत्राच्या वरच्या बाजूला बादशहा स्वतः आपल्या हाताने काही मजकूर लिही. हा मजकूर म्हणजे एखादे सर्वसामान्य विधान किंवा बादशाही हुकूम कसोशीने पाळण्याचा आदेश याबाबत असे. मुख्य मजकुराशी त्याचा काहीही संबंध नसे. बादशहाने अशा तऱ्हेने लिहिलेला मजकूर **आदाब-ई-आलमगिरी** या ग्रंथात आपल्याला स्वतंत्रपणे आढळतो.

अधिकृत पत्रामध्ये मजकुरात बादशहाचे नाव आले असल्यास ते तेथून काढून कागदाच्या वरच्या बाजूला बादशहाचा आब राखण्यासाठी लिहीत असत. मजकुरातील ती जागा मोकळी ठेवीत. जेव्हा एखादे अधिकृत पत्र ज्याचे त्याला मिळे, तेव्हा त्याचा चिटणीस त्या पत्रावर पत्र आल्याची तारीख आणि ते वाचल्याची तारीख लिहून पाठीमागील बाजूस **"अर्ज दिदा शुद"** अशी अक्षरे लिही. ज्यावेळेला एखाद्या वजीराच्या अथवा बादशहाच्या मर्जीतील माणसाच्या ओळखीमुळे एखाद्याला जमीन अथवा इतर काही बादशहाच्या मर्जीदाखल दिले जाई त्यावेळी अशा **फर्मानाच्या** पाठीमागे त्या व्यक्तीचे नाव **रेसालतुन** या शब्दाने दर्शविले जाई. ज्यावेळेला असे एखादे फर्मान येई तेव्हा ते ज्याच्या नावे असे त्याला ते घेण्यासाठी अनेक मैल सामोरे जावे लागे. मोगलकाळात दक्षिणेतील मोगलांच्या मांडलिकांनी अशी **फर्माने** घेण्यासाठी **फर्मानबारी** नाव असलेली एक इमारतच राजधानीपासून सहा ते आठ मैलांवर बांधल्याचे उल्लेख आहेत.

मोगल साम्राज्याच्या कालखंडात लिहिल्या जाणाऱ्या पत्रांचे अनेक प्रकार असत. (१) **फर्मान, शुक्का, आहकाम,** आणि **रम्ज-व-ईशारा** : बादशहाने राजपुत्र, प्रजाजन किंवा इतर सम्राट यांना लिहिलेल्या पत्रांना हे नाव देण्यात येई. (२) **निशाण** : बादशहा खेरीज राजपुत्राकडून इतर कोणालाही लिहिले गेलेले पत्र. (३) **अर्जदाश्त** : प्रजाजनांकडून बादशहाला अगर राजपुत्राला आणि बादशहाकडून राजपुत्राला जाणारी पत्रे. जय मिळाल्यावर पाठविल्या जाणाऱ्या पत्राला **फतनामा** असे म्हणत. (४) **हश-उल-हुक्म** : बादशहाच्या सांगण्यावरून आणि त्याचे हुकूम ज्या पत्रात आहेत असे पत्र. (५) **आहकाम** आणि **रम्ज** : बादशहा आपल्या सचिवांना जी पत्रे धाडावयाची असतात त्याबाबतचे मुद्दे आणि कुराणातील ओळी आणि इतर काव्यरचना यांचा यात समावेश होतो. (६) **सनद :** नेमणुकीबाबतचे पत्र. (७) **परवाना** : न्यायालयाच्या निकालाबाबतचा दुय्यम अधिकाऱ्याला देण्यात आलेला हुकूम. (८) **दस्तक :** मालाची ने-आण करण्यासाठी किंवा छावणी अथवा दरबार यात प्रवेश करण्यासाठी परवाना. (९) **रुका** : खाजगी पत्र.

फर्माने लिहिण्याची आणि त्यांवर **दस्तखत** करण्याची एक विशिष्ट पद्धती त्या काळी अस्तित्वात होती, तिचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे. **दिवाण-ई खास**मध्ये बसून बादशहा काही महत्त्वाच्या पत्रांना स्वतः

लिहून उत्तरे देत असे. त्याचे **अमीर-उमराव** आणि **वजीर** यांच्या प्रतिनिधींनी सादर केलेली पत्रे, त्याचप्रमाणे सुभेदारांकडून आलेले **अहवाल** यांचे वाचन झाल्यावर बादशहाच्या सांगीनुसार त्याचे सचिव पत्रे लिहीत. ही पत्रे ते बादशहाला सादर करीत. त्यामध्ये बादशहा स्वतःला वाटेल त्या सुधारणा करीत असे. ज्या राजपुत्राला मध्यस्थी (**रिसाल**) करण्याचे अधिकार दिले असत तो राजपुत्र **फर्मानाच्या** पाठीमागे आपला **रेसालतुन** लिही आणि त्यांवर स्वतःचे **शिक्कामोर्तब** करी. त्याखाली बादशहाचा **दिवाण** आपले **मारफत** लिही. याचा अर्थ हे **फर्मान दिवाणा**च्या हस्ते पाठविले गेले असा केला जाई. त्याशिवाय अशा **फर्मानावर** कारवाई होत नसे. त्यानंतर **फर्माने** अंतःपुरात पाठविली जात व तेथे त्यावर **औजक** शिक्याने **शिक्कामोर्तब** केले जाई. **फर्माना**ची पहिली प्रत सुंदर अक्षरात लिहिली जाई. त्यावर **शिक्कामोर्तब** झाल्यावर हे **फर्मान** गुंडाळून सोन्याच्या कापडाच्या पिशवीत ठेवत. ही पिशवी **वजीराच्या शिक्याने** सीलबंद केली जाई. अशा पिशवीला **खरीता** असे म्हणत.

बादशहाचा **शिक्का** गोल असून त्याला **औजक** असे म्हणत. हा **शिक्का** ज्या फर्मानांवर मारला जाई त्यांना **फर्मान-ई-सीबती** (म्हणजे मोठ्या अधिकारावर नेमणूका केल्याची अगर जहागिरी दिल्याची **फर्माने**) असे म्हणत. याशिवाय आणखी एक मोठा गोल **शिक्का** असे. त्यामध्ये एका वर्तुळाच्या मध्यभागी बादशहाचे नाव असे. त्याभोवती अशी अनेक वर्तुळे असून त्यामध्ये बादशहाच्या पूर्वजांची नावे लिहिलेली असत. सुरवातीला हा **शिक्का** परदेशी सुलतानांना लिहिलेल्या पत्रावर वापरीत असत. पुढे मात्र सर्व फर्मानांवर हा **शिक्का** वापरण्यात येऊ लागला. तातडीच्या किंवा गुप्त खलित्यावर बादशहाच्या **शिक्याचे मोर्तब** केले जाई. अशा फर्मानांना **फर्मान-ई-बयाजी** असे म्हणत. इतर प्रकारची **फर्माने, पर्वाने** आणि **बराते** यांवर **वजीरापासून** तो इतर अनेक अधिकाऱ्यांच्या शिक्याचे **मोर्तब** केले जाई.

राजपुत्राची किंवा एखाद्या सरदाराची पत्रे पुढील प्रमाणे लावलेली असत. ही पत्रे लावण्याचे काम मुनशी करीत असे. प्रथम त्या व्यक्तीकडून बादशहाला पाठविलेली पत्रे, नंतर राजपुत्रांना, नंतर **वजीर** आणि इतर वरिष्ठ अधिकारी आणि त्या व्यक्तीच्या कनिष्ठांना पाठविलेली पत्रे, नंतर त्या व्यक्तीचे आप्त आणि दरबारातील **वकील** यांना पाठविलेली पत्रे, नंतर स्वतः **मुनशीने** वरील नमूद केलेल्या चार वर्गातील व्यक्तींना आपल्या मालकाच्या वतीने पाठविलेली पत्रे आणि **मुनशीने** स्वतः पाठविलेली पत्रे. नंतर **मुनशीने** स्वतःच्या नातेवाईकांना पाठविलेली पत्रे आणि शेवटी **मुनशीने** इतर **मुनशी** आणि कवी यांना पाठविलेली पत्रे असत. अशा तऱ्हेने गोळा केलेल्या पत्रांच्या अखेरीला नमुना पत्रे आणि विशिष्ट प्रसंगी जी पत्रे पाठवावी लागत त्या पत्रांचा नमुना दाखविणारी पण मजकूर नसलेली पत्रे असत. त्याशिवाय अधिकारीवर्गांच्या नेमणुका करावयाच्या पत्राचा मजकूर नसलेला मसुदा आणि त्या अधिकाऱ्यांची कामे नमूद करणारे मसूदे देखील अशा पत्रसंग्रहाच्या शेवटी पुष्कळदा असत. अशा तऱ्हेचे दोन ग्रंथ म्हणजे **निगारनामा-ई-मुनशी** आणि **ईन्शा-ई-हरकर्ण** हे होत.

हिंदुस्थानातील मोगल राज्याने आणि विशेषतः औरंगजेबाने काय साधले?

औरंगजेबाच्या अमलाखाली मोगल साम्राज्याचा विस्तार जास्तीत जास्त वाढला. एक अधिकृत भाषा, एक शासकीय पद्धती आणि अर्थव्यवस्था यामुळे राजकीय आणि भौगोलिकदृष्ट्या हिंदुस्थानातील प्रांतोपप्रांत अधिक जवळ आले. मोगल राज्याचे जे २० **सुभे** होते तेथील राज्यपद्धती, अधिकारी वर्ग, त्यांची कामे यात समानता होती. फारशी ही राज्यभाषा होती. अधिकाऱ्यांच्या वारंवार बदल्या होत असल्यामुळे त्यांना प्रत्येक प्रांत हा आपल्या मायभूमीसारखा वाटे. व्यापारी आणि प्रवासी एका शहरातून दुसऱ्या शहरात

आणि एका **सुभ्यातून** दुसऱ्या **सुभ्यात** विनासायास प्रवास करीत. अशा वेळी देशभर पसरलेल्या मोगल साम्राज्याची एकात्मता त्यांच्या प्रत्ययास येत असे. इतके जरी असले तरी लोकांना नागरी स्वातंत्र्य किंवा राज्यकारभारात कोणताही भाग नसल्याने लोकांमध्ये राष्टीयत्वाच्या भावनेचा अभाव होता. देशातील लोक हे खऱ्या अर्थाने नागरिक नव्हते.

या मोगल साम्राज्यात अतिशय मोठ्या प्रमाणावर ऐतिहासिक वाङ्मयाची निर्मिती झाली. या बाबतीत मोगल कालाची हिंदू कालखंडाशी तुलना केल्यास मोगल कालखंडालाच प्राधान्य द्यावे लागेल. या गोष्टीला कारण हिंदू आणि मुसलमानांची मनोवृत्ती हे असू शकेल. मुसलमानपूर्व काळात हिंदूंनी लिहिलेला इतिहास हा जवळजवळ नव्हताच आणि पुढे मुसलमानांच्या काळात हिंदूंनी पर्शियन भाषा शिकल्यानंतर जो इतिहास लिहिला त्याचा विशेष म्हणजे त्यामधील तारखांचा जवळजवळ असलेला अभाव हा होय. याउलट मुसलमान इतिहासकार हे अधिक वस्तुस्थितिनिष्ठ असे होते. त्यांच्या प्रत्येक लिखाणात दिवस, तारीख, महिना आणि वर्ष यांची नोद असे. हिंदूंप्रमाणे अनेक शकांच्या भानगडी नसल्याने मुसलमानी इतिहासकारांनी दिलेली तारीख ही निश्चित असे.

मोगल काळात भारताचा इतर देशांबरोबर असलेला संपर्क—विशेषतः आशियातील देशांबरोबरचा — अधिक वाढला. अफगाणिस्तानवर मोगलांचा ताबा असल्यामुळे हिंदुस्थानात होणारी वाहतूक ही अफगाणिस्तानातूनच होत राहिली. या जमिनीवरील मार्गाशिवाय समुद्रमार्गाने भारताचा इतर देशांशी होणारा व्यवहार हा पश्चिम किनाऱ्यावरील आणि पूर्व किनाऱ्यावरील बंदरांतूनच चालू होता. त्या काळची प्रमुख बंदरे म्हणजे भडोच, सूरत, चेउल, राजापूर, गोवा, कारवार आणि मसुलीपट्टम ही होती. पश्चिम किनाऱ्यावरील व्यापार म्हणजे जवळजवळ अरबांचीच मक्तेदारी होती.

मोगल राजवटीमुळे हिंदुस्थानात अनेक धार्मिक बदल घडून आले. हिंदू धर्मामध्ये अनेक देवदेवता आहेत. परंतु त्या पाठीमागे एक परमेश्वर आहे ही हिंदू धर्माची पहिल्यापासूनची शिकवण आहे. मध्ययुगीन हिंदुस्थानात हिंदूंमध्ये अनेक पंथ निर्माण झाले. मुसलमानी धर्म हा एकेश्वरवादाचा पुरस्कर्ता आहे. या मतप्रणालीचा हिंदू धर्मामधील परस्परविरोधी पथांवर निश्चितच योग्य तो परिणाम झाला. हिंदू आणि मुसलमान धर्म यांच्यामध्ये एकोपा घडवून आणण्यासाठी अनेक उपपंथ हिंदू आणि मुसलमान या धर्मात उदयास आले. या पंथांचा पुरस्कार करणारे म्हणजे कबीर, दादू नानक आणि चैतन्य हे होते. मोगल कालखंडात त्यांच्या प्रेरणेमुळे दोन्ही धर्मातील धर्मवेड हे पुष्कळच कमी झाले. विशेषतः **सुफी** पंथाने हिंदू आणि मुसलमान धर्मातील विद्वान व धर्मशील मंडळींना एकत्र आणले. परंतु **सुफी** पंथ हा धर्मवेड्या आणि अशिक्षित लोकांपासून नेहमीच दूर राहिला. हिंदूंनी पर्शियन भाषेत मोठ्या प्रमाणात **सुफी** वाङ्मयाची निर्मिती केली. हे **सुफी** वाङ्मय म्हणजे, त्या काळांत जी राजकीय अनास्था आणि आर्थिक ऱ्हास सर्वसामान्य माणसाच्या अनुभवास येत होती, त्यामधून त्याला दिलासा देणारे होते.

तत्कालीन समाज, कलाकुसर आणि ललितकला यांवर मुसलमानी संस्कृतीचा फार मोठा प्रभाव पडला. हिंदू समाजातील बऱ्याच चालिरीतींचा उगम आपल्याला मुसलमानांशी आलेल्या संबंधात दिसून येईल. विशेषतः पोषाख आणि भाषा यांवर हा प्रभाव प्रामुख्याने आपल्या नजरेस येतो. युद्धाची कला ही मुसलमानांनी पूर्णत्वाला नेली. या बाबतीत त्यांनी तुर्कस्तान आणि इराण यांचे अनुकरण केले. हिंदू कालातील लहान लहान सैन्यांच्या तुकड्यांच्या ऐवजी आता एका सेनापतीच्या हाताखाली प्रचंड सैन्ये वावरू लागली. औरंगजेबाच्या हाताखाली दक्षिणेत आलेल्या सैन्यांची संख्या कित्येक लाख होती.

मोगलांचे सैन्ये सर्व दृष्टीने परिपूर्ण होते असेच आपल्याला म्हणावे लागेल. जी गोष्ट सैन्याच्या बाबतीत तीच शिल्पशास्त्राच्या बाबतीत. हिंदू राजांनी आपली संपत्ती आणि कौशल्य देवळांवर खर्च केले. त्यांनी बांधलेले राजवाडे आज शिल्लक नाहीत. परंतु मोगल कालखंडात बांधले गेलेले राजवाडे आणि कबरींवर उभारलेले शिल्प हे आज मितीला जसेच्या तसे असून त्या काळातील वैभवाची आणि शिल्पकलेची ते साक्ष देतात.

मोगल साम्राज्याच्या नाशाची कारणे :

वरील विवेचनावरून आपल्याला असे दिसून येईल की मोगल साम्राज्याने हिंदुस्थानला अनेक मोठ्या आणि चांगल्या गोष्टी दिल्या. इतके असूनदेखील औरंगजेबाच्या मृत्यूनंतर एवढे प्रचंड मोगल साम्राज्य नाश पावले. याची कारणे शोधावयाची असल्यास मोगल साम्राज्याचे सामर्थ्य कशामध्ये होते आणि त्याची दुर्बलता कशात होती याचा विचार करणे जरूर आहे. भारतामध्ये आलेल्या मुसलमानांमध्ये संस्कृती आणि सामाजिक जीवन याबाबत जी एकात्मता होती त्याचा परिणाम त्यांच्यामध्ये एक तऱ्हेची प्रचंड शक्ती निर्माण करण्यात झाला. जातिभेदाच्या अभावामुळे त्यांना आपली जेत्याची भूमिका कणखरपणे टिकवून धरता आली. त्यांनी फक्त शासनाच्या खालच्या थराला असलेली हिंदूंची व्यवस्था टिकवून धरली, इतकेच नव्हे तर महसूल खात्यात बहुतेक सर्व हिंदूंच्याच नेमणुका केल्या. याचा परिणाम असा झाला की स्थानिक प्रजाजनांना राजधानीमध्ये घडत असलेल्या बदलांचे कधीच आकलन झाले नाही. त्याचप्रमाणे राजसत्तेविरुद्ध बंड करण्याचीही त्यांना जरुरी भासली नाही. कालांतराने हिंदुस्थानात आलेले मुसलमान या देशातील परिस्थितीशी एकरूप झाले. मोगल साम्राज्याच्या अखेरच्या कालखंडात जे परकीय मुसलमान हिंदुस्थानात आले ते मात्र हिंदुस्थानात तसे एकरूप होऊ शकले नाहीत. हिंदी मुसलमानांनी भारतीयांच्या अनेक चालिरीती आत्मसात केल्या. इतकेच नव्हे तर पोषाख, अन्नधान्य आणि भाषा याबाबतीत त्यांचे अनुकरण केले. याचा परिणाम असा झाला की हिंदी मुसलमान आणि त्यांचे भाईबंद म्हणजे अरब जगातील मुसलमान यांची परस्परापासून फारकत झाली.

या देशात शेकडो वर्षे वास्तव्य केल्यामुळे आणि बहुसंख्य हिंदू असलेल्या वातावरणात राहिल्यामुळे मुसलमान हे काही बाबतीत तद्देशीय हिंदूंबरोबर एकरूप होऊन गेले. हिंदी मुसलमानांनी स्थानिक स्त्रियांबरोबर लग्ने लावली आणि मुसलमान झालेल्या हिंदूंना समाजात समान वागणूक दिली. परिणामी त्यांच्या विशेष जाति गुणांचा लोप झाला. हिंदू समाजातील खालचा वर्ग अनेक मुसलमान पिरांना भजू लागला. इतकेच नव्हे तर हिंदू धर्माचे कट्टर अभिमानी छत्रपती शिवाजी आणि महादजी शिंदे यांनी सुप्रसिद्ध मुसलमान अवलियांना गुरुस्थानी मानले. हिंदू हे जीत आणि मुसलमान हे जेते असे मानले तर दोन्ही पंथांतील लोकांना सांधणारा दुवा म्हणजे **सुफी** पंथ, ऊर्दू भाषा आणि दोन्ही धर्मांचा समन्वय झाल्यामुळे निर्माण झालेल्या ललितकला या गोष्टी; असेच म्हणावे लागेल. हिंदूप्रमाणेच मुसलमानांनीही हिंदू देवदेवतांना भाविकपणे मानल्याची आणि हिंदूंच्या सणासुदीत आणि उत्सवसमारंभात भाग घेतल्याची अनेक उदाहरणे आपल्याला मोगल काळात सापडतील. सारांश कर्मठधर्मसिद्धांत आणि जुने धर्मग्रंथ यांनी जरी हिंदू आणि मुसलमान धर्मियांना परस्परांपासून दूर ठेवले तरीदेखील एकाच राज्यछत्राखाली भोगावयास लागणारी जीवनातील सुखदुःखे आणि समान असे भवितव्य या गोष्टींनी दोन्ही समाजांना जवळ खेचून आणले.

हिंदू आणि मुसलमान या दोन धर्मांमध्ये जे मूलतः मतभेद आहेत त्याचे उत्कृष्ट विवेचन एका ज्येष्ठ ब्रिटिश अधिकाऱ्याने केलेले आहे. औरंगजेबकालीन समाजस्थितीला ते अतिशय अनुरूपतेने लागू पडते

त्याचा सारांश या ठिकाणी दिल्यास तो अनुचित होणार नाही. तो म्हणतो, “हिंदू माणसाचे मन, विचार करण्याच्या त्याच्या सवयी आणि जीवनाकडे बघण्याचा त्याचा दृष्टिकोन ही सर्व नैराश्यातून निर्माण होणाऱ्या वैराग्यावर आधारलेली आणि घडवलेली असतात. या उलट मुसलमानांच्या बाबतीत त्यावर आशावादातून निर्माण झालेल्या सुख-कल्याणवादाचा पगडा हा अधिक असतो. हिंदू विचारसरणीनुसार सद्‌गुणांची उभारणी, त्याग, विकार आणि इच्छा यांचे दमन आणि दानशीलपणा यांवर झालेली आहे. हिंदूंच्या ठिकाणी असलेला गतिक्षमतेचा अभाव हा आहे त्यापेक्षा चांगले काही मिळणार नाही, या विचारसरणीवर आधारलेला असतो. या उलट मुसलमानांच्या बाबतीत विशिष्ट राहणीमानावर समाधान मानण्याची त्यांची वृत्ती आणि ठराविक मर्यादेपलीकडे न जाण्याची त्यांची इच्छा ही त्या गतिक्षमतेच्या अभावाला कारण असतात.

हिंदूंचे मुख्य स्वभाव विशेष म्हणजे सौम्यपणा, सालसपणा आणि अतिसोशिकपणा. यांपैकी मुसलमानांच्या अंगात जे काही गुणविशेष उतरले असतील ते हिंदूंबरोबरच्या सतत सहवासाच्या परिणामांमुळे किंवा मुसलमान समाज हा बराचसा पूर्वाश्रमी हिंदू धर्मीय असल्यामुळे. मुसलमानांचा दृष्टिकोण हा सर्वसाधारणपणे ताठर आणि ठराविक साचाचा असा असतो.”

हिंदुस्थानामध्ये मुसलमानी सत्ता जी फलावली त्याला कारण एखादी मध्यवर्ती सत्ता नसून स्वतःच्या हिंमतीवर तलवार गाजविणारे छोटे-मोठे राजेराजवाडे आणि इतर साहसी व्यक्ती ह्या होत. अर्थात याचा अर्थ त्या काळात कायदेशीरपणे राज्य चालविणारा सुलतान नव्हता असे नव्हे. मध्यवर्ती सरकारची नामधारी सत्ता मानणारे धर्मवेडे सेनापती हे राज्याच्या सरहद्दी पलीकडील हिंदूंची राज्ये जिंकून त्यावर अनियंत्रित सत्ता गाजवीत. त्यांना दूर करण्याची सुलतानाची प्राज्ञा नसे. अशा आपल्याच धर्माच्या धाडसी उमरावांबरोबर अतिशय चांगले संबंध ठेवून आणि त्यांच्यापासून आज्ञा पालनाची अपेक्षा न करता हे सुलतान आपला फायदा करून घेत. जोपर्यंत या आक्रमक वृत्तीला वाव होता तोपर्यंत हे सर्व सुरळीत चालले. नंतर मात्र बंडखोरी, कटबाजी, राजवाड्यातील खून आणि नाशकारी लढाया यांमुळे सर्वत्र गोंधळ माजून मध्यवर्ती सत्ता खिळखिळी झाली. परिणामी देशाचा अर्थिक विकास थांबला, समाजाची वाढ खुंटली आणि संस्कृतीची वाटचाल मंदावली.

मुसलमानी राज्यात वंशपरंपरेच्या तत्त्वानुसार सरदारकी नव्हती. त्याचप्रमाणे खासगी मालमत्तेचा अधिकारही नव्हता. प्रत्येक **उमरावाची** मालमत्ता आणि जमीन-जुमला त्याच्या मृत्यूनंतर जप्त केला जात असे. याचा परिणाम भविष्यकाळ सुधारण्यासाठी ज्या संचयाची जरुरी असते तो संचय न होण्यात झाला. एखाद्या व्यक्तीने आपल्या हयातीत केलेली उन्नती आणि भरभराट त्याच्या मृत्यूनंतर कवडी किमतीची होई. साहजिकच प्रत्येक पिढीला विकासाची सुरुवात पुन्हा पहिल्यापासून करावी लागे.

ही झाली श्रीमंत वर्गाची स्थिती. सर्वसाधारण माणसाची स्थिती याहीपेक्षा हलाखीची होती. कोणत्याही मुसलमान सत्ताधींशाने राष्ट्रीयत्व बाणविण्याचा प्रयत्न केला नाही किंवा सर्वसाधारण माणसाची अर्थिक परिस्थिती सुधारण्याकडे लक्ष दिले नाही. कोणत्याही प्रजाजनाला विचारस्वातंत्र्य नव्हते. खुशामतखोरपणा वाढल्यामुळे कला किंवा वाङ्मय यांमध्ये अतिज्येष्ठ अशा व्यक्ती भारतीय मुसलमानांत निर्माण होऊ शकल्या नाहीत. संस्कृती आणि कला यांचा विकास फक्त राज-दरबारी झाला. त्याचा फायदा सर्वसाधारण व्यक्तीला कधीच होऊ शकला नाही.

अनुक्रमणिका

मुसलमानी अमलाखाली हिंदू समाजाची प्रगतीही खुंटली. मुसलमानी आक्रमणाच्या सुरुवातीला हिंदूंची देवळे आणि पूजास्थाने यांचा नाश झाला. या नाशाबरोबर हिंदू समाजाची शिक्षणकेंद्रेही नाहीशी झाली. बलशाली हिंदू राजांच्या अभावी संस्कृत भाषेचा आधार तुटला आणि संस्कृत शिकणे व शिकविणे यांचा ऱ्हास झाला. संस्कृत वाङ्मयाची नवी निर्मिती होण्याचे पूर्णपणे थांबले. हिंदूंबरोबरच मुसलमान समाजाचीही अवनती झाली. याला अनेक कारणे होती. पहिल्या प्रथम मुसलमान अमीर-उमरावांनी आपले जनानखाने वाढवून त्यात सर्व जातींच्या आणि धर्मांच्या स्त्रियांची भरती केल्यामुळे अस्सल प्रजेची निर्मिती होऊ शकली नाही. श्रीमंत वर्गाजवळ भरपूर संपत्ती आली आणि त्यांना जे स्वास्थ्य लाभले त्यामुळे त्यांच्यामध्ये अनाठायी गर्व आणि आळशीपणा निर्माण झाला. आणखी एका गोष्टीचा या ठिकाणी उल्लेख केला पाहिजे आणि ती म्हणजे भारतीय मुसलमानांनी फारशी किंवा तुर्की या भाषांचा मातृभाषेसारखा उपयोग केला नाही. इतकेच नव्हे तर वाङ्मयीन कारणासाठी कोणतीच भारतीय भाषा त्यांनी आत्मसात केली नाही. सरकारी कामकाजासाठी किंवा बोली म्हणून फारशी भाषेला चिकटून राहण्याच्या या वृत्तीमुळे खऱ्या शिक्षणाची वाढ मोगल काळात होऊ शकली नाही. हिंदुस्थानमधील तुर्की आणि अफगाण वंशाचे मुसलमान हे प्रामुख्याने लष्करी बाण्याचे होते. त्यांना बुद्धिवादी आणि औद्योगिक निर्मितीची आवड जवळ जवळ नव्हतीच, असे म्हटले तरी चालेल. साहजिकच जेव्हा मोगल आक्रमणाने कमाल मर्यादा गाठली त्यावेळी त्यांचा ऱ्हास झाला. या सर्व गोष्टींचा परिणाम असा झाला की मोगल साम्राज्याचा पाठीशी इतकी प्रचंड संपत्ती आणि शक्ती असताना आणि ज्या साम्राज्यात सोळाव्या व सतराव्या शतकात अनेक दूरगामी, ऐतिहासिक आणि उल्लेखनीय घटना घटल्या, ते साम्राज्य अठराव्या शतकात एखाद्या पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळून पडले.

भ. ग. कुंटे

अनुक्रमणिका

औरंगजेबाच्या कारकिर्दीचा संक्षिप्त इतिहास

संक्षिप्त आणि प्रदीर्घ अनुक्रमणिका

संक्षिप्त अनुक्रमणिका

प्रकरण पहिले पूर्वायुष्य १६१८ – १६५२ ..... ६९
प्रकरण दुसरे औरंगजेबाची दक्षिणेची दुसरी सुभेदारी १६५२-१६५८ ..... ९७
प्रकरण तिसरे शहाजहानचे आजारीपण आणि त्याच्या मुलांचे बंड ११९
प्रकरण चौथे वारसा हक्काचे युद्ध : औरंगजेबाचा विजय १३४
प्रकरण पाचवे वारसाहक्काचे युद्ध : दारा व शुजा यांचा शेवट १५२
प्रकरण सहावे कारकिर्दीचा पूर्वार्ध : सर्वसामान्य समीक्षण 183
प्रकरण सातवे सरहद्दीवरील युद्धे : आसाम आणि अफगाणिस्तान २१०
प्रकरण आठवे औरंगजेबाचे धार्मिक धोरण आणि त्याला झालेली हिंदूंची प्रतिक्रिया २३३
प्रकरण नववे रजपुतान्यातील युद्ध : अकबराचे बंड २५१
प्रकरण दहावे मराठ्यांच्या सत्तेचा उदय २६५
प्रकरण अकरावे शिवाजी १६७० – १६८० ..... ३२९
प्रकरण बारावे विजापूरच्या राज्याला लागलेली उतरती कळा आणि विजापूरचा नाश ३५१
प्रकरण तेरावे गोवळकोंड्याच्या कुतुबशाही घराण्याचा ऱ्हास आणि अधःपतन ३८१
प्रकरण चवदावे संभाजीची कारकीर्द, १६८०–१६८९ ..... ३९९
प्रकरण पंधरावे इ. स. १७०० पर्यंत मराठ्यांबरोबर झालेल्या युद्धांची हकीकत ४४५
प्रकरण सोळावे औरंगजेबाच्या जीवनातील अखेरचे पर्व ४९१
प्रकरण सतरावे उत्तर हिंदुस्थानातील घडामोडींची हकीकत ५४८
प्रकरण अठरावे औरंगजेबाच्या कारकिर्दीतील काही प्रांतांसंबंधीची हकीकत ५७२
प्रकरण एकोणिसावे औरंगजेबाचे व्यक्तिमत्त्व आणि त्याच्या राजवटीचे झालेले परिणाम ५९२
प्रकरण विसावे औरंगजेबाचे साम्राज्य : त्याची साधनसामग्री, व्यापार आणि राज्यकारभाराची पद्धती... ६२३
सूची ६३४

औरंगजेबाचा कारकीर्दीचा संक्षिप्त इतिहास —

प्रदीर्घ अनुक्रमणिका

१६१८-१७०७

पुस्तक पहिले

प्रकरण पहिले

पूर्वायुष्य-१६१८-१६५२

(१) औरंगजेबाच्या कारकीर्दीचे महत्त्व (२) औरंगजेबाच्या जीवनाची शोकांतिका आणि ती होण्यास कारणीभूत झालेली परिस्थिती (३) औरंगजेबाच्या इतिहासाची साधन-सामग्री (४) बालपण आणि शिक्षण (५) औरंगजेबाची हत्तीशी झुंज (६) बुंदेला युद्ध, १६३५ (७) औरंगजेबाची दक्षिणेतील पहिली सुभेदारी, इ. स. १६३६-इ. स. १६४४ (८) औरंगजेबाचा कुटुंब विस्तार (९) औरंगजेबावर अवकृपा (१०) औरंगजेबाची बाल्ख प्रांतातील मोहीम, १६४७ (११) औरंगजेबाचा कंदहारला वेढा, १६४९-१६५२.

प्रकरण दुसरे

दक्षिणेची दुसरी सुभेदारी

१६५२-१६५८

(१) मोगल अमलाखालील दक्षिणेतील अवकळा आणि दुर्दशा; अर्थिक अडचणी (२) मुर्शिद कुलीखान-त्याचे चारित्र्य आणि त्याने अंमलात आणलेली सारापद्धती (३) दक्षिणेच्या राज्यकारभारात औरंगजेबाने केलेल्या सुधारणा (४) औरंगजेबाचे बादशहाबरोबर मतभेद झाले त्याची कारणे (५) लहानसहान मोहिमा (६) गोवळकोंडा : गोवळकोंड्याची संपत्ती आणि मोगलांबरोबरील संघर्षाची कारणे (७) मीर जुमला : त्याचा इतिहास आणि त्याचे स्थान (८) इ. स. १६५५ मध्ये कुतुबशहाचा मोगलांबरोबर झालेला संघर्ष (९) औरंगजेब गोवळकोंड्याच्या राज्यावर स्वारी करतो. इ. स. १६५६ (१०) गोवळकोंड्याच्या लुटीबाबत औरंगजेबाचे शहाजहानबरोबर उडालेले खटके (११) औरंगजेबाची विजापूरवर स्वारी, इ. स. १६५७.

प्रकरण तिसरे

शहाजहानचे आजारीपण आणि त्याच्या मुलांचे बंड

(१) शहाजहानचा वडील पुत्र दारा शुको (२) शहाजहानचे आजारीपण इ. स. १६५७

आणि त्यामुळे साम्राज्यात माजलेली अव्यवस्था (३) मुराद बक्ष गुजरातमध्ये स्वतःला राज्याभिषेक करून घेतो (४) वारसाहक्काचे युद्ध सुरू होण्याच्या सुमारास औरंगजेबाची मनःस्थिती आणि धोरण (५) सिंहासनासाठी लढा देण्यासाठी औरंगजेबाची सिद्धता.

पुस्तक दुसरे

प्रकरण चौथे

वारसाहक्काचे युद्ध : औरंगजेबाचा विजय

(१) धर्मत येथे जसवंतसिंग, त्याच्या पुढील समस्या (२) धर्मतचा रणसंग्राम (३) जसवंत आणि त्याच्या फौजेचे पलायन (४) औरंगजेब आग्र्यावर चाल करून जातो (५) धर्मतनंतर दाराच्या हालचाली (६) समुगडची लढाई, ता. २९ मे १६५८ (७) समुगड येथील खुद्द दाराची हालचाल – दाराचा शेवट (८) आग्र्यामधील घडामोडी आणि शहाजहानची कैद, जून १६५८ (९) मुराद बक्षाची कैद आणि मृत्यू.

प्रकरण पाचवे

वारसा हक्काचे युद्ध : दारा आणि शुजा यांचा शेवट

(१) समुगडच्या युद्धानंतरचा दाराचा पाठलाग (२) रजपुतान्यात दारा; देवराईची लढाई (३) दाराचे पलायन आणि कैद (४) दाराची कुतरओढ आणि निर्घृण हत्या (५) सुलेमान शुकोचा शेवट (६) सिंहासनावर आपला हक्क सांगण्यासाठी शुजाने केलेली पहिली आगेकूच; बहादूरपूरची लढाई (७) खाजवा : जसवंतचा विश्वासघातकीपणा आणि औरंगजेबाचा दृढनिश्चयीपणा (८) खाजवाची लढाई (९) शुजाचा पाठलाग आणि बिहारमधील युद्ध (१०) बंगालमधील युद्ध (११) शुजा बंगाल सोडतो. शुजाचा शेवट.

पुस्तक तिसरे

प्रकरण सहावे

कारकिर्दीचा पूर्वार्ध : सर्वसामान्य समीक्षण

(१) औरंगजेबाच्या कारकिर्दीचा पूर्वार्ध आणि उत्तरार्ध यांमधील तफावत : त्याच्या व्यक्तिगत हालचाली (२) औरंगजेबाचे आजारीपण, १६६२ (३) साम्राज्याच्या प्रांतामध्ये बादशाही हुकमती विरुद्ध झालेले उठाव (४) पालमाउ वगैरे ठिकाणे काबीज (५) धान्यावरील कर रद्द करण्यात येतात; बादशहाचे इस्लामविषयक वटहुकूम (६) दाराच्या मर्जीतले धर्मज्ञ आणि पाखंडी यांचा औरंगजेबाने केलेला अमानुष छळ (७) बाह्य मुस्लिम जगताबरोबरचे औरंगजेबाचे संबंध (८) आग्र्याच्या किल्ल्यातील शहाजहानचे कैदेतील

जीवन आणि त्याचे औरंगजेबाबरोबरील कलह (९) शहाजहानचे अखेरचे आजारीपण आणि मृत्यू.

प्रकरण सातवे

सरहद्दीवरील युद्धे : आसाम आणि अफगाणिस्तान

(१) १६५८ च्या पूर्व काळातील कूचबिहार आणि आसामबरोबरचे मोगलांचे संबंध (२) अहोम कामरूप जिंकून घेतात, १६५८ (३) मीर जुम्ला कूचबिहार आणि आसाम जिंकून घेतो (४) अहोमाबरोबर सातत्याने चाललेले युद्ध; पावसाळ्यात मोगल एकाकी पडतात (५) मोगल आरमाराची कामगिरी; मिर जुम्ला याची पुन्हा चढाई (६) आसामबरोबर शांततेचा तह (७) मीर जुम्ला याच्या स्वभावाचे मोठेपण (८) मोगलांची कामरूपमधून माघार; त्यासाठी झालेला संघर्ष, १६६७—१६८१ (९) छटगावचे लुटारू आणि त्यांनी बंगाल्यात घातलेला धुमाकूळ (१०) मोगल छटगाव जिंकून घेतात (११) अफगाण लोक – त्यांचे वैशिष्ट्य आणि मोगल साम्राज्याबरोबरचे त्यांचे संबंध (१२) १६६७ सालामधील युसुफ जाईंचे बंड (१३) आफ्रिडी आणि खाटक टोळ्यांचे बंड – इ. स. १६७२—मोगल सेनानींवर ओढवलेली आपत्ती (१४) अमीरखानाकडून अफगाणिस्तानचा उत्कृष्ट राज्यकारभार १६७८-१६९८.

प्रकरण आठवे

औरंगजेबाचे धार्मिक धोरण आणि त्याबाबतची हिंदूंची प्रतिक्रिया

(१) मुसलमानी राज्य, त्याची तात्त्विक भूमिका आणि स्वभावधर्म (२) बिगर मुसलमानांवरील राजकीय बंधने (३) कुराणातील राजकीय ध्येयवादाचा मुसलमान प्रजा आणि इतर पंथीय नागरिकांच्या जीवनावर परिणाम (४) इस्लामची सहिष्णुता ही अपवादात्मक आणि कुराणाने घालून दिलेल्या तत्त्वांच्या विरोधी असते (५) औरंगजेबाचा हटवाद आणि त्याने हिंदूंच्या देवळांचा केलेला पद्धतशीर नाश (६) हिंदूंवर लादलेला जिझिया कर अथवा डोईपट्टी (७) हिंदूंवर दडपशाही करण्यासाठी बादशहाने योजलेले उपाय (८) मथुरा जिल्ह्यातील हिंदूंवरील दडपशाही; शेतकऱ्यांचे उठाव (९) सतनामी पंथ; सतनामींचा उठाव, १६७२ (१०) शीख धर्माची वाटचाल, शीख धर्माच्या स्वरूपातील आणि धर्मप्रमुखांच्या उद्दिष्टांमधील बदल (११) गुरू गोविंद, त्यांचा ध्येयवाद आणि चारित्र्य.

प्रकरण नववे

रजपुतान्यातील युद्ध : अकबराचे बंड

(१) औरंगजेब मारवाड जिंकून घेतो, १६७९ (२) दुर्गादासाने अजितसिंगाला वाचविले

त्याची हकीकत (३) उदयपूरच्या महाराण्याबरोबर मोगलांचे युद्ध (४) राजपुत्र अकबर याची मारवाडमधील मोहीम (५) राजपुत्र अकबर याने आपण मोगल सम्राट झाल्याची केलेली घोषणा, १६८१ (६) तहव्वूरखानाचा मृत्यू आणि अकबराचे अपयश (७) महाराण्याबरोबर तह.

पुस्तक चौथे

प्रकरण दहावे

मराठ्यांच्या सत्तेचा उदय

(१) १७ व्या शतकातील दक्षिणेच्या इतिहासाचे मर्मस्थान (२) मोगलांच्या दक्षिणेतील दौर्बल्याची कारणमीमांसा (३) महाराष्ट्र देश आणि तेथील लोक (४) शहाजी भोसले आणि त्याचा आयुष्यक्रम (५) शिवाजीचे बालपण, शिक्षण आणि त्याचा स्वभाव (६) शिवाजीचे आरंभीचे विजय (७) शिवाजीचा मोगलांबरोबर पहिला संघर्ष, १६५७ (८) शिवाजीकडून विजापूरचा सरदार अफजलखान मारला जातो, १६५९ (९) पन्हाळा किल्ल्यावर शिवाजीची कोंडी (१०) शायस्ताखान पुणे आणि चाकण ताब्यात घेतो (११) शिवाजीने शायस्ताखानावर केलेला रात्रीचा हल्ला (१२) शिवाजीने सुरतेची केलेली पहिली लूट (१३) शिवाजी विरुद्ध जयसिंग : मोगल पुरंदर जिंकतात (१४) पुरंदरचा तह, १६६५ (१५) शिवाजीची औरंगजेबाबरोबर आग्रा येथे भेट, १६६६ (१६) शिवाजीचे आग्र्याहून पलायन.

प्रकरण अकरावे

शिवाजी १६७०-१६८०.

(१) शिवाजीचा मोगलांबरोबरील स्नेहाचा भंग आणि शिवाजीकडून किल्ल्यांची पुन्हा प्राप्ती (२) मुआज्जम आणि दिलेरखान यांच्यामधील कलह (३) सुरतेची दुसऱ्यांदा लूट (४) दाउदखानाचा दिंडोरी येथे १७ ऑक्टोबर १६७० रोजी शिवाजीकडून पराभव; शिवाजीचे वऱ्हाडवर हल्ले (५) इ. स. १६७१-७२ मधील मोगल सेनापतींच्या मोहिमांची हकीकत (६) मराठे कोळी लोकांच्या देशाचा ताबा घेतात; सुरतेच्या चौथाईची मराठ्यांकडून मागणी, १६७२ (७) इ. स. १६७३ मधील मराठ्यांच्या हालचाली (८) बहादूरखानाच्या छावणीची लूट आणि मोगलांबरोबर मोठ्या प्रमाणावर झालेले युद्ध १६७४ (९) शिवाजीची कर्नाटकवरील मोहिमेसाठी मुत्सद्देगिरीची पूर्वतयारी (१०) शिवाजीचा गोवळकोंड्याबरोबर तह आणि कर्नाटकाचा पाडाव (११) मोगल, विजापूर आणि शिवाजी, १६७८—७९ (१२) शिवाजीची अखेरची मोहीम (१३) शिवाजीचे राज्य, त्याचे सैन्य आणि अर्थव्यवस्था (१४) शिवाजीच्या कारभाराचे केंद्रीय स्वरूप (१५) शिवाजीचे चारित्र्य आणि त्याचे इतिहासातील स्थान.

प्रकरण बारावे

विजापूरची अधोगती आणि पाडाव

(१) जयसिंगाची विजापूरवरील स्वारी, १६६५–६६ (२) जयसिंगाला विजापुराहून माघार घेणे भाग पडते, १६६६ (३) जयसिंगाचे अपयश आणि मृत्यू (४) विजापूरच्या प्रांतावर राज्यकारभार करणारे लष्करी उमराव आणि त्यांचे स्वभावविशेष (५) आदिलशाही सुलतानांचा अस्त; राज्यकारभार करण्याचा हक्क मिळविण्यासाठी झालेले कलह (६) वजीर म्हणून बहलोलखानाची कारकीर्द, १६७५-१६७७ (७) दिलेरखान आणि बहलोल यांचे गोवळकोंड्यावर आक्रमण, १६७७ (८) मसूदकडे वजिरीचे पद येते; अफगाणांचे बंड; विजापूरच्या प्रांतात उद्भवलेली बंडे (९) दिलेरखानाचे विजापूरवर आक्रमण; शिवाजीची आदिलशहाला मदत, १६७९ (१०) दिलेरखान विजापूरभोवतालचा मुलूख उध्वस्त करतो आणि राजधानीवर हल्ला चढवितो (११) दिलेरखानाची बडतर्फी आणि त्याला परतण्याचा आलेला हुकूम, १६८० (१२) १६८० ते १६८४ पर्यंत औरंगजेबाचे विजापूर बाबतचे धोरण (१३) विजापूरच्या वेढ्याची सुरवात (१४) राजपुत्र आजम संकटात सापडतो; फिरोजजंगाकडून राजपुत्र आजम याजवरील संकटाचे निवारण (१५) विजापूरच्या वेढ्यात मोगलांचे झालेले हाल आणि त्यांना सोसाव्या लागलेल्या अडचणी (१६) विजापूरच्या शेवटच्या सुलतानाचा पाडाव.

प्रकरण तेरावे

कुतुबशहांची अधोगती आणि पाडाव

(१) अबुल हसन कुतुबशहा याचे राज्यारोहण, १६७२ (२) गोवळकोंड्याच्या सुलतानाबाबत मोगलांचे धोरण (३) मोगलांबरोबर युद्ध आणि हैद्राबादचा पाडाव, १६८५ (४) मादण्णाचा खून, इ. स. १६८६ (५) औरंगजेब गोवळकोंड्याला वेढा घालतो, इ. स. १६८७ (६) शहाआलम याला कैद केले जाते (७) गोवळकोंड्याच्या वेढ्यात औरंगजेबाला तोंड द्याव्या लागलेल्या अडचणींची हकीकत (८) किल्ल्यामधील शिबंदीने मोगल छावणीवर केलेले हल्ले आणि त्यात झालेले मोगलांचे अपरंपार नुकसान (९) मोगलांचे अपयश; दुष्काळ आणि रोगराई (१०) गोवळकोंड्याचा विश्वासघाताने झालेला पाडाव

प्रकरण चौदावे

संभाजीची कारकीर्द, १६८०–१६८९

(१) संभाजीचे कलहामधून झालेले राज्यारोहण; संभाजी स्वतःल राजा म्हणून राज्याभिषेक करून घेतो (२) संभाजी मोगलांबरोबर पुन्हा युद्ध सुरू करतो (३) राजपुत्र अकबर संभाजीकडे आश्रयासाठी येतो, जून १६८१ (४) संभाजीविरुद्ध करण्यात आलेला कट; कविकलश याच्यावर संभाजीची मर्जी बसते (५) औरंगजेबाच्या डावपेचांच्या दृष्टीने

अतिशय महत्त्वाच्या हालचाली, १६८२ (६) मोगल प्रयत्नांना आलेले अपयश; बादशहाच्या मनाचा गोंधळ आणि त्याच्या मनात निर्माण झालेले संशय-पिशाच्च (७) मराठ्यांचे आरमार आणि सिद्यांबरोबर त्यांची झालेली युद्धे, १६८०–८२ (८) संभाजीचे पोर्तुगीजांबरोबर युद्ध, १६८३ (९) संभाजी गोव्यावर स्वारी करतो (१०) राजपुत्र अकबर याचे बेत आणि मराठ्यांच्या दरबारात त्याच्या पदरी पडलेली निराशा (११) संभाजीविरुद्ध उद्भवलेली बंडाळी; जुलै १६८३ नंतर मोगलांनी केलेल्या कारवायांची हकीकत (१२) शहा आलम याची दक्षिण कोंकणावर स्वारी (१३) १६८३ नंतरच्या संभाजीच्या हालचाली (१४) मोगलांकडून विजापूरच्या प्रांतावर कब्जा केला जातो (१५) हिंदुस्थानातील अकबराने केलेले अखेरचे प्रयत्न (१६) मराठ्यांच्या राज्यातील अंतर्गत परिस्थिती आणि संभाजीच्या हालचाली. १६८५–८७ (१७) संभाजीची कैद आणि त्याला देण्यात आलेली देहांताची शिक्षा (१८) इ. स. १६८९ मधील युद्धाची हकीकत; रायगडाचा पाडाव आणि संभाजीच्या कुटुंबातील सर्व मंडळींची कैद.

पुस्तक पाचवे

प्रकरण पंधरावे

इ. स. १७०० पर्यंत मराठ्यांबरोबरचा झालेला संघर्ष

(१) औरंगजेबाच्या कारकीर्दीच्या दुसऱ्या भागातील त्याच्या हालचालींची हकिकत (२) मराठ्यांनी केलेली उचल, १६९०-९५ (३) बादशहाचे इस्लामपूरी येथील वास्तव्य, १६९५-९९ (४) औरंगजेबाच्या शेवटच्या मोहीमांची हकिकत १६९९-१७०५ (५) औरंगजेबाच्या अखेरच्या वर्षातील दुःख आणि दैन्यावस्था यांची हकिकत (६) राजारामाच्या राज्यारोहण प्रसंगी हजर असलेले प्रतिष्ठित मराठा मंत्री आणि सेनापती (७) इ. स. १६८९ मध्ये औरंगजेबाला प्राप्त झालेले विजय आणि त्याने स्वीकारलेले धोरण याची हकिकत (८) मराठ्यांची सरशी, १६९० च्या मे महिन्यात झालेला रूस्तुमखानाचा पाडाव आणि पन्हाळ्याचा वेढा यांची हकिकत (९) संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव यांजबरोबरील मोगलांचा संघर्ष, १६९३-९४ (१०) पूर्व कर्नाटक, त्याचे भौगोलिक विभाग आणि इतिहास यांची थोडक्यात माहिती (११) इ. स. १६८७ या वर्षी मोगल फौजांनी पूर्व कर्नाटकात जो प्रवेश केला त्यांची हकिकत (१२) जिंजी येथे राजाराम (१३) जिंजीच्या वेढ्याची सुरवात (१४) इ. स १६९२ साली अली मर्दानखान आणि इस्माईलखान यांना संताजी घोरपडे व धनाजी जाधव पकडतात त्याची हकिकत (१५) राजपुत्र कामबक्ष याची मराठ्यांबरोबर कारस्थाने आणि त्याला झालेली अटक याची हकिकत (१६) जुल्पिकारखानाच्या छावणीत पडलेला दुष्काळ आणि त्याने जिंजीहून वांदिवॉशकडे घेतलेली माघार (१७) १६९३–१६९४ या कालावधीत कर्नाटकमधील हालचाली (१८) जुल्पिकारखानाच्या इ. स. १६९५ मधील हालचाली आणि त्याच्या अडचणी (१९) १६९६ या वर्षीच्या जुल्पिकारखानाच्या हालचाली (२०) जिंजीच्या वेढ्याची पुन्हा सुरवात आणि किल्ल्याचा पाडाव (२१) कासिमखानाचा संताजीकडून पराभव आणि इ. स. १६९५ मध्ये दोड्डेरी येथे मृत्यू (२२) बसवपट्टण येथे संताजी हिम्मतखानाला ठार मारतो (२३) १६९६

मध्ये बादशाही बाजूकडून झालेल्या लष्करी व्यवस्थेची हकिकत (२४) संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव यांच्यामधील यादवी युद्ध; संताजीचा मृत्यू (२५) राजारामाचे स्वगृही आगमन आणि १६९८-९९ मधील त्याच्या हालचाली (२६) राजारामाचा मृत्यू आणि ताराबाईचे धोरण (२७) कोकणामधील युद्ध; १६८९—१७०४.

प्रकरण सोळावे

औरंगजेबाच्या जीवनातील अखेरचे पर्व

(१) मराठ्यांच्या शासनाचे १६८९ ते १६९९ या कालखंडामधील धोरण (२) राजमाता म्हणून ताराबाईने केलेला कारभार; मराठ्यांच्या राज्यातील अंतर्गत संघर्ष (३) शाहूचे कैदेतील जीवन, १६८९-१७०७; मोगलांचे मराठा पक्षपाती (४) औरंगजेबाचा साताऱ्याचा वेढा (५) मोगल परळीचा किल्ला जिंकून घेतात (६) इ. स. १७०१ मधील पन्हाळा किल्ल्याचा वेढा (७) खेळणा किल्ल्याचा वेढा (८) कोंडाणा (सिंहगड), राजगड आणि तोरणा या किल्ल्यांच्या वेढ्याची हकिकत (९) बेरड लोक, त्यांचा देश आणि त्यांचा राजा यांची हकिकत (१०) औरंगजेब वाकीन खेडा जिंकून घेतो, १७०५ (११) औरंगजेबाच्या युद्धांनी देशाची झालेली नासधूस; सर्व दूर निर्माण झालेली अशांतता (१२) मराठ्यांची दरोडेखोरी आणि युद्ध करण्याची पद्धती (१३) औरंगजेबाची अहमदनगरकडे माघार, १७०५ (१४) दुःख आणि निराशा यांनी भरलेली औरंगजेबाच्या जीवनातील शेवटची वर्षे (१५) मराठ्यांनी बादशाही मुलखात घातलेला धुमाकूळ, १७०६-१७०७ (१६) औरंगजेबाचे अखेरचे दिवस.

प्रकरण सतरावे

उत्तर हिंदुस्थानामधील घडामोडी

(१) मारवाडमध्ये चाललेले त्रिदश वार्षिक युद्ध (२) मारवाडमध्ये पुन्हा दुर्गादास. १६८७—१६९८ (३) अजित आणि दुर्गादास, १७०१-१७०७ (४) आग्र्याच्या जवळपास जाटांनी मांडलेला उच्छाद (५) पहाडसिंग गौर आणि त्याची मुले यांनी माळव्यात केलेली धामधूम, १६८५. (६) बिहारमधील गंगाराम याचे आणि माळव्यातील गोपालसिंग याचे बंड (७) बंगाल प्रातांबरोबर इंग्रजांचा व्यापार (८) बंगालमधील इंग्रज व्यापारी आणि मोगल अधिकारी यांच्यामध्ये निर्माण झालेला संघर्ष (९) इंगजांचे बंगालमध्ये औरंगजेबाबरोबर युद्ध, १६८६—१६८९ (१०) पश्चिम किनाऱ्यावर इंग्रजांचे मोगलांबरोबर युद्ध (११) हिंदी समुद्रावरील १७ व्या शतकात चांचेगिरी करणारे युरोपीयन चांचे (१२) युरोपीयन व्यापाराबाबत औरंगजेबाचे धोरण.

प्रकरण अठरावे

औरगंजेबाच्या कारकीर्दीमधील काही प्रांत

(१) बंगाल : बंगालची नैसर्गिक संपत्ती आणि मोगल राजवटीतील शांततेच्या काळात झालेला बंगाल प्रांताचा विकास (२) औरंगजेबाच्या कारकीर्दीतील बंगालचे सुभेदार (३) माळवा आणि मोगल कालखंडातील त्या प्रांताचे महत्त्वपूर्ण स्थान (४) मराठ्यांचे माळव्यामध्ये हल्ले, १६९९–१७०६ (५) छत्रसाल बुंदेला याचे पूर्वायुष्य (६) मोगल सरकारबरोबर छत्रसालचा झालेला संघर्ष (७) गोंडांचे राज्य आणि त्यांचे मोगलांबरोबरचे संबंध (८) देवगडचा गोंडराजा बख्त बुलंद हा आपले स्वातंत्र्य पुकारतो (९) मोगल अमलाखालील काश्मीरमधील परिस्थिती (१०) औरंगजेबाचे काश्मीरमधील सुभेदार आणि त्यांच्या कारकीर्दीत घडलेल्या गोष्टी (११) गुजरात : भौगोलिकदृष्ट्या गुजरातचे महत्त्व आणि गुजरातमधील लोकसंख्येची विविधता (१२) औरंगजेबाच्या कारकीर्दीतील गुजरातचे सुभेदार (१३) गुजरातवर मराठ्यांचे आक्रमण, १७०६ (१४) बोहरा आणि खोजा पंथी लोकांचा धार्मिक छळ.

प्रकरण एकोणिसावे

औरंगजेबाचे व्यक्तिमत्त्व आणि त्याच्या कारकीर्दीचा प्रभाव

(१) हिंदुस्थानच्या भरभराटीचे मूळ कारण म्हणजे हिंदुस्थानात नांदत असलेली शांतता (२) औरंगजेबाच्या कारकीर्दीतील सतत झालेल्या युद्धांनी अर्थिक क्षमतेला लागलेली ओहोटी (३) व्यापार आणि उद्योगधंदे यांची, युद्धे, अशांतता आणि सरकारी अधिकाऱ्यांकडून होणारी पिळवणूक, यांमुळे झालेली नुकसानी (४) मोगल सरकारची दिवाळखोरी (कर्जबाजारीपणा) (५) राज्यकारभाराला लागलेली उतरती कळा आणि सार्वजनिक अशांततेची निर्माण झालेली परिस्थिती (६) औरंगजेबाच्या अमदानीत भारतीय संस्कृतीचा झालेला ऱ्हास, त्याची कारणे आणि लक्षणे (७) मोगल साम्राज्यातील अमीरउमरावांचा झालेला नैतिक अधःपात (८) तत्कालीन लोकांमधील धर्मभोळेपणा (९) सरकारी अधिकाऱ्यांमधील लाचखाऊपणा; अधिकारी जगातील जीवन आणि नीतिमत्ता (१०) सर्वसामान्य लोकांच्या जीवनातील पवित्रता आणि निर्भेळ आनंद (११) औरंगजेबाचे स्वभावचित्र (१२) औरंगजेबाच्या बोकांडीस बसलेले सत्तेच्या केंद्रीकरणाच्या पापाचे भूत आणि या गोष्टीचे राज्यकारभारावर झालेले अनर्थावह परिणाम (१३) मोगल सरकारचे खरे स्वरूप आणि उद्दिष्ट (१४) हिंदू आणि मुसलमान यांचे सर्वसाधारण जीवन आणि त्यांची ध्येये यामधील भेदामुळे दोन्ही जमातीत संपूर्ण एकीकरण होण्याची अशक्यता (१५) औरंगजेबाच्या अंमलाखाली हिंदूंची जी स्थिती होती तिचे वर्णन, राजकीयदृष्ट्या दडपलेले आणि मानभंगामुळे हिनत्वं पावलेले असे जे केले जाते त्याची हकिकत (१६) हिंदुस्थानातील मुसलमानांची अवनती आणि तिची कारणमीमांसा (१७) हिंदू समाजाची झालेली अवनती आणि हिंदू समाजातील मूलभूत असलेला कमकुवतपणा (१८) हिंदुस्थानामधील हिंदू आणि मुसलमान यांचे एकत्रित जीवन; दोन्ही जमातीत कधीमधी निर्माण झालेला एकोपा, त्यांच्यातील सुप्त वैमनस्य आणि त्यांच्यामध्ये उडालेले संघर्ष (१९) प्रगतिशील होण्यासाठी ज्या मनोधैर्याची आवश्यकता लागते तिचा हिंदुस्थानी लोकांमधील अभाव आणि परिणामी त्यांची झालेली अवनती (२०) औरंगजेबाच्या

कारकीर्दीचे महत्त्व; भारतीय राष्ट्रीयत्वाची उभारणी कशी करता येईल याबद्दल चर्चा.

प्रकरण विसावे

औरंगजेबाचे साम्राज्य, त्याची साधनसंपत्ती आणि राज्यकारभाराची पद्धती

(१) मोगल साम्राज्य : त्याची व्याप्ती आणि वार्षिक वसूल (२) साम्राज्याचा अधिकारी उमराव वर्ग (३) उद्योगधंदे आणि व्यापार (४) राज्यकारभाराची पद्धती.

औरंगजेबाच्या कारकीर्दीचा संक्षिप्त इतिहास

ग्रंथसूची

Ahkam-I-Alamgiri of Hamiduddin translated by Sir Sarkar (1925).
Alamgirnama
Ain-i-Akbari of Blochmann.
Adab-i-Alamgiri
Amal-i-Salih of Kambu in Elliot and Dowson Vol. VII.
Akhabarat
Annals of Todd
Basatin-i-Salatin by Mirza Ibrahim, Hyderabad Lithographed Edition.
Chhatrapati Sambhaji Maharaj by Shri Bendre.
Chitnis Bakhar.
Chitragupta Bakhar.
Cambridge History of India Vol. III (1928) Vol. IV (1937).
Dilkusha of Bhimsen Saxena.
Elliot and Dowson Vols. V to VII.
Fatohate Alamgiri of Ishwardas Nagar
Fragments of the Mugal Empire of Orme (1805).
Fathiyah-i-Ibriyah.
History of the Marathas of Grant Duff.
Hindvi Swarajya Ani Moghal by Shri Setu Madhavrao Pagdi (1961)
History of Shah Jahan of Dilhi by Saxena (1932).
Imperial Gazetteers.
Jedhe Shakawali.
Judicial System of the Marathas of Dr. V. T. Gune.
Kalimat-i-Tayyibat.
Kaifiyats.
Masir-i-Alamgiri of Saqi Mustaid Khan translated by Sir Sarkar.

Masir-ul-umra.
Muntkhabullubab of Khafi Khan.
Masum.
Mirat-i-Ahmadi by Ali Muhammad Khan translated as Birds History of Goozerat.
Mughal Administration of Sir Sarkar (1952).
Maharashtra Ani Marathe by Shri Setu Madhavrao Pagdi (1962).
Provincial Government of the Mughals of Saran.
Padshahnama of Abdul Hamid Lahori.
Rajwade Khand.
Rajputana Gazetteer.
Rajtarangini of Stein.
Ruqaat-i-Alamgiri.
Storia Do Mogor of Manucci.
Shivaji of Sir Sarkar.
Shahjahannama of Inayat Khan.
Studies in Mughal Administration of Sir Sarkar.
Sabhasad Bakhar.
Shivcharitra Sahitya
Shivcharitra Pradip.
Tuzuk-i-Jahangiri translated by A. Rogers, Vol. I (1909) and Vol. II (1914).
Travels of Vambery.
Tarikh-i-Kashmiri of Azam.
Travels in India of Tavernier translated by V. Ball, London, 1889.
Voyages and Travels of Kerr.
Waris.
Zubdat-ul-Tawarikh of Afzal Husain.

औरंगजेबाच्या कारकीर्दीचा संक्षिप्त इतिहास

कालसूची

१६१८ ऑक्टोबर २४, औरंगजेबाचा जन्म.

१६२७ एप्रिल १०, शिवाजीचा जन्म.

१६२८ फेब्रुवारी ४, शहाजहान स्वतःला राज्याभिषेक करून घेतो (जहांगीरचा मृत्यू, २९ ऑक्टोबर १६२७)

१६३३ मे २८, औरंगजेबाची हत्तीबरोबर झुंज.

१६३५ सप्टेंबर-डिसेंबर, औरंगजेबाचे बुंदेल्यांबरोबरील युद्धात धुरीणत्व.

अनुक्रमणिका

१६३६ मे, शहाजहान आणि आदिलशहा यांमधील फाळणीचा तह.

१६३६ जुलै– १६४४ मे, औरंगजेबाची दक्षिणेच्या पहिल्या सुभेदारीची कारकीर्द.

१६३६ ऑक्टोबर, शहाजी भोसले याची मोगलांना शरणागती आणि विजापूरच्या चाकरीत प्रवेश.

१६३७ मे ८, औरंगजेबाचा दिलरसबानूबरोबर विवाह, (८ ऑक्टोबर १६५७, दिलरसबानूचा मृत्यू).

१६३८ फेब्रुवारी १५, औरंगजेबाची मोठी मुलगी जेबुन्नीसा हिचा जन्म. (२६ मे १७०२, जेबुन्नीसाचा मृत्यू) जून, औरंगजेब बागलाण जिंकून साम्राज्यात सामील करतो.

१६३९ डिसेंबर १९, महमद सुलतान याचा जन्म (३ डिसेंबर १६७६ महमद सुलतान याचा मृत्यू.)

१६४३ ऑक्टोबर ४, मुआज्जम (शहाआलम पहिला) याचा जन्म.

१६४४ मे, औरंगजेबाची बडतर्फी आणि पदच्युती. नोव्हेंबरमध्ये पुन्हा पहिल्या पदावर नियुक्ती.

१६४५ फेब्रुवारी – १६४७ जानेवारी, औरंगजेबाकडे गुजरातची सुभेदारी.

१६४७ मार्च ७, दादाजी कोंडदेवाचा मृत्यू; शिवाजी स्वातंत्र्य पुकारतो आणि आदिलशाही किल्ले जिंकून घेतो. मे २५, औरंगजेब वाल्ख शहरापर्यंत पोहोचतो; ऑक्टोबरमध्ये औरंगजेबाची माघार.

१६४८ मार्च – १६५२ जुलै, औरंगजेबाची मुलतान आणि सिंधचा सुभेदार म्हणून नेमणूक.

१६४९ मे १४ – सप्टेंबर ५, कंदहारला औरंगजेबाने घातलेला पहिला वेढा.

१६५२ मे २ – जुलै ९, कंदहारला औरंगजेबाचा दुसरा वेढा.

१६५२ १६५८, औरंगजेबाची दक्षिणेची दुसरी सुभेदारी.

१६५५ नोव्हेंबर २१; कुतुबशहा मीर जुमला याच्या मुलाला कैदेत टाकतो.

१६५६ जानेवारी १५, शिवाजी जावळी जिंकून घेतो, ६ एप्रिलला शिवाजीकडून रायगडचा पाडाव. जानेवारी; औरंगजेबाचे गोवळकोंड्यावर आक्रमण; मोगल हैद्राबादचा ताबा घेतात. २३ जानेवारी; औरंगजेब गोवळकोंड्याला वेढा घालतो. फेब्रुवारी ७ – मार्च ३०, एप्रिलमध्ये झालेला तह. जुलै, मीर जुमलाचे दिल्लीला प्रयाण आणि वजीर म्हणून त्याची नेमणूक. नोव्हेंबर ४, महमद आदिलशहाचा मृत्यू आणि अली आदिलशहा दुसरा याचे राज्यारोहण.

१६५७ विजापूर बरोबरचे युद्ध : औरंगजेब बिदरला वेढा घालतो. बिदरचा पाडाव २ – २९ मार्च, कल्याणीला वेढा आणि पाडाव , ४ मे – १ ऑगस्ट, औरंगजेबाची माघार, ४ आक्टोबर. सप्टेंबर ६, शहाजहान दिल्ली येथे आजारी पडतो. २६ ऑक्टोबर रोजी त्याचे आग्रा येथे प्रयाण. नोव्हेंबर, शुजा बंगालमध्ये स्वतःला राज्याभिषेक करून घेतो. डिसेंबर ५, मुराद स्वतःला राज्याभिषेक करून घेतो. डिसेंबर २० रोजी मुरादकडून

सुरतेचा पाडाव व लूट.

१६५८ फेब्रुवारी ५, सिंहासनासाठी होणाऱ्या संघर्षांत भाग घेण्यासाठी औरंगजेब औरंगाबादहून कूच करतो. फेब्रुवारी १४, बहादूरपूर येथे सुलेमान शुकोकडून शुजाचा पराभव. एप्रिल १५, धर्मत येथे जसवंताचा औरंगजेब आणि मुराद यांजकडून पराभव. मे २३, औरंगजेबाच्या कारकीर्दीच्या पहिल्या वर्षाची अधिकृतरीत्या सुरुवात. मे २९, समुगढ येथे दाराचा पराभव. जून ८, आग्र्याच्या किल्ल्यात शहाजहानचा बंदीवास. जून २५, औरंगजेब मुरादला बंदीवासात टाकतो. (४ डिसेंबर १६६१ रोजी मुरादला ठार केले जाते.) जुलै २१, औरंगजेबाचा पहिला राज्यारोहण समारंभ.

१६५९ जानेवारी ५, शुजाचा खाजवा येथे पराभव. मार्च १३, दाराचा देवराई येथे पाडाव. जून ५, औरंगजेबाचे भपकेबाज राज्यारोहण. जून ९, दारा आणि शुको यांची कैद. ऑगस्ट ३०, दाराला देहदंडाची सजा. नोव्हेंबर १०, शिवाजीकडून अफजलखानाचा वध.

१६६० मे ९, शायस्ताखान पुण्याचा ताबा घेतो. चाकणवर अचानक हल्ला, ऑगस्ट १५. मे ६, शुजाचे डाक्क्याहून पलायन. मीर जुमला डाक्क्याचा ताबा घेतो. (आराकानमध्ये शुजाचा नाश, फेब्रुवारी १६६१). डिसेंबर २७, सुलेमान शुकोला कैद करून दिल्ली येथे आणले जाते. (मे १६६२ मध्ये शुकोचा वध).

१६६१ फेब्रुवारी ३, शिवाजी उंबरखिंड येथे कार्तल्बखानाचा पराभव करतो. मे , मोगल शिवाजीकडून कल्याण जिंकून घेतात. मे २२, पर्शियाचा वकील बुदाक बेग औरंगजेबाची गाठ घेतो. डिसेंबर १९, मीर जुमला कुचबिहार शहर जिंकून घेतो.

१६६२ मार्च १७, मीर जुमला आसामचे राजधानीचे शहर गढगाव जिंकून घेतो. मे १२, औरंगजेब आजारी पडतो. आजारीपणातून औरंगजेब पूर्ण बरा होतो, जून २४.

१६६३ जानेवारी १, आसामचा राजा मीर जुमलाबरोबर तह करतो. मीर जुमला १० जानेवारी पासून आसाममधून परतण्यास सुरुवात करतो. मीर जुमला याचा ३१ मार्च रोजी मृत्यू. एप्रिल ५, शिवाजीचा शायस्ताखानावर रात्रीचा हल्ला. मे १४ – ऑगस्ट १६, औरंगजेबाची काश्मीरला भेट.

१६६४ जानेवारी ६ – १० शिवाजीची सुरतेची पहिली लूट. जानेवारी २३, शहाजी भोसले याचा मृत्यू.

१६६५ मार्च ३०, जयसिंग पुरंदरच्या वेढ्याला सुरुवात करतो. शिवाजी ११ जून रोजी जयसिंगाची भेट घेतो, पुरंदरचा तह, १३ जून. एप्रिल १०, औरंगजेब हिंदूंवरील कर दुप्पटीने वाढवितो. नोव्हेंबर २०, जयसिंग विजापूरवरील स्वारीची सुरवात करतो.

१६६६ ५ जानेवारी १६६६ रोजी त्याच्या माघारीला सुरवात, २८ ऑगस्ट १६६७ रोजी त्याचा मृत्यू. जानेवारी २२, शहाजहानचा मृत्यू. जानेवारी २६, शायस्ताखान छटगाव काबीज करतो. मे १२, शिवाजी आणि औरंगजेब यांची भेट, शिवाजीचे १९ ऑगस्ट रोजी पलायन. १२ सप्टेंबर १६६६ रोजी शिवाजी राजगड येथे परततो. सप्टेंबर १६६७ रोजी शिवाजीची मोगलांना शरणागती (?)

१६६७ फेब्रुवारी २४, कामबक्ष याचा जन्म. मार्च, पेशावर येथे युसुफजाई लोकांचे बंड.

१६६८ फेब्रुवारी, औरंगजेब दरबारात संगीताला मज्जाव करतो. फेब्रुवारी, औरंगजेबाची शिवाजीला राजा म्हणून मान्यता.

१६६९ एप्रिल ९, सगळ्या साम्राज्यात देवळांचा नाश करण्यात यावा अशी औरंगजेबाची आज्ञा; ऑगस्टमध्ये बनारस येथील विश्वनाथाच्या देवळाचा विध्वंस, नंतरच्या जानेवारी महिन्यात मथुरेमधील केशव मंदिराचा नाश.

१६७० जानेवारी १ (?), शिवाजी मोगलांबरोबर पुन्हा युद्ध सुरू करतो, आणि आपले सर्व किल्ले जिंकून घेऊन मोगल प्रदेशावर छापे घालतो. ऑक्टोबर ३–५, शिवाजीची दुसऱ्यांदा सुरतेची लूट. ऑक्टोबर १७, दिंडोरी येथे शिवाजीकडून दाऊदखानाचा पराभव. डिसेंबर, शिवाजी खानदेश आणि वऱ्हाड लुटतो.

१६७१ जानेवारी, औरंगजेब महसूल खात्यातून सर्व हिंदू अधिकाऱ्यांना बडतर्फ करतो. बुंदेलखंडात छत्रसाल औरंगजेबाविरुद्ध युद्ध सुरू करतो. (राजा छत्रसालाचा मृत्यू, १७३१.)

१६७२ ?....अचमलच्या नेतृत्वाखाली आफ्रिडी लोकांचे बंड मार्च , सतनामी लोकांचे बंड. एप्रिल २१, अबदुल्ला कुतुबशहा याचा मृत्यू. अबुलहसन गादीवर येतो. नोव्हेंबर २४, दुसरा अलिआदिलशहा याचा मृत्यू. सिकंदर गादीवर येतो. खवासखान वजीर होतो. (११ नोव्हेंबर १६७५ रोजी खवासखानाची बडतर्फी.)

१६७३ ६ मार्च रोजी पन्हाळा, १ एप्रिल रोजी परळी आणि २७ जुलै रोजी सातारा हे किल्ले शिवाजी जिंकून घेतो.

१६७४ फेब्रुवारी २४, नेसारी येथील युद्धात प्रतापराव मारला जातो. हंबीररावाची सेनापती म्हणून नेमणूक होते. एप्रिल ७, औरंगजेब हसनअब्दाल येथे जाण्यासाठी दिल्लीहून निघतो. डिसेंबर १६७५ पर्यंत त्याचा या ठिकाणी मुक्काम. जून ६, शिवाजीचा राज्याभिषेक; १८ जून रोजी जिजाबाईचा मृत्यू.

१६७५ एप्रिल – मे, शिवाजी फोंडा किल्ला आणि कारवार जिल्हा जिंकून घेतो. नोव्हेंबर ११, बहलोलखान विजापूरचा वजीर होतो. (मृत्यू २३ डिसेंबर १६७७.) डिसेंबर, गुरू तेघ बहादूर याला फाशी. व्यंकोजी तंजावर जिंकून आपल्या राज्याला जोडतो.

१६७६ जून १, हळसंगी येथे बहादूरखानाचा बहलोलकडून पराभव. ऑक्टोबर ८, असदखानाची औरंगजेबाचा वजीर म्हणून नेमणूक.

१६७७ ? जानेवारी १, शिवाजीची कर्नाटकच्या मोहिमेची सुरुवात. फेब्रुवारी महिन्यात त्याचा हैद्राबाद येथे मुक्काम, २४ मार्च – १ एप्रिल, श्री शैल येथे मुक्काम, १३ मे रोजी जिंजी किल्ल्याचा पाडाव, २३ मे ला वेल्लोरला वेढा. (२१ जुलै १६७८ रोजी वेल्लोरचा पाडाव.) २६ जून रोजी तिरुवाडी येथे शेरखानाचा पराभव, १८ – २३ जुलै (?) च्या दरम्यान तिरुमलवाडी येथे व्यंकोजीची भेट. ५ नोव्हेंबर (?) रोजी शिवाजी आपल्या परतीच्या प्रवासात म्हैसूरचे पठार चढतो. व्यंकोजीचा १६ नोव्हेंबर रोजी संताजीवर हल्ला, शिवाजी मायदेशी (पन्हाळा) ४ एप्रिल १६७८ रोजी पोहोचतो (?). मार्च १९, अमीरखानाची अफगाणिस्तानचा सुभेदार म्हणून नेमणूक (८ जून १६७८ रोजी

आगमन, २८ एप्रिल १६९८ रोजी मृत्यू.) जुलै ७, बहादूरखान गुलबर्गा जिंकून घेतो. त्याच्या जागी ऑगस्टमध्ये दिलेरखानाची नेमणूक. दिलेरखानाचे गोवळकोंड्यावर आक्रमण. मळखेड येथे सप्टेंबरमध्ये दिलेरखानाची पिछेहाट. नोव्हेंबर १८, औरंगजेब दरबारी रिती–रिवाजात अतिशय कडक अशी शुचिर्भूतता आणतो.

१६७८ फेब्रुवारी २१, सिद्दी मसूद विजापूरचा वजीर होतो, डिसेंबर १६८३ मध्ये आपल्या पदाचा त्याच्याकडून राजीनामा. अकाखुश्राव त्याच्या जागी वजीर होतो. ११ ऑक्टोबर १६८४ रोजी त्याचा मृत्यू. डिसेंबर १०, जामरूद येथे जसवंतसिंगाचा मृत्यू. डिसेंबर १३, संभाजी दिलेरखानाकडे पळून जातो. ४ डिसेंबर १६७९ रोजी तो पन्हाळा येथे परततो. (?)

१६७९ फेब्रुवारी १९, औरंगजेब अजमीर येथे पोहोचतो. औरंगजेबाची मारवाडवर स्वारी. २६ मे रोजी औरंगजेब मारवाडचे राज्य इंद्रसिंग याला देतो. एप्रिल २, औरंगजेब बिगर मुसलमानांवर पुन्हा जिजीया कर लादतो. जुलै १५, दुर्गादासाकडून अजीतसिंगाला दिल्लीबाहेर नेले जाते. सप्टेंबर २५, औरंगजेबाचे पुन्हा अजमीर येथे आगमन. ऑक्टोबरमध्ये मारवाडचे राज्य साम्राज्यात सामील. ऑक्टोबर ७ – नोव्हेबर १४, दिलेरखानाची विजापूरच्या किल्ल्यावर चाल. त्याच्याकडून सभोवतालच्या प्रदेशाची लुटालूट. नोव्हेंबर ४, शिवाजी मोगली जिल्ह्यात लुटालूट करण्यासाठी बाहेर पडतो, १५–१८ नोव्हेंबर जालन्याची लूट. रणमस्तखानाकडून शिवाजीचा पराभव. २२ नोव्हेंबर (?) रोजी पट्टा येथे शिवाजीची माघार?

१६८० जानेवारी २३, औरंगजेबाचा उदयपूरमध्ये प्रवेश. २२ फेब्रुवारी रोजी चितोडला भेट. २२ मार्च रोजी अजमेर येथे त्याचे आगमन. एप्रिल ४, शिवाजीचा मृत्यू. जून १८, संभाजीचा रायगडमध्ये राजा म्हणून प्रवेश. ऑक्टोबर २२, महाराणा राजसिंग याचा मृत्यू. जयसिंग याचे राज्यारोहण. शायस्ताखानाची दुसऱ्यांदा बंगालच्या सुभेदारीवर नेमणूक १६८०-८८.

१६८१ जानेवारी १, राजपुत्र अकबराचा स्वतःला बादशहा म्हणून राज्याभिषेक. जानेवारी १६, बंडाचा प्रयत्न अशयस्वी झाल्यामुळे राजपुत्र अकबर याचे पलायन. महाराष्ट्रात १ जून रोजी पाली येथे त्याचे आगमन. जानेवारी ३०–फेब्रुवारी १, बुरहाणपूरच्या सर्व उपनगरांची मराठ्यांकडून लूट. मार्च , बिहारमधील बंडखोर गंगाराम नागर पाटण्याच्या किल्ल्याला वेढा घालतो. (मृत्यू १६८४). जून १४, महाराणा जयसिंग औरंगजेबाबरोबरचा राज समुद्रचा तह करतो. सप्टेंबर ६, जहानआरा हिचा मृत्यू सप्टेंबर ८, दक्षिणेकडे जाण्यासाठी औरंगजेबाची अजमीरहून कूच. १३ नोव्हेंबर १६८१ रोजी बुरहाणपूर येथे आणि २२ मार्च १६८२ रोजी औरंगाबाद येथे त्याचे आगमन. ऑक्टोबर, अण्णाजी, सोयराबाई आणि इतर कटवाल्यांना संभाजी मृत्युदंडाची शिक्षा करतो. नोव्हेंबर १३, संभाजीची पाली येथे अकबराबरोबर मुलाखत.

१६८२ जानेवारी, संभाजीचा जंजिऱ्यावर तोफांचा भडिमार. एप्रिल , मोगलांचा रामसेजला वेढा. ऑक्टोबरमध्ये अपयश आल्यामुळे त्यांची माघार. मे १८, शाहू (अथवा दुसरा शिवाजी) याचा जन्म. नोव्हेंबर, मोगल कल्याणचा ताबा घेतात. २३ मार्च १६८३ रोजी मोगल कल्याण खाली करतात. डिसेंबर, अकबराचे पालीहून बांदा येथे प्रयाण.

१६८३ एप्रिल ५, संभाजी पोर्तुगीजांबरोबर युद्ध सुरू करतो. सप्टेंबर, अकबराचे बिचोलीमकडे प्रयाण. पर्शियाकडे जाण्यासाठी जहाज मिळविण्याचा अकबराचा प्रयत्न. सप्टेंबर २०, रामघाटावरील मोहीमेसाठी शहाआलम याचे औरंगाबादहून प्रयाण. ऑक्टोबर २२, गोव्याचा व्हाइसरॉय फोंड्याला वेढा घालतो. ३१ ऑक्टोबर रोजी भयंकर नुकसान झाल्यामुळे त्याची माघार. नोव्हेंबर १४, मराठे दक्षिण एस्टेहाओचा ताबा घेतात. गोव्यावर मराठ्यांच्या संकटाची छाया. डिसेंबर १, मराठ्यांचे बारदेश आणि सालसेट्टी या जिल्ह्यांवर आक्रमण. (१ महिन्यापर्यंत मराठे त्या प्रदेशात धुमाकूळ घालतात).

१६८४ जानेवारी ५, शहाआलम बिचोलीम येथे पोहोचतो. तेथून गोव्याकडे त्याचे प्रयाण. सावंतवाडी आणि दक्षिण रत्नागिरीमध्ये शहाआलमची नासधूस. २० फेब्रुवारी रोजी तो रामघाटला परततो. १८ मे रोजी त्याचे अहमदनगरला आगमन. जानेवारी २०, भीमगड येथे संभाजी आणि पोर्तुगीज यांमध्ये अकबराने घडवून आणलेला तह. मे, मुंबईच्या इंग्रजांबरोबर संभाजीची मैत्रीचा तह. श्रीनगर येथे शिया व सुन्नी यांमध्ये यादवी युद्ध.

१६८५ जानेवारी, व्यंकोजीचा मृत्यू. दुसऱ्या शहाजीचे तंजावर येथे राज्यारोहण. फेब्रुवारी, खेमसावंत याचे संभाजीविरुद्ध बंड. एप्रिल १, मोगलांच्या विजापूरच्या वेढ्याची सुरुवात. राजारामाच्या नेतृत्वाखाली जाटांची बंडाला सुरुवात. ऑक्टोबर ८ (?) मोगल दुसऱ्यांदा हैद्राबादचा ताबा घेतात. ऑक्टोबर, भडोचचा किल्ला धर्मवेडे खोजे आपल्या ताब्यात घेतात. डिसेंबर, माळव्यामध्ये मुलूकचंद हा पहाडसिंग गौर याला ठार मारतो. परंतु गौरांचे बंड १६९२ पर्यंत राहते.

१६८६ मार्च ७, (?) मादण्णाचा गोवळकोंडा येथे खून. जुलै ३, विजापूरच्या वेढ्याच्या जागी औरंगजेबाचे आगमन. सप्टेंबर १२, विजापूरचा पाडाव आणि सिंकदर आदिलशहाच्या सुलतानपदाची समाप्ती. (मृत्यू ३ एप्रिल १७००) ऑक्टोबर २८, बंगालमधील इंग्रज हुगळीची लूट करतात आणि युद्धाला सुरुवात करतात.

१६८७ जानेवारी २८, मोगल हैद्राबादचा अखेरचा ताबा घेतात. फेब्रुवारी ७, गोवळकोंड्याच्या वेढ्याला सुरुवात २१ सप्टेंबर रोजी गोवळकोंड्याचा पाडाव. फेब्रुवारी २१, शहा आलमला कैद केले जाते. फेब्रुवारी, अकबराचे जहाजातून पर्शियाकडे प्रयाण. २४ जानेवारी १६८८ रोजी इस्फहान येथे त्याचे आगमन (मृत्यू १७०४) मार्च, दुर्गादास मारवाडला परततो. राठोड मोगलांना जेरीस आणतात. दुर्जनसाल हाडा बुंदी काबीज करतो. जून ११, इंग्रज बंडखोर हिजलीचा ताबा सोडतात. नोव्हेंबर २८, पामनायक बेरड लोकांच्या राजधानीचे शहर सागर याची शरणागती देतो. (मृत्यू १ जानेवारी १६८८)

१६८८ जानेवारी ११, मराठे कांजीवरम शहर लुटतात. फेबुवारी, (?) राजाराम जाट सिंकदरा येथील अकबराचे कबरस्थान उध्वस्त करतो. (४ जुलै रोजी राजाराम जाट मारला जातो.) मार्च, आजम बेळगाव जिंकून घेतो. ऑगस्ट ६, सिद्दीमसूद आदोनी किल्ला मोगलांच्या हवाली करतो. ऑक्टोबर, पश्चिम किनाऱ्यावर इंग्रज व्यापारी औरंगजेबाबरोबर युद्ध सुरू करतात. नोव्हेंबर, विजापूरमध्ये दोन महिनेपर्यंत गाठीच्या रोगाची लागण.

१६८९ फेब्रुवारी १, संभाजी आणि कविकलश यांना कैद केले जाते. १५ फेब्रुवारी रोजी त्यांना बादशाही छावणीत बंदी म्हणून आणले जाते. ३ मार्च रोजी त्यांचा वध. फेब्रुवारी ८, राजारामाला रायगड येथे राज्याभिषेक. ५ एप्रिल रोजी त्याचे रायगडहून पलायन आणि १ नोव्हेंबर रोजी जिंजी येथे आगमन. मार्च २७, मातबरखान कल्याण परत जिंकून घेतो. ऑक्टोबर १९, रायगडचा शाहू सहीत जुल्फिकारखानाकडून पाडाव डिसेंबर २५, औरंगजेब इंग्रज व्यापाऱ्यांना क्षमा करून त्यांच्याबरोबर तह करतो.

१६९० जानेवारी २८ (?) मोगलांचा सिनसानीवर अचानक हल्ला.

मार्च २१, औरंगजेबाची मार्च १६९५ पर्यंत गलगली येथे छावणी (मार्च १६९१ ते १६९२ इतका अवधी सोडून.) मे २५, मराठे रुस्तुमखानाला साताऱ्याजवळ पकडतात. ऑगस्ट २४, इंग्रज कलकत्त्याची स्थापना करतात. ऑगस्ट , जुल्फिकारखान कांजीवरम येथे पोहोचतो. सप्टेंबर २ (?), जुल्फिकारखानाचे जिंजीसमोर आगमन व जिंजीच्या वेढ्याला सुरुवात.

१६९१ डिसेंबर १६, असदखान आणि कामबक्ष जिंजीला पोहोचतात.

१६९२ डिसेंबर १३, कांजीवरमचा फौजदार अली मर्दानखान याला संताजी घोरपडे काबीज करतो. डिसेंबर १६, धनाजी जाधव जिंजीच्या परिसरात इस्माईलखानमखा याला काबीज करतो. डिसेंबर २० (?) असदखान कामबक्ष याला कैद करतो.

१६९३ जानेवारी २३, जुल्फिकार जिंजीचा वेढा अर्धवट सोडतो आणि वांदिवाशकडे माघार घेतो. (?) उत्तर कोकणातल्या पोर्तुगीजांबरोबर मातबरखान युद्ध सुरू करतो.

१६९४ फेब्रुवारी – मे, तंजावर प्रांतातून जुल्फिकार खंडणी गोळा करतो आणि दक्षिण अर्काट जिल्हा काबीज करतो. सप्टेंबर, जुल्फिकार जिंजीला पुन्हा वेढा देतो, डिसेंबर १६९५ मध्ये वेढा उठवून अर्काट येथे छावणी देतो. (जानेवारी १६९६ – मार्च १६९७). दुर्गादास अकबराच्या मुलीला औरंगजेबापाशी पोहोचती करतो.

१६९५ मे २१ – ऑक्टोबर १९, १६९९ औरंगजेबाची इस्लामपूरी येथे छावणी मे, शहाआलमची सुटका आणि पंजाबचा सुभेदार म्हणून रवानगी. सप्टेंबर ८, गंज-इ-सवाईवरील चांचेगिरी. ऑक्टोबर, वेल्लोरला मोगल वेढा देतात. (१४ ऑगस्ट १७०२ रोजी वेल्लोरचा पाडाव). नोव्हेंबर , संताजी घोरपडे कासीमखानाला दोड्डेरीमध्ये वेढतो. कासीमखानाचा मृत्यू.

१६९६ जानेवारी २०, बसवपाटण येथे संताजी हिम्मतखानाला ठार करतो. मार्च, संताजीची पूर्व कर्नाटकावर धाड; तेथून नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये त्याचे म्हैसूरवर आक्रमण. मे (?), शोव्हासिंग आणि रहीमखान यांचे बंड. बख्त बुलंद गोंड देवगडमध्ये युद्ध पुकारतो.

१६९७ मार्च, संताजीचा सातारा जिल्ह्यात धनाजीकडून पराभव. जून, संताजीचा खून. मे – जून, जबरदस्तखान बंडखोर रहीमखानाला घालवून देतो. (ऑगस्ट १६९८ मध्ये रहीमखान मारला जातो). नोव्हेंबर, बंगालचा नवीन सुभेदार राजपुत्र अजीमउश्शान याचे बरद्वान येथे आगमन. नोव्हेंबर, जुल्फिकारखान जिंजीच्या वेढ्याला पुन्हा सुरवात करतो.

१६९८ जानेवारी ८, जुल्फिकारकडून जिंजीचा पाडाव. मे, अकबराचा मुलगा बुलंद अख्तर याला दुर्गादास औरंगजेबाकडे नेऊन पोहोचवितो. बादशहा, दुर्गादास आणि अजीत यांच्यावर जहागिरी आणि मनसब यांची खैरात करतो.

१६९९ फेब्रुवारी, राजाराम विशाळगडला पोहोचतो. मार्च , हिंदीमहासागरात पहारा करण्याबाबत बादशहा आणि युरोपीयन व्यापारी यांच्यामध्ये करार. ऑक्टोबर १९, किल्ल्यांना वेढा देण्यासाठी औरंगजेबाची इस्लामपूरहून कूच. ऑक्टोबर २६, राजाराम सातारा किल्ल्यातून बाहेर पडतो. नोव्हेंबर, कृष्णा सावंतच्या नेतृत्वाखाली मराठ्यांचे माळव्यावर प्रथम आक्रमण. डिसेंबर ९, औरंगजेब साताऱ्याच्या वेढ्याला सुरवात करतो. (२१ एप्रिल १७०० रोजी साताऱ्याचा पाडाव).

१७०० मार्च २, सिंहगड येथे राजारामाचा मृत्यू. त्याचा मुलगा कर्ण याला राज्याभिषेक. २३ मार्च रोजी कर्णाचा मृत्यू. ताराबाईचा मुलगा तिसरा शिवाजी याचे राज्यारोहण जून ९. औरंगजेब परळी काबीज करतो. ऑक्टोबर १, खवासपूर येथील बादशाही छावणी वाहून जाते. बादशहाच्या गुडघ्याचा सांधा निखळतो.

१७०१ मार्च ९, औरंगजेब पन्हाळ्याला वेढा घालतो. (२८ मे रोजी पन्हाळ्याचा पाडावा.) एप्रिल, सर विल्यम नॉरीसची वकील म्हणून औरंगजेबाबरोबर मुलाखत. बंगालचा दिवाण म्हणून मुर्शीदकुलीखान याची नेमणूक.

१७०२ जानेवारी १६, औरंगजेबाचे खेळण्यासमोर आगमन, वेढ्याची सुरुवात आणि ७ जून रोजी पाडाव. दुर्गादास आणि अजीत यांचे औरंगजेबाविरूद्ध पुन्हा एकदा बंड. डिसेंबर २७, औरंगजेब कोंडाण्याच्या (सिंहगड) वेढ्याला सुरुवात करतो. ८ एप्रिल १७०३ रोजी किल्ल्याचा पाडावा.

१७०३ ऑक्टोबर, नेमा शिंदे याचे वऱ्हाड आणि माळवा या प्रांतांवर आक्रमण. फेब्रुवारी १७०४ मध्ये त्याची फिरोजजंग याजकडून हाकालपट्टी. डिसेंबर २, औरंगजेब राजगडला वेढा देतो. १६ फेब्रुवारी १७०४ रोजी किल्ल्याचा पाडाव.

१७०४ २३ फेब्रुवारी, औरंगजेब तोरण्याला वेढा देतो. १० मार्च रोजी तोरण्याचा पाडाव.

१७०५ फेब्रुवारी ८, औरंगजेब वाकीण खेड्याला वेढा देतो. २७ एप्रिल रोजी वाकीण खेड्याचा पाडाव. मे –ऑक्टोबर, औरंगजेब देवापूर येथे मुक्काम करतो. औरंगजेबाचे आजारीपण. नोव्हेंबर , दुर्गादास औरंगजेबाला पुन्हा शरण जातो. परंतु पुढील एप्रिलमध्ये त्याचे बंड.

१७०६ जानेवारी २०, औरंगजेब अहमदनगरला पोहोचतो. मार्च, मराठ्यांची गुजरातवर स्वारी. १५ मार्च रोजी रतनपूर येथे आणि बाबापिआराच्या उतारावर मोगलांचा दणदणीत पराभव; बडोद्याची लूट.

१७०७ फेब्रुवारी, औरंगजेब ९ तारखेला कामबक्ष याला विजापूरकडे आणि १३ तारखेला आजम याला माळव्याकडे पाठवितो. तारीख १७ रोजी औरंगजेब आजारी पडतो. तारीख २० रोजी औरंगजेबाचा मृत्यू. मार्च ८, अजीतसिंग जोधपूर पुन्हा जिंकून घेतो.

●●●

अनुक्रमणिका

औरंगजेबाच्या कारकिर्दीचा संक्षिप्त इतिहास

१६१८ – १७०७

सर जदुनाथ सरकार

मराठीत अनुवाद

भ. ग. कुंटे

पुस्तक पहिले

अनुक्रमणिका

प्रकरण पहिले

पूर्वायुष्य १६१८ – १६५२

(१) औरंगजेबाच्या कारकिर्दीचे महत्त्व

औरंगजेबाचा इतिहास म्हणजे वस्तुतः हिंदुस्थानचाच ६० वर्षांचा इतिहास होय. त्याच्या कारकिर्दीने (१६५८–१७०७) सतराव्या शतकाचा उत्तरार्ध व्यापला आहे आणि हिंदुस्थानच्या इतिहासातील एक महत्त्वाचे युग म्हणून तिचा उल्लेख करता येईल. त्याच्या सत्तेखाली मोगल साम्राज्याची सर्वोच्च वाढ झाली आणि इतिहासाच्या सुरुवातीपासून तो ब्रिटिश सत्तेची स्थापना होईतोपर्यंत मोगल साम्राज्य म्हणजे हिंदुस्थानातील सर्वांत मोठे असे पहिलेच एकसंघी राज्य झाले. गजनीपासून छटगावपर्यंत आणि काश्मिरपासून कर्नाटकपर्यंत हिंदुस्थानामध्ये एकछत्री अमल सुरू झाला. मुसलमान धर्माची हिंदुस्थानामधील शेवटची चढाई ही त्याच्या कारकिर्दीत झाली. अशा तऱ्हेने स्थापन झालेले साम्राज्य हे जसे आकाराच्या बाबतीत अभूतपूर्व होते तसेच राजकीय दृष्टीने ते सूत्रबद्ध होते. या साम्राज्याच्या घटकांवर उपराज्यप्रमुखाची सत्ता चालत नव्हती तर त्यावर बादशहाच्या सनदी नोकरांचा कारभार होता. ह्या देशामधील औरंगजेबाचे हिंदुस्थानातील साम्राज्य हे अशोक किंवा समुद्रगुप्त किंवा हर्षवर्धन यांच्यापेक्षा विस्ताराने अधिक होते.

परंतु ज्या कारकिर्दीने ब्रिटिश पूर्वकालातील एका प्रचंड साम्राज्याची स्थापना झालेली पाहिली, त्याच कारकिर्दीत त्या साम्राज्याचा ऱ्हास आणि विघटन होणार असे सुचित करणारी चिन्हेही दृगोचर झाली. पर्शियाच्या नादिरशहाने किंवा अफगाणिस्थानच्या अहमदशहाने दिल्लीपदपातशाही ही राजेशाहीची निव्वळ पडछाया आहे आणि दिल्ली शहर हे गतकाळातल्या मोठेपणाची एक स्मृती आहे, हे सिद्ध करण्यापूर्वी, त्याचप्रमाणे मराठामंडळाने साऱ्या हिंदुस्थानभर अमल गाजविण्याच्या मिषाने आम्ही या हिंदुस्थानचे एकमेव राजे आहोत हे जाहीर करण्याच्या फार फार अगोदर, किंबहुना औरंगजेबाचे डोळे मिटण्याच्याही अगोदर मोगल साम्राज्य हे अर्थव्यवस्था आणि तोल याबाबतीत दिवाळखोर बनले होते. साम्राज्याचा कारभार हा खिळखिळा झाला होता आणि देशात सुव्यवस्था राखणे आणि राज्यसंभार एकत्रित हाकणे याबाबतीत आपली असमर्थता असल्याची साम्राज्यसत्तेने कबुली दिली होती.

औरंगजेबाच्या कारकिर्दीत आणखी दोन नमूद करण्याजोग्या गोष्टी म्हणजे फारच थोडा काळ आयुष्य लाभलेल्या मराठ्यांच्या राजेशाहीच्या सरणातून त्यांच्या राष्ट्रीय वृत्तीच्या स्फुलिंगाचा उद्रेक झाला, आणि लढवय्ये आणि हत्यारबंद अशा प्रतिस्पर्ध्यांच्या स्वरूपात राजसत्तेला आव्हान देणारा शिख पंथ उदयास आला. अशा तऱ्हेने अठरावे शतक आणि एकोणिसाव्या शतकाचा पूर्वार्ध या कालखंडात हिंदुस्थानाच्या इतिहासात अग्रगण्य ठरलेल्या घटनांचा उगम आपल्याला औरंगजेबाची कारकीर्द आणि त्याचे धोरण यात झालेला दिसून येईल.

ज्या कारकिर्दीत मोगल साम्राज्यरूपी चंद्रकोर ही वृद्धिंगत होऊन पूर्णत्वाप्रत पोहोचली त्याच कारकीर्दीत या साम्राज्यरूपी चंद्रकोरीच्या कलांना उघड उघड ओहोटी लागली. त्याच औरंगजेबाच्या कारकिर्दीत हिंदुस्थानच्या राजकीय क्षितिजावर एका नवीन प्रभातकालच्या पहिल्या तेजाची झलक स्पष्टपणे दृग्गोचर झाली. भावी कालात या देशातील राजकीय सत्ता ज्या सत्ताधीशांच्या हाती जावयाची

होती आणि ज्यांच्या हाती या देशाचे भवितव्य होते त्यांनी या देशाच्या भूमीत खंबीरपणे आणि आत्मविश्वासाने पाय रोवला. अनुक्रमे १६५३ आणि १६८७ मध्ये इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यात मद्रास आणि मुबई हे प्रांत आले. १६९० मध्ये कलक त्याची स्थापना झाली. युरोपियन लोकांनी अशा तऱ्हेने आश्रयासाठी जी ठिकाणे आपल्या ताब्यात आणली त्यांना स्वसत्ताक राज्यामध्ये स्वसत्ताक राज्याचे स्वरूप प्राप्त झाले.

१७ व्या शतकाच्या अखेरीला मोगल साम्राज्याचे जे स्वरूप दृष्टीला आले ते गाभा कुजलेल्या साम्राज्यासारखे होते. या साम्राज्याचा खजिना रिता झालेला होता. आपण शत्रूकडून मार खाल्लेला आहे आणि शत्रूला पाठ दाखवून आपण परत फिरलेले आहोत याची जाणीव मोगल सैन्याला झालेली होती. केंद्र सत्तेपासून दूर राहू पाहणाऱ्या शक्ती यशस्वीपणे आपले डोके वर काढून आपले स्वत्व प्रतिपादन करू लागल्या होत्या. मोगल साम्राज्य हे तुकडे तुकडे होण्याच्या मार्गाच्या अगदी नजीक आले होते. मोगल साम्राज्याची नैतिक दुर्बलता ही त्या साम्राज्याच्या भौतिक दुर्बलतेपेक्षा अधिक भयावह झाली होती. साम्राज्यातील प्रजेला सरकारबद्दल वाटणारा दरारा हा नाहीसा झालेला होता. सरकारी नोकरवर्गांमध्ये प्रामाणिकपणा आणि कार्यक्षमता यांचा पूर्णपणे लोप झाला होता. मंत्री आणि त्याचप्रमाणे राजघराण्यातील मंडळी यांच्यामध्ये मुत्सद्देगिरी आणि सामर्थ्य यांचा प्रकर्षाने अभाव भासू लागला होता. सरकारचे सामर्थ्य दर्शविणारी शक्ती असे सैन्याचे स्वरूप राहिले नव्हते तर सेनेची विल्हेवाट लागली होती.

हे असे का झाले? स्वतः औरंगजेब हा दुर्गुण, मूर्खपणा आणि स्वैराचार यांपासून अलिप्त होता. त्याचे बुद्धिचातुर्य अलौकिक होते तरी देखील ज्या आवेगाचा उपयोग सर्वसाधारण व्यक्ती चैनबाजीच्या पाठलागात करतात तो सर्व आवेग त्याने राज्यशासनासाठी उपयोगात आणला. उद्योगक्षमता आणि सार्वजनिक बाबींकडे अवधानता या गोष्टीत त्यातील मुरब्बी व्यक्तीदेखील त्याच्या पासंगाला पुरली नसती. शिस्त आणि सुव्यवस्था ही त्याला जितकी प्रिय होती तितकाच त्याला सहनशीलता आणि चिकाटी यांचा हव्यास होता. त्याच्या खासगी जीवनात तो एखाद्या ऋषिमुनीसारखा साधा आणि निःसंग होता. मोहिमेवरच्या अगर प्रसंगानुरूप करावयाला लागलेल्या कुच करण्यातून होणाऱ्या हालअपेष्टा तो एखाद्या मुरलेल्या सैनिकाप्रमाणे बिनतक्रार सहन करीत असे. भीतीने त्याच्या हृदयाचा कधीच थरकाप उडत नसे किंवा दुबळेपणा अथवा अनुकंपेने त्याचे हृदय कधीच हेलावून जात नसे. धार्मिक ग्रंथांमधून प्राचीन व्यक्तींविषयी ज्ञात होणारी ज्ञानसूत्रे यांचा त्याच्याइतका अभ्यासू कोणीही नव्हता. याशिवाय त्याचा बाप शहाजहान याच्या कारकीर्दीत युद्धकला आणि राजनीती या गोष्टी शिकण्यांत त्याने आपल्या जीवनाचा बराच मोठा काळ यशस्वीपणे घालविला होता. आणि तरीदेखील अशा कर्तृत्वाच्या बादशहाच्या पन्नास वर्षांच्या कारकीर्दीच्या अखेरीस निष्पन्न काय झाले तर अपयश आणि गोंधळ. अशा तऱ्हेने राजकीय विरोधाभासाने भरलेली औरंगजेबाची कारकीर्द ही राजकीय तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकाप्रमाणेच हिंदुस्थानच्या इतिहासाच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अभ्यासपूर्ण आणि महत्त्वपूर्ण आहे.

(२) औरंगजेबाच्या जीवनाची शोकांतिका आणि ती होण्यास कारणीभूत झालेली परिस्थिती

औरंगजेबाचे सारे जीवनच एक शोकांतिका होते. एका अदृश्य पण कठोर दैवगतीविरुद्ध अयशस्वी झगडा देणाऱ्या व्यक्तीची ती कथा होती की ज्या जीवनात दुर्दम्य आशावादाचा वार्वक्याच्या शक्तींनी पराभव केलेला आपल्याला दिसून येतो. कष्टाने भरलेली पन्नास वर्षांची कारकीर्द पण त्या अखेरीस आलेले प्रचंड अपयश. तरीदेखील बुद्धिमत्ता, चारित्र्य आणि धडाडी यांबाबतीत आशिया खंडातला हा एक महान राजा

होऊन गेला आणि एकाद्या नाटकात ज्या सुसूत्रतेने घटना घडून यावी त्याच पद्धतीने इतिहासातील या शोकांतिकेची गुंफण झाली.

त्याच्या जीवनाची पहिली चाळीस वर्षे सातत्याने आणि कष्टाने त्याच्या आयुष्याला वळण लावण्यात आणि भविष्यकाळात ज्या उच्चपदाचा अंगीकार त्याला करावयाचा होता त्याची तयारी करण्यात गेली (पुस्तक पहिले). वालेवाणीच्या जीवनाच्या या कालावधीनंतरचे त्याचे एक वर्ष सिंहासनासाठी झालेल्या कटू झगड्यात गेले (पुस्तक दुसरे). या झगड्यात त्याच्या सर्व शक्ती पणास लागल्या आणि दिल्लीच्या राजमुकुटाच्या रूपाने त्याचे साहस, उत्साह आणि शहाणपणा याची योग्य ती बक्षिसी मिळाली. त्यानंतरची त्याची तेवीस वर्षे शांततामय आणि भरभराटीच्या राज्यकारभारात गेली आणि उत्तर हिंदुस्थानातील प्रसिध्द राजधानीत त्याचे स्थिर वास्तव्य झाले (पुस्तक तिसरे). त्याला विरोध करणारे सर्व शत्रू नाहीसे झाले होते. साऱ्या हिंदुस्थानचे साम्राज्य त्याच्या पायाशी लोळण घेत होते. साऱ्या देशाला त्याच्या कणखर आणि जागरूक राज्यकारभारामुळे जी शांतता आणि सुव्यवस्था लाभली होती त्यामुळे देशातील संपत्ती आणि संस्कृती यांत भर पडत होती. सारांश औरंगजेबाने मानवी जीवनातील सुख आणि वैभव यांचा उच्च बिंदू गाठला होता. त्याच्या जीवनाचा हा तिसरा अंक होता आणि त्यानंतर त्याच्या अधोगतीला सुरुवात झाली. परमेश्वराचीच अवकृपा म्हणून की काय त्याच्याच खुद्द कुटुंबियात त्याच्या शत्रूने डोके वर काढले. शहाजहानच्या बंडखोर मुलाला (औरंगजेब) मिळालेले वैभव फार काळ भोगण्याचे भाग्य लाभले नाही कारण खुद्द त्याचाच मुलगा महमद अकबर याने त्याच्याविरुद्ध बंडाचे निशाण उभारले (इ. स. १६८१).

महमद अकबराने दक्षिण हिंदुस्थानात मराठ्यांच्या राजाचा आश्रय घेतल्यामुळे औरंगजेबाला दक्षिणेकडे जाणे भाग पडले. त्याच्या हयातीची २६ वर्षे नियतीने दक्षिणेची म्हणून लिहिली होती आणि हा कालावधी त्याने तंबूत राहून बादशाही खजिना आणि फौज आणि राज्याची बसलेली घडी यांचा व्यय करण्यात एवढेच नव्हे तर कधीही न संपणारा आणि यशाचे माप पदरात न पाडणारा असा लढा देऊन स्वतःचे बलिदान करण्यात चालविला. परंतु दैवदुर्विपाक असा की त्याच्या प्रयत्नांची असफलता आणि त्याच्या जीवनाचा होणारा दुःखपर्यवसायी अंत याची जाणीव ही त्याला आणि त्याच्या समकालीनांना दैवगतीने यत्किंचितही दिली नाही. त्याच्या जीवनाच्या चौथ्या अंकात (पुस्तक चार या त्याच्या जीवनचरित्रात त्याची यथासांगता केली आहे.) सर्व काही सुरळीत चालले आहे असा आभास निर्माण झाला. विजापूर आणि गोवळकोंडा ही राज्ये साम्राज्याला जोडण्यात आली. सगरचा बेडर प्रमुख हा शरण आला आणि मराठ्यांचा बंडखोर राजा (संभाजी) याला आणि त्याची कुटुंबीय मंडळी यांना कैद करण्यात येऊन त्यांची राजधानी (रायगड) काबीज करण्यात आली (इ. स. १६८९). ह्या सर्व परिणामांत औरंगजेबाच्या पदरात यशाचे माप पुरेपूर पडण्याला आता काहीच कमी नव्हते. परंतु काही विचारवंत निरीक्षकांना कुठेना कुठेतरी पुढे वाढून ठेवलेल्या भीषण भवितव्याची चाहूल लागली होती. तर काहीजण साम्राज्याच्या तळपत्या वैभवामुळे भवितव्याकडे पूर्णपणे डोळेझाक करून बसले होते. अनाहूतपणे आणि पुढे काय वाढून ठेवले आहे या विषयीच्या अज्ञानाने औरंगजेबाने आपल्या जीवनाच्या तिसऱ्या अंकात केलेली पेरणी आता त्याच्या जीवनाच्या चौथ्या अंकात फोफावल्या स्वरूपात दिसू लागली होती आणि या पेरणीची कटू फळे त्याच्या जीवनातल्या पाचव्या अंकात आणि आयुष्याच्या शेवटल्या क्षणात त्याला गोळा करावी लागत होती.

साहजिकच औरंगजेबाच्या शोकपर्यवसायी जीवनाचे मर्म त्याच्या आयुष्याच्या शेवटच्या अठरा वर्षांत (इ. स. १६८९ ते इ. स. १७०७) साठविलेले आहे (पुस्तक पाचवे या खंडात त्याची सांगता केली

आहे). अतिशय सावकाश परंतु तितक्याच दृढतर निश्चिततेने त्याच्या जीवनाच्या शोकदायी घटनांची कथा उकलली गेली आणि अखेर औरंगजेबाला त्याच्याविरुद्ध ठाण मांडून बसलेल्या शक्ती आणि खऱ्या परिस्थितीच्या कल्पनेची जाणीव झाली. परंतु तरीदेखील त्याने आपली धडपड थांबविली नाही आणि ज्या क्षणी तो देत असलेल्या झगड्यांची विफलता त्याच्या आणि त्याच्या दरबाराच्या कटुत्वाने प्रत्ययास आली त्या क्षणी देखील त्याचा निश्चय पहिल्याइतकाच दृढ राहिला. त्याने नवीन क्लुप्तींचा अवलंब केला. राजकारणाचे रंग बदलले तसे त्याने आपले धोरण पण बदलले (आणि शत्रूच्या सेनेची जमावबंदी बदलली तशी) प्रथम त्याने मोहिमांवर आपल्या सेनाधिकाऱ्यांची खासगी रवानगी केली आणि त्यांच्यावर ताबा ठेवून त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी तो एका मध्यवर्ती ठिकाणी ठाण देऊन बसला. त्याचे सेनानी कार्यभाग साधण्यात अयशस्वी झाले. हरकत नाही असे म्हणून हा ८२ वर्षांचा म्हातारा सहा वर्षे (इ. स. १६९९ ते इ. स. १७०५) स्वतः युद्ध करण्यासाठी कंबर कसून तयार झाला. मृत्यूची पहिली साद ज्या वेळी त्याच्या कानावर पडली त्याच वेळी तो अहमदनगरला रवाना झाला. आपल्या जीवनाची इतिश्री (खतम उस् सफर) आता अहमदनगर येथे आहे याची दुखःपूर्ण जाणीव त्याला या वेळी झाली.

(३) औरंगजेबाच्या इतिहासाची साधनसामुग्री

या बाबतीत आनंदाची गोष्ट म्हणजे मोगल हिंदुस्थानची साहित्यिक परिभाषा जी पर्शियन त्या भाषेत औरंगजेब बादशहाच्या जीवनाची माहिती देणारी भरपूर साधने उपलब्ध आहेत. प्रथम बादशहाच्या जीवनाची हकीकत देणारे अधिकृत अहवाल. ते म्हणजे पादशाहनामा आणि आलमगीरनामा. (यांपैकी पहिला अहवाल हा तीन लेखकांनी तीन खंडांत दिला आहे) या अहवालात शहाजहानच्या राज्यारोहणापासून औरंगजेबाच्या कारकिर्दीच्या अकराव्या वर्षापर्यंतचा म्हणजे ४१ वर्षांचा इतिहास आहे. शाही दप्तरखान्यात जतन करून ठेवलेल्या कागदपत्रांच्या आधारावर हे अहवाल बादशाही आज्ञेनुसार लिहिले गेले. ह्या दप्तरांत अधिकृत पत्रव्यवहार, अहवाल, बातमीपत्रे, करारनामे आणि वसूलखतावण्या वगैरे कागदपत्रे असत. अतिशय महत्त्वाच्या आणि तंतोतंत जुळणाऱ्या तारखा आणि भौगोलिक विवेचनाची त्यात रेलचेल आहे. औरंगजेबाच्या शेवटच्या चाळीस वर्षांच्या कारकिर्दीचा इतिहास आपल्याला मासिरी आलमगिरी या ग्रंथात आढळतो. हा ग्रंथ वरील कागदपत्रांच्या आधारानेच पण औरंगजेबाच्या मृत्यूनंतर लिहिला गेला.

यानंतर काही खासगी इतिहासकारांचा उल्लेख करावा लागेल. ते म्हणजे मासूम, अकीलखान (बंगालमधील एक रोजभानी शिलेदार) आणि खाफीखान. हे इतिहासकार सरकारी नोकरीत होते, पण त्यांनी लिहिलेला इतिहास हा बादशाही हुकूमावरून नव्हता. या इतिहासकारांनी दिलेल्या तारखा पुष्कळदा चुकीच्या असल्या आणि जरी त्यांनी दिलेली वर्णने कोती असली, तरी त्यांच्या ग्रंथांमधून, सरकारी अहवालातून दडपलेली माहिती आपल्याला मिळते.

याशिवाय दोन हिंदूंनी पर्शियन भाषेत लिहिलेले औरंगजेबाच्या कारकिर्दीचे इतिहास उपलब्ध आहेत. एक म्हणजे भीमसेन बुरहानपुरी याचा 'नुक्श ए दिलकुशा' हा ग्रंथ. भीमसेन हा औरंगजेबाचा सेनापती राव दलपत बुन्देला याचा कारभारी होता. भीमसेनाला प्रवासाची अतिशय आवड होती. भौगोलिक वैविध्ये टिपण्याकडे त्याची दृष्टी होती आणि मथुरेपासून मलबारपर्यंत त्याने जे काही पाहिले त्या सर्वांची त्याने काळजीपूर्वक नोंद करून ठेवली आहे. दक्षिणेतल्या घडामोडी समजण्याच्या दृष्टीने त्याच्या कामाचे महत्त्व अधिक आहे. कारण तो त्याच देशात लहानाचा मोठा झाला आणि त्याचे पुढील आयुष्य

तिकडेच गेले. दुसरा ग्रंथ म्हणजे ईश्वरदास नागर याचा 'फुतुहात-इ-आलमगिरी' हा होय. तो बराच काळ शेख उल इस्लामच्या चाकरीत होता आणि गुजरातेतील पट्टण या गावी राहात असे. राजपुतान्यातील घडामोडी समजण्यासाठी ह्या ग्रंथाचे महत्त्व आहे.

सर्वसाधारण घटनांची माहिती देणाऱ्या या इतिहास ग्रंथाशिवाय विशिष्ट घटना किंवा व्यक्ती यांबद्दल माहिती देणारे पर्शियन भाषेतील अनेक छोटे लेख उपलब्ध आहेत. त्यामध्ये गोवळकोंड्याच्या वेढ्याची हकीकत देणारा नीमतखान अलीचा वृत्तान्त, कूचविहार, आसाम आणि छटगाव हे जिंकल्याची माहिती देणारी शहाबुद्दिन तालिशची रोजनिशी, आणि इरादत खान व पहिल्या बहादुरशहाच्या चाकरीतील काही अधिकाऱ्यांचे औरंगजेबाच्या अखेरच्या वर्षांपासूनची हकीकत देणारे, आठवणींच्या रूपाने लिहिलेले ग्रंथ यांचा उल्लेख करावा लागेल. दक्षिणेतील गोवळकोंडा आणि विजापूर या राज्यांविषयी माहिती देणारे दोन वेगळे ग्रंथ उपलब्ध आहेत. त्यांमध्ये मोगल सरकार आणि वरील राज्ये यांच्या परस्पर राजकारणाची हकीकत आपल्याला मिळते. आसाममधील घडामोडींसाठी बुरनजीस या स्वतंत्रपणे लिहिल्या गेलेल्या अहवालांचा उल्लेख करावा लागेल.

परंतु औरंगजेबाच्या कारकिर्दीच्या अनेक कालखंडाविषयी माहिती देणारी मूलभूत साधनसामुग्री माझ्या हाती लागली. या साधनसामुग्रीचे महत्त्व वर उल्लेखिलेल्या समकालीन अधिकृत अहवालांशी तुलना करता माहितीच्या दृष्टीने अधिक मोलाचे आहे. ही साधनसामुग्री म्हणजे शाही दरबारातील हस्तलिखिताच्या रूपाने जयपूर आणि रॉयल एशियाटिक सोसायटी ग्रंथालय (लंडन) येथे ठेवण्यात आलेली बातमीपत्रे आणि सतराव्या शतकातील राजकीय घडामोडीत प्रत्यक्ष भाग घेणाऱ्या व्यक्तींनी लिहिलेली एकंदर ६००० पत्रे ही होय. यांपैकी एक हजारांवर पत्रे खुद्द औरंगजेबाने पाठविलेली माझ्याजवळ आहेत. त्यांमध्ये कथन केलेल्या घटना ती गोष्ट घडून गेल्यावर लेखकांनी त्यावर आपला साज चढविलेल्या स्वरूपात नसून दररोज घडणाऱ्या हकीकतींचा चक्षुर्वैसत्यं वृत्तांत त्यामध्ये आपल्याला दिसून येतो. त्यांमध्ये ज्यांनी हिंदुस्थानचा इतिहास घडवून आणला त्यांच्या आशा आणि निराशा, त्यांच्या योजना आणि त्यांची मते यांचे सम्यकदर्शन आपल्याला मिळते.

या कालावधीत हिंदुस्थानात प्रवासाच्या रूपाने आलेल्या टॅव्हरनियर, बर्नियर, कॅरेरी आणि मनुची या युरोपियन प्रवाशांनी या देशाबद्दलचे विस्तृत वृत्तान्त लिहून ठेवले आहेत. या देशातील लोकांची परिस्थिती, व्यापार आणि उदीम याबद्दलची माहिती आणि हिंदुस्थानातील ख्रिश्चन चर्चेसचा इतिहास यावर हे प्रवासवृत्तान्त बहुमोल प्रकाश टाकतात. त्याशिवाय हिंदुस्थानातील लोकांच्या चालीरीती आणि त्यांच्या संस्था यांवर त्यामध्ये आलेल्या टीकेमुळे या ग्रंथांना एक आगळेच महत्त्व प्राप्त झाले आहे. परंतु हिंदुस्थानात घडत असलेल्या राजकीय घडामोडीसंबंधांत, त्यांनी ज्या घटनांत भाग घेतला किंवा ज्या त्यांनी स्वतः प्रत्यक्ष पाहिल्या त्यांचा वृतान्त सोडल्यास त्यांनी दिलेली माहिती लोकांमध्ये प्रचलित असलेल्या निव्वळ बाजारगप्पांवर आधारलेली आहे. समकालीन इतिहास आणि पर्शियन भाषेतील पत्रे यांमध्ये दिलेल्या वृत्तान्ताच्या दृष्टीने त्यांचे महत्त्व क्षुल्लक आहे.

(४) बालपण आणि शिक्षण

दिल्लीच्या तख्तावर पहिला आलमगीर म्हणून अधिष्ठित झालेला मुहिउद्दीन मुहमद औरंगजेब हा शहाजहान आणि मुमताज महाल यांचे सहावे अपत्य. त्याचा जन्म दोहद [दोहद हे (२२·५० उत्तर ७४·२० पूर्व) मुंबई

प्रांताचा (जुन्या) हल्लीचे गुजरात राज्य, पंचमहाल जिल्ह्याचा एक उपविभाग आहे. हे गाव बी. बी. सी. आय. (हल्लीची पश्चिम रेल्वे) रेल्वेच्या दोहद स्टेशनच्या थोड्या दक्षिणेला वसले आहे.]

[ज्या ठिकाणी औरंगजेबाचा जन्म झाला त्या ठिकाणाबद्दलच्या अतिशय हळुवार स्मृती औरंगजेबाने आपल्या मनाशी जोंबाळल्या होत्या; आपल्या वृद्धपणी महमद आजम या आपल्या मुलाला त्याने लिहिलेल्या पत्रात पुढील मजकूर आढळतो, "माझ्या उमद्या राजपुत्रा, गुजरात प्रांतातील दोहद हे खेडे या अभाग्याचे जन्मस्थान आहे. तेथील नागरिकांना अतिशय दयाळूपणे वागविण्याची दक्षता तू घे. बऱ्याच काळापासून त्या गावचा फौजदार असलेल्या आणि आता वृद्ध झालेल्या अधिकाऱ्याला तू आपलासा कर आणि त्याला त्याच जागेवर कायम ठेव." (**रुक्कात-इ-आलमगिरी**, क्र. ३१; **सरकार**, खंड १, पान २)] येथे १५ जिल्कादच्या रात्री, हिजरी १०२७ म्हणजे २४ ऑक्टोबर १६१८ या साली झाला. (**तुजुक-इ-जहांगिरी** —संपादन सय्यद अहमद पान २५०).

इ. स. १६२२ पासून त्याच्या बापाच्या कारकिर्दीच्या शेवटापर्यंत शहाजहानवर बादशहाची (जहांगीर) गैर मर्जी होती आणि स्वसंरक्षणासाठी त्याला बंडाचे निशाण उभारावे लागले. परंतु त्याचे सर्व प्रयत्न विफल झाले. जहांगीर बादशहाला अखेर तो शरण गेला आणि आपले दोन मुलगे दारा आणि औरंगजेब त्याने बादशहाकडे ओलीस म्हणून ठेवले. ही दोन्ही मुले इ. स. १६२५ च्या जूनमध्ये लाहोर येथे बादशहाच्या दरबारात दाखल झाली. यानंतर लवकरच जहांगीरचा मृत्यू झाला. शहाजहान तख्तावर बसला आणि असफखानाने २६ फेब्रुवारी १६२८ मध्ये या दोन्ही मुलांना आग्रा येथे शहाजहानकडे आणले. (**तुजुक**, ३८०—३९१, ३९७, ४१०. ग्लॅडविन, ६९—७५, ७८).

अशा तऱ्हेने वयाच्या दहाव्या वर्षी औरंगजेबाच्या जीवनाला स्थैर्य प्राप्त झाले. यानंतरच पुढे त्याच्या इतमामाला साजेलशा शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली. गीलानचा मीर महमद हाशीम याचा औरंगजेबाचा गुरू म्हणून उल्लेख आहे. बर्नियर औरंगजेबाच्या शिक्षकाचे मुल्ला सलीह असे नाव देतो. पण पर्शियन इतिहासात या विधानाला दुजोरा मिळत नाही. (**बर्नियर्स ट्रॅव्हल्स**, संपादन कॉन्स्टेबल, पान १५४).

औरंगजेब हा निसर्गतः तल्लख बुद्धीचा होता आणि तो जे वाचीत असे ते तो लगोलग ध्यानात ठेवीत असे हे आपल्याला सहज पटेल. कारण त्याचा पत्रव्यवहार एक गोष्ट सिद्ध करतो की त्याला कुराण आणि हादीस तोंडपाठ होती आणि कुराणातील वचने तो केव्हाही दाखल्या दाखल देत असे. एकाद्या विद्वानाप्रमाणे तो अरबी आणि पर्शियन भाषा बोलू आणि लिहू शकत असे. मोगल दरबारच्या खासगी व्यवहारात वापरली जाणारी हिंदुस्थानी ही त्याची मातृभाषा होती. त्याला हिंदीचेही थोडेसे ज्ञान होते आणि ती भाषा तो बोलत असे आणि त्यातील काही लोकप्रिय वाक्प्रचार तो म्हणून दाखवी. (**मासिरी-इ-आलमगिरी**, ३३४; **आलमगिरनामा**, १०९५.)

औरंगजेबाची अरबी भाषा लिहिण्याची धाटणी जोशपूर्ण आणि अत्युत्कृष्ट अशा नक्शपद्धतीची होती. या पद्धतीत तो कुराण लिहून काढीत असे. या पद्धतीने लिहिलेल्या कुराणाच्या दोन प्रती त्याने उत्कृष्ट बांधून मक्का आणि मदिना या शहरांना नजर केल्या. (**मासिरी-इ-आलमगिरी**, ५३२.) "त्याच्या नस्तलिक आणि शिकस्त या लिहिण्याच्या पद्धती अत्युत्कृष्ट होत्या" असे साकी मुस्तैदखान सांगतो. हे सहज पटण्यासारखे आहे कारण खुद्द औरंगजेबाच्या हातची अनेक पत्रे आहेत आणि प्रत्येक अर्जावर दस्तुरखुद्द हुकूम देण्याची त्याची सवय होती. (**आलमगिरनामा**, १०९२—९४) निरर्थक काव्यरचनेचा आस्वाद घेणे त्याला आवडत नसे आणि स्तुतीपर काव्याचा तर नसेच. याला अपवाद म्हणजे ज्यामध्ये काही तरी शिकवण आहे असे काव्य. (**मासिरी-इ-आलमगिरी**, ५३२) धार्मिक ग्रंथांचे अध्ययन हा त्याचा आवडीचा विषय होता. असे ग्रंथ म्हणजे कुराणावरील टीका, हादीस, धर्माची मूलतत्त्वे, इमाम महमद धजाली याच्या

रचना, शेख जैनुद्दीन कुतुब मुही शिराजी आणि मुनीरचा शेख शर्फ याहिया यांची निवडक पत्रे आणि याच वर्गात मोडणारे लिखाण हे होत. (**मासिरी-इ-आलमगिरी**, ५३१–५३२). [औरंगजेब दुपारचा आपला फावला वेळ धर्मविषयक प्रमेयांच्या चिन्तनात घालवीत असे, आणि सत्यविषयक जे तत्त्वज्ञान होते त्याबाबत चर्चा करीत असे. त्याचप्रमाणे विद्वान आणि संतमंडळी यांनी लिहिलेले ग्रंथ आणि छोट्या पुस्तिका यांचेही तो वाचन करी (**आलमगिरनामा**, ११०३). स्वतः औरंगजेब धजाली याची दोन पुस्तके वाचल्याचे सांगतो. (ए. एस. बी. पर्शि. मॅन्यु. फो. २७,१२६ अ आणि ब.)]

चित्रकलेची त्याला कधीच आवड नव्हती. संगीताला त्याने आपल्या दरबारातून हद्दपार केले होते. त्याच्या कारकिर्दीची दहा वर्षे पूर्ण झाल्यावर त्याच्या मनात भक्तीभावनेचा जो उद्रेक झाला त्याचा हा परिणाम होता. उत्कृष्ट चिनी कलाकुसरीची भांडी त्याला आवडत, परंतु बापाला असलेली शिल्पाची आवड त्याच्यात उतरली नव्हती. शिल्पाचा उत्कृष्ट नमुना म्हणून गणना करता येईल अशी इमारत, उत्कृष्ट आणि अनुपमेय अशी मशीद, [याला अपवाद म्हणजे दिल्लीच्या राजवाड्यातील मोती मशिदीचा करावा लागेल. या मशिदीच्या बांधकामाला १० डिसेंबर १६५९ मध्ये सुरुवात झाली आणि ५ वर्षांनंतर ती बांधून पूर्ण झाली. तिच्या बांधणीला १ लक्ष ६० हजार रुपये खर्च आला (**ए. एन्**., ४६८) लाहोर शहरातील त्याने बांधलेली मशीद त्या शहरातील उत्कृष्ट मशीद आहे असे म्हणता येणार नाही. त्याची पत्नी दिलरस बानू हिची औरंगाबाद येथे त्याने बांधलेली कबर म्हणजे अप्रतिम शिल्प असे म्हणता येईल.] दिवाणखाना अगर कबरस्तान त्याच्या कारकीर्दीत झाली नाही. त्याच्या हातून बांधकाम झाले ते साधेसुधे, नेहमीच्या उपयोगी असे म्हणजे त्याच्या विजयाची खूण सांगणाऱ्या मशिदी आणि दक्षिण आणि पश्चिम दिशांकडे पोहोचणारे जे राजेशाही रस्ते त्यांच्या बाजूबाजूने बांधलेल्या सराया. (अधिक माहितीसाठी पाहा **आलमगिरनामा**, १०८४.)

(५) औरंगजेबाची हत्तीशी झुंज

त्याच्या लहानपणी घडलेल्या एका प्रसंगामुळे त्याची कीर्ती साऱ्या हिंदुस्थानभर फैलावली. २८ मे १६३३ रोजी शहाजहान बादशहाने आग्रा येथे यमुनेच्या सखल मैदानात सुधाकर आणि सुरतसुंदर या दोन प्रचंड हत्तींची झुंज लावली. हे दोन हत्ती थोडे अंतर परस्परांवर चालून गेले आणि नंतर किल्ल्याच्या दर्शनी गच्चीखाली येऊन ते एकमेकांशी भिडले. बादशहा ती झुंज पाहण्यासाठी त्वरीत येथे आला. त्याच्या काही पावले पुढेच त्याचे तीन मोठे मुलगे त्याच्यापुढे स्वार होऊन आले. ही झुंज जवळून बघता यावी म्हणून औरंगजेब हत्तीच्या अगदी जवळ जाऊन उभा राहिला.

काही वेळाने त्या क्रूर प्राण्यांनी परस्परास सोडून दिले आणि ते काही पावले मागे हटले. सुधाकर आता पिसाळला होता. त्याने आपल्या प्रतिस्पर्ध्याकडून दृष्टी काढली आणि वळून जवळच औरंगजेब उभा होता त्याच्यावर चाल केली. औरंगजेबाचे वय त्या वेळी जेमतेम १४ वर्षांचे होते. तरीदेखील तो विचलित आपल्या जागी उभा राहिला. मांडीखालील घोड्याला त्याने रेसभरही हलू दिले नाही आणि आपल्या हातातील भाला त्याने हत्तीच्या मस्तकावर फेकला. सगळीकडे आता एकच गोंधळ आणि घबराट पसरली. सरदार मंडळी आणि नोकरचाकर ओरडत इतस्ततः पळू लागले. हत्तींनाही घाबरविण्यासाठी आपटबार उडविण्यात आले परंतु याचा काहीही उपयोग झाला नाही. तो हत्ती झपाट्याने धावून आला आणि आपल्या लांब सोंडेच्या फटक्याने त्याने औरंगजेबाच्या घोड्याला पाडले. परंतु औरंगजेबाने चटकन जमिनीवर उभा राहून आपली तलवार काढली आणि तो त्या पिसाळलेल्या हत्तीसमोर उभा राहिला. याचसुमारास त्याचा मोठा भाऊ शुजा हा गर्दीतून आणि धुरातून वाट काढीत तेथे आला आणि त्याने आपल्या भालाफेकीने त्या हत्तीला जखमी केले. राजा जयसिंग हाही पुढे चालून आला आणि हत्तीवर चालून गेला. अगदी याच वेळी अनपेक्षित अशी घटना राजपुत्राच्या मदतीला धावून आली. सुरतसुंदर हा दुसरा हत्ती अपुरी राहिलेली लढत देण्यासाठी पुन्हा उभा ठाकला आणि त्याच्यावर झालेल्या हल्ल्यामुळे आणि आपटबारांच्या आवाजाने बावरून गेलेला सुधाकर रणमैदानातून माघारी फिरला. सुरतसुंदर त्याच्या पाठीशी लागला. अशा तऱ्हेने

राजपुत्रांचे प्राण वाचले. शहाजहानने औरंगजेबाला आपल्या छातीशी कवटाळून धरले, त्याच्या धैर्याची प्रशंसा केली आणि त्याला बहादूर अशी पदवी दिली. दरबारी मंडळी असे बोलली की राजपुत्राच्या अंगात आपल्या बापाची बेदरकार हिंमत आली आहे आणि शहाजहान बादशहाने राजपुत्र असताना जहांगीर बादशहासमक्ष तलवारीने एका क्रूर वाघावर कसा हल्ला केला होता या घटनेची परस्परास आठवण दिली. (**अबदुल हमीद**, आय. ए. ४८९–४९५, **खाफीखान**, १· ४७४).

या प्रसंगी औरंगजेबाने त्याच्या अंगात वसत असलेल्या महान धैर्याची एक चुणूक दाखविली. शहाजहानने जेव्हा त्याच्या अप्रासंगिक साहसाबद्दल त्याची कानउघाडणी केली तेव्हा त्याने उत्तर दिले की जर का या धुमश्चक्रीत मला मृत्यू आला असता तर त्यात लांछनास्पद असे काहीच नव्हते. मृत्यू हा आपले पाश बादशहावरदेखील टाकतो; त्यात अपमानास्पद असे काहीच नाही. [हमीदउद्दीनखान याच्या **अहकाम-इ-आलमगिरी**, आय आर. मॅन्यु. १५ अ आणि ब. या ग्रंथात बादशहाने या ठिकाणी केलेल्या भाषणात दाराशूकोहवर भ्याडपणाचा जो आरोप केलेला आहे तो त्याच्यावर अन्याय करणारा आहे. शुजा आणि औरंगजेब यांच्यापासून तो काही अंतरावर होता आणि जरी त्याच्या मनात आले असते तरीदेखील तो औरंगजेबाच्या मदतीला येऊ शकला नसता. कारण शुजा आणि औरंगजेब यांच्यामधील युद्धाचा काही मिनिटांतच निकाल लागला. या घटनेच्या आणखी एका वृत्तान्तासाठी पाहा. **डो**, भाग ३,१३६ (**सरकार**, खंड १, पान १२, तळटीप १).] (**अहकाम-इ-आलमगिरी**, आय. आर. मॅन्यु. १५ अ आणि ब.)

त्याची पहिली मनसब

१३ डिसेंबर १६३४ रोजी त्याची १० हजारी मनसबदार म्हणून नेमणूक झाली आणि मोगल दरबारातील प्रतिष्ठित उमरावांत त्याला स्थान प्राप्त झाले. पुढील सप्टेंबर महिन्यात युद्ध कसे लढावे आणि आपल्या हाताखालील माणसांवर ताबा कसा ठेवावा याचा प्रत्यक्ष अनुभव यावा म्हणून त्याची रवानगी बुन्देला मोहिमेवर करण्यात आली. [औरंगजेबाची पहिली **मनसब** : आतापर्यंत औरंगजेबाला इतर राजपुत्रांप्रमाणे दररोजचा भत्ता म्हणून पाचशे रुपयांची रक्कम मिळत असे. परंतु १३ डिसेंबर १६३४ रोजी वयाची सोळा वर्षेदेखील पूर्ण झाली नसताना मोगल उमरावववर्गामध्ये त्याचा समावेश करण्यात आला. त्याला दहा हजार घोडेस्वारांची आणि अधिक चार हजारांची **मनसब** देण्यात आली. त्याचप्रमाणे केवळ बादशहाचा खास अधिकार असलेला असा तांबड्या रंगाचा तंबू वापरण्याची परवानगीही त्याला देण्यात आली. दक्षिणेची सुभेदारी त्याच्यासाठी मुक्रर करण्यात आली. तेथे गेल्यावर त्याच्यासारख्या कार्यक्षम आणि सेनापतीपदाला योग्य अशा व्यक्तीला ज्या तऱ्हेच्या उत्कृष्ट शिक्षणाची जरुरी असते ते शिक्षण त्याच्या वडिलांच्या दरबारातील सर्वोत्तम सेनानीच्या हाताखाली त्याला मिळेल अशी ही योजना या नेमणुकी पाठीमागे होती. इतक्या उच्च आणि कठीण अशा जागी नेमणुकीकरिता तयारी म्हणून युद्ध-कला आणि हाताखालील सैनिकांवर ताबा यांच्या शिक्षणाचा पहिला धडा त्याला मिळावा म्हणून त्याची रवानगी सप्टेंबर १६३५ मध्ये बुंदेल्याच्या मोहिमेवर करण्यात आली. (**अबदुल हमीद**, आय. बी. ९९).]

(६) बुंदेला युद्ध–१६३५

बुंदेला जमात

ओर्च्छाचा बुंदेला राजा वीरसिंग देव हा जहांगीराच्या कृपेने मोठ्या सत्तेस आणि वैभवास चढला होता. जहांगीराच्या चिथावणीनेच त्याने अबुल फजलचा खून केला होता. (ब्लॉचमानस **अैन-इ-अकबरी**, १, ४८ आणि २५–२६; **एम्. यु.**, २९७–१९९.) त्याच्यानंतर त्याचा मुलगा झुजहारसिंग हा इ. स. १६२७ मध्ये गादीवर आला.

वीरसिंग आणि ओर्च्छाचा झुजहार

शहाजहानच्या कारकिर्दीत त्याने बंड केले. त्याने गोंडांची जुनी राजधानी चौरागड बळजोरीने ताब्यात घेतली, गोंडाचा राजा प्रेमनारायण याला ठार मारले आणि जवळ जवळ दहा लाखांचा त्याचा खजिना त्याने बळकाविला. प्रेमनारायणच्या मुलाने शहाजहानकडे मदतीची याचना केली. (इ. स. १६३५) [मोगल बादशहाला जो सावित्क संताप आला तो या लुटमारीच्या कृत्यांमुळे आला असे नाही. या लुटीमध्ये त्याने आपल्या हिश्शाची मागणी केली. त्याने झुजहार याला असे सांगितले की, जर का मोगलांना त्याने जिंकलेल्या मुलखा इतकाच मुलूख दिला तर बादशहा झुजहार याला त्याने जिंकलेला मुलूख त्याच्या ताब्यात राहू देण्यास परवानगीं देईल. परंतु ही गोष्ट करण्यास झुजहार बुंदेला बिलकूल राजी नव्हता. त्याने बादशहाला प्रतिकार करण्याचे धोरण स्वीकारले. आपला मुलगा योगराज (विक्रमजित) त्याला त्याने गुप्तपणे बोलावणे पाठविले. योगराज याला त्याने त्यावेळी बालाघाटातील आपल्या फौजेचे अधिपत्य दिलेले होते. योगराज हा तेथून गुप्तपणे निसटला. परंतु खान दौरान या मोगल अधिकाऱ्याने त्याचा पाठलाग केला आणि मजल-दर-मजल करीत तो पाच दिवसांत बुरहाणपुरहून अष्टा येथे पोहोचला. त्याने विक्रमजित याला गाठले. पराजित होऊन जखमी झालेला विक्रमजित आपल्या बापाकडे घामुनी येथे पळून गेला. (**अबदुल हमीद**, आय. बी. ९५–९६. मध्यप्रांतात सागरच्या उत्तरेस २४ मैलांवर घासन नदीच्या जवळ घामुनी गाव आहे. **इंडि. अटलास**, ७०, एस. डब्ल्यू.)]

शहाजहानचे झुजहारविरुद्ध युद्ध

बादशहाने बुंदेलखंडावर तीन सेनाविभाग त्या प्रदेशाला वेढण्यासाठी आणि त्यावर हल्ला करण्यासाठी रवाना केले. या कामी बुंदेला घराण्याच्या दुसऱ्या एका शाखेचा वारस देवीसिंग याची मदत घेण्यात आली आणि त्याला सिंहासनाचे आश्वासन देण्यात आले. (अधिक माहितीसाठी पाहा, **अबदुल हमीद**, आय. बी. ९६-९८, १०६; **एम्, यू.**, २, २९५, २१३) परंतु या मोहिमेत एका उच्च सेनाधिकाऱ्याची आवश्यकता होती. कारण या तिन्ही सेनाविभागांचे सेनानी हे सारख्या दर्जाचे होते. त्यांच्यामध्ये एकोप्याची भावना निर्माण करणे आणि जी योजना आखण्यात आली होती तिची शिस्तपूर्ण आणि सूत्रबद्ध कारवाई होणे अतिशय जरुरीचे होते. या कारणासाठी औरंगजेबाची या मोहिमेचा नामधारी प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्याने पिछाडीला आपले वास्तव्य ठेवावयाचे होते पण त्याच्याशी विचार विनिमय केल्याशिवाय कोणतीही कारवाई न करण्याचे बंधन वरील तीन सेनानींवर घालण्यात आले होते. [या घटनेबाबत डो या इतिहासकाराने अतिशय अतिरंजीत असा वृत्तान्त दिलेला आहे तो मोठा मनोरंजक आहे. "औरंगजेबाला त्याच्याविरुद्ध पाठविण्यात आले. सिंहाच्या छाव्यासारख्या असलेल्या त्या राजपुत्राला रक्तामध्ये न्हाहून निघण्याची ही प्रथमच संधी देण्यात आलेली होती. युद्ध जवळ जवळ दोन वर्षांपर्यंत रेंगाळले. औरंगजेबाचे वय त्यावेळी केवळ १३ वर्षांचे होते. परंतु त्याने आपल्या अंगातील लष्करी-चापल्य अशा तऱ्हेने प्रकट केले की, त्याला आवरणे अशक्य होऊन बसले. संकटाच्या-प्रत्येक वेळी तो जातीने हजर असे (भाग ३, १३२)". जर का ही मोहीम म्हणजे औरंगजेबाच्या दृष्टीने युद्धरूपी अग्नीत पडण्याचा पहिला ओनामा होती तर आपल्याला असे म्हणावे लागेल की हा ओनामा औरंगजेबाने युद्धाच्या अग्नीपासून फार मोठ्या अंतरावरून गिरविला. कारण सबंध युद्धकालात औरंगजेबाला त्याच्या रक्षणकर्त्याने प्रत्यक्ष युद्धभूमीपासून अनेक मैल अंतरावर पिछाडीला सुरक्षित ठेवलेले होते.]

झुजहारचा पाठलाग; त्याच्या कुटुंबाचा उच्छाद

२ आक्टोबर १६३५ रोजी ओर्च्छाजवळील एका टेकडीवर देवीसिंगाच्या लोकांनी हल्ला केला आणि ४ तारखेला खुद्द ओर्च्छा मोगलांनी काबीज केले. झुजहार नाउमेद झाला आणि त्याने घामुनीला आणि तेथून नर्मदा ओलांडून चौरागड येथे पलायन केले. मोगलांनी १८ आक्टोबरला घामुनी काबीज केले आणि झुजहारचा देवगड आणि चांदा या गोंडांच्या मुलुखांतून पाठलाग केला. झुजहारचे अतिशय हाल झाले आणि प्रत्येक पावलागणिक त्याला आपले सामानसुमान आणि माणसे यांना सोडून द्यावे लागले. सरतेशेवटी एका घनदाट जंगलात निद्रिस्त झालेल्या या परागंदा राजपुत्रांना गोंडांनी गाठले आणि त्यांचा वध केला. (डिसेंबर) जोहारांतून राहिलेल्या त्यांच्या स्त्रिया आणि मुले यांना मोगल जनान्यांत खेचण्यात आले. (**अबदुल हमीद**, आय. बी. १३३; खाफीखान, १·५१९) झुजहारचे दोन मुलगे आणि एक नातू अल्पवयी होते त्यांना बाटविण्यात आले. (**अबदुल हमीद**, आय. बी. १३३, १३९; खाफीखान, १·५१९, ५२३) दुसरा एक मुलगा आणि एक मंत्री यांनी मुसलमान होण्याचे नाकारल्यामुळे त्यांचा क्रूरपणे वध

करण्यात आला. **ओर्छाच्या देवळाचे मशिदीत रूपांतर** :- ओर्च्छा येथील वीरसिंगाचे उत्तुंग देवालय जमिनदोस्त करण्यात आले आणि त्या जागेवर एक मशीद उभी करण्यात आली. आक्टोबरच्या अखेरीस झाशीचा किल्ला मोगलांनी सर केला. लढाईमधील लूट आणि वीरसिंगाची पुरलेली संपत्ती मिळून जवळ जवळ एक कोट रुपयांचा ऐवज झाला. [या घटनेची सविस्तर हकीकत पुढील प्रमाणे आहे :

घामुनीचा पाडाव : जवळ जवळ एक दिवस शहराचा ताबा घेण्यात आणि देवीसिंगाची गादीवर स्थापना करण्यात गेला. त्यानंतर मोगल सैन्याने बेतवा नदी ओलांडली आणि घामुनीच्या दिशेने कुच केले. परंतु झुजहारसिंग याला घामुनी येथे सुरक्षित न वाटल्यामुळे त्याने आणखी दक्षिणेकडे पलायन केले आणि विंध्य पर्वत व नर्मदा नदी ओलांडून तो गोंडांच्या प्रदेशात चौरागड येथे गेला. घामुनी या शहरी संरक्षणाचा कडेकोड बंदोबस्त करण्यात आला होता. किल्ल्यासभोवारची घरे जमीनदोस्त करण्यात आली होती आणि किल्ल्याचा ताबा रत्नाई नावाच्या शूर रजपुताकडे देण्यात आला होता. १८ ऑक्टोबर रोजी बादशाही फौजा किल्ल्यासमोर येऊन ठेपल्या आणि त्यांनी किल्ल्याच्या वेढ्याला सुरुवात केली. मध्यरात्रीपर्यंत शिबंदीने प्रतिकार केला. परंतु नंतर त्यांनी खान दौरानकडे तहाची याचना करण्यासाठी एका दूताची रवानगी केली. किल्ल्याच्या पूर्वेकडील भिंतीला लागून एक बांबूचे बेट होते. तेथपर्यंत रोहिल्यांच्या एका तुकडीने आपले चर खणत नेले. त्यांनी काळोखाच्या आवरणाखाली बहुतेक जंगलाचा ताबा घेतला. मध्यरात्रीनंतर त्यांच्यापैकी काही त्या बाजूने किल्ल्यात शिरले व त्यांनी लुटालूट करण्यास सुरुवात केली. दरम्यान खान दौरान तेथे येऊन पोहोचला आणि त्याने बंदोबस्त करण्याचा प्रयत्न केला. किल्ल्यामध्ये विजयी मोगल सैन्य झपाट्याने घुसत होते. अशा वेळी किल्ल्याच्या दक्षिणेकडील तटबंदीच्या एका बुरुजातील दारूच्या कोठाराने पेट घेतला. एक भयानक स्फोट झाला आणि स्फोटामुळे ८० यार्ड लांबीची किल्ल्याची प्रचंड भिंत उडाली. भिंतीच्या बाजूने उभे असलेले तीनशे रजपुत व त्याचप्रमाणे दोनशे घोडे भिंतीखाली सापडून ठार झाले. (**अबदुल हमीद**, आय. बी. १०८–११०).

गोंडवनातून झुजहारसिंगाचा पाठलाग : या घडामोडी होत असताना झुजहारसिंग हा ज्या मार्गाने गेला होता त्याबद्दल बातमी आली. २७ ऑक्टोबर रोजी त्याचा पुन्हा पाठलाग सुरू करण्यात आला. बादशाही फौजा चौरागड येथे दाखल झाल्या. त्यांना असे आढळून आले की, झुजहारने किल्ला खाली केला असून तोफखान्याची मोडतोड आणि मालमत्तेचा विध्वंस केला आहे. त्याचप्रमाणे गोंडांचे जुने राजवाडे त्याने उद्ध्वस्त केले आहेत. या ठिकाणी काही मोगल शिबंदी ठेवण्यात आली परंतु मोगलांच्या मुख्य सैन्याने तेथून चार मैलांवर शहापूर येथे मुक्काम केला. तेथे त्यांना असे समजले की, झुजहारने देवगड आणि चांदा या गोंडी राज्यांतून दक्षिणेकडे पळ काढला असून त्याच्याकडे सहा हजार शिपाई व साठ हत्ती आहेत व तो एका दिवसाकाठी जवळ जवळ सोळा मैलांची मजल मारीत आहे. जरी झुजहार याला चौदा दिवसांची आघाडी मिळाली होती तरी मोगल सेनापतीने हलकी फौज बरोबर घेऊन शहापूर येथून त्याचा पाठलाग सुरू केला. दररोज ४० मैलांची मजल मोगल फौजा मारीत असत. चांद्याच्या सरहद्दीवर त्यांना झुजहारचा सुगावा लागला आणि त्यांनी पाठलागाचा वेग वाढवला. झुजहार कोंडीत पकडला गेला आणि त्याने मोगलांबरोबर प्राणपणाने लढा दिला. परंतु त्याचा पराभव झाला आणि त्याने जंगलात माघार घेतली. त्याचा पाठलाग पुन्हा सुरू करण्यात आला. झुजहारजवळ जनाना आणि मालमत्ता असल्यामुळे आणि त्याच्याकडे घोड्यांची चणचण असल्यामुळे त्याच्या हालचाली कठीण होत गेल्या आणि त्याला स्वास्थ मिळाले नाही. क्षणभर झोप घेणे किंवा आपल्या घोड्यांना ताजेतवाने करणे हे देखील त्याला जमत नसे. रात्रीसाठी त्याने मुक्काम केला तर त्याला पाठलाग करणारांची चाहूल लागे. ताबडतोब तो आपली छावणी मोडी आणि आपले दमलेले सैनिक आणि छावणीतील जनावरे यांना कुच करण्याचा इशारा देई. पलायनाच्या सर्व मार्गांचा त्याने अवलंब केला. हत्तींच्या पावलांनी तयार झालेल्या वाटा नष्ट करण्यात आल्या, आणि बुंदेला सेनापतीने ज्या रस्त्याने कुच केले होते त्या रस्त्यापासून मोगलांना दूर नेण्यासाठी संपत्तीने लादलेले हत्ती दुसऱ्या वाटेने पाठविण्यात आले. परंतु मोगल हे या सर्व कारवायांना पुरून उरले. त्यांनी इतर सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष केले व खुद्द बंडखोरांचाच पाठलाग धिमेपणाने चालू ठेवला. स्थानिक जमीनदारांना त्यांनी लाच दिली. ते मोगलांना वाटा दाखवित आणि झुजहारच्या हालचालीची व्यवस्थित बातमी पुरवीत. त्यामुळे त्याला जंगलाचा आधार मिळण्याऐवजी अडथळाच होऊ लागला. त्याचप्रमाणे दरोडेखोर गुंडांपासून बुंदेल्यांना कोणत्याही प्रकारची दयामाया दाखविली गेली नाही. (**अबदुल हमीद**, आय. बी. ११०–११३).

झुजहारने आपल्या लोकांची विभागणी केली पण त्याचा काही उपयोग झाला नाही. त्याच्या मुलांना मोगलांनी पकडले. रजपुतांच्या जोहार करण्याच्या पद्धतीप्रमाणे त्यांना आपल्या स्त्रियांना ठार मारण्यास देखील वेळ मिळाला नाही. मोगलांनी जेव्हा त्याच्यावर हल्ला केला तेव्हा त्यांनी पहारेकऱ्यांना ठार मारले आणि बुंदेल्यांचा जनाना काबीज केला. (**अबदुल हमीद**, आय. बी. ११४–११५)

गोंडांकडून झुजहारचा खून : झुजहार आणि त्याचा सर्वांत मोठा मुलगा विक्रमजित हे खूप दूरवर जंगलात पळून गेले होते. तेथे त्यांच्या दुर्दैवाने त्यांच्यावर मात केली. लुटमार आणि मोगलांकडून बक्षिशीच्या आशेने गोंडांनी दमून निद्रिस्त झालेल्या राजपुत्रांवर हल्ला केला आणि अतिशय निर्दयपणे त्यांचा वध केला. (या घटनेचा अतिशय रोमांचकारी असा वृत्तान्त डो (३, १३३) याने आपल्या ग्रंथात दिला आहे.) बंडखोरांची मस्तके धडावेगळी करण्यात आली आणि त्यांची रवानगी बादशहाकडे करण्यात आली. (डिसेंबर १६३५) बादशहाने त्यांचे प्रदर्शन सैहूर येथील आपल्या छावणीच्या दरवाजावर केले. (**अबदुल हमीद**, आय. बी. ११६–११७; **खाफीखान**, १, ५०६–१६).] (**अबदुल हमीद**, आय. बी. १३३, १३९, ११९, ११०, ११७, १२३.)

(७) औरंगजेबाची दक्षिणेतली पहिली सुभेदारी इ. स. १६३६ ते इ. स. १६४४

मोगलांचा दक्षिणेत प्रवेश : अकबराच्या कारकिर्दीच्या अखेरीस नर्मदा नदीच्या पलीकडे दक्षिणेस मोगल साम्राज्याचा विस्तार होऊ लागला होता. प्रथम इ. स. १५९९ मध्ये खानदेश, नंतर वऱ्हाड (वऱ्हाड, **इलियट**, ६. ८४, ९४, ९८. खानदेश, ६, १३४–१४६) आणि इ. स. १६०० मध्ये अहमदनगर शहर साम्राज्याला जोडण्यात आले. (**इलियट**, ६, ९९–१०१) अहमदनगरचा छोटा सुलतान निजामशहा याला पदच्युत करण्यात आले आणि ते राज्य खालसा झाले. परंतु अहमदनगरचे राज्य हे नावापुरतेच मोगलराज्यात समाविष्ट होते कारण नवीन काबीज केलेल्या प्रदेशावर मोगलांचा प्रत्यक्ष ताबा आला नाही. जहांगीरच्या दुबळ्या कारकिर्दीत निजामशाही घराण्याचे आणि सत्तेचे मलिक अंबर या अलौकिक बुद्धिमत्तेच्या आणि कर्तृत्त्वाच्या हबशी गुलामाच्या सुज्ञ आणि जबरदस्त नेतृत्वाखाली पुनुरुज्जीवन झाले. त्याने घालून दिलेल्या सारापद्धतीमुळे शेतकरी सुखी झाला आणि राज्य सधन झाले. त्याच्या अंगी जन्मजात पुढारीपण असल्यामुळे त्याने सर्व पक्षांना एकत्र आणले, राज्यात शांतता प्रस्थापिली आणि न्याय, धडाडी आणि लोकोपयोगी वृत्ती यांनी आपले नाव अजरामर करून ठेवले. दक्षिणेतील सत्तांना त्याने एकत्र आणले आणि मराठा घोडदळाचा पुरेपूर उपयोग करून घेऊन त्याने मोगलांना पिछेहाट करणे भाग पाडले. (जहांगीरच्या कारकिर्दीतील दक्षिणेतील मोगलांच्या लढायांकरिता अधिक माहितीसाठी पाहा. **अबदुल हमीद** आय. बी. १८२–२०१; **खाफीखान**, १, २८२–२९४, ३०४–३०७, ३१४–३२४, ३४७–३५०; ग्लॅडवीन, १९, २१, २५, ३७–३९, ५१–५४ वगैरे) [मलिक अंबरबाबतच्या अधिक माहितीसाठी पाहा **अबदुल हमीद**, आय. बी. ३४, १९७–२००, २७३–७५ २८२–८५, २९१–९४, ३०४, ३०५, ३१४–३२२, ३४७–५०; **ग्लॅडविन**, ५१–५४, ९०–९२; ग्रँट डफ, १९४–९७; **इडिया ऑफिस पर्शियन** एम. एस. क्र. १९५७ (**तारीख इ शिवाजी**), ६ ब–७ ब.]

शहाजहानच्या कारकिर्दीतील दक्षिणेतील घडामोडी

मलिक अंबरचा मृत्यू इ. स. १६२७ मध्ये झाला आणि नंतर लगोलग शहाजहान गादीवर आला. त्याने दक्षिणेबाबत मोठे धडाडीचे धोरण स्वीकारले. अहमदनगरची नवीन राजधानी दौलताबाद शहर आणि त्याबरोबरच निजामशाही घराण्याचा शेवटचा राजा हुसेन शहा याला मोगलांनी काबीज केले (इ. स. १६३३). यातून आता एक नवीनच भानगडीचे प्रकरण उद्भवले . पाडाव झालेल्या अहमदनगर राज्याचा त्यांच्या राज्याला लागून असलेला मुलूख विजापूरच्या आदिलशहाने आणि गोवळकोंड्याच्या कुतुबशहाने दाबण्याचा प्रयत्न केला. शिवाजीचा बाप शहाजी याने विजापूरच्या मदतीने एका नामधारी निजामशहाची स्थापना केली आणि त्याच्या नावाने देशाच्या काही भागांवर अमल चालू केला. [अहमदनगरचा सुलतान हा मलिक अंबरचा मुलगा फत्तेखान याच्या हातातील निव्वळ बाहुल्यासारखा होता. १७ जून १६३३ रोजी दौलताबादचा पाडाव झाल्यानंतर त्याला मोगलांच्या स्वाधीन करण्यात आले (**अबदुल हमीद**, आय. ए. ५२८). सप्टेंबरमध्ये त्याला ग्वाल्हेर किल्ल्यात कैदेत ठेवण्यात आले. (५४०). शहाजीने दुसऱ्या एका राजपुत्राची गादीवर स्थापना केली. १६३६ च्या नोव्हेंबर अथवा डिसेंबर महिन्यात शहाजीने त्याला मोगलांच्या स्वाधीन केले. या राजपुत्राचा एका ठिकाणी निजामशहाचा मुलगा असा उल्लेख आहे, (आय. बी. १३५) तर दुसरीकडे त्याचा आप्त म्हणून उल्लेख आहे. (आय. बी. ३५, १३५, १४०).]

शहाजहानने आपली सत्ता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. राज्यकारभार अधिक कार्यक्षम करण्यासाठी दौलताबाद आणि अहमदनगर हे प्रदेश खानदेश सुभ्यापासून वेगळे काढण्यात आले आणि त्यावर एका नवीन सुभेदाराची नेमणूक करण्यात आली (नोव्हेंबर १६३४). इ. स. १६३६ च्या फेब्रुवारी महिन्यात प्रत्यक्ष बादशहा मोहिमेच्या देखरेखीसाठी दक्षिणेत उतरला (**अबदुल हमीद**, आय. बी. ६२, ६८, ६९, १३८). तीन सेनाविभागांत विभागलेले ५०,००० मोगल सैन्य विजापूर आणि गोवळकोंडा या राज्यांवर हल्ला करण्याकरता सज्ज झाले आणि ८००० फौजेच्या एका सेनाविभागाने महाराष्ट्रावर हल्ला केला (**खाफीखान**, १· ५२१–५२३). कुतुबशहा घाबरून जाऊन शरण आला. त्याने वार्षिक दोन लक्ष होनांची खंडणी कबूल केली आणि आपण मोगल बादशहाचे मांडलिक असल्याचे मान्य

केले. (एप्रिल १६३६) (**अबदुल हमीद**, आय. बी. १४५).

विजापूरबरोबरील तहाच्या अटी

विजापूरच्या सुलतानाने मात्र आपले स्वातंत्र्य टिकविण्यासाठी लढा दिला. परंतु वर उल्लेखिलेले तीन मोगल सेना विभाग त्याच्या राज्यात घुसले व त्यांनी शेती आणि खेडोपाडी उद्ध्वस्त करून प्रजेला नागवून सोडले. [कलीयान या खेड्यामध्ये खान दौरान याने २००० हजार माणसांना ठार मारले. (**अबदुल हमीद, आय. बी**. १५१). त्याचप्रमाणे इतर ठिकाणीही त्याने असेच अत्याचार केले. खानजमान याने कोल्हापूर जिल्ह्यात २००० युद्धकैद्यांना गुलाम म्हणून विकले. यात स्त्री आणि पुरुष या दोघांचाही समावेश होता. (**अबदुल हमीद, आय. बी**. १६३) खान दौरान याच्या तुकडीच्या हालचालींसाठी पाहा: **अबदुल हमीद, आय. बी.** १५१-१५४; सय्यद खानजहानच्या हालचालींसाठी पाहा: १५५-१६०; खान जमानच्या हालचालींसाठी पाहा: १६०-१६५; या सर्व वृत्तान्तासाठी पाहा: **खाफीखान**, भाग १, ५२०-५२१, ५२५-५३०.] अखेर १६३६ मध्ये दोन्ही बाजूत समझोता झाला. या तहान्वये भूतपूर्व निजामशाही राज्यांची या दोन सत्तांमध्ये विभागणी झाली. सोलापूर आणि वांगी (भीमा आणि सीना नद्यांमधील प्रदेश), भालकी आणि चिदगुपा (ईशान्य दिशेकडे), पूर्णा जिल्हा आणि उत्तर कोकण असा एकंदर अंदाजे २० लक्ष होन (८० लाख रुपये) उत्पन्नाचा मुलूख विजापूरकडे आला. अहमदनगर राज्याचा उरलेला प्रदेश मोगल साम्राज्याला जोडण्यात आला. याशिवाय आदिलशहाने मोगलांचे सार्वभौमत्व मानण्याचे, मोगलांचा मांडलिक गोवळकोंड्याचा कुतुबशहा याजबरोबर सलोखा ठेवण्याचे (गोवळकोंड्याची सरहद्द मांजरा नदीपर्यंतचा मुलूख असे ठरवून देण्यात आले होते) आणि वार्षिक खंडणी ऐवजी २० लाख रुपये दंडादाखल देण्याचे कबूल केले. (**अबदुल हमीद**, आय. बी. १६८ १७३, २०३; **खाफीखान**, १· ५२७).

याप्रमाणे दक्षिणेमध्ये स्थिरस्थावर झाल्यावर आणि मोगल साम्राज्याची हद्द पक्की केल्यावर आणि तिला स्थानिक राजेरजवाड्यांकडून जाहीर मान्यता मिळविल्यावर शहाजहान उत्तर हिंदुस्थानाकडे परतला. त्याने दक्षिणेत औरंगजेबाला ठेवले (१४ जुलै १६३६) आणि औरंगाबादची त्याचे मुख्य ठाणे म्हणून योजना केली. हे शहर मलिक अंबरने खिडकी या खेड्याच्या जागी बसविले होते. त्याला शहाजहानने आपल्या तिसऱ्या मुलाच्या नावावरून (औरंगजेब) औरंगाबाद असे नाव दिले. [त्याकाळी मोगलांच्या दक्षिण सुभ्यामध्ये चार प्रांत होते. (**अबदुल हमीद, आय. बी** २०२, २०५, ६२-६३)

(१) खानदेश अथवा तापीचे खोरे – हा प्रांत उत्तरेस सातपुड्याच्या रांगा आणि दक्षिणेस सह्याद्री पर्वत ह्यांमध्ये पसरलेला होता. ह्या प्रांताचे राजधानीचे शहर बुरहाणपूर हे असून किल्ल्याचे ठिकाण अशीरगड हे होते.

(२) वऱ्हाड – हा प्रांत खानदेशच्या आग्नेयेला होता. या प्रांताच्या उत्तरेकडे महादेव डोंगर आणि मध्यप्रांताच्या अगदी मर्मस्थानी असलेला गोंडांचा प्रदेश होता. या प्रांताच्या दक्षिणेस अजंठा पर्वतांची रांग आणि पैनगंगा नदी होती. या प्रांताचे राजधानीचे शहर इलिचपूर हे असून किल्ल्याचे ठिकाण गावीलगड हे होते.

(३) तेलंगण – हा प्रांत विस्ताराने खूप आणि निश्चित सीमा नसलेला असा असून डोंगर आणि जंगले यांनी भरलेला होता. तेथील लोकसंख्या विरळ असून लोक रानटी होते. या प्रांताचा विस्तार वऱ्हाडच्या दक्षिणेस चांद्यापासून आणि वैनगंगा नदीपासून गोवळकोंड्याच्या उत्तर आणि ईशान्य सरहद्दीपर्यंत होता. हा सर्व प्रांत म्हणजे एक पठार होते. (बालाघाट)

(४) दौलताबाद – या प्रांतात अहमदनगर आणि इतर संस्थाने यांचा समावेश होता. दक्षिण प्रांत म्हणजेच दौलताबाद प्रांत होय. या प्रांतात दक्षिणेच्या सुभेदाराचे मुख्य ठाणे असून ते दौलताबाद किल्ल्यात होते. किल्ल्यापासून थोड्या मैल अंतरावर खडकी येथे मलीक अंबर याने मुलकी ठाणे वसविले होते. औरंगजेबाच्या कारकिर्दीत त्याची वाढ होऊन भरभराट झाली. खडकीचे नाव बदलून औरंगाबाद असे ठेवण्यात आले. या प्रांताच्या उत्तरेला अजंठ्याचे डोंगर आणि पैनगंगा नदी होती. या प्रांताची पूर्व सरहद्द नांदेडपासून कन्धार आणि उद्गीरपर्यंत मांजरा नदीच्या काठाकाठाने होती. उद्गीरपासून या सरहद्दीने औसापर्यंत पश्चिमेच्या दिशेने बांक घेतला होता, आणि त्यानंतर ही सरहद्द वायव्येच्या दिशेकडे सोलापूरच्या उत्तर सरहद्दीपर्यंत वाकलेली होती. त्यापुढे ही सरहद्द विसापूर, पारनेर आणि जुन्नर या किल्ल्यांमधून थेट पश्चिम घाटापर्यंत भिडलेली होती. या भागामध्ये घोडनदी म्हणजे या प्रांताची दक्षिणेकडची मर्यादा होती. जुन्नरच्या पलीकडे या प्रांताची सरहद्द घाटाच्या कडेकडेने उत्तरेकडे गेली होती, आणि ज्या ठिकाणी चांदोरच्या डोंगरांनी पूर्वेकडे पलट खाल्लेली होती त्या ठिकाणी ही सरहद्द खानदेशच्या नैर्ऋत्य सरहद्दीला भिडली

होती. दक्षिणेच्या सुभ्यात एकंदर ६४ किल्ले असून सुभ्याचा वसूल ५ कोट रुपये होता. राज्यकारभाराचा सर्व खर्च औरंगजेबाने या उत्पन्नातून भागवावयाचा होता.]

उद्‌गीर आणि औसा काबीज

२८ सप्टेंबर रोजी उद्‌गीर (**अबदुल हमीद**, आय. बी. २१७–२१९, २४८.) आणि १९ ऑक्टोबर रोजी औसा (**अबदुल हमीद**, आय. बी. २२०-२२१) हे किल्ले मोगलांनी काबीज केले. त्याचप्रमाणे शहाजी भोसले याचा खूप पाठलागानंतर मोगल सेनापती खानजमान आणि त्याचा विजापुरी मददगार रणदुल्लाखान यांनी पराभव केल्यावर तो आक्टोबरच्या अखेरीस माहुली (उत्तर कोकण) येथे शरण आला. अशा तऱ्हेने मोगलांचा दक्षिण दिग्विजय पूर्ण झाला. **शहाजी भोसले याची शरणागती :-** शहाजीने नामधारी निजामशहाला मोगलांच्या हवाली करून त्याची शाही संपत्ती, सात किल्ले आणि पुणे जिल्ह्यातील थोडी जहागिरी सोडून महाराष्ट्रातील इतर सर्व मुलूख मोगलांच्या ताब्यात दिला. ही जहागिरी त्याने विजापूरचा मांडलीक म्हणून आपल्याकडे ठेवण्याचे कबूल केले.

गोंडाकडून खंडणी

दुसरा एक मोगल सेनापती खान दौरान (**अबदुल हमीद**, आय. बी. २३०-२३३) याने देवगडचे गोंड राजे आणि इतर राजेरजवाडे यांजकडून जबरदस्त खंडणी वसूल केली [खान दौरान याने उद्‌गीर आणि औसा जिंकून घेतल्यानंतर गोवळकोंड्याच्या सुलतानापासून एक लक्ष रुपये किमतीचा गजमती नावाचा हत्ती दंडादाखल घेतला होता. त्याशिवाय त्याला सोन्याने मढविण्यासाठी आणि त्याच्यावर हौदा तयार करण्यासाठी आणखी एक लक्ष रुपये त्याने सुलतानाकडून घेऊन तो बादशहाला नजर देण्यायोग्य केला. नंतर त्याने गोंडांच्या प्रदेशात चाल केली. प्रथम त्याने अष्टा आणि कटंझर हे किल्ले जिंकून घेतले व नंतर नागपूरला त्याने वेढा दिला. नागपूर हे गोंडांचा राजा कुकीया याच्या ताब्यातील महत्त्वाचे स्थळ होते. वेढ्यामध्ये तीन सुरुंग उडविण्यात आले आणि त्यामुळे भिंतीचा काही भाग आणि बुरूज कोसळून पडले. किल्ल्यावर हल्ला चढविण्यात आला आणि किल्ल्याचा अधिपति देवजी याला कैद करण्यात आले. कुकियाने १६ जानेवारी १६३७ रोजी खान दौरानची भेट घेतली आणि मोगलांबरोबर तह केला. त्याने दीड लक्ष रुपये रोख, आपल्या जवळील सर्व हत्ती आणि वार्षिक १⅓ लाख रुपये इतकी खंडणी देण्याचे कबूल केले. नागपूर त्याच्या स्वाधीन करण्यात आले.

यानंतर खान दौरान बादशहाकडे परतला आणि त्याने गोंड आणि इतर राजेरजवाडे यांच्याकडून खंडणी म्हणून जमा केलेले ८ लक्ष रुपये बादशहाला नजर केले. या कामगिरीबद्दल त्याला बादशहाने नुस्रतजंग असा किताब देऊन त्याचा सन्मान केला. (**अबदुल हमीद**, आय. बी. २४६–२४७)]. इ. स. १६३८ च्या जानेवारीमध्ये औरंगजेबाने दक्षिणेतून गुजरातकडे जाण्याच्या मुख्य मार्गावर असलेले आणि चांदोर डोंगरपट्टीत वसलेले बागलाणाचे साल्हेर आणि मुल्हेर हे प्रसिद्ध किल्ले आणि राज्य जिंकून घेण्यासाठी फौजेची रवानगी केली. [याबद्दल सविस्तर हकीकत आणि बागलाणाच्या राज्यासंबंधाने माहिती पुढीलप्रमाणे आहे. या राज्याने छोटासाच प्रदेश व्यापला असून त्यात १००० खेडी आणि नऊ किल्ले होते. बागलाणाचा प्रदेश अतिशय सुपीक असून पावसाळा सोडल्यास तेथील हवा अतिशय थंड आणि उत्साहवर्धक असे. दक्षिण आणि गुजराथ यांमधील व्यापार बागलाणातून होत असल्यामुळे बागलाणाला एक वेगळे महत्त्व प्राप्त झाले होते.

या राज्यावर राज्य करणाऱ्या राजाचे नाव राठोड असून ते आपल्याला शहा असे म्हणवून घेत आणि बहरजी या पदवीचा उपयोग करीत. या राज्यात साल्हेर आणि मुल्हेर हे दोन सुप्रसिद्ध किल्ले होते. मोगलांनी जेव्हा गुजराथ आणि खानदेश हे दोन प्रांत जिंकून घेतले तेव्हा या दोन प्रांतांना जोडणारा दुवा म्हणून बागलाण जिंकून घेण्याची आवश्यकता त्यांना भासली. अकबराने बागलाणाचे राज्य जिंकून घेण्याचा अयशस्वी प्रयत्न केला.

औरंगजेबाने मालोजी आणि महमद ताहीर खुरासानी या दोन अधिकाऱ्यांची सात हजार सैन्य देऊन मुल्हेर जिंकून घेण्यासाठी रवानगी केली. किल्ल्याच्या खालच्या बाजूला असलेल्या एका खेड्यात बागलाणाच्या राजाचा मुक्काम होता. १६ जानेवारी १६३८ रोजी मोगल फौजेने या बारीवर हल्ला चढविला. दोन्ही बाजूंचे अतिशय नुकसान झाले. त्यानंतर राजा बहरजी ५०० सैनिकांना बरोबर घेऊन वरच्या किल्ल्यात गेला. किल्ल्याला मोगलांनी वेढा दिला. एक महिन्याच्या वेढ्यानंतर बहरजी शरण आला. १५ फेब्रुवारी रोजी त्याने आपल्या ताब्यातील इतर आठ किल्ले औरंगजेबाच्या ताब्यात देण्याची तयारी दाखविली आणि आपल्याला बादशाही फौजेत सामील करून घेण्याची याचना केली. त्याची विनंती मान्य करण्यात आली. मोगल सैन्यात त्याला तीन हजारी **मनसबदार** करण्यात आले. ४ जून रोजी मुल्हेरचा पाडाव झाला आणि त्यानंतर एक महिन्याने साल्हेरच्या दक्षिणेस नऊ मैलांवर असलेला पिपला हा किल्ला मोगलांच्या स्वाधीन झाला. (**अबदुल हमीद**, भाग २, पाने १०६-१०९; **खाफीखान**,

भाग १, पाने ५४२, ५६१-५६४). बागलाणाच्या अधिक माहितीसाठी पाहा **आइन-इ-अकबरी**, भाग २, २५१; **टॅव्हर्नियरचा बेरग्राम**, भाग १, ३७; **फिंच आणि रोए**, (केर, भाग ८, २७७; भाग ९, २५६)] **बागलाणाचा पाडाव :-** मुल्हेर आणि पिपला यांचा पाडाव झाला आणि जून अखेरीस सर्व राज्य खालसा करण्यात आले. इ. स. १६३९ च्या ऑक्टोबरमध्ये शहाजीचा चुलत भाऊ खेळोजी भोसले याला औरंगजेबाने पकडून ठार मारले [औरंगजेबाची दक्षिणेतील पहिली सुभेदारी १४ जुलै १६३६ पासून २८ मे १६४४ पर्यंत टिकली. या आठ वर्षांच्या काळात त्याने पुष्कळ वेळा शहाजहानच्या भेटीसाठी उत्तरेकडे प्रयाण केले. आपल्या जागी त्याने आपला मामा शायस्ताखान याची प्रत्येक वेळी नेमणूक केली. त्याच्या दर्जात सावकाशपणे वाढ होत गेली. १४ आगस्ट १६३७ रोजी त्याला बारा हजाराच्या सेनापतीपदी नेमण्यात आले. त्याशिवाय त्याच्या तैनातीखाली सात हजार स्वार अधिक म्हणून होते. यानंतर २३ फेब्रुवारी १६३९ रोजी त्याला पंधरा हजाराचा सेनापती म्हणून नेमण्यात आले. त्याशिवाय नऊ हजार अधिक स्वारांची तैनात त्याला देण्यात आली. (**अबदुल हमीद, आय. बी.** २७७, भाग २, १३८) या ठिकाणी ज्या खेळोजी भोसल्याचा उल्लेख आलेला आहे तो निजामशहाच्या पदरी एक मोठा अधिकारी होता. १६२९ मध्ये तो मोगलांना येऊन मिळाला. त्याला पाच हजारी **मनसबदार** करण्यात आले. १६३३ मध्ये दौलताबादचा किल्ला मोगलांच्या ताब्यात जाण्याची वेळ आली असताना खेळोजी हा विजापूरकरांना जाऊन मिळाला आणि मोगलांविरुद्ध त्याने अनेकवार युद्धे केली. पुढे त्याच्या बायकोला कैद केले गेले आणि त्याच्याकडे चार लाखाची रक्कम दंडादाखल मागण्यात आली. खेळोजीने ही रक्कम भरली. कालांतराने विजापूरने मोगलांबरोबर तह केला आणि त्याला विजापूरची नोकरी सोडावी लागली. या गोष्टीमुळे सर्वनाश होऊन खेळोजी दौलताबादकडे आला आणि त्याने लुटमारीचे जीवन जगण्यास सुरुवात केली. औरंगजेबाला हे कळताच त्याने मलिक हुसेन याच्या हाताखाली फौज पाठवून खेळोजीला ठार मारले. (आक्टोबर १६३९ च्या सुमारास)

(**अबदुल हमीद**, भाग २, १६६; **मासिर-उल-उमरा**, भाग ३, पाने ५२०-५२१)].

(८) औरंगजेबाचा कुटुंब-विस्तार

दिलरसबानूबरोबर विवाह

औरंगजेबाला चार बायका होत्या. त्यांची नावे खालीलप्रमाणे (१) दिलरसबानू बेगम—ही शहानवाजखानाची मुलगी. (शहानवाज खानाचा पणजा हा पर्शियाचा राजा शहा इस्माईल सफवी याचा धाकटा मुलगा होता.) तिचा औरंगजेबाबरोबर मोठ्या थाटाने ८ मे १६३७ रोजी आग्रा येथे विवाह झाला. महमद अकबर याच्या जन्मानंतर झालेल्या आजारामुळे ती ८ आक्टोबर १६७७ रोजी औरंगाबाद येथे मरण पावली. **औरंगजेबाच्या इतर स्त्रिया** :- (**कम्बू ६ ब आदाब-इ-आलमगिरी,** १९८ अ, **कालिमात-इ-तय्यीबात**, ३६ व ३९ अ) तिला शहराबाहेर पुरण्यात येऊन तिला रबिया उद दौरानी म्हणजे आधुनिक संत **रबिया** अशी पदवी देण्यात आली. दक्षिणचा ताजमहाल म्हणून प्रसिद्ध असलेली तिची कबर औरंगजेबाच्या हुकुमावरून तिचा मुलगा आजम याने दुरुस्त केली. ती अतिशय मानी स्वभावाची असून तिला आपल्या अंगामधील पर्शियाच्या शाही रक्ताचा अभिमान होता. औरंगजेब हा तिला वचकून असे. (**ॲनेकडोटस् ऑफ औरंगजेब** नं. २७)

(२) रहमत उन्निसा उर्फ नबाब बाई ही काश्मीरमधल्या **राजाउरी** संस्थानचा राजा राजू याची मुलगी. हिच्या अंगात रजपूत रक्त खेळत होते. (**आयर्विनस् स्टोरीया द मोगोर**, भाग २, ५७ एन. २७६ एन.) परंतु तिचा मुलगा बहादूरशहा हा सिंहासनावर आल्यानंतर त्याची गणना **सय्यदात** केली जावी या हेतूने ती वेगळ्याच रक्ताची होती असे जाहीर करण्यात आले. तिने घाटाच्या खाली फर्दापूर येथे एक सराई बांधली आणि औरंगाबादेचे एक उपनगर वैजीपुरा याची स्थापना केली. (**खाफीखान**, भाग २, ६०५) तिचे दोन मुलगे महमद सुलतान आणि मुआज्जम यांनी बदसल्ल्यावरून औरंगजेबाची जी अवज्ञा केली त्यामुळे तिच्या जीवनाच्या उत्तरार्धात ती अतिशय कष्टी झाली. तिचा सल्ला आणि तिने केलेल्या विनवण्या मुआज्जमने मानल्या नाहीत. (**एम्. ए.** १०१, २९३) अखेर मुआज्जमला कैदखान्यात पडावे लागले. नबाब बाईचे तारुण्य लौकरच संपुष्टात आले आणि त्याचबरोबर तिच्यावरील औरंगजेबाची मर्जी. आपला पती आणि मुलगे यांजपासून अनेक दिवस तिने विभक्तावस्थेत काढल्यावर ती इ. स. १६९१ मध्ये दिल्लीला मरण पावली.

(३) औरंगाबादी महल – हिला असे नाव पडण्याचे कारण म्हणजे औरंगाबाद शहरी हिचा औरंगजेबाच्या जनान्यात प्रवेश झाला हे होय. इ. स. १६८८ च्या ऑक्टोबर अथवा नोव्हेंबर महिन्यात विजापूर येथे प्लेगने तिचा बळी घेतला. (**एम्. ए**. ३१८)

(४) उदेपुरी महल-ही राजपुत्र कामबख्श याची आई. तिचा उल्लेख समकालीन व्हेनेशियन प्रवासी मनूची हा दाराशुकोच्या जनान्यातील जॉर्जियन गुलाम असा करतो. दाराशुकोचा औरंगजेबाने काटा काढल्यावर विजयी औरंगजेबाच्या जनान्यात तिला घालण्यात आले. (**आयर्विनस् स्टोरीया,** भाग १, १६१, भाग २, १०७) ती त्यावेळी अतिशय तरुण असली पाहिजे. कारण तिला पहिले मातृत्व इ. स. १६६७ मध्ये प्राप्त झाले. बादशहावर तिची मोहिनी आणि प्रभावही अखेरपर्यंत टिकून राहिली आणि बादशहाच्या अखेरच्या दिवसांत ती त्याचा कंठमणी होऊन राहिली होती. तिच्या आधीन होऊन औरंगजेबाने कामबख्शचे अनेक अपराध माफ केले आणि कट्टर मुसलमान असूनदेखील तिच्या मद्यपी स्वभावाकडे दुर्लक्ष केले. (**आयर्विनस् स्टोरीया द मोगीर**, भाग २, १०७, १०८.)

जैनावादी आणि औरंगजेबाचे प्रणयी जीवन

या चार विवाहित स्त्रियांव्यतिरिक्त या सोज्वळ बादशहाच्या जीवनात आपली कमनियता, संगीतावरील प्रभुत्व आणि अनुनयाची हातोटी यांच्या जोरावर प्रेमभावनेचा आविष्कार करणारी आणखी एक तरुणी होती. ती म्हणजे हिराबाई उर्फ जैनाबादी. ही औरंगजेबाच्या मावशीचा नवरा मीर खलील याच्या जनान्यातील एक तरुण गुलाम स्त्री होती. दक्षिणेच्या सुभेदारीवर असताना औरंगजेबाने **बुरहाणपूर** येथे आपल्या मावशीची भेट घेतली. त्याठिकाणी तापीच्यापलीकडल्या तीरावर असलेल्या जैनाबाद बगिचात सहल करीत असताना त्याने आपल्या मावशीच्या दासीपरिवारात ओढणीविना असलेल्या हिराबाईला पाहिले. ती सौंदर्यखनी हिराबाई समोरील आंब्यांनी लवलेला आम्रवृक्ष पाहून लचकत मुरडत आणि आनंदोन्मादाने पुढे सरकली आणि तिने औरंगजेब तिच्याकडे पाहात आहे या गोष्टीकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष करून एक आम्रफल खुडले. तिच्या अप्रतिम लावण्याच्या प्रभावाने औरंगजेबाच्या हृदयात एकच खळबळ उडवून दिली. "अगदी निर्लज्जपणाचा कळस करून त्याने तिचे आपल्या मावशीच्या अंतःपुरातून अपहरण केले आणि तिच्या नादात तो पूर्णपणे धुंद होऊन गेला." इतका की एक दिवस तिने त्याला दारूचा एक पेला दिला आणि ती त्याने प्यावी म्हणून त्याला आग्रह केला. त्याच्या सर्व विनवण्या आणि काकुळती तिने झिडकारून लावली. प्रेमाने भान विसरलेला औरंगजेब मद्याचा घोट गिळण्याच्या बेतात होता आणि त्याच वेळी त्या कावेबाज मोहिनीने तो मद्याचा चषक त्याच्या हातातून हिसकावून घेतला आणि ती म्हणाली "राजा, माझा उद्देश, तुझ्या माझ्यावरील प्रेमाची परीक्षा घेण्याचा होता. तुला दारूच्या पापी व्यसनात पाडण्याचा नव्हता." मृत्यूने आपला कठोर आघात करून ऐन तारुण्यात तिची जीवनवेल खुडली आणि या प्रेमप्रकरणावर पडदा पाडला. औरंगजेबाला तिच्या मृत्यूने अतिशय शोक झाला आणि त्याने तिला औरंगाबादच्या मोठ्या तलावाशेजारी पुरले. (**मासिर-उल-उमरा**, भाग १, ७९०-७९२) [औरंगजेबाच्या या प्रेम प्रकरणाची हकीकत ही घटना होऊन गेल्यानंतर ५० वर्षांनी बादशहाचा आवडता सेवक हमिद उद्दीन खान याने "**आलमगिर बादशाहाच्या संबंधी दंतकथा**" या आपल्या पुस्तकात दिली आहे, ती पुढील प्रमाणे. "दक्षिणेचा सुभेदार म्हणून आपल्या अधिकाराची सूत्रे घेण्यासाठी औरंगजेब औरंगाबादेकडे जात असताना बुऱ्हाणपूर येथे आल्यावर आपल्या आत्याच्या भेटीसाठी गेला. त्याने जेव्हा वाड्यात प्रवेश केला तेव्हा हिराबाई ही एका झाडाखाली उभी असून बारीक आवाजात काहीतरी गुणगुणत होती. तिला पाहिल्यावर औरंगजेबाला मूर्च्छा येऊन तो अगतिकपणे जमिनीवर आडवा झाला. ही बातमी त्याच्या आत्याला कळली. तिने त्याला आपल्या छातीशी कवटाळून धरले आणि शोक करण्यास सुरुवात केली. तीन-चार प्रहरानंतर राजपुत्र शुद्धीवर आला. असे का झाले याबद्दल तिने त्याला खोदून खोदून विचारले. परंतु काही उत्तर न देता तो स्वस्थ राहिला. मध्यरात्र उलटल्यानंतर तो आपल्या आत्याला म्हणाला की 'माझा रोग मी तुला सांगितला तर त्यावर तू औषध देशील का?' यावर तिने उत्तर दिले

'अरे औषधाचे तू काय घेऊन बसलास! तुला बरा करण्यासाठी माझे प्राणदेखील मी देईन.' यावर औरंगजेबाने एकंदर सर्व घटना तिला सांगितली. यावर त्याच्या आतेने उत्तर दिले, 'अरे माझा नवरा कसा दुष्ट स्वभावाचा आहे हे तुला माहीत आहे ना? त्याची मनोवृत्ती अगदी हलकट असून शहाजहान बादशहा आणि तू यांच्याबद्दल त्याला यत्किंचितही पर्वा वाटत नाही. तुझ्या मनात हिराबाईसंबंधी नुसती इच्छा निर्माण झाली आहे असे कळताच तो प्रथम तिला ठार मारील आणि नंतर मला. म्हणून ही गोष्ट त्याला सांगितल्यास त्यातून काहीही चांगले निष्पन्न व्हावयाचे नाही.'

दुसऱ्या दिवशी सकाळी राजपुत्र आपल्या छावणीत परत आला आणि त्याने या गोष्टीची आपला विश्वासू सेवक आणि दक्षिणेचा दिवाण मुर्शीद कुलीखान याच्याबरोबर चर्चा केली. खानाने उत्तर दिले, 'प्रथम मी तुमच्या चुलत्याचा निकाल लावतो आणि त्यानंतर जर मला कुणी ठार मारले तर त्यामध्ये काही बिघडणार नाही, कारण माझ्या प्राणाच्या मोबदल्यात माझ्या धन्याच्या आकांक्षा फलद्रुप झाल्या याचे समाधान मला मिळेल.' परंतु अशी गोष्ट करण्यास औरंगजेबाने परवानगी देण्याचे नाकारले. हे सर्व संभाषण मुर्शीद कुलीखानाने औरंगजेबाच्या आतेच्या नवऱ्याला सांगितले. त्याने औरंगजेबाच्या जनानखान्यात छत्तरबाई नावाची एक गुलाम कन्या होती. तिच्या बदली त्याने हिराबाईला औरंगजेबाच्या स्वाधीन केले. (**ॲनेकडोटस् ऑफ औरंगजेब**, ५)]

औरंगजेबाची मुले

औरंगजेबाचा वंशविस्तार बराच मोठा होता. त्याची पट्टराणी दिलरसबानू हिला पाच मुले झाली.

(१) जेबुन्निसा – (**रिऊस् ब्रिटिश म्युझियम कॅटलॉग**, भाग २, ७०२ ब) हिचा जन्म १५ फेब्रुवारी १६३८ रोजी दौलताबाद येथे झाला. ती दिल्ली येथे २६ मे १७०२ रोजी मरण पावली. तिला काबुल दरवाजाबाहेरील तीस हजार वनराजीच्या बागेत पुरण्यात आले. पुढे रेल्वेमार्ग तयार करताना तिची कबर पाडून टाकण्यात आली. औरंगजेबाकडून तिने कुशाग्र बुद्धिमत्ता आणि साहित्याची आवड हे गुण उचलले. तिचे ग्रंथालय इतर खासगी संग्रहांपेक्षा निःसंशय श्रेष्ठ होते. आपल्या मर्जीप्रमाणे ग्रंथोत्पती करण्यासाठी अथवा हस्तलिखिते लिहून काढण्यासाठी तिने मोठ्या मानधनावर विद्वानांच्या नियुक्त्या केल्या होत्या. औरंगजेबाला काव्याचा तिटकारा होता. परंतु दरबाराच्या उपेक्षेची ही उणीव तिने भारंभार भरून काढली. तत्कालीन बहुतेक कवी तिच्या आश्रयाला आले. ती स्वतः मखपी अथवा Concealed one या टोपण नावाखाली पर्शियन भाषेत काव्यरचना करी. परंतु आज अस्तित्वात असलेले दिवान-इ-मखपी ही खचित तिची कलाकृती नव्हे.

(२) जिनत उन्निसा ऊर्फ पादशहा बेगम – हिचा जन्म ५ ऑक्टोबर १६४३ रोजी बहुधा औरंगाबादला झाला. तिने आपल्या वृद्ध बापाच्या दक्षिणेतील घरादाराकडे जवळ जवळ २५ वर्ष, त्याच्या मृत्यूपर्यंत लक्ष पुरविले. बापाच्या मृत्यूनंतर ती बरीच वर्षे जगली. औरंगजेबाच्या काळातील एक चालते-बोलते स्मारक असे समजून औरंगजेबाच्या वारसांनी तिचा मान राखला. इतिहासकारांनी तिच्या पापभीरुतेची आणि औदार्याची वाखाणणी केली आहे. (**अबदुल हमीद**, भाग २, ३४३; **एम्. ए.**, ५३९; **खाफीखान**, भाग २, ३०). ती ७ मे १७२१ रोजी दिल्ली येथे मरण पावली. इ. स. १७०० मध्ये तिने बांधलेल्या जिनत उल मसजीद या उत्कृष्ट मशिदीत तिला पुरण्यात आले.

(३) जुबदत उन्निसा – हिचा जन्म २ सप्टेंबर १६५१ मध्ये मुलतान येथे झाला. तिचा विवाह तिच्या दुर्दैवी चुलत्याचा (दाराशुको) मुलगा म्हणजे तिचा चुलतभाऊ सिपिहर शुकोबरोबर ३० जानेवारी १६७३ मध्ये झाला. ती १७०७ च्या फेब्रुवारीत मरण पावली. (**एम्. ए.**, ५४०, १२५, १५४).

(४) महमद आजम – २८ जून १६५५ रोजी बुरहाणपूर येथे याचा जन्म झाला. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर सिंहासनासाठी त्याच्या वारसामध्ये जाजाऊ येथे झालेल्या लढाईत तो ८ जून १७०७ रोजी मारला गेला. (**वारिस; पादशहानामा** ७९ ब; **एम्. ए.**, ५३६).

अनुक्रमणिका

(५) महमद अकबर – ११ सप्टेंबर १६५७ रोजी औरंगाबाद येथे याचा जन्म झाला. इ. स. १७०४ साली नोव्हेंबर महिन्यात निर्वासितावस्थेत तो पर्शियात मरण पावला. (**एम्. ए.**, ५४७, ४८३; **कम्बू,** ६ ब) त्याला मशहद येथे पुरण्यात आले.

औरंगजेबाची दुसरी बायको नबाबबाई हिच्यापासून त्याला तीन मुले झाली.

(६) महमद सुलतान – मथुरेजवळ १९ डिसेंबर १६३९ मध्ये याचा जन्म झाला. तुरुंगवासात असतानाच हा ३ डिसेंबर १६७६ रोजी मरण पावला. (**अबदुल हमीद**, २. १७०; **एम्. ए.**, ५३४, १५९-१६०) ख्वाजा कुतुबुद्दीनच्या कबरीच्या आवारात याला पुरण्यात आले.

(७) महमद मुआज्जम ऊर्फ शहा आलम – याचा जन्म बुरहाणपुर येथे ४ आक्टोबर १६४३ रोजी झाला. औरंगजेबानंतर हा बहादुरशहा पहिला म्हणून गादीवर आला. लाहोर येथे १८ फेब्रुवारी १७१२ रोजी त्याचा मृत्यू झाला. (**अबदुल हमीद**, भाग २, ३४३; **एम्. ए.**, ५४३)

(८) बद्रुन्नीसा – हिचा जन्म १७ नोव्हेंबर १६४७ रोजी झाला. ही ९ एप्रिल १६७० मध्ये मरण पावली. (**एम्. ए.**, ५३९-५४०, १००).

(९) औरंगाबादी महलपासून औरंगजेबाला एकच मूल झाले.

मिहिरउन्नीसा हिचा जन्म १८ सप्टेंबर १६६१ रोजी झाला. हिचा विवाह २७ नोव्हेंबर १६७२ रोजी मुरादबक्षाच्या मुलाबरोबर-इजीदबख्श-याजबरोबर झाला. ही जून १७०६ मध्ये मरण पावली. (**एम्. ए.**, १२०, ५१५, ५४०)

उदेपुरी महलपासून औरंगजेबाला झालेला मुलगा म्हणजे

(१०) कामबख्श – याचा जन्म दिल्ली येथे २४ फेब्रुवारी १६६७ मध्ये झाला. वारसासाठी झालेल्या लढाईत तो हैदराबादजवळ ३ जानेवारी १७०९ मध्ये मारला गेला. (**एम्. ए.** ५३८; **आलमगिरनामा,** १०३१)

(९) औरंगजेबावर अवकृपा

इ. स. १६४४ मध्ये बादशहाची औरंगजेबावर एकाएकी अवकृपा झाली आणि त्याला दक्षिणच्या सुभेदारीवरून बडतर्फ करण्यात आले.

२६ मार्च १६४४ रोजी रात्री राजकन्या जहानआरा ही आग्र्याच्या किल्ल्यात आपल्या बापाच्या खोलीतून स्वतःच्या दिवाणखान्याकडे येत होती तेव्हा तिचे नेसते वस्त्र तेथील मार्ग प्रकाशित करण्यासाठी ठेवलेल्या पेटत्या मेणबत्तीला चाटून गेले. ती अतिशय भाजली. (**अबदुल हमीद**, भाग २. ३६३–३६९; **खाफीखान**, भाग १. ५९८-६००) आणि जवळ जवळ ४ महिने तिने जगते की मरते अशा अवस्थेत काढले.

दिल्लीच्या राजवैद्याने तिला झालेल्या जखमा बऱ्या करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली पण त्यांना यश आले नाही. अखेर आरिफ नावाच्या एका गुलामाने तयार केलेल्या अंजनाने तिच्या जखमा साफ बऱ्या झाल्या. तिची प्रकृती पूर्णपणे सुधारली. या आनंदाप्रीत्यर्थ अतिशय मोठ्या प्रमाणावर आणि भव्यतेने समारंभ साजरे करण्यात आले. (**अबदुल हमीद**, भाग २. ३९५-४००) तिच्या विनंतीवरून बादशहाने औरंगजेबावर पुन्हा कृपा केली आणि दरम्यानच्या काळात त्याच्याकडून काढून घेतलेला दर्जा आणि अधिकार त्याला परत देण्यात आला.

आपल्या बहिणीला भेटण्यासाठी औरंगजेब हा २ मे रोजी आग्रा येथे आला होता. तेथे असताना तीन आठवड्यानंतर एकाएकी त्याची अधिकारावरून बडतर्फी करण्यात आलेली होती आणि त्याचा दर्जा आणि सरंजाम खालसा करण्यात आला होता. [या घटनेबद्दल दरबारातील वृत्तान्त लिहणारा अबदुल हमीद लाहोरी असे लिहितो की, औरंगजेबाला अशातऱ्हेने शिक्षा करण्यात आली याचे कारण औरंगजेबाच्या मूर्ख सोबत्यांनी त्याची दिशाभूल केली आणि त्यामुळे त्याच्या मनात एखाद्या फकिरासारखे जीवन जगण्याचे विचार डोकावू लागले. त्याचप्रमाणे त्याच्या हातून अशा काही गोष्टी घडल्या की, बादशहाने त्याबद्दल नापसंती दर्शविली. या घटनेबाबत खाफीखान असे सांगतो की, आपण केलेल्या वाईट कृत्यांबद्दल बादशहा आपल्याला शिक्षा करणार हे ओळखून त्याने शस्त्रत्याग केला आणि काही दिवस एखाद्या फकिरासारखे घालविले. याबद्दल बादशहाने त्याला बडतर्फ केले. परंतु औरंगजेबाच्या हातून जी काही वाईट कृत्ये घडली होती त्याबद्दल मात्र दोघेही एक चकार शब्ददेखील काढीत नाहीत. (**अबदुल हमीद**, भाग २. ३७३-३७६; **खाफीखान**, भाग १. ६०० **आणि**, भाग २. ३९८)] उपलब्ध असलेल्या एका पत्रावरून आपल्याला असे कळून येते की दाराने त्याच्याबरोबर जे सातत्याने शत्रूत्व धरले होते आणि त्याशिवाय दारावरील अधिक पुत्रप्रेमामुळे शहाजहानच्या मर्जीतून आणि विश्वासातून औरंगजेब उतरला होता. या गोष्टी आपल्या मनाविरुद्ध आहेत हे दर्शविण्यासाठी औरंगजेबाने आपल्या पदाचा त्याग केला होता. औरंगजेबाला असे वाटले की लोकांतरात त्याची नामुष्की झालेली आहे आणि स्वाभिमान ठेवून किंवा लोकसेवेच्या ध्येयाने आता त्याला दक्षिणेचा राज्यकारभार करता येणे शक्य नाही. [एका पर्शियन शद्बाचा (**मन्जवी इख्तिआर करदन**) शद्बशः अर्थ लावल्याने इंग्लिश इतिहासामध्ये एका दंतकथेचा उगम झाला आणि ती म्हणजे धर्माविषयीचे प्रेम एकाएकी उफाळून आल्याने औरंगजेब फकीर बनला. परंतु यावेळी वस्तुस्थिती अशी होती की त्याच्या कृतीशी धार्मिकतेचा काहीच संबंध नव्हता. त्याचा हेतू धार्मिक नसून राजकीय होता. त्याने फक्त आपल्या अधिकाराचा राजीनामा दिला. परंतु त्याने फकिराचा पेशा अंगीकारला नाही. दाराबद्दल वाटणाऱ्या मत्सराचे औरंगजेबाने केलेले जाहीर प्रदर्शन आणि त्यामुळे शहाजहानने त्याला दिलेली शिक्षा याकरिता **औरंगजेबाच्या दंतकथा** भाग २ पाहा.]

[या घटनेबद्दल खुद्द औरंगजेबाने आपली बहीण जहानआरा हिला १६५४ मध्ये रागारागाने पुढीलप्रमाणे लिहिले आहे. या वेळी औरंगजेबाची नेमणूक दुसऱ्यांदा दक्षिणेच्या सुभेदारीवर झाली होती आणि त्याच्याबद्दल असाच अविश्वास दाखविण्यात आला होता. "बादशहाच्या सर्व नोकरांमध्ये मी अपमानाचे जिणे घालवावे आणि माझ्या जीवनाचा अंत त्याच तऱ्हेने व्हावा अशीच जर बादशहाची इच्छा असेल तर तिचे पालन केल्यावाचून मला गत्यंतर नाही.... परंतु अशातऱ्हेने जगणे आणि मरणे हे कठीण आहे. बादशहाची माझ्यावर मर्जी नाही, आणि म्हणून या पृथ्वीवरील नाशवंत गोष्टींच्या प्रित्यर्थ मी दुःख आणि यातना यांमध्ये जीवन घालवू शकत नाही किंवा माझे जीवन मी दुसऱ्यांच्या स्वाधीनही करू शकत नाही. अशा परिस्थितीत बादशहाच्या हुकुमावरून माझी या लाजिरवाण्या जिण्यातून मुक्तता व्हावी हेच चांगले. असे झाले म्हणजे राज्याच्या इभ्रतीला धोका पोहोचावयास नको आणि इतरांची मनेही मोडावयास नकोत. १० वर्षांपूर्वीच या गोष्टीची मला जाणीव झाली होती. त्याचप्रमाणे माझ्यावर माझे शत्रू टपून राहिलेले होते हेही मला माहीत होते. म्हणून मी माझ्या अधिकाराचा राजीनामा दिला. असे करण्यात माझा उद्देश एकान्तवास प्राप्त करून घेणे, कोणाच्याही मनाला ताप न होऊ देणे आणि विनाकारण स्वतःची मानहानी टाळणे हाच होता." (**आदाब-इ-आलमगिरी**, १७७ अ)]

औरंगजेबावर बादशहाची पुन्हा मर्जी बसते, त्याची गुजरातेत पाठवणी.

जहानआराच्या रदबदलीमुळे शहाजहानने औरंगजेबाला पुन्हा आपल्या कृपाछत्राखाली घेतले [औरंगजेबाच्या वृद्धापकाळात त्याच्या संबंधीच्या ज्या काही दंतकथा संकलित झाल्या त्यावर आपण विश्वास ठेवला तर आपल्याला असे दिसून येईल की औरंगजेबावर बादशहाची गैरमर्जी होण्याला कारण दाराशुको याला औरंगजेबाविषयी वाटणारा द्वेष हेच कारण होते. असे सांगतात की दाराने आपला बाप आणि तीन भाऊ यांना आग्रा येथे बांधलेला त्याचा नवीन राजवाडा पाहण्यास बोलविले. ते दिवस उन्हाळ्याचे होते आणि त्या सर्वांना जमिनीखाली असलेल्या नदीजवळच्या एका खोलीत नेण्यात आले. या खोलीत जाण्यासाठी एकच दरवाजा होता. सर्वांनी खोलीत प्रवेश केला. परंतु औरंगजेब मात्र दाराजवळच बसून राहिला. शहाजहानने त्याला याबद्दल विचारता त्याने काहीच उत्तर दिले नाही. त्याच्या अवज्ञेबद्दल त्याला दरबारात येण्याची बंदी करण्यात आली. अशातऱ्हेने सात महिने झाल्यानंतर त्याने आपली बहीण जहानआरा हिच्या जवळ असे सांगितले की त्या खोलीला एकच दरवाजा असल्यामुळे आपल्याला सिंहासन मिळावे म्हणून दारा दरवाजा बंद करून आपले वडील आणि भाऊ यांना ठार

मारील अशी भीती आपणाला वाटली. असा प्रयत्न टाळावा म्हणून आपण रक्षकासारखे दरवाजाजवळ बसून राहिलो. शहाजहान याला ही गोष्ट कळल्यानंतर त्याने औरंगजेबावरील आपला राग काढून घेतला. अर्थात औरंगजेब आणि दारा यांना दरबारात एकत्र ठेवणे अशक्य होते म्हणून १६ फेब्रुवारी १६४५, रोजी त्याची नेमणूक गुजरातचा सुभेदार म्हणून करण्यात आली. (**अबदुल हमीद** भाग २. ४११)] आणि १६ फेब्रुवारी १६४५ मध्ये गुजरातचा सुभेदार म्हणून त्याची रवानगी केली. (**अबदुल हमीद**, भाग २. ४११) इ. स. १६४७ च्या जानेवारी महिन्यात बाल्ख प्रांतामध्ये त्याची नियुक्ती झाली आणि गुजरातेतील त्याची सुभेदारी संपली. गुजरातच्या सुभेदारीच्या अल्पकाळातदेखील औरंगजेबाने राज्यकारभारातील आपले कसब आणि खणखणीतपणा प्रत्ययास आणून दिला.

औरंगजेबाचा कडक कारभार

गुजरातमध्ये असलेल्या चोरट्या जमाती आणि बंडखोर यांच्याविरुद्ध औरंगजेबाने कडक धोरण स्वीकारले. त्यांना परिणामकारक रीतीने पायबंद घालण्यासाठी त्याने त्याच्या मनसबदारीच्या अधिकाराने परवानगी दिल्यापेक्षाही अधिक लोकांची सेनेमध्ये भरती केली. अशातऱ्हेने त्याने आपली कुवत आणि धडाडी बापाच्या नजरेस आणून दिली. (अधिक माहितीसाठी पाहा. **सरकारांचे हिस्टरी ऑफ औरंगजेब**, खंड १, पाने ८०-८१) यानंतर अगदी थोड्या अवधितच साम्राज्याच्या दूरच्या भागात या गुणांची तेथील स्फोटक परिस्थितीमुळे आवश्यकता भासल्याने त्याला त्याठिकाणी पाठविण्यात आले. ही घटना म्हणजे २१ जानेवारी १६४७ रोजी त्याची बाल्ख आणि बदक्शान प्रांतांचा सुभेदार आणि सरसेनानी म्हणून नियुक्ती करण्यात आली. (**अबदुल हमीद**, भाग २. ५८३, ६२५, ६२७, ६३२).

(बाल्ख प्रांताच्या अधिक माहितीसाठी पाहा – **लेडनस् मेमॉयर्स ऑफ बाबर** (१८२६); **वाम्बेरिज् ट्रॅव्हल्स; वुड्स् जर्नी**)

(१०) औरंगजेबाची बाल्ख प्रांतातील मोहीम, १६४७

बाल्ख आणि बदक्शान त्यांचा इतिहास

काबूलच्या उत्तरेस हिंदकूश पर्वतांच्या रांगांच्या पलीकडे पसरलेले बाल्ख आणि बदक्शान प्रांत हे बुखाराच्या राज्याच्या अमलाखाली होते. (**स्क्रिन अँड रॉस**, १६०, १९२) बुखाराचा राजा नजरमहमदखान हा एक दुबळा आणि नालायक राज्यकर्ता असून साऱ्या प्रजेची सहानुभूती त्याने गमाविली होती. तो गादीवर आल्याला जेमतेम तीन वर्षे झाली न झाली तोच त्याच्या प्रचंड साम्राज्यात सर्वत्र बंडाळी माजली (१६४५). (**अबदुल हमीद**, भाग २. ४३५, ४४२) या संधीचा फायदा घेऊन शहाजहानने बाल्ख आणि बदक्शान काबीज करण्यासाठी त्या प्रांतांत मोहीम पाठविली. कारण हे दोन प्रांत म्हणजे बादशहा बाबर याचा वारसा होते आणि मोगल घराण्याचा संस्थापक तिमूर याची राजधानी जे समर्कंद त्याच्या वाटेवरचे होते. (अधिक माहितीसाठी पाहा. **अबदुल हमीद**, भाग २. ४८२-४८३).

बदक्शान व बाल्खवर आक्रमण

इ. स. १६४६ च्या जून महिन्यात मुरादबक्षाने प्रचंड सैन्यासहीत बाल्ख आणि बदक्शान हे दोन प्रांत सहज आक्रमिले. परंतु या ओसाड, जंगली आणि दूषित हवेच्या प्रदेशांत चाकरी करणे मुरादबक्ष आणि त्याचे अधिकारी यांच्या जिवावर आले होते आणि आक्ससच्या पलीकडील क्रूर अशा उजबेक टोळीवाल्यांशी

सामना देण्याची कल्पना त्यांना भयावह वाटत होती. (**एम. यू**. १. ४८८ ; **अबदुल हमीद**, भाग २. ५४२, ६६६) ऑगस्टमध्ये मुरादबक्ष आपल्या सैन्याला एकाकी टाकून आणि बादशहाच्या मर्जीविरुद्ध बाल्खमधून परतला. परिस्थिती काबूत आणण्यासाठी औरंगजेबाची तिकडे रवानगी करण्यात आली. त्याने ७ एप्रिल १६४७ रोजी अलीमर्दानखानाला आपला निकटचा अधिकारी म्हणून बरोबर घेऊन काबूल सोडले आणि उजबेक टोळीवाल्यांशी पावलापावलांगणीक लढा देत तो २५ मे रोजी बाल्ख येथे पोहोचला. (अधिक माहितीसाठी पाहा. **अबदुल हमीद**, भाग २. ४८३-४८८, ५१२-५३७, ५२१-५३४, ५३९-५४१, ५४८-५५३, ५५७-५५९, ५६०-५६५, ५७९, ५८४, ५६६-५७१, ६१४-६१८, ६२०-६२४, ६४२-६५७, ६०३, ६३३, ६४१-६४२).

बदक्शान व बाल्खवर औरंगजेबाची नेमणूक

बुखाराच्या राज्यातर्फे सामना देण्यासाठी नजरमहमदचा कर्तृत्ववान आणि शूर मोठा मुलगा अदुबल अजीजखान उभा ठाकला. त्याच्या नेतृत्वाखाली उजबेक टोळीवाले बाल्ख प्रांताच्या निरनिराळ्या भागांत जमा झाले आणि त्यांनी मोगल सैन्याला एकाकी पाडण्याचा आणि लुटण्याचा घाट घातला. अकचा (वायव्य दिशेला ४० मैल) येथे जमाव झालेल्या शत्रूला मोडण्यासाठी औरंगजेब जेव्हा बाल्ख शहरातून बाहेर पडला तेव्हा त्याला दररोज मार्गावर टोळीवाल्या उजबेकानी प्रतिकार केला. त्याचवेळी त्यांची दुसरी एक पलटण बाल्ख शहरावर हल्ला करण्यासाठी बुखाऱ्यावरून आली. ही बातमी कळताच औरंगजेबाला इंचइंच जमिनीचा तुकडा लढवित राजधानीच्या शहरी (बाल्ख) परत फिरणे भाग पडले. ह्या माघारीला जवळ जवळ दहा दिवस लागले आणि या अवधित मोगल फौजेला एका क्षणाचीही उसंत लाभली नाही. ताज्या दमाच्या आणि फिरत्या शत्रूबरोबर घनघोर लढा अहोरात्र द्यावा लागत होता आणि अगदी याचवेळी उपासमारीने शाही फौजेत हलकल्लोळ घातला. सेनादल सारखे कुचीवर होते आणि या धावपळीत अन्न शिजविण्याची पाळी आघाडीवर असलेल्या हत्तींच्या पाठीवर आली. **मोगलांचे हाल : औरंगजेबाचा धिमेपणा** :- एका भाकरीची किंमत एक रुपया क्वचित दोन रुपयेही झाली. तितकेच पाणीही महागले. पाण्याचे दुर्भिक्ष पडले. इतक्या अडचणी आणि धोका आ वासून उभ्या असताना औरंगजेबाचा खंबीरपणा आणि विलक्षण ताबा यामुळे ढिलाई आणि अव्यवस्था निर्माण होण्याचा प्रसंग टळला. त्याची तीव्र निरीक्षणशक्ती आणि केव्हाही कारवाईला सिद्ध असलेला देह अडचणीच्या जागेवर सदा धावून जाई आणि त्याचे चातुर्य आणि धडाडी फौजेला कोणत्याही प्रसंगातून निभावून नेई.

औरंगजेबाच्या चिवटपणाने त्याचे उद्दिष्ट साध्य झाले. अबदुल, अजीज याने तह करण्याची तयारी दर्शविली. औरंगजेबाचा नाश करण्याची त्याची आशा आता फसली होती. औरंगजेबाच्या अंगात वसत असलेल्या कठोर निर्धाराचे प्रात्यक्षिक त्याने स्वतः अनुभविले होते. एके दिवशी लढाईची ऐन धुमश्चक्री चालली असताना सायंप्रार्थनेची वेळ झाली. औरंगजेबाने लढाईच्या मैदानात चादर पसरली, गुढगे टेकले आणि शांतपणे नमाज पढले. सभोवारची हाणामारी आणि गोंधळ यांजकडे त्याचे अजिबात लक्ष गेले नाही. मोहिमेवर असताना जसे त्याच्या अंगावर चिलखत आणि कवच नसे त्याप्रमाणे आताही नव्हते. बुखाऱ्याची सेना या दृश्याकडे भान विसरून पाहात राहिली. औरंगजेबाबद्दलच्या आदराच्या भावनेने अबदुल अजीज याने युद्धविराम केला आणि तो उद्‌गारला की "अशा माणसांशी लढणे म्हणजे स्वतःचा नाश ओढवून घेण्यासारखे आहे."

नजरमहमदबरोबर तह

अबदुल अजीजने अशी योजना मांडली की शहाजहानने बाल्खदेश त्याच्या बापाकडे परत सोपविण्याचे जाहीर केले होतेच, तरी आता आपला धाकटा भाऊ सुभान कुली याच्या ताब्यात बाल्ख प्रांत देण्यात यावा. औरंगजेबाने शहाजहानचा या बाबतीत सल्ला विचारला. त्याने असे कळविले की बादशाहीचा मान राखण्यासाठी नजरमहमद जर बादशहाची माफी मागण्यास तयार असेल तर बाल्ख प्रांत नरजमहमदच्या स्वाधीन करण्यात येईल.

माघारीत झालेले मोगलांचे हाल

ही योजना नजरमहमदने मान्य केली. १ ऑक्टोबर रोजी बाल्खचा किल्ला नजरमहमदच्या लोकांच्या स्वाधीन करण्यात आला. मोगल सैन्याने काबूलच्या दिशेने परत कूच करण्यास सुरुवात केली. हिंदुकुश पर्वताच्या खिंडी ओलांडताना मोगल सैन्याचे अतोनात हाल झाले आणि वित्त आणि सेनेची पुष्कळच हानी झाली. याला कारण म्हणजे पिछाडी आणि आघाडीवर उजबेक आणि हजारा टोळीवाल्यांनी त्यांच्यावर केलेले प्रखर हल्ले हे होय. **मोहिमेतील मोगलांचे झालेले नुकसान :-** मोगलांनी ५००० माणसे आणि तेवढ्याच मोठ्या संख्येने मालवाहू जनावरे गमाविली. दाणागोटा, लष्करी सामान आणि इतर सामग्री यांच्या रूपाने मोगलांना जे पाठीमागे सोडावे लागले त्याची किंमत अनेक लाख रुपयांवर भरली. या लढाईत हिंदुस्थानच्या तिजोरीला ४ कोटी रुपयांचा फटका बसला, पण एक इंच जमिनीच्या तुकड्याचा लभ्यांशदेखील या मोहिमेतून झाला नाही. [या मोहिमेची सविस्तर हकीकत पुढीलप्रमाणे आहे. १६४७ मध्ये या मोहिमेची बादशहाने मोठ्या प्रमाणावर तयारी केली. शुजा आणि औरंगजेब यांना त्यांच्या प्रांतांतून बोलाविण्यात आले. पेशावर आणि काबूल यांच्या दरम्यान ठिकठिकाणी सैन्याच्या तुकड्या ठेवण्यात आल्या. (**अबदुल हमीद**, भाग २. ६०३, ६३३, ६४१-४२). ज्या सुमारास औरंगजेबाला बादशहाचे पत्र मिळाले (४ सप्टेंबर १६४६) त्यावेळी तो गुजराथेत होता. त्याने आपले अधिकार माळव्याचा सुभेदार शायस्ताखान याच्याकडे सोपविले. २० जानेवारी १६४७ रोजी तो लाहोरला पोहोचला. तेथे त्याची बादशहाशी मुलाखत झाली. १० फेब्रुवारी रोजी त्याने पेशावरकडे कूच केले. येथे त्याच वसंतऋतूपर्यंत मुक्काम व्हावयाचा होता. (**अबदुल हमीद**, भाग २. ५८३, ६२५-२८, ६३२. तेथून तो ३ एप्रिल रोजी काबूलला पोहोचला आणि तेथून चार दिवसांनी तो युद्धभूमीच्या दिशेने निघाला. त्याचा मुख्य सल्लागार म्हणून अली मर्दानखान त्याच्याबरोबर होता. (**अबदुल हमीद**, भाग २. ६७०, ६७१).

सुरुवातीपासून औरंगजेबाचे सैन्य संख्येने लहान असल्यामुळे अडचण झाली. अगोदरच्या स्वारीवरील काही सैनिक अजून किल्ल्याचे संरक्षण करीत किंवा अफगाणिस्थानामधील मुख्य छावणीबरोबर असलेल्या रस्त्याचे रक्षण करीत पाठीमागेच होते. हे सैन्य मोठमोठ्या अधिकाऱ्यांच्या हाताखाली होते. औरंगजेबाने त्या सर्वांना आपल्या अधिकारकक्षेत ठेवले. त्यामुळे त्याच्यापुढे अधिकाराच्या जागा कोणास द्यावयाच्या याचा प्रश्न पडला. त्याला जाऊन मिळण्याचा ज्यांना हुकूम झाला होता ते अधिकारी हिंदुस्थानात राहिले अथवा जेमतेम अफगाणिस्थानापर्यंत पोहोचले. साहजिकच औरंगजेबाच्या हाताखाली जेमतेम २५ हजार सैन्य राहिले. याउलट शत्रूच्या सैनिकांची संख्या औरंगजेबाच्या हाताखालील सैन्याच्या तिप्पट होती. (**अबदुल हमीद**, भाग २. ७०२-७०४; खाफीखान औरंगजेबाच्या सैन्याची संख्या ३५००० होती आणि शत्रुसैन्य १ लक्ष २० हजार होते असे सांगतो. भाग १. ६७१) या दोन्ही फौजांत हातघाईच्या लढाया जरी झाल्या नाहीत तरी शत्रुसैन्याने मोगलांना जेरीस आणले. त्यांच्यावर निर्णायक विजय मिळविणे मोगलांना शक्य झाले नाही. (**अबदुल हमीद**, भाग २. ७०४, ७०५). सात एप्रिल १६४७ रोजी औरंगजेबाने काबूल सोडले. बाल्खकडे जाणाऱ्या रस्त्यावर देहास नदीचे डेरागाज या नावाचे खोरे आहे. तेथे उजबेक लोकांनी आपली फौज जमा केली. त्यांच्याविरुद्ध औरंगजेबाने ५०० सैनिकांची एक तुकडी रवाना केली. त्यांनी शत्रूंवर हल्ला केला. त्यांच्या मदतीसाठी आघाडीच्या लोकांना पाठविण्यात आले. उजबेकांचा मोड झाला आणि त्यांनी पळ काढला. परंतु थोडे पुढे जाऊन त्यांनी नवीन ठिकाणी मोर्चे उभारले. ही घटना २० मे रोजी झाली. (**अबदुल हमीद**, भाग २. ६७१–६७३). दुसऱ्या दिवशी औरंगजेबाने देहास नदीच्या पूर्व किनाऱ्याने आणि अली मर्दानखान याने देहासच्या दोन उपनद्या ओलांडून शत्रुसैन्याला दऱ्याखोऱ्यांतून हुसकावून लावण्यासाठी कूच केले. मोगल सैनिकांच्या आघाडीच्या तुकडीने खिंडीतून पुढे कूच केले. त्यांच्यावर उजबेकांनी हल्ला केला. परंतु मोगल सैन्याच्या उजव्या आणि डाव्या फळीचे सैनिक पुढे झाले आणि त्यांनी शत्रुसैन्याची मधली फळी मोडली. अली मर्दानखानाने उजबेकांचा चार मैलांपर्यंत पाठलाग केला आणि तो छावणीवर परतला. औरंगजेबाचा बाल्खमधील हा पहिला विजय होय.

२५ मे रोजी मोगल सैन्य बाल्ख येथे पोहोचले. शहरातील प्रमुख लोकांना कैद करण्यात आले. (**अबदुल हमीद**, भाग २. ६७३-६७५, ६८६-६८७). या सैन्याला काबूलहून सैनिक आणि द्रव्य यांची भरपूर रसद पोहोचली. काबूल येथे खुद्द शहाजहान हजर होता. (**अबदुल हमीद**, भाग २. ६८०, ६८१, ६८४, ६८५). बुखारा येथील सैन्याचा अधिपती अबदुल अजीजखान हा होता. हा बुखाऱ्याचा बादशहा नजर महमद याचा मुलगा. त्याने आणखी एक सैन्याची तुकडी अकचा ह्या बाल्खच्या वायव्येस चाळीस मैलांवर असलेल्या ठिकाणाकडे रवाना केली. याठिकाणी

मागील युद्धातून पळालेले सैन्य त्यांना मिळाले. (**अबदुल हमीद**, भाग २. ६८६) बाल्ख येथे तीन दिवस मुक्काम केल्यानंतर औरंगजेबाने अकचा या ठिकाणाकडे कूच केले. त्याने आपल्या मोठ्या मुलाला जड सामानसुमानासहित बाल्ख येथे ठेविले. बादशाही फौज अतिशय काळजीपूर्वक कूच करीत होती. तोफखान्याचा पाठिंबा पायदळी फौजेला होता. उजबेकांनी केलेले अनेक हल्ले परतवून लावण्यात आले. परंतु बादशाही फौजेला त्रास देण्यात त्यांना यश आले. २ जून रोजी औरंगजेब तिमूराबाद येथे पोहोचला. या ठिकाणी उजबेकांनी त्यांच्यावर सर्व बाजूंनी हल्ले चढविले. परंतु त्यांना बऱ्याच युद्धानंतर परतवून लावण्यात मोगलांना यश मिळाले. मोगलांच्या डाव्या फळीचा सेनापती खान बहादुर जफरजंग हा होता. हा प्रकृतीने दुबळा होता. उजबेकांना याची जाणीव झाली आणि ते या ठिकाणी जमा झाले. जफरजंग याने ४०० सैनिकांची एक तुकडी शत्रूला अटकाव करण्यासाठी पाठविली तिचा उजबेकांनी निःपात केला. जफरजंग स्वतः शत्रूशी मुकाबला करण्यासाठी गेला परंतु तो घोड्यावरून खाली पडला आणि त्याचे दोन मुलगे ठार झाले. त्याक्षणी औरंगजेब मदत घेऊन तेथे दाखल झाला. या नवीन आलेल्या सैन्याने शत्रूचा मोड केला. (**अबदुल हमीद**, भाग २. ६८८, ६९२; खाफीखान ही लढाई दुसऱ्या दिवशी सकाळी झाला असे सांगतो. भाग १. ६६२). अशा तऱ्हेने २ जून हा दिवस बादशाही फौजांना भयंकर कठीण असा गेला. वरील विजयानंतर छावणीला मोर्चे बांधण्यात आले आणि अतिशय जागरूक असा पाहारा सतत ठेवण्यात आला. दुसऱ्या दिवशी मोगल सैन्याने कूच केले. उजबेकांनी मोगल सैन्यावर सतत हल्ले चालू ठेवले. मोगल तोफखान्यापुढे त्यांचा निभाव लागला नाही. मोगलांची आगे कूच चालूच राहिली. अखेर औरंगजेबाने पशाई येथील उजबेकांची छावणी ताब्यात घेतली. दरम्यान शत्रूचे मोठे सैन्य राजपुत्र सुभान कुली याच्या हाताखाली बुखाऱ्याहून बाल्खवर हल्ला करण्यासाठी येत आहे, अशी बातमी औरंगजेबाला लागली. ही बातमी कळताच ५ जून रोजी त्याने झपाट्याने पशाईहून माघार घेतली. शत्रूने जास्त धिटाईने मोगलांवर हल्ले चढविले. दोन वेळा शत्रूसैनिक त्याच्या छावणीतच शिरले (**खाफीखान**, भाग १. ६६८). दुसऱ्या दिवशी औरंगजेबाने शेखाबादकडे माघार घेतली आणि तेथून त्याने फैजाबादकडे कूच केले. (**अबदुल हमीद**, भाग २. ६९४–६९७). ७ तारखेला परिस्थिती बिघडली. उजबेकांनी तिन्ही बाजूंनी मोगलांवर हल्ले चढविले. परंतु पुन्हा एकदा मोगलांच्या तोफखान्याने शत्रूवर मात केली. ९ तारखेपर्यंत मोगलांची माघार चालू होती. ११ तारखेला मोगल सैन्य बाल्ख येथे पोहोचले. (**अबदुल हमीद**, भाग २, ६९७–७०१). माघारीच्या या १० दिवसांत मोगल सैन्याला विश्रांती ती कशी मिळाली नाही. मोगल सैन्य भुकेने पिडले. धान्याचे भाव अतिशय कडाडले. धान्य पुरे पडेनासे झाले. सर्वसाधारण माणसाचे हाल तर याहीपेक्षा कठीण होते. या कठीण परिस्थितीत औरंगजेबाचा कणखरपणा आणि संयम यामुळे एकंदर शिस्तीत बिघाड झाला नाही. त्याने आपल्या धिटाईने आणि शहाणपणाने सैन्याला सुरक्षित आणले (**खाफीखान**, भाग १. ६६८, ६६९; अधिक माहितीसाठी पाहा **होवर्थ**, ७५२).

मोगल सैन्याप्रमाणेच शत्रूची परिस्थितीही भयानक होती. अबदुल अजीज याने तहाची इच्छा प्रकट केली. औरंगजेबाच्या अंगी असलेले धैर्य आणि कणखरपणा ही त्याने आणि त्याच्या सैनिकांनी प्रत्यक्ष बघितलेली होती. घनघोर युद्ध चालू असताना कशाचीही पर्वा न करता औरंगजेबाने रणभूमीवर नमाज पढले होते. हे बघितल्यानंतर अशा माणसाशी युद्ध करणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण देण्यासारखे आहे, असे उद्‌गार त्याने काढले हाते. (**मसिरी–इ–आलमगिरी**, ५३१; **अबदुल हमीद**, भाग २. ७०४).

बुखाऱ्याच्या सुलतानाला आपल्या सैन्याचा पगार देणे शक्य झाले नाही. साहजिकच त्याच्या सैनिकांना मायदेशाला परत जाण्याची उत्सुकता लागून राहिली. अशा वेळी अजीजने असा प्रस्ताव मांडला की, आपल्या धाकट्या भावाला बाल्खचा ताबा देण्यात यावा. औरंगजेबाने शहाजहानकडे विचारणा केली. दरम्यान अजीजने बाल्ख सोडून उत्तरेकडे ऑक्सस नदी ओलांडून पळ काढला. लढाई काही काळ तरी थांबली होती. परंतु तहाबाबत काहीच निकाल लागला नव्हता. शहाजहानची इच्छा सुलतान नजर महमदखान याने शरण यावे अशी होती. इकडे मोगल सैन्य कंटाळले होते हा देश जिंकल्यास इथेच कायम राहावे लागेल अशी मोगल अधिकाऱ्यांना भीती वाटली. साहजिकच त्यांनी औरंगजेबाच्या बेतात अडथळे आणले. तेव्हा औरंगजेबाने या देशात राहून काहीही साधणार नाही असे शहाजहानला कळविले. (**वारिस**, ३ ब, ४ अ). दरम्यात वाटाघाटी चालूच राहिल्या. हिवाळा आता जवळ येत होता. हिंदुकुश पर्वतांच्या वाटा थोड्याच कालावधीत बंद होणार होत्या. औरंगजेबाच्या सैन्यापुढे दुष्काळ आ वासून उभा होता. शत्रूसैन्याचे तुरळक हल्ले पुन्हा सुरू झाले होते. वेळ घालविण्यात अर्थ नव्हता. तेव्हा बादशहाच्या संमतीची वाट न पाहता १ ऑक्टोबर १६४७ रोजी त्याने बाल्ख शहराचा ताबा नजरमहमदच्या नातवाकडे दिला. ३ ऑक्टोबर रोजी मोगल सैन्याने काबूलच्या दिशेने माघारीला सुरुवात केली. वाटेत शत्रु सैन्याने मोगलांचा उच्छाद मांडला. तारीख १४ ऑक्टोबर रोजी मोगल सैन्य घोरी येथे पोहोचले. हा किल्ला शहाजहानला आपल्या ताब्यात ठेवावयाचा होता परंतु त्याच्या अधिकाऱ्यांनी तिथे राहण्यास नकार दिला (**वारिस**, ७ ब). मोगल सैन्याची माघार चालूच राहिली. या वर्षीचा हिवाळा अधिक लौकर आला. सुरखाब नदी आणि हिंदुकुश पर्वत जेमतेम पार करून औरंगजेब २७ आक्टोबर रोजी काबूल येथे पोहोचला. (**वाम्बेरीज हिस्टरी ऑफ औरंगजेब**, ३३२; **वारिस**, ८ अ, ८ ब).

परंतु मुख्य सैन्य पाठीमागेच राहिले. त्याचे अतिशय हाल झाले. उंट बर्फामध्ये गाडले गेले. १० नोव्हेंबर रोजी सैन्याच्या अखेरच्या तुकड्या काबूल येथे पोहोचल्या. (**वारिस**, ९ अ). या माघारीत मोगलांनी १० हजारांवर माणसे गमावली. किती मालमत्ता मागे राहिली याची मोजदादच करता येणार नाही. पुढील वर्षी जेव्हा बर्फ वितळले तेव्हा गाडल्या गेलेल्या मानवी सांगाड्यांचे ढिगारेच्या ढिगारे रस्त्याच्या दोन्ही बाजूला पसरलेले आढळले. (**वाम्बेरीज बुखारा**, ३२२).]

मुलतानची सुभेदारी

बाल्खच्या मोहिमेनंतर औरंगजेबाने मार्च १६४८ पासून जुलै १६५२ पर्यंत मुलतान आणि सिंधची सुभेदारी केली. (**वारिस**, १२ अ) या सुभेदारीवर असताना दोनवेळा (जानेवारी ते डिसेंबर १६२९ आणि मार्च ते जुलै १६५२) त्याला कंदहारला वेढा घालण्यासाठी आणि पर्शियनांकडून तो किल्ला जिंकून

घेण्यासाठी पाचारण करण्यात आले. [या चार वर्षांच्या काळात औरंगजेबाच्या वैयक्तिक जीवनाविषयी फारच थोडी माहिती मिळते. दोन वेळा त्याला पर्शियनांबरोबर कंदहार येथे लढण्यासाठी पाचारण करण्यात आले. पहिल्या खेपेला परत येताना १० ते २६ नोव्हेंबर १६४९ पर्यंत तो बादशहाबरोबर लाहोर येथे होता. त्याने आपल्या बापाची पुन्हा एकदा भेट दिल्ली येथे २ जानेवारी ते १२ फेब्रुवारी १६५१ या कालावधीत घेतली. १६ जानेवारी १६४९ रोजी त्याच्या मनसबदारीत वाढ करण्यात आली. तो आता १५००० स्वारांचा अधिकारी झाला. (**वारिस**, २४ अ, ३९ ब, ४८ अ, ४९ ब, ५९ अ; **आदाब–ई–आलमगिरी**, ३ अ, ४ ब, ९ अ, आणि ९ ब). या वर्षाच्या नोव्हेंबर महिन्यात सिंध प्रांताचा त्याच्या सुभेदारीत समावेश करण्यात आला आणि भाक्कर व सिवीस्तान हे दोन जिल्हे त्याला जहागीर म्हणून देण्यात आले. (**वारिस**, ३९ ब).] **बलूची टोळ्यांचा उच्छाद** :- त्याच्या नवीन सुभेदारीच्या प्रांतात अतिशय क्रूर आणि भांडखोर अशा अफगाण आणि बलूची टोळ्यांच्या वसाहती होत्या. आपल्या सुभेदारीच्या थोड्याशा कालावधीतील औरंगजेबाची कामगिरी म्हणजे त्याने कुप्रसिद्ध अशा टोळीप्रमुखांचा केलेला नाश आणि सरहद्दीवर राहणाऱ्या टोळीवाल्यांकडून बादशहाशी एकनिष्ठ राहण्याचे घेतलेले तकलुपी वचन ही होय. (**सरकार**, १, पाने ११७–११९) (अधिक माहितीसाठी पाहा. **डेमस् बलोच रेस** ४८ व ५५.)

सिंधच्या व्यापाराचा विकास [सिंध प्रांत, त्यामधील रानटी टोळ्या आणि औरंगजेबाने या टोळ्यांना वठणीवर आणण्यासाठी केलेले प्रयत्न याची सविस्तर हकीकत पुढीलप्रमाणे आहे. औरंगजेबाच्या सुभेदारीत सिंधचा समावेश झाल्यामुळे अतिशय रानटी अशा अफगाण आणि बलुची अशा टोळ्यांबरोबर त्याचा संबंध आला. अनेक वर्षेपर्यंत बादशाही सत्तेला कोणीही जुमानत नव्हते. औरंगजेबाला अशा तऱ्हेची परिस्थिती सहन होणे कठीण होते. कायदा प्रस्थापित करावयाचा तर शासन मजबूत असणे जरूर होते. त्याच्या सुभेदारीच्या थोड्याशा काळात त्या प्रांतातील जमातींना शांततामय जीवनाची सवय लावणे कठीण होते. औरंगजेबाने जे केले ते म्हणजे त्या जमातींपैकी बंडखोर असलेल्या प्रमुखांचा त्याने नायनाट केला, हे होय. होत नावाची जमात सिंध आणि पंजाब या दोन प्रांतांत बाहेरून आलेली होती. तिच्या दोन शाखा होत्या. एक शाखा डेरा इस्माईलखान या ठिकाणी राजधानी करून होती. दुसऱ्या जमातीचे ठाणे मानकेरा हे होते. होत जमातींचा प्रमुख इस्माईल याने शहाजहानकडे नजराणे पाठविले. सिंध आणि पंजाब या दोन प्रांतांच्या सरहद्दीवर त्याचा मुख्य तळ होता. त्याचा फायदा घेऊन त्याने मुलतानच्या सुभेदाराची ताबेदारी मानण्याचे नाकारले. इतकेच नव्हे तर त्याने मुबारक नावाच्या दुसऱ्या एका बलुची प्रमुखाकडून तीन किल्ले जिंकून घेतले. औरंगजेबाने सैन्य पाठवून हे किल्ले परत मुबारकच्या ताब्यात दिले. परंतु इस्माईलने ते परत जिंकून घेतले. यावर औरंगजेबाने त्याच्याविरूद्ध कडक उपापयोजना केली व त्याला किल्ले परत द्यावयास लावले. (२० जून १६५०). अशा तऱ्हेने कंदहारच्या वेढ्यामध्ये आपल्याला मदत होईल हा हेतू मनात ठेवून औरंगजेबाने इस्माईलबरोबर समझोता केला.

दुसऱ्या एका बलुची टोळीबरोबर मोगलांना तोंड द्यावे लागले. ती टोळी म्हणजे नोहानी ही होय. (अधिक माहितीसाठी पाहा. **डेमस् बलोच रेस**, पा. ५६. **एच. बुल्लरचे सेन्सस ऑफ बलुचिस्तान**, पा. ८३). या टोळीचा मुख्य आलम हा होता. त्याच्याशी मैत्री करण्याचे औरंगजेबाचे प्रयत्न फसले. तेव्हा औरंगजेबाने त्याच्याविरुद्ध कारवाई करण्याचे ठरविले. (**आदाब-ई-आलमगिरी**, ३ अ, ३ ब, ४ अ, ५ अ). वरील टोळीशिवाय आणखी दोन टोळ्या म्हणजे नहमर्दी व जुकीया या होत. या टोळ्यांविरुद्ध औरंगजेबाने मलीक हुसेन याची रवानगी केली. मलीक हुसेनने त्यांना शरण यावयास लावले. त्याचा परिणाम इतर टोळ्यांवर होऊन त्यांनीही बादशाही सत्तेपुढे मान तुकविली. वरील कामगिरीनंतर बादशाही सैन्य तत्ता येथे परतले.

दरम्यान कक्रालच्या जमीनदाराचा मुलगा सातहला याने औरंगजेबाची मुलतान येथे भेट घेतली. तो मुलतान येथे असताना त्याच्या प्रतिस्पर्ध्याने त्याच्या जमिनी बळकाविल्या. त्याचाही पराभव मलीक हुसेन याने केला.

अशा तऱ्हेने औरंगजेब अंतर्गत शांतता प्रस्थापित करीत असताना त्या प्रांताच्या व्यापार उदिमाचा विकास करण्याचे व तेथील सारा वाढविण्याचे कामही त्याने केले. औरंगजेबाने किनाऱ्यावरील व्यापाराची वृद्धी व्हावी म्हणून अनेक सवलती दिल्या. सिंधू नदीच्या मुखावर त्याने एक नवीन बंदर बांधले, आणि तेथे किल्लाही बांधला. त्याचप्रमाणे त्याने बंदरात येणाऱ्या मालावरील जकातीची माफी केली. (**आदाब-ई-आलमगिरी**, ६०). या सुमारास औरंगजेबाला अनेक आर्थिक अडचणीस तोंड द्यावे लागले. दुष्काळामुळे त्याच्या जहागिरीपासून येणारे उत्पन्न घटले, त्यामुळे त्याने बादशहाकडे द्रव्याची मागणी केली. आपण आपला पैसा सैन्य दक्ष ठेवण्यासाठी खर्च केला असे त्याने शहाजहानला लिहिले. परंतु त्याची ही विनंती शहाजहानने झिडकारून लावली. (**आदाब**, १७२ अ).]

त्याशिवाय त्याने त्या प्रांताच्या सागरी व्यापारासाठी अनेक सवलती देऊन त्या प्रांताच्या व्यापाराचे पुनरुज्जीवन करण्याचे कार्य हाती घेतले. नदीच्या मुखाशी वाळू साचल्याने तट्टा हे बंदर निरुपयोगी झाले होते. औरंगजेबाने आणखी खाली सिंधू नदीच्या तीरावर नवीन बंदराची योजना केली आणि तेथे एक किल्ला आणि धक्का यांची उभारणी केली.

(११) औरंगजेबाचा कंदहारला वेढा, १६४९-१६५२

(कंदहारच्या अधिक माहितीसाठी पाहा. **केरस व्हॉयजेस अँड ट्रॅव्हल्स**, भाग ९. २१२ व २१३ **ऐन-इ-अकबरी**, भाग २. ३९४, **मॅसन्सस् जर्नीज्**, भाग २. १८६-१८९.)

कंदहार, भूगोल आणि रचना

कंदहारचा किल्ला हा हिंदुस्थानाकडे जाणारा रस्ता पश्चिमेकडून आणि काबूलकडे जाणारा रस्ता दक्षिणेकडून रोखून धरण्याची कामगिरी करतो. या किल्ल्याचे लष्करीदृष्ट्या महत्त्व असे की केवळ ३६० मैलांच्या सपाट प्रदेशाने या किल्ल्याची आणि हिरात शहराची फारकत केली आहे. हिरातजवळ हिंदुकुश पर्वतांच्या रांगांनी दबाव घेतल्यामुळे मध्य आशिया अथवा पर्शिया यांमधून स्वारी करून येणाऱ्या सैन्याला येथून सुलभ मार्ग मिळतो. अशातऱ्हेने स्वारी करून येणाऱ्या सैन्याला कंदहारमधून जाणे भाग आहे आणि त्याला परतवून लावायचे झाल्यास तेही इथेच. ज्या काळी काबूल हे दिल्लीच्या साम्राज्यात मोडत होते त्या काळी कंदहार म्हणजे आपल्या देशाच्या संरक्षण-फळीतला पहिला दुवा होते. (अधिक माहितीसाठी पाहा. **फोरस्टर्स जर्नी** (१७९८). **होल्डीचस गेटस् ऑफ इंडिया; टॅव्हेर्निअर; ईस्कीन्स् हिस्टरी ऑफ इंडिया**).

कंदहारचे लष्करीदृष्ट्या महत्त्व

१७ व्या शतकात जेव्हा पोर्तुगालच्या आरमाराचे हिंदी महासागरात प्राबल्य होते आणि पर्शियन सामुद्रधुनीकडे जाणारे हिंदी महासागरातील सर्व मार्ग त्यांनी रोखून धरले त्यावेळी कंदहारचे व्यापारीदृष्ट्या महत्त्व हे त्याच्या लष्करी महत्त्वाइतकेच होते. हिंदुस्थानातून आणि स्पाईस बेटातूनदेखील पश्चिमेकडे जाणारा सर्व माल खुष्कीच्या मार्गाने मुलतान, पिशिन आणि कन्दहार मधून पर्शियाकडे आणि तेथून युरोपकडे जात असे. इ. स. १६१५ मध्ये मालाने भरलेले १४ हजार उंट या मार्गाने पर्शियाकडे रवाना झाले. व्यापाराच्या विनिमयाचे मध्यवर्ती केन्द्र म्हणून कन्दहार शहराची संपत्ती आणि विस्तार यादृष्टीने जलदगतीने वाढ झाली.

कन्दहारचा पाडाव

कन्दहारला अशा तऱ्हेने महत्त्व प्राप्त झाल्यामुळे पर्शिया आणि हिंदुस्थानचे सम्राट यांमध्ये कन्दहार हे कलहाचे कारण होऊ लागले. इ. स. १५२२ मध्ये बाबराने कन्दहार अफगाण बादशहाकडून जिंकून घेतले परंतु पर्शियाच्या राजाने ते पुन्हा १५५८ मध्ये काबीज केले. नंतर अकबराने १५९४ मध्ये कन्दहारच्या सुभेदाराकडून ते परत घेतले. परंतु जहांगीरच्या वृद्धापकाळात शहा अब्बास द ग्रेट याने २५ दिवसांच्या वेढ्यानंतर इ. स. १६२३ मध्ये ते पुन्हा काबीज केले. इ. स. १६३८ मध्ये कन्दहारचा पर्शियन सुभेदार अली मर्दानखान याने आपल्या बादशहाच्या क्रोधाला भिऊन कन्दहारचा किल्ला शहाजहानच्या स्वाधीन केला. परंतु पर्शियनांना फार काळ रोखून धरणे शक्य नव्हते. इ. स. १६४९ च्या फेब्रुवारीमध्ये शहाजहानने वेळेवर मदत न पाठविल्यामुळे ५७ दिवसांच्या वेढ्यानंतर (वेढ्याच्या हकीकतीसाठी पाहा : **वारिस**, २३ अ—२७ अ; **खाफीखान** ६८६—६९०१) पर्शियनानी ते मोगलांकडून परत हिसकावून घेतले. (पाहा **इलिअट**, ६. १३०; **खाफीखान**, भाग १· ११५, १२२, ३२६; **ए. एच**. भाग २· २४, ४०; **मसिर उल उमरा**, भाग २· ७९५—७९८)

कंदहारला मोगलांचा पहिला वेढा

बादशाहीची इज्जत राखायची तर कन्दहार पुन्हा पर्शियनांकडून जिंकून घेणे जरूर होते. शहाजहानच्या मुलांनी कंदहारला तीन वेळा वेढे घातले. पण प्रत्येक वेळी त्यांना अपयश आले. पहिली मोहीम औरंगजेब आणि वजीर सादुल्लाखान यांच्या नेतृत्वाखाली ५०,००० फौज देऊन काढण्यात आली. ही सेना १४ मे १६२९ रोजी डेरेदाखल झाली आणि त्यांनी किल्ल्याला वेढा दिला. पण मोठ्या तोफांच्या अभावी त्यांना किल्ल्यावर हल्ला करता आला नाही. याउलट किल्ल्यावरील तोफा भारी आणि पल्लेदार होत्या. दिल्लीदरबारच्या इतिहासकाराने तर पुढील शब्दांत यासंबंधी स्पष्टपणे कबुली दिली आहे. तुर्कांबरोबर त्यांच्या नेहमी येणाऱ्या युद्धप्रसंगांमुळे पर्शियन लोक किल्ले जिंकून घेणे आणि त्यांचे संरक्षण करणे यात तरबेज झाले होते. **पर्शियनांबरोबर युद्ध** :- गोलंदाजी आणि तोफखाना यांच्या उपयोगात तर ते अद्वितीय होते. कंदहार किल्ला तर मजबूत आणि दाणागोट्याने भरलेला आणि मोठ्या तोफा आणि नेमबाज गोलंदाज यांच्या संरक्षणाखाली होता. तेव्हा बादशाही फौजेच्या प्रयत्नांवर पाणी पडले यात काहीच नवल नाही. जरी यापूर्वी कंदहारच्या नैर्ऋत्य दिशेस २४ मैलांवर अर्धंदाब नदीच्या किनाऱ्यावर झालेल्या घनघोर युद्धात त्यांचे सेनापती किलिचखान आणि रुस्तुमखान दख्खनी यांनी एका मोठ्या पर्शियन सेनादलावर प्रचंड विजय मिळवून त्यांचा कुष्क-इ-नाखूदच्या पलीकडेही पाठलाग केला होता, [कंदहारच्या पहिल्या वेढ्याची सविस्तरपणे हकीकत पुढीलप्रमाणे आहे :— १६ मे १६४९ रोजी औरंगजेब कंदहारपुढे येऊन उभा ठाकला. किल्ल्याला मोगलांनी वेढा दिला. दुसऱ्या दिवशी रजपुतांनी अचानक हल्ला करून किल्ला घेण्याचा प्रयत्न केला. परंतु पर्शियन गोलंदाजांनी प्रचंड भडिमार करून हा हल्ला परतवून लावला. रजपुतांना टेकडीवरून माघार घ्यावी लागली. तिथेच त्यांनी मेढेकोट उभारले. (**वारिस**, २८ ब, २९ अ). किल्ल्यावरून प्रचंड भडिमार होत असताना देखील चार जुलैपर्यंत खंदकापर्यंत मोर्चे नेण्यात आले आणि ते थेट ख्वाजा खिजर दरवाजापर्यंत नेण्यात आले. यामधून खंदकात माती आणि झाडेझुडपे यांचा भरणा करण्यात आला. खंदकाखालून किल्ल्याच्या भिंतीपर्यंत मोगल सैनिक गेले आणि त्यांनी तेथे सुरुंग भरला. (**वारिस**, ३४ अ, ३४ ब). आता पर्शियनांबरोबर झुंज द्यावयाची तर मोगलांना उघड मैदानात उतरणे भाग होते. त्यासाठी शत्रूचा तोफखाना गारद करणे या गोष्टीची जरूर होती. परंतु त्यासाठी लागणारा तोफखाना औरंगजेबाजवळ नव्हता. अशा परिस्थितीत किल्ल्यावर हल्ला करणे जबर प्राणहानी सोसूनच शक्य होते. साहजिकच याबाबत वरचष्मा हा कंदहारचे संरक्षण करणाऱ्यांचाच होता. किल्ला जिंकणे औरंगजेबाच्या आवाक्या पलीकडचे होते. म्हणून बादशाही हुकुमावरून औरंगजेबाने पाच सप्टेंबर रोजी कंदहारहून माघार घेण्यास सुरुवात केली. हिवाळा नजीक येत होता आणि २० हजार पर्शियन फौज कंदहारच्या मदतीस येत होती. या गोष्टीमुळे माघार जलद घेणे भाग पडले.

यावेळी मोगल अधिकारी कलीचखान याच्या हाताखाली एक सैन्याची तुकडी बिस्त नावाच्या किल्ल्याजवळ ठाण मांडून बसली होती. परंतु ऑगस्टमध्ये पर्शियन फौजांनी कंदहारच्या दिशेने कूच करण्यास सुरुवात केली, तेव्हा त्याची परिस्थिती पुष्कळ नाजूक झाली. त्याने खंजरखानाच्या हाताखाली पाठविलेल्या ४ हजार सैनिकांचा पर्शियन घोडदलाचा प्रमुख नजफ कुली याने पराभव केला. त्याची ७०० माणसे ह्या हल्ल्यात ठार झाली. कलीचखान याने कंदहारच्या नैर्ऋत्येस २४ मैलांवर असलेल्या संग हिसारकडे माघार घेतली. त्याच्या मदतीसाठी औरंगजेबाने रुस्तुमखान याला पाठविले. या दोन सेनापतींचे २५ ऑगस्ट रोजी शहामीर येथे पर्शियनांशी घनघोर युद्ध झाले. रुस्तुमखानाचे सैन्य अर्धंदाब नदीच्या किनाऱ्यावर कंदहारची वाट अडवून ठाण मांडून राहिले, तर तीस हजार पर्शियन सैनिक कुष्क-इ-नाखूदच्या डोंगरापासून नदीच्या किनाऱ्यापर्यंत पसरले. त्यांना आणखी कुमक मूर्तजा कुलीखानाच्या हाताखाली येऊन पोहोचली. यत्किंचितही विश्रांती न घेता त्याने मोगलांवर हल्ला करण्यासाठी चाल केली. दुपारचे काही प्रहर उलटून गेल्यानंतर युद्धाला आरंभ झाला. समोरून आणि दोन्ही बाजूंकडून मोगलांची सेना वेढली गेलेली होती. तीन तासपर्यंत घनघोर युद्ध झाले. मोगल सैन्याची उजवी फळी पर्शियन लोकांच्या हल्ल्याखाली आली. परंतु रुस्तुमखानाच्या हाताखालील सैन्याने हा हल्ला परतवून लावला. दरम्यान धुळीचे वादळ झाल्यामुळे युद्ध थांबले. पर्शियन सैन्याने पळ काढला. त्यांनी आपला तोफखाना, घोडे आणि इतर युद्ध सामग्री पाठीमागे टाकली ती मोगलांच्या हातात पडली. पर्शियनांचा वीस मैलपर्यंत मोगलांनी पाठलाग केला. (**वारिस**, ३६ अ, ३६ ब; या घटनेची पर्शियन बाजू **झुबदत-उत्—तवारीख**, ४२ ब, ४३ अ या ग्रंथात दिली आहे, ती अगदी वरील हकीकतीच्या उलट आहे). वरील विजयाबद्दल शहाजहानने मोठा उत्सव साजरा केला. लष्करातील सेनापतींना बढत्या देण्यात आल्या. परंतु हा विजय अगदी पोकळ होता. कारण यानंतर लगेच दहा दिवसांनी मोगलांना कंदहारचा वेढा उठवावा लागला. औरंगजेबाची ३००० माणसे आणि त्याच्या दुप्पट जनावरे गारद झालेली होती. सैन्यात धान्याचा भयंकर दुष्काळ पडलेला होता. (**खाफीखान**, भाग १, ६९५-७००). मोगलांनी ज्या दिवशी माघारीला सुरुवात केली त्या दिवशीच कंदहारचा पर्शियन सेनापती मिहराबखान हा मरण पावला. परंतु त्याने आपला शब्द मात्र पाळला.] तरी एकंदर तीन महिने आणि २० दिवस किल्ल्यासमोर फुकट घालविल्यानंतर औरंगजेबाने ५ सप्टेंबर रोजी पिछेहाटीला सुरुवात केली.

कंदहारला दुसरा वेढा

कंदाहार परत जिंकून घेण्यासाठी पूर्वीपेक्षा मोठ्या प्रमाणावर मोहिमेची तयारी करण्यात आली.

पुन्हा औरंगजेब आणि सादुल्लाखान किल्ल्यासमोर दाखल झाले, (औरंगजेब ज्या मार्गाने गेला त्याच्या अधिक माहितीसाठी पाहा : **वारिस** ६४ अ; **आदब–ई–आलमगिरी** ९ अ–११ ब) आणि त्यांनी २ मे १६५२ रोजी किल्ल्याला वेढा दिला. किल्ल्याच्या भिंतीना भगदाडे पाडण्यासाठी तोफखाना डागण्यात आला आणि किल्ल्याला लागून असलेल्या खंदकापर्यंत मोर्चे उभारण्यात आले. खंदक कोरडे करण्यासाठी जारीने प्रयत्न करण्यात आले आणि चाळींसपायरी (चिहिल जीना) मनोऱ्या पाठीमागील जमिनीच्या पट्ट्याच्या टोकावर रात्री हल्ला चढविण्यात आला. परंतु मोगलांच्या सर्व प्रयत्नांना अपयश आले. **मोगलांचा कमकुवत तोफखाना :-** किल्ल्याच्या भिंतीवरून तोफखान्याचा जो प्रचंड भडिमार करण्यात आला त्यामुळे किल्ल्याजवळ मोर्चे चालवून नेणे अशक्य झाले. शत्रूने किल्ल्याच्या तिन्ही बाजूंनी हल्ले केले आणि सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत किल्ल्याच्या भिंतीच्या गजातून गोळीबार चालू ठेवला आणि औरंगजेबाच्या फौजेला पुढे सरकणे अशक्य करून टाकले. किंबहुना मोगल तोफखाना जितका कुचकामी होता त्यापेक्षा पर्शियन तोफखाना कितीतरी पटीने मारक होता. हिंदुस्थानातील गोलंदाज नेमबाजीत कमकुवत होते आणि त्यांच्या तोफांच्या भडिमाराचा किल्ल्याच्या तटबंदीवर काहीच परिणाम होत नसे.

कंदहारहून माघार

किल्ल्याला वेढा घातल्यापासून एका महिन्याच्या आतच किल्ल्याभोवतालचे खंदक कोरडे करण्याचे आणि सुरुंग भरण्याचे काम सामानसुमानाच्या अभावी बंद ठेवावे लागले. पर्शियनांनी वारंवार हल्ले करून मोर्चामधील मोगल शिपायांना ठार मारण्याचे वा जखमी करण्याचे सत्र चालू ठेवले आणि त्यांचा तोफखाना नादुरुस्त केला. दोन महिन्यांच्या सतत भडिमारानंतर देखील किल्ल्याच्या तटबंदीला खिंडार पडले नाही. अशा किल्ल्यावर हल्ला करणे म्हणजे शुद्ध वेडेपणा होता. अखेर शहाजहानच्या हुकुमावरून मोगल सैन्याने वेढा उठविला आणि ९ जुलै रोजी आपल्या पिछेहाटीला सुरुवात केली. [इ. स. १६५२ मध्ये औरंगजेबाने कंदाहारला जो दुसरा वेढा दिला त्याच सविस्तर हकीकत पुढीलप्रमाणे आहे; औरंगजेबाबरोबर असलेले सैन्य ५० ते ६० हजारांच्या दरम्यान होते. यांपैकी ¼ गोलंदाज आणि तोफखान्यातील लोक होते. अधिकाऱ्यांची संख्या या सैन्याच्या $^{1}/_{20}$ एवढी होती. लहान–मोठ्या तोफा जवळ जवळ १४८ होत्या. सैन्यात दहा नामवंत हत्ती आणि ३००० उंट होते. मोहिमेकरिता बाजूला काढलेली रक्कम दोन कोट रुपये इतकी होती. या सैन्याला मदत लागल्यास खुद्द बादशहा ४० ते ५० हजार फौज घेऊन काबूल येथे मुक्काम करून राहिला होता. (**वारिस**, ६० अ–६१ ब).

सादुल्लाखानाच्या हाताखालील मुख्य सैन्य खैबरमार्गे कंदहारला पोहोचले. औरंगजेबाजवळ ५००० सैनिकांची तुकडी होती. हे सैन्य पंजमंड्राकमार्गे कंदहारकडे निघाले. २ मे १६५२ रोजी दोन्ही सैन्यांची गाठ कंदहार येथे पडली. त्या दिवशीच कंदहारच्या वेढ्याला सुरुवात झाली. सेनाधिकाऱ्यांनी त्यांना नेमून दिलेल्या ठिकाणी मोर्चे उभारण्यास सुरुवात केली. औरंगजेबाची छावणी पश्चिमेकडे होती. तोफखान्याचा प्रमुख कासीमखान हा दक्षिणेकडे होता. सादुल्लाखान हा आग्नेयेकडे होता आणि वायव्येच्या दिशेला राजा राजरूप हा होता. यांच्यामधील मोक्याच्या ठिकाणी आणखी चार सेनापती मोर्चे देऊन उभे होते. (**वारिस**, ६५ अ; **आदाब-ई-आलमगिरी**. १२ ब) खंदक खोदण्याच्या कामाला वेळ लागला. दरम्यान काही मोक्याची ठिकाणे अचानक हल्ला करून ताब्यात घेण्याचा प्रयत्न मोगलांनी केला. हा हल्ला वायव्येच्या दिशेला झाला. परंतु या हल्ल्याचा काहीही उपयोग झाला नाही. हल्ल्याचे ठिकाण चाळीस पायऱ्यांवरील दोन बुरूज हे होते. हा हल्ला भाऊसिंगाचा मुलगा राजरूप याने चढविला होता. त्याने आता चाळीस पायऱ्या पाठीमागील जे चिंचोळे शिखर होते त्यावर हल्ला करण्याचे ठरविले. त्याच्या सैन्यात डोंगर चढून जाण्यात पटाईत असलेले अनेक सैनिक होते. त्यांना रात्रीच्या वेळी डोंगरमाथ्यावर पाठवून त्यांनी दरवाजा ताब्यात घेतल्यावर आपण पाठीमागे घुसावयाचे असा त्याने बेत केला. रविवार तारीख २० जून रोजी हा हल्ला करण्याचे ठरले. (**वारिस**, ६५, ब; **आदाब-ई-आलमगिरी**, १६ ब, १७ अ; **मासिर-उल-उमरा** या ग्रंथात या प्रसंगाचा उल्लेख देखील नाही). राजरूपच्या मदतीसाठी सादुल्लाखानाने निवडक फौजेची रवानगी केली. प्रत्येक अधिकाऱ्याने त्याला नेमून दिलेली जागा घेतली. राजरूपने रात्रीच्या वेळी आपली माणसे दिवसा पाहून ठेवलेल्या मार्गाने वर रवाना केली. काही अंतरावरून तो स्वतःही निघाला. मदतीला आलेले सैनिक अली काबी दरवाजाच्या दिशेने निघाले. त्यांचा अधिकारी बाकीखान हा तीनशे सैनिक घेऊन राजाला येऊन मिळाला. या हल्ल्याचे यश, किती गुपचूपपणे हल्ला करण्यात येणार होता त्यावर अवलंबून होते. नेमकी याच बाबतीत मोगलांची गफलत झाली. अधिकाऱ्यांची मोठ्या आवाजात बाचाबाची सुरू झाली. त्यामुळे शत्रुसैनिक सावध झाले. दरम्यान चंद्र उगवला आणि मोगलांची उरली-सुरली आशाही मावळली. इतक्यात राजरूपकडे अशी बातमी आली की शत्रूला सावध असलेला पाहिल्यामुळे हल्ला करणारे सैन्य परतले आहे. तेव्हा त्याने आपले मुख्य सैन्य पाठीमागे रवाना केले आणि तो स्वतः परतणाऱ्या सैनिकांची वाट पाहात त्याचजागी बसला. काही वेळाने त्याला एका मूर्ख सेवकाने असे सांगितले की, आपले सैनिक किल्ल्यात घुसले आहेत. यावर विश्वास ठेवून त्याने विजयाचे रणशिंग फुंकले. त्याबरोबर परतणारे बादशाही सैन्य पाठीमागे आले. नेमका याचवेळी सूर्योदय झाला आणि किल्ल्यावरून शिबंदीने मोगलांवर गोळीबार केला. मोगलांचे अनेक सैनिक ठार मारले गेले.

अनुक्रमणिका

कंदहार घेण्याची आता एकच आशा होती, आणि ती म्हणजे खंदक किल्ल्याच्या भिंतीपर्यंत नेऊन तटबंदीला खिंडार पाडणे ही होय. यामध्येदेखील मोगलांना अपयश आले. मोगलांची प्रगती किल्ल्यावरून होणाऱ्या भडिमारामुळे रोखली गेली. हा भडिमार रात्रंदिवस चालू असे. (**वारिस**, ६५ अ, ६५ ब; **आदाब-ई-आलमगिरी**, १६ अ, १५ ब). तसे पाहिले तर पर्शियन तोफखाना हा मोगलांच्या तोफखान्यापेक्षा निश्चितच वरचढ होता. मोगल गोलंदाज नेमबाजीत कुचकामी होते. परिणामी औरंगजेबाला युरोपियन गोलंदाजांवर अवलंबून राहावे लागले. त्याशिवाय मोगलांना आणखी अडचणींना तोंड द्यावे लागले. त्यांच्याजवळील खंदक भरण्याची सामग्री संपून गेली. अचानक हल्ला करूनच किल्ला घेता येईल याची औरंगजेबाला जाणीव झाली आणि बादशहाने तर अशी आज्ञा दिली होती की तटबंदीला खिंडार पाडल्याखेरीज हल्ला चढवायचा नाही. (**आदाब-ई-आलमगिरी**, १७ ब).

अखेर सादुल्लाच्या योजनेप्रमाणे किल्ल्याच्या पूर्वेला सर्व तोफा जमा करण्यात आल्या. प्रत्येक तोफेतून दहा वेळा भडिमार करण्यात येई. परंतु दिवसा झालेले नुकसान शत्रूचे सैनिक रातोरात भरून काढीत. साहजिकच पर्शियन तोफखान्यावर जास्त जबाबदारी पडली नाही. दरम्यान आपल्या मोर्चांपुढे औरंगजेबाने चार मेढेकोट उभारले. एकंदर तीन हजार सैनिक त्याठिकाणी तयार ठेवले. सादुल्लाखानाने तटबंदीला खिंडार पाडल्यावर या सैनिकांनी किल्ल्यावर हल्ला चढवायचा होता. परंतु मोगलांचा हा प्रयत्न देखील फसला. एकोणीस जूनला किल्ल्यावरून शत्रुसैनिकांनी सादुल्लाखानाच्या मोर्चावर हल्ला चढविला. एक तासाच्या सख्त लढाईनंतर पर्शियनांना माघार घ्यावी लागली. इतर अनेक वेळा असेच हल्ले पर्शियनांनी केले आणि अनेक मोगल सैनिकांना ते कैद करून घेऊन गेले. (**आदाब-ई-आलमगिरी**, १६ ब; **वारिस**, ६५ ब; **खाफीखान**, भाग १. ७१२).

मोगलांच्या तोफा अशा तऱ्हेने निरुपयोगी ठरल्यामुळे त्या किल्ल्याच्या पश्चिमेकडे हलविण्यात आल्या. औरंगजेबाच्या मोर्चातील तोफखाना आणखी मजबूत करण्यात आला. परंतु येथे मोगलांचा प्रभाव पडला नाही. किल्लेदाराला वश करण्याचे मोगलांचे प्रयत्न फसले. जूनच्या मध्याला दोन पर्शियन अधिकारी तोफेचा गोळा लागून ठार झाले. २६ मे रोजी किल्ल्यावरील एका दारूच्या कोठाराला आग लावून दारूचा भडका उडाला. १५० माणसे यामध्ये ठार झाली, चार अधिकारी जखमी झाले आणि अनेक माणसे आणि जनावरे जायबंदी झाली. इतके होऊनही मोगलांना जय मिळण्याची आशा नव्हती. तीन जुलै रोजी औरंगजेबाने बादशहाला पत्र लिहून किल्ल्यावर अचानक हल्ला करण्याची परवानगी मागितली. सादुल्लाखानाने बादशाहाला खरी परिस्थिती कळविली होती आणि १ जुलै रोजी वेढा उठवावा असे शहाजहानचे उत्तर आले होते. औरंगजेबाने बादशहाकडे मुदत देण्यासंबंधी विनवणी केली. परंतु वेढा उठविण्यासंबंधी शहाजहानचे जे पत्र आले होते त्याची बातमी सैन्यात पसरली आणि सैनिक खंदक सोडून पाठीमागे आले. जेव्हा शहाजहानने कुरकुरत वेढ्याचे काम आणखी एक महिना चालविण्यास परवानगी दिली, तेव्हा या हुकुमाची अमलबजावणी करणे शक्य नव्हते. औरंगजेबाने माघार घेण्याबद्दल असा हुकूम देण्याचे कारण, १०००० उजबेक सैनिकांनी मोगलांच्या पिछाडीवर हल्ला चढवून काबूल आणि कंदहार यांमधील दळणवळणाला धोका आणला हे जे संकट होते ते आपण निवारू शकू अशी ग्वाही दिली आणि अखेर तसे झालेही. परंतु कंदहारचा वेढा उठविण्यात आला आणि ९ जुलै रोजी मोगल सैन्याने माघारीला सुरुवात केली. ७ ऑगस्ट रोजी तो काबूल येथे बादशहाला येऊन मिळाला. (**आदाब–ई–आलमगिरी**, १८ ब; **वारिस** ६६ ब; **झुबदत–उत–तवारीख**, ४४ अ, ४४ ब).]

शहाजहान आणि औरंगजेब यांमधील कटू पत्रव्यवहार

औरंगजेबाच्या ह्या अपयशाची शहाजहानला अतिशय चीड आली आणि त्याचा पराजय हा केवळ त्याच्या दौर्बल्यामुळे झाला असा शहाजहानने त्याच्यावर ठपका ठेवला. परंतु कंदहार जिंकून घेण्याचे कामी अपयश आल्याबद्दल औरंगजेबाला दोष देणे हे त्याच्यावर अन्याय करण्यासारखे आहे. कारण वेढ्याच्या संपूर्ण कालावधीत औरंगजेबाकडे दुय्यम दर्जाचे सैन्य होते. शहाजहान बादशहा हा काबूलमधून सादुल्लाखानातर्फे सर्व कारवाईचे मार्गदर्शन करीत होता. प्रत्येक महत्त्वाचे पाऊल पुढे टाकण्याच्या अगोदर शहाजहानची परवानगी घेतली जात होती. [औरंगजेबाला कंदहारच्या वेढ्यात जे अपयश आले त्याबाबत शहाजहानने त्याच्याबरोबर अतिशय कटू असा पत्रव्यवहार केला. एका पत्रात त्याने त्याला लिहिले की, "इतकी तयारी केल्यानंतर देखील तुला किल्ला जिंकता आला नाही याचे मला मोठे आश्चर्य वाटते." औरंगजेबाने यावर बादशहाला लिहिले की "माझ्या प्रयत्नांची मी शिकस्त केली, परंतु वेढ्याचे सामान कमी पडल्यामुळे आणि तोफखाना अपुरा पडल्यामुळे सर्व प्रयत्नांना अपयश आले." यावर शहाजहानने त्याला संतापून असे उत्तर दिले की, "मी कंदहार सोडणार नाही. प्रयत्नांची शर्थ करून ते मी परत घेईन." यावर औरंगजेबाने बादशहाची विनवणी केली की, "कंदहारवर होणाऱ्या पुढील मोहिमेत भाग घेण्याची मला संधी द्यावी. यासाठी मला दुय्यम दर्जाचे स्थान दिले तरी चालेल. इतकेच नव्हे तर दक्षिणेच्या सुभेदारीवर देखील मी पाणी सोडण्यास तयार आहे." या विनवणीचा शहाजहानने धिक्कार केला. त्याला दक्षिणेत जाण्याची आज्ञा केली आणि कळविले की, "तू कंदहार घेऊ शकशील असे मला वाटले असते तर मी तुझ्या सैन्याला परत बोलाविलेच नसते. प्रत्येक माणसाची काहीतरी काम करण्याची कुवत असते. असे म्हणतात की, अनुभवी माणसांना कोणत्याही हुकुमाची जरुरी भासत नाही." यावर औरंगजेबाने लिहिले की, "ज्याला थोडीदेखील अक्कल आहे त्याला आपल्या हिताचे काय आहे आणि आपला तोटा कशापासून आहे ते कळते. जाणूनबुजून मला काही अपयश आले नाही. कारण अपयश म्हणजे आपली माझ्यावर इतराजी होणार याची मला पूर्ण जाणीव होती." (**आदाब–ई–आलमगिरी**, १९ अ–२० ब). दरबारी कागदपत्राप्रमाणे या मोहिमेत मोगलांचा झालेला पराजय हा शहाजहानने मोहिमेची जी योजना आखली होती ती सोडून दिल्यामुळे झाला असे आहे. या योजनेप्रमाणे

मोगल सैन्याचे दोन भाग करावयाचे होते. परंतु सादुल्लाखानाने या योजनेला विरोध केला आणि शहाजहाननेही या मताला मान्यता दिली. (**वारिस**, ६५ ब; **आदाब–ई–आलमगिरी**, १३ ब, १७ ब, १८ ब).]

त्यानंतरच्या वर्षी आणखी प्रचंड प्रमाणावर आणि पुष्कळ द्रव्य खर्चून दारा शुकोच्या अधिपत्याखाली कंदहारला केलेल्या स्वारीचा विचका झाला. (दाराच्या या स्वारीचे आतिशयोक्तीपूर्ण वर्णन लतीफउल अखबार या रशीदखान याच्या ग्रंथात आहे) आणि औरंगजेबाच्या पराभवाची परस्पर कारणमीमांसा झाली. ह्या तीन अयशस्वी मोहिमांसाठी हिंदुस्थानच्या तिजोरीला १० कोटी रुपयांवर फटका बसला आणि साऱ्या आशिया खंडात मोगलांच्या वजनाला उतरती कळा लागली. पर्शियाच्या शहाने साहजिकच अशी बढाई मारली की दिल्लीच्या बादशहांना सोने घेऊन किल्ला घेणे माहीत आहे, पण शस्त्रबळाच्या जोरावर तो जिंकून घेणे त्यांना जमत नाही (**रुक्कात-ई-शहा अब्बास सानी**, १०६, १२०). याचा अर्थ असा झाला की एक लष्करीदृष्ट्या बलाढ्य राष्ट्र म्हणून पर्शियाची ख्याती झाली. १७ व्या शतकाच्या उत्तरार्धात पर्शियाकडून स्वारी होणार अशा नुसत्या भूमकेने दिल्ली दरबारात मोठी धूमधाम माजून जाई. (पाहा. **मासिरी-इ-आलमगिरी**, ५६–५८; **आलमगिरनामा**, ९७४; **ॲनेकडोट्स ऑफ औरंगजेब** ५०, ५१ व ५२) यानंतरची अनेक वर्षे पर्शियाकडून हिंदुस्थानला पोहोचणारा संभाव्य धोका एखाद्या काळ्याकुट्ट ढगाप्रमाणे हिंदुस्थानच्या पश्चिम सरहद्दीवर लटकत राहिला आणि पर्शियाच्या एखाद्या युद्धखोर शहाचा ज्यावेळी मृत्यू होईल त्यावेळी औरंगजेब आणि त्याचे मंत्री सुटकेचा एक मोठा निश्वास टाकीत.

●●●

प्रकरण दुसरे
औरंगजेबाची दक्षिणेची दुसरी सुभेदारी
१६५२-१६५८

(१) मोगल अमलाखालील दक्षिणेतील अवकळा आणि दुर्दशा; अर्थिक अडचणी.

औरंगजेबाचे प्रयाण

कंदहारहून काबूलला आल्यावर औरंगजेबाची दक्षिणेच्या सुभेदारीवर दुसऱ्यांदा नेमणूक झाली (१६५२). वाटेत बुरहाणपूर येथे ९ महिने तो थांबला आणि **सुभ्याची** राजधानी औरंगाबाद येथे नोव्हेंबर १६५३ मध्ये दाखल झाला. सुभेदारीची चार वर्षे, गोवळकोंडा आणि विजापूर या राज्यांवर केलेल्या स्वाऱ्या सोडता त्याने तेथेच घालविली आणि ५ फेब्रुवारी १६५८ मध्ये त्याने औरंगाबाद सोडले ते सिंहासनासाठी दिल्ली येथे पेटलेल्या वारसा युद्धात भाग घेण्यासाठी. [१७ जुलै १६५२ रोजी औरंगजेबाची दुसऱ्यांदा दक्षिणेच्या सुभेदारीवर नेमणूक झाली. बरोबर एक महिन्याने त्याने बादशहाची रजा घेतली आणि तो दक्षिणेकडे निघाला. ९ सप्टेंबरला त्याने अटक येथे सिंधू नदी ओलांडली. १७ आणि २८ नोव्हेंबर रोजी तो दिल्ली आणि आग्रा यामधून पार झाला, आणि १ जानेवारी १६५३ रोजी तो नर्मदा नदीवर पोहोचला. बुरहाणपूर येथील राजवाड्याची दुरुस्ती झाली नसल्याकारणाने तो काही दिवस शहराबाहेर राहिला. ३० जानेवारी रोजी त्याने शहरात प्रवेश केला. येथेच त्याने हिराबाई ऊर्फ जैनाबादी महल हिची प्रीती संपादन केली. येथे तो ९ महिने रेंगाळला. अखेर २८ ऑक्टोबर १६५३ रोजी त्याने बुरहाणपूर सोडले आणि २५ नोव्हेंबर रोजी त्याने दौलताबादच्या किल्ल्यात प्रवेश केला. औरंगाबाद येथे तो चार वर्षे राहिला. गोवळकोंडा आणि विजापूर या राज्यांवर मोहीम करण्याच्या वेळी तो औरंगाबाद सोडून गेला. अखेर औरंगाबाद सोडून तो गेला तो वारसाहक्काच्या युद्धासाठीच. (५ फेब्रुवारी १६५८.) औरंगाबाद येथे त्याचा मुलगा अकबर याचा जन्म झाला. (११ सप्टेंबर १६५७.) या ठिकाणीच त्याने आपली पत्नी दि रसबानू (८ ऑक्टोबर १६५७.) आणि प्रेयसी जैनाबादी (१६५४.) यांचे दफन केले.

या कालावधीत त्याच्या जीवनाचे वर्णन त्याने आपला नातू बेदार बख्त याला लिहिलेल्या एका पत्रात केलेले आहे. या पत्रात औरंगजेबाने लिहिले आहे, "औरंगाबाद जवळील सातारा नावाच्या खेड्यात मी शिकारीसाठी जाई. येथील एका टेकडीवर खंडेरायचे देऊळ होते. ते मी पाडून टाकले. मी दक्षिणेचा सुभेदार असताना दौलताबाद आणि औरंगाबाद येथे रहात असे. तेथून मी घोड्यावर बसून खूप दूरवर शिकारीसाठी जाई. त्याचप्रमाणे कतलक नावाच्या तळ्यावर मी नेहमी जाई आणि बुरहाण उद्दीन आणि जैनुद्दीन या औलीयांच्या कबरीचे दर्शन घेण्यासाठी मी जात असे. पुष्कळदा बरोबर जनान्याला घेऊन तर कधी एकटा दौलताबादच्या किल्यावर अथवा एलोराच्या लेण्यावरही मी जात असे. (**कालिमात–ई–तय्यीबात**, ७ ब–८ अ.).

औरंगजेबाच्या अंगातील राज्यकारभार करण्याची कुशलता व त्याच्या अंगातील कर्तबगारी याचा प्रत्यय औरंगजेबाची दुसऱ्या वेळी दक्षिणेचा सुभेदार म्हणून नेमणूक झाल्यावर येतो. त्याचप्रमाणे त्याच्या स्वभावातील उणिवा याच कालखंडामध्ये प्रकर्षाने पुढे आल्या. विशेषतः त्याच्या स्वभावातील धर्मांधपणा. याचे एक उदाहरण म्हणजे त्याने सादुल्लाखानाला लिहिलेले पुढील पत्र होय: "छबीलाराम या ब्राह्मणाने महमद पैगंबराविषयी वाईट शब्द उच्चारले. बादशहाच्या हुकूमाप्रमाणे या आरोपाची चौकशी झाली आणि जुल्पीकारखान आणि इतर अधिकारी यांनी त्याचा शिरच्छेद केला. आता मुल्लामुहान याने मला लिहिले आहे की, त्या काफर छबीलारामच्या भावांनी बादशाही दरबाराकडे प्रांताच्या मुख्य न्यायाधीशाविरुद्ध अपील केलेले आहे. या गोष्टीवरून मला तुला असे सांगावेसे वाटते की, मुसलमानी धर्माच्या तत्त्वाचा पुरस्कार करणे हे प्रत्येक मुसलमानाचे कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे इस्लामचे धर्मवेत्ते कुराणाच्या तत्त्वाप्रमाणे न्यायदानाचे काम करीत असताना त्यांचे संरक्षण करणे हे बादशहा आणि त्याचे सरदार यांचे कर्तव्य आहे. माझी तुला अशी आज्ञा आहे की, त्या काफराने केलेली तक्रार बादशहापर्यंत पोहोचणार नाही, याची तू सख्त काळजी घे." (**आदाब–ई–आलमगिरी**, भाग १, १०१९) औरंगाबाद शहरावर देखील औरंगजेबाच्या व्यक्तिमत्त्वाची छाप पडलेली दिसून येते. प्रथम औरंगजेब दौलताबादच्या किल्ल्यात येत असे. परंतु किल्ल्यामध्ये फारच थोडी माणसे राहू शकत असल्याने त्याने राजधानीचे ठिकाण खिडकी येथे हलविले. तेथे त्याने एक राजवाडा बांधला आणि सरदारांना सभोवारची जागा वाटून दिली. कालान्तराने शहराला औरंगाबाद हे नाव पडले. औरंगाबाद येथे औरंगजेबाने बांधलेला आलमगिर महाल अजून चांगल्या अवस्थेत आहे.]

औरंगजेब दक्षिणेच्या सुभेदारीवरून १६४४ च्या मे महिन्यात निवृत्त झाल्यापासून तेथील राज्यकारभार यत्किंचित्ही सुधारला नव्हता. जरी दक्षिणेला अनपेक्षित असे स्वास्थ्य लाभले होते तरी पुष्कळशी शेतजमीन ओसाड झाली होती. शेतकऱ्यांची संख्या आणि त्यांची सामुग्री यांत घट पडली होती

आणि जमीन-महसूल पुष्कळच कमी झाला होता . थोड्या काळापुरत्या झालेल्या सुभेदारी नेमणुका आणि अकार्यक्षम सुभेदार यांची एक मालिकाच लागून राहिल्यामुळे अशी दुःसह परिस्थिती निर्माण झाली यात काहीच संशय नाही. [औरंगजेबाच्या पहिल्या आणि दुसऱ्या सुभेदारीच्या काळात दक्षिणेत पुढील व्यक्तींची सुभेदार म्हणून नेमणूक झाली . २८ मे १६४४ रोजी खान दौरान याची नेमणूक झाली. २२ जून १६४५ रोजी उत्तर हिंदुस्थानात त्याचा खून झाला. त्याच्या जागी काही काळ जयसिंग याने काम बघितले. त्याच्यानंतर १७ जुलै १६४५ रोजी इस्लामखान याची नेमणूक झाली . २ नोव्हेंबर १६४७ रोजी तो मरण पावला . त्यानंतर काही काळ शहानवाजखान याने काम बघितले . १५ जुलै १६४८ रोजी मुरादबक्ष याची नेमणूक झाली . त्याच्या जागी ४ सप्टेंबर १६४९ रोजी शायस्ताखानाची नेमणूक झाली. सप्टेंबर १६५२ पर्यंत तो या अधिकारावर होता.]

दक्षिणेची दुर्दशा

दक्षिणेमुळे शाही खजिन्यावर बराच काळ भार पडत राहिला होता . दक्षिण प्रांत विस्ताराने मोठा , तुटफुट असलेला , निबिड जंगलाने भरलेला , तुरळक वस्तीचा आणि असंघटित असा होता . सरहद्दीपलीकडे दोन समर्थ राज्ये खडी होती . त्यामुळे सरहद्दीवर मोठा सेनासमुदाय कायम ठेवणे भाग होते. परंतु जमीन नापिक असल्याने दुष्काळ आणि अन्नाची चणचण ही नेहमीचीच चालू असत आणि प्रमाणित शेतसाऱ्याची कधीच वसुली होत नसे . मोगल दक्षिण सुभ्यात त्यावेळी जे चार प्रांत मोडत असत त्यांचा कुल वसूल वर्षाला ३ कोटी ६२ लाख रुपये होता . परंतु १६५२ साली प्रत्यक्षात झालेला वसूल जेमतेम १ कोट अथवा ⅓ पेक्षाही कमी भरला . (**अबदुल हमीद , भाग २ , ७१२; एम्. यू.** भाग ३ , ४९७; **आदाब**, ३१ अ). साहजिकच दक्षिणेच्या खर्चाची जमेशी कधीच मेळ बसत नसे आणि दक्षिणेचा राज्यकारभार चालविण्यासाठी समाजातील इतर जुन्या आणि संपन्न प्रांतांमधून जमाखर्चातील तूट भरून काढावी लागे.

औरंगजेबाच्या अर्थिक अडचणी

दक्षिणेत आल्यानंतर औरंगजेबापुढे अतिशय कठीण अशी अर्थिक समस्या उभी राहिली . जहागिरीपासून प्रत्यक्षात येणारे उत्पन्न त्याच्या प्रमाणित उत्पन्नाच्या फारच थोडा हिस्सा येत होते . जहागिरीपासून येणाऱ्या उत्पन्नावरच अवलंबून राहण्याची पाळी आली असती , तर मोगल अधिकाऱ्यांवर उपासमारीचीच पाळी आली असती . आपल्या पूर्वीच्या अधिकाऱ्यांच्या अकार्यक्षमतेमुळे निर्माण झालेल्या गैरकारभाराची चिन्हे औरंगजेबाला सर्वत्र दिसली . प्रत्यक्ष मोजणीपेक्षा पुष्कळदा उत्पन्न जेमतेम एकदशांशाएवढे भरे. साहजिकच औरंगजेबाला जमाखर्चाची तोंडमिळवणी करणे कठीण गेले . या सुमारास अधिकाऱ्यांना त्यांच्या जहागिरीपासून मिळणारा मेहनताना सोडल्यास दक्षिणेमधील मुलकी आणि लष्करी खर्चामुळे होणारी तूट कुल २०,३६,००० रुपये एवढी होती . दक्षिणेच्या तिजोरीतील शिलकी ठेवलेल्या रकमेतून ही तूट भरून काढण्यात आली.

आपापल्या जहागिरीपासून मिळणारे उत्पन्न घटल्यामुळे इतर जहागिरदारांना सर्वसाधारण वेतनावर फौजफाटा पोसण्यास जी अडचण भासे तीच औरंगजेबालाही भासू लागली . बापलेकामधल्या अर्थिक कटकटी वर्षांनुवर्षे चालत राहिल्या . दक्षिणेकडे लागणाऱ्या पैशासाठी उत्तरेतल्या खजिन्यावर जो दाब पडत होता तो थांबविण्याची शहाजहानची इच्छा होती . तर दक्षिणेतल्या जहागिरींच्या बदली इतर प्रांतांतून आपल्याला रोकड पाहिजे असल्याची मागणी औरंगजेब करीत होता . [मोगल राज्यातील इतर जहागिरदारांप्रमाणेच औरंगजेबालाही पैशाची अडचण भासली . त्याने आपल्या बापाला पत्र लिहून कळविले की , जर का मोठी जहागिरी देऊन आपल्याला माझा सन्मान करावयाचा असेल तर त्या योग्य अशी जहागिरी मला आपण द्यावीत . बादशहाने त्याला इतर जहागिरदारांच्या अधिक संपन्न जहागिरी ताब्यात घेण्याचा हुकूम केला. (**आदाब**, १९ ब, २५ अ, १७३ अ.). यावर औरंगजेबाने आपल्या हाताखालील फक्त अकार्यक्षम आणि

आळशी अशा अधिकाऱ्यांच्या जहागिरी आपल्याकडे घेतल्या . या जहागिरदारांनी बादशहाकडे याबद्दल तक्रार केली . औरंगजेबाने असे उत्तर दिले की, ज्या महालामध्ये अनेक जहागिरदार आहेत अशाच जहागिरी आपण आपल्याकडे राज्यकारभार सोयीचा व्हावा म्हणून घेतल्या आहेत . (**आदाब**, २५ अ, २९ अ, ३२ ब, ३३ अ, ३६ अ, ४१ अ, ३६ ब.). औरंगजेबाची दुसरी विनंती अशी होती की , त्याच्या पगारापैकी नगद रक्कम माळवा आणि सुरत येथून पाठविण्यात यावी . ही विनंती मान्य करण्यात आली नाही . इतकेच नव्हे तर जेव्हा औरंगजेबाने एलिचपूर मधून रोकड रक्कम मागविली तेव्हा बादशहाने एलिचपूरचा वसूल जाणून बुजून अधिक दाखविला . औरंगजेबाने यावर अधिक रकमेची मागणी केली . यामुळे शहाजहानने चिडून जाऊन भर दरबारात औरंगजेबाविषयी तीव्र असे उद्‌गार काढले . (**आदाब**, २७ अ, २८ अ, ३९ अ.). १६५४ मध्ये माळव्यातून औरंगजेबाकडे २५ लक्ष रुपये पाठविण्यात आले . उरलेले पाच लक्ष रुपये त्याला नंदूरबारमधून घेण्याचा हुकूम देण्यात आला . तेवढी रक्कम तेथून न मिळाल्यामुळे औरंगजेबाने पुन्हा पैशाची मागणी केली . (**आदाब**, ३२ ब , ३३ अ , ३७ ब). बापलेकामधील पैशाचा झगडा अनेक वर्षांपर्यंत चालू राहिला. दक्षिणेकडे वाहणारा पैशाचा ओघ थांबविण्याचे शहाजहानचे प्रयत्न होते तर औरंगजेब अधिक पैशाची मागणी करीत होता . ज्यांच्या जहागिरी औरंगजेबाने आपल्या ताब्यात घेतल्या होत्या , त्यांनी बादशहाकडे तक्रार केली की , औरंगजेब या जहागिरीपासून वाजवीपेक्षा अधिक उत्पन्न मिळवीत आहे आणि जहागिरदार उपाशी मरत आहेत . बादशहाने औरंगजेबाला अतिशय संतापून पत्र लिहिले , ते असे : "एखाद्या परगण्यातीत सर्व सुपीक खेडी आपल्याकडे घेऊन उरलेली खेडी इतरांना देणे हे अन्यायाचे कृत्य आहे . माझा तुला असा हुकूम आहे की अरशीर परगण्यांतील ५० हजार रुपये उत्पन्नाचा कमी उत्पन्नाचा मुलूख तू घे आणि तुझा रोख पगार तेवढ्या रकमेने तू कमी कर." औरंगजेबाने यावर चिडून असे उत्तर दिले की, "माझ्या आयुष्यात मी कधीही अन्यायाने वागलो नाही. मी नेहमी परमेश्वराला आणि त्याच्या येथील प्रतिनिधीला खूष ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. या जमिनी मी आपण होऊन घेतलेल्या नाहीत तर तुमच्याच महसूल अधिकाऱ्यांनी शायस्ताखानाकडून त्या माझ्याकडे अंदाजे तेवढा वसूल देणाऱ्या म्हणून सोपविल्या होत्या . नेहमीप्रमाणे चौकशी न करता आपण माझ्याविरुद्ध तक्रार ऐकून हुकूम सोडले आणि या संदर्भात मुसलमान हा शब्द वापरला . मी अगतिक आहे . वरीलप्रमाणे हुकूम आपण केला असताना मी मागितलेल्या रकमेच्या बदली मला दुसऱ्या कशाची जरुरी आहे?" (**आदाब**, ४१ अ).

दक्षिणेत औरंगजेबाची नेमणूक करताना बादशहाने त्याला शेतकऱ्यांकडे अधिक लक्ष पुरविण्यास सांगितले होते . औरंगजेबाने तसे करण्याबाबत आश्वासन दिलेले होते आणि आपल्या पहिल्या सुभेदारीत त्यादृष्टीने त्याने प्रयत्न केलेले होते . त्यासाठी आपल्याला पैसा आणि मनुष्यबळ देण्याची त्याने मागणी केली होती. शहाजहानला ही दिरंगाई सहन झाली नाही. त्याने अपयशाबद्दल औरंगजेबाची निर्भर्त्सना केली आणि त्याचे उत्पन्न कमी करण्यात येईल अशी धमकीही त्याला दिली . परंतु अनेक वर्षे चाललेले युद्ध आणि त्यानंतरचा दहा वर्षांचा गैरकारभार यामुळे निर्माण झालेली परिस्थिती दोन-तीन वर्षांत सुधारता येणार नाही असेही त्याने कळविले. परंतु वरील गोष्टी सुधारण्याकडे औरंगजेबाने कसून प्रयत्न चालविले होते आणि तीन वर्षांत त्याने वसूल दुप्पट केला. (**आदाब**, २० अ, २० ब, २६ ब, २८ अ, ३२ अ, ३२ ब, १४४ अ.)]

दक्षिणेचा सुभेदार म्हणून औरंगजेबाची नेमणूक करताना शहाजहानने त्याला शेतकऱ्यांच्या परिस्थितीत सुधारणा करण्याबद्दल आणि शेतजमिनीची वाढ करण्यासंबंधी विशेष लक्ष देण्याबद्दल खास ताकीद दिली होती . ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आपण शक्य तेवढे प्रयत्न करू असे आश्वासन औरंगजेबाने दिले होते . त्याने मागणी केली ती आपल्याला अधिक काळ अधिकारपद आणि ह्या गोष्टी प्रत्यक्षात आणण्यासाठी लागणारे द्रव्य आणि मनुष्यबळ यांची. कारण एका पिढीच्या काळापर्यंत चाललेल्या युद्धामुळे जी लोकसंख्येची अपरिमित हानी झाली होती आणि इतर विध्वंस झाला होता , आणि त्यानंतर दहा वर्षे जी गैरकारभाराची गेली होती त्याची भरपाई दोन अगर तीन वर्षांत होणे अशक्य होते . थोड्याच अवकाशात दक्षिणेमधील औरंगजेबाची सुभेदारी त्याने केलेल्या महसूल मोजणीमुळे इतिहासात अजरामर होणार होती.

(२) मुर्शिद कुलीखान—त्याचे चारित्र्य आणि त्याने अमलात आणलली सारापद्धती

मुर्शिद कुलीखान हा खुरासाणाचा रहिवासी . कंदहारचा पर्शियन सुभेदार अली मर्दानखान हा परागंदा झाला तेव्हा त्याच्याबरोबर हिंदुस्थानात आलेल्या लोकात हा होता . त्याच्या अंगी शिपायाचे धाडस आणि सनदी नोकराची कारभारविषयक कुशलता यांचे मिश्रण झाले होते . औरंगजेबाचा दक्षिणेतील दिवाण या अधिकारावर त्याने महसूलविषयक सुधारणा अमलात आणल्या आणि आपल्या (अधिक माहितीसाठी पाहा. **एम्. यू.** भाग ३, ४९३—५००; **खाफीखान**, भाग १, ७१४, ७३२—७३५; **आदाब** २४ ब, २७ अ, २८ अ, ४३ अ, ९९ अ, ४१ अ, ३० ब, ४७ ब; **वारिस** ६७ ब, १०१ अ, १०६ ब). नव्या पद्धतीला प्रथम यश मिळवून दाखविले.

अनुक्रमणिका

दक्षिणेमध्ये सारापद्धती अशी आतापर्यंत अस्तित्वातच नव्हती . जमिनीची हिस्सेवारी , साखळीपद्धतीने जमिनीची मोजणी , दर बिघ्यापाठीमागे अमुक अमुक सारा अशी मोजणी आणि जमिनीपासून येणाऱ्या उत्पन्नाची सरकार आणि शेतकरी यांमध्ये विभागणी या गोष्टी इकडे माहीतच नव्हत्या. दक्षिणेमधला शेतकरी एक नांगर आणि एक बैलाची जोडी यांच्या मदतीने जितकी जमीन त्याला शक्य असेल तेवढी नांगरून काढी , आपल्या मर्जीला येईल ते पीक काढी आणि सरकारला दर नांगरी उत्पन्नाचा थोडासा भाग देई . कारण साऱ्याचा दर वेगवेगळ्या जागी बदलता असे आणि त्याची मोजणी अनमान धक्याने होत असे . याचा परिणाम असा होई की , लहानसहान वसुलाधिकारी यांची मर्जी आणि माजोरी याला शेतकरी वर्ग बळी पडे . मोगल चढाईमुळे चाललेले अविरत युद्ध आणि अनेक वर्षे पाठोपाठ पडलेला दुष्काळ यांमुळे शेतकरी वर्ग साफ बुडाला . पिडलेली रयत आपली घरेदारे सोडून परागंदा झाली आणि बेवारशी शेतजमिनीत जंगले माजली . एकेकाळी भरभराटलेली खेडी आता निर्मनुष्यतेमुळे भयानक झाली.

औरंगजेबाच्या दिवाणाने केलेल्या सुधारणा म्हणजे त्याने तोडरमलची पद्धती दक्षिणेत लागू केली . पहिल्याप्रथम त्याने मोठी मेहनत घेऊन पांगापांग झालेली रयत पुन्हा संघटित करण्याचे प्रयत्न केले आणि खेड्यापाड्यांची पुनर्वसाहत करून व त्यावर सर्व संबंधित अधिकाऱ्यांच्या नेमणुका करून खेड्यांतील जीवन सुरळीत करण्याची कोशीश केली . त्याने सर्वत्र हुशार अमीन आणि प्रामाणिक मोजणीदार जमिनीची मोजणी करण्यासाठी नेमले आणि त्यांच्याकडे त्याशिवाय पूर्ण मोजणी झालेल्या जमिनींच्या तुकड्यांची (रकबा) यादी तयार करण्याचे , आणि खडकाळ जमीन व ओढे –नाले यापासून शेतजमिनीची वर्गवारी करण्याचे अशी कामे सोपविली . ज्या खेड्यांवर मुख्य अधिकारी (मुकादम) नव्हता अशा खेड्यांवर त्याने रयतेची सहानुभूतीपूर्वक काळजी घेणारे आणि ज्यांच्या वर्तनावरून ते शेतीची सुधारणा करण्यासाठी वाटेल ते प्रयत्न करतील असे प्रमाणित झालेले नवीन अधिकारी नेमले . सरकारी तिजोरीमधून गरीब शेतकऱ्यांना गुरेढोरे, बी-बियाणे आणि इतर शेतीविषयक सामुग्री खरेदी करण्यासाठी कर्जे (तकबी) देण्यात आली. ही दिलेली कर्जे कापणीच्या वेळी हप्त्याहप्त्याने वसूल करण्यात आली.

स्थानिक परिस्थितीत फरक असतील त्याप्रमाणे वरील पद्धतीत बदल करण्याचा शहाणपणा मुर्शीद कुलीखानाने दाखविला आणि ज्या ठिकाणी शेतकरी मागासलेले होते आणि लोकसंख्या कमी होती अथवा खेडोपाड्यांची वसाहत अतिशय दूर अशा ठिकाणी झाली होती , त्या ठिकाणी त्याने दर नांगरी उत्पन्नाचा ठराविक भाग वसूल म्हणून दिला जावा ही जुनी पद्धती कायम ठेवली . इतर काही ठिकाणी त्याने प्रत्यक्षात येणारे उत्पन्न विभागून घेण्याची (metayership) पद्धती अमलात आणली.

त्याने सारा पद्धतीची तिसरी अमलात आणलेली योजना म्हणजे उत्तर हिंदुस्थानात प्रचलित असलेली विस्तृत आणि कठीण असलेली पद्धती ही होय . ह्या पद्धतीत उत्पन्न , धान्याचे, बागाइतचे अगर फळफळावळांचे असले तरी उत्पन्नातील सरकारचा कुल कमाल वाटा उत्पन्नाच्या ¼ एवढा होता . दर बिघ्यापाठीमागे ठरलेल्या दराप्रमाणे इतके रुपये वसूल या पद्धतीने मोजणी केली जाई आणि पेरणीपासून कापणीपर्यंतच्या काळातील धान्याचा दर्जा आणि कुल उत्पन्न ही विचारात घेऊन , धान्याची बाजारातील किंमत लक्षात घेऊन आणि पेरणीसाठी आलेली जमीन प्रत्यक्षात मोजल्यानंतर सारा वसुली केली जाई . हीच पद्धत दक्षिणेच्या मोगल सुभ्यात प्रचलित झाली आणि त्यानंतर अनेक शतके ती मुर्शीद कुलीखानाची सारापद्धती म्हणून ओळखली गेली . ह्या उत्कृष्ट पद्धतीबरोबरच त्याने स्वतः एकंदर कारभारावर जातीने

लक्ष आणि वैयक्तिक देखरेख ठेवल्यामुळे शेतीत सुधारणा झाली आणि थोड्याच वर्षांत वसुलापासून येणारे उत्पन्न वाढले.

(३) दक्षिणेच्या राज्यकारभारात औरंगजेबाने केलेल्या सुधारणा.

सुभेदारीच्या अधिकारावर आल्यानंतर ताबडतोब औरंगजेबाने राज्यकारभार कार्यक्षम बनविण्याची कोशीश केली. जुन्या आणि नालायक अधिकाऱ्यांना त्याने कामावरून बडतर्फ केले अथवा त्यांच्या नेमणुका हलक्या अधिकाराच्या जागांवर केल्या . ज्या अधिकाऱ्यांची कार्यक्षमता पणास लागलेली होती अशा अधिकाऱ्यांची त्याने निवड केली आणि सर्व महत्त्वाच्या आणि जबाबदारीच्या जागांवर त्याने त्यांची नियुक्ती केली. (**आदाब**, २६ ब, २४ अ, २४ ब, २५ ब). लष्करीदृष्ट्या कार्यक्षम असणे जरुरीचे आहे ह्याची जाणीव त्याने ठेवली आणि लष्कराला नेहमी सज्जतेच्या अवस्थेत ठेवणे असेल तर त्यासाठी अर्थिक बळाची आवश्यकता आहे हे ओळखून त्याने त्याप्रमाणे अर्थिक पाठिंब्याची व्यवस्था केली.

फारच थोड्या कालावधीत एका अतिशय कर्तृत्ववान आणि उत्साही अशा पुरवठाखात्याच्या अधिकारावर असलेल्या अधिकाऱ्याने जुन्या जमान्यातील ढिसूळपणा पार नाहीसा केला . त्याने प्रत्येक किल्ल्याला भेट दिली . लहानमोठ्या प्रत्येक गोष्टीची कसून पाहणी केली आणि प्रत्येक मोक्याच्या जागी जरूर असलेला दाणागोटा आणि दारूगोळा यांचा भरपूर पुरवठा केला . तोफखान्यावरील म्हातारे-कोतारे आणि निरुपयोगी अधिकारी यांची नेमबाजीमध्ये परीक्षा घेण्यात आली . निशाणावर ज्यांना एकदाही गोळी मारता आली नाही त्यांना ताबडतोब बडतर्फ करण्यात आले . पूर्वी त्यांनी केलेल्या कामगिरीबद्दल म्हाताऱ्या आणि (युद्धामुळे) निरुपयोगी झालेल्या शिपायांना वर्षासने देऊन निवृत्त करण्यात आले . अशा तऱ्हेने एकीकडे या अधिकाऱ्याने वर्षाकाठी ५० ,००० रुपयांची बचत केली तर दुसरीकडे प्रत्यक्षात फौजेची कार्यक्षमता सुधारून दाखविली. (**एम्. यू**. भाग १. १६६, ७८६, ७८७; **वारिस**, ३९ ब, ७९ ब; **मनुची**, भा. ३. ४८५).

(४) औरंगजेबाचे बादशहाबरोबर मतभेद झाले त्याची कारणे.

दक्षिणेच्या दुसऱ्या सुभेदारीच्या काळात औरंगजेबाचे बापाशी खटके येणारे अनेक प्रसंग उद्भवले . याला कारण म्हणजे एक औरंगजेबाचे शत्रू दरबारात बादशहाच्या कानाशी लागले अथवा बादशहाला औरंगजेबाच्या दक्षिणेमधील अडचणींची कल्पना तरी आली नाही . सुभेदारीवर आल्यापासूनच औरंगजेबाबद्दल गैरसमज आणि अविश्वास यांना सुरुवात झाली आणि निष्कारण त्याच्यावर ताशेरे झाडण्यात आले . या गोष्टींमुळे भावनांची जी कटुता निर्माण झाली त्याचाच परिणाम वारसाहक्काचे युद्ध इतक्या क्रूरपणे आणि निर्घृणपणे लढविले जाण्यात झाला.

दक्षिणेत औरंगजेबाची नियुक्ती झाली त्याचवेळी त्याने आपल्या नेमणुकीला विरोध केला . कारण त्यामुळे सिंधमधील त्याच्या सुपीक जहागिरीमधून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा दक्षिणेतील त्याच्या नव्या जहागिरीतून त्याला १७ लाख रुपये कमी मिळणार होते.

वरील कारणासाठी त्याचा आपल्याला आपल्या हल्लीच्या जहागिरीच्या बदली अधिक उत्पादन देणाऱ्या जहागिरी देण्यात याव्या या संबंधात बादशहाबरोबर बऱ्याच काळपर्यंत आणि उपहासपूर्ण असा

पत्रव्यवहार झाला.

पुष्कळ बाबतीत औरंगजेबाने आपल्या हाताखालील अधिकाऱ्यांच्या केलेल्या नेमणुका आणि बढत्या बादशहाकडून स्वीकारल्या जात नसत आणि त्यासंबंधात औरंगजेब बादशहाला संतापून लिहीत असे , "मी माझ्या वयाच्या १८ व्या वर्षापासून सुभेदारीच्या अधिकाराचे काम केले आहे आणि एखादे काम करण्यास नालायक ठरलेल्या माणसाची मी एकदाही तारीफ केलेली नाही ." (**आदाब**, २७ ब, २८ अ, २८ ब, २९ अ, १२९ ब). याशिवाय इतर अनेक बारीकसारीक गोष्टींवर बाप आणि लेक यांच्यामध्ये मतभेदाचे प्रसंग येत . [औरंगजेबाच्या दक्षिणेमधील धोरणाबाबत शहाजहान अतिशय अधिरा होई आणि दक्षिणेमध्ये भरभराट आणण्याबाबत अपयश आल्यामुळे त्याची निर्भर्त्सना करी. यावर औरंगजेब असे कळवी की , "मी शेतीची वाढ करण्याचे माझ्या परीने प्रयत्न केले आहेत . परंतु मी बढाईखोर नसल्यामुळे ते आपल्याला कळविले नाहीत . अनेक आपत्तींमुळे उद्ध्वस्त झालेल्या देशात दोन -तीन वर्षांत आबादी आणणे अशक्य आहे . अशा परिस्थितीत परगण्याचे उत्पन्न पूर्वस्थितीवर आणणे ही अतिशय कठीण गोष्ट आहे ." परंतु शहाजहानचे समाधान झाले नाही . तो भर दरबारात औरंगजेबाची अवहेलना करी. परिस्थिती सुधारण्यासाठी त्याने सुभेदार बदलण्याचा विचार केला आणि सुजाला सुभेदारीबद्दल त्याने विचारले . (**आदाब**, २८ अ, ३२ अ, ३२ ब; **फैयाज-उल-कवानीन**, ३५४)]

बापलेकात संघर्षाचे आणखी कारण म्हणजे विजापूर आणि गोवळकोंडा याजबरोबरील राजकीय संबध. औरंगजेबाने याबाबतीत असा पुरस्कार केला की या राज्यातील दरबारातल्या वकिलांनी दक्षिणेच्या सुभेदाराचे हूकूम घेतले पाहिजेत . हा पुरस्कार योग्य होता . त्याचबरोबर औरंगजेबाने असेही सांगितले की या दरबाराबरोबरील पत्रव्यवहारही त्याच्या तर्फेच गेला पाहिजे . (**आदाब**, २४ ब) परंतु हा अधिकार औरंगजेबाला त्याच्या कारकिर्दीच्या अगदी अखेरीस देण्यात आला आणि तोदेखील पूर्णपणे देण्यात आला नाही.

एकदा वेळ अशी आली की त्याच्याविषयी नेहमी गैरसमज करून घेतला गेल्याने , त्याच्यावर टीका केली गेल्याने आणि त्याच्या कामात अडथळे निर्माण केले गेल्याने औरंगजेब इतका विटला की , त्याने स्वतःच्या जबाबदारीवर एक आवश्यक गोष्ट करण्याचे साफ नाकारले . एवढेच नव्हे परंतु आपल्या कृतीच्या समर्थनार्थ त्याने चिडून उद्गार काढले की , "मी कधीही न केलेल्या गोष्टींबद्दल माझ्यावर ताशेरे झाडण्यात आले. मग ते पाहिल्यानंतर मी याबाबत जबाबदारी स्वीकारण्याचे नाकारले यात काहीच आश्चर्य नाही . मी आता अधिक सावध झालो आहे."

इ. स. १६३७ मध्ये खान -इ-दौरान याने देवगडावर स्वारी केली होती आणि तेथल्या राजाला दरवर्षी बादशहाला १,७५००० खंडणीच्या रूपाने देण्याचे वचन देणे भाग पाडले होते . परंतु खंडणी देण्याचे थकत चालले आणि अनेकदा मागणी करून उपयोग झाला नाही . तेव्हा इ. स. १६५५ मध्ये औरंगजेबाने देवगडावर स्वारी करण्याचा हुकूम दिला . गोंड राजा केसरीसिंग हा ताबडतोब शरण आला आणि त्याने थकबाकी देण्याचे कबूल केले . [देवगडच्या गोंड राज्याची हकीकत पुढीलप्रमाणे आहे . १६४० मध्ये देवगडच्या गादीवर केसरीसिंग हा आला. त्याने बादशहाला चार लक्ष रुपये खंडणी दिली . परंतु काही वर्षांत ही खंडणी थकली . १६५५ मध्ये शहाजहानने देवगडवर स्वारी करण्याचा हुकूम दिला . देवगडच्या राजाजवळ २०० हत्ती आहेत अशी बातमी शहाजहानला लागली होती . औरंगजेबाने ही बातमी खोटी असल्याचे शहाजहानला कळविले आणि देवगड राज्य जिंकावयाचे की फक्त खंडणी वसूल करावयाची याची विचारणा केली . ही बातमी चांद्याच्या राजाने कळविली होती. शहाजहानने राज्य जिंकण्याचा हुकूम दिला. त्यावर औरंगजेबाने कळविले की, राज्य जिंकणे सोपे आहे परंतु ते ताब्यात ठेवणे फार महागात पडेल . (**आदाब**, ४२ अ, ४२ ब; **वारिस**, १०५ अ). १२ ऑक्टोबर १६५५ रोजी मिरजाखान आणि हदीदादखान यांच्या हाताखाली दोन फौजांनी देवगडवर चाल केली . दोन्ही फौजांमध्ये सापडून केसरीसिंगाचा पराभव झाला . त्याने खंडणी देण्याचे कबूल केले . ८ जानेवारी १६५६ रोजी तो औरंगजेबाच्या भेटीला आला . त्याने ५ लक्ष रुपये रोख देण्याचे आणि पुढील खंडणीदाखल काही परगणे तोडून देण्याचे कबूल केले . गोवळकोंड्याच्या स्वारीत केसरीसिंग हा औरंगजेबाबरोबर होता आणि त्याने चांगली कामगिरी बजावली . (**आदाब**, ४३ अ, ४५ अ, ४६ अ, ४७ अ; **वारिस**, १०५ ब).]

अनुक्रमणिका

बागलाणाच्या नैर्ऋत्येस आणि कोकणच्या उत्तरेस असलेल्या उंचाळ मैदानी प्रदेशात जव्हारचे छोटे राज्य होते. त्यावर राज्य करणारा राजा हा दिल्लीपतींचे अधिराज्य मानीत नसे . औरंगजेबाच्या सूचनेवरून शहाजहानने या राज्यावर स्वारी करण्याला मान्यता दिली . जव्हारचा राजा यामुळे घाबरून गेला आणि त्याने वार्षिक खंडणी देण्याचे वचन दिले. (जानेवारी १६५६).

(५) लहानसहान मोहिमा [औरंगजेबाने जव्हारच्या राज्यावर जी स्वारी केली त्याची हकीकत पुढीलप्रमाणे आहे : मुंबईच्या उत्तरेला घाटमाथा आणि अरबी समुद्र यांमधील सपाटीवर जव्हारचे राज्य आहे . उत्तर आणि पूर्व या दिशाना जव्हारची हद्द बागलाण आणि नाशिक या मोगल जिल्ह्यांना भिडते आणि दक्षिणेला कोकण प्रदेशाबरोबर जव्हारमधून चौल या संपन्न बंदराकडे मार्ग आहे . दक्षिण आणि पश्चिम येथील काही भाग सोडल्यास जव्हारचा बहुतेक प्रदेश उंच, खडकाळ आणि जंगलांनी भरलेला आहे. संरक्षणाच्या दृष्टीने ही गोष्ट जव्हारच्या दृष्टीने महत्त्वाची आहे . या सुमारास हे राज्य पोर्तुगीजांबरोबर लढण्यात गुंतले होते . येथील राजा श्रीपद हा मोगलांना खंडणी देत नसे किंवा त्यांचे सार्वभौमत्व मानीत नसे . त्यामुळे औरंगजेबाच्या सुचनेवरून शहाजहानने जव्हारवर स्वारी करण्यास परवानगी दिली. आपल्याला जव्हारचे राज्य जहागिर म्हणून दिल्यास ते आपण जिंकून घेऊ असे बिकानेरचा राजा रावकर्ण याने सांगितले . ३ आक्टोबर १६५५ रोजी तो औरंगाबादेहून निघाला आणि पश्चिम घाटातून तो जव्हारच्या हद्दीजवळ पोहोचला . ५ जानेवारी १६५६ रोजी श्रीपद याने शरणागती दिली . त्याने खंडणी देण्याचे व आपला मुलगा रावकर्ण याच्याबरोबर पाठविण्याचे कबूल केले . २० जानेवारी १६५६ रोजी ही मंडळी औरंगजेबाकडे परतली . (**वारिस**, १०६ अ; **आदाब**, ३७ ब, ३९ ब, ४७ अ.)]

देवगडावरील मोहीम

सोळाव्या आणि सतराव्या शतकात हल्ली ज्याला मध्यप्रांत म्हणून म्हणतात तो बहुतेक तेथील मुळच्या गोंड राजांच्या अधिपत्याखाली होता आणि त्याला गोंडवन या नावाने ओळखत असत . गोंडाचे मोठे राज्य जे गढमंडला हे अकबराच्या कारकिर्दीत झालेल्या मोगल स्वारीमुळे आणि राजधानीची लुटालूट झाल्यामुळे मोडकळीला आले होते. त्यात आणखी त्याच सुमारास उत्तरेकडून झालेल्या बुंदेला आक्रमणाची भर पडली. परंतु सतराव्या शतकाच्या मध्यात आणखी एक गोंडांचे राज्य भरभराटीस आले . या राज्याची राजधानी देवगड ही होती . या राज्याचा विस्तार बेतूल , छिंदवाडा आणि नागपूर हे जिल्हे आणि सेवनी , भंडारा आणि बालाघाट यांच्या काही भागांवर झाला. गोंडवनाच्या दक्षिणेकडील भागात चांदा हे शहर होते. गोंडांच्या तिसऱ्या राज्याची ही राजधानी असून तेथला राजा हा देवगडचा वंशपरंपरा प्रतिस्पर्धी आणि शत्रू होता.

(६) गोवळकोंडा : गोवळकोंड्याची संपत्ती आणि मोगलांबरोबरील संघर्षाची कारणे : गोवळकोंड्याचा प्रदेश अतिशय सुपीक असून , अतिशय काळजीपूर्वक तेथे पाटबंधाऱ्यांपासून पीक काढले जात असे. तेथील लोकसंख्या खूप असून लोक प्रयत्नशील होते . त्या राज्याची राजधानी हैद्राबाद हे केवळ आशियाचेच नव्हे तर साऱ्या जगातील हिऱ्यांच्या व्यापाराचे केन्द्र होते . अनेक परकीय व्यापारी येथे जमत आणि आपला धंदा करीत . अनेक उद्योगधंद्यांकरता या राज्याची प्रसिद्धी होती आणि बंगालच्या उपसागरातील मसुलीपट्टम हे उत्कृष्ट बंदर या राज्याला लाभले होते . या राज्यात असलेल्या जंगलांत नावाजलेल्या हत्तींचे कळपच्या कळप वास करून होते . राज्याच्या संपत्तीत यामुळे भर पडली होती . तंबाखू आणि ताड यांसाठी हे राज्य प्रसिद्ध होते . तंबाखू आणि ताडी यांपासून जकातीचे मोठे उत्पन्न येई . (अधिक माहिती पाहा. **टॅव्हर्निअर** भाग १. १५०, १५८, १७५, २७४; **ग्रिबल्स**, हिस्टरी ऑफ दी डेक्कन, भाग १. २६९.

औरंगजेबाचा गोवळकोंड्याच्या राजाबरोबर खटका उडायला नेहमी एक कारण होई . दर वर्षाला ठरलेली दोन लाख होनांची खंडणी ही नेहमी थकत असे आणि मोगल सुभेदाराकडून मिळणाऱ्या तंबीला अनेक सबबी आणि सवडीसाठी अर्ज या स्वरूपात उत्तर मिळे.

अनुक्रमणिका

त्यानंतर होनांचे विनिमय मूल्य [एक्सचेंज – व्हॅल्यू] हे १६३६ मध्ये ४ रुपयांवरून ४ ½ रुपयांवर आणि अखेर १६५४ मध्ये ५ रुपयांवर गेले. कुतुबशहा आपल्या खंडणीची रक्कम रुपये आठ लाख दरसाल ही जुन्या दराप्रमाणे देत असे . मोगलांनी आता अशी मागणी केली की , विनिमय मूल्यामध्ये झालेल्या बदलांमुळे खंडणीच्या रकमेत होणारी वाढ ही मागील वर्षीसुद्धा ताबडतोब चुकती व्हावी . ह्यामुळे गोवळकोंड्याच्या राज्यावर एकंदर २० लाख रुपयांचा नवा बोजा पडणार होता. (**आदाब** ५६ अ; **वारीस** ११३ अ).

त्यानंतर गोवळकोंड्याच्या राजाने कर्नाटक जिंकण्याचे अगोदर मोगल सम्राटाची संमती न घेतल्याबद्दल त्याची कानउघाडणी करण्यात आली . सरतेशेवटी मिरजुम्ल्याच्या प्रकरणातून युद्धाचा प्रसंग उद्भवला. (**आदाब**, ५४ ब-५५ ब, ४४ अ, ४४ ब).

(७) मीरजुम्ला : त्याचा इतिहास आणि त्याचे स्थान [हा वृत्तान्त खालील ग्रंथांवर आधारलेला आहे . (**टॅव्हर्निअर**, भाग १. १७०, २५९, २७३, २८४-२९३, २९५; **ग्रिवल्स**, भाग १. २६९-२७१; **बर्निअर**, १६-१९; **मासिर-उल-उमरा**, भाग ३. ५३०, ५५५).]

इ. स. १६३६ साली झालेल्या तहाप्रमाणे मोगल साम्राज्य आणि दक्षिणेतील दोन राज्ये यांच्या सरहद्दी अगदी स्वच्छपणे ठरविल्या गेल्या होत्या . उत्तरेकडे मोगलांच्या प्रबळ अशा शस्त्रबळाने अडवणूक केल्यामुळे ह्या दोन राज्यांनी आपल्या फौजेचा उपयोग आणि आपल्या आकांक्षांना स्वैर संधी देण्यासाठी इतर दिशांच्या बाजूने राज्यविस्ताराचे धोरण अंगीकारले . कावेरीच्या पलीकडे कृष्णानदीपासून तो तंजावरपर्यंतचा कर्नाटकचा सर्व प्रदेश ऱ्हास पावलेल्या विजयनगर साम्राज्याच्या लहानमोठ्या तुकड्यांतून निर्माण झालेल्या छोट्या छोट्या हिंदू संस्थानांनी व्यापलेला होता . मुसलमानी सत्तेसमोर ह्या राज्यांचा आता बळी पडला. बंगालच्या उपसागरापर्यंत आक्रमण करून गोवळकोंड्याच्या फौजांनी तो प्रदेश जिंकला आणि चिल्कासरोवरापासून पेन्नर नदीपर्यंतचा सर्व प्रदेश आपल्या ताब्यात घेतला.

विजापूरकरांनी दक्षिणेकडे आक्रमण चालविले आणि नंतर पूर्वेकडे आपला मोर्चा वळवून जिंजी आणि तंजावरमधील किनारपट्टी व्यापली . ह्या दोन सुलतानांच्या उत्तरेकडून आणि दक्षिणेकडून झालेल्या आक्रमणामुळे एकाद्या भयंकर प्राण्याच्या जबड्यात सापडल्यासारखी चंद्रगिरीच्या राज्याची स्थिती झाली होती. हे राज्य विजयनगरच्या अवशिष्ट साम्राज्यापैकी होते . या राज्याचा प्रदेश पूर्वेला नेलोरपासून पॉंडिचेरीपर्यंत आणि , पश्चिमेला म्हैसूरच्या सरहद्दीपर्यंतच्या आसमंतात सामावलेला होता . आता गोवळकोंडा आणि विजापूर या राज्यांमध्ये चन्द्रगिरीचे राज्य आपल्या राज्यात समाविष्ट करून घेण्यासाठी स्पर्धा सुरू झाली . उत्तर आणि दक्षिणेकडून या दोन राज्यांचे आक्रमणरूपी जबडे कर्नाटकच्या नरड्याभोवती भराभर आवळले जाऊ लागले . ह्या आक्रमणात गोवळकोंड्याचा वजीर मिर जुम्ला याने अतिशय महत्त्वाची कामगिरी बजावली.

महमद सैद ऊर्फ मिर जुम्ला हा पर्शियामधील अर्दिस्तान या गावचा सय्यद असून त्याचा बाप इस्फहान येथील एक तेलाचा व्यापारी होता . तारुण्यांतच इतर काही शियापंथी धडाडीच्या तरुणांप्रमाणे त्याने आपला मायदेश सोडला आणि इ . स. १६३० च्या सुमारास दक्षिणेतील शियापंथी सुलतानांच्या दरबारात आपले नशीब अजमाविण्यासाठी तो दाखल झाला. धंद्यातील कौशल्य आणि पक्केपणा या गुणांच्या जोरावर त्याने हिऱ्यांच्या धंद्यांत अमाप द्रव्य संपादन केले . त्याच्या अंगी असलेल्या बहुमोल गुणांमुळे अबदुल्ला कुतुबशहाची त्याच्यावर मर्जी बसली आणि त्याने मिर जुम्ला यास आपला मुख्य प्रधान नेमले . मिर जुम्लाची उद्योगशीलता , कोणत्याही कामाची तडाखून अजमावणी , राजकारभारातील कुशलता ,

लष्करीबाबींबाबत अचूकता आणि नेतेपदासाठी लागणाऱ्या गुणांची नैसर्गिक सिद्धता यांमुळे हाती घेतलेल्या सर्व कामात त्याला यश मिळत गेले . मुलकी कारभार आणि युद्धप्रसंग ह्यांमध्ये सारखी वाकबगारी त्याच्या अंगी असल्याने गोवळकोंड्याच्या राज्यकारभाराची सारी सूत्रे त्याच्या हाती आली . त्याच्या संमतीवाचून कोणतीही गोष्ट सुलतानाकडे पोहोचेनाशी झाली . सुलतानाने त्याला कर्नाटकात पाठविले . तेथे लवकरच त्याने संपूर्ण कायापालट घडवून आणला . मिर जुम्लाने अनेक युरोपियन गोलंदाज आणि तोफा ओतणारे यांची भरती करून आपली बाजू बळकट केली आणि आपल्या फौजेची कार्यक्षमता आणि शिस्त ही एका विशिष्ट पातळीपर्यंत पोहोचविली . यानंतर लवकरच त्याने कुडाप्पा जिल्हा जिंकून घेतला . त्याच्या कामगिरीचा कळस म्हणजे आतापर्यंत अजिंक्य समजला जाणारा गंडीकोटाचा किल्ला त्याने हस्तगत केला हा होय. कुडाप्पाच्या पूर्वेस असलेले सिद्धौत [कुडाप्पाच्या पूर्वेस ९ मैलांवर सिद्धौत असून , वायव्येस ४२ मैलांवर गंडीकोटा आहे . ही दोन्ही पेन्नर नदीवर वसलेली आहेत .] त्याने जिंकून घेतले . त्याच्या फौजा उत्तर अर्काट जिल्ह्यात चक्रगिरी आणि तिरुपतीपर्यंत जाऊन पोहोचल्या. दक्षिणेतील जुनी वैभवसंपन्न देवळे लुटून आणि दडलेल्या संपत्तीचा शोध लावून मिर जुम्ला याने अफाट संपत्ती गोळा केली . दक्षिणेमधली अतिशय श्रीमंत व्यक्ती आणि २० मण हिऱ्यांचा मालक म्हणून त्याचा लौकिक झाला . त्याने आपल्या आक्रमणाच्या जोरावर कर्नाटकातील आपल्या जहागिरीचे रूपांतर ३०० मैल लांबीचा आणि ५० मैल रुंदीचा , वर्षाला ५० लाखांपर्यंत वसूल असलेल्या आणि अनेक हिऱ्यांच्या खाणींनी संपन्न अशा राज्यामध्ये केले . अशा तऱ्हेने आपला धनी जो कुतुबशहा यापासून तो पूर्णपणे स्वतंत्र झाला आणि जवळजवळ साऱ्या कर्नाटकचा तो अधिपती झाला . त्याच्याबद्दल मत्सर वाटणाऱ्या दरबारी मंडळींनी त्याच्याविषयी सुलतानाचे कान फुंकून सुलतानाच्या मनात भरविले की दरबारात हजीर नसलेल्या वजिराचा प्रचंड फौजफाटा हा सुलतानाच्या सुरक्षिततेला धोकादायक आहे आणि वजिराने मिळविलेल्या संपत्तीमुळे सुलतानाच्या दरबाराचे वैभव फिके पडलेले आहे. कुतुबशहाला साहजिकच त्याच्या वजिराने कर्नाटकात हस्तगत केलेल्या मिळकतीचा वाटा आपल्याला मिळावा अशी इच्छा झाली . आपला बादशहा किती दुर्बल आणि नालायक आहे याची जाणीव जुम्ला याला होती. त्यामुळे आपली कमाई ही पूर्णपणे आपल्या कर्तृत्वाची देणगी आहे असे तो समजत होता आणि दरबाराचे नैमित्तिक जीवन जगण्यासाठी परत जाण्याची त्याची बिलकूल तयारी नव्हती . अखेर कुतुबशहाने आपली अवज्ञा करणाऱ्या आपल्या सेवकाचे उघडपणे रिपत्य करण्याचे ठरविले (**आदाब**, ३० अ, ३६ ब, ७२ ब; **टॅव्हर्निअर** भाग १-१६५).

(८) इ. स १६५५ मध्ये कुतुबशहाचा मोगलांबरोबर झालेला संघर्ष

अशा परिस्थितीत मिर जुम्ला याने आपल्याला संरक्षण देणारा कोणी आहे का याची दखल घेतली . एकीकडे विजापूर दरबाराकडे आपण चाकरीसाठी येण्यास तयार आहोत असे दाखवून दुसरीकडे त्याने मोगल सत्तेबरोबर लाडीगोडी करण्यास प्रारंभ केला . गोवळकोंड्याचे वैभवसंपन्न राज्य काबीज करण्याची सुप्त इच्छा गुप्तपणे मनाशी बाळगून असलेल्या औरंगजेबाची , त्या राजाच्या मुख्य वजिरासारखी व्यक्ती मदत करण्यास आणि सल्ला देण्यास मिळाली तर तिचा फायदा घेण्याची उत्सुकता होतीच.

औरंगजेबाचा मिर जुम्लाबरोबर गुप्त पत्रव्यवहार

गोवळकोंडा येथे असलेल्या मोगल वकिलाच्या तर्फेने औरंगजेबाने मिर जुम्लाबरोबर गुप्त पत्रव्यवहार सुरू केला आणि तो मोगलांच्या चाकरीत आल्यास त्याच्यावर बादशहाची अपरिमित मर्जी होण्यासंबंधीची आश्वासने त्याला दिली. परंतु मिर जुम्ला याची या आश्वासनांना ताबडतोब बळी पडण्याची

तयारी नव्हती . त्याने एक वर्षाचा कालावधी औरंगजेबापासून मागून घेतला . या दुटप्पी मनोवृत्तीची औरंगजेबाला किळस आली [मिर जुम्ला याने आपल्याला येऊन मिळावे याबद्दल औरंगजेब अतिशय उत्सुक होता . परंतु त्यामध्ये होणारा विलंब पाहून तो संतप्त झाला . मिर जुम्ला याचा दुटप्पीपणाही त्याच्या नजरेस आला . त्याने बादशहाला लिहिले की मिर जुम्ला याला बादशाही चाकरीत येण्याची इच्छा दिसत नाही . कारण त्याच्या ताब्यात मोठा प्रदेश असून त्याने विजापूरच्या नोकरीत शिरण्यास नकार दिला आहे . जोपर्यंत दोन्ही सुलतानांचे शत्रुत्व तो कौशल्याने टाळू शकत आहे , तोपर्यंत तो, तो देश सोडणार नाही. (**आदाब**, ३९अ). परंतु असे दिसते की औरंगजेबाची मनधरणी संपली असावी किंवा गोंवळकोंडा येशील त्याच्या प्रतिनिधींची काहीतरी गफलत झाली असावी . कारण मिर जुम्ला आणि बादशहा यांच्यामधील समझोत्याची बातमी बाहेर फुटली . दक्षिणेच्या दोन्ही सुलतानांनी मिर जुम्ला याला शिक्षा करण्याचे ठरविले . आता मोगलांची मनधरणी करण्याची पाळी मिर जुम्ला याच्यावर आली . त्याने औरंगजेबाला लिहिले की मी बादशहाचा चाकर आहे आणि माझे रक्षण करण्याची भीक मागत आहे. परंतु आता औरंगजेबाने टाळाटाळ केली. त्याला मदत पाठविण्याचे अगोदर त्याच्यावर होणाऱ्या हल्ल्याची वाट पाहात तो बसला . (**आदाब**, ४० अ, ३६ ब).]

मिर जुम्लाच्या कुटुंबियांना कैद

मिर जुम्ला याला शासन करण्यासाठी पुरेसे मनोधैर्य आपल्या अंगी बाणविण्याच्या किंवा त्यासाठी लागणारे फौजी सामर्थ्य जमविण्याच्या अगोदरच मिर जुम्ला याचा मुलगा महमद अमीन याच्या वर्तनातून एक गंभीर समस्या उद्भवली . अमीन हा संतापी आणि हेकट स्वभावाचा असून मिर जुम्ला याचा दुय्यम म्हणून इतकी वर्षे तो गोवळकोंड्याच्या दरबारात रुजू होता . भर दरबारात देखील तो सुलतानाची कधीच मुलाहिजा ठेवीत नसे . अखेर एके दिवशी महमद अमीन हा दारूच्या धुंदीत झोकांड्या खात दरबारात आला. सुलतानाच्या बिछायतीवरच त्याला झोप लागली आणि त्या मद्यपी धुंदीत असतानाच त्याने ती बिछायत खराब करून टाकली . सुलतानाच्या मनात धुमसत असलेला राग आता उफाळून आला आणि त्याने महमद अमीन आणि त्याची कुटुंबीय मंडळी यांना तुरुंगात टाकले आणि त्याची मालमत्ता जप्त केली . (२१ नोव्हेंबर १६५५). (**एम्. यू.** भाग ३—५३१; **आदाब**, ४५ अ; **टॅव्हर्निअर**, भाग १-१६६). ज्या संधीची इतका काळ औरंगजेब वाट पाहात होता ती संधी आता चालून आली.

मिर जुम्ला आणि त्याचा मुलगा यांची मोगली चाकरीत नेमणूक केल्यासंबंधीची आणि बादशाही दरबारात ते रुजू होत असताना त्यांना प्रतिबंध न करण्याची अथवा त्यांची मालमत्ता जप्त न करण्यासंबंधीची ताकीद कुतुबशहाला देणारी अशी पत्रे १८ डिसेंबर रोजी औरंगजेबाकडे पोहोचली होती . त्याने ताबडतोब कुतुबशहाला हुकूम पाठवून कळविले की , या संबंधात गैरआज्ञा किंवा विलंब झाल्यास कुतुबशहाविरुद्ध युद्ध पुकारले जाईल. (**वारिस**, १०२ ब). दरम्यान त्याने गोवळकोंड्याच्या हद्दीवर आपल्या फौजेची जमवाजमव केली . (**आदाब**, ४५ अ , ४५ ब ; **वारिस**, १०९ ब). चालून येणाऱ्या वादळाकडे कुतुबशहाने डोळेझाक केली आणि मोगलांकडून आलेल्या पत्रांकडे दुर्लक्ष केले.

कुतुबशहाने महमद अमीन याला कैद केल्याचे कळल्यावर (२४ डिसेंबर) शहाजहानने पत्र लिहून मिर जुम्लाच्या कुटुंबियांना सोडण्याबद्दल कुतुबशहाला कळविले . शहाजहानला खात्री वाटली की या पत्राचा निश्चितपणे योग्य असाच परिणाम होईल . परंतु "औरंगजेबाला खूष ठेवण्यासाठी म्हणून " त्याने स्वतःच्या मनाविरुद्ध जर महमद अमीन अजून कैदेत असेल तर गोवळकोंड्यावर स्वारी करण्याची परवानगी दिली . (**वारिस**, १०९ ब) ही दोन्ही पत्रे औरंगजेबाकडे ७ जानेवारी १६५६ रोजी पोहोचली . (**आदाब**, ४६ अ) त्याने गोवळकोंड्याचा नाश करण्यासाठी कुटिल नीतीचा उपयोग केला . शहाजहानच्या २४ डिसेंबरच्या पत्राप्रमाणे कैद्यांची सुटका करण्यासंबंधी स्पष्ट हुकूम होते . ते पत्र कुतुबशहाच्या हातात पडून आणि त्याप्रमाणे पालन करण्याला त्याला अवधी न देता औरंगजेबाने जाहीर केले की बादशाही हुकमाची उघडउघड अवज्ञा ही गोवळकोंड्यावर स्वारी करण्यासाठी बादशहाने घातलेली आवश्यक अट

आहे. आपल्या ३ डिसेंबरच्या पत्रान्वये अमीनच्या कुटुंबियांच्या सुटकेच्या केलेल्याहुकमाचे पालन न करून गोवळकोंड्याच्या सुलतानाने बादशाही हुकमाची उघडउघड अवज्ञा केली आहे.

(९) औरंगजेब गोवळकोंड्याच्या राज्यावर स्वारी करतो, इ. स. १६५६.

ताबडतोब औरंगजेबाच्या आज्ञेवरून त्याचा मोठा मुलगा महमद सुलतान याने नांदेड सरहद्द ओलांडली, (१० जानेवारी १६५६) आणि आपल्या घोडदळांसह हैद्राबाद शहरावर धडक मारली . त्याच महिन्यात २० तारखेला औरंगजेबाने स्वतः औरंगाबादेहून कूच केले आणि तो आपल्या मुलाबरोबर हातमिळवणी करण्यासाठी निघाला.

दरम्यान महमद सुलतान गोवळकोंड्याच्या मुलखात घुसल्यावर अबदुल्ला याला शहाजहानचे २४ डिसेंबरचे कडक मजकुराचे पत्र मिळाले . त्याने ताबडतोब महमद अमीन , त्याची बायका -मुले आणि नोकर-चाकर यांना औरंगजेबाकडे रवाना केले आणि बादशहाकडे संपूर्ण शरणागती दर्शविणारे एक पत्र त्याचबरोबर रवाना केले . परंतु औरंगजेबाने आपला डावच अशा पद्धतीने टाकला होता की कुतुबशहाने शरणागतीचे पाठविलेले पत्र त्याची त्याच्यावर आलेल्या संकटातून सुटका करण्यास उपयोगी पडू नये . महमद अमीन हा हैद्राबादपासून २४ मैलांवर औरंगजेबाला भेटला . (बहुधा २१ जानेवारी रोजी) परंतु औरंगजेबाने युद्धबंदी करण्यास नकार दिला , आणि अबदुल्लाने अजून कैद्यांची मालमत्ता त्यांची त्यांना परत केली नाही या सबबीवर राजधानीवरचे आपले दडपण चालू ठेवले . अशा तऱ्हेने कुतुबशहाला वाटणारी अखेरची आशाही मावळली. कारण मोगल घोडदळ इतक्या जलद गतीने चाल करून आले की त्याच्यावर आश्चर्यचकित होण्याचीच पाळी आली . आपला सर्वनाश ओढवला आहे असे पाहून त्याने राजधानी सोडली आणि तो २२ जानेवारीच्या रात्री गोवळकोंड्याच्या किल्ल्याकडे पळाला . (**वारिस**, १०९ ब; **आदाब** ४९ अ, ८० ब).

औरंगजेबाने महमद सुलतान याला ज्या काही गुप्त सूचना दिल्या होत्या त्यात दिसून येणारी शत्रुत्वाची भीषण भावना बघितल्यावर अबदुल्ला पळून गेल्यामुळेच त्याचा जीव वाचला.

"कुतुबउल्मुल्क हा भेकड आहे आणि बहुधा तो प्रतिकार करील असे वाटत नाही . हा निरोप पोहोचल्यावर लगेच तू कसलाही विचार न करता त्याच्यावर हल्ला कर आणि जर तुला जमले तर त्याच्या मानेवरील त्याच्या मस्तकाचा भार तू कमी कर . हा बेत जर तडीस नेणे असेल तर हुषारी , चलाखपणा आणि हाताचा हलकेपणा ह्या गोष्टींची जरुरी आहे." (**आदाब**, १८७ ब).

२५ जानेवारी रोजी हल्ला करणारे सैन्य हैद्राबादच्या उत्तरेला दोन मैलांवर असलेल्या हुसेन सागर तलावाजवळ येऊन पोहोचले . गोवळकोंड्याच्या दरबारात एकच गोंधळ माजून राहिला . दुसऱ्या दिवशी औरंगजेबाने हैद्राबादेत प्रवेश केला . शहरामध्ये लुटालूट आणि अत्याचार होऊ नयेत यासाठी महमद बेग याच्या हाताखाली सुसज्ज सैनिक देऊन बंदोबस्त करण्यात आला . हैद्राबाद हे हिंदुस्थानातील एक अतिशय वैभवशाली आणि संपन्न असे शहर होते . मोगल सैन्य आता हैद्राबाद लुटणार असा बोलबाला सर्व हिंदुस्थानभर त्यावेळी झाला . औरंगजेबाचा (Equrrey) खासगी कारभारी अकीलखान राजी हा आपल्या इतिहासात लिहितो , "कुतुबउल्मुल्काचे बहुतेक सर्व भांडार आणि त्याच्याजवळची दुर्मिळ पुस्तके आणि ज्यांची गणती करता येणार नाही अशा अनेक मूल्यवान वस्तू यांची लूट राजपुत्र महमद सुलतान याने

केली. कुतुबशहाच्या मालमत्तेत त्या काळी दुर्मिळ समजल्या जाणाऱ्या अनेक वस्तू होत्या . त्या सर्व औरंगजेबाने जप्त केल्या." (**वारिस**, ११० अ; **आदाब**, ५० अ; **अकीलखान**, १३; **दिलकषा**, १६).

मोगलांचा हैद्राबादमध्ये प्रवेश

आपल्याबरोबर असलेल्या मुख्य सेनाविभागासहित औरंगजेब हा स्वतः ६फेब्रुवारी रोजी हैद्राबाद येथे येऊन पोहोचला. त्याच्या अंगी असलेल्या धडाडी आणि जलदता या गुणांची त्याच्या सर्व कृतींवर छाप पडलेली असे. त्या गुणांना साजेलसे वर्तन त्याने प्रथम गोवळकोंड्याचा किल्ला आणि त्याच्या आसमंतातील प्रदेश यांची पाहणी करून केले.

औरंगजेबाचा गोवळकोंड्याला वेढा

दुसऱ्या दिवशी गोवळकोंड्याच्या वेढ्याला सुरुवात झाली . पश्चिमेकडची बाजू मोकळी होती . पण मोगल अधिकाऱ्यांनी इतर तिन्ही बाजूलाच मोर्चे दिले . गोवळकोंड्याचा वेढा ७ फेब्रुवारी ते ३० मार्चपर्यंत चालला आणि त्याचे काम अतिशय रेंगाळलेले असे चालले . कारण गोवळकोंड्याचा किल्लाच इतका अभेद्य होता की हाताशी असलेल्या सामुग्रीच्या जोरावर किल्ल्याच्या अभेद्यतेला तडा देणे त्याला शक्य झाले नाही. अवतीभोवती घिरट्या घालणाऱ्या गोवळकोंड्याच्या फौजांबरोबर मोगलांच्या चकमकी उडाल्या . ह्या चकमकी चालू असतानाच वेढ्यात पडलेल्या सुलतानाकडून बव्हंशी दररोज नजराणे आणि शांततेसाठी आवाहन ही आक्रमकांच्या छावणीत येऊन पोहोचत . परंतु औरंगजेबाने दृढपणे तहासंबंधीच्या सर्व मागण्या फेटाळून लावल्या. त्याला सारे राज्य गिळंकृत करावयाचे होते आणि त्यापेक्षा कमी घेण्याची त्याची तयारी नव्हती. गोवळकोंड्याचे राज्य मोगल साम्राज्याला जोडण्याची शहाजहानने आपल्याला संमती द्यावी यासाठी त्याने शहाजहानपुढे अनेक तऱ्हेचा युक्तिवाद केला . परंतु आपल्या बेइमान वजिराला शिस्तीचा बडगा दाखविण्याचा प्रयत्न केला या एकाच कारणास्तव आपल्यासारख्याच सिंहासनाधिष्ठित राजाच्या राज्याचा सर्वनाश – करण्यास त्याचे मन घेईना . गोवळकोंड्याच्या दिल्ली येथील वकीलाने दाराला पैसे चारून आणि त्याच्याकडे विनवणी करून शहाजहानकडे कुतुबउल्मुल्काची रदबदली करविली ––या गोष्टीचा औरंगजेबाला अतिशय तिटकारा आणि संताप आला –आणि अखेर वार्षिक खंडणी देण्याच्या अटीवर कुतुबउल्मुल्काबरोबर तह केला जाण्यास त्याने शहाजहानची संमती मिळविली . दोन्ही राज्यांत वरील अटीवर संधी केला जावा या संबधीचे शहाजहानचे पत्र औरंगजेबाला २४ फेब्रुवारीला मिळाले . कुतुबउल्मुल्क याला माफी देण्यासंबंधीचे बादशहाचे पत्र औरंगजेबाने दडपले . (८ फेब्रुवारी या तारखेचे). कारण त्याला असे वाटले की यामुळे कुतुबशहा चढून जाईल आणि तहाच्या अटी सौम्य करावयास लावील.

बादशहाची तह करण्याची आज्ञा

दरम्यान अबदुल्ला कुतुबशहाच्या दिल्ली दरबारातील वकिलाने दारा शुको आणि राजकन्या जहानआरा यांना मध्यस्थ म्हणून घातले (गुलदश्त). त्यांच्या मध्यस्तीने त्याने बादशहाच्या कानावर औरंगजेबाच्या कारस्थानाची खरी हकीकत घातली . अबदुल्लाची फसवणूक कशी केली गेली आणि तो जवळ जवळ ठारच कसा व्हावयाचा , त्याला बादशहाच्या आज्ञेचे पालन करण्याची संधीच कशी देण्यात आली नाही , शहाजहान बादशहाचे शरण आलेल्या कुतुबशहासंबंधीचे दयाळू धोरण कसे धुडकावून

लावण्यात आले वगैरे वगैरे ऐकून शहाजहानच्या सहृदय मनाचा अगदी जळफळाट झाला . त्याने औरंगजेबाचा निषेध करणारे एक कडक पत्र त्याला पाठविले आणि गोवळकोंड्याचा वेढा उठवून ताबडतोब गोवळकोंड्याच्या प्रदेशातून बाहेर पडण्याचा त्याला हुकूम दिला.

तहाच्या अटी

बादशहाने याप्रमाणे तडकाफडकी दिलेल्या हुकूमाची अमलबजावणी म्हणून तारीख ३० मार्च रोजी औरंगजेबाने वेढा उठविला आणि गोवळकोंड्याच्या परिसरातून माघार घेतली . चार दिवसांनंतर महमद सुलतानाचे लग्न अबदुल्ला कुतुबशहा याच्या दुरच्या मुलीबरोबर अपरोक्ष पद्धतीनें लावण्यात आले . गोवळकोंड्याच्या सुलतानाला युद्धखर्च आणि उरलेली खंडणीची थकबाकी धरून रुपये एक कोट आणि त्याशिवाय रामगीर जिल्हा (हल्लीचे माणिक दुर्ग आणि चिन्नूर) मोगलांना तोडून द्यावा लागला . मोगलांनी गोवळकोंड्याच्या राज्यातून आपल्या फौजा २१ एप्रिलपासून काढून घेण्यास सुरुवात केली . [औरंगजेबाच्या गोवळकोंड्यावरील स्वारीची हकीकत पुढीलप्रमाणे आहे :— ६ फेब्रुवारी रोजी औरंगजेब आपल्या मुख्य सैन्यानिशी गोवळकोंडा येथे येऊन पोहोचला. त्याने प्रथम किल्ल्याची पाहाणी केली. दरम्यान गोवळकोंड्याचे १५ हजार सैन्य मैदानावर आले आणि त्यांनी मोगलांवर गोळीबार केला . किल्ल्यावरूनही तोफांचा मारा करण्यात आला . परिस्थिती बिकट झाली असावी कारण औरंगजेबाने शत्रूचा हल्ला परतविण्यासाठी आपल्या सर्व सैन्याला कूच करण्याचा हुकूम दिला . संध्याकाळपर्यंत जोरदार युद्ध झाले . दुसऱ्या दिवशी गोवळकोंड्याच्या वेढ्याला सुरुवात झाली . पश्चिमेची बाजू सोडून मोगलांनी इतर तिन्ही बाजूला मोर्चे उभारले . किल्ल्याला वेढा देणे हे कठीण होते . कारण मोगलांजवळ मोठ्या पल्ल्याच्या तोफा नव्हत्या. त्याचप्रमाणे शायस्ताखान व इतर अधिकारी रसद घेऊन पोहोचले नव्हते . साहजिकच औरंगजेबाने किल्ल्याभोवती सैन्य ठेवण्यात समाधान मानले. कुतुबशहा याचा खून करून त्याचे राज्य एका फटक्या सरशी घेण्याचा त्याचा बेत फसला होता . ७ फेब्रुवारी ते ३० मार्चपर्यंत वेढ्याचे काम अतिशय रेंगाळत चालले होते . पुष्कळदा किल्ल्यावरील शिबंदी मोगलांवर हल्ले करी ११ आणि १२ फेब्रुवारीला दोन्ही फौजांत किल्ल्याच्या परिसरात लढाया झाल्या. दक्षिणी फौजांनी प्रत्येक वेळी माघार घेतली कारण त्यांचा उद्देश मोगल सैन्याला दमविण्याचा होता.

ही युद्धे चालू असताना गोवळकोंड्याच्या सुलतानाचे तहाविषयीचे प्रयत्न चालू होते . औरंगजेबाने या प्रयत्नांना दाद दिली नाही. त्याला साऱ्या राज्याचा मोह पडला . गोवळकोंड्याच्या राज्यात थोडी कूच करून गेल्यानंतर तो आपल्या बापाला लिहितो . "या राज्याच्या सृष्टिसौंदर्याविषयी मी काय लिहू. सरहद्द ओलांडल्यानंतर हरघडी मला मोठमोठे तलाव व गोड्या पाण्याचे झरे , वसलेली खेडी आणि नांगरलेली शेते दिसून आली. असा समृद्ध प्रदेश बादशाही राज्याच्याऐवजी त्या नादान सुलतानाच्या हाती पडला आहे ." (**आदाब**, ५० अ,) गोवळकोंड्याचे राज्य साम्राज्याला जोडण्यासाठी त्याने अनेक परींनी कारणमीमांसा केली आणि बादशहा आपल्या बेताला मान्यता देईल अशी आशा प्रकट केली , (**आदाब**, ४६ ब , ५० ब) इतकेच नव्हे तर अशी सुवर्णसंधी न दवडण्याबद्दल त्याने बादशहाला आवाहन केले (४६ ब , ४९ ब). परंतु वरील युक्तिवादाचा शहाजहानवर काहीही परिणाम झाला नाही. आपल्याच समान धर्मीय सुलतानाचा नाश करण्याची शहाजहानला घृणा वाटली. दाराने गोवळकोंड्याच्या सुलतानासाठी खूप मनघरणी केली आणि तह घडवून आणण्यात यश मिळविले . बादशहाचे तसे पत्र औरंगजेबाला २४ फेब्रुवारी रोजी मिळाले. (**वारिस**, १११ ब). परंतु दरम्यान औरंगजेबाची बाजू गोवळकोंडा येथे मजबूत झाली . गोवळकोंड्याचे अधिकारी त्याला दररोज येऊन मिळत होते. साहजिकच बादशहाचे वरील पत्र औरंगजेबाने दडपले . अनेक दिवसांच्या वाटाघाटीनंतर सुलतानाच्या आईला औरंगजेबाला भेटण्याची परवानगी देण्यात आली . औरंगजेबाने एक कोटी रुपये खंडणी आणि न दिलेली खंडणी दिल्यास राज्य परत करण्याचे कबूल केले . खंडणीची रक्कम कुतुबशहाला अधिक वाटल्यामुळे वाटाघाटी रखडल्या. दरम्यान औरंगजेबाचा बक्षी मीर असदउल्ला बुखारी हा तोफेचा गोळा लागून ठार झाला. (**वारिस**, १११ ब, ११२ अ; **टॅव्हर्निअर**, भाग १. १६७). दरम्यान २० मार्च रोजी मीर जुम्ला छावणीत दाखल झाला . याच वेळी औरंगजेबाचे कारस्थान, त्याने बादशाही फर्मान आडवून ठेवल्याची हकीकत ही दिल्ली येथे शहाजहानच्या कानावर अबदुल्लाच्या वकीलाने घातली . या गोष्टीचा शहाजहानला अतिशय संताप आला . त्याने औरंगजेबाला कडक पत्र लिहून गोवळकोंड्याच्या राज्यातून ताबडतोब माघार घेण्याचा हुकूम दिला. औरंगजेबाचा अपमान व्हावा म्हणून ही गोष्ट जाहीर करण्यात आली. (**आदाब**, ५९ अ, ६९ ब, ८५ अ; **स्टोरीया**, भाग १. २३५).

वरील हुकूमाप्रमाणे ३० मार्च रोजी औरंगजेबाने वेढा उठविला . सुलतानाच्या मुलीचे लग्न औरंगजेबाचा मुलगा महमद सुलतान याजबरोबर लावण्यात आले. औरंगजेब १७ मे रोजी औरंगाबाद येथे पोहोचला (**वारिस**, ११२ ब, ११३ अ).]

मिर जुम्ला हा औरंगजेबाच्या गोवळकोंडा येथील छावणीत २० मार्च रोजी एकाद्या सरदाराऐवजी राजपुत्राच्याच थाटात दाखल झाला होता . त्याच्याबरोबर ६००० घोडदळ , १५००० पायदळ , १५० हत्ती आणि उत्कृष्ट तोफखाना एवढा संभार होता . (**वारिस**, ११२ अ ; **आदाब**, ११६ अ). त्याला ताबडतोब बादशाही दरबारातून बोलावणे पाठविण्यात आले . त्याप्रमाणे तो दिल्ली येथे ७ जुलै रोजी पोहोचला . त्याने बादशहाला १५ लाख रुपये किमतीचा नजराणा दिला , त्यात २१६ रती वजन भरेल एवढा एक हिरा होता .

अनुक्रमणिका

त्याला बादशहाने सहाहजारी मनसबदार नेमले आणि नुकत्याच मरण पावलेल्या सादुल्लाखानाच्या जागी त्याची मुख्य वजीर म्हणून नेमणूक केली. (**वारीस**, ११२ ब, ११४ अ, ११८ अ).

(१०) गोवळकोंड्याच्या लुटीबाबत औरंगजेबाचे शहाजहानबरोबर उडालेले खटके

गोवळकोंड्याच्या मोहिमेतून औरंगजेबाचे शहाजहानबरोबर खटके उडण्यास पुन्हा सुरुवात झाली. हैद्राबादच्या लुटीसंबंधीची अतिरंजित हकीकत दिल्ली येथे फैलावली होती. शहाजहानला असे सांगण्यात आले, बहुधा गोवळकोंड्याच्या वकिलाकडून, की औरंगजेबाने आणि त्याच्या मुलांनी कुतुबशहाकडून भारी नजराणे घेतले. त्याची खबर त्यांनी आपल्या वार्तापत्रातून दिली नाही. अगर येणे असलेल्या खंडणीतून त्या वस्तूंच्या किमती एवढी रक्कम वजा देखील केली नाही. या उलट औरंगजेबाने आपल्याकडून तक्रार केली की गोवळकोंड्याकडून येणे असलेली खंडणी आपल्या दोघांमध्ये विभागून घेऊ असे बादशहाने दिलेले वचन बादशहाकडून पाळले गेलेले नाही. गोवळकोंड्याकडून येणारी खंडणीची सर्व रक्कम बादशहाने घेतली आणि तिचा दौलताबादच्या तिजोरीत भरणा केला. युद्धामुळे मला झालेले कर्ज आणि माझ्या फौजेच्या पगाराची थकबाकी मिळून होणारी २० लाख रुपयांची रक्कम मी कशी फेडू ? (**आदाब**, ८४ ब, १९० अ, १९० ब). गोवळकोंड्याकडून मिळालेले नजराणे यांचे वर्णन शाही दरबारातील दुष्ट बातमीदारांनी "माणकाने भरलेल्या पेट्या " असे जे केले ते पूर्णपणे अतिशयोक्तीचे आहे असेही तो म्हणाला. [औरंगजेबाने आपली बाजू आपल्यापरीने मांडण्याचा प्रयत्न केला. त्याने असे सांगितले, "अबदुल्ला कुतुबशहाकडून आलेले हत्ती कुचकामी होते आणि त्याने पाठविलेले हिरे हे काळे आणि दोषी होते. कुतुबशहाच्या प्रतिनिधीने विनंती केल्यावरूनच आपण त्यांचा स्वीकार केला. यामध्ये लपवाछपवीचा काहीच प्रकार नव्हता. या सर्व भेटी मिर जुम्ला याच्या समक्ष झाल्या आणि बादशहाकडे या भेटी, खंडणीतून विकत घेतलेली माणके आणि शंभर हत्ती पाठविण्याचा आपला बेत होता परंतु हे करण्याच्या अगोदरच वरील सर्व गोष्टी ताबडतोब पाठविण्याबाबत बादशहाची आज्ञा झाली. कारण बादशहाला वाटले की त्यातील काही भाग नाहीसा होईल किंवा मी दाबून बसेन. मला असे विचारावयाचे आहे की, माझे सगळे जीवनच बादशहाच्या सेवेत असताना काही हिरे बादशहाला देण्याबाबत मी काकूं कशाला करीन ? अतिशय मनस्तापाने कुतुबशहाकडून आलेल्या सर्व वस्तू शहाजहानकडे मी लगेच पाठवून दिल्या." (**आदाब**, ८४ ब, ८५ ब, १९२ ब.)]

कर्नाटकबाबत मतभेद

गोवळकोंड्याच्या राजाबरोबर तह झाला. परंतु मतभेदाची एक बाब मात्र तशीच राहिली. कुतुबशहाला कर्नाटकचा ताबा सोडावयाचा नव्हता आणि त्याची ही मागणी योग्यच होती. कारण कर्नाटक हा त्याच्या सेवकांनी जिंकून घेतला होता आणि म्हणून त्याच्या राज्याचा तो एक अविभाज्य घटक होता. परंतु औरंगजेबाने ही गोष्ट नाकारून असे सांगितले की, कर्नाटक हा मिर जुम्लाचा खासगी जहागिरीचा प्रांत आहे. हा प्रश्न त्याने बादशहाकडे निर्णयासाठी पाठविला. (**आदाब**, ५८ अ, ५८ ब). त्याने कर्नाटक हा प्रांत मिर जुम्लाची जहागिर असे समजून आपल्या हाती ठेवण्याचे ठरविले. त्याप्रमाणे कुतुबशहाला त्या प्रांतातून आपले अधिकारी परत बोलाविण्याचा हुकूम देण्यात आला. परंतु इतका संपन्न प्रदेश आपल्या हातातून सोडण्याचे गोवळकोंड्याच्या अधिकाऱ्यांच्या जीवावर आले. ते कर्नाटकातच रेंगाळून राहिले आणि मोगलांच्या तो प्रांत ताब्यात घेण्याच्या आणि तेथील राज्यकारभार करण्याच्या कामात त्यांनी हरतऱ्हेने अडथळे आणण्याचे प्रयत्न चालविले. [गोवळकोंडा आणि मोगल यांच्यामध्ये जो तह झाला, त्यामध्ये भांडणाचा एक मुद्दा कायम राहिला. तो म्हणजे मोगलांना कर्नाटकचा प्रांत आपल्याकडे ठेवावयाचा होता तर कुतुबशहाला तो देण्याची इच्छा नव्हती. त्याने त्या प्रांताचे बदली १५ लक्ष रुपये देण्याची तयारी दाखविली. (**आदाब**, ५९ अ, ६१ अ,). परंतु औरंगजेबाने त्या प्रांताच्या संपन्नतेबद्दल बादशहाला कळविले आणि गोंवळकोंड्याच्या राज्याइतकी कर्नाटकची संपत्ती आहे असे सांगून त्याने शहाजहानच्या संपत्तीच्या हव्यासाला आवाहन करण्याचा प्रयत्न केला. मिर जुम्ला याने देखील औरंगजेबाचे म्हणणे उचलून धरले. (**आदाब**, ४६ ब, ५९ अ,). अखेर शहाजहानने कर्नाटक मीर जुम्ला याची जहागिर म्हणून आपल्याकडे ठेवण्याचे ठरविले. मोगल फौजा कर्नाटकात घुसल्या. त्यांना अडथळा करण्याचे गोवळकोंड्याच्या अधिकाऱ्यांनी खूप प्रयत्न केले. याबाबत औरंगजेबाने अनेकवार कुतुबशहाला लिहिल्याचे आपल्याला आढळते. एका पत्रात तो असे लिहितो, "कर्नाटक हा साम्राज्याचा एक भाग आहे. तो आपल्याकडे ठेवण्याचा सर्व विचार तू मनातून घालवून टाक. तुझे सर्व अधिकारी तू काढून घे, नाही तर मीर जुम्ला याला पाठवून तुझे

सगळे राज्य मी खालसा करीन ." (**आदाब,** ६७ अ , ८९ अ.). औरंगजेबाने विश्वासघाताने हैद्राबादचे राज्य घेतले असा प्रवाद आहे . त्याबाबत अकीलखान राजी पुढीलप्रमाणे लिहितो : गोंवळकोंड्यावर हल्ला करावयाचे अगोदर औरंगजेबाने कुतुबशहाला कळविले की , माझा मुलगा सुलतान महमद हा ओरिसा मार्गे बंगाल्यात जात आहे . तुम्ही त्याला मदत करा आणि तुमच्या प्रांतातून जाऊ द्या . भोळ्या कुतुबशहाने या गोष्टीला संमती दिली आणि त्याच्या स्वागताची तयारी केली . जेव्हा राजपुत्र लष्करी सामग्री घेऊन हैद्राबाद नजीक दाखल झाला तेव्हा सुलतानाचे डोळे उघडले आणि तो गोवळकोंड्याकडे पळून गेला . बर्नियर (पान २०.) आणि मनुची (खंड १, पान २३४). अशाच तऱ्हेची हकीकत सांगतात . अर्थात वरील हकीकतीत तथ्य नाही . कारण १८ डिसेंबरचे औरंगजेबाचे पत्र मिळाल्यानंतर त्याचा काय हेतू आहे याची सुलतानाला निश्चितच जाणीव झाली असली पाहिजे . औरंगजेबाने विश्वासघात केला असलाच तर तो कुतुबशहाच्या प्रत्यक्ष भेटीत त्याचा खून करण्याबद्दल त्याने आपल्या मुलाला दिलेला हुकूम हाच म्हणावा लागेल.]

(११) औरंगजेबाची विजापूरवर स्वारी इ स. १६५७.

१६३६ नंतर विजापूरची झालेली भरभराट

महमद आदिलशहाच्या कारकिर्दीत (इ. स. १६२६ ते १६५६) विजापूरच्या राजाने विस्तार , सत्ता आणि वैभव यांबाबतीत कमालमर्यादा गाठली होती . अरबी समुद्रापासून तो बंगालच्या उपसागरापर्यंत साऱ्या हिंदुस्थानचा ह्या टोकापासून त्या टोकापर्यंतचा भूभाग त्याच्या राज्याने व्यापला होता . [विजापूरच्या इतिहासासाठी पाहा. **बसातिन-उल-सलातिन**, ३०२, ३०८, ३११; **एन्शन्ट इंडिया**, एस. के. आयंगार, २९३, २९४; डॅनव्हर्सचे पोर्तुगीज इन इंडिया, भाग २, ३०८, ३०९] इ. स. १६३६ पासून महमद आदिलशहा आणि दिल्लीचा मोगल सम्राट यांमध्ये शांततेचे संबंध होते आणि दोन्ही दरबारांमध्ये परस्पर मित्रत्वाच्या भेटीगाठी झाल्याची माहिती आपल्याला वाचावयाला मिळते. (**अबदुल हमीद; वारिस**, ९० अ, ९८ ब, १०१ अ, ११३ ब, ११७ ब). ह्या सुलतानाची दयाशील वृत्ती, न्यायप्रेम आणि प्रजाहित दक्षता यामुळे शहाजहान बादशहाला त्याच्याबद्दल कौतुक वाटे . (**बसातिन**. ३२४, ३२५). या सुलतानाच्या नावलौकिकात त्याच्या स्वभावातील साधेभोळेपणा आणि जगरहाटीसंबंधी निर्विकारपणा यामुळे भर पडली होती . मिर जुम्ला हा दिल्ली येथे (७ जुलै १६५६ रोजी) पोहोचल्यावर बादशाही सल्लागारात औरंगजेबाच्या आक्रमक धोरणाचा विजय झाल्यासारखे झाले . बादशाही सल्लामसलतीत मिर जुम्ला याचा प्रभाव पडला आणि तेव्हापासून विजापूरच्या सुलतानाच्या मृत्यूच्या वेळी त्या राज्यावर आक्रमण करण्याची सुप्त इच्छा औरंगजैबाने गुप्तपणे आपल्याशी जोपासली . (**आदाब**, ८८ अ, ८८ ब, ९१ अ, ९१ ब, १९१ अ).

दिल्ली आणि विजापूरमधील संबंध

४ नोव्हेंबर १६५६ रोजी विजापूर गादीचा सातवा सुलतान महमद आदिलशहा मरण पावला . राज्याचा वजीर खान महमद आणि राणी बडी साहिबा यांच्या प्रयत्नांनी सिंहासनावर मृत बादशहाचा एकुलता एक मुलगा , १८ वर्षांचा तरुण अली आदिलशहा , दुसरा याला बसविण्यात आले . औरंगजेबाने शहाजहानला कळविले की मृत सुलतानाचा अली आदिलशहा हा औरस मुलगा नसून, ज्याच्या आईबापाची काही माहिती नाही असा, महमद आदिलशहाने आपल्या जनान्यात बाळगलेला तो एक मुलगा आहे . सबब विजापूरवर स्वारी करण्याचा हुकूम व्हावा . (**आदाब,** ८८ ब, ६० ब , १४५ अ , १३२ ब). महमद आदिलशहाच्या मृत्यूनंतर कर्नाटकात सर्वत्र गोंधळ झाला . [कर्नाटक प्रांताचा इतिहास आणि मोगलांबरोबर आलेला त्या प्रांताचा संबंध याबद्दलची हकीकत पुढीलप्रमाणे आहे : विजयनगरच्या राज्यावर विजापूर आणि गोवळकोंडा या राज्यांनी आक्रमण केले. १६५३ मध्ये विजयनगरच्या राजाने औरंगजेबाची मदत मागितली . त्यावेळी औरंगजेबाने मदत नाकारली. पुढील दोन वर्षांत विजयनगरच्या राजाची परिस्थिती खालावली. त्याने पुनः एकदा औरंगजेबाकडे मदतीची याचना केली . त्याने अडीच कोट रुपये देण्याचे आणि शहाजहानची मर्जी संपादन करण्यासाठी मुसलमान होण्याचे देखील कबूल केले (**आदाब**, ३३ ब, ३४ ब). या विनंतीवर केली गेलेली कारवाई हिंदुस्थानातील मोगल राज्य कारभारावर प्रखर प्रकाश टाकते. औरंगजेबाने असे सुचविले की दिलेली वचने पाळण्याची राजाची कुवत आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी आपला अधिकारी रवाना करावा. ही विनंती शहाजहानने अमान्य करून असा हुकूम दिला की राजाने मागितलेले संरक्षण नाकारण्यासाठी विजापूर आणि गोवळकोंडा या राज्यांकडून जबर रक्कम वसूल करावी. या वाटाघाटीची बातमी ऐकल्यावर विजापूरच्या सेनापतींनी प्रखर हल्ला करून वेलोर घेतले.

अनुक्रमणिका

पुनः एकदा राजाने मदतीसाठी औरंगजेबाची याचना केली . यावर औरंगजेबाने कर्नाटकात जाण्यासाठी महमद मुनीम या अधिकाऱ्याची नेमणूक केली. बादशहाला मात्र त्याने लिहिले की असे करण्यात माझा उद्देश विजापूर राज्याकडून भरपूर लूट उपटण्याचा आहे . कारण मुनीमच्या नेमणुकीमुळे दक्षिणी सुलतान घाबरलेले आहेत . (**आदाब**, ४४ अ , ४४ ब , ३४ ब ५४ ब ५५ ब .). विजयनगरच्या राजाची परिस्थिती मोठी आणीबाणीची झाली. त्याने आपले सारे राज्य गमावले ; आणि काही थोड्या जहागिरी त्याच्या ताब्यात राहिल्या . वरील हकीकत वाचल्यानंतर एक गोष्ट सिद्ध होते ती ही की मोगल साम्राज्य म्हणजे बुरख्या आड दडलेली एक दरोडेखोरीची पद्धती होती . हिंदुस्थानातील लोकांनी आणि संस्थानिकांनी इंग्रजाचे अधिराज्य का स्वीकारले याची यावरून सहज कल्पना येते .] जमीनदारवर्गाने आपल्या पूर्वीच्या जमिनी पुन्हा आपल्या ताब्यात घेतल्या . राजधानीमध्ये तर परिस्थिती अगदी विकोपाला गेली होती . विजापूरच्या सरदारात अंतस्थ भांडणे निर्माण झाली आणि मुख्य वजीर खान महमद याच्याबरोबर सत्ता विभागणीसाठी त्यांची चुरस लागली . (आदाब, ८९ ब , ९१ अ). परिस्थिती आणखी बिकट करण्यासाठी औरंगजेबाने त्यांच्याबरोबर संधान बांधले आणि दरबारातील अनेक प्रथितयश मुत्सद्द्यांना आपल्या बाजूला वळवून घेण्यात तो यशस्वी झाला. त्यांनी औरंगजेबाला पाठिंबा देण्याचे वचन दिले आणि आपला फौजफाटा घेऊन मोगली मुलखात पळून येण्याची तयारी दाखविली . विजापूरच्या इतर मुत्सद्दयांना मिर जुम्लाच्या मदतीने आपल्याकडे वळवून घेण्याची औरंगजेबाला आशा वाटत होती . [विजापूर दरबारातील अधिकाऱ्यांबरोबर औरंगजेबाची कारस्थाने चाललेली असताना त्याचे मिर जुम्ला याला पुढीलप्रमाणे पत्र आहे . तो लिहितो, विजापूरच्या सैन्याला आपल्या बाजूला वळवून घेण्याची मी कोशिश करीत आहे . दरम्यान रणदुल्लाखानाचा मुलगा आणि इतर प्रमुख अधिकाऱ्यांनी आपल्या सैन्यांसह मोगलाकडे येण्याचे कबूल केले . त्यानंतर औरंगजेबाने विजापुरी सैन्यांत वाटण्यासाठी २० हजार रुपये अहमदनगरचा सुभेदार मुल्तफतखान याच्याकडे रवाना केले . शंभर माणसे बरोबर घेऊन येणाऱ्या प्रत्येक विजापुरी अधिकाऱ्याला २ हजार रुपयांची रक्कम देण्याचे जाहीर करण्यात आले . विजापूरहून येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचे स्वागत करण्याचा आणि मिळते -जुळते घेण्याचा हुकूम देण्यात आला . (**आदाब**, ९१ अ, १४५ ब, १४६ ब.). या घडामोडी होत असताना शिवाजीचा एक प्रतिनिधी औरंगजेबाबरोबर वाटाघाटी करण्यात गुंतला होता . विजापुरी कोकणवर आपण हल्ला केला तर , आपल्या अटी काय राहतील याबाबत ही बोलणी होती. एक संदिग्ध पत्र लिहून उत्तरादाखल त्याला देण्यात आले. (**आदाब**, १४४ ब, १४६ अ.).]

शहाजहानची विजापूरच्या स्वारीची परवानगी

२६ नोव्हेंबरला औरंगजेबाला शहाजहानकडून मोहीम उघडण्याची परवानगी मिळाली आणि "विजापूरचे प्रकरण औरंगजेबाला योग्य वाटेल त्या पद्धतीने त्याने हाताळावे " यासाठी मुक्त अधिकार त्याला देण्यात आले . (**वारिस**, ११८ अ ; **आदाब**, ९० अ). थोड्या प्रमाणात दरबारकडून आणि थोड्या प्रमाणात जहागिरीमधून २० ,००० शिपायांचे सैन्य आणि त्याबरोबर मोठा अधिकारी वर्ग आणि खुद्द मिर जुम्ला यांची नियुक्ती औरंगजेबाच्या सैन्याला मदत म्हणून करण्यात आली . [बादशहाचा औरंगजेबाला असा हुकूम होता की त्याने मिरजुम्ला याच्या बरोबर विजापूरच्या सरहद्दीपर्यंत चाल करून जावे आणि जमल्यास विजापूरचे सारे राज्य जिंकावे ; किंवा १६३६ च्या तहाप्रमाणे अहमदनगरचा जो प्रदेश विजापूरला देण्यात आला होता तो जिंकून घ्यावा आणि उरलेल्या प्रदेशाबद्दल विजापूरकडून दीड कोटीची खंडणी आणि मोगल अधिराज्याला मान्यता घेण्यात यावी . जर दुसऱ्या पर्यायाप्रमाणे कार्यवाही झाली तर औरंगजेबाने आपले प्रचंड सैन्य गोवळकोंड्याचे राज्य जिंकून घेण्याचे कामी लावावे . औरंगजेबाची इच्छा विजापूरचे राज्य प्रथम जिंकण्याची होती म्हणून तो लिहितो , "गोवळकोंड्याचे राज्य केव्हाही जिंकता येईल . तरी तूर्त त्या राज्यावरील मोहीम बाजूला ठेवावी ." (**आदाब**, ९० अ , १९६ ब.)] (**वारिस**, ११८ अ , ११८ ब ; **आदाब**, ११८ अ). अशा तऱ्हेने युद्ध सुरू करण्यासाठी देण्यात आलेल्या परवानगीला कसल्याही नैतिकतेचे पाठबळ नव्हते. विजापूर राज्य हे काही मोगलांचे मांडलिक राज्य नव्हते , तर ते एक स्वतंत्र राज्य असून समानतेच्या भूमिकेवर त्यांचे मोगल सम्राटांशी मैत्रीचे संबंध होते . मोगल सम्राटाला विजापूरच्या वारसाला संमती देण्याचा अगर त्या संबंधी वाद उकरून काढण्याचा कसलाही कायदेशीर अधिकार पोहोचत नव्हता . १८ जानेवारीला मिर जुम्ला हा औरंगाबादेला येऊन पोहोचला आणि त्याच दिवशी ज्योतिष्यांनी काढून दिलेल्या शुभमुहूर्तावर मिर जुम्लासह औरंगजेब विजापूरच्या स्वारीवर निघाला. [मिर जुम्ला आपल्याला येऊन मिळण्याची औरंगजेब अतिशय अधिरतेने वाट पाहात होता . त्याने त्याला घाई करण्याविषयी लिहिले . औरंगजेब लिहितो, "अशी संधी आपण वाया जाऊ देता कामा नाही. तू जलद निघून ये, म्हणजे आपण बरोबरच कूच करून जाऊ". उत्तरेकडून जी रसद येत होती तिच्यासाठी वाट पाहाण्यात अर्थ नव्हता . बादशहाकडून सख्तीची पत्रे गेली असताना देखील अनेक अधिकाऱ्यांनी आपली जहागिरी सोडण्यात दिरंगाई केली . १९ फेब्रुवारी १६५७ च्या अगोदर २० ,००० सैनिक आपल्याला येऊन मिळतील याची औरंगजेबाला बिलकूल आशा नव्हती. (**आदाब**, ९० ब, ९२ अ, ९५ ब.)

अनुक्रमणिका

१८ जानेवारी रोजी मिर जुम्ला हा औरंगाबादेला येऊन पोहोचला . त्याच दिवशी विजापूरवर हल्ला करण्यासाठी त्याला बरोबर घेऊन औरंगजेबाने कूच केले. (**आदाब**, ९२ अ, १०९ ब, १४५ ब, ११८ अ, १९६ ब; **कम्बू**, २ ब) तोफखाना आणि वेढ्याचे सामान बरोबर असल्यामुळे , त्याची आगेकूच अतिशय मंद होती. २४० मैल अंतर तोडावयास त्याला ४३ दिवस लागले. २८ फेब्रुवारीला तो बिदरच्या परिसरात पोहोचला. २ मार्च रोजी त्याने किल्ल्याला वेढा दिला. (**कम्बू**, २ ब; **आदाब**, १०९ ब, १४६ अ, ११८ ब).]

बिदरला वेढा

२८ फेब्रुवारीला तो बिदरच्या परिसरात पोहोचला आणि त्याने २ मार्चला बिदरच्या किल्ल्याला वेढा दिला. सिद्दी मर्जन याने कणखर प्रतिकार केला . त्याने किल्ल्यामधून अनेक वेळा छापे घातले आणि मोर्चांवर हल्ले करून त्याने वेढ्याची प्रगती रोखण्याचा प्रयत्न केला . परंतु अखेर संख्येने अधिक असलेल्या मोगलांचा वरचष्मा झाला . मिर जुम्लाच्या उत्कृष्ट तोफखान्याने किल्ल्याच्या तटबंदीची खूप मोडतोड केली. किल्ल्याचे दोन बुरूज उद्ध्वस्त करण्यात आले आणि बाहेरील तटबंदीचे मोर्चे आणि त्याचप्रमाणे किल्ल्याच्या अगदीं खालच्या तटाच्या बाजूचे मोर्चे जमीनदोस्त करण्यात आले.

किल्ल्याच्या भोवतालचा खंदक भरून काढण्यात आल्यावर २९ मार्च रोजी किल्ल्यावर हल्ला चढविण्यात आला. मोगलांनी उडविलेल्या एका हातगोळ्याची ठिणगी दारू आणि हातगोळे ठेवलेल्या बुरुजापाठीमागील कोठारात पडली. तेव्हा भयंकर असा स्फोट झाला. मर्जन, त्याचे दोन मुलगे आणि इतर अनेक अधिकारी यांना प्राणांतिक जखमा झाल्या . आनंदाने बेहोष झालेले मोगल मुंग्यांप्रमाणे आपल्या खंदकातून बाहेर पडले आणि शहरात घुसून त्यांनी शहराचे संरक्षण करणाऱ्या उरल्या सुरल्या लोकांची भयंकर कत्तल करीत त्यांना मागे रेटले. सिद्दी मर्जन याने मृत्यूशय्येवरून आपल्या सात मुलांना किल्ल्याच्या किल्ल्या देऊन औरंगजेबाकडे पाठविले . याप्रमाणे बिदरचा बळकट किल्ला अवघ्या २७ दिवसांच्या वेढ्यानंतर पडला. विजयानंतर मिळालेल्या लुटीत १२ लाख रुपयांची रोकड , ८ लाख रुपये किमतीची बंदुकीची दारू, दारूगोळे, अन्नधान्य आणि इतर सामान आणि त्याशिवाय ३३० तोफा एवढी सामुग्री होती.

महाबतखानाची विजापूरच्या मुलखात नासधूस

यानंतर औरंगजेबाने १५ ,००० अनुभवी आणि कसलेली घोडदळाची सेना महाबतखानाच्या नेतृत्वाखाली रवाना केली . त्यांना शत्रूच्या जमाव झालेल्या फौजेचा मोड करण्याचा आणि पश्चिमेकडे कल्याणीपर्यंत आणि दक्षिणेस कुलबर्ग्यापर्यंत विजापूरचा मुलुख उद्ध्वस्त करण्याचा हुकूम देण्यात आला . मोगल फौजेची शत्रूसैन्याबरोबर १२ एप्रिल रोजी गाठ पडली . विजापूरच्या जवळजवळ २० ,००० एवढ्या फौजेने खानमहमद , अफजलखान आणि रणदुल्ला आणि रैहान यांची मुले वगैरे कर्तबगार सेनानींच्या नेतृत्वाखाली मोगलांवर हल्ला सुरू केला . शत्रूने कचाट्यात पकडलेले असताना आणि त्यांच्याकडून भयानक हल्ले होत असतानाही एकाद्या वाकबगार सेनानीप्रमाणे महाबतखानाने आपल्या फौजेला काबूत ठेवले; अखेर त्याने त्यांच्यावर हल्ला केला आणि विजापुरी फौजेने पळ काढला. (**कम्बू**, ३ अ, ३ ब; **आदाब**, १२५ अ, १२० ब).

कल्याणीचा वेढा

बिदरपासून पश्चिमेस ४० मैलांवर तुळजापूरच्या पवित्र देवालयापासून ते गोवळकोंड्यापर्यंतच्या जुन्या रस्त्यावर चालुक्य राजांचे आणि कन्नड (Cannarese) देशातील पुरातन राजधानीचे शहर कल्याणी

हे वसलेले आहे . (अधिक माहितीसाठी पाहा **बर्जेस**, २३, ३७, ३८) औरंगजेबाने २७ एप्रिलला आपला मुक्काम हलविला आणि बरोबर हलके सामान घेऊन तो कल्याणीनजीक एक आठवड्याच्या आत येऊन ठेपला. कल्याणीवर लगोलग हल्ला चढविण्यात आला . (**कम्बू,** ३ ब, ५ अ; **आदाब,** ११३ अ, १३९ अ, १४९ ब, १५६ ब) रात्रंदिवस शिबंदीने तटबंदीवरून अविरत गोळीबार चालू ठेवला . त्यांनी मिर जुम्लाच्या मोर्चेल्यांवर प्रखर हल्ले चालू ठेवले पण त्यांचा कोणताही उपयोग झाला नाही . एकदा खुद्द महाबतखान संरक्षक कामगिरीवर असताना कल्याणीपासून ईशान्येस १० मैलांवर शत्रूच्या फौजांनी त्याला कोंडीत पकडले. खूप वेळपर्यंत भयानक युद्धसंग्राम झाला . युद्धाचा मारा रजपुतांवर अधिक झाला . पत्थराच्या भिंतीप्रमाणे खड्या असलेल्या राव छत्रसाल आणि त्याचे हाडा बांधव यांच्यावर खानमहमदच्या घोडदळाने निरर्थक प्रहार केले . राजा रायसिंग सिसोदिया याच्यावर विजापूरच्या बहलोलखानाच्या मुलांनी हल्ला केला. त्यात तो जखमी झाला आणि शत्रूने केलेल्या गर्दीत तो घोड्यावरून खाली आला . याच वेळी मदत येऊन पोहोचली . महाबतखानाने केलेल्या हल्ल्यामुळे शत्रूची फळी फुटली आणि त्यांनी पलायन केले . (**कम्बू,** ४ अ)

औरंगजेबाने वेढा शिकस्तीचा करण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा केली पण त्याचवेळी त्याच्या छावणीपासून केवळ ४ मैलांवर विजापूरची ३० ,००० फौज जमा झाली. २८ मे रोजी किल्ल्याभोवती नुसत्या छावणीचा देखावा ठेवून औरंगजेबानें आपल्या मुख्य फौजेनिशी शत्रूच्या छावणीच्या दिशेने चाल केली . दोन्ही सेनादलातील सर्व फौजविभाग परस्परांशी भिडले . जवळजवळ सहातास तुंबळ युद्ध झाले . दक्षिणी सैन्याने माघार घेत घेत लढा दिला . लागोपाठ चार वेळा त्यांची दाणादाण उडाली पण पुन्हा तितक्या वेळा त्यांनी जमाव केला आणि चाल करून येणाऱ्या मोगलांना तोंड दिले . परंतु अखेर शस्त्रास्त्राने अधिक सुसज्ज असलेल्या उत्तरेच्या घोडदळाने केलेल्या लागोपाठ हल्ल्यांपुढे हातघाईच्या लढाईत त्यांचा टिकाव लागला नाही. डाव्या आणि उजव्या बाजूने मोगल फौजांनी शत्रूला कोंडीत आणले आणि अखेर त्यांची पांगापांग केली. शाही फौजांनी विस्कळीत झालेल्या विजापुरी सैन्याचा त्यांच्या छावणीपर्यंत पाठलाग केला आणि जे हाती मिळतील त्यांची त्यांनी कत्तल केली किंवा त्यांना कैद केले . विजापुरी छावणीत जे जे म्हणून – शस्त्रास्त्रे, गुलाम, स्त्रिया, घोडे, मालवाहू गुरेढोरे आणि हरतऱ्हेचे सामानसुमान वगैरे –हाती लागेल त्याची मोगलांनी लूट केली . (**कम्बू,** १४ ब; **आदाब**, ११२ अ, १४७ ब, १५४ ब). मोगलांनी किल्ल्याच्या वेढ्याची शिकस्त केली पण सिद्दी दिलावर यानेही तितक्याच शौर्याने किल्ल्याचा वेढा लढविला . मोगलांचा प्रतिकार करण्यासाठी म्हणून विजापूरच्या फौजा परत जमावाने एकत्र होऊ लागल्या . म्हणून २२ जुलै रोजी औरंगजेबाने आपला मोठा मुलगा आणि मिर जुम्ला याच्या हाताखाली एका मोठ्या सेनाविभागाला त्यांचा मोड करण्यासाठी रवाना केले. ह्या मोगल सेनादलाने ४८ मैलांची चढाई केली , शत्रूवर हल्ला करून त्यांची पांगापांग केली आणि त्यांचा चार मैलांपर्यंत पाठलाग केला . आपली चढाई तशीच पुढे चालू ठेवून मोगलांच्या विजयी सेनांनी गुलबर्ग्यापर्यंतची विजापूरची खेडीपाडी उद्ध्वस्त केली. (**कम्बू,** ५ अ).

२९ जुलै रोजी मोगल फौजा कल्याणीकडच्या खंदकाच्या दुसऱ्या बाजूला असलेला एक बुरूज वर चढून गेल्या. ह्या ठिकाणी झालेले रणकंदन दुर्धर होते . परंतु हल्लेखोर प्रचंड संख्येने आत घुसले आणि त्यांनी संरक्षक फळीची ही बाजू धरून ठेवली . १ ऑगस्ट रोजी दिलावरने किल्ल्याच्या चाव्या मोगलांकडे सुपूर्द केल्या. दिलावरला मानाचा पोशाख देण्यात येऊन विजापूरला जाण्याची परवानगी देण्यात आली . [कल्याणीच्या वेढ्याची आणखी माहिती पुढीलप्रमाणे आहे . मोगल सैनिकांनी किल्ल्यासभोवारचा खंदक दगड आणि माती यांनी भरून काढला व किल्ल्याच्या भिंती उद्ध्वस्त केल्या . २९ जुलै रोजी बादशाही सैनिक मोटेच्या दुसऱ्या बाजूचा एक बुरूज चढून गेले . परंतु या बुरुजाला समान्तर अशी एक भिंत शिबंदीने बांधली होती . तिच्या आडून शिबंदीने मोगलांवर अग्निबाण , बंदुका आणि बाण यांचा वर्षाव करून युद्ध केले . येथे अतिशय घनघोर युद्ध झाले . शिबंदीने बांधलेल्या भिंतीवर भडिमार करून मोगलांना ती उद्ध्वस्त करावी लागली . विजापुरी सैनिकांनी त्यांच्यावर पेटलेले हातगोळे आणि जळणारे गवत टाकून त्याची प्रगती रोखली . परंतु या सर्वांचा मारा सहन करून मोगल किल्ल्यात जमा झाले आणि त्यांनी

किल्ल्याचा हा भाग आपल्या ताब्यात ठेवला . २ दिवसानंतर कल्याणीचा किल्लेदार दिलावर याने शिबंदी आणि त्यांची कुटुंबे यांना अभय दिल्यास किल्ला स्वाधीन करण्याची तयारी दाखविली. औरंगजेबाने वरील अटीला मान्यता दिली. कारण किल्ल्यात अनेक मुसलमान विशेषतः सय्यद लोक होते. (**कम्बू**, ५ अ). १ ऑगस्ट रोजी दिलावरने कल्याणीच्या किल्ल्या औरंगजेबाच्या स्वाधीन केल्या . त्याला विजापूरला जाण्याची परवानगी देण्यात आली.]

तह करण्याचा बादशहाचा हुकूम

कल्याणीच्या पाडावानंतर विजापूरच्या सुलतानाने वाटाघाटींना सुरुवात केली . विजापूरच्या वकिलांनी दिल्ली येथे कारस्थाने करून बादशहाकडे दाराची मध्यस्ती मिळविण्यात यश मिळविले (**आदाब**, १७७ अ). आदिलशहाने बिदर , कल्याणी आणि परेंडा हे किल्ले , त्यांच्या हुकमतीखाली असलेल्या मुलुखासहित मोगलांच्या स्वाधीन करावे आणि युद्धखर्च म्हणून १ कोट रुपये द्यावे अशा तहाच्या अटी ठरल्या. या अटीवर औरंगजेबाला तह करण्यासंबंधी आणि आपल्या फौजा घेऊन बिदर येथे परतण्याचे हुकूम शहाजहानने दिले. दक्षिणेस माळवा आणि उत्तर हिंदुस्थानातून पाठविलेल्या मदतसैन्याला आपल्या पूर्वीच्या जागी रुजू होण्याचा आदेश देण्यात आला. ऐन विजयाच्या क्षणी औरंगजेबाला याप्रमाणे सणसणीत चपराक बसल्याप्रमाणे झाले . विजापूरच्या प्रचंड राज्याच्या उत्तरेकडच्या भागाचा एक तुकडा जेमतेम औरंगजेबाने ताब्यात घेतला असतानाच औरंगजेबाच्या आकांक्षांना बापाच्या आज्ञेचा लगाम बसला . औरंगजेबाचा अशा तऱ्हेने गोंधळ झाला असताना आणि त्याची शक्ती क्षीण झाली असताना विजापूरकरांनी आलेल्या संधीचा फायदा घेतला आणि प्रथम परेंडा ताब्यात देण्यास त्यांनी टाळाटाळ केली आणि पुढे ते स्वाधीन करण्याचे साफ नाकारले.

शहाजहानचे आजारीपण

दक्षिणेतल्या मोगलांच्या धोरणाचा दैवदुर्विपाक आणखी पुरा करण्यासाठी म्हणूनच की काय ६ सप्टेंबरला शहाजहान आजारी पडला आणि साऱ्या साम्राज्यात त्याच्या मृत्यूच्या बातम्या फैलावल्या . काळजीने चिंताग्रस्त झाल्यामुळे आणि पर स्परविरोधी बेतामुळे गोंधळून गेल्यामुळे ४ ऑक्टोबर १६५७ पासून औरंगजेबाने कल्याणीमधून माघार घेण्यास सुरुवात केली . [या संघर्षातील आणखी एक गोष्ट नमूद करण्यासारखी आहे . विजापूर राज्याच्या ईशान्येकडील भाग जिंकण्यात औरंगजेब गुंतला असताना त्या राज्याच्या वायव्य भागात फार मोठी धामधूम उडाली होती . या ठिकाणी मोगल साम्राज्यातील अहमदनगरचा जिल्हा उत्तर कोकणाला भिडलेला होता . या भागात फारशी साधनसामग्री नसलेला आणि सरदारी घराण्याची पार्श्वभूमी नसलेला असा एक तरुण आणि अनोखी स्थानिक प्रमुख , इतिहासाच्या क्षितिजावर नुकताच डोकावू पाहात होता . त्याने जो ध्येयवाद स्वीकारला होता त्याच्यामुळे सारा हिंदुस्थान चमकून उठणार होता. इतकेच नव्हे तर त्याचे नाव भविष्यकाळात अजरामर होणार होते. हा तरुण म्हणजे विजापूरच्या चाकरीतील शहाजी भोसल्याचा मुलगा . त्याने विजापूर राज्याचे किल्ल्या पाठोपाठ किल्ले घेतले होते . मोगलांनी विजापूरवर स्वारी केली तेव्हा त्याने मोगलांबरोबर सहकार्य करण्याची तयारी दाखविली . औरंगजेबाने त्याला निश्चित असे काहीच वचन दिले नाही. (**ग्रँटडफ्**. भा. १. १६१–१६२; **आदाब**, १४४ ब , १४६ अ). शिवाजीला अर्थात पूर्ण जाणीव होती की , मोगलांशी झालेली बोलणी ही कुचकामाची आहेत. म्हणून त्याने विजापूरबरोबर युद्ध सुरू होताच मोगल मुलुखावर हल्ला सुरू केला . त्याने जुन्नरवर हल्ला करून खूप लूट नेली . (अधिक माहीतीसाठी पाहा **कम्बू**, ३ ब; **आदाब**, ११० ब , ११२ अ , १४७ अ – १४९ अ , १५३ अ – १५७ अ). मराठ्यांच्या अनेक टोळ्या सर्व दूर पसरून लुटालूट करू लागल्या. इतकेच नव्हे तर ते अहमदनगरपर्यंत येऊन पोहोचले . औरंगजेबाला हे कळताच त्याने ताबडतोब रसद पाठविली आणि शिवाजीचा मुलूख उद्ध्वस्त करण्याविषयी आपल्या अधिकाऱ्यांना लिहिले . या पत्रात औरंगजेबाचा राग आणि त्वेष आपल्याला दिसून येतो . या प्रदेशाचे रक्षण करण्यासाठी औरंगजेबाने अतिशय धूर्तता दाखविली . वेगवेगळ्या सरदारांची त्याने वेगवेगळ्या भागात नेमणूक केली . शत्रूच्या प्रगतीचा प्रत्येक मार्ग त्यांनी रोखून धरला. मराठ्यांच्या प्रदेशात जिथे मिळेल तिथे घुसण्याची आज्ञा त्यांना देण्यात आली. मे १६५७ मध्ये नसीरीखान हा शिवाजीवर अहमदनगर जवळ तुटून पडला . शिवाजीचे खुप नुकसान झाले आणि त्याला माघार घ्यावी लागली . शिवाजीच्या मुलूखावर स्वारी करण्याचा हुकूम औरंगजेबाने दिला . परंतु पावसाळा आल्यामुळे ही मोहीम होऊ शकली नाही . दरम्यान विजापूर आणि मोगल यांच्यामध्ये तह झाल्यामुळे युद्ध चालू ठेवणे शिवाजीला निरर्थक वाटले . त्याने प्रथम रघुनाथ पंत आणि नंतर कृष्णाजी भास्कर यांची रवानगी केली . आपल्याला क्षमा करावी अशी त्याने याचना केली आणि ५०० घोडेस्वार राजपुत्राच्या मदतीसाठी पाठविण्याचे अभिवचन दिले . (**आदाब**, १५६ ब , १५७ अ; **ग्रँटडफ्** भाग १, १६३–१६४). यासुमारास औरंगजेब दक्षिणेतून दिल्लीकडे वारसाहक्काचे युद्ध लढण्यासाठी निघण्याच्या तयारीत होता. त्याने वर वर शिवाजीच्या शरणागतीबद्दल आनंद दाखविला. परंतु त्याचे मन मात्र कोकणाबद्दलच्या प्रकाराने स्वस्थ झाले नव्हते. त्याने त्या प्रदेशाच्या संरक्षणाची काळजी घेण्यात कोणतीही कुचराई केली नाही . कारण त्याला अशी जाणीव होती की , शिवाजीच्या अंगात त्याच्या धाडसाइतकेच कौशल्य आहे

आणि त्याच्या स्वार्थापुढे तो दिलेल्या वचनाची किंवा केलेल्या उपकाराची तमा करणार नाही. (**आदाब**, १५७ अ, १६३ अ; **दिलकषा**, २०, २१).]

[शिवाजी-औरंगजेब संबंधातील काही माहिती व पत्रव्यवहार पुढे दिला आहे.

मीर जुम्लाने इ. स. १६५६ नंतर शहाजीसाठी औरंगजेबाकडे मध्यस्ती केली. तेव्हा औरंगजेबाने शहाजीचे राजकारण उचलून धरले. [औरंगजेबाने लिहिले : "It is necessary for you to conciliate a person, who in fear of his own master, expresses a desire to serve in this (Imperial) court." परंतु दाराचा आदिलशाही विरुद्ध काहीही आगळीक करण्यास विरोध होणार असल्याने मीर जुम्ल्यास परस्पर शहाजहानास लिहिण्यास सुचविताना औरंगजेब लिहितो : "What you have said before the Emperor about Shahaji is Well-timed, fit and proper. As it is necessary to dispose of this matter for certain reasons you should endeavour to place before the Emperor's farman, written in his own handwriting. I have learnt its contents. It is highly desirable if you reveal (to me) those delicate matters, which can be included only in an interview, from out of the curtain of mystery. I, too will give the reply to these points in the proper form. The sooner you can conclude the business of the Bhonsla (shahaji) the better, as it has been the case of the manifestation of lack of spirit (or ambition) on the part of Anha (i. e. Dara's Party); Continue false negotiations with him." _P. 363-65, **Proceedings of the Indian History Congress, 7th Madras Session** 1944—**Mir Jumla's Diplomatic relations with.....Shahaji Bhonsla** by J. N. Sarkar] परंतु याहीपेक्षा खास शिवाजीस फर्माने आली आहेत ती अधिक बोलकी आहेत असे म्हटले तरी चालेल. पहिले पत्र २३ एप्रिल १६५७ चे आहे. त्याचा मराठीत तर्जुमा : "अलिफ— सर्व उमरावांत श्रेष्ठ, आपले बरोबरीचे मंडळीत थोर, नानाप्रकारचे कृपेस पात्र, शिवाजी भोसले, बादशाही कृपेस पात्र, कृतकृत्यता पावून जाणोत की तुमचा अर्जदास्त इकडील पंजाचे निशाणाचे फर्मान पोहोचल्यानंतर चिठी पावली. हरएकविषयी जे सांगणे ते तुम्हाकडील वकील सोनाजी (सोनोपंत डबीर) याजपाशी सांगितले. त्याणी तुम्हास बोलोन खातरजमा केलीच असेल. सांप्रत जे किल्ले व मुलूख विजापुराकडील तुमचे हाती होते ते पेशजीप्रमाणे होऊन तुमचे मनोगतान्वये बंदर दाभोळ व त्याजखालील मुलूख तुम्हास दिला असे. ऐशियास, इकडील दौलतीनी किफायत मदत जी करणे असेल तिचा समय हाच आहे. जाणोन करण्यात आणावे, आणि हुजूर भेटीस यावे. याखेरीज जे मतलब तुमचे मनात असतील ते सर्व घडोन येतील. हाली तुमचे वकील यांस परत जाण्याची जलदी होती, सबब निरोप दिल्हा आहे. त्याचे जबानी इकडील लक्ष दिवसेंदिवस तुमचा उत्कर्षाचा करण्याचा वगैरे सर्व ध्यानात येईल. याजकरिता इकडील दौलतीचे लहान मोठे काम -काजाची तरतूद आपले उर्जिताचे कारण समजून करीत जावी व वारंवार इकडील कृपेचे इच्छित असावे. सांप्रत ईश्वरकृत्य व दैवशालीत्व व फौजेचे शेरपणा याणी इकडील वाईट इच्छिणार नाहीसे जाले. दिवसानुदिवस इकडे जय येत चालला, तो असा की, किल्ला बेदर हा मोठा मजबूत. आजपावेतो त्यास कोणीच सर केला नव्हता व कोणाचे मनात कल्याणी दरवाजा, तो एका दिवसात हस्तगत झाला. इतरांसी वर्षाची वर्षेहि वश झाला नाही. ईश्वराचे सर्व कृत्य ! इकडील प्रतापशूराचे शौर्यामुळे तुम्ही येविषयीचा संतोष मानून, वरचेवर जसे आमचे जय होतील तसे त्या संतोषाचे वर्तमानावर कान ठेवीत जाणे आणि आमचा लोभ पूर्ण आहे असे मानीत जाणे. छ १८ **रजब** सन ३१ **जुलुस**, सन १०६७ **हिजरी**, (२३ एप्रिल १६५७)." (**राजखं**, ८, पु. ४ - ५ ले. ५, जुन्या **भा. त्रै. कागदपत्रसंग्रह विभाग** ३, पृ. ५, क्र. ४९३).

दुसरे पत्र बादशहाचे मोगल अधिकाऱ्यास एप्रिल १६५७ चे. "शाहूच्या मुलाने (शिवाजीने) या दरबाराकडे एका वकिलामार्फत असे विनंतीपत्र पाठविले की, (विजापूरकरांच्या मुलुखापैकी जो प्रांत माझ्या ताब्यात आहे तो मजकडे ठेवून जर मनसब देण्यात येईल तर राजनिष्ठा व आज्ञाधारकत्व यास अनुसरून तो प्रांत मी बादशाही राज्यास देईन'. या पत्रास मी उत्तर पाठविले आहे. त्यात काही अटी लिहिल्या आहेत, व शाहूसही (शहाजीसही) याविषयी कळविले आहे. (शिवाजीकडून) उत्तर आले म्हणजे मी तुम्हास कळवीन. त्याने माझ्या हुकुमातील अटी मान्य केल्या तर ठीक आहे, नाही तर आमची सैन्ये त्याला तुडवून टाकतील." (फरुकीकृत, **औरंगजेबचरित्र**, पृ. २५४; **पसासं**, २, पृ. ७८, ले. २६१६).

तिसऱ्या २४ फेब्रुवारी १६५८ च्या पत्राचा मराठी तर्जुमा असा : "अलीफ—आपले बरोबरीचे मंडळीत श्रेष्ठ, सर्व उमराव लोकांत श्रेष्ठ, महत्कृपेस पात्र, बादशाही कृपेस योग्य शिवाजी भोसले, बादशाही कृपेस आपला सत्कार मनात आणोन समजोत की, तुमची अर्जदास्त कृष्णाजी भास्कर पंडित याचे पत्रासुद्धा रघुमाथपंत वकील यांबरोबर पाठवून (दिलेली पाहून) मजकूर ध्यानास आला. यद्यपि तुमच्या पेशजींच्या गोष्टी विसरावया जोग्या नाहीत, तथापि तुम्ही आपले कृतकृत्यांचा पश्चाताप केला आणि हा दरबार उपेक्षेचा नाही जाणोन, वडिलांचे लक्ष निभ्रंत इकडे आहे असे समजोन, तुमचे पूर्व कृत्य मनात आणीत नाही. याविषयीचा संतोष मानून, इकडील दौलतीविषयी कोशिष करीत जावी. आपले वतनी महाल, किल्ले व कोकण देशसुद्धा नगरवाले खेरीज विजापूरकर आदिलखानाचे इलाख्यात जे आहेत ते त्यांजकडून मुलूख हस्तगत झाल्यानंतर बंदोबस्त होण्याविषयी वचन असावे, म्हणजे सोनोपंत यांस हुजूर पाठवितो आणि इकडील लक्षात वागून सरकारी मुलुखाची सरहद्द रक्षण करून कामदारांशी षरीक होतो की ज्यायोगे बंड वगैरे बखेडे न होवोत, म्हणोन लिहिले. त्यास तुम्ही लिहिल्या अन्वये वर्तून हा फर्मान पाहताच आपले मजकुराची अर्जी लेहून सोनोपंतांबरोबर पाठवून देणे. म्हणजे त्याप्रमाणे केले जाईल. जाणोन लक्षात वागोन आमचे लोभाची पूर्णता समजावी. छ १ माहे **जमादिलाखर** सन १०६८ **हिजरी**" (२४ फेब्रुवारी १६५८).

"ताजाकलम — महाराज जसवंतसिंग व कासमखान हे उभयता इकडील फौज आलीशी समजोन उज्जनीहून सहा कोस पुढे लढाईचे इराद्याने आले होते. परंतु ईश्वरकृपेने इकडील शूर अस्सल लौकिकी सहा सात हजार स्वार त्याजकडील कामास येऊन शेवटी पळू लागले. त्याजकडील खजिना, तोफखाना व हत्ती वगैरे बहुत कारखाने लुटले गेले. ईश्वरे अशा तऱ्हेने आमची फत्ते करविली. पुढे आणखी नाना प्रकारचे जे सर्वांस संतोषदायक व शत्रूस पादाक्रांती देणार असे सत्वरच होईल. तुम्ही याविषयीचा संतोष मानून इकडील लक्षात राहून कल्याणाचे उमेदवार असावे. रा छ मजकूर" (**राजखं**, ८, ले. ६, पृ. ४—५).

चौथे पत्र १४ जुलै १६५९ चे मराठी भाषांतर असे : सहहल वसलसमकालीन व बरोबरीच्या लोकांत श्रेष्ठ, उमराव मंडळात अग्रेसर, कृपेस पात्र, इस्लामचा आज्ञांकित, बादशहाचा कृपाकांषी, शिवाजी याने जाणावे की, सर्वात श्रेष्ठ व अतुल असा जो सर्वशक्तीमान परमेश्वर त्याने

सत्कृत्ये व दानशूरता यांचा प्रसार करण्याकरीता , न्यायाचा स्तंभ उभारण्याकरीता व जुलुमाचा पाया खणून काढण्याकरीता आमच्या राज्याची ध्वजा विजयाच्या अवतंसाने सुशोभित करून शनीच्या कळसास पोहोचविली ; व आमचे करवी सामर्थ्यवान शत्रूंचे व ज्यांच्या डोक्यात स्वातंत्र्याचे वेड शिरले होते. व जुलुमाचे वारे भणाणत होते असे जे धर्माचे व राज्याचे द्वेष्टे त्यांचे निर्दालन केले . आपल्या पूर्वीच्या मेहेरबानीस अनुसरून आम्ही शुभ **रमजानच्या** २४ व्या तारखेस आदितवारी (५ जून १६५९) खलीफाच्या सिंहासनाला आपल्या बसण्याने अलंकृत केले व सुखाचे दरवाजे सर्वास खुले केले. तुम्ही या सुखसमयी आपल्या नोकराबरोबर अर्जदास्ती पाठविली ती खलीफाच्या सिंहासनाच्या पायथ्याशी उभे राहणाऱ्या आमच्या नोकराचे द्वारा आमच्या पवित्र व उच्च नजरेखालून जाऊन त्यातील आशय जगाला सुशोभित करणाऱ्या आमच्या मनाला विदीत जाला . गगनाचा भेद करणाऱ्या आमच्या या दरबारच्या उंबरठ्यावर राजनिष्ठा व सेवा याही निश्चयपूर्वक पायरव करून श्रेष्ठ अशा या राज्याच्या आधारस्तंभ , विश्वासपात्र, ईश्वराचे भजन करणारा , सुखाची चिन्हे असणारा असा सरदारश्रेष्ठ उमदतुल्मुलुक ज्यास दक्षिणेची सुभेदारी देण्यात आली आहे व ज्याला पूर्णाधिकार देण्यात आल्यामुळे जो उच्चपदाला पोहोचला आहे त्याच्या मर्जीनुरूप तो मला सला देईल . त्याप्रमाणे तुम्ही काम करावे . आमच्या कृपाछत्राखाली असणाऱ्या त्या अंमलदाराच्या सल्ल्याबाहेर तुम्ही वागू नये . जी जी कामे तुमचेकडे येतील त्यांचा तुम्ही उत्तमरितीने फडशा पाडावा आणि अर्जाचा निकाल करण्यात न्यायाचे परिपालन करावे . अदृश्य सृष्टीचे पूर्णत्वाने अवलोकन करणाऱ्या आमच्या अंतःकरणापुढे जी जी कामे आम्ही ठेविली होती ती ती चांगल्याप्रकारे पार पाडून राज्याची इमारत भरभक्कम उभारली गेली . ईशकृपेने व नशिबाने आमच्या अभागी शत्रूस केल्या कर्माचे फळ मिळाले व ते मुलांबाळांसह भक्करच्या सरहद्दीवर पकडले गेले . कृतघ्न सुजाची पाळमुळे लवकरच खणली जातील . आमची अतिश्रेष्ठ अशी मेहेरबानी तुमचेवर आहे , असे जाणून योग्य ती नोकरी बजावून आमच्या वांछा धरून असावे . तुमचा दर्जा वाढविण्याकरीता तुम्हास पोशाख पाठविला आहे. ता. ४. **जिल्काद** सन १०६९ **हिजरी** (२४ जुलै १६५९)." (**भा. इ. सं. मं. चतुर्थ संमेलन वृत्त शके** १८३८, पृ. ७७–७८; **राजखं** ८, ले. ६, पृ. ५–६).]

[शिवाजी व औरंगजेब यांच्या स्वभावांचे तुलनात्मक विवेचन पुढील पत्रात समर्थपणे आले आहे.

सनदापत्रें पृ. १४९–१५१ } (२६२१) { श. १५७९

भा. इ. सं. मं. इ. १८३७ पृ. १६७ इ. १६५७

सत्यवचनी शिवाजी–औरंगजेब

प्रारब्धयोगाने हुजरून निरोपाशिवाय आलो. परंतु यथायोग्य सेवेचे सांप्रदायात हजर आहे . ती चांगली सेवा व उतम प्रयत्न हिंदुस्थान व इराण व दुराण व रूम व शाम येथील बादशहा व उमराव मोगल व राजे लोक व राणे यांस खेरीज सात मुलुखांचे राहणार व खुषकी व तरी येथील मुशाफर यांस जाहीर आहेत . त्यापेक्षा आपले अंतःकरण समुद्रासारखे आहे त्यासही विदित जाहलेच असेल . याजकरीता कित्येक गोष्टी त्यात आबालवृद्धांचे कल्याण राहील अशा लिहिल्या जातात . सांप्रत आम्ही इकडे आल्यावर पादशाही खजिना रिकामा जाहला व सारे द्रव्य खर्च जाले . याजकरिता हिंदू लोकांपासून जजिया पट्टीचे द्रव्य उत्पन्न करून पादशहातीचा क्रम चालविला आहे ऐसे ऐकण्यात आले. त्यास पूर्वी अकबर बादशहा याणी न्यायाने बावन्न वर्षे राज्य केले . याजमुळे इसवी व दाउदी व महमदी वगैरे याती खेरीज ब्राह्मण व शेवडे वगैरे हिंदू लोक यांचे धर्म चांगले चालले व त्या धर्माचे संस्थापनविषयी ते बादशाही मदत ठेवीत होते . याजकरता जगतगुरु अशी त्यांची प्रसिद्धी जाहली व अशा सद्वासनेच्या योगाने हरएक स्थळी त्यांची नजर पडत होती तेथे यश येत होते व कित्येक मुलुख सर केले. त्याजवर नुरुद्दीन जहांगीर बादशहा याणी बावीस वर्षे बादशाही ईश्वरी लक्ष ठेवून केली नंतर स्वर्गास पोहोचले . शहाजहानसाहेब किरान याणी बत्तीस वर्षे बादशहात करून उपरात राहिले . आयुष्य चांगलेपणात घालून निरंतर किर्ती मिळविली . याविषयी दृष्टांत जो पुरुष जीवन्त असताना लौकीकवान व मागे ज्यांची चांगली किर्ती असा जो त्यांजला . अचल लक्ष्मी प्राप्त जाहली असे आहे. सदरी लिहिले पादशहाचा प्रताप व पराक्रम असा त्याणी दस्तुर व वहिवाटी केल्या. त्यांचे रक्षण करण्यास आलमगीर फिकिरबंद जाहले. ते बादशहाहि जजियापट्टी घेण्यास समर्थ होते . परंतु सारे लहान -मोठे आपलाले धर्मावर आहेत ते सर्व ईश्वराचे आहेत , असे जाणून कोणावर जुलूम करावा हे त्यांनी मनी आणिले नाही . त्यांचे उपकाराची किर्ती अद्याप आहे व हरएक लहानमोठे यांचे मुखी त्यांची स्तुती व आशीर्वाद आहे. जशी नियेत तशी बरकत. त्या बादशहाची दृष्टी लोकांच्या कल्याणात होती. हल्ली आपले कारकीर्दीत कित्येक किले व मुलूख गेले व बाकी राहिले तेही जातात. कारण जे खराबी करण्याविषयी कमतर नाही. जे रयत लोक खराब आहेत. हरएक महालाचे उत्पन्न लाखास एक हजार येणे कठीण असे जाहले. बादशहा व बादशहादे यांचे घरी दारीद्र्याचा वास जाहला. तेव्हा पदरचे मनसबदार व उमराव यांची अवस्था कळतच आहे. सारांश, शिपाई लोक हैराण , व सबदागर पुकारा करतात व मुसलमान राहतात , हिंदूलोक मनात जळतात आणि कित्येक लोकास पोटास मिळत नाही असे आहे . तेव्हा राज्य चालविणे कसे ? त्याजवर जजिया पट्टीचा उपद्रव या प्रकारचा . तो पूर्व पश्चिमेपावेतो जाहीर जाहला आहे की , हिंदुस्थानचे पातशहा फकीर व ब्राह्मण व शेवडे व जोगी व संन्यासी व वैरागी व अनाथ गरीब व थकलेले व पडलेले असे एकंदर लोकांपासून जजिया घेतात व यांतच पुरुषार्थ असे समजतात व तैमूर पातशहाचे नांव बुडवितात . असे जाहले आहे. अस्मानी किताब म्हणजे कुराण . ते ईश्वराची वाणी आहे. त्यांत आज्ञा केली ती ईश्वर जगाचा किंवा मुसलमानांचा आहे. वाईट अथवा चांगले असो, हे दोन्ही ईश्वराचे निर्मित आहेत. कोठे महजीद आहे त्याचे स्मरण करून बांग देतात. कोठे देवालय आहे तेथे घंटा वाजवितात. त्यास कोणाचे धर्मास विरोध करणे हे आपले धर्मापासून सुटणे व ईश्वराचे लिहिले रद्द करून त्याजवर दोष ठेवणे आहे . याविषयी चांगले अगर वाईट जे पाहावे त्यास रद्द करू नये . पदार्थाची निंदा करणे हे पदार्थ करणारावर शब्द ठेवणे आहे . न्यायाचे मार्गाने पाहाता जजिया पट्टीचा कायदा केवळ गर . पेशजी सुलतान अहमद गुजराथी हा असाच वैरचालीने वागला तो लवकरच बुडाला . त्यास या वृद्धापकाली असे बद्ध होणे हे पराक्रमास अगदी योग्य नाही . येविषयी दृष्टांत जुलूम ज्याजवर जाला त्याणे खेद करून हायहाय म्हणून मुखाने धूर काढल्यास त्या धूराने जितके लवकर जळेल तितके जल्दीने जळता अग्नीही संमधास जाळणार नाही . अंतकरण पातकाने मलीन जाले ते स्वच्छ करावे ही चांगली सल्ला आहे . याजवर हिंदू लोकास पीडा करण्यातच धर्म आहे असे मनामधे आले असल्यास आधी राजा राजसिंग यांजपासून जजिया घ्यावा म्हणजे इकडून कठीण नाही . उपरांत सेवेसी हजर आहे . परंतु गरीब अनाथ ते मुंग्याचिलटासारखे आहेत. त्यास उपसर्ग करण्यात काही मोठेपणा नाही . पदरची मंडळीही पाहता पाहता अग्नी तृणाने झाकतात याचेही आश्चर्य

अनुक्रमणिका

वाटते. अस्तु. राज्याचा सूर्य हा प्रतापाचे उदयाचलापासून तेजस्वी असो.

(**शि. प. सा. सं**. खंड ३, ७९–८१).]

●●●

प्रकरण तिसरे
शहाजहानचे आजारीपण आणि त्याच्या मुलांचे बंड

(१) शहाजहानचा वडीलपुत्र दारा शुको

शहाजहानची वैभवशाली कारकीर्द

७ मार्च १६५७ रोजी शहाजहानच्या कारकिर्दीची ३० वर्षे पूर्ण झाली आणि कारकिर्दीचे ३१ वे वर्ष सुरू झाले. त्याची कारकीर्द जितकी प्रदीर्घ तितकीच वैभवसंपन्न झाली . हिंदुस्थानात आलेल्या परकीयांचे डोळे या मोठ्या मोगल बादशहाच्या अमलाखाली असलेल्या हिंदुस्थानच्या संपत्तीने दिपून जात . उत्सवाच्या प्रसंगी बुखारा आणि पर्शिया , तुर्कस्तान आणि अरबस्तान या देशांतील वकील त्याचप्रमाणे फ्रान्स आणि इटाली या देशांमधून आलेले प्रवासी मयूरसिंहासन , कोहिनूर आणि इतर नावाजलेले हिरे यांच्या वैभवशाली दर्शनाने अचंबित होत असत . पांढऱ्या शुभ्र संगमरवराची स्मारके उभारण्याचे शहाजहानला वेड होते . ही स्मारके बांधण्यात जितके द्रव्य खर्च होत असे तितक्याच प्रमाणात ह्या कलाकृतींचे शिल्प सोज्वळतेने नटलेले असे . शाही दरबारातील अमीर -उमरावांच्या संपत्ती आणि थाटामाटाबरोबर इतर देशांचे राजेदेखील पासंगाला पुरत नसत . ईश्वरी सत्तेचे संरक्षण असलेल्या साम्राज्याच्या मर्यादा पूर्वी कधीही नव्हत्या एवढ्या प्रदेशावर पसरल्या होत्या . खुद्द देशात निव्वळ शांततेचे साम्राज्य होते. शेतकरी वर्गाची काळजीपूर्वक जोपासना केली जात होती. लोकांनी केलेल्या तक्रारीमुळे क्रूर आणि कठोर अशा सुभेदारांना बडतर्फ केले गेले होते . संपत्ती आणि वैभव यांची सर्वांगीण वाढ होत होती . शहाजहान हा दयाळू आणि तितकाच कर्तृत्ववान राज्यकर्ता होता. त्याने आपल्या हाताखाली कार्यक्षम अशा अधिकाऱ्यांचा एक संच तयार केला आणि बुद्धिचापल्य आणि बुद्धिमत्ता या गुणांचा आपला दरबार म्हणजे एक माहेरघरच त्याने जणू बनविले. परंतु ज्या कर्तबगार मंत्र्यांनी आणि सेनापतींनी शहाजहानची कारकीर्द वैभवसंपन्न बनविण्यास हातभार लावला होता त्यांना एकामागून एक क्रूर काळाने ओढून नेले . जुन्या पिढीचे भरभक्कम आधारस्तंभ नाहीसे होत गेले परंतु त्यांची जागा भरून काढण्यासाठी बादशहाला सभोवार असलेल्या नव्या आणि तरूण पिढीतून लायक माणसे मिळेनात . त्याच्या वयाला आता ६७ वर्षे पूर्ण झाली होती (२४ जानेवारी १६५७). त्याच्या पाठीमागे दैवगतीचा ओघ कसा वळणार होता?

दाराचे धर्मविषयक तत्त्वज्ञान

शहाजहानला चार मुलगे होते. सर्वांची वये होऊन गेली होती आणि सर्वांना प्रांतांचे सुभेदार आणि फौजेचे सेनानी म्हणून अनुभव मिळालेला होता. परंतु त्यांच्यामध्ये बंधुप्रेमाचा पूर्णपणे अभाव होता. विशेषतः दारा आणि औरंगजेब यांमध्ये कटुत्वाची भावना इतकी प्रखर होती आणि गेली अनेक वर्षे त्या भावनेला इतके उग्र स्वरूप आले होते की , त्याची वाच्यता साऱ्या साम्राज्यात झाली होती . त्या दोघांमध्ये अनुचित प्रकार घडून न येण्याचे कारण म्हणजे दरबार आणि दारा यांजपासून औरंगजेबाला दूरवर ठेवण्यात आले होते. (**ॲनेकडोट्स्** २ व ५; **मासूम** ६ ब; **कम्बू** ८ ब; **आदाब** १७१ ब, १७४ ब) एकाच मातेच्या चारी मुलांमध्ये सर्वांत वडील असलेला जो दारा त्यालाच आपल्या पाठीमागे राज्य देण्याची स्पष्ट जाणीव शहाजहानने दिलेली होती . साम्राज्याच्या राज्यकारभारांत दाराला तरबेज करण्यासाठी आणि सार्वभौमत्वाच्या अधिकाराची सुलभ खांदेपालट व्हावी यासाठी शहाजहानने त्याला गेली अनेक वर्षे आपल्यापाशीच ठेवले

होते आणि त्याच्या ताब्यातील सुभ्यांवर दुय्यमांतर्फे राज्यकारभार चालविण्याची परवानगी दिली होती . आणि त्याचबरोबर बादशहाने त्याच्यावर इतके हुद्दे आणि खास अधिकार त्यांची खैरात केली की तो जणू बादशहाच बनून राहिला. बादशहाकडे अर्जी दाखल व्हावयाची असेल तर सर्वांना प्रथम दाराची मध्यस्थीची भीक मागावी अगर विकत घ्यावी लागे. (**वारिस**, ८५ अ ९१ ब, ११६ अ, ८७ ब ९७ ब) दाराचे नुकतेच ४२ वे वर्ष सरले होते . तो आपला पणजोबा अकबर याच्या वळणावर गेला होता . ईश्वरवादी तत्त्वज्ञानाच्या ध्यासात तालमूद (Talmud) आणि न्यू टेस्टामेन्ट , मुसलमान सुफींची शिकवण सांगणारे लिखाण आणि हिंदूंचे वेदान्त तत्त्वज्ञान यांचा त्याने अभ्यास केला होता . सर्व खऱ्या धर्मांची समान भूमिकेवरून शिकवण देणारी आणि केवळ धर्माच्या बाह्य रूपावर विश्वास टाकून वेडावल्यामुळे धर्मवेड्यांनी उपेक्षिलेली अशीजी हिंदू आणि मुसलमान धर्मांना एका व्यासपीठावर आणणारी सर्वग्राह्य मूल्ये होती ती शोधून काढणे हे त्याचे ध्येय होते. हिंदू योगी लाल दास आणि मुसलमान फकीर सरमद या दोघांकडून सारखेपणी त्याने आपले सारग्राही (इलेक्टिक) तत्त्वज्ञान उचलले होते आणि दोघांच्याही पायाजवळ त्याने हुशार चेला म्हणून आराधना केली होती . परंतु तो इस्लाम धर्मापासून यत्किंचितही च्युत झाला नव्हता . त्याने मुसलमान अवलियांची चरित्रे लिहून काढली होती आणि जे कोणाहि काफराला कधी शक्य झाले नसते ते म्हणजे मुसलमान अवलिया मिया मिर याचा शिष्य म्हणून त्याने अनुग्रह घेतला होता . **दाराचे व्यक्तिमत्त्व :-** धर्मनिष्ठ जहानआरादेखील दाराचा उल्लेख आपल्याला धर्माची शिकवण देणारा असाच करते . त्याने धर्मतत्त्वज्ञानावरील आपल्या ग्रंथांना वाचकांच्या खुलाशासाठी जी प्रस्तावना लिहिली आहे ती सिद्ध करते की मुसलमान धर्माच्या मूलभूत तत्त्वांचा दाराने कधीच त्याग केला नाही . त्यातून एवढेच अनुमान काढता येईल की इस्लामवर विश्वास ठेवणाऱ्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सुफी संप्रदायाच्या सारग्राही तत्त्वज्ञानाची तत्त्वे त्याने आपल्या अंगी बाणवली होती . परंतु हिंदू तत्त्वज्ञाना बरोबर त्याने जी चुंबाचुंबी चालविली होती त्यामुळे त्याने जरी मनात आणले असते तरीदेखील त्याला सनातनी आणि अद्वैताचा पुरस्कार करणाऱ्या इस्लामचा प्रणेता म्हणून ग्वाही देणे अशक्यातले झाले असते अथवा मुसलमानी धर्मतत्त्वाचा स्वीकार न करणाऱ्या आम व्यक्तिविरूद्ध जिहाद पुकारून साऱ्या मुस्लिमाना आपल्या नेतृत्वाखाली एकत्र आणण्याची किमया देखील त्याला जमली नसती.

त्याच्या बापाच्या त्याच्यावरील अतिरिक्त प्रेमामुळे जे झाले ते निश्चितच त्याला विपरीत असे झाले . त्याला नेहमीच दरबारात हजर ठेवण्यात आले आणि कंदहारला पडलेला तिसरा वेढा सोडला तर त्याला कोणत्याही मोहिमेवर अगर प्रांताच्या राज्यकारभारावर पाठविण्यात आले नाही . याचा परिणाम असा झाला की, त्याला युद्धकला आणि राज्यशास्त्र यांमध्ये कसलाही अनुभव मिळविता आला नाही . व्यक्तीची खरी परीक्षा धोके आणि अडचणी यांना तोंड देण्याच्या तिच्या कुवतीतून होते . या कसावर कोणाचीही निवड करण्याचा प्रसंग त्यामुळे त्याच्यावर कधीच आला नाही . मोहिमांवर गुंतलेल्या फौजेशी त्याचा संबंध पूर्णपणे सुटला. साहजिकच बळी तो कान पिळी या म्हणीची प्रत्यता आणून देणाऱ्या मोगल घराण्यातील वारसाहक्काच्या संघर्षात भाग घेण्यास तो नालायक ठरला . त्याच्या जवळील अमाप संपत्ती आणि त्याच्या शब्दाला दिला जाणारा मान यांमधून त्याच्या अंगी अस्मिता, संयम अथवा दूरदृष्टी या गुणांचा विकास होईल ही अपेक्षा फोल होती. तर याउलट सर्वांकडून त्याची जी वारेमाप स्तुती होई त्यामुळे दिल्लीच्या सिंहासनाचा जो वारस दारा त्याच्या अंगी नैसर्गिकतेने वसणारे गर्व आणि औद्धत्य ही अधिकच पराकोटीला पोहोचली . साहजिकच व्यक्तीचारित्र्याचे परिशीलन दाराला कधीच करता आले नाही . कर्तृत्ववान आणि स्वाभिमानी माणसे असल्या उद्धट आणि पोच नसलेल्या भावी मालकापासून दूर दूर राहू लागली . दाराला पतिधर्म, पितृधर्म आणि पुत्रधर्म हे उत्कृष्ट तऱ्हेने ज्ञात होते . परंतु धामधुमीच्या काळात माणसावर वचक बसविणारा अधिनेता म्हणून दारा कुचकामी ठरला . अखंडीत लाभ झालेली वैभवसंपन्नता दाराच्या चारित्र्यावर प्रहार

करून गेली आणि शहाणपणाने योजना आखणे , बेदरकारपणे धोका पत्करणे आणि कष्टाने उद्दिष्ट साध्य करणे किंवा जरूर पडेल तर जीवावर उदार होऊन किंवा प्रयत्नांची पराकाष्ठा करून मृत्यूच्या जबड्यातून विजयश्रीला खेचून आणणे ह्या कामात तो निरुपयोगी ठरला . लष्करी संघटना आणि आपल्या कार्याची कुशलतापूर्वक जुळवणी ही कामे त्याच्या आवाक्याबाहेरची होती . त्याचप्रमाणे डोके थंड ठेवून आणि बुद्धी पणाला लावून युद्धामध्ये वारंवार बदलणाऱ्या परिस्थितीत मार्गदर्शन करणाऱ्या युद्धकुशल सेनानीपणाचे धडे घेण्याची संधी दाराला कधीच मिळाली नाही . युद्धाच्या कलेत अनभिज्ञ असलेल्या दाराची गाठ सिंहासनासाठी होणाऱ्या झगड्यात एका कसलेल्या सेनानीबरोबर विधीने घातली होती . (**कम्बू**, ९ अ, १० अ, १५ अ; **आलमगीरनामा**, ९९; **अकीलखान**, ३३).

(२) शहाजहानचे आजारीपण – इ. स. १६५७ आणि त्यामुळे साम्राज्यात माजलेली अव्यवस्था

६ सप्टेंबर रोजी शहाजहान हा एकाएकी मुतखडा आणि अपचन यामुळे दिल्ली येथे आजारी पडला . (**कम्बू**, ६ अ , ७ अ ; **मासूम**, २९ ब , ३० ब). एक आठवडाभर राजवैद्यांनी निरर्थक आपल्या प्रयत्नांची शिकस्त केली . परंतु शहाजहानचा आजार वाढतच गेला . दैनंदिन दरबार भरविणे बंद झाले . राजवाड्यातील सज्जामधून प्रजेला दर्शन देणेही बादशहाने थांबविले . एका आठवड्यानंतर राजवैद्यांना रोगाला काबूत आणण्यात यश आले . परंतु बादशहाच्या प्रकृतीत झालेली सुधारणा बेताचीच होती म्हणून त्याने आग्र्याला जाण्याचे ठरविले . मृत्यू यावयाचाच तर जिच्यावर जीवापाड प्रेम केले त्या पत्नीच्या कबरस्तानासमीप शांतपणे यावा असे त्याला वाटले . तारीख २६ ऑक्टोबर रोजी तो आग्र्याला येऊन पोहोचला. (**कम्बू**, ८ ब).

दाराची वारस म्हणून नेमणूक

शहाजहान आजारी असताना दारा सतत त्याच्या बिछान्याजवळ बसून राही . त्याने शहाजहानची अतिशय काळजीपूर्वक आणि कनवाळूपणे सेवासुश्रूषा केली आणि राजमुकूट स्वतःकरता मिळविण्यासाठी कोणत्याही विपरीत मार्गाचा अवलंब करण्याची घिसाडघाई त्याने दाखविली नाही . शहाजहानच्या आजाराच्या पूर्वकाळात जेव्हा आपण आता यातून उठत नाही असे त्याला वाटले तेव्हा तो मृत्योत्तर जगात या नश्वर देहाचा त्याग करून जाण्यासाठी मनाची तयारी करण्याच्या मागे लागला . आपल्या विश्वासातील दरबारी मंडळी आणि राज्यातील प्रमुख अधिकारी यांना त्याने आपल्या समीप बोलाविले . त्यांच्या समक्ष त्याने आपले अखेरचे मृत्युपत्र तयार केले आणि यापुढे त्यांनी दाराला सार्वभौम समजून त्याच्या आज्ञांचे पालन करण्याचा त्यांना हुकूम केला . दाराने अर्थात राजमुकूट धारण केला नाही परंतु आपल्या बापाच्या नावे त्याने हुकुमनामे काढणे चालू ठेवले आणि त्याजबरोबर स्वतःचे आसन मजबूत करण्याचे प्रयत्नही केले. औरंगजेबाच्या विश्वासातील आणि त्याचा पक्षपाती जो मिर जुम्ला त्याला त्याने मुख्य प्रधानाच्या जागेवरून काढले (सप्टेंबर अखेर) आणि मिरजुम्ला , महाबतखान आणि इतर शाही अधिकाऱ्यांना आपापल्या फौजासह दक्षिणेतून दरबाराकडे परतण्याचे आदेश दिले . (**कम्बू**, ६ ब, १० अ; **आलमगीरनामा** २९) आतापर्यंत शहाजहानपासून राज्यकारभारासंबंधीच्या महत्त्वाच्या बातम्या गुप्त ठेवण्यात आल्या होत्या. **शुजा, मुराद आणि औरंगजेब यांच्यावर सैन्याची रवानगी :-** त्या त्याला सांगण्याइतपत त्याची प्रकृती नोव्हेंबरच्या मध्यापर्यंत सुधारली होती . त्यांपैकी एक बातमी म्हणजे शुजाने स्वतःला राज्याभिषेक करून घेतला होता आणि तो बंगालमधून चाल करून येत होता ही . शहाजहानच्या संमतीने ३० नोव्हेंबर रोजी सुलेमान शुको (दाराचा मोठा मुलगा) आणि मिर्झा राजा जयसिंग यांच्या हाताखाली २२००० फौज शुजावर

पाठविण्यात आली. यानंतर लगोलग तितकीच धडकी भरविणारी बातमी गुजरातेतून आली. तेथे मुरादने ५ डिसेंबर रोजी स्वतःला राज्याभिषेक करून घेतला होता आणि औरंगजेबाबरोबर हातमिळवणी केली होती. म्हणून डिसेंबर महिन्याच्या अखेरीस दोन बादशाही सेनाविभाग आग्र्याहून माळव्यात एक औरंगजेबाची दक्षिणेतून होणारी प्रगती रोखून धरण्यासाठी आणि दुसरा गुजरातमध्ये कूच करून त्या प्रांतातून मुरादची हकालपट्टी करण्यासाठी रवाना करण्यात आला. ह्यांपैकी एका सेनाविभागावर मारवाडचा राजा जसवंतसिंग याची नेमणूक करण्यात आली. जसवंतसिंगाची नेमणूक शायस्ताखानाऐवजी माळव्याचा सुभेदार म्हणून करण्यात आली आणि त्याला दरबारात हजर होण्यास सांगण्यात आले. दुसऱ्या सेनाविभागाचे नेतृत्व स्वीकारण्याची कासीमखानाला त्याला गुजरातचा सुभेदार करून गळ घालण्यात आली. शहाजहानने आपल्या सेनानींना असा आदेश दिला की त्यांनी बंड करून उठलेल्या त्याच्या धाकट्या मुलांचे प्राण वाचवावेत. शक्यतोवर गोड शब्द बोलून त्यांची रवानगी त्यांच्या सुभेदारीच्या प्रांतांवर पाठविण्याचा पहिल्या प्रथम प्रयत्न करावा आणि हे नाहीच जमले तर आपल्या ताकदींचे प्रदर्शन करण्याचा आणि तशीच आत्यंतिक गरज भासली तर भयानक रणसंग्राम करण्याचा आदेश त्याने त्यांना दिला.

[शहाजहानच्या आजारीपणात त्याच्या मुलांमध्ये झालेल्या कलहाची माहिती पुढीलप्रमाणे आहे :— नोव्हेंबरच्या मध्यात शहाजहानला पूर्ण बरे वाटले, तेव्हा दाराने शुजाने केलेल्या बंडाची हकीकत त्याच्या कानावर घातली. त्याच्याविरुद्ध जयसिंग आणि दाराचा मुलगा सुलेमान यांच्याबरोबर २२ हजार सैन्य देऊन रवाना करण्यास शहाजहानने परवानगी दिली. यामुळे दाराची बाजू कमकुवत झाली. (**कम्बू**, ९ अ, ९ ब; **खाफीखान**, भाग २, ५; **मासूम**, ३२ ब–४० ब). दरम्यान गुजरातेतून मुरादने बंड केल्याची आणि राज्याभिषेक करून घेतल्याची बातमी आली. दाराने त्याला पत्र पाठवून त्याची नेमणूक वऱ्हाडच्या सुभ्यावर केल्याचे कळविले. त्याचा उद्देश औरंगजेब आणि मुराद यांच्यामध्ये कलह लावण्याचा होता. परंतु त्याचा उद्देश साध्य झाला नाही. मुरादने औरंगजेबाविरुद्ध कसलीही हालचाल केली नाही. (**कम्बू**. १० अ, १० ब, ११ अ; **फैयाझ-उल-कवानिन**, ४१४, ४२०).

औरंगजेबाने अजूनपर्यंत कसलीही हालचाल केलेली नव्हती. दाराला औरंगजेबाची अतिशय भीती वाटत होती. त्याने मुराद आणि शुजा यांच्याबरोबर संगनमत केल्याचे त्याला कळले होते. परिणामी बादशहाकडून मिर जुम्ला आणि इतर सेनानी यांना दक्षिणेतून ताबडतोब परतण्याचे हुकूम रवाना झाले. त्याचप्रमाणे मुराद आणि औरंगजेब यांच्यावरही फौजा रवाना करण्यात आल्या. या फौजांना कोणीही सेनानी मिळेना. फक्त जसवंतसिंग हा औरंगजेबावर चाल करून जाण्यास तयार झाला. (**ईश्वरदास**, १८ ब) शायस्ताखानाची माळव्याहून बदली करण्यात आली; व त्याच्या जागी जसवंतला नेमण्यात आले. याचे कारण शायस्ताखान आणि औरंगजेब यांच्यामधील घनिष्ठ संबंध. दुसऱ्या फौजेवर कासीमखानाला नेमण्यात आले. राजपुत्राच्या जीवाला धोका न लावण्याचा हुकूम शहाजहानने आपल्या सेनानींना दिला. त्याचप्रमाणे वेळ पडली तरच युद्ध करावे असे त्यांना सांगण्यात आले. (**मासूम**, ४५ ब; **अकीलखान**, २१; **कम्बू**, ११ अ). जानेवारी १६५८ मध्ये आग्र्याला आणखी बातम्या येऊन पोहोचल्या. त्यांपैकी एक बातमी म्हणजे औरंगजेबाने मिरजुम्ला याला पकडल्याची होती. त्यालाकारण औरंगजेबाने मिरजुम्ला याच्या विजापूरबरोबरील संगनमताचे दिले. (**आलमगीरनामा**, ८४; **खाफीखान**, भाग २, ९; **आदाब**, ९५ अ, ६७ ब; **अकीलखान**, १९, २०, २२). दाराला मात्र खऱ्या वस्तुस्थितीबद्दल शंका नव्हती. औरंगजेबाच्या फौजा २५ जानेवारी रोजी उत्तरेची वाट चालू लागल्या होत्या. तिन्ही राजपुत्रांनी आपले खरे स्वरूप आता प्रकट केले होते.

दरम्यान दाराच्या चिथावणीवरून बादशहाने औरंगजेबाचा दरबारातील प्रतिनिधी इसाबेग याला कैद केले. परंतु त्याची त्यालाच लाज वाटल्यावरून इसाबेगची मुक्तता करण्यात आली. (**आलमगीरनामा**, ३५, ३९; **अकीलखान**, १८, २३.) इसाबेग हा बुरहाणपूर येथे औरंगजेबाला जाऊन मिळाला.

शहाजहानचा आजार आणि सार्वजनिक जीवनातून त्याची निवृत्ती यामुळे तो मेला आहे असा समज पसरला होता. दारा हा शहाजहानजवळ रात्रंदिवस बसून असे. एक दोघा वजिरांशिवाय त्याच्याजवळ कोणीही जाऊ शकत नसे. साहजिकच बादशहा मेल्याची बातमी सर्वदूर पसरली. त्यामध्ये दाराच्या असमंजस वागणुकीची भर पडली. आपल्या भावांकडे कोणताही पत्रव्यवहार पोहोचू नये, अशी व्यवस्था त्याने आपल्याला राज्यावर बसणे सुलभ व्हावे म्हणून केली. त्यांच्या दरबारातील प्रतिनिधींवरही त्याने कडक नजर ठेवली. (**आलमगीरनामा**, २८; **कम्बू**, ८६; **फैयाझ–उल–कवानिन**, ४१८; **मासूम**, ३० अ, ३० ब)]

शहाजहानच्या आजारीपणात प्रथमप्रथम आपल्या विश्वासातील एक अथवा दोन मंत्र्यांशिवाय दारा त्याच्या जवळ कोणाला जाण्याची परवानगी देत नसे. जलमार्गावरील सर्व नौकांची तो पाहणी करी आणि बंगाल, गुजरात आणि दक्षिणेत आपल्या भावांकडे जाणारी सर्व पत्रे आणि जासूद यांना अटकाव करी. त्यांच्या शाही दरबारातील हस्तकांकरवी त्यांना काहीतरी निरोप जातील या भीतीने त्याने त्यांच्यावर सख्त नजर ठेवली. परंतु त्याने ही जी विशेष काळजी घेतली त्यामुळे भले होण्याऐवजी त्याचे अतिशय विपरीत

परिणाम झाले. राज्यातील दूरवरच्या प्रांतांतील राजपुत्र आणि अधिकारी यांच्याकडे कोणतीही बातमी जाण्याचे थांबल्यामुळे त्यांची अशी समजूत झाली की शहाजहान मरण पावला आहे. याचा परिणाम असा झाला की मोगल वारसाहक्काच्या होणाऱ्या धुमश्चक्रीतून निर्माण होणारी अव्यवस्था आणि सावळागोंधळ यांचा अचानक स्फोट झाला. सगळीकडे गुन्हेगार माणसांनी एकच धमाल उडनवू दिली. शेतकऱ्यांनी सारा भरण्याचे नाकारले, जमीनदारांनी आपल्या प्रतिस्पर्ध्यांना नागविण्याचा किंवा त्याना नेस्तनाबूद करण्याचा प्रयत्न केला आणि राज्याच्या सीमेचा भंग झाला. भविष्यकाळासंबंधी अनिश्चितता आणि उत्कंठा यामुळे काय करावे हे न समजून स्थानिक अधिकारी हे गर्भगळीत होऊन गेले आणि अनेक ठिकाणी कायदा आणि सुव्यवस्था विलयाला गेली.

आपली तब्येत सुधारत आहे अशा अर्थाची शहाजहानच्या हस्ताक्षरातील आणि त्याच्या सहीशिक्क्याची पत्रे निःसंशय राजपुत्रांकडे पोहोचली, परंतु त्यांनी असा दावा केला की शहाजहानच्या हस्ताक्षराची हुबेहूब नक्कल करणाऱ्या दारानेच ही सर्व पत्रे प्रत्यक्षात लिहिली आहेत आणि मृत शहाजहान बादशहाच्या सहीचा शिक्का हा सिंहासन बळकावून बसलेल्या दाराच्या ताब्यात आहे. (**फैयाझ-उल-कवानिन**, ४१८, ४२५, ४२९). तेव्हा दाराच्या तीन धाकट्या भावंडांनी बादशहाकडे धाडलेल्या पत्रात असे उघड उघडपणे सांगितले की त्यांच्याकडे बादशहासंबंधी ज्या काही गंभीर बातम्या येत आहेत त्यामुळे त्यांची प्रेमळ मनःस्थिती अगदी विकलित होऊन गेली आहे आणि आग्र्याला येण्याचा त्यांचा उद्देश आपल्या बापाला प्रत्यक्ष डोळ्यांनी बघावे आणि त्याची खरी परिस्थिती काय आहे ते जाणून घेऊन मनाचे समाधान करावे हाच आहे. (**फैयाझ-उल-कवानिन**, ४१८, ४२५; **मासूम**, ४४ अ, ४४ ब).

(३) मुरादबक्ष गुजरातमध्ये स्वतःला राज्याभिषेक करून घेतो

मुरादबक्ष आणि त्याचे व्यक्तिमत्त्व

शहाजहानचा धाकटा मुलगा महमद मुरादबक्ष हा साऱ्या शाहीकुटुंबावर एकाद्या काळ्या डागासारखा होता. शहाजहानने त्याला बाल्ख, दक्षिण आणि गुजरातमध्ये पाठविले होते. पण सर्व ठिकाणी त्याच्या पदरात अपयशच आले. मूर्ख, सुखासीन आणि बेमुर्वतखोर असलेल्या मुरादचे चारित्र्य वाढत्या वयाबरोबर सुधारले नाही. कार्यप्रवण होण्याविषयी तो बेफिकीर राहिला आणि भावनांना लगाम घालण्याचे त्याला कधीच साधले नाही. आणि या सर्वांवर कडी म्हणजे कर्तृत्ववान हस्तक आपले मददगार म्हणून निवडण्याची निसर्गदत्त देणगी त्याला लाभली नव्हती. पण मुरादच्या अंगी जीवावर उदार झालेल्या शिपाईगड्याची हिंमत होती. त्याला शत्रूच्या समोर रणांगणात उभा करा आणि तिमूरच्या लष्करी उत्साहाने त्याच्या धमन्यांतील रक्त सळसळू लागून शत्रूच्या नरडीचा घोट घेण्यासाठी शत्रूला पकडीत धरण्याकरता तो आपल्या शौर्यबलाची पराकाष्ठा करील आणि सभोवार चाललेल्या भयानक रणकुंडात पडणाऱ्या आहुतींनी धुंद होऊन नररुंडाच्या पडणाऱ्या मालिकेत आनंदमदाचा आस्वाद घेत त्याला इतर साऱ्या भावनांचा विसर पडेल. परंतु नेत्याला लागणाऱ्या सेनाचातुर्याच्या अभावी त्याच्या अंगी वसत असलेले शौर्य कुचकामाचे होते.

अलीनकीचा खून

आपल्या मुलाच्या अंगातील दुर्बलता ओळखून असल्याने शहाजहानने त्यावर उपाय म्हणून त्याने

अलीनकी नावाचा एक अतिशय कर्तृत्ववान आणि प्रामाणिक अधिकारी मुरादचा महसूल मंत्री आणि मुख्य सल्लागार म्हणून त्याच्याकडे नियुक्त केला . अलीनकीचा नेकीचा कारभार आणि जागरूक राज्यव्यवस्था यामुळे त्याच्याविरुद्ध मुरादच्या खुषमस्कऱ्यात आणि जानी दोस्तात त्याला अनेक शत्रू निर्माण झाले . त्याचा परिणाम म्हणून द्वेषाला पात्र झालेल्या अलीनकी याच्याविरुद्ध मुरादच्या आवडत्या खोजाने गुप्त कट केला. अलीनकी याच्या हातचे आणि शिक्याचे दाराच्या भूमिकेला पाठिंबा देणारे एक बनावट पत्र तयार करण्यात आले आणि एका बातमीदाराकडे ते देण्यात आले . ह्या पत्राचा खरा कर्ता कोण हे उघडकीस न आणता त्या बातमीदाराने मुरादच्या रस्त्यावरील गस्तगिरांकडून आपल्याला स्वतःला कैद करवून घेतले . या बातमीदाराकडून पकडलेले पत्र उजाडण्याच्या थोड्या अगोदर मुरादकडे आणण्यात आले त्यावेळी तो आपल्या खास बगीच्यामध्ये जल्लोषात दंग होता . रात्रीच्या बेहोषीच्या धुंदीची झापड अजून मुरादच्या डोळ्यावरून उडाली नव्हती. मुराद संतापाने नुसता पेटून गेला आणि त्याने अलीनकी याला आपल्यासमोर फरफटत आणण्यास फर्माविले. संताप शिगेला पोहोचलेल्या अवस्थेत थरथर कापत मुरादने आपला भाला अलीनकीच्या अंगातून आरपार भोसकला आणि तो मोठ्याने ओरडला "हलकटा! अखेर तुझ्यावर मी इतकी मर्जी दाखविल्यानंतर देखील तू हरामखोरी करायची ती केलीसच."

सुरत लुटण्यासाठी मुराद सैन्य पाठवितो

मुराद आता मोठ्या प्रमाणावर फौजेची जमवाजमव करीत होता आणि त्याला पैशाची अतिशय गरज होती. म्हणून त्याने शहाबाजखान नावाच्या खोजाला ६००० फौज आणि युद्धसामग्री देऊन सुरतेच्या संपन्न बंदरातून खंडणी वसूल करण्यासाठी रवाना केले . तटबंदीशिवाय असलेल्या सुरतेचा सहजपणे ताबा घेण्यात येऊन शहराची लुटालुट करण्यात आली . (**ईश्वरदास**, १० ब, ११ अ) शहाबाजखानाने काही डच तंत्रज्ञांच्या मदतीने सुरतेच्या किल्ल्याच्या भिंतीखाली सुरुंग पेरले आणि त्यांपैकी एक उडवून सुरतेच्या किल्ल्यावरील शिबंदींला शरण येण्यास भाग पाडले (२० डिसेंबर). याप्रमाणे सुरतेच्या किल्ल्यावरील सर्व तोफा आणि जमविलेली संपत्ती मुरादच्या ताब्यात आली . त्याशिवाय त्याने सुरतेमधील दोन श्रीमंत व्यापाऱ्यांकडून बळजबरीने पाच लाख रुपयांचे कर्ज घेतले.

दाराविरुद्ध मुरादची औरंगजेबाबरोबर हातमिळवणी

दरम्यान शहाजहानच्या गंभीर आजाराच्या बातम्या मिळाल्यानंतर मुराद आणि औरंगजेब यांनी आपल्या विश्वासू हस्तकांकरवी परस्परांशी गुप्तपणे पत्रव्यवहार चालू केला . त्यांनी शुजाला देखील पत्र लिहून दाराविरुद्ध आपल्याबरोबर सहकार्य करण्याविषयी त्याला आवाहन केले . परंतु एकमेकांपासून दूर अंतरावर असल्याने त्यांच्यामध्ये निश्चित अगर कामचलाऊ अशी तहयोजना होऊ शकली नाही . परंतु मुराद आणि औरंगजेब या दोघांनी परस्पर सहकार्याने केल्या जाणाऱ्या कारवाईची योजना आखली . [मुराद आणि औरंगजेब यांच्यामध्ये झालेल्या कारस्थानाची हकीकत पुढीलप्रमाणे आहे : शहाजहानच्या आजारीपणानंतर तो दुखण्यातून उठल्याची पत्रे येण्याचे दिल्लीहून जेव्हा बंद झाले तेव्हा शहाजहान मेला असावा असे अनुमान मुरादने काढले आणि तो वारसाहक्काच्या लढ्यासाठी सिद्ध झाला . या कामासाठी त्याला दोस्तांची गरज होती आणि त्याच्या इतकाच औरंगजेब दाराचा द्वेष करीत असल्यामुळे दोघांची मैत्री जमण्यास काहीच हरकत नव्हती. २३ डिसेंबर १६५२ मध्ये मुराद आणि औरंगजेब यांची भेट झालेली होती आणि दोघांच्याही मनात दाराविषयीचे कारस्थान डोकावून गेले होते. आता दोघांच्या कारस्थानाला . मूर्त स्वरूप आले . आक्टोबरच्या मध्याला दोघांनी शहाजहानच्या आजारीपणाबद्दल एकमेकांना पत्रे लिहिली . ही पत्रे खासगी जासुदाबरोबर पाठविण्यात आली आणि या जासुदाबरोबर गुप्त असा तोंडी निरोप देण्यात आला . मुरादने १९ आक्टोबर रोजी शुजा याला पत्र लिहिले . याच जासुदाबरोबर औरंगजेबाने शुजाला देण्यासाठी आपले पत्र दिले . (**आदाब–इ–आलमगिरी**, १६९ अ, १६९ ब, १७० ब; **फैयाझ-उल-कवानिन**, ४३३–४३४, ४१७) पत्रव्यवहार जलद व्हावा म्हणून जागोजागी कामगार ठेवण्यात आले . हीच व्यवस्था शुजाबरोबर देखील करण्यात आली. त्याशिवाय प्रत्येकाने आपापले खासगी प्रतिनिधी दुसऱ्याच्या दरबारी पाठविले . (**आदाब** १७१ अ, २०५ अ, २०५ ब; **फैयाझ-उल-कवानिन**, ४२१, ४२२)

अनुक्रमणिका

शुजा हा बऱ्याच दूर असल्याने त्याच्याबरोबर इतकी जलद कारस्थाने झाली नाहीत. परंतु मुराद आणि औरंगजेब यांनी मात्र मिळून कृती करण्याचे ठरविले. मुराद हा औरंगजेबावर संपूर्णतया अवलंबून राहिला . त्याने आपल्या कारस्थानांना धार्मिक स्वरूप दिले आणि इस्लामचा शत्रू म्हणून त्याने दाराचा नाश करण्याची धमकी दिली . दाराचा उल्लेख त्याने 'मुलहीद' असा केला .] सुरुवातीपासूनच मुरादने औरंगजेबाचे मार्गदर्शन स्वीकारण्याची तयारी दाखविली . परंतु मुराद अतिशय अधिऱ्या स्वभावाचा होता . सुरतेला त्याला विजय मिळाला आणि त्याबरोबर त्याने जाहीरपणे मऊव्वाजउद्दीन असा किताब धारण करून स्वतःला राज्याभिषेक करून घेतला (५ डिसेंबर). तत्संबंधित सर्व पत्रव्यवहारांत आपल्याला एकीकडे जाज्वल्य आणि घिसाडघाई वृत्तीच्या मुरादचे दर्शन घडते तर दुसरीकडे धिम्या आणि बिचकत पावले टाकणाऱ्या औरंगजेबाच्या वृत्तीचा अविष्कार प्रत्ययास येतो.

पर्शियाबरोबरील कारस्थाने

मुरादने असे सुचविले की दाराला आपली ताकत संघटित करण्यास अवसर न देता आणि राज्यात दूरवर आणि नजिक असलेल्या अधिकाऱ्यांना आपल्या बाजूस वळविण्याची संधी मिळण्याचे अगोदर सर्व भावांनी दक्षिणेतून चाल करून जावे आणि दारावर हल्ला करावा . औरंगजेबाने मुरादला कोणत्याही तऱ्हेने गोत्यात आणील अशी गोष्ट न करण्याचा अथवा उघड उघड बंडाची निशाणी न पुकारण्याविषयी सबुरीने घेण्यास सुचविले आणि त्याला असे सांगितले की शहाजहान मेला आहे याबाबत त्यांना नक्की खबर कळेतोपर्यंत आपण वाट बघावी , आपण गोंधळून गेलो आहोत असे दाखवावे आणि दाराला मित्रत्वाचा आभास निर्माण करणारी दिखाऊ पत्रे पाठवावीत . [औरंगजेब आणि मुराद यांच्यामधील संबंधाबाबत पुढील हकीकत आणखी प्रकाश टाकते. औरंगजेबाने पुढील काही अटींवर मुरादला मदत करण्याचे मान्य केले होते . पहिली अट अशी होती की आपला शत्रू जो दारा त्याचा नाश करून राज्य दोघांनी वाटून घ्यावयाचे . मुरादच्या विनंतीला बळी पडून औरंगजेबाने त्याला अशा तऱ्हेचे लेखी वचन लिहून दिले . त्यामध्ये मुरादला द्यावयात येणाऱ्या प्रांतांचा समावेश होता . इतकेच नव्हे तर आपण दिलेले वचन पाळू याबद्दल औरंगजेबाने परमेश्वर आणि महमद पैगंबर यांची शपथ देखील घेतली. (या पत्राचा मजकूर **आदाब-इ-आलमगिरी**, ७८ ब, ७९ अ आणि **तजकिरात उस् सलातिन उस् चगताईआ** या ग्रंथांमध्ये पूर्णतया आलेला आहे.) औरंगजेबाचा खासगी कारभारी अकीलखान राजी हा देखील आपल्याला या मैत्रीच्या तहाबाबतची काही हकीकत देतो . तो असे म्हणतो की मुरादबरोबर यावेळी एकी करणे हे मुत्सद्देगिरीचे आहे असा विचार करून त्याने त्याला एक स्नेहपूर्ण पत्र पाठविले आणि जी लूट मिळेल तिचा तिसरा हिस्सा व पंजाब , अफगाणिस्तान, काश्मीर आणि सिंध हे प्रांत देण्याचे कबूल केले आणि त्या ठिकाणी आपल्या नावाने नाणी पाडण्याचा व खुत्बा पठण करण्याचा मुरादचा अधिकार मान्य केला . (**अकीलखान**, २५). औरंगजेबाने आपल्याला येऊन मिळावे याबद्दलची मुरादची उत्कंठा पराकोटीला गेली होती , ती अखेर पूर्ण झाली होती . १६५८ च्या फेब्रुवारी महिन्यात औरंगजेबाने औरंगबादहून कूच केले आणि मुरादला नर्मदेच्या किनाऱ्यावर तो पोहोचण्याचे सुमारास येण्याबद्दल कळविले . (**आलमगीरनामा**, ४३; **फैयाझ**, ४३०). आपण कोणता मार्ग घ्यावा याबद्दल मुरादची मनःस्थिती द्विधा होती . परंतु जसवंतसिंग तीन -चार हजार फौज घेऊन उज्जैन येथे आल्याचे कळताच मुरादने २५ फेब्रुवारीला अहमदाबादेहून कूच केले . ४ एप्रिल रोजी तो दोहद येथे होता . परंतु जसवंतसिंगाबरोबर बरीच फौज आहे हे कळल्यामुळे आणि औरंगजेबाची काहीच खबर न कळल्यामुळे त्याने आपल्या प्रांताकडे माघार घेतली . (**फैयाझ**, ४४५; **कम्बू**, ११ अ). दरम्यान जसवंतसिंगाने काचराऊड येथे आपली छावणी दिली . मुराद तेथून ३६ मैलांवर होता . परंतु जसवंतच्या ताकदीचा अंदाज आल्याने त्याने औरंगजेब ज्या दिशेने आगेकूच करीत होता त्या दिशेने कूच करून मंडळपूर येथे आपला तळ ठोकला . (**ईश्वरदास**, १७ अ; **आलमगीर-नामा**, ५६–५७; **अकीलखान**, २२). येथे १३ एप्रिल रोजी औरंगजेबाकडून त्याच्याकडे एक गुप्त बातमीदार आला आणि त्याने औरंगजेब नजीक आल्याची खबर दिली . त्यावर मुरादने कूच केले आणि तो दिपालपूरपासून काही मैलांवर औरंगजेबाला जाऊन मिळाला . दोन्ही भावांच्या फौजा आता एकत्र झाल्या होत्या .] औरंगजेबाने मुरादला अशीही सूचना केली की , त्यावेळी मोगल साम्राज्यांतर्गत अमलेल्या अफगाणिस्तानवर हल्ला करण्याची पर्शियन आणि उझबेक लोकांना चिथावणी देऊन दाराचे लक्ष दुसरीकडे वेधण्याचाही प्रयत्न करावा. साहजिकच मुरादने पर्शियाच्या बादशहाला पत्र लिहून शहाजहान बादशहा मृत झाल्याच्या अफवा त्याला कळविल्या. आणि त्याच्याकडून सशस्त्र मदतीची याचना केली . इराणच्या बादशहाच्या मनात काही काळ थांबून या बातमीची शहानिशा करावी असे होते.

औरंगजेबाचे जागरूक धोरण आणि मुरादची उतावळी घाई

मुराद आणि औरंगजेब यांमधील समझोता

औरंगजेबाने खालील अटीवर कुराणावर शपथपूर्वक हात ठेवून साम्राज्याची वाटणी करणारा दोहो पक्षांवर बंधनपूर्वक असा करार तयार केला आणि तो मुरादकडे पाठविला :

(१) मुरादने पंजाब, अफगाणिस्तान, काश्मीर आणि सिंध या प्रांतांवर आपला ताबा बसवून स्वतंत्र बादशहाप्रमाणे त्यांच्यावर राज्य चालवावे. उरलेले मोगल साम्राज्य औरंगजेबाच्या मालकीचे व्हावे.

(२) लढाईत मिळणाऱ्या लुटीचा तिसरा हिस्सा मुरादकडे जावा आणि उरलेला औरंगजेबाकडे जावा. [या अटी स्पष्टपणे औरंगजेबाच्या स्वतःच्या पत्रव्यवहारात, (**आदाब-इ-आलमगिरी**, पान ७८), त्याचा अधिकारी अकीलखान राजी याच्या इतिहासात आणि **तजकिरात उस सलातिन उस चगताईआ** यामध्ये आढळतात. त्यामुळे बर्नियरने दिलेल वृत्तान्त म्हणजे औरंगजेबाने सारे साम्राज्य मुरादला देण्याचे वचन दिले आणि काफर दारा याचा पाडाव केल्यावर मग मक्केला दरवेश (हजरातजी) म्हणून स्वतः जाण्याची इच्छा प्रकट केली हा किती धादांत खोटा होता हे कळून येते.]

मुराद गुजरातेतून कूच करून औरंगजेबाला मिळतो

यानंतर आपली तयारी पूर्ण झाल्यावर २५ फेब्रुवारी १६५८ रोजी मुरादने अहमदाबाद सोडले आणि १४ एप्रिल रोजी औरंगजेबाच्या माळव्यामधील दिपालपूर येथे असलेल्या फौजेला तो येऊन मिळाला.

४) वारसाहक्काचे युद्ध सुरू होण्याच्या सुमारास औरंगजेबाची मनःस्थिती आणि धोरण

औरंगजेबाचे दक्षिणेतून कूच

४ आक्टोबर १६५७ रोजी विजापूरबरोबरच्या युद्धातून अंग काढून घेतल्यावर तो २५ जानेवारी १६५८ पर्यंत म्हणजे सिंहासनावर आपला अधिकार सांगून हिंदुस्थानच्या दिशेने कूच करण्यास सुरुवात करीपावेतो औरंगजेबाला संत्रस्त आणि काळजीने पिडलेल्या मनःस्थितीत दिवस घालवावे लागले . ज्या गोष्टीवर त्याचा ताबा चालू शकला नसता अशा गोष्टी झपाट्याने घडून येऊ लागल्या.

त्याची मनःस्थिती दिवसेंदिवस अधिकाधिक नाजूक बनत चालली तर भविष्यकाळाचे चित्र विदारक होते. परंतु मोठमोठ्या आणि कठीणतम अडचणींना त्याने ज्या पद्धतीने तोंड दिले त्यामुळे त्याचा धीमेपणा, त्याचे चातुर्य , आपल्या हाताखालच्या लोकांना काबूत ठेवण्याची कुवत आणि त्याचे मुत्सद्देगिरीतील कौशल्य याविषयी आपल्या मनातील त्याच्याविषयीच्या प्रशंसेची भावना पराकोटीची मर्यादा गाठते.

सिंहासन की विजापूरच्या युद्धाचा लाभ उठवणे याबाबत औरंगजेबाची द्विधा मनःस्थिती

बादशहाने तह केला जावा यासंबंधी हुकूम सोडल्याची आणि दक्षिणेमध्ये अधिक पाठविलेली फौज परत बोलाविल्याची अशी बातमी फैलावली होती . अशा तऱ्हेने विजापूरबरोबर लांबवर रेंगाळलेला आणि खर्चिक असा भयंकर रणसंग्राम केल्यानंतर त्याच्या प्रयत्नांना मिळणारी फळे चाखण्याच्या तो बेतात असताना औरंगजेबाच्या तोंडून ती हिसकावून घेण्याचा कठोर काळाने डाव टाकला. तेव्हा विजापूरकरांच्या

नुकत्याच झालेल्या पराभवातून त्यांनी डोके वर काढण्याच्या अगोदर किंवा शाही सरकारची दुर्बलता आणि निर्माण झालेली गोंधळाची परिस्थिती यांची त्यांना पूर्ण जाणीव होण्याचे अगोदर तहाच्या अटींचे पुरेपूर माप पदरात पाडून घेण्यासाठी औरंगजेबाने एका धाडसी क्लुप्तीचा अवलंब करण्याचा निश्चय केला.

परंतु विजापूरकरांना परत पलटी खाऊन तोंड देणे आणि दक्षिणेत लष्करी सामर्थ्याचे प्रदर्शन करण्याच्या धोरणात आपल्यापरीने काही दोष होते . सिंहासनावर आपला हक्क सांगणाऱ्या योजना पूर्णत्वास नेण्यासाठी औरंगजेबाकडून जितका विलंब लागणार होता किंवा आपण सिंहासनाचे वारस आहोत हे जाहीर करण्यास आणि त्याप्रमाणे हिंदुस्थानवर चाल करून जाण्यात जितका काळाचा अपव्यय होणार होता त्याप्रमाणात दक्षिणेतील मुख्य मुख्य अधिकाऱ्यांना परत बोलाविण्यास , लांबवर आणि नजीक अधिकारावर असलेल्या व्यक्तींस आणि अधिकारी वर्गास आपल्या बाजूस वळवून घेण्यात आणि त्याप्रमाणात आपली बाजू अधिक बळकट करण्यात आणि सरतेशेवटी औरंगजेबाचे जे काही बेत असतील त्यांना प्रखरपणे तोंड देण्याची सिद्धता करण्यास दाराला अधिक वेळ मिळणार होता . याउलट औरंगजेबाने आपल्या फौजा एकत्रित केल्यास , जाहीरपणे आपला सिंहासनावर अधिकार सांगितल्यास , उत्तरेकडे कूच करून आणि उघडउघड शाही सरकारबरोबर संबंध तोडून स्वतंत्रपणे फौजेची भरती केल्यास दाराला वेळेवर आळा घालण्यात आणि महत्त्वाकांक्षी शिलेदारास आपल्याशी एकनिष्ठ ठेवण्यात त्याला यश मिळाले असते. पण त्याबरोबर परेंडा ताब्यात मिळण्याची किंवा तहाप्रमाणे ठरलेली खंडणी मिळण्याची आशा विलयाला गेली असती , त्याच्या दक्षिणेमधल्या इतर शत्रूंनी डोके वर काढले असते आणि गेली दोन वर्षे त्याने दक्षिणेत जो लढा दिला होता तो पूर्णपणे निरर्थक ठरला असता.

औरंगजेबाच्या आदाब-इ-आलमगिरीमध्ये असलेल्या पत्रात विजापूरबरोबर जलद समझोता होईल ही आशा दिवसेंदिवस कशी अंधुक अंधुक होत चालली होती , औरंगजेबाने तहात ठरल्याप्रमाणे प्रदेश आणि खंडणी मिळविण्यासाठी निरनिराळ्या मार्गांचा अवलंब कसा केला , तहाप्रमाणे विजापूरकरांवर लादलेल्या कडक अटी त्याने एकापाठीमागून एक कशा ढिल्या केल्या आणि अखेर विजापूरकरांपासून काही लभ्यांश पदरात पडण्याची आशा पूर्णपणे विलयाला गेल्यानंतर त्याने दक्षिणेचा नाद पूर्णपणे कसा सोडून दिला आणि आपल्या उत्तर हिंदुस्थानातील योजना पूर्ण पाडण्याकडे त्याने आपल्या पूर्णशक्ती आणि अविचलित लक्ष कसे केन्द्रीत केले याचे सम्यक दर्शन आपल्याला मिळते.

औरंगजेब कल्याणी आणि बिदरहून औरंगाबादकडे माघार घेतो

औरंगजेबाने कल्याणी ४ ऑक्टोबर १६५७ ला सोडली आणि तो पाच दिवसांत बिदरला पोहोचला . या किल्ल्याची डागडुजी करण्यात आली आणि त्यात योग्य ती शिधासामग्री आणि फौजफाटा ठेवण्यात आला. १८ ऑक्टोबरला त्याने पुन्हा आपली परत माघार सुरू केली आणि ११ नोव्हेंबरला तो औरंगाबादला पोहोचला. औरंगजेबाने बिदर सोडल्याबरोबर दक्षिणी राज्यांत आनंदाची एकच लाट पसरली . या ठिकाणी आपले चालणार नाही म्हणून नुकताच काबीज केलेला मुलूख मोगल खाली करत असल्याचा हा देखावा विपरीत होता . २८ सप्टेंबरला त्याने तहात ठरल्याप्रमाणे परेंडा किल्ल्याचा ताबा घेण्यासाठी मिर जुम्ला याला परेंडा जिल्ह्यात पाठविले होते . परंतु मिर जुम्ला याचे सर्व प्रयत्न चालू असतानादेखील परेंडा किल्ला आणि विजापूरकरांकडून मिळणाऱ्या खंडणीच्या रकमेची आशा दिवसेंदिवस अस्तंगत होत चालली आणि अखेर निरुत्साह झालेला मिर जुम्ला औरंगाबाद येथे परतला (१ जानेवारी १६५८)

अनुक्रमणिका

त्याअगोदरच २८ ऑक्टोबरला औरंगजेबाने दारा आणि दक्षिणेतील इतर बादशाही अधिकारी याच्यांमधील पत्रव्यवहाराला आळा घालण्यासाठी अत्यंत जरुरीची अशी उपाययोजना म्हणजे नर्मदेवरील ने-आण करणाऱ्या तराफ्यांना एक सेनापथक पाठवून आपल्या ताब्यात घेऊन केली होती. परंतु आता त्याने आपली पावले पुढे कशाप्रकारे टाकावयाची हा प्रश्न होता. त्याने आपले धोरण उघडपणे जाहीर करावे या अपेक्षेने त्याचे अनुयायी त्याच्याकडून प्रतीक्षा करीत होते. परंतु सद्यःपरिस्थितीत निर्णय घेणे हे अतिशय कठीण आणि अतिशय धोकादायक असे होते. शाही दरबारातून परस्पर विरोधी बातम्या येत होत्या. शहाजहानची प्रत्यक्षात परिस्थिती काय आहे हे निश्चितपणे समजून येत नव्हते. त्यामुळे औरंगजेबाचे त्यानंतरचे काही आठवडे अगदी विभ्रांत अशा मनःस्थितीत गेले. त्याच्याप्रमाणेच त्याच्या अनुयायाचींही गत झाली.

शहाजहानच्या परिस्थितीबद्दल औरंगजेब संभ्रमित अवस्थेत

शहाजहान हा खरोखरीच मरण पावला आहे याची निश्चित खातरजमा झाल्याखेरीज बंडाचे निशाण उभारावयाचे नाही असे औरंगजेबाने पहिल्यापासूनच ठरविले होते. परंतु परिस्थितीचा बनावच असा घडून येत गेला की त्याला त्याच्या अनपेक्षित अशी पावले टाकावी लागली. दक्षिणेच्या संबंधात दाराची काय योजना होती हे आता उघडपणे जाहीर झाले होते. अगतिक झालेल्या शहाजहानला त्याने गुजरातच्या सुभेदारीवरून मुरादला काढावयास आणि दोघा भावांमध्ये कलहाची बीजे पेरावी म्हणून बिहारचा सुभा औरंगजेबाकडून मुरादकडे सोपवावयास भाग पाडले होते. त्याशिवाय दक्षिणेत आपल्या दोन्ही भावांविरुद्ध त्याने डिसेंबर सरतासरता दोन सेनाविभाग रवाना केले होते आणि औरंगजेबाचा कट्टर पुरस्कर्ता शायस्ताखान याला माळव्यातून दरबारात येण्याचा आदेश दिला होता, तर इकडे औरंगजेबाच्या बाजूकडील मिर जुम्ला याला परत फिरण्याचे शाही फर्मान गेले होते आणि ह्या फर्मानाप्रमाणे न वागणे म्हणजे उघडउघड बंद केल्याप्रमाणे होणार होते. अशाच तऱ्हेची पत्र औरंगजेबाच्या इतर अधिकाऱ्यांकडे पोहोचली. [औरंगजेबाने दक्षिणेमधून १६५८ च्या जानेवारी महिन्यात कूच केल्यानंतरच्या घटनांची सविस्तर हकीकत पुढीलप्रमाणे आहे: हा काळ औरंगजेबाच्या दृष्टीने अतिशय चिंतेचा असा गेला. परिस्थिती झपाट्याने बदलत होती आणि त्याबरोबर बदलणे औरंगजेबाला भाग पडणार होते. परिस्थिती इतकी भयानक होती की योग्य निर्णय घेणे कठीण होते. या सर्वांमधून औरंगजेब ताऊनसुलाखून पार पडला. प्रत्येक बाजूने त्याच्यावर संकट आले. विजापूरकरांशी तह करावा अशी बादशहाची आज्ञा झाल्याची बातमी बाहेर फुटली होती. साहजिकच विजापूरकरांना ताकदीच्या जोरावर वठणीवर आणून पाहिजेल ते पदरात पाडून घेणे त्याला शक्य नव्हते. अशा परिस्थितीत औरंगजेबाने एक अतिशय धाडसी डाव खेळण्याचे ठरविले. पहिल्या प्रथम त्याने असे जाहीर केले की आपण बिदर येथे राहून विजापूरकरांनी आपला शब्द मोडल्यास त्यांना शासन करू. नंतर त्याने आपल्या मुलाला अहमदनगरकडे परेंड्याचा किल्लेदार प्रतिकार करीत होता त्याला दहशत बसविण्यासाठी म्हणून रवाना केले. विजापूरलाही त्याने दमदाटी केली. परंतु असे करण्यात देखील एक धोका होता. कारण जितका वेळ औरंगजेबाने दक्षिणेत घालविला असता तितकी दाराला आपली पकड मजबूत करण्याची संधी मिळाली असती. त्याचप्रमाणे औरंगजेबाची ढिलाई बघितल्यानंतर अनेक स्वार्थी आणि महत्त्वाकांक्षी व्यक्ती दाराला जाऊन मिळाल्या असत्या. (**आदाब**, ९४ अ.)

याउलट जर औरंगजेबाने सिंहासनावरील आपला अधिकार उघडरित्या जाहीर केला असता तरी ही शक्यता होती की त्यामुळे दाराला प्रतिबंध बसला असता आणि औरंगजेबाला अनेक महत्त्वाकांक्षी माणसे येऊन मिळाली असती. अर्थात शहाजहानची अगतिक परिस्थिती, राजपुत्रांची आपापसांतील भांडणे यामुळे विजापूरकरांचे मात्र फावले असते, आणि त्याच्या दक्षिणेतील इतर शत्रूंनी डोके वर काढले असते. सारांश औरंगजेबाचा असा बेत होता की विजापूरबरोबरील तह साधावा, दक्षिणेची बाजू सुरक्षित करावी आणि मग उत्तरेकडे कूच करावे. औरंगजेबाचे हे बेत कसे फसत गेले आणि त्याला विजापूरकरांच्या सर्व अटी मान्य करून उत्तरेकडे कसे कूच करावे लागले याची सर्व हकीकत त्याने मिर जुम्ला याला लिहिलेल्या अनेक खासगी पत्रात आलेली आहे. (**आदाब** ९२ अ – ९५ अ, १९७ अ – २०६ अ, १७८ ब.) त्यानुसार २८ सप्टेंबर रोजी औरंगजेबाने मिर जुम्ला याला परेंड्याचा ताबा घेण्यासाठी पाठविले. त्या अगोदर त्याने मिर जुम्ला याच्याबरोबर परिस्थितीची साधक-बाधक चर्चा केली. मिर जुम्ला याने कूच केल्यावर त्याला तो दररोज पत्र रवाना करीत असे. औरंगजेबाने त्याला असे लिहीले की तुझ्याशिवाय माझा कोणीही मित्र अगर विश्वासातील नाही.

४ आक्टोबरला औरंगजेबाने बिदरच्या दिशेने कूच केले. शहाजहानच्या हुकमाप्रमाणे त्याने येथे राहून जिंकलेला मुलुख ताब्यात ठेवावयाचा होता. दरम्यान शहाजहानच्या हुकमाप्रमाणे मोठमोठे अधिकारी दिल्ली येथे निघून गेले होते. विजापूरच्या फौजा मोगल सैन्यावर हल्ले

अनुक्रमणिका

करू लागल्या. त्याचप्रमाणे विजापूरकरांच्या हाती शहाजहानची चिंताजनक प्रकृती आणि भावाभावांमधील कलह याची माहिती देणारे औरंगजेबाने मिरजुम्ला याला पाठविलेले पत्र मिळाले (**कम्बू**, ६ ब; **आदाब**, १९७ अ, २०३ अ, १४९ ब, १५७ ब; **अकीलखान**, १६.) अशा परिस्थितीत त्याने मोठ्या चातुर्याने आणि शहाणपणाने भविष्यकाळाची तरतूद केली. बिदरच्या किल्ल्याची त्याने मजबुती केली. त्याचप्रमाणे दाराविरुद्ध चढाई करावी अशा अर्थाचे पत्र त्याने मुरादकडे आपला खासगी अधिकारी अल्लायार याजबरोबर पाठविले. तारीख १७ रोजी दिल्ली येथून दरबारातील परिस्थितीने वेगळे वळण घेतल्या संबंधीचे पत्र त्याच्या हाती आले. त्यामुळे औरंगजेबाने आपल्या मनाचा निश्चय केला आणि १८ आक्टोबर १६५७ रोजी त्याने बिदर सोडले (**आदाब**, ९२ ब, १६९ अ, १६९ ब, १९९ अ; **कंम्बू**, ६ ब.) या घटनेमुळे दक्षिणेत आनंदाची लाट उसळली; सारांश दक्षिणेतील त्याच्या शत्रूंनी उचल खाल्ली असताना आणि उत्तरेत त्याच्याविरुद्ध कारस्थान चाललेले असताना औरंगजेबावर आणखी एक प्रसंग गुदरला. तो म्हणजे बिदर सोडल्यानंतर एकाच दिवसाने त्याची पत्नी दिलरसबानू हिचा झालेला मृत्यू. बिदर सोडून औरंगाबाद येथे जाण्यासाठी औरंगजेबाला निमित्त मिळालेले होते. बिदर सोडल्यानंतर काही आठवडे त्याने बादशहाला पत्रच लिहिले नाही. (**आदाब** १९८ अ, १९८ ब.) मुराद आणि शुजा यांच्याबरोबर मात्र त्याचा पत्र व्यवहार चालू राहिला. एका पत्रात त्याने यापुढे असेपत्र व्यवहार करताना कोणती गुप्त लिपी वापरावयाची हेही मुरादला कळविले. (**आदाब**, १६९ अ – १७० अ, **औरंगजेबाकडून मुरादला**; १७० अ–१७१ अ, **शुजाला; मुरादकडून औरंगजेबाला-फैय्याझ** ४१३–४३५.,) बिदर सोडल्यानंतर औरंगजेबाचा विचार पाथ्री येथे जाण्याचा होता. तेथे शहाजहानच्या मृत्यूची बातमी त्याच्या कानावर पडल्यास तो उत्तरेकडे जाणार होता नाहीतर औरंगाबादकडे. (**आदाब**, १९८ अ,) परंतु दिल्लीहून निश्चित अशी बातमी त्याला कळली नाही त्यामुळे त्याचा हा कालावधी सचिंत अवस्थेतच गेला. दिल्लीहून नंतर येणाऱ्या बातम्या ह्या परस्परविरोधी होत्या. एका पत्रात दाराचे प्राबल्य वाढल्याची बातमी आली. याचा अर्थ असा की, बादशहाचा मृत्यू तरी झाला आहे किंवा तो हतबल तरी झाला आहे. (**आदाब**, १९९ अ, २०० ब, १६९ ब.)

ही परिस्थिती बघितल्यानंतर औरंगजेबाने असे ठरविले की, आपल्या मुलाला बुरहाणपूर येथे पाठवून दक्षिणेतून दिल्लीकडे जाणाऱ्या मोगल सरदारांचा मार्ग बंद करावा. परंतु असे करणे म्हणजे उघड उघड बंड करण्यासारखे होते. मिर जुम्ला याने आपले मत विरुद्ध बाजूने दिले. इतकेच नव्हे तर त्याने परेंडा किल्ला घेण्याचा सल्ला दिला. परंतु शांततेच्या मार्गाने किंवा दमदाटी करून परेंडा मिळणार नाही असे औरंगजेबाने मिर जुम्ला याला कळविले. त्याप्रमाणे किल्लेदाराला वश करण्याचे व आपल्या सामर्थ्याचे प्रदर्शन करून किल्ला घेण्याचे मिर जुम्ला याच्या सांगण्यावरून औरंगजेबाने केलेले सर्व प्रयत्न फसले. कारण शहाजहानच्या आजारीपणाची बातमी विजापूरकडे पसरली आणि त्यांना खात्री होती की, परेंडा किल्ला लढाई करून घेण्याचे सामर्थ्य औरंगजेबामध्ये नाही. इतके असूनदेखील औरंगजेबाने मिर जुम्ला याला परेंडा घेण्याचा प्रयत्न करण्यास मुभा दिली. परंतु औरंगजेबाच्या पदरी निराशा पडली. तेव्हां औरंगजेबाने विजापूरकरांबरोबर शांततेचा तह करण्याचे ठरविले. तरी देखील मिर जुम्ला याने तीन महिने परेंड्याच्या आसपास रेंगाळत काढले. अखेर बादशहाकडून बोलावणे आल्यामुळे त्याने बिदरहून कूच केले आणि तो १ जानेवारी १६५८ रोजी औरंगाबाद येथे पोहोचला. (**आदाब**, २०२ ब, ९४ ब.) दरम्यान औरंगजेबाने दारा आणि दक्षिणेतील मोगल सरदार यांच्यामध्ये पत्र व्यवहार होणार नाही अशी व्यवस्था केली होती. आम्याला जाण्याचा मार्ग ज्या राजांच्या राज्यांतून होता त्यांना त्याने मित्रत्वाची पत्रे लिहिली. त्याच्या छावणीत दाराशी पत्र व्यवहार करणारे जे होते त्यांना त्याने कडक शिक्षा केली. प्रश्न असा होता की, औरंगजेब आता कोणत्या धोरणाचा स्वीकार करणार होता. जलद निर्णय घेणे जरूर होते. वर सांगितल्याप्रमाणे दिल्लीहून येणाऱ्या परस्परविरोधी बातम्यांनी त्याचे मन विचलीत झालेले होते. त्याच्या अनुयायांची मनःस्थिती त्याच्यासारखीच झाली होती. मिरजुम्ला याला तो कळवतो की, बादशहाच्या आजारीपणामुळे सेनाधिकाऱ्यांची मने चलबिचल होत आहेत. माझ्या अनेक अधिकाऱ्यांना बादशहाकडे जावेसे वाटत आहे. (**आदाब**, ९३ ब.) जेव्हा डिसेंबरमध्ये मिर जुम्ला याला शहाजहानकडून परतण्याचा हुकूम आला तेव्हा औरंगजेबाचा धीर सुटला. मुरादकडूनही औरंगजेबाला काहीतरी कृती करण्याबद्दल पत्रावर पत्रे येत होती. परंतु बादशहा गेला आहे हे निश्चित कळल्याखेरीज कृती करण्यास औरंगजेबाची तयारी नव्हती. त्याचप्रमाणे दारा एखाद्या भावावर हल्ला करून आपल्याला संधी देईल, याचीही वाट तो पाहात असावा. (**अनेक्डोट्स् ऑफ औरंगजेब** ६; **आदाब**, २०५ अ).

परंतु यानंतर घटना इतक्या झपाट्याने होत गेल्या की औरंगजेबाला काहीतरी कृती करणे भाग पडले. २४ नोव्हेंबरला त्याला कळले की दाराने शुजा विरुद्ध फौज रवाना केली आहे. साहजिकच दक्षिणेबाबत त्याची योजना काय असावी याची औरंगजेबाला जाणीव झाली. दाराचा बेत मुराद आणि औरंगजेब यांच्यामध्ये शत्रुत्व निर्माण करण्याचा उघडउघड होता. यासाठी त्याने मुरादची बदली शहाजहान करवी गुजराथेतून वऱ्हाडमध्ये करवली. परंतु मुरादने याला दाद दिली नाही. या घटना यापूर्वी सविस्तर दिल्या आहेतच. अशा परिस्थितीत काहीही कृती न करणे म्हणजेच सिंहासनावर पाणी सोडण्यासारखे होते. परिणामी काय करावयाचे याचा निर्णय औरंगजेबाने ताबडतोब घेतला. त्याने मिर जुम्ला याला स्तुतीने ओतःप्रोत भरलेले असे पत्र लिहिले. जानेवारी १६५८ मध्ये मिर जुम्ला जेव्हा औरंगजेबाकडे आला तेव्हा पुढे काय करावयाचे या संबंधी दोघांचा कट शिजला होता. मिर जुम्ला याने आग्रा येथे बादशहाला भेटण्यासाठी आपण जात आहोत असे कळविले. औरंगजेबाबद्दल आपल्या मनात भीती वाटत असल्याची त्याने बतावणी केली. ठरल्याप्रमाणे औरंगजेबाने अशी भीती न बाळगण्याबद्दल मिर जुम्ला याला राजपुत्र महमद सुलतान याच्या हस्ते पत्र पाठवून कळविले आणि आपल्या भेटीस येण्याबद्दल त्याला निरोप दिला. मिर जुम्ला हा भेटीस येताच त्याला औरंगजेबाने कैद केले आणि त्याची सर्व मालमत्ता जप्त केली. (**कम्बू**, १० ब; **अकीलखान** २०; **आलमगीरनामा** ८३, ८४.) याचे कारण मात्र त्याने असे दिले की, विजापूर घेण्यात मिर जुम्ला याने कुचराई केल्यामुळे त्यास कैद करण्यात आले आहे. अर्थात जेव्हा औरंगजेब हा बादशहा झाला तेव्हा त्याने मिर जुम्ला याची सुटका केली आणि त्याला खान-इ-खानात आणि याद-इ-वफादार हे किताब देऊन त्याचा सन्मान केला. (**आदाब**, ९६ अ; **आलमगिरनामा** १९१, ५६३.) वरील घटना घडून आल्यानंतर देखील औरंगजेबाने उघडउघड बंडाचा पुकारा केला नाही तर आपण आपल्या आजारी वडिलांस पाहण्यासाठी आग्रा येथे जात आहो असे त्याने जाहीर केले. तसे त्याने शहाजहान आणि वजीर जफरखान यांना कळविले (**आलमगीरनामा** ४१; **कम्बू**, ११ अ; **अे. एस. बी.** एम्. एस्. फोलिओ ५६, पाने ५४–५७; **मासूम**, ४४ अ–४५ अ; **फैय्याझ**, ४६६, ४६७.) दरम्यान त्याने आपली लष्करी सिद्धता जोरदारपणे चालविली होती. दक्षिणेचा प्रश्न मिटविण्याचेही त्याचे प्रयत्न चाललेले होते. गोवळकोंड्याच्या अबदुल्ला कुतुबशहा याला त्याने खंडणी न दिल्याबद्दल आणि कर्नाटकात आपले अधिकारी पाठविल्याबद्दल धारेवर धरले होते. याबाबत जेव्हा अबदुल्लाने त्याची मनधरणी करण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याने त्याला जहानआरा आणि दारा यांचे पाय धरण्यास सांगितले (**आदाब**, ५९ अ, ६३ ब, ६९ अ–७० अ.) कुतुबशहाच्या दरबारी त्याने मिर अहमद सैद या उद्धट अधिकाऱ्याची वकील म्हणून रवानगी केली. कालांतराने जेव्हा औरंगजेबाच्या फौजा उत्तरेची वाट चालू लागल्या तेव्हा मात्र त्याच्या धोरणात बदल झाला आणि अखेर त्याने कुतुबशहाला पत्र लिहून मोगल कर्नाटकच्या सीमा सुरक्षित ठेवण्याबद्दल

अनुक्रमणिका

त्याला कळविले. (**आदाब**, ६४ ब, ७१ ब, ६५ अ, ६५ ब, ७२ अ.) विजापूरच्या राजमातेलाही त्याने लिहिले की दक्षिणी सुलतान आपला शब्द पाळतील आणि त्यांनी तसे केल्यास मी बादशहा झाल्यावर त्याचे योग्य ते चीज करीन (**आदाब**, ५१ अ–५२ ब.) विजापूरच्या सुलतानाला त्याने कळविले की परेंड्याचा किल्ला, कोकण आणि वांगी महाल हे बादशाही मुलखात सामील करण्यात आलेले प्रदेश तुमच्याकडे परतसुपूर्द करण्यात येत आहेत आणि तुमच्या १ कोट खंडणीपैकी ३० लक्ष रुपये कमी करण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे शिवाजीला शासन करण्याबद्दलही त्याने आदिलशहाला लिहिले आणि तुमच्या शत्रूंना मी आपल्या चाकरीत घेणार नाही हेही औरंगजेबाने आदिलशहाला कळविले (संपूर्ण पत्रासाठी पाहा : **आदाब**, १६२ अ–१६३ ब.) परिणामी दक्षिणी सुलतानांकडून औरंगजेबाच्या पदरात काही खंडणी पडली तिचा उपयोग त्याने आपली लष्करी सिद्धता वाढविण्यासाठी केला. (**आदाब**, १९५ ब; **वारिस**, १२१ ब.) मिर जुम्ला याचा सर्वोत्कृष्ट तोफखाना यावेळी औरंगजेबाच्या अतिशय उपयोगी आला.

उत्तरेकडे कूच करताना औरंगजेबाने दरबारी मंडळी आणि प्रांतिक सुभेदार यांजबरोबर कारस्थाने चालू ठेवली. औरंगजेबाची खरी योग्यता ज्याना माहिती होती ते आपला स्वार्थ साधण्यासाठी औरंगजेबाला सर्वतोपरी साहाय्य करण्याचे वचन देते झाले. या गोष्टीची जाणीव खुद्द दाराने शहाजहानला एका पत्रात दिलेली आपल्याला आढळते. (**रुक्कात-इ-आलमगिरी**, नं. ५४, ५५ **इंडिया ऑफिस पर्शियन** एम्. एस्. ३७० आणि फोलिओ ८१ अ; **कम्बू**, ८ ब, १० अ; **अकीलखान**, २३.) ह्या कालावधीचा उपयोग औरंगजेबाने मनुष्यबळ आणि युद्धसामुग्री जमा करण्यात केला. औरंजेबाजवळील निवडक सैन्याची संख्या ३०,००० पेक्षा अधिक झाली आणि मिर जुम्लाच्या इंग्लिश आणि फ्रेंच गोलंदाजांनी युक्त असलेल्या तोफखान्यामुळे त्याचे बळ अधिकच वाढले (**आदाब**, ९३ ब, १६८ ब–१६९ अ; **ईश्वरदास**, १६ अ; **अकीलखान**, २५; **कम्बू**, ११ ब; **ए. एन.** ४२.) या सैन्याबरोबर औरंगजेबाने उत्कृष्ट आणि विश्वासू अधिकाऱ्यांचा एक संच दक्षिणेत जमा केला होता. यांच्यापैकी काहीजणांची नावे पुढीलप्रमाणे होती : मुर्शिद कुलीखान, शेख मिर, अकीलखान राजी, काबीलखान-इ-जमात, महमद ताहिर, इसा बेग ऊर्फ मुखलीसखान, शमसुद्दीन मुख्तारखान, नसिरीखान, राजा इन्द्रद्युम्न, राव कर्ण, शुभकर्ण वगैरे. उत्तरेकडे कूच करण्याचा बेत झाल्यावर त्याने दक्षिणेच्या बंदोबस्तासाठी शहाबेगखान, राजपुत्र मुआज्जम आणि महमद अकबर यांना भरपूर सैन्य देऊन ठेवले. यासाठी त्याने द्रव्याची तरतूद केली (**आदाब**, २०१ अ, १६८ ब, ९२ अ, १२३ अ; **ए. एन.** ४३–४६, **दिलकुषा**, १८–२१.)

मुरादबक्ष याने स्वतःला करून घेतलेला राज्याभिषेक आणि मिर जुम्ला याची कैद यावर शहाजहानने आपल्या दोन्ही मुलांना आपापल्या प्रांताकडे निघून जाण्यास व शाही आज्ञांचे पालन करण्याविषयी फर्माविले. पण राजपुत्रांनी तिकडे दुर्लक्ष केले आणि बापाला भेटण्याविषयी आपला आग्र्याला जाण्याचा बेत जाहीर केला. २५ जानेवारीला औरंगजेबाने आपल्या मोठ्या मुलाला बुरहाणपुरकडे पाठविले आणि त्याने स्वतः ५ फेब्रुवारीला औरंगाबाद सोडले. याबरोबरच त्याने स्वतःच्या अधिकारात मनसबी पदव्या वगैरे देण्यास सुरुवात केली. (**ए. एन्.** ४२–४६; **अकीलखान**, २४–२६; **कम्बू**, १० ब; **मासूम**, ४२ ब–४५ अ.) १८ फेब्रुवारीला औरंगजेब बुरहाणपुरला पोहोचला. तेथे त्याने १ महिना मुक्काम केला. येथे त्याला दरबारातील खरी बातमी त्याचा प्रतिनिधी इसाबेग याने दिली. त्याच्याकडून त्याला कळले की शहाजहान हा दारावर पूर्णपणे अवलंबून असून दाराने स्वतःकडे बादशहाचे अधिकार घेतले आहेत. त्याचप्रमाणे दरबारातील अनेक उमरावांनी औरंगजेबाला मदतीचे आश्वासन दिलेले असून झपाट्याने उत्तरेकडे चालून येण्याचे आवाहन केले आहे. वरील गोष्टींमुळे उत्तेजन मिळून औरंगजेबाने २० मार्च रोजी बुरहाणपूरहून कूच केले. त्याच्याबरोबर न येणाऱ्या सरदारांत त्याचा सासरा शहानवाजखान हा होता. त्याला त्याने कैद करून बुरहाणपूरच्या किल्ल्यात ७ महिने ठेवले. (**ए. एन्.** ४६–५३, २०९; **अनेक्डोट्स ऑफ औरंगजेब**, ६; **कम्बू**, १० ब; **अकीलखान**, २३–२५.) ३ एप्रिल रोजी अकबरपूर येथे त्याने नर्मदा नदी ओलांडली. १३ एप्रिलला तो दिपालपूर येथे पोहोचला. तेथे मुराद त्याला सैन्यासहित येऊन मिळाला. तेथून त्याने उज्जैनच्या दिशेने कूच केले आणि तो धर्मत येथे पोहोचला. येथे शत्रूबरोबर लढाई देण्याचे त्याने ठरविले. (**ए. एन्.** ५३–५६; **अकीलखान**, २६; **ईश्वरदास** १७.)]

(५) सिंहासनासाठी लढा देण्यासाठी औरंगजेबाची सिद्धता

जर का कधीकाळी बादशहा होण्याची अगर स्वतंत्रपणे जीवन जगण्याची आशा औरंगजेब मनाशी बाळगून असला तर आता कृतीने ते मिळविण्याची वेळ आली होती. काय करायचे त्यासंबंधीचा निर्णय त्याने १६५८ च्या जानेवारीच्या सुरुवातीसुरुवातीसच घेतला आणि त्याप्रमाणे त्याने झपाट्याने आणि निश्चयाने पावले टाकण्यास सुरुवात केली. प्रथम मिर जुम्ला याला त्याला विश्वासात घेऊन अटक करण्यात आले आणि त्याला दौलताबादच्या किल्ल्यात दिखाऊ कैदेत ठेवण्यात आले. त्याची सर्व मालमत्ता आणि उत्कृष्ट तोफखाना सरकारच्या नावाखाली औरंगजेबाने आपल्या ताब्यात घेतला. आपल्या या कृतीच्या समर्थनार्थ औरंगजेबाने मानभावीपणाने कारण सांगितले की मिर जुम्लाहा बादशहाविरुद्ध दक्षिणेमधील दोन्ही सुलतानांबरोबर गुप्त कारस्थान करीत होता. त्यानंतर त्याने शहाजहान आणि नवीन वजीर जफरखाज यांना पत्र लिहून असे कळविले की शहाजहान संबंधीच्या शोककारक बातम्या ऐकून आपल्या प्रेमळ हृदयाची चलबिचल झालेली आहे आणि म्हणून कर्तव्यदक्ष पुत्राप्रमाणे आपण ज्वरपीडित अशा आपल्या पित्याचे दर्शन घेण्यासाठी, त्याला दाराच्या बंधनातून सोडविण्यासाठी आणि भीती, गोंधळ आणि बंडखोर यापासून साम्राज्याला वाचविण्यासाठी आग्रा येथे येत आहोत.

अनुक्रमणिका

औरंगजेबाचा कुतुबशहाबरोबर समेट

त्याचवेळी कुतुबशहाला ताकिदीची पत्रे लिहून त्याने युद्धकराची थकलेली बाकी ताबडतोब द्यावी असे कळविण्यात आले पण त्याचबरोबर गोवळकोंड्याच्या दरबारातील मोगल वकीलाला कुतुबशहाबरोबर सबुरीचे वर्तन करण्याविषयी आणि औरंगजेबाच्या दक्षिणेमधील अपेक्षित गैरहजेरीत त्याने मोगल हितसंबंधांना बाध येईल असे काही न करण्याविषयी त्याचे मन वळविण्यासंबंधी हुकूम देण्यात आला . त्याचप्रमाणे मित्रत्त्वाची पत्रे आणि भेटी विजापूरची राजमाता (बडी साहिबा) हिच्याकडे रवाना करण्यात आल्या. **विजापूरबरोबर मैत्रीचे प्रयत्न :-** विजापूरने वचन दिल्याप्रमाणे ताबडतोब द्रव्य पाठविण्याची आणि औरंगजेबाच्या गैरहजेरीत विजापूरकरानी गडबड न करता स्वस्थ राहाण्याची त्यामधून तिला विनंती करण्यात आली. त्यानंतर थोड्या कालावधिनंतर त्याच्या मित्रत्त्वाची किंमत म्हणून मन विचलीत करणारी योजना औरंगजेबाने आदिलशहाकडे सादर केली . तिचा सारांश असा , "तुम्ही आमच्याशी एकनिष्ठ रहावे आणि आपली वचने पाळावी . मी असे कबूल करतो की – (१) परेड्याचा किल्ला आणि किल्ल्याच्या बंदोबस्ताखालील प्रदेश , कोकण साम्राज्याला पूर्वी जोडण्यात आलेला वांगीचा महाल आणि त्याशिवाय मरहूम आदिलशहाला तोडून देण्यात आलेला कर्नाटकचा भाग पूर्वीप्रमाणेच तुमच्याकडे राहू देऊ आणि (२) तुम्ही तहात वचन दिल्याप्रमाणे तुम्हाकडून येणाऱ्या १ कोटीच्या युद्धखर्चापैकी तीस लाख रुपये तुम्हाला माफ करू . ह्या प्रदेशाचे संरक्षण करा , त्याचा राज्यकारभार सुधारा , या प्रदेशातील काही किल्ल्यांचा ताबा चोरून शिवाजीने घेतलेला आहे , त्याची हकालपट्टी करा . माझ्याकडे तुम्ही कमीतकमी १०,००० घोडदळाची रवानगी करा . तुम्हाला बाणगंगेच्या काठापर्यंतचा असलेला सर्व प्रदेश मी तोडून देईन."

दरबारातील अधिकाऱ्यांबरोबर गुप्त कारस्थाने

या सर्व कालावधीत सर्व प्रांतांतल्या (विशेषतः माळवा) श्रेष्ठ अधिकाऱ्यांबरोबर आणि राजधानीतील उच्चपदस्थ दरबारी अधिकाऱ्यांबरोबर गुप्तपणे पण ठाम भूमिकेवरून औरंगजेबाची कारस्थाने चालली होती. शहाजहानच्या चारी मुलांमध्ये कर्तृत्व आणि अनुभव यांमध्ये उजवा म्हणून औरंगजेबाची ख्याती होती. आपले हितसंबंध रक्षणारे राज्यातले सर्व सरदार आणि अधिकारी यांनी काळाने निवडलेला नेता म्हणजे औरंगजेब हे ओळखले आणि भविष्यकाळातले आपले स्थान पक्के करण्यासाठी त्याला मित्र दृष्टीने साह्य देण्याची अथवा आमचा तुम्हाला पूर्णपणे पाठिंबा आहे अशा अर्थाची गुप्त वचने पाठविण्याची एकच त्वरा केली.

नवीन सैनिकांची भरती करण्याचे काम मोठ्या जोमाने चालू होते . सोरामीठ, गंधक आणि शिसे यांचे प्रचंड साठे दारूगोळा बनविण्यासाठी विकत घेण्यात आले आणि दक्षिणेतील किल्ल्यातील बंदुकीची दारू आणि fuses आगवाती दिल्लीकडे कूच करण्यासाठी लागणाऱ्या कारवाईकरता काढून घेण्यात आल्या. औरंगजेबाजवळचे सैन्य अशा तऱ्हेने सुमारे ३०००० निवडक शिपायांइतके संस्थेने भरले आणि ह्याशिवाय या फौजेचा पाठपुरावा करण्यासाठी इंग्रज आणि फ्रेंच गोलंदाजांच्या हाताखालील मिर जुम्लाचा उत्कृष्ट तोफखाना होता तो वेगळाच.

औरंगजेबाबरोबरचे कर्तृत्ववान अधिकारी

परंतु फौजफाटा आणि युद्धसामग्री यापेक्षाही अधिकाऱ्यांच्या दृष्टीने औरंगजेबाची बाजू अधिक मजबूत होती. दक्षिणेतील आपल्या राजवटीत त्याने आपल्याभोवती कर्तबगार अधिकाऱ्यांची एक मालिकाच तयार केली होती आणि हे सर्व अधिकारी कृतज्ञतेच्या भावनेमुळे आणि त्यांपैकी काही औरंगजेबाबद्दल वाटणाऱ्या वैयक्तिक प्रेमामुळे त्याच्याकरता जीवाला जीव देण्यास तयार होते . सिंहासनासाठी झालेल्या लढ्यात या सर्वांनी त्याच्यासाठी अतुलनीय अशी कामगिरी बजाविली . त्यांच्यापैकी मुर्शिद कुलीखान , दिवाण शेख मिर —लढवय्या आणि खासगी सल्लागार , अकीलखान राजी —(equerry) शाही तबेल्यांचा अधिकारी आणि वैयक्तिक मददगार , काबीलखान—हुषार आणि विश्वासू सचिव , खान-इ-जमान पुरवठा खात्याचा धडाडीचा तपासनीस , महमद ताहिर वजीरखान —म्हणून उमराव पद दिलेला एक कसलेला सेनानी, विश्वासू वकील इसा बेग ऊर्फ मुखलिसखान , उच्चकुलस्थ आणि अनुभवी असा शम्सुद्दीन मुखतारखान, आणि त्या सर्वांपेक्षा श्रेष्ठ असा युद्धामध्ये महान आणि सल्ला देण्यात विजोड असा सेवकामधला हिरा मिर जुम्ला हे होते . औरंगजेबाच्या अतिशय विश्वासू हिंदू सेवकांमध्ये बिकानेरचा राव कर्ण , दतियाचा शुभकर्ण बुंदेला आणि ढमढेऱ्याचा राजा इंद्रमणी यांचा उल्लेख करावा लागेल . दक्षिण सोडण्याच्या पूर्वी त्या प्रदेशावरील आपल्या हुकमतीला बाध येऊ नये यादृष्टीने औरंगजेबाने पूर्ण खबरदारी घेतली . दोन वरिष्ठ अधिकारी आणि सुसज्ज फौजेसमवेत राज्यकारभार चालविण्यासाठी राजपुत्र मुआज्जम याला औरंगाबाद येथे ठेवण्यात आले तर औरंगजेबाने आपला जनाना नजीकच्या दौलताबाद किल्ल्यात ठेवला.

औरंगजेबाचे औरंगाबादहून कूच

अखेर ५ फेब्रुवारी १६५८ रोजी सिंहासनासाठी निकाली सामना देण्याकरता औरंगजेबाने औरंगाबाद सोडले . तारीख १८ ला तो बुरहाणपूरला पोहोचला . याठिकाणी सैन्याची पुनर्घटना करण्यासाठी आणि इतर तयारी करण्यासाठी त्याने एक महिना तळ दिला . २० मार्चला त्याने बुरहाणपूर सोडले आणि शहाजहानबरोबर एकनिष्ठ राहण्याचा आपला हेका न सोडणाऱ्या आपल्या सासऱ्याला — शहानवाजखान—त्याने २६ मार्च रोजी गिरफदार केले . कोणताही प्रतिकार न होता त्याने ३ एप्रिल रोजी नर्मदा नदी अकबरपूर येथे ओलांडली आणि उत्तरेकडे उज्जैनकडे जाण्यासाठी कूच करीत असताना १३ एप्रिल रोजी उज्जैनपासून दक्षिणेस २६ मैलांवर दिपालपूर मुक्कामी त्याला खबर मिळाली की , त्याच्या मुक्कामाच्या थोड्या पश्चिमेस काही मैलांवर मुराद येऊन पोहोचला आहे . **मुरादबरोबर मिलाफ :-** दुसऱ्या दिवशी दोन्ही भावांच्या सेनादलांची हातमिळवणी दिपालपूरच्या तळ्यानजीक झाली . जसबंतसिंग हा त्याच्यापुढे फक्त एक दिवसाच्या आघाडीवर होता. संध्याकाळच्या सुमारास राजपुत्रांचा मुक्काम उज्जैनपासून नैऋत्येस १४ मैल धरमत या चंबळ नदीला जाऊन मिळणाऱ्या गंभीरा नदीच्या पश्चिम किनाऱ्यावर वसलेल्या खेड्यावर पडला. दुसऱ्या दिवशी मोगल वारसाहक्काच्या प्रचंड युद्धाची सुरुवात झाली.

●●●

औरंगजेबाच्या कारकिर्दीचा संक्षिप्त इतिहास
१६१८ — १७०७

सर जदुनाथ सरकार

मराठीत अनुवाद
भ. ग. कुंटे

पुस्तक दुसरे

अनुक्रमणिका

प्रकरण चौथे

वारसा हक्काचे युद्ध : औरंगजेबाचा विजय

(१) धर्मत येथे जसवंतसिंग : त्याच्यापुढील समस्या

आपल्या सैन्यासहित जसवंतसिंग हा उज्जैनला फेब्रुवारी १६५८ च्या अखेरीस पोहोचला . औरंगजेबाने नर्मदा नदीवरील तराफे आणि रस्ते यांवर इतकी सक्त नजर ठेवली होती की औरंगजेबाचे डावपेच काय आहेत आणि त्याच्या हालचाली कशा काय चालू आहेत याविषयी यत्किंचितही थांग त्याला लागला नाही. त्याला औरंगजेबाविषयी पहिली बातमी मिळाली ती ही की , तो अगोदरच माळव्यात आला असून झपाट्याने उज्जैनच्या रोखानेच चाल करून येत आहे.

अतिशय गोंधळून गेलेल्या मनःस्थितीत जसवंत उज्जैनच्या नैऋत्येस १४ मैलापर्यंत चाल करून आला आणि त्याने धर्मतसमोर आपली छावणी दिली . या उद्देशाने की दक्षिणेकडून वर येणाऱ्या शत्रूची वाट रोखली जावी. या ठिकाणी त्याला आश्चर्याचा धक्का देणारी आणखी एक बातमी मिळाली . ती म्हणजे मुरादने औरंगजेबाशी हातमिळवणी केली असून (१४ एप्रिल) दोघाजणांची आघाडी त्याच्यापासून केवळ एका दिवसाच्या टप्प्याइतकी दूरवर आहे . [१४ एप्रिल रोजी मुराद आणि औरंगजेब यांच्या फौजा एकमेकांस मिळाल्या . या घटनेची जसवंतने अपेक्षा केली नव्हती. या दोन्ही फौजांना आपण कसे तोंड देणार हा प्रश्न त्याला पडला . नुसत्या कल्पनेने त्याचा थरकाप उडाला. दुसऱ्या दिवशी सकाळी औरंगजेबाचे सैन्य कूच करू लागले तेव्हा जसवंतला त्याची दहशत वाटली आणि त्याने औरंगजेबाकडे निरोप पाठवून कळविले की तुमच्याशी युद्ध करण्याची माझी ताकद नाही . माझी इच्छा आपली चाकरी करण्याची आहे . आपण मला क्षमा करावी . परंतु औरंगजेबाला शत्रूला संधी देऊन त्याची बाजू बळकट करावयाची नव्हती . त्याने जसवंतला कळविले की, तुझ्या मनात खरोखरच तू म्हणतोस तसे करावयाचे असले तर तूर एकदा नजाबतखानाकडे ये . तो तुला महमद सुलतान याच्याकडे घेऊन जाईल आणि तो तुला माझ्याकडे आणिल . (**ए. एन**, ५८, ६४–६५; **अकीलखान** २७–२८; **ईश्वरदास**, २९; **मासूम**, ४६६–४६७) हा अपमान जसवंतला सहन होणे कठीण होते . त्याने युद्धाची तयारी केली . परंतु भीतीच्या आहारी जाणारा आणि वाटाघाटीची तयारी दाखविणारा सेनापती हा कधीच यशस्वी होत नाही . जसवंत जेव्हा माळव्यात उतरला तेव्हा त्याची अशी कल्पना होती की नुसत्या बादशाही सैन्याच्या दबावाने बंडखोर राजपुत्र परत फिरतील . परंतु त्याला आता खात्री पटली की शत्रूला युद्ध पाहिजे आणि अखेरपर्यंत लढण्याची त्याची तयारी आहे . त्याने आपले सैन्य जमविले . परंतु जणू काही आपण फार मोठा गुन्हा करीत आहोत , या भावनेने त्याचे मनोधैर्य औरंगजेबापुढे ढासळले. अशा दोन सेनापतींमध्ये झालेल्या लढाईचा शेवट काय होणार हे सांगण्याची काहीच जरुरी नाही.]

जसवंत माळव्यामध्ये उतरला होता तो या अपेक्षेने की शाही सेनेच्या नुसत्या सान्निध्याने आणि दडपणाने बंडखोरी करून उठलेले राजपुत्र परत आपापल्या सुभेदारीच्या प्रांताकडे कूच होतील आणि त्याच्यावरील कामगिरीचे स्वरूप म्हणजे निव्वळ शाही सामर्थ्याच्या प्रदर्शनाइतकेच मर्यादित राहिल . आता, अर्थात खूप उशिरा , त्याला कळून चुकले की त्याचे शत्रू युयुत्सू वृत्तीने चाल करून येत आहेत आणि निकाली लढा देण्याच्या तयारीने ते येत आहेत.

शहाजहानने जसवंताला सख्त सूचना दिल्या होत्या की त्याची कामगिरी बंड करून उठलेल्या दोघा राजपुत्रांना फारशी तोशीस न देता त्याने त्यांच्या जहागिरीच्या प्रांताकडे परत पाठवावे आणि अगदीच नाईलाज झाला तर त्यांच्याबरोबर सामना द्यावा . (**कम्बू**, ११ अ ; **मासूम**, ४६६; **स्टोरीया**, १, २५८; **बर्निअर**, ३७, ३८). या उघड उघड ताकिदीमुळे जसवंतची परिस्थिती हातपाय तोडल्यागत झाली . इकडे औरंगजेब पूर्णपणे आपल्या बुद्धिमत्तेवर विसंबून राहिला होता आणि आपल्याला काय करावयाचे आहे याचा निश्चित आराखडा त्याच्या मनात होता तर जसवंतच्या मनस्थितीत चलबिचल होती आणि आग्र्याहून येणारे हुकुम आणि माळव्यामध्ये प्रत्यक्षात स्थित असलेल्या लष्करी परिस्थितीनुसार करावे लागणारे डावपेच यांमधील परस्पर विरोधामुळे तो अगदी गोंधळून गेला होता . साहजिकच कारवाईची सुत्रे त्याच्या हातात

राहिली नसून त्याचे शत्रू जी हालचाल करतील त्यावर त्याच्याकडून दिला जाणारा प्रतिसाद पूर्णपणे अवलंबून होता.

जसवंतच्या अडचणी

जसवंतची फौजदेखील विसंगत घटक असुसूत्र पद्धतीने एकत्र आणल्यासारखीच होती . त्यामधील रजपुतांच्या टोळ्या वंशपरंपरागत वैर आणि मान आणि मानाचे पान यांमधील अग्रहक्क यामुळे परस्परांपासून पुष्कळदा विभागल्या जात असत . त्यात भर म्हणून हिंदू आणि मुसलमान यांची परस्परात कसलाही संबंध न ठेवण्याची रुढलेली पद्धती. त्यामुळे एका कुशल सेनानीच्या हाताखाली मोहिमेसाठी या अनेक पंथियांची एकत्र मोट बांधणे जवळ जवळ अशक्य कोटीतले आहे असे आढळून आले होते . धर्मतपाशी जी बादशाही फौज जमा झाली होती तिच्यामध्ये सूत्रधारपणाचा संपूर्ण अभाव होता . कारण कासिमखानाचा असा हुकूम होता की त्यांनी जसवंतसिंगाचे दुय्यम म्हणून कुठलीही गोष्ट न करता त्याच्याबरोबर फक्त सहकार्य करावयाचे होते. त्याखेरीज पुष्कळसे मुसलमान अधिकारी औरंगजेबाबरोबर गुप्तपणे मैत्रीचे संबंध ठेवून होते. कारण पुढे झालेल्या युद्धात बादशाहाच्या बाजूने लढताना मारल्या गेलेल्या अधिकाऱ्यांत २४ रजपूत अधिकारी आणि फक्त एक मुसलमान अशी संख्या होती . कासिमखान आणि त्याची माणसे आपली कातडी बचावण्यासाठी युद्धाच्या धुमश्चक्रीपासून अलिप्त राहिली आणि युद्धाचा सर्व तडाखा रजपुतांना सहन करावा लागला.

जसवंतची लढाईची योजना

आणि शेवटी म्हणजे सेनानी म्हणून जसवंत औरंगजेबाच्या पासंगालादेखील पुरला नसता . त्याने आखलेली सदोष योजना आणि युद्धाच्या कारवाईचे निदर्शन ही त्याच्या अननुभवीपणाची आणि हेकट स्वभावाची साक्ष देण्याला पुरेशी आहेत . त्याने अदूरदर्शीपणाने युद्धाची जागा निवडली आणि आपल्या सैनिकांची इतकी दाटवाटी केली की त्याच्या घोडदळाला परिणामकारी कारवाई करणे किंवा शत्रूवर हल्ला करण्यासाठी संचलन करणे अशक्यप्राय झाले . युद्ध चालू असताना ज्या सेनाविभागाला मदतीची अगदी निकडीने गरज होती ती वेळेवर पाठविण्यात त्याला अपयश आले आणि एकदा युद्ध सुरू झाले मात्र आणि जणू काही एकाद्या सरसेनापतीच्या ऐवजी एकाद्या सेनाविभागाचाच तो जणू अधिकारी आहे अशा पद्धतीने त्याचे त्याच्या सेनासमुदायांवरील नियंत्रण सुटले. त्याच्या पराभवाचे अखेरचे कारण म्हणजे तोफखान्याला क्षुल्लक लेखण्याची त्याने केलेली जीवघेणी चूक हे होय. (**ईश्वरदास**, २० अ).

कदाचित यामध्ये जसवंतसिंगाचा उद्देश पहिल्यांदा मुसंडी मारण्याच्या प्रसंगी काही थोडाफार अवधी बंदुकींच्या फैरींचा मारा सहन करून शत्रूच्या तोफखान्याला बगल द्यावयाची आणि नंतर शत्रूच्या फौजांबरोबर हातघाईची लढाई द्यावयाची हा असावा. परंतु जेव्हा धुमश्चक्रीला सुरूवात झाली तेव्हा त्यांच्या दोन्ही वगलांच्या बाजूला असलेल्या खंदक आणि मोर्चे यांमधील चिंचोळ्या जागेत ते कोंडीत पकडले गेले आणि शत्रूवर हल्ला करण्यासाठी आपापल्या जागा घेण्याचे अगोदरच त्यांच्यावर यमसदनाला रवाना करणाऱ्याच अग्निगोळ्यांचा प्रखर मारा झाला . यानंतर जेव्हा ते शत्रूच्या तोफखान्याला बगल देऊन पुढे गेले आणि औरंगजेबाच्या फौजेशी मुकाबल्याला त्यांनी सुरुवात केली तेव्हा औरंगजेबाच्या फ्रेन्च आणि इंग्रज गोलंदाजांनी त्वरेने आपल्या तोफखान्याचे मोर्चे बाजूला वळविले आणि रजपुतांनी घेतलेल्या नव्या फळीवर मारा करून त्यांचा निःपात करण्यात सुरुवात केली . खरोखर हे युद्ध म्हणजे तलवार आणि

बंदुकीची दारू यांमधील संघर्षांचे प्रतीक होते आणि अखेर तोफखान्याने घोडदळावर मात केली.

(२) धर्मतचा रणसंग्राम

दोन्ही फौजा जवळ जवळ तुल्यबल होत्या आणि दोहोंची संख्या ३५००० च्या आतबाहेर अशीच होती. परंतु औरंगजेबाचे सामर्थ्य, एकसूत्रता आणि तोफखाना यांबाबत जसवंतपेक्षा फार फार वरचढ होते . [या युद्धात औरंगजेबाच्या सैन्याची संख्या ३० हजार होती . यामध्ये मुरादच्या १० हजार फौजेची भर पडली . बादशाही सैन्याचे अनेक आकडे उपलब्ध आहेत. औरंगजेब हे सैन्य ३० हजार घोडेस्वार आणि अनेक पायदळी सैनिक इतके होते असे सांगतो . ईश्वरदास या सैन्याची संख्या ५० हजार देतो. मुराद याही पुढे जाऊन हे सैन्य ५० ते ६० हजार असावे असे सांगतो . अकीलखान हा आकडा ३० हजार देतो . हे आकडे पाहता दोन्ही फौजांची संख्या प्रत्येकी ३५ हजारांपेक्षा अधिक असावी असे अनुमान काढण्यास हरकत नाही . औरंगजेबाच्या फौजेची योजना पुढील प्रमाणे होती . आघाडीवरील आठ हजार चिलखती फौज राजपुत्र महमद सुलतान आणि नजाबतखान यांच्या हाताखाली होती . मुख्य तोफखाना हा मुर्शिद कुलीखान याच्या हाताखाली होता . उजव्या फळीचा सेनापती मुराद हा होता . तर डावी फळी मुलतफतखान याच्या अधिपत्याखाली होती . आघाडीची फौज मुर्तजाखानाच्या अधिपत्याखाली होती तर फौजेच्या मुख्य भागी खुद्द औरंगजेब होता . औरंगजेबाच्या उजव्या आणि डाव्या बाजूला शेखमिर आणि सफशिकनखान हे अनुक्रमे होते.]

रजपुतांचे प्रचंड नुकसान

१५ एप्रिल रोजी सूर्योदयानंतर दोन तास उलटल्यावर दोन्ही फौजा एकमेकांच्या दृष्टिपथात आल्या. विशिष्ट पद्धतीने संघटित झालेल्या औरंगजेबाच्या सैन्याने शाही फौजांनी घेतलेल्या मोर्चांवर हळूहळू चाल करून जाण्यास सुरुवात केली आणि युद्धाचे डावपेच मोकळेपणी खेळता न येण्याजोग्या युद्धभूमीवर तुंबून राहिलेल्या रजपूत सैनिकांच्या सेनाविभागातील सैनिकांना त्यांनी टिपून मारण्यास सुरुवात केली. मिनिटामिनिटाला रजपुतांच्या भयानक नुकसानीची कमान वाढतच जाऊ लागली . अशा परिस्थितीनंतर त्यांच्या आघाडीची बाजू संभाळून असलेले मुकुंदसिंग हाडा , रतनसिंग राठोड, दयाळसिंग झाला, अर्जुनसिंग गौर, सुजनसिंग सिसोदिया आणि इतर शूर रजपूत वीर अगदी निवडक अशा रजपूत योद्धयांना घेऊन दौड करीत चाल करून आले . राम! राम! अशा युद्धगर्जनेचा ललकार देत आणि आखलेल्या योजना वाऱ्यावर सोडून देत ते वाघाप्रमाणे शत्रुसेनेवर तुटून पडले . रजपुतांच्या हल्ल्याचा पहिला तडाखा औरंगजेबाच्या तोफखान्यावर पडला . तोफा आणि बंदुका यांचा अगदी जवळून भडिमार झाल्याने त्याची अगदी ससेहोलपट झाली परंतु त्यांच्या चढाईचा पवित्राच इतका भारी होता की त्यामुळे साऱ्या विरोधकांची दाणादाण उडाली . तोफखान्याचा प्रमुख अधिकारी मुर्शिद कुलीखान हा कणखर प्रतिकारानंतर मारला गेला. त्याच्या मृत्यूमुळे त्याचा सेनाविभाग गडबडला परंतु तोफखान्याला मात्र धक्का पोहोचला नाही. रजपुतांच्या हल्ल्याच्या झंझावातापुढे गोलंदाजांनी बहुधा पळ काढला परंतु हल्ल्याचा जोर निघून गेल्यावर त्यांनी पुन्हा आपापल्या जागा घेतल्या . तोफखान्याच्या सरंक्षक दलावर विजय मिळविल्यानंतर चढाई करून येणारे रजपूत औरंगजेबाच्या आघाडीच्या पुढील विभागावर तुटून पडले . याठिकाणी काही काळपर्यंत अतिशय घनघोर अशी हातघाईची रणधुमाळी माजली . विजयाच्या मदाने धुंद झालेल्या रजपुतांनी पुढे चाल केली आणि औरंगजेबाच्या आघाडीच्या मध्यभागी ते घुसले . सर्व दिवसभर चाललेल्या रणधुमाळीत अतिशय आणीबाणीचा असा हाच क्षण होता . जर रजपुतांना रोखण्यात औरंगजेब यशस्वी झाला नसता तर औरंगजेबाच्या दृष्टीने साऱ्याची इतिश्री होणार होती.

परंतु औरंगजेबाच्या आघाडीच्या तुकड्या म्हणजे त्याच्या फौजेतील निवडक असे सैनिक होते . संख्येने ते ८ ,००० असून प्रत्येकजण चिलखतधारी योद्धा होता आणि त्यांचे सेनानी अतिशय विश्वासू अशी माणसे होती . त्यांपैकी प्रत्येकजण हत्तीवर बसून त्यांच्या अवतीभोवती रजपूत सैनिकांच्या हल्ल्याच्या

लाटांवर लाटा तुफान पाण्याप्रमाणे कोसळत असताना आपली जागा खड्या पर्वताप्रमाणे कणखरपणे धरून होते. याठिकाणी त्या दिवसाचे अतिशय तुंबळ आणि निर्णायक युद्ध झाले आणि "अहिपुष्पाच्या ताटव्याप्रमाणे समरभूमी रक्ताने लालभडक रंग दिल्याप्रमाणे न्हाऊन निघाली होती ." रजपूत सैनिकांनी केलेल्या हल्ल्याचा धडाका विभागून गेला आणि त्यांनी जेव्हा औरंगजेबाच्या आघाडीच्या बलिष्ठ सेनासमूहावर प्रहार केला तेव्हा त्यांतील धमक कमी होऊन गेली.

जसवंतच्या मध्य आघाडीवरील आणि राखीव दलांपैकी पुढे आलेल्या सैनिकांपैकी फक्त काही सैनिक आघाडीवर जीवनमरणाचा लढा देत असलेल्या आपल्या बांधवांच्या सहाय्यासाठी पुढे चाल करून आले. कासीमखानाच्या हाताखालील मोगल सैनिकांनी कोणत्याही प्रकारचे सहाय्य दिले नाही . अशा तऱ्हेने जसवंतच्या आघाडीच्या सैनिकांनी केलेल्या हल्ल्याचा पाठपुरावा झाला नाही . रजपुतांच्या माऱ्यापुढे विभागून गेलेली औरंगजेबाची सेना पुन्हा त्यांच्या पिछाडीला एकत्र संकलित झाली आणि तिने रजपुतांचा माघारीचा मार्ग रोखून धरला . ह्यावेळेपर्यंत औरंगजेबाच्या कसलेल्या नजरेने एकंदर परिस्थितीचा आढावा घेतला. आघाडीवरील फौजेच्य मदतीसाठी राखीव सेनासमुदाय मोठ्या हिरिरीने युद्धात सामील झाला आणि त्याने स्वतः आपल्या सैन्याला सहाय्य देण्यासाठी आणि बचावाची फळी त्यांच्या पाठीशी निर्माण करण्याच्या उद्देशाने आपल्या फौजेच्या मध्यभागी असलेल्या सैनिकांसह आगेकूच केले . त्या सर्वांवर कडी म्हणजे रजपुतांच्या मध्यावर दोहोबाजूंनी औरंगजेबाच्या मध्यविभागाच्या डाव्या आणि उजव्या बाजूच्या सेनाविभागांनी प्रहार केले. औरंगजेबाच्या फौजेवर हल्ला करणाऱ्या सहाही रजपूत सेनानींची या धुमश्चक्रीत कत्तल झाली. सेनासामर्थ्यात उणे पडलेली , आणि आता आघाडीकडून , डावीकडून आणि उजवीकडून औरंगजेबाच्या फौजेकडून प्रहार केली जाणारी आणि माघारीचा मार्ग बंद झाल्यामुळे अगतिक झालेली रजपूत सेना कचाट्यात सापडली . त्यांनी आपल्या शौर्याची शर्थ केली पण औरंगजेबाच्या सैन्याकडून सर्व रजपुतांची कत्तल झाली.

दरम्यान युद्धाचे मर्यादित स्वरूप जाऊन सर्वत्र एकच हाणामारी सुरू झाली . मुकुंदसिंगाच्या हल्ल्यामुळे बसलेल्या धक्क्यातून आता मोगल सैन्य सावध झालेले होते . रजपूत घोडदळाच्या हल्ल्याचा झपाटा आता आघाडीच्या दुसऱ्या बाजूला झालेला होता . त्यामुळे लगोलग औरंगजेबाच्या गोलंदाजांनी आपल्या तोफा उंचवटा असलेल्या जागेवर चढविल्या आणि त्यांनी आपल्या गोलंदाजीचा मारा खुद्द जसवंतच्या हाताखाली असलेल्या शत्रूच्या आघाडीच्या मध्यावर सुरू केला.

बादशाही सेनासमुदायाची दोन्ही बाजूला तरून न जातायेण्याजोगे खंदक आणि दलदल यांमधील चिंचोळ्या जागेत एकच गर्दी झाली . त्यांना सेनेच्या मोकळेपणी हालचाली करणे अशक्य झाले आणि "त्यांनी युद्धाच्या उफाळत्या ज्वालांत एकाद्या चिलटाप्रमाणे आपल्या प्राणांची आहुती दिली ." आपल्या आघाडीच्या शूर सैनिकांचा संहारहोत असलेला पाहून आणि औरंगजेबाच्या फौजेची विजयोन्मादाने होणारी आगेकूच पाहून जसवंतच्या मध्य आघाडीच्या उजव्या बाजूने रायसिंग सिसोदिया याने आणि सुजनसिंग बुंदेला आणि अमरसिंग चंद्रावत यांनी खुद्द आघाडीकडून रणांगणातून आपापल्या अनुयायांसह काढता पाय घेतला आणि ते आपापल्या मायदेशांकडे चालते झाले.

(३) जसवंत आणि त्याच्या फौजेचे पलायन

रायसिंगाने रणातून काढता पाय घेतल्याने जसवंतची उजवी बाजू अगोदरच उघडी पडली होती ;

इफ्तिकारखानाचा पाडाव झाला आणि त्याची डावी फळी देखील कोलमडली . दरम्यान त्याच्या आघाडीचा पार निकाल लागला होता . कासीमखानाच्या हाताखालील मुसलमानी फौजानी अजूनपर्यंत युद्धांमध्ये बिलकूल भाग घेतला नव्हता . त्यांनी जेव्हा औरंगजेबाच्या आघाडीच्या फौजा आपल्यावर चाल करून येत आहेत हे पाहिले तेव्हा युद्धातून पलायन करण्याची त्यांनी देखील तयारी केली . आणि आता जसवंतचे जे काही थोडेफार सैन्य शिल्लक राहिले होते त्याला एकाद्या प्रचंड महापुराने जणू काही वेढून टाकण्यासाठीच औरंगजेबाने समोरून , मुरादने डावीकडून आणि सफशिकनखानाने उजवीकडून चाल करून येण्यास सुरुवात केली . महाराजा जसवंतसिंगाला दोन ठिकाणी जखमा झाल्या होत्या . समोरून अंगावर चाल करून येणाऱ्या शत्रूच्या सैनिकांत घोडा फेकावा आणि समरभूमीवर प्राणार्पण करावे हीच त्याची आता इच्छा होती. परंतु त्याच्या सेनानींनी आणि कारभाऱ्यांनी त्याच्या घोड्याचे लगाम खेचून धरले आणि त्याच्या घोड्याला रणांगणातून बाहेर काढून जोधपूरचा रस्ता धरला. विजयश्री तर हातातून निसटलीच होती आणि राठोडांनी रणांगणातून काढता पाय घेतल्यावर सगळीकडे एकच पळापळ सुरू झाली . परंतु औरंगजेबाच्या विजयी फौजांनी पाठलाग केला नाही . [दोन्ही बाजूकडील शिपाई जवळ जवळ आठ तास एप्रिलच्या रणरणत्या उन्हात रणांगणात होते. युद्धामुळे दोन्ही फौजा पूर्णपणे थकून गेल्या होत्या . म्हणून दयेच्या भावनेने औरंगजेबाने शत्रूचा पाठलाग करण्याचे टाळले . तो म्हणाला , "यामुळे जितके जीव वाचतील ते माझ्या दृष्टीने परमेश्वराला दिलेली जकात आहे ." परंतु औरंगजेबाच्या मनातलाहा परमेश्वर फक्त मुसलमानांपुरताच मर्यादित होता . रणांगणातील प्रत्येक मुसलमानाचा जीव वाचविण्याची आणि शत्रूच्या छावणीत सापडलेल्या प्रत्येक मुसलमानाची मालमत्ता व्यवस्थित राखण्याची सख्त ताकीद औरंगजेबाने आपल्या अधिकाऱ्यांना दिलेली होती . त्याच्या दयाळूपणाच्या कक्षेत हिंदू बसत नव्हते. त्याच्यासाठी अतिशय निष्ठेने हजारो हिंदू लढले होते आणि त्याच्या जखमी झालेल्या चार मोठ्या अधिकाऱ्यांत एक हिंदू होता ही गोष्ट त्याने दृष्टिआड केली. (**ए. एन्**., ७३; **मासूम**, ५१ अ). कंबू आणि अकीलखान यांच्या मते शत्रूचा तीन -चार मैल पाठलाग झाला आणि या पाठलागात अनेकजण ठार झाले . याबाबतीत अर्थात आपल्याला औरंगजेबाच्या अधिकृत इतिहासावरच विश्वास ठेवला पाहिजे .] जीत आणि जेते ह्या दोघांचीही युद्धाच्या धुमश्चक्रीमुळे कुतरओढ झाली होती आणि विजयी सेनादलापुढे पाठलागापेक्षाही फार मोठे असे अमीष होते . बादशहाच्या दोन सेनानींचा सारा लष्करी तळ त्यातील सर्व तोफखाना, तंबू, हत्ती आणि खजिना यांसहित विजयी औरंगजेबाच्या ताब्यात लूट म्हणून आला तर त्याच्या सैनिकांनी पाडाव झालेल्या शत्रूसैन्याचे सामानसुमान आणि युद्धसामग्री यांची लूट केली . (**ए. एन्**, ७१–७२; **खाफीखान**, भाग २, १८; **कम्बू**, ११ ब).

धर्मतच्या यशाची परिणती

परंतु एवढ्या प्रचंड युद्धसामग्रीपेक्षाही दुसरा फार मोठा विजय औरंगजेबाच्या पदरात पडला आणि तो म्हणजे या लढाईमुळे त्याच्या नैतिक बळात झालेली वाढ . धर्मत येथे त्याला मिळालेला विजय हा त्याच्या भावी यशाचे गमक ठरला . केवळ एकाच तडाख्यात त्याने सामर्थ्यशाली भूमिकेवरून त्याच्याशी खेळ खेळणाऱ्या दाराला आपल्या बरोबरीच्या किंबहुना आपल्यापेक्षा कमी पातळीच्याच भूमिकेवर आणून सोडले होते. ज्यांच्या मनाची आतापर्यंत चलबिचल होत होती त्यांनी आता ठाम निर्णय घेतला . त्यांच्या मनाची आता अगदी निःसंकोचपणे खात्री झाली की परस्परांशी संघर्षात भिडलेल्या चार भावांमध्ये अखेर विजयश्री कोणाच्या गळ्यांत माळ घालणार!

जसवंत आणि कासिमखान यांनी रणभूमीकडे पाठ फिरविली आणि त्याक्षणीच औरंगजेबाच्या सेनेने विजयाच्या आरोळीची रणगर्जना केली. औरंगजेब स्वतः युद्धभूमीवर गुढगे टेकून बसला आणि हात जोडून त्याने आपल्याला विजयश्री मिळवून देणाऱ्या शक्तीचे आभार मानले.

बादशहाच्या पक्षाकडील एकंदर फौजेपैकी ६००० सैनिक मृत्युमुखी पडले आणि यांपैकी नुकसानीचे बव्हंशी प्रमाण रजपुतांच्या सेनाविभागातच अधिकतर होते . राजस्तानमधील प्रत्येक जमातीने ,

ज्या शूर नरपुंगवांनी स्वामीकार्यासाठी आपल्या प्राणांच्या आहुती दिल्या त्यांमध्ये आपापला वाटा उचलला . रणांगणात मृत झालेल्या रतनसिंग राठोड (रतलाम, सैलाना आणि सितामहू या घराण्यांचा संस्थापक) याच्या प्रेताचे ज्या ठिकाणी दहन करण्यात आले त्या जागेवर त्याच्या वारसांनी त्याच्या स्मरणार्थ एक दगडी स्मारक उभे केले.

(४) औरंगजेब आग्र्यावर चाल करून जातो

दाराची नवीन सैन्याची जमवाजमव

वरील विजय मिळाल्यानंतर एका दिवसानेच दोन्ही राजपुत्र उज्जैनला पोहोचले आणि तेथून कूच करून ते २१ मे ला ग्वाल्हेरला आले . (**ए. एन्**., ७५–७८) याठिकाणी त्यांना असे कळले की प्रचंड फौज घेऊन दारा धोलपूर मुक्कामी आलेला आहे आणि त्याने चंबळनदीवरील नेहमीचे आणि सरावाचे उतारावर आपला कबजा बसविला आहे . नदी पार करून जाण्याच्या सर्व ठिकाणी त्याने मोर्चे रोखून धरले होते . त्याचा तोफखाना पलीकडच्या तीरावर शत्रूचा समाचार घेण्यासाठी सज्ज होता आणि शत्रूच्या आगमनाची प्रतीक्षा करीत सर्व ठिकाणी त्याच्या सेनेच्या बलिष्ठ तुकड्या जागरूकपणे पहारा करीत होत्या . नदीच्या किनाऱ्यावर दुर्धर असे मोठमोठे कातळ होते आणि नदी तरून जाण्याच्या सर्व मार्गांत प्रचंड भोवरे अडचणी निर्माण करीत. त्यात शत्रूच्या प्रतिकाराची तयारी दांडगी होती . अशा परिस्थितीत नदी तरून जाणे म्हणजे जीविताची प्रचंड हानी सोसावी लागणार होती म्हणून औरंगजेबाने तिथल्या स्थानिक जमिनदारांची मदत मिळविली. त्यांच्यापासून त्याला कळले की धोलपूरच्या पूर्वेस ४० मैलांवर जेमतेम गुढगाभर पाणी असलेला आणि दाराच्या रक्षक दलाकडून असंरक्षित राहिलेला असा एक सहसा नजरेत न येणारा उतार आहे.

आता एका क्षणाचाही विलंब करून चालणारा नव्हता . २१ मे रोजी ज्या दिवशी ते ग्वाल्हेर मुक्कामी पोहोचले त्या दिवशी संध्याकाळीच मुख्य फौज तळावरच असताना औरंगजेबाच्या सैन्यातील एका सेनाविभागाबरोबर तीन सेनानी आणि काही तोफखाना यांना पुढे पाठविण्यात आले . रात्रभर कूच करून दुसऱ्या दिवशी सकाळी ते वर उल्लेखिलेल्या उतारापाशी येऊन पोहोचले आणि सुरक्षितपणे ते तो उतार पार करून गेले. त्यादिवशीच खुद्द औरंगजेबाने ग्वाल्हेर सोडले आणि मधले अंतर दोन मोठमोठ्या कूचीत पार करून सर्व सैन्यासहित त्याच ठिकाणी तो नदी उतरून पलीकडे पोहोचला . (२३ मे) "वाट अतिशय बिकट होती. उतारापाशी येण्याचे अगोदर शिपायांचे अतिशय हाल झाले आणि वाटेत जवळ जवळ ५००० शिपाई तहानेने तडफडून मेले ." परंतु लष्करी डावपेचाचे दृष्ट्या या हालचालीला अतिशय महत्त्व होते . फक्त एकच महत्त्वाची हालचाल करून त्याने शत्रूचा डाव त्याच्यावर उलटविला होता आणि दाराने प्रचंड खटाटोप करून खणलेले चर आणि बांधलेले मोर्चे हे कुचकामी करून टाकले होते . त्याच्यापुढे आता आग्र्याचा मार्ग खुला झाला होता . आता चंबळच्या काठावर उभारलेली आघाडी सोडून राजधानीकडे माघार घेण्याची दारावर पाळी आली होती . आपल्या अनेक अवजड तोफा त्याला नदीच्या किनाऱ्यावर तशाच टाकून जाणे भाग पडले आणि परिणामी पुढील युद्धात तोफखान्यांत त्याची बाजू लंगडी पढली . चंबळहून (दिलकुषा, २६) विजयी फौजांनी उत्तरेकडे कूच केले आणि तीन दिवसानंतर आग्र्याच्या पूर्वेस १० मैलांवर समूगडनजीक त्यांची शत्रूबरोबर गाठ पडली.

(५) धर्मतनंतर दाराच्या हालचाली

शहाजहानचे बेत आणि त्याचा दाराला उपदेश

धर्मतच्या लढाईनंतर दहा दिवसांनी तेथील पराभवाची बातमी बलुजपूर मुक्कामी असलेल्या शाही दरबारात पोहोचली. दाराने त्यानंतर धावपळ करून आणखी नवीन सैन्यभरती केली . त्याच्यापाशी आता ५०००० सैनिक जमा झाले होते . त्यामुळे वरवर दिसायला तरी त्याच्याजवळ प्रचंड फौज जमा झाल्याचा आभास निर्माण होत होता . परंतु निरनिराळ्या ठिकाणांहून आणि अनेक जमातींचे लोक घाईघाईने पुढे आणल्यामुळे ही फौज म्हणजे विविध पेशांच्या सैनिकांचे एक बिनआयोजित असे संघटन होते आणि संघटित कारवाईसाठी त्या फौजेला ना शिक्षण दिले गेले होते , ना त्यांच्यामध्ये योग्य अशी एकसूत्रीपणाची भावना निर्माण करण्यात आली होती . त्या शिवाय त्या फौजेतील अनेक अधिकारी म्हणजे शाही दरबारातील निव्वळ पोषाखी उमराव होते आणि दक्षिणेतील कसलेल्या अधिकाऱ्यांशी तुलना करता त्यांच्याजवळ तेवढ्या धाडसाचा आणि अनुभवाचा पूर्णपणे अभाव होता . शुजाला प्रतिकार करण्यासाठी म्हणून दाराने सुलेमान शुकोबरोबर त्याच्या विश्वासातील जीवाला जीव देणारी आणि अतिशय कर्तबगार अशी अधिकारी मंडळी पाठविण्याची फार मोठी घोडचूक केली होती . त्याला आता अशा कार्यक्षम अधिकाऱ्यांची जातीने उणीव भासू लागली . शाही चाकरीतील परदेशी मुसलमान शिपाईगड्यांना दाराचे रजपुतांवरील परावलंबित्व सहन होईनासे झाले आणि ते दारा आणि त्याचे नशीब असे म्हणून त्याची चाकरी सोडून गेले . आणि त्याशिवाय शहाजहानकडूनही त्याला काही कमी उपद्रव झाला नाही . या परिस्थितीत देखील शहाजहानने त्याला युद्धाचा प्रसंग टाळण्याचा सल्ला दिला . तो अजूनही मनाशी अशी फोल आशा बाळगून होता की, आपल्या मुलांमधील कलह हे शांततामय मार्गाने वाटाघाटींच्या रूपाने सोडविता येतील.

दारा समुगड येथे पोहोचतो

१८ मे रोजी आग्रा किल्ल्यामधील दिवाण -इ-आममध्ये आपल्या वयोवृद्ध बापाचा जवळ जवळ शेवटचा असा निरोप दुःखित अंतःकरणाने घेतल्यावर दाराने आपल्या फौजेबरोबर चंबळ नदीच्या तिराकडे कूच केले. मे महिन्याच्या २२ तारखेला तो धोलपूरला पोहोचला आणि आसमंतातील चंबळ नदीच्या सर्व उतारावर त्याने आपला पहारा बसविला. प्रत्यक्ष लढाईचा प्रसंग न आणता औरंगजेबाची प्रगती रोखण्याचा आणि अशा तऱ्हेने सुलेमान शुकोच्या फौजेची त्याच्या फौजेबरोबर हातमिळवणी होण्यासाठी वेळ मिळविण्याचा दाराचा बेत होता . परंतु त्याच्या हृदयाचा थरकाप उडविणारी बातमी त्याला लवकरच मिळाली आणि ती म्हणजे ता. २३ रोजी धोलपूरच्या पूर्वेस ४० मैलांवर औरंगजेबाने नदी केव्हाच पार केली आहे. म्हणून त्याने आग्र्याच्या दिशेने पिछेहाट केली आणि शहराबाहेर समुगडजवळ त्याने आपली छावणी दिली. औरंगजेब तिथे २८ तारखेला येऊन पोहोचला.

त्या दिवशी औरंगजेब कूच करून तेथे आला आहे हे ऐकल्यावर दाराने आपल्या फौजेला इषारा देऊन बाहेर काढले आणि युद्धाचा डाव खेळावयाचा आहे अशा मिषाने त्याने कूच केले . परंतु शत्रू दृष्टिपथात आल्यावर आपला शत्रू आता कोणता डाव टाकून हालचाल करीत आहे हे पाहण्यासाठी त्याने आपली दौड थांबविली . सूर्यास्ताबरोबर तो आपल्या छावणीकडे परतला . दाराने केलेली ही कारवाई अतिशय घातक होती . औरंगजेबाच्या सेनेची संख्या खूपच कमी होती आणि त्याचे सारे सैनिक धुळीने भरलेल्या बिनपाण्याच्या प्रदेशातून, उन्हातून रखरखत १० मैलांची कूच करून आल्यामुळे पार थकून गेले होते, तर खुद्द दाराची फौज ताजीतवानी होती . त्यामुळे झाले असे की तासन्तास काही न करता कडकडीत उन्हात दाराचे सैनिक घोडे आणि हत्ती खोळंबून राहिल्याने पूर्णपणे गळून गेले . तर धूर्त

औरंगजेबाने त्या दिवशी संध्याकाळी आणि रात्री आपल्या सर्व सैनिकांना पूर्णपणे विश्रान्ती देऊन दुसऱ्या दिवशीच्या लढ्यासाठी तयार ठेवले . [ती सारी रात्र औरंगजेबाच्या अधिकाऱ्यांनी आपल्या छावणीभोवती पहारा देऊन काढली . औरंगजेबाने स्फुर्तिदायक शब्दांनी आपल्या सैनिकांच्या मनात उत्साह निर्माण केला . तो म्हणाला, "उद्याचा दिवस हा शौर्याची कृत्ये करण्याचा दिवस आहे. माझी राजधानी येथून फार दूर अंतरावर आहे . तुम्ही सर्वांनी शत्रूवर एका मनाने आणि एका दिलाने हल्ला करणे जरूर आहे . तुम्ही तुमच्या शस्त्रांच्या प्रहारांनी नशिबाची कवाडे खोलून तेथील कागदपत्र हस्तगत करा आणि विजय व शत्रूचा संहार करणारे म्हणून जगात प्रसिद्धी मिळवा." (**अकीलखान**, ४३)]

(६) समुगडची लढाई ता. २९ मे, १६५८

दुसऱ्या दिवशी सकाळी २९ मे रोजी दाराने आपल्या छावणीपासून समोर दोन मैलांवर एका रुंद सपाटीवर आपल्या फौजेची युद्धासाठी जमवाजमव केली . त्याच्याजवळ एकंदर ५०००० एवढ्या संख्येने फौज होती. त्याच्या साऱ्या फौजेची भिस्त त्याच्या हितसंबंधासाठी आपले प्राण अर्पण करणाऱ्या त्याच्या रजपूत सेनाविभागावर आणि त्याच्या स्वतःच्या खास रक्षक दलावर होती . परंतु त्याच्या फौजेपैकी जवळ जवळ निम्मे लोक शाही सेनाविभागातील होते आणि म्हणून त्यांच्यावर विश्वासाने विसंबून राहणे धोक्याचे होते. त्याचे अनेक अधिकारी , प्रामुख्याने खल्लीलुल्लाखान यांना औरंगजेबाने स्वामीद्रोही बनवून आपल्या पक्षाकडे वळवून घेतले होते . दाराचा सारा तोफखाना युद्धभूमीच्या साऱ्या आघाडीवर एका रांगेत खडा झाला होता. त्याच्या पाठीमागे त्याचे पायदळी, बंदुकची, नंतर त्याची हत्ती सेना आणि सर्वांपाठीमागे त्याचे दाटीदाटीने उभे असलेले घोडदळ अशी त्याच्या सैन्याची रचना होती. औरंगजेबाच्या तोफखान्याशी तुलना करता दाराचा तोफखाना कमी चलनशील आणि अधिक अकार्यक्षम असा होता . त्याशिवाय त्याचे घोडदळ आणि सामानसुमान वाहून नेणारी जनावरे एकदम निकामी झाली होती.

याउलट या सेनासमुदायाला प्रतिकार करण्यासाठी औरंगजेबाचे कणखर आणि कसलेले सैनिक दमदार घोड्यांवर स्वार होऊन तयार होते आणि त्याच्या उत्कृष्ट तोफखान्यातील तोफांवर मिर जुम्लाचे युरोपियन गोलदांज सज्ज होते. त्याच्या तोफखान्याला दारूगोळ्याचा भरपूर पुरवठा होता . त्याच्या फौजेत आज्ञापालनाबाबत पूर्णपणे एकसूत्रिपणा होता आणि प्रत्येक अधिकाऱ्याने सर्वोच्च सेनापतीकडून येणाऱ्या आज्ञेचे पालन काकू न करता किंवा कसलाही प्रश्न न विचारता करावे असा औरंगजेबाचा सख्त हुकूम होता. [या युद्धात औरंगजेबाच्या फौजेची रचना पुढील प्रमाणे होती : फौजेच्या आघाडीवर १० हजार सैन्य असून त्याचे सेनापतिपद सुलतान महमद याजकडे होते. त्याचा सल्लागार नजाबतखान ऊर्फ खानखानान हा होता . आघाडीचे संरक्षण जुल्फीकारखान आणि सफशिकनखान यांच्या हाताखालील तोफखान्यांच्या दोन तुकड्यांकडे होते . आघाडीची उजवी बाजू इस्लामखानाकडे होती . येथे लढणाऱ्यांमध्ये इंद्रद्युम्न , चंपतराय बुंदेला, भगवंतसिंग हाडा वगैरे वीर होते. मुराद आपल्या १० हजार फौजेसह डाव्या आघाडीवर होता . राखीव फौज, अंदाजे ५ हजार, ही शेख मिर याच्या हाताखाली होती . लढाई ऐन रंगात आली असताना आणि यशापयशाची निश्चिती नसताना या कसलेल्या वीरांचा उपयोग होणार होता . आघाडीच्या मध्यावर औरंगजेब असून साऱ्या रणभूमीवर त्याची नजर होती . त्याच्या उजव्या बाजूला बहादूरखान आणि डाव्या बाजूला खान दौरान असे होते. पायदळाची फळी मजबूत करण्यासाठी म्हणून सैन्यात इकडे तिकडे क्रूर आणि चिलखत चढवलेले व सोंडांना अणकुचीदार हत्यारे बांधलेले असे हत्ती ठेवण्यात आलेले होते. हत्तीवरील चिलखती पत्र्याने मढवलेले हौदे बघितल्यानंतर मानवी मस्तकांच्या समुद्रातून बाहेर पडलेले हे बुरूजच आहेत असा भास होत होता. (**ए. एन्.**, ९१–९४; **अकीलखान**, ४४; **के. के.**, भाग २, २३; **स्टोरीया**, भाग १, २७४).]

साधारण दुपारच्या सुमारास युद्धाला तोंड लागले . दाराने एकदम चढाईला सुरुवात केली आणि आपल्या सर्व तोफखान्याचा प्रचंड भडिमार केला . परंतु तोफांचा नुसता दणदणाटच झाला . कारण शत्रू लांबच्या पल्ल्यावर असल्यामुळे त्याला कसलीही नुकसानी पोहोचली नाही. याउलट औरंगजेबाने आपल्या जवळची सर्व दारू आणि गोळे मोठ्या शहाणपणाने राखून ठेवले.

अशा तऱ्हेने तोफांचा भडिमार होता होता एक तास गेला आणि त्यानंतर दाराने चढाईचा हुकूम

दिला. त्याच्या डाव्या फळीचे नेतृत्व रुस्तुमखानाकडे होते . तोफखान्यामधील मोकळ्या जागेमधून बाहेर पडून त्याची फौज एकत्रित झाली आणि त्यांनी नंग्या तलवारी म्यानातून बाहेर काढीत आणि युद्धगर्जना करीत शत्रुपक्षाच्या तोफखान्यावर हल्ला चढविला . औरंगजेबाचा तोफखान्याचा मुख्य अधिकारी सफशिकनखान आणि तोफखान्यावर असलेले गोलंदाज यांनी प्रखरपणे हल्ल्याला तोंड दिले आणि चाल करून येणाऱ्या शत्रुसैन्यावर तोफांची सरबत्ती आणि बंदुकींच्या गोळ्यांचा भडिमार , शरवर्षाव आणि भाल्यांची जीवघेणी फेक केली . दाराचे पुढे चाल करून येणारे सैन्य तोफखान्याच्या जथ्यापाशी येऊन तेथील प्रतिकार मोडू शकले नाही. औरंगजेबाच्या तोफखान्याच्या भडिमाराने दाराच्या सैन्याचा संहार होऊ लागला आणि त्याच्या चढाईचा वेग मंदावला . तेव्हा ज्या बाजूकडून प्रतिकाराची भीती कमी होती त्या बाजूकडून हल्ला करण्यासाठी म्हणून रुस्तुमखानाने उजवीकडे पलट घेतली आणि आपल्या पाठीशी धुराळ्याचा प्रचंड गदारोळ उडवीत तो औरंगजेबाच्या तळाकडे घोडदौड करीत चाल करून निघाला . परंतु औरंगजेबाच्या मध्य आघाडीच्या उजव्या फळीला बहादूरखान होता तो चपळाईने आघाडीकडे सरकला आणि त्याने औरंगजेबाचा तोफखाना आणि त्याचा तळ यांमधली मोकळी जागा व्यापून रुस्तुमखानाचा मार्ग रोखून धरला . आता हातघाईच्या लढाईची एकच धुमश्चक्री उडाली . बहादुरखान जखमी होऊन रणांगणावर पडला आणि त्याच्या सेनाविभागाची मोड होण्याची पाळी आली तोच उजव्या फळीकडून इस्लामखान आणि आघाडीवर असलेला राखीव विभाग घेऊन शेख मिर त्याच्या मदतीला धावले . आता परिस्थिती उलटली . औरंगजेबाच्या फौजेने संख्येत रुस्तुमखानावर मात केली आणि त्याच्या फौजेचा पाडाव केला . रुस्तुमखानाला दंडावर जखम झाली . परंतु बरोबर १०।१२ जिवावर उदार झालेल्या शिपाईगड्यांना बरोबर घेऊन हाणामारी करीत शत्रूच्या आघाडीच्या मध्यापर्यंत तो घुसला आणि तेथे धारातीर्थावर त्याने आपल्या प्राणाचे बलिदान केले . दाराच्या डाव्या फळीवरले उरलेसुरले सैन्य सिपाहर शुकोच्या बरोबर पाठीमागे पळून गेले.

रजपुतांचा मुराद आणि औरंगजेबावर हल्ला

याचवेळी औरंगजेबाच्या डाव्या बाजूकडे घनघोर रणकंदन चालले होते . तेथे छत्रसाल हाडाच्या नेतृत्वाखालील आघाडीच्या सेनाविभागातील रजपूत जुल्पिकारचा तोफखाना आणि मुरादचा आणि सेनाविभाग यांमधील मोकळ्या झालेल्या जागेतून पुढे घुसले आणि त्यांनी मुरादच्या फौजेवर प्रचंड आवेशाने हल्ला चढवून मुरादचे सैन्य आणि औरंगजेबाची फौज यांमध्ये पाचर मारण्यात यश मिळविले . राजा रामसिंग राठोडच्या अंगात होळीच्या सणादिवशी पेहेरण्यात येणारे आतषी पितवस्त्र होते आणि त्याच्या फेट्याला बहुमोल मोत्यांची माळ लटकाविलेली होती . तो चेवाचेवाने "तुला दारापासून सिंहासन हिसकावून घ्यायला पाहिजे नाही का " अशी प्रचंड गर्जना करीत मुरादच्या हत्तीवर तुटून पडला . त्याच वेळी हत्तीच्या माहुताला त्याने ओरडून सांगितले की तुला जीव प्यारा असेल तर तू हत्तीला गुढगे खाली टेकावयास लाव. असे सांगून त्याने आपला भाला मुरादच्या रोखाने फेकला. परंतु त्याचा नेम चुकला आणि मुरादने बाण मारून त्याला ठार केले . मुरादच्या हत्तीभोवती गर्दी करून जमणारे इतर रजपूतही असेच मारले गेले आणि त्यांनी घातलेल्या पिवळ्या रंगाच्या पोषाखामुळे "सारी समरभूमी एकाद्या केशराच्या वनाप्रमाणे पिवळीधमक दिसू लागली ." रजपूत घोडेस्वार उंच हत्तीवरील अंबारीत बसलेल्या मुरादपर्यंत पोहोचूच शकले नाहीत ; परंतु मुरादच्या तोंडावर तीन ठिकाणी जखमा झाल्या ; त्याचा माहूत ठार झाला आणि त्याच्या हत्तीवरील हौदा तीरांनी भरून गेल्यामुळे साळूच्या पाठीवरील काट्यांसारखा झुलपून दिसू लागला. रजपुतांच्या या प्रखर हल्ल्यापुढे त्याला पिछेहाट करावी लागली. (**खाफीखान**, भाग २, २९—३०; **स्टोरीया**, भाग १, २८०).

अनुक्रमणिका

विजयी रजपूत वीरांनी आघाडीच्या मध्याला चेपीत नेले आणि आपल्या डाव्या फळीकडे उडालेल्या हाहाःकाराची बातमी ऐकून मुरादच्या मदतीला येणाऱ्या औरंगजेबावर ते तुटून पडले . या दोन तुल्यबळ सेनाविभागांमध्ये उडालेली रणधुमाळी महाभयंकर स्वरूपाची होती . रजपुतांनी हाणामारी करीत खुद्द औरंगजेबाकडे मोर्चा वळविला . परंतु औरंगजेबाच्या संरक्षक दलाने रजपुतांच्या हल्ल्याला तितक्याच शौर्याने कणखरपणे प्रतिकार केला . ते ताज्या दमाचे असल्यामुळे त्यांनी मुरादच्या फौजेबरोबर निकराने लढल्यामुळे दमून गेलेल्या आणि खूप प्राणहानी झालेल्या रजपुतांवर मात केली. परंतु परिस्थिती सर्वतोपरी उलटलेली असताना देखील "जीविताला तुच्छ लेखून" रजपूत मोठ्या शौर्याने लढले . परंतु एकापाठीमागून एक असे त्यांचे नेते छत्रसाल हाडा , रामसिंग राठोड, भीमसिंग गौर आणि शिवराम गौर रणांगणावर पतन पावले. तरी देखील उरलेल्या रजपूत सैनिकांनी "पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणे" आपल्या पराक्रमाची शिकस्त केली असे या प्रसंगाचे वर्णन त्याठिकाणी हजर असलेल्या एका युरोपियनाने केले आहे. परिणामाची यत्किंचितही क्षिती न बाळगता आपल्या घोड्यावरून राजा रूपसिंग राठोड याने उडी घेतली आणि आपल्या नंग्या समशेरीने कापाकापी करीत त्याने औरंगजेबाच्या हत्तीपर्यंत चाल केली आणि औरंगजेबाला हत्तीच्या हौद्यावरून खाली जमिनीवर पाडण्यासाठी त्याने हौद्याला बांधलेल्या दोऱ्या तोडण्याचा प्रयत्न केला . त्याने हत्तीच्या पायावर वार करून त्याला घायाळ केले पण औरंगजेबाच्या रक्षकांनी त्याचीच कत्तल केली . उरलेल्या रजपुतांचा युद्धाच्या खाईत नाश झाला . अशा तऱ्हेने इतक्या वेळपर्यंत चाललेल्या घनघोर रणकंदनात दाराच्या फौजेच्या डाव्या आणि उजव्या फळीचा पूर्णपणे विध्वंस झाला.

(७) समुगड येथील खुद्द दाराची हालचाल – दाराचा शेवट

लढाईच्या सुरुवातीलाच ज्या क्षणाला रुस्तुमखान आणि छत्रसाल यांनी अनुक्रमे आपल्या डाव्या फळीला आणि आघाडीला बरोबर घेऊन औरंगजेबावर हल्ला चढविला , त्याचवेळी दाराने आघाडीच्या मध्यावरील आपली जागा सोडली आणि आपल्या तोफखान्यामधून दौड करीत तो रुस्तुमखानाला मदत करण्याच्या उद्देशाने औरंगजेबाच्या उजव्या फळीवर चाल करून गेला . दाराची ही हालचाल म्हणजे युद्धातील डावपेचाच्या दृष्टीने एक फार मोठी घोडचूक होती . सर्व रणभूमीवर काय चालले आहे हे त्याला कळणे आता अशक्यच होते आणि सर्व सेनाविभागाचा सेनापती म्हणून साऱ्या सैन्याला काबूत ठेवणे त्याला आता जमणार नव्हते. याचा परिणाम असा झाला की सर्वत्र एकदम एकच गोंधळ माजला. दुसरी गोष्ट अशी की आपल्याच तोफखान्याच्या समोरून त्याने कूच केल्यामुळे गोलंदाजांच्या माऱ्याआड तो आला. तर उलट शत्रूला प्रतिचढाईची संधी न देता औरंगजेबाच्या तोफखान्याने दाराच्या फौजेवर भडिमार करून त्यांची ससेहोलपट करण्याचा सपाटा सुरू केला. ही एकच चूक दाराच्या फौजेवर झालेल्या इतर सर्व चुकांपेक्षाही त्याच्या सर्वनाशास कारणीभूत ठरली . (**आलमगिरनामा**, ९९; **कम्बू**, १५ अ ; **अकीलखान**, ४७). त्याच्यासमोर असलेल्या शत्रूच्या तोफखान्याचा मारा चुकविण्याच्या हेतूने दारा आता उजवीकडे वळला आणि त्याने शेख मिर याच्या सेनाविभागावर हल्ला चढविला. (पाहा, **स्टोरीया**, भाग १, २७७–२७८).

अगदी याच वेळी औरंगजेबाभोवती रक्षकदलातील कोणीही सैनिक नव्हते . आता जर दाराने आपल्या शत्रूच्या अंगावर जोरदारपणे धडक मारली असती तर विजयश्री त्याला खेचून आणता आली असती. परंतु "रणांगणावरील अडथळ्यांमुळे आणि अतिशय थकून गेल्यामुळे त्याला जी ग्लानी आली होती त्यामुळे त्याने क्षणभर आपली चाल रोखून धरली ." त्याच्या फौजेच्या वाढत जाणाऱ्या माऱ्याचा जोर आता

ओसरला आणि त्यांच्याकडून दमदारपणे होणाऱ्या प्रतिहल्ल्याची धडक आता कमी झाली . अतिशय मोलाची अशी मिळालेली सुवर्णसंधी दाराने कायमची घालविली . (**मनूची इन स्टोरीया** , भाग १ , २७७–२७९). कारण दरम्यान औरंगजेबाने आपल्या विस्कळीत झालेल्या सैन्याची घडी पुन्हा बसविली आणि त्यांना नवीन मोक्याच्या जागी रवाना केले . औरंगजेबाच्या या हालचालीमुळे आपल्या शत्रूच्या हत्तीवर समोरून हल्ला करण्याच्या दृष्टीने केलेली कारवाई दाराला सोडून देणे भाग पडले आणि आपल्या उजव्या फळीवर लढा देणाऱ्या छत्रसालाच्या पथकांना मदत देण्यासाठी म्हणून थोड्या बाजूला त्याला आपल्या सेनाविभागासह जावे लागले . अशा तऱ्हेने दाराने आपल्या सबंध आघाडीच्या समोरून डाव्या फळीच्या अगदी टोकाकडून तो उजव्या फळीच्या जवळ जवळ शेवटच्या टोकापर्यंत सेनेची निष्कारण हालचाल केली. या निष्फळ डावपेचात त्याचे सैनिक आणि घोडी उन्हाच्या भयंकर तडाख्यामुळे घायाळ होऊन पडली तर उलट शत्रूच्या सामने आघाडीवर ठाण माडून बसलेल्या तोफखान्याचा प्रचंड मारा त्याच्या डाव्या फळीवर बिनचूकपणे होऊ लागला. कडक उन्हामुळे विस्तवासारख्या तापून निघालेल्या रेताड मैदानातील लांबवर आणि दमवून टाकणाऱ्या दौडीमुळे त्याचे सैनिक पार थकून गेले होते आणि त्यात गुदमरून टाकणाऱ्या धुळीची भर होती . तळपत्या रखरखीत उन्हात त्याच्या सैनिकांनी घातलेली चिलखते त्यांच्या कातडीवर फोड आणीत होती आणि अशा जीवघेण्या परिस्थितीत तहानेने शुष्क झालेल्या त्यांच्या जीवांना थंड करण्यासाठी पाण्याचा एक थेंब देखील मिळणे मुष्किल होऊन गेले होते.

दाराच्या सैन्याचा संपूर्ण पराभव

दरम्यान औरंगजेबाच्या कडक शिस्तपालनाच्या बंधनाने त्याच्या आघाडीच्या सैनिकांनी आपापल्या जागा मजबूतपणे रोखून धरल्या होत्या . परंतु आता दाराच्या दोन्ही फळ्या आणि आघाडीची दाणादाण झालेली पाहून आणि त्याच्या आघाडीचा मध्यभाग गोंधळात पडलेला आणि विस्कळीत झालेला बघून औरंगजेबाच्या आघाडीचे नेतृत्व करीत असलेल्या राजपुत्र महमद सुलतान याने दारावर हल्ला करण्यासाठी पुढे झेप घेतली . त्याचवेळी औरंगजेबाच्या सेनाविभागाच्या उजव्या फळीकडील विजयी सैनिकांनी पलट खाल्ली आणि दाराच्या फौजेला कोंडीत पकडण्यासाठी म्हणून त्यांनी चढाई केली , तर डाव्या आणि उजव्या फळीवर असलेल्या तोफखान्याने एकसमयावच्छेदे करून तोफांचा भडिमार केला . युद्धाच्या अखेरच्या अंकावर पडदा पडण्यास आता सुरुवात झाली असे म्हणण्यास हरकत नव्हती . आपले उत्कृष्ट सेनानी मरण पावल्याचे वृत्त दाराला कळले होते आणि आता "एकाद्या सागराच्या लाटांप्रमाणे असंख्यात तोफा आघाडीला ठेवून औरंगजेबाचे सैनिक त्याला गिळण्यासाठी आक्रमण करून येत होते ." त्यांचा बिनचूक आणि घनघोर मारा दर क्षणाला त्याच्याभोवती अजून असलेल्या सैनिकांचा फडशा पाडीत होता . खुद्द दाराचा हत्ती शत्रूच्या "तोफातून सुटणाऱ्या गोळ्यांचे लक्ष्य बनला." त्यामुळे दाराचे खास शरीररक्षक त्याला सोडून पळून जाऊ लागले . त्या हतभागी राजपुत्राला आता हत्तीवरून खाली उतरून घोड्यावर बसण्याऐवजी दुसरे गत्यंतर उरले नव्हते . [अत्यंत धोक्याची परिस्थिती असताना आणि जेव्हा त्याने विजयाची सारी आशा सोडून दिली तेव्हा दारा आपल्या हत्तीवरून उतरला . या घटनेला **ए. एन्**. (१०४), **अकील** (४८), **मासूम** (६३), आणि **कम्बू** (१५ अ) या ग्रंथांतून दुजोरा मिळतो. दाराने जेव्हा औरंगजेबाचा पूर्ण पराजय केला त्यावेळी खलीलुल्लाखानाच्या विश्वासघातकी सल्ल्यानुसार दारा हत्तीवरून उतरून घोड्यावर स्वार झाला आणि त्यामुळे दाराच्या हाती आलेली विजयीश्रीची माला खेचली जाऊन त्याचा पूर्ण मोड झाला ही मनुची आणि बर्नियर यांनी दिलेली बाजारगप्प वरील समकालीन आणि विश्वासार्ह ग्रंथकर्त्यांच्या हकीकतीवरून धादान्त खोटी आहे असे सिद्ध होते (**स्टोरीया**, भाग १, २८१–२८२; **बर्नियर**, ५३–५४; आणि **ईश्वरदास**, २५ ब–२५ अ)]

आणि त्याच क्षणी दाराचा अवतार समाप्त झाला असे म्हणण्यास हरकत नाही . रणभूमीच्या विस्तृत प्रांगणावर पांगलेल्या त्याच्या सैनिकांनी दाराच्या हत्तीवरील हौदा रिकामा पाहिला आणि आपला धनी रणांगणावर मृत होऊन पडला अशी त्यांची समजूत झाली . थकल्याने आणि तहानेमुळे ते अगोदरच अर्धमेले

झाले होते आणि आता अंगाची लाहीलाही करणारा गरम असा वारा वाहू लागला आणि त्याचा प्रचंड झोत दाराच्या अर्धमुर्च्छित अशा सैनिकांच्या तोंडावर सपाट्याने आला . आपल्या शस्त्रांचा उपयोगही न करता येण्याजोगे त्यांचे बाहुबल क्षीण झाले होते. त्यांपैकी अनेक तहानेने मृत्युमुखी पडले. शाही सेनादलांपैकी जे काही या धुमश्चक्रीतून वाचून शिल्लक राहिले होते ते रणांगणातून काढता पाय घेण्यास मिळावा म्हणून कोणत्यातरी सबबीचा आधार घ्यावा म्हणून थांबले होते आणि दारा हत्तीच्या पाठीवरून एकाएकी नाहीसा झाल्याचे पाहिल्यानंतर त्यांना पाहिजे होती ती संधी मिळाली . एकाएकी साऱ्या सैन्याची वाताहात झाल्यासारखे झाले आणि अतिशय विस्कळीत अशा अवस्थेत त्यांनी रणांगणातून काढता पाय घेतला . त्याच्या चाकरीत असलेले वंशपरंपरागत चाकर वगळता दाराचा सर्वांनी त्याग केला आणि अशा परिस्थितीत दारा रणांगणात एकाकी पडला . त्यांनी त्याला रणांगणातून काढून आग्र्याला नेले . (**मासुम**, ६२ब-६४ब; **अकीलखान**, ४७-४८; **ए. एन्**. १०४—१०५; **खाफीखान**, भाग २-२८).

प्रतिकाराची शेवटची निशाणी देखील आता उरली नाही . परंतु औरंगजेबाच्या फौजेने शत्रूचा पाठलाग केला नाही . कारण औरंगजेबाला या युद्धात इतका पूर्णपणे विजय मिळाला होता की शत्रूचा पाठलाग करण्याची जरूरच उरली नव्हती . दाराच्या फौजेतील १०००० सैनिकांनी धारातीर्थी देह ठेवला होता आणि त्याशिवाय घोडी आणि मालवाहू जनावरे किती खर्ची पडली याची गणतीच नव्हती . शाही सेनादलातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांमध्ये ९ रजपूत आणि १९ मुसलमान सेनानींचा नावाने उल्लेख आढळतो.

दाराची झालेली प्रचंड हानी

रणांगणावर आहुती पडलेल्यांमध्ये शूर वीरांमध्ये अग्रणी म्हणून उल्लेख करता येईल अशांमध्ये ५२ लढाया खेळलेला रणधुरंधर आणि बुंदीचा मुख्य राव छत्रसाल हाडा हा होता . "मृत्यू अथवा विजयश्री यांची पताका असलेले असे जे केशरी रंगाचे कपडे , त्यांनी ज्यांची शरीरे विभूषित झालेली आहेत असे त्याचे हाडारजपूत या बुंदीच्या राजाच्या नेतृत्वाखाली दाराची आघाडी संभाळत होते . आपल्या सैनिकांत विजयश्रीची गर्जना निर्माण करीत तो हत्तीवर आरूढ झाला आणि आपल्या सैनिकांना आपल्या गर्जनेने आणि उदाहरणाने उत्साह देत असताना एक तोफेचा गोळा त्याच्या हत्तीवर आदळला. त्याबरोबर हत्ती मागे फिरला आणि त्याने पळ काढला . छत्रसालने हत्तीच्या पाठीवरून उडी घेतली आणि आपला घोडा आणून देण्यासाठी फर्माविता फर्माविता तो उद्गारला , 'माझा हत्ती शत्रूसमोर पाठ दाखवील पण त्याचा धनी मात्र प्राणांतीही नाही,' असे म्हणत तो आपल्या घोड्यावर स्वार झाला आणि आपल्या सैनिकांना एकत्र आणून मुरादला आपले लक्ष्य म्हणून वेधत त्याने आपल्या सैनिकांसह त्याच्यावर हल्ला करण्यासाठी चाल केली . त्याने स्वतः फेकण्याच्या उद्देशाने आपला भाला पेलून रोखला तोच तोफेच्या एका गोळ्याने त्याचा कपाळमोक्ष झाला". धर्मत आणि समुगड याठिकाणी झालेल्या दोन युद्धांत अस्सल खानदानी रक्ताच्या १२ रजपूत राजांनी प्रत्येक हाडा जमातीच्या मुख्यासमवेत आपले प्राण समर्पण केले . (टोडने आपल्या राजस्तान (भाग २, १३४) या पुस्तकात हाडा जमातीविषयी अतिशय प्रशंशोद्गार काढले आहेत.)

परंतु त्या दिवशी धारातीर्थावर पतन पावलेला मोहरा म्हणजे उजबेग आणि पर्शियामधील युद्धांचा रणधुरंधर सेनानी रुस्तमखान ऊर्फ फिरोज जंग हा होय.

औरंगजेबाच्या सैन्यातील पहिल्या दर्जाचा एकच सेनानी मरण पावला आणि तो म्हणजे

आजमखान. त्याला अतिशय उष्माघाताने मृत्यू आला . [औरंगजेबाच्या सैन्यातील आणखी काही मृत झालेल्या अधिकाऱ्यांची नावे पुढीलप्रमाणे होती : सजावारखान, सय्यद दिलावरखान आणि हदीदादखान . त्याशिवाय जुल्पिकारखान आणि बहादुरखान मिळून आठ अधिकारी जखमी झाले होते . शत्रूच्या हल्ल्याचा सारा मारा सहन करावा लागल्यामुळे आणि अनेक कठीण प्रसंगांना बराच काळ तोंड द्यावे लागल्यामुळे औरंगजेबाच्या सैन्याच्या उजव्या फळीचे इतर सैन्याच्या मानाने आतोनात नुकसान झालेले होते . (अधिक माहितीसाठी पाहा: **ए. एन्.**, १०५–१०, **के. के.**, भाग २. २८, ३०; **ईश्वरदास**, २४ अ, २६ अ).]

(८) आग्र्यामधील घडामोडी आणि शहाजहानची कैद-जून १६५८

शहाजहानचा पराजित दाराला निरोप

अपेशी ठरलेल्या समुगडच्या रणांगणातून दाराने काढता पाय घेतला आणि रात्री ९ च्या सुमाराला बरोबर काही सेवक केवळ आहेत अशा परिस्थितीत तो आग्र्याला पोहोचला आणि त्याने शहरातील आपल्या राजवाड्यात स्वतःला कोंडून घेतले . सर्वत्र भीतीचे एकच वातावरण पसरले आणि बादशाही (**स्टोरीया**, भाग १, २८७, २८९; **के. के**. भाग २. ३०; **मासूम**, ६५ अ, ६५ ब) कुटुंबात शोकांतिकेचा एकच हलकल्लोळ झाला. शहाजहानने दाराला निरोप पाठवून किल्ल्यात यावयला आणि त्याची भेट घेण्याविषयी कळविले. परंतु शरिराने आणि मनाने दारा पूर्णपणे खचून गेला होता . त्याने बादशहाला भेटण्यास नकार देऊन कळविले की , "माझ्या हल्लीच्या या हालाखीच्या परिस्थितीत माझे हे अपेशी मुख मी आपल्याला दाखवू शकत नाही. माझ्यापुढे आता मला जो दूरदूर नेणाऱ्या प्रवासाचा मार्ग दिसत आहे तेथे जाण्यासाठी मला आपले आशीर्वाद देऊन परवानगी द्या."

दाराचे आग्र्याहून दिल्लीकडे पलायन

अशा तऱ्हेने तो दुर्दैवी राजपुत्र आपली बायकामुले आणि १० –१२ अनुयायी यांना घेऊन पहाटे तीनच्या सुमारास आग्र्याहून दिल्लीकडे जाण्यासाठी निघाला . बादशाही खजिन्यातून शहाजहानच्या हुकुमावरून सोन्याच्या नाण्यांच्या गोणती भरून त्या लादलेले खेचर दाराबरोबर पाठविण्यात आले . इतक्या घाईत त्याने स्वतःच्या मालकीची अशी वाहून नेता येईल इतके हिरे आणि रोकड आपल्याबरोबर नेली. नंतरचे दोन दिवस त्याचे अनुयायी छोटी छोटी पथके करून त्याला वाटेत मिळत गेले . तो दिल्लीला पोहोचला तेव्हा त्याच्या बरोबरच्या फौजेचा जमाव जवळ जवळ पाच हजारांइतका झाला.

समुगडचे युद्ध संपुष्टात आल्यावर औरंगजेब मुरादकडे गेला आणि त्याने त्याचे अभिनंदन करून सांगितले की त्यांना मिळालेला विजय हा पूर्णपणे मुरादच्या शौर्यामुळेच मिळालेला आहे आणि त्या विजयी दिवसापासूनच मुरादच्या कारकिर्दीला सुरुवात झाली आहे असे आपण समजतो . त्याने याच्याही पुढे जाऊन मोठ्या प्रेमाने मुरादच्या जखमांची सेवाशुश्रूषा केली.

औरंगजेबाचे आग्र्याबाहेर आगमन

लढाईच्या मैदानातून कूच करून विजयी सेना दोन मजलात आग्रा शहराच्या बाहेरील नूर मंजिल अथवा धारा या बागेपाशी येऊन पोहोचल्या (१ जून). या ठिकाणी त्यांनी १० दिवस मुक्काम केला . दर दिवशी शाही दरबारातील दरबारी मंडळी , अमीर, उमराव आणि अधिकारी शहाजहानला सोडून मोठ्या संख्येने त्यांना येऊन मिळाले. त्याच मार्गाचे अनुकरण दाराच्या सेवेतील पूर्वीच्या अधिकारीवर्गाने केले. (**ए.**

एन्., १११—११५; **अकीलखान**, ४९—५०; **कम्बू**, १५ ब).

शहाजहान आणि औरंगजेब यांच्यामधील वाटाघाटी

समुगडच्या लढाईनंतर एकाच दिवसाने औरंगजेबाने शहाजहानला उघडपणे लिहून कळविले की आपल्या हातून अलीकडेच ज्या काही गोष्टी घडल्या त्या आपण आपल्या शत्रूंनी केवळ भाग पाडल्यामुळेच केल्या. नूर मंजिल येथे औरंगजेब पोहोचल्यावर त्याला शहाजहानने लिहिलेले त्याच्या पत्राचे उत्तर मिळाले. त्यात त्याने औरंगजेबाला भेटीला बोलाविले होते . औरंजेबाने आपल्या काही हितकर्त्यांच्या सल्ल्यावरून (त्यात प्रामुख्याने शायस्ताखान आणि खलीलुल्ला हे होते .) काही काळ चालढकल करून भेटीचे आमंत्रण न स्वीकारण्याचे ठरविले . या हितकर्त्यांनी त्याला सांगितले की औरंगजेबाने आग्र्याच्या किल्ल्यात प्रवेश करताक्षणीच त्याला आपल्या रक्षक दलातील तार्तर स्त्रियांकडून ठार मारण्याचा बेत शहाजहानने आपल्या मनाशी योजला आहे . [समुगडच्या लढाईनंतर औरंगजेब आणि शहाजहान यांच्यामध्ये बराच पत्रव्यवहार झाला. शहाजहानने लिहिलेली पत्रे फाझीलखान आणि मुख्य न्यायाधीश सय्यद हिदायतुल्ला हे दोघेजण घेऊन गेले . त्यांनी बादशहाचा प्रेमळ निरोप औरंगजेबाला तोंडी सांगितला आणि बादशहाच्या भेटीबाबत औरंगजेबाची संमती घेऊन ते परतले . दुसऱ्या दिवशी बादशहाकडून आणखी एक निरोप आणि मौल्यवान भेटी घेऊन ते औरंगजेबाला भेटले आणि त्यांनी बादशहाची औरंगजेबाला भेटण्याची उत्सुकता त्याच्या कानावर घातली . या भेटीत शहाजहानने दिलेली आलमगिरी ही तलवार त्यानी औरंगजेबाला नजर केली . या भेटीत राजपुत्रामध्ये एकदम बदल झाल्याचे त्यांना दिसून आले. आदल्या दिवशी संध्याकाळी औरंगजेबाच्या खासगी सल्लागाराने त्याला असे सांगितले होते की बादशहाचे दारावर अतोनात प्रेम आहे आणि तो त्याच्या भल्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करीत आहे आणि अशा परिस्थितीत औरंगजेबाला आग्र्याला येण्यासाठी केलेले बोलावणे म्हणजे एक सापळा आहे. औरंगजेबाच्या मनातील संशय काढण्याची फाझीलखानाने पराकाष्ठा केली . परंतु त्याला अपयश घेऊन आपल्या धन्याकडे परत जावे लागले. याबाबतीत शायस्ताखानाने औरंगजेबाच्या मनातील संशय अधिक चेतविला . ५ तारखेला फाझीलखान तिसऱ्यांदा औरंगजेबाकडे आला आणि त्याने औरंगजेबाला शहाजहानकडे भेटीला जाऊन बापाचे प्रेम प्रत्यक्ष अनुभवावयाची विनंती केली . दरम्यान फाझीलखानाबरोबर आलेल्या खलीलुल्लाखानाला औरंगजेबाने आपल्याकडे वळवून घेतले होते . त्याला औरंगजेबाने खासगीरित्या भेटीस बोलावले . त्याने औरंगजेबाला शहाजहानच्या दुष्ट हेतूची जाणीव दिली आणि त्याला (खलीलुल्ला याला) कैद करण्याचा सल्ला दिला . हे चालले असताना फाझीलखान बाहेर होता. त्याला असे सांगण्यात आले की खलीलुल्ला याला कैद केले आहे आणि औरंगजेबाने शहाजहानबरोबर भेट घेण्याचे नाकारले आहे . कारण भेटीमध्ये बादशहा काय करील याबद्दल औरंगजेबाला खात्री नाही . त्याने शहाजहानकडे एकट्याने निघून जावे असे त्याला सांगण्यात आले . फाझीलखान हा शहाजहानकडे परत गेला आणि त्याने उद्गार काढले , "पत्रे पाठवणे आणि निरोप धाडणे याच्या पलीकडे आता गोष्ट गेली आहे (**कम्बू**, १५ ब, १६ ब; **अकीलखान**, ५०—५४; **ए. एन्**., ११२). शायस्ताखान याचे औरंगजेबाबरोबर संगनमत होते . याविषयी अधिक माहितीसाठी पाहा (**ए. एन्**. ११४; **आदाब**, २६१; **के. के.** भाग २. २१; **स्टोरीया**, भाग १. २५५, २९२).]

औरंगजेबाचा आग्रा किल्ल्याला वेढा

अखेर औरंगजेबाने आपले खरे कुटिल स्वरूप उघड केले . ३ जूनला त्याने आपला मोठा मुलगा महमद सुलतान याला आग्रा शहराचा ताबा घेऊन तेथे सुव्यवस्था राखण्यासाठी रवाना केले आणि ५ जून रोजी त्याने आग्र्याच्या किल्ल्याला वेढा दिला . शहाजहानने आग्रा किल्ल्याचे दरवाजे बंद करून घेतले होते आणि तेथून वेढ्याला तोंड देण्याची तयारी त्याने केली होती. त्या काळी आग्रा किल्ल्याची गणना दुर्गम अशा किल्ल्यांमध्ये होत असे आणि औरंगजेबाचा तोफखाना किल्ल्याच्या मजबूत संरक्षण फळीपुढे कुचकामी ठरला. साहजिकच किल्ल्याच्या तटाला खिंडार पाडून आणि मग किल्ल्यात घुसून विजय मिळविणे जवळ जवळ अशक्यप्राय कोटीतले होते . किल्ल्याचा वेढा चालू ठेवला असता तर औरंगजेब आणि मुराद या विजयी बंधुद्वयांचे तिथे अनेक महिने , कदाचित अनेक वर्षे देखील मोडली असती आणि त्यामुळे दाराला नवीन सैन्याची उभारणी करण्याकरता आणखी उसंत मिळाली असती.

म्हणून औरंगजेबाने अचानक हल्ला करून एकच गर्दी करण्यासाठी आपली माणसे पाठविली आणि त्यांना यमुना नदीच्या प्रवाहाकडे खुलणाऱ्या किल्ल्याच्या पाणी दरवाजाची (खिजीरी) बाहेरची बाजू ताब्यात घेण्याचा हुकूम दिला . याचा परिणाम असा झाला की किल्ल्यातील शिबंदीचे पाणी तुटले आणि

उन्हाळ्याचा मोसम ऐन मध्यावर असताना तहानेमुळे होणारे भयंकर हाल सहन करण्याची त्यांच्यावर पाळी आली. किल्ल्यामधील काही जुन्या आणि दीर्घकाळपर्यंत उपयोगात आणल्या न गेलेल्या विहिरीत मिळणारे पाणी कडवट आणि अतएव पिण्यालायक नव्हते . अशी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे बादशहाच्या दरबारातील फुकटखाऊ आणि आळशी असे काही लालचावलेले अधिकारी किल्ल्याबाहेर निसटले.

आग्र्याचा पाडाव आणि शहाजहानची कैद

या भयानक परिस्थितीत शहाजहानने जेमतेम तीन दिवसपर्यंत तग धरली . त्याने औरंगजेबाकडे एक अतिशय केविलवाणा असा निरोप पाठवून तहानेपोटी आपल्या बापाला ठार न मारण्याविषयी विनविले. पण या पत्राला औरंगजेबाने उत्तर दिले की , "हा सारा तुमच्याच करणीचा प्रभाव आहे ." तहानेमुळे जीव व्याकूळ झाला असताना आणि भोवती निराशा आणि विश्वासघातकी वातावरण यांनी वेढून टाकले असताना वृद्ध शहाजहानने शरणागती स्वीकारण्याचे [औरंगजेब आणि शहाजहान यांच्यामधली पत्रोपत्री ही चालूच राहिली . शहाजहानने चौथ्यांदा औरंगजेबाकडे फाझीलखान याला पत्र घेऊन पाठविले . या पत्रात आपल्या दुर्दशेबद्दल शहाजहानने दुःख प्रदर्शित केले होते . त्याची सर्व जबाबदारी त्याने परमेश्वरावर टाकली होती . आपल्या सामर्थ्याचा गर्व न करण्याबद्दल आणि दैवावर फारसा हवाला न टाकण्याबद्दल त्याने औरंगजेबाला ताकीद दिली . इतकेच नव्हे तर या जगात चांगले नाव राखावयाचे असेल आणि पुढील जन्माची तरतूद करावयाची असेल तर बापाची आज्ञा कुराणाने सांगितल्याप्रमाणे मान्य करण्याचे त्याला आवाहन केले . या पत्राला औरंगजेबाने अतिशय नम्रपणे उत्तर दिले आणि आपल्याला करावयाला लागलेल्या सर्व गोष्टी शत्रूच्या कारवाईमुळे कराव्या लागल्या असे प्रतिपादन केले . त्याने असे सांगितले की, दाराने उघड-उघड शत्रुत्व केले असताना देखील आपण बादशहाजवळ एकनिष्ठ राहिलो . यानंतर त्याने पुढे लिहिले की , काही विशिष्ट घटना घडून आल्यामुळे आपली भेट घेण्यास मला भय वाटत आहे . जर का किल्ल्याचे दरवाजे आपण माझ्या स्वाधीन केले आणि माझ्या सैन्याला मुक्तपणे आतबाहेर करण्याची मुभा दिली आणि अशा तऱ्हेने माझ्या मनातील संशयाचे निराकरण केले , तर मी आपली भेट घेईन , तुमच्या इच्छेप्रमाणे सर्व काही करीन व आपल्याला दुःखास्पद होईल किंवा आपण नाखूष व्हाल असे काहीही करणार नाही .] ठरविले . ८ जूनला औरंगजेबाच्या अधिकाऱ्यांना आत घेण्यासाठी म्हणून त्याने किल्ल्याचे दरवाजे उघडले आणि आपल्या राजवाड्यातील अंतःपुरातच तो कैदी होऊन बसला . दिवाण-इ-आम (हॉल ऑफ पब्लिक ऑडियन्स) च्या पाठीमागील खोल्यांमध्ये त्याला बंदिस्त करून ठेवण्यात आले . त्याच्या हातातील सर्व सत्ता छिनावून घेण्यात आली . किल्ल्याच्या आत आणि सभोवार शहाजहानच्या सुटकेचा प्रयत्न होऊ नये म्हणून सुसज्ज सैनिकांचा पहारा ठेवण्यात आला आणि त्याच्याकडेबाहेरून पत्रे वगैरे येऊ देतील या भीतीमुळे त्याच्या दिमतीला असलेल्या खोजांवर सख्त नजर ठेवण्यात आली . हिंदुस्थानच्या वैभवसंपन्न सम्राटांनी तीन पिढ्यांमध्ये कष्ट करून जमविलेली आग्र्याच्या किल्ल्यातील सारी संपत्ती औरंगजेबाच्या ताब्यात गेली.

दहा जूनला आपले वैयक्तिक वजन औरंगजेबावर पाडून आणि बहिणीबद्दल जर काही प्रेम त्याला वाटत असले तर त्याला आवाहन करून त्याचे मन वळविण्यासाठी राजकन्या जहानआरा हिने औरंगजेबाची भेट घेतली . तिने शहाजहानच्या इच्छेनुसार त्याला सांगितले की साऱ्या साम्राज्याची चारी भावांत वाटणी केली जावी. औरंगजेबाने साहजिकच या योजनेला साफ नकार दिला . [राजकन्या जहानआरा ही समेटाच्या काही अटी घेऊन औरंगजेबाकडे गेली . त्याने या अटी नाकारल्या . त्याने उत्तर दिले , "दारा हा काफर असून हिंदूंचा मित्र आहे . मुसलमानी धर्माच्या संरक्षणासाठी त्याचा नाश होणे अवश्य आहे , तोपर्यंत मी बादशहाची भेट घेणार नाही . (**अकीलखान**, ५९-६१). परंतु बऱ्याच वाटाघाटी झाल्यानंतर त्याने शहाजहानला भेटण्यास संमती दिली . दुसऱ्या दिवशी मोठ्या थाटामाटाने तो शहराकडे निघाला . परंतु वाटेत शायस्ताखान आणि शेख मिर यांनी त्याला भेट न घेण्याविषयी विनंती केली . त्यांनी त्याला सांगितले की , शहाजहानने त्याला ठार मारण्याचा कट केला आहे. याचा परिणाम असा झाला की शहाजहानच्या भेटीला जाण्याचा त्याचा निर्धार डळमळला . त्याने आपला हत्ती वाटेतच थांबविला . तोच नहीरदिल नावाच्या एका गुलामाने शहाजहानने दाराला पाठविलेले पत्र औरंगजेबाजवळ दिले . त्यात त्याने दाराला असे सांगितले होते की , तू दिल्ली येथेच राहा. तेथे पैसा आणि फौज याची कमतरता नाही . तेथून तू दुसरीकडे जाऊ नको . येथील कारभार मी सांभाळीन. (**अकीलखान**, ६१-६२; **मासूम**, ७९ ब, ८२ अ; **वारिस**, १०६ ब; **मनूची**, भाग १. २९६; **बर्नियर**, ६५; **के. के.** भाग २. ३४-३६; **ए. एन्**. १२२-१२३. हे पत्र औरंगजेबाने बनावटपणे लिहिलेले असावे असे मनूची आणि बर्नियर यांनी विधान केले आहे). वरील पत्रावरून आपल्या बापाचा दाराकडे किती ओढा आहे याची औरंगजेबाला जाणीव झाली. त्याने शहाजहानला भेटण्याचा आपला बेत सोडून दिला आणि त्याने शहरामधील दाराचा राजवाडा आपल्या ताब्यात घेतला आणि अशातऱ्हेने शहाजहानचे बाहेरील जगाबरोबरचे सर्व दळणवळण तुटले.

अनुक्रमणिका

समुगडची लढाई झाल्यापासून औरंगजेबाकडे मोठ्या प्रमाणात सैनिक आणि अधिकारी यांची भरती होत होती . जेव्हा आग्रा किल्ला औरंगजेबाच्या ताब्यात आला तेव्हा तो खरोखरीचा सम्राट झाला . १० जून रोजी त्याने आपल्या छावणीत मोठा दरबार भरविला . त्या दिवशी त्याने आम जनतेला दर्शन दिले . मुख्य वजीर आणि इतर सर्व विभाग प्रमुख यांनी त्याला आपापल्या सेवकांसहित अभिवादन केले . त्याला समोरच्या शेकडो व्यक्तींनी मानवंदना केली , आणि त्याच्या हुकूमावरून दरबारच्या अधिकाऱ्यांनी प्रत्येक व्यक्तीला तिच्या दर्जाप्रमाणे **मनसब** दिली. आग्रा शहरामध्ये प्रवेश केल्यानंतर तारीख ११ आणि १२ या दिवशी अनेक नवीन नेमणुका करण्यात आल्या. (**ए. एन्**., १११-११९; **ईश्वरदास**, २९ अ).]

(९) मुराद बख्शाची कैद आणि मृत्यू

१३ जून रोजी दाराचा पाठलाग करण्यासाठी म्हणून औरंगजेब आग्रा शहर सोडून दिल्लीच्या रोखाने निघाला. परंतु वाटेत मुरादच्या मत्सरी आणि हटवादी वागणुकीमुळे जी धोकादायक परिस्थिती निर्माण होऊ पाहात होती , यामुळे त्याने मथुरा येथे मुक्काम केला (**स्टोरीया**, भाग १.३०० अ; **अकीलखान**, ६५; **ईश्वरदास** ३१ ब; **ए. एन**. १३८). मुरादचे अधिकारी त्याच्या कानात असे भरवून देत होते की , दिवसेंदिवस त्याच्या हातातून सत्ता निसटत होती आणि औरंगजेबाचे हात सामर्थ्यशाली आणि बळकट बनत होते. त्याची (मुरादची) इच्छा आपल्याला ताबडतोब राज्याभिषेक व्हावा अशी होती तर त्याची ही इच्छा पुरी करण्याचा बेत औरंगजेब कायमचा पुढे केव्हातरी ढकलण्याच्या विचारात असल्यासारखा दिसत होता . यातून मार्ग एवढाच होता की , औरंगजेबाच्या हातातील निव्वळ एक खेळणे बनून राहावे आणि नंतर औरंगजेबाकडून आपण पायदळी तुडवले जावे असे जर त्याला (मुरादला) वाटत नसेल तर त्याने ताबडतोब सर्व गोष्टींची सुत्रे आपल्या हाती घेणे अतिशय जरूर आहे.

मुरादच्या मनात औरंगजेबाविषयी वैरभाव

त्याच्या सल्लागारांनी अशा तऱ्हेने भर दिल्यामुळे मुराद हा उघडउघड औरंगजेबाच्या विरुद्ध वर्तन करू लागला. त्याने आपली फौज वाढविली आणि बादशाही फौजांपैकी नुकत्याच औरंगजेबाला जाऊन मिळालेल्या सैनिकांना त्याने अधिक पगार आणि जादा स्वातंत्र्याची अमिषे दाखवून आपल्याकडे फितवले आणि त्यांच्यावर पदव्यांची खैरात केली . यावर कळस म्हणून की काय आपल्या मानाचा उपमर्द होतो म्हणून त्याने औरंगजेबाला भेटण्याचे सोडून दिले. अशा तऱ्हेने खुद्द वरवर दोस्ती असणाऱ्या या बंधुद्वयांच्या छावणीत औरंगजेबाविरुद्ध उघडउघड प्रतिपक्षाची स्थापना झाली.

औरंगजेबाचे मुरादला मेजवानीचे निमंत्रण

आता परिस्थिती मोठ्या आणीबाणीची अशी निर्माण झाली होती . परंतु तितक्याच चपखळपणे औरंगजेबाने आपल्या मनाशी योजना आखली आणि तिच्यावर तितक्याच कुशलतेने कारवाई केली . त्याने पहिल्याप्रथम मुरादला २२ लाख रुपये रोकड आणि २३३ घोडे नजर करून मुरादच्या मनात संशयाला जागा न ठेवता त्याला गाफील केले आणि त्याला झालेल्या जखमांतून तो पूर्णपणे बरा झाला म्हणून आनंदोत्सव साजरा करण्याच्या इच्छेने आणि पळून गेलेल्या दाराविरुद्ध मोहीम करण्याचा बेत आखण्यासाठी म्हणून मेजवानीसाठी त्याला आमंत्रण दिले आणि शेवटी त्याने मुरादच्या मर्जीतला त्याचा खास रक्षक नुरुद्दीन खवास याला भरपूर लाच चारली आणि त्याला आपल्या बाजूला वळवून घेतले . त्याने मुरादला औरंगजेबाचे आमंत्रण स्वीकारण्याविषयी भर घातली . २५ जून रोजी शिकारीहून परतताना मुरादने औरंगजेबाच्या छावणीत प्रवेश केला.

मुरादला विश्वासघाताने कैद

औरंगजेबाने मोठ्या प्रेमपूर्वक मुरादचे स्वागत केले , त्याला थाटाची मेजवानी दिली , खूप दारू पाजली आणि तो झोपी गेल्यावर त्याला निःशस्त्र करून बंदिवान केले. मध्यरात्रीच्या सुमारास कैद झालेल्या मुरादला बलवान अशा घोडदळाच्या बंदोबस्तात झाकलेल्या पालखीतून (Ladies Hauda) सलीमगडाला पाठविण्यात आले आणि तेथून त्याची रवानगी ग्वाल्हेरच्या सरकारी बंदिखान्यात करण्यात आली . डावपेचाच्या दृष्टीने अजोड अशी ही कारवाई कोणत्याही तऱ्हेचा गाजावाजा न करता पुरी करण्यात आली . इतकी की, मुरादच्या अनुयायांना त्याचा कानीसाही लागला नाही आणि त्यांना जेव्हा या गोष्टीची खबर मिळाली तेव्हा वेळ निघून गेली होती . दुसऱ्या दिवशी सकाळी मुरादच्या नेतृत्वहीन झालेल्या सैनिकांना औरंगजेबाने आपल्या चाकरीत घेतले . इतकेच काय परंतु मुरादच्या अत्यंत विश्वासातील अशा अधिकाऱ्यांनादेखील आपल्या या नव्या धन्यापुढे मान तुकविण्याखेरीज दुसरा मार्ग उरला नाही . मुरादचा सर्व नोकरवर्ग, लवाजमा आणि मालमत्ता औरंगजेबाच्या ताब्यात गेली . [मुरादला औरंगजेबाने कपटाने ठार मारले . त्याची हकीकत पुढीलप्रमाणे आहे : औरंगजेबाच्या खासगी महालात मुराद हा फक्त एका नोकराला घेऊन गेला . दोघे भाऊ एकाच गालीच्यावर बसले. औरंगजेबाने मुरादच्या अंगावर अत्तराचा शिडकाव केला आणि त्याच्यावर कल्पनातीत अशी मेहेरनजर दाखविली . काही वेळानंतर दोघाभावांचे भोजन संपले. औरंगजेबाने मुरादला भरपूर दारू पाजल्याचे एका वृत्तान्ताप्रमाणे आहे . भोजनानंतर दोघाभावांचे संभाषण झाले. काही काळ मुरादला झोपेने घेरले. औरंगजेबाने त्याला एका बिछान्यावर विश्रांती घेण्यास सांगितले आणि तो स्वतः जनानखान्यात गेला.

मुरादने बिछान्यावर अंग झोकून दिले . त्याचा सेवक बशारत हा त्याचे पाय चेपू लागला . काही वेळानंतर एका सुंदर गुलाम कन्येने मुरादच्या खोलीत प्रवेश केला आणि बशारत याला जावयास सांगितले . तिने हळुवारपणे मुरादचे अंग चेपावयास सुरुवात केली . तिच्या मुलायम स्पर्शाने मुरादला गाढ झोप लागली . त्याबरोबर तिने मुरादची शस्त्रे घेऊन हळूच खोली सोडली . ती गेल्याबरोबर शेख मीर याने अतिशय विश्वासू अशा बऱ्याच सेवकांना घेऊन मुरादच्या खोलीत प्रवेश केला आणि त्याच्या बिछान्याला वेढा दिला . त्यांनी केलेल्या आवाजामुळे तो जागा झाला आणि त्याने शस्त्र घेण्यासाठी हालचाल केली पण ती जागेवर नव्हती . आपला विश्वासघात झाला हे त्याने ओळखले आणि त्याने औरंगजेबाची निर्भत्सना करण्यास सुरुवात केली . औरंगजेब बाजूलाच पडद्याआड उभा होता . तो म्हणाला, "गेल्या काही दिवसांत तुझ्या हातून घडलेल्या कृत्याने साऱ्या देशाचा नाश होत आहे . गर्वामुळे तुझे माथे फिरून गेले आहे . या तुझ्या स्वभावाला सुधारण्यासाठी आणि राज्याचे भले व्हावे म्हणून काही दिवस माझ्या नजरेसमोर तुला विश्रांती देण्याचे मी ठरवले आहे ." औरंगजेब पुढे असे म्हणाला "तुझा जीव धोक्यात घालण्याची माझी बिलकूल इच्छा नाही. तुला मी दिलेली वचने अजून आहेत तशीच आहेत. तुझ्या नजरकैदेचा हा काळ तुझ्या फायद्यासाठीच आहे."

औरंगजेबाने केलेल्या या मानभावी मनधरणीत काही अर्थ नाही हे मुरादने ओळखले . त्याचप्रमाणे प्रतिकार करणे म्हणजे स्वतःचा बळी देणे आहे याची जाणीव त्याला झाली . त्याचवेळी शेख मीर याने सोनेरी शृंखला त्याच्यापुढे ठेवल्या आणि कुर्निसात करून राजपुत्राचे पाय त्याने बांधले. मध्यरात्रीनंतर मुरादला बंदिस्त अंबारीत घालून सलिमगड किल्ल्याकडे बंदिवासात पाठविण्यात आले . त्याच्या मित्रांना चकविण्यासाठी म्हणून असेच तीन हत्ती पूर्व, पश्चिम आणि दक्षिण दिशांकडे रवाना करण्यात आले.

या बेमालूम युक्तीमुळे मुरादच्या अनुयायांना मुरादविषयीची बातमी कळली ती फार उशिरा . त्यांची समजूत अशी झाली की, मुराद हा आपल्या भावाबरोबर गुप्त बैठकी करण्यात गुंतला आहे . दुसऱ्या दिवशी सकाळी त्याची २० हजार फौज औरंगजेबाच्या नोकरीत सामील करून घेण्यात आली. मुरादचे अधिकारीही मुरादच्या बेजबाबदारपणाला दोष देत औरंगजेबाला जाऊन मिळाले . मुरादचा मुलगा इजीदबक्ष याला दिल्ली येथे कैदखान्यात रवाना करण्यात आले . मुरादला पकडण्यात नुरुद्दीन आणि त्याचे इतर अधिकारी यांनी जी मदत केली त्या सर्वांना औरंगजेबाने मोठमोठी बक्षिशी दिली . (**अकीलखान**, ७०; **ईश्वरदास**, ३४ अ, ३४ ब; **स्टोरीया**, भाग १. ३०५-३०६; **ए. एन्.**, १३९; **के. के.**, भाग २, ३८; **दिलकुषा**, ३०).]

मुरादचे तुरुंगातील जीवन

ग्वाल्हेरच्या किल्ल्यात मुरादने एकंदर तीन वर्षे काढली . परंतु त्याच्या बाहेरील मित्रांनी त्याच्या सुटकेसाठी केलेला प्रयत्न आणि मुरादच्या अविचारीपणामुळे अतिशय थोडक्यासाठी त्या प्रयत्नांची न झालेली सांगता यामुळे औरंगजेबाने मुरादला नाहीसा करण्याचे ठरविले . **अलीनकीच्या खुनाचा आरोप व फाशी** :- बादशहाच्या चिथावणीवरून अलीनकीच्या दुसऱ्या मुलाने अहमदाबाद येथे इ . स. १६५७ मध्ये आपल्या बापाच्या हत्येबद्दल मुरादच्या रक्ताच्या रूपाने बदला दिला जावा अशी मागणी केली . मुसलमान न्यायशास्त्राप्रमाणे न्यायाधीशांना ही मागणी मान्य करणे भाग होते. म्हणून ४ डिसेंबर १६६१ मध्ये ग्वाल्हेरच्या

तुरुंगातील खोलीत दिल्लीच्या सिंहासनावर एकेकाळी आपला अधिकार सांगणाऱ्या दुर्दैवी मुरादचा दोन गुलामांकडून शिरच्छेद करविण्यात आला . त्याचे प्रेत किल्ल्याच्या आवारातच पुरण्यात आले . (**ए. एन्**. २९१, ३०४; **खाफीखान**, १५६; **कम्बू**, २४ ब; **स्टोरीया**, भाग १. ३८२-३८३; **दिलकुषा** ३५; **अहकाम**, २८९ ब, ३०२ ब).

●●●

प्रकरण पाचवे

वारसाहक्काचे युद्ध : दारा व शुजा यांचा शेवट

(१) समुगडच्या युद्धानंतरचा दाराचा पाठलाग

दिल्ली येथे दारा

दारा ५ जून १६५८ रोजी दिल्ली येथे पोहोचला आणि राजधानीतील सरकारी मालमत्ता बळकावून तिच्या साहाय्याने त्याने नवी फौज उभारण्याचा आणि तिला सुसज्ज करण्याचा प्रयत्न केला . परंतु आग्रा किल्ल्याचा पाडाव झाल्याची बातमी त्याला कळली तेव्हा औरंगजेबाला आपला पाठलाग करण्यास मोकळीक झाली ह्याची जाणीव झाल्याने एका आठवड्यानंतरच त्याने दिल्लीहून लाहोरकडे जाण्यासाठी कूच केले. पंजाब सुभ्याचा दाराला मजबूत पाठिंबा होता . ह्या प्रांताचा तो पुष्कळ काळपर्यंत सुभेदार होता आणि आता त्या सुभ्याची व्यवस्था त्याचा विश्वासू अधिकारी सय्यद घैरतखान याजकडे होती . दिल्लीहून १०,००० फौज घेऊन दारा निघाला तो लाहोरला ३ जुलैला पोहोचला आणि युद्धाची तयारी पुरी करण्यात त्याने तेथे दीड महिना घालविला . **दाराची लाहोर येथे युद्धाची तयारी** :- तेथील शाही खजिना त्याने आपल्या ताब्यात घेऊन जवळ जवळ २० ,००० एवढी फौज त्याने जमा केली आणि सतलज नदीवरील तळवण आणि रुपार येथील तराफ्यावर सख्त नजर ठेवण्यासाठी त्याने सुसज्ज सेनापथकांची रवानगी केली.

दिल्लीवर औरंगजेबाची चाल

दरम्यान दाराच्या फौजांपासून अलाहाबाद काबीज करण्यासाठी औरंगजेबाने खान -इ-दौरानची रवानगी केली आणि खुद्द दाराच्या पाठलागावर त्याने बहादुरखानाला पाठविले . त्याने स्वतः चाल ६ जुलै रोजी दिल्लीवर धडक मारली. या राजधानीच्या ठिकाणी तो तीन आठवडे राहिला आणि जुनी राज्यव्यवस्था बदलून त्या ठिकाणी नवीन जमान्याच्या राजवटीला सुरुवात केली . सरतेशेवटी २१ जुलै रोजी त्याने आलमगिर गाजी अशी पदवी धारण करून स्वतःला बादशहा म्हणून राज्याभिषेक करून घेतला . **दिल्ली येथे राज्याभिषेक** :- खलीलुल्लाखानाची पंजाब सुभ्याचा सुभेदार म्हणून नेमणूक करण्यात आली आणि दाराच्या पाठलागाच्या मजबुतीसाठी त्याला पाठविण्यात आले . [या ठिकाणी एक गोष्ट नमूद करण्यासारखी आहे आणि ती म्हणजे ही की, दरम्यानच्या काळात औरंगजेबाने दाराचा पाठलाग जारीने व्हावा म्हणून सर्व ती कारवाई केली आणि त्या दुर्दैवी राजपुत्राला आपले सामर्थ्य पुन्हा प्राप्त करून घेण्याकरिता बिलकूल अवधी ठेवला नाही . त्याने दूरदृष्टी दाखवून आपल्या नाविक विभागाला सहज नेता येण्याजोग्या बोटी बांधण्याचा हुकूम दिला आणि या बोटी त्याने गाड्यांवर घालून आपल्या आघाडीकडे रवाना केल्या. (**ए. एन्**, १६४.)]

लाहोरकडे दाराचा पाठलाग

५ ऑगस्ट रोजी रात्री रापूर येथे बहादुरखानाने अचानकपणे सतलज नदी ओलांडली . त्या ठिकाणाहून दाराच्या सेनापतीने बियास नदीवर गोविन्दबालकडे माघार घेतली. परंतु औरंगजेब जेव्हा दिल्लीहून सतलज नदीपर्यंत पोहोचला तेव्हा दारा होडीतून आपली बायकामाणसे आणि संपत्ती घेऊन लाहोरहून १८ ऑगस्ट रोजी मुलतानकडे पळाला . पुन्हा एकदा दाराचे चातुर्य औरंगजेबापुढे कोते पडले . त्याला विजयाबद्दल निराशा वाटली आणि त्याच्या निराशेचे लोण त्याच्या साऱ्या फौजेमध्ये पसरले.

अनुक्रमणिका

दाराची सिंधकडे माघार

३० ऑगस्ट रोजी औरंगजेबाचे सैन्य लाहोरहून दाराच्या सख्त पाठलागावर निघाले आणि खुद्द बादशहा आपल्या पाठलाग करणाऱ्या फौजेला १७ सप्टेंबर रोजी येऊन मिळाला . परंतु दाराने पुन्हा मुलतानहून १३ सप्टेंबर रोजी निघून सक्करकडे १३ आक्टोबरला पळ काढला . (**ए. एन्**., २०५-२०९, २७२-२७३) मुलतानच्या परिसरांतून शुजाने केलेल्या चढाईला तोंड देण्यासाठी औरंगजेब दिल्लीकडे परत फिरला (३० सप्टेंबर). परंतु सिंधू नदीच्या दोन्ही तीरांवरून औरंगजेबाच्या सफशिकनखान आणि शेख मीर या दोन सेनापतींनी १५,००० सैनिकांच्या दोन सेनाविभागांना बरोबर घेऊन दाराचा अविरत पाठलाग चालू ठेवला.

सिंध सोडून दाराचे गुजरातकडे पलायन

सक्कर येथे २३ ऑक्टोबर रोजी शाही सेनापतींना अशी खबर मिळाली की , दाराने आपली बरीचशी मालमत्ता आणि मोठमोठ्या तोफा आणि निकोलाय मनूची याच्या नेतृत्वाखाली असलेले युरोपियन गोलंदाज यांना आपला खोजा वसंत याच्या ताब्यात देऊन भाक्करच्या किल्ल्यात ठेवले आहे आणि त्याने स्वतः शेवानकडे पळ काढला आहे; आणि त्याच्याजवळ फक्त ३००० माणसे उरली असून बाकीचे त्याचे सर्व सैनिक त्याला सोडून गेले आहेत . (**ए. एन्**., २७०-२७५; **स्टोरीया**, भाग १. ३१८, ३२६-३२७.) परिणामी आपल्या विनाकारण संशयी असलेल्या धन्याची (दारा) बाजू सोडून जाण्याचा निर्णय दाउदखानासारख्या विश्वासू अधिकाऱ्याला घेणे भाग पडले . शेवान येथे शाही फौजांनी तडाख्याने मजल मारीत दाराला गाठले (३१ ऑक्टोबर), आणि त्याची अडवणूक करता येईल या आशेने सिंधू नदीचे दोन्ही किनारे व्यापले . परंतु फौजेला होड्या पुरविण्याच्या बाबतीत त्याची बाजू कमकुवत पडली आणि दाराजवळ तरून जाण्यासाठी होड्यातराफ्यांची भरपूर सिद्धता असल्याने दाराने धडक मारून नदीचे रुंद पात्र केव्हाच सुरक्षितपणे पार केले (२ नोव्हेंबर) आणि तो तट्टा येथे जाऊन पोहोचला (१३ नोव्हेंबर). शाही फौजांनी तट्ट्यापर्यंत जलदगतीने मजल मारीत त्याचा पाठलाग केला (१८ नोव्हेंबर). परंतु तेथे त्यांना कळले की दाराने आणखी दक्षिणेकडे वादिनच्या दिशेने पलायन केले आहे (२४ नोव्हेंबर), आणि तो कच्छचे आखात ओलांडून गुजरातकडे चालून जात आहे.

आता पाठलाग करणाऱ्या शाही फौजेला दरबाराकडे परतण्याचा हुकूम देण्यात आला . दाराने लाहोर सोडल्यानंतर जवळ जवळ तीन महिने अविश्रान्त धडाडी आणि आश्चर्यकारकपणे सहनशक्ती दाखवून त्यांनी दाराचा जो पाठलाग चालू ठेवला होता त्यामध्ये त्यांच्या अगदी हातातोंडाशी आलेला यशाचा घास केवळ त्यांच्याजवळ तरून जाण्यासाठी पुरेशा नावा नव्हत्या म्हणून थोडक्यासाठी हुकला . [दारा शुको याचा पंजाब आणि सिंध या प्रांतांमधून जो पाठलाग झाला त्या संबंधीची सविस्तर हकीकत पुढीलप्रमाणे आहे : ५ जून रोजी तो दिल्लीं येथे पोहोचला. त्याने बाबरच्या जुन्या किल्ल्यात मुक्काम केला व तेथील मालमत्ता आपल्या उपयोगात आणली . त्याचप्रमाणे त्याने अनेक उमरावांची धनदौलत आपल्या ताब्यात घेतली . त्याचा उद्देश दिल्ली येथे नवे सैन्य उभारण्याचा होता . त्याने आपल्या मुलाला बंगालमधून बोलावणे पाठविले आणि इतर बादशाही अधिकाऱ्यांना आपल्याला मदत करण्याविषयी लिहिले . शहाजहानबरोबरही त्याने पत्रव्यवहार चालू ठेवला (**ए. एन**., १२०, १२१; **अकीलखान**, ६३; **मासूम** ७५ ब). परंतु औरंगजेब त्याला सुखाने दिल्ली येथे राहू देणार नव्हता . आग्रा किल्ला जिंकून घेतल्यामुळे भावाचा पाठलाग करण्यास तो मोकळा होता . त्याने त्याप्रमाणे तयारी केली हे कळताच दाराने दिल्ली येथून पलायन करण्याचे ठरविले . पूर्वेकडे आपल्या मुलाला मिळून शुजाशी संगनमत करावे व औरंगजेबाला तोंड द्यावे असा विचार त्याच्या मनात आला . परंतु शुजा त्याच्या शत्रूचा मित्र होता . त्याचा पराभव दाराच्या मुलाने नुकताच केलेला होता . साहजिकच शुजाबरोबर मैत्री अशक्य होती . अशा परिस्थितीत त्याला पंजाबकडे जावेसे वाटले . पंजाब ही शिपायांची भूमी होती आणि तेथे त्याचा विश्वासू अधिकारी गैरतखान हा होता . दाराने म्हणून लाहोरकडे मोर्चा वळविला आणि आपल्या मुलाला आग्रा व दिल्ली यांना वळसा घालून आपल्याला येऊन मिळण्यास सांगितले . या निर्णयामुळेच बापलेकांचा नाश झाला . (**ए. एन्**., १२५-१२६) १२ जून रोजी दारा याने दिल्ली सोडली आणि तो सरहिंद येथे पोहोचला . तेथून कूच करून तो ३ जुलै रोजी लाहोर येथे पोहोचला . तेथे त्याने

माणसे आणि युद्धसामग्री यांची जमवाजमव केली. त्याने लाहोर येथून औरंगजेबाच्या अधिकाऱ्यांना औरंगजेबाविरुद्ध बंड करण्याची चेतावणी दिली. (**ए. एन्.**, १४२-१४३, १७८-१७९; **के. के.**, भाग २. ३३; **स्टोरीया** भाग १. ३१०).

सतलज येथे शत्रूने नदी पार करू नये म्हणून त्याने आपला सेनापती दाउदखान याला पाठविले. तेथून थोड्या अंतरावर रुपार येथे त्याने गैरतखान आणि मुसाहिब बेग यांना पाठविले. त्याने शुजाला पत्र लिहून औरंगजेबाविरुद्ध पूर्वेकडे आघाडी उघडण्यास सांगितली. दाराला अशी आशा होती की, औरंगजेबाची फौज दक्षिणेतून दमून आलेली होती, पावसाळ्याला सुरुवात झालेली आहे आणि त्यामुळे औरंगजेबाला आपला त्वरित पाठलाग करता येणार नाही. दाराची ही आशा फोल ठरली. कारण लाहोरला पोहोचून त्याला एक महिना होत आहे तोच औरंगजेब सतलज नदीपाशी पोहोचल्याची बातमी आली (१४ ऑगस्ट).

औरंगजेबाने १३ जूनला आग्रा सोडले होते. परंतु मुरादचा धोका जवळ असल्यामुळे त्याने दाराचा लगेच पाठलाग केला नाही, तर बहादुरखान याला २१ जून रोजी दाराच्या पाठलागावर पाठविले. मुरादचा निकाल लावल्यावर त्याने दाराकडे आपले लक्ष वळविले. दिल्ली येथे त्याचा २-३ आठवडे वेळ गेला. त्याच्या सैन्याला विश्रांतीची गरज होती. सुलेमान शुको याच्या हालचालींकडे लक्ष देणे जरूर होते. त्याने शायस्ताखान याला गंगा नदीचा उजवा किनारा रक्षण करण्यासाठी पाठविले, शेख मिर याची सुलेमान शुकोविरुद्ध रवानगी केली आणि खलीलउल्लाखान याला बहादुरखानाच्या मदतीला पाठविले. त्याने प्रथम विस्कळीत झालेली राज्यव्यवस्था ठिकाणावर आणली. त्याशिवाय त्याच्यापुढे जो मोठा प्रश्न होता तो शहाजहानची जागा भरून काढण्याचा. त्याने आता उघडउघड बंडखोरीचे धोरण स्वीकारण्याचे ठरविले व स्वतःला राज्याभिषेक करून घेण्याचा ज्योतिषांनी २१ जुलै हा ठरविलेला दिवस राज्याभिषेकाला योग्य असल्याचे सांगितले. मोठ्या प्रमाणावर तयारी करण्याला आता वेळ नव्हता. तेव्हा घाईघाईने तयारी करण्यात आली. दिल्ली बाहेरच्या शालीमार बागेत राज्याभिषेकाचा समारंभ उरकण्यात आला. औरंगजेबाने आलमगीर, पादशहा आणि गाझी या पदव्या धारण केल्या. दरम्यान बहादुरखान सतलज नदीवर पोहोचला होता. त्याने रुपार येथे नदी ओलांडून दाराच्या फौजेवर हल्ला केला आणि त्यांना पळवून लावले. दुसऱ्या दिवशी त्याच ठिकाणी खलीलउल्लाखानाने सतलज नदी ओलांडली. (**ए. एन्**, १६४–१६६).

आता फक्त बियास नदी ही दारा आणि औरंगजेबाचे सैन्य यांच्यामध्ये होती. दाऊदखानाला लाहोरहून दाराने बियास नदी ओलांडण्यासाठी व औरंगजेबाबरोबर युद्ध करण्यासाठी पाठविले. परंतु दाउदखान हा गोविंदवाल येथे आल्यावर औरंगजेबाच्या सैन्याची संख्या त्याला कळली. म्हणून त्याने सुलतानपूर येथून फौजेची मदत मागितली. दरम्यान औरंगजेबाने कुमक आल्याखेरीज युद्ध करू नये असा आदेश खलीलउल्लाखानाला पाठविला होता. स्वतः औरंगजेब १५ ऑगस्ट रोजी रुपार येथे पोहोचला. तेथून त्याने जयसिंग आणि दिलेरखान यांना खलीलउल्लाखानाच्या मदतीला पाठविले. तेथे त्यांना कळले की, दाराने लाहोरहून पळ काढला आहे.

यावरून एक गोष्ट सिद्ध झाली आणि ती म्हणजे ही की दारा हा प्रत्येक बाबतीत औरंगजेबापुढे कमी पडला. त्याने अशी कबुली दिली की आपण औरंगजेबाला प्रतिकार करू शकत नाही. याचा परिणाम असा झाला की दाराच्या सैन्यानेच कच खाल्ली. याचवेळी औरंगजेबाने दाराच्या सन्यात फितुरी करावयास सुरुवात केली. त्याने दाराचा विश्वासू अधिकारी दाऊदखान याच्या नावे एक खोटे पत्र लिहून ते दाराच्या हाती पडेल अशी व्यवस्था केली. औरंगजेबाचा उद्देश साध्य झाला. दाऊदखान जेव्हा परतला तेव्हा दाराचे मन त्याच्याविषयी बदललेले असल्याचे त्याला आढळून आले. या घटनेला आधार हा फक्त मनूची याचाच मिळतो. (पाहा, **मासूम**, ८९ ब, ९३ ब; **स्टोरीया**, भाग १. ३११, ३१२). मागे सांगितल्याप्रमाणे या घटनेनंतर दाराने १८ ऑगस्ट रोजी लाहोरहून मुलतानकडे पळ काढला. सिपाहर शुको आणि दाऊदखान त्याला नंतर येऊन मिळाले. औरंगजेबाचे अधिकारी हे दाराच्या पाठलागावर होतेच. ते बरोबर एक आठवड्याने लाहोर येथे पोहोचले. खलीलउल्लाखान हा २९ रोजी लाहोर येथे पोहोचला आणि लगोलग दाराच्या पाठलागावर निघाला. (**ए. एन्.**, १८६-१८८). खुद्द औरंगजेबाने ११ सप्टेंबर रोजी बियास नदी ओलांडली. तेथे त्याला खलीलउल्लाने असे कळविले की मुलतान येथे दारा जोरदार प्रतिकार करण्याची शक्यता आहे. या बातमीमुळे औरंगजेबाने स्वतः दाराचा पाठलाग करण्याचे ठरविले. त्याने निवडक सैन्य बरोबर घेतले आणि दररोज १४ ते २२ मैलांची मजल मारीत तो १७ सप्टेंबर रोजी मुमानपुर या ठिकाणी येऊन पोहोचला. तेथे त्याला दाराने मुलतानहून भाक्करकडे पळ काढल्याची बातमी लागली. त्याच्या पाठलागावर औरंगजेबाने सफशिकनखान याला पाठविले. तो स्वतः २५ रोजी मुलतान येथे पोहोचला. तेथून दाराच्या पाठलागावर पुढे न जाता तो दिल्ली येथे परतला. दारा पळ काढीत असताना वाटेत त्याचे सैनिक त्याला सोडून चालले होते. खुद्द त्याचा बक्षी खाजा सादिक औरंगजेबाला येऊन मिळाला. १३ आक्टोबर रोजी दारा सक्कर येथे पोहोचला. परंतु औरंगजेबाच्या सैन्याने त्याचा पिच्छा सोडला नाही. सफशिकनखान हा ३० रोजी कूच येथे पोहोचला. तेथे त्याला औरंगजेबाने पाठविलेली रसद येऊन मिळाली. या ठिकाणी दाराने सिंधू नदी ओलांडून सक्करमध्ये प्रवेश केल्याची बातमी त्याला मिळाली. पाठलाग करणाऱ्या फौजेची संख्या १५ हजार एवढी होती. या सैन्याचे दोन भाग करण्यात आले आणि एका भागाने सिंधू नदीच्या उत्तर किनाऱ्याने आणि दुसऱ्या भागाने डाव्या किनाऱ्याने कूच करण्यास सुरुवात केली. सफशिकनखान तारीख २१ रोजी भाक्कर येथे पोहोचला आणि शेख मिर भयंकर अडचणी सोसून सक्कर येथे पोहोचला. (**ए. एन्.**, २७३–२७४). येथे त्यांना असे कळले की दाराने तेथून पुन्हा दक्षिणेकडे पळ काढला आहे. त्याच्याजवळ आता जेमतेम ३००० सैनिक उरले होते. सतत माघारीला दाराचे सैनिक आता कंटाळले होते. त्याचे सर्व सैन्य त्याला सोडून गेले. इतकेच नव्हे तर दाऊदखान हा देखील त्याला सोडून निघून गेला. दाऊदखानाने "आपल्याबद्दल संशय का आहे" असे दाराला विचारले, तेव्हा दाराला असे वाटले की दाऊदखान हा प्रश्न ढोंगीपणाने विचारीत आहे तेव्हा त्याने दाऊदखानाला "तुला बडतर्फ केलेले आहे" असे सांगितले. या हुकमावर दाऊदखानाचा विश्वास बसेना. त्याने दाराची आपल्या निष्ठेबद्दल पुन्हा पुन्हा खात्री दिली तरी देखील दाराने त्याचे म्हणणे मान्य केले नाही. नाईलाजास्तव तो औरंगजेबाला जाऊन मिळाला. औरंगजेबाने त्याला मोठ्या पदावर चढविले. (**मासूम**, ९३ ब, ९६ अ; **ए. एन्.**, २७४, २७५; **एम. यू.**, भाग २. ३३; **स्टोरीया**, भाग १. ३१७-३१८). कूच करत दारा सक्करच्या दक्षिणेस ५० मैलांवर पोहोचला. येथून कंदहारकडे जाण्याचा रस्ता निघत होता. कंदहारकडे जाण्याचे त्याच्या नोकरांनी व बायकांनी साफ नाकारले. तेव्हा दाराने शेवानकडे पळ काढला. दरम्यान सफशिकनखान २१ आक्टोबर रोजी भाक्कर येथे येऊन पोहोचला होता. त्याला शेवानच्या किल्लेदाराने दारा हा शेवानच्या परिसरात आल्याची खबर दिली. सफशिकनखानाने ताबडतोब घाई करून दाराला नदीच्या विरुद्ध किनाऱ्याच्या बाजूने गाठले. दाराच्या

अनुक्रमणिका

पलायनाचा मार्ग याच ठिकाणी रोखता येणार होता . औरंगजेबाच्या दोन्ही सैन्यांमधून बोटीच्या मदतीने पळ काढण्याचा एकच मार्ग दाराला होता . औरंगजेबाच्या सैन्याजवळ बोटी नव्हत्या . सफशिकनखानाने शेवानच्या किल्लेदाराकडे बोंटीची मागणी केली आणि त्याला दारावर हल्ला करण्यास सांगितले. परंतु दाराचे नाविकबळ आपल्यापेक्षा अधिक आहे असे कळवून शेवानचा किल्लेदार महमद तारखान याने दारावर हल्ला करण्याची जबाबदारी टाळली. दरम्यान २ नोव्हेंबर रोजी दाराच्या सैन्याने आपले ठिकाण सोडले . सैनिकांनी भरलेल्या बोटी सफशिकनखानाच्या सैन्याच्या दृष्टीस आल्या. परंतु दाराच्या सैनिकांनी भरलेल्या बोटी किल्ल्याच्या दिशेने चाललेल्या होत्या . सफशिकनखानाने त्यांच्यावर तोफांचा भडिमार केला. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही . ३ नोव्हेंबर रोजी दारा ठट्टा येथे पोहोचला . पुन्हा दाराचा पाठलाग सुरू झाला . १९ रोजी सफशिकनखान ठट्टा येथे पोहोचला . तेथे त्याला दाराने पुन्हा एकदा कच्छचे रण आणि गुजराथकडे पळ काढल्याचे समजले . याचवेळी पाठलाग करणाऱ्या सैन्याला शुजाच्या आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी परतण्याचा औरंगजेबाचा हुकूम आला . ५ डिसेंबर रोजी हे सैन्य परत फिरले . अशा रीतीने दाराचा पाठलाग संपुष्टात आला.]

(२) रजपुतान्यात दारा : देवराईची लढाई

दाराचा कच्छमध्ये प्रवेश

तट्ट्याच्या पूर्वेस ५५ मैलांवर असलेले वादिन सोडल्यानंतर दाराने कच्छचे रण (Salt Lagoon सॉल्ट लागून) नोव्हेंबर अखेरीला ओलांडले. पाण्याविना त्याला अपरिमित अशा हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. कच्छ बेटाचे राजधानीचे शहर भूज येथे तो येऊन पोहोचला तेव्हा त्याचे स्वागत झाले आणि तेथला राजा आणि काठियावाडमधील नवानगरचा जामसाहेब यांनी त्याला सर्वतोपरी साहाय्य देऊ केले . त्यामुळे दात कूच करीत जेव्हा अहमदाबाद येथे येऊन पोहोचला तेव्हा त्याच्या नेतृत्वाखाली ३००० माणसे होती. **दारा अहमदाबादचा ताबा घेतो** :- अहमदाबाद येथे त्या प्रांताचा नवा सुभेदार शहानवाजखान त्याला जाऊन मिळाला आणि त्याने तेथील शाही खजिना दारासाठी खुला केला (९ जानेवारी १६५९). दाराने आपल्या फौजेत वाढ करून तिची संख्या २२००० सैनिकांपर्यंत नेली आणि सुरतेहून सारा तोफखाना आणविला. या सुमारास त्याला कळले की औरंगजेबावर हल्ला करण्यासाठी शुजा हा अलाहाबादच्या पलीकडे चाल करून गेला आहे . **जसवतसिंगाकडून अजमिरला येण्याचे आमंत्रण** :- तेव्हा त्याचवेळी दाराने आगऱ्यावर धडक मारण्यासाठी झपाट्याने कूच केले . वाटेत त्याला जसवंतसिंगाकडून अजमीरला येण्यासंबंधी बोलावणे आले . जसवंतसिंगाने त्याला आपल्या सर्व राठोड आणि इतर रजपुतांसह येऊन मिळण्याचे अभिवचन दिले.

औरंगजेब जसवंतला दारापासून फोडतो

परंतु दरम्यान औरंगजेबाने शुजाचा खाजवा येथे पूर्णपणे मोड केला होता . (५ जानेवारी). [औरंगजेब आणि शुजा यांच्यामध्ये झालेला संघर्ष आणि त्यामध्ये झालेला शुजाचा मोड याची सविस्तर हकीकत पुढे दिलेली आहे . दाराचा पराभव केल्यानंतर आणि मुरादबक्षाला कैद केल्यावर औरंगजेबाने शुजाला एक मित्रत्वदर्शक पत्र लिहिले . त्याने त्याच्या जहागिरीत बिहार प्रांताची भर टाकली . या पत्राचा शुजाला प्रथम मोठा दिलासा वाटला . औरंगजेब त्याला लिहितो , "शहाजहान बादशहाजवळ तू नेहमी बिहारची मागणी करीत असस . तो प्रांत आता मी तुला देत आहे . तेथील राज्यकारभार तू व्यवस्थित तऱ्हेने कर . दाराचे प्रकरण मिटविल्यावर मी तुला तुझ्या इच्छेला येईल ते देईन ." (**आलमगीरनामा**, २११, २३३, २२४) औरंगजेबाने आपला भाऊ आणि बाप यांना जी वागणूक दिली ते लक्षात घेऊनच शुजाने या पत्राची संभवना केली. त्याने औरंगजेबाला एक जुजबी पत्र लिहिले आणि तो युद्धाच्या तयारीला लागला . यावेळी औरंगजेब दाराच्या पाठलागावर पंजाबमध्ये होता. या संधीचा सुजाने फायदा घेण्याचे ठरवले . आपल्या सल्लागारांचा सल्ला त्याने मानला नाही , आणि त्यांना असे उत्तर दिले की , "राजपुत्र सुलतान महमद याचा मी पराभव करीन . त्याचप्रमाणे शहाजहानला गादीवर बसवून त्याचा सेवक म्हणून मी दरबारात राहीन ." (**मासूम**, ९६ अ, ९६ ब; **आलमगीरनामा**, २२४) या विचाराने तो पाटणा येथे गेला . तेथे त्याला त्याचा सेनापती मिर इस्फन्दियार मामुरी हा येऊन मिळाला . त्याने शुजाला आक्रमक पवित्रा घेण्याला उत्तेजन दिले . आक्टोबर १६५८ मध्ये २५ हजार फौज घेऊन शुजाने पाटणा सोडले . दाराच्या हुकमावरून वाटेतील सर्व किल्ले तेथील अधिकाऱ्यांनी शुजाच्या ताब्यात दिले . २३ डिसेंबर रोजी तो अलाहाबाद येथे पोहोचला . ३० डिसेंबरला तो खाजवा येथे पोहोचला . तेथे त्याला औरंगजेबाचा मोठा मुलगा सुलतान महमद याने आडविले . तीन दिवसांनी खुद्द औरंगजेब छावणीत दाखल झाला आणि त्याने युद्धाची सूत्रे हाती घेतली. औरंगजेबाने इतकी घाई केली त्याला काही निश्चित कारणे होती . शुजाच्या हालचालीवर त्याचे पूर्ण लक्ष होते . दाराच्या पाठलागावर असताना शुजाच्या हालचालींच्या गंभीर बातम्या त्याच्या कानावर येत होत्या . मुलतान येथे त्याने दाराचा पाठलाग काही अधिकाऱ्यांवर सोपविला आणि झपाट्याने कूच करीत तो राजधानीकडे निघाला . २० नोव्हेंबर १६५८ रोजी तो दिल्लीला पोहोचला . तीन दिवसांनी त्याने आपला मुलगा

सुलतान महमद याला अलाहाबाद येथे खान दौरान याला मिळण्यासाठी रवाना केले . थोड्याच अवधित जुल्फिकारखान आणि इतर अधिकारी आपल्या फौजासहीत अलाहाबाद येथे जाऊन पोहोचले . (**आलमगीरनामा**, २२६, २३४, २३५). हे चालले असताना शुजा बनारस येथेच होता . दिल्ली येथे पोहोचण्याचा त्याचा एकमेव मार्ग आता बंद झाला होता . औरंगजेबाची आता अशी समजूत झाली की शुजा आता माघार घेईल . या हेतूने त्याने दिल्ली येथे १२ दिवस मुक्काम केला . परंतु शुजाने आपली आगेकूच बेजबाबदारपणे चालूच ठेवली . तेव्हा औरंगजेबाने दिल्ली सोडून पुढे चाल करून जाण्याचे ठरविले. २ जानेवारी १६५९ रोजी त्याच्या फौजा कोरानजिक सुलतान महमद याच्या फौजेला जाऊन मिळाल्या . (**आलमगीरनामा**, २३५, २३८, २४१). याच वेळी मिर जुम्ला हा झपाट्याने कूच करीत दक्षिणेतून औरंगजेबाला येऊन मिळाला.

खाजवाचा रणसंग्राम

३ जानेवारी रोजी औरंगजेबाने लढाईची तयारी केली आणि फौजेच्या तुकड्यांकडे त्यांची कामगिरी वाटून दिली . फौजेतील अधिकाऱ्यांनी त्यांना दिलेल्या हुकमाप्रमाणे त्यांच्या सैनिकांची रचना केली . प्रत्येक तुकडीपुढे हत्ती आणि तोफखाना आणि पाठोपाठ चिलखती घोडेस्वार अशी सैन्याची रचना करण्यात आली . ९० हजार घोड्यांच्या खुरांनी जी धूळ उधळली त्यामुळे सारी पृथ्वी आणि आकाश व्यापून गेले . (**आलमगीरनामा**, २४२, २४५, २५०. अधिक माहितीसाठी पाहा **के. के.**, भाग २ , ४९; **अकीलखान**, ७५). सकाळी आठ वाजता खुद्द औरंगजेब रणांगणावर हजर झाला. फौजेने कूच करण्यास सुरुवात केली, आणि दुपारी तीन वाजता औरंगजेबाची सेना शत्रूसैन्यापासून १ मैलावर पोहोचली . शुजाने फक्त आपला तोफखाना पुढे पाठविला . दोन्ही फौजांत थोडी गोळाबारी झाली . रात्री शुजाचा तोफखाना मूळ छावणीकडे परतला . ही जागा उंचवट्यावरची होती. ती मिर जुम्ला याने व्यापली आणि तेथे तोफा चढविल्या . औरंगजेबाचे सैन्य युद्धाचा पोशाख न उतरविता तसेच निद्रिस्त झाले. मिर जुम्ला याने रात्रभर गस्त घातली आणि रक्षकांना सावध राहण्याविषयी हुकूम दिला . (**आलमगीरनामा**, २५२). पहाट नुकतीच झाली होती आणि अशा वेळी छावणीमध्ये एकच गोंधळ उडाला . वातावरण घोषणांनी भरून गेले . काय झाले आहे हे कोणासच कळेना . औरंगजेबाकडे खरी परिस्थिती सांगण्यासाठी जेव्हा जासूद आले आणि या कारणाचे मूळ जवसवंतसिंग आहे असे आढळून आले . जसवंतसिंगाने शुजाला निरोप पाठवून असे कळविले होते की मध्यरात्रीनंतर मी राजपुत्र महमदच्या छावणीवर हल्ला करीन. औरंगजेब माझा प्रतिकार करण्यासाठी पाठीमागे येईल अशा वेळी तुम्ही औरंगजेबावर हल्ला करावा . याप्रमाणे जसवंतने हल्ला केला . त्याच्या रजपूत सैनिकांनी मिळेल ती वस्तू लुटली . ही लूट घेऊन रजपूत आग्र्याच्या वाटेला लागले . परिणामी औरंगजेबाच्या सैन्याची घडी विस्कटली . जे भ्याड होते ते जसवंतबरोबर पळाले , आणि काहीजण शुजाकडे निघून गेले . अशा परिस्थितीत औरंगजेबाने कमालीचा धिमेपणा दाखवून बाजू सावरून नेली . परंतु शुजाला असे वाटले की त्याला फसविण्याची ही एक जसवंत आणि औरंगजेब यांच्यामधील योजना असावी . साहजिकच शुजाने काही हालचाल केली नाही . जसवंतच्या पलायनाची बातमी औरंगजेबाला कळाली तेव्हा त्याने उद्‌गार काढले की , "तो जर गेला असला तर त्याला जाऊ दे ." त्यानंतर त्याने आपल्या अधिकाऱ्यांना बोलावून सांगितले की "जसवंत गेला ही परमेश्वराची आपल्यावर कृपा आहे . कारण जर का लढाईच्या मध्यात त्याने विश्वासघात केला असता तर साऱ्यांचाच नाश झाला असता. (पाहा **आलमगीरनामा**, २५५, २५६; **के. के.**, भाग २. ५३; **अहकाम**, ४ ब). असे सांगून औरंगजेबाने त्याच्या भोवतालच्या फौजेत होणारा संभाव्य गोंधळ थांबविला . त्याने जासूद पाठवून प्रत्येक अधिकाऱ्याला आपापल्या जागी ठाम राहण्याचा हुकूम दिला आणि असे जो करणार नाही त्याला स्वतःपुढे आणण्याची ताकीद केली . इस्लामखान याला जसवंतची जागा देण्यात आली . बाकीच्या सैन्याची रचना तशीच ठेवण्यात आली . दुसऱ्या दिवशी सकाळी औरंगजेबाने सैन्याची पाहणी केली . अनेक गेलेले अधिकारी पुन्हा परतले . औरंगजेबाला आपल्या हाताखाली असलेल्या सैन्याची संख्या ५० हजार असावी असा अंदाज आला . या उलट शुजाचे सैन्य जेमतेम २३ हजार ऐवढे होते. अगदी निश्चिंत मनाने औरंगजेबाने युद्धाला सुरुवात करण्याचा हुकूम दिला . सैन्याच्या समोर औरंगजेबाची निवडक अशी फौज अब्दुल्लाखानाच्या हाताखाली होती . आघाडीचे सेनापती जुल्फिकारखान आणि सुलतान महमद हे होते . उजव्या फळीवर इस्लामखान हा होता आणि डाव्या फळीवर खान दौरान आणि रामसिंग हे होते . सैन्याच्या मध्यभागी औरंगजेब असून तेथील सेनासमुदाय जवळ जवळ २० हजार एवढा होता. बादशहाच्या जवळ मिर जुम्ला होता. सकाळी आठ वाजता लढाईला तोंड लागले. औरंगजेबाच्या सैन्यापुढे आपली सेना कमी आहे हे जाणून त्याने (शुजाने) आपल्या सेनेची रचना वेगळ्या पद्धतीने केली . त्याने आपले सर्व सैन्य एका ओळीत उभे करून समोर तोफखाना ठेवला . सैन्याच्या मध्यभागी शुजा आपला मुलगा बुलंद अख्तर याच्या समवेत होता . त्याच्या सैनिकांची संख्या १० हजार एवढी होती . शुजाने आक्रमक पवित्रा टाकून पहिला हल्ला चढविला. दोन्ही बाजूंकडून तोफांचा भयंकर भडिमार झाला . शुजाच्या उजव्या बाजूला सय्यद आलम हा होता . त्याने औरंगजेबाच्या सैन्यावर आघाडीला तीन खवळलेले हत्ती ठेवून हल्ला चढविला . या हल्ल्याच्या तीव्रतेने औरंगजेबाची डावी आघाडी कोसळली . सैनिकांनी रणांगणातून पळ काढण्यास सुरुवात केली . दरम्यान औरंगजेब मरण पावल्याची अफवा पसरली . त्यामुळे सर्व सैन्यात एकच गोंधळ माजला . दरम्यान शुजाच्या सैन्याने औरंगजेबाच्या मध्य आघाडीवर हल्ला चढविला . परंतु त्यांना खुद्द औरंगजेब , मुर्तजाखान आणि हसन अलीखान यांनी थोपवून धरले. याचवेळी शुजाच्या तीन हत्तींनी औरंगजेबाकडे मोर्चा वळविला . परंतु औरंगजेब ठाण मांडून आपल्या हत्तीवर बसून राहिला . त्याचा बंदुकची जलालखान याने तीन हत्तींपैकी एका हत्तीच्या माहुताला ठार मारले . औरंगजेबाच्या एका माहुताने त्या हत्तीवर उडी मारून त्याला काबूत आणले. उरलेले दोन हत्ती पळून गेले . औरंगजेबाने आता आपल्या उजव्या फळीला मदत करण्यासाठी कूच केले . तेथे त्याला एकच गोंधळ उडालेला दिसून आला. इतक्या कठीण प्रसंगात देखील त्याचे मनोधैर्य आणि धिमेपणा कायम होता . त्याने असा विचार केला की आपल्या सैन्याचे तोंड आता डावीकडे आहे. अशा परिस्थितीत आपण जर उजव्या फळीकडे कूच केले तर आपण पळ काढला असे आपल्या सैन्याला वाटेल . यासाठी त्याने जासूद पाठवून आपल्या सेनापतींना आपण काय करणार याची खबर दिली . नंतर तो आपल्या सैन्याच्या उजव्या फळीच्या मदतीला गेला . याठिकाणी सैफखान आणि अक्रामखान हे चिकाटीने शत्रूजवळ लढत होते . औरंगजेब तेथे पोहोचला आणि लढाईचे पारडे शुजाच्या विरुद्ध उलटले. औरंगजेबाची उजवी फळी शत्रूवर तुटून पडली आणि तिने शत्रूचा धुव्वा उडविला . बुलंद अख्तर हा आपल्या बापाकडे पळून गेला . (**आलमगीरनामा**, २६३; **अकीलखान**, ७८) दरम्यान बादशाही आघाडीने शत्रूचा हल्ला परतवून लावला होता. बादशहाच्या तोफखान्याच्या माऱ्यापुढे शत्रूच्या सैन्याने सुरक्षित अंतरावर पळ काढला . (**मासूम** १०३ अ, १०४ अ) यानंतर औरंगजेबाच्या सैन्याने सर्व बाजूंनी आगेकूच करण्यास सुरुवात केली. शुजाची मधली फळी त्यांनी वेढली . तोफांचे गोळे शुजाच्या अवतीभोवती पडू लागले . परिणामी शुजा हत्तीवरून उतरून घोड्यावर स्वार झाला. लढाई आता जवळ जवळ संपल्यासारखी होती . हत्तीचा रिकामा हौदा बघून शुजाच्या शिपायांचे मनोधैर्य ढासळले . शुजा ठार झाला अशी त्यांची कल्पना झाली. रणांगण सोडण्याचे त्यांना एक निमित्त मिळाले . क्षणातच साऱ्या सैन्याने पळ काढला . पळणाऱ्या सैनिकांना ओरडून थोपवून

अनुक्रमणिका

धरण्याचा व्यर्थ प्रयत्न शुजाने केला . हे चालू असताना शुजाचे एक एक अधिकारी औरंगजेबाला येऊन मिळाले . शुजाने आपले मुलगे , सय्यद आलम, आलावर्दीखान, आणि उरलेली फौज घेऊन रणांगणातून पळ काढला (अधिक माहितीसाठी पाहा **रुक्कात-इ-आलमगिरी**, नं १९ ; **पॅरिस एम्. एस्**, २ बी).

विजयाच्या या बातमीने औरंगजेबाच्या सैन्याने शहादणे वाजविली . औरंगजेब हत्तीवरून खाली उतरला आणि त्याने परमेश्वराला नमन करण्यासाठी रणांगणावर गुढगे टेकले . शुजाची सारी छावणी आणि सामानसुमान त्याच्या सैनिकांनी लुटले . लहान-मोठ्या ११४ तोफा आणि बंगालचे सुप्रसिद्ध ११ हत्ती व थोडाफार खजिना ही बादशाही सैन्याच्या हाती पडली . (**आलमगीरनामा** २६५ ; **खाफीखान**, भाग २,५९).] आणि नंतर मिर्जा राजा जयसिंग याच्या मदतीने त्याने जसवंतसिंगाला काही प्रमाणात त्याच्या मुलुखावर स्वारी करण्याच्या धमक्या देऊन आणि काही अंशी त्याला बढतीच्या आश्वासनांचे आमिष दाखवून आपल्याकडे फितवून घेतले होते . [वरील घटनेमुळे दारा मैरता येथे पोहोचला तेव्हा त्याला जसवंतचा ठावठिकाणा लागला नाही . त्यामुळे घाबरून जाऊन त्याने आपला एक विश्वासू चाकर दुबिनचंद याला जसवंतसिंगाकडे पाठविले . दुबिनचंद याने जसवंतला त्याने दिलेल्या वचनाची जाणीव दिली. त्यावर जसवंतने उत्तर दिले की आपण फौजेची जमवाजमव करीत आहोत आणि अजमेर येथे दाराला आपण मिळू.

अजमेर येथे पोहोचल्यावर दाराने परत दुबिनचंद याला जसवंतला आणण्यास पाठविले . परंतु जसवंतने दाराची विनंती झिडकारून लावली. दुर्दैवी दाराने पुन्हा एकदा प्रयत्न केला. त्याने आपला मुलगा सिपाहर शुको याला जोधपूर येथे जसवंतकडे पाठविले . परंतु त्याचाही काही उपयोग झाला नाही. शुको निराश होऊन आपल्या बापाकडे परतला . एक जातिवंत रजपूत आपल्या वचनाला विसरला . वारसाहक्काच्या या युद्धात जसवंतची कीर्ती डागाळली . ज्या लढाईचे नेतृत्व त्याच्याकडे होते त्या लढाईतून त्याने पळ काढला होता . महाराजा जसवंतसिंगावर विश्वास टाकणारा दारा खरोखरच दुर्दैवी होता . (**ए. एन.**, ३००, ३०९-३१२; **खाफीखान**, भाग २. ६५-६६; **बर्नियर**, ८५-८६; **ईश्वरदास**, ४३ ए; **कम्बू**, २१ अ; **अकीलखान**, ८१-८४).] आता औरंगजेब दाराच्या अगदी समीप येऊन ठेपला होता आणि त्यामुळे त्याच्याबरोबर लढा देण्याखेरीज दुसरा मार्ग दाराला उरला नव्हता . त्याने सुज्ञपणा दाखवून आपली योजना बदलली. उघड्या मैदानात औरंगजेबाबरोबर समोरासमोर घनघोर युद्धात गुंतवून घेण्याचे ऐवजी त्याने अजमीरच्या दक्षिणेस चार मैलांवर असलेली देवराईची खिंड ताब्यात घेऊन तेथून लढा देण्याचे ठरविले. ती खिंड अतिशय अरुंद असल्यामुळे लहानशा फौजेला सामर्थ्याने आपल्यापेक्षा अधिक असलेल्या शत्रूसैन्याला रोखून धरता येणे शक्य होते . त्याच्या सैन्याच्या दोन्ही फळ्यांना बिथली आणि गोकला टेकड्यांनी नैसर्गिक संरक्षण दिले तर त्याच्या पाठीशी संपन्न असे अजमीर शहर पसरले होते आणि तेथून त्याला अतिशय सहजगत्या रसदीचा पुरवठा झाला असता . त्याने, त्याच्या सैन्याने ज्या जागा व्यापल्या होत्या त्यांच्या दक्षिणेला असलेल्या दरीच्या दोन्ही बाजूला पसरलेल्या टेकड्यांना जोडणाऱ्या कमी उंचीच्या भिंती बांधून एक संरक्षक फळी उभारली. त्यासमोर त्याने मोर्चे बांधून काढले आणि संरक्षक म्हणून बांधलेल्या भिंतीत अधून मधून छोट्याछोट्या बुरुजांची (redoubts) उभारणी केली.

देवराईची लढाई

दाराने व्यापलेल्या या मोक्याच्या जागांवर औरंगजेब दक्षिणेकडून चाल करून आला आणि त्यावर त्याने १२ मार्च १६५९ या दिवशी सूर्यास्तापासून तोफांची प्रचंड आग ओकण्यास सुरुवात केली ती १३ मार्चची रात्र उलटेपर्यंत. दाराच्या फौजेने उंच ठिकाणी व्यापलेल्या आणि आडोशाआड असलेल्या आपल्या जागेवरून औरंगजेबाच्या असंरक्षित अशा गोलंदाजांवर आणि पायदळावर तोफखाना आणि बंदुकीच्या गोळ्यांचा मृत्यूलाही भय वाटेल असा अविरत मारा केला . औरंगजेबाच्या गोलंदाजांना या चढाईला तितक्याच दमदारपणे सडेतोड प्रत्युत्तर देता आले नाही . शत्रूने बांधलेले मोर्चे जवळ जवळ अजिंक्य होते . म्हणून औरंगजेबाने १४ मार्च रोजी आपल्या युद्धसल्लागारांची एक बैठक बोलावली आणि या बैठकीतून हल्ल्याची पुढीलप्रमाणे नवी रूपरेषा आखली . ती अशी : शहानवाजखानाच्या नेतृत्वाखाली असलेल्या शत्रूच्या डाव्या फळीवर सारी शक्ती पणाला लावून एकवटून हल्ला करावयाचा आणि त्याच वेळी शत्रूच्या उजव्या फळीला त्यांच्या समोर असलेल्या शाही फौजेच्या सेनाविभागाने गुंतवून ठेवावयाचे होते . या योजनेचे यश अर्थात शत्रूवर समोरासमोर होणाऱ्या हल्ल्यावर अवलंबून नसून शत्रूच्या डाव्या फळीच्या

पिछाडीवर (गोकला टेकडी) औरंगजेबाच्या फौजेची जी गुप्त कारवाई होणार होती तिच्यावर अवलंबून होते. गोकला टेकडी चढून जाण्याचा मार्ग जम्मूच्या डोंगरातील राजा राजरूप आणि त्याचे डोंगर चढून जाण्यात पटाईत असलेले जातभाई ह्यांनी शोधून काढला होता आणि त्या टेकडीवर चढून जाण्याची जबाबदारी औरंगजेबाने त्यांच्यावर टाकली होती.

शहानवाजखानाच्या खंदकांवर हल्ला

१४ मार्च रोजी सायंकाळच्या सुमारास शत्रूच्या डाव्या फळीच्या समोर एकवटून उभ्या असलेल्या शाही सैन्याने शहानवाजखानाच्या सैन्याने व्यापलेल्या खंदकांवर हल्ला चढविला . त्यांनी तोफखान्याचा जलदगतीने पुन्हा मारा सुरू केला आणि डाव्या फळीकडे दाराचे सैन्य जे कचाट्यात सापडले होते त्यांच्या मदतीसाठी आपले खंदक सोडून आणि पुढे चाल करून जाणाऱ्या दाराच्या इतर सेनाविभागांना रोखून धरले. रणांगणाच्या या भागात त्या दिवसाची भयानक अशी रणधुमाळी माजली. दाराच्या लोकांनी आपल्या जागांचे रक्षण करण्यासाठी अतिशय कडवा प्रतिकार केला . हल्ला करण्यासाठी बादशाही फौजेचे एकापाठोपाठ एक सेनाविभाग लाटांप्रमाणे दाराच्या सैन्यावर येऊन आदळू लागले . अखेर त्यांनी शत्रूच्या सर्व सैन्याला मैदानातून पाठीमागे रेटण्यात यश मिळविले आणि खंदकाच्या अगदी टोकापर्यंतच्या रणमैदानावर ताबा मिळविला.

या वेळेपर्यंत राजरूपचे लोक गोकला टेकडी पाठीमागच्या बाजूकडून चढून आले होते, तर शत्रूला आघाडीवर चाललेल्या घनघोर युद्धसंग्रामात इतर कसलीच शुद्ध राहिली नव्हती . त्यांनी आपले निशाण टेकडीच्या माथ्यावर रोवले आणि एकच गर्जना केली . याप्रमाणे पिछाडी कोसळून पडल्यामुळे दाराच्या डाव्या फळीत निराशेचा घनघोर अंधःकार पसरला . तरी देखील त्याच्या पुष्कळ सैनिकांनी आवेशाने प्रतिकार चालू ठेवला. या अखेरच्या प्रतिकाराला मोडून काढण्यासाठी शेख मिर याने आपला हत्ती पुढे घुसविला. परंतु त्याला एक गोळी लागून तो ठार झाला . सरते शेवटी औरंगजेबाच्या सैनिकांनी या खंदकावर चढाई केली . विजयाची आशा नसताना आणि सारे काही संपुष्टात आले तरी देखील शहानवाजखान आपल्या सैनिकांना चेतावणी देत होता . पण एका तोफगोळ्याने त्याच्या चिंधड्या उडविल्या. उरल्या-सुरल्या सैनिकांची फळी मोडली आणि त्यांनी काळोखाच्या आवरणाखाली रणांगणातून काढता पाय घेतला.

त्यातल्या त्यात आश्चर्याची गोष्ट ही की आतापर्यंत एकंदर चार मोर्चांपैकी फक्त एकच औरंगजेबाच्या फौजांनी जिंकून घेतला होता. पण तरी देखील दाराची सारी आघाडी कोसळून पडण्याला तेवढे पुरेसे होते. राजरूपच्या माणसांनी गोकला टेकडी काबीज केल्यामुळे दाराची संरक्षणफळी भेदून अस्ताव्यस्त झाली होती आणि दाराच्या सैनिकांना टिकाव धरून प्रतिकार करणे अशक्य झाले होते. आपला मुलगा सिपाहर शुको आणि केवळ बारा माणसे यांच्या समवेत दाराने विलक्षण घाईघाईने रणमैदानातून पळ काढला आणि तो गुजरातच्या रोखाने निघून गेला . अजमेरच्या सभोवतालच्या प्रदेशात भयंकर लुटालुटीच्या सैतानी साम्राज्याने थयथयाट घातला. जसवंतसिंगाच्या हाकेवरून हजारो रजपूत आसमंतात जमा झाले होते आणि ते गिधाडांप्रमाणे आपल्या भक्ष्याच्या शोधार्थ इतस्ततः घिरट्या घालू लागले . त्यांनी आता पराभूत झालेल्या दाराच्या सेनेची मालमत्ता आणि मालवाहू जनावरे यांची लुटालूट केली .
[औरंगजेबाबरोबर लढाई देण्याशिवाय दाराला दुसरा मार्ग नव्हता . या वेळेपर्यंत औरंगजेब अजमीरजवळ आलेला होता . जसवंताने केलेल्या विश्वासघातामुळे दाराची निराशा झालेली होती. अशा परिस्थितीत त्याची इच्छा असो वा नसो त्याला लढाईची तयारी करणे भाग पडले.

अनुक्रमणिका

स्वतःचे सैन्य कमी आहे हे दाराने ओळखून आपला लढाईचा बेत त्याने बदलला . त्याने अजमीरच्या दक्षिणेस चार मैलांवर देवराईच्या खिंडीत औरंगजेबाशी सामना देण्याचे ठरविले . त्याच्या फौजेच्या दोन्ही बाजूला बिथली आणि गोकला हे डोंगर होते . पिछाडीचे बाजूला अजमीरचे संपन्न शहर होते. त्याने दोन्ही डोंगराच्या कडा जोडणारी एक भिंत आपल्या फौजेच्या दक्षिण बाजूला बांधली . त्याच्या साऱ्या सैन्याची विभागणी चार भागात झालेली होती . त्यावर सेनापती म्हणून मुस्तफाखान आणि जानी बेग , फिरोज मिवती, शहानवाजखान आणि महमद शरीफ कलीच खान आणि सिपाहर शुको यांची नियुक्ती झालेली होती . आघाडीच्या मध्यभागी दारा होता . (**ए. एन्**., ३१३–३१४; **के. के.,** भाग २ , ६७; **ए. के**. ८४; **ईश्वरदास**, ४६ ब).

सैन्याच्या दोन्ही बाजूला असलेल्या दोन टेकड्यांच्या रांगांनी दाराच्या सैन्याला आणखी मजबुती आणली होती . दाराच्या सैन्यासमोर औरंगजेबाची फौज होती आणि या फौजेवर दाराच्या तोफखान्याचा प्रचंड भडिमार होऊ शकला असता . अशा परिस्थितीत दारा औरंगजेबाची प्रतीक्षा करून राहिला. औरंगजेब कूच करीत देवराईहून एक मैलावर येऊन पोहोचला . त्याच्या आघाडीच्या पुढे दोन मैल दाराच्या फौजेचे खंदक होते. त्या दिवशी रात्री औरंगजेबाचा एक अधिकारी पुरदिलखान याने दोन्ही सैन्यांमधील एका टेकडीचा ताबा घेतला . दुसऱ्या दिवशी सकाळी दाराच्या सैन्याने त्याची हाकालपट्टी करण्याचा प्रयत्न केला . परंतु दाराच्या प्रयत्नांना यश आले नाही आणि औरंगजेबाचा तोफखाना या टेकडीवर नेण्यात त्याच्या फौजेला यश आले . दाराच्या सैन्याने आपल्या फळीकडे माघार घेतली . आता औरंगजेबाच्या सैन्याने पुढे कूच केले आणि फौजेची नवीन रचना करण्यात आली . तोपर्यंत संध्याकाळ झाली . युद्धाला तोंड लागले . प्रथम दोन्ही सैन्यांकडून परस्परांवर तोफांचा भयंकर भडिमार झाला. दोन दिवसपर्यंत हे युद्ध चालले होते . दरम्यान दाराच्या सैन्यातील दोन हजार चिलखती सनिक रणांगणावर आले आणि त्यांनी युद्धाचे आव्हान दिले. औरंगजेबाच्या सैन्याने ते स्वीकारले. दोन्ही फौजांत आता हातघाईची लढाई सुरू झाली . दाराचा तोफखाना अतिशय मारक ठरला. तर औरंगजेबाच्या तोफखान्याचा दाराच्या उंचीवर असलेल्या छावणीवर काहीच परिणाम झाला नाही . (**के. के.,** भाग र. ६८). १३ तारखेची रात्र बादशाही अधिकाऱ्यांनी खलवते करण्यात घालविली . शत्रूवर नवीन तऱ्हेने हल्ला करण्याचा मनसुबा करण्यात आला . आपल्या समोर असलेल्या शत्रूच्या फळीवर सर्व शक्ती एकत्रित करून हल्ला करण्याचे औरंगजेबाने ठरविले . त्यासाठी दाराच्या सैन्याच्या डाव्या बाजूला गोकला नावाची टेकडी होती, तेथून हल्ला करण्याचे ठरले . हे काम जम्मूच्या टेकड्यांतील राजाराजरूप याच्याकडे सोपविण्यात आले . संध्याकाळी गोलंदाजांनी थोडी विश्रांती घेतली तेव्हा राजरूपने गोकला टेकडीच्या पाठीमागून आपले सैन्य पाठवले . तो स्वतः शत्रूचे लक्ष विचलित करण्यासाठी घोडेस्वार घेऊन टेकडीच्या पुढील बाजूने आला . त्याच्यावर शहानवाजखान याने १००० फौजेनिशी हल्ला केला . ते पाहताच दिलेरखान, शायस्ताखान, शेख मीर आणि जयसिंग हे त्याच्यावर तुटून पडले . त्याबरोबर युद्धाची व्याप्ती वाढली . औरंगजेबाच्या सैन्याने तोफांचा भडिमार करून दाराच्या सैनिकांना त्यांच्या खंदकातच रोखून धरले . युद्धाची एकच घनचक्कर उडाली . दाराच्या सैन्यातील गोलंदाजांनी औरंगजेबाच्या अनेक सैनिकांचा बळी घेतला. परंतु औरंगजेबाने एक तासभर हल्ल्याचा जोर सतत चालू ठेवला . दरम्यान राजरूपचे सैनिक गोकला टेकडीवर चढून गेले होते . त्यांनी आपले निशाण तेथे रोवले . या घटनेने दाराच्या डाव्या फळीमध्ये निराशेची लाट पसरली . औरंगजेबाच्या सैन्याने आपल्या हल्ल्याचा जोर वाढविला आणि दाराच्या सैन्याच्या खंदकात घुसण्याचा त्यांनी जोरदार प्रयत्न केला . या हल्ल्यात शेख मीर हा ठार झाला . दिलेरखानाला जखम झाली. अखेर औरंगजेबाला यश मिळाले आणि शत्रुसैनिक नाउमेद झाले . (**ए. एन्**., ३२३–३२४). औरंगजेबाच्या सैन्याने आता शत्रुसैन्याची कत्तल सुरू केली. शहानवाजखान ठार झाला आणि इतर अनेक अधिकारी जखमी झाले . दाराच्या सैन्याने रणभूमी सोडून पळण्यास सुरुवात केली . दरम्यान सूर्यास्त झाला आणि रणभूमीवर काळोख पसरला . शत्रू कोण आणि मित्र कोण हे ओळखू येईना . परंतु युद्धाचा निकाल लागल्यासारखाच होता. या सर्व घटना दारा अतिशय काळजीपूर्वक पाहात होता . त्याने आपल्या कोसळणाऱ्या आघाडीला रसद पाठविली . आपल्या सैनिकांना त्याने धीर देण्याचा प्रयत्न केला . परंतु शहानवाजखानाचा मृत्यू आणि गोकला टेकडीचा पाडाव यांमुळे त्याच्या अधिकाऱ्यांचे मनोधैर्य खचले . त्यांनी लढण्यास नकार दिला . काळोखाचा फायदा घेऊन पळून जाण्यात सुरक्षितता आहे असा निर्णय त्यांनी घेतला . (**कम्बू**, २१ व , २२ अ). अशा परिस्थितीत रणांगण सोडण्याखेरीज दारालाही दुसरा मार्ग उरला नव्हता . आपला मुलगा सिपाहर शुको आणि सेनापती फिरोज मिवती यांना बरोबर घेऊन त्याने गुजरातकडे पळ काढला . दाराची छावणी विजयी सैनिकांच्या आणि त्याच्या मदतीसाठी जमा झालेल्या परंतु जसवंतच्या फितुरीमुळे लढाईत भाग न घेतलेल्या हजारो रजपुतांच्या भक्षस्थानी पडली . (अधिक माहितीसाठी पाहा **ए. एन्**, ३२५–३२६, ३२९, ४१०; **के. के**., भाग २ . ७३). दुसऱ्या दिवशी सकाळी दाराचे इतर अधिकारी औरंगजेबापाशी आले आणि त्याच्या चाकरीत ते शिरले . औरंगजेबाने दाराच्या पाठलागासाठी जयसिंग आणि बहादुरखान यांची नियुक्ती केली. (**ए. एन्**., ३३०–३३२; **के. के**, भाग २. ७२, ७४; **स्टोरीया**, भाग १, ३४२).]

(३) दाराचे पलायन आणि कैद

दाराचे गुजरातकडे पलायन

देवराईची लढाई चालू असताना दाराचा जनानखाना आणि संपत्ती ही हत्ती, उंट आणि खेचरे यांवर लादून दाराचा विश्वासू खोजा खाजा मकूल आणि त्याच्या दिमतीला काही फौज यांच्या संरक्षणाखाली पलायनासाठी सज्ज अशी अजमेर येथील अनसगर तळ्याच्या डाव्या काठावर ठेवण्यात आली होती . त्यांनी १४ रोजी रात्री त्या ठिकाणाहून पळ काढला आणि ते दाराला १५ तारखेच्या दुपारी मैरता येथे येऊन मिळाले. परंतु औरंगजेबाने या अगोदरच जयसिंग आणि बहादुरखान यांच्या हाताखाली एक बलाढ्य सेनाविभाग त्यांच्या पाठलागावर रवाना केला होता . त्यामुळे दाराला कुठेच विश्रांती घेता आली नाही . तर उलट पूर्वीइतक्याच घाईने त्याला आपला पलायनाचा मार्ग आक्रमावा लागला . त्याने जेव्हा भैरता सोडले

तेव्हा त्याच्याजवळ फक्त ३००० सैनिक बरोबर होते . गुजरातेकडच्या पलायनात त्यांनी दरदिवशी ३० मैल किंवा अधिक देखील मजल मारली . भयंकर उष्मा आणि धूळ आणि तंबू आणि मालवाहू जनावरे यांची कमतरता यामुळे या पलायनात त्यांना असह्य यातना सहन कराव्या लागल्या . उष्माघात आणि भयंकर कष्ट यामुळे त्यांच्या जवळची उरलेली घोडी आणि उंट वगैरे जनावरे मरून गेली . (पाहा **बर्नियर**, ८८–९२; **ए. एन्**., ४१०; **कम्बू**, २२६). **कच्छहून सिंधकडे दारा** :- दाराला असे आढळून आले की तो पोहोचण्याच्या अगोदरच औरंगजेबाची पत्रे सर्व ठिकाणी गेलेली होती आणि प्रत्येक ठिकाणचे स्थानिक अधिकारी त्याला बंदिस्त करावयाच्या तयारीत होते. (पाहा **अकीलखान**, ८७; **पॅरिस एम. एस**., ९५ अ, ९६ ब, ९७ ब, १८० अ). त्याचा बातमीदार अहमदाबादेहून परतला . तेव्हा त्याने मनाची घोर निराशा करणारी बातमी आणली की, जर दाराने अहमदाबादमध्ये प्रवेश करण्याचा प्रयत्न केला तर त्याला प्रतिकार करण्यात येईल . त्यामुळे दाराने मनाशी बांधलेल्या मनोरथांची धुळदाण उडाली . ज्या ठिकाणी आपल्याला अखेरचा आसरा घेता येईल अशी त्यांना अशा होती त्यावर आता विरजण पडल्यामुळे दारा आणि त्याच्याबरोबरील सर्व मंडळी यामध्ये दुःख आणि निराशा यांचा एकच हलकल्लोळ माजून राहिला . जनान्यातून येणाऱ्या किंकाळ्या ऐकून प्रत्येकाच्या डोळ्यांत अश्रूंचा पूर लोटला . यावेळी डॉ. बर्नियर हा प्रवासी लेखक दाराच्या आजारी पत्नीवर औषधोपचार करीत होता त्याने याप्रसंगी त्या मंडळींना भोगावे लागलेले दुःख आणि त्यांना सहन कराव्या लागणाऱ्या यातना यांचे अतिशय हृदयद्रावक वर्णन केलेले आहे . "एकाद्या भिकारड्यासारखा आणि दरिद्र्यासारखा त्यांचा पोशाख झाला होता . जनाना वाहून नेण्यासाठी फक्त एक घोडा , एकच बैलगाडी आणि पाच उंट त्यांच्याजवळ होते . सामानसुमान वाहून नेण्यासाठी फक्त काही उंटच शिल्लक होते आणि माणसे म्हणाल तर त्यांची संख्या असून नसल्यासारखीच झाली होती ." अशा केविलवाण्या परिस्थितीत आलेल्या आशिया खंडातील संपन्न राजाच्या नियुक्त वारसाने च्छचे ते भयानक रण पुन्हा एकदा ओलांडले आणि तो सिंधच्या दक्षिण किनाऱ्यावर मे महिन्याच्या सुरुवातीला पोहोचला . (**ए. एन्**., ४१०–४११; **बर्नियर**, ८९–९१; **ईश्वरदास**, ४४ अ).

दारा अशा तऱ्हेची हालचाल करणार याचा अगोदरच औरंगजेबाने कयास बांधला होता . त्याने सिंधच्या खालच्या भागाकडे लाहोर येथून भाक्करकडे खलीलउल्लाखानाला रवाना केले . त्यामुळे खालच्या सिंधकडे जाण्याचा आपला मार्गही बंद झाल्याचे दाराला आढळून आले . औरंगजेबाचे स्थानिक अधिकारी आणि जयसिंगाच्या आघाडीच्या तुकड्या आपल्या शत्रूला वेढण्यासाठी उत्तर, पूर्व आणि आग्नेय दिशांकडून चाल करून येत होत्याच . सुटकेचा फक्त एकच मार्ग शिल्लक होता आणि तोच दाराने स्वीकारला . तो वायव्य दिशेकडे वळला, त्याने सिंधू नदी ओलांडली आणि कंदहारच्या मार्गे पर्शियाकडे पळून जाण्यासाठी म्हणून तो सिविस्तानमध्ये शिरला.

जयसिंगाकडून दाराचा पाठलाग

दरम्यान अजमीरहून जयसिंग हा दाराच्या पाठोपाठ त्याचा पाठलाग दरदिवशी १६ ते २० मैल कूच करीत करत होता . पाण्याची टंचाई , चाऱ्याचा अभाव आणि थकून जाणारे त्याचे घोडे आणि मालवाहू जनावरे यांची देखील त्याने पर्वा केली नाही . दाराचा मागोवा काढीत त्याने लहान आणि मोठे रण ओलांडले आणि कच्छ बेट तो पार करून गेला. वाटेत त्याला भयानक हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. "वाटेत काही जागी धान्याचा भाव रुपयाला एक शेर होता तर काही ठिकाणी अन्न मिळविणेच मुष्कील होऊन गेले." परंतु कठोर चिकाटीने त्याने आपल्या पाठलागाचा मार्ग चालू ठेवला आणि सिविस्तानच्या सरहद्दीवर त्याने सिंधू नदीचा किनारा ११ जून १६५९ रोजी गाठला . **जयसिंगाचे हाल** :- या धावपळीत

त्याच्याजवळील तीन चतुर्थांश फौज गारद झाली. नंतर त्याला असे कळले की दारा हा मोगल हिंदुस्थानची सरहद्द सोडून गेला आहे . तेव्हा हिंदुस्थानात सिंधू नदीच्या रोखाने त्याने आपला परतीचा मार्ग क्रमण्यास सुरुवात केली . [जयसिंगाने दाराच्या केलेल्या पाठलागाची सविस्तर हकीकत पुढीलप्रमाणे आहे : २० मार्च रोजी जयसिंग मैरता येथे पोहोचला. तेथे त्याला दाराने घेतलेला मार्ग कळल्यावर त्याने जालोर आणि सिरोहीच्या मार्गे दाराच्या पाठलागास सुरुवात केली . सिरोहीच्या अलीकडे त्याला जसवंतसिंग येऊन मिळाला . बादशाही फौजांनी संकटाची पर्वा न करता दररोज १६ ते २० मैल दाराचा पाठलाग केला . सिंधपूर येथे पोहोचल्यानंतर दारा कच्छकडे वळल्याचे त्यांना कळले . तेथील राजांनी दाराला आसरा देऊ नये अशी पत्रे जयसिंगाने अगोदरच लिहिली होती. पाठलाग करीत बादशाही सैन्य अहमदाबाद येथे पोहोचले . पाण्याच्या आणि चाऱ्याच्या अभावी वाटेत या सैन्याचे भयंकर हाल झाले . तो मोसम उन्हाळ्याचा होता. त्यामुळे गुरेढोरे दगावली. सैनिकांचा धीर खचू नये म्हणून त्यांना रोख पगार देण्यात आला . अहमदाबाद येथे एक दिवस मुक्काम करून बादशाही सैन्य पुढे निघाले . २२ एप्रिल रोजी जयसिंग पाथरी जिल्ह्यात पोहोचला . तेथून कूच करून ३ मे रोजी तो हलवाडच्यापासून ६ मैलांवर असलेल्या एका गावी पोहोचला . तेथे त्याला असे कळले की , कच्छच्या रणात दाराने पुन्हा प्रवेश केला आहे . (**पॅरिस एमएस**., ९४ ब–१०१ ब). १३ मे रोजी जयसिंग कच्छच्या राजधानीला पोहोचला . तेथील राजाने दाराला आश्रय दिलेला नव्हता . जयसिंग भूजजवळ येताच राजाने आपल्या मुलाला त्याच्या स्वागतासाठी पाठविले आणि १३ मे रोजी जयसिंगाची राजधानीबाहेर भेट घेतली . तेथे त्याला दाराने दक्षिण सिंधमध्ये प्रवेश केल्याचे कळले. यावर ५०० सैनिकांची एक तुकडी पुढे पाठविण्यात आली आणि बाकीचे सैन्य मागाहून निघाले.

कच्छच्या रणातून कूच करताना बादशाही सैन्याचे भयंकर हाल झाले . कच्छचा राजा आता बिथरला आणि त्याने वाटाड्या देण्याचे नाकारले. कच्छच्या रणाच्या दक्षिणेस ६ मैलांवर त्यांना काही विहिरी आढळल्या . त्यामधील चिखल असलेले पाणी पिऊन त्यांना आपली तहान भागवावी लागली. दुसऱ्या दिवशी रात्री लुना येथून बादशाही सैनिकांनी कच्छचे रण ओलांडण्यास सुरुवात केली . या रणाची रुंदी ७० मैल एवढी होती. त्यात पाण्याचा एक थेंबही नव्हता . मध्यरात्रीपर्यंत चंद्रप्रकाशाने त्यांना वाट दाखविली . त्यानंतर मशाली पेटविण्यात आल्या . सूर्योदयानंतर दोन तासांनी रण पार करण्यात आले. सर्व बादशाही फौज रहमान या खेड्यापाशी पोहोचली . तेथे असलेल्या तलावात सर्व बादशाही फौज घुसली . खेड्यातील नाले आणि इतर ठिकाणचे गढूळ झालेले पाणी पिऊन त्यांनी आपली तहान भागविली . दुपारपर्यंत कूच केल्यानंतर कुलाबी येथे आपल्या छावणीच्या ठिकाणी ते येऊन पोहोचले . येथे त्यांना खरी विश्रांती मिळाली . (**पॅरिस एमएस**., १०२ ब, १०३ ब, १०९ अ–११० अ). परंतु त्यांना आलेला अनुभव मात्र भयंकर होता. जवळ जवळ ८० मैल सारे सैन्य वाळवंट तुडवीत आले होते. पाण्याचा त्यांना एक थेंबही मिळाला नव्हता. हत्ती आणि घोड्यांची दैना तर विचारूच नका ! सूर्यास्तानंतर जेव्हा कूच करण्याची पाळी आली तेव्हा अनेक उंट आणि घोडे मरून पडले . जयसिंगाच्या चार हजार घोडेस्वारांपैकी जेमतेम एक हजार स्वारांचे घोडे शिल्लक राहिले . लष्करीदृष्ट्या जयसिंगाचा हा मोठा विक्रम होता . परंतु यासाठी त्याला फार मोठी किंमत द्यावी लागली. सिंधमध्ये त्याची प्रगती दररोज जेमतेम ६ ते ८ मैल होती. (**पॅरिस एमएस**., १०३ ब–१०४ अ, १०६ अ, १०८ अ; **ए. एन**., ४३३). २९ मे ला तो नसरपूर येथे पोहोचला . ११ जून रोजी तो सिंधू नदीच्या जवळ येऊन पोहोचला . तेथे त्याला दाराने सिविस्तानमध्ये प्रवेश केल्याचे व कंदहारकडे जाण्याचा त्याचा उद्देश असल्याचे कळले.

जयसिंगाचा हेतू अशा तऱ्हेने साध्य झाला. दारा आता हिंदुस्थानच्या भूमीवर नव्हता. तेव्हा त्याने आपल्याला परत बोलावून घेण्याविषयी लिहिले. जयसिंगाने दाराला पळून जाण्याची मुद्दाम संधी दिली असे मनूची लिहितो . या संशयाला पूर्णपणे जागा आहे . दरम्यान जयसिंग उत्तर हिंदुस्थानकडे येण्यासाठी निघाला असताना दारा कैद झाल्याची बातमी त्याला कळली. (**पॅरिस एमएस**., १०८ अ; **ए. एन.**, ४१४–४१५).]

इकडे दाराच्या कुटुंबिय मंडळींचा हिंदुस्थान सोडून पर्शियामध्ये जाण्याच्या कल्पनेला सख्त विरोध होता. दाराची आवडती पत्नी नदिराबानू ही अतिशय आजारी होती . उजाड अशा बोलन खिंडीतील प्रवासामुळे आणि कंदहारसारख्या जिथे मित्रत्वाचे अगत्य होईलच अशी खात्री नसलेल्या प्रदेशांतून जाण्यामुळे त्यांना ज्या हालअपेष्टा भोगाव्या लागल्या असत्या त्यामुळे तर तिचे प्राणच गेले असते . त्यामुळे दाराने आपला बेत बदलला आणि आजूबाजूच्या प्रदेशांतील एकादा टोळीप्रमुख की ज्याच्यावर सुरक्षिततेसाठी विसंबून राहता येईल आणि ज्याच्या अनुयायांची मदत मिळू शकेल अशांच्या शोधाला सुरुवात केली. हिंदुस्थानच्या सरहद्दीच्या बाजूने असलेल्या बोलन खिंडीपासून पूर्वेस ९ मैलांवरचा दादार येथील जमीनदार मलिक जीवन हा आपल्याला पाहिजे तशी मदत करू शकेल अशी आशा दाराला वाटली. अनेक वर्षांपूर्वी या अफगाण प्रमुखाला हत्तीच्या पायाखाली तुडवून ठार मारण्याची शिक्षा शहाजहानने दिली होती. दारा त्यावेळी आपल्या बापाच्या अतिशय मर्जीतला होता . त्याने बापाची विनवणी करून मलिक जीवनला त्याचे प्राण आणि स्वातंत्र्य पुन्हा मिळवून दिले . दाराने कृतज्ञतेची फेड जीवन करील या अपेक्षेने त्याच्याकडे पाहिले. तो दादारला पोहोचला . मलिक जीवनने त्याच्या योग्यतेनुरूप सन्मान करून आणि त्याची योग्य ती काळजी घेऊन दाराला आपल्या घरात नेले (बहुधा ६ जून).

दाराच्या पत्नीचा मृत्यू

अनुक्रमणिका

दादारला जात असताना भयंकर कष्टामुळे आणि औषध आणि विश्रांती यांच्या अभावी नदिराबानू मृत्युमुखी पडली. आपल्या पत्नीचे साहचर्य आता संपले या कल्पनेने दारा दुःखाच्या भोवऱ्यात सापडला . "त्याच्या डोळ्यांना सारे जग सुन्न दिसू लागले . त्याची मनःस्थिती विमनस्क झाली . त्याचे सारे शहाणपण नाहीसे झाले आणि त्याचा बुद्धिभ्रम झाला ." त्याने तिचा मृतदेह लाहोर येथे त्याचा गुरू मिया मीर ह्याच्या दफनभूमीमध्ये दफन करण्यासाठी पाठविला . त्याला अजून चिकटून असलेल्या सैनिकांपैकी ७० स्वार आणि त्याचा एकनिष्ठ अधिकारी गुल महमद यांना त्याने तिच्या मृतदेहाबरोबर संरक्षक म्हणून रवाना केले . **मलिक जीवनकडून दारा कैद केला जातो** :- आपल्या उरलेल्या अनुयायांना त्याने आपापल्या घरी परतण्याचा किंवा त्याच्याबरोबर पर्शियामध्ये जाण्याचा यांपैकी कोणत्याही प्रत्यवायाचा स्वीकार करण्याची पूर्ण मुभा दिली . सरतेशेवटी असा प्रसंग आला की दाराच्या विश्वासू अनुयायांपैकी एकही त्याच्याजवळ आता राहिला नाही . त्याची परिस्थिती आता फारच शोचनीय झाली आणि आपल्या यजमानाच्या विश्वासावरच केवळ त्याला अवलंबून राहावे लागले.

अखेर त्या अफगाणाच्या कृतज्ञतेच्या भावनेवर त्याच्या हव्यासाने मात केली आणि दिला शब्द पाळण्याचा त्याचा निर्धारही यामुळेच ढासळून पडला . त्याने विश्वासघाताने दारा , त्याचा धाकटा मुलगा आणि दोन मुली यांना कैद केले. (९ जून) आणि त्यांना बहादुरखानाच्या स्वाधीन केले. (पाहा **मासूम**, १३९ ब १४२ अ; **ए. एन.**, ४१२-४१४, ४१९; **कम्बू**, २२ ब, २३ अ; **के. के.**, भाग २. ८३–८४; **स्टोरीया**, भाग १. ३४७–३५१).

(४) दाराची कुतरओढ आणि निर्घृण हत्या [दाराचा पाडाव झाल्याची बातमी औरंगजेबाला २ जुलै रोजी मलिक जीवन याच्या पत्रावरून कळली. त्याने हे पत्र भर दरबारात वाचून दाखविले . परंतु त्याचा आपल्या भावनांवर इतका ताबा होता की , त्याने आपल्याला झालेला आनंद बाहेर दाखविला नाही. दारा पकडला गेला आहे या गोष्टीचा उल्लेख करण्याचे देखील त्याने टाळले . त्याने इतका संयम दाखविण्याचे कारण म्हणजे दाराला पकडल्याची बातमी त्याच्या दृष्टीने इतकी चांगली होती की तिच्यावर ताबडतोब विश्वास ठेवणे त्याला अशक्य झाले . परंतु जेव्हा १५ जुलै रोजी खुद्द बहादुरखानाने दाराचा ताबा घेतल्याचे त्याला कळविले , तेव्हा मात्र संशयाला जागा राहिली नव्हती . औरंगजेबाने आता ताबडतोब आनंद-उत्सव साजरा करण्याचा हुकूम दिला. यात त्याचा उद्देश अजूनही संशयी असलेल्या जनमताच्या संशयाचे निराकरण करण्याचा होता . (**ए. एन.**, ४१४–४१९; **मासूम**, १४२ अ; **कम्बू**, २३ ब; **खाफीखान**, भाग २.८५).]

दाराला दिल्ली येथे आणले जाते

बंदिस्त केलेल्या कैद्यांना दिल्ली येथे आणल्यावर अतिशय अपमानास्पद अशा अवस्थेत त्यांची राजधानीच्या शहरातून धिंड काढण्यात आली (२९ ऑगस्ट). एका चिखलाने माखलेल्या छोट्या हत्तीणीच्या पाठीवरील छत नसलेल्या हौद्यात दाराला बसविण्यात आले . त्याच्या बाजूला त्याचा चौदा वर्षांचा कोवळा तरुण मुलगा सिपाहर शुको हा होता आणि त्यांच्या पाठीमागे हातात नंगी तलवार घेऊन त्यांचा भयानक चेहेऱ्याचा बंदिपाल गुलाम नजर बेग हा बसला होता . जगातल्या अत्यंत वैभवसंपन्न अशा सिंहासनाचा वारस प्रवासामुळे माखलेल्या ओबडधोबड कपड्यांत आज बसला होता . त्याच्या मस्तकावर धुळीने माखलेला फक्त गरीबच केवळ वापरू शकतील असा फेटा होता . त्याच्या गळ्यात ना मोत्याची माळ होती की त्याच्या अंगावर एखादा खुलून दिसणारा हिऱ्याचा दागिना होता . त्याचे हात मोकळे होते पण पाय साखळदंडाने बद्ध केलेले होते . ऑगस्ट महिन्यातल्या तळपत्या सूर्यनारायणाचे ऊन वर रणरणत होते आणि अशा भयानक वेषात ज्या ठिकाणी एकेकाळी तो अतिशय वैभवाने आणि थाटामाटाने राहिला होता त्या ठिकाणी त्याची धिंड काढण्यात आली. अपमानाच्या जाणिवेने साऱ्या अंगाची लाहीलाही होत असताना देखील त्याने आपले मस्तक वर उचलले नाही की आजूबाजूला दृष्टिक्षेपही केला नाही . परंतु तो एखाद्या

पायदळी धुळीत पडलेल्या पर्णाप्रमाणे बसून राहिला.

दाराबद्दलच्या करुणेने तेथे जमलेल्या नागरिकांच्या मनातील इतर सर्व भावना साफ धुवून गेल्याप्रमाणे झाल्या. जमा झालेला जनसमुदाय संख्येने प्रचंड होता आणि बर्नियर सांगतो की जिकडे पाहावे तिकडे लोक दारासाठी नेत्रांतून अश्रू ढाळीत होते आणि त्याच्या भवितव्याबद्दल शोकाकूल झालेले दिसत होते. (अधिक माहितीसाठी पाहा **स्टोरीया**, भाग १, ३५४–३५५; **बर्नियर**, ९८–९९; **ए. एन.**, ४३१; **के. के.**, भाग २. ८६; **ईश्वरदास**, ४४ ब–४५ अ; **कम्बू**, २३ ब).

दाराला देहान्ताची शिक्षा

त्या दिवशी संध्याकाळी दाराचे भवितव्य ठरविण्यासाठी म्हणून औरंगजेबाने आपल्या मंत्र्यांची एक गुप्त बैठक बोलाविली. बर्नियरचा आश्रयदाता दानिष्मंदखान याने दाराचे प्राण वाचवावे यासाठी शिकस्त केली पण शायस्ताखान, महमद अमीनखान, बहादुरखान आणि जनान्यातून राजकन्या रोशनआरा यांनी धर्म आणि राष्ट्र यांच्या भल्यासाठी दाराला ठार करण्यात यावे असा आग्रह धरला. बादशहाच्या खजिन्यातील पगार खात असलेल्या तोंडपुजा धर्मवेत्त्यांनी दारा हा इस्लाम धर्माच्या तत्त्वापासून च्यूत झाला आहे आणि अतएव त्याला मृत्यू हीच शिक्षा योग्य आहे अशा तऱ्हेचे फर्मान काढून त्यावर आपल्या दस्तखती केल्या.

दाराचा खून

मलिक जीवन याला आता हजाराचा मनसबदार करण्यात येऊन बख्तियारखान अशी पदवी देण्यात आली होती. हा विश्वासघातकी मनुष्य ३० तारखेला दरबारात रुजू होण्यासाठी चालला असताना दिल्लीच्या नागरिकांनी त्याच्याविरुद्ध दंगा केला आणि या दंग्यामुळेच दाराचा शेवट काय होणार ते जवळ जवळ ठरल्यासारखे झाले. किंबहुना त्याचा शेवट जवळ आल्यासारखा झाला. त्याच दिवशी रात्री नजर बेग आणि इतर काही गुलाम यांनी दाराच्या खवासपुरा येथील तुरुंगाला भेट दिली. आपल्या बापाच्या बाहुपाशात बद्ध असलेल्या सिपाहर शुकोला त्यांनी ओढून काढले आणि दुर्दैवी दाराचे तुकडे तुकडे केले. औरंगजेबाच्या हुकुमावरून दाराचे कलेवर एका हत्तीवर ठेवण्यात आले. पुन्हा एकदा त्याची शहरातल्या रस्त्यांमधून धिंड काढण्यात आली आणि हुमायुनच्या कबरस्तानामधील एका घुमटाखालील (Vault) तळघरामध्ये त्याचे दफन करण्यात आले. [दुर्दैवी दाराचा जीव वाचविण्याचा प्रयत्न त्याच्या मुत्सद्द्यांनी अनेक मध्यस्थ्यांच्या तर्फे केला. (**ए. एन.**, ४३२; **खाफीखान**, भाग २-८७; **मासूम** १४२ ब; **बर्नियर** १००-१०१; **स्टोरीया** भाग १. ३५६) दाराला आपला शेवट काय आहे ते कळून चुकले. त्याने औरंगजेबाला पुढीलप्रमाणे पत्र लिहून त्याच्या दयाबुद्धीला आवाहन केले. "मला आता राज्यपदाची कोणतीच इच्छा राहिलेली नाही. ते आता तुला आणि तुझ्या मुलानांच लाभू दे. तू मला मारण्याचा जो बेत रचलेला आहेस तो माझ्यावर अन्याय करणारा आहे. मला राहण्यासाठी एक घर दे, एक दासी माझ्या सेवेला दे आणि मग सारे आयुष्य मी तुझे चांगले होण्यासाठी प्रार्थना करण्यात घालवीन." या पत्रावर औरंगजेबाने स्वतःच्या हस्ताक्षरात लिहिले ते असे, "तू प्रथम राज्य बळकावून घेण्याचा प्रयत्न केलास आणि तुझी भूमिका ही भानगडी निर्माण करण्याची होती. (**ब्रिटिश म्युझियम**, Or. Ms. Addl. 18881, f, 77 a.) औरंगजेबाकडून दाराला क्षमा होणे अशक्य होते. १६ वर्षांपेक्षा अधिक काळ दाराची छाया औरंगजेबाच्या जीवनावर पडली होती. दारानेच शहाजहानच्या मनात औरंगजेबाबद्दल आकस निर्माण केला होता. त्याच्याविरुद्ध विजापूर आणि गोवळकोंडा यांच्याबरोबर कारस्थाने केलेली होती. औरंगजेबाच्या शत्रूंना दाराने थारा दिला होता. या सर्व गोष्टी आणि त्यामधील मानखंडना औरंगजेबाने सहन केली होती. आता सूड घेण्याची त्याची संधी आली होती आणि ती सोडणारा औरंगजेब हा माणूस नव्हता. ता. ३० रोजी दिल्ली येथे झालेल्या दंग्याने दाराचा मृत्यू अगोदर ओढवून आणला गेला. मलिक जीवन याने दाराला पकडल्यामुळे लोक त्याच्यावर चिडले होते. ३० रोजी तो दरबारात चाललेला असताना दाराचे मित्र, हितचिंतक आणि इतर गुंड यांनी त्याला घेरले. बोलण्यातून मारामारीवर प्रकरण आले. मलिक जीवनच्या बऱ्याच अनुयायांना ठार मारण्यात आले आणि जर दिल्ली शहराचा कोतवाल सैनिक घेऊन आला नसता तर मलिकचे सर्व अफगाण अनुचर ठार झाले असते. मलिक जीवन याला सैनिकांच्या बंदोबस्ताखाली दरबारात आणण्यात आले. (अधिक माहितीसाठी पाहा, **खाफीखान** भाग २. ८६; **ए. एन.**, ४३२; **बर्नियर**, ९९).

अनुक्रमणिका

या घटनेनंतर औरंगजेबाने दाराला ठार मारण्याचा हुकूम दिला. ही कामगिरी नजरबेग आणि इतर गुलाम यांच्यावर सोपविण्यात आली. २० ऑगस्ट रोजी रात्री हे गुलाम दाराची , त्याचा मुलगा सिपाहर शुको याच्यापासून फारकत करण्यासाठी दाराच्या खोलीत शिरले . दारा त्यांच्यापुढे गुडघे टेकून आक्रंदून म्हणाला, "तुम्ही मला ठार मारण्यासाठी आला आहात काय ?" यावर गुलामांनी उत्तर केले की, "आम्हाला आज्ञा सिपाहर शुको याला येथून नेण्याची आहे." दाराचा मुलगा आपल्या बापाला ओळंबून उभा होता. नजरखानाने त्याला उठण्यास सांगितले. निराशेने सिपाहर आक्रोश करू लागला. यावर गुलामांनी सिपाहरला दारापासून ओढण्याचा प्रयत्न केला. दाराची शुकोला आपल्याजवळ ठेवण्याची विनंती त्याने धुडकावून लावली. अखेर शुकोला गुलामांनी जबरदस्तीने दुसऱ्या खोलीत नेले. दाराने निर्वाणीचा प्रयत्न म्हणून गुलामांवर हल्ला चढविला. परंतु दाराला गुलामांनी वेढले. काही मिनिटांतच दाराचा निकाल लागला आणि साऱ्या खोलीत शांतता पसरली . दाराचे मस्तक औरंगजेबाकडे पाठविण्यात आले. दाराच्या धडाची शहरातून धिंड काढण्यात आली व कसलाही विधी न करता त्यांच्या प्रेताचे दफन करण्यात आले . यानंतर जवळ जवळ २०० वर्षे गेली . १८५७ काल उजाडले आणि ज्या ठिकाणी दाराला पुरण्यात आले त्या जागेपासून थोड्या अंतरावर दिल्लीच्या बादशहाचे मुलगे, एक नातू आणि त्याने नेमलेला वारस यांना एका परकीय सत्तेच्या शिपायांनी गोळ्या घालून ठार मारले . त्यांच्या प्रेताची दाराच्या प्रेतासारखीच विल्हेवाट लावण्यात आली. आपल्या भावाच्या रक्ताने माखलेल्या सिंहासनावर आरंगजेब आसनस्थ झाला तर त्याच्या नातवंडांच्या आणि पंतवंडांच्या रक्ताने दिल्लीच्या भूमीवरील त्याच्या घराण्याचे नाव पुसले गेले.]

(५) सुलेमान शुकोचा शेवट

सुलेमानचे अलाहाबादहून हरद्वारकडे कूच

आता आपण दाराचा मोठा मुलगा सुलेमान शुको याची औरंजेबाने कशी वासलात लावली याचा मागोवा काढू. सुलेमानने शुजाचा बनारस येथे पराभव केला आणि पराभूत शुजाचा बिहारमधून भुंगिरपर्यंत त्याने पाठलाग केला. तेव्हा त्याला मे महिन्याच्या सुरुवाती सुरुवातीस (१६५८) आपल्या बापाकडून पत्र मिळाले आणि त्यात औरंगजेबाकडून धर्मत येथे आपला पराभव झाला आहे तरी त्याने ताबडतोब आपल्याला येऊन मिळावे असे लिहिले होते. सुलेमानने घाईघाईने शुजाबरोबर कसाबसा तह केला आणि तो आपल्या बापाकडे परतण्याच्या मार्गाला लागला. २ जून रोजी अलाहाबादेपासून पश्चिमेस १०५ मैलांवर असताना समुगड येथे आपल्या बापाचा संपूर्ण पराभव झाल्याची खबर त्याला मिळाली. त्या बातमीने त्याच्या शिपायांची मने विचलित झाली. त्याचे नामवंत आणि कसलेले सेनानी जयसिंग आणि दिलेरखान आणि इतर सगळे शाही चाकरीतील अधिकारी त्याला सोडून औरंगजेबाकडे निघून गेले. (**मासूम**, १४७ अ, १४८ ब; **ए. एन्.**, १६८-१७०). या दोघांच्या खुनाचा कट सुलेमानने केला असे मनूची म्हणतो. त्याच्या एकंदर सैन्यापैकी (**स्टोरीया**, भाग १. २८४-२८७). फक्त ⅓ म्हणजे जेमतेम ६००० सैनिक त्याने अलाहाबादकडे जी माघार घेतली त्यावेळी त्याच्याबरोबर राहिले (४ जून). सुलेमानजवळ अतिशय भारी किमतीचे आणि अवजड असे लाकूडसामान आणि काच सामान होते. त्याचा जनानाही प्रचंड होता. आता या सर्वांची वासलात तरी कशी लावायची अशा विमनस्क मनस्थितीतच त्याने वेळेच्या दृष्टीने त्याला महाग पडणारा बहुमोल असा एका आठवड्याचा कालावधी फुकट घालविला. अखेरीस त्याचे मुख्य सल्लागार बारहाने सय्यद यांच्या सल्ल्यावरून त्याने दिल्लीला एक मोठा वळसा घेण्याचा निणय घेतला आणि त्यांच्या जहागिरीचा प्रांत जो मध्यदोआब त्यातून गंगा नदीच्या उत्तर किनाऱ्यावरून कूच करत जाण्याचे ठरविले. येथून नंतर टेकडीच्या पायथ्याशी नदी ओलांडून आपल्या बापाला पंजाबात जाऊन मिळावे असे त्याने ठरविले असे करताना त्याला औरंगजेबाकडून अटकाव होईल अशी भीती बाळगण्याचे कारण नव्हते.

गढवालच्या राजाकडे सुलेमानचे पलायन

हरद्वारच्या समोरील गंगा नदीच्या किनाऱ्यावरच्या मार्गाने सुलेमानने झपाट्याने नगिन्याहून चान्दीच्या दिशेने कूच केले. त्याचे अनेक सैनिक दररोज त्याला सोडून जाऊ लागले आणि दिल्लीहून पुढे सरकणाऱ्या शत्रूच्या प्रबळ तुकड्यांनी दक्षिण, पूर्व आणि पश्चिमेकडून सर्व दिशांनी त्याची पुढे जाण्याची वाट

रोखून धरली. म्हणून आसरा घेण्यासाठी सुलेमानने श्रीनगरच्या टेकड्यांकडे पळ काढला . त्याच्याबरोबर तिकडे जाण्याचे त्याचे प्रमुख सल्लागार बारहाचे सय्यद यांनी साफ साफ नाकारले . गढवालमधील श्रीनगरचा राजा पृथ्वीसिंग याने एका अटीवर त्याला आसरा देण्याचे कबूल केले आणि ती म्हणजे सुलेमानने फक्त आपला जनाना आणि १७ अनुयायी यांना बरोबर घेऊन यावे , आपल्या शिपायांपैकी एकही बरोबर आणू नये . विपन्नावस्थेत असलेल्या आपल्या शाही पाहुण्याचा राजाने आदरसत्कार आणि योग्य भलावणूक केली. या रांगड्या परंतु सुरक्षित असलेल्या आसऱ्याचे ठिकाणी सुलेमानला एक वर्षाचा अवधी मोठ्या शांततेत घालविता आला . [हा मार्ग अखेरचा म्हणून सुलेमान शुको याने स्वीकारला . त्याने आपले सामानसुमान वगैरे अलाहाबादच्या किल्ल्यात ठेवले आणि १४ जून रोजी गंगा नदी ओलांडली . तेथून तो नगीना येथे झपाट्याने गेला आणि तेथील सरकारी खजिना त्याने लुटला. त्याचे शिपाई त्याला दररोज सोडून जात होते . येथून त्याला गंगा नदी , पुन्हा उजव्या किनाऱ्यावर जाण्यासाठी ओलांडता येईना . त्याची माणसे घाटापाशी आली की फेरीवाले पलीकडील बाजूला जात . त्यामुळे त्याला हरद्वारकडे कूच करणे भाग पडले . त्याने हरद्वारच्यासमोर चंदी येथे मुक्काम केला आणि आपला अधिकारी भवानीदास याला श्रीनगरच्या राजाची मदत मिळविण्यासाठी रवाना केले . (**ए. एन.**, १२५–१२६, १४८,१७०–१७३; **मासूम**, १४८ ब –१५१ अ). याठिकाणी त्याने जो मुक्काम केला त्या दिवसांत त्याचा मार्ग शत्रूने अडविला . औरंगजेबाने शायस्ताखानाला हरद्वार येथे सुलेमान शुकोने गंगा ओलांडून जाऊ नये म्हणून पाठविले. त्याचप्रमाणे यमुना नदी त्याने ओलांडू नये म्हणून शेख मीर व दिलेरखान यांची रवानगी केली . (**ए. एन.**, १४८, १५९–१६०; **अकीलखान** ७१). अशा तऱ्हेने दक्षिण आणि पश्चिम या दिशांकडील सुलेमानचा मार्ग बंद झाला आणि बापापासून देखील त्याची फारकत झाली.

दरम्यान शायस्ताखान गंगा नदीच्या उजव्या किनाऱ्याने कूच करून जात असताना फिदाईखान या अधिकाऱ्याने त्याच्यापुढे मजल मारून पूथ येथील फेरी गाठली . त्याची अपेक्षा सुलेमान तेथून गंगा पार करून जाईल अशी होती . येथे त्याला कुमाऊनच्या राजाकडून आलेल्या पत्रानुसार असे कळले की श्रीनगरच्या राजाच्या मदतीने नदी ओलांडण्यासाठी म्हणून सुलेमान हा हरद्वारकडे कूच करून जात आहे . यावर फिदाईखानाने १६० मैलांची मजल एका दिवसात मारली व तो हरद्वार येथे पोहोचला . सुलेमान हजारो सैनिकांसह विरुद्ध किनाऱ्यावर होता तर फिदाईखानापाशी जेमतेम ५० माणसे होती . पण सुलेमान शुकोच्या छावणीत बातमी पसरली की फिदाईखानाचे सैन्य म्हणजे बादशाही सैन्याच्या आघाडीचा भाग असून शायस्ताखान मुख्य सैन्यानिशी पाठीमागून चाल करून येत आहे . यात बराच अवधी लोटला आणि सुलेमानला श्रीनगरच्या टेकड्यांकडे आसऱ्यासाठी माघार घ्यावी लागली. (**अकीलखान**, ७१–७२). वाटेत त्याचा एकनिष्ठ सेवक बाकी बेग मरण पावला. परिणामी त्याच्या सैन्यात एकच गोंधळ उडाला आणि त्याचे निम्मे सैनिक पळून गेले. (**मासूम**, १५२ अ; **ए. एन.**, १७४). अशा परिस्थितीत सुलेमानने श्रीनगरचा राजा पृथ्वीसिंग याच्याकडे मदतीची याचना केली . राजाने त्याला फक्त काही सेवकांसहित आसरा देण्यास संमती दिली . अशा तऱ्हेने दुर्बलावस्थेत आपण राजाचा आसरा घ्यावा किंवा नाही याबाबत सुलेमानचे मन विचलित झाले . पण त्याला आता दुसरा मार्ग उरला नव्हता . शत्रूने त्याची सर्व बाजूंनी नाकेबंदी केली होती . त्याने राजाच्या अटी स्वीकारण्याचे ठरविले . परंतु त्याच्या सेवकांपैकी त्याला सोडून जाण्याचे ज्यांनी ठरविले होते त्यांनी त्याला अलाहाबादला परत जाण्याचा सल्ला दिला . त्यांनी एक खोटे पत्र तयार करून ते अलाहाबादच्या किल्लेदाराकडून आल्याचे त्याला सांगितले. पत्रात शुजा अलाहाबाद येथे आल्याचा मजकूर होता. परिणामी सुलेमानने आपले मत बदलले. राजाच्या आदरातिथ्याबद्दल त्याचे आभार मानले आणि नगिन्याच्या दिशेने त्याने कूच केले . येथे त्याचे सर्व सैनिक पळून गेले . त्याच्यापाशी जेमतेम ७०० माणसे राहिली . सुलेमानला जेव्हा खरी परिस्थिती कळली तेव्हा त्याने पुन्हा श्रीनगरकडे जाण्याचा बेत केला . परंतु त्याने तोंड फिरविले मात्र ताबडतोब त्याच्याजवळच्या उरल्यासुरल्या माणसांनी पळ काढला . त्याच्याजवळ आता फक्त २०० सैनिक उरले . त्याच्या जनान्यातच २०० स्त्रिया होत्या . त्यांचे संरक्षण करणे अशक्य होते . साहजिकच त्यांच्यापैकी फक्त उच्चभ्रू असलेल्यांना सुलेमानने आपल्याजवळ ठेवले आणि बाकीच्यांना त्याने वाटून टाकले . या कमनशिबी मंडळींनी पुन्हा दौड करण्यास सुरुवात केली . शत्रू पाठलागावर होताच. मोरादाबादचा जहागिरदार सुलेमानने नगिना सोडल्यावर १८ तासांनीच तिथे पोहोचला आणि सुलेमानने घेतलेली दिशा कळताच त्याने ताबडतोब सुलेमानचा पिच्छा पुरविला . आता सुलेमानपाशी त्याची बायको, इतर काही स्त्रिया, त्याचा दुधभाऊ आणि १७ सेवक एवढीच मंडळी राहिली . अशा परिस्थितीत आपल्यावर कोसळणाऱ्या संकटाची जाणीव असून देखील श्रीनगरच्या राजाने त्याला आश्रय दिला . त्याने आपला जुना राजवाडा त्याच्या दिमतीला दिला . सुलेमानचे आगमन तो एक भाग्याचे लक्षण समजला. इतकेच नव्हे तर त्याने आपली एक मुलगी सुलेमानला विवाहादाखल दिली. (**मासूम**, १५३ ब, १५६ अ).]

गढवालवर औरंगजेबाचे आक्रमण

परंतु जेव्हा सरतेशेवटी औरंगजेबाला आपल्या सर्व भावांवर विजय मिळाला तेव्हा त्याने आपला मोर्चा सुलेमानकडे वळविला . २७ जुलै १६५९ रोजी त्याने राजा राजरूप याला श्रीनगरच्या राजाकडून सुलेमानला आपल्या ताब्यात घेण्यासाठी रवाना केले ; परंतु जवळ जवळ वर्ष -दीडवर्षे त्याच्या प्रयत्नांना अपयश आले. औरंगजेबाने या कामगिरीवर जयसिंगाची नेमणूक केली . त्याने पृथ्वीसिंगाला पत्र लिहिले की बादशहाच्या आज्ञेचा अवमान करून तू आपल्या राज्याचा नाश ओढवून घेऊ नको . गढवालचा राजा आता अतिशय वृद्ध झाला होता . त्याने आपल्याकडे आसऱ्यासाठी आलेल्या आश्रितांचा विश्वासघात करण्याचे पाप आणि निर्लज्जपणा यांचा धनी होण्याचे साफ नाकारले . परंतु त्याचा मुलगा आणि वारस

मेदिनीसिंग हा अधिक व्यवहारी मनोवृत्तीचा होता . दिल्लीहून मिळणाऱ्या बक्षिसाच्या आशेने त्याची सद्सद्विवेकबुद्धी त्याला सोडून गेली . शिवाय आपण आपले राज्य गमावू ही भीती त्याला होतीच . कारण औरंगजेब हा गढवाल राज्याचा शेजारी आणि प्रतिस्पर्धी व अन्य राजे यांना गढवालवर स्वारी करण्याची आणि ते राज्य जिंकण्याची चिथावणी देतच होता. आपल्या यजमानाने आपला घात करण्याचे ठरविले आहे हे कळल्यावर सुलेमानने बर्फाच्छादित टेकड्या ओलांडून लडाखमध्ये पळून जाण्याचा प्रयत्न केला . परंतु त्याचा पाठलाग करण्यात आला आणि जखमी अवस्थेत त्याला पकडण्यात येऊन औरंगजेबाच्या अधिकाऱ्यांच्या स्वाधीन करण्यात आले. त्याला २ जानेवारी १६६१ रोजी दिल्ली येथे आणण्यात आले.

औरंगजेबासमोर सुलेमानला आणण्यात येते

५ जानेवारीला दुर्दैवी सुलेमानला दिल्लीच्या राजवाड्यातील (हॉल ऑफ प्रॉयव्हेट ऑडिअन्स) **दिवाण-इ-खास** मध्ये त्याच्या क्रूर चुलत्याच्या समोर उभे करण्यात आले (**ए. एन.**, ६०२). त्याचे तारुण्य, त्याचा उमदेपणा, त्याचा लढाऊ बाणा आणि त्याची आजची विपन्नावस्था पाहून दरबारी मंडळींना आणि बादशाही जनान्यातील स्त्रियांना देखील त्याची भवितव्यता आता काय आहे हे जाणून घेण्याची उत्सुकता लागून राहिली. औरंगजेबाने त्याच्याजवळ वरवर ममताळूपणा दाखविणारे संभाषण केले . तो म्हणाला, "तू मनाशी निर्धास्त राहा, तुझ्यावर कोणतेही संकट कोसळणार नाही . तुला देण्यात येणाऱ्या वागणुकीत माझा दयाळूपणाच तुला दिसून येईल ." राजपुत्राने औरंगजेबाला आपण याबद्दल अतिशय कृतज्ञ आहो हे दर्शविण्यासाठी कुर्निसात केला . नंतर त्याने अतिशय बाणेदारपणे बादशहाला सांगितले की जर त्याला पिण्यासाठी म्हणून पौस्ता [चुरडून आणि एक रात्रभर पाण्यात मुरत ठेवून त्यापासून तयार केलेले पेय म्हणजे पौस्ता . ग्वाल्हेरच्या किल्ल्यात बंदिस्त करून ठेवलेल्या राजपुत्रांना हे पेय सर्वसाधारणपणे देण्याचा प्रघात होता . कारण अशा राजपुत्रांची डोकी मारल्यास लोकमत काय म्हणेल याच्या भीतीने बादशहा या कृत्याला सहसा धजावत नसे . सकाळच्या प्रहरी पहाटे पहाटे या पेयाचा एक भलामोठा पेला अशा दुदवी कैद्याला दिला जाई आणि त्याने ते पेय संपूर्णपणे घेतल्याखेरीज त्याला दुसरे काहीही खाण्यासाठी देण्यात येत नसे . हे पेय अशा दुर्दैवी प्राण्यांना अगदी गलितगात्र करी, सावकाश सावकाश त्यांची शक्ती क्षीण करी आणि बुद्धीला मांद्य आणी . त्यांची मग शुद्धबुद्ध जाई आणि भान हरपे आणि कालांतराने काळच त्यांची या यातनातून सुटका करी .] देण्याचा बेत आधीच ठरलेला असेल तर त्याचे प्राण सत्वर हरण करण्यात यावे अशी त्याची आपल्या चुलत्याजवळ भीक आहे . औरंगजेबाने अतिशय गंभीरपणाचा आव आणून आणि मोठ्या आवाजात त्याला सांगितले की त्याने उल्लेखिलेले पेय त्याला खचित देण्यात येणार नाही असे आपले अभिवचन आहे . (**बर्नियर**, १०५-१०६; बर्नियर या वेळी स्वतः हजर होता. **स्टोरिया**, भाग १, ३८०).

सुलेमानचा शेवट

यानंतर सुलेमानला ग्वाल्हेरच्या किल्ल्यात पाठविण्यात आले आणि त्या भयानक राजबंदीशाळेत औरंगजेबाने शपथपूर्वक दिलेल्या वचनाला हरताळ फासून दुर्दैवी सुलेमान शुकोची अफूच्या अतिरिक्त सेवनाला भाग पाडून क्रूर हत्त्या केली. (मे १६६२)* (पाहा **कम्बू**, २४ ब; **ईश्वरदास**, ४१ ब; **बर्नियर**, १०७; **स्टोरीया**, भाग १, ३८०; **ए. एन.**, ६०३; **अहकाम-इ-आलमगिरी**, २८६ ब, ३०२ ब).

(६) सिंहासनावर आपला हक्क सांगण्यासाठी शुजाने केलेली पहिली आगेकूच : बहादुरपूरची लढाई

शहाजहानचा दुसरा मुलगा आणि बंगाल प्रांताचा सुभेदार राजपुत्र महमद शुजा हा अतिशय बुद्धिमान, आवडी-निवडीच्या बाबतीत काटेकोर आणि मनमोकळ्या स्वभावाचा असा होता . परंतु चैनीत

सदासर्वदा बेहोष होऊन जाण्याची त्याची वृत्ती , बंगाल सुभ्याचा सरळ धोपटपणे त्याने चालविलेला कारभार आणि माणसांचे हातपाय आखडून जातील अशा वातावरणाच्या बंगाल प्रांतातील १७ वर्षांचे त्याचे वास्तव्य यामुळे तो दुर्बल , आळशी आणि बेपर्वा झाला होता आणि सपाटून कष्ट करण्यास , सातत्याने प्रयत्नांची बूज राखण्यास , काळजीने व्यवहारचातुर्य दाखविण्यास किंवा बुद्धिमतापूर्वक साकल्याने परिस्थितीचा अभ्यास करण्यास असमर्थ बनला होता . त्याने आपल्या कारभारात ढिलेपणा येऊ दिला . आपले सैन्य अकार्यक्षम बनत गेले त्याची पर्वा केली नाही आणि राज्यकारभाराच्या सर्व खात्यांत ढिलाई आली आणि लोक कामचुकार बनले तिकडे त्याने लक्षही दिले नाही . इतके झाले तरीदेखील त्याला बुद्धिमांद्य मात्र आले नव्हते. तर त्याचा मेंदू पूर्वीइतकाच तल्लख होता. परंतु त्याच्या बुद्धीचे तेज आणि अंगचे कर्तृत्व दाखविणे त्याला आता अतिशय कष्टाचे जात होते . त्याच्या बुद्धिमतेची झलक वीज चमकून जावी तशी अधूनमधूनच चमकून जाई . कोणतीही गोष्ट जोषपूर्वक करण्याची अजून त्याच्या , अंगात धमक होती. परंतु त्यात आता सातत्य उरले नव्हते.

शहाजहानच्या आजाराचे अतिशयोक्तीने भरलेले वृत्तान्त बंगालची त्या काळची राजधानी राजमहल येथे शुजाच्या कानावर पडले . त्याने ताबडतोब आपल्याला बादशहा म्हणून राज्याभिषेक करविला आणि अबूल फौज नसिरउद्दीन महमद , तिमूर तिसरा, अलेक्झांडर दुसरा, शहा शुजा गाजी हे किताब धारण केले. (**के. के.,** भाग २. ५; **मासूम**, ३२ ब).

बरोबर प्रचंड फौज, उत्कृष्ट असे तोफखान्याचे पथक आणि बंगालच्या अतिशय उपयोगी अशा युद्ध नौका (नव्वारा) घेऊन त्याने कूच केले आणि तो २४ जानेवारी १६५८ रोजी बनारसला पोहोचला . दरम्यान दाराने आपला सर्वांत मोठा मुलगा सुलेमान शुको याला २२००० फौज देऊन त्याच्याविरुद्ध रवाना केले आणि त्याच्याबरोबर आपले कसलेले आणि अनुभवी सेनानी मिर्जाराजा जयसिंग आणि दिलेरखान रोहिला यांना दिले. (**आदाब**, २१५ ब; **आलमगीरनामा**, ३१; **मासूम**, ३४ अ; **कम्बू**, ९ अ).

सुलेमानचा शुजावर हल्ला

१४ फेब्रुवारी रोजी उजाडता उजाडता सुलेमान शुकोने बनारसच्या ईशान्येस ५ मैलांवर बहादुरपूर येथे शुजाच्या छावणीवर अचानक हल्ला केला (**आलमगीरनामा**, ३१; **मासूम**, ३४ अ–४० ब). हा हल्ला इतक्या गुप्तपणे करण्यात आला की त्याची यत्किंचितही चाहूल निद्रिस्त अशा बंगाली शिपायांना आणि त्यांच्या नेत्यांना लागली नाही . आपला पोषाख अंगावर चढविण्यासदेखील त्यांना अवसर मिळाला नाही आणि आपले छावणीतले सामान अस्ताव्यस्तपणे पाठीमागे टाकून त्यांनी पळ काढला . अतिशय मोठ्या संकटाने हत्तीवर आरूढ झालेल्या शुजाने त्याच्या भोवती साखळी केलेल्या शत्रूची कोंडी फोडली आणि तो आपल्या युद्धनौकांकडे सुरक्षित जाऊन पोहोचला . त्याच्या युद्धनौकांनी केलेल्या तोफांच्या भडिमाराने शत्रूला किनाऱ्यापासून लांब रोखून धरण्यात त्यांना यश आले . परंतु त्याची सारी छावणी आणि मालमत्ता अंदाजे पन्नास लाख रुपये किमतीची जेत्या सुलेमानच्या ताब्यात गेली. इतकेच काय पण त्याच्या फौजेतील अगदी साधा शिपाईदेखील नागवला गेला.

शुजाचे पलायन

भयचकित झालेल्या शुजाच्या सैन्याने भूमार्गाने ससेरममधून पाटण्याच्या रोखाने पळ काढला .

वाटेत खेड्यातील लोकांनी त्यांना साफ लुबाडले . परंतु आपल्या पाठलागावर शाही फौजा येत आहेत असे कळताच शुजा हा मुंगीरच्या रोखाने पळाला आणि त्याने खंदक खणून आणि मोर्चे बांधून रस्ता रोखून धरण्याचा प्रयत्न केला . (**मासूम**, ४० ब ४१ अ). याचा परिणाम असा झाला की सुलेमानला मुंगीरच्या नैर्ऋत्येस १५ मैलांवर सुरजगढ येथे आपला पाठलाग एकाएकी थांबवून मुक्काम करावा लागला . **शुजाचा सुलेमानबरोबर तह** :- याठिकाणी त्याने पुढची कसलीही हालचाल न करता निष्कारण काही मोक्याचे महिनेच्या महिने फुकट घालविले . परंतु धर्मतला दाराचा पराजय झाल्याची बातमी त्याला कळल्यामुळे त्याला कसातरी शुजाबरोबर घाईघाईने समझोता करावा लागून बंगाल , पूर्व बिहार आणि ओरिसा हे प्रांत त्याच्याकडे ठेवणे भाग पडले (७ मे). त्यानंतर त्याने आगऱ्याच्या रोखाने आपली परत चाल सुरू केली . (**मासूम**, ५२ अ–५६ अ).

औरंगजेबाने २१ जुलै रोजी दिल्ली येथे स्वतःला राज्याभिषेक करून घेतल्यावर शुजाला मित्रत्वाचे निदर्शक असे एक पत्र पाठविले. त्यात त्याने बिहारचा संपूर्ण प्रांत त्याच्या सुभेदारीत सामील केल्याचे आणि त्याच्यावर इतर आणखी मानमरातबांचा, वर्षाव करण्याचे अभिवचन दिले.

औरंगजेब दाराच्या पाठलागावर दूरवरच्या पंजाब प्रांतामध्ये गुंतल्याची बातमी कळताच शुजाची आकांक्षा पुन्हा बळावली . आग्र्यापर्यंतचा असंरक्षित असलेला प्रदेश जिंकून घेण्याची आणि शहाजहानची सुटका करण्याची हीच वेळ आहे अशी त्याने मनाशी खुणगाठ बांधली . तेव्हा १६५८ मध्ये ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीस शुजा हा पाटण्याहून २५००० घोडदळ आणि तोफखाना आणि युद्धनौका घेऊन निघाला आणि अलाहाबादहून तीन दिवसांच्या मुक्कामावर खाजवा येथे ३० डिसेंबरला पोहोचला . या ठिकाणी सुलतान महमद याने त्याची वाट रोखून धरल्याचे त्याला दिसून आले . दरम्यान औरंगजेब हा मुलतानपर्यंत दाराचा पाठलाग करून परत फिरला (३० सप्टेंबर) आणि तातडीने दौड करून तो दिल्लीला त्वरेने येऊन पोहोचला (२० नोव्हेंबर). त्याने आपल्या अलाहाबाद येथील सेनेची अधिक फौज आणि पैसा पाठवून मजबुती केली . शुजाचा आग्र्याला जाण्याचा राजमार्ग आता रोखला गेला होता . तारीख २ जानेवारी १६५९ रोजी खुद्द बादशहा शुजाच्या तळापासून पश्चिमेस ८ मैलांवर कोरा येथे आपल्या मुलाला येऊन मिळाला. त्याच दिवशी दक्षिणेतून मिर जुम्ला हा त्याठिकाणी येऊन पोहोचला.

(७) खाजवा : जसवंतचा विश्वासघातकीपणा आणि औरंगजेबाचा दृढनिश्चयीपणा

शुजा आणि औरंगजेब खाजवा येथे

४ जानेवारी रोजी औरंगजेबाने आपल्या फौजेची शिस्तबद्ध हालचाल करीत कूच केले आणि तो शत्रूच्या छावणीसमोर एक मैल अंतरावर येऊन ठेपला . या ठिकाणी त्याने मुक्काम केला . त्याच्या सैनिकांनी ताब्यात घेतलेल्या जागा पक्क्या रोखून धरल्या . त्याच्या फौजेतील प्रत्येक शिपाई अंगावर चिलखत ठेवून मोका धरलेल्या जागीच झोप घेत असे आणि रिकिब चढविलेला त्याचा घोडा त्याच्याजवळ उभा राही . त्या रात्री एकाद्या अव्वल दर्जाच्या सेनानीच्या दूर दृष्टीने मिर जुम्ला याने दोन फौजांमध्ये असलेली एक टेकडी ताब्यात घेतली आणि मोठ्या कष्टाने त्या टेकडीवर त्याने चाळीस तोफा चढविल्या . शत्रूची सारी छावणी अशा तऱ्हेने औरंगजेबाच्या टप्प्यात आली . सारी रात्र त्याच्या अधिकाऱ्यांनी अतिशय सावधगिरीने पहारा करून घालविली.

जसवंतचा औरंगजेबाच्या छावणीवर हल्ला

५ जानेवारी हा दिवस लढाईचा म्हणून मुक्रर करण्यात आला होता. त्या दिवशी पहाटेच काही प्रहर शिल्लक असताना औरंगजेबाच्या फौजेच्या आघाडीवर गडबड माजून कोलाहल निर्माण झाला . यामुळे साऱ्या छावणीभर झपाट्याने भीतीचे आणि गोंधळाचे एकच वातावरण माजून राहिले . हल्लेखोरांच्या आरोळ्यांनी, पळापळ करणाऱ्यांच्या किंकाळ्यांनी आणि बेदरकारपणे घोडा मारीत दौडत जाणाऱ्या स्वारांच्या आवाजाने आसमंत भरून गेले . काळोखामुळे गोंधळात आणखीनच भर पडली . या सर्वांच्या मुळाशी महाराजा जसवंतसिंग हा होता . त्याच्या ताब्यात औरंगजेबाच्या सेनेची उजवी फळी होती . आपला काहीतरी अपमान झाला आहे अशी त्याने आपल्या मनाची समजूत करून घेतली आणि त्याचा वचपा घेण्याचा त्याने बेत केला . असे म्हणतात की त्याने शुजाला निरोप पाठवून कळविले की रात्र संपता संपता आपण लढाईच्या मैदानापाठीमागून शाही छावणीवर हल्ला करू आणि त्यामुळे जेव्हा बादशहा त्याचा हल्ला उधळून लावण्यासाठी त्वरेने पिछाडीला मदत करण्यासाठी जाईल तेव्हा गोंधळून गेलेल्या शाही फौजेवर शुजाने एकाएकी त्वरित हल्ला करावा आणि तिला दोन शत्रूंच्या कचाट्यात भरडून काढावे . असा बेत ठरल्यावर मध्यरात्रीनंतर थोड्या वेळाने त्याने आपले १४००० रजपूत सैनिक तयार ठेवले , रणमैदानाकडून आपली पाठ फिरविली आणि त्याच्या माघारीच्या वाटेत असणाऱ्या राजपुत्र महमद सुलतानाच्या छावणीवर तो तुटून पडला . त्या ठिकाणी हाती सापडेल त्या सर्व गोष्टींवर रजपुतांनी हात मारला . खुद्द बादशहाच्या स्वतःच्या छावणीची देखील तीच गत झाली . रजपुतांनी आग्र्याचा मार्ग धरला पण काळोख आणि घडून आलेल्या प्रसंगाचा अचानकपणा, यामुळे उडालेल्या गोंधळाचे लोण फौजेच्या आघाडीवरही पोहोचले.

इतक्या भयानक प्रसंगात देखील औरंगजेबाने डोके शांत ठेवण्याची दाखविलेली धमक आणि तितक्याच प्रमाणात शुजाने दाखविलेला मनाचा अस्थिरपणा यामुळे ओढवून आलेले संकट टळले . जसवंतचा निरोप शुजाला मिळाला . छावणीतील कोलाहालही त्याने ऐकला परंतु त्या रात्री त्याने आपली छावणी सोडली नाही. कारण त्याला अशी भीती वाटली की , आपला नाश व्हावा यासाठी औरंगजेब आणि जसवंत यांनी आपल्याला छावणीतून बाहेर काढण्यासाठी आखलेल्या बेताचा हा परिपाक असावा.

रणांगणावर उभारलेल्या तंबूत बादशहा आपल्या ताहज्जुद प्रार्थनेमध्ये मग्न असताना जसवंतने केलेला हल्ला आणि त्याने छावणी सोडल्याची खबर त्याला मिळाली . तोंडाने एक शब्दही न उच्चारता त्याने फक्त आपल्या हाताची खूण केली . जणू काही त्याला असे सुचवावयाचे होते की , “तो जर गेला आहे तर त्याला जाऊ दे !” यानंतर बुद्धिपुरःसर शांतपणे प्रार्थना आटोपून तो आपल्या तंबूतून बाहेर पडला आणि खुर्चीच्या पालखीत आरूढ झाला (तख्त-इ-रावन). आपल्या अधिकाऱ्यांना त्याने पुढीलप्रमाणे आदेश दिला. “हा प्रसंग म्हणजे परमेश्वराने आपल्यावर कृपावंत होऊन आपल्याला दिलेले एक वरदानच आहे . कारण त्या काफराने जर युद्धाच्या धुमश्चक्रीत दगाबाजी केली असती तर काहीच हाती लागले नसते . त्याचे पलायन हे आता आपल्या पथ्यावरच पडले आहे.”

अशा तऱ्हेने औरंगजेबाने कणखरपणे आपल्या जागा धरून ठेवल्या आणि झालेला गोंधळ त्याच्या सैन्याच्या इतर सेनाविभागात पसरणार नाही अशी खबरदारी घेतली . निरनिराळ्या सेनाविभागाच्या अधिकाऱ्यांकडे खास दूत पाठवून त्यांना निरोप पाठविण्यात आले की , त्यांनी आपापल्या जागा मजबुतीने रोखून धराव्या आणि सैन्यातून पळून जाणाऱ्यांची मने वळवून त्यांना पुन्हा एकत्रित करावे . रात्र संपून उजाडल्यानंतर पलायनाच्या गर्दीत अनेक विश्वासू अधिकारी मुख्य सैन्यापासून दूरवर खेचले गेले होते .

अनुक्रमणिका

त्यांनी बादशाही सैन्याबरोबर हातमिळवणी करण्याची एकच त्वरा केली . आता औरंगजेबाच्या सेनाधिपत्याखाली ५० ,००० पेक्षा अधिक सैनिक जमा झाले तर शुजाकडील सैनिकांची संख्या जेमतेम २३,००० इतकी होती.

(८) खाजवाची लढाई

शत्रूने जी युद्धरचना आणि युद्धाचा व्यूह आखला होता त्याप्रमाणे आपली सैन्यरचना करून आणि शत्रूच्या एका सेनाविभागाला तोड म्हणून आपलाही एक सेनाविभाग समोर ठेवावयाचा अशा तऱ्हेचा पारंपारिक युद्धाचा डाव खेळून आपले चालणार नाही हे शुजा ओळखून होता . त्याने जर तसे केले असते तर त्याची छोटीशी फौज एकास तीन इतक्या प्रबळ असलेल्या आणि ज्यांची आघाडीची रेषा अतिशय दूरवर पसरलेली आहे अशा शत्रूकडून केव्हाच नाहीशी झाली असती आणि शत्रूच्या सागररूपी सेनासमुद्रात तिचा केव्हाच स्वाहाकार होऊन गेला असता . म्हणून अतिशय अवधान राखून त्याने त्या दिवशी आपल्या सेनेचा नवीन पद्धतीने व्यूह रचला. तोफखान्याच्या पाठीमागे त्याची सारी फौज एका लांबच लांब आघाडीने युद्धास सज्ज झाली. एखाद्या कसलेल्या सेनानीला साजेलशा पद्धतीने त्याने चढाईचे धोरण स्वीकारण्याचे ठरविले आणि प्रथम हल्ला करणाऱ्या पक्षाला नैतिक वरचढपणाचा जो फायदा मिळतो त्याच्या जोरावर त्याने आपल्या सैन्याच्या संख्येच्या कमीपणाची उणीव भरून काढण्याचे ठरविले . तोफा, हातगोळे आणि बंदुका यांच्या परस्परांवरील प्रचंड माऱ्याने सकाळी आठ वाजता युद्धाला तोंड लागले . त्यानंतर दोन्ही फौजांची आघाडी समोरासमोर येऊन हातघाईची लढाई सुरू झाली आणि एकमेकांनी शरवर्षावाने पस्परांस आच्छादून टाकले. शुजाच्या उजव्या फळीचे नेतृत्व सय्यद आलम याच्याकडे होते . त्याने सोंडेत दोन दोन मणाच्या लोखंडी साखळ्या झिरकावीत , पिसाळलेल्या अशा तीन हत्तींना समोर घालून शाही सैन्याच्या डाव्या फळीवर घसरा केला . या तीन हत्तींनी केलेल्या बेदरकार हल्ल्याला तोंड देऊन टिकाव धरणे सैनिकांना किंवा फौजेतील इतर प्राणिदलांना अशक्य होऊन गेले . शाही सैन्याच्या डाव्या बाजूचे नेतृत्व करण्यासाठी ना एखादा राजपुत्र होता ना ती फळी एखाद्या कसलेल्या सेनानीच्या अधिपत्याखाली होती . त्यामुळे या हल्ल्यासरशी शाही सैन्याची डावी फळी मोडली गेली आणि सैनिक पळू लागले . आघाडीच्या मध्यापर्यंत ही घबराट पसरली . गोंधळून गेलेले सैनिक इतस्ततः धावपळ करू लागले . यात आणखी भर घालून परिस्थिती चिघळविण्यास आणखी एक गोष्ट कारणीभूत झाली आणि ती म्हणजे बादशहाचा मृत्यू झाल्याची खोटी बातमी वाऱ्याच्या वेगाने सैनिकांत फैलावली आणि पुष्कळांनी पळ काढला . शत्रूने शाही सेनेच्या डाव्या फळीचा धुव्वा उडविला आणि शत्रू मध्यआघाडीकडे घुसला . बादशहाचे रक्षण करण्यासाठी म्हणून तेथे फक्त २००० फौजी शिपाई शिल्लक होते . परंतु या दोन शिलकी पथकांनी चेवाने रणकंदनात उडी घेतली आणि शत्रूची वाट रोखून धरली . बादशहाने मध्यआघाडी वरून कोसळणाऱ्या डाव्या आघाडीला सावरण्यासाठी आपल्या हत्तीला डाव्या बाजूकडे वळविले . सय्यद आलमचा हल्ला परतविण्यात आला. ज्या मार्गाने त्याने शाही फौजेवर हल्ला करण्यासाठी चाल केली त्याच मार्गाने तो पळून गेला.

परंतु पिसाळलेले ते तीन हत्ती चेवल्याप्रमाणे वेगाने पुढे जाऊ लागले . त्यांना झालेल्या जखमामुळे ते पहिल्यापेक्षाही अधिक आक्रस्ताळे बनले होते . त्यापैकी एक औरंगजेबाच्या हत्तीजवळ येऊन पोहोचला . लढाईचा अगदी आणीबाणीचा क्षण आता येऊन ठेपला होता . जर बादशहाने थोडी माघार घेतली असती अथवा तो परत फिरला असता तर त्याच्या सर्व सैन्याने रणांगणातून पलायन केले असते . परंतु तो एखाद्या प्रचंड खडकासारखा स्थिर राहिला आणि त्याने हत्ती पळू नये म्हणून त्याचे पाय साखळदंडाने बांधून टाकले. त्याच्या हुकुमावरून सैन्यातील एक गोलंदाज जलालखान याने चाल करून येणाऱ्या हत्तीच्या

माहुताला गोळी घालून ठार केले आणि त्याबरोबर शाही सैन्यातील एका माहुताने चपळाई करून त्या हत्तीवर उडी मारली आणि स्वार नसलेल्या त्या भयानक प्राण्याला काबूत आणले . बादशहाला आता दम घेण्यासाठी थोडी फुरसत मिळाली तेव्हा त्याने शत्रूच्या आघाडीच्या फौजेच्या हल्ल्याने आणि राजपुत्र बुलंद अख्तर याच्या नेतृत्वाखालील शत्रूच्या डाव्या आघाडीने केलेल्या माऱ्याने खिळखिळ्या झालेल्या आपल्या उजव्या फळीच्या बचावासाठी त्या दिशेला कूच केले. जरी संख्येने शुजाची बाजू कमकुवत होती तरी त्यांनी केलेल्या प्रखर हल्ल्यापुढे शत्रूचा टिकाव लागला नाही . शाही सेनेतील पुष्कळ सनिकांनी रणातून पळ काढला. औरंगजेबाच्या डाव्या फळीकडील धोका आता टळला होता . तेव्हा त्याने आपल्या कोसळणाऱ्या उजव्या फळीकडे आपले लक्ष वळविले तेव्हा त्याला असे आढळून आले की तिकडे अतिशय गोधळ माजला असून सैनिक पळ काढण्याच्या तयारीत आहेत . त्याला आता असे कळून चुकले की त्याने आपल्या आघाडीचा रोख आत्तापर्यंत आपल्या डाव्या फळीकडे वळविला आहे . अशा परिस्थितीत त्याने जर अचानक पलट घेतली आणि जर उजव्या फळीच्या दिशेने मोर्चा वळविला तर त्याच्या इतरत्र पसरलेल्या सेनाविभागाला असे वाटेल की ही अचानक घेतलेली पलट म्हणजे औरंगजेबाने रणातून काढलेला पळच आहे. असे होऊ नये म्हणून त्याने आपल्या सर्व सेनापतींकडे आपला खरा उद्देश काय आहे ते कळविण्यासाठी आणि मनात कसलीही भीती आणि अंदशा न बाळगता लढा देण्याचे त्यांना आवाहन करण्यासाठी आपले खास दूत रवाना केले.

शुजाच्या फौजेची दाणादाण

इतकी काळजी घेतल्यानंतर त्याने आपल्या मध्यआघाडीला पलट घेण्याचा हुकूम दिला आणि तो आपल्या शत्रूच्या दडपणामुळे जेरीस आलेल्या उजव्या फळीला जाऊन मिळाला . औरंगजेबाकडून मदतीसाठी करण्यात आलेली ही हालचाल अगदी ऐन मोक्याच्या वेळी झाली . त्या दिवशीची अतिशय निर्णायक कारवाई म्हणून औरंगजेबाच्या या हालचालीचा उल्लेख करावा लागेल . लढाईचा रंग आता शुजाच्या विरुद्ध जणू काही पूर्वसंकेताप्रमाणे झपाट्याने पालटू लागला . मदत मिळाल्यामुळे शाही फौजेच्या उजव्या फळीवरील सैनिकांनी दमदारपणे शत्रूवर प्रतिहल्ला चढविला आणि त्यांची भयंकर कत्तल करीत त्यांना आपल्या समोरून सोसाट्याच्या झंझावाताप्रमाणे पिटाळून लावले.

दरम्यान जुल्फिकारखान आणि सुलतान महमद यांच्या नेतृत्वाखालील बादशाही आघाडीचा सेनाविभागाने आपल्यावर झालेला शत्रूचा हल्ला मोडून काढून पुढे प्रगती केली आणि शत्रूची आघाडीची संरक्षण रेषा खिळखिळी करून टाकली . औरंगजेबाच्या सेनेकडून तोफगोळे , हातगोळे आणि बंदुकीच्या गोळ्या यांचा होणारा वर्षाव इतका प्रखर होता की त्यामुळे टिकाव धरून राहणे शुजाच्या सैनिकांना अशक्य झाले. आता बादशाही फौजेची उजव्या डाव्या आणि आघाडीच्या मध्यावरून एकसारखी आगेकूच सुरू झाली. “काळ्याकुट्ट ढगांच्या प्रचंड समुहाप्रमाणे त्यांनी शुजाच्या मध्यआघाडीवरील सेनाविभागाला वेढून टाकले. त्याच्या उजव्या आणि डाव्या फळीचा अगोदरच निकाल लागला होता . त्याच्या कानशिलाजवळून बंदुकीच्या गोळ्यांचा सतत वर्षाव होत होता आणि या गोळागोळीत त्याचे अनेक संरक्षक शिपाई ठार मारले गेले”. म्हणून हत्तीच्या पाठीवरील त्याला मृत्यूच्या धोक्यात टाकणारी उंच जागा त्याने सोडली आणि तो घोड्यावर स्वार झाला . स्ट्यूअर्टने हातोहात उचललेले बर्नियरचे विधान की विजयश्री शुजाला माळ घालण्याच्या बेतात होती , तेव्हा तो हत्तीवरून खाली उतरला त्यामुळे सगळा घात झाला ही निव्वळ बाजारगप्प आहे. ज्यांच्या हकीकतीवर मी दिलेला वृत्तान्त आधारलेला आहे त्यापैकी कोणताही समकालीन इतिहासकार या कल्पनेला दुजोरा देत नाही , आणि अशी गोष्ट प्रायः असंभवनीय वाटते . खरोखर लढाईचे

पारडे औरंगजेबाच्या बाजूने झुकले होते आणि शुजा शत्रूच्या हातात पडण्याचा धोका निर्माण झाला होता . तेव्हाच तो हत्तीवरून उतरून घोड्यावर स्वार झाला ; दोहोंमधील संघर्षाची ही अखेर होती . शुजाच्या शिपायांची अशी समजूत झाली की शुजा हा रणांगणावर मृत होऊन पडला आहे आणि मग सारेच काही धुळीला मिळाले. एका क्षणातच बंगाली सेनेचा जो काही उरलासुरला संभार होता तो कोसळला आणि पलायनास सुरुवात झाली. आपले मुलगे, आपला सेनापती सय्यद आलम आणि काही शिपायांची पलटण यांच्यासहीत शुजाने रणातून झपाट्याने काढता पाय घेतला. त्याची सबंध छावणी आणि सामानसुमान शाही फौजांनी लुटले. ११४ तोफा आणि बंगालच्या वनातील ११ उत्कृष्ट हत्ती विजयी सैन्याला लुटीदाखल मिळाले.

(९) शुजाचा पाठलाग आणि बिहारमधील युद्ध

खाजवाच्या विजयानंतर दुसऱ्या दिवशी दुपारी औरंगजेबाने शुजाच्या पाठलागावर महमद सुलतान याला त्याच्या हाताखाली सैन्य देऊन पाठविले. मिर जुम्ला याच्याकडून रसद येऊन पोहोचली. त्यामुळे या सैन्याचे सैन्यबळ ३०,०० इतके वाढले. (**आलमगीरनामा**, २६५-२६९; **अकीलखान**, ९१); बनारस आणि पाटण्याच्या मार्गे शुजा मुंगीरच्या रोखाने पळाला. मुंगीर येथे त्याने पंधरा दिवस ठाणे दिले (१९ फेब्रुवारी ते ६ मार्च) [या लढाईनंतर शुजाने रणांगणातून पळ काढला आणि ३० मैल दौड केल्यानंतर त्याने विश्रांतीसाठी मुक्काम केला . पुन्हा ४ दिवस पळापळीत काढल्यावर त्याने गंगा नदी ओलांडली व तो अलाहाबाद समोर जुसी येथे थांबला . अलाहाबादच्या किल्लेदाराने किल्ल्याचे दरवाजे शुजाला बंद केले आणि औरंगजेबाच्या फौजांना किल्ल्याचा ताबा घेण्यासाठी पाचारण केले . औरंगजेबाच्या फौजांनी १२ जानेवारीला किल्ल्याचा ताबा घेतला (**आलमगीरनामा**, २८५, २८६; **मासूम**, १०५ ब). बहादूरपूर येथे पोहोचल्यावर शुजाने तेथे डागडुजी केली आणि लढा देण्याचे ठरविले. चुनारहून ७ मोठ्या तोफा मागविण्यात येऊन तटबंदीवर चढविण्यात आल्या (**आलमगीरनामा**, ४९२, ४९३). दरम्यान सुलतान महमद याने अलाहाबादनजिक गंगा नदी ओलांडली आणि चुनारपासून २ मुक्कामावर तो येऊन पोहोचला (**अकीलखान**, ९१). याच वेळी फिदाईखान पाटण्याकडे चाल करून येत आहे हे शुजाला कळताच त्याने पाटण्याकडे पळ काढला आणि १० फेब्रुवारी १६५९ रोजी तो पाटण्याच्या उपनगरात दाखल झाला (**अकीलखान**, ९१, ९२; **आलमगीरनामा**, ४९३). येथे शुजाने आपल्या मुलाचे लग्न जुल्फिकारखान कुरमानळु या जुन्या लष्करी अधिकाऱ्याच्या मुलीबरोबर आपल्या इभ्रतीत भर घालण्यासाठी लावले व निष्कारण बहुमोल वेळेचा अपव्यय केला . दरम्यान शत्रू शहरापासून २० मैलांवर येऊन ठेपल्याचे कळताच शुजाने परत मुंगीरकडे पळ काढला . तेथे तो १९ रोजी पोहोचला . इकडे पाटण्याला २९ रोजी सुलतान महमद शुजाने पाटणा सोडल्यानंतर ८ दिवसांनी येऊन पोहोचला . तेथे त्याला फिदाईखान येऊन मिळाला (**अकीलखान** १२).]. मुंगीर हे शहर एका अरुंद सपाटीवर वसलेले असून ही सपाटी गंगा नदी आणि खर्गपूर डोंगर यांच्यामध्ये जवळ जवळ २½मैल रुंद एवढी पसरलेली आहे . या सपाटीच्या बाजूने पाटण्याहून बंगालकडे जाणारा अतिशय सोयिस्कर मार्ग धावतो. नदीपासून तो डोंगरापर्यंतच्या भागांत भिंत बांधून आणि खंदक खोदून शुजाने हा रस्ता अडवून धरला होता . दर नव्वद फुटावर त्याने बुरूज बांधून काढले होते आणि ह्या बुरुजांच्या रक्षणासाठी त्याने आपल्या नौकांतून आणलेल्या तोफा आणि गोलंदाज सज्ज ठेवले होते.

मिर जुम्लाकडून शुजाचा पाठलाग

मार्च महिन्याच्या सुरुवातीला मिर जुम्ला मुंगीरच्यासमोर येऊन ठेपला. मुख्य रस्ता शुजाने रोखला आहे हे जेव्हा त्याला आढळून आले तेव्हा त्याने खर्गपूरचा राजा बहरोज याला लाच दिली आणि त्याच्या मार्गदर्शनाखाली बादशाही सैन्य डोंगर आणि जंगल यांतील मार्गाने मुंगीर किल्ल्याच्या आग्नेयेस नेऊन शुजाची पिछाडी उलटविली. (**आलमगीरनामा**, ४९४, ४९५; **ए.के.**, ९२; **मासूम**, ११३ ब) शुजाने मुंगीरहून काढता पाय घेतला (६ मार्च) आणि तो साहिबगंजच्या रोखाने पळाला . तेथून त्याने वाटेतील अरुंद खिंड भिंत बांधून अडवून धरली (१० ते २४ मार्च). परंतु बादशहाच्या अधिकाऱ्यांनी विरभूम आणि छाटनगरचा जमिनदार रव्वाजा कमाल अफगाण याला आपल्याकडे फोडण्यात यश मिळविले आणि त्याच्या साहाय्याने आणि मार्गदर्शनाखाली मुंगीर जिल्ह्याच्या आग्नेय बाजूने त्यांनी वळसा घेतला आणि ते २८ रोजी सुरी येथे

पोहोचले. (**आलमगीरनामा**, ४९६, ४९७; **ए. के**. १२)

परंतु दरम्यान एक खोटी अफवा पसरली . ती अशी की दाराचा अजमेरला विजय झाला असून तो आता आपला भयंकर सूड रजपूत संस्थानांवर उगवत आहे . या अफवेमुळे मिर जुम्ला याच्या नेतृत्वाखालील रजपूत पलटणी विशेषतः जयसिंगाचा मोठा मुलगा रामसिंग याच्या पलटणी बिथरून सैन्य सोडून परागंदा झाल्या आणि त्यांनी दूरवरच्या आपापल्या मायदेशाकडे धाव ठोकली . यामुळे शुजाचा पाठलाग करणारी सेना जवळजवळ ४००० माणसांनी कमी झाली (३० मार्च). तरी देखील त्यांचे सेनाबल शुजाच्या फौजेच्या जवळजवळ दुप्पट होते . [या सुमारास एक चमत्कारिक बातमी छावणीत पसरली आणि तिचा अतिशय अनिष्ट असा परिणाम औरंगजेबाच्या सैन्याच्या मनोधैर्यावर झाला . ही बातमी म्हणजे दाराबरोबर अजमेर येथे झालेल्या लढाईत औरंगजेबाचा पूर्ण पराजय होऊन त्याने दक्षिणेत पळ काढला ही होय . यामुळे सैन्यात एकच गोंधळ उडाला . विशेषतः मिर जुम्ला याने शुजाला बगल देऊन पुढे चाल करून जाण्याचा केलेला बेत म्हणजे राजपुत्र सुलतान महमद याच्यासह दक्षिणेत पळून जाण्याची तयारी असावी असे वाढण्याची परिस्थिती निर्माण झाली . या बातमीने रजपूत सैन्यात जास्तच घबराट पसरली . त्यांचा पश्चिमेकडील मायदेश विजयी दाराच्या फौजेच्या तावडीत सापडणार या भीतीने ते अधिकच हवालदील झाले . या परिस्थितीत डोंगराळ मुलुखातून अन्नान्न करीत दक्षिणेत सुरक्षित पोहोचता आले तरी पुढे काय हा प्रश्न त्यांच्यापुढे होताच. परागंदा झालेल्या औरंगजेबाबरोबर घरेदारे सोडून भटकण्याचा दुर्धर प्रसंग त्यांच्यावर ओढवणार होता . तेव्हा पाटणा किंवा अलाहाबाद मार्गे रजपुतान्यात जाऊन. दाराशी समझोता करावा किंवा शत्रू तेथे पोहोचण्याचे अगोदर तेथे पोहोचावे असा विचार रजपुतांच्या मनात आला आणि याबाबत काय करावयाचे याचा त्यांनी मनाशी निश्चय केला . पिआलपूर येथील छावणी सोडून पुढील तळावर मुक्काम करण्याची वेळ आली तेव्हा सैन्यातील सर्व रजपूत एकत्र झाले आणि त्यांना नेमून दिलेल्या तळावरील जागेवर छावण्या न टाकता त्यांनी मुख्य तळाच्या पाठीमागे आपल्या छावण्या ठोकल्या. दुसऱ्या दिवशी मुख्य सैन्याच्या थोड्या मागे राहून त्यांनी कूच केले आणि आपले सामान -सुमान बरोबरच ठेवले. ३० मार्च रोजी विरभूमपासून दोन मुक्कामावर असताना ४००० रजपूत सैनिक मुख्य सैन्यापासून अलग झाले आणि त्यांनी जामा शहराच्या रोखाने कूच केले (**आलमगीरनामा**, ४९७, ४९८; अधिक माहितीसाठी पाहा **अकीलखान**, ९३; **मासूम**, ११५ ब, ११६ अ). या परिस्थितीत मिर जुम्ला याने त्यांचे मन वळविण्याचा अथवा त्यांना शिक्षा करण्याचा व्यर्थ प्रयत्न करण्यात वेळ घालविला नाही . त्याने आपल्या ईप्सिताच्या दिशेने धिमेपणाने कूच करण्यास सुरुवात केली. त्याच्यापाशी शुजाच्या दुप्पट म्हणजे जवळ जवळ २५००० सैनिक होते (अकीलखान पळून गेलेल्या सैनिकांची संख्या ४००० एवढी देतो तर मासूममध्ये ही संख्या १० ते १२ हजार एवढी दिली आहे . औरंगजेबाच्या सैन्यातील सर्व रजपूतांनी पळ काढला नव्हता . राजा इंद्रद्युम्न हा शेवटपर्यंत एकनिष्ठ राहिला तर पळून जाणाऱ्या रजपूतांबरोबर दोन मुसलमान अधिकारी असल्याचे विधान मासूममध्ये आहे) आणि शत्रूची दक्षिणेकडे होणारी पिछेहाट त्याला थांबवावयाची असल्यास प्रत्येक क्षण त्याच्या दृष्टीने महत्त्वाचा होता.]

मिर जुम्ला राजमहलचा ताबा घेतो.

दरम्यान शुजाने साहिबगंजचा ताबा सोडून राजमहलकडे कूच केले होते (२७ मार्च). परंतु राजमहल त्याला असुरक्षित वाटल्याने त्याने माल्डा जिल्ह्याच्या दिशेने माघार घेतली (४ एप्रिल). त्याचा मुख्य सेनापती अलावर्दीखान याने मिर जुम्ला याला आपल्या अनेक अधिकाऱ्यांसह जाऊन मिळण्याचा केलेला कट उघडकीस आला . त्यामुळे अलावर्दीखानाचे डोके मारण्यात आले (२ एप्रिल). (अधिक माहितीसाठी पाहा : **आलमगीरनामा**, **मासूम**, **अकीलखान**) बादशाही फौजांनी राजमहल १३ एप्रिल रोजी ताब्यात घेतले आणि अशा तऱ्हेने गंगा नदीच्या पश्चिमेस पसरलेला सर्व मुलूख शुजाच्या हातातून गेला.

दोन्ही पक्षांचे सेनाबल

यानंतर दोन्ही पक्षांमध्ये ज्या पद्धतीने संग्राम सुरू झाला त्याची तुलना वाघ आणि मगर यांमध्ये होणाऱ्या अटीतटीच्या सामन्याशीच करता येईल . शुजाच्या हाताखालील नियमित फौजेची संख्या आता जवळ जवळ ५००० इतकी खाली आली होती , तर मिर जुम्ला याच्याजवळ त्याच्या ५ पट सैन्य होते ; आणि मिर जुम्लाच्या सैनिकांची लढाईची तयारी शुजाच्या सैनिकांपेक्षा निश्चित वरचढ होती . साहजिकच भूसेनेच्या बाबतीत शुजाची बाजू भलतीच कमकुवत होती . परंतु मिर जुम्ला याच्या अधिपत्याखाली फक्त भूदलातील सेनाविभागांचाच समावेश होता . पहिल्या प्रथम त्याच्या जवळ अनेक जलमार्ग असलेल्या या प्रदेशात मोहीम करण्यासाठी लागणाऱ्या नौदलासाठी त्याच्या स्वतःच्या ताब्यातील अशी एकही नौका

नव्हती. त्याशिवाय त्याच्या तोफा शत्रूपेक्षा संख्येने कमी आणि माऱ्याच्या दृष्टीने पल्लेदार नव्हत्या . त्याउलट शुजाजवळ भारी असा तोफखाना असून त्यावर आपली कामगिरी चोख बजावणारे युरोपियन अधिकारी होते आणि कसलेल्या गोलंदाजांच्या तो हातात होता . बंगालचे सारेच्या सारे नौदल (नव्वारा) नद्या तरून जाण्यासाठी, सनिकांची ने -आण करण्यासाठी किंवा त्याला मोक्याचे वाटेल अशा ठिकाणाहून शाही फौजांनी नदीकिनाऱ्यावर उभ्या केलेल्या संरक्षक तटबंद्या आणि छावण्या यावर तोफांचा भडिमार करण्यासाठी त्याच्या दिमतीला तयार होते . त्याच्या सेनासामर्थ्याच्या या भक्कम बाजूमुळे सैनिकांची विस्मय वाटेल इतक्या जलद हालचाल करणे आणि त्याच्या छोट्या फौजेची प्रत्यक्ष कारवाईच्या दृष्टीने उपयुक्तता वाढवून संख्येने भारी असलेल्या शत्रूबरोबर सामना देणे हे शुजाला साध्य झाले . तर नौदलाच्या अभावी मिर जुम्लाची हालचाल आणि प्रयत्न थंडावले आणि भूसेनेच्या बाबतीतील त्याच्या वरचढपणाचा जोर त्या प्रमाणात कमी झाला.

गौर किल्ल्याच्या पश्चिमेस चार मैलांवर असलेल्या टंडा येथे शुजाने आपला तळ मुक्रर केला आणि मिर जुम्ला याने नदी ओलांडू नये म्हणून प्रतिबंध करण्याकरता त्याने गंगा नदीच्या पूर्वकिनाऱ्यावर ठिकठिकाणी मोर्चे बांधले . परंतु शुजाचे हे प्रयत्न फसले . याचे कारण मिर जुम्ला याने अती दूरच्या ठिकाणाहून बोटी मागवून घेण्यात दाखविलेली आश्चर्यकारक चपळाई (**मासूम**, ११८ अ) आणि गंगेच्या पूर्वकिनाऱ्यावर शुजाचे लक्ष वेधले जावे आणि शुजाची उजव्या फळीवर बाजू उलटविता यावी यासाठी पाटण्याच्या सुभेदाराच्या हाताखाली आणखी एक सेनाविभाग रवाना करण्यात औरंगजेबाने टाकलेला कुशल डाव हे होय.

मिर जुम्लाची पहिली चढाई

राजमहलपासून १३ मैल दक्षिणेस असलेल्या दोगची येथील आपल्या मुख्य तळावरून मिर जुम्ला याने शुजावर दोन वेळा यशस्वी हल्ले करून त्याची बाजू खिळखिळी केली . दोगचीच्या समोर चढाई नदीच्या प्रवाहाच्या मध्यात असलेले एक बेट त्याने रात्रीच्या वेळी अचानक हल्ला करून शत्रूपासून बळकावून घेतले . याठिकाणी शुजाने आपला एक सेनाविभाग ठेवलेला होता . हे बेट शत्रूने अनेकवार परत मिळविण्यासाठी केलेल्या हल्ल्यांचा प्रतिकार करून मिर जुम्ला याने हातचे जाऊ दिले नाही . (**आलमगीरनामा**, ५०१, ५०३). नंतर बादशाही फौजांनी सुटीच्या समोर नदीच्या पूर्वकिनाऱ्यावर शत्रूने खडा केलेला ८ तोफांचा मोर्चेला अचानक हल्ला करून उद्ध्वस्त करून टाकला.

बादशाही सैन्य नदीच्या पश्चिम किनाऱ्याला लागून सर्वत्र पसरले होते . उत्तर दिशेकडे अगदी टोकाला राजमहल येथील डाव्या फळीवर महमद मुराद बेग हा सेनानी होता . खुद्द राजपुत्र , जुल्फिकारखान इस्लामखान आणि फौजेचा बहुसंख्य भाग दक्षिण दिशेकडे १३ मैलांवर दोगची येथे शुजासमोर ठाण मांडून होता. आणखी थोड्या दक्षिणेकडे ८ मैलांवर दुनापुरला अलीकुलीखानाची नियुक्ती झाली होती. तर राजमहलच्या दक्षिणेस २८ मैलांवर मोगल फौजेच्या आघाडीचे अगदी दक्षिणेकडचे टोक सुटी, हे मिर जुम्ला स्वतः ६ ते ७ हजार सैनिकांसह व्यापून राहिला होता. (**आलमगीरनामा**, ५०३, ५०४).

मिर जुम्लाला आलेले अपयश

परंतु मिर जुम्ला याने केलेली तिसरी कटयोजना फसली आणि त्यात त्याचे अपरिमित नुकसान

झाले. कारण यावेळी शुजा हा सावध होता आणि त्याने आपली फौज दबा धरून ठेवलेली होती . ३ मे १६५९ रोजी जेव्हा मोगल सेनापतीने योजलेल्या मोहिमेतील कुल सेनाविभागाची एकच पलटण जेव्हा शुजाच्या तळावर उतरली तेव्हा पलटणीतील माणसे आणि त्यांच्या बोटी यांच्यावर दबा धरून बसलेल्या आणि त्यांची जणू काही मार्गप्रतीक्षाच करीत असलेल्या शुजाच्या संख्येने अधिक असलेल्या लोकांनी हल्ला केला . या अयशस्वी प्रयत्नात बादशाही फौजेपैकी लोकांची आहुती पडलेल्यात ४ उच्चपदस्थ अधिकारी आणि शेकडो सैनिक होते आणि त्याशिवाय ५०० सनिक गिरफ्दार केले गेले . पश्चिम किनाऱ्यावरून मिर जुम्ला हा कोणतीही मदत पाठवू शकला नाही . कारण बंगाली नौदलाबरोबर सामना देण्याची त्याच्या नौदलाला हिंमत होत नव्हती. (**आलमगीरनामा**, ५०६–५०९; **मासूम**, ११८ अ, ११९ ब; **अकीलखान**, ९५).

राजपुत्र महमदचे शुजाकडे पलायन

८ जून रोजी बरीच रात्र उलटल्यावर दोगची येथील आपले ठाणे सोडून राजपुत्र महमद सुलतान हा शुजाकडे पळून गेला . (**आलम**. ५११, ४०६, ४०७; **खाफीखान**, भाग २. ९१; **मासूम**,१२० **ब**, १२४ ब; **अकीलखान**, ९६, ९७). मिर जुम्ला याच्या पालकत्वाखाली तो फार काळ झिरमत होता आणि आता स्वतंत्रपणे अधिसत्ता गाजविण्याची त्याची आकांक्षा होती . शुजाने गुप्तपणे आपली मुलगी गुलरुखबानू हिच्याबरोबर त्याचा विवाह लावून देण्याचे आणि सिंहासन मिळविण्यासाठी त्याला मदत करण्याचे कबूल केले, आणि त्या अविचारी राजपुत्राला आपल्या पक्षाकडे वळवून घेण्यात यश मिळविले . ही बातमी कानावर आल्यावर मिर जुम्ला याने सुटी येथील आपल्या सैनिकांना अतिशय कणखरपणे काबूत ठेवले आणि राजपुत्र पळून गेल्यानंतरच्या दुसऱ्या दिवशी सकाळी तो दोगची येथील राजपुत्राच्या छावणीत गेला आणि आता पुढाऱ्याशिवाय असलेल्या त्याच्या सैनिकांना आवाहन करून त्यांच्या हृदयातील मावळत चाललेला आशेचा दीप पुन्हा प्रज्वलित केला आणि त्याच्या तळावर पुन्हा शांतता आणि शिस्तीचे वातावरण निर्माण केले. फौजेतील इतर सर्व सेनाधिकाऱ्यांनी एकमेव सेनापती म्हणून त्याची हुकमत मान्य करण्याचे कबूल केले. अशा तऱ्हेने कोसळू पाहणाऱ्या संकटातून फौजेने वेळ निभावून नेली . "त्यांनी फक्त एकच माणूस गमावला आणि तो म्हणजे राजपुत्र" (**अकीलखान**).

यानंतर थोडाच कालावधी लोटला आणि बंगालच्या धुम्मेदार पडणाऱ्या पावसाच्या सरींनी लष्करी कारवाया स्थगित करून सोडल्या . आपल्याबरोबर १५,००० माणसे घेऊन मिर जुम्ला याने मसुमा बजार येथे आपला तळ दिला तर उरलेली बादशाही सेना जुल्फिकारखानाच्या हाताखाली राजमहल येथे छावणी करून राहिली . या दोन सेनाविभागांची फारकत त्या ऋतूमध्ये वाहतुकीला अशक्य अशा ६० मैलांच्या रस्त्याने केली होती.

राजमहलवर शुजाचा पुन्हा कब्जा

पावसामुळे राजमहलच्या आसमंतातील प्रदेशाचे रूपांतर एकाद्या दलदलीने भरलेल्या तलावात झाले. वायव्येकडे असलेल्या मज्वा टेकड्यांच्या राजाला शुजाने लाच दिल्यामुळे तिकडून शहराला होणारा अन्नधान्याचा पुरवठा तोडला गेला . शुजाच्या नौदलाने जलमार्ग रोखून धरला होता . त्यामुळे राजमहल येथील मोगल छावणीत अन्नधान्याची टंचाई अगदी पराकोटीला पोहोचली . अशा परिस्थितीत आपल्या नौदलाच्या मदतीने शुजाने राजमहलवर एकाएकी हल्ला केला आणि २२ ऑगस्ट रोजी मोगलांच्या सर्व मालमत्तेसह शहर काबीज केले. (**आलम**. ५१६, ५१९; **मासूम**, १२५ अ, १२६ ब; **अकीलखान**, ९८).

अनुक्रमणिका

(१०) बंगालमधील युद्ध

शुजाचे मुर्शिदाबादेकडे कूच

डिसेंबर १६५९ सालच्या सुरुवातीला शुजाने ८००० फौज घेऊन राजमहलमधून कूच केले आणि मुर्शिदाबाद जिल्ह्यात जंगीपूरच्या विरुद्ध दिशेला आणि राजमहलच्या दक्षिणेकडे ४२ मैलांवर वेलघाट नजीक मुक्काम करून असलेल्या मिर जुम्ल्यावर चाल केली. या ठिकाणी त्याने दोन वेळा बादशाही फौजेवर हल्ले केले आणि बादशाही सैन्याच्या तोफखान्याचा मारा लक्षात येईल एवढा कमकुवत असल्याकारणाने त्यांचे एवढे नुकसान केले की मिर जुम्ला याने मुर्शिदाबादकडे माघार घेतली , तर त्याला समांतर अशा पद्धतीने शुजाने नशीपूरच्या दिशेने आगेकूच केले . परंतु दरम्यान बिहारचा सुभेदार दाऊदखान याने आपल्या नेतृत्वाखालील दुसऱ्या सेनाविभागासमवेत जोरदार चढाई करून कुशी नदी ओलांडली आणि गंगा नदीच्या उत्तर किनाऱ्यावर असलेल्या शुजाच्या फौजेची धुळदाण उडविली . त्यानंतर तो अतिशय वेगाने टंडा शहराच्या दिशेने चाल करून जात होता. ही बातमी कानावर पडल्यामुळे शुजाने नशीपूर सोडले (२६ डिसेंबर) आणि सुटीमार्गे त्याने टंडाच्या दिशेने कूच केले . मिर जुम्ला याने लगोलग त्याचा पाठलाग केला. शुजाने गंगा नदी राजमहल येथे ओलांडली आणि बादशाही फौजांनी ११ जानेवारी १६६० रोजी ते शहर ताब्यात घेतले. अशा तऱ्हेने गंगेच्या पश्चिमेस असलेला सर्व प्रदेश शुजाच्या ताब्यातून गेला.

मिर जुम्लाकडून शुजाचा पाठलाग

या वर्षी मिर जुम्ला याने मोहिमेची केलेली आखणी ही सर्व दृष्टीने अजोड अशी होती . शत्रूवर तो अगदी अनपेक्षित अशा बाजूने म्हणजे ईशान्येकडून हल्ला करणार होता . शुजाने घेतलेले मोर्चे हे आता राजमहलच्या विरुद्ध दिशेला असलेल्या सामदा बेटापासून ते टंडापर्यंत वायव्येपासून ते आग्नेय दिशेपर्यंत लांबलचक एका ओळीत पसरलेले होते. खुद्द शुजाचे ठाणे या मोर्चाच्या मध्यभागी असलेल्या चौकी मिर्दापूर येथे होते . मिर जुम्ला याचा डाव राजमहल , अकबरपूर आणि माल्डा या मार्गांनी या मोर्चांना दूरवर अंतरावरून बगल देण्याचा आणि नंतर एकदम दक्षिणेकडे पलट खाऊन पूर्वेकडून टंडावर झडप घालण्याचा होता . पाटण्याहून आणलेल्या १६० बोटींच्या साहाय्याने त्याने राजमहलच्या उत्तरेस १० मैलांवर आपले सारे सैन्य गंगापार नेले आणि तो दाऊदखानाला जाऊन मिळाला.

पहिल्यापासून सैन्यबलाच्या बाबतीत शुजाची बाजू भलतीच कमकुवत होती आणि आता (फेब्रुवारी १६६०) त्याचा दक्षिणेकडे माघार घेण्याचा एकमेव मार्ग धोक्यात आला होता . ह्या सुमारास राजपुत्र महमद सुलतान याने त्याची छावणी सोडली आणि तो गुपचुपपणे दोगची येथील मोगल छावणीत परत आला (८ फेब्रुवारी). आता त्याच्या नशिबात उरलेले सारे जीवन तुरुंगात व्यतीत करणे एवढेच होते.

मिर जुम्ला माल्डा येथे

६ मार्च रोजी मिर जुम्ला हा माल्डा येथे पोहोचला आणि फक्त एकाच चढाईने शुजाचा पार निकाल लावता येईल अशा अंतिम चढाईची तयारी करण्यात त्याने एक महिनाभर सख्त मेहेनत घेतली . आपल्या महमुदाबाद येथील मुख्य ठाण्यावर (माल्डा शहराच्या खालच्या बाजूला काही मैल अंतरावर) त्याने ५

एप्रिल रोजी कूच केले आणि १० मैल चालून गेल्यावर महानंदा नदीवरील एका अपरिचित उतारावर असलेल्या शत्रूच्या छोट्या गस्ती -पलटणीवर त्याने हल्ला केला. काही क्षणाच्या अवधित बादशाही फौजांनी पाण्यात डुबी घेतली. सारी शिस्त कोसळून पडली आणि झालेल्या गोंधळात त्यांची नदी तरून जाण्याची सखल वाट चुकली. रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेल्या खोलवर भागांत सैनिक मोठ्या संख्येने खाली गेले. एकंदर १००० पेक्षा जास्त सैनिक बुडून मेले त्यात दिलेरखानाचा एक मुलगा होता.

शुजाचे डाक्क्याला पलायन

पण एकंदर मोहिमेच्या दृष्टीने मिर जुम्लाचा पवित्रा निर्णायक ठरणारा होता. शुजाची परिस्थिती आता आशेच्या आवाक्याच्या बाहेर गेली होती. शत्रूने फेकलेल्या जाळ्याचा त्याच्या मानेभोवती घट्ट फास पडण्याच्या अगोदर त्याने ताबडतोब डाक्क्याला पळून जाणे जरुरीचे होते. ८ एप्रिल रोजी सकाळी त्याने टंडाला त्वरेने कूच केले आणि "कपडाही बदलण्याची वाट न पाहता" ताबडतोब निघून येण्याची आपल्या बेगमांना आज्ञा केली. त्याचा खजिना आणि त्याच्या मालमत्तेतील निवडक सामान ४ मोठ्या बोटीत भरण्यात आले आणि नदीच्या प्रवाहाबरोबर लावून देण्यात आले. दुपारी स्वतः शुजाने बोटीवर पाय ठेवला. त्याचे दोन धाकटे मुलगे (बुलन्द अख्तर आणि जैनउल आबिदिन), त्याचे मुख्य सेनानी मिर्जा जान बेग, बारहाचा सय्यद आलम, सय्यद कुली उजबेक आणि मिर्जा बेग, काही शिपाई, नोकरचाकर आणि खोजे अशी एकंदर तीनशे माणसे त्याच्याबरोबर ६० बोटींतून (कोसास) गेली. ज्या दिल्लीच्या तख्तासाठी त्याने दोन वेळा प्रचंड फौजेनीशी लढा दिला आणि ज्या वैभवसंपन्न दरबारातून त्याने तीन प्रांतांवर राज्य केले त्यातले उरले ते केवळ एवढेच.

त्याच्या टंडा येथील छावणीत आता गोंधळ आणि भीती यांचा नंगानाच सुरू झाला. संरक्षणविरहित असलेली त्याची सर्व मालमत्ता लुटण्यात आली. दुसऱ्या दिवशी (७ एप्रिल) मिर जुम्ला याने शहराचा ताबा घेतला आणि तेथे सुव्यवस्था स्थापन केली. लुटारू टोळ्यांच्या हातून परत मिळविलेली किंवा शहरात सापडलेली सर्व मालमत्ता त्याने सरकारतर्फे म्हणून जप्त केली. शुजाने आपल्या पाठीमागे ठेवलेल्या बायकामाणसांना संरक्षण देण्यात आले आणि त्यांची योग्य ती काळजी घेण्यात आली. तर्तीपूर येथे मालाने भरलेल्या शुजाच्या नौदलापैकी ४०० बोटी पकडण्यात आल्या; त्याशिवाय २ संपत्तीने भरलेले **धुरब** ताब्यात घेण्यात आले. त्याची फौज आता मिर जुम्ला याला येऊन मिळाली (९ एप्रिल). त्यानंतर सेनापती मिर जुम्ला याने टंड्याहून डाक्क्याकडे प्रयाण केले (१९ एप्रिल). [पावसाळ्यामध्ये विशेष अशा घटना झाल्या नाहीत. पावसाळा संपतासंपता शुजाने आठ हजार सैनिक गोळा केले आणि तो मिर जुम्ला याच्यावर चाल करून गेला. मिर जुम्ला हा मुर्शिदाबादमधून बाहेर पडला आणि बेलघाटनजीक एका नाल्यामध्ये तो शत्रूची वाट पाहात बसला. ६ डिसेंबर १६५९ रोजी शुजा आपल्या छावणीतून बाहेर आला आणि १५ डिसेंबरला त्याने मिर जुम्लावर हल्ला केला. दोन्ही बाजूंचे खूप नुकसान झाले. मिर जुम्लाच्या सैनिकांचा पराभव होऊन त्यांनी माघार घेतली आणि परतताना उजव्या बाजूला बांधलेला पूल जाळून टाकला. ही लढाई चालू असताना मिर जुम्ला हा डावीकडे बांधलेल्या पुलावरून शुजाच्या सैन्याच्या पिछाडीकडे गेला. परंतु शुजाच्या मुख्य सैन्याने या फौजेबरोबर पाठीमागे परतून लढा दिला आणि त्याला माघार घेणे भाग पाडले. दोन दिवसांनी शुजाच्या सैन्याने पुन्हा एकदा मिर जुम्लाच्या सैन्यावर हल्ला करून त्याचे नुकसान केले. (**आलमगीरनामा**, ५१९, ५२५; **मासूम**, १३१ अ, १३३ ब.) ह्या लढाईत मिर जुम्लाचा तोफखाना अतिशय कमकुवत होता. साहाजिकच मिर जुम्लाने डावपेचाच्या दृष्टीने भागिरथी नदीच्या किनाऱ्याने माघार घेण्यास सुरुवात केली आणि तो मुर्शिदाबादला पोहोचला. त्याचवेळी दुसऱ्या किनाऱ्याने शुजाने चाल करण्यास सुरुवात केली आणि तो मुर्शिदाबादच्या उत्तरेस १२ मैलांवर नशीपूर येथे पोहोचला.

औरंगजेबाने बिहारचा सुभेदार दाऊदखान याला मिर जुम्लाबरोबर सहकार्य करण्याचा हुकूम दिला. त्याला मिर जुम्लाला येऊन मिळण्यास ६ -७ महिने लागले. शुजाला हे कळताच त्याने सुटीच्या दिशेने माघार घेण्यास सुरुवात केली. त्याचा उद्देश टंडा येथे जाऊन पोहोचण्याचा होता (**आलमगीरनामा**, ५१३, ५१४, ५२४, ५२६; **मासूम** १३४ अ). मिर जुम्लाला हे कळताच त्याने ताबडतोब शुजाच्या पाठलागाला सुरुवात केली. दुसऱ्या दिवशी रात्री तो फतेहपूर येथे पोहोचला. २८ डिसेंबरला त्याने शत्रूला गाठले. ४-५ दिवस मामुली चकमकीत गेले. १ जानेवारी १६६० रोजी शुजाने दुनापूरकडे आणि तेथून दोगचीकडे माघार घेतली. मिर जुम्ला त्याच्या पाठोपाठ होताच. त्याचा तोफखाना मात्र पाठीमागे होता. म्हणून त्याने शुजावर हल्ला न करता दोगची नाल्याच्या एका बाजूने कूच करण्यास सुरुवात केली. दुसऱ्या बाजूने शुजा कूच करीत

अनुक्रमणिका

होता. ९ जानेवारी रोजी शुजाने गंगा नदी ओलांडली . ही बातमी मिर जुम्ला याला दोगची येथे कळताच त्याने सैन्याची एक तुकडी पाठवून राजमहल काबीज केले. अशा तऱ्हेने गंगेच्या पश्चिमेकडील सर्व प्रदेश शुजाच्या ताब्यातून कायमचा गेला. (**आलमगीरनामा**, ५२६, ५३२; **मासूम** १३४ अ; **अकीलखान**, १०१, १०३).

मिर जुम्ला याने ताबडतोब गंगेच्या पूर्व किनाऱ्यावर हल्ला करण्याची तयारी केली . याचवेळी औरंगजेबाने पाठविलेली सैनिकांची व द्रव्याची मदत त्याला येऊन पोहोचली (**खाफीखान**, भाग २, ९३; **आलमगीरनामा**, ५३३, ५३४). या वेळेला मिर जुम्ला याने आपल्या हालचालींचा बेत अतिशय चातुर्याने आखला . शुजाच्या सैन्यासमोर आपल्या सैन्याची तुकडी ठेवून खोटी हालचाल करून त्याला फसवावयाचे , आणि राजमहलच्या वर १० मैल गंगा नदी ओलांडून पूर्वेकडून टंडावर हल्ला करावयाचा व शुजाला पूर्णपणे वेढावयाचे असा त्याचा बेत होता . त्याच्यापाशी जे प्रचंड सैन्य होते त्यामुळेच त्याला हा बेत पार पाडणे शक्य झाले . शुजाने वेळोवेळी त्याला कणखर प्रतिकार केला . वाटेतील ओढे आणि नाले यांनी देखील त्याची प्रगती रोखून धरली. परंतु अखेर त्याला त्याच्या योजनेत यश आले.

टंडावर मिर जुम्ला याने सरळ चाल करून येऊ नये म्हणून महानंदा या नदीची उपनदी कालिंदी हिच्या काठाने शुजाने तटबंदी उभारली. परंतु मिर जुम्ला याने आपल्या आघाडीवर खोटी हालचाल करीत असल्याची बतावणी केली आणि झपाट्याने उत्तरेच्या दिशेने चाल करून गंगेची अगदी पूर्वेकडची उपनदी आणि महानंदा या तो पार करून गेला . तेथून त्याने ८ फेब्रुवारी रोजी महानंदानदीच्या पूर्वकिनाऱ्याकडे माल्डावर एका तुकडीची रवानगी केली (**आलमगीरनामा**, ५३७, ५४१; **मासूम** १३५ अ, १३५ ब).

शुजासमोर आता विनाश आ वासून उभा राहिला. शत्रूने सर्व बाजूंनी त्याला वेढले. या सुमारास राजपुत्र महमद त्याला सोडून पुन्हा मिर जुम्लाकडे गेला. त्याची सख्त बंदोबस्तात औरंगजेबाकडे रवानगी करण्यात आली . दरम्यान मिर जुम्ला याने कूच केले आणि ६ मार्चला तो माल्डा येथे पोहोचला. या ठिकाणाहून थोड्या अंतरावर असलेल्या महमूदाबाद येथे त्याने जारीने तयारी करण्यास सुरुवात केली (**आलमगीरनामा**, ५४७, ५४८). सर्व तयारी झाल्यावर ५ एप्रिल रोजी त्याने महमूदाबाद सोडले आणि शत्रूला अनपेक्षित असलेल्या अशा एका ठिकाणी महानंदा ओलांडण्यास सुरुवात केली . नदी पार करताना शिस्त बिघडली . वाट दाखविणारी रोवलेली निशाणे तोडली गेली आणि सैनिक चुकून खोल पाण्यात शिरले. शुजाच्या सैन्याकडूनही गोलंदाजी चालूच होती . या धुमश्चक्रीत १००० सैनिक बुडून मेले . (**आलमगीरनामा**, ५५०. **मासूम**मध्ये हा आकडा ३००० आहे तर **अकीलखान** ही संख्या २००० देतो .) परंतु नदी पार करणे क्रमप्राप्त असल्यामुळे हा धोका त्याने पत्करला . मृतांचे दफन करण्यात त्याचा एक दिवस गेला . मिर जुम्ला याने नदी पार केली . ही घटना शुजाच्या कानावर अजूनपर्यंत नव्हती . परंतु या एक दिवसामुळे शुजाला डाक्क्याला पळून जाण्याची संधी मिळाली , त्याचे प्राण वाचले आणि आणखी एका भ्रातृहत्येच्या पापापासून औरंगजेबाला वाचविले . इकडे शुजाच्या सैनिकांनी काही तास सामना दिला. अखेर त्यांनीही माघार घेतली. सय्यद आलम आणि राजपुत्र बुलंद अख्तर यांची मदत आली पण ती फार उशिरा. यार पराजयाची बातमी शुजाला चौकी मिरदापूर येथे मिळाली . त्याला आता झपाट्याने डाक्क्याकडे पळ काढणे भाग होते . रात्र पडल्यावर त्याने टंडाकडे कूच केले (**मासूम**, १६२ अ) सहा एप्रिल रोजी शुजा टंडा येथे पोहोचला. तेथे गेल्यावर त्याने ताबडतोब आपल्या बेगमांना जनान्याबाहेर येण्यास फर्माबिले . नंतर त्याने दोन मजबूत गलबतांवर आपले निवडक सामान भरले आणि टंडाहून कूच केले . त्याच्याबरोबर जेमतेम ३०० माणसे होती . उरलेले त्याचे सरदार आणि इतर मंडळी यांनी आपापला मार्ग स्वीकारला (**आलमगीरनामा**, ५५२). दरम्यान मिर जुम्ला याने टंडाकडे कूच केले पण मधेच डावीकडे वळून त्याने शुजाचा गंगानदीवरील तर्तीपूरकडील माघारीचा मार्ग रोखण्याचे ठरविले . त्याने शुजाची ४०० गलबते पकडली आणि फक्त ४०० माणसे घेऊन तो टंडा येथे मध्यरात्री पोहोचला. टंडा येथे एकच गोंधळ माजला होता. शिपाई आणि गुंड दिसेल त्यावर हात मारीत लुटालूट करीत होते . परंतु ७ एप्रिल रोजी मिर जुम्ला याने शहराचा ताबा घेतला आणि शांतता प्रस्थापित केली . साहजिकच शुजाला आपल्याबरोबर जमा केलेली सर्व सामग्री नेता येणे अशक्य होते . त्याची भरलेली दोन जहाजे तर्तीपूर येथे पकडण्यात आली . शुजाचा नोकरवर्ग त्याला सोडून औरंगजेबाच्या चाकरीत दाखल झाला . त्याच्या तोफखान्याचा प्रमुख मिर मुर्तजा आणि आरमाराचा सेनापती इब्न हुसेन यांनी पुढे आसामच्या लढाईत फार मोठी मर्दुमकी गाजविली (**आलमगीरनामा** ५५४). मिर जुम्ला १२ दिवस टंडा येथे राहिला . तेथील राज्यकारभाराची व्यवस्था लावून १९ एप्रिल रोजी त्याने तर्तीपूर येथे कूच केले . तेथून तो दुसऱ्या दिवशी खुष्कीच्या मार्गाने डाक्क्याकडे निघाला . (**आलमगीरनामा**, ५५५).]

(११) शुजा बंगाल सोडतो; शुजाचा शेवट

बंगालची दुसरी राजधानी , कीर्ती आणि वैभवाच्या बाबतीत शून्य असलेले जे डाक्का शहर तेथे १२ एप्रिल रोजी शुजा पोहोचला . पण तेथे त्याला थारा मिळेल अशी सुतराम शक्यता नव्हती . तेथल्या सर्व जमीनदारांनी त्याच्याविरुद्ध उठाव केला होता आणि त्यांना जरब बसविण्यास एक तर तो असमर्थ होता किंवा त्याच्या पाठलागावर झपाट्याने चाल करून येणाऱ्या मिर जुम्लाला तोंड देण्याची त्याच्यात हिंमत नव्हती. म्हणून ६ मेला त्याने डाक्का सोडले आणि नदीच्या प्रवाहातून तो समुद्राच्या रोखाने निघाला . प्रत्येक मुक्कामावर मोठ्या संख्येने त्याचे शिपाई आणि खलाशी त्याला सोडून जाऊ लागले . त्याने या अगोदरच आराकानच्या राजाकडे मदतीची याचना केली होती आणि डाक्का सोडल्यानंतर आराकानच्या राजाच्या छटगाव येथील सुभेदाराने त्याच्या मदतीसाठी पाठविलेल्या ५१ बोटी त्याला येऊन मिळाल्या होत्या. बंगाल प्रांतावर आपला ताबा राखण्याच्या त्याच्या मनातील आशा आता विलयाला गेल्या होत्या आणि रानटी माघ

लोकांच्या प्रदेशात आता आपणाला परागंदा व्हावे लागणार याविषयी त्याने आपल्या मनाची आता तयारी केली होती.

ह्या बातमीने त्याचा परिवार आणि त्याचे अनुचर यांच्यात एकच घबराटीचे वातावरण पसरले . पूर्व बंगालच्या नद्यातून चांचेगिरी करणाऱ्या छटगावचे आराकानी लोक जनतेच्या पूर्ण परिचयाचे होते . त्यांच्या लुटालुटीमुळे नौखाली आणि वकरगंज हे जिल्हे पूर्णपणे निर्मनुष्य होऊन गेले होते . त्यांचे धाडसी हल्ले , त्यांचा भयानक क्रूरपणा , त्यांच्या रानटी चालिरिती , त्यांचा धर्म आणि जाती निरपेक्ष समाजव्यवस्था आणि घाणेरड्या जनावरांचे मांस खाण्याच्या त्यांच्या सवयी यामुळे बंगालमधील हिंदू काय किंवा मुसलमान काय यांच्या मनात त्या लोकांबद्दल भीती आणि किळस या भावना एकवटून राहिलेल्या होत्या.

परंतु औरंगजेबाने दारा शुको आणि मुरादबक्ष यांची जी वासलात लाविली होती ती भवितव्यता शुजाला टाळावयाची असल्यास त्यातून हा एकच मार्ग होता आणि दुसरी कोणतीही आशा नव्हती . आणि म्हणून अखेर १२ मे १६६० रोजी त्याने आपल्या पूर्वजांची मातृभूमी आणि ज्या प्रांताचा २० वर्षेपर्यंत त्याने राज्यकारभार केला होता तो प्रांत सोडला आणि आपला जनाना आणि ४० पेक्षाही कमी अनुचर घेऊन त्याने आराकानच्या दिशेने नावा हाकारल्या . या अनुचरांपैकी दहाजण आपले साहस आणि आपली स्वामिभक्ती याविषयी साऱ्या हिंदुस्थानात प्रसिद्ध असलेले बारहाचे सय्यद होते.

आपल्या नवीन वास्तुदेशात शुजाला शांतता कधीच लाभली नाही . त्याच्या मनातील पुऱ्या न झालेल्या ध्येयाच्या पोटी त्याच्या जीवनाचा अतिशय शोकदायी पद्धतीने अंत झाला "आराकानमधील स्थायिक झालेल्या अनेक मोगल आणि पठाण रहिवाशांनी त्याच्या बाजूने आपला कल दाखविला . त्याने तेथल्या राजाला ठार मारून आणि त्याचे राज्य बळकाविण्याच्या हेतूने अंदाधुंदी माजविण्याचा आणि नंतर आपल्या नशिबाची परीक्षा पाहण्यासाठी बंगालवर पुन्हा एकदा धडक देण्याचा बेत आखला ." आराकानच्या राजाला या कटाची बातमी समजली आणि त्याने शहाशुजाला ठार मारण्याची योजना आखली . शहाशुजा काही माणसे बरोबर घेऊन जंगलात पळून गेला . माघ लोकांनी त्या दुर्दैवी राजपुत्राचा पाठलाग केला आणि त्याच्या शरीराचे तुकडे तुकडे केले . (**डच अहवाल** , फेब्रुवारी १६६१) [शुजाच्या पलायनाची हकीकत पुढीलप्रमाणे आहे : १२ एप्रिल रोजी शुजा डाक्का येथे पोहोचला . परंतु तेथे त्याला खरा आसरा मिळणार नव्हता . तेथील सर्व जमीनदार त्याच्याविरुद्ध उठले होते . आराकानच्या राजाकडे त्याने मदत मागितली होती . परंतु त्याच्याकडून काहीही उत्तर आले नव्हते . म्हणून ६ मे रोजी त्याने डाक्का सोडले. दुसऱ्या दिवशी तो श्रीपूर येथे पोहोचला . वाटेत त्याचे चाकर इतकेच नव्हे तर त्याचे जुने मंत्री देखील त्याला सोडून गेले . ८ मे रोजी श्रीपूर सोडल्यानंतर छट्गावच्या सुभेदाराने पाठविलेली ५१ गलबते त्याला मिळाली . कूच करत तो भालुआच्या किल्ल्याजवळ पोहोचला . तो किल्ला विश्वासघाताने घेण्याचा त्याने केलेला प्रयत्न फसला . ११ मे रोजी आराकानचा एक सेनापती त्याच्या मदतीसाठी आला . परंतु त्याने भालुआचा किल्ला हल्ला करून घेण्याच्या बेतास मान्यता दिली नाही . इतकेच नव्हे तर त्याने शुजाला दमदाटी करून आराकानकडे कूच करण्यास सांगितले. दुर्दैवी शुजापुढे असे वागण्याखेरीज दुसरा मार्ग उरला नव्हता . (**आलमगीरनामा**, ५५६-५६५; आणखी माहितीसाठी पाहा **Talish's Continuation**).

ह्या बातमीमुळे शुजाच्या कुटुंबात आणि चाकरांत एकच घबराट उडाली . आराकानचे लोक , त्यांचा दुष्ट स्वभाव , दरोडेखोरीची वृत्ती , धर्मभावनेचा अभाव यांविषयी प्रसिद्ध होते . अशा प्रदेशात आता शुजाला जावयाचे होते . परंतु त्याने औरंगजेबाच्या हाती पडण्यापेक्षा आराकानांच्या क्रोधाला बळी पडल्यास हरकत नाही असा विचार केला. आपला बाप आणि भाऊ यांची औरंगजेबाने लावलेली वाट त्याच्या आठवणीत ताजी होती . शुजाच्या मनाने एकच निर्णय घेतला आणि तो म्हणजे हिंदुस्थान सोडण्याचा . १२ मे १६६० रोजी ज्या प्रांतावर त्याने २० वर्षे राज्य केले तो प्रांत , आपली कुटुंबीय मंडळी आणि जेमतेम ४० माणसे यांना घेऊन सोडला . त्यांच्यापैकी १० सय्यद होते आणि त्यांचे नेतृत्व सय्यद आलमकडे होते १२ जण मोगल असून त्यांचे नेतृत्व सय्यद कुली उजबेक याच्याकडे होते . (**आलमगीरनामा**, ५६१; **खाफीखान**, भाग २ , ११०), आपल्या धन्याच्या संकटकाळात या सय्यदांनी त्याच्याशी इमान राखून आपली परंपरा सांभाळली . शुजाचे आराकानमध्ये काय झाले याबद्दल बरेच गूढ आहे . १६७१ मध्ये लिहिताना कम्बू असे उद्गार काढतो की , तो कुठे आहे आणि त्याचे काय झाले याचा पत्ता नाही (**कम्बू**, २१ अ). खाफीखानही त्याच्याबद्दल असेच उद्गार काढतो (**खाफीखान**, भाग २ , १०९). यानंतर अनेक वर्षेपर्यंत शुजा इराणमध्ये गेल्याच्या बातम्या येत होत्या . त्याचा मुलगा बुलंद अख्तर याचे अनेक तोतये निर्माण झाले . शुजाचे देखील दोन तोतये १६६९ आणि १६७४ मध्ये निर्माण झाले (**मासिरी-इ-आलमगिरी**, पाने ४०५ , ४८४; **Orme's Fragments** पा. ५०). यामुळे निर्माण होणारी अनिश्चितता टाळण्यासाठी औरंगजेबाने मिर जुम्ला याला आराकानमध्ये शुजाच्या

कुटुंबाचा शोध घेण्यात सांगितले . १६६६ मध्ये शायस्ताखानाने छट्गाव जिंकले तेव्हा त्याला देखील शुजाचा काहीही शोध लागला नाही . शुजाविषयी युरोपिअन व्यापाऱ्यांनी त्या हकीकती लिहून ठेवल्या त्याच अधिक विश्वसनीय वाटतात . या हकीकतीवरून आपल्याला असे कळते की , शुजाने आराकानच्या राजाविरुद्ध उठाव करण्याचा प्रयत्न केला . हे राजाला कळताच त्याने शुजाला ठार करण्याचे ठरविले . त्याबरोबर शुजाने पळ काढला. परंतु त्याचा पाठलाग करण्यात येऊन त्याला ठार मारण्यात आले . ह्या घटनेची दखल डच लोकांच्या अहवालात आहे . नंतरच्या वार्तेत मात्र त्यांनी असे नमूद केले आहे की आराकानी आणि शुजा यांच्या झालेल्या पहिल्या चकमकीतच शुजा ठार झाला . परंतु त्याच्या अनुयायांनी ही घटना लपविली आणि त्याने जंगलात पळ काढला असे ते नमूद करतात. (**स्टोरिया**, भाग १. ३७४, ३७६).]

●●●

अनुक्रमणिका

औरंगजेबाच्या कारकिर्दीचा संक्षिप्त इतिहास
१६१८ — १७०७

सर जदुनाथ सरकार

मराठीत अनुवाद
भ. ग. कुंटे

पुस्तक तिसरे

[औरंगजेबाच्या भव्य राज्यारोहण समारंभाची हकीकत पुढे दिली आहे. सर्व मोगल सम्राटांत औरंगजेबाच्या राज्यारोहणाचा भपका अधिक होता. प्रत्यक्ष शहाजहानचे राज्यारोहणही त्याच्यापुढे फिके पडते. राज्यारोहण समारंभाच्या एक वर्ष अगोदरच त्याने आपल्या भावांवर मिळविलेल्या विजयाने या समारंभाला अधिकच महत्त्व आले.

मुसलमान सम्राट सिंहासनावर आरूढ होतो त्यावेळी हिंदू अथवा ज्यू लोकांच्या पद्धतीप्रमाणे त्याला चंदन लावीत नाहीत तर तो पूर्ण पोषाख धारण करून सिंहासनावर आरुढ होतो . त्याचवेळी त्याच्या नावाची द्वाही फिरविली जाते आणि त्याच्या नावाची नाणी पाडली जातात . सम्राटपद धारण करताना तो अनेक पदव्या स्वीकारतो , त्याचे अमीर-उमराव त्याला नजराणे देतात , तो अमाप दान करतो आणि समारंभानिमित्त फार मोठा जल्लोष होतो.

रविवार तारीख ५ जून १६५९ हा दिवस दरबारी ज्योतिषांनी शुभ दिवस म्हणून ठरविला आणि राज्यारोहणाची मोठ्या धुमधडाक्याने तयारी करण्यात आली. १२ मे रोजी औरंगजेबाने खाजवा आणि अजमिरच्या विजयानंतर दिल्लीत प्रवेश केला . सकाळी खिजिराबाद या दिल्लीच्या उपनगरातून मिरवणुकीला सुरुवात झाली . पहिल्या प्रथम वादकांचा ताफा होता . त्याच्या पाठोपाठ सोन्याच्या किनखाबाने मढविलेले आणि निरनिराळ्या अलंकारांनी सुशोभित केलेले हत्ती होते. प्रत्येक हत्तीच्या पाठीवर सम्राटपदाची निशाणी फडकविणारे उंच खांब होते. त्यांच्या पाठोपाठ उत्कृष्ट पर्शियन आणि अरबी घोड्यांवर स्वार झालेल्या स्वारांची तुकडी होती . या तुकड्यांच्या पाठोपाठ प्रचंड संख्येने पायदळी सैनिक होते . या पायदळानंतर बादशाही तबेल्यातील उंच आणि प्रचंड हत्ती मोठ्या डौलाने येत होता . त्याच्या पाठीवर सोन्याचे सिंहासन ठेवलेले असून त्यावर मोगल साम्राज्याचा अनभिषिक्त सम्राट औरंगजेब विराजमान झाला होता . या हत्तीभोवती मोगल साम्राजातील लहान मोठ्या अमीर -उमरावांनी आपल्या प्रचंड संस्थेने एक कडे तयार केले होते. त्यावेळी त्याचे वय ४० पेक्षा अधिक होते. सतत केलेल्या मोहिमांमुळे त्याच्या अंगात कमकुवतपणा आलेला नव्हता. त्याची चण किरकोळ होती . चेहरा लांबट होता . कपाळ रुंद होते . त्याचे डोळे अतिशय भेदक असून संकट किंवा भीती यांमुळे त्यामधील गांभीर्य कमी होणारे नव्हते. त्याच्या उजव्या, डाव्या आणि पाठीमागील बाजूस त्याचे सैनिक शिस्तीत चालत होते . औरंगजेबाच्या शत्रूंना पाणी पाजणाऱ्या ह्या खंद्या वीरांकडे दिल्लीचे नागरिक मोठ्या कुतुहलाने बघत होते . अशा तऱ्हेने मार्ग आक्रमित ही मिरवणूक जुन्या दिल्लीच्या बाजारातून निघाली, आणि लाहोर दरवाजातून तिने किल्ल्यात प्रवेश केला . त्यानंतर सर्वजण खाली उतरले . बादशहासमोर त्याच्या उमरावांनी नजराणे ठेवले. ही रक्कम गोरगरिबांना वाटण्यात आली.

अभिषेकाच्या समारंभासाठी दरबाराचे दोन्ही दिवाणखाणे सजविण्यात आले . सम्राटाच्या तीन पिढ्यांनी साम्राज्यातून गोळा केलेल्या देशी आणि विदेशी कारागिरांनी बनविलेल्या उत्कृष्ट अशा वस्तूंचे प्रदर्शन मांडण्यात आले . **दिवाण-इ-आम** आणि **दिवाण-इ-खास** यांची अतिशय भपक्याने सजावट करण्यात आली. दिवाण-इ-आमचे ४० खांब आणि तक्तपोशी सोन्याची झालर असलेल्या किनखाबाच्या कपड्यांनी मढविण्यात आली. प्रत्येक कमानीवरून हिरे -माणके किंवा सोने यांनी मढविलेल्या माळा सोडण्यात आल्या . दिवाणखान्याच्या मध्यभागी सोन्याच्या तारांचे कुंपण घातलेली एक जागा तयार केलेली असून त्यामध्ये मयूर सिंहासन ठेवण्यात आलेले होते . त्यासमोर ४ खांबावर उभारलेली शाहीकनात होती. सिंहासनाच्या दोन्ही प्रवेशद्वाराजवळ दोन रत्नजडीत छत्रे होती. सिंहासनाच्या डाव्या व उजव्या बाजूस कोच ठेवलेले होते. त्यांच्या पाठीमागे सोन्यानी मढविलेली बाके असून त्यांच्यावर शाही शस्त्रास्त्रे ठेवलेली होती . दिवाणखान्यासमोरील पटांगणावर चांदीच्या खांबांवर उभारलेले किनखाबाचे छत होते. पटांगणात अतिशय किंमतवान असे गालीचे पसरण्यात आलेले होते . दिवाणखान्याच्या बाहेरील बाजूस चांदीचे कुंपण होते. दिवाणखान्याच्या उजव्या आणि डाव्या बाजूला मोठमोठे शामियाने उभारण्यात आलेले होते . दिवाण-इ-खासही अशाच तऱ्हेने सजविण्यात आला होता. सूर्योदयानंतर ३ तास १५ मिनिटे ही वेळ शुभ म्हणून ज्योतिषांनी सांगितली होती . साऱ्या दरबारी मंडळींच्या नजरा ज्योतिषांच्या चेहऱ्याकडे लागल्या होत्या. अखेर वेळ झाल्याचे त्यांनी सूचित केले. बादशहा पोशाख करून पडद्याआड बसला होता. त्याने दिवाणखान्यात प्रवेश केला आणि तो सिंहासनावर आरूढ झाला . त्याबरोबर वादकांनी वाद्ये वाजविण्यास सुरुवात केली , गवयांनी गीत गाण्यास सुरुवात केली व नर्तकींनी नृत्य

अनुक्रमणिका

करण्यास सुरुवात केली.

हे चालू असताना दरबारात उंच उभारलेल्या व्यासपीठावर उत्तम तऱ्हेने पाठ म्हणणारा चढला . त्याने स्वच्छ आवाजात बादशहाच्या नावाने **खुत्बा** वाचला. त्याबरोबरच त्याने बादशहाच्या पूर्वजांचीही नावे घेतली . प्रत्येक नावाबरोबरच त्याला एक पोषाख अर्पण करण्यात आला . त्याने बादशहाच्या नावाचा उच्चार करताच सोन्याचांदीची नाणी आणि हिरे -माणके जमलेल्या मंडळींवर उधळण्यात आली . जमलेल्या मंडळींनी बादशहाला नजराणे दिले आणि त्याच्या नावाचा जयजयकार केला . त्याच्यावर सेवकांनी गुलाबपाणी शिंपडले . मंडळींना पानसुपारी वाटण्यात आली. सुगंधी धूपाच्या सुवासाने वातावरण दरवळून गेले . त्या दिवशी औरंगजेबाच्या नावे नाणी पाडण्यात आली . शहाजहानच्या वेळची नाण्याच्या एका बाजूला **कालीमा** कोरण्याची पद्धत टाकून त्याजागी ही नाणी औरंगजेबाने पाडली आहेत अशा अर्थाच्या फारशी ओळी कोरण्यात आल्या . नाण्याच्या दुसऱ्या बाजूला नाणी ज्या ठिकाणी पाडण्यात आली होती त्या गावाचे नाव आणि कारकिर्दीचे वर्ष आणि बादशहाचे सर्व किताब तुघ्रा भाषेमध्ये कोरण्यात आले. त्यानंतर बादशहा जनान्यामध्ये गेला. तेथे आणखी एक दरबार भरविण्यात आला आणि त्याठिकाणी राजकन्या , अमीर-उमरावांच्या स्त्रिया यांनी बादशहाचे अभिनंदन केले . याप्रसंगी औरंगजेबाला सातत्याने पाठींबा देणारी त्याची बहिण रौशन -आरा-बेगम हिला ५ लक्ष रु. देण्यात आले. आपल्या ४ मुलींनाही त्याने रोख रकमा दिल्या . यानंतर बादशहा **दिवाण-इ-खास** मध्ये गेला. तेथे त्याने आपल्या चारही मुलांना रोख रकमा दिल्या. त्याचप्रमाणे अमीर-उमराव, कवी, विद्वान आणि गायक यानांही देणग्या देण्यात आल्या.

याप्रसंगी कविजनांनी राज्यारोहणाचे वर्ष ज्यातून निघेल अशा अक्षरांच्या कविता रचण्याची चढाओढ केली . यांपैकी उत्तम ठरलेल्या काही कवितांना बक्षिसी देण्यात आली . मोगल सम्राट, गादीवर येण्याच्या वेळी प्रचलीत राज्यपद्धतीत आपण काय बदल करणार हे जाहीर करीत असत. औरंगजेबाने या पद्धतीनुसार सर्व अधिकृत व्यवहारात चांद्रवर्ष गणले जावे असा हुकूम काढला , त्याचप्रमाणे नवरोजचा समारंभ करू नये अशी आज्ञा काढली . लोकांमध्ये असलेले दारूचे व्यसन आणि कुराणातील नियमांचा भंग करण्याची प्रवृत्ती नाहीशी व्हावी यासाठी खास अधिकाऱ्यांची नेमणूक केली आणि पुष्कळ जकाती व कर रद्द केले . राज्याभिषेकाचा हा समारंभ पुढे अनेक दिवसांपर्यंत चालला . राज्याच्या अमीर-उमरावांकडून बादशहाकडे नजराणे आले , तर बादशहाकडून त्यांना पदव्या , मानाचे पोषाख , रोख रकमा वगैरे समारंभपूर्वक देण्यात आल्या . रात्रीच्या वेळी यमुनेच्या दोन्ही किनाऱ्यावर रोषणाई करण्यात येत असे. अमीर-उमराव आपल्या नौकांना दोन्ही बाजूंनी दिवे लावून नदीच्या प्रवाहात त्यांना प्रवाहाबरोबर खालीवर वल्हवीत . त्यावेळी दिसणारी दिव्यांची शोभा अप्रतिम असे . ती पाहण्यासाठी नदीच्या तीरावर हजारो लोक जमत असत. या सर्व कार्यक्रमात बादशाही तोफखान्याने २४ जून रोजी दारूकामाच्या आतषबाजीची जी कमाल केली , तिचे वर्णन खरोखरच करता येण्याजोगे नाही. खुद्द बादशहाने हे दारूकाम पाहिले . जुलै महिन्याच्या सुरुवातीला दाराला पकडल्याची बातमी आली . त्यामुळे बादशहाचा आनंद अधिकच द्विगुणीत झाला . राज्याभिषेकाचा समारंभ आणखी दोन महिने पुढे चालला आणि १९ ऑगस्ट रोजी समाप्त झाला . सर्व अधिकृत कागदपत्रात आपल्या कारकीर्दीची सुरुवात १ **रमजान** १०६८ **हिजरी** (२३ मे १६५८) यादिवशी झाली, असे नमूद करण्यात यावे असा बादशहाने हुकूम काढला.]

अनुक्रमणिका

प्रकरण सहावे

कारकिर्दीचा पूर्वार्ध : सर्वसामान्य समीक्षण

(१) औरंगजेबाच्या कारकिर्दीचा पूर्वार्ध आणि उत्तरार्ध यामधील तफावत : त्याच्या व्यक्तिगत हालचाली.

औरंगजेबाच्या कारकिर्दीचे नैसर्गिकतया २५ /२५ वर्षांचे प्रत्येकी असे दोन सारखे भाग पडतात . त्यांपैकी पहिला भाग त्याने उत्तर हिंदुस्थानात व्यतीत केला . तर दुसरा त्याने दक्षिणेत घालविला . या दोन्ही भागांच्या पूर्वकाळात राजकीय हालचालींचा मध्यबिंदू निःसंशयपणे उत्तरेत होता यात प्रत्यवाय नाही . याला कारण बादशहाचे उत्तरेत वास्तव्य होते हे नाही तर अतिशय महत्त्वाच्या अशा मुलकी आणि लष्करी घटनांचे राजकारण हे त्या भागाशी निगडित होते. याउलट दक्षिणेचा प्रदेश म्हणजे अतिशय दूरवरचा आणि कमी महत्त्वाचे स्थान असलेला अशी समजूत होती . बादशहाच्या कारकिर्दीच्या उत्तरार्धात ही परिस्थिती बदललेली आपल्याला दिसते. साम्राज्याची सर्व साधनसंपत्ती आपल्याला दक्षिणेत एकवटलेली पाहावयास मिळते. बादशहा, त्याचा दरबार आणि कुटुंबिय मंडळी , त्याचे बहुतेक सैन्य आणि त्याच्या राज्यातील नावाजलेले अधिकारी हे सर्वजण पावशतक तिथे राहिलेले आपल्याला आढळतात , आणि उत्तर हिंदुस्थानला दुय्यम दर्जाचे स्थान प्राप्त झालेले आपल्याला दिसते . बादशहाचे सारे सेनानी आणि शिपाई यांना दक्षिणेतील चाकरी म्हणजे सक्तीचा वनवास वाटतो आणि ते आपल्या उत्तरेतील घरादाराकडे जायचा हव्यास धरतात. आपल्या घराकडे जाण्याची ओढ लागलेला एक अधिकारी फक्त १ वर्ष दिल्ली येथे राहावयाला मिळावे म्हणून बादशहाला १ लाख रुपये देऊ करतो (**एम्. यू.** भाग १, ४५७) तर बादशहाच्या फौजेतील रजपूत शिपाईगडी तक्रार करतात की , त्यांचे घरदार आणि कुटुंब यांच्यापासून दूरवर लांब दक्षिणेत त्यांना हयातभर राहावे लागल्याने त्यांची जातच नष्ट होण्याची पाळी आली आहे . जवळ जवळ एका मानवी पिढीच्या आयुर्मानाइतक्या कालखंडाबरोबर भरणाऱ्या या कालावधित बादशहाची चाणाक्ष नजर आणि नाणावलेले कारभारी हे कारभारातून बाहेर काढले गेल्यामुळे उत्तर हिंदुस्थानच्या राजवटीचा साहजिकच विचका होतो . जनतेचे दारिद्र्य वाढते . नैतिक वागणूक , बुद्धिमत्ता आणि उपयुक्ततेची कामे करण्याच्या बाबतीत उच्चवर्णीय समाज ढासळतो आणि या सर्वांवर ताण म्हणून की काय राज्याच्या सर्व भागात कायद्याला विरोध करण्याची वृत्ती बळावते.

कारकिर्दीच्या पूर्वार्धात उत्तर हिंदुस्थानातील राजकारणाचा मध्यबिंदू अतिशय वेगाने आणि कल्पना करता येणार नाही इतक्या पल्लेदारपणे बदलतो . शाही राजकारणाचे पडघम अतिपश्चिमेकडे असलेल्या काबूलहून निघून हिंदुस्थानच्या अगदी पूर्वेकडे नामरूप टेकड्यांच्या दिशेने कूच करताना आणि हिंदुस्थानच्या उत्तर सीमेकडील तिबेटहून निघून साम्राज्याच्या दक्षिण सीमेवरील विजापूरच्या दिशेने कूच करून चाललेले आपल्याला आढळतात . एकमेकांपासून दूरवर असलेल्या साम्राज्याच्या अनेक जिल्ह्यांत कायद्याविरुद्ध वर्तन करणारे शेतकरी आणि छोटेछोटे प्रमुख यांच्याविरुद्ध लहान प्रमाणावर कारवाया केल्या जातात. आणि याच कालखंडात बादशहाची धार्मिक असहिष्णुता आपला बुरखा फाडून नंगानाच घालत असलेली आपल्याला दिसते.

औरंगजेबाच्या हालचाली १६५७ - १६८१

आपल्या कारकिर्दीच्या दुसऱ्या वर्षाच्या सुरुवातीला (१३ मे १६५९) भव्य प्रमाणावर स्वतःला

राज्याभिषेक करून घेतल्यावर सारा राज्यकारभार राजधानीतूनच पाहात औरंगजेब दिल्ली येथेच राहात असे. १६६१ ते १६६७ या दरम्यानच्या काळात हिंदुस्थानाबाहेरील जगातल्या इतर सर्व मुसलमान देशातील राजांनी पाठविलेल्या वकिलाती त्याच्या राज्यारोहणानिमित्त त्याचे अभिष्ट चिंतिण्यासाठी दिल्लीत दाखल झाल्या. परदेशातून आलेल्या या पाहुण्यांच्या बडदास्तीसाठी त्याने आपली संपत्ती आणि सामर्थ्य यांचे भव्य प्रमाणात असे काही प्रदर्शन केले की "व्हसेलिसचे वैभव पाहण्याची ज्यांना सवय झाली आहे अशांचेही डोळे त्यामुळे दिपून गेले." आपल्या कारकिर्दीच्या पाचव्या वर्षात त्याने काश्मीरमध्ये एक खेप केली . ८ डिसेंबर १६६२ रोजी त्याने दिल्ली सोडली आणि १८ जानेवारी १६६४ मध्ये तो दिल्लीला पुन्हा परतला . फेब्रुवारी १६६६ मध्ये शहाजहानचा मृत्यू झाल्यामुळे त्याला आग्र्याला जावे लागले . जोपर्यंत शहाजहान हा बंदिवासात जिवंत होता तोपर्यंत साहजिकच औरंगजेबाने आग्र्याला जायचे टाळले आणि आपले दरबारी कामकाज दिल्लीहूनच केले.

१६७४ साली आफ्रिडी टोळ्यांच्या बंडाने उग्र स्वरूप धारण केल्याने पेशावरजवळ राहूनच आपल्या सेनेच्या हालचालीबाबत नियंत्रण ठेवता येईल म्हणून औरंगजेबाला पेशावरजवळ हसन अब्दालकडे जाणे भाग पडले. याठिकाणी तो २६ जून १६७४ ते २३ डिसेंबर १६७५ पर्यंत राहिला आणि २७ मार्च १६७६ रोजी तो दिल्लीला परतला . १६७९ च्या सुरुवातीला महाराजा जसवंतसिंग याचा मृत्यू झाला आणि जोधपूरचे राज्य खालसा करण्याच्या चालून आलेल्या संधीने त्याने अजमेरकडे प्रयाण केले . राजपुतान्यात त्याने नंतरची दोन वर्षे घालविली आणि नंतर आपल्या कारकिर्दीच्या २५ व्या वर्षाच्या सुरुवातीला त्याने दक्षिणेकडे कूच केले आणि तेथेच त्याने २५ वर्षांच्या अविरत परंतु अयशस्वी प्रयत्नानंतर आपल्या जीवनाची आणि साम्राज्याची इतिश्री केली.

औरंगजेब प्रथम सिंहासनारूढ झाला तो हिजरी सनाच्या १०६८ व्या झिल्काद महिन्याच्या १ तारखेला (२१ जुलै १६५८). परंतु त्याचा दुसरा अथवा मोठ्या प्रमाणावर साजरा झालेला राज्याभिषेक हा रमजानच्या २४ तारखेला हिजरी सनाच्या १०६९ या वर्षी (५ जून १६५९). त्याच्या कारकिर्दीच्या दुसऱ्या वर्षी असा हुकूम जारी झाला की अधिकृत कागदपत्रात त्याच्या कारकिर्दीच्या प्रत्येक वर्षाची गणना ही १ रमजानपासून केली जावी.

परंतु धर्मबंधनामुळे पडणारे उपवास आणि प्रार्थना ही रमजान महिन्यात येत असल्याने त्या वेळी समारंभ आणि मौजमजा करणे हे गैरसोयीचे होऊ लागले . त्यामुळे कारकिर्दीच्या ४ थ्या वर्षापासून पुढे बादशहा रमजान महिन्याच्या अखेरीस ताबडतोब सिंहासनारूढ होऊ लागला . म्हणजेच इद उलफित्रच्या दिवशी (कधीकधी एक दिवस उशिरा) आणि त्या तारखेपासून १० दिवसानंतर राज्यारोहणाचा उत्सव साजरा होत असे. कारकिर्दीच्या २१ व्या वर्षी (१६७७) त्याने राज्यारोहणानिमित्ताने होणारे उत्सव, अमीर-उमरावांकडून त्याला देण्यात येणाऱ्या भेटींची प्रथा आणि राज्यारोहणाच्या वर्षसमारंभानिमित्ताने दरबारात होणारी निरनिराळी संचलने यांना बंदी केली.

(२) औरंगजेबाचे आजारीपण, १६६२

त्याच्या कारकिर्दीच्या ५ व्या वर्षाच्या सुरुवातीला औरंगजेबाला मोठ्या दुखण्याने ग्रासले . (**ए. एन.**, ७४५–७५३; **स्टोरिया**, भाग २. ५४–६१; **बर्नियर**, १२३-१२६) कर्तव्य पार पाडण्याच्या बाबतीतला त्याचा दुराग्रह आणि धार्मिकबाबती संबंधात नेमनियम पाळण्याचा त्याचा हटवादीपणा यामुळे त्याचे दुखणे

विकोपाला गेले. रमजानचे दिवस हे अतिशय मोठे आणि त्यात कडक उन्हाळ्याचे (१० एप्रिल ते ९ मे १६६२). न सोसणारे कामकाज , झोपेशिवाय घालविलेल्या रात्री आणि या संबंध महिन्यात दिवसाचा पडणारा उपवास आणि त्या काळात झालेली खाण्यापिण्याची आबाळ आणि यात भर म्हणून की काय दिल्लीच्या उन्हाळ्याचे रणरणते पेटते ऊन यामुळे तो अतिशय अशक्त झाला . अखेर १२ मे रोजी त्याला तापाने गाठले. राजवैद्यांनी त्याच्या अंगातून इतके रक्त काढले की तो अतिशय अशक्त झाला. पुष्कळ वेळा अधूनमधून त्याला बेशुद्धीचे झटके येत आणि त्याच्या चेहऱ्यावर भयानक अवकळा पसरे . राजवाडा आणि राजधानी यांमध्ये अतिशय काळजीचे आणि अनिश्चिततेचे वातावरण पसरले आणि त्यातच त्याच्या मुलांनी आपल्या बाजूला पक्षपाती मिळविण्यासाठी आणि वारसाहक्काचा आपला अधिकार शाबीत करण्यासाठी केलेल्या परस्परविरोधी हालचालींनी त्या वातावरणाचे गांभीर्य अधिकच वाढले.

पाचव्या दिवसापर्यंत त्याचा ताप आणि दुर्बलता यात यत्किंचितही उतार पडला नाही. परंतु त्याची इच्छाशक्ती इतकी जबर होती की त्याने काठीच्या आधाराने एक क्षणभर का होईना पण त्या दिवशी संध्याकाळी आणि दुसऱ्या दिवशी (ऑडियन्स हॉल) दिवाण-इ-आममध्ये येऊन लोकांना दर्शन दिले आणि शाही मानचिन्हांचे वंदन स्वीकारले. त्याचे आजारीपण त्यानंतर एक महिनाभर चालू होते. परंतु सार्वजनिक सुरक्षिततेला धोका येईल अथवा लोकांत घबराट पसरेल इतके गांभीर्य त्या आजारीपणात नव्हते . शुक्रवार तारीख २३ आणि ३० या दोन्ही दिवशी सार्वजनिकरित्या नमाज पढण्यासाठी तो पालखीतून जामा मशिदीत गेला. तो तापातून पूर्ण बरा झाल्या निमित्ताने २४ जून रोजी उत्सव साजरा करण्यात आला . [औरंगजेब आजारातून उठल्यानंतर देशात सर्वत्र आनंदोत्सव साजरे झाले . विशेषतः औरंगजेबाची बहीण रोशन -आरा हिने आपल्या प्रिय भावाची मृत्यूच्या जबड्यातून सुटका झाल्याबद्दल एक अतिशय जंगी अशी मेजवानी दिली . औरंगजेब आजारी असताना त्या दीड महिन्याच्या अतिशय संकटमय परिस्थितीत सबंध साम्राज्यात जी संपूर्ण शांतता वास करीत होती तिचे सारे श्रेय औरंगजेबाचे प्रभावी व्यक्तिमत्त्व आणि त्याने स्थापन केलेल्या राज्ययंत्रणेचे स्थैर्य यांनाच द्यावे लागेल. सारा हिंदुस्थान जणुकाही त्याच्या अभूतपूर्व अशा इच्छाशक्तीने भारून गेल्यासारख झाला होता आणि या नश्वर जगाचा त्याग करून तो आता परत येणार नाही अशी खात्री झाल्याखेरीज त्याच्या राजवटीविरुद्ध हात उचलण्याची भारताची , जगातील कोणाचीच जणुकाही हिम्मत नव्हती .] औरंगजेबाच्या ह्या आजारीपणाच्या दीड महिन्यांतील कालावधीच्या आणीबाणीच्या प्रसंगी साऱ्या साम्राज्यात जी पूर्णपणे शांतता नांदली ह्यातच औरंगजेबाच्या स्वभावाचा कणखरपणा आणि त्याने स्थापन केलेल्या अधिपत्याचे स्थैर्य यांचे श्रेष्ठतम श्रेय साठविलेले आहे असे म्हणण्यास काहीच हरकत नाही. [बर्नियरच्या वर्णनातील अगफिया ऊर्फ दानिष्मंदखान आजारीपणातील औरंगजेबाच्या चिवटपणाची हकीकत ऐकल्यानंतर उद्गारला, "ओहो! केवढे हे मनाचे सामर्थ्य ! केवढे हे दुर्दम्य धैर्य ! औरंगजेबा, तुझ्या हातून यापेक्षा अधिक कामगिरी व्हावी यासाठी परमेश्वर तुझे रक्षण करो! आज या घटकेला तरी मृत्यूची तुझ्याजवळ येण्याची हिंमत नाही!" (पान १२५)]

आजारातून उठल्यावर आपली गेलेली ताकद परत मिळविण्यासाठी आणि वृत्ती आमोदित करण्यासाठी औरंगजेबाने त्या काळी पृथ्वीवरचे नंदनवन म्हणून प्रसिद्ध असलेल्या काश्मीरच्या सौंदर्याने नटलेल्या भूमीला भेट द्यावी असे सुचविण्यात आले . १६६३ सालच्या मे महिन्याच्या सुरुवातीला त्याने काश्मीरला जाण्यासाठी लाहोर सोडले (**ए. एन.**, ८१९ -८४०; **बर्नियर**, ३९१-४२८) आणि त्याने काश्मीरच्या भूमीत भिम्बर येथील पिर पंजाल खिंडीच्या रस्त्याने प्रवास करत प्रवेश केला . श्रीनगर येथे अडीच महिने दरबारीमंडळींनी मोठ्या प्रसन्नपणे व्यतीत केले . परत प्रवासात औरंगजेबाचा लाहोर येथे १६६३ सालच्या सप्टेंबर महिन्याच्या २९ तारखेला मुक्काम झाला . १६६४ च्या जानेवारीच्या १८ तारखेस तो दिल्लीला पोहोचला. [**मासिरी आलमगिरी** (४६) आणि **खाफीखान** (भाग २. १७६) यांनी दिलेल्या हकीकतीप्रमाणे काश्मीरला जात असताना झालेल्या भयंकर अपघातामुळे औरंगजेबाचे मन अस्वस्थ झाले आणि त्याने यापुढे कधीही काश्मीरला न जाण्याचा निश्चय केला. ती घटना अशी : पीर पंजाल ही खिंड ओलांडत असताना एक घाबरलेला हत्ती पाठीमागे फिरला आणि एखाद्या झंझावाताप्रमाणे भीम्बारच्या दिशेने तो पळू लागला. साहजिकच त्या छोट्याशा खिंडीत सैनिक आणि जनावरे यांच्यामध्ये एकच गोंधळ माजला . या अजस्र हत्तीच्या हल्ल्यापुढे अनेक हत्तीं आणि हमाल दरीत कोसळून त्यांच्या चिंधड्या झाल्या . ही दुर्घटना ऐकल्यावर बादशहाचे अंतःकरण हेलावून गेले , आणि त्याने काश्मीरला पुन्हा कधीही न जाण्याचा निश्चय केला.

अनुक्रमणिका

वरील घटनेबाबतची आश्चर्याची गोष्ट ही की औरंगजेबाच्या अधिकृत इतिहासामध्ये (**ए. एन्.**) याबाबत काहीच उल्लेख नाही . यावेळी प्रत्यक्ष हजर असलेला बर्नियर मात्र हीच घटना थोड्याशा वेगळ्या स्वरूपात देतो (४०७)]

शिकारी औरंगजेब

राजेपदाच्या दिल्ली येथील घालविलेल्या सुरुवातीच्या काही वर्षांत राज्याच्या सीमांच्या क्षितीजावर कलहाचे काळेकाळे ढग पसरलेले नसताना दुआबाच्या प्रदेशात अथवा राजधानीच्या आसमंतात शिकारीपासून मिळणाऱ्या आनंदाचा मनमुराद उपभोग औरंगजेबाने अनेकदा घेतला . अर्थात आपल्या म्हातारपणी शिकार म्हणजे बेकार लोकांचा व्यवसाय अशी त्याने संभावना केली ही गोष्ट वेगळी.

(३) साम्राज्याच्या प्रांतामध्ये बादशाही हुकमतीच्या विरुद्ध झालेले उठाव

औरंगजेबाच्या कारकिर्दीच्या पहिल्या २५ वर्षांत साम्राज्याला लागून असलेल्या लगतच्या प्रदेशावर अनेक लहान -मोठ्या मोहिमा काढण्यात आल्या . त्या खालीलप्रमाणे : बिहारच्या दक्षिणेस पालभाऊ , आसाम आणि कुचबिहार (या दोन्ही मोहिमा अर्धवट सोडण्यात आल्या), इदार, छटगाव आणि तिबेट (ही मोहीम १६६५ साली काढण्यात आली ; त्या देशाचा बुद्धाधिपती याने बादशहाचे सार्वभौमत्व मान्य करावे एवढाच या मोहिमेचा उद्देश होता . हा देश म्हणजे बहुदा लडाख किंवा छोटा तिबेट असावा) [या काळातील औरंगजेबाचा आणखी एक विजय म्हणजे मोगलांचे तिबेटवर स्थापन झालेले प्रभुत्व . इ. स. १६६५ मध्ये काश्मीरच्या मोगल सुभेदाराने तिबेटच्या राजाला एक पत्र पाठवून अशी धमकी दिली की , जर त्याने इस्लाम धर्माचा प्रसार आणि बादशहाशी राजनिष्ठा न दाखविल्यास तिबेटवर स्वारी करण्यात येईल . या धमकीला घाबरून तिबेटच्या राजाने दोन्ही अटी मान्य केल्या . त्यानुसार त्याने एक मशीद बांधली , बादशहाच्या नावे जाहीररीत्या **खुत्बा** वाचला आणि बादशहाच्या नावे नाणी पाडली . पत्र घेऊन आलेल्या वकिलातीला त्याने सन्मानपूर्वक निरोप दिला . वकिलातीबरोबर औरंगजेबाचे नाव असलेल्या दोन हजार मोहरा आणि २ हजार रुपये , तिबेटमधील बहुमोल वस्तू आणि आपण मांडलिकत्व पत्करले आहे याचे निदर्शक असलेली एक सोन्याची किल्ली त्याने बादशहाला देण्यासाठी पाठविली . त्याकाळचे तिबेटचे वर्णन तितकेसे यथातथ्य आढळत नाही. देशाची लांबी ६ महिन्यांच्या प्रवासाइतकी आणि रुंदी २ महिन्यांच्या प्रवासाइतकी असून राजाच्या सन्याची संख्या १२ हजार घोडदळ आणि पायदळ आहे, या गोष्टी आपल्याला या वर्णनात आढळतात. राज्याचे सर्व अधिकारी तार्तर जमातीचे असल्याचाही उल्लेख आहे.

या जमातीने १६८३ मध्ये तिबेटवर आक्रमण केले. तिबेटच्या रक्षणाकरिता काश्मीरचा सुभेदार इब्राहीमखान याचा मुलगा फिदा -इ-खान त्याच्या हाताखाली फौजेची रवानगी करण्यात आली . त्याने आक्रमकांचा पराभव करून प्रचंड लूट बरोबर आणली . बादशहाच्या अधिकृत इतिहासात बादशाही फौजांनी तिबेटच्या राजाकडून तिबेट मोगलांनी जिंकून घेतला असे विधान आहे . परंतु हे असंभवनीय वाटते (पाहा **ए. एन्.**, ९२१-९२३, तिबेटच्या वकिलातीची औरंगजेबाने काश्मीरमध्ये भेट घेतली. (१६६३) असे बर्नियर सांगतो. **एम्. ए.**, २३६; **तारिखी काश्मीरी आझमी**, १२४ ब आणि १३१ ब).]

औरंगजेबाच्या कारकिर्दीत त्याच्या राज्याच्या अंतर्गत शांततेचे जे भंग झाले त्याचे तीन प्रकारांत वर्गीकरण करता येईल. (१) राजपुत्रामध्ये वारसाहक्कासंबंधीच्या युद्धात साहजिकतया उद्भूत होणारी बंडे. अशा वेळी मुलकी राजवट कोलमडून पडल्याने लुटारू आणि महत्त्वाकांक्षी वृत्तीचे पुढारी शिक्षेच्या भयाची भीती न बाळगता कायद्याच्या विरुद्ध कृत्ये करून स्वतःची तुंबडी भरण्याला प्रवृत्त होतात . (२) कारकिर्दीच्या १२ व्या वर्षात औरंगजेबाने हिंदूंच्या देवळांचा साऱ्या सामाज्यात उच्छेद करण्याचे जे धोरण अंगीकारले त्याच्या विरुद्ध हिंदूंनी केलेले उठाव . (३) मां लिक राजांनी केलेले उठाव . याशिवाय आपल्याला शाही हुकुमांचे उल्लंघन जंगलासारख्या ठिकाणी किंवा जिथे फारशी वसाहत नाही अशा ठिकाणी लहानसहान अधिकाऱ्यांनी केल्याचे प्रकारही तुरळकपणे आढळतात.

औरंगजेबाच्या धर्मांधतेमुळे चिडून गेलेल्या हिंदूंनी केलेले उठाव आणि त्याचप्रमाणे त्याचे शिखधर्मियांबरोबरील वर्तन या संबंधीची समग्र हकीकत पुढील प्रकरणात सविस्तरपणे सांगण्यात येईल.

अनुक्रमणिका

त्या शिवाय त्याचे मृत बंधू किंवा पुतणे यांच्या तोतयांनी बंडाची उभारणी केल्यामुळे अनेक ठिकाणी स्थानिक शांतताभंगाचे प्रकार घडले . इ. स. १६६३ च्या ऑगस्ट महिन्यात दारा शुकोचा तोतया गुजरातेत अवतरला तर शुजाचा एक तोतया मोरंग टेकड्यात (कुचबिहारच्या पश्चिमेस) १६६९ च्या मे महिन्यात , दुसरा १६७४ मध्ये युसफजाई प्रदेशात तर तिसरा कामराजमध्ये (काश्मीरात) १७०७ इतक्या उशिरा असे क्रमाने अवतीर्ण झाले ; त्याचप्रमाणे शुजाचा दुसरा मुलगा बुलंद अख्तर याचा तोतया १६९९ च्या जुलैमध्ये अलाहाबाद सुभ्यात उगवला तर त्याच वर्षी मार्च महिन्यात दक्षिणेत बंडखोर राजपुत्र अकबर याच्या तोतयाने डोके वर काढले. [या काळामध्ये जी बारीकसारीक बंडाळी झाली तिचा थोडासा उल्लेख केला तरी चालण्यासारखे आहे . इ. स. १६५९ च्या नोव्हेंबर महिन्यात बहादूर पचकीपी याच्या नेतृत्वाखाली रजपूत आणि इतर टोळीवाले यांनी बंड केले . त्यामुळे वसुली करणे देखील कठीण झाले. इ. स. १६६३ च्या मे महिन्यात संबळ अफगाणांनी बंड करून मोगलांची ठाणी लुटली . त्यांचा पराभव करण्यात आला आणि दोन लाखांची लूट त्याच्यापासून जप्त करण्यात आली.

इ. स. १६६० च्या सुरुवातीला चक्रसेन नावाच्या भिल्ल जमीनदाराने भीलशानजीक बंड केले . त्याने बरीच खेडी ताब्यात घेतली . त्याच्यावर भगवंतसिंग हाडा नावाच्या अधिकाऱ्याला पाठविण्यात आले . त्याने मे महिन्यात बंडखोराचा मोड केला . १६६९ मध्ये भूपालसिंग या गोंड जमीनदाराने बंड केले . त्याचाही मोड करण्यात येऊन त्याची हकालपट्टी करण्यात आली . परंतु आक्टोबर महिन्यात त्याने ८००० लोक जमवून चौकीगढ येथील मोगल फौजदाराचा पराभव केला . त्याची ताकद एवढी वाढली की , त्याच्याविरुद्ध बादशहाला चार मोठे सरदार पाठवावे लागले . त्याचा पूरा मोड करण्यात बादशहाला यश आले नाही . डिसेंबर १६६५ मध्ये शहाबाद येथे हमीर सेन याने बंड केले . एप्रिल १६६७ मध्ये जम्मूच्या राजाने बंड केले. आक्टोबर १६६९ मध्ये मीना जमातीच्या लोकांनी बंड केले. ह्या बंडाचा बीमोड रामसिंग गौर याने केला.

विशेष सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे औरंगजेबाच्या सर्व कारकिर्दीत इदरच्या राजाने खूपच धामधूम माजविली . मुरादबक्ष याने राज्याचे मुख्य शहर जिंकून तेथे आपल्यातर्फे फौजदाराची नेमणूक केली . परंतु इदरच्या राजाचा मुलगा पुंजा याने इदर जिंकून घेतले . त्याच्या मृत्यूनंतर काही काळ मोगल सत्ता तेथे पुन्हा प्रस्थापित करण्यात आली . तरी देखील राजघराण्यातील लोकांनी मोगलांना सतावण्याचे काम चालूच ठेवले . १६७० च्या जानेवारीमध्ये एका राठोड राजपुत्राने इदरवर हल्ला केला . इ. स. १६७५ मध्ये गोपीनाथराव याने इदरचा फौजदार सय्यद कमाल याचा पराभव करून इदर जिंकले. १६८० मध्ये पुन्हा मोगलांनी इदरचा कबजा मिळविला.

याशिवाय आणखी बरीच बंडे झाली . ती म्हणजे पश्चिम सिंधमधील शेवान या प्रांतात १६७० मध्ये उच्छरैन या टोळीतील लोकांनी घातलेला धुमाकूळ व मे महिन्यात किश्तवारच्या राजाने खंडणी देण्यास दिलेला नकार , १६७१ च्या जानेवारीत अलाहाबाद प्रांतात हरडी आणि इतर जमीनदारांनी केलेला उठाव, १६७४ च्या सप्टेंबरमध्ये बीरसिंग गौर याने केलेले बंड, त्यापुढील वर्षी बिहारमधील आलम, इस्माईल आणि इतर अफगाण जमीनदारांनी केलेला उठाव ही होत . ही सर्व बंडे पूर्णपणे स्थानिक स्वरूपाची होती , आणि त्यांचा बिमोड स्थानिक प्रांतिय अधिकाऱ्यांनी केला. ज्यावेळी औरंगजेब सिंहासनावर आला त्यावेळी केनजूर आणि हिजली या ओरिसामधील जमीनदारांनी बंड केले आणि खंडणी देण्यास नकार दिला. याच सुमारास ओरिसातील इतर मांडलिकांनीही बादशहाविरुद्ध उठाव करण्याचे प्रयत्न केले.]

बिकानेरचा राजा आणि चंपत बुंदेला यांवरील मोहिमा

बिकानेरचा मुख्याधिपती भूर्तिया जमातीचा रावकर्ण (पाहा **ए. एन्.**, ५७०, ५७२, ५५९, ६००, ६०३, ६०६) याने शहाजहानच्या कारकिर्दीच्या शेवटच्या वर्षी दक्षिणेतील . मोगल सैन्यात चाकरी केली होती , परंतु औरंगजेबाची परवानगी न घेता दाराच्या चिथावणीवरून तो उत्तर हिंदुस्थानात परतला होता . त्यानंतर नवीन बादशहाला रीतीप्रमाणे आदरपूर्वक भेट देण्याची त्याने टाळाटाळ केली होती . म्हणून इ. स. १६६० च्या आगस्ट महिन्यात अमीरखानाला त्याच्या हाताखाली ९००० फौज देऊन त्याला वठणीवर आणण्यासाठी रवाना करण्यात आले . रावकर्णला वठणीवर आणण्यात आले . त्यानंतर २७ नोव्हेंबर रोजी तो बादशहाच्या भेटीस आला आणि त्याला बादशहाने क्षमा केली.

औरंगजेबाच्या क्रोधाला बळी पडण्यास पात्र झालेला दुसरा बंडखोर राजा म्हणजे चंपतराय बुंदेला (पाहा **छत्र प्रकाश** -Cartos, ५–८; **ए. एन्.**, ७८, ९२, १६३, २१७, ३०१, ६३०–६३३; **एम् यू.**, भाग २. ५१०). १६३५ च्या युद्धानंतर वीरसिंग देवाच्या कुटुंबियांना पदच्युत करण्यात आले आणि ओर्च्छाचे राज्य त्याच्या थोरल्या भावाचा एक वारस देवीसिंग याला देण्यात आले . परंतु वीरसिंगाच्या बापाच्या धाकट्या

भावाच्या वंशजाचे घराणे पूर्व बुंदेलखंडात महेवाचे अधिपती म्हणून राज्य करीत होते . त्यांचा पुढारी चंपतराय हा होता . जसवंतवर मिळविलेल्या विजयानंतर औरंगजेब जेव्हा उज्जैनला पोहोचला तेव्हा चंपतराय त्याला येऊन मिळाला . परंतु जेव्हा खाजवावर शुजा चाल करून येत होता आणि साऱ्या साम्राज्यात वेड्यावाकड्या अफवांनी एकच धुमाकूळ घातला होता तेव्हा चंपतने औरंगजेबाचा पक्ष सोडला आणि आपल्या मायदेशाला जाऊन त्याने आपला पूर्वीचा दरोडेखोरीचा मार्ग पुन्हा अवलंबिला . औरंगजेबाने शुभकर्ण बुंदेला आणि इतर रजपूत अधिकारी यांच्या हाताखाली बंडखोरांवर फौजेची रवानगी केली (१० फेब्रुवारी १६५९). राजा देवीसिंग बुंदेला याच्या हाताखालील एक तुकडी आणि माळव्यातील जहागीरदार आणि स्थानिक फौज यांना वरील फौजेला साहाय्य करण्याचे हुकूम देण्यात आले . आता प्रत्येकाने चंपतरायवर शस्त्र उगारले होते . चंपतराय याठिकाणाहून त्याठिकाणी आश्रय घेत फिरत होता आणि बादशाही फौज त्याच्या पाठीशी होती.

अखेर १६६१ च्या आक्टोबर महिन्याच्या मध्यास आपल्या तकलुपी मित्रांकडून आता आपला पाडाव होण्याचा काळ अगदी नजीक आला आहे अशी जाणीव झाल्याने आणि ताप आणि अशक्तपणा यामुळे झालेल्या यातनांच्या तीव्रतेमुळे स्वतःचा बचाव करणे केवळ अशक्यप्राय आहे हे समजून चुकल्याने चंपतरायने स्वतःला भोसकून घेऊन आत्मघात केला. त्याचप्रमाणे त्याच्या जीवनातील त्याची सहचरी राणी काली कुमारी हिनेही त्याचाच कित्ता गिरविला . परंतु त्याचा मुलगा छत्रसाल हा मात्र मोगल शत्रुत्वाला पुरून उरण्याइतका दीर्घकाळ जगला आणि पूर्व बुंदेल खंडात पन्ना येथे त्याने नवीन राज्याची स्थापना केली.

(४) पालमाऊ वगैरे ठिकाणे काबीज

बिहारच्या दक्षिणेच्या मर्यादा संपल्यावर पलीकडे पालमाऊ हा किल्ला आहे . आग्नेयेकडे पसरलेले छोटा नागपूरचे पठार आणि नैऋत्येच्या दिशेने पसरलेला मध्य प्रांत यात प्रवेश करण्यासाठी जणूकाही एक खडबडीत अशी पायरीच असे पालमाऊचे वर्णन योग्य ठरेल . हा प्रदेश जंगली असून डोंगरांच्या रांगा आणि उत्तुंग शिखरे आणि केवळ पावसाळी पाण्यावर वाहणाऱ्या पण ने -आण करण्याला निरुपयोगी आणि कालवे-शेती यांना नियमित पाण्याचा पुरवठा करतीलच अशी काहीच खात्री नसलेल्या नद्या यांनी भरलेला आहे. जिल्ह्याचा दक्षिण भाग हा अतिशय खडकाळ, नापीक आणि जंगलमय आहे. उत्तर भागात दऱ्याखोरी जराशी रुंद आहेत आणि अधिक सुपीक आहेत परंतु जिल्ह्यामध्ये कुठेही सरळ आकारमानाच्या एकाद्या टेकाडापासून सहा किंवा सात मैलांपर्यंत सभोवर सलग असा प्रदेश आढळेल याची खात्री नाही . जिल्ह्यात सपाट मैदाने नाहीत आणि जिल्ह्याच्या एकंदर भू -भागाचे वर्णन करावयाचे झाल्यास वेड्यावाकड्या आकाराच्या खडकाळ डोंगरांचा प्रदेश असेच करावे लागेल . हा सर्व प्रदेश घनदाट जंगलांनी आच्छादित झालेला असा आहे. एकाद्या डोंगराच्या शिखरावरून अथवा तुटलेल्या कड्यावरून पाहिल्यास सारा प्रदेश म्हणजे कमी उंचीच्या घनदाट जंगलांनी व्यापलेला झुलता पट्टाच जणू असा भासमान होतो . मानवी वस्तीची सारी चिन्हे या गर्द झाडीमुळे दृष्टीपासून लपविली जातात आणि जे काही दृष्टिपथात येते ते म्हणजे क्वचित्च अधूनमधून नजरेत पडणारे छोटेसे तांबडे कौलारू घर , लांबवर वाढलेल्या झाडांची दृश्यमान होणारी राई अथवा चुकूनमाकून दृष्टिपथात येणारा गुराढोरांचा कळप. लोकवस्ती अतिशय विरळ अशी आहे आणि ज्या छोट्याछोट्या आणि विखुरलेल्या खेड्यांमधून लोक वस्ती करून राहिलेले आहेत ती खेडी म्हणजे डोंगरांच्या रांगांमधील मोकळ्या असलेल्या खोलगट जागेतील वसतीस्थानेच होत . (**ओ'मॅलीज पॉलमाऊ डिस्ट्रिस्ट गॅझेटीअर** (१९०७), २, ३, ६-९).

अनुक्रमणिका

१७ व्या आणि १८ व्या शतकात या जिल्ह्यात प्रामुख्याने वस्ती करून राहणारी जमात म्हणजे द्रविड वंशाचे चेरो हे लोक होत . ही जमात राजभट जमातीपासून निर्माण झालेली असावी असे म्हणतात . इ. स. १६४३ मध्ये मोगलांनी या जमातीमधील कौटुंबिक कलहांचा फायदा घेऊन राजा प्रताप चेरो याला मोगल मनसबदाराच्या रांगेत नेऊन बसविले आणि त्याच्या वंशपरंपरागत राज्याची मोगल साम्राज्यातील एक जहागीर अशी त्यांनी वर्गवारी केली . या जहागिरीवर दरसाल एक लाख रुपयांचा बोजा खंडणीदाखल बसविण्यात आला . (मोगल आणि पॉलमाऊ यांच्या संबंधासाठी पाहा , **ए. एच्. पादशाहनामा**, भाग २ . २४८, २५०, ३५६–३६१). खंडणीची रक्कम ही अव्वाच्यासव्वा होती आणि ती नियमितपणे देणे हे राजाच्या शक्तीच्या आवाक्याबाहेरचे होते . साहजिकच देण्याची थकबाकी वाढली आणि त्यात दरवर्षी बिहारच्या सरहद्दीवरून चेरो लोकांचे गुराढोराकरता जे हल्ले होत त्याचे मोगलांना आणखी एक निमित्त मिळाले.

इ. स. १६६१ च्या एप्रिलमध्ये बादशहाचा हुकुमावरून बिहारचा सुभेदार दाऊदखान याने पालमाऊवर आक्रमण केले. पालमाऊ राज्याच्या उत्तर सरहद्दीचे संरक्षण करणारे कुभीकुंडा आणि देवगाव हे किल्ले त्याने लिलया जिंकून घेतले आणि जंगल तोडीत आणि राजधानीच्या दिशेने रस्ता तयार करीत त्याने आपली आगेकूच चालू ठेवली . ७ डिसेंबर रोजी त्याने पालमाऊच्या समोर दोन मैल अंतरावर असलेल्या शत्रूच्या खंदकावर हल्ला चढविला आणि तीन दिवसांच्या घनघोर युद्धानंतर त्याने चेरोच्या सैन्याला युद्धातून पळ काढावयास लावले . यानंतर अतिशय मेहनत करून राजधानीपर्यंतच्या उरलेल्या दोन मैलांच्या घनदाट जंगलातून रस्ता तयार करण्यात आला आणि १३ तारखेला राजधानीच्या समोरील राजाच्या खंदकावर मोगल सैनिक तुटून पडले . ६ तासांच्या अटीतटीच्या युद्धानंतर शत्रूने शहरात पळ काढला. विजयमदाने धुन्द झालेल्या मोगल फौजेने लगोलग शहरावर हल्ला चढविला . रात्रीच्या वेळी राजा आपल्या किल्ल्यांतून पळून गेला . दुसऱ्या दिवशी मोगलांनी किल्ला आपल्या ताब्यात घेतला . त्यानंतर पालमाऊचे राज्य बिहारच्या सुभ्यामध्ये खालसा करण्यात आले . [पालमाऊवरील मोहिमेची हकिकत पुढीलप्रमाणे आहे . या राज्याच्या उत्तर सरहद्दीवर असलेले कुठी कुंडा आणि देवगाव हे किल्ले या राज्याचे रक्षण करीत . २३ मार्च १६६१ रोजी दाऊदखान याने पाटणा सोडले. कुठी हा किल्ला शत्रूने खाली केला होता . त्याचा मोगलांनी २४ एप्रिल रोजी ताबा घेतला . नंतर त्यानी कुंडा या किल्ल्यावर हल्ला करण्याचे ठरविले. हाही किल्ला शत्रूने खाली केला होता . २३ मे रोजी दाऊदखानाने किल्ल्यात प्रवेश केला . दरम्यान पाऊस सुरू झाला . साहजिकच मोगलांनी या दोन किल्ल्यांमधील प्रदेशात छावणी दिली . पालमाऊच्या राजाने शरणागतीची बोलणी केली परंतु ती फेटाळून लावण्यात आली . १५ आक्टोबर १६६१ रोजी मोगल फौजांनी पालमाऊवर कूच करण्यास सुरुवात केली . सैन्याच्या आघाडीला मिरजाखान हा होता . उजव्या फळीवर तहब्बूरखान आणि डाव्या फळीवर शेखतातर आणि राजा बहरोज यांची नेमणूक करण्यात आली. सैन्याच्या मध्यभागी दाऊदखान हा होता. सैन्याची कूच अतिशय सावकाशपणे होत होती . नऊ दिवसांत फक्त वीस मैल अंतर काटण्यात आले . २३ आक्टोबर रोजी पालमाऊपासून बावीस मैलांवर लोहारसे येथे मोगलांनी छावणी दिली . त्यामुळे राजाला दहशत वाटून त्याने आपला मुख्यमंत्री सुरतसिंग याला बोलणी करण्यासाठी खानाकडे पाठविले. बादशहाला एक लाख रुपये खंडणी देण्याचे त्याने कबूल केले . दरम्यान मोगलांच्या एका रसद घेऊन येणाऱ्या तुकडीवर राजाच्या फौजेने हल्ला केला . या गोष्टीशी आपला काहीही संबंध नाही असे राजाने सांगून पाठविले , आणि खंडणीपैकी ५० ,००० रुपये देऊ केले . परंतु दाऊदखानाने बोलणी करण्यास स्पष्ट नकार दिला.

२१ नोव्हेंबर रोजी मोगलांनी कूच करण्यास सुरुवात केली आणि २९ तारखेला ते पालमाऊपासून दोन मैलांवर पोहोचले . यावर राजाने लढण्याची सख्त तयारी केली . दरम्यान बादशहाकडून पत्र आले . "राजा मुसलमान होत नसल्यास त्याचा नाश करावा " असा हुकूम त्यात दिला होता. ह्या बाबतचा निरोप राजाकडे जाण्याचे अगोदर तहब्बूरखानाने शत्रूवर हल्ला केला . संध्याकाळपर्यंत लढाई चालू राहिली . राजाच्या फौजेने रात्री दोन तोफा युद्धभूमीवर आणल्या आणि मोगलांना जेरीस आणले . दुसऱ्या दिवशी दाऊदखानाने आजूबाजूच्या मोक्याच्या जागा आपल्या ताब्यात घेऊन त्यावर तोफा चढविल्या आणि राजाच्या सैन्याला तोफांच्या भडिमाराने पळवून लावले . यानंतर १३ तारखेला दाऊदखानाने शत्रूवर चाल केली आणि तो तीन बाजूंनी शत्रूवर तुटून पडला. हे युद्ध सहा तासपर्यंत चालले. मोगलांचा जय झाला आणि शत्रूने शहरात पळ काढला.

दाऊदखानाचा बेत थोडा मुक्काम करण्याचा होता . परंतु त्याच्या विजयी सैन्याने शत्रूचा पाठलाग केला आणि शहरावर हल्ला चढविला . प्रतापरायाने आपली बायकामुले आणि जडजवाहीर जंगलात पाठविले आणि स्वतः वेढ्यासाठी तो सज्ज झाला . मोगलांनी शहरातील लोकांची कत्तल केली आणि किल्ल्यावर हल्ला चढविला . शिबंदीने नऊ वाजेपर्यंत तग धरला . परंतु नंतर राजाने पळ काढला . किल्ला मोगलांच्या ताब्यात आला. मोगलांचे ६१ सैनिक ठार आणि १७७ जखमी झाले. देवगावचा किल्लाही मोगलांच्या ताब्यात आला.

अनुक्रमणिका

पालमाऊ जिंकल्यानंतर दाऊदखान पाटण्याला परतला . १६६६ पर्यंत पालमाऊवर मुसलमान फौजदाराची नेमणूक होत गेली . त्यानंतर पालमाऊचा राज्यकारभार बिहारच्या सुभेदाराकडे सोपविण्यात आला.]

लहानसहान बंडांची हकीकत

काठियावाडच्या वायव्येकडील भागात हालारचे संस्थान होते . संस्थानाची राजधानी नवानगर येथे १६६२ मध्ये वारसाबाबत तंटे उद्‌भवले आणि त्यात मोगल सम्राटांनी हस्तक्षेप केला . सिंहासन बळजोरीने बळकाविणाऱ्या वारसाबरोबर जुनागढच्या फौजदाराची घनघोर लढाई झाली (१३ फेब्रुवारी १६६३). त्यात बादशाही सैनिकांपैकी एकंदर ६११ सैनिक ठार वा जखमी झाले पण त्यात सिंहासन बळकाविणारा फौजदाराकडून मारला गेला आणि फौजदाराने खऱ्या वारसाला सिंहासनावर बसविले . परंतु त्यानंतर बराच काळपर्यंत त्या प्रदेशात अशांततेचे साम्राज्य चालू होते . (पाहा **नवानगर रिव्होल्ट; ए. एन्.**, ७६८–७७५; **अखबारात** ९/२, ९/२६, १०/३)

इ. स. १६६४ मध्ये मोरंगच्या बंडखोर राजाला वठणीवर आणण्यासाठी दरभंगा आणि गोरखपूर येथून संयुक्त कारवाई करण्यासाठी फौज रवाना करण्यात आली. (मोरंगचे संस्थान हा डोंगराळ मुलखाचा प्रदेश कूचबिहारच्या पश्चिमेला आणि पुर्निआ जिल्ह्याच्या उत्तरेला आहे.) इ. स. १६७६ मध्ये मोरंगचे संस्थान पुन्हा काबीज केल्याची बातमी आपल्याला वाचावयाला मिळते.

इ. स. १६६५ मध्ये राजाबहादूर चांदच्या मुलखातील कुमाऊन टेकड्यांच्या प्रदेशात बादशाही सत्तेची जरब बसविण्यासाठी मोहीम काढण्यात आली . बराच काळ चाललेल्या संघर्षानंतर इ . स. १६७३ मध्ये राजाला क्षमा करण्यात आली . (**ए. एन्.** ८५०, ८७५; **एम्. ए.** १५०; **एम्. ए.** १२८; **ए. एन्.** ४४१, ५९५, ७६५ २, ८६१). [बादशाही कुटुंब आणि दरबारी मंडळी (ही हकीकत मूळ ग्रंथात नाही म्हणून येथे सारांशरूपाने दिली आहे.)

इतर सर्व मोगलबादशहाप्रमाणे औरंगजेब हा मुलांच्या बाबतीत दुःखी होता . त्याला असे वाटे की शहाजहानने भविष्य वर्तविल्याप्रमाणे त्याची मुलेही त्याला, शहाजहानला जशी वागणूक त्याने दिली तशी वागणूक देतील . हे होऊ नये म्हणून त्याने आयुष्यभर आपल्या मुलांवर कडक नजर ठेवली, आणि त्यांच्याकडून अधिकाराचे अतिक्रमण होत आहे असा थोडा जरी संशय आला तरी त्यांची कानउघाडणी केली.

औरंगजेबाचा मोठा मुलगा महमद सुलतान हा वारसा युद्धात शुजाला मिळाल्यामुळे त्याला औरंगजेबाने ग्वाल्हेर येथे कैदेत ठेवले . बारा वर्षांनंतर त्याच्यावर दैवाने खैर केली. (**एम. ए.**, १२१, १२५, १३९, १४८, १५५–१५६, १५९–१६०; **के. के**, भाग २. २३६, २४७; **ईश्वरदास**, ७२६) डिसेंबर १६७२ मध्ये त्याला दिल्लीच्या सलीमगड किल्ल्यामध्ये आणण्यात आले . त्याला बादशहाकडे भेटीस नेण्यात आले . बादशहाचा उद्देश त्याचा उपयोग राजपुत्र महमद मुआज़्झम याचे दरबारातील वाढते वर्चस्व कमी करण्यासाठी करण्याचा होता . महमद सुलतानावर बादशहाची खूप मर्जी बसली. बादशहाने त्याची तीन लग्ने लावली , आणि त्याची मनसब आणि तनखा यांच्यामध्ये वाढ केली . परंतु क्रूर दैवाला हे पाहावले नाही . वारस म्हणून नियुक्ती होण्याचे आतच त्याला ३७ व्या वर्षी मृत्यू आला. (३ डिसेंबर १६७६).

महमद सुलतान याच्या मानहानीनंतर त्याची जागा महमद मुआज़्झम याने घेतली . १६६३ च्या मे महिन्यात तो २० वर्षांचा असताना त्याला दक्षिणेचा सुभेदार म्हणून पाठविण्यात आले. तेथे तो दहा वर्षे होता. या कालावधित एकदा त्याला पंजाबमध्ये मोहिमेवर पाठविण्यात आले (१६६६). १६७० मध्ये त्याच्यावर बादशहाची गैरमर्जी झाली . तो स्वतंत्रपणे वागू लागला . त्याची समजूत घालण्यासाठी त्याची आई आणि एक सरदार यांना पाठविण्यात आले. पण असे कळले की राजपुत्राबद्दलचे आलेले सर्व अहवाल खोटे आहेत. त्याने बादशहाला अतिशय नम्रतापूर्वक असे पत्र लिहिले. परिणामी त्याच्यावर बादशहाची मर्जी पुन्हा बसली . ·(**एम्. ए.**, १०१; **दिलकुशा**, ७३; **स्टोरिया**, भाग २. १६२, १६५; **एम्. यू.**, भाग १. १८२) परंतु शिवाजीचे बंड मोडण्यात त्याला अपयश आल्यामुळे जानेवारी १६७३ मध्ये त्याला दक्षिणेतून बदलण्यात आले . १५ आक्टोबर १६७६ रोजी त्याला शहाअलम हा किताब देण्यात आला . सप्टेंबर १६७८ ते मार्च १६८० या काळांत त्याला पुन्हा दक्षिणेचा सुभेदार नेमण्यात आले . परंतु शिवाजी आणि विजापूर यांच्याविरुद्ध त्याला अपयश आले . पुढे अकबराचा पाठलाग करण्यातही तो अयशस्वी झाला . बादशहाबरोबर दक्षिणेत असताना त्याला कोकणच्या मोहिमेवर पाठविण्यात आले (सप्टेंबर १६८३ ते मे १६८४). ही मोहीम देखील अयशस्वी ठरली . गोवळकोंड्याच्या वेढ्यात त्याने सुलतानाबरोबर पत्रव्यवहार केल्याचे आणि बरीच लूट आपल्याकडे घेतल्याचे उघडकीस आले . २० फेब्रुवारी १६८७ मध्ये त्याला पकडण्यात आले (**एम्. ए.**, २९३-२९४, ३४१-३४४, ३७०-३७३; **के. के.**, भाग २ . ३३०-३३४, ३९७-३९८, ३४७, ४४३-४४४; **ईश्वरदास**, १०० ब , ११३ ब ; **अनेक्डोटस**, ९, ११; **स्टोरिया**, भाग २. ३९४, ३९६, भाग ४. २४५). त्याला आणि त्याच्या कुटुंबियांना विशेषतः त्याच्या आवडत्या पत्नीला अतिशय अपमानाने वागविण्यात आले. हळूहळू त्याच्यावरील बंधने कमी करण्यात आली आणि ९ मे १६९५ रोजी त्याला मोकळे करण्यात आले . पुढे त्याला

अफगणिस्थानचा सुभेदार म्हणून पाठविण्यात आले . हा राजपुत्र शूर किंवा निधड्या छातीचा कधीच नव्हता . या घटनेनंतर तो साफ खचून गेला . बादशहाला फसविण्यात आणि जनान्याच्या सुखोपभोगात दंग होण्यात तो धन्यता मानू लागला . त्याला नातवंडे झाली तरीदेखील बादशहा त्याची भित्रेपणाबद्दल हेटाळणी करी.

शहा आलमवर गैरमर्जी झाली तिचा फायदा महमद आजम याने घेतला . ह्या राजपुत्राला आपल्या अस्सल रक्ताबद्दल अभिमान होता . स्वभावाने तो तापट असून त्याचा बोलण्यावर बिलकूल ताबा राहात असे . औरंगजेबाने त्याच्यावर जी मर्जी दाखविली त्यामुळे तो अधिकच दुराग्रही बनला. (**स्टोरिया**, भाग २. ३९४; **एम्. ए.**, १०६, २३०., २६४, २११)

१६७० मध्ये अलाहाबादचा सुभेदार मीरखान याने आजमबरोबर संगनमत करून त्याला स्वातंत्र्य मिळवून देण्याचा घाट घातला . औरंगजेबाने ताबडतोब मीरखानाची मनसब रद्द केली आणि त्याची मालमत्ता जप्त केली (**ईश्वरदास**, ६१६) औरंगजेबाच्या अधिकृत इतिहासात या घटनेचा उल्लेख नाही . मनूची आपल्या हकिकतीत म्हणतो की आजमला कैद करून एक वर्षभर राजवाड्यात ठेवण्यात आले . ही गोष्ट अर्थात विश्वासार्ह नाही . कारण आजम हा बादशहाचा असा एकच मुलगा होता की ज्याला तुरुंगवास भोगावा लागला नाही . बादशहाची त्याच्यावर आयुष्यभर मर्जी होती . १६८३ मध्ये तो , बादशहा दक्षिणेच्या मोहिमेत असताना त्याला भेटण्यास आला . १६९३ मध्ये तो आजारी होता , तेव्हा खुद्द बादशहाने त्याची शुश्रूषा केली. त्यामुळे बादशहाला तो अधिकच प्रिय झाला. ३१ जुलै १६८१ रोजी त्याला **शहा-ई-अलीजा** ही पदवी देण्यात आली. दरबारात त्याची जागा बादशहाच्या उजव्या हाताला असे.

शहा आलमची सुटका झाल्यानंतर ५ मे १६९५ रोजी बादशहा आपल्या मुलाबाळांसह विजापूरच्या भव्य मशिदीत प्रार्थनेसाठी गेला . बादशहाच्या उजव्या बाजूला मोठ्या राजपुत्राने बसावयाचे अशी प्रथा असे . हा मान यावेळी शहा आलमला दिला गेल्यामुळे दोघा भावांत कलह होण्याची पाळी आली . औरंगजेबाने मोठ्या खुबीने दोघांमधील भांडणाचे परिणाम मारामारीत होण्याचे टाळले . (**एम्. ए.**, ३७२; **के. के.**, भाग २. ४४३). खाफीखान असे सांगतो की शहा आलमला मुक्त करण्याचा बादशहाचा निर्णय आजमला पसंत पडला नाही . तो बादशहावर हल्ला करणार अशीही वदंता पसरली . तेव्हा बादशहाने आपल्या सर्व मुलांना एकत्र बोलाविले आणि अप्रत्यक्षरित्या 'शहा आलमच्या जे नशिबी आले त्यातून तू सुटलास' याची आजमला जाणीव दिली . आजमने यातून योग्य तो धडा घेतला . (**के. के.**, भाग २. ४०७-४१०) **ईश्वरदास** असे सांगतो की १६८३ मध्ये बादशहाने आपला संशय घेतल्यामुळे आजमने तक्रार केली आणि बादशहाने त्याचे सांत्वन केले . (**ईश्वरदास, फतोहाते आलमगिरी**, ८७ अ आणि ब).

बादशहाविरुद्ध उघडपणे बंड करणारा त्याचा मुलगा म्हणजे महमद अकबर . याची आई दिलरसबानू ही त्याच्या लहानपणीच गेल्यामुळे तो बादशहाचा व इतर सर्वांचाच लाडका होता . वयाच्या पंधराव्या वर्षी त्याचे दाराच्या नातीबरोबर लग्न झाले . १६७९ मध्ये तो बादशहाबरोबर रजपुतान्याच्या मोहिमेवर गेला होता . पुढील वर्षभर त्याच्या हाताखाली सैन्याची मोठी तुकडी होती . त्याने आपल्या अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार बापाविरुद्ध बंड केले , स्वतःला राज्याभिषेक केला व जानेवारी १६८१ मध्ये बादशहाबरोबर लढाई देण्यासाठी तो निघाला . त्याला या प्रयत्नात अपयश आले आणि प्रथम संभाजीकडे आणि नंतर इराणच्या शहाकडे पळून जाणे त्याला भाग पडले . इराणमध्ये आपला बाप कधी मरतो याची वाट पाहात तो बसला . हे औरंगजेबाला कळल्यावर तो म्हणाला प्रथम तो मरतो की मी मरतो ते आपण पाहूच . तो जिवंत असेतोपर्यंत त्याच्यापासून औरंगजेबाला सतत धोका होता. तो मेल्यावर बादशहा म्हणाला हिंदुस्थानच्या शांततेचा एक मोठा शत्रू नाहीसा झाला. (**एम्. ए.**, ४८४)

औरंगजेबाचा सर्वांत धाकटा मुलगा महमद कामबक्ष . याचा जन्म २४ फेब्रुवारी १६६७ मध्ये झाला . हिंदुस्थानच्या इतिहासाच्या दृष्टीने त्याचे फारसे महत्त्व नाही. बादशहाने त्याला देखील गैरवागणुकीबद्दल कैदेत ठेवले होते (डिसेंबर १६९८ ते जून १६९९).

बादशहाच्या सर्वांत मोठ्या मुलीचे नाव जेब उन्नीसा . ती कवियित्री असून तिने अरब धर्माचा उत्तम अभ्यास केला होता . तिने मखफी या टोपण नावाखाली गजलांचे एक मोठे पुस्तक लिहिले होते . बादशहाच्या दरबारात अकीलखान नावाचा एक सरदार होता . त्याच्याबरोबर तिचे प्रेमसंबंध होते असे काही उर्दू लेखकांनी लिहिले आहे . (हे विधान सरकारांनी **मॉडर्न रिव्ह्यू**, जानेवारी १९१६, पान ३३ – ३६ यामध्ये खोडून काढले आहे.) हिला आपला धाकटा भाऊ अकबर याच्याबद्दल फार माया होती . अकबराची एक छावणी लुटल्यानंतर तिची काही पत्रे बादशहाच्या हाती पडली. बादशहाने तिचा तनखा बंद केला आणि हयातभर तिला कैदेत ठेवले . (१६८१ ते १७०२) तिच्या मृत्यूच्या वार्तेने वृद्ध झालेल्या बादशहाला दुःख झाले.

बादशहाची आणखी एक मुलगी म्हणजे जिनत उन्नीसा . तिला एकटे राहणे आवडे . तिने आपल्या लग्नाचा हुंडा बादशहापासून मागून घेतला आणि तो दिल्ली येथे एक मशिद बांधण्यात खर्च केला . या मशिदीचे नाव कुमारी मशिद . तिने आपली सारी हयात बादशहाच्या कारकिर्दीच्या उत्तरार्धात त्याचा जनानखाना सांभाळण्यात घालविली . आपल्या मुलींचे लग्न न करण्याची प्रथा औरंगजेबाने मोडली (**स्टोरिया**, भाग २. ५८). त्याच्या आणखी दोन मुली मिहिर उन्नीसा आणि जुबदत . त्यांची त्याने लग्ने लावून दिली . त्याची आणखी एक मुलगी बद्र उन्नीसा ही वयाच्या २२ व्या वर्षी लग्न न होताच मृत झाली.

बादशहाची मोठी बहीण जहानआरा हिचा दाराकडे ओढा होता . तिने औरंगजेब आणि मुराद यांची बापाविरुद्ध बंड केल्याबद्दल खूप निर्भत्सना केली. तिने आपले आयुष्य शहाजहानबरोबर कष्टात घालविले . तिने औरंगजेबाला क्षमा करण्याविषयी तीन वेळा शहाजहानची विनवणी केली. तिसऱ्या खेपेला तिला यश आले . शहाजहानच्या मृत्यूनंतर औरंगजेबाने अनेक वेळा तिची भेट घेतली आणि तिचा मोठा सन्मान केला . (अधिक माहितीसाठी पाहा : **के. के.**, भाग २. १८८; **स्टोरिया**, भाग २. १२७, २५६; भाग ४. ५९; **ए. एन्.**, ९३८, ९५९; **अखबारात**, ९/४, १२/४, १२/२; **एम्. ए.**, २१३). तिच्या दर्शनाला प्रत्येक अमीराने आगऱ्याला जावे असा त्याने हुकूम काढला. राज्याभिषेकाच्या दुसऱ्या वर्षी त्याने तिला एक

लक्ष सोन्याच्या मोहरा बक्षीस दिल्या आणि तिचा वार्षिक तनखा सतरा लाख केला . १६६६ मध्ये ती दिल्ली येथे राहण्यास आली . दारा आणि मुराद यांच्या मुलींना तिने वाढविले. औरंगजेबाने त्यांची लग्ने मोठ्या थाटाने करून दिली. १६६९ मध्ये त्याने आपला उच्च प्रतीचा सरदार दानिशमंदखान याला तिच्या राजवाड्यात पाठविले आणि त्याला जहानआरा हिला असे सांगण्यास सांगितले की , 'आपण सांगाल ती चाकरी करण्यासाठी मी आलेला आहे.' अशा तऱ्हेने तिने जवळ जवळ २७ वर्षे आपल्या बापाचे घर सांभाळले . तिला बेगमसाहिब आणि पादीशाहबेगम या पदव्या देण्यात आल्या. तिचा मृत्यू ६ सप्टेंबर १६८१ रोजी झाला . औरंगजेबाने तीन दिवसपर्यंत सुतक पाळले आणि सर्व अधिकृत कागदपत्रात तिचा उल्लेख **साहिबात-उज-जमानी** असा करण्याचा हुकूम दिला.

जहानआराची धाकटी बहीण रोशनआरा बेगम ही होय . (हिच्याबद्दल अधिक माहितीसाठी पाहा : **स्टोरिया**, भाग २. ५४–६०, ३५, १८९–१९० : **बर्नियर**, १२३–१२५, १३२; **ए. एन्.**, ३६८). हिने वारसा–युद्धात औरंगजेबाचा सतत पाठपुरावा केला . त्याच्या राज्याभिषेकाच्या वेळी त्याने तिला ५ लक्ष रुपये दिले. शहाजहानच्या मृत्यूपर्यंत बादशहाच्या जनान्यावर तिची सत्ता चालली. पुढे तो अधिकार जहानआरा बेगमकडे गेला. ११ सप्टेंबर १६७१ मध्ये ती मरण पावली. औरंगजेब आजारी असताना तिने बादशाही शिक्क्याचा दुरूपयोग करून औरंगजेबाचा मुलगा आजम याला गादीवर आणण्याचा कट रचला . त्यामुळे दिल्लीत एकच घबराट उडाली . औरंगजेबाला तिने कोणासही भेटू दिले नाही . औरंगजेब बरा झाल्यावर त्याला जेव्हा हे कळले तेव्हा त्याची तिच्यावर खप्पा मर्जी झाली . (**स्टोरिया**, भाग २. ५४–५५, ५९–६०). या घटनेबद्दल मनूचीने एक दंतकथा दिलेली आहे. त्यात तो असे सांगतो की, बादशहाने या तिच्या वर्तनाबद्दल तिला विषप्रयोग करून ठार मारले (**स्टोरिया**, भाग २. १८९). त्याला अर्थात दुसरा कोणताच पुरावा नाही . याउलट मासिरी आलमगिरीचा कर्ता तिच्या स्वभावाची खूप स्तुती करून म्हणतो की , तिचे आपल्या भावावर अतिशय प्रेम होते. तिच्या मृत्यूनंतर औरंगजेबाने खूप दानधर्म केला आणि तिच्या नोकरवर्गाला चांगली वागणूक दिली . (**एम्. ए**, ११०). औरंगजेबाला इतर बहिणी होत्या परंतु इतिहासाच्या दृष्टीने त्यांना महत्त्व नाही. त्यांनी आपली हयात राजवाड्यामध्ये सुखाने घालविली.

औरंगजेबाने आपले कुटुंब आणि आपल्या भावांची कुटुंबे यांच्यामध्ये विवाहसंबंध घडवून आणले . त्याचा मोठा मुलगा महमद सुलतान याचे लग्न १६५९ मध्ये शुजाची मुलगी गुलरखबानू हिच्याबरोबर आणि १६७२ मध्ये मुरादची मुलगी दोस्तदारबानू हिच्याबरोबर झाले . त्याचप्रमाणे आजमचे लग्न दाराची मुलगी जहानजेबबानू हिच्याबरोबर १६६९ मध्ये आणि महमद अकबरचे लग्न सुलेमान शुकोची मुलगी सलिमाबानू हिच्याबरोबर १६७२ मध्ये झाले. औरंगजेबाच्या दोन मुली मिहिर उन्नीसा आणि जुबदत उन्नीसा यांची लग्ने १६७२ आणि १६७३ मध्ये अनुक्रमे मुराद आणि दारा यांच्या मुलांबरोबर झाली . पुढे १६९५ मध्ये शहा आलमच्या दोन मुलांबरोबर अकबराच्या दोन मुलींची लग्ने लावण्यात आली . अशा तऱ्हेने तिसऱ्या पिढीमध्ये औरंगजेबाचे त्याच्या मृत भावांबरोबर रक्ताचे नाते जडले.

औरंगजेबाच्या दरबारातील अधिकारीवर्ग पुढीलप्रमाणे होता : पहिल्या प्रतीच्या अधिकाऱ्यांमध्ये **दिवाण**, **बक्षी** आणि **खान-इ-सामान** हे अधिकारी होते . धर्मविषयक बाबींमध्ये प्रमुख अधिकारी म्हणजे **काजी-उल-कजात**, **मुहतसीब** आणि **सद्रउससदूर** हे अधिकारी होते . तोफखान्यावरील अधिकाऱ्याला **मीरआतीश** असे म्हणत. कोणताही सरकारी अधिकारी मग तो मुलकी, लष्करी अथवा धर्मविषयक बाबींचा असो, त्याची सैन्यात नियुक्ती केली जाई आणि त्याला मनसब दिली जात असे . सर्व अधिकाऱ्यांचे पगार बक्षीच्या तर्फे होत. असे एकंदर चार बक्षी असत. त्या काळात **खान-इ-सामान** हा पहिल्या दर्जाचा अधिकारी असून तो बादशहाच्या घरगुती बाबी आणि भांडार यावर हुकमत चालवी.

वजीर अथवा प्रधानमंत्री ही पदवी होती . अमुकच खात्याचा त्याच्याकडे अधिकार होता असे नव्हते . परंतु सर्वसाधारणपणे त्याच्याकडे महसूल खाते असे आणि तो या खात्यावर **दिवाण** म्हणून अधिकार चालवी . अर्थात सर्वच **दिवाण** हे **वजीर** असतच असे नाही . पुष्कळ वेळा प्रधानमंत्र्याचे पद रिकामे राही. अशा वेळी दिवाणाचे खाते दोन सभासदांच्या मंडळाकडे अथवा साहाय्यक दिवाणाकडे (**पेशदस्त**) सोपविण्यात येई. याला **नायब दिवाण** असे म्हणत. मुख्य दिवाणाला दोन दुय्यम अधिकारी दिलेले असत . एकाला तनख्याचा दिवाण आणि दुसऱ्याला खालसाचा दिवाण असे म्हणत. पहिल्याकडे जहागिरी देण्यासंबंधीचे अधिकार असत तर दुसऱ्याकडे शाही जमिनीचा ताबा असे . शहाजहानच्या कारकिर्दीच्या अखेरीला मीर जुम्ला याला मुख्य **वजीर** म्हणून नेमण्यात आले (७ जुलै १६५६). ५ महिन्यांत त्याला औरंगजेबाच्या मदतीसाठी दक्षिणेत पाठविण्यात आले व त्याचे अधिकार त्याचा मुलगा महमद अमिनखान याच्याकडे दुय्यम म्हणून सोपविण्यात आले . यानंतर शहाजहान आजारी पडला तेव्हा दाराने राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली . त्याने मीर जुम्ला याला अधिकारावरून दूर केले. त्याच्या जागी जफरखान याची नेमणूक करण्यात आली. परंतु प्रत्यक्षात महसूल खाते हे रायरायान रघुनाथ खत्री या साहाय्यक दिवाणाच्या ताब्यात राहिले . औरंगजेब सिंहासनावर आल्यानंतर त्याने ही तात्पुरती व्यवस्था पुढे चालविली आणि रघुनाथला **राजा** ही पदवी दिली. परंतु त्याला प्रधानमंत्रीपद मात्र दिले नाही . ती जागा औरंगजेबाने मीर जुम्ला याच्याकरिता राखून ठेवली . परंतु पुढील चार-पाच वर्षे मीर जुम्ला हा बंगालमध्ये होता . तेथेच मार्च १६६२ मध्ये तो मरण पावला. दोन महिन्यानंतर राजा रघुनाथ यालाही मृत्यू आला. (**रघुनाथ खत्री, एम्. यू.**, भाग २. २८२; **ए. एन्**, ११६. ३९६, ८२९; **रूक्कात–इ–आलमगिरी** क्रमांक. ५६, १४९, १५४).

राजा रघुनाथ हा राज्यकारभाराला अतिशय लायक व इमानदार असा होता. याला **वजीर** सादुल्लाखान याने पुढे आणले. तो **पेशदस्त** या अधिकारावर चढला, आणि बऱ्याच काळपर्यंत त्याने मुख्य दिवाणाची कामगिरी पार पाडली . रघुनाथचा प्रामाणिकपणा आणि शेतकऱ्यांचे चांगले व्हावे याकरिता कष्ट घेण्याची त्याची वृत्ती याबद्दलच्या अनेक आख्यायिकांची नोंद आपल्याला इतिहासात आढळते.

राजा रघुनाथच्या मृत्यूनंतर अलाउलमुल्क तुणी ऊर्फ फाजीलखान याची मुख्य **वजीर** आणि **दिवाण** म्हणून नेमणूक करण्यात आली. याचे अनेक भाषांवर उत्कृष्ट प्रभुत्व होते आणि त्याच्या चारित्र्यात नाव ठेवावयाला जागा नव्हती . परंतु हा अतिशय वृद्ध होता. त्याची वजिरी जेमतेम १६ दिवस टिकली. (७ जून ते २३ जून १६६३)

त्यानंतर जफरखान याची **वजीर** म्हणून नेमणूक करण्यात आली . (ऑगस्ट १६६३ ते ६ मे १६७०) त्याचा विवाह मुमताज महलच्या

अनुक्रमणिका

बहिणीबरोबर झाला होता . साहजिकच राजदरबारी त्याला मोठा मान असे . उमद्या आणि दयाळू स्वभावाबद्दल जशी जफरखानाची प्रसिद्धी होती त्याचप्रमाणे तो स्वतःला मोठा उच्चभ्रू समजत असे . दरबारचे जे कागदपत्र उपलब्ध आहेत त्यावरून तो मोठा बुद्धिमान असावा असे दिसत नाही . तो प्रत्येकाला **महाराज** म्हणून संबोधत असे . तो दारूचे सेवनही करी . त्यामुळे औरंगजेबाने साम्राज्याच्या पहिल्या वजिराने दारू पिणे हे अयोग्य आहे असे त्याला सांगितले. त्यावर त्याने उत्तर दिले की, माझे वय झाले आहे, माझ्या हातात ताकद नाही की पायात कणखरपणा नाही . मला डोळ्याला कमी दिसते व मी अतिशय गरीब आहे . परिणामी दारू पिण्यामुळे मी बघू शकतो , बादशहाची चाकरी करण्याकरिता लेखणी धरण्याची ताकद मला येते, बादशहा बोलावतील तेव्हा दरबाराकडे माझे पाय धावू शकतात , इतकेच नव्हे तर माझ्या प्रतिभेला बहर येतो . (**स्टोरिया,** भाग २. १५६–१५७).

अशा माणसाची **वजीर** म्हणून नेमणूक करण्याचा उद्देश शहाजहानच्या काळातील जुन्या अमीरांची बूज राखण्याचा होता . शहाजहानच्या कारकिर्दीत थोरपणाला चढलेल्या नव्या वजिराची जुनी सरदारमंडळी अवहेलना करतील हे संभवनीय नव्हते . परंतु बादशहाच्या राजकीय धोरणावर जफरखानाचा कसलाही प्रभाव पडला नाही . राजघराण्याशी संबंध असलेली एक व्यक्ती ही भूमिका मात्र त्याने पार पाडली . औरंगजेब अनेक वेळा त्याला भेट देत असे. इतकेच नव्हे तर त्यालाही तो पुष्कळदा आपल्याकडे बोलावी. जफरखान ६ मे १६७० रोजी मरण पावला.

याच्या मृत्यूनंतर जवळ जवळ ६ वर्षे वजिराच्या अधिकारावर कोणीही नव्हते . परंतु दरबारात अशी एक व्यक्ती होती की जिच्या कर्तबगारीबद्दल त्याला खात्री होती आणि जिचा सहवास त्याला आवडत असे . ही व्यक्ती म्हणजे महमद इब्राहीम असदखान . परंतु हा अतिशय तरुण असल्यामुळे त्याची **दिवाण** म्हणून नेमणूक केल्यास जुने उमराव नाराज होतील अशी भीती त्याला वाटली . असदखान हा जफरखानाच्या बहिणीचा मुलगा असून औरंगजेबाच्या आईची एक बहीण त्याला दिली होती . त्याचे उमदे व्यक्तिमत्त्व आणि तारुण्य यांची शहाजहानवर छाप पडली होती. परंतु त्याचे अधिकार फार मोठे नव्हते जफरखानाच्या मृत्यूच्या वेळी त्याची मनसब दोन हजारांची असून त्याचा दर्जा दुसऱ्या बक्षीचा होता. अशा परिस्थितीत औरंगजेबाने ६ वर्षे वजिराचे पद रिकामे ठेवले . जफरखानाच्या मृत्यूनंतर त्याने असदखानाची **नायब दिवाण** म्हणून नेमणूक केली. त्यावेळी असदखानाचे वय ४८ वर्षांचे होते . सप्टेंबर १६७१ मध्ये बादशहाने मिर जुम्लाचा मुलगा महमद अमीनखान याला **वजीर** म्हणून नेमण्याच्या उद्देशाने बोलाविले . परंतु त्याचा रागीट स्वभाव आणि स्पष्ट वक्तेपणा यामुळे तो या पदाला नालायक आहे अशी औरंगजेबाची धारणा झाली आणि त्याने त्याला त्याच्या सुभेदारीवर परत पाठविले . १० मार्च १६७३ रोजी असदखानाने आपल्या अधिकाराचा राजीनामा दिला . ८ ऑक्टोबर १६७३ रोजी त्याची मुख्य **वजीर** म्हणून नेमणूक झाली. दरम्यानच्या काळात तनख्याचा **दिवाण** आणि खालसाचा **दिवाण** हे दोघे मिळून कारभार पाहात असत . यावेळी असदखानाचे वय ५० पेक्षा जास्त होते . तरी देखील त्याची नेमणूक जुन्या उमरावांना पसंत पडली नाही . महाबतखानाने बादशहाला चिडून लिहिले की , 'बादशहाने एका छोट्या पोराची मुख्य **वजीर** म्हणून नेमणूक केलेली आहे . अशा तऱ्हेच्या नालायक माणसाच्या नेमणुकीचे झालेले परिणाम आपल्या कानावर आले असतीलच ' (**आय. ओ. एल्. एम्एस्**. २६७८, पान १२३). परंतु असदखानाची **वजीर** म्हणून गाजलेली कारकीर्द औरंगजेबाची निवड चुकली नव्हती हे दर्शविते . एकतीस वर्षे त्याने **वजीर** म्हणून काम केले . औरंगजेबाच्या मृत्यूनंतर तो निवृत्त झाला . जून १७१६ मध्ये तो मरण पावला . त्यावेळी त्याचे वय ९४ वर्षांचे होते . तो एक उमदा अमीर होता . त्याची राहणी भपक्याची होती. नर्तिका आणि तरुण स्त्रिया यांच्या सहवासाचा तो मोठा चाहता होता , आणि त्यांच्यावर त्याच्याकडून केला जाणारा खर्च त्याच्या उत्पन्नापेक्षाही अधिक असे.

औरंगजेबाच्या कारकिर्दीत पुढील व्यक्तींनी मुख्य **बक्षी** म्हणून काम केले.

महमद अमीनखान, जानेवारी १६५९ – डिसेंबर १६६७
दानिशमंदखान, डिसेंबर १६६७ – जुलै १६७०
लष्करखान, जुलै १६७० – १ जानेवारी १६७१
असदखान, फेब्रुवारी १६७१ – ? ऑक्टोबर १६७६
सरबुलंदखान, ? ऑक्टोबर १६७६ – डिसेंबर १६७९
(रुहुल्लाखान पहिला बक्षी म्हणून हंगामी नेमणूक)
हिम्मतखान, ऑक्टोबर १६८० – जानेवारी १६८१
अश्राफखान, जानेवारी १६८१ – सप्टेंबर १६८६
रुहुल्लाखान पहिला, सप्टेंबर १६८६ – जुलै १६९२
बहरामंदखान, जुलै १६९२ – नोव्हेंबर १७०२
नुसरतजंगखान बहादूर, नोव्हेंबर १७०२ – १७०७?

यांच्यापैकी सर्वजण पर्शियन जातीचे होते . कर्तृत्व, शिष्टाचार आणि राज्यकारभार चालविण्याची कुवत यांविषयी औरंगजेबाचे हे **बक्षी** प्रसिद्ध होते. (यांच्याबद्दल अधिक माहितीसाठी पाहा **एम. यू.,** भाग १ ३१० (**असद**), २७२ (**अश्राफ**), ४५४ (**बहरामंद**) भाग २. ९३ (**नुसरतजंग**), ३०९ (**रुहुल्ला**), ४७७ (**सरबुलंद**), ३० (**दानिशमंद**) भाग ३. १६८ (**लष्कर**), ६१३ (**महमद अमीन**), ९४६ (**हिम्मत**).

खान-इ-सामान यांना **मीर-इ-सामान** असेही म्हणत . त्यांच्याकडे बादशहाच्या घरगुती खर्चाच्या बाबीसंबंधी आणि भांडारगृह व कारखाने यांबाबत सर्व अधिकार असत . बादशहा कूच करत असताना तो त्याच्याबरोबर जाई व घरगुती नोकर आणि चाकर व भांडार यांवर ताबा चालवी. औरंगजेबाच्या कारकिर्दीत पुढील व्यक्तींनी **खान-इ-सामान** म्हणून काम केले.

फाजिलखान पहिला, अलाउल्मुल्क तुणी, डिसेंबर १६६२ – जून १६६३

अनुक्रमणिका

इफ्तिकारखान सुलतान हुसेनयेजदी, जून १६६३ – मार्च १६७०
अश्राफखान, मार्च १६७० – नोव्हेंबर १६७०
रुहुल्लाखान पहिला, नोव्हेंबर १६७६ – ? १६७८
महमद अलिखान, (दाऊदखानाचा मुलगा),? १६७८ – मे १६८७
कामगारखान, १६८७ – १६८८
फाजिलखान तिसरा (इतिमादखान), १६८८ – १६९७
खानाजादखान (रुहुल्लाखान दुसरा), १६९७ – मे १७०४

खुदाबंदाखान, मे १७०४ – १७०७ (पाहा **एम्. यू.**, भाग १. २५२. (**इफ्तिकार**), भाग ३. ६२५ (**महमद अली**), ३४ (**फाजिलखान**), भाग ३. १५९ (**कामगार**), भाग २. ३१५ (**रुहुल्लाखान दुसरा**), भाग १. ८१४ (**खुदाबंदा**).

प्रत्येक प्रांतात एक **सद्र** नावाचा अधिकारी असे. त्याच्याकडे न्यायदानाचे व विद्वान आणि धार्मिक मंडळींना धर्मादाय रक्कम देण्याचे काम असे. त्या सर्वांवरचा अधिकारी **सद्र-उस-सदूर** हा असे.

औरंगजेबाच्या कारकिर्दीत पुढील व्यक्ती या अधिकारावर होत्या.

सय्यद हिदायतुल्ला कादिरी, जून १६५८ – मार्च १६६०
हिरातचा शेख मिरक, मार्च १६६० – नोव्हेंबर १६६१
कलिचखान (अबीदखान), नोव्हेंबर १६६१ – मे १६६७
रजवीखान, मे १६६७ – ? जून १६८१
कलिचखान, जून – आक्टोबर १६८१
शरीफखान, आक्टोबर १६८१ – आक्टोबर १६८२
फाजीलखान दुसरा (शेखमखदूम), आक्टोबर १६८२–डिसेंबर १६८८

१६८९ ते १६९८ या दरम्यानच्या काळात या अधिकारावर असलेल्या व्यक्तींची नावे आपल्याला मिळत नाहीत . **ईश्वरदास** (१४४ ब) सियादतखान याचा वजीर म्हणून उल्लेख करतो . परंतु **मासिर-उल-उमरा** (भाग २. ४९४) मध्ये त्याच्याविषयी आलेल्या माहितीत या गोष्टीचा उल्लेख नाही.

?———?, १६८९ – १६९८

काजी अब्दुल्ला ·(काही महिन्यांसाठी) १६९८ (हा याच वेळी मुख्य **काजी** देखील होता.)

महमद अमीनखान दुसरा (चिन बहादूर इतिमादउद्दीला) मे १६९८ –१७०७? (अधिक माहितीसाठी पाहा **एम्. यू.**, भाग ३ , १२० (**कलिचखान**), भाग २. ३२ (**फाजीलखान दुसरा**), भाग. ३, ३०७ (**रजवीखान**), भाग १. ३४६ (**महमदअमीनखान, दुसरा**).

औरंगजेबाच्या मुख्य काजींची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

अब्दुल वहाब १६५९ – १६७५
शेख-उल-इस्लाम, १६७६ – १६८३
सय्यद अबुसैद, १६८३ – १६८५
ख्वाजा अब्दुल्ला, १६८५ – १६९८
महमद अक्राम, १६९८ – १७०६
मुल्लाहैदर, जून १७०६ – १७०७

औरंगजेबाच्या हयातीत **मुहतसीब** या जागेवर पुढील व्यक्तींनी काम केले.
मुल्लाऔज वजी, जून १६५९ – ऑक्टोबर १६६३

ख्वाजा कादिर, ऑक्टोबर १६६३–ऑक्टोबर १६६५
महमद जहीद (काजी अर्सलान याचा मुलगा), ऑक्टोबर १६६५–? १६६८ किंवा १६६९
महमद हुसेन जौनपुरी,? १६६८–मार्च १६७०
सय्यद अमजादखान, मार्च १६७०–१७०७?

वर उल्लेखिलेल्या काही व्यक्तींची चरित्रात्मक माहिती पुढे दिली आहे.

मुख्य काजी अब्दुल वहाब याचा जन्म अनहीलवाड पट्टण येथे झाला . शेख महमद ताहीर या सुप्रसिद्ध विद्वानाचा हा नातू . धर्मवेत्ता

म्हणून याची ख्याती होती . शहाजहानच्या कारकिर्दीत याने पट्टणचा **काजी** म्हणून काम केले . औरंगजेब दुसऱ्या वेळी दक्षिणचा **सुभेदार** असताना अब्दुल वहाब त्याला मिळाला . वारसाहक्काच्या युद्धानंतर इतर सर्व काजी विरुद्ध असताना त्याने औरंगजेबाचे राज्यारोहण कायदेशीर असल्याचे जाहीर केले. याचे बक्षीस म्हणून औरंगजेबाने त्याची मुख्य **काजी** म्हणून नेमणूक केली.

राज्यकारभाराच्या बाबतीत औरंगजेब धर्मविषयक कायदा व पुराणमतवादी खलिफानी घालून दिलेली उदाहरणे यांचे तंतोतंत पालन करी. साहजिकच धर्मविषयक , त्याचप्रमाणे राज्यकारभाराच्या बाबतीत तो काजीचा सल्ला घेई . त्यामुळे मुलकी राज्यकारभारावर वजीर आणि सेनापती यांच्यापेक्षाही त्याचा दबाव अधिक असे . अब्दुल वहाब हा दरबारात **एकमेवाद्वितियं** असा होता . राज्याचे सर्व अमीर -उमराव त्याला भीत असत. परंतु मनामधून त्यांना त्याचा मत्सर वाटे . महाबतखान हा अतिशय स्पष्टवक्ता उमराव होता . एक दिवस औरंगजेब शिवाजीबरोबरील युद्धासाठी एका सेनापतीची निवड करीत असताना तो कुत्सितपणे म्हणाला , "त्याच्याविरुद्ध सैन्य पाठविण्याची जरूर नाही . मुख्य काजीने एक जाहीरनामा काढला तरी काम होण्यासारखे आहे."

अब्दुल वहाब याने आपल्या औरंगजेबावरील वजनाचा गैरउपयोग केला . तो पहिल्या प्रतीचा लाचखाऊ आणि निर्दय होता . त्याच्या खात्यातील जागा तो पैसे देऊन विकत असे , आणि गुप्तपणे व्यापार करून द्रव्याचा संचय करीत असे . त्याने आपल्या हयातीत ३३ लक्ष रुपये जमा केले. याच्या उलट त्याचा मुलगा शेख -उल-इस्लाम होता . त्याच्यासारखा प्रामाणिक काजी पुन्हा झाला नाही . त्याने आपल्या बापाच्या एका दिडकीलाही स्पर्श केला नाही . तो लाच घेत नसे इतकेच नव्हे तर मित्र आणि नातेवाईक यांच्याकडून भेटी देखील स्वीकारीत नसे . खटल्यामध्ये दोन्ही बाजूंकडून इतक्या असत्य गोष्टी पुढे मांडल्या जात की त्यामुळे शेख -उल-इस्लाम खटल्याचा निकाल पुढे आलेल्या पुराव्याप्रमाणे न देता दोन्ही पक्षांना आपापसात भांडण मिटविण्यास सांगे . कायद्याच्या या कटकटीतून आपली मुक्तता करून घेण्याचा त्याने अनेकवार प्रयत्न केला . परंतु औरंगजेब अशा गुणवान माणसाला सोडण्यास तयार झाला नाही . त्याच्यापासून औरंगजेबाने गोवळकोंडा आणि विजापूर यांच्यावरील मोहिमांबाबत **फतवा** मागितला. परंतु दोन मुसलमान राज्यांमधील हे युद्ध आहे आणि ते कुराणाच्या नियमाविरुद्ध आहे म्हणून त्याने **फतवा** देण्याचे नाकारले. नोव्हेंबर १६८३ मध्ये त्याने राजीनामा दिला आणि तो मक्केला गेला . तेथून परतल्यावर तो पट्टण येथे राहिला . १६९८ मध्ये औरंगजेबाने स्वतः पत्र लिहून त्याला दरबारात बोलाविले . या विनंतीचा त्याला अव्हेर करता येईना . तो जाण्यासाठी निघाला परंतु परमेश्वराने आपल्याला यातून सोडवावे अशी प्रार्थना करीतच. त्याची ही प्रार्थना परमेश्वराने ऐकली आणि दरबारात रुजू होण्यापूर्वीच तो मरण पावला.

याच्यानंतर अब्दुल वहाबचा जावई सय्यद अबुसैद हा अधिकारावर आला . परंतु त्याने लाचखाऊपणाचा अतिरेक केल्यामुळे औरंगजेबाने दीड वर्षांतच त्याला बडतर्फ केले.

मुल्ला हैदर हा शिवाजीचा फारसी **सचिव** होता. तो १६८३ मध्ये औरंगजेबाकडे आला . त्याला दोन हजारी **मनसबदार** करण्यात आले . त्याची दिल्लीचा **काजी** म्हणून प्रथम आणि नंतर १७०६ मध्ये मुख्य **काजी** म्हणून नेमणूक करण्यात आली.

औरंगजेबाचा पहिला मुहतसीब मुल्ला औज वजी हा होता . तो समरकंदचा राहाणारा . १६४० मध्ये तो हिंदुस्थानात आला व त्याची नेमणूक शहाजहानचा **मुफ्ती** म्हणून झाली. औरंगजेबाने जून १६५९ मध्ये त्याची प्रमुख **मुहतसीब** म्हणून नेमणूक केली . त्याने मोठ्या निर्धाराने दुष्ट रूढींचे आणि पापी वर्तन करणाऱ्यांचे निर्मूलन केले . त्याला एक हजाराची **मनसब** होती . ऑक्टोबर १६६३ मध्ये त्याच्या हातून काही गुन्हा घडल्यामुळे त्याला बडतर्फ करण्यात आले . एप्रिल १६७६ मध्ये त्याला त्याची **मनसब** फक्त देण्यात आली . पुढील नोव्हेंबर महिन्यात तो मरण पावला. (**एम्. ए.**, १५०. १५६; **के. के.**, भाग २. ८०; **ए. एन्.**, ३९२, ८४०).]

(५) धा यावरील कर रद्द करण्यात येतात; बादशहाचे इस्लामविषयक वटहुकूम

आपल्या दुसऱ्या राज्यारोहणानंतर बादशहाने ताबडतोब त्याला राज्यकारभाराच्या दृष्टीने आत्यंतिक जरुरीच्या वाटणाऱ्या दोन उपाययोजना अमलात आणल्या . वारसाहक्काचे युद्ध चालू असताना उत्तर हिंदुस्थानातील अनेक भाग आर्थिकदृष्ट्या विपन्नावस्थेला पोहोचले होते आणि दुष्काळात विकल्या जाणाऱ्या किंमतीला धान्य विकले जात होते . अंतर्गत ने-आणीवर जी जकात होती त्यामुळे परिस्थितीची भयानकता अधिकच जाणवू लागली होती . प्रत्येक उताराचे ठिकाणी , नदीवर, घाटामध्ये किंवा प्रांताच्या सरहद्दीवर वस्तूच्या किंमतीच्या १ /१० इतका दस्त अथवा रहदारी त्याठिकाणाहून ने -आण होणाऱ्या मालावर रस्त्यांचे संरक्षण करण्यादाखलचा मेहेनताना म्हणून वसूल केला जाई . आग्रा, दिल्ली, लाहोर आणि बुरहाणपूर सारख्या मोठ्या शहरात इतर ठिकाणांहून आयात झालेल्या सर्व खाद्यपदार्थांवर आणि पेयांवर पांढरी नावाचा एक कर लादला जाई . औरंगजेबाने खाजगीकडे असलेल्या सर्व प्रदेशांतून गोळा करण्यात येणारे रहदारी आणि पांढरी हे कर रद्द केले आणि त्याचबरोबर राज्यातील जहागीरदार आणि जमीनदार यांनाही त्यांच्या जहागिरीतील मुलुखातून वरील कर रद्द करण्याची विनंती केली . याप्रमाणे

कारवाई करण्यात आली आणि त्याचा परिणाम असा झाला की राज्याच्या दुष्काळग्रस्त अशा प्रत्येक भागात अन्नधान्याची अनिर्बंध वाहतूक सुरू झाली आणि धान्याच्या किमती बऱ्याच प्रमाणात खाली उतरल्या. इ. स. १६७३ मध्ये पुष्कळशा बारीक सारीक आणि तापदायक पट्ट्या (**अबवाब**) औरंगजेबाने रद्द केल्या. (पाहा **मोगल राज्यपद्धती** प्रकरण ५ वे). इ. स. १६६६ मध्ये तंबाखूवरील जकात रद्द करण्यात आली. (पाहा **ए. एन्**. ४३६; ४३८; **के. के. भाग** २. ८७, ८९, २१२; **स्टोरिया, भा**. २. १७१, १७५; **मिरात-ई-अहमदी**, २६२, २६५; **विल्सनचे ग्लॉसरी**, ३९६).

औरंगजेबाने सिंहासनावर आपला हक्क सांगितला तो शुद्ध इस्लामधर्माचा पाठीराखा आणि दारा शुकोच्या धर्मलंड वर्तनाविरुद्ध आणि तत्त्ववादाविरुद्धची भूमिका स्वीकारून. १६५९ मधील जून महिन्यात त्याचा दुसरा राज्यारोहण समारंभ झाल्यानंतर त्याने खालीलप्रमाणे वटहुकूम काढले. या वटहुकूमांचा उद्देश परंपरागत चालत आलेल्या इस्लामच्या तत्त्वप्रणालीची पुनःप्रतिष्ठा करणे आणि सर्वसामान्य लोकांचे जीवन कुराणाच्या शिकवणीनुसार घडवून आणणे हा होता. [कोरोनेशन आर्डिनन्सेस् – **ए. एन्**., ३६६, ३९०–३९२; **मिरात**, २६०, २६३, – २६४; **स्टोरिया**, भा. २.५-७ (सेन्सॉर); **अकीलखान**, ८८–८९; **के. के**., भाग २. ७९; **रुक्कात** नं. २ (**नौरोझ**); **मुराकत-ई-हसन**, १९६ (सेन्सॉर).]

(१) यापूर्वीचे मोगल सम्राट टांकसाळीतल्या नाण्यावर इस्लामच्या कालिमाचा –महमदी धर्मातील श्रद्धेची कबुली – शिक्का मारून घेत. औरंगजेबाने ह्या प्रथेला बंदी घातली.

(२) पर्शियाचे प्राचीन राजे आणि त्यांना अनुसरून त्या देशाचे नंतरचे मुसलमान राजे आणि त्याचप्रमाणे हिंदुस्थानातील मोगल सम्राट सूर्य ज्या दिवशी (Aries) मेष राशीमध्ये प्रवेश करीत असे तो दिवस आनंदोत्सवाचा आणि दरबारी जल्लोष साजरा करण्याचा प्रसंग म्हणून मानीत. कारण झरतुष्ट्री पंथानुयायांच्या कालगणना पद्धतीनुसार त्या दिवशी (१ **फरवर्दीन**) नवीन वर्षाची सुरुवात होत असे (**नवरोज**). औरंगजेबाने वरील दिवस म्हणजे सणासुदीचा दिवस असे मानण्याची प्रथा बंद केली आणि नवरोजच्या निमित्ताने दरबारात होणारा जल्लोष हा **रमजान** महिना उलटल्यानंतर राज्यारोहणाच्या निमित्ताने करण्यात येणाऱ्या उत्सवाच्या वेळी करण्यात यावा असा हुकूम काढला.

(३) **मुहतसीब** नावाच्या अधिकाऱ्याची (नीतिमत्तेवर नियंत्रण ठेवणारा अधिकारी) महमद पैगंबराने घालून दिलेल्या नियमांप्रमाणे वर्तन होत आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी आणि त्याने निषिद्ध म्हणून सांगितलेल्या चालीरितीविरुद्ध वर्तन करणाऱ्यांना शासन करण्यासाठी – उदाहरणार्थ दारू किंवा आंबवलेली नीरा पिणे, भांग आणि इतर धुंदी आणणाऱ्या पेयांचे सेवन करणे, जुवेबाजी आणि लैंगिक बाबतीसंबधांत अनैतिक व्यवहार करणे वगैरे – औरंगजेबाने नेमणूक केली. अफू आणि गांजा यांच्या सेवनास मात्र बंदी घालण्यात आली नव्हती. उपरिनिर्दिष्ट अधिकाऱ्याच्या अधिकारात पाखंडी मतांचा प्रचार करणे, परमेश्वराची निंदा करणे आणि दैनंदिन व्यवहारात मुस्लीम धर्माच्या अनुयायांकडून प्रार्थना न केली जाणे आणि उपवास न करणे वगैरे गुन्ह्यांबद्दल शासन करण्याचा समावेश केलेला होता. या अधिकाऱ्याच्या हाताखाली वरील हुकुमांची तामिली करण्यासाठी म्हणून **मनसबदार** आणि **अहादी** नेमण्यात आले.

(४) भांगेची लागवड करण्यास प्रतिबंध करणारा एक शाही वटहुकूम १३ मे १६५९ या दिवशी जारी केलेला सर्व प्रांतांच्या सुभेदारांकडे पाठविण्यात आला.

(५) जुन्या मशिदी आणि दर्गे जे काळाच्या ओघात मोडतोड होऊन नामशेष होण्याच्या मार्गाला लागले होते, त्या सर्वांची दुरुस्ती करण्यात आली आणि या ठिकाणी **इमाम**, **मोआजिन खातिब** आणि **सेवक** यांच्या नक्त पगारदारीवर नेमणुका करण्यात आल्या . औरंगजेबाचा धर्मतत्त्वाच्या बाबतीतला कडवटपणा वयाबरोबर वाढत गेला . या ठिकाणी औरंगजेबाच्या जीवनाबद्दलच्या बुरसटलेल्या गांभीर्याच्या ज्या काही कल्पना होत्या त्यांची अमलबजावणी करण्यासाठी त्याने योजलेल्या उपाययोजनांचाच आपण विचार करू.

(६) त्याच्या कारकिर्दीच्या ११ व्या वर्षाच्या सुरुवातीला त्याने आपल्या दरबारी वाद्यवृंदांना आपल्या समक्ष कार्यक्रम करण्याची मनाई केली . "हळूहळू दरबारातून संगीतकलेची पूर्णपणे हाकालपट्टी झाली."

परंतु संगीतदेवतेच्या उपासकांनी सिंहासनाधिष्ठित असलेल्या आपल्या शत्रूचा सूड (औरंगजेबाचा) सार्वजनिक कुत्सितपणा आणि हेटाळणी यांचा ओघ त्याच्याकडे वळवून घेतला . एका शुक्रवारी औरंगजेब मशिदीकडे चाललेला असताना दिल्लीतील १ हजार संगीतज्ञ एकत्र जमले . या देशात प्रचलित असलेल्या पद्धतीप्रमाणे ते उत्कृष्टपणे सजविलेल्या अशा २० ताट्या घेऊन बाहेर पडले आणि अतिशय दुःख झाल्याप्रमाणे ते आक्रोश करू लागले. दूर अंतरावरूनच औरंगजेबाने ही गर्दी बघितली आणि त्यांचा भयंकर आक्रोश आणि वेदनायुक्त विलाप त्याच्या कानावर पडला . ह्या प्रकाराचे त्याला आश्चर्य वाटले आणि हे लोक दुःख का करीत आहेत हे जाणून घेण्यासाठी त्याने एका अनुचराची रवानगी केली . त्या संगीतकारांनी हुंदके देत देत उत्तर केले की बादशहाच्या हुकुमामुळे संगीतकला ठार झाली आहे तेव्हा तिच्या दफनविधीसाठी ते तिला ताटीवर घालून घेऊन जात आहेत . बादशहाने मनाचा समतोलपणा बिघडू न देता उत्तर दिले की संगीतकला व्यवस्थितपणे गाडली जात आहे किंवा नाही याची पूर्णपणे काळजी त्यांनी घ्यावी. (**एम्. ए**., ७१; **के. के**., भाग २. २१२. २१३ **स्टोरिया**, भाग २. ८). (चंद्रमानीय आणि सूर्यमानीय कालगणनेनुसार).

(७) बादशहाच्या दोन वाढदिवसांच्या प्रसंगी कालगणनेनुसार सोने आणि चांदी यांमध्ये त्याची तुला करण्याचा जो समारंभ होत असे तो बादशहाने बंद केला. (**एम्. ए**. ७५, ८१; **रूक्कात** नं. ७८)

(८) आग्रा किल्ल्याच्या हत्तीपूल दरवाज्याच्या दोन्ही बाजूस असलेल्या खांबांवर जहांगीर बादशहाने दोन दगडी हत्ती बसविले होते ते बादशहाने १६६८ मध्ये काढून टाकले . (**एम्. ए**., ७७; **स्टोरिआ**, भाग २.११)

हिंदूविरोधी वटहुकूम

(९) इ. स १६७० च्या एप्रिल महिन्यात दरबारामध्ये परस्परांना अभिवादन करण्याची हिंदू —म्हणजे आपला हात अभिवादनार्थ मस्तकापाशी नेण्याची —पद्धती पाळण्याची त्याने दरबारी मंडळींना मनाई करणारा हुकूम काढला आणि यापुढे त्यांनी परस्परास **सलाम आलेकूम** अथवा आपल्याला शांततेचा लाभ होवो असे म्हणूनच अभिवादन करावे अशी आज्ञा जारी केली. (**एम. ए.**, ९८, २७२; **अखबारात** १/२, ३/२).

(१०) बादशहाच्या वाढदिवशी जो उत्सवसमारंभ करण्यात येत असे ती प्रथा बंद करण्याचा त्याने मार्च १६७० मध्ये हुकूम काढला . यापुढे त्यादिवशी शाही वादकांकडून (**बॅण्ड**) सर्व दिवसाच्या ऐवजी फक्त

३ तासच वादन केले जाईल अशी त्याने आज्ञा केली . त्याच्या कारकिर्दीच्या २१ व्या वर्षाच्या सुरुवातीला (नोव्हेंबर १६७७) त्याच्या राज्यारोहणाच्या वाढदिवसानिमित्त रूढिनुसार होणारे समारंभ त्याने **फतवा** काढून रद्द करण्याची आज्ञा दिली.

(११) यापूर्वीचे बादशहा दरबारातील मोठमोठ्या राजेरजवाड्यांना वस्त्राधिकार अर्पण करण्याच्या प्रसंगी त्यांच्या कपाळावर आपल्या हाताने गंधाचा टीळा (**टिका**) लावीत. ह्या प्रथेला हिंदू धर्मतत्त्वांचा वास येतो अशा समजुतीने त्याने ती प्रथा मे १६७९ रोजी कायमची बंद केली (**एम. ए.**, १७६)

(१२) राजवाड्याच्या बाहेरील मैदानात जमलेल्या असंख्यात प्रजेचा मुजरा घेण्यासाठी म्हणून राजवाड्याच्या गच्चीवरील भिंतीवर उभे राहून दररोज सकाळी प्रजेला दर्शन देण्याचा आजतागायत चालत आलेला समारंभ बादशहाने करण्याचे सोडून दिले . (**के. के.**, भाग. २. २१३) ह्या पद्धतीची सुरुवात अकबराने केली होती आणि त्याच्या वारसांनी ती चालविली होती . ही पद्धती म्हणजे दिवसाचे काम सुरू करण्याच्या अगोदर आपल्याला पूज्य असलेल्या मूर्तीचे दर्शन घेण्याच्या हिंदूंच्या प्रथेशी मिळतीजुळती होता.

(१३) कुराणाच्या तत्त्वाप्रमाणे थडगी असलेल्या इमारतींवर छप्पर बांधणे , कबरींची रंगसफेती करणे आणि स्त्रियांनी संतमंडळींच्या कबरस्थानाची यात्रा करणे वगैरे गोष्टी निषिद्ध होत्या . या गोष्टींना औरंगजेबाने बंदी घातली. (**के. टी.**, ५५६, १४८ अ).

नैतिक सुधारणेसाठी औरंगजेबाने केलेले प्रयत्न

परंतु एका झेपेत मानवजातीचा उद्धार घडवून आणण्याचे त्याचे प्रयत्न फसले . काही काळ केलेले कायदेकानू जबरदस्तीने जनतेवर लादावयाचे , नंतर त्याबाबत थंडपणा स्वीकारावयाचा आणि अखेर साऱ्या जनतेच्या भावनांना उद्रेक आणणारी बुरसटलेली नैतिक मूल्ये जनतेवर लादण्याचे प्रयत्न सोडून द्यावयाचे यामुळे औरंगजेबाची सारी राजवट लोकांकडून कुचेष्टीली गेली . कारण या सर्वांमध्ये उच्च विचारसरणीची तत्त्वे लोकांना योग्य मार्गाने शिकविण्याचा प्रयत्नच अगोदर केला गेला नाही . यासंबंधांत मनूची म्हणतो, "औरंगजेबाचे जेव्हा राज्यारोहण झाले त्या वेळी दारू पिणे हे इतके सर्रास झाले होते की एक दिवस संतापाच्या भरात तो उद्‌गारला की साऱ्या हिंदुस्थानात फक्त दोनच माणसे दारू न पिणारी अशी आढळतील आणि ती म्हणजे तो स्वतः आणि त्याचा मुख्य **काजी**. दारू पिण्यासंबधीची बंधने पहिल्या प्रथम अतिशय कडक होती परंतु हळूहळू ती ढिली केली गेली . चोरून दारू न पिणारी अशी माणसे फारच थोडी आढळली असती. खुद्द बादशहाचे मंत्री दारू पीत आणि पिऊन झिंगण्यात स्वतःला धन्य मानीत ." जी गोष्ट दारुबंदीच्या हुकुमासंबंधात तीच संगीताबद्दलचे बादशहाने जे **फतवे** काढले त्याबाबत लागू होती.

जुव्वेबाजीबद्दल कुप्रसिद्ध असलेल्या अड्ड्यांना बादशहाकडून कडक शिक्षा दिली गेली . मनूची असे सांगतो की, बादशहाने सर्व वेश्या आणि नर्तकी यांना विवाह करा अथवा राज्यातून चालत्या व्हा असा हुकूम दिला (**स्टोरिया**, भाग २. ९). परंतु मनूचीने पुढे केलेल्या विधानावरून असे दिसते की बादशहाने या संबधात केलेल्या कायदेकानूंची किंमत असून नसल्यासारखीच होती . (**स्टोरिया**, भाग २. १८६) होळीच्या सणाच्या वेळी बीभत्स गाणी रस्त्यावर उघडपणे म्हटली जात आणि होळी करण्यासाठी लोकांकडून सक्तीने लाकडाचे ओंडके जमा केले जात . औरंगजेबाने होळीच्या उत्सवास बंदी घातली . त्याची ही बंदी

म्हणजे पोलिशी खाक्याच्या बंदीहुकुमाचा एक मासला होता. त्याचप्रमाणे इ. स. १६६९ मध्ये बुरहाणपूर येथे **मोहरम**च्या दोन परस्परविरोधी मिरवणुकीत भयंकर दंगल माजल्यानंतर बादशहाने यापुढे **मोहरम**च्या मिरवणुका काढण्यात येऊ नयेत अशी बंदी जारी केली. (गॅम्बलिंग, **रुक्कात** क्र. २७; **ड्रेस**, ibid क्र. १४७; होली फेस्टिव्हिटिज, **मीरात**, २७६; मोहरम, **के. के.**, भाग २. २१४).

इ. स. १६६४ मध्ये हिंदू लोकांत नवऱ्याच्या प्रेताबरोबर स्त्रीने जाळून घेण्याची जी प्रथा होती ती बंद करण्याचा त्याने हुकूम काढला (**दस्तुर-उल-अमल**, आय्. ओ. एल. एमएस. ३७०, एफ. १०३ अ). परंतु या हुकुमाची अमलबजावणी सगळीकडे करणे हे सरकारच्या शक्तीबाहेरचे झाले. त्याचप्रमाणे लहान मुलांना नपुंसक करून त्यांची गुलाम म्हणून विक्री करण्याची क्रूर आणि अमानुष पद्धती इ. स. १६६८ मध्ये साऱ्या साम्राज्यामधून नाहीशी करण्याचा हुकूमनामा काढण्यात आला. (**एम्. ए.**, ७५; **के. टी**. ४४ अ; **मुराकत**, ७६)

(६) दाराच्या मर्जीतले धर्मज्ञ आणि पाखंडी यांचा औरंगजेबाने केलेला अमानुष छळ. [सर जदुनाथ सरकार यांनी दाराबाबत औरंगजेबाची वागणूक कशी होती यासंबंधी आपले मत पुढीलप्रमाणे दिले आहे. ते म्हणतात की शिष्टाचाराच्या बाबतीत औरंगजेब अतिशय काळजीपूर्वक वागत असे, आणि सामाजिक चालिरितींचा भंग होणार नाही याकडे कटाक्षाने लक्ष देई. ही त्याची वागणूक लक्षात घेता दाराचे धडावेगळे मस्तक त्याच्यासमोर आल्यानंतर त्यात त्याने आपली तलवार खुपसली ह्या त्या काळी प्रचलित असलेल्या गोष्टीवर माझा विश्वास बसत नाही. मनूची (भाग २. ३५९) आणि जे. कॅम्बेल हा इंग्रज प्रवासी वरील गोष्टीचा उल्लेख करतात. याबाबत बर्नियर असे म्हणतो (पा. १०३) की त्या भयंकर दृश्याकडे लक्ष गेल्यानंतर औरंगजेबाने आपली मान बाजूला फिरविली. शुजाचा इतिहासकार मासूम (१४५ ब) असे विधान करतो की शुजाचे मस्तक हे एका काफराचे मस्तक आहे असे समजून त्याकडे बघण्यास देखील औरंगजेबाने नकार दिला. ५ सप्टेंबर १६६९ रोजी त्याला जेव्हा कळले की, दाराची कबर मोडकळीस आली असून तिच्यावर काहीही आच्छादन नाही तेव्हा त्याने कबरीपाशी एका सेवकाला कायम ठेवण्याचा आणि कबरीवर आच्छादन टाकण्याचा हुकूम दिला. त्याचप्रमाणे औरंगजेब हा ताजमहालला भेट देऊन आपल्या आई-वडिलांच्या थडग्यांना नमन करीत असे आणि दान करीत असे, असे विधान दरबारच्या बातमीदारांनी केलेले आपल्याला आढळते. (दाराच्या कबरीविषयी माहिती आपल्याला **अखबारात** १२/३ यामध्ये मिळते. औरंगजेब ताजमहालमध्ये जात असल्याचा पुरावा आपल्याला **अखबारात** १३/४, १३/२७ आणि **एम्. ए.**, ९३ यामध्ये मिळतो.)]

सनातनी इस्लाम धर्मांची प्रतिष्ठापना करण्याच्या निमित्ताने दाराच्या मर्जीला पात्र झालेल्या इस्लाम धर्माबद्दल पुरोगामीत्त्वाचे धोरण बाळगून असलेल्या सज्जन मंडळींना शासन करण्याची औरंगजेबाला अनायासेच संधी मिळाली. अशापैकी एक म्हणजे मियां मिरचा शिष्य आणि लिलया गुढगुंजनात्मक काव्य रचणारा शहा महमद बदख्शी हा होता. दाराने याचा अतिशय सत्कार केला होता आणि तो त्याला अतिशय चाहत असे आणि म्हणून औरंगजेबाच्या राज्यारोहणानंतर त्याला बादशहासमोर हजर राहण्याचा हुकूम देण्यात आला. परंतु येत असताना तो (**तारीख-ई-काश्मीरी** लेखक आजम, १२१ अ—१२२ अ) १६६१ मध्ये लाहोर येथे मरण पावला.

गूढ सरमद

परंतु अशा मंडळींपैकी बळी पडलेल्यांत नाणावलेला म्हणून सरमद याचा उल्लेख करावा लागेल. (याची पूर्ण माहिती **दाबीस्तान** (१९४—१९६) मध्ये मिळते. त्याशिवाय पाहा. **अकीलखान**, ८९—९०; **माधोदासचे बुस्तान—ई—मराफत, आय. ए**. १९१०, १२१—१२२; **स्टोरिया**, भा. १. २२३; **बर्नियर**, ३१७). हिंदुस्थानातील सुफी सांप्रदायामध्ये तो अतिशय नाणावलेल्यांपैकी एक होता. पर्शियामध्ये कशान या गावी ज्यू आईबापांचे पोटी याचा जन्म झाला होता. हिब्रू धर्मग्रंथांच्या सखोल अभ्यासाने ईश्वरविषयक शास्त्रामध्ये पारंगत (**रब्बी**) अशी त्याची ख्याती झालेली होती. नंतर त्याने इस्लाम धर्माचा स्वीकार करून महमद सैद हे नाव धारण केले. यानंतर व्यापारी म्हणून तो हिंदुस्थानात आला. तट्टा येथे अभयचंद नावाच्या एका हिंदू

युवकाबरोबर त्याची गाठ पडली. त्याच्या नादाने तो इतका वेडावला की तो एक नंगा फकीर बनला आणि त्याने आपला शिष्य होण्याविषयी अभयचंदाचे मन वळविले . दिल्ली येथे दारा शुकोने त्याला वारेमाप चढविले आणि त्याची शहाजहानबरोबर भेटही घडवून आणण्यात आली.

सारे विश्व म्हणजे परमेश्वरच आहे या प्रणालीचा सरमद हा पुरस्कर्ता होता . त्याने रचलेले सहज सुंदर काव्य यात केवळ सुफी पंथियांची गूढगुंजनावरील अस्मिताच केवळ ओतप्रोत भरलेली दिसते असे नाही तर त्यात सर्व धर्मांच्या तत्त्वज्ञानात अंगीभूत असलेल्या अंतिम सत्याची भलावणी करणाऱ्या आणि पंथापंथांतील गुंतावळीच्या बाहेर पडून आगळे काही तरी सांगणाऱ्या विश्वबंधुत्वाच्या उच्चतम तेजोवलयाचा आपणाला साक्षात्कार होतो . महमद पैगंबराबद्दलची त्याची भूमिका आत्यंतिक आदराची होती . परंतु मुस्लीम धर्मासंबंधीच्या अनेक बाबी आणि परंपरा याबाबत त्याचे विचार अतिशय सनातनी होते . तो असे म्हणत असे की, "परमेश्वर ही एक सगुण भौतिक अशी वस्तू आहे. त्याच्या भौतिकतेचे एक निदर्शक म्हणजे मानवी व्यक्तीचे साकार स्वरूप आणि देह ही होत . चांगल्या कृत्यांबद्दलचे बक्षीस आणि वाईट कृत्यांबद्दल शासनही या इहलोकीच प्राप्त होतात. माणसाच्या जीवनाची जितकी व्याप्ती आहे तितक्याच कालावधीच्या निद्रेनंतर मनुष्याचा आत्मा पुन्हा जन्म घेतो."

अंगावर कसलेही वस्त्र न पांघरता सरमद हा इतस्ततः भटकत असे . अद्वैतवादासंबंधीची त्याची भूमिका निश्चित तडजोडीची नव्हती , आकारसादृश्यता आहे ही गोष्ट तो ठामपणे नाकारीत असे आणि शरीरविषयक कोणत्याही गोष्टीबद्दल त्याला लज्जा अथवा घृणा वाटत नसे.

सरमदसंबंधी निर्णय घेण्यासाठी मुसलमान धर्मवेत्त्यांचे एक मंडळ बसले आणि पाखंडी मताबद्दल त्याला देहान्ताची शिक्षा फर्माविण्यात आली . त्याच्या शिक्षेपाठीमागचे खरे कारण राजकीय होते . कारण सिंहासनासंबंधीच्या लढ्यात त्याने दाराला "तुझा जय होईल" अशी ग्वाही दिली होती.

इ. स. १६७२ मध्ये दिवाणाच्या अधिकारावर असलेल्या महमद ताहिर याचे डोके त्याने पहिल्या तीन खलिफांना शिव्या दिल्यामुळे उडविण्यात आले (**एम्. ए.,** १२०). तो शियापंथी होता. १६६७ मध्ये एका पोर्तुगीज पाद्र्याने प्रथम इस्लाम धर्माचा स्वीकार केला आणि नंतर परत आपल्या पूर्वधर्मात पदार्पण केले . या धर्मपरिवर्तनाबद्दल त्याला औरंगाबाद येथे ठार मारण्यात आले (**स्टोरिया,** भाग २. १५९–१६१) बोहरा पंथियांचा धर्मगुरु , अहमदाबादचा सय्यद कुतुबुद्दीन याच औरंगजेबाच्या हुकूमावरून त्याच्या ७०० अनुयायांबरोबर ठार मारण्यात आले. (बूरवेज **स्ट्रगल बिटवीन दी मराठाज ॲण्ड दी मोगल्स**, भाग ४ एन्.; **एम्. यू,** भाग १. २४१).

(७) बाह्य मुस्लीम जगताबरोबरचे औरंगजेबाचे संबंध

औरंगजेब पक्केपणी सिंहासनाधिष्ठित झाल्यावर हिंदुस्थानबरोबर व्यापारीसंबंध असलेल्या सर्व मुसलमानी राज्यांकडून त्याच्या राज्यारोहणाबद्दल त्याचे अभिनंदन करण्यासाठी एका पाठोपाठ वकिलाती आल्या.

मक्केच्या शरीफाबरोबरील संबंध

वारसाहक्कासंबंधीचे युद्ध संपल्यावर आपल्या बापाचे सिंहासन बळकाविलेल्या बादशहाला कायदेशीर मान्यता देण्यात मक्केतील धर्मप्रमुख आणि धर्मवेत्ते यांना जी अळंटळं वाटली ती सोन्याच्या वर्षावाने साफ बुडवून टाकण्याचा बेत औरंगजेबाने आखला . १६५९ च्या नोव्हेंबरमध्ये , त्याचा भव्य आणि भपकेबाज राज्यारोहणाचा विधी संपल्यानंतर लगेच त्याने सय्यद मीर इब्राहीम याची ६ लक्ष ६० हजार रुपये देऊन मक्का आणि मदीना येथे रवानगी केली. ही रक्कम त्याने तेथील सय्यद, फकीर, मशिदी आणि दर्गे यांचे पुजारी आणि स्थानिक भक्तगण यांजमध्ये वाटावयाची होती . यानंतर शरीफाचे प्रतिनिधी दिल्ली दरबाराला प्रतिवर्षी भेट देत आणि महमद पैगंबराच्या नावाखाली देणग्यांची रक्कम लादित . परंतु अखेर शरीफाच्या लावसटपणामुळे खुद्द औरंगजेब त्याच्याविरुद्ध उभा ठाकला . आपल्या कारकिर्दीच्या शेवटच्या दशकामध्ये त्याने आपल्या मुख्य प्रधानाला लिहिले , "हिंदुस्थानात अमाप संपत्ती आहे असे कळल्यावर मक्केचा **शरीफ** आपली तुंबडी भरण्यासाठी दरवर्षी आपला प्रतिनिधी येथे पाठवितो. मी जे द्रव्य येथून तिकडे रवाना करतो, ते गरिबगुरिबांसाठी असते . त्याच्यासाठी निश्चित नाही . (अधिक माहितीसाठी पाहा : **बर्नियर**, १३३ ; **स्टोरिया**, भाग २, ११५; **ए. एन्**., ४४९, ४५०, ६२७, ८८२, ८८६, ९७७; **के. के.**, ४१२; **एम्. ए**., ७६, १०८, १४०, २५१, २७१, २८५)

पर्शियाच्या शहाकडे वकिलात

औरंगजेबाच्या सिंहासनावरील अधिकाराला आता कोणीही प्रतिस्पर्धी उरला नाही अशी परिस्थिती निर्माण झाल्यावर इराणचा शहा अब्बास दुसरा याने १६६१ मध्ये आपल्या तोफखान्याचा प्रमुख वुदाक बेग याच्या नेतृत्वाखाली एक भव्य वकिलात औरंगजेबाचे अभिनंदन करण्यासाठी रवाना केली.

पर्शियाच्या लोकांना आशियाखंडाचे फ्रेन्च लोक म्हणतात ते काही उगीच नाही . त्यांचा देश म्हणजे साऱ्या मुस्लीम जगतातील संस्कृती, तत्त्वज्ञान आणि प्रगती यांच्या माहेरघराप्रमाणे आहे. मुस्लीम देशातील काव्यावर पर्शियन विचारांची दाट छाप पडली आणि पर्शियन चालीरीती आणि आचारविचार कधी कष्टाने तर कधी मोठ्या सायासाने देखील कार्डोव्हा आणि कॉन्स्टॅन्टिनोपलपासून दिल्ली आणि श्रीरंगपट्टमच्या टप्प्यातील सर्व मुसलमानी राज्यांतील दरबारात सहीसही उचलण्यात धन्यता मानली जाई . आपल्या शत्रूच्या तलवारीच्या धारेपेक्षा राजेरजवाड्यांनी पर्शियन टीकाकारांच्या तिखट हल्ल्याची अधिक धास्त घेतली होती . पर्शियनांकडून एका वकिलातीचे आगमन होत आहे या बातमीने मोगल दरबारात एकच धामधूम उडाली. बादशहापासून तो अगदी खालच्या दर्जाच्या रक्षकाला असे वाटले की खुद्द त्याची आणि त्याच्या देशाची आता जणू कसोटीच आहे . साऱ्या आशियाखंडातील सामाजिक चालिरितींचे जे प्रणेते पर्शियन त्यांच्याकडून राजदरबारातील प्रत्येकाची चालचलणूक आणि वर्तन ही कसाला लागणार होती आणि जर या परीक्षेत वर्तनाची सभ्यता आणि आवडी निवडी बाबतचा काटेकोरपणा यात जर तो अगदी थोडासा जरी कमी पडला असता तरी साऱ्या मुसलमान जगतात सगळीकडून त्याचे हसे झाले असते.

शहाकडून आलेल्या नजराण्याची किंमत जवळ जवळ चार लाख बावीस हजार रुपये होती . २७ जुलै १६६१ रोजी शहाच्या वकिलाला परतीचा निरोप देण्यात आला . वकील आणि त्याच्याबरोबर आलेल्या लवाजम्याला बादशहाने पाच लाख पसतीस हजार रुपये किमतीइतक्या भेटी बहाल केल्या . (अधिक माहितीसाठी पाहा : **ए. एन्**., ६०९, ६१४, ६२१, ६२०, ६२८, ६६४; **स्टोरिया**. भाग २. ४७–५४; **बर्नियर**, १४६, १५१; **रुक्कात-ई-शाह अब्बास सानी**, १५६–१६२). शहाकडून आलेल्या खलित्याला उत्तर देण्यासाठी म्हणून औरंगजेब बादशहाने मुलतानचा सुभेदार तर्बियतखान याच्या नेतृत्वाखाली २ नोव्हेंबर

१६६३ मध्ये आपल्याकडून परतीची वकिलात रवाना केली. या वकिलातीबरोबर शहाला नजर करण्यासाठी म्हणून सात लाख रुपये किमतीपेक्षा जास्त असा नजराणा पाठविण्यात आला . वकिलातीबरोबर पाठविण्यात आलेल्या पत्रामध्ये औरंगजेबाने शहाच्या मैत्रीच्या दृष्टिकोनाबद्दल त्याचे आभार मानले . (**बहार-ई-सखून, आय्. ओ. एल्. एम् एस्.**) परंतु मोठ्या धीरगंभीर भाषेत त्याने असेही कळविले की तो मानवी व्यक्तीवर मदतीसाठी अवलंबून नाही तर तो केवळ परमेश्वराच्या कृपेवर पूर्णपणे विश्वासून आहे . त्याला मिळालेले अलौकिक विजय ही परमेश्वराची त्याच्यावर जी अपार कृपा आहे त्याचेच प्रतीक होत . त्यानंतर औरंगजेबाने आपल्या भावावर त्याने जे विजय मिळविले त्याचे लांबलचक आणि औद्धत्यपूर्ण भाषेमध्ये चऱ्हाट लावले . अर्थात हे साहजिकच होते . इस्फहानच्या शहाने मोगल वकिलाची भेट घेतली . परंतु शहाने त्याला मोठ्या उद्धटपणे वागविले आणि त्याला अतिशय अपमानास्पद वागवून त्याचे अतिशय हालहाल केले. मोगल वकिलाच्या समक्ष अनेक वेळा पर्शियाच्या शहाने हिंदुस्थानवर स्वारी करण्याची दर्पोक्ती केली. या सुमारास बहुधा शहाने औरंगजेबाला मिर्झा ताहिर वहिद याने रचलेले एक लांबलचक पत्र पाठविले. (**फैय्याझ-उल-कवानिन**, ३८९–३९८). या पत्रात त्याने शिया धर्माची मोठ्या बळकटपणे बाजू मांडली होती , पर्शियन राजघराण्याचा उदोउदो केला होता , औरंगजेबाची कुटाळकी केली होती आणि एक यशस्वी राज्यकर्ता आणि खऱ्या धर्माचा पुरस्कर्ता म्हणून स्वतःची बढाई सांगितली होती.

पर्शियाबरोबर कलह

अखेर पर्शियामध्ये एक वर्षभर राहिल्यानंतर तर्बियतखानाची पाठवणी करण्यात आली . त्याच्याबरोबर कुत्सित मजकुराने भरलेले एक पत्र औरंगजेबाला देण्यासाठी म्हणून रवाना करण्यात आले . या पत्रात शहा अब्बास लिहितो , "मला असे कळते की हिंदुस्थानातील बहुतेक जमीनदार (राजे) बंड करून उठले आहेत. कारण त्यांचा राज्यकर्ता दुबळा , अकुशल आणि साधनसामग्री नसलेला असा आहे . त्यांचा पुढारी तो नापाक शिवा आहे . हा शिवा इतका काळ जणू अज्ञातवासात राहिला की त्याचे नाव देखील कोणाला माहीत नाही . परंतु आता तुमच्याजवळील साधनसामग्रीच्या अभावाचा फायदा घेऊन आणि तुमच्या फौजांनी घेतलेली माघार पाहून एकाद्या पर्वताच्या शिखराप्रमाणे तो आपल्या कृतीने सर्वांच्या समोर आला, अनेक किल्ले त्यांनी बळकाविले , तुमचे अनेक शिपाई ठार मारले वा पकडले , त्या प्रदेशाचा बराचसा भाग त्याने बळकाविला , तुमच्या ताब्यातील अनेक बंदरे , शहरे आणि खेडी लुटली आणि जाळून फस्त केली आणि आता तो तुमच्याशी दोन हात करण्यासाठी उभा ठाकला आहे . तुम्ही स्वतःला जगज्जेते (**आलमगीर**) म्हणून म्हणवून घेता पण प्रत्यक्षात तर तुम्ही फक्त आपल्या बापाला जिंकलेत आणि आपल्या भावांचा खून करून तुम्ही तुमच्या मनाला शांती मिळविलीत. परंतु बेकायदेशीर वागणाऱ्या व्यक्तीचा पुंडावा मोडण्याचे मात्र तुमच्या सामर्थ्याबाहेरचे होते . जगाच्या सुलतानांना आसरा म्हणजे आमचे पूर्वज होते ... आम्ही त्यांच्या सिंहासनावर हुमायून आणि नजर महमदखान यांची पुन्हा प्रतिष्ठापना केली ही गोष्ट मी आपल्या नजरेस आणून देऊ इच्छितो . आता तुम्ही, हुमायूनचे वारस संकटात सापडलेले आहात . तेव्हा माझी अशी मनीषा आहे की ज्या गोष्टीची मी फार काळ मनाशी आकांक्षा बाळगून आहे आणि ती म्हणजे आपली भेट घेणे त्यासाठी मी स्वतः हिंदुस्थानात माझ्या प्रचंड सैन्यानिशी आपल्याला भेटू इच्छितो , आपल्याला सर्व तऱ्हेची मदत देऊ करतो आणि तुमच्या राज्यात माजलेल्या अनाचाररूपी वडवानलाची आग विझवू इच्छितो." (**फैय्याझ–उल–कवानिन**, ४९६–४९९). औरंगजेबाने आपल्या निष्क्रिय क्रोधाला शहाकडून पत्र घेऊन आलेल्या निरपराध वकिलावर सूड घेऊन वाट करून दिली . आपल्या कर्तव्यात तो अयशस्वी झाल्याचा त्याच्यावर आरोप केला, त्याची भेट घेण्याचे नाकारले आणि त्याची मनसब कमी केली. (**ए. एन.**, ९७७,१०३३ व १०५०; **एम्. यू.** भाग १. ४९६; **स्टोरिया**, भाग २.१२८–१३१, १४६–१४७).

अनुक्रमणिका

मोगल आणि मध्य आशिया

इराणचा हा शहा ऑगस्ट १६६७ मध्ये मेला आणि हिंदुस्थानवर होऊ घातलेली पर्शियन स्वारी शब्दामध्येच संपली . तरी देखील औरंगजेबाने आपल्या मृत्यूपर्यंत आपल्या राज्याला आशिया लागून असलेल्या पर्शियाच्या सरहद्दीवर सख्त नजर ठेवली होती . (पाहा : **ए. एन्**., ९७४, ९७५, ९८४; **स्टोरिया**, भाग २. १४६, १४९; **के. के**. भाग २. २०२). औरंगजेबाकडे आलेल्या इतर वकिलाती म्हणजे बाल्ख आणि बुखारा (१६६१ आणि पुन्हा १६६७), काशघर (१६६४), उरगंज (खीवा), कॉन्स्टॅन्टिनोपल (१६९०) आणि ॲबिसिनिया (१६६५ आणि पुन्हा १६७१). दिल्ली सरकारचे देखील अरेबिया आणि मध्य आशिया येथील अनेक लहानसहान राजेरजवाडे आणि बसऱ्याचे तुर्की सुभेदार यांजबरोबर स्नेहाचे संबंध होते.

जवळ जवळ सात वर्षांपेक्षाही कमी कालावधीत (१६६१–६७) औरंगजेबाने वकिलातींची भेट घेण्यात आणि वकिलाती पाठविण्यात २१ लाखांवर रुपये खर्च केले . त्याशिवाय इ . स. १६६८ मध्ये हिंदुस्थानमध्ये आश्रयासाठी आलेला काशघरचा भूतपूर्व राजा अबदुल्लाखान याला ११ लाख रुपये दिले ते वेगळेच. [औरंगजेबाची परदेशात हस्तक्षेप करण्याची वृत्ती आणि तेथे आपल्या वकिलाती पाठविण्याचे त्याने केलेले प्रयत्न या बद्दलची माहिती पुढीलप्रमाणे आहे. मध्य आशियातील राजसत्तांबरोबरचे त्याचे संबंध अधिक घनिष्ट होते . तो सिंहासनावर आल्यानंतर त्याच्याकडे पहिली वकिलात ही बाल्खचा सुलतान सुभानकुली याच्याकडून आली (जानेवारी आणि फेब्रुवारी १६६१). त्याच्याकडून बादशहाला उंची भेटी देण्यात आल्या . बादशहाने परत भेटी दाखल रुपये २६००० इतकी रक्कम दिली . त्याच वर्षी नोव्हेंबरमध्ये बुखाऱ्याच्या सुलतानाकडून पत्र घेऊन ख्वाजा अहमद हा वकील आला या वकिलातीवर बादशहाने १,२०,००० रु. खर्च केले. हे दोन्ही वकील हिंदुस्थानातच त्यांच्या दरिद्री राहणीमुळे मेले.

या वकिलातीची परतफेड औरंगजेबाने आपला वकील २ जुलै १६६४ रोजी मध्य आशियात पाठवून केली . बुखाऱ्याच्या सुलतानाला दीड लक्ष रुपये किमतीच्या आणि बाल्खच्या सुलतानाला एक लक्ष रुपये किमतीच्या भेटी देण्यात आल्या . १६६७ मध्ये पुन्हा या देशांकडून हिंदुस्थानात वकील आले. ही देवाणघेवाण औरंगजेबाच्या कारकिर्दीत सारखी चालू राहिली. एप्रिल १६६४ मध्ये काशघरच्या सुलतानाकडून मीर पुलाद नावाचा वकील आला. तो जूनमध्ये परतला . नोव्हेंबर १६६६ मध्ये हिंदुस्थानातून काशघर येथे वकील पाठविण्यात आला . यानंतर काशघरमधून तीन वकिलाती आल्याची नोंद आहे. आणखी दोन छोट्या देशांकडून आलेल्या वकिलाती म्हणजे खिवा आणि शहरनाव.

१६६८ मध्ये बुखाऱ्याचा सुलतान अब्दुल्लाखान याला त्याच्या मुलाने सिंहासनावरून काढले . त्याने हिंदुस्थानात पलायन केले . त्याची बडदास्त ठेवण्याबद्दल काश्मीर आणि पंजाबच्या सुभेदारांना औरंगजेबाने कळविले व त्याला दिल्लीला घेऊन येण्याचा काश्मीरच्या सुभेदाराला हुकूम दिला. १५ मार्चला अब्दुल्लाखान दिल्ली येथे येऊन पोहोचला. खुद्द बाहशहाने त्याचे स्वागत केले आणि एखाद्या राजासारखी त्याची बडदास्त ठेवली . सुलतान ८ महिने दिल्लीत होता. त्यानंतर तो मक्केला भेट देण्यासाठी निघाला . त्याच्यावर एकंदर दहा लक्ष रुपये खर्च करण्यात आले . १६७० मध्ये तो हिंदुस्थानात परतला आणि २० आक्टोबर १६७५ मध्ये दिल्ली येथे मरण पावला . (**ए. एन.**, १०६४ ६६ ; **एम. ए**., ७१, ७६, १०५, ११३, १४३; **स्टोरिया**, भाग २. १९०–१९३)

मध्य आशियातील काही विद्वान आणि व्यापारी यांच्याबरोबर औरंगजेब नियमित पत्रव्यवहार करी . ट्रान्स-ऑक्सिआना येथील ख्वाजा अब्दुलगफार याच्याबरोबर त्याने केलेल्या पत्रव्यवहारात त्याने आपल्या भावावर मिळविलेल्या विजयांचे आणि दक्षिणेतील पराक्रमांचे वर्णन केले आहे. सिंहासनावर आल्यानंतर त्याने अब्दुलगफार आणि इतर मंडळी यांना वेळोवेळी रोख रकमा पाठविल्या . (पत्रव्यवहारासाठी पाहा : **आदाब**, १३१ ब - १३५ ब; इतर हकिकतीसाठी **ए. एन**., ४६२, ६०५, ८४८, ८७६, १०३५). तुर्कस्तान हा देश हिंदुस्थानपासून फार दूर होता . त्या देशाची संस्कृतीही वेगळी होती . जून १६९० मध्ये त्या देशाची एकमेव वकिलात बादशहाकडे आली . या ठिकाणी नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे तुर्कस्तानच्या सुलतानाचा उल्लेख पत्रव्यवहारात कधीही खलिफा असा केला जात नसे. तर पूर्वेकडील रोमन साम्राज्याचा सुलतान या नावाने त्याचा उल्लेख होई (या वकिलातीसाठी पाहा **एम. ए**., ३३७). तुर्कस्तानच्या अरबस्तानातील प्रदेशावरील सुभेदारांबरोबर मात्र औरंगजेबाचे घनिष्ट संबंध होते. १६६१ मध्ये बसऱ्याचा सुभेदार हुसेनपाशा याने औरंगजेबाला अभिनंदनपर पत्र पाठविले . १६६९ मध्ये पाशावर त्याच्या बादशहाची गैरमर्जी झाली. बसरा सोडून तो प्रथम इराणमध्ये गेला. परंतु तेथे त्याचे फारसे स्वागत झाले नाही. त्यामुळे तो दिल्ली येथे आला. औरंगजेबाने त्याला ५००० ची मनसबदारी आणि इस्लामखान हा किताब दिला . हुसेनपाशानंतर बसऱ्याच्या सुभेदारीवर आलेला याहियापाशा हा देखील आपली सुभेदारी सोडून ऑगस्ट १६७१ मध्ये हिंदुस्थानात आला . (बसऱ्याच्या वकिलातीसाठी पाहा : **ए. एन**., ६०६, ६१४, ६३६; **स्टोरिया**, भाग २. ११५; **एम. ए**., ८५, ८७, ११०, १२१ : **एम. यू.**, भाग १, २४१, २४७)

अरबस्तानातील छोट्याछोट्या नायकांनी देखील औरंगजेबाबरोबर मैत्रीचे संबंध जोडले . त्यामध्ये हद्रमाउतचा सुभेदार , यमनचा सुभेदार, इमाम इस्माईल आणि मोकाहचा सुभेदार यांचा उल्लेख करावा लागेल.

अनुक्रमणिका

आफ्रिकेतील सत्तांबरोबर औरंगजेबाचे फारच थोडे संबंध होते. बारबरीच्या सय्यदाने १६६५ मध्ये औरंगजेबाला एक पत्र पाठविले. १६८३ च्या मे मध्ये बारबरीच्या सुलतानाचा भाऊ सय्यद अहमद हा हिंदुस्थानात आला . त्याला बादशहाने ५००० रुपये दिले . १६६५ च्या मार्च महिन्यात ॲबिसिनियाच्या बादशहाचा वकील सिद्दिकामिल हा एक पत्र घेऊन बादशहाकडे आला . या वकिलातीबद्दल बर्नियर आणि मनूची यांनी वाद घातला आहे. बर्नियरच्या मते ही वकिलात खरोखरीची असून त्यांना शिवाजीने सुरत येथे लुटले तर मनूचीच्या मते ही वकिलात तोतयांची होती . (या वकिलातीबरोबर एक पत्र असून त्यात त्यांनी आपल्या देशातील एक मशिद दुरुस्त करण्यासाठी औरंगजेबाकडे द्रव्याची याचना केली होती . हे पत्र खोटे आहे असा मनूची आरोप करतो . ही वकिलात खरी असावी असे म्हणण्यास जागा आहे . कारण १६७१ च्या फेब्रुवारी अथवा मार्च महिन्यात एक वकिलात औरंगजेबाकडे आली होती . साहजिकच या देशाचे हिंदुस्थानबरोबर राजकीय संबंध असल्याचे सिद्ध होते . (अधिक माहितीसाठी पाहा : **ए. एन**, ८८३, ८८६, १०३५; **एम. ए.**, ३५०, २२७, १०८; **बर्नियर**, १३३, १३४, १४४; **स्टोरिया**, भाग २. ११०, ११४.)]

(८) आग्र्याच्या किल्ल्यातील शहाजहानचे कैदेतील जीवन आणि त्याचे औरंगजेबाबरोबरील कलह

शहाजहानची सक्त कैद

जेव्हा शहाजहानने आपल्या विजयी मुलासाठी आग्रा किल्ल्याचे दरवाजे खोलले त्या क्षणापासून त्याच्या उर्वरित आयुष्यभर तो बंदी झाला . राजांच्या राजाला त्याच्या जीवनातील हा बदल खरोखरच कडू जहराप्रमाणे वाटला आणि त्यासाठी आपल्या मुलाबरोबर अनेक वेळा संघर्षाचे प्रसंग आल्यानंतर त्याने नाईलाज म्हणून ते जीवन पत्करले . त्याने दारा आणि शुजा यांना लिहिलेली पत्रे औरंगजेबाच्या माणसांनी मध्येच पकडली आणि ती गुप्तपणे आग्रा किल्ल्याच्या बाहेर घेऊन जाणाऱ्या खोजांना कडक शासन करण्यात आले. या अयशस्वी प्रयत्नांचा अखेर परिणाम असा झाला की शहाजहानच्या बंदी जीवनावरील बंधने अधिक कडक झाली . [८ जून १६५८ रोजी औरंगजेबाच्या वतीने राजपुत्र महमद सुलतान याने शहाजहानची भेट घेतली . असे म्हणतात की, शहाजहानने त्याला राज्य बळकाविण्याविषयी चेतावणी दिली , आणि त्याला सर्व पाठिंबा देण्याची तयारी दर्शविली . अशी चेतावणी जरी खरोखर दिली गेली असती तरी तिला बळी न पडण्याइतका सुज्ञपणा राजपुत्राने दाखविला , कारण त्याच्या हातात कसलीच सत्ता नव्हती . त्याचे काम फक्त निरोप्याचे होते. आग्रा येथील रक्षकांवर त्याचा ताबा नव्हता आणि औरंगजेबाच्या परवानगीवाचून त्याला शहाजहानची भेटही घेता येत नव्हती (**बर्नियर**, ६२; **आदाब**, १८८ अ आणि ब). याबाबत दुसरी एक दंतकथा अशी आहे की शहाजहानने औरंगजेबाला आपल्याकडे बोलावून जनानखान्यातील गुलाम स्त्रियांकडून त्याला ठार मारण्याचा कट रचला . हा कट नहारदिल नावाच्या गुलामाने उघडकीस आणला . औरंगजेबाचे सल्लागार शेखमीर आणि शायस्ताखान यांनी त्याला शहाजहानच्या भेटीपासून परावृत्त केले.

शुजाचा इतिहासकार महमद मासूम हा असे सांगतो की , शहाजहानने मुरादला पत्र लिहून औरंगजेब आणि महमद सुलतान यांचा खून करण्याचा आणि स्वतःची (शहाजहान) मुक्तता करून आपल्या नावे (शहाजहान) राज्य करण्याचा सल्ला दिला. हे पत्र मुरादने निष्काळजीपणे एका पुस्तकात ठेवले. ते ग्रंथपालाला मिळाले. त्याने ते औरंगजेबाकडे दिले . परिणामी औरंगजेबाने ताबडतोब मुरादला कैद केले . वरील गोष्टींवर जरी आपण विश्वास ठेवला नाही तरी शहाजहान हा दाराला पत्र लिहून त्याला आपण सर्व तऱ्हेची मदत देण्यास तयार आहोत असे कळवीत असे . ज्या खोजातर्फे ही पत्रे चोरून पाठविली जात ते औरंगजेबाच्या माणसाकडून पकडले जात , आणि त्यांना कडक शिक्षा केली जात असे . शहाजहानने सुटकेसाठी शेवटचा प्रयत्न केला तो म्हणजे शुजा हा पाटण्याहून आग्र्यावर चाल करून येत होता तेव्हा . शहाजहानने शुजाला आशीर्वादपर पत्र लिहिले आणि सर्व प्रजाजनांना त्याला मदत करण्याचे आवाहन केले . हिंदी भाषेमधून हे लिहिलेले पत्र शुजाला मिळाले . या पत्राने त्याला खाजवाच्या युद्धभूमीवर त्याच्या नाशाकडे खेचून नेले . (**मासूम**, ७९ अ ८१ अ ; **आदाब**, २६२ अ)] **शहाजहानचे सुटकेचे निष्फळ प्रयत्न :-** शहाजहानभोवती त्याच्या शत्रूंचे आता एक कडेच पूर्णपणे निर्माण करण्यात आले . शहाजहानच्या तोंडातून निघालेला प्रत्येक शब्दन् शब्द औरंगजेबाच्या गुप्तहेरांकडून ताबडतोब औरंगजेबाच्या कानावर घातला जाऊ लागला. लिहिण्याचे सामान देखील भूतपूर्व बादशहाकडे नेण्यावर बंदी घालण्यात आली.

आग्रा येथील जडजवाहिर आणि त्यासाठी औरंगजेबाने केलेले अकांडतांडव

वैभवाच्या उत्तुंग शिखरावर बसलेल्या त्या मोगल सम्राटाच्या पदच्युतीमधील जो अकलंक टाळता आला असता त्याला औरंगजेबाच्या कधीही न शमणाऱ्या हव्यासामुळे एक प्रकारचे अमांगल्य लागले . त्यामुळे शहाजहान बादशहाने आपल्या हयातीत अंगावर घातलेले किंवा आग्रा किल्ल्यात ठेवलेले शाही

जडजवाहिर, ह्यावर मालकी कोणाची याबाबत बाप आणि लेक यांमध्ये अनेक नामुष्कीचे झगडे झाले . आपण या जडजवाहिराचे कायदेशीर मालक आहोत आणि आपल्या मुलाने शुद्ध दडपेगिरी करून राज्याची मालमत्ता बळकाविली आहे , ही गोष्ट बंदिस्त शहाजहानच्या मनातून कधीही गेली नाही . बादशहाच्या या भूमिकेला औरंगजेबाने पुढीलप्रमाणे उत्तर दिले , "सर्व बादशाही मालमत्ता आणि खजिना ही समाजाच्या भल्यासाठी असतात कारण ते कोणताही कर देत नाहीत . राजाची परमेश्वराने त्या सर्वांच्या रक्षणासाठी खास निवड केलेली असते . त्या सर्वांचा लोकांच्या फायद्यासाठी उपयोग व्हावा म्हणून परमेश्वराने त्याला विश्वस्त नेमले असते " आणि सिंहासनाभिषिक्त सम्राट म्हणून आग्रा किल्ल्यातील सर्व शाही मालमता त्याच्या मालकीची आहे असा औरंगजेबाने दावा मांडला.

दारा ज्यावेळी पळून गेला त्यावेळी त्याच्या बायका आणि मुली यांच्या अंगावरचे जडजवाहिर सुमारे २७ लाख रुपये किमतीचे त्याने आग्रा किल्ल्यात ठेवले होते . औरंगजेबाने ते आपल्या ताब्यात देण्यात यावे अशी मागणी केली . शहाजहानने बराच काळपर्यंत या मागणीला विरोध केला . परंतु अखेर त्याला याबाबतीत शरणागती स्वीकारावी लागली . पुन्हा औरंगजेबाने मागणी केली की दाराच्या गायिका आपल्याकडे पाठविण्यात याव्या अशी (**आदाब**, २६३ ब). ८ जून १६५८ रोजी आग्रा किल्ल्याचा पाडाव झाल्यावर औरंगजेबाने किल्ल्यातील शाही कपडेलत्ते , लाकडी सामान , भांडीकुंडी, जडजवाहिर आणि खजिना यांना सिले लावली . सर्व मालमत्ता "ताबडतोब आणि अतिशय कसोशीने ताब्यात घेण्याचा त्याने हुकूम दिला".

औरंगजेब आणि शहाजहान यांच्यामधील द्वेषपूर्ण पत्रव्यवहार

महमद सुलतान निघून गेल्यानंतर किल्ल्यामधील सर्वाधिकारी मोतमद हा खोजा बनला आणि त्याने शहाजहानला अतिशय क्रौर्याने आणि निष्काळजीपूर्वक वागविण्यास सुरुवात केली . "पुष्कळदा शहाजहानला एकाद्या दुर्दैवी गुलामासारखे वागविले जात आहे हे त्याने बिनदिक्कत उघड्या डोळ्यांनी पाहिले." (पाहा : **स्टोरिआ** भाग २. ७७–७८).

शहाजहानच्या कैदेच्या पहिल्या वर्षात बापलेकांमध्ये उपहासगर्भ आणि निंदाव्यंजक असा पत्रव्यवहार झाला. दोघांमधील संघर्षात इस्लामचे पुरस्कर्ते आणि चांगल्या राज्यपद्धतीचे आपण उपासक आहोत आणि लोककल्याणासाठी आणि सुधारणा घडवून आणण्याच्या कामी परमेश्वराने पाठविलेले आपण एक नम्र प्रेषित आहो असा आव औरंगजेबाने आणला . (यासंबंधी फक्त ८ पत्रे उपलब्ध असून ती **आदाब**, २६० अ-२६४ अ मध्ये आहेत . त्यांपैकी ३ पत्रे जशीच्या तशी खाफीखानाने दिली असून (**के. के**. भाग २. १०१, १०६), **बर्नियर** (१६७– १६८) आणि **मनूची** (भाग २. १९–२०) त्यांपैकी काहींचा सारांश देतात .). त्याने आपल्या बापाची नालायकी आणि अन्यायी राजसत्ता यांवर कडाडून हल्ला चढविला आणि सदसद्विवेक बुद्धीचा सारा मक्ता आपल्याकडे घेऊन आणि धर्मबंधनांचे पालन करणारा जणू काही मी एकटाच आहे असा खोटा अविर्भाव धारण करून त्याने आपल्या वर्तनाचे समर्थन केले . शहाजहानने जेव्हा तुझे वर्तन सख्ख्या मुलाला न शोभणारे आणि एखाद्या बंडखोराला शोभण्यासारखे आहे असा आरोप केला तेव्हा त्याला त्याने पुढीलप्रमाणे उत्तर दिले : "जोपर्यंत तुमच्या हाती राज्याची सारी सूत्रे होती तोपर्यंत तुमच्या परवानगीशिवाय मी एकही गोष्ट केली नाही किंवा मला घालून दिलेल्या मर्यादेचे अतिक्रमण कधी केले नाही. तुम्ही आजारी असताना दाराने सर्व सत्ता बळकावली . हिंदुधर्माची उन्नती करण्यासाठी आणि इस्लामचा नाश करण्यासाठी तो कंबर कसून उभा ठाकला आणि तुम्हाला बाजूला सारून एखाद्या

बादशहाप्रमाणे तो वागू लागला . सारा कारभार ओंगळभोंगळ बनला . मी जो आग्र्यावर चालून आलो तो बंडखोरीच्या भावनेने नव्हे . परंतु दाराने बळजबरीने जी सत्ता बळकावली होती , इस्लामपासून त्याची जी पदच्युती झाली होती आणि साऱ्या साम्राज्यभर पाखंडी मतप्रणालीचा जो भयंकर उदोउदो सुरू झाला होता त्याचा निकाल लावण्याचाच माझा हेतू होता . या लोकानंतर परलोकात आपल्यासाठी काय वाढून ठेवले आहे या जाणिवेने आणि मला स्वतःला त्याची आवड होती म्हणून नव्हे तर तसे करणे निव्वळ क्रमप्राप्त झाल्यामुळेच मी स्वतःच्या मस्तकावर राजमुकुट ठेवून घेण्याचा धोक्याचा मार्ग अनिच्छेने पत्करला . माझा उद्देश फक्त साऱ्या साम्राज्यात शांतता स्थापन करणे आणि इस्लामची प्राणप्रतिष्ठा करणे एवढाच होता."

त्याने पुढे असेही सांगितले की "बादशहाचे स्थान आणि त्याची कर्तव्ये यात त्याच्या सामाजिक कर्तव्याचाही अंतर्भाव होतो – याबद्दलच्या आपल्या कल्पना फार उच्च आहेत . राजेपणाचा अर्थ साऱ्या राज्याचे रक्षण आणि रयतेचे पालन हा होय . राजेपण हे शरीराचे स्वास्थ्य संपादणे किंवा आपल्या वासनांचे शमन करणे यात नक्कीच सामावलेले नाही."

आपण ज्या कारणासाठी लढा दिला ती आपली भूमिका कशी तर्कशुद्ध आहे आणि परमेश्वराची आपल्यावर कशी कृपा आहे याचा पुरावा म्हणून औरंगजेब मोठ्या दिमाखाने परिस्थिती अगदी प्रतिकूल असताना आपण मिळविलेल्या विजयांकडे बोट दाखवी . मोठ्या दांभिकतेने त्याने शहाजहानला सांगितले की शहाण्या माणसाप्रमाणे त्याने परमेश्वरी इच्छेपुढे मान तुकविली पाहिजे आणि औरंगजेबाचा विजय ही त्याच्या जीवनातील यदृच्छेने घडून आलेली एकमेव चांगली घटना ही सत्यस्थिती स्वीकारली पाहिजे.

औरंगजेबाच्या या ढोंगीपणाबद्दल शहाजहानने उघडउघड तिटकारा दाखवून त्याला टोमणेवजा स्वरात असे सांगितले की "खराखुरा मुसलमान म्हणून तू आपला टेंभा मिरवतोस पण लोकांची मालमत्ता लुबाडणारा एक चोर एवढीच तुझी लायकी आहे ." आपल्या वर्तनाचे औरंगजेबाने आपण मोठे ध्येयवादीपणाचे आचरण करीत आहोत अशा थाटात समर्थन केले . तो बापाला लिहितो , "तुम्ही मला लिहिलेत की दुसऱ्याची मालमता बळकाविणे हे मुसलमान धर्मतत्त्वाच्या विरुद्ध आहे . पण तुम्ही एवढीच जाणीव ठेवा की शाही मालमत्ता आणि खजिना हा जनतेच्या बऱ्यासाठीच असतो . राज्य म्हणजे काही वंशपरंपरागत चालत आलेली खाजगी मालमत्ता नाही . बादशहा म्हणजे प्रजेचे भले व्हावे या हेतूने परमेश्वराने त्यांच्या द्रव्यसंभारासाठी नियुक्त केलेला रखवालदार आणि विश्वस्त आहे."

त्याहीपुढे जाऊन शहाजहानने त्या क्रूरकर्म्या औरंगजेबाला इशारा दिला की "तू मला जसे वागविले आहेस तसेच तुला तुझ्या मुलांकडून वागविले जाईल हे तू लक्षात ठेवून राहा " यावर औरंगजेबाने जे उत्तर दिले त्यात धर्मतत्त्वाप्रमाणे वर्तन करणाऱ्या एकाद्या प्रेषकाचा दंभ ओतप्रोत भरून राहिलेला होता . "तुम्ही म्हणता ते ठीक आहे पण परमेश्वरी इच्छेशिवाय जगातील कोणतीही गोष्ट घडून येत नाही . ज्या भविष्यवाणीचा तुम्ही उल्लेख करता ते माझ्या वाडवडिलांच्या बाबतीतही घडून आलेले आहे . मग परमेश्वराच्या मनात जे होणे आहे त्यापासून मीच कसा बरे सुटेन ? परमेश्वराकडून प्रत्येकाला जी परतफेड मिळते ती प्रत्येकाच्या हेतूनुसारच घडविलेली असते आणि माझे हेतू चांगले आहेत आणि म्हणून माझा पुरा विश्वास आहे की मला माझ्या मुलांकडून चांगल्या वागणुकीशिवाय दुसरे काहीच मिळणार नाही."

शहाजहानची भविष्यवाणी

अनुक्रमणिका

परंतु आपल्या गर्वोद्धत मुलापेक्षा शहाजहानने वर्तविलेली भविष्यवाणी अधिक खरी ठरली . औरंगजेबाचा काळ त्याचा चौथा मुलगा महमद अकबर याच्या रूपानेच उभा राहिला . जेव्हा त्या राजपुत्राने १६८१ साली बंड केले तेव्हा त्याने आपल्या बापाला एक अतिशय कडवट आणि टोमणेवजा पत्र लिहिले . ते पत्र बघितल्यावर औरंगजेबाने शहाजहानला जी उपरिनिर्दिष्ट पत्रे लिहिली त्यातील विस्मयजनक साम्य दृष्टोत्पत्तीस येते (पाहा : **आर. ए. एस्. एम् एस्**., ७१, **ए. एस्. बी. एम् एस्. एफ्**. ५६ आणि **जहिर-उल-इनशा**). त्यात अकबराने औरंगजेबाची त्याच्या राज्यकारभारातील अपयशाबद्दल नालस्ती केली आहे आणि त्याला असा सल्ला दिला आहे की, आपल्या बापाला पदच्युत करून आणि आपल्या दोन भावांचा खून करून त्याने जे पाप केलेले आहे त्याच्या क्षालनार्थ त्याने आपले म्हातारपण धर्मविषयक चिंतन करून घालवावे . अखेर अकबराने औरंगजेबाला असा सवाल केला आहे की मी मुलाला न शोभणारे वर्तन केले आहे असे म्हणण्यास तुम्हाला तरी कुठे तोंड आहे कारण तुम्ही देखील आपल्या बापाविरुद्ध बंड केले नाही काय?

शहाजहानची अखेरची वर्षे

शहाजहान आणि औरंगजेब यांच्यामधील पत्रव्यवहाराला दिवसेंदिवस अधिक कडवटपणाचे स्वरूप येऊ लागले. अखेर त्या वृद्ध बादशहाने नियतीपुढे मान तुकविली आणि रडून रडून मूल जसे झोपी जाते तसे त्याने तक्रार करण्याचे सोडून दिले (पाहा : **कम्बू**, १८ अ, २४ ब, २५ ब; **बर्नियर**, १६५; **स्टोरिया**, भाग २. ६४, ६७, ७७, ७८).

शहाजहानच्या खचून गेलेल्या हृदयावर तडाख्यामागून तडाखे बसत गेले. प्रथम दारा, शुको, नंतर मुरादबक्ष, त्याच्या पाठोपाठ सुलेमान शुको या सर्वांना औरंगजेबाने यमसदनी पाठविले . शुजा आणि त्याची सर्व मुलेबाळे यांना माघ लोकांच्या देशातील अनाकलनीय अशा भीषण संकटाच्या जबड्यात घालवून औरंगजेबाने त्यांना नाशाच्या खाईत लोटले. "परंतु इतकी संकटे कोसळली तरी देखील त्याने आपला धीर सोडला नाही की परमेश्वरावरची निष्ठा सोडून दिली नाही . अगदी अखेरच्या क्षणापर्यंत त्याचे हृदय हे सहनशीलता आणि स्थैर्य यांचा मेरूमणी बनून राहिले." (**कम्बू**, २४६)

धर्माने त्याच्या मनाला शांती दिली . कनोजचा सय्यद महमद हा त्याचा कायमचा सोबती बनला . ह्या सिद्ध पुरुषाने त्याची धर्मगुरू , आणि त्याच्या वतीने दानकर्ता म्हणून सेवा केली . "त्या भूतपूर्व बादशहाचा सारा वेळ परमेश्वराच्या आज्ञांचे पालन करण्याची शिकवणूक देण्यात , नमाज पढण्यात, धर्माने घालून दिलेल्या विधींचे निष्ठापूर्वक पालन करण्यात , कुराणाचे वाचन करण्यात किंवा भूतकाळात होऊन गेलेल्या साधुसंतांचे वा थोर व्यक्तींचे चरित्र ऐकण्यात विभागून गेला होता."

त्याच्या मनाचे सांत्वन करण्यासाठी वरील संतांइतकीच सोज्वळ पण वृत्तीने अधिक कोमल अशी सहचरी त्याला मिळाली आणि ती म्हणजे त्याची मुलगी जहानआरा . तिच्या प्रेमळ वागणुकीने त्याच्या इतर पुत्रांच्या क्रौर्यपूर्ण वर्तनाची त्याला झालेली जखम साफ बुजून गेली . राज्यकन्या जहानआरा ही मिया मिर या संताची शिष्या होती . तिने आग्रा किल्ल्यातील आपल्या बापाच्या जनानखान्यात जवळजवळ संन्याशिणीचे जीवन व्रत स्वीकारले आणि मातेच्या आणि भगिनीच्या ठिकाणी असणारा सेवाभाव एकवटून आपल्या वृद्ध आणि एकाकी पित्याची चाकरी केली. त्याच वेळी दारा आणि मुराद यांच्या आता मातृपितृहीन झालेल्या बालकांना तिने एकत्र जमवून आपल्या छत्राखाली त्यांना आसरा दिला आणि त्यांचे संगोपन तिने केले. याप्रमाणे पारमार्थिक संगतीत आपले जीवन व्यतीत करत असताना शहाजहानने या पृथ्वीच्या

पलीकडे असलेल्या पण वाईटाची छाया नसलेल्या प्रदेशात पाऊल टाकण्यासाठी स्वतःची तयारी केली . त्याला आता मृत्यूच्या भीषणतेचे भय वाटेनासे झाले . इतकेच काय पण त्याला भोगाव्या लागणाऱ्या यमयातनातून सुटकेचा एक मार्ग या दृष्टिकोनातून तो मृत्यूकडे पाहू लागला.

(९) शहाजहानचे अखेरचे आजारीपण आणि मृत्यू

ज्या यातनातून आपली सुटका व्हावी याची अत्यंत आतुरतेने परंतु शांत चिताने शहाजहान वाट पाहात होता तो क्षण जानेवारी १६६६ मध्ये येऊन ठेपला . त्या महिन्याच्या ७ तारखेला शहाजहानला तापाने पछाडले. तापाबरोबरच आणखी व्याधींचा उपद्रव त्याला सुरू झाला. त्याला आता ७४ वर्षे पूर्ण झाली होती. सिंहासनावर येण्याच्या अगोदर शहाजहानला अतिशय कष्टमय जीवनातून जावे लागले होते आणि आता थंडीच्या कडाक्याच्या मोसमातील जीवघेण्या गारव्याने त्याची शक्ती थिजून गेली.

सोमवार दि. २२ जानेवारीची सायंकाळ उलटता उलटता त्याची प्रकृती एकदम ढासळली आणि त्याचा अंतकाळ समीप आला . शहाजहानला आपला मृत्यू नजीक आला हे जेव्हा समजून चुकले तेव्हा परमेश्वराने त्याला जीवनात ज्या देणग्या दिल्या आणि त्याच्यावर जो कृपेचा वर्षाव केला त्याबद्दल त्याचे आभार मानले आणि जगन्नियंत्या परमेश्वराच्या इच्छेला मान तुकविण्याची आपली तयारी त्याने निदर्शनास आणली. अत्यंत धीरगंभीर अशा मनस्थितीत त्याने आपले दफन करण्यासंबंधीच्या सूचना दिल्या , त्याच्या हयात असलेल्या स्त्रियांचे, (अकबराबादी महल आणि फतेपुरी महल) त्याची ज्येष्ठ कन्या जहानआरा आणि जनानखान्यातील इतर स्त्रिया , ज्यांना शोक आवरता न आल्यामुळे ज्या त्याच्या बिछान्याभोवती रुदन करीत बसल्या होत्या त्यांचे सांत्वन केले आणि त्याच्या मृत्यूमुळे जगात उघड्यावर पडणाऱ्या जनान्यातील स्त्रिया आणि जहानआराची सावत्र बहीण पुरहूनर बानू ह्यांची काळजी घेण्याची कामगिरी जहानआरावर सोपविली. नंतर त्याने आपले मृत्युपत्र तयार केले. आपली कुटुंबीय मंडळी आणि नोकरचाकर यांचा निरोप घेतला. त्यांना आपल्या अखेरच्या भेटी आणि स्मृती राहावी म्हणून काही वस्तू दिल्या आणि कुराणाचे पठण केले जावे अशी आज्ञा दिली . सरते शेवटी कुराणातील वचने धीरगंभीर स्वरात उच्चारली जात असताना , जनान्यातील स्त्रिया दुःखाने व्याकुळ होऊन रडत असताना आणि नोकरचाकर हुंदके देऊन रुदन करीत असताना अखेरच्या क्षणापर्यंत शुद्धीवर असलेल्या शहाजहानने आपल्या प्रियतमा आणि त्याला सोडून गेलेली मुमताज महल हिच्या कबरीकडे एकटक दृष्टी लावली , मुसलमानी धर्मावरील श्रद्धेचा पुनरुच्चार केला आणि पुढीलप्रमाणे प्रार्थना म्हटली.

"हे परमेश्वरा, ह्या इहलोकातील आणि परलोकातील माझ्या स्थानावर कृपादृष्टी ठेव आणि मला यमयातनांपासून होणाऱ्या दुःखापासून वाचव."

यानंतर काही क्षणांनीच शहाजहानचा आत्मा त्याच्या नश्वर देहाला चिरशांती देण्यासाठी म्हणून त्याला सोडून गेला . त्यावेळी संध्याकाळचे ७ वाजून १५ मिनिटे झाली होती . (शहाजहानच्या शेवटच्या क्षणांचे वर्णन **कम्बू** (२५ ब –२६ अ) आणि **ए. एन**. (९२६, ९३१, ९३२) यामध्ये उत्कृष्ट आले आहे . त्याशिवाय पाहा **बर्नियर** (१९८); **स्टोरिया**, भाग २. १२५–१२६; **के. के.**, भाग २. १८८).

शहाजहानचे दफन

शहाजहानचा पार्थिव देह त्याचे जिथे देहावसान झाले त्या अष्टकोनी बुरुजावर होता (मुसम्मान बुरूज) आणि ताजमहालच्या अगदी समोर ज्याठिकाणी आपल्या प्रियतमेचा देह मातीत मिळून गेला तिथेच आपलेही समर्पण व्हावे अशी शहाजहानची इच्छा होती तिथेच तो मिसळून गेला.

किल्ल्यातील अधिकाऱ्यांनी बुरुजापासून निघालेल्या जिन्याच्या अगदी खालच्या पायरीशी असलेला दरवाजा फोडून काढला . हा दरवाजा शहाजहानच्या बंदीकाळात भिंत बांधून बुजवून टाकण्यात आला होता. या दरवाजातून शहाजहानची शवपेटिका नेण्यात आली.

नंतर एका मचव्यावर ती शवपेटिका टाकून यमुना ओलांडून ते ताजमहालापाशी पोहोचले आणि शहाजहानची प्रियतमा मुमताज महल हिचे जे अवशेष या भूतलावर राहिले होते त्याशेजारी त्याचे दफन करण्यात आले . (अधिक माहितीसाठी पाहा : **कम्बू**, २६ अ ; **ए. एन.**, ९३२–९३४; **अकीलखान**, १०८; **स्टोरिया**, भाग २. १२६).

शहाजहानच्या मृत्यूमुळे जनतेला झालेला शोक हा सर्वदूर होता आणि तिच्या दुःखात खोटेपणाचा लवलेशही नव्हता. त्याच्या अंगी वसत असलेल्या गुणांचा पुन्हा पुन्हा उच्चार केला गेला (**कम्बू**, २७ अ; **के. के.**, भाग २, १८७; **दिलकुशा**, ५१) आणि त्याच्या ठायी असलेले थोडेफार दोष हे विसरले गेले.

शहाजहानच्या मृत्यूनंतर जवळजवळ एक महिन्याने औरंगजेब हा आग्र्याला आला . त्याने जहानआराची भेट घेतली आणि तिच्याजवळ अतिशय सौजन्याचे वर्तन केले आणि तिच्यावर पूर्ण मर्जी दाखविली. शहाजहानच्या अखेरच्या दिवसांत तिने त्याच्या ज्या विनवण्या केल्या त्यामुळे शहाजहानचा औरंगजेबावर असलेला न्याय्य राग नाहीसा करण्यात तिला यश मिळाले होते . आपल्यावर औरंगजेबाने अन्याय केला आहे अशी जी अढी त्याच्या मनात बसली होती त्यामुळे औरंगजेबाला क्षमा करण्याचे त्याने अनेकवार नाकारले होते . परंतु अखेर आपण औरंगजेबाला त्याच्या अपराधाबद्दल क्षमा केली असल्याचे त्याने लिहिले.

औरंगजेबाने आपल्या बापाला जी कठोर वागणूक दिली त्यामुळे त्याच्या समकालिनांच्या नैतिक तत्त्वासंबंधीच्या कल्पनांना धक्का बसला एवढेच नव्हे तर त्या काळचे जे सामाजिक शिष्टाचार होते त्यांनाही त्यामुळे हादरा बसला. (पाहा : **एम्. यू.**, भाग १.१४; **स्टोरिया**, भाग २, ३. **मिरात-इ-अहमदी**, २१६).

●●●

अनुक्रमणिका

प्रकरण सातवे

सरहद्दीवरील युद्धे : आसाम आणि अफगाणिस्तान

(१) १६५८ च्या पूर्वकाळातील कुचबिहार आणि आसामबरोबरचे मोगलांचे संबंध

कुचबिहार आणि तेथील सत्ताधीश

सोळाव्या शतकाच्या सुरुवातीला मंगोल वंशातील एक उच्चभ्रू शिपाई विश्वासिंग (कारकीर्द १५१५ ते १५४०) याने एका राजवंशाची स्थापना केली. या राजाचे वंशज अजून कुचबिहारवर राज्य करतात. त्याने हिंदू धर्माचा आणि हिंदू संस्कृतीचा स्वीकार केला आणि आपला राज्यकारभार आणि सेनादल यांची उत्कृष्ट संघटना केली. त्याचा मोठा मुलगा आणि युवराज नर नारायण (१५४० ते १५८४) हा धार्मिक वृत्तीचा असून एकांतप्रिय होता. परंतु राजाच्या धाकट्या भावाचा मुलगा रघुदेव याने कामरूप अथवा पूर्व कूच प्रदेशावर आपली राजा म्हणून अधिष्ठापना करणे त्याला भाग पडले. हा प्रदेश संकोश आणि बार नदी या नद्यांच्या दुआबात आहे आणि याला मुसलमान इतिहासकार कचहाजोचा प्रांत असे नाव देतात. हा प्रांत म्हणजे पश्चिम आसामचे हल्लीचे गोपाळ परा आणि कामरूप जिल्हे मिळून झालेला होता. रघुदेवाचा मुलगा परीक्षित याने नर नारायणाचा आता गादीवर आलेला मुलगा लक्ष्मी नारायण याच्यावर हल्ला चढविला. लक्ष्मी नारायणाने बंगालच्या मोगल सुभेदाराची मदत मागितली. इ. स. १६१२ मध्ये मुसलमानी फौजांनी कचहाजो जिंकून सम्राज्याला जोडला. अशा रितीने साम्राज्याच्या सीमा नैर्ऋत्येकडे बारनदीपर्यंत पोहोचल्या आणि त्या नदीच्या पलीकडील मध्य आणि पूर्व आसामवर राज्य करणाऱ्या अहोम राजांबरोबर मोगल सरकारचे संबंध आले (पाहा **चौधरीज कूच बिहार स्टेट** (१९०३), २२०. २३५; **गेटस् हिस्टरी ऑफ आसाम**, ४२—६५, ९५, ९८; **बुरांजी**, भाग ८. ३३- ४२).

अहोम आणि त्यांचे स्वभावविशेष

अहोम हे शान जातीची एक शाखा होते आणि उत्तर ब्रम्हदेशाच्या उत्तर आणि पूर्वेकडे पसरलेल्या डोंगराळ भागांत त्यांचे वसतिस्थान होते. तेराव्या शतकात त्यांच्या पॉग या प्राचीन राजघराण्यातील एका राजपुत्राने ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यातील आग्नेयेकडच्या कोपऱ्यात स्वतंत्र राज्य स्थापले. नंतर त्याने पश्चिमेच्या रोखाने आपला मोर्चा वळविला आणि आपल्या आगेकूचीत अनेक जमातींना जिंकून घेतले. अहोमांची जमात कणखर असून ते दानवपूजक होते. ते गोमांस आणि पक्ष्यांचे मांस खात आणि धुंदी आणणाऱ्या मद्याचे सेवन करीत. वर्मी जमातीच्या अंगीभूत असलेली संरक्षक मोर्चे बांधण्याची आणि बाम्बूंचे पूल तयार करण्याची अभिजात कला त्यांनी आत्मसात केली होती. ते जहाजे चालविण्यात वाकबगार होते आणि रात्रीचे हल्ले चढविण्यात त्यांचा हातखंडा होता. अनेक सरदारमंडळींच्या नेतृत्वाखाली सरंजामी पद्धतिनुसार त्यांच्या जमातीचा राज्यकारभार चाले. या सरदारांना गोहैन, बारुआ आणि फुकन अशी नावे होती. वेठकामगारांच्या मदतीने सरदारमंडळी आपल्या जमिनीची मशागत करीत. या प्रदेशातील वयात आलेले सर्व पुरुषप्रजाजन हे लष्करी नोकरी करण्याला पात्र समजले जात. त्यांच्या फौजेत फक्त पायदळी सैनिकांचाच भरणा असे आणि गजदल त्यांच्या पायदळी सेनेला मजबुती आणीत असे.

राजा हा जमातीचा प्रमुख पुढारी असे. जमातीमधील लोक एखाद्या दैवताप्रमाणे त्याला मानीत

आणि जमातीची रक्षणकर्ती देवता सोमदेव हिचा तो पालक आहे असे ते समजत . अहोम लोकांची शिक्षेची पद्धती अतिशय क्रूर होती. एखाद्या क्षुल्लक अपराधासाठी देखील पुरुषांना हालहाल करून ठार मारले जाई. (अधिक माहितीसाठी पाहा. **गेट**, ५६, ५८, ६७, १०१, ११८, १२०, १३७, १४० २३०-२३९; **पादिशाहनामा** भाग २· ६८; **फथिया-इ इब्रिया**, ५१-६९)

आसाममधील त्यांच्या वास्तव्याचा परिणाम असा झाला की हिंदू संस्कृती आणि हिंदू धर्म यांच्या प्रभुत्वामुळे त्यांच्या जीवनात बदल होऊ लागला . कच जमातीच्या राणीच्या लवाजम्याबरोबर हिंदू भिक्षुक आणि कलाकार ह्यांनी आसामात प्रवेश केला . बंगालच्या पठाण सुलतानाबरोबर झालेल्या युद्धात विजय मिळाल्यामुळे अहोम लोक दारूगोळ्याचा वापर करण्यास शिकले . त्याचबरोबर अनेक बंगाली युद्ध कैद्यांचे (बव्हंशी मुसलमान) त्यांच्या देशांत वसन झाले. त्याचबरोबर शंकरदेव आणि इतर संतमंडळी यांनी वैष्णव धर्माची शिकवण दिली आणि अहोमांच्या देशात वैष्णव धर्माची डोळ्यांत भरण्यासारखी प्रगती झाली.

अहोम आणि मोगल यांचा संघर्ष

लोकसंख्येचे विभिन्नत्व ही अहोम राज्याची एक लंगडी बाजू होती . त्या राज्याची प्रमुख जमात म्हणजे अहोम ही होय . समाजाच्या मधल्या थरात मुख्यत्वेकरून आसामी लोकांचा भरणा होता . हे लोक सपाटीवर राहणारे असून त्यांचे बंगालशी निगडित संबंध होते . शारीरिक कणखरपणा, सहनशक्ती आणि लष्करी युयुत्सुपणा यांचा त्यांच्यामध्ये अभाव होता . समाजाच्या खालच्या थरात गुलामांची मोठी संख्या होती. यांपैकी बरेचसे मंगोल वंशातील गुलाम होते . परंतु त्यामध्ये बहुसंख्य म्हणजे युद्धामध्ये पकडलेले बंगाली युद्धबंदी होते. समाजाच्या खालच्या थरातला हा वर्ग अहोमांच्या राज्यात वास्तव्य करण्याला राजी नसलेला असा होता. (**फथिया**., ६४, ४४, ४८, ४९).

सतराव्या शतकाच्या सुरुवातीला मोगलांनी १६१२ मध्ये कचहाजो आपल्या राज्याला जोडल्यानंतर त्यांचे अहोमांशी बराच काळापर्यंत युद्ध चाललेले होते . कारण पदच्युत झालेल्या घराण्यातील एका राजपुत्राला त्यांनी आसरा दिला होता. अखेर १६३८ मध्ये दोन्ही राज्यांत तह झाला. त्यानुसार ब्रम्हपुत्रेच्या खोऱ्यात बारनदीच्या पश्चिमेकडील प्रदेश आणि ब्रह्मपुत्रेच्या दक्षिणेकडील असुरार अलीच्या पश्चिमेस असलेला मुलूख मुसलमानांकडे कायमचा जोडला जावा असे ठरले. हा तह २० वर्षेपर्यंत टिकला.

(२) अहोम कामरूप जिंकून घेतात, १६५८

परंतु इ. स. १६५७ मध्ये जेव्हा सिंहासनावर आपला अधिकार सांगण्यासाठी म्हणून शुजाने बहुतेक सर्व फौजेसह बंगालमधून प्रयाण केले तेव्हा कुचबिहारचा राजा प्राण नारायण याने बंगाल प्रांताचे संरक्षण करण्यास आता कोणीही नाही अशा परिस्थितीचा फायदा घेण्याचे ठरविले . त्याने आपला वजीर भावनाथ याला मोगलांच्या प्रदेशांत (हाजो) पळून गेलेल्या त्याच्या एका बंडखोर मांडलिकाला पकडण्यासाठी सैन्य देऊन रवाना केले . त्या सुमारास पश्चिमेच्या प्रदेशातील अहोम सुभेदार मोगल कामरूपमध्ये चाल करून जाण्याची तयारी करण्यात गुंतला होता . त्यावेळी गौहत्तीचा सुभेदार मिर लुतफुल्ला शिरानी हा होता . आपल्यावर दोन्ही बाजूंकडून आता हल्ला होणार या भीतीने आणि बंगालमधून मदत येणे अशक्य कोटीतले आहे या जाणिवेने तो जहाजात बसून डाक्क्याकडे पळून गेला . कोणत्याही प्रतिकाराशिवाय आसाम्यांनी कामरूपची राजधानी गौहत्ती जिंकून घेतली आणि राजधानीतील सर्व स्थावर जंगम मालमत्तेची लुटालूट

केली.

ही घटना १६५८ च्या सुरुवातीस घडली . परंतु जून १६६० मध्ये मोगली अंतर्गत यादवी अखेर संपुष्टात आली. मिर जुम्ला याची बंगालचा सुभेदार म्हणून नेमणूक झाली . त्याला "बंगालमधील आणि विशेषतः आसाम आणि माघ (आराकान) मधील गुन्हेगार जमीनदारांचा मोड करण्याचा " हुकूम देण्यात आला. [औरंगजेबाला मिळालेले विजय आणि डाक्का येथील लष्करी आणि नाविक सिद्धता पाहिल्यानंतर कुचबिहार आणि आसामच्या राजाने आपले वकील औरंगजेबाकडे पाठविले , आणि जिंकून घेतलेला प्रदेश परत देण्याची सिद्धता दाखविली . त्याप्रमाणे अहोमांच्यापासून कामरूपचा ताबा घेण्यासाठी रशिदखान याला पाठविण्यात आले. परंतु प्राण नारायण याने केलेल्या विश्वासघाताला शिक्षा करणे जरूर आहे असे औरंगजेबाला वाटले. म्हणून राजा सुजनसिंग याच्या हाताखाली कुचबिहार जिंकून तेथील राजाला शिक्षा करण्यासाठी सैन्य पाठविण्यात आले.

रशीदखान याने रंगमतीपर्यंत चाल केली , तर सुजनसिंग हा कुचबिहारचे प्रवेशद्वार एक दुआर येथे येऊन थांबला . शत्रूचे संख्याबल आपल्यापेक्षा अधिक आहे म्हणून दोघांनी कुमकेची मागणी केली . त्यानंतर मीर जुम्ला याने स्वतः युद्धासाठी जाण्याचे ठरविले आणि त्यासाठी तयारी सुरू केली. (**ईश्वरदास**, ५० अ याने औरंगजेबाचे याबाबत मिर जुम्ला याला गेलेले पत्र उद्धृत केले आहे . वरील घटनेबाबतच्या अधिक माहितीसाठी पाहा : **फथिया**., ८, ९, २५, ४०).]

(३) मिर जुम्ला कुचबिहार आणि आसाम जिंकून घेतो

१ नोव्हेंबर १६६१ रोजी मिर जुम्ला याने १२००० घोडेस्वार आणि ३०००० पायदळ एवढ्या फौजेनिशी डाक्क्याहून कूच केले . त्याच्याबरोबर युद्धनौकांचा प्रचंड काफिला होता (यांत सर्व प्रकारची ३२३ अशी जहाजे होती). त्यामध्ये सर्वशक्तिमान अशी घुरब किंवा तरता तोफखाना या प्रकारची जहाजे होती. या जहाजांना कोसास नावाची ४ गलबते ओढून नेत . प्रत्येक घुरवावर १४ तोफा आणि ६० नावाडी असत.

मिर जुम्ला याने एका कठीण आणि अपरिचित अशा मार्गाने कुचबिहारमध्ये प्रवेश केला. ६ दिवसांत मोगल सैन्य राजधानीला जाऊन पोहोचले (१९ डिसेंबर). कुचबिहारचा राजा आणि तेथील लोक हे भीतीने राजधानीचा त्याग करून गेले होते . राजधानीचे नाव बदलण्यात येऊन ते आलमगीर नगर असे ठेवण्यात आले. तेथील मुख्य देवालय पाडण्यात येऊन त्याठिकाणी मशिद बांधण्यात आली आणि कुचबिहारचे सर्व राज्य मोगल साम्राज्याला जोडण्यात आले. (पाहा **फथिया**., १०, १८; **फॉर आसाम वॉर**, **स्टोरीया**, भाग २. ९८, १०२; **बर्नियर**, १७. १७३; **रियाझ-उस-सलातीन**).

१६ दिवसांच्या मुक्कामानंतर मिर जुम्लाने कुचबिहार सोडले (४ जानेवारी १६६२) आणि आसामवर स्वारी केली. "त्या प्रदेशातील अनेक जंगले आणि असंख्य नाले यामुळे दिवसाकाठी ४ /५ मैलांपेक्षा जास्त प्रगती होत नसे". त्याच्या माणसांना दुर्दमनीय असे कष्ट सहन करावे लागले. कॉलऱ्याच्या साथीने केलेल्या संहारामुळे दुबळ्या झालेल्या अहोमांच्या सैन्याने केलेला प्रतिकार लंगडा पडला. प्रत्येक वेळी त्यांना मोगल हल्लेखोरांपुढे एक माघार तरी घ्यावी लागली अथवा त्यांचा संहार करण्यात येऊन त्यांना पराभवाची नामुष्की पत्करावी लागली . विजय मिळवित मुसलमानांनी ब्रह्मपुत्रेपर्यंत प्रगती केली आणि वाटेत उभारलेले अडथळे, मोर्चे आणि बांबूच्या काट्यांनी भरलेले खंदक ओलांडून ते पुढे गेले (पाहा **फथिया**., १८, ४३; **बुरांजी**, भाग ८, ८२–९०; **गेट**, २७, १३१; **ग्लेनिअस**, १३४, १६१). एकापाठोपाठ एक किल्ले त्यांनी ताब्यात घेतले . मोनस नदीच्या तोंडावरील जोगीगुफा (२० जानेवारी), गौहत्ती, वार नदीच्या तोंडावरील श्रीघाट (५ फेब्रुवारी), पांडू, बेलतला, कल्लंग नदीच्या तोंडावरील काजली , भारली नदीच्या तोंडावरील समधरा , त्याच्या समोरच ब्रम्हपुत्रेच्या दक्षिण किनाऱ्यावरील सिमलागड (२५ फेब्रुवारी)

याप्रमाणे किल्ले जिंकून घेण्यात आले. ३ मार्चच्या रात्री अहोमांच्या आरमाराने मोगली काफिल्याबरोबर झुंज देण्याचा प्रयत्न केला. परंतु मिर जुम्लाने अहोमांच्या नाविक सामर्थ्याचा धुव्वा उडविला आणि त्यांची ३०० जहाजे हस्तगत केली.

मोगल हल्लेखोर १७ मार्चला गरगाव येथे पोहोचले . तेथला राजा जयध्वज याने आपली राजधानी आणि सगळी संपत्ती टाकून देऊन पळ काढला होता . आसाममध्ये मोगलांना अगणित लूट मिळाली ती अशी– ८० हत्ती, ३ लाख रुपये रोकड , ६७५ तोफा, १३४५ जंबुरख, १२०० रामचंगीस, ६७५० तोड्याच्या बंदुका, ३४० मण बंदुकीची दारू, १००० वर जहाजे आणि १७३ धान्याची कोठारे . यांपैकी प्रत्येक कोठारात १० पासून १००० मणापर्यंत तांदूळ साठविलेला होता . (पाहा **फथिया**., ४३, ४५, ४७, ४८,४९, ५०, ६६–६९; **गेट**, १३२).

यानंतर मिर जुम्ला याने मुक्काम करण्याची आणि सुरू होणाऱ्या पावसाळ्यामध्ये जिंकून घेतलेल्या प्रदेशांवर आपला ताबा ठेवण्यासाठी योग्य ती तजवीज केली. राजधानीजवळ असलेल्या नदीचे पात्र सखल असल्यामुळे मोगल आरमाराला शहरापर्यंत नावा हाकारता आल्या नाहीत . त्यामुळे राजधानीपासून १८ मैलांवर वायव्येला लखाऊ येथे त्यांना नांगर टाकावे लागले . मिर जुम्ला याने आपल्या सैन्याचा तळ मथुरापूर या उंचवट्यावर वसलेल्या आणि गरगावच्या आग्नेयेस ७ मैलांवर असलेल्या खेड्याच्या मुक्कामावर केला. अहोमांच्या राजधानीचा ताबा सर्व मोगली सैन्य , हत्ती, सामानसुमान आणि मालमत्ता यांसह मीर मुर्तजाकडे देण्यात आला आणि त्याच्या दिमतीला एक सुसज्ज सेनाविभाग देण्यात आला . त्याशिवाय मोगलांनी अनेक वरकड ठाणी स्थापन केली.

शत्रूचे सैन्य पुढीलप्रमाणे पांगले गेले . गरगावच्या दक्षिणेस असलेल्या सर्व डोंगरांचा ताबा वार गौहैन याने घेतला. इतर सर्व सरदारांनी आपल्या अनुचरांना घेऊन ब्रह्मपुत्रेच्या पुढे घुसलेला प्रवाह आणि दिहिंग नदी यामुळे तयार झालेल्या अत्यंत विस्तृत अशा माजुली बेटावर वास्तव्य केले . अहोमांच्या राजाने त्याच्या राज्याच्या अगदी पूर्वेकडे असलेल्या नामरूप प्रदेशाकडे पलायन केले . (अधिक माहितीसाठी पाहा : **फथिया**., ६९, ७४; **गेट**, १३२; **बुरांजी**, भाग ८. ९१-९२, १३४).

(४) अहोमांबरोबर सातत्याने चाललेले युद्ध; पावसाळ्यात मोगल एकाकी पडतात

परंतु सुरुवातीपासूनच मोगलांच्या ठाण्यांना स्वास्थ्य असे कधी लाभले नाही . अहोमांनी चढाईचे धोरण स्वीकारले आणि मोगलांच्या ठाण्यावर रात्रीचे हल्ले करण्यास सुरुवात केली. गरगाववर देखील हल्ला झाला परंतु अहोमांचे प्रयत्न फसले . मेच्या सुरुवातीला मुसळधार पावसाला सुरुवात झाली आणि नद्या दुथडी भरून वाहू लागल्या , खुष्कीच्या मार्गाने फौजेची वाहतूक करणे कठीण झाले आणि त्यामुळे मोगलांची सर्व ठाणी मुख्य तळापासून तोडली गेली . प्रत्यक्षातच म्हणावयाचे तर सर्व पावसाळाभर म्हणजे मेच्या सुरुवातीपासूनच तो ऑक्टोबरच्या अखेरपर्यंत मोगलांच्या आसाममधील फौजेची स्थिती वेढा घातल्यासारखी झाली होती (**फथिया**., ८९). मोगलांचे प्रत्येक ठाणे जणू काही पाण्याने वेढलेल्या बेटासारखे झाले . लखाऊ येथे असलेल्या मोगलांच्या आरमारी दलाकडूनही मदत येऊ शकली नाही . कारण मोठ्या बोटी वाहून नेण्याइतके गरगावच्या नदीचे पात्र खोल नव्हते आणि जोपर्यंत नदीच्या किनाऱ्यावरील अहोमांचे मोर्चे उध्वस्त करण्यात आलेले नव्हते तोपर्यंत लहानलहान जहाजांना सुरक्षितपणे वाहतूक करणे शक्य नव्हते.

अनुक्रमणिका

गरगाववर हल्ला

दाणागोट्याच्या अभावी घोडदळातील घोडे आणि मालवाहू जनावरे हजारोंच्या संख्येने मेली . कोणत्याही प्रकारचा पुरवठा , अगदी साधी बातमीदेखील बाहेरच्या जगातून येऊ शकत नव्हती . १० मेच्या सुमारास गजपूरचे मोगल ठाणे पडले आणि अशा तऱ्हेने अहोमांनी मोगल फौज आणि त्यांचे आरमार यांमधील दळणवळण तोडून टाकले . गरगावला देखील शत्रूने आपली फौज जमविली आणि आपल्यावर केव्हा हल्ला होईल या भीतीने सारखे धसक्यात ठेवले . मीर जुम्ला याने त्यामुळे आपली सर्व ठाणी खाली केली. अहोमांच्या राजाने लखाऊच्या पूर्वेकडील सर्व मुलूख जिंकून घेतला . मोगलांच्या ताब्यात फक्त गरगाव आणि मथुरापूर ही ठाणी राहिली.

यानंतर अहोमांनी केलेल्या प्रतिहल्ल्यांचा जोर वाढला . दररोज मोगल आणि अहोम यांच्या फौजांमध्ये जे हल्ले प्रतिहल्ले होऊ लागले त्यांची मोजदाद करणे कठीण आहे . परंतु युद्धकला आत्मसात केलेल्या दिल्लीच्या सेनानायकांनी सतत जागरूक राहून आणि शत्रूचा हल्ला परतविण्याची सदा तयारी ठेवून अहोमांचा प्रतिकार केला . मग त्यात त्यांनी कडक उन्हामुळे अंगोपांगावर येणाऱ्या फोडांची , पाण्यात ओलेचिंब होण्याची अथवा चिखलाने माखून जाण्याची यत्किंचितही पर्वा केली नाही.

याप्रमाणे सातत्याने दररोज हल्ले करून आणि हल्ल्यांची हूल उठवून मोगलांना सतावल्यानंतर ८ जुलैच्या रात्री अहोमांनी मोठ्या संख्येने गरगाववर हल्ला चढविला . राजवाड्याच्या आवाराच्या उत्तरेच्या बाजूकडे असलेले बांबूंचे कुंपण त्यांनी उध्वस्त केले , तिथे पहाऱ्यावर असलेल्या बक्सारी बंदुकची रखवालदारांचा धुव्वा उडविला आणि अर्ध्या आवाराचा ताबा घेतला . हे अर्धे आवार म्हणजे गरगावचा बालेकिल्लाच होता. परंतु अखेर मोगल सैन्यातील प्रत्येक शिपायाने आपल्या पराक्रमाची शर्थ केली आणि किल्ल्याचा पुन्हा पूर्णपणे ताबा मिळविला. अशा तऱ्हेने धोक्याची रात्र कशीबशी पार पडली . परंतु अहोमांनी आपला प्रचंड हल्ला १२ जुलै रोजी चढविला . त्या दिवशी अहोमांनी आपल्या सर्व सैन्याची ४ विभागांत विभागणी करून एकाच वेळेला चारी बाजूंनी हल्ले चढविले . परंतु ते सर्व हल्ले अयशस्वी ठरले . यानंतर शत्रूला आवाराचा छेद करून पुन्हा कधीही चढाई करता आली नाही.

मोगल छावणीत रोगराई आणि दुष्काळ

ऑगस्ट महिन्यात मथुरापूर येथील मोगल छावणीत भयानक साथींनी धुमाकूळ घातला. ताप आणि रक्तस्राव यांनी दररोज शेकडो माणसे मरू लागली . दिलेरखानाच्या तुकडीतील १५०० सैनिकांपैकी फक्त ४५० लोक राहिले . साऱ्या आसाम प्रांतभर ही लागण लागली आणि त्यावर्षी या रोगराईमुळे आसामात २,३०,००० माणसे मृत्युमुखी पडली . मोगलांच्या छावणीत आजारग्रस्तांना चालू शकेल असे धान्य किंवा सुखसोयी याची वानवा पडली ; सर्वांच्यावर हलक्या प्रतीच्या तांदुळावर गुजराण करण्याची पाळी आली . गहू, डाळी, तूप, साखर आणि अफू किंवा तंबाखू ह्या वस्तू नाहीशाच झाल्या आणि थोड्या प्रमाणात मिळाल्याच तर त्यांची भरमसाट किंमत द्यावी लागे . तंबाखूच्या एका गुडाखूची किंमत ३ रुपये झाली . १ तोळा अफूला एक सोन्याची मोहोर द्यावी लागे . एक शेर मुगाला १० रुपये पडू लागले आणि १ शेर मिठाची किंमत देखील शेवटच्या किंमतीएवढीच होती . हिंदुस्तानी आणि तुर्की शिपायांची गव्हाच्या पोळ्यावाचून दैना होऊ लागली. तांदूळ खाल्यामुळे अनेक घोडे मृत्यूमुखी पडले. [या मोहिमेची सविस्तर हकीकत पुढे दिलेली आहे . मे

महिन्यात शत्रूने देवळगाववर हल्ला केला . १० तारखेला गजपूरचा पाडाव झाला . शत्रूने मोगल सैन्य आणि आरमार यांमधील दळणवळण तोडून टाकले. मिर जुम्ला याने सरअंदाजखान आणि महमद मुराद यांना गजपूर घेण्यासाठी काही लढाऊ जहाजे देऊन पाठविले . या दोघांचे भांडण होऊन सैन्य परतले . परंतु आरमाराने पुढे चाल केली . अहोमांनी या आरमारावर हल्ला केला आणि मोगलांचे खूप नुकसान केले . या यशामुळे अहोमांना जोर चढला आणि त्यांनी देवपाणीवर हल्ला केला . गढगाव भोवतीही शत्रू मोठ्या संख्येने जमा झाले . दरम्यान बातमी आली की शत्रूने कूचबिहार जिंकून घेतले आहे . मे महिन्याच्या अखेरीला मिर जुम्ला याने आरमाराबरोबर संपर्क साधण्यासाठी फरहादखानाला पाठविले . वाटेत शत्रूचे मोर्चे उद्ध्वस्त करण्याचा, गजपूर जिंकून घेण्याचा आणि लखाऊहून कुमक आणण्याचा हुकूम त्याला देण्यात आला.

ही कामगिरी अतिशय कठीण होती. मुख्य अडचण म्हणजे आरमारी बोटींचा अभाव ही होय . २७ मे रोजी फरहादखानाने गरगाव सोडले आणि तो चिखलातून वाट काढीत टिओक येथे पोहचला . त्याची पुढील प्रगती पुरामुळे खुंटली . त्याने तिरमोहानी येथे परतण्याचा प्रयत्न केला . परंतु त्याची वाट आता अहोमांनी अडविली आणि त्याला जवळ जवळ कोंडले . त्याच्या सुटकेसाठी महमदमुनिमबेग याला पाठविण्यात आले . परंतु तोही पुरामुळे अडकून पडला . मोगल छावणीत निराशेचे वातावरण पसरले . फरहादखानाची आशा सोडून देण्यात आली . परंतु फरहादखानाने दाखविलेला चिवटपणा आणि लष्करी कौशल्य यामुळे त्याने वेळ निभावून नेली . त्याने सात दिवस आपल्या सैन्यातील बैल आणि घोडे यांचे मांस खाऊन दिवस काढले आणि एक दिवस अहोमांची काही गलबते ताब्यात घेऊन ओढा पार केला . निर्धास्त असलेल्या अहोमांवर त्याने हल्ला चढवून त्यांचा पूर्ण पराजय केला आणि तो तिरमोहानी येथे सुरक्षित परतला.

दरम्यान अहोमांचा जोर वाढला . मोगलांना आपली ठाणी ताब्यात ठेवणे अशक्य झाले . फक्त गरगाव आणि मथुरापूर मोगलांच्या ताब्यात राहिले. आपल्याला कधीतरी हिंदुस्थानात जावयाला मिळेल ही आशा मोगल सैन्याने सोडली . या सुमारास अहोमांचा राजा नामरूपमधून बाहेर पडला, आणि सोलगुरी येथे त्याने आपले ठाणे दिले . त्याने बदुलीफूकन याला आपला मुख्य वजीर आणि सेनापती नेमले व मोगलांचा नाश करण्याचा त्याला हुकूम दिला . दरम्यान दिलेरखानाने अहोमांचा पराभव केला . त्यामुळे फुकनच्या मथुरापूरवरील हल्ल्यास पायबंद बसला . दरम्यान गरगावकर हल्ला करण्याचा सैरिंगच्या राजाचा बेत होता तो सुजनसिंग याने हाणून पाडला . मोगल सैन्याने ऊन -पाणी किंवा तहानभूक यांची पर्वा न करता शत्रूच्या दररोज होणाऱ्या हल्ल्यांना तोंड दिले . मथुरापूर घेण्यात अपयश आल्यामुळे त्याने आता गरगाववर दररोज रात्री हल्ले करण्यास सुरुवात केली. परंतु मिर जुम्ला याने १४ जून रोजी फरहादखानाला तेथे पाठवून शहराची संरक्षणव्यवस्था मजबूत केली , आणि शत्रूला शहराच्या आसमंतातून हुसकण्याचा प्रयत्न केला . अखेर शत्रूने ८ जुलैच्या रात्री गरगाववर हल्ला चढविला . ते उत्तरेच्या बाजूने घुसले आणि त्यांनी गरगावच्या किल्ल्याचा ताबा घेतला . रात्रीच्या काळोखात मोगलांना शत्रू कोण व मित्र कोण हे कळेना . याच वेळी अहोमांनी एका वाड्याला आग लावून दिली. आगीच्या प्रकाशात मोगलांनी शत्रूवर हल्ला केला आणि जिद्दीने लढून किल्ल्याचा ताबा घेतला. या युद्धात फरहादखान जखमी झाला.

यानंतर गरगावभोवती मातीची भिंत बांधण्यात आली . अहोमांनी आपले रात्रीचे हल्ले चालूच ठेवले , आणि सर्वांत मोठा हल्ला १२ जुलै रोजी चढविला . अहोमांच्या चार तुकड्यांनी चारी बाजूंनी एका वेळेस हल्ला चढविला . परंतु त्यात त्यांना अपयश आले . जुलैच्या मध्यापासून मोगलांनी प्रतिहल्ले चढविण्यास सुरुवात केली आणि शत्रूला उधळून लावले . दरम्यान बातमी आली की , लखाऊ येथील मोगल आरमाराने बंगालबरोबर दळणवळण चालू ठेवण्यात यश मिळविले आहे . परंतु आसाममध्ये खरा शत्रू म्हणजे मनुष्य नव्हे . ऑगस्टमध्ये मथुरापूर येथे रोगाची साथ उसळली. दररोज मोगल छावणीतील शेकडो माणसे या साथीला बळी पडू लागली . औषधाचा काही उपयोग होईना , आणि जे मरत त्यांचे दफन करणेही शक्य होईना . मोगल छावणीत व्यवस्थित अन्न मिळेना . मिळत होता तो जाडाभरडा तांदूळ . गव्हाच्या पोळीच्या अभावी हिंदुस्थानी आणि तुर्की शिपाई अशक्त होऊन गेले . तांदूळ खाल्ल्यामुळे अनेक घोडे मरण पावले . पुष्कळ दिवस छावणीतील शिपाई दुर्बल झालेल्या वाहतुकीच्या बैलांच्या मासांवर जगून राहिले. बहुतेक शिपायांना अफूचे व्यसन होते. तिच्याअभावी त्यांना असह्य यातना सोसाव्या लागल्या.]

सरतेशेवटी मथुरापूरमधील जिणे अतिशय दुःसह झाले आणि १७ ऑगस्ट रोजी मोगल सैन्य गरगाव येथे परतले. दळणवळणाच्या साधनांच्या अभावी अनेक पीडितांना पाठीमागेच ठेवण्यात आले.

विजयोन्मादाने आनंदित झालेल्या अहोमांनी गरगाववरील आपले हल्ले पुन्हा सुरू केले आणि किल्ल्याच्या बाहेर दररोज धुमश्चक्री उडू लागली . किल्ल्यामधील रोगराई आता अगदी पराकोटीला पोहोचली होती. कारण मथुरापूरहून आलेल्या निर्वासितांच्यामुळे गरगावमधल्या फौजेतही साथीची लागण झाली. एखाद्या साध्या सैनिकाप्रमाणे मिर जुम्ला हा छावणीत राहू आणि खाऊ-पिऊ लागला.

सप्टेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात ही भयानक दुर्दशा संपली, पाऊस कमी होऊ लागला, पूर ओसरू लागले आणि पाणी ओसरल्यामुळे रस्ते पुन्हा नजरेस पडू लागले.

(५) मोगल आरमाराची कामगिरी; मिर जुम्ला याची पुन्हा चढाई

मोगलांवर कोसळलेल्या या संकटकाळात लखाऊ येथे नांगर टाकून असलेल्या इब्न हुसेन या

सेनासारंगाच्या हाताखालील मोगल आरमाराने आपला बचाव केला आणि त्याचबरोबर मोगल सेनादलाचाही. त्याची जहाजे नदीमधून वरखाली अशा गस्ती घालीत . त्यामुळे त्यांनी सातत्याने गौहत्तीबरोबर आपले दळणवळण चालू ठेवले होते आणि गौहत्तीमार्गे डाक्का आणि दिल्लीबरोबरदेखीलही . त्यानंतर इब्न हुसेन याने अचानक माजुलीबेटावर आपले सैनिक उतरविले आणि तेथे आसरा घेऊन बसलेल्या अहोम सरदारांविरुद्ध कारवाई केली. अखेर पावसाळा कमी झाल्यावर त्याने उत्तरेकडील बाजूने चढाई करून गरगावकडचा रस्ता खुला केला . (पाहा **फथिया.**, ११९—१२७). लखाऊहून बंदोबस्तासाठी खुष्कीच्या आणि जलमार्गाने त्याने मोठी रसद पाठविली . ती गरगाव येथे अनुक्रमे २४ आणि ३१ ऑक्टोबर रोजी येऊन पोहोचली. दुष्काळाची जागा आता सुबत्तेने घेतली.

मिर जुम्लाची टिपमवर चाल

आता जमीन कोरडी पडल्यामुळे मोगलांच्या घोडदळाने केलेल्या चढाईला प्रतिकार करणे अहोमांना कठीण गेले आणि जयध्वज आणि त्याचे सरदार पुन्हा एकदा नामरूप टेकड्यांमध्ये पळून गेले . मिर जुम्ला याने पुन्हा एकदा चढाईला सुरुवात केली . (**फथिया.**, १३९-१५३) आणि सोलगुदीच्या मार्गाने तो टिपमवर चाल करून गेला (१८ डिसेंबर). त्याच्या चढाईमधला त्याने गाठलेला हा सर्वात लांबवरचा पल्ला. २० नोव्हेंबर रोजी त्याला मूर्च्छाघात झाला . "ज्या रोगाने अखेर मृत्यू त्याच्यावर मात करणार होता त्याचीच ही सुरुवात होती ". परंतु हाती घेतलेल्या कार्याला तो निर्धाराने चिकटून राहिला . ३० नोव्हेंबर रोजी बदुली पुरवन हा मोगलांना येऊन मिळाला . त्याच्यावर मान-सन्मानाची खैरखैरात करण्यात आली . त्याला पूर्व आसामच्या सुभेदारीवर बादशहातर्फे नेमण्यात आले . पुरवन मोगलांना येऊन मिळाल्याने त्याचा जो फायदा झाला त्यामुळे अनेक अहोम सरदार मोगलांना येऊन मिळाले . जयध्वज अगदी निराधार झाला आणि रोगराईने ग्रासलेल्या नामरूप टेकड्यांमध्ये एकाकी होऊन पडला . (पाहा **फथिया.**, ९६, १४७—१५०; **बुरांजी**, भाग ८. ९२—९३; **खुनलुंग ॲण्ड खुनलाई**, भाग २. १—२, ६—८).

तारीख १० डिसेंबर रोजी मिर जुम्ला याला असह्य तापाने घेरले . त्याच्या अंगोपांगाची आग आग होऊ लागली आणि त्याला प्लुरसी हा रोग झाला . नामरूपमध्ये चाल करून जाण्याचे मोगल सेनेने नाकारले आणि आपल्या सेनापतीला सोडून मायदेशाकडे परतण्याचा त्यांनी कट केला.

(६) आसामबरोबर शांततेचा तह

(**फथिया.**, ९५—९६, १५४—१५९ **बुरांजी**, भाग ८. ९३—९४; **बुक** २ (ब) पाने ३—८.)

दिलेरखानाच्या मध्यस्तीने अहोमांच्या राजाबरोबर खालील अटींवर तह करण्यात आला.

(१) जयध्वजाने आपली मुलगी आणि टिपम राजाचे मुलगे मोगल दरबारी रूजू करावी.

(२) अहोमांच्या राजाने युद्धकर म्हणून ताबडतोब २० ,००० तोळे सोने , १,२०,००० तोळे चांदी आणि २० हत्ती बादशहाकडे रवाना करावे (त्याशिवाय १५ आणि ५ हत्ती अनुक्रमे मिर जुम्ला आणि दिलेरखान यांना भेटी दाखल द्यावे).

(३) युद्धकराची बाकी म्हणून पुढील १२ महिन्यांत त्याने सारख्या हप्त्याने ३ लक्ष तोळे चांदी आणि ९० हत्ती बादशहाकडे रवाना करावे.

(४) त्यानंतर वार्षिक खंडणी म्हणून त्याने २० हत्ती पाठवावे.

(५) युद्धकर पुरा चुकता झाला नाही तोपर्यंत वुऱ्हां गोहैन , बार गोहैन, गरगावचा पुरवन आणि वार पत्रा पुरवनचे मुलगे नबाबाकडे ओलीस म्हणून ठेवण्यात यावे.

(६) ब्रह्मपुत्रेच्या उत्तर किनाऱ्यावरील भराली नदीच्या पश्चिमेचा आणि दक्षिण किनाऱ्यावरील कल्लंग नदीच्या पश्चिमेचा आसामचा मुलुख मोगल साम्राज्यात सामील केला जावा . या करारानुसार हत्तीसाठी प्रसिद्ध असलेल्या दर्रांग प्रांताचा निम्म्याहून अधिक मुलुख मोगलांना मिळणार होता.

(७) अहोमांनी मोगलांच्या प्रदेशांतून पकडून नेलेले युद्धकैदी (विशेषतः कामरूपमधून) अहोमांनी सोडावे. त्याचप्रमाणे अहोमांच्या राजाने बदुली पुरवन याची बायको आणि मुले यांना कैद केले होते त्यांची सुटका करावी.

५ जानेवारी १६६३ रोजी अहोमांच्या राजाची मुलगी , ओलीस मंडळी आणि ठरलेल्या युद्धकरापैकी थोडे सोने, चांदी आणि हत्ती मोगल छावणीत येऊन पोहोचली . पाच दिवसानंतर मिर जुम्ला याने आपल्या परतीची कूच सुरू केली . अखेर वैद्यकीय सल्लागारांच्या सल्ल्यानुसार तो बोटीवर चढला आणि नदीमधून त्याने डाक्क्याच्या दिशेने प्रवासाला सुरुवात केली . वाटेत ३१ मार्च १६६३ रोजी तो मरण पावला . (**फथिया**., १६०—१७१).

(७) मिर जुम्ला याच्या स्वभावाचे मोठेपण

लष्करीदृष्ट्या एक महत्त्वाची कारवाई या दृष्टिकोनातून पाहिल्यास मिर जुम्ला याची आसामवरील स्वारी ही यशस्वी ठरली असे म्हणावे लागेल . त्याने आसामच्या राजाला अपमानास्पद अटीवर तह करावयास भाग पाडले , त्याच्यावर प्रचंड युद्धकर लादला आणि त्याच्यापासून अधिक युद्धकराचे आणि त्याच्या राज्याचा मोठा भाग मोगलांना तोडून देण्याचे वचन घेतले . या तहाचे राजकीय परिणाम जरी चिरस्थायी राहिले नाहीत, जरी तहाप्रमाणे मिळालेले जिल्हे मोगलांकडून हिसकावून घेतले गेले आणि मिर जुम्ला याच्या मृत्यूनंतर चारच वर्षांनी गौहत्तीमधून मोगलांची हकालपट्टी झाली तरी त्याचा ठपका मिर जुम्लावर ठेवता येत नाही.

मिर जुम्ला याच्या मोहिमेचा शेवट भयंकर मनुष्यहानी होण्यात झाला. व्याधी आणि शक्तिपात यांनी वेढल्यामुळे तो मरण पावला . कुचबिहार आणि आसाममध्ये त्याने जिंकून घेतलेला प्रदेश मोगलांना त्वरीत सोडून द्यावा लागला. परंतु या मोहिमेत त्याच्या स्वभावातले गुण मोठ्या प्रकर्षाने तळपले . त्या काळातील कोणत्याही सेनापतीने इतक्या मानवतेच्या आणि न्यायाच्या भूमिकेवरून युद्ध केले नाही की आपले सैनिक , खाजगीनीस आणि अधिकारी यांना इतक्या सारख्या शिस्तीच्या कडक बंधनात . ठेवले नाही. भयंकर कष्ट आणि हालअपेष्टा सहन कराव्या लागत असून देखीलसुद्धा अगदी अखेरपर्यंत मिर जुम्ला याने आपल्या दुय्यम अधिकाऱ्यांना त्याच्याबद्दल वाटणारा विश्वास आणि क्वचित् प्रेमही गमावले नाहीत . हे दुसऱ्या

कोणाही अधिकाऱ्याला साधले नाही . २० मण हिरे ज्याच्या मालकीचे होते आणि बंगालसारख्या सधन प्रांताचा जो सुभेदार होता असा मिर जुम्ला , कूच करताना ज्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत त्याचा अनुभव मोठ्या आनंदाने त्याच्या फौजेतील एकाद्या क्षुल्लक शिपायाबरोबरही घेत असे . जीवनातल्या आनंदाकडे पाठ फिरवून आणि मोठ्या कष्टाने भरलेले दिवस घालवीत त्याने अकाली मृत्यूला आपणहून आमंत्रण दिले. लोकांवर अत्याचार, जुलूम, जबरदस्ती आणि जिंकलेल्या प्रदेशांत जाळपोळ न करण्याचे सख्त हुकूम त्याने आपल्या सैनिकांना दिलेले होते आणि आपल्या हुकूमाचे कडकपणे पालन होत आहे यासंबंधी तो अतिशय जागरूक राही . या आज्ञांचा भंग करणाऱ्यांना त्याने जी कठोर शिक्षा दिली त्याचा अपेक्षेबाहेर परिणाम झाला. मिर जुम्ला याच्या अंगी विशिष्ट गुण वास करीत होते याची जाणीव इतरांबरोबर त्याची तुलना केल्यावरच आपल्याला होते . मिर जुम्लासारखा कथानायक जर मिळाला तर तालिशसारख्या इतिहासकाराची प्रतिभादेखील त्याच्या वर्णनाला अपुरी पडते. त्याने मिर जुम्लाची केलेली स्तुती ही केवळ त्याच्याबाबत वापरण्यात आलेली अलंकारिक भाषा ठरत नाही तर लोकांचा राजा म्हणून जन्माला आलेल्या व्यक्तीला योग्य ती श्रद्धापूर्वक वाहिलेली श्रद्धांजली ठरते. (अधिक माहितीसाठी पाहा : **फथिया**., १५, ३५, १६०, ८६-८७).

(८) मोगलांची कामरूपमधून माघार : त्यासाठी झालेला संघर्ष, १६६७–१६८१

अहोम आणि मोगल यांच्यामध्ये पुनश्च संघर्ष आणि त्याची कारणे

मिर जुम्ला याने जिंकून घेतलेला आसामचा भाग मोगल १६६७ पर्यंत आपल्या ताब्यात ठेवू शकले . अहोमांनी, त्यांच्यावर लादलेला युद्धकर पूर्णपणे दिला पण त्याला त्यांनी पाच वर्षे घेतली . त्यांचा नूतनाभिषिक्त राजा चक्रध्वज (राज्यारोहण १६६३) याने युद्धाचा अवलंब करण्याचे ठरविले आणि त्या अनुषंगाने त्याने आपली तयारी चालविली . [मिर जुम्ला याच्या मृत्यूनंतर पूर्व हिंदुस्थानातील परिस्थिती :– मिर जुम्लाच्या माघारीनंतर मोगलांनी त्यांना तहाप्रमाणे मिळालेला मुलूख सोडला नाही . १६६७ पर्यंत कजाली आणि बन्सबारी ही ठाणी त्यांच्या ताब्यात राहिली . ठरलेली युद्धाची खंडणी अहोमांनी त्यांना हप्त्याहप्त्यांनी भरली . औरंगजेबाचा अहोमांच्या राजाबरोबर पत्रव्यवहार चालू राहिला . परंतु खंडणी देण्यात अहोमांच्याकडून विलंब झाल्यामुळे गौहत्तीचा मोगल फौजदार याने अहोमांना धारेवर धरले. खंडणी म्हणून अहोम जे हत्ती पाठवित त्यातील एखादा जर मेला तर आसाम सरकारला त्या पोटी २ ,००० रु. भरावे लागत. असे अनेक हत्ती मरत आणि साहजिकच वार्षिक खंडणीची भरपाई अहोमांना वेळच्या वेळी करणे जमत नसे. ही खंडणी पुढीलप्रमाणे होती. युद्धकर म्हणून वीस हजार तोळे सोने , एक लक्ष वीस हजार तोळे चांदी व वीस हत्ती अहोमांनी ताबडतोब द्यावेत आणि त्यानंतर ३ लक्ष तोळे चांदी व ९० हत्ती तीन सारख्या हप्त्यांनी द्यावे . (**फथिया**., १५४). अहोमांनी एकंदर खंडणी दिली ती १४३ हत्ती व २ लक्ष ८०,००० रुपये. यांपैकी २४ हत्ती मेले. त्यांची किंमत अहोमांकडून वसूल करण्यात आली.

मोगल आणि अहोम यांच्यामध्ये बेबनाव होण्याचे दुसरे कारण म्हणजे अनेक आसामी नागरिक बंगालमध्ये बादशाही फौजेबरोबर गेले हे होय. त्याबद्दल अहोमांचा राजा जयध्वज याने निषेध केला असता मिर जुम्लाने उत्तर दिले की , मी माझ्याबरोबर येण्याला कोणालाही भाग पाडत नाही व जे माझ्याबरोबर येतात त्यांना मी अटकाव करीत नाही. मोगलांनी या वर्तणुकीने कराराचा भंग केला अशी अहोमांनी समजूत करून घेतली. त्याशिवाय अहोमांच्या राजाने अशी तक्रार केली की , मोगल अधिकारी आपल्या प्रदेशात घुसतात आणि तेथून तहात ठरल्याप्रमाणे माघार घेत नाहीत. अखेर बादशहाच्या हुकमाने वादग्रस्त प्रदेश योग्य त्या पक्षाकडे सोपविण्यात आला. १६६३ मध्ये चक्रध्वज हा गादीवर आला. त्याच्या मनात मोगलांनी केलेला अन्याय व त्यांची उद्धट वागणूक या दोन्ही गोष्टी डाचत होत्या . याचा परिणाम म्हणजे मोगल वकीलाबरोबरची त्याची वागणूक एकदम बदलली. अखेर जेव्हा गोहत्तीचा नवा फौजदार सय्यद फिरोजखान याने उरलेल्या खंडणीची अतिशय उद्धट भाषेत मागणी केली तेव्हा चक्रध्वजाचा संयम सुटला आणि त्याने मोगलांबरोबर युद्धाची तयारी करण्यास सुरुवात केली . (**फथिया**., १६०, १६२; **बुरांजी खुनलुंग**, भाग २. १३–१४, १२–१८; **बुरांजी**, भाग २. (ब) १०–११, १८; भाग ८. ९७; **बुरांजी**, भाग ८. ९७–९८).] १६६७ मध्ये त्याने ब्रह्मपुत्रेच्या दोन्ही किनाऱ्यांवरून खाली दोन फौजा आपल्या सेनापतींच्या हाताखाली रवाना केल्या . वाटेत मोगलांच्या ताब्यातील किल्ले भराभर पडले आणि अखेर नोव्हेंबरच्या सुरुवातीस खुद्द गौहतीचाच पाडाव झाला . शस्त्रास्त्रे, घोडी आणि इतर सामान -सुमान प्रचंड प्रमाणात विजेत्यांच्या हाती पडले . अनेक मुसलमानांना अहोमांनी कैद केले आणि त्यांनी कत्तल केली. यात अनेक अधिकारी होते. एकाच चढाईत अहोमांनी मोगल आघाडीला मोनास नदीपर्यंत रेटले . गौहत्ती अहोम सुभेदाराचे पुन्हा मुख्य ठाणे झाले . (पाहा **बुरान्जी**

खुनलुंग, भाग २. १५–२८, २८–३७, भाग ८. ९८–१०१; **ए. एन्.**, १०६८).

रामसिंगाच्या नेतृत्वाखाली रेंगाळलेले युद्ध

मोगलांनी त्यांच्या ताब्यातून गेलेला प्रदेश पुन्हा जिंकून घेण्याचा प्रयत्न केला . परंतु त्यातून अनिर्बंध आणि निरर्थक असे युद्ध सुरू झाले. १६६९ च्या फेब्रुवारीत मिर्जा राजा जयसिंग याचा मुलगा आणि वारस रामसिंग हा दरबारातून रंगमती येथे युद्धाची सूत्रे हाती घेण्यासाठी दाखल झाला . परंतु सुरुवातीपासूनच त्याच्यापुढे असलेली कामगिरी त्याच्या पदरी निराशा टाकणारी होती. त्याच्या हाताखाली जेमतेम ८,००० फौजी सैनिक होते व त्यातून त्याचे जे नुकसान होई त्याची भरपाई कधीच केली जात नसे . अहोमांनी आपण एक राष्ट्र आहोत या अभिनिवेशात युद्ध पुकारल्यामुळे सैन्य भरती करून त्यांनी एक लाख फौज उभी केली . मिर जुम्लाच्या वेळी मोगलांचे जे आरमारी प्रभुत्व होते ते आता नाहीसे झाले आणि पाण्यावरील सत्ता अहोमांकडे गेली. ब्रम्हपुत्रेवरील त्यांच्या ज्या ४० युद्धनौका होत्या त्यबाबत मोगल फारच थोडी कारवाई करू शकले. [याबाबत सविस्तर हकिकत पुढीलप्रमाणे आहे : रामसिंग याच्याबरोबर त्याचे स्वतःचे ४ ,००० घोडेस्वार, १,५०० अहदी आणि ५०० गोलंदाज एवढे सैन्य होते . त्याशिवाय कुचबिहारमधील १५ ,००० धनुर्धर होते. परंतु लढण्याच्या दृष्टीने त्यांचा उपयोग नव्हता. पाटण्याहून बंगालकडे जाताना वाटेत त्याने आपला शीख गुरू तेगबहादूर याला बरोबर घेतले . रंगमती येथे फेब्रुवारी १६६९ मध्ये रामसिंग जाऊन पोहोचला. (या मोहिमेच्या अधिक माहितीसाठी पाहा. **बुरांजी खुनलुंग**, भाग २. ३८–५८, भाग ८. १०१–११०; **ए. एन्.**, १०६८–६९ **एम्. ए.**, ९७, १५४). परंतु पहिल्यापासूनच त्याच्या पुढील कामगिरी दुष्कर होती . आसाममध्ये मोहिमेवर जाण्यासाठी कोणताही शिपाई सहजासहजी तयार होत नसे. आसाममध्ये रामसिंगाला पाठवण्यात आले याचे कारण , त्याने शिवाजीला आग्र्याहून पळून जाण्यास मदत केली हे आहे , असे समजण्यास भरपूर जागा आहे. त्याच्याजवळ जेमतेम ८ ,००० शिपाई होते आणि त्याच्या नुकसानीची कधीच भरपाई होत नसे . याउलट अहोमांनी एक लक्ष फौज जमा केली. त्यांनी आपले आरमारही मजबूत केले. त्यामुळे मोगलांच्या चाळीस जहाजांच्या काफल्याचे काहीही चालले नाही.

यात भर म्हणून गौहत्तीचा फौजदार रशिदखान याने सहकार्य करण्यास दिलेला नकार व त्याच्यातील निष्ठेचा अभाव . रामसिंगाचे आज्ञापालन करण्याऐवजी त्याने बरोबरीच्या हक्काकरिता भांडण्यास सुरुवात केली . इतके दिवस गौहत्तीचा फौजदार म्हणून भपक्यात राहिल्यावर रामसिंगाकडून आज्ञा घेणे त्याला कमीपणाचे वाटू लागले. त्याचा अहोमांबरोबर पत्रव्यवहार असावा अशी शंका येण्यास जागा निर्माण झाली. अखेर रामसिंगाने रशिदखानाला आपल्या छावणीतून हाकलून दिले.

आपल्या रंगमती येथील तळापासून रामसिंगाने उत्तर ब्रम्हपुत्रेच्या दरीच्या काठाने कूच करण्यास सुरुवात केली . अहोमांनी माघार घेतली आणि तो वार नदीपाशी पोहोचला. थोड्याफार चकमकीत मोगलांना यश मिळाले. परंतु निर्णायक विजय त्यांना मिळाला नाही . लवकरच लढाईचे पारडे फिरले, आणि त्याला हाजोकडे माघार घ्यावी लागली . नंतर त्याने गौहत्तीला वेढा दिला . परंतु चार महिन्यांच्या वेढ्यानंतर खूप नुकसान सोसून त्याला माघार घ्यावी लागली. अहोमांनी नागांची मदत आणली. या रानटी लढवय्यांनी मोगलांना मोठा धोका निर्माण केला.

१६७० च्या उत्तरार्धात मोगलांना तीन मोठे पराभव सहन करावे लागले . रामसिंगाने तहाची याचना केली . दोन्ही बाजू युद्धाला कंटाळलेल्या होत्या. परंतु चक्रध्वजाच्या मृत्यूमुळे तहाची बोलणी लांबणीवर पडली. तहाच्या वाटाघाटी फिसकटल्या. अहोमांनी आपले हल्ले पुन्हा सुरू केले. यानंतरचा बराच काळ दोन्ही फौजांत चकमकी होण्यात गेला . विजयाचे पारडे अहोमांच्याकडे झुकले . सरतेशेवटी मार्च १६७१ मध्ये रामसिंगाने पदरी अपयश घेऊन रंगमतीकडे माघार घेतली. येथे काही वर्षे तो आसामच्या सरहद्दीवर रेंगाळला. परंतु पुन्हा मोहीम करण्याचे सामर्थ्य त्याच्यामध्ये उरले नव्हते. इ. स. १६७६ मध्ये त्याला दरबारात परतण्याची परवानगी मिळाली . तो जूनमध्ये दरबारात रुजू झाला . दारंग आणि बेलतोला ही ठिकाणे मोगलांनी कायमची गमाविली.]

आणि रामसिंगाचे मनदेखील या स्वारीत नव्हते. कारण तो हे पूर्णपणे जाणून होता की १६६६ मध्ये शिवाजीला आग्र्याहून सुटून जाण्यात मदत केल्याच्या अपराधाबद्दल शिक्षा म्हणून त्याला आसामात ज्वरजर्जर होऊन मरून जाण्यासाठी रवाना करण्यात आले होते . आसामात रणसंग्रामाच्या परिघात आल्यावर रामसिंगाने गौहत्तीला वेढा दिला . पण गौहत्ती जिंकून घेण्याचे त्याचे सर्व प्रयत्न फसले . मार्च १६७१ मध्ये त्याने रंगमतीकडे माघार घेतली तेथे त्याचा काही वर्षे मुक्काम झाला . पण त्याने कोणतीही कारवाई केली नाही. अखेर १६६५ मध्ये त्याला दरबारात रूजू होण्याची परवानगी देण्यात आली.

गौहत्ती काबीज व पुन्हा गौहत्तीचा पाडाव

अनुक्रमणिका

चक्रध्वजाचा १६७० मध्ये मृत्यू झाल्यावर अंतर्गत भानगडीमुळे अहोमांच्या राजघराण्याची सत्ता अतिशय कमकुवत झाली. १६७० पासून १६८१ पर्यंतच्या ११ वर्षांच्या थोड्याशा कालावधीत अहोमांचे काही नाही तरी ७ राजे गादीवर आले आणि त्यांपैकी कोणाचाही मृत्यू नैसर्गिक कारणपरत्वे झाला नाही . महत्वाकांक्षी आणि कसलीही चाड न बाळगणाऱ्या सरदारांनी अंतिम सत्ता बळकावली , स्वतःच्या स्वार्थासाठी परस्परांशी झगडे केले आणि सिंहासनावर राजांची उलटापालट केली . १६७९ च्या फेब्रुवारीत वार फुकन याने आपला प्रतिस्पर्धी बुऱ्हा गोहैन याच्या धास्तीने गौहत्ती हे मोगलांच्या स्वाधीन केले . (याचे बक्षीस म्हणून औरंगजेबाने आजमची नेमणूक बंगालच्या सुभेदारीवर केली). (अधिक माहितीसाठी पाहा : **एम. ए.**, १७३; **गेटस्**, १५७).

परंतु १६८१ मध्ये गदाधरसिंह हा अहोमांच्या सिंहासनाचा अधिपती झाला आणि त्याने लवकरच आपल्या घराण्याची प्रतिष्ठा पुन्हा संपादन केली . त्याने सहजतया गौहत्ती काबीज केले आणि प्रचंड लूट मिळविली. अशा तऱ्हेने बंगालच्या सुभ्यातून कामरूपचा ताबा मोगलांच्याकडून गेला (**गेट**, १६०; **बुरांजी**, भाग ८, १२२—१२३).

१६६३ नंतर मोगलांचे कुचबिहारबरोबर संबंध

१६६२ मध्ये मिर जुम्ला हा गरगाव येथे वेढ्यात अडकला असताना कुचबिहारच्या राजाने आपला सर्व प्रदेश जिंकून घेतला आणि तेथील मोगल फौजेची हकालपट्टी केली . १६६४ मध्ये बंगालच्या सुभेदारीवर नेमणूक झालेला शायस्ताखान राजमहलला पोहोचला . मोगलांच्या सामर्थ्याची भीती वाटल्यामुळे कुचबिहारच्या राजाने ताबडतोब शरणागती स्वीकारली आणि साडेपाच लाख रुपयांची खंडणी आदा केली. (**फथिया, कन्टिन्युएशन**, १२१ ब; **अखबारात,** ८ वे बर्ष , १४). कुचबिहारचा हा राजा प्राण नारायण १६६६ मध्ये मेला . त्यानंतर जवळ जवळ अर्धशतकापर्यंत त्या राज्यात यादवी युद्धामुळे , राजसत्तेकडून होणाऱ्या जुलुमजबरदस्तीमुळे आणि अंतर्गत अशांततेमुळे भयंकर अंदाधुंदी माजली . याचा फायदा मोगलांनी घेतला आणि आपल्या राज्याच्या मर्यादा हल्लीचे रंगपूर आणि पश्चिम कामरूप जिल्हे यांचा बराच भाग जिंकून कुचबिहारच्या दक्षिण आणि पूर्व भागापर्यंत नेऊन भिडविल्या . इ. स. १७११ मध्ये एका तहानुसार मोगलांच्या ताब्यात आलेल्या या प्रदेशांवरील हक्क सोडण्यास त्यांनी कुचबिहारच्या राजाला भाग पाडले. (**एच्. एन्. चौधरीज् कुचबिहार स्टेट**, २३८—२४१)

(९) छटगावचे लुटारू आणि त्यांनी बंगाल्यात घातलेला धुमाकूळ

छटगावचे पोर्तुगीज चांचे

बंगालचे मुसलमान राज्यकर्ते आणि आराकानचे मोंगोलाईड प्रमुख यांच्यामध्ये अनेक शतकांपासून छटगाव जिल्हा कोणाच्या मालकीचा याबद्दल वाद होता . १७ व्या शतकाच्या सुरुवातीला फेनी नदी ही या दोन्ही राज्यांमधील सरहद्द ठरविण्यात आली . परंतु पुढील पन्नास वर्षांत पूर्व बंगालमधील नद्या आणि खाड्या यांवर माघ लोकांची अनिर्बंध सत्ता पूर्णपणे प्रस्थापित झाली . या घटनेला पुढीलप्रमाणे कारणे देता येतील— जहांगीरचा भोंगळ राज्यकारभार , त्याचा युवराज शहाजहान याची बंडखोरी आणि परदेशी लोकांच्या प्रभावाच्या शिरकावामुळे आराकानी लोकांच्या आरमारी सामर्थ्यात झालेली वाढ (आराकानच्या

प्राचीन इतिहासासाठी पाहा : **फैयरेज् हिस्टरी ऑफ बर्मा**, ७७–७९, १७२; **फथिया, कन्टिन्यूएशन**, १५४ ब –१५६ अ, १६४ अ, १७६ अ आणि ब). हे परकीय म्हणजे छटगाव येथे स्थायिक झालेले आणि तेथल्या स्थानिक राजाच्या हुकमतीत वागणारे फिरंगी अथवा धाडसाला तयार असलेले पोर्तुगीज आणि त्यांच्यापासून निर्माण झालेली तेथील प्रजा . "माघ आणि फिरंगी हे आराकानी लुटारू खलाशी सातत्याने जलमार्गाने हल्ले करीत आणि बंगालमध्ये लुटालूट करून परत जात . आपल्याबरोबर ते त्यांनी पकडलेल्या हिंदू आणि मुसलमान यांना घेऊन जात . आपल्या मायप्रदेशात पोहोचल्यावर जलप्रवासातून बचावून तेथे पोहोचलेल्या पकडलेल्यांपैकी दणकट अशा कैद्यांना ते शेतकामाला आणि इतर हलक्या प्रतीच्या उद्योगधंद्यांच्या कामाला लावीत . उरलेले इतर कैदी ते दक्षिणेतल्या बंदरात डच , इंग्रज आणि फ्रेंच व्यापाऱ्यांना विकून टाकीत. बंगालवर अशा तऱ्हेचे हल्ले आणि लुटालूट आराकानी लुटारूंनी नियमितपणे चालविल्यामुळे बंगाल हा दिवसेंदिवस अधिकाधिक ओसाड आणि निर्मनुष्य बनत गेला आणि आराकान्यांचा प्रतिकार करण्याची त्याची शक्ती दिवसेंदिवस कमी होत गेली . पूर्वी वकला जिल्ह्यामधून (वकरगंज आणि डाक्क्याचा काही भाग) सुपारीवरील करामधून सरकारला खूप उत्पन्न मिळे . हा जिल्हा घरादारांनी आणि लागवडीखाली आणलेल्या जमिनींनी नुसता भरगच्च भरून गेला होता . परंतु आता आराकान्यांनी आपल्या लुटारूपणा आणि पळवापळवी रूपी केरसुणीने जणू काही हा जिल्हा साफ धुवून नेला . परिणामी त्या प्रदेशात एकही राहत्या घरात रहिवासी आढळेना किंवा दिवा लावायला माणूस मिळेना."

"बंगालच्या आरमारी काफिल्याच्या खलाशात या लुटारू आराकान्यांची इतकी धडकी बसली की या आरमाराच्या शंभर जहाजांच्या काफिल्याने केवळ लुटारूंच्या चार गलबतांना एकजुटीने चाल करून येताना पाहिले तर त्यातून पलायन करून बंगालच्या आरमारी काफिल्यातील खलाशांनी स्वतःचा जीव वाचविल्यास ते स्वतःला धन्य समजत असत" (पाहा : **बर्नियर**, पान १७९). "हे फिरंगी लुटारू आपल्याला मिळालेल्या लुटीचा अर्धा भाग आराकानच्या राजांना देत आणि स्वतःकडे उरलेला अर्धा हिस्सा ठेवीत . ह्या लुटारूंना लोक हरमद या नावाने ओळखत (हरमद हा पोर्तुगीज आरमाडा अथवा काफिला या शब्दाचा अपभ्रंश). त्यांच्या ताब्यात युद्धसामग्रीने भरलेली १०० जलद गतीची गलबते होती ." मनुचीने त्यांचे वर्णन कठोर हृदयाची माणसे आणि कसलाही किंतु मनात न बाळगता एखाद्या छोट्या बालकाला ठार करण्यास सरावलेले" असे केले आहे. (**मनुची**, भाग २ पान १७४) (अधिक माहितीसाठी पाहा : **बर्नियर** १७४-१७९; **अे. एन.**, ९४१; **फथिया, कन्टिन्यूअेशन**, १२२ ब–१२५ ब, १०८ अ, १३९ अ आणि ब, १५० ब १५२ अ).

पूर्व बंगालच्या नदीलगतच्या प्रदेशातील लोकवस्ती उठून गेल्यामुळे सरकारी उत्पन्नात कमालीची घट आली. परंतु त्यापेक्षाही जास्त म्हणजे बादशाही इभ्रतीला त्यामुळे अतिशय धोका पोहोचला . प्रांताचे संरक्षण योग्य तऱ्हेने होणे असेल तर छटगावच्या लुटारूंचे निर्मूलन होणे ही अत्यावश्यक बाब होऊन राहिली.

शायस्ताखानाची नव्याने आरमाराची उभारणी

मिर जुम्लाची अर्धवट राहिलेली कामगिरी हाती घेण्याचा शायस्ताखानाला हुकूम देण्यात आला . सुरुवाती सुरुवातीला शायस्ताखानाची कामगिरी त्याला हातावेगळी करणे अशक्यप्राय आहे असे वाटले . मोगलांचे बंगालमध्ये जे आरमार (नाव्वर) ठेवण्यात आले होते त्याच्या खर्चासाठी १४ लाख वार्षिक उत्पन्नाच्या जमिनी तोडून देण्यात आल्या होत्या. राजपुत्र शुजाच्या ढिलाईच्या कारभारामुळे ह्या आरमाराची परिस्थिती अतिशय खालावली होती . त्यात आणखी अधिकाऱ्यांच्या लांडीलबाडीची भर पडलेली . त्यातून

जे काही उरले होते त्याचा मिर जुम्लाच्या आसामच्या स्वारीत नाश झाला होता. थोडक्यात म्हणजे बंगालचे आरमार आता जवळजवळ अस्तित्वातच उरले नव्हते आणि त्यामुळे शायस्ताखानाचे पहिले काम त्या आरमाराची पुन्हा उभारणी करणे हे होते.

शायस्ताखानाने ही कामगिरी प्रथम हातावेगळी केली . त्याच्या अमाप उत्साहाने आणि धैर्याने तो सगळ्या अडचणींवर मात करू शकला . डाक्का, हुगळी, जेसोर, वाळेश्वर, कारीवारी वगैरे ठिकाणच्या गोद्यात नवीन जहाजे बांधण्यात आली आणि एका वर्षाच्या अवधीत ३०० जहाजांचे आरमार नावाडी आणि युद्धसामग्री यासहीत युद्धासाठी सुसज्ज झाले . (**फथिया**, **कन्टिन्यूएशन**, ११५ व , १३७ ब –१३८ अ). डाक्याच्या आग्नेयेस ६ मैलांवर ढापा येथे १०० युद्धनौका ठेवण्यात आल्या आणि तेथून पुढे दक्षिणेस आणखी ३० मैलांवर संग्रामगढ येथे आणखी २०० जहाजे सज्ज ठेवण्यात आली . या दोहोंना जोडणारा एक लष्करी मार्ग पूररेषेच्या वर बांधण्यात आला . छटगावपासून केवळ ६ तासांच्या जलमार्गावर असलेले सोनदीप हे बेट संग्रामगढ आणि छटगाव या दोन गावांच्या बरोबर मध्यावर मुक्कामासाठी सोयीस्कर असे ठाणे होते . सोनदीप बेटावर त्यावेळी दिलावर नावाच्या बंडखोरीने आरमार सोडून गेलेल्या मोगल कप्तानाचा अधिकार चालत असे ; तरीदेखील दिलावर हा एक उत्कृष्ट योद्धा आणि अंगी उत्कृष्ट कर्तबगारी असलेला शासक होता.

मोगल सोनदीप काबीज करतात

१६६५ च्या नोव्हेंबरमध्ये सेनासारंग अबुल हसन आपल्या काफिल्यासह जात असताना त्याने सोनदीपवर हल्ला केला आणि ते काबीज केले . दिलावरचे वय आता ८० वर्षांचे होते . त्याने अतिशय शौर्याने लढा दिला. तो जखमी झाला आणि त्याला पायात बेड्या घालून डाक्क्याला नेण्यात आले . सोनदीपच्या बेटावर मोगल फौज ठेवण्यात आली. (**ए. एन.**, ९४४–९४६).

आता शायस्ताखानाने मोगलांच्या चाकरीची जबरदस्त अमिषे पुढे करून फिरंग्याची मने आपल्याकडे वळवून घेतली . फिरंगी आणि त्यांचे आराकानी धनी यांच्यात भयंकर भांडणे झाल्यामुळे शायस्ताखानाची कामगिरी आणखीनच सुलभ झाली . छटगावच्या सर्वच्या सर्व फिरंगी वसाहतीने आपली बायकामुले आणि मालमत्ता यांसह मोगलांच्या मुलखात घाईघाईने पलायन केले (डिसेंबर १६६५). फिरंग्यांच्या पुढाऱ्यांची भरपूर वेतनावर मोगल आरमारात भरती करण्यात आली . “फिरंग्यांचे मोगलांकडे येणे या घटनेने बंगाली जनतेच्या मनाला एक मोठाच दिलासा मिळाला.”

(१०) मोगल छटगाव जिंकून घेतात

छटगाववरील मोहिमेची सुरुवात

२४ डिसेंबर १६६५ या दिवशी शायस्ताखानाचा मुलगा बुजुर्ग उम्मेदखान याच्या अधिपत्याखाली ६५०० फौज मोहिमेवर डाक्क्याहून रवाना करण्यात आली . बादशाही आरमारात सर्व तऱ्हेची अशी एकूण २८८ गलबते होती . फिरंगी आपली ४० गलबते घेऊन बादशाही आरमाराला जोड म्हणून येऊन मिळाले होते. मोहिमेचा आराखडा पुढीलप्रमाणे होता . इब्न हुसेन याने आपले आरमार घेऊन काठाकाठाने पुढे सरकावे तर त्यांना समांतर अशी दिशा ठेवून फौजेनेही प्रगती करावी आणि वाटेत जाताना टप्प्या टप्प्याने

समुद्रकिनाऱ्यावर लागणारी जंगले साफ करावी आणि उत्तमपैकी रस्ता करावा . याप्रमाणे आरमारी काफिला आणि फौजा दल यांनी परस्परांशी सहकार्य करावयाचे . आघाडीच्या सेनेचे नेतृत्व फरहादखानाकडे होते. त्याने १४ जानेवारी १६६६ रोजी फेनी नदी ओलांडली आणि आराकानी मुलुखात प्रवेश केला.

२३ तारखेला मोगल आरमारी काफिला कुमारिया खाडीच्या बाहेर पडला आणि त्याची शत्रूच्या आरमाराबरोबर गाठ पडली. शत्रूच्या आरमारात घुरव जातीची १० आणि जलिया जातीची २५ अशी जहाजे होती. हे आरमार मोगल काफिल्याशी लढण्यासाठी कुमारिया खाडीतून बाहेर पडले होते . फिरंग्यांनी मोगल आरमाराची आघाडी सांभाळली आणि त्यांनी केलेल्या चढाईमुळे युद्धाला कसे वळण लागणार तेही दिसून आले. घुरवात असलेल्या माघ खलाशांनी फिरंग्यांच्या चढाईमुळे भराभर जहाजातून उड्या टाकल्या तर शत्रूच्या जालियांनी पळ काढला.

आरमारी लढाया

परंतु मोगलांच्या आरमाराशी गाठ पडलेल्या शत्रूच्या काफिल्यातील जहाजे हलक्या प्रतीची होती . त्यांची अधिक तोफा असलेली मोठी गलबते आता हूली खाडीतून बाहेर पडून भर समुद्रात आली.

दुसरा आणि मोठा विजय मोगल आरमाराला २४ जानेवारीच्या सकाळी मिळाला . त्यावेळी मुसलमानी आरमारातील जहाजे आपले विजयी ध्वज फडकावीत आणि शत्रूवर तोफांचा भडिमार करीत चाल करून जाऊ लागली . पुढे चाल करून येणाऱ्या मोगल काफिल्यावर तोफांचा भडिमार करत आराकानी आरमाराने कर्णफुली नदीमध्ये माघार घेतली . त्यांनी नदीच्या मुखात दुपारी ३ वाजता प्रवेश केला आणि छटगाव आणि नदीच्या प्रवाहात असलेले एक बेट यांच्या मधोमध युद्धाकरता आपल्या आरमाराची फळी उभारली . नदीच्या समोरच्या किनाऱ्यावर फिरंगी लोकांचे बंदर असलेल्या खेड्याच्या नजीक त्यांनी बाबूंच्या तीन संरक्षक तटबंदी उभारल्या होत्या . परंतु इब्न हुसेन याने आपली सर्व गलबते नदीच्या प्रवाहात घातली आणि जमिनीवरील बाजूनेही हल्ला चढवून वरील तटबंदी काबीज केल्या.

यानंतर विजयाच्या उन्मादाने धुंद झालेल्या मोगलांनी शत्रूच्या आरमारावर धडक दिली . भयंकर रणधुमाळी माजली . छटगावच्या किल्ल्यामधूनही मोगलांवर तोफांचा भडिमार करण्यात आला . अखेर शत्रूचा नाश करण्यात आला . त्यांच्या कित्येक नावाड्यांनी भराभर जहाजांतून समुद्रात उड्या टाकल्या आणि पोहून जाऊन त्यांनी आपला जीव वाचविला . पुष्कळसे बुडून मेले. उरलेल्यांना ठार करण्यात आले किंवा कैद केले गेले. विजयी मोगलांच्या ताब्यात शत्रूची १३५ लढाऊ गलबते आली. दुसऱ्या दिवशी म्हणजे २५ जानेवारीला छटगावच्या किल्ल्याला मोगलांनी वेढा दिला . २६ तारखेला उजाडता उजाडता किल्ला इब्न हुसेनच्या ताब्यात आला . परंतु तेथील जमीनदार मुनब्बरखान याच्या बेशिस्त अनुयायांनी लुटालूट करण्यासाठी किल्ल्यात प्रथम प्रवेश केला. तेथल्या घरांना आगी लावल्या. त्यामध्ये शहराचा बराचसा भाग आणि राजवाड्यातील दोन हत्ती जळून खाक झाले . किल्ल्यातील आराकानी फौज किल्ल्यातून कर्णफुली नदीच्या पलीकडल्या तीरावर पळून गेली . परंतु त्या पळपुट्यांवर त्यांच्या पूर्वीच्या गुलामांनी हल्ला केला आणि त्यांना साफ नागविले. हे गुलाम म्हणजे बंगालमधून आराकान्यांनी पळवून नेलेले आणि त्या प्रांतात शेतकरी म्हणून राबविलेले बंगाली मुसलमान होत.

अनुक्रमणिका

दरम्यान २३ तारखेपासून आपला काफिला पुढे चाल करून जात असल्याची बातमी ऐकल्यापासून फरहादखानाच्या हाताखालील सैन्याने घनदाट जंगलातून छटगावाच्या रोखाने मार्ग काढून , चाल करून जाण्यासाठी पराकाष्ठेची कोशिश चालविली होती . त्याची फौज नजीक येताच वाटेत असलेली आपली ठाणी माघ लोकांनी सोडून दिली . मुख्य सेनापती २६ तारखेला छटगावला येऊन दाखल झाला आणि दुसऱ्या दिवशी विजयाचे नगारे वाजवीत त्याने किल्ल्यात प्रवेश केला . मोगलांना मिळालेल्या लुटीचे मूल्य पैशाच्या स्वरूपात काहीच नव्हते. ही लूट म्हणजे ३ हत्ती , पितळ आणि लोखंड यांच्या बनावटीच्या , लहान आकाराच्या आणि १ पौंडी किंवा लहान गोळे टाकणाऱ्या १०२६ तोफा , अनेक तोड्यांच्या बंदुका आणि जंबुरख आणि पुष्कळसा दारूगोळा ही होय . परंतु मोगलांच्या या विजयाचा अतिशय नेत्रदीपक परिणाम म्हणजे या लुटारूंनी ज्या हजारो बंगाली मुसलमानांना पळवून नेऊन त्यांना गुलामगिरीत डांबून ठेवले होते त्यांची सुटका आणि त्यांचे त्यांच्या स्वतःच्या प्रदेशात झालेले पुनर्वसन . त्याशिवाय या विजयातून मिळालेला दुसरा लभ्यांश म्हणजे बंगालच्या सखल भूमीत शेतीची झालेली अमाप वाढ . छटगाव येथे एका मोगल फौजदाराची नेमणूक करण्यात आली आणि छटगावचे नाव बदलून ते इस्लामाबाद असे ठेवण्यात आले.

(११) अफगाण लोक : त्यांचे वैशिष्ट्य आणि मोगल साम्राज्याबरोबरचे त्यांचे संबंध

हिंदुस्थानपासून काश्मीर आणि अफगाणिस्तानापर्यंत पसरलेल्या खोऱ्यात आणि त्यांना वेढणाऱ्या आजूबाजूच्या डोंगरांत अनेक तुर्की इराणी जमाती राहतात . उत्तरेकडे या लोकांना पठाण म्हणतात आणि दक्षिणेत बलुची म्हणतात. त्यांचे इस्लाम धर्मात परिवर्तन झाल्यानंतर देखीलही त्यांनी आपली जुनी बोली , त्यांचे परंपरागत चालत आलेले टोळीसंघटन आणि त्यांचा पूर्वापार फार जुन्या काळापासून चालत आलेला वाटमारीचा आणि लुटालुटीचा धंदा ही वैशिष्ट्ये कायम ठेविली आहेत.

सपाटीच्या प्रदेशात राहत असलेल्या सर्व जातीजमातीपेक्षा शूर आणि कणखर असे हे लोक आहेत परंतु जमातीजमातींमधील वैमनस्य आणि पुष्कळदा कुटुंबाकुटुंबांमधील हेवेदावे यांनी त्यांचे जीवन अगदी पोखरून गेले आहे . त्यांच्या साऱ्या इतिहासात मोठे आणि संघटित असे राज्य स्थापण्यात त्यांना नेहमीच अपयश आले आहे एवढेच नव्हे तर अनेक जाती मिळून एकाद्या टिकाऊ संघराज्याची देखील त्यांना स्थापना करता आली नाही.

राष्ट्र म्हणून त्यांना कधीच अस्तित्व लाभले नाही तर टोळीवाली जमात म्हणूनच . परंतु त्यांच्या जमातीच्या अंतरंगात देखील रजपूत टोळीच्या संघटनेच्या कडक शिस्तीचा पूर्णपणे अभाव आहे. युसुफजाई किंवा आफ्रिडी टोळीवाले त्यांच्या फायद्याचे असले अगर त्यांची मर्जी असली तरच आपल्या टोळीप्रमुखाचे अनुकरण करीत. या नेहमी अस्तित्वात येणाऱ्या आणि तितक्याच सातत्याने विलयास जाणाऱ्या कुटुंबसंस्था म्हणजे अफगाण टोळीवाल्यांचे एकमेव आणि परिणामकारक असे संरक्षणाचे आणि बचावाचे साधन . टोळीचा नामधारी प्रमुख त्याचे अनुयायी त्याला मानत असत तोपर्यंतच त्यांच्यावर सत्ता गाजवू शकत असे . त्यामुळे अफगाण समाजाचा खरा मध्यबिंदू म्हणजे कुटुंब, टोळी निश्चितच नाही.

ह्या लबाड पण तितक्याच धाडशी अशा क्रूर टोळीवाल्यांचा भररस्त्यावर दरवडेखोरी करणे हा धंदा होऊन राहिला होता. त्यांच्या अव्वाच्या सव्वा वाढणाऱ्या लोकसंख्येला त्यांच्या जमिनींपासून येणारे उत्पन्न उदरनिर्वाहाला तुटपुंजे पडत होते . घालमेलीच्या जीवनापासून विमुक्त असलेले शेतीचे उत्पन्न हे त्यांच्या

अधिक उद्योगशील शेजाऱ्यांना मिळणारी लूट आणि त्यांच्या लुटमारीच्या आवाक्यातून जाणाऱ्या श्रीमंत व्यापाऱ्यांची संपत्ती याजबरोबर तुलना करता त्यांच्या दृष्टीने त्यांच्या प्रयत्नांना मिळणारे अगदी भिकार आणि झटपट आधीन न होणारे असे होते . आफ्रिडी, शिनबरी, युसुफजाई आणि खाटक या जंगली टोळ्यांचा हिंदुस्थान आणि काबूल यांमधील व्यापारउदीमांवर डोईपट्टी वसूल करण्याचा अधिकार मोगल सरकारने निःसंशय मान्य केला होता . कारण बऱ्याच अनुभवाअंती मोगलांना कळून चुकले होते की त्या प्रदेशात सुव्यवस्था राखण्याचा आणि तेथील रस्ते रहदारीला मोकळे ठेवण्याचा एकमेव सोपा मार्ग म्हणजे त्यांच्यावर दंडेली करण्यापेक्षा त्यांना लाच देऊन आपलेसे करणे हा होता . परंतु अशा तऱ्हेने त्यांच्यावर केलेली राजकारणी कृपा ही त्यांना आज्ञाधारक बनविण्यात नेहमीच परिणामकारक ठरत असे असे नाही . त्यांच्यामध्ये अधूनमधून एखादा उपटसुंभ पुढारी निर्माण व्हावयाचा . आपण कोणीतरी अवलिया आहो अगर आपल्यात राजरक्त आहे असा आव तो आणायचा. काही तरुण मंडळींची एकत्र संघटना करून काही काळ त्यांना आपल्या पैशांवर चैन करू द्यावयाची आणि नंतर विरोधी टोळीवाल्यांच्या प्रदेशावर आणि सपाटीवरील बादशाही मुलुखावर लुटालुटीसाठी धाड घालावयाची हा त्यांचा खाक्या असे . जोपर्यंत लुटीचा प्रवाह अखंड चालू राही तोपर्यंत ह्या टोळ्यांची संघटना टिकून राही . परंतु एकदा का हा प्रवाह कोरडा पडला किंवा या लुटीच्या वाटणीत भेदभाव होत आहे असा यात्किंचितही संशय येण्याचा अवकाश की तथाकथित लोकशाही नियमाला चटावलेले हे हुल्लडबाज परस्परांवर शस्त्रे उचलीत आणि अशातऱ्हेने त्यांची संघटना संपुष्टात येई ["युसुफजाई जमातीतील एका अवलियाने त्या जमातीला एक आशीर्वाद आणि शाप बरोबरच देऊन ठेवला तो म्हणजे ते नेहमी स्वतंत्र राहावे पण कधीही संघटित राहू नयेत " (एल्फिन्स्टन, ३३८) (अधिक माहितीसाठी पाहा : **ए. एन्.**, १०३९: **बेलोज जनरल रिपोर्ट ऑन दी युसूफजाईस** (१८६४.), ६४, ६७, १५२, १७९; **एनसायक्लोपिडीया ऑफ इस्लाम**, भाग १. १४९, १५४; **पेशावर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, (१८९८), ४९–५८.)]

एकादा तडफदार मोगल बादशहा आपला अधिकार प्रस्थापित करण्याचा आणि आपल्या प्रजेचे रक्षण करण्याचा निर्धार करी. या जमाती वसाहत करून राहिलेल्या खोऱ्यात सैन्य लोटले जाई आणि प्रचंड नुकसान सोसल्यानंतर त्यांचा संघटित प्रतिकार मोडला जाई , त्यांच्या घरादारांची नासधूस केली जाई , त्यांच्या मैदानी प्रदेशांवर लष्करी ठाण्याच्या साखळीच्या मदतीने अधिकार गाजविला जाई , त्यांची पिके कापून घेतली जात आणि तलवारीच्या जोरावर अफगाणांची कत्तल करून त्यांची संख्या घटविली जाई . हिवाळ्यात मोगलांना आपली ठाणी माघारी नेणे भाग पडे आणि मग पुन्हा शांतता प्रस्थापनेचे हे काम वसंतऋतूत सुरू करण्यात येई.

काही वर्षांच्या कालावधीतच मोगल तलवारीला बळी पडल्यामुळे घट झालेल्या लोकसंख्येत घटीच्या प्रमाणाबाहेर भर पडे आणि भुकेने वखवखलेल्या टोळ्या आजूबाजूच्या जिल्ह्यांवर धाडी घालीत अगर व्यापारी तांड्यांना लुटीत.

मोगल सामर्थ्याला ह्या प्रदेशात सोसावा लागलेला पहिला जबरदस्त तडाखा १५८६ च्या फेब्रुवारीत बसला. त्यावेळी राजा बिरबलच्या हाताखालील ८००० सैनिकांची फौज स्वातच्या चिंचोळ्या पट्टीत कापून काढण्यात आली. टोळीच्या प्रमुखाला वार्षिक नक्त उत्पन्न आदा करून आणि त्यांनी केलेल्या भयंकर लुटालुटीकडे दुर्लक्ष करून बादशहाला कसाबसा समझोता करून आणावा लागला . जहांगीर आणि शहाजहानच्या कारकिर्दीत हीच परिस्थिती कायम राहिली (**तबकाते अबकरी**, ३६९; **अलबदायुनी**, भाग २. ३५०; **एम्. यू.**, भाग १. २७९–२८०.)

(१२) १६६७ सालामधील युसुफजाईंचे बंड

युसुफजाईवरील मोगलांचे विजय

इ. स. १६६७ साल उजाडता उजाडता युसुफजाई जमातीने आपल्या वसाहतीचा प्रसार करण्याच्या दृष्टीने हालचाल करण्यास सुरुवात केली . या युसुफजाई टोळ्यांचे वसतिस्थान म्हणजे स्वात आणि वजाऊर खोरी आणि उत्तर पेशावरचे मैदान . त्यांच्या टोळींपैकी एक प्रसिद्ध पुढारी भागू याने इतर कुटुंबप्रमुखाना आपल्या कटात सामील केले , त्यांच्या पूर्वी होऊन गेलेल्या राजाच्या एका तोतया वारसाला महमदशहा म्हणून राज्याभिषेक केला आणि या नवीन राजवटीला त्याने मुल्ला चलाक या स्थानिक जमातीत एक थोर धार्मिक पुरुष म्हणून गणल्या जाणाऱ्या अवलियाला संयोजित करून धार्मिक प्रतिष्ठान मिळवून दिले. भागूने स्वतः वजीर आणि जवळजवळ बादशहाच्या अधिकारात ५००० टोळीवाल्यांची मोहिमेसाठी नियुक्त केलेली सेना म्हणून संघटना केली आणि अटकच्या वरच्या बाजूस सिंधू नदी ओलांडून परवलीवर हल्ला चढविला . हा सपाटीचा प्रदेश नदीच्या पूर्वेला हजारा जिल्ह्यात मोडत होता आणि या प्रदेशामधून काश्मीरकडे जाणारा मुख्य रस्ता गेला होता . याठिकाणी त्यांनी तेथील स्थानिक पुढारी शाउमन याचा किल्ला काबीज केला आणि तेथल्या सर्व शेतकऱ्यांकडून सारा -वसुली केली . हल्लेखोरांची संख्या दररोज वाढतच गेली आणि अधिकाधिक मोगल ठाण्यांवर हल्ले चढविले जाऊ लागले . दुसऱ्या युसुफजाई टोळ्यांनी पश्चिम पेशावर आणि अटक जिल्हा यामधील बादशाही मुलुखात लुटालुटीला सुरुवात केली . (**ए. एन्.**, १०४२; **अखबारात**, **वर्ष** १०, ताव ३ आणि ४)

बादशहाने संरक्षणाची कडक उपाययोजना केली आणि आपल्या तीन फौजी सेनाविभागांना बंडखोरांच्या मुलुखावर चालून जाण्याचा हुकूम केला . सिंधू नदीच्या पैलतीरावरील दक्षिणेच्या बाजूकडील हरून येथील जलमार्गावर बंडखोर येऊन ठेपले आणि मोठ्या संख्येने त्यांनी जलमार्गाचा ताबा घेतला . ही तयारी त्यांनी बादशाही फौजांची स्वारी होणार असे गृहीत धरून केली . असे करण्यात त्यांचा उद्देश नदी ओलांडून आपल्या प्रदेशात येणाऱ्या मोगलांना प्रतिरोध करणे हा होता . १ एप्रिल १६६७ रोजी त्यांच्यावर याठिकाणी अटकचा फौजदार कामिलखान याने हल्ला केला . घनघोर युद्धानंतर शत्रूची फळी फुटली आणि त्यांची नदीच्या दिशेने हकालपट्टी करण्यात आली . शत्रूपैकी दोन हजार ठार मारले गेले , पुष्कळ जखमी झाले आणि पुष्कळांना जलसमाधी मिळाली . सिंधू नदीच्या या बाजूकडील प्रदेश शत्रूच्या कचाट्यातून मोकळा करण्यात आला. (**ए. एन.**, १०४२-१०४४).

मे महिन्यात समशेरखानाने अफगाणिस्तानामधील एका मोठ्या सेनाविभागाचा प्रमुख म्हणून सरसेनानीपदाची सूत्रे आपल्या हाती घेतली आणि सिंधू नदी ओलांडून युसुफजाईंच्या प्रदेशात तो उतरला.

समशेरखानाने त्याच्याबरोबर अनेक वेळा लढाया दिल्या आणि पुष्कळ विजय संपादन केले . ओहिंद येथे त्याने आपले मोर्चे उभे केले आणि युसुफजाई ज्या ठिकाणी आपले अन्नधान्य पिकवीत तो मनदौरचा सपाट प्रदेश ताब्यात घेतला आणि सखल प्रदेशात असलेली त्यांची शेतजमीन आणि घरेदारे यांचा नाश केला. ४ जून रोजी भागू ज्या ठिकाणी तळ देऊन होता, त्या ठिकाणावर हल्ला करण्यासाठी त्याने ओहिंदमधून कूच केले. अनेक अडथळे असूनदेखील घनघोर युद्धानंतर मोगलांनी प्रचंड नुकसान सोसूनही अनेक खेडी काबीज केली . घरादारांचा जाळून नाश करण्यात आला , मालमत्तेची लूट करण्यात आली आणि शेतीची नावनिशाणीही ठेवण्यात आली नाही . २८ जून १६६७ रोजी पंजशीर नदीवरील मन्सूर येथील शत्रूचे मोर्चे काबीज करण्यात आले . ऑगस्टच्या अखेर बादशाही दरबारातील एक नामांकित सरदार

महमद अमीनखान हा मोठी फौज घेऊन युसुफजाईंच्या मुलखात आला आणि समशेरखानाकडून त्याने सर्व सूत्रे आपल्याकडे घेतली . शहाबाजगढीजवळील आणि करहमार खोऱ्यातील सर्व खेडी लुटण्यात आली . स्वात खोऱ्यातील हिजाज हे खेडे नष्ट करण्यात आले (ऑक्टोबर). अशा तऱ्हेने युसुफजाईंवर एकापाठोपाठ तडाखे दिल्यामुळे ते काही अंशी स्वस्थ झाल्यासारखे दिसले. मोगल राज्याच्या या सरहद्दीवर १६७२ पर्यंत सामुदायिक असा उठाव झाला नाही.

(१३) आफ्रिडी आणि खाटक टोळ्यांचे बंड – इ. स. १६७२–मोगल सेनानींवर ओढवलेली आपत्ती

इ. स. १६७२ मध्ये जलालाबादच्या फौजदाराच्या असमंजस कारवाईचा परिणाम असा झाला की खैबरमधील टोळीवाल्यात प्रक्षोभ निर्माण झाला . आफ्रिडी लोकांनी त्याचा पुढारी अचमलखान याच्या नेतृत्वाखाली बंड केले. (**ईश्वरदास**, ६३ अ; **स्टोरीया**, भाग २-१९ अ). हा जन्मजात सेनापती होता. त्याने स्वतःला राज्याभिषेक करून घेतला , आपल्या नावाची नाणी पाडली आणि मोगलांविरुद्ध युद्ध पुकारून राष्ट्रीय चळवळीत सामील होण्यासाठी त्याने सर्व पठाण टोळीवाल्यांना आवाहन केले आणि खैबरखिंड बंद करून टाकली.

१६७२ च्या वसंतऋतूत आता अफगाणिस्तानच्या सुभेदारीवर असलेला महमद अमीनखान हा पेशावरहून काबुलकडे निघाला . त्याच्याबरोबर त्याचे सैन्य होते . सैनिकांची बायकामुले आणि त्यांचे कौटुंबिक सामानसुमानही बरोबर होते . जामरूदला पोहोचल्यावर त्याला कळले की अफगाणांनी पुढचा मार्ग रोखून धरला आहे . परंतु संपत्ती आणि सामर्थ्य यांच्या मदाने धुंद झाल्याने आणि अफगाणांच्या सामर्थ्याविषयी तुच्छता दाखवीत मृत्यूने ओढल्यागतच जणू काही तो पुढे चाल करून गेला . २१ एप्रिलला अली मस्जीद येथे पोहोचून त्याने मोर्चे उभारले. रात्रीच्या वेळी आफ्रिडी टोळ्यांनी डोंगरामधून उतरून ज्या ओढ्यातून त्याला पाण्याचा पुरवठा होत असे तो बंद करून टाकला . दुसऱ्या दिवशी शाही छावणीतील माणसे आणि जनावरे कडक उन्हामुळे लागलेल्या तहानेपोटी मरू लागली . अफगाण टोळीवाल्यांनी मोगलांवर जबरदस्त शस्त्रांचा एकच मारा केला . समोरच्या ३४०० फुटांवर असलेल्या तारतराच्या उत्तुंग शिखरावरून खालच्या अरुंद पट्ट्यात जमा झालेल्या दुर्दैवी सैनिकांवर त्यांनी दगड फेकले . मोगलांच्या सैन्यातील अधिकारी वर्ग मारला गेला आणि मोगल सैन्यात एकच अंदाधुंदी माजली . "हत्ती, घोडे आणि सैनिक यांची गर्दी होऊन एकच गोंधळ उडाला ." यानंतर अफगाणांनी टेकड्यांवरून खाली उतरून हल्ला चढविला आणि मोगल छावणीत कत्तल आणि लुटालूट यांचे थैमान घातले.

महमद अमीनखान आणि त्याचे काही मोठे अधिकारी यांनी मोठ्या मेटाकुटीने जिवानिशी पेशावरला पळून जाण्यात यश मिळविले . परंतु इतर सर्व गोष्टींचा नाश झाला . "समरांगणात शत्रूच्या शस्त्राला १०,००० सैनिक बळी पडले आणि रोख आणि वस्तू मिळून जवळजवळ २ कोटींइतक्या ऐवजाची रक्कम शत्रूला लूट म्हणून मिळाली . शत्रूने २०,००० पुरुष आणि स्त्रिया यांना कैद केले आणि त्यांना विकण्यासाठी मध्य आशियात पाठवून दिले " (**मनूची**, भाग २. ११९–२०१). सुभेदाराचे कुटुंब –त्याची आई, बायको आणि मुलगी शत्रूच्या हाती लागली आणि मोठी खंडणी भरून त्याला त्यांची सुटका करून घ्यावी लागली. या नेत्रदीपक विजयामुळे आफ्रिडी पुढाऱ्यांची कीर्ती आणि साधनसामग्री यात भर पडली . त्याना मिळालेल्या लुटीबद्दलच्या कथा आजूबाजूच्या डोंगरी मुलखांत पसरल्या आणि त्यांच्या नेतृत्वाखाली आणखी माणसे जमा झाली.

अनुक्रमणिका

खुशहालखान खाटक

खाटक (**ए. एन्.**, १०४२; **अखबारात**, **वर्ष** १०, **ताव** ९, **वर्ष** १७, **ताव** २) ही संख्येने मोठी आणि युद्धखोर अशी जमात होती. पेशावर जिल्ह्याचा दक्षिण भाग आणि कोहट आणि बाजूचा बहुतेक प्रदेश त्यांनी व्यापलेला होता. त्यांचे आणि युसुफजाईंचे परंपरागत वैमनस्य होते. कारण या दोन्ही टोळीवाल्यांच्या प्रदेशाच्या सीमा पेशावर जिल्ह्याच्या मध्यभागी भिडत होत्या. त्यांचा पुढारी खुशहालखान हा मोठा कवी होता. अनेक वर्षांपूर्वीच त्याने आपल्या जातभाईंमध्ये शाही सरकारला विरोध करण्याची हिम्मत निर्माण केली होती. परंतु विश्वासघाताने त्याला कैद करण्यात आले आणि तीन वर्षे हिंदुस्थानात कैदेत ठेवण्यात आले. इ. स. १६६७ मध्ये युसुफजाईंच्या प्रदेशावर स्वारी करणाऱ्या मोगलसेनेत तो सामील झाला. परंतु आता तो अचमलला जाऊन मिळाला. राष्ट्रीयत्वाचा प्रतीकात्मक असा जो उठाव झाला त्याचे तो मूर्तिमंत चैतन्य बनला आणि तलवारीइतक्याच प्रखरपणे आपल्या लेखणीने त्याने टोळीवाल्यांमध्ये स्फूर्ती निर्माण केली. त्याने मोगलांवर अनेक विजय संपादन केले.

मोगलांचे आरंभीचे अपयश

मोगल साम्राज्याला आता खरोखरच मोठा धोका निर्माण झाला होता. टोळ्यांचे बंड हे राष्ट्रीय स्वरूपाचे होते. कंदहारपासून अटकपर्यंतच्या साऱ्या पठाण जमाती त्यात होत्या. त्याचप्रमाणे बंडवाल्यांचे जे पुढारी होते त्यांनी मोगल फौजेत हिंदुस्थान आणि दक्षिणेत चाकरी केली होती. बादशाही फौजेची संघटना, कार्यक्षमता आणि डावपेच यांची त्यांना पूर्ण माहिती होती. दोन्ही पक्षांची शस्त्रास्त्रे सारखी होती आणि अफगाणांकडे पल्लेदार तोफांच्या अभावाची उणीव जरी सोडून दिली तर त्यांची बाजू निश्चितच वरचढ होती. कारण त्यांच्या प्रदेशात, डोंगराळ मुलखातील कुशल योद्धे म्हणून त्यांची ख्याती होती तर हिंदी फौजांना डोंगरात नुसत्या लढण्याच्या कल्पनेनेही कापरे भरावयाचे. हालअपेष्टा आणि थंडी सहन करणे याचा त्यांना अतिशय तिटकारा होता.

बादशहाच्या कानावर वरील वाताहात झाल्याची बातमी पडताच त्याने अफगाणांच्या हल्ल्यापासून पेशावरचा बचाव होण्यासाठी म्हणून कडक उपाययोजना केल्या. महमद अमीनखानाचा दर्जा उतरविण्यात आला. महाबत हा पूर्वी तीन वेळा अफगाणिस्तानच्या सुभेदारीवर होता आणि या लोकांबरोबर सामना देण्यात त्याला यश लाभले होते. त्याला दक्षिणेतून परत बोलाविण्यात आले आणि त्याची चौथ्यांदा काबूल येथे सुभेदार म्हणून रवानगी करण्यात आली. परंतु नवीन सुभेदाराने आपल्या आधीच्या सुभेदारांची जी वाट लागली त्या वाटेने जाण्याचा धोका घेण्याची जबाबदारी टाळली. विजयाने धुंद झालेल्या अफगाणांशी सरळ सरळ सामना देण्याचे त्याने टाळले. अफगाणांशी त्याने गुप्तपणे करार केला आणि त्यात असे ठरले की प्रत्येक बाजूने दुसऱ्या पक्षाची छेड काढू नये. पुढल्या वर्षी वसंतऋतूमध्ये तो करपाखिंडीतून काबुलला गेला. वाटेत अफगाणांनी प्रतिकार करू नये म्हणून त्याने त्यांना लाच चारली. परंतु खैबरखिंड ही मात्र पूर्वीप्रमाणेच बंद राहिली. यामुळे बादशहा अतिशय संतप्त झाला. (**एम्. ए.**, १२१, १२९; **ईश्वरदास**, ६५ ब, ६७ अ; **स्टोरीया**, भाग २. २०२, २०५). त्याने शुजातखानाला मोठे सैन्य देऊन अफगाणांना जरब बसविण्यासाठी रवाना केले. त्याचे अधिकार स्वतंत्र होते. त्याच्याबरोबर भरपूर युद्धसामग्री आणि तोफखाना देण्यात आला होता. (१४ नोव्हेंबर १६७३). जसवंतसिंगाने त्याला साहाय्य करावे अशी आज्ञा देण्यात आली.

अनुक्रमणिका

शुजातखानाची वाताहात

शुजातखान हा एक साध्या कुळातला माणूस होता . त्याला जे उच्चपद प्राप्त झाले होते आणि त्याच्यावर बादशहाची जी मर्जी बसली होती त्याला कारण त्याने सतनामी बंड मोडण्यात मिळवलेले यश हे होय. साहजिकच महाबतखान आणि महाराजा जसवंतसिंग यासारखे उच्च कुलस्थ अधिकारी त्याचा तिरस्कार आणि मत्सर करीत . शुजातखानाला बादशहाच्या त्याच्यावरील मर्जीचा अभिमान वाटे आणि त्याच्या पूर्वीच्या यशाबद्दल तो अभिमान बाळगी . त्याने जसवंतने दिलेल्या सल्ल्याचा अनादर केला आणि त्याला योग्य वाटणारी कारवाई केली. मोगल अधिकाऱ्यांमध्ये परस्पर सहकाऱ्यांचा असलेला अभाव यामुळे १६७४ सालची आपत्ती मोगलांवर ओढवली.

शुजातखानाने काबुलवर चाल करून जाण्यासाठी नेट धरला . गडंब नदी ओलांडल्यावर तो २१ फेब्रुवारी रोजी करपाखिंडीचे नाकाड (कोटल) चढून गेला. त्या रात्री पावसाने आणि हिमवर्षावाने कहर केला. कडक थंडी आणि हवेमधील गारठा यामुळे हिंदुस्थानी छावणीमधील प्रत्येकजण मृत्यूच्या दाराशीच जणू येऊन ठेपला . दोन्ही बाजूकडील उंच टेकड्यांवरील आपल्या ठाण्यांवरून पठाणांनी मोगलांच्या संत्रस्त झालेल्या फौजेला त्रास देण्यास सुरुवात केली . बादशाही फौज थंडीमुळे गारठून गेली . सकाळच्या प्रहरी अफगाणांनी मोगलांच्या पिडलेल्या फौजेवर सर्व बाजूंनी हल्ला चढविला . शुजातखान सेनापती या नात्याने स्वतःचे कर्तव्य विसरला आणि चढाईच्या जोषांत त्याने आघाडीवर वीरासारखे मृत्यूचे आव्हान स्वीकारले. सेनापती नाहीसा झाल्यामुळे त्याची सर्व सेना कचाट्यात सापडली परंतु जसवंतसिंगाने शहाणपणाने राठोड सैनिकांची तुकडी पाठविली . त्यांनी वेळेवर येऊन तोफखान्याच्या सहाय्याने शत्रूची कोंडी फोडली आणि उरलेले सैन्य सुखरूप छावणीवर परत आणले . या साहसाच्या कामगिरीवर असताना रजपुतांच्या ३०० सैनिकांनी आपल्या प्राणांचे बलिदान केले . शुजातच्या सैन्यांपैकी हजारो शिपायांची यापूर्वीच कत्तल झाली होती. (**एम्. ए.**, १३१; **ईश्वरदास**, ६७ अ—६९ अ).

औरंगजेबाचे पेशावरला प्रयाण आणि मोगलांचा विजय

बादशाही वर्चस्वाचा दबदबा पुन्हा निर्माण करण्यासाठी रावळपिंडी आणि पेशावरच्या मधोमध असलेल्या हसन अबदाल येथे बादशहा स्वतः गेला (२६ जून १६७४). त्या ठिकाणी अफगाणांविरुद्ध चाललेल्या कारवाईवर स्वतः देखरेख ठेवीत तो दीड वर्षे राहिला . बादशहाबरोबर प्रचंड सैन्य आणि भरपूर तोफखाना होता . सामर्थ्यवान आणि शस्त्रास्त्रांनी सुसज्ज असे सेनाविभाग मुबलक साहित्यानिशी शत्रूच्या प्रदेशांत पाठविण्यात आले अघारखान हा तुर्की सरदार अफगाणांबरोबर लढण्यात प्रसिद्धी पावला होता . त्याला सत्वर दक्षिणेमधून बोलाविण्यात आले आणि खैबरच्या प्रदेशातील वाट मोकळी करण्याची कामगिरी त्याच्यावर सोपविण्यात आली (जुलै). शुजातखानाच्या नाशाला कारणीभूत झाल्याच्या संशयावरून महाबतखानाची सुभेदारीवरून बडतर्फी करण्यात आली.

स्वतः औरंगजेब युद्धस्थळावर दाखल झाल्यामुळे बादशाही डावपेच आणि त्याबरोबरच मोगल शस्त्रास्त्रे यांचा प्रभाव पडू लागला . बक्षिशी, वर्षासने, जहागिरी आणि टोळीप्रमुखांना मोगलांच्या सैन्यांत अधिकारपदे बहाल करून अनेक टोळ्यांना मोगलांनी आपल्याकडे वळविले . समझोत्याला जे दादच देत नव्हते त्यांच्या खोऱ्यामधील वस्तीत पेशावरमधील सेनाविभाग घुसविण्यात आले . याप्रमाणे काही कालावधीतच घोराई, गिलजाई, शिरानी आणि युसुफजाई टोळीवाल्यांचा पराभव करण्यात आला आणि

त्यांच्या वस्तीची खेडी ओस पाडण्यात आली . दरियाखान आफ्रिडीच्या अनुचरांनी आपल्या गतापराधांची क्षमा होत असल्यास अचमलचे डोके मारून आणण्याचे वचन दिले (ऑगस्ट अखेर) (**अखबारात**, **वर्ष** १७, **ताव** २).

अघारखानाचे विजय

दरम्यान अघारखानाने पेशावरच्या पश्चिमेस पराक्रमाची जिद्द केली . प्रथम त्याने मोहमंड आणि त्याचे दोस्त यांनी केलेला रात्रीचा हल्ला उधळून दिला आणि सूडादाखल त्यांची ३०० माणसे ठार केली , त्यांची घरेदारे लुटून फस्त केली आणि त्यांची २००० माणसे कैद करून पुष्कळ लूट हस्तगत केली . नंतर त्याने खैबरखिंड खुली करण्याचा प्रयत्न केला . परंतु अली मस्जिद येथे घनघोर लढाई होऊन दोन्ही बाजूंचे अतोनात नुकसान झाले. खुद्द अघारखान जखमी झाला. अखेर वरील प्रयत्न सोडून देण्यात आला. हिंदुस्थानी सरदारांना अघारखानाबद्दल जे वैषम्य वाटे त्यामुळे अघारखान आणि त्याचे तुर्की अनुयायी यांच्या अडचणीत भर पडली . यानंतर त्याने ५००० रजपूत आणि त्याला मिळालेले अफगाण यांच्या साहाय्याने नंग्रहारचा ताबा घेतला आणि रस्ते वाहतुकीला मोकळे ठेवण्याचा प्रयत्न केला . गिलझाईनी जगदालक खिंड ताब्यात घेतली होती . त्यांचा अनेकवार पराजय करण्यात आला आणि त्यांना तेथून हुसकाविण्यात आले. सर्व मोगल सेनापतींमध्ये त्यालाच (अघारखान) सरहद्दीवरील टोळ्यांवर विजय संपादण्यात सातत्याने यश मिळाले होते आणि असे म्हणतात की , अफगाण आया आपल्या मुलांना झोपेसाठी दामटविताना त्याच्या नावाची भिती दाखविण्यासाठी उपयोग करीत . [अफगाण मोहिमेबाबत बादशहाचा बेत पुढीलप्रमाणे होता . राजपुत्र अकबर याने जलालाबादहून पूर्वाभिमुख होऊन कूच करावे , आपली आघाडीची तुकडी जसवंत सिंगाच्या हाताखाली देऊन खैबरच्या मार्गाने त्याची रवानगी करावी आणि आणखी एक तुकडी हसनबेगखान याच्या हाताखाली करपा खिंडीतून पाठवावी . याप्रमाणे तीन तुकड्या कूच करून जात असताना पेशावरहून अघारखानाच्या हाताखालील तुकडीने पश्चिमेच्या दिशेने चाल करून जावे. ही योजना यशस्वी झाल्यास खैबर टोळ्या वेढल्या जाऊन त्यांचा पूर्ण नाश होणार होता आणि अफगाण बंडखोरांना बाहेरून मदत मिळणे अशक्य होणार होते . (औरंगजेबाने अकबराला दिलेल्या सूचना करता पाहा **अखबारात**, १७–२). अघारखानाने कोणती कारवाई केली ते वर आलेलेच आहे . परंतु राजपुत्र अकबरालादेखील आखून दिल्याप्रमाणे मोहिमेची योजना पार पाडता आली नाही. त्याने काबूल येथे काही काळ त्या प्रांताचा राज्यकारभार सुव्यवस्थित करण्यात घालविला. नंतर त्याने फिदाईखानाकडे सर्वाधिकार सोपविले, आणि तो स्वतः हसन अबदालकडे परतला.] (**के. के.**, भाग २. २३७–२४६; **एम् यू.**, भाग १. २५०–२५१, २७६).

१६७५ मधील संग्राम : मुकर्रमखानावरील आपत्ती

१६७५ च्या वसंतऋतूत फिदाईखानाने जेव्हा काबूलहून पेशावरकडे परतीच्या कुचीला सुरुवात केली तेव्हा अफगाणांनी जगदालक खिंडीत त्याच्यावर हल्ला केला . त्याच्या आघाडीचा पराजय झाला , आघाडीच्या अरब सेनापतीला ठार करण्यात आले आणि या सेनानी भागांपैकी अनेक हत्ती , तोफखाना, सामानसुमान आणि बायकामुले यांना शत्रूने लूट म्हणून नेले. परंतु सुभेदाराचे अलौकिक धैर्य आणि साहसी शांतवृत्ती यांनी फौजेच्या मध्यावर ओढविलेल्या प्रसंगावर मात केली . अघारखान त्या वेळी गंडमनूच्या ठाण्यावर होता. त्याच्या कानावर या भयानक आपत्तीची बातमी जाताच तो झपाट्याने मजला मारीत मदतीसाठी आला आणि जगदालक खिंड ताब्यात घेऊन , डोंगरमाथ्यावर असलेल्या शत्रूचा त्याने निःपात केला.

परंतु जूनच्या सुरुवातीला अपजयाची भयानक आपत्ती मोगल सैन्यावर कोसळली . (**एम्. ए.**, १४४-१४५) मुकर्रमखान हा हाताखाली मोठा सेनाविभाग घेऊन अफगाणांविरुद्ध वजाऊर प्रदेशाच्या खपुरा येथील नाकाडावर (कोटल) सामना देण्यात गुंतला होता. तेथे एके दिवशी त्याला बेसावध ठेवून त्याच्यावर

अफगाणांनी प्रचंड संख्येने हल्ला केला आणि या हल्ल्यात त्याचे अपरिमित नुकसान केले.

ह्या हल्ल्याचा वचपा घेण्यासाठी ताबडतोब कारवाई करण्यात आली आणि अफगाणिस्तानामधील सर्व मोगल ठाण्यांची मजबुती करण्यात आली.

ऑगस्टच्या अखेरीस मोगलांना सोसाव्या लागलेल्या दोन नवीन पराभवांच्या बातम्या आल्या . हे अपजय छोट्याशा प्रमाणावर होते . जगदालकचा ठाणेदार हिजबरखान याला त्याचा मुलगा आणि इतर मोगल सैनिकांसमवेत ठार करण्यात आले . वरंगव आणि सूररबान यांचा ठाणेदार अब्दुल्ला यांचे अनेक सैनिक ठार करण्यात येऊन त्याची त्याच्या ठाण्यातून हकालपट्टी करण्यात आली . परंतु सर्वसाधारणपणे पाहता बादशाही फौजांनी डावपेचाच्या दृष्टीने पठाणांच्या प्रदेशातील अनेक ठाणी आणि किल्ले आपल्या ताब्यात ठेवून आपले आसन स्थिर ठेवले . १६७५ सालच्या अखेरीस परिस्थितीत इतकी सुधारणा घडून आली की बादशहाला हसन अबदाल सोडून दिल्लीला परत येणे शक्य झाले. (**ईश्वरदास**, ७१ अ)

(१४) अमीरखानाकडून अफगाणिस्तानचा उत्कृष्ट राज्यकारभार १६७८—१६९८

अमीरखानाची सुभेदार म्हणून नेमणूक

खलीलुल्लाचा मुलगा मिरखान हा बिहारमधील दोन बंडखोर अफगाण पुढाऱ्यांचा बंदोबस्त केल्याबद्दल आणि शहाबाजगढीमधील युसुफजाईना शासन केल्याबद्दल पूर्वीच प्रसिद्धी पावला होता . १६७५ मध्ये त्याला अमीरखान ही पदवी देण्यात आली आणि १९ मार्च १६७७ रोजी त्याला काबूलचा सुभेदार म्हणून नेमण्यात आले. (पाहा **एम्. ए.**, ८२, ११३, १४६; **ईश्वरदास**, ६१ ब, ७३ अ; **एम्. यू.**, भाग १. २७७-२८६) त्याने आपल्या अधिकाराचा ८ जून १६७८ रोजी ताबा घेतला आणि त्यानंतर २० वर्षांनी त्याचा मृत्यू होईपर्यंत मोठ्या कौशल्याने त्याने अफगाणिस्तानचा राज्यकारभार केला . त्याने अफगाणांची मने जिंकून घेण्याकडे आणि त्यांच्याशी सामाजिक संबंध जोडण्याकडे परिश्रमपूर्वक प्रयत्न केले . त्यात त्याला इतके यश आले की "टोळीप्रमुखांनी आपला बुजरा स्वभाव आणि उर्मट चालीरिती टाकून दिल्या आणि मनात कसलाही किंतु न बाळगता ते त्याला भेटण्यासाठी येऊ लागले ." त्यांचा त्याच्यावर अतिशय लोभ जडला आणि आपल्या घरगुती बाबीत सल्ला देणारा एक पुढारी या दृष्टीने ते त्याच्याकडे पाहू लागले. त्याने हुशारीने चालविलेल्या कारभारामुळे बादशाही राज्यकारभारात अडचणी आणण्याचे धोरण त्यांनी सोडून दिले आणि परस्परातील भांडणातच त्यांच्या शक्तीचा व्यय होऊ लागला . एकदा अमीरखानाने अचमलच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या मंडळाचा उपयोग अचमलाच्या अनुयायांनी जिंकून घेतलेल्या , प्रदेशाची वाटणी करण्याची मागणी त्याच्याकडे करण्याबद्दल चिथावणी देऊन केला. अचमलने ही योजना धुडकावून लावली आणि तो म्हणाला , "इतका छोटा प्रदेश इतक्या मंडळीत वाटता येणे कसे शक्य आहे ?" संत्रस्त झालेल्या त्याच्या अनुयायांनी त्याच्या चाकरीचा त्याग केला आणि ते रागारागाने आपल्या घरादाराकडे परतू लागले. अखेर अचमलला जमिनीची विभागणी करणे भाग पडले . त्याने साहजिकच जेव्हा आपले टोळीवाले आणि जातभाई ह्यांच्या हितसंबंधाबद्दल आस्था दाखविली तेव्हा त्याच्या इतर अनुयायांना त्याचा तिटकारा वाटला आणि ते त्याची छावणी सोडून गेले . अमीरखानाला राज्यकारभारात जे यश मिळाले त्याचे बरेचसे श्रेय त्याची बायको साहिबजी हिचा शहाणपणाचा सल्ला , दांडगा उत्साह आणि डावपेच यांना दिले पाहिजे. ही साहिबजी म्हणजे अली मर्दानखानाची मुलगी. (**हिस्ट्रॉरिकल एसेज, सर सरकार**, १८५—१९१).

अनुक्रमणिका

बादशाहाला अफगाणिस्तानात जे यश मिळाले ते तेथील लोकांना पैसे चारून [कालिमात १६ ब मध्ये औरंगजेब हा अमीरखानाच्या कारभारविषयक पद्धतीचे , त्याच्या न्यायीपणाचे आणि सर्वांबरोबर डावपेचाने आणि कौशल्यपूर्णतेने वागण्याच्या त्याच्या हातोटीचे वर्णन करतो . त्याचप्रमाणे त्या प्रांताकरता अंदाजपत्रकात आखून दिलेल्या खर्चात बचत घडवून आणण्याचे त्याचे कसब , दळणवळणाचे सर्व मार्ग खुले ठेवण्यात त्याने केलेली कामगिरी , डोंगरांमधील टोळ्यांना बादशाही चाकरीत घेऊन त्यांना काहीना काही व्यवसायात गुंतवून ठेवण्यात त्याने दाखविलेला समयोचितपणा आणि बादशाही खजिना , आपले स्वतःचे उत्पन्न आणि त्याने बेकायदा जमा केलेली दंडवसुली यांतून तेथील टोळ्यांना त्याने भरपूर पैसे चारण्याचे दाखविलेले धैर्य याचेही औरंगजेबाने त्यात चित्र रंगविलेले आहे . असाच मजकूर ११ ब मध्ये आहे. २५ ऑक्टोबर १६८१ मध्ये औरंगजेबाला अमीरखानाकडून एक खलिता मिळाला . त्यात तो खालीलप्रमाणे लिहितो , "सरकारकडून रस्त्याच्या संरक्षणासाठी अफगाणांना सहा लाख रुपये देण्यात यावेत म्हणून मंजुरी मिळाली होती . मी त्यापैकी १॥ लाख खर्च केले आणि उरलेले शाही खजिन्यात शिल्लक म्हणून आदा केले ."] आणि टोळीवाल्यांत परस्परांबद्दल कलागती लावून आणि त्याच्याच अपमानपूर्वक शब्दांत सांगावयाचे म्हटले तर "दोन हाडांच्या तुकड्यांना एकमेकांवर हापटून मोडण्याचे " धोरण स्वीकारून. यापुढे बादशाही साम्राज्यावर सरहद्दीपलीकडून हल्ले होण्याचे पूर्णपणे बंद झाले . डोंगरी जमातींना नियमित वर्षासने देण्यात येऊन खैबर खिंडीचा मार्ग खुला ठेवण्यात आला . अमीरखानाच्या मुत्सद्देगिरीमुळे अचमलच्या अनुयायांत फूट पडली आणि अखेर जेव्हा स्वतःस बादशहा म्हणवून घेणारा अचमल मरण पावला तेव्हा आफ्रिडींनी बादशहाबरोबर (मोगलांबरोबर) समझोता केला.

तरी देखील टोळीवाल्यांचा हा लढा पुढे अनेक वर्षे खुशहालखान खाटक याच्या कणखर आणि तडफदार स्वातंत्र्योत्सुक नेतृत्वाखाली चालूच राहिला . वंगश आणि युसुफजाई —खुद्द त्याचा मुलगा आश्रफ—हे त्याच्या विरुद्ध मोगल सैन्याच्या बाजूने लढत होते ; परंतु वार्धक्य किंवा ज्या कारणासाठी तो लढा देत होता त्यामध्ये अंतिम यशाबद्दलची संपूर्णपणे निराशा यामुळे त्याचा दुर्दम्य हटवादीपणा आणि त्याच्या मनातील भावनेचे जाज्वल्य ही यत्किंचितही कमी झाली नाहीत . त्याच्या खुद्द मुलानेच विश्वासघात करून त्याला शत्रूच्या स्वाधीन करीपर्यंत त्याने एकट्याने पठाणी स्वातंत्र्याचा ध्वज फडकावीत ठेवला . त्याच्या स्वतःच्या मातृभूमीतून त्याची हकालपट्टी झाली होती . तो स्वतः शत्रूच्या किल्ल्यात बंदिस्त होता तरी तो असे छातीठोकपणे सांगू शकत होता की औरंगजेबाच्या काळजाला कोणी ओरबाडून काढले असेल तर ती हिंमत माझीच ; खैबरखिंडीसाठी मोगलांना अमोल किंमत कोणी द्यावयाला लावली असेल तर ती करामत या पठ्ठ्याचीच.

या अफगाण युद्धामुळे पुढे मोगल रजपुतांचा जो संघर्ष निर्माण झाला त्यात अफगाणांची भरती करणे हे अशक्यप्राय झाले . त्याचप्रमाणे दक्षिणेमधील उत्कृष्ट सेना वायव्य सरहद्द प्रांताच्या सीमा रक्षण करण्यासाठी काढून घ्यावी लागल्यामुळे शिवाजीवरील मोगलांचे दडपण कमी झाले . शत्रूच्या तावडीत यामुळे जो कमजोरपणा आला त्याचा फायदा घेऊन मराठ्यांच्या राजाने डिसेंबर १६७६ नंतरच्या १५ महिन्यांत गोवळकोंड्यापासून कर्नाटकापर्यंत धडक मारली आणि तेथून म्हैसूर आणि विजापूरमार्गे रायगड गाठताना अनेक सनसनाटी विजय संपादन केले . शिवाजीच्या जीवनातील यशाने गाठलेला तो परमोच्च बिंदू होता ; परंतु शिवाजीला मिळालेल्या या अखंडित विजयाचे बरेचसे श्रेय आफ्रिडी आणि खाटक टोळीवाल्यांच्या मोगलांबरोबर झालेल्या संघर्षाला द्यावे लागेल.

●●●

अनुक्रमणिका

प्रकरण आठवे

औरंगजेबाचे धार्मिक धोरण आणि त्याला झालेली हिंदूंची प्रतिक्रिया

(१) मुसलमान राज्य, त्याची तात्त्विक भूमिका आणि स्वभावधर्म

मुसलमानी राज्याच्या उगमाच्या मुळ सिद्धान्ताप्रमाणे ते पूर्णपणे धर्मनिष्ठ असे राज्य आहे . त्या राज्याचा खरा राजा परमेश्वर आहे . पृथ्वीवरचे राजे हे त्याने केलेले कायदे भूतलावर सर्वांना बंधनकारक करण्यासाठी त्याने नेमलेले केवळ हस्तक आहेत . मुलकी अधिकाऱ्यांचे अस्तित्व हे खऱ्या धर्माचा प्रसार करण्यासाठी आणि त्याची सर्वांवर सक्ती करण्यासाठीच केवळ आहे . अशा तऱ्हेच्या राज्यामध्ये धर्मलंडपणाची बरोबरी तर्कदृष्ट्या राष्ट्रविद्रोहाबरोबर केली जाते कारण धर्मनियमबाह्य वर्तन करणारी व्यक्ती ही खऱ्या राजाची सत्ता झुगारून देते आणि त्याचे विरोधक जे लुच्चे देव आणि देवता यांच्या चरणी नतमस्तक होते. यामुळे पूर्वापार चालत आलेल्या इस्लाम धर्माच्या रूढ चाकोरीबाहेर असलेला कोणताही पंथ सह्य मानणे याचा अर्थ पापाबरोबर संगनमत करण्यापलीकडे दुसरे काही नाही असा आहे . तात्त्विक अथवा प्रत्यक्ष भूमिकेवरून पापाची अगदी परिसीमा गाठणे म्हणजे एकापेक्षा अधिक परमेश्वराच्या अस्तित्वाला मान्यता देण्यासारखे आहे . अनेकेश्वर ग्राह्य धरणे म्हणजे खऱ्या एका परमेश्वराबरोबर त्याची इतर अनेक देवदेवतांच्या स्वरूपात रूपे आहेत असे मानणे होय . यासाठी इस्लाम धर्मशास्त्र खऱ्या ईश्वर भक्ताला हे सांगते की त्याचे खरे इतिकर्तव्य "परमेश्वर साधनासाठी कष्ट करणे (जिहाद) हे आहे" [**जिहाद फी साबिल उल्लाह (कुराण ९-२९)** जिहादबद्दलच्या अधिक माहितीसाठी पाहा **ह्युजेस**, २४३-२४८, ७१०; **एनसायक्लोपिडीया ऑफ इस्लाम** भाग १. १०४१. "आणि ज्या वेळी इस्लामधर्माप्रमाणे पवित्र असलेले महिने उलटतात त्या वेळी परमेश्वराबरोबर दुसऱ्या देवता सह्य मानणारे तुम्हाला ज्या ज्या ठिकाणी आढळतील त्या त्या ठिकाणी त्यांना ठार मारा परंतु त्यांनी इस्लाम धर्म स्विकारला तर त्यांना त्यांच्या मार्गाने जाण्यात आडकाठी करू नका". (**कुराण** ९—५, ६) "धर्मलंडांना असे सांगा की ते त्यांच्या आताच्या भूमिकेपासून च्यूत झाले तर जे काही पूर्वी त्यांच्या हातून होऊन गेले आहे त्याची त्यांना क्षमा करण्यात येईल. परंतु त्यांनी आपल्याच हट्टाप्रमाणे पुन्हा वागण्याचे ठरविले तर युद्धाची परिसमाप्ती होईपर्यंत त्यांच्याबरोबर कणखर लढा द्या आणि खऱ्या धर्माच्या परमेश्वराचा विजय जोपर्यंत झाला नाही तोपर्यंत युद्ध थांबवू नका ." (भाग ८ -३९—४२).] त्याने ही साधना त्या क्षणापर्यंत चालू ठेवावयाची की ज्यावेळी काफर लोकांच्या भूमिविरुद्ध (दार-उल-हर्ब) सातत्याने चालू ठेवलेल्या युद्धाचा परिणाम दार -उल-हर्बचे रूपांतर इस्लामच्या जगताच्या एका भागात (दार-उल-इस्लाम) होईल. त्या क्षणी काफर लोकांच्या भूमीतील सारी प्रजा इस्लामचा खरा धर्म स्वीकारून पाक बनेल तेव्हाच हे युद्ध थांबेल . दार-उल-हर्ब जिंकून घेतल्यानंतर तात्त्विकदृष्ट्या तेथील सर्व प्रजा ही प्रत्यक्षात विजेत्या सेनेची गुलाम बनते.

सर्व लोकसंख्येचे मुसलमान धर्मांत परिवर्तन आणि प्रत्येक मतभेदाच्या स्वरूपाचे पूर्ण उच्छादन हे मुसलमानी राज्यसंस्थेचे एकमेव ध्येय आहे. जर का एकाद्या काफराच्या नशिबी अशा समाजव्यवस्थेत राहणे क्रमप्राप्त झाले तर त्याचे वास्तव्य केवळ नाईलाज म्हणून आणि बदलत्या काळापुरतेच मर्यादित असते . त्याच्यावर सर्व तऱ्हेची राजकीय आणि सामाजिक बंधने आणि अन्याय्यपूर्ण वागणूक लादली गेलीच पाहिजेत. इतकेच नव्हे तर त्याच्या मनावर खऱ्या धर्मतत्त्वाचा प्रकाशझोत पडावा आणि त्याचे नाव सच्चा अनुयायांच्या यादीत (म्हणजे मुसलमानी धर्मात) दाखल व्हावे याकरिता सार्वजनिक वा सरकारी रकमेतून (तिजोरीतून) त्याला पैशाचीही लाच देऊ केली जावी. ["अरब नसलेल्या देशातील मूर्तिपूजकांसंबंधी शर्फीचा असा दावा आहे की नाशाला ते देखील कारणीभूत असतात . परंतु इतर धर्मवेत्त्यांचे असे एकमत आहे की अशा लोकांना गुलामीप्रत आणून सोडणे हे कायद्याला धरून आहे . या हेतूने की त्यांना त्यांच्या गुलामीच्या बंधनातला जो काही तथाकथित कालावधी मिळेल त्या दरम्यान परमेश्वराची कदाचित त्याच्यावर कृपा होऊन त्याना खऱ्या मार्गाचा साक्षात्कार होईल. तरीदेखील या कालावधीत त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांची इहलोकातील राहणी ही इस्लामच्या तत्त्वप्रणाली संबंधात गुलामीसारखी आणि दुय्यम भूमिकेसारखी आणून सोडणे आवश्यक आहे ." (**ह्युजेस**, ७१०; **एनसायक्लो. ऑफ इस्लाम**, भाग १. ९१७; **दार—उल-हर्ब**)]

अनुक्रमणिका

(२) बिगर मुसलमानावरील राजकीय बंधने

साहजिकच बिगर मुसलमान हा राज्याचा प्रजाजन होऊच शकत नाही . त्याचे समाजातले स्थान हे अगदी खालच्या दर्जाच्या गटातील असे राहते . त्याची सामाजिक स्थिती ही थोड्याफार सवलती असलेल्या गुलामासारखीच . राज्यसंस्थेबरोबरील त्याचे संबंध विशिष्ट करारानुसार (zimma) ठरविले जातात. खऱ्या सद्धर्माच्या सेवकांचा पुढारी जो बादशहा त्याने मोठ्या औदार्याने त्याला जीवित आणि मालमत्ता यांचा जो वाटा देऊ केला असतो त्याच्याबदली त्याला काही निश्चित राजकीय आणि सामाजिक बंधने सोसावी लागतात आणि त्याला मोठ्या शिक्षेच्या ऐवजी कमी शिक्षा जणू दिली गेली म्हणून सरकारात पैसा जिजिया कराच्या रूपाने द्यावा लागतो.

त्याने आपल्या जमिनीच्या पोटी राज्याला कर हा दिलाच पाहिजे (खराज). हा कर पूर्वी मुसलमानांना द्यावा लागत नसे ; फौजेच्या खर्चासाठी त्याने इतर सख्तीचे करही दिलेच पाहिजेत कारण जरी त्याची अशा तऱ्हेचा वैयक्तिक कर देण्याऐवजी सैन्यात भरती होऊन चाकरी करण्याची इच्छा असली तरी तो सैन्यात भरती होऊ शकतच नाही (कारण सैन्यात फक्त पाक म्हणजे मुसलमान लोकच पाहिजेत असा कायद्याचा दंडक आहे). त्याशिवाय त्याने आपल्या आदबशीर वागणुकीने आणि कमी प्रतीची वस्त्र प्रावरणे वापरून आपण समाजातल्या अत्यंत कनिष्ठ वर्गात मोडतो असे दाखविणे अवश्य आहे . कोणताही बिगर मुसलमान (जिम्मी) उच्च दर्जाचा पोषाख करू शकत नाही किंवा घोड्यावर बसू शकत नाही की शस्त्र धारण करू शकत नाही ; समाजातला उच्चभ्रू वर्ग म्हणजे जो मुसलमान वर्ग त्यामधील प्रत्येक घटकाबरोबर त्याने आपली वागणूक अतिशय आदबशीर आणि जित मनोवृत्तीची निदर्शक अशीच ठेविली पाहिजे . [जिम्मी अथवा संरक्षित बिगर मुसलमानांकरिता पाहा **ह्यूजेस**, ७१०–७१३; **एनसायक्लोपिडीया ऑफ इस्लाम** , भाग १. ९५८, १०५१; Muir's Caliphate, **तिसरी आवृत्ती** १४९ , १५८. "प्रत्येक वयात आलेल्या , स्वतंत्र, ज्याला काहीही विकार झाला नाही अशा जिम्मी पुरुषाने जिजिया कर दिलाच पाहिजे. त्याची सर्व मालमत्ता, जरी तिचा तो उपभोग घेऊ शकत असला तरी, ती एकतर वक्फ म्हणून साऱ्या मुसलमान समाजाकरिता नियुक्त होते अथवा त्या परिस्थितीत देखील ती तो स्वतःची म्हणून संभाळू शकतो. तरीसुद्धा दोन्ही बाबतीत त्याला त्या मालमत्तेवर कर भरावा लागतो आणि त्या मालमत्तेपासून जमिनीवर बसणारा खंड , खिराज, जो मुसलमान मालक असला तर सर्वसाधारणपणे पडतो तोही सरकारला मिळतो . मुसलमान फौजेच्या उभारणीसाठी जो खर्च येतो त्यासाठी त्याच्याकडून इतर कर वसूल केले जातात . सच्चे मुसलमान जे असतील त्यासर्वांपासून आपण वेगळे आहो हे दाखविण्यासाठी त्याने पोषाख वेगळा केला पाहिजे , घोड्यावर बसता कामा नये अथवा शस्त्र धारण करता कामा नये आणि मुसलमानांबरोबर सर्वसाधारणपणे आदबीची वागणूक ठेवली पाहिजे. न्यायालयात साक्ष देण्याच्याबाबतीत, फौजदारी कायद्याच्या बाबतीत, संरक्षण मिळण्याबाबत आणि लग्नसंबंधातबिगर मुसलमान व्यक्तीवर सरकारकडून बंधने लादली जातात . त्याचप्रमाणे त्यांनी (जिम्मी) आपल्या धर्माचे पूजेअर्चेच्या बाबतीत पालन करताना मुसलमानांच्या भावना दुखावल्या जातील अशा तऱ्हेने उघडपणे वागू नये . जिम्मी हे मुसलमानी राज्याचे नागरिक नाहीत (असूच शकत नाही)" (**एनसायक्लो. ऑफ इस्लाम**, भाग १. ९५८–९५९.).]

मुसलमान धर्माच्या मूलतत्त्वांच्या सिद्धान्तावरील ग्रंथातील शिकवणीनुसार विद्वान काजी मुधीसुद्दीन याने अल्लाउद्दीन खिलजी याला असे निवेदन केले की "अशा तऱ्हेने जिम्मींचा (बिगर मुसलमान) बाबतीत त्यांना जी इतकी हीन आणि हलक्या दर्जाची वागणूक दिली जाते तिचा उद्देश जिम्मी हे पराकोटीच्या जीत अवस्थेप्रत कसे पोहोचले आहेत हे दाखविण्याचा आणि त्याबरोबरच इस्लामच्या सद्धर्माची थोरवी गाण्याचा आणि काफरांचे खोट्या धर्माचा पुरस्कार करणारे तत्त्वज्ञान कसे नीच आहे हे सांगण्याचा आहे. सद्धर्माचा पुरस्कार करणारा जो पैगंबर त्याने आपल्याला अशी स्पष्ट आज्ञा दिली आहे की त्यांना ठार मारा, त्यांची मालमत्ता लुटा आणि त्यांना कैदी बनवा . आपण ज्या विद्वान आणि थोर इमामांच्या (हनीफा) तत्त्वांचे अनुकरण करतो त्याशिवाय इतर कोणत्याही धर्मपंडिताने हिंदूंवर जिजिया कर लादावयास मुभा दिलेली नाही . इतर सर्व धर्मशास्त्रज्ञांच्या मताप्रमाणे हिंदूंसाठी कायदा एकच आणि तो म्हणजे मृत्यू अगर इस्लाम (धर्म स्वीकारणे)" (**तारीख–ई–फिरुझशाही**, २९०–२९१).

अनुक्रमणिका

हिंदू किंवा बिगर मुसलमान यांच्या बाबतीत न्यायालयीन साक्षीपुरावा , फौजदारी कायद्याखाली संरक्षण आणि विवाह याबाबत काही कायदेशीर बंधने असतात . सामाजिक करारानुसार राज्यसंस्था ही दुसरा पक्ष असते (जिम्मा). राज्यसंस्था ही बिगर मुसलमानांना जीवित आणि वित्त यांबाबत संरक्षणाची हमी देते आणि त्याचप्रमाणे त्यांना आपल्या धर्माप्रमाणे आचरण करता यावे म्हणून मर्यादित संरक्षणही देऊ करते. परंतु तो नवीन देवालये बांधू शकत नाही आणि ज्यामुळे इतरांच्या भावना दुखावल्या जातील अशातऱ्हेचे वर्तन तो आपल्या धर्माप्रमाणे आचरण करताना करू शकत नाही.

हिंदुस्थानवर विशेषतः सिंध प्रान्तावर आक्रमण करणाऱ्या पूर्वकाळातील अरब टोळ्यांनी अतिशय शहाणपणाचा आणि कायदेशीर असा मार्ग स्वीकारला आणि तो म्हणजे स्थानिक बिगर मुसलमान प्रजेची देवस्थाने आणि त्यांच्या धार्मिक चालीरिती यात यत्किंचितही हस्तक्षेप न करण्याचा . सुरुवातीसुरुवातीला बेदरकारपणे अथवा पद्धतशीरपणे कधीच मूर्तीची फोडझोड त्यांनी केली नाही . परंतु कालांतराने मुसलमानांच्या लोकसंख्येत वाढ झाली आणि अनिर्बंध सत्तेच्या उपभोगाच्या त्यांना चढलेल्या धुंदीत त्यांच्यामधील सहनशीलता पार लोपून गेली आणि दुसऱ्याचा छळ करण्याच्या वृत्तीचा त्यांच्यामध्ये उगम झाला [**इलियट**, भाग १. ४६९. बिगर मुसलमान हे असलेल्या देवस्थानांची दुरुस्ती अगर पुन्हा उभारणी करू शकत असत पण नवीन ठिकाणी नवीन देवस्थाने बांधण्याचा त्यांना मज्जाव होता . (**एनसायक्लो**. भाग १. ९५९) देवस्थानांची बांधणी बिगर मुस्लिमांनी मुसलमानी राज्यांमध्ये करणे म्हणजे बेकायदेशीरपणाचे होते . आपल्या घरातच केवळ ते पूजास्थाने उभारू शकत , परंतु ख्रिश्चन लोकांची देवस्थाने आणि जूंची देवालये ह्याचा नाश झाला अगर त्यांची पडझड झाली तर ती पुन्हा बांधणे आणि दुरुस्त करणे याचे संपूर्ण स्वातंत्र्य त्यांना होते ." (**ह्युजेस**, ७११) "धर्मसंबंधीच्या नीतीनियमानुसार आता असा ठाम निर्णय घेण्यात आला आहे की बरीच जुनी असलेली देवालये पाडण्यात येऊ नयेत अथवा नवीन बांधण्याची परवानगी देण्यात येऊ नये ," (औरंगजेबाचे बनारस फर्मान , **जे. ए. एस. बी**., १९११, ६८९).] एक सरसहा निर्घृण कत्तल सोडून दिली तर त्यांच्या काफर प्रजेला मुसलमान करण्याचा एकही मार्ग त्यांनी हाताळण्याचा शिल्लक ठेवला नाही. त्यांच्यावर लादण्यात आलेला व्यक्तिगत कर , पोषाख आणि त्यांची सर्वसाधारण सामाजिक चालचलणूक यांबाबत सार्वजनिकरित्या त्यांच्यावर लादण्यात आलेले अपमानास्पद निर्बंध याशिवाय बिगर मुसलमानांचे जीवन म्हणजे आशा -निराशा आणि भयभीती यांनी विसकटून टाकण्यात आले . हिंदुधर्माचा त्याग करून मुसलमानी धर्माचा स्वीकार करणाऱ्यांना द्रव्याची आणि सरकारी नोकरीच्या बक्षिसाची लालूच दाखविण्यात येऊ लागली. हिंदुधर्म आणि हिंदुसमाज यांच्या अध्वर्यूंची पद्धतशीरपणे लांडगेतोड करण्यात येऊ लागली . उद्देश असा की समाजाची बौद्धिक उभारी करणारा वर्गच नाहीसा व्हावा . त्याचप्रमाणे हिंदुसमाजात जातीय संघटनेच्या भावनेची पैदास होऊ नये आणि त्यांच्यात ऐक्याच्या भावनेची जोपासना निर्माण होऊ नये म्हणून त्यांच्या धार्मिक सभा, बैठकी आणि मिरवणुका यांवर बंदी घालण्यात आली. नवीन देवस्थाने बांधणे अगर जुन्यांची डागडुजी करणे यांवर संपूर्णतया बंदी घालण्यात आली. साहजिकच मोगल राज्यांत असलेल्या हिंदूंच्या देवस्थानांचा संपूर्णपणे ऱ्हास होणे हा केवळ काही कालावधीचाच प्रश्न उरला . परंतु इस्लामधर्मातील सत्तेच्या मदाने उन्मत्त झालेल्या काही विध्वंसकांनी काळाच्या नाशवंत वृत्तीचा ओघ अलीकडे खेचण्याचा प्रयत्न केला आणि जबरदस्तीने देवालयांची नासधूस आणि पाडझोड केली . त्यानंतरच्या कालखंडात बिगर मुसलमानी धर्मपंथांना सहिष्णुतेची वागणूक द्यावी असे जुन्या पिढीतील अरबांकडून प्रतिपादन केले जाई ते नव्या पिढीतील मुसलमानांकडून विशेषतः तुर्कपंथीयांकडून मुस्लीमधर्माच्या प्रसाराच्या दृष्टीने पापी कृत्य होय असे समजले जाई . त्यांच्या राज्याच्या सरहद्दीच्या पलीकडे हिंदूंच्या देवळांचे विध्वंसन आणि हिंदूंची निर्घृण कत्तल या गोष्टींमुळे त्यांच्या चढावू धोरणावर पावित्र्याचा साज चढविला जाई. साहजिकच मुसलमान जमातीमध्ये अशा एका मनोभावनेची धारणा झाली की हिंदूंची लुटालूट करणे आणि त्यांची कत्तल करणे ही मानवतेच्या दृष्टीने अतिशय विशुद्ध अशी कृत्ये आहेत आणि असे ते सहजतया समजू लागले . "परमेश्वराकडे जाण्याच्या मार्गातील आणखी एक टप्पा

गाठण्याकरता केलेली आराधना (जिहाद)" या दृष्टीने ते वरील गोष्टींकडे बघू लागले . काफरांची हत्या करणे (काफिर खुशी) हे मुसलमानाचे पुण्य कृत्य समजण्यात येऊ लागले . त्याने आपल्या भावनांवर काबू मिळविण्याची अगर आपल्या वासनांना जरबेत ठेवण्याची जरुरी नव्हती ; त्याचप्रमाणे धर्मभावनेच्या उच्च विचारांनी स्वतःच्या मनाला शांती मिळवून घेण्याचीही त्याने कदर करण्याची आवश्यकता नव्हती . त्याने काय करावयाला पाहिजे होते, तर आपल्या सहबांधवांपैकी विशिष्ट वर्गाची हत्या करणे अगर त्यांची जमीन आणि संपत्ती लुटणे हे होय . कारण एवढे केल्यानंतर त्याच्या आत्म्याची स्वर्गाकडे जाण्याची वाट आपोआपच खुली होणार होती . [इ. स. १९१० मध्ये बौत्रोस पाशा याचा एका इजिप्शियन मुसलमानाने खून केला . त्याचे कारण वैयक्तिक हेवादावा हे नसून राजकीय होते . ते म्हणजे देन्शवाई खेड्यातील लोकांना फाशीची शिक्षा देणाऱ्या न्यायालयाचा तो प्रमुख होता आणि पुराव्याच्या आधारावर खुनी लोकांचा गुन्हा भरपूर प्रमाणात सिद्धही झाला होता , तरी देखील इजिप्तच्या मुख्य काजीने जो न्याय दिला तो असा – इस्लाम धर्माप्रमाणे एखाद्या मुसलमानाने काफराला ठार मारले तर तो गुन्हा होत नाही . विसाव्या शतकातील सुसंस्कृत जगात इस्लाम धर्माच्या नीतितत्त्वांच्या उच्च स्थानावरील धर्मपंडिताचे हे मत आहे ही गोष्ट याठिकाणी विसरून चालणार नाही.]

जे धर्मतत्त्व आपल्या अनुयायांना चोरीमारी आणि खून ही तुमची धार्मिक कर्तव्ये आहेत अशी शिकवण देते त्या धर्मतत्त्वाची मानवजातीचा विकास अथवा जागतिक शांतता यांजबरोबर कधीच सांगड बसू शकत नाही.

(३) कुराणातील राजकीय ध्ययेवादाचा मुसलमान नागरिक आणि (subject creeds) इतर पंथीय नागरिकांच्या जीवनावर परिणाम

हे धर्मतत्त्व मुसलमानी धर्मपंथीयांच्या खऱ्या हितसंबंधांचे रक्षण करणारे होते असेही म्हणणे चुकीचे ठरेल. मुसलमानी धर्माचे राजकारण खऱ्या धर्माचा अनुनय करणाऱ्यांची एक संघटना घडवून आणी आणि ती म्हणजे राज्य -राष्ट्र ही होय . या संघटनेपुढचे एकमेव ध्येय म्हणजे युद्धवादाचा पुरस्कार . जोपर्यंत जिंकून घेण्यासाठी अजून अबाधित राहिलेले असे प्रदेश होते आणि जोपर्यंत लुटालूट करण्यासाठी एक तरी काफर जिवंत होता तोपर्यंत या मुसलमानी राज्याच्या भलभलाईत काहीही कमतरता नसे . ["जिंकून घेतलेल्या राज्यातील संपत्तीवरच अरब लोक आपली मिजाश पोशीत आणि जित हे त्यांची सेवाचाकरी करीत . लढाईत मिळालेल्या लुटीचा ४ /५ भाग हा प्रत्यक्ष युद्धात भाग घेणाऱ्या सैन्यात वाटला जाई . त्याचप्रमाणे जिंकून घेतलेल्या प्रदेशांतील लोकांवर लादण्यात येणारा व्यक्तिगत कर आणि जमिनीच्या मोजणीपासून मिळणारा खंड ही त्यांना संपत्ती मिळविण्याची आणखी साधने झाली . मुलकी आणि लष्करी खर्च भागविल्यानंतर त्यातून उरणारी शिल्लक म्हणजे अरब राष्ट्राला युद्धातून मिळणाऱ्या लुटीसारखीच . ही शिल्लक म्हणजे लूट होऊ लागली " (Muir's Caliphate, १५८; **इलियट**, भाग १, ४६१).] राज्यातील प्रमुख घटकांची बेसुमार वाढ होई आणि त्यांना वैभव प्राप्त होई. इतकेच नव्हे तर कला आणि उद्योगधंदे आणि विशिष्ट प्रणालीचा पुरस्कार करणारे वाङ्मय आणि चित्रकला यांचेही उत्पादन आणि भरभराट होई. परंतु मुसलमान राज्याच्या वाढीने कमाल मर्यादा गाठून जेव्हा त्या वाढीला आसाम आणि छटगावच्या डोंगराळ मुलखांत दणका बसतो आणि तिचे शतशः तुकडे बनतात किंवा महाराष्ट्राच्या छातीचा कोट केलेल्या फत्तरापुढे त्या वाढीला नांगी टाकावी लागते त्यावेळी मुस्लीम राज्याची अधोगती थांबवावयाला जगातली कोणतीच शक्ती समर्थ ठरत नाही . या मुस्लीम राज्याला कसलीच आर्थिक भूमिका नव्हती आणि शांततेच्या काळात ठामपणे उभे राहणे या राष्ट्राला शक्यच नव्हते.

कारण मुस्लीम राज्याने आपल्या प्रजेला जी अघोरी मानवतेची शिकवण दिली होती त्यामुळे त्या राज्यातील प्रमुख वर्गाचे शांततेशी वावडे आले होते आणि या जगात जीवन जगण्यासाठी जो प्रखर पण अबोल लढा द्यावा लागतो तो देण्याला हा वर्ग लायक राहिला नाही . जीवन हा परिस्थितीशी लढा नसून मुसलमानांनी बिगर मुसलमानांबरोबर सातत्याने देण्याची लढाई आहे असे शिक्षण त्यांना दिले गेले होते . किंबहुना लढाईशिवाय त्यांना दुसरी कसलीच उमका नव्हती, तर शांततेचे सहजीवन म्हणजे बेकारी, दुर्गुण

आणि अधोगती यांचे जिणे अशी त्यांची समजूत होती.

समाजातील मुसलमानांना खास व्यक्तिगत असे स्थान प्राप्त करून दिल्यावर मुस्लीम धर्माच्या स्थित तत्त्वप्रणालीच्या प्रगतीचा रोख थांबला . हा मुसलमानवर्ग सरकाराकडून मिळणाऱ्या वित्तावर जीवन जगण्यास सवकला , शांततेच्या काळात आळशीपणाने राहण्याकडे त्यांची वृत्ती साहजिकतया बळावली आणि स्वतःच्या पायावर जीवनातील संघर्षाबरोबर झुंज देत जीवन जगणे त्याला अशक्य झाले . सार्वजनिक अधिकारांच्या जागा म्हणजे सच्च्या मुसलमानांची जन्मसिद्ध मक्तेदारी आहे असे मानण्यात येऊ लागले आणि त्यामुळे आपल्या अंगचे कौशल्य दाखविण्यासाठी अथवा अधिक श्रम करण्यासाठी जी लालूच प्रत्येक व्यक्तीला असते ती जवळजवळ काढून घेतल्यासारखी झाली . गरिबांसाठी बांधलेल्या धर्मशाळा यांवर आणि रमजान , इतर पवित्र दिवस आणि सार्वजनिक उत्सवांचे प्रसंग यावेळी सरकारकडून खर्च केल्या जाणाऱ्या अफाट रकमा म्हणजे निरुद्योगीपणाला उघडउघड उत्तेजन दिल्यासारखे होते . याचा परिणाम असा झाला की साम्राज्यात निरुद्योगी आणि हपापलेला असा एक वर्ग निर्माण झाला . त्याने साम्राज्याची सगळी शक्ती खच्ची केली एवढेच नव्हे तर ज्यावेळी राज्याच्या वैभवाला उतरती कळा लागली त्यावेळी पहिला फटका बसला तो याच वर्गाला . संपत्तीमुळे आळसाचा उगम झाला आणि सुखासीन जीवनावर आसक्ती वाढली . अखेर परिणामी लवकरच अवनती बोकाळली आणि या अवनतीतून दारिद्र्य आणि विनाश यांचा धुडगुस सुरू झाला.

ह्याच अनुषंगात बिगर मुसलमान प्रजेला ज्या तऱ्हेची वागणूक दिली जात होती त्यामुळे त्यांच्याकडून राष्ट्राच्या शक्तीचा ज्या तऱ्हेने पूर्ण विकास होण्यास जी मदत झाली असती ती होण्यास प्रतिबंध झाला . ज्यावेळी एकाद्या वर्गाची सार्वजनिक नाचक्की आणि छळणूक कायदा आणि त्याचबरोबर जोडीने राज्यकर्त्यांच्या लहरीनुसार होते त्यावेळी तो वर्ग आपले जिणे जनावरांपेक्षा अधिक किमतीचे नाही असे समजून कसे तरी दिवस घालविण्यात समाधान मानतो . अशा परिस्थितीत समाजाची उन्नती होण्यास ज्या तऱ्हेने हातभार लावण्याची हिंदूंची कार्यक्षमता होती तिची त्यांच्याकडून अपेक्षा करणे चुकीचे होते . त्यांच्या नशिबी त्यांच्या धन्यासाठी लाकडे तोडणे आणि पाणी वाहणे याशिवाय दुसरे नव्हते , इतकेच काय तर त्यांच्या जीवनाची इतिश्री समाजाच्या अर्थिक गिरणभट्टीत आपल्या मेहेनतीचा कस टाकणे , दुसरे ध्येय नसल्यामुळे आपल्या पिंडांची बदमाषीच्या वृत्तीत जोपासना करणे आणि आपण केलेल्या श्रमाचे या नाही त्या रूपाने थोडे तरी फळ आपल्या पदरात पडावे यासाठी खुशामतीच्या एकमेव मार्गाचा अवलंब करणे यातच होणार होती . अशा तऱ्हेची परिस्थिती ज्या समाजात असते त्या समाजात व्यक्ती ही आपल्या कार्याचा उत्कर्षबिंदू गाठू शकत नाही आणि मनाची मौलिकता प्राप्त करून घेऊ शकत नाही . अशा व्यक्तिचे मन ध्येयवादाची पल्लेदार झेप कधीच घेऊ शकत नाही . हिंदू बुद्धिवादाला लागलेली कीड आणि हिंदुसमाजाच्या उच्च वर्गातील लोकांच्या सदसद्विवेकबुद्धीने गाठलेली नीच पातळी याशिवाय तत्कालीन हिंदुस्थानातील मुसलमानी सत्तेचा अधिक्षेप करणारा आणखी दुसरा कोणता पुरावा आपल्याला मिळणार आहे? इस्लामच्या राजकीय वृक्षाची त्याला आलेल्या फळांवरूनच जर परीक्षा करावयाची म्हटले तर संपूर्ण अपयशाशिवाय आपल्याला दुसरे काय दिसणार आहे?

भरपूर प्रवास केलेला आणि अत्याधुनिक जगातला एक गाढा तत्त्वज्ञ लिहितो , "इस्लाम हा एक असा धर्म आहे की ज्यात परमेश्वरापुढे सपशेल शरणागती आणि परमेश्वराच्या पायाशी पूर्ण लीनता आहे . परंतु या परमेश्वराचे देखील एक विशिष्ट स्वरूप आहे आणि ते म्हणजे युद्धाधिपतीसारखे . या निष्ठेची प्रत्यक्ष जीवनात जपणूक करणे यातच मुसलमानांच्या शिस्तीच्या कल्पना अभिप्रेत आहेत . इस्लामच्या अधिष्ठानाचे

हे जे लष्करी स्वरूप आहे त्यातच व्यक्तीशः मुसलमानांच्या अंगात असाव्या लागणाऱ्या अंगीभूत गुणधर्मांचा साक्षात्कार होतो आणि त्याचबरोबरच त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील मूलभूत कमकुवतपणाचे म्हणजे त्यांचे अती प्रतिगामित्व, परिस्थितीनुरूप जीवनात समरस होण्याची त्यांची नालायकी , ध्येयवाद आणि संशोधनशीलवृत्ती यांचा त्यांच्यामधील अभाव यांचे आपल्याला सहजगत्या स्पष्टीकरण मिळते . (**एच्. केसरलिंग**).

ज्यावेळी सार्वजनिक अधिकाराच्या जागांची वाटणी व्यक्तीच्या गुणावगुणांकडे न बघता तो कोणत्या जातीचा वा धर्माचा आहे यावर केली जाते त्यावेळी अशा राज्यात आपल्याला काहीच स्थान नाही अथवा अशा राज्यात आपण समभागी होऊ शकत नाही अशा तऱ्हेचे अनुमान काढण्याप्रत बिगर मुसलमानांची प्रवृत्ती बळावते . धर्मतत्त्वावर आधारलेल्या इस्लामचे राज्य ज्यावेळी विभिन्न पंथीय जनतेवर लादले जाते त्यावेळी सरदारी हुकुमशाही आणि परकीय सत्ता एकत्रित झाल्यामुळे होणाऱ्या विपन्नावस्थेचा कटू अनुभव बिगर मुसलमानी प्रजेला येतो.

हिंदुस्थानातल्या मोगल साम्राज्याचा विचार करावयाचा म्हटल्यास त्यात आणखी एका गोष्टीची भर पडते आणि ती म्हणजे ते राज्य अल्पसंख्यांकांचे बहुसंख्य जनतेवरचे होते . राजकीयदृष्ट्या हीनावस्थेला पोहोचलेल्या बहुसंख्य हिंदू प्रजाजनांमध्ये आणि या अल्पसंख्य राजकर्त्यांमध्ये असलेला फरक हा दोन जमातींमधील शारीरिक वा बौद्धिक विशिष्ट गुणावगुणांचा नव्हता तर फक्त विशिष्ट धर्माबाबतचाच होता . या बलवत्तर शासक धर्मावगुंठणाच्या बाहेरील हिंदू प्रजेला साहजिकपणेच असे वाटले की सार्वजनिक हितासाठी सरकारकडे सोपविलेल्या समाजाच्या धारणाशक्ती आणि संपत्तिस्थाने यांचा सरकारकडून गैरउपयोग केला जात आहे कारण ज्या धर्माचा निव्वळ उद्देश हिंदू जमातीचे पार उच्चाटन करणे असाच आहे त्याच्याच प्रसारासाठी सरकार त्या राबवीत आहे . अशातऱ्हेच्या राज्याला स्वतःला राष्ट्रीय म्हणून घ्यावयाचा कोणताही अधिकार पोहोचत नाही कारण या राज्याची उभारणी प्रजेचे प्रेम आणि निष्ठा यावर झालेली नाही.

(४) इस्लामची सहिष्णुता ही अपवादात्मक आणि कुराणाने घालून दिलेल्या तत्त्वाच्या विरोधी असते

प्रतिगामी इस्लामी धर्माने राष्ट्राचे रंगविलेले ध्येयवादी चित्र हे असे होते . पुष्कळदा तर्कट विचारसरणीवर सामान्य विचारसरणी आणि जुनाट धर्मबंधनावर मुत्सद्दीपणाही मात करीत असत . अनेकदा असेही होत असे की नैसर्गिकतया व्यक्तीच्या मनात परस्पर विरोधी शक्तीचा जो समुच्चय झालेला असतो त्यामुळे प्रत्येक राजाला आणि त्याच्या अधिकाऱ्यांना असहिष्णुतावादावर आधारलेल्या या पद्धतीची सर्वत्र किंवा संपूर्णतया अंमलबजावणी करणे अशक्यप्राय होत असे . त्यामुळे असे झाले की मुसलमान अमलाखाली देखील पुष्कळ वेळा असा काळ येई की त्यावेळी हिंदूंना सहिष्णुतेची वागणूक मिळे आणि त्यांची मालमत्ता सुरक्षित राखली जाई किंवा ज्या वेळी ध्येयवादाच्या अस्मितेने भारावलेला आणि वृत्तीने उदार असलेला सम्राट सिंहासनाधिष्ठ होई त्याचेळी तो वाङ्मय आणि कला , संपत्तिसाधना आणि सार्वजनिक कामगिरी यांमध्ये प्रगत होण्यास हिंदूंना उत्तेजन देई . अशा वेळी त्याचे राज्य सामर्थ्यशाली बनण्यास आणि त्या राज्याची भौतिक संपत्ती वाढण्यास मदत होई.

परंतु काफरप्रणित वागणुकीला अशा तऱ्हेने उत्तेजन देण्यात कसलाही धरबंध न पाळणे हे मूलतःच मुस्लीम नीतितत्त्वाप्रमाणे धोकादायक आणि अपवादात्मक होते . मुसलमान समाज अशातऱ्हेची वागणूक

म्हणजे इस्लामच्या प्रतिगामी ध्येयवादापासून झालेले गर्हणीय अधःपतन आणि राजकीय कर्तव्यपालनापासून अक्षम्य तऱ्हेने झालेली च्युती असे समजत असे . ज्यांच्या खड्ग सामर्थ्यावर राजसत्तेचे अधिष्ठान अवलंबून असे तो सैनिकवर्ग अशा तऱ्हेच्या उदारमतवादी सुलतानाला धर्मलंड अतएव त्यांच्यावर राज्य करण्यास नालायक असा समजत असे.

त्यामुळे बिगर मुसलमानांचा विकास आणि प्रगती इतकेच काय पण त्यांचे समाजातील सातत्याने चालू राहात असलेले जीवन हे मुस्लीम राज्याच्या मूलभूत तात्त्विक अधिष्ठानाशी विसंगत समजले जाई . जोपर्यंत मुस्लीम धर्माच्या विरोधकांचा समूळ उच्छेद झाला नाही किंवा मुसलमानांच्या हातातून सत्तेचा राजदंड हिसकावून घेतला जात नाही तोपर्यंत समाजाच्या राजकीय अधिष्ठानाची स्थिती ही नेहमीच अस्थिर असलेल्या समतोलपणासारखी अधांतरी राहते . याचा परिणाम असा होतो की राज्यकर्ते आणि प्रजाजन यांच्यामध्ये शत्रुत्वाची भावना बद्धमूल होते आणि याची अखेर म्हणजे आपल्याला असे दिसून येईल की विभिन्न धर्माच्या प्रजाजनांमिळून संघटित झालेल्या प्रत्येक मुस्लीम राज्याच्या सरतेशेवटी ठिकऱ्या ठिकऱ्या उडालेल्या आहेत. औरंगजेबाच्या कारकिर्दीत याच सत्याची प्रचिती आपल्याला मिळणार होती.

(५) औरंगजेबाचा हटवाद आणि त्याने हिंदूंच्या देवळांचा केलेला पद्धतशीर नाश

औरंगजेबाने हिंदू धर्माचा उच्छेद करण्याच्या आपल्या धोरणाची सुरुवात मोठ्या कावेबाजपणे केली. आपल्या कारकिर्दीच्या पहिल्या वर्षात त्याने बनारसमधील एका भिक्षुकाला सनद दिली . त्यामध्ये त्याने असे प्रतिपादले की आपल्या धर्माने (मुसलमान) हिंदूंची नवीन देवळे बांधली जाण्यास प्रतिकार करावा असे आपल्यावर बंधन घातले आहे पण जुन्या देवळांचा नाश करावा अशी सक्ती काही आपल्यावर केली नाही . इ. स. १६४४ मध्ये गुजरातच्या सुभेदारीवर असताना औरंगजेबाने अहमदाबाद येथील चिंतामणाचे नवीनच बांधलेले देवालय त्यामध्ये एका गाईची कत्तल करून बाटविले आणि त्या इमारतीचे रूपांतर एका मशिदीत केले. त्याचवेळी त्याने गुजरात सुभ्यामधील अनेक हिंदूंची देवालये पाडून टाकली . त्याच्या कारकिर्दीच्या सुरुवातीस ओरिसा प्रांतातील कटकपासून मेदिनीपूरच्या दरम्यान असणाऱ्या प्रत्येक खेड्यातील स्थानिक अधिकाऱ्यांना त्याने मागील १० ते १२ वर्षांत बांधण्यात आलेले प्रत्येक देऊळ अन् देऊळ पाडून टाकण्याचा हुकूम दिला. मग ते एकाद्या मातीच्या झोपड्यात का बांधलेले असेना. त्याचप्रमाणे कोणतेही जुने देवालय दुरुस्त करण्याची परवानगी देण्यात येऊ नये अशीही त्याने त्यांना आज्ञा दिली.

यानंतर ९ एप्रिल १६६९ रोजी त्याने एक सर्वसाधारण फतवा काढला . त्यानुसार "काफरांच्या सर्व शाळा आणि देवालये [औरंगजेबाच्या कारकिर्दीत पाडून टाकण्यात आलेल्या देवालयांची (खंड ३) यादी तत्संबंधी हुकुमाबरोबर पुढे दिलेली आहे .] पाडून टाकण्यात यावी आणि काफरांच्या धार्मिक चालीरिती आणि शिकवणूक यावर दडपशाहीचा वरवंटा फिरविण्यात यावा " अशी सरसहा आज्ञा अधिकारी वर्गाला देण्यात आली . औरंगजेबाची आसुरी दृष्टी आता अखिल हिंदुस्थानात सर्व हिंदूंना अतिशय पूज्य असलेल्या अशा मोठमोठ्या देवालयांवर पडली. ही देवस्थाने म्हणजे सोमनाथचे दुसरे देवालय , बनारस येथील विश्वनाथाचे मंदिर आणि मथुरा येथील केशवरायाचे देवालय.

मुसलमानी धर्मांधतेचे मथुरेचे पवित्र शहर हे नेहमीच खास लक्ष्य बनलेले आहे . बादशहाच्या राजमार्गावर आग्रा आणि दिल्ली या दरम्यान ते वसलेले आहे . हिंदूंवर दडपशाही करण्यासाठी औरंगजेबाने अबदुन नबी या तथाकथित धार्मिक गृहस्थाची मथुरेचा फौजदार म्हणून नेमणूक केली.

अनुक्रमणिका

दारा शुकोने मथुरेच्या केशवरायाच्या मंदिराला एक दगडी कठडा बांधून दिला आहे हे औरंगजेबाला कळले तेव्हा त्याने १४ ऑक्टोबर १६६६ रोजी तो पाडून टाकण्याचा हुकूम दिला.

यावर सर्वांत वरताण म्हणून १६७० च्या जानेवारीत त्याने ते देऊळ साफ पाडून जमीनदोस्त करण्यात यावे आणि मथुरेचे नाव बदलून ते इस्लामाबाद असे ठेवण्यात यावे अशातऱ्हेचे हुकूम पाठविले . साम्राज्याच्या सर्व शहरांत आणि जिल्ह्यांत मुहतसीब अथवा नीतिमत्ता नियामक अधिकारी (सेन्सॉर ऑफ मॉरल्स्) या अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येई . या अधिकाऱ्यावर सोपविण्यात आलेले आद्य कर्तव्य म्हणजे हिंदूंच्या देवस्थानांचा आणि पूजास्थानांचा समूळ उच्छेद करणे हे होते . १६८० च्या जूनमध्ये मोगल साम्राज्याबरोबर एकनिष्ठता बाळगून असलेल्या जयपूर राज्याची राजधानी अंबर येथील देवालयांचा विध्वंस करण्यात आला.

१६७४ मध्ये गुजरातच्या सुभ्यातील धार्मिक सनदांच्या रूपाने हिंदूंच्या ताब्यातील असलेल्या सर्व जमिनी (वजीफा) जप्त करण्याचा हुकूम औरंगजेबाने दिला.

(६) हिंदूंवर लादलेला जिजिया कर अथवा डोइपट्टी

(पाहा **हयुजेस्**, २४८; **इलियट**, भाग १. ४७६; **तारीख—इ फिरुझशाही**, २९०; **मिरात—इ अहमदी**, ३१३, ३१४; **ईश्वरदास**, ७४; **स्टोरीया**, २-४; **एम्. ए.**, १७४; **के. के.**, २-२५५, २७८, २७९, ३७७, ३७८)

मुसलमानी राज्यामध्ये राहण्यासाठी परवानगी मिळावी म्हणून बिगर मुसलमान अथवा अश्रद्धाळूंना जिजिया नावाचा कर देणे भाग असे . जिजिया म्हणजे (**सब्स्टिट्यूट मनी** अथवा **प्राईस ऑफ इन्डल्जन्स**) सरकारी अनुग्रह मिळावा म्हणून द्यावी लागणारी किंमत . हा कर पहिल्या प्रथम लादला तो महमद पैगंबराने. त्याने आपल्या अनुयायांना अशी आज्ञा दिली की "खऱ्या धर्माचे जे पालन करीत नाहीत त्यांच्याबरोबर त्या क्षणापर्यंत लढा द्या की ज्या क्षणापर्यंत दाती तृण धरून ते जिजिया कर देण्यास तयार होत नाहीत." (कुराण, ९· २९) दाती तृण धरून या वरील आज्ञेतील शब्दांचा अर्थ कुराणावरील मुसलमान टीकाकारांनी असा घेतला की जिजिया कर अशा पद्धतीने गोळा केला जावा की तो देणाऱ्याला तो मानहानीकारक आणि अपमानास्पद वाटावा. हा कर देणाऱ्याने पायी चालत आले पाहिजे आणि कर देताना त्याने तो उभा राहून दिला पाहिजे . कराचा स्वीकार करणारा मात्र कर घेतेवेळी आसनस्थ असेल . स्त्रिया, १४ वर्षांखालील मुले आणि गुलाम यांना करमाफी देण्यात आली होती . आंधळे, लुळेपांगळे आणि अर्धवट ह्यांच्याजवळ संपत्ती असेल तेव्हाच त्यांनी हा कर द्यावयाचा होता . भिक्षुक जर गरीब असले तर त्यांना कर द्यावा लागत नसे, परंतु ते जर श्रीमंत देवस्थानाशी संलग्न असले तर अशा धार्मिक देवस्थानांच्या प्रमुखांना हा कर द्यावा लागत असे . कर देणाऱ्यांच्या उत्पन्नाच्या प्रमाणानुसार या कराची आकारणी होत नसे , परंतु कर देणाऱ्यांचे किमानपक्षी तीन वर्ग त्यांच्या उत्पन्नानुरूप पाडले जात. ते म्हणजे ज्यांच्या मालमत्तेची किंमत २०० दिरहामच्या वर नाही असा गरिबांचा वर्ग , २०० आणि १० ,००० दिरहाम एवढी ज्यांच्या मालमत्तेची किंमत आहे असा मध्यमवर्ग आणि १० ,००० दिरहामच्या वर ज्यांच्या मालमत्तेची किंमत आहे असा श्रीमंतवर्ग. पेढीवाले, कापडाचे व्यापारी, जमीनदार, व्यापारी आणि डॉक्टरवर्ग यांचा समावेश वरच्या थरात करण्यात येई. शिंपी, रंगारी, मोची आणि जोडे बनविणारे वगैरे कारागिरांची गणना गरीबवर्गात करण्यात येई. ज्यावेळी या गरीब थरातील लोकांचे त्यांच्या धंद्यापासून त्यांना मिळणारे उत्पन्न हे त्यांच्या आणि

त्यांच्या कुटुंबियांच्या पोषणार्थ लागणाऱ्या खर्चापेक्षा अधिक असे त्यावेळी त्यांना जिजिया कर द्यावा लागे . भिकारी आणि दरिद्री हे साहजिकच करमुक्त असत.

वरील तीन वर्गांसाठी ठरविण्यात आलेले कराचे दर वर्षाला अनुक्रमे १२ , २४ आणि ४८ दिरहाम अथवा ३ ⅓, ६⅔, आणि १३ ⅓, रुपये असे होते . साहजिकच गरिबांवर पडणारा कराचा बोजा त्यांच्या कुलउत्पन्नाच्या कमीत कमी ६ टक्के होता . मध्यमवर्गावर पडणारा हा बोजा ६ ते ¼ टक्के इतका होता आणि श्रीमंतावर तो अगदीच कमी म्हणजे जेमतेम दरहजारी २ ½ टक्के एवढाच होता . आजच्या जगातील करपद्धतीसंबंधीचे जे काही सर्वसामान्य नियम आहेत त्यांच्या दृष्टिकोनातून जिजिया करपद्धती म्हणजे उघड उघड नियमभंग करणारी होती. कारण जिजिया करामुळे समाजातील अगदी गरीब हिंदूवर्ग जो होता त्याची त्यामुळे भयानक अशी पिळवणूक होत होती आणि केवळ आपल्या धर्माच्या नीतिनियमानुसार आपल्याला वागता यावे म्हणून औरंगजेबाच्या गरीब थरातील हिंदू प्रजेला त्यांच्या वार्षिक अन्नधान्यावर खर्च होणाऱ्या रकमेइतकी किंमत कराच्या रूपाने त्यांना द्यावी लागत होती . अकबराने हा कर रद्द केला होता आणि आपल्या बहुसंख्य प्रजेवर ह्या करामुळे जो मानहानीचा काळा डाग लागला होता तो नाहीसा केला होता (१५६४). औरंगजेबाच्या या धोरणाच्या विरुद्ध धोरणाचा त्याने पुरस्कार केला.

२ एप्रिल १६७९ या तारखेपासून साम्राज्याच्या सर्व भागांतील काफर (अश्रद्धाळू) प्रजेवर जिजिया कर परत लादण्याची शाहीफर्मांने काढण्यात आली . या फेरलादणीचा उद्देश औरंगजेबाच्या अधिकृत इतिहासकारांनी नमूद केल्याप्रमाणे "इस्लामचा प्रसार करणे आणि खऱ्या धर्माप्रमाणे न वागणाऱ्यांच्या धर्मपद्धतीचे निर्मूलन करणे हा होता ." दिल्ली आणि दिल्लीच्या आसपास राहणाऱ्या हिंदूंनी एकत्र येऊन हा कर मागे घेण्यात यावा अशी केविलवाणी याचना केली . पण बादशहाने या विनंतीकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले. पुढील शुक्रवारी किल्ल्याच्या दरवाजापासून तो जामामशिदीपर्यंतचा रस्ता दिनवाण्या हिंदूंच्या समुदायाने अडवून टाकला. त्यांना तेथून हटून जाण्यासाठी दिलेला इशारा त्यांनी मानला नाही. बादशहाने मशिदीत प्रार्थना करण्याकरता जाण्यासाठी जवळ जवळ एक तासभर निरर्थक वाट पाहिली आणि अखेर आपला विरोध दाखविण्यासाठी जमलेल्या त्या जनतासागरात हत्ती घुसविण्याचा त्याने हुकूम सोडला . अनेक लोक हत्तींच्या पायाखाली तुडविले गेले आणि बादशहाला जाण्यासाठी वाट करण्यात आली . शिवाजीने बादशहाला एक मार्दवयुक्त आणि परिणामी असे पत्र लिहून बादशहाने हिंदूंवर लादलेला नवीन कर हा अयोग्य आहे असे प्रतिपादन केले . सर्व मानवजातीचा पिता जो परमेश्वर त्याच्या नावाने त्याने बादशहाला आवाहन केले आणि सर्व धर्म हे परमेश्वराच्या दृष्टिकोनातून सारखेच असतात हे त्याच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न केला . पण शिवाजीने केलेल्या आवाहनाचा उपयोग उपड्या घड्यावर टाकलेल्या पाण्यासारखा झाला [**शिवाजी**, प्रकरण १३; खंड ३. परिशिष्ट ६.]

कराच्या रूपाने बादशाही खजिन्यात बरीच मोठी रक्कम जमा होई . उदाहरणार्थ गुजरातच्या सुभ्यामधून या करापासून मिळणारे वार्षिक उत्पन्न ५ लाख रुपये होते . जिजिया कर म्हणजे हिंदूंच्या दृष्टिकोनातून प्रत्येक नागरिकाकडून राजाला मिळणाऱ्या प्रत्यक्ष उत्पन्नाचा जवळ जवळ ⅓ भागा एवढा अधिक कर असे जर आपण विधान केले तर त्यात फारशी चूक असावयाचे कारण नाही . मुसलमान नागरिक असणे म्हणजे या जादा करापासून सूट असेच प्रमेय होते.

जिजिया कराची फेरलादणी करण्याचा औरंगजेबाचा उघड उघड उद्देश हिंदूंवर अधिकाधिक दडपण आणून त्यांना धर्मपरिवर्तन करण्यास भाग पाडणे आणि मुसलमानांच्या संख्येत भर घालणे हा होता .

अनुक्रमणिका

[औरंगजेबाच्या मर्जीतल्या सचिवाच्या सांगण्यावरून राजदप्तरावरून जो अधिकृत इतिहास लिहिला गेला त्यात असे म्हटले आहे की , "धार्मिक वृत्तीच्या बादशहाचा हेतू इस्लामधर्माची वृद्धी आणि अश्रद्धाळू (काफर) लोकांच्या चालिरितींचे उच्चाटन हा होता. त्यामुळे त्याने रबिऊल अव्वालच्या पहिल्या तारखेस (२ एप्रिल १६७९) एका फर्मानाने हुकून काढला की कुराणाच्या वचनाप्रमाणे प्रत्येक जिम्मीकडून तो दाती तृण धरून भरपाई करण्यास कबूल होईतोपर्यंत जिजिया कराची वसुली करावी " (**एम्. ए.**, १७४). सरकारी दप्तरावर आधारलेल्या दुसऱ्या एका इतिहासग्रंथात (**मिरात इ अहमदी**, ३७३) बादशहासंबंधी असेच विधान आहे. हल्लीच्या काही इतिहास लेखकांनी असा सिद्धात मांडला आहे की , जिजिया कर हा लष्करी नोकरीतून सूट दिल्याबद्दल व्यक्तीकडून बदली दिले जाणारे द्रव्य होय . ह्या सिद्धान्ताच्या पुष्ट्यर्थ इतिहासात काहीच पुरावा नाही कारण अगदी अलीकडे म्हणजे १० मे १८५५ रोजी युरोपीय तुर्कस्थानात "धर्माचे मुक्त पालन करण्यासाठी लादण्यात आलेल्या जिजिया कराच्या बदली लष्करी नोकरीतून सूट दिल्याबद्दलचा कर लादण्यात आला." (**एनसायक्लो. ऑफ इस्लाम**, भाग १, १०५२).] औरंगजेबाचा समकालीन इतिहासकार मनुची याबाबत म्हणतो "ज्या हिंदूंना जिजिया कर देणे अशक्य होते ते मुसलमान झाले . असे केल्याने जिजिया कर वसूल करणाऱ्यांकडून होणाऱ्या अपमानातून त्यांची मुक्तता होत असे...औरंगजेबाला या गोष्टीचा अत्यानंद होई."

(७) हिंदूंवर दडपशाही करण्यासाठी बादशहाने योजलेले उपाय

१० एप्रिल १६६५ रोजी बादशहाने एक हुकूम काढला . त्या हुकुमान्वये बाजारात विकण्यासाठी आलेल्या सर्व वस्तूंवरील महसूल अथवा जकातीचा दर हा मुसलमानांच्या बाबतीत त्या वस्तूच्या किमतीच्या २½ आणि हिंदू विक्रेत्यांच्या बाबतीत ५ टक्के असा जारी करण्यात आला.

९ मे १६६७ रोजी मुसलमान विक्रेत्यांना द्यावी लागणारी जकात पूर्णपणे रद्द करण्यात आली तर हिंदूंच्या बाबतीत ती पूर्वीच्याच दराने कायम करण्यात आली . यामुळे सरकारी तिजोरीचे भारी नुकसान होण्याची शक्यता होती कारण मुसलमान व्यापाऱ्यांशी संगनमत करून आपली मालमत्ता ही मुसलमानांच्या नावावर दाखविण्याच्या हिंदू मनाच्या वृत्तीला वरील गोष्टीमुळे चेतना दिल्यासारखे होणार होते.

हिंदूंवर आर्थिक दडपण आणण्यासाठी औरंगजेबाने योजलेला तिसरा उपाय म्हणजे मुसलमान झालेल्यांवर बक्षिसांची खैरात करणे आणि मुसलमान होण्याच्या अटीवर सरकारी नोकरीत मोठमोठ्या जागा देणे , तुरुंगातून मुक्तता करणे किंवा वादग्रस्त मालमत्तेचा वारसाहक्क बहाल करणे हा होय . (**इलियट**, भाग ३. ६०४; **एम्. ए.**, ५२८; **के. के.**, भाग २. ४६१; **एम्. यू.**, भाग २. २८१; **अहकाम**, १९७ ब; **मिरात**, ३१४).

१६७१ मध्ये बादशहाने एक हुकूमनामा काढून शाही जमिनीपासून खंडवसुली करणारे अधिकारी हे मुसलमानच असले पाहिजेत असा दंडक घातला आणि राज्यांतील सर्व सुभेदार आणि तालुकदार यांना हुकूम दिला की त्यांनी आपले हिंदू पेशकार [हेड क्लार्क] आणि दिवाण [अकाउन्टन्ट] काढून टाकावेत आणि त्यांच्या जागी मुसलमानांच्या नेमणुका कराव्यात . प्रांतिक सुभेदारांना हिंदू पेशकारांना काढून टाकल्यावर राज्यकारभार चालविणे हे अशक्यप्राय होऊन बसले, तरी देखील काही ठिकाणी हिंदू करोरींची [डिस्ट्रिक्ट रेंट कलेक्टर] जागा मुसलमानांनी घेतली . अखेर परिस्थितीनेच मात केल्यामुळे महसूल मंत्री आणि बक्षी या दोघांच्या खात्यात अर्धे पेशकार हिंदू असावेत आणि उरलेले अर्धे मुसलमान असावेत या गोष्टीला बादशहाने संमती दिली (**के. के.**, भाग २. २४९, २५२). औरंगजेबाच्या कारकिर्दीत "मुसलमान होण्याच्या अटीवर कानुंगो होता येते " असा वाक्प्रचार रूढ झाला . आज देखील पंजाबात अशी अनेक कुटुंबे आहेत की ज्यांच्याजवळील बादशाही सनदापत्रांत कानुंगोचा अधिकार मिळण्याकरता घातलेली अट निलाजरेपणाने घातलेली आपल्याला दिसते.

अनुक्रमणिका

मुसलमान धर्माचा स्वीकार केलेल्या काहींची हत्तीवरून मिरवणूक बादशाही हुकुमावरून , वाजतगाजत आणि ध्वजापताकांच्या सभारंभात शहरात काढण्यात आली . इतरांना दररोजचा पगार खजिन्यातून मिळू लागला आणि किमानअंशी हा पगार चार आणे होता. (**एम्. ए.**, ३७४; **मिरात**, ३१४;)

१६९५ च्या मार्च महिन्यात रजपुतांखेरीज सर्व हिंदूंना पालखीत बसणे अगर हत्ती किंवा अस्सल घोड्यावर स्वार होणे अथवा शस्त्र बाळगणे या गोष्टींची बंदी करण्यात आली . (**के. के.**, भाग २. ३९५; **एम्. ए.**, ३७०)

वर्षातील काही दिवशी सर्व हिंदुस्थानात हिंदू आपापल्या पवित्र तीर्थक्षेत्रांजवळ जत्रा भरवीत असत. अशा ठिकाणी स्त्रिया, मुलेबाळे आणि पुरुष मोठ्या संख्येने जमत , मांडव घातले जात आणि व्यापारी आपल्या राहुट्या उघडत . या ठिकाणी खेड्यापाड्यांतील स्त्रिया आपले दूरचे नातेवाईक आणि मित्रमंडळी यांना भेटत आणि मौजमजा करीत . इ. स. १६६८ मध्ये औरंगजेबाने आपल्या सर्व साम्राज्यभर अशा तऱ्हेचे मेळे भरविण्यास बंदा घातली.

त्याचप्रमाणे हिंदूंचा दिव्यांचा सण (दिवाळी) आणि वसंतऋतूतील उत्सव (होळी) हे गावाबाहेर साजरे केले जावेत असा बादशहाने हुकूम काढला आणि ते साजरे करण्याच्या पद्धतीवर निर्बंध घालण्यात आले.

(८) मथुरा जिल्ह्यातील हिंदूंवरील दडपशाही; शेतकऱ्यांचे उठाव

अशा तऱ्हेने खुद्द सरकारी यंत्रणेच्या सर्व शक्तींकडून हिंदू धर्मावर हे जे उघडउघड हल्ले होऊ लागले, त्यामुळे छळाने गांजून गेलेल्या हिंदू जनतेत साहजिकच असंतोषाची लाट निर्माण झाली . बादशहाला ठार मारण्याचे काही प्रयत्न झाले पण हे सर्व प्रयत्न भरीव नव्हते आणि त्यामुळे ते फसले.

इ. स. १६६९ च्या सुरूवातीसुरुवातीस मथुरा जिल्ह्यामध्ये लोकांच्या असंतोषाने बंडाचे मोठे उग्र स्वरूप धारण केले. (**एम्. ए.**, ८३, ९२–९४, ११०; **ईश्वरदास**, ५३; **अखबारात**, १२/२२, १२/२३, १३/७, १४/३)

१६६० च्या ऑगस्टपासून तो १६६९ च्या मेपर्यंत मथुरेचा फौजदार अबदुन नबीखान हा होता . त्याने मूर्तिपूजकांचा विध्वंस करण्याचे जे बादशहाचे धोरण होते त्यात बादशहाच्याही वरताण केली.

मथुरेचा फौजदार म्हणून नेमणूक झाल्यावर त्याने लगेच मथुरा शहराच्या मध्यभागी नाश केलेल्या एका हिंदू देवस्थानाच्या जागेवर जामा मशिद बांधली (१६६१–१६६२). १६६६ च्या उत्तरार्धात दारा शुकोने नजर केलेल्या केशवरायाच्या मंदिराचा दगडी चबुतरा त्याने सक्तीने हलविला . १६६९ मध्ये तिलपतचा जमीनदार गोकला याच्या नेतृत्वाखाली जाट शेतकऱ्यांनी बंडाचे निशाण उभारले तेव्हा अबदुन नबी हा त्यांच्यावर हल्ला करण्यासाठी वशरा नावाच्या खेड्यावर चालून गेला , परंतु झालेल्या धुमश्चक्रीत (१० मे रोजी) तो गोळी लागून ठार झाला . विजयोन्मादाने गोकलाने सदबादचा परगणा लुटून फस्त केला . मथुरा जिल्ह्यातील बंडाची झळ शेजारच्या आग्रा जिल्ह्यापर्यंत पोहोचली.

या घटनेमुळे बंडाचा बिमोड करण्यासाठी औरंगजेबाने मोठमोठया अधिकाऱ्यांच्या हाताखाली

सुसज्ज सैन्यदल रवाना केले. १६६९ च्या सर्व वर्षभरात मथुरा जिल्ह्यांत अव्यवस्था आणि गोंधळ यांचा एकच धुमाकूळ माजून राहिला होता. ४ डिसेंबर रोजी हसनअलीखानाने काही बंडखोर खेडुतांवर हल्ला चढविला. दुपारपर्यंत त्यांनी लढा दिला , पण त्यानंतर जेव्हा प्रतिकार करणे त्यांना अशक्य झाले तेव्हा त्यांच्यापैकी अनेकांनी आपल्या स्त्रियांना कंठस्नान घातले आणि आपल्या नंग्या तलवारी हातात घेऊन निराशेच्या पोटी निर्माण होणाऱ्या बेदरकार वृत्तीने लढत लढत ते मोगल सैन्यावर तुटून पडले.

पुढील महिन्यात हसनअलीखानाने गोकलाचा पराभव केला . जाट आणि इतर कसलेले शेतकरी बंडखोर २२००० च्या संख्येने जमा झाले होते. त्यांची आणि मोगल फौजेची गाठ तिलपतपासून २० मैलांवर पडली. परंतु हे युद्ध अतिशय भयानक झाले आणि अनेक प्रहरांपर्यंत चालू राहिले. परंतु अखेरीस मोगलांची कवायती फौज आणि तोफखाना यांच्यापुढे बंडखोरांचा इलाज चालला नाही. त्यांनी माघार घेतली आणि ते तिलपतच्या दिशेने पळाले . मोगलांनी तिलपतला तीन दिवस वेढा दिला आणि अखेर मोगल सैनिकांनी नंग्या तलवारीनिशी चढाई केली . युद्धात झालेला संहार भयानक होता . जेत्या मोगलांच्याकडील ४००० माणसे आणि जीत बंडखोरांपैकी ५००० हजार माणसे ठार झाली . गोकला व त्याची कुटुंबीय मंडळी आणि ७००० हजार बंडखोर मोगलांचे कैदी झाले. आग्र्याच्या पोलीस चावडीवर सर्वांच्या समक्ष जाट बंडखोरांचा पुढारी गोकला याचा एकएक अवयव तोडण्यात आला आणि त्याच्या कुटुंबियांना बळजबरीने इस्लामची दिक्षा देण्यात आली.

हसनअलीने योजलेल्या कडक उपायांचा योग्य तोच परिणाम झाला आणि मथुरा जिल्ह्यात शांततेचे वातावरण पुन्हा प्रस्थापित झाले . परंतु ही शांतता फार थोडा काळ टिकली . १६८६ मध्ये दुसऱ्या चार बंडाचा पुन्हा उद्‌भव झाला . या बंडाचा पुढारी राजाराम होता . त्याची हकीकत पुढे येईलच . (**ईश्वरदास**, ६१६)

(९) सतनामी पंथ; सतनामींचा उठाव, १६७२

(पाहा : **एम्. ए.**, ११५; **के. के.**, भाग २. २५२, २५४; **स्टोरीया**, भाग २. १६७, १६८)

ज्या सतनामींनी औरंगजेबाविरुद्ध उठाव केला ते खरे म्हटले म्हणजे **सध** sadhs होत. ते त्यांच्या स्वतःपुरते आपल्याला सतनामी म्हणून घेत . हे सतनामी फक्त एकेश्वर वादी होते (त्रिमूर्तीचा अवतार न मानणारे). सतनामी पंथाची स्थापना नरनौलजवळ विजेसर येथे विरभान याने केली . सतनामी पंथाचे मूळ आपल्याला रामदासी पंथामध्ये दिसू शकेल . हे लोक आपल्याला मुंडिया (shearlings) असे म्हणवून घेऊ लागले. कारण त्यांच्यामध्ये डोक्यावरील इतकेच नव्हे तर भुवयांवरीलही केस साफ काढून टाकण्याची पद्धती प्रचलित होती. दिल्लीच्या ईशान्येस ७५ , मैलांवर असलेल्या नरनौळ जिल्ह्यात या पंथाचा जबरदस्त प्रचार झाला आणि नरनौळ जिल्हा या पंथियांचा बालेकिल्ला बनला.

खाफीखानाने त्यांच्या चारित्र्याबद्दल ग्वाही देऊन त्यांचे वर्णन प्रामाणिक आणि सामर्थ्यशाली बंधुत्व वादाचा पुरस्कार करणारे असे केले आहे . तो म्हणतो , "जरी ते सर्वजण फकीरासारखा पोशाख करत असले तरी थोड्याशा भांडवलावर ते शेती अथवा व्यापार हा उद्योग करतात . आपल्या श्रद्धेप्रमाणे ते आचरण करीत असताना त्यांची इच्छा आपल्याला चांगले नाव मिळावे अशी असते . अप्रामाणिक अथवा बेकायदेशीर मार्गाने द्रव्यार्जन करण्याचा आपण प्रयत्न करावा अशी इच्छा देखील त्यांना होत नाही."

अनुक्रमणिका

ह्या लोकांचा सरकारजवळ जो खटका उडाला त्याला कारण मात्र निव्वळ प्रापंचिक (**टेम्पोरल**) असे झाले. "एके दिवशी नरनौळजवळ एका सतनामी शेतकऱ्याची एका शेताचे निरीक्षण करणाऱ्या पायदळ शिपायाबरोबर (piada) खूप खडाजंगी उडाली. आपल्याजवळील भल्या दांडग्या दंडुक्याने त्या शिपायाने त्या शेतकऱ्याचे डोके फोडले . सतनाम्यांच्या एका टोळीने हल्लेखोरावर हल्ला करून तो मरेपर्यंत त्याला बेदम मारले . शिकदाराला (**पेटी रेव्हेन्यू कलेक्टर**) हे कळताच त्याने या लोकांना पकडण्यासाठी पियादांची (पायदळी शिपाई) एक पलटण रवाना केली. परंतु सतनाम्यांनी मोठ्या संख्येने जमून पियादांना चोप दिला, त्यांच्यापैकी अनेकांना जखमी केले आणि त्यांची हत्यारे हिसकावून घेतली. सतनाम्यांची संख्या आणि मगरुरी क्षणाक्षणाला वाढू लागली."

परंतु लवकरच या भांडणाचा रंग पालटून त्याला धार्मिक स्वरूप प्राप्त झाले . खुद्द औरंगजेबावर हल्ला चढवून हिंदूंच्या धार्मिक मुक्ततेसाठी लढले जाणारे युद्ध असा बोलबाला या संघर्षातून निर्माण झाला . सतनाम्यांचे पुढारीपण एका वृद्ध महंतिणीकडे गेले . तिने अशी ग्वाही दिली की , तिच्या निशाणाखाली जे सतनामी लढतील त्यांना शत्रूच्या शस्त्रापासून कसलाही धोका पोहोचणार नाही आणि त्यांच्यापैकी एक जरी रणांगणात पडला तर त्याच्या जागी दुसरे ऐशी निर्माण होतील . एकाद्या प्रलय कालाच्या वडवानळासारखी सतनाम्यांची चळवळ फैलावली आणि या चळवळीच्या उग्र स्वरूपाने सरकारची मती गुंग होऊन गेली . काही कालावधीतच जवळ जवळ ५००० सतनामी शस्त्र घेऊन लढ्यासाठी सिद्ध झाले . स्थानिक अधिकाऱ्यांनी या उठावाच्या तीव्रतेला कमी लेखले आणि सतनाम्यांवर हल्ला करण्यासाठी त्यांनी छोटी छोटी पथके रवाना केली पण सतनाम्यांनी त्यांचा लागोपाठ पराजय केला . सुरुवातीला मिळालेल्या या विजयांमुळे बंडखोरांचा आत्मविश्वास वाढला आणि ह्या विजयाचे मूळ महंतिणीच्या मंत्रसामर्थ्यात आहे याबद्दल त्यांची खात्री पटली . नरनौळच्या फौजदाराचा पराजय होऊन त्याचे अपरिमित नुकसान झाले आणि शहराचा ताबा सतनाम्यांनी घेतला . विजयी बंडखोरांनी नरनौळ लुटले , तेथील मशिदी पाडून टाकल्या आणि जिल्ह्याचा ताबा आपापली ठाणी वसवून घेऊन जिल्ह्यात आपल्या नावे कारभार सुरू केला . शेतकऱ्यांपासून सारावसुली करण्यासाठी त्यांनी सुरुवात केली . सतनाम्यांच्या बंडाचे पडसाद दिल्लीपर्यंत पोहोचले. दिल्लीतले धान्याचे साठे घटले आणि नागरिकांमध्ये घबराट पसरून त्यांच्या चित्तवृत्ती विचलीत झाल्या. सतनाम्यांच्या मंत्रशक्तीच्या सामर्थ्यांचा प्रभाव शाही फौजेवर झाला आणि एका अमानुष शक्तीच्या भयाने ते गर्भगळीत झाले.

इतका प्रकार झाल्यावर औरंगजेबाचे डोळे खाडकन उघडले . १५ मार्च रोजी त्याने रणअंदाजखान आणि इतर मोठमोठे अधिकारी यांच्या हाताखाली १० ,००० सैनिकांचे एक भारी दल बंडखोरांविरुद्ध रवाना केले. या सैन्याबरोबर तोफखाना आणि बादशहाच्या खास शरीररक्षक दलापैकी एक तुकडी रवाना करण्यात आली . सतनाम्यांकडून होणाऱ्या तथाकथित जादुटोण्याला तोड देण्यासाठी औरंगजेबाने स्वतःच्या हाताने कागदावर प्रार्थना लिहिल्या आणि जादूच्या आकृती काढल्या . [औरंगजेबाची चालताबोलता महंत अशी ख्याती होती "आलमगीर जिंदा पीर."]

हे कागद त्याने आपल्या फौजेच्या नौबती निशाणांना शिवून टाकण्याचा आणि शत्रूसमोर प्रकट करण्याचा हुकूम दिला . दोहो पक्षांत झालेली रणधुमाळी महाभयंकर होती . युद्ध अतिशय कडवे झाले . त्यात २,००० सतनामी रणांगणावर पडले तर पुष्कळसे पाठलागात मारले गेले . "त्यांच्यापैकी फारच थोडे पळून गेले; देशाचा तो भाग काफरांच्या तडाख्यातून मुक्त करण्यात आला."

अनुक्रमणिका

(१०) शीख धर्माची वाटचाल, शीख धर्माच्या स्वरूपातील आणि धर्मप्रमुखांच्या उद्दिष्टांमधील बदल

१५ व्या शतकाचा अखेरीस पंजाबमध्ये बाबा नानक नावाच्या हिंदुधर्मसुधारकाचा उदय झाला . त्याने लोकांना धर्माच्या बाह्यस्वरूपाऐवजी धर्मतत्त्वाचे जे सार , त्याचे ग्रहण करण्यासाठी म्हणून आवाहन केले. इतकेच नव्हे तर रुढीने बुजबुजलेल्या आचारविचारांना जळत्या श्रद्धेचे पाणी देण्याची आणि धर्मग्रंथातील शिकवणीला कृतीचे मूर्त स्वरूप देण्याची त्यांना हाक दिली . लोकसंमत असलेल्या हजारो देवदेवतांच्या पूजेअर्चे पाठीमागे एकेश्वरतेचे गूढ तत्त्व सामावलेले आहे असे त्याने अट्टाहासाने प्रतिपादन केले आणि धर्म आणि पंथ याबाबत भेदाभेदाची तमा न बाळगता त्याने खऱ्या श्रद्धाळूंना आपल्या पंथात सामील होण्याचे आयोजन देऊन भावनात्मक्यैतेने एकत्र आलेल्या निवडक व्यक्तींची संघटना तयार करण्याचा प्रयत्न केला . बाबा नानकचा ध्येयवाद , त्याच्यानंतर शिखांचे पुढारीपण मिळालेल्या त्याच्या शिष्यवृदांनी जेव्हा स्वतःसाठी एका (**टेम्पोरल डोमिनिअन**) प्रापंचिक अधिराज्याची स्थापना केली आणि व्यक्तीची नैतिक उन्नती आणि बौद्धिक विकास यांच्या ऐवजी व्यक्तीच्या जीवनात लष्करी कवायतीला प्राधान्य दिले तेव्हाच विलयाला गेला . "आज शिखांमध्ये प्रगती आणि विकास यांचा ध्येयवाद दिसून येत नाही. त्यांचे रूपांतर आज अगदी एका छोट्या पंथात झाले आहे . अनेक शतके निघून गेली परंतु त्यांच्यामध्ये नवीन शिकवणीचा प्रणेता निर्माण होऊ शकला नाही." (र. टागोर)

नानक हा हिंदू खत्री (व्यापारी) जमातीपैकी असून त्याचा जन्म १४६९ मध्ये लाहोरपासून ईशान्येस ३५ मैलांवर तलवंडी (आता नानकाना) येथे झाला. त्याच्या पंथाचे सार म्हणजे एका चालत्याबोलत्या खऱ्या परमेश्वरावरील श्रद्धेत आणि व्यक्तीच्या जीवनातील वर्तनाला अशातऱ्हेने कलाटणी देणे की त्यामुळे त्या परमेश्वराची साधना प्रत्यक्षात करता येईल या ध्येयप्रणालीत होते.

कबीराच्याच शब्दांत नानकाने सांगितले की , "नम्रता आणि प्रार्थना , आत्मसंयमन, अंतर्मुख होणे आणि परमेश्वरावर एकटक नजर लावणे एवढ्याने परमेश्वराप्रत पोहोचता येईल ." नानकाचा मृत्यू १५३८ मध्ये झाला. त्याच्याभोवती सच्च्या पूजकांची संघटना निर्माण झाली आणि काही कालावधीतच तिला एका कडव्या पंथाचे स्वरूप प्राप्त झाले.

१६ व्या शतकामध्ये नानकापासून पाचवा शीख गुरू जो अर्जुन याजबद्दल सर्व मोगल बादशहांना अतिशय आदर होता. ह्या आदराला शीख धर्मगुरूंची निःसंग आणि भाविक राहाणी कारणीभूत झाली . शीख धर्माचे किंवा त्यांच्या गुरूचे इस्लाम बरोबर अथवा राजाबरोबर कसलेही भांडण नव्हते.

औरंगजेब बादशहा होण्याचे अगोदर धार्मिक भूमिकेवरून शिखांचा कधीही छळ झालेला नव्हता . जहांगीरच्या काळात त्यांचे मोगल सरदारांशी जे खटके उडाले त्याची कारणे संपूर्णतया निधार्मिक होती आणि त्याबद्दल जबाबदारी शीख धर्मगुरूंच्या स्वभावात जो बदल झाला त्यावरच टाकता येईल.

अर्जुन हा शिखांचा पाचवा गुरू (१५८१—१६०६). त्याच्या कालखंडात शीख पंथियांची संख्या अतोनात वाढली आणि त्याचबरोबर शिख धर्मगुरूंच्या संपत्तीतही भर पडली . त्याने आपल्याला कायम उत्पन्न मिळावे यासाठी सोय करून ठेवली . काबुलपासून तो डाक्क्यापर्यंत प्रत्येक शहरात जेथे जेथे शीख होते तेथे तेथे त्याने आपले प्रतिनिधी नेमले आणि त्यांच्याकडे शीख पंथियांकडून करपट्टी आणि देणग्या

वसूल करण्याची कामगिरी सोपविली . धर्मपंथियांकडून येणाऱ्या ह्या देणग्यांपैकी धर्मगुरूंच्या प्रतिनिधींकडून लाटली न जाणारी रक्कम अमृतसर येथे शिखांच्या केंद्रीय खजिन्यापर्यंत पोहोचत असे. शीख लोक धर्मगुरूला आधिभौतिक राजाचे स्थान देत. या गुरूच्या भोवती दरबारी आणि मंत्री यांचा नेहमी गराडा असे. त्यांना मसंद असे म्हणत. मसंद हा शब्द मसनद-इ-अला या शब्दाचा हिंदी अपभ्रंश. मसनद-इ-अला हे नामाभिधान दिल्लीच्या पठाण सुलतानाच्या सरदारांना दिले जाई . शीख धर्मगुरूने अभावितपणे राजपुत्र जहांगीराच्या सिंहासनाप्रीत्यर्थ चाललेल्या लढ्यातील प्रतिस्पर्धी खुश्राव याला आशीर्वाद दिले . इतकेच नव्हे तर खुश्रावला त्याने पैशाच्या रूपानेही मदत दिली . खुश्रावचा या युद्धात पराजय झाला . त्याला मदत दिल्याबद्दल जहांगीरने गुरू अर्जुनाला २ लाख रुपये दंडाची शिक्षा केली . गुरू अर्जुन याने दंड देण्याचे साफ नाकारले आणि त्या कालामध्ये कसलाही कर देण्यात टाळाटाळी करणाऱ्यांना जी शिक्षा दिली जात असे ती शिक्षा म्हणजे कैद आणि हालहाल करण्याची शिक्षा मोठ्या स्थितप्रज्ञतेने सहन केली . लाहोरच्या कडक उन्हात अंगाला पोळे देणाऱ्या तापलेल्या वाळूत सतत बसण्याची शिक्षा भोगत असताना शरीर खचून गेल्यामुळे गुरू अर्जुन हा १६०६ च्या जूनमध्ये मरण पावला.

त्याचा मुलगा हर गोविंद (१६०६-१६४५) याच्याबरोबर एका नवीन युगाला सुरुवात झाली . "त्याच्या बापाच्या विरोधी असे वर्तन त्याने केले . म्हणजे सातत्याने लष्करी कवायतीत वाकबगारी मिळविण्यासाठी त्याने शिक्षण घेण्यास सुरुवात केली आणि पद्धतशीरपणे शिकारीकडे आपले व्यवधान त्याने वळविले". त्याने आपल्या शरीररक्षकांची संख्या ५२ वरून वाढवीत वाढवीत त्यांना एखाद्या छोट्याशा सैन्याचे स्वरूप दिले . त्याने आपल्या एका अनुयायाला सांगितल्याप्रमाणे "गुरुगृही धर्म आणि ऐहिक सुखोपभोग यांची सांगड घातली जाईल ". शहाजहान गादीवर आल्यानंतर बादशहा अमृतसरनजीक रपेट करीत असताना गुरू गोविंद हा शिकारीचा पाठलाग करीत त्याच प्रदेशात शिरला. त्याच्या शीख अनुयायांचे एका पक्ष्याच्या शिकारीवरून बादशहाच्या सैनिकांशी भांडण झाले . दोन्ही पक्ष मारामारीवर आले आणि त्यात अखेर बादशाही सैनिकांना भरपूर मार खावा लागून त्यांची काही माणसेही ठार झाली . या बेदरकार बंडखोरांवर फौजेची रवानगी करण्यात आली . परंतु १६२८ मध्ये अमृतसरजवळ संग्रण येथे त्या सैन्याची अपरिमित हानी होऊन त्यांचा धुव्वा उडविण्यात आला . विजयी शिखांची कीर्ती दूरवर पसरली . "अनेक लोकांनी गुरू गोविंदला सामील होण्यासाठी एकच गर्दी केली . ते म्हणू लागले की बादशहाशी सामना देण्याची ताकद गुरू गोविंदशिवाय दुसऱ्या कोणाजवळ नाही ." लाहोरनजीक बादशाही सत्तेबरोबर अशा तऱ्हेने केला जाणारा उर्मट प्रतिरोध सहन केला जाणे शक्य नव्हते . मोठमोठी सैन्ये गुरू गोविंदसिंगाविरुद्ध पाठविण्यात आली. प्रथम जरी यशाचे माप गुरू गोविंदच्या पदरात पडले तरी अखेर अमृतसर येथील त्याचे घर आणि मालमत्ता जप्त करण्यात आली . सरतेशेवटी मोगलांचे हात पोहोचणार नाहीत अशा काश्मिरच्या डोंगरामधील किरातपूर येथे आसरा घेणे त्याला भाग पडले. (**दाबिस्तान**, १८८). तेथे तो १६४५ मध्ये मरण पावला.

यानंतर हरकिसन हा शिखांचा गुरू झाला . त्याचा १६६४ मध्ये मृत्यू झाल्यानंतर शिखांमध्ये गोंधळ आणि अहमअहमिका करण्याच्या प्रवृत्तीची वाढ झाली . "बकला येथील २२ लोक गुरू हरकिसन नंतर वारसा सांगण्यासाठी पुढे आले . स्वतःला शिखांचे धर्मगुरू समजणारी ही मंडळी शीख अनुयायांकडून बळजबरीने बक्षिसांची वसुली करू लागली ". काही काळानंतर हरगोविंदचा सर्वांत धाकटा मुलगा तेघ बहादूर याला गुरुपदावर बसण्यात यश मिळाले. बहुसंख्य शिखांनी त्याचे गुरुपद मान्य केले.

आनंदपूर येथे तो वास्तव्य करीत असताना शीख धर्मावर जे विनाकारण हल्ले होत होते आणि

त्यांच्या पवित्र गुरुद्वारांचा जो विध्वंस करण्यात येत होता त्या दृश्याने त्याच्या वृत्ती खवळून उठल्या . त्याने काश्मिरात हिंदूंवर सक्तीने इस्लाम धर्म लादला जात होता त्याला प्रतिकार करण्याची चेतावणी दिली आणि उघडउघड बादशहाविरुद्ध बंडावा पुकारला. त्याला दिल्ली येथे नेऊन तुरुंगात डांबण्यात आले आणि इस्लाम धर्माचा स्वीकार करण्याविषयी त्याला सांगी झाली . तेघ बहादूरने या गोष्टीला कडवा विरोध केला . त्यामुळे ५ दिवस त्याचे हालहाल करण्यात आले आणि १६७६ मध्ये बादशहाच्या खास हुकमावरून त्याचा शिरच्छेद करण्यात आला.

आता मात्र शीख आणि मुसलमानी धर्म यांमध्ये उघडउघड युद्धाचा वणवा पेटला . लवकरच शिखांमध्ये एका नेत्याचा उदय झाला आणि त्याने मोगल साम्राज्य आणि मुसलमान धर्म यांचा कडवा प्रतिकार करील आणि त्यांच्याशी जन्मजात कधीही न संपणारे वैर धरील अशा भूमिकेवरून शिखांची एका कार्यक्षम पंथामध्ये पुनर्घटना केली . ही व्यक्ती म्हणजे गोविंदराय . हा शिखांचा दहावा आणि शेवटचा गुरू (१६७६–१७०८) आणि तेघबहादूरचा एकुलता एक मुलगा . हा जन्माला येण्यापूर्वीच त्याच्याविषयी अशी भविष्यवाणी वर्तविण्यात आली होती की , "हा कोल्ह्यांना वाघांची शक्ती देईल आणि चिमण्यांना गरुडासारखी भरारी मारण्यास शिकवील".

या ठिकाणी गुरू गोविंदला जे यश मिळाले ते मिळण्यास कोणती कारणे प्रमाणभूत झाली त्याचा विचार करणे योग्य ठरेल . पहिले कारण म्हणजे शीख धर्मगुरूचे यथानुक्रमे मानवी भूमिकेपासून अतिमानुष स्थानाकडे होत गेलेले रूपांतर . कोणताही प्रश्न न विचारता अंधश्रद्धा ठेवून आपल्या गुरूची आज्ञा पालन करण्याचे शिखांना शिक्षण देण्यात येई . आपल्यापेक्षा श्रेष्ठ दर्जाच्या व्यक्तीच्या ठायी असलेल्या या अमाप श्रद्धेचा परिणाम असा झाला की एखाद्या रेजिमेंटमधील सैनिक जसे एका विशिष्ट ध्येयवादाच्या धाग्याने गुंफलेले असतात, तद्वत शीख लोक हे श्रद्धेच्या धाग्याने निकट गुंफले गेले . १७ व्या शतकामध्ये शिखांना परस्परांबद्दल वाटणारा बंधुभाव आणि प्रेम ही पराकोटीला पोहोचलेली होती . आपण, केवळ आपणच परमेश्वराचे पायिक आणि एकमेव लाडकी लेकरे आहोत अशी त्यांची भावना झाली होती . भाई गुरुदासाच्याच भाषेत सांगावयाचे म्हटले तर , "जेथे दोन शीख स्थित आहेत तेथे संतांच्या सहवासाची प्रचिती तुम्हाला येईल; जेथे पाच शीख एकत्र आले आहेत तेथे तुम्हाला प्रत्यक्ष परमेश्वरच दिसेल." धर्माच्या एकसारखेपणाने शिखांमध्ये जी ऐक्याची भावना निर्माण झाली त्या भावनेला बळकटी आली ती सर्व तऱ्हेचे जातिभेद नष्ट करण्याची गुरू गोविंद याने आपल्या अनुयायांना जी आज्ञा दिली त्यामुळे . तत्कालीन हिंदू–समाजात प्रचलित असलेली खाणे आणि पिणे यांवरील बंधने ह्यांचा शिखांनी केव्हाच त्याग केला होता . If Cromwell's Ironsides could have been inspired with the Jesuits unquestioning acceptance of their superior's decisions on moral and spiritual questions, the result would have equalled Guru Govind's Sikhs as a fighting machine.

(११) गुरू गोविंद, त्याचा ध्येयवाद आणि चारित्र्य

गुरू गोविंद याने संथपणे आपल्या अनुयायांत कणखरपणा निर्माण केला , त्यांना आगळ्या पोषाखाचे बंधन घालून दिले आणि नव्या धर्माच्या दिक्षेची शपथ दिली , इतकेच नव्हे तर त्याने उघडउघड इस्लामबरोबर शत्रुत्वाचे धोरण स्वीकारले . मुसलमानांच्या अत्याचारांविरुद्ध उठाव करण्यासाठी त्याने हिंदूंना साद दिली आणि मुसलमान संतांच्या कबरीला प्रणाम करणाऱ्या आपल्या अनुयायांना १२५ रुपये दंडाची शिक्षा फर्माविली . त्याचा ध्येयवाद आणि हेतू हे उघड भाषेत बोलावयाचे म्हटले तर भौतिकतेचे

पुरस्कार करणारे होते. “हे प्रिय माते, खालसांना साम्राज्याच्या देणगीचा लाभ कसा करून देऊ याचाच मी विचार करीत आहे”. त्याने आपले सारे आयुष्य एकाद्या राजासारखे घालविले.

गुरू गोविंद याने आपले जीवन उत्तर पंजाबच्या डोंगरात घालविले. तेथे राहून त्याने गरवालमधील जम्मूपासून श्रीनगरपर्यंतच्या प्रदेशात असलेल्या डोंगरी प्रमुखांबरोबर सातत्याने लढा दिला . गुरू गोविंदच्या अनुयायांनी चालविलेल्या अत्याचारी वर्तणुकीचा हे राजेराजवाडे तिरस्कार करीत तर खुद्द गुरू गोविंदच्या आकांक्षामुळे त्यांच्या पोटात भीतीचा गोळा उठला होता . दोहोमधील लढ्याला ह्याच गोष्टी कारणीभूत झाल्या. या डोंगरी प्रमुखांच्या सैन्याबरोबर सहकार्य करून गुरू गोविंदचा काटा काढण्याकरता सरहिंदमधून अनेकवार फौजा रवाना करण्यात आल्या . परंतु त्यांची गुरू गोविंदने धुळदाण उडविली . दिवसेंदिवस त्याचे पाठबळ वाढतच गेले. कारण पंजाबच्या दोआबामधून त्याच्याकडे माणसांची नुसती रीघ लागली आणि त्याने त्यांना आपल्या धर्माची दिक्षा दिली. अनेक मुसलमानांनी देखील शीख पंथाचा स्वीकार केला. आनंदपूरवर ५ वेळा हल्ला करण्यात आला . शेवटच्या हल्ल्यानंतर गुरू गोविंद याने किल्ला खाली केला. त्याचा लगोलग पाठलाग मोगल करीत असताना त्याच्यावर अनेक संकटे आली आणि अनेक जिवावरच्या प्रसंगांतून त्याला जावे लागले . एखादा शिकारी पाठीस लागलेल्या जनावरासारखी त्याला आपली आसऱ्याची जागा बदलावी लागत होती. त्याचे चार मुलगे या सत्रात प्राणाला मुकले . त्यानंतर गुरू गोविंदसिंग याने आपल्या काही थोड्या पण अतिशय विश्वासू अनुयायांना बरोबर घेऊन दक्षिण हिंदुस्थानकडे प्रयाण केले . इ. स. १७०७ मध्ये सिंहासनावर आलेल्या बहादुरशहाने (पहिला) त्याचे मन आपल्याबरोबर रजपुताना आणि दक्षिणेकडे येण्यासाठी वळविले . गुरू गोविंद गोदावरी तीरावर नांदेड येथे (हैद्राबादच्या ईशान्येस १५० मैल) १७०७ च्या ऑगस्ट महिन्यात काही पायदळी सैनिक आणि २०० -३०० घोडेस्वार यांसह येऊन पोहोचला . त्या ठिकाणी त्याचे एक वर्षापेक्षा जास्त वास्तव्य झाल्यावर एका पठाणाने सुरा भोसकून त्याला ठार मारले (१७०८). त्याच्या मृत्युबरोबर शीख धर्मगुरूंची परंपरा संपुष्टात आली.

वरील हकिकतीवरून आपल्याला असे दिसून येईल की औरंगजेबकालीन मोगल सरकार शीख धर्मगुरूंची सत्ता खिळखिळी करण्यात यशस्वी झाले . एक सर्वमान्य पुढारी आणि त्याच्याभोवती सारे शीख एकसमयावच्छेदेकरून जमू शकतील असा एक नेता मोगलांनी त्यांच्यापासून हिरावून घेतला . त्यानंतर सार्वजनिक शांततेचा भंग शिखांनी अनेक वेळा केला . पण त्यांच्या हालचाली तुरळक गटागटांनीच होत गेल्या. विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन नेत्याच्या पुढारीपणाखाली प्रचलित सत्तेविरुद्ध लढा देणारी एक सुसज्ज संघटना असे या लढ्याचे पूर्वी असलेले स्वरूप राहिले नाही , तर अतिशय शूर , उत्साही आणि कणखर अशा राज्यात वास्तव्य करून इतस्ततः भटकणाऱ्या लुटारू टोळ्या यापेक्षा त्यांना जास्त किंमत राहिली नाही. या शिखांच्या टोळ्यांपाठीमागे या देशात आपले स्वतंत्र असे सरकार स्थापन करण्याच्या ध्येयवादाची स्फूर्ती नव्हती तर लुटारूपणा करणे हेच आता त्यांचे ध्येय होते . जर रणजितसिंगाचा उदय झाला नसता तर शिखांचे मोठे आणि संघटित असे राज्य कधीच निर्माण झाले नसते तर साऱ्या पंजाबमध्ये शीख शिपाई सरदारांच्या हातात सत्ता असलेली आणि आपले संघटित टोळीवाले सैनिक आजूबाजूच्या प्रदेशात हल्ले करण्यासाठी आणि तो मुलूख उजाड करण्यासाठी पाठविणारी छोटी-छोटी संस्थाने निर्माण झाली असती.

औरंगजेबाच्या धर्मवेडेपणाचा याहीपेक्षा जो भयंकर परिणाम झाला तो म्हणजे दोन मोठ्या रजपुत जमातींना त्याने युद्धासाठी उद्युक्त केले हा होय. त्याची हकीकत पुढील प्रकरणात येईल.

अनुक्रमणिका

●●●

प्रकरण नववे

रजपुतान्यातील युद्ध : अकबराचे बंड

(१) औरंगजेब मारवाड जिंकून घेतो, १६७९

मारवाडचे महत्त्व

मारवाडचा मुलूख ओसाड आहे . परंतु डावपेचांच्या दृष्टीने मारवाडचे अतिशय महत्त्व आहे कारण मारवाडच्या सीमांमधून मोगलांची राजधानी आग्रा येथून अहमदाबादचे कारखानदारीने समृद्ध असलेले शहर आणि गजबजलेले कॅम्बेचे बंदर येथे जाण्यासाठी सर्वांत जवळचा आणि अतिशय सोपा मार्ग जातो . आग्र्याहून बादशाही मुलूखातील अजमेरच्या शहराकडे मोगलांशी एकनिष्ठ असलेल्या जयपूरच्या संस्थानांतून जाणारा पश्चिममार्ग हा सुरक्षित आणि सतत वाहतुकीचा होता . त्यानंतर हा रस्ता अरवली पर्वतामधील एका खिंडीतून जाई आणि तेथून पुढे मारवाडच्या पाली आणि झालोद शहरांतून सरळ मार्ग आक्रमित अहमदाबादला पोहोचे. अशा प्रांताला जिंकून मोगल साम्राज्याला जोडण्यात जर यश मिळाले तर उदयपूरच्या मानी सम्राटाच्या फळीवरच हल्ला करून ती ताब्यात घेतल्यासारखे झाले असते आणि अशा तऱ्हेने रजपुतांच्या मध्यातून लांबवर पसरलेल्या मुस्लीम प्रदेशाची पाचर घुसवून रजपुतान्याची दोन विभिन्न शकले पाडली गेली असती. मग अशा दोन शकलांना चिरडून टाकणे म्हणजे मोगलांच्या हातचा मळ होता . **जसवंत आणि औरंगजेब** :- त्या कालखंडात मारवाडचे राज्य हे उत्तर हिंदुस्थानातील प्रमुख असे हिंदुराज्य होते. त्या राज्याचा मुख्य जसवंतसिंग हा होता . जसवंतसिंगाला महाराजा ही पदवी होती आणि तेरा वर्षांपूर्वी (unrivalled) जयसिंगाचा मृत्यू झाल्यावर मोगल दरबारामधील हिंदूंचा एकमेव पुढारी असे त्याचे निर्विवाद स्थान होते . हिंदूंना बळजबरीने मुसलमान धर्माची दीक्षा देण्याचा औरंगजेबाचा जो डाव होता तो यशस्वी व्हावयाचा असेल तर जसवंतचे राज्य मोगल साम्राज्याचा एक प्रांत तरी होणे किंवा मोगल राज्यावर पूर्णपणे अवलंबून असलेले एक दुर्बल संस्थान अशी त्याची स्थिती होणे अपरिहार्य होते . पद्धतशीरपणे होणाऱ्या धर्मच्छलाच्या औरंगजेबाच्या धोरणाला हिंदूंकडून जो कडवा विरोध होत होता त्या विरोधाची एक हुशार नेता मिळून वाढणारी धार अगोदरच खुडून टाकणे अवश्य होते.

१० डिसेंबर १६७८ रोजी खैबर खिंडीमध्ये एका मोगल ठाण्याचे नेतृत्व करीत असताना जामरूद येथे महाराजा जसवंतसिंग मरण पावला . [जसवंतसिंग हा अफगाणिस्तानचा सरसुभेदार किंवा काबूल शहराचा सुभेदारही कधी नव्हता. जामरूदच्या मोगल ठाण्याची ठाणेदारी त्याच्याकडे होती .] जसवंतच्या मृत्यूची बातमी ऐकताच त्याचे राज्य ताब्यात घेऊन त्याच्यावर प्रत्यक्षपणे मोगलांचा अंमल जारी करण्याच्या दृष्टिने औरंगजेबाने पाऊले टाकली . ९ जानेवारी १६७९ रोजी यःकदाचित् जोधपूरकडून प्रतिकार झालाच तर तो दडपून टाकण्यासाठी खुद्द औरंगजेबाने अजमेरच्या दिशेने कूच केले.

मोगल मारवाड व्यापतात

जसवंतच्या मृत्यूमुळे सगळ्या राठोड सरदार मंडळीत गोंधळ आणि निराशेचे वातावरण पसरले होते. राज्य होते पण राज्याला अधिपती नव्हता . जसवंतचे उच्चपदस्थ अधिकारी आणि नाणावलेली फौज अफगाणिस्तानात कामगिरीवर होती. मारवाडच्या राज्यात प्रचंड संख्येने आणि सुसंघटित रितीने मोगलांची

जी सैन्ये घुसली त्या सैन्याला सुरुवाती-सुरुवातीला प्रतिकार करणे राठोडांना शक्य झाले नाही.

२६ फेब्रुवारी रोजी औरंगजेबाला बातमी लागली होती की जयवंतसिंगाच्या विधवा स्त्रीने दोन राजपुत्रांना लाहोर येथे जन्म दिला आहे . (**एम्. ए.**, १७३; **ईश्वरदास**, ७३ ब) परंतु कायदेशीरपणे आता जसवंतसिंगाच्या गादीचा वारसा त्याच्या राजपुत्रांकडे जातो या तत्त्वाला भीक घालण्याची औरंगजेबाची मनःस्थिती नव्हती. त्याचे धोरण काय वाटेल ते झाले तरी मारवाडचे राज्य मोगल साम्राज्याला जोडण्याचे होते. २ एप्रिल रोजी तो अजमिरहून दिल्ली येथे परतला . त्या दिवशीच शंभर वर्षांनंतर हिंदूंवर द्वेषमूलक असा जिजिया कर लादणारा फतवा औरंगजेबाने जारी केला (**एम. ए.**, १७४; **मिरात**, ३१३; **ईश्वरदास**, ७४ अ).

नागोरचा प्रमुख आणि जसवंतसिंगाचा आजेपुतण्या (grand nephew) इन्द्रसिंग राठोड याला २६ मे रोजी, ३६ लाख रुपये वारसाहक्क मिळविण्याबद्दल बादशहाला नजर केल्यानंतर जोधपूरचा राजा असे जाहीर करण्यात आले आणि नंतर त्याची मारवाडात रवानगी करण्यात आली. परंतु मोगल कारभारी आणि मारवाडात घुसलेले मोगल सेनानी हे मात्र त्या प्रदेशातच ठेवण्यात आले . अशा उघड उद्देशाने की त्यांच्या मदतीने इन्द्रसिंगाला मारवाडचा ताबा घेणे सोपे जावे.

(२) दुर्गादासाने अजितसिंगाला वाचविले त्याची हकीकत.

लाहोरला पोहोचल्यानंतर जसवंतसिंगाच्या दोन विधवा स्त्रियांनी फेब्रुवारी १६७९ मध्ये दोघा राजपुत्रांना जन्म दिला . दोघा राजपुत्रांपैकी एक काही आठवड्यातच मरण पावला तर दुसरा राजपुत्र अजितसिंग हा मात्र जोधपूरच्या सिंहासनावर अधिष्ठित होण्यासाठी जगला आणि त्याचे हे जीवन सुरस प्रसंगांनी नटलेले आणि रोमांचकारी असे झाले . जूनच्या अखेरीस जसवंतसिंगाची कुटुंबीय मंडळी दिल्ली येथे पोहोचली . औरंगजेबासमोर अजितसिंगाच्या कायदेशीर हक्कांचा दावा मांडण्यात आला . परंतु औरंगजेबाने अजितसिंगाला आपल्या अंतःपुरातच वाढविण्यात यावे असा यावर फक्त हुकूम दिला . तो वयात आल्यावर आपण त्याला मोगल दरबारची मनसबदारी देऊ आणि राजा म्हणून त्याला अभिषेक करू एवढे सांगून औरंगजेबाने त्याच्या योग्य वारसाहक्काला तेव्हा तरी पाने पुसली . एक समकालीन इतिहासकार असे सांगतो की मुसलमान होण्याच्या अटीवर औरंगजेबाने अजितसिंगाला जोधपूरचे राज्य देऊ केले होते (**दिलकुषा**, १६४).

औरंगजेबाने हा जो प्रस्ताव मांडला त्यामुळे राजनिष्ठ राठोडांमध्ये संतापाची एकच तीव्र लाट उसळली. आपल्या मृत राजाच्या युवराजाचे प्राण वाचविण्यासाठी त्यांनी एकमुखाने आपल्या प्राणांचे बलिदान करण्याची प्रतिज्ञा केली . राठोडांच्या शौर्यपरंपरेचा मेरूमणी दुर्गादास हा त्यांचा पुढारी आणि त्यांना स्फूर्ती देणारी शक्ती बनला. दुर्गादास हा मुनेरचा सरदार आणि जसवंतसिंगाचा मंत्री अस्करन याचा मुलगा. त्याने २५ वर्षे अविचलीत राहून जी मेहनत घेतली आणि ज्या अनेक युक्त्या प्रयुक्त्यांचा उपयोग केला, ते झाले नसते तर अजितसिंगाला आपल्या बापाची गादी मिळणे अशक्यप्राय होते . भयानक संकटांबरोबर झुंज देत आणि चहुबाजूंनी घेरणाऱ्या शत्रूबरोबर युद्ध करीत , त्याच्या देशबांधवांमध्ये निर्माण झालेल्या अविश्वासाच्या वातावरणाला आणि त्यांच्या दोलायमान होणाऱ्या निष्ठेला दादापुता करून संभाळत त्याने आपल्या धन्याच्या सच्चा भूमिकेचा विजयी ध्वज सातत्याने उंच फडकावित ठेवला . विंध्याचलासारख्या अचल असलेल्या त्याच्या हृदयावर ना मोगलद्रव्याची झिरपणी टिकत होती ना मोगल

शस्त्रास्त्रे त्याच्या निर्धाराला धक्का लावू शकत होती . साऱ्या राठोडांमध्ये त्याने एकट्याने राठोड शिपाईगड्याचे अंगी असलेला बेदरकारपणा आणि चढाऊ वृत्ती यांचा अजोड संगम दाखविला आणि आपल्या अंगचे हे गुण प्रकट करताना त्याने जो मुत्सद्दीपणा, कौशल्य आणि संघटकशक्ती दाखविली त्याची जोड मोगल दरबारातील एकाद्या राजमंत्र्यामध्येच आपल्याला आढळू शकली असती.

१५ जुलै रोजी बादशहाने दिल्ली शहराचा फौजदार आणि शाही रक्षकदलाचा कप्तान यांच्या हाताखाली जसवंतसिंगाच्या राण्या आणि अजितसिंग यांना पकडण्यासाठी आणि नुरगड किल्ल्याच्या तुरुंगात त्यांना डांबून ठेवण्यासाठी सुसज्ज सैनिकांना रवाना केले . तर इकडे जीवावर उदार होऊन मोगलांना प्रतिकार करत आणि वेळ आली तर आपल्या प्राणांचे बलिदान करून देखील माघार घेत घेत अजितसिंगाला सुखरूप पळवून नेण्याचा राठोडांचा बेत होता . जोधपूरचा एक भही सरदार रघुनाथ याने १०० जीवावर उदार झालेल्या सैनिकांना घेऊन राजवाड्याच्या एका बाजूने हल्ला चढविला . त्यांच्या भयानक हल्ल्यापुढे मोगल सैनिकांची हबेलंडी उडाली आणि क्षणिक झालेल्या या गोंधळाचा फायदा घेऊन अजितसिंगाला आणि पुरुषाचा पोषाख केलेल्या जसवंतसिंगाच्या राण्यांना घेऊन दुर्गादास निसटला आणि त्याने मारवाडच्या दिशेने कूच केले . जवळ जवळ दीड तास रघुनाथाने निकराची झुंज दिली आणि दिल्ली शहरात रक्ताचे सडे पाडले पण अखेर त्याला विरोचित मरण आले . आता मोगलांनी पाठलागाला सुरुवात केली, परंतु ते दुर्गादासाच्या पाठीवर आले तोपर्यंत त्याने नऊ मैलांची मजल गाठली होती . आता पाळी होती ती रणछोडदास बोधाची. आपल्या जवळील थोडीशी माणसे घेऊन पलट खावयाची आणि शत्रूची वाट अडवून दुर्गादासाला पळून जाण्यासाठी मोलाचा वेळ मिळवून द्यावयाचा एवढे करणे अत्यावश्यक होते . अशी धुमश्चक्रीची वेळ तीनदा आली . संध्याकाळच्या सुमारास रजपूत आणि मोगल यांच्यामध्ये तीन वेळा जे तुंबळ रणकंदन झाले त्यामुळे मोगल सैनिक पार थकून गेले होते . त्यांनी पाठलाग सोडला . दुर्गादासाने राजपुत्र अजित याला सुखरूपपणे मारवाडात पोहोचविले (२३ जुलै). राठोड घराण्याच्या कायदेशीर वारसाहक्काचा पाठपुरावा करणाऱ्या रजपुतांना राजपुत्र अजित हा स्फूर्तिस्थानाचे केन्द्र बनला . औरंगजेबाने मारवाडच्या बाबतीत स्वीकारलेल्या धोरणाचे तारू आपटी खाणार असे दिसू लागले . परंतु औरंगजेबाच्या मुत्सद्दीपणातून दुर्गादासाच्या कारवाईला तोडीसतोड असा प्रहार करणारी शक्कल निघाली . त्याने आपल्या अंतःपुरात एका गवळ्याच्या मुलाला अजितसिंग म्हणून वाढविले आणि दुर्गादासाने मारवाडात वाढविलेला राजपुत्र अजित हा तोतया आहे असे जाहीर केले. त्याचवेळी सिंहासनावर मारवाडचा राजा म्हणून अधिष्ठित झालेल्या इंद्रसिंगाला त्याने राज्य करण्यास नालायक म्हणून पदच्युत केले.

यानंतर औरंगजेबाने एका सामर्थ्यवान सेनाविभागाची मारवाडचे राज्य जिंकून घेण्यासाठी रवानगी केली. अंदाधुंदी आणि कत्तली यांच्या अनिर्बंध हैदोसामुळे त्या प्रांतात जणू प्रलयकालच जवळ आला आहे असे वाटण्याइतपत परिस्थिती निर्माण झाली.

२५ सप्टेंबरला बादशहाने आपले मुख्य ठाणे अजमेरला नेले . त्याचा मुलगा महमद अकबर याच्या नेतृत्वाखाली लढत लढत मोगल सैन्याने आगेकूच करण्यास सुरुवात केली . अजमिरचा फौजदार तहव्वुरखान याच्याकडे मोगल सैन्याची आघाडी होती . पुष्करच्या पवित्र तलावाजवळील बोआर नावाच्या देवळासमोर त्याची वाट मैरतिया जमातीच्या राठोडांनी सरदार राजसिंगाच्या नेतृत्वाखाली अडविली . तीन दिवस सतत घनघोर युद्ध झाले आणि या युद्धाचा शेवट बोआर देवळाच्या बचाव करणाऱ्या शूर राठोडांच्या विध्वंसनाने झाला . त्यानंतर मात्र रजपुतांनी आपल्या डोंगरांतील आणि जंगलांतील इतस्ततः दूरवर पसरलेल्या आपल्या ठाण्यांमधून मोगलांबरोबर गनिमीकाव्याचे युद्ध सुरू ठेवले . अखेर औरंगजेबाने

मारवाडाची जिल्ह्या जिल्ह्यात छकले केली आणि त्यावर फौजदार म्हणून एकेका मोगल अधिकाऱ्याची नेमणूक केली . (**एम्. ए.**, १७९-१८२; **ईश्वरदास**, ७६ ब ,) (ऑक्टोबरअखेर) इतका कडक बंदोबस्त असताना कसलाही आणि कितीही प्रतिकार टिकून राहणे अशक्य होते . सरतेशेवटी सारा मारवाडचा प्रदेश शत्रूच्या ताब्यात गेला. "जोधपूर आणि मारवाडच्या पठारांवरील सारी शहरे शत्रूच्या हाती पडली आणि ती जाळून पोळून फस्त करण्यात आली . सारी देवळे पाडून जमीनदोस्त करण्यात आली आणि त्यांच्या जागी मशिदींची उभारणी करण्यात आली." (**टॉड**, भाग २. प्र. ७)

(३) उदयपूरच्या महाराण्याबरोबर मोगलांचे युद्ध

मारवाडला लागलेले मोगल साम्राज्याचे ग्रहण म्हणजे मेवाड सहजतया घशात घालण्याची नांदीच होती. औरंगजेबाने जिजिया कर पुन्हा लादल्यावर त्याची अंमलबजावणी साऱ्या राज्यभर करण्याची मागणी महाराण्याकडे केली. (**के. के.**, भाग २. २६१) आता वेळ अशी आली होती की जर सिसोदियांनी राठोडांना खांद्याला खांदा लावून साथ दिली नसती तर दोन्ही जमातींची मोगलांनी वेगवेगळे गाठून केव्हाच चटणी उडविली असती आणि अशा तऱ्हेने सारा राजस्थान त्या उन्मत्त सम्राटाच्या पायाशी अगतिक होऊन पडला असता. अगदी हाच विचार महाराणा राजसिंग आणि त्याच्या साऱ्या जमातीतील शूर वीरांच्या मनात आला . अजितसिंगाची आई ही मेवाडची राजकन्या होती आणि नातेवाईक म्हणून अथवा रजपुतांच्या क्षात्रतेजाची ग्वाही देणारा सरदार म्हणून राजसिंग हा अजितसिंगाच्या मातेने आपल्या अनाथ राजबाळकाचे संरक्षण करण्याविषयी केलेले आवाहन डावलू शकत नव्हता.

राजसिंगाने युद्धाची तयारी करण्यास सुरुवात केली . औरंगजेबाने आपल्या नेहमीच्या झपाट्याने हालचाल करण्याच्या पद्धतीनुसार राजसिंगावर पहिला प्रहार केला . ७००० निवडक फौजेने हसनअलीखानाच्या हाताखाली पूरहून अगोदर आगेकूच केले आणि त्यांनी वाटेत राण्याच्या प्रदेशाची नासधूस करून मुख्य मोगल सैन्याच्या चढाईसाठी मार्ग मोकळा केला . युरोपियन गोलंदाज असलेल्या उत्कृष्ट मोगल तोफखान्याला जारीने प्रतिकार करू शकेल असे कोणतेच परिणामी साधन रजपुतांजवळ नव्हते. वरील गोष्ट ध्यानात घेऊन आणि राजस्थानच्या पठारावर मोगलचढाईला आपल्याला तोंड देता येणार नाही हे उमजून त्याने आपल्या राज्याचा उतारावर असलेला प्रदेश सोडून दिला आणि ज्या ठिकाणी मोगलांची चढाई करून जाण्याची हिंमत नव्हती अशा राजस्थानातील डोंगराळ मुलुखात त्याने आपल्या सर्व प्रजाजनांसह आश्रय घेतला . इतकेच नव्हे तर त्याने आपल्या राज्याची राजधानी उदयपूर देखील खाली केले. मोगलांनी उदयपूरचा ताबा घेतला आणि तेथल्या मोठ्या प्रसिद्ध देवळांचा आणि त्याचप्रमाणे उदयसागर तलावावर असलेल्या इतर तीन देवळांचा देखील त्यांनी विध्वंस केला . (**एम्. ए.**, १८२, १८६; **ईश्वरदास**, ७८ ब, ७९ अ; **के. के.**, भाग २. २६३).

उदयपूरच्या वायव्य दिशेकडे असलेल्या टेकड्यांच्या दिशेने रजपूत सैन्याच्या मागावर हसनअलीखानाने कूच केले. त्याला ताजी कुमक आणि पुन्हा भरपूर रसद मिळाल्यावर त्याने २२ जानेवारी रोजी महाराण्याचा पराभव केला . त्याचे सामानसुमान आणि छावणी हसनअलीखानाच्या हाती पडली . वाटेत त्याच्या हाती पुष्कळ दाणागोटा पडला. उदयपूरच्या आसमंतातील १७३ देवळांचा हसनअलीखानाने विध्वंस केला . चितोडचा ताबा मोगलांनी अगोदरच घेतलेला होता . फेब्रुवारीच्या अखेरीस औरंगजेबाने चितोडला भेट दिली तेव्हा तेथल्या ६३ देवळांचा नाश करण्यात आला . बादशहाने उदयपूर सोडले आणि २२ मार्च रोजी तो अजमिरला परतला . पुढील कारवाई करण्यासाठी तळ म्हणून उपयोगात आणण्यासाठी

राजपुत्र अकबर याने मोठ्या फौजेनिशी चितोडचा जिल्हा आपल्या ताब्यात ठेवला होता परंतु बादशाही ठाणी इतक्या दूरवर पसरली होती की त्यांचा बचाव करणे सहज शक्य नव्हते ; तर साऱ्या राजस्थानच्या इंचइंच जमिनीत रजपुतांच्या मनात मोगलांविषयीचा द्वेष ओतःप्रोत भरून राहिलेला होता . मोगलांच्या मेवाड आणि मारवाड येथील तळामधून अरवली पर्वताची रांग गेली होती आणि त्यामुळे ते तळ परस्परांपासून तोडले गेले होते . पर्वतांच्या शिखरांवर राजाने मोठी फौज घेऊन तळ दिला होता . त्या ठिकाणांपासून त्याला केव्हाही झपाट्याने उतरता येत असे आणि मनाला येईल त्याप्रमाणे मोगल फौजांवर पूर्वेच्या दिशेने अथवा पश्चिमेच्या दिशेने प्रभावी हल्ले चढविता येत असत . याउलट मोगलांना चितोडहून दक्षिण मारवाडमध्ये फौजा न्यावयाच्या म्हणजे वेदनूर , बेवाड आणि खोजात जिल्ह्यांमधून अतिशय लांबचा आणि कंटाळवाणा असा पल्ला मारावा लागत असे.

मोगलांच्या अडचणी

मेवाडचा उत्तुंग आणि उदयपूरपासून पश्चिमेकडे कमळमीरकडे आणि राजसमुद्र तळ्यापासून तो दक्षिणेकडे साळुंब्रापर्यंत पसरलेल्या पर्वतराजींनी एक प्रचंड असे कडे निर्माण केले होते . हा सर्व देखावा एखाद्या अजिंक्य दुर्गासमान भासावयाचा . या दुर्गाचे तीन दरवाजे एक पूर्वेला , एक उत्तरेला आणि एक पश्चिमेला म्हणजे जणू काही अनुक्रमे देववारी , राजसमुद्रा आणि देवसुरी असे भासमान व्हावयाचे . या अजिंक्य दुर्गाच्या या दरवाजांतून मन चाहेल तेव्हा वाटेल तेवढ्या संख्येने रजपूत सेना सुसाट वेगाने बाहेर पडे आणि एकट्यादुकट्या मोगल ठाण्यावर हल्ला करून त्यांना उधळून टाकी . याउलट मोगलांना जेव्हा रजपुतांच्या हल्ल्याला तोंड देण्यासाठी आपल्या फौजेची जमवाजमव करावयाची असे त्यावेळी त्यांना वर्तुळाकार अशी हालचाल करावी लागे आणि या वर्तुळाचा मध्यबिंदू राण्याच्या ताब्यात होता.

राजपुत्र अकबर याला चितोड येथे पाठीमागे ठेवण्यात आले होते आणि त्याच्या ताब्यात अरवलीच्या पूर्वेकडील आणि अजमिरच्या दक्षिणेकडील सर्व मोगल ठाणी देण्यात आली होती . परंतु या दूरवर पसरलेल्या प्रदेशाचे संरक्षण करण्याच्या दृष्टिने त्याच्या जवळील सेना फारच थोडी होती . याउलट रजपूत आपल्या मायभूमीतच लढा देत होते . त्यांना तेथल्या जमिनीची तसूनतसू माहिती होती आणि तेथल्या शेतकरी वर्गाचे त्यांना सर्वतोपरी साहाय्य होते . तर त्या ओबडधोबड आणि दंतूर प्रदेशात मोगल हे अगदी अनोळखी होते आणि त्यांना जी हालचाल करावी लागत होती ती त्यांच्या विषयी शत्रुत्वाची भावना मनात बाळगणाऱ्या जनतेमधून.

रजपुतांचे विजय

बादशहा मार्चमध्ये अजमिरला परतल्यावर रजपुतांच्या कारवायांना आणि चळवळींना जोर चढला . त्यांनी मोगलांवरील हल्ले वाढविले , पुरवठ्याची साधने तोडून काढली आणि एकट्यादुकट्या सैनिकांना कापून काढले आणि अशातऱ्हेने मोगल ठाणी धोक्यात आणून त्यांनी आपल्या सामर्थ्याबद्दल शत्रूमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण केले . मोगल ठाण्यांचा ताबा घेण्यासाठी अधिकारी मिळेनात . कारण अशातऱ्हेने जीवावरचा धोका पत्करण्यासाठी एकही मोगल लष्करी अधिकारी तयार होईनासा झाला . कोणत्याही खिंडीत प्रवेश करण्याचे मोगल सैनिक नाकारू लागले . मुख्य तळापासून अगदी नजीकच मोगल फौजेच्या तुकड्या कूच करून जाऊन छावणी देऊ लागल्या आणि पुढे कूच करण्यास नकार देऊ लागल्या.

अनुक्रमणिका

पुढील मे महिन्याच्या मध्यात चितोड येथील अकबराच्या छावणीवर रजपुतांनी एकाएकी रात्रीच्या सुमारास हल्ला चढविला. मोगल पहारेकऱ्यांना फसवून आत शिरलेल्या रजपूत सैनिकांनी मोगल छावणीत बरीच कत्तल केली . महाराणाही आपल्या डोंगरातील छावणीतून खाली उतरला आणि त्याने वेदनूर जिल्ह्यात स्वैरसंचार सुरू केला आणि अकबराचा अजमिरबरोबर असलेला दळणवळणाचा मार्ग धोक्यात आणला. मे महिन्याच्या अखेरीस मोगल सैन्यावर मोठा बाका प्रसंग येऊन नामुष्कीची पाळी आली . राजाने पुन्हा एकदा अकबरावर अचानक हल्ला केला आणि त्याचे अतोनात नुकसान केले . काही दिवसानंतर माळव्याहून अकबराच्या सैन्याला दाण्यागोट्याची रसद घेऊन येणाऱ्या वंजाऱ्यांवर हल्ला करून रजपुतांनी १०,००० लादलेले बैल पळवून नेले . राण्याचा मुलगा भीमसिंग याच्या हाताखालील एका सैन्याच्या तुकडीने साऱ्या देशात संचार केला आणि मोगलांच्या कमकुवत ठाण्यावर झपाट्याने आणि अचानक हल्ले करून त्यांचा साफ धुव्वा उडवून दिला. "भीतीमुळे आमचे सैन्य अगदी गलितगात्र होऊन गेले आहे." अशी अकबराने आपली बाजू मांडताना तक्रार केली. (**आदाब; टॉड**, भाग १ पान ४००)

अकबराचे हे दणदणीत पराभव झाल्याचे पाहिल्यानंतर बादशहाचा त्याच्यावर अतिशय राग झाला आणि त्याने अकबराला मारवाडात रवाना केले. २६ जून रोजी चितोडचा ताबा त्याने आपला दुसरा एक पुत्र राजपुत्र आजम याजकडे सोपविला.

वरील अपयशानंतर बादशाही योजना तीन दिशांनी मेवाडचे डोंगर छेदून पार करावयाचे अशी होती. चितोड अथवा पूर्वेकडून देववारी खिंड आणि उदयपूरच्या मार्गाने राजपुत्र आजम , उत्तरेच्या दिशेने राजसमुद्र सरोवराच्या वाटेने राजपुत्र मोआज्जम आणि पश्चिमेच्या बाजूने देवसुरीच्या मार्गे अकबर अशा तऱ्हेने तिघांनी पुढे चाल करून जावे असे ठरले . या योजनेत राजपुत्र आजम आणि मोआज्जम यांना आपले उद्दिष्ट साधण्यात अपयश आले.

(४) राजपुत्र अकबर याची मारवाडमधील मोहीम

चितोडहून मुक्काम हलवावा लागल्यानंतर राजपुत्र अकबराने १८ जुलै १६८० रोजी मारवाडात सोजात येथे आपले ठाणे दिले . परंतु मेवाडातल्या यशापेक्षा मारवाडातील त्याच्या यशाच्या मापात फारशी काही भर पडली नाही . राठोडांच्या टोळ्या सर्व मुलूखभर पसरल्या . त्यांनी दळणवळणाचे मार्ग बंद केले आणि मुलुखातील सारे वातारण सतत तंग ठेवले. अकबराचा बेत असा होता की प्रथम सोजातच्या मध्यवर्ती ठाण्याला बळकटी आणावयाची , नंतर गोदवार जिल्ह्यातील प्रमुख शहर नादोल व्यापावयाचे , नादोलच्या नवीन तळावरून आपल्या आघाडीच्या फौजा मेवाडमध्ये पूर्वदिशेकडे तहव्वूरखानाच्या अधिपत्याखाली नरलाई शहराच्या मार्गे चढाई करण्यासाठी रवाना करावयाच्या आणि देवसुरी खिंड काबीज करून महाराणा आणि त्याचे पराजित झालेले राठोड यांनी आश्रय घेतलेल्या कमळमीरच्या प्रदेशावर स्वारी करावयाची. परंतु मृत्यूला भेट देण्यासाठी उत्सुक असलेल्या रजपुतांनी साऱ्या देशात असे काही भयचकित वातावरण निर्माण केले होते की तहव्वूरखानाच्या सैनिकांनी भीती आणि निष्क्रियता यांनी टेकीला येऊन हातपाय गाळले.

२१ सप्टेंबर रोजी अकबराने सोजातहून मुक्काम हलविला आणि महिनाअखेरीला तो नादोलला पोहोचला. परंतु तहव्वूरखानाने डोंगराळ मुलुखात जाण्याचे चक्क नाकारले आणि आपल्या भित्र्या सेनानीवर

चढाई करून जाण्याची सख्ती करण्याचा प्रसंग अकबरावर आला . २७ सप्टेंबर रोजी खिंडीच्या तोंडाजवळ देखभाल करण्यासाठी तहव्वूरखानाने आगेकूच केले . तरी देखील तो रजपुतांच्या जाळ्यात कसा फसला आणि बेईमानी करण्याचे त्याने केव्हा ठरविले यांचा मात्र थांग लागत नाही . परंतु एवढे मात्र खरे की सप्टेंबर १६८० पासून त्याच्या हालचालीमध्ये संशय निर्माण होण्याइतपत ढिलाई दिसून येऊ लागली.

यानंतर मात्र बादशहाच्या सहनशक्तीची मर्यादा संपली . त्याने आपला खास बख्शी रजपुतांच्या मुलुखावर जारीने चढाई करून जा असा हुकूम देऊन अकबराला देण्यासाठी रवाना केला . त्यामुळे १९ नोव्हेंबर रोजी आपला तळ अकबराने नादोलहून देवसुरीला नेला . तेथून त्याने तहव्वूरखानाला जिलवाडा खिंड जिंकून घेण्यासाठी पाठविले . लढतलढत आणि वाटेतील अडथळे दूर करत मोगलांनी जिलवाडा खिंडीपर्यंत प्रगती केली आणि आपल्या जिलवाडा येथील तळावरून खानाने आजूबाजूचा मुलूख उध्वस्त करण्यास सुरुवात केली.

मोगलांनी जिलवाड्यापर्यंत मजल मारली ती २२ नोव्हेंबर रोजी . यानंतरची कारवाई म्हणजे राज्याचे आश्रयस्थान असलेले जिलवाड्याहून आठ मैलांवरील कमळमीर गाव यावर धडक देणे ही होती . परंतु यानंतरचे पाच आठवडे तहव्वूरखानाने इतकी ढिलाई दाखविली की त्याच्याबद्दल पुन्हा संशयाला जागा झाली. खरी हकीकत अशी होती की , याच कालावधीत राजपुत्राच्या पितृद्रोही कटाची गुंफण बांधली गेली. १ जानेवारी १६८१ रोजी त्याने रजपूत बंडखोरांबरोबर हातमिळवणी केली , एक फतवा काढून आपल्या बापाला सिंहासनावरून काढून टाकल्याचे जाहीर केले आणि स्वतःला बादशहा म्हणून अभिषेक करून घेतला . दुसऱ्या दिवशी त्याने खुद्द औरंगजेबाच्या हातून मोगल राजमुकूट हिसकावून घेण्यासाठी अजमिरहून कूच केले.

(५) राजपुत्र अकबर याने आपण मोगल सम्राट झाल्याची केलेली घोषणा , १६८१ (**एम. ए.**, १९७-२०४; **ईश्वरदास**, ८० अ—८३ ब; **के. के**, भाग २. २६५—२७६; **स्टोरीया**, भाग २ २४३ २५१; **दिलकुषा** १७०)

अकबराचे व्यक्तिमत्त्व

औरंगजेबाचा चौथा मुलगा राजपुत्र महमद अकबर याचे वय त्या वेळी फक्त २३ वर्षांचे होते . मेवाडमधील मोहिमेत त्याच्या अंगची ढिलाई आणि दुर्बलता ही अगदी उघडउघड दिसून आली होती . त्याबद्दल औरंगजेबाने त्याची सणसणीत कानउघाडणीही केली होती . यानंतर मारवाडात त्याची रवानगी करण्यात आली परंतु तेथेही औरंगजेबाने योजिल्याप्रमाणे इतस्ततः भटकणाऱ्या राठोड टोळ्यांना चिरडून टाकणे किंवा देवसुरी खिंडीच्या मार्गे मेवाडात प्रवेश करणे या दोन्ही कामात तो अपयशी ठरला . **अकबराची विश्वासघातकी वागणूक** :- सातत्याने आलेल्या या अपयशांमुळे त्याच्यावर जे अपमानांचे डोंगर रचण्यात आले त्यामुळे रजपुतांच्याकडून आपल्या बापाचे सिंहासन बळकावून घेण्यासाठी त्याला जे मदतीचे आश्वासन देण्यात आले त्याची मनावर भुरळ पडून तो वरील कटाला बळी पडला.

अकबराच्या या ज्या पितृद्रोही कारवाया चालू होत्या त्यामध्ये मध्यस्थाचे काम तहव्वूरखानाने केले . महाराणा राजसिंग आणि राठोडांचा म्होरक्या दुर्गादास यांनी राजपुत्र अकबराच्या मनावर असे बिंबविले की रजपुतांना साफ उखडून टाकण्याच्या औरंगजेबाच्या धर्मवेडेपणामुळे साऱ्या मोगल साम्राज्याची स्थिरता धोक्यात आली आहे ; त्यामुळे आता जर अकबराला मोगल साम्राज्याच्या परंपरागत वैभवाचा नाश

टाळावयाचा असेल तर त्याने सिंहासन बळकाविणे आणि आपल्या वाडवडिलांनी स्वीकारलेले सहिष्णू धोरण पुढे चालविणे आवश्यक आहे . ही कामगिरी पार पाडण्यासाठी त्यांनी अकबराला सिसोदिया आणि राठोड या दोन सामर्थ्यशाली रजपूत जमातींच्या संपूर्ण सशस्त्र पाठिंब्याचे वचन दिले.

अकबराची औरंगजेबाविरुद्ध चढाई

औरंगजेबावर चाल करून जाण्यासाठी सर्व जय्यत तयारी अजमिर येथे करण्यात आली . दरम्यान २२ ऑक्टोबर १६८० रोजी महाराणा राजसिंग मरण पावला आणि त्याच्या मृत्यूनंतरच्या सुतकाच्या १ महिन्याच्या काळांत त्याचा मुलगा आणि वारस महाराणा जयसिंग याने साहजिकच काहीच हालचाल केली नाही. त्यानंतर रजपुतांच्या कमळमीर येथील मुख्य ठाण्यापासून फार लांब नसलेल्या जिलवाडा खिंडीजवळ तहव्वूरखान येऊन पोहोचला . लगोलग वाटाघाटींना सुरुवात झाली आणि झपाट्याने वाटाघाटी संपुष्टातही आल्या . आपल्या पायदळ अथवा घोडदळापैकी निम्मे सैन्य आपला मुलगा अथवा भाऊ याच्या अधिपत्याखाली राजपुत्र अकबर याच्या बाजूने लढण्यासाठी पाठविण्याचे राजाने कबूल केले . सिंहासनावरील आपला हक्क शाबीत करण्यासाठी २ जानेवारी १६८१ हा दिवस अकबराने अजमिरवर चढाई करून जाण्यासाठी मुक्रर करण्यात आला. (**आदाब**, क्रमांक ७५६, ७६२)

या तारखेच्या अगोदर दोन दिवस आपल्या बापाच्या मनात जर काही संशय आला असेल तर तो नाहीसा व्हावा म्हणून अकबराने औरंगजेबाला एक बनावट पत्र लिहिले , "नव्या राजाचा भाऊ आणि मुलगा हे तहव्वूरखानाच्या मार्गदर्शनाखाली डोंगर उतरून माझ्याकडे आले आहेत . त्याशिवाय इतर राठोर पुढारीही खानाच्या मध्यस्थीने सल्ला करण्यासाठी याठिकाणी जमले आहेत . त्यांचे असे म्हणणे आहे की , स्वतः त्यांना पुढे घालून आपल्याकडे आणल्याखेरीज आणि त्यांच्यावतीने बादशहाजवळ माफी मागितल्याखेरीज त्यांची मने आपल्याला येऊन मिळण्याइतपत स्थिरावणार नाहीत . आपल्याकडे त्यांना सर्वांना बरोबर घेऊन येण्यासाठी मी निघत आहे." (**आदाब**, क्र. ६७६)

आणि यानंतर अकबराने आपली खरी नखे बाहेर काढली . त्याच्या नोकरवर्गातील ४ धर्मवेत्त्यांनी आपल्या सहीशिक्यानिशी एक फतवा काढला आणि त्यात जाहीर केले की इस्लाम धर्माने आखून दिलेल्या धर्मबंधनांचा भंग करून औरंगजेबाने सिंहासनावरचा आपला हक्क गमावलेला आहे . यानंतर १ जानेवारी रोजी अकबराने स्वतःला राज्याभिषेक करून घेतला आणि तहव्वूरखानाला आपल्या मुख्य वजीरपदावर नेमले. अकबराजवळ असलेले बहुतेक बादशाही अधिकारी त्याला प्रतिकार करावयाला किंवा पळून जावयाला असमर्थ ठरले आणी त्यांनी अकबरापाशी खोटी राजनिष्ठा दाखविली.

औरंगजेबाने आखलेली संरक्षण योजना

औरंगजेबाची परिस्थिती अजमिर येथे मात्र मोठी चमत्कारीक झाली . त्याच्याशी पूर्णपणे निष्ठा बाळगून असलेल्या त्याच्या सैन्याच्या दोन मुख्य तुकड्यांचा मुक्काम बराच दूरवर होता . खुद्द औरंगजेबाजवळ असलेल्या लवाजम्यात त्याचे बिनलढाऊ सैनिक , त्याचे खाजगी खिदमतगार , कारकून आणि खोजे होते तर अकबराबरोबर येत असलेल्या बंडखोरांची संख्या ७० ,००० सैनिकांवर गेली असून त्यामध्ये उत्कृष्ट तलवार चालविणारे रजपुत सैनिक आहेत अशा बातम्या प्रसृत होत होत्या.

अनुक्रमणिका

या घटना न्याहाळणाऱ्या प्रत्येकाची अपेक्षा अशी होती की अकबराची फौज जलद गतीने आगेचूक करील, औरंगजेबाच्या छोट्याशा संरक्षकदलाचा त्वरीत निःपात होईल आणि सिंहासनावरील विराजमान बादशहांची लगोलग अदलाबदल होईल . परंतु अकबराने आपल्या रात्री आणि दिवस आळसात आणि ख्यालीखुशालीत घालविण्यास सुरुवात केली . आपल्या बापाच्या छावणीपर्यंत असलेले १२० मैलांचे अंतर तोडण्यासाठी त्याने एक पंधरवडा घेतला (२ ते १५ जानेवारी) आणि यातल्या प्रत्येक क्षणाचा औरंगजेबाला भरपूर फायदा मिळत होता.

कारण दरम्यान इतस्ततः विखुरलेल्या मोगल तुकड्यांना बादशहापाशी गोळा होण्याकरता हुकूम देण्यासाठी निरोप्ये केव्हाच दौडत गेले होते. बादशहाजवळ एकनिष्ठ असलेले अधिकारी आपली सर्व शक्ती पणाला लावून आणि रात्रंदिवस दौड करत बादशहापाशी वेळेवर येण्याला मिळावे म्हणून जिवाचे रान करीत होते. पहिल्या निजामाचा बाप शहाबुद्दीनखान १२० मैलांचे अंतर दोन दिवसांत पार करून सिरोही येथील आपल्या मुक्कामाहून जलद गतीने कूच करत ९ जानेवारीला अजमिरला येऊन पोहोचला . इतर आणखी अधिकाऱ्यांनी देखील अशीच घाई केली . म्हणून खरा जीवावर आलेला प्रसंग केव्हाच टळून गेला . अजमिरच्या राजवाड्यासभोवार संरक्षक दले ठेवण्यात आली ; साऱ्या छावणी सभोवार मोर्चे खोदण्यात आले; शहराकडे येणाऱ्या सर्व वाटा सैनिकांनी रोखून धरल्या . १४ जानेवारी रोजी बादशहा शहरातून बाहेर पडून उघड्यावर आला आणि अजमिरपासून ६५ मैलांवर असलेल्या देवराईच्या इतिहास प्रसिद्ध रणभूमीवर त्याने आपली छावणी दिली. परंतु इकडे अकबराच्या छावणीमध्ये मात्र निराशा पसरली आणि पळपुट्यांची संख्या वाढत चालली . जसजसा तो औरंगजेबाच्या छावणीजवळ येत चालला तसतशी त्याला सोडून जाणाऱ्या आणि बादशहाला येऊन मिळणाऱ्या मोगल अधिकाऱ्यांची संख्या वाढू लागली . परंतु त्याच्याबरोबर असलेले ३०,००० रजपूत सैनिक मात्र त्याच्याजवळ इमान बाळगून राहिले.

खरा बाका प्रसंग १५ जानेवारीस ओढवला . बादशहाने दक्षिणेकडे आणखी ४ मैल आपले मोर्चे नेले आणि दोराहा येथे तो शत्रूची प्रतीक्षा करून राहिला.

संध्याकाळी पाऊस आणि वारा आणि मध्य हिवाळ्याची कडक थंडी याची पर्वा न करता जलद गतीने राजपुत्र मुआज्जम बादशहाला येऊन मिळाला . बादशहाचे सामर्थ्य यामुळे दुप्पटीने वाढले . इकडे दुसऱ्या पक्षी आपल्या बापाच्या छावणीपासून अकबर तीन मैल येऊन पोहोचला . रात्रीचा तेथे त्याने मुक्काम केला आणि दुसऱ्या दिवशी सकाळची वेळ ही त्याने बापाशी सामना देण्यासाठी मुक्रर केली.

(६) तहव्वूरखानाचा मृत्यू आणि अकबराचे अपयश

परंतु रात्रीच्या मध्यन्तरात औरंगजेबाच्या पाताळयंत्री कुटिलनीतीने शस्त्रास्त्रांचा यत्किंचितही खणखणाट न करता औरंगजेबाच्या पदरात संपूर्ण विजयश्रीची माळ घातली . अकबराचा उजवा हात तहव्वूरखान याचे लग्न औरंगजेबाच्या दरबारातील एक उच्च अधिकारी इनायतखान याच्या मुलीशी झाले होते. औरंगजेबाने इनायतखानाकडून तहव्वूरखानाला पत्र लिहवून त्याला ताबडतोब आपल्या छावणीत येण्याविषयी कळविले. त्यात त्याला त्याच्या मागील गुन्ह्याबद्दल क्षमा करण्यात येईल असे वचन देण्यात आले आणि अशीही धमकी देण्यात आली की जर त्याने ह्या गोष्टीला नकार दिला तर "त्याच्या बायकांची जाहीररित्या अब्रू घेण्यात येईल आणि त्याच्या मुलांना कुत्र्याच्या मोतीने बाजारात गुलाम म्हणून विकण्यात येईल."

अनुक्रमणिका

हे पत्र तहव्वूरखानाला मिळताच त्याची भयचकित मनस्थिती झाली . त्याने बादशहाच्या छावणीत जाण्याचे ठरविले आणि अकबर अथवा दुर्गादास यांना न विचारता त्याने आपली छावणी सोडली . विश्वासघात होऊन जिवावर बेतू नये म्हणून त्याने आपल्या पोषाखाखाली खवल्या चिलखताचा अंगरखा चढविला. बादशहाच्या छावणीत मध्यरात्रीच्या थोड्या अगोदर तो येऊन पोहोचला आणि बादशहाला भेटावयाची मागणी केली . परंतु एकाद्या कैद्यासारखे निःशस्त्र होऊन अपमानास्पद रितीने बादशहाच्या सामोरे नेले जाण्याचे त्याने साफ नाकारले . या बाचाबाचीचे रूपांतर मोठ्या गलक्यात झाले . अखेर या आवाजामुळे लक्ष वेधले गेल्याने बादशहाचे शरीररक्षक मोठ्या संख्येने तेथे जमा झाले आणि त्यांनी आपल्या दंडुक्यांनी तहव्वूरखानाला चेचून काढले. थोड्या अवधीपर्यंत त्याच्या दडलेल्या कवचाने त्याला वाचविले. परंतु सरते शेवटी कोणीतरी त्याचा गळा कापला आणि "त्याची गडबड बंद केली ." (**स्टोरीया**, भाग २. २४७; **के. के.**, भाग २. २६८; **एम्. ए.**, २०१; **टॉड**, भाग २. ८९१).

रजपुतांची फसवणूक व अकबराचा त्यांनी केलेला त्याग

दरम्यान औरंगजेबाने अकबराला एक बनावट पत्र पाठविले. त्यात त्याने औरंगजेबाची सर्व रजपूत लढवय्यांना जाळ्यात ओढण्याची जी शक्कल होती ती कृतीत उतरवून दाखविण्यात आतापर्यंत जे यश संपादले होते त्याबद्दल त्याची भरपूर स्तुती केली होती आणि अशा तऱ्हेने त्याने सर्व रजपुतांना बादशहाच्या इतक्या आवाक्यात आणल्याबद्दल शाबासकी दिली होती . या पत्रात त्याला अशीही सूचना देण्यात आली होती की आता त्याच्या कामगिरीचे अखेरचे पर्व त्याने दुसऱ्या दिवशी होणाऱ्या रणसंग्रामात सर्व रजपुतांना आपल्या आघाडीवर ठेवल्याने पुरे होणारे होते . कारण त्याने असे केले म्हणजे औरंगजेबाच्या सैन्याकडून पुढून होणारा हल्ला आणि अकबराच्या फौजेकढून पिछाडीहून होणारा मारा यांमध्ये सारे रजपूत भरडून निघतील. औरंगजेबाने योजल्याप्रमाणे हे पत्र दुर्गादासाच्या हातात पडले . त्याने ते वाचले आणि त्याबद्दल जाब विचारण्यासाठी तो अकबराच्या तंबूत गेला . राजपुत्राला गाढ निद्रा आलेली होती आणि आपल्याला उठवू नये अशी सख्त ताकीद त्याने आपल्या खोजा पहारेकऱ्यांना दिली होती . दुर्गादासाने नंतर तहव्वुरखानाला बोलाविण्यासाठी हरकाऱ्ये रवाना केले. रजपुतांना तेव्हा असे आढळून आले की या साऱ्या बनावाचा कर्ता तहव्वुरखान हा काही तासांपूर्वीच बादशाही छावणीकडे मोका साधून गेला आहे. अकबराला पाठविलेले पण मध्येच दुर्गादासाच्या हाती पडलेले, हे पत्र म्हणजे अकबराच्या दुटप्पी वर्तनाचा पुरावा असे या घटनांनी सिद्ध झाले. केवळ त्यांचे नशीब शिकंदर म्हणून त्याच्या नजरेस हा कट आला होता आणि अशा विश्वासघातकी योजनेतून सहीसलामत सुटून जावयाचे असले तर क्षणाचाही विलंब लावून चालणारे नव्हते. सकाळ होण्याच्या अगोदर ४ तास रजपुतांनी घोडे धरले , अकबराच्या मालमत्तेपैकी जेवढी लुटता येईल तेवढी लुटली आणि मारवाडकडे आपले घोडे सोडले . या संधीचा फायदा घेऊन ज्या बादशाही सैनिकांना अकबराने आपल्या निशाणाखाली आपल्याबरोबर येण्याची सख्ती केली होती आणि ज्या राजनिष्ठ अधिकाऱ्यांना त्याने कैद करून ठेवले होते ते सर्व औरंगजेबाच्या छावणीकडे पळून आले . रजपुत आणि अकबर यांना सांधणारा दुवा म्हणजे तहव्वुरखान होता. नवीन बादशहाचा (अकबराचा) तो सेनापती आणि त्याचबरोबरोबर मुख्य वजीरही होता. त्याच्या पलायनाने रजपूत आणि अकबर यांमध्ये झालेला कट साफ उधळून गेला.

सकाळी अकबर आपल्या निद्रेतून जागा झाला तेव्हा त्याला आपल्याला सर्वजण सोडून पळून गेले आहेत असे आढळून आले. त्याचे प्रचंड सैन्य एका रात्रीत यक्षिणीची कांडी फिरावी त्याप्रमाणे वितळून गेले

होते आणि त्याच्याजवळ निष्ठा बाळगून असलेले त्याचे जुने अनुचर म्हणजे ३५० घोडेस्वार एवढीच मंडळी उरली होती. अकबराने आपला जनाना घोड्यावर चढविला आणि जेवढी संपत्ती उंटांवर लादता येईल तेवढी लादली आणि आपला जीव वचावा म्हणून रजपुतांच्या मागोव्यावर त्याने पलायन केले.

रजपुतांच्या तडाक्यातून वाचलेली अकबराची ऊर्वरित संपत्ती ही बादशहाने ताब्यात घेतली आणि अकबराने पाठीमागे टाकून दिलेली त्याची एक बायको , दोन मुलगे आणि तीन मुले यांना औरंगजेबाच्या छावणीवर आणण्यात आले. त्याच्या अनुचरांचा पाठपुरावा करण्यात येऊन त्यांना जरबीने शिक्षा करण्यात आल्या. राजकन्या जेबुउन्निसा हिने अकबराबरोबर चालविलेला गुप्त पत्रव्यवहार या वेळी उघडकीस आल्याने तिची तैनात म्हणजे रुपये चार लाख रद्द करण्यात आली आणि तिची स्थावर जमिनीची मिळकत जप्त केली गेली . तिला सलीमगडच्या किल्ल्यात बंदिस्त करण्यात आले . (अकबराच्या नंतरच्या हालचालींसाठी पाहा : **एम्. ए.**, २०३–२०६, २११; **के. के.**, भाग २. २७५–२७७; **बसातीन**, ४३९; **टॉड**, भाग २ ८९२–८९३).

मेवाडमधील युद्धाचा शेवट

यानंतर राजपुत्र मुआज्जम याच्या हाताखाली अकबराचा पाठलाग करण्यासाठी सुसज्ज सेनेची मारवाडात रवानगी करण्यात आली . अकबराच्या पलायनानंतरच्या दुसऱ्या रात्री औरंगजेबाचे कुटिल कारस्थान दुर्गादासाच्या नजरेस आले तेव्हा तो परत फिरला आणि त्याने अकबराला आपल्या छत्राखाली घेतले. आपल्या आश्रयाला आलेल्यांचे , मग तो कोणीही –त्याचे वाटेल ती किंमत देऊन संरक्षण करणे हा रजपुतांच्या जीवनाचा मानबिंदू होता . अकबर आपल्या रजपूत संरक्षकांबरोबर साऱ्या मारवाडात इतस्ततः भटकू लागला . कोणत्याही एका जागी त्याने २४ तासांच्या पेक्षा जास्त अवधी घालविला नाही . परंतु गुजरातमधील मोगल अधिकारी डोळ्यात तेल घालून होते आणि त्यांनी बंडखोरांना पिटाळून लावले . यानंतर दुर्गादासाने अकबराला मोठ्या हिकमतीने मराठा दरबारात आश्रयार्थ नेण्याचे ठरविले . मोगल सत्तेला यशस्वीपणे तोंड दिलेली एकच सत्ता हिंदुस्थानात होती आणि ती म्हणजे मराठ्यांची . प्रत्येक माहीत असलेला घाट आणि वहिवाटीचा रस्ता यांवर मोगलांनी पहारा बसविलेला होता . परंतु राठोडांचा नामवंत पुढारी दुर्गादास याने मोठ्या कौशल्याने सर्वांना चुकविले आणि आपल्या खऱ्या उद्देशाबद्दल आपल्या शत्रूची मने साशंक ठेवून त्याने अकबरपूरजवळील उतारावर ९ मे रोजी नर्मदा ओलांडली आणि तो १५ मे रोजी तापी नदीवर बुरहाणपूरपासून काही अंतरावर येऊन ठेपला . परंतु याठिकाणीही त्याची वाट बादशाही अधिकाऱ्यांनी अडविलेली होती . म्हणून त्याने खानदेश आणि बागलाणातून पश्चिमेच्या दिशेने कूच केले आणि १ जून रोजी तो संभाजीच्या आश्रयाला कोकणामध्ये येऊन पोहोचला.

(७) महाराण्याबरोबर तह

मोगलांनी मारवाडच्या राज्याभोवती जे जाळे विणत आणले होते त्याची अखेर करण्याचा मोगलांचा बेत ऐन रंगात येण्याची वेळ आली असतानाच त्यांचे युद्धाचे डावपेच अकबराच्या बंडामुळे पूर्णतया विस्कळीत होऊन गेले . त्यामुळे त्या राज्याला ओघानेच मुक्ततेचा थोडासा श्वास टाकण्याला अवधी मिळाला. मोगल पेचात सापडले असतानाचीच संधी साधून सिसोदियांनी मोगलांवर आपले प्रतिहल्ले करण्यास सुरुवात केली . त्यांचा शूर राजपुत्र भीमसिंग आणि महाराण्याचा अर्थमंत्री दयालदास यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी गुजरात आणि माळवा या प्रांतांत धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली.

अनुक्रमणिका

रजपूत आणि मोगल यांच्यामधील संघर्षाचे प्रत्यक्ष युद्धाबाबतचे स्वरूप म्हणजे एखाद्या अनिर्णित खेळासारखे होते. परंतु या युद्धाचे परिणाम मात्र महाराण्याच्या प्रजेला भयानक पद्धतीने भोवले . त्यांची धान्याची शेते शत्रूच्या सैनिकांनी नासधूस करून टाकली . पराजय त्यांना टाळता आला पण उपासमार नाही. म्हणून दोन्ही पक्ष तहासाठी उत्सुक झाले . महाराणा जयसिंग याने स्वतः १४ जून १६८१ रोजी राजपुत्र महमद आजम याची भेट घेतली आणि मोगलांबरोबर खालील अटींवर तह केला.

१ राण्याच्या राज्यातून जिजिया कर लादण्याचे बदली राण्याने मंडल , पूर, आणि वेदनूर हे परगणे बादशाही मुलुखाला तोडून द्यावे.

२ मोगलांनी मेवाडमधून माघार घ्यावी आणि जयसिंगाला राणा ही पदवी आणि पाच हजारी स्वारांची मनसबदारी देऊन मेवाडचा मुलूख त्याला परत द्यावा . (**एम्. ए.**, २०८; **टॉड** भाग १. **पान** ४०३). याप्रमाणे अखेर मेवाडच्या राज्याला शांती आणि स्वातंत्र्य यांचा पुन्हा लाभ झाला . परंतु मारवाडमधील परिस्थिती मात्र तशी नव्हती. त्याठिकाणी चाललेल्या युद्धामुळे मारवाडला स्मशानभूमीचे स्वरूप प्राप्त झाले होते आणि जोधपूरचा त्यानंतरचा ३० वर्षांचा इतिहास म्हणजे युयुत्सु अशा दोन पक्षांमधील झालेल्या संघर्षाची कहाणी होती. "तलवार आणि रोगराई यांनी जणू त्या प्रदेशाला साफ करण्याचा विडाच उचलला होता." परंतु अकबराने संभाजीबरोबर साधलेली युती म्हणजे मोगल साम्राज्याला निर्माण झालेला एक प्रचंड धोका होता आणि त्यामुळे औरंगजेबाला आपल्या सर्व शक्ती दक्षिणेमध्ये एकवटाव्या लागल्या आणि इतकेच नव्हे तर खुद्द त्यालाच दक्षिणेकडे प्रयाण करावे लागले . याचा परिणाम असा झाला की मोगलांची मारवाडवरील पकड ढिली झाली. राठोडांच्या दृष्टिने ही घटना म्हणजे त्यांची जणू काही सुटका झाल्याचे निदर्शक होती. या नंतरच्या पुढील २० वर्षांच्या कालावधीत आपल्याला असे दिसून येईल की दक्षिणेमधील लष्करी परिस्थितीच्या गंभीरतेवर मोगलांचा मारवाडवरील ताबा कमी-अधिक होई.

मारवाडमधील लांबलेले युद्ध

मराठ्यांची गनिमी काव्याची लढण्याची पद्धत आणि तिला मिळालेले यश यांची नांदी आपल्याला दुर्गादासाच्या कसबी मार्गदर्शनाखाली राठोडांनी अवलंबिलेल्या युद्धपद्धतीत दिसून येईल. त्यांनी बादशाही फौजेला संत्रस्त करण्याचे आणि तिची दमछाक करण्याचे धोरण स्वीकारले आणि मोगल लष्करी अधिकाऱ्यांची इतकी दमछाक केली की ते गुप्तपणे चौथाईचे माप राठोडांच्या पदरात टाकून आपली तात्पुरती का होईना सुटका करून घेत . याप्रमाणे कोणत्याही तऱ्हेचा निर्णय न लागता यशाचे माप झुकते ठेवत ऑगस्ट १७०९ पर्यंत जवळजवळ ३० वर्षे हे युद्ध चालले . त्यावर्षी राणा अजितसिंग याने जोधपुरात विजयोत्साहाने अखेरचा प्रवेश केला . त्याचे मारवाडचे अधिपत्य औपचारिकरित्या का होईना सरतेशेवटी दिल्लीच्या मोगल सम्राटांनी मान्य केले.

ज्या वेळी राज्याच्या सीमांवर अफगाणांचा अजून पाहिजे तसा बंदोबस्त झाला नव्हता त्या वेळी औरंगजेबाने राजकीय सत्तेच्या धुंदीत काहीही कारण नसताना रजपुतान्यात बंडाची आग पेटविली . दोन प्रमुख रजपूत जमातींनी त्याच्याबरोबर उघडउघड शत्रुत्वाचा स्वीकार केला आणि याचा परिणाम त्यांच्याबरोबर झालेल्या संघर्षात त्याच्या सैन्यातील उत्कृष्ट आणि त्याच्याबरोबर एकनिष्ठ असलेला सैनिकवर्ग मारला गेला आणि तरी देखील ह्या संघर्षाचे स्वरूप मारवाड आणि मेवाडपुरतेच मर्यादित होते

असे म्हणता येणार नाही. त्यांच्याबरोबर सहानुभूती बाळगून असणाऱ्या हाडा आणि गौर जमातीतही त्याचा प्रादुर्भाव झाला. कायद्याला न जुमानणाऱ्या वर्गाची निर्माण झालेली ही लाट अनाहूतपणे माळव्यात शिरून तिने माळवा ग्रासून टाकला आणि माळव्यामधून दक्षिणेकडे जाणारा (अतिशय महत्त्वाचा) मोगल राजमार्ग या घटनेने धोक्यात आणला.

●●●

औरंगजेबाच्या कारकिर्दीचा संक्षिप्त इतिहास
१६१८ — १७०७

सर जदुनाथ सरकार

मराठीत अनुवाद
भ. ग. कुंटे

पुस्तक चौथे

अनुक्रमणिका

प्रकरण दहावे
मराठ्यांच्या सत्तेचा उदय

(१) सतराव्या शतकातील दक्षिणेच्या इतिहासाचे मर्मस्थान

चौदाव्या शतकाच्या मध्यात बहमनी राज्याची स्थापना झाल्यामुळे दक्षिण हिंदुस्थानात मुसलमानी सत्तेचे एक स्वतंत्र असे एक केन्द्रस्थान निर्माण झाले . हिंदुस्थानातील मुसलमानी सत्तेने दक्षिणेकडे आपल्या राज्याच्या मर्यादा वाढविण्याच्या दृष्टीने एक नवीन आक्रमक पवित्रा घेतला आणि उत्तर हिंदुस्थानात दिल्लीच्या सुलतानांनी जे धोरण स्वीकारले त्याचीच पुनरावृत्ती आतापर्यंत दक्षिणेत आपले स्वातंत्र्य अबाधित राखलेल्या मोठमोठ्या हिंदू राजांचा नाश करून केली . इतिहासाला मिळालेल्या ह्या कलाटणीचा ओघ सबंध पंधराव्या शतकात तसाच चालू राहिला आणि जेव्हा पुढील शतकाच्या पहिल्या २५ वर्षांच्या काळात एकेकाळच्या मोठ्या परंपरेच्या बहमनी साम्राज्याचे तुकडे झाले तेव्हा त्या राज्याची परंपरा निजामशाही आणि आदिलशाही घराण्यांच्या वंशवृक्षाकडे गेली . गुलबर्ग्याच्या सुलतानांनी इस्लामी सत्तेच्या अधिष्ठानाची घालून दिलेली परंपरा आणि इस्लामी संस्कृतीची अभिवृद्धी करण्यासाठी घालून दिलेला मार्ग यांचा अहमदनगर आणि विजापूर घराण्यांनी पुरेपूर पाठपुरावा केला आणि ही दोन्ही घराणी इस्लामी संस्कृतीची केन्द्रस्थाने बनली . १७ व्या शतकाच्या पहिल्या पंचवीस वर्षांच्या कालखंडाने निजामशाहीची अखेर पाहिली पण निजामशाहीच्या पूर्ण ऱ्हासामुळे निर्माण झालेली अग्रेसरत्वाची पोकळी विजापूरचे आदिलशहा भरून काढण्यास पुढे सरसावले.

परंतु सतराव्या शतकाची सुरुवात झाली आणि दक्षिणेच्या प्रांगणात एका नवीन युयुत्सु शक्तीने प्रवेश केला. मोगल सम्राट हा आपल्या इच्छेनुसार दक्षिण देश जिंकून घेण्यास आता समर्थपणे केव्हाही सज्ज होता आणि केवळ याच घटनेने सबंध सतराव्या शतकातील दक्षिण हिंदुस्थानच्या एकंदर इतिहासावर छाप पाडल्याचे आपल्याला दिसून येईल. विजापूरचा सुलतान आदिलशहा याला असे दिसून आले की , बहमनी आणि अहमदनगरची निजामशाही यांचा वारस म्हणून दक्षिणेचे सम्राटपद आणि सार्वभौमत्व जिंकून घेण्याचे आपले स्वप्न पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आहे आणि आपल्या साम्राज्यवाढीची तृष्णा पुरी करावयाची असेल तर आसमंतात जरब बसविलेल्या उत्तरेकडून येणाऱ्या मोगल सत्ताधिशांच्या वाटेत न येता पूर्वेकडे आणि दक्षिणेकडेच हातपाय पसरणे , योग्य ठरेल. १६३६ साली मोगल आणि दक्षिणेकडच्या राजवटी यामध्ये जो विभागणीचा तह झाला त्याअन्वये मोगलांच्या दक्षिणेतील राज्याच्या सीमा स्पष्टपणे आखून दिल्या गेल्या होत्या. यानंतरच्या २० वर्षांत साऱ्या दक्षिण खंडात समुद्राच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत आपल्या राज्याच्या मर्यादा फैलावून विजापूर राज्याने वैभवाची कमालमर्यादा गाठली होती . या वैभवाच्या काळात विजापूर राज्याचे राजधानीचे शहर हे कला आणि वाङ्मय , धर्मशास्त्र आणि भौतिक शास्त्रे यांच्या प्रगतीचे माहेरघर बनले होते . परंतु पूर्वीच्या गरीब आणि कणखर पिढ्यांवर राज्य करणाऱ्या युयुत्सु सुलतानांच्या जागी आता आलेले सुलतान यांना छावण्यांच्या गजबजाटाने सजलेली युद्धभूमी आणि स्वार होण्यासाठी आव्हान देणारे वारू याऐवजी रमणी सहवास आणि दरबारचे षोकीन वातावरण यांचा अधिक मोह पडत होता. आदिलशाही सत्तेने गाठलेला वैभवाचा उत्कर्षबिंदू ही त्यांच्या झपाट्याने होणाऱ्या ऱ्हासाची आणि नाशाचीही सुरुवात होती असे म्हणण्यास काहीच प्रत्यवाय नाही.

सरंजामी तत्त्वावर आधारलेल्या राज्याचा कारभार हा एखाद्या नामधारी राजाकडून होऊ शकत

नाही किंवा घटनेनुसार आयोजिलेला मुख्य वजीर हा देखील त्या राज्याचा गाडा हाकू शकत नाही . ज्यावेळी राज्याचा राष्ट्रपुरुष म्हणून राजाची गणना होईनाशी होते त्यावेळी प्रांतांचे लष्करी सुभेदार त्याच्या आज्ञा मानेनासे होतात. म्हणून जेव्हा इ. स. १६५६ च्या नोव्हेंबरमध्ये शेवटच्या थोरल्या आदिलशहाचा मृत्यू झाला तेव्हा दक्षिणेतल्या उर्वरित मुसलमानी राज्यांचे विसर्जन आणि त्यांचा मोगल साम्राज्यांत समावेश ही घटना जलद, विनासायास, नैसर्गिक नियमानुसार आणि अपरिहार्य म्हणून घडून आली असती . असे झाले नाही याला कारण म्हणजे दक्षिणेच्या राजकारणात एका नवीन सत्तेचा झालेला उदय हे होय.

ही नवीन सत्ता म्हणजे मराठे होत . औरंगजेबाच्या राज्याभिषेकानंतर त्यानी दक्षिणेचा इतिहास त्यानंतरची ५० वर्षे गाजविला तर अठराव्या शतकाचा संपूर्ण उत्तरार्ध त्यांनी उत्तरेचे राजकारण दुमदुमून सोडले. मराठे लोक हे तेथे गणना करता येणार नाही येवढ्या कालावधीपासून होते . परंतु तेराव्या शतकापासून ते त्यांच्या जन्मभूमीत दुसऱ्यांचे नागरिक म्हणून विखुरलेल्या अवस्थेत अनेक राज्यांमधून राहात होते आणि या त्यांच्या वास्तव्यात त्यांना त्यांचे स्वतःचे अस्तित्व अगर राजकीय संघटना अशी नव्हती. या विखुरलेल्या घटकांना एकत्र आणून राष्ट्रामध्ये त्यांचे पुनरुज्जीवन करणाऱ्या आणि मोगल साम्राजामध्ये या बलाढ्य राष्ट्राची जबरदस्त पाचर घुसवून त्या साम्राजाचा थरकाप उडवावयास लावणाऱ्या अशा एका असामान्य नेत्याची आता गरज होती . हा नेता म्हणजे औरंगजेबाचा समकालीन आणि कट्टा शत्रू राष्ट्रपुरुष शिवाजी हा होय.

ज्या दिवशी सम्राट अकबराने विंध्य पर्वताच्या पलीकडील दक्षिणेचा मुलूख जिंकून घेण्याचे धोरण स्वीकारले त्या दिवसापासून पुढे ९४ वर्षांनंतर ज्या दिवशी औरंगजेबाने शेवटच्या कुतुबशहाचा पराभव करून त्याच्या राजधानीत विजयोन्मादाने प्रवेश केला त्यादिवसापर्यंत विजापूर आणि गोवळकोंड्याचे सुलतान एक क्षणभरही जी गोष्ट विसरू शकले नाहीत ती ही की , मोगल सम्राटांचे अविचलित ध्येय म्हणजे त्या शाह्यांचा समूळ उच्छेद आणि त्यांच्या सर्व मुलुखाचा मोगल साम्राज्यात समावेश हे आहे . छत्रपती शिवाजी महाराजांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वात आणि संभाजीराजांच्या बेदरकार पौरुषात त्या शाह्यांना आणि त्यांच्या सुलतानांना त्यांच्यासमोर उभ्या ठाकलेल्या पराकोटीच्या संकटात एकमेव आसरा दिसला . मराठ्यांच्या विरुद्ध विजापूर अथवा गोवळकोंडा आणि मोगल यांच्यामध्ये मनोमन ऐक्य होणे ही मानसिकदृष्ट्या अशक्य कोटीतील गोष्ट होती.

सर्व युरोपीय इतिहासकार असा दावा मांडतात की मोगल सत्तेची हाडे अखेर खिळखिळी करण्यात यशस्वी झालेल्या दक्षिणेतील मराठ्यांच्या पुंडाईला आळा घालण्यासाठी विजापूर आणि गोवळकोंडा यांना स्वतंत्र ठेवून त्यांच्याकडे दक्षिणेच्या बंदोबस्ताचे काम देणे हे औरंगजेबाच्या दृष्टीने अधिक शहाणपणाचे ठरले असते . दक्षिणेतल्या खऱ्या परिस्थितीबद्दल अज्ञान असल्यामुळेच युरोपीय इतिहासकारांनी असा चुकीचा दावा मांडला . कारण मुसलमानांची चाकरी करणाऱ्या मराठा सरदारांना मराठ्यांचे असे स्वतंत्र राज्य स्थापून त्याच्याभोवती ग्रहमालेप्रमाणे एकत्र आणण्यात छत्रपती शिवाजीला यश जेव्हा आले त्या वेळी विजापूर आणि गोवळकोंडा ही राज्ये आपल्या अधोगतीच्या शेवटच्या पायरीपाशी पोहोचली होती . या राज्यांचे सुलतान निव्वळ बाहुल्यांसारखे झालेले असून विलासात दंग होते . मुख्य वजिराची जागा मिळविण्यासाठी दरबाराच्या अधिकाऱ्यांत होणाऱ्या दंग्यामध्ये राजधानीच्या रस्त्यातून रक्ताचे सडे पडत . या राज्यांचा राज्यकारभार पूर्णपणे मोडकळीस आलेला होता . कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे नाहीशी झालेली होती. प्रांतांचे सुभेदार केन्द्रीय सत्ता झुगारून स्वतंत्र झाले होते आणि लष्करी अधिकारी जो जास्त द्रव्य देईल त्याची चाकरी बिनदिक्कत पत्करीत . अशा तऱ्हेची सरकारे संभाजी आणि संताजी घोरपडे यांच्या

उसळत्या उत्साहाला औरंगजेबापेक्षा काही अधिक तऱ्हेने अडवू शकली असती अशी अपेक्षा करणे चुकीचे होते.

दक्षिणेतील राजवटींचे परस्पराबरोबरील संबंध

थोडक्यात सांगावयाचे म्हटले तर , दक्षिणेतील सत्तांची खालीलप्रमाणे युती झाली होती . मोगलांच्या चढाईच्या भीतीने गोवळकोंड्याचा सुलतान हा आपल्या सर्व सामर्थ्यानिशी तर विजापूरचा सुलतान थोड्याशा अविश्वासाने आणि बिचकत बिचकत का होईना शिवाजीच्या गळी जाऊन पडले होते . ज्या वेळी मोगलांची चढाई ही एक दुर्दम्य अशी वस्तुस्थिती बनली आणि आदिलशहावर जेव्हा जीवनमरणाचा प्रसंग कोसळला तेव्हाच विजापूरची शिवाजीबरोबर युती झाली . परंतु ज्या वेळी ह्या शाह्यांच्या मनात जेव्हा अशी भीती वाढत्या प्रमाणात निर्माण होऊ लागली की , आपले किल्ले आणि मुलूख विश्वासघाताने बळकावून स्वतःची तुंबडी भरण्याचा शिवाजीचा बेत आहे त्याच वेळी ह्या युती झपाट्याने कोलमडून पडल्या. या तीन दक्षिणी सत्तांपैकी आपण कुतुबशहाचा विचार केला नाही तरी चालण्यासारखे आहे. कारण वरील कालावधीत त्याने मोगलांबरोबर बेबनावाची कधीच पाळी आणली नाही . १६६६ नंतर विजापूर सरकारची अतिशय शोचनीय अशी अवस्था झाली . [इ. स. १६४६ मध्ये म्हणजे जवळजवळ २० वर्षांपूर्वी अतिशय गंभीर आणि रेंगाळलेल्या दुखण्याने महमद आदिलशहा आजारी पडला तेव्हाच या घसरगुंडीला सुरुवात झाली होती .] कारण अली आदिलशहा दुसरा हा पूर्णपणे दारूच्या आधीन झाला आणि त्याचे एकमेकांशी शत्रूत्व बाळगून असणारे अमीरउमराव परस्परांशी वजिरी मिळविण्यासाठी आणि राजधानी आणि नामधारी सुलतान यावर ताबा मिळविण्यासाठी झगडू लागले . १६७२ मध्ये विजापूरची परिस्थिती शिकंदर हा अल्पवयी राजपुत्र गादीवर आल्यावर अधिकच चिघळली आणि यानंतरचा विजापूरचा इतिहास म्हणजे राजप्रतिनिधींच्या कर्तृत्वाचा इतिहास झाला. राज्यकारभारात अतिशय अंदाधुंदी माजली . शिवाजीचा स्वतंत्र सत्ताधीश म्हणून विकास होण्यास ही संधी अगदी योग्य ठरली.

दिल्लीच्या सरकारचा शांततामय मार्गाचा पाठपुरावा किंवा तहामध्ये दिलेल्या वचनांना टिकून राहण्याची त्या सरकारची इच्छाशक्ती यांवर शिवाजीचा एक क्षणभर देखील विश्वास नव्हता . त्यामुळे मोगल मुलुखावर दक्षिणेत हात मारण्याची संधी त्याने एकदाही सोडली नाही . विजापूरबरोबर मात्र त्याचे संबंध थोडे वेगळे होते . कारण थोडी उचल खाणे किंवा आपल्या राज्याच्या सीमा वाढविणे हे विजापूरचा बळी देऊन करणे शक्य आहे ही गोष्ट तो पुरेपूर ओळखून होता . परंतु जेव्हा १६६२ मध्ये आदिलशाही सरदार आणि शिवाजी यांच्यामध्ये एकोपा निर्माण झाला तेव्हा विजापूर राज्यावर शस्त्र उचलण्याचे शिवाजीने सोडून दिले . तरी देखील त्याच्या राज्याला लागून असलेल्या प्रदेशात सरंजाम बाळगून असलेल्या आणि ज्या दिशेने आपल्या राज्याच्या नैसर्गिक मर्यादा वाढविण्याकडे त्याची दृष्टी वळे त्या प्रदेशात—म्हणजे कोल्हापूर , कानरा आणि कौप्पल —ठाण मांडून बसलेल्या विजापुरी उमरावांबरोबर शांततेचे संबंध ठेवणे त्याला शक्य नव्हते . इतके असून सुद्धा विजापूरच्या मध्यवर्ती सरकारला आव्हान देण्याची त्याची यत्किंचितही इच्छा नव्हती.

(२) मोगलांच्या दक्षिणेतील दौर्बल्याची कारणमीमांसा

१६५८ च्या जानेवारीत औरंगजेबाने आपल्या बापाचे सिंहासन मिळविण्यासाठी दक्षिण सोडली तेव्हापासून १६८२ च्या मार्चमध्ये तो दक्षिणेत आपल्या जीवनाची शेवटची २५ वर्षे निरर्थक युद्धात

घालविण्यासाठी परत येईपर्यंत एकंदर २४ वर्षांचा कालावधी मध्ये लोटला होता . या दरम्यान दक्षिणेच्या मोगल सुभ्यांवर एकंदर ५ सुभेदार नेमले गेले . त्यामध्ये राजपुत्र शहाआलम ११ वर्षे अधिकारावर होता , बहादूरखान ६ वर्षे , शायस्ताखान ४ वर्षे , जयसिंग जवळजवळ २ वर्षे आणि दिलिरखान १ वर्ष . या २४ वर्षांच्या कालावधीत जयसिंग (१६६६), बहादूरखान (१६७६–७७) आणि दिलिरखान (१६७९–८०) हे सुभेदारीवर असताना मोगलांनी विजापूर विरुद्ध चढाईचे धोरण स्वीकारले . मराठ्यांच्या विरुद्ध जोरदार लष्करी कारवाया केल्या त्या शायस्ताखान (१६६०–६२), जयसिंग (१६६५), महाबतखान (१६७१–७२), बहादूरखान (१६७३–७५) आणि थोडा काळपर्यंत १६७८ –७९ मध्ये दिलिरखान यांनी . शिवाजी अणि मोगल यांच्यामध्ये युद्धाचे वातावरण यापेक्षाही अधिक काळ टिकले . परंतु या सर्व कालावधीत मोगल सेनानींचे वर्तन गलथानपणाचे झाले . दूरवर दिल्ली येथे असलेल्या बादशहाच्या डोळ्यात त्यांनी हातोहात धूळ टाकली आणि इकडे प्रथम त्यांनी शिवाजीबरोबर गुप्तपणे आपली संधाने बांधली आणि नंतर संभाजीबरोबर तसेच संबंध ठेवून त्यांनी त्याच्याजवळून बिनदिक्कत लाच घेण्यासही काकू केले नाही.

या २४ वर्षांत दक्षिणेत मोगलांना थोडेफार विजय मिळाले पण निर्णायक यश त्यांच्या पदरात कधीच पडले नाही. या अपयशाचे कारण थोडेसे वैयक्तिक आणि थोडेसे राजकीय होते . राजपुत्र शहाआलम हा भित्रा आणि कसलेही साहस न स्वीकारणारा होता . त्याची मनोवृत्ती आपल्या शेजारी राज्यांशी शांततेने नांदण्याची होती आणि अंतःपुराच्या विलासात अथवा शिकारीच्या शौकात रममाण होऊन जाणेच त्याला अधिक पसंत पडे . त्याशिवाय त्याचा मुख्य सेनानी हा शहाअलमच्या आज्ञा उघडउघड धाब्यावर बसवी . त्यामुळे दक्षिणेतील मोगल छावणीला पुष्कळदा अंतर्गत यादवीमुळे एखाद्या देशाला जे दौर्बल्य प्राप्त होते तसे प्राप्त होई . शहा आलम आणि दिलीरखान यांच्या सतत परस्परविरोधी कारवाया चालू असत आणि त्यामुळे मोगलांच्या दक्षिणेतील अपयशाची जणू मुहूर्तमेढ रोवली गेली.

मोगल दौर्बल्याचे दुसरे कारण असे की शिवाजीबरोबर चाललेल्या अविरत युद्धाला मोगल अधिकारी मनापासून कंटाळले होते . मोगलांच्या छावणीतील हिंदू अधिकारी हिंदूधर्माचा विजेता जो शिवाजी त्याच्याबरोबर गुप्तपणे सहकार्य करीत तर अनेक मुसलमान अधिकारी , शिवाजीने त्यांना शांततेने राहू द्यावे म्हणून त्याला आनंदाने लाच देत . या सर्वांवर कडी म्हणून की काय विजापूर आणि मराठे यांचा पराभव करण्यासाठी जे मनुष्यबळ आणि युद्धसामग्री यांची आवश्यकता लागते त्याच्या निम्म्याने देखील पुरवठा मोगल सुभेदारांना करण्यात आलेला नव्हता.

त्यामध्ये राजपुत्र अकबराचे बंड आणि त्याचे संभाजीकडे पलायन या घटनांमुळे दिल्लीच्या सिंहासनाला जो धोका निर्माण झाला होता त्याला तोंड द्यावयाचे म्हणजे -खुद्द औरंगजेबालाच दक्षिणेमध्ये येणे भाग पडले. याचा परिणाम असा झाला की त्या प्रदेशासंबंधीच्या धोरणाचा संपूर्णपणे कायापालट करणे मोगलांना भाग पडले . त्यामुळे आता संभाजीच्या सत्तेचा नाश करणे आणि अकबराला खच्ची करून निरुपद्रवी बनविणे ह्या गोष्टी पार पाडण्याची औरंगजेबाला प्रथमतया निकड भासली.

(३) महाराष्ट्र-देश आणि तेथील लोक

मराठ्यांचा देश हा तीन आखीव अशा नैसर्गिक विभागांचा बनलेला आहे . पश्चिम घाट आणि हिंदी महासागर यांच्यामधील विभिन्न रुंदीची चिंचोळी जमीनपट्टी , ह्यामध्ये कोकण (मुंबई आणि गोवा यांमधील प्रदेश) आणि कानरा (गोव्याच्या दक्षिणेकडील प्रदेश) यांचा समावेश होतो . ह्या प्रदेशात निश्चित आणि

भरपूर पाऊस आहे. अंदाजे वर्षाला १०० ते १२० इंच . येथील मुख्य पीक म्हणजे तांदूळ आणि या प्रदेशात भरगच्च आमराया, केळीची बने आणि नारळांचे आगर यांची भरपूर रेलचेल आहे . हा घाट ओलांडून पूर्वेकडे गेल्यावर आपल्याला साधारण २० मैल रुंदीचा असा जमिनीचा पट्टा लागतो . याला म्हणतात मावळ . "मावळ म्हणजे अतिशय खडकाळ प्रदेश आहे . या प्रदेशात ओळीने पठारेच पठारे असून ह्या पठारांच्या सर्व बाजूला अतिशय खोल, विस्तृत अशा दऱ्या व खोरी आहेत."

आणखी थोडे पूर्वेच्या बाजूला गेले का पश्चिमघाटाचे उंचावलेले आरे किंचित खाली डोकावतात , नद्यांची पात्रे रुंदावत जातात आणि त्यामधून ज्याला आपण देश म्हणतो तो लांबच लांब पसरलेला काळ्याशार जमिनीचा सपाट प्रदेश म्हणजे मध्यदक्षिणेचा भाग आपल्याला लागतो.

डोंगरांच्या जवळजवळ कैचीत सापडलेल्या आणि पूर्वेच्याच बाजूने केवळ तोंड असलेला हा भूभाग म्हणजे मराठी राज्याची जन्मभूमी होय . घाटाच्या पूर्वेकडे पाऊसप्रमाण जलद कमी होत जाते आणि शेतीसाठी तो अनिश्चित आणि अपुरा ठरतो . तेथली जमीन ही नैसर्गिकतया नापिक आहे आणि उघड्या बोडक्या डोंगरांच्या छोट्या रांगांनी ती तुटलीफुटलेली आहे . "सर्वसाधारणपणे पाहता दक्षिणेत भरपूर श्रमांच्या मानाने मिळणारा मोबदला हा जेमतेम पोटापाण्यापुरते भागवील एवढाच असतो."

अशा या प्रदेशात जेथे निसर्गानेच तथाकथित स्पार्टनांची साधीसुधी राहणी लादलेली आहे अशा प्रदेशात चैनीचे , भिक्षुकवर्ग सोडून दिल्यास शिक्षणामुळे मिळणाऱ्या सुखासीन जीवनाचे , सौंदर्यात्मक दृष्टिकोनाचे फार काय लखटाक रीतिरिवाजाचे नावच घ्यायला नको. परंतु अशा तऱ्हेचा प्रदेश आणि तेथले प्रतीकात्मक वातावरण यांची विशेषेकरून अनुभवास येणारी अनुभूती मात्र तिथे निश्चित यावयाचीच . तेथील लोकांच्या ठायी स्वावलंबन, धाडस, चिकाटी, चपखल साधेपणा, ओबड धोबड वाटणारा सरळ धोपटपणा, सामाजिक समतेची जाणीव आणि तदनुषंगाने निर्माण होणारी आम्ही माणसे आहोत म्हणून माणसासारखे जगू अशी वाणी हे गुण प्रकर्षाने उद्भवतात . ७ व्या शतकामध्ये युवान च्वांग या चिनी प्रवाशाने मराठ्यांची मानी आणि ओजस्वी , युयुत्सु, उपकाराची भीड ठेवणारे आणि दुष्कर्माबद्दल सूड घेणारे अशी नोंद केलेली आहे. यानंतरच्या १० शतकाच्या कालात ते अधिक कावेबाज बनले आणि त्यांच्या मधला दिलदारपणा कमी झाला. परंतु चपलता , स्वावलंबन, स्वाभिमान आणि समतेबद्दलचे प्रेम या गुणसमुच्च्ययावर आधारभूत असलेले त्यांचे चारित्र्य मात्र बदलले नाही.

अधिक श्रीमंत आणि सुसंस्कृत जमातीशी तुलना करता १६ व्या शतकातील मराठ्यांमध्ये सामाजिक विषमता ही फारच थोडी आणि नजरेत न येण्याइतकी हलकीफुलकी होती . त्यांच्या धर्मामुळे ह्याच समानतेची भावना त्यांच्यामध्ये दृढमूल झाली होती . १५ व्या आणि १६ व्या शतकातील त्यांच्या लोकप्रिय संतमंडळींनी निव्वळ जन्मामुळे मिळणाऱ्या पावित्र्याच्या मोठेपणापेक्षा चारित्र्यामुळे मिळणाऱ्या मोठेपणाला मानावयाचे शिकविले आणि खऱ्या धर्माचा पाठपुरावा करणारे सर्वजण परमेश्वरासमोर सारखे असतात या तत्त्वाची मांडणी केली.

मराठ्यांच्या सामाजिक संघटनेच्या पूर्वकाळात त्यांच्या समाजरचनेत जो साधेपणा आणि एकात्मता होती त्यांचे प्रतिबिंब त्यांच्या पोरक्या , अविकसित आणि तत्त्वतः लोकप्रिय असलेल्या भाषेत आणि वाङ्मयात उमटलेले होते. निसर्गाने त्यांना उत्तमपैकी बांधलेले आणि सहज संरक्षणक्षम असे डोंगरी किल्ले जवळकीत दिले . या किल्ल्यांत ते अडीअडचणीला निवाऱ्यासाठी ताबडतोब धाव घेऊ शकत आणि या

किल्ल्यांमधूनच ते शत्रूचा कडवा प्रतिकारदेखील करू शकत . "पुष्कळदा घाटमाथा ज्या ठिकाणी संपत असे त्याठिकाणी गुळगुळीत खडकांची एक भिंत तयार होई . या घाटमाथ्याची उंचचउंच शिखरे त्याचप्रमाणे एकाकी खड्या असलेल्या डोंगराचे अलग पडलेले कडे यांना निसर्गच जणू किल्ल्याच्या स्वरूपात उभे करी. या माथ्यावर सपाट जागा असे . निसर्गाने बनविलेल्या अशा अनेक किल्ल्यांमध्ये उत्कृष्ट पाण्याचे झरे असत." याप्रमाणे शिवाजीने महाराष्ट्रात राजकीय एकात्मता निर्माण करण्याच्याही अगोदर १७ व्या शतकात महाराष्ट्राने भाषा, संप्रदाय आणि जीवनप्रवाह यांच्या विलक्षण समुच्ययाची पायरी गाठली होती.

शिवाजीच्या फौजेचा कणा म्हणजे मराठा आणि कुणबी जातीतून येणारा साधा भोळा , रोखठोक, स्वतंत्र बाण्याचा , पुरुषी अहंकाराने युक्त आणि कणखर असा शेतकरी वर्ग होता . दक्षिण हिंदुस्थान मुसलमानांनी जिंकल्यावर आणि १४ व्या शतकात महाराष्ट्रातील शेवटचे हिंदू राज्य नामशेष झाल्यावर तद्देशियांमधील लढाऊ वर्ग आपापल्या पुढाऱ्यांभोवती गोळा झाला आणि या देशाच्या नवीन राज्यकर्त्यांच्या सेवेसाठी त्याने आपली तलवार वाहिली . नवीन उदयास आलेल्या मुसलमान राजांच्या आवतीभोवती त्यांच्या सेवाचाकरीत अनेक मराठा घराणी लुटारू शिपायांचे कप्तान म्हणून श्रीमान , सत्ताधीश आणि कर्तबगार अशी उदयास आली.

(४) शहाजी भोसले आणि त्याचा आयुष्यक्रम

अशा तऱ्हेचे भोसले हे आडनाव धारण करणारे एक कुटुंब दोन खेड्यांची पाटीलकी करीत सुरुवातीला पुणे जिल्ह्याच्या पाटस विभागात राहात होते . त्यांचे शेती हे चरितार्थाचे साधन होते आणि त्यांनी आपल्या विचारी प्रामाणिक वागणुकीमुळे आणि धार्मिक दानप्रवृत्तीमुळे स्थानिक लोकांत बरेच वजन निर्माण केले होते. त्यांच्या शेतामध्ये पुरलेली संपत्ती त्यांच्या हाती पडली. तिच्या जोरावर त्यांनी शस्त्रे आणि घोडी खरेदी केली आणि १६ व्या शतकाच्या अखेरीला निजामशाही घराण्याच्या अमदानीत लुटारू स्वारांचे नेतेपण आपल्याकडे घेतले. मालोजीचा मोठा मुलगा शहाजी भोसले हा अशा कप्तानांपैकी एक होता. याचा जन्म १५९४ साली झाला . सिंदखेडचा उमराव आणि अहमदनगरचा एक श्रेष्ठ प्रतीचा हिंदू सरदार उच्चकुलोत्पन्न लखुजी यादव (जाधव) राव याची मुलगी जिजाबाई हिच्याशी तो लहान असतानाच त्याचे लग्न झाले. निजामशहाचा राजप्रतिनिधी मलिक अंबर हा होता. त्याच्या कारकिर्दीत आपल्या कुटुंबाची जी छोटीशी फौज होती तिचा नायक म्हणून बहुधा शहाजीने आपल्या चाकरीला सुरुवात केली असावी . इ. स. १६२६ च्या मे महिन्यात मलिक अंबरचा मृत्यू झाल्यावर निजामशाही राज्यांत अंदाधुंदीची परिस्थिती माजली. दरबारात वारंवार हत्या घडत गेल्या . या अनिश्चित परिस्थितीच्या काळात शहाजीने प्रथम निजामशाही सरकारची ताबेदारी पत्करली . नंतर तो मोगलांना मिळाला . त्यांचा पक्ष सोडून त्याने मग विजापूरकरांशी टक्कर दिली आणि नंतर तो त्यांच्या पक्षाला मिळाला आणि अखेर सह्याद्रीच्या रांगेतील एका डोंगरी किल्ल्यावर इ. स. १६३३ मध्ये त्याने एका नामधारी निजामशहाची राजा म्हणून ग्वाही फिरविली . त्याने पुणे आणि चाकणपासून तो बालाघाट आणि जुन्नर , अहमदनगर, संगमनेर, त्रिंबक आणि नाशिक पर्यंतचा निजामशाही राज्याचा एक चतुर्थांश भाग बळकाविला आणि तीन वर्षे पर्यंत (१६३३–३६) या सुलतानाच्या नावाने राज्यकारभार चालविला . त्याने जुन्नर हे आपले राजधानीचे शहर केले . परंतु इ. स. १६३६ मध्ये मोगलांनी शहाजीविरुद्ध मोठ्या प्रमाणावर मोहीम उघडली . या मोहिमेत शहाजीचा संपूर्ण पराभव झाला. त्याला आपल्या ताब्यातील आठ किल्ले मोगलांकडे देणे आणि विजापूरच्या चाकरीत शिरणे भाग पडले. एवढेच नव्हे तर महाराष्ट्रही त्याला सोडावा लागला.

(५) शिवाजीचे बालपण, शिक्षण आणि त्याचा स्वभाव

शहाजी आणि जिजाबाई ह्यांचा दुसरा मुलगा शिवाजी याचा जन्म १० एप्रिल १६२७ मध्ये शिवनेरीच्या डोंगरी किल्ल्यावर झाला . शिवनेरी किल्ला जुन्नरच्या परिसरातला होता . १६३६ च्या अखेरीस विजापूरच्या चाकरीत शिरल्यावर शहाजीला प्रथम तुंगभद्रेचा प्रदेश आणि म्हैसूरचे पठार आणि नंतर मद्रासच्या किनारपट्टीकडे आपल्या नवीन धन्यासाठी मुलूख आणि स्वतःसाठी जहागीर काबीज करण्यासाठी पाठविण्यात आले. परंतु इकडे त्याची आवडती पत्नी तुकाबाई आणि तिचा मुलगा व्यंकोजी ही त्याच्याबरोबर गेली तर जिजाबाई आणि शिवाजी यांना त्याच्या जहागिरीचा कारकून दादोजी कोंडदेव याच्या देखरेखीखाली पुण्याला राहाण्यासाठी पाठविण्यात आले.

नवऱ्याने दुर्लक्ष केल्यामुळे जिजाबाईचे मन अंतर्मुख बनले आणि तिच्या अंगची धार्मिक प्रवृत्ती बळावली. हीच शिकवण तिने आपल्या मुलाच्या मनावर बिंबविली. शिवाजी वाढला तो एकान्तवासात, मित्र विरहित, भाऊ, बहीण अगर बाप जवळ नाहीत अशा वातावरणात . एकांतवासातल्या या जिण्यामुळे आई आणि मुलगा यांच्यात दृढ असा धागा निर्माण झाला आणि शिवाजीला आपल्या मातेबद्दल गाढ प्रेम निर्माण झाले. एखाद्या देवतेला भक्ताने भजावे तसा तो आईवेडा बनला . अगदी लहान असतानाच त्याला आपल्या कर्तृत्वावरच सारी भिस्त ठेवावी लागली . त्यामुळे आपल्या मनातल्या कल्पना कोणाच्याही मदतीशिवाय प्रत्यक्षात आणावयास तो शिकला आणि वडिलधाऱ्या मंडळींकडून आदेशाची वाट न पाहता स्वतःच्या हिंमतीवर धडाडीने पुढे पाऊल टाकू लागला . त्याला जे काही शिक्षण मिळाले ते विशेषेकरून व्यावहारिक मिळाले. तलवारीचे हात चालविणे , घोड्यावर बसणे आणि इतर अनेक कलांत त्याने प्रावीण्य मिळविले . वारंवार पठण करून आणि अनेक वाद गोष्टीरूपाने कानावर पडल्यामुळे हिंदूंचे थोर पुराणग्रंथ त्याला मुखोद्‌गत झाले आणि अशा रितीने त्या ग्रंथातील राजकीय नीतिमत्ता आणि नैतिक शिकवण त्याने आत्मसात केली. धार्मिक ग्रंथांचे वाचन आणि कीर्तनांचे श्रवण यांच्या हव्यासाचे त्याला वेड लागले आणि जिथे जिथे तो जाई तिथे तिथे तो हिंदू आणि मुस्लीम अवलिये यांच्या संगतीत सुख मानू लागला.

सह्याद्रीच्या रांगांच्या पायथ्याशी आणि त्यांच्या लगतच पसरलेला घनदाट जंगलांनी वेढलेला असा पुणे जिल्ह्याचा पश्चिमपट्टा अथवा मावळ म्हणजे कणखर , रसरशीत आणि रणधुरंधर अशा शेतकऱ्यांचे म्हणजे मावळ्यांचे वसतिस्थान होते . ह्या मावळे मंडळींतूनच शिवाजीने आपले बालपणाचे सौंगडी , त्याच्या जीवाला जीव देणारे सेवक आणि त्याचे लढाऊ मावळेगडी निवडले . समवयस्क मावळे मंडळींच्या समवेत शिवाजीने सह्याद्रीच्या अंगाखांद्यावरील जंगले आणि डोंगरमाथी आणि दऱ्याखोऱ्यांच्या काठाकाठाची नागमोडी वळणे पायाखाली घातली . अशा तऱ्हेने त्याने हालअपेष्टा आणि काबाडकष्ट यांनी भरलेल्या जीवनाला तोंड देण्यासाठी स्वतःची कंबर कसली . शिवाजीच्या चारित्र्याला अगदी लहानपणापासून धार्मिक अस्मितेबरोबरच जीवनातल्या सुखदुःखांबाबत उदासीन राहण्याच्या वृत्तीची झिलई मिळाली . स्वातंत्र्याबद्दल त्याच्या मनात अपरंपार प्रेम निर्माण झाले आणि एखाद्या मुसलमान बादशहाचा पगारी सेवक म्हणून गुलामगिरीतले सुखासिन जिणे जगण्याचा तो मनोमन तिटकार करू लागला.

७ मार्च १६४७ या दिवशी दादोजी कोंडदेव मरण पावला आणि वयाच्या विसाव्या वर्षी शिवाजीच्या हाती अधिकार सुपूर्द झाला . लष्करी हालचाली आणि मुलकी राज्यकारभार याबाबतचे शिक्षण त्याला अगोदरच प्राप्त झालेले होते.

अनुक्रमणिका

पश्चिमेकडील आपल्या बापाच्या जहागिरीतील शिपाईगडी आणि आता ज्यांच्यावर त्याला अधिसत्ता गाजवावी लागणार होती ते प्रजाजन यांच्याबरोबर तो केव्हाच एकरूप होऊन गेला होता . धडाडी आणि हुकूम गाजविण्याची प्रवृत्ती त्याच्या अंगी उन्मेषाने विकसित झाली होती. [शिवाजीचा आपल्या वडीलधाऱ्यामंडळींबरोबर जो संघर्ष झाला तो त्याच्या पुढील आयुष्याला त्याने कोणते वळण द्यावे या प्रश्नावर . दादोजी कोंडदेव हा अतिशय कर्तृत्ववान , प्रामाणिक आणि नियमित असे चारित्र्यवान जीवन जगणारा होता . परंतु उच्च ध्येयवाद , धाडसी महत्त्वाकांक्षा आणि विस्तृत कल्पनाशक्ती यांचा त्याच्या ठिकाणी अभाव होता. शिवाजीने दाखविलेला धाडसीपणा आणि स्वतंत्रवृत्ती म्हणजे उच्छृंखल ध्येयवाद असून त्यामुळे त्याचे जीवन बरबाद होईल असे दादोजी कोंडदेव याला वाटत असे . त्याने शिवाजीबरोबर वादविवाद करून आपल्या वाडवडिलांनी चोखाळलेला मार्ग त्याने स्वीकारावा आणि आदिलशहाचा एक मांडलिक होऊन राहावे असे त्याला अनेकवार सांगण्याचा प्रयत्न केला . शिवाजी आपले मावळे जमवून विजापूरच्या मुलखावर जे धाडशी हल्ले करी आणि विजापूरचे किल्ले घेण्याचे जे मनसुबे रची त्यामुळे दादोजी कोंडदेव याला त्याच्या भविष्याबद्दल अतिशय काळजी वाटे . तो याबाबत शहाजीकडे तक्रार करीत असे परंतु शिवाजीला सुधारण्यात त्याला यश येत नसे . शिवाजीबद्दलच्या काळजीने थकल्यामुळे आणि वार्धक्यामुळे १६४७ मध्ये त्याचा मृत्यू झाला. वयाच्या केवळ २० व्या वर्षी शिवाजी आपल्या भवितव्याचा धनी झाला.]

(६) शिवाजीचे आरंभीचे विजय

इ. स. १६४६ हे वर्ष विजापूरच्या इतिहासातील आणीबाणीचे म्हणून समजले पाहिजे . विजापूरच्या सुलतानाला गंभीर आजाराने ग्रासले . त्याचा हा आजार , जवळजवळ १० वर्षेपर्यंत रेंगाळला आणि ह्या कालावधीत त्याला कोणत्याही महत्त्वाच्या बाबींकडे जातीने लक्ष पुरविता आले नाही. शिवाजीच्या दृष्टीने ही वेळ संधी साधून घेण्याची होती . त्याने तोरण्याचा किल्ला तेथल्या विजापूरी किल्लेदाराला हातोहात फसवून घेतला. ह्या ठिकाणी जवळजवळ २ लक्ष होन भरेल एवढा सरकारी खजिना त्याच्या हाती पडला . तोरण्याच्या पूर्वेला पाच मैल त्याच डोंगराच्या रांगेच्या उंच शिखरावर त्याने राजगड नावाचा नवीन किल्ला बांधला. नंतर त्याने कोंडाण्याचा (सिंहगड) किल्ला तेथील विजापूरी अधिकाऱ्याकडून घेतला . दादोजी कोंडदेवाच्या मृत्यूनंतर एकछत्री अंमल ज्याच्यावर चालविता येईल असे राज्य निर्माण करण्यासाठी शिवाजीने शहाजीच्या पश्चिम जहागिरीत मोडणारे प्रदेश जिंकून घेण्यासाठी कंबर कसली.

आदिलशहा शहाजीला कैद करतो, १६४८

२५ जुलै १६४८ रोजी दक्षिण अर्काट जिल्ह्यात जिंजीला वेढा घालून बसलेला विजापूरी सेनापती मुस्तफाखान याने शहाजीला कैद केले आणि त्याची मालमत्ता आणि फौजफाटा जप्त केला . शहाजीला बेड्या घालून विजापूरला नेण्यात आले आणि बादशहाला शरणागती देईपर्यंत त्याला सख्त नजरकैदेत ठेवण्यात आले.

शिवाजीची इकडे आड आणि तिकडे विहीर अशी परिस्थिती झाली . त्यावेळी दक्षिणेचा मोगल सुभेदार राजपुत्र मुरादबक्ष हा होता . त्याच्याकडे शिवाजीने याचना करून कळविले की त्याने शहाजीच्या गतापराधाबद्दल बादशहाकडून माफी मिळवावी आणि शहाजी आणि त्याचे मुलगे यांना भविष्यकाळात संरक्षण द्यावे. असे झाल्यास आपण स्वतः येऊ आणि मोगलांच्या चाकरीत रुजू होऊ . शहाजहानने अर्थात् शहाजीची सुटका करण्याबद्दल आदिलशहावर कोणत्याही तऱ्हेचे दडपण आणले नाही . विजापुरी उमराव अहमदखान याच्या मध्यस्तीने आणि शहाजीने बंगलोर , कोंडाणा आणि कंदार्पि हे किल्ले देण्याचे कबूल केल्यावर मे १६४९ मध्ये शहाजीला मुक्त करण्यात आले . शहाजीची सुटका बिनशर्त झालेली नसल्याने १६४९ ते १६५५ या कालावधीत शिवाजीने विजापूर दरबारची कसल्याही तऱ्हेची नवीन कुरापत न काढता फारशी हालचाल केली नाही. या काळातील त्याच्या ताब्यात आलेला मुख्य किल्ला म्हणजे पुरंदर हा होय . हा किल्ला त्याने तेथील मराठा ब्राह्मण किल्लेदाराकडून हिकमतीने घेतला.

अनुक्रमणिका

जावळीचा पाडाव, १६५६

सातारा जिल्ह्याच्या अगदी वायव्य टोकाला जावळीचे खेडे आहे . हे खेडे एका मोठ्या सरदार घराण्याचे मुख्य ठिकाण होते . या घराण्याच्या ताब्यात जवळ जवळ सर्व जिल्ह्याचा प्रदेश होता . हे सरदार घराणे म्हणजे मोरे या मराठा सरदाराचे होय . या घराण्याच्या मुख्याला चन्द्रराव हा वंशपरंपरा चालत आलेला किताब होता . ते १२ ,००० पायदळ ठेऊन असत आणि या पायदळातील शिपाई म्हणजे मावळी जातीची कणखर पहाडी मंडळी होती.

जावळी राज्याची ठेवणच अशी होती की त्या राज्याने शिवाजीच्या दक्षिण आणि नैर्ऋत्य दिशेकडील महत्त्वाकांक्षेला पायबंद घातला . म्हणून त्याने आपल्याबरोबर थोरल्या मृत चन्द्रावाच्या मुलीचे लग्न जमविण्यासाठी वाटाघाटी करण्याच्या मिषाने धाकट्या चन्द्रावाला ठार मारण्याच्या हेतूने आपला अधिकारी रघुनाथ बल्लाळ कोरडे यास रवाना केले . कोरडे आपल्या कामगिरीत यशस्वी झाला आहे असे कळल्यावर शिवाजीने कूच केले आणि १५ जानेवारी १६५६ रोजी त्याने जावळीवर हल्ला चढविला . सेनापतिविरहित जावळीच्या शिबंदीने सहा तास झुंज दिली आणि अखेर त्यांनी शस्त्रे खाली ठेवली . जावळीचे सबंध राज्य अशा तऱ्हेने शिवाजीच्या ताब्यात आले . जावळीच्या पश्चिमेस २ मैलांवर त्याने प्रतापगड नावाचा किल्ला बांधला आणि त्या ठिकाणी त्याने आपली अधिष्ठात्री देवता भवानी हिची प्रतिष्ठापना केली. पुढच्याच एप्रिल महिन्यात त्याने आपली भावी राजधानी रायगड , ही मोऱ्यांपासून जिंकून घेतली . [शिवाजीने जावळी जिंकून घेतल्यामुळे तेथून पश्चिम आणि दक्षिण या बाजूचा मुलूख जिंकून घेण्याचा त्याचा मार्ग मोकळा झाला . त्याचप्रमाणे चन्द्रराव मोरे याच्या ताब्यातील हजारो मावळे त्याच्या चाकरीत शिरल्यामुळे त्याच्या सामर्थ्यात भर पडली . मोऱ्यांनी जवळजवळ ८ पिढ्यांच्या आपल्या कारकिर्दीत प्रचंड संपत्ती जमा केलेली होती ती सर्व शिवाजीच्या हातात पडली . जावळीच्या पाडावानंतर सुपा, बारामती आणि इंदापूर ही ठिकाणे त्याच्या ताब्यात आली . पुरंदर, राजगड, कोंडाणा आणि तोरणा हे किल्ले त्याच्या ताब्यात आल्यामुळे त्याच्या राज्याच्या दक्षिण बाजूस जणू काही मजबूत किल्ल्यांची एक साखळीच निर्माण झाली . याच दिशेने त्याने ताब्यात घेतलेला आणखी एक किल्ला म्हणजे रोहिडा . पुण्याच्या वायव्येला त्याने ताब्यात घेतलेला आणखी किल्ले म्हणजे तिकोणा , लोहगड आणि राजमाची हे होत . भोरघाटाच्या उत्तरेस ६ मैलांवर सह्याद्रीच्या उंच शिखरावर हा किल्ला होता. हा किल्ला ताब्यात आल्यामुळे कोकण प्रदेशावर ताबा राखणे शिवाजीला सहज शक्य झाले.]

(७) शिवाजीचा मोगलांबरोबर पहिला संघर्ष , १६५७ [आपले स्वातंत्र्य पुकारल्यानंतर बरीच वर्षे शिवाजीने मोगलांबरोबर कसोशीने शांततेचे संबंध ठेवले . याला कारण म्हणजे त्याची सत्ता अजून स्थिरावली नव्हती आणि अशा वेळी विजापूर आणि दिल्ली येथील सत्तांना एकाच वेळी डिवचण्याचा मूर्खपणा करणे धोक्याचे होते . त्याशिवाय १६५३ पासून पुढे राजपुत्र औरंगजेब याने दक्षिणेचा कारभार असामान्य कर्तबगारीने आणि दक्षतेने केला होता . साहजिकच त्याच्या मनाविरुद्ध एखादी गोष्ट करण्याची आजूबाजूच्या राजेरजवाड्यांची हिंमत होत नव्हती . १६५६ च्या जानेवारी –मार्च महिन्यात औरंगजेब गोवळकोंड्याबरोबरच्या युद्धात गुंतलेला असताना शिवाजीचे सारे लक्ष जावळी आणि उत्तर रत्नागिरी जिल्हा जिंकून घेण्याकडे केंद्रित झाले होते . साहजिकच औरंगजेबाच्या गैरहजेरीत मोगलांच्या मुलुखावर हल्ले करण्यास त्याला अवधीच नव्हता.]

४ नोव्हेंबर १६५६ रोजी महमद आदिलशहाचा मृत्यू झाल्यावर विजापूरवर स्वारी करण्यासाठी औरंगजेबाने झटून तयारी करण्यास सुरुवात केली आणि जमेल तितक्या आदिलशाही उमरावांना आणि मांडलिकांना फूस लावण्याचा प्रयत्न केला . मार्च १६५७ मध्ये शिवाजीचा वकील सोनाजी बिदरला वेढा घालून बसलेल्या मोगल छावणीत येऊन पोहोचला . मोगल दरबाराकडून त्याला असे आश्वासन देण्यात आले की , शिवाजीच्या सर्व विनंत्या म्हणजे त्याच्या प्रत्यक्ष ताब्यात असलेल्या विजापुरी मुलुखातील सर्व किल्ले आणि खेडी यांवरील त्याच्या मालकीहक्काला मान्यता आणि दाभोळ बंदर आणि त्याच्या आवतीभोवती असलेला मुलूख जिंकण्याबद्दल संमती , या मान्य करण्यात येतील . २३ एप्रिल १६५७ या दिवशी औरंगजेबाने वरील मजकुराचा खलिता शिवाजीकडे रवाना केला . परंतु शिवाजीने त्याला रूचेल अशा पद्धतीने लढण्याचे वेगळे धोरण अगोदरच आखलेले होते . मोगलांच्या ताब्यातील असलेल्या दक्षिण

भारताच्या नैर्ऋत्य भागावर हल्ले चढवून आणि अशा तऱ्हेने मोगल फौजांना विभागून विजापूर राज्याला उपकारक ठरणारे धोरण स्वीकारणे अधिक फायदेशीर आहे असा विचार त्याने केला . [विजापुरावरील मोगल चढाईचे वर्णन खाफीखानाने पुढीलप्रमाणे दिले आहे :

(१९१) राजा जयसिंघाने दिलेरखान व इतर साथीदार यांसह हुकूमाप्रमाणे विजापुरविरुद्ध कूच केले . त्याने आपल्याबरोबर मुल्लायाह्या बीजापुरी, पुरदिलखान, सीवा आणि एक नातलग , मुख्य साहाय्यक व पाच हजारी मनसब मिळविण्याविषयी सुचविला गेलेला नेतू , यांना वाटाडे म्हणून घेतले. त्याचे सैन्य कागदावर ३३,००० हजार स्वार, पण प्रत्यक्ष २५,००० हजार होते. बहलूलखानाचा नातू व विजापुरी शूरतम उमरावांपैकी एक अबुल–मज्द हा आदिलखानास सोडून राजा जयसिंघास (१९२) मिळाला व त्याने मुलूख जिंकण्यास मदत केली . राजा सर्व बाबतीत त्याच्या म्हणण्याप्रमाणे वागे. त्याने त्याजकरिता बादशहाकडे पाच हजारी चार हजार स्वार एवढ्या मनसबीची शिफारस केल्यावर तेवढी मनसब त्यास मिळाली.

सर्व बाजूंचे विजापुरी किल्ले , एकदम हल्ला करून अथवा थोड्या दिवसांच्या वेढ्यानंतर काबीज झाले . सीवा व नथूजी यांनी दोन हजार स्वार व ८/९ हजार पायदळ यांच्या मदतीने किल्ले हस्तगत करण्यात मोठे कौशल्य दाखवून पुष्कळ कीर्ती मिळविली आणि तीन-चार आठवड्यांच्या अवधीत मंगळवेढे (मंगल पहरह) व इतर असे तीन किल्ले ताब्यात आणिले. त्यांनी किल्ल्यातील लोकांना अमान देऊन गल्ला, मसाला, तोफखाना व हत्यारे याशिवाय बाकीच्या गोष्टी घेऊ दिल्या . आता विजापूरच्या फौजा उजव्या व डाव्या बाजूने प्रकट होऊ लागल्या . रोज दोन्ही बाजूंचे आघाड्यांच्या गोळे व बाण यांच्या साह्याने लढाया होत . शेवटी दक्षिण्यांचा जोर इतका वाढला की , बहुतेक रात्री दिलेरखान आपल्या शिपायांसह हत्ती व घोडे यांवर बसून काढी. दोन्ही बाजूंचे पुष्कळ लोक मरत व जखमी होत. रात्रंदिवस खाणे, झोप व विश्रांती बादशाही लष्करास मिळेना. शत्रू धिटाई करून बादशाही लष्करात येणारी कही फिरवी . अशातऱ्हेने आठ-नऊ मजली गेल्यावर बातमी आली की , शर्झाखान महदवी, कित्येक नामी सरदार, दहा-बारा हजार स्वार व पुष्कळ कर्नाटकी प्यादे –हे रात्री छापे घालण्यात तरबेज असत –घेऊन पहिल्या विजापुरी फौजेच्या मदतीस आला आहे आणि आघाडीच्या फौजेभोवती उभा ठाकला असून (१९३) बादशाही फौजेवर हल्ला करीत आहे . त्यात दिलेरखानाने मुकाबला करून शर्झाखानास पराभूत केले . पण दोन्ही बाजूंचे पुष्कळ स्वार व प्यादे कामास आले . हा पराभव झाल्यानंतर तीन -चार घटकांनी दखनी फौजा चार भाग करून नामी सरदारांच्या अधिपत्याखाली चारी बाजूंनी हल्ला करू लागल्या . त्यावेळी एवढी मोठी चकमक घडली की , रक्ताचा पूर वाहला व दोन्ही बाजूंचे पुष्कळ नामी लोक पडले . विजापुरी लष्करातील याकूत नावाचा हबशी सरदार पुष्कळ हबशी व दक्षिणी लोकांसह मरण पावला . शेवटी दिलेरखानाच्या हल्ल्यास तोंड देणे शक्य न होऊन शत्रुसैन्य पळून गेले. यात पुष्कळ घोडे, घोड्या, छत्र्या व झेंडे अफगाणांच्या हाती लागले. पुन्हा रात्रीच्या वेळी येऊन त्यांनी शाही फौजेस घेरले . दोन दिवस व रात्री लोक घोड्यावरून खाली उतरले नाहीत . तिसरे दिवशी सीवा व नथूजी यांच्या हाताखाली असलेल्या पिछाडीवर शत्रूने जोर केला . तेव्हा फतहजंगखान राजाच्या काही फौजेसह मदतीस धावला . लढाई जोराची झाली आणि सीवाबरोबरचे पुष्कळ लोक कामी आले . पण जादवराय नावाचा एक दक्षिणी सीवाच्या शिताफीने आपल्या साथीदारासह मारला गेला आणि दक्षिणी लोक पळून गेले. दररोज अशा प्रकारे जोराच्या कटकटी होत व त्यामध्ये दिलेरखान उत्तम शौर्य प्रकट करी.

इतक्यात मंगळवेढ्याच्या –हा किल्ला सरहद्दीवर जिंकलेल्या किल्ल्यांपैकी होता –किल्लेदाराकडून लिहून आल्याने कळून आले की , (१९४) विजापूरची सुमारे वीस हजार यक्काताझ स्वारांची फौज किल्ल्याच्या दरवाजापाशी पोहोचली आणि तिने तोफा व बंदुका यांच्या माराला न जुमानता मोर्चे कायम केले. दररोज तिच्या मदतीस नवीन फौज येते. लौकर मदत झाली नाही तर किल्ला हातातून जाईल. तेव्हा सराफराझखानास त्या किल्लेदाराच्या मदतीस पाठविले . कुमक पोचल्यावर किल्लेदार किल्ल्यातून पुढे आला आणि दोघेही दक्षिण्यांना मारू लागले . यामध्ये कित्येक जखमी झाले व मेले. दोन्ही फौजा किल्ल्यापुढे समोरासमोर थांबून राहिल्या.

अशा तऱ्हेने वीस दिवसांचा रस्ता दोन महिन्यांत लढाई करीत तोडून बादशाही सैन्य विजापूरपासून पाच कोस अंतरावर आले व ता . २ **रजबला'** (श. १५८८ **चैत्र शुद्ध** २, इ. १६६६ मार्च २७) त्याने शहर वेढण्यास सुरुवात केली . आदिलखानाने कोंडला गेल्यामुळे आपल्या काही सेनापतीस बादशाही मुलखात जाऊन तो उजाड करण्यास व दुसऱ्या काहीस राजास विरोध करून त्याची कही लुटण्यास सांगितले . त्याने तलावांचे बांध फोडविले , विहिरीत विषारी पदार्थ व काटेकुटे फेकले , किल्ल्याजवळच्या उंच हवेल्या व झाडे पाडून टाकिली , जमिनीत खिळे ठोकले, आणि शहराभोवतालच्या बागा व घरे यांचा इतका नाश केला की , त्या सालभर शहरात आबादीचे नावही राहिले नाही आणि आदिलशाहीस तिचा नाश होईतो ऊर्जितावस्था आली नाही.

या वेळी हैद्राबादकराच्या नोकरांपैकी एक उत्तम चाकर व ख्वाजासरा नेकनामखान –असे सांगतात की , हा एक इराणी उमराव होता , शाह अब्बासच्या क्रोधापासून बचाव करण्यासाठी याने (१९५) स्वहस्ते स्वतःस खच्ची करून घेतले होते व शेवटी दक्षिणेत येऊन कुत्बुल्मुलकाच्या जवळच्या उमरावांपैकी एक झाला होता –सहा हजार स्वार व २५ हजार प्यादे यांसह आदिलशहाच्या मदतीस येऊन शर्झाखानास मिळाला . रोज चांगली लढाई होई. कहीसाठी जी फौज व जनावरे जात त्यावर संकट आल्याशिवाय क्वचित परत येत. दक्षिणी फौजेचा पातशाही फौजेवर जोर होई तेथे तेथे दिलेरखान स्वतः जाई. दोन्ही फौजांच्या अशा प्रकारच्या लढायांची क्रमाने वर्णने देत बसलो , तर ते कंटाळवाणे होईल. असा एक दिवसही जात नसे की, ज्या दिवशी दोन्ही बाजूंची शे–दोनशे माणसे मेली नाहीत.

इकडे सीवाला , नथूजी पादशाही काही हजार स्वार यांसह पन्हाळा किल्ला घेण्यास पाठविले होते . पण विशेष कामगिरी न करता तो तेथून उठून स्वसंबद्ध अशा खेळणा किल्ल्यावर गेला. विजापुरी सरदारांनी नथूजीस फितवून फोडले व आपल्या बाजूस वळविले. पुढे राजाने पुष्कळ उपाय योजून त्यास आपल्याकडे ओढिले, शेवटी सीवाने युक्तीप्रयुक्तीने काही किल्ले पातशाही कबजात आणिले.

अनुक्रमणिका

यावेळी राजाने वायदा, सीवाची इच्छा व हुजूरचा हुकूम यांच्या अनुरोधाने सीवास त्याच्या मुलासह **रमजानच्या** शेवटच्या तारखेस [श. १५८८ **चैत्र शुद्ध** २, इ. स. १६६६ मार्च ३१] सड्याने दरबाराकडे पाठविले. तद्विषयक हकीकत सांगितलीच आहे. नथूजी बहुतेक साथीदारांसह (१९६) विजापूरच्या वेढ्यात होता. सीवा रवाना झाल्यावर विजापूरचा वेढा २ ॥ महिने चालला. तेवढ्यात लढाया झाल्या. आलमगीरनाम्यात अशा दहा-बारा लढाया वर्णन केल्या असून त्यांपैकी एक येथे सांगण्याजोगी आहे.

जिल्कादच्या आरंभी वेढ्यात पाच महिने झाल्यावर एके दिवशी सर्व दक्षिणी, पातशाही फौजेच्या भोवती – राजावर अगोदरच लढाईचा भार पडला असता – जमले. पंचवीस हजार स्वार व पन्नास हजार प्यादे यांनी किल्ल्यावरून मदत म्हणून तीन अहोरात्र आगीचा मारा केला. तेव्हा चोहोबाजूंनी लढाईची इतकी धामधूम उठली की, डोके खाजविण्याची किंवा डोळ्याची उघडझाप करण्याची फुरसत मिळेना. ज्या ज्या बाजूस हल्ले होत त्या त्या बाजूस हे तोंड देत. विशेषतः बहलूलखानाचा नातू आणि पादशाही लष्करात आलेल्या अबुल – मुहम्मदाचा भाऊ अबुल आला हे दोघे इर्षेने लढू लागले. दोघांचीही इच्छा होती की, आपण नमकहलाली दाखवावी. दुसऱ्या बाजूने शर्झाखान व मूसाखान यांनी जोराचे हल्ले चढवून राजाच्या सैन्यात गोंधळ उडवून दिला. असा कोणीही राहिला नाही की, ज्यासह राजाने कैद करावे किंवा मरावे. यावेळी दिलेरखान राजापासून दूर होता (१९७) आणि आठ नऊ हजार सैन्यांसह नामी दक्षिणी सरदारांनी त्याशी लढाई सुरू करून पादशाही फौजेस कुमक मिळण्याचा मार्ग बंद केला होता. पण त्याने जोराच्या हल्ल्यावर शत्रूवर दाब पाडला आणि स्वतः वेढले गेलेल्या राजाच्या सरदाराकडे आला तेव्हा अबुल मुहम्मदखान यांनी अवर्णनीय कामगिरी बजाविली. या लढाईत विजापुरी स्वार व प्यादे फार मेले. तसेच विजापुरी मूसाखान नावाचा सरदारही मरण पावला. अशा तऱ्हेने दक्षिण्यांचा मोठा मोड झाला आणि अगणित हत्ती, घोडे, पालख्या, छत्र्या व झेंडे पादशाही लष्कराच्या हाती लागले. या लष्कराने शत्रूचा सात कोस पाठलाग केला व सुमारे १००० जखमी व चांगले लोक कैद केले. पैकी शंभरावर यक्काताझ स्वार होते. पुढे प्रत्येकाने पैसे देऊन आपली सुटका करून घेतली. यात मुसाखानाबरोबरचे ५०० व जखमी १००० लोक होते. राजा व दिलेरखान यांकडील १३० मोजके लोक ठार व २०० जखमी झाले. **जमादिलावलच्या** आरंभीपासून ते **जिल्कादच्या** अखेरपर्यंत सात महिने स्वार, घोडे व प्यादे यांना विश्रांती मिळाली नव्हती आणि विजापूरच्या आसमंतात ४०/५० कोसपर्यंत गल्ला व वैरण यांचे नावही उरले नव्हते. यामुळे दोन्ही सैन्ये जेर झाली होती. तेव्हा राजा व दिलेरखान यांस काही दिवस लोकांच्या जखमा भरून याव्या, दारू व शिसे पैदा करावे व लष्करास आराम मिळावा एतदर्थ घारुरास येथे गलावैरण मिळण्याची आशा होती – (१९८) जाऊन हुजुरास हकीकत लिहून कळवावी असे करणे श्रेयस्कर वाटले. इकडे किल्ल्यातील मसाला संपल्याने, धान्य सरल्याने व हत्यारे निकामी झाल्याने दक्षिणीही मेटाकुटीस आले होते. दोघांनीही कीमती मसाला मागवला होता. तरीही विजापुरी लोक काकुळत दाखवून रक्षणाची भाषा बोलू लागले. आदिलशहाचा खजिना व कारखाने हेही मोकळे पडले आणि राऊत व घोडे यांत रया उरली नाही, तसेच मुलूख वैराण झाला होता. एवढ्यात बादशाहास अर्ज पोहोचल्यावर हुकूम सादर झाला की, आदिलशाहाविरुद्ध चाललेला वेढा उठवून राजाने खुजस्ते– वनियादेस जावे व दिलेरखानास हुजूर पाठवावे.

(२०५) आता पुन्हा राजा जयसिंघाची हकीकत सांगतो. त्याने बादशाही हुकूमाप्रमाणे विजापुरी किल्ले वेढणे व मुलूख उजाड करणे या बाबतीत हात आखडला. त्याने ओळखिले की, आपण परतल्यावर जिंकलेले किल्ले दक्षिणी लोकांच्या गर्दीमुळे व किल्ल्यातील सामग्री संपल्यामुळे किल्लेदाराच्या ताब्यात राहणे कठीण आहे. तेव्हा उत्तम गोष्ट किल्ले खाली करावेत, तोफखान्याचा जो मसाला बरोबर घेण्यालायक आहे तो घेऊन बाकीचा शिपायांना उद्ध्वस्त करण्यास व आग लावण्यास सांगावे आणि बळकट बुरुज व भिंती ह्या उखडून टाकून व कूच करून औरंगाबादेस पोहोचावे. यावेळी बादशहाकडून सीवा पळून गेल्याबद्दल आणि नथूजीला कैद करून पाठविल्याबद्दल हुकूम पोहोचला. तेव्हा राजाने नथूजीला त्याच्या मुलासह कैद करून हुजूरकडे पाठविले. [हुकूमाप्रमाणे दिलेरखान नर्मदेपार होतो तो त्यास चांदा देवगड या बाजूंची कामगिरी करण्याचा हुकूम आला. ती कामगिरी त्याने पार पाडली.] (२०७) इतक्यात जयसिंघ आजारी पडून पुणे बालाघाटाच्या रस्त्यावर मरण पावल्याची बातमी आली. तेव्हा त्याच दिवशी दक्षिणच्या सुभेदारीच्या फर्मानासह विजापूरवर नवीन मोहीम करण्यास फर्माविल्याचा हुकूम दिलेरखानाच्या नावे सादर झाला.

(**शि. च. वृ. सं.** खं. ३, **मुन्तखाबुल्लुबाब**, ७४–७८)]

याला अनुसरून ३००० घोडेस्वारांना घेऊन मानाजी भोसले आणि काशी ह्या दोन मराठा सेनानींनी भीमा ओलांडली आणि त्यांनी अनुक्रमे चांभारगोंदा आणि रायसीन या दुय्यम विभागातील मोगलांच्या ताब्यातील खेड्यांची लुटालूट केली. अहमदनगर शहराच्या वेशीपर्यंत जाळपोळ करीत आणि दहशतीचे वातावरण निर्माण करीत ते येऊन पोहोचले. अहमदनगर हे (एप्रिल अखेर १६५७) (**कम्बू**, ३ ब; **आदाब**, १४८ अ) त्यावेळच्या मोगलांच्या ताब्यातील दक्षिण भारतातले प्रमुख शहर होते. अहमदनगर किल्ल्याच्या सावटात गजबजलेले शहर लुटण्याचा मराठ्यांचा प्रयत्न किल्ल्यातील शिबंदीने ऐनवेळी हल्ला करून मोडून काढला. अगदी याच वेळी उत्तरेत जुन्नरचा दुय्यम विभाग लुटण्यात शिवाजी गंतला होता. ३० एप्रिलच्या काळोख्या रात्री दोरांच्या शिड्या लावून जुन्नर शहराच्या भिंती गुपचूपपणे तो चढून गेला आणि शहररक्षकांची कत्तल करून ३ लक्ष होन एवढी रोकड, २०० घोडे आणि पुष्कळ किमती कापड आणि जडजवाहीर अशी लूट घेऊन तो निघून गेला (**सभासद**, ८; **आदाब**, १५३ ब).

अनुक्रमणिका

या धामधुमीची बातमी कानावर पडताच औरंगजेबाने अहमदनगर जिल्ह्याकडे सपाटून रसदीची रवानगी केली . नसिरीखान, इरजखान आणि इतर काही अधिकाऱ्यांना ३००० घोडेस्वार घेऊन तेथे जाण्याचा हुकूम देण्यात आला . दरम्यान अहमदनगर किल्ल्यामधून बाहेर पडून मुल्तफतखानाने मानाजी भोसल्याचा पराभव केला आणि वेढ्यात पडलेल्या चांभारगोंद्याच्या ठाण्याची सुटका केली (२८ एप्रिल १६५७).

परंतु जेव्हा उत्तर पुणे विभागात मोगलांचा जोर अतिशय वाढला तेव्हा शिवाजी तेथून निसटून अहमदनगर जिल्ह्याकडे गेला आणि तेथे लुटालूट करण्यास त्याने सुरुवात केली . याच वेळी (मे अखेर) नसिरीखान हा या धामधूम चाललेल्या भागात येऊन पोहोचला होता . त्याने झपाट्याने कूच करून शिवाजीच्या सैन्यावर अचानक हल्ला केला आणि त्यांना जवळ जवळ वेढले . मराठ्यांपैकी अनेकांची कत्तल झाली, अनेक जखमी झाले आणि उरलेल्यांना माघार घेणे भाग पडले (४ जून १६५७). औरंगजेबाने याचा सूड घेण्यासाठी आपल्या सर्व अधिकाऱ्यांना शिवाजीच्या प्रदेशात घुसून खेडी बरबाद करण्याचा , दयामाया न दाखविता लोकांची कत्तल करण्याचा आणि त्यांची भयंकर लुटमार करण्याचा हुकूम दिला . मोगली साम्राज्याच्या नैर्ऋत्य सीमेचे रक्षण करण्यासाठी औरंगजेबाने जी योजना आखली त्यात त्याचे उत्कृष्ट संघटनाचातुर्य आणि सारासार बुद्धी दिसून येते . याच वेळी तुफानी वादळाच्या वेगाने पाऊस पडण्यास सुरुवात झाली आणि जून , जुलै, ऑगस्ट या कालावधीपुरती मोहीम स्थगित करणे मोगलांना भाग पडले . [या सुमारास औरंगजेबाने नसिरीखान याला जी पत्रे लिहिली त्यात त्वेष आणि सूड या भावना ओतःप्रोत भरलेल्या होत्या . बादशाहीमुलुखातून तुम्ही मराठे हल्लेखोरांना हाकलून लावले पाहिजे आणि शिवाजीच्या मुलुखात सर्व बाजूंनी घुसून तेथील खेड्यांचा नाश करून , तेथील लोकांची बेगुमानपणे कत्तल करून आणि त्यांना मन मानेल तसे लुटून हल्लेखोरांचा वचपा काढला पाहिजे अशी सक्त आज्ञा औरंगजेबाने आपल्या अधिकाऱ्यांना दिली. विशेषतः शिवाजीच्या ताब्यातील पुणे आणि चाकण हे जिल्हे संपूर्ण उद्ध्वस्त करावेत , तेथील लोकांची कत्तल करण्यात आणि त्यांना गुलाम बनविण्यात कसलीही कसूर करू नये व बादशाही मुलुखातील जे शेतकरी आणि खेड्याचे प्रमुख शत्रूला जाऊन मिळाले आहेत त्यांची सर्रास कत्तल करावी असा हुकूम त्याने दिला.

औरंगजेबाने आपल्या प्रदेशाच्या नैर्ऋत्य सीमेचे रक्षण करण्यासाठी जी उपाययोजना आखली त्यात त्याचे चातुर्य आणि डावपेचही दिसून येतात. चांभारगोंदा, कारा आणि अष्टी या परगण्यांचे रक्षण करण्यासाठी त्याने जुन्नरजवळ कारतलबखान याची , गडनमुनाजवळ अब्दुल मुनीम याची व परंडा किल्ल्यासमोर पांडा येथे नसिरीखान व रावकर्ण यांची नियुक्ती केली . हे सर्व अधिकारी सरहद्दीसमोर खडे राहिले आणि शत्रूच्या प्रगतीचा मार्ग त्यांनी रोखून धरला . जेव्हा संधी मिळेल तेव्हा त्यांनी शत्रूच्या मुलुखात घुसावे , शक्य तेवढा शत्रूचा मुलूख उद्ध्वस्त करावा आणि परत आपल्या जागी यावे अशी ताकीद औरंगजेबाने आपल्या अधिकाऱ्यांना दिली होती.

अहमदनगर जिल्ह्यात नसिरीखानाला शिवाजीवर जो विजय मिळाला त्यानंतर त्याने मराठ्यांचा पाठलाग करून त्यांचा नाश करावा असा हुकूम त्याला दिला. परंतु हे साध्य होऊ शकले नाही . पावसाला अतिशय सोसाट्याने सुरुवात झाली आणि मोहीम आवरती घेणे भाग पडले . शिवाजी आपल्या मुलुखात परतला आणि मोगल अधिकाऱ्यांनी त्यांना नेमून दिलेल्या जागी माघार घेतली . परिणामी साऱ्या जिल्ह्यात शांतता नांदू लागली. (**आदाब,** १५६ अ, १४९ अ)

जून, जुलै आणि ऑगस्ट १६५७ हे महिने बादशाही फौजांनी आपल्या छावणीत काढले . सप्टेंबरमध्ये शहाजहान आजारी पडला. त्यामुळे परिस्थिती बिघडली . विजापूरने मोगलांशी तह केला . तरी देखील औरंगजेबाने आपल्या अधिकाऱ्यांना सावध राहण्याची ताकीद दिली . ऑक्टोबरच्या मध्याला त्याने शिवाजी अहमदनगरवर हल्ला करील म्हणून तेथील सुभेदाराला सर्व प्रकारे काळजी घेण्याबद्दल आणि सैन्य तयार ठेवण्याबद्दल लिहिले. (**आदाब,** १४९ ब, १५७ ब)]

मोगल आणि शिवाजी यांमधील तह

सप्टेंबर महिन्यात त्याचा तथाकथित अधिपती विजापूरचा सुलतान याने मोगलांबरोबर तह केला तेव्हा स्वतःच्या बळावर मोगल साम्राज्याबरोबर युद्ध चालू ठेवणे हे निरर्थक आहे एवढेच नव्हे तर परिणामी त्याला नाशकारक आहे हे शिवाजीला आढळून आले . त्याने आपला वकील रघुनाथपंत याला औरंगजेबाकडे रवाना केले . त्यावेळी औरंगजेब उत्तर हिंदुस्थानाकडे कूच करण्याच्या तयारीत होता (२५

जानेवारी १६५८). त्याने शिवाजीला उत्तर पाठविले ते असे , "तू केलेले अपराध हे क्षमेला खचित पात्र नसले तरी तुला पश्चात्ताप झाल्याने मी तुला क्षमा करतो ." परंतु मनातून मात्र औरंगजेबाला निश्चिती वाटत नव्हती. त्याची पूर्णपणे खात्री पटली होती की शिवाजी हा एक दरोडेखोर असून त्याच्या धाडसाइतकीच लबाडी त्याच्या जवळ आहे . इतकेच नव्हे तर तो एक महत्त्वाकांक्षेने प्रेरित झालेला धाडसी माणूस असून जर स्वार्थाचा प्रश्न आला तर दिलेल्या शब्दाची पत्रास तो बिलकूल बाळगणार नाही . [जरी शिवाजीकडून आलेल्या शरणागतीचा औरंगजेबाने वरवर आनंद दाखवून स्वीकार केला , तरी तो मनामध्ये शिवाजीबद्दल अस्वस्थ होता . त्या प्रदेशात बळाच्या जोरावर शांतता राखण्याचा त्याने सर्व परीने प्रयत्न केला . कारण त्याची अशी खात्री झाली होती की , शिवाजीच्या धाडसाला विलक्षण अशा चातुर्याची जोड आहे इतकेच नव्हे तर त्याचे असे मत होते की , आपल्या स्वतःच्या हितसंबंधाच्या रक्षणासाठी तो आपण दिलेले वचन मोडण्यास किंवा केलेले उपकार विसरून जाण्यास बिलकूल अनमान करणार नाही . डिसेंबर १६५७ मध्ये त्याने मिर जुम्ला याला लिहिले : "नसिरीखान हा ह्या जिल्ह्यातून गेल्यामुळे तेथे आता कोणताही अधिकारी नाही . त्या जिल्ह्याकडे तू लक्ष दे . कारण तो कुत्र्याचा बच्चा संधीची वाट पाहात टपून बसला आहे ." (**आदाब,** ९२ अ). औरंगजेबाने आदिलशहाला आवाहन केले ते पुढीलप्रमाणे होते : 'तू या देशाचे रक्षण कर. तेथील काही किल्ल्यांचा ताबा शिवाने हलकटपणे घेतला आहे त्याला तू हाकलून लाव . जर का तुझी इच्छा त्याला आपल्या चाकरीत घ्यावयाची असेल तर त्याला कर्नाटकातील जहागिरी बादशाही मुलुखापासून दूरवर अशा दे म्हणजे त्याला बादशाही मुलखाला उपद्रव देता येणार नाही.' (**आदाब,** १६३ अ).]

शिवाजीची कोकणवर स्वारी

इ. स. १६५७ च्या शेवटच्या तिमाहीत राजपुत्र औरंगजेबाने उत्तरेच्या दिशेने घेतलेली माघार , दिल्लीच्या तख्ताकरता यादवी युद्ध होण्याची शक्यता , आणि नुकत्याच झालेल्या मोगलांबरोबरील लढाईत मिळालेल्या अपयशाची जबाबदारी कोणाची याबद्दल विजापूरच्या सरदार मंडळीत सुरू झालेली बाचाबाची (हिचे पर्यवसान वजीरखान महमद याच्या खुनात झाले .) या सर्वांचा परिणाम शिवाजीच्या महत्त्वाकांक्षेवर जी काही बंधने होती ती नष्ट होण्यात झाला . त्याने पश्चिम घाट ओलांडून कोकणात धडक मारली . या किनारपट्टीचा उत्तर भाग कल्याण (हल्लीचा ठाणे जिल्हा) जिल्ह्याने व्यापला होता. या जिल्ह्याची सुभेदारी मुल्ला अहमद या नवाईयत जमातीच्या अरबाकडे होती . मुल्ला अहमद हा विजापूरच्या प्रमुख उमरावांपैकी एक होता. शिवाजीने कल्याण आणि भिवंडी ही संपन्न शहरे सहजगत्या हस्तगत केली (२४ ऑक्टोबर १६५७). त्यावेळी ह्या शहरांना तटबंदी नव्हती . शिवाजीला या दोन शहरांत खूप संपत्ती आणि किमती सामग्री हस्तगत झाली. एके काळी शहाजीने शेवटी शेवटी ज्या किल्ल्याचा आश्रय घेतला तो माहुली किल्ला शिवाजीने नंतर काबीज केला (८ जानेवारी १६५८). कल्याण आणि भिवंडी याठिकाणी शिवाजीने आरमारी तळांची ताबडतोब उभारणी केली आणि तेथे जहाजे बांधण्याचे कारखाने सुरू केले.

इ. स. १६५९ या वर्षी ज्याला आपण देश म्हणू त्या भागात सातारा जिल्ह्याच्या दक्षिण टोकापर्यंत आणि कोकणात माहुलीपासून जवळ जवळ महाडपर्यंत शिवाजीने आपल्या राज्याच्या मर्यादा विस्तृत केल्या. [मराठी राज्याला आता मोठा आकार प्राप्त झाला होता . हे राज्य अधिक मजबूत पायावर आणि विशिष्ट योजनेनुसार संघटित करण्यात आले. शामराज निलकंठ या अकार्यक्षम पेशव्याच्या जागी मोरो त्रिंबक पिंगळे याची , बाळकृष्ण याच्या ऐवजी **मुजुमदार** म्हणून निळो सोनदेव याची आणि **सरनौबत** म्हणून नेताजी पालकर याची , अशा नेमणुका करण्यात आल्या . त्याचप्रमाणे **सुरनीस** आणि **वाकनीस** या दोन नवीन जागा निर्माण करण्यात आल्या आणि त्यावर अनुक्रमे आबाजी सोनदेव व गंगाजी मंगाजी यांच्या नेमणुका करण्यात आल्या . सैन्यातील घोडेस्वारांची संख्या दहा हजार एवढी झाली . तेवढीच संख्या मावळ्यांच्या पायदळी तुकडीची असून त्यांचा प्रमुख येसाजी कंक हा होता . (**सभासद,** ११). जुन्या आणि शिवाजीने जिंकून घेतलेल्या किल्ल्यांची संख्या चाळीस झाली . (**ए. एन्.,** ५७६). १४ मे १६५७ रोजी नव्यानेच अस्तित्वात आलेल्या या राज्याचा वारस संभाजी याचा जन्म झाला.]

(८) शिवाजीकडून विजापूरचा सरदार अफजलखान मारला जातो (१६५९)

इ. स. १६५९ मध्ये विजापूर सरकारची तात्पुरती का होईना परंतु सरहद्दीवर सतत होणाऱ्या मोगल आक्रमणापासून सुटका झाली आणि विजापूर सरकारने पुंडावा करणाऱ्या आपल्या मांडलिकांना वठणीवर

आणण्यासाठी कंबर कसली. शिवाजीविरुद्धच्या मोहिमेची सूत्रे विजापूरचा पहिल्या प्रतीचा सरदार अबदुल्ला भटारी ऊर्फ अफजलखान याजकडे सोपविण्यात आली . अफजलखानाने कर्नाटकातल्या मोहिमेत आणि अगदी अलीकडच्या झालेल्या मोगलांबरोबरील युद्धात नजरेत भरण्याजोगे शौर्य आणि कसबीपणा दाखविलेला होता. अफजलखानाबरोबर देण्यासाठी विजापूर दरबाराकडून १०००० घोडेस्वारांची तरतूद करण्यात आली तर शिवाजीच्या मावळ्यांची संख्या ६०००० स्वारांवर गेली आहे अशा वार्ता जनतेत प्रसृत झाल्या. यामुळे खुद्द राजमातेकडून अफजलखानाला अशी सूचना देण्यात आली की त्याच्याबरोबर खोटी मैत्री दाखवून आणि आदिलशहाकडून त्याच्या अपराधांची क्षमा करण्याची हमी देऊन अफजलखानाने शिवाजीला पकडावे अगर ठार करावे . [यावर्षी शिवाजीविरुद्ध राजमातेने अबदुल्ला खानाला १०००० घोडेस्वार आणि पायदळ एवढे सैन्य देऊन पाठविले आणि तेवढ्या फौजेच्या जोरावर तो शिवाजीबरोबर लढा देऊ शकणार याची तिला जाणीव झाल्याने तिने त्याला आपल्या शत्रूबरोबर (शिवाजी) खोटी मैत्री दाखविण्याचा सल्ला दिला. अफजलखानाने त्याप्रमाणे केले आणि दुसऱ्याने (म्हणजे शिवाजीने) धूर्तपणाने अथवा संशयाने कसे काय कोणास ठाऊक अफजलखानाने दाखविलेल्या प्रेमाचा दांभिकपणा ओळखला . **(रेव्हिंग्टन ॲट राजापूर टू कंपनी , १० डिसेंबर १६५९, एफ. आर. राजापूर)**

दोघांचे अनुचर पाठीमागे राहिले . शिवाजी भेटीसाठी उभारण्यात आलेल्या पीठावर चढला आणि अफजलखानापुढे वाकला . खान आपल्या जागेवरून उठला, चार पावले चालून गेला आणि शिवाजीला आलिंगन देण्यासाठी त्याने आपले बाहू पसरले . ठेंगणे सडपातळ असलेले शिवाजीराजे खानाच्या जेमतेम खांद्यापर्यंत लागले. निमिषार्धात खानाने आपली पकड घट्ट केली आणि शिवाजीची मान लोखंडी पंजाप्रमाणे आपल्या डाव्या हाताने आवळली . त्याचवेळी उजव्या हाताने त्याने कमरेला लटकाविलेल्या म्यानातून आपली लांब दुधारी तलवार काढली आणि शिवाजीच्या कुशीवर वार केला . शिवाजीने पेहेरलेल्या अंगरख्याखाली चिलखत घातलेले असल्याने हा वार निष्फळ ठरला . मान दाबली जाऊन जीव कोंडला गेल्याने झालेल्या वेदनेमुळे शिवाजी कण्हला परंतु क्षणातच या अचानक झालेल्या हल्ल्यांतून तो सावध झाला आणि आपला डावा हात त्याने खानाच्या कमरे पाठीमागून घालून आपल्या हातातील वाघनखांनी खानाचा कोथळा बाहेर काढला . लागोपाठ त्याने आपल्या उजव्या हातातील बिचव्याने खानाच्या कुशीत वार केले . जखमी झालेल्या खानाने आपली पकड ढिली केली . शिवाजीने खानापासून आपल्याला मोकळे करून घेतले, पीठावरून खाली उडी घेतली आणि बाहेर उभ्या असलेल्या आपल्या माणसांकडे तो धावला.

याच वेळी दगा! खून! धावा! धावा! असे खान ओरडला. दोन्ही बाजूकडचे अनुचर धावून आले . खानाचा कुशल तलवारबहादर सय्यद बंडा हा आपली लांब पात्याची तलवार घेऊन शिवाजीवर समोर चालून गेला आणि त्याने शिवाजीचे पागोटे वार करून मधोमध फाडले आणि त्याखालील जिरेटोपावर खोलवर खाच पडली . परंतु जीवा महालाने सय्यद बंडाचा उजवा हात तोडून काढला आणि नंतर त्याला ठार मारले . संभाजी कावजीने खानाचे मुंडके उडविले आणि ते घेऊन विजयोन्मादाने तो शिवाजीकडे धावला .] अफजलखानाची छावणी वाईला पडली होती. तेथून त्याने आपला कारभारी कृष्णाजी भास्कर याला शिवाजीकडे मोठा मायावी निरोप देऊन रवाना केले. त्यात त्याने असे कळविले की तुझा बाप शहाजी हा फार काळापासून माझा एक परममित्र आहे आणि म्हणून तू काही मला परका नाहीस . तू माझ्याकडे येऊन माझी भेट घे . मी आदिलशहाबरोबर माझे वजन खर्च करून कोकण आणि तुझ्या ताब्यात हल्ली जे किल्ले आहेत त्यावरील तुझ्या हक्काला मान्यता मिळवून देईन.

शिवाजीने अफजलखानाचा वकील कृष्णाजी भास्कर याला मोठ्या सन्मानाने वागविले . शिवाजीने त्याची रात्रीच्या वेळी गुप्तपणे भेट घेतली आणि एक हिंदू म्हणून आणि ब्राह्मण म्हणून त्याला आवाहन केले आणि खानाचा भेटीमागील खरा उद्देश काय आहे हे सांगण्याची विनंती केली . अफजलखान जेव्हा सिराच्या किल्ल्याला वेढा घालून होता तेव्हा त्या प्रदेशाचा राजा कस्तुरीरंगा हा खानाच्या छावणीमध्ये त्याच्याकडे शरणागती देण्यासाठी आला होता. खानाने त्याला ठार मारले होते आणि ही गोष्ट सर्वश्रुत होती . खानाच्या मनात काही तरी दगाफटका करण्याचा विचार आहे इथपर्यंत कृष्णाजी भास्करने वळणावळणाने सांगितले . यानंतर शिवाजीने आपला वकील पंताजी गोपीनाथ याला बरोबर देऊन कृष्णाजीची रवानगी केली . पंताजी गोपीनाथ याने भरपूर लाच देऊन खानाच्या अधिकाऱ्यांकडून बातमी मिळविली की "समोरासमोर युद्ध करून पकडला जाण्याइतका शिवाजी लेचापेचा नाही तेव्हा खानाने अशी काही योजना आखली आहे की शिवाजी पहिल्या भेटीतच गिरफदार व्हावा."

अनुक्रमणिका

प्रतापगड किल्ल्याच्या खाली एका टेकडीच्या माथ्यावरील मोक्याच्या जागी दोघांच्या भेटीची जागा निवडण्यात आली होती. तेथून समोर कोयनेचे खोरे दृष्टिपथात येत होते. भेटीसाठी या जागेवर सुशोभित केलेला एक शामियाना उभारण्यात आला होता. शामियान्यात दोन्ही बाजूंची चार-चार माणसे होती : मुख्य यजमान, दोन सशस्त्र अनुचर आणि वकील. एखादा बंडखोर शरणागत यावा तसा शिवाजी वरवर दिसायला तरी निःशस्त्र दिसत होता. परंतु खानाच्या कमरेला तलवार लटकाविलेली होती. तर शिवाजीच्या डाव्या हाताच्या बोटांना कड्यांच्या जोडीने बांधलेली वाघनखे होती आणि त्याच्या उजव्या हाताच्या बाहीत बिचव्यासारखे तीक्ष्ण शस्त्र होते. (खाफीखान दोघेही निःशस्त्र होते असे सांगतो : **के. के.**, ११-११७).

दोघांचे अनुचर पाठीमागे राहिले. शिवाजी भेटीसाठी उभारण्यात आलेल्या पीठावर चढला आणि अफजलखानापुढे वाकला. खान आपल्या जागेवरून उठला, चार पावले चालून गेला आणि शिवाजीला आलिंगन देण्यासाठी त्याने आपले बाहू पसरले. ठेंगणे सडपातळ असलेले शिवाजी राजे खानाच्या जेमतेम खांद्यापर्यंत लागले. निमिषार्धात खानाने आपली पकड घट्ट केली आणि शिवाजीची मान लोखंडी पंजाप्रमाणे आपल्या डाव्या हाताने आवळली. त्याच वेळी उजव्या हाताने त्याने कमरेला लटकाविलेल्या म्यानातून आपली लांब दुधारी तलवार काढली आणि शिवाजीच्या कुशीवर वार केला. शिवाजीने पेहेरलेल्या अंगरख्याखाली चिलखत घातलेले असल्याने हा वार निष्फळ ठरला. मान दाबली जाऊन जीव कोंडला गेल्याने झालेल्या वेदनेमुळे शिवाजी कण्हला परंतु क्षणातच या अचानक झालेल्या हल्ल्यातून तो सावध झाला आणि आपला डावा हात त्याने खानाच्या कमरे पाठीमागून घालून आपल्या हातातील वाघनखांनी खानाचा कोथळा बाहेर काढला. लागोपाठ त्याने आपल्या उजव्या हातातील बिचव्याने खानाच्या कुशीत वार केले. जखमी झालेल्या खानाने आपली पकड ढिली केली. शिवाजीने खानापासून आपल्याला मोकळे करून घेतले. पीठावरून खाली उडी घेतली आणि बाहेर उभ्या असलेल्या आपल्या माणसांकडे तो धावला.

याचवेळी दगा! खून! धावा! धावा! असे खान ओरडला. दोन्ही बांजूकडचे अनुचर धावून आले. खानाचा कुशल तलवारबहाद्दर सय्यद बंडा हा आपली लांब पात्याची तलवार घेऊन शिवाजीवर समोर चालून गेला आणि त्याने शिवाजीचे पागोटे वार करून मधोमध फाडले आणि त्याखालील जिरेटोपावर खोलवर खाच पाडली. परंतु जीवा महालाने सय्यद बंडाचा उजवा हात तोडून काढला आणि नंतर त्याला ठार मारले. संभाजी कावजीने खानाचे मुंडके उडविले आणि ते घेऊन विजयोन्मादाने तो शिवाजीकडे धावला. [अफजलखान व शिवाजी यांची प्रतापगडावरील भेट व शिवाजीकडून त्याचा वध याची हकीकत **तारीख-इ-अली** या ग्रंथामधून पुढे दिली आहे : अफजलखानाची रवानगी व नाश –बादशहा (महमद आदिलशहा) आजारी पडला आहे असे पाहून शिवाजीने तळकोकणच्या सर्व मुलखांवर लुटीचा झाडू साफ मारून ह्या प्रदेशातील किल्ल्यांपैकी राहीर नावाचा एक किल्ला कबजात आणिला. बादशहा मेला हे समजल्यावर त्यास मोठीच लूट मिळाली असे वाटले व त्याने जास्त मुलूख मिळविण्याची इच्छा केली. [नवीन] बादशहालाही मुलूख वाढविण्याची इच्छा होतीच. त्याने शिवाजीला तंबी देण्याकरिता व उखडून टाकण्यासाठी अफजलखानास १० हजार स्वारांसह नेमिले. खानाने येऊन शिवाजीच्या नवीन जिंकलेल्या मुलखात धुमाकूळ घातला. ही हकीकत शिवाजीस समजली. सर्व लोक हताश झाले आहेत असे पाहून व दुसरा उपाय न राहिल्यामुळे त्याने अफजलखानास पत्र घातले की, माझ्या दुबळ्या वडिलांवर बादशहाने कृपा केली व त्याचा उत्कर्ष झाला, त्याप्रमाणे माझ्यावर बादशहा कृपा करतील तर मी एक केसभरही वाकडा न जाता सुखाने राहीन. वास्तविक मीच भेटण्यास यावयास पाहिजे. परंतु केलेल्या कृत्यांची अतिशय लाज वाटत असल्यामुळे मला येववत नाही. आपण कृपा करून राजगडावर (येथे प्रतापगड पाहिजे) आला व मला दिलासा दिला तर माझ्यावर मेहरबानी होईल. 'बादशहाने' अफजलखानाला जाते वेळी सांगितले होते की, शिवाजीने वाटेल ते सांगितले तरी त्याचे बिलकूल न ऐकता त्याच्या जीविताच्या हंगामावर अग्नी टाकण्याशिवाय व त्याच्या जीवितजमिनीचा नाश करण्याशिवाय इतर काही करू नकोस. पण त्याच्या ठिकाणी शहाणपणाचा अंश नसल्यामुळे शिवाजीचे हे म्हणणे म्हणजे खरेपणाच्या बाबतीत जणू काही चित्रगुप्ती वही असे तो समजला व एखादा तरुण आपल्या नव परिणीत पत्नीच्या सौंदर्याने व प्रेमाने मोहित होऊन उल्लूपणाने व अधीरपणाने समागमाच्या हेतूने तिजकडे जातो, तसा हा थोडक्याच दिवसांत स्वतःच्या सर्व शिपायांसह त्या किल्ल्याच्या जवळ पोहोचला. शिवाजीला या गोष्टीने अतिशय आनंद होऊन त्याने निरोप पाठविला की, 'उद्याचाच दिवस आपल्या भेटीसाठी मुक्रर केला आहे.' अफजलखानापाशी अक्कल नसल्याने तो दुसरे दिवशी सकाळी १२ लोकांसह (**दुबाइ-दह**

कस) किल्ल्यावर गेला. पण शिवाजीने त्यास मारिले आणि हे पाहून त्याचे प्यादे व स्वार गर्भगळीत होऊन पळून गेले (**शि. वृ. सं.** खंड २, ३४–३५, **तारीख-इ-अली**)]

[**अफजलखान आणि शिवाजीच्या भेटीची खाफीखानाने दिलेली हकीकत पुढीलप्रमाणे आहे :**

सिकंदर अली आदिलखान वयात येऊन राज्यकारभार पाहू लागल्यावर त्याने सीवास पत्रे लिहून पाहिली , पण त्याचा उपयोग झाला नाही. तेव्हा त्याने मोठ्या लष्करासह अफजलखानास त्याला सजा देण्यासाठी पाठविले. खान आदिलखानी सरदारांत अत्यंत प्रख्यात व शूर होता. त्याने त्यास खूप जेर केले . लुच्चा बंडखोराने उघड लढाईने आपणास काहीच फायदा होणार नाही हे जाणून लज्जाप्रदर्शन व अपराधक्षमेची याचना यासाठी काही लोक त्याजकडे पाठविले , कित्येक बोलाचालीनंतर त्या लुच्च्या ब्राम्हणांनी करार केला की , सीवाने आपल्या गडाखाली एके जागी बिनहत्यारी फक्त तीन-चार चाकरांसह येऊन अफजलखानास भेटावे आणि खानानेही त्या जागी पालखीमधून चार-पाच बिनहत्यारी चाकरांसह जावे; सिवाने आदाब केल्यावर व इतर करार झाल्यावर त्यास पोशाख मिळवून निरोप द्यावा ; अफजलखानास पेशकश व नजराणा भरून सीवाने त्यास मेजवानी द्यावी, विजापुरास रवाना करावे व समाधान झाल्यावर त्याने खानाबरोबर विजापुरास जावे.

सीवाने तऱ्हेतऱ्हेचे नजराणे व मेवे पाठवून आणि नम्रता , शरणभाव दाखवून अफजलखानास वश केले व जाळ्यात अडकविले . त्याच्या देखाव्यावर विश्वास ठेवून व शहाणे घेत असलेली सावधगिरी न घेता (११७) तो बिनहत्यारी पालखीत बसला व ठरलेल्या जागी पोहोचला.

त्याने आपले खिदमतगारही बाणाच्या एका टप्प्याइतक्या लांब अंतरावर उभे केले . नंतर लुच्च्याने गडावरून पायी खाली येऊन निराशा व शरणागती याचे प्रदर्शन केले . गडाच्या पायथ्याशी आल्यावर तो प्रत्येक ३ /४ पावलांगणिक आपले अपराध कबूल करून कापत व वाकत स्पष्ट शब्दांनी क्षमेची याचना करू लागला . त्याने खानाच्या पालखीबरोबर आलेल्या हत्यारी व साध्या खिदमतगारांनी आणखी लांब जावे अशी विनंती केली. सीवाने जवळ अस्तनीत बिछवा नावाचे हत्यार लपविले . भोवतालच्या झाडीत, कडेकपारात व डोंगर पठारावर सर्वत्र हत्यारी लोक लपवून ठेवले आणि पायऱ्यावर एका शिंगाड्यास उभे करून सांगितले की , मी या हत्याराने शत्रूस मारणार आहे . तेव्हा मी त्यास मारीत आहे असे पाहताच माझ्याविषयी विचार न करता तू शिंग फुकून सैनिकांना सावध कर . त्याने सैनिकांना कळविले की , शिंगाचा आवाज ऐकताच त्यांनी बाहेर पडून अफजलखानाचे लोकांवर हल्ला चढवावा व यश मिळविण्याची शिकस्त करावी.

यमदूताने बोलवून नेलेल्या अफजलखानास स्वतःच्या धैर्याचा विश्वास होता . त्याने शिवाजी बिनहत्यारी , भीतभीत व कापत येत असल्याचे पाहिले. त्याला त्याचे शरीर व प्रकृती दोन्ही क्षुद्र वाटली . म्हणून त्याने पालखीबरोबर आलेल्या सर्वांस दूर जाण्यास सांगितले . नंतर विश्वासघातकी शत्रूने जवळ येऊन अफजलखानाच्या पायावर रडत लोळण घेतली . खानाने त्याचे डोके उचलिले व तो त्यास कुरवाळून (११८) आलिंगन देण्याच्या बेतात होता . इतक्यात सीवाने , लपविलेले हत्यार त्याच्या पोटात इतक्या जोराने खुपसले की , किंकाळी शिवाय तो मरण पावला. त्याच्या आज्ञेप्रमाणे शिंगाड्याने इशारतीचे शिंग फुकले . त्याबरोबरच चोहोबाजूंनी घोडेस्वार व पायदळ मोठमोठ्या जमावांनी बाहेर पडले आणि त्यांनी अफजलखानाच्या सैन्यावर चढाई करून कापाकापी , लुटालूट व नाश सुरू केला. नंतर तो रक्तपिपासू खूनी बिनधोक निघून आपल्या लोकांस मिळाला व त्याने पराजित लोकांस संरक्षण दिल्याचे जाहीर केले . त्यास खानाचे घोडे , हत्ती, खजिना, वस्त्रप्रावरण व सामग्री मिळाली . त्याने पराजितांना आपल्या सैन्यांत घ्यावयाचे ठरवून आपल्या बाजूस ओढले. नंतर नेहमीप्रमाणे तो सामग्री व मनुष्ये जमवू लागला.

आदिलखानाने पराजयाची बातमी ऐकून रुस्तुमखान नावाच्या आपल्या एका उत्तम सेनापतीस सैन्यांसह त्यावर पाठविले . पर्नाळ्याजवळ एक लढाई झाली; पण तीत रुस्तुमखान पराभूत झाला.

सारांश दैवाने या विश्वासघातकी व क्षुद्र मनुष्यास इतका हात दिला की , त्याचे सैन्य वाढून तो दिवसेंदिवस जास्तच समर्थ होऊ लागला आणि नवीन किल्ले उभारून आपल्या प्रदेशाची आबादी व विजापुरी प्रदेश वैराण करू लागला . दूरदुरून आलेले लमाणांचे तांडे लुटून त्यांचा माल व बायका तो हस्तगत करी. मात्र त्याचा सक्त नियम होता की , लूट करताना कोणीही मशिदी , कुराण व बायका यांवर हात टाकता कामा नये . जेव्हा केव्हा एखादी कुराणाची प्रत त्याच्या हाती लागे तेव्हा तो तिचा मान राखी व ती आपल्या मुसलमान अनुयायांस देई . कोणा हिंदुमुसलमानांच्या बायका कैद झाल्यावर त्यांचे रक्षण करण्यास कोणी नाही (११९) असे आढळल्यास त्यांचे नातेवाईक अशांच्या सुटकेसाठी लागणारी रक्कम घेऊन येईतो स्वतः त्यावर देखरेख ठेवी. कैद्यांत एखादी कुणबीण आढळल्यास तिला मालकाची संपत्ती समजून आपल्या ताब्यात ठेवी . त्याचा असा नियम होता की, एखादे ठिकाण लुटले असता त्यात मिळणारा गरिबीचा कपडा , ताम्रद्रव्य आणि तांब्या-पितळ्याची भांडी ही ज्यास सापडत त्यांची होत , व इतर वस्तू साधे किंवा शिक्क्याचे सोनेरूपे , रत्ने, किंमती पदार्थ , हिरे, या सर्व वस्तू काही एक चोरून न ठेवता अधिकाऱ्यांच्या हवाली कराव्या लागत व त्यांनी त्या सरकारात भरावयाच्या असत.

(**शि. वृत्तसंग्रह**, ३, **मुन्तखाबुल्लुबाब**, ६४–६६)]

संकटातून अशा तऱ्हेने सुटका झाल्यावर शिवाजी आपल्या दोन अनुचरांसह प्रतापगडावर चढून गेला. प्रतापगडावरून एका तोफेला बत्ती देण्यात आली . खाली असलेल्या खोऱ्यांत दबा धरून लपून बसलेल्या त्याच्या सैनिकांना तोफेचा धडाका ही इशाऱ्याची खूण होती . निमिषार्धात मोरो त्रिंबक आणि नेताजी पालकर यांच्या फौजा आणि हजारो मावळे चोहोबाजूंनी विजापुरी छावणीवर तुटून पडले .

अनुक्रमणिका

अफजलखानाच्या मृत्यूची बातमी ऐकून त्याचे अधिकारी आणि सैनिक यांचेही धाबे दणाणले होते आणि त्यात अनोळखी प्रदेशांतून अनपेक्षितपणे झालेला हल्ला . जणू प्रत्येक झाडाझुडूपांतूनच शत्रूची झडप आपल्यावर पडत आहे आसा भास त्यांना झाला. विजापुरी सैन्याची झालेली कत्तल भयानक होती.

शिवाजीच्या हाती अपरंपार लूट पडली . तोफखाना, गाडे, दारूगोळा, संपत्ती, तंबू आणि इतर सामान, वाहतुकीची जनावरे आणि इतर सामानसुमान अशी संबंध सेनादलाची सामग्री विजयी मराठ्यांना मिळाली. यात ६५ हत्ती , ४००० घोडे , १२०० उंट , २००० कापडाचे गठले , १० लक्ष रुपयांची रोख रक्कम आणि जवाहिर यांचा अंतर्भाव होता.

अफजलखानावरचा विजय (१० नोव्हेंबर १६५९) आणि त्याच्या सेनादलाचा विध्वंस यामुळे बेहोष होऊन गेलेल्या मराठ्यांनी दक्षिण कोकण आणि कोल्हापूर जिल्ह्यांत धडक मारली , विजापूरच्या आणखी एका सेनासंभाराचा पराभव करून पन्हाळ्याचा किल्ला जिंकून घेतला आणि इतर बराचसा प्रदेश आपल्या ताब्यात आणला (डिसेंबर १६५९ ते फेब्रुवारी १६६०).

(९) पन्हाळा किल्ल्यावर शिवाजीची कोंडी

इ. स. १६६० च्या सुरुवातीला अली आदिलशहा दुसरा याने आपला सिद्दी गुलाम सिद्दी जोहार (यालाच पुढे सलाबतखान हा किताब देण्यात आला) याला फौज देऊन शिवाजीचा पाडाव करण्यासाठी पाठविले. सिद्दी जोहारने शिवाजीला पन्हाळ्याचा आश्रय घेणे भाग पाडले (२ मार्च १६६०). जोहारने १५००० फौजेनिशी पन्हाळ्याला वेढा दिला . परंतु शिवाजीने जोहारला लाच देऊन आपलासा केला . त्यामुळे पन्हाळ्याचा वेढा केवळ नाममात्र सावकाशपणे चालू राहिला. अफजलखानाचा मुलगा फाजलखान याने मात्र मराठ्यांवर अविरत सामर्थ्याने हल्ल्यावर हल्ले चढविले आणि पन्हाळ्याजवळील टेकडीवर कबजा धरून पन्हाळ्यावरून लढा चालविणे अशक्य करून सोडले . तेव्हा एका काळोख्या रात्री (१३ जुलै) शिवाजीने आपल्या अर्ध्या फौजेसहित किल्ल्यावरून पलायन केले आणि विजापुरी सैन्यांकडून पाठलाग होत असतानादेखील पन्हाळ्याच्या पश्चिमेस २७ मैलांवर असलेल्या विशाळगडावर तो सुखरूप पोहोचला . शिवाजीच्या पिछाडीकडचा अधिकारी बाजी प्रभू याने गजापूरच्या घाटात प्राणपणाने लढून प्रतिकार केल्यामुळे शिवाजी विशाळगडावर सुखरूप जाऊन पोहोचला . बाजी प्रभू आपल्या बहुतेक सैनिकांसह रणांगणी पडला. शिवाजीने पन्हाळ्यावर ठेवलेल्या सैनिकांनी २२ सप्टेंबर रोजी शरणागती पत्करली.

(१०) शायस्ताखान पुणे आणि चाकण ताब्यात घेतो

इ. स. १६६० सुरुवातीला दक्षिणेचा नवा मोगल सुभेदार शायस्ताखान याने उत्तरेतून शिवाजीच्या विरुद्ध मोहीम उघडली. त्याचवेळी दक्षिणेतून मराठी राज्यावर विजापूरकरांकडून हल्ला केला जाईल अशी कारवाईही त्याने केली . २५ फेब्रुवारी रोजी त्याने मोठी फौज घेऊन अहमदनगर सोडले आणि दक्षिणाभिमुख होऊन पुण्याच्या पूर्वेकडील बाजूने कूच केले . पुण्याकडे जाणाऱ्या पूर्व आणि दक्षिण दिशांकडील मार्गांचे रक्षण करणारी सर्व ठाणी तो पद्धतशीरपणे काबीज करीत आणि तेथे आपले सैनिक ठेवीत तो आगेकूच करू लागला. शायस्ताखानाला तोंड देऊन परंतु समोरासमोर लढाईचा प्रसंग न आणता पुरंदरपर्यंत मराठ्यांनी प्रथम माघार घेतली. झालेल्या लढायांत मोगलांना विजय मिळाला आणि ९ मे रोजी शायस्ताखानाने पुण्यात प्रवेश केला.

अनुक्रमणिका

१९ जून रोजी त्याने पुणे सोडले आणि २१ रोजी तो पुण्याच्या उत्तरेस १८ मैलांवर चाकणनजीक येऊन तो पोहोचला . तेथे येऊन पोहोचल्यावर त्याने किल्ल्याची पाहणी केली आणि किल्ल्याच्या रोखाने मोर्चे बांधण्यास सुरुवात केली. ५४ दिवसांच्या अविरत श्रमानंतर शायस्ताखानाच्या उत्तरेकडील छावणीच्या जागेपासून तो किल्ल्याच्या ईशान्य बाजूकडील टोका खालपर्यंत एक सुरुंग भरण्यात आला . १४ ऑगस्ट १६६० रोजी दुपारी ३ वाजता तो उडविण्यात आला . त्या बाजूचे बांधकाम आणि त्याचे रक्षण करणाऱ्या शिबंदीच्या चिंधड्या उडाल्या. मोगल हल्ला करण्यासाठी म्हणून पुढे घुसले. दुसऱ्या दिवशी चाकणचा किल्ला पडला. किल्ला काबीज करण्यासाठी मोगलांना २६८ ठार आणि ६०० जखमी एवढी प्रचंड किंमत द्यावी लागली. चाकण जिंकल्यानंतर ऑगस्ट १६६० च्या अखेरीला शायस्ताखान पुण्याला परतला . पावसाळा सुरू झाल्यामुळे कसलीही हालचाल करणे अशक्य झाले होते. शायस्ताखानाने पावसाळा पुणे येथे काढला. परंडा येथील विजापुरी किल्लेदार गालिब हा होता . त्याला भली मोठी लाच देऊन परंडा औरंगजेबाच्या स्वाधीन करून देण्यात शायस्ताखानाने आपला पावसाळा सार्थकी लावला (२० नोव्हेंबर).

१६६१—१६६३ मधील संघर्ष

१६६१ च्या सुरुवातीला शायस्ताखानाने आपला मोर्चा उत्तर कोकणातल्या कल्याण जिल्ह्याकडे वळविला. या जिल्ह्यात गतवर्षाच्या एप्रिल महिन्यापासून इस्माईल या मोगल अधिकाऱ्याच्या हाताखाली ३००० फौज कारवाई करीत होती . या फौजेने कल्याणचा काही भाग ताब्यात आणला होता . पण कल्याणसारखी काही शहरे आणि किल्ले यांवर अजून मोगलांचा कबजा झाला नव्हता. जानेवारी १६६१ मध्ये पुण्याहून कार्तलबखान हा मोगल अधिकारी मोठी फौज घेऊन कोकणात उतरला . पेणपासून १५ मैलांवर असलेल्या उंबरखिंड या ठिकाणी शिवाजीने अतिशय गुप्तपणे आणि जलदगतीने कूच करून या फौजेला गाठले आणि त्यांच्या पुढे सरकण्याच्या आणि पाठीमागे वळण्याच्या अशा दोन्ही मार्गांची नाकेबंदी केली . तहानेने व्याकूळ होऊन एक पाऊल उचलण्याची ताकद नाही अशा परिस्थितीत कार्तलबखानावर सर्वनाशाची पाळी ओढवली . निराश होऊन त्याने छावणीतील सर्व मालमत्तेवर पाणी सोडले , शिवाजीला भलीदांडगी रक्कम खंडणीदाखल दिली आणि आपल्या फौजेची अशा तऱ्हेने सुटका करून घेतली (३ फेब्रुवारी १६६१). कल्याण जिल्ह्यात होणाऱ्या मोगलांच्या शिरकावाला शिवाजीने अशा तऱ्हेने पायबंद घातला आणि तेथून तो पुढील मोहिमेसाठी बाहेर निघाला . कल्याणातून शिवाजीने दक्षिणेकडे कूच केले आणि शहरामागून शहरे तो सपाट्याने काबीज करीत चालला . लवकरच शिवाजीच्या अमलाखाली दंडराजपुरीपासून खारेपाटणपर्यंतची किनारपट्टी आली . परंतु ह्या विजयाला एका मोठ्या पराभवाचे गालबोट लागले. १६६१ च्या मे महिन्यात मोगलांनी मराठ्यांपासून कल्याण घेतले आणि जवळजवळ ९ वर्षेपर्यंत ते आपल्या ताब्यात ठेवले. या दोन वर्षांत दोन्ही पक्षाच्या एकंदर कारवायांची गोळाबेरीज बघितली तर मोगलांनी कोकणच्या अगदी उत्तर टोकाच्या पट्टीवरील आपला दाब कायम ठेवला तर कोकणच्या दक्षिण किनारपट्टीवर शिवाजीने आपला दबदबा ठेवला असे आपल्याला दिसेल . इ. स. १६६३ च्या मार्च महिन्यात मोगलांनी मराठ्यांच्या घोडदळाचा सेनापती नेताजी पालकर याचा दूरवर आणि सख्त पाठलाग केला. नेताजी सुटून गेला पण या धावपळीत तो स्वतः जखमी झाला आणि त्याने ३०० घोडेस्वार गमावले .
[शिवाजी महाराजांच्या हालचालीची मराठी कागद-पत्रातील बातमी पुढे दिली आहे.

(शायस्तखान प्रकरण)

शिवाजी राजा मसलतीने आटोपत नाही!

अनुक्रमणिका

"श्री शिवाजी राजे यांणी राज्य सोडवून , ('सोडून') किल्ले, कोट, ठाणी प्रांत बहुत घेतला ; त्यांत ('त्या') राज्यांत बहु रीतीने मर्यादेने पाये घालून चालतात; मनुष्ये पदरी बहुत चांगली मेळविली; त्यांचे जवळ खजिना, द्रव्य बहुत जाले; त्या योगे करून व युक्तीने बहुतच मनसबेबाज; मोठे धाडसे करून शिपाईगिरी ते करितात ; बहुत लोकांचा जमाव करून त्यांनी किल्ले कोट फार घेतले ; नवी स्थळे, लोक खजिनाही विपुल केला, सर्व लोक एकदिल व सुखी केले . फौजफार व माणसे पराक्रमी ; सरदार, सरकारकडून मोठे मोठे मनसबेदार ('मनसबदार') मेळविले; बालघाट, परांढे, ('परांड') कलबर्गे, आवसे ('आवढे') उदगीरी, गंगातीरापर्यंत स्वारी शिकारी करितात ; औरंगाबादेचा त्यांनी पुरा लुटला ; जालनापूर मारिले; महकूबशिंग ('महकूबसिंग') व आपले सुभ्याची फौज गेली ती मारिली , गर्दीस मेळविली, हत्ती पाडाव नेले ; सुरत मारिली; रायबागीण व मोहबतखान सरदार गेले ते बुडविले" ही वर्तमाने वरचेवरि दिल्लीस बादशहा औरंगजेब यांस कळविल्यावरि पादशाह बहुत दिलगीर होऊन विचारात पडले की , "आम्ही या प्रांतीच बंदोबस्तास गुंतलो . हा सोडून जावे , तरी मूळ हे ; यास अपाय होईल . शिवाजीने तरि धुम मांडली तिकडील पादशाहाती जेर करून , आमच्या फौजा बुडवून , लुटून त्याने प्रांत घेतला . तो गुमान राखीव नाही . विजापूरची तरि पातशाहातच त्याने घेतली ; अफजलखान मोठे धाडसे , ('धाडीस') आंगेजणीने मोहरा मारिला ; वरकडही उमराव नामोहरम केले . पादशाहाजादे व दिलेरखान मध्यप्रांती होते यांणीहि राजे यांचा उत्कर्ष लिहिला. तेव्हा आपण जाऊन मसलत करणे ठीठ नाही . शिवाजीराजा मसलतीने आटोपत ('आटोपीत') नाही. अगोदर दोन्ही पाद शाहाती– भागानगर व विजापूर -हस्तगत होतील "('होईल') तेव्हांच जे घडणे ते घडले . नाही तरी एकटेच शिवाजीराजे आंगेजणी करितील. प्रसंगी त्यासही साह्य करितील . नामोष जाईल." यास्तव विचार करून एखलास खानाय्याच्या सुभ्याची तगिरी ('याची सुभेतगिरी')" करून, पादशाहाचे मातुल शाइस्ताखान यांस देऊन , नवाजीस करून फौज , तोफखाना वगैरे सामान बहुत पोख्त व खजिना ऐसे बराबर मुबलक साहित्य देऊन रवाना केले. "शिवाजीराजे यांचा बंदोबस्त हरतऱ्हेने दोन्ही पादशाहातीत अहटा साह्य करून ('तह व साह्य घेऊन') आधी करावा," हे सांगून रवाना केले . बरोबर रोहिले, पठाण, उदबक व रजपूत वगैरे पोख्त सरदार दिल्हे ते दरमजल येते जाते . त्यांणी येता अगोदर सुभ्याचा बंदोबस्त केला. आणि मग ते महाराजांवर चालून आले.

आंगी आविर्भाव, श्रीदेवीचा संचार

[इकडे] महाराज रायगडी होते ; तेथून त्यांनी सर्व तयारी करून फौज व सरदार , पागा आणवून , जमाव करून राजगडास ('रायगडास') आले. तमाम हषम एके ठायी केले . सर्व सरकारकून, सरदार जमाव करून विचार केला जे , "गनीम चालून आला यास कोणते उपाये व हुनरे करून जेरजूर ('जेर') करावा, तंबी कशी पोचवावी , आपली फौज लोक जाया न करिता कसा उपाय करावा ?" ते समयी सर्वांचे विचारे संमते, "मोगली फौज; बाहेर कहीकवाड, सामान, रसद समागमे आहे त्यास जवाब ('जबाब') धरून, बंदी करून, आधीच पुढे तोंड देऊन लढाई कशास करावी? बंदी करून, गनीम घाबरा पाडावा. ('करावा,') ('घाबरा पाडून') एखादे गडसंधीस ('गलीसधीस') मारून काढावा, किंवा एकादे किलियास येऊन मोर्चे देऊन बसू द्यावा , तेथे मारावे . ऐसे कित्येक प्रकारे कावेसीनेस ('कावेबाजीने') घाबरा करावा !" ऐसे ठराऊन महाराजांनी, "संकट झाले यास काय करावे ?" म्हणून श्री देवीची प्रार्थना केली . त्याजवरून आंगी आयुर्भाव ('आयुरभाव') होऊन सांगितले जे , "सर्वांस सांगा, चिंता करू नका. जसा अफजल मारीला, तसाच याचाहि अपजय करून लावून ('मारून') देईन. तुम्हांस यश देईन." इतकी वाक्ये निघाली ती चिटणीस, वाकनीस यांणी लिहिली. ती वाक्ये संचार गेल्यावरि उभयतांनी श्रुत केली. महाराजांनी ऐकून घेऊन, "सर्व पार पाडणार श्री समर्थ! त्यांणी आंगीकार केला आहेच तर चिंता नाही. शत्रूचे पारिपत्य करूच, हे उमेद धरून." ('धरिली')

'तुम्ही शिपाई खरे मर्द आहां!'

खान येताच आधी चाकणचे किल्ल्यास मोर्चे दिले . ते समयी संभाजी कावजी पागे होते . बळकट घोडे उचलावे ऐसे बळ , मर्द होते. त्यांजवरि महाराजांची इतराजी काही कारणे करून जाली होती . त्यांणी पागासुद्धा जाऊन खानास भेटले. व बाबाजी राम होनप, देशपांडे प्रांत पुणे, हे पुढे जाऊन बराणपुरीच खानास मिळाले . माहितगार म्हणून त्याने जवळ सन्माने ठेविले . चाकण किल्ला फिरंगोजी नरसाळा हवालदार याणे भांडविला ('भांडविली') ईशान्य कोनीचा बुरुज सुरुंगाने [खानाने] उडविला. तेव्हा किल्ला जेर झाला . कौल घेऊन महाराजांची आज्ञा नेऊन ('घेऊन') किल्ल नरसाळे याणे तहानी ('तह करून') दिला. त्यास "तुम्ही शिपाई खरे मर्द आहां तुम्हांस वाढवितो. आम्हांपाशी राहावे." म्हणून खान याणे म्हटले असता 'ये समयी राहात नाही ,' म्हणून निघोन नरसाळा महाराजांकडे आला . महाराजांनी त्यास शर्त केलीस म्हणोन नवाजून किल्ले व भूपाळगड येथील हवाला देऊन पाठविले. चाकण घेऊन खान याणे पुणियास मुक्काम केला.

अद्‌भुत साहसकर्म; खानास शास्त केली.

इकडे महाराजांनी प्रतापराव गुजर सरनोबत यांस तमाम पागा ('पागोटी') देऊन कहीकवाड चालू न द्यावे , रसद बंद करावी , अंतरे करून रोखून गनीम धरावा , म्हणोन रवाना केले. आपण खासा तमाम मावळे लोक निवड करून राजगडाहून सिंहगडास आले , तेथून विचार केला जे, "काही एक साहसकर्म करून खान यास मारावा . खानाचे गोटावर चालून जावे , छापा घालावा , आपणच जाऊन खानाचे डोचके कापून आणावे!" ऐसे कित्येक बेत चित्ती दृढ करून कवाईत केली जे , "कात्रजेचे घाटांनी जाग जागा झाडास पोत बांधावे आणि बैलाचे शिंगासही बांधावे ; करणेकरी शिंगाडे पाच पंचवीस यांनी डोंगरात बिकट जागियांस असावे. त्यांणी आम्ही फत्ते पाऊन इशारतीचा कर्णा सिंहगडचे वाटेस एक वाजवू, ते समयी पोत उजळणार मावळे लोक त्याजबरोबर नेमोन दिल्हे होते त्यांनी पोत उजळावे , करणेकरी त्यांणी करणे, शिंगे, बाजे करून सर्वांसह निघोन जावे, म्हणजे त्या मार्गी ('मार्गे') छापा आला असे पाहून फौज व खान तिकडे जाईल . इकडे अवकाश पडल्यास ('सांपडल्यास') गोट लुटावा अगर पडेल तशी मसलत करून आपण सिंहगडास पोचावे , असे [निश्चित] करून ('असा ठराव करून') मावळे लोक यांस सिंहगडचे वाटेने जागा जागा हजार पाचशे ऐसे जथे करून देऊन घालणीचे जाग्यांस उभे केले . त्यांणी करण्यातील बारीक नळीची इशारत होताच येऊन मिळत जावे , ऐसे सांगोन आपण अंगात जिरेटोप त्यावरि आंगरखा , ('अंगरखा') पागोटे घालून, चोळणा काच्या घालून , तलवार बिचवा एका हाती , वाघनखे एके हाती, पाठीशी ढाल याप्रमाणे [तयारी] करून पायउतारा बराबर घारकरी येसाजी कंक , तानाजी मालुसरे, दादाजी ('बाबाजी') बापूजी देशपांडे व

चिमणाजी बापूजी देशपांडे व सुखे ऐसे घेऊन , मातबर निघडा ('निघाडा') माणसे पंचवीस तीस असामी केवळ जवळ असावे ऐसे करून पांच सहा हजार लोक निवडून घेतले, ते ठेवीत ठेवीत आंबे" ('आंबील') वोहोळ येथपर्यंत आले. पांचसातशे तेथे ठेवून, गोटानजीक दोन तीनशे ठेवून, गोटात राजे शिरले. काळोख, भाद्रपदमासचा, त्यात काही पाऊस त्या दिवसात होता. गोटात शिरून कोणी पुशिले 'कोण'? म्हणोन, तेव्हा 'चौकीचे लोक' म्हणोन सांगतसांगत बाडाजवळ आले. बागेलगत बाड होते. त्यात येऊन झाडांचे आश्रयाने चौकी चुकवून , बाड चिरून, वरकड लोक बाहेर ठेवून, एक दोन असामी ('असागी निकम') धारकरी बराबर येसजी कंक , दादाजी बापूजी देशपांडे घेऊन बाडात ('बागेत') शिरले— आतील डेऱ्याजवळ गेले. तो खोज्या ('खान') जागा होता, त्यास ('त्याचे मानेवर तलवार ठेवून एकजणास बसवून ') एकजण तलवार मानेवरी ठेवून बसविले ('त्याचे मानेवर तलवार ठेवून एकजणास बसवून ') आणि आपण खासा पुढे गेले . खानाचा लेक निजला होता त्यास तेथेच जेब करून निजले जागांच मारिला. आणि खानाचे बिचोव्यांत गेले , आणि छातीवर चढोन बसले . वार करावा तो बायकोने जागी होऊन पाहिले , आणि पाय धरिले . तिजला दबाविली. तेव्हा तिने 'ये समयी मारू नये . जीवदान द्यावे व मजला चुडेदान द्यावे ' ऐशी बहुत ग्लानी करून , करुणा भाकून प्रार्थना केली . महाराजांचे अंतःकरणात द्रव जाला ('आला') परंतु "आपण येऊन हे कर्म केले व निभावून गोट पार होऊन , बचावून आपले लोकांत मिळून गेले पाहिजे यास कसे करावे ?" म्हणून मनांत विचार करून "खान वांचून मोहिम केली तरी काय चिंता ? पारिपात्य करीत, रणांत मारीन" म्हणून बहुत सावधपणे खबरदारीने दाबून धरून गळ्यावरी तलवार ठेविली ('ठेविली होती') व एक हाते पोटास नखे लाविली , ('लाविली होती') आणि खान यास बोलिले जे, "ये समयी तुझा प्राण वाचविला तरि इमान द्यावे जे आम्ही हात धरून नेऊन; तेथपर्यंत न बोलता बराबर यावे, तेथून सोडविल्यावरि जावे; आणि काही तरी शास्त करितों याकरिता शास्ताखान म्हणवावे . ('म्हणावे') बायकोने बराबर यावे. याप्रमाणे उभयतां इमान कुराण ('खुरुन') शपथ घेऊन, मधी गलबल केलिया मारून टाकू." असे करार करून हाताची दोन बोटे कापून घेतली . ते समयी शास्ताखान भयाभीत जाला. त्यास हाती धरून बायकोसुद्धा बाडापाशी येऊन , आल्या वाटेने बाहेर आपले लोकात येऊन , "शिवाजी तो मी , तू मोहीम करून आलास , तुझे पारिपत्य करीन. यास्तव युद्ध न करितां फिरोन जावे. नाही तरि मारीन." बोलोन तेथून गोटाबाहेरील लोकांत मिळून आंबे ('आंबील') वोहोळांत लोक ठेविले होते त्यांस मिळाले आणि इशारतीचा करणा केला. तो लोकांनी कात्रजेचे डोंगरात पोत उजळले व करणे वाजविले. खान बहुत सर्द, खजील होऊन गुल न करिता बाडांत आले. तो लेक मारिला. हे लोकांस सांगण्यास देखील शरमिंदे जाले.

जसा कालिया साप पत्न्यांचे करुणे करून जित सोडिला

इतक्यात खोजे वगैरे चौकोचे लोक यांत गुल जाली. लष्करांतही छापा आला अशी एकच गुल होऊन, लोक तयार होऊन कात्रजेचे वाटे व चहुंकडे धावू लागले. गलबल पडली. यांत कोणी कोणास मिळेना. कांही पळू लागले. कांही तयार होऊन छाप्याचे रोखे चालले . तो महाराजांनी जागा जागा लोक ठेविले . त्यांचे इशारतीच्या संकेताप्रमाणे मेळवीत मेळवीत मोठे प्रतापे यश घेऊन जसा कालिया साप पत्न्यांचे करुणे करून श्रीकृष्णजींने जित सोडिला , ऐसा खान याचे मानेवरि तलवार ठेविली असता काढून , शासन करून, सोडून देऊन, सिंहगडास विजयी होऊन सुरक्षित येऊन पावले.

ना-हिंमत होऊन खानाने पुणें सोडिलें.

तों प्रातःकाळी गनिमाच्या फौजा झाडीत (झाडांत) जाऊन झाडांस बैलांचे शिंगास पोत बांधिले [आहेत], छापा नव्हे ! असे पाहून सिंहगडाखाली येऊन उभ्या राहिल्या (उभा राहिला). ते समयी किल्ल्यारून तोफेची मारगीरी केली . त्याणी निशाणाचे हत्तीस गोळा लावून पाडिला. लोकहि फार जाया जाले . ऐसेहि जालें असतां महाराजांनी विचार केला जे , "मोगल वेढा घालून बसले . यास्तव किल्ल्याचा बंदोबस्त करून, आपण पलीकडील वाटेने उतरीन राजगडास जाऊन पावावे . शास्तखान ते दिवशी फौजसुद्धा किलियाजवळ उभे राहिला ." पावसाचे दिवस, शिवाजी दगेखोर, मोठी ('मोठा') आंगेजणी पाहिला. अफजल मारिला असे ऐकिले. तसेंच आम्हांसही केले असोन सोडिलें , जीवदान दिलें व शास्त केली . मोर्चे देऊन बसण्याचे दिवस नाहींत ; फौज पावसानी सडेल ; फौजेत फितवा असेल , तरिच डेऱ्यापर्यंत लोकसुद्धा येऊन पोहोचून बाडांत पोहोचलें, आणि आपणावरि एहसान ('अहसान') केले. ऐसे प्रकारें कित्येक अंदेशे मनांत आणून, बाजतबरसात मसलत करणे पाहून करितां येईल म्हणून ना-हिंमत होऊन, पुणे येथे शिवाजीचे नजीक राहाणे ठीक नाही जाणून दरमजल कोस दोन कोसांच्या मजली करीत करीत पेडगांवी ('पेडगांवी') जाऊन छावणीस राहिला.

याप्रमाणे शास्ताखान यास शास्त करून नामोहरम करून घालविला . महाराज बहुत संतोषी जाले . बरोबर लोक नेले त्यास सर्वांस नावाजून, आपले बरोबर धाडसे केली म्हणून सर्फराजी करून बक्षीसे दिल्ही . देशपांडे दोन असामींस— दादाजी बापूजी व चिमणाजी बापूजी— यास पालख्या दिल्ह्या.

'शिवाजी बडा सैतान पैदा हुवा!'

शास्ताखानाचे पारिपत्य केले , नामोहरम होऊन छावणीस आले हे वर्तमान दिल्लीस गेले . ते समयी पादशाहानी आश्चर्य केले , व त्यास क्रोधही आला. "शिवाजी बडा सैतान पैदा हुवा ," असे पादशाहा बोलले . "जे कोण्ही आजपर्यंत कर्म न केले , तेच करितो. आपले सुभे बुडविले . खान गेले त्यांची गति अशी केली . किल्ले, कोट, मुलुख घेतला. त्याचा बंदोबस्त पारिपत्य चांगले जाले पाहिजे ," म्हणून बहुत विचारात पडून खानाचे बराबर सरदार लोक दिले होते त्यांजवर इतराजी करून त्यांचे मनसब, सरंजाम जप्त केले आणि खानाने इतके सामान बराबर दिले असता जाऊन आब गमावला , नामोहोरम जाले. शास्तही करून घेतली म्हणून 'तुम्ही हुजूर निघोन येणे ,' ऐसे फर्मान समजाविले , पाठविले आणि हुजूर बोलावून घेतले. [खान] निघोन गेले. (**म. रा. चि.** ९८. १०३)]

[भीमसेन सक्सेना याने शाइस्ताखानाच्या स्वारी संबंधाने खालीलप्रमाणे लिहिले आहे. (पान १९).

अनुक्रमणिका

"अमीरुल् उमरा आपल्या सैन्यासह औरंगाबादेस आला आणि काही दिवस तेथे राहून चाकणच्या वेढ्याकरीता रवाना झाला ..... चाकणचा किल्ला बादशहाच्या ताब्यात आला . त्याचे इस्लामबाद असे नामकरण करण्यात आले . अमीरुल् उमरा हा शिवाजीचे निवासस्थान असलेल्या कसबे पुणे येथे येऊन राहू लागला . त्यावेळी केवळ खाजगीचेच असे त्याच्यापाशी तीन हजार नोकर होते . शिवापाशी तीन हजार स्वार आणि पाच सहा हजार पायदळ यापेक्षा जास्त सैन्य नव्हते . नामदारखान आणि शुभकरण वगैरे बादशाही सरदारांना चौलच्या बाजूला नेमण्यात आले. शत्रूचा मोड करून तिकडील मुलूख ताब्यात आणावा हा शाइस्ताखानाचा उद्देश होता . शत्रूने सैन्यानिशी शुभकरणावर रात्रीचा छापा घातला. शुभकरण बुंदेला तयारीत होता . अनेकांना त्याने यमसदनी पाठविले . नामदारखानाने अनेक स्थळे आपल्या ताब्यात आणली . शुभकरणाने लोदीखानाला कल्याण भिवंडीच्या ठाणेदारीवर नेमिले . आणि शत्रूच्या पारिपत्यासाठी तो बाहेर फिरत राहीला . अमीरुल् उमरा पुण्यात राहून जनता पुन्हा आबादी व्हावी याचा प्रयत्न करू लागला. धान्य आणि इतर वस्तू अतिशय स्वस्त दराने मिळू लागल्या.

..... अमीरुल् उमराचे गुण आणि त्याचे औदार्य वर्णन करण्यास लेखणी असमर्थ आहे.

अमीरुल् उमराला शिवाजीच्या युक्त्या आणि कपट कारस्थाने यांची कल्पना नव्हती. तो गाफीलपणे पुण्यात राहिला. शिवाजीपाशी सैन्य कमी होते तरी तो निकराने लढत होता (पान २३). तो आपल्या आवाक्याबाहेर आपला निर्धार दाखवीत होता . त्याने अमीरुल् उमराचे निवासस्थान, लष्कर, बाजार ही अनेकदा हेरून ठेविली . एके दिवशी त्याने कसलेले असे दोनशे गडी घेतले . वीस कोसाची पायी मजल मारून मध्यरात्री महाराजा जसवंतसिंगाच्या बाजारा जवळून ते गेले . अमीरुल् उमराच्या मुदपाकखान्याकडे पोहोचले . त्यांनी जनानी महालाच्या भिंतीला भोक पाडले. त्यात दोन-तीन माणसे आत दाखल झाली . स्वतः (शिवाजी) आत घुसला. इतर दहा माणसे मागोमाग आत आली . महालातील दासींनी अमीरुल् उमराला बातमी दिली की , भिंतीला भोक पाडून काही माणसे आत आली आहेत . अमीरुल् उमरा आपल्या झोपेची जागा सोडून महालाच्या सोप्यावर आला. रात्र अंधारी होती. कोण आले ते समजले नाही . शत्रूकडून त्याला (अमीरुल् उमराला) दोन जखमा झाल्या. दुसऱ्या दिवाणखान्यात भरपूर दिवे लागले होते . अमीरुल् उमराचा मुलगा अबुल्फता तेथे झोपला होता . शत्रूंनी त्यालाच अमीरुल् उमरा समजून ठार मारले आणि त्याचे डोके धडापासून वेगळे करून नेले . या सुमारास अमीरुल् उमरा गोंधळलेल्या मनःस्थितीत दिवाणखान्याच्या देवडीवर पोहोचला. त्याने काही शिपायांना (ज्यांचा स्वाभिमान शिल्लक होता) आत पाठविले. थोडावेळ मारामारी झाली. शिवाजी सहीसलामत बाहेर पडला. आजपर्यंत कोण्याही जमीनदाराने बादशाही सरदाराविरुद्ध आशा प्रकारचे धाडस केले नव्हते . अमीरुल् उमराला क्रोध आणि दुःख होऊन त्याठिकाणी राहणे योग्य नव्हे असे वाटले . त्याने जसवंतसिंग व इतर सरदार त्यांना पुण्यात ठेविले आणि तो औरंगाबादेस परतला ..... शिवाजीने केलेल्या या कृत्याबद्दल लोकप्रवाद हा की, हे कृत्य जसवंतसिंगाच्या सामिलीने झाले..... खरे खोटे काय ते परमेश्वर जाणे."

(**महाराष्ट्र आणि मराठे,** श्री. सेतुमाधवराव पगडी, ४८ – ४९)]

(११) शिवाजीने शायस्ताखानावर केलेला रात्रीचा हल्ला

परंतु रणांगणामध्ये आपल्या फौजेला आलेल्या अपयशाला एक महिना पुरा लोटावयाच्या आत शिवाजीने मोगलांना एक जबरदस्त तडाखा हाणला . दक्षिणेचा सुभेदार शायस्ताखान याच्या छावणीवर त्याने अचानक हल्ला केला आणि शरीररक्षक सेनादल आणि गुलाम यांचेकडे भेटून शिवाजीने खुद्द त्याच्या अंतःपुरात शिरून त्याला जखमी केले.

शायस्ताखानाचा तळ पुण्यात लालमहाल येथे होता . लालमहाल म्हणजे शिवाजीचे बाळपणीचे साधेसुधे घर होते. शायस्ताखानाचा जनाना त्याच्याबरोबर होता . त्याच्या निवासस्थानाभोवती त्याचे रक्षक आणि सेवक यांच्या राहण्याच्या जागा होत्या आणि बिगुलखाना आणि कचेरी होती . त्यापलीकडे रस्ता ओलांडून दक्षिणेच्या बाजूने सिंहगडाच्या रस्त्याकडेच्या वाटेवर शायस्ताखानाचा दुय्यम महाराजा जसवंतसिंग आणि त्याचे १०,००० शिपाई यांचा तळ होता. अशा बंदोबस्तात असलेल्या खानाच्या छावणीवर हल्ला करावयाचा म्हणजे नुसते शौर्य आणि धाडसच नव्हे तर चपळाई आणि कावेबाजपणा यांचीही जरुरी होती. मोगलांची छावणी दूरवर पसरलेली होती . छावणीच्या दोन्ही फळ्यांना बाहेरच्या बाजूला १ मैल अंतरावर शिवाजीने नेताजी पालकर आणि पेशवा मोरोपंत यांना एक एक हजार सैनिक देऊन प्रसंग पडल्यास मदत करण्यासाठी म्हणून मोक्यावर ठेवले. रविवार तारीख ५ एप्रिल १६६३ रोजी रात्र पडल्यावर शिवाजीने ४०० निवडक सैनिक घेऊन पुण्याच्या परिसरात प्रवेश केला . छावणीच्या मोगल रक्षकांनी त्यांना हटकल्यावर त्यांनी जबाब दिला की ते शाही फौजेतील दक्षिणी शिपाई असून ठरवून दिलेल्या जागी पहारा देण्यासाठी ते जात आहेत . छावणीच्या वावदळ नसलेल्या एका जागी काही तास विश्रान्ती घेतल्यानंतर

शिवाजी आणि त्याची माणसे मध्यरात्रीच्या सुमारास खानाच्या मुक्कामाजवळ येऊन दाखल झाली . शिवाजीला शहराच्या आतबाहेरची आणि प्रत्येक घरान्घराच्या कानाकोपऱ्याची संपूर्ण माहिती होती कारण पुणे शहरात त्याचे सारे बालपण आणि तारुण्य गेले होते.

रमजान महिन्याचा म्हणजे मुसलमानांच्या उपवासाच्या महिन्याचा तो सहावा दिवस होता . नबाबाच्या नोकरवर्गाने दिवसभर उपवास केला होता आणि त्यानंतर रात्री भरभक्कम जेवण केले होते . त्यामुळे ते सारे गाढ झोपेत होते. सबंध रमजानच्या महिन्यात झुंजुमुंजू व्हावयाचे अगोदर जेवण घेत असत . ते करण्यासाठी विस्तव पेटविण्याकरता म्हणून काही आचारी झोपेतून उठले होते . त्या सर्वांची मराठ्यांनी अगदी गुपचूप विल्हेवाट लावून टाकली . अंतःपुरात असलेल्या शरीररक्षकांच्या खोलीला या बाहेरील स्वयंपाकघरापासून विभागणारी जी भिंत होती तिला पूर्वी एक छोटासा दरवाजा होता . परंतु जनाना अगदी अलग ठेवण्यासाठी म्हणून हा दरवाजा विटा आणि चिखल यांनी बुजवून टाकण्यात आला होता. मराठ्यांनी तेथल्या विटा काढल्या आणि भिंतीला भगदाड पाडले . जनान्यात आपला अत्यंत विश्वासू सेवक चिमणाजी बापूजी याला बरोबर घेऊन शिवाजीने प्रथम प्रवेश केला. त्याच्या पाठोपाठ त्याची २०० माणसे आत घुसली. शिवाजी खानाच्या शयनगृहापर्यंत जाऊन पोहोचला तेव्हा त्याच्या घाबरून गेलेल्या स्त्रियांनी त्याला जागे केले. परंतु खान हातात शस्त्र घेऊन प्रतिकाराला सिद्ध होईपर्यंत शिवाजी त्याच्याजवळ भिडला आणि तलवारीच्या एका वाराने त्याने खानाचा अंगठा तोडला . बहुधा याच वेळेला जनान्यातील कोणत्या तरी दक्ष स्त्रीने खोलीतले दिवे विझवून टाकले . काळोखात दोन मराठा शिपाई एका पाण्याच्या पिंपावर धडपडले . झालेल्या गोंधळाचा फायदा घेऊन शायस्ताखानाच्या गुलाम दासींनी त्याला सुरक्षित जागी नेऊन पोहोचविले. मराठ्यांनी काहा वेळपर्यंत काळोखात कापाकापी चालू ठेवली.

दरम्यान अंतःपुराच्या बाहेर ठेवण्यात आलेल्या शिवाजीच्या नियुक्त केलेल्या निम्म्या स्वारांनी मुख्य पहाऱ्यावर असलेल्या रक्षकांवर हल्ला केला आणि झोपलेल्यांची आणि जागे झालेल्यांची कत्तल केली . "तुम्ही पहाऱ्याचे काम अशाच तऱ्हेने करता काय ?" असे टोमणे त्यांनी शायस्ताखानाच्या शिपायांना मारले. नंतर त्यांनी बिगुलवाल्यांच्या खोलीत प्रवेश केला आणि जणू खान स्वतःच हुकूम करीत आहे अशा थाटाने त्यांनी त्यांना बिगूल वाजविण्याची आज्ञा केली . त्यांनी वाजविलेल्या ढोलकांचा जो मोठा आवाज झाला त्यात इतर सर्व आवाज बुडून गेले आणि त्यातच शत्रूने मारलेल्या आरोळ्यांनी सगळीकडे गोंधळच गोंधळ झाला.

शायस्ताखानाचा अबुलफत नावाचा मुलगा होता . तो इतरांची वाट न पाहता सर्वाअगोदर आपल्या बापाच्या रक्षणाकरता धावला . त्याने दोन तीन मराठा शिपायांवर वार करून त्यांना लोळविले परंतु तो झालेल्या धामधुमीत ठार मारला गेला.

आपले शत्रू आता जागरूक होत आहेत आणि सशस्त्र होण्याच्या तयारीला लागले आहेत हे पाहून शिवाजीने तेथे फार वेळ घालविला नाही. त्याने जनान्यातून काढता पाय घेतला, आपल्या माणसांना एकत्र बोलाविले आणि छावणीतून कोणताही प्रतिकार न होता किंवा पाठलाग न होता त्याने उघडउघड राजमार्गाने बाहेरचा रस्ता पकडला . या अचानक हल्ल्यात मराठ्यांची ६ माणसे ठार आणि ४० जखमी झाली तर याउलट खानाचा मुलगा आणि एक अधिकारी , त्याचे ४० सैनिक आणि ६ स्त्रिया आणि गुलाम दासी इतकीजण ह्या हल्ल्यात ठार झाली आणि त्याचे २ मुलगे , ८ इतर स्त्रिया आणि खुद्द शायस्ताखान इतकीजण जखमी झाले . साऱ्या दक्षिणेमध्ये शिवाजीचे हे धाडसी कृत्य जसवंतसिंगाच्या पाठिंब्याशिवाय

अनुक्रमणिका

झाले नाही अशी सर्वसाधारण लोकांची धारणा झाली.

शिवाजीने धाडसाने आणि कौशल्याने शायस्ताखानावर घातलेल्या यशस्वी छाप्यामुळे त्याचा दबदबा सर्वत्र वाढला. त्याला लोक सैतानाचा अवतार समजू लागले. तो जिथे जाऊ शकणार नाही अशी एकही जागा नाही आणि कोणतीही गोष्ट त्याला अशक्य नाही अशी प्रायः सर्वत्र समजूत पसरली. शायस्ताखानावरील हल्ल्याची बातमी बादशहाच्या कानावर गेली. त्याने त्याचे खापर शायस्ताखानाचा निष्काळजीपणा आणि बेवकुबी यावर फोडले. त्याच्यावर बादशहाची इतराजी झाली आणि त्याची उचलबांगडी बादशहाने १ डिसेंबर १६६३ रोजी बंगालच्या सुभेदारीवर केली. त्या काळी बंगाल प्रातांची सुभेदारी म्हणजे सुळावरच्या पोळीसारखी समजत. जानेवारी १६६४ च्या मध्याला, राजपुत्र मुआज्जमच्या स्वाधीन कारभाराची सूत्रे देऊन शायस्ताखानाने दक्षिण प्रांत सोडला. [शिवाजीमहाराजांनी शायस्ताखानावर केलेल्या हल्ल्याची हकीकत पोर्तुगीज कागदपत्रात पुढीलप्रमाणे आहे :—

इ. स. १६६३ साली औरंगजेब बादशहाने शाहिस्तेखानाला मोठे सैन्य देऊन शिवाजी महाराजांवर पाठविले. शिवाजी महाराजांना विजय मिळावा म्हणून गोव्याचा पोर्तुगीज व्हाइसरॉय आंतोनियु द मेलु द काश्रुं (Antonio de Melo de Castro) ह्याने पुढील सदिच्छापर संदेश धाडला :—

"मी देशाहून वसईला आलो, तेव्हा आपणाला कळविले की, आपल्या दोन्हीही देशांना मान्य अशा मनुष्याची माझ्याकडे रवानगी करावी. परंतु उत्तर लांबल्यामुळे सरकारला सोयिस्कर अशा आज्ञा करता आल्या नाहीत. आता ह्या पत्रान्वये आपणाला कळवीत आहे की, आम्ही एका अनुभवी अधिकाऱ्याला उत्तरेकडे पाठवीत आहोत. हा अधिकारी आपणाशी सल्लामसलत करून व आम्हाला आपले विचार विदित करील. ह्या अधिकाऱ्याचे नाव दो आल्हारु द आताइद (Dom Alvaro de Ataide) हे असून, तो आपल्या लोकांचे अनहित करणारे असे कोणतेच कृत्य आपल्या हातून होऊ देणार नाही, ह्याची मला खात्री आहे. मी आपणाला वचन देतो की, माझ्याकडून आपणाला जी काही मदत हवी असेल ती देण्यास मी कधीच कुचराई करणार नाही. मला आशा आहे की, आपण विजयी व्हाल आणि आपली कीर्ती आणि आपल्या देशबांधवांचा दरारा सर्वत्र पसरेल."

गोवा, २७ एप्रिल १६६३.

आंतोनियु द मेलु द काश्रुं (Livro Dosreis Vizinhos, No 2 FLS., 14)

शिवाजीमहाराजांनी शाहिस्तेखानावर पुणे येथे अचानक हल्ला करून त्याचा पुरता पराभव केला. ह्या विजयाचा उल्लेख फिलिप गाय्फोर्ड ह्या नावाच्या इंग्रजाने ईस्ट इंडिया कंपनीच्या सुरत येथील कचेरीला कोल्हापूरहून लिहिलेल्या पत्रात केला आहे. हे पत्र दि. २४ मे १६६३ चे आहे.

शिवाजीमहाराजांनी सावंतवाडीवर स्वारी केली. डिचोली आणि साखळी ह्या दोन्ही प्रांतांच्या सुभेदारांनी भीतीने पळ काढला. (**इंग्लिश रेकॉर्डस् ऑन शिवाजी** पा. ५५) गोव्याचा व्हाइसराय आंतोनियु द मेलु द काश्रुं ह्याने पुढील पत्र पाठवून महाराजांचे अभिनंदन केले :

"शिवाजी राजे ह्यांस—

आपले पत्र मिळण्यापूर्वीच मी रामजी शेणवी कोठारी ह्यांच्याकडे अभिनंदनपर पत्र देऊन आपणांकडे रवाना केले होते. आपल्या विजयाबद्दल मी आपले अभिनंदन करतो....."

गोवा, ४ जून १६६३.

आंतोनियु द मेलु काश्रुं

(Livro Dosreis Vizinhos, No 2 FLS., 17)

पोर्तुगीज व्हाइसरॉय आंतोनियु द मेलु द काश्रुं ह्याने दि. १४ जानेवारी १६६४ रोजी पोर्तुगालला आपल्या राजास लिहिलेल्या पत्रात शिवाजी महाराजांनी शाहिस्तेखानावर मिळविलेल्या विजयाचा उल्लेख केला आहे. तो म्हणतो :—

"..... शिवाजी हा एक कष्टाळू आणि पराक्रमी राजा आहे. त्याने इनिझा मालुकु (Iniza Maluco?) चे राज्य बळकावले. हा प्रदेश डोंगराळ असल्याने त्याचे त्याला सुलभतेने रक्षण करता येते. इदालशा (आदिलशहा) च्या सैन्याशी त्याच्या अनेक लढाया झाल्या. पण त्या सर्व लढाया त्याने जिंकल्या. गेल्या वर्षी मोगलांचे एक बलाढ्य सैन्य शिवाजीवर चालून आले. त्याने डोंगराळ प्रदेशाचा आसरा घेऊन मोगलांशी युद्ध सुरू ठेवले. मोगलांना आपल्या सैन्यात रसद पोहोचविणे अशक्य झाल्याने त्यांना माघार घ्यावी लागली. शिवाजीच्या सैन्याने एक अरुंद खिंड गाठून

त्यांची धूळदाण उडवून दिली.....”

(**म. इ. सा.**, खंड ३, ३–५)]

[शायस्ताखानाच्या दक्षिणेवरील स्वारीची हकीकत खाफीखानाने पुढीलप्रमाणे दिली आहे :–

“सीवाच्या दावाची हकीकत औरंगजेबास समजल्यावर त्याने दख्खनचा सुभेदार अमीरु ल-उमरा यास त्याला शिक्षा करून नाहिसा करण्याबद्दल फर्माविले. तेव्हा तो वरील हुकुमाप्रमाणे सीवास सजा देण्यासाठीही १०७० च्या जमादिलावल महिन्याच्या अखेरीस त्याची सुरक्षित वसतिस्थाने असलेल्या पुणे व चाकण यांच्या बाजूस जाण्याकरिता औरंगाबादेहून निघाला . आणि औरंगाबाद येथे मुमताझखानास ठेवून ता . १ **रजबला** [श. १५८९ **चैत्र शुद्ध** २, इ. स. १६६० मार्च ३.] सीवाच्या महालांपैकी सेवगाव नामक ठिकाणास आला. यावेळी सीवा सुप्याकडे होता. पण अमीरुल–उमरावाच्या हालचालींची वार्ता ऐकून तो ते ठिकाण खाली करून दुसरीकडे निघून गेला . अमीरुल-उमराने विरोधाशिवायच सुपे घेतले आणि तेथे जादूराय यास ठेवून लष्करास धान्य पुरविण्याबद्दल व ती जागा रक्षण करण्याविषयी (१२०) त्यास ताकीद केली . सीवाने आपल्या सैन्याला संधी सापडताच अमीरुल उमराच्या सैन्याच्या पिछाडीवर हल्ले करण्याचा हुकूम दिला . अमीरुल-उमरास हे समजताच त्याने अनुभवी अधिकाऱ्यांच्या हाताखाली चार हजार स्वार आळीपाळीने कहीचे रक्षण करण्यासाठी नेमिले . पण प्रत्येक दिवशी व कूचांत सीवाचे दखनी लोक कहीभोवती घिरटया व कज्जाकांप्रमाणे एकदम छापा घालून घोडे , उंट, मनुष्ये यांपैकी सापडेल त्यास सैन्य सावध होईतो मारीत व लुटून नेत . बादशाही लष्कर पाठलाग करून त्यांना त्रास देई, तेव्हा ते लढण्याऐवजी पळून जात. शेवटी या सैन्यांपैकी काही यक्काताजांनी त्या कुत्र्याने (सीवा) वसविलेल्या पुणे व शिवापूर या दोन ठिकाणी पोहोचून ती दोन्ही हस्तगत केली आणि पुण्यास येऊन राहण्याच्या जागा मुकरर केल्या.

नंतर शाही सैन्य चाकण किल्ल्यावर चालून गेले . त्याचे बुरूज तट यांचे निरीक्षण केल्यावर सैन्याने मोर्चे लाविले , दमदमे रचिले, आपल्याभोवती खंदक खणले आणि किल्ल्याखाली सुरुंग लावण्यास सुरुवात केली . अशा तऱ्हेने किल्ल्यास वेढा घातल्यावर तो घेण्याचा ते कसून प्रयत्न करू लागले. त्या प्रदेशात पाऊस जवळ जवळ पाच महिने रात्रंदिवस पडे . तेव्हा लोकांना घराबाहेर जाता येत नसे . ढगामुळे दिवस संपून रात्र केव्हा सुरू होई हेही समजत नसे . यामुळे दिव्याशिवाय एक मनुष्य दुसऱ्या स्वपक्षीयास ओळखू शकत नसे . बंदुकांच्या गोळ्या व दारू खराब होऊन धनुष्यांच्या दोऱ्याही बाद झाल्या. (१२१) तरीही वेढा जोराने चालवून तटास तोफांच्या माऱ्याने खिंडारे पाडण्यात आली . शिबंदीस अतिशय ताण पडला तरी अंधाऱ्या रात्री ते मोर्चात शिरून विलक्षण धाडसाने लढत . कित्येक प्रसंगी शत्रूची आतील व बाहेरील शिबंदी दिवसाढवळ्या बादशाही सैन्यावर तुटून पडे व मोर्चे धोक्यात पडत. वेढा छपन्न दिवस चालल्यावर सुरुंग लावलेला एक बुरुज त्यावरील माणसे आणि त्याचे दगड व विटा यांसह उडाला . तेव्हा इस्लामी शिपायांनी ईश्वरी रक्षणाच्या ढाली पुढे करून हल्ला चढविला व ते मोठ्या कसोशीने लढले . परंतु काफीर किल्ल्यामध्ये मातीची भिंत व शिवाय खंदकाभोवती मोर्चे रचून त्यांच्या आश्रयाने लढत होते . संबंध दिवस लढण्यात जाऊन बादशाही शिपायांपैकी काही त्यांत मेले. पण बहादुरांनी माघार घेण्याचे नाकारून रात्र अन्न व विश्रांती याशिवाय तेथेच घालविली . दुसऱ्या दिवशी सूर्य उगवताच त्यांनी पुन्हा हल्ले सुरू केले, शिबंदीपैकी कित्येकांना ठार केले आणि मोठ्या शर्तीने ते ठिकाण हस्तगत केले . तेव्हा उरलेली शिबंदी बालेकिल्ल्यात गेली. या (१२२) वेढ्याच्या कामात गुंतलेल्या बेलदार वगैरे खेरीज ३०० शाही लोक मेले आणि ६०० स्वार व प्यादे दगड , गोळ्या, बाण व तलवारी यांनी जखमी झाले. बालेकिल्ल्यातील लोकांची मोठी कठीण अवस्था होऊन राव भाऊसिंघाच्या मध्यस्थीने त्यांनी किल्ला बादशाही लोकांच्या हवाली केला. दुसरे दिवशी अमीरुल-उमराने आत जाऊन किल्ल्याची पाहणी केली, उझबकखानास तेथे ठेविले व स्वतः सीवास तंबी देण्यासाठी निघाला. हे समजल्यावर बादशहाने चाकणास इस्लामबाद हे नाव दिले आणि माळव्यातून जाफरखानास अमीरुल-उमराच्या मदतीस जाण्यासाठी फर्माविले. नंतर अमीरुल-उमराने दरबारास कळविले की, परिंडा किल्ला लढाईशिवायच ताब्यात आला.

(**शि. वृ. सं.**, खंड ३, **मुन्तखाबुल्लुबाब**, ६६–६८)]

[शिवाजीने शायस्तखानावर घातलेल्या छाप्याची हकीकत खाफीखानाने पुढीलप्रमाणे दिली आहे :

(१७२) या वेळी बादशाहास बेचैन करणारी आणखी एक गोष्ट घडली व ती म्हणजे दक्षिणेतून सीवाने अमीरुल –उमरावर दरुणी महालात छापा घातला व त्याचा मुलगा अबुल– फतहखान मारला ही. स्वतः अमीरुल – उमराबरोबर असलेल्या माझ्या बापाकडून मी याविषयीचा तपशील ऐकला तो पुढे देत आहे.

अमीरुल-उमराने कित्येक किल्ले व समृद्ध ठिकाणे घेतल्यावर पुण्यास त्या नरक्याने बांधलेल्या त्या घरात मुक्काम केला . तेथून त्याने सीवाचे बळ मोडण्यासाठी व त्यास कैद करण्यासाठी सैन्याच्या तुकड्या पाठविल्या . त्याने असा एक दंडक घातला होता की , पातशाही नोकराशिवाय कोणाही हत्यारी किंवा बिनहत्यारी विशेषतः मराठा मनुष्यास शहरात किंवा सैन्यात प्रवेश मिळत नसे . सीवा मार बसून इतका हैराण झाला की, तो दुर्गम अशा डोंगरात जाऊन राहिला व तेथील प्रत्येक आठवड्यास व महिन्यास जागा बदली . (१७३) एके दिवशी मराठा प्याद्यांच्या टोळीने कोतवालाकडे जाऊन २०० माणसांच्या एका अपरिचित लग्नाच्या वऱ्हाडासाठी परवाना मिळविला आणि त्यांनी रात्र पडताच नवऱ्या मुलाचा पोशाख केलेला एक मुलगा बरोबर वाद्ये असलेल्या टोळींसह वाजत गाजत शहरात आणिला . त्याच दिवशी एका चौकीवर बरेच शत्रुपक्षीय लोक कैद करून त्यास हातकड्या घालून , अनवाणी, दोरांस बांधून, शिव्या देत एक टोळी घेऊन येत आहे अशा बातमीवरून आणखी एका टोळीस संध्याकाळच्या वेळेस शहरात येण्याची परवानगी मिळाली व ते आत आले . ते ठरल्या जागी आल्यावर सर्वांनी हत्यारे घेतली . मध्यरात्री ते अंतःपुराच्या भिंतीजवळ असलेल्या मुदबकखान्यापाशी पोहोचले . दोहोंमध्ये फक्त एक दिंडी असून ती मातीविटांनी भरून काढली होती . ते एका परिचित रस्त्याने मुदबकखान्यात शिरले. तो महिना रोजांचा होता. काही आचारी उठून खान्याची भांडी उजळीत व स्वयंपाक करीत होते आणि काही निजले होते. मोठा आवाज होऊ न देता त्यांनी जागृत व झोपलेल्या आचाऱ्यांना कापून काढले.

अनुक्रमणिका

नंतर त्यांनी दिंडी उघडण्याचा प्रयत्न केला . मरणाऱ्यांचे व पिकावांचे आवाजांनी मुदबकखान्यामागच्या खोलीत निजलेला एक चाकर जागा झाला. त्याने अमीरुल-उमरापाशी जाऊन ऐकू आलेल्या आवाजांविषयी सांगितले . (१७४) त्यावर तो रागावून आचारी खाना शिजविण्यास उठले असतीलच येवढेच म्हणाला . नंतर काही दासी एकामागून एक येऊन कोणी खिडकी उघडून आत आल्याचे सांगू लागल्या . तेव्हा मात्र अमीरुल-उमरा घाईने एक दम उठला व त्याने धनुष्य , बाण व भाला घेतला . इतक्यात काही मराठे त्याच्यासमोर असलेल्या पाण्याच्या हौदापुढे आले. त्यापैकी एकास त्याने बाण मारला , पण त्याने पुढे येऊन वार केला व खानाचा अंगठा उडाला . यावेळी दोन मराठे पाण्याच्या हौदात पडले . खानाने आणखी एकास बर्चीने खाली पाडले . या गोंधळात दासींनी शायिस्ताखानास (अमीरुल-उमरास) हातांनी धरून तेथून सुरक्षित जागी नेले . कित्येक मराठ्यांनी पहारेकऱ्यांच्या घरात शिरून निद्रित किंवा जागृत अशा सर्वांस 'असा पहारा करतात होय ' म्हणून ठार केले . काहींनी नगारखान्यात प्रवेश करून अमीरु ल-उमराच्या नावावर नगारे वाजविण्याची आज्ञा केली . यामुळे इतका आवाज झाला की , कोणाचा आवाज कोणास ऐकू येईना . त्यातच छापेकऱ्यांच्या आवाजांची भर पडली . शिवाय त्यांनी दरवाजे लावून घेतले . शायिस्तेखानाचा शूर मुलगा अबुल-फतहखान याने ही बातमी ऐकली तेव्हा तेथे जाऊन २।३ जणांस ठार व जखमी केले . पण मागाहून स्वतःच जखमी होऊन मरण पावला . एक अमीरुल-उमराच्या वाड्यामागे घर असलेला व उमदा जमातदार , आतील गोंगाट ऐकून आला . वाट बंद असलेली पाहून दोराची शिडी लावून भिंतीवर चढला व त्याने खाली उडी टाकली . तो म्हातारा , अशक्त व काहीसा शायिस्तेखानासारखा होता . (१७५) मराठ्यांनी त्यास अमीरुल-उमरा समजून ठार केले . त्यांनी अमीरुल—उमराच्या दोन बायकांसही कापून काढिले . एकीचे तर इतके तुकडे केले होते की , दहनासाठी ते टोपलीत भरले गेले. दुसरी तिला ३०।४० जखमा झाल्या असतानाही बचावली. छापेवाल्यांनी लुटालूट न करताच घराबाहेर पळून पोबारा केला.

दुसरे दिवशी सकाळी , अमीरुल-उमराच्या साहय्यकांचा मुख्य जसवंत अमीराकडे भेटण्यास व माफी मागण्यासाठी आला ; पण तो 'मजवर संकट आले असता महाराजा हजरतांच्या चाकरीवर होते असे मला वाटते ' एवढेच वाक्य बोलला. ही बातमी बादशहास समजल्यावर त्याने अमीर व राजा जसवंत या दोघांचीही निर्भर्त्सना केली आणि दख्खनची सुभेदारी व सीवाविरुद्ध पाठविलेल्या सेनेचे आधिपत्य शाहझादा मुहम्मद मुअज्जम यास मुकरर केली. प्रथम अमीरुल-उमरास परत बोलविले ; पण नंतर त्यास बंगालच्या सुभ्यावर जावे म्हणून फर्माविले . महाराजा जसवंत याजकडे शाहजाद्याच्या हाताखालील साहाय्यक सेनेचे अधिपत्य तसेच चालू ठेविले . (१७७) दख्खनच्या बातम्यांवरून समजून आले की , सीवाने बंडाचे निशाण बेहद्द फडकाविले आहे आणि रोजबरोज बादशाही महाल व लमाणी तांडे यावर हल्ले करून त्यांना तो लुटीत आहे . त्याने जीवल (चेऊल), पाबल (दाभोळ) व सुरतेजवळची इतर बंदरे दाबली आहेत आणि मक्केला जाणारी जहाजे तो लुटीत आहे—त्याने समुद्रावर कित्येक किल्ले बांधले असून दळणवळण धोक्यात आणले आहे . तो राजगडावर तांब्याचे पैसे व सोन्याचे होन पाडतो . महाराजा जसवंताने त्यास दाबण्याचा यत्न केला; पण उपयोग झाला नाही . तेव्हा बादशहाने राजा (१७८) जयसिंघास व दिलेरखान , दाऊदखान, राजा रायसिंघ [सी] सोदियह, इहतशामखान, राजा सुजानसिंघ बुंदेला , पुरणमल, झबरदस्तखान, बर्कन्दाझखान आणि इतर लढवय्ये व कार्यकर्ते यांसह सीवास तंबी व सजा देण्यासाठी रवाना केले . यावेळी राजा जयसिंघ दिलेरखान व इतर यांचा योग्यतेप्रमाणेच सत्कार केला आणि हाजी शफीअखानास दख्खनचा दिवाण बनविले . दाउदखानास बुर्हानपूरचा **सुभेदार** करून त्यास फर्माविले की , त्याने बुर्हानपुरास **नायब** नेमून स्वतः राजा जयसिंघाबरोबर सीवाच्या मोहिमेवर जावे.

(**शि. च. वृ. सं.**, खंड ३; **मुन्तखावुल्लुवाव**, ६८—७०)]

[अलीनाम्यामध्ये शायस्ताखानावरील छाप्याची हकीकत पुढीलप्रमाणे दिली आहे :

शाइस्तेखानावर छापा — मलनाडच्या राजावर स्वारी करण्याकरिता म्हणून अली आदिलशाह बंकापुरास गेला होता . त्यावेळी विजापूरचे सर्व कामगार लोक त्याजबरोबर गेले असल्याने प्रत्यक्ष विजापुरात फारच थोडी फौज राहिली होती . अशा प्रकारे मैदानी मुलूख मोकळा आहे असे पाहून शिवाजी पहाडातून बाहेर आला व त्याने विचार केला की , आपण हा सर्व मुलूख काबीज करावा . वास्तविक हे त्याचे फारच मोठे धाडस होते; कारण यावेळी अली आदिलशहाची शक्ती एवढी मोठी होती की , त्याशी लढण्याची ताकद कोणाचीच नव्हती. याचवेळी मोगलांचा एक बडा सुभेदार शिवाजीच्या तोंडावर फौज घेऊन कायमचा उभा होता . मोगल बादशाह यास मोठा, राज्याचा आधारस्तंभ, शहाणा, दूरदर्शी, मोठमोठी कामे सर्वाआधी करणारा, दिल्लीवर वजन असणारा, असा मानीत असून त्यास शाइस्तेखान हा किताब होता . हा मोठमोठ्या लढाया व दंगेधोपे यांनी न होणारी कामे अकलेच्या जोरावर करीत असे . शिवाजीने याशी खेळ खेळण्याची इच्छा केली . त्यासाठी त्याने आपल्यासारखेच चोर , दरोडेखोर, खुनी इसम जमवून एक फौज तयार केली व कपटाने शाइस्तेखानाचा काटा काढण्याचे ठरविले . एके दिवशी रात्री शाइस्तेखान आपल्या स्त्रियांशी क्रीडा करण्यात दंग झाला असता इकडे चोरांनी त्याच्या राज्यांत खेळ केला . शिवाजी मोगल सेनापतीच्या आसपास आला व खूप रात्र झाली आहे असे पाहून त्याच्या जिवाचा घात करण्याचा त्याने विचार केला . त्याने आपल्या सैन्याचे दोन भाग करून सावाचा भाग सावात व चोराचा भाग चोरात मिसळून दिला. शाइस्तेखान ऐषात दंग असता शिवाजीने घराभोवती पहारेकरी होते त्यांस ठार केले व जेथे सैतान देखील प्रवेश करू शकला नसता तेथे रक्ताचा गुलाल उधळला . शाइस्तेखान झोपेतून उठून तलवार हातात घेऊन तोंडावर जाण्याच्या विचारात होता ; पण शिवाजीने त्यास तयार होऊ न देता त्याजवर चटकन वार करून त्याचे शरीर घायाळ केले . जिकडे तिकडे रक्त सांडल्यामुळे स्त्रियांचा बेरंग झाला . आपल्या धन्यावर मोठा प्रसंग गुदरला आहे असे पाहून त्याचा जीव वाचविण्यासाठी रजपूत स्त्रिया स्वतः जणू आगीत उड्या घेऊ लागल्या ; पण सर्वांची डोकी उडविली गेली. पुष्कळांना घायाळ करून , कित्येक स्त्रियांना त्यांच्या नवऱ्यासमोर मारून व लूट करून शिवाजी आपल्या वाटेने निघून गेला . शिवाजी निघून गेल्यावर शाइस्तेखानाच्या लोकांना लाजेने मेल्यासारखे होऊन गेले . इकडे ही गोष्ट सर्व ठिकाणी फैलावली जाऊन ताबडतोब दिल्लीस पोहोचली . तीमुळे बादशाहाचे तोंड सुकून गेले . तरी पण या गोष्टीचा सूड घेतला पाहिजे असा सर्वानुमते विचार करून त्याने जसवंतसिंग नावाच्या सरदारास बरोबर मोठमोठे फौजदार देऊन शिवाजीवर पाठविले. (**शि. च. वृ. सं.** २ ६४—६५, **अली नामा**).]

[शायस्ताखानाच्या स्वारीची हकीकत आलमगीरनाम्यात पुढीलप्रमाणे दिली आहे :

ही हकीकत बादशहाच्या कानावर जाताच दक्षिणचा सुभेदार अमीरु ल-उमरा (शायिस्तेखान) यास हुकूम सादर झाला की , त्या सुभ्यातील सैन्य घेऊन त्यास दफे करण्यासाठी व त्याच्या विलायतेतील किल्ले व गढ्या हस्तगत करण्यासाठी कमर बांधून त्या भागास बंडातून मुक्त करावे. तेव्हा अमीरुल-उमरा फर्मानाप्रमाणे ता. २५ **जमादिलावल जुलूस** या दिवशी [श. १५८१ **माघ वद्य** ११, इ. १६६० जानेवारी २८.] हे काम करण्यासाठी लष्करासह औरंगाबादेच्या बाहेर पडला आणि नांदेडचा फौजदार मुक्तारखान यास शहराच्या रक्षणाचे काम व अधिकार सांगून ९ **जमादिलाखरला** [श. १५८१ **फाल्गुन शुद्ध** ११, इ. स. १६६० फेब्रुवारी ११.] अहमदनगर येथे पोहचला. इतर कामाची व्यवस्था लावण्यासाठी तो तेथेच काही दिवस राहिला. नंतर त्याच महिन्याच्या २३ तारखेस [श. १५८१ **फाल्गुन वद्य** १०, इ. १६६० फेब्रुवारी २५.] तेथून कूच करून रजबाच्या १ तारखेस [श. १५८२ **चैत्र शुद्ध** २, इ. १६६० मार्च ३.] सीवाच्या विलायतेतील महालांपैकी सोन्बरी (सोनोरी?) या गावी त्याने मुक्काम केला. नंतर कोकणातील एक भरभराटीस आलेले, मातीची गढी असलेले, शत्रूने रक्षण करण्याचे सोडून दिल्याने मोकळे पडलेले अशा सुपे गावास येऊन तेथे त्याने जादूराय यास ठेविले. हेतू हा की, त्याने त्या गावचे (५७९) रक्षण करून भोवतालच्या प्रदेशापासून सावध असावे आणि बादशाही लष्करास धान्य व इतर सामग्री पोहोचविण्याची व्यवस्था करावी . यावेळी दिसून आले की शत्रूची फौज बादशाही फौजेच्या जवळपास दक्षिणी लोकांच्या नेहमीच्या सवयीप्रमाणे गनिमी पद्धतीचे कावे करून हात मारण्याची संधी पहात आहे . तेव्हा त्याने ठरविले की, रोज बादशाही सैन्यातील एकेका सरदाराने तीन-चार हजार स्वारांसह पाळीपाळीने रसद आणण्यासाठी तळावरून जाणाऱ्या कहीचे रक्षण करावे. नंतर त्याने ता. ४ **शाबान** रोजी [श १५८२ **वैशाख शुद्ध** ६, इ. १६६० एप्रिल ५.] सीवाच्या विलायतेत व त्याचे घरदार असलेल्या पुण्यास जाण्यासाठी म्हणून सुपे परगण्यातील मातीची गढी असलेल्या बारामती गावी मुक्काम केला . तेथे काही सैन्यास ठेवून त्याने असे ठरविले की , त्याने त्या गढीची —जी अतिशय मोडकळीस आली होती—डागडुजी करावी व उत्तम रक्षण करीत खबरदारीने रहावे . नंतर त्याने नीरेच्या किनाऱ्यावर येऊन मुक्काम केला . इतक्यात त्याला बातमी आली की, सिवाची फौज आपल्या लष्करापासून १० कोसांवर आली आहे व लपून राहिली आहे . तेव्हा त्याने ३ हजार स्वारांसह शर्झाखानास त्या फौजेचे पारिपत्य करण्यास नेमिले. शत्रूसैन्यास त्याच्यापुढे गाठून उभे राहाणे शक्य न झाल्याने ते पळून गेले . तेव्हा बादशाही लष्कर तेथेच काही दिवस राहून नंतर त्याच महिन्याच्या १५ तारखेस [श. १५८२ **वैशाख वद्य** १, इ. १६६० एप्रिल १६.] पुणे परगण्यातील नीरेच्या काठी असलेल्या धाल (होळ) या गावी गेले. तेथून दोन मुक्कामांनी आदिलखानाच्या मुलखातील पण सीवाच्या ताब्यात गेलेल्या शिरवळ गावी —यास राज्याचा पायाच समजून शत्रू (सीवा) ने उद्ध्वस्त केले होते —पोहोचले. तेथे त्याने तीन-चार मुक्काम केले व नवीन (५८०) इमारती करून काहींनी तेथेच राहावे असे ठरले. यावेळी त्यास बातमी लागली की, शिरवळपासून दहा कोस अंतरावर राजगड नावाचा किल्ला असून त्याच्या आसपास सीवाचे ४।५ इतर किल्ले आहेत . त्याच्या आजूबाजूस शत्रूचे लोक एकत्र जमून महालांच्या आधाराने शत्रूस दफे करण्यास व लढाईस तयार आहेत . तेव्हा आघाडीच्या फौजेसह शमसुद्दीनखानास , साथीदारांसह राव भावसिंग यास , कित्येक दक्षिण्यांसह शर्झाखानास आणि १००० बंदुक्यांसह तोफखान्याचा दारोगा मीर अब्दुलमाबूद यास शत्रूस दफे करण्याचा त्याने हुकूम दिला . शत्रूस उभे राहण्यास सामर्थ्य नसल्याने तो पळून गेला . तेव्हा बादशाही सैन्याने राजगडाच्या भोवतालची गावे उद्ध्वस्त करून त्या दिवशी सायंकाळच्या सुमारास ते सैन्य मुख्य सैन्यास येऊन मिळाले . तिसऱ्या दिवशी मुख्य सैन्याने कूच केल्यावर शत्रूपैकी काहींनी धाडस करून तळावर हल्ला केला . पिछाडीचा सरदार राव भावसिंग यास ही बातमी लागताच तो वेळेवर येऊन पोहोचला आणि त्याने मोठ्या मर्दानगीने त्या सैन्यावर हल्ला करून कित्येकांना ठार केले व थोड्यांना जखमी करून पळवून लाविले. तात्पर्य तळास कोणतेही नुकसान पोहोचले नाही. या दिवशी शिरवळपासून आठ कोसांवर असलेल्या शिवापूर गावी सैन्याचा मुक्काम झाला. पुणे व शिवापूर यामधील डोंगराजवळ गराडे या ठिकाणी पुण्यास जाण्याचे दोन रस्ते फुटत असून प्रत्येक अतिशय अवघड होता . याठिकाणी बातमी लागली की , शत्रूसैन्य घाटाच्या तळाशी (५८१) एकत्र होऊन लढाईच्या तयारीने हत्यारांनी सुसज्ज होऊन उभे आहे . तेव्हा रस्ता करण्यासाठी व घाट उतरून जाण्याची सोय करण्यासाठी अमीरुल-उमराने शिवापूरला मुक्काम केला, तेथून शमसुद्दीनखानाला काही बेलदार व कुऱ्हाडे यांसह एका रस्त्याकडे पाठविले व सांगितले की , रस्ता पाहून तो जर जाण्यासारखा असेल तर चांगला तयार करावा . स्वतः दुसरा रस्ता पाहण्यास गेला आणि त्याने त्या डोंगराच्या आसपास चौक्या बसविल्या . हेतू हा की त्या चौक्यांच्या आश्रयाने दुसरा रस्ता शोधून काढावा . काही वेळानंतर बातमी आली की , त्या डोंगराच्या मध्यावर एक रस्ता आहे ; त्यासच दुरुस्त केल्यास गाडे सहज पलीकडे जाऊ शकतील . तेव्हा त्याने ताबडतोब आपल्या हाताखालच्या पंधराशे स्वारांसह काही बेलदार व कुऱ्हाडे यास पाठवून सांगितले की , त्यांनी रस्ता तयार करावा. त्याप्रमाणे ते मोठ्या प्रयत्नाने रस्ता तयार करण्यात गढून गेले व संध्याकाळ पावेतो सैन्यास जाण्याची सोय झाली . या दिवशी राजा रायसिंग कहीच्या व्यवस्थेकरिता गेला असता त्याजवर हल्ला करण्याकरता जवळ जवळ चार हजार शत्रूंचे स्वार धावले . राजाने आपल्या सैन्यास तवझूक करून हिमतीने त्यास दफे करण्याचा विचार केला ; पण ही बातमी अमीरुल-उमरा यास पूर्वीच लागल्यामुळे त्याने सर्फराजखानास कित्येक दक्षिणी व स्वतःचे हजार स्वार यांसह त्याच्या मदतीस पाठविले . ही टोळी यावेळी त्याच्या मदतीस आल्यामुळे शत्रूस त्यावर हल्ला करणे बरे न वाटून त्याने माघार घेतली. सारांश दुसरे दिवशी रस्ता तयार झाल्यावर अमीरुल-उमरा शिवापुराहून कूच करून मध्यान्ही घाटाच्या पायथ्यास आला आणि सर्व लष्कर घाट उतरून गेल्यावर ३ ॥ कोस (५८२) जाऊन गराडे गावी मुक्काम केला . राव भावसिंग यास पिछाडीच्या काही लोकांसह , बाकीच्या लष्कराने तळाचे घाट उतरून जावे अशी व्यवस्था करण्यासाठी घाटाच्या पायथ्याशी ठेविले होते. त्याप्रमाणे बादशाही लष्कर घाट उतरून गेल्यावर शत्रूचे तीन हजार स्वार घाटाच्या पायथ्याशी दिसू लागले व लढाईस तयार झाले . राव भावसिंगाने हिमतीने त्याजवर तुटून पडून व फळी फोडून त्यांची पांगापांग केली . शत्रूने एकत्र होऊन पुन्हा हल्ला चढविला . ही गोष्ट अमीरुल-उमरास माहीत होऊन त्याने पिछाडीच्या मदतीसाठी शमसुद्दीनखानास पाठविले होते; तो यावेळी तातडीने येऊन पोहोचला व त्याने शत्रूवर हल्ला चढविला . तेव्हा शत्रूस ठरणे शक्य न होऊन तो पळून गेला. दुसरे दिवशी सासवड येथे बादशाही सैन्याचा मुक्काम झाला . अमीरुल-उमरावाने तेथे पोहोचल्यावर आपल्या हाताखालच्या बर्कदाजांपैकी काहींना पुरंदर किल्ल्याखालची गावे उद्ध्वस्त करण्यासाठी पाठविले. हा किल्ला सिवाच्या उत्तम किल्ल्यांपैकी एक असून सासवडपासून दोन कोस अंतरावर होता. शत्रूस ही खबर लागून तो तीन हजार स्वारांसह या लोकांवर तुटून पडला . हे लोक जरी कमी होते व त्यांना मदत नव्हती तरी त्यांनी लढण्याची हिंमत धरली व गोळ्या सोडणे सुरू केले . बंदुकीची दारू, व मसाला संपल्यावर त्यांनी तलवारीस हात घातला व कापाकापीवर लक्ष दिले. पुष्कळ मारामारी झाल्यावर याचपैकी २४ लोक (५८३) यात ३।४ जमादार होते— मेले व २५ लोक जखमी झाले. शत्रूपैकी पुष्कळ लोक पडून जखमी झाले. अमीरुल-उमरास ही खबर लागताच त्याने राजा रायसिंग व राव भावसिंग यांस तळाच्या रक्षणासाठी ठेवून बाकीच्या लोकासंह तो स्वतः तातडीने त्या बाजूस गेला . शत्रूस या लष्कराशी लढण्याचे सामर्थ्य नसल्याने तो पळून गेला . तेव्हा अमीरुल-उमराने त्यांचा पुरंदरच्या पायथ्याशी असलेल्या पठारापर्यंत पाठलाग केला. आता किल्ल्यावरून लोकांनी गोळ्या व बाण टाकण्यास सुरुवात केली. म्हणून शमसुद्दीनखानाचे

काही लोक पठाराच्या खाली गेले. तेव्हा पायथ्याशी असलेल्या लोकांनी खानाचे लोक थोडे आहेत असे पाहून त्यावर हल्ला केला. शमसुद्दीनखानास लढाईचे स्फुरण चढले व किल्ल्याच्या बुरुजांवरून व बाऱ्यातून गोळ्यांचा भडिमार होत असतानाही पठारावरून किल्ल्याच्याखाली जाऊन शत्रूवर तो घसरला आणि कित्येकांना यमसदनास पाठवून बाकीच्यांना त्याने पळावयास लाविले. यावेळी दिवस मावळण्याची वेळ झाल्यामुळे व सैन्याचा तळ दोन कोस लांब राहिल्यामुळे अमीरुल-उमरावाने पाठलाग करावयाचे सोडून दिले व तो बुनग्याकडे परत गेला. दुसरे दिवशी कूच करून त्याने राजवाह (राजेवाडी?) येथे मुक्काम केला. यापुढे जाण्यास मोठी टेकडी आडवी होती व (५८४) रस्ता करणे जरूर होते. त्याचप्रमाणे यावेळी बातमी आली की, शत्रूने पुणे व चाकण या बाजूस असलेल्या वैरणीस व धान्यास आग लावून देऊन आबादीचे नावही ठेवलेले नाही. याठिकाणी त्यास (अमीरुल-उमरास) धान्य व कही मिळत होती. रस्ता तयार होण्यास अवकाश होता तेव्हा काही सैन्याने बाहेर जाऊन काही रोजाची रसद मिळवावी म्हणून त्यान तेथे ४ मुक्काम केले. तारीख ७ **रमजानला** [श. १५८२ अधिक **ज्येष्ठ शुद्ध** ८, इ. १६६० मे ७.] कूच करून तो पठाराच्या माथ्यावर आला आणि पुष्कळ सैन्य व थोडा तळही पुढे गेल्यावर स्वतः पुढे चालू लागला. नंतर त्याने सरफझखान व जादूराय याबरोबर एक टोळी व स्वतःच्या हाताखालची फौज देऊन त्यास रस्त्यामध्ये जागजागी उभे राहून तळ डोंगर उतरून जात असता त्याचे शत्रूच्या हात मारण्यापासून रक्षण करण्यास सांगितले. शत्रू संधी मिळताच धाडसाने पुढे येऊन या तळावर हात टाकण्याचे करीत होता व बादशाही सैन्य त्यास दफे करीत होते. शेवटी सर्व तळ डोंगर सुरक्षितपणे उतरला व त्याच्या पायथ्याशी मुक्काम करून राहिला. तेथून दोन मुक्कामाने तो पुण्यास आला.

अमीरुल-उमराने स्वतःच्या हाताखालचे एक हजार स्वार व दोन हजार बंदुखे स्वतःच्या नोकरांपैकी इस्माईल नावाच्या गृहस्थाच्या ताब्यात देऊन त्यास तळकोकण जप्त करण्यासाठी पाठविले होते. त्याविषयी खबर आली की, ते लोक तळकोकणात गेले. त्यांनी बहुतेक मुलुख ताब्यात आणिला आणि सलाबत नावाच्या दक्षिण्यास त्या विलायतेची फौजदारी व रक्षण हे काम दिले. आता अमीरुल-उमराने बाबाजी भोसले, दाखोजी (जाखोजी) व दुसरी टोळी यास त्याच्या कुमकेसाठी पाठविले. पावसाळा जवळ आल्याने तो घालविण्यासाठी पुण्यास (५८५) मुक्काम करण्याचे ठरविले आणि जवळ जवळ ४० दिवस तेथे मुक्काम केला. या मुदतीत पुष्कळ वेळा कहीमुळे बादशाही लष्करास शत्रूशी लढावे लागले. तसेच पातशाही मुलूख व हे गाव (पुणे) यामधील नद्या तुफान होऊन लष्करास रसद मिळविण्याचा मार्ग बंद झाल्यामुळे टंचाई उत्पन्न झाली. तेव्हा त्यास असे वाटू लागले की, आपण पुण्याहून कूच करून चाकणास जावे—कारण ते गाव व पातशाही मुलूख यामध्ये फक्त भिवरा नदी आहे व तेथे पातशाही लष्करास रसदही जास्त सुलभतेने मिळू शकेल—व बाकीचा पाऊस काळ तेथे मुक्काम करून घालवावा. तसेच पाऊस सरेपर्यंत लष्कर बेकार असल्यामुळे, त्याने चाकण किल्ला—हा त्या प्रदेशातील एक बळकट किल्ला असून तो घेणे हे मोहिमेतील एक जरुरीचे काम होते—हस्तगत करण्याचे ठरविले. या हेतूने पुण्याहून कूच करून तो २२ शव्वालला चाकणच्या गढीनजीक आला आणि त्या गढीचे बुरूज व तट, आसपासचा भाग वगैरे नीट पाहून ती घेण्याची त्याने हिंमत बांधली व लगेच मोर्चे लावून जमेतीची प्रत्येक बाजूस नेमणूक झाली. उत्तरेच्या बाजूस तो स्वतः व त्याचे शिपाई, गिरधर कुवर, वीरमदेव सीवादियह (सीसोदियह), हबशखान, त्रिंबकजी भोसले, दावाजी व इतर बादशाही सैन्य यांनी मोर्चे लाविले. पूर्वेच्या बाजूस—या बाजूला दरवाजा होता—शमसुद्दीनखान, मीर अब्दुल माबूद (तोफखान्याचा दारोगा), सय्यिद हसन, (५८६) उझबकखान, खुदावंद हबशी, दक्षिणेत नेमलेल्या त्याच्या फौजेसह राणा राजसिंगाचा नोकर बजयसिंग, सुलतान अली अरब अलायार बुखारी हे धमधमे (सीबाह) पुढे सारण्यात गढले. दक्षिणेच्या बाजूस राव भावसिंग सराफ, राझखान, जादूराय, जौहरखान हबशी व दक्षिण्यांपैकी कित्येक नेमले गेले. पश्चिमेच्या बाजूस राजा रायसिंग सीवादियह (सीसोदियह) व दुसऱ्या टोळ्या यांनी मोर्चे बांधून पुढे जाणे सुरू केले. हा किल्ला जिंकण्यासाठी दक्षिणेच्या किल्ल्यातून मोठ्या तोफा मागविल्या होत्या त्या आल्यामुळे अमीरुल-उमराने इशारा केला की, योग्य ठिकाणी घमेघमे रचून त्यावर त्या ठेवाव्या व योग्य ठिकाणी भुयारे खोदावी. शेवटी या सैन्याने गढीस वेढिले आणि ती घेण्याची हिंमत बांधली. यावेळी पावसाचा अगदी भर होता तरी रात्रंदिवस तोफा व बंदुका यांच्या साह्याने जोरात लढाई चालू झाली होती. दारूचे बाण बुरूज व तट यावरून बादशाही सैन्यावर एकसारखे येऊन पडत आणि बादशाही तोफा व बंदुका याचे गोळे वर व आत पडून शत्रुसैन्याचा नाश करीत. फुरसत मिळताच शत्रू किल्ल्याच्याबाहेर येऊन मोर्चावर गर्दी करी; व बादशाही तलवारीच्या माराने हतप्रभ होई. अशा तऱ्हेने छपन्न दिवस गेले. तेव्हा (५८७) अमीरुल-उमराच्या मोर्चेतील भुयारासमोरच्या बुरुजापर्यंत गेले आणि ता. १७ **जीहम जुलूस** ३ म्हणजे ता. ३ **शहरेवरला** [श. १५८२ **श्रावण वद्य** ४ इ. १६६० ऑगस्ट १४.) ते भुयार दारूने भरून त्याने ठरविले की सर्व लष्कर तयार होऊन बुरुज उडताच चोहोबाजूंनी किल्ल्यावर धावा करावा. दिवसाचा एक प्रहर राहताच त्याने इषारा केला व सुरुंगाची बत्ती लाविली. त्याबरोबर बुरूज उडाला व त्यावरील लोकही आकाशात फेकले गेले. हल्ला करण्यास वाट झाल्याने शायस्ताखानाने स्वतःच्या मोर्चापुढे असलेल्या दमदम्यावर येऊन बादशाही व आपल्या लोकास हल्ला करण्यास चेताविले. बादशाही सैन्याने बादशाही सुदैवावर हवाला ठेवून व ईश्वरी रक्षणाची ढाल डोक्यावर धरून एकदम किल्ल्यावर धावा केला व प्रयत्नांची शिकस्त केली. विशेषतः शमसुद्दीनखान व राव भावसिंग यांनी विशेष श्रम घेतले; बुरुजामागे मातीची उंच भिंत असल्याने शत्रू तीवर येऊन मारगिरी करू लागला व अर्थात् बाण, गोळे, हुक्के, दगड मारण्यात गढून गेला. बादशाही लष्करास त्यादिशीव पुढे जाणे व भिंत चढणे शक्य झाले नाही. अशा स्थितीतच दिवस मावळून रात्र पडली. पण बादशाही लष्करास (५८८) माघार घेण्याची लाज वाटून त्यांपैकी बहुतेकांनी ती रात्र तेथेच काढली. दुसरे दिवशी सूर्य उगवल्यावर त्यांनी तयारीनिशी किल्ल्यावर धावा केला. बादशाही लोक सुदैवाने किल्ल्यात शिरले व त्यांनी तो काबीज केला. कित्येकांना त्यांनी यमसदनास पाठविले व बाकीचे बालेकिल्ल्यास आश्रयास गेले. या दोन हल्ल्यांत २६८ लोक मेले व ६०० लोक जखमी झाले. शत्रूस बालेकिल्ला ताब्यात ठेवणे शक्तीच्या बाहेर वाटून त्यांनी सुरक्षण मागितले आणि भावसिंगाच्या मध्यस्थीने येऊन अमीरुल-उमराची गाठ घेतली व किल्ला हवाली केला. नंतर अमीरुल-उमराने किल्ल्यास येऊन बुरूज, तट, तोफखाना व सामग्री यांची पाहणी केली आणि त्याचा बंदोबस्त व डागडुजी यांकडे लक्ष दिले. नंतर दखनला कुमक करण्यापैकी एक ऊझबकखान यास बादशहाकडून त्या किल्ल्याच्या रक्षणावर नेमले असल्यामुळे त्यास कित्येक शिपाई व चांगला तोफखाना यांसह तेथे ठेविले. काही दिवसांनी तो लष्करासह तेथून कूच करून सीवास तंबी देण्यासाठी व त्याच्या विलायतेतील बाकीचे किल्ले घेण्यासाठी पुण्यास रवाना झाला. या किल्ल्यास बादशाही हुकूमाप्रमाणे (५८९) इस्लामाबाद हे नाव मिळाले. यापुढे दक्षिणेस जे घडले ते त्या स्थळी सांगण्यात येईल..... (५९०) माळव्याचा सुभेदार जाफरखान यास हुकूम सादर झाला की, त्यांनी आपल्या लोकांपैकी थोडेसे तेथे ठेवून बाकीच्यांसह अमीरुल-उमराच्या कुमकेसाठी दक्षिणेत जावे आणि बादशाही चाकरी, त्यास करावयाची मदत यात प्रगत असावे [ही हकीकत ता. १८ **सफर** ब १२ **रबिलावल** जु. ३ म्हणजे श. १५८२ **अश्विन वद्य** ५ व **कार्तिक शुद्ध** १५ किंवा इ. १६६० आक्टोबर १३ व नोव्हेबर ६ यांमधील आहे.] (**शि. वृत्तसंग्रह** खंड ३, **आलमगीरनामा**, २०—२६).]

अनुक्रमणिका

(१२) शिवाजीने सुरतेची केलेली पहिली लूट

सुरतेचे वर्णन

वरीलप्रमाणे औरंगाबाद येथे सुभेदारांच्या अदलाबदलीचे काम चालले असताना शिवाजीने याहीपेक्षा मनाला थक्क करून सोडणारे अचाट कृत्य केले . ते म्हणजे मोगल साम्राजातील धनाढ्य म्हणून नावाजल्या गेलेल्या सुरत या बंदरगावाची त्याने जानेवारी ६ ते १० पर्यंत केलेली लूट हे होय . त्या काळी गावाचे रक्षण करील अशी तटबंदी सुरतेला नव्हती . सुरतेची संपत्ती अमोज होती. केवळ शाही जकातीच्या उत्पन्नाचे वर्षाला १२ लक्ष रुपये वसूल होत असत.

सुरत शहराचा विस्तार तेथील बागबगीचे आणि मोकळी जागा धरून जवळजवळ चार चौरस मैल एवढा होता आणि सुरतेची लोकसंख्या २ ,००,००० एवढी होती. सुरतेचे रस्ते अरुंद आणि वेडेवाकडे होते . परंतु शहरामध्ये मुख्यतः गरीब लोकांच्याच झोपड्या अधिक होत्या . लाकडाचे खांब, बांबूच्या कामट्यांच्या भिंती आणि चिखलाने सारवलेल्या जमिनी अशी या झोपड्यांची बांधणी होती . "शहराच्या बहुतेक भागांत क्वचित् रस्त्यावर दोन किंवा तीन विटांनी बांधलेली घरे आढळून येत आणि काही भागांत अनेक रस्ते मिळून असे एखादेच घर दृष्टोपत्तीस पडे."

मंगळवार तारीख ५ जानेवारी १६६४ या दिवशी उजाडता उजाडता शिवाजी हा आपल्या फौजेला घेऊन सुरतेच्या दक्षिणेला २८ मैलांवर असलेल्या गंडावी या गावी येऊन ठेपला आहे आणि शहर लुटण्यासाठी तो पुढे चाल करून येत आहे या बातमीने सुरत शहरात घबराटीचे एकच वातावरण पसरले . लोकांची एकदम घाबरगुंडी उडाली आणि आपला जीव बचावण्यासाठी म्हणून आपल्या बायकांना आणि मुलाबाळांना घेऊन त्यांनी नदी ओलांडून पलीकडे पळ काढण्यास सुरुवात केली . किल्ल्याच्या किल्लेदाराला लाच देऊन श्रीमंत लोकांनी किल्ल्याचा आश्रय घेतला शहराचा सुभेदार इनायतखान हा होता. किल्ल्याच्या किल्लेदाराहून हा इनायतखान अगदी वेगळा होता . त्याने शत्रूच्या तलवारीला शहराचा बळी दिला आणि त्याने स्वतः किल्ल्यात पळ काढला . तो खजिन्यातून ५०० स्वारांच्या मनसबीच्या रकमेची उचल करीत असे परंतु आतापर्यंत त्याने त्याप्रमाणे फौजफाट्याची योग्य तरतूद न करता सगळा पैसा गडप केला होता. त्याच्या भित्रेपणामुळे शत्रूविरुद्ध संरक्षणाची तजवीज करणे किंवा शत्रूविरूद्ध लढता लढता धारातिर्थी पतन पावणे त्याच्याने होऊ शकले नाही. सुरतेतील इंग्रज आणि डच व्यापाऱ्यांच्या वखारी म्हणजे तर असंरक्षित घरे होती आणि हल्ल्याचा प्रतिकार करण्याचे त्यांच्यात सामर्थ्य नव्हते तरी देखील पडेल ती किंमत देऊन त्यांनी आपापल्या वखारी लढविण्याचा निर्धार केला.

बुधवार तारीख ६ जानेवारी १६६४ या दिवशी सकाळी अकरा वाजता शिवाजी सुरतेला येऊन पोहोचला. त्याने आपली छावणी शहराच्या बुरहानपूर अथवा पूर्वदरवाजापासून पाव मैलावर असलेल्या एका बागेत ठोकली. यानंतर लागलीच मराठा घोडेस्वार असंरक्षित आणि जवळ जवळ ओसाड पडलेल्या सुरत शहरात घुसले . त्यांनी तेथील घरादारांची लुटालूट करून त्यांना आगी लावण्यास सुरुवात केली . बुधवार, गुरुवार, शुक्रवार आणि शनिवार हे चारही दिवस नासधुसींचे सत्र सातत्याने चालू होते . दररोज नवीन नवीन ठिकाणी आगी लावल्या जात होत्या. या आगीच्या कल्लोळात हजारो घरे भस्मसात झाली आणि जवळ जवळ दोन -तृतीयांश शहराची धुळदाण उडाली . डच वखारी जवळच बहर्जी बोहरा याचा भव्य प्रासाद उभा होता. बहर्जी बोहराची जगातला श्रीमान व्यापारी म्हणून कीर्ती होती . त्याची संपत्ती ८० लाख

रुपये असावी असा अंदाज केला जात असे . मराठ्यांनी शुक्रवारी संध्याकाळपर्यंत रात्रंदिवस संथपणे त्याच्या मालमत्तेची लुटालूट केली. त्याच्या मालमत्तेचा पूर्णपणे विध्वंस केल्यावर आणि त्याच्या प्रासादाच्या जमिनी खणून काढल्यावर त्याला त्यांनी आग लावून दिली . इंग्रजांच्या वखारीच्या अगदी नजीकच दुसऱ्या एका श्रीमंत व्यापाऱ्याचे भव्य निवासस्थान आणि प्रचंड गुदामे होती . त्याचे नाव हाजी सैद बेग . हा देखील आपल्या मालमत्तेच्या रक्षणाची व्यवस्था न करता किल्ल्यात पळून गेला होता . बुधवारची सबंध दुपार आणि रात्र आणि गुरुवारची मध्यान्ह होईपर्यंत सैद बेगच्या प्रासादाची दारे उखडण्याचे आणि तिजोऱ्या फोडण्याचे आणि नेता येईल तेवढे द्रव्य वाहून नेण्याचे काम मराठ्यांनी अखंड चालू ठेवले होते . परंतु गुरुवारी दुपारी इंग्रजांनी रस्त्यावर अचानक हल्ला चढविल्यामुळे त्या चोरांनी घाबरून घाईघाईने काढता पाय घेतला होता . दुसऱ्या दिवशी इंग्रज व्यापाऱ्यांनी सैद बेगच्या घरावर आपला पहारा बसविला आणि म्हणून त्यानंतर त्याच्या मालमत्तेचे काहीही नुकसान झाले नाही . सुरतेच्या लुटीत शिवाजीला १ कोट रुपयांच्या वर संपत्ती मिळाली.

शिवाजीच्या खुनाचा प्रयत्न

मंगळवारी रात्रीच शहराचा भ्याड सुभेदार इनायतखान हा किल्ल्यात पळून गेला होता . किल्ल्याच्या सुरक्षित आसऱ्यामधून त्याने एका हलकट बेताची योजना केली . गुरुवारी रात्री त्याने आपल्या एका तरुण अनुचराला शिवाजीकडे तहाच्या वाटाघाटी करण्याच्या मिषाने परंतु प्रत्यक्ष भेटीत त्याला ठार करण्याच्या हेतूने पाठविले . परंतु शिवाजीच्या पुढे हातात नंगी तलवार घेऊन उभ्या असलेल्या त्याच्या शरीर रक्षकाने तलवारीच्या एका घावाबरोबर खुन्याचा हात कलम केला . परंतु खुनी माणसाने शिवाजीवर इतक्या जोराने धडक मारली होती की हात तुटला तरी न थांबता आपल्या रक्तबंबाळ थोट्या हाताने तो शिवाजीच्या अंगावर आदळला आणि दोघेजण एकदमच जमिनीवर कोसळले . रविवार तारीख १० रोजी सकाळी १० वाजता शहराच्या मदतीसाठी मोगलांची फौज येत असल्याची बातमी ऐकल्यावर शिवाजीने आपल्या सेनेसह अचानक सुरतेमधून प्रयाण केले.

शिवाजीने सुरतेवर केलेल्या हल्ल्यात ज्या ज्या नागरिकांचे नुकसान झाले होते त्यांना सहानुभूती म्हणून औरंगजेबाने सुरतेमधील सर्व व्यापाऱ्यांबाबत एक वर्षापुरती जकात माफ केली . इंग्रज आणि डच व्यापाऱ्यांनी दाखविलेल्या शौर्याबद्दल बक्षीस म्हणून बादशहाने त्यांच्या त्यापुढील आयात मालावरील नेहमी वसूल करण्यात येणाऱ्या करामध्ये एक टक्का सूट दिली.

शायस्ताखानाचे दक्षिणेमधून प्रयाण आणि जयसिंगाचे आगमन यामधल्या एका वर्षाच्या कालावधीत – इ. स. १६६४ – मोगलांना कुठेच विजय मिळाला नाही. दक्षिणेचा नवा सुभेदार म्हणून राजपुत्र मुआज्जम याची नेमणूक झाली होती . त्याचा मुक्काम औरंगाबादेस होता . त्याने ख्यालीखुशालीत आणि शिकारीत आपला वेळ घालविला. [राजा जयसिंघ याच्या दक्षिणेवरील स्वारीची हकीकत खाफीखानाने पुढीलप्रमाणे दिली आहे.

राजा जयसिंघ सीवाचा नाश करण्याच्या कामावर रुजू होऊन त्याने ता . १ ला औरंगाबादेस बादशाहझादा मुहम्मद मुअज्जम याची भेट घेतली व तेथून तो पुण्यास गेला. नंतर त्या प्रदेशाचा बंदोबस्त करण्यास सुरुवात करून सर्व सैन्यास ठिकठिकाणी मुलूख उद्ध्वस्त करण्यासाठी व किल्ले ताब्यात घेण्यासाठी पाठविले . नंतर स्वतः पूनंधर (पुरंधर) व रुदमाल (रुद्रमाळ) किल्ले (१७९) हे निजामुल्मुलकी किल्ल्यांपैकी प्रसिद्ध –– हल्ली सीवाचे अधिकारी असलेले व एकमेकांजवळ असे होते –घेण्यासाठी रवाना झाला . दिलेरखानास सैन्याची आघाडी दिली . दिलेरखान आजूबाजूस प्रकट होणाऱ्या शत्रूच्या फौजेशी लढत जात होता . त्यामुळे काफिरांची पुष्कळ माणसे, पैसा, बायकामुले मरत व गाझीच्या हाती लागत. शेवटी खान दोन किल्ल्यांच्या जवळ व मध्ये एका गोळ्याच्या अंतराइतका पुढे आला व किल्ले काबीज करण्याच्या मागे लागला . यामुळे दोन्ही गडावरील लोक वेढले जाऊन त्यांनी तोफा , बाण, इतर अग्नीची आयुधे व इत्यादींचा मारा करून किल्लेदारीच्या कर्तव्यात प्रगती केली . वेढा घातल्यावर राजा येण्यापूर्वीच अफगाणांनी एकदम हल्ला करून ते डोंगराच्या मध्यापर्यंत (माचीपर्यंत) पोचले आणि किल्ल्याच्या पायथ्याशी

असलेल्या वाडीला त्यांनी आग लावली व ती उद्ध्वस्त करून टाकली . बंडखोरांनी किल्ल्यावरून धावून येणे , मोर्चावर घसरणे , तसेच किल्ल्यावरून तोफा डागणे , घोडे सोडणे वगैरेत कमी केले नाही . राजा जयसिंघ स्वतः आपला मुलगा कैसरसिंघ यासह येऊन वेढ्याच्या बाजूस हल्ले व चारी बाजू उद्ध्वस्त करीत होता . यामुळे वेढलेल्यांची कठीण स्थिती होऊन गेली . हे तोफा, बंदुका, हुक्के याचा मारा करून मोर्चे पुढे नेत होते. एकदा दारूने एका बाजूचा बुरूज उडवून दिल्यावर त्यावरील लोक खाली पडले . बहादर लगट करून किल्ल्यावर चढले. तेव्हा गडकऱ्यांनी अमान मागितले. राजा व दिलेरखान यांनी ते दिल्यावर दोन्ही किल्ल्यांवरील लोकांनी पुढे येऊन दिलेरखानाची भेट घेतली . खानाने दोन्ही (१८०) किल्लेदारास राजाकडे पाठविले. राजाने सर्वांची हत्यारे काढून घेऊन किल्ले कब्जात घेतले . या प्रसंगात पादशाही ८० स्वार व पुष्कळ प्यादे कामास आले आणि १०० हून जास्त लोक जखमी झाले.

दोन्ही किल्ले घेतल्यावर सात हजार स्वार दाऊदखान, राजा रायसिंध व इतर यांच्या हाताखाली देऊन त्यांनी सीवाची समृद्ध विलायत— ही त्याने बंद करून आपल्या ताब्यात आणिली होती— उद्ध्वस्त करण्यासाठी पाठविले. दोन्ही बाजूंनी खूप प्रयत्न झाले . पाच महिन्यांपर्यंत शाही सैन्य लढाया देण्याचा प्रयत्न अविश्रांत करत होते . शेवटी सीवाने वसविलेले सीवापूर आणि कोंढाणा व कुवारी हे दोन गड या ठिकाणी आबादीचा मागमूसही न ठेवता अपरिमित गुरेढोरे सैन्याने हस्तगत केली. सीवाच्या बाजूनेही अस्कमात हल्ले, विलक्षण विजय, रात्रीचे छापे, रस्ते व घाट रोखून बसणे, दाट झाडीच्या जंगलांना आगी लावून देणे , या गोष्टींनी शाही सैन्य बेजार होऊन त्यांची पुष्कळ माणसे व जनावरे नाश पावली . शत्रूचाही पुष्कळ नाश होऊन तो पळू लागला होता . सीवा राहात असलेला राजगड आणि बायकामुले व आईकडील माणसे राहात असलेला कोंढाणा या दोन्ही गडांना शाही सैन्याने वेढा घालून तेथील शिबंदीवर जोर केला . सर्व बाजूंचे रस्ते बंद केले गेले . तेव्हा सीवाच्या लक्षात आले की , आपण कितीही इच्छिले तरी मुलामाणसांना सुरक्षित ठिकाणी नेऊ शकत नाही . (१८१) त्याच्या हेही ध्यानात आले की , हे दोन गड बादशाहाच्या ताब्यात गेले तर आपल्या दुष्कृत्याचा दुष्परिणाम आपल्याच कुटुंबाला भोगावा लागेल . म्हणून त्याने काही बुद्धिमान लोकांना पाठवून अपराधाची क्षमा मागणे, त्याच्या ताब्यातील कित्येक गड हवाली करण्याचे वचन देणे , राजास भेटणे, या बाबतीत विनंती केली . राजास त्याची लुच्चेगिरी व कपट नीट माहीत असल्यामुळे त्याने जास्त जोराने हल्ले चढविण्यास हुकूम दिले . शेवटी बातमी आली की , सीवा सड्याने बाहेर पडला आहे . आता त्याजकडून काही विश्वस्त ब्राह्मण आले व त्यांनी शरणागती व पश्चात्ताप यांच्या बोलण्यास गंभीर शपथा घेऊन बळकटी आणली.

राजाने त्यास प्राण व अब्रू यांच्या रक्षणाचे वचन दिले . मात्र त्याने बादशहाचे दर्शन घेऊन त्याच्या नोकरीत शिरले पाहिजे अशी अट घातली. त्याने त्यास मोठी मनसब देण्याचे कबूल करून त्याचे योग्य स्वागत करण्याची तयारी केली . नंतर सीवा अतिशय नम्रतेने आला . राजाने आपला मुनशी त्याचे स्वागतासाठी व काही हत्यारी रजपूत विश्वासघात करू नये म्हणून पाठविले . मुनशीने जाऊन सांगितले की , सीवा सरळपणे शरण येईल, आपले किल्ले बादशाही कब्जात देईल आणि आज्ञाधारकता दाखविण्याचे कबूल करील तर क्षमायाचनेचा अर्ज बादशहा मंजूर करतील . पण या अटी कबूल नसतील तर त्याने परत जाऊन पुन्हा युद्धाची तयारी करावी . हा निरोप पोहोचल्यावर सीवा म्हणाला की, शरण गेल्यावर प्राण व लज्जा सुरक्षित राहतील हे मला समजले आहे. पुढे राजाने उच्चतर दर्जाचा मनुष्य त्यास आत आणण्यासाठी पाठविला.

सीवा आत येताच राजाने त्यास उठून आलिंगिले व आपल्याजवळ बसविले . (१८२) यावेळी सीवाने सहस्रगुणे लज्जित होऊन व हात जोडून म्हटले, 'मी अपराधी गुलाम बनून क्षमा मागण्यास आलो आहे. आता मला क्षमा किंवा ठार करणे आपल्या मर्जीवर आहे. मी माझे मोठे किल्ले व कोकणशाही अधिकाऱ्याच्या हवाली करतो आणि माझ्या मुलास बादशाही चाकरीस पाठवितो. स्वतःविषयी मला आशा आहे की, मी बादशहाचे दर्शन घेऊन आल्यावर म्हणजे एक वर्षाने राज्यातील इतर नोकर आपल्या मुलखात अधिकार चालवितात त्याप्रमाणे कुटुंबासह एक-दोन लहान किल्ल्यात मला राहावयास मिळेल . बोलवाल तेथे व तेव्हा मी निष्ठेने चाकरी बजावीन .' नंतर राजाने त्याचे समाधान करून त्यास दिलेरखानाकडे धाडले.

यामुळे किल्ल्यांच्या वेढ्याचे काम तहकूब करण्यास सांगितल्यावर तेथील सात हजार पुरुष , स्त्रिया व मुले खाली उतरली आणि त्यांना नेता येण्यासारखे नव्हते ते सामान व गड बादशाही कब्जात आले . दिलेरखानाने आतापर्यंत बिनहत्यारी असलेल्या सीवास समशेर , जडावाची जमघर व सोन्याच्या साजाचे दोन अरबी घोडे नजर केले . नंतर त्याने राजाकडे येऊन त्याचा हात राजाच्या हातात दिला . राजाने त्यास पोशाख , घोडा, जिगा, हत्ती ही बक्षिसे व पुन्हा प्राण लज्जारक्षणाची हमी देऊन समाधानी केले . सीवाने लीलेने तलवार कमरेत लटकविली व एकनिष्ठ चाकरी करण्याचे वचन दिले . सीवाशी विरोध बंद करून सरळ होण्याची वाटाघाट चालू असता (१८३) राजाने बादशाहास त्याजसाठी क्षमेचा फर्मान व पोषाख पाठविण्याबद्दल लिहिले होते . त्यांची तो वाट पाहात होता . याचवेळी बादशाही गुर्जबर्दार फर्मान व पोषाख घेऊन आले . राजाने सीवास त्याचे स्वागत करून तसलीमात कशी करावयाची हे शिकविले. सीवा त्याप्रमाणे तीन कोस अनवाणी स्वागतासाठी गेला आणि तो देण्याच्या बाबतीत बरीच वाटाघाट झाल्यावर असे ठरले की , त्याने स्वतःच्या ताब्यात असलेल्या ३५ किल्ल्यांपैकी २३ गड व त्या भोवतालची १० लाख होनाची अर्थात् चाळीस लाख रुपये वसुलाची विलायत बादशाही कब्जात द्यावी आणि १२ लहान किल्ले व थोडा वसूल त्याचे ताब्यात राहावे . राजा जयसिंघाच्या विनंतीवरून सीवाचा आठ वर्षांचा मुलगा संभा यास पाच हजारी मनसब मिळाली व त्याने हुजूरकडे रवाना होईपर्यंत योग्य फौजेसह राजाबरोबर चाकरी करावी , सीवाने स्वतः कुटुंबासह डोंगरात राहून , वैराण झालेला स्वतःचा मुलूख आबाद करण्याचा प्रयत्न करावा व चाकरीसाठी बोलवितील तेव्हा हजर व्हावे असे ठरले . निरोप येते वेळी त्यास पुन्हा पोशाख , घोडा, जिगा, समशेर व हत्ती देऊन कमरेस तलवार बांधविली व त्याच्या मुलास पाच हजारी मनसबीची तसलीम करण्यास सांगितले.

(**शि. च. वृ. सं.**, खंड ३, **मुन्तखाबुल्लुबाब**, ७०—७३)]

[जयसिंगाच्या शिवाजीवरील स्वारीची हकीकत आलमगीर नाम्यात पुढीलप्रमाणे दिली आहे :

(८६६) याने (सीवाने) आपल्या विलायतेमध्ये उत्तम किल्ले व गढ्या करून आणि हीन दर्जाचे व दक्षिणी लोक जमवून बळ धरिले होते ;

त्या भागात तो स्थिर झाला होता ; विध्वंस व चोरी यायोगे त्याने गोंधळ उडविला होता ; याचा मुलूख समुद्रकिनाऱ्याच्या जवळ असल्याने त्याच्या ताब्यात काही बंदरे होती. (८६७) मलबारी लोकाप्रमाणे जलप्रवाशांच्या चोऱ्या व वाटमारी करून त्याने आपले हीनकुलत्व प्रकट केले होते . जेव्हा केव्हा एखादे जहाज तुफानामुळे त्याच्या बंदरात येई तेव्हा त्यावरील सर्व चीजवस्तू व ते जहाजही तो आपल्या ताब्यात घेई . यावेळी तर निश्चित समजले होते की , एक मोठे पुष्कळ मालाने भरलेले जहाज तुफानामुळे त्याच्या हाती लागले असता त्यातील सामान ताब्यात घेऊन त्याच्या मालकांना हे—बहुतेक सर्व मुसलमान होते— याने कैद केले. नंतर त्यांना त्रास देऊन तो जास्त पैसा मागू लागला व त्यासाठी पुष्कळ काळापर्यंत त्यास हैराण केले. तेव्हा ज्यापैकी त्यांच्या घरी माया होती त्यांनी सर्व पैसा मागवून त्यास दिला व सुटका करून घेतली.

महाराजा जसवंतसिंघाची सैन्यासह याला नाहीसा करण्यावर नेमणूक झाली होती . त्याप्रमाणे त्याच्या विलायतेत जाऊन काही दिवस त्याच्या कित्येक किल्ल्यांना वेढा घालण्यात त्याने खर्च केले ; तसेच ते घेऊन त्याचा मुलूख खराब करावा म्हणून पुष्कळ प्रयत्न केला ; तरी त्यामुळे बादशाही इच्छा पूर्ण झाली नाही . कारण त्याचा एकही किल्ला हस्तगत झाला नाही व मोहीम मात्र लांबत चालली . तेव्हा बादशाहाने बेत केला की , एका सरदारास (८६८) ताजे सैन्य व पोक्त सामान देऊन त्यास (सीवाला) दफे करण्यासाठी पाठवावे आणि महाराजा जसवंतसिंघाला परत हुजूर बोलवावे. या बाबतीत राजा जयसिंघ युक्ती , लष्कराची जमेत पुष्कळ सामान यायोगे सरदारीस व सरलष्करीस योग्य वाटल्यामुळे त्याजबरोबर दिलेरखान, दाऊदखान, राजा रायसिंघ सीसोदियह , इहतशामखान, शेखझादा, कुबादखान, सुजानसिंघ बुंदेला , कीरतसिंघ, मुल्ला याह्या नायतह, राजा नरसिंघ गोर, पूरणमल बुंदेला, झबरदस्तखान, बादिलबख्तियार, बर्कन्दाझखान वगैरेंसारखे उमराव व योध्दे तोफखाना व लढाईत इतर सामान— हे सर्व सुमारे चौदा हजार झाले— देऊन त्याची या कामी योजना केली आणि त्याने सौर वाढदिवशी [श. १५८६ **आश्विन वद्य** ५ इ. १६६४ सप्टेंबर ३०.] त्या बाजूस रवाना व्हावे म्हणून फर्माविले . तसेच वतनावर गेलेल्या दिलेरखान, इहतशामखान वगैरेंना हुकूम सुटले की , त्यांनी तेथून परस्पर रवाना होऊन राजास मिळावे.

(८८७) या प्रसंगाचे वर्णनास राजा जयसिंघ बादशाही सैन्यासह मागे सांगितल्याप्रमाणे , गेल्या साल ७ **जुलूसच्या** १९ **रबिलावलाल** [श. १५८६ **आश्विन वद्य** ५, इ. १६६४ सप्टेंबर ३० .] बादशहाकडून सीवाला दफे करण्यासाठी नेमला गेला एथपासून सुरुवात होते . जयसिंघाने त्या सालच्या ता. ४ **शाबानला** [श. १५८६ **फाल्गुन शुद्ध** ५, इ. स. १६६५ फेब्रुवारी १०.] औरंगाबादेस आपल्या सोबत्यांसह येऊन बादशहाझादा मुहम्मद मुअज्जम याची भेट घेतली. ता. ८ माहे मजकूरला [**फाल्गुन शुद्ध**, फेब्रुवारी १४.] त्याची परवानगी घेऊन (८८८) तो इच्छित बाजूस रवाना झाला व ता. २५ ला [**फाल्गुन वद्य** १२, मार्च ३.] पुण्यास—येथे महाराजा जसवंतसिंघ बादशाही फौजेसह होता —पोहोचला. तेव्हा महाराजाने फर्माप्रमाणे या मोहिमेची सूत्रे त्याजकडे देऊन दरगाहाकडे प्रयाण केले . तो उमराव काही दिवस पुण्यास घालवून ती बाजू सर करण्यात व ठाणी बसविण्यात गर्क झाला. त्याच वेळी त्याने कुत्बुद्दीनखानास ७००० स्वारांसह जुन्नरच्या बाजूस पाठविले . हेतू हा की, त्याने त्या बाजूस राहून शत्रूविषयी खबरदार असावे. तसेच त्याने असे ठरविले की लोहगडाच्या समोर एखाद्या योग्य जागी ठाणे बसवून तेथे तीन हजार स्वार ठेवावे ; नारदुर्गारच्या समोर दुसरे ठाणे बसवून तेथेही योग्य फौज ठेवावी आणि स्वतः बाकीच्या सैन्यासह हमेशा त्या बाजूस हिंडून हुशारीने राहावे अशाच तऱ्हेने त्याने जेथे जेथे बंडखोरांचा जोर होता तेथे तेथे काही सैन्य नेमिले . पुढे त्याने सीवाच्या उत्कृष्ट किल्ल्यांपैकी पुरंधर व रुदमाळ हे गड घेण्याची हिम्मत धरून त्या इच्छेने त्या सालच्या ता. ७ **रमजानला** [श. १५८७ **चैत्र शुद्ध** ९, इ. स. १६६५ मार्च १५.] पुण्याहून सासवड तर्फेस —याच्या जवळच्या डोंगरावर हें दोन किल्ले आहेत —कूच केले . मात्र इहतशामखानाला पुणे ताब्यात ठेवून त्याच्या रक्षणासाठी तेथेच राहविले आणि रनदौलतखान , बीरमदेव सीसोदीयह, झाहिदखान, जाननिसारखान खाजा अबुल -मकारिम व इतर कित्येक ——हे सर्व मिळून चार हजार स्वार झाले —यास त्याच्याबरोबर दिले. लोणी हे (८८९) गाव पुण्यापासून पाच कोसांवर सासवडच्या बाजूस आणि पुरंधरच्या समोर असून त्या डोंगरातून बादशाही मुलुखात जाणारे दोन रस्ते येथे येत होते व हे शत्रूने आपल्या ताब्यात ठेविले होते ?—येथे पोहोचल्यावर त्याने राया व हनवंतराव यांस तीनशे स्वार व तीनशे बंदुकवाले प्यादे यांसह तेथील ठाणेदारी दिली. नंतर ता. २२ माहे मजकूरला [श. १५८७ **चैत्र वद्य** ९, इ. स. १६६५ मार्च ३०.] सासवडपासून एका मजलेवर आला आणि सैन्याच्या आघाडीस असलेल्या दिलेरखानास आघाडीची फौज व तोफखाना यांसह पुढे पाठविले . हेतू हा की , त्याने रस्त्याच्या तोंडाशी असलेली खिंड उतरून सासवडजवळ मुक्काम करावा . नंतर तो स्वतःही इतर बादशाही सैन्यासह चालू लागला . खिंडीच्या तळाशी आल्यावर तेथे दाऊदखान यास ठेविले. हेतू हा की, सर्व लष्कर घाटी उतरून गेल्यावर त्याने रवाना व्हावे. मग स्वतः बरोबरच्या शिपायांसह खिंड उतरून गेला व दोन कोस जाऊन मुक्काम केला . पुढे आलेला दिलेरखान सासवडजवळ थांबला व मुक्कामासाठी चांगली जागा शोधू लागला . इतक्यात शत्रूची फौज येऊन हल्ला करू लागली . तेव्हा खानाने आपले सैन्य नीट लावून शत्रूवर उलट हल्ला चढविला . त्याशी लढण्याची ताकद आपणामध्ये नाही असे वाटून शत्रू वरील किल्ल्यांच्या डोंगरात पळाला ; पण तसे करता करता तो लढत मात्र होता. अर्थात् खानही लढत-लढत त्या डोंगराच्या पायथ्याशी आला. या हातघाईत शत्रूचे पुष्कळ लोक कामास आले, कित्येकांनी किल्ल्यांचा आश्रय केला व (८९०) बाकी रानोमाळ भटकू लागले. बादशाही लोक लढत डोंगरापर्यंत पोचले . एवढेच नव्हे तर डोंगराच्या मध्यभागी असलेल्या माचीस आग लावून किल्ल्यास वेढा घालण्याच्या बेताने ते आणखी पुढे गेले. दोन्ही किल्ल्यावरील शिबंदीने तोफा व बंदुका उडविणे आणि बाण मारणे सुरू करून लढाईस तोंड पाडले . दिलेरखान आपल्या सैन्यासह माघार घेईना . उलट किल्ल्याच्या पायाजवळ पोचून त्याने मोर्चे लावण्याची त्वरा केली व ही हकीकत राजा जयसिंघास कळविली. राजाने ताबडतोब आपला मुलगा किरतसिंघ , स्वतःच्या तीन हजार स्वारांसह आणि राया रायसिंघ , कुबादखान, मित्रसेन, इन्द्रमन बुंदेला, बादिल बख्तियार व इतर कित्येक यांची , दिलेरखानाकडे जाऊन दोन्ही किल्ल्यांच्या वेढ्याचा प्रयत्न करण्यासाठी नेमणूक केली . तसेच बेलदार आणि तोफखाना व मोर्चे यांचे सामानही पाठविले . दाऊदखानाला— यास राजाने खिंडीच्या तळाशी पिछाडीस म्हणून ठेविले होते— ही गोष्ट कळताच तो खिंड ओलांडून हुकूमाप्रमाणे परस्पर खानाच्या सैन्याकडे गेला व त्यास मिळाला . बादशाही सैन्याची साखळी जुळताच त्याने दोन्ही किल्ल्यांच्या वेढ्याची हिम्मत धरली व मोर्चे पक्के करण्यात सैन्य दंग झाले . दिलेरखानाने स्वतःचे शिपाई, गैरत व मुजफ्फर असे आपले पुतणे व इतर अफगाण उदेभान हरिभान कुंवर, यांसह माची ओलांडून पुरंधर व रुद्रमाळ यांमध्ये एके जागी मोर्चे घातले , तोफखान्यासह आतिशखान मीर आतिश, (८९१) तुर्कताजखान आणि राजा जयसिंघाच्या फौजेपैकी कित्येक , यांनी स्वतःच्या तळापुढे ठाण मांडले . कीरतसिंघ याने राजाचेच तीन हजार स्वार व इतर मनसबदारांचे कित्येक लोक यांसह पुरंधर किल्ल्याच्या दरवाजासमोर दमदमा केला . त्याच्या उजव्या हातास राजा नरसिंघ कुवर, करण राठोर जगतसिंघ नखरी आणि सय्यिद मक्बूल आलम यांनी मोर्चे कायम केले . दाऊदखान याने स्वतःचे सर्व लोक , राजा रायसिंघ राठोर, मुहम्मद सालिह तर्खान , रामसिंघ, सय्यिद झैनुल अबिदीन बुखारी , हुसेन दाऊदझई , शेरसिंघ राठोड , राजसिंघ कुवर आणि काही

पादशाही बंदे यांसह पुरंधर किल्ल्याच्या पाठीमागे खडकी समोर एके ठिकाणी मोर्चे लाविले . रसुलबेग रोझाथानाने आणखी कित्येक रोझथान्यांसह दाऊदखानाच्या उजवीकडे ठाण मांडिले . चतुर्भुज चव्हाणाने दिलेरखानाच्या थोड्या शिपायांसह , रुद्रमाळ किल्ल्याच्या समोर आणि मित्रसेन व इन्द्रमन बुंदेला व आणखी काही यांनी त्या किल्ल्याच्या मागे मोर्चे लाविले . राजाने दुसरे दिवशी कूच करून सासवड गाठले , किल्ल्यापासून दोन कोसांवर लष्कराचा तळ दिला व स्वतः थोड्या लोकांनिशी किल्ल्याच्या पायथ्याशी जाऊन दमदमे , उठाव, प्रगती वगैरेंची व्यवस्था पाहून माघार आला. यावेळी जासुदांनी बातमी आणली की , सीवाच्या जवळचा (नातलग) व घोडेस्वारांचा सेनापती नेतू फौज घेऊन परिंड्याकडे धावून गेला आहे. तेव्हा राजाने सय्यिद मुनव्वरखान बार्हा याला शर्झेखान , हसनखान, जौहरखान, जगतसिंघ व इतर पादशाही चाकर – हे सप्याच्या ठाण्यांत होते– यांसह त्याचा पाठलाग व त्यास सजा करण्यासाठीं पाठविले . ही फौज परिंड्यापर्यंत गेली . पण शत्रू त्यांचे आगमन ऐकून पळून गेल्यामुळे परत आली. (८९२) पुण्याचा ठाणेदार इहतशामखान– ज्यास हुजूरकडे माहिती देण्याचे काम दिले होते– हा मेला तेव्हा राजाने त्याचे जागी ता. ३ **शव्वालला** [श. १५८७ **वैशाख शुद्ध** ४, इ. १६६५ एप्रिल ९.] कुबादखान यास नेमिले आणि तेथून कूच करून डोंगराच्या तळाशी जेथे मोर्चे लाविले होते तेथे आला. लष्कराने सर्व डेरे माचीवर दिले होते . यामुळे अहोरात्र तोफा व बंदुका यांच्या साहाय्याने लढाई होत असे . तसेच त्या गडावरील शत्रूचे लोक यांना दफे करण्याची फार खटपट करीत . राजा स्वतः रोज मोर्चावर जाऊन नीट ताकीद व व्यवस्था करी . रुद्रमाळ किल्ल्याचा एक बुरूज त्यावर होणाऱ्या तोफांच्या माऱ्याने मोडला व पडला . यामुळे दिलेरखानास आपल्या शिपायांसह त्यावर हल्ला करण्याचे स्फुरण चढले . तेव्हा ता. ६ **शव्वालला** [श. १५८७ **वैशाख शुद्ध** ७, इ. १६६५ एप्रिल १२ .] तो मोठ्या हिमतीने हल्ला करून त्याच्या माथ्यावर चढला असता त्याच्या रक्षणास असलेल्या शत्रूचे लोकांस तेथेच गाडून राहण्याची धमक न राहून ते बुरूजासमोर असलेल्या आसऱ्याच्या जागेस गेले . यांनी बुरुजावर आपले निशाण लाविले व हे तो बळकट करण्याचे मागे लागले . या हल्ल्यात दिलेरखानाचे चार लोक जखमी झाले व शत्रूचे सात लोक मरून चार जखमी झाले. राजास हे समजताच त्याने आपल्या रजपुतांपैकी काहीस दिलेरखानास मिळून किल्ला घेण्याचा प्रयत्न करण्यासाठी नेमिले . त्यांनी खूप मारपीट केली (८९३) व तोफखान्याचा उपयोग करून गडावरील शिबंदीस अगदी जेरीस आणले . तेव्हा गडाचे रक्षण करण्याचे बळ आपले ठिकाणी नाही असे त्यास वाटून दुसरे दिवशी त्यांनी एका मनुष्यास राजापाशी पाठविले व अभय मागितले . त्याप्रमाणे राजाने अभय दिले . या दिवसाच्या अखेरीस ते लोक किल्ल्याच्या बाहेर पडून दिलेरखानास भेटले आणि बादशहाच्या ताब्यात आले . दिलेरखानाने या जमावांपैकी दोन सरदारांस पोशाख देऊन त्यांच्या साथीदारांसह राजाकडे पाठविले . राजानेही त्यांपैकी काहींस कपडे दिले . पण त्यांनी आपल्या वतनावर जाण्याबद्दल विचारले तेव्हा त्यांची हत्यारे काढून घेऊन सर्वांना जाण्यास परवानगी दिली . हा किल्ला घेण्यात जवळजवळ ५० स्वार व ३० प्यादे मेले आणि ३३ स्वार व ७७ प्यादे जखमी झाले. किल्ला सर झाल्यावर राजाने दाऊदखानास राजा रायसिंघ, शर्झेखान, अमसिंघ चंद्रावत, मुहम्मद सालिह तर्खान, सय्यिद झैनुल–आबिदीन बुखारी, स्वतःचा उमदा नोकर अचलसिंघ कछवाह , स्वतःचे चारशे स्वार झाले –यांसह दोन्हींकडून सीवाचा मुलूख ताराज करण्यास व त्यायोगे त्यास टेकीस आणावे म्हणून नेमिले आणि ता . १९ **शव्वाल (जुलूस ७)** ला [श. १५८७ **वैशाख वद्य** ६, इ. स. १६६५ एप्रिल २५ .] त्यास निरोप दिला . तसेच कुत्बुद्दीन–यास योग्य सैन्यांसह जुन्नर तर्फेस नेमिले होते –व बलुद्दीखान–यास तळकोकणाच्या रक्षणासाठी ठेविले होते–या दोघांना लिहिले की, त्यांनी त्या बाजूंनी सीवाच्या विलायतेत (८९४) शिरून ती खराब करण्याचा प्रयत्न करावा आणि तीमधील सर्व रयत व वतनदार हे अडाणी व चुकणारे असल्याने त्यांपैकी जमेल तितक्यांना कैद करावे म्हणजे सीवा सर्व बाजूंनी जेरीस आणि काकुळतीस येईल.

एके रात्री शत्रूपैकी कित्येक छापा घालण्यासाठी कीरतसिंघाच्या मोर्चावर आले . पण तो आपल्या सोबत्यांसह हुशार व तोंड देण्याच्या तयारीत होता. यामुळे काही एक न करता ते परत गेले . दुसऱ्या वेळी संधी साधून रात्रीच्या अंधाराच्या मदतीने रसूलबेग रोझमानी याच्या मोर्चावर शत्रूने हल्ला केला . तो व त्याचे साथीदार गाफील असल्याने त्याच्या मोर्चातील तोफांवर धाड घालून एका तोफेत त्यांनी मेख ठोकली आणि रसूलबेगाच्या लोकांवर चढाई करून एकास ठार व चौदा जणांस जखमी केले . याचा मोठा गोंगाट झाल्यावर झबरदस्तखान – स्वतःच्या मोर्चातून निघून आणि दिलेरखानाचा नोकर महमूदखान याच्या कित्येक लोकांसह –शत्रूवर तुटून पडला. त्यांनी चार लोकांना ठार करून पुष्कळांना जखमी केले. तेव्हा वाचलेले अर्धमेले होऊन किल्ल्याच्या कोटात परतले . दुसरे दिवशी त्यांपैकी काही मेलेल्यांची प्रेते नेण्यासाठी किल्ल्याच्या दिंडीतून बाहेर आले. या बाजूस पुरदिलखान, शुभकर्ण बुंदेला आणि पातशाही इतर बंदे यांचा मोर्चा होता त्यावर हे लोक घसरले . पण काही करू न शकता त्यांना पळून जावे लागले . या झटापटीत बादशाही आठ लोक जखमी झाले आणि शत्रूकडील चारजण (८९५) मेले व पुष्कळ जखमी झाले . दाऊदखान, राजा रायसिंघ व इतर लढवय्ये मुलूख उद्ध्वस्त करण्यासाठी गेले होते ते ता . २१ **शव्वालला** [श. १५८७ **वैशाख वद्य** ८ इ. १६६५ मे २७.] रोहिड्याजवळच्या व राजगड किल्ल्याच्या आसमंत भागात पोचून त्यांनी जवळजवळ ५० खेडी जाळून टाकिली आणि चार गावास – ही डोंगराच्या खिंडीत असून आबाद होती व यात शत्रूपैकी कित्येक राहत असत– काही मुघल जे या सैन्याच्या आघाडीस होते–पोहोचून त्यांनी शत्रूशी तोंड देण्यास सुरुवात करून दाऊदखानास तसे कळविले . खानाने आघाडीच्या फौजेसह राजा रायसिंघाला व राजा जयसिंघाच्या रजपुतांसह अचलसिंघ कछवाहास त्यांच्या मदतीसाठी पाठविले . तेव्हा शत्रू पळून जाऊन चारी गाव धुळीस मिळाले व तेथील रयत भटकू लागून तिची गुरे , मत्ता व घरे बादशाही लोकांच्या हाती लागली. दुसरे दिवशी तेथे मुक्काम करून नंतर हे लोक राजगडाच्या बाजूस रवाना झाले; तिकडे त्यांनी पुष्कळ गावे आगी लावून वैराण केली आणि ता . २४ ला [श. १५८७ **वैशाख वद्य** ११, १६६५ एप्रिल ३० .] किल्ल्याच्या पायथ्याशी पोचून तेथील व आसपासचा प्रदेश ते सर करू लागले . यावेळी शत्रू किल्ल्यावरून तोफा, बंदुकीच्या गोळ्या व बाण सोडीत होता . त्यांपैकी पुष्कळजण पुढे येऊन माचीवर ओळ धरून उभे राहिले. परंतु बादशाही फौजेच्या बळापुढे उभे राहाणे त्यांना होईना . ती जमीन डोंगराळ, शिलामय, पठारे व शिवरे यांनी युक्त होती. यामुळे बादशाही लोकांनी तो भाग उद्ध्वस्त करून व तेथून दोन कोस माघारे येऊन गुंजणघेण्या (केवरह) जवळ डेरा दिला आणि रात्र हुषारीने तेथेच काढून दुसरे दिवशी ते सीवापूरला आले . दाऊदखानाने तेथून किल्ले कोंढाण्याच्या तर्फेस जाऊन (८९६) त्या बाजूचा भाग उद्ध्वस्त केला. कुत्बुद्दीनखान स्वतःच्या साथीदारांसह दरहपूर खोरह व तागी खोरह या कुवारी किल्ल्याच्या – जवळ जाऊन ती विलायत खराब करू लागला. त्यांनी पुष्कळ लोक कैद करून अगणित गुरेढोरे हस्तगत केली . ता. २९ **शव्वालला** [श. १५८७ **वैशाख वद्य** ३०, इ. १६६५ मे ५ .] दाऊदखान व कुत्बुद्दीनखान एक झाल्यावर दोघेही लोहगडाकडे धावले . ही फौज लोहगडाच्या पायथ्याशी पोहोचते तोच शत्रूचे पाचशे स्वार व हजार प्यादे किल्ल्यातून बाहेर आले आणि आघाडीच्या लोकांशी लढू लागले . दाऊदखानास हे समजताच त्याने राजा रायसिंघ , कुत्बुद्दीनखान, राजा जयसिंघाचा नोकर अचलसिंघ त्याच्या शिपायांसह – यांस आघाडीच्या मदतीस पाठविले . राजा राजसिंघ व अचलसिंघ वेळेवर पोहोचले आणि त्यांनी शत्रूची फळी फोडली . शत्रूचे कित्येक लोक या झटापटींत मेले व बाकीचे बचावासाठी किल्ल्यात पळून गेले . बादशाही लोकांनी

किल्ल्याच्या लगतची सर्व लागवड जाळून टाकून उद्ध्वस्त केली आणि पुष्कळ लोक व गुरेढोरे हस्तगत करून त्याच्या जवळच डेरा दिला . दुसरे दिवशी पुन्हा ते स्वार झाले व लोहगड , इसागड, तुंगी, निकोना या किल्ल्यांच्या डोंगरालगतचे गाव जाळून व खराब करून परत डेऱ्यात आले . शत्रूची बहुतेक विलायत अशा तऱ्हेने उद्ध्वस्त झाल्यामुळे त्यांनी परत जाण्याच्या उद्देशाने दुसरे दिवशी कूच करून पुण्याजवळ येऊन मुक्काम केला . राजा जयसिंघाने ठरविले होते की , कुत्बुद्दीनखानाने आपल्या साथीदारांसह पुण्याजवळ ठाणे (८९७) देऊन राहावे; तेव्हा त्याने तेथे मुक्काम केला अणि दाऊदखान, राजा राजसिंघ व इतर पादशाही चाकर ता . ४ **जीकादला** [श. १५८७ **ज्येष्ठ शुद्ध** ६, इ. १६६५ मे १०.] अर्थात् चौदा दिवसानंतर परत मुख्य लष्करास जाऊन मिळाले.

राजा जयसिंघास किल्ले ताब्यात घेण्याची कला चांगली माहीत होती ; म्हणून त्याने हुकूम केला की , लाकडे व फळ्या यांचे उंच दमदमे करावे म्हणजे काही बंदुखे व तोफा मारणारे तोफखान्यांसह त्यावर जाऊन शत्रूस मारून जेर करतील . ता २४ **जीकादला** [श. १५८७ **ज्येष्ठ वद्य** ११, इ. १६६५ मे ३० .] दमदमा तयार झाल्यावर (८९८) राजाने स्वतःच्या काही लोकांस किल्ला दुर्भेद्य व्हावा या उद्देशाने बांधलेल्या सफेद नावाच्या बुरुजासमोर तो दमदमा उभा करावयास सांगितला . त्याप्रमाणे दिवसाच्या अखेरीस बुरुजाइतका उंच दमदमा उभा राहिला आणि तोफखान्याचे लोक व राजाचे काही रजपूत त्यावर चढले. तेव्हा बुरुजावरच्या लोकांनी हे पाहून तोफा, बंदुका, हुक्के, दगड व इतर आगीच्या आयुधांचा वर्षाव सुरू करून या लोकांस दफे करण्याकडे व दमदमा निकामा करण्याकडे लक्ष लाविले . याच वेळी मोर्चात असलेले राजाचे इतर लोक दिलेरखानाच्या शिपायांसह वरील बहादुरांच्या मदतीस गेले . नंतर जबरदस्तखान व तोफखान्याचा दारोगा आतिशखान हेही येऊन पोहोचले . जोराच्या लढाईस सुरुवात झाली , दोन्ही कडूनही लढाईचा खूप जोर होऊन तीत राजा जयसिंघ याचा चाकर भूपतसिंघ ——हा पांचशेचा सरदार होता ——, रजपूतांपैकी काही व दिलेरखानाच्या हाताखालील एक येवढे आणि शत्रूपैकी पुष्कळ मेले . यानंतर राजाने शुभकर्ण बुंदेला , तुर्कताझखान व इतर कित्येक शूर यांस बहादुरांच्या मदतीस पाठविले . पुढे दिलेरखान व कीरतसिंघ यांनी दमदम्यावर जाऊन लढाईची पाहणी व प्रगतीची व्यवस्था केली. तोफखान्याच्या माराने सफेद बुरुजाची फारच मोडतोड झाली. तेव्हा लढवय्ये हल्ला करण्याचे ठरवून बुरुजाच्या पायाशी गेले व खणू लागले . शत्रूने हा बुरूज व जुना काळा बुरूज यांमध्ये पुष्कळ दारू भरून ठेवली होती ; हेतू हा की, बादशाही लोकांस सफेद बुरूज हस्तगत (८९९) झाला व त्यांनी त्यावरून काळ्या बुरुजावर हल्ला चढविण्याचा बेत केला तर त्यास आग लावावी . यावेळी त्यांनी दारूस आग लाविली . पण तीमुळे त्याचेच जवळजवळ ८० लोक जळाले . अशा गरमीतच काळ्या बुरुजावर हल्ला चढवावा असे बहादर म्हणत होते . पण रात्रीचा समय जवळ आला होता आणि दोन बुरुजांमधील खळग्यात शत्रूने आग लाविली होती ; म्हणून राजास तसे करणे बरे वाटले नाही . तेव्हा त्याने शिपायांस तसे करू दिले नाही; पण सफेद बुरुजाच्या पायथ्याशी मोर्चे लाविले . संध्याकाळी अंधार पडल्यावर शत्रूने आपले ठाणे सफेद बुरुजावरून काळ्या बुरुजावर नेले व सीवाने बांधलेले—हा व त्याचे जवळचा असे दोन्ही —बुरूज बादशहाच्या ताब्यात आले . तेव्हा त्याच्या लोकांनी काळ्या (सफेद?) बुरुजावर तोफा चढवून खळगा भरून काढण्याची हिंमत बांधिली व ५ /६ दिवसांत तसे केले . नंतर त्या जमिनीवर उंच मोर्चा बांधून तो काळ्या बुरुजाचे बरोबरीचा केला व त्यावर दोन तोफा चढवून मारा सुरू केला . तोफांच्या माऱ्याने रक्षकांना जखमा होऊ लागल्या तेव्हा ते हा व त्याजवळचा दुसरा असे दोन्ही बुरूज खाली करून गडाच्या तटाच्या आश्रयास गेले आणि हेही दोन्ही बुरूज बहादरांच्या ताब्यात आले.

यावेळी पुण्याचा ठाणेदार कुबादखान यास बातमी लागली की, शत्रूपैकी काहीजण मौजे नरकोत येथे राहात आहेत. तेव्हा अबुल कासिम व अब्दुल्लाह —स्वतःचे मुलगे—यास आपल्या काही लोकांसह रनदौलतखान , ख्वाजा अबुल -मकारिम, राजीवभाई (९००) अफ्जल बीजापुरीचे मुलगे—आणि इतर पादशाही लोक यांना त्या बाजूस पाठविले . हे लोक त्या गावापाशी आले तो गावातील शत्रूच्या तीनशे स्वारांनी पलायन केले . तेव्हा पुष्कळ माणसे व गुरे कैद करून ते परत फिरले.

सारांश, सीवाला बादशाही सैन्याचे बळ समजले . तेव्हा त्याची खात्री झाली की , पुरंधर किल्ला— हा त्याच्या उत्तम गडांपैकी एक होता व यावर त्याचे चांगले लोक होते — बादशाही सैन्याच्या जोराने त्याच्या ताब्यात जाईल आणि त्यानंतर हे सैन्य राजगडास — येथे तो स्वतः सर्व मुले , माणसे, सामुग्री व पैसा यांसह होता — वेढा देईल; एवढेच नव्हे तर सर करील . मी अशीच बंडखोरी करीत राहून बादशाही ताबेदार होणार नाही ; शत्रूत्वच करीत राहीन तर स्वतःचा शेवट जवळ आणीन . म्हणून दूर दृष्टीने यापूर्वी थोडे दिवस त्याने काही मुत्सद्द्यास राजा जयसिंघाकडे पाठविले होते. हेतू हा की, त्यांनी त्याचे कार्य घडवून आणावे . शेवटी पंडित नावाच्या ब्राह्मणाने —ज्यावर त्याचा फार विश्वास होता — त्याच्या सांगण्यावरून राजाकडे येऊन सुरक्षिततेचे वचन मागितले . राजाने वचन दिले की , तो जर प्रामाणिकपणाने काकुळतीस येईल व बिनहत्याराने भेटेल तर त्यास अभय मिळेल. पंडित (९०१) परतल्यावर त्यास अभय मिळविण्याची आणि संपत्ती व प्राण वाचविण्याची इच्छा असल्यामुळे राजाच्या वचनावरून सर्व भय, शंका वगैरेंपासून मुक्त होऊन बादशाही कृपा , आज्ञाधारकता वगैरेंच्या इच्छेचा त्याने निश्चय केला आणि ता . ७ **जीहजला** [श. १५८७ **आषाढ शुद्ध** ९, इ. १६६५ जून ११.] मोजक्या लोकांसह राजगडावरून राजाच्या भेटीसाठी ठरल्याप्रमाणे रवाना झाला . रात्री राजास बातमी आली की , उद्या तो येणार आहे . तेव्हा उजाडल्यावर राजाने आघाडीवर असलेल्या दिलेरखान व कीरतसिंघ यास —यांचे मोर्चे किल्ल्याच्या फार जवळ गेले होते— सांगितले की, तुम्ही आपले मोर्चे पुढे सारून किल्ल्यावरील हल्ल्याची तजवीज करा . तेव्हा खान, कीरतसिंघ यांनी मोठ्या प्रयत्नाने पुढे सरकणे सुरू केले . हे पाहून गडावरील सर्व लोक गडाबाहेर पडून लढू लागले . पण बहादुरांनी खूप शौर्याचे हल्ले करून त्यांना किल्ल्याच्या दरवाजापर्यंत मागे रेटले . यात शत्रूचे अजमासे ६० लोक मरून पुष्कळ जखमी झाले आणि इकडील राजा , दिलेरखान व कीरतसिंघ यांच्या लोकांपैकी काही जखमी झाले व मेले . लढाई जोरात चालू असता व राजा लढाईचे काम कोठवर आले आहे याची वारंवार चौकशी करीत असताच बातमीदारांनी बातमी आणली की , सीवा सीवापूरला येऊन तेथील ठाणेदार सराफ्राझखान यांसह (९०२) मुलाखतीस येत आहे . तेव्हा राजाने आपला मुनशी उदयराज यास गुरकसेन कछवाह यांसह त्याला सामोरे जाण्यास सांगितले व निरोप पाठविला की , जर येण्यामध्ये बादशाही ताबेदारी पतकरणे व किल्ले बादशाही ताब्यात देणे हा हेतू असेल तर तो पसंत असून यावे म्हणजे गुन्हे माफ होऊन कृपा होईल आणि संपत्ती , कीर्ती व प्राण यांचे रक्षण होईल . नाहीतर येण्याची जरुरी नाही ; ईश्वरी कृपा व बादशाही सुदैव यांच्या बळावर त्याचे सर्व किल्ले व विलायत आमच्या ताब्यात येईल. उदयराज काही अंतर गेल्यावर त्यास भेटला व त्याने राजाचा निरोप कळविला . त्याने जाब दिला 'आज मी हुजुरजवळ आलो आहे. जी इच्छा असेल ती अमलात आणीन.' पुढे काही वेळानंतर तो बादशाही सैन्यात येऊन राजाच्या डेऱ्यापाशी पोहोचला . राजाने लष्कराचा बक्षी जानी बेग यास त्याला आत आणण्यासाठी पाठविले . त्याप्रमाणे आत गेल्यावर तो राजास भेटला . राजाने त्यास आलिंगन देऊन आपल्या जवळ जागा

अनुक्रमणिका

दिली. त्याने मोठ्या काकुळतीने आपल्या अपराधाविषयी लाज दाखविली आणि म्हणाला , 'पुरंधर व आणखी पुष्कळ किल्ले अपराधक्षमा होण्याच्या आशेने पेशकश म्हणून देतो व यापुढे बादशाही बंदा होतो .' राजाने त्यास अभय दिले आणि गाझी बेग मीर तवझूक यास सुचविले की , त्याच्या लोकांपैकी एकाबरोबर (९०३) दिलेरखान व कीरतसिंघ यांजकडे जाऊन सांगा की , सीवा सुदैवाने रस्त्यावर आल्याकारणाने गडावर अडकलेल्या लोकांना अमान दिले आहे . त्यास आता त्रास देऊ नये . म्हणजे ते बाहेर येतील व आपले लोक आत जाऊन किल्ला ताब्यात घेतील . गाझी बेगाने निरोप सांगितला व सीवाच्या मनुष्याने त्याच्या सांगण्यावरून गडाच्या दरवाजापाशी जाऊन गडकऱ्यास परिस्थिती समजावून दिली . तेव्हा त्याने ती रात्र आळसात घालविली. राजाने सीवाला—जो एकटाच आला होता —स्वतःच्या डेऱ्यात जागा देऊन त्याची नीट बरदास्त ठेविली . दुसरे दिवशी ठरल्याप्रमाणे सात हजार स्त्री -पुरुष—पैकी चार हजार माणसे लढाऊ —किल्ल्याबाहेर पडले आणि पातशाही नोकर आत दाखल होऊन त्यांनी गडाचा कब्जा घेतला . राजाने सय्यिद मुहम्मद जवाद —हा बादशाही लष्कराच्या घरादारांचा कारभारी होता —यास सांगितले की , त्याने गडावर जाऊन तेथील सामुग्री , आयुधे, तोफखाना व इतर जिनसा ताब्यात घ्याव्या . सीवाने त्याच दिवशी दुसरे पाच किल्ले —लोहगड, ईसागड, तपकी (तुंगी), तिकोना, रोहिडा हवाला केले. तेव्हा राजा जयसिंघाने राजा सुजानसिंघ बुंदेला — हा पुरंदरच्या मागे राजगड रस्त्याच्या तोंडावर होता — यास सूचना दिली की , त्याने आपला भाऊ इंद्रमन यास एका टोळीसह रोहिडा किल्ला कबजात घेण्यासाठी पाठवावे . तसेच पुण्याचा ठाणेदार कुबादखान यास लिहिले की, १५०० स्वारांसह जाऊन बाकीचे चार किल्ले ताब्यात घ्यावे. सीवानेही हे किल्ले पाइशाही नोकरांच्या ताब्यात देण्यासाठी आपले लोक पाठविले. दिलेरखान अजूनही गडाच्या पायाशी असल्याने जयसिंघाने राजा सीवाला राजा रायसिंघासह खानाकडे (९०४) त्याची भेट घेण्यासाठी पाठविले . खानाने भेट झाल्यानंतर दोन घोडे — पैकी एक सोन्याच्या साजाचा व अरबी —समशेर व जमघर —दोन्ही जडावाच्या सामानासह आणि दोन तकूझ त्यास देऊन बिदा केले . सीवाने पूर्वीच आपले लोक राजाकडे पाठविले होते व राजाने त्यास बादशाही ताबेदारीचा उपदेश केला होता. तेव्हा त्यास उमेद यावी म्हणून राजाने बादशाहास सीवाच्या नावे कृपाप्रसाद यांनी भरलेले फर्मान पोशाखासह पाठविण्याविषयी विनविले होते. राजाच्या विनंतीप्रमाणे फर्मान व पोशाख पाठविला होता तो याच दिवशी येऊन पोहोचला . सीवास हे समजताच आनंदीत होऊन तो त्यास सामोरा गेला व त्याने आदरपूर्वक पोशाख परिधान केला आणि यामुळे त्यास समाधान वाटले . राजाने त्याशी सर्व गड सोपविण्याच्या बाबतीत बोलणे करून असे ठरविले की , निजामुल्मुल्कच्या वेळेपासून त्या विलायतेत व सध्या सीवाच्या ताब्यात असलेल्या ३५ किल्ल्यांपैकी पुरंदर व रुद्रमाळ यांसह २३ किल्ले व त्याशी संबंद्ध अशी दहा लाख होन वसुलाची विलायत बादशाही नोकरांच्या ताब्यात द्यावी ; (९०५) आणि बादशहाने क्षमा करून त्यावर मेहरबानी केली आहे त्याअर्थी बारा किल्ले ज्यांशी सबंध जमिनीचा महसूल एक लाख होन आहे — त्याच्या ताब्यात राहावे . त्याने आपल्या घरी जाऊन आपल्या आठ वर्षे वयाच्या संभाजी नावाच्या मुलास राजापाशी पाठवावे . त्या मुलाने बादशाही नोकरीत शिरून राजाबरोबर असावे आणि त्याचे नोकर व शिपाई यांनी बादशाही चाकरी करावी . सीवानेही त्या प्रदेशात मोहीम निघाली असता चाकरीसाठी कमर बांधून सेवकत्वाचे कर्तव्य बजावावे. असा ठराव झाल्यावर राजाने त्यास सोन्याच्या साजाचे दोन घोडे व एक हत्तीण देऊन विदा केले आणि किरतसिंघाला बरोबर दिले. अशासाठीच की, सोपवायाच्या किल्ल्यांपैकी एक , व जणू दुसरा पुरंदरच इतका बळकट , अशा कोंढाण्यास जाऊन तो ताब्यात घ्यावा आणि शाहीदखानाकडे ——ज्यास त्याची किल्लेदारी मुक्रर केली होती ——सोपवून सीवास तेथे निरोप द्यावा . फत्ते झालेल्या किल्ल्यांचा तपशील येणेप्रमाणे——पुरंदर, रुद्रमाळ, कोंढाणा, खंडगळा, लोहगड , ईसागड, पतकी (तुंग), तिकोडा, रोहिडा, नारदुर्ग, माममोली (माहोली), भंडारदुर्ग, पकसखोल (पळसखोल), रुपगड, बक्तगड, मोरबखन, माणिकगड, सरूपगड, साकरगड, मरकगड, अंकोला, सोनगड, मानगड.

सीवाने ठरविल्याप्रमाणे त्याचा मुलगा संभाजी राजापाशी आला . सीवाकडून ताब्यात आलेल्या विलायतीमध्ये चेऊल बंदर असल्यामुळे (९०६) राजाने लोदीखानास ते जप्त करण्यास पाठविले आणि स्वतः ता . २१ **रविलावलला** [श. १५८७ **भाद्रपद वद्य ७**, इ. १६६५ सप्टेंबर २१ .] कोंढाणा किल्ला लष्करापासून सहा कोसांवर होता——पाहण्यास गेला. त्याने तो पाहून तेथील व्यवस्था व जरुरीचा बंदोबस्त केला आणि रात्र तेथेच घालवून दुसरे दिवशी तो लष्करास परतला . राज्याच्या विनंतीप्रमाणे बादशहाकडून सीवाचा मुलगा संभाजी यास पाच हजारी पाच हजार स्वार ही मनसब मिळून त्या अर्थाचा फर्मान या दिवशी पोहोचल्यामुळे राजाने त्यास कचेरीच्या वेळेस बोलावून लष्करचा बक्षी जानी बेग यास सूचना दिली . त्याने यास उत्थापन देण्यास सांगितले . नंतर त्यास आपल्यातर्फे पोशाख व रुपयांच्या साजाचा हत्ती देऊन गौरविले . पुढे काही दिवसांनी सीवाही राजगडाहून आला. (९१४) या वेळी पुन्हा त्यास बादशहाकडून आलेला पोशाख मिळाला . ता. १७ **सफर** (श. १५८७ **श्रावण वद्य** ४, इ. १६६५ ऑगस्ट १९) व ता. ७ **रविलालला** (श. १५८७ **आश्विन शुद्ध** ९ इ. १६६५ ऑक्टोबर ७) यांमध्ये केव्हा तरी वरील हकीकत घडली . कारण वरील दोन तारखांमधील नोंदीच्या दरम्यान ही हकीकत दिली आहे.]

यापूर्वी विजापूरचा अधिकारी आदिलखान याने काही गुन्हे — त्यापैकी एक पेशकश पाठविण्यात अळंटळं करणे हा होता — केले होते. आता आपली कामे सरळ व्हावी म्हणून त्याने मुल्ला अहमद नायता याला — हा त्याच्या राज्यातील उमद्यांपैकी एक होता — राजाजवळ धाडिले. तो ता. २६ **रविलावलला** [श. १५८७ **भाद्रपद वद्य** १२, इ. १६६५ सप्टेंबर २६] लष्करापासून सहा कोसांवर आला असता राजाने आपला मुनशी उदयराज यास त्याचे स्वागतासाठी पाठविले. तसेच त्याचा भाऊ मुल्ला याह्या—यापूर्वी पुष्कळ दिवसापूर्वी सांगितल्याप्रमाणे बादशाही नौकरीत आला होता व यावेळी बादशाही लष्करात होता — यास त्याची भेट घेण्याची परवानगी दिली . तीन दिवसानंतर मुल्ला अहमदची भेट व्हावयाची होती . त्यावेळी राजाने ठरविले की , राजा रायसिंघ व किरतसिंघ यांनी त्यास जाऊन आणावे . त्याप्रमाणे हे काही अंतर जाऊन रस्त्यामध्ये त्यास (९०७) भेटले व आणून राजास भेटविले . राजाने त्याचा चांगला सन्मान केला . त्यास दोन इराकी घोडे — सोन्याच्या साजासह — एक हत्ती— रुप्याच्या साजासह— आणि दोन तकूझ देऊन स्वतःच्या घरी जाण्यास निरोप दिला . आदिलखानाने त्याजबरोबर राजासाठी दोन हत्ती , थोडे जवाहीर व जडावाचे सामान पाठविले होते.

सीवाने पूर्वीच गुन्हेगाराप्रमाणे बिनहत्यारी परत येऊन राजाची भेट घेतली होती व हा वेळपर्यंत त्यास हत्यार बांधले नव्हते . तेव्हा आता राजाने त्यास जडावाची एक समशेर व एक जमघर देऊन ती त्याचे कमरेस बांधिली. आता दख्खनच्या हकीकतीचे सूत्र येथेच सोडून देऊन हुजूरची हकीकत सांगण्याचे करतो.

(**शि. च. वृ. सं.**, खंड ३, **आलमगीर नामा**, २६—३८)]

अनुक्रमणिका

(१३) शिवाजीविरुद्ध जयसिंग : मोगल पुरंदर जिंकतात

शायस्ताखानाचे अपयश आणि शिवाजीने सुरतेची केलेली लूट यामुळे औरंगजेब आणि त्याची दरबारी मंडळी यांमध्ये अतिशय चिडीची भावना निर्माण झाली . शिवाजीचा पुंडावा मोडण्यासाठी त्याने आपले सर्वोत्कृष्ट हिंदू आणि मुसलमान सेनापती जयसिंग आणि दिलेरखान यांना पाठविण्याचे ठरविले . [३० सप्टेंबर १६६४ रोजी बादशहाने मिर्जा राजा जयसिंग याची शिवाजीविरुद्ध नियुक्ती केली . जयसिंगाच्या हाताखाली ज्या अधिकाऱ्यांना नेमण्यात आले होते त्यांची नावे पुढीलप्रमाणे होती :— दिलेरखान, दाऊदखान कुरेशी, राजा रायसिंग शिसोदिया, इहतिषामखान शेखजादा, कुबादखान, राजा सुजनसिंग बुंदेला , जयसिंग याचा मुलगा किरतसिंग , मोगलांकडे आलेला विजापूरचा उमराव मुल्लायाह्यानवायत आणि इतर अनेक अधिकारी. जयसिंगाबरोबर दिलेल्या सैनिकांची संख्या १४,००० एवढी होती.]

जयसिंगाची मोहिमेची आखणी

जयसिंग हा बादशहाचा नावाजलेला सेनापती होता आणि मध्य आशियातील बाल्खपासून तो दक्षिणेतून विजापूरपर्यंत आणि पश्चिमेस कंदहारपासून तो पूर्वेस मोंघीरपर्यंत साऱ्या साम्राज्यात त्याने बादशाही सेनेचा सेनापती म्हणून रणमैदान गाजविले होते . शहाजहान बादशहाच्या कारकीर्दीत असे एक वर्ष देखील सुने गेले नाही की ज्या वर्षी या रणझुंझार रजपूत सेनानीने कुठेना कुठे मोहीम केली नाही आणि उत्कृष्ट कामगिरी बजावल्याबद्दल बढती मिळविली नाही. राजकारणात तर त्याचे यश इतके असामान्य होते की रणांगणातील त्याची कामगिरीदेखील त्यापुढे फिकी पडली असती. ज्या ज्या वेळी कठीण किंवा नाजूक कामगिरी पार पाडावयाची असे त्या त्या प्रसंगी बादशहाने नुसते जयसिंगाकडे वळावयाचा अवकाश ! जयसिंगाचे कसब आणि सहनशीलता यांना जोड नव्हती . मुसलमानांच्या दरबारी रितीरिवाजात त्याच्याइतका वाकगबार कोणी नव्हता . उर्दू आणि रजपूत भाषांशिवाय तुर्की आणि पर्शियन भाषांवर त्याचे असामान्य प्रभुत्व होते आणि दिल्लीपतीच्या अर्धचक्राची आकृती असलेल्या झेंड्याखाली चाकरी करणाऱ्या अफगाण आणि तुर्क , रजपूत आणि हिंदुस्थानी शिपायांच्या संयुक्त फौजेचा आदर्श नेता होण्याचे भाग्य त्याला लाभले होते . त्याची दूरदृष्टी आणि राजकीय कावेबाजपणा , त्याची साखरपेरी भाषा आणि धिमे धिमेपणे पण विचारपूर्वक ठरविलेले धोरण हे जयसिंगाचे स्वभावविशेष म्हणजे सर्वसाधारणपणे कोणत्याही रजपूत व्यक्तीच्या स्वभाववैशिष्ट्यातील दिसून येणारी भावनापूर्ण उदारता , अघोरी धाडस , दुसऱ्याचा मर्मभेद करणारा रोखठोकपणा आणि अविचारी दिलदारपणा यांजबरोबर तुलना करता पूर्णपणे विसंगत अशा वाटावयाला लावणाऱ्या गोष्टी होत्या.

विजापूरच्या सुलतानाला वाटणाऱ्या आशा आणि त्याच्या मनातील भीती यांचा जयसिंगाने मोठ्या कौशल्याने उपयोग करून घेतला . आदिलशहाने मोगलांना मदत केली आणि अशा तऱ्हेने शिवाजीबरोबर आपला कसल्याही तऱ्हेचा संबंध नाही असे त्याने सिद्ध केले तर खंडणी कमी करण्याचे आणि बादशहाची नाराजी दूर करण्याचे प्रलोभन त्याने सुलतानापुढे उभे केले . त्याने शिवाजीविरुद्ध त्याच्या सर्व शत्रूंची एकजूट करण्याचा घाट घातला आणि सगळीकडून चढाई करून त्याचे लक्ष विचलीत करण्याचीही योजना आखली. शिवाजीच्या अनुयायांनी आपल्या स्वामीनिष्ठेपासून च्यूत व्हावे म्हणून त्याने द्रव्य आणि मोगलांच्या चाकरीत मानमरातबाच्या नेमणुकांची वचने यांचा मुक्त हस्ताने उपयोग केला . काही अंशी त्याच्या प्रयत्नात त्याला यश आले. लढाईमध्ये त्याला सदैव विजयश्रीने माळ घातली कारण त्याने आपल्या हातात सर्व सत्ता केंद्रीभूत करावयाची त्याखेरीज पाऊल पुढे टाकावयाचे नाही या धोरणाचा नेहमी पाठपुरावा केला . लढाईमध्ये अधिकाराची सूत्रे एकाच सेनानीच्या हाती पाहिजेत आणि प्रत्यक्ष रणांगणावर असलेल्या

व्यक्तीच्या हाती सर्व अधिकार सोपविले पाहिजेत नाहीतर कामाची हानी होईल हे सुसूत्र त्याने प्रतिपादले . बादशहाला जयसिंगाने पुढे मांडलेली भूमिका पटली आणि परिणामी लष्करी आणि मुलकी बाबतीत बादशहाने त्याच्याकडे संपूर्ण अधिकार सोपविले.

अनुभवी सेनानी ज्या प्रांतात लढा द्यावयाचा त्या विभागाचे लष्करीदृष्ट्या परिशीलन करतो या उक्तीला अनुसरून जयसिंगाने सासवड या गावी आपला लष्करी तळ कायम केला . पुण्याला शिबंदीचा कडेकोट बंदोबस्त करण्यात आला . लोहगड किल्ल्याची देखभाल करण्यासाठी आणि नाकेबंदी करण्यासाठी किल्ल्यासमोर एक ठाणे वसविण्यात आले . जुन्नर नजिकच्या मोगल सरहद्दीकडे जाणाऱ्या उत्तरेच्या रस्त्याचे रक्षण करण्यासाठी देखील या ठाण्याचा उपयोग करण्यात येणार होता . सासवडच्या पश्चिमेस आणि नैर्ऋत्येस डोंगरदऱ्यात वसलेल्या मराठी मुलुखातील खेड्यापाड्यांची नासधूस करण्यासाठी म्हणून एक धावते पथक संघटित करण्यात आले.

युद्धाला सुरुवात, १६६५

३१ मार्च रोजी पुरंदर आणि सासवडच्या मध्ये पुरंदरपासून केवळ ४ मैलांवर जयसिंगाने आपली कायम छावणी आयोजित केली. त्यानंतर त्याने पुरंदरच्या किल्ल्याला वेढा दिला.

सासवडपासून दक्षिणेस ६ मैलांवर पुरंदरचे काळेकभिन्न प्रचंड पहाड गगनाला भिडलेले दिसतात . या पर्वतराजीचे सर्वांत उंच शिखर समुद्रसपाटीपासून ४५६४ एवढ्या उंचीवर आहे तर तळ्यावरल्या पठारापासूनची या शिखराची उंची २५०० फूट आहे . पुरंदर म्हणजे खरोखरीचा एक जोड किल्लाच आहे . पुरंदर किल्ल्याच्या पूर्वदिशेकडून निघणाऱ्या पर्वतराजीत पुरंदर इतकाच बळकट आणि स्वतंत्र असा वज्रगड किल्ला आहे . पुरंदर किल्ल्याला वरच्या बाजूस बालेकिल्ला असून त्याच्या सर्व बाजूंनी खोल कडे तुटलेले आहेत. किल्ल्याच्या खालच्या बाजूस पुरंदरची माची आहे आणि ती बालेकिल्ल्यापासून ३०० फूट खाली आहे . पुरंदरची माची म्हणजे किल्ल्याच्या बाजूबाजूने किल्ल्याला वेढा घालणारी खडकाची रांग असून या वळणे घेत जाणाऱ्या रांगेचा एकंदर घेर ४ मैल एवढा आहे . उत्तरेच्या बाजूला ही खडकाची रांग रुंद होत गेली असून तिथे एक पठार निर्माण झाले आहे . या ठिकाणी किल्ल्याच्या त्या शिबंदीच्या बराकी आणि कार्यालये आहेत . या पठाराच्या पूर्वेच्या बाजूला एक उंच कडा असून त्याला भैरव खिंड असे म्हणतात. या कड्याची सुरुवात बालेकिल्ल्याच्या खडकाला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ईशान्येकडील खोलवर तुटलेल्या बुरुजाच्या पायापासून झाली आहे .**पुरंदरला वेढा :-** पूर्वेकडे निमुळत्या होत गेलेल्या कड्यापर्यंत एक मैलभर जवळजवळ हा कडा पसरलेला आहे आणि समुद्रसपाटीपासून ३६१८ फूट उंचीवर असलेल्या छोट्याशा डोंगर पठारापर्यंत तो येऊन संपतो . या कड्याच्या टोकाला रुद्रमाळचा किल्ला आहे . या किल्ल्याला हल्ली वज्रगड असे म्हणतात . पुरंदरची माची अथवा खालच्या किल्ल्याची उत्तर बाजू आणि किल्ल्याचा महत्त्वाचा दर्शनी भाग यावर वज्रगडावरून हुकमत चालू शकते. कारण किल्ल्यावरील शिबंदीची छावणी याच ठिकाणी असते . युद्धशास्त्र पारंगत असलेल्या खऱ्याखुऱ्या सेनापतीप्रमाणे जयसिंगाने प्रथम वज्रगडावर हल्ला करण्याचे ठरविले.

वज्रगडचा पाडाव

मोगलांनी तोफांच्या केलेल्या सततच्या भडिमाराने वज्रगड किल्ल्याच्या समोर असलेल्या बुरुजाचा

पाया ढासळून पडला. १३ एप्रिलच्या मध्यरात्री दिलेरखानाच्या तुकडीने बुरुजावर हल्ला केला आणि शत्रूला हाकलून बुरुजापाठीमागच्या आवारात माघार घेणे त्यांना भाग पाडले . दुसऱ्या दिवशी मोगलांची विजयी सेना आतल्या आवारात घुसली . मोगलांनी दारूगोळ्याच्या सातत्याने केलेल्या बरसातीमुळे नाईलाज होऊन १४ एप्रिलच्या संध्याकाळी तेथील शिबंदीने शरणागती पत्करली.

वेढा उठविण्याचे मराठ्यांचे प्रयत्न

वज्रगडाच्या पाडावाने पुरंदर किल्ला जिंकून घेण्याची जणूकाही मूहूर्तमेढच रोवली गेली . दिलेरखानाने आपले लक्ष पुरंदरकडे वळविले . जयसिंगाने मराठ्यांच्या मुलखात हल्ले करण्याच्या तंत्राचा स्वीकार केला. त्याबाबत बादशहाला लिहिताना तो म्हणतो , "असे करण्यात माझा उद्देश शिवाजी आणि विजापूरचा सुलतान यांची अशी खात्री करून देण्याचा आहे की , मोगलांचे सैन्य एवढे प्रचंड आहे की वेढ्याचे काम चालू असताना देखील मोगल आपल्या फौजा इतर कामासाठी नियुक्त करु शकतात . त्याचप्रमाणे शिवाजीच्या राज्यातील वेगवेगळ्या भागांत सतत दहशतीचे आणि अंदाधुंदीचे वातावरण निर्माण करून शिवाजीभोवती सेनासमूह गोळा होणार नाही याबद्दलही खबरदारी घेण्याचा माझा उद्देश यातून साध्य होतो." तो पुढे असेही लिहितो , "वेढ्याच्या छावणीतून काही अधिकाऱ्यांना अशा तऱ्हेने रवाना करण्यात माझा आणखी एक गुप्त हेतू आहे . माझ्या हाताखाली काही बेईमान अधिकारी आहेत . त्यांचे छावणीतील वास्तव्य हे निरुपयोगी आहे , इतकेच नव्हे तर धोकादायकही आहे . दाऊदखान कुरेशी याला किल्ल्याच्या मागील दरवाजावर टेहळणी करण्यासाठी ठेवले होते . परंतु काही दिवसानंतर असे कळून आले की , त्या दरवाजाने मराठ्यांच्या एका तुकडीने किल्ल्यात प्रवेश केला . परंतु दाऊदखानाने त्या तुकडीचा काहीही प्रतिकार केला नाही . त्याचप्रमाणे शुभकर्ण बुंदेला याने आपल्या कामात मनःपूर्वक कधीही लक्ष घातले नाही. त्याचे सर्व लक्ष इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा शिवाजीची मर्जी संपादन करण्याकडे लागले होते."

मराठ्यांनी वेढा उठविण्यासाठी अनेक वार प्रयत्न केले. परंतु सर्वसाधारणपणे जयसिंगाला तडाखा देण्यात त्यांना यश आले नाही . [पुरंदरचा वेढा उठविण्यासाठी मराठ्यांनी केलेल्या प्रयत्नांची हकीकत पुढे दिली आहे : मराठा सरदारांनी मोगलांना सतावण्याची आणि वेढा उठविण्याची पराकाष्ठा केली . एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला मराठा घोडदलाचा प्रमुख नेताजी पालकर याने परड्यांवर हल्ला केला . परंतु सुप्याहून एक तुकडी त्याच्या पाठलागावर त्वरित पाठविण्यात आली . ही बातमी मिळताच लढाई न करताच नेताजीने पळ काढला . मे महिन्याच्या अखेरीला उखडा किल्ल्याच्या जवळ मराठे जमा झाल्याची बातमी कुतुबुद्दीनखान याला लागताच त्यांना उधळून लावण्यासाठी तो चाल करून गेला . वाटेत जी खेडी लागली ती उद्ध्वस्त करण्यात आली . जेथे जेथे मराठे आपल्या किल्ल्याभोवती जमा झाले तेथून त्यांना हुसकावून देण्यात आले . मोगलांनी लोहोगडवर हल्ला केला. तेथील शिबंदीला ठार वा जखमी केले. दाऊदखान ३०० कैदी आणि ३००० गुरेढोरे घेऊन परतला . नंतर नारकोट येथे ३०० मराठे घोडेस्वार जमा झाले होते . त्यांना पुण्याचा ठाणेदार कुबादखान याने पाठविलेल्या तुकडीने हुसकावून लावले.

परंतु प्रत्येक वेळीच मराठ्यांच्या पदरी अपयश पडले असे नाही . शत्रूला आपला उद्देश साध्य न करू देण्यात आम्हाला पुष्कळ वेळा अपयश आले आहे अशी कबुली खुद्द जयसिंग याने स्वतः दिलेली आहे . खाफीखानाचे विधान यापेक्षा अधिक परखड आहे . तो म्हणतो अचानक हल्ला करण्याची शत्रूची हातोटी त्यांनी मिळविलेले अप्रतिम विजय , रात्रीच्या वेळी त्यांनी चढविलेले हल्ले , रस्ते आणि दुर्धर अशा खिंडी यांची त्यांनी केलेली नाकेबंदी आणि जंगलांची त्यांनी केलेली जाळपोळ यामुळे मोगलांना हालचाल करणे कठीण होऊन बसले . त्यांची अनेक माणसे आणि जनावरे मृत्युमुखी पडली.]

वज्रगड जिंकल्यानंतर दिलेरखानाने दोन्ही किल्ल्यांना जोडणाऱ्या दांडावरून आगेकूच केली आणि पुरंदरच्या माचीला वेढा दिला. किल्ल्याच्या ईशान्य टोकाकडील खडकाल्याच्या बुरुजाजवळ त्याच्या छावणीचे खंदक येऊन ठेपले.

मे महिन्यात दोन पांढऱ्या बुरुजांच्या पायथ्याजवळ मोगली छावणीचे खंदक जाऊन पोहोचले .

अनुक्रमणिका

सततच्या भडिमाराने हे दोन्ही बुरुज निकामी होऊन गेले होते . त्यावेळी किल्ल्यावरील शिबंदीने पेटते रोगणाचे तेल , बंदुकीच्या दारूने भरलेल्या चामड्याच्या पिशव्या , हातगोळे आणि मोठमोठे दगड खाली टाकण्यास सुरुवात केली . साहजिकच मोगल सैन्याच्या प्रगतीला परिणामकारकरित्या पायबंद घातला गेला. यावर जयसिंगाने ओण्डके आणि फळ्या यांचा उंच असा ओटा तयार करण्याची आज्ञा दिली . या ओट्यावर तोफा चढविण्यात यावयाच्या होत्या , आणि गोलंदाजांनी केलेल्या माऱ्याने व बंदुकांच्या गोळीबाराने शत्रूने ठाण मांडलेली जागा टिपून काढावयाची होती . तो दिवस ३० मे हा होता . दिवस मावळावयाला फक्त दोन तास उरले होते . अशा वेळी काही रोहिला शिपायांनी दिलेरखानाला वर्दी न देता सफेद बुरुजावर हल्ला चढविला . दोन्ही बाजूंमध्ये अतिशय हातघाईचे असे भयंकर युद्ध झाले . या युद्धांत मराठ्यांची प्रचंड हानी झाली . तेव्हा त्यांनी काळ्या बुरुजापाठीमागे माघार घेतली . परन्तु दोन दिवसानंतर या ठिकाणाहूनही त्यांना काढून लावण्यात आले . अशा तऱ्हेने ५ बुरूज आणि एक खालच्या किल्ल्यावरील मेढेकोट एवढ्या जागा मोगलांच्या हाती पडल्या. पुरंदरचे भवितव्य अशा तऱ्हेने निश्चित झाले.

वेढा चालू असताना किल्ल्याचा शूर किल्लेदार मुरारबाजी प्रभु याने ७०० निवडक सैनिक घेऊन दिलेरखानावर हल्ला चढविला . त्यावेळी दिलेरखान हा ५ हजार अफगाण आणि इतर जमातींच्या सैनिकांसमवेत किल्ला चढण्याच्या प्रयत्नात होता . मुरारबाजीने आपल्या मावळेसैनिकांच्या मदतीने ५०० पठाण आणि अनेक बटलीया पायदळातील सैनिक ठार मारले , आणि मोगलांच्या सैन्यातून वाट कापत जिवावर उदार झालेल्या साठ सैनिकांना घेऊन तो दिलेरखानाच्या समोर येऊन ठेपला . त्याच्या असीम शौर्याची दिलेरखानाने वाहवा केली . त्याने मुरारबाजीला शरण येण्यास सांगितले . त्याने त्याला जीवदान देऊ केले आणि आपल्या हाताखाली मानाची जागा देण्याचे वचन दिले . मुरारबाजीने तुच्छतापूर्वक दिलेरखानाचा धिक्कार केला . तो दिलेरखानावर प्रहार करण्याच्या बेतात होता , तोच दिलेरखानाने बाण मारून त्याचा वध केला . त्याच्याबरोबर तीनशे मावळे लढाईत ठार झाले . बाकीच्यांनी किल्ल्याकडे माघार घेतली.

२ जून रोजी मोगलांना मिळालेला विजय आणि खालचा किल्ला पडणार याची दिसू लागलेली चिन्हे याचा परिणाम शिवाजीने लढाई आटोपती घेण्याचा निर्णय घेण्यात झाला . मराठा अधिकाऱ्यांची बायकामंडळी पुरंदर किल्ल्यात आश्रयासाठी होती . पुरंदरचा पाडाव म्हणजे त्यांची कैद आणि मानहानीचा प्रसंग होता. शिवाजीने जयसिंगाची भेट घेण्याचा निश्चय केला आणि बादशहाशी तह करण्याचे ठरविले.

(१४) पुरंदरचा तह, १६६५

शिवाजी आणि जयसिंग यांची भेट

११ जून रोजी सकाळी ९ वाजता पुरंदरच्या पायथ्याजवळ असलेल्या आपल्या शामीयान्यात जयसिंगाने दरबार भरविला होता . त्या ठिकाणी शिवाजी त्याला भेटावयास आला . तेथे त्याचे मोठ्या इतमामाने स्वागत करण्यात आले . [शिवाजी आणि जयसिंग यांच्यामध्ये झालेल्या भेटीचा वृत्तांत पुढीलप्रमाणे आहे : ९ जून १६६५ रोजी मराठ्यांचा वकील रघुनाथ बल्लाळ हा शिवाजीकडे परतला . १० जून रोजी त्याने निरोप पाठविला की , शिवाजी दुसऱ्या दिवशी भेटावयास येत आहे. ता. ११ रोजी सकाळी ९ वाजता पुरंदरच्या पायथ्याशी एका तंबूत जयसिंगाने दरबार भरविला होता . त्यावेळी रघुनाथ आत आला . त्याने सांगितले की , शिवाजी पालखीत बसून अगदी नजीक आला आहे आणि त्याच्याबरोबर फक्त ६ ब्राह्मण आहेत . जयसिंगाने त्याला वाटेत भेटण्यासाठी आपला चिटणीस उदयराज आणि उग्रसेन कछवा यांना पाठविले . त्यांच्याबरोबर त्याने शिवाजीला निरोप दिला की , तुझ्या ताब्यातील सर्व किल्ले देण्याची तुझी तयारी असेल तरच तू यावेस नाहीतर आल्याजागेपासून माघारी फिरावेस . शिवाजीने या अटीला आपली अनुमती दिली आणि दोघा अधिकाऱ्यांना घेऊन तो पुढे निघाला . तंबूच्या दरवाज्याजवळ त्याचे जयसिंगाच्या बक्षीने स्वागत केले आणि शिवाजीने तंबूत प्रवेश

केला. जयसिंग चार पाऊले पुढे चालून गेला , त्याने शिवाजीला आलिंगन दिले आणि त्याला आपल्या शेजारी बसविले . त्याचवेळी अफजलखानाच्या भेटीच्या प्रसंगी जो दगा फटका झाला तसा होऊ नये म्हणून सशस्त्र रजपूत सैनिकांना सभोवार पाहाऱ्यासाठी ठेवण्यात आले .

शिवाजीच्या मनात कदाचित् त्याला नेस्तनाबूद करण्याच्या मोगलांच्या निश्चयाबद्दल थोडा संशय असल्यास तो नाहीसा व्हावा म्हणून जयसिंगाने एक बनाव उघडून आणला होता . त्याने दिलेरखान आणि किरतसिंग यांना असे सांगून पाठविले होते की शिवाजी येण्याच्या वेळी तुम्ही पुरंदरवर हल्ला करण्याच्या तयारीत राहा . शिवाजीने तंबूत प्रवेश करता क्षणीच मोगलांनी हल्ला करून खडकाल्याचा उरलेला भाग जिंकून घेतला . शिबंदीने प्रतिहल्ला केला . पण तो परतवून लावण्यात आला . शिबंदीची ८० माणसे ठार झाली . हे चाललेले युद्ध शिवाजीच्या तंबूतून स्वच्छ दिसत होते. आपल्या माणसांची विनाकारण कत्तल होऊ नये म्हणून शिवाजीने किल्ला मोगलांच्या ताब्यात देण्याची तयारी दाखविली .]

मध्यरात्रीपर्यंत दोन्ही पक्षांनी कायम तहाच्या अटीबाबत वाटाघाटी केल्या . प्रत्येक पक्षाने आपल्या म्हणण्याप्रमाणे अटी ठरल्या जाव्यात याबद्दल कोशिश केली . "बऱ्याच वाटाघाटीनंतर पुढील अटीवर आमच्यामध्ये तह ठरला . (१) शिवाजीने आपल्या किल्ल्यांपैकी एकंदर २३ किल्ले त्यांच्या जमिनीपासून येणाऱ्या ४ लाख होनांच्या वार्षिक उत्पन्नासह बादशाही मुलुखात सामील करावे . [पुरंदरच्या तहाप्रमाणे शिवाजीने मोगलांच्या ताब्यात दिलेले किल्ले पुढीलप्रमाणे होते : दक्षिणेतील अथवा देशावरील (१) रुद्रमाळ अथवा वज्रगड (२) पुरंदर (३) कोंडाणा (४) रोहिडा (५) लोहगड (६) इसागड (७) टंकी (८) तिकोणा (९) कोंडाणा किल्ल्याजवळील खडकाला; कोकणामधील (१०) माहुली (११) मुरंजन (१२) खिरदुर्ग (१३) भांडारदुर्ग (१४) तुलसीखुल (१५) नरदुर्ग (१६) खायगड अथवा अंकोला. (१७) मार्ग गड अथवा अत्रा (१८) कोहज (१९) बसंद (२०) नंग (२१) करनाळा (२२) सोनगड आणि (२३) भावगड (**ए. एन्.**, ९०५)] (२) आणि जर शिवाने चाकरी करण्याची आणि बादशाही सिंहासनाशी एकनिष्ठ राहाण्याची अट कबूल केल्यास राजगडसकट वार्षिक एक लाख होनांचा महसूल येणारे १२ किल्ले त्याच्या ताब्यात ठेवण्यात यावेत ." यावर शिवाजीने याचना केली की , इतर उमराव आणि राजे -रजवाडे यांना दरबारात हजेरी लावावी लागत असे त्यापासून आपल्याला माफी देण्यात यावी. याऐवजी त्याने असा पर्याय सुचविला की , "आपण आपला मुलगा संभाजी याला प्रतिनिधी म्हणून ५००० घोडेस्वारांसह पाठविण्यास तयार आहो . या तुकडीचा खर्च बादशहाने दिलेल्या जहागिरीतून चालविण्यात यावा. संभाजी हा दरबारात नियमित हजर राहील आणि बादशहाच्या किंवा दक्षिणेच्या मोगल सुभेदाराच्या हाताखाली चाकरी बजावेल."

वरील अटीशिवाय शिवाजीने आणखी एक आणि सशर्त असा तह मोगलांबरोबर केला . तो असा, "जर का बादशहाने मला कोकणच्या खालच्या प्रदेशातील वर्षाला ४ लाख होन वसूल असलेल्या आणि घाटावरील (बालाघाट विजापूरी) वर्षाला ५ लाख होन वसूल असलेल्या जमिनी दिल्या आणि त्याचप्रमाणे मोगलांची विजापूरवरील अपेक्षित स्वारी झाल्यानंतर व विजापूर त्यांच्या ताब्यात आल्यानंतर माझ्या नावे या जमिनी कायम दिल्याचे बादशाही फर्मान देण्याचे अभिवचन दिल्यास मी बादशहांना ४० लक्ष होन १३ वार्षिक हप्त्यांमध्ये देण्याचे कबूल करतो ." या जमिनी शिवाजीने आपल्या स्वतःच्या फौजेच्या साहाय्याने विजापुरी अधिकाऱ्याकडून जिंकून घ्यावयाच्या होत्या . याठिकाणी आपल्याला शिवाजी आणि विजापूरचे सुलतान यांच्यामध्ये कायमचे भांडण लावून देण्याच्या जयसिंगाच्या धोरणातील कावेबाजपणा दृष्टोत्पत्तीस येतो. दुसऱ्या दिवशी (१२ जून) ठरलेल्या कराराप्रमाणे ७००० बायका आणि मुलांनी (यामध्ये ४००० लढाऊ सैनिक होते .) पुरंदर किल्ला सोडला . यावर मोगलांनी किल्ल्याचा ताबा आपल्याकडे घेतला . किल्ल्यामधील सर्व सामानसुमान , हत्यारे, तोफखाना आणि इतर मालमत्ता ही मोगल सरकारच्या नावे जप्त करण्यात आली . मराठ्यांनी आणखी ५ किल्ले मोगलांना देण्याचे कबूल केले होते . त्यांचा ताबा घेण्यासाठी शिवाजीच्या लोकांना मोगल अधिकाऱ्यांबरोबर पाठविण्यात आले . [पुरंदरचा तह ठरला त्यावेळी बादशहाचे खालील पत्र ५ –९–१६६५ चे शिवाजीस आले . "मुसलमानी धर्मरक्षक शिवाजी राजे यांनी बादशाही कृपेचे उमेदवार होऊन जाणावे की सांप्रत तुमचे पत्र बहुत नर्माईचे राजे जयसिंह यांची भेट , आपले केलेले कृत्य माफ व्हावे म्हणोन घेतल्याचे , पावून मजकूर ध्यानास आला . या पूर्वी तुमचे मनातील हांशिल सरकार कामदारांनी समजवीले होते , की तुम्ही आपले कृत्याचा पश्चात्ताप करून या दौलतीचे आसऱ्यास येऊन , वीस किल्ले आपणाकडील इकडील कामदारांचे स्वाधीन करून , बारा किल्ले व त्या खालचा मुलूख एक लक्ष होनाचा , निजामशाहीचे किल्ले व मुलूखापैकी, त्याच प्रकारे आणखी चार होनाचा मुलूख तळ कोकणातील विजापूर कराचे इलाख्याचा जो हाल्ली तुम्हाकडे चालत आहे , व पाच लक्ष होनाचा मुलूख बाला घाटापैकी विजापूरकराचे इलाख्यातील , येणेप्रमाणे एकंदराचा फर्मान बादशाही मागता व चाळीस लाख होन , दर साल तीन लाखप्रमाणे

पेशकशीबदल देऊ म्हणता; ऐसीयास, तुमच्या गोष्टी, ज्या तुम्ही दूरअंदेशा न पाहता केल्या, त्या माफी जोग्या नाहीत. तथापि राजे जयसिंह याणि लिहिल्या वरून सर्व माफ करून तुमचे मनोरथा प्रमाणे बारा किल्ले, ज्यांचा तपसील खाली लिहीला आहे ते व त्या खालचा मुलूख देऊन, आणखी हुकूम केला की, जो मुलूख नऊ लक्ष होनाचा, पैकी चार लक्ष होनाचा तळ कोकणांपैकी विजापूर कराचे इलाख्यातील हाल्ली तुम्हाकडे चालत आहे, तो बंदोबस्तामुळे इकडील सरकारात आला सबब, व बालाघाटी पाच लक्षाचा, विजापूर आमचे हाती येई त्याआधी तुम्ही त्याचेकडून घेतल्यास, या अन्वये तुम्ही चांगले फौजेसुद्धा राजे जयसिंह याशी मिळोन बादशाही कामात त्याचे मर्जीप्रमाणे कोशीश केल्यास, विजापूर फत्ते जाहल्यानंतर तुम्ही पेशकशीचे ऐवजाचा भरणा केल्यास, तुम्हाकडे ठेवू. हाल्ली तुमचे चिरंजीवास पाच हजारी मनसबा व पाच हजार स्वार, की एका-एकाची दोन-दोन तीन-तीन घोडी असावी, या प्रमाणे देऊन तुम्हा करीता पोषाख पाठवून फर्मान आपले पंजाचे चिन्हासुद्धा पाठविला आहे. तरी तुम्ही इकडील लक्षात वागोन बादशाही काम लहान मोठे करून, हे सर्व आपले उर्जिताची गोष्ट आहे असे समजत जावे. छ ५ **रबीलावल** सन १०८७ **हिजरी**". शिवाजीकडे राहावयाचे बारा किल्ल्यांचा तपसील :–

१ राजगड	१ तोरणा	१ लिंगणगड	१ महाडगड
१ घोसला	१ अलवारी	१ भोरप	१ कुंवारी
१ रायरी	१ पाल	१ तळेगड	१ उदयदुर्ग

]

[पुरंदरच्या वेढ्याविषयी विविध साधनांमधून मिळणारी माहिती पुढे दिली आहे :

'सभासदी बखरी'– तील या वेढ्याबाबत तपशील असा : "पुढे जयसिंगाच्या लष्करात राजियाचा हेजीब आला होता हे वर्तमान दिलेरखानास कळून मनात कष्टी जाहाला. 'शेवटी हिंदूसी हिंदू मिळोन काम जाया करितील' ऐसे म्हणोन दुसरे दिवशी दिलेरखान मिरजा राजियाच्या भेटीस आला आणि बोलू लागला कीं, 'उगेच काय म्हणून बैसला? गोटाजवळ कोंढाणा व पुरंधर हे दोन्ही किल्ले आहेत. पुरंधराला सुलतान ढवा करतो आणि गड घेतो. तुम्ही कोंढाणा गड घेणें. गड घेत चाललात म्हणजे शिवाजी येईल' असे बोलता, मिरजा राजा बोलला जे, 'गड आले तरी बरे. नाही तर नामोश जाईल. याजकरीता गडास न लागावे. मुलूख काबीज करावा. गडास सामान चालोन द्यावे म्हणजे गड आपाप येतील,' असे बोलता दिलेरखान रागे उठून चालिला. 'आपण आताच जाऊन पुरंधर घेतो. तुम्ही कोंढाणा घ्याल तरी घेणे,' असे म्हणून गोटास येऊन, नगारा करून, ढाल फिरंग घेऊन पुरंधराखाली येऊन, मुकाम करून गडावरील येलगार केला. पायउतार होऊन पांच हजार पठाण व दहा हजार बैल तोफांचे पायउतारा जाहाले. पेंढारी व आडहत्यारी व खलशे लोक वीस हजार लहान थोर एकत्र पाय उतार होऊन लगट करीत चालले."

"तेव्हा पुरंधरावरील नामजाद लोकांचा सरदार राजियाचा मुरार बाजी परभू होता. त्याजबरोबर हजार माणूस होते. त्याखेरीज एक हजार किल्ल्याचे होते, असे एक दोन हजार लोक होते. त्यात निवड करून मुरार बाजी यांनी सातशे माणूस घेऊन (ते) गडाखाली दिलेरखानावर आले. दिलेरखान तोलदार, जोरावर पठाण पांच हजार, याजखेरीज बैल वगैरे लोक ऐशी फौज गडास चौतर्फा चढत होती त्यात जाऊन सरमिसळ जाहाले. मोठे घोरांदर युद्ध जाहाले. मावळे लोकांनी व खासा मुरार बाजी याणी निदान करून भांडण केले. पाचशे पठाण लष्कर ठार जाहाले. तसेच बहिरे मारिले. खासा मुरारबाजी परभू दिलेरखानाचा देवडी पावेतो साठी माणसानिशी मारीत शिरले. दिलेरखान देवडी सोडून माघारा जाहाला आणि लोकांशी सांगून तोफखाना व तिरंदाज, बरच्या व आडहत्यारी एक हजार लोक यांजकडून मार करविला; त्यामध्ये साठी लोक पडिले. मुरारबाजी प्रभू याणी ढाल फिरंगी घेऊन दिलेरखानावर चालोन आले. महाराजांचे नांवाजलेले लोक ते खर्च जाहाले. आता काय मुख दाखवावे? म्हणून नीट चालून जावे असे मनात आणोन खानाशी गाठ घातली. तेव्हा दिलेरखान बोलला जे, 'अरे तू कौल घे, मोठा मर्दाना शिपाई, तुज नावांजितो.' ऐसे बोलता मुरार बाजी बोलिला जे, 'तुला कौल म्हणजे काय? मी शिवाजी राजाचा शिपाई तुझा कौल घेतो की काय?' म्हणोन नीट खानावरी चालिला. खानावर तलवारीचा वार करावा तो आपले अंगे कमाण घेऊन तीर मारून पुरा केला. तो पाडिला. मग खानाने तोंडात अंगोळी घातली की, 'असा शिपाई खुदाने पैदा केला' ऐसे आश्चर्य केले. मुरारबाजीबरोबर तीनशे माणूस ठार जाहाले. वरकड चारशे माणसे गडावर गेली. दिलेरखानाने शिरची पगडी उतरली, आणि गडावर चालून घेतली की गड घेईन तेव्हा पगडी बांधीन, ऐसा नेम करून चालिला तो दरवाज्याखाले येऊन, ढालेचा कोट करून बसला. किल्ल्याचे लोक मुरारबाजी पडला म्हणून गणना न करता शरतीने भांडू लागले. 'एक मुरारबाजी पडला म्हणून काय जाले? आम्ही तसेच शूर आहोत. ऐसी हिंमत धरून भांडतो' [सभा. ब. पृ. ३९–४१ चित्रगुप्त पृ. ५५–६.] यात कालक्रमाचा विचार नसल्याने त्या तपशीलावरून खरा वास्तवबोध होत नाही. 'मराठी माणसाची छोटी बखर' यातही वरील अर्थाचा मजकूर आहे. मुरारबाजी पडल्यानंतर "खानाने लगट करून रुद्रमाळेवर तोफा चढविल्या. मारगिरी करू लागला अशी अधिक माहिती आहे [म. सा. छो. ब., पृ. २९.] 'शेडगावकर बखरी' त अक्षरशः सभासदीचा मजकूर घेतला आहे." दिलेरखानाच्या सैन्याची गणती देताना थोडा फरक केलेला आहे तो : "खासा पाच हजार पठाणानिशी पायउतारा जाहला. सात आठ हजार रोहिले व बघेले व तोफा आणि पायउतारू जाहला व पेंढारी व अडाणी खलक वीस हजार लहान थोर पायउतारा होऊन गडासी लगट करीत चालिले" [शे. मो. ब., पृ. ४६–७]

'शिवदिग्विजया'त जरा वेगळ्या प्रकारचा मजकूर आढळतो : "मिरजा राजे जयसिंग यास सुभा सांगोन, दिलेरखान वगैरे फौज सरंजाम मोहिमेवर पाठविला. ह्याणी औरंगाबादेस येऊन, सुभ्याचा बंदोबस्त केला. तेथून सिंहगडास आले आणि मोर्चे बसविले. ते समयी महाराज पुरंदरास यावयाचा विचार करून लोकांस दिलासा देऊन, निघोन किल्ल्यास दाखल जाहाले. तेथून लोकांचा जमाव करून राजगडास यावे, मोर्चे मारावे, नसेल जिन्नस किराणा किल्ल्यावर तो पोंहोचवावा, याप्रमाणे काही दिवस किल्ला लढविला. जातींनी मोर्चावर येऊन पडावे. लोक मनस्वी जाया केल्यामुळे, मिरजा राजे यास महाराज आल्याचे वृत्त कळोन, सिंहगडचा वेढा उठवून पुरंदरास लागले. महाराज यांचे लोकांनी पेडगांवपर्यंत

अनुक्रमणिका

लोकांची रसद चालू देऊ नये ; मार्ग मारावे , फौजेवरी पडावे , मोर्चे कापावे . ते समयी मिरजा राजे व दिलेरखान याणी रुद्रमाळेकडून डोंगरावर दमदमा रचला. तेथे तोफ ठेवून मारगिरी केली . गोळे लागू जाले . नारायणाकडूनहि मोर्चेबंदी केली . परंतु किल्ल्यातून केदार दरवाजियानी लोक यावे आणि मोर्चे उधळून द्यावे . किल्ल्यावरील मनुष्य जेर न येई . ते समयी मिरजा राजे याणी विचार केला की , "एक एक किल्ला एक एक वर्ष लढला; तरी आपला प्रांत लागणार नाही . याअर्थी सल्ला करावा..... तो अर्थ दिलेरखानास कळून , परम क्रोधायमान होऊन 'हिंदु हिंदु एक आहेत , जाले, पादशाही दौलत बुडवावी .....' असा अभिप्राय धरून पुरंदरावर हल्ला चढविला . ते समयी मुरार बाजीप्रभु देशपांडे , पाच हजार मावळे व कोंकणे लोक घेऊन येऊन हल्ला कापून काढला . दिलेरखानापर्यंत तलवार मारीत यावे . असे हियाचा खबरदार माणूस , चागला पाहून ,... तेव्हा खानानी तीर चालविला . तो जिव्हारी लागून गतप्राण जाले ! ते समयी पाच सातशे मावळे लोक याणी उठावणी एकदाच करून चालून घेतले . ते वेळेस खानास विचार पडून , एकेक सरदार असा उमदा , एकासाठी इतकी मनुष्ये उदार जाली , त्याअर्थी हा किल्ला आपणास येत नाही . माणसाचे पराक्रम हिंमत पाहून दंग जाले. नंतर आपली फौज गोल बांधून वाचावे. हे जाणून मिरजा राजे यांणी जो विचार केला तो ठीक आहे ; येणे करून यश मिळेल, लढून यश नाही. ही खातरी होऊन परत लष्करात आले ." [**शिवदिग्विजय** पृ. २३६–३७.] मजकूर जरी काही तपशिलात बरोबर असला तरी कालक्रमाच्या निर्देशाभावी तुटक असल्याने अवस्तावता धारण करतो. चिटणीस बखरीतील मजकुरात काही विशेष नाही.

कास्मा द गार्डा लिहितो : "...जयसिंगाने ताबडतोब पुष्कळ लोक गडाच्या उत्तरेचा भाग आक्रमण्यासाठी पाठविले . कारण तोच काय तो भाग सोयीचा होता . इतरत्र चढून जाण्याची परिस्थिती नव्हती . येथे त्यांनी खंदक , त्यात राहून बचाव करता यावा म्हणून खणले . खंदकाच्या बाहेर गडावरील माऱ्यापुढे निभाव लागणे शक्य नव्हते . बऱ्याच परिश्रमाने एका मागून एक असे खंदक खणीत ते गडाच्या पायथ्यापर्यंत आले . येथून मोठा उभा सुळका असल्याने खंदक खणणे अशक्य होते . तेथे त्यांनी आपले काम थांबविले व जयसिंगाला खंदक खणणे अशक्य असल्याचे कळविले. तेव्हा तेथे एक फ्रेंच इंजिनियर आणला होता , त्याने बांबूच्या शिड्या बांधून जितके वर जाता येईल तितके वर जावे व तेथे मोठा सुरुंग पेरावा, की ज्याच्या योगाने तो डोंगराचा भागच उडवता येईल . शिवाजीने आतून खणण्यास सुरुवात केली आणि सुरुंगाचा थाग लागताच आतील दारू काढून नेण्याचा विलंब होईल हे जाणून त्याने त्या दारूवर पाण्याचा मारा करून ती दारू सर्व ओलीचिंब झाल्याने ओल्या कोळशासारखी निरुपयोगी करून टाकली . बाहेरच्या लोकांनी सुरुंग उडवताना दाखविण्यासाठी जयसिंगाला मुद्दाम आणले . परंतु सुरुंग पेटच घेईना . तेव्हा तो गडावरील लोकांचा एक हास्याचा व थट्टेचा विषय झाला."

"ते (मोगल) आता तोफखान्याचा जोर दाखवू लागले . जयसिंगाने फार मोठ्या अवजड तोफा , की ज्या ऐशी बैलाने ओढाव्या लागतात अशा, आणल्या आहेत . या जातीच्या गडावर गोळीबारास त्या पूर्ण निरुपयोगी ठरल्या , कारण हा गड म्हणजे काही मानवी कृती नव्हती . ती ईश्वराची घडण (कातळ) आहे. तोफगोळे, तुफानी वारा किंवा विजा यांचा त्याच्यावर थोडाही परिणाम होत नाही ...गडावर अर्धा लीग रुंदीचे गगनभेदी पठार आहे. पुष्कळ वर्षे पुरेल इतका अन्नसाठा आहे आणि पाणीही भरपूर आहे . शिवाय त्या पठारावर झाडझाडोराही आहे" [F. B. of S- डॉ. सेन, पान ८३ – ८४] अबे करेही थोडक्यात वरीलच तपशील देतो. तो लिहितो :– "जयसिंग ससैन्य येत आहे असे पाहून शिवाजी त्यास वाटेत हैराण करण्यासाठी पुढे चालून गेला . जयसिंगाने लढा देण्याचे टाळले . त्याला ठाऊक होते की , शत्रूच्या हुलकावणीवर न हुरळता आपला मार्ग आक्रमीत राहिले पाहिजे . शेवटी जयसिंग तटांकित शहरात (पुण्याला किंवा पुरंदरच्या तळोभागी) जाऊन बसला व तयारी होताच युद्धचातुर्याने वेढा दिला. परंतु प्रतिकार इतका जोराचा होता की , मोगली सेनापतीला वेढा उठवून शिवाजीबरोबर सामाची बोलणी करणे प्राप्त झाले ." [Ibid, पान – २०८]

मनुची जयसिंगाबरोबरच राहावयास आला असल्याने त्याने जयसिंगाच्या राजकारणी हालचालीचे वर्णन केले आहे ते फार महत्त्वाचे आहे. त्यावरून तत्कालीन राजकारणाची आता चांगली कल्पना होते . मनुचीच्या हकीकतीचा सारांश असा : "जयसिंगाने त्याला रामनगर , पेंट व चोथीया या राजांकडून , ते शिवाजीच्या बाजूने लढणार नाहीत किंवा त्याला आश्रयही देणार नाहीत म्हणून शपथपूर्वक आश्वासन घ्यावयाचे आणि या आश्वासनाबाबत त्यांनी आपली मुले ओलीस पाठवावयाची , या कामावर त्याला दख्खनचे हद्दीत येताच औरंगाबादेहून रवाना केले . मनुचीने त्याप्रमाणे त्या तीन राजांकडून दोघांचे मुलगे व एकाचा भाऊ ओलीस म्हणून जयसिंगाकडे आणले . या कामाला त्याला सात महिने लागल्याचे तो लिहितो. या तीनही राज्यांत त्याचा चांगलाच पाहुणचार झाल्याचे त्याने नमूद केले आहे . मनुची परत आल्यावर जयसिंगाकडेच राहात होता . त्याने लिहिले आहे की जयसिंग व शिवाजीची मैत्रीची बोलणी चालली असताना "गडावरील हवालदाराने फार नेटाने मोगली सैन्यावर तोफांचा भडीमार चालू ठेविला होता. शिवाजीच्या लेखी आज्ञेशिवाय तो गडही द्यावयास तयार झाला नाही." [**मनुची**, खंड २, पाने १३१–१३८]

खाफीखानाची माहिती जरी मुख्य गोष्टीचे तपशीलवार विवेचन करणारी असली तरी त्याचे लिहिणे सदोष आहे . कदाचित् मोगली नोकरांनी आपलाच वरचष्मा दाखवून बादशहास खूष करण्याच्या उद्देशाने लिहिलेल्या अहवालामुळे त्या माहितीला तसे रूप आले असावे . खाफीखानाच्या लिहिण्यातील मुख्य तपशील असा : "राजा जयसिंग औरंगाबादेस **सव्वाल** महिन्यात (६ फेब्रुवारी ते ६ मार्च १६६५) आला आणि पादशहाजादा मुहंमद मुअझमला भेटून पुण्याकडे गेला . तेथून मुलखाचा बंदोबस्ताकरिता आपले सरदार सर्वत्र लूट व जाळपोळ करून दहशत बसविण्याकरीता पाठविले . त्याचप्रमाणे शिवाजीच्या तीन मुख्य गडास वेढा देण्याकरता सैन्य रवाना केले . ते गड पुरंदर , रुद्रमाळ व कोंढाणा असावेत. (खाफीखानाप्रमाणे ते Poonah, Hirora आणि Riaul असे दिले आहेत .) दिलेरखानाकडे या वेढ्याच्या आघाडीच्या सेनापतीला दिले . मोगली सैन्यावर मागून व गडावरून मराठ्यांनी हल्ले चढविण्याचा क्रम सारखा चालू ठेविला होता . मराठी मुलुखातील खेड्यातील माणसे , बायका मुले व जनावरे पकडून मोगली सेनेने कैद करून ठेविली . पुरंदर व रुद्रमाळ यांच्यावरून होणाऱ्या तोफांच्या माऱ्याबाहेर मोगली सेनेने तळ राहिला . दोन्ही बाजूंनी तोफांचा भडीमार होतच होता . दिलेरखान आघाडीवर होता . जयसिंगही आपल्या कीरातसिंग पुत्राबरोबर पुढे गेला . सारखे हल्ले चढविता चढविता मोगली सैन्य बुरुजाजवळ गेले व तेथे सुरुंग उडविल्याने तर दरवाजे उडाले . मोगलांचा शिरकाव रुद्रमाळेपर्यंत झाला. येथे मोठी लढाई झाली. गडकरी राहिले ते वर पळून गेले . मात्र गोळीबार चालूच ठेवला होता . मुख्य गड घेण्याचा बाकी राहिला होता . परंतु तहाची बोलणी सुरू झाल्याने लढाई थांबवली . दरम्यान दाऊदखानाच्या सैन्याने रायसिंगाच्या सैन्यासह जवळ जवळ ५ महिने आसपासच्या मुलुखात लुटालूट व मारहाण करीत शिवापूरपासून ते कोंढाण्यापर्यंतचा मुलूख बेचिराख करून टाकला . उलट मराठ्यांनी छुपे हल्ले रात्रीबेरात्री चढवून संरक्षणार्थ

अनुक्रमणिका

डोंगरदऱ्यांचा आश्रय करून मोगली सर्व सरदारांच्या सैन्याचा दाणागोटा व जनावरे पळवून नेऊन व जंगलांत सभोवती आगी लावून हैराण करून सोडले. त्यानी विशेषतः अन्नपाण्याची सारखी टंचाई निर्माण केली. (**खाफीखान**, Mac-Col. खंड ९. भाग १, पाने १८२–८७.)

जयसिंगाला सुरुवातीसच आपल्या अधिकाऱ्यांवरील सत्तेबद्दल बराच संशय उत्पन्न झालेला दिसतो . याबाबतीत त्याचे एक पत्र उपलब्ध आहे. त्यातील मजकूर असा : "सैन्यातील लोकांचे बरेवाईटकरणे सेनापतीच्या हाती पाहिजे . शाहिस्तेखान सुभेदार झाल्यापासून सैन्याचे पगार , नेमणुका व बदल्या कारकूनांच्या हाती गेल्यामुळे शिपायांना युद्धभूमी सोडून त्याच्याकडे धावावे लागते . शिपायाची हजेरी व काम सेनापतीला माहिती असावयाचे, परंतु त्याचे हाती बक्षीस देणे किंवा शिक्षा करणे यापैकी काहीच नाही! तरी हे सर्व अधिकार जहागिरीबहाल करण्याचे सुद्धा माझे हाती असावे..... नेहमी शाहाजाद्याकडे जावे लागते ते बंद व्हावे . तसे झाले म्हणजे सर्वांची शेंडी माझे हाती आहे याची जाणीव होईल आणि सर्वजण मनासारखी कामे करू लागतील . हे करणे तुम्हाला मान्य नसेल तर हे पत्र गुप्त ठेवावे . नाहीतर माझा आब जाईल [मॉर्डन रिव्हू, भाग २, पान ५ . जयसिंगाची पत्रे क्रमांक ११९ –ब, १२०– ब; **पत्रसारसंग्रह**, क्र. १०५४.] हा अधिकार औरंगजेबाने कोणाही हिंदू अगर मुसलमान सरदारांना दिला नव्हता . इतकेच नव्हे तर औरंगजेब खासा सतराव्या शतकाचे अखेरीस दख्खनमध्ये उतरला तेव्हा तो अधिकार त्याने पादशाहाजाद्याकडे ही ठेवला नव्हता.

या लढ्याबाबत हकीकत मिरजाराजा जयसिंग याच्या पत्रातून आढळते . जयसिंग औरंगजेबास मार्च १६६५ त लिहितो : "प्रथम तळकोकणाच्या मार्गाने आपल्या तळाकडे जावे असा माझा बेत होता. प्रथम या प्रांतात आल्यावर विजापूरकर आणि शिवाजी एकत्र मिळण्याचा संभव होता. तसे झाले तर सावधगिरी निरुपयोगी झाली असती . यामुळे सैन्य सासवडलाच ठेवण्याचे ठरवले . शिवाजीचा पुरंदर गड आणि इतर मुलूख याला हे ठिकाण जवळ असून शिवाय विजापूरकरांच्या मुलूखालाही दूर नाही. [Ibid, पान ४; **पत्रसारसंग्रह**, क्र. १०५१].

जयसिंगाच्या जूनच्या पत्रात थोडीबहुत माहिती संदर्भाने आलेली आहे . हे पत्र जूनमध्ये औरंगजेबासच लिहिले असल्याने त्या माहितीत मोगली इभ्रतीला कमीपणा आणणारी भाषा व माहिती न येणे साहजिक आहे . त्यातील जरूर तो भाग असा : "...पादशाही फौज पाबळजवळ होती तेव्हा शिवाजीचे वकील येऊन भेटू लागले व नंतर पुण्यास मुक्काम आल्यानंतरही भेटले ... शेवटी आपल्या सैन्याने रुद्रमाळगड घेतला . तेव्हा मी सैन्याचे विभाग पाडून एक दाऊदखान व राजा रायसिंग यांचेबरोबर शिवाजीचा प्रदेश लुटण्यास पाठविला , दुसरा मुख्य सैन्याच्या भाग मुख्य तळाच्या संरक्षणार्थ व गस्तीसाठी ठेवला व तिसरा खंदकात काम करणाऱ्या सैनिकास सर्व तऱ्हेची मदत व विश्रांती मिळावी व त्याचे काम रात्रंदिवस सतत चालू राहावे अशी व्यवस्था ठेवण्यास वेगळा केला. मी स्वतः सर्वत्र जातीने लक्ष ठेविले होते."

"या व्यवस्थेचा चांगला उपयोग झाला . खास शिवाजीही लोकांजवळ बोलला की , 'मी पुष्कळ वेळा खंदकांचा नाश करण्यासाठी गडाकडे जाण्याचा प्रयत्न केला. परंतु दाऊदखानाच्या धावत्या पहाऱ्यामुळे , तसेच हे संरक्षकाचे मोठे जमाव व त्यांची तत्परता इतकी चांगली होती की, मी जर तसा प्रयत्न केला असता तर राजगडला परत जाणे दुस्तर झाले असते."

याच दाऊदखानाच्या पहाऱ्यातून शिवाजीच्या सैन्याची एक तुकडी गडावर बिनविरोध गेली होती, हे लक्षात ठेवणे आहे.

"थोडक्यात सांगावयाचे तर गडाचा वेढा परिणामकारकरीतीने चालविल्यामुळे पाच बुरुज व एक कंगुरा आपण जिंकू शकलो . आपल्या घोडदळाने सभोवतालील प्रदेश लुटला आणि त्यांनी आजपर्यंत मिळविलेली फौजही आपण त्यांच्यापासून सोडवू शकलो , याकरिता पुष्कळसे परवाने देऊन व लालूच दाखवून त्यांच्या कित्येक लोकांना मोगली घोडदळात सामील करून घेतले . त्यांना योग्य त्या मनसबीही देत आहे. दहा ते वीस रुपये जादा पगार देऊन कित्येकांना नोकरीत घेतले आहे व घेतही आहे ." [या बाबतीत जयसिंगाचे एक पत्र उपलब्ध आहे . जयसिंग औरंगजेबास लिहितो : ".....जावळीचा जुना जमीनदार चंद्रराय आणि त्याचा भाऊ यांना मी बोलावणे पाठविलेले आहे ..... त्यांना पुष्कळ अभिवचने देऊन पाथेयाची तजवीज केली आहे . अंबाजी खारकुली (मोरे?) व दोन भाऊ हे सर्व पुरंदरावर शिवाजीने तोफा ओतण्याकरीता ठेवले असून त्यांना तीन हजाराची मनसबदारी आहे . त्यांच्याकडेही माझे दूत गेले आहेत . अफजलखानाच्या मुलाला बापाचा सूड उगवण्याबद्दल मोगली नोकरीत ये असे कळविले आहे . कदाचित शिवाजीचे काही जोडीदारही आमच्याकडे फुटून येतील . आता या लोकांना मनसबा आणि जहागिरी द्याव्या लागतील. त्याबद्दल तुमचे मत काय आहे?"– [**मॉ. रे.**, भा. २. पृ. ४, **जयसिंगाची पत्रे.**]

"मी खेळोजी भोसलेकडून पाचशे पावलोक जावळीहून बोलाविले व रोज शिवाजीचे सैन्य कसे फोडावे यांचेच माझे प्रयत्न चालले आहेत." [**राजा जयसिंग टू दि एम्परर , डेटेड जून १६६५ , (हफ्त अंजुमान) राजस्थानी रेकॉर्डस्, 'शिवाजीज् व्हिजिट टू औरंगजेब ॲट आग्रा ', लेखक जे. एन्. सरकार**, नं. १, पाने ३–१३.]

शिवाजी १० मेला जावळीवर गेला होता तो याच फौजेच्या अडवणुकीसाठी.

या जयसिंगाच्या पत्राशिवाय या कालातील हालचालींची तत्कालीन कागदपत्रांवरून जी माहिती मिळते त्यावरून "महाराजा जयसिंग ३ मार्चला पुण्यास आला. जसवंतसिंगाने त्याचे स्वागत केले आणि जसवंतसिंग दरबारी जाण्यासाठी ५ मार्चला पुण्याहून निघाला ." [**एस. व्ही. टू ए ॲट ए**] (**नोट** २७)–**राजस्थानी लेटर** नं. १, पान १५ (१), **हरनाथ टू कल्याणदास**, बऱ्हाणपूर डेटेड १७ मार्च १६६५.] दिलेरखानाने "३१ मार्चला पुरंदराच्या वेढ्यास सुरुवात केली . (शिवापूरकर शकावलीत हीच तारीख दिली आहे .) जयसिंग १ एप्रिलला पुरंदरी येऊन डेरा दिला . ११ एप्रिलच्या सुमारास वेढ्याची आघाडी पायथ्याशी नेली व तेथे एक मोठी तोफ डागली . [Ibid, क्रमांक २ आणि ३. पान १५ (२–३) **नारायणदास टू कल्याणदास** डेटेड ९ एप्रिल आणि ११ एप्रिल १६६५ अनुक्रमे .] मोगली सैन्य पुण्याहून सासवडवरून पुरंदरच्या थेट पायथ्यापाशी जाऊन भिडले . एक सुरुंग खणला . रुद्रमाळ १४ एप्रिलला (शिवापूरकर शकावली हीच तारीख देते .) मोगली सैन्याने घेतला आणि पुरंदरच्या एका बुरुजासही

अनुक्रमणिका

खिंडार पाडले. पण ते फार लहान आहे . [Ibid, क्रमांक ४ आणि ५ , पान १६ (४–६) **हरनाथ टू कल्याणदास बऱ्हाणपूर** डेटेड २२ एप्रिल १६६५ आणि **दुर्गादास टू कल्याणदास** पुरंदर, डेटेड ३ मे १६६५ पान १६ (४–६).] २५ मे पूर्वीच पुरंदराचा पुढील तट व बुरुज तोफांनी उडवून दिला . गडातील लोक हिरिरीने प्रतिकार करीत आहेत . चार-पाच दिवसांत गड पडेल असा मोगली अंदाज होता . शिवाजीचा वकील रघुनाथ पंडित (रघुनाथपंत कोरडे नव्हे) (२० मे) येऊन बसल्याची बातमी होती." [Ibid, क्रमांक ६, **हरनाथ टू कल्याणदास** डेटेड २५, मे १६६५, पान १६ (७).]

यापुढील माहिती जयसिंगाच्या जून १६६५ च्या पत्रात [**राजा जयसिंग टू एम्परर** डेटेट जून १६६५ , (**हफ्त अंजुमान**) – **राजस्थानी रेकॉर्ड्स, शिवाजीज् व्हिजिट टू औरंगजेब ॲट आग्रा , लेखक जे. एन्, सरकार,** नंबर १, पान ३–१३] आली आहे ती, "...९ जूनला शिवाजीचा वकील पुन्हा आला आणि त्याने शिवाजी भेटीस येण्याच्या मार्गावर असल्याचे सांगितले ... शिवाजीच्या आगमनानंतर दिलेरखान व माझा मुलगा किरातसिंग यांनी पूर्वीच ठरवून ठेविलेल्या व बादशाहास अन्य बातमी पत्राने कळविलेल्या योजनेप्रमाणे माझेकडून इशारा होताच गडावर जोराचा हल्ला चढविला व खडकाला (वज्रगड चारशे फूट पुरंदराचे खालचे बाजूचा) घेतला व पुरंदरावर जाऊ लागले . या लढ्याची तीव्रता माझ्या डेऱ्यातूनही दिसत होती. शिवाजीने येताच चौकशी केली व पुरंदरचा तह देऊ केला. तेव्हा मी उत्तर दिले की, 'आता काय उपयोग, बादशादी सेनेने तो जिंकलाच आहे. एखाद्या तासात किंवा काही मिनिटांत किल्ल्यातील लोकांची कत्तल होईल . जर तुला पादशाहास गड द्यावयाचा असेल तर तुझे इतर गड आहेत त्यातील दे."

"त्याने गडावरील लोकांची कत्तल होऊ देऊ नका म्हणून.....विनंती केली."

"आता पुरंदर गड कसा ताब्यात घेतला याचे वर्णन करतो . मी मागे कळविले आहे की खडकाळा (रुद्रमाळ) दोन बुरुज व एक कंगोरा उडविले गेले. नंतर त्यापुढील खंदक आम्ही शत्रूकडून घेतला . येथे आपल्या सेनेला निवारा मिळाला . शत्रू त्यामागील संरक्षित अशा जागी जाऊन बसला. ११ जूनच्या रात्री बातमी आली की , शिवाजी शरणागती स्वीकारून मला भेटण्यासाठी दुसऱ्या दिवशी येत आहे . तो आल्यानंतर गडावर हल्ला चढविणे बरे दिसणार नाही ; परंतु बादशाही शक्तिसामर्थ्याची जाणीव दिल्यास तो पूर्ण शरणागतीस सत्वर कबूल होईल अशी माझी अपेक्षा होती याकरिता ११ जूनच्या रात्री दिलेरखान व सैन्याचा खंदक (मलचर) शत्रूच्या खंदकापर्यंत पोहोचवावा आणि आपला मोर्चा तेथे पोहोचताच सैनिकांनी लढाईला प्रारंभ करावा . असे होताच शत्रू ताबडतोब आपल्या निवाऱ्यातून बाहेर पडला . पुढे चालून येऊन लढ्यास तोंड देऊ लागला . अगदी हातघाईची (मुरादबाजीची) लढाई झाली. माझे व दिलेरखानाचे लोकांनी नेटाने शत्रूस हल्ले चढवून मागे रेटले."

"शत्रूने खडकाळा (रुद्रमाळ) गडातून पाय काढण्यास सुरुवात केली . या गडाच्या दोन बाजूस बळकट बुरुज व रुंद खोल असे खंदक होते. वाट इतकी अरुंद होती की , त्यावरून जेमतेम एक दोन माणसे एका वेळी जाऊ शकतील . काही जागी या सैन्यात शत्रूसैन्य आमच्या तलवारीच्या आणि धनुष्याच्या टप्प्यात सांपडले . त्यातील काही मारले गेले व बाकीचे पुरंदर किल्ल्याच्या पहिल्या दरवाजाजवळ जाऊन बसले . दरम्यान दिलेरखानाने व माझ्या लोकांनी देवडीसमोरील खंदकाचा आश्रय केला . तेथून गडाच्या दरवाजाची वरची बाजू व बुरुज पाडून टाकले आणि तटावर चढून जाऊ लागले . गडाचे दोन्ही बाजूंनी शत्रूने आम्हाबरोबर तलवार व कटारीचे युद्ध केले . त्यात शत्रूचे बरेच लोक मारले गेले . आपल्या बाजूकडीलही पुष्कळ मारले गेले व अनेक जखमी झाले . नंतर शत्रू पुरंदर गडावर निघून गेला आणि त्यांनी तिसऱ्या दरवाजाचा आश्रय केला. तोही दरवाजा आपल्या तोफखान्याने जेर केला आणि त्या दरवाजातून आत घुसण्याची खटपट चालू होती तोच शिवाजी आपली शरणागती देण्यास माझ्या गोटात आला . पुरंदरच्या लढ्यात ३० हजार रुपये रोख खर्चण्यात आले . त्याशिवाय बादशहाच्या कोठारातून जो अमाप दारुगोळा खर्च झाला त्याचाही हिशेब नंतर कळविण्यात येईल ." [**राजा जयसिंह टू दी एम्परर डेटेड जून १६६५ (हफ्त अजुमान राजस्थानी रेकॉर्डस् – 'शिवाजीज् व्हिजिट टू औरंगजेब ॲट आग्रा,' लेखक जे. एन्. सरकार.** क्रमांक १, पान ३ – १३.)]

[जयसिंग–शिवाजी यांच्यामधील संघर्षाची मराठी कागदपत्रात मिळणारी माहिती पुढे दिली आहे.

जयसिंगाची योजना : महाराजांचे अंगी श्रीचा संचार.

यानंतर पादशहाने विचार केला जे, "मिरझा जयसिंग ('मिरजा जैसिंग') यास मोहिमेस पाठवावे. हे हिंदू आहेत. राजकारण तह करून अथवा युद्ध करून हाती लागल्यास घ्यावे अगर मसलत करावी ," म्हणून जयसिंग यांस सांगून सुभेदारी देऊन त्यांचेबरोबर दिलेरखान पठाण विश्वासू मातबर सरदार दिल्हे . फौज, तोफखाना, वगैरे सामान बहुत पोख्त करून दिल्हे . ते दरमजल येऊन औरंगाबादेस पोहोचून सुभ्याचा बंदोबस्त केला, आणि महाराजावरी चालून आले.

तेव्हा महाराजांना विचार पडला जे ('महाराज विचारात पडले जे ,') "दोन सुभे दिल्लीचे आले ते बुडविले . श्रीने त्यांचे पारिपत्य केले . हल्ली मातबर सरदार मोठे आंगेजणीचे व सामान भारी घेऊन ('असे') आले. बरे, देव पार पाडणार ! तेव्हा काय चिंता आहे ?" म्हणून श्रीची प्रार्थना केली जे "या शत्रूचा पराभव कसा करावा ?" ते समयी श्रीचा संचार अंगी होऊन बोलिले जे , "अरे मुला, ये समयीचा प्रसंग कठीण आहे . याचा पराभव घडत नाही. तुला दिल्लीस जाणे घडेल, तेथे कठीण प्रसंग प्राप्त होईल, परंतु तेथून निभावून आणीन, तीर्थयात्रा बहुत घडतील, आजपर्यंत रक्षिले, तसेच रक्षीन," अशी आज्ञा जाली. ते चिटणीस व वाकेनीस यांणी लिहून ठेवून ('ठेविलिया') त्याप्रमाणे वाचून दाखविले. ते ऐकून घेऊन बहुत संतोषी जाले. "सर्व प्रकारे श्री निभवणार आहे," ऐसे बोलले आणि विचार केला जे, "जयसिंग आले, हे हिंदु आहेत, यांशी सख्याचेच विचारे बोलावे." म्हणून रायगडाने निघोन राजगडास आले, फौजा जमा केल्या.

'आम्ही-तुम्ही हिंदु, तुमचा बचाव करता यावा हा हेतू ' [इकडे] जयशिंग व खान भीमा उतरून आले . तो राजे राजगडी आले हे कळोन सिंहगड व पुरंदर यांचे मधी येऊन मुक्काम करून राहिले . आणि जयशिंग यांणी महाराजांचे चरित्र व राज्यआक्रमण शक्ती पाहून "हा राजा हिंदु,

अनुक्रमणिका

परम धार्मिक , भला, धर्मस्थापन करणारा , नितीकरून राज्य चालवितो ; यास कसेही बचवून ('रक्षून') पादशाहाची चाकरीही मनसबेचे युक्तीने बजवावी. याशी युद्ध केले असता जय अथवा अपजय कसे पडेल कोण जाणे ! याची फौज व लोक , समान चांगले जातीचे मनसबा करणारा , व ठिकाणे चांगली बाकी , सर्वगुण संपन्न आहेत . वरकड सरदार नामोहरम होऊन गेले तसे आपणासही घडल्यास ('घडलेल्या,' 'घडेलेया,' 'घडल्या') ठीक नाही ('कठीज') आपण अब ('अबरू') रक्षून जावे ," ऐसा विचार करून महाराजांकडे सख्याचे अनुसंधान करावेसे करून , वकीलाबराबर सांगून पाठविले जे , "औरंगजेब बलवान पृथ्वीपती त्याशी तुम्ही सख्य करावे ; शत्रूत्वेच राहून परिणाम या काली लागणार नाही ; आम्ही हिंदु जयपूरचे राजे , तुम्ही उदापूरचे ('उदेपूरचे') घराण्यातील सिसोदे थोर वौश ('वंश') आहा. धर्मस्थापना हिंदुधर्माची तुमचे कुली परंपरा चालत आली तीच करीतां . यास्तव तुम्हांस अनुकूल आहे . तुमचा बच्याव करून राज्य रक्षावे हे आमचे चित्तांत बहुत आहे . तुमचे मानस काय ते कळवावे." म्हणून ('असे') सांगून पाठविले असता महाराजांनी गोष्ट मनात आणिली ('आणिले') तसाच ('तसेच') यांचाही भाव आला . "श्रीची आज्ञा तसेच एक वेळ दिल्लीस जावे , आपला पूर्वप्रांत दृष्टीस पडून गंगादि यात्रा पुण्यक्षेत्रे हेही घडेल . यास्तव सख्याचे बोलणे आले तेच उत्तम " म्हणून वकील आले त्याचा गौरव बहुमान करून आपले वकील त्याजबराबर पाठवावे , बोलणे लावावे, हा विचार करून सर्वांचे ('सर्व सरकारकून यांचे') विचारे विचार ठरावात आणून , रघुनाथ भट पंडितराव यास हत्ती , घोडे लवाजिमा बरोबर देऊन त्याज बराबर वकीलीस पाठविले . जयसिंगराजे यांस व खानास बहुमान वस्त्रे, पोशाख पाठविले.

'तुम्ही देव ब्राह्मण संरक्षिता, हे आम्हांस संतोषकारक...'

ते [रघुनाथ पंत] जाऊन भेटल्यावरी बोलणी जाली . त्यात महाराजांचे बोलणे , "आपण पादशाहाशी सख्य असावे [म्हणता] तेच आम्हास कर्तव्य. आम्हाकडे प्रांत व किल्ले, मुलूख आम्ही आपले बाहुबळे करून पर – तालुक्यातील मेळविले, त्यास पादशाहाकडून उपसर्ग नसावा; आणि पादशाहाची स्वच्छता ('स्वस्थता') घडावी; भेटी होऊन अधिक सरफराजी व्हावी , हे आपणास आवश्यक आहे ; त्याअर्थी आमचा आपणाशी दुसरा अर्थ नाही." हे बोलणे बहुत निखालसतेचे ऐकून घेऊन जयसिंगराजे यांनी उत्तर केले की , तुम्ही हिंदुधर्म उच्छेद जाला तो दक्षिण प्रांतचे ठाई स्थापन करून देवब्राह्मण संरक्षण करिता हे आम्हास संतोषकार आहे . तुम्ही आमचे रामशिंग जसे पुत्र तसेच आम्हास आहा . तुम्हाशी शपथपूर्वक दुसरा अर्थ नाही. तुमचे मतलब पादशाहाकडून काय काय करून घ्यावयाचे असतील ते लिहून पाठवावे . समजवावे त्यासारखे पुढील बोलणे चालू होईल, ('समजावे. त्यासारखा पुढील विचार होईल ') म्हणून वकिलापाशी सांगून दिलेरखान याची भेट करविली . त्यास बहुमान वस्त्रे , जवाहीर आणिले ते देऊन ('देविले') बोलणीही समजाविली. त्याची सलाह घेऊन पंडितराव यास वस्त्रे , बहुमान देऊन, त्यांजबरोबर महाराजास बहुमान , वस्त्रे, जवाहीर देऊन परतून रवाना केले.

दिलेरखानाचा तहास विरोध.

ते महाराजापाशी येऊन जयशिंगाची बोलणी समजाविली . महाराजांनी सर्व आपले मतलब लिहून काढिले . "आम्ही राज्य घेतले हे दरोबस्त आमचे आम्हाकडे राहावे. वरकड दक्षिण प्रांत यांतील चौथाई, सरदेशमुखी आम्हाकडे चालावी. किल्ले, कोट घेतले ते व नवे केले ते आमचे आम्हाकडे असावे आणि सख्य घडावे ." ऐसे मतलब सांगून पुन्हा वकील रवाना केले आणि त्यांनी जाऊन यादी दाखविल्या , बोलणी सांगितली. तेव्हा महाराज तह करितात हा सिद्धांत जयशिंगास निश्चयाचा कळला आणि भेटी 'व्हावी नंतर परस्परे निखालसता ठरोन बोलणी करार करीता येतील, ऐसा ठराव केला. तेव्हा दिलेरखान यांचे विचारे , "लागलीच भेटी घेऊन बोलणी पक्केपणात आणून या जातीचा तह ठरवू नये ; सर्व वाके पादशहास लिहून पाठवून तेथून आज्ञा येईल त्या अन्वये पुढील विचार करावा . मसलत ('मतलब') करून आलो , हा दाब ('दावा') वाढवून ('बसवून') काही प्रांत, किल्ले सोडवावे आणि नंतर करणे ते करावे . पादशाहाकडील उत्तरे येत तो आम्ही पुरंधर घेतो तुम्ही सिंहगड घ्यावा ." असा आग्रह त्याचा पडला ('ऐसे बोलणे आग्रहाचे पडले ') ते समयी "शिवाजी राजे तहाने येतात हे वाईट नाही . पादशाहाचे आज्ञेप्रमाणे त्यांचेही बरे करून पादशाही मतलब मनात आणून ('करून') आपलेसे करावे, दौलताबाद तालुक्यातील प्रांत , किल्ले घेतले ते तहांनी सोडवावे हे उत्तम ," असे [जयसिंगाने] सांगितले असता खानाचा आग्रह न सुटला. "पादशाहास लिहून करणे तसे करू," म्हणून वकिलास निरोप देवविला.

मावळे लोक हे शिवाजीचा सैतानखाना.

आणि [खान] आपण कूच करून, पुरंधरानजीक येऊन, मोर्चेबंदी करून वेढा घेतला. रुद्रमाळचे डोंगरावर दमदमे रचून , तोफा चढवून मारगिरी केली आणि 'हल्लेनी किल्ला घ्यावा , किल्ला म्हणजे हिसाब काय आहे ? हल्ला करावा' ऐसा विचार केला. ते समयी महाराजांनी राजगडाहून केदार दरवाजाकडून रसद पोहोचविली . लोकांनी भरती केली . वरचेवरि मदत करिते जाले . मोर्चे मारून उठवून ('उधळून') दिले. त्याजवरून फारच अभिमाने करून आग्रहास खान प्रवर्तला. आपली कुल जमियत एक करून आपण खासा नारायणाचे देवळापाशी उभे राहून, लोक पायउतारा करून, किलियावरि हल्ला चढविली . तोफांची (तोफेची) मारगिरी करून पेंढार वगैरे पुढे घातले ; त्याचे मागे गारदे ; ('गारद') त्यांचे मागे पठाण लोक, तोफा; त्यामागे असे करून आपणही चालून घेतले . याजवरून किलीयावरून मुरारबाजी देशपांडे माहाडकर प्रभु मावळे लोकांचे सरदार होते, त्यांणी लोक निवड करून, घाटकरी घेऊन, हल्लेवारी चालून घेतले. पेंढार कापून पिटले. मागे पठाण व गारद होते, ते उभे राहिले, त्याजवरी सरसून आले. पठाण हजार दोन हजार गोळा व तलवार चालवून रणी पाडिले . मावळे लोकही बहुत पडिले. सारी हल्ला मारून डोंगराखाली पिटीत आणिली. तेव्हा खासा दिलेरखान चालून गेला . त्याजवरी मुरारबाजी लोक सुद्धा चालून आले आणि लोक मारीत सुटले . तेव्हा खानही आपले जागा दंग जाला . पुढे हल्ला चालेनासे बाजी याणे केले . खान तोंडात बोट घालून चकित जाला . 'शिपाई गिरीची शर्थ केली ! मावळे लोक हे शिवाजीचा ('शिवाजीपाशी') सैतानखान आहे म्हणून बोलोन , 'कौल घ्यावा' असे सांगून पाठविले असता "तुम्ही तुरुकडे ('तुरुख') तुमचा हिसाब काय? तुमचा कौल कशास पाहिजे ? मी शिवाजीचा चाकर आहे ! मरून खस्त होऊन तुम्हास नामोहरम करीन !!" ऐसे बोलोन पुढे चालून घेतले . तेव्हा दिलेरखान याचे हातचा ('हाताचा') तीर लागून, आणखीही जखमा बहुत चढून रणी ठार पडले . लोकही त्यांजबराबर बहुत पडले . वरकड सावरून निघोन किल्ल्यावर गेले. तो महाराजाकडील आणखी नामी लोक भरतीस आले ते पोहोचले . नगारे, करणे वाजू लागले की , किल्ला हुशार

अनुक्रमणिका

आहे, तोफा चालू लागल्या, घोडी लोटल्या. हे कळोन खान खजील होऊन शेवटास हल्ला जाणार नाही . हटाने करणे, लोक मार [वि] णे चांगले नाही, म्हणून गोटास आले. अस्तमानही जाला.

सुलतानढवा गर्दी करून घालून बुडविला.

तेव्हा जयसिंग यांनी सांगून पाठविले जे, "हे करिता हे चांगले नाही. शिवाजी राजाची माणसे एकाहून एक अधिक आहेत. किल्ला येणार नाही. एक किलीयास इतकी माणसे खराब केली . खडे खावविले. तेव्हा सारे किल्ले मोठे झाडीतील कोकण बांधारी वगैरे कसे येतात ? ('येतील') शयाद्रीचे ('सह्याद्रीचे') किल्ले बिकट, झाडीरान त्यास तेथे कसे कराल ? शिवाजी राजा राजकरण करून येऊन भेटत होता ते सोडून विश्वासही गमाविलात. राजकारण तोडिलेत. पुढे विचार काय ? इतक्यात सिंहगडावरी सुलतानढवा [करावा] म्हणून सरदार फौज देऊन मोर्चे लावावयास पाठविला होता, त्यास महाराजांनी छापा पहाटेस पाच चार टोळ्या ('वेळा') करून गर्दी करून घालून बुडविला, ('उडविला') सरदार मारिला, फौज लुटून घेतली," हेही वर्तमान आले याजवरून खान सर्द होऊन जयसिंग यास बोलीले जे , "राजे यांसि पुन्हा भेटीचे राजकारण विश्वास जेणेकरून होय त्या रीतीने करवावे; परंतु त्यांत पुरंदरास मोर्चे आम्ही लावून हल्ला केला, प्रतिज्ञा केली असता गोष्ट न घडली ये विषयी किल्ल्यावर आमचे निशाण त्यांनी घेऊन [आमचे] लोक चढवावे. पुन्हा किल्ला त्यांसच तहात द्यावा . हे मात्र करून घेऊन मागील बोलणे आहे त्याप्रमाणे चालवावे."

खान शर्मिंदा झाला.

याजवरून जयशिंग राजे यांणी "प्रयत्न करून घडेल तितके पाहू" म्हटले. ('म्हणोन') महाराज यांचे जैसिंग यांचे चित्त मिळाले होतेच. खानाचे दुराग्रह यामुळे वकिलास निरोप दिला. आतून ऐक्यता ('एक विचार होता.') पुन्हा वकील पाठवून" जाली ती गोष्ट बरीच जाली. या उपरी पूर्वी बोलणे आहे तेच कायम करून किल्ल्यावरी मात्र एक वेळ निशाण घ्यावे आणि किल्ला तुम्हीच ठेवावा ." [असे] सांगून पाठविले असता, महाराजांनी सांगून पाठविले जे, "निशाण [तुमचे] घेऊन किल्ला दिल्हा हे काही घडणार नाही. खानानी दोनशे पाचशे हजार लोकांनिशी पाहिजे तसे किल्ल्यावरी येऊन किल्ला पाहून फिरोन जावे " ऐसे सांगून पाठविले . यावरून खान किल्ल्यावर जावे ऐसे ठरोन खानास पाचशे लोकांनिशी किल्ल्यावर घ्यावे ठरले, आणि किल्ल्यावरी दोन हजार माणसे बहुत नामी लोक , सामान, तोफा वगैरे बहुतच तरतुदीचे शिलेपोत दुरुस्ता उभे [करून,] सदरेस बैठक तरतूद करून [खानास] वरते घेतले. सामान पाहता बहुत चांगले , दगाबाजी करू म्हणता चालावयाचे नाही , गद्रीस मेळवितील, दगा पावू, म्हणोन खाली उतरोन येऊन शर्मिंद जाले . "केले कर्म शेवटास न गेले . [नेम शेवटास न गेला .] किल्ले, कोट घेणे अवघड गोष्ट, राजे यांचे माणूस बहुत चांगले, मर्द व तरतूद राजाची [चांगली] लढाई करण्याची शर्त जाली" ['करितात'] ह्मणोन गोटात आले. भेटी व्हावी हा सिद्धांत जालाच होता . परंतु रुद्रमाळ खानानी दमदमे रचून घेतली ती परत द्यावी आणि पुरंधरापासून फौजा उठून जाण्या , नंतर भेटीचा योग घडेल असे सांगून पाठविले. यावर रुद्रमाळ परत दिली फौज उठविली.

'तुम्ही आम्ही शरीरसंबंधीच!'

यानंतर पंडितराव यांसी पुन्हा रवाना केले. "तुमचा विश्वास कसा पडतो? एक वेळ [बोलणे] ठरावात आणिले ['आले'] असता तुम्हीच तह बिघडविला. आता भेटी कशी घ्यावी ? हे खातरजमा व्हावी." म्हणून [रघुनाथ पंडित] बोलल्यावर आणशपत खानासह निखालसत्ता जयसिंग यांणी करून देऊन "यादीचा करार ठरावून लिहिले मतलबाप्रमाणे पादशाहापासून करून ('ठरवून') आणून" ऐसे ठरावून खातरजमा केली . जयसिंगाचे म्हणणे, "तुम्ही आम्ही एक रजपूत. तुम्ही राणे सिसोदे, आम्ही कछवे, शरीरसंमंधीच ('शरीसंबंधीच') आहो; जसे रामशिंग तसेच तुम्ही आम्हास; दुसरा विचार ('प्रकार') नाही. तुमचे बरे ते सर्व प्रकारे करीन," असे सांगून वकील रवाना केले.

त्यांणी जाऊन सर्व वर्तमान समजलियावरून ('कळविल्यावरून') भेटीस आले. आपली फौज व हषम लोक निवड करून बराबर घेऊन उभयता पेशवे व सुरनीस संभाजी महाराजांपाशी फौज पंचवीस तीस हजार व हषम असे किल्ल्याचा बंदोबस्त करून ठेविले . बराबर सरदार, सरकारकून ('सरकारखानदार') फौज, पागा पंचवीस तीस हजार लोक व हषम दाहा हजार घेतली व फौजेत मावळे लोक घेतले . त्यांस पोशाख ('बाधली') व पैठणी घोड्यास सामाने सोने रुपे यांची ; व मुत्सद्दी सरदार वगैरे यांचे आंगावरी जवाहिरे तसेच हत्तीची सामाने भरजरी . पायी सोन्या रुप्याच्या साखळ्या; अंबाऱ्या, हौदे सोन्यारुप्याचे ऐसे शेपन्नास; तसेच खिदमतगार हुजरे वस्त्रे अलंकार सोन्याचे येणेकरून युक्त पायचे सरदार यास सोन्यारुपे (ची) कडी, साखळ्या, कंठ्या, दुहीकरून युक्त; याप्रमाणे स्वारी सिद्ध करून आपण खासा साधा पोशाख करून अंबारीत बसोन , हाती तलवार तीर-कमान घेऊन, पाठीमागे मुत्सद्दी व सरकारकून व सरदार यांच्या अंबाऱ्या पंचवीस चाळीस , पुढे कोतवाल, जिलीब (संगे लोक मर्द होते शिंगाडे यांची शिंगे रुप्याची होती .) लोक, शाहाजानी घाडी, करणे, शिंगे रुप्याची पंचवीस पन्नास ऐसे भेटीस आले . जयसिंग याचा इतबार पक्केपणा पुरला ('पुरा') होताच; बेकिलाफ उभयपक्षीही जाला होताच.

सरदार कोण व राजा कोण हा संदेह!

महाराज आले हे बातमी येताच जयसिंगही खान यांस बराबर घेऊन , फौज स्वारी तयार करून सामोरे गेले . आणि उभयतांकडील ('इकडील तिकडील') लोक, सरदार हजार पाचशे खासे नेमून त्यांच्या समारंभेकरून भेटी करविल्या . नंतर खासही भेटले. परस्परे बहुत आदर जाले. महाराजांचे लोक व सामान तरतूद पाहून सर्वही बहुत चकीत जाले . "ज्याचे देणे व संपत्ती अशी ! तेव्हा लोक जिवाची परवा कशास ठेवितील? किल्ले कोट घेणे, मोठे धाडसाची कर्मे करणे हे असे सामान असता अगाथ काय ?" ऐशी चर्चा करू लागले. सर्वांचे पोशाख व आभरणे, अमीर लोक, मातबर मातबर सरदार पाहून राजा कोणता हा संदेह जनास पडला . ('पाहूनही सरदार कोण व राजा कोणता हा संदेह त्यांना

झाला') महाराजांनी जवाहीर देखील अंगावर विशेष घातले नाही. भेटी जालियावरी जयसिंग व महाराज एके अंबारीत बसून डेरियास आले. तेथेही एक आसनी बसले. विडे, पान आदर ('अत्तर गुलाब') होऊन गोटास जाण्यास निरोप दिल्हा.

भेटीगाठी, मेजवान्या, निखालसता.

दुसरे दिवशी "दिलेलखान यांचे डेरियास जावे, पादशाहा इतबार अमीर आहेत" म्हणून जयशिंग यांणी सांगितल्यावरून ठरले. बरोबर सुभानसिंग मामा दिल्हे. त्यांसह महाराज त्यांचे डेरियास जाता खान गोटाबाहेर सामोरे आले व घेऊन गेले. वस्त्रे, बहुमान, जवाहीर, हत्ती घोडे राजे यांस दिल्हे. मानकरी व मुत्सद्दी यांस वस्त्रे, जवाहीर देऊन तहाचे बोलणे परस्परे चालते जाले. सुभानशिंग यांणी राजियाचे बोलणे सांगितले यावरून, "जयशिंग राजे सुभेदार वडील ('वये वडील') पादशाहाचे इतबारी, आम्ही त्याचे ताबिनांत, ते करितील त्यांत आम्ही आहो," ऐसे खान सफाईकरून बोलले. महाराज गोटास आले. नंतर जयशिंग व दिलेरखान यांस मेजवान्या महाराजांनी बहुत तरतुदीने केल्या. हत्ती, घोडे, जवाहीर, वस्त्रे दिल्ही. व मातबर सरदार अमीर यांसही वस्त्रे जवाहीर योग्यतेनुरूप दिल्हे. त्यानंतर खान व जयसिंग यांणीही महाराज यांसी मेजवान्या केल्या. सरकारकून सरदार यांस वस्त्रे, जवाहीर दिल्हे. महाराज यांसी वस्त्रे जवाहीर, हत्ती, घोडे देऊन सभारंभ केला. जयशिंगाची ममता, मनःपूर्वक बोलणे, उत्तम प्रकारे निखालसता ['महाराजांशी'] जाल्या. "राजा परम धार्मिक कुलीन होय, यास यश येऊन दिवसेदिवस वृद्धींगत पावावे ('पावो') दैववान्, पराक्रम याचा ('करणे') विचित्र यास्तव जसे साहित्य होईल तसे याचे करावे, यांस राखावे," म्हणून ('असा विचार करून') करिते जाले. ते समयी जंजिरेकर सिद्दी संबूल हपशी ('हबशी') जयशिंग याजकडे आले होते. महाराजांनी 'जंजिरा आम्हाकडे देववावा' बोलणे घातले असता, "पादशाही चाकर ते, औरंगजेबाची आज्ञा पाहिजे. तुमचे मतलबात ('मतलब') लिहून पाठवू," ऐसे उत्तर केले. नंतर राजे निरोप घेऊन राजगडास आले.

तहनामा : जंजिऱ्याचा विचार नाहीं.

[जयशिंगाने] तहनामे लिहून, त्यांत पूर्वी ['पूर्वकलम जंजिरे याचे लिहून'] कलमे लिहीलीं [तीं] व जंजिरे याचेही कलम लिहून आणविले ('आणिले') डाकेवरी रवाना केले. येथे जाले वर्तमान वाके सर्व लिहिले. "राजे भेटीस दिल्लीस यावयाचे ठरले. यादीवर रुकार होऊन सनदा ('यादी व रुकारसनदा') याव्या. आम्ही उभयता बाहादारीस निभावणीस ठेवावे ('व्हावे') म्हणजे दिल्लीस येतात, ('येतो') नंतर आपणही सफाई करून सर्फराज करावे." ऐसे कितेक प्रकार जयशिंग यांणी लिहिणे ते लिहिले आणि कूच करून नदी भीमातीरी मुकाम केला. नंतर पादशाहाची उत्तरे आली : "उभयता निभावणी बहादारीस ('बहादरी सांगून') व्हावे, जंजिरे कलम बोलो नये. वरकड किल्ले, कोट, पादशाही दौलतीतील सोडावे. त्यातही दौलताबादेखालील प्रांत किल्ले हे सोडावे. चौथाई व सरदेशमुखी करार करावी. हुजूर भेटीस आलियावरी येथून प्रांत किल्ले सफाईची चाल पाहून देणे ते देता येईल." ऐशी यादीवर उत्तरे खाल होऊन आलियावरी महाराजास पत्रे पाठवून आणवून पुन्हा जयशिगांनी ठराव केला. "विजापूर प्रांतातील त्या पादशाहीतील [प्रांत किल्ले] घेतले त्यांजविषयी बोलो नये, व त्या लगती काही प्रांत व किल्ले दौलताबादेखालील हेही जुन्नर वगैरे तालुके राहावे ('राखावे'). बाकी सत्तावीस किल्ले, त्रिंबक नासिक प्रांत, बागलाण, खानदेश सोडावे," ऐसे ठरोन करार यादी तहनामे करून, उभयपक्षीचे वकील जाऊन तेथून तहनामे करार होऊन यावे, नंतर जाण्याचा बेत करावा, ऐसे ठरवून आपले कडील माणूस मातबर देऊन महाराजाकडील सोनोपंत डबीर याचे मेहुणे रघुनाथ बल्लाळ कोरडे, बरे, शाहाणे, पारसनीस होते जाणून, दिल्हे आणि दिल्लीस रवाना केले.

जयशिंग राजे व दिलेरखान औरंगाबादेस जावयाचा विचार ठरवून जाता विजापूर यांणी खंडणी घ्यावयाची, महाराज बराबर फौजेसुद्धा यावे म्हणोन बोलोन कूच करून निघाले. जयशिंग व महाराज यांणी एके अंबारीत बसावे, उभयतांची बहुत निखालसता, हे पाहून आपली अंबारी मागे चालवणे वगैरे दिलेरखानास असह्य वाटू लागले. तेव्हा पेडगावी आपले राहण्यास ठाणे बांधावयाचे म्हणून काम लावून तेथेच खान राहीले. महाराज व जयशिंग पुढे गेले. खंडणी जाली. नंतर महाराज दिल्लीचे जाब येताच जाणे पडेल, किल्ले कोट वगैरेंचा बंदोबस्त जाला पाहिजे, म्हणून निरोप घेऊन निघाले. जयशिंग औरंगाबादेस गेले. (म. रा. चि. १०३–१११)]

(१५) शिवाजीची औरंगजेबाबरोबर आग्रा येथे भेट, १६६६

आग्राभेटीबद्दल शिवाजीच्या मनातील शंकाकुशंका

विजापूरची मोहीम संपल्यानंतर शिवाजीला शाही दरबाराबरोबर पाठविण्याचे जयसिंगाने कबूल केले होते. त्याने शिवाजीला मोठमोठ्या मानसन्मानाची लालूच दाखविली, आणि त्याला आग्र्याला जाण्यास उद्युक्त करण्यासाठी "हजारो क्लुप्त्या उपयोगात आणल्या." इतकी प्रलोभने दाखविली तरीसुद्धा शिवाजीने बराच काळपर्यंत टंगळमंगळ केली. अफजलखानाच्या भेटीच्या प्रसंगाच्या वेळी जितकी दहशत शिवाजीला आणि त्याच्या हितचिंतकांना वाटली होती तितकीच दहशत मोगल दरबारात जाण्याच्या नुसत्या कल्पनेने त्यांना वाटली. परंतु जयसिंगाने स्वतःच्या हिंदुत्वाला साजेलशा अशा शपथा घेऊन शिवाजीला अभिवचन दिले की, "त्याच्या आग्रा येथील भेटीतून त्याला कोणताही धोका होणार नाही."

अनुक्रमणिका

आपण उत्तर हिन्दुस्थानात गेल्यावर आपल्या गैरहजेरीत राज्याचा राज्यकारभार चालविण्यासाठी शिवाजीने केलेली व्यवस्था म्हणजे संघटना आणि दूरदृष्टी यांचा एक उत्कृष्ट नमुना असेच म्हणावे लागेल . आपल्या स्वतःच्या गैरहजेरीत आपल्या आज्ञेची अथवा मार्गदर्शनाची आपल्या स्थानिक प्रतिनिधींना कोणतीही गरज भासणार नाही आणि ते स्वतंत्रपणे राज्याचा कारभार करू शकतील असा या योजनेपाठीमागील त्याचा बेत होता . राजप्रतिनिधी म्हणून त्याने आपली आई जिजाबाई हिची नियुक्ती केली. उत्तर हिंदुस्तानच्या आपल्या प्रवासाची सुरुवात त्याने ५ मार्च १६६६ रोजी केली . त्याच्याबरोबर त्याचा मुलगा संभाजी , त्याच्या अतिशय विश्वासातले सात अधिकारी आणि चार हजार सैनिक एवढा लवाजमा होता. ९ मे रोजी तो आग्रा शहराच्या उपनगरात येऊन पोहोचला . त्यावेळी बादशहाचा दरबार आग्रा शहरात चालू होता.

शिवाजी आणि औरंगजेब यांची भेट

त्या महिन्याच्या १२ तारखेला शिवाजीने दरबारात हजर रहावे असे ठरविण्यात आले . तो दिवस म्हणजे चान्द्रमासाप्रमाणे बादशहाचा ५० वा वाढदिवस होता . खास या प्रसंगासाठी म्हणून आगऱ्याच्या किल्ल्यातील ज्याठिकाणी दरबार भरविण्यात येत असे ती जागा अतिशय शानदारपणे सजविण्यात आली होती. या **दिवाणेआम** मध्ये कुमार रामसिंगाने शिवाजी , त्याचा मुलगा संभाजी आणि त्याचे दहा अधिकारी यांना आणले . शिवाजीच्या वतीने १५०० सोन्याची नाणी नजर म्हणून आणि ६००० रु . निसार म्हणून बादशहापुढे हजर करण्यात आले . यावर औरंगजेबाने कृपादृष्टीने, "हे शिवाजीराजा माझ्या समोर ये " असे उद्‌गार काढले. शिवाजीला सिंहासनाच्यासमोर नेण्यात आले . त्याने बादशहाला तीन वेळा मुजरा केला . यानंतर बादशहाने खूण केल्यावर शिवाजीला त्याच्यासाठी नियुक्त केलेल्या जागेवर नेण्यात आले . ही जागा तिसऱ्या प्रतीच्या सरदारांसाठी होती . या घटनेनंतर दरबाराचे कामकाज पुढे चालू झाले . शिवाजी त्या ठिकाणी आहे ही गोष्ट सर्वजण विसरून गेले.

आपल्याला विशिष्ट सन्मानाने वागविण्यात येईल असे चित्र शिवाजीने आपल्या डोळ्यांसमोर उभे केले होते. (**ए. एन्**, ९६९; **के. के**., सुरत टू कारवार) जयसिंगाबरोबर त्याचे जे अनेकवार संभाषण झाले होते त्यावरूनही आपले फार चांगले स्वागत होईल याबद्दल त्याची खात्री झाली होती . रामसिंगाकडून त्याला असे कळले की त्याला ५ हजारी मनसबदारांच्या रांगेत उभे करण्यात आले आहे . यावर शिवाजी उद्‌गारला, "काय हा अपमान ! प्रत्यक्ष बादशहाच्या समक्ष न येता देखील माझ्या ७ वर्षाच्या मुलाला ५ हजारी मनसबदार करण्यात आले होते. माझा सेवक नेताजी हा देखील पाचहजारी मनसबदार आहे आणि इतकी सेवाचाकरी करून आणि इतक्या दूरवरून दरबारात हजर होणाऱ्या मला मात्र इतक्या खालच्या दर्जाच्या सरदारात उभे करण्यात यावे ना !" नंतर त्याने विचारले "माझ्या समोर उभा असलेला हा सरदार कोण आहे?" यावर रामसिंगाने उत्तर दिले , "ते महाराजा जसवंतसिंग आहेत ." यावर शिवाजीने ओरडून विचारले, "कोण? जसवंत? ज्याने माझ्या शिपायांसमोर पाठ फिरविली , त्याच्या पाठीशी मी उभे राहावे ? याचा अर्थ काय ?" जाहीररीत्या आपला अपमान झाला आहे असे शिवाजीला वाटले . तो रागाने बेभान झाला आणि त्याने चढ्या आवाजात रामसिंगाची निर्भर्त्सना केली . असे लाजिरवाणे जिणे जगण्यापेक्षा आत्महत्या करणे बरे असेही तो म्हणाला . त्याला शान्त करण्यासाठी रामसिंगाने आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा केली. परन्तु त्याचे प्रयत्न व्यर्थ गेले . संतापाने तो आतल्याआत धुमसत होता . इतकेच नव्हे तर झालेल्या मानहानीमुळे अतिशय चिडून जाऊन त्याची सारखी चुळबुळ चालली होती . परिणामी शिवाजीला मूर्च्छा येऊन तो खाली पडला . हजर असलेल्या दरबारी मंडळीमध्ये एकच गडबड उडाली . यावर

बादशहाने विचारले, "कसला गोंधळ चालला आहे ?" या प्रश्नावर रामसिंगाने मोठ्या मुत्सद्देगिरीने उत्तर दिले. "वाघ हा जंगलाचा एक रानटी प्राणी आहे . या ठिकाणी जी भयंकर गरमी आहे त्यामुळे त्याच्या जीवाची घालमेल झाली आहे, आणि त्याला बरे वाटेनासे झाले आहे." त्याने शिवाजीच्या उद्धट वर्तनाबद्दल बादशहापाशी क्षमायाचना केली . तो असेही म्हणाला की , "शिवाजी हा दक्षिणी माणूस असून दरबारी रीतीभाती आणि सभ्य वागणूक याची त्याला माहिती नाही ." औरंगजेबाने मोठ्या दयाळूपणाने शिवाजीला शेजारीच असलेल्या एका खोलीत घेऊन जाण्याची आणि त्याच्या अंगावर गुलाबपाणी शिंपडण्याची आज्ञा दिली. त्याने असाही हुकूम दिला की, "शिवाजी शुद्धीवर आला की त्याने दरबार बरखास्त होण्याची वाट न पाहता आपल्या मुक्कामावर निघून जाण्यास आमची संमती आहे."

शिवाजीची कैद

दरबारातून परतल्यावर शिवाजीने औरंगजेबाची आपला विश्वासघात केल्याबद्दल उघडउघड निर्भर्त्सना केली . इतकी मानहानी करण्यापेक्षा आपल्याला ठार करण्यात यावे असाही निरोप त्याने बादशहाकडे पाठविला. याचा परिणाम असा झाला की मराठ्यांच्या राजाबद्दल बादशहाच्या मनात अधिकच तिटकारा आणि अविश्वास उत्पन्न झाला. शहराच्या बाहेर असलेल्या जयपूर राजवाड्यात शिवाजीला नेऊन ठेवण्याचा आणि त्याच्या बंदोबस्ताबद्दल खबरदार राहण्याचा हुकूम त्याने रामसिंगाला दिला . शिवाजीला दरबारात हजर राहण्याची बंदी करण्यात आली. आपण जवळजवळ कैदी आहोत असे शिवाजीला आढळून आले. त्याने बादशहाकडे आणि मुख्य वजिराकडे आपली सुटका करण्याबद्दल अनेकवार विनवण्या केल्या . परंतु प्रत्येक वेळी त्याला असे गुळमुळीत उत्तर देण्यात आले की , "तू काही काळ वाट बघ . तुझ्यासाठी मला जितके करता येईल तितके मी करीन." याच सुमारास त्याची परिस्थिती पूर्वीपेक्षा अधिक धोकादायक बनली. आग्र्याच्या शिबंदीचा प्रमुख पोलादखान हा होता . त्याने शिवाजीच्या वाड्याभोवती तोफखाना बरोबर असलेल्या रक्षकांची मोठी तुकडी ठेवली. शिवाजी आता देखाव्या पुरताच नाही तर प्रत्यक्षात देखील औरंगजेबाचा कैदी बनला होता.

शिवाजीच्या दरबारातील भेटीचा हा जो अनपेक्षित परिणाम झाला होता त्यामुळे जयसिंग पेचात सापडल्यासारखा झाला. त्याने दरबारातील आपला प्रतिनिधी रामसिंग याला कळविले की , "शिवाजीच्या जिवाला कोणताही धोका होणार नाही आणि आम्ही रजपूत बापलेकांनी शिवाजीला जे शपथपूर्वक आश्वासन दिले आहे त्याचा भंग होणार नाही याची तुम्ही काळजी घ्यावी ." [शिवाजी आग्रा येथे नजरकैदेत असताना मोगलांचे त्या वेळेचे धोरण अभ्यासण्यासारखे आहे . शिवाजीच्या पहिल्या भेटीच्या वेळी त्याला एक हत्ती , मानाचा पोशाख आणि काही रत्ने भेट देण्याचा औरंगजेबाचा उद्देश होता . परंतु दरबारी रितीरिवाजाचा शिवाजीने जो भंग केला होता त्यामुळे औरंगजेबाने आपले मत बदलले आणि या देणग्या देणे स्थगित केले . याउलट शिवाजीने अशी तक्रार केली की , मोगल सरकारतर्फे आपल्याला दिली गेलेली वचने पाळण्यात आलेली नाहीत. यावर औरंगजेबाने जयसिंगाकडून याबाबतचा सविस्तर अहवाल मागविला . जयसिंगाने पुरंदरच्या तहाची कलमे बादशहाकडे स्पष्टीकरण करून पाठविली आणि यापलीकडे कसलेही वचन देण्यात आलेले नाही असे बादशहाला कळविले.

शिवाजीच्या दिल्ली येथील भेटीतून निर्माण झालेल्या अनपेक्षित घटनेने जयसिंगाची परिस्थिती चमत्कारिक झाली . दक्षिणेतील परिस्थिती लष्करीदृष्ट्या मोगलांना धोकादायक झाल्यामुळे हजारो सबबी सांगून जयसिंगाने शिवाजीची रवानगी उत्तरेत केली होती . परंतु त्याच वेळी शिवाजीला सुरक्षितपणे दक्षिणेत आणण्याची हमी देखील त्याने घेतली होती . म्हणून त्याने बादशहाला लिहून कळविले की , शिवाजीला कैद करून अथवा ठार मारून आपला कोणताही फायदा होणार नाही . कारण स्वतःच्या गैरहजेरीत राज्यकारभाराची उत्कृष्ट व्यवस्था शिवाजीने करून ठेवलेली आहे. त्याने बादशहाला असेही कळविले की शिवाजीला मित्र केल्याने आपले दक्षिणेतील हितसंबंध सुरक्षित राहतील . इतकेच नव्हे तर दिलेले वचन पाळण्याची मोगल अधिकारी दक्षता दाखवितात याची खात्री लोकांना पटेल . हा पत्रव्यवहार चालू असताना जयसिंग वारंवार आपला मुलगा रामसिंग याला शिवाजीच्या जिवाला धोका होणार नाही आणि रजपूत बाप -लेकांनी दिलेले वचन अभंग राहील अशातऱ्हने वागण्याची खबरदारी घेण्याबद्दल लिहीत असे.]

अनुक्रमणिका

(१६) शिवाजीचे आग्र्याहून पलायन

आपली सुटका करून घेण्यासाठी शिवाजीने आता आपल्याजवळील अंतस्थ हिकमतीचा उपयोग करून घेण्याचे ठरविले . त्याने आपल्याबरोबर आणलेल्या मराठा सैनिकांच्या लवाजम्याला दक्षिणेत परत पाठविण्याबद्दल बादशहाकडून परवानगी मिळविली . आपल्या अनुयायांबाबतच्या काळजीतून अशा तऱ्हेने मुक्त झाल्यावर आपली सुटका करून घेण्याच्या योजनेकडे शिवाजीने लक्ष पुरविले . त्याने आजारीपणाचे ढोंग केले आणि आपल्या वाड्यातून ब्राह्मणांना वाटण्यासाठी म्हणून दररोज मिठाई बाहेर पाठविण्यास सुरुवात केली. ही मिठाई मोठ्या पेटाऱ्यांतून बाहेर नेण्यात येई. हे पेटारे मोठ्या खांबावर लोंबकळते टाकून दोन माणसांच्या खांद्यावरून नेले जात . वाड्याबाहेरील रक्षकांनी काही दिवस या पेटाऱ्यांची कसून झडती घेतली. परंतु नंतर मात्र कोणतीही विचारपूस न करता हे पेटारे ते बाहेर जाऊ देऊ लागले . याच संधीची शिवाजी मोठ्या उत्सुकतेने वाट पाहात होता. १९ ऑगस्टच्या दुपारी त्याने आपल्या रक्षकांकडे असा निरोप पाठविला की, "मी अतिशय आजारी आहे . मी आता झोपी जात आहे . मला तुम्ही कोणत्याही प्रकारे त्रास देऊ नये." शिवाजीचा सावत्रभाऊ हिरोजी फर्जन्द हा दिसावयाला थोडाफार शिवाजीसारखाच होता . तो शिवाजीच्या बिछान्यावर पडून राहिला . त्याने आपल्या अंगावर रजई पांघरलेली होती . रजईबाहेर त्याने आपला उजवा हात ठेवला होता , आणि या उजव्या हातात त्याने शिवाजीची मनगटी घातलेली होती . याचवेळी शिवाजी आणि त्याचा मुलगा हे दोन पेटाऱ्यांमध्ये अंग चोरून बसले . हे दोन्ही पेटारे सूर्यास्तानंतर निःशंक मनाने पहारा करीत बसलेल्या रक्षकांच्या रांगेमधून काही काळाने सुरक्षितपणे बाहेर पाठविण्यात आले. या दोन्ही पेटाऱ्यांच्या पुढे आणि पाठीमागे नेण्यात आलेल्या पेटाऱ्यांत मात्र खरोखरीची मिठाई भरलेली होती.

शहराच्या बाहेर एका निर्जन अशा जागेवर हे पेटारे ठेवण्यात आले . हे पेटारे आणणाऱ्या हमालांना परत पाठविण्यात आले . यानंतर शिवाजी आणि त्याचा मुलगा हे दोघेजण पेटाऱ्यातून बाहेर पडले आणि आग्र्याहून ६ मैल अंतरावर असलेल्या एका खेड्याची त्यांनी वाट धरली . त्या ठिकाणी शिवाजीचा विश्वासू मुख्य न्यायाधीश निराजी रावजी हा घोडे घेऊन त्यांची वाट बघत होता . तेथील जंगलात त्याने घाईघाईने विचारविनिमय केला आणि आपापसात विभागून ते तेथून निघाले . शिवाजीबरोबर त्याचा मुलगा , निराजी रावजी, दत्ता त्रिंबक आणि रघु मित्र नावाचा एक मराठा असे तीन अधिकारी होते . त्यांनी हिन्दू बैराग्यासारखी आपल्या अंगाला राख फासून घेतली होती. या सर्वांनी ताबडतोब मथुरेकडे प्रयाण केले, तर बाकीच्या सर्वांनी आपल्या घरची वाट धरली.

इकडे आग्रा येथे हिरोजी फर्जन्द हा ती सबंध रात्र आणि दुसऱ्या दिवशी दुपारपर्यन्त बिछान्यात झोपून होता. सकाळच्या प्रहरी पहारेकऱ्यांनी खोलीत डोकावून बघितले आणि जेव्हा त्यांनी शिवाजीच्या हातावरील कडी बिछान्याबाहेर आलेल्या मनगटावर बघितली आणि एक चाकर जमिनीवर बसून दुखणेकऱ्याचे पाय चेपत असल्याचे पाहिले , तेव्हा त्यांचे समाधान झाले . दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास हिरोजी शान्तपणे नोकरांसह वाड्याबाहेर पडला . वाड्याबाहेर पडताना त्याने रखवालदारांना ताकीद दिली, "आवाज कमी करा, शिवाजी आजारी असून त्याला औषधोपचार चालू आहेत ." परन्तु कालान्तराने पहारेकऱ्याच्या मनात संशय निर्माण झाला . कारण वाड्यावर भकासपणाची चमत्कारिक कळा आल्यासारखे झाले . नेहमीसारखी शिवाजीला भेटावयाला येणाऱ्यांची गर्दी दिसेना . इतकेच नव्हे तर वाड्यातून कोणता आवाज येईना की गडबड ऐकू येईना . यावर त्यांनी शिवाजीच्या खोलीत प्रवेश केला तेव्हा त्यांना पक्षी पिंजऱ्यातून उडून गेल्याचे आढळून आले . मनाला थक्क करणारी ही बातमी घेऊन ते

ताबडतोब आपला प्रमुख पोलादखान याच्याकडे गेले . त्याने ही बातमी बादशहाला दिली . शिवाजी हा चेटूकविद्येच्या जोरावर पळून गेल्याची मखलाशी त्याने बादशहाजवळ केली आणि दोषाचे खापर आपल्या माथी फुटू नये म्हणून त्याने प्रयत्न केला . याक्षणापर्यंत शिवाजीने आपला पाठलाग करणाऱ्यांवर जवळ जवळ २४ तासांची आघाडी मिळवलेली होती . रामसिंगाने कानाडोळा केल्यामुळे शिवाजी पळून गेला असा संशय बादशहाला आला. बादशहाने रामसिंगाला शिक्षा केली . प्रथम त्याने त्याला दरबारात येण्याची बंदी केली आणि नंतर त्याने त्याची मनसब आणि तनखा काढून घेतला.

पलायनाचा मार्ग

अतिशय धूर्तपणाने शिवाजीने आपल पाठलाग करणाऱ्या मोगल स्वारांना हुलकावणी दिली . महाराष्ट्राकडे नेणाऱ्या मार्गाच्या अगदी विरुद्ध दिशेच्या मार्गाने त्याने कूच केले . माळवा आणि खानदेश किंवा गुजराथ ह्या प्रान्तातून आग्र्याच्या नैर्ऋत्य दिशेकडे कूच करण्याच्या ऐवजी त्याने प्रथम मथुरा , अलाहाबाद, बनारस आणि गया या शहरांच्या दिशेने पूर्वेच्या बाजूने कूच केले आणि नंतर गोंडवन आणि गोवळकोंडा या प्रान्तातून नैर्ऋत्य दिशेची वाट धरली . अतिशय रोमांचकारी आणि साहसपूर्ण प्रसंगांचा अनुभव घेत आणि कवटाळणाऱ्या मृत्यूला मोठ्या कौशल्याने दूर सारीत २० नोव्हेंबर १६६६ रोजी शिवाजी राजगड येथे जाऊन पोहोचला. [शिवाजी महाराजांचे आग्र्याला प्रयाण व तेथून त्यांची झालेली सुटका याचे पुढीलप्रमाणे वर्णन भीमसेन सक्सेना याने केले आहे :

शिवाजी हा आपल्या मुलखाला परत गेला. तेथून तो आपला मुलगा संभाजी यास घेऊन बादशहाकडे रवाना झाला. तो औरंगाबादेजवळ आला (एप्रिल १६६६). त्या वेळी त्याच्याबरोबर उत्तम आणि सुसज्ज अशा घोड्यावर स्वार असलेले पाचशे स्वार होते . तसेच उत्कृष्ट असे पाचशे पायदळ सैन्य त्याच्याबरोबर होते. त्याला पाहण्यास विलक्षण गर्दी लोटली होती. (**आलमी बदीदनश बरामद.** भीमसेन हा त्या वेळी औरंगाबाद येथे होता.) सफशिकनखान तीन हजारी **मनसबदार** हा त्या वेळेस औरंगाबादेच्या कारभारावर होता . शिवाजी हा एक क्षुल्लक असा मराठा जमीनदार आहे असा त्याने विचार केला. आपले **दिवाण, बक्षी** आणि इतर अधिकारी यांना बरोबर घेऊन तो **खास आम** (सुभेदारांच्या दरबाराची जागा) मध्ये बसून राहिला. सफशिकनखान याने आपल्या पुतण्याला शिवाजीच्या स्वागतार्थ पाठविले . सफशिकनखान याची आतून इच्छा ही की , शिवाजीने आपल्याकडे येऊन या ठिकाणी आपली गाठ घ्यावी. शिवाजीला या गोष्टीची चीड आली. तो औरंगाबादेस पोहोचल्यावर मिर्जा जयसिंग याचा वाडा औरंगाबादेत होता, तिकडे तो रवाना झाला. सफशिकनखान याच्या पुतण्याने शिवाजीला म्हटले की, "खानसाहेब हे **खास आम**मध्ये असून आपली वाट पाहात आहेत." यावर शिवाजीने म्हटले, "सफशिकनखान हा कोण आहे ? या ठिकाणी तो कोणत्या नोकरीवर आहे ? मला भेटण्यासाठी तो येथे काय म्हणून आला नाही ?" असे म्हणून त्याने खानाच्या पुतण्याला आणि इतरांना निरोप दिला आणि तो स्वतः मिर्जा राजा जयसिंग याच्या वाड्यात उतरला.

संध्याकाळच्या सुमारास सफशिकनखान आणि इतर अधिकारी शिवाजीच्या भेटीस आले . गालिच्याच्या टोकापर्यंत पुढे येऊन शिवाजीने त्यांचे स्वागत केले . नंतर त्यांची बैठक झाली . दुसऱ्या दिवशी शिवाजी हा सफशिकनखान यास भेटण्यासाठी त्याच्या घरी गेला . त्यानंतर तो क्रमाक्रमाने **दिवाण, बक्षी** इत्यादी अधिकारी यांना भेटला. त्यांपैकी प्रत्येकाने आपापल्या ऐपतीप्रमाणे त्याचा आदरसत्कार केला.

शिवाजी हा काही दिवस औरंगाबादेस होता . त्याला खर्चासाठी म्हणून काही रक्कम देण्यात यावी अशी बादशहाने औरंगाबादेच्या अधिकाऱ्यांना आज्ञा केली होती. ती घेऊन तो बादशहाकडे रवाना झाला . त्याच्याबरोबर मोगल संरक्षकांचे पथक होते . तो बादशहाच्या दरबारात पोहोचला (१२ मे १६६६). त्याने बादशहाची भेट घेतली ; पण त्याची जशी इच्छा आणि अपेक्षा होती तसा त्याचा मानसन्मान झाला नाही . पाच हजारी मनसबदारांच्या रांगेत त्याला उभे करण्यात आले . शिवाजीने विचारले ही कोणत्या सरदारांची जागा आहे . त्याला सांगण्यात आले की, ही जागा राजा रायसिंग सिसोदिया याची आहे . तो थोडा वेळ तेथे उभा राहिला . त्याच्या पापण्या ओल्या झाल्या. त्याला घेरी आली. बादशहाने आज्ञा केली की शिवाजीला गुसलखानाच्या देवडीवर नेऊन गुलाबपाणी शिंपडावे . त्याला पंख्याने वारा घालावा. बादशाही दरबाराचे तेज त्याच्याने सहन करवले नाही म्हणून त्याला घेरी आलेली दिसते.

पण शिवाजीच्या कसलेल्या मुत्सद्दीगिरीची कुणालाच कल्पना आली नाही . शुद्धीवर आल्यावर शिवाजीने म्हटले, "माझ्या राहण्यासाठी जी जागा ठरविली आहे तिकडे मला घेऊन चला." बादशहाच्या आज्ञेप्रमाणे त्याला त्याच्या ठरलेल्या निवासस्थळी नेण्यात आले . तेथे गेल्यावर तो अद्वातद्वा बोलू लागला . वेड लागल्याप्रमाणे तो वागू लागला . शिवाजी उघडउघड म्हणाला की , माझ्यासारखा भयंकर अपराधी गुन्हेगार हा तावडीत सापडला आहे. मला लवकर काय म्हणून ठार मारीत नाहीत . शिवाजीचे असे निरर्थक बोलणे बादशहाच्या कानावर घालण्यात आले . बादशहाने आज्ञा केली की, मिर्जा राजा जयसिंग याचा मुलगा रामसिंग चार हजारी याने शिवाजीवर चौकीपहारे ठेवून सावधगिरीने देखरेख ठेवावी.

अनुक्रमणिका

शिवाजीने विनंती केली ती ही , "मी सांप्रत आपल्या हुजुरात आलो आहे . माझ्याबरोबर आलेली मंडळी , ही दक्षिणेत राहिलेली आणि वाढलेली आहेत. त्यांना या ठिकाणी राहणे जमत नाही. त्यांना परवानगीची दस्तके देण्यात आली तर ते आपल्या देशाकडे निघून जातील."

ही विनंती आपल्या पथ्यावर पडली असे समजून बादशहाने **दस्तके** (परवानगी पत्रे) दिली. शिवाजी हा आपला मुलगा संभाजी आणि काही विश्वासू माणसे यांना घेऊन मागे राहिला. आपल्या इतर सहकाऱ्यांना त्याने जाण्याचा निरोप दिला.

देवाचा प्रसाद (**चढावा**) म्हणून तो दर गुरुवारी मिठाईचे मोठमोठे पेटारे बाहेर वाटण्यासाठी पाठवू लागला . हे पेटारे इतके मोठे असत की एकेक वाहून नेण्यासाठी काही माणसे लागत . अशा रीतीने पेटारे बाहेर पाठविण्यात येऊन मिठाई वाटण्यात येऊ लागली . मिठाई वाटण्याच्या वेळी शिवाजीच्या निवासस्थानाच्या दरवाज्याबाहेर खूप गर्दी जमू लागली.

यानंतर रामसिंगाच्या विनंतीवरून बादशहाने रामसिंगाची माणसे शिवाजीच्या पाहऱ्यावरून काढून ते काम पोलादखान याजकडे सोपविले. पोलादखानाच्या माणसांबरोबर शिवाजीने अशी काही वागणूक ठेवली की ते लोक त्याच्या भजनी लागले . शिवाजीने अशी पद्धत ठेवली की, तो रोज सकाळी संध्याकाळी आपल्याला पाहरेकरी पाहू शकतील अशा रीतीने वावरत असे . आपण आजारी आहोत असे निमित्त करून तो संध्याकाळपासूनच झोपून राहात असे.

एके दिवशी (१९ ऑगस्ट १६६६) शिवाजीने आपल्या सहकाऱ्यांना आपला गुप्त बेत सांगितला. एका माणसाला त्याने आपल्या पलंगावर झोपविले. शय्यागृहात हजर राहण्यासाठी म्हणून त्याने दोन -तीन माणसे ठेवली . नंतर त्याने मिठाईचे दोन पेटारे रिकामे केले . एका पेटाऱ्यात शिवाजी आणि दुसऱ्या पेटाऱ्यात त्याचा मुलगा हे बसले . मिठाईने भरलेले काही पेटारे पुढे पाठविण्यात आले . नंतर शिवाजी आणि त्याचा मुलगा वाड्याबाहेर निघाले. त्यांनी मथुरेची वाट धरली. आग्र्याच्या बाहेर एका लहान घोड्यावर त्याने आपल्या मुलाला बसविले. तो स्वतः पायी चालला. ते तडक मार्ग आक्रमण करीत निघाले. शेकडो शिपायांच्या सैन्याने जे होऊ शकणार नाही असे काम शहाणी माणसे केवळ शब्दाच्या जोरावर उत्तम तऱ्हेने पार पाडतात.

दुसऱ्या दिवशी सकाळी नेहमीप्रमाणे शिवाजी दिसला नाही हे पाहून पहारेकरी आपापसात तक्रार करू लागले . नंतर त्यांनी पोलादखान यास ही बातमी कळविली. पोलादखान हा शिवाजीच्या शय्यागृहात आला. तेथे एक मनुष्य पलंगावर झोपला होता. त्याला त्याने उठविले; तो नोकर उठून बसला. खानाने त्याला विचारले , "तू कोण आहेस आणि शिवाजी कोठे आहे ?" तो म्हणाला , "संध्याकाळी शिवाजीने मला पलंगावर झोपविले. नंतर तो निघून गेला . पुढे काय झाले मला माहीत नाही ." त्या नोकराच्या आणि इतर काहीजणांच्या मुसक्या बांधण्यात आल्या . बादशहाला ही हकीकत कळविण्यात आली . या प्रकारची चौकशी करावी अशी बादशहाने आज्ञा केली . शिवाजीस पकडण्यासंबंधी प्रांतोप्रांतीच्या अधिकाऱ्यांना हुकूम रवाना करण्यात आले . हरकाऱ्याचा दारोगा कीमतराय ऊर्फ कृष्णा भास्कर याने बातम्या दिल्या नाहीत म्हणून त्याची बेअब्रू करण्यात आली. रामसिंगाने आपले पहारे काढून घेतले होते . यावरून तो शिवाजीचा पक्षपाती असावा असा संशय येऊन बादशहाने त्याची मनसब कमी केली आणि त्याला दरबारात येण्याची मनाई केली . मिर्जा राजा जयसिंग यास आज्ञा करण्यात आली की , शहाजादा महमद मुअज्जम आणि महाराजा जसवंतसिंग यांना पाठविण्यात येत आहे. ते दक्षिणेत पोहोचल्यावर तुम्ही हुजुरात या.

शिवाजी हा मथुरेला पोहोचला . त्याने दाढी मिशा काढल्या आणि डोक्यावरील केस काढून टाकले . शिवाजीने आपल्या मुलाला एका ब्राह्मणाच्या घरी ठेवले. त्या ब्राह्मणाची आणि शिवाजीची पूर्वीपासून ओळख होती. शिवाजीने त्याच्यावर पूर्वी उपकार केले होते. माझ्या मुलाला जर तुम्ही देशी आणाल तर मी तुमच्यावर खूपच कृपा करीन असे त्याने त्या ब्राह्मणाला आश्वासन दिले . याबरोबर त्याने त्या ब्राह्मणाला अश्रफ्या आणि जडजवाहीरही दिली.

यानंतर बैराग्याचा वेष घेऊन शिवाजी अलाहाबाद आणि बनारस या वाटेने गयेकडे गेला . तेथे त्याने पूर्वीच दोन माणसे पाठविली होती . न जाणो काही घडले तर माणसे असावीत म्हणून ही व्यवस्था करण्यात आली होती . त्यांना घेऊन शिवाजी ओरिसाकडे गेला. रोज लांबची मजल मारावयाची तीही पायी. यामुळे स्वारीला घोडा असावा असे शिवाजीला वाटले. त्याने घोडा विकत घेतला. त्यावेळी त्याच्यापाशी रुपये नव्हते. त्याने अश्रफीची पिशवी उघडून काही अश्रफ्या घोड्याच्या सौदागराला दिल्या . शिवाजी पळाल्याची बातमी सर्वत्र झाली होती . सौदागर म्हणाला, "तू बहुतेक शिवाजी असला पाहिजेस. एका लहान घोड्यासाठी तू इतक्या अश्रफ्या देत आहेस !" शिवाजीने अश्रफीची पूर्ण पिशवीच त्याला दिली. नंतर तो [शिवाजी] तेथून निघून गेला. त्याने पुढे जगन्नाथपुरीची यात्रा केली आणि हैद्राबादेच्या वाटेने तो आपल्या देशी पोहोचला (सप्टेंबर १६६६).

इकडे मथुरेत शिवाजीचा मुलगा होता . त्याचा चेहरा कोवळा होता आणि त्याचे केस लांब होते . ब्राह्मणांनी त्याला मुलीचा वेष दिला . नंतर तो आपल्या बायकापोरांना घेऊन निघाला . स्त्री वेषधारी मुलाला (संभाजी) ही आपली दासी आहे असे त्याने दाखविले . अशा रीतीने त्याने त्याला शिवाजीपाशी पोहोचविले. शिवाजीने त्याला इतकी बक्षिसी दिली की, त्या ब्राह्मणाचे जन्माचे सार्थक झाले.]

[शिवाजीमहाराजांच्या आग्र्याहून पलायनासंबंधी पोर्तुगीज कागदपत्रात पुढील माहिती आहे :

"शिवाजी एका फळांच्या पेटाऱ्यात बसून तुरुंगातून मोठ्या शिताफीने बाहेर पडला . तो छत्तीस तास पेटाऱ्यात होता. तो आपल्या देशास आल्याचे कळताच आदिलशहाने त्याच्या विरुद्ध हालचाली करण्यासाठी चाळीस हजार घोडेस्वार व मोठे पायदळ गोळा केले व तो घाटाखाली उतरला. तो आमच्या हद्दीपासून अवघ्या सहा मैलांच्या अंतरावर होता. त्याच्या सैन्याने सगळीकडे जाळपोळीचे आणि लुटमारीचे सत्र सुरू करताच शिवाजीने त्याच्या सेनापतीकडे एक मोठा नजराणा पाठविला . त्या नजराण्याने सेनापती खूष झाला व आपल्या सैन्यास त्याने आवरते घेतले .

अनुक्रमणिका

शिवाजी त्याचीच वाट पाहात होता. तो एखाद्या विजेप्रमाणे कोकणात शिरला व आदिलशहाच्या सेनापतीला त्याने जे द्रव्य भेट म्हणून पाठविले होते त्या द्रव्याच्या तिप्पट द्रव्य त्याने त्याच्याकडून वसूल केले . त्याने कोकणातील अनेक देसायांना आपल्या अंकित केले , आणि आता तो कोंडा महालात आमच्या हद्दीपासून अगदी जवळ येऊन पोहोचला आहे . धूर्तपणा, चातूर्य, पराक्रम, चपलता आणि लष्करी बुद्धी या बाबतीत शिवाजीची तुलना करायची झाल्यास ती सीझर आणि सिकंदर ह्यांच्याशी करावी लागेल . तो नाही अशी एकही जागा नाही . तो संबंध आशियाशी युद्ध करीत आहे. मोगल बादशहापाशी लक्षावधी सैन्य आहे. पण ह्या सैन्याला न जुमानता त्याने सुरत शहर लुटले. मोगल सैन्याप्रमाणेच आदिलशहाचे सैन्यही त्याच्या दुसऱ्या बाजूस होते. परंतु ह्या दोन्ही बलाढ्य शत्रूमधून तो सुरतेहून सुरक्षितपणे मागे परतला. जमिनीप्रमाणे समुद्रावरही त्याचा दरारा आहे. आम्हाला त्याच्या आरमाराची भीती वाटते . कारण समुद्रकिनाऱ्यावर त्याचे किल्ले आहेत . त्याच्यापाशी असलेल्या नौका जरी सगळ्याच मोठ्या नसल्या. तरी बऱ्याच लहान लढाऊ नौका त्याच्यापाशी आहेत".

(**म. इ. सा.** खंड **३, ९–१०**)]

[आग्र्याहून शिवाजीच्या पलायनाची हकीकत आलमगीरनाम्यामध्ये पुढीलप्रमाणे दिली आहे :

(९६७) सीवाचा नायनाट करण्यासाठी बादशहाने फौज नेमल्यावर त्याने बादशाही चाकर होण्याचे ठरविले . राजा जयसिंग वचन दिल्याप्रमाणे त्याशी चांगल्या तऱ्हेने वागत होता. सध्या त्याने त्याला त्याच्या इच्छेप्रमाणे दरबाराकडे पाठविले आणि विनंती केली की , तो हुजूरकडे पोहोचल्यावर त्यावर पातशाही कृपा करून त्यास योग्य तो दर्जा द्यावा. म्हणून तो तिकडे गेला तेव्हा त्याच्या जुन्या अपराधाकडे न पाहता बादशहाने त्याचा सन्मानच केला आणि इच्छा केली की , त्यावर बादशाही कृपा व प्रसाद करावा . या हेतूने एका सणाच्या दिवशी – या दिवशी त्याशी भेट व्हावयाची होती – कुंवर रामसिंघ व मुखलिसखान यास हुकूम झाला की , त्यावर कृपा करण्यासाठी त्यास घेऊन दर्शनास यावे . त्याप्रमाणे दरबारात नेले असता त्याने नम्रता दाखवून **आदाब** केला. तेव्हा बादशहाच्या सूचनेवरून त्यास जवळच बिशातीवर योग्य ठिकाणी –जी बादशहाच्या जवळच्यांची (नातेवाइकांची?) जागा होती किंवा जेथे थोर उमराव भिडून उभे होते –उभे केले. यावेळी ठरले होते की , या दिवशी तऱ्हेतऱ्हेच्या कृपाप्रसादाने त्याचे ऊर्जित करावे . तसेच काही दिवस दर्शनास आणून आणि इच्छेप्रमाणे कृपाप्रसाद घेऊन लवकरच त्यास निरोप द्यावा . पण त्याच्या ठिकाणी मूर्खपणा भरला असल्याने तो सहसा दर्शनास येईना . त्यास पातशाही मजलिसीतील आदाबाचे नियम (९६९) माहीत नव्हते व तो भलतेच हेतू मनात धरून होता . म्हणून त्यावर स्पष्ट प्रसाद केला असतानाही त्या मजलिसीत उभा राहिल्यावर अडाणीपणाच्या व्यापाराने त्याच्या डोक्यात गोंधळ उडवून देला आणि एका कोपऱ्यात जाऊन कुंवर रामसिंघापाशी स्वतःच्या मनाचे दुःख प्रदर्शित केले व भलत्याच इच्छा दाखवून मूर्खपणाचे आवरण घेतले . ही गोष्ट बादशहाच्या ध्यानात येताच त्यास हुजुराजवळच्या बिशातीस नालायक समजून त्याने आपल्या घरी जावे या हेतूने निरोप दिला. यामुळे त्यावर जे कृपाप्रसाद व्हावयाचे ते प्रकट झाले नाहीत. तो बादशाही नजरेतून उतरून त्यास हुकूम झाला की, त्याने हुजूर येऊन कुर्निसात करू नये, आणि त्याच्या दिमतीस व शहराबाहेर घर असलेल्या कुंवर रामसिंघास हुकूम झाला की , त्यास आपल्या घराजवळ ठेवून त्याजविषयी खबरदार असावे. तसेच त्याचा मुलगा संभाजी यास – ज्यास मागे सांगितल्याप्रमाणे पाच हजारी पाच हजार स्वार **मनसब** मिळाली होती – काही दिवस स्वतःबरोबर दर्शनास आणावे . सीवाच्या कपटाचे प्रकार बादशहास चांगले माहीत असल्याने व तो पळून जाण्याचा संशय आल्याने फौलादखान शहर-कोतवाल यास आज्ञा झाली की , त्याच्या घराच्या सर्व बाजूस स्वतःचे व तोफखान्याकडील काही लोक पहाऱ्यासाठी बसवावे. नंतर (९७०) त्याजविषयीची हकीकत राजा जयसिंगास – हा विजापूरच्या मोहिमेत गुंतला होता आणि हा व सीवा यामध्ये ठराव झाले होते – कळविली आणि हुकूम झाला की , त्याजविषयी राज्याच्या दृष्टिने ते योग्य वाटेल ते कळवावे म्हणजे तसे करता येईल . दोन-तीन दिवसांनी सीवाच्या डोक्यातील गर्व उतरून तो शुद्धीवर आला . त्याचे काळीज बादशहाच्या भयाने सुकून तो आपल्या कार्याविषयी उपाय योजू लागला आणि उमरावाकडे जाऊन काकुळत व लाज दाखवू लागला . तरी बादशहाचे लक्ष त्याजकडे जाऊन त्यास कुर्निसातची परवानगी मिळेना . पण त्याचा मुलगा संभाजी बादशाही हुकमाप्रमाणे रामसिंघाबरोबर कुर्निस करावयास जाई व त्यावर बादशाही कृपा होई . अशा स्थितीत राजा जयसिंगाचा अर्ज आला की, मी त्याशी करार केले आहेत व अजून या बाजूच्या कामात गुंतलो आहे . बादशहा त्याच्या दुष्कृत्यांकडे नजर न देता कृपा करतील तर मीच कृपायुक्त झालो असे समजेन . हीच गोष्ट बादशाही काम व इकडील मोहीम या दृष्टीने चांगली दिसते . आमचा करार झाला आहे की , त्याने आज्ञेबाहेर जाऊ नये (९७१) व बंडखोरी करू नये. बादशहाने राजाचे हे म्हणणे मान्य करून त्यावर कृपा केली व फौलादखानास हुकूम झाला की , त्याच्या घरावर बसविलेला पहारा उठवावा , म्हणजे त्याचे भीतीग्रस्त मन समाधानी व विश्वासयुक्त होईल . त्याचा मुलगा संभाजी यावर पूर्वीपेक्षा जास्तच कृपा होऊ लागली . हेतू हा की , त्यावर कुर्निस करण्याची काही दिवसांनंतर कृपा करावी व तऱ्हेतऱ्हेचे प्रसाद करून निरोप द्यावा . या वेळेपर्यंत केलेली दुष्कृत्ये व बादशाही दहशत यायोगे सीवा अस्वस्थ होता . पण आता तोफखान्यावरील फौलादखानाचे लोक त्याच्या भोवतालून निघून गेल्यामुळे व कुंवर रामसिंघाने त्यावरील पहाऱ्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन त्याने फसविण्याचे ठरविले आणि लपून ता. २७ **सफरला** [श. १५८८ **श्रावण वद्य** १२, इ. स. १६६६ ऑगस्ट १७.] रात्री आपला मुलगा संभाजीसह पळून गेला . ही गोष्ट बादशहास समजताच कुंवर रामसिंघावर नाराजी होऊन त्यास कुर्निसेची मना झाली आणि जयसिंगास फर्मान गेले की , त्या बंडखोराच्या जवळचा (= नातलग?), मागे सांगितल्याप्रमाणे त्याचा सरलष्कर , राजा जयसिंग याच्या सल्ल्यावरून पाच (९७२) हजारी मनसब मिळालेला आणि बादशाही लष्करात राजाबरोबर असलेला नेतूई यास दस्तागीर करून हुजूर पाठवावे. म्हणजे तो पळून जाऊन त्यास मिळू शकणार नाही.....

(**शि. वृत्त संग्रह**, ३ **आलमगीरनामा**, ३९–४१.)]

[शिवाजीची आग्र्याला भेट व तेथून पलायन याचे खाफीखानाने पुढीलप्रमाणे वर्णन दिले आहे :

राजा जयसिंघाने विजापूरच्या युद्धात सीवाच्या मदतीने फार चांगली कामगिरी केली . त्याने सीवास दरबाराकडे गेल्यावर कृपायुक्त व स्वागत होण्याविषयी हरएक आश्वासन देऊन सुरक्षिततेची स्वतः हमी घेतली व दरबाराकडे पाठविले . राज्यारोहणाचा उत्सव चालू असता सीवा अकबराबादेजवळ आल्याची बातमी पोचली . तेव्हा हुकूम झाला की , राजा जयसिंघाचा मुलगा कुंवर रामसिंघ व मुखलिसखान यांनी स्वागतास

जाऊन त्याला भेटीस आणावे. (१९०) ता. १८ **जिल्काद** हि. १०७६ या दिवशी [श. १५८८ **वैशाख वद्य ५**, इ. स. १६६६ मे १३] सीवा व त्याचा नऊ वर्षांचा मुलगा यांस बादशहाच्या दर्शनपरिचयाचा लाभ झाला . त्याने १५०० अश्रफी व ६००० रुपये म्हणजे एकंदर ३० ,००० रुपये नजराणा व ओवाळणी केली. बादशाही आज्ञेने त्यास पाच हजारी केले होते आणि त्याचा नातलग विजापूरच्या खराबीत राजा जयसिंघास अतिशय मदत करणारा नथूजी यासही तेवढीच मनसब मिळाली होती . तेव्हा सीवाचा आपणास कमीत कमी हफ्त हजारी मिळावी असा दावा होता राजा जयसिंघाने वचने देऊन त्यास चढविले होते. पण बादशहाचे मन सीवाविषयी मुळीच निर्मळ नसल्यामुळे त्याने त्यास काय देऊ केले आहे हे राजाने कधीच स्पष्ट केले नाही . सीवाचे स्वागतही त्याच्या अपेक्षेप्रमाणे झाले नाही . यामुळे त्यास द्यावयाचा पोशाख , रत्ने, हत्ती ही त्यास मिळण्याच्या अगोदरच त्याच्या चेहऱ्यावर लाज व अज्ञान दिसू लागली आणि काळजीने व्याप्त व जीर्ण हृदय होऊन त्याने एका कोपऱ्यात जमिनीवर अंग टाकले. थोड्या वेळाने सावध होऊन त्याने रामसिंघाजवळ आपण निराश झाल्याचे सांगितले . कुंवर रामसिंघाने त्याचे समाधानाचा प्रयत्न केला ; पण तो निष्फळ ठरला त्याची अपमानास्पद वर्तणूक ध्यानात येताच बादशहाने त्यास बादशाही प्रसादाशिवाय निरोप दिला . आणि कुंवर रामसिंघाने ठरविल्याप्रमाणे त्यास शहराबाहेर राजा जयसिंघाच्या घराजवळच्या एका घरी नेलें . नंतर झालेल्या घटनेविषयी माहिती देणारे एक पत्र राजा जयसिंघास धाडण्यात यावे आणि राजाकडून त्याचे योग्य ते उत्तर येईतो सीवाने मुजऱ्यास येऊ नये ; फक्त त्याच्या मुलाने रामसिंघाबरोबर दरबारात यावे असा हुकूम झाला . (१९८) सीवास मुजऱ्यांची मनाई होऊन तो घरी आला असता त्याच्या घराभोवती चौकी ठेवण्याविषयी कोतवालास आज्ञा झाली . आपली पूर्वकृत्ये व सध्याची अवस्था याचा विचार करू लागताच आपल्या कार्यामुळे सीवा अती बेचैन झाला . या संकटाच्या परिस्थितीतून एकाद्या लुच्चेगिरीच्या उपायाने आपली सुटका करून घ्यावी एवढ्याच विचारात होता . त्याच्या सुपीक मनाने तेव्हाच एक उपाय शोधून काढला. प्रथमपासून तो अमीर व कुंवर रामसिंघ यांशी मैत्री व परिचय यांचे प्रदर्शन करीत होता . तो त्यास दक्षिणेतील चिजांच्या भेटी पाठवी. शेवटी सीवाने आपल्या गतकाळच्या वर्तणुकीबद्दल पश्चात्ताप दाखवून बादशहाने आपली लज्जा व पश्चात्ताप यांचा स्वीकार करविण्याबद्दल यांचे मन वळविले.

(१९९) नंतर तो आजारीपणाचे सोंग करून कण्हूं -कुथूं लागला. आपल्या यकृत-पानथरीमध्ये दुखते असे सांगून तो अंथरुणावर पडून क्षयी किंवा तापकरी माणसांप्रमाणे हिंदू वैद्याकडून इलाज करवूं लागला . काही काळापर्यंत त्याने ही युक्ती चालू ठेविली . नंतर त्याने आपण बरे झालो असे उठविले. तो वैद्य व परिचारक, यांना बक्षिसे, ब्राह्मणांस अन्न आणि गरीब हिंदुमुसलमानास पैसे देऊ लागला. यासाठी त्याने कागदाच्या झाकणाच्या मोठाल्या टोपल्या तयार करविल्या होत्या . या मेवामिठाईने भरून अमीर व फकीर यांच्या घरी तो पाठवी . दोन-तीन चपळ घोडे पैदा करून ते बाह्मणास दान केल्याच्या नावाखाली त्याच्या बेतात सामील असलेल्या त्याच्या लोकांकरवी शहरापासून चौदा कोसांवरील एका ठरल्या जागी पाठवून दिले. त्याने बांध्यात व दिसण्यात त्याच्याच सारखा असलेल्या एका स्वामीनिष्ठ वीरास त्याच्या अंथरुणावर स्वतःचे कपडे घालून निजविले. त्यास तोंडावर तलम कपड्याचे पांघरूण देऊन कडे दिसेल अशा रीतीने हात उघडा टाकावा , कोणी आल्यास झोपेचे सोंग करावे, अशा सूचना दिल्या. सिवा आपल्या मुलासह दोन टोपल्यांत बसला आणि मथुरेच्या ब्राह्मणांना व फकिरांना देण्यासाठी त्यात मेवामिठाई भरली आहे अशा सबबीवर त्या शहराबाहेर नेल्या गेल्या.

अशा तऱ्हेने **सफर** महिन्याच्या शेवटच्या तारखेस [श १५८८ **भाद्रपद शुद्ध** २, इ. १६६६ ऑगस्ट २१.] दिवसाच्या अखेरीस सीवा आग्र्याबाहेर पडला आणि घोडे पाठविले होते त्याठिकाणी गेला. तेथून तो दोन प्रहरात मथुरेस पोहोचला. तेथे त्याने आपल्या दाढीमिशा काढल्या, स्वतःचे व मुलाच्या अंगास राख फासली आणि आपल्याबरोबर रत्ने, सोने व फकिराचा वेष घेतलेले काही विश्वासू लोक घेऊन (२००) तो निघाला. त्याने एका अप्रसिद्ध घाटाने यमुना ओलांडिली आणि काही चलाख व वेष पालटून सर्वत्र भटकणाऱ्या दक्षिणी वाटाड्यांच्या मदतीने रात्रीचा प्रवास करीत तो बनारसकडे चालता झाला. असे म्हणतात की त्यांनी जरूर इतकी रत्ने व पैसा आपल्या टेकण्याच्या पोकळ काठ्यांत भरून घेतला होता.

दुसरे दिवशी पाचवे प्रहरी एका दक्षिणी हेराने बातमी आणली की , सीवा निसटून दूर निघून जात आहे . तेव्हा कोतवालास चौकशी करण्याची आज्ञा झाली पण त्याने कळविले की, घराभोवती नेहमीप्रमाणे पहारा आहे. दुसऱ्या हेराने त्याच्या निसटून जाण्याविषयी सांगितले. म्हणून कोतवालाचे लोक पाहण्यास गेले तो त्याच्या कल्पनेप्रमाणे सीवा पातळ पांघरून घेऊन व कड्याचा बाहेर हात टाकून निजल्याचे दिसले . कोतवालाने त्याप्रमाणे खबर दिली. आता तिसऱ्या हेराने खात्रीपूर्वक सांगितले की, सीवा निसटून चाळीस पन्नास कोस गेला आहे. मला तो होडीत बसलेला दिसला. तेव्हा जास्त चौकशी करता तो निसटल्याचे आढळून आले . कोतवाल व कुंवर रामसिंग यांची निर्भर्त्सना झाली . रामसिंगाने निसटून जाण्यास प्रोत्साहन दिल्याचा संशय येऊन त्याची **मनसब** जप्त व त्यास मुजऱ्यास येण्याची मना झाली आणि गुर्जबर्दारांनी सुभेदार व फौजदार यांच्या नावे सीवाचा शोध करून व त्यास पकडून दरबाराकडे पाठविण्याचा हुकूम घेऊन चोहोकडे म्हणजे दखन , पूर्व व उत्तर दिशा या बाजूंस जाण्यास फर्माविले गेले.

यावेळी राजा जयसिंग नुकताच विजापुराहून परत फिरून औरंगाबादेस आला असता त्यास हुकूम आली की , सीवाचे पळून जाणे उघड होण्यापूर्वीच त्याचा नातलग नथूजी यास पकडून (२०१) दरबाराकडे पाठवून द्यावे. नंतर त्याने पिंजऱ्यातून निसटलेल्या पक्ष्याचा शोध घेऊन त्यास आपल्या जुन्या मुलुखात स्थिर होऊ व आपल्या भोवती अनुयायी जमवू देऊ नये . तो दक्षिणेत अहमदाबाद व वऱ्हाड या मार्गाने पळून जाण्याचा बराच संभव असल्याने बादशाहाने प्रथम त्याच बाजूस सक्त ताकीद करून **गुर्जबर्दार** पाठविले आणि नंतर सर्वच सुभ्यात धाडले. पण सीवा गेलेल्या बनारसच्या बाजूस चार पाच किंबहुना सात दिवसांनी **गुर्जबर्दार** पाठविले गेले. असे म्हणतात की, सीवा इतक्या झपाट्याने मार्गक्रमण करी की , कोणाही स्वारास त्याचा पाठलाग करवत नसे . पण त्याचा मुलगा संभा यास लहान वयामुळे जलदीचा फार त्रास होऊ लागला . तेव्हा त्यास अलाहाबादेस एका कबकलस नावाचा ब्राह्मणाच्या घरी ठेवणे भाग पडले . याची तेथे फार कीर्ती असून याच्या दक्षिणेतील नातेवाईकांचा सीवाच्या बापाशी फार घरोब्याचा संबंध होता . सीवाने त्या ब्राह्मणास काही द्रव्य देऊन आपला मुलगा त्याचे स्वाधीन केला . आपल्या हातचे पत्र येई तो तू मुलास सोडू नये आणि माझ्या मरणाची निश्चित बातमी ऐकल्यास तुला युक्त तसे तू वागावे असे सीवाने त्यास सांगितले आणि तेथून तो बनारसकडे रवाना झाला.

अनुक्रमणिका

(२१६) सीवाने कपडे बदलून व दाढीमिशा काढून मथुरा सोडली . सोडताना बरोबर आपला तरुण मुलगा व चाळीस पन्नास हरकारे व चाकर घेतले. या सर्वांनी आपल्या अंगास राख लावून बैराग्याचा वेष घेतला . त्यांनी बरोबर घेतलेली रत्ने , मोहरा व होन टेकण्याच्या काठीत लपविले. या काठ्या मुद्दाम यासाठीच पोकळ करून त्यांजवर मुठी बसविल्या होत्या . काही द्रव्य जुन्या पादत्राणांत शिवले होते आणि ती घालणारे लोक आपण बैरागी , गोसावी व उदासी अशा तीन प्रकारचे भिकारी आहोत असे भासवून अलाहाबाद -बनारसकडे निघाले. काही मूल्यवान रत्ने मेणात घालून ती एका हरकाऱ्यांच्या पोशाखात ठेविली आणि इतर रत्ने दुसऱ्या चाकराच्या तोंडात ठेवून ते रस्ता क्रमू लागले . अशा तऱ्हेने वाट चालत असता ते एका ठिकाणी आले . तेथील फौजदार अलीकुलीखान यास **गुर्जबर्दार** येण्यापूर्वीच सीवाच्या पलायनाची बातमी आपल्या वकिलाकडून आली होती. यामुळे त्याने हिंदू भक्तांचे तीन जथे आपल्या गावी आल्याचे ऐकून त्या सर्वास कैद केले व चौकशी करण्याचा हुकूम दिला. तेव्हा हे सर्व लोक व इतर प्रवासी एक रात्र व एक दिवस कैदेत पडले . दुसरे रात्री (२१८) दुसऱ्या प्रहरी सीवाने एकटे फौजदाराच्या खलबतखान्यात जाऊन आपण सीवा असल्याचे त्यास सांगितले . पण म्हणाला, 'माझे जवळ एक हिरा व एक लाल प्रत्येकी लाखाहून जास्त किमतीचे आहेत. तू मला पकडून कैदी म्हणून पाठविलेस किंवा माझे शीर तोडून ते धाडलेस तर वरील दोन रत्ने तुला मिळणार नाहीत . हा मी येथे आहे व हे माझे डोके. पण तू आपला हात मजपासून दूर ठेव.' अलीकुलीस पुढे मिळणाऱ्या बक्षिसीऐवजी चालून आलेली लाच पसंत पडली त्याने ती दोन रत्ने घेतली आणि दुसरे दिवशी चौकशी करून कैदेतील सर्व भक्त व प्रवासी सोडून दिले.

सीवास आपली सुटका म्हणजे दुसरे आयुष्यच वाटून तो बनारसच्या बाजूस जलदीने प्रवास करू लागला . जलद प्रवास व चाल यात त्याने नेहमीच्या दूतास मागे टाकिले . पण अलाहाबादेस पोहोचल्यावर त्याचा मुलगा व त्याजबरोबर असलेल्या संभाच्या पायास फोड आले व तो दमला. तेव्हा सीवाने बनारसेत कबकलस नावाच्या एका ब्राह्मणास काही रत्ने व पैसा देऊन आपल्या मुलास त्याच्या हवाला केले . कबकलस हा त्याचा आनुवंशिक कुलोपाध्याय असून त्यावेळी बनारसेत आला होता. सीवाने त्यास वचन दिले की, मी जिवंत घरी परतलो तर तुम्हास पत्र घालीन आणि त्यात सांगितलेल्या रस्त्याने व पद्धतीने संभास घरी घेऊन यावे . तसे न झाल्यास तुम्हा दोघांनाही परमेश्वराच्या हाती सोपवतो ; पण मुलाच्या इच्छेवरून किंवा आईच्या पत्रावरून तुम्ही कोणतीही हालचाल करू नये . (२१९) अशा तऱ्हेने मुलाला त्याच्या काही वर्षांच्या खर्चाच्या रकमेसह त्याच्या हवाला करून तो बनारसच्या मार्गास लागला. तो बनारसेत दाखल झाला त्या दिवशी पहाटे दोन घटका रात्र उरली असता आंघोळ व इतर हिंदूंची कृत्ये करण्यासाठी नदीकिनारी गेला . त्याने स्मश्रु करून आंघोळ केली पण अंधाराचा अमल होता तोच हुजूरहून सीवाचे निसटण्याची बातमी, गुर्जबर्दारांचे आगमन व धरपकडीचा आवाज याचा मोठा गोंगाट झाला.

(**शि. च. वृ. सं. खंड ३, मुन्तखाबुल्लुबाब**, ७९–८३)]

[शिवाजीची आग्राभेट आणि मोगलांची विजापूरवर स्वारी याची मासिरी आलमागिरीच्या कर्त्याने दिलेली हकीकत पुढीलप्रमाणे आहे :

(५५) राजा जयसिंघाने सीवाला हुजूरकडे पाठविले होते. (ही हकीकत जु. ९, हि. १०७६ **शव्वाल** १ (श. १५८८ **चैत्र शुद्ध** ३, इ. १६६६ मार्च २८) च्या मजकुरापुढे आहे) त्याप्रमाणे तो मुस्तफिऊल खिलाफत (आग्रा) जवळ पोहोचला तेव्हा फर्मान सुटले की , कुंवर रामसिंघ व मुखलिसखान यांनी सामोरे जाऊन त्यास दरबारात आणावे . सीवा व त्याचा मुलगा संभा यांनी बादशाहाचे दर्शन घेतले आणि १५०० अश्रफी नजर करून ६००० रुपये ओवाळून टाकले . (ही हकीकत ता १८ **जिल्काद** (श. १५८८ **वैशाख वद्य** ५, इ. १६६६ मे १३) च्या मजकुरापुढे आहे .) राजा जयसिंघाने सीवाला त्याच्या इच्छेप्रमाणे हुजूर पाठविले होते आणि हजरत त्याच्या गुन्ह्याकडे डोळेझाक करून इच्छित होते की , त्याची नावाजणी करून त्यास काही दिवसानंतर विदा करावे . दरम्यान दर्शनाच्या एके दिवशी थोर उमरावांच्या बरोबर एका योग्य जागी जाऊन तो उभा राहिला . परंतु तो अज्ञानाच्या जंगलात राहणारा बादशाही मजसिलीचे कायदे जाणत नव्हता . यामुळे एका कोपऱ्यात जाऊन त्याने कुंवर रामसिंघाला आपले गाऱ्हाणे सांगितले . त्या मूर्खाचे डोके भणभणले . तेव्हा हुकूम झाला की त्याने आपल्या मुक्कामास जावे . रामसिंघाने त्यास आपल्या घरापाशी राहावयास आणावे आणि त्याचा मुलगा संभा यास आपल्याबरोबर मुजऱ्यास घेऊन येत जावे . नंतर फौलादखानास त्याच्या पहाऱ्यावर ठेविले . बादशहाने राजा जयसिंघास ही हकीकत लिहून (५६) पाठविली आणि योग्य वाटेल ते लिहावे म्हणजे त्याप्रमाणे त्याशी आचरण करू असे कळविले. दोन तीन दिवसांनंतर संकटाच्या भयाने त्याचे हृदय सुकून गेले आणि स्वतःच्या कामाविषयी उपाय शोधून मोठमोठ्या उमरावांकडे जाऊन तो काकुळत दर्शवू लागला . दरम्यान राजा जयसिंघाची अर्जी आली की मी त्यास वचन दिले आहे आणि स्वतः इकडच्या कामात गुंतून राहिलो आहे. त्याचे अपराध माफ करणे योग्य आहे . यामुळे फौलादखानास हुकूम झाला की त्याच्या मुक्कामास असलेल्या पहारेकऱ्यांना काढून द्यावे. कुंवर रामसिंघाने पहाऱ्यात गफलत केली . यायोगे रूपात बदल करून तो ता . २७ **सफरला** (श. १५८८ **श्रावण वद्य** १४, इ. १६६६ ऑगस्ट १९.) आपल्या मुलासह पळून जंगलाच्या वाटेला लागला . तेव्हा कुंवर रामसिंघ मनसबेवरून बडतर्फ झाला आणि राजा जयसिंघास फर्मान गेले की, त्या रस्ता चुकलेल्याचा जवळचा (नातेवाईक) राजाच्या विनंतीवरून पाच हजारी पाच हजार स्वार एवढा मनसब मिळालेला आणि त्याच्याजवळ असलेला जो नेतू त्यास तजविजीने दस्तगीर करून हुजूर पाठवावे (५८) त्याप्रमाणे (ता. २४ **जमादिलाखर** हि. १०७७ व जु. ९ (श. १५८८ **मार्गशीर्ष वद्य १०** , इ. १६६६ डिसेंबर ११) च्या हकीकतीपुढे हा मजकूर आहे .) राजा जयसिंघाने सिवाचा नातलग नेतू याला पकडून दरबाराकडे पाठविले. तेथे त्यास फिदाईखानाकडे सोपविले आणि तो मुसलमान होऊन सफलाश झाला . राजा जयसिंघ सीवाची मोहीम संपवून आदिलखानास सजा देण्यास निघाला . तो दोन मजली गेल्यावर आदिलखानी सरदारांपैकी बहलोलचा नातू अबुल -मुहम्मद हा राजास येऊन भेटला. राजाच्या विनंतीवरून त्यास पाच हजारी पाच हजार स्वार एवढी मनसब मिळाली आणि तो राजाच्या मददगारांपैकी एक बनला . राजाच्या सूचनेवरून सीवा आणि त्याचा सरलष्कर नेतू यांच्या प्रयत्नाने फलटण , ताथवडा, खटवन (खटाव) आणि मंगळवेढे हे किल्ले सर झाले . याच वेळी अबुल-मुहम्मद व इतर सैन्य यांनी आदिलखान , खवासखान व अगणित सैन्य यांस तंबी देण्यास सुरुवात केली व तीत त्यास यश मिळून विजापूरचे सर्व महाल उद्ध्वस्त झाले . शेवटी विजयी सैन्याने विजापूरपासून पाच कोसांवर मुक्काम ठोकला . आदिलखानाने विजापूरचा किल्ला सन्नद्ध करून तलाव फोडले, विहिरीतून काटेकुटे टाकले, किल्ल्याबाहेरचे पीकपाणी नाहीसे करून सोडले आणि किल्ल्याचा आश्रय घेऊन विजयी सैन्यास दफे करण्याचे ठरविले. राजाचा किल्ला घ्यावा हा हेतू नव्हता , यामुळे त्याजपाशी किल्ले घेण्याचे सामानही नव्हते . तेव्हा काही दिवस मुक्काम करून नंतर तेथून त्याने कूच केले व २४ **रजबला** (श. १५८८ **पौष शुद्ध** ११, इ. स. १६६७ जानेवारी १० .) भिवरा नदी ओलांडली. आदिल खानाचा विश्वस्त

दियानतराय याने अतिशय काकुळत दाखवून व जडावाच्या वस्तू नजर करून पैगाम बांधिले . पाऊसकाळ जवळ आला होता आणि बादशहाकडून हुकूम सादर झाला की, बरसात औरंगाबादेस घालवावी. म्हणून शत्रूशी लढण्याचे सोडून त्याने परत कूच केले. (६०) हा मजकूर ता. १ **शव्वाल** जु. १० व हि. १०७७ (श. १५८९ **चैत्र शुद्ध ३**, इ. स. १६६७ मार्च १७) च्या हकीकतीपुढे आहे.) (**शि. च. वृ. सं. खंड** ३, **मासिरी आलमगिरी**, ९३–९५.)]

[शिवाजीच्या आग्राभेटीविषयी विविध साधनांमधून मिळणारी माहिती पुढे दिली आहे :

"सभासदी बखर" सांगते : "उपरी उभयतांनी दिल्लीस जावें, त्यास मिर्जा राजा बोलिला जे, 'पादशाहा बहोत हुन्नरवंत आहे. बेईमानी आहे. आम्ही तुम्ही बरोबरी गेलियानें दगा दोघासहि केल्यानें कसें करावे आपण मागाहून येतो . औरंगाबादेत राहतों. तुम्ही दिल्लीस जाणें. आपला पुत्र रामसिंग हुजूर आहे. तोहि तोलदार भिडेचा आहे. त्यास सांगोन पाठवितों. त्याचे हाते भेट घेणें. सरंजाम करून दक्षिणेस येणें. तुम्ही दिल्लीहून निघाला म्हणजे आपण दिल्लीस जाऊ. तोपर्यंत आपण बाहेर आहों.' पादशाहास भेटल्यावर तो तुमच्याशी बेइमानी न करी म्हणवून तजवीज सांगोन रामसिंगास पुढे पत्र पाठवून ठीक करून, राजियांसि रवाना केलें. राजियानि बरोबरी घेतले कारकून व हुजूरे तपशील : निराजी राऊजी शाहाणा १, त्रिंबकजी सोनदेव, सोनाजी पंताचे (ढबीराचे) पुत्र १, कलम १. माणको हरी सबनीस १, दत्ताजी त्रिंबक १, हिरोजी फरजंद १, राघोजी मित्रा १, दावलजी गाडगे १."

"मावळे लोक एकहजार, लष्कर तीनहजार येणेप्रमाणे, या सहवर्तमान राजे रायगडास येऊन , सर्वांच्या भेटी घेऊन, सदरहूप्रमाणे बरोबर घेऊन, राजे व पुत्र असे उभयता मजल दरमजल दिल्लीस चालले . पादशाहास राजे भेटीस येतात हे कळोन आपले कुलफौजदार व महालमौकासे यांसि ताकीद पत्रे पाठविली की, 'शिवाजीराजे मुलाजमातीस येतात ते जागा मुक्कामास राहतील तेथील फौजदारांनी येऊन भेटावें . दाणापाणी जो लागेल तो द्यावा. शाहाजादे यांचेप्रमाणे आदब चालवावी.' ऐसे रोखे पाठविले. त्यावरून रोज मजलीस जात तेथे फौजदार भेटून दाणापाणी जो खर्च लागेल, तो द्यावा. असे दोन महिन्यांनी दिल्लीस पावले."

"राजे आले ही खबर पादशहास समजून रामसिंग पुढे भेटीस पाठविले . रामसिंग येऊन भेटले. पादशहाचे सर्व वर्तमान सांगितले. बाह्यात्कार समाधान खुशाली सांगितली 'मनांत पादशहाचे काय आहे न कळे ,' असे बोलिलें. रामसिंग भेट घेऊन पादशहापाशी आले. वर्तमान सांगितले. पादशहांच्या एक हवेली जागा सचंतर शिवपुरा म्हणून वसवून (तेथे राजे) राहिले. मुहूर्त पाहून पादशहाचे भेटीस चालिले. पादशाहांनी सदर करून पांच हत्यारे आपणांजवळ ठेवून, कंबर बस्ती करून, अंगात जरीची कुडती घालून खासा तख्ती बैसला. तैसेच तख्ताजवळ मोठे मोठे शूर मर्दाने व तख्ताचे आसपास दोन हजार माणूस उभे केले . मनांत कीं, 'शिवाजी सामान्य नाही. सैतान आहे. अफजलखान भेटीमध्ये मारिला. तैसाच उठोन तख्तावरि आला आणि आपणास दगा केला तरि काय करावे?' असे समजून मुस्तेदीनिशी बसला. राजियासि भेटीस बोलविलें. राजे व पुत्र संभाजी राजे व कारकून व हुजरे अगत्यगत्य दहा जण भेटीस रामसिंग घेऊन गेलें . पादशाहाची नजर जाहाली. पादशाहा बोलिला जे, 'आवो शिवाजी राजे' असे बोलतांच राजियांनि तीन सलाम केलें . मनांत भाव धरिला कीं, श्री शंभुमहादेव एक व दुसरा श्रीभवानी , तिसरा महाराज पितियास. ऐसे तीन सलाम केले, आणि उजवे बाजूस जसवंतसिंग महाराज, नवकोट मारवाडचा राजा, त्याचे शेजारी खालते उभे राहावयासाठी हुकूम (पादशाहांनी) केला. राजे व पुत्र उभे राहिले रामसिंग यास पुसिले की, 'आपणावरते शेजारी कोण?' असे पुसिले. त्यास रामसिंग बोलिला जे, 'महाराज जसवंतसिंग' असे ऐकताच राजा क्रोधायुक्त होऊन बोलला की, 'जसवंतासारखा उमराव, याच्या पाठी माझ्या लष्करानी पाहिल्या असतील!! याचे खाले आपण उभे राहावें म्हणजे काय?' असे क्रोधे बोलून, रामसिंगाची कटार माझेची घेऊन महाराजा यास मारतो म्हणवून कटार मागूं लागले. मग रामसिंग 'धीर धरणे' म्हणून बोलू लागले. शब्दाशब्दी होताच पादशाहास कळले. पादशाहा म्हणू लागला की, 'काय जाहले?' रामसिंग बोलला की, 'जंगली वाघ हयवान त्यास गर्मा जाहला. कांहीं करिणा जाहाला.' असे बोलताच पादशाहाच्या मनात शंका उत्पन्न जाहाली. काय होईल ते न कळे. म्हणून रामसिंग पादशाहास बोलला की, 'राजियास घेऊन डेरियास जाणे उद्या सावकाश मुलाखत होईल.' असे बोलताच राजे व राजपुत्र व रामसिंग राजियाचे लोक देखील हवेलीस गेले . राजा बाहेर गेल्यावरि पादशाहा संतोष जाहला आणि 'मोठा अनर्थ चुकला. शिवाजीची व आमची नजर जाहली होती' ऐसे बोलून राहिले."

राजे डेरियास गेलियावरि रामसिंग व आपण बैसोन बोलिले जे , 'कोण पादशाहा! मी शिवाजी, मजला जसवंताखाली उभे करावें! करिणा काही पादशहा समजत नाहीं, ऐसे बोलिले. रामसिंग बोलिला जे 'तुम्ही भेटीस येऊ नये. आले तरी रसरंग राखून निघून जाणें. तुम्ही येथून सुखरूप गेलेत म्हणजे आम्हास मोठी जोड जाहाली.' असे बोलून रामसिंग आपले हवेलीस गेले. [**सभा. बखर** पृ. ४५–४७] अगदी नजिकचे हे लिखाण असून सुद्धा यांतील जवळ जवळ सर्वच विधानांत यत्कीचिंतही वास्तवबोध नाही हे पाहून आश्चर्य वाटणें साहजिक आहे . परंतु बखरकार राजघराण्याशी किंवा राजकर्त्यांशी संबंधीत नसल्याने त्यांचे लिहीणे अज्ञानपूर्ण असल्याचे दिसून येते . चित्रगुप्त उगाच पाल्हाळ लावितो. मिरजा राजा व जयसिंग राजे असे दोन निराळे पुरुष मानतो . परंतु सर्व पाल्हाळ मूळ सभासदीला धरून आहे . [**चित्रगुप्त**, पृ. ६३–६७] मराठी साम्राज्याच्या बखरीत संक्षिप्त असा मजकूर आला आहे, "तेव्हा मिर्जा राजे यांसि महाराज बोलिले कीं, हुजूर पादशहाची मुलाजमत राजापूर जहागिर पादशाहापासून देवविणे त्याजवरून मिर्जा राजे यांसी पादशाहाचा हुकूम आला कीं, शिवाजी राजे यांसि पाठविणे. त्याजवरून रामसिंघ हांडे समागम देऊन राजे यांसि पादशहाकडे रवाना केलें. महाराज संभाजी राजे यास समागमे घेऊन चालले. पादशहाकडे रवाना केलें. पादशाहास मुजरा करणार नाही म्हणून बोलले . त्याजवरून रामसिंग बोलला की, दिल्लीचा पादशहा सार्वभौम थोर आहे . त्यासी मुजरा करावा. तदनंतर मुलाखतीस गेले. पादशहाने आपल्यापुढे कमाना बांधल्या. कुरनिस करावी तो महाराजाच्या डोईवर हात धरला . त्याचे हातावर मारून कुरनिस करून पुढे गेले. दिवाण ५ हजारी ज्या जागेत उभे राहतात त्या जागी यांसि उभे करूं लागले . तो मनांत विचार आणून त्या स्थळी बसले. रामसिंग आडवा जाहला व दिवाण आडवा उभा राहिला . बादशहाने रामसिंगास नजरेनें इशारत केली कीं, हे काय? पादशहाचे कचेरीत कोणीही बसत नाहीत. तेव्हा पादशाहास रामसिंगाने अर्ज केला कीं, याने पादशाही बराबर पाहिली नाहीं. त्याजवरून हुकूम जाहला की, डेऱ्यास घेऊन जाणे." [**म. सा. छो. बखर**, पृ. ३१] एक्याण्णव कलमी बखरीत जरा निराळा मजकूर येतो. "याउपर भेटीस उभयतां शिवाजी राजे, संभाजी राजे मुत्सुद्दी

अनुक्रमणिका

घेऊन भेटीस पादशाहाचें गेलें. अगोदर रामसिंगाने व निराजीपंती मुजऱ्याची राहार वेष उभे राहून करावा हे पढविलें होतें . भेटीस तक्तापुढे सन्निध जाताच सलाम न करता रहीमखान दिवाण त्याचे वरते जाऊन पिते व पुत्र उभयतां उभे राहिले. खुणेने रामसिंगाने सांगितलें. परंतु सलाम न करीत. मनामध्ये तुरकास सलाम करणे उचित नाही . पादशहानी शिवाजीस पाहून रुमाल तोंडास लावून हंसो लागले . रामसिंगाकडे पाहिलें. रामसिंगाने समजावून सांगितले जे, मराठे यांस राहार वेष ठाऊकी नाही. तेच क्षणी रामसिंगास आज्ञा केली जे घेऊन उभयतास जाणे. जातेसमयी मुजरा केला नाही. पाठी पादशहाकडे करून चालिले. लष्करात आपल्या डेऱ्यात आले." [**ए. कलमी बखर**, क. ५२]

'शेडगांवकर बखरीत' शिवाजीबरोबर जाणाऱ्यात त्रिंबकजी सोनादेवऐवजी नारायण रामचंद्र दावलजी , गाडगेऐवजी बहिरजी नाईक व त्या शिवाय मुदगल भट आर्विकर, संभाजी कावजी अशी दोन अधिक नावे आहेत. शिवाजी महाराजांचा प्रवास रायगड–प्रयाग (प्रयागास अपशकुन) – काशी–(सोनोपंत दशग्रंथीस उपाध्येपण दाम) दिल्ली–दोन महिने प्रवास. बाकी सर्व मजकूर सभासदासारखाच [**शेड. भो. बखर,** पृ. ४९–५२.]

"शिवदिग्विजयात" बरोबर नेलेल्या मंडळीत रघुनाथराव कोरडे , प्रतापराव गुजर, त्रिंबकपंत डबीर, निराजी रावजी, हिरोजी फरजंद, बाळाजी आवजी चिटणीस, येसाजी कंक, तानाजी मालुसरे अशी निवड आहे . शिवाजी बरोबर औरंगाबादेपासून रामसिंग बरोबर होता असे म्हटले आहे. शिवाय विशेष मजकूर असा : "...रायगडाहून...औरंगबाद...मथुरा...गेलें. रामसिंगास पुढे पाठविलें...येत असल्याबद्दल समाधानाचे फर्मान बादशाकडून आले ते वाटेत ...मिळाले...दिल्ली नजीक येऊन मुक्काम केला ." बाकी सर्व मजकूर सभासदी व शेडगांवकर बखरीला धरून आहे . तपशीलाव्यतिरिक्त तार्किक पाल्हाळाचा विचार करण्याचे कारण नाही. [**शिदिवी**, पृ. २४२–२४६.]

चिटणीस बखरीतील काल्पनिक उठाव सोडला तर जो तपशील मिळतो तो असा : "यानंतर रायगडावर गेलियावर दिल्लीहून पादशाहाने विचार केला जे शिवाजी राजे यांस तह ठरावून , आपणापाशी आणून कसेही करून निरोप न देता गोवून ठेवावे . सफाईने चालिल्यासी इकडीलच मातबर कामे सांगावी ...पादशाही उमराव म्हणून , येथे भेटून रुजु होऊन सर्फराज होऊन जावे ....सनदा रवाना केल्या ....ते घेऊन आले आणि दिल्लीस जाण्याचा विचार पक्केपणे ठरावात आला ...राज्य करून रायगड प्रांतांत ठेविलें ....औरंगाबादेस आले. जयसिंगाची भेटी होऊन...रामसिंग त्याचे पुत्र चार हजार फौजेनिशीं बराबर दिल्हें . ते व महाराज निघोन दरमजल नर्मदा चमेली उतरून मथुरेस पावलें ...मथुरेस (चोबे ब्राह्मण अपशकुन)...दरमजल दिल्लीस गेले ....विरस न दाखवतां सन्माने करून बोलोन डेरीयास जाण्यास निरोप विडे देऊन दिला ." बाकीचा मजकूर सभासदीला धरूनच आहे. [**चिट. बखर,** पृ. २२८–२३२.]

बखरकारांना खऱ्या वस्तुस्थितीबाबत अज्ञान असल्यामुळे त्यांनी तर्काने रचलेल्या कथा शिवाजीच्या वागण्यातील मूळ हेतूबद्दल विपर्यास करतात. सभासदाचे या अवघ्या तीस वर्षापूर्वी घडलेल्या महत्त्वाच्या हालचालीबाबतचे अज्ञान पाहिले म्हणजे मागूनच्या बखरकारांनी निदान वस्तुस्थिती जाणण्याचा जो थोडा तरी प्रयत्न केल्याचे दिसून येते तसा प्रयत्न सभासदांनी मुळीच केलेला नसावा . ऐकीव दंतकथांवर विसंबून आपली बखर लिहून काढली, असे म्हणणे भाग पडते.

बर्नियर लिहितो : "शिवाजीने आदिलशाहीविरुद्ध मोगलास मदत करण्याचे कबूल केल्यावरून औरंगजेबाने त्यास "राजा" ही पदवी दिली आणि आपल्या संरक्षणाखाली घेतला व त्याच्या मुलास उमरावी मनसब दिली. काही दिवसानंतर बादशाहाने इराणशी युद्ध करण्याचे ठरविले आणि शिवाजीस गौरवून लिहिले . त्याचे औदार्य, बुद्धी, वागणूक यांची मोठी तारीफ केली आणि त्याला दिल्लीला भेटीस बोलाविले . जयसिंगाने शिवाजीच्या सुरक्षिततेबद्दल शपथेवर हमी घेतली." [बर्नियर, पा. १९०].

अबे करे लिहितो : "शिवाजी मोगली दरबारात त्यांच्या कीर्तीला व दर्जाला शोभणाऱ्या स्तुतीघोषात व थाटात गेला , आणि तेथे त्याला सवे प्रकारे चांगल्या तऱ्हेने वागविण्यांत आले." [**अबे कारे,** एफ्. बी. ऑफ एस्., पा. २०९].

थेवोन लिहितो : "प्रथम त्याला शक्य तितक्या चांगल्या रीतीने वागविण्यात आले . परंतु काही महिन्यांनी बादशाहा त्याचेकडे दुर्लक्ष करीत असलेले पाहून त्याने उघड तक्रार केली आणि सांगितले की तो पादशाहाच्या अभिवचनांवर विसंबून दरबारात आलेला असताना आणि तसे करण्याची त्याला काही आवश्यकता नसताना तो तेथे आला , आता बादशाहाचा त्याला मारण्याचा इरादा असल्याचे दिसते ." [**मॉनसिअर डी थेव्हेनॉट**, एफ्. बी. ऑफ एस., पा. १८१].

कास्मा द गार्डाची माहिती एका विशिष्ट कल्पनेने भारली गेली असल्याने तीत पुष्कळ विस्तार असला तरी विपर्यास बराच झालेला दिसतो. गार्डाप्रमाणे शिवाजीची बरीच स्तुती जयसिंगाकडून लिहून आल्यानंतर बादशहाने शिवाजीस पाहण्याची तीव्र इच्छा आहे म्हणून दरबारात पाठवून द्यावा अशा अर्थाने पत्र पाठविले. त्या पत्रात शिवाजीची बरीच प्रशंसा होती. शिवाजीला ते पत्र वाचून आत काही काळेबेरे असल्याचा संशय आला म्हणून त्याने जयसिंगाला कळविले की , ज्या अर्थी त्याच्या गैरहजेरीत त्याच्या मुलखाची व्यवस्था बिघडली आहे त्याअर्थी काही कामगिरी असल्यास येता येईल, नसल्यास सर्व स्थिरस्थावर झाल्यावर येईन. जयसिंगाला औरंगजेबाचे पत्र आले की , शिवाजीला जिवंत किंवा मेलेला पण ताबडतोब पाठवा. तेव्हा जयसिंगाने जाणले की , बादशहा शिवाजीला नेऊन त्यास ठार मारणार . जयसिंगाला आता शिवाजीला जा म्हणून सांगणे जड वाटू लागले. परंतु त्याला शिवाजीला दरबारात जाण्याचा आग्रह करणे प्राप्तच होते . शिवाजीला पाठवला जात नाही, असे पाहून औरंगजेबाने जयसिंगाला एक तलवार व बांगड्या पाठविल्या आणि लिहिले की , जर शिवाजीला पाठविलास तर तलवार कमरेस लटकाव व तसे तुझ्या हातून घडत नसेल तर ज्या बांगड्या पाठविल्या आहेत त्या बायकांसारख्या हातात घाल . जयसिंग काळजीत पडला. आजारी झाला. तेव्हा किरतसिंगाने बाप अत्यवस्थ आहे तरी भेटून जा म्हणून शिवाजीस पत्र पाठविले . शिवाजी सोलापुरास आला व भेटला. जयसिंगाने दिलेरखानाला पादशाहाकडे फार मोठी वस्तू नेण्यासाठी तयार होण्यास सांगितले आणि पादशाहाला पत्र पाठविले की , शिवाजी माझ्या कचाट्यात सापडला आहे . त्याची लवकरच रवानगी करतो . नंतर शिवाजीच्या जागी ठरल्याप्रमाणे दिलेरखान व जयसिंग आले . जयसिंगाने शिवाजीस थापा मारून दरबारात

अनुक्रमणिका

जाण्यासाठी विनविले. परंतु शिवाजीने जयसिंगाचा शपथेपर खोटे बोलतोस म्हणून निषेध केला . शिवाजीने नेताजीला बरोबर नेतो म्हटले . परंतु त्याला एका ब्राह्मणाशिवाय कोणासही बरोबर घेऊ न देता दिलेरखानाबरोबर जाणे भाग पाडले . नंतर जयसिंगाने शिवाजी व तो असे दोघे तीर्थक्षेत्री गेले म्हणून भूमिका उठवून आपण लोकांना दिसू नये म्हणून जयसिंग घरात लपून राहिला . शिवाजीच्या लोकांनी आपणास गाठू नये म्हणून विसावा न घेता दिलेरखान प्रथम औरंगाबादेस व नंतर राजधानीत गेला . दिलेरखानाने शिवाजीला आणल्याची खबर येताच बादशहाने शिवाजीला ताबडतोब फरादखान फौजदाराच्या ताब्यात देण्याची आज्ञा दिली . (**कॉस्मे दा गार्डा** , एफ. बी. ऑफ. एस्. पा. ११५–१३०). गार्डाचे हे वर्णन फारच मोठे आहे . वर फक्त हालचालींची नोंद घेतली आहे . या हालचालींचा उठाव घेतला नाही . सर्व हकीकत यावेळी कोणातरी बाताड्या माणसाच्या सांगण्यावरून आधारलेली आहे. साहजिकच ती वस्तुस्थितीला थोडीही धरून नाही.

दिलेरखान शिवाजीचा खून करण्यास कसा आटारेटा करीत होता . हे सांगितल्यानंतर मनुचीने शिवाजीच्या व औरंगजेबाच्या भेटीची माहिती दिली आहे : "शिवाजी दिल्लीस आलेला समजताच पादशाहाने त्यास भेटीस बोलविले . परंतु त्याला आपल्या दरबारात त्यावेळेपर्यंत कबूल केलेली मानाची जागा न देता बादशाहाने सोनेरी कठड्याच्या आतील खालच्या दर्जाच्या सरदारांच्या रांगेत उभे राहावे असे दर्शविले . औरंगजेबाच्या त्या वागणुकीवरून शिवाजीचे मन फार दुखाविले गेले . कारण तो दर्जा त्यांनी दिलेल्या वचनाला सोडून होता . त्याने त्रागा केला व तो औरंगजेबाला निकराने बोलला की , त्याने शपथेवर कबूल केलेल्या वचनाला धरून त्यांनी त्यास ती खालची जागा खात्रीने दिलेली नाही , इतकेच नव्हे तर राजा जयसिंगाने जे करार केले, त्यालाही तसा दर्जा देणे सोडून आहे. या पहिल्याच स्वागतावरून यापुढे काय घडून येणार त्याची अटकळ शिवाजीने बांधली . तो म्हणाला, "औरंगजेबाला समजू द्या की , त्याच्यासमोर उभे असलेले उमराव एक नामदारखान की , जो चांगला लढवय्या आहे. त्याखेरीज सर्व म्हाताऱ्या बायका असून त्यांना मी सहज जिंकले होते .' अर्थात त्यात त्याच्या (शिवाजीच्या) बरोबरीचा असा एकही नाही. नंतर तो रागात बाहेर निघून गेला . प्रत्येकाला असे वाटले की औरंगजेब त्यास मारील . परंतु औरंगजेबाला आपल्या मनातील भाव उघड प्रकट करण्याची संवय नव्हती तो आपला बेत गुप्तपणे सिद्धीस नेत असे . त्यांनी खूण केली की सरदारांनी शिवाजीबरोबर बोलणी करावी . कारण त्यावेळी त्याला दरबारात काय सांगावयाचे होते ते समजले नाही . सरदारांपैकी एकजण बाहेर आला आणि त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न करू लागला. दरबारात नवीन येणाऱ्या माणसाला एकदम प्रथम दर्जा देण्याची हिंदुस्थानच्या पादशाहाची रीत नाही , परंतु तो खात्रीने नंतर तसे करील. कारण तो त्याला (शिवाजीला) शूर सेनापती म्हणूने चाहतो. परंतु थोडे दिवस धीर धरणे जरूर आहे." [**मनुची,** खंड. २, पा. १३७, १३८].

'मासिर-इ-आलमगिरीत' नोंद आहे की, "राजा जयसिंगाने शिवाजीला दरबारांत पाठविल्यावरून तो आग्र्याजवळ आलेला समजताच कुमार रामसिंग व मुखलिसखान यांना बादशाहाने आज्ञा केली की त्यांनी पुढे जाऊन शिवाजीला सत्कारपूर्वक घेऊन यावे . शनवार १२ मेला बादशाहाने आपला ५० वा (चांद्रवर्ष) जन्मवर्षोत्सव साजरा केला . शिवाजी व त्याचा मुलगा संभाजी यांस भेटीचा लाभ मिळाला . शिवाजीकडून १५०० आश्रफा नजर व ६००० रुपये निसार म्हणून आले . राजा जयसिंगाच्या विनंतीवरून शिवाजी दरबारी आला होता म्हणून बादशाहाने त्याच्या पूर्वीच्या गुन्ह्याकडे कानडोळा करून त्याला मानसन्मान देऊन थोड्या दिवसांनी परत जाण्यास परवानगी देणार होता . भेटीच्या दिवशी तो उमरावांमध्ये त्याच्या योग्य जागेवर उभा राहिला . परंतु त्या दरबाराचा रीतीरिवाज न जाणणाऱ्या व अज्ञ रानटी माणसाने एका कोपऱ्यांत जाऊन आपला तीव्र असंतोष दर्शविण्याकरिता विचित्र तोंडवारे करण्यास व कुमार रामसिंगाजवळ तक्रार करण्यास सुरुवात केली . जेव्हा तो गोंधळ माजवू लागला तेव्हा बादशहाने त्याला घरी परत जाण्यास सांगितले . कुमार रामसिंगाला त्याच्या डेऱ्याजवळ शिवाजीला तंबू देऊन तेथे नेण्यास व संभाजीला दरबारात आणण्यास फर्माविले आणि फुलादखानाला हा महा लबाड शिवाजी एखादी फसवणूक किंवा सैतानी डाव खेळेल म्हणून त्याच्यावर नजर ठेवण्यास सांगितले . ह्या सर्व हकीकतीचे बादशहाने पत्र जयसिंगास पाठविले आणि जयसिंगास विचारले की यापुढे शिवाजीची व्यवस्था काय करावी. पत्रोत्तर ताबडतोब मागितले." [**मसिर-इ-आलमगिरी**, प्रकरण ९, पान ३६–३७].

'जेधेशकावली' ची नोंद अशी : "ज्येष्ठ शुद्ध द्वितीया (२५ मे १६६६) राजश्री शिवाजी राजे अगरियास पाऊन औरंगजेबाची भेटी घेतली तेव्हा बिघाड होऊन राजश्रीस चौकिया दिल्या."

'बुसातीन सलातीन' मध्ये बराच मजकूर आला आहे . त्यातील महत्त्वाचा भाग पुढे उद्धृत करतो : ".....त्यानंतर सिवास याचा पुत्र संभाजीसुद्धा आलमगिरी पादशाहाकडे रवाना केला. सिवा आपले पुत्रासहित जेव्हां दिलीस जाऊन पोहचला व आलमगीर बादशहाची भेटी घेतली तेव्हा आलमगिर पादशहा याणी त्याजवर बहुत मेहेरबानगी करून सिवास व त्याचे पुत्रास या उभयतासहि पाच हजारी असा किताब दिल्हा आणि सिवास बहुत दिलभरवंसा दिल्हा . परंतु पहिले भेटी समयी सिवा एकंदर जवळ उभे राहणारे अमीर लोकांचे बरोबरीने पादशाहापुढे उभा राहिला . तेव्हां सिवास खाली बसणेविसी पादशाहानी हुकूम दिल्हा नाही . सिवास फार गर्व व अभिमान व दांडगेपणा होता . यामुळे पादशाहास बहुत त्रास जाला व पादशाहानी आपल्यास बसण्याबिषयी आज्ञा दिल्ही नाही . यामुळे सिवास फार वाईट वाटले आणि काही वेळ आजार नसता सिवा याणे माझी प्रकृती बिघडली आहे असें निमित्य करून पुन्हा दरबारांत हजर जाला नाहीं . आलमगीर पादशाहा फारच अकलवान होता . सिवाचे दुष्ट संकल्प व कपटी प्रकृत वोळखून सिवा व त्याचा पुत्र संभाजी या उभयतासहि पादशाहानी नजरबंदीचे कैदेत ठेविले . तेव्हां आलमगिर बादशाहानी मजला माझे पुत्रासहित नजरबंदीचे पाहऱ्यात ठेविले आहे असा बोभाटा लिहून या मजकुराचे पत्र राजा जयसिंग याजकडे पाठविलें . जयसिंगाने पुन्हां शिफारस केल्यावर त्यास मुक्त केले . सिवा नजरबंदीचे पहाऱ्यांतून सुटला तेव्हां पळून जाण्यास संधी पाहातच होता . फुरसतीची वेळ पाहून आपले पुत्रासहित शिवा दिल्ली येथून पळाला ...बहादूरखान नेमून जयसिंगास हुजूर आणविले . तेव्हा जयसिंग परत येत होता तो सिवा दिल्ली येथून पळत...येऊन सिवानी जयसिंगाची वाटेतच भेट घेतली." [**बुसातीन-उस-सलातीन, मराठी ट्रान्स. पारसनीस**, पान ९२३–९३५].

खाफीखानाने शिवाजी औरंगजेब भेटीचा मजकूर थोडक्यात दिला आहे . तो लिहितो : ".....महोत्सव चालू असतां , बादशाहाला अकबराबादेजवळ शिवाजी आल्याचे समजले , तेव्हा जयसिंगाचा पुत्र कुमारसिंग व मुखलिसखान यांना मार्गात पुढे जाऊन त्याचे सत्कारपूर्वक स्वागत करण्यास हुकूम झाला . त्यांनी जाऊन त्याला दरबारात भेटीस आणावयास सांगितले .....चंद्रमानाप्रमाणे १२ मेला बादशाहाचा ५० वा जन्मोत्सव साजरा होत होता .....शिवाजी आणि त्याचा मुलगा नऊ वर्षांचा संभाजी हुजूरजवळ येऊन १५ हजार सोन्याच्या मोहरा व ६ हजार

अनुक्रमणिका

रुपये नजर व नियाझ म्हणून दिले.....आणि बादशाहाची खूण होताच शिवाजी व नऊ वर्षांचा संभाजी यास पंचहजारी उमरावांत उभे केले . जरी राजा जयसिंगाच्या वचनांप्रमाणे शिवाजीला सप्तहजारीपेक्षा कमी दर्जा लाधणार नाहीं असें शिवाजी म्हणत असला तरी त्याचे गैरवर्तन वगैरेचा विचार करिता त्याच्या म्हणण्याला पुरावा दरबारी दाखल नव्हता . त्याला खिलात, हत्ती, घोडे वगैरे देऊन पूर्वी गौरवला होता व अमीरांनी त्याचे ज्या तऱ्हेने स्वागत केले होते तसे त्याचे यावेळी झाले नव्हते . त्याच्या मनांत अपमान व गोंधळ यांनी काहूर माजविलें होतें . जसा तीर लागून किंवा जाळ्यांत अडकल्याने एखादा मनुष्य सुन्न होतो त्याप्रमाणे तो विचारमग्न होऊन राहिला . तो भानावर आला आणि थोड्याच अवधीत आपल्या नेहमीच्या धूर्तपणाने कुमार रामसिंगाजवळ बोलू लागला . त्यांने आपली सर्व तक्रार सांगितली व म्हणू लागला की , येथे दिवस फुकट घालविण्यात अर्थ नाहीं. कुमारसिंगाने त्याला शांत करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला .....परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं . जेव्हां या सर्व गैरवर्तुणुकीच्या गोष्टी बादशाहास कळल्या तेव्हा त्याला शिवाजीचा विट आला आणि सरकारी मानमरातब मिळण्यापूर्वीच त्याला दरबारातून रजा दिली . शहराबाहेर जयसिंगाच्या वाड्याजवळ शिवाजीला डेरा दिला. शिवाजीने जयसिंगास लिहून उत्तर आणले. मग त्याला मुजऱ्यास दरबारात परत घेऊन ये म्हणून रामसिंगास फर्माविले. मात्र शिवाजीच्या मुलाने रोज दरबारांत व बादशाहाच्या भेटीस रामसिंगाबरोबर यावे असा हुकूम झाला होता ." **(खाफीखान, मॅकेन्झी कलेक्शन्स, इंडिया ऑफिस,** पा. २१३-२१६).

व्हॅलेंटाईन लिहितो : "त्याला (शिवाजीला) पुष्कळ आशा दाखवून दरबारांत नेण्याचे प्रयत्न केले . त्यावरून तो आपला मुलगा व निवडक लोक बरोबर घेऊन दिल्लीस गेला व तो खास थोड्या नोकरांसह दरबारात गेला.

परंतु आपल्या मुलाला लोकांसह दिल्ली शहरापासून थोड्या अंतरावर ठेविले आणि वडिलाचा निरोप येईपर्यंत तेथेच थांबण्यास सांगितले. कारण शिवाजीला आपणाला तेथे वागणूक कशा प्रकारची मिळते ते पाहावयाचे होते."

"त्याचा सरदार, उमराव वगैरेंनी चांगला सत्कार केला व त्यास चांगल्या रीतीने वागविले . त्याची व बादशाहाची जेथे भेट व्हावयाची होती त्या राजवाड्यात त्याला नेले . परंतु औरंगजेबासमोर जाताना त्याने जेव्हा पाहिले की आपल्यास उमरावात कबूल केल्याप्रमाणे तिसऱ्या जागेचा मान न देता त्या ऐवजी चौथा दर्जा दिला जात आहे तेव्हा तो संतापला व म्हणाला की , 'ज्या बादशाहाच्या वचनावर विश्वसून आलो त्याला असे करणे शोभते का ? त्याने साफ सांगितले की तिसऱ्या जागेवर मी बसणार नाही .' आणि तो दरबारातून निघून जाऊ लागला . परंतु काही सरदारांनी त्यास शांत करून सांगितले की त्याला जे वचन दिले आहे ते पाळण्याची व्यवस्था होईल."

"औरंगजेबाला आपल्या उमरावांकडून अशा उद्दामपणाचे वर्तन सहन करण्याची सवय नव्हती. त्यातले त्यात बंडखोर चोरट्याकडून तर असले वर्तन सहन करणे शक्य नव्हते. तेव्हा बादशाहाने आपल्या नोकरास हुकूम दिला की, त्याचेबरोबर चार नोकर ठेवून नीट बंदोबस्ताने राहू द्या. शिवाजीने सहजच जाणले की त्याला नजर कैदेत ठेवलेलें आहे." [**लाइव्हज ऑफ दी ग्रेट मोगल** बाय व्हटिन, **इंग्लिश ट्रान्स** पा. १४३-४४].

यानंतर कागदपत्राचा शोध घेऊ; औरंगजेबाचे ५ एप्रिलचे १६६६ चें शिवाजीस लिहिलेले फारशी फर्मान असे : "आपले बराबरीचे राजांस श्रेष्ठ सर्व उमरावांत श्रेष्ठ महत्कृपेस पात्र , मुसलमानी धर्मरक्षक, शिवाजी याणे बादशाही कृपेने उमेदवार होऊन जाणावे की तुमचे पत्र मिर्जा राजे जैसिंग याणी ठरविल्याप्रमाणे इकडील प्रांती रवाना जालें . ते पाहून बहुत संतोष जाला . ऐशियास इकडील लोभ तुम्हावर पूर्ण आहे . म्हणोन शनवकाअ करिता खातर जमेने मजल दरमजल निघोन यावें . म्हणोन भेटीअंती बहुत सत्कार पावून माघारे जाण्याविषयीचा निरोप दिल्हा जाईल . सांप्रत तुम्हाकरिता पोषाख पाठविला आहे तो घ्यावा ". [**राज. खंड** ८, ले. १६ पृ. १४; **पर्शियन लेटर**, पान, २२ एस. व्ही. अे. अे]. दुसरे पत्र परखलदासचे २३ एप्रिल १६६६ चे कल्याणदासला लिहिलेले : कुमार रामसिंगाने शिवाजीला पादशहाच्या भेटीसाठी ११ मेला येण्याबद्दलचे पत्र रवाना झाले आहे . आग्र्यापासून एका मुक्कामावर कुमार व फिदाईखान यांणी शिवाजी येण्यापूर्वी एक दिवस आधी सामोरे जावे आणि शिवाजीला सत्कारपूर्वक घेऊन यावे. अशा रीतीने त्याची व पादशाहाची भेट ११ मेलाच होईल. (कन्हनीचा मुलगा) तेजसिंग ज्याला जयसिंगाने शिवाजीबरोबर पाठविला आहे तोहि त्या वेळी येईल ". [**एस्, व्ही. टू. अे. ॲट अे.**, राज्यस्थानी लेटर क्रमांक नं १४ , पा. २३ आणि ७, **रकलदास टू कल्याणदास फ्रॉम आग्रा**, तारीख २३ एप्रिल १६६६ .]. नंतर त्याच्याच १५ मेच्या पत्रात हकीकत येते की , "११ मेला शिवाजी मलुकचंद सराईला आला आणि त्याने तेथेच मुक्काम केला. कुंवर रामसिंगाने आपला मुनशी गिरिधरलाल याजबरोबर एक शिरपाव व चांदीच्या जिनाबारगिरासह घोडा देऊन 'तू पुढे जा आणि माझा शिवाजीला 'राम राम' प्रविष्ट कर' म्हणून सांगून पाठविला. त्याप्रमाणे गिरिधरलाल ३५ –४० पायदळांसह गेला व त्याने आपल्या धन्याचा 'राम राम' प्रविष्ट करून रामसिंगाने कळविल्याप्रमाणे भेटीची व्यवस्था झाली असल्याचे सांगितले . शिवाजीने गिरिधरलालला २०० रुपये बक्षीस व एक पोषाख देऊन निरोप दिला."

"राजवाड्यावरील पहाऱ्यांची रामसिंगाची पाळी १२ मेला होती . म्हणून कामावरून सुटका होताच रामसिंग स्वार होऊन शिवाजीच्या तंबूकडे निघाला . तत्पूर्वी गिरिधरलालला शिवाजीने मार्गदर्शन देऊन आग्र्यास आणण्यासाठी पुढे रवाना केले होते . मुनशी गेला व तो मुखलिसखान हे कुमारच्या तंबूवरून फिरोझा बागेवर शिवाजीस सामोरा म्हणून गेले . परंतु कुंवरला कळले की , शिवाजी दहार -आरा बागेवरून जात आहे तेव्हा त्याने डुगरमल चौधरी व रामदास रजपूत यांना जलदीने जावयास लावून त्यांना शिवाजीस फिरोज बागेच्या रस्त्याने आणण्यास सांगितले. त्या दोघांनी जाऊन शिवाजीला बाजारपेठेतून कुंवरच्या तळाकडे आणले व पुढे नुरगंज बागेशी त्यांची गाठ पडली."

"तेजसिंगाने शिवाजीला कुंवर रामसिंगाची ओळख करून दिली व नंतर कुमाराजवळ येऊन त्याला शिवाजीची ओळख करून दिली . शिवाजीला वाटले, कुमाराने प्रथम पुढे येऊन त्याचा सत्कार करावा, म्हणून तो पुढे आला नाही. पण कुमार जरा पुढे सरला व घोड्यावरूनच त्यांनी एकमेकांना आलिंगन दिले. नंतर तो मुखलिसखानास भेटला. शिवाजी बरोबर चार हत्ती व चार हत्तीणी होत्या. कुंवर बोलला, 'पुढे गर्दी आहे. एवढे हत्ती कशाला घेता?' तेव्हा कुमाराच्या तळाशेजारीच शिवाजीसाठी तंबू उभारले होते तिकडे ते हत्ती पाठवून दिले व तेथे त्यांना बांधून ठेवले."

अनुक्रमणिका

"कुमार व मुखलिसखान शिवाजीला बरोबर घेऊन जात होते . दरम्यान पादशाहा आमखास (पब्लिक ऑडियन्स हॉल) मधून उठून गुसलखान्यात (दिवाणीखास) गेले. शिवाजी या दुसऱ्या दिवाणखान्यात गेला . असदखान बक्षी शिवाजीला भेटीसाठी पुढे घेऊन गेला . शिवाजीने एक हजार मोहरा व दोन हजार रुपये नजर व पाच हजार रुपये निसार दिली . शिवाजीचा मुलगा शंभूजीने नंतर ५०० मोहरा व १००० रुपये नजर व दोन हजार रुपये निसार दिली . शिवाजीला राया रायसिंगासमोर ताहिरखानाच्या जागेवर उभे केले . बादशाहा शिवाजीजवळ एक शब्दही बोलले नाहीत."

"त्या दिवशी बादशहाचा जन्मोत्सव असल्याकारणाने पादशाहाजादे व सरदार यांना पानविडे दिले . त्याबरोबर शिवाजीलाहि मिळाला. पोशाख (खिलात) मात्र पादशाहाजादे, जाफरखान व जसवंतसिंग यास मिळाली . हे पाहून शिवाजी दिलगीर झाला व त्याला रागही आला ; डोळे लाल होऊन अश्रूही भरले . बादशाहाने हे पाहिले . तेव्हा त्याने कुमारला सांगितले की , 'शिवाजीला विचारा काय झाले ?' कुमार शिवाजी जवळ आला. तेव्हा शिवाजी त्याला म्हणाला : 'तू पहात आहेस तुझ्या पिताजीने पाहिले आहे आणि बादशाहानी पाहिले आहे की , मी कसा माणूस आहे आणि असूनही तुम्ही मला येथे जाणूनबुजून उभा करून ठेवलेत ! मी तुमची मनसब फेकून देतो . जर तुम्हाला मला येथेच उभे करावयाचे होते तर मला माझ्या मानाच्या जागी उभे करावयाचे होते .' तो नंतर ताबडतोब पाठ फिरवून रागाने त्या सरदारांच्या रांगेतून जाऊ लागला . कुमारसिंगाने त्याचा हात धरला, परंतु शिवाजीने तो झिडकारून टाकला आणि एका बाजूला जाऊन बसला . कुमार त्याच्या मागे गेला व त्याला परत आणण्याचा प्रयत्न करू लागला. परंतु शिवाजी ऐकण्यास तयार झाला नाही . तो मोठ्याने ओरडला, "माझ्या मृत्यूची वेळ जवळ आलेली आहे . एक तर तुम्ही मला मारा नाहीतर मी आपणांस मारून टाकीन. माझे शिर कापून पाहिजे तर घेऊन जा तिकडे, परंतु मी बादशाहाच्या जवळ जाणार नाही."

"शिवाजीची समजूत घालणे कठीण आहे हे पाहून कुमार बादशाहाजवळ गेला व त्यास सर्व हकीकत निवेदन केली . बादशाहाने मुलतफीतखान, आकीलखान व मुखलिसखान यांना आज्ञा केली , 'शिवाजीकडे जाऊन त्याला शांत करा व त्यास खिलात देऊन सिंहासनाजवळ आणा.' ते तिघे खान शिवाजीजवळ आले व त्यास खिलात पेहेरण्यास विनंती केली . परंतु शिवाजीने खिलात घेण्याचे नाकारले. 'पादशाहाने जाणून बुजून मला जसवंतसिंगाखाली उभे राहण्यास लावले . मी असा काय होतो की त्याने मला तशा अपमानाच्या स्थितीत उभे करावे ! बादशाहाची मनसब मला नको आहे. मी त्याचा चाकर होणार नाही. तुम्हाला वाटत असेल तर तुम्ही माझा खून करा किंवा कैदेत टाका . परंतु आता ही खिलात घेणार नाही.' शेवटी ते परत फिरले व बादशाहास सर्व मजकूर सांगितला . तेव्हा बादशाहाने कुमारास सांगितले की , शिवाजीस तू तुझ्याबरोबर घेऊन जा व त्याला तंबूत पोहोचीव आणि त्याची समजूत घाल . कुमार शिवाजीला आपल्याबरोबर घेऊन गेला व त्याच्या तंबूत बसून पुष्कळ प्रयत्न केले, पण तो काही ऐकण्यास तयार नव्हता. अर्धा तास बसल्यानंतर शिवाजीला त्याच्या डेऱ्यात जाण्यास निरोप दिला."

'जे सरदार शिवाजीचा द्वेष करणारे होते ते बादशाहास बोलले की शिवाजीने एवढे मोठे गैर आचरण केले असताना सुद्धा पादशाहा त्याचेकडे दुर्लक्ष करितात!' सैयद मुर्तबाखान म्हणाला, 'तो जंगली प्राणी आहे. आज जरी त्याने खिलात स्वीकारली नसली तरी तो उद्या निमूटपणे घेईल. केवळ मिर्झा राजासाठी म्हणूनच त्याला थोडी मैत्रीची वागणूक मिळत आहे. नाहीतर त्याची कोण पर्वा करतो!'

"तिसऱ्या प्रहरी कुमार रामसिंगाने शिवाजीच्या छावणीत गोपीरामबरोबर सुखामेवा (फळे) पाठविला. गोपीरामने शिवाजीपुढे रु. ९ नजर ठेविली. शिवाजीने त्यास शिरपाव दिला . संध्याकाळी कुमाराने बल्लुशहा व गिरधरिलाल मुनशी यांस शिवाजीकडे त्याची समजूत करून देण्यास पाठविले. बल्लुशहाने शिवाजीस ५ मोहरा नजर केल्या व त्याच्याशी बोलणे करून त्याची खात्री पटवून दिली . शिवाजीने त्याचे म्हणणे संमत केले आणि तो म्हणाला, "ठीक आहे. मी माझ्या मुलाला माझ्या भावा- (रामसिंग) बरोबर पाठवीन; त्याचेकडून चाकरी घेऊ दे. ती तो करील. मी ही २–३ दिवसांनी जाईन."

"संध्याकाळी सिद्दी फुलाद व पर्तितराय हरकारा रामसिंगाकडे आले आणि त्यांनी बादशाहाचा निरोप सांगितला की , 'कुमारने शिवाजीची समजूत घालावी .' तेव्हा शिवाजीला आपल्या डेऱ्यात बोलावून आणून त्याची यशस्वीपणे समजूत घातली व त्याप्रमाणे बादशाहास कळविले."

"दुसऱ्या दिवशी सकाळी कुमार बादशाहाच्या दरबारात गेला तेव्हा बादशाहाने विचारले , 'शिवाजी येत आहे काय ?' कुमार म्हणाला, 'त्याच्या अंगात ताप आहे त्यामुळे तो आज येणार नाही.' नंतर सायंकाळी जेव्हा कुमार बादशाहाच्या दरबारात गेला तेव्हा त्याने शिवाजीच्या मुलाला आपल्याबरोबर नेले आणि त्यास आपल्या बाजूला उभे केले. पादशाहाने मुलाला एक शिरपाव, हिरेजडीत कट्यार व मोत्याचा कंठा दिला."

"आज १५ तारखेपर्यंत शिवाजी बादशाहाच्या दरबारात गेला नाही . राजा जसवंतसिंग, जाफरखान, बेगम (जहानारा), इतर सरदार, जे शिवाजीच्या विरुद्ध गटातील होते ते बादशाहाला बोलले की 'शिवाजीने इतका उद्दामपणा व अवज्ञा केली असताना सुद्धा बादशाहा त्याकडे दुर्लक्ष करीत आहेत ही बातमी आता देशोदशी पसरेल.' तेव्हा काही दिवस शिवाजीला दरबारात गेला नाही."

"कुमार त्याचेबाबत मध्यस्थी करीत असून त्याच्या समाधानार्थ त्याला मनसब मिळवून देण्याची खटपट करीत आहे ." [इबिड क्रमांक १६ पाने २३-२७ आणि २२, २६, तारीख १५ मे १६६६].

नंतर मिरझा राजा जयसिंगाच्या गुमास्त्याचे एक पत्र आहे . त्यात मजकूर की , "शिवाजी भेटीला आला त्यावेळी दरबारी शिष्टाचाराचे उल्लंघन केल्यामुळे थोडे दिवसपर्यंत बादशाहाने त्याला दरबारास येण्याची बंदी केली होती . परंतु नंतर सन्मान व कृपा दाखवून त्याला परत पाठवावा असा औरंगजेबाचा बेत होता....." [**भांडारकर कॉमेमोरेशन व्हॉल्यूम,** पा. ३०२; पसासं क्र. ११२९].

अनुक्रमणिका

यानंतर बाहेरच्या बातम्यांवर आधारलेला तत्कालीन पत्रव्यवहार काय सांगतो ते पाहू : सुरतकर कारवारला आपल्या ८ जून १६६६ च्या पत्रात लिहितात की, "या बाजूला इतकीच बातमी आली आहे की, शिवाजी बादशाहापुढे गेल्या वेळी त्याचे वर्तन बादशाहाला पसंत न पडल्यामुळे शिवाजीला कठोरपणाने वागविण्यात आले. इतर उमरावांप्रमाणे हात बांधून दूर अंतरावर मुक्याप्रमाणे अदबीने (उभे) राहण्याचा अपमान सहन न होऊन त्याला संताप आला. असे ऐकल्यावर बादशाहाने बढती करण्याची वचने देऊन त्याच्या समाधानाकरीता माणसे पाठविली. त्याला काबूलकडे पाठविल्याची बातमी आहे. परंतु त्या प्रांताचा कारभार करण्याचा उमरावी अधिकार त्याला दिला आहे की प्रसंग पडेल त्याप्रमाणे दूर करण्याचा बादशाहाचा इरादा आहे, हे समजण्यास, आम्ही दरबारापासून बरेच दूर असल्यामुळे, आम्हांला मार्ग नाही." [**सुरत टू कारवार**, ता. ८ जून १६६६; **एफ. आर. सुरत व्हॉल्यूम** ८६, पान ३०२; इ. आर. ऑन एस्. पा. नं. १२७ पसासं, क्र. ११२८]. यानंतर सुरतकरांच्याच लंडनला २५ सप्टेंबर १६६६ रोजी लिहिलेल्या पत्रात या प्रसंगाबाबत माहिती आली आहे. ती अशी : "शिवाजी, अखेरीला त्याच्यासारख्याच मोठी वचने देऊन घात करणाऱ्या बादशाहाच्या कचाटीत सापडला! खुद्द शिवाजीकरिता ६००० घोड्यांची मनसब, आणि मुलाकरिता ३००० घोड्यांची मनसब अशी बढतीची मोठी वचने आपल्या सेनापतीचे मार्फत देऊन आणि वर गत अपराधांची क्षमा करून कृपा करण्याबद्दल लेखी पत्रे पाठवून, बादशाहाने वारंवार आमंत्रण केल्यामुळे भाळून गेलेला शिवाजी स्वतःला सुरक्षित समजून बादशाहाला कुर्निसात करून राजनिष्ठा व्यक्त करण्याकरिता म्हणून गेला. परंतु दरबारात गेल्यावर आपल्यापेक्षा कमी दर्जाचे उमरावांचे खाली उभे केल्यामुळे बादशाहाची पर्वा न करिता तो निधड्या छातीचा वीर संतापून तिरस्काराने दरबाराचा त्याग करून निघून गेला. बादशाहाने त्याच्या समाधानाकरिता अनेक सरदार पाठविले, तरी देखील तो परत येईना, की दरबाराची निर्भर्त्सना करण्याचे थांबविना. 'आपण युद्धात जिंकलेले कैदी नाही! तह होऊन भेटीस आलो आहे' असे तो म्हणतो; व बादशाहापुढे येण्यास पुनः कधीच तयार नाही. नंतर शिवाजीने बरोबर आणलेल्या सर्व लोकांस बादशाहाकडे रजा देऊन, त्याला फक्त हालचालीची मोकळीक ठेवून त्याच्या घरावर आपल्या लोकांचा कडक पहारा ठेवला की बहुतेकांच्या मते त्याला स्वदेशाकडे परत जाण्यास येथून सुटका करून घेण्यास 'सवड दिली जाणार नाही असे आहे.' 'शिवाजीपासून आपली आता मुक्तता झाली' असे सर्वजण समजत होते." [**सुरत टू लंडन** ता. २८ सप्टेंबर १६६६ ओ. सी. व्हॉल्यूम २९, इ. आर. ऑन एस्. नं. १२९; पसासं क्र. ११३६].]

[जयसिंगाच्या स्वारीबाबत पोर्तुगीज कागदपत्रात पुढीलप्रमाणे माहिती आढळते :

इ. स. १६६५ च्या सुरुवातीला औरंगजेब बादशहाने महाराजा जयसिंग ह्यांना शिवाजी महाराजांचे पारिपात्य करण्यासाठी मोठे सैन्य देऊन पाठविले. जयसिंग पुण्यास दि. ३ मार्च १६६५ रोजी येऊन पोहोचले.

महाराजा जयसिग ह्यांच्या शिवाजी महाराजांवरील स्वारी संबंधाने गोव्याचा व्हाइसरॉय आपल्या राजास लिहितो :

"महाराज,

अली इदालशा (आदिलशहा) राजाच्या राज्याची सीमा साळ नदीला भिडली असून साष्टी महालातील ते शापोरापर्यंतचे शेवटचे बंदर आहे आणि शापोरा हे देखील बारदेशचे शेवटचे बंदर आहे. बारदेशमध्ये सांप्रत मोठी धामधूम सुरू आहे. कारण बऱ्याच वर्षामागे शिवाजी या नावाचा एक देशी मांडलिक राजा आदिलशहाविरुद्ध बंड करून उठला. आदिलशहाच्या सैन्याशी शिवाजीच्या अनेक झटपटी आणि लढाया झाल्या. पण त्या सर्व लढाया त्याने जिंकल्या. त्याचे कारण हे की, प्रदेश डोंगराळ असल्याने घोडदळाला त्या प्रदेशात हालचाली करता येत नाहीत. त्याचा फायदा शिवाजीला मिळाल्याने त्याने आदिलशहाच्या सैन्याचा लिलेने पराभव केला. इतकेच नव्हे, तर त्या सैन्याची मोठीच हानी केली. ते पाहून मोगल बादशहाने शिवाजीवर मोठे सैन्य धाडले. पण त्या जंगली लोकाच्या निष्काळजीपणाने म्हणा अथवा शिवाजीने त्यांना पैशांची लाच चारल्याने म्हणा, शिवाजी आपल्या दुर्गातून (किल्ला) निसटला व बरोबर आठ किंवा दहा हजार सैन्य घेऊन तो दोन्ही सैन्यांमधून एखाद्या विजेप्रमाणे बाहेर पडला. तो थेट सुरतेवर चालून गेला. त्याच्या हल्ल्याची कुणालाच कल्पना नसल्याने सुरतेचे लोक गाफील होते. त्यामुळे शिवाजीला मुळीच प्रतिकार झाला नाही. त्याने ते शहर खुशाल लुटले व सर्व लूट नौकांमध्ये भरून त्या त्याने आपल्या मुलखाला पाठवून दिल्या. शिवाजीने सुरतेला हल्ला केल्याची वार्ता औरंगजेब बादशहाला कळताच त्याला भयंकर दुःख झाले व त्याने शिवाजीचे पारिपात्य करण्यासाठी महाराजा जयसिंग ह्या नावाच्या आपल्या एका मांडलिक राजाला मोठे सैन्य देऊन पाठविले. ह्या राजाने शिवाजीचे अनेक दुर्ग घेतले व त्याला मोगल बादशहाचे मांडलिकत्व स्वीकारण्यास भाग पाडले....."

(**म. इ. सा. खंड** ३, ७–८)]

[शिवाजीमहाराजांच्या आग्रा भेटीबद्दल मराठी कागदपत्रात मिळणारी माहिती पुढे दिली आहे :

कुर्नीस केली नाही.

ते दिवशी पादशाहांनी बहुत तरतुदीने अदालत मजालस करून सर्व वजीर, बक्षी, व उमराव मातबर जमा करून यांस नेले. भेटीस जाण्यापूर्वी नजर करणे, कुरनिशात ('खुरनिषाद आदाब बजावणे') बजावणे पादशाही कायदे सर्व रामसिंग यांणी सांगून ठेविले जे "प्रसंगी तुम्ही येथे आला तेव्हां येथील रंग राखून, आपले मतलब सिद्ध करून देशी जावे हे उतम!" ऐसे बहुत रीतीने सांगून ठेविले. 'बरे' बोलले असता, भेटीस गेलियावरि यवनास भुईस हात लाऊन सलाम करणे हे काय?' हे ईर्षा मनात येऊन बावरेपणे रामसिंगानी सांगितला मार्ग सर्व सोडिला आणि कुर्नीस केली नाही. हे रामसिंगानी पाहून, नजर घेऊन, आपण पुढे होऊन [रामसिंग याणीच] केली. उजवे बाजूस अमीर, [उभे] होते, त्यांत उभे राहण्यास हाताने पादशाहांनी दाखविले त्याजवरून खान व रोहीले वजीर राजे माखाडकर जसवंतसिंग यांचे वरते जाऊन उभे राहावे, ('न राहता') ते बसले. हे रामसिंग यांणी पाहताच आपण पुढे होऊन उभे राहीले. तेव्हा पादशहांनी खुणेने विचारले [तेव्हा रामसिंग बोलले] "दक्षीणी

अनुक्रमणिका

राजे होत, अदालत कधीच पाहिली नाही " ऐसे बोलले. ते समयी पादशहांनी मनात आणिले जे कुलुब ('पुरुष,' 'कुरुप') खंबीरच हा होय म्हणून तोंडात रुमाल लावून किंचित हास्य करून आश्चर्य केले आणि सन्मानरीतीप्रमाणे 'कधी आला? काय खबर आहे?' हे प्रश्न केले. यांणीही उत्तरे समर्पक केली. वीरसन दाखविता ('सनदा दाखवता') सन्माने करून बोलोन डेरियास जाण्यास निरोप, विडे देऊन दिला. खर्चास व मेजवानी पाठविली. फौजेसुद्धा अजमास करून दरमहा बांधून देविला. रामसिंग बराबर डेरियास घेऊन आले. "येथे आला तेव्हा फार विचारे चालावे, केली ही गोष्ट पूर्वी आपणास सांगितली असता कशी केली ऐसे बहुत प्रकारे ममतेचे अर्थ सांगून हवेलीस निघोन गेले. याजवरिल ('त्यांजवर महाराज काही दिवस पादशहाचे हवेलीत रहावे') काही दिवशी पादशहाने यास राहण्यास हवेलीत रहावे ('त्यांजवर महाराज काही दिवस पादशहाने हवेलीत रहावे') व फौजही आसपास जवळ उतरावी. ऐसे ठिकाण हवेली योजून देवविली. तेथे आपले सलतनतेनिशी जाऊन राहिले.

त्याजउपरि रामसिंग मधेस्त ('मध्यस्थ', 'मध्यस्थी') याजपाशी "करार यादीबुदी जाल्यावरून देशीहून आलो. येण्याचे मानस कसे केले. इकडील हवा मानत नाही, यास्तव कराराप्रमाणे करून देऊन, तिकडील कार्यभाग ('काय') सांगणे ते सांगून निरोप देववावा." हे बोलणे. लाविले 'बरे आहे' असे पादशाह बोलले, आणि "राजे यांणी आम्हांपाशी असावे, मोठी मोठी कार्ये करावी, सर्फराजी अधिक करून घ्यावी, जाण्याची तातड का करितात? त्यांचे मतलब करार तर होऊन गेले आहेतच," असे उत्तर जाले. नंतर राजे यांणी वरकड वजीर मातबर यांच्या भेटी घेण्याविषयी विचारले ते परवानगी जाली. ज्याचे घरी जाणे योग्य, त्यांच्या भेटी घरी जाणे येणे केलेयावरि रामसिंग यांजपासून बोलविले जे, "राजे याचे म्हणणेप्रमाणे ('प्रथम') आलो, कराराप्रमाणे मतलब कागदपत्र होऊन निरोप द्यावा. ('घ्यावा') पुन्हा जे समयी प्रसंग, उपयोग काम पडेल ते समयी पत्रे येतील तेव्हा पाहिजे सामान तसे घेऊन येऊन कामगारी ('कामगारी') असल्यास बजावू," ऐसे बोलणे लाविले. पादशहाने ऐकोन घेतले, आणि मनात आणिले जे, "प्रथम भेटीस ('भेटीत', 'भेटी') यांणी कुरनीस, दाब-आदाब न केली व पुढेही येथे राहून स्वच्छतेने ('स्वस्थतेने') नौकर म्हणवून चाकरी करावी, हुकुमात ('हुकूम मात्र') चालावे असे होईल हे दिसत नाही; वाकड बहुत योग्य, मर्द व शिपाई, मनसबेदार; ('मनसबदार') धाडसाचे माणूस, सर्वगुणसंपन्न, दैववान पुरुष आपले हाती लागून हुकूमात चालून निखालसता जालियास वजिरी देऊन सर्व राज्यभर यांजवर ठेवावा ऐसी योग्यता याची आहे. निरोप दिला असता जाऊन फंद करण्यास चुकावयाचे नाहीत; कसेही येथे ममतेत गोवून ज्या रीतीने येतील तसे आणावे. करार व तह ठरला, बाहादारी मोठे दिले, त्याअर्थी [आपण] वावगी गोष्ट करणे युक्त नाही. व ममतेने बोलण्याने हातांस लागेल तरी घ्यावे, नाही तरी दाब ठेवून तरी हाती घ्यावे. निरोप देणे ठीक नाही" ऐसे दृढनिश्चयात आणून रामसिंग याज पासून सांगितले जे, "राजे आले मोठे कर्ते शिपाई आणि मन व्यसनी, चतुरतेने सर्व गुण योग्य ('संपन्न') यांसी ('याणी') चाकर म्हणवून. तिकडील जाहागीर आहे ते राखून. इकडेही करोडो रुपयांचा तालुका स्वाधीन करिता येईल. लाख पन्नास हजार फौज बाळगून आम्हांजवळ या प्रांतीच राहून कामे काजे करावी. तिकडेही पुत्र ठेवून चालवावे. तिकडील पादशाहातीत बंडे वाढली ती मोडावी. तो तालुका व इकडील ('वाईकडील') घेऊन त्यांचा [व] फौजेचा बेहडा करून घ्यावा. चाकर म्हणवून सर्फराजी करून घ्यावी. यात सफाई दिसलियावरि वजिरीही यास सांगावी, सर्व इतबार ठेवावा ऐसे आमचे चित्ती आहे व या कामास लायवरही राजे आहेत. यास्तव तुम्ही कसेही उपाये राजे यांस या मतलबावरि आणावे."

याजवरून रामसिंग याणे सर्व वृत्त सांगितले यांची खंबिरी ('याची खंबीर') [अशी की] "या प्रांती राहाणे व इकडील दौलत घेणे घडावयाचे नाही. मतलब करारात आले ते करून देऊन त्या प्रांती सुभे आहेत. त्यासह वर्तमान तिकडील कामगिरी सांगावी. ती बजावून देऊन" ऐशीच बोलणी पडत गेलियावरून "शिवाजीचा खंबीर ढळत नाही, हाती लागत नाही, कसे करावे." हाच विचार करीते जाले. "ऐकत नाही त्याअर्थी दाबूनही पाहावे," म्हणून एके दिवशी जाफरखान अमीर पादशहाचे केवळ इतबारी, खिलोणे ('खिलावणे') जवळ होत, त्याजपाशी खुलासा निघाला जे, राजे कुरनूश करीत नाहीत व हुजूर चाकरी करून राहात नाहीत. बहुत खंदेपणा जात नाही. त्याअर्थी जरब देणे प्राप्त," ऐसे रोषयुक्त बोलणे पडले. ते समयी जाफरखान शास्ताखान यांचे आप्त, याजमुळे पादशाहाची मर्जी पाहून अधिकच चढी देऊन बोलले. हे बातमी राजे यांस लागली ('कळली') तेव्हा जाफरखान यांचे हवेलीस जाऊन, त्यास कित्येक अर्थ ममतेचे," तुम्ही पादशाहापाशी बहुत लगत व मेहेरबानीत आहा; आमचे साहित्य करीत असावे," बोलले असता त्याणी मनावरते 'बरे' म्हणोन, महाराजांचा संशय काय करतील हा दाब भेटण्यात बसण्यात वाटून ('वाढवून') गाठ तोडोन, निरोप वस्त्रे देऊन लावून दिल्हे.

पुन्हा पादशापाशी बोलण्याविषयी रामसिंगास महाराजांनी सांगून बोलविले जे, "दक्षणची मसलत सर्व आपणांस सांगावी, येथून मर्जी असल्यास फौज सामान द्यावे, किंवा तिकडे जयसिंगास हुकूम करावा ते व आपण मिळोन सर्व दक्षण काबीज करून देतो," ऐसे बोलिले असता पादशहाचे मनांत प्रशस्त न पडे. अधिकच संशय वाटू ('वाढू') लागला. आणि करार शपथ दिल्ही व बाहादर दिल्हे हे अडचण, तेव्हा केवळ बेमानी दाखविणे चांगले नाही. परंतु जरब देऊन आपले मनांत तसे पल्यावर आणावे म्हणून पोलादखान यांसि हुकूम केला जे, "राजे यांचे मोकाबल्यानी तुम्ही आपली फौज पंचवीस हजार घेऊन, लोक सुद्धा उत्तरोन चौकी द्यावी, आणि हुकूमाशिवाय बाहेर जाणे येणे न घडे ऐसे करावे," म्हणून ('ऐसे सांगून') चौक्या पाठविल्या ते भोवते दुरुन येऊन उतरले. हे राजे यांसि समजल्यावरि रामसिंग यांस सांगून पाठविले, "तुम्ही बाहादार असून हे गोष्ट काय आहे? अर्ज करावा. पादशाहाची मर्जी आम्ही येथेच असावेशी दिसती. ते आम्हांस मान्य आहे," ऐसे बोलविले. तेव्हा त्याणी अर्ज केला. ते समयी [बादशाहानी] "राजे यांचे अंतःकरण शुद्ध होऊन, हुजूर राहून, चाकरी मोठे इतबाराची करावी. ते ऐकत नाहीत, यास्तव हे करणे प्राप्त पडले. वरकड तुम्ही या पल्यावर ('आपल्या बोलण्यावर') आणावे, या पल्ल्यास येत तो ('येईतो') हेच करावयाचे. वरकड जयसिंग राजे व दिलेरखान बाहादार असून सरकारी करारनामे गुंतले आहेत. राजे यांस वाकडे करणे तरि पारिपत्य करण्यास काय गुंता होता? परंतु ते गोष्ट करावयाची नाही. तुम्हीही सुभेदार यास लिहून राजे निखालस पक्केपणे होऊन सरकार आज्ञेत चालत ऐसे त्यांणीही लेहून सांगून करावे," म्हणून सांगितले. ते शिंग यांणी राजे यास येऊन कळविले.

सरनोबत, सरदार वगैरे लोकांस निरोप.

ते समयी राजे यांनी शिंग यांस सांगितले जे, "आम्हांस पादशाहाची मर्जी अशी आहे त्या अर्थी आम्ही येथेच राहातो. जेव्हा निखालसता पडत जाईल तेव्हा तसेच कामकाजही करिता येईल. परंतु चिरंजीवास व फौजेस इकडील हवा मानवत नाही, यास्तव निरोप देववावा. कार्याकारण

अनुक्रमणिका

माणसे ठेवून घेणे ते घेतो . बाकी लावून देतो ." त्याजवरून पादशाहास विचारले . त्यांणी "लोक फौज जाऊ देणे हे सहजात काम होते , हालकूद ('हाल खूप') होतात, त्या अर्थी निरोप द्यावा " सांगितले पुत्रास लावून देणे ते "तिकडे जाऊन फंद न करीतसे जिम्मेदार मद्यस्थ देऊन रवाना करावे," ऐसे बोलले . ते शिंग यांणी सांगितल्यावरि "जिम्मेदार देणे कशास ? व आम्हांस या प्रांती कोण जिम्मेदार होतो ? पादशाहाची मर्जी तसे उभयतांही राहतो ." म्हणून शागीर्दपेशा , काही पागा कार्याकरण ठेवून हषमपैकी काही सरदार ठेवून , कारभारी मंडळी ठेविली . वरकड कारकून पागा, फौज सर्व प्रतापराव गुजर सरनोबत , दत्तो गंगाजी, त्र्यंबकराव वाकनीस यांजबराबर जावे . चांगली घोडी हत्ती वगैरे जावे " सांगितले. त्यांणी जाता आड घातली , "साहेबांसाठी प्राण गेले तरी जावोत , परंतु टाकून जाणे ('जाणार नाही') ऐसा सरनोबत सरदार व लोक यांचा निश्चय जाणून सर्वांचे समाधान करून , प्रतापराव यास "हा प्रसंग ऐसेच रीतीने , मोठे हुनरे यातून बचावून जाण्याचा आहे , समजोन तुम्हास निरोप दिल्हा . याजकरिता 'जावे' सांगितले. याजवरून देशी सर्वांस लावून दिले . आणि प्रधान वगैरे कारभारी यास सांगावे , "ते व तुम्ही बहुत खबरदारीने रहावे , आम्हाविषयीं काडीमात्र चिंता करूं नये व जिजाबाईसाहेब यासही समाधान करून सांगावे ," ऐसे सांगून लावून दिल्हे.

त्याजवर विचार चित्तांत केला जे , "या संकटातून पार कसे पडावें ? पादशाहाचे म्हणणें तसें इमान प्रमाण देऊन ; आपण अवलंबिलेला मार्ग यवनांचे अन्न न घेणें , धर्मस्थापना करणें ते सारे सोडून ; त्यांचें म्हणवून त्यांजवळ वजिरी व दौलत मेळवून राहावें ; किंवा मोठें धाडसें , हुनरें करून यांतून बचावून जाण्याचा समय आहे तसें करून आपले संकल्प सिद्धीस न्यावें ; तरिच [ते] घडेल. ('हा विचार पडला') त्या अर्थी आपणांस तरि प्राणही गेले असतां [हा] संकल्प सोडावयाचा नाही . यास्तव जाहांबाजीनें, श्रीवर भार ठेवून , पार पाडावें." हाच निश्चय करून ('आठादिवशीं आपला गुरुवारचा उत्साह करितों') ऐसें करून सर्वांस मिठाईच्या डाल्या भरून पाठवाव्या असा बाहाना ('भाहाना', 'बहाणा') निर्माण करून पाठवूं लागले. मिठाईच्या डाल्या कशाच्या ('कशा') जातात ऐसा चौकीस संदेह जाला . यावरून चौकशी केली . एक, दोन, चार वेळ पाहिले असतां मिठाईच जाती, डाल्या, बहंग्या भरून जातात , हें कळोन चौकशी पहारेकऱ्यानीं ('करणे') सोडिले. आणि महाराजांची दिनचर्या व बारीक बातमी , काय उमेद , पल्यावर येतात न येतात , हे पादशाहानी ठेविली होती . ते पादशाहास राजे राहाण्याचा निश्चय करून , निखालसता होऊन , आपण इकडील चाकरी चाकर म्हणून करावी , मनसब दौलत मेळवावी, बहुतच निष्ठेनें चालावे, ऐसे खंबिरात आलें असें दिसोन बातमी जाण्याजोगे बोलणे करण्यांत निःसीम डौल महाराज दाखवूं लागलें.

मारुतीने लंकेत जाऊन जशी ख्याति केली होती...

जयशिंग व रामशिंग यांनी शपथपूर्वक बाहादार होऊन आणिलें असतां , पादशाहानी बेइमानी नजर धरली. याजवरून त्यांनी महाराजांशी अंतरंगापासून दुसरा विचार ठेविला नाही . सर्व बातमी राखणें व बाहेरून राखण करणे ('राखणे') खर्चास पावतें करणें , पादशाहाशी बोलणें वगैरे सर्व तें करिते जाले . त्याजवर महाराजांनी चौकीचे लोक बहुत सफाई दाखविणें , आदर करून बोलणे , मेजवान्या करणे, वस्त्र, द्रव्य देणे, जवळ बोलवणे, ताईम-तवाजू विडे-पान करून आपलेसे करून , त्यात बोलणे पादशाहास उत्कंठतेनेच सफाई दिसोन कृपा कधी करतील असेच [महाराज] दाखविते जाले. ह्या बातम्या वरचेवरि पादशाहासही कळत गेल्या ऐसे दृढ ('तयारी') जालियावरी आपले कारभारी लोक इतवारीसुद्धा निघण्याचा बेत सिद्ध केला. ज्या मार्गेकरून जाणे व तीर्थ करणें तीं ती मोठीं शहरे व क्षेत्रे येथें हुड्या करून साक्करीत द्रव्य श्रीकाशीसुद्धां जागां जागां ('जातां जातां') रवाना केले. फौज पागा, लोक आधी रवाना, केले होते. व दिल्लीत राहिले लोक यास कोण्हास दुखणे , कोण्ही चाकरी टाकिली , कोण्ही उठोन गेले , ऐसे करून संकेत करून त्यांतही देशी जाणार , व पाठवणें, त्यास जावयास सांगितले . केवळ बराबरच निभावावयाजोगे व घ्यावयाचे त्याचे संकेत सांगून पडद्यांनी अमके स्थळी राहावें ऐसे ठेविले . काही रामसिंग याचे आश्रयेकरून घालविले . आणि देशचे लोक रहात नाहीत उठोन जातात, ऐसे दाखवून, राहिले तेही युक्तीने हलके केले नंतर शहरचे लोक शागीर्दपेशास वगैरे दोन चारशे वगैरे ठेविले . यानी दुरोन असोन चाकरी करावीसें केले . आपले शरीरास आराम नाहीं हा बहाना करून आपण निजले . प्रहर साहा घटका दिवस येईतों निजावे , बहुत करून आंतच गैराबत्यात राहावें ऐसे करूं लागलें . राबता गैराबता ऐसे आठ पंधरा दिवस करून दाखवून कामकाजासाठी कारकून , कारभारी हुजरे लोक जाणे येणे तसे बेतांनी सारे बाहेर काढिले . श्रीमारुतीने लंकेत जाऊन जशी ख्याती केली , सीताशुद्धी घेऊन निघोन गेले , तसे आपण युक्तिकरून जाहांबाजीनें हुनर करून पादशाहास दगा देऊन जावें , म्हणून श्री देवीस प्रार्थना केली . देवीनेही आश्वासन दिले , "निघणे निभावून नेईल " ऐसा स्वप्नगत दृष्टान्त होऊन सांगितले . यावरि सर्वांस आधी काढून दिलें . त्यांनी अमके पुऱ्यात जाऊन गुप्तरूपे असावें , हे जागा ('जागे') वगैरे आधी निश्चयात आणिले . तेथें सर्व पोहोचले अशी बातमी आणून आपण खासा व संभजीराजे पेटारियांत बसोन गुजरीचे वेळेस मिठाईच्या बग्या जातात म्हणून त्यांत निघाले. पलंगावरि खासा पोषाख तसाच ठेवून हिरोजी फर्जंद यास बेत सांगितले कीं , "तू पलंगावरि रजईची वळकटी करून , निजले आहेतसे दाखवून बुक्या मारीत बसावें . मध्यरात्री निघोन अमके स्थळी येऊन पोहोचावें ." याप्रमाणे तों पलंगापाशी बुक्या देत खोलीत बसला . "महाराजांनी जावे , मागे आपणास जसे पडेल तसे पडो , महाराजांचे कृपे आपणही निघोन येतो ." म्हणून राहीला प्रातःकाळ जाला चार घटका दिवस आला. "महाराजांस निद्रा लागली आहे . गुल करू नका " ऐशी ताकीद करून आपणही निघोन 'कामास जातो ('कामाहून येतो') म्हणोन ठिकाणास गेला. महाराज व सर्व निघाले ते शहरचे पश्चिमेस पुरा बाहेर होता तेथे बेताप्रमाणे सर्व एक होऊन , आठ चार दिवस वेष पालटून , जागां जागां फुटून, कोण्ही बैरागी, कोण्ही गोसावी ऐसे होऊन, ब्राह्मण वाणी ('याणी') शुद्र वैश्य ('शूद्र वेश') ऐसे करून ४ ('वेश धरून') राहिले.

राजे निघोन दग्यानी गेले!

इकडे प्रहर दिवस आला , हालचाल नाही , ऐसे पाहोन शहरचा शागीर्दपेशा नवा ('नांव') ठेविला ते चौकीचे लोक पाहतात तो राजे नाहीत! तो कारभारी आदिकरून कोण्हीस नाहीसे पाहून गुल केली . चौकशी करिता 'निघोन गेले , नाहीत!!' असे समजून पोलादखान यास समजाविले. त्यांणी पादशाहास जाऊन अर्ज केला जे , "राजे निघोन दग्यानी गेले ." हे पादशाहास कळविल्यावरि त्याची पोलादखान याजवरि इतराजी होऊन मनसब जप्त करून चौकी बसविली व राजे निघाले ते रामशिंग याचेच सलेनी निघाले असतील हा संशय धरिला . तो रामशिंग याणेही अर्ज केला जे , "शिवाजी राजे निघोन गेले . आपण शपथ देऊन आणिले असता हजरतीने चौकी पाठविली , दस्त केले. मर्जी सरकारची!!" बोलले. तेव्हा "काय चिंता ? राजे जातील तेथे पारिपात्य करीन . तुम्ही मधेस्त ('मध्ये', 'मध्यस्थ') म्हणून इतकी सबुरी केली ." ऐसे म्हणून

अनुक्रमणिका

शहरातही चौकशी करविली. तमाम तालुके दारांस पत्रे पाठविली. "जेथे राजे सांपडतील तेथे दस्त करावे," व मार्गानीही लोक रवाना केले. परंतु शोध न लागे. तेव्हा ('येथे') हरिफाई करून निघोन गेले हे मनांत शाहा अपूर्व मानिते जाते.

संभाजीराजांना मथुरेस ठेविले.

[इकडे] महाराज आठ चार दिवस नानाप्रकारेचे वेशे राहून ('घरुन कांही') तेथून पुढे मथुरेस रवाना झाले, आणि दहावीस असामी कारभारी व हुजरे सरदार इतके एकजिवाचे बैरागी होऊन मथुरेस जाऊन पाविले. तेथून देशी जाणे ठीक नाही; चौकशी बहुत चालली आहे. निभाव पडणार नाही. आपणास यात्रा भागीरथी काशी वगैरे करणे; संभाजी राजे लहान, त्यांचा पायी निभाव पडणार नाही; म्हणून मथुरेत काशीपंत व कृष्णाजीपंत व विसाजीपंत त्रिवर्ग बन्धु, देशस्थ ब्राह्मण, मोरोपंत पेशवे यांचे आप्त, विश्वासु रोजगारी तेथे होते, त्यांचे जवळ मथुरेत उपाध्ये याचे विचारे ठेवून आम्ही अमके मार्गी जाणार ते न समजो देता, आम्ही अमूक स्थळी आलियावरि सांगून पाठवू, तेथे घेऊन यावे ('घेऊन जाऊ') असे सांगून ब्राह्मणाचा वेष संभाजी राजे यांस देऊन गुप्तरूपे ठेविले. समागमे विसाजी पंत व चोबे उपाध्ये यांस घेतले.

म्हातारीस आश्वासन तसेच वेशेकरून राजगडास आले.

आपण सर्व मंडळीसह बैराग्याचे वेष धारण केले होते, तसेच बैराग्यांचे मेळ्यांत मिळोन तेथून कुरुक्षेत्रास गेले. तेथून उत्तर मानस हरिद्वार करून, गंडकी, अयोध्या दर्शन करून, श्रीकाशी व प्रयाग हे यात्रा करून गयेस आले तेथे गयावर्जन केले. निघता श्रीविष्णुपदावरि मोहोरा घालून, पद भरून गुप्त रूपे निघाले. त्रिस्थली यात्रा, कार्तिकस्नाने माघस्नाने सांगकरुन बराबरचे सर्व [लोक] याजपासून यात्रा ('गयावर्जन') वगैरे करवून देवगड चांदे येथे येऊन, श्रीगंगातीरींची क्षेत्रें करीत करीत उत्तरमानस ('येथे') करून दक्षिण मानसी सुरक्षित वीस बेवीस महिनियांत पावले. महाराज पुण्यश्लोक त्याप्रमाणे पुण्य क्षेत्रे यात्रा व देवदर्शन ('महिन्यांनी') घेऊन निभावून आले. गंगातीरी मंथनकालेश्वरादि करून कुशर्तपणास आले. तीर्थविधी केला तेथून पुढें एके गांवी येऊन राहिले. त्या गांवी गरीब एक कुळवाडी होता, त्याचे गोठ्यांत राहिले. त्याची आई वृद्ध होती, ती स्वाभाविकपणे, "तुम्ही बैरागी आलां, अन्न द्यावें, परंतु गांवी देशींची फौज कोणाकोणाची आली?" विचारलियावरि "शिवाजी राजा याचा तेलंगराव सरदार फौजा घेऊन आला, गांव लुटला. शिवाजी राजा दिल्लीस गेला. त्यास पादशहाने पारिपत्य कां अद्यापि न केलें? आम्हां गरिबांस बहुत उपद्रव होतो." असे बोलीयावरी महाराज मनीं फार समाधान पावले जे. "आपण विदेशी गेलो असतां प्रसंगेकरून मोठे संकटांत पडलो, देवाने निभावून हे दिवस दाखविले. प्रमाण. परंतु आम्ही नसता आम्हांप्रमाणे राज्य रक्षून सर्वांवर दाब आहे. अम्मल उगवितात तेव्हा बहुत ('बरे') केली." [असे] मानून तिजला आश्वासन दिले कीं, तुझे बरे होईल. तुझे नाव काय? वतन ('सर्व') वगैरे विचारून घेतलें. तेथून भागा नगरचे तालुकियांतून विजापूरचे इतल्यांतून महाराज जवळ देशी येऊन पन्हाळा प्रांती आलीयावरि सांगून पाठविलें आणि आपण तसेच वेशेंकरून राजगडास येऊन पावले. मातुश्रीचे दर्शन घेतलें. शके १५८८, पराभवनाम संवत्सरे, मार्गशीर्ष वद्य दशमीस आले. ते समयी बहुत आनंद होऊन कुरवंड्या व दानधर्म, साखरा वाटणे वगैरे मातुश्रीनी करऊन सर्वांसह मंगल स्नाने करविली. तोफांची सरबती केली. [महाराजांनी] वस्त्रे भूषणे सर्वांसह परिधान केली. (**म. रा. चि.** ११५-१२२)]

आग्र्याहून आपल्या मायदेशी येऊन पोहोचल्यानंतर दक्षिणेतील राजकीय परिस्थितीत संपूर्ण बदल झाला असल्याचे शिवाजीला आढळून आले. मराठ्यांवर पूर्वी मिळविलेल्या विजयाप्रमाणे पुन्हा विजय मिळविण्याइतकी ताकद मोगल सुभेदार जयसिंग याच्याजवळ राहिली नव्हती. वार्धक्य, सतत कष्ट, निराशा आणि घरगुती अडचणी यांनी तो खचून गेला होता. विजापूरच्या स्वारीत मिळालेल्या अपयशाने औरंगजेबाच्या दृष्टीतून तो नालायक ठरला होता. अशा परिस्थितीत इ. स. १६६७ च्या मे महिन्यात दक्षिणेच्या सुभेदार पदावर त्याच्या ऐवजी राजपुत्र मुआज्जम याची नेमणूक करण्यात आली. उत्तरेकडे जात असताना मिर्जा राजा जयसिंग हा २ जुलै १६६७ रोजी बुरहाणपूर येथे मरण पावला.

दक्षिणेमध्ये मोगल, १६६७

मुआज्जम हा दुर्बल आणि आळशी स्वभावाचा होता. दक्षिणेमध्ये सत्ताधीश असलेल्या जयवंतसिंगाचे शिवाजीबरोबर स्नेहाचे संबंध होते. अशा परिस्थितीत (मे १६६७) मोगलांकडून आपल्याला काहीही धोका नाही याबद्दल शिवाजीची खात्री पटली. इ. स. १६६७ च्या ऑक्टोबर महिन्यात दिलेरखान हा राजपुत्र मुआज्जम याला येऊन मिळाला. हे जरी खरे असले तरी या सुप्रसिद्ध सेनापतीच्या आगमनामुळे मोगलांच्या सामर्थ्यात भर पडली असे काही म्हणता येणार नाही. आपल्या बापाच्या दरबारात दिलेरखानाचे असलेले वजन आणि महत्त्व याबद्दल राजपुत्राला नेहमीच हेवा वाटे. त्याचप्रमाणे दिलेरखानाच्या अंगी जी शिरजोरपणाची वृत्ती बाणली होती त्याचा राजपुत्राला नेहमी संताप येई. बादशहाच्या वतीने दिलेरखान हा

आपल्यावर हेरगिरी करावयाला आला आहे यादृष्टीने तो त्याच्याकडे पाही ; याउलट दिलेरखानाला स्वतःच्या कर्तृत्वाची जाणीव होती. राजपुत्राचा उजवा हात आणि त्याच्या अतिशय विश्वासातला महाराजा जसवंतसिंग याची दिलेरखान उघडउघड अवहेलना करी. याचा परिणाम असा झाला की दक्षिणेतील मोगलांच्या छावणीत पुढील काही काळपर्यंत यादवी युद्धाने कहर केला. साहजिकच शिवाजीविरुद्ध कोणतीही कारवाई करणे मोगलांना शक्य झाले नाही. अर्थात् जरी दक्षिणेतील मोगल सुभेदार हा कितीही तडफदार आणि साहसी असता तरी काही वर्षेपर्यंत शिवाजीला नेस्तनाबूत करण्याच्या प्रयत्नासाठी भरपूर माणसे आणि द्रव्य मिळविणे त्यालाही शक्य झाले नसते. कारण इतर ठिकाणी निर्माण झालेल्या अधिक धोकादायक परिस्थितीला तोंड देण्यासाठी साम्राज्याची सर्व साधनसामग्री एकवटणे जरूर होते. मार्च १६६७ मध्ये पेशावरमध्ये युसुफजाई जमातीच्या लोकांच्या बंडाचा उद्रेक झाला. या बंडाचा उपशम करण्याच्या कामी पुढील एक वर्षापेक्षा अधिक काळ मोगल साम्राज्याची शक्ती खर्च पडली.

शिवाजीचा मौगलांबरोबर तह, १६६८

शिवाजीदेखील आपल्या वतीने मोगलांबरोबर युद्ध करण्यासाठी उत्सुक नव्हता. आग्र्याहून आपल्या मायभूमीला परतल्यानंतर त्याने अतिशय कटाक्षाने शांतता पाळली आणि कोणत्याही प्रकारे मोगलांची आगळीक केली जाईल अशा तऱ्हेचे वर्तन केले नाही. आपल्या राज्याची पुनर्घटना करण्यासाठी किल्ले दुरुस्त करून त्यावर दाणागोटा भरण्यासाठी आणि विजापूर आणि जंजिऱ्याचे सिद्दी यांना शह देऊन पश्चिम किनाऱ्यावरील आपली सत्ता वाढवून आणि मजबूत करण्यासाठी त्याला काही काळ शांततेची आवश्यकता होती. मोगल बादशहा आणि आपण यांच्यामध्ये तह घडवून आणण्यासाठी मध्यस्थाची भूमिका पत्करण्याची त्याने जसवंतसिंगाला विनंती केली. त्याने महाराजा जसवंतसिंगाला लिहिले "माझे आश्रयदाते मिर्जा राजा जयसिंग हे मरण पावले आहेत. जर का आपल्या मध्यस्थीने मला क्षमा करण्यात आली तर मी माझा मुलगा संभाजी याला राजपुत्राकडे रवाना करीन. आपण हुकूम कराल त्या ठिकाणी माझ्या सैनिकांचा सेनापती म्हणून तो आपली **मनसबदारी** करील."

शिवाजीकडून आलेल्या या निरोपाने महाराजा जसवंतसिंग आणि राजपूत्र मुआज्जम हे हुरळून गेले. त्यांनी बादशहापाशी शिवाजीची रदबदली केली. बादशहानेदेखील शिवाजीकडून आलेल्या प्रस्तावाचा स्वीकार केला. इ. स. १६६८ च्या सुरुवातीला बादशहाने शिवाजीच्या राजा या पदवीला मान्यता दिली. परंतु चाकण सोडल्यास इतर कोणताही किल्ला त्याने शिवाजीच्या स्वाधीन केला नाही. अशा तऱ्हेने दोन्ही पक्षांत घडून आलेला तह दोन वर्षे टिकला.

●●●

अनुक्रमणिका

प्रकरण अकरावे

शिवाजी १६७० – १६८०

(१) शिवाजीच्या मोगलांबरोबरील स्नेहाचा भंग आणि शिवाजीकडून किल्ल्यांची पुनःप्राप्ती

मोगलांबरोबर झालेल्या आपल्या नवीन तहाच्या अटीनुसार शिवाजीने मराठा फौजेची एक तुकडी प्रतापराव आणि निराजी रावजी यांच्या हाताखाली औरंगाबाद येथे रवाना केली (ऑगस्ट १६६८). संभाजीची पुन्हा पाच हजारी **मनसबदार** म्हणून नेमणूक करण्यात आली, आणि त्याला एक हत्ती आणि एक रत्नजडीत तलवार बक्षीस देण्यात आली . त्याला वऱ्हाडात जहागिरी देण्यात आल्या . १६६७, ६८, ६९ ही तीन वर्षे शिवाजीने मोगलांचा मांडलिक म्हणून काहीही गडबड न करता काढली . विजापूरबरोबरचे त्याचे संबंधही शान्ततेचे होते . किंबहुना हा तीन वर्षांचा काळ त्याने राज्यसुधारण्याच्या दृष्टीने काही चांगले कायदे-कानू करण्यात घालविला. परिणामी त्याच्या राज्याचा पाया मजबूत आणि घट्ट झाला.

परन्तु दोन्ही पक्षांत झालेला हा तह वस्तुतः पोकळ होता . औरंगजेबाला आपल्या मुलांबद्दल नेहमीच संशय वाटे. मुआज्जमची शिवाजीबरोबर असलेली मैत्री म्हणजे आपल्या सिंहासनाला संभाव्य धोका आहे अशी त्याची समजूत होती. म्हणून त्याने गुप्तपणे शिवाजीला पुन्हा एकदा सापळ्यात पकडण्याचा बेत केला आणि ते न जमल्यास त्याचा मुलगा आणि सेनापती यांना ओलीस म्हणून बंदिस्त करण्याची योजना त्याने आखली. बादशाही कद्रूपणाच्या धोरणाचे आणखी एक उदाहरण म्हणजे बादशहाने इ . स. १६६६ मध्ये शिवाजीला आग्र्याला येण्यासाठी वाटखर्च म्हणून १ लाख रुपयांची रक्कम वसूल करण्यासाठी वऱ्हाडात त्याला दिलेल्या नवीन जहागिरी त्याने जप्त केल्या हे होय . ही बातमी जेव्हा शिवाजीला कळली तेव्हा त्याने १६६९ सालच्या अखेरीला मोगलांबरोबर असलेले त्याचे स्नेहाचे संबंध तोडले.

युद्धाला पुन्हा सुरुवात, १६७०

शिवाजीने मोगलांविरुद्ध आपल्या चढाईला दमदारपणे सुरुवात केली . या चढाईत त्याला अपेक्षेबाहेर यश मिळाले . त्याच्या इतस्ततः भ्रमण करणाऱ्या पथकांनी मोगली मुलुखात लुटालूट केली . पुरंदरच्या तहानुसार त्याने औरंगजेबाला दिलेल्या किल्ल्यांपैकी अनेक किल्ले जिंकून , घेतले. त्याचा ठळकपणे मनात भरणारा विजय म्हणजे कोंडाण्याचा पाडाव , हा किल्ला त्याने तेथील रजपूत किल्लेदार उदयभान याच्याकडून ४ फेब्रुवारी १६७० रोजी जिंकून घेतला . या किल्ल्याची पूर्णपणे माहिती असलेल्या काही कोळी वाटाड्यांना बरोबर घेऊन एका काळोख्या रात्री ३०० निवडक मावळी शिपायांसह तानाजी मालुसरे हा कल्याण दरवाजाजवळील बेताची चढण असलेल्या डोंगराच्या भागाकडून दोरीच्या शिड्या लावून किल्ल्यावर चढला . किल्ल्यावरील शिबंदीने मोठ्या प्राणपणाने लढा दिला . परंतु मावळ्यांच्या पथकांनी हरहर महादेव या आपल्या युद्धगर्जनांनी त्यांच्यामध्ये हाहाःकार उडवून दिला . तानाजी आणि उदयभान यांनी परस्परांना आव्हान दिले . दोघेजण एकमेकांच्या वारांनी घायाळ होऊन युद्धभूमीवर गतःप्राण होऊन पडले . १२०० रजपूत ठार मारले गेले . किल्ल्यावरून उतरून जाण्याच्या प्रयत्नात अनेकजण प्राणास मुकले . सिंहासारखे हृदय असलेल्या ज्या तानाजीने किल्ला जिंकून घेतला त्याच्या नावावरून शिवाजीने किल्ल्याला सिंहगड हे नाव दिले.

अनुक्रमणिका

त्यावेळी लोदीखान हा कोकणचा फौजदार होता . मराठ्यांच्या पथकाबरोबर झालेल्या एका चकमकीत तो जखमी झाला . मराठ्यांबरोबर झालेल्या दुसऱ्या लढाईत त्याचा पराभव करण्यात येऊन त्याला कोकणातून हाकलून देण्यात आले . नांदेडच्या मोगल फौजदाराने आपली जागा सोडून पळ काढला. दक्षिणेमध्ये बादशाही मानाची प्रतिष्ठा राखण्याचा प्रयत्न फक्त एकाच अधिकाऱ्याने केला . तो म्हणजे दाऊदखान कुरेशी. त्याने पारनेर आणि जुन्नर यांचा यशस्वीपणे बचाव केला.

१६७० सालच्या एप्रिल महिन्याच्या अखेरपर्यंत शिवाजीने अहमदनगर , जुन्नर आणि परेंडा यांच्या नजिकची एकावन्न खेडी लुटली.

(२) मुआज्जम आणि दिलेरखान यांच्यामधील कलह

इ. स. १६७० या वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत दक्षिणेतील मोगल राजवटीला दक्षिणेचा सुभेदार शहा आलम आणि त्याचा सेनापती दिलेरखान यांच्यामधील यादवी युद्धाचा विचित्र अनुभव आला . शहा आलम आपल्याला विश्वासघाताने ठार मारील किंवा कैद करील या भीतीने दिलेरखानाने राजपुत्राच्या सेवेत हजर होण्याचे नाकबूल केले . दिलेरखानाच्या या उद्धट वर्तनाने राजपुत्र आणि त्याच्या मर्जीतील अधिकारी जसवंत यांनी बादशहाला लिहून कळविले की दिलेरखानाने बंड पुकारले आहे . यापूर्वीच दिलेरखानाने राजपुत्राची बादशहाकडे बदनामी केली होती आणि राजपुत्राचे शिवाजीबरोबर संगनमत असल्याचा आरोप केला होता . यावेळी मुआज्जमने बादशहाची जी जाणूनबुजून अवहेलना केली होती , बादशाही कामाकडे जे दुर्लक्ष केले होते आणि हुकूमांचे पालन करण्यात जी कसुरी दाखविली होती त्याबद्दल बादशहा सचिंत झाला होता. शिवाजीने मोगलांवर जे हल्ले केले, त्यातील उद्दामपणा आणि त्याला मिळालेले सहज यश आणि त्याजबरोबर राजपुत्राची निष्क्रियता याबाबत दक्षिणेमधील सर्वसाधारण मताचा कानोसा घेतला असता तर त्यातून असा सूर निघाला असता की याच्या मुळाशी मराठ्यांशी संगनमत करून आपल्या बापाचे सिंहासन बळकाविण्याचा राजपुत्र मुआज्जमचा विश्वासघातकी प्रयत्न आहे.

या घडामोडी चालल्या असताना इ . स. १६७० सालच्या मार्च महिन्याच्या अखेरीस बादशहाने आपला खान-इ-सामान (खाजगी कारभारी) इफ्तीकारखान याला औरंगाबाद येथे प्रत्यक्ष परिस्थिती काय आहे याचा शोध घेण्यासाठी पाठविले . त्याने त्याला अशी आज्ञा दिली की मुआज्जमचा बेत खरोखर बंड करण्याचा आहे किंवा काय आणि त्याचे शिवाजीबरोबर संबंध कसे काय आहेत याची तू चौकशी कर . राजपुत्राने दिलेरखानाविरुद्ध जे आरोप केले होते त्याबाबतही चौकशी करण्याचा हुकुम त्याने इफ्तीकारखानाला दिला.

दक्षिणेतील आपली परिस्थिती असहाय्य झाली आहे असे जेव्हा दिलेरखानाला आढळून आले तेव्हा शहा आलमच्या परवानगीची वाट न पाहता बादशाही दरबाराकडे आपण परतावे असे त्याला वाटू लागले . परन्तु या पाठीमागे उत्तर हिंदुस्तानात अशान्तता निर्माण करण्याचा त्याचा दुष्ट हेतू आहे असा राजपुत्राने त्याच्यावर आरोप केला. परिणामी दिलेरखानाला जबरीने वठणीवर आणावे, अशा अर्थाचा बादशाही हुकूम राजपुत्र मुआज्जम याच्याकडे येऊन पोहोचला . तो ऑगस्ट महिना होता . पावसाची संतत धार चालू होती , नद्यांना पूर आले होते आणि रस्त्यात चिखल झाला होता. अशा परिस्थितीत दिलेरखानाने आपले तंबू आणि सामानसुमान जाळून टाकले आणि सैन्यासहीत उत्तरेकडे उज्जैनच्या दिशेने पळ काढला . दिलेरखानाने उत्तरेकडे जाण्यासाठी दक्षिणेतून कूच करताच राजपुत्र मुआज्जम आणि जसवंत यांनी त्यांच्यापाशी

असलेल्या मोगल फौजेनीशी त्याचा पाठलाग केला . परन्तु खानदेशच्या सरहद्दीपाशी बादशहाकडून मुआज्जमला औरंगाबादेकडे परत जाण्याचा हुकूम करणारे पत्र आले (सप्टेंबर). कारण दरम्यानच्या काळात गुजराथेचा सुभेदार बहादूरखान याने दिलेरखानाला आपल्याजवळ आश्रय दिला होता . त्याने बादशहाला लिहून दिलेरखानाची निष्ठा आणि त्याची पूर्वीची कामगिरी याबद्दल स्तुती केली होती , आणि दिलेरखानाची नेमणूक आपल्या हाताखाली काठेवाडचा फौजदार म्हणून करण्याबद्दल बादशहाकडे शिफारस केली होती . या गोष्टीला बाहशहाने आपली सम्मती दिली . आपल्या बापाच्या हुकूमाची तामिली मुआज्जमने तत्परतेने केली, आणि १६७० सालच्या सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस तो औरंगाबादेला परतला.

या अंतस्थ भानगडीमुळे मोगलांचे सामर्थ्य दुबळे झाल्यासारखे झाले . या सुवर्ण संधीचा शिवाजीने पुरेपूर फायदा घेतला . मार्च महिन्यात सुरतेमधील इंग्लिश कारभाऱ्याने पुढीलप्रमाणे लिहिले : "शिवाजी आता पूर्वीसारखा एखाद्या चोरासारखा कूच करीत नाही तर बरोबर ३० हजार सैनिकांचा जमाव घेऊन देश जिंकत आघाडी मारतो . आपल्यानजीक राजपुत्र शहा आलम आहे याचीही त्याला क्षिती वाटत नाही ." ३ ऑक्टोबर रोजी शिवाजीने दुसऱ्यांदा सुरत शहर लुटले.

(३) सुरतेची दुसऱ्यांदा लूट

२ ऑक्टोबर ह्या दिवशी शिवाजी हा १५ हजार घोडेस्वार आणि पायदळ घेऊन सुरतेपासून २० मैलांवर येऊन ठेपल्याच्या बातम्या एका पाठोपाठ येऊ लागल्या . त्या अगोदरच्या दिवशी शहरातील सर्व हिंदी व्यापारी आणि सरकारी अधिकारी यांनी पळ काढला होता . ३ ऑक्टोबर रोजी शिवाजीने शहरावर हल्ला केला. शहराला औरंगजेबाच्या आज्ञेवरून नुकतीच तटबंटी करण्यात आली होती . थोडासा प्रतिकार केल्यानंतर शहराच्या रक्षकांनी किल्ल्याकडे पळ काढला. शहरातील इंग्रज, डच आणि फ्रेंच यांच्या वखारी, इंग्रज आणि फ्रेंच यांच्या वसतीमध्ये असलेल्या पर्शियन आणि तुर्की व्यापाऱ्यांची नवी सराई आणि तार्तर सराई ह्याखेरीज सोडून मराठ्यांनी सर्व शहराचा ताबा आपल्याकडे घेतला . तार्तर सराईमध्ये मक्केची यात्रा करून आलेला काशघरचा भूतपूर्व राजा अब्दुल्लाखान हा राहत होता . फ्रेंच लोकांनी भारी किंमतीच्या वस्तू मराठ्यांना देऊन आपल्यावरील संकट टाळले . इंग्रजांची वखार उघड्यावर होती . तिचा बचाव स्ट्रेनशॉम मास्टर याने पन्नास खलाशांच्या मदतीने केला.

तार्तर सैनिकांनी सर्व दिवसभर मोठ्या निकराने प्रतिकार केला . परंतु जेव्हा त्यांना आढळून आले की यापुढे प्रतिकार शक्य नाही तेव्हा त्यांनी आपल्या चीजवस्तूंसहीत राजवाडा सोडला आणि रात्रीच्या वेळी आपल्या राजाला घेऊन ते किल्ल्याकडे पळून गेले. तार्तर सराई मराठ्यांनी साफ लुटली. नवीन सराईमध्ये असलेल्या तुर्क लोकांनी मराठ्यांना यशस्वीपणे तोड दिले . त्यांनी हल्लेखोरांचे काही नुकसानही केले . मराठ्यांनी शहरातील मोठमोठ्या घरांची धीमेपणाने लुटालूट केली. जवळ जवळ निम्मे शहर त्यांनी पेटवून दिले. ५ तारखेला त्यांनी शहरातून पाय काढला.

सुरतेचे झालेले प्रचंड नुकसान

सरकारीरित्या वरील हल्ल्याची जेव्हा चौकशी झाली तेव्हा शिवाजीने लुटीच्या रूपाने ६० लाख रुपयांचा ऐवज नेल्याचे आढळून आले . परंतु सुरतेचे जे खरे नुकसान झाले त्याचे मोजमापन मराठ्यांनी किती लूट आपल्याबरोबर नेली याचा अंदाज करून होण्यासारखे नव्हते . हिन्दुस्तानातल्या सर्वांत श्रीमंत

अशा या बंदरांतील व्यापाराचा पूर्णपणे नाश झाला . शिवाजी शहरातून निघून गेल्यानंतर कित्येक वर्षेपर्यंत , जेव्हा जेव्हा मराठ्यांचे सैन्य शहरापासून एक दिवसाच्या मुक्कामावर येई तेव्हा किंवा मराठ्यांचे सैन्य येत आहे अशी खोटी आवई उठली तरी देखील शहरामध्ये एकसारखे भयभीत वातावरण निर्माण होई . अशा प्रत्येक वेळी व्यापारी झपाट्याने आपला माल जहाजावर नेऊन ठेवीत . शहरातील नागरिक खेड्याकडे पळ काढीत आणि युरोपिअन मंडळी घाईघाईने स्वालीच्या दिशेने निघून जात . कालान्तराने या दहशतीच्या वातावरणामुळे सुरतेची बाजारपेठ पूर्णपणे बसली.

(४) दाऊदखानाचा दिंडोरी येथे १७ ऑक्टोबर १६७० रोजी शिवाजीकडून पराभव ; शिवाजीचे वऱ्हाडवर हल्ले

सुरतेच्या या दुसऱ्या लुटीनंतर शिवाजीने बागलाणात प्रवेश केला , आणि मुल्हेर किल्ल्याच्या पायथ्याजवळची खेडी त्याने लुटली . मराठा हल्लेखोरांवर चाल करून जाण्याकरिता दाऊदखानाला बुरहाणपूरहून बोलाविण्यात आले होते . तो चांदोर या गावी पोहोचला . या ठिकाणाहून बागलाणातून नाशिककडे जाणारी वाट डोंगरांच्या रागांना ओलांडत होती . १६ ऑक्टोबरच्या मध्यरात्रीनंतर त्याच्या (बहादूरखान) हेरांनी बातमी आणली की शिवाजीने यापूर्वीच घाट ओलांडला असून आपल्याजवळील अर्ध्या फौजेसहीत तो नाशिकच्या रस्त्याला लागला आहे . त्याचप्रमाणे त्याची उरलेली अर्धी फौज पाठीमागे राहिलेल्या लोकांना जमा करण्यासाठी घाटावरील मोक्याची ठिकाणे धरून आहे . दाऊदखानाने यावर ताबडतोब कूच करण्यास सुरुवात केली . मोगल फौजेच्या बिनीला इखलासखान मियाना हा अधिकारी होता. उजाडता उजाडता त्याच्या नजरेला शत्रुसैनिक पडले . आपल्या सैनिकांची कुमक येण्यानी वाट न पाहता त्याने अविचाराने शत्रूवर हल्ला चढविला . मराठ्यांच्या पिछाडीने आता पलट खाल्ली . या पिछाडीत १० हजार सैनिक होते आणि त्यांचे अधिपत्य प्रतापराव गुजर (घोडदळाचा प्रमुख), व्यंकाजी दत्तो आणि मकाजी आनंदराव (शहाजीचा अनौरस मुलगा) या नावाजलेल्या सेनानींकडे होते . झालेल्या लढाईत इखलासखान हा लौकरच जखमी झाला आणि घोड्यावरून खाली पडला . काही काळानंतर दाऊदखान त्या ठिकाणी आला आणि त्याने आपल्या बिनीकडे कुमक पोहोचविली . काही प्रहरपर्यंत अतिशय निकराचे युद्ध झाले. या युद्धात भयानक रक्तपात झाला. दक्षिणेतील बारगींच्याप्रमाणे बादशाही फौजेभोवती घिरट्या घालीत मराठ्यांनी लढा दिला . परंतु मोगलांच्या फौजेतील बुंदेला पायदळाने आपल्या जवळील विपुल तोफखान्याचा मारा करून शत्रूला पाठीमागे रोखले. दुपारच्या वेळी लढाईत थोडा खंड पडला. संध्याकाळी मराठ्यांनी मोगलांवर पुन्हा हल्ला चढविला . परंतु तोफांच्या माऱ्याने हा हल्ला परतवून लावण्यात आला . रात्रीच्या वेळी उघड्या आकाशाखाली मोगलांनी आपली तात्पुरती छावणी केली . छावणी सभोवार खंदक खणण्यात आले होते . मृतांचे दफन करण्यात आणि जखमींची शुश्रूषा करण्यात मोगल सैनिक गढून गेले होते. यानंतर कोठच्याही प्रकारे प्रतिहल्ला न करता मराठ्यांनी कोकणच्या दिशेने माघार घेतली . [वणी दिंडोरीच्या लढाईची हकिकत भीमसेन सक्सेना याने पुढीलप्रमाणे दिली आहे : वणी-दिंडोरीची लढाई (१७ ऑक्टोबर १६७०).

सुरतेवर हल्ला करून ते शहर लुटले (३ ऑक्टोबर १६७०). शहाजादा मुआज्जम याने दाऊदखान यास आज्ञा केली की , शिवाजीचा मोड करण्यासाठी तुम्ही ताबडतोब निघून यावे . त्याप्रमाणे दाऊदखान आणि राव भाऊसिंग हाडा हे औरंगाबादेस पोहोचले . दाऊदखान हा शहाजाद्यास भेटला. नंतर तो शिवाजीच्या विरुद्ध रवाना झाला . मी (ग्रंथकार भीमसेन) आणि मीर अब्दुल्माबूद दाऊदखानाबरोबर होतो . माझ्याकडे माझ्या स्वतःच्या नोकरीशिवाय बक्षीच्या मुख्य चिटणिशीचेही काम देण्यात आले होते . मी काही हरकारे नोकरीत ठेवले . मराठ्यांच्या खबरा आणण्यासाठी मी त्यांना रवाना केले. वैजापूर (जिल्हे औरंगाबाद) येथे आमच्या सैन्याचा तळ होता . हरकाऱ्यांनी तेथे बातमी आणली की , शिवाजीने सुरत पूर्णपणे लुटले असून तो परत चालला आहे . ही गोष्ट मी वैजापुराजवळ पोहोचलो तेव्हा मला कळली . मी ती दाऊदखानास सांगितली . दुसऱ्या दिवशी दाऊदखानाच्या हरकऱ्यांनी पण तीच बातमी आणली . दाऊदखानाने आपले बाजारबुणगे औरंगाबादेस रवाना केले . तो सड्या सैन्यानिशी पुढे रवाना झाला. माझ्या हरकाऱ्यांनी बातमी आणली की , शिवाजीने मुल्हेर ऊर्फ औरंगगड येथील पेठ लुटली असून तो तावडीत सापडण्यासारखा आहे. नेकनामखान यानेही अशाच अर्थाचे पत्र पाठविले . दाऊदखान हा तातडीने चांदूरच्या घाटापाशी पोहोचला . बागलाणाकडे जाण्याची वाट

तिकडूनच गेली आहे. माझ्या हरकाऱ्यांनी बातमी आणली की, "मोगलांची फौज येत आहे हे शिवाजीस कळले असून तो मुल्हेरचा किल्ला सोडून पुढे निघाला. कंचन-मंचनचा घाट (चांदूरच्या पश्चिमेस दहा मैलांवर) पार करून जाण्याचा त्याचा बेत आहे." नेकनामखान (मुल्हेरचा किल्लेदार) याने अशाच अर्थाचे पत्र दाऊदखान यास लिहिले. ते पत्र दाऊदखानाच्या हरकाऱ्यांनी खानाकडे पोहोचविले, पण मला मिळालेल्या बातमीनंतर दोन-तीन घटकांनी दाऊदखानाला हे पत्र मिळाले. मी तातडीने बातम्या मागवी आणि खानापर्यंत पोहोचवी. ते पाहून दाऊदखान खूष झाला. माझ्याकडून त्याला बातमी मिळाली की, तो आवश्यक अशी उपाययोजना करी. दुसरीकडून बातम्या येण्याची तो वाट पाहात नसे.

दाऊदखान चांदूरकडे रवाना झाला. शिवाजीची वाट अडवावी असा त्याचा हेतू होता. संध्याकाळच्या सुमारास तो चांदूरजवळ पोहोचला. तेथील फौजदार बाकीखान हा मराठ्यांच्या आक्रमणामुळे किल्ल्यावर गेला होता. तो खाली येऊन दाऊदखानास भेटला.

तोपर्यन्त रात्रीचा एक प्रहर होऊन गेला होता. पुढची नक्की बातमी येईपर्यन्त दाऊदखान विश्रांती घेत तेथे राहिला. मध्यरात्रीच्या सुमारास माझ्या हरकाऱ्यांनी बातमी आणली की, शिवाजी याने कंचन-मंचनचा घाट ओलांडला असून तो तातडीने नाशिक गुल्शनाबादकडची वाट धरून जात आहे. त्याचे सैन्य घाटावर असून मागाहून येत असलेल्या सैनिकांची ते वाट पाहात आहे. त्या वेळी रात्र बरीच झाली होती. पण एक क्षणाचाही विलंब न करता दाऊदखान हा स्वार होऊन निघाला. त्याच्यापाशी जे थोडेबहुत बुणगे होते ते त्याने मागे राहू दिले. रात्र अंधारी होती. दाऊदखानाच्या सैनिकांची वाट चुकली. दाऊदखान आणि मीर अब्दुल्माबूद यांची आणि माझी ताटातूट झाली. त्यामुळे सूर्य उगवेपर्यन्त थांबून राहणे भाग पडले. बुणगे पण पाठीमागून आले.

गालीबखान, नारोजी व बसवंतराव हे चंदावलीला (पिछाडीला) होते. मी त्यांच्याबरोबर निघालो. बहलोलखानाचा नातू आणि अब्दुलकरीम याचा मुलगा इखलासखान मियाना हा पाच हजारी मनसबदार असून हरावलीला (बिनीला) होता. पहाटेच्या सुमारास तो घाटमाथ्यावर पोहोचला. तो मराठ्यांचे सैन्य सुसज्ज असे उभे असलेले त्याला आढळून आले. इखलासखानाने आपल्या सैनिकांना तयार रहाण्यास सांगितले. त्याच्यापाशी शस्त्रास्त्रांचा साठा असलेले काही उंट होते. त्याचे सैनिक चिलखते वगैरे चढवून तयार होऊ लागले. इखलासखान हा तरुण होता. त्याने सारासार विचार केला नाही. आपल्याबरोबर असलेली थोडी माणसे घेऊन तो शत्रूवर तुटून पडला. मराठ्यांचे सैन्य पंधरा हजारांच्यावर असावे. त्यांच्याशी तो लढू लागला. युद्धाच्या गर्दीत इखलासखान यास जखमा होऊन तो जमिनीवर कोसळला.

या वेळेपर्यन्त दाऊदखान त्या स्थळी पोहोचला. इखलासखानाने काय अविचार केला हे त्याला दिसून आले. त्याने पुढील माणसे इखलासखानाची मदत करण्यास आघाडीवर पाठविली : (१) राय मकरंद खत्री (हा पूर्वी कनोज आणि बरेली येथे फौजदार होता.) (२) दाऊदखानाचा भाऊ शेख सफी, (३) चंदेरीच्या राजाचा पुरोहित भान, हा विश्वासपात्र नव्हता. राजापाशी पैसे मागून हा गुजराण करीत असे. पुष्कळ प्रयत्नाने त्याला मनसब मिळाली. वजीर जाफरखान याच्या वशिल्याने त्याला बुंदेले स्वारशिपाई यांच्यावरील देखरेखीचे काम मिळाले होते आणि आता तो दक्षिणेत तैनात झाला होता. (४) संग्रामखान घोरी. अशा प्रकारे दाऊदखानाने वरील अधिकाऱ्यांना इखलासखान याच्या मदतीसाठी पाठविले. तोही त्यांच्या मागोमाग आला. वाटेत उंच जागेवर बेचिराख खेडे होते. त्याच्याभोवती एक ओढा वाहात होता. दाऊदखानाने बाकीखान आणि इब्राहीम पन्नी यांच्याबरोबर हत्ती, निशाण नगारे इत्यादी ठेवून दिली. त्यांना सांगण्यात आले की, बुणगे आणि चंदावलीचे (पिछाडीचे) सैन्य पाठीमागे येत आहे. ते आल्यावर त्याना तेथेच थांबण्यास सांगावे.

मी (ग्रंथकार भीमसेन) बाकीखानाजवळ येऊन पोहोचलो. संग्रामखान घोरी आणि इतर सरदार यांना पुढे पाठविण्यात आले होते. त्यांचे आणि मराठ्यांचे निकराचे युद्ध झाले. संग्रामखान घोरी, त्याची मुले आणि इतर आप्त यांना जखमा झाल्या. मोगलांचे अनेक स्वारशिपाई मारले गेले. त्यात बादशाही सैनिक आणि सरदारांचे स्वतःचे सैनिक होते. राय मकरंद आणि भान पुरोहित यांजपाशी बराच तोफखाना होता. त्यामुळे त्यांनी मराठ्यांना हरविले. तोपर्यंत दाऊदखान तेथे पोहोचला. इखलासखान हा जखमी होऊन जमिनीवर पडला होता. त्याला दाऊदखानाने उचलले, आणि तो स्वतः शत्रूशी लढू लागला. मराठे आपल्या पद्धतीने (याला **बरगीगिरी** म्हणतात) लढू लागले. मोगल सैन्याच्या भोवती ते चहूकडून घिरट्या घालू लागले आणि हल्ले करू लागले. मोगलांच्या तोफांमुळे त्यांच्यापैकी अनेक मारले गेले. बाकीचे परत फिरले.

वाट चढउताराची होती. मीर अब्दुल्माबूद याची आणि इतर मोगल सैन्याची ताटातूट झाली. मराठे त्यांच्यावर तुटून पडले. मीर अब्दुल्माबूद, त्याचा एक मुलगा आणि त्याचे काही सैनिक हे मारले गेले. मराठ्यांनी त्यांची शस्त्रे, घोडे इत्यादी हिसकावून घेतली. ही बातमी अब्दुल्माबूद याच्या नोकराने मला सांगितली. मी बाकीखान यास ती कळविली. बाकीखान हा उंच जागेवर होता. मीर अब्दुल्माबूदचा झेंडा आणि मराठ्यांचे भाले हे त्याच्या नजरेस पडले. तोपर्यंत मराठे हे मैदान सोडून निघून गेले होते. बाकीखानाने स्वतःची पालखी, इतर पालख्या आणि काही माणसे पाठविली. मीही त्यांच्याबरोबर गेलो. आम्ही पोहोचलो तेव्हा मीर अब्दुल्माबूद हा बेशुद्धावस्थेत असलेला आम्हाला आढळला. आम्ही मृत आणि जखमी अशा सर्वांना तेथून आणले.

त्यावेळी दाऊदखानापाशी दोन-एक हजारांच्यावर सैन्य नव्हते. संध्याकाळच्या सुमारास मराठ्यांनी पुन्हा एकदा हल्ला केला; पण मोगल सेनाधिकारी हे कसलेले आणि अनुभवी होते. ते मोठ्या निर्धाराने लढले. दाऊदखानाने सांडणीस्वार पाठवून बाकीखान आणि इतर यांना बोलाविले. मराठ्यांना पळून जाण्याशिवाय मार्ग राहीला नाही.

मोगलांनी विजयाचे चौघडे वाजविले. यानंतर मृतांचे दफन, जखमी लोकांची शुश्रूषा इत्यादी कामास मोगल लागले. दाऊदखानाने इखलासखान आणि मीर अब्दुल्माबूद यांना आपल्या स्वतःच्या तंबूत नेऊन त्यांच्या जखमा बांधविल्या. बदायून परगण्याचा रहिवासी इहतिशामखान याचा मुलगा शेख मुइनुद्दीन हा होता. त्याने मीर अब्दुल्माबूद यास नंतर आपल्या तंबूत नेले. तो अब्दुल्माबूदची शुश्रूषा करू लागला. लष्करात फक्त काहीजणासाठी तंबू होते. बाकीची सर्व फौज उघड्यावरच राहिली. दाऊदखानाने मला मोर्चे पाडून येण्यास सांगितले होते. ते काम करून मी परत

अनुक्रमणिका

आलो. तो मला अब्दुल्माबूद कोठेच दिसेना . मी घाबरलो. दाऊदखानाने मला सांगितले , “शेख मुइनुद्दीन हा अब्दुल्माबूदला आपल्या तंबूत घेऊन गेला आहे.” याच सुमारास अब्दुल्माबूद शुद्धीवर आला . त्याने मला बोलावू पाठविले . मी गेल्यावर त्याने आपल्या कामाची मोहर (शिक्का) माझ्या हवाली केली. त्या दिवसापासून माझी आणि शेख मुइनुद्दीन यांची मैत्री झाली.

ही लढाई वणी-दिंडोरीजवळ झाली . (१७ ऑक्टोबर १६७०)] या घटनेला एक आठवडा झाला नाही तोच मराठ्यांच्या पेशव्याने नाशिक जिल्ह्यातील त्रिंबकचा किल्ला जिंकून घेतला . या लढाईमुळे जवळ जवळ पुढील १ महिनाभर मोगली सत्तेचा शक्तिपात झाल्यासारखे झाले . लढाई झाल्यानंतर ३ दिवसांनी दाऊदखानाने आपल्या सैन्यातील उरल्या सुरल्या लोकांना घेऊन नाशिककडे कूच केले . त्याठिकाणी आपले झालेले नुकसान भरून काढण्यासाठी त्याने १ महिनाभर मुक्काम केला . नोव्हेम्बरच्या अखेरीस त्याने अहमदनगरकडे कूच केले . डिसेंबरच्या सुरुवातीला प्रतापरावाच्या हाताखाली एका मराठा सैन्याच्या तुकडीने खानदेशमध्ये छापा घातला . वाटेत त्यांनी बागलाणातील अहिवंत आणि इतर ३ किल्ले जिंकून घेतले. तेथून झपाट्याने कूच करून त्यांनी बुरहाणपूरपासून २ मैलांवर असलेले बहादूरपुरा हे खेडेगाव लुटले. नंतर प्रतापराव हा वऱ्हाडात शिरला आणि अचानक कोणाची अपेक्षा नसताना करंजा या श्रीमंत आणि संपन्न शहरावर त्याने छापा घातला . हे शहर त्याने साफ लुटले . कापड, सोने आणि चांदी वगैरे मिळून १ कोटीचा माल त्याने लुटला आणि त्याजबरोबर ४ हजार बैल आणि गाढवे त्याने हस्तगत केली . वरील सर्व लूट या जनावरांवर लादण्यात आली ; शहरातील सर्व श्रीमन्त व्यक्तींना दंडादाखल ओलीस म्हणून पकडून नेण्यात आले. इतर शहरांतूनही मराठ्यांना दण्डादाखल मोठ्या रकमा मिळाल्या. वऱ्हाडचा प्रान्त श्रीमन्त होता . जवळ जवळ अर्ध्या शतकापेक्षा अधिक काल शान्तता आणि सुबत्ता यामध्ये गेल्यामुळे तेथे प्रचंड संपत्ती साठलेली होती . त्यामुळे मराठ्यांनी वऱ्हाडवर केलेला हा पहिला हल्ला म्हणजे हल्लेखोरांना वाढून आलेली ती एक पर्वणीच होती.

साल्हेरचा पाडाव

इकडे प्रतापराव वऱ्हाडातील करंजा शहराचा विध्वंस करण्यात गुंतलेला असताना मोरो त्रिबंक पिंगळे याच्या हाताखाली दुसरी एक तुकडी पश्चिम खानदेश आणि बागलाण याठिकाणी लुटालूट करीत होती. आता ह्या दोन्ही तुकड्या साल्हेरनजीक एकत्र आल्या आणि त्यांनी किल्ल्याला वेढा दिला . दाऊदखान मुल्हेरनजीक रात्री आठ वाजता येऊन दाखल झाला . परंतु त्याची छावणी आणि सैन्य पाठीमागे राहिल्यामुळे त्याला पुढे कूच करून जाता आले नाही. साहजिकच साल्हेरला जलद कुमक घेऊन जाणे त्याला जमले नाही.

शिवाजीने जवळ जवळ २० हजार घोडेस्वार आणि पायदळ एवढ्या सैन्यानीशी साल्हेरला वेढा दिला होता . एक दिवस किल्ल्यावरील शिबंदी बेसावध आहे असे पाहून दोरांच्या शिड्या लावून तो किल्ल्याच्या भिंती चढून गेला . किल्लेदार फतुल्लाखान हा लढत असताना मारला गेला . त्याच्या बायकोच्या भावाने त्यानंतर किल्ला शत्रूच्या स्वाधीन केला (५ जानेवारी १६७१). दिवसेंदिवस मराठ्यांना यश मिळत गेले. त्यांच्या इतस्ततः भटकणाऱ्या टोळ्यांनी बागलाणचा फौजदार नेकनामखान याला येणारी धान्याची रसद कापून टाकली.

(५) इ. स. १६७१–७२ मधील मोगल सेनापतींच्या मोहिमांची हकीकत

महाबत व दाऊदखान आणि बहादूर आणि दिलेरखान

लागोपाठ मोगलांच्या पदरी पराभव पडल्याने परिस्थितीच्या गंभीरतेची जाणीव औरंगजेबाला झाली. त्याने दक्षिणेतील मुख्य सेनापतीच्या पदावर महाबतखानाची नेमणूक केली . बागलाणामध्ये सैनिक, द्रव्य आणि दाणागोटा यांचा भरभक्कम पुरवठा करण्यात आला (जानेवारी १६७१).

१६७१ चा जानेवारी महिना संपता संपता चान्दोरनजीक महाबतखान हा दाऊदखानाला जाऊन मिळाला. शिवाजीने अहिवंतचा किल्ला नुकताच घेतला होता . त्याला या दोघांनी वेढा दिला . एक महिन्यानंतर किल्ल्यावरील शिबंदीने शरणागती दिली . अहिवंत किल्ल्याच्या रक्षणाकरिता एक तुकडी ठेवून महाबतखान नाशिककडे गेला . तेथे त्याने तीन महिने मुक्काम केला . तेथून तो अहमदनगरपासून २० मैलांवर असलेल्या पारनेर येथे गेला. तेथे त्याने जून ते सप्टेंबरपर्यंत पावसाळी छावणी केली.

महाबतखानाला या मोहिमेत म्हणण्यासारखे यश मिळाले नव्हते. यानंतरचा बराच कालावधी त्याने कोणतीही कारवाई केल्याशिवाय घालविला होता . साहजिकच औरंगजेब त्याच्या कामगिरीवर नाखूष झाला होता. शिवाजीबरोबर त्याने गुप्तपणे काहीतरी समझोता केला असावा असा त्याला संशय आला . म्हणून त्याने पुढील हिवाळ्यात बहादूरखान आणि दिलेरखान यांना दक्षिणेत पाठविले . त्यांनी गुजरातेतून बागलाणात कूच केले आणि मराठ्यांच्या ताब्यात असलेल्या साल्हेरच्या किल्ल्याला वेढा दिला . वेढ्याचे काम त्यांनी इखलासखान मियाना, राव अमरसिंग चन्दावत आणि इतर काही अधिकारी यांच्यावर सोपवून त्यांनी दोघांनी अहमदनगरकडे कूच केले . तेथून दिलेरखानाने एका कजाखी तुकडीला बरोबर घेऊन पुणे परत जिंकून घेतले . शहरातील ९ वर्षांवरील सर्व रहिवाशांची त्याने कत्तल केली (१६७१ च्या डिसेंबर अखेरीला ही घटना घडली). परंतु साल्हेर येथे वेढ्याचे काम चालू ठेवण्यासाठी आलेल्या मोगल तुकडीवर प्रतापराव, आनंदराव आणि पेशवा यांच्या हाताखालील मराठ्यांच्या मोठ्या फौजेने हल्ला केला . दोन्ही फौजांत निकराचे युद्ध झाले . इखलासखान, राव अमरसिंग चन्दावत याचा मुलगा मुहक्कमसिंग हे जखमी झाले. त्यांना आणि मोगलांच्या फौजेतील इतर तीन प्रमुख अधिकाऱ्यांना कैद करण्यात आले . राव अमरसिंग आणि मोगल सैन्यातील इतर अनेक सैनिक रणांगणावर ठार मारले गेले . मराठ्यांनी वेढा घातलेली मोगलांची सर्व छावणी लुटून आपल्या ताब्यात घेतली. यानन्तर काही काळाने मोरोपन्ताने मुल्हेर जिंकून घेतले. ही घटना इ . स. १६७२ च्या जानेवारी महिन्याच्या अखेरीस आणि फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात घडली . या विजयामुळे शिवाजीचे वजन आणि स्वतःच्या सामर्थ्यावरील त्याचा विश्वास अतिशय वृद्धिंगत् झाला.

१६७२ च्या मध्याला महाबत आणि शहा आलम यांना हिंदुस्तानात परत बोलाविण्यात आले . या दोघांच्या जागी बहादुरखानाची नेमणूक दक्षिणेचा सेनापती आणि बदली सुभेदार म्हणून करण्यात आली . या जागी त्याला १६७३ च्या जानेवारी महिन्यात कायम करण्यात आले . या जागेवर तो ऑगस्ट १६७७ पर्यंत होता.

(६) मराठे कोळी लोकांच्या देशाचा ताबा घेतात; सुरतेच्या चौथाईची मराठ्यांकडून मागणी (१६७२)

५ जून १६७२ रोजी मोरो त्रिंबक पिंगळे याच्या हाताखालील मराठ्यांच्या एका मोठया सैन्याने विक्रमशहा या कोळी राजाकडून जव्हार हे शहर जिंकून घेतले . तेथील जवळ जवळ १७ लाख रु . किमतीच्या खजिन्याचा त्यानी ताबा घेतला. तेथून मोरो त्रिम्बक पिंगळे याने पुढे उत्तरेकडे कूच केले , आणि

जुलैच्या पहिल्या आठवड्यात रामनगर हे दुसरे कोळी संस्थान जिंकून घेतले.

जव्हार आणि रामनगर ही दोन्ही राज्ये मराठ्यांनी जिंकून घेतल्यामुळे त्यांना कल्याणपासून उत्तर कोकणातून सुरतेकडे जाणारा अतिशय लहान , सुरक्षित आणि सोपा मार्ग हाती आल्यासारखा झाला . दक्षिणेकडून स्वारी झाल्यास या बंदराकडे जाण्याचा रस्ता अगदी खुला झाला आणि बंदराला कोणतेच संरक्षण उरले नाही. सुरतेवर मराठ्यांची स्वारी होणार अशा नुसत्या वारंवार येणाऱ्या बातम्यांनी सुरत शहर भीतीग्रस्त होऊन गेले.

रामनगरच्या परिसरातून मोरो त्रिम्बक पिंगळे याने शिवाजीच्या वतीने लागोपाठ ३ पत्रे सुरतेचा सुभेदार आणि शहरातील प्रमुख व्यापारी यांना पाठविली . त्यात त्याने धमकावणी देऊन ४ लाख रुपयांची मागणी केली, आणि पैसे न दिल्यास शहरावर स्वारी करण्याची दहशत घातली.

मराठ्यांचा मुख्य तळ कोळी लोकांच्या राज्यात होता . तेथून मोरो त्रिम्बक याने १६७२ च्या जुलैच्या मध्याला सहजगत्या पश्चिम घाट ओलांडून नाशिक जिल्ह्यात प्रवेश केला . तेथे त्याने लुटालूट केली आणि जिल्ह्याच्या दक्षिण आणि उत्तर विभागाचे अधिकारी ठाणेदार अनुक्रमे जाधवराव आणि सिद्धी हलाल यांचा पराभव केला. या पराजयाबद्दल बहादुरखानाने या दोन्ही अधिकाऱ्यांची कडक निर्भर्त्सना केली . त्यामुळे संतापून जाऊन ते दोघेजण मराठ्यांना जाऊन मिळाले.

(७) इ. स. १६७३ मधील मराठ्यांच्या हालचाली

या नंतरच्या नोव्हेंबर महिन्यात शिवाजीने वऱ्हाड आणि तेलंगणात अचानक हल्ला करण्यासाठी आपल्या घोडदळाची रवानगी केली. त्यांना तोंड देता देता तेथील मोगल अधिकारी गोंधळून गेला . रामगीर येथे असलेल्या मराठ्यांनी आपल्या फौजेच्या दोन तुकड्या केल्या . एक तुकडी दक्षिणेकडे गोवळकोंडा संस्थानात उतरली आणि दुसरी तुकडी उत्तरेकडे चांद्याच्या दिशेने गेली आणि तेथून पश्चिमाभिमुख होऊन तिने वऱ्हाडात मोर्चा वळविला . पहिल्या तुकडीला विजापूरच्या मुलखात दिलेरखानाने अडविले आणि तिच्याकडून बरीचशी लूट त्याने परत जिंकून घेतली . दुसऱ्या तुकडीला औरंगाबादपासून ३८ मैलांवर अन्तूर येथे बहादुरखानाने अडविले . या तुकडीपासूनही त्याने बरेचसे लुटीचे सामान परत मिळविले आणि ज्याचे त्यांना परत केले . दुसरी लढाई औरंगाबादपासून ६ मैलांवर झाली (डिसेंबर). मराठ्यांचा हल्ला शुभकर्ण बुन्देला याने परतविला. या लढाईत मराठ्यांची ४०० माणसे ठार झाली.

खानदेश आणि वऱ्हाड या प्रान्तांत १६७० साली मराठ्यांनी ज्या स्वाऱ्या केल्या त्यात त्यांना यश मिळाले. परंतु यावेळी मात्र मोगल फौजांनी जी प्रशंसनीय कामगिरी केली त्यामुळे मराठ्यांचे सर्व प्रयत्न हाणून पाडण्यात आले.

१६७३ मधील चकमकी

इ. स. १६७३ मध्ये बहादुरखानाने भीमा नदीच्या उत्तर किनाऱ्यावर चांभार गोंद्याच्या दक्षिणेस ८ मैल असलेल्या पेडगाव येथे आपली छावणी दिली . यापुढील अनेक वर्षे पेडगाव हे त्याच्या छावणीचे मुख्य ठिकाण बनले. या छावणीभोवती एक किल्ला बांधण्यात आला . लौकरच तेथे एका शहराची उभारणी झाली .

अनुक्रमणिका

बादशहाने या शहराचे नाव बहादुरगड असे ठेवण्यास बहादुरखानाला परवानगी दिली.

व्यूहरचनेच्या दृष्टीने पेडगाव या शहराचे स्थान अतिशय महत्त्वाचे होते . पुण्यापासून पूर्वेकडे पसरत गेलेल्या लांबच लांब डोंगराच्या रांगेपासून पेडगाव अगदी तुटकपणे असलेल्या एका पठारावर वसलेले होते. या ठिकाणाहून या डोंगरांच्या रांगेच्या उत्तरेने उत्तर पुणे जिल्ह्यातील मुळा आणि भीमा या नद्यांच्यामधील खोऱ्याचे रक्षण करण्याकरिता पश्चिमाभिमुख होऊन कूच करणे बहादुरखानला सहज शक्य होते. त्याचप्रमाणे पेडगावहून या रांगेच्या दक्षिण दिशेने पुणे जिल्ह्याच्या दक्षिण भागातील निरा आणि बारामती या नद्यांच्या खोऱ्यांचे रक्षण करण्यासाठी चाल करून जाणेही त्याला अतिशय सुलभ होते . तद्वतच अहमदनगर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेली नदी सोडता दुसरी कोणतीही नदी ओलांडण्याचा प्रसंग न आणू देता दारूगोळा आणि दाणागोटा असलेल्या उत्तर दिशेकडील अहमदनगर येथील मोठ्या तळाबरोबर बहादुरखानाला संपर्क ठेवता येत असे . तर दक्षिणेच्या बाजूला सोलापूर जिल्ह्यामधून चाल करून जाऊन विजापूरवर आक्रमण करणे ही गोष्टही त्याच्या दृष्टीने अतिशय सोपी होती.

यावर्षी शिवाजीने जुन्नर येथील शिवनेरीचा किल्ला लाचलुचपत देऊन घेण्याचा केलेला प्रयत्न किल्ल्याचा मोगल सुभेदार अब्दुल अजीजखान याने हाणून पाडला . हा किल्लेदार मुसलमानी धर्माची दीक्षा घेतलेला एक ब्राह्मण होता . बादशहाच्या अतिशय विश्वासू आणि कदर केल्या जाणाऱ्या सेवकांमध्ये त्याची गणना होत असे . त्याने शिवाजीने देऊ केलेली लाच स्वीकारली परन्तु त्याच वेळी गुप्तपणे या बेताची माहिती त्याने बहादुरखानाला दिली . मराठ्यांचे सैन्य मोगल दबा धरून राहिलेल्या एका कोण्डीच्या जागी सापडले. मोगलांच्या हल्ल्यात मराठ्यांचे खूप नुकसान झाले , आणि अपयश घेऊन त्यांना परत फिरावे लागले.

विजापूरकडील लभ्यांश आणि कॅनरावर हल्ले, १६७३

२४ नोव्हेंबर १६७२ रोजी अली अदिलशहा दुसरा हा मरण पावला . त्याच्या जागी सिंहासनावर आलेला राजपुत्र हा केवळ ४ वर्षांचा होता . त्यामुळे काही महिन्यांतच विजापूर सरकारात गोंधळ माजला आणि राज्ययंत्रणा दुबळी बनली . शिवाजीला ही जणुकाही परमेश्वरी संधीच वाटली . ६ मार्च १६७३ रोजी त्याने दुसऱ्यांदा लाच देऊन पन्हाळा किल्ल्याचा ताबा घेतला . याच मार्गाचा अवलंब करून २७ जुलै १६७३ रोजी त्याने साताऱ्याचा किल्ला ताब्यात आणला . मे महिन्यात प्रतापराव गुजर याच्या हाताखालील मराठा फौज विजापूर कन्नडच्या अंतर्भागात घुसली. या फौजेने हुबळी आणि इतर अनेक संपन्न शहरे लुटली . परंतु या मराठी फौजेला बहलोलखान या विजापुरी सेनापतीने थोपवून धरले.

१० ऑक्टोबर १६७३ या दसऱ्याच्या दिवशी खुद्द शिवाजीने २५ हजार फौज घेऊन विजापूरच्या मुलखावर आक्रमण केले. अनेक संपन्न शहरांची त्याने लूट केली. अधिक लूट मिळविण्यासाठी त्याने कन्नड प्रांतात कूच केले. या स्वारीवर डिसेंबरच्या मध्यापर्यन्त शिवाजी गुंतून राहिला होता.

१६७४ वर्षाच्या जानेवारीच्या अखेरीस मोगलांच्या एका सैन्याने कोकणात उतरून युद्धक्षेत्र तिकडे नेण्याचा आणि त्याच वेळी पन्हाळ्यावर विजापूरकरांनी आक्रमण करण्याचा घाट घातला . परंतु शिवाजीने रस्त्यात अडथळे उभारून आणि घाट पाडून व त्याचप्रमाणे ज्या ठिकाणी मार्ग अतिशय कठीण होता त्या सर्वजागी सतत पहारा ठेवून आक्रमकांचा मार्ग रोखून धरला. परिणामी अपयश पदरी घेऊन मोगलांना परत

फिरावे लागले.

यानन्तर काही काळाने दक्षिणेमधील मोगलांची सत्ता विस्कळीत झाली . कारण खैबर अफगाण यांच्या बंडाळीने इतके उग्र स्वरूप धारण केले की , औरंगजेबाने ७ एप्रिलला दिल्ली सोडली आणि अफगाणांच्या पिछाडीकडून युद्धाच्या योजनेची आखणी करण्यासाठी तो हसन अब्दाल येथे रवाना झाला . पुढील महिन्यात दिलेरखानाला वायव्य सरहद्द प्रांताकडे बोलावून घेण्यात आले . दक्षिणेमध्ये फक्त बहादुरखानच राहिला. परंतु त्याच्या सामर्थ्यात अतिशय घट झालेली होती. लढाईमध्ये हा जो खंड पडला होता त्याचा शिवाजीने फायदा घेतला आणि रायगड येथे ६ जून १६७४ रोजी मोठ्या थाटामाटाने आणि संस्कारपूर्वक राज्याभिषेक करून घेतला.

(८) बहादुरखानाच्या छावणीची लूट आणि मोगलांबरोबर मोठ्या प्रमाणावर झालेले युद्ध (१६७४)

[शिवाजी व बहादुरखान—कर्मधर्मसंयोगाने त्याचवेळी शिवाजीने लष्कर जमवून ते पंचमहाल घेण्यासाठी पाठविले व स्वतःही काही दिवसांनी त्याच बाजूस जाऊन मामले फोंड्यास वेढा घातला . पण त्यास शंका आली की , कदाचित् बहादुरखान संधी साधून तिकडून माझ्या प्रदेशात हालचाल करील व मग वाईट होईल . तेव्हा त्याने बहादुरखानाशी बोलणे सुरू केले की , 'माझ्या अपराधांचे क्षमेविषयी व दख्खनच्या देसगतीसंबंधी कृपेचे फर्मान होईल व बादशहाकडून माझ्या मुलास पूर्वीप्रमाणे मनसब मिळेल तर नव्याने घेतलेले व मिर्झा राजा याच्या वेळी तहात दिलेले असे बादशाही किल्ले आपल्या हवाली करीन , मुलास चाकरीस पाठविन व स्वतःही सेवेस हजर होईन .' बहादुरखानाने विचार केला की , इच्छित गोष्ट हात बांधून प्रयत्न न करता चालून आली आहे . तेव्हा त्याप्रमाणे कबूल करून सीवासारखा मनुष्य इतक्या लवकर आपलासा झाला असे पाहून बादशहाने बहादुरखानावर जास्तच खूष होऊन व त्याची मनसब वाढवून त्यास जफरजंग कोकलताश हा किताब दिला . बहादुरखानाने सईदखान नावाच्या आपल्या विश्वासू चाकरास फर्मान व पोशाख यांसह त्यास (शिवाजीकडे) पाठविले. एवढा वेळ सीवाजीने निर्धास्तपणे त्या किल्ल्याचा वेढा चालविला आणि ता. १५ **सफर** सन (४४५) १०८६ रोजी (श. १५९८ **वैशाख वद्य** २; इ. स. १६७५ मे. १) फोंडा किल्ला व त्या बाजूचे महाल काबीज केले. त्याने १५।२० हजार होन किमतीचे जरुरीचे सामान बहादुरखानाच्या लष्करापासून विकत घेतले व पुन्हा आपल्या वळणावर जाऊन सईदखानास म्हटले, 'बहादुरखान अशी कोण व काय वस्तू आहे की, माझ्या सारख्याने त्याच्या मारफतीने तह करावा व आपले हेतू साध्य करण्यास झटावे? त्याला जर तसे वाटत असेल तर ते वृथा आहे. त्याला सांग की, असे होण्याची अपेक्षा धरू नकोस'. सईदखान त्याच्या या लुच्चेगिरीने हैराण झाला व निरुपाय होऊन परत फिरला . या कपटामुळे नवाब बहादुरखान सुक्या मांसाप्रमाणे झाला . त्याला धाक पडला की , बादशहास हा मामला समजला तर आपणास शासन करण्यास योग्य व नादान म्हणून समजेल तेव्हा उत्तम गोष्ट म्हणजे कसेही करून खवासखानाची गाठ घ्यावी . सीवावरील मोहिमेचा ठराव करून त्यात प्रगती करावी व आपले स्थान सांभाळावे.

बहादुरखान व दिलेरखान याची स्पर्धा— (४५१) सीवाची बंडखोरी रोज वाढत होती; संधी साधून तो निर्धास्तपणे बादशाही मुलूख लुटणे व ताब्यात आणणे यात कोणतीही कसूर करीत नसे. भांडणाशिवाय ताब्यात येण्यासारखा असेल असा प्रत्येक महाल किंवा परगणा तो ताब्यात घेई . सरहद्द व मुलूख याचे रक्षण करण्यासाठी हुसैनखान मियानह याची नेमणूक केल्यामुळे तो ते काम करीत होता . त्यास सीवाने दग्याने कैद केले . बहादुरखानास दक्षिण्यांचा मान राखणे कबूल असल्याने तो अब्दुल -करीमचे उच्चाटन करण्याचा प्रयत्न करीत होता . परंतु दिल्लीचा एक उमदा उमराव दिलेरखान अब्दुल -करीमशी दोस्ती ठेवत असून त्याचा उत्कर्ष म्हणजेच आपल्या जातीचे ऊर्जित मानीत असे . यामुळेच तो आपल्या स्थैर्यासाठी झटे व त्याच्या इच्छेप्रमाणे सर्व व्यवहाराची तड लावण्याची खटपट करी . (४५२) आता त्याने हासरत आलमगीरास अर्ज केला की , 'अब्दुल-करीम आपल्या गुन्ह्याची बादशहाकडून माफी मिळाल्यास बादशाही पत्रातील हुकुमाप्रमाणे सीवाजीच्या मोहिमेवर जाऊन त्याचा समूळ नाश करावा असे इच्छितो '. बादशहास हा अर्ज पसंत पडला . पण दखनी व बहादुरखान या गोष्टीस राजी नव्हते . हे त्याच्या नाशाशिवाय दुसरे काहीच इच्छित नव्हते . अशा स्थितीत व अब्दुल -करीमच्या कारकिर्दीत काही आदिलशाही मुलूख सीवाच्या व काही मुघलांच्या ताब्यात गेला . अहसनावादचा किल्ला ता. १६ **जमादिलावल** सन १०८८ मध्ये (श. १५९९ **आषाढ वद्य**; इ. १६७७ जुलै ७) व शाह दुर्गचा किल्ला याच साली ता . १२ **जमादिलाखर** रोजी (श. १५९९ **श्रावण शुद्ध** १४ ; इ. १६७७ ऑगस्ट २) मुघलाच्या ताब्यात गेले . त्याच सालच्या **रजब** महिन्यात (श. १५९९ **भाद्रपद**; इ. १६७७ ऑगस्ट -सप्टेंबर) बहादुरखान हुकूमाप्रमाणे दिल्लीस रवाना झाला आणि (दिलेरखान) दखनची जिल्हेदारी व आदिलशाही मुलूख ताब्यात आणण्याचे काम यावर नेमला गेला. (**शि. च. वृ. स.** २, ९५—९६, **बसातीनुस्सलातीन**.)]

तहाची फसवी बोलणी

राज्याभिषेकाच्या खर्चामुळे शिवाजीचा खजिना रिता पडला . आपल्या सैनिकांचा पगार भागविण्यासाठी त्याला द्रव्याची गरज भासली . जुलै महिन्याच्या मध्याला दोन हजार मराठा घोडदळाने लुटुपुटीच्या लढाईचा देखावा केला आणि बहादुरखानाला त्याच्या पेडगाव येथील छावणीपासून ५० मैल लांब फसवून नेले . याच वेळी शिवाजीने स्वतः ७ हजार सैन्याच्या तुकडीसह दुसऱ्या एका मार्गाने येऊन

कोणत्याही प्रकारचे संरक्षण न उरलेल्या पेडगाव येथील मोगल छावणीवर हल्ला केला . या छावणीतून त्याने एक कोट रुपयांची लूट आणि दोनशे उत्तम घोडे हस्तगत केले . ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीस खुद्द शिवाजीच्या हाताखालील एका मोठ्या सैन्याने घाट ओलांडून दक्षिणेच्या पठारात प्रवेश केला . बहादुरखानाच्या छावणीत भयभीत वातावरण पसरलेले होते . या छावणीला त्याने वळसा घातला आणि औरंगाबाद जवळची अनेक शहरे त्याने लुटली . तेथून तो बागलाण आणि खानदेश या प्रांतांत घुसला . येथे मराठ्यांचे सैन्य नोव्हेंबरपासून डिसेंबरच्या मध्यापर्यंत जवळ जवळ १ महिन्यापेक्षा जास्त लुटालूट करीत फिरत राहिले . या प्रांतात ज्या शहरांची त्याने लूट केली आणि ज्या शहरांना आगी लावल्या त्यामध्ये एरंडोलपासून १० मैलांवर असलेले धरणगाव हे शहर होते . या शहरातील इंग्लिश वखारीचा त्यांनी विध्वंस केला. यानंतर शिवाजीने बहादुरखानाबरोबर तहाची फसवी बोलणी सुरू केली . मार्चपासून मेपर्यंत जवळजवळ ३ महिने त्याने तहाची खोटी आशा निर्माण करून मोगलांना झुलवत ठेवले . जुलै १६७५ मध्ये शिवाजीने फोंड्याचे शहर जिंकून घेतले. त्याबरोबर त्याने शांततेचा पांघरलेला खोटा बुरखा झुगारून दिला आणि मोगल वकिलाची तुच्छतापूर्वक अवहेलना करून त्याला हाकलून दिले.

मोगलांबरोबर पुन्हा युद्ध

१६७६ च्या जानेवारी महिन्यात शिवाजी हा अतिशय आजारी पडला . त्यानंतरचे तीन महिने त्याने सातारा येथे बिछान्यावर पडून काढले . १६७५ च्या अखेरीस विजापूर येथे बहलोलखानाने राजप्रतिनिधित्वाचे अधिकार बळकाविल्यामुळे दक्षिणी आणि अफगाण या दोन पक्षांत यादवी युद्ध माजले. ते शिवाजीच्या पथ्यावर पडले . त्याने सर्वत्र धामधूम माजविली . कसल्याही तऱ्हेचा अडथळा न होता किंवा कोणत्याही धोक्याची क्षिती न बाळगता त्याने जिकडे तिकडे लुटालूट केली आणि दरोडे घातले . ३१ मे रोजी बहादुरखानाने विजापूरविरुद्ध अतिशय जोराची आणि बराच काल चालणारी अशी मोहीम उघडली . या मोहिमेचा परिणाम एकच झाला आणि तो म्हणजे विजापूरचा नवीन राजप्रतिनिधी बहलोलखान याची शिवाजीशी युती झाली.

(९) शिवाजीची कर्नाटकवरील मोहिमेसाठी मुत्सद्देगिरीची पूर्वतयारी

१६७० च्या जानेवारी महिन्यात शिवाजी आपल्या जीवनातील अतिशय मोठ्या मोहिमेवर बाहेर पडला. ही मोहीम म्हणजे कर्नाटकावरील स्वारी होय. त्या वेळी शेजारच्या राज्यातील राजकीय परिस्थिती ही शिवाजीचे बेत सिद्धीस जाण्याचे दृष्टीने अतिशय अनुकूल होती . औरंगजेबाचे अतिशय उत्कृष्ट असे सैनिक अफगाणिस्तानच्या सरहद्दीवरील बंद केलेल्या डोंगरी लोकांचा उपशम करण्यात अजून गुंतलेले होते. विजापूर येथे मोगल सुभेदाराने उघडउघड दक्षिणी पक्षाची बाजू घेतलेली होती . ३१ मे रोजी त्याने विजापूरविरुद्ध मोहीम उघडली. ही मोहीम पुढे जवळ जवळ १ वर्षापेक्षा जास्त चालली.

शिवाजीने अतिशय मुत्सद्देगिरीने जी पावले टाकली त्यामुळे त्याला बहादुरखानावर संपूर्ण विजय मिळविता आला. या ठिकाणी ही गोष्ट नमूद करण्यासारखी आहे की शिवाजीबरोबर आपली मैत्री व्हावी यासाठी बहादुरखानाने यापूर्वीच प्रयत्न केलेले होते , आणि आता इ. स. १६७६ च्या मे महिन्यात मोगलांनी विजापूरविरुद्ध मोहीम उघडली तेव्हा आपली उजवी फळी सुरक्षित राखण्यासाठी बहादुरखानाला मराठ्यांबरोबर मैत्रीचे संबंध राखणे आवश्यक होते . याच वेळी शिवाजीची कर्नाटकावरील स्वारी आयोजित होती. त्यामुळे आपली पिछाडी सुरक्षित राहावी यासाठी मोगलांनी तटस्थ राहण्याची शिवाजीच्या दृष्टीने

आवश्यकता होती . शिवाजीने आपला मुख्य न्यायाधीश याला बहादुरखानाकडे किमती नजराणे देऊन रवाना केले. कर्नाटकची मोहीम आटोपण्यास शिवाजीला जवळजवळ १ वर्ष एवढा अवधी लागणार होता . या काळात बहादुरखानाचे मन मोगलांनी तटस्थ राहावे यासाठी वळविण्याबद्दल शिवाजीने निराजी रावजी याला प्रयत्नांची पराकाष्ठा करण्यास सांगितले.

गोवळकोंड्याबरोबर मैत्रीच्या तहाचे प्रयत्न

गोवळकोंड्याबरोबर शिवाजीने अतिशय मैत्रीचे आणि सहकार्याचे संबंध प्रस्थापित केले . गोवळकोंड्याचा सुलतान अबुल हसन कुतुबशहा याचा सर्व सत्ताधीश वजीर मादण्णा पंडित याने अगोदरच शिवाजीबरोबर परस्पर मदतीचा तह केलेला होता . राज्याच्या रक्षणासाठी त्याने शिवाजीला सालीना १ लक्ष होन खंडणी देण्याचे कबूल केले होते . शिवाजीने आपला अतिशय धूर्त मुत्सद्दी प्रल्हाद निराजी याची नेमणूक हैद्राबाद येथे आपला वकील म्हणून केली होती . आपण कर्नाटकमध्ये जो प्रदेश जिंकू त्यातील काही भाग तुम्हाला देऊ असे वचन शिवाजीने कुतुबशहाला देण्याचे ठरवून त्याने गोवळकोंड्याच्या राज्याकडून मोहिमेचा खर्च आणि सैन्याच्या तुकडीची मदत मिळविण्याचे ठरविले.

(१०) शिवाजीचा गोवळकोंड्याबरोबर तह आणि कनार्टकचा पाडाव

१६७७ च्या जानेवारी महिन्याच्या सुरुवातीला शिवाजी रायगडाहून निघाला आणि जवळजवळ ५० हजार सशस्त्र सैन्यासहित त्याने पूर्वेच्या दिशेने मजलदरमजल कूच करण्यास सुरुवात केली . फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीला तो हैद्राबाद येथे येऊन पोहोचला . कुतुबशाही मुलूखात येऊन पोहोचल्यावर त्या राज्यातील कोणत्याही प्रजाजनाला लुटावयाचे नाही किंवा कोणत्याही प्रकारचा उपद्रव करावयाचा नाही असा सख्त हुकूम त्याने दिला. या हुकमाची अंमलबजावणी अतिशय कडक शिक्षा देऊन त्याने केली.

आपल्या राज्यात आपल्या सुलतानाचा मित्र आणि राज्याचा रक्षणकर्ता शिवाजी याचे शाहीथाटाने स्वागत करण्यासाठी हैद्राबाद शहर नागरिकांनी सुशोभित केले होते . मराठ्यांचे सैन्य शहरामधल्या रस्त्यातून मोठ्या शिस्तीने कूच करीत गेले, आणि दादमहाल राजवाड्यासमोर येऊन उभे राहिले. शिवाजी बरोबर पाच अधिकारी घेऊन राजवाड्याच्या वरच्या दालनात गेला. तेथे त्याचे सुलतानाबरोबर जवळजवळ तीन तास अतिशय स्नेहभावाने संभाषण झाले . शिवाजीच्या व्यक्तिमत्त्वाची , त्याच्या स्वभावाची आणि त्याच्या कर्तृत्वाची सुलतान अबुल हसन याजवर अतिशय मोहिनी पडली . शिवाजीच्या फौजेचे सामर्थ्य आणि शिस्त ही पाहिल्यानंतर त्याने जे जे काही मागितले त्याला मंजुरी देण्यास अबुल हसन याच्या वजिराने कोणतेही अनमान केले नाही . काही काल चर्चा झाल्यानन्तर कर्नाटकच्या आगामी मोहिमेबद्दल दोन्ही पक्षांत एक गुप्त तह झाला . या तहाप्रमाणे सुलतानाने शिवाजीला कुमक म्हणून दररोज तीन हजार होन किंवा महिन्याला साडे चार लाख रुपये द्यावयाचे होते आणि आपला एक **सरलष्कर** मिर्जा महमद अमीन याला पाच हजार फौज बरोबर देऊन कर्नाटकच्या मोहिमेत शिवाजीबरोबर सहकार्य देण्यासाठी पाठवावयाचे होते . या मदतीच्या बदल्यात शिवाजीने असे कबूल केले की कर्नाटकमधील जिंकलेल्या मुलुखांपैकी जो भाग आपला बाप शहाजी याजकडे नव्हता तो आपण सुलतान अबुल हसन याच्या हवाली करू. त्याचप्रमाणे दोन्ही राज्यांत मोगलांविरुद्ध जो बचावाचा तह झाला होता तो आणाभाका घेऊन दृढ करण्यात आला . कुतुबशहाने एक लाख होनांची खंडणी नियमितपणे देण्याचे आणि आपल्या दरबारात मराठ्यांचा एक वकील ठेवण्याचे शिवाजीजवळ कबूल केले . याची किंमत म्हणून मोगलांपासून आपले

संरक्षण करण्याचे वचन त्याने शिवाजीपासून घेतले.

या ठिकाणी ही गोष्ट नमूद करण्यासारखी आहे की पराभूत झालेल्या विजयनगरच्या साम्राज्याच्या मांडलिक संस्थानांचा प्रदेश आदिलशाही आणि कुतुबशाही राज्यांनी बळकाविलेला होता . विजापूरच्या ताब्यात आता उत्तर आणि पूर्व म्हैसूर आणि पालार नदीपासून दक्षिणेकडे कावेरीची उपनदी कोलेसन यामधील मद्रासचे पठार अथवा कर्नाटकचा तळघाट म्हणजेच वेलोरपासून तंजावरनजीकपर्यंतचा प्रदेश होता तर गोवळकोंडा राज्याने पालारच्या उत्तरेकडील सर्व मुलूख म्हणजे चिकाकोलपासून मद्रासपर्यन्त बळकाविला होता . कर्नाटकच्या मैदानात विजापूरचा भूतपूर्व वजिर खान महमद याचा मुलगा नसिर महमदखान हा सुभेदार होता . त्याचे मुख्य ठिकाण जिंजी येथे होते . त्याच्या दक्षिणेकडल्या प्रदेशात बहलोलखानाचा आश्रित शेरखान लोदी अफगाण हा सुभेदार असून त्याचे राज्यकारभाराचे प्रमुख शहर त्रिचनापल्ली जिल्ह्याच्या उत्तर भागातील वालीकाण्डपूरम् हे होते. त्याच्या आणखी दक्षिणेस तंजावरची हिंदू राज्ये आणि मदुरेचे राज्य होते . इ. स. १६७५ मध्ये तंजावरची हिंदू राज्ये शिवाजीचा सावत्र भाऊ व्यंकोजी याने जिंकून घेतली होती . ही सर्व राज्ये आपापसामध्ये लढण्यासाठी आणि परस्परांचा मुलूख बळकाविण्यासाठी नेहमी युयुत्सु असत . या अंतर्गत कलहाचा फायदा घेऊन कुतुबशहाचा मंत्री मादण्णा याने शिवाजीच्या मदतीने विजापुरी कर्नाटक जिंकून घेऊन तेथे हिंदूंची सत्ता पुन्हा प्रस्थापित करण्याचा बेत केला.

१ महिन्यानंतर शिवाजीने हैद्राबाद सोडले आणि दक्षिणेच्या दिशेने कर्नूल , श्रीशैलम्, अनंतपूर, तिरुपती, कलहस्त्री, पेडुपोलम्मार्गे झपाट्याने कूच केले. पेडुपोलम् मद्रासच्या पश्चिमेस सात मैलांवर आहे. तेथे तो मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात येऊन पोहोचला . त्यानंतर त्याने जिंजिचा बळकट किल्ला तेथील किल्लेदाराबरोबर तह करून आपल्या ताब्यात घेतला. नंतर त्याने वेल्लोरच्या किल्ल्याला वेढा दिला. किल्लेदाराने जवळजवळ १४ महिने अतिशय शौर्याने शिवाजीचा प्रतिकार केला . किल्ला शिवाजीच्या ताब्यात देण्याबद्दल त्याने भरपूर द्रव्य घेतले आणि २१ ऑगस्ट १६७८ रोजी त्याने किल्ला शिवाजीच्या स्वाधीन केला.

मराठ्यांच्या आक्रमणाच्या लोंढ्याने कर्नाटकच्या प्रदेशाचे मैदान जणू काही साफ वाहून गेले . तटबंदी बांधून मजबूत केलेल्या काही ठिकाणांनीच फक्त त्यांना प्रतिकार केला . मराठ्यांच्या आक्रमणाची बातमी लागताच कर्नाटकातील श्रीमंत लोकांनी पळून जाऊन एक जंगलाचा तरी आश्रय घेतला किंवा किनारपट्टीवरील युरोपिअन किल्ल्याच्या आश्रयार्थ ते गेले. २६ जून रोजी कुडालोरच्या पश्चिमेस १३ मैलांवर असलेल्या तिरुवाडी येथे मराठ्यांनी शेरखान लोदी याचा पराभव केला . आपल्या ताब्यातील सर्व मुलूख त्याला सोडून द्यावा लागला . तिरुवाडीहून शिवाजी कोलेरुन नदीच्या उतर किनाऱ्यावर असलेल्या तिरुमलवाडी येथे कूच करून गेला. तेथे त्याने आपला भाऊ व्यंकोजी याला भेटीला बोलाविले . तेथे त्याने आपला बाप शहाजी याने आपल्या मृत्यूच्या वेळी जो प्रदेश त्याला दिला होता त्यांपैकी ¾ भाग त्याने व्यंकोजीपासून हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला . परन्तु २३ जुलै रोजी व्यंकोजी मोठ्या हुशारीने तंजावर येथे पळून गेला. यानन्तर शिवाजीने कर्नाटकातून मायदेशाकडे येण्यासाठी कूच केले . वाटेत त्याने अनेक तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्या . "शिवाजीने अतिशय संघटितपणे कर्नाटकची जी लूट केली आणि तेथून जबरदस्तीने जे द्रव्य वसूल केले , त्यामुळे कर्नाटकची परिस्थिती रस शोषून घेतलेल्या एखाद्या हाडाच्या तुकड्याप्रमाणे झाली."

इ. स. १६७७ आणि ७८ या दोन वर्षांच्या काळात शिवाजीने कर्नाटकात जो प्रदेश जिंकला त्याची

लांबी-रुंदी १८०×१३५ मैल एवढी होती. या प्रदेशाचे वार्षिक उत्पन्न २० लक्ष होन एवढे होते . या प्रदेशातील किल्ल्यांची संख्या १०० एवढी होती.

१६७७ सालच्या नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीला शिवाजीने मद्रासचा सपाटीचा प्रदेश सोडला आणि म्हैसूरच्या पठारामध्ये त्याने कूच केले . तेथील पूर्व आणि पश्चिम भाग त्याने जिंकून घेतला . म्हैसूर राज्यातील मध्यवर्ती ठिकाण सेरा येथून त्याने आपल्या राज्याकडे कोकपल , गदग, बंकापूर, बेलवाडी (बेळगाव जिल्हा) आणि तोरगल मार्गे प्रयाण केले आणि १६७८ च्या एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात तो महाराष्ट्रातील मजबूत किल्ला पन्हाळा येथे परत येऊन पोहोचला.

(११) मोगल, विजापूर आणि शिवाजी, १६७८–७९

१६७८ च्या मे महिन्यात मराठ्यांनी शिवनेरी जिंकून घेण्याचा दुसऱ्यांदा प्रयत्न केला . शिवनेरीच्या पायथ्याजवळचे खेडे जुन्नर याला त्यांनी वेढा दिला आणि रात्रीच्या वेळी किल्ला चढून जाण्याचा त्यांनी प्रयत्न केला. रात्रीच्या वेळी ३०० मराठा शिपाई दोरीच्या शिड्या आणि फासे यांच्या साहाय्याने किल्ल्याच्या भिंती चढून गेले. परंतु किल्लेदार अब्दुल अजिजखान हा अतिशय कुशल अधिकारी होता . त्याने शिवाजीचे जे सैनिक किल्ला चढून आले होते त्यांची कत्तल केली आणि शिवाजीकडे पुढीलप्रमाणे निरोप पाठविला . तो असा : "जोपर्यन्त मी या किल्ल्याचा किल्लेदार आहे तोपर्यन्त हा किल्ला तुला जिंकून घेता येणे शक्य नाही."

या सुमारास शिवाजी आणि कुतुबशहा यांच्यामध्ये मतभेद निर्माण झाले आणि दोन्ही राज्यांत मादण्णा पंडिताने अतिशय कौशल्याने जे मुत्सद्देगिरीचे संबंध निर्माण केले होते ते कोलमडून पडले . कर्नाटकवरील आपल्या स्वारीत शिवाजीने आपली स्थिती एखाद्या खेळण्यातल्या बाहुल्याप्रमाणे केली हे जेव्हा कुतुबशहाला आढळले तेव्हा त्याच्या रागाचा पारा चढला . त्याने मोहिमेचा सर्व खर्च अंगावर घेतला होता आणि मोहिमेसाठी तोफखाना आणि सैन्याची कुमक दिलेली होती . परंतु जिंकलेल्या किल्ल्यांपैकी एकही किल्ला शिवाजीने कुतुबशहाला दिला नाही किंवा जिथे सोने पिकते अशा कर्नाटकातून शिवाजीने जी प्रचंड लूट गोळा केली त्यांपैकी एक दिडकीदेखील परतफेड म्हणून शिवाजीने कुतुबशहाला दिली नाही . परिणामी अबुल हसन याने विजापूरचा नवीन राजप्रमुख सिद्दी मसूद आणि त्याचे प्रतिस्पर्धी विशेषतः शारजाखान यांच्यामध्ये सलोखा घडवून आणला. सिद्दी मसूदच्या बंडखोर शिपायांना काबूत आणण्यासाठी अबुल हसनने त्याला द्रव्याची मदत केली . त्याचप्रमाणे त्याने शिवाजीविरुद्ध युद्ध करण्यासाठी सिद्दी मसूदशी तह करून त्याला बांधून घेतले आणि शिवाजीला कोकणामध्ये कोंडण्याबाबत त्याच्याबरोबर योजना आखली. परंतु दिलेरखानाने विजापूरवर हल्ला करून जमत आलेली ही योजना उधळून लावली . शिवाजीचा मोठा मुलगा संभाजी हा त्याच्या उतारवयात लागलेला त्याच्या पाठीशी एक शाप होता . २१ वर्षांचा हा तरुण आसुरी स्वभावाचा , लहरी, चंचल, अविचारी आणि नीतिमूल्याबाबत बेदरकारपणे कोणाचीही पर्वा न ठेवून वागणारा होता . एका विवाहित ब्राह्मण तरुणीवर त्याने केलेल्या अत्याचारामुळे त्याला पन्हाळा किल्ल्यावर कैदेत ठेवण्यात आले होते . परंतु १३ डिसेंबर १६७८ रोजी तेथून तो आपली पत्नी येसूबाई आणि काही आश्रित यांच्यासह दिलेरखानाला जाऊन मिळण्यासाठी निसटला . दिलेरखानाने आपल्या या नवोदित मित्रासह बहादुरगडापासून दक्षिणेस ५० मैलांवर अकलूज येथे विजापूरवरील आक्रमणाची तयारी करण्यासाठी काही काळ मुक्काम केला . [संभाजीचा पळ – (५०१) या वेळी आलमगीर बादशहाने संभाजीस हुजूर बोलाविले होते ; पण तो अनेक भयांमुळे जाण्यास राजी नव्हता. याच सुमारास त्याचा बाप सीवाजी याने त्याचे हर प्रकारे समाधान करून व आपले विश्वासू लोक त्याजकडे पाठवून हुरूप आणिला होता . त्याने त्यास आपल्याजवळ बोलाविले आणि त्याने जो दुर्लौकिक केला होता व ज्यासाठी त्यावर नाराजी झाली होती तो पैतृक कृपेने झाडून टाकून त्याचे मन आपल्या बाजूस वळविले . तेव्हा संभाजीने

संधी मिळताच आपल्या बायकांना पुरुषी पोशाख देऊन पाच हजार स्वारांसह पलायन केले . ता. २८ **शव्वालला** (श. १६०१ **कार्तिक वद्य** ३०; इ. १६७९ नोव्हेंबर २३) तो विजापुरास आला तेव्हा मसऊदखानाने नीट बडदास्त ठेवून त्याचे समाधान केले . दिलेरखान ही बातमी ऐकून मसऊदखानावर खूप संतापला . या संधीचा फायदा घेऊन ख्वाजा अब्दुर्रझाक दिलेरखानास म्हणाला . 'मला परवानगी या म्हणजे मसऊदखानाकडे जाऊन संभाजीविषयी उपाय करतो' तेव्हा परवानगी मिळून तो पाच **जिल्कादला** (१६०१ **मार्गशीर्ष शुद्ध**, ६; इ. स. १६७९ नोव्हेंबर २९) विजापूरास आला. त्याच्या येण्याने शंकित होऊन व त्याचे काही लष्करही यावेळी त्याजवळ पोचल्याने तो ता . ७ **जिल्कादच्या** रात्री (**मार्गशीर्ष शुद्ध** ९; डिसेंबर १) पन्हाळ्यास गेला. (दिलेरखान विजापूरजवळ येऊन दक्षिण्यांशी लढाया देतो पण त्यांचे काही चालत नाही .) (५०३) सीवाच्या व इतर विलायतेतून विजापुरात सर्व प्रकारचे पदार्थ येत असल्याने स्वस्ताई होती . उलट मुघल लष्करास उपास पडत . शाहजादा मुआज्जम व दिलेरखान यांतील बेबनावामुळे शाहजादा पैसे पाठवीना . सीवाच्या लष्कराने केलेल्या मुलखाच्या पायमल्लीमुळे त्यातूनही काही वसूल येईना . शाहजादा दिलेरखानास एकसारखी ताकीद पाठवी की , विजापुराहून उठून मुलखाचे रक्षण करावे आणि आपल्या प्रदेशात शिरलेल्या बंडखोरास (सीवास) बाहेर हुसकवावे. (५०४) दिलेरखान मसऊदखानाशी तह करण्याचा प्रयत्न करीत होता . पण मसऊदखानास शाहजादा व दिलेरखान यांमधील बेबनाव माहीत होता. सीवाजी एकसारखा मसऊदखानास प्रोत्साहन पत्रे धाडी (आणि खुद्द शाहजाद्याने त्यास गुप्तपणे कळविले की, मला पंचवीस हजार होन दिल्यास मी दिलेरखानास तुमच्या विलायतेतून बाहेर काढतो . यामुळे तो तह करण्यास राजी झाला नाही.) (**शि. च. वृ. सं.** २, १०९–११० **बसातीनुस्सलातीन**).]

या गंभीर परिस्थितीत सिद्दी मसूद याने पूर्वी ठरल्याप्रमाणे शिवाजीकडे ताबडतोब मदतीची याचना केली. शिवाजीने विजापूरच्या संरक्षणासाठी सुसज्ज असे ६॥७ हजार घोडदळ रवाना केले . मसूदला आपल्या दोस्तावर पूर्णपणे विश्वास टाकण्याचा धीर होईना . तेव्हा शिवाजीने आपला बुरखा फेकून दिला आणि पुन्हा विजापूरच्या प्रदेशात लुटालूट करण्यास आणि तो प्रदेश उद्ध्वस्त करण्यास सुरुवात केली . मसूदने दिलेरखानाबरोबर तह केला . मोगलांच्या फौजेला मसूदखानाने विजापूर येथे बोलाविणे पाठविले . या फौजेचे मोठ्या थाटाने स्वागत करण्यात आले.

दिलेर भोपाळगड जिंकून घेतो

यानंतर दिलेरखानाने भोपाळगडच्या दिशेने कूच केले . हा किल्ला जतच्या वायव्येस वीस मैलांवर आणि पंढरपूरच्या नैर्ऋत्येस ४५ मैलांवर आहे . या किल्ल्याच्या आसमंतात त्याच्या मोगलांबरोबर लढाया चाललेल्या असताना आपली मालमत्ता सुरक्षित ठेवण्यासाठी आणि आपल्या प्रजाजनांच्या कुटुंबियांना आश्रयस्थान म्हणून हा किल्ला शिवाजीने बांधला होता . १६७९ या वर्षाच्या एप्रिल महिन्याच्या दोन तारखेस सकाळी ९ वाजता मोगलांनी किल्ल्यावर हल्ला चढविला . दुपारपर्यंत मोगल अतिशय शर्थीने लढले . त्यानंतर मोगलांनी किल्ला जिंकून घेतला . दोन्ही बाजूंची अतिशय मनुष्यहानी झाली . मोगलांच्या ताब्यात धान्याचे प्रचंड साठे आणि अगणित मालमत्ता आली . त्याचप्रमाणे शत्रूची अनेक माणसे त्यांनी कैद केली . किल्ल्यावरील शिबंदीपैकी जे शेकडो सैनिक बचावले होते त्यांचा एक हात तोडण्यात आला , आणि त्यांना किल्ल्यावरून हाकलून देण्यात आले . इतरांना गुलाम म्हणून बहुधा विकण्यात आले असावे . भोपाळगडचा पाडाव झाल्यानंतर काही काळपर्यंत मोगल सुभेदार आणि विजापूरचे सरदार यांच्यामध्ये मनाला संभ्रमात पाडणारी कारस्थाने आणि प्रतिकारस्थाने यांचा कहर झाला . त्याचप्रमाणे या काळात मसूद आणि शारजाखान, मसूद आणि दिलेरखान आणि मसूद व त्याचा पक्षपाती वेंकटाद्री मुरारी यांच्यामध्ये भांडणे निर्माण झाली . या वर्षाच्या मध्याला औरंगजेबाने बसविलेल्या **जिजिया** या कराला आक्षेप घेणारे असे विचारपूर्ण आणि भावनावशतेने भरलेले पत्र शिवाजीने औरंगजेबाला पाठविले . हे पत्र अतिशय वक्तृत्वपूर्ण अशा फारशी भाषेत नीलप्रभूने तयार केले होते.

(१२) शिवाजीची अखेरची मोहीम

दिलेरची विजापूरवर स्वारी

१८ ऑगस्ट रोजी दिलेरखानाने विजापूरच्या उत्तरेस ४० मैलांवर धूळखेड येथे भीमा नदी ओलांडली आणि मसूदविरुद्ध नवीन मोहिमेला सुरुवात केली . मसूदची परिस्थिती अतिशय केविलवाणी झाली. त्याने शिवाजीकडे मदतीची याचना केली . शिवाजीने विजापूरचा बचाव करण्याचे ताबडतोब कबूल केले. या सुमारास संभाजी दिलेरखानापासून पळून गेला होता . तो ४ डिसेंबरच्या सुमारास पन्हाळ्याला परत आला. [दिलेरखानाची भोपाळगडावर स्वारी आणि संभाजीचे मोगल छावणीतून पलायन या घटनांची हकीकत पुढे दिली आहे :

दिलेरखान भूपाळगड घेतो – सीवाजीने माजऱ्याजवळ डोंगरामध्ये एक खूप बळकट किल्ला बांधून त्यास भूपाळगड हे नाव ठेविले . एव्हा त्याचे व मुघलांचे भांडण सुरू झाले म्हणून त्यावर त्याने अनुभवी व लढाऊ लोकांचा भरणा केला . यामुळे मुघली लष्कराचा आवाज ऐकताच भोवतालच्या गावातील लोकांच्या झुंडी , बायकामुले व सामानसुमान घेऊन किल्ल्यात येऊन राहिल्या होत्या . हे समजताच दिलेरखान तो किल्ला घेण्यास निघाला. सकाळीच डोंगरावर चढून त्याने हल्ला चढविला . दोन प्रहरपर्यंत कडाक्याची लढाई होऊन दोन्हींकडचे पुष्कळ लोक कामास आले. पण किल्ला दिलेरखानाच्या ताब्यात आला . त्यावरील लोक व सामानसुमान त्याच्या हाती लागले . सीवाचे लोकांपैकी सातशे कैद झाले . प्रत्येकाचा एक हात त्याने तोडला . यांपैकी बहुतेक लोक थंडीने मेले . सीवाने यापूर्वीच कुमकेसाठी सोळा हजार स्वार पाठविले होते . पण ते येऊन पोहोचले तो किल्ला मुघलांच्या ताब्यात गेला होता . तेव्हा त्यांनी फौजेच्या तुकड्या पाडून मुघलास चारी बांजूनी सतावण्यास सुरुवात केली . इतक्यात त्यांना खबर लागली की , ईरजखान व बाजीराव (४७८) हे परिंऱ्याच्या बाजूकडून दिलेरखानाच्या लष्करासाठी धान्य घेऊन येत आहेत . तेव्हा सीवाजीचे सैन्य तेथून ईरजखानावर चालून गेले . दिलेरखानाने इख्लासखानास १५०० स्वारांसह ईरजखानाच्या मदतीस पाठविले . किल्ल्यापासून सहा कोसांवर इख्लासखान व सीवाजीचे लोक यांची लढाई झाली . सीवाच्या लोकांनी हे लोक थोडे आहेत असे पाहून त्यांस चारी बाजूंनी घेरले. इख्लासखानाने एका खेड्याच्या आश्रयाने लढण्यास प्रारंभ केला व तिसऱ्या तासापासून नवव्यापर्यंत लढाई चालू राहिली . सीवाचे लोक सर्व बाजूंनी हल्ले चढवीत होते ; तर इख्लासखान खेड्यांतील गढीची भिंत पाठीशी घालून तोंड देत होता . यांत सीवाचे जवळजवळ हजार लोक ठार झाले. दिलेरखानाने या लढाईची बातमी लागताच सरफराझखान व लतीफशाह यांस एका मोठया जमेतीसह इख्लासखानाच्या मदतीस पाठविले व स्वतःही त्यांचे मागून निघाला . हे इख्लासखानाजवळ पोहोचले तो सीवाच्या सैन्याने पळ काढला . दिलेरखान एक-दोन कोस पाठलाग करून परतला. नंतर भूपाळगडास येऊन तो किल्ला त्याने जमीनदोस्त केला.

(शि. च. वृ. सं २, १०४, बसातीनुस्सलातीन)]

[संभाजीराजे परत शिवाजी महाराजांकडे आले त्याबद्दल बुसतिनींत बराच तपशील आला आहे . तो पुढे दिला आहे . : "(दिलेरखान) ता. २७ रोजी (२२ नवंबर १६७९) अथणीहून निघोन ऐनापुरास जात होता. तेव्हा त्याने वाटेतच वर्तमान ऐकले की संभाजी मोगली लष्करातून पळोन जाऊन विज्यापुरीस निघोन गेला . ज्या जागी संभाजी निघोन गेला अशी बातमी ऐकली तेथूनच दिलेरखान माघारा फिरोन विज्यापुराकडे निघाला."

"दलेरखानाचे लष्करातून संभाजी याणी पळोन जाणे प्रकर्ण :– ते कारण जाहले होते की या दिवसी आलमगीर पातशाहा याणी दलेरखानासी हुजूर बोलाविले व दलेरखान हा किती एक संशयामुळे व किती एक अंदेशाचे कारणावरून पातशाहाकडे हुजूर जाण्यास राजी नव्हता व त्याच दिवसात संभाजीचा बाप सिवाजी याणी संभाजीस नानाप्रकारे दिलभरंवसा देऊन आपले कडोन पूर्ण विश्वासूक लोकांस संभाजीकडे पाठविले आणि संभाजीस हरप्रकारे समजूत करून व चित्तसमाधान करून आपल्याकडे आणविले व उभयती बापलेकामध्ये वाकडेपणा आला होता , त्यामुळे उभयताचे सख्य होत नव्हते तो वाकडेपणा बापाचे कळवळ्याने व मित्रतेने दूर जाहाला . सिवाजीने आपल्या पुत्राचे मन आपल्याकडे वळवून घेतले. तेव्हां संभाजी याणी फुरसतीची वेळ पाहून आपले स्त्रीस (चंपास) पुरुषाचा पोशाख पांघरून शूराचा वेश देऊन पाच स्वारानिसी आपले स्त्रीसहित दलेरखानाचे लष्करातून पळाला . ता. २८ वी माहे **सवाल** (२३ नवंबर १६७९) रोजी विजापूरास येऊन पोचला . तेव्हा मसउदखान आणि जरुरीचा सामानसरंजाम पोशाख व बिछाइतीकरितां संभाजीकडे पाठविले आणि मसउदखान याणी संभाजीचे बहुत चित्त समाधान केले . [शिवाजीचा व आदिलशहाचा तह झाला होता .] दिलेरखानास हे वर्तमान कळले , तेव्हा दिलेरखान मसउदखानावर अत्यंत क्रोधायमान जाहाला . अबदुल रिजाक याणी ही फुरसती संधी पाहून दलेरखानाचे मनात आणोन दिल्हे की , मजला आपला निरोप द्यावा म्हणजे मी मसउदखानाकडे जाऊन संभाजीचा इलाज करतो असे बोलून निरोप घेऊन ता . ५ माहे **जिलकाद** (२९ नवंबर १६७९) रोजी विजापूरास आला . अबदुल रिजाक (येण्याचे) हे कारण संभाजीने जाणोन तेथूनही ता . ७ माहे **जिलकाद** (१ डिसेंबर) रोजी रात्री घोड्यावर बसून संभाजी पनाळ्यास निघून गेला ." (उर्दू भाषांतर (छापील) **बुसाट** पृ. ७१६ यात "२७" **जिलकाद** म्हणजे २१ दिसेंबर ही तारीख दिली आहे . ज्या अर्थी राजपुरकर १६ डिसेंबर पत्राने संभाजी राजे कोल्हापुरास (पन्हाळ्यास) आल्याची बातमी देतात त्या अर्थी पारसनिसांनी आपल्या मराठी भाषांतरात दिलेली ७ चंद्र हीच तारीख मुळांत असावी व तीच बरोबर आहे. **बुसापा** पृ, ५६. [१ भाग ६ वा]. १६ जुलैच्या (१६८०) डच लोकांच्या अहवालात या प्रसंगाची माहिती आली आहे ती अशी : "वेंगुर्ला व कानडा या बाजूच्या डोंगराळ मुलुखातील युद्धे अद्याप चालूच आहेत . शिवाजीचा मुलगा संभाजी आपल्या बापाला सोडून काही कालापर्यंत मोगली सैन्यात गेला होता. तो आता आपल्या बापाच्या आश्वासनावर विश्वासून शिवाजीकडे परत आला आहे ." [**पसासं**, क्र. २२६७, पृ. ६९४ **डाघ रजिस्टर** (१६८०), पृ. ५१६).]

१६७९ वर्षाच्या नोव्हेंबर महिन्याच्या ४ तारखेला शिवाजीने विजापूरपासून वायव्येला ५५ मैलांवर असलेल्या सेलगुर येथून कूच केले . त्याच्याजवळील घोडदळाची संख्या १८००० होती . या घोडदळाचे त्याने दोन भाग केले . एक त्याच्या हाताखाली आणि दुसरा आनंदरावाच्या हाताखाली . या दोन्ही

तुकड्यांनी समांतर रेषेत उत्तरेकडे झपाट्याने कूच करण्यास सुरुवात केली . एखाद्या पुराच्या लोंढ्याप्रमाणे हे घोडेस्वार दक्षिणेतील मोगलांच्या जिल्ह्यांत घुसले . वाटेत लागलेली सर्व ठिकाणे त्यांनी लुटली आणि जाळून फस्त केली . त्यांनी पैशाच्या आणि वस्तूंच्या स्वरूपात प्रचंड लूट जमा केली . नोव्हेंबर महिन्याच्या मध्याला शिवाजीने औरंगाबादच्या पूर्वेस ४० मैलांवर असलेले जालना हे अतिशय संपन्न असे व्यापारी पेठेचे शहर काबीज केले आणि त्या शहराची लुटालूट केली . जालन्याच्या उपनगरातील एका उद्यानात सय्यद जान महमद या अवलियाची पर्णकुटी होती . जालन्यातील बहुतेक श्रीमंत मंडळींनी आपल्या जवळील द्रव्य आणि हिरे घेऊन या पर्णकुटीचा आश्रय घेतलेला होता . हल्लेखोरांना जेव्हा शहरात फारच थोडी लूट मिळाली आणि जेव्हा त्यांना वरील पर्णकुटीत संपत्ती दडवून ठेवल्याचे कळले तेव्हा त्यांनी या पर्णकुटीत प्रवेश केला आणि तेथे आश्रय घेऊन राहिलेल्या व्यक्तींना लुटले आणि अनेकांना जखमी केले . या कृत्यापासून त्यांना परावृत्त करण्याचा त्या अवलियाने प्रयत्न केला . परंतु त्यांनी त्याला शिवीगाळ केली आणि त्याला शिक्षा करण्याची धमकी दिली . सय्यद जान महमद हा अवलिया परमेश्वराचा प्रेषित होता . त्याच्या प्रार्थनेमध्ये आश्चर्यकारक असे सामर्थ्य होते . त्याने शिवाजीला शाप दिला . त्यावरून लोकांची अशी समजूत झाली की ५ महिन्यानंतर शिवाजीला जो मृत्यू आला तो या शापाचा परिणाम होय.

जवळ जवळ ४ दिवसपर्यंत जालना शहर लुटल्यानंतर आणि शहराचा पूर्णपणे विध्वंस केल्यानंतर मराठ्यांनी ज्याची मोजदाद करता येणार नाही इतके सोने , चांदी, हिरे, कापडचोपड, हत्ती आणि उंट यांसह माघार घेतली . ते माघार घेत असताना रणमस्तखान नावाच्या एका धाडसी मोगल अधिकाऱ्याने त्यांच्या पिछाडीवर हल्ला केला . तीन दिवसपर्यंत सीदोजी निंबाळकर या मराठा सरदाराने ५ हजार स्वारांनिशी त्याला थोपवून धरले . परंतु अखेर त्याच्या अनेक माणसांसहीत तो मारला गेला . दरम्यान औरंगाबाद येथून मोगलांना अतिशय मोठ्या प्रमाणावर कुमक केसरीसिंग आणि सरदारखान यांच्या हाताखाली येत होती . वर लढाई चाललेल्या ठिकाणापासून हे दोघे सरदार ६ मैलांवर येऊन पोहोचले . तेथून केसरीसिंगाने शिवाजीचा एक जातभाई म्हणून रात्रीच्या वेळी त्याला एक निरोप पाठवून असे कळविले, की, “मोगलांचा तुमच्याभोवती पडलेला वेढा पूर्ण होण्याचे आत आणि तुमचा पलायनाचा मार्ग त्यांनी तोडून टाकण्याचे अगोदर तुम्ही ताबडतोब निसटून जा .” शिवाजीने आपल्या गुप्त हेर खात्याचा प्रमुख बहिर्जी याच्याबरोबर याबाबत सल्लामसलत केली . बहिर्जीच्या कुशल मार्गदर्शनाखाली मराठ्यांनी सतत ३ दिवस आणि रात्री अविरत आणि चिंताग्रस्त मनःस्थितीत एका अनोळखी वाटेने पलायन केले . पळून जात असताना त्यांना मिळालेल्या बऱ्याचशा लुटीचा त्यांना त्याग करावा लागला . त्यांचे चार हजार घोडेस्वार मारले गेले . त्यांचा सेनापती हंबीरराव हा जखमी झाला . या अपयशी मोहिमेनंतर शिवाजी २२ नोव्हेंबरच्या सुमाराला पट्टा या किल्ल्यापाशी परतला . तेथे त्याने आपल्या थकून गेलेल्या आणि पिडलेल्या सैन्याला काही दिवस विश्रांती दिली . डिसेंबरच्या सुरुवातीला तो राजगडला परतला . दरम्यान नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात मराठ्यांच्या एका तुकडीने खानदेशवर हल्ला केला आणि धरणगाव , चोपडा व त्या जवळील अनेक महत्त्वाच्या गावांची त्यांनी लुटालूट केली.

शिवाजीचा मृत्यू

आपला सर्वांत मोठा मुलगा संभाजी याच्या वर्तनामुळे शिवाजीसमोर भविष्यकाळात घडून येणाऱ्या घटनांचे भयंकर चित्र उभे राहिले . विषयासक्त, लहरी, स्वभावाने निर्दय आणि कसल्याही प्रकारची प्रतिष्ठा, देशाभिमान अथवा धर्माबद्दलची ओजस्विता याबाबत यत्किंचितही चाड नसलेल्या संभाजीसारख्या तरुणाच्या हातात महाराष्ट्राचे भवितव्य पूर्णपणे सोपविणे यामध्ये फार मोठा धोका भरलेला होता याची

शिवाजीला पूर्ण जाणीव होती . शिवाजीने संभाजीबरोबर समझोता करण्याचा आणि त्याची समजूत घालण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न केला . शिवाजीला मनुष्यस्वभावाची अतिशय उत्कृष्ट पारख होती . त्याला लौकरच समजून आले की आपला उपदेश म्हणजे उपड्या घड्यावरील पाण्यासारखा आहे . साहजिकच त्याच्या अखेरच्या दिवसांत त्याच्या जीवनावर निराशेची छाया पडली . २३ मार्च १६८० रोजी शिवाजी राजाला तापाने घेरले आणि त्याला रक्ती आवेचा विकार जडला . त्याचे आजारीपण १२ दिवसपर्यंत टिकले, आणि अखेर मराठी राज्य घडविणारा महाराष्ट्राचा नेता चैत्री पौर्णिमेच्या दुपारी रविवारी ता . ४ एप्रिल १६८० रोजी मरण पावला. मृत्युसमयी त्याच्या वयाची ५३ वर्षे देखील पुरी झाली नव्हती . [खाफीखानाने शिवाजीच्या पूर्ववृत्ताविषयी दिलेली हकिकत पुढीलप्रमाणे आहे :

(१११) आता मी सीवाचे कुल व उत्पत्ती याविषयी दक्षिणेतील विश्वासू व मराठा कुळांतील लोकांकडून ऐकले ते सांगतो (११२) त्याचे पूर्वज चित्तोरचे राण्याच्या वंशाशी संबंध होते . असे म्हणतात की , त्याचा एक पूर्वज— ज्यामुळे त्यास भोसले हे नाव मिळाले— राण्याच्या मुलखात राहात असे. तो एका हलक्या बाईच्या जातीशी संबंध ठेवून तीस जातिधर्माप्रमाणे लग्नाशिवाय बायको म्हणवू लागला . तिला त्यापासून एक मुलगा झाला, व स्वतःच्या व जातीच्या शरमेमुळे त्यास डोंगराळ मुलखांत गुप्तपणे ठेवले व वाढविले . त्याचे त्या बाईवर फार प्रेम होते . त्याचे आईबाप स्वजातीय स्त्रीशी लग्न करण्याचा आग्रह करीत असतानाही त्याने ते ऐकले नाही . त्याचे प्रेम उघड होऊन मुलाच्या पालनाविषयी त्याच्या मित्रांत व तिऱ्हाइतात चर्चा होऊ लागल्यामुळे तो , मुलगा व बाई यास घेऊन दक्षिणेत गेला . तो स्वजातीय स्त्रीपासून मुलगा झाल्याची बतावणी करी तरी , कोणीही शुद्ध रजपूत त्याशी लग्नसंबंध करण्यास तयार होईना . सरते शेवटी त्यास मुलाचे लग्न एका मराठा मुलीशी —हे कुलही आपण रजपुतकुलोत्पन्न आहोत असे म्हणवी-करावे लागले. अशा उत्तम कुळात सातव्या किंवा आठव्या पिढीत शाहू भोसल्याचा जन्म झाला . भोसला शब्दाची व्युत्पत्ती सर्वसामान्य ग्राह्य मताप्रमाणे घोसला या हिंदी आणि स्थानवाची किंवा अतिशय लहान व रुंद स्थानवाची शब्दापासून आहे . तो मुलगा अशा ठिकाणी वाढविला गेल्यामुळे त्यास भोसला हे नाव मिळाले. पण मी निराळी व्युत्पत्ती ऐकली आहे.

(११३) निजामुल्मुकी घराण्याचा सर्व प्रदेश शहाजहानच्या ताब्यात आल्यावर

त्याने आदिलखानाशी मित्रत्वाचा तह केल्यावर खानाने औरंगाबादेजवळ असलेला आपला मुलुख कोकणातील जीवल (चेऊल), बाबल (दाभोळ), दंडाराजपुरी, चाकण या बंदराच्या ऐवजी ही सर्व पूर्वी निजामुल्मुकाकडे होती , पण आता ती तळकोकणच्या जवळ असल्याने आदिलशहाने आपल्या ताब्यात घेण्याची इच्छा केली होती— अदलाबदल करून दक्षिण सोडावी असे विनवले . हा प्रदेश झाडी व डोंगर यांनी भरलेला असल्यामुळे ही सूचना पसंत पडून दोन्ही कोकणे आदिलखानाच्या ताब्यात आली . मुल्ला अहमद याचे पूर्वज अरबस्तानातून जुलमाला कंटाळून नव्यानेच कोकणच्या आसपास आले . यामुळे त्यांना नवातियह हे नाव मिळाले . त्याच्या वंशापैकी मुल्ला अहमद हा विजापूरच्या विश्वस्तापैकी झाला. याजकडे या भागातील तीन परगणे जागीर म्हणून होते. त्याच वेळी पुणे व सुपे असे दोन परगणे शाहू भोसल्यास जागीर म्हणून मिळाले. सीवा आपल्या बापाच्या वतीने या दोन परगण्यांचा काळजीपूर्वक कारभार पाहू लागला . तो आपल्या जातीत धैर्य , बुद्धी, कपट, लुच्चेगिरी इत्यादींबद्दल प्रसिद्ध झाला होता. (११४) उंच उंच डोंगर व दाट अरण्य असलेल्या त्या प्रदेशात त्या मुलखातील जमीनदाराप्रमाणे तो गड व गढ्या बांधू लागला.

इकडे याच सुमारास आदिलखानास एक दुखणे लागून तो पुष्कळ दिवस आजारी पडला . यामुळे त्याच्या राज्यात गोंधळ उत्पन्न झाला . त्यातच मुल्ला अहमद शहाजहानकडे गेला व त्याची फौज कोकणच्या जागीरीतून उठून गेली . तेव्हा सीवा मुलूख निर्णायक आहे असे पाहून धाडसाने व दुष्टपणाने त्यात शिरला व इतर जागीरदारांच्या जागीरीसकट तो त्याने हस्तगत केला . तो त्याचे वंशज त्यांनी पुढे तो मुलूख व सर्व दक्षिण यांमध्ये जी बंडखोरी माजविली तिचा हा आरंभ होय . एखाद्या समृद्ध शहराची किंवा प्रदेशाची त्यास बातमी लागली की , तो लुटी व ताब्यात घेई . त्या बंडखोरीच्या दिवसात जागीरदारांनी विजापूरकडे तक्रार करण्याच्या अगोदरच हा त्या बाबतीत स्वतःचा अर्ज भेट व नजराणा यांसह पाठवी . तो लिही की, 'फलाण्या महालाचा जास्त महसूल येण्याजोगा असता तो जागीरदाराने अथवा जमीनदाराने शिक्षा करण्यालायक गुन्हा केला , यामुळे त्यास तंबी दिली. तो प्रदेश माझ्या ताब्यात दिल्यास काही जास्त पैसा देण्याचे अथवा सर्व वसूल थेट विजापूरला पाठविण्याचे मला कबूल आहे .' यामुळे जहागिरदाराच्या गाऱ्हाण्यांची दाद लागत नसे . (११५) या काळी दक्षिणेत सारखी बंडे उद्भवत . तेथील अधिकारी , रयत व सैनिक भोवतालच्या परिस्थितीमुळे हावरे व मूर्ख बालिश होते . ते आपल्या पायावर आपल्या हातानेच कुऱ्हाड पाडून घेत व आपली मालमत्ता नाशाच्या वाऱ्यावर फेकीत . राजकर्त्यांच्या अधिकारात व्यत्यय आला किंवा त्याचे लक्ष दुसरीकडे लागले म्हणजे अधिकाऱ्यांचा हावरेपणा वाढे . या बंडखोरांच्या इच्छेप्रमाणे त्या प्रदेशाचा अधिकार त्याजकडे आला होता व तो सर्वांत जास्त तापदायक बंडखोर बनला.

तो निवडक मराठे चोरांचे व लुटारूंचे पुष्कळ सैन्य जमवून गड ताब्यात घेऊ लागला . त्यापैकी पहिला चंदन होता. नंतर त्याने इतरही सामग्री नसलेले किंवा असमर्थ व अननुभवी गडकऱ्यांच्या ताब्यात असलेले किल्ले घेतले . सिकंदर अली आदिलखान दुसरा याच्यावेळी विजापुरी राज्यात गोंधळ माजला. कारण त्याच्या कायदेशीरपणाबद्दल शंका घेत. शिवाय तो लहानपणीच बापाचा वारस म्हणून राज्य करू लागला होता.

औरंगजेबाने आपल्या बापाच्या कारकिर्दीत त्या प्रदेशात ज्या हालचाली केल्या त्यामुळे व इतर गोंधळामुळे विजापुरी मुलखातील खराबी व बंडखोरी आणखी वाढली. सीवाने रोजच्या रोज आपले बळ वाढवून त्या प्रदेशातील सर्व गड हस्तगत केले . यामुळे तो सामर्थ्यवान व साधनवान झाला. त्याने मोठे सैन्य व द्रव्य जमवून विजापूर व हिंदुस्थान यांच्या राजावर चढाई केली आणि डोंगर व झाडी यांच्या आश्रयाने लांबवरचा प्रदेश

लुटला व उद्ध्वस्त केला . त्याची मुख्य वसती चाकण व राजगड येथे असे . (११६) एक आरमार उभारून त्याने किल्लेही बांधविले . यामुळे त्याचे चाळीस किल्ले झाले. अन्न व युद्ध यांच्या सामग्रीने हे किल्ले सुसज्जित करून तो सर्वांत मोठा बंडखोर बनला.

(शिवचरित्र वृत्त संग्रह ३, मुन्तखाबुल्लुबाब, ६२ - ६४)]

(१३) शिवाजीचे राज्य, त्याचे सैन्य आणि अर्थव्यवस्था

शिवाजीचे मृत्यूच्या वेळी त्याचे राज्य उत्तरेस रामनगरपासून [सुरत एजन्सीमधील हल्लीचे धरमपूर संस्थान .] दक्षिणेस मुंबई इलाख्यातील कानरा जिल्ह्यातील कारवार अथवा गंगावती नदीपर्यंत पसरलेले होते . यामध्ये पोर्तुगीज मुलखाचा समावेश नव्हता . शिवाजीच्या राज्याच्या पूर्व सीमेने उत्तरेकडे बागलाणाचे टोक गाठले होते , आणि तेथून नाशिक -पुणे जिल्ह्यांच्या मध्यभागातून ही सीमा वेड्यावाकड्या वळणांनी दक्षिणेकडे उतरली होती. यानंतर या सीमेने सर्व सातारा जिल्हा आणि कोल्हापूर जिल्ह्याचा बराचसा भाग वेष्टिलेला होता . यात भर म्हणून शिवाजीने नुकताच कायमपणे आपल्या राज्याला जोडलेला पश्चिम कर्नाटक अथवा कानडी भाषिकांचा मुलुख . हा प्रदेश बेळगाव जिल्ह्यापासून मद्रास इलाख्याच्या बेलदारी जिल्ह्याच्या लगतच असलेल्या तुंगभद्रा नदीच्या किनाऱ्यापर्यंत पसरलेला होता.

शिवाजीने आपल्या मृत्यूच्या अगोदर नुकताच जिंकलेला प्रदेश म्हणजे कोप्पलच्या पलीकडील तुंगभद्रेपासून वेल्लोर आणि जिंजीपर्यंत पसरलेला होता . यामध्ये हल्लीच्या म्हैसूर राज्याचे उत्तर , मध्य आणि पूर्व विभाग , मद्रास इलाख्यातील बेल्लारी , चित्तूर आणि अर्काट जिल्ह्यांचे काही भाग इतका प्रदेश मोडत होता. हा प्रान्त तसे म्हटले तर शिवाजीच्या सैन्याने व्यापला होता . इ. स. १६८० पर्यंत या प्रांतात स्थिरस्थावर झालेली नव्हती.

शिवाजीच्या राज्यातील त्याच्या संपूर्ण ताब्यात असलेला अथवा त्याचा संपूर्णतः अंमल असलेल्या मुलुखाव्यतिरिक्त असा एक मोठा आणि दूरवर पसरलेला जमिनीचा पट्टा होता की ज्यामध्ये त्याच्या सत्तेला मान्यता होती. परंतु जेथे त्याचे सार्वभौमत्व नव्हते , अशा प्रदेशामध्ये शक्य तेवढ्या नियमितपणे त्याचे सैन्य वर्षाकाठी आक्रमण करी आणि त्यामधून खंडणी गोळा करी . अशा तऱ्हेने त्याला देण्यात येणाऱ्या द्रव्याला **चौथ** म्हणत कारण त्याठिकाणचा सरकारने ठरविलेला जो जमाबंदीचा वसूल असे , त्याच्या चौथ्या हिश्शाएवढी ही रक्कम होई. एखाद्या ठिकाणाहून अशा तऱ्हेने चौथाईची रक्कम वसूल केल्यानंतर त्याठिकाणी मराठ्यांचे सैन्य आणि मुलकी अधिकारी यांचा नको असलेला उपद्रव लोकांना सहन करावा लागत नसे . अशा प्रदेशावर परकी आक्रमण झाल्यास अथवा तेथील अंतर्गत शांतता बिघडल्यास त्या प्रदेशाचे रक्षण करण्याची कोणत्याही प्रकारची जबाबदारी अनुषंगाने शिवाजीवर पडत नसे . त्याचा दरबारी लेखक सभासद याने शिवाजीच्या राज्याच्या वसुलाची रक्कम एक कोटी होन एवढी दिलेली आहे . ज्यावेळी चौथाईची संपूर्ण रक्कम वसूल होई त्यावेळी वरील उत्पन्नात आणखी ८० लाख होनांची भर पडत असे.

मराठा सैन्य आणि चौथाई

परकीय राज्यांच्या मुलुखातून प्रतिवर्षी त्याला लागणारी रसद आणि सामग्री ही आपले सैन्य पाठवून मिळविण्याचे शिवाजीचे स्थायी धोरण होते. 'पावसाळ्यामध्ये म्हणजे जूनपासून सप्टेंबर महिन्यापर्यंत शिवाजीचे सैन्य छावणीसाठी आपल्या राज्यात जात असे . ऑक्टोबरच्या सुरुवातीला दसऱ्याच्या दिवशी हे सैन्य आपल्या राजाने नेमून दिलेल्या प्रदेशावर आक्रमण करण्यासाठी छावणीमधून बाहेर पडे . आठ

महिनेपर्यंत या सैन्याने आपली गुजराण परदेशी मुलुखात करावयाची असे . त्याचप्रमाणे अशा मुलखात त्यांनी खंडणी वसूल करावी अशी आज्ञा त्यांना दिली जाई . सैन्याबरोबर स्त्रिया, गुलाम अथवा नर्तकी न नेण्याबद्दल शिवाजीचे आपल्या सैन्याला अतिशय सख्त हुकूम असत . या हुकमाचा भंग करून एखाद्या शिपायाने आपल्याबरोबर दासी अगर नर्तकी नेल्यास त्याचा शिरच्छेद करण्यात येई . युद्धामध्ये स्त्रिया आणि मुले यांना कैद करण्यात येत नसे . फक्त पुरुषांनाच युद्धकैदी करण्यात येई . ब्राह्मणांना कोणताही त्रास दिला जात नसे अथवा खंडणीदाखल ओलीस म्हणून धरण्यात येत नसे . परदेशी मुलुखातून स्वराज्यात परतल्यावर प्रत्येक शिपायाला आपली लूट सरकार दरबारी जमा करावी लागत असे.

(१४) शिवाजीच्या कारभाराचे केंद्रीय स्वरूप

शिवाजी आपल्या राज्याचा कारभार अष्टप्रधानांच्या सल्ल्याने आणि मदतीने करीत असे . हे अष्टप्रधान म्हणजे (१) **पेशवा** अथवा मुख्य प्रधान (प्रधानमंत्री), (२) **मुझुमदार** अथवा अमात्य (मुख्य हिशेबतपासनीस), (३) **बाकेनवीस** अथवा मंत्री – याच्याकडे राजाच्या दैनंदिन व्यवहाराची आणि दरबारात घडलेल्या प्रसंगांची नोंद ठेवण्याचे काम असे, (४) **सूरनीस** अथवा **सचिव** (पत्रव्यवहाराचा मुख्य अधिकारी, (५) **डबीर** अथवा **सुमंत** (परदेश मंत्री आणि बातमीखात्याचा प्रमुख), (६) **सरनोबत** अथवा सेनापती (लष्कराचा मुख्य अधिकारी), (७) **पंडितराव** (फारशीमधील **सूद** आणि **मुहतसीब** ही दोन अधिकारपदे पंडितरावाच्या ठिकाणी एकवटलेली होती .) या अधिकाऱ्याकडे धार्मिक प्रश्न आणि जातीमधील भांडणे याबाबत निवाडा देणे , पाखंडी आणि धर्मनिंदकांना शिक्षा लावणे आणि राजाने दान करण्यासाठी काढून ठेवलेल्या द्रव्यातून विद्वान ब्राह्मणांना बक्षिसी देणे ही कामे होती , (८) **न्यायाधीश** अथवा न्यायदान खात्याचा प्रमुख एक सेनापती सोडल्यास बाकीचे सर्व मंत्री जातीने ब्राह्मण होते . जरूर पडल्यास पहिल्या सहा अधिकाऱ्यांनादेखील सैन्याचे नेतृत्व पत्करावे लागे. राज्याच्या पत्रव्यवहाराचे प्रत्यक्ष काम प्रभु जमातीची माणसे बघत असत . त्यांच्यापैकी बहुतेकांना पर्शियन भाषेचे उत्तमपैकी ज्ञान असे . सैन्याच्या पगाराच्या हिशेबाचे काम **सबनीस** या अधिकारी वर्गाकडून केले जाई . फारशी भाषेत या अधिकाऱ्याला **बक्षी** असे म्हणत.

परंतु या आठ मंत्र्यांचे मण्डळ म्हणजे कोणत्याही अर्थाने हल्लीच्या भाषेतील मंत्रिमंडळासारखे नव्हते. त्यांची भूमिका राजाचे निव्वळ **सचिव** एवढ्यापुरतीच मर्यादित असे . त्यांना आपल्या हिमतीने कोणतीही गोष्ट करता येत नसे ; किंवा राजीनाम्याची धमकी देऊन आपल्या धोरणाप्रमाणे एखादी गोष्ट राजाला करावयास भाग पाडण्याचेही त्यांना सामर्थ्य नसे . ज्यावेळी राजाची मर्जी लागे त्या वेळी त्याला निव्वळ सल्ला देणे एवढेच त्यांचे काम असे , तर इतर वेळी राजाच्या सर्वसाधारण आदेशांचे पालन करणे आणि आपापल्या खात्यांच्या कारभारावर देखरेख करणे एवढेच त्यांचे काम असे . इतर सात प्रधानांपेक्षा पेशव्याचे स्थान हे अधिक मानाचे असे . परंतु कोणत्याही बाबतीत ते त्याच्यापेक्षा दुय्यम नसत . ब्रिटिश मंत्रिमंडळात जी एकजूट होती आणि मंत्रिमंडळाचे जे सामर्थ्य होते त्याचा मराठ्यांच्या मंत्रिमंडळात अभाव होता. १४ व्या लुईप्रमाणे किंवा फ्रेड्रिक द ग्रेटप्रमाणे शिवाजीने राज्यकारभाराची सर्व सूत्रे आपल्या हाती ठेवलेली होती.

(१५) शिवाजीचे चारित्र्य आणि त्याचे इतिहासातील स्थान

शिवाजीने आपले कार्य सिद्धीस जाण्यासाठी योजलेल्या उपायांचे नैतिक मूल्यमापन कसेही केले

तरी त्याने संपादन केलेले विजय म्हणजे डोळे दिपविणारी वस्तुस्थिती होती , यात काही संशय नाही. एका जहागीरदाराचा हा मुलगा मोगल साम्राज्य आणि त्याची प्रचंड शक्ती यांचा अतिशय कट्टर असा शत्रू बनला. शिवाजीला वठणीवर कसे आणावे या एकाच विचाराने औरंगजेब चिंताग्रस्त झाला . कारण दक्षिणेमध्ये या कामी त्याच्या मोठमोठ्या सेनापतींना अपयश आल्याचे त्याला दिसून आले हेते.

हिंदूच्या छळाला त्या काळी पुन्हा एकदा सुरुवात झाली होती . साहजिकच सारा हिंदू समाज शिवाजीकडे एका नूतन आशेचा किरण आणि आपल्या धर्माचा संरक्षणकर्ता या दृष्टीने पाहात होता.

शिवाजीचे खाजगी जीवन म्हणजे चारित्र्यवान् आणि नीतिमान् व्यक्तीच्या जीवनाचा एक आदर्श होते. त्याच्या अंगी जाज्वल्य पितृभक्ती होती , त्याचे आपल्या मुलांवर अतिशय प्रेम होते –आणि पति म्हणून तो एक आदर्श होता . अगदी लहानपणापासून तो कट्टर धार्मिक होता – किंबहुना जन्मतःच आणि शिक्षणाच्या संस्कारामधून त्याची वृत्ती तशी बनली होती . सबंध आयुष्यभर तो कोणत्याही गोष्टीच्या आहारी गेला नाही , दुर्गणांपासून तो अलिप्त राहिला आणि सज्जनांना त्याने नेहमीच मान दिला . ज्या धर्माचा तो पुरस्कर्ता होता , त्या धर्माचे औदार्य त्याच्या अंगी पुरेपूर बाणलेले होते . याचे उदाहरण म्हणजे सर्व धर्मातील, मग ते हिंदू असोत अगर मुसलमान असोत , आचरणाने शुद्ध असलेल्या व्यक्तींना तो मनात कोणत्याही तऱ्हेचा विकल्प न ठेवता आदर दाखवीत असे . स्त्रियांच्या बाबतीतला त्याचा दिलदारपणा आणि आपल्या छावणीत नीतिनियमांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबतचा त्याचा कटाक्ष या गोष्टी म्हणजे त्या काळातले एक आश्चर्यच होते. शिवाजीचा अतिशय कट्टर असा टिकाकार खाफीखान यानेही शिवाजीच्या या गुणांची अतिशय मुक्त कंठाने स्तुती केलेली आहे.

जन्मजात पुढाऱ्याच्या अंगी असलेली असीम आकर्षणशक्ती शिवाजीच्या व्यक्तिमत्त्वात होती . ज्या ज्या व्यक्ती त्याच्या सान्निध्यात येत , त्यांच्यावर त्याची मोहिनी पडे . देशामध्ये जी जी काही उत्कृष्ट माणसे होती त्या सर्वांना त्याने आपल्याकडे खेचून घेतले . त्याच्या सर्व अधिकाऱ्यांनी आपल्या प्राणांची कदर न करता त्याची सेवाचाकरी केली . त्याला मिळालेले डोळे दिपविणारे विजय आणि त्याच्या तोंडावर सदा विलसत असलेले स्मित हास्य यामुळे तो आपल्या सैनिकांचा जीव की प्राण बनला . त्याच्या अंगी माणसाची पारख करण्याचा जो राजाला शोभणारा असा गुण होता , त्यातच त्याच्या विजयाचे सारे गमक साठविलेले होते. त्याने आपल्या सेनापतींची आणि सुभेदारांची आणि त्याचप्रमाणे मुत्सद्यांची आणि सचिवांची केलेली निवड ही कधीही चुकत नसे . त्याच्या सैन्याची संघटना म्हणजे कार्यक्षमतेचे उत्कृष्ट उदाहरण होते . मोहिमेसाठी लागणाऱ्या वस्तूंची अगोदरच तरतूद केली जाई आणि सामानसुमानाची व्यवस्था योग्य अशा अधिकाऱ्यांकडे सोपविली जाई . त्याचे हेरखाते अतिशय उत्कृष्ट होते . त्यामुळे ज्या प्रांतावर त्याला मोहीम काढावयाची असे त्यामधील इत्यंभूत बातमी अगोदरच त्याला त्याच्या हेरखात्याकडून पुरविली जाई . त्याच्या सैन्याच्या तुकड्या स्वेच्छेनुसार दूरदूरच्या प्रदेशांत संघटितपणे अगर विभागून आपापली कारवाई करीत. त्यामध्ये त्यांना कधीही अपयश येत नसे . शत्रूने केलेला पाठलाग अगर निर्माण केलेले अडथळे यांना यशस्वीरित्या तोंड दिले जाई , आणि तरी देखील मिळालेली लूट अतिशय झपाट्याने आणि सुरक्षितपणे कसलेही नुकसान न होता स्वदेशात पोहोचविली जाई . शिवाजीच्या अंगी लष्करी बाणा जन्मजात होता . याला पुरावा म्हणजे त्याने त्याच्या हाताखाली लढणाऱ्या शिपायांच्या जातिविषयक गुणाला शोभेल अशी , त्याच्या हाताखालील प्रदेशाच्या स्वाभाविक गुणाला साजेल अशी , त्या काळातील उपलब्ध शस्त्रसामग्रीला धरून आणि शत्रूच्या अंतर्गत परिस्थितीला मारक ठरेल अशी युद्धपद्धती स्वाभाविकतयाच अंगीकारीली. अतिशय जलदगतीने मजल करणाऱ्या त्याच्या पायदळाचा त्याच्या हलक्या

घोडदळाबरोबर मिलाफ झाल्याने मजबूत झालेला त्याचा सेनासंभार औरंगजेबाच्या काळात अजोड आणि अजिंक्य ठरला.

परंतु शिवाजीचे खरे मोठेपण हे त्याच्या चारित्र्यात आणि परिस्थितीनुरूप त्याच्या अंगी असलेल्या कर्तृत्वात होते. याबाबत त्याने दखविलेली कल्पनेची अपूर्वाई अथवा भविष्यकाळात राजकारणाच्या घडीचा पालटणारा रंग आणि त्याबाबत त्याने बांधलेले अंदाज यांनी त्याला मोठा केले , असे म्हणणे योग्य ठरणार नाही. दुसऱ्याच्या स्वभावातील खोलीचे मोजमापन अचूक रीतीने करण्याची त्याची हुशारी , राज्यकारभाराबाबत दिसून येणारी त्याची कार्यक्षमता , प्राप्त परिस्थितीत आपल्या फायद्याचे काय आहे आणि कोणती गोष्ट कृतीत उतरविणे शक्य आहे हे जाणण्याबाबत त्याच्या अंगी जन्मजात असलेली अनाकलनीय शक्ती हीच त्याच्या जीवनात त्याला यश मिळवून देण्यास कारणीभूत ठरली . त्याच्या जीवनातील चिरकाल टिकणारी कामगिरी म्हणजे विखुरलेल्या मराठ्यांना एकत्र आणून त्याने त्यांच्यातून राष्ट्राची जी निर्मिती केली ही होय . त्याने आपल्या पुढील पिढीला दिलेला अमोल ठेवा म्हणजे जनतेच्या जीवनात त्याने निर्माण केलेले राष्ट्रप्रेमाच्या ज्योतीचे स्फुल्लिंग हा होय , आणि त्याने ही जी सर्व कामगिरी पार पाडली ती मोगल साम्राज्य , विजापूर, हिंदुस्थानातील पोर्तुगीज आणि जंजिऱ्याचे सिद्दी या चार प्रबल सत्तांकडून झालेल्या कणखर प्रतिकारांवर मात करूनच.

अर्वाचीन कालखंडात दुसऱ्या कोणत्याही हिंदूने अशा तऱ्हेची विधायक अर्थाची बुद्धिमत्ता दाखविलेली नाही. त्याने आपल्या स्वतःच्या उदाहरणाने असे सिद्ध केले की हिंदू जमात ही राष्ट्र निर्माण करू शकते , राज्याची उभारणी करू शकते आणि शत्रूचा पराजय करू शकते . इतकेच नव्हे तर स्वतःचे संरक्षण करण्याचे सामर्थ्यही त्यांच्या अंगात आहे . त्याचप्रमाणे वाङ्मय आणि कला , व्यापार आणि उद्योगधंदे यांना संरक्षण देण्याचे आणि त्यांची भरभराट करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात आहे हेही त्याने दाखवून दिले. मराठे आपले आरमार राखू शकतात , सागरात व्यापारासाठी दूरवर गमन करणारे नौकादल ते निर्माण करू शकतात आणि परदेशी सत्तांबरोबर त्यांच्या बरोबरीने सागरी युद्धे ते खेळू शकतात हेही त्याने दाखवून दिले. मध्य युगातून बाहेर पडलेल्या हिंदूला आपल्या व्यक्तिमत्त्वाची सर्वांगीण प्रगतीची झेप कशी घेता येईल याचीही शिकवण शिवाजीने त्याला दिली.

●●●

प्रकरण बारावे

विजापूरच्या राज्याला लागलेली उतरती कळा आणि विजापूरचा नाश

(१) जयसिंगाची विजापूरवरील स्वारी , १६६५–१६६६ [विजापूरबरोबर मोगलांचे जे युद्ध झाले त्याची कारणमीमांसा पुढे दिली आहे : दक्षिणेच्या सुभेदारीवर जयसिंगाची नेमणूक करताना औरंगजेबाने त्याला शिवाजी व विजापूरचा सुलतान या दोघांचा मोड करण्याबद्दल लिहिले होते . परंतु या दोघांवर एकाच वेळी हल्ला करणे अदूरदर्शीपणाचे होईल , असे सांगून जयसिंगाने प्रथम शिवाजीकडे मोर्चा वळविला होता (**एच्. ए,** ६८ अ). आता पाळी विजापूरच्या आदिलशहाची होती.

विजापूरच्या आदिलशहाच्या अनेक चुका होत्या . ऑगस्ट १६५७ च्या तहाप्रमाणे त्याने मोगल बादशहाला १ कोट रु . खंडणी, परंडा किल्ला आणि निजामशाही कोकण देण्याचे कबूल केले होते . परंतु शहाजहानचे आजारीपण आणि नंतर झालेले वारसाहक्काचे युद्ध याचा फायदा घेऊन त्याने या अटी पाळल्या नव्हत्या . अर्थात् औरंगजेबाच्या राज्यारोहणाच्या वेळी या खंडणीचा एक भाग म्हणून त्याने ८ ॥ लक्ष रु . दिले होते आणि नंतर १६६५ , च्या जानेवारीमध्ये त्याने ७ लक्ष रु . आणि रत्नांनी भरलेल्या ६ पेट्या नजर केल्या होत्या ही गोष्ट खरी होती . तरी देखील ठरलेल्या खंडणीच्या मानाने या भेटी म्हणजे काहीच नव्हत्या . १६६० च्या नोव्हेंबरमध्ये मोगलांनी परंड्याचा किल्ला आपल्या ताब्यात घेतला होता . परंतु तो आदिलशहाने दिला नव्हता तर तेथील किल्लेदाराला लाच देऊन त्यांनी किल्ल्याचा ताबा घेतला होता.

१६६० मध्ये आदिलशहाने शिवाजीवर हल्ला केला तेव्हा त्याने मोगलांची मदत मागितली . औरंगजेबाने ती देऊ केली . परिणामी आदिलशहाने पन्हाळा, पावनगड वगैरे किल्ले मराठ्यांपासून जिंकून घेतले. परंतु ठरलेली खंडणी मात्र त्याने दिली नाही. इतकेच नव्हे तर आपणच त्या वेळी शायस्ताखानाला मदत केली असा दावा मांडून खंडणी मधील १० लक्ष रुपये त्याने कमी करून घेतले . १६६५ मध्ये जयसिंगाच्या मोहिमेच्या वेळी त्याने आपले सैन्य खवासखानाच्या हाताखाली पाठविले . परंतु त्याला या सैन्याबद्दल कधीच खात्री नव्हती . एका पत्रात तो म्हणतो आदिलखानाने सैन्य पाठविले हे खरे परंतु शिवाजीचा पूर्ण नाश होणे हे त्याला धोक्याचे वाटत होते . म्हणून त्याने शिवाजीशी तह करून त्याला सर्व साहाय्य केले. गोवळकोंड्याच्या सुलतानालाही त्याने अशाच तऱ्हेचे धोरण शिवाजीबरोबर स्वीकारण्यास प्रवृत्त केले. एकीकडे मात्र तो बादशहाकडे निष्ठेची पत्रे पाठवतच राहिला. (**ए. एन्.**, ९१०, ९१३, ३९७; **एच्. ए.**, ६६ अ, ७९ अ, ७० अ; **बी. एस.**, ३९९-४०१) अर्थात् खरी गोष्ट अशी होती की अकबराच्या वेळेपासून मोगल सरकारचा उद्देश दक्षिणेचा अंतर्भाव आपल्या साम्राज्यात करण्याचा होता . १७ व्या शतकातील भारतीय राजनीतीचे हे सूत्र विजापूर आणि गोवळकोंडा यांचे सुलतान सहजासहजी कधीच विसरू शकले नाहीत . साहजिकच शिवाजीचा संपूर्ण नाश करण्याच्या कोणत्याही योजनेत त्यांना मनःपूर्वक सामील होणे शक्य झाले नाही.

मोगलांच्या खऱ्या उद्देशाची कल्पना जयसिंगाने औरंगजेबाला जो गुप्त खलिता पाठविला त्यावरून येते . तो म्हणतो विजापूरचा पाडाव म्हणजे दक्षिण आणि कर्नाटक जिंकून घेण्याची नांदी आहे . शिवाजीबरोबरचे युद्ध संपल्यानंतर जयसिंगाच्या हाताखाली जमा झालेल्या प्रचंड सैन्याला कोठल्या तरी मोहिमेत गुंतविणे आवश्यक होते. विजापूरवरील हल्ला म्हणजे अशा तऱ्हेने या सैन्याला गुंतविण्याचा एक मार्ग होता (**एच्. ए.,** ९० अ, ७४ अ; **ए. एन्.**, ९१३).]

विजापूरच्या स्वारीची कारणे

विजापूरच्या सुलतानाबद्दल औरंगजेबाच्या मनात अढी निर्माण होण्यास भरपूर जागा होती . शहाजहानच्या मृत्यूनंतर मोगल सिंहासनासाठी जे कलह झाले त्याचा फायदा घेऊन आदिलशहाने ऑगस्ट १६५७ रोजी मोगलांबरोबर झालेल्या तहाच्या अटीनुसार वागण्याची टाळाटाळ केली . जयसिंगाची शिवाजीवर मोहीम चाललेली असताना त्याला असे आढळून आले की , विजापूर सरकारने शिवाजीबरोबर तह केलेला असून त्याला आपल्या मुलखाचा उपयोग करू देणे , द्रव्य देणे , आणि इतर हरेक प्रकारची कुमक देऊ केलेली आहे . १६६५ च्या जूनमध्ये शिवाजीबरोबर चाललेले मोगलांचे युद्ध संपले होते . शिवाजीबरोबर लढा देण्यासाठी दक्षिणेमध्ये जयसिंगाच्या हाताखाली जमा झालेले प्रचंड सैन्य आता मोकळे झालेले होते. या सैन्याला पोषक अशा रितीने गुंतविण्याचा मार्ग शोधणे जरुरीचे होते . विजापूरवरील स्वारी म्हणजे मोगल सैन्याला अशा तऱ्हेने गुंतवून ठेवण्याचा एक उत्कृष्ट मार्ग होता.

पुरंदरच्या तहात जयसिंगाने जी उत्कृष्ट मुत्सद्देगिरी दाखवली त्याचा परिणाम शिवाजीची

विजापूरपासून फारकत करण्यात झाला. इतकेच नव्हे तर या तहामुळे दोन्ही राज्यांत कलहाचे बीज पेरले गेले. मोगलांच्या विजापूरवरील योजलेल्या या स्वारीत शिवाजीने त्याला मदत करण्याचे वचन दिले, आणि त्याप्रमाणे मोगलांचा **मनसबदार** या नात्याने आपला मुलगा संभाजी याच्या हाताखाली दोन हजार घोडेस्वार आणि आपल्या स्वतःच्या हाताखाली ७ हजार उत्तमपैकी पायदळी फौज घेऊन येण्याचे शिवाजीने कबूल केले (**एच. ए.**, ७७ ब, ७९ अ).

जयसिंगाची कारस्थाने

जयसिंगाने विजापूरच्या अनेक माण्डलिक संस्थानिकांबरोबर कारस्थाने केली आणि त्यांच्याबरोबर पत्रव्यवहार करून दिल्लीपतीच्या हाताखाली त्यांना चाकरी देऊ केली. [जयसिंगाने विजापूरच्या अनेक जमीनदारांना बादशहाच्या हाताखाली चाकरी देण्याची आश्वासने देऊन आपल्याकडे ओढून घेण्याचा प्रयत्न केला. आदिलशहाने या गोष्टीचा निषेध केला. तेव्हा जयसिंगाने उत्तर दिले की 'आमच्या सेवेत येण्याची जे जे इच्छा दाखवितात त्यांना अशा तऱ्हेची सलोख्याची पत्रे पाठविण्याची मोगल सुभेदारांची प्रथा आहे.' कर्नाटकमधील जमीनदार आणि कुर्नुल जिल्ह्यातील हबशी यांनी विजापूर सुलतानाविरुद्ध उघडउघड स्वातंत्र्य पुकारले होते. त्यांना जयसिंगाकडून मोठमोठी प्रलोभने दाखवून मोगलांना येऊन मिळण्याचे आवाहन केले गेले. त्याने जंजिऱ्याच्या शिद्दीला लिहून आपल्याबरोबर एकजूट करण्यास कळविले आणि मोबदल्यात मोगल दरबारातील उमरावपद देऊ केले. त्याबरोबरच त्याने आदिलशहाबरोबर कारस्थाने करून शिद्द्यांचा नाश करण्याची योजना आखली (**एच्. ए.**, ७७ ब, ७९ अ).

विजापूरचे वजीर व सेनापती यांना देखील वश करून घेण्याचे जुने धोरण जयसिंगाने मोठ्या जोमाने पुढे चालविले आणि त्यासाठी त्याने पैशाची पर्वा केली नाही. युद्धासाठी जो प्रचंड खर्च येणार होता त्याकरिता बादशहाच्या मनाची तयारी व्हावी म्हणून जयसिंगाने त्याला लिहिले की, आदिलशाही मुलुखात आपले सैन्य शिरताच अनेक दक्षिण्यांना आपल्या सैन्यात सामील करून घ्यावे लागेल आणि सैन्याची जमवाजमव करणे आणि सैन्याला शस्त्रे पुरविणे यासाठी प्रत्येकाला त्याच्या दर्जाप्रमाणे द्रव्य देणे भाग पडेल. विजापूरचा पाडाव होईपर्यंत अशा तऱ्हेने पैसा खर्च करणे जरूर आहे. त्यानंतर आपला पैसा वसूल होईल अशी मला आशा आहे (**एच्. ए.**, ७४ ब).] विजापूरचे वजीर आणि सेनापती यांना आपल्या बाजूला वळविण्याचे मोगलांचे जुने धोरण त्याने मोठ्या तडाख्याने पुढे चालविले आणि यासाठी त्याने खर्चाची यत्किंचितही पर्वा केली नाही. या धोरणाला पहिला बळी पडला तो विजापूरचा सुप्रसिद्ध सरदार आणि विजापूरच्या सरदारात दुसरे मानाचे स्थान असलेला अमीर मुल्ला अहमद हा होय. कोकणामध्ये स्थायिक झालेल्या अरबांच्या नवायत जमातीपैकी हा एक होता. १६६५ च्या सप्टेंबर महिन्याच्या एकोणतीस तारखेला तो जयसिंगाला येऊन मिळाला. मोगल उमरावांमध्ये त्याला ताबडतोब ६ हजारी **मनसबदार** करण्यात आले. परन्तु दिल्लीच्या वाटेवर असतानाच तो आजारी पडला आणि १८ डिसेंबरच्या सुमारास तो मरण पावला (**ए. एन.** ९२५; **एच., ए.**, ७२ अ, ७६ ब, ८० अ).

मुत्सद्देगिरीत जयसिंगाचा हात धरणारा कोणी नव्हता. विजापूरवरील मोहिमेला सुरुवात करण्याच्या अगोदर जयसिंगाने कुटिल नीतीचा अतिशय चातुर्याने उपयोग केला. विजापूरवर स्वारी करण्याबाबत बादशहाकडून आपल्याला कोणतीही आज्ञा नाही असे त्याने भासविले आणि आदिलशहाच्या मनात खोट्या सुरक्षिततेची भावना निर्माण करण्याचा त्याने प्रसन्न केला. त्याचप्रमाणे त्याने कुतुबशहाकडे मैत्रीबाबतच्या वाटाघाटी करून विजापूरबरोबर होणाऱ्या आगामी युद्धात तटस्थ राहण्यासंबंधी त्याचे मन वळविण्याचा प्रयत्न केला (**एच्. ए.**, ७२ अ).

विजापूरवर लढाई

अखेर विजापूरवरील आक्रमणाची पूर्ण तयारी झाली. १६६५ च्या नोव्हेंबर महिन्याच्या एकोणीस तारखेला जयसिंगाने पुरंदर किल्ल्याच्या पायथ्यापासून कूच केले. त्याच्या हाताखाली ४० हजार मोगल सैन्य आणि त्याशिवाय नेताजी पालकरच्या अधिपत्याखाली दोन हजार मराठा घोडेस्वार आणि ७ हजार पायदळ एवढा

सेनासंभार होता. [जयसिंगाचे सैन्य किती होते यासंबंधी वेगळे वेगळे अंदाज देण्यात आलेले आहेत . **ए. एन्**, ९८८ मध्ये जयसिंगाजवळ ३५००० पेक्षा अधिक घोडेस्वार होते असे विधान आहे . मनुची (**आय्. आय्**. १४१) ही संख्या ५०००० अशी देतो . दिलकुशामध्ये (पा. ५५) ही संख्या ६१००० अशी आहे. **बी. एस्**. मध्ये (पा. ४०५) जयसिंगाजवळ ७०००० घोडेस्वार व अनेक अहशाम होते असे दिले आहे . खाफीखान (भाग २. १९१) ही संख्या २५००० एवढी देतो . जयसिंगाबरोबर मराठा घोडेस्वारांची एक तुकडी होती असे **एच्. ए.**, ८१ अ मध्ये आहे . शिवाजी हा अतिशय उत्कृष्ट सेनापती असल्याचे जयसिंगाचे मत होते , आणि या बाबतीत त्याने बादशहाला लिहिले की , विजापूरच्या मोहिमेत शिवाजीचे सर्वतोपरी साहाय्य होण्यासारखे आहे. या मोहिमेत तो असणे हे अतिशय जरूर आहे . खाफीखानाने देखील शिवाजीच्या उपयुक्ततेबद्दल ग्वाही दिली असून तो म्हणतो की, शिवा आणि नेताजी यांचा किल्ले काबीज करण्यामध्ये कोणीही हात धरू शकणार नाही . (भाग २ . १९२).] मोहिमेच्या पहिल्या महिन्यात कोणत्याही तऱ्हेचे अडथळे न येता जयसिंगाला नेत्रदीपक असे विजय प्राप्त होत गेले . विजापूरच्या वाटेवरील फलटण , थातवड, खटाव आणि अखेर मंगळवेढा (विजापूरच्या उत्तरेस फक्त ५२ मैलांवर) हे किल्ले मोगलांच्या हल्ल्यासमोर तेथील शिबन्दीने खाली केले किंवा शरण येऊन त्यांचा मोगलांकडे ताबा दिला . शत्रू बरोबरील पहिली लढाई २५ डिसेंबर रोजी झाली . त्या दिवशी दिलेरखान आणि शिवाजी यांच्या हाताखालील एक तुकडी बादशाही छावणीपासून १० मैल कूच करून गेली . तिची गाठ विजापूरच्या १२ हजार सैनिकांबरोबर पडली. विजापूरी सेनेचे अधिपत्य शारजाखान आणि खवासखान हे दोन सुप्रसिद्ध सेनापती आणि त्यांचे मराठा दोस्त कल्याणीचा जाधवराव व शिवाजीचा सावत्रभाऊ व्यंकोजी याजकडे होते . **पहिली चकमक , २५ डिसेंबर , १६६५ :-** दिल्लीच्या अवजड घोडदळाचा मारा दक्षिणी फौजांनी मोठ्या कौशल्याने चुकविला आणि आपल्या सैन्याच्या चार तुकड्या करून आणि फुटकळपणाने लढा देत , कोसाक स्वारांच्या लढाईच्या पद्धतीचा अवलंब करीत त्यांनी बादशाही फौजेला हैराण करून सोडले . बराच काळ लढाई चालल्यानंतर दिलेरखानाने आपल्या अविरत परिश्रमाने आणि धैर्याने शत्रूवर वारंवार हल्ले चढवून त्यांचा मोड केला . रात्र पडल्यावर शत्रूने माघार घेतली . परन्तु विजयी मोगल फौजांनी परत फिरण्यासाठी कूच करण्यास सुरुवात केली नाही तोच सहजासहजी निसटून जाण्याचे कसब अंगी असलेल्या शत्रूने मोगल सैन्यावर पुन्हा हल्ला चढविला आणि त्यांच्या दोन बाजू आणि पिछाडी झोडपून काढली . दुसऱ्या दिवशी सकाळी २४ डिसेंबर रोजी शारजाखान सहा हजार घोडेस्वार घेऊन झपाट्याने कूच करीत मंगळवेढ्याच्या किल्ल्याजवळ येऊन पोहोचला . किल्ल्याचा मोगल फौजदार सरफराजखान हा जयसिंगाची आज्ञा न जुमानता शारजाखानाशी लढण्याकरिता किल्लेयाबाहेर पडला . झालेल्या लढाईत तो ठार मारला गेला. त्याचे उरलेले सैन्य किल्ल्याकडे पळून गेले.

विजापूरजवळ जयसिंगाची प्रगती रोखली

दोन दिवसांच्या मुक्कामानंतर जयसिंगाने पुन्हा कूच करण्यास सुरुवात केली . २८ डिसेंबर रोजी शत्रूबरोबर त्याची पुन्हा एकदा लढाई झाली . दक्षिणी घोडेस्वारांनी आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे मोगलांना गराडा घालण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आपल्या फौजेची अनेक तुकड्यांत विभागणी केली आणि आपल्यासमोर असलेल्या शत्रूंवर , त्यांच्यामध्ये दुर्बलतेचे थोडेसे चिन्ह दिसताच अगर त्यांची घडी विस्कटल्याचे समजताच हल्ला करण्यास सुरुवात केली . सरतेशेवटी मोगलांनी प्रतिहल्ला चढविला. त्यांच्या माऱ्यापुढे दक्षिणी फौजांनी माघार घेतली . दक्षिणी फौजांचा ६ मैलांपर्यंत पाठलाग करण्यात आला . परन्तु हा पाठलाग चालू असताना त्यांनी पळापळीची लढाई चालू ठेवली . दुसऱ्या दिवशी २९ डिसेंबर रोजी विजापूरपासून १२ मैलांवर जयसिंग येऊन पोहोचला . जयसिंगाने जी आघाडी मारली त्यातील हा त्याचा शेवटचा पल्ला ठरणार होता . कारण या सुमारास विजापूरचा सुलतान दुसरा अली आदिलशहा याची लष्करी तयारी पूर्ण झाली असून विजापूर शहर आणि आजूबाजूचा मुलूख हल्ला झाला असता अजिंक्य होईल अशा रितीने मजबूत करण्यात आला होता . या प्रदेशाच्या संरक्षणासाठी ठेवण्यात आलेल्या सैन्यात ३० हजार कर्नाटकी पायदळाची भर घालण्यात आलेली होती . लढाई खेळण्यात अतिशय वाकबगार अशी या सैनिकांची ख्याती होती . त्याशिवाय आजूबाजूचा जवळजवळ ६ मैलाच्या परिघातला मुलूख अतिशय

पद्धतशीरपणे ओसाड करण्यात आला होता . नवरसपूर आणि शहापूर या दोन मोठ्या तलावांतील पाणी आटवून ते कोरडे करण्यात आले होते. आजूबाजूच्या प्रदेशांतील सर्व विहिरी माती भरून बुजवून टाकण्यात आल्या होत्या. प्रत्येक इमारत भुईसपाट करण्यात आली होती , आणि प्रत्येक झाड तोडण्यात आले होते . परिणामी आक्रमण करणाऱ्या सैनिकांना निवारा मिळेल अशी एक देखील हिरवी फांदी अगर सावली देणारी भिंत उभी ठेवण्यात आलेली नव्हती . याच सुमारास विजापूरचे दोन सुप्रसिद्ध सेनापती शारजाखान आणि सिद्दी मसूद यांना निवडक फौज देऊन बादशाही मुलखावर आक्रमण करण्यासाठी आणि जयसिंगाच्या पिछाडीला विजापुरी हल्ल्याची हूल उठविण्यासाठी रवाना करण्यात आले , तर विजापूरच्या मुख्य सैन्याने जयसिंगाच्या छावणीभोवती घिरट्या घालण्यास सुरुवात केली.

विजापूर शहराच्या संरक्षणाची फारशी व्यवस्था नाही आणि अन्तर्गत कलहाने विजापूरचे राज्य खिळखिळे झाले आहे अशा परिस्थितीत विजापूरवर हल्ला करण्याच्या या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा असे जयसिंगाला वाटले . या उतावळेपणाच्या भरात त्याने परंड्याच्या किल्ल्याहून आपला मोठा तोफखाना आणि वेढ्यासाठी लागणारे सामान मागविले नाही . तो तसाच झपाट्याने कूच करीत मंगळवेढ्याच्या जवळ येऊन पोहोचला , आणि आता त्याची परिस्थिती मोठी बिकट झाली होती . आदिलशहाच्या मदतीसाठी गोवळकोंड्याहून मोठे सैन्य कूच करून येत होते , आणि मोगल आक्रमकासमोर भूकमारी आ वासून उभी राहिली होती . [विजापूरच्या मोहिमेबाबत जयसिंगाने केलेल्या तयारीची हकीगत पुढे सविस्तरपणे दिली आहे : विजापूरच्या मोहिमेवर निघण्याचे अगोदर दक्षिणेतील किल्ल्यामधून आपल्याला ४० ते ५० मोठ्या तोफा पाठविण्यात याव्या अशी मागणी जयसिंगाने केली कारण विजापूरच्या रक्षणासाठी **मलीक-इ-मैदान** ही सुप्रसिद्ध तोफ आणि इतर लहानमोठ्या तोफा होत्या . त्यानुसार शाही तोफखान्याच्या प्रमुखाला या महत्त्वाच्या मोहिमेसाठी दारू, तोफांचे गोळे आणि अग्निबाण पाठविण्याची विनंती करण्यात आली. त्याचप्रमाणे मोहिमेत रसदीचा पुरवठा व्यवस्थित व्हावा यासाठी स्थानिक अधिकाऱ्यांना बादशाही खलिते मिळविण्याची योजना करण्यात आली . (**एच्. ए.**, ६४ ब ७४ अ). लढाईसाठी जयसिंग अतिशय उतावळा झाला. त्याने उद्गार काढले की आता एक दिवसाचा उशीर करणे म्हणजे एक वर्ष घालविण्यासारखे आहे . (**एच्. ए.**, ७४ अ) त्याला जाणीव होती की त्याने अचानक हल्ला केल्यासच त्याला यश मिळेल . त्याच्या हेरांनी त्याला बातमी दिली की , विजापूरच्या सैन्यात एकजूट नाही, विजापूरचे संरक्षण कोते आहे, बादशाही फौजा विजापूरनजीक गेल्याबरोबर विजापूरचे अधिकारी बादशाही चाकरीत शिरतील आणि त्यामुळे अदिलशहाला शरण येणे भाग पडेल . (**एच. ए.**, ८५ अ) परंतु द्रव्याच्या अभावी जयसिंगाला एक इंचभरही पुढे सरकणे अशक्य होते . त्याच्या फौजेतील लोकांचे सहा महिन्याचे पगार थकले होते आणि त्यांची उपासमार होत होती . त्याशिवाय विजापूरकडून मोगलांना येऊन मिळणाऱ्या फितुऱ्यांना द्रव्य द्यावे लागणार होते. यासाठी त्याने बादशहाकडे द्रव्याची निकड लावली. (**एच्. ए.**, ७४ ब). १२ नोव्हेंबर १६६५ रोजी त्याच्याकडे २० लक्ष रुपये येऊन पोहोचते झाले . जयसिंगाने सैन्याचा बाकी पगार देऊन टाकला आणि मोठ्या तोफा व युद्धसामग्री यांची वाट न पाहता त्याने १९ नोव्हेंबर रोजी पुरंदर किल्ल्यापासून कूच केले. (**एच्. ए.**, ८१ ब,–८२ अ, ८५ अ).

बादशाही फौजेच्या आघाडीवर साडेसात हजार सैनिक असून त्यांचे नेतृत्व दिलेरखानाकडे होते . सैन्याच्या मध्यभागी १२ ,००० सैनिक असून त्यांचे नेतृत्व खुद्द जयसिंगाकडे होते . सैन्याच्या उजव्या आणि डाव्या फळीवर अनुक्रमे दाऊदखान आणि राजा रायसिंग शिसोदिया हे असून त्यांच्या हाताखाली सहा हजार घोडेस्वार होते. शिवाजीने पाठविलेले ९००० सैन्य मधल्या फळीच्या डाव्या बाजूला होते. त्याशिवाय सैन्याच्या दोन्ही फळ्यांचे रक्षण करण्यासाठी दोन तुकड्या असून त्या सैन्यापासून दूर अंतरावर समांतर रेषेत कूच करीत होत्या . (**ए. एन्.**, ९८८). यानंतर दोनच दिवसांनी विजापूरचा एक अफगाण सरदार अब्दुल महमद मियाना हा मोगलांना येऊन मिळाला . परंतु अफगाणांच्या सैन्यातील बहुसंख्य शिपाई हे आपला पुढारी बहलोलखान याच्यासह आदिलशहाशी राजनिष्ठ राहिले आणि त्यामुळे जयसिंगाचा वरील घटनेमुळे फारसा फायदा झाला नाही . (**ए. एन्.**, ९८९; **एच्. ए.**, ८२ ब , ८३ अ, ८४ अ). मोहिमेच्या पहिल्या महिन्यात जयसिंगाला एकापाठोपाठ विजय मिळत गेले . मंगळवेढ्यापर्यंत त्याला कोणताच प्रतिकार झाला नाही . वाटेतील विजापूर राज्यातले सर्व किल्ले मोगलांच्या हाती पडले . फलटण ७ डिसेंबरला , थाथोरा ८ डिसेंबरला, खटाव त्यानंतर आठवड्याने आणि मंगळवेढा १८ तारखेला मोगलांच्या हाती आली . २४ डिसेंबर रोजी मोगलांचा पहिल्या प्रथम विजापुरी फौजांबरोबर संघर्ष उडाला . याचे कारण, त्यांनी आपली फौज राजधानीभोवती एकत्रित केली होती . त्या दिवशी विजापुरी सैन्यातील टेहेळ्यांनी मोगल छावणीत प्रथमच गोळाबारी केली.

दुसऱ्या दिवशी दिलेरखान आणि शिवाजी यांच्या हाताखालील एका तुकडीने विजापूरच्या सैन्याबरोबर युद्ध केले . विजापूरच्या सैन्यात शारजाखान, खवासखान, जाधवराव, आणि व्यंकाजी हे अधिकारी होते. मोगलांच्या सैन्यातील घोडदळाचा मारा विजापुरी सैन्याने चुकविला परंतु गनिमी काव्याचा अवलंब करून त्यांनी मोगलांना संत्रस्त केले . परंतु अखेर दिलेरखानाने त्यांना माघार घेण्यास भाग पाडले . विजापूरचा एक सेनापती आणि पंधरा अधिकारी युद्धात ठार झाले. मोगल सैन्य परतू लागले. या सैन्यावर पुन्हा विजापूरी सैन्याने हल्ला चढविला. या हल्ल्याचा मारा नेताजीवर पडला. जयसिंगाने त्याच्या मदतीला कुमक पाठविली. अखेर मोगलांनी शत्रूला पुन्हा परतविले. या लढाईत मोगल सैन्याची मोठी हानी झाली. या लढाईच्या आदल्या दिवशी मोगलांचा एक नामांकित सेनापती विजापुरी सैन्याकडून मारला गेला . त्या दिवशी मंगळवेढ्याच्या किल्ल्यात जयसिंगाने जड सामानसुमान ठेवले आणि किल्ल्याच्या संरक्षणासाठी उदितसिंग आणि सरफराजखान यांची नियुक्ती केली . किल्ल्यावर

अनुक्रमणिका

शारजाखान चाल करून आला. त्याच्याशी लढण्याकरिता सरफराज किल्ल्याबाहेर आला. परंतु झालेल्या लढाईत तो मारला गेला.

२७ डिसेंबर रोजी जयसिंगाने पुन्हा कूच करण्यास सुरुवात केली . मुक्कामाचे ठिकाण आल्यावर शत्रूची फौज त्याला एक मैलावर येऊन ठेपल्याचे कळले. ताबडतोब त्याने छावणीच्या रक्षणाची व्यवस्था करून शत्रूबरोबर युद्धाची तयारी केली . विजापुरी सैनिकांनी नेहमीप्रमाणे शत्रूवर हल्ला करावयाचा आणि शत्रू जवळ भिडत आहे असे दिसताच पळ काढावयाचा अशा तंत्राचा अवलंब केला . २९ डिसेंबर रोजी विजापूरपासून १२ मैलांवर जयसिंग दाखल झाला. विजापूर आणि मोगल यांच्यामधील युद्धाचे पहिले पर्व येथे संपले आणि युद्धाच्या दुसऱ्या पर्वाला सुरुवात झाली. या पर्वात संख्येने अधिक असलेल्या विजापुरी सैनिकांनी मोगलांवर प्रत्येक वेळी मात केली आणि जोपर्यंत मोगल सैन्य विजापूरच्या मुलूखात होते तोपर्यंत त्यांची स्थिती जवळ जवळ वेढ्यात असल्यासारखीच केली . यावेळी आदिलशहाची युद्धाची तयारी पुर्ण झाली होती . युद्धाची त्याची योजना तयार होती आणि राजधानीची इतकी मजबूत व्यवस्था करण्यात आली होती की सहजासहजी ती ताब्यात घेणे अशक्य होते . विजापूर किल्ल्याच्या भिंतीची दुरुस्ती करण्यात आली होती आणि किल्ल्याच्या नेहमीच्या शिबंदीशिवाय मोठ्या संख्येने कर्नाटकी पायदळ कुमक म्हणून किल्ल्यात आले होते. किल्ल्याच्या समोरचा सहा मैलांचा प्रदेश बेचिराख करण्यात आला होता . विहिरी आणि तलाव बुजविण्यात आले होते आणि शत्रूला आसरा मिळू नये म्हणून सर्व इमारती जमीनदोस्त करण्यात आलेल्या होत्या . त्याच वेळी मोगलांच्या प्रदेशात हल्ला करण्यासाठी शारजाखान आणि सिद्दीमसूद यांची रवानगी करण्यात आलेली होती, आणि विजापुरचे मुख्य सैन्य जयसिंगाच्या छावणीभोवती घिरट्या घालीत होते.

अचानक हल्ला करून विजापूर जिंकून घेण्याची आता शक्यता नव्हती. बराच काळपर्यंत किल्ल्याला वेढा घालून बसण्यासाठी जी तयारी लागते ती त्याने केलेली नव्हती. त्याचा मोठा तोफखाना परंडा येथे होता. त्याच्यासमोर २०,००० विजापुरी सैन्य लढाईसाठी सज्ज होते. विजापूरच्या मदतीसाठी कुतुबशहाकडून मोठे सैन्य चाल करून येत होते . किल्ल्याच्या भोवतालचा प्रदेश बेचिराख झाल्यामुळे जयसिंगाच्या सैन्यावर तहानेने व्याकुळ होण्याचा व भुकेने मरण्याचा प्रसंग ओढवला. अशा परिस्थितीत त्याच्या सल्लागारानी त्याला माघार घेण्याचा सल्ला दिला.]

(२) जयसिंगाला विजापुराहून माघार घेणे भाग पडते, १६६६

अखेर मोगल सेनापती जगसिंग याने ५ जानेवारी १६६६ रोजी माघार घेण्यास सुरुवात केली . विजापूरचे सैनिक त्याच्या पिछाडीचे गिधाडाप्रमाणे लचके तोडीत होते . परंड्याच्या दक्षिणेस १६ मैलांवर सीना नदीच्या किनाऱ्यावर तो २७ जानेवारी रोजी सुलतानपूर येथे येऊन पोहोचला . तेथे त्याने २४ दिवस मुक्काम केला.

या जानेवारी महिन्यात मोगलांवर चार भयानक आपत्ती कोसळल्या . पहिल्या प्रथम तारीख १२ रोजी फतेजंगखानाचा भाऊ शिकंदर नावाचा शूर अफगाण सरदार जयसिंगाच्या सैन्याला दाणागोटा , युद्धसामग्री आणि दारुगोळा घेऊन जात होता , त्याच्यावर परंड्याच्या दक्षिणेस ८ मैलांवर शारजाखानाच्या हाताखालील संख्येने प्रबळ असलेल्या विजापुरी सैन्याने अचानक हल्ला केला . शिकन्दरखानाची कत्तल झाली, आणि त्याचा सामग्रीने सुसज्ज असलेला तांडा लुटून फस्त करण्यात आला.

शिवाजी आणि नेताजी यांच्या हालचाली

नंतर १६ तारखेला शिवाजीने पन्हाळ्यावर हल्ला करून विजापूरविरुद्ध पश्चिमेकडे आघाडी उघडण्याचा प्रयत्न केला . तसे करण्यासाठी शिवाजी आपण होऊन मोगल फौजांपासून वेगळा निघाला होता. परंतु पन्हाळ्यावर हल्ला करण्याच्या कामी शिवाजीला भयंकर अपयश आले आणि त्याने आपली १ हजार माणसे गमावली . २० तारखेला आणखी एक वाईट बातमी आली ती अशी : शिवाजीचा प्रमुख अधिकारी नेताजी आपण केलेल्या मोलाच्या कामगिरीचे आणि आपण गाजविलेल्या अतुलनीय शौर्याचे शिवाजीकडून अपुरे कौतुक होते , या कारणास्तव त्याच्यावर असंतुष्ट होऊन विजापूरकरांना जाऊन मिळाला. त्याने विजापूरकरांकडून ४ लाख होनांची लाच घेतली . त्याचप्रमाणे मोगलांच्या मुलखावर त्याने दूरवर हल्ले केले. २० मार्च रोजी जयसिंगाने त्याला मोगलांकडे परत आणण्यात यश मिळविले , त्याचे मन वळविणारी अनेक पत्रे त्याला लिहिली , आणि त्याच्या भरमसाट मागण्या त्याने मान्य केल्या . मोगलांवर कोसळलेली चौथी आपत्ती म्हणजे आदिलशहाच्या मदतीकरता गोवळकोण्ड्याच्या सुलतानाने १२ हजार

घोडेस्वार आणि ४० हजार पायदळ एवढ्या मोठ्या सैन्याची पाठविलेली कुमक ही होय.

माघार घेताना जयसिंगाचे झालेले हाल

विजापूरच्या परिसरातून माघार घेताना ११ आणि २२ या दोन दिवशी जयसिंगाला शत्रूबरोबर दोन निकराच्या लढाया खेळाव्या लागल्या . त्याशिवाय वैरण आणण्यासाठी जाणाऱ्या त्याच्या सैनिकांबरोबर शत्रूची दररोज चकमक उडत असे ती वेगळीच . मोगलांनी नुकत्याच काबीज केलेल्या बिदर कल्याणीच्या जिल्ह्यात बहलोलखान आणि नेताजी यांच्या हाताखालील हल्लेखोर टोळ्यांकडे दुर्लक्ष करून आता मोगलांना चालणारे नव्हते , आणि म्हणून २० फेब्रुवारी रोजी जयसिंगाने आपल्या सुलतानपूर येथील छावणीतून कूच केले आणि पूर्वेकडील दंगलग्रस्त प्रदेशाकडे मोर्चा वळविला . [या दरम्यानच्या काळात शिवाजी आणि नेताजी यांनी जी कामगिरी केली त्याची हकीकत पुढे दिलेली आहे : १६ जानेवारी १६६६ रोजी शिवाजीने पन्हाळ्यावर हल्ला केला . परंतु त्यात त्याला अपयश आले . त्याचे १००० सैनिक रणांगणावर मारले गेले . शिवाजीने ताबडतोब माघार घेतली आणि तो विशाळगडाकडे परतला . वाटेत त्यांच्या सैन्याने लुटालूट करण्याचे सत्र चालू ठेवले . परिणामी त्याच्या पाठलागावर विजापूरचे ६००० सैन्य गुंतून राहिले (**एच्. ए.**, ८४ ब, ८५ अ). २० तारखेला शिवाजीच्या दृष्टीने अतिशय वाईट बातमी आली आणि ती म्हणजे नेताजी विजापूरला जाऊन मिळाल्याची आणि त्याच्याकडून मोगल प्रदेशावर हल्ले होत असल्याची . जयसिंगाच्या दृष्टीने ही घटना अतिशय भयानक होती . त्याने अनेक प्रलोभने दाखवून नेताजीला परत मोगलांकडे आणण्यात यश मिळविले (**एच्. ए.**, ९४ अ). नेताजीच्या या अपराधाबद्दल त्याला शासन मिळाले . १६६६ च्या आक्टोबरमध्ये त्याला धारूर येथे पकडण्यात आले व त्याची रवानगी दिल्ली येथे बेड्या घालून करण्यात आली . तेथे प्राण वाचविण्यासाठी मुसलमानी धर्माचा स्वीकार करणे त्याला भाग पडले (**ए. एन्.**, ९८७, १००९, १०२१, १०३३) मोगलांवर याच सुमारास आणखी एक संकट कोसळले आणि ते म्हणजे आदिलशहाच्या मदतीसाठी गोवळकोंड्याच्या सुलतानाने आपला सरदार नेकनामखान याच्या हाताखाली १२ ,००० घोडेस्वार आणि ४० ,००० पायदळ यांची पाठविलेली कुमक हे होय . या सैन्याकडून अलिआदिलशहाने सलामी घेतली . दोन्ही राज्यांच्या फौजा एकच झाल्या आणि जयसिंगाला कैचीत पकडण्यासाठी त्यांनी दोन्ही बाजूंनी कूच केले (**ए. एन्.**, १००६; **बी. एस्.**, ४१३–४१४).

जयसिंगाची परिस्थिती आता अतिशय कठीण झाली होती . विजापूरहून परतताना ११ आणि २२ जानेवारी रोजी त्याच्या विजापूरच्या सैनिकांबरोबर मोठ्या लढाया झाल्या . त्याशिवाय बारीकसारीक चकमकी झाल्या त्या वेगळ्याच . विजापूरच्या सैनिकांनी मोगलांच्या डाव्या आणि उजव्या फळीवर हल्ला केला . जयसिंगाने फौजेच्या मधल्या फळीवरून कुमक पाठविली . त्याचा फायदा घेऊन विजापूरच्या सैन्याने खुद्द जयसिंगावरच हल्ला चढविला . त्या ठिकाणी झालेले युद्ध अतिशय निकराचे झाले . अनेक रजपूत रणांगणात ठार झाले . अखेर शत्रूचा पराभव करण्यात मोगलांना यश मिळाले. २५ डिसेंबर ते २२ जानेवारी या कालावधीत अशा एकंदर पाच लढाया जयसिंगाला द्याव्या लागल्या . मोगल सैन्य अतिशय दमून गेले. जयसिंगाने २४ दिवस सुलतानपूर येथे मुक्काम केला. शत्रूने आपल्या सैन्याच्या चार तुकड्या केल्या आणि मोगलांवर चहूबाजूंनी हल्ले चढविले. त्यांनी खटाव, मंगळवेढा आणि कल्याणी यांना वेढा दिला . ही बातमी येताच जयसिंगाने दाऊदखान आणि कुतुबुद्दीनखान यांना मंगळवेढ्याकडे कुमक घेऊन जाण्याचा हुकूम केला . आपल्याबरोबर राजा रायसिंग याच्या हाताखालील डाव्या फळीची तुकडी येत असल्यासच आपण कूच करून जाऊ असे त्याने जयसिंगाला सांगितले . त्याप्रमाणे वागण्याखेरीज जयसिंगाला गत्यंतर उरले नाही (**एच्, ए.**, ९३ अ). हे तीन सेनापती चाल करून येताच १२ फेब्रुवारी १६६६ रोजी विजापूरी सैन्याने वेढा उठविला . या सुमारास बहलोलखान आणि नेताजी यांच्या हाताखालील तुकड्यांनी मोगलांनी जिंकून घेतलेल्या बिदरकल्याणीच्या जिल्ल्यात धुमाकूळ घातला होता . त्यांच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नव्हते. म्हणून २० फेब्रुवारी रोजी जयसिंगाने सुलतानपूर येथील आपली छावणी सोडून पूर्वेकडे वरील जिल्ह्यांच्या दिशेने कूच केले.]

लढाईचे तिसरे पर्व, फेब्रुवारी–जून १६६६

लढाईच्या तिसऱ्या पर्वाला आता सुरुवात झाली होती . या पर्वाचा शेवट नंतरच्या जून महिन्यात परंड्याच्या ईशान्येकडे १८ मैलांवर भूम या गावाकडे जयसिंगाने माघार घेण्यात होणार होता . या साडेतीन महिन्यांच्या काळात जयसिंगाची हालचाल पश्चिमेस भीमा आणि पूर्वेस मांजरा , उत्तरेस धारुर आणि दक्षिणेस तुळजापूर ही शहरे यांनी तयार झालेल्या चौकोनामध्ये मर्यादित होती . ही मोहीम चालू असताना जयसिंगाला शत्रूबरोबर चार अतिशय निकराच्या लढाया खेळाव्या लागल्या. परंतु पूर्वी वर्णन केल्याप्रमाणेच या लढायातून काहीही निष्पन्न झाले नाही . प्रत्येक वेळी लढाईच्या मैदानात विजापुरी सैनिकांना उधळून लावण्यात आले, आणि काही अंतरापर्यन्त त्यांना हाकलून देण्यात आले . परंतु त्यांचा पुरा मोड झाला नाही. साहजिकच त्यांनी मोगल छावणीभोवती पूर्वीप्रमाणेच घिरट्या घालण्याचा उपक्रम चालू ठेवला . मुख्य सैन्यापासून पाठीमागे राहिलेल्यांची त्यांनी कत्तल केली , रसद आणण्यासाठी गेलेल्या लहानसहान

तुकड्यांचा त्यांनी निकाल लावला आणि मोगल सैन्यामध्ये होणारा पुरवठा त्यांनी थांबविला . मोगल सरहद्दीपासून मंगळवेढे फार दूरवर होते , आणि अगदी एका बाजूला असल्यामुळे त्याठिकाणी शत्रुविरुद्ध सहज टिकाव धरता आला नसता . म्हणून २४ मे रोजी जयसिंगाने किल्ल्यामधून तोफा आणि इतर सामान काढण्यासाठी, धान्य आणि इतर मालमत्ता वाटून टाकण्यासाठी , जे नेता येणार नाही ते जाळण्याकरिता आणि किल्ल्याची तटबंदी उद्ध्वस्त करण्यासाठी दिलेरखानाला मुख्य सैन्यापासून वेगळा केला . दिलेरखानाने त्याप्रमाणे कारवाई केली . शत्रुविरुद्ध फलटणचा टिकाव लागणे शक्य नाही , म्हणून तेथील मोगल शिबंदीने मागील फेब्रुवारी महिन्यातच माघार घेतली होती . परिणामी मोगलांच्या पहिल्या स्वारीत त्यांनी जिंकून घेतलेल्या ठिकाणांपैकी एकही जागा आता त्यांच्या ताब्यात राहिलेली नव्हती.

३१ मे रोजी जयसिंगाने आपल्या उत्तर दिशेकडील माघारीला सुरुवात केली. १० जूनच्या सुमारास तो भूम येथे पोहोचला . तेथे त्याने साडेतीन महिने मुक्काम केला , आणि नंतर २८ सप्टेंबर रोजी भूमपासून उत्तरेस ३७ मैलांवर असलेल्या बीड गावाच्या परिसरात जाण्यासाठी कूच केले . तेथे त्याने १७ नोव्हेंबरपर्यंत मुक्काम केला . अखेर त्याच महिन्याच्या २६ तारखेला तो औरंगाबाद येथे पोहोचला . दोन्ही बाजू आता युद्धाला कंटाळलेल्या होत्या . तह व्हावा असे त्यांना उत्सुकतेने वाटत होते . पुन्हा एकदा वाटाघाटींना सुरुवात करण्यात आली . मोगल फौजा आपल्या मुलखाकडे पोहोचल्या आणि लगोलग विजापुरी फौजांनीही आपल्या सरहद्दीकडे माघार घेतली . [या सुमारास लढाईचे तिसरे पर्व सुरू झाले . या पर्वाचा शेवट जयसिंगाच्या भूमकडे माघार घेण्यात होणार होता . फेब्रुवारी १६६६ ते जून १६६६ या तीन महिन्यांच्या काळात जयसिंगाची हालचाल पश्चिमेस भीमा व पूर्वेस मांजरा, उत्तरेस धारूर आणि दक्षिणेस तुळजापूर यामध्ये मर्यादित होती . या कालावधीत मोगलांची विजापूरबरोबर चार वेळा घनघोर युद्धे झाली . प्रत्येक वेळी विजापुरी सैनिकांना परतवून लावण्यात मोगलांना यश आले . परंतु विजापूरचा संपूर्ण पाडाव मात्र त्यांना करता आला नाही . मोगलांना संत्रस्त करण्याचे काम मात्र विजापूरी सैनिकांनी यशस्वीरित्या पार पाडले. या मोहिमेत ढोकी, गुंजोटी आणि नीलंगा हे किल्ले मोगलांनी जिंकले. या मोहिमेची एक नवीन योजना जयसिंगाने आखली . शत्रूचा पूर्ण पराभव करणे अशक्य असल्याने आणि त्याचा पाठलाग करणे जवळील अवजड सामानामुळे मोगलांना शक्य नसल्याने जयसिंगाने आपले सैन्य अधिक सुटसुटीत करण्याचे ठरविले . त्यासाठी त्याने स्वतःबरोबर लहान तंबू आणि बारीक सामानसुमान ठेवले, आणि शिपायांच्या आणि बाजार बुणग्यांच्या सामानाची रवानगी धारूर येथे केली . धारुरच्या रक्षणासाठी त्याने शस्त्रसज्ज अशा शिबंदीला ठेवले (**ए. एन्.**, १०१८).

१६ मे रोजी जयसिंगाने मांजरा नदीवरून कूच केले आणि सिना नदी ओलांडून त्याने भीमेच्या किनाऱ्यावर मुक्काम केला . परंतु या सुमारास बादशाही फौजेचे मनोधैर्य पूर्णपणे ढासळले आणि परिणामी मोहीम सोडून देणे जयसिंगाला भाग पडले . सतत दौड केल्यामुळे मोगल सैनिक दमून गेले होते . पाऊस जवळ आला होता . त्याचप्रमाणे बादशहाने जयसिंगाला औरंगाबादकडे परतण्याविषयी लिहिले आणि सैन्याच्या काही विभागांना त्याच्या अधिकाऱ्यांच्या जहागिरीच्या जागी पाठविण्याचा हुकूम दिला . (**ए. एन्.**, १०२०). साहजिकच जयसिंगाने माघार घेण्याचे ठरविले. मंगळवेढ्याचे ठिकाण मोगल सरहद्दीपासून लांब होते . संरक्षणाच्या दृष्टीने त्याची मजबुती नव्हती . म्हणून २४ मे रोजी जयसिंगाने दिलेरखानाला तोफा आणि इतर सामान किल्ल्यातून हलविणे , जे सामान नेता येणार नाही ते जाळून टाकणे व किल्ल्याची तटबंदी उद्ध्वस्त करणे या कामांवर नियुक्त केले . हे झाल्यावर ३० मे रोजी दिलेरखान जयसिंगाला परत येऊन मिळाला . फलटण येथून फेब्रुवारीमध्येच मोगल शिबंदी हलविण्यात आली होती . फलटणचा ताबा शिवाजीचा जावई आणि मोगलांचा एक अधिकारी महादजी निंबाळकर याच्याकडे देण्यात आला . (**ए. एन्.**, १०२०–२१, १००७) याचा अर्थ असा की , विजापूरवरील पहिल्या मोहिमेत काबीज केलेल्या ठिकाणांपैकी एकही मोगलांच्या ताब्यात राहिले नाही.

३१ मे रोजी जयसिंगाने माघारीला सुरुवात केली . १० जून रोजी तो भूम येथे पोहोचला . तेथे त्याने साडेतीन महिने मुक्काम केला . तेथून २८ सप्टेंबर रोजी त्याने बीडच्या रोखाने कूच केले . तेथे तो १७ नोव्हेंबरपर्यंत राहिला . अखेर २६ नोव्हेंबरला तो औरंगाबाद येथे पोहोचला . मे महिन्याच्या अखेरीला जेव्हा मोगलांनी आपल्या अखेरच्या माघारीला सुरुवात केली त्यावेळी विजापूरच्या फौजाही थकून गेल्या होत्या . त्यांच्याजवळील सामग्री संपलेली होती ; त्यांची शस्त्रे जुनाट झाली होती ; त्यांचा सर्व प्रदेश उद्ध्वस्त झाला होता आणि त्यांच्या शिपायांपुढे मृत्यू आ वासून उभा होता गोवळकोंड्याच्या सुलतानानेही आपले सैन्य परत बोलाविले होते . दोन्ही बाजू युद्धाला कंटाळलेल्या होत्या आणि तहाची आच त्यांना लागलेली होती . अशा परिस्थितीत वाटाघाटीला सुरुवात झाली . विजापूरच्या सैन्याने आपल्या सरहद्दीच्या आत आणि मोगलांनी त्यांच्या सरहद्दीच्या आत माघार घेतली (**ए. एन्.**, १०१९).]

३) जयसिंगाचे अपयश आणि मृत्यू

विजापूरच्या मोहिमेचा नफातोटा

अनुक्रमणिका

जयसिंगाची विजापूरवरील स्वारी म्हणजे लष्करीदृष्ट्या मोठ्या अपयशासारखी होती . या स्वारीतून जमिनीचा एक इंचाएवढाही तुकडा , किल्ल्याचा एक एवढासाही दगड किंवा खंडणीच्या रूपाने एक दमडीएवढी देखील प्राप्ती झालेली नव्हती . या स्वारीचा अर्थिक नफ्यातोट्याच्या दृष्टीने विचार केला तर झालेले नुकसान प्रचंड होते. बादशाही खजिन्यातून खर्च केलेल्या ३० लाख रु. च्या शिवाय जयसिंगाने आपल्या स्वतःच्या खजिन्यातून जवळजवळ १ कोट रु. खर्च केले होते (**दिलकुशा**, ५६). जयसिंगाचा खर्च अनावर होता. त्याच्यापेक्षाही बादशहाच्या वतीने त्याने केलेले वायदे हे प्रमाणाबाहेर होते . विजापूरचा पक्ष सोडून येणाऱ्या कोणत्याही हलक्यासलक्या मुस्लीम अधिकाऱ्याला अथवा मराठा प्रमुखाला मोगलांच्या चाकरीत एक पदवी आणि मोठ्या मनसबीचे वचन देण्यात येई (**दिल**., ६२). त्याशिवाय त्यांच्या हाताखालील लोकांना सज्ज करण्यासाठी मोठी रोख रक्कमही त्यांना देण्यात येई.

बादशहाची जयसिंगावर अवकृपा

विजापूरच्या स्वारीत मोगलांचा जो लष्करी पराजय झाला आणि पैशाचे जे अफाट नुकसान झाले त्यामुळे बादशहाची जयसिंगावर अतिशय अवकृपा झाली . १६६६ च्या ऑक्टोबर महिन्यात या दुर्दैवी सेनापतीला बादशहाकडून औरंगाबाद येथे परतण्याचा हुकूम आला . १६६७ च्या मार्च महिन्यात त्याला दरबारात परत बोलाविण्यात आले. दक्षिणेच्या सुभेदारीवर राजपुत्र मुआज्जम याची नेमणूक करण्यात आली आणि जसवंतसिंग याला त्याचा मदतनीस म्हणून देण्यात आले . शेकडो लढाया खेळलेल्या या रणधुरंधर रजपुताने (जयसिंग) १६६७ च्या मे महिन्यात औरंगाबाद येथे नवीन सुभेदाराच्या हाती सुत्रे सोपविली . अतिशय अपमानीत आणि निराश मनःस्थितीत त्याने उत्तर हिंदुस्थानच्या दिशेने कूच करण्यास सुरुवात केली. विजापूरच्या युद्धामध्ये त्याने आपल्या स्वतःजवळील खर्च केलेल्या एक कोटी रुपयांपैकी एक पै देखील त्याला बादशहाकडून परतफेडीदाखल मिळणार नव्हती. अपमान आणि निराशा यामुळे त्याचे हृदय पार खचून गेले होते . शरीराला जडलेला आजार आणि वार्धक्य यांना पाठ देत त्याचा जीव मेटाकुटीला आलेला होता. अशा परिस्थितीत तो बुरहाणपूर येथे पोहोचला . तेथे २ जुलै १६६७ रोजी त्याचा मृत्यू झाला. [जयसिंगाला माघार घ्यावी लागल्यामुळे त्याच्यावर औरंगजेबाचा रोष ओढवला . 'इतके मोठे सैन्य आणि पैसा यातून तू काय मिळविलेस ' असे औरंगजेबाने याला विचारले. विजापूरच्या मोहिमेत त्याला जे अपयश आले यामुळे त्याला असे वाटले की, या अपयशाचा डाग जर आपण धुऊन काढला नाही तर आयुष्यभर मोगल घराण्याची केलेली सेवा हिचा विसर पडेल आणि आपल्यावर नामुष्कीचा प्रसंग ओढवेल . त्याने दक्षिणेतील सैन्याचे सेनापतीपद आपल्याकडे राहावे म्हणून प्रयत्न केला. परंतु औरंगजेबाने त्याच्याबद्दल चिडून काढलेले उद्‌गार आणि राजपुत्र मुआज्जम याला दक्षिणेचा सुभेदार म्हणून पाठविणार असल्याची बातमी यामुळे तो अतिशय संत्रस्त झाला . आपला मुलगा आणि इतर मित्र-मंडळी यांच्या साहाय्याने आणि मुख्य वजिराला ३०,००० रु. लाच देऊन दक्षिणेमधून आपल्याला हालवू नये असे प्रयत्न करण्याची त्याने कोशिश केली . परंतु त्याचा काहीही उपयोग झाला नाही (**बी. एस्.**, ४१५; **एम्. ए.**, ८९ ब–९३ अ १९५ अ–१९६ ब). ऑगस्ट १६६६ मध्ये शिवाजीने आग्र्याहून केलेल्या पलायनामुळे जयसिंगाच्या अडचणीत आणखीच भर पडली. त्याचा मुलगा रामसिंग याच्या वर्तनाबद्दल जयसिंगालाच जबाबदार धरण्यात आले . १६६७ च्या मार्च महिन्यात त्याला दरबाराकडे परत येण्याचा हुकूम देण्यात आला . दक्षिणेच्या सुभेदारीवर राजपुत्र मुआज्जम आणि त्याचा मदतनीस म्हणून जसवंतसिंग अशा बादशहाने नेमणुका केल्या (**ए. एन्**., १०३७).

१६६७ च्या मे महिन्यात जयसिंगाने औरंगाबाद येथे नव्या सुभेदाराकडे अधिकार सोपविले . अतिशय निराश मनःस्थितीत त्याने उत्तरेकडे कूच करण्यात सुरुवात केली . तीन मोगल बादशहांच्या अमदानीत ज्याची सबंध हयात युद्धे जिंकण्यात गेली , त्या हयातीवर शेवटच्या क्षणी एका पराभवाची छाया पडली. त्याने विजापूरच्या लढाईत स्वतःच्या पदरचे एक कोट रुपये खर्च केले होते . त्यातील एक दिडकी त्याला बादशहाकडून परत मिळणार नव्हती. अपमान आणि बडतर्फी यामुळे त्याचे हृदय विदीर्ण होऊन गेले . त्यात वार्धक्य आणि रोग याची भर पडली. अशा परिस्थितीत २ जुलै १६६७ रोजी त्याला बुरहाणपूर येथे मृत्यू आला . केलेल्या चाकरीची ज्याला कदर नाही अशा कठोर धन्याची अतिशय इमानेइतबारे सेवा करूनही त्याला जेव्हा मृत्यू आला तेव्हा त्याची अवस्था एखाद्या दिवाळखोराप्रमाणे होती.]

[जयसिंगाची दक्षिणेवर स्वारी व त्याचा विजापूरकरांकडून झालेला पराभव यांची **तारीख-इ-अली** यामध्ये दिलेली हकीकत :

जयसिंगाची दक्षिणेवर स्वारी – हिंदुस्थानचा सुलतान औरंगजेब याची शिवाजीवर कृपा झाल्यामुळे व त्याचे हेतू साध्य झाल्यामुळे त्याने

बंडखोरी करण्यास सुरुवात केली होती . पुढे बादशाहाने तो धर्मास विदीर्ण करणारा आहे असे जाणून त्यावर अवकृपा केली . तेव्हा त्याचा निरुपाय होऊन त्याने आपल्या कित्येक किल्ल्यांच्या चाव्या राजा जयसिंगाच्या स्वाधीन केल्या होत्या. राजा जयसिंग याची उमेद, या काफिराचे व इतर बरेच किल्ले विजय मिळून त्याच्या ताब्यात आल्याने वाढली होती. त्याने इच्छा केली की, आपण विद्यापूर देखील जिंकून घ्यावे. बादशाहाचा हेतू मोगलांशी दोस्ती करण्याचा असल्याने त्याने प्रथम मुल्ला खुर्रम व मुल्ला अहमद यास जयसिंगाकडे पाठविले व निरोप धाडला की , तुम्ही आपले वचन मोडून युद्धाची तयारी केली आहे ; पण यात आपणास बेअब्रू पत्करावी लागणार आहे . त्या दोघांनी बेत केला की , राजाने जरी लढाईची इच्छा केली आहे तरी आपण दोस्ती करण्याची खटपट करावी . पण राजाने दोघांच्या उपदेशाकडे लक्ष न देता त्यांचा हेतू विफल केला . तेव्हा त्या दोघांनी बादशाहाकडे अर्ज केला की, याचा आपल्या वीरांकडून पराभव झाला नाही तोवर हा समेटाचे बोलणे करण्यास तयार होणार नाही.

बादशाहास ही गोष्ट समजल्यावर त्याने किल्ला उत्तम तऱ्हेने लढविण्याची तयारी केली व अब्दुल -मुहमद इख्लासखान , शर्झाखान, बहलूलखान, रूस्तम झमान, सीदी मसऊद, सीदो अब्दुल अझीझ , व्यंकोजी राजा, या व इतर उमरांवास आज्ञा केली की , या लोकांस अशी तंबी द्या की, त्यांचे नावही राहणार नाही . या लोकांनी बादशाहाच्या हुकूमाप्रमाणे बेत केला की , एका लढाईतच यांचा नाश करून टाकावा . इतक्यात शर्झाखानास खबर लागली की , विजापूरच्या वाटेवर असलेला मंगळवेढे हा किल्ला जयसिंगाच्या काही लोकांनी ताब्यात घेतला असून जयसिंगाने आपल्या चाकरीतील , ५००० स्वार घेऊन असणाऱ्या सर्फराजखान नावाच्या गृहस्थास त्या किल्ल्याकडे पाठविले आहे . तेव्हा शर्झाखान त्यास अडविण्यासाठी आपले सैन्य घेऊन निघाला . शर्झाखानाने त्यास गाठून लढाईस सुरुवात करताच तो लपूछपू लागला . तेव्हा शर्झाखानाने त्याजवर चोहोबाजूने लगट करून तो , त्याचा मुलगा व त्याचा जावई यांस यमसदनास पाठविले आणि पूर्णपणे विजय मिळविला . इतक्यात अब्दुल-मुहम्मद व मुहम्मद इख्लासखान यांनी शर्झाखानास लिहून पाठविले , तेव्हा शर्झाखान तडक निघून त्यांची वाट पाहात असताच त्यांना येऊन मिळाला . तो आल्यावर अब्दुल—मुहम्मदने सांगितले की , जयसिंग मोठ्या सैन्याच्या जोरावर दंगल माजवू इच्छितो ; पण आमचे लष्कर त्याचा खात्रीने पराभव करील. इतक्यात शत्रुपक्षाकडील लढाईच्या तयारीची चिन्हे दिसू लागली . तेव्हा आदिलशाही सैन्याने त्याजवर हल्ला करून त्याचा धुव्वा उडवून दिला. जयसिंग पळून गेला . अब्दुल-मुहम्मद यास हे समजल्यावर त्याने उमरावांना त्याचा पाठलाग करण्यास सांगितले . येवढे झाले तरी जयसिंगाने एक क्षणही न घालविता पुन्हा लढण्याची तयारी केली . ही सैन्येही जासूदांनी आदिलशाही सेनापतीकडे आणली . तेव्हा आदिलशाही सैन्यही त्याचा एकदाच नायनाट करण्याच्या उद्देशाने तयार झाले आणि त्यांजपैकी इख्लासखान आपल्या ५००० शिपायांसह रजपूत व इतर यांवर तुटून पडला. या वेळचा तडाखाही जयसिंगास सहन न होऊन तो पळून गेला ; येवढेच नव्हे तर तो आपल्या मुलखास जाऊ लागला . बादशाहाने त्याचा पाठलाग करण्याचे ठरवून तो स्वतः त्याजवर रवाना झाला . याच वेळी शर्झाखानास बातमी लागली की , सलाबतखान नावाचा एक जयसिंगाचा सरदार आपल्या पाच हजार स्वारांसह लढाईचे व इतर सामान घेऊन येत आहे . शर्झाखानाने विचार केला की , हा जयसिंगास मिळण्याच्या पूर्वी यास गाठले तरच उत्तम ; नाही तर हा त्यास मिळाल्यावर जयसिंगास लढण्याची चांगली ताकद येईल . तेव्हा यास त्यांची भेट होण्यापूर्वी गाठून याचा नाश केला तर ते मला अनुरूप असे होईल . बादशाहाही याबद्दल माझी पाठ थोपटील . शर्झाखान याच उद्देशाने प्रेरित होऊन आपल्या शिपायांसह पाच दिवसांचे अंतर दोन दिवसांत तोडून एकदम सलाबतखानावर जाऊन आदळला . शर्झाखानाने मंगळवेढ्यास सर्फराझखानाची वाट लावल्यापासून सलाबतखान व इतर हिंदुस्थानी उमराव यांना वाटू लागले की , शर्झाखानाचे शौर्य अप्रतिम असून त्याजपुढे कोणाची मात्रा चालणार नाही . असे असले तरी सलाबतखानाने गर्वाने व अहंमन्यतेने त्याच्याशी सामना करण्याचे ठरविले . शर्झाखानही त्याजवर चालून गेल्यामुळे दोघांची खूप लढाई झाली शेवटी सलाबतखान शर्झाखानाच्या हातून मारला जाऊन बाकीचे लोक पराजित झाले .

कुत्बशाहाची आदिलशहास मदत — आदिलशाही व कुत्बशाही ही दोन्ही राज्ये वास्तविक एक आहेत असे लोक मानीत . वरील खबर तेथील बादशाहास समजताच त्याने अब्दुल -मुहम्मदच्या मध्यस्थीने आदिलशाहास आश्वासनपत्र लिहिले की , 'सर्व शहाणे लोक जाणतात की , आदिलशाही राजांच्या प्रयत्नानेच कुत्बशाही जोमात टिकून राहिली आहे व जगाला स्वातंत्र्य आणि सुख देत आहे . मी राज्यावर आल्यापासून आपले वडील व आपण मदत केल्यामुळे मी लोकांना न्याय देऊ शकत आहे . हल्ली तो काफिर बेत करीत आहे की , बादशाहाची अवकृपा मजवर करवून माझा नाश करावा . म्हणून मी विचार केला आहे की , नेकनामखान याजबरोबर माझे सैन्य देऊन त्यास तुमच्याकडे पाठवावे . म्हणजे ते सैन्य आपल्या सैन्यास मदत करून सदिच्छा प्रकट करील . तसेच त्या राजालाही चांगली तंबी पोहोचेल .' बादशाहा विश्वासू लोकांच्या उमेदीस वाढविणारा असल्यामुळे त्याने या मदतीचा स्वीकार केला व कुत्बशाहास प्रेमाचा निरोप पाठविला की , 'माझ्या लोकांनी प्रत्येक बंडखोरास शासन केले आहे व ते इतके समर्थ आहेत की , आम्हाला दुसऱ्याच्या मदतीची वास्तविक जरुरी नाही . पण तुमची आमच्याविषयी नेहमी सदिच्छा असते त्या अर्थी तुमची इच्छा मला कबूल आहे . तरी तुम्ही आपले सैन्य नेकनामखान याजबरोबर पाठवून द्या .' कुत्बशाहाने या पत्राप्रमाणे नेकनामखान व इतर उमराव यास १२००० स्वार व ४०००० प्यादे यांसह पाठवून दिले . नेकनामखान आल्याची बातमी समजल्यावर बादशाहा स्वतः रसूलपुरास गेला व त्याने अब्दुल -मुहम्मद यास नेकनामाचे योग्य स्वागत करून घेऊन येण्यास सांगितले . त्याप्रमाणे अब्दुल -मुहम्मद त्यास घेऊन आल्यावर बादशाहाने त्यावर अनेक तऱ्हेने कृपा करून त्यास सांगितले की, तुम्ही अब्दुल-मुहम्मद, खवासखान व शर्झाखान यांना मदत करीत जा.

जयसिंगाची चढाई व पराभव — इतक्यात खबर आली की , राजा जयसिंगाने गर्वाने फुगून जाऊन १००० स्वार , पंच हजारी उमराव जाधवराव (जादहराव) व केसरीसिंग (केसेरी सिंग) व इतर यासह रसद व लढाईचे सामान आणण्यासाठी पाठविले आहेत . त्यांच्या या आयुष्याचा घडा आता भरला गेला होता . खवासखान व शर्झाखान यांस ही खबर लागल्यामुळे आपले सैन्य घेऊन ते त्यांजवर चालून गेले व त्यांनी इतक्या जोराने लढाई केली की , शत्रूंची वाताहत होऊन त्यांची बेअब्रु झाली . राजा जयसिंगाने ही बातमी ऐकली व नाउमेद होऊन तो आपल्या उमरावांना म्हणाला, 'दक्षिणी शिपायांनी हिंदुस्थानी शिपायांची अब्रू घेऊन त्यास नाउमेद केले आहे . हे लोक हिंदुस्थानी लोकांस चांगले वंगवतील . जर आमचे लोक त्यांचा नाश करतील तर माझ्यावरून हजारो लाल ओवाळून टाकल्यासारखे होईल .' तेव्हा हिंदुस्थानी मन्सबदार राजास (जयसिंगास) म्हणाले, "आज आदिलशाही सैन्याने आपल्या सैन्याचे रसदीच्या चारी बाजू अशा तऱ्हेने रोखल्या आहेत की , वाटेच्या मुंग्यासुद्धा त्यातून दाणे घेऊन जाणार नाही. या सैन्याची ताकद कोणीकडे व आमची हीन स्थिती कोणीकडे ? आज आपण युद्ध न करता आपल्या देशाकडे परत जाऊ तर ते जास्त चांगले होईल. नाही तर दक्षिणेतील वाटमारे व चोर यांचा विचार करता पुढे परत जाणेही पुष्कळ कठीण होईल ." राजाने विचार केला की आपण पुन्हा एकदा उचल खावी आणि तुंबळ युद्ध करून आदिलशाही सैन्याचा एकदाच नायनाट करावा . खवासखान, बहलूल खान, याकोजी व

इतर आदिलशाही व कुत्बशाही उमराव यांस ही हकीकत समजताच ते त्याजवर रवाना झाले . या वेळी दोघांकडील लोकांनी मुळीच कसूर केली नाही. पण आदिलशाही लोकांनी चोहोबाजूनी असा हल्ला चढविला की , त्यांनी शेकडो लोकांना मारून काढले . खवासखान याने तर आपल्या लोकांनिशी राजा जयसिंगाच्या ठिकाणावर असा जोराचा हल्ला चढविला की , जिकडे तिकडे रक्तच रक्त होऊन गेले . तेव्हा जयसिंग आपल्या लोकांस म्हणाले की, आपणही यांच्या जीवाचा नायनाट करू या पण त्याच्या लोकांना पळून जाणेच जास्त श्रेयस्कर वाटून ते पळून गेले . (**शि. च. वृ. सं.**, २, ४७–५०, **तारीख–इ–अली**)]

परंतु एवढे मात्र खरे की जयसिंगाला या लढाईत दैवाने कधीच हात दिला नाही . इतक्या मोठ्या आणि समृद्ध अशा राज्याला जिंकून घेण्यासाठी त्याच्या जवळील फौज ही अतिशय अपुरी होती . त्याच्या जवळील युद्धसामग्री आणि धान्यपुरवठाही महिना अथवा दोन महिने पुरेल इतकीच होती . वेढा घालण्यासाठी लागणाऱ्या तोफा त्याच्याजवळ नव्हत्या . त्याच वेळी विजापूरचे सामर्थ्य मात्र यत्किंचितही दुर्बल झालेले नव्हते . याच्या अगदी उलट परिस्थिती २० वर्षांनन्तर जेव्हा औरंगजेबाने विजापूरचे राजधानीचे शहर काबीज केले तेव्हा होती . त्यावेळी विजापूरचे सामर्थ्य पार खच्ची झाले होते . जयसिंगावर जी कामगिरी सोपविण्यात आली होती त्या मानाने त्याचे सैन्य फार थोडे होते , आणि त्यात भर म्हणून की काय त्याच्या दुय्यम अधिकाऱ्यांनी अतिशय कामचुकारपणा केला . त्याचे अनेक अधिकारी अविश्वसनीय होते (**एच्, ए.,** ८९ ब). त्याच्या आज्ञांचे पालन करण्यास ते नकार देत अथवा त्या प्रत्यक्षात आणण्यास वेळ तरी लावीत (**एच्. ए.**, १९० ब). त्याचप्रमाणे मुख्य तळावरील बादशाही अधिकारी नियमितपणे त्याच्या सैन्याला धान्यपुरवठा करीत नसत . अशा परिस्थितीत विजय प्राप्त होणे हे मानवी यत्नांच्या पलीकडचे होते.

(४) विजापूरच्या प्रान्तावर राज्यकारभार करणारे लष्करी उमराव आणि त्यांचे स्वभावविशेष

वारंवार होणारी लष्करी बंडे हा विजापूरच्या राजवटीला मिळालेला एक शाप होता . विजापूरच्या सुलतानी राजवटीचा जसजसा ऱ्हास होत गेला तसतसे विजापूर राज्याचे अनेक लष्करी जहागिरींमध्ये तुकडे तुकडे झाले ; विजापूरचे सरकार म्हणजे निव्वळ लष्करी राजवट होती . राज्यातील सत्ता निव्वळ स्वार्थासाठी भांडणाऱ्या लष्करी अधिकाऱ्यांच्या हातात होती , आणि राज्यातील अधिकाराच्या आणि विश्वासाच्या जागा त्यांच्यामध्ये आपापसात विभागलेल्या होत्या . राज्यामध्ये वर्चस्व असलेल्या उमरावांच्या ज्या प्रमुख जाती होत्या त्यांच्यामध्ये अफगाण , हबशी, सय्यद आणि अरब मुल्ला यांचा अंतर्भाव होता . अफगाणांच्या ताब्यात कोप्पलपासून बंकापूर पर्यंतच्या पश्चिम भागातील जहागिरी होत्या . हबशी लोकांची सत्ता राज्यातल्या पूर्व प्रांतावर म्हणजे कर्नूल जिल्हा आणि रायचूर दोआबाचा काही भाग यावर होती . सय्यदांकडे मेहेदवी पंथाचे आणि अरबमुल्लांच्याकडे कोकणामधील नबाइयत लोकांच्या जातीचे पुढारीपण होते. राज्यातील हिंदूंची म्हणजे सरकारी नोकर आणि मांडलिक राजे यांची परिस्थिती अतिशय हलाखीची होती. विजापूर राज्याला आपल्या ताब्यांत ठेवणारा जो अधिकृत अधिकारीवर्ग होता , तो मुळांत परकीय होता. परन्तु आपल्याला स्वगृही परत जावयाचे नाही या कल्पनेनेच तो वर्ग विजापूर राज्यात स्थायिक झाला होता. या अधिकाऱ्यांनी वंशपरंपरा चालणाऱ्या सरंजामी उमरावकीचे अधिकार आपल्याकडे घेतलेले होते. त्यांच्यामधील प्रत्येक जमात आपल्या जातीमध्येच कटाक्षाने विवाह करी . साहजिकच स्थानिक लोकांमध्ये ते कधीच एकरूप होऊ शकले नाहीत . अधिकारपदावर असलेले हे परदेशी उमराव राज्याचा महत्त्वाचा घटक या नात्याने कधीच वावरू शकले नाहीत . वैयक्तिक स्वार्थ साधणे हा त्यांचा एकमेव हेतू होता, आणि जोपर्यंत या अधिकारीवर्गांतील प्रत्येक व्यक्तीचा मेहनताना आणि निवृत्ती -वेतन सुरक्षित होते, तोपर्यंत त्या देशाचे ते एक नाममात्र घटक होते . त्या देशाचा सार्वभौम सुलतान कोण आहे याची त्यांनी कवीच पर्वा केली नाही . त्यांच्या अंगी देशभक्तीचा अंश देखील नव्हता . किंबहुना राजकारणाच्या दृष्टिकोनातून जणूकाही ते हिन्दुस्थानात इतस्ततः भटकणाऱ्या टोळ्यांपैकी हिन्दुस्थानचे नसलेले असे

होते.

अशातऱ्हेच्या सरकारी नोकरांच्या निष्ठेवर उभारलेले राज्य म्हणजे वाळूवर बांधण्यात आलेल्या एखाद्या प्रचंड इमारतीसारखे होते . प्रत्येक वेळी जेव्हा परकीय आक्रमण झाले तेव्हा प्रजेने फक्त आपला धनी बदलला. राजकारणात झालेल्या बदलांनी त्यांच्या जीवनावर कसलाच परिणाम झाला नाही . त्यामुळे ज्याप्रमाणे एखाद्या खऱ्याखुऱ्या राष्ट्राचे नागरिक , राष्ट्र संकटात पडले असताना त्याच्या रक्षणासाठी धावून जातात त्याप्रमाणे अशातऱ्हेने विजापूरचे राज्य संकटात असताना आपल्या सुलतानाभोवती छातीचा कोट करून ते उभे राहतील अशी अपेक्षा करणे चुकीचे होते . आदिलशाही राजघराण्याचा जो ऱ्हास झाला त्यामधून या दृष्टांताचा आपल्याला पुरेपूर प्रत्यय दिसून येतो.

(५) आदिलशाही सुलतानाचा अस्त; राज्यकारभार करण्याचा हक्क मिळविण्यासाठी झालेले कलह

महमद आदिलशहाच्या कारकिर्दीत विजापूरची भरभराट

महमद आदिलशहाच्या सुलतानपदाखाली विजापूरच्या राज्याची जास्तीतजास्त वाढ झाली . भरतखण्डाच्या या टोकापासून त्या टोकापर्यन्त म्हणजे अरबी समुद्रापासून तो बंगालच्या उपसागरापर्यंत विजापूरचे राज्य पसरलेले होते . त्याच्या कारकीर्दीत राज्याचे वार्षिक उत्पन्न ७ कोटी ८४ लक्ष रुपये एवढे होते; त्याशिवाय माण्डलीक राजे आणि जमीनदार यांच्याकडून मिळणारी खंडणीची ५ कोटी २५ लक्ष रुपये एवढी रक्कम वेगळीच. विजापूरच्या सेनासंभाराचे सामर्थ्य पुढीलप्रमाणे होते : ८० हजार घोडदळ आणि २॥ लाख पायदळ, आणि त्याशिवाय ५३० लढाऊ हत्ती. (**बी. एस्**, ३४६-३४८)

दुसरा अली आदिलशहा, १६५६—१६७२

१६५७ साली विजापूर राज्यावरील मोगलांच्या आक्रमणरूपी वादळाचा उपशम झाल्यावर काही काळापर्यन्त विजापूर राज्याच्या सामर्थ्याचे पुनरुत्थापन होत आहे असे वाटले . इ. स. १६६१ पासून १६६६ पर्यन्त दुसऱ्या अली आदिलशहाने आपल्या अंगातील कर्तृत्व आणि धडाडी ही मोठ्या हिरिरीने प्रगट केली . तो स्वतः लढाईच्या मैदानात उतरला , शिवाजीच्या वाढत्या सामर्थ्याला त्याने पायबंद घातला , ईशान्येकडील कर्नूल प्रान्तातील बंडखोर हबशी अधिकाऱ्यांना त्याने जबरदस्तीने वठणीवर आणले . बेदनूरच्या बंडखोर राजाला त्याने शरण यावयास लावले आणि अखेर जयसिंगाच्या अधिपत्याखालील विजापूरवरील मोगल आक्रमणाची लाट त्याने थोपवून धरली. यानंतर मात्र सुलतानाने आपले सारे आयुष्य जनानखान्यात मिळणाऱ्या सुखोपभोगात आणि मदिरेच्या पेल्याच्या धुन्दीत घालविले . परंतु त्याचा कर्तबगार वजीर अब्दुल महमद याने राज्यकारभार मोठ्या यशस्वीपणे पुढे चालविला . २४ नोव्हेंबर १६७२ रोजी दुसऱ्या अली आदिलशहाचा मृत्यू झाला , आणि त्याबरोबर विजापूरच्या भाग्यरवीचा अस्त झाला . त्याचा मुलगा शिकंदर याला सिंहासनावर बसविण्यात आले . त्याचे वय फक्त ४ वर्षांचे होते . त्याबरोबरच राज्यातल्या स्वार्थी आधिकाऱ्यांचा राज्यकारभार सुरू झाला . यातूनच अखेर विजापूरचे राजघराणे नाश पावले.

विजापूरचा १६७२ पासून तो विजापूर घराणे १६८६ मध्ये विलयाला जाण्यापर्यंतचा इतिहास म्हणजे खरोखरी विजापूरच्या वजिरीवर असलेल्या व्यक्तींचा होय . या कालखंडाचा विशेष म्हणजे आपापसात

भांडणाऱ्या उमरावांमधील वारंवार होणारी यादवी युद्धे , प्रांतिक सुभेदारांकडून पुकारण्यात आलेले फतवे , खुद्द राजधानीमध्ये कोलमडून पडलेली मध्यवर्ती सरकारची राज्ययंत्रणा , वारंवार परंतु अनिर्णित होणाऱ्या मोगलांच्या स्वाऱ्या आणि वरवर दाखविण्यात येणारे मराठ्यांबरोबरचे शत्रुत्व , परंतु प्रत्यक्षात मात्र त्यांच्याबरोबर करण्यात आलेला गुप्त तह हे होते.

खवासखान राज्याधिकारी, १६७२–१६७५

२४ नोव्हेंबर १६७२ रोजी दुसऱ्या अली आदिलशहाचा मृत्यू झाला . यानंतर ताबडतोब दक्षिणी मुसलमानांच्या पक्षाचा हबशी पुढारी खवासखान याने राज्यातील सर्वाधिकार आपल्या हाती घेतले आणि आदिलशाही घराण्यातील शेवटचा होणारा सुलतान अल्पवयी शिकंदर याला सिंहासनावर बसविले . नवीन मुख्य प्रधानाने अधिकारावर आल्यानंतर इतर उमरावांना दिलेल्या वचनांना हरताळ फासला , आणि जे किल्ले त्यांना देण्याचे त्याने वचन दिले होते ते त्यांच्या स्वाधीन करण्यास त्याने नकार दिला . हे पाहून राज्याचा एक अतिशय कर्तृत्ववान आणि अनुभवी भूतपूर्व वजीर अब्दुल महमद याने तिटकारा येऊन विजापूर दरबारचा त्याग केला . "सुलतानाचे बालपण आणि वजिराचा अकार्यक्षमता यामुळे राजसत्तेला उतरती कळा लागली. राज्यातल्या सर्व भागांत अंदाधुंदी माजली." [याबाबतची थोडक्यात हकिकत पुढीलप्रमाणे आहे : प्रथम विजापूरचा जवळचा शत्रू जो शिवाजी याने विजापूरचा खूपसा मुलूख जिंकून आपल्या राज्यात भर घातली . इकडे मोगल बादशहाला विजापूर सरकारने चार लक्ष रुपये किमतीचे नजराणे अर्पण करून खूष करण्याचा प्रयत्न केला . (११ जानेवारी १६७३). परंतु आतापर्यंत जरी मोगलांनी केलेली सर्व आक्रमणे परतवून लावण्यात आली होती तरी आता राज्यावर असलेला सुलतान वयाने लहान होता ; त्याला सल्ला देणारे दरबारातील अमीरउमराव दुबळे होते आणि अधिकारांच्या जागांवर नालायक उमरावांचा भरणा होता . मोगलांच्या दृष्टीने ही फार मोठी संधी होती . (**बी. एस्.,** ४४२). अशा परिस्थितीत औरंगजेबाने बहादूरखान ऊर्फ खानजहानबहादूर कोकलताश या अतिशय उत्साही आणि यशस्वी अधिकाऱ्याची दक्षिणचा सुभेदार म्हणून नेमणूक केली . याचा अर्थ असा होता की , दक्षिणेमधील राजपुत्र मुआज्जम याच्या धीम्या आणि बेजबाबदार राजवटीऐवजी एका तडफदार अधिकाऱ्याचे हाती दक्षिणेचे राजकारण सोपविले जाणार होते. (**एम्. ए.**, १२३–१२४)]

"बादशहाने विजापूरवर स्वारी करण्यासाठी बहादूरखानाला वारंवार हुकूम पाठविण्यास सुरुवात केली." परंतु प्रांतिक सुभेदाराबरोबर जितकी फौज असते तेवढीच बहादूरखान याच्याबरोबर असल्यामुळे बहादूरखानाकडून विजापूरवर स्वारी अशक्य होती . बहादूरखानाने कारवाई केली ती अशी :– आपल्या राज्यकारभाराचे ठाणे त्याने पेडगाव येथे हलविले . (पेडगावलाच त्याने पुढे बहादूरगड असे नाव दिले .) पेडगावचे ठाणे हे औरंगाबाद आणि विजापूर यांच्या मधोमध आणि पुण्याच्या पूर्वेस ५५ मैलांवर भीमा नदीच्या काठी एका मोक्याच्या ठिकाणी वसलेले होते . त्याचा उद्देश आपली मुख्य फौज शिवाजीविरुद्ध उपयोगात आणण्याचा आणि विजापूरवर प्रत्यक्ष स्वारी करण्याऐवजी विजापूरच्या सरदारांना लाच देऊन आणि विजापूरला युद्धाची धमकी देऊन त्यांचा मुलूख जिंकून घेण्याचा होता . [विजापूरची राजसत्ता टिकवावयाची असल्यास खवासखानापुढे एकच मार्ग होता आणि तो म्हणजे पुढील दोन अटींवर मोगल बादशहाशी तह करणे . त्यांपैकी पहिली अट म्हणजे शिकंदर आदिलशहाच्या बहिणीचा विवाह औरंगजेबाच्या एखाद्या मुलाबरोबर लावून देणे आणि दुसरी म्हणजे शिवाजीचा नाश करण्यासाठी मोगलांनी ज्या मोहिमेची सिद्धता चालविली होती त्या मोहिमेत मोगलांना संपूर्ण सहकार्य देणे . विजापूरने याबाबतीत सहकार्य दिल्यास औरंगजेबाने अतिशय सोप्या अटींवर विजापूरबरोबर तह करण्याची तयारी दाखविली . याबाबतच्या वाटाघाटी जवळ जवळ पूर्ण होण्याच्या मार्गावर आलेल्या होत्या परंतु खवासखानाची अकार्यक्षमता आणि भोळसटपणा याचा पुरेपूर फायदा त्याचा द्वेष करणाऱ्या विजापुरमधील एका पक्षाने घेतला आणि या वाटाघाटी उधळून लावल्या. वाटाघाटी मोडण्यास आणखी एक कारण झाले आणि ते म्हणजे भाडोत्री अफगाण शिपायांनी केलेला उठाव.]

विजापूरच्या सैन्यांत जवळ जवळ निम्म्यापेक्षा अधिक पठाण होते . (**एच्, ए.**, ८२ ब). सेनापती अब्दुलकरीम ऊर्फ बहलोलखान हा होता . त्याची जहागिरी बंकापूर येथे होती . अफगाणांनी आपली पगाराची बाकी देण्याचा जी धमकावणीची मागणी केली होती आणि राज्यकारभाराला त्यानी उघडउघड विरोध करण्याचे जे धोरण स्वीकारले होते त्यामुळे वजिराला गुप्तपणे मोगल सुभेदाराकडे जाऊन त्यांच्या बंडाचा उपशम करण्यासाठी किंवा त्यांचा नाश करण्यासाठी मोगलांची मदत मागण्यावाचून दुसरा उपाय

उरला नव्हता . परिणामी बहादूरखानाने भीमा नदीच्या तीराकडे कूच केले , १९ ऑक्टोबर रोजी खवासखानाची भेट घेतली , आणि विजापूरमधील अफगाणांच्या पक्षाचा मोड करण्याबाबत आणि शिवाजीविरुद्ध युद्ध पुकारण्यासंबंधी त्याच्याबरोबर अटी ठरविल्या.

(६) वजीर म्हणून बहलोल सानाची कारकीर्द, १६७५–१६७७

मोगलांचा पाठिंबा मिळेल याबद्दलच्या खात्रीने खवासखानाने आपल्याला विरोध करणाऱ्या आणि कधीकधी आपली आज्ञा मोडणाऱ्या बहलोलखानाची सत्ता उखडून टाकण्याचा बेत रचला . बहलोलखान हा त्यावेळी विजापूरचा सरसेनानी होता . बहलोलखानाला या गोष्टीचा सुगावा लागताच त्याने संरक्षणाची पूर्ण सिद्धता केली . त्याने खवासखानाला मेजवानीसाठी बोलाविले , त्याला भरपूर दारू पाजली . त्याला कैद केले, (११ नोव्हेंबर) आणि कैदी म्हणून बंकापूर येथे त्याची रवानगी केली . नंतर त्याने विजापूरच्या किल्ल्यात प्रवेश केला आणि कोठल्याही तऱ्हेच्या हाणामारीची पाळी न आणता स्वतः वजिराचे पद प्राप्त करून घेतले. खवासखान हा तीन वर्षेपर्यंत राज्याचा वजीर आणि जवळ जवळ अनभिषिक्त सुलतान होता. या काळामध्ये बहलोलखानाची अकार्यक्षमता आणि ऐदीपणा यामुळे राज्याचा कारभार दिवसेंदिवस अधिकाधिकच बिघडत चालला . परंतु जर हबशी वजिरांच्याकडील हा राज्यकारभार वाईट होता असे म्हटले तर बहलोलखान आणि त्याचे अफगाण अनुयायी यांचा राज्यकारभार अधिकच भयानक होता असे म्हणावे लागेल. वजिरीचे पद बळकाविल्यानंतर त्याने आपले अफगाण अनुयायी आणि नातेवाईक यांना अधिकाराच्या जागा देण्यास आणि दक्षिणी लोकांना एकामागून एक अधिकारावरून काढण्यास सुरुवात केली. इतकेच नव्हे तर विजापूर शहरातून देखील त्यांची हाकालपट्टी केली . सर्व राज्यामध्ये जिकडेतिकडे भयंकर अंदाधुंदी माजली. परिणामी राज्यातील दक्षिणी लोकांचा पक्ष बहलोलखानाविरुद्ध शस्त्रे घेऊन उभा राहिला.

बहादूरखानाकडून युद्धाला सुरुवात, १६७६

बहलोलखानाच्या राज्यकारभाराची मदार फक्त एका व्यक्तीचे कर्तृत्व आणि जोमदारपणा यावर अवलंबून होती. ही व्यक्ती म्हणजे त्याचा प्रमुख सल्लागार खिजरखान पन्नी ही होय . १२ जानेवारी १६७६ रोजी खिजरखान पन्नीला एका दक्षिणी माणसाने भोसकून ठार मारले . परिणामी बहलोलखानाने ताबडतोब असहाय्य परिस्थितीत कैदेत असलेल्या खवासखानाचा खून केला . (१८ जानेवारी), आणि नंतर मिनहाज व इतर दक्षिणी यांना शासन करण्यासाठी विजापूरहून कूच केले . २१ मार्च रोजी शारजाखानाचे सैन्य आणि वजिराचे सैनिक यांच्यामध्ये मोका येथे भयंकर रणधुमाळी माजली . या लढाईत अफगाणांचा विजय झाला . शारजाखानाने सोलापूर येथे बहादूरखानाजवळ आश्रय घेतला . बहादूरखानाने आता दक्षिणी पक्षाची बाजू घेतली आणि विजापूर येथील अफगाणांच्या राजवटीचा धिःकार केला . सोलापूरहून त्याने दक्षिणेकडे कूच केले. २१ मे रोजी त्याने हळसंगी येथे भीमा नदी ओलांडली . त्याच्या घोडदळाने विजापूर शहराच्या आसमंतातील प्रदेश उद्ध्वस्त करण्यास सुरुवात केली . १३ जून रोजी विजापूरच्या ईशान्येस आदिलाबाद आणि इंदी यामध्ये असलेल्या मैदानात बहलोलखानाने बहादुरखानाबरोबर युद्धाचा पवित्रा घेतला . मोगलांच्या उजव्या फळीचा सेनापती माळव्याचा सुभेदार इस्लामखान हा होता . दक्षिणी फौजांनी केलेल्या हल्ल्याचा मारा त्याच्यावर आणि त्याच्या तुर्की सैनिकांवर पडला . दक्षिणी फौजांचे दोन हल्ले त्यांनी परतवून लावले. परंतु बंदुकीच्या दारूच्या झालेल्या एका स्फोटात इस्लामखानाचा हत्ती शत्रूच्या सैन्यात सैरावैरा पळत सुटला. त्यात इस्लामखान आणि त्याचा मुलगा हे ठार मारले गेले . भीमा नदींच्या दुसऱ्या तीरावर

असलेली मोगलांची छावणी अफगाणांनी लुटली आणि छावणीच्या रक्षकांना कंठस्नान घातले . भीमा नदीला पाण्याचा प्रचंड पूर आल्यामुळे इस्लामखानाला कुमक पाठविणे बहादूरखानाला शक्य झाले नाही . [त्यानंतर त्याने अक्कलकोटच्या दिशेने चाल केली आणि ऑगस्ट १६७६ च्या सुमारास नळदुर्गला वेढा दिला . या किल्ल्याचा ताबा खिजरखान पन्नी याच्या मुलाकडे होता . या किल्ल्याच्या कुमकीकरिता विजापूरहून बहलोलखानाच्या हाताखाली सैन्य आले . या सैन्याची आणि मोगलांची किल्ल्यापासून सहा मैलांवर मोठी लढाई झाली . या सैन्याने रजपूतांचे अतोनात नुकसान केले , किल्ल्यात प्रवेश केला आणि बहादूरखानाला वेढा उठविण्यास भाग पाडले . यानंतर मोगल फौज काही दिवस किल्ल्याभोवती नुसती घोटाळत राहिली आणि नंतर त्यांनी किल्ल्यापासून सोळा मैलांवर असलेल्या कांभगाव ह्याठिकाणी मुक्काम केला . नळदुर्ग जवळ झालेल्या लढाईत बहादूरखानाचा मुलगा महमद मुहसान हा ठार मारला गेला.]

दरम्यान विजापुरी सैन्याच्या मदतीसाठी गोवळकोंड्याचा वजीर मादण्णा पंडित याच्या हाताखाली प्रचंड सैन्य येऊन दाखल झाले . त्यामुळे बहादूरखानाची परिस्थिती अधिकच बिकट झाली . परंतु नवीन आलेल्या या सैन्याला बहादूरखानाने लाच चारली . त्यांचे बहलोलखानाबरोबर काही मतभेदही निर्माण झाले, आणि म्हणून कोणतीही कारवाई न करता गोवळकोंड्याच्या सैनिकांनी माघार घेतली . बहादूरखानाने तसेच हळसंगीकडे कूच केले आणि तेथे प्रचंड सैन्याची जमवाजमव केली . सामर्थ्याच्या या प्रदर्शनाने बहलोलखान हा नरम आला . त्याने बहादूरखानाजवळ असे कबूल केले की , विजापूरचे काही जिल्हे मोगलांनी जिंकल्यास त्यांना आपण अडथळा निर्माण करणार नाही . या वचनावर त्याने आपली तात्पुरती का होईना सुटका करून घेतली. यानंतर १४ मे १६७७ रोजी बहादूरखानाने सहजतया नळदुर्गचा आणि ७ जुलै रोजी लाच देऊन गुलबर्ग्याचा ताबा घेतला . परंतु बहादूरखान आणि त्याचा उपप्रमुख दिलेरखान यांच्यामध्ये धोरणाबाबत मतभेद निर्माण झाले , आणि परिणामी बहादूरखानाची परिस्थिती अधिकच शोचनीय झाली. दिलेरखान हा दक्षिणेत जून १६७६ मध्ये आला होता . तो स्वतः जातीने अफगाण असल्यामुळे त्याची बहलोलखानाबरोबर गाढ मैत्री जमली इतकेच नव्हे तर तो विजापूर येथील अफगाणांच्या पक्षाचा पक्षपाती बनला . दिलेरखान आणि बहलोलखान यांनी बादशहाला पत्र लिहून कळविले की बहादूरखानाने दक्षिणेमधील तीन शाह्यांबरोबर गुप्तपणे तह केलेला आहे आणि दक्षिणेमधील बादशाही मोहिमेला यश मिळू नये याकरिता त्याने शत्रुत्वाची भूमिका स्वीकारलेली आहे.

(७) दिलेरखान आणि बहलोल यांचे गोवळकोंड्यावर आक्रमण, १६७७

औरंगजेबाने बहादूरखानाला परत बोलाविले . तो सप्टेंबर १६७७ च्या सुरुवातीला प्रांत सोडून निघाला. त्याच्या जागी दिलेरखानाने बदली म्हणून ऑक्टोबर १६७८ पर्यंत दक्षिणचा सुभेदार म्हणून काम बघितले. औरंगजेबाच्या कारकिर्दीच्या पहिल्या २० वर्षांत दक्षिणेमध्ये मोगलांच्या पदरात पडलेल्या यशाचा साकल्याने विचार केला तर असे आढळून येईल की इ . स. १६५७ मध्ये त्यानी विजापूर राज्याच्या ईशान्येकडील भागातील कल्याणी आणि बिदर मोगल साम्राज्याला जोडली . १६६० च्या नोव्हेंबर महिन्यात अगदी उत्तरेकडील परंड्याचा किल्ला आणि जिल्हा लाच देऊन त्यानी ताब्यात घेतला . जुलै १६६८ मध्ये झालेल्या तहाप्रमाणे सोलापूरवर मोगलांनी ताबा मिळविला आणि आता नळदुर्ग आणि कुलबर्गा ही त्यांनी जिंकून घेतली. अशा तऱ्हेने भीमा आणि मांजरा या दोन नद्यांमधील जमिनीचा पूर्वाभिमुख होत गेलेला आणि कुलबर्गा ते बिदर यांना जोडणारी एक रेषा कल्पिली असता तिला जावून मिळालेला मोठा पट्टा मोगलांच्या ताब्यात आला. मोगलसाम्राज्याची दक्षिणेकडील सरहद्द हळसंगी गावासमोर आणि विजापूरचे शहर माऱ्यांत येईल अशा ठिकाणापर्यंत भीमा नदीच्या उत्तर किनाऱ्यापर्यंत पोहोचली , तर आग्नेय दिशेकडे गोवळकोंडा राज्याच्या पश्चिम सरहद्दीवरील मळखेडच्या किल्ल्याला तिने स्पर्श केला.

मळखेडजवळील संग्राम, मोगलांची माघार

अनुक्रमणिका

विजापूर राज्याच्या या भागातील प्रदेश जिंकून घेतल्यावर मोगलांनी आपले लक्ष गोवळकोंड्याचा समाचार घेण्याकडे वळविले . शिवाजी आणि शेख मिनहाज यांना पकडून आपल्या ताब्यात न दिल्यास आपण कुतुबशाही मुलुखावर स्वारी करू अशी त्यांनी धमकी दिली . ते दिवस ऑगस्टच्या मध्याचे होते. शेख मिनहाज याने मोगल सुभेदाराला मिळण्याचे वचन देऊन त्याच्यापासून भरपूर द्रव्य लाच म्हणून घेतले होते. परंतु त्याप्रमाणे न वागता तो अखेर गोवळकोंड्याला जाऊन मिळाला होता . दिलेर आणि बहलोल यांनी सप्टेंबर महिन्यात गोवळकोंड्यावर आक्रमण केले . कुलबर्गा ह्या मोगलांच्या शेवटच्या ठाण्यापासून त्यांनी २४ मैल पूर्वेकडे मळखेडच्या दिशेने कूच केले . गोवळकोंड्याच्या सरहद्दीवरील मळखेड हा पहिला किल्ला होता . तो त्यांनी एका दिवसात काबीज केला . परंतु मळखेड जवळ कुतुबशाही राज्याच्या राजधानीपासून ८० मैलावर शत्रूच्या प्रचंड सैन्याने मोगल आक्रमणाचा ओघ थोपवून धरला . मळखेड येथील मोगल छावणीपासून (ऑक्टोबर) उत्तरेला सात मैलांवर कुतुबशाही सैन्याची छावणी होती . जवळ जवळ दोन महिने पर्यंत दोन्ही फौजांत युद्ध चालू होते. परंतु ते निर्णायक ठरले नाही. विजापूर आणि मोगल यांच्या प्रदेशात कुतुबशाही फौजांनी खूपच आघाडी मारली , आणि आक्रमकांना धान्याचा पुरवठा करणारे तांडे मारून काढले . शत्रूचे सैन्य छावणीभोवती सारखे घिरट्या घालीत होते . त्यामुळे धान्याचा तुटवडा पडला होता. त्यात आणखी पावसाची मुसळधार चालू होती . परिणामी विजापूर आणि मोगली फौजातील अफगाण आणि रजपूत शिपायांना भयंकर हालअपेष्टा सोसाव्या लागल्या . बहलोलखानाला एका भयंकर दुखण्याने घेरले . त्याचे अनुयायी उपासमारीतून बचावण्यासाठी इतस्ततः विखुरले . यावर दिलेरखानाने अनर्थावह अशा माघारीला कुलबर्ग्याच्या दिशेने सुरुवात केली . शत्रूने त्याला कोंडीत आणले होते . त्याच्यावर शत्रूकडून दररोज हल्ले होत होते . दिलेरखानाचे सर्व सामानसुमान शत्रूने लुटले . भूकेने व्याकुळ झालेल्या बादशाही सैनिकांना ताड आणि खजूरी यांच्या बिया खाऊन भूक भागवावी लागली . [मळखेड या गावाजवळ झालेल्या लढाया आणि तेथून मोगलांना घ्यावी लागणारी माघार याची हकिकत पुढे दिली आहे : मळखेड हे ठिकाण कुतुबशहाच्या राजधानीपासून ८० मैलांवर आहे . याठिकाणी मोगल आक्रमणाचा ओघ थोपविण्यात आला . बहलोलखानाच्या हाताखालील मोगलांच्या आघाडीवरील ५ ,००० सैन्याच्या तुकडीचा प्रतिकार त्यांच्यापेक्षा ५ पटीने अधिक असलेल्या कुतुबशाही फौजेने केला . बहलोलखानाचा पराभव होण्याची पाळी आली होती परंतु दिलेरखानाने त्याच्या मदतीला येऊन माघार घेण्यास मदत केली . मोगलांचे ७०० सैनिक ठार झाले . गोवळकोंड्याच्या सैनिकांनी मोगलांचा पाठलाग केला नाही . यानंतर गोवळकोंड्याच्या सुलतानाने मादण्णाचा पुतण्या येनगणा आणि इतर सरदारांच्या हाताखाली मोठी कुमक रवाना केली . एके दिवशी हैदरशहाच्या हाताखालील कुतुबशाहीच्या आघाडीच्या तुकडीने मोगल फौजेवर हल्ला केला व माघार घेऊन त्यांना आपल्या पाठीवर घेतले . दोन्ही फौजांचे युद्ध झाले परंतु मोगल सैन्याला कुमक आल्यामुळे दोन्ही फौजांनी आपापल्या छावण्यांत माघार घेतली . कुतुबशाही फौजा मंगलगी येथे होत्या . वरील युद्धानंतर तीन दिवसांनी कुतुबशाही सैन्याने मोगलांवर हल्ला केला परंतु मोगल फौजांनी एका ठिकाणी त्यांच्यावर हल्ला करून त्यांचे बरेच सैनिक ठार मारले . परंतु गोवळकोंड्याचा अधिकारी महमद इब्राहीम हा कुमक घेऊन आला आणि त्याने मोगलांना पाठीमागे रेटले . दोन महिनेपर्यंत अशाच तऱ्हेने युद्ध झाले . कुतुबशाही फौजेने मोगल आणि विजापुरी मुलुखात घुसून मोगलांची रसद तोडली . परिणामी जिवावर उदार झालेल्या मोगलांनी गोवळकोंड्याच्या छावणीवर हल्ला करून तेथील सर्व स्त्री - पुरुषांची कत्तल केली, छावणीतील बाजार लुटून छावणी उध्वस्त केली व कुतुबशाही फौजांची दाणादाण उडविली.

परंतु हा विजय तात्पुरता होता . शत्रू ताबडतोब सावरला . त्याशिवाय अती पाऊस आणि धान्याचा तुटवडा यामुळे फौजेतील अफगाण आणि रजपूत यांचे भयानक हाल झाले . बहलोलखान हा अतिशय आजारी पडला आणि आपली उपासमार होऊ नये म्हणून त्याचे सैनिक इतस्ततः गेले. यावर दिलेरखानाने कुलबर्ग्याकडे माघार घेतली . वाटेत शत्रूने त्याच्यावर सारखे हल्ले केले व त्याचे सामानसुमान लुटले . शत्रूच्या हल्ल्यापासून रात्रंदिवस बचाव करताना त्याचे अतोनात नुकसान झाले . मळखेड ते कुलबर्गा हे २४ मैलांचे अंतर तोडण्यास त्यांना १२ दिवस लागले. रजपूतांची अजिंक्य वृत्ती आणि कसलाही स्वार्थत्याग करण्याची त्यांची तयारी यामुळेच दिलेरखानाचे सैन्य सुरक्षित परत येऊ शकले .

दिलेरखानाला आता तहाची याचना करण्याखेरीज दुसरा मार्ग उरला नाही. त्याला पाठिंबा देणारा बहलोलखान हा मृत्युशय्येवर पडला होता. याच्या अगोदर आदिलशहाशी एकनिष्ठ असलेले सिद्दी मसूद आणि इतर सरदार यांनी राजधानीतील पठाणांच्या राजवटीला कंटाळून कुतुबशहाला मध्यस्ती करण्याची विनंती केली होती . यावर अबुलहसन कुतुबशहा याने दरबारातील भांडण करणाऱ्या परस्परविरोधी पक्षांना एकत्र आणून पुढील अटींवर समझोता करणे त्यांना भाग पाडले होते . (१) बहलोलखानाने आपल्या अधिकाराचा त्याग करून ते मसूदकडे सोपवावे . (२) मसूदने अफगाण शिपायांना त्यांच्या पगाराची सहा लक्ष रुपये बाकी द्यावी . ही बाकी मिळाल्यावर त्यांनी विजापूरचे राज्य सोडावे व बहलोलखानाने आपल्या जहागिरीच्या जागी निघून जावे . (३) विजापूरचे यापुढे आणखी तुकडे होऊ न देण्याची सर्वांनी कोशिश करावी . (४) गोवळकोंड्यातर्फे मादण्णाचा भाऊ आकण्णा याची राज्यकारभाराबाबत सल्ला देण्यासाठी नियुक्ती व्हावी.]

अनुक्रमणिका

कुलबर्गा येथे मसूदने दिलेरखानाची गाठ घेतली आणि मोगलांबरोबर तह केला . विजापूर येथे त्याने वजीर म्हणून काम बघावयाचे होते . परंतु तसे करताना औरंगजेबाच्या आज्ञा त्याने पाळावयाच्या होत्या, शिवाजीबरोबर मैत्री करावयाची नव्हती आणि शिवाजीने हिसकावून घेतलेला मुलुख परत घेण्याच्या कामी मोगलांना त्याने नेहमी मदत करावयाची होती . त्याचप्रमाणे आदिलशहाची बहीण शहर बानूबेगम ऊर्फ पादीशाह बीबी हिची रवानगी बादशहाच्या एका मुलाबरोबर लग्न करण्यासाठी मोगल दरबाराकडे करावयाची होती. यानंतर दिलेरखान उत्तरेच्या दिशेने परत फिरला (दिलेरखानाच्या मोहिमेसाठी पाहा **दिलकुशा**, १५१–१५४; **एम्. ए.**, १६५; **फॅक्टरी रेकॉर्ड फोर्ट सेंट जॉर्ज खंड** २७, **विरराघवय्या, गोवळकोंड्यात असलेला इंग्रजांचा एजंट याची पत्रे** ३ **जुलै**, २६ **ऑगस्ट**, १९ **सप्टेंबर**, २८ **ऑक्टोबर** १६७७; **बी. एस.**, ४५६).

(८) मसूदकडे वजिरीचे पद येते; अफगाणांचे बंड; विजापूरच्या प्रांतात उद्‌भवलेली बंडे

बहलोलखान २३ डिसेंबर १६७७ रोजी मरण पावला . जानेवारी महिन्यात मसूदची वजीर म्हणून नेमणूक करण्यात आली. त्याच्याबरोबर गोवळकोंड्याची फौज होती. परंतु खजिना रिता पडलेला होता. अफगाण शिपायांच्या पगाराची थकलेली बाकी देण्यात त्याला अपयश आले. परिणामी क्रोधाविष्ट झालेल्या अफगाणांनी बेभान होऊन वाटेल ते अत्याचार करण्यास सुरुवात केली. त्यांनी बहलोलखानाची अल्पवयी मुले, त्याच्या विधवा स्त्रिया आणि इतर नातेवाईक यांच्या राहत्या घरांचा ताबा घेतला . आपली राहिलेली बाकी देण्यासाठी त्यांना भाग पाडावे म्हणून त्यांनी त्यांचा जाहीररित्या अपमान केला. श्रीमंत असलेल्या सर्व नागरिकांना पकडण्यात आले आणि त्यांचे हालहाल करण्यात आले. "चिन्तू चिमणा नावाच्या एका ब्राह्मण दरोडेखोराने शहरातील लोकांच्यावर अत्याचार केले . तर किल्ल्याच्या भिंतीबाहेर असलेल्यांवर अफगाणांनी जुलूम जबरदस्ती केली . हे चाललेले असताना आपल्या घराची दारे बंद करून मसूद असहाय्यपणे बसला होता. भितीमुळे अनेक माणसे कर्नाटकात निघून गेली." (**बी. एस्.** ४६२)

नवीन वजिराचे हुकूम प्रांतिक सुभेदार देखील धुडकावून लावत होते . त्यात आपल्या दुर्दैवात भर घालण्यासाठी म्हणून की काय मसूदने आपली बाजू बळकट करण्यासाठी शिवाजीबरोबर गुप्तपणे मैत्री घडवून आणण्याचा प्रयत्न केला आणि मोगलांचा क्रोध आपल्यावर ओढवून घेतला . मसूदने केलेल्या विश्वासघातामुळे कुलबर्ग्याच्या तहाच्या अटी पाळण्याचे बंधन आता दिलेरखानावर राहिलेले नव्हते . "या अटी आपण पाळाव्या अशी भावना जोपर्यंत त्याच्या मनात होती तोपर्यंत त्याने विजापूरवर स्वारी करण्याचा विचार देखील केला नाही." ऑक्टोबर १६७८ च्या अखेरीस पावसाळा संपल्यावर दिलेरखानाने पेडगावहून कूच केले आणि अकलूज येथे मुक्काम केला.

दरम्यान शिवाजीने ठरलेल्या तहाप्रमाणे सहा हजार चिलखती सैनिक विजापूरच्या संरक्षणासाठी मसूदला कुमक म्हणून रवाना केले . परंतु शिवाजी आणि विजापूर यांच्यामध्ये मनापासून सहकार्य होणे अशक्यप्राय होते. शिवाजीने विश्वासघाताने विजापूर घेण्याचा प्रयत्न केला. दोहोंमधील वैफल्याची भावना दिवसेंदिवस वाढू लागली आणि सरतेशेवटी त्यांच्यामधील भांडण उघड्यावर आले . नंतर शिवाजीने विजापूरचा प्रदेश पुन्हा उध्वस्त करण्यास सुरुवात केली. मराठ्यांचे सैनिक शहराच्या नजीक आले आणि त्यांनी दौलतपूर (खवासपुर), खुसरावपूर आणि जहरपूर आदी उपविभागांत लूटालूट केली. उघडउघड शत्रूपेक्षा मित्र म्हणवून घेणाऱ्या या छुप्या शत्रूचीच मसूदखानाला अधिक भिंती वाटली . त्याने

दिलेरखानाकडे संरक्षण मागितले आणि विजापूर येथे मोगल फौज पाठविण्याबद्दल विनंती केली.

विजापूरच्या मदतीसाठी दिलेरखानाने शिवाजीविरुद्ध यशस्वीरित्या दुसरी आघाडी उघडली . त्याने २ एप्रिल १६७९ रोजी शिवाजीचे अतिशय मजबूत ठाणे म्हणजे भोपाळगडचा किल्ला जिंकला आणि उध्वस्त केला . त्याचप्रमाणे किल्ल्याच्या मदतीसाठी येणाऱ्या १६ हजार मराठा फौजेचा पराभव करून त्यांची भयंकर कत्तल केली. परंतु अखेर मसूदच्या दुटप्पी वर्तनामुळे त्याची सहनशक्ती संपली आणि त्याने धूळखेड येथे भीमा नदी ओलांडली . तेथून त्याने विजापूरच्या उत्तरेस फक्त ३५ मैलांवर असलेल्या हळसंगीकडे कूच केले . दरम्यान विजापूर येथील आदिलशाही सरकार संपुष्टात आले होते . मसूद आणि शारजाखान यांच्यामधील कलहामुळे विजापूरच्या प्रदेशात आणि राजधानीत विलक्षण अंदाधुंदी माजली होती. दक्षिणेचा मोगल सुभेदार आता विजापूरमधील आपापसात भांडणाऱ्या विरोधी पक्षांचा जणू काही एकमेव मध्यस्थ बनला होता . "आदिलशहाच्या सैन्यातील दक्षिणी मुसलमान , अफगाण आणि मराठे असे एकंदर १० हजार सैनिक मोगलांच्या चाकरीत शिरले आणि दिलेरखानाच्या भोवती जमा झाले . तर विजापूर येथे मसूदजवळ फक्त ३ ते ४ हजार भुकेने व्याकुळ झालेली माणसे राहिली . यामधील सर्व मोगलांच्या चाकरीत शिरण्यासाठी हापापलेली होती." (**बी. एस्.**, ४८१–४८६)

अशा वेळी औरंगजेबाने विजापूरच्या सुलतानाकडे अशी मागणी केली की , सुलतानाने आपली बहीण शहरबानू ऊर्फ पादशाह बीबी हिला ताबडतोब मोगलांच्या जनानखान्यात रवाना करण्यात यावे . विजापूर राजघराण्यातील व्यक्तींची आणि त्याचप्रमाणे विजापूरच्या नागरिकांची राजकन्या म्हणजे जीव की प्राण होती. या राजकन्येने १ जुलै १६७९ रोजी आपले उरलेले सारे जीवन एका धर्मांध सुन्नी मुसलमानाच्या कुटुंबात घालविण्यासाठी तिचे जन्मस्थान जे विजापूर त्याचा त्याग केला . त्यावेळी दरबारातील साऱ्या मंडळींच्या आणि जनतेच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले आणि त्यांची मने शोकाकुल होऊन आक्रंदू लागली . (**बी. एस्**., ४८७)

(९) दिलेरखानाचे विजापूरवर आक्रमण; शिवाजीची आदिलशहाला मदत. १६७९

विजापूरच्या प्रजाजनांना प्रिय असलेल्या राजकन्येचा बळी हा नाशाची वाटचाल चालू लागलेल्या विजापूर घराण्याला वाचविण्याच्या कामी उपयोगी पडला नाही . मोगलांची लालसा अनिवार होती . दिलेरखानाने आता मागणी केली की मसूदने राजीनामा द्यावा आणि आपल्या जहागिरीच्या ठिकाणी निवृत्त व्हावे. त्याच वेळी विजापूर सरकारचा राज्यकारभार मोगलांना संमत असलेल्या व्यक्तीकडून चालविला जावा. ही योजना मसूदने शहाणपणाने धिःकारली . आपल्याला अशा तऱ्हेने उघड उघड प्रतिरोध झाल्याचे दिसताच दिलेरखानाने ताबडतोब विजापूरविरुद्ध युद्ध पुकारले . परंतु यावेळी त्याची परिस्थिती खरोखरच कमकुवत होती. त्याचा खजिना रिता होता आणि त्याच्या सैनिकांचा पगार थकलेला होता . दुसरे कारण म्हणजे दक्षिणेचा नवीन सुभेदार राजपुत्र शहाआलम हा त्याचा कट्टर शत्रू होता . दिलेरखानाचे सर्व बेत हाणून पाडण्याचा आणि त्याची बेअदबी करण्याचा त्याने आपल्या परीने कसून प्रयत्न केला . साहजिकच मोहिमेवर निघण्याच्या वेळीच त्याच्या सर्व हालचाली थंडावल्या . त्याने द्रव्य पाठविण्यासाठी राजपुत्राकडे पत्र लिहून याचना केली . मोहिमेत जो खंड पडला त्याचा फायदा घेऊन मसूदने विजापूरची संरक्षण व्यवस्था अधिक मजबूत केली . त्याचप्रमाणे त्याने शिवाजीकडे वकील पाठवून आदिलशहावर ओढवलेल्या ह्या कठीण प्रसंगी त्याच्या मदतीला येण्यासाठी शिवाजीला आवाहन केले . (**बी. एस्**., ४९३) यावर शिवाजीने अतिशय चपळाईने कारवाई केली . त्याने १० हजार मराठा घोडेस्वार मसूदच्या मदतीसाठी

रवाना केले आणि २ हजार बैलांवर लादलेली रसद विजापूरकडे पाठविली.

१६७९ च्या सप्टेंबर महिन्यात मोगलांनी विजापूरच्या उत्तरेस ५२ मैलांवर असलेल्या मंगळवेढे गावाचा आणि भीमा नदी व मंगळवेढ्याचा किल्ला यांमधील प्रदेशाचा ताबा घेतला . त्याचप्रमाणे त्यांनी सलोरगी, कासीगाव आणि अल्माला यावर हल्ले केले आणि अकलूजला वेढा दिला . परंतु त्यात त्यांना यश आले नाही. ७ ऑक्टोबर रोजी दिलेरखान विजापूरपासून ईशान्येला ६ मैलांवर असलेल्या बाररगी या गावी पोहोचला. परंतु शहाआलमकडून होणारा विरोध, विजापूर जिंकून घेण्याच्या कामी लागलेल्या खोळंब्यामुळे बादशाहाकडून झालेली निर्भर्त्सना आणि त्याचे सल्लागार व दोस्त यांमधील भांडणे यामुळे तो अगदी गांजून गेला. अपयश त्याच्यापुढे आ वासून उभे राहिले . पन्हाळा आणि विजापूर यांच्या मधोमध असलेल्या सेलगूर या गावी शिवाजी हा १० हजार सैनिकांची नवी तुकडी घेऊन दाखल झाला . ३१ ऑक्टोबर १६७९ रोजी आनंदराव हा त्याच्या फौजेच्या आघाडीवरील जवळ जवळ तेवढ्याच सैनिकांची तुकडी घेऊन त्याला येऊन मिळाला. ४ नोव्हेंबर रोजी त्याने आपल्या सैन्याचे दोन भाग केले . यांपैकी एक भाग त्याने आपल्या स्वतःच्या अधिपत्याखाली घेतला आणि मुसला व अल्माला या गावांच्या मार्गे ईशान्येकडे कूच केले त्याच्या हाताखालील सैनिकांची संख्या ८५०० एवढी होती . दुसऱ्या भागातील १० हजार सैनिक आनंदरावाच्या हाताखाली होते. हे सैन्य सांगोला मार्गे वायव्येच्या दिशेने मोगल प्रदेशात शिरले.

शिवाजीच्या हाताखाली आता जवळ जवळ ३० हजारांचे सैन्य जमा झाले होते . त्याने मोगल प्रदेशांत छापा घालणारे सैनिक सर्व दूर पसरविले आणि भीमा नदीपासून उत्तरेकडे नर्मदेपर्यंत विस्तार असलेल्या बादशाही मुलुखात सगळीकडून हल्ले चढविले , आणि त्या प्रदेशात लुटालूट , जाळपोळ आणि कत्तल यांचा कहर उडवून दिला . [दिलेरखानाच्या दुर्दैवात आणखी भर म्हणून की काय याच वेळी संभाजी त्याच्या छावणीतून पळाला. शिवाजीचा वारस आपल्या हाती सापडला आहे , त्याचा आपल्याला भरपूर फायदा घेता येईल अशी मनोराज्ये त्याने मनाशी बांधली होती . मराठ्यांमध्ये यादवी युद्ध पेटवून देऊन त्यांना हतबल करता येईल आणि संभाजीच्या सैन्याच्या मदतीने मराठ्यांचे किल्ले जिंकून घेता येतील , अशी त्याला आशा होती . परंतु संभाजी २० नोव्हेंबर रोजी दिलेरखानाच्या छावणीतून पळाला , आणि डिसेंबरच्या सुरुवातीला तो पन्हाळा येथे जाऊन पोहोचला. (**बी. एम्.**, ५०४–५००)]

(१०) दिलेरखान विजापूरभोवतालचा मुलूख उध्वस्त करतो आणि राजधानीवर हल्ला चढवतो

बादशहाने दिलेरखानाला जो ठपका दिला होता , ती गोष्ट दिलेरखानाच्या मनात डाचत होती . त्यामुळे त्याने विजापूरवरील मोहिमेला पुन्हा सुरुवात केली . विजापूरला वेढा देऊन किंवा अचानक हल्ला करून विजापूर जिंकण्याच्या कामी त्याला आशा वाटत नव्हती . त्याचप्रमाणे विजापूरला वेढा देऊन मोर्चे उभारल्यास शिवाजी आपल्या पिछाडीवर हल्ला करील ही भीती त्याला वाटत होती . म्हणून दिलेरखानाने १४ नोव्हेंबर रोजी विजापूरच्या भोवतालचा प्रदेश सोडला आणि मिरज पन्हाळा भागावर आक्रमण करण्याच्या उद्देशाने त्याने पश्चिमेच्या दिशेने कूच केले . त्याने केलेली पहिली कारवाई म्हणजे भयंकर क्रौर्याने त्याने विजापूरचा मुलूख उध्वस्त केला ही होय . त्याच्या वाटेमध्ये लागलेली सर्व खेडी त्याने बेचिराख केली . त्या खेड्यातील सर्व हिंदू आणि मुसलमान पुरुषांना गुलाम म्हणून विकण्यासाठी त्याने कैदी केले. तेथील स्त्रियांनी आपल्या मुलाबाळांसहित विहिरीत उड्या टाकून आत्महत्या केली . २० नोव्हेंबर रोजी संभाजी दिलेरखानाच्या छावणीतून पळून विजापूर येथे गेला . तेथून सुमारे ४ डिसेंबर रोजी तो पन्हाळ्याला येऊन पोहोचला.

ऐनापूरपासून दिलेरखानाने पलट खाल्ली . नंतर त्याने विजापूर शहराच्या दक्षिण बाजूने खूप मोठा

वळसा घेऊन दोण आणि कृष्णा या नद्यांच्या खोऱ्यातील अतिशय सुपीक आणि समृद्ध प्रदेशावर हल्ला केला . दोण नदीचे खोरे म्हणजे विजापूरचे धान्याचे कोठार समजले जाई . वाटेमध्ये त्याने बागायती , शेतजमिनी आणि खेडीपाडी उध्वस्त केली , तेथील सर्व रहिवाशांना त्याने कैद केले , आणि तेथून चार डिसेंबर रोजी विजापूरच्या ईशान्येस ६ मैलांवर असलेल्या अलीयाबाद येथे तो पोहोचला . या ठिकाणाहून दररोज तो आपल्या तोफा आणि सैनिक घेऊन कूच करी आणि दररोज वेगवेगळ्या ठिकाणांवरून किल्ल्याच्या अभेद्य तटबंदीवर बेदरकारपणे तोफांचा भडिमार करून जवळील दारूगोळा संपवी आणि आपले सैनिक आणि घोडे यांना दमवी.

दिवसेंदिवस शहाआलम आणि दिलेरखान यांच्यामधील वैमनस्य वाढतच गेले . बादशहाने दिलेरखानाची कानउघाडणी करणारे एक अतिशय कडक पत्र त्याला लिहिले . दिलेरखानाची विजापूरसमोरील एकंदर स्थिती ही फारशी आशादायक नव्हती . [या वेढ्याची हकीकत पुढीलप्रमाणे आहे . किल्ल्यावरून झालेल्या तोफांच्या भडिमारामुळे मोगल सैन्यातील अनेक शिपाई आणि हत्ती ठार मारले गेले . किल्ल्यावरील शिबंदीने अनेक वेळा किल्ल्याबाहेर पडून मोगलांवर केलेल्या हल्ल्यात त्यांचे खूप नुकसान झाले . दररोज दोन्ही बाजूंकडून तोफांची सरबत्ती होई . दिलेरखानापाशी २० ,००० सैन्य असून देखील त्याला किल्ल्याला वेढा देता आला नाही. त्याने फक्त वेगवेगळ्या मोर्च्यांवरून किल्ल्यावर तोफांचा भडिमार केला. (**दिल.,** १६३) या भडिमारात शहरातील बागा आणि घरेदारे व त्याचप्रमाणे शहापूर तलावातून किल्ल्याला पाणीपुरवठा करणारा कालवा यांचा नाश झाला . २२ डिसेंबर रोजी किल्ल्यावरील शिबंदीने अल्लापूर दरवाजातून बाहेर पडून मोगलांवर हल्ला केला, आणि त्यांचे खूप नुकसान केले. (**बी. एस्.,** ५०२)

या हल्ल्यात मालोजी घोरपडे , त्याच्या मामाचा मुलगा माणिकजी खरे (खोपडे?) आणि मसुदने नेमलेले अधिकारी सोडल्यास विजापूरचे सर्व अधिकारी कामास आले . किल्ल्यात जेमतेम ५००० सैन्य होते . मोगलांचे कसलेही नुकसान करण्याचे सामर्थ्य विजापुरजवळ उरले नव्हते. परंतु परमेश्वराची अशी इच्छा होती की यावेळी विजापूर मोगलांच्या ताब्यात जाऊ नये . (**बी. एस्.,** ५०३) शिवाजीच्या प्रदेशातून किल्ल्यामध्ये भरपूर अन्नधान्य पोहोचू लागले. त्यामुळे तेथे सुबत्ता झाली तर छावणीमध्ये याच्या अगदी उलट स्थिती निर्माण झाली. नाईलाज म्हणून दिलेरखानाने तहाची तयारी दाखविली . परंतु मोगलांची परिस्थिती किती निराशाजनक आहे हे माहीत असल्यामुळे मसुदने ही मागणी फेटाळून लावली.

इकडे शहाआलम आणि दिलेरखान यांच्यामधील वैमनस्य दिवसेंदिवस वाढू लागले . राजपुत्राने दिलेरखानाला वारंवार सांगून पाठविले की तुम्ही विजापूरचा नाद सोहन शिवाजीची मोगल प्रदेशातून हाकालपट्टी करावी . त्याने गुप्तपणे मसूदला पत्र पाठवून कळविले की विजापूरहून दिलेरखानाला परत बोलावण्याबद्दल आणि विजापूरबरोबर तह करण्याबद्दल आपण बादशहाचे मन वळवू . शहाआलमने बादशहाकडे दिलेरखानाबद्दल खूप तक्रारी केल्या त्याचा बादशहावर विशेष परिणाम झाला नाही . परंतु दिलेरखानाला जे अपयश आले होते त्याचा परिणाम होऊन बादशहाने दिलेरखानाला अतिशय कडक असे पत्र लिहिले . तो लिहितो, "तुझे पहिले कर्तव्य बादशाही मुलखाचे रक्षण करण्याचे होते . ते सोडून हा कोणता मूर्खपणा तू चालविला आहेस ? तू माझ्या साम्राज्याचे रक्षणही केले नाहीस किंवा तुझा उद्देशही तुला साध्य करता आला नाही तू ताबडतोब विजापूरचा वेढा उठवून बादशाही मुलखाच्या रक्षणासाठी कूच कर ." दक्षिणेची सर्व सुत्रे शहाआलम याच्याकडे होती . त्याने सर्व अधिकाऱ्यांना कळविले की "तुम्ही दिलेरखानाला द्रव्य , तोफा अगर दारुगोळा याचा पुरवठा करू नका . इतकेच नव्हे तर विजापूरवर हल्ला करण्याची दिलेरखानाने आज्ञा दिल्यास ती मानू नका ." (**बी. एस्.,** ५०४–५०५)] त्याच्या फौजेने त्याचे हुकूम मानण्यास साफ नकार दिला. अखेर त्याने २९ जानेवारी १६८० रोजी बैगम हौजजवळील आपली छावणी मोडली , आणि माघार घेण्यास सुरुवात केली . विजापूरच्या किल्ल्यासमोर त्याचे अशा तऱ्हेने ५६ दिवस फुकट गेले . त्यानंतर दिलेरखानाने एखाद्या पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणे भटकण्यास सुरुवात केली, आणि राक्षमी क्रौर्याने हत्या आणि लुटालूट यांचा कहर केला . निरपराध शेतकऱ्यांवर त्याने कोणतेही कारण नसताना भयानक अत्याचार केले , आणि विजापूर शहरापासून दक्षिणेस कृष्णा नदीपर्यंत आणि पूर्वेकडे कृष्णा आणि भीमा यांच्या बेचंगळ्यातील सर्व मुलूख वैराण जंगलाप्रमाणे करून सोडला . आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे वाटेत दरोडेखोरी करीत दिलेरखानाने बेरड लोकांच्या प्रदेशावर आक्रमण केले . त्यांची राजधानी सागर येथे होती , आणि त्यांच्यावर पामनायक राज्य करीत होता . २० फेब्रुवारी १६८० रोजी तो गोगी येथे पोहोचला. गोगीपासून ८ मैलांवर असलेल्या सागरवर त्याने जेव्हा हल्ला केला तेव्हा त्याचा संपूर्ण पराभव झाला. किल्ल्याच्या तटबंदी पाठीमागे आणि त्याचप्रमाणे डोंगर आणि कडेकपारे यांच्या आश्रयाने आडोसा घेतलेल्या बेरड पायदळी सैनिकांनी खेड्यापाड्यांमध्ये दाटीदाटीने छावणी करून राहिलेल्या मोगल सैनिकांवरती आपल्याजवळील बंदुकांचा बिनचूक मारा करून त्यांची जबरदस्त हानी केली.

अनुक्रमणिका

बादशाही घोडदळ घाबरून इतस्ततः सैरावैरा पळत सुटले . त्यांच्या पिछाडीवर चपळ अशा बेरड स्वारांनी भयानक हल्ले चढविले . मोगल घोडेस्वार आपल्यावर दया दाखविण्यासाठी अतिशय विकलतेने तोंड वेंगाडू लागले . त्या दिवशी मोगलांची जवळ जवळ १७०० माणसे जाया झाली . मोगल सैनिकांचे मनोधैर्य साफ खचून गेले . आणि शत्रूला तोंड देण्यासाठीं दिलेरखानाने ५ हजार रुपयांच्या रकमेची दाखविलेली लालूच त्यांनी धिक्कारली . [दिलेरखानाने सागरला दिलेल्या वेढ्याची हकीकत पुढे दिली आहे : २० फेब्रुवारी रोजी त्याने सागर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या शहापूर येथे मोर्चे उभे केले . त्याच्या सैन्याच्या उजव्या आणि डाव्या फळीवर अबदुल गफूर आणि इखलासखान हे दोघे असून सैन्याच्या मध्यभागी दिलेरखान होता . दिवसभर दोन्ही पक्षांकडून गोळीबार चालू होता . संध्याकाळी बेरड लोकांनी गफुरवर हल्ला करून त्याला पाठीमागे रेटले. सूर्यास्तानंतर दिलेरखानाने गोगी येथे माघार घेतली.

२१ फेब्रुवारी रोजी दिलेरखान हा आपले सर्व सैन्य आणि तोफखाना घेऊन परतला . त्याने शहापूर दरवाजाला खिंडार पाडले . त्याच्या फौजा खेड्यात शिरल्या आणि त्यांनी खेडे पूर्णपणे लुटले . खेड्याचा ताबा घेऊन बसलेल्या मोगल सैनिकांवर बेरड शिबंदीने अचूक मारा केला . मोगलांचे इतके प्रचंड नुकसान झाले की दिलेरखानाने दुपारी खेडे सोडले आणि गोगीकडे माघार घेण्याचा सैन्याला हुकूम दिला . माघार घेणाऱ्या मोगल सैन्यांवर आता बेरडांनी किल्ल्याबाहेर पडून चहूबाजूंनी हल्ला चढविला . दिलेरखानाचा मुलगा जेमतेम वाचला . लुटीसाठी बाहेर पडलेले मोगल सैनिक मोठ्या संख्येने ठार मारले गेले . मोगल घोडेस्वार सैरावैरा पळू लागले . आणि त्यांच्या पाठलागावर असलेल्या बेरड सैनिकांजवळ जीवदान मागू लागले. या हल्ल्यात मोगलांचे १७०० सैनिक ठार झाले.

ही लढाई निर्णायक ठरली. दिलेरखानाला झालेल्या पराभवाचा सूड घ्यावयाचा होता परंतु त्याच्या सैनिकांचे मनोधैर्य इतके खचून गेले होते की त्यांनी लढण्याचे नाकारले . इतके झाल्यावरदेखील दिलेरखानाने माघार घेण्याचे नाकारल्यामुळे खुद्द बादशहाच्या खासखेलानी त्याची निर्भर्त्सना केली आणि त्याच्याभोवती पहारेकरी ठेवले . बादशहाची त्याच्यावर गैरमर्जी झाल्याचे कळताच त्याच्या सैनिकांनीही त्याला शिवीगाळ केली. त्याने वेढ्याचे काम चालू ठेवण्याचे ठरविल्यास त्याला सोडून निघून जाण्याचा त्यांनी निश्चय केला. (**बी. एस्.** ५०९-५१२)]

(११) दिलेरखानाची बडतर्फी आणि त्याला परतण्याचा आलेला हुकूम, १६८०

अशा तऱ्हेने दिलेरखानाचे पूर्णपणे गर्वहरण झाले , आणि त्याने २३ फेब्रुवारी रोजी आपल्या परतीच्या प्रवासाला सुरुवात केली. विजापूरच्या पूर्वेकडून तो उत्तरेच्या दिशेने निघाला . वाटेत त्याने खेडी जाळून टाकली आणि तेथील नागरिकांना ओलीस म्हणून धरून नेले . दिलेरखानाची दक्षिणेमधील बदली म्हणून झालेली सुभेदारीच्या अधिकारावरील नेमणूक १६७८ च्या ऑक्टोबरमध्ये संपली . कारण तेव्हा चौथ्यांदा शहा आलम हा सुभेदारीच्या जागेवर रुजू होण्यासाठी औरंगाबाद येथे दाखल झाला होता . राजपुत्र या अधिकारावर दक्षिणेमध्ये १६८० च्या मे महिन्यापर्यंत होता . त्याचा राज्यकारभार हा ऐदीपणाचा असल्यामुळे त्याच्या पदरी यशाचे माप पडले नाही. बादशहा त्यामुळे नाराज झाला आणि त्याने शहा आलम आणि दिलेर या दोघांनाही परत बोलाविले . त्याने खानजहान बहादूरखान याची दक्षिणेचा सुभेदार म्हणून दुसऱ्यांदा नेमणूक केली . खानजहानने औरंगाबाद येथे १६८० च्या मे महिन्यात शहा आलमपासून सुभेदारीचे अधिकार घेतले (**एन् ए.**, १९३).

(१२) १६८० ते १६८४ पर्यंत औरंगजेबाचे विजापूरबाबतचे धोरण

दिलेरखानाचे अपयश आणि १६८० च्या फेब्रुवारी महिन्यात त्याने घेतलेली माघार , यानंतर ४ वर्षे मोगलांनी विजापुरविरुद्ध कोणतीही निर्णायक कामगिरी केली नाही . कारण संभाजीच्या बेगुमान आव्हानापुढे ते अतिशय गांजून आणि संत्रस्त होऊन गेलेले होते . १३ जुलै १६८१ रोजी औरंगजेबाने विजापूरचा एक प्रमुख सरदार शारजाखान याला मित्रभावाने एक पत्र लिहिले . या पत्रात त्याने संभाजीचा नाश करण्यासाठी आणि त्याने बळकाविलेला विजापूरचा मुलूख परत जिंकून घेण्यासाठी मोगल सेनापतींबरोबर सहकार्य करण्यासंबंधी त्याच्यावर दडपण आणण्याचा प्रयत्न केला . अशाच तऱ्हेचे पत्र

शाहरबानू या नुकत्याच आजमबरोबर लग्न झालेल्या विजापुरी राजकन्येने १८ जुलै रोजी शारजाखानाला लिहिले आणि स्वतःच्या वतीने त्याला वरील प्रमाणेच विनंती केली (**बी. एस्, ५२०-२१, ५२८**). परंतु औरंगजेबाने आपल्याबरोबर सहकार्य करण्यासंबंधी विजापुरी अधिकाऱ्यांना जे आवाहन केले त्याला कोणताच प्रतिसाद मिळाला नाही . इतकेच नव्हे तर विजापुरी सरकारकडून मराठ्यांना जी मदत मिळत होती त्याबाबतचे उघडउघड आणि वारंवार पुरावे त्याच्या हाती येऊन पोहोचले . तेव्हा औरंगजेबाने विजापूरविरुद्ध दुसरी आघाडी उघडून संभाजीवरील दबाव वाढविण्याचा आणि विजापूरकरांना स्वतःची साधनसामग्री आपल्या राज्याच्या रक्षणासाठी एकत्रित करण्यासाठी भाग पाडण्याचा निश्चय केला . इ. स. १६८२ च्या एप्रिलमध्ये विजापूर राज्यात घुसण्यासाठी राजपुत्र आजम याला मोठे सैन्य देऊन रवाना करण्यात आले . त्याने सरहद्दीलगतचा प्रदेश उद्ध्वस्त केला आणि विजापूरच्या उत्तरेस १४० मैलांवर असलेला धारूरचा किल्ला जिंकून घेतला . ही मोहीम अनेक महिने रेंगाळली . राजपुत्राची आगेकूच दक्षिणेकडे जेमतेम नीरानदीपर्यंत झाली होती तोच त्याला बादशहाकडून परत फिरण्याचा हुकूम आला (जून १६८३). काही महिन्यानंतर विजापूरवर होणारे अशा तऱ्हेचे विस्कळीत हल्ले तेवढ्यापुरते तरी थांबले (**एम्. ए.**, २१८-२१९, २३०, २३९; **बी. एस्**., ५२९).

विजापूरची परिस्थिती आता अतिशय निराशाजनक होती . उतरती कळा लागलेल्या विजापूरच्या आदिलशाही दरबारात ५ वर्षे वजीरपदावर घालविल्यानंतर सिद्दी मसूद हा एकंदर परिस्थितीबद्दल पूर्णपणे निराश झालेला होता. "सर्व तऱ्हेचे प्रयत्न केल्यानंतरही राज्यकारभारात सुव्यवस्था घडवून आणण्यासाठी आणि सरकार सुधारण्यासाठी त्याला अपयश आलेले होते . एक दिवस सुद्धा साध्या शेतकऱ्यापासून तो राज्याच्या मुख्यापर्यंत कोणाही व्यक्तीला शांत मनःस्थितीत आपली भाकरी खाणे अशक्य होऊन गेले होते . अशी एक रात्रदेखील गेली नाही की ज्या दिवशी सुलतानापासून तो भिकाऱ्यापर्यंत कोणाही व्यक्तीला झोप लागली असेल " (**बी. एस्**., ५२५). अखेर राज्यकारभारात सुधारणा घडवून आणण्याचे कामी पूर्णपणे निराश झाल्याने २१ नोव्हेंबर १६८३ रोजी मसूदने विजापूर दरबाराचा त्याग केला आणि अदोनीच्या किल्ल्यात पोहोचल्यानंतर औपचारिकपणे त्याने आपल्या अधिकार पदाचा राजीनामा पाठवून दिला . १९ मार्च १६८४ रोजी अका खुसराव याला वजीरपदाची वस्त्रे देण्यात आली . परंतु ६ महिन्याच्या आतच २१ ऑक्टोबर रोजी त्याचा मृत्यू झाला . या सुमारास राज्याचे संरक्षण करण्यासाठी अतिशय जारीने उपाययोजना करण्यात आली. ही योजना पार पाडण्याचे काम शिकंदर आदिलशहाने आपला शूर सेनानी सय्यद मखदूम ऊर्फ शारजाखान याच्याकडे ३ मार्च १६८४ रोजी सोपविले . त्याचा मांडलिक वाकीणखेड्याचा पामनायक हा होता. त्याचे बेरड अनुयायी देशामध्ये उत्तम नेमबाज म्हणून ओळखले जात असत. पामनायकाला त्याच्या अनुयायासहीत राजधानीकडे बोलाविणे पाठविण्यात आले.

३० मार्च रोजी औरंगजेबाकडून एक पत्र येऊन पोहोचले . त्या पत्रामध्ये मोगल साम्राज्याचा मांडलिक म्हणून आदिलशहाकडे बादशाही फौजांना ताबडतोब रसद पुरविण्याची , मोगल फौजांना स्वेच्छेने, विजापूरच्या मुलखातून जाऊ देण्याची, मराठ्यांच्या बरोबर चाललेल्या बादशहाच्या युद्धात ५ ते ६ हजार घोडेस्वारांची कुमक करण्याची , संभाजीला मदत करण्यापासून अथवा त्याचा पाठपुरावा करण्यापासून परावृत्त राहण्याची, आणि शारजाखानाला विजापूरमधून हाकलून देण्याची मागणी करण्यात आलेली होती.

विजापूरवर मोगलांचे आक्रमण

दरम्यान मोगलांनी आदिलशाही राज्याचे बारीक बारीक लचके तोडण्याचे काम आणि जिंकलेल्या मुलखात आपली ठाणी प्रस्थापित करण्याचे काम चालू ठेवले . मे महिन्याच्या अखेरीला मोगल सेनापनी खानजहान याने मंगळवेढे आणि सांगोला व त्या भोवतालचा प्रदेश आपल्या ताब्यात घेतला . यानंतर शिंकदर आदिलशहाने औरंगजेबाला एक अतिशय बाणेदार उत्तर पाठविले , आणि त्यात अशी मागणी केली की मोगलांनी पूर्वी विजापूरचा घेतलेला मुलूख आणि खंडणी ताबडतोब परत करावी , विजापूरच्या राज्यात त्यांनी उभारलेली ठाणी ताबडतोब काढून घ्यावी , संभाजीविरुद्ध मोगलांनी आपल्या स्वतःच्या मुलखातून चाल करून जावे आणि संभाजी अथवा शिवाजी यांनी आदिलशहाचा जिंकलेला इंच इंच मुलूख परत मिळवून व विजापूरच्या स्वाधीन केल्याखेरीज मराठ्यांच्या राजाबरोबर तह करू नये (**बी. एस्**, ५३०).

यानंतर औरंगजेबाने आपल्या सेनापतींना विजापूरच्या मुलखात ठाणी उभी करण्याची आज्ञा दिली. परिणामी मोगल सेनापती आणि विजापूरचा प्रमुख लष्करी अधिकारी शारजाखान यांच्यामध्ये संघर्ष निर्माण झाला. शारजाखान हा विजापूरच्या सरहद्दीचे संरक्षण करण्याचे काम करीत होता . वरील संघर्ष झाल्यानंतरही दोन्ही राज्यांमध्ये अधिकृतरित्या युद्ध पुकारले गेले नाही . यानंतर काही काळापर्यंत शिकंदर आदिलशहाला मोगल दरबारातून पत्रे आणि मानाचा पोशाख वगैरे गोष्टी येतच राहिल्या.

इ. स. १६८५ च्या जानेवारीमध्ये शारजाखान हा राजधानीला परतला . त्याचप्रमाणे मसूदचा एक मुलगा आपल्या बापाचा सल्ला सुलतान शिकंदर आदिलशहाला देण्यासाठी विजापूर येथे आला . याच्या थोड्या अगोदर विजापूरकडे मदतीचे आश्वासन देणारा खलिता गोवळकोंड्याहून पोहोचला होता . २१ फेब्रुवारी रोजी मराठा सैनिकांची एक तुकडी संभाजीचा दिवाण मेलगिरी पंडित याच्या हाताखाली विजापूर येथे येऊन पोहोचली . त्या तुकडीला सुलतान स्वतः जुहरापूर दरवाज्यापाशी सामोरा गेला होता . मोगलांबरोबरचे विजापूरकरांचे राजकीय संबंध अगोदरच तुटलेले होते . दोन्ही बाजू तलवारीच्या जोरावर आपापसातील भांडणाचा निकाल लावून घेण्याची तयारी करीत होत्या . एक एप्रिल १६८५ रोजी मोगलानी पहिले खंदक खणले आणि विजापूरच्या वेढ्याला सुरूवात झाली.

(१३) विजापूरच्या वेढ्याची सुरूवात

विजापूर शहराभोवती असलेल्या भिंतीच्या आतमध्ये जवळ जवळ २॥ चौरस मैल एवढ्या जागेचा समावेश झालेला होता . या भिंतीने शहराभोवती एक दीर्घ वर्तुळच जणू काही निर्माण केलेले होते . या भिंतीसभोवर असलेला खंदक ४० ते ५० फूट रुंद होता . हा खंदक ओलांडल्यानंतर अतिशय प्रचंड आणि मजबूत अशा तटबंदीलगत या भिंतीची उंची ३० पासून ५० फुटांपर्यंत होती , आणि सर्वसाधारण जाडी २० फुटांपर्यंत होती . या भिंतींला १० दरवाजे असून जवळ जवळ ९६ बुरुजांनी त्यांना मजबुती आणण्यात आलेली होती. भिंतीच्या वरच्या बाजूला बुरुजाबुरुजामध्ये १० फूट उंचीची बचावाकरता म्हणून एक मजबूत तटबंदी बांधण्यात आलेली होती. बंदुका आणि तोफा यांचा मारा करणे सुलभ जावे म्हणून या भिंतीला फटी ठेवण्यात आलेल्या होत्या . औरंगजेबाने तटबंदीच्या पश्चिमेकडील शारजी बुरुजाकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले आणि आपल्या तोफखान्याचा सारा भडिमार दक्षिणेकडे असलेल्या लांडाकसाब या बुरुजावर एकवटला. या बुरुजाजवळच असलेल्या लढाऊ तटबंदीला एक खिंडार पाडण्यात आले . हा बुरूज आणि फिरंगीबुरूज यांच्यामध्ये मंगळी दरवाजा होता. या दरवाज्यामधून विजय मिळाल्यानंतर औरंगजेबाने जेव्हा प्रवेश केला तेव्हा त्या बुरुजाचे नाव बदलून फते दरवाजा असे ठेवण्यात आले.

शहराच्या मध्यभागात आणची एक आतील तटबंदी आहे . या तटबंदीला किला अर्क असे म्हणत . या तटबंदीमुळे एक वर्तुळ तयार झाले असून त्याचा घेर जवळ जवळ १ मैल इतका आहे . या तटबंदीच्या आतील आवारात सुलतानाचे राजवाडे आणि आदिलशाही सरकारच्या इमारती होत्या . परंतु ज्याला किला अर्क म्हटले जात असे ती जागा संरक्षणाच्या दृष्टीने अनुकूल नव्हती . विजापूर शहराचा तो एक अतिशय खोलगट असा भाग होता आणि शहराच्या वायव्य दिशेकडे असलेल्या उंच टेकडीवरून किला अर्कवर सहज भडिमार करता आला असता.

मोगलांनी आपले वेढ्याचे काम १ एप्रिल १६८५ रोजी सुरू केले . त्या दिवशी रुहुल्लाखान आणि कासिमखान यांनी किल्ल्याच्या भिंतीपासून अर्धा मैल अंतरावर असलेल्या शहापूर या वायव्येकडील ठिकाणावर आपले मोर्चे उभारले. त्याच्या पाठीमागील बाजूला एक मोठा तलाव होता. इकडे दुसरा मोगल अधिकारी खानजहान याने शहराच्या पश्चिमेस असलेल्या जुहरापूर अथवा रसुलपूर या उपनगराच्या बाजूने आपल्या मोर्चांची उभारणी केली . १४ जून रोजी राजपुत्र आजम हा मोठे सैन्य घेऊन दाखल झाला आणि त्याने सैन्याचे सर्वाधिकार आपल्याकडे घेतले . शहराच्या दक्षिणेकडे असलेल्या बेगम हौज या ठिकाणी त्याने आपला मुक्काम केला.

वेढा घालून किल्ला घेण्याचे कामी अतिशय सावकाशपणे आणि गलथानपणे वेढ्याचे काम चालविण्याबद्दल मोगलांची प्रसिद्धी होती . त्यात आणखी भर म्हणून की काय विजापूर शहराच्या भोवतालची जमीन अतिशय कणखर अशी होती . पृष्ठभागाखाली १–२ फूट खणल्यावर अतिशय कठीण असा खडक लागे. (**बी. एस्**., ५३६-३९). साहजिकच मोगलांची प्रगती अतिशय धीमेपणाने आणि कष्टाने होत होती.

मोगलांच्या अडचणी

वेढा सुरू झाल्याला आता एक वर्षापेक्षा जास्त दिवस होऊन गेलेले होते . तरी देखील विजापूरच्या वेढ्याला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली असे म्हणता आले नसते . किल्ल्यावरील शिबंदी त्यांना पाहिजे त्यावेळी किल्ल्याच्या बाहेर पडे आणि मोगल सैनिकांच्या मोर्चावर हल्ले चढवी . त्याचप्रमाणे बाहेरून किल्ल्यामध्ये रसद आणि इतर सामग्री यांचा अतिशय मुक्तपणे प्रवेश होत असे.

आदिलशहावर ओढवलेल्या या संकटाचे प्रसंगी त्याच्या मदतीला त्याचे दोस्त धावून आले . १० जून रोजी सिद्दीमसूद याच्या फौजेची तुकडी येऊन दाखल झाली. १४ ऑगस्ट रोजी गोवळकोंड्याचे सैनिक येऊन पोहोचले , आणि अखेर १० डिसेंबर रोजी हंबीररावाच्या हाताखाली संभाजीच्या सैन्याची दुसरी तुकडी येऊन पोहोचली. (जेधे शकावली) [विजापूरच्या वेढ्यात मोगलांना ज्या अडचणी सोसाव्या लागल्या त्याची हकीकत पुढे दिली आहे : या सुमारास मोगल आणि गोवळकोंडा यांच्यामध्ये वैमनस्य निर्माण झाले . त्यामुळे मोगलांची बाजू अधिकच कमकुवत झाली . विजापूरचा वेढा सुरू होण्याचे अगोदर औरंगजेबाने कुतुबशहाला धमकी दिली होती की त्याने विजापूरला मदत केल्यास त्याचे परिणाम भयंकर होतील (**बी. एस्.,** ५३३). जुलै १६८४ मध्ये शिकंदर आदिलशहाने अबुलहसन याला दोन्ही राज्यांत संरक्षणाचा करार करण्याविषयी आवाहन केले होते. आदिलशहाने आपला वकील कुतुबशहाकडे पाठविला होता . दक्षिणेतील सर्व राज्यांनी मोगलांविरुद्ध एकत्र यावे याबाबत कुतुबशहाचा वजीर मादण्णा पंडित याचे मन वळविण्यात त्याला यश आले . विजापूरच्या गादीवर असलेला १६ वर्षांचा आदिलशहा मोगल राजसत्तेला इतक्या हिरिरीने तोंड देत आहे हे पाहिल्यावर कुतुबशहाने मोठ्या उत्साहाने आदिलशहाला मदत करण्यास आपली संमती दिली.

सोलापूर येथे आल्यावर औरंगजेबाने आपला अधिकारी बहरामंदखान याला २४ मे १६८५ रोजी गोवळकोंड्याकडे देखभाल करण्यासाठी पाठविले. कुतुबशहाने आपण १० ,००० फौज आदिलशहाच्या मदतीसाठी पाठवीत असल्याचे आणि अशाच तऱ्हेचे आवाहन आपण संभाजीला केले आहे अशा मजकुराचे एक पत्र मोगल दरबारातील आपल्या वकिलाला लिहिले होते , ते बहरामंदखानाच्या हाती सापडले . या

परिस्थितीशी तोंड देण्याकरिता औरंगजेबाने २८ जून रोजी शहा आलम याला मोठी फौज देऊन हैद्राबादवर हल्ला करण्यासाठी पाठविले . यामुळे विजापूर जिंकण्याच्या कामी अडथळे निर्माण होतील याची औरंगजेबाला जाणीव होती . या सुमारास विजापूरच्या ईशान्येस ३० मैलावर इंदी येथे खानजहान मोगल सैन्याच्या दळणवळणाच्या मार्गाचे रक्षण करण्याच्या मार्गावर होता . त्याला शहा आलमला जाऊन मिळण्याचा हुकूम देण्यात आला. (**एम. ए.**, २५९–२६१)]

२९ जून १६८५ रोजी राजपुत्र आजम हा विजापूर किल्ल्याच्या अगदी नजीक येऊन पोहोचला . परंतु एका महिन्याच्या आतच त्याला शत्रूबरोबर तीन अतिशय भयानक अशा लढाया द्याव्या लागल्या . १ जुलै रोजी अबदूर रोफ आणि शारजाखान यांनी मोगलांच्या मोर्चावर हल्ले चढविले . त्यामध्ये अनेक मोगल अधिकारी जखमी आणि ठार झाले. (**एम्. ए.**, २६३; **बी. एस्.**, ५३६)

दुसऱ्या दिवशी वेढ्याच्या छावणीत येणाऱ्या रसदीवर दक्षिणी फौजांनी हल्ला केला आणि त्यांनी रसद लुटून नेली.

(१४) राजपुत्र आजम संकटात सापडतो ; फिरोजजंग याजकडून राजपुत्र आजम याजवरील संकटाचे निवारण.

या सुमारास मोगलांच्या छावणीमध्ये दुष्काळाने कहर उडवून दिला . विजापूरच्या सभोवतालच्या भागात वारंवार लुटालूट झाल्यामुळे तेथून कोणताही अन्नपुरवठा होणे शक्य नव्हते . त्याचप्रमाणे उत्तरेकडील रस्ते मराठ्यांच्या हालचालीमुळे आणि पावसाळा सुरू झाल्याने ओढ्यांना आलेल्या पुरामुळे बंद झालेले होते . "धान्याची विक्री १ रुपयाला १५ शेर या भावाने होत होती आणि ते सुद्धा अगदी थोड्या प्रमाणात मिळत होते " (**दिलकुशा**, १९८).

मोगलांजवळ माणसे कमी पडल्यामुळे सोलापूर आणि विजापूर या दोन शहरामधोमध असलेल्या इंदी या गावातील आपले ठाणे मोगलांनी उठविले होते . साहजिकच मोगलांच्या मुख्य छावणीपासून विजापूरला वेढा देऊन बसलेल्या छावणीपर्यंत जाणारा रस्ता आता बंद झाला होता (**दिल.**, १९८; **एम्. ए.**, २६६).

आपल्या मुलाची सुटका करण्याचा एकच मार्ग औरंगजेबाला दिसत होता आणि तो म्हणजे त्याला त्याच्या सैन्यासह विजापूरहून माघार घेण्याचा हुकूम देणे हा होय . राजपुत्राने आपल्या युद्धमंडळाची बैठक बोलाविली. या बैठकीत सर्व सेनापतींनी माघार घेण्याच्या बाजूनेच आपले मत दिले . परंतु राजपुत्र आजम याला अनिवार उमेद चढली होती . त्याचा भाऊ आणि प्रतिस्पर्धी शहाआलम हा कोकणच्या मोहिमेवरून भयंकर अपयश पदरात घेऊन नुकताच परतला होता . त्याच्या पायरीला जाऊन बसण्याची राजपुत्र आजम याची बिलकुल इच्छा नव्हती . आपल्या अधिकाऱ्यांकडे वळून राजपुत्र आजम उद्गारला , "तुम्ही जे काही बोललात ते फक्त तुमच्या स्वतःच्या पुरते होते . आता माझे बोलणे ऐकून घ्या . जोपर्यंत माझ्या जीवात जीव आहे तोपर्यंत मी , माझे दोन मुलगे आणि माझी बेगम या धोक्याच्या ठिकाणापासून कधीही माघार घेणार नाही. मी मेल्यानंतर बादशहानी या ठिकाणी यावे आणि माझा मृतदेह दफनासाठी या ठिकाणाहून हलविण्याची आज्ञा द्यावी . माझे अनुयायी या नात्याने माझे तुम्हाला असे सांगणे आहे की तुम्हाला पाहिजे असल्यास तुम्ही माझ्याबरोबर राहा अथवा निघून जा ." यावर तेथे जमलेल्या सर्व मंडळींनी एकमुखाने आवाज दिला, "जे आपले मत आहे त्या सारखेच आम्हा सर्वांचे मत आहे."(**एम्. ए.**, २६३–२६४).

आपल्या मुलाचा हा निश्चय जेव्हा औरंगजेबाच्या कानावर गेला तेव्हा त्याने ताबडतोब त्याला रसद पाठविण्याची व्यवस्था केली . पाच हजार बैलांवर अन्न धान्य लादून ते राजपुत्र आजम याजकडे रवाना करण्यात आले . त्याचप्रमाणे शेकडो बैलांवर खजिना आणि भरपूर दारूगोळा लादण्यात येऊन त्यांचीही रवानगी आजमकडे करण्यात आली . ४ ऑक्टोबर १६८५ रोजी गाजीउद्दीनखान बहादूर फिरोजजंग याच्या हाताखाली वरील रसदीने लादलेले बैल सुसज्ज अशा सैनिकासमवेत बादशाही छावणीतून निघाले . इंदी येथे शारजाखानाने केलेला हल्ला परतवून लढत लढत फिरोजजंग हा राजपुत्र आजमच्या दुष्काळाने पीडलेल्या छावणीत येऊन दाखल झाला (**के. के.**, **भाग २**, ३१७; **ईश्वरदास**, ९७६; **दिल.**, १९९; **एम्. ए.**, २६५).

फिरोजजंग याचे छावणीत आगमन झाल्यावर "मोगल छावणीत दुष्काळाच्या ऐवजी सुबत्ता नांदू लागली आणि भुकेने काळवंडून गेलेल्या शिपायांच्या अंगात तजेला आला ." फिरोजजंगाने मिळवलेले दुसरे यश म्हणजे सहा हजार बेरड पायदळाचा त्याने लावलेला निकाल हे होय . या पायदळातील प्रत्येक सैनिकाच्या डोक्यावर धान्याने भरलेली एकेक गोण होती . त्यांचा पुढारी पामनायक हा रात्रीच्या वेळी किल्ल्यामध्ये गुप्तपणे ही रसद नेण्याचा प्रयत्न करीत होता . ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीला कुतुबशहाची राजधानी हैद्राबाद येथे शहाअलम याने केणताही प्रतिकार न होता प्रवेश केला . कारण कुतुबशहाने आपल्याला गोवळकोंड्याच्या किल्ल्यात कोंडून घेतलेले होते . त्याचे अनेक अधिकारी त्याला सोडून शहाअलम याला येऊन मिळाले . कुतुबशाही राज्यावरील मोगलांचा ताबा १६८६ च्या मार्च महिन्यात अधिकृतपणे जाहीर झाला . कारण त्यावेळी विजापूर आणि मराठे यांजबरोबर मैत्रीच्या धोरणाचा पुरस्कार करणारा गोवळकोंड्याचा मुख्य वजीर मादण्णा पंडित याचा खून झाला.

(१५) विजापूरच्या वेढ्यात मोगलांचे झालेले हाल आणि त्यांना सोसाव्या लागलेल्या अडचणी

या सुमारास (१६८६ जून) विजापूरचा वेढा जवळ जवळ १५ महिने रेंगाळला होता आणि वेढ्याचा कोणताच निर्णायक निकाल अजून लागलेला नव्हता.

वेढ्यामध्ये असलेल्या मोगल अधिकाऱ्यांत भांडणे आणि परस्परांविषयी द्वेषबुद्धी यांनी कहर उडवून दिला होता. त्यामुळे बादशहाची अशी खात्री झाली होती की वेढ्याची सूत्रे आपण स्वतः हाती घेतल्याखेरीज किल्ल्याचा पाडाव होणार नाही . १४ जून १६८६ रोजी त्याने सोलापूर सोडले आणि ३ जुलै रोजी तो किल्ल्याच्या पश्चिमेकडील रसुलपूर या उपनगरात दाखल झाला (**एम्, ए.**, २७६–२७७). वेढ्याचे काम अधिक नेटाने चालविण्यात यावे अशा तऱ्हेचे हुकूम त्याने ताबडतोब जारी केले . विजापूर शहर सर्व बाजूंनी पूर्णपणे वेढण्यात आले . बादशहाचा सर्वांत मोठा हयात असलेला मुलगा राजपुत्र शहाआलम याच्याकडे किल्ल्याच्या वायव्येकडील भागाचे म्हणजेच शहापूर दरवाज्याकडील छावणीच्या मोर्चाचे नेतृत्व होते . वेढ्याच्या एकंदर कामाचे अधिकार राजपुत्र आजम याजकडे होते . त्याच्यावर आघाडी मिळवावी अशी शहाआलमची मनापासूनची इच्छा होती . त्याने शिकंदर आदिलशहा आणि त्याचे अधिकारी याजबरोबर किल्ल्याचा ताबा त्यांनी लढाई न देता मोगलांकडे द्यावा या हेतूने पत्रव्यवहार सुरू केला . यामध्ये त्याचा हेतू विजापूर जिंकून घेणारा विजयी वीर म्हणून राजपुत्र आजम याच्याकडे जे श्रेय जाणार होते ते हिरावून घेण्याचा होता. त्याचा एक अतिशय विश्वासू अधिकारी शहाकुली हा किल्ल्यातील शिबंदीबरोबर वाटाघाटी करण्यासाठी गुप्तपणे किल्ल्यात जात असे. वरील गोष्ट मोगल छावणीमध्ये सर्वांच्या तोंडी झाली आणि खुद्द महमद आजमशहा आणि बादशहा यांच्या कानावर गेली (**के. के., भाग २**, ३२०–३२१). बादशहाने वरील

गोष्टीबद्दल शहाआलमची निर्भर्त्सना केली . वरील भानगडीत ज्या अधिकाऱ्यांचा हात होता त्यांना तुरुंगात टाकण्यात आले आणि इतरांची छावणीमधून हकालपट्टी करण्यात आली (**एम्. ए.,** २९३). त्या वर्षी पाऊस न पडल्यामुळे सर्व दक्षिण देशात दुष्काळाने कहर उडवून दिलेला होता . परिणामी वेढा घालून बसलेल्या मोगल सैनिकांची अवस्था अधिकच शोचनीय झाली . परंतु यापेक्षाही वेढ्यामध्ये अडकलेल्या शिबंदीचे हाल दसपटीने अधिक होते . "किल्ल्यामध्ये असंख्य माणसे आणि घोडी मरत होती . घोड्याचा तुटवडा पडल्यामुळे शत्रूच्या छावणीभोवती घिरट्या घालून आणि शत्रूच्या चुकलेल्या स्वारांना ठार करून त्याचे दळणवळणाचे मार्ग रोखून धरण्याचा दक्षिणी सैनिक पूर्वी युद्धकलेचे एक अंग म्हणून उपयोग करीत . या युक्तीचा उपयोग त्यांना आता करता येईनासा झाला ." (**के. के., भाग २**, ३२२; **दिल.**, २०२). किल्ल्याचा वेढा अशा तऱ्हेने हातघाईवर आला असताना शहरातून मुसलमान धर्ममार्तंडांचे एक प्रतिनिधी मंडळ बाहेर पडले आणि औरंगजेबाला भेटण्यासाठी छावणीत येऊन दाखल झाले . त्यांनी बादशहाची पुढीलप्रमाणे विनवणी केली . "तुम्ही मुसलमान धर्माचे एक कट्टर अनुयायी आहात . कुराणाने घालून दिलेल्या नीतीनियमांचे आपल्याला पूर्णपणे आकलन आहे . कुराणाने निषिद्ध मानलेल्या आणि धर्ममार्तंडांनी सर्वांनी पालन करावे म्हणून जाहीर केलेल्या नियमांच्या विरुद्ध वर्तन आपण कधीही करत नाही . आपले आचरण हे कुराणातील तत्त्वाप्रमाणे असते. तेव्हा आपण स्वतः आपल्या मुसलमान धर्म बांधवाविरुद्ध जे अधार्मिक युद्ध चालविले आहे त्याचे समर्थन कसे करू शकता ते सांगावे ". या प्रश्नाचे उत्तर औरंगजेबाजवळ ताबडतोब तयार होते . तो म्हणाला , "तुम्ही उच्चारलेला प्रत्येक शब्द खरा आहे . तुमच्या ताब्यातील प्रदेश बळकाविण्याची माझी मुळीसुद्धा इच्छा नाही . परंतु त्या नतद्रष्ट काफराचा काफर मुलगा (संभाजी) हा तुमच्या गळ्यात गळा घालून आहे आणि त्याला तुमचा भरपूर आधार आहे . या ठिकाणापासून तो थेट दिल्लीच्या दरवाजापर्यंत मुसलमानांचा तो उच्छाद करीत आहे आणि दिवसरात्र त्यांच्याकडून माझ्याकडे तक्रारी येत आहेत . त्याला माझ्या स्वाधीन करा आणि पुढल्याक्षणीच मी विजापूरचा वेढा उठवीन ." (**बी. एस्.**, ५४२). औरंगजेबाच्या या युक्तिवादाने त्याला प्रश्न विचारण्यास आलेल्या विद्वानांची तोंडे बंद झाली.

औरंगजेब छावणीत आल्यानंतर काही कालावधीने खंदकाच्या टोकापर्यंत चर खणण्यात आलेले होते. परंतु किल्ल्याभोवतालचा खंदक भरून काढणे ही जवळ जवळ अशक्यप्राय गोष्ट दिसत होती . "मोगल सैनिकांपैकी जो कोणी खंदकाच्या टोकापर्यंत येत असे त्याला किल्ल्यावरील तोफा अचूक टिपून काढीत. साहजिकच कोणालाही आपले डोके वर उचलण्याची हिम्मत होत नसे ." जवळ जवळ तीन महिनेपर्यंत किल्ल्याभोवतालचा रुंद आणि खोल असा खंदक बुजला न जाता तसाच राहिला.

४ सप्टेंबरला औरंगजेबाने मोर्चाच्या अगदी पाठीमागे असलेल्या जागेपासून २ मैल अंतरावर आपले तंबू हालविले तेथून तो पूर्णपणे सशस्त्र होऊन रपेट करी . तेथे असलेल्या एका आच्छादलेल्या अरुंद अशा रस्त्याचे त्याला संरक्षण मिळे . तो याप्रमाणे रपेट करीत असताना मोर्चे देऊन बसलेल्या अधिकाऱ्यांकडून त्याला सलामी मिळे. तेथून तो खंदकाच्या अगदी टोकापर्यंत दौडत जाई. यामध्ये त्याचा उद्देश किल्ल्याच्या बुरुजांवर मारा करण्यासाठी उभारण्यात आलेल्या तोफांच्या मोर्चांचे निरीक्षण करणे आणि किल्ला जिंकून घेण्यासाठी इतका अवधी का लागत आहे याचे स्वतःहून परीक्षण करणे हा असे.

(१६) विजापूरच्या शेवटच्या सुलतानाचा पाडाव

यानंतर एका आठवड्याच्या आतच विजापूरचा पाडाव झाला . परंतु तो मोगलांनी केलेल्या हल्ल्यामुळे मात्र नव्हे . किल्ल्यावरील शिबंदीचा आता धीर सुटला होता . आदिलशाही सुलतानाची

परिस्थिती आता पूर्णपणे निराशाजनक झाली होती. दरबारातील स्वार्थसाधू सरदारांच्या हातामध्ये सुलतान एक खेळणे बनला होता . बाहेरून कोणत्याही तऱ्हेची मदत मिळण्याची थोडीसुद्धा आशा उरली नव्हती . राज्याचा भविष्यकाळ काळाकुट्ट दिसत होता . किल्ल्यावरील शिबंदीची संख्या कमी होत होत दोन हजार सैनिकांवर येऊन ठेपली होती (**दिल**., २०३). ९ सप्टेंबरच्या रात्री नबाब अबदूर रोफ आणि शारजाखान या दोन विजापुरी पुढाऱ्यांचे चिटणीस फिरोजजंगाची भेट घेण्यासाठी मोगल छावणीत आले आणि त्यांनी संपूर्ण शरणागतीसाठी वाटाघाटीना सुरुवात केली. औरंगजेबाने त्यांच्यावर मेहरबानी करून त्यांची भेट घेतली.

इ. स. १६८६ या वर्षी रविवार ता . १२ सप्टेंबर रोजी विजापूरच्या आदिलशाही घराण्याचे अधःपतन झाले. आदिलशाही घराण्याचा शेवटचा सुलतान शिकंदर याने आपल्या वंशपरंपरागत सिंहासनाचा त्याग केला आणि दुपारी १ वाजण्याच्या सुमारास तो राजधानीतील आपल्या घरातून बाहेर पडला . त्यावेळी रस्त्याच्या दोन्ही बाजूला त्याचे प्रजाजन अश्रू ढाळीत आणि आपल्या सुलतानावर ओढवलेल्या प्रसंगाबद्दल विलाप करीत उभे होते . शिकंदर आदिलशहाच्या बरोबर राव दलपत बुंदेला हा मोगल अधिकारी होता . राजधानीतून बाहेर पडल्यावर तो शिकंदराला घेऊन औरंगजेबाच्या रसुलपूर येथील छावणीत येऊन दाखल झाला.

औरंगजेबाचा विजापुरात प्रवेश

दरम्यान औरंगजेबाच्या छावणीत ज्या तंबूचा उपयोग सार्वजनिक कामकाज पाहण्यासाठी केला जाई, तो तंबू या ऐतिहासिक प्रसंगानिमित्त अतिशय भपकेदारपणे सजविण्यात आला . जेव्हा शिकंदर आदिलशहाचे आगमन झाले तेव्हा अनेक उच्च पदस्थ अधिकाऱ्यांनी त्याचे स्वागत केले आणि त्यांनी त्याला बादशहाच्या समोर आणले. आपल्या विजेत्याच्या सिंहासनासमोर पराजित झालेल्या शिकंदर आदिलशहाने आपली मान झुकवली. त्याचे अप्रतिम सौंदर्य आणि त्याच्या ठिकाणी झालेला तारुण्य आणि राजयोग यांचा मनोहर संगम यांच्या योगाने त्याची सर्वदूर वाहवा झाली आणि त्याच्या कमनशिबाबद्दल सर्वांनी अनुकंपेचे उद्‌गार काढले. प्रत्यक्ष औरंगजेब या प्रसंगाने भारावून गेला . शिकंदर आदिलशहाबरोबर त्याने सांत्वनपर संभाषण केले . पदच्युत झालेल्या शिकंदर आदिलशहाची भरती मोगल उमरावांमध्ये करण्यात आली . बादशहाने त्याला खान ही पदवी दिली , आणि सालिना एक लाख रुपयांचे निवृत्तीवेतन त्याला मुक्रर केले . सर्व विजापुरी अधिकाऱ्यांना मोगलांच्या चाकरीत घेण्यात आले . १९ सप्टेंबर रोजी विजयी औरंगजेब एका वाहनावर ठेवलेल्या सिंहासनावर बसला , आणि मोगलांनी विजापूरच्या किल्ल्यावर हल्ला करण्यासाठी जी जागा मुक्रर केली होती तेथून म्हणजे सफशिकनखानाचे मोर्चे आणि दक्षिणेकडचा अथवा ज्या दरवाज्याचे नाव मंगळाई दरवाजा असे होते तेथून त्याने किल्ल्यामध्ये प्रवेश केला . शहराच्या ज्या रस्त्यांनी त्याने कूच केले होते त्यावर उजव्या आणि डाव्या बाजूला त्याने सोन्याच्या व चांदीच्या मूठभर मोहरा उधळल्या आणि किल्ल्यामधील तटबंदी, बुरूज आणि राजवाडे यांची पाहणी केली . तेथून ती जामा मशिदीमध्ये गेला आणि परमेश्वराने त्याच्यावर दाखविलेल्या मेहेरबानीबद्दल त्याने दोन वेळा त्याची प्रार्थना केली . शिकंदर आदिलशहाच्या राजवाड्यामध्ये त्याने काही तास विश्रांती घेतली . तेथे त्याच्या दरबारी मंडळींनी मिळालेल्या विजयाबद्दल त्याचे अभिनंदन केले . कोणत्याही व्यक्तीने आपल्याला निर्माण करणाऱ्या परमेश्वराजवळ मगरूरपणे स्पर्धा करू नये अशा तऱ्हेच्या कुराणातील नियमाचे भंग करणारी जी चित्रे जिवंत असलेल्या व्यक्तीच्या स्वरूपात भिंतीवर काढण्यात आलेली होती ती सर्व पुसून टाकण्याचा त्याने हुकूम दिला . त्याचप्रमाणे त्याला मिळालेला विजय सुप्रसिद्ध मलिक -इ-मैदान या तोफेवर कोरून ठेवण्याचीही त्याने आज्ञा केली.

अनुक्रमणिका

विजापूरच्या स्वतंत्र राजवटीचा अशा तऱ्हेने विध्वंस झाल्यावर विजापूर शहरावर एक तऱ्हेची संपूर्ण स्मशानशांतता पसरली . विजापूरचा पाडाव झाल्यावर दोन वर्षांनी प्लेगच्या भयंकर रोगाने विजापूर शहराच्या अर्ध्यापेक्षा जास्त लोकसंख्येचा बळी घेतला. यानंतर काही वर्षांनीच विजापूर शहर आणि शहराचे तितकेच मोठे नवरसपूर हे उपनगर ओसाड आणि निर्मनुष्य बनले असे भीमसेन सक्सेना स्वतः पाहिल्याचे सांगतो. लोकसंख्या ही विखुरलेली होती आणि शहराला पाण्याचा भरपूर पुरवठा करणाऱ्या विहिरी जणुकाही एकाएकी आटून गेल्यासारख्या झाल्या (**दिल**., २०३; **एम्. ए**., ३१०). भूतकालामध्ये जमा झालेल्या मोठेपणाचे एक भयानक उदाहरण अशीच विजापूरची परिस्थिती झाली . "दूरवर पसरलेली पडझड झालेली घरे, उद्ध्वस्त प्रासाद आणि अधूनमधून दिसणारी जंगलांची वाढ" यांनीच जणू काही सारे विजापूर शहर आच्छादून गेल्यासारखे वाटत होते.

शिकंदर आदिलशहाचा मृत्यू

शेवटच्या आदिलशाही सुलतानाला काही काळपर्यंत दौलताबादच्या सरकारी तुरुंगात ठेवण्यात आले. नंतर त्याला औरंगजेबाने आपल्याबरोबर युद्धकैदी म्हणून छावणीतून इतस्ततः नेले . या बंदिवासाच्या परिस्थितीत सातारा किल्ल्याच्या बाहेरील छावणीत ३ एप्रिल १७०० रोजी शिकंदर आदिलशहा मरण पावला . (**अखबारात,** ४४।५२). त्यावेळी त्याच्या वयाला ३२ वर्षे देखील पुरी झालेली नव्हती. त्याने अंत्यसमयी प्रकट केलेल्या इच्छेप्रमाणे त्याचा मृतदेह विजापूर येथे नेण्यात आला आणि त्याचा आध्यात्मिक गुरु शेख फहिमुल्ला याच्या कबरीच्या पायाशी एका आच्छादन नसलेल्या बंदिस्त जागेत त्याचे दफन करण्यात आले. [इ. स. १६८६ मधील मोगलांच्या विजापूरवरील स्वारीची हकीकत पुढे दिली आहे :

"औरंगजेबास बातमी लागली की, गहू व चणा यांच्या अभावामुळे सैन्याची फार उपासमार झाली आहे. रोज तोफा व बंदुकांची मोर्चातील सरबत्ती उडत असली तरी जिवास जे खाणे व झोपणे आवश्यक त्यांचा बिलकुल अभाव आहे . बाजार फार गरम आहे . कोठूनही रसद येऊन पोहोचत नाही. हाल करून घेण्यापेक्षा वेढा उठवून परत या असा बादशाहाने निरोप दिला . मुरादबक्ष व इतर काही लोक परत गेलेही होते . परंतु महमद अजमशहाने आपल्या लोकांस व औरंगजेबास सांगितले की, काम फत्ते झाल्याविना आपण विजापुराहून हालणार नाही. तेव्हा औरंगजेबाने ५ ऑक्टोबरला पुष्कळ रसद व नव्या दमाचे बरेच सैन्यही पाठविले . फिरुजजंग फार जलदीने कूच करून शहाजाद्याच्या उपासमार झालेल्या सैन्यापाशी रसद घेऊन आला. तेव्हा उपासमार थांबली व सैन्याला लढण्यास त्राण वाटू लागला. शहाजाद्याने आपल्या सैन्यविभागाला बाहेरून हल्ले चढवून सतावणाऱ्या आदिलशाही व शत्रूच्या सैन्याच्या परिपत्यार्थ रवाना केले . फिरुजजंग विजापुराजवळील रसुलपुराजवळ आला . ही बातमी फिरुजजंगास लागली. तेव्हा त्याने पहाटे अकस्मात छापा घालून बंडा नायकाचे लोक मारिले . बंडाच्या लष्कराचा पुरा मोड केला ...." (**औनामा,** खंड १२, पृ. २३–५; **एम्. आय्. ए.,** प्र. २९, पा. १६३). बुसातिन-इ-सलातिनीत मोगली सैन्यात दुष्काळ भासण्याचे कारण दिले आहे. ते मासिरीत व खाफीखान याने गाळले आहे . तो मजकूर असा "...शहाजादे यांनी किल्याची फते करण्याविषयी मोर्चे पुढे चालविणे व नकब म्हणजे पौकार खणून त्यातून दारू भरून उडवितात तो नकब , जलद पुढे चालविणे व आतषबाजीची हत्यारे म्हणजे तोफा बंदुकी बाण वगैरे एकदम उडवून सरबत्ती करण्यात फार फार यत्न केला. फार दिवस लढाई लांबली. त्यामुळे महमद अजमशहाच्या फौजेत दुष्काळ पडला व खाण्यापिण्याचे सामान कोणीकडून येऊन पोचत नव्हते . एकंदर मागे बंद झाले होते . संभाजीराजांच्या फौजांनी मोगलांच्या लष्करात रसद येण्याचे मार्ग बंद करून मोगलांचे मुलखात लुटालूट चालविली होती व जागोजागचे ठायी ते पाणी देखील खराब करून निखालस बंदी केली . जून-जुलैत (१६८५) संभाजीने विजापूरच्या मदतीस कबजीस पाठविले होते . त्यांनी पन्हाळ्यास राहून फौजा रवाना केल्याचा मागे उल्लेख आलाच आहे . शकावली व लष्करातील बहुत मनुष्यांनी खाण्यापिण्याचा सरंजाम काहीच येऊ न पोचला, सबब घोडी वगैरे जनावरे उंट कापून त्याचे मांस खात होते व कित्येक मनुष्ये उपोषणाने मरत होती ." (**बुसा-पा**. पृ. ७६, वही ६), खाफीखानही सांगतो : "गाजीउद्दीनखान बहादुर १९ ते २० हजार बैलांचा काफिला भरून अन्नधान्य व इतर सामग्री व दारूगोळा घेऊत विजापुरापासून १५ –१६ कोसांवरील अथणी (अबटाडी किंवा अबटारीटा) परगण्याजवळ आला" (**के. के., एम्.** पृ. ५८४–५९१). ही त्याची अधिक माहिती आहे . सारांश जरी मोगलांची रसद तोडण्याचा अटोकाट प्रयत्न केला गेला तरी शेवटी मोगली सैन्याला फार मोठी रसद येऊन पोचल्याने त्या सैन्यास पुन्हा बराच जोर चढला. परंतु याचवेळी "संभाजीची फौज मोगली इलाख्यात लूटमार करण्याकरिता १९ डिसेंबरला रवाना झाली व हंबीरराव त्यापूर्वी म्हणजे १० डिसेंबरला मोगलांच्या पिछाडीवर हल्ले चढविण्यासाठी विजापूरजवळ आला." (**बुसा–पा.** पृ. ७६, वही ६; **बुसा**–३, पृ. ७५३). एकूण संभाजी व आदिलशाहा यांच्या जुटीला इ. स. १६८५ त कुत्बशहाच्या प्रत्यक्ष मदतीला मुकावे लागले. तरीही त्यांनी मोगलांना जोरदार तोंड दिले होते यात शंका नाही.

इ. स. १६८६ साल सुरू झाले. वेढ्याचे काम चालूच होते. "१७ मार्च १६८६ रोजी विजापुरी लढाई झाली. एकीकडून हसनखान बहादुर वगैरे अमीरउमराव व दुसरेकडून रूहुल्लाहखान , कासमखान बहादूर वगैरे युद्धात कोशिस करीत होते . त्यानंतर अजमशहा सक्त लढाई

देण्याकरिता नेमला. तेव्हा मोठेच दारूण युद्ध झाले. त्यानंतर २३ जूनला पाम नायक याची आलंग म्हणजे चौकी उठविली. जवहर काजी सैयद हा त्या लढाईत ठार झाला." (**बुसा-पा.** पृ. ७६; वही ६, **बुसा**-३, पृ. ७५३). या कालच्या परिस्थितीचे वर्णन करिताना बुसातिनकार लिहितो : "विजापुरात इतके काही एक सामान नाहीसे झाले होते असे असोन व एकमेकांत बिघाड असून आपली जमात थोडीसी राहिली होती. दक्षिणी लोकांनी आपली जमात थोडी व शत्रूची जमात फार ह्या गोष्टीवर नजर न ठेवून धैर्य व शूरत्व धरून बहुत पराक्रमाने लढाई करीत होते आणि शत्रूचे मोर्चे लागू होऊ देत नव्हते व शत्रूकडील बाहेरचे फौजेस त्यांचे मनोदयाप्रमाणे काम करू न देता ज्या जागेवर उभे राहात होते तेथून हाकून देत होते. आपले मनोरथ पूर्ण होईनात व कार्यसिद्धी होण्यास दिवसगत लागले. त्यामुळे अलमगीर बादशाहा अत्यंत क्रोधायमान होऊन सोलापुरास कित्येक दिवस स्वस्थपणाने घालवणे ठीक नाही असे जाणून बादशाहा खुद्द जातीने सोलापुराचे किल्ल्यातून १४ जून १६८६ ला निघून ३ जुलैला रसुलपूर येथे येऊन आपल्या लष्कराचे डेरे टाकिले. बादशाहाची स्वारी तेथे उतरली ..." (**बुसा-पा.** पृ. ७६–७, वही ६; **बुसा**-३, पृ. ७५३–४; औनामा, खंड १२, पृ. ३३–४; **एम्. आय्. ए.** प्र. २९, पृ. १६९). अलमगीर खासा विजापुरास का आला याचे मुख्य कारण खाफीखानाप्रमाणे लष्करात व मोगली सरदारात यादवी अगर द्वेषभाव पसरला होता असे होते. (**के. के. एम्.**, पृ. ५९१-९३). उलट मासिरीत मजकूर की, "सिकंदर हा राज्य करण्यास लायक नव्हता. सैयद मसूद, अब्दुल रौफ व सर्जा या तिघा उमरावांनी आपल्या हाती सत्ता राखण्याकरिता त्यास बाहुले म्हणून राजा केला होता. बाकी ते त्याला मोजीत नसत व स्वेच्छाचाराने वागत. ते आपापसात भांडो लागले, प्रजेला फार सतावीत व शिकंदरला शहराबाहेर जाऊ देत नसत. पुढे ते संभाच्या आहारी गेले व मुसलमान लोकांना त्रास देऊ लागले. त्यांना वाटे की, विजापूरचा किल्ला त्यांचे सदैव रक्षण करील.....एके दिवशी शेख महमद नक्षबंदी बादशहास म्हणाला, "खाविंद आपण खासा विजापूरच्या किल्ल्यावर जात आहा ?" बादशाहा बोलले : 'जगात राजांना फक्त कीर्ती काय मिळत असते आणि मला फार वाटत होते की, ती माझ्या मुलांना मिळावी. पण तसा ईश्वरी संकेत नसावा. याकरिता मी स्वतःच जाऊन त्या किल्ल्याचा तट कसा काय अजिंक्य आहे ते पाहतो. या कारणाने बादशहाने आपली छावणी सोलापुराहून १४ जून रोजी हालविली व ३ जुलैला तो रसुलपुरास आला....." (**औनामा**, खंड १२, पृ. ३३; **एम्. आय्. ए. प्र.** २९, पृ. १६९). परंतु आदिलशाहीत जशी बेदिली होती तशीच ती मोगली सरदारात व त्यांचे पुत्रपौत्रात वाढत होती. त्याचे वर्णन बुसतिनकाराने व खाफीखानाने केलेले आहे. त्याचा येथे विस्तार करीत नाही. आदिलशाहाने मसुदखानास परोपरीने लिहून पाहिले. परंतु त्याचा उपयोग झाला नाही. त्यास पाठविलेले शेवटचे पत्र ५ ऑगस्ट १६८६ चे उपलब्ध आहे. (**बुसा पा.** पृ. ७६–७, वही ६; **बुसा**-३, पृ. ७५१–५; **के. के.-एम्.**, पृ. ५९२-९९). बुसतिनकार लिहितो : "ईश्वराचे मनोगत विजापूर शत्रूचे हाती जाण्याविषयी चंचल झाले होते. ह्यास्तव मसुदखान याने बोलण्याकडे कदापि कान दिलाच नाही. म्हणजे हे बोलणे ऐकून घेतलेच नाही .....व विजापुरास जावे असे त्याच्या चित्तास वाटलेच नाही." (**बुसा-पा.** पृ. ७७, वही ६; **बुसा**-२ पृ. ७५५). सारांश, अंतस्थ कलहाच्या त्राग्याने मसुदखान अदोनीस निघून गेला होता व ज्याच्या कर्तृत्वावर लोकांचा विश्वास होता त्याला आपल्या राज्याच्या व प्रजेच्या संकटात साह्यार्थ जाण्याची बुद्धी होत नव्हती.

औरंगजेबाने आपला मुक्काम रसुलपुरातच केला. दुसऱ्याच दिवशी म्हणजे "४ जुलैस मोर्चे चढविण्यास व तोफांच्या माऱ्याने बुरुज उडविण्यास व तटाखाली खणून सुरुंग लावण्यास बादशहाने हुकूम दिले." (**औनामा**, पृ. ३४,. खंड १२; **एम्. आय्. ए.** प्र. २९, पा. १६९). विजापूरचा किल्ला ज्या जमिनीत बांधला आहे ती जमीन अर्धा गज खणली. तथापि काळे धोंडे निघतात. जलद काम करणारे बेलदार लोक व मजबूत हाताचे पाथरघट व दुसरे कित्येक अतिउत्तम हरएक कामाचे कामदार काम करण्यास लागोन त्यांनी कित्येक दिवसांत मोर्चे किल्ल्याच्या दरवाजानजीक पोहोचविले व दक्षिणी लोक पराक्रमी यांनीही तोफा व बंदुकीची सरबत्ती करण्याविषयी किंचितही अंतर न करिता जितके सामर्थ्य होते." तितका ते शत्रूचा पराभव करण्याकरिता प्रयत्न करित होते." (**बुसा-पा.** पृ. ७७-८ वही ६). "४ सप्टेंबरला बादशहा घोड्यावर स्वार होऊन दमदमे पहावयास गेला. ते किल्ल्याच्या कंगारीपर्यंत आले असताना देखील किल्ला सर करण्यास विलंब का लागला ते पाहण्यास तो तेथे गेला. सकाळी ही धामधूम पाहून किल्ल्यावरून बाण, बंदुकीचे व तोफांचे गोळे किल्ल्यावरून खाली येऊ लागले. बादशहाच्या डोक्यावरून तोफेचे गोळे जात. जलालाने मोर्चाचे काम चांगल्या रितीने केलेले पाहून बादशहाने त्यास १२ सप्टेंबरला बक्षीस वगैरे दिले. जेव्हा दोन महिने व बारा दिवस सख्त मेहनत करून किल्ला उडविण्याची तयारी केलेली पाहिली तेव्हा शिकंदर व त्याचे साथीदार आपला नाश जवळ ठेपला असे पाहून त्यांनी दयेची याचना भाकली..." (**औनामा**, खंड १२, पृ. ३४.५ **एम्. आय्. ए.** प्र. ३० पा. १७०–१७१) अशा तऱ्हने निराशा झाल्याने "१० सप्टेंबरला अबुलरौफचा मुनशी सय्यदखान व सैयद मखदुम, सर्जाखानाचा मुनशी शेख हुसेन हे हाफीज अफजलच्या बरोबर सख्य करण्याकरिता जाऊन गाजी उद्दीनखानास भेटून रात्री किल्ल्यात परत गेले. ११ सप्टेंबरला अबुल रौफने जाऊन गावी उद्दीनखानाची भेट घेतली. सख्य करण्याबाबत करारमदार करून रौफ परत किल्ल्यात गेला. शिकंदरशहाशी बोलून १२ तारखेस पुन्हा मोगली छावणीमध्ये येऊन बादशाहाची भेट घेतली." (**बुसा-पा**, पृ. ७७-८, वही ६; **बुसा-उ**, पृ. ७५६-७) १३ सप्टेंबरला विजापूरचा किल्ला अलमगीरच्या हवाली झाला व आदिलशाही प्रजा बादशाहाच्या अमलाखाली आली...बादशाहाने शिकंदरची विनंती मान्य केली. त्यास माफी दिली व बादशाहाने त्यास दरबारात बोलविला व आपल्या सरदारांत उभा केला. त्यास मोत्याची लडी, जडाऊ खंजीर, एकहजार रुपयांचा फुलकटारा, तेरा हजार रुपये किंमतीचा मोत्याचा हार, हिरेजडित कलगी व जडाऊ छडी व पोशाख बक्षीस दिला. त्यास शिकंदरखान असा किताब देऊन सालिना एक लाख रुपयांची तैनात दिली. त्याचा डेरा गुलालबादेत देण्याची आशा दिली." (**बुसा–पा**, पृ. ७८–९, वही ६; **बुसा–उ**, पृ. ७५६–८; **औनामा**, खंड १२, पृ. ३५; **एम्. आय्. ए.** प्र. ३०, पा. १९१; **के के. एम्.**; पा. ५९९-६०१) सिकंदर आदिलशहाचा सिकंदरखान करून औरंगजेबाने आदिलशाहीला कायमची मूठमाती दिली. " सिकंदर पुढे १४ वर्षे कैदेत राहिला व १६९९ इ. स. त त्यास औरंगजेबाने विष घालून मारिले. विजापूरचा किल्ला अलमगीरच्या हवाली करण्याचे कारस्थान होत आहे असे पाहून संभाजीराजांचा वकील किंवा दिवाण, आपली बायको व लोकांनिशी किल्ल्यात होता तो आपल्या माणसानिशी तेथून निसटला व संभाजीराजांच्या मुलुखात निघून गेला." (**अनुपुपरि–१**, श्लोक ८४ ते १०८). अबुल रौफ व सर्जाखान पादशाहाकडे ताबडतोब गेले. अबुल रौफला दिलेरखा व सर्जाला रुस्तुमखा असे किताब व ६ हजारी व ६ हजार स्वारांची मनसब मिळाली. इतर मुसलमान सरदारांनाही मानमरातब मिळाले व त्याच दिवसापासून मोगली नोकरीत दाखल झाले. "२० सप्टेंबरला दौलतखाना रसुलपुराहून किल्ल्याच्या दरवाजापासून अर्धा कोसावर आणला. त्याच दिवशी बादशाहाने शहर व कोट पाहिला." (**औनामा**, खंड १२, पृ. ३४–५, **एम्. आय्. ए.** प्र. ३० पा. १७२) राजा, मंत्री व सरदार औरंगजेबाच्या हुकमतीत स्वेच्छेने गेल्यानंतर प्रजेला मार्गदर्शक राहिला नाही. प्रजाही आपल्या पूर्वापार शाहीचे सुहेरसुतक न मानता "कालाय तस्मै नमः" म्हणत स्वस्थ राहिली. सुरतकर ३० नवंबरला लिहितात : बादशाहाने नुकतेच विजापूर घेतले. राजा त्याच्या ताब्यात आहे. ...सांप्रत त्यांनी आपले सैन्य संभाजी राजांवर रोखले आहे. त्याचे उमराव किती निष्ठेने वागतील ते सांगता येत नाही." (**स्वाली टू लंडन**, ३०–११–१६८–६ **ओ.**

अनुक्रमणिका

सी. खंड ४६, नं. ५५३४; **मिसलेनियस् खंड.** ४, पा. १३५; **एफ्. आर्.**) सारांश, आदिलशहाच्या फितुरामुळे संभाजीराजांचे सरदार तसेच फितुर होतात की, काय असे वाटणे साहजिक होते . प्रजेत दहशत बसावी म्हणून आणि मोगली फितुरांनाही संधी मिळू नये म्हणून शिकंदरला ठार मारल्याच्याही बातम्या पसरविल्या . सुरतकर ७ जानेवारी १६८७ च्या व १६ फेब्रुवारीच्या पत्रात लिहितात की , "विजापूर निश्चितपणे मोगलांचे ताब्यात गेले आहे. परंतु आपली शपथ मोडून बादशाहाने त्या राजास ठार मारला ." (**स्वाली टू. फोर्ट सेंट जॉर्ज.** १६–२–१६८७, **फोर्ट सेंट जॉर्ज, खंड** ४ पा. १०८-९; **सुरत टू बॉम्बे,** ३–२–१६८६ ८–२-१६८७; **ओ. सी. खंड,** ४६ नं. ५५६३; **खंड** ४७ नं. ५६४९; **फोर्ट सेंट जॉर्ज, टू लंडन.** ३–२–१६८७; **ऑर्म खंड,** १५४, पान १४; **सुरत टू लंडन** ७–१–१६८७; **ओ. सी. खंड,** ४६, नं. ५५५१; **खंड** ४७, नं. ५५५२ **एफ्. आर्.**)]

●●●

प्रकरण तेरावे

गोवळकोंड्याच्या कुतुबशाही घराण्याचा ऱ्हास आणि अधःपतन

(१) अबुलहसन कुतुबशहा याचे राज्यारोहण, १६७२

गोवळकोंड्याचा सहावा सुलतान अबदुल्ला कुतुबशहा हा वयाच्या १२ व्या वर्षी इ . स. १६२६ मध्ये आपल्या बापानंतर गादीवर आला . त्याची कारकीर्द ४६ वर्षे झाली . या सर्व कारकिर्दीत तो सिंहासनावर निव्वळ नामधारी सुलतान होता . प्रत्यक्ष राज्यव्यवस्था त्याची आई हयातबक्षबेगम हिने ४० वर्षांपेक्षा अधिक काळ बघितली. ही स्त्री स्वभावाने अतिशय कणखर होती . १६६७ मध्ये तिचा मृत्यू झाल्यावर राज्यकारभार अबदुल्लाचा श्रेष्ठ जावई सय्यद अहमद याच्या नियंत्रणाखाली चालला . आपल्या सबंध आयुष्यभर अबदुल्ला हा आळशीपणाने आणि मनोदौर्बल्याने वागला . आपल्या प्रजेची गाऱ्हाणी ऐकण्यासाठी आणि तद्देशियांच्या चालीप्रमाणे प्रत्यक्ष न्यायदान करण्यासाठी तो उघडपणे दरबारात कधीच आला नाही . किंबहुना गोवळकोंडा किल्ल्याच्या भिंतीबाहेर पडण्याचे धारिष्टही त्याने दाखविले नाही . अशा तऱ्हेच्या परिस्थितीत राज्यामध्ये गोंधळ आणि अराजक निर्माण होणे हे अतिशय नैसर्गिक आणि अपरिहार्य होते . (**बर्नियर,** १९४-१९५).

अबदुल्ला कुतुबशहा याला मुलगा नव्हता परंतु तीन मुली होत्या . त्यांच्यापैकी दुसरीचे लग्न औरंगजेबाचा मुलगा महमद सुलतान याच्याबरोबर आणि पहिलीचे सय्यद अहमद याजबरोबर झाले होते . मक्का येथील अतिशय चारित्र्यवान अशा एका घराण्यामध्ये आपला जन्म झाला असल्याचा अहमदचा दावा होता. आपल्या अंगातील कर्तृत्वाच्या जोरावर तो गोवळकोंड्याच्या मुख्य प्रधानाच्या जागी चढला होता . त्याच्या अंगातील गुणामुळे गोवळकोंडा येथील राज्यकारभाराची प्रत्यक्ष सूत्रे त्याच्या हातामध्ये होती . तिसऱ्या राजकन्येचा विवाह सय्यद सुलतान याजबरोबर व्हावा असे ठरले होते . परंतु ज्या दिवशी लग्न व्हावयाचे होते त्या दिवशी सय्यद अहमद याने अबदुल्ला कुतुबशहा याला असे सांगितले की तुम्ही जर आपली मुलगी सय्यद सुलतान याला दिली तर मी ताबडतोब राज्याचा त्याग करून जाईन . साहजिकच राजकन्येसाठी दुसरा नवरा मुलगा शोधून काढण्याची सुलतानाने घाई केली. राजवाड्यातील सुलतानाच्या प्रतिनिधींनी अबुलहसन याचा आपल्या बापाच्या कडून कुतुबशाही घराण्यात जन्म झाला होता . त्याने यापूर्वीची आपल्या जीवनाची १६ वर्षे सैय्यद राजू कताल या अवलियाचे शिष्यत्व पत्करून आळशीपणाच्या धुंदीत फकिराचे आयुष्य जगण्यात घालविली होती . या माणसाला राजवाड्यात नेण्यात आले आणि तिथे त्याचा विवाह ताबडतोब राजकन्येबरोबर उरकण्यात आला. (**कुत्ब नुमा,** ९०—९४)

इ. स. १६७२ या वर्षाच्या एप्रिल महिन्यात २१ तारखेला अबदुल्ला मरण पावला . त्याच्या मृत्यूनंतर ताबडतोब वारसाहक्कासाठी भांडणे जुंपली . काही काळ सर्वत्र गोंधळ माजला . थोडी फार हाणामारीही झाली आणि त्यानंतर सय्यद मुजफ्फर या उच्च पर्शियन कुळात जन्म पावलेल्या दरबारातील प्रमुख सेनापतीने सय्यद अहमद याच्यावर कुरघोडी केली आणि त्याला जबरदस्तीने बंदिवासात टाकले . या कामी त्याला महालदार मुसाखान आणि जनान्यामधील अनेक अधिकारी यांचा पाठिंबा मिळाला . अबुल हसन याला राज्याभिषेक करण्यात आला . मुजफ्फर हा राज्याचा मुख्य प्रधान बनला . परंतु थोड्याच महिन्यांच्या अवधीत अबुलहसन याने मुजफ्फरचा जणू काही उजवा हात असलेल्या मादण्णा ब्राह्मणाला आपल्या पक्षात ओढून घेतले आणि त्याच्या मदतीने मुजफ्फरच्या खाजगी सेनापथकाचे अधिकारी लाच

देऊन आपल्या बाजूला वळविले . परिणामी एके दिवशी कसलाही गाजावाजा न होता मुजफ्फरकडून वजिरीचे अधिकार काढून घेण्यात आले . त्या पदावर मादण्णाची नेमणूक करण्यात आली आणि त्याला सूर्यप्रकाशराव ही पदवी देण्यात आली. मंत्र्यांमध्ये झालेला हा बदल इ. स. १६७३ मध्ये घडून आला. इ. स. १६८६ मध्ये गोवळकोंड्याचे राज्य नाहीसे झाले . या राज्याचे वजिरांचे अधिकार मादण्णाचा खून होईपर्यंत त्याच्याकडेच राहिले. त्याचा भाऊ आकण्णा याला सेनापती पदावर नेमण्यात आले . त्याचा अतिशय शूर आणि विद्वान असा पुतण्या येंगण्णा ऊर्फ रुस्तुमराव यालाही मोठ्या अधिकार पदावर नेमण्यात आले . मादण्णाचाच एक पक्षपाती महमद इब्राहिम याला प्रथम श्रेष्ठ उमराव करण्यात आले.

मादण्णाचे मराठा धार्जिणे धोरण

मादण्णाच्या १२ वर्षांच्या कारकिर्दीत देशातील अंतर्गत राज्यव्यवस्था अबदुल्ला कुतुबशहाच्या कारकिर्दीसारखीच अव्यवस्थित आणि जुलमी अशी राहिली . एकंदर परिस्थिती साहजिकच अतिशय विकोपाला गेली . "राज्यांतील प्रजेला पिळून काढणे आणि त्यांची गांजणूक करणे याखेरीज दुसरा कोणताही विचार मादण्णाच्या मंत्रिमंडळाने केला नाही ." मादण्णाने आपले परराष्ट्रीय धोरण पूर्वीप्रमाणेच चालू ठेवले . फक्त त्यात जरूर ते फेरफार मात्र त्याने केले . आदिलशाही राज्यावर गोवळकोंड्याच्या संबधांत कोणताच बिघाड झाला नाही. परंतु आदिलशाही दरबार म्हणजे गोंधळ, पक्षोपक्षांचे : परस्पर संघर्ष आणि प्रतिनिधी मंडळात वारंवार होणारे बदल यांचे एक विचित्र मिश्रण होऊन राहिला होता . साहजिकच आपल्या देशाचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने मादण्णाने सतत विजय मिळविणाऱ्या मराठ्यांच्या राजाबरोबर अतिशय धनिष्ट असे संबंध राखण्यावरच आपल्या आशा केंद्रिभूत केल्या . त्याने गोवळकोंड्याच्या संरक्षणासाठी मराठ्यांच्या राजाला नियमितपणे एक लाख होनांची खंडणी देण्याचे वचन दिले.

(२) गोवळकोंड्याच्या सुलतानाबाबत मोगलांचे धोरण

जोपयत विजापूरचे राज्य उभे होते तोपर्यंत गोवळकोंड्याच्या सुरक्षिततेला धोका नव्हता , (**फ्रायर,** भाग २-५७) ही गोष्ट औरंगजेबाने जाणली होती . म्हणूनच गोवळकोंड्याचे राज्य प्रथम खालसा करण्याचा प्रयत्न त्याने केला नाही . किंबहुना तसे करण्याची गरजच त्याला भासली नाही . कारण गोवळकोंड्याचा उच्छेद करण्याच्या ऐवजी कुतुबशाही सरकारला धमकावणी देऊन आणि त्याचा हळूहळू ग्रास करणे हे त्याला अधिक फायदेशीर आणि स्वस्तात पडणार होते . हैद्राबाद येथे असलेला मोगलांचा प्रतिनिधी हा सुलतान आणि प्रजाजन यांच्याबरोबर अतिशय उद्धटपणे वागे आणि त्यांच्याबरोबर मुजोरीचे वर्तन करी . परंतु हे सर्व करताना गोवळकोंड्याबरोबर सशस्त्र संघर्ष होणार नाही याबद्दल तो खबरदारी घेत असे . [औरंगजेबाच्या वकिलाने आपल्यापरीने प्रयत्नांची पराकाष्ठा केली परंतु कुतुबशहाला मोगलांविरुद्ध युद्धासाठी उद्युक्त करण्यात त्याला यश आले नाही. सिंहासनाला चिकटून राहण्याची त्याची लालसा इतकी भयंकर होती की त्यापायी त्याने आपल्या प्रतिष्ठेची देखील पर्वा केली नाही . त्याच्या अंगी इतकी नम्रता आणि बोलण्याचे कौशल्य होते की त्यामुळे मोगल वकिलाबरोबर त्याच्या ज्या बौद्धिक टापटी होत त्यात त्याला यश मिळे . मिरजामहमद याला कुतुबशहाबरोबर उद्धटपणे बोलण्याची सवय होती . त्याला अनुलक्षून अबुलहसन त्याला म्हणाला 'माझ्या प्रदेशात माझा मीच सम्राट आहे'. त्यावर मिरजामहमद याने टोमणा दिला की स्वतःला सम्राट म्हणवून घेणे तुला शोभत नाही . औरंगजेबाला हे कळल्यास तो अधिकच संतापेल. त्यावर अबुलहसन उद्गारला 'तू चुकून मला धमकावणी देत आहेस . आम्हाला जर बादशहा असे म्हटले नाही तर औरंगजेबाला बादशहांचा बादशहा असे कसे म्हणता येईल ?' अबुलहसनच्या या मार्मिक उद्गारांनी आपल्याला गप्प बसविले अशी कबुली मिरजामहमद याने आपल्या मित्रांजवळ दिली. (**के. के.,** भाग २, २९५).]

सुलतान अबुलहसन याने राजा म्हणून त्याला करावी लागणारी सर्व कामे मादण्णावर सोपविली , आणि तो स्वतः नर्तकींचा ताफा आणि जनानखान्यातील इतर अनेक स्त्रिया यांना बरोबर घेऊन

राजवाड्यामध्ये सुखोपभोगात मशगूल झाला (**फ्रायर,** भाग १ -८५). अबुलहसनच्या जागेवर असलेल्या सुलतानाच्या कारकिर्दीत हैद्राबाद म्हणजे हिंदुस्तानचे जणू काही वॅबिलोनच होते . शहरामध्ये जवळ जवळ वीस हजार वेश्या आणि तेथील असंख्यात पथिकाश्रम यांची एकच दाटी होती . या स्त्रियांना प्रत्येक शुक्रवारी राजधानीतील सार्वजनिक चौकामध्ये सुलतानासमोर नृत्य करावे लागे . तेथे प्रत्येक दिवशी ताडीने भरलेल्या अतिशय मोठ्या अशा चामड्याच्या बाराशे बाटल्यांचा फन्ना उडे (**टॅव्हर्निअर**, भाग १. १५७-५८) परंतु या सुखोपभोगांच्या अनुषंगाने सुलतानाने अनेक उत्कृष्ट कलाकृतींना उत्तेजन दिले . त्याने आपल्या राजधानीमध्ये अतिशय नामवंत अशा अनेक तऱ्हेच्या कारागिरांना आसरा दिला आणि त्यांच्या चरितार्थाची सोय केली. त्यांनी निर्माण केलेल्या सर्वोत्कृष्ट कलाकृतींची साऱ्या हिंदुस्तानभर प्रसिद्धी होती . त्याचप्रमाणे सुलतानाचे गानशास्त्रातील प्रभुत्व हेही काही कमी दर्जाचे नव्हते . साहजिकच त्याला तानाशहा अथवा रूपवान सुलतान या नावाने संबोधिले जाई. (**चहार गुलशन,** ९१ ब-९२ अ)

गोवळकोंड्याच्या राज्यातील प्रचंड संपत्तीची निर्मिती ही तेथील पाण्याने भरलेल्या शेतीतून निर्माण झाली होती. विजापूरच्या आजूबाजूच्या रखरखीत आणि नापीक प्रदेशातून बाहेर पडून गोवळकोंड्याच्या प्रदेशात प्रवेश केल्यानंतर तेथील हिरवीगार जमीन आणि तेथील गरम हवेत पिकणाऱ्या फळांची सुबत्ता ह्या गोष्टी कोणाचेही ताबडतोब लक्ष वेधून घेत . गोवळकोंड्याची संपत्ती वाढविण्यास तेथील हिऱ्याच्या आणि लोखंडाच्या संपन्न अशा खाणी आणि शिकाकोलपासून सेंट थोमपर्यंतची पूर्व किनाऱ्यावरील भरभराटलेली बंदरे ह्या गोष्टीही कारणीभूत होत्या . गोवळकोंड्याच्या सुलतानाचे सालीना नक्त असे पावणे तीन कोटी रुपयांचे निश्चित असे उत्पन्न होते . औरंगजेब गादीवर आल्यानंतर जवळ जवळ तीस वर्षेपर्यंत गोवळकोंड्याच्या राज्यावर मोगल आक्रमणाची धाड पडलेली नव्हती . शिवाजी आणि त्याचा पुरस्कर्ता आदिलशहा यांच्याबरोबर युद्धात गुंतल्यामुळे मोगलांना गोवळकोंड्याकडे लक्ष देण्यास संधी मिळाली नाही. त्याशिवाय विजापूरच्या सुलतानापेक्षा कुतुबशहाने मोगल सरकारला अधिक नियमितपणे खंडणी दिलेली होती. [परंतु अबुलहसन याने मोगलांवरील आपल्या संबंधात निष्ठा दाखविली नाही इतकेच नव्हे तर तीन प्रसंगी त्याने उघडउघड बंडखोरीची वृत्ती स्वीकारली. त्याच्या हातून घडलेले अपराध अनेक होते . प्रथम त्याने एप्रिल १६५६ मध्ये झालेल्या तहाच्या अटीप्रमाणे खंडणी दिलेली नव्हती इतकेच नव्हे तर २ लक्ष होनांची त्याची वार्षिक खंडणी ही थकबाकीत होती . दुसरी गोष्ट म्हणजे मीर जुम्ला त्याच्या चाकरीत असताना त्याने कर्नाटकात जो प्रदेश जिंकला होता तो आपल्या ताब्यात ठेवण्याचा सतत प्रयत्न त्याने केला होता . त्याचप्रमाणे शहाजहानच्या मृत्यूनंतर जे यादवी युद्ध झाले त्याचा फायदा घेऊन त्याने मीर जुम्ला याच्या हस्तकांकडून गंडीकोटा आणि सिद्धौत ही दोन ठिकाणे हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला . परंतु औरंगजेबाने गादीवर आल्यानंतर दुसऱ्या वर्षी ही ठिकाणे परत जिंकून घेतली . त्यानंतर विजापूरच्या पडत्या काळात मोगलांनी जेव्हा गुलबर्गा जिंकून घेतले तेव्हा कुतुबशहाच्या अधिकाऱ्यांनी मळखेड , सेरम आणि गोवळकोंड्याच्या राज्याच्या पश्चिम सीमेकडील आणि मोगल साम्राज्यात नुकत्याच समाविष्ट झालेल्या बिदर जवळील जिल्हे बळकाविले . हे जिल्हे पूर्वी तेलंगणात समाविष्ट होते आणि म्हणून कायदेशीररित्या ते जिल्हे गोवळकोंडा राज्यात राहिले पाहिजेत असा खोटा दावा पुढे मांडून त्यांनी आपल्या कृत्याचे समर्थन केले. (**के. के.,** भाग २ २९३).]

गोवळकोंड्यावरील आक्रमणाची कारणमीमांसा

विजापूरवर १६६५ –६६ मध्ये जयसिंगाचे , १६७९ मध्ये दिलेरखानाचे आणि १६८५ मध्ये राजपुत्र महमद आजम याचे , अशी जी तीन आक्रमणे झाली त्यावेळी गोवळकोंड्याच्या सुलतानाने संकटात सापडलेल्या विजापूरच्या सुलतानाच्या मदतीसाठी उघडपणे फौजेची रवानगी केली होती. यापैकी पहिल्या दोन प्रसंगांचे वेळी त्याला क्षमा करण्यात आली किंवा त्याने मोगलांकडे खंडणी भरून आपल्या अपराधाचे परिमार्जन केले. परंतु त्याच्या अखेरच्या कृत्याने त्याने आपला नाश ओढवून घेतला . परंतु औरंगजेबाच्या दृष्टिकोनातून कुतुबशहाच्या हातून घडलेला भयंकर अपराध म्हणजे त्याने काफरांबरोबर केलेले सख्य हा होय. १६६६ मध्ये शिवाजी आग्र्याहून पळून आल्यानंतर त्याने त्याला अतिशय परिणामकारकरित्या युद्धसामग्रीची मदत केली आणि त्यायोगे मोगलांकडून त्यांनी घेतलेले किल्ले परत जिंकून घेणे त्याला शक्य

केले. इ. स. १६७७ मध्ये शिवाजीने जेव्हा हैद्राबादला भेट दिली तेव्हा कुतुबशहाने मोठ्या आनंदाने त्याचे स्वागत केले . या भेटीच्या वेळी मराठ्यांचा राजाच्या एखाद्या क्षुल्लक मांडलिकासारखे वर्तन कुतुबशहाने करून आपल्या हाताने त्याने शिवाजीच्या घोड्याच्या मानेवर रत्नांचा हार घातला आणि आपल्या राज्याच्या संरक्षणार्थ दरसाल एक लक्ष होन खंडणी म्हणून शिवाजीला देण्याचे त्याने कबूल केले . या सर्वांवर कडी म्हणजे कुतुबशहाने मादण्णा आणि आकण्णा या दोघा ब्राह्मणांना आपले मुख्य वजीर म्हणून नेमले आणि अशा तऱ्हेने आपल्या राज्यकारभारात हिंदूंच्या प्रभावाची पकड मजबूत करण्यास सहजतया वाव दिला (**के. के.**, भाग. २, ३२८).

(३) मोगलांबरोबर युद्ध आणि हैद्राबादचा पाडाव, १६८५

औरंगजेबाने मार्च १६८५ मध्ये विजापूरवरील आपल्या हल्ल्याला सुरुवात केली त्यावेळी त्याने शिकंदर आदिलशहाला कोणत्याही प्रकारे मदत न करण्याबद्दल अबुलहसन याला सक्त ताकीद दिली . परंतु जूनच्या अखेरीला अबुलहसन याने आपल्या गुप्त हेराना पाठविलेले एक पत्र वाटेत पकडण्यात आले . त्यात अबुलहसन याने पुढीलप्रमाणे मजकूर लिहिला होता . "मोगल बादशहा हा अतिशय मोठा माणूस आहे. आतापर्यंतचे त्याचे वर्तन दिलदारपणाचे आहे परंतु आता त्याला शिकंदर आदिलशहा हा एक असाहाय्य आणि पोरका आहे असे आढळून आल्यानंतर त्याने विजापूरला वेढा दिला आहे आणि तो आदिलशहावर दबाव आणत आहे . त्यामुळे विजापूरचे सैन्य आणि आपल्या असंख्यात सैनिकांसह संभाजी एका बाजूकडून मोगलांना प्रतिकार करीत आहे . अशा वेळी माझ्या बाजूकडून मी लढाईत भाग घेण्यासाठी खलीलुल्लाखान याच्या हाताखाली चाळीस हजार सैनिकांची रवानगी करणे हे अतिशय जरुरीचे आहे . असे झाल्यानंतर आपल्या शत्रूबरोबर बादशहा कुठे लढाई देतो आणि त्यांचे हल्ले परतवून लावतो हे आपल्याला दिसून येईल." (**बी. एस्.**, ५३३; **एम्. ए.**, २५९. ६०)

मळखेडजवळील युद्धे

हा मजकूर वाचल्याबरोबर औरंगजेबाने प्रचंड सैन्य देऊन राजपुत्र शहाआलम याला हैद्राबादवर जाण्यासाठी नियुक्त केले . परंतु मळखेडच्या पूर्वेस ८ मैलांवर सेरम येथे मोगल सैन्याच्या आघाडीच्या तुकड्या जेव्हा येऊन पोहोचल्या तेव्हा त्यांच्या मार्गात गोवळकोंड्याचे सैन्य उभे असलेले त्यांना आढळून आले. मोगल सैन्याची आगेचूक थांबविण्यात आली आणि मोगल फौजांना मळखेडकडे माघार घ्यावी लागली. प्रत्येक दिवशी शत्रूबरोबर चकमकी उडत होत्या . मळखेड येथील आपल्या छावणीभोवती खानजहान याने तटबंदी उभारली. त्याची परिस्थिती जवळ जवळ वेड्यामध्ये अडकल्यासारखी झाली.

काही काळ लोटल्यानंतर राजपुत्र शहाआलम हा कुमक घेऊन दाखल झाला . मोगलांनी आपले सामानसुमान मळखेड येथे ठेवले , आणि पुन्हा त्यांनी आपल्या आघाडीच्या तुकड्या हैद्राबादकडे जाण्याचा मार्ग मोकळा करण्यासाठी खानजहानच्या हाताखाली रवाना केल्या . दक्षिणी सैनिकांची संख्या मोगल सैन्याच्या तिप्पट होती . दोन्ही फौजांत अनेक वेळा चकमकी झडत होत्या . अशा तऱ्हेची प्रत्येक चकमक झाल्यानंतर मोगल सैनिकांची प्रगती तीन ते चार दिवस थबकून राहात असे. (**के. के.**, भाग २, २९६-२९८) ऑगस्ट महिना उजाडला होता . मुसळधार पडणाऱ्या पावसाने मोगल सैनिकांचे अतिशय हाल झाले आणि त्यांच्या प्रगतीत अडथळे निर्माण झाले . मोगलांना दररोज जी नुकसानी सोसावी लागत होती त्यामुळे मोगल सैनिकांच्या हृदयाने ठाव सोडला . परिणामी मोगल सेनापतींनी मुक्काम केला , आणि लढाई न देता

मळखेडच्या आसमंतात त्यानी दोन महिने निष्कारण वाया घालविले , त्यामुळे बादशहाकडून अतिशय झणझणीत अशा मजकुराचे पत्र येऊन दाखल झाले . त्याचवेळी राजपुत्राच्या छावणीवर शत्रूने विलक्षण असा धाडसी हल्ला केला . त्यामुळे राजपुत्र शत्रूबरोबर झुंज देण्यासाठी खवळून उठला . दोन्ही फौजांत अतिशय भीषण असे युद्ध झाले आणि दक्षिणी फौजांना त्यांच्या छावणीच्या दिशेने मागे लोटण्यात आले . दुसऱ्या दिवशी अशी खबर आली की शत्रूने हैद्राबादच्या दिशेने पळ काढला आहे . दक्षिणी सैनिकांचा प्रतिकार अशा तऱ्हेने मोडून पडण्यास कारण त्यांचा सेनापती मीर महमद इब्राहिम आणि दुय्यम सेनापती शेख मिनहाज यांच्यामधील मतभेद हे होय . गोवळकोंड्याचा सेनापती मीर महमद याला मोगलांनी केव्हाच आपल्या बाजूला वळवून घेतले होते . राजपुत्राला प्रतिकार करणारे आता कोणीच न उरल्यामुळे त्याने झपाट्या गोवळकोंड्याच्या दिशेने कूच करण्यास सुरुवात केली . खुद्द सेनापतीनेच पळ काढल्यामुळे हैद्राबादच्या संरक्षणाची व्यवस्था जवळ जवळ मोडून पडल्यासारखी झाली . आपण कोणावर विश्वास टाकावा हेच कुतुबशहाला समजेना . त्याने गोवळकोंड्याच्या किल्ल्याकडे पळ काढला . सुलतानाचे हे पलायन इतके अचानक होते की त्याची सर्व मालमत्ता पाठीमागे राहिली . जेव्हा हैद्राबादच्या प्रजाजनांना कळले की त्यांच्या सरकारने हैद्राबाद शहर शत्रूच्या भक्षस्थानी सोडले आहे आणि शत्रू अगदी नजीक येऊन ठेपला आहे तेव्हा किल्ल्यामध्ये पळून जाण्यासाठी त्यांच्यामध्ये एकच घनचक्कर उडाली . या घटनेनंतर ताबडतोब शहरामध्ये जी बेफाम लुटालूट झाली त्यामुळे गोंधळात आणखीनच भर पडली . शत्रूच्या हल्ल्यानंतर उद्ध्वस्त झालेल्या जागेला जशी अवकळा येते तशी अवकळा हैद्राबाद शहराला प्राप्त झाली . शहराच्या प्रत्येक विभागात रस्तोरस्ती आणि बाजाराचे ठिकाणी लक्षावधी रुपये किंमत भरेल इतकी सरदार आणि व्यापारी यांच्या मालकीची रोकड मालमत्ता आणि चिनीमातीची भांडी भरगच्च पडलेली होती . त्याचप्रमाणे सुलतान आणि अमीरउमराव यांच्या मालकीचे गालीचे यांचाही खच पडला होता . त्याशिवाय हत्ती आणि घोडे हेही अगणित संख्येने होते . सुलतान शहर सोडून गेल्यानंतर झालेल्या प्रचंड कोलाहालात या सर्वाची लुटालूट करण्यात आली आणि अनेक हिंदू आणि मुसलमान स्त्रिया व मुले यांना पळवून नेण्यात आले आणि त्यांच्यापैकी काहींवर अत्याचार करण्यात आले. (**दिल.**, १९०; **के. के.**, भाग २. ३०६-३०७)

दुसऱ्या दिवशी शहाआलम याने आपल्या शिपायांची एक तुकडी नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी रवाना केली . परंतु हे सैनिकच होत असलेल्या लुटालुटीत सामील झाले . दोन दिवसानंतर राजपुत्राने खानजहान याची शहराच्या पोलीस बंदोबस्तासाठी नेमणूक केली . शहरामध्ये थोड्याफार प्रमाणात सुव्यवस्था प्रस्थापित करण्यात त्याला यश आले . मोगल सैन्याने दुसऱ्यांदा जो हा हैद्राबाद शहरामध्ये प्रवेश केला ती तारीख ८ ऑक्टोबर १६८५ च्या जवळपास होती . कुतुबशहाने आपले जासूद राजपुत्राकडे सारखे पाठविण्याचा आणि अगतिकपणे तह घडवून आणण्याबद्दल त्याची मनधरणी करण्याचा प्रयत्न चालूच ठेवला. राजपुत्राने केकेल्या शिफारशी १८ ऑक्टोबर रोजी दरबाराकडे आल्या . अबुलहसन याला पुढील अटींवर क्षमा करण्याचे बादशहाने कबूल केले. त्या कबूल केलेल्या अटी अशा :—

(१) अबुलहसन याने मागील सर्व कर्जफेडीपोटी एक कोटी वीस लक्ष रुपये द्यावेत आणि त्याशिवाय दरवर्षी दोन लक्ष होन खंडणी म्हणून द्यावेत.

(२) अबुलहसन याने मादण्णा आणि आकण्णा ह्यांना बडतर्फ करावे.

(३) बादशाही फौजांनी आपल्या ताब्यात घेतलेल्या मळखेड आणि सेरम ह्या ठिकाणावरील आपले सर्व अधिकार [या अटींची पूर्तता होण्याची वाट पाहात राजपुत्र असताना औरंगजेबाकडून शहाआलम व त्याचे अधिकारी यांच्यासाठी उंची भेटी

घेऊन औरंगजेबाकडून काही माणसे येत होती . यावेळी गोवळकोंड्यामध्ये पूर्णपणे अंदाधुंदी माजली होती . प्रत्येक व्यक्ती स्वतःला मन मानेल तसे वागत होती . या तुकडीवर हैद्राबादच्या पश्चिमेस २८ मैलांवर मुनगळ येथे शेखनिजाम आणि त्याचे अफगाण सैनिक यांनी हल्ला चढविला . या हल्ल्यात या तुकडीचा प्रमुख मीर अबदुल करीम हा जखमी होऊन पकडला गेला . त्याचे अनेक सैनिक ठार झाले . त्याचप्रमाणे औरंगजेबाने पाठविलेल्या भेटी व या तुकडीबरोबर आलेल्या व्यापाऱ्यांचा माल याची लुटालूट करण्यात आली . या घटनेबद्दल कुतुबशहाने बादशहाकडे क्षमा मागितली, अबदुल करीम याची मुक्तता केली व लुटलेल्या मालापैकी पुष्कळसा माल परत केला . (**एम. ए.,** २६८-२६९, **दिल.,** १९२; **के. के.,** भाग २. ३१५).] सोडून द्यावे. त्याने (**ईश.,** ९१ अ; **दिल.,** १९०—१९१; **के. के.,** भाग २. ३०७; **एम्. ए.,** २६७)

(४) मादण्णाचा खून, इ. स. १६८६

शहाअलम याने काही महिने प्रथम गोवळकोंड्याच्या अगदी नजीक मुक्काम केला आणि नंतर कुतुबशहाच्या विनंतीवरून गोवळकोंड्याच्या वायव्येस ४८ मैलांवर असलेल्या कुहीर या गावाकडे त्याने माघार घेतली . ह्या ठिकाणी युद्धाचा झालेला खर्च वसूल करण्यासाठी त्याने मुक्काम केला . मादण्णाला त्याच्या अधिकारपदावरून बडतर्फ करण्याचे अबुलहसन याने जास्तीत जास्त लांबणीवर टाकले . ह्या घटनेमुळे त्याच्या नाराज असलेल्या सरदारांची सहनशक्ती संपली . मोगलांकडून गोवळकोंड्यावर जे आघात होत होते त्याला कारणीभूत मादण्णा आहे अशीच त्यांनी मनाशी खूणगाठ बांधली . नाराज झालेल्या या मुसलमान सरदारांनी माटण्णाविरुद्ध एक कट रचला. ह्या कटवाल्यांचा पुढारी शेख मीनहाज होता. ह्या कटामध्ये अब्दुल्ला कुतुबशहा याच्या विधवा स्त्रिया सरुमा आणि जानीसाहिबा ह्या दोघीजणी होत्या . ह्या दोघींनी निरंकुशपणे अंतःपुरावर आता आपली सत्ता गाजविण्यास सुरुवात केली . इ. स. १६८६ च्या मार्च महिन्याच्या सुरुवातीला एके दिवशी रात्री मादण्णा हा नुकताच कुतुबशहाची भेट घेऊन परत चालला होता. तो परत जात असताना जमशीद आणि इतर गुलाम ह्यांनी त्याच्यावर हल्ला केला आणि गोवळकोंड्याच्या रस्त्यामध्ये त्याचा खून केला . त्याच ठिकाणी मादण्णाचा भाऊ आकण्णा ह्यालाही ठार मारण्यात आले. त्याचा शूर आणि चतुरस्त्र पुतण्या रुस्तुमराव ह्याचा त्याच्या घरापर्यंत पाठलाग करण्यात आला आणि त्याला भोसकून ठार मारण्यात आले . मादण्णाची कुटुंबीय मंडळी राहात असत त्या घरांची लुटालूट करण्यात आली . नंतर किल्ल्यामधील हिंदू राहात असलेल्या वस्तीवर जमावाने एकाएकी हल्ला केला. "त्या दिवशी रात्री इतर अनेक ब्राह्मणांनी आपला जीव आणि मालमत्ता ह्यांचे बलिदान केले ." (**के. के.**, भाग २ . ३०८, **ईश.,** ९१ ब ; **दिल.,** १९१). सुलतानाच्या आईने औरंगजेबाला नको असलेल्या वजिरांची मस्तके त्याच्याकडे रवाना केली . ह्या भेटीमुळे खूष होऊन औरंगजेब तहाला तयार होईल अशी तिने आपल्या मनाची समजूत करून घेतली . ह्यानंतर बादशहाने सोलापूर मुक्कामी शहाअलम ह्याला आपल्या भेटीसाठी बोलावून घेतले . सोलापूर येथे ७ जून १६८६ रोजी राजपुत्र येऊन पोहोचला . गोवळकोंड्याच्या मुलुखामधून मोगलांनी आता पूर्णपणे माघार घेतलेली होती . त्याच वर्षी १२ सप्टेंबर रोजी विजापूरचा पाडाव झाला . विजापूरच्या पाडावामुळे कुतुबशाही राज्याचा कायमचा निकाल लावण्यासाठी मोगल फौजा मोकळ्या झाल्या होत्या. (गोवळकोंड्याच्या वेढ्यासाठी पाहा: **एम्. ए.,** २८८—३००).

(५) औरंगजेब गोवळकोंड्याला वेढा घालतो, इ. स. १६८७

१६८७ या वर्षाच्या जानेवारी महिन्याच्या २८ तारखेला बादशहा गोवळकोंड्यापासून २ मैलांवर येऊन ठेपला . दरम्यान अबुलहसन ह्याने पुन्हा राजधानीतून किल्ल्याकडे पळ काढला होता . हैद्राबाद शहराचा मोगलांनी तिसऱ्यांदा आणि अखेरचा ताबा घेतला . [खुद्द औगरंजेब गोवळकोंड्यावर चाल करून येत आहे हे समजताच अबुलहसन हा अतिशय निराश झाला आणि काय करावे हे त्याला समजेनासे झाले . नेहमी हास्य करणाऱ्या त्याच्या ओठावरील हास्य मावळले. त्याचे डोळे अश्रूंनी भरून आले . त्याच्या डोळ्यांतील भावना विरहीत झाली आणि त्याच्या तोंडातून शब्द उमटेना . त्याने बादशहाकडे अनेक प्रकारांनी आपली राजनिष्ठा व्यक्त करून शरणागती देण्याचे प्रयत्न केले . परंतु बादशहाकडून त्याला एकच प्रतिसाद मिळाला आणि तो म्हणजे तलवारीचा. (**एम्. ए.,** २८७).]

अनुक्रमणिका

गोवळकोंडा किल्ला

हैद्राबाद शहराचे दोन भाग आहेत. त्या दोन्ही भागांना जोडणारा दगडी पूल मुसी नदीवर आहे. ह्या पुलाच्या पश्चिमेला दोन मैल गोवळकोंड्याचा किल्ला आहे . किल्ल्याच्या ईशान्येकडच्या टोकाला एक अतिशय ओबडधोबड पंचकोनी आकाराचे बांधकाम किल्ल्याला जोडण्यात आलेले आहे . याला नवा किल्ला असे म्हणतात. यामुळे किल्ल्याचे स्वरूप एखाद्या वेड्यावाकड्या समांतरभुज चौकोनासारखे वाटत असे . किल्ल्याच्या सभोवार चार मैल लांबीची आणि अतिशय जाड अशी असलेली काळ्या फत्तरात बांधलेली आणि ओबडधोबड आणि खाचाखोचा असलेली मजबूत अशी भिंत आहे . ह्या भिंतीवर आणखी मजबुती आणण्यासाठी सत्त्याऐंशी अर्धवर्तुळाकार असे बुरूज आहेत. प्रत्येक बुरुजाची उंची पन्नास ते साठ फूट आहे. हे बुरूज भक्कम अशा दगडात बांधलेले असून सिमेंटने ते सांधलेले आहेत . त्यांच्यापैकी काहींचे वजन एक टनापेक्षा अधिक आहे. किल्ल्याच्या भिंतीला असलेल्या आठ प्रचंड दरवाजांनी सतराव्या शतकात उपलब्ध असलेल्या तोफांच्या माऱ्याला अतिशय लीलया तोंड दिले असते . या तटबंदीबाहेर एक खोल असा खंदक आहे. खंदकांची रुंदी पन्नास फूट असून खंदकाच्या बाहेरील बाजूच्या भिंती दगडात बांधण्यात आलेल्या आहेत. परंतु तसे बघितले तर गोवळकोंडा म्हणजे चार विभिन्न किल्ले एकमेकांना जोडून जणुकाही एकवटलेले आहे. त्याचप्रमाणे किल्ल्याच्या आतील बाजूस तशाच तऱ्हेने बांधलेल्या तटबंदीचे वेढे आहेत . यांपैकी सर्वांत खालच्या बाजूला असलेली तटबंदी म्हणजे शहराचे अगदी बाहेरच्या बाजूला असलेले संरक्षणात्मक कुंपण आहे. यामध्ये आपण फत्ते दरवाजातून आग्नेयेच्या दिशेने प्रवेश करतो. ही जागा म्हणजे एक लांबलचक पसरलेला पट्टा असून त्यामध्ये सरदारांचे वाडे , बाजार, देवळे, मशिदी, शिपायांच्या बराकी, दारूगोळ्यांची कोठारे, तबेले आणि क्वचित ठिकाणी नांगरलेली शेते देखील आहेत . ह्या ठिकाणी संकटकाळात हैद्राबादची सर्व नागरिक मंडळी आसरा घेऊन राहात असत . ह्या ठिकाणाहून फत्ते दरवाजातून आतमधे मुख्य राजरस्त्याने अंदाजे १२५० वार चालून गेल्यावर आणि उजवीकडे असलेल्या खोलगट जागेवर अगदी अलीकडच्या काळात बांधलेले राजवाडे , अंतःपुरे आणि कचेऱ्या वगैरे इमारती ओलांडल्यावर आपण बालाहिसार दरवाजापाशी येऊन ठेपतो . या दरवाजातून काही पायऱ्या चढून गेल्यावर आपण एका उंचवट्याच्या जागेवर येतो . ह्या जागेभोवती अतिशय उंच आणि मजबूत अशा भिंती आहेत. येथे असलेल्या इमारतीमधे अतिशय मोठे असे तीन मजली शस्त्रागार, दारूगोळ्यांची कोठारे, तबेले, मशिदी, लोकांची गाऱ्हाणी ऐकण्यासाठी बांधलेले सज्जे , अंतःपुरांच्या इमारती, बागा, पायऱ्या असलेल्या मोठ्या विहिरी आणि त्याशिवाय दोन धर्मशाळा आणि एक हनुमंताचे देऊळ या सर्व गोष्टींचा उल्लेख करावा लागेल. आणखी थोडे पश्चिमेकडे मजबूत अशा दगडात बांधलेल्या दोनशे पायऱ्या ओलांडल्यावर वाटसरू किल्ल्याच्या अगदी शिखरापाशी येऊन पोहोचतो . हे शिखर म्हणजेच बालाहिसार अथवा हैद्राबादचा बालेकिल्ला होय. अतिशय मजबूत अशा कातळावर हा किल्ला उभा असून प्रचंड कड्यांनी त्याच्या भिंती आपोआप तयार झाल्या आहेत. या भिंतींना अधेमधे जोडणाऱ्या आणि वरच्या बाजूला सुळक्यासारख्या ठाण मांडून बसलेल्या मजबूत तटबंद्या आणि दगडांच्या कनाती आहेत . हा किल्ला म्हणजे बालेकिल्ल्याच्याही आतला बालेकिल्ला आहे आणि त्याची गणना सर्व किल्ल्यांचा जणुकाही गाभाच अशी करावी लागेल . किल्ल्याच्या ईशान्येकडील टोकाला एक टेकडी आहे . त्या टेकडीवरून गोवळकोंड्याच्या काही भागावर सहज ताबा चालविता येतो . परंतु ह्या टेकडीभोवती एक भिंत बांधण्यात आली आणि तिचा समावेश किल्ल्यात करून घेण्यात आला. ह्या नवीन भागाला नवा किल्ला असे नाव देण्यात आले. इ. स. १६५६ मध्ये औरंगजेबाने दिलेल्या पहिल्या वेढ्यानंतर संरक्षणात्मक तरतूद म्हणून हा किल्ला बांधण्यात आला . किल्ल्याच्या ह्या शेवटच्या भागाच्या उत्तरेला , दक्षिणेला आणि पश्चिमेला देखील मोठमोठे तलाव आहेत .

अनुक्रमणिका

त्यामुळे किल्ल्याच्या पाणीपुरवठ्यात कधीही खंड पडत नाही . किल्ल्याच्या उत्तरेला सव्वा मैल अंतरावर अतिशय चमत्कारिकपणे जणुकाही एकावर एक रचलेल्या आणि उघड्याबोडक्या अशा कमी उंचीच्या डोंगरांची एक रांग आहे . ह्या रांगेभोवती आणि पश्चिमेच्या बाजूला सोलापूराहून येणारा जुना मोठा रस्ता आहे. किल्ल्याच्या मागील वेढ्याच्या वेळी ह्या ठिकाणी आपली छावणी औरंगजेबाने टाकली असे म्हटले जाते. मोगलांनी केलेल्या हल्ल्याचा रोख किल्ल्याच्या दक्षिण आणि आग्नेय दिशेच्या बाजूवर केंद्रित झालेला होता . त्यांचे शिपाई मुसी नदीच्या उत्तर आणि दक्षिण किनाऱ्यावर हालचाल करीत होते तर किल्ल्याच्या वायव्येकडील दरवाजावर होणारा भडिमार हा केवळ मोगलांनी शत्रूला फसविण्याकरिता चालू ठेवला होता.

गोवळकोंड्याच्या वेढ्याची सुरुवात : किलिचखानाचा मृत्यू

गोवळकोंड्याच्या नजीक मोगलांचे सैन्य येऊन ठेपले . किल्ल्याच्या तटबंदीच्या छायेत असलेल्या कोरड्या खंदकाच्या आधाराने शत्रूचे सैन्य जमा झालेले होते . त्या सैन्यावर हल्ला करून त्यांना हाकलून देण्याची आज्ञा औरंगजेबाने आपल्या सेनापतींना दिली. बादशाही फौजांनी केलेल्या एकाच हल्ल्यात शत्रूची पळता भुई थोडी झाली . ह्या घटनेचे वर्णन मोगल इतिहासकारांनी पुढील शब्दांत केलेले आहे : "वाऱ्याचा प्रचंड झोत आला आणि चिलटे उडून गेली ." शत्रूची मालमत्ता, बायका आणि मुले ह्यांना मोगलानी बंदिस्त केले. पहिल्या निजामाचा आजा किलिचखान त्याने निर्वासितांबरोबर निर्माण झालेल्या गोंधळाचा फायदा घेऊन किल्ल्यात शिरण्याचा आणि एका फटक्यासरशी किल्ला जिंकून घेण्याचा प्रयत्न केला . परंतु किल्ल्याच्या भिंतीवर असलेल्या जम्बूरक ह्या शस्त्रातून सुटलेली गोळी त्याच्या खांद्याला लागली . छावणीत उपस्थित असलेल्या हकिमांनी त्याच्यावर अनेक प्रकारे उपचार केले परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. त्यानंतर तीनच दिवसांनी किलिचखान हा मरण पावला . (**एम. ए.**, २८८–२८९; **दिल.**, २०६). किल्ल्याच्या वेढ्याचे मोर्चे त्यानंतर ७ फेब्रुवारीपासून व्यवस्थितपणे उभारले गेले , आणि वेढ्याचे काम सुरू झाले.

(६) शहाअलम याला कैद केले जाते

परंतु वेढ्याच्या सुरुवातीलाच छावणीमध्ये औरंगजेबाच्या सरदारात परस्परांसंबंधी जी मत्सराची भावना निर्माण झाली त्यामुळे बादशहाचे जणुकाही हात तोडल्यागतच झाले . शहाअलमचा स्वभाव अतिशय मृदू आणि सुखाला लालचावलेला असा होता . एखाद्या वीराला शोभेल अशी वागणूक आणि शरीराला कष्ट देणारी साहसपूर्ण कृती ही त्याच्या शरीरधर्माच्या अगदी विरोधी होती . अबुलहसनसारखा एक सुलतान आणि त्याचे राज्य ह्यांचा पूर्णपणे नाश व्हावा ही गोष्ट त्याच्या मनाला पटेना . त्याच्या मनात निर्माण झालेली ही अनुकंपेची भावना थोडी फार स्वार्थी होती . कारण ह्या विचाराबरोबर आणखी काही नीचपणाचे विचार त्याच्या मनात घोळू लागले . त्याला असे वाटले की जर अबुलहसन ह्याला आपल्या मध्यस्थीने तह करण्यास उद्युक्त केले गेले तर सरकारी अहवालात गोवळकोंड्याचा विजेता म्हणून आपले नाव झळकेल . अबुलहसनच्या जासूदांनी अतिशय उंची नजराणे घेऊन गुप्तपणे शहाअलमच्या भेटी घेतल्या . शहाअलम ह्याने बादशहापाशी असलेल्या आपल्या वजनाचा उपयोग करून अबुलहसन ह्याची गादी आणि त्याचे घराणे ह्यांचा बचाव करावा अशी त्यांनी त्याच्यापाशी याचना केली. शहाअलम ह्याने त्यांना उत्तेजन वाटण्यासारखी उत्तरे दिली . बादशहाला नकळत राजपुत्राने ह्या ज्या वाटाघाटी चालविल्या होत्या आणि त्या देखील बादशहाकडून ज्याला कधीही क्षमा होणार नाही अशा शत्रूबरोबर : त्यामधून एकच अनुमान काढता आले

असते आणि ते म्हणजे शहाअलम हा विस्तवाशी खेळ खेळत होता . खुद्द छावणीमध्येच त्याचा नाश करण्याची संधी आपल्याला कधी प्राप्त होते ह्याची वाट बघत त्याचे शत्रू टपून बसले होते . त्याचा प्रतिस्पर्धी आजम ह्याच्या पक्षपात्यांनी शहाअलम आणि अबुलहसन ह्यांच्यामध्ये जो गुप्त पत्रव्यवहार चालला होता तो बादशहाजवळ उघड केला . त्यामध्ये शहाअलमने आपल्या अंतःपुराचे तंबू त्याच्या स्वतःच्या मुख्य ठाण्यानजीक आणण्याची आज्ञा केली . त्यामुळे औरंगजेबाचा संशय अधिकच बळावला वस्तुतः शत्रूने अचानक हल्ला करू नये म्हणून शहाअलमने घेतलेली ती खबरदारी होती . परंतु औरंगजेबाला असे वाटले की राजपुत्राचा उद्देश आपल्या कुटुंबियांसहित शत्रूच्या किल्ल्याकडे पळून जाण्याचा आहे . अखेर जेव्हा फिरोजजंग ह्याने राजपुत्र शहाअलम अबुलहसन ह्याच्याकडे किल्ल्यावर जी पत्रे पाठविण्याचा प्रयत्न करीत होता ती पकडली आणि एके रात्री बादशहाला दाखविली , तेव्हा बादशहाच्या मनात शहाअलमबद्दल जो संशय निर्माण झाला होता त्याला पुष्टी मिळाली.

ह्यावर औरंगजेबाने ताबडतोब कृती केली . राजपुत्राच्या छावणीभोवती त्याने लगोलग बादशाही फौजांचा कडेकोट पहारा ठेवला . दुसऱ्या दिवशी सकाळी म्हणजे २१ फेब्रुवारी रोजी शहाअलम ह्याला त्याच्या चार मुलांसह बादशहाने आपल्या छावणीत सल्लामसलतीसाठी बोलाविले . काही मिनिटे त्याच्याशी बातचीत झाल्यावर बादशहाच्या काही गुप्त सूचना ऐकण्यासाठी म्हणून वजिराने त्यांना शेजारच्या एका खोलीत प्रवेश करण्यास सांगितले . तेथे त्यांना शिष्टाचारपूर्वक असे सांगण्यात आले की , "तुम्ही सर्वजण कैदी आहात आणि म्हणून तुम्ही आपल्या तलवारी आमच्या स्वाधीन करा ." राजपुत्राच्या कुटुंबातील सर्व व्यक्तींना बंदिस्त करण्यात आले , त्याची मालमत्ता जप्त करण्यात आली , त्याचे शिपाई सैन्यातील इतर अधिकाऱ्यांकडे वाटून देण्यात आले आणि शहाअलमने बादशहाचा विश्वासघात करण्याचा जो बेत रचला होता त्याची उघडीक करावी म्हणून त्याच्या पदरच्या विश्वासू खोजांचे हालहाल करण्यात आले . जो जो राजपुत्राने आपले निरपराधित्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला तो तो बादशहाचा संताप अतिशय वेगाने उफाळून आला. त्याने शहाअलमचा बंदिवास अधिक कडक केला , आणि त्याने असा हुकूम काढला की शहाअलमने आपले केस कापू नयेत अगर नखे साफ करू नयेत व त्याचप्रमाणे शहाअलम ह्याला सुग्रास भोजन, शीतल पेये अथवा त्याचा नेहमीचा पोषाख देण्यात येऊ नये . अशा कडक बंदिवासात सात वर्षे घालविल्यानंतर शहाअलम ह्याला त्याचे पूर्वीचे स्वातंत्र्य प्राप्त झाले . राजपुत्राला कैद केल्यानंतर औरंगजेबाने घाईघाईने आपला दरबार बरखास्त केला पण आपली बेगम औरंगाबादी महल हिच्याकडे तो त्वरित निघून गेला आणि आपल्या गुडघ्यावर थापट्या मारीत आक्रोश करीत त्याने असे उद्‌गार काढले , "हायरे परमेश्वरा! गेली चाळीस वर्षे ज्या गोष्टींची मी मनोभावे जोपासना केली ती गोष्ट माझ्या हाताने मी जमिनीवर उन्मळून पाडली आहे." (**एम्. ए.,** २९४).

(७) गोवळकोंड्याच्या वेढ्यात औरंगजेबाला तोंड द्याव्या लागलेल्या अडचणींची हकीकत

बादशहाच्या छावणीत विसंवादीपणाची तार छेडणारा शहाअलम ही काही एकटीच व्यक्ती होती असे नव्हते. बादशहाच्या चाकरीत अनेक शिया पंथी मुसलमान होते. हिंदुस्थानातील शिया पंथाचा पुरस्कार करणारे शेवटचे राज्य अशा तऱ्हेने नाश पावले जावे ही गोष्ट त्यांना मनापासून आवडत नव्हती . ह्या शियाव्यतिरिक्त अबुलहसनविरुद्ध हे जे त्याच्या सर्वस्वाचा नाश करणारे युद्ध चालले होते त्याचा अनेक सनातनी सुनी पंथियांनी धिक्कार केला. ह्या युद्धाची गणना त्यांनी कोणत्याही तऱ्हेचे कारण नसताना निर्माण झालेले आणि म्हणून पापाच्या गर्तेत लोटणारे युद्ध अशी केली . बादशहाच्या सरळ स्वभावाचा आणि वृत्तीने धार्मिक असलेला मुख्य न्यायाधीश शेख उल् इस्लाम ह्याने दक्षिणेतील दोन शाह्यांवर आक्रमण न करण्याचा

बादशहाला सल्ला दिला होता. परंतु बादशहाने हा सल्ला झिडकारून लावल्यामुळे त्याने आपल्या उच्चपदाचा राजीनामा दिला होता आणि तो मक्केला निघून गेला होता . त्याच्या जागी अधिकारावर आलेला काजी अब्दुला ह्यानेही अशाच तऱ्हेचा बादशहाला न पटणारा सल्ला दिला . त्याचा गाशा गुंडाळून बादशहाने त्याला मुख्य छावणीकडे पाठवून दिले.

शियांच्या मनामध्ये या मोहिमेबद्दल साहजिकपणे जी कटुतेची भावना निर्माण झाली होती त्यामुळे औरंगजेबाच्या हालचालीत अनेक व्यत्यय आले. सुरुवातीला वेढ्याच्या कामावर फिरोजजंग हा एकच मोठा आणि नामवंत अधिकारी होता . तोफखान्याचा प्रमुख सफशिकनखान हा पर्शियन होता . फिरोजजंग हा जातीने तुर्क होता . त्याचे सैन्यामधील उच्च स्थान आणि बादशहाची त्याच्यावरील मर्जी ह्याबद्दल सफशिकनखानाला नेहेमीच मत्सर वाटे. काही काळपर्यंत वेढ्याचे काम अतिशय कसोशीने चालविल्यानंतर फिरोजजंग ह्याची नाचक्की व्हावी म्हणून सफशिकनखानाने आपल्या अधिकाराचा राजीनामा दिला . त्याच्या जागी सलाबतखानाची नेमणूक झाली . परंतु त्याला आपली कामगिरी यशस्वीपणे बजावता आली नाही . काही काळानंतर त्यानेही आपल्या जागेचा राजीनामा दिला . ह्यानंतर तोफखान्याचा प्रमुख म्हणून धैरतखान ह्याची नेमणूक झाली . एकदा अतिशय निष्काळजीपणाच्या अवस्थेत असताना शत्रूने त्याच्यावर अचानक हल्ला केला आणि कैद करून त्याला पकडून नेले . ह्यानंतर काही काळपर्यंत वरील जागेवर कोणाचीच नेमणूक करण्यात आली नाही. साहजिकच वेढ्याच्या कामावर या गोष्टीचे अतिशय भयानक असे परिणाम झाले . सरतेशेवटी सफशिकनखान ह्याला कैदेतून मुक्त करण्यात आले आणि त्याची पुन्हा तोफखान्याचा प्रमुख म्हणून नेमणूक करण्यात आली [२२ जून १६८७]. ही गोष्ट झाली त्यावेळी मोगल सैनिकांनी जवळ जवळ पाच महिने अविश्रांत श्रम घेऊन जे मोर्चे उभारले होते त्यांचा शत्रूने विध्वंस केला होता. साहजिकच हे मोर्चे पुन्हा नव्याने उभारण्याची आवश्यकता होती . वेढ्याच्या कामाला ७ फेब्रुवारी रोजी सुरुवात झाली होती . परंतु किल्ल्यावर कधीहा न संपणारा असा दारूगोळ्याचा अमाप पुरवठा होता आणि किल्ल्याच्या तटबंदीवरून लांब पल्ल्याच्या अनेक तोफा शत्रूवर रोखण्यात आलेल्या होत्या . पुढे सरकणाऱ्या मोगल फौजांवर किल्ल्यावरील शिबंदीने तोफांचा अविरत भडिमार चालू ठेवला . प्रत्येक दिवशी मोगल छावणीतील थोडीफार माणसे मारली जात किंवा जखमी तरी होत . परंतु सफशिकनखानाच्या हाताखालील फौजेने जे अजोड साहस आणि वाखाणण्याजोगा चिवटपणा दाखविला त्यामुळे सहा आठवड्यांच्या अवधीत मोगलांनी जो चर खणायला सुरुवात केली होती तो त्यांनी खंदकाच्या टोकापर्यंत नेऊन भिडविला . ह्याच्या पुढची पायरी म्हणजे खंदक भरून काढणे आणि किल्ल्यावर हल्ला करण्यासाठी जाणाऱ्या तुकडीला वाट करून देणे ही होती.

फिरोजजंगाला आलेले अपयश

ह्याप्रमाणे तटबंदीला खिंडार पाडण्यासाठी आणि हल्ल्याची तयारी करण्यासाठी जी कारवाई चालली होती ती चालू असताना मोगल सेनापती फिरोजजंग ह्याने १६ मे रोजी किल्ल्याच्या भिंती चढून जाऊन किल्ला जिंकून घेण्याचा प्रयत्न केला . रात्री नऊच्या सुमाराला तो आपल्या छावणीतून गुपचूपपणे बाहेर पडला. शत्रूचे रक्षक शिपाई ज्या ठिकाणी झोपी गेले होते अशा एका बुरुजाजवळ तो येऊन पोहोचला. त्या ठिकाणी त्याने भिंतीला टेकून एक शिडी उभी केली आणि आपले दोन शिपाई किल्ल्याच्या तटावर पाठविले. त्याने आपल्याबरोबर ज्या आणखी दोन शिड्या घेतल्या होत्या त्या तोकड्या पडल्या म्हणून किल्ल्याच्या दरवाजाच्या वरच्या टोकाला दोरखंडाची शिडी करून बांधण्यात आली . कर्मधर्मसंयोगाने किल्ल्याच्या भिंतीवर एक बेवारशी (pariah) कुत्रा उभा होता . खंदकात उतरण्यासाठी आणि तेथे

असलेल्या प्रेतावर ताव मारण्यासाठी कुठे वाट मिळते का ह्याचा तो शोध घेत होता. भिंतीवर चढून आलेल्या अनोळखी माणसांना बघितल्यावर तो कुत्रा बिचकला आणि त्याने मोठ्याने भुंकायला सुरुवात केली . ह्या भुंकण्यामुळे किल्ल्यावरील शिबंदी जागी झाली आणि त्यांनी मोगलांना हाकलून लावले . मुसलमानांच्या दृष्टीने कुत्रा हा अतिशय घाणेरडा प्राणी आहे . परंतु ह्या कुत्र्याने आज राजधानीचा बचाव केला होता . ज्या कुत्र्याने आपल्याला संकटातून सोडविले त्याला अबुलहसन ह्याने सोन्याची साखळी घालण्यास दिली . त्याचप्रमाणे हिऱ्याने मढविलेला एक गळपट्टा आणि सोनेरी कडा असलेला एक अंगरखा देखील बक्षिशीदाखल त्या कुत्र्यासाठी देण्यात आला . त्याने ह्या कुत्र्याला सेह -ताबका म्हणजे तीन पदव्यांचा सरदार हा किताब दिला . ह्यामध्ये अबुलहसनचा उद्देश फिरोजजंग ह्याच्या खान , बहादुर आणि जंग ह्या तीन पदव्यांची उघडउघड टिंगल करण्याचा होता . अबुलहसन ह्यानंतर विनोदाने असे म्हणाला की ह्या कुत्र्याने फिरोजजंगापेक्षा काही कमी कामगिरी केलेली नाही.

पाऊस आणि दुष्काळ

मोगलांनी अचानकपणे केलेल्या ह्या अयशस्वी हल्ल्याचा किल्ल्यावरील शिबंदीने लगोलग सूड घेतला. तोफा चढविण्यासाठी उभारण्यात आलेल्या दमदम्यावर त्यांनी अचानक हल्ला केला आणि तोफखान्यावरील सर्व गोलंदाजांना ठार मारले . मोगल सैन्याच्या तोफखान्याच्या तुकडीत जी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती त्यामुळे गेल्या काही दिवसांत वेढ्याच्या कामात कोणतीही प्रगती झालेली नव्हती. शत्रूकडून होणाऱ्या माऱ्यावर यत्किंचितही दबाव आला नव्हता आणि किल्ल्याभोवती असलेला खंदक भरून काढण्याचे दूरच राहिले होते . त्यात आणखी मोगल सैन्य दुष्काळाच्या कचाट्यात सापडले . दक्षिणी सैनिक आणि त्यांचे मराठा दोस्त ह्यांनी वाहतुकीच्या मार्गावर मोगलांना सतत त्रास दिला आणि मोगल छावणीत अन्नधान्य वाहून नेण्यास अटकाव केला . नंतर जून महिन्यात मुसळधार पाऊस कोसळावयाला सुरुवात झाली. दुथडी भरून वाहणारे नाले आणि नद्या ह्या ओलांडणे अशक्य झाले आणि चिखलामुळे रस्त्यांना एखाद्या दलदलीचे स्वरूप आले. वेढा घालून बसलेल्या मोगल सैनिकांकडे अन्नधान्य पोहोचणे अशक्य झाले . जून महिन्याच्या मध्याला अविरतपणे पडणाऱ्या पावसाने , मोगलांनी वेढ्यासाठी उभारलेल्या मोर्चांची पूर्णपणे नासधूस केली . तोफांसाठी उभारण्यात आलेले दमदमे कोसळून त्यांचा एक चिखलाचा ढीग झाला . मोगलांनी खणलेल्या खंदकांच्या भिंती कोसळून पडल्या आणि त्यामुळे वाटा बंद झाल्या. मोगलांची सबंध छावणी एखाद्या अथांग पसरलेल्या जलाशयासारखी झाली . त्यामधून उभे असलेले पांढरे तंबू हे फेसाच्या बुडबुड्याप्रमाणे वाटत होते.

(८) किल्ल्यामधील शिबंदीने मोगल छावणीवर केलेले हल्ले आणि त्यात झालेले मोगलांचे अपरंपार नुकसान

शत्रूने वरील संधीचा पुरेपूर फायदा घेतला . १५ जूनच्या रात्री पावसाची मुसळधार लागली असताना शत्रूने मोगल सैन्याची आघाडीवर असलेली मोर्चांची ठिकाणे आणि तोफखाना ह्यांवर हल्ला केला . बेशिस्त असलेल्या गोलंदाजांना त्यांनी ठार मारले , तोफांच्या तोंडात त्यांनी खिळे ठोकले आणि दारूगोळा आणि सुरुंग पेरण्यासाठी लागणाऱ्या सामानसुमानाचा त्यांनी विध्वंस केला . त्यानंतर ते मोगल छावणीतील अधिकाऱ्यांवर तुटून पडले आणि तोफखान्याचा प्रमुख धैरतखान , बादशहाचा एक अतिशय विश्वासू जुना सेवक सरबराहखान आणि इतर बारा उच्च पदस्थ अधिकारी ह्यांना कैद करून ते निघून गेले . जवळ जवळ तीन दिवसपर्यंत मोगलांनी शत्रूबरोबर लढा दिल्यानंतर आणि एका नवीन तुकडीचे साहाय्य आल्यानंतर

शत्रूचा हल्ला परतवून लावण्यात आणि शत्रूच्या ताब्यात गेलेले तोफांचे मोर्चे परत जिंकून घेण्यात मोगलांना यश आले. कैद केलेल्या मोगल अधिकाऱ्यांना अबुलहसन याने अतिशय दयाळूपणे वागविले . त्यांना त्याने बहुमोल देणग्या भेटीदाखल दिल्या आणि त्यांची बादशहाकडे रवानगी केली . [अबुलहसन याने पकडलेल्या मोगल अधिकाऱ्यांना अतिशय दयाळूपणे वागविले आणि त्यांना उंची नजराणे देऊन त्यांची रवानगी बादशहाकडे केली . बादशहाने त्यांना अतिशय कडक रितीने वागविले. त्यांच्या **मनसबी** त्याने कमी केल्या. त्यांच्या बरोबर अबुलहसन याने एक अर्ज पाठविला होता . त्यात त्याने विनंती केली होती की गोवळकोंड्याचे राज्य खालसा करून तेथे आपला अधिकारी राज्यकारभारासाठी नेमण्याचे ऐवजी बादशहाने गोवळकोंडा माझ्याच ताब्यात ठेवावे . कारण त्यामुळे बादशहाला करावा लागणारा खर्च कमी येईल त्याचप्रमाणे राज्यामध्ये पुन्हा पहिल्यासारखी परिस्थिती निर्माण करण्यास सात , आठ वर्षे सहज लागतील आणि एवढ्या कालावधीत मोगलांना थोडा देखील वसूल मिळणार नाही . या उलट बादशहाने माझ्याशी तह करून माझ्या राज्यामधून माघार घेतल्यास मी स्वतः खंडणी म्हणून १ कोट रुपये देईन . वरील अर्जात आपण मोगल सैन्यासाठी ५ , ६ लक्ष मण धान्य देण्यास तयार आहोत हेही त्याने कळविले.

परंतु मोगलांवर हल्ला करून त्यांचे अधिकारी पकडण्यात शत्रूने जे अलौकिक साहस दाखविले होते त्यामुळे औरंगजेबाला आपली अतिशय मानहानी झाली आहे असे वाटत होते . अशा परिस्थितीत आपले कितीही नुकसान झाले आणि कितीही कष्ट सोसावे लागले तरी त्याचा वचपा औरंगजेबाला घ्यावयाचा होता. औरंगजेबाने तहाच्या अटी झिडकारल्या आणि एका अधिकाऱ्यातर्फे अबुलहसन याला कळविले की तुला जर शरण यावयाचेच असेल तर तू आपले हात बांधून आणि मानेभोवती दोरी बांधून माझ्या समोर ये . नंतर मला योग्य वाटेले ती मेहरनजर मी तुझ्यावर करीन.

यानंतर झालेली नुकसानी भरून काढण्यासाठी मोगलांनी अनेक उपाययोजना केल्या . खंदक भरून काढण्यासाठी आणि हल्ला करणाऱ्या सैन्याला वाट मिळावी म्हणून औरंगाबाद , खानदेश आणि वऱ्हाड येथून अनेक प्रकारची सामग्री मागविण्यात आली . तहाच्या अटी नाकारल्याबद्दल बादशाही अधिकाऱ्यांनी कुरकूर केली , परंतु औरंगजेबाने कुतुबशहाच्या बाबत आपले ताठर धोरण सोडण्यास नकार दिला .] मोगलांना हे जे अपयश आले त्याचा कलंक धुऊन काढण्यासाठी आणि शत्रूवर हल्ला अधिक परिणामकारक व्हावा म्हणून मोगलांनी अधिक जोरदार उपायांची योजना केली . वेढ्याच्या मोर्चापासून तटबंदीच्या तटापर्यंत तीन सुरुंग खोदण्यात आलेले होते . १९ जून रोजी ते उडविण्याची तयारी झाली होती . प्रत्येक सुरुंगामागे ५०० मण बंदुकीची दारू ठासून भरण्यात आली होती आणि वात लावून प्रत्येक सुरुंग तयार ठेवण्यात आला होता.

सुरुंगाचा स्फोट २० जून

सुरुंग उडविण्यासाठी आणि किल्ल्यातील हल्ला जारी करण्यासाठी नंतरचा दिवस (२० जून) निश्चित करण्यात आला होता . ह्या कामगिरीवर देखरेख ठेवण्यासाठी फिरोजजंगच्या मोर्चातून खुद्द बादशहा जातीने हजर होता . हुकमाप्रमाणे मोगल सैनिक आपापल्या मोर्चांमधून झपाट्याने बाहेर पडले . तटबंदीच्या ज्या भागाखाली सुरुंग भरण्यात आला होता त्या ठिकाणी जाऊन त्यांनी उगीचच मोठमोठ्यांनी आवाज करण्यास सुरुवात केली . ह्यामध्ये त्यांचा उद्देश शत्रूला मोठ्या संख्येने गोळा होण्यास उद्युक्त करण्याचा आणि सुरुंगाचा स्फोट झाल्यानंतर त्यांच्या पैकी असंख्य सैनिकांना ठार करण्याचा होता . दिवस उजाडता उजाडता पहिल्या सुरुंगाला बत्ती देण्यात आली. परंतु सुरुंगाच्या स्फोटाचा जोर बाहेरच्या बाजूने होता. तटबंदीखाली मोठ्या संख्येने जमा झालेल्या मोगल सैनिकांवर सुरुंगाची दारू भरलेल्या तटबंदीच्या खालच्या भागातून दगड आणि माती ह्यांचा प्रचंड वर्षाव झाला , "डोळा लवतो न लवतो इतक्या वेळात मोगलांचे अकराशे सैनिक दगडांच्या उडणाऱ्या कपाऱ्यांमुळे ठार मारले गेले , तर किल्ल्याच्या भिंती जशाच्या तशा अखंड राहिल्या."

किल्ल्यामधून अचानक बाहेर पडून आणि गोंधळून गेलेल्या मोगलांवर हल्ला करून शत्रूने या संधीचा फायदा घेतला. यानंतर शत्रूने मोगलांचे मोर्चे आणि ठाणी आपल्या कबजात घेतली . हे मोर्चे आणि ठाणी तयार करून त्यावर आपली पकड मजबूत करण्यास मोगलांना जवळ जवळ चार महिन्यांचा कालावधी लागला होता . औरंगजेबाने पाठविलेल्या एका तुकडीने शत्रूला हाकलून लावले आणि वरील

ठाण्यावर पुन्हा कबजा केला . ह्या साठी मोगलांना जबर लढा द्यावा लागला आणि भरपूर हानी सोसावी लागली. ही गोष्ट होऊन थोडा कालावधी लोटला न लोटला तोच दुसऱ्या सुरुंगाला बत्ती देण्यात आली. या सुरुंगाच्या स्फोटामुळे झालेले परिणाम पहिल्या इतकेच भयंकर होते . पुन्हा एकदा धडाकून उडालेल्या बुरुजांच्या कपाऱ्या मोगल सैन्यावर कोसळल्या आणि त्यांच्यापैकी हजारांवर सैनिक कामी आले . यावर शत्रूने पुन्हा एकदा किल्ल्यातून बाहेर पडून मोगलांनी उभारलेली मैदानी ठाणी आणि मोर्चे यांचा ताबा घेतला. त्यासाठी दोन्ही फौजांमध्ये आता घनघोर रणसंग्राम माजला . फिरोजजंग आणि त्याच्याबरोबर रुस्तुमखान आणि दलपतराव बुन्देला हे दोघे सेनानी जखमी झाले . फिरोजजंग याची अनेक माणसे रणांगणात मृत्युमुखी पडली.

शत्रूने केलेल्या या जबरदस्त प्रतिबंधाची बातमी जेव्हा औरंगजेबाला समजली तेव्हा आपल्या अधिकाऱ्यांसमवेत त्याने फिरोजजंग याच्या छावणीतील आपल्या मुक्कामापासून कूच केले . यामध्ये त्याचा उद्देश आपल्या शत्रूच्या कैचीत सापडलेल्या सैन्याला मदत करण्याचा होता . शत्रूच्या तोफांतून उडणारे गोळे त्याच्या इकडे तिकडे नेता येणाऱ्या सिंहासनाजवळ पडू लागले . त्यातील एका गोळ्याने त्याच्या शरीररक्षकाचा हात उडवून नेला . परंतु त्याने अतिशय धीमेपणाने आपल्या जागीच ठाण दिले व स्वतःच्या उदाहरणाने आपल्या शिपायांच्या मनात दिलासा निर्माण केला.

इकडे लढाईची धुमश्चक्री चाललेली असताना लढाईच्या मैदानावर सोसाट्याचा वारा , मुसळधार पाऊस आणि विजांचे भयंकर थैमान यांनी एकच धुमाकूळ घातला . मुसळधार पावसाने अविरत पडून एकच कहर केला. कोरडे असलेले नाले आणि उताराच्या जागा यांना खळाळून वाहणाऱ्या ओढ्याचे स्वरूप आले. मानव आणि परमेश्वर यांनी जणूकाही मोगलांवर एकवटून हल्ला केला आहे किंवा काय असे वाटू लागले . या हल्ल्यापुढे मोगलांनी माघार घेतली. यानंतर दक्षिणी शिपायांनी त्या दिवशीचा मोगलांवरचा तिसरा हल्ला चढविला. त्यांनी आगेकूच करून मोगलांचे पुढील मोर्चे आणि तोफासाठी उभारण्यात आलेले दमदमे यावर आपला कब्जा केला . नेता येतील इतक्या तोफा त्यांनी आपल्या ताब्यात घेतल्या आणि उरलेल्यांचा नाश केला. मोगलांनी मोठमोठ्या फळ्या , लाकडी भालें आणि मातींनी भरलेल्या हजारो गोणी खंदकात टाकल्या होत्या. त्या शत्रूच्या सैनिकांनी झपाट्याने किल्ल्यामध्ये वाहून नेल्या आणि सुरुंगाच्या स्फोटामुळे किल्ल्याच्या भिंतीला जे भगदाड पडले होते ते दुरुस्त करण्याचे कामी या सामानाचा उपयोग केला . या वेळेपर्यंत लढाईच्या मैदानाला एखाद्या चिखलाच्या तळ्याचे स्वरूप आले होते . सूर्यास्ताच्या सुमाराला पराभूत झालेले मोगल सैन्य आपल्या छावणीकडे परत फिरले . ती रात्र औरंगजेबाने फिरोजजंगच्या छावणीत काढली.

(९) मोगलांचे अपयश; दुष्काळ आणि रोगराई

दुसऱ्या दिवशी सकाळी (२१ जून) राहिलेला तिसरा सुरुंग उडविण्यासाठी आणि स्वतःच्या देखरेखीखाली शत्रूवर हल्ला करून आपल्या नशिबाची परीक्षा पाहण्यासाठी औरंगजेब छावणीतून बाहेर पडला. परंतु सुरुंगाचा अजिबात स्फोटच झाला नाही. त्यावेळी असे कळून आले की, त्या सुरुंगाचा शत्रूला शोध लागला होता , आणि शत्रूने सुरुंगाच्या जागेत पाणी भरून सोडले होते . विस्मित झालेला बादशहा कोणत्याही तऱ्हेचा गाजावाजा न करता अतिशय चोरटेपणाने आपल्या तंबूत परतला . “मोगलांनी आपल्या प्रयत्नांची अनेक तऱ्हेने कोशिश केली , अमाप संपत्ती खर्च केली परंतु वेढ्याचे काम रेंगाळतच गेले .” (**एन्. ए.**, २९५) मोगल सैन्याचे मनोधैर्य यामुळे पूर्णपणे खचून गेले. पूर्वीपेक्षाही दुष्काळाने उग्र स्वरूप धारण केले

आणि त्याचा एक अनिवार्य सोबती म्हणूनच की काय रोगराई मोगल सैन्यात अवतीर्ण झाली . हैद्राबाद शहर माणसावाचून पूर्णपणे ओस पडले . घरेदारे, नद्यानाले, आणि मैदाने यात प्रेतांचा खच पडला . मोगल छावणीतही जवळ जवळ तशीच परिस्थिती निर्माण झाली होती. रात्रीच्या वेळी प्रेतांचा ढीग जमा होई. काही महिन्यानंतर जेव्हा पाऊस थांबला तेव्हा पांढऱ्या सांगाड्यांचे ढीग हे दूर अंतरावरून बघणाऱ्याला एखाद्या बर्फाच्या डोंगरासारखे वाटत.

परंतु औरंगजेबाने आपल्या मनाचा अतिशय दृढनिश्चय केला , आणि किल्ल्याची उपासमार करून किल्ला शरणागत आणण्याचे ठरविले . "बादशहाने गोवळकोंड्याच्या किल्ल्याभोवती लाकूड आणि माती यांची मिळून एक भिंत बांधण्याचे ठरविले . थोड्याच कालावधीत ती भिंत बांधून तयार झाली . भिंतीमधील दरवाजावर पहारेकरी बसविण्यात आले . यामधून आत जाणे किंवा बाहेर पडणे या गोष्टींना परवाना दाखविल्याखेरीज बंदी करण्यात आली." त्याच वेळी किल्ल्यातील शिबंदीला ताज्या रसदीचा पुरवठा होऊ नये म्हणून औरंगजेबाने हैद्राबादचे राज्य मोगल साम्राज्याला जोडल्याचा वटहुकूम काढला . राज्यातील सर्व ठिकाणांवर त्याने आपल्या तर्फेचे न्यायाधीश आणि वसूल जमा करणारे अधिकारी यांच्या नेमणुका केल्या. बादशहाच्या नावे खुत्बा वाचण्यात आला आणि हैद्राबाद शहरात त्याने मुहतसीब (सेन्सॉर ऑफ पब्लिक मॉरलस्) नावाच्या अधिकाऱ्याची नेमणूक केली.

(१०) गोवळकोंड्याचा विश्वासघाताने झालेला पाडाव

किल्ल्याचा वेढा जवळजवळ आठ महिने चालला होता . त्यानंतर २१ सप्टेंबर रोजी लाच देऊन गोवळकोंडा काबीज करण्यात आले . अबदुल्ला पन्नी सरदारखान नावाचा अफगाण शिपाई पूर्वी विजापूरच्या नोकरीत होता . तो मोगलांना जाऊन मिळाला होता आणि मोगलांचा पक्ष सोडून तो अबुलहसन याच्या चाकरीत शिरला होता . त्याने आपल्या धन्याचा विश्वासघात करून त्याला शत्रूच्या स्वाधीन केले . त्याने किल्ल्याच्या मागील बाजूचा दरवाजा उघडा ठेवला , आणि त्याच्या सांगण्यावरून रुहुल्लाखानाच्या हाताखाली मोगल सैन्याची एक तुकडी २१ सप्टेंबर १६८७ या दिवशी सकाळी ३ वाजण्याच्या सुमारास किल्ल्यामध्ये कोणताही प्रतिकार न होता शिरली . त्यांनी आपली बाजू धरून ठेवण्यासाठी काही माणसे आत ठेवली आणि नंतर किल्ल्याचा मुख्य दरवाजा उघडला . या दरवाजातून मोगल सैनिकांचे लोंढेच्यालोंढे किल्ल्यात घुसले . राजपुत्र आजम हा नदीच्या किनाऱ्यावरून रसद घेऊन तटबंदीच्या पायथ्याशी येऊन ठेपला.

अबदुल रज्जाक लारीचे शौर्य आणि धाडसी कृत्ये

गोवळकोंड्याच्या पाडावाच्या या क्षणीही किल्ल्यातील शिबंदीच्या अतुलनीय शौर्याच्या प्रभेने दशदिशा हेलावून गेल्यासारख्या झाल्या आणि किल्ल्याच्या पाडावाने शिबंदीच्या शौर्याला जो कलंक लागला होता तो थोडाफार धुऊन काढला. विजयाच्या बेहोशीने धुंद झालेले मोगल सैनिक जेव्हा किल्ल्यात एकच गर्दी करत होते आणि राजवाड्याकडे जाण्याचा मार्ग मोकळा करीत होते तेव्हा ज्याला आपला कमरपट्टा बांधावयालाही वेळ नव्हता अथवा घोड्यावर जीन चढविण्याचीही ज्याला फुरसद नव्हती असा एक एकाकी घोडेस्वार हजारोच्या संख्येने असलेल्या शत्रूवर एकाद्या वेड्यासारखा तुटून पडला . हा घोडेस्वार म्हणजे अबदुल रज्जाक लारी ऊर्फ मुस्तफाखान हा होय . गोवळकोंड्याच्या विश्वासघातकी सरदारांमध्ये विश्वासू असा हा एकमेव शिपाईगडी निघाला . किल्ल्याचा वेढा चालू असताना औरंगजेबाने

त्याला लाच देण्याचे केलेले सारे प्रयत्न त्याने तुच्छतापूर्वक झिडकारले . औरंगजेबाने त्याला मोगल सैन्यामध्ये जेव्हा सहा हजार घोडेस्वारांची मनसब देऊ केली तेव्हा तो म्हणाला की , "करबला येथे इमाम हुसेन याच्यावर चाल करून आलेल्या २२ हजार विश्वासघातक्यांमध्ये माझी गणना केली जाण्याच्या ऐवजी त्याच्याबरोबर ज्या ७२ विश्वासू सोबत्यांचा नाश झाला त्याच्यामध्ये गणना होणे हे मला अधिक भूषणावह वाटते" एखाद्या लोंढ्याप्रमाणे चाल करून येणाऱ्या मोगल आक्रमकांवर तुटून पडताना त्याने अशी आरोळी ठोकली की , "जो पर्यंत मी जिवंत आहे तोपर्यंत सुलतान अबुलहसन याच्या रक्षणासाठी बलिदान करण्याकरता एकतरी व्यक्ती आहे यात काहीच संशय नाही ." मोगलांवर केलेल्या या एकाकी हल्ल्यात त्याला ७० मोठ्या जखमा झाल्या आणि त्याच्या एका डोळ्याला जबरदस्त दुखापत झाली . जखमा झाल्यामुळे आणि रक्तस्त्रावामुळे त्याच्या घोड्याच्या झोकांड्या जात होत्या . अशा परिस्थितीत अबदुल रज्जाक याला आपल्या समोरील मार्ग दिसेनासा झाला . तरी देखील त्याने आपली घोड्यावरील मांड व्यवस्थित ठेवण्याचा आणि घोड्याचा लगाम ढिला सोडण्याचा कसोशीने प्रयत्न केला . अशा तऱ्हेने पुढे जात असताना रज्जाकचा घोडा सैनिकांच्या दाटीतून सुटला . त्याने आपल्या पाठीवरील स्वाराला किल्ल्याजवळ असलेल्या नगीना बागेतील एका जुन्या नारळाच्या झाडाखाली टाकले . तेथून अबदुल रज्जाक याला मोगल छावणीत नेण्यात आले आणि खास बादशहाच्या हुकमावरून त्याची शुश्रूषा करण्यात आली. अशा तऱ्हेने त्याचे प्राण वाचविण्यात आले.

(११) अबुलहसन याला कैद केले जाते

दरम्यान आगेकूच करणाऱ्या मोगल सैनिकांकडून होणारा कोलाहल जेव्हा अबुलहसन याच्या कानावर पडला तेव्हा तो मुलाखतीसाठी ठेवलेल्या दिवाणखान्यात येऊन हजर झाला . तेथे आल्यावर अनाहूतपणे येणाऱ्या पाहुण्यांची शांतपणे मार्गप्रतीक्षा करीत तो तेथील सिंहासनावर आसनस्थ झाला . अखेर जेव्हा रुहुल्लाखान आणि त्याच्या बरोबरच्या मंडळींनी आत प्रवेश केला तेव्हा त्याने त्यांचे स्नेहभावाने स्वागत केले आणि मनाला अतिशय दुःख देणाऱ्या या प्रसंगामध्ये आपल्या राजेपणाला शोभेल अशा तऱ्हेची वागणूक त्याने ठेवली . नंतर त्याने त्याला कैदी म्हणून नेण्यासाठी आलेल्या या मंडळींना न्याहारी करण्यासाठी बोलाविले. त्याने आपली न्याहारी संपवली , आणि राजवाड्याचा त्याग केला . संध्याकाळी आजमने त्याला बादशहासमोर हजर केले. काही काळाने त्याची रवानगी दौलताबादच्या किल्ल्यावर करण्यात आली . तेथे त्याने आपल्या बंदिवासातील आयुष्याची उरलेली वर्षे दुःखाचे निश्वास टाकण्यात घालवली . बादशहाने बंदिवासात त्याला सालीना ५० हजार रुपयांचे निवृत्ती वेतन नेमून दिले होते . आपल्या सिंहासनाचा त्याग करण्याच्या वेळी आणि आपला उघड उघड शत्रू असलेल्या औरंगजेबाच्या ताब्यात बंदिवासाचे कठोर जिणे जगण्यासाठी अबुलहसनने जेव्हा राजवाड्याचा त्याग केला तेव्हा त्याने जो स्वतःच्या मनावर अप्रतीम ताबा दाखविला आणि जी भारदस्त वागणूक ठेवली त्याचा त्याच्या शत्रूलाही अचंबा वाटला . त्याच्या या वर्तनाने स्तिमित होऊन मोगल सैनिक त्याच्याबद्दल प्रशंसा करीत असताना त्याने उत्तर दिले की , "जरी माझा जन्म राजघराण्यात झाला असला तरी माझ्या तरुणपणात दारिद्र्य काय असते याचा अनुभव मला आला आहे आणि ज्या परमेश्वराने मला भिकारी बनविले , नंतर मला ज्याने राज्यपद दिले आणि ज्याने आता पुन्हा मला भिकारी बनविले त्या परमेश्वराकडून सुख आणि दुःख ह्या ज्या मानवाला मिळालेल्या देणग्या आहेत त्यांच्याकडे तितक्याच सारख्या निरपेक्षपणे मी बघावयास शिकलो आहे . आम्ही माणसे म्हणजे त्या परमेश्वराचे गुलाम आहोत . आम्हा गुलामावरील कृपादृष्टी तो कधीही काढून घेत नाही . परंतु प्रत्येकाला त्याच्या नशिबाप्रमाणे वाट्याला येणारा अन्नाचा भाग तो पाठवून देतो!"

अनुक्रमणिका

गोवळकोंडा येथे मोगलांना जी लूट मिळाली त्यामध्ये जवळजवळ ७ कोटी रुपये रोख होते आणि त्याशिवाय सोन्याचांदीची भांडी , हिरे आणि हिरे जडविलेल्या अनेक वस्तू यांचा समावेश होता . मोगलांनी जिंकलेल्या गोवळकोंड्याच्या राज्याचा एकंदर वसूल २ कोटी ८७ लक्ष रुपये एवढा होता . [अबुलहसन याला कैद करून औरंगजेबाकडे नेत असताना त्याचा अपमान केल्याचा आणि त्याला मारल्याचा आरोप मनुची (भाग २ . ३०६–३०८) आणि डा . करेरी (**चर्चिलस् व्हॉयेजेस्**, भाग ४. २४९ मधे) हे दोघेजण करतात . या उलट ईश्वरदास असे सांगतो की अबुलहसन याला जेव्हा कैद करण्यात आले तेव्हा तो कलावंतीणी आणि गाणारिणी यांच्या समवेत मजा करण्यात दंग होता . शत्रूने राजवाड्यात प्रवेश केल्याचे पाहताच नर्तकींनी आपला नाच थांबविला. त्यावर कुतुबशहा त्यांना ओरडून म्हणाला 'पहिल्या सारखाच तुमचा नाच चालू ठेवा. सुख मिळविण्यात मी जो प्रत्येक क्षण घालवीत आहे तो माझ्या दृष्टीने अतिशय मोठा लाभ आहे .' फिरोजजंग याने त्याला सिंहासनावरून उतरवून घोड्यावर बसवून बादशहाकडे नेले . अबुलहसन कुर्निसात न करता तसाच ताठ मानेने बादशहासमोर गेला . बादशहाने त्याला विचारले , 'तुझे कसे काय चालले आहे ?' यावर तो म्हणाला , 'मला आनंदही होत नाही आणि दुःख देखील झालेले नाही . परंतु अदृश्य अशा पडद्याच्या पाठीमागे लपलेले जे आज मला दृश्य झाले आहे , त्याच्याकडे एकटक बघण्यात मला अतिशय आनंद होत आहे . (९३ अ आणि ब). वरील घटनेबाबतची विश्वसनीय हकीकत आपल्याला १२ नोव्हेंबर १६८७ रोजी फोर्ट सेंट जॉर्ज येथील रोजनिशीत झालेली आढळते . ती अशी : "फ्रेंच, डच आणि इतर राष्ट्रे यांच्याकडून आलेल्या बातमीनुसार मागील महिन्याच्या २ तारखेला रात्री मोगलांनी विश्वासघाताने गोवळकोंड्याचा किल्ला घेतला . कुतुबशहा समोर आल्यावर औरंगजेबाने त्याची बराच वेळ कानउघडणी केली. त्याने राज्यकारभारात लाचलुचपतीला वाव दिला , त्याला सांगितलेल्या कामगिरी पार पाडण्यात विश्वासघात केला आणि ब्राह्मणांना उत्तेजन देऊन मुसलमानांना अवमानीत केले असे आरोप त्याने कुतुबशहावर केले . बादशहा असेही म्हणाला की तुझ्या या परिस्थितीला तूच जबाबदार आहेस. इतके सांगून बादशहाने कुतुबशहाच्या हातापायात साखळदंड चढविण्याचा हुकूम केला . परंतु नंतर आलेल्या बातमीप्रमाणे त्यामधून त्याला मुक्त करण्यात आल्याचे समजते."

१६८७ मधील मोगलांच्या गोवळकोंड्यावरील हल्ल्याची हकीकत पुढे दिली आहे :]

[औरंगजेबाने लढाई करण्याचे ठरविले . कुलबर्ग्याहून जान निसारखान व मालखेडहून पर्विझ बेग यांनी जाऊन जूनच्या सुरुवातीस सेरमची गढी घेतली . अबुलहसनने शेख मिनाज , रुस्तमराव व बडाखान यांस गढी घेण्यास रवाना केले . खानजहान बहादूर मदतीस गेला व मोगली सैन्यास धीर दिला . तेव्हा कुतुबशाहाने आपल्या सैन्याच्या मदतीस महमद इब्राहिम व हसन बेग ऊर्फ खलिलुल्लाहखान यास पाठविले . ते एक महिना मोर्चे बांधून राहिले. नंतर लढाई झाली. मोगली सैन्याचा बराच नाश झाला. परंतु एक मस्त हत्ती कुत्बशाही फौजेत शिरल्याने दाणादाण उडाली व एक दोन कोस त्यांना माघार घ्यावी लागली . बडाखान त्या हत्तीवर चालून गेला . परंतु घोड्यावरून खाली पडल्याने तो तात्काळ मेला . खानजहा बहादूरने कुत्बशाही सैन्याचा पाठलाग न करिता तो शत्रूच्या हल्ल्याची वाट पाहात बसला . त्यामुळे औरंगजेबाला त्याचा संशय येऊन त्याने शहाअलम यास कुतुबशाहावर जाण्याचा हुकूम दिला. (**हदिकत-उल्-आलम्**, पा. ९४ – ९९; **के. के. – डी**, पा. ३१५–१७; **के. के. – एम्.**, पा. ५२२–५३५; **गोकुत्व**) तेव्हा शहाअलम गुलबर्ग्याहून कोहिर प्रांतात आला. मध्यंतरी आणखी काही काळ गेला. नंतर लढाई झाली. त्यांत दोन्ही बाजूंचे बरेच नुकसान झाले . शहाअलमने सेरमची गढी व कोहीर प्रांत मोगलास ठेवू देऊन सल्ला करावा असे सुचविले . त्यास खलिलुल्लाहखान कबूल झाला. परंतु शेख मिनाज व रुस्तमराव कबूल न होता त्यांनी लढाई चालू ठेविली . पुन्हा एकदा घनश्चक्री उडाली . दोन्ही बाजूंचे सरदार जखमी झाले. सैन्यही बरेच जखमी अगर ठार झाले . कुत्बशाही सैन्याने थोडी माघार घेतली . दोन्ही बाजूकडील सरदारानी आपल्या शोर्याची पराकाष्टा केली. खलिलुल्लाहखान व इतर पठाण सरदारांचा शहाअलमकडे ओढा होता . त्यामुळे त्यांनी प्रथमपासूनच अंगचोरपणाने काम चालविले होते. सायंकाळपर्यंत युद्ध झाले. रात्री सैन्ये आपापल्या तळावर गेली. खलिलुल्लाहखान रात्रीच [८ ऑक्टोबर (**मचलीपटम् टू फोर्ट सेंट जॉर्ज**, ९–१०–१६८५, **लेटर्स. फोर्ट सेंट जॉर्ज** खंड. ३ पा. १८९; मच. खंड. ८. पा. ३६; **मादापोलम कॉन.** २३–१०–१६८५, **मादापोलम** खंड १. पा. ४७; **एफ्. आर्.**)] पळून जाऊन मोगलास मिळाल्याने कुत्बशाही सैन्याने आपली छावणी हालवून ताबडतोब हैद्राबादची वाट धरली . शहाअलमही त्यांचा पाठलाग करीत हैद्राबादेस गेला . (**गोकुत्व., हदिकत–उल–आलम्**, पा. ९९–१०८; **के. के.–एम्.**, पा. ५३५–५५२; **एम्–एस्. एम्.**, खंड. दुसरा, पा. २८८–९४,) कुत्बशाही फौजेने माघार घेतलेली समजताच अबुलहसनने आपले जडजवाहिर वगैरे रातोरात गोवळकोंड्याच्या किल्ल्यात नेले. हैद्राबादेतील लोक नेता येईल ती मालमत्ता घेऊन बाहेरगावी जाऊ लागले . ज्यांना किल्ल्यात जाणे शक्य होते ते रात्रीच किल्ल्यात गेले. या गडबडीत चोर व दरोडेखोर लोकांनी मनमुराद लूट व जाळपोळ करण्यास सुरुवात केली . दुसऱ्या दिवशी सकाळी शहाअलमचे सैन्य हैद्राबादेस येऊन दाखल झाले . तेही लुटालूट व जाळपोळ करू लागले . कल्पनातीत लुटालूट झाली . बायकामुलांस फार त्रास झाला . शहा आलमने सुझावेल नेमून बऱ्याच प्रयासाने स्थिरस्थावर केली . अबुलहसनने क्षमा मागून तहाचे बोलणे लाविले . शहाअलमने मध्यस्थी करण्याचे कबूल केले. तहाच्या अटी सांगितल्या की , अबुलहसनने दोन लाख होन खंडणीखेरीज एक कोटी वीस (काही ठिकाणी पन्नास) लक्ष रुपयांची पेशकश ताबडतोब भरावी , मोगली सैन्याने घेतलेला सेरम व कोहीर वगैरे प्रांत मोगलाकडे राहू द्यावा आणि मादण्णा व आकण्णा यास कामावरून दूर करावे ." (**गोकुत्व; हदिकत–उल्–आलम्**, पा. १०८–१११; **एम्–एस् एम्** ., खंड २ . पा. २९३–४; **के. के.–एम्.**, पा. ५५२–५५९) अबुलहसनने बहुतेक सर्व अटी मान्य केल्या . शहाअलमच्या स्वारीच्या यशाची बातमी औरंगजेबास १९ ऑक्टोबरला मिळाली . त्याच्या तहास संमती दिली. कारण विजापूरच्या लढ्यात याच सुमारास त्यास कुत्बशाहाच्या सैन्यामुळे हार खावी लागली होती . तशी पुन्हा पाळी येऊ नये म्हणून कुत्बशाहाशी जुळते घेऊन ती मदत थांबविली . अबुलहसनला वस्त्रे वगैरे मानमरातब पाठविले . शहाअलम यास ४० हजारी व ३० हजारांची मनसब झाली. (**औनामा.**, खंड १२, पृ. २६; **गोकुत्व**, पृ. १३६; **के. के.–एम्.**, पा. ५५९–६०) सरोमा जानी बेगम हिने नोकरांच्या साह्याने अबुल यास कळू न देता मादण्णा व आकण्णा यांचा दरबारातून परत येताना वाटेत खून करविला . खाफीखान लिहितो : "अबुलहसनची एक पत्नी सरुमा जानी बेगम हिचा महालात बराच वरचष्मा होता व तिला सर्वांत अधिक मान होता . तिने अबुलहसनला न कळविता जमशीद व इतर नोकरांना बोलावून दोघांना (मादण्णा व आकण्णा यांना) मारविले. एका दासीच्या सांगण्यावरून ते दरबारातून घरी परत जात होते . त्या नोकरांनी त्यास वाटेत गाठून ठार मारिले. रुस्तुमराव नुकताच घरी येत होता. त्यासही तेथेच ठार मारिले. त्यांनी मादण्णाचे घर लुटले. त्यावेळी बरीच लुटमार झाली व पुष्कळ ब्राह्मण कारभाऱ्यांची घरेदारे लुटली . पुष्कळ लोक मारले गेले . नंतर त्यांनी त्या दोघा बंधूची शिरे कापून आणली आणि ती एका वस्ताद

माणसाबरोबर शहाअलमकडे पाठवून दिली ...” (**गोकुत्व, परि.** २ पा . १११; **के. के.–एम्.**, पा. ५६०–६१) या कटातील जैनुल अबदीनने मादण्णाचे शिर कापून शहाअलमकडे नेले होते . ते शिर १६ मार्चला बहादूर आलिखा यानी औरंगजैबास आणून दाखविले . (**औनामा.**, खंड १२, पृ. ३०; **एम्. आय. ए.**, प्र. २९. पा. १६७) ही कत्तल केव्हा केली याचा यावरून बोध होत नाही . मदापोलमच्या रोजनिशीत २४ ऑक्टोबरला अशी नोंद आहे की , “गोवळकोंड्याहून असे लिहून आले आहे की , सुलतान, मादण्णा व आकण्णा सुरक्षिततेसाठी गोवळकोंड्याच्या किल्ल्यात जाऊन राहिले....” परंतु दुसऱ्याच दिवसाच्या म्हणजे २५ ऑक्टोबरच्या नोंदीत पुढील माहिती आली आहे : “येथे नक्की बातमी आली आहे की , मादण्णा व आकण्णा हे इतर १३ ब्राह्मणांसह कुत्बशाहाच्या हुकमाने ठार मारिले . ते कुत्बशाहाला मोगलाच्या ताब्यात देण्याच्या कटात होते असे सरखेलने पाठविलेल्या पत्रावरून दिसून आले होते.... मोगलांशी लढण्यासाठी अशा सूचना दिल्या की , सैन्य घेऊन लढण्यास जा, परंतु एकही वार न करता औरंगजेबाच्या ताब्यात जा . ही पत्रे कुत्बशाहाच्या हाती लागली . तेव्हा त्याने मादण्णा , आकण्णा व त्यांच्या अनुयायांचा शिरच्छेद करण्याचे हुकूम दिले. राज्यांत सर्वत्र गोंधळ व भीतीचे वातावरण पसरले आहे ....” नंतर २७ ऑक्टोबरची नोंद अशी : “गोवळकोंड्याच्या राज्याचे सैन्य छावणी मोडून किल्ल्याच्या रक्षणार्थ आले आहे . राजाने हुसेन बेग व मुसाखान यास पत्रिका दिल्या . हुसेन बेग यास सरखेली दिली ....” पुढे २८ तारखेची नोंद अशी : “मोगली सेना एक हजार घोडेस्वारांसह गोवळकोंडा शहरात शिरली . औरंगजेबाचा दरोगा (चौक्या) निरनिराळ्या मुख्य भागातून बसला.” (**मादापोलम कॉन.** २४, २५, २७, २८ **ऑक्टो.** १६८५, **मादा** : खंड. १. पा. ४१, ४२, ४८; **मादापोलम टू फोर्ट सेंट जॉर्ज**, ६–११–१६८५, **फोर्ट सेंट जॉर्ज लेटर्स**, खंड. ३ पा. २००; **एफ. आर्.**) यावरून मादण्णाच्या मृत्यूने सर्वत्र गोंधळाची स्थिती कशी झाली होती व कशा खऱ्याखोट्या बातम्या उठत होत्या याची कल्पना येते . त्या वेळच्या परिस्थितीचे चित्र डोळ्यासमोर असणे जरूर आहे . कुत्बशाहाने भागानगर सोडले तेव्हा बरेच पठाण सरदार शहाअलमकडे गेले . ज्याना औरंगजेबाने खास मानमरातब दिले व मनसबी दिल्या त्यातील काही उल्लेख मासिरीत येतात . त्यात महमद इब्राहिम व त्याचे मुलगे , शरिफुल्मुलक व त्याचे मुलगे , हिदायतुल्लाह व अबदुल कादिर हे आहेत . पुढे मिर हशम मारला गेला व अबदुल करीम कैद झाला होता. लिंगाप्पाच्या जागी अब्दुल नबीला कर्नाटकाचा सुभा मिळाला : (**औनामा.**, खंड १२, पृ. २७–३२; **एम्. आय्. ए.**, प्र. २९, पृ. १६४–६८) इतकेच नव्हे तर मुसाखानास पुन्हा वजिरी द्यावयास लाविली . या कुत्बशाहीतील क्रांतीचे वर्णन मच्छलीपटमच्या ११ नवंबर व ३१ डिसेंबरच्या पत्रात येते. ११ नवंबर : “आता येथे बातमी अशी आहे की, गोवळकोंड्याचा राजा तह करण्याच्या खटपटीत आहे. १५० लाख रुपयांच्या खंडणीच्या रूपाने जवळजवळ तो ठरलाच आहे . बादशाहा मेला किंवा फार आजारी आहे . डचांनी शहाअलमला त्यांनी मागितली त्यावेळी २ लाखांची रक्कम कर्जाऊ दिली नाही , त्यामुळे आता ५० हजार रुपये त्यास देणे भाग पडले आहे .... सरखेल राजद्रोही होऊन मोगलांस जाऊन मिळाला आहे. मादण्णा व आकण्णा यांचा नक्की शिरच्छेद केला . त्यांच्या नोकरीतील आणखीही कित्येक ब्राह्मण मारिले ....’ दुसरा उतारा ३१ डिसेंबर : “गोवळकोंड्याची बातमी अशी की, सर सुभेदार लिंगाप्पा हा त्याच लोकांकडून मारला गेला की , ज्यांनी मादुण्णा व आकण्णांना मारिले . राजाने जेव्हा मादण्णाच्या वाड्याची झडती घेतली तेव्हा त्यात पुष्कळ संपत्ती व इतर मौल्यवान चीजवस्तू मिळाली . त्यातच त्यास उत्तम पोशाखाच्या दोन गाठी मिळाल्या . ते पोशाख अशा तऱ्हेचे होते की , ते जे कोणी घालतील ते विषबाधा होऊन मृत्युमुखी पडतील . राजास हे माहित नसल्याने त्याने या प्रसंगी ज्यांनी चांगली कामगिरी केली होती त्यास ते दिले . परंतु ते लोक तात्काळ मेले . त्यामुळे महमद इब्राहिम गोवळकोंड्याहून घाबरून पळून गेला व आपलाही सुभेदार वेलोरला गेला . ते परत केव्हा येतील ते सांगता येत नाही ” (**मछलीपटम टू फोर्ट सेंट जॉर्ज**, ११–११–१६८५, ३१–१२–१६८५, **मचली** : खंड खंड ८, पा. ४१, ५३, ५४; **लेटर्स् टू फोर्ट सेंट जॉर्ज**, खंड ३, पा. २०३; **एफ्. आर्.**) वरील उल्लेखावरून असे दिसते की , मादण्णा व आकण्णा अबुलहसन बरोबरच गोवळकोंड्याच्या किल्ल्यात आले . तेथे येताच अकस्मात् १० ऑक्टोबरनंतर मादण्णा व त्याचे साथीदार यास मारण्यात आल्याने सर्वत्र गोंधळ उडाला . कारण कोणी कोणावर विश्वासावे हे समजण्यासारखी परिस्थिती राहिली नाही. तेल शरणागती धाडली व शहा अलमकडे फुटून गेलेले पठाण परत कुत्बशाहाला येऊन भेटले . अशा तऱ्हेने हिंदू व दक्षिणी मुसलमान यांचे प्राबल्य जाऊन पठाणांचा अमल सुरू झाला . खानजहा बहादूर हा काही दख्खनी सरदारांना बरोबर घेऊन गेला . मोगलाने कृत्रिमपणे केलेल्या तहाला भुलून पठाणास काही काल या राजक्रांतीचे सुख लाभले . परंतु कुत्बशाहीच्या नाशाचे राजकारण करण्यास चांगला अवधी मिळेपर्यंत औरंगजेबाने त्यास व कुत्बशाहास पेशकश व खंडणीच्या वसुलीच्या दाबाखाली गोवळकोंड्याच्या किल्ल्याबाहेर काहीही हालचाल करू दिली नाही. मात्र पठाण व कुत्बशाहा यांच्यात बेबनाव असल्याने सर्वत्र गोंधळाची परिस्थिती कायम राहिली . मद्रासकर १८ जानेवारी १६८६ ला लिहितात “सर्वत्र बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे .... मोगलाने युद्ध पुकारण्याचे कारण म्हणजे मुख्य प्रधान मादण्णा यांस कारभारावरून दूर करावे. कुत्बशाहास ते पसंत नाही . परंतु त्याचा काटा काढण्याचे प्रयत्न चालू होते . शेवटी त्याचा खून करविला तेव्हा मोगल व कुत्बशाहाचा सल्ला झाला व मोगलाने आपले सैन्य काढून घेतले . मुसाखानाने या सुभ्यावर आपला माणूस नेमला , तर राजाने लिंगाप्पाला त्यास मारण्यास लिहिले. परंतु हा कट उघडकीस आला व लिंगाप्पास ठार मारले . सुलतानाने आपणास यांतील काही माहित नसल्याचे सांगितले . मुसाखानाने किल्ला ताब्यात घेतला . ब्राह्मण आमदारांना मारले किंवा दूर केले .... त्यामुळे खरा राजा कोण व अधिकारी कोण व खरा जेता कोण हे कळेपर्यंत काहीही अर्ज वगैरे पाठविता येत नाहीत.” (**मचलीपटम् टू फोर्ट सेंट जॉर्ज**, ११–११–१६८५, ३१–१२–१६८५, **मचली** : खंड ८, पा. ४१, ५३, ५४; **लेटर्स टू फोर्ट सेंटं जॉर्ज**, खंड तिसरा पा. २०३; **एफ. आर्.**)

औरंगजेबाने कुत्बशाही सरदार फोडण्याची पराकाष्ठा चालविली होती . त्यात त्याला थोडे यशही आले होते . २९ मेला शेख निजाम मोगलास मिळाला. त्यापूर्वी मिरझा मोमीन गोवळकोंड्याहून पळून आला होता . शेख मिनाज, मलिक मुन्नवर, शेख लाडू आणि शेख अबदुल्लाह व शेख निजामाचे इतर भाईबंद मोगलांस येऊन मिळाले होते. अबुलहसनचा भाचा इफतरखा हाही मोगलांस २१ मेला येऊन मिळाला. (**औनामा.**, खं. १२, पृ. ४६–७; **एम्. आय. ए.**, प्र. ३०, पा १८०–१; **गोकुत्व**. प्र. १४१; **मचलीपटम टू फोर्ट सेंट जॉर्ज** ४–४–१६८७, **फोर्ट सेंट जॉर्ज**, **लेटर्स**, खंड ४, पा. ११२, क्र. ११७; **एफ. आर्.**) उलट मोगली सैन्याची हलाखी पाहून मोगली सैनिक व सरदार कुत्बशाहाकडे जाऊ लागले . ज्यांना जाता येईना ते कुत्बशाहास आतून मदत करीत . किल्ल्यावरून तोफांचा मारा चालू होता त्यामुळे मोगली सरदार सारखे जखमी होत . त्यातून पावसाळा सुरू झाल्याने वेढ्याचे काम रेंगाळत चालले. १६ जूनला मोठे वादळ झाले. मुसळधार पाऊस पडला. पुष्कळ सामानसुमान वाहून गेले. बरीच माणसे महापुरात बुडाली. चिखल झाला. डेरे, राहुट्या जमीनदोस्त झाल्या , धमधमा तयार होऊन राहिला होता तो समूळ वाहून गेला . मोगली सैन्य संकटात पाहाताच १७ जून रोजी पहाटे कुत्बशाही सैन्याने हल्ला चढविला . अब्दुल रझाकच्या शौर्यापुढे कोणाचा धीर निघेना . पुष्कळ मारले गेले व कैदही झाले. बाकीचे पळून गेले. फिरूजजंगास ७०–८० हत्तीच्या साह्यानेही नदी ओलांडणे अशक्य झाल्यामुळे त्याची मदत मोगल सैन्याला होऊ शकली नाही. कुत्बशाहाने कैद झालेले मोगली सरदार सोडले व त्यांचेबरोबर इस्लामीयांचे रक्त सांडणे थांबवावे व सल्ला करावा म्हणून निरोप

अनुक्रमणिका

धाडला. परंतु आलमगिराने कुत्बशाहाची विनंती मान्य केली नाही . सफशीखनखानाकडून नंतर पुन्हा धमेधमे व मोर्चे बांधविले . किल्ल्याचे कोटास सुरुंगही भरले. २० जूनला सुरुंग अडविण्याची आज्ञाही दिली . परंतु अब्दुल रझाकला बातमी कळताच त्याने आतून त्या सुरुंगाची दारू काढून घेतली व आत पाणी सोडले. पहिला सुरुंग उडविला. तोंडावरच दारू शिल्लक होती ती उडाली. त्यामुळे बाहेरचा भाग उडाला. त्याखाली मोगलाचे १२०० लोक ठार झाले. या गोंधळाचा फायदा घेऊन अब्दुल रझाकने पुढे येऊन मोर्चे मारून काढले . मोगली फौज येताच अब्दुल रझाक मागे गेला. पुन्हा मोर्चे. बाधूंन दुसरा सुरुंग उडवला . त्यातीलहि दारू काढून घेतली गेल्यामुळे पहिल्यासारखीच बाहेरील तोंडावरची दारू पेटली व त्यात २००० लोक मेले . पुन्हा कुत्बशाही सैन्याने मोर्चावर हल्ला चढविला . त्यात आणखी ४३४ लोक मारले गेले . औरंगजेब रागावून कलसरला आला . निकराने हल्ला चढविण्यास हुकूम दिला . तुंबळ युद्ध झाले. पुन्हा वादळ होऊन पाऊस पडला . धमधमे वाहून गेले. कुत्बशाहीने मोर्चे मारले , तोफा पळविल्या, मोठ्या तोफास खिले ठोकले . खंदक भरण्यासाठी जी मोगलाने पोती भरून ठेवली होती तीच बुरुजाची खिंडारे भरण्यास उपयोगात अणिली. मोगली सैन्याचा पाडाव झाल्याने औरंगजेबाची फार निराशा झाली . तिसरा सुरुंग २१ जूनला पेटविण्याचा प्रयत्न केला . दारू काढून नेली होती व राहिलेली भिजली होती. वातही तोडली होती. या दंगलीत किल्ल्यावरील तोफांच्या माऱ्याने फिरुजजंग जखमी झाला व इतर सरदारांसही जखमा झाल्या. शाहाजादा महमद अजमकडे वेढ्याचे नेतृत्व दिले ." (**के. के.**—**एम.**, पा. ६६३—७०१; **एम्. आय्. ए.**, प्र. ३०—३१, पा. ३०—३१, १८१—१८४, **औनामा.**, खंड १२ पृ. ४५—४६. **गोकुत्ब परि.** : २ पृ. १४१—३ १४३—१५९).]

●●●

प्रकरण चवदावे

संभाजीची कारकीर्द, १६८०—१६८९

(१) संभाजीचे कलहामधून झालेले राज्यारोहण ; संभाजी स्वतःला राजा म्हणून राज्याभिषेक करून घेतो

राजारामाला राज्याभिषेक

शिवाजीच्या मृत्यूमुळे नव्याने निर्माण झालेल्या मराठ्यांच्या राज्यात भयंकर अंदाधुंदी आणि विभक्तपणा यांचा कहर झाला . त्याचबरोबर भविष्यकाळासंबंधी अतिशय अनिश्चिततेची परिस्थिती निर्माण आली. शिवाजीचा मोठा मुलगा संभाजी याच्या अनिवार्य स्वभावामुळे त्याच्या प्रजेला त्याची कारकीर्द दुःखाची जाणार याविषयी काही संशय उरला नाही . संभाजीच्या हिंदू धर्माचा आणि त्याच्या पितृभूमीचा कट्टर शत्रू जो मोगल त्याला संभाजी हा काही वर्षांपूर्वी पळून जाऊन मिळाल्यामुळे स्वराज्यातील सर्व विचारवंत व्यक्तींच्या दृष्टिकोनातून त्याच्याविषयी अप्रीतीची भावना निर्माण झाली होती . आपल्या वृद्धापकाळात त्याच्या समंजस बापाने [म्हणजे शिवाजीने] संभाजीला सुधारण्याचा निरर्थक प्रयत्न केला . परंतु अखेर त्याला पन्हाळ्याच्या किल्ल्यावर नजरकैदेत ठेवणे शिवाजीला भाग पडले . त्यामुळे शिवाजीच्या उत्तरक्रियेनंतर रायगडावर हजर असलेल्या शिवाजीच्या मंत्र्यांनी त्याचा १० वर्षांचा धाकटा मुलगा राजाराम याला राजा म्हणून गादीवर बसविले. यामध्ये अण्णाजी दत्तोचा अधिक हात होता.

नैसर्गिकरीत्या सिंहासनावर आरूढ होण्याचा संभाजीचाच अधिकार होता . यामध्ये बदल घडवून आणण्यात फक्त राजधानीतीलच एका पक्षाचा पुढाकार होता . या बदलामध्ये सर्वसाधारण जनता आणि राजधानी बाहेर असलेले सैनिक यांचा विचार घेण्यात आलेला नव्हता . साहजिकच त्यांच्यामध्ये कुरबुरीला सुरुवात झाली.

राजारामाला सिंहासनावर बसविल्याबरोबर मराठ्यांच्यामध्ये मतभेद आणि विभाजन यांना सुरुवात झाली. संभाजीच्या बाजूचा एक पक्ष अस्तित्वात आला. शिवाजीच्या वेळी सैन्याने जी प्रचंड लूट मिळवलेली होती त्यापैकी मराठ्यांच्या राजकारणात आता जो बदल झाला होता त्यामुळे कोणताच हिस्सा त्यांना मिळालेला नव्हता. साहजिकच आपली लाचखाऊ तलवार ते संभाजीच्या बाजूने चालविण्यासाठी अतिशय उत्सुक होते. संभाजीची परिस्थिती यावेळी अतिशय असहाय्य अशी होती. साहजिकच आपल्याला अनुयायी मिळावे यासाठी वाटेल ती वचने बेदरकारपणे देण्यास त्याला काहीच दिक्कत वाटली नाही . रायगड येथे जे राजमंडळ स्थापन झाले होते त्याचा अर्थ ब्राह्मण सत्ताधीश होणार असा होता . मराठ्यांचा सेनापती जातीने मराठा होता . राजवाड्यामधून एक उपाध्याय मुख्य असलेल्या राजमंडळाकडून हुकूम घेण्याची त्याची निश्चितच तयारी नव्हती.

संभाजीचे राज्यारोहण

याचा परिणाम असा झाला की शिवाजीचे देहावसान होऊन एक आठवडा लोटण्याच्या आतच शिपायांच्या टोळ्या पन्हाळा येथे दररोज संभाजीच्या भोवती जमू लागल्या . रायगड येथे स्थापन झालेल्या

सरकारचा पूर्णपणे अधिक्षेप करून संभाजीने उघडपणे राजचिन्हे धारण केली.

अधिकार धारण केल्यावर संभाजीने प्रथम जी कारवाई केली त्यामधून संभाजीने आपल्या अंगी असलेले शहाणपण आणि योग्य अशी हिंमत प्रकट केली . त्याच्या सारखा स्वभाव असलेल्या व्यक्तीकडून अशा तऱ्हेची गोष्ट पूर्णपणे अनपेक्षित होती . त्याने पहिल्याप्रथम पन्हाळा किल्ल्याचा संपूर्णपणे ताबा मिळविला. उत्तरेकडे असलेल्या राजधानीतील आपल्या प्रतिस्पर्ध्यांच्या सैन्याबरोबर सामना खेळण्याचे धारिष्ट करण्याच्या अगोदर त्याने दक्षिण मराठा देश आणि दक्षिण कोकण यांमधील आपल्या ताब्यातील प्रदेशावरची पकड मजबूत केली. [संभाजीचे शत्रू रायगड येथे त्याला पकडण्याचे मनसुबे करीत होते तेव्हा शिवाजीबद्दल बराच काळ बातमी न आल्याने त्याचा मृत्यू झाला असावा असा त्यांनी तर्क केला . यावर संभाजीने ताबडतोब पन्हाळा किल्ल्याचा ताबा घेतला आणि किल्लेदाराला कैद केले. त्यानंतर त्याने राज्यातील सर्व अधिकाऱ्यांना आणि महत्त्वाच्या व्यक्तींना आपल्याला मदत करण्याविषयी पत्रे लिहिली . याचा परिणाम असा झाला की दररोज सैनिकांच्या तुकड्या त्याला पन्हाळा येथे जाऊन मिळू लागल्या . यानंतर त्याने आपल्या अधिकाऱ्यांच्या तर्फे शेजारील जिल्ह्यांचा ताबा घेतला. १५ एप्रिलच्या सुमारास कारवार शहरातील सर्व धान्य जप्त करून पन्हाळा येथे पाठविण्याचा त्याने हुकूम केला . एका आठवड्यानंतर त्याने दक्षिण कोकण आणि कानराची किनारपट्टी येथील सर्व सुभेदारांना हिशेब देण्यासाठी पन्हाळा येथे बोलाविले . यांपैकी काहींना त्याने कैद केले आणि काहींना अधिकारावरून काढले . (**कारवार टू सुरत**, १९ आणि २६ एप्रिल, १६८०, **एफ. आर्. सुरत** १०८ मध्ये, **राजापूर टू मुंबई**, २७ एप्रिल, **ओ. एम्.** ११६ मध्ये).

शिवाजीच्या हयातीत जनार्दन हणमंते याच्याकडे कोल्हापूर जिल्ह्याची सुभेदारी होती . शिवाजीच्या मृत्यूची बातमी समजल्यानंतर सरकारी खजिना घेऊन चिपळूण येथे पळून गेलेल्या हिरोजी फर्जन्द याला संभाजीच्या माणसांनी कैद केले. (**चिटणीस**, भाग २. ३–४).]

दरम्यान अण्णाजी दत्तो याने २१ एप्रिल रोजी राजारामाला रायगड येथे सिंहासनावर बसविले . त्यानंतर काही कालावधीने त्याने पेशव्याला बरोबर घेऊन पन्हाळ्याकडे प्रयाण केले . यामध्ये त्याचा उद्देश कसलाही आडपडदा न ठेवता पन्हाळा किल्ला ताब्यात घेण्याचा आणि संभाजीला कैद करण्याचा होता . (**जे. श.**)

परंतु संभाजीने यशस्वीपणे त्यांना जो टोला हाणला होता त्याची बातमी जेव्हा त्यांना कळली तेव्हा त्यांच्या तोंडचे पाणी पळाले , आणि संभाजीवर हल्ला करावा की न करावा याबद्दल ते साशंक झाले . लवकरच दुटप्पीपणे वर्तन करणाऱ्या स्वार्थी मंत्र्यांचे पितळ सैन्याने केलेल्या कारवाईमुळे उघडे पडले . मे महिन्याच्या अखेरीला मराठ्यांचा सेनापती हंबीरराव मोहिते याने अण्णाजी दत्तो आणि मोरोपंत यांना कैद केले आणि कैदी म्हणून पन्हाळ्याला संभाजीसमोर आणून हजर केले . पन्हाळा येथे सर्व सेनाप्रमुख जमा झाले आणि त्यांनी संभाजीला आपला राजा म्हणून मान्यता दिली.

अण्णाजी दत्तो याला तुरुंगात टाकण्यात आले , आणि त्याच्या अंगावर बेड्या चढविण्यात आल्या . पेशवा मोरोपंत याने वेळीच आपली बाजू सावरून धरली आणि संभाजीचा विश्वास जरी नाही तरी मर्जी संपादन केली. यानंतर संभाजीने रायगडाकडे कूच केले. कूच करीत असताना त्याच्या सैन्याची संख्या २० हजारांपर्यंत गेली . १८ जून रोजी मराठ्यांच्या राजधानीने आपले दरवाजे संभाजीसाठी खुले केले राजारामाने कोणताच प्रतिकार केला नाही कारण प्रतिकार करणे त्याच्या शक्तीपलीकडचे होते.

जरी राजारामाला पदच्युत करण्यात आले तरी संभाजीने त्याला दयाळूपणाची वागणूक दिली . कारण वृत्तीने अतिशय कावेवाज असलेल्या व्यक्तीच्या हातातील तो एक निव्वळ बाहुले बनून राहिला होता.

संभाजीने २० जुलै रोजी पहिल्याप्रथम सिंहासनारोहण केले . १६ जानेवारी १६८१ रोजी सर्व विधींसह आणि अतिशय भपक्यामध्ये औपचारिकपणे त्याला राज्याभिषेक करण्यात आला . १८ मे १६८२

अनुक्रमणिका

रोजी संभाजीच्या मुलाचा आणि मराठ्यांच्या राज्याच्या वारसाचा जन्म झाला. पुढे जवळजवळ ३० वर्षांनंतर हा मुलगा मराठ्यांच्या छत्रपतीच्या स्थानाचे पुनरुत्थापन करणार असे विधिलिखित होते . हा मुलगा म्हणजे दुसरा शिवाजी हा होय. लोकोत्तरात तो राजा शाहू म्हणून प्रसिद्ध झाला. (**जे. श.**)

(२) संभाजी मोगलांबरोबर पुन्हा युद्ध सुरू करतो

बुरहाणपूरची लूट

मराठ्यांच्या नव्या राजाला परकियांच्या हल्ल्यापासून बऱ्याच काळपर्यंत विश्रांती मिळाली . मोगलांची सर्व लष्करी साधनसामग्री खुद्द बादशहाच्या नेतृत्वाखाली रजपुतांबरोबरील युद्धामध्ये एकवटली होती. ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीला दसऱ्यानंतर मराठ्यांची सैन्ये नेहमीप्रमाणे आपल्या राज्याबाहेर पडली. घोडदळ आणि पायदळ असलेली एक तुकडी सुरतेच्या रोखाने कूच करू लागली आणि दुसऱ्या तुकडीने बुरहाणपूरकडे मोर्चा वळविला. तिसऱ्या तुकडीने औरंगाबाद येथील बहादूरखान ऊर्फ खानजहान याच्या छावणीपुढे तळ देऊन त्याला काबूत ठेवले . मराठ्यांच्या मोगली मुलुखातील या हल्ल्यांची बातमी मोगल सेनापतींना लागली आणि ते २५ नोव्हेंबरच्या सुमारास खानदेशात येऊन दाखल झाले . मराठ्यांनी त्या प्रांतातून माघार घेतली. परंतु ही माघार फक्त तात्पुरती होती.

१६८१ च्या जानेवारी महिन्याच्या अखेरीला मराठ्यांच्या हल्लेखोर तुकड्या फिरून दाखल झाल्या . राजपुत्र अकबर याने बंड केल्याच्या बातमीने त्यांना अधिकच जोर चढला आणि त्यात औरंगजेब पदच्यूत झाल्याच्या ज्या अतिरंजित बातम्या पसरल्या त्यामुळे आणखीनच भर पडली . हंबीररावाच्या हाताखाली एका तुकडीने धरणगाव आणि उत्तर खानदेशातील इतर गावे उद्ध्वस्त केली. यानंतर या तुकडीने आणखी पूर्वेकडे कूच केले , आणि ३० जानेवारीला बुरहाणपूरचे उपनगर बहादूरपुरा यावर तिने हल्ला चढविला . मराठ्यांची तुकडी इतक्या जलद चाल करून आली की त्याच्या हालचालीची यत्किंचितही बातमी ते येईपर्यंत लागली नाही. बहादूरपुऱ्यामधील अनेक दुकाने आणि घरे यांमधून त्यांनी प्रचंड लूट जमा केली . शहराच्या भिंतीबाहेरील आणखी १७ विभाग (पुरा) वरीलप्रमाणेच लुटण्यात आले. मराठ्यांचा हल्ला इतका अचानकपणे आला की कोणालाही कवडी किमती एवढी देखील आपली मालमत्ता लपविता अगर दुसऱ्या एखाद्या जागी हलविता आली नाही किंवा आपली बायका आणि मुले यांचा बचाव करता आला नाही . पेटलेल्या घरामधून वर उसळणाऱ्या धुरामुळे शत्रूच्या उपस्थितीची जाणीव शहरसुभेदाराला झाली . परंतु अशा परिस्थितीत काहीही करावयाला तो असमर्थ होता . त्याने आपल्याला किल्ल्यात कोंडून घेण्याशिवाय दुसरे काहीच केले नाही. प्रत्येक पुऱ्यामधून लक्षावधी रुपये किमतीची लूट घेण्यात आली . अनेक प्रतिष्ठित नागरिकांनी लुटारूंच्या हातून आपल्या कुटुंबियांची अब्रू हरण होऊ नये म्हणून आपल्या स्त्रिया आणि मुली यांना ठार मारले आणि आपण हल्लेखोरांशी लढत लढत स्वतःचे बलिदान केले.

जवळ जवळ तीन दिवसपर्यंत मराठ्यांनी शहराच्या उपनगराची मनसोक्त लुटालूट केली . त्यांना त्यांच्या लुटीच्या कामात कसलाही अडथळा निर्माण झाला नाही . त्यांनी प्रत्येक घराच्या जमिनी खणून काढल्या आणि अशा तऱ्हेने अनेक पिढ्यानपिढ्या गाडून ठेवण्यात आलेली संपत्ती हस्तगत केली . खानजहान याला मदत घेऊन येण्यास अतिशय विलंब लागला . हल्लेखोर ज्या मार्गाने आले त्या बाबत त्यांची दिशाभूल झाली. साहजिकच आपले सर्व युद्धकैदी आणि लूट घेऊन हल्लेखोरांना पळून जाणे सुलभ झाले. दक्षिणेमधील लोकांमध्ये असा समज पसरला की मोगल सुभेदाराने अशा तऱ्हेने चुकीच्या डावपेचांचा

स्वीकार करावा म्हणून संभाजीने त्याला लाच दिली . वरील प्रकारची तक्रार बुरहाणपूरच्या नागरिकांनी बादशहाकडे केली. मुसलमानांनी तर अशी धमकी दिली की , यापुढे त्यांचे जीवित आणि अब्रू सुरक्षित राहील अशा तऱ्हेची हमी न दिल्यास ते शुक्रवारी मशिदीमध्ये नमाज पढण्याचे बंद करतील . (**के. के.** भाग २. २७२–२७५; **दिल.,** १६७–१६८)

औरंगाबादवरील मराठ्यांच्या हल्ल्याला अपयश

बुरहाणपूर शहराच्या पश्चिमेस २६ मैलांवर असलेल्या बाभूळगाव या गावी खानजहान याला असे कलले की औरंगाबाद लुटण्यासाठी दक्षिणेकडून अहमदनगर आणि मुंगी पैठण या मार्गे मराठ्यांची एक तुकडी चाल करून येत आहे . हे कळताच तो ताबडतोब घोड्यावर स्वार झाला आणि पहाटे तीन वाजता आपल्या घोडदळासहीत त्याने कूच केले . दुपारच्या सुमारास अगदी ऐन मोक्याच्या वेळी येऊन त्याने शहराचा बचाव केला . सबंध शहरभर भयानक घबराटीचे वातावरण पसरले होते . सर्व घरे बंद झालेली होती. नागरिक सशस्त्र होऊन आणि भीतीने कापत बसलेले होते . बायका घरामध्ये आक्रोश करीत बसल्या होत्या. खानाचे आगमन झाल्याबरोबर शत्रूने लढाई न देताच पलायन केले. (**दिल.,** १६९)

यानंतर नेहमीप्रमाणे इ. स. १६८१ च्या ऑक्टोबर महिन्यातील दसऱ्याचा सण झाल्यानंतर मराठा घोडदळाच्या तुकड्या शत्रूच्या मुलखात धुमाकूळ घालण्यासाठी वेगवेगळया दिशांना कूच करत्या झाल्या . मराठ्यांनी अहमदनगरवर प्रत्यक्ष हल्ला करण्याचा प्रयत्न केला . कारण अहमदनगरच्या किल्ल्यामध्ये संभाजीची एक बायको आणि बहीण अशा दोन मराठा राजकुलांतील स्त्रिया कैदेत होत्या . त्यांना दिलेरखानाने पकडले होते, आणि त्यांची सुटका करण्याचा मराठ्यांचा बेत होता . मराठ्यांचे काही सैनिक गुप्तपणे वेषांतर करून किल्ल्यात शिरले होते . त्यांचा थांग लागला. त्यांच्यापैकी काहींना किल्लेदाराने ठार मारले आणि उरलेल्यांना थोड्याशा चकमकीनंतर किल्ल्याबाहेर काढण्यात आले . ही घटना ऑक्टोबर अखेर घडली.[या घटनेनंतर काही दिवसांनी मराठ्यांच्या ६००० सैनिकांनी सोलापूर शहराला वेढा दिला . त्यावेळी सोलापूरचा किल्लेदार मनोहरदास गौर हा होता. त्याने मराठ्यांवर हल्ला करून त्यांना पाठीमागे रेटले . दरम्यान खानजहानच्या सैन्याची आघाडीची तुकडी सोलापूर येथे येऊन पोहोचली, तेव्हा मराठ्यांनी वेढा उठविला . याच वेळी मराठा सैन्याची आणखी एक तुकडी मुल्हेर आणि साल्हेर यांच्या नजीक होती . ते कळल्यावर शहाबुद्दीनखान याने आपले सामानसुमान गाळणा येथे ठेवले आणि त्याने झपाट्याने कूच करून मराठ्यांवर हल्ला केला . मराठ्यांचे ९०० सैनिक या हल्ल्यात मारले गेले. साल्हेरचा प्रदेश अशा तऱ्हेने मराठ्यांच्या आक्रमणापासून मोकळा झाला.]

(३) राजपुत्र अकबर संभाजीकडे आश्रयासाठी येतो, जून १६८१

औरंगजेबाचा बंडखोर मुलगा राजपुत्र महमद अकबर याने ९ मे रोजी अकबरपूर येथे नर्मदा नदी आपला विश्वासू सेवक दुर्गादास राठोड याच्या मार्गदर्शनाखाली ओलांडली , आणि तो महाराष्ट्राच्या मार्गाला लागला. त्याने मोगल साम्राज्याची सरहद्द जेव्हा ओलांडली तेव्हा संभाजीच्या अनेक उच्च पदस्थ अधिकाऱ्यांनी त्याचे स्वागत केले आणि मोठ्या सन्मानाने त्याला पाली येथे नेले. (१ जून)

राजपुत्राबरोबर ४०० घोडेस्वार , बव्हंशी रजपूत आणि थोडेसे मुसलमान सैनिक असलेली पायदळाची एक छोटीशी तुकडी आणि वाहतुकीसाठी ५० उंट इतका लवाजमा होता.

संभाजीने ३०० मराठा पायदळी शिपायांना राजपुत्र अकबराच्या शरीररक्षक दलाचे तुकडीसाठी नियुक्त केले. आजूबाजूच्या मुलखात उपस्थित असलेले संभाजीचे सुभेदार –महसूल अधिकारी–राजपुत्र

अकबराच्या भेटीसाठी हजर झाले . संभाजीचा प्रतिनिधी म्हणून नेताजी पालकर याला राजपुत्र अकबराजवळ ठेवण्यात आले. [औरंगजेबाचा मुलगा अकबर याने पाली येथे मुक्काम केल्यावर संभाजीने ३०० मराठा सैनिक शरीररक्षक म्हणून त्याला दिले. आजुबाजूच्या प्रदेशातील संभाजीचे अधिकारी त्याच्या भेटीसाठी गेले . १५ दिवसानंतर संभाजीकडून एक पत्र आणि बऱ्याचशा भेटी घेऊन हिरोजी फर्जंद हा अकबराकडे आला . त्याने आणलेल्या भेटीत १००० होन , हिऱ्याचा लोलक असलेली एक मोत्याची मोठी माळ , भारी कापडाचे अनेक तुकडे , वगैरे वस्तू होत्या. संभाजीने आपला प्रतिनिधी म्हणून नेताजी पालकर याला त्याच्या जवळ ठेवले . संभाजीने अकबराच्या इतमामाला साजेल असा मान त्याला दिला . संभाजीच्या आज्ञेवरून त्याचे अनेक अधिकारी अकबरासाठी आणि त्याच्या सैनिकांसाठी अन्नधान्य आणि दाणावैरण आणीत असत . अकबराला द्रव्याची चणचण भासली परंतु त्याच्याजवळ भारी किमतीचे जडजवाहिर होते . (**बॉम्बे टू सुरत** १० व २१ जून १६८१; उधृत **ऑर्मस् फ्रॅगमेंटस्** मध्ये २६८–२७०; **एम्. ए.**, २११; **अखबारात**.)]

(४) संभाजीविरुद्ध करण्यात आलेला कट; कवी कलश याच्यावर संभाजीची मर्जी बसते

१८ जून १६८० रोजी रायगडचा कबजा घेतल्यावर संभाजीने आपल्या मुख्य शत्रूंना त्यांच्या अण्णाजी दत्तो आणि निलकंठ मोरेश्वर पिंगळे (पेशवा मोरेश्वर त्रिंबक याचा मुलगा) या पुढाऱ्यांसकट कैद केले. ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीला मोरेश्वर मरण पावला . त्याचा मुलगा निलकंठ याला संभाजीने कैदेतून सोडले, आणि रिकाम्या पडलेल्या मुख्य प्रधानाच्या जागेवर त्याची नेमणूक केली . संभाजीविरुद्ध झालेल्या कटाचा प्रमुख सूत्रधार अण्णाजी दत्तो यालाही त्याने तुरुंगातून सोडले आणि मुजुमदारीच्या अधिकारपदावर त्याची नेमणूक केली.

१६८१ च्या ऑगस्ट महिन्यात अण्णाजी दत्तोने सोयराबाई , हिरोजी फर्जंद आणि इतर काही प्रमुख मंडळी यांच्या संगनमताने संभाजीला ठार मारण्याचा आणि राजपुत्र अकबर याच्या संरक्षणाखाली राजारामाला सिंहासनावर बसविण्याचा कट रचला . संभाजीच्या अन्नात विष कालवून त्याला ठार मारण्याचा कटवाल्या मंडळीचा उद्देश होता.

परंतु हा कट उघडकीला आला. संभाजीने विश्वासघातक्यांना ताबडतोब पकडले, त्यांची तुरुंगात रवानगी केली आणि त्यांचे हालहाल करण्यास प्रारंभ केला . अण्णाजी दत्तो, त्याचा भाऊ सोमाजी, हिरोजी फर्जंद, बाळाजी आवजी प्रभू , महादेव अनंत आणि इतर तिघेजण यांना हातापायात बेड्या अडकवून हत्तीच्या पायाखाली तुडवून ठार मारण्यात आले . काही काळानंतर आणखी २० गुन्हेगारांना मृत्यूची शिक्षा देण्यात आली. राजारामाची आई सोयराबाई हिच्यावर दीड वर्षापूर्वी शिवाजीवर विषप्रयोग केल्याचा आरोप ठेवण्यात आला. संभाजीने अतिशय हालहाल करून तिला विष देऊन अथवा तिची उपासमार करून ठार मारले. ह्या सर्व घटना ऑक्टोबर १६८१ मध्ये घडल्या . सोयराबाईचे वडील शिर्के ह्यांच्या कुटुंबावरही संभाजीची वकदृष्टी पडली . शिर्के कुटुंबातील अनेकांना ठार मारण्यात आले आणि उरलेले पळून मोगलांकडे गेले. [संभाजीविरुद्ध झालेल्या कटाची हकीकत चिटणिसांच्या बखरीमध्ये दिलेली आहे . ही हकीकत इंग्रज दफ्तरामध्ये मिळणाऱ्या हकीकतीशी जुळत नाही . (पाहा **बॉम्बे टू सुरत** , ३० ऑगस्ट , ८ सप्टेंबर , व १२ व १७ ऑक्टोबर १६८१ **ओ. एम्**. ११६ मध्ये). या हकीकतीत असे म्हटले आहे की "संभाजीविरुद्ध कट करणाऱ्यांमध्ये अण्णाजी पंडित , राजारामाची आई आणि हिरोजी फर्जंद हे होते . त्यांचा बेत अकबराला संभाजीच्या जागी आणण्याचा होता. त्याने या गोष्टीला नकार दिला आणि संभाजीला ताबडतोब दुताबरोबर खबर दिली . वरील गोष्टीचा संभाजीराजाच्या मनावर इतका परिणाम झाला की त्याने '३० हजार घोडेस्वार तुझाबरोबर बुरहाणपूरला जाण्यासाठी मी तयार ठेवीत आहे ' असे वचन अकबराला (८ सप्टेंबर) दिले. संभाजी आता रायरी येथे आहे . आपल्याला ठार मारण्याचा कट केल्याबद्दल त्याने अण्णाजी पंडित , हिरोजी फर्जंद, बोवाजी (?) आणखी इतर ५ जण यांना हत्तीच्या पायाखाली तुडवून ठार मारले . आणखी २० जणांना त्याने मृत्यूची शिक्षा (१२ ऑक्टोबर) दिली. राजारामाची आई मरण पावली आहे. परंतु संभाजीनेच तिला कट करून विषप्रयोग केला अशी बातमी आहे (२७ ऑक्टोबर)."]

संभाजीचा स्वभाव आणि वागणूकच अशी होती की, राज्याच्या जुन्या सेवकांना शिवाजीबद्दल जे प्रेम आणि आत्मीयता वाटत होती तशा तऱ्हेची भावना संभाजीबद्दल बाळगणे अशक्यप्राय गेले . संभाजीपुरते बोलावयाचे तर आपल्याला गादीवरून काढण्यात सुरुवातीला राज्यातील बहुतेक सर्व प्रमुख मंत्री आणि

सेनापती यांनी समंती दर्शवली होती , ही गोष्ट तो कधीही विसरू शकला नाही . साहजिकच त्याच्या मनाची अशी धारणा झाली की आपण आपल्या मायदेशात अगदी एकाकी आणि मित्रविरहीत आहोत . त्यामुळे संभाजीची सबंध कारकीर्द त्याच्या अधिकाऱ्यांनी वारंवार केलेले कट आणि त्यांचे पक्षांतर आणि त्याच्या मांडलिकांची उद्‌भवलेली बंडे यांनी विस्कळित झालेली आपल्याला दिसून येईल . [संभाजीराजांनी रजपुतांना औरंगजेंबाविरुद्ध उठविण्याचा प्रयत्न केला. १६८२ मध्ये त्यांनी जयसिंगाचा मुलगा रामसिंग याला लिहिलेले पत्र पुढीलप्रमाणे होते :

"तुमचे पत्र मिळाले. मी बादशहांना विरोध करू नये आणि त्यांचे सार्वभौमत्व मान्य करावे असे तुम्ही पत्रात सुचविले आहे.

"तुमचा मुलगा कृष्णसिंह याने सुलतान अकबर याजबरोबर कारस्थान केले . म्हणून त्याचा सर्वनाश कसा झाला हे तुम्हाला कळलेच आहे. (कृष्णसिंह हा परिंडा मुक्कामी . एक स्त्रीच्या प्रकरणावरून एका अफगाणाच्या हातून मारला गेला . १० एप्रिल १६८२ . पण हे औरंगजेबाच्या आज्ञेवरून झाले असावे अशी त्यावेळी बातमी उठली होती .) राजकीय परिस्थितीचा पूर्ण विचार केल्यानंतर तुम्ही पुन्हा लिहिलेत ते असे 'तुम्ही आपल्या राज्यात सुलतान अकबर यास आश्रय दिला ही फार चांगली गोष्ट झाली . तुम्ही जे काही धोरण अमलात आणीत आहात ते मला मान्य आहे. आपण सगळे हिंदू आहोत म्हणून या परिस्थितीत जे काही करणे योग्य आहे, असे तुम्हास वाटेल ते करण्यास मी तयार आहे.'

"हा जर तुमचा उद्देश असेल तर या कामात तुम्हीच पुढाकार घेण्यास हवा . त्या यवनाधमाला (औरंगजेबाला) सांप्रत असे वाटू लागले आहे की, आम्ही हिंदू म्हणजे तत्त्वशून्य झालो आहोत . आम्हाला धर्माचा काहीच अभिमान राहिला नाही . बादशहाची ही वागणूक यापुढे आम्हाला सहन होणे शक्य नाही. आम्ही क्षत्रिय आहोत. आमच्या क्षात्रधर्माला कमीपणा आणणारी कोणतीही गोष्ट आम्ही मान्य करणार नाही. वेद, श्रुती-स्मृती इत्यादींनी धर्म आणि जाती यांच्यासंबंधी कर्तव्ये नेमून दिली आहेत . त्यांची पायमल्ली झालेली आम्हाला सहन होणार नाही . राजे म्हणून आमचा प्रजापालनाचा जो धर्म तो आम्ही टाकू शकत नाही . या दुष्ट यवनाशी युद्ध करण्यात आम्ही आमची संपत्ती , आमचा देश, आमचे दुर्ग, सारांश सर्व काही पणास लावण्यास तयार आहोत . या दृढ उद्देशानेच आम्ही गेली काही वर्षे अकबर आणि दुर्गादास यांना आमच्या देशात आश्रय दिला आहे . आम्ही यवनाधिपतीच्या अनेक सेनानायकांचा वध केला , कित्येकांना कारागृहात टाकले , काहींना खंडणी घेऊन तर काहींना दयाबुद्धीने सोडून दिले. काहीनीं लाच चारून आपली सुटका करून घेतली . अशा रीतीने बादशहाचे सेनानायक हे बिनकामाचे ठरले . आता अशी वेळ आली आहे की त्या यवनाधमाला (औरंगजेबाला) पकडून कारागृहात घालणे शक्य होईल. मग आपल्याला देवतांची पुन्हा स्थापना करून धर्मकर्मे निर्विघ्नपणे पार पडतील अशी व्यवस्था करता येईल. हे सगळे लवकरच करण्याचे आम्ही ठरविले आहे याची आपण खात्री बाळगावी.

"पण आपल्या मानाने आम्ही अल्पवयी आणि अननुभवी आहोत . आपल्या धर्माभिमानाच्या आणि शौर्याच्या अनेक गोष्टी ऐकल्या आहेत . तुम्ही या वेळी सप्तांग -राज्यसंपन्न आहात. तुम्ही यावेळी धैर्य आणि साहस दाखविलेत तर आणि या यवनाची (औरंगजेब) शक्ती नष्ट करण्याच्या कामात आम्हाला मदत केलीत तर आपण काय करू शकणार नाही . या गोष्टीचा आम्ही विचार करतो तेव्हा आपण अशा प्रसंगी धर्माभिमान सोडून गप्प बसून राहिला या गोष्टीचे आम्हाला आश्चर्य वाटते.

"आणखी एक गोष्ट , दुर्जनसिंह हाडा हा कशा प्रकारचा मनुष्य हे आपणा दोघांनाही माहीत आहे . त्याच्यापाशी किती संपत्ती होती हेही आपल्याला माहीत आहे. पण त्याने आपल्या संपत्तीवर पाणी सोडले आणि आमच्या सूचनेस अनुसरून त्याने शौर्य गाजवून धामधूम उडवून दिली . तुम्ही तिकडच्या भागात असल्यामुळे तुम्हाला हे सर्व माहीत असेल . (बुंदिचा राजा दुर्जनसिंह हाडा याने औरंगजेबाविरुद्ध बंड केले . पुढे तो एका लढाईत मारला गेला.)

"इकडे आम्ही अकबर आणि दुर्गादास यांना गुजरातेत पाठविण्याच्या विचारात आहोत . या वेळी आपणही जे काही आवश्यक आहे ते धैर्यपूर्वक करावे. पठाणाधिप (इराणचा) शहा अब्बास याने आपण अकबराला मदत करू असे लिहिले आहे . पण या बाबतीत आपण यवनांची मदत घ्यावी आणि यशाचे श्रेय त्यांना मिळवून द्यावे हे मला अनुचित वाटते . आपले पिते (जयसिंग) यांनी यवनाधमाला (औरंगजेबाला) दिल्लीश्वर करून त्याचे श्रेय संपादिलेच ना. त्याप्रमाणे आपणही अकबराला मदत करून यशाचे धनी व्हावे. यवनांच्या मदतीने अकबराला राज्यपद लाभले तर त्यांना प्राधान्य लाभेल. ही गोष्ट आपण होऊ देऊ नये . आपण उभयतांनी एक होऊन अकबराला गादीवर बसविले तर धर्मरक्षणाचे कार्य होईल आणि आपल्या या कार्याने महाराज जयसिंह यांच्या वंशाला शोभा येईल.

"माझे मंत्री कवी कलश आणि जनार्दन पंडित हे तुम्हाला सविस्तर असे वेगळे लिहीत आहेत . प्रतापसिंहाच्या (दूत) आणि इतर हेरांच्या तोंडून आपल्याला सगळा तपशील कळेल . ते आपल्याला भेटतीलच . आपले कुशल वरचेवर कळवीत असावे . अधिक काय लिहिणे . सर्व गोष्टी आपल्याला विदितच आहेत."

(मूळ पत्र संस्कृतमध्ये आहे. त्याचा अनुवाद काणे अभिनंदन ग्रंथ १९४१, पान ३९० वर आलेला वर दिला आहे.)]

अशा तऱ्हेच्या एकाकी अवस्थेत असताना त्याला एका अतिशय जीवाभावाने चाकरी करणाऱ्या सेवकाचा लाभ झाला. अलाहाबाद येथील भोसले कुटुंबाचा वंशपरंपरागत उपाध्याय असलेला एक कनोजी ब्राह्मण होता. संभाजीचे भव्य प्रमाणावर जे राज्यारोहण झाले , त्याच्या थोड्या अगोदर तो रायगड येथे

अनुक्रमणिका

आला. त्याने लवकरच संभाजीराजांची मर्जी संपादली. तो संभाजीच्या विश्वासातील एकमेव सेवक बनला, आणि राज्याची सर्व प्रमुख सूत्रे त्यांने आपल्या हाती घेतली . संभाजीने त्याला 'कवी कलश' अथवा 'कविजनांचा मुगुटमणी' असा किताब दिला. संभाजीची परिस्थिती लवकरच एकाद्या नामधारी राजासारखी बनली. तो आंधळेपणाने कवी कलशच्या सल्ल्याचा स्वीकार करू लागला. आपला सर्व वेळ तो दारू आणि स्त्रिया यांच्या बेहोशीत घालवू लागला . या त्याच्या जीवनक्रमात मधूनच लढाईचे मैदान गाजविण्याचा झटका त्याला येई.

अकबर आणि संभाजी यांमधील संबंध

या वेळी राजपुत्र अकबर एका ओसाड खेडेगावी आसरा घेऊन होता . त्याची चरितार्थाची साधने जेमतेम आणि बेताबाताची होती . तरीही त्यातल्यात्यात तो आपला बादशहाचा रुबाब ठेवण्याचा प्रयत्न करी. निव्वळ पैसा घेऊन काम करणारे घोडेस्वार त्याच्याभोवती सारखे जमा होत होते . ऑगस्ट महिन्यापर्यंत त्याच्याकडे जवळजवळ २ हजार पगारी घोडेस्वारांची तुकडी जमा झाली. [अकबराच्या सैन्यात जी झपाट्याने वाढ होत गेली आणि त्याच्या भोवती हजारोंच्या संख्येने जे परदेशी सैनिक जमा झाले ते संभाजीला भयसूचक वाटले . जुलै अखेर त्याने अकबराला बजावले की तुला जर सैन्याची उभारणी करावयाची असेल तर तू दुसऱ्या कोणत्या तरी राज्यात निघून जा . परंतु जर तुला माझ्या राज्यात राहावयाचे असेल तर माझ्याकडे येताना तुझी जी परिस्थिती होती तीच तुला कायम ठेवली पाहिजे . संभाजीने त्यानंतर अकबराच्या सैन्यभरतीला बंदी केली. परंतु रोजचा खर्च म्हणून त्याला ६० होन इतकी रक्कम मंजूर केली. (**अखबारात**, १६ **ऑगस्ट** १६८१)] १३ नोव्हेम्बर १६८१ रोजी संभाजीने आपले सर्व सैन्य आणि लवाजमा घेऊन राजपुत्र अकबर याची पाच्छापूर (पाली) येथे भेट घेतली (जेधेश.) अकबराबरोबर दुर्गादास हा होता. परंतु आता मोगल साम्राज्यावर हल्ला करून यश संपादन करण्याची अकबराची एकमेव संधी निघून गेली होती . रजपुतांबरोबर चाललेल्या युद्धाचा धोका जून महिन्यांत संपला होता . कारण तेव्हा महाराण्याने बादशहाबरोबर निश्चित शांततेचा तह केला होता. अकबराचा पाठलाग करण्यासाठी सारी मोगल सेना आता मोकळी होती. खुद्द बादशहा १३ नोव्हेम्बर रोजी बुरहाणपूर येथे येऊन पोहोचला . याप्रमाणे नोंव्हेबरच्या मध्याला मोगल साम्राज्याची सर्व लष्करी साधन सामग्री खुद्द बादशहा , त्याचे तीन मुलगे आणि त्याचे नाणावलेले सेनापती यांच्या हाताखाली एकत्रित झाली . सुरुवातीला त्याने परिस्थितीचे काळजीपूर्वक निरीक्षण करण्याचे आणि धीमेपणाने वागण्याचे धोरण स्वीकारण्याचे ठरविले.

(५) औरंगजेबाच्या डावपेचाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या हालचाली, १६८२

इ. स. १६८२ च्या जानेवारी महिन्यात संभाजी स्वतःच्या देखरेखीखाली जंजिऱ्यावर अतिशय तडाख्याने हल्ले करण्यात गुंतला होता . औरंगजेबाच्या दृष्टीने ही एक चालून आलेली मोठी संधी होती . सय्यद हसन अलीखान हा जुन्नरमार्गे उत्तर कोकणात चौदा हजार घोडेस्वार घेऊन उतरला , आणि ३० जानेवारी १६८२ रोजी त्याने कल्याणचा ताबा घेतला . वाटेमध्ये लागलेली मराठा मुलखातील सर्व खेडी त्याने जाळून टाकली. नंतरच्या मे महिन्यात पश्चिम किनाऱ्यावरील मुसळधार पावसापासून आपले घोडदळ सुरक्षित राहावे म्हणून त्याने या प्रांतातून माघार घेतली . [१६८२ मध्ये खानजहान याला बहादूरगड येथे आपली छावणी करण्याचा आणि तेथून जिथे मराठे असतील तिथे त्यांच्या पाठलागावर जाण्याचा हुकूम देण्यात आला. अशाच एका मोहिमेत त्याने पुणे जिल्ह्यातील शिवापूर हे गाव उध्वस्त केले. (**दिल.**, १७३; **एम्. ए.**, २१६).

या सुमारास संभाजी हा जंजिऱ्याच्या वेढ्यात गुंतला होता. हसनअली याला जे मोठेमोठे विजय मिळाले त्यामुळे अतिशय निराश होऊन संभाजीला वेढ्याचे काम उठवून परत यावे लागले . तेथे १० हजार सैनिक त्याने हल्ला चालू ठेवण्यासाठी म्हणून ठेवले आणि तो स्वतः रायगडला परतला. रायगडला त्याने संरक्षणाची व्यवस्था केली . पेण नदीच्या मुखाजवळील उताराचे रक्षण करण्यासाठी त्याने ५ हजार सैनिक ठेवले . त्याचप्रमाणे चेवूल ते नागोठणा यामधील प्रदेशाच्या रक्षणासाठी त्याने १५००० सैनिकांची नियुक्ती केली . महाराष्ट्रात पसरलेल्या मोगल सैन्याच्या

दक्षिण विभागाला तोंड देण्यासाठी त्याने सातारा आणि फोंडा यांच्या दरम्यान २० हजार घोडस्वार सज्ज ठेवले. (**ऑर्म**, ११०).]

२२ मार्च १६८२ रोजी औरंगजेब औरंगाबाद येथे येऊन पोहोचला . तेथून त्याने दक्षिणेकडे अहमदनगर येथे आजमशहा आणि दिलेरखान यांना रवाना केले तर शहाबुद्दीनखान याच्याबरोबर दलपतरावाला देऊन त्याची रवानगी पश्चिम सरहद्दीकडे नाशिककडे केली शहाबुद्दीनखानाने या भागातील काही छोटे -छोटे किल्ले घेतले आणि एप्रिल महिन्यात नाशिकपासून ७ मैलांवर असलेल्या रामसेजच्या किल्ल्याला त्याने वेढा दिला . मोगल वेढ्याचा प्रतिकार अतिशय शूर अशा मराठा शिबंदीने एका नाणावलेल्या किल्लेदाराच्या अधिपत्याखाली केला . मोगलांनी केलेले किल्ला घेण्याचे प्रयत्न वाया गेले . बादशहाने वेढा देणाऱ्या शिबंदीला मदत म्हणून खान —जहान याची रवानगी केली . परंतु या सेनापतीला देखील किल्ला घेण्याच्या कामी काही अधिक असे यश प्राप्त झाले नाही . मोगलांचे दोन हल्ले परतवून लावण्यात आले. या दोन्ही हल्ल्यांत मोगलांचे प्रचंड नुकसान झाले . [रामसेजचा किल्ला जिंकण्यासाठी मोगलांनी मोर्चे खणले आणि सुरुंग पेरले . परंतु त्यांना यश मिळाले नाही . अखेर शहाबुद्दीन याने किल्ल्याजवळील एका टेकडीवर ५०० बंदुकची मावतील इतका उंच लाकडी मनोरा बांधण्याचे ठरविले. मोठ्या कष्टाने हा मनोरा बांधून तयार झाला. तो किल्ल्याच्या बुरुजापेक्षाही उंच होता. (**दिल.**, १७६).

मे महिन्यात रुपाजी भोसले आणि मानाजी मोरे हे चाल करून येत आहेत असे कळताच शहाबुद्दीनखान त्यांच्यावर चालून गेला आणि त्याने त्यांना गणेशगाव येथे अडविले . झालेल्या लढाईत खानाची ५०० माणसे जाया झाली . (**जेधे श.**) किल्ल्याचा वेढा बराच काळ चालल्याचे पाहून औरंगजेबाने खानजहान याची वेढ्याला मदत म्हणून रवानगी केली . त्याला देखील अपयश आले. (**के. के.** भा. २, २८२—२८३). बादशहा यामुळे अतिशय नाखूष झाला आणि त्याने आपल्या अधिकाऱ्यांना किल्ल्यावर हल्ला करण्यास भाग पाडण्यासाठी सजाबल पाठविण्याचे ठरविले . (**एम्., ए.** २१९) एका रात्री किल्ल्याच्या एका बाजूला मोठा आवाज करून दुसऱ्या बाजूने गुप्तपणे किल्ला चढून जाण्याचा खानजहानने प्रयत्न केला. ही युक्ती किल्ल्यावरील शिबंदीने ओळखिली आणि सर्व तयारीनीशी ते मोगलांची वाट पाहात बसले . मोगलांनी वर चढून जाण्याचा प्रयत्न करताच त्यांनी त्यांच्यावर दगड आणि तेलात भिजवून पेटविलेले पलिते टाकले . खानजहानला मोठे नुकसान सोसून माघार घ्यावी लागली . शहाबुद्दीनखान याने चढविलेला दुसरा हल्लाही असाच अयशस्वी ठरला .(**के. के. भा.** २, २८३, **दिल.**, १७७). परंतु मोगलांना २ लहान विजय प्राप्त झाले. २० मे रोजी औरंगाबादजवळ शरीफखानावर मराठ्यांच्या एका तुकडीने हल्ला केला . परंतु मराठ्यांचे मोठे नुकसान करून तो परतला. (**एम्. ए.**, २१८) यानंतर १८ हजार पायदळ घेऊन हंबीरराव रामसेजचा वेढा उठविण्यासाठी चाल करून आला . त्याला परतवून लावण्यात आले. त्याने आपली २००० माणसे गमावली. (**कारवार ऑकरन्सेस्**, ३० जुलै १६८२, **एफ्. आर्. सुरत** १०८ **मध्ये**,)]

[खाफीखानाने आणि भीमसेन सक्सेना याने रामसेजच्या वेढ्याची पुढीलप्रमाणे हकीकत दिली आहे :

"बादशहाने रामसेजचा किल्ला जिंकून घेण्याच्या कामावर शहाबुद्दीनखान (गाजिउद्दीन फिरोजगंज) याची नेमणूक केली. किल्ल्याला वेढा घालणे, सुरुंग लावणे, मोर्चे बांधणे, दमदमे तयार करून वर चढविणे, इत्यादी सर्व गोष्टी शहाबुद्दीनखानाने केल्या. परंतु रामसेजचा किल्लेदार हा सर्व मराठ्यात अत्यंत अनुभवी आणि कसलेला होता . त्याच्या प्रयत्नामुळे आणि सावधगिरीमुळे मोगल फौजेचे काही चालेना . प्रस्तुत ग्रंथकार (खाफीखान) हा त्यावेळी तेथे असलेल्या मोगल फौजेत होता . किल्ल्यात लोखंडी तोफा नव्हत्या . पण कातडे बरेच होते . किल्ल्यातील लोकांनी लाकडाच्या तोफा बनविल्या. त्यात ते कातडे भरून तोफ उडवीत. अशी एक-एक तोफ दहा तोफांचे काम करी."

भीमसेन सक्सेना म्हणतो, "शहाबुद्दीन याने किल्ल्याला मोर्चे लाविले . किल्ल्याच्या बुरुजासमोर शहाबुद्दीन याने लाकडाचा एक प्रचंड बुरूज उभा केला . त्यावर चढून पाचशे माणसे एका वेळी किल्ल्यावरील लोकांवर गोळ्यांचा मारा करू शकत . इतक्यात बातमी आली की , किल्ल्यातील लोकांच्या मदतीसाठी मराठ्यांचे सैन्य चाल करून येत आहे."

मराठ्यांच्या या सैन्याचा उल्लेख जेधे शकावलीत पुढीलप्रमाणे आला आहे : "(एप्रिल १६८२) शहादीखान येऊन रामसेजेस वेढा घातला. नंतर (मे महिन्यात) रुपाजी भोसले व मानाजी मोरे जाऊन शाहादीखानाशी गणेश गावापाशी भांडण केले . पाचशे घोडी पाडाव केली . त्यावर (सप्टेंबर-ऑक्टोबरात) रामसेजेचा वेढा उठविला."

भीमसेन लिहितो , "बादशहाने बहादूरखानाला ताबडतोब मोगलांच्या कुमकेस जाण्याची आज्ञा केली . बहादूरखानाने आपले बाजारबुणगे आणि जड सामान बहादूरगडला ठेवले आणि तो गुल्शनाबादेस (नाशिक) पोहोचला. बादशहाने त्याला तेथेच छावणी करण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणे बहादूरगडचा तळ हलवून गुल्शनाबादेस नेण्यात आला . मी (भीमसेन) आणि सय्यद कबीर हे बुणग्यांबरोबर गुल्शनाबादेस पोहोचलो. दल्पतराय याची गाठ घेण्यासाठी मी रामसेज येथे गेलो . रामसेज येथे शहाबुद्दीन याने लाकडी बुरूज उभा केला होता तो मी पाहिला . खरोखरीच तो प्रेक्षणीय होता . शहाबुद्दीनखान याने रामसेजच्या किल्ल्यावर हल्ला चढविला पण त्याला यश आले नाही . मोगलांची अनेक माणसे मारली गेली. दल्पतराय याला दगडाच्या मारामुळे जखमा झाल्या . शहाबुद्दीन हा जुन्नरकडे रवाना झाला . बहादूरखानाने रामसेजचा वेढा चालू ठेवला. त्याने किल्ल्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला पण त्याचा काही उपयोग झाला नाही . शेवटी बादशहाच्या, आज्ञेने त्याने किल्ल्याचा वेढा उठविला. शहाबुद्दीन याने अफाट खर्च करून लाकडी बुरूज तयार केला होता . त्यात पेंढा आणि दारू भरून बुरुजाला पेटविण्यात आले . प्रचंड

जाळ झाला .” रामसेजच्या वेढ्याच्या बाबत खाफीखान लिहितो . : “नंतर बादशहाने शहाबुद्दीनखानाला परत बोलाविले आणि त्याच्या जागी खानजहान बहादूर कोकल्ताश (बहादूरखान) यास किल्ला घेण्यासाठी पाठविले . त्याने पण किल्ल्याच्या वेढ्यात शिपाईगिरीची शर्थ केली . त्याचे तपशीलवार वर्णन मी केले तर ती अतिशयोक्ती वाटेल. पण काम काही पार पडले नाही.”

“एके दिवशी रात्री खानजहान बहादूर कोकल्ताश म्हणाला , “किल्ल्याच्या एका बाजूला आपण हल्ला करणार म्हणून पुकारा करावा . तिकडे तोफा आणाव्या. दारुगोळा न्यावा. तोफखान्यातील माणसे, लष्करातील लोक आणि बाजारबुणगे यांनी तिकडे खूप गडबड उठवून द्यावी , म्हणजे किल्ल्यातील लोक तिकडे गोळा होऊन बंदोबस्त करू लागतील. त्याच वेळी किल्ल्याच्या दुसऱ्या बाजूस योग्य अशी जागा शोधून काढून शे-दोनशे शूर शिपायांनी जावे . त्यांच्याबरोबर हल्ला करण्याचे सामान किंवा मशाली वगैरे उजेड पाडण्याच्या वस्तू असू नयेत . त्यांनी सापाप्रमाणे जावे आणि दोराच्या साहाय्याने. हरप्रयत्नाने किल्ल्यावर पोहोचावे.

“पण किल्लेदाराला हा बहादूरखानाचा बेत समजला . त्यानेही युक्ती केली . त्याने असे ठरविले की , ‘ज्या बाजूने मोगल बाजारबुणगे आणून हल्ल्याचा आरडाओरडा करतील त्या बाजूने आपणही किल्ल्यातील शूर शिपायांना गोळा करावे आणि नगारे -नौबती-कर्णे इत्यादींचा घोष करावा. वरून मोगलांच्यावर दगड लोटून द्यावे . कपडे तेलात भिजवून ते पेटवून वरून ते टाकावे . या कामात कसूर करू नये आणि ज्या जागी खानजहानची माणसे गुपचुपपणे चढून येणार होती , त्या ठिकाणी किल्लेदाराने शूर निवडक , आणि सर्व प्रकारच्या शस्त्रांनी युक्त असलेले शिपाई घेऊन दबा धरून बसावे. त्यांनी कोणत्याही प्रकारचा आवाज करू नये.’

“अशा रीतीने दबा धरून मराठे त्या आगंतुक पाहुण्यांची , (म्हणजे मोगलांची) वाट पाहात बसले. ठरलेल्या वेळी मोगलांची दोन माणसे वर चढली. त्यांची डोकी दिसताच किल्ल्यातील सैनिकांनी प्राण हरण करणाऱ्या आपल्या शस्त्रांनी त्यांच्यावर इतक्या जोराने आघात केला की त्यांचे डोळेच बाहेर आले. ते मोठ्या कष्टाने वाट चढून आले होते . तिकडेच ते फेकले गेले . इतर माणसे त्यांच्यामागे चढत होती ती पण वरून पडणाऱ्या माणसांबरोबरच खाली पडली.

“एके दिवशी खानजहान बहादूरचा मोतद्दार म्हणाला , ‘भुते वश करण्याच्या कामात मी पटाईत आहे. शंभर तोळे वजनाचा एक सोन्याचा साप तयार करा . तो माझ्या हाती द्या आणि हल्ल्याच्या वेळी मला आघाडीवर ठेवा . मी भुतांच्या मदतीने किल्ल्याच्या प्रवेशद्वारापर्यंत कोणतीही अडचण न येता जाऊ शकेन अशी मला आशा आहे .’ खानजहान बहादूरने त्याच्या म्हणण्याप्रमाणे केले . तो मोतद्दार हल्ल्याच्या वेळी पुढे होता . इतक्यात किल्ल्यावरून गोफणाचा गोळा येऊन त्याच्या छातीवर इतक्या जोराने लागला की , मोतद्दाराच्या हातून सोन्याचा नाग उडाला आणि मोतद्दार खाली पडला . [बेन्द्रे यांच्यासमोर चुकीचा इंग्रजी अनुवाद असल्याने या वाक्याचा त्यांनी मराठी अनुवाद पुढीलप्रमाणे दिला आहे . “इतक्यात किल्ल्यावरून रेशमाचा चेंडू खाली आला व त्याच्या छातीत जोराने बसला व त्याच्याजवळील नाग घेऊन गेला” (संभाजी पान १३६)

“खानजहान बहादूरने खूप परिश्रम केले पण काम काही निभू शकले नाही . शेवटी बादशहाच्या आज्ञेने तोही वेढा उठवून निघाला . मोर्चे आणि किल्ल्यावर चढण्याची साधने म्हणून मोगलांनी खूप लाकडे जमविली होती . त्यात त्यांना बराच खर्च आला होता . कूचीच्या दिवशी खानजहानच्या आज्ञेने मोगलांनी लाकडाला आग लावून दिली . यावेळी किल्ल्यातील लोक तटावर जमले होते. ते नगारे, चौघडे इत्यादी वाजवीत होते. तोंडाने जे म्हणत ते उच्चार करण्यासारखे नाही . कासीमखान किरमानी हा शूर आणि तडफदार सरदार म्हणून प्रसिद्ध होता , त्याची या वेढ्याच्या कामावर नेमणूक झाली . त्यानेही खूप परिश्रम केले . पण काम काही पार पडले नाही . शेवटी बादशहाने वेढ्याचे काम तहकूब केले ; कासीमखानाला दुसऱ्या कामगिरीवर रवाना करण्यात आले . त्यानंतर संभाजीने रामसेजच्या किल्लेदाराकडे खिलतीचा पोषाख , रत्नजडित कडे आणि नगद रक्कम पाठवून त्याचा गौरव केला . इतर किल्लेदारांच्या मानाने तो श्रेष्ठ म्हणून त्याचा मानसन्मान करून त्याची आपल्या एका प्रमुख किल्ल्यावर त्याने बदली केली.”]

औरंगजेबाची योजना, १६८२

परंतु औरंगजेबाला आता विलक्षण स्फूर्ती चढली होती . त्याने संभाजीविरुद्ध मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्याचे ठरविले . याबाबत कारवार येथील इंग्रज प्रतिनिधी पुढीलप्रमाणे लिहितो . “संभाजी विरुद्धच्या भयंकर द्वेषाने तो इतका पेटला होता की त्याने आपली पगडी फेकून दिली , आणि अशी प्रतिज्ञा केली की, जोपर्यंत संभाजीला मी ठार मारले नाही किंवा त्याला पकडले नाही अथवा रणांगणात त्याचा पराभव करून त्याची हकालपट्टी केली नाही तोपर्यंत ही पगडी मी डोक्यावर ठेवणार नाही .” (३० जुलै १६८२) त्याने २३ मे रोजी रुहल्लाखान याला आणि नंतर २८ सप्टेंबर रोजी मुईजुद्दीन याला अहमदनगर जिल्ह्याच्या रक्षणासाठी पाठवून दिले . तर १४ जून रोजी त्याने विजापूरच्या राज्याला दहशत निर्माण करण्यासाठी आणि विजापूर सरकारने मराठ्यांच्या तुकड्यांना मदत करू नये अथवा आश्रय देऊ नये यासाठी राजपुत्र आजम याची विजापूरच्या दिशेने रवानगी केली . जून महिन्यात त्याने नाशिकहून शहाबुद्दीनखानाला जुन्नरकडे बदलले तर सप्टेंबर महिन्यात खान -जहान याचा तडफदार दुय्यम अधिकारी

रणमस्तखान याला एका स्वतंत्र सेनाविभागाचा अधिकारी म्हणून त्याने बढती दिली आणि त्याला कोकणवर स्वारी करण्याचा हुकूम दिला . [याठिकाणी खाफीखानाने आणखी एका मोगल सेनापतीला रामसेजचा वेढा यशस्वी करण्यासाठी पाठविण्यात आल्याचे विधान केले आहे . हा सेनापती म्हणजे कासिमखान किरमानी . यानंतर संभाजीने रामसेजच्या किल्लेदाराला त्याच्या शौर्याबद्दल बक्षिसी देऊन त्याची नेमणूक दुसऱ्या मोठ्या अधिकारावर केली . त्याच्यानंतर नेमणूक झालेल्या किल्लेदाराला मोगलांनी लाच चारली आणि किल्ला आपल्या ताब्यात घेतला. (**के. के.** भा. २, २८४)]

रामसेजचा अपयशी वेढा

यानंतर काही महिने खान -ई-जहान याने रामसेजचा वेढा चालू ठेवला . त्याने किल्ल्यावर पुन्हा एकदा हल्ला चढविला पण त्यात त्याला अपयश आले . अखेर ऑक्टोबर १६८२ मध्ये त्याने किल्ल्याचा वेढा उठविला.

रणमस्तखान इकडे कोकणात शिरला , आणि १६८२ च्या नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस त्याने कल्याण जिंकून घेतले . रूपाजी भोसले आणि पेशवा यांनी त्याचा अयशस्वी प्रतिकार केला . तरीदेखील त्याच्याबरोबर झालेल्या अनेक लढायांत त्यांनी मोगलांची अनेक माणसे ठार मारली.

औरंगजेबाचे चढाईचे धोरण

खान-जहान हा औरंगाबादच्या दक्षिणेस २५ मैलांवर गोदावरीच्या काठी असलेल्या रामदू येथे राजपुत्राच्या फौजेला येऊन मिळाला. तेथून त्याने पूर्वेच्या बाजूने नांदेडच्या दिशेने कूच केले . तेथून मोगल सैन्याची तुकडी आणखी दक्षिणेस ८६ मैलांवर असलेल्या बिदरच्या दिशेने गेली. त्यानंतर खान-जहान याने मराठा हल्लेखोरांबरोबर धावतपळत आणि त्यांचा पाठलाग करीत लढाई दिली . मराठ्यांचा पाठलाग करीत करीत तो चांदा आणि गोवळकोंडा यांच्या सरहद्दीपाशी येऊन पोहोचला . त्याची ही कामगिरी अजोड होती यात काहीच शंका नाही . या मोहिमेत त्याच्या सैनिकांना अनेक हालअपेष्टा भोगाव्या लागल्या . (**दिल**., १७८—१८०)

१६८२ च्या जून महिन्यात राजपुत्र आजम याने आदिलशाही मुलुखावर आक्रमण करण्यासाठी अहमदनगरहून कूच केले. या मोहिमेत त्याने धारूर काबीज केले . नंतर त्याने संभाजीच्या मुलुखात प्रवेश केला आणि आपली बायको जहानजेब बेगम ऊर्फ जानीबेगम हिला छावणीत पाठीमागे ठेवून त्याने आपल्या सैन्यासह शत्रूच्या मुलुखात जोरदार आगेकूच केली . जानीबेगमच्या संरक्षणासाठी त्याने रावअनिरुद्धसिंग हाडा आणि त्याचे रजपूत शिपाई यांना मुक्रर केले. मराठ्यांनी आपल्या सैन्याची एक तुकडी राजपुत्र आजम याच्या प्रतिकारासाठी रवाना केली आणि अतिशय मोठ्या संख्येने ते अचानक जानीबेगमच्या छावणीवर चालून आले. दाराशुकोच्या या अतिशय शूर अशा कन्येने हत्तीवर ठेवलेल्या आपल्या आच्छादित पालखीत बसून शत्रूला तोंड देण्यासाठी छावणीपासून दोन मैल आगेकूच केले.

अनिरुद्धसिंग याला तिने आपल्या हत्तीजवळ बोलाविले आणि ती त्याला म्हणाली , "चगताई घराण्याची प्रतिष्ठा ही रजपूतांना त्यांच्या घराण्याच्या प्रतिष्ठेइतकीच महत्त्वाची आहे . मी तुला माझा मुलगा मानते. जर का परमेश्वराने आपल्याला या छोट्याशा सैन्याच्या साहाय्याने यश दिले तर ठीकच आहे . न दिल्यास माझे भवितव्य मी माझ्या हातानीच ठरवीन . त्याविषयी तुला शंका नको . शत्रूकडून पकडले जाण्याऐवजी माझे कर्तव्य पार पाडल्यानंतर मी माझ्या प्राणांचे बलिदान करीन ." यानंतर दोन्ही फौजांत

घनघोर युद्ध झाले . अनिरुद्धाचे ९०० रजपूत सैनिक रणांगणावर ठार मारले गेले . त्याचप्रमाणे अनेक मराठेही पतन पावले . अखेर अनिरुद्धाला विजयश्रीने माळ घातली . जखमांनी तो घायाळ झाला होता . काही काळ निरा नदीच्या किनाऱ्यावर घालविल्यानंतर १६८३ च्या जून महिन्यात आजमला औरंगजेबाने आपल्याजवळ येण्याचा हुकूम दिला.

(६) मोगल प्रयत्नांना आलेले अपयश , बादशहाच्या मनाचा गोंधळ आणि त्याच्या मनात निर्माण झालेले संशय-पिशाच

इ. स. १६८३ च्या मार्च महिन्यात अकबराविरुद्ध कारवाई करण्यात गुंतलेल्या सर्व मोगल तुकड्यांना बादशहाने आपल्यापाशी येण्याचा हुकूम दिला . २३ मार्च रोजी रुहुल्लाखान आणि रणमस्तखान यांनी कल्याण शहर खाली केले . त्यांनी शहराभोवती जी तटबंदी बांधली होती , ती त्यांनी जाळून टाकली आणि भुईसपाट केली. ते माघार घेत असताना त्यांना रुपाजी भोसल्याच्या हाताखालील एका मराठ्यांच्या तुकडीने प्रतिकार केला. त्यांनी टिटवाळा येथे (कल्याणच्या ईशान्येकडे ७ मैलांवर) मोगलांच्या पिछाडीवर हल्ला केला. मोगलांची अनेक माणसे त्याने ठार मारली आणि बरेचसे घोडे त्यांनी पळवून नेले [वरील डोंगराळ प्रदेशातून मोठ्या कष्टाने रुहुल्लाखानाला आपली सुटका करून घ्यावी लागली आणि घाटातून दक्षिणेच्या पठारावर यावे लागले . त्याचे अतिशय उत्कृष्ट वर्णन दरबारातील एका बातमीपत्रात आहे . ते पुढीलप्रमाणे आहे : रुहुल्लाखान कोकणात समुद्र किनाऱ्यावर उतरल्यावर त्याच्या नजरेस शत्रुसैन्य आले. त्याने त्यांच्यावर अग्निबाणांचा वर्षाव केला . त्यामध्ये मराठा सेनापतीचा मुलगा जखमी झाला . त्याला तसाच सोडून मराठे पळून गेले. त्याच्या सुटकेसाठी मराठ्यांनी २ लक्ष रुपये देऊ केले ते घेण्याचे रुहुल्लाखानाने नाकारले.

यानंतर शत्रूने ३५००० सैनिक घेऊन पुन्हा चाल केली आणि रस्ते आणि घाट यांची नाकेबंदी केली . रणमस्तखान हा घाटात होता , तो तसाच अडकून पडला. मोगल सैन्याचा रसदपुरवठा बंद करण्यात आला . यावर रुहुल्लाखानाने फिरंग्यांना वश केले आणि त्यांच्याकडून समुद्राच्या मार्गाने रसद मिळविली . तेव्हा मराठ्यांनी समुद्रमार्गही बंद करण्याचा प्रयत्न केला . यावेळी रुहुल्लाखानाकडे कागदावर ८००० सैनिक असल्याची नोंद होती . त्याने बादशहाकडे आपल्याला ताबडतोब मदत पाठविण्यात यावी अशी विनंती केली . बादशहाने त्याला उत्तर दिले की जर का त्याच्याकडे ८००० घोडेस्वार असतील तर त्याला कुमकेची जरूर नाही . पकडलेल्या सेनापतीच्या मुलाची सुटका करून त्याने सहजतया माघार घ्यावी. (**अखबारात**)] (**सुरत टू कंपनी**., १० एप्रिल १६८३, **एफ्, आर्. सुरत, ९१ मध्ये**).

यावरून आपल्याला असे दिसून येईल की १६८१ च्या नोव्हेंबर महिन्यापासून तो १६८३ च्या एप्रिल महिन्यापर्यंत जवळजवळ १ वर्षापेक्षा अधिक काळ बादशहा दक्षिणेमध्ये होता . या कालावधीत त्याच्याजवळ प्रचंड साधनसामग्री असून देखील त्याला विशेष उल्लेखनीय अशी कामगिरी बजावता आली नाही . खरे बोलावयाचे तर या कालावधीत घरगुती आणि मानसिक भानगडींनी तो अतिशय संत्रस्त होऊन गेला होता . त्याच्या आपल्या कुटुंबीय मंडळीवरील विश्वासाला पूर्णपणे तडा गेला होता . कोणावर विश्वास ठेवावा किंवा कुठे आपण सुरक्षित राहू हेच त्याला समजेनासे झाले होते . म्हणून यानंतर काही काळपर्यंत त्याचे धोरण अस्थिर, संशयी, बारकाव्याचे आणि वरवर दिसावयाला लहरी अथवा विरोधाभासपूर्ण होते . २ ऑक्टोबर १६८३ रोजी सुरतेमधील इंग्रज गुमास्ता पुढीलप्रमाणे लिहितो . "बादशहाचे मन केव्हा कसे बदलेल याविषयी आम्हाला काहीच सांगता येत नाही . त्याच्या मनाचा चंचलपणा सारखा वाढत आहे . सुलतान अकबरामुळे तो विलक्षण तिरसट आणि बेचैन झाला आहे . सुलतान आजम, जानीबेगम आणि दिलेरखान यांना त्याने कोणत्याही तऱ्हेचा प्रत्यक्ष पुरावा नसताना केवळ ते अकबराला सहानुभुती दाखवतात , या संशयावरून अपमानास्पद रीतीने वागविले आहे. त्याच्याभोवती असलेल्या बड्याबड्या मंडळींची परिस्थिती मोठी नाजूक झाली आहे आणि त्यांना अतिशय काळजीपूर्वक रीतीने राहावे लागत आहे ." [३ एप्रिल १६८२ रोजी सुरतेच्या इंग्रज गुमास्त्यांनी पुढील नोंद केली आहे : औरंगजेबाजवळ खूप मोठे सैन्य आहे , परंतु आपण सुरक्षित नाही अशा भावनेने तो काहीही हालचाल करीत नाही. ३१ ऑगस्टला सुरतेला अशी नोंद आढळते की सुलतान आजम याने बंड केले असून तो विजापूरकरांना मिळाला आहे . १० एप्रिल १६८३ ची नोंद पुढीलप्रमाणे आहे : औरंगजेबाने अकबर आणि संभाजी यांच्यावर रवाना केलेली सर्व फौज परत बोलावली असून त्यामुळे सर्व लोक संभ्रमित झाले आहेत. मे १६८३ मध्ये औरंगजेबाने खानजहान, शहाआलम आणि आजम यांना दक्षिणेच्या मोहिमेची सूत्रे देण्याचे ठरविले आणि

स्वतः उत्तर हिंदुस्थानात जाण्याचा त्याने बेत केला. परंतु प्रत्येकाने ही कामगिरी अंगावर घेण्यास नकार दिला.

१९ जून रोजी सुरत दफ्तरात पुढील नोंद आढळते : औरंगजेब वेडापिसा झाला आहे . त्याचे मन चंचल झाले आहे . त्याचे सर्व उमराव त्याच्याबाबत नाखूष आहेत. सुलतान अकबर याच्याकडे सर्वांचा ओढा आहे. २ ऑक्टोबरची नोंद पुढीलप्रमाणे आहे : बादशहाचे मन कसे बदलेल हे आम्हास सांगता येत नाही . सुलतान अकबरामुळे तो अतिशय चिडखोर झाला आहे . फारसे कारण नसताना देखील त्याने सुलतान आजम , जहानजेब बानू आणि दिलेरखान यांची मानखंडना केल्यामुळे दरबारातील मोठमोठे अमीरउमराव हे अतिशय काळजीपूर्वक वागतात . (**एफ्. आर्. सुरत, ९१**)

यानंतर २ वर्षांनी पुन्हा अशाच तऱ्हेच्या वावड्या पसरल्या . १८ जुलै १६८५ रोजी सुरतेत पुढील नोंद केलेली आढळते : अशी बातमी आहे की सर्व रजपूत राजेरजवाडे अकबराला मदत करण्यासाठी एकत्र झाले असून अनेक उमरावांनी त्यांना पाठिंबा दिला आहे . बादशहा हा अतिशय वृद्ध झाला असून त्याला मृत्यू आल्यास एकच गोंधळ माजेल (**एफ्. आर्. सुरत**, ९२)

वरील हकिकत इंग्रज व्यापारी आणि मनूची (**स्टोरिआ**, भाग २. २५९) यांच्याकडून आपल्याला मिळते . याशिवाय बादशहाचे पर्शियन चरित्रकार पुढील माहिती देतात : भीमसेन सांगतो : बादशहाच्या मनात राजपुत्र आजम याच्याबद्दल संशय निर्माण झाला . त्याने त्याला आणि दिलेरखानाला आपल्याकडे बोलाविले दोघांनी येण्याला विलंब केला . परिणामी दिलेरखान बादशहाच्या क्रोधाला बळी पडला . (१८०) ईश्वरदासाने दिलेली हकीकत यापेक्षा विस्तृत आहे (८७). तो सांगतो की राजपुत्राने मध्यरात्री दिलेरखानाची गाठ घेतली . दोघांची चार तास बोलणी झाली. हेरांनी ही बातमी बादशहाला कळविली तेव्हा त्याने राजपुत्राचे अधिकार काढून घेतले आणि सर्व अधिकाऱ्यांना परत बोलाविले . राजपुत्राने संतापून आपल्या सर्व अधिकारांचा त्याग केला आणि स्वतःला कोंडून घेतले . बादशहाने स्वतः त्याची गाठ घेतली आणि त्याची समजूत घातली. बादशहाच्या रागाला बळी पडू नये म्हणून दिलेरखानाने विष घेऊन आत्महत्या केली . (अधिक माहितीसाठी पाहा , **एम्. ए., २३०, २३४, २३७, २३९**)

बादशहा शहाआलम याच्यावर रागावण्यास काही गोष्टी कारणीभूत झाल्या आणि त्या म्हणजे शहाआलमने अकबराबाबत दाखविलेली दयाळू वृत्ती आणि लढाईमध्ये अकबराला ठार मारण्याची अथवा त्याला जिवंत पकडून बादशहाच्या स्वाधीन करण्याची त्याने दाखविलेली अनिच्छा.]

[१६८२–१६८३ मधील मोगल हालचालींचे वर्तमान पुढे दिले आहे :

औरंगजेब व संभाजी यांच्या एकमेकांशी झगडण्याच्या तयारीबद्दल पुष्कळ बातम्या पसरत होत्या . परंतु पावसाळा संपेपर्यंत औरंगजेबाचे सैन्य बाहेर पडणे शक्य नव्हते व संभाजीने तर गनिमीकाव्याची शक्यता नसेल तर आपण होऊन आपली सेना उघड्या रणांगणात न घालण्याची विशेष खबरदारी बाळगली होती. अर्थात औरंगजेबालाच आगळीक करणे जरूर होते. त्याप्रमाणे इ. स. १६८१-२ चा कटू अनुभव जमेस धरून त्याने आपले सरदार नवंबरात रवाना केले . प्रथम "नवंबरात रणमस्तखान येऊन कल्याणी बैसले . त्यावर रुपाजी भोसले व केसोपंत व निळोपंत पेशवे रवाना केले," अशी शकावलीत नोंद आहे. धरणगावच्या १२ नवंबरच्या पत्रातील मजकूर या नोंदीला दुजोरा देतो . तो मजकूर : "पादशाहा अद्याप औरंगाबादेतच आहे. बहादुरखान आणि रणमस्तखान कोकणात रवाना झाले ...." (**धरणगाव टू सुरत** , १२–११–१६८२, **सुरत**, खंड १०८ , पान २०३; **ऑर्म**, खंड ११७–३, पान १२०; **एफ्, आर्.**) परंतु मुंबईची २८ नवंबरची बातमी अशी होती की , "..मोगली सरदार रणमस्तखान आपल्या सैन्यासह कल्याण-भिवंडीजवळ ठाण मांडून बसला आहे...." (**बॉम्बे टू सुरत**, २८–११–१६८२, **बॉम्बे**, खंड ९, पान ३७–८; **ऑर्म**, खंड ११७–१, पान ३–६; **एफ्. आर्.**) यानंतरच्या २१ व २४ डिसेंबर १६८२ च्या पत्रातही "रणमस्तखान कल्याणभिवंडीसच असल्याचा" (**बॉम्बे टू सुरत** , २१–१२–१६८२, **बॉम्बे**. खंड ९, पान ४२; **ऑर्म**, खंड, ११७–१, पान १४ **आणि बॉम्बे टू कॅप्टन गॅरी** , २४–१२–१६८२, **बॉम्बे**, खंड ९, पान ४३; **ऑर्म**, खंड ११७–१ पान १६; **एफ्. आर्.**) उल्लेख आहे. परंतु मोगली दरबारी नोंदीप्रमाणे "२८ सप्टेंबरलाच शहाजादे मोहम्मद मोअज्जुद्दीन यास ८ हजारी , ६ हजार स्वाराची जादा मनसब देऊन व रणमस्तखान , दाऊदखान व गझनफरखान यास बरोबर देऊन बागियांना सजा देण्यासाठी अहमदनगराहून रवाना केले (**औनामा**, खंड ११ , पृ. १२५; **एम्. आय्, ए.** पान १०२) असे आहे. यावरून रणमस्तखान फक्त कल्याणभिवंडीस आला आणि शहा आजम व इतर सरदार दक्षिणेकडे गेले आणि इ. स. १६८३ चे वर्ष चालू झाले.

इ. स. १६८३ तील मोगली हालचालींची पहिली नोंद शकावलीत आली आहे ती : "जानेवारी-फेब्रुवारी (माघ मास) महिन्यात सुलतान अजमशाहा कोल्हापूरापावेतो धावला. त्यास हंबीररायाने फिरवून लाविले ." मागे मासिरातील उल्लेखाप्रमाणे शहा अजम औरंगाबादेहून सप्टेंबर २८ (१६८२) ला निघाला तो कोल्हापूरापर्यंत यावयास ३ –४ महिने लागले. त्याच्याबरोबर निघालेला रणमस्तखान नवंबरच्या अखेर कल्याणभिवंडीस येऊन पोहोचला होता व खानबहादुरखानाला अकबराचा रस्ता रोखून धरण्यासाठी पादशाहाचे हुकूमावरून बंदरास जाऊन बसावे लागले होते . याबद्दल चर्चा इतरत्र आलीच आहे . पुढे शकावलीप्रमाणे अजमला फेब्रुवारीचे सुरुवातीस हंबीररावाने कोल्हापुरावरून माघारा लावला . परंतु अजम विजापूराकडे जावयास निघाला . "मार्च-एप्रिलात रुहुल्लाहखान कोलवणातून उतरून रणमस्तखान घाटावरी घेऊन गेला . येते वेळेस रूपाजी भोसले याणी तिटोळियाजवळ लढाई केली . पदमसिंग रजपूत घेतला . युद्धप्रसंग होऊन पदमसिंग व कित्येक थोर थोर लोक मारिले ," अशी शकावलीतील दुसरी नोंद आहे . परंतु मोगली दरबारी नोंदीप्रमाणे : "रुहुल्लाहखान मेला कोकणच्या मोहिमेवरून परत गेला , त्यास मानपान दिला." तसाच "रणमस्तखानही परत गेल्यानंतर त्याला ५ ऑगस्टला बहादुरखान असा किताब मिळाला ." (**औनामा**, खंड ११ पृ. १२६; **एम् आय् ए** पान १४२) यांच्या ह्या आदिअंताच्या नोंदीवरून खरी वस्तुस्थिती समजून येत नाही . रणमस्तखानास दाणागोटा न मिळू देण्याची खटपट संभाजीच्या लोकांनी केली होती . मुंबईकर ८ जानेवारी १६८३ ला लिहितात की , "मोगली आरमारास आपण आपल्या बंदरांत येऊ दिल्यास संभाजीराजा त्याबद्दल तीव्र नापसंती दाखवील व रागवेलही . त्याने याच कारणावरून पोर्तुगीजांना शत्रू लेखून त्यांचे कित्येक वाडे जाळले . कारण

अनुक्रमणिका

त्यांनी नबाब रणमस्तखानाचे हाताखालील मोगली सैन्यास ठाणा ते कल्याण दाणागोटा नेऊन देण्यास परवानगी दिली होती . त्यातून हल्ली तर संभाजीची १०० गलबते खाडीत आपले समोर नांगरून उभी आहेत ....” (**बॉम्बे टू लंडन**, ८–१–१६८३; **ओ. सी. खंड** ४२, नं. ४८८९; **होम मिस.**, **खंड** ५१, पान ३११; **एफ्. आर्.**) रुहुल्लाहखान मार्चपूर्वी एकदोन महिने कल्याणास आलेला असावा . असे सुरतकरांच्या २७ मार्चच्या पत्रावरून दिसते: “...रणमस्तखान व इतर बादशाही अमलदारांकडून पत्रे आली ....त्यांतील एकात रणमस्तखानाला फारसा बोभाटा होऊ न देता पाच हजार रुपये देण्याबद्दल विचारणा केली ...तसे रुहुल्लाहखानाला पेशकश देण्याबाबतचा मजकूर ...रुहुल्लाहखान फार मोठा मानाचा अधिकारी ...” (**सुरत टू बॉम्बे**, २७–३–१६८३; **सुरत**, खंड ९१, पान ८४-७; **ऑर्म**, खंड ११७–४, पान १५३–५५; **एफ्. आर.**) पोर्तुगीजांच्या अहवालातील उल्लेखाप्रमाणे रुहुल्लाहखान १५ जानेवारीला कल्याणला आला असे आहे . “१५ जानेवारीला...त्याच वेळी मोगली सैन्य कल्याणास (संभाजीचे शहर) पोहोचले व थोड्याच प्रतिकारास तोंड द्यावे लागून ते शहर त्यांनी घेतले ...” (**कलेक्शन ऑफ मिस्. इन दि पब्लि. लायब्ररी**, खंड ब, १६–७, काल. ७०–८१ किंवा **पोर्तुगीज** रेकॉर्ड, नोटिसियास इंडिया, खंड १, भाग २, पान ३६६–४४७; **एफ्. आर्.**) परंतु दाणागोटा पोर्तुगीजांनी बंद केला होता; त्यामुळे कल्याणची मोगल सेना पुन्हा परत गेली . ही बातमी देताना सुरतकर १० एप्रिलच्या पत्रात लिहितात “तुम्ही रुहुल्लाहखानाचा इतका त्वरेने कल्याण-भिवंडीहून परत जाण्याचा येत कळविलात...” (**सुरत टू बॉम्बे**, १०–४–१६८३, **सुरत**, खंड ९१; पान ९०, **ऑर्म**, खंड ११७–४, पान १५५; **एफ्. आर्.**) परंतु हा आकस्मिक येत होण्याचे कारण पोर्तुगीज आपल्या अहवालात देतात की , “२ एप्रिल १६८३ रोजी ...जे मोगली सैन्य कल्याणला बंदोबस्ताने तळ देऊन बसले होते व ज्यांनी कल्याण जाळून जमीनदोस्त केले होते त्या सैन्यावर संभाजीने पिछाडीवरून हल्ला चढविला व बरेच लोक मारले व पुष्कळ घोडी पाडाव करून घेतली .” (**पी. आर्. एन्.** भाग २, पाने ३३६–४४७) वरील माहितीवरून असे दिसते की, १६८२ च्या नवंबरात रणमस्तखान कल्याणास आला . परंतु त्यावर रुपाजी भोसले , केसोपंत व निळोपंत पेशवे चालून गेले व त्याचा ठाणा खाडीतून येणारा दाणागोटा बंद केला गेल्यामुळे त्याला घाटावर निघोन जावे लागले . पुढे रुहुल्लाहखान १५ जानेवारी १६८३ स मदतीस आला . त्याने रणमस्तखानाला बरोबर आणून कल्याणचा किल्ला जाळून टाकला . रणमस्तखान घाटावरून येत असता रुपाजी भोसले यांनी टिटवाळ्याजवळ लढाई दिली. पदमसिंगाचे पाठीवर जाऊन युद्ध करून त्यास व आणखी कित्येक थोर सरदारांस मारले म्हणून २ एप्रिल १६८३ ला मोगली सैन्य कल्याणवरून उठून परत बादशाहाच्या छावणीत मे पूर्वीच जाऊन पोहोचले . या कल्याणभिवंडीच्या लढाईचे प्रसंगी खास संभाजी राजेही जाऊन येत असत . एका प्रसंगाचे वर्णन मुंबईचा वकील हेन्री स्मिथ याने केले आहे . तो लिहितो : “...संभाजी राजे याजकडून मी आपलेबरोबर कागद का आणले नाहीत याचे ...कारण असे की, राजे त्याच रात्री रायरीला गेले आणि तेथून लगेच पालीजवळील पाच्छापुरावरून कल्याणजवळ मढगडावर म्हणजे येथून माझ्या पाचसहा दिवसांच्या डोंगरातील प्रवासाच्या टप्प्यावर जाणार होते . शिवाय मजजवळ खर्चास एक पैसाही शिल्लक नव्हता व तसे केले असते तर त्यांच्या प्रत्यक्ष हुकुमाविरुद्ध तेथे राहिल्याने राजेही रागावले असते . (**हेन्री स्मिथ टू बॉम्बे**, २७–१०–१६८३; **ओ. सी. खंड** ४३, क्र. ४९८७; **एफ्. आर्.**)]

(७) मराठ्यांचे आरमार आणि सिद्द्यांबरोबर त्यांची झालेली युद्धे, (१६८०–१६८२)

इंग्लिश आणि संभाजी यांच्यामध्यें सख्याची भावना निर्माण होणे अशक्य होते . कारण प्रत्येक वर्षी मे ते ऑक्टोबर या दरम्यानच्या वादळी हवामानात सिद्द्यांचे आरमार आणि कधी कधी सुरतेहून मोगल आरमाराचे काफिले मुंबई बंदरात निवाऱ्यासाठी येत असत . त्याचप्रमाणे मुंबई बेटाच्या माजगाव विभागात सिद्दी ठाण मांडून राही , आणि तेथून मुंबईच्या पूर्वेकडील मराठ्यांच्या ताब्यातील संपन्न मुलखात वारंवार छापे घालून तो मुलूख उद्ध्वस्त करीत असे . संभाजी कधी इंग्रजांना धमकावणी देई तर कधी इंग्रजांनी आपल्या बंदरातून सिद्द्यांना आश्रय न दिल्यास त्यांच्याबरोबर मैत्रीचा हात पुढे करी . परंतु सुरतेचा प्रेसिडेंट आणि कौन्सिल यांनी मुंबईच्या अधिकाऱ्यांना पुढीलप्रमाणे आदेश दिला : “तुम्ही काय वाटेल तो उपाय योजून त्याच्याबरोबर (संभाजी) त्यांनाही (पोर्तुगीज) न दुखविण्याचे धोरण ठेवा . ज्याप्रमाणे आपण कोणत्याही परिस्थितीत संभाजी राजाजवळ भांडण करणार नाही , त्याचप्रमाणे सद्यःपरिस्थितीत काय वाटेल ते झाले तरी सिद्द्यांबरोबर मतभेद होऊ देणे हे शहाणपणाचे ठरणार नाही . कारण आताची वेळ ही त्या दृष्टीने अतिशय अयोग्य अशी आहे”

मराठ्यांची गलबते ही आकार आणि शस्त्रसामग्री या बाबतीत तुलना करता सिद्द्यांच्या गलबतांपेक्षा कमी दर्जाची होती . पावसाळ्याच्या दिवसात ही गलबते नागोठण्याची खाडी आणि खांदेरी बंदर यांच्या आश्रयाला जात . पावसाळ्यामध्ये घनघोर लढाईसाठी बाहेर पडण्याचे धाडस त्यांच्याने होत नसे . परंतु अधूनमधून दोन्ही बाजूंच्या गलबतात चकमकी उडत आणि त्यात सिद्द्यांची नेहमी सरशी होई . ह्या बाजूचा सागरी विभाग मराठ्यांच्या व्यापारी गलबतांना पुष्कळदा बंद होत असे.

७ डिसेंबर १६८१ रोजी सिद्द्यांनी पनवेलच्या दक्षिणेस १० मैलांवर पाताळगंगा नदीच्या काठावरील

आपटा हे गाव जाळून टाकले (यापूर्वी १६७३ मध्ये त्यांनी हे गाव लुटले होते). "सिद्द्यांनी अशा तऱ्हेने चिथावल्यामुळे संभाजी चिडला . त्याने सुलतान अकबर याला बरोबर घेऊन रायगडचा किल्ला सोडला आणि २० हजार सैनिक व प्रचंड तोफखाना घेऊन तो १८ डिसेंबर रोजी दंडा येथे पोहोचला . त्यानंतर त्याने जंजिऱ्याच्या आवतीभोवती असलेल्या सर्व टेकड्यांवरून जवळजवळ ३० दिवसपर्यंत जंजिरा बेटावर तोफांचा अविरत भडिमार केला ." परंतु ३० जानेवारीच्या सुमारास मोगलांनी उत्तर कोकणावर केलेली स्वारी आणि त्यांनी केलेला कल्याणचा पाडाव यामुळे त्याला रायगडकडे झपाट्याने माघार घेणे भाग पडले.

जुलै १६८२ मध्ये मराठ्यांनी काही गलबते एकत्र जमविली आणि जंजिऱ्यावर हल्ला चढविला . परंतु जंजिऱ्याच्या खडकाळ आणि सतत भयानक वादळांनी ग्रस्त असलेल्या किनाऱ्यावर त्यांना पाय रोवता आला नाही . त्यांना माघार घ्यावी लागली आणि त्यामध्ये त्यांचे भयंकर नुकसान झाले . मराठ्यांच्या चाकरीत सिद्दी मिश्री हा होता . त्याच्या हाताखाली ३० गलिव्हर जातीची गलबते होती . सिद्द्यांचे आरमार सिद्दी कासिम याच्या हाताखाली होते . या काफिल्यात १६ जहाजे होती आणि सिद्द्यांचे उत्कृष्ट नौसैनिक त्यांवर होते. या काफिल्याबरोबर सिद्दी मिश्रि याने कुलाबा पॉइंटच्या दक्षिणेस ८ मैलांवर कलगाव येथे लढा दिला. परंतु थोडाशा चकमकीनंतर त्याचा पराभव झाला . त्याची इतर जहाजे पळून गेली . खुद्द त्याला प्राणांतिक जखम झाली . त्याला कैद करण्यात आले व तो आणि त्याची ७ गलबते यांना मुंबईस नेण्यात आले.

(८) संभाजीचे पोर्तुगीजांबरोबर युद्ध, १६८३

वरील घटनेमुळे पोर्तुगीजांवर संभाजीच्या क्रोधाचा मारा पडला . पोर्तुगीजांनी कारवारच्या दक्षिणेस असलेले अंजदीव बेट ताब्यात घेऊन आणि त्याला तटबंदी करून अगोदरच कळ काढली होती . संभाजीचा उद्देश सिद्द्यांच्या जंजिरा येथील मजबूत तळाला शह देण्यासाठी अंजदीव येथे नाविक तळ बांधण्याचा होता (एप्रिल १६८२). यात आणखी भर म्हणून डिसेंबर १६८२ मध्ये गोव्याच्या पोर्तुगीज व्हॉईसरायने मोगल जहाजांना पोतुर्गीजांच्या ठाण्याच्या किल्ल्यावरून कल्याणच्या खाडीपर्यंत जाऊ दिलेले होते . त्यावेळी मोगल अधिकारी रणमस्तखान याच्या हाताखाली मोगल सैन्य कल्याण प्रांतात लुटालूट करीत होते . त्याला रसद घेऊन ही जहाजे चालली होती . त्याचप्रमाणे पोर्तुगीज व्हॉईसरायने पोतुगीजांच्या उत्तर दमण प्रांतातून मराठ्यांच्या उत्तर कोकणातील जिल्ह्याकडे जाण्यासाठी मोगल सैन्याला वाट दिली होती . पोर्तुगीजांनी तटस्थतेचा अशा तऱ्हेने अनेकदा भंग केल्याने त्यांच्यावर सूड उगविण्याची संभाजीने प्रतिज्ञा केली होती . ५ एप्रिल १६८३ रोजी संभाजीने त्यांच्यावरील आपल्या हल्ल्याला सुरुवात केली . १ हजार घोडेस्वार आणि २ हजार स्वार घेऊन त्याने तारापूर या पोर्तुगीजांच्या ताब्यातील शहरावर हल्ला केला . तारापूर शहर आणि त्याचप्रमाणे दमणपासून वसईपर्यंतची सर्व शहरे त्याने जाळून टाकली . ३१ जुलै रोजी त्याच्या पेशव्याने ६ हजार पायदळ आणि २ हजार घोडेस्वार घेऊन चौलला वेढा दिला . ८ ऑगस्ट रोजी सकाळी उजाडता उजाडता मराठ्यांनी शहरावर हल्ला केला . हा हल्ला परतवून लावण्यात आला , आणि त्यात मराठ्यांचे प्रचंड नुकसान करण्यात आले . २९ ऑगस्टनंतरच्या मध्यरात्री पोर्तुगीज व्हॉईसरायने गोव्यातील हिंदी रहिवाशांच्या एका मोठ्या तुकडीला नदीपलीकडे असलेल्या सावंतवाडीच्या मुलखात रवाना केले. संभाजीच्या ताब्यातील खेडी लुटण्याचा आणि जाळून टाकण्याचा सर्रास परवाना त्याने त्यांना दिला. परंतु मराठे जी मुलखगिरी करत त्याची नक्कल करण्याचा हा प्रयत्न अयशस्वी ठरला . चौलचा वेढा अनेक महिनेपर्यंत चालला होता. परंतु इतक्या वेढ्यानंतरही चौल हे अजिंक्यच राहिले.

अनुक्रमणिका

पोर्तुगीजांचा फोंड्याला वेढा आणि अपयशी माघार

गोव्याच्या व्हॉईसरायने या सुमारास फोंड्याला वेढा देऊन मराठ्यांचे लक्ष दुसरीकडे वेधण्याची योजना आखली. ८०० गोरे सैनिक, ८ हजार कानडी फौज आणि ५ भारी तोफा इतक्या सामग्रीसह तो २२ ऑक्टोबर रोजी फोंड्यानजीक येऊन पोहोचला. त्याने ताबडतोब किल्ल्यावर तोफांचा भडिमार करण्यास सुरुवात केली.

किल्ल्याच्या आतील भिंतीला जे भगदाड पडले होते त्यामधून किल्ल्यात शिरण्याचा ३० ऑक्टोबर हा दिवस मुक्रर करण्यात आला. परंतु नेमक्या त्याच दिवशी संभाजीकडून मदत घेऊन सैन्याची एक तुकडी आली. या तुकडीने पोर्तुगीज सैन्याला पूर्णपणे वेढले. परिणामी पोर्तुगीज सैन्याचा धीर सुटला आणि त्यांनी वेढा उठविण्याचे ठरविले. दुसऱ्या दिवशी त्यांनी माघार घेण्याला सुरुवात केली. एक नोव्हेंबर रोजी ते इर्बता येथे पोहोचले. गोव्याला परत जाण्यासाठी या ठिकाणाहून त्यांची रवानगी होणार होती.

इर्बताहून पोर्तुगीजांनी जी माघार घेतली त्यामध्ये त्यांचे अतिशय नुकसान झाले. मराठ्यांच्या घोडदळाने गोवा येथील पायदळावर मोठ्या निर्धाराने हल्ला चढविला.

"गोव्यामधील तद्देशीय सैनिकांनी आपल्या बंदुका टाकून दिल्या आणि त्यांनी पळ काढला. अखेर बहुतेक सर्व पोर्तुगीज सैनिकांनी त्यांचीच री ओढली. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. एतद्देशीय काळ्या सैनिकांनी पोर्तुगीज सैनिकांना पायाखाली तुडविले. आमचे पुष्कळ सैनिक तुडविले गेले. आमची सर्व माणसे सैरावैरा पळत सुटली. प्रत्येकाने आपापला जीव वाचविण्याचा प्रयत्न केला. पोर्तुगीजांच्या पायदळी तुकडीपैकी एक कंपनी भरेल इतक्या संख्येने पोर्तुगीज खलाशी ठार मारले गेले. मृत आणि जखमी झालेल्यांची संख्या जवळ जवळ २०० एवढी भरली."

(९) संभाजी गोव्यावर स्वारी करतो

फोंडा किल्ल्याच्या तटबंदीपासून संभाजीने ७ हजार घोडदळ आणि १५ हजार पायदळ घेऊन गोवा शहरावर चाल केली. १४ नोव्हेंबरच्या रात्री १० वाजता ४० मराठे सैनिक गोव्याच्या ईशान्येस २ मैलांवर असलेल्या सॅन्टो एस्टेव्हॉओ या बेटावर शिरले. संपूर्णपणे ओहोटी असताना त्यांनी एका खाडीमधून पार होऊन वरील बेटावर प्रवेश मिळविला. नंतर ते डोंगराच्या माथ्यावर असलेल्या किल्ल्याच्या भिंती चढून गेले. थोड्या कालावधीनंतर नदीच्या पलीकडील बाजूस असलेल्या त्यांच्या मुख्य छावणीतून त्यांना ४ हजार सैनिकांची मदत येऊन पोहोचली.

दुसऱ्या दिवशी सकाळी ७ वाजता पोर्तुगीज व्हॉईसराय हा ४०० सैनिक घेऊन सॅन्टो एस्टेव्हॉओ या बेटावर उतरला. त्याने मराठ्यांच्या पायदळावर मोठ्या निकराने हल्ला चढविला. परंतु त्यांना आता ३०० घोडेस्वारांची मदत मिळाली होती. "ते मोठ्या हिरिरीने आमच्या सैनिकांवर तुटून पडले. आमचे सैनिक टेकडीवरून सैरावैरा पळत सुटले. मृत झालेल्यांची संख्या जवळ जवळ १५० पेक्षा अधिक होती आणि उरलेल्या सैनिकांत असा एक देखील सैनिक नव्हता की ज्याला बंदुकीची गोळी, तलवार, अगर दगडांचा मारा यामुळे जखम झाली नव्हती. खुद्द व्हॉईसरायच्या हाताला बंदुकीच्या गोळीने भारी जखम झाली होती.

अनुक्रमणिका

दुपारी २ वाजण्याच्या सुमारास व्हॉईसराय हा जहाजामध्ये चढला . उरलेले जवळ जवळ १५० सैनिक हे नदीच्या प्रवाहात घुसले. बरेच जण चिखलात अडकले आणि काही पोहून नदीपार करून गेले . चिखलात अडकलेले सर्वजण मरण पावले. दुसऱ्या दिवशी (१६ नोव्हेंबर) मराठ्यांनी मोठ्या घाईघाईने वरील बेटाचा त्याग केला"

१ डिसेंबर रोजी १ हजार मराठा घोडेस्वार आणि ३ हजार पायदळी सैनिक गोवा बेटाच्या अनुक्रमे दक्षिणेस आणि उत्तरेस असलेल्या सालसेट्टी आणि बारदेश या जिल्ह्यांत घुसले . हे दोन जिल्हे आणि गोव्याचे बेट यामध्ये फक्त १ खाडी होती. त्या ठिकाणी सापडेल ती वस्तू त्यांनी लुटून फस्त केली, पुरुषांना पकडून कैद केले, स्त्रियांवर अत्याचार केले आणि जवळ जवळ एक महिनाभर त्या प्रदेशात त्यांनी धुमाकूळ घातला. गोव्याच्या प्रदेशात अशा तऱ्हेने दहशतीचे वातावरण निर्माण झालेले असताना गोव्याची सुटका करण्याकरता जणू काही शहाआलम गोव्यावर स्वारी करून आला . त्याने संभाजीच्या ताब्यातील बिचोलीम हे शहर ५ जानेवारी १६८४ रोजी ताब्यात घेतले . यानंतर तीनच दिवसांनी मोगल आरमाराचा एक सामर्थ्यवान काफिला गोव्याच्या बंदरात येऊन पोहोचला . राजपुत्राच्या स्वारीची बातमी कळताच संभाजीने २३ डिसेंबर रोजी रायगडाकडे पळ काढला . पोर्तुगीजांबरोबर शांततेच्या वाटाघाटी करण्यासाठी कवी कलश याला त्याने अकबराबरोबर ठेवले.

पोर्तुगीजांबरोबरील युद्धाचा तात्पुरता शेवट

युद्धाच्या उत्तरेकडील मैदानात म्हणजे दमण जिल्ह्यात पोर्तुगीजांना सपाटून मार खावा लागला . त्यांच्या ताब्यातील अनेक गावे मराठ्यांनी जिंकली आणि जाळून टाकली . मुंबईच्या आग्नेयेस केवळ १० मैलांवर असलेले करंजा हे बेट २२ डिसेंबर रोजी संभाजीने ताब्यात घेतले . पोर्तुगीजांबरोबर तह करण्यासाठी मध्यस्त म्हणून अकबराच्या मदतीला कवी कलश याला आपला पूर्णाधिकारी म्हणून ठेवून संभाजीने जेव्हा उत्तरेकडे घाईघाईने आपल्या राजधानीकडे पळ काढला तेव्हा या दोघांनी मोगलांपासून पळ काढून गोव्याच्या पूर्वेस असलेल्या भीमगडच्या जंगलाचा आश्रय घेतला . तेथून ते फोंडा येथे गेले , आणि पोर्तुगीजांचा वकील मॅन्युएल्. एस्. ड. अल्बुकर्क याजबरोबर तह केला (२० जानेवारी). या तहाच्या अटीप्रमाणे दोघांनी परस्परांचा जिंकून घेतलेला मुलूख आणि लूट ही एकमेकांना परत करावयाची होती आणि यापुढे परस्पर संबंधात तटस्थतेचे धोरण स्वीकारावयाचे होते.

परंतु दोघांमधील हा तह निव्वळ पोकळ होता . मराठ्यांच्या राज्यामध्ये लवकरच पोर्तुगीजांबरोबर दुसऱ्यांदा लढा देण्यासाठी म्हणून जारीने तयारी सुरू झाली होती . १९ सप्टेंबर रोजी पोर्तुगीजांनी करंजा बेटावर हल्ला केला आणि ते जिंकून घेतले . संभाजीच्या कारकिर्दीच्या शेवटपर्यंत मराठे आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये शत्रुत्वाची भावना चालूच राहिली . परंतु या शत्रुत्वाच्या भावनेने कधीही उग्र स्वरूप धारण केले नाही.

(१०) राजपुत्र अकबर याचे बेत आणि मराठ्यांच्या दरबारात त्याच्या पदरी पडलेली निराशा

संभाजी हा मोगलांच्या मुलखात इकडे तिकडे बारीकसारीक लुटारू मोहिमा काढून अगर सिद्दी व पोर्तुगीज यांजबरोबर निष्फळ युद्धामध्ये गुंतवून घेऊन स्वतःच्या शक्तीचा ऱ्हास करून घेत होता . एकाच वेळी अनेक निरर्थक व्यवधानात गुंतल्यामुळे संभाजीला कोणतीही परिणामकारक कारवाई करणे अशक्य

होते. अशा तऱ्हेचे परिस्थितीनुरूप विधान सुरतेच्या इंग्रज फॅक्टरने डिसेंबर १६८३ मध्ये केलेले आपल्याला आढळते.

अकबराच्या मनात एकच विचार होता . तो म्हणजे दिल्लीचे सिंहासन कसे प्राप्त करून घ्यावे हा होय. आपला हा बेत सिद्धीस जाण्याच्या कामी एक उपकरण अशा दृष्टीने तो संभाजीकडे पाहात होता . महाराष्ट्रात त्याने घालविलेला प्रत्येक दिवस म्हणजे त्याच्या मनातील ईप्सित साध्य होण्याच्या कामी तेवढा काळ पुढे ढकलला जाण्यासारखे होते . त्याचप्रमाणे हा प्रत्येक दिवस म्हणजे त्याच्या मनाला होणाऱ्या असंख्यात वेदनांचे प्रतीक असल्यासारखा होता . महाराष्ट्र जर आपण सोडून गेलो तरच सुसंस्कृत जगात आपण जाऊन पडू अशी त्याच्या मनाची धारणा झाली होती.

परंतु वस्तुस्थिती अशी होती की , संभाजीचे हितसंबंध आणि अकबराचे मनोरथ यांच्यामध्ये एकोपा कधीच होण्यासारखा नव्हता . दक्षिणेतील डोंगर आणि जंगली मुलखातील सुरक्षितता सोडून उत्तर हिंदुस्थानच्या लांबरुंद पसरलेल्या मैदानात जाण्याचे संभाजीला काहीच कारण नव्हते . असे केल्याने त्याच्या सैनिकांना नैसर्गिक परिस्थितीचा जो लाभ उठविता येत होता तो आला नसता . त्याच्या मनात असाही विचार आला की हिंदुस्थानवर स्वारी करण्याची अकबराची योजना म्हणजे एखाद्या स्वप्नासारखी आहे. त्याच्याबरोबर जाणे म्हणजे मायदेशाला त्याचे संरक्षण करणाऱ्या सैनिकांपासून वंचित करण्यासारखे आहे, आणि असे करणे म्हणजे आपल्या स्वतःच्या गैरहजेरीत औरंगजेबाला महाराष्ट्र जिंकून घेण्याची संधी दिल्यासारखे नाही काय?

अकबराची महाराष्ट्र सोडून जाण्याची इच्छा, १६८३

अखेर हृदयाला संत्रस्त करणाऱ्या परिस्थितीत अकबराने १८ महिन्यांचा कालावधी काढला . त्याची आशा मावळल्यासारखी झाली . आपल्याला दिलेली वचने पाळली जाण्याचे टाळले जात आहे हे त्याला दिसून आले. या सर्व गोष्टीतून संभाजीचे चारित्र्य आणि त्याचे धोरण यांच्या फोलपणाविषयी त्याची खात्री झाली. संभाजीकडून आपल्याला परिणामकारक मदतीची केव्हाही , अपेक्षा ठेवता येणार नाही या गोष्टीची त्याला जाणीव होऊन तो निराश झाला . म्हणून त्याने महाराष्ट्र सोडून जाण्याचे ठरविले . १६८२ च्या डिसेंबर महिन्यात आपल्या राठोड अनुयायांसह त्याने पाली हे आपले आश्रयाचे ठिकाण सोडले . सावंतवाडीमध्ये बांदा या ठिकाणी तो राहावयास गेला . हे ठिकाण जरी मराठ्यांच्या राज्यात होते तरी ते गोव्याच्या उत्तरेस फक्त २५ मैलांवर आहे . या ठिकाणाहून १६८३ च्या जानेवारी महिन्यात अकबराने गोव्याच्या व्हॉईसरायकडे आपला एक प्रतिनिधी पाठविला. त्याच्याबरोबर आपली हिरेजडित कट्यार त्याने त्याला नजर म्हणून पाठविली . गोवा येथे आपल्याजवळील काही हिरे विकण्याची परवानगी आपल्याला देण्यात यावी, अशी विनवणी करून त्याने व्हॉईसरायजवळ अशी याचना केली की कानराच्या राज्यातील मंगलोर येथे असलेल्या पोर्तुगीज फॅक्टरना आपण मला अरेबिया येथे घेऊन जाण्यासाठी एक जहाज मिळविण्यास मदत करण्यासाठी सांगावे. परंतु बादशहाच्या हुकमावरून मार्च आणि एप्रिल महिन्यात सिद्दी हा आपले आरमार घेऊन राजापूरच्या खाडीत गस्त घालत होता . त्याला असा हुकूम होता की अकबराने जहाजातून गोव्याकडे जाण्याचा प्रयत्न केल्यास त्याला अटकाव करावा.

सप्टेंबर महिन्यात अकबर याने बांद्याहून बिचोलीम येथे आपला मुक्काम हलविला . हे ठिकाण संभाजीच्या मुलखात असून गोव्यापासून १० मैलांपेक्षा कमी अंतरावर होते. संभाजीबद्दल अकबराच्या मनात

विलक्षण घृणा निर्माण झाली होती. अशा तऱ्हेने फसविल्या गेलेल्या या अगतिक मोगल राजपुत्राने अखेर ८ नोव्हेंबरच्या सुमारास एक जहाज विकत घेतले. या जहाजावर इराणला जाण्याच्या उद्देशाने तो वेंगुर्ला येथे चढला. दरम्यान कवी कलश हा अतिशय त्वरेने राजापुराहून वेंगुर्ला येथे आला. त्याने दुर्गादासाला बरोबर घेऊन जहाजावर अकबराची गाठ घेतली. संभाजी तुम्हाला हिंदुस्थानच्या स्वारीत सशस्त्र मदत करण्यास तयार आहे अशी नवीन अभिवचने त्याने संभाजीतर्फे अकबराला दिली आणि पुन्हा जमिनीवर उतरण्यास त्याने अकबराचे मन वळविले. दरम्यान पोर्तुगीज (या ठिकाणी मुळात Luso असा शब्द आहे) आणि मराठे यांच्यामध्ये युद्धाला तोंड लागले. या युद्धात मराठ्यांच्या वतीने अकबराने मध्यस्थाचे काम केले. फेब्रुवारी १६८४ नंतरचे संपूर्ण वर्ष अकबराने रत्नागिरी जिल्ह्यात साखरपे आणि मलकापूर येथे घालविले. कवी कलश याने आपल्याला भेटण्यास यावे आणि पुढे काय करावयाचे त्याबद्दलची बोलणी करावी यासाठी अकबराने त्याला वारंवार बोलाविले. [मराठे-मोगल संघर्षाबद्दल पोर्तुगीज कागदपत्रात मिळणारी माहिती (इ. स. १६८३–१६८४) आणि त्याचप्रमाणे पोर्तुगीज हालचालींची माहिती पुढे दिली आहे :

दि. २ जानेवारी १६८३ ते ५ जानेवारी १६८४ ह्या दरम्यानच्या काळात हिंदुस्थानच्या (गोव्यात) राज्यात जे काय घडले त्याचा अस्सल वृत्तांत –

दि. १५ जानेवारी १६८३ रोजी गोव्याबाहेर उत्तरेकडील आरमार येऊन दाखल झाले. त्या आरमाराचे कप्तान कापितांव भोर मानुपल द सौझपरैरा ह्यांनी बातमी आणली की, मोगलांचे आरमार मुंबई आणि वसई बंदरात येऊन दाखल झाले आहे. हे मोगल आरमार आमच्या वसईच्या पाण्यात शिरले असून दुसऱ्या बाजूने मोगल सैन्याने संभाजीचे कल्याण हे शहर विशेष प्रतिकार न होता घेतले आहे.

दि. ५ फेब्रुवारीस मोगलांचे शिष्टमंडळ आले. त्या शिष्टमंडळातील वकिलाने अशी मागणी आणली होती की, मोगल सैन्याला संभाजीवर हल्ला करण्यासाठी आमच्या मुलखातून वाट देण्यात यावी. तसेच आमच्या राजाने मोगल सम्राटाशी दोस्ती करावी.

दि. १५ फेब्रुवारीस संभाजी एक हजार घोडेस्वार आणि दोन हजार पायदळ घेऊन तारापूर ह्या नावाच्या आमच्या ठाण्यावर चालून आला. ते ठाणे खुले होते, त्यामुळे संभाजीला तें जाळता आले. त्या ठाण्याबरोबरच त्याने दमण आणि वसईनजिकची आणखी काही गावे जाळली. तारापूरच्या ठाण्याचा सेनापती मानुपल ताव्हारिज ह्याने किल्ल्यात माघार घेतली. पण त्याने तेथून शत्रूवर हल्ले चढवून त्याची पुष्कळ हानी केली.

मे महिन्याच्या सुरुवातीला चौल शहराचा सेनापती कापितांव दो फ्रान्सिस्कु द कोश्त ह्याने बाले किल्ल्यावरील तोफखान्याला संभाजीच्या चौल नावाच्या खेड्यावर तोफा डागण्याचा हुकूम केला. तोफांच्या सरबत्तीमुळे त्या खेड्याचा काही भाग उद्ध्वस्त झाला. त्या खेड्यात संघाच्या एका प्रादीलला कैद करण्यात आले होते, म्हणून हा तोफांच्या भडिमार करण्यात आला.

दि. १२ मे ला दो मिगेल द आलमैद ह्याने हुकूम काढला की, साष्टी प्रांतात शस्त्रे हातात धरण्यासारखे जे धडधाकट कानारी (एतद्देशीय) पुरुष असतील त्यांनी मडगाव आणि रासई या दरम्यानच्या एका मैदानात गोळा व्हावे. त्याने त्यांना सक्त ताकीद दिली की, जो कोणी ह्या हुकमाचा भंग करील तो देहांत शिक्षेस पात्र होईल. त्या हुकमाप्रमाणे उपरिनिर्दिष्ट मैदानात लोक गोळा झाले. ते त्या ठिकाणी सतत आठवडाभर रखरखीत उन्हात होते. एके रात्री एक हिंदू त्याची बायको अत्यावस्थ होती म्हणून आपल्या कॅप्टनची परवानगी घेऊन तिला भेटावयास घरी गेला. त्याच रात्री तो छावणीत परतला. त्याच्या गैरहजेरीत ती बातमी दो मिगेल द आलमैद ह्याला कळली असता त्याने त्या हिंदूला कैद करून फासावर लटकविण्याचा हुकूम दिला. ती बातमी छावणीतील लोकांना कळली असता त्यानी पाद्री तेवोतोनियु ह्याला विनंती केली की, त्याने सेनापतीशी त्या दुर्दैवी मनुष्याविषयी रदबदली करावी. परंतु सदरहू पाद्रीने त्या हिंदूचा प्राण वाचविण्याची खटपट तर केली नाहीच, उलट सेनापतीलाच त्याला फाशी देण्याचा त्याने सल्ला दिला. तो सेनापतीच्या भेटीहून परतल्यावर देशी लोकांना धमकी देत म्हणाला की, तुम्ही संघाचे (कॉमपान्हीया डी जीसस) जे वाईट केले आहे त्याचे फळ तुम्हाला भोगणे भाग आहे. ते ऐकताच लोक रागाने बेफाम झाले व त्यांनी सेनापतिविरुद्ध हल्ला करण्याची तयारी केली. लोकांचा तो निर्धार पाहून सेनापती गडबडला व त्यांना शांत करण्यासाठी त्याने पकडलेल्या हिंदूस सोडून दिले. व्हॉइसरॉय : फ्रान्सिस्कु द ताव्होरा ह्यांच्या पहिल्या वर्षाच्या कारकिर्दीत पटकीची भयंकर साथ आली व दुसऱ्या वर्षी मोठे अवर्षण पडले.

दि. २ ऑगस्टला संभाजीच्या सैन्याने चौलच्या किल्ल्याला वेढा घातला. त्या सन्यात दोन हजार घोडेस्वार आणि सहा हजार पायदळ होते. ह्या सैन्यापासून शहराला गंभीर स्वरूपाचा धोका निर्माण झाला. शहर पडण्याची परिस्थिती निर्माण झाली. शत्रुसैन्याने तटास शिड्या लावून वर चढण्याचा प्रयत्न केला. पण तो प्रयत्न हाणून पाडण्यात आला. शत्रूने तटापासून माघार घेताच किल्ल्यातून त्याच्यावर तोफा डागण्याचा हुकूम झाला परंतु तोफा डागताक्षणी त्यांच्या गाड्याची चाके मोडून त्या खाली जमिनीवर पडल्या. गोळ्यांनीही नेम साधला नाही. दारू कोळशाची होती. काही तोफा तर पंधरा वर्षाच्या मागे मून द मेलुव्हे कॅप्टन होते तेव्हा भरलेल्या होत्या. उत्तरेकडील सर्व ठाण्यांत दारुगोळ्याची व्यवस्था पाद्रीच्या हातात असते. त्यांच्या परवानगीशिवाय केवळ गोलंदाजांनाच नव्हे, तर खुद्द गव्हर्नरलाही तो डागता येत नाही. दारू अशी जपून वापरण्याचे कारण की, दारू जितकी शिल्लक राहते तितका ती विकत घेण्याचा पैसा पाद्रीच्या खिशात जातो.

अनुक्रमणिका

तोफांच्या गाड्या नादुरुस्त झाल्याची बातमी गव्हर्नरने शहराच्या दारुगोळ्याचे कारभारी आणि पागेच्या पाठशाळेचे रेइतोर (प्राचार्य) पाद्री मिगेल गोमिश ह्यांना कळविली. त्यांनी उत्तर केले की, तोफांच्या गाड्या शिल्लक नाहीत, आणि नवीन गाड्या बनविण्यासाठी लागणारे लाकूड हाताशी नाही. तीच कथा दारू आणि गोळे ह्यांचीही होती . शेवटी दारुगोळा विकत आणण्यासाठी शहरातील दरिद्री नागरिकांकडून तीन हजार क्रुझादुश् (Cruzados) गोळा करून ते वसई येथे पाठवून देण्यात आले . त्याचबरोबर उत्तरेकडील प्रदेशाचा सेनापती दो मानुएल द लोबो ह्याच्याकडेही मदतीची याचना करण्यात आली. त्याने ताबडतोब तोफांच्या गाड्या, दारुगोळा आणि शंभर माणसे पाठवून दिली.

चौल येथील सैन्याच्या पाद्रीपाशी पाच हजार क्रुझादुश् आहेत , त्या रकमेचा उपयोग दारुगोळा खरेदी करण्यासाठी करता येईल . वसई येथे चौदा हजार आणि दमण येथे दहा हजार क्रुझादुश् आहेत . लढाई असल्यासच हे सर्व पैसे खर्च करण्यात येतात . काहीच शिल्लक उरत नाही . परंतु सर्वसामान्यतः ह्या भागात क्वचितच लढाया होतात.

दि. २७ ऑगस्टला व्हॉइसरायांनी सर्व धर्माच्या लोकांना कळविले की , संभाजी एक मोठी फौज घेऊन गोवा शहरावर चाल करून येत आहे तरी त्यांनी शहराच्या रक्षणासाठी आणि रक्षण करणाऱ्यांना मदत करण्यासाठी जय्यत तयार राहावे.

दि. ७ सप्टेंबरला व्हॉइसरायनी हुकूम काढली की , सर्व नागरिकांनी विशेष करून साष्टी आणि बारदेशमधील लोकांनी सात आणि आठ तारखेच्या रात्री संभाजीच्या प्रदेशात शिरून खेड्यांची लुटालूट आणि जाळपोळ करावी.

दि. २७ आक्टोबरला कौंट व्हॉइसराय हे शहरातील सुमारे ४० घोडेस्वार घेऊन सा लौरेंसुला रवाना झाले व तिथून त्यांनी फोंड्यास प्रयाण केले. दि. २८ ऑक्टोबरला त्यांनी आपल्या सैन्याची पाहणी केली . ते सैन्य पुढीलप्रमाणे होते. ६०० पगारी शिपाई, त्यातील पुष्कळशी पोरेच होती. जवळ जवळ ३०० नौसैनिक आणि ३०० इतर सैनिक . त्यातील काही घोडेस्वार तर इतर पायदळ होते . हे सर्व सैन्य एकूण १२० होते . त्यांना साष्टीतील २ ,००० कानारी (देशी) सैन्य येऊन मिळाले . त्यातील १ ,५०० बंदुकधारी तर ५०० इतर होते . साष्टीच्या सैन्याला पगार दिला नाही . पगारच नव्हे, तर बंदुका आणि दारुगोळादेखील त्यांना स्वतःच्या पैशातून विकत घ्यावा लागला . ह्या सैन्याने फोंड्याच्या किल्ल्यास वेढा घातला . सतत पाच दिवसपर्यंत अविरत भडिमार करून किल्ला पडला नाही, ते पाहून व्हॉइसराय चिंतातुर झाले.

दि. ९ नवंबरला शत्रूला ९०० घोडेस्वारांची कुमक आली . शत्रूचे पायदळही पुष्कळ होते . त्याच दिवशी व्हॉइसरायनी आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यांशी विचारविनिमय करून वेढा उठविण्याचा निर्णय घेतला . दि. १० नवंबरला आमच्या सैन्याने माघार घेण्यास सुरुवात केली. कौट व्हॉइसराय चार दिवस पाद्रीच्या निवासस्थानी होते . तेथे त्यांनी कुणाचीच भेट घेतली नाही . दुसरी गोष्ट अशी की , पाद्रींना प्रथम कळविल्याशिवाय ते व्हॉइसरायची भेट घेऊन देत नसत. व्हॉइसराय त्यांच्या नुसते मुठीत आहेत असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही . त्यामुळे ते कुणाचाही छळ करतात आणि कुणालाही काढतात . हे पाद्री हाताला लागेल ती वस्तू लंपास करतात ; व धान्य आणि इतर वस्तूंचा राजरोस व्यापार करतात. दि. २४ नवंबरला रात्री १० वाजता संभाजीचे ४० काळे सैनिक सां इश्तेव्हांव बेटावर ओहोटीच्या वेळी जमिनीवरून उतरले . त्या बाजूला टेहळणी बिलकुल नव्हती . त्यामुळे त्यांना टेकडीवर चढून खिंडीच्या रक्षणासाठी उभारलेल्या तटबंदीतच उतरणे शक्य झाले . त्यांनी म्हाताऱ्या कॅप्टनला आणि काही सैनिकांना कंठस्नान घातले. किल्लेदारही त्या झटापटीत ठार झाला.

दि. २५ नवंबर १६८३ रोजी सकाळी सात ते आठ ह्या दरम्यान व्हॉइसराय ४०० सैनिकांसह सा इश्तेव्हांव बेटावर उतरले . त्यांनी किल्ल्यावर हल्ला करण्यासाठी सैनिकांना जय्यत तयार राहण्याचा हुकूम दिला. सैनिक घेऊन ते किल्ल्याच्या रोखाने निघाले. ज्या टेकडीवर किल्ला आहे त्या टेकडीवर व्हॉइसराय चढले तेव्हा त्यांच्याबरोबर २३० लोक होते . टेकडीवर शत्रूचे ९०० बंदुकधारी शिपाई होते . व्हॉइसरायने त्यांच्यावर इतक्या त्वेषाने हल्ला केला की , त्या हल्ल्यासमोर निभाव न लागल्याने शत्रूने पळ काढण्यास सुरुवात केली . पण त्याच वेळी त्यांना ३०० घोडेस्वारांची कुमक आली ते पाहताच त्यांना चेव आला व त्यांनी आमच्या सैन्यावर प्रतिहल्ला चढविला . तो प्रतिहल्ला भयंकर तीव्र असाच होता . शत्रूचा जोर झालेला पाहून व्हॉइसरायनी असा विचार केला की , आता लढाई चालू ठेवणे शहाणपणाचे नाही . म्हणून त्यांनी आपल्या तुकडीला माघार घेण्याचा हुकूम केला. तो हुकूम कानी पडताच आमच्या सैन्याने खाली सैरावैरा पळ काढण्यास सुरुवात केली. आपल्या सैन्याने शत्रूला पाठ दाखवून अशा रीतीने पळ काढलेला पाहून व्हॉइसरायही सेनापती .....ह्यांच्यासह माघारी परतले . त्याच दुपारी ते सेनापती ..... ह्यांच्यासह सरकारी नौकेत बसले.

दुसऱ्या दिवशी शत्रूने सा इश्तेव्हांव येथील चर्च जाळून टाकले . दि. ११ डिसेंबरला शत्रूचे १६ हजार घोडदळ आणि ३ हजार पायदळ साष्टीत शिरले. त्यांनी सगळीकडे लुटालुटीचे सत्र सुरु केले. अन्नधान्य, गुरेढोरे, थोडक्यात हातास लागेल ते त्यांनी लुटले.

दि. २५ डिसेंबरला मडगावच्या इगर्जीचे (चर्च) रक्षण करणारे लोक शत्रूला शरण गेले .... असोळणे हे गाव संघाच्या पाद्रीचे आहे . त्या गावचे वार्षिक उत्पन्न १२ हजार क्रुझादुश् आहे. साष्टीतील सर्व इगर्जीत अन्नसामग्री आणि दारुगोळा भरपूर होता . शत्रूने त्या प्रदेशात शिरकाव केला तर त्या इगर्जी लोकांनी लढविण्याचा निर्धार केला होता . इगर्जीचे पाद्रीही लोकांच्या खांद्यास खांदा भिडवून लढणार होते . परंतु पाद्रींनी पळ काढताच लोकांची पळापळ सुरू झाली . सर्व खेडी ओस पडल्याने शत्रूला कोठेच विरोध झाला नाही . फक्त सांकवाळ येथील इगर्जीने मात्र शत्रूशी मोठ्या नेटाने तोंड दिले . त्या इगर्जीचा पाद्री फांसिस्कु द कुन्य हा त्याच गावचा होता म्हणून त्या गावचे लोक त्याच्या हाताखाली लढले . अशा रीतीने मडगावपेक्षाही इगर्जी शत्रूला घेणे जरा कठीण गेली.

बाणावली ह्या खेड्यातला ज्यूलियु मोनिझ ह्या नावाचा ब्राह्मण शत्रूचे आगमन होताच काही लोकांना घेऊन आपल्या घरात जाऊन बसला व त्याने शत्रूशी चांगलाच मुकाबला केला . शत्रूला त्याचा प्रतिकार मुळीच मोडून काढता आला नाही . शत्रू ज्या दिवशी साष्टीत शिरला त्याच

अनुक्रमणिका

दिवशी तो बार्देशमध्येही शिरला . तिकडे तीन किल्ले आहेत . ह्या तीनही किल्ल्यांत पोर्तुगीज सैनिकांच्या तीन कंपन्या होत्या . तिथल्या तोफाही चांगल्या स्थितीत होत्या . शत्रूचे आगमन होताच लोकांची पळापळ सुरू झाली . पोर्तुगीज सैनिकांकडून शत्रूला प्रतिकार झाला नाही . बार्देशच्या गव्हर्नरचे आणि सेनापतीचे नाव क्रिश्तोव्हांव द सौझ कौतिन्यु होते. शत्रूला ज्या घरातून आणि इगर्जीतून प्रतिकार झाला तिकडे तो गेला नाही. मात्र ज्या खेड्यात त्याला विरोध झाला नाही त्या खेड्यात शिरून त्याने मनसोक्त लुटालूट केली . त्याने सर्व चीजवस्तू तर लुटलीच परंतु लोकांची गुरेढोरे देखील नेली . तिविचा किल्ला सतत दहा दिवसपर्यंत लढविण्यात आला . परंतु किल्ल्यात पाण्याची टंचाई झाल्यामुळे तो अखेर शत्रूच्या हवाली करावा लागला . उरलेलेही दोन्ही किल्ले पडले . शत्रूचे काळे सैनिक वचनाला जागले नाहीत . त्यांनी शरण येणाऱ्या पोर्तुगीज सैनिकांना कोणतीच मानहानी सहन करावी लागणार नाही असे वचन दिले होते. त्या वचनाप्रमाणे पोर्तुगीजांनी शरणागती पत्करल्यावर त्या काळ्या सैनिकांनी त्यांचे हात पाठीमागे बांधून त्यांना पुष्कळ मारहाण केली. तिन्ही किल्ल्यांत एकूण १५० पोर्तुगीज शिपाई होते. त्या सर्वांना शत्रूने कैद केले.

शापुरा नदीच्या मुखावर असलेल्या किल्ल्यासही शत्रूने वेढा घातला . ह्या किल्ल्याच्या किल्लेदाराच्या बायकोने शत्रूची एवढी दहशत घेतली की , तिने किल्ला बिलकुल न लढविता तो शत्रूच्या ताब्यात देण्याचा आपल्या नवऱ्यास सल्ला दिला . ह्या किल्ल्याची दारे शत्रूला रात्री उघडण्यात आली. वार्देश आणि साष्टी ह्या दोन्ही प्रांतांत शत्रू एक महिना होता . ह्या काळात त्याने सगळीकडे जाळपोळ आणि लुटालूट केली . त्याला कुणीही प्रतिकार केला नाही , आणि ज्याने प्रतिकार केला तो सहीसलामत सुटला नाही . वार्देशच्या किल्ल्यातून शत्रूने एकूण ४६ तोफा नेल्या.

२८ डिसेंबरला संभाजीचे चार वकील तहाच्या वाटाघाटी करण्यासाठी आले . दि. २ जानेवारी १६८४ रोजी संभाजीकडे तहाच्या करारावर सही करण्यासाठी गेलेला व्हॉइसरायचा दूत मानुएल साराइव्ह द आल्बुकर्क हा तहाच्या करारावर सही करून येताना तिकडून शत्रूने कैद करून नेलेली आमची सर्व माणसे घेऊन आला.

दि. १५ जानेवारी १६८४ रोजी औरंगजेबाच्या सैन्यापैकी काही सैन्य संभाजीच्या डिचोली प्रांतात शिरले. ह्या सैन्यात ४०,००० घोडेस्वार, ६०,००० पायदळ, १,००० हत्ती आणि २०,००० उंट असल्याची बातमी आहे.

दि. १८ जानेवारीस मोगलांचे एक प्रचंड आरमार गोव्याच्या पाण्यात येऊन दाखल झाले.

दि. १९ जानेवारीस मोगल राजपुत्र आणि त्याचा बाप ह्या दोघांचे दूत व्हॉइसरायना भेटले . मोगल सम्राटाचा वकील मोगल आरमाराबरोबर आला होता.

इंग्रजांनी संभाजी महाराजांना दारुगोळ्याची मदत केल्याबद्दल व्हॉइसराय पोर्तुगालला आपल्या राजास लिहितो :—

"महाराज—

आपणास पत्र लिहिल्यावर मला उत्तरेकडील युद्धपरिस्थितीसंबंधाने जे पत्र आले , त्याची एक प्रत मी आपणाला पाठवीत आहे . चौलचे गव्हर्नर दो. फ्रान्सिस्कु द कोश्त ह्यांनी मला कळविले आहे की शत्रूने पुन्हा येऊन त्या ठाण्यास वेढा घातला आहे . सारेजण माझ्याकडे मदत मागतात आणि ही मदत जर आकाशातून (देवाकडून) आली नाही तर ती आम्हाला कुठून येईल ते मी सांगू शकत नाही . हिंदुस्थानातील युरोपियन लोक हे तर आमचे सर्वांत मोठे शत्रू आहेत . विशेषकरून इंग्रजांनी तर संभाजीला आमच्याविरुद्ध उघडपणे मदत करण्यास सुरुवात केली आहे . ते त्याला तोफा, तोफाचे गोळे, दारू, बंदुका, आणि सर्व प्रकारची इतर शस्त्रे आणि हत्यारे पुरवीत आहेत . पण आम्हाला त्यांनी चिमूटभर देखील दारू विकली नाही.

माझ्या बलशाली श्रेष्ठ स्वामीला देव उदंड आयुष्य आणि सुख संपत्ती देवो." (**म. इ. सा.**, खंड ३.४३, ४९)]

(११) संभाजीविरुद्ध उद्‌भवलेली बंडाळी; जुलै १६८३ नंतर मोगलांनी केलेल्या कारवायांची हकिकत

जुलै १६८३ नंतर मोगलांची दक्षिणेमधील परिस्थिती सुधारणार अशी चिन्हे दिसू लागली अकबराचे संभाजीबरोबरचे संबंध दुरावले आणि हिंदुस्थानातून पळून जाण्याच्या विचाराने त्याला घेरले . मराठ्यांचे पोर्तुगीजांबरोबर बराच काळ रेंगाळणारे युद्ध सुरू झाले . या परिस्थितीचा मोगलांनी फायदा उठविला . अजूनपर्यंत बादशहा कोणताच ठाम निर्णय घेत नव्हता . त्याची पावले फार काळजीपूर्वक पडत होती. तो काळ आता संपला, आणि त्याने सर्व दिशांनी मोठ्या प्रमाणावर चढाईचे पवित्रे टाकण्यास सुरुवात केली. संभाजीच्या वर्तनातील दुष्ट प्रवृत्ती , लहरीपणा आणि तामसी वृत्ती यामुळे त्याचे अधिकारी आणि आश्रित यांच्या मनामध्ये एक तऱ्हेची अढी निर्माण झाली होती. औरंगजेबाने लाच देण्याचा सपाटा लावून या असंतोषाची धार अधिक प्रखर केली. परिणामी मराठ्यांच्या चाकरीमधून वारंवार अधिकाऱ्यांची गळती सुरू

झाली. २६ जुलै १६८३ रोजी शिवाजीचा **मुनशी** काजी हैदर हा औरंगजेबाला येऊन मिळाला . त्याला २ हजारी मनसब आणि खान ही पदवी देण्यात आली. पुढे १७०६ मध्ये तो साम्राज्याचा मुख्य **काजी** झाला.

कुडाळचा राजा खेमसावंत हा संभाजीचा मांडलिक होता . त्याने संभाजी विरुद्ध बंड केले. त्याला पोर्तुगीजांची मदत मिळाली . त्याने सावंतवाडीभर धुमाकूळ घातला . आणि गोव्याच्या उत्तरेकडील मराठी राज्यातील अनेक खेड्यांची त्याने जाळपोळ आणि लुटालूट केली. (फेब्रुवारी १६८५) खेमसावंताने आणखी दोन बंडखोरांबरोबर-फोंड्याचा दुलवानायक आणि राम दळवी – पोर्तुगीजांच्या प्रदेशात आसरा घेतला . तेथून ते मराठ्यांच्या मुलुखात लुटालूट करून सुरक्षितपणे परत निघून जात असत . अशा तऱ्हेने त्यांनी दक्षिण कोकण आणि कानरा या प्रांतांत अशांततेचे वातावरण निर्माण केले . त्यांच्या बंडाळीचा फैलाव झाला. काही काळातच किनारपट्टीचा संबंध प्रदेश संभाजीविरुद्ध बंड करून उठला.

इ. स. १६८३ च्या सप्टेंबर महिन्याच्या मध्याला पाऊस संपतासंपता मोगलांनी आपल्या आक्रमक चढाईला सुरुवात केली . १५ सप्टेंबर नंतर काही दिवसांनी रामघाटाच्या मार्गे सावंतवाडी आणि दक्षिण कोकण या प्रदेशांत मुसंडी मारण्यासाठी शहाआलम हा मोठे सैन्य घेऊन औरंगाबादेहून निघाला. शहाबुद्दीन याला ऑक्टोबर महिन्यात पुण्याकडे रवाना करण्यात आले . तेथून त्याने २७ डिसेंबर रोजी घाट ओलांडून कुलाबा जिल्ह्यातील निजामपूर या गावावर छापा घातला. राजपुत्र आजम याला २० ऑगस्ट रोजी विजापूरच्या प्रदेशावर पाठविण्यात आले. तो ऑक्टोबर महिन्यात दरबारात दाखल झाला . त्याला बागलाण आणि खानदेशकडे जाणाऱ्या उत्तरेकडील रस्त्याचे रक्षण करण्यासाठी म्हणून नाशिककडे नोव्हेंबर महिन्यात नियुक्त करण्यात आले . ऑक्टोबर महिन्यात अकबराच्या हालचालीवर नजर ठेवण्यासाठी सिद्दी हा वेंर्गुल्यानजीक गस्त घालीत होता. नोव्हेंबर महिन्यात खुद्द बादशहाने अहमदनगरच्या दक्षिणेकडे कूच केले. या सुमारास गोवळकोंडा आणि विजापूर या राज्यांच्या सरहद्दीवर नजर ठेवण्यासाठी आणि मराठ्यांना मदत करण्यासाठी या राज्यांच्या सुलतानांनी दुसरी आघाडी उघडली तर त्यांना प्रतिबंध करण्यासाठी सैन्याच्या एका तुकडीला खान जहानच्या हाताखाली बिदरहून अक्कलकोटकडे जाण्याचा हुकूम देण्यात आला.

(१२) शहाआलम याची दक्षिण कोकणावर स्वारी [इ. स. १६८४ मधील मोगलांच्या हालचालीचे वर्तमान पुढे दिले आहे :

शहाअलमच्या या स्वारीची दखल कोणाही मराठी बखरकार व इतिहासकारांनी घेतली नाही . जेधे शकावलीत मात्र या प्रसंगास अनुलक्षून दोन-तीन नोंदी आल्या आहेत . त्या अशा : "२७ दिसेंबर १६८३ : शाहादिखान देवघाटें उतरोन निजामपूर मारिले . २८ दिसेंबर १६८३ : शहाअलम रामघाटे उतरोन कुडाल व बांदे जाळून घाटावरी २० फेब्रुवारी १६८४ स गेला . लस्कर फार मेले . एप्रिल १६८४ : शहाअलम विजापूरजवळ शेळस म्हणून गाव आहे तेथे बसला . विजापुरकरांनी मोगलासी बिघाड केला ." "**मासिर-इ-आलमगिरीत**" किंवा "**औरंगजेबनाम्यात**" काही माहिती आली आहे . ती अशी : "१५ सप्टेंबर १६८३ : बादशहाने शहाअलम बहादुर यास कोकण , रामगड व इतर दक्षिणेतील संभाजीचा मुलूख घेण्यासाठी रवाना केले . तो औरंगाबादेहून त्या दिवशी सवाद्य वाजतगाजत बाहेर पडला . १७ एप्रिल (२०–२१ एप्रिल १५ **जमादिलावल**) १६८४ : बक्षी उल मुल्क यास मोठा दळभार देऊन अलमच्या मदतीस रवाना केले . त्याचेबरोबर शहाअलमसाठी २० हजार आश्रफी १०० घोडे , ५०० उंट आणि २५ खेचरे पाठविली आणि पोशाख , रत्ने, हत्ती व घोडे त्याच्या मुलांकरिता आणि सरदारासाठी पाठविले . त्यानंतर तिसरी नोंद की , २४ मे १६८४ : शहाअलम बहादुर कोकणातून परत आला . त्याला पोशाख, ३ लाख २९ हजार रुपये किमतीचे जवाहिर (सरकार – ३ लाख ९० हजार) मिळाले. त्याच्या मुलांना व सरदारांनाही पोशाख व जवाहिर दिले ." (**ओनामा**, खंड १२, पृ. २, ६, ७; **एम्. आय् ए.**, प्र. २७, पाने १४५, १४८, १४९) या मोगली दरबारी तीन नोंदीवरून ही शहामअलची स्वारी १५ सप्टेंबर १६८३ ते २४ मे १६८४ च्या कालात झाली. **बुसातिन-इ-सलातिन** मध्येही अगदी त्रोटक माहिती आली आहे . मुसलमानी बखरकार त्याच्याविरुद्ध असलेली बातमी प्रथमतः देण्याची टाळतात आणि दिलीच तर ती अगदी त्रोटक व त्यातील अपयशाच्या भागाला काट देऊनच देतात . बुसतिनीतील मजकूर : "७ बी **रमजान** रोजी (२० ऑगस्ट १६८३) शहाजादे अजम यास विजापूरच्या मोहिमेवर जाण्याचा हुकूम झाला . ३ री **शव्वाल** रोजी (१५ सप्टेंबर १६८३) शहाअलम यास संभाजी राजांच्या परिपत्यास रवाना केले . शहाअलम करमाळे रामघाटावरून उतरून कोकणात शिरला . जाळपोळ करीत गोवा बंदरात आला . तेथून साष्टी बंदरात जाऊन तमाम मुलूख जाळण्याचा सपाटा लाविला . परंतु शहाअलमची रसद दाणागोटा तोडल्याने त्याची हलाखी झालेली समजली तेव्हा बादशाहाने त्यास परतण्याचा हुकूम पाठवला . २६ **जमादिलावल** रोजी (२ मे १६८४) शहाजादा शहाअलम कोकणातून माघारा

फिरून अहमदनगरास बापाच्या भेटीस गेला ." (**बुसा-पा**, पृ. ७४५, ७४६, ७४९) इ. स. १६८९ च्या प्रवासवर्णनात ऑर्लिन्स लिहितो की , "गोवा अशा संकटापत्तीत असताना...अकस्मात एक भले मोठे सैन्य चालून येत असताना दिसले ...ते मोगली सैन्य असून संभाजीराजांच्या सैन्याशी भांडण देण्याच्या हिरिरीने पाठलाग करीत होते . संभाजीराजांनी आपणास एवढ्या अफाट सैन्यास तोंड देता येणे शक्य नाही हे जाणून , बचावार्थ युक्तीने माघार घेण्याचे ठरविले आणि त्याने मोगली सैन्य जवळ येऊन भिडण्यापूर्वीच तो आपल्या सैन्यानिशी दाट जंगलात निघून गेला ...व्हॉइसरॉयने आपल्या अधिकाऱ्यातील एक मोठा अधिकारी या मदतीस आलेल्या मोगली सेनाधिकाऱ्याकडे पाठविला . तेव्हा त्यास कळले की तो पादशाहाचा मोठा मुलगा शहाअलमच आपला धाकटा भाऊ अकबर याच्या पाठलागार्थ संभाजीच्या राज्यात पादशाहाने धाडला आहे ....मी, संभाजी व शहाअलम यांच्यामध्ये झालेल्या लढाईचे टिपण केले आहे . त्यावरून असे दिसते की , त्यांचे भांडण बहुधा अल्पावधीसाठी करारमदार होऊन आवरते घेतले गेले असावे."(**ऑर्लिन्स**, पान १–३७, **इ. आर्. एस्**., पाने ३४१–२)

यानंतर १८ जुलै १६८८ ला डॉ. सेंट जॉन याने हिंदुस्थानातील हालचालींचा एक अहवाल इंग्लंडच्या बादशाहास पाठविला आहे . त्यात तो लिहितो : "जेव्हा औरंगजेबाचा ज्येष्ठ मुलगा फार मोठ्या सैन्यासह आला तेव्हा शहाअलमचा भाऊ अकबर याच्या सल्ल्यावरून त्यांनी त्यास गळ घातली (या लिहिण्यात सत्य वस्तुस्थिती नाही . कारण अकबरानेच आपल्या (२०–८–१६८४ च्या) पत्रात लिहिले आहे की , "As for the peace With the Firangis in Which you have dragged me in as intermediary, it is not known to me how their affair has been concluded..." यावरून पोर्तुगीजांशी केलेल्या तहात डॉ . सेंट जॉन लिहितो त्याप्रमाणे अकबराचा संबंध नव्हता . म्हणून संभाजीराजाने पोर्तुगीजांशी तह केला . मोगली सैन्य अगदी जवळ व एकदोन ठिकाणी राज्यातच शिरल्याने तोही अडचणीत आला होता . परंतु शहाअलमचे सैन्य परत घाटावर जाताच संभाजीराजांनी तो तह मोडला . पाण्याच्या आणि दाण्यागोट्याच्या अभावी शहाअलमला एवढ्या मोठ्या सैन्यानिशी कोकणात राहणे अशक्य झाले . शहाअलमला या जीवनसाहित्याच्या अभावी पुष्कळ लोक , घोडे, हत्ती, आणि बैल मृत्युमुखी पडल्याने अगदी हताश होऊन परतावे लागले . शहाअलमचा बाप मोगल याला मात्र संभाजीराजांच्या साहाय्यकांचा नाश केल्याविना संभाजीराजांविरुद्ध काहीही यश येणे शक्य नाही हे जाणून राजनीतिकुशल सेनाधिपतीस योग्य असा विचार करून त्याने विजापुरास वेढा देण्याचे ठरविले ." **डॉ. सेंट जॉन टू किंग** , १८–७–१६८८; **मॅन्यु. रॉवलिन्सन** अ–१७१ **फॉलिओस** ५२ ओबी . ते ५७ ओबी – **सेन यांचे ट्रान्सस्क्रीप्टस्**) पोर्तुगीजांच्या अहवालातही शहाअलमच्या स्वारीचा उल्लेख आला आहे . त्यात नोंद अशी की , १५ (५) जानेवारी १६८४ रोजी संभाजीच्या राज्यातील बिचोली येथे ४० हजार स्वार , साठ हजार पायदळ , एकोणिसशे हत्ती आणि वीस हजार उंट असे मोठे मोगली सैन्य येऊन उतरले . हे सैन्य मोगलाचा मुलगा शहाअलम याचे आधिपत्याखाली होते . १८ (८) जानेवारीला मोगलाचे फार सामर्थ्यवान आरमारही गोवा बंदरात येऊन दाखल झाले . हे लक्षात घेणे जरूर आहे की , संभाजीविरुद्ध मोगलाने असे मोठमोठे तीन सैन्य विभाग पाठविले आहेत . १९ (९) जानेवारीला शहाअलमकडून एक व आरमारातून एक असे दोन वकील व्हॉइसरायकडे आले" (**पी. आर्. एन्**.) समकालीन इतिहासकारांची माहिती एवढीच मिळते]

[इ. स. १६८४–१६८५ मधील मोगल हालचालींची माहिती पुढे दिली आहे :

"१६८४ च्या सुरुवातीस " बुसातिन-इ-सलातिनकार लिहितो , "संभाजी विरुद्ध शहाअलमबरोबर गेलेल्या फौजेच्या वाटा व रसद जाण्याचे सर्वही मार्ग शत्रूने बंद केल्याने त्या फौजेस खाण्यापिण्याचे सामान वगैरे मिळेनासे झाले . संभाने सतत चालविलेले छापे , वाटमार व लुटालूट त्यामुळे विजापुराकडून काही एक साह्य अगर मदत होणे ती अजिबात बंद झाली . विजापूरचे लोक संभास सामील व मिलाफी होऊन संभास बल देत होते. या कारणाने मोठा हरएक जिनसांविषयी दुष्काळ पडला . बहुत कठीण प्रसंग प्राप्त झाला . जनावरे उपाशी मरू लागली. कैक जिन्नस निखालस नाहीसा जाहला . यामुळे त्या फौजेतील लोकांनी बहुत संकट भोगले . तेव्हा त्या फौजेस परत येण्यास दुःख झाले ." (**बुसा–पा**, पृ. ७२, वही ६) हे औरंगजेबास कळल्यावर त्याने "४ फेब्रुवारीस अजम व बेदरबख्त भेटावयास आले असता त्यास विजापूरतर्फेतील मुलूख लुटण्याचा हुकूम दिला . त्या आज्ञेवरून त्यांनी सर्व मुलूख लुटून धारवाडच्या किल्ल्यावर हल्ला चडविला आणि थोड्याच दिवसांत तो किल्ला फत्ते करून माघारे छावणीत गेले ." (**बुसा–पा**. पृ. ७२, वही ६ ; **बुसा**–३, पृ. ७४६; **औनामा**, **खंड** १२ , पृ. ६; **एम्. आय. ए**., प्र. २७, पान १४७) या लुटमारीची हकीकत कारवारकर आपल्या १३ फेब्रुवारीच्या पत्रात देतात की , "...मोगली फौज सर्वत्र जाळपोळ करून या प्रांताची नासधूस करीत आहे....डच लोकांना फारच वाईट रीतीने वागविले...त्यांचा मुख्य थोडक्यात जिवानिशी निसटला....घराच्या खिडक्यातून व झरोक्यांतून हे हरामी लोक गोळ्या झाडीत होते . त्यांनी डचांची वखार लुटली नाही परंतु त्यांनी त्यांची बाहेरील कोठारे मात्र लुटली व निशाण व निशाणाची काठीही लांबविली." (**कारवार टू सुरत**, १३–२–१६८४, **सुरत**, खंड १०९, पाने १००-०१; **ऑरमे**, खंड १२६–२, पाने २६८–९; **एफ्. आर्**.) परंतु मोगली फौजेचे धोरण आदिलशाही प्रजेस नागविण्याकडे तितकेसे नव्हते . कारवारकर नंतर ७ मेला लिहितात : "मोगली फौज घाटमाथ्यावर पावसाळ्याच्या निवाऱ्यासाठी राहिलसे वाटते . त्यात त्यांचा हेतू हा आहे की , जरूर पडल्यास सहज खाली उतरून छापे घालता यावेत . अद्याप पावेतो त्यांनी आदिलशाही ठाण्यांशी मत्रीचे संबंध राखले आहेत परंतु संभाजीराजांच्या प्रजेला मात्र ते फार ताप देतात . संभाजीराजांच्या प्रदेशात राहणाऱ्या लोकांना थोडीही दया , क्षमा दाखविली जाणार नाही असे ते जाहीरपणे बोलतात ." (**कारवार टू सूरत**, ७-५-१६८४, **सुरत**, खंड १०९, पाने १३६-९, **ऑरमे**, खंड १२६-२, पाने २८८-९०; **एफ्. आर्**.) पुढे २२ मेला मुझफरजंग बहादुर याने मंगळवेढे व सांगोले याखालील सर्व मुलूख घेतला. जालीहालनजीक ठाणे वसविताना लढाई झाली . त्या लढाईत युसुफशा ठार झाला . बहुत मनुष्ये ठार व जखमी झाली . सैयद मखदुमकडील लोकांचा मोड झाला (**बुसा-पा**, पृ. ७३–४, वही ६ ; **बुसा**–३. पृ. ७५०). विजापूरकर व मोगल यांचा प्रत्यक्ष झगडा लागलेला दिसताच संभाजीराजांनी आदिलशाहीस मदत करण्यास सुरुवात केली . कारवारकर १५ जूनला लिहितात : "...मोगली सैन्याचा बराच मोठा भाग विजापुराभोवती किल्ल्यास वेढा देऊन बसला आहे . त्यांनी दोन हल्ले चढविले परंतु एवढ्या मोठ्या सैन्याच्या मानाने ते अगदीच किरकोळ ठरले . मोगल आदिलशाहाला आपल्या सैन्यानिशी संभाजी राजांवर लढाई करण्यास भाग पाडील किंवा त्याचा सर्व मुलूख काबीज करील . बिचारा आदिलशहा मात्र पेचात सापडला आहे . शेवटी त्याला आपल्या मनाविरुद्ध वागावे लागेल . संभाजीराजे मात्र त्याला पैशाची व माणसांची फुकट मदत करीत आहेत ....." (**कारवार टू सुरत**, १५–६–१६८४, **सुरत**, खंड. १०९, पाने, १४०–४१; **ऑरमे**, खंड १२६–२, पाने २९०–९३; **एफ्. आर्**.) आदिलशहास संभाजीराजांच्या मदतीची आशा वाटू लागली . त्याच वेळी शहाअजमने आदिलशहास सामोपचाराने मिळविण्यासाठी त्यास वस्त्रे पाठविली. ती ३ जुलैला आदिलशहाने समारंभाने घेतली . नंतर अजमचे पत्र आले . ते त्याच्या हाती २२ ऑगस्टला पडले . मजकुराचा तपशील

समजत नाही. परंतु बहुधा त्यात विजापुरास वेढा घालण्याची धमकी असावी . धरणगावकर १८ ऑगस्टला लिहितात : "……या प्रांतात बातमी अशी आहे की, बादशाहाने विजापुरास वेढा देण्याचे नक्की ठरविले आहे . त्यासाठी तो दररोज अजम ताराकडे आपले सैन्यविभाग सारखे पाठवीत आहे आणि बादशहाही खासा हवा निवळताच तिकडे जाणार आहे ……" **धरणगाव टू सुरत**, १८–८–१६८४, **सुरत**, खंड १०९, पाने १५९–६०; **ऑरमे**, खंड १२६ –२, पाने २९८ ; **एफ्. आर्**,) परंतु सुरतची बातमी यानंतरची असावी . ते २२ ऑगस्टलाच लिहितात : "…मोगली फौजा विजापूरावर चालून जात आहेत. अशी बातमी आहे की, शत्रूने त्यास पळवून लाविले. त्यांचा पराभव करून अगदी दाणादाण उडविली. शहाजादा अजम तारा यास दोन जखमा झाल्या परंतु तो थोडक्यात बचावला …."(**सुरत, टू कारवार**, २२–८–१६८४; **सुरत**, खंड. ९, पाने १९०; **ऑरमे**, खंड १२६–१, पान १२७) संकट निकट आलेले पाहून मसुदखानाच्या विद्यमाने आदिलशाहाने शहा हजरत यास भागानगरास ३१ जुलैला रवाना केले. (**बुसा-पा**, पृ. ७४, वही ६) आणि मदतीची अपेक्षा केली. शहा हजरत ९ डिसेंबरला भागानगरहून परत आला . आदिलशहाने १९ एप्रिलच्या पत्रात मसुदखानास मदतीला बोलविताना लिहिले की, "हैद्राबादप्रकरणी कित्येक मोकदमे शहा हजरत कादरी याजला शेवटास नेण्याविषयी तुम्ही लिहिले होते ते एकंदर ….हैद्राबादेस जाहीर केले व ते बहुत पसंत पडले ….." (**बुसा-पा**, पृ. ७५, वही ६) शहा हजरतच्या यशस्वी कामगिरीचा उल्लेख कारवारकरांच्या १५ सप्टेंबरच्या पत्रात आला आहे . ते लिहितात : "…मोगली फौजा विजापूरच्या तटाभोवती वेढा देऊन आहेत . गोवळकोंड्यांचा राजा, संभाजीराजा व आदिलशहा यांचा एक गट झाला आहे . ते त्रिकूट मोगलाशी संगर करण्याच्या तयारीत आहे . या वर्षी भांडणाचा निकाल लागेल आणि हे प्रांताचे घनी होतील . संभाजीराजे व पोर्तुगीज यांच्यात भांडण चालूच आहे आणि संभाजी फक्त मोगल जाण्याचीच वाट पाहात आहे . सवड होताच तो त्यांचा प्रदेश गिळंकृत करीलच …"(**कारवार टू सुरत**, १५–९–१६८४, **सुरत**, खंड १०९, पाने १८३–८४, **ओ. सी**. खंड ४४, नं ५१९८; **ऑरमे**, खंड १२६–२, पाने ३००–३०२; **एफ्. आर्**.) आदिलशहा, कुत्बशहा व संभाजीराजे यांची एकजूट होण्याची शक्यता होत असता "औरंगजेबाने ९ ऑक्टोबरला शहा अलमला फार मोठी मदत पाठविली व २८ डिसेंबरला एक मागाची एक तोफ व वीसवीस शेराची एक अशा चार तोफा रुहुल्लाहखानाच्या मदतीस विजापुरास रवाना केल्या ." (**औनामा**, पृ. ११ व १४, खंड १२; **एम्. आय. ए**., प्र. २८, पाने १५२ , १५४) या हालचालीत इ . स. १६८४ हे साल गेले . इ. स. १६८५ च्या अगदी सुरुवातीस एक -दोन आठवड्यांत गोव्यात संभाजीराजांविषयी नमूद केलेली तत्कालीन समजूत त्यांच्या मागील पाच वर्षाच्या राजकारणाचा स्पष्ट बोध करून देत आहे . फादर ऑर्लिन्स आपल्या इ. स. १६८७ च्या सुमारास लिहिलेल्या इतिहासात ती नमूद करतो " : ……संभाजीराजांनी आपल्या बापाच्याच पावलावर पाऊल टाकून आपला राज्यकारभार चालविला आहे. त्यांनी हिंदुस्थानातील राजांना लुटून पुष्कळ अन्नधान्य, संपत्ती साठविली आहे. ते सध्या इतके सामर्थ्यवान झाले आहेत की, त्यांनी आपल्याला अल्पवयी आदिलशहाचा पालक म्हणून नेमून घेतले आहे . त्यांचे मोठे हल्ले म्हणजे मोगली फौजेवरील व पोर्तुगीज प्रदेशातील होत. हा मजकूर गोव्याहून जानेवारी १६८५ त लिहून आलेल्या एका पत्रातील आहे . ……" (**ओ. एच्. आय्., इ. आर्. एस्**., क्र. ५३४, पान ३३९).]

औरंगाबादहून १६८३ च्या सप्टेंबर महिन्यात शहाआलम याने विजापूरच्या मुलुखातून दक्षिणेकडे कूच केले. त्याने बेळगाव जिल्ह्यात प्रवेश केला , आणि शहापूरचा किल्ला , बेळगावच्या आग्नेय दिशेस असलेले संपगाव आणि इतर मोठी शहरे व त्या प्रदेशातील काही किल्ले जिंकून घेतले . या स्वारीत त्याला भरपूर लूट मिळाली . नंतर त्याने सरळ पश्चिम दिशेकडे मोर्चा वळविला आणि बेळगावच्या पश्चिमेस २६ मैलांवर व गोव्याच्या ईशान्येस ३० मैलांवर असलेला रामघाट त्याने ओलांडला . घाटातून तो सावंतवाडीच्या सपाट मैदानावर उतरला.

१६८४ च्या जानेवारी महिन्याच्या ५ तारखेला शहाआलम बिचोलीम येथे पोहोचला . तेथे त्याने संभाजी व अकबर यांनी बांधलेले भव्य प्रासाद आणि सुखसोईंनी युक्त असलेल्या बागा यांचा संपूर्ण नाश केला. ३ दिवसानंतर राजपुत्राच्या सैन्याला रसद घेऊन आलेले मोगल आरमार गोव्याच्या बंदरात दाखल झाले.

गोव्याच्या जवळ आल्यावर संभाजीच्या लुटालुटीपासून बचावल्याबद्दल त्याने पोर्तुगीजांकडून मोठ्या खंडणीची मागणी केली. इतकेच नव्हे तर विश्वासघात करून गोवा हस्तगत करण्याचा बेतही त्याने केला. पोर्तुगीजांबरोबर राजपुत्राने हे जे भांडण निर्माण केले ते म्हणजे मोगलांच्या दृष्टीने त्याच्या हातून झालेली एक मोठी घोडचूक होती . कारण याचा परिणाम उपासमारीने त्याच्या सर्व फौजेचा पुढील काही काळात नाश होण्यात झाला.

गोव्याच्या आसमंतातून शहाआलम याने उत्तरेच्या दिशेने मालवणकडे चाल केली . तेथे त्याने मराठ्यांच्या राजाच्या ताब्यातील सुप्रसिद्ध पांढरे मंदिर आणि इतर काही भव्य प्रासाद बंदुकीच्या दारूने उडवून दिले. कुडाळ आणि सावंतवाडीतील बांदा ही ठिकाणे त्याने जाळून टाकली . याच मोहिमेत त्याने

वेंगुर्ल्याचे बंदर लुटून फस्त केले . तेथून तो पुन्हा दक्षिणेकडे वळला आणि गोव्याच्या उत्तरेकडील चाकोरा नदीच्या किनाऱ्यावर परत आला. असे करण्यात त्याचा उद्देश त्याला मदत घेऊन येणाऱ्या जहाजांशी संपर्क साधण्याचा किंवा पोर्तुगीजांच्या राजधानीवर दुसऱ्यांदा हल्ला करण्याचा असावा.

फेब्रुवारी महिन्यात मोगल सैन्याची पुढील प्रगती दुष्काळी परिस्थितीने रोखून धरली. पोर्तुगीजांच्या मनात मोगलांच्या उद्देशाबद्दल किंतू आल्याने त्यांनी रसद घेऊन आलेल्या मोगल आरमाराला गोव्याच्या खाडीतून राजपुत्राच्या छावणीकडे जाण्यास प्रतिबंध केला . तेथील प्रदेशात धान्य मिळविणे जवळ जवळ अशक्यप्राय होऊन बसले , आणि गोव्यामध्ये तर दुष्काळाने कहर उडविला . राजपुत्राच्या कोकणामधील कामगिरीचे उत्कृष्ट वर्णन एका इंग्रज व्यापाऱ्याने पुढीलप्रमाणे केले आहे : "राजपुत्र हा स्वतःच्या इच्छेला येईल त्याप्रमाणे कोणताही प्रतिकार न होता या ठिकाणाहून त्या ठिकाणाकडे कूच करण्याशिवाय काहीही करीत नव्हता. कोकणच्या प्रदेशात त्याने कुठेही मजबूत ठाणे स्थापन केले नव्हते . जिथे जाईल तिथे तो देशाचा विध्वंस करतो , हाती लागेल त्याची नासधूस करतो आणि शहरेच्या शहरे पेटवून देतो ." (**सुरत टू हुगली**, २८ मार्च १६८४) त्याच्या छावणीतील टंचाईने आता अगदी परिसीमा गाठली . शिपायांना सारखे उपास पडू लागले आणि परिणामी त्यांचे शरीर जिवंत राहील इतकाच श्वास घेण्याची ताकद त्यांच्यात राहिली (**ईश्वरदास**, ८९ अ). अशा तऱ्हेच्या दैन्यावस्थ मनःस्थितीत असलेला राजपुत्र २० फेब्रुवारी रोजी घाटावर परतला.

शहाआलमची अयशस्वी माघार, १६८४

परंतु त्याच्या अडचणी अधिकच वाढत गेल्या . तो जात असलेला रामघाट अतिशय अरुंद होता . हवेतील वातावरण इतके भयानक दूषित होते की , रोगराईने त्याच्या सैन्याला ग्रासले , आणि एका आठवड्यात त्याच्या सैन्यातील एक तृतीयांश माणसे ठार झाली . ज्यांना ज्यांना रोगाने पछाडले त्यांच्यापैकी एकही जण मृत्यूच्या तावडीतून सुटला नाही . माणसांपेक्षाही मोठ्या प्रमाणात घोडे , हत्ती आणि उंट यांचा नाश झाला. त्यांच्या सडलेल्या प्रेतांनी वातावरण दूषित होऊन गेले . सामानसुमान वाहून नेणारी गुरेढोरे आणि प्राणी अशा तऱ्हेने नाहीसे झाल्यामुळे राजपुत्राच्या सैन्यात पुन्हा एकदा दुष्काळ पडला . त्याच्या सैन्यातील अनेकजण भयंकर उष्मा आणि जीवघेणी तहान यांच्या योगे मृत्युमुखी पडले . (**स्टोरिआ.**, भाग २. २८७; **के. के.**, भाग २. २९२)

शहाआलम याने घाट ओलांडला आणि तो कानरा प्रांतात उतरला . परंतु शत्रू त्याच्याभोवती घिरट्या घालीत होता . रेंगाळणारे सैनिक शत्रूकडून ठार मारले जात होते . राजपुत्राच्या सैन्यातील सामानसुमान आणि संरक्षणासाठी दिलेले काफिले सर्व बाजूंनी शत्रूकडून लुटले जात होते . त्याच्या सैन्याचा गलितगात्र झालेला उर्वरित भाग १८ मे रोजी अहमदनगर येथे पोहोचला . (**एम्. ए.**, २४४, **दिल.**, १८३) थोड्या फार खेड्यांना आगी लावण्यावाचून आणि काही शहरांत लुटमार करण्यावाचून इतर दुसरी कोणतीही कामगिरी त्याच्या हातून पार पडली नव्हती.

(१३) १६८३ नंतरच्या संभाजीच्या हालचाली [संभाजीराजांनी सैन्याची तयारी कशी चालविली होती याबाबतची दोन पत्रे शके १६०५ पौष बहुल १२, ३ जानेवारी १६८४ ची उपलब्ध आहेत. ती पुढीलप्रमाणे :

राजा शंभु छत्रपती – विठ्ठल शंकर देशाधिकारी प्रांत जावळी.

दत्ताजी केशवजी पिसाळ देशमुख ऊर्फ जोरखोरे यांसी कै . स्वामीनी हक्क वतन करून दिल्हे आहे . त्याप्रमाणे मोईन चालत आले . हल्ली

कसूर होतो. तरी हे दिवसांत गनीम कोकणात पेशक . या प्रसंगे हशमाचा जमाव करावया देशमुख मशारनिल्हेस आज्ञा केली असे व पुढे कित्येक काम याचे हातून घेणे असता उगेच माणूस दिलगीर करावे आणि स्वामीकार्याचा नाश करावा हे कोण कारकुनी , हे गोष्टीने स्वामीचा तरी फायदा ? तरी कौडीइतकी गोष्ट नाही. ऐसे असता असे करावया गरज काय ? याऊपरी देशमुख तरी रंजीस न करणे . त्यांचा हक्क सालाबादप्रमाणे चालविणे. कसूर काडीइतकी न करणे. पुढे बोथार आल्यास स्वामी तुमची भीड धरणार नाहीत हे नेमस्त समजणे. लेखनालंकार.

(२)

"शंभु छत्रपती स्वामी-देशमुखान प्रांत वाई.
सुल्तान मुअज्जम व शहाबुद्दीनखान गनीम

दोन्हींकडून कोकणात उतरला . या प्रसंगे हशमाचे बहुत प्रयोजन आहे . करिता रा. संताजी यमाजी सरमिरा याला नौसंचणी हशमाचा जमाव करावयाबद्दल वरघाट प्रांते पाठविले असे ते सांगतील तेणेप्रमाणे नौसंचणी करून पाठवून देणे . हे काम बहुत नाजूक आहे. या प्रसंगी जरी हशमाचा पोख्त जमाव झाला तरी गनिमाचा काय गुमान लागला . बुडविलाच जातो. जमाव पाठविणे. स्वामी संतोषी होतील . आजीवरी स्वामीने तुमचे चालविले ते सार्थक ह्या दिवसांत करून आपला मुजरा करून घेणे. तलाश तरतूद करून हशम पाठवून देणे."

(**संभाजीकालीन प. सा. सं ३५**)]

१६८३ ते १६८५ या दोन वर्षांच्या कालावधीत घडलेल्या घडामोडीचे वर्णन या ठिकाणी नाही दिले तरी चालण्यासारखे आहे. [इ. स. १६८३ आणि ८५ या दरम्यान मराठ्यांविरुद्ध मोगलानी केलेल्या कारवायांची हकीकत पुढे दिली आहे. १६८३ च्या अखेरीस बादशहा अहमदनगर येथे आला . तेथून त्याने मराठ्यांच्या मागावर लहान लहान तुकड्या रवाना केल्या आणि आपल्या प्रमुख सेनापतीच्या हाताखाली मोठे सेनाविभाग देऊन शत्रूचा मुलूख जिंकण्याची कामगिरी त्यांच्यावर सोपविली . यानुसार डिसेंबर १६८३ मध्ये सरबुलंदखान याला बहादूरगडाच्या दिशेला , रुहुल्लाखानाला नीरा नदी काठी , बहरामंदखानाला अष्टीकडे आणि मामूरखान याला पुणे जिल्ह्यात पाठविण्यात आले . (**एम्. ए**, २४०) यानंतर मराठ्यांनी उत्तरेकडे तोंड वर काढले . त्यांच्यावर जानेवारी १६८४ मध्ये मुंगीपट्टणच्या दिशेने बहरामंदखानाची रवानगी करण्यात आली . त्यानंतर काही काळाने खानजहान याने कृष्णा काठी मराठ्यांचा पराभव करून त्यांची मालमत्ता लुटली. (**एम्. ए., २४१**)

फेब्रुवारी आणि मार्चमध्ये बहरामंदखानाला नाशिक येथे , शहाबुद्दीनखान याला पुणे आणि गढ नमुना येथे आणि एप्रिल महिन्यात रुहुल्लाखान याला रामघाटातून परतणाऱ्या शहाआलमच्या मदतीसाठी पाठविण्यात आले. याच महिन्यात बादशहाने संभाजीच्या कैद केलेल्या ११२ अधिकाऱ्यांना ठार मारण्याचा हुकूम दिला. (**एम्. ए.**, २४०–२४३) मे मध्ये मोगलांनी सांगोला आणि मंगळवेढे जिंकून घेतले. (**बी. एस्.**, ५३०)

पावसाळ्यात मोगलांनी पश्चिम घाटाच्या कडेने छावणी देण्याचे ठरविले . त्यांचा उद्देश अचानक सपाटीवर येऊन हल्ला करण्याचा होता . आदिलशाही राज्यातील सर्व ठिकाणांबरोबर त्यांचे दळणवळण चालू होते . परंतु बादशहाने असा वटहुकूम काढला की संभाजीच्या प्रदेशात जो कोणी सापडेल त्याला दयामाया दाखविण्यात येणार नाही . (**कारवार टू सुरत** , ७ मे १६८४ , **एफ्. आर्. सुरत** १०९ मधे) या अवधीत मोगलांना मराठ्यांवर मोठमोठे विजय मिळाल्याने त्यांना आपले युद्धाचे बेत बदलणे आणि विजापूरविरुद्ध हिवाळ्यात मोठी फौज रवाना करणे शक्य झाले .]
१६८४ सालच्या पहिल्या सहामाहीतील मोगलांच्या मोहिमांना अपेक्षेबाहेर यश आले. मराठ्यांचे अनेक किल्ले जिंकण्यात आले ; इतस्ततः पसरलेल्या त्यांच्या सैन्याचा वारंवार पराभव करण्यात आला आणि त्यांचा बराचसा प्रदेश मोगलांनी काबीज केला. परंतु या सर्व यशामधील नेत्रदीपक विजय म्हणजे संभाजीच्या दोन बायका, एक मुलगी आणि तीन दासी यांना काबीज करण्यात आले हा होय . या कैद्यांना जुलै महिन्यात बहादूरगडच्या किल्ल्यात बंदिवासात ठेवण्यात आले . (**एम्. ए.**, २४५, २४६) यापूर्वीच संभाजीची एक बायको आणि बहीण यांना दिलेरखानाने काबीज केले होते आणि त्यांना अहमदनगरच्या किल्ल्यात कैदेत ठेवण्यात आले होते. (**अख.**, २७ नोव्हेंबर १६८१).

या कालावधीत संभाजीचा ठावठिकाणा काय होता ? १६८३ च्या अखेरीस गोव्यावर त्याने जो हल्ला केला त्यात त्याला अपयश आले . त्यानंतर लढाईच्या मैदानात उतरून आणि शौर्य आणि सतत पराक्रम यांचा शिवाजीकडून त्याला मिळालेला जो वारसा होता तो पुढे चालविण्याऐवजी त्याने स्वतःला सुखोपभोग, स्त्रियांचा संग, चैनबाजी आणि मादक पेयांचे सेवन यांत बेहोष करून घेतले.

१६८५ वर्षाच्या जानेवारी महिन्याच्या मध्यांत शहाबुद्दीनखानाने भोरघाट मार्गे कोकण प्रांतात पुन्हा

एकदा मुसंडी मारली. रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पाचाड या खेडेगावावर हल्ला करून त्याने त्या खेड्याला आग लावली . या हल्ल्यात त्याने अनेक काफर अधिकाऱ्यांना ठार मारले , त्यांची संपत्ती आणि दौलत लुटली , अनेकांना कैद केले आणि मोठा विजय संपादन केला . या त्याच्या नेत्रदीपक विजयाबद्दल बादशहाने त्याला खानबहादूर फिरोजजंग ही पदवी दिली. (**एम्. ए.**, २४८, २५५)

फिरोजजंगाने अनेक मराठा अधिकाऱ्यांना लाच देऊन बादशहाच्या बाजूला सामील करून घेतले . डिसेंबरच्या सुरुवातीला अबदुल कादीर याने कोंडाणा किल्ला जिंकला . यावेळी प्रत्येक मराठा शिपायाची त्याच्या मातृभूमीचे संरक्षण करण्यासाठी जरूर होती . असे असताना त्यांनी आपले मुलुखगिरी करण्याचे व खानदेशवर हल्ला करण्याचे धोरण चालू ठेवण्याची मोठी घोडचूक केली . १६८५ च्या मार्च महिन्याच्या अखेरीला विजापूरचा वेढा सुरू झाला . मोगलांच्या सर्व फौजा तिथे एकत्रित झाल्या आणि साहजिकच मराठ्यांवरील मोगलांचा दबाव तात्पुरता तरी कमी झाला.

संभाजी आणि इंग्रज

ईस्ट इंडिया कंपनीच्या गव्हर्नरच्या ताब्यातून मुंबईचा किल्ला कॅप्टन रिचर्ड केगवीन याने बळकाविला होता. त्याने चढाईच्या धोरणाचा स्वीकार केला. यापूर्वी मुंबई बेटाचा उपयोग सिद्दी कासीम हा मराठ्यांच्या ताब्यातील खेड्यांवर हल्ला करण्यासाठी एखाद्या तळासारखा करीत असे . केगवीन याने सिद्दी कासीमला मुंबई बेटाचा अशा तऱ्हेचा उपयोग करण्यापासून अटकाव केला आणि इंग्रजांचे तटस्थतेचे धोरण मान्य करण्यास त्याला भाग पाडले . एप्रिलच्या अखेरीला त्याने कॅप्टन हेन्री गॅरी आणि ले . थॉमस विल्किनीस ह्या दोघांना वकील म्हणून आणि त्यांच्याबरोबर दुभाषा म्हणून राम शेणवी याला संभाजीकडे पाठविले. बऱ्याच काळापूर्वी शिवाजीने १६६१ च्या मार्च महिन्यात राजापूर येथील वखारीची जी लुटालूट केली होती त्याची नुकसानभरपाई देण्याबाबत दोन्ही पक्षांत मतभेद होते. हे मतभेद आणि दोघांमधील इतर कटकटी मिटवून टाकाव्या व त्याचप्रमाणे मराठ्यांच्या राजाबरोबर मित्रत्वाचा तह करावा या उद्देशाने या दोघा वकिलांची रवानगी झालेली होती. या वकिलातीच्या पदरी संपूर्ण यश पडले. संभाजीने इंग्रजांच्या सर्व मागण्या मान्य केल्या. त्यांच्याबरोबर त्याने दोन करार केले . एका करारात ३० आणि दुसऱ्या करारात ११ अशी कलमे होती. (**पूना** ९ वे **संमेलन प्रोसिडिंग्ज्**, पाने ३०-४४).

(१४) मोगलांकडून विजापूरच्या प्रांतावर कब्जा केला जातो

१६८६ च्या सप्टेंबर महिन्याच्या १२ तारखेला विजापूर शहराचा पाडाव झाल्यावर नवीन जिंकून घेतलेल्या प्रदेशात वसुलाबाबत व्यवस्था करण्यासाठी , शांतता राखण्यासाठी आणि किल्ल्यांचा ताबा घेण्यासाठी निरनिराळ्या भागांत औरंगजेबाने आपल्या लष्करी अधिकाऱ्यांची रवानगी केली . (**एम्. ए.**, २८२-२८३) नंतरच्या फेब्रुवारीपासून ते सप्टेंबरपर्यंत मोगल फौजा गोवळकोंड्याच्या वेढ्याच्या ठिकाणी एकत्रित झाल्या होत्या . २१ सप्टेंबर १६८७ रोजी त्या किल्ल्याचा पाडाव झाल्यावर भूतपूर्व आदिलशाही राज्याच्या प्रांतामध्ये कारवाई करण्यासाठी मोगल फौजा मोकळ्या होऊन कूच करत्या झाल्या.

सगरच्या पामनायकाचा पराभव

मोगलांनी पहिली मोहीम बेरड जमातीविरुद्ध उघडली . कृष्णा आणि भीमा या नद्यांच्या मध्ये

वेडावाकडा पसरलेला जो मुलूख आहे त्यावर त्यांचे राज्य होते आणि सागर हे त्यांच्या राजधानीच्या ठिकाणाचे नाव होते. एका वर्षाच्या अवधीत विजापूर आणि गोवळकोंडा यांचा पाडाव झाल्याने मोगलांच्या सामर्थ्याबद्दल जी दहशत निर्माण झाली होती त्यामुळेच मोगलांच्या या मोहिमेचे काम सुकर झाले. बेरडांचा प्रमुख पामनायक याने शरणागती दिली. २८ नोव्हेंबर रोजी त्याने आपला किल्ला मोगलांच्या स्वाधीन केला. २७ डिसेंबर १६८७ रोजी त्याने बादशहाला भेट दिली. त्यानंतर पाचच दिवसांनी तो एकाएकी मरण पावला. त्याचे राज्य खालसा करण्यात आले. (**एम्. ए.**, ३०४-३०७)

विजापूरच्या मुलखाचा पाडाव

यानंतर मोगलांनी आपले लक्ष दक्षिणेमधील नवीन जिंकून घेतलेल्या २ शाह्यांच्या पूर्व आणि दक्षिण दिशांकडील मुलखाकडे वळविले. फिरोजजंगाने तुंगभद्रेच्या दक्षिणेकडील कर्नुल जिल्हा आणि आदोनीचा किल्ला यावर हल्ला केला. या ठिकाणी सिद्दी मसूद हा स्वतंत्रपणे राज्य करीत होता. ६ ऑगस्ट १६८८ रोजी सिद्दी मसुदला शरणागती देण्यास भाग पाडण्यात आले. त्याच्या किल्ल्याचा ताबा घेण्यात आला आणि किल्ल्याचे नाव इमतियाजगड असे ठेवण्यात आले. सिद्दी मसुदला मोगल सैन्यात ७ हजारी मनसबदारी देऊन अमीर करण्यात आले.

राजपुत्र आजम याने मार्च महिन्यात थोडा काळ चाललेल्या वेढ्यानंतर बेळगावचा मजबूत किल्ला जिंकून घेतला. (अधिक माहितीसाठी पाहा : **एम्. ए.**, ३०८ आणि ३१५ ; **ईश.**, १२७ ब–१३० ब) इतर दिशांनाही बादशाही फौजांनी अनेक किल्ले काबीज केले. (**एम्. ए.**, ३११)

२५ जानेवारी १६८८ रोजी बादशहाने हैद्राबाद सोडले आणि तो १५ मार्च रोजी विजापूर येथे येऊन पोहोचला. विजापूर शहर आणि आजूबाजूचा प्रदेश उद्ध्वस्त झाल्यामुळे तेथील लोकांना विपन्नावस्था प्राप्त झाली होती. या लोकांना साहाय्य देण्याची जरुरी असल्याचे बादशहाच्या लक्षात आले. नागरिकांची मुख्य गरज पिण्याच्या पाण्याची होती. पाण्याचा तुटवडा पडला होता. वेढ्यामध्ये तलावाचे नुकसान झाले होते आणि याच कारणामुळे कदाचित त्यांचे पाणी एकाएकी आटून गेले होते. **मीर आतीश** मुखलीसखान याला कृष्णा नदीचे पाणी कालवे बांधून शहरामध्ये आणण्याची सोय करण्याचा बादशहाने हुकूम दिला. (**एम्. ए.**, ३१०, ३१३; **दिल.**, २०३; **ईश.** १२३ ब)

विजापूरमधील प्लेग

१६८८ च्या नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीला विजापूर शहर आणि बादशाही छावणी यांच्या परिसरात भयंकर रोगराईचा प्रसार झाला. "पहिल्या प्रथम खाकेमध्ये आणि नंतर मांडीच्या टोकाला गाठ येत असे. त्यामुळे ताप भयंकर चढे, आणि रोग्याला असाहाय्य मूर्च्छा येई. औषध योजनेचा कसलाही उपयोग होत नसे. फारच थोडी माणसे दोन दिवसांपेक्षा जास्त जगत. बहुतेकांना त्या अगोदरच मृत्यू येई. मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये बादशहाची वृद्ध बायको औरंगाबादी महल, महाराजा जसवंतसिंग यांचा महमद राज नावाचा १३ वर्षांचा मुलगा, सद्र या अधिकारावर असलेला फाजीलखान आणि इतर अनेक उमराव होते. हिंदू आणि मुसलमान या दोन जमातीतील मध्यम वर्गातील आणि गरीब असे किती मेले त्यांची गणतीच करता येणार नाही. परंतु काहींच्या अंदाजाप्रमाणे ही संख्या १ लाखापेक्षा कमी नसावी. यातच फिरोजजंगाचे डोळे गेले." (**एम् ए.**, ३१७, ३१८)

अनुक्रमणिका

चौदा डिसेंबर १६८८ रोजी औरंगजेबाने मोठ्या निर्धाराने मोहिमेवर कूच केले . यानंतर एका आठवड्यानेच रोगराईचा जोर कमी झाला . बादशहाने विजापूरच्या उत्तरेस ८५ मैलांवर असलेल्या अकलूजकडे कूच केले आणि तेथे त्याने मुक्काम केला.

(१५) हिंदुस्थानातील, अकबराने केलेले अखेरचे प्रयत्न

जून १६८६ मध्ये अकबराने मोगल मुलखामध्ये धडक मारली . कारण विजापूरच्या वेढ्यात भाग घेण्यासाठी बादशहाने सोलापूरचा मुक्काम उठविला होता . साहजिकच मोगलांच्या ताब्यातील दक्षिणेतल्या प्रदेशातून बादशाही फौजेचा पूर्णपणे अभाव होता . परंतु अकबराला त्याच्या या प्रयत्नात यश आले नाही . कारण बादशहाने आपली दूरदृष्टी वापरून अहमदनगरच्या बचावासाठी मरहमतखानाला सैन्याची एक तुकडी देऊन ठेविले होते . त्याने अकबराबरोबर चाकण येथे अतिशय नेटाने लढाई दिली , आणि त्याचा पराभव करून त्याचा हल्ला परतवून लावला . राजपुत्राने संभाजीच्या राज्याकडे माघार घेतली , आणि माहुली आणि जवाहर (जव्हार) मार्गे उत्तरेच्या बाजूने सुरतेकडे मुसंडी मारण्याचे काही वेळा निरर्थक प्रयत्न केले.

अखेर राजपुत्र शुजा याचा एक जुना अनुयायी जियाउद्दीन महमद आणि ४५ जणांचा सेवकगण यांच्यासह राजापूर येथे विकत घेतलेल्या एका जहाजावर अकबर चढला . या जहाजाचा मुख्य कप्तान बेंडाल नावाचा इंग्रज होता . १६८७ च्या फेब्रुवारी महिन्यात त्याने इराणच्या दिशेने प्रयाण केले . परंतु वाटेमध्ये वाईट हवेचा त्रास झाल्यामुळे मस्कत या बंदराचा आश्रय त्याला घ्यावा लागला . काही महिने या ठिकाणी त्याला अडकून पडावे लागले . यानंतर २४ जानेवारी १६८८ रोजी तो इस्फहान येथे इराणच्या दरबारात येऊन पोहोचला . अशा तऱ्हेने हिंदुस्थानातून अकबराला सुखरूपपणे बाहेर काढून दिल्यानंतर दुर्गादास हा मारवाडातील आपल्या गावी परतला . [राजपुत्र अकबर याने हिंदुस्थानात जे अखेरचे प्रयत्न केले त्याची हकीकत पुढे दिली आहे : नोव्हेंबर १६८३ मध्ये त्याचे संभाजी बरोबरचे मतभेद मिटले. अनिच्छेने का होईना तो महाराष्ट्रातच राहिला. सुरुवातीला बादशहाचे वकील त्याला भेटून परत फिरण्याविषयी त्याचे मन वळविण्याचा प्रयत्न करीत. (**स्टोरिआ,** भाग २. २५८–२५९) यातून काहीही निष्पन्न झाले नाही. उलट बापलेकामध्ये जो कटू पत्रव्यवहार झाला होता त्यामुळे परस्परांमध्ये द्वेषाची भावना निर्माण झाली होती . १२ एप्रिल १६८५ रोजी अकबराचा एक गुलाम बादशहाला २ घोडे नजर करण्यासाठी घेऊन आला . बादशहाने त्याची भेट घेण्याचे नाकारले . (**एम्. ए.,** २५६) सुरतेच्या इंग्लिश दफ्तरात सप्टेंबर आणि नोव्हेंबर १६८४ ची अशी नोंद आहे की १५००० घोडेस्वार घेऊन अकबर आणि १० हजार स्वार घेऊन संभाजी हे सुरत लुटण्याच्या तयारीत आहेत. (**सुरत टू कंपनी** २६ सप्टेंबर आणि २९ नोव्हेंबर . **एफ्. आर्. सुरत** ९१ व **ओ. सी.**, ५२०६ ब मध्ये) यातून काही निष्पन्न झाले नाही. सरदार तरीन नावाचा एक अफगाण अहमदनगर येथील बादशहाच्या छावणीत गुप्तपणे शिपायांची भरती करी आणि त्यांची रवानगी अकबराकडे करी. हे उघडकीस आल्यावर बादशहाने त्याला पकडून ठार मारले. (**दिल.,** १८४) पुढील वर्षी अबदुस शकुर नावाचा बडतर्फ केलेला अधिकारी सोलापूरहून पळून अकबराला जाऊन मिळाला . (**ईश.,** १०८ ब) २० जुलै १६८५ रोजी बादशहाने अकबराचा उत्तरेकडचा मार्ग रोखून धरण्याचा कारतलबखानाला हुकूम केला. ऑक्टोबर १६८५ मध्ये ४००० बंडखोरांनी भडोचचा ताबा घेतला आणि अकबराच्या नावे द्वाही फिरविली . या सुमारास अशी बातमी पसरली की अकबर ३० हजार फौज घेऊन बंडखोराना मिळण्यासाठी येत आहे . परंतु या बंडाचा बिमोड करण्यात आला . (**सुरत टू जेम्स किंग, ३०** ऑक्टोबर **एफ्. आर्. सुरत** ९२ मध्ये)

जून १६८६ मध्ये बादशहा विजापूरच्या वेढ्यात गुंतल्यावर अकबराने मोगल प्रदेशात मुसंडी मारली . परंतु त्याचा हा प्रयत्न फसला . कारण बादशहाने अहमदनगरच्या रक्षणासाठी ठेवलेल्या मरहमतखानाने त्याचा चाकण येथे पराभव केला . अकबराने यानंतर मराठ्यांच्या प्रदेशाचा पुन्हा आश्रय घेतला . (**दिल., २००**) ईश्वरदास नागर याचे आणि दुर्गादासाचे या सुमारास परस्परसंबंध होते . तो अकबराच्या हालचालीविषयी पुढील माहिती देतो. शिरवळ येथील ठाणेदाराने बादशहाला कळविले की संभाजी हा अकबराला मोठे सैन्य देऊन उत्तरेकडे धाडण्याच्या तयारीत आहे. यावर बादशहाने राजपुत्र आजम याला बंडखोराचा मार्ग अडविण्यासाठी आणि त्याला पकडण्यासाठी ३० हजार घोडेस्वार देऊन अहमदनगरकडे पाठविले . आजम कंदपूर येथे पोहोचताच अकबराने मोठ्या कष्टाने साल्हेरकडे पळ काढला . आजम पाठलाग करीत अहिवंत गडाकडे आला तेव्हा पुन्हा अकबराने माहुलीकडे पळ काढला.

यानंतर शिरवळकडून आलेल्या बातमीपत्रात बादशहाला असे कळले की अकबर माहुलीहून कल्याण भिवंडीकडे व तेथून पन्हाळ्याकडे

गेला. तेथे बादशाही फौजांबरोबर त्याची मोठी चकमक उडाली आणि त्याने पुन्हा डोंगराळ भागात माघार घेतली . यावेळी बादशहाच्या आज्ञेवरून सैय्यद महमद हा जीनतऊन्निसा बेगम हिच्याकडून अकबराला पत्र घेऊन गेला होता तो परत आला . त्याने अकबराकडून उत्तर आणले असून त्यात त्याने क्षमायाचना केली होती . बादशहाने त्याला फर्मान पाठवून ताबडतोब परत येण्यास कळविले . एक महिन्यानंतर हेरांनी बातमी आणली की अकबर हा निराश होऊन सर्वदूर भटकत राहिला आणि अखेर संभाजीकडे गेला . त्याच्याकडून मदत घेऊन तो आता सुरतेवर चाल करून जाण्याच्या तयारीत आहे . यावर बादशहा उद्‌गारला की कायमच्या दुःखाने त्याला घेरले असून ते दुःख त्याला दऱ्याखोऱ्यात भटकवीत आहे . यानंतर हेरांकडून अशी बातमी आली की जव्हारच्या जमीनदाराचा भाऊ रघुवीर खांडे याच्या मदतीने अकबर हा पोर्तुगीज सरहद्दीपर्यंत पोहोचला असून तेथून परत फिरून उत्तरेकडे जाण्याचा त्याचा बेत आहे. यावर बादशहाने ताबडतोब त्याचा बंदोबस्त करण्याचा हुकूम आजमला दिला.

राजपुत्र आजम याने बादशहाला असे कळविले की हेरांनी आणलेल्या बातमीप्रमाणे दुर्गादासाने अकबराला जहाजावर बसवून दिले असून तो स्वतः जोधपूरकडे निघून गेला आहे. (ईश., १०८ ब, १०९ ब, ११० ब, ११३ अ, ११९ अ) याबाबत खाफीखान असे सांगतो की राजापूर येथे अकबराने भाड्याने जहाज घेतले आणि जियाउद्दीन महमद आणि आणखी ४५ अनुचर यांच्यासह त्याने फेब्रुवारी १६८७ मध्ये पर्शियाकडे प्रयाण केले. या जहाजाचा कप्तान बेंडाल नावाचा इंग्रज होता. वादळी हवेमुळे त्याला मसकत बंदराचा आश्रय घ्यावा लागला. (**के. के.** भाग २. २८५) २४ जानेवारी १६८८ रोजी तो इस्फहान येथे पोहोचला . (पर्शियामधील अकबराच्या जीवनक्रमाबद्दल अधिक माहितीसाठी पाहा **के. के.** भाग २. २८६–२९०, ४५०–५४६; **स्टोरिआ**, भाग २. २८९–३२२; **रुक्कात** नं. ९५ **एम्. ए.**, ४८४)]

[औरंगजेब व अकबर यांच्या दरम्यान झालेल्या पत्रव्यवहारावरून तत्कालीन मोगली राज्याच्या परिस्थितीचा वगैरे बोध होत असल्याने तो महत्त्वाचा आहे. तो पुढे दिला आहे : पहिल्या पत्रात औरंगजेबाने अकबराला 'आपल्या बापाविरुद्ध लढण्यापेक्षा त्याच्या शत्रूबरोबर दोन हात केले असते तर कितीतरी चांगले होईल .' वगैरे सांगताना औरंगजेब लिहितो "अरेरे! शहाणपण व सुविचार याचे अभावी , बापलेकांच्या नात्यास योग्य अशा आज्ञाधारकतेच्या व पितृनिष्ठेच्या सुमार्गावरून तू भ्रष्ट झाल्यामुळेच आपल्या दुर्वृत्तीचे व दुष्ट बुद्धीचे प्रदर्शन केलेस ! आणि राजमुकुट व तख्तनसीन होण्याच्या आशेने आपल्या जन्मदात्या बापावर तलवार उपसलीस ! हिंदुस्थानातील बादशहाच्या परंपरेत कोणत्या मुलाने आतापर्यंत आपल्या पित्यावर शस्त्र उगारले होते ! तू अतिशय आढ्यतेत व मगरुरीतच वाढला आहेस .....पर्शियात जा.....आणि तेथील शहाच्या शहरांचा विध्वंस कर.....हेच खरे सुपुत्राचे कर्तव्य आहे . .....तख्तासाठी आपल्या बापाशीच कां भांडतोस ? कृतज्ञतापूर्वक पातशहाची चरणधूळ आपल्या कपाळी धारण कर.....त्यातच तुझे कल्याण आहे. ....." (**फारशी हस्त. ७१, आर्. ए. सोसा., एम्. डी. आर्.** खंड १७, क्र १, क्र. ९७, जानेवारी १९१५, पाने ४७–८) या पत्रात क्षमेची आशा दाखविली . परंतु या पत्राचा अकबरावर फारसा परिणाम झाला नाही . पुढे औरंगजेबाने दुसरे पत्र लिहिले. हे लिहिताना त्याला आपला राग दूर ठेवून अकबरास प्रेम दाखवून विश्वासात घेण्याचा प्रयत्न करावा लागला : "सर्व पुत्रांत तूच मला आवडता व प्रियकर आहेस , यास ईश्वर साक्ष आहे . तू तुझ्या कमनशिबाने त्या मनुष्यदेहरूपी सैतानी रजपुत बंडखोरांच्या कारवाईला व फसवणुकीला बळी पडलास आणि आपल्या सुखसंपत्तीच्या नंदनवनास पारखा होऊन दुर्दैवाच्या कड्यापठारात भटकत राहिला आहेस. .....जेव्हा मी, तुझी हल्लीची निकृष्टावस्था, तुझ्या मनाचा गोंधळ, घबराट आणि तसेच तुझे सांप्रतचे दैन्य व नैराश्य याबद्दलच्या वार्ता ऐकतो तेव्हा मला होणाऱ्या अती तीव्र दुःखशोकाग्नीने माझे हृदय होरपळून जाते ..... पातशहाचा पुत्र म्हणून तुला प्राप्त झालेला जन्मसिद्ध असा पातशहाजाद्याचा पातशाही मान व दर्जा सोडून आपल्या कोमल तारुण्यावस्थेचाही तू विचार केला नाहीस . इतकेच नव्हे तर तू आपल्या बायकामुलांचीही पर्वा न करिता त्यांना खुशाल तू पशुसम व पशुतुल्य रजपुतांच्या कैदेत व हीनावस्थेत सोडून गेलास ! .....तू एकदा तरी माझेसमोर येऊन हजर हो आणि आपल्या चारित्र्यास लावून घेतलेला कलंक दूर कर .....रजपुतांचा अग्रणी जो जसवंतसिंग त्याने दाराशुकोहची पाठीराखी करून अगदी त्याचेबरोबर राहिला होता ; परंतु शेवटी आपली मानखंडना करून घेण्यापलीकडे आणि दुष्परिणाम भोगण्यापेक्षा अधिक काहीही प्राप्ती करून घेतली नाही . तुझीही तीच अवस्था होईल....." (**फारशी हस्त**. क्र. ७१, **आर्. ए. सोसा.**, **एम्. डी. आर्**. खंड १७ क्र. १, क्र. ९७; जानेवारी १९१५, पाने, ४४-५. त्याशिवाय **पी. एच्. सी.**, **अलाहाबाद**, १९३८ पाने ३५५ –६; वगैरे) अकबराने या पत्रास उत्तर दिले . त्यातील महत्त्वाचा भाग असा : ".....गुलामांना आनंददायक असे आपले राजपत्र .....येऊन पोहोचले.....मी ते शुभ्र आणि दिव्य शब्दसुमनगुच्छ आपल्या राजमुगुटावर ठेवले . त्यातील स्वच्छ शुभ्र भाग प्रकाशाप्रमाणे व काळा भाग काजळाप्रमाणे नेत्रांत घातला .....आपल्या लेखणीच्या प्रवाहातून वाहिलेल्या शब्दप्रवाहातील काही बाबतीत उत्तरादाखल माझ्या भावनांचे थोडक्यात प्रदर्शन करीत आहे . बापाच्या समाधानार्थ व निकट सेवा करण्यासाठी झटणे हे जसे खऱ्या पुत्राचे कर्तव्यकर्म असते , तसेच बापानेही आपल्या सर्व मुलांचे सारखेच संगोपन करणे , शिक्षण देणे आणि त्यांच्या ऐहिक व नैतिक बऱ्यावाईट बाबींविषयी काळजी राखून त्यांच्या व्यक्तिगत हक्कांचे संरक्षण करणे हे पित्याचे कर्तव्यकर्म असते .....विशेषतः लहानमुलांचे सर्व गोष्टीत संरक्षण करणे, हे तर सदाच सर्व पित्यांचे प्रधान उद्दिष्ट असते . परंतु आपण या जगातील नियमांची यत्किंचितही कदर न बाळगता मोठ्या मुलास सर्व थोर मानमरातब व शहा असा किताब देऊन त्यालाच आपला एकमेव वारस करून इतर सर्व धाकट्या मुलांची पातशहांनी आबाळ केली आहे . कोणत्या न्यायाच्या व समतेच्या शास्त्रार्थात तुमची ही वागणूक बसत आहे ? बापाच्या मालमत्तेवर सर्व मुलांचा सारखाच हक्क असतो . कोणत्या कुराणांतील अगर इस्लामी धर्मीय कायद्यान्वये आपण आपले सर्वस्व एकाच वडील मुलास देऊन बाकीच्यांना वाटेस लावीत आहात ? खरा सम्राट वेगळीच विभूती आहे. त्याच्या साम्राज्यात व कशास्तव हा प्रश्न उपस्थित होत नसतो . राजांना महत्पदास चढवणे हे सर्व त्या महान प्रकाशमान व तेजस्वी ईश्वराच्या इच्छेवर अवलंबून आहे . असे असताना देखील आपल्याला ती जाणीव नाही आपली धर्मनियमांवर श्रद्धा आहे , आपणास प्रामाणिकपणा किंवा नेकीची आवड आहे, आपण आध्यात्मिक ज्ञानात बरीच प्रगती करून घेतली आहे , आणि सत्याची कदरही करीत आला आहात . या सर्व गोष्टी जगास व सर्व संबंधीयास जाहीर आहेत . आपले वडील शहाजहान पातशाहा यांनी तुमच्या तारुण्याच्या काळाबाबतचे काढलेले उद्‌गारही सर्वश्रुत आहेत : त्यांनी लिहिले होते की , "तो (औरंगजेब) कोणाच्या मैत्रीची इच्छा धरिल व कोणाकडे त्याचे अंतःकरण ओढेल ?" .....खरोखर, राजमुकुटधारी बापाच्या विरुद्ध बंड करणाऱ्यांचे आपणच गुरू व मार्गदर्शक आहात , इतर फक्त तुमच्याच पावलावर पावले टाकीत आहेत . आपण पातशहानी खासा जो मार्ग चोखाळला तो मार्ग दुर्दैवी किंवा अपयशी कसा ठरू शकेल ! .....माझी पूर्ण खात्री आहे की..... माझ्या अंतःकरणातील इच्छा फार चांगल्या प्रकारे सफल होऊन येईल व माझी सांप्रतची सर्व चिंता व श्रमसायास लवकरच उत्साहानंदात परिवर्तन पावतील ...आपण लिहिले की, जसवंत रजपुतांचा अग्रणी व धुरीण होता...आपण यथार्थच लिहिलेत. परंतु मुख्य विषयाचा गाभा जाणला नाहीत. खरे म्हणावयाचे तर दारा शुकोह जसवंताचा द्वेष व रजपुतांचा द्रोह करीत होता . आणि दाराला जे काही भोगावे लागले ते त्याच्याच कर्माचे फळ होते ....याच जसवंताने

अनुक्रमणिका

आपल्या व सुजाच्या भांडणात उद्धटपणाचे वर्तन व बंडखोरी केली ती क्षमा करण्याबाहेरची गोष्ट होती ; परंतु जाणूनबुजून व हेतुपूर्वक त्याकडे दुर्लक्ष केलेत. त्याच जसवंताशी आपण गोड बोलून व लालूच दाखवून त्याला आपल्याकडे वळवून घेतलात व दाराकडून फोडलात आणि दारा शुकोहविरुद्ध यश संपादन केलेत . खरोखरच या धन्याच्या मिठाला जागणाऱ्या रजपुत जमातीला अनेक धन्यवाद दिले पाहिजेत . कारण त्यांनी आता आपल्या धन्याच्या मुलांसाठी आपले जीव धोक्यात घालण्यास मागे पुढे पाहिले नाही व त्यांनी त्यांचेसाठी कित्येक शूरत्वाची कार्येही करून दाखविली आणि केवळ त्यांच्या नेकी विरुद्धच खास पातशहा , पातशहाजादे, मंत्री, सुभेदार, सरदारादि मंडळी झगडत गेली , तीन वर्षे हिंडत आहेत. ही हालचाल म्हणजे केवळ मुख्य लढ्याची सुरुवात आहे ....आणि अशी बंडाई तरी का उद्भवू नाही ? आपल्या कारकिर्दीत प्रधानमंत्र्यांना अधिकार राहिला नाही , सरदारावर विश्वास नाही , सैनिकसेनापती खडतर दारिद्र्यात आहेत , लेखक वर्गाला कामकाजावरून दूर केले आहेत , व्यापाऱ्याजवळ मुद्दल नाही आणि शेतकरीवर्गाची धुळदाण उडाली आहे . त्याप्रमाणे दक्षिणचे राज्य की , जे अती विस्तीर्ण व पृथ्वीवरील नंदनवन मानले जात होते , ते सारे उद्ध्वस्त होऊन डोंगराळ वाळवंटाच्या अवस्थेप्रत गेले आहे , आणि सृष्टीच्या गालावरील सौंदर्याच्या तीळासारखी शोभणारी तेथील राजधानी बऱ्हाणपूर नगरी ही लुटून फस्त केली गेली आहे , आपल्या नावाने गौरविलेले औरंगाबाद शहर शत्रुसैन्याने नासधूस व आघात केल्याने पाऱ्याप्रमाणे अस्थिर झाले आहे . हिंदुजमातीवरही दारुण आपत्ती कोसळल्या आहेत . पहिली आपत्ती शहरात जिझिया कर लादल्याने व दुसरी आपत्ती सर्व मुलखांत शत्रूच्या जुलूमजबरदस्तीने . प्रजेच्या डोक्यावर सर्व बाजूने अशा आपत्ती कोसळू लागल्यानंतर त्यांनी आपल्या राजास कोपरापासून हात जोडल्यास नवल कसले ! पुरातन कुलवान , सुसंस्कृत व श्रेष्ठ दर्जाच्या लोकांना सध्या पातशाहीतून नाहीसे करण्यात आले असून त्या जागी सरकारदरबारी व कारखान्यात , तसेच राजकारणात सल्लामसलत देणाऱ्या प्रधानमंत्र्यात कारागीर , क्षुद्र लोक , विणकर, साबुविक्रेते, आणि शिंपी या लोकांचा भरणा झाला आहे . हे लोक जिभेवर कुराणातील काही उक्ती व दंतकथेतील शिकवणी घोळत ठेवून काखेखाली कपट व ठकबाजीची पांघरुणे व फसवणुकीची जाळी घेऊन वावरत आहेत आणि हातात मात्र जपमाळ दाखवत आहेत ....आपण पातशहा असल्या मंत्री व मित्रांवर विश्वासून आहात ....आणि त्याच्याच नियंत्रणाखाली असाहाय्यपणे वागत आहात .....हे लोक गहू दाखवून सातू विकीत आहेत आणि अनेक बहाणे करून गवताऐवजी टेकडी व टेकडीऐवजी गवत दाखवून तुम्हास फसवित आहेत .....तुमच्या पातशाहीची इमारत ढासळण्याचा दिवस अगदी नजीक असल्यासारखा दिसतो .....जेव्हा पातशाहीची अशी दुर्दशा झालेली मी पाहिली आणि पातशहाच्या स्वभावात फरक पडण्याची आशा मावळली तेव्हाच हिंदुस्थानातील या पातशाहीत वाढलेली काटेरी झुडपे व रानटी निवडुंगे साफ करण्याची बुद्धी माझ्या दयेत प्रेरित झाली . जुलूमजबरदस्ती करणाऱ्या या हालकट वृत्तीच्या लोकांस दूर करून त्याच्याऐवजी सुसंस्कृत व कुलवान पण सुविद्य लोकांस नेमण्याची आवश्यकता भासली. असे केले तरच प्रजेस शांततेचे वातावरण व सुलभ व निर्धास्त राहणी प्राप्त होऊन त्यांना आपल्या धंद्यात व नावलौकिकात भर टाकता येईल .....पातशहा ईश्वराच्या सान्निध्यात राहून जर हे सर्व कार्य आपल्या अतिनम्र अशा मुलांचे हाती देतील तर कितीतरी चांगले होईल. जर आपण पवित्र ठिकाणच्या यात्रेस जाल तर सर्व जग तुमचे गोडवे गातील व स्तुतीही करतील ....पातशहांनी आपल्या पत्रात केलेल्या उपदेशाबद्दल लिहावयाचे तर आपण जी जी तत्त्वे अधिकारवाणीने लिहू पाहता ती आपल्या लेखणीतून बाहेर निघालेली पाहून मला लाजेने मान खाली घालावी लागते .....तुम्ही आपल्या वडिलांचे काय चांगले केले आहे ? तर तुमच्या मुलांकडून चांगल्या सेवेची तुम्ही अपेक्षा धरावी! ..... आपण आपल्यासमोर मला हजर होण्यास लिहिलेत. जरी तसे करणे म्हणजे तुमच्या कृपाशीर्वादास पात्र होणे असे असले तरी तुमच्या स्वभावातील सुडाची जन्मजात प्रवृत्ती मला साशंकितच करते . ज्या माणसाने आपल्या सख्ख्या भावांशी व बापाशी इतकी बेगुमानपणाची वर्तणूक केली त्याच्याकडून नाहक शिक्षा होण्याचीच माझ्या तरुण मनाला भीती वाटणे साहजिकच आहे .....” [**फारशी हस्त क्र. ७१, आर. ए. सोसा., एम्. डी. आर.** खंड, १७ क्र. १, क्र. ९७, जानेवारी १९१५, पाने क्र. ४५–७; **पी. एच्. सी. अलाहाबाद**, १९३८, पाने ३५६–६० वगैरे]. हे उत्तर १६८३ च्या अखेरीचे किंवा त्यानंतरचे आहे यात शंका नाही. या पत्रातील मजकुरावर हिंदवी राज्यातील संस्कृतीचा संस्कार दिसतो.]

[काफीखानाने अकबराचा प्रवासमार्ग वगैरेबद्दलची हकीकत दिली आहे . ती पुढीलप्रमाणे आहे : “पातशाहाजादा अकबराचा पूर्ण पाडाव झाला. शेवटी त्याचे जवळ अवघे तीनचारशे स्वार , काही रजपूत सरदार व मिर्जा यहुद्दीन शुझाई व आणखी दोघे -तिघे मुसलमान सरदार होते . खजाना वगैरे सर्व काही लुटला गेला होता . बायकामुले पातशाहाने नेली . एक मोठा मुलगा मात्र राहिला , तो रजपुतांनी आपल्याबरोबर नेला . अकबर प्रथम अजमीरावरून शहाजहानाबाद , लाहोरकडे जाऊन इराणात जाण्याच्या विचारात होता . परंतु सर्वत्र नाकेबंदी झाल्याने व शहाआलम पाठीस लागल्याने अकबर काही जमीनदारांच्या साहाय्येकरून पहाडीमुलखातून दक्षिणेत जाण्याच्या खटपटीत लागला . नदी ओलांडून तो राजा मोहनसिंगाच्या मुलखात शिरला . तेथून मीर नुरुल्लाच्या तालुक्यात गेला . औरंगजेबाने दख्खनचा सुभेदार खानजहान बहादूर यास पत्रे लिहून अकबराला ताबडतोब पकडण्याचा अगर मारण्याचा हुकूम पाठविला . बहादूरखानानेही त्वरित निघून अकबराला गाठण्याचा प्रयत्न केला . एलगडच्याजवळ ते एकमेकांपासून अवघे चौदापंधरा कोसांवर होते . परंतु त्याने अकबराला तेथून निसटून जाण्याचा अवसर मिळू दिला . ते पाहून औरंगजेबाने बहादूरखानास ताकीदपत्र पाठविले . दरम्यान अकबर बागलाणात राजा देवीसिंग बुंदेल्याचे मुलखात शिरला . देवीसिंगाने त्याचेवर सैन्य पाठविले. तेव्हा अकबराकडील काही रजपूत बुंदेल्याजवळ जाऊन राहिले . अकबर मात्र राहिलेल्या लोकांनिशी तेथून निसटून फिरंगणांतून संभाजीराजाच्या हद्दीत शिरला . तेथे (संभाजी) राजांनी त्याला त्याच्या छावणीत नेमून दिलेल्या ठिकाणावर आणण्याची व्यवस्था केली होती . हे ठिकाण राइरीगडापासून तीन कोसांवर होते . तेथे त्याला आणले व त्याच्या खर्चाचे मोईन करून दिली ....” (**के. के. एम्**. पा. ४६१–६८; **के. के. डी**. वगैरे).]

[अकबराच्या हालचालींविषयी माहिती पुढे दिली आहे :

मुंबईकर इंग्रजांची बातमी अकबराविषयी बरीच माहिती देते . ते १० जूनला लिहितात : “येथे उडत-उडत बातमी आहे की , सुलतान अकबर हा संभाजीच्या राज्यात येऊन राहिला आहे पलीकडील संभाजीच्या भागात गेलेल्या आपल्या बेटावरील रहिवासी दोन दिवसांपूर्वी येथे परत आला. त्याने त्याला नागोठण्यापासून एका दिवसाच्या टप्प्यावर असलेल्या पाली येथे पाहिले असल्याचे सांगतो . त्याचेजवळ फक्त ४०० घोडे, २५० उंट आणि थोडेसे पायदळ आहे . तेथे त्यास राजा म्हणून मुजरा केला जातो . अकबर जेव्हा संभाजीमहाराजांच्या राज्यात शिरला तेव्हा त्याला आणण्याकरिता राजांनी पाठविलेले शिष्ट लोक त्याला भेटले व त्याला त्यास नियोजित ठिकाणी घेऊन आले . राजा लवकरच येऊन त्याची भेट घेईल असे तेथे सांगितले जाते ....असे म्हणतात की , राणा आणि संभाजीराजे यांची सैन्ये एकत्र होऊन अकबराला त्याच्या बापाच्या पादशाही

अनुक्रमणिका

तख्तावर बसविण्याचा प्रयत्न करतील ....” (**एफ्. आर्. बॉम्बे खंड ९**, पा. ५१–६; **बाम्बे टु सुरत** १०–६–१६८१; **ऑर्म** खंड ११६–७ पा. २५७–२६०; **बाम्बे टू सुरत** १०–६–१६८१). नंतर इंग्रजांनी आपला माणूस पाठवून बातमी आणवली . ती त्यांचे २१ जूनचे पत्रात आलेली आहे . मुंबईकर लिहितात :-“...सुलतान (अकबर) तेथेच (पालीस) आहे. तो मध्यम बांध्याचा व शुभ्रवर्ण आहे . त्याचे सुमारे २५ वर्षांचे वय असावे . पालीगडच्या पायथ्याशी एका पेंढ्याने शाकारलेल्या मोठ्या घरात त्याला राहावयास जागा दिली आहे . घराला राहाळाचे कुड होते . परंतु तो तेथे आल्यावर ते काढून टाकले आहे . आता सभोवती कॅलिको कापडाचे पडदे व छत लावले असून खाली सामान्यच संतरजी अंथरलेली आहे . तो उघड्यावरच बसतो. त्याच्याबरोबर विशेष महत्त्वाचा माणूस म्हणजे राण्याचा फार प्रातीतील असा दुर्गादास रजपूत आहे . शिवाय त्याचेबरोबर अजमासे पाचशे घोडी पण पन्नासच उंट असून त्याच्या माणसांपैकी बरेच रजपूत आहेत व अगदी थोडे मूर (मुसलमान) आहेत. सुलतानाच्या छावणीसभोवती संभाजीराजांचे ३०० हषम संरक्षणार्थ ठेवले आहेत . आसपासचे सुभेदार त्याला भेटण्यास तेथे आले आहेत . चार दिवसांपूर्वी संभाजीराजे याजकडून हरजी फर्ज्सिंग (फर्जंद) नावाचा एक प्रीतीतला मोठा सरदार आला आहे . त्याने आपल्या धन्याचे पत्र प्रविष्ट करण्यास आणले होते . ते व नजराणा सुलतानाच्या पुढे ठेवून अर्पण केला . नजराण्यात १ हजार पगोडे , एक मोठा मोत्याचा रत्न व हिरेजडित असा हार , हिरेजडित एक तुरा , शिवाय हिंदी व इराणी पद्धतीच्या इतर वस्तू होत्या . सुलतानाने एक हजार पगोडे दुसरे दिवशी आपल्या लोकांस वाटून दिले . शक्य तेवढा मानमरातब त्याला दिला जात आहे . संभाजीराजे यांच्या आज्ञेनुसार त्या सर्व लोकांच्या व उंट , अश्व वगैरेंच्या तरतुदीसाठी आसपासचे सुभेदार धान्यसामग्री वगैरे पाठवीत आहेत . संभाजीराजे मात्र पन्हाळ्याहून प्रयाण करण्यासाठी शुभदिवसाची वाट पाहात आहेत . परंतु ते लवकरच येऊन सुलतानाची भेट घेतील असे बोलले जाते . ते आल्यावर सुलतानापुढे उभे राहतील ; त्यांचेसमोर बसणार नाहीत. कारण सुलतान कोणाला त्याचेसमोर बसू देत नाही. जे कोणी त्याजकडे येतात ते सर्व त्याला राजा म्हणूनच मुजरा करतात . त्याला पैशाची टंचाई भासत आहे . परंतु त्याचेजवळ मोल्यवान जडजवाहीर आहेत. तेथे सर्वत्रांच्या तोडून एकच वार्ता ऐकावयास मिळते . ती म्हणजे राणा , संभाजीराजे व इतर हिन्दू राजे आपले सर्व सैन्यबल एकत्र करून (अकबराला) त्याला राजा (पातशाहा) करण्याचा प्रयत्न करणार आहेत ....” (**बॉम्बे टू सुरत**, २१–६–१६८१; **बॉम्बे** खंड ९ , पा. ५८–६०; **आर्म**, खंड ११६–७, पा. २६०–३; **सुरत टु बॉम्बे** , ५–७–१६८१; **बॉम्बे** खंड १९ , पा. ३१; **ऑर्म**, खंड ११६–७, पा. ३०६, वगैरे; **एफ्. आर**.) पुढे मुंबईकर आपल्या १६ जुलैच्या पत्रात अधिक माहिती देतात : “...सुलतान अकबराचे सैन्यबल दिवसेंदिवस वाढत आहे . हल्ली त्याचेजवळ १५०० स्वार असून त्र्यंबकला आणखी पाच -सहा हजार स्वार त्याला मिळण्याच्या तयारीने आहेत . संभाजी राजे त्यास येऊन भेटतील अशी रोजचेरोज अपेक्षा करण्यात येत आहे . ते दोन हजार स्वारानिशी त्याला (सुलतानाला) बऱ्हाणपुरास घेऊन जातील व तेथे सर्व हिंदू राजे व त्याचे मित्र अमीरउमराव येऊन मिळतील. तेथून ते दिल्लीवर चालून जातील...” (**बॉम्बे टू सुरत**, १६–७–१६८१; **बाम्बे**, खंड ९, पा. ६०–३, **ऑर्म**, खंड ११६–७, पा. २६४–७ वगैरे; **एफ्. आर्**.)

अकबराचा ताबडतोब बंदोबस्त करणे औरंगजेबास अगदी निकडीचे होते . कारण त्रस्त झालेल्या रजपुतांचा मोड झाला होता तरी ते संधी मिळताच पुन्हा बंड करतील अशी परिस्थिती निर्माण झाल्याची त्याला पूर्ण जाणीव होती . शिवाय अकबराचे बाहुले पुढे करून इतरत्रही नामोहरम केले गेलेले राजे व मानखंडणा झालेले मुसलमान उमरावही आपल्याशी वैर करतील अशी त्याला भीती वाटत होती . “शहा अलमने पुष्कळ धावपळ करून पाहिली . परंतु त्याला इ . स. १६८१ च्या मार्चच्या अखेरीस निराश होऊन मागे परतावे लागले . त्यांनी अकबराला दाखविलेल्या पैशाच्या आमिषाला अकबर बळी न पडता तो मिळालेल्या मदतीने सावरला .” (**एम्. एस्. एम्**., खंड २, पा. २५०–१). हे पाहून औरंगजेबास, आपण व मुराद एक होऊन जी क्रांती केली तीच शहा आलम करीत आहे की काय याचा संशय येऊन , “औरंगजेबाने निरनिराळ्या कारणांनी अकबराचा कसून पाठलाग करण्याचा निग्रह केला. राण्याशी घाईने तह करून तो अजमिराहून १६८१ च्या सप्टेंबरात निघाला . या कूचात त्याचा एकमेव विचार म्हणजे काहीही होवो ज्यांनी अकबरास ठाव दिला त्या संभाजी राजांचा नाश करावयाचा .” (**एम्. एस्. एम्**., खंड २, पा. २५५; **फोर्ट सेंट जॉर्ज टू इंग्लंड**, २९–१–१६८२; **ऑर्म**, खंड १५४, पा. ८; **एफ्. आर्**.) ३१ जानेवारी १६८२ ला डच सुरतेहून लिहितात की,.....

(२) “..... पिलाजी बिन गणोजी व देवाजीराव बिन पिलाजीराव व गुणाजीराव बिन बहिरजीराव शिर्के पश्चिमवादी यांनी केली तकरीर ऐसीजे : मामले रायरी शिरकाण येथील सरदेशमुखीचे वतन .....गुणोजी शिर्के याची भीड राज्यात दरबारी होती .....सारे शिरकाणाचे वतन सरदेशमुखीपैकी.....मामले रायरी शिरकाण येथील.....”..... महाराजनामा पृ. ७७–७८, वतनपत्रे, निवाडपत्रे, वगैरे, इत्यादी.

सारांश, ‘शिर्काई म्हणजे शिर्क्यांची कुलस्वामिनी व शिरकाण म्हणजे शिर्क्यांची जहागीर , ज्याअर्थी राजारामाचे कारकिर्दीत खास गणोजी व इतर शिर्के व त्यांच्या मुलाबाळांचा उल्लेख येतो – त्याअर्थी त्यांची डोसकी मारली नव्हती व गर्भही कापले नव्हते . चुकीचा अर्थ लावून उगाच कथेकरी थाटाचा बाष्कळ रंग आणला आहे इतकेच . मोगल...बऱ्हाणपूरला आला आहे....संभाजी राजाच्या हालचालीवर लक्ष ठेवणे जरूर पडले आहे. कारण तो मोगली राज्याच्या मर्यादेत तळ देऊन बसला आहे . त्याप्रमाणे त्याचा बंडखोर पुत्र अकबर यास त्याच्या साहाय्याने काही विशेष चढाई करू देऊ नये म्हणून त्याचा बंदोबस्त करणेही जरूर झाले आहे . यामुळे याने (औरंगजेबाने) राज्यमर्यादेवर सर्वत्र सैन्य ठेवून सर्व मोक्याच्या जागा मजबूत राखल्या आहेत .....” (**डच रेकार्डस्**, खंड ३७; **सुरत टू बटाव्हिया**, ३१–१–१६८२; **लेटर्स फ्रॉम इंडिया सिरिज्**). तरी औरंगजेबाला आपली इतर मुले व सरदार अकबरास मिळतील की काय हा संदेश मनात असल्याने त्याच्या सर्व हालचाली भीतभीत व कोणावरही विश्वास न धरता होत होत्या. सुरतकर आपल्या ३ एप्रिलच्या पत्रात लिहतात की , “बादशाहा...बऱ्हाणपुरात आहे....त्याच्या मुलांतील एका मुलाने त्याचे विरुद्ध बंड केले आहे व संभाजीच्या राज्यात जाऊन राहिला आहे . पाठलागार्थ तो दक्षिणेत गेला आहे. पातशाहाबरोबर फार मोठी सेना आहे. परंतु तो काहीही हालचाल न करता स्वस्थ बसून आहे . कारण संशय व भीतीने तो इतका ग्रस्त झाला आहे की त्याला आपला जीव तितका सुरक्षित नाही असेच वाटत आहे....” (**सुरत टू बनटाम**, ३–४–१६८२; **सुरत**, खंड ९०, भाग ३ पा. ७४; **एफ्, आर्**.) पुढे धरणगावकरांच्या २२ मेच्या पत्रात औरंगजेब औरंगाबादेला आल्याचा उल्लेख आला आहे. (**धरणगाव टु सुरत**, २२–५–१६८२; **सुरत**, खंड ते १०८, पान ९१; **ऑर्म**, खंड ११७–३, पा. ८९–९० **एफ्. आर्**.) नंतर १० जुलैच्या त्यांच्याच पत्रात औरंगजेब औरंगाबादेस व बहादुरखान आपल्या सैनिकानिशी नाशिक त्र्यंबकास पावसाळा काढणार असल्याची वार्ता (**धरणगाव टु सुरत**, १०–७–१६८२; **सुरत**, खंड १०८, पा. ९८; **ऑर्म**, खंड ११७–३, पा. ९७; **एफ. आर**.) दिली आहे. परंतु याचा अर्थ असा नाही की बहादुरखानाने चालविलेली मोहीम व इतर मोगली सरदारांच्या हालचाली थांबल्या होत्या. त्या शिवाजीच्या मुलखात चालूच होत्या. त्यांची तपशीलवार चर्चा इतरत्र आली आहे . औरंगजेब जरी खासा स्वारीवर निघाला नव्हता तरी त्याने अकबराला धरण्याची किंवा

अनुक्रमणिका

मारवण्याची इतर कारस्थाने चालविलीच होती . औरंगजेबाने अकबरास पत्रे लिहून त्याला बंडखोरीपासून परावृत करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला . या पत्रव्यवहाराबद्दल मनूची लिहितो : "त्याने (औरंगजेबाने) अकबरास ममतापूर्वक पत्रे लिहून त्याला परत येण्याचा पुष्कळ आग्रह केला . त्याने लिहिले की : आपणास पूर्ण खात्री आहे की , राज्यावरील स्वारीचे प्रसंगी जे पातशाहाविरुद्ध बंड केले ती कारवाई अकबराची नसून ती त्याच्या कारभाऱ्यांचीच होती. तेव्हा त्यांनी पूर्ण विश्वास ठेवून परत यावे आणि पातशाहाची क्षमा स्वीकारावी . त्याला कोणत्याही प्रकारचा धक्का लागणार नाही, असे औरंगजेबाने कुराणाच्या नावाने शपथपूर्वक त्यास वचनही दिले . पत्रोपत्री चालूच राहिली . परंतु अकबर आपल्या बापाला चांगलाच ओळखत होता. तो इतका मूर्ख नव्हता की , ज्या बापाने आपल्या एका मुलाला ठार मारले होते त्याच्यावर विश्वास धरील . परंतु अकबराने इतकी नम्रता व आज्ञाधारकपणा दाखवून उत्तरे धाडली की , त्या योगे औरंगजेबाने अकबराकडे त्याच्या गुरुजीलाही रवाना केले व अकबराला खर्चास पुष्कळ सोनेनाणे पाठविले व पत्र लिहून पुत्राच्या प्रत्यागमनाची मोठ्या उत्सुकतेने प्रतीक्षा करीत आहे असे कळविले .....शेवटी औरंगजेबाला कळून चुकले की, आपला मुलगा परतण्यास टाळाटाळी करीत आहे. तेव्हा औरंगजेबाने पुन्हा पत्र पाठवून अकबराने लावलेल्या विलंबाबद्दल आश्चर्य व्यक्त केले आणि पुन्हा त्यास येण्याबद्दल लिहिले . परंतु अकबराने आपल्या बापापासून पैसा उकळून आपली बऱ्याच दिवसांची बेगमी करून घेतल्यानंतर औरंगजेबास उत्तर पाठविले की , तो बादशाहाकडे नक्कीच येणार आहे . मात्र तसे करताना तो एका हातात तलवार उपसून व आपल्या जिवावर उदार होऊन बापास ठार करून त्यांच्या हिंदुस्थानच्या पातशाहीवर विराजमान होण्याकरिताच येईल . तेव्हा औरंगजेबास कळून चुकले की, ज्याअर्थी आपणही चुकीमुळे अकबराच्या भुलवणीस फसलो त्या अर्थी तशाच प्रकारच्या शहा अलमने केलेल्या प्रयत्नात तोही फसला असला तर नवल नाही . (**एम्. एस्. एम्.**, खंड २, पा. २५६–६०) सारांश, पत्रव्यवहाराचा मार्ग हा जास्त यशस्वी होणार होता व त्यात इतर लोकांच्या फंदफितुरीची भीती बाळगण्याचे कारण नव्हते . परंतु यातही औरंगजेबाला निराशच व्हावे लागले . ज्याप्रमाणे त्यांने अकबराला पत्रे लिहिली होती , त्याप्रमाणे त्याने सर्वत्र लोक पाठवून व संभाजीच्या सभोवतालील राजे -जहागिरदारांस पत्रे पाठवून अकबरास धरण्याकरिता अगर मारण्याकरिता फर्मावले होते. परमानंदाचा मुलगा लिहितो : "शम्भोस्तद्वत्तनुजस्य चसमितिमतौ सम्प्रमूढो दिलीशः ॥ क्रोधान्धो वासरान्धः प्रकृतिमुपगतो वीक्षणं न चकार ॥ १२३ ॥...स्थाने स्थाने सुखानाः प्रकृतिकपटिनः प्रेषिताः प्राक् पठाणाः । प्राणानुसृज्य कार्येष्वभिमतमतयः स्थापितास्ते तुराणाः ॥ श्यामास्या लोहितास्याः सलिलनिधीपथे प्रायशः सावधाना । ज्योषं रोषं पिघाय हाकबराविषये घातुषोषं पुपोष ॥ १२५ ॥ " [अनुप परिशिष्ट] मनूची असेच एक पत्र गोव्याच्या व्हॉइसरायला लिहिल्याचे सांगतो . औरंगजेबाने गोव्याचा व्हॉइसराय , फ्रान्सिस्को द तवोरा कोंद -द अलवोर याला लिहिले की, "तुम्ही संभाजीवर स्वारी करा . लढाईत त्याच्याकडून मुलूख घ्याल तो सर्व तुम्हाला बक्षीस म्हणून दिला जाईल . संभाजीबरोबर औरंगजेबाचा बंडखोर मुलगा अकबर आहे त्याला वाट देऊ नका व कोणत्याही प्रकारची मदत करू नका . उलट त्याला पकडले , मारून टाकले तर पातशाहावर मोठेच उपकार केल्यासारखे होतील . योग्य वेळी अशा मदतीची जरूर लागेलच . याबाबत बोलण्यासाठी शेख महमद वकील म्हणून पाठवला आहे . दरम्यान अबदुल हकीमच्या सांगण्यावरून शहाआलम गोव्याच्या बाजूने संभाजीच्या मुलखावर स्वारी करण्याकरिता पाठविण्याची तयारी चालू आहे.." (**एम्. एस्. एम्.**, खंड २, पा. २५९-६०) याप्रमाणे गोवेकर पोर्तुगीजांशी राजकारण चालू होते . इंग्रजांच्या हद्दीत सिद्दीतळ बसला असल्याने तिकडील कामगिरी सिद्दीकडेच सोपविली होती . फोर्ट सेंट जॉर्जकडेही तेथील इंग्रजांकडे खलिता गेलाच होता . ते लिहितात : "पुल्लीमल्लीचा हवालदार मखदुमखान याचे पत्र आले की, तेथील गव्हर्नरने आपले लोक पाठवून मोगलांचा मुलगा अकबर यास शक्य झाल्यास कैद करावे." परंतु त्यांना स्वाभाविकच वाटले की , ह्या कामात पडले तर त्याचे फार वाईट दुष्परिणाम भोगावे लागतील . (**फोर्ट सेंट जॉर्ज** , ५-२-१६८३; **फोर्ट सेंट जॉर्ज**, खंड ३ पान १७; **फोर्ट सेंट जॉर्ज**, खंड २, पा. १४; **एफ. आर**.)]

[औरंगजेबाने मराठ्यांवर केलेल्या स्वारीबाबत पोर्तुगीज कागदपत्रात पुढीलप्रमाणे माहिती मिळते :

संभाजीराजे ह्यांनी औरंगजेब बादशहाचा पुत्र अकबर ह्याला आश्रय दिल्याबद्दल , औरंगजेब बादशाहा त्यांच्यावर क्रोधाविष्ट झाला व त्याने इ. स. १६८२ साली त्यांच्याशी युद्ध पुकारले . त्याने संभाजी महाराजांविरुद्ध पोर्तुगीजांची मदत मिळविण्यासाठी त्यांच्याकडे आपला एक वकील रवाना केला. ह्या प्रकरणी कारवारचे इंग्रज दि. ३० जुलै १६८२ रोजी लिहिलेल्या एका पत्रात म्हणतात :

"औरंगजेबाचा संभाजीवर एवढा कोप झाला आहे की , त्याला ठार अथवा कैद अथवा त्याचा पराभव केल्याशिवाय आपण आपला मंदील डोक्यावर चढविणार नाही आणि तलवार हाती धरणार नाही , असा त्याने पण केला आहे ." (**हिस्टरी ऑफ औरंगजेब** , ज. सरकार खंड ४ , पान २९८.) औरंगजेबाने संभाजीमहाराज ह्यांच्यावर जे सैन्य पाठविले त्यासंबंधी गोव्याचा व्हॉइसराय दि . २४ जानेवारी १६८३ रोजी पोर्तुगालला लिहिलेल्या एका पत्रात म्हणतो :

"गेल्या ऑगस्ट महिन्यात मी मोगलांच्या सैन्यासंबंधाने लिहिले होते . हे सैन्य शिवाजीच्या मुलखात तीन बाजूने शिरले आहे . या सैन्याबरोबर जे सरदार आहेत, ते जिंकलेल्या प्रदेशात तटबंद्या उभारीत आहेत. कारण, त्यांनी संभाजीचे राज्य खालसा करण्याचा पण यापूर्वी कधी केला नव्हता.

मराठ्याचे राज्य जिंकण्याच्या उद्देशाने सुरतेहून निघालेले मोगलांचे एक प्रचंड आरमार सांप्रत मुंबई बेटानजीक येऊन दाखल झाले आहे. ह्या आरमारात लहानमोठ्या अगणित नौका आहेत . बहुतेक नौका पुरवठा घेऊन आल्या आहेत . मुंबई बेटानजिकचा एक किल्ला इंग्रजांनी मोगलांना विकला अशी बातमी आहे . ही बातमी कळल्यावर पुढे जे काय घडणार आहे तत्संबंधाने मी मुंबई बेटाच्या गव्हर्नरांना एक पत्र लिहिले होते. परंतु त्या पत्राचे मला अद्याप उत्तर आलेले नाही.

मी त्या पत्रात अशी तक्रार केली की , इंग्रजांना किल्ला मोगलांना विकायचा झाल्यास प्रथम त्यांनी मला ह्या सौद्यासंबंधाने समज देणे आवश्यक होते. कारण ही बातमी कळल्याशिवाय राहणार नव्हती.

ज्या मोगल सैन्याना मी वर उल्लेख केला आहे ते सैन्य आमची परवानगी घेऊन आमच्या मुलखातून कोणतीच हानी न करता पुढे गेले .

अनुक्रमणिका

त्यांनी आपल्या सामर्थ्याचा उपयोग केला नाही . येथे मोगल सम्राटाचा एक वकील आहे . आतापर्यंत सर्व सुरळीत चालले आहे . परंतु मौरांवर (मुसलमानांवर) फार विश्वास ठेवणे इष्ट नाही , आणि विशेषेकरून ह्या मुसलमानांवर . ते जसे दगलबाज आहेत तसेच ते बेशरम देखील आहेत . त्यांना आपला दर्जा सांभाळता येत नाही . म्हनून महाराज आपणाला माझी विनंती आहे , कारण मुसलमानांविषयी गैरसावध राहून उपयोगाचे नाही . मोगलांचा आमच्यावर कधी हल्ला होईल त्याचा नेम नाही . केवळ मोगलांच्या हल्ल्याच्याच भीतीने नव्हे तर राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनेही मदत हवी आहे.

ह्या राजाचा (औरंगजेबाचा) पुत्र संभाजीबरोबर होताच . आता तो दुसरीकडे निघून गेला आहे . बहुधा तो आता कर्नाटकात असावा . तेथून त्याने माझ्याकडे आपला एक दूत पाठविला आहे . त्याने माझ्याकडे गोव्यात आपले जडजवाहीर विकण्याची परवानगी मागितली आहे . बापाचे व आपले वितुष्ट का आले तीही हकीकत त्याने मला कळविली आहे . मी त्याला मोघम असे उत्तर पाठविले असून त्यात त्याच्याविषयी थोडी सहानुभूती व्यक्त केली आहे . त्याला मी इकडे त्याचे जडजवाहीर विकण्यास परवानगी दिली आहे . त्या परवानगीचा उपयोग त्याने अद्याप केलेला नाही. त्याच्या बापाचा वकील सांप्रत इकडे असल्याने तो थांबला असावा....." गोवा, २४ जानेवारी १६८३.

(**म. इ. सा.** खंड ३, ३३-३४)]

(१६) मराठ्यांच्या राज्यातील अंतर्गत परिस्थिती आणि संभाजीच्या हालचाली, १६८५-१६८७

ज्यावेळी औरंगजेबाने आपल्या साम्राज्याच्या सर्व शक्ती विजापूर आणि गोवळकोंडा यांच्या विरुद्ध पणास लावल्या होत्या , तेव्हा संभाजीने दक्षिणेतील सर्व राजवटींना जो धोका निर्माण झाला होता त्याचे निवारण करण्यासाठी पुरेसा प्रयत्न केला नाही . जणू काही अंगवळणी पडल्याप्रमाणे त्याचे शिपाई मोगलांच्या मुलखातील अनेक गावे उद्ध्वस्त करीत . परंतु याचा कोणताही परिणाम एकंदर लष्करी परिस्थितीवर झाला नाही. संभाजीकडून हे जे चिमटे बसत होते त्याची औरंगजेबाने पूर्णपणे उपेक्षा केली . विजापूर आणि गोवळकोंडा यांची वेढ्यांतून सुटका करावी आणि त्यांचा पाडाव टाळावा यासाठी मोगलांचे लक्ष वेधण्याची कोणतीही मोठी आणि विचारपूर्वक केलेली योजना पार पाडण्याइतका शहाणपणा संभाजीने दाखविला नाही. त्याच्या मांडलिकांमध्ये होणारी बंडे आणि त्याच्या दरबारी मंडळीकडून केले जाणारे कट यामुळे त्याची सरकारी यंत्रणा पूर्णपणे दुर्बळ झाली होती . संभाजी गादीवर आल्यानंतरच्या काही वर्षांतच ज्या मंत्र्यांनी आणि सेनानींनी त्याच्या बापाच्या कारकिर्दीचे वैभव वाढविण्यासाठी हातभार लावला , ते सर्वजण राजपटलावरून अदृश्य झाले होते . त्याच्या राज्याच्या बाहेर पसरलेल्या भागांतील कारभार त्या ठिकाणी अनुभवी माणसांच्या अभावामुळे विस्कळीत झाला होता . अगोरदच बिघडलेल्या परिस्थितीत आणखी भर म्हणूनच की काय त्याच्याविरुद्ध पुन्हा पुन्हा कट केले गेले . याचा परिणाम मोठमोठी स्थाने भूषविणारे अनेक मराठी सेनापती आणि मंत्री यांना देहांतशासन अथवा थोडीफार कैद अशा तऱ्हेच्या शिक्षा होण्यात झाला . संभाजीच्या राज्यात मद्रास -कर्नाटकचा समावेश झाला होता . हा भाग म्हणजे एखाद्या स्वतंत्र राज्यासारखाच होता. या प्रदेशावरील संभाजीचा अंमल जवळजवळ पूर्णपणे नाहीसा झाला , आणि संभाजीचा मेव्हणा हरजी महाडीक याचे या प्रदेशावर जवळजवळ एखाद्या स्वतंत्र राजासारखे राज्य चालू झाले. हरजी महाडीक याने महाराजा ही पदवी धारण केली . [मे १६८५ मध्ये औरंगजेब विजापूरच्या वेढ्यासाठी गेल्यानंतर मराठ्यांनी अहमदनगर किल्ल्याच्या भिंती चढून जाण्याचा प्रयत्न केला . परंतु किल्लेदार सय्यद बुखारी याने तो हाणून पाडला . (**दिल.**, १८६) विजापूरच्या पाडावानंतर मराठ्यांनी मंगळवेढ्यापर्यंत चाल केली . परंतु त्यांना जास्त काही करता आले नाही . (**एम्. ए.**, २८३) यानंतर बादशहाने पन्हाळा किल्ल्याला वेढा दिला. मराठ्यांचे अनेक किल्ले-साल्हेर, सांगोला, (**एम्. ए.**, २९७) कोहज, हलगड, सामानगड, आणि माहुली मोगलांच्या हाती पडले.

१६८४ नंतर संभाजीविरुद्ध अनेक कट झाले आणि त्याची पुष्कळ माणसे त्याला सोडून गेली . १२ फेब्रुवारी १६८५ रोजी खानदेशमधील इंग्रज वखारदारांनी पुढील नोंद केलेली आहे : "याच्या काही दिवस आधी एका मोठ्या ब्राह्मणाने संभाजीला मेजवानीला बोलाविले आणि त्याला कैद करून राजारामाला गादीवर बसविले ." अर्थात या घटनेचा याच पत्रात त्यांनी इन्कार केला आहे . २ मार्च रोजी कारवारची अशी बातमी आहे की संभाजीला त्याच्याच काही माणसांनी ठार मारले आहे . यावर आम्ही विश्वास ठेवतो याचे कारण त्याच्या देशात पूर्वी जे लोक त्याला वचकून असत तेच आता त्याच्याविरुद्ध बंड करून उठले आहेत . एक महिन्यानंतर कारवारच्या बातमीपत्रात पुढील नोंद आहे : अशी बातमी आहे की रामराजा आणि हंबीरराव या दोघांनी तुरुंगातून आपली सुटका करून घेतली असून ते शारजाखानाला जाऊन मिळाले आहेत . काहीजण म्हणतात की संभाजी राजा मरण पावला आहे तर काहीजण तो जिवंत आहे असे म्हणतात . आमच्या मते तो मेला असावा कारण तसे नसल्यास बंडखोरांचा

नाश करण्यासाठी तो या आधीच उभा ठाकला असता . (**कारवार टू सुरत**, ८ एप्रिल १६८५; **ओ. एम्**. ११८ मध्ये) जानेवारी १६८६ मध्ये परिस्थिती फारशी सुधारली नव्हती. इंग्रज वखारदार अशी नोंद करतात की संभाजी राजाविरुद्ध बंड करणारे इतके प्रबळ झाले आहेत की त्यामुळे संभाजीची सत्ता कोसळून पडल्यासारखी झाली आहे. (**ओ. सी**., ५४६१)]

मराठ्यांचे राज्य आर्थिक दृष्ट्याही विपन्नावस्थेला पोहोचले . संभाजीचा बेदरकारपणे चालणारा राज्यकारभार, त्याच्या अधिकाऱ्यांची लाचलुचपतीला चटावलेली वृत्ती आणि बंडखोरांच्या कृत्यामुळे निर्माण झालेली अशांतता ह्या गोष्टी वरील परिस्थितीला कारणीभूत ठरल्या . याचे अतिशय बहारदार वर्णन इंग्रजांच्या वखारीतील दप्तरात आढळते ; "काही वर्षांपूर्वी राजापुरात आणि राजापूरच्या परिसरात जवळजवळ १५०० खंडी मिरी तयार होत असत . परंतु आता राजापूर शिवाजीच्या ताब्यात गेल्यापासून याच्या $^{1}/_{10}$ ही तयार होत नाहीत. संभाजीच्या काळातील परिस्थितीबद्दल बोलावयाचे तर तेथे दुर्दशा आहे असेच म्हणावे लागेल." (**कारवार**, ४ सप्टेंबर १६८३)

व्यापार आणि उद्योगधंदे यांचा जो हा नाश झाला त्याला दोन कारणे होती . एक म्हणजे राज्यकारभारातील अव्यवस्था आणि दुसरे म्हणजे मराठ्यांच्या राज्यातील अधिकाऱ्यांची लाच आणि बक्षिसी घेण्याबद्दलची अतिशय आसुसलेली वृत्ती . "राजापासून तो खाली शेतकऱ्यापर्यंत पेशकश म्हणजे बक्षिसी घेण्याचा रोग इतका फैलावला होता की कोणतेही काम त्यावाचून होणे अशक्य होते आणि कोणाचीही त्याविरुद्ध जाण्याची हिंमत नव्हती." ठाणे आणि चेऊल येथून मुंबईकडे जवळजवळ विणकरांची ६०० कुटुंबे येत असत. परंतु १६८३ मध्ये मराठ्यांचा चेऊलला वेढा पडल्यापासून एक वर्षाचे आतच यातील ४०० कुटुंबांनी प्रोत्साहनाच्या अभावी मुंबईला येण्याचे सोडून दिले , तर १५० कुटुंबांचा नाश झाला म्हणजे १६८५ मध्ये वरीलपैकी फक्त ५० कुटुंबेच शिल्लक राहिली.

कारवारजवळील वाटा संभाजीच्या बंडखोर मांडलिकांनी उपद्रव दिल्यामुळे बंद झालेल्या होत्या . "त्याच्या राज्यामध्ये जवळजवळ सुरक्षितता बिलकूल नाही असे म्हणावे लागेल . तेथे असलेल्या परिस्थितीचे वर्णन करावयाचे म्हटल्यास अतिशय उपद्रवाची असेच म्हणावे लागेल . सर्वसाधारणपणे व्यापारउदिमाला अडथळा होई." (**ओ. सी**., ६४६१)

(१७) संभाजीची कैद आणि त्याला देण्यात आलेली देहांताची शिक्षा

जून १६८० आणि ऑक्टोबर १६८१ मध्ये संभाजीविरुद्ध जी कारस्थाने झाली त्यांचा बिमोड करण्यात आला. त्यानंतर पुन्हा एकदा १६८४ च्या ऑक्टोबर महिन्यात त्याच्याविरुद्ध कटाची उभारणी झाली. परिणामी त्याने अनेक प्रमुख मंडळींना बंदिवासात टाकले . संभाजीचा मृत्यू होईपर्यंत ही सर्व मंडळी बंदिवासातच राहिली. त्यानंतर संभाजीच्या दरबारातील ४ वर्षे शांततेच्या वातावरणात गेली . ऑक्टोबर १६८८ मध्ये शिर्के कुटुंब पुन्हा एकदा त्याच्याविरुद्ध बंड करून उठले . त्यांनी कवी कलशवर हल्ला केला आणि त्याला खेळण्याच्या किल्ल्याचा आश्रय घेण्यास भाग पाडले . संभाजीची कवी कलशवर मर्जी होती . त्याच्या सुटकेकरता त्याने रायगडाहून कूच केले . बंडखोरांचा त्याने संगमेश्वर येथे पराभव करून उच्छाद केला. तेथून तो खेळण्याकडे गेला . शिर्क्यांच्या बंडामध्ये प्रल्हाद निराजी , इतर काही मंत्री आणि प्रमुख पुढारी यांचा हात असल्याचा त्याला संशय येऊन त्याने त्यांना कैद केले . नंतर खेळण्यावर त्याने भरपूर रसदीचा पुरवठा केला आणि कवी कलशला बरोबर घेऊन तो राजधानीकडे निघाला . वाटेत रत्नागिरीच्या ईशान्येकडे २२ मैलांवर असलेल्या आणि अलकनंदा व वारुणा यांच्या पवित्र संगमावर वसलेल्या संगमेश्वर येथे तो आला. या ठिकाणी कवी कलश याने संभाजीसाठी उत्कृष्ट बागबगीचे तयार केले होते आणि उत्तम

तऱ्हेने सजविलेले प्रासाद बांधले होते . या ठिकाणी आल्यावर त्याने आपली फौज व बायकामुले यांना रायगडाकडे परत पाठवले आणि स्वतःबरोबर अतिशय थोडा लवाजमा बाळगून व कोणत्याही गोष्टीची पर्वा न करता तो दारू पिण्यात आणि चैनबाजी करण्यात मशगुल होऊन गेला . सगळी जागरुकता त्याने झुगारून दिली संगमेश्वर येथे मोगल फौजेचा हल्ला येणे अशक्य आहे असा समज त्याने करून घेतला.

कुतुबशाहीच्या प्रमुख अशा उमरावांत शेख निजाम हा एक होता . मोगलांनी गोवळकोंड्याला वेढा घातला, त्यावेळी त्यांनी त्याला आपल्या बाजूस येऊन मिळण्यासाठी उद्युक्त केले (२८ मे १६८७). बादशहाने त्याला ६ हजारांची **मनसबदारी** दिली व मुकर्रबखान ही पदवी बहाल केली . ह्या अतिशय कार्यक्षम आणि कर्तृत्ववान अशा सेनापतीला पन्हाळ्याच्या किल्ल्याला वेढा घालण्यासाठी पाठविण्यात आले होते (१६८८).

संगमेश्वर येथे संभाजी असुरक्षित अशा अवस्थेत बदफैलीपणे आपला काळ घालवीत असल्याची बातमी जेव्हा शेख निजाम याच्या कानावर आली , तेव्हा त्याने क्षणाचाही विलंब न लावता कोल्हापूर येथील आपल्या छावणीतून २ हजार निवडक घोडेस्वार आणि एक हजार पायदळ घेऊन जलद गतीने कूच केले . इतक्या झपाट्याने कूच करताना पश्चिम घाटातील जंगले, तुटीफुटी जमीन, आणि अतिशय उंच अशा खिंडी पार करताना त्याला अतिशय कष्ट सहन करावे लागले . केवळ ३०० स्वार घेऊन तो संगमेश्वर येथे येऊन पोहोचला. विजेच्या आणि वाऱ्याच्या गतीने त्याने मधले ९० मैलांचे अंतर २–३ दिवसांत कापले.

जेव्हा हल्लेखोरांचे सैन्य गावात शिरले तेव्हा कवी कलश याने त्याचा प्रतिकार केला . त्याच्या उजव्या हाताला बाण लागून तो जखमी झाला आणि लढणे अशक्य झाल्यामुळे तो पायउतारा झाला . जी काही मराठा फौज गोळा झाली होती तिला घाईघाईने शस्त्रे हाती देऊन जमविल्यामुळे आणि कवी कलशच्या अभावी कोणीही नेता न उरल्यामुळे त्यांची दाणादाण झाली व त्यांनी रणांगणातून काढता पाय घेतला. त्यानंतर संभाजी आणि कवी कलश यांनी कवी कलशच्या घरातील जमिनीमध्ये असलेल्या एका बिळामध्ये (भुयारामध्ये) आपल्याला छपवून घेतले . परंतु त्यांना त्यांच्या लांब केसांना धरून खेचून काढण्यात आले आणि बाहेर असलेल्या हत्तीवरून त्यांना शेख निजामाकडे नेण्यात आले . संगमेश्वर येथे संभाजीच्या २५ प्रमुख अनुयायांना आणि त्यांच्या बायका आणि मुली यांना कैद करण्यात आले . (**एम्. ए.**, ३२०., ३२२; **के. के**. भाग २ , ३८६; **जेधे शकावली**) [संभाजीराजास शेख निजाम याने कैद केल्याची हकिकत एका यादीनाम्यात पुढीलप्रमाणे आहे :

[४३] पिढी वजीर ३९ का सिवाजीराजे का राजश्री संभाजीराजे झा इहिदे समानीन ता तिसा समानीन यो मु ९ राज्य केले . आखेर तिसामध्ये मानुले स्वारी करून ता संगमेश्वरास मुकाम करून राहिले . त्यास सेख निजाम फौजदार कोल्हापूर निा गनीम मोगल स्वारी करून राजे अजमावरी छापा घातला. खासा दस्त करून धरून नेला. रायेगडास जुलपुकारखान वेढा देऊन बैसला. तेथून राजश्री.....साहेब निघोन प्रताप... मजल दरमजल करून खासा जातीनसी कर्नाटकात भेस घेऊन गेले . त्यावरी रायेगड गनिमास हस्तगत जाला . सारा राज्याचे कबिला धरून पादशाहा जवली तुलापुरास नेला. अरा मुदती साले ९ (**शि. सा. खंड ६, यादीनामे**, ६९)]

[संभाजी महाराजाची कैद आणि मृत्यू याबद्दल मराठी बखरी आणि कागदपत्रे यामधील मजकूर यामधे दिला आहे . मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरीतील मजकूर असा : "शिर्के यांनी विचार केला की , या कलशाने राज्यास बुडविले ; यासी नेऊन मारावे. म्हणोन पंचवीस हजार इसम मेळविले. हे वर्तमान कबजीकडील कारभारी याणी कबजीस श्रूत केले . त्याने महाराजास लिहोन शिर्के याजवर हल्ला करविला. लोक बहुत मारिले. त्याजवर पिलाजी खिमतगार व गणुजी शिर्के मोगलाईत गेले ." मराठी साम्राज्याची छोटी बखर पुढे सांगते : "तदनंतर दिल्लीहून अवरंगशहा बादशहा याणि गाजीउद्दीखां यास दक्षिणेच्या बंदोबस्ताकरिता पाठविले . त्यांनी बऱ्हाणपुरास येऊन साताऱ्यास संभाजीराजे महाराज याजला पत्र पाठविले की , तुम्ही निघून बऱ्हाणपुरास यावे . तेव्हा संभाजी महाराज बऱ्हाणपुरास आले . त्यास गाजीउद्दीखां बोलले की तुम्ही दिल्लीस चलावे . दक्षिणच्या साडेसहा सुभ्यांचा सनदा पादशहाकडून देववितो . तुम्ही सनदा घेऊन बंदोबस्त करावा . असे सांगितल्या वरून संभाजीमहाराज बोलिले की तुम्ही पुढे चालावे. आम्ही साताऱ्यास जाऊन येतो. असा मनसबा होऊन गाजीउद्दीखां दिल्लीस गेले ." हा मजकूर पूर्णपणे चुकीचा आहे हे सांगणे नकोच. यानंतर बखरीतील मजकूर असा : "महाराजांनी साताऱ्यास येऊन दिल्लीस जाण्याची तयारी केली . चाळीस हजार फौज , शिवाय पागे व

सरदार निंबाळकर घाडगे वगैरे मानकरी मिळून ऐंशी हजार फौजेचा भरणा व कानोजी भोसले बरोबर घेतले , आपले पुत्र शिवाजी महाराजही बरोबर घेतले आणि कूच करून गुजराथ किनाऱ्याने चालले . मार्गी, कुंड व जमीनदार व मवासी याची पारिपत्ये करून खंडण्या घेऊन पुढे गिरासे याचे मुलखातून त्याची पारिपत्ये करून सातपुड्यातील भिल्ल लुटून मारिले. मेवाती लुट्टन माळव्यात गेले. मारवाडची खंडणी घेऊन बुंदेल खंडात जाऊन खंडणीऐवजी मुलूख बुंदेल खंडाचा घेतला . तेथून दिल्लीस गेले. गाजीउद्दीखां याची भेट घेऊन निजाम उलमुल्क वजीर याची भेट घेतली . सदरेस बसविले. वजिराने दक्षिणचे वर्तमान पातशहास समजाविले. अर्ज केला की दक्षिणचे हे राजे माहीतगार यास दक्षिणचे वसुलापैकी चौथाईच्या सनदा वसूल करून द्याव्या . साडेसहा सुभे दक्षिणचे मेहबत करून , कुल मवासी जेर करून सरकारचा पैसा वसुलात आणीतील . तेव्हा पातशहानी संभाजीसकडे पाहिले. राजे उठून मुजरा करून उभे राहिले . उभयतांची मर्जी खुशवक्त असता सहजात पातशहा बोलले की तू मुसलमान होतोस की काय ? राजाने ऐकून उत्तर दिले , 'जहाँपन्हा, तकसी माफ . अपनी बेटी बेगम पातशहावादी इनायत होय तो मैं कबूल .' असा जाफसाल पातशहानी ऐकून संभाजी राजे याचे डोळे काढले आणि चिणून टाकीले . वजीर व शिवाजी राजे भयभीत होऊन आपले फौजेत आले . हे वर्तमान बेगमेस कळताच तिने खोजास बातमी करीता दरबारात पाठविले . तो राजाचा शिरच्छेद जाहाला. त्याचा पुत्र शिवाजी राजे फौजेनिशी तयार होऊन महालावर चालून येणार अशी बातमी समजताच पालकीत बसोन पातशहाकडे आली आणि चिकाचे पडद्यातून बोलली की राजाने माझी इच्छा केली तो माझा भ्रतार झाला . आता दुसरा करावयाचा नाही . त्याचा पुत्र आहे . तो माझा पुत्र त्याची दिलभराई जल्दी करून दक्षिणचे वसुलापैकी चौथाईच्या सनदा देऊन रवाना करून द्यावे ... मी आपला प्राण देईन ...बोलून बेगम महलात गेली ...." (**मसाब**, पृ. ६१-६३) या बखरीतील ही हकीकत विश्वासार्ह नाही हे सांगावयाला नको . यानंतरची बखर म्हणजे मल्हार रामरावाची . यानी दिलेले वर्णन पाल्हाळपूर्ण आहे आणि ते थोडे फार विकृत स्वरूपाचेही आहे. त्यामधील मुद्दे पुढे दिले आहेत त्यावरून वरील विधानाची सत्यता पटेल . "दिवसेंदिवस कबजीचे स्वाधीन अधिकच होत चालले ...कबजीचे सहवासे त्याचे वाम मार्ग कर्म तेणे करून फारच विचार राहिला नाही ....महाराजांनी नूतन पराक्रम करावा , नवे राज्य साधन करावे हे राहिले नाही ...सुभेदार कारभारी ...शिरच्छेद करावा ...सर्वही लघु मनुष्ये वृद्धिंगत झाली ...त्यास 'छंदोगामात्य कवि कलश पंडितराय' ऐसा किताब दिला ...तेव्हा सर्व आला कारभार 'त्याकडे जा' म्हणावे...चंदीपर्यंत किले घेऊन काय समजोन करणारांनी केले कळत नाही राज्य आंगठीचे ठिकडे असे असावे ...असे अनेक प्रकारे ...बोलावे...फौज बुडाली . लोक नामी ...चहूकडे चार गेली ....पिलाजी शिर्के व तानाजी शिर्के, गणोजी शिर्के हे महाराजांचे आप्त . याणी राजा वेडा झाला . कबजीने वश केले. राज्य बुडते त्या अर्थी हिय्या करून शिवाजी राजे , शिर्के याचे भाचे , यास घेऊन राज्यावर बसवले . राजाराम काढून त्याचे हाते कारभार चालवून राज्य रक्षावे . ऐसे राजकारण केले ....फुटले...क्रूर मर्जी...इतराजी केली...जप्ती घरी पाठविली , घरे लुटली, जाळली, एक दोन शिर्के सापडले ते मारिले . शिर्के जेथे असतील तितके मारावे ऐशी आज्ञा करून शिरकाण करविले ते समयी दौलतराव शिर्के , गणोजी व देवजी शिर्के वगैरे पळोन सर्व शिर्के तितके कुटुंब सुद्धा हबसाणात केले . चहूकडे चार जाऊन मोगलाईत जाऊन चाकऱ्या करू लागले ..." (**मराब**, पृ. २१) "१६...संभाजी राजे शिवाजीचे बेटे आहेत ते बेखबरदार आहेत , ऐसे ऐकतो. म्हणून बातम्या पाठविल्या, तो इकडूनही खबरी अव्यवस्थित गेल्या. कबजीने वश करून बेहोष आहेत."]

अकलूज येथे असलेल्या बादशाही छावणीत संभाजीला पकडल्याची बातमी कळली . परिणामी बादशाही साम्राज्याच्या सर्व भागांत अमाप उत्साहाचे आणि आनंदाचे एकच भरते आले. (**एम्. ए.**, ३२०)

१५ फेब्रुवारी रोजी बादशाही छावणी बहादूरगड येथे पोहोचली . तेथे कैद्यांना आणण्यात आले . बादशहाच्या हुकमाने दक्षिणेला पीडा देणाऱ्या संभाजीची जाहीररीत्या नाचक्की करण्यात आली . छावणीच्या बाहेर ४ मैलांवर संभाजी आणि कवी कलश यांना विदूषकाचा पोशाख चढविण्यात आला . त्यांच्या डोक्यावर विदूषकाची मोठी टोपी चढविण्यात आली आणि त्यांच्या डोक्याला घंटा बांधण्यात आल्या . नंतर त्या दोघांना उंटावर बसविण्यात आले , आणि ताशांच्या कलकलाटात आणि पिपाण्यांच्या कर्कश आवाजात त्यांना बहादूरगड येथे आणण्यात आले . शेकडो हजारोंच्या संख्येने एखाद्या रानटी जनावराला किंवा राक्षसाला बघण्यासाठी जमावे तसे प्रेक्षक रस्त्याच्या दोन्ही कडेला संभाजीला न्याहाळण्यासाठी जमा झाले. अशा तऱ्हेने त्यांना अवमानीत केल्यावर सर्व छावणीभर त्यांची हळूहळू मिरवणूक काढण्यात आली . अखेर त्यांना बादशहासमोर आणण्यात आले. या प्रसंगासाठी बादशहाने खास संपूर्ण दरबार भरविला होता. कैदी दृष्टीस पडल्याबरोबर औरंगजेब सिंहासनावरून खाली उतरला आणि समोर पसरलेल्या गालिचावर तो गुडघे टेकून बसला. ज्या परमेश्वराने त्याला या अतिम यशाचा धनी केले होते त्याचे पुन्हा पुन्हा आभार मानण्यासाठी त्याने आपले मस्तक जमिनीला टेकविले. (**के. के.**, ३८८) बादशहाच्या सल्लागारांचे असे मत होते की 'संभाजीला जीवदान द्यावे आणि त्याचे सर्व किल्ले शांततेने त्याच्या अधिकाऱ्यांनी स्वाधीन करण्याबाबत त्यांना आज्ञा देण्यास त्याला उद्युक्त करावे. संभाजीने आपली संपत्ती कुठे लपवून ठेवली आहे आणि कोणते बादशाही अधिकारी त्याच्याबरोबर पत्रव्यवहार करीत , हे जाणून घेण्यासाठी औरंगजेबाने रुहुल्लाखानाला त्याच्याकडे रवाना केले . जाहीररीत्या आपला अपमान केल्याबद्दल संभाजीचा संताप उसळ्या घेत होता . आता जीविताविषयी त्याला काहीच आशा उरली नव्हती . त्याने जीवदानाबद्दलचे

बादशहाचे अभय झिडकारून लावले आणि बादशहा व महमद पैगंबर यांना त्याने शिव्यांची लाखोली वाहिली. आपल्याशी मैत्री पाहिजे असेल तर त्याची किंमत म्हणून बादशहाने आपली मुलगी मला विवाहादाखल द्यावी अशी भयंकर हलकटपणाची मागणीही त्याने केली.

मराठ्यांच्या राजाचे अपराध आता क्षमेच्या पलीकडे गेले होते . त्याच दिवशी रात्री संभाजीचे डोळे काढण्यात आले आणि दुसऱ्या दिवशी कवी कलश याची जीभ छाटण्यात आली . (**एम्. ए.**, ३२३) मुसलमानांना ठार मारणे , कैद करणे , आणि त्यांची अब्रू घेणे व त्याचप्रमाणे इस्लामची शहरे लुटून फस्त करणे या अपराधांबद्दल संभाजीला मृत्यूची शिक्षा देण्यात यावी असा **फतवा** मुसलमान धर्ममार्तंडांनी काढला. संभाजीला ठार करण्याच्या सूचनेला बादशहाने आपली संमती दिली . जवळजवळ एक पंधरवडाभर कैद्यांचे हालहाल करण्यात आले, आणि त्यांचा वाटेल तसा अपमान करण्यात आला. त्यानंतर ३ मार्च रोजी पुण्याहून २२ मैलांवर ईशान्येला भीमा नदीच्या काठावर असलेल्या कोरेगाव येथील छावणीत या कैद्यांची रवानगी करण्यात आली . तेथे त्यांना ११ मार्च रोजी अतिशय क्रूर रीतीने आणि भयंकर हाल करून ठार मारण्यात आले . त्यांचे एक एक अवयव कुऱ्हाडीने तोडण्यात आले (**एम्. ए.**, ३२५; **ईश**, १५६ ब) आणि त्यांचे मास कुत्र्यांपुढे फेकण्यात आले .(**स्टोरिया** भाग २, ३११) त्यांची छाटलेली मस्तके गवताने भरण्यात आली आणि ताशे आणि तुताऱ्या यांच्या भयानक आवाजात दक्षिणेतील प्रमुख शहरात त्यांचे प्रदर्शन करण्यात आले. (**के. के**. भाग २, ३८७; **ईश**, १५६ ब)

(१८) इ. स. १६८९ मधील युद्धाची हकीकत , रायगडचा पाडाव आणि संभाजीच्या सबंध कुटुंबाची कैद

[संभाजीची कैद व वध यासंबंधी साकी मुस्तैदखानाने दिलेली हकीकत पुढीलप्रमाणे आहे :

संभाजींची कैद आणि त्याचा वध

"निसर्गाचा नियमच आहे की दुष्टांना आपल्या कर्माची फळे भोगावी लागतात . आपल्या दुष्कृत्यांनी ते जग जाळून टाकतात पण शेवटी तेही परमेश्वराच्या कोपाग्नीत जळून खाक होतात . ज्यावेळी बादशहा मोहिमांच्या निमित्ताने अकलूज येथे मुक्काम करून होते , तेव्हा एक अत्यंत आनंदायक बातमी कानावर आली . ती बातमी ऐकण्यासाठी कित्येक दिवसांपासून लोकांचे कान आतुर झाले होते . ती आनंदाची बातमी ऐकून मुसलमानांनी शहाजणे वाजवून अक्षरशः आकाश डोक्यावर घेतले . बादशहाला धन्यवाद देऊन त्याच्याबद्दल लोकांनी प्रार्थना केल्या . धर्मरक्षक बादशहाचे सर्व जग ऋणी झाले . त्याच्यामुळे सर्वत्र शांतता स्थापन होणार असे सर्वांना वाटू लागले . उच्छादाचा शेवट झाला . सैतान बंधनात सांपडला. स्पष्टच सांगतो, तो काफर दुष्ट संभाजी, बादशहाच्या अटल भाग्यामुळे, बादशाही फौजेच्या तावडीत सांपडला.

या विषयसूचक हकीकतीचा तपशील असा.

शेख निजाम हैद्राबादी याला मुकर्रबखान ही पदवी होती . तो अत्यंत शूर आणि कुशल लढवय्या होता. या गुणांमुळे, तो आणि त्याची मुले या सर्वांना मिळून पंचवीस हजारी आणि एकवीस हजार स्वारांची मनसब मिळाली होती . यापूर्वी त्याला पन्हाळगड घेण्यासाठी विजापुराहून रवाना करण्यात आले होते . हा किल्ला गनिमांच्या ताब्यात होता . मुकर्रबखान हा अतिशय हुशारीने आणि सावधपणे वागत होता . त्याने त्या काफराची (संभाजी) बातमी काढून आणण्यासाठी स्वतःचे हेर नेमले . एकाएकी त्याला बातमी लागली ती अशी . समजूतदारपणाचा अभाव असलेला (बेबहरा अज जौहरे शऊर) संभाजी याचे आणि त्याचे आप्त असणारी शिर्के मंडळी यांचे भांडण झाले . याकरिता तो रायरीहून खेळण्याला गेला. त्याचा त्याने बंदोबस्त केला. खेळण्याच्या किल्ल्यात सगळी सामग्री आहे याची त्याने खात्री करून घेतली . यानंतर तो संगमेश्वर येथे आला. तेथे त्याचा सर्वनाशी सचिव (पेशकारे तबाहकारे ऊ) कवि कलश याने उत्तमोत्तम बागा आणि वाडे बांधले होते . तेथे संभाजी विलासात दंग झाला आहे . (ब बस्ते बिसाते लहू व निशात इश्तिगाल दारद).

तो शूर खान कोल्हापुराहून निघाला . कोल्हापुराहून संगमेश्वर पंचेचाळीस कोसांवर होते . वाटा अतिशय अवघड होत्या . दऱ्याही तशाच होत्या. इतक्या भयंकर आणि संकटपूर्ण वाटा जग फिरलेल्या प्रवाशांना कुठेच दिसल्या नसतील . मुकर्रबखान याने प्राणपणाचा निर्धार केला . स्वाभिमानी अशा आपल्या निवडक सेवकांना घेऊन एल्गार करून (तडक कूच करून) आला. त्या दैव फिरलेल्या (वरगश्ताचे बख्त) संभाजीला हेरांनी कितींदा (हरचंद) आणि किती प्रकारे सांगितले की मोगलांची फौज येत आहे . पण मूर्खपणा आणि गर्व यांची त्याला धुंदी चढली होती . मूर्खपणाच्या आणि गर्वाच्या मदिरेने धुंद झालेल्या संभाजीने आपल्या भुवयांच्या इशाऱ्याने त्यांची शिरे धडापासून काढली . (सर अजतने आंहा बर्दाश्त) उपहासाने तो म्हणाला (बर जबाते बतालत वयान मी गुजरांद) "बेखबरांनो तुम्हाला वेड लागले आहे . मोगलांची फौज येथे येणे शक्य आहे काय ?" त्या शूर मुकर्रबखानाने मार्गातील कष्ट आणि श्रम झेलण्यात कमालीची सहनशक्ती दाखविली . तो विजेच्या आणि वाऱ्याच्या वेगाने

संभाजीवर चाल करून आला. (बसरवक्ते ऊरसीद) त्या हीन आणि हलकट माणसाने (मतरुदे लईन) चारपाच हजारी दखनी भालाइतांना घेऊन हल्ला केला. परमेश्वरी संकेत पाहा (कजारा), एक बाण (जणू काय तो देवाच्या धनुष्यातून निघाला होता , तीरे अच शस्ते तकदीर,) कवि कलशला लागला आणि थोड्या मारामारीनंतर (ब अंदुक जदोखुर्द) युद्धात अपेशी झालेला तो (हरबइदबार) पळाला. कोल्ह्याच्या वृत्तीचा (रुबाहसरीरत) तो (संभाजी) कवि कलशच्या हवेलीरूपी बिळात घुसला . (व आं रुबाह सरीरत दर सुराखे हवेलीये कबकलस खजीदा). त्याला वाटले की आपल्याला कोणी पाहिले नाही (दनिस्त कस ऊरा न दीद). बातमीदारांनी चौकशी करून मुकर्रबखानाला कळविले की तो कुटिल मनुष्य हवेलीत लपलेला आहे. मारामारीत जे पळून चाललेले होते त्यांचा मुकर्रबखानाने पाठलाग केला नाही. त्याने हवेलीला वेढा घातला.

मुकर्रबखानाचा मुलगा इखलासखान हा आपल्या सर्व शूर सहकाऱ्यांसह जिन्याच्या वाटेने आत घुसला (वराहे जीना दरून दरामदा). त्या दीन माणसाला (संभाजीला) केस धरून ओढीत (मृकशान) त्याने मुकर्रबखानाच्या स्वारीच्या हत्तीच्या पायापाशी आणले . (पाये फिले सवारीयेखान आबार्द) हलकट माणसांना पुढे आणण्याच्या दैवाच्या वृत्तीमुळेच तो राज्यावर आला . त्याच दैवाने त्याला आणि त्याच्या सचिवाला (कवि कलशला) नरकाची वाट दाखविली.

संभाजीबरोबर त्याची पंचवीस माणसे आपल्या बायकापोरीच्यासह कैद झाली . (वीस्त व पंज कस अज उम्दहाश बा जनान व दुख्तरान असीर आमदंद)

ही बातमी अकलूज मुक्कामी बादशहाला कळली . अकलूज हे यानंतर असदनगर या नावाने जगात प्रख्यात झाले . बादशहाने लष्कराचा व्यवस्थापक सरदारखान याचा मुलगा हमीदुद्दीनखान यास आज्ञा केली की , "तुम्ही मुकर्रबखानास सामोरे जावे , आणि अज्ञानाच्या वनात वावरणाऱ्या त्या जंगली माणसाला (संभाजी) बेड्यात जखडून आणावे (बदामे अगलाल व सलासल दरावर्द). विजयी मुकर्रबखान हा युक्ति - प्रयुक्तीने त्या मुलखातून (मराठ्यांच्या) बाहेर पडला. आलमगीर बादशहाच्या भाग्याने त्या काफराच्या सहाय्यकांपैकी आणि पाठीराख्यांपैकी कोणीही त्याच्यासाठी काही धडपड करू शकले नाही . शुक्रवार **जमादिलावल** महिन्याच्या पाच तारखे (१५ फेब्रुवारी १६८९) जेव्हा बादशाही सैन्याने असदनगराहून (अकलूज) कूच करून बहादुरगड येथे छावणी केली , तेव्हा त्यांना (कैद्यांना) लष्करात आणण्यात आले . बादशाही कोप म्हणजे परमेश्वरी कोपाचाच प्रकार होय . बादशहाचा क्रोध प्रकट झाला. इस्लामला पाठिंबा आणि धर्माचा अभिमान (बतआस्तुबे इस्लाम व हमीयते दीन) या विचारांनी प्रेरित होऊन बादशहानी आज्ञा केली की , "अपयशाच्या आणि भटकेपणाच्या तावडीत सापडलेल्या त्या कैद्याला (संभाजी) लष्करापासून दोन कोसांवरून अंगावर तख्ता कुलाह (इराणमध्ये गुन्हेगाराच्या अंगावर घालीत तसा पोशाख आणि विदूषकासारखी उंच टोकदार लाकडी टोपी) चढवावे. त्याच्या सहकाऱ्याच्या अंगावर विदूषकी वस्त्रे घालावी. त्यांना तऱ्हेतऱ्हेने पीडा घेऊन त्यांची विटंबना करावी. त्यांना उंटावर स्वार करावे आणि ढोल बडवीत शिंगे कर्णे वाजवीत त्यांना लष्करात आणि दरबारात आणावे . म्हणजे ते दृश्य पाहून इस्लामियाना उत्साह येईल आणि अधर्मियांचे प्राण कंठाशी येतील . संभाजीला आणल्याची आदली रात्र म्हणजे जणू काही शबेबरातचा सणच होता . त्यात काही अतिशयोक्ती नाही. दुसऱ्या दिवशी आपणाला जे पाहावयाला मिळणार आहे त्याच्या कल्पनेने कुणालाही रात्री झोप आली नाही . दुसरा दिवस म्हणजे जणू काही ईदेचा सण होता. मनोरंजक दृश्य (तर्फरुज) पाहण्यास मिळेल या कल्पनेने तरुण आणि वृद्ध अत्यंत आनंदित झाले होते.

सारांश, मिरवीत मिरवीत वध करण्यास योग्य असलेल्या त्याला (संभाजीला) लष्करातून धिंड काढून फिरविण्यात आले . दिवाणे आममध्ये बादशहा बसला होता त्यावेळी त्याला दरबारात आणण्यात आले . (वक्ते के अंजुमने दीवार आम बफरे तशरीफे हजरत अरास्तगी दाश्त , बादशहाच्या उपस्थीने दिवाणे आमचा दरबार सुशोभित झाला होता.) बादशहाने आज्ञा केली की, "त्यांना कैदखान्यात घेऊन जा."

त्याच वेळी बादशहा आपल्या आसनावरून खाली उतरला . गालिचाच्या कोपऱ्यावर बसून (गोशाये कालीन निशस्ता) त्याने परमेश्वराचे आभार मानले. प्रार्थना करताना त्याने आपले डोके जमिनीवर टेकले . योग्य कर्माची फळे देणारा आणि मनोरथ सिद्धीस नेणारा जो परमेश्वर त्याचे त्याने बाहू वर करून आभार मानले. निसर्गाचा चमत्कार यावेळी प्रकट झाला. बादशहाच्या नेत्रातून अश्रुबिंदू प्रकट होऊन वाहू लागले.

कविता—मुकुटाचे टोक आकाशापर्यंत पोहचलेले आहे. पण यांचे मस्तक मात्र परमेश्वराच्या आराधनेत जमिनीवर टेकले आहे.

कुलाह गोशा बर आसमाने बरीन

हनूज अज तवाजो सरश बर जगीन.

तो दुष्ट (बदकैश), वचन न पाळणारा (सुस्त अहद) होता. बादशहा म्हणजे परमेश्वरी कृपा प्रकट करणारे होत . त्यांनी संभाजीवर पूर्वी कृपा केली होती. पण तिची कदर त्याने ओळखली नाही . एकदा तो आपल्या दुष्ट बापाबरोबर बादशहाच्या दरबारातून आणि फिरून एकदा मरहूम दिलेरखानाच्या जवळून लबाडीने आणि बंड करण्याच्या उद्देशाने पळून गेला होता.

त्याच रात्री त्या निर्बुद्ध माणसाचे (बे वसीरत) डोळे काढण्यात आले. दुसऱ्या दिवशी कवी कलशची दुष्ट जीभ उपटण्यात आली.

सुभान अल्लाह (धन्य परमेश्वराची), जे केवळ वर वर पाहतात (जाहिरबीन), त्यांना हा प्रश्न सुटणे अशक्य वाटत होते . पण धर्मनिष्ठ बादशहाच्या नेकनियतीने तो प्रश्न सुटला. हताश आणि निर्बुध झालेल्या लोकांना या अवघड प्रश्नावर तोड सापडली आणि ही गोष्ट त्याच्या मनावर बिंबली. कुठे तो संभाजी आणि कुठे त्याचे त्या गगनचुंबी रायरीतील वास्तव्य आणि कुठे त्याच्या दुष्कृत्याचे फळ म्हणून त्याच्या वाटेला आलेली कैद आणि विटंबना.

अनुक्रमणिका

कविता – अजल राह सरकर्द व उफताद पेश
कशा सूये दामे फना सैद रवीश.

मृत्यू आला आणि समोर उभा ठाकला की सावज आपण होऊन सर्वनाशाच्या जाळ्याकडे जाऊ लागते.

या घटनेवर अनेक विद्वानांनी कवितेच्या ओळी रचून त्यातून घटनेची तारीख दर्शविली (या प्रकाराला क्रोनोग्राम म्हणतात). शहाजादा महंमद आजम याचा वकील इनायतुल्ला याने खालील ओळी रचली.

बा जन व फर्जंद सुंभा शुद अमीर

आपल्या बायकापोरासहित संभाजी कैद झाला. (ओळीतील अक्षराचे ठरलेले आकडे असतात. ते जोडले की घटनेचे वर्ष **हिजरी** अकराशे म्हणजे इ. स. १६८९ हे निघते). ही ओळ सर्व लहान-मोठ्यांना आवडली. इनायतुल्लावर बादशहाची खास कृपा झाली.

मुकर्रबखानाने ही जी कामगिरी बजावली त्याबद्दल त्याचा खूप गौरव करण्यात आला. त्याला खानजमान फत्तेह जंग ही पदवी देण्यात आली. त्याला पन्नास हजार रुपये रोख बक्षीस म्हणून देण्यात आले. त्याला खास खिलतीचा पोशाख देण्यात आला. उत्तम तऱ्हेने सजविलेला घोडा, सोनेरी साजाने युक्त असलेला हत्ती, खंजीर, तलवार, रत्नजडित पहदला (एक अलंकार) या वस्तू त्याला देण्यात आल्या. त्याची कसब वाढविण्यात आली व तो सात हजारी आणि सात हजार स्वारांचा मनसबदार बनला. अशा रीतीने त्याचा मान आकाशापर्यंत चढविण्यात आला. त्याचा एक मुलगा इखलासखान यास खान आलम ही पदवी देण्यात आली. पाच हजारी पाच हजार स्वारांचा **मनसबदार** करण्यात येऊन त्याला खिलतीचा पोशाख देण्यात आला. मुकर्रबखानाचा दुसरा मुलगा शेख मीरान यास मुनव्वरखान आणि तिसरा मुलगा शेख अब्दुला यास इख्तियारखान या पदव्या देण्यात आल्या. मुकर्रबखान याचे इहत्तिमामखान आणि इतर आप्त आणि सहकारी यांपैकी प्रत्येकाला **मनसब** आणि खिलतीचे पोशाखही देण्यात आले.

त्या दुष्ट (मुशारिके बदकैश) आणि नरक ज्याच्या नशिबी आहे (जहन्नमनसीब) अशा काफराने मुसलमानांना मारले होते, त्यांना बंधनात टाकले होते आणि त्यांना विविधप्रकारे पीडित केले होते. त्याने इस्लामी राज्यांतील नगरे गारद केली होती. त्याला जिवंत ठेवण्याऐवजी त्याला नाहीसा (इफनाय) करणे बरे असे बादशहाचे मत झाले. धर्मशास्त्रज्ञांनी फतवा (संभाजीच्या वधाचा) दिला. त्याबरोबर अमीरउमरावांनीही हाच सल्ला दिला. त्यास अनुसरून त्या लुटारूचा (काते अल्तरीक) वध करणे आवश्यक आहे असे ठरविण्यात आले. बादशाही सैन्य बादशहाच्या राज्यारोहणाच्या बत्तिसाव्या वर्षी **जमादिलावल** महिन्याच्या एकवीस तारखेस (३ मार्च १६८९) कोरेगाव ऊर्फ फतेहाबाद येथे आले. त्याच महिन्याच्या एकोणतीस तारखेस (११ मार्च १६८९) त्याला (संभाजीला) आणि नेहमी त्याच्याबरोबर राहणाऱ्या कवी कलशला तलवारीच्या योगे नरकात (दरके असफल) पाठविण्यात आले. (मारण्यात आले), या घटनेची तारीख खालील ओळीवरून काढण्यात आली.

"काफरबच्चा जहन्नमी रक्त"

साकी मुस्तैदखान म्हणतो, "आता या घटनेच्या शेवटी मी एक घटना नमूद करतो. त्यावरून बादशहाच्या धर्मनिष्ठेची कल्पना येईल.

संभाजीला कैद करणार अशी अफवाही पसरली नव्हती. असे घडणे अत्यंत कठीण आहे असे समजण्यात येत होते. गुलबर्ग्याचे प्रसिद्ध साधू हजरत बंदेनवाज गेसूदरबाज यांच्या वंशजात सय्यद फत्तेह महंमद हे आहेत. त्यांनी अनेक वर्षे शिपाईगिरीत घालविली. त्यानंतर ते गुलबर्ग्यास जाऊन राहिले. बादशहांना मागे होऊन गेलेल्या अवलियांविषयी नेहमी भक्ती वाटे. त्यांच्या वंशजांकडे त्यांचे नेहमी लक्ष असे. सय्यद फत्तेह महंमदचा मुलगा सय्यद यदुल्ला हा लहानपणापासून साधुवृत्तीचा होता. त्याला गुलबर्ग्यातील लहान दर्ग्याचा सज्जादा नशीन (मठाधिपती) म्हणून बादशहानी नेमले. त्याला चांगले इनाम देऊन, काही गावे देण्यात आली. गावाचा शेतसारा माफ करण्यात आला. सय्यद फत्तेह महंमद हे बादशहाच्या लष्करात हजर झाले. त्यांनी बादशहाला पुढील हकीकत सांगितली.

"त्या काफराचा (संभाजीचा) शेवट कसा होणार ते समजून घेण्यासाठी हजरत बंदेनवाजच्या समाधिसमोर मी नेहमी ध्यान लावून बसत असे. कित्येक दिवसांनंतर नंतर मला एके रात्री स्वप्न पडले. मी पाहिले की हजरत बंदेनवाज हे तीर्थक्षेत्रांची यात्रा करण्यास निघाले आहेत. अनेक लोक त्यांच्याबरोबर आहेत. पुढील मार्ग डोंगराळ होता. त्यांनी मला पाहून तू कुठे चालला आहेस असे विचारले. मी आपला हेतू त्यांना सांगितला. यावर ते म्हणाले, "समोरील डोंगरांत कित्येक दिवसांपासून एक डुक्कर ठाण मांडून बसला आहे. त्याला पकडण्याच्या कामी तू आमच्याबरोबर राहा आणि प्रयत्न कर." सकाळी जाग आल्यावर मला वाटले की लष्करात निघून जावे, आणि त्या दुष्ट काफराचा (संभाजी) निकाल लागेपर्यंत गाजीच्या (गुज्जात) बरोबरीने धर्मयुद्धात भाग घ्यावा."

"सय्यद फत्तेह महंमदच्या या साक्षात्काराच्या भाषणाने बादशहाला अतिशय आनंद झाला. त्यांनी सय्यद फत्तेह महंमदचा मानसन्मान करून त्यांना गौरविले. या गोष्टीला अजून दहा दिवस लोटले नव्हते तोच परमेश्वराने बादशहाचे मनोरथ पूर्ण केले. ज्या दिवशी (संभाजीला पकडल्याची) बातमी आली त्याच दिवशी बादशहाने सय्यद फत्तेह महंमदला बोलविले आणि त्याच्यावर कृपा करून आणि त्याला वाटखर्चाला रक्कम देऊन गुलबर्ग्यास परत जाण्यासाठी त्याला निरोप दिला. या सुयशाबद्दल परमेश्वराचे आभार म्हणून बादशहानी बंदेनवाजच्या दर्ग्यातील

अनुक्रमणिका

सेवक आणि याचक यांना देण्यासाठी दहा हजार रुपये पाठविले."

(**मराठे व औरंगजेब**, सेतुमाधवराव पगडी, ३६–४२)]

[संभाजीराजांची कैद व वध यासंबंधी ईश्वरदास नागर याने दिलेली हकीकत पुढीलप्रमाणे आहे :

"दिवाणखान्याच्या प्रवेशद्वारापर्यंत ते येऊन पोहोचल्यावर बादशहाच्या आज्ञेने त्यांना न्यायालयाजवळ उभे करण्यात आले . बादशहाने संभाजीकडे पाहिले. त्याची दुर्दशा पाहून बादशहाच्या मनावर परिणाम झाला . यानंतर बादशहा सिंहासनावरून उतरला आणि त्याने प्रार्थना करून परमेश्वराचे आभार मानले.

"पण संभाजी हा गर्विष्ठ होता . त्याची अशी अवस्था झाली तरी त्याने बादशहाला ताजीम देण्यासाठी म्हणून यत्किंचितही मान लवविली नाही. इखलासखान आणि हमीदुद्दीनखान यांनी त्याला पुष्कळ समजाविले पण त्याचा काही उपयोग झाला नाही."

यानंतर दोन दिवसांनी बादशहाने रुहुल्लाखान यास खालीलप्रमाणे आज्ञा केली :

"तुम्ही जाऊन संभाजीपाशी चौकशी करावी की तुझे खजिने , जडजवाहीर आणि इतर संपत्ती कुठे आहे . तसेच बादशाही सरदारांपैकी कोण कोण तुझ्याशी पत्रव्यवहार करून संबंध ठेवीत होते."

"संभाजीचे डोळे काढण्यात आले , पण संभाजी गर्विष्ठ आणि स्वाभिमानी होता . त्याने त्या दिवसापासून जेवणखाण सोडले . त्याच्या पहारेकऱ्यांनी त्याला अन्नसेवन करण्यास पुष्कळ सांगितले . पण त्याचा काही उपयोग झाला नाही . त्याला काही उपवास घडले . शेवटी ही बातमी बादशहाला कळविण्यात आली. संभाजीचे दिवस भरले होते . बादशहाच्या आज्ञेने त्याला वधस्थानाकडे नेण्यात आले . तेथे त्याच्या शरीराचे तुकडे तुकडे करण्यात आले."

या घटनेबद्दल खाफीखान म्हणतो : "यानंतर त्यांना त्याच्या दहा -अकरा साथीदारांसह अनन्वित छळ करून ठार मारण्यात आले . संभाजी आणि कवी कलश यांच्या तमाम शरीरात पेंढा भरण्यात आला. दख्खनमधील प्रसिद्ध अशा सर्व शहरांतून आणि गावांतून ती प्रेते नगारे, कर्णे, शिंगे इत्यादी वाद्यांच्या गजरात मिरविण्यात आली."]

[याच घटनेची हकीकत भीमसेन सक्सेना याने पुढीलप्रमाणे दिली आहे :

"रायगडला जाण्याचे संभाजीने ठरविले होते त्यासाठी त्याने आपले कुटुंबीय आणि सैन्य यांना पुढे रवाना केले होते . संभाजी स्वतः कवी कलश बाह्मण याची वाट पाहात बसला . संभाजी कवी कलशला गुरू समजत असे . कवी कलश हा पूजा व अनुष्ठान करण्यात गुंतला होता . आकस्मिकपणे संभाजी आणि कवी कलश हे शाही फौजांच्या हाती सापडून कैद झाले."]

[संभाजी राजांच्या अखेरच्या दिवसांची माहिती खाफीखानाने पुढीलप्रमाणे दिली आहे :

असे म्हणतात की, त्या अपवित्र कुत्र्याच्या (संभाजी) हरकाऱ्यांनी बादशाही म्हणजे मोगल लष्कर आल्याची त्याला खबर केली. संभाजी गफलतीच्या धुंदीत होता. अशा ठिकाणी मोगल येतील असे म्हणणे निव्वळ शंका बाळगणे आहे व हा विचारच खोटा आहे , असे तो समजला. त्याला भारी गर्व चढला होता. याशिवाय त्या माणसाला सर्वनाश करणाऱ्या दारूची धुंदी चढली होती . (दर आलमे गुरुर व नखवत के नशाये सरशार बादा खानाबर अंदाज अलावा आं गरदीदा बूद) त्याने हरकऱ्यांच्या जिभा उपटून काढण्याची आज्ञा केली . त्याने स्वारी अगर मोर्चे बांधण्याची मुळीच तयारी केली नाही. तो शूर सरदार (मुकर्रबखान), त्याचा मुलगा, आणि पुतणे, दहा बारा शूर आप्त आणि दोन -तीनशे स्वार हे विजेप्रमाणे नागव्या तलवारी घेऊन वध करण्यायोग्य (खून गिपत्तगाम) आणि ज्यांची बुद्धी नष्ट झाली आहे अशा त्या लोकांवर (संभाजी आणि त्याचे साथीदार) तुटून पडले. पण संभाजी गफलतीच्या धुंदीत होता आणि आता वेळ तर निघून गेली होती . त्याच्याबरोबर जी फौज होती त्यापैकी बहुसंख्य फरार झाले (रुपोश गरदीदा, तोंड लपविले.) उरलेल्यांना घेऊन तो हत्यारे चढवून लढण्यास तयार झाला . संभाजीच्या शूर सोबती सल्लागारात त्याचा प्रधान कवी कलश हा एकनिष्ठ म्हणून प्रख्यात होता. त्याने संभाजीला (पान ३८६) आपल्याबरोबर घेतले (पसे पुश्ते खुद दादा). नामांकित मराठे सरदार बरोबर ठेवून तो लढण्यासाठी चालून आला . लढाईच्या सुरुवातीसच त्याच्या (कवी कलश) हाताला बाण लागला . त्यामुळे त्याचा उजवा हात निकामी झाला . तो घोड्यावरून खाली आला आणि ओरडून म्हणाला की , मी मागे राहिलो . संभाजी पळून जाण्याच्या विचारात होता . त्याने घोड्यावरून उडी घेतली. तो म्हणाला, ' पंडितजी मी पण थांबतो .' चारपाच मराठे मारले गेले . बाकी सगळे पळून गेले . कवी कलश कैद झाला . दैव उलटलेला संभाजी एका देवळाच्या आश्रयाला गेला. तेथे तो स्वतःला कोंडून घेऊन लपून बसला.

मोगलांनी शोध घेतला. त्यांना संभाजीचा पत्ता लागला. तो निष्फळ धडपड करू लागला. शेवटी त्याच्या माणसांपैकी काही मारले गेले. नंतर संभाजी, त्याची बायकामाणसे, लहान मुलगा शाहू अशी एकंदरीत सव्वीस माणसे पकडली गेली . त्यात त्याचा सात-आठ वर्षाचा मुलगा शाहू, दोन बायका आणि आप्त आणि काही मातबर सोबती अशी मंडळी होती . एक रामराजा (राजाराम) त्यात नव्हता. कारण तो एका किल्ल्यात बंधनात होता. मोगलांनी सर्वांचे हात बांधले . त्यांचे केस धरून ओढीत त्यांना मुकर्रबखानाच्या हत्तीच्या पायापाशी आणण्यात आले . तोपर्यंत संभाजीने आपले केस काढून टाकले होते (रीश तराशीदा) अंगाला राख फासली होती आणि वेष बदलला होता. पण त्याच्या वस्त्राखाली मोत्याची माळ होती.

अनुक्रमणिका

मोगलांना संभाजीचा घोडा सापडला. त्याच्या पायांत सोन्याचे तोडे होते यावरून त्यांनी संभाजीला ओळखले.

मग मुकर्रबखानाने संभाजीला आपल्या हत्तीवर घेतले . काहींना पायात आणि गळ्यात बेड्या घालून हत्तीवर घातले आणि उरलेल्यांना घोड्यावर स्वार केले . नंतर विजयाचे नगारे वाजवीत कैद्यांना मोठ्या सावधगिरीने आपल्या छावणीवर आणले . नंतर त्याने घडलेली वस्तुस्थिती बादशहाला कळविली.

मुकर्रबखानाची अर्जी येण्यापूर्वीच हेरांच्या आणि विश्वासू दूतांच्या द्वारे ही बातमी आली होती . बातमी तंबूतंबूतून पसरली . त्यामुळे लहानांपासून थोरांपर्यंत (तरुण आणि वृद्ध) सर्वांना विलक्षण आनंद झाला.

(पान ३८७) त्या गडबडीत मुकर्रबखान कैद्यांना घेऊन येत आहे अशी बातमी बादशहाला कळविण्यात आली . बादशहाने त्यांना सूचना दिली की, तुम्ही अकलूजपासून दोन कोसांवर थांबावे . नायब कोतवाल हमीदुद्दीनखान यास मुकर्रबखानाच्या स्वागतास पाठविण्यात आले . त्या दुष्टांना (संभाजी आणि साथीदार) पाहण्यासाठी लाखो माणसे गोळा झाली होती . इराणच्या पद्धतीप्रमाणे त्यांना डोक्यावर लाकडी फळ्यांच्या लांबट टोप्या घालण्यात आल्या . त्यांच्या अंगावर विदुषकी थाटाचा पोशाख घालण्यात आला . त्यांचा सारखा छळ करण्यात येत होता . लाखो लोकांना त्यांची चाललेली विटंबना दिसत होती . त्यांना उंटावर बसविण्यात आले होते . शिंगे, कर्णे, नगारे इत्यादी वाद्ये वाजविण्यात येत होती . अशा स्थितीत कैद्यांना लष्करात आणण्यात आले . लोकांचे कान ज्याना ऐकण्यासाठी आतुर झाले होते ते विजयसूचक नगारे झडू लागले . लाखो हिंदू आणि मुसलमान त्या दुष्ट आणि बंडखोर काफरांच्या छळामुळे होरपळून निघालेले होते . ते दुःखी होते. त्यांना या विजयसूचक नगाऱ्यांचा संदेश सुखदायक वाटला. त्यांचा आनंद गगनात मावेना.

असे म्हणतात की , मुकर्रबखान येत असल्याची बातमी आली . तो येऊन पोहचेपर्यंतच्या चार -पाच दिवसांत बायका काय , पुरुष काय सर्वांना हर्षवायू झाला . आनंदाने त्यांना झोपा आल्या नाहीत . जागजागी गोळा होऊन ते धन्यवाद देत मुकर्रबखानाचे स्वागत करीत होते . वाटेत असलेल्या प्रत्येक खेड्यात आणि भोवतालच्या प्रदेशात जेथे जेथे ही बातमी पोहचली तेथे चौघडे झडू लागले . जिकडून जिकडून म्हणून कैद्यांना नेण्यात आले तिकडे सर्व जागा स्त्री -पुरुषांनी भरून जात. मुकर्रबखानाचे हर्षभराने स्वागत करण्यात येई . काही दिवस तर रात्री शबेबरात (सण) आणि दिवसा ईद (सण) अशी लोकांची स्थिती झाली.

(पान ३८८) सारांश वधास योग्य असलेल्या त्या माणसांना (संभाजी आणि त्यांचे साथीदार) फजिती करून , विटंबना करून आणि त्यांचा तऱ्हेतऱ्हेने छळ करून बादशहापाशी आणण्यात आले . (१५ फेब्रुवारी १६८९) त्या वेळी बादशहाने पूर्ण दरबार भरविला होता . अमीरउमराव आणि तमाम प्रजा त्यावेळी झाडून हजर होती . बादशहाने त्या दुष्टांना सिंहासनाच्या पायापाशी आणण्याची आज्ञा केली . त्यांना पाहून बादशहा सिंहासनावरून खाली उतरला. त्याने प्रार्थना करून परमेश्वराचे आभार मानले.

असे म्हणतात की , तो फुटक्या नशिबाचा कवी कलश हिंदीत उत्तम कविता करीत असे . त्याचे हातपाय आणि शरीराचे सर्व अवयव जखडले गेले होते. फक्त डोळे आणि जीभ ही सोडून त्याला कोणताही अवयव हलवता येत नव्हता . बादशहा नम्र होऊन सिंहासनावरून उतरला आणि त्याने मान वाकवून परमेश्वराची प्रार्थना केली . हे कवी कलशने पाहिले . कवी कलशने आपल्या तशा स्थितीतही संभाजीला डोळ्याने संकेत केला आणि ताबडतोब एक हिंदी कविता रचून म्हटली . कवितेचा अर्थ असा की , 'हे राजन् तुला पाहून दिमाखाने आणि वैभवाने सिंहासनावर बसण्याचे भान राहिले नाही. त्याचे भान हरपून तो तुला ताजीम देण्याकरिता सिंहासनावरून उतरून खाली आला आहे.'

यानंतर त्यांना कैदखान्यात पाठविण्यात आले . बादशहाच्या काही हितचिंतकांनी योग्य मसलत दिसली ती ही : त्या कमनशिब्यांना जीवदान द्यावे. त्याच्या अधिकाऱ्याच्या हातात किल्ले होते . त्यांच्या किल्ल्या मागवून घ्याव्या आणि किल्ल्यावर बादशाही अधिकारी नेमण्यात यावे . नंतर त्यांना एका किल्ल्यात आमरण कैदेत ठेवण्यात यावे.

(पान ३८९) पण त्या सर्वनाश झालेल्या लोकांनी (संभाजी आणि त्याचे साथीदार) ओळखले की , आपली डोकी उडणारच . बरे आपल्याला जिवंत ठेवले तरी छळ आणि विटंबना सहन करीत आपल्याला कैदेत दिवस कंठावे लागणारच . जीवनाचे सुख काही आपल्या नशिबी राहणार नाही. कैदेतील प्रत्येक दिवस म्हणजे रोजचे मरण ठरेल. (मर्गे ताजा ख्वाहदबूद) ते दोघे दुष्ट (संभाजी आणि कवी कलश) अद्वातद्वा आणि असभ्य (हरफाराये नाशायिस्ता व कलमाते लगो) शब्द उच्चारू लागले. बादशहा आणि त्याचे कारभारी त्याच्यासंबंधी ते उद्धट आणि अपमानास्पद अशी भाषा वापरू लागले.

परमेश्वरी संकेतच असा ठरला होता की , त्या दुष्टांनी सुरू केलेल्या उच्छादाची मुळे दक्षिणेतून उपटली जाऊ नयेत (मशीयते इलाहि बरांरफ्ता बूद के रीशाये फसाद आंबदनिहादान अज मुल्के दक न कंदा न गर्दद) आणि बादशहाची उरलेली हयात , मोहीम करण्यात आणि किल्ले घेण्यातच जावी (व बादशाही बाकी उम्रे अजीज दरां मुहिम व किलागीरी सर्फ नुमायंद).

बादशहाला चीड आली . त्याला वाटले की , त्या दुष्टांचा जीवनरूपी वृक्ष ताबडतोब छाटून टाकावा आणि त्या हलक्या लोकांनी चालविलेल्या उच्छादाचा मुळापासून नाश करावा (गैरत बादशहा तक्काजाये आं नमूद के फुर्सत नदादा बकिते शजरें हयात आं मलऊनान व काला बीखे फसाद आं नाकसान परदाख्त). किल्ले काय, अल्प प्रयत्नाने ताब्यात येतील. म्हणून त्यांना जीवदान देणे आणि त्यांच्या ताब्यातील किल्ल्यांच्या किल्ल्या मागवून घेणे या गोष्टीला बादशहा कबूल झाला नाही . त्याने आज्ञा केली की , प्रथम त्या दुष्टांच्या जिभा उपटून काढून त्यांच्या असभ्य बोलण्याची त्यांना शिक्षा देण्यात यावी. त्यानंतर त्यांचे डोळे त्यांच्या मस्तकाच्या पात्रांतून बाहेर काढण्यात यावे.

अनुक्रमणिका

(११ मार्च १६८९) यानंतर त्यांना त्यांच्या दहा –अकरा साथीदारांसह अनन्वित छळ करून ठार मारण्यात आले . नरकवासी संभाजी आणि कवी कलश यांच्या तमाम शरीरात पेंढा भरण्यात आला . दख्खनमधील प्रसिद्ध अशा सर्व शहरांतून आणि गावांतून ती प्रेते नगारे , कर्णे, शिंगे इत्यादी वाद्यांच्या गजरात मिरविण्यात आली. लोकांना पीडा देणे, उच्छाद मांडणे हाच ज्यांचा पेशा आहे असे हे दुष्ट. त्यांना हीच शिक्षा हवी.

त्या दुष्टाचा मुलगा शाहू सात वर्षाचा होता . तो आणि त्या दुष्ट जमातीतील इतर काहीजण यांना बादशहाने जीवदान दिले . बादशहाने हुकूम केला की, शाहू आणि इतर काहीजण यांना आपल्या गुलाल बार (बादशहाची वास्तव्याची खास जागा) मध्ये ठेवण्यात येऊन त्यांच्याकडे लक्ष ठेवावे. शाहूच्या शिक्षणाकरिता त्याने हुशार माणसे नेमली . त्याला सात हजारी **मनसबदारी** नेमण्यात आली . आपल्या कारभाऱ्यांच्या सल्ल्याने शाहूच्या तैनातीला वेगळे दिवाण आणि बक्षी हे अधिकारी देण्यात आले . सापाला ठार करावयाचे आणि त्याचे पिल्लू पोसायचे , आग विझवायची पण निखारे शिल्लक ठेवायचे असा प्रकार झाला. यांची फळे औरंगजेबाच्या मृत्यूनंतर दिसून आली त्याची हकिकत योग्य स्थळी देण्यात येईल. याचा अर्थ खालील कवितेप्रमाणेच झाला. (पान ३९५)

आक़िवत गुर्गज़ादा गुर्ग शवद

गर्चे वा आदमी वुज़ुर्ग शवद

(**मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध**, सेतुमाधवराव पगडी, १६–२१)]

[संभाजीराजाच्या मृत्यूनंतर एका यादीनाम्यात पुढीलप्रमाणे मजकूर आपल्याला आढळतो :

आखेर का राज्य बुडाले मोगलांनी कबज करून गड वाई देसीचे घेतले कमलगड १ पांडोगड १ वंदन १ मनमोहन गड म्हणजे , १ चंदन १

गैर कबजी लोकानी इमान राखो न जागा राखिला १ कल्याणगड + १ वर्धनगड = २ (**शि. सा.** खंड ६, **यादीनामे** ७०)]

संभाजीचा अशा रीतीने अधःपात झाल्यावर रायगड येथे असलेल्या मराठा मंत्र्यांनी त्याचा धाकटा भाऊ राजाराम याला तुरुंगातून बाहेर काढले आणि ८ फेब्रुवारी रोजी त्याला राज्याभिषेक केला . संभाजीचा मुलगा शाहू हा त्यावेळी अतिशय लहान होता , आणि औरंगजेबासारख्या बलाढ्य शत्रूबरोबर जीवनमरणाच्या लढ्यात सारा देश गुंतला असताना राज्याची धुरा त्याच्याने पेलवली नसती . यानंतर थोड्याच काळाने एती कादखानाच्या हाताखालील बादशाही सैन्याच्या एका तुकडीने मराठ्यांची राजधानी रायगड हिला वेढा दिला . परंतु राजारामाने ५ एप्रिल रोजी रायगडाहून एका बैराग्याच्या वेषामध्ये पलायन केले. विजापूरचा नवीन सुभेदार , बारहाचा सय्यद अबुदुल्लाखान याने त्याला अडविण्याचा प्रयत्न केला . त्याचा पाठलाग करीत ३ दिवसांच्या आत तो तुंगभद्रा नदीच्या काठी असलेल्या सुभानगड आणि जराथा किल्ल्यापाशी येऊन पोहोचला. त्यावेळी राजाराम आणि त्याच्याबरोबर असलेल्या मराठ्यांनी एका बेटाचा आश्रय घेतला होता. त्यांच्यावर हल्ला करण्यात आला व त्यांच्यापैकी १०० प्रमुख अधिकाऱ्यांना पकडण्यात आले. राजारामाचे अधिकारी याप्रमाणे शत्रूबरोबर लढा देत असताना त्याने मोठ्या मुश्किलीने जीव बचावून पलायन केले.

काही काळ त्याने बेदनूरच्या राणीच्या ताब्यातील मुलखात लपूनछपून काढला (हे ठिकाण म्हणजे म्हैसूर जिल्ह्यातील आताचे शिमोगा हे होय.) परंतु अखेर तिने त्याला जिंजीकडे सुखरूप लावून दिले . तेथे तो १ नोव्हेंबर रोजी पोहोचला . त्यानंतर तिने दंडादाखल छोटीशी रक्कम देऊन बादशहाबरोबर तह केला . बेटावर पकडण्यात आलेल्या मराठा कैद्यांना विजापूरच्या किल्ल्यावर कैदेत ठेवण्यात आले . परंतु थोड्याच अवधीत हिंदूराव बहर्जी आणि इतर २० प्रमुख अधिकारी किल्ल्यावरून पळून गेले . त्यांनी केलेले हे अजब कृत्य त्यांच्यावर नजर ठेवण्यासाठी आलेल्या रक्षकांनी साहाय्य केल्याखेरीज निश्चितच झाले नाही . (**एम्. ए.**, ३२९) याच वेळी बादशहाने उरलेल्या ८० कैद्यांचा वध केला . [राजाराम हा पन्हाळगडावरून कर्नाटकाकडे निघाला . त्याचा पाठलाग करून त्याला पकडावे असे तातडीचे हुकूम औरंगजेबाने सोडले . या घटनेची अधिकृत हकीकत आपल्याला औरंगजेबाचा चिटणीस

साकी मुस्तैदखान याच्या **मासिरे आलमगिरी** या औरंगजेब चरित्रात सापडते. तो म्हणतो :

"अब्दुल्लाखान बाऱ्हा (सुप्रसिद्ध सय्यद बंधूचा बाप) हा रुहुल्लाखान बख्शी हा हैद्राबादेस गेला असताना त्याचा नायब म्हणून काम करीत होता. या वेळी बादशहाने त्याची विजापूरचा सुभेदार म्हणून नेमणूक केली होती आणि तो विजापूर प्रांतातील दोन किल्ले जिंकून घेण्याच्या कामात गुंतला होता. बादशहाने त्याला आज्ञा केली की, राजाराम परागंदा होऊन त्या प्रांतात गेला असल्यास त्याला पकडून कैद करावे.

"जासुदांच्याद्वारे बातमी लागली की , राजाराम हा बराच काळ अज्ञातवासात होता . पण आता त्याच्याभोवती तीनशेच्या जवळ जवळ मातब्बर आणि प्रतिष्ठित असे सरदार जमले आहेत . अब्दुल्लाखानाच्या मुक्कामापासून काही कोसांवरून प्रवास करीत तो बिदनूरच्या राणीच्या मुलखात दाखल झाला आहे . ही बातमी ऐकताच अब्दुल्लाखानाने किल्ल्याच्या वेढ्याचे काम थांबविले आणि आपला मोठा मुलगा हसनअली (हाच पुढे सय्यद अब्दुला या नावाने मोगलांचा मुख्य प्रधान झाला .) याला बिदनूरच्या दिशेने पाठविले . स्वतः अब्दुल्लाखान याने तीन रात्री आणि तीन दिवस दौड केली. तो बिदनूरच्या हद्दीत दाखल झाला . तो सुभानगड किल्ल्याजवळ पोहोचला . सुभानगड आणि त्याला लागून असलेला जिरा हे किल्ले तुंगभद्रेच्या काठावर आहेत . नदीच्या पात्रात एक बेट होते . तेथे राजाराम आणि त्याचे साथीदार यांनी आश्रय घेतला होता . अब्दुल्लाखान हा रात्रीच्या वेळी त्यांच्यावर तुटून पडला . शत्रूचे अनेक लोक मारले गेले . हिंदूराव येकोजी (संताजी घोरपडे याचा भाऊ), बहिर्जी, मानाजी घोरपडे इत्यादी मराठे सरदार कैद झाले . या धुमश्चक्रीत राजारामाने आपली शस्त्रे , वस्त्रे, पागोटे, पादत्राणे ही सगळी टाकून दिली आणि तो अशा प्रकारे निघून गेला. त्याचा कोणालाही पत्ता लागला नाही.

"अब्दुलाखानाने फार मोठी कामगिरी बजावली . पण त्याचे नशीब वाईट म्हटले पाहिजे . राजारामाला निसटून जाऊ देण्यात त्याच्याकडून हलगर्जीपणा झाला . बिदनूरच्या राणीनेही राजारामाला लपवून ठेवले आणि नंतर त्याला सुरक्षित जाऊ दिले असले पाहिजे असा संशय सर्वच पसरला . प्रथम बातमी आली की , राजाराम पळून गेला असून त्याची माणसे कैद झाली आहेत . विजापूरच्या किल्ले अर्कमध्ये त्यांना डांबून ठेवावे अशी बादशहाने आज्ञा केली.

"आश्चर्याची गोष्ट ही की विजापूरच्या कैदखान्यातून हिंदूराव बहिर्जी आणि इतर काही इसम पळून गेले . कैदखाना इतका बंदिस्त होता की, पहारेकऱ्यांच्या संमतीशिवाय ते त्यातून पळून जाणे अशक्यच होय . ही बातमी बादशहाला कळल्यावर त्याच्या आज्ञेने कैदेत राहिलेल्या ऐंशी इसमांना बादशहाकडे पाठविण्यात आले. तेथे त्यांचा वध करण्यात आला."]

[राजाराम आपल्या हातातून निसटला याचा औरंगजेबाला धक्का बसला . त्याचा ठपका त्याने जुल्फिकारखानावर ठेवला . आपली भूमिका जुल्फिकारखानाने पुढीलप्रमाणे आपला बाप असदखान याला लिहिलेल्या पत्रात मांडली : "विनंती बादशहाच्या आज्ञेने आपण लिहिलेली दोन पत्रे मिळाली . त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यात येत आहे . पत्रात बादशहांनी काही ताकिदी दिल्या आहेत . मी सर्वप्रकारे अपराधी आहे . केवळ स्वामिनिष्ठेच्या भावनेने मी क्षणाचीही विश्रांती न घेता रात्रंदिवस काम करीत आहे . बादशहांनी मला दोष दिला हे माझे दुर्दैव होय . मी जावळीला गेलो नाही. मी प्रतापगडाला वेढा घातला नाही. मी या कामासाठी फक्त फत्तेहजंगखानाला पाठविले म्हणून हा ठपका आहे . मी असे का केले याची कारणे सांगतो . तो लबाड शत्रू (राजाराम) हा रायरीहून निघाला. तो एका ठिकाणी असा टिकून राहीना . तो डोंगराळ भागातून आणि रानावनातून भटकत निघून गेला. तो पुन्हा इकडे परत येईल अशी बातमी आली होती . न जाणो तो पुन्हा रायरीकडे आणि आम्ही जिंकून घेतलेल्या मुलखाकडे यावयाचा. जाणकारांनी सल्ला दिला की, राजारामाच्या पाठलागावर निघण्याच्या ऐवजी आपण या ठिकाणीच तळ देऊन राहावे हे बरे . आता त्याचा पाठलाग होतो आहे . मी स्वतः त्याच्यामागे जाण्याचा प्रयत्न करीन . पण जावळीचा भाग किती डोंगराळ आहे आणि वाट किती अवघड आहे हे स्पष्टच आहे . खरे पाहिले तर निहारखान (वाईचा फौजदार) हा तेथून जवळच आहे . पारघाटावरून कोकणात उतरण्याची त्याने तयारी केली. पण अद्यापपर्यंत त्याला तसे करणे जमले नाही . शत्रू (राजाराम) हा घाबरलेला आहे. तो एका ठिकाणी स्वतःला कोंडून घेत नाही . तो या किल्ल्यातून त्या किल्ल्यात आणि या प्रदेशातून त्या प्रदेशात असा भटकत आहे . तो प्रतापगडातही टिकून राहिला नाही . तेथून तो वरघाटावरील वासोटा या किल्ल्याकडे निघून गेला. मी ज्या सरदाराला नेमले तो बख्शी बहरामंदखानाच्या सहकार्याने शत्रूच्या पाठलागासाठी झटत होता."

"पावसाळ्यामुळे कामाला विलंब लागत आहे . त्याला (राजारामाला) आम्हीं रायरीच्या किल्यातून बाहेर काढला आहे . त्याचे सरदार आणि त्याची प्रजा यांना आम्ही त्याच्यापासून वेगळे केले आहे . आम्ही त्याच्या सैन्यात फूट पाडली आहे . तो (राजाराम) आता वाचू शकेल असे वाटत नाही. अधिक काय लिहावे." (**खूतूते शिवाजी, हिं. स्व. आणि मो.** ९३–९४)

राजाराम प्रतापगडावरून निघून पन्हाळ्याकडे गेला . त्याच्या पाठलागावर रुहुल्लाखानास पाठविण्यात आले . या मोहिमेत भीमसेन सक्सेना रुहाल्लखानाबरोबर होता. तो लिहितो :

"रुहुल्लाखान यास आज्ञा झाली की तुम्ही पन्हाळगडला जाऊन तेथील शिबंदीचे मन वळवून किल्ला ताब्यात घ्यावा . आज्ञेप्रमाणे रुहुल्लाखानाने पन्हाळगडला जाऊन किल्लेदारांना सांगून पाहिले . पण किल्ला ताब्यात देण्याचे त्यांनी कबूल केले नाही . त्यानंतर रुहुल्लाखान तेथून निघून रहमतपूर सातारा भागाकडे गेला . कृष्णानदीच्या काठावर आदिलखानाचा मुलूख आहे . तेथून पाच कोसांवरच डोंगरात कृष्णा नदी वाहू लागते. त्या भागात शत्रूचा पाडाव करण्याच्या उद्योगास रुहुल्लाखान लागला . बादशहाने आज्ञा केली की खानजहानला तिकडे पाठविण्यात येत आहे. तुम्ही त्याच्यापाशी आपले सैन्य सोडून दरबारात यावे. त्याप्रमाणे रुहुल्लाखान दरबारात येण्यास निघाला. या मोहिमेस मी त्याच्याबरोबर राहून त्याची चाकरी बजावली याबद्दल त्याची माझ्यावर कृपा होती." (**भीमसेन सक्सेना, हिं. स्व. आणि मो.** ९४)

१६८८–८९ मध्ये बराचसा वतनदार वर्ग मोगलांना सामील झाला . खोपडे यांनी रोहिडा किल्ला मोगलांना घेऊन देण्याचे कबूल केले .

अनुक्रमणिका

त्याचे प्रतिस्पर्धी जेधे यांनाही रोहिड्याच्या वेढ्यात सामील व्हावे लागले. त्याची हकीकत जेध्यांनी आपल्या कैफियतीत पुढीलप्रमाणे दिली आहे :

"त्यावरी औरंगजेब बादशहा तुळापुरास आला. (मार्च १६८९ ते डिसेंबर १६८९) त्याचे पुत्र आज़मशहा शिरळानजीक येऊन राहिले होते. तेथे किल्ले रोहिडा घेण्याचा प्रसंग पहिला की किल्ल्याची पाने घेणे . ते समयी आपले बाप सर्जाराऊ जेधे यांनी पाने घेतली नाहीत ; खोपडियाने पाने घेतली आणि बाळाजी नाईक खोपडे याने येऊन रोहिडियास चौकी बसविली . ते समयी गडास सिधोजी जाधव किल्ल्यास हवालदार होते . त्याकडे सर्जाराव जेधे यांनी माणसे पाठवून सामान व गल्ला रातोरात आपले तरफेचा पाठविला . हे वर्तमान बाळाजी खोपडे यास दखल झाले . त्यांनी वजीरअली सय्यदमजली ठाणेदार होता त्यास सांगितले . त्याची स्वारी मुलखात आणिली. त्याने मौजे करंजीये तालुका मजकूर येथे येऊन मुक्काम केला आणि मौजे नाहंबी , व करंजीये व सांगवी तिन्ही गावे लुटून खराब केली . बाळाजी खोपडे यास कारीस सर्जाराव यास आणावयास पाठविले . त्यास सर्जाराव यास व्यथा झाली होती याकरिता आपणास बाळाजी नाईकाचे हाती दिले . त्यांनी सयद मजली जवळी आणिले . त्यास सैयदमजलीने ताकीद करावयाची ती केली आणि बोलिले , या ऊपरी तुम्ही फितवा केला म्हणजे तुमचे बरे होणार नाही . ऐसी ताकीद केली. त्यास आपला मुद्दई बाळाजी नाईक जवळ आहे . नसते तुफान करील याकरिता त्याबाबत आपणास गडाखाले चौकीस बैसावे लागले . खोपड्यामुळे किल्ला सीबंद झाला. त्यावरी किल्लेकरी याने पातशहाकडे राजकारण लावून किल्ला नजर केला." (**राजवाडे** खंड १५, पान ३९५)

राजाराम १६८९ सप्टेंबरपर्यंत पन्हाळ्यावर होता . रायगडचा वेढा मोगलांनी उठवावा म्हणून मराठ्यांनी अनेक प्रयत्न केले . ईश्वरदास नागर याने अशा एका प्रसंगाची पुढीलप्रमाणे नोंद केली आहे :

"जुल्फिकारखान याने किल्ल्यापासून काही अंतरावर बुजुर्गवाडीचा दर्गा आहे तेथे आपली छावणी कायम केली . तो अद्याप छावणीत पोहोचला नव्हता . इतक्यात साताऱ्याच्या दिशेने हंबीरराव (दुसरा) त्याच्यावर चालून आला . मोगलांची रसद तोडणे हा त्याचा उद्देश होता . जुल्फिकारखान आणि हंबीरराव यांचे निकराचे युद्ध झाले . मराठ्यांची जवळजवळ १५०० माणसे ठार झाली . मोगलांचे सुमारे ९०० सैनिक ठार झाले. मराठे टिकाव धरू शकले नाहीत . ते पळून गेले . रसद तोडण्यासाठी तुकड्या नेमल्या होत्या त्याही निघून गेल्या ." (**ईश्वरदास, हिं. स्व. आणि मोगल**, ९७)]

औरंगजेबाचा वजीर असदखान याचा मुलगा एतीकादखान याने रायगडला वेढा दिला होता . बराच काळ युद्ध चालल्यानंतर १९ ऑक्टोबर रोजी त्याच्या हातात किल्ला पडला (१६८९). किल्ल्यामध्ये त्याने शिवाजीच्या हयात स्त्रिया आणि संभाजी व राजाराम यांच्या बायका , मुली आणि मुलगे यांना कैद केले. या मधेच संभाजीचा ७ वर्षांचा मुलगा शाहू हा होता . स्त्रियांना अतिशय सन्मानाने आणि आब राखून वेगळ्या तंबूत ठेवण्यात आले . शाहूला ७ हजारी **मनसबदारी** आणि **राजा** ही पदवी देण्यात आली . परंतु त्याला बादशहाच्या तंबूजवळ बंदिस्त करण्यात आले . [रायगडचा वेढा आणि त्यापूर्वीच्या मोगलांच्या हालचाली याबाबत ईश्वरदासाने दिलेली हकीकत पुढीलप्रमाणे आहे :

ईश्वरदास नागर म्हणतो :

"या सुमारास बादशहाला कळले की संभाजीचे सरदार खालोजी आणि केशवजी यांनी संभाजीची बायकामुले यांना रायरी (रायगड) च्या किल्ल्यात आणले असून तोफा आणि युद्धाचे इतर सामान जमविले आहे . त्यांनी बरेच सैन्य जमविले असून शहाजादा आज़म याजबरोबर असलेले सैन्य त्या भागात पोहोचले आहे , त्याजबरोबर लढण्याची ते तयारी करीत आहेत . शहाजादा आज़म याजबरोबर असलेले सैन्य व बहरामखान वगैरे सरदार हे मराठ्यांचे किल्ले जिंकून घेण्यासाठी गेले होते . त्यांनी किल्ले जिंकून घेतले आणि त्याची बातमी त्यांनी बादशहाला कळविली."

मोगलांनी यापूर्वी काय हालचाली केल्या याबद्दल ईश्वरदास म्हणतो :

"बादशहाने शहाजादा आज़म यास संभाजीच्या मुलखावर चालून जाण्याची आज्ञा केली (डिसेंबर १६८८). जुल्फिकारखान आणि कासिमखान हे शहाजाद्याच्या सैन्यापासून तीन मजला पुढे चालत होते . ते कूच करीत घाटाजवळ आले . मराठ्यांनी रस्ते रोखून धरले होते . रसदेची ये-जा बंद झाली . मोगल छावणीत धान्याची अतिशय टंचाई झाली . हे पाहून शहाजाद्याने जुल्फिकारखान , बख्तमंदखान आणि सिद्दी मिफताहखान यांस कसलेले सैन्य बरोबर देऊन घाटमाथ्यावर पाठविले. ते घाटाच्या तोंडाशी पोहोचले. तेथे मोगल सैन्य पायउतारा होऊन घाटात जमलेल्या मराठ्यांवर तुटून पडले. निकराचे युद्ध होऊन मोगलांनी घाट ताब्यात घेऊन तेथील ठाणी मजबूत केली . याच सुमारास जुल्फिकारखान आणि कासिमखान यांनी कुडमच्या किल्ल्यास वेढा घातला. वेढा दहा दिवस चालला. शेवटी मोगलांनी किल्ला जिंकून घेतला."

आज़मच्या वतीने बहरामंदखानाने महब आणि सासद हे किल्ले जिंकून घेतले होते. ईश्वरदास म्हणतो :

"बहरामंदखानाच्या सैन्यात दिलेरखान, रुस्तमखान, राजा अनूपसिंग वगैरे सरदार होते. त्यांना बादशहाने शहाजादा आज़म याजपाशी तैनात केले. याशिवाय सिद्दी मिफताहखान, मानसिंग राठोड, सिद्दी अब्दुल्लकादिरखान, हाजी अफजल इत्यादी सरदारांनाही शहाजादा आज़म

याजकडे पाठविण्यात आले . थोड्याच दिवसांनी जुल्फिकारखान बहादूर हा बादशहापाशी आला . रायगडचा किल्ला जिंकून घेण्याचे बादशहाने ठरविले. यापूर्वी शहाजादा आझम आणि गाजीउद्दीनखान हे त्या किल्ल्यावर चालून गेले होते पण त्यांच्या मोहिमेचा काही उपयोग झाला नाही . यामुळे रायगड जिंकून घेण्यासाठी बादशहाने जुल्फिकारखान बहादूर याची नेमणूक केली . शहाजादा आझम याजकडून हवी ती मदत घेऊन किल्ला जिंकून घ्यावा अशी बादशहाने त्यास आज्ञा केली . बादशहाची आज्ञा घेऊन जुल्फिकारखान निघाला तो प्रथम शहाजादा याजकडे गेला . तेथे तो तीन दिवस राहिला. नंतर त्याने शहाजाद्याकडे असलेले काही सरदार निवडून आपल्याबरोबर घेतले आणि तो तडक रायरीच्या पायथ्याशी आला . रायरीपासून दोन कोसांवर त्याने आपला तळ दिला."]

[या सुमारास जुल्फिकारखान याने शहाजादा आझम यांस लिहिलेले एक पत्र उपलब्ध झाले आहे . खुतुते शिवाजी या पत्रसंग्रहात ते सापडले. पत्र मार्च १६८९ चे असावे, या पत्रात जुल्फिकारखान हा शहाजादा आझमला कळवितो की,

"विनंती की, रायरी (रायगड) पासून सहा कोसांवर असलेल्या महाड येथे मी पोहोचलो . आज गुरुवार असून या महिन्याची आठ तारीख आहे . प्रथम आमच्या लष्कराने येथील गावे आणि ठाणी लुटली . शत्रू किल्ल्याच्या पायथ्याशी होते . त्यांच्यावरही आम्ही हल्ले केले . किल्ल्याच्या पायथ्याशी असलेली ठाणीही आम्ही सोडली नाहीत . येथे रतनगडचा किल्ला आहे . या किल्ल्याच्या पायथ्याशी असलेली ठाणी पण उद्ध्वस्त केली. येथील शेते, फळबागाही आम्ही नष्ट केल्या . मला आढळून आले आहे की राजाराम हा नाममात्र आहे . त्याचे सरदार हंबीरराव (दुसरे) निळो, आणि दोघे खंडूजी हे सैन्याची जमवाजमव करीत आहेत . तेच राजारामाच्या नाशाला कारणीभूत होतील . त्यांनी रुपाजी भोसले यालाही बोलावून घेतले आहे. परमेश्वराच्या आणि बादशहाच्या कृपेने शत्रूची हानी होऊन त्यांना शिक्षा मिळेल अशी आशा आहे . गांगोलीच्या मुक्कामी शत्रूने आमच्यावर रात्री हल्ला केला. त्यांनी आमच्यावर बाण फेकले, आणि गोळ्यांचा वर्षाव केला. पण आमचे शूर सैनिक सावध होते. त्यांनी शत्रूंचा प्रतिकार करून त्यांना परतवून लाविले . आजही महाडच्या वाटेवर असलेल्या सोनगडच्या डोंगरावर शत्रू जमले होते आणि त्यांनी आमच्यावर तोफांचा आणि बंदुकीचा मारा केला. आमचे सैन्य डोंगरावर चढले. आमच्या सैनिकांनी शत्रूला मार देत किल्ल्याच्या दरवाजापर्यंत रेटले.

"तोपर्यंत समुद्राच्या खाडीला भरती आली आणि पायथ्याशी जाण्यायेण्याची वाट होती ती फक्त तीन -चार हातच रुंद होती . त्यातच दिवस मावळून रात्र झाली. या चकमकीत खैर अंदेशखान आणि त्याचे मोगल यांनी चांगलीच कामगिरी बजावली.

"मला बंदुकची, बेलदार, सुतार, जंगले तोडणारे, जमिनी खणणारे, मशालजी इत्यादी लागतील. याबद्दल यापूर्वी मी आपणास विनंती केली होती. येथे जास्त पायदळ शिपायांचे आहे. ते आमच्यापाशी विशेष नाहीत. कर्नाटकी, बेलदार आणि इतर युद्धसाधने यांची आवश्यकता आहे . चार-पाच हजार माणसे लवकर पाठवावीत . त्यांपैकी एक हजार तरी बहेलिये (पायदळ बंदुकची) हवेत. दारू आणि लहान आणि मोठे गोळे लवकर पाठवावे. आतापर्यंत कोकणात (घाटाखाली) ठाणी कायम झाली आहेत . आता रायरी (रायगडच्या) जवळ ठाणी कायम करावयाची आहेत. माझ्यापाशी किती थोडे सैन्य आहे हे आपल्याला माहीतच आहे. म्हणून अधिक सैन्य पाठवावे."]

याप्रमाणे १६८९ या वर्षाच्या अखेरीला औरंगजेबाचे उत्तर हिंदुस्थानात आणि त्याचप्रमाणे दक्षिणेत निर्विवाद सार्वभौमत्व स्थापन झाले. आदिलशहा, कुतुबशहा आणि राजा संभाजी यांचा पाडाव झाला होता . त्यांचा मुलूख बादशाही साम्राज्याला जोडण्यात आला.

"आता औरंगजेबाने आपल्या मनासारखे सारे काही प्राप्त करून घेतले होते . निदान तसा देखावा तरी निर्माण झाला होता . परंतु प्रत्यक्षात मात्र त्याने सारे काही गमावलेले होते . तसे बघितले तर त्याच्या सर्वनाशाची ती केवळ सुरुवात होती . मोगलसाम्राज्याचा विस्तार आता इतका मोठा झाला होता की , एका माणसाकडून अथवा एकाच मध्यवर्ती ठिकाणावरून त्या साम्राज्यावर अधिसत्ता गाजविणे कठीण होते . त्याच्या शत्रूंनी सर्व बाजूंनी त्याच्याविरुद्ध उठाव केला होता . तो त्यांचा पराभव करू शकत होता . परंतु त्याचा कायमचा नायनाट करणे त्याच्या आवाक्यापलीकडचे होते . उत्तर आणि मध्य हिंदुस्थानातील अनेक भागांत अराजकता माजली होती . राज्यकारभारात ढिलाई आणि लाचलुचपत याचा सुळसुळाट झाला होता. दक्षिणेमधील अविरत चाललेल्या युद्धाने खजिना रिता पडला होता . पहिला नेपोलियन म्हणत असे की 'स्पेनरूपी अल्सरने माझा नाश केला .' दक्षिणेतल्या अल्सरने औरंगजेबाला धुळीला मिळविले ." (**स्टडिज इन मुघल इंडिया**, ५०)

●●●

अनुक्रमणिका

औरंगजेबाच्या कारकिर्दीचा संक्षिप्त इतिहास

१६१८ — १७०७

सर जदुनाथ सरकार

मराठीत अनुवाद

भ. ग. कुंटे

पुस्तक पाचवे

अनुक्रमणिका

प्रकरण पंधरावे

इ. स. १७०० पर्यंत मराठ्यांबरोबर झालेल्या युद्धांची हकीकत

(१) औरंगजेबाच्या कारकिर्दीच्या दुसऱ्या भागातील त्याच्या हालचालींची हकीकत

८ सप्टेंबर १६८१ रोजी औरंगजेबाने राजपुतान्यातून कूच केले . १६८२ च्या मार्च महिन्याच्या २२ तारखेला तो औरंगाबाद येथे पोहोचला. युद्धाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे हे ठिकाण त्याने ताब्यात घेतले . तेथून त्याने निरनिराळ्या भागांत कारवाई करणाऱ्या आपल्या सेनाविभागांना मार्गदर्शन केले , आणि यानंतर १३ नोव्हेंबर १६८३ रोजी तो तेथून पुढे दक्षिणेकडे अहमदनगरच्या दिशेने निघाला . विजापूरनजीक आपण असावे या हेतूने तो अहमदनगरहून सोलापूर येथे २४ मे १६८५ रोजी येऊन पोहोचला . विजापूरला त्याच्या फौजांनी अगोदरच वेढा घातला होता. वेढ्याचे काम लवकर संपुष्टात आणण्यासाठी तो स्वतः ३जुलै १६८६ रोजी रसुलपूर या विजापूरच्या उपनगराकडे गेला . नव्याने जिंकलेले आदिलशाही राजधानीचे शहर त्याने ३० ऑक्टोबर रोजी सोडले आणि त्याने कुलबर्गा आणि बीदर या शहरांना भेटी दिल्या . नंतर तो २८ जानेवारी १६८७ पासून गोवळकोंड्यासमोर ठाण देऊन बसला . या ठिकाणी तो एक वर्षभर छावणी करून होता. तेथून तो विजापूर येथे १५ मार्च १६८८ रोजी आला . ही त्याची विजापूरची दुसरी भेट होती . विजापूरमध्ये त्याने नंतरचे ९ महिने काढले . यावेळी विजापुरात पटकीच्या रोगाने भयंकर धुमाकूळ घातला होता. तेव्हा १४ डिसेंबर रोजी विजापूर शहर सोडणे त्याला भाग पडले . तेथून तो अकलूज आणि भीमा तीरावर असलेल्या बहादूरगड मार्गे पुणे जिल्ह्यातील कोरेगाव येथे पोहोचला . येथे तो ३ मार्चपासून १८ डिसेंबर १६८९ पर्यंत छावणी करून होता . तेथून तो ११ जानेवारी १६९० रोजी विजापूर येथे परतला . परंतु लवकरच त्याने विजापूर शहर सोडले आणि शहराच्या दक्षिणेस कृष्णा नदीच्या काठी असलेल्या खेडोपाडी फेब्रुवारी, मार्च आणि एप्रिल हे महिने घालविले . शेवटी त्याने या नदीच्या दक्षिणेस आणि विजापूरच्या नैर्ऋत्येस असलेल्या गलगली या ठिकाणी २१ मे १६९० रोजी छावणी केली. उरलेले सबंध वर्ष आणि पुढील वर्षाचे पहिले २ महिने त्याने या ठिकाणी घालविले. तेथून मुक्काम हलविल्यानंतर तो जवळ जवळ १४ महिने (मार्च १६९१ ते मे १६९२) विजापूरच्या परिसरात होता . त्यानंतर मात्र पुढील ३ वर्षे (मे १६९२ ते मार्च १६९५) त्याचा मुक्काम गलगली येथेच राहिला.

शेवटी विजापूरला त्याने आपली ५ वी आणि अखेरची भेट दिली . तेथे त्याचा मुक्काम ५ आठवडे झाला. (एप्रिल–मे १६९५) त्यानंतर मात्र त्याने भीमा नदीच्या दक्षिण किनाऱ्यावर ब्रह्मपुरी येथे आपला मुक्काम दिला. ब्रह्मपुरीचे नाव बदलून त्याने ते इस्लामपुरी हे ठेवले . येथे तो जवळजवळ साडेचार वर्षे मुक्काम करून होता. (२१ मे १६९५ ते १६ ऑक्टोबर १६९९). इस्लामपुरी येथील छावणी सभोवार त्याने भिंत बांधून काढली. येथे आपल्या जनान्याला त्याने वजिराच्या ताब्यात सोपविले आणि १९ ऑक्टोबर १६९९ रोजी तो मराठ्यांचे किल्ले घेण्याच्या आपल्या मोहिमेवर निघाला . ही मोहीम अविरत चालूच राहिली आणि अखेर तिने त्याच्या जीवनाचा अंत बघितला. या मोहिमेवरून तो २० जानेवारी १७०६ रोजी अहमदनगर येथे परतला. यानंतर केवळ एकाच वर्षाने म्हणजे २० फेब्रुवारी १७०७ रोजी तो मरण पावला.

(२) मराठ्यांनी केलेली उचल , १६९०-९५ [मोगलांस जाऊन मिळालेल्या मराठा सरदारांबद्दलची प्रतिक्रिया पुढील हकीकतीत आपल्याला बघावयास मिळेल :

ऑक्टोबर १६८३ त शाहाबुद्दीनखान पुणियांस येऊन बसल्याने पुण्याजवळील मावळात देशमुख देशपाड्यांची चलबिचल होणे

अनुक्रमणिका

साहजिकच होते. त्यांना आपल्या घरादाराची वगैरे धास्ती वाटू लागली . तेव्हा कानदखोरे, कारी वगैरेचे देशमुख आपल्या गुरांढोरांनिशी मोगली हद्दीतील शिखळास जाऊन राहिले . मोगल ताबडतोब मावळ ताब्यात घेईल असे त्यांना वाटले होते . परंतु पावसाळ्यापर्यंत तशी हालचाल झाली नाही, हे पाहून ते पुन्हा संभाजीराजांचा कौल मागू लागले . राजश्री बकाजी नावडकर त्यांची मध्यस्थी करीत होता . या बाबतीत कवी कलशने 'कानदखोरे' येथील देशमुखांना ३ ऑगस्ट १६८४ ला पत्र लिहिले आहे . त्यात मजकूर..."आम्ही राजश्री छत्रपती स्वामीस तुमचे विशई विनंती करून तुम्हास भेटीस यावयाची आज्ञा केली आहे . पत्रदर्शने स्वार होऊन येणे. राजश्रीची भेट होईल. तुमचा मुद्दा मनास आणून तदनुसार पारपत्य करून देऊ. या प्रसंगी तुम्ही आपली येकनिष्ठा राजश्रीच्या पायासी जाहीर करून अवघे वतनदार येकमते राहोन गनीमास सजा द्यावा . आपली सरफराजी करून घ्यावी. तुम्ही इमानी आहा. राजश्रीस व आम्हास तुमचा भरंवसा आहे ..." (**शिचसा, खंड** ५ वा, पृ. १२०) केवळ स्वार्थासाठी राज्यांतर करणारी ही मंडळी भेटावयास येण्यास भीत होती. पुढे त्यांनी बोलणे लावले. त्यावरून संभाजीचे सर्जाराऊ जेधे यांस ५ ऑक्टोबर १६८५ चे आज्ञापत्र गेले. त्यांतील मजकुरावरून सभाजीराजांची शिस्त आणि राजा व हे फितुर यांच्या मनःस्थितीची चांगली कल्पना येते : "...श्री राजा शंभु राजा छत्रपति स्वामी याणी सर्जाराऊ जेधे यांसी आज्ञा केली ऐसी जे तुम्ही संताजी निंबाळकर मुद्राधारी विचित्रगड यासी पत्र लिहून आपला मुद्दा सांगोन पाठविला की आपला भाऊ शिवाजी जेधा याणे हरामखोरी करून सिरवळास गेला. त्याने आपली गुरेढोरे वळुनु नेली. पुढे आपणास बरे पहाणार नाही याबद्दल आपणहि उठोन शिरवळास आलो आहे . ऐसायासि आपण राजश्री स्वामीच्या पायाजवळी एकनिष्ठच आहे . स्वामीः कृपाळु होऊनु आपले वतन देशमुखी आपले स्वाधीन करितील आणि अभयपत्र सादर होईल तरी आपण सेवेसी येऊनु एकनिष्ठ होऊनु शेवा करीन म्हणून ; तरी तुमचा मुद्दा माझले हवालदार एहि स्वामीचे शेवेसी हुजुर लिहिला . त्यावरोन कळोन आले. त्यावरून हे आज्ञापत्र तुम्हास लिहिले आहे . तरी आधी तुम्हीच सरासरी हरामखोरी केली की वतनदार (काही वतने शिवाजीराजांनी जेधेबांदल यासारखे जुने सरदार देशमुख व निकट नातेवाईक यांजकडे चालू ठेविली होती.) होऊनु इमाने इतबारे वर्तावे ते गोष्ट न करिता स्वामीचे अन्न बहुत दिवस भक्षिले त्याचे सार्थक केलेत की स्वामींच्या पायासी दुर्बुद्धि धरून दोन दिवसांचे मोगल त्यांकडे जाउनु राहिलेत . तुमचा भाऊ शिवाजी गनीमाकडे गेला. तो तुम्हांस बरे पाहे ना. ऐसें होते तरी तुम्ही स्वामिसान्निध हुजुर यावे होते . म्हणिजे तुमचे इतबार पण कलोन एकनिष्ठता कळो येती . ते केले नाही. तरी बरीच गोष्ट जाली . याउपरीहि गनिमाकडे राहणेच असेली तरी सुखेच राहाणे . तुमचा हिसाब तो काय आहे येक्षणी स्वामी आज्ञा करितात तरी गनिमादेखील तुम्हास कापून काढवितच आहेत, हे बरे समजणे. दुसरी गोष्ट की तेथे राहणेच नाही ; एकनिष्ठेने स्वामीच्या पायाजवळी वर्तावे ऐसे असेली तरी तुम्ही परभारे मुद्दे सांगोन गडकिल्ल्याकडे राबिते काय म्हणून करिता ? हे गोष्ट स्वामीस मानत नाही जो राबिता करणे तो स्वामींकडेच करून हुजुर वर्तमान लेहून पाठवावे. स्वामी तुमचा मुद्दा मनास आणून आज्ञा करावयाचीं ते करितील . तरी ऐसी गोष्ट करावया प्रयोजन नाही . उजरातीखेरीज दुसरियाकडे एकंदर राबिता न करणे जे वर्तमान लिहिणे ते स्वामीस लिहित जाणे . तुमचे ठायी एकनिष्ठताच आहे ऐसे स्वामीस कळलियावरि जे आज्ञा करणे ते करून आज्ञापत्र सादर होईल. तेणेप्रमाणे वर्तणूक करणे ..." (**राजखं,** १५ वा, ले. ३४२, पृ. ३७१-२, या पत्रावर मुख्य प्रधान वगैरेचे शिक्के वगैरे आहेत. **रामरा,** भाग ३ रा, **जेधे देशमुख,** पृ. २२-३) यावरून फितूर कां व कसा होत असे याचा बोध होतो. तसेच संभाजीची सत्ता मोगलापुढे निष्प्रभ झाली नव्हती हेहि स्पष्ट होते. उलट संभाजीराजे गडकिल्ल्याशी शत्रूचा अगर त्याचे हस्तकांचा संबंध न येऊ देण्याबद्दल किती काळजी घेत असत याची कल्पना येते. निंबाळकरालाहि समज मिळालीच असेल . असो. त्यानंतर २ फेब्रुवारी १६८७ स नीळोपंत मुख्य प्रधानाने आपला कौलनामा सर्जेराव जेधे यास पाठविला आहे. त्यांतील मजकूर : "...तुम्ही गनीमाकडे जाऊन शेवा करिता. कोव्या भरास भरून गेलेत. बरे जे जाले ते फिरोन न ये परंतु मुसलमानाची सेवा करिता. तुम्हास कष्ट होतात. सांप्रत स्वामीचे सेवेसी येऊनु कार्यभाग करावा. कष्टाची मजुरा होईल. सरफराजी करून घ्यावी म्हणोन कलोन आले तरी तुम्ही कदीम लोक . तुमचा भरवंसा. स्वामीचे बहुत अन्न भक्षिले आहेत. क्रिया धरुनु आणि यावयाचे केले तरी बहुत उत्तम केले. कदाचित गनिमाकडे गेले होतेस त्या गोष्टीकरिता यावयाचा अनमान कराल तरी सर्वस्वी न धरणे . बेशक येणे..." (**राजखं,** १५ वा, ले. २८१, पृ. २८८, **रामरा, भाग ३ रा,** ले. २८१) यानंतर सर्जेराव जेधे (यांनी पाठविलेल्या उत्तरावरून पुन्हा आणखी एक कौलनामा नीळो मोरेश्वर मुख्य प्रधानाने ४ मार्च १६८७ रोजी पाठविला हा सर्जेरावाचा मुलगा बाजी जेधे यास पाठविला आहे . बाजी जेधे मोगली कैदेत होता. तो जून १६८५ पूर्वीच कैदेतून पळोन आला होता. (**राजखं,** १५ वा, ले. ३४१, पृ. ३७०-१) परंतु तो आला नव्हता. त्यानंतर त्याच्या बापाने पत्रव्यवहार केला. त्याचे उत्तर म्हणून ४ मार्च १६८७ चा हा कौलनामा आहे . त्यांतील मजकूर : "बाजी सर्जाराऊ जेधे देशमुख तपे भोर ता रोहिडखोरे ...कौलनामा दिला यैसा जे...तुमचा मुद्दा येकनिष्ठता धरून आपले वृत्तीवर यावे . शेवा येकनिष्ठेने करावी. मुलेमानसे कबिला आणावा म्हणोन मुदे सांगोन पाठविला व आपले पासून जे काय अन्याये जाले असतील ते माफ करावे आनुभये देऊन मस्तकी हात ठेऊन शेवा घ्यावी म्हणून कित्येक रजेने मुदा सांगोनु पाठविला म्हणून : तरी बहुत बरे याहून काय बरे आहे. तुम्ही आधीच या प्रांतीहून नवजावे आणि गेलेस तरी ते सर्व अन्याये तुमचे असतील ते तुम्ही येकनिष्ठता माहाराज राजेश्री स्वामीच्या अभयपत्राचा उजुर कराल तरी सहसा न करणे . तेहि पत्रे आणुनु देऊनु . तुम्ही अलियाने तुमच्या कबिल्याच्या खायाखर्चाची विलेमामलां करूनु देऊनु. तुम्हापासी जे जे लोक असतील तेहि तुम्ही घेऊनु आमचे भेटीस कबिला घेऊनु येणे . कबिला रोहाडागडी ठेऊनु तुम्ही आम्हापासी श्रीवर्धनगडी भेटीस येणे. भेटीनंतर तुमचा मुद्दा मावाफिक सरंजाम अवघाच करून व लोक तुम्हाबरोबरी येतील त्यांची बिले करून तुम्ही कोणेविसी शक अदेसा सहसा न धरणे. तुम्हास अभय दिल्हे असे...." (**शिचसा,** खंड २, ले. २२२, प्र. २२१, **रामरा,** भाग ३ रा, लेख, २२) बहुधा या कौलानुसार बाजी जेधे कबिल्यासह रोहिड खोऱ्यांत येऊन राहिला. परंतु संभाजीराजे मारले गेले व मुलुख मोगलाचे हाती पडला, तेव्हा त्यांनी मोगली सरदाराशी बोलणे चालू केले . तेव्हा इ. स. १६८९ च्या मे पूर्वी त्यांस मोगली सरदाराकडील पत्र आले आहे . त्यांतील मजकूर : "...तुला हुजुर सिवाजीपंत पाठविला होता. त्याणे हकीकत जाहीर केली. त्यावरून तुझे इसाफतीचे गाव व हक्क हुमाले केले असे व तुझा गुमास्ता सिरोली (शिरवळी) चाकरीस देणे. तुला हुजुर येणे जालियावरि तुम्हास हजरती पातशहाजादें याचा कौल आणून देऊ . जरी न हुजूर येस तरी गाव दुमाले नाहीत. दिगरबाजी घोलप व बकाजी नावडकर यासी कौल दिधले त्यांस बराबरी घेऊनु येणे ...तुम्हानजिक जमाव कित्येक होईल ते लेहोनु घेऊन येणे..." (**राजखं,** १५, ले. ३४४, पृ. ३७४) नंतर १६ मे १६८९ ला बाजी जेध्याला कौल मिळाला. त्यांतील मजकूर ".....राजाजी शंकर हुजुर जाहिर केले की देशमुख मजकूर कौलाचा उमेदवार आहे ...हंदियांत जमा होवायाची उमेद धरिली आहे ...कौल दिधला...मौजे कारीस.....सभेत कबिला व शिबंदी सभेत राहणे ...आबादानी करणे . तुझा गुमास्ता सिरोली (शिरवळी) ठाणियांत चाकरीस देणे...सनद...देऊनु.." (**शिचसा,** खंड, ले. २२३ पृ. २२१-२२) असाच "कौल २० मे १६८९ रोजी संकराजी जुंझारराव देशमुख ता कानदखोरे " यांस दिला आहे. (**राजखं,** १६, ले. २६, पृ. ४२) हा एक हिन्दवी स्वराज्यातील घटनेच्या संभाजीराजांच्या कारकिर्दीतील कारभाराचा नमुना म्हणून पत्रव्यवहारांतील महत्त्वाचा भाग उद्धृत केला . या पत्रावरून संभाजीराजांच्या कारकिर्दीत सरकारकून वगैरे किती आत्मविश्वासाने वागत होते याचाही चांगला बोध होतो.]

अनुक्रमणिका

१६८८ आणि १६८९ ही दोन वर्षे म्हणजे बादशहाला सतत विजय मिळत गेल्याचा कालखंड होता . त्याच्या फौजांनी विजापूर आणि गोवळकोंडा या पाडाव झालेल्या राज्यांचे किल्ले आणि प्रांत यांचा ताबा आपल्याकडे घेतला. त्याची वर्गवारी अशी– बेरड लोकांचे राजधानीचे शहर सागर, पूर्वेस असलेली रायचूर आणि अदोनी ही शहरे , म्हैसूरमधील सेरा आणि बंगलोर , मद्रास कर्नाटकमधील वांदीवाश आणि कांजीवरम, अगदी नैर्ऋत्येस असलेली बंकापूर आणि बेळगाव ही शहरे आणि त्याशिवाय मराठ्यांची राजधानी रायगड आणि त्यांचे इतर अनेक किल्ले . उत्तर हिंदुस्थानातही त्याच्या सैन्याला असेच उल्लेखनीय विजय मिळाले . राजारामाच्या अधिपत्याखाली झालेले जाट लोकांचे बंड मोडून काढण्यात आले व राजारामाला ठार करण्यात आले. (४ जुलै १६८८).

इ. स. १६८९ या वर्षाच्या अखेरीला मराठ्यांचा नवा राजा राजाराम हा जिंजीच्या किल्ल्यावर जाऊन पोहोचल्याची बातमी आली. यापुढे पूर्व किनाऱ्यावरील मराठ्यांच्या चढाईचे जिंजी हे प्रमुख ठिकाण बनले, तर राजारामाने मायदेशी ठेवलेल्या मंत्र्यांनी पश्चिमेला मोगलांना संघटित असा प्रतिकार करण्याची संघटना सिद्ध केली . औरंगजेबाच्या अडचणीमध्ये अधिकाधिक भर पडली कारण मराठ्यांचे मध्यवर्ती सरकार आणि राज्याची धुरा वाहणारा शास्ता यांचा अस्त झाला होता . साहजिकच मराठ्यांचा प्रत्येक अधिकारी स्वतःच्या हिमतीवर आपल्या सैनिकांनिशी लढे व मोगल राज्याच्या वेगवेगळ्या प्रांतात छापे घाली. मराठ्यांचे युद्ध म्हणजे आता लोकयुद्ध झाले . हे युद्ध संपुष्टात आणणे औरंगजेबाला शक्य नव्हते . कारण ज्या सरकारवर किंवा सैन्यावर हल्ला करून औरंगजेब त्यांचा नाश करू शकेल , असे मराठ्यांचे सैन्य अथवा सरकार आता अस्तित्वात नव्हते . बादशाही सैन्य सर्व ठिकाणी मोठ्या संख्येने मराठ्यांना तोंड देण्यासाठी सज्ज असणे शक्य नव्हते . साहजिकच बादशाही फौजांना अनेक ठिकाणी पराभव पत्करावा लागला. संभाजीच्या मृत्यूनंतर निर्माण झालेल्या गोंधळात मोगलांनी मराठ्यांचे जे किल्ले लाच देऊन अथवा जिंकून घेतलेले होते ते पुन्हा जिंकून घेण्यास मराठ्यांनी सुरुवात केली . १६९० च्या मे महिन्यात पहिल्या प्रथम औरंगजेबावर बाजू उलटण्यास सुरुवात झाली . त्या महिन्यात औरंगजेबाचा सेनापती रुस्तुमखान याला मराठ्यांनी पकडले आणि त्याची छावणी साफ लुटून नेली.

१६९० आणि १६९१ या दोन्ही वर्षांत औरंगजेबाचे सर्व मुख्य प्रयत्न दक्षिण आणि पूर्वे दिशांकडे अथांग पसरलेला अतिशय सुपीक असा मुलूख आपल्या ताब्यात घेण्याचा होता . हा मुलूख आदिलशाही आणि कुतुबशाही राज्ये साम्राज्याला जोडली गेल्यामुळे कायदेशीरपणे त्याच्या ताब्यात आला होता . ह्या प्रयत्नात तो असताना मराठ्यांकडून त्याला निर्माण होणाऱ्या धोक्याची तितकीशी जाणीव त्याला झाली नाही. त्याला असे वाटले की मराठ्यांच्या राज्याचा आता जवळजवळ संपूर्णपणे नाश झालेला आहे . अजून त्याला मराठे लोक काय करू शकतात याची पूर्ण कल्पना यावयाची होती.

१६९२ आणि १६९३ मध्ये झालेली युद्धे

१६९१ च्या शरद ऋतूमध्ये जिंजीसमोर मोगलांची परिस्थिती इतकी भयानक झाली की बादशहाला जिंजीकडे बरीच मोठी फौज रवाना करणे भाग पडले. १६९२ मध्ये लढाईच्या पश्चिम विभागात मोगलांकडून उल्लेखनीय अशी कोणतीच कामगिरी पार पडली नाही , तर पूर्व किनाऱ्यावर मोगल फौजांना अतिशय मोठे पराभव खावे लागले . त्यांचे दोन मोठे सेनानी मराठ्यांनी पकडले , जिंजीचा वेढा त्यांना सोडून द्यावा लागला, आणि राजपुत्र कामबक्ष याला त्याच्या बरोबरीच्या सेनापतींनी केलेली अटक या गोष्टींचा वरील

सबंधात उल्लेख करावा लागेल . (डिसेंबर १६९२ ते जानेवारी १६९३). साहजिकच १६९३ या वर्षी बादशहाला प्रामुख्याने जी गोष्ट प्रथम करावीशी वाटली ती म्हणजे पूर्व कर्नाटकात भरपूर रसद आणि युद्धसामग्री पोहोचवून देणे ही होय. युद्धाच्या पश्चिम विभागात राजपुत्र मुईजुद्दीन याने ऑक्टोबर १६९२ मध्ये पन्हाळा किल्ल्याला वेढा दिला होता. पुढील सबंध वर्ष त्याला किल्ल्यासमोर हाती यश न गवसता रखडत पडावे लागले होते. अखेर १६९४ च्या मार्च महिन्यात मराठ्यांनी त्याची हकालपट्टी केली. यात भर म्हणूनच की काय मराठा मंडळातील संता घोरपडे , धना जाधव, नेमा शिंदे, हणमंतराव आणि इतर मराठे सरदार यांचे मोगलांवर अविरत हल्ले चालू होते . बीदरपासून विजापूरपर्यंत आणि रायचूरपासून मळखेडपर्यंत पसरलेल्या अतिशय रुंद आणि डावपेचांच्या दृष्टीने महत्त्वाच्या मुलखात पीड नायकाच्या हाताखाली अतिशय कणखर असलेल्या तद्देशीय बेरड जमातीच्या लोकांच्या हालचाली चालू होत्या . त्यांनी इतके उग्र स्वरूप धारण केले होते की औरंगजेबाला सागर येथे जून १६९१ पासून ते डिसेंबर १६९२ पर्यंत एका अतिशय नावाजलेल्या सेनापतीच्या हाती बऱ्याच मोठ्या सैन्याची नियुक्ती करावी लागली होती . त्यानंतर बेरडांचा प्रमुख पीड नायक याने शरणागती दिली . परंतु पुन्हा तीन वर्षांनंतर त्याने मोगलांबरोबर शत्रुत्व सुरू केले त्यामुळे पुन्हा एकदा बरेच मोठे सैन्य त्याच्यावर पाठविणे औरंगजेबाला भाग पडले (१६९६). १६९४ या वर्षी दक्षिण देशाच्या पश्चिम विभागात चाललेले युद्ध पूर्वीसारखेच अनिर्णायक स्वरूपाचे आणि रेंगाळणारे असे राहिले. फक्त मद्रास-कर्नाटक विभागांत असलेल्या मोगल सेनापतीने त्याला मिळालेल्या रसदीच्या बळावर काही मुलूख जिंकून घेतला आणि तंजावरपासून खंडणी वसूल केली . परंतु जिंजीचा मात्र पाडाव झाला नाही.

आपल्या भयानक परिस्थितीची औरंगजेबाला झालेली जाणीव, १६९५

सरतेशेवटी १६९५ च्या एप्रिलमध्ये औरंगजेबाला अशी जाणीव झाली की आदिलशाही आणि कुतुबशाही राज्यांच्या राजधान्या जिंकून आणि त्या दोन्ही राजघराण्यांचा विध्वंस करून प्रत्यक्षात त्याच्या हाती काहीही पडलेले नाही. त्याला आता असेही कळून चुकले की शिवाजीच्या काळात किंवा संभाजीच्या काळात देखील मराठ्यांबद्दलच्या प्रश्नाचे जे स्वरूप होते ते आता राहिलेले नाही . मराठे आता स्थानिक बंडखोर किंवा बंडखोरांची एक जमात असे राहिलेले नव्हते , तर दक्षिणेतील राजकारणातला एक अतिशय महत्त्वाचा घटक आणि साम्राज्याचा उरलेला एकमेव शत्रू या दृष्टिकोनांतून त्यांचे मूल्यमापन करणे आता जरूर होते . हा शत्रू असा होता की भरतखंडाच्या मुंबईपासून मद्रासपर्यंतच्या साऱ्या मुलखात त्याचा निरंकुश प्रभाव होता . या शत्रूला वाऱ्याला जसे कोंडता येत नाही तसे बंदिस्त करता येणे अशक्य होते . त्याचप्रमाणे या शत्रूचा असा एखादा पुढारी नव्हता किंवा अशी एखादी मजबूत जागा नव्हती की त्या गोष्टीचा पाडाव केल्यामुळे त्या शत्रूची सत्ता ओघानेच नाश पावणारी होती . मराठ्यांच्या सत्तेने आता इतके भयानक सामर्थ्य प्राप्त करून घेतले होते की साम्राज्याचे सर्व शत्रू आणि त्याचप्रमाणे सारा दक्षिण देश ,किंबहुना माळवा, मध्य प्रदेश आणि बुंदेलखंड येथील सार्वजनिक शांतता आणि राज्यकारभार चालविणारी यंत्रणा यांचा विध्वंस करणारी मंडळी हे त्या सत्तेचे मित्र बनले होते . त्याचप्रमाणे ही सत्ता या सर्वांना एकत्र आणणारा दुवा होती.

याचा अर्थ असा आहे की औरंगजेबाला आता दिल्लीची वाट कायमची बंद झाली होती. दक्षिणेमधील त्याचे कार्य अजून अपुरे राहिले होते . तसे पाहिले गेल्यास त्याच्या कार्यास नुकतीच कुठे सुरुवात झाली होती असे म्हणावयास पाहिजे.

अनुक्रमणिका

(३) बादशहाचे इस्लामपुरी येथील वास्तव्य, १६९५-९९

म्हणून १६९५ च्या मे महिन्यात बादशहाने आपल्या हयात असलेल्या मुलांपैकी सर्वांत मोठा जो शहा आलम याला साम्राज्याच्या वायव्येकडील प्रदेशावर (पंजाब, सिंध, आणि अफगाणिस्तान) राज्यकारभार करण्यासाठी आणि हिंदुस्थानच्या पश्चिमेकडील प्रवेशद्वाराचे संरक्षण करण्यासाठी रवाना केले. त्याने स्वतः इस्लामपुरी येथे पुढील ४॥ वर्षे मुक्काम केला आणि नंतर आपल्या मोहिमांसाठी मुख्य छावणी म्हणून त्याने इस्लामपुरीचे ठाणे मुक्रर केले. [बादशहाची छावणी ४ वर्षेपर्यंत ब्रह्मपुरी येथे होती. १९ ऑक्टोबर १६९९ रोजी त्याने तेथून कूच केले. खाफीखानाने त्याबाबत पुढीलप्रमाणे उद्‌गार काढले आहेत.

"इस्लामपुरी येथे [ब्रह्मपुरीला इस्लामपुरी हे नाव देण्यात आले होते.] बादशहाची छावणी चार वर्षेपर्यंत होती. सैन्यांतील लोकांनी तेथे मोठमोठे वाडे आणि आकर्षक घरे बांधली होती. त्यांना वाटले की, येथे एक नवीन शहर वसले आहे. बादशहा काही येथून लांबचा प्रवास करणार नाही. बादशहाने तेथून सैन्याला कूच करण्याचा हुकूम दिला. पण त्याआधी त्याने एक गोष्ट केली. ती ही की, तेथील छावणीभोवती कुशल आणि तडफदार अधिकाऱ्यांकडून तट उभारण्याचा त्याने हुकूम दिला. एरव्ही ते काम सहासात महिन्यांत पार पडणे मुश्किल होते. पण हुशार व्यवस्थापकांनी ते पंधरा-वीस दिवसांत तडीस नेले. बादशहाची मुलगी आणि शहाजादा आझम याची सख्खी बहीण नबाब कुदसिया जीन तुन्निसा बेगम, बादशहाची बायको आणि शहाजादा कामबख्श याची आई उदेपुरी बेगम, इत्यादी स्त्रियांना बादशहाने ब्रह्मपुरीलाच ठेविले. वजीर जुम्दतुल्मुल्क असदखान याला छावणीवर मुख्य अधिकारी म्हणून तैनात करण्यात आले."

(**महाराष्ट्र आणि मराठे**, श्री. सेतुमाधवराव पगडी, ७०)] इस्लामपुरी येथे (१६९५-१६९९) तो असताना मराठ्यांचे संकट त्याच्या अगदी अंगाशी येऊन भिडले. परिणामी हल्लीच्या मुंबई प्रांतातील मराठी आणि कानडी जिल्ह्यांत मोगलांना बचावाची भूमिका घेणे भाग पडले. मराठ्यांच्या इतस्ततः भ्रमण करणाऱ्या टोळ्यांच्या हालचाली अनपेक्षित आणि मनाला थक्क करून सोडण्याइतक्या जलद होत्या. प्रत्येक ठाण्याचा बचाव करणे मोगलांना अशक्य होते. तथाकथित चोरट्यांचा पाठलाग करताना मोगलांचा पाठलाग करणाऱ्या टोळ्यांची दमछाक होई आणि निरर्थक भ्रमण पडल्याने मोगल सैनिक दमून जात. मराठ्यांबरोबर बादशहाच्या स्थानिक प्रतिनिधींना अनधिकृत अटीवर तह करावा लागे आणि त्या त्या प्रदेशाच्या वार्षिक उत्पन्नाचा ¼ हिस्सा (चौथा) धमकावणीच्या पोटी देण्याचे वचन त्यांना द्यावे लागे. याहीपेक्षा वाईट गोष्ट म्हणजे खुद्द बादशहाचेच अधिकारी शत्रूंबरोबर संगनमत करीत आणि बादशहाचे प्रजाजन आणि निरपराध व्यापारी यांची लूट करून स्वतःच्या खिशात भर घालीत. याचे कारण असे होते की या अधिकाऱ्यांवर त्यांच्या उद्‌ध्वस्त झालेल्या जहागिरीतून खंड न मिळाल्याने भुकेने मरण्याचा प्रसंग ओढवला होता. प्रत्यक्षात मोगल राजयंत्रणा जवळजवळ नाहीशी झालेली होती. केवळ बादशहा आपल्या सर्व सैन्यानिशी हजर असल्यामुळे तिचे एकसंध स्वरूप टिकून राहिले होते. परंतु ही राजयंत्रणा म्हणजे आता एखाद्या अदृश्य पिशाच्चासारखी झालेली होती.

बादशहाचा मुक्काम इस्लामपुरी येथे असताना घडलेले मुख्य प्रसंग म्हणजे संताकडून दोन मोठ्या मोगल सेनापतींचा—कासीमखान (नोव्हेंबर १६९५) आणि हिंमतखान (जानेवारी १६९६) — झालेला नाश, घरगुती भांडणामुळे संताचा झालेला खून (जून १६९७), मोगलांनी जिंजीचा केलेला पाडाव (७ जानेवारी १६९८) आणि त्यामुळे राजारामाचे महाराष्ट्रात झालेले पुनरागमन.

(४) औरंगजेबाच्या शेवटच्या मोहिमांची हकीकत, १६९९—१७०५

वर उल्लेखिलेल्या शेवटच्या घटनेमुळे औरंगजेबाला आपल्या धोरणात बदल करणे भाग पडले. पश्चिम किनाऱ्यावर जो मुलूख त्याच्या ताब्यात आला होता त्यावर त्याची निर्विवाद सत्ता होती. साहजिकच युद्धाच्या पश्चिम विभागात आपली सर्व शक्ती एकवटणे त्याला सहज शक्य होते. आता औरंगजेबाच्या

जीवनातील शेवटच्या घडीला सुरुवात झाली . या कालावधीत औरंगजेबाने स्वतः मराठ्यांच्या किल्ल्यांना एकामागून एक असे वेढे घातले . त्याच्या हयातीचा उरलेला अवशेष (१६९९ ते १७०७) म्हणजे त्याच त्याच शोकांतिकेची पुनरावृत्ती होती . ही कंटाळवाणी शोकांतिका पुढील शब्दांत वर्णन करून सांगता येईल . — प्रचंड प्रमाणावर वेळ, माणसे आणि संपत्ती खर्च करून त्याने एखादा डोंगरी किल्ला घ्यावा , हा किल्ला काही महिन्यांनंतर तेथील दुर्बळ मोगल शिबंदीवर हल्ला करून मराठ्यांनी परत जिंकून घ्यावा आणि नंतर १ —२ वर्षांनी पुन्हा मोगलांनी त्या किल्ल्याच्या वेढ्याचे काम सुरू करावे , ह्या गोष्टीची पुनरावृत्ती सारखी होत राहिली. दुथडी भरून वाहणाऱ्या नद्या, चिखलांनी भरलेले रस्ते आणि तुटलेफुटलेले डोंगरी मार्ग यांमधून कूच करताना त्याचे सैनिक आणि छावणीबरोबर येणारी इतर असंख्यात मंडळी यांना शब्दांनी वर्णन करता येणार नाहीत इतके हाल सोसावे लागले; मालवाहू हमाल नाहीसे झाले; ओझी वाहून नेणारी जनावरे भुकेने आणि अतिश्रमाने गारद झाली ; छावणीच्या पाठीशी अन्नधान्याचा दुष्काळ पाचवीला पुजलेला होता तो वेगळाच. या प्रचंड यातायातीच्या श्रमामुळे त्याचा अधिकारीवर्ग पार खचून गेला . परंतु कोणीही उत्तर हिंदुस्थानाकडे जाण्याची सूचना जरी पुढे आणली तर औरंगजेब त्याच्यावर उसळून उठे आणि अशा तऱ्हेचा सल्ला देणाऱ्या दुर्दैवी मुत्सद्द्यावर तो भित्रेपणाचा आणि चैनीला चटावल्याचा आरोप करून त्याला वाक्ताडन करी. ज्याप्रमाणे नेपोलियनच्या सेनापतीमधील परस्परांच्या मत्सराने युरोप खंडातील युद्धामध्ये फ्रेंचांची बाजू लंगडी पडून त्यांचा नाश झाला , त्याचप्रमाणे बादशहाच्या सेनापतीमधील परस्पर वैमनस्याने औरंगजेबाच्या कार्याची घडी पार विस्कटून गेली . साहजिकच बादशहाला प्रत्येक मोहीम स्वतः हाती घेणे भाग पडले ; नाहीतर कोणत्याही प्रकारची कार्यसिद्धी झाली नसती . सातारा, परळी, पन्हाळा, खेळणा, कोंडाणा, रायगड, तोरणा आणि वाकिनखेडा या आठ किल्ल्यांना त्याने दिलेल्या वेढ्यात जवळ जवळ ५॥ वर्षे गेली. (१६९९ ते १७०५) [औरंगजेबाने ज्या किल्ल्यांना वेढा दिला त्यांची यादी पुढे दिली आहे :—

वसंतगड (वेढा २२ ते २५ नोव्हेंबर १६९९).
सातारा (वेढा ८ डिसेंबर १६९९ ते २१ एप्रिल १७००).
पालीगड (वेढा ३० एप्रिल ते ९ जून).
१७०० च्या पावसाळ्यासाठी खवासपूर येथे मुक्काम (३० ऑगस्टपासून).
पन्हाळा (वेढा ९ मार्च ते २८ मे १७०१).
पावनगड (वेढा ९ मार्च ते ८ मे १७०१).
१७०१ च्या पावसाळ्यासाठी खटाव येथे मुक्काम (२९ मे ते ७ नोव्हेंबर).
वर्धनगडचा पाडाव (६ जून).
फतेउल्लाखान नंदगिरी, चंदन आणि वंदन हे किल्ले जिंकून घेतो.—
(६ ऑक्टोबर १७०१).
खेळणा (वेढा २६ डिसेंबर १७०१ ते ४ जून १७०२).
१७०२ च्या पावसाळ्यासाठी बहादुरगड येथे मुक्काम.
कोंडाणा (वेढा २७ डिसेंबर १७०२ ते ८ एप्रिल १७०३).
१७०३ च्या पावसाळ्यासाठी पुणे येथे मुक्काम (१ मे ते १० नोव्हेंबर)
राजगड (वेढा २ डिसेंबर १७०३ ते १६ फेब्रुवारी १७०४).
तोरणा (वेढा २३ फेब्रुवारी ते १० मार्च).
१७०४ च्या पावसाळ्यासाठी खेड येथे मुक्काम (१७ एप्रिल ते २२ ऑक्टोबर).
वाकीणखेडा (वेढा ८ फेब्रुवारी ते २७ एप्रिल १७०५).
१७०५ च्या पावसाळ्यासाठी देवापूर येथे मुक्काम (मे ते २३ ऑक्टोबर).]

८८ वर्षांच्या वृद्ध औरंगजेबाच्या हयातीतील शेवटची मोहीम म्हणजे वाकीणखेड्याचा वेढा ही होती. (८ फेब्रुवारी ते २७ एप्रिल १७०५). या किल्ल्याच्या पाडावानंतर त्याने देवापूर येथे मे ते ऑक्टोबर १७०५ या दरम्यान मुक्काम केला . या ठिकाणी तो भयंकर आजारी पडला . सर्व छावणीभर निराशेचे आणि गोंधळाचे एकच वातावरण पसरले . अखेर औरंगजेबाला त्याच्या अधिकाऱ्यांनी केलेली विनवणी आणि आपला मृत्यू जवळ आला आहे अशी त्याला मिळालेली सूचना या गोष्टीमुळे माघार घेणे भाग पडले , आणि तो २०

जानेवारी १७०६ रोजी अहमदनगरकडे परतला. तेथेच त्याचा एका वर्षानंतर मृत्यू झाला. [इंग्लंडचा राजा तिसरा विलियम याने विलियम नॉरिस याची आपला वकील म्हणून औरंगजेबाकडे रवानगी केली . औरंगजेबाची छावणी आणि तत्संबंधीच्या हकीकतीचे वर्णन त्याने आपल्या दैनंदिनीत लिहून ठेविले आहे. ते पुढीलप्रमाणे :— वारे खंदक!

नॉरिसने २७ मार्च १७०१ रोजी ब्रह्मपुरीहून प्रयाण केले . जतच्या मार्गाने प्रवास करीत तो मिरजेस पोहोचला . मिरजेस बादशहा नुकताच राहून गेला होता . त्याच्या छावणीची जागा नॉरिसने पाहिली . छावणीभोवती खंदक पाहून नॉरिसला हसू आले . तो म्हणतो, "हा कसला खंदक ! सहा-सात वर्षांचे मूल सुद्धा हा खंदक सहज ओलांडू शकेल ." मिरजेच्या आसपास मेलेले हत्ती , उंट इत्यादी जनावरांमुळे विलक्षण दुर्गंधी सुटली होती.

मिरजेहून निघून नॉरिस पन्हाळ गडापाशी पोहोचला . बादशहाच्या छावणीबाहेर एक कोसावर त्याने आपला तळ दिला . किल्ल्याच्या वेढ्याचे काम चालू होते . नॉरिसला तोफांचे आवाज ऐकू येत होते . यानंतर थोड्याच काळात बादशहाकडून दस्तके आली . दस्तके म्हणजे परवानगी. नॉरिसने हवी तेथे छावणी करावी आणि दरबारात यावे, अशी नॉरिसला या दस्तकाने परवानगी मिळाली.

बादशहाच्या लष्करात नॉरिसला मुक्काम करण्याची परवानगी मिळाली . त्याने जागा निवडली आणि तो १० एप्रिल १७०१ रोजी बादशहाच्या लष्करात दाखल झाला . पन्हाळगडच्या वेढ्यासंबंधी नॉरिसने बरीच माहिती दिली आहे . "एकदोन आठवड्यांत किल्ला ताब्यात येईल अशी सर्वांची अपेक्षा होती . पन्हाळगड आणि पावनगड येथील किल्लेदारांनी मोगलांना सांगून पाठविले ते हे : "मराठा सरकारकडून आम्हांला पगाराची बाकी म्हणून दोन लाख रुपये येणे आहे . ती रक्कम तुम्ही देत असाल तर किल्ले आम्ही तुमच्या ताब्यात देऊ ." यावर काय घडले ते नॉरिसला कळले नाही. पण छावणीत असलेल्या काही इंग्रजांकडून नॉरिसला खालीलप्रमाणे माहिती मिळाली आणि वा रे तोफखाना !

मोगलांनी दहा वर्षांपूर्वी पन्हाळगड घेतला होता . त्यांनी त्याची डागडुजी आणि किल्ल्यात रसद , दारूगोळा इत्यादी वस्तू साठविल्या . अल्पावधीतच मराठ्यांनी किल्यावर हल्ला केला. दोरे लावून ते तटावर चढले आणि एका रात्रीत तो किल्ला त्यांनी परत मिळविला . किल्ल्यावर हल्ला करण्यासाठी मोगलांपाशी फक्त सात तोफा होत्या . दिवसातून एक तोफ कितीदा उडवाययाची हे ठरवून देण्यात आले होते . तोफांतून ते दगडाचे गोळे उडवीत . मोगलांचा तोफखान्याचा अधिकारी (मीर आतिश) तरबियतखान याने लोखंडी गोळे वापरण्याची परवानगी दिली होती . पण गोलंदाज लोखंडी गोळे वापरीत नसत. गोळ्याभोवती जाड ताग (हेंप) वापरण्याऐवजी ते गवत गुंडाळून गोळे उडवीत.]

(५) औरंगजेबाच्या अखेरच्या वर्षातील दुःख आणि दैन्यावस्था यांची हकीकत

औरंगजेबाची शेवटची वर्षे न भूतो न भविष्यती अशा तऱ्हेच्या दुःखात गेली . ह्या जीवनाची सार्वजनिक बाजू लक्षात घेता सर्वत्र अशी जाणीव होती की अर्धशतक पसरलेली त्याची राजवट म्हणजे भयंकर अपयशाचे एक चालतेबोलते उदाहरण आहे . दक्षिणेमध्ये चाललेल्या अविरत युद्धाने त्याचा खजिना रिता पडला होता ; सरकारवर दिवाळखोरीची पाळी आली होती ; जवळजवळ ३ वर्षांवर पगाराची बाकी थकल्यामुळे उपासमार झालेल्या शिपायांनी बंड केले होते ; त्याच्या कारकिर्दीच्या शेवटच्या वर्षात त्याचा प्रामाणिक आणि कार्यक्षम दिवाण मुर्शीदकुलीखान याच्याकडून नियमितपणे येणारा बंगाल प्रांताचा वसूल म्हणजेच बादशहाचे कुटुंब आणि सैन्य यांना पोसणारा एकमेव आधार होता . हा वसूल केव्हा येईल याची बादशहा अतिशय उत्सुकतेने वाट पाहात असे . इकडे दक्षिणेमध्ये मराठे अखेरपर्यंत वरचढ राहिले , तर उत्तर आणि मध्यहिंदुस्थानात अनेक ठिकाणी राज्यव्यवस्थेत बेदिली माजली . दूरवर दक्षिणेत असलेल्या बादशहाचा उत्तर हिंदुस्थानात असलेल्या अधिकाऱ्यांवरील ताबा नाहीसा झाला , आणि राज्यकारभारात ढिलाई आणि लाचलुचपत माजली . तेथील मुख्य (राजेरजवाडे) आणि जमीनदार यांनी स्थानिक अधिकाऱ्यांची सत्ता झुगारून दिली व स्वतःचा दरारा प्रस्थापित केला , आणि अशा तऱ्हेने साऱ्या देशभर एकच बजबजपुरी माजली . दिल्लीपतीच्या साम्राज्यात अशा तऱ्हेने औरंगजेबाचे डोळे मिटण्यापूर्वीच फार अगोदर मोठी अंदाधुंदी निर्माण झाली.

इकडे दक्षिणेत प्रत्येक मराठा अधिकाऱ्याने स्वतःच्या हिमतीवर मन मानेल तसे वागण्यास सुरुवात केली. त्यांनी मोगलांच्या प्रदेशावर अविरत हल्ले केले , आणि गनिमी काव्याच्या युद्धपद्धतीचा अवलंब करून बादशाही फौजांचे जास्तीत जास्त नुकसान केले मराठ्यांचे सैन्य हे वाऱ्याप्रमाणे सर्वव्यापी आणि तितकेच

चपखळ होते. बादशाही छावणीतून ह्या तथाकथित दरोडेखोरांना शिक्षा लावण्यासाठी सैनिकांच्या तुकड्या वारंवार पाठविल्या जात. ह्या तुकड्या मराठ्यांवर चाल करीत आणि प्रतिहल्लेही करीत , परंतु शत्रूचा संपूर्ण निःपात करणे त्यांच्याने कधीही जमले नाही . जेव्हा मोगलांचे सैन्य परत फिरे त्यावेळी दूरवर पसरलेले मराठे सैनिक ज्याप्रमाणे वल्ह्याने दूर झालेले पाणी जसे एकवटते तसे एकत्र येत आणि पूर्वीसारखेच आपले हल्ले पुन्हा सुरू करीत . जेव्हा जेव्हा बादशहाची छावणी मुक्काम करी अथवा कूच करी तेव्हातेव्हा या छावणीपाठीमागे ३–४ मैलांवर मराठ्यांचे उत्साहाने भारलेले आणि दहशत निर्माण करणारे सेनादल दबा धरून असे. [महाराष्ट्रात व कर्नाटकात मराठ्यांचे व्यवहार कसे चालू होते आणि बादशहाचा पाडाव करण्यास लोकांचे अंगी केवढा हुरूप आला होता हे खाली दिलेल्या २२ –३–१६९० च्या पत्रात चांगले व्यक्त होते : "रा. बाजी सरजाराऊ जेधे देशमुख यास राजाज्ञा . अभय दिल्हे ऐसीजे. तुम्ही मा रत्नोजी शिंदे व शंकराजी ढगे याजबरोबरी किती एकनिष्ठेच्या गोष्टी सांगून पाठविल्या ; सांगितल्याप्रमाणे विदित झाल्या त्यास हे महाराष्ट्र राज्य आहे . तुम्ही ह्या राज्याची पोटतिडीक धरिता ; तरी ते प्रांते जितकी राजकारणे आहेत त्यांची चाळणा करून आपण जमाव करून सावध राहोन, स्वामी कार्य दृष्टीस पडेल ते मनास आणून हस्तगत करून ठेवणे , हुजूर लेहून पाठविणे. तेणेप्रमाणे हुजरून विल्हे केली जाईल . या प्रांती वर्तमान तर, राजश्री छत्रपती स्वामी स्वारी करून कर्नाटक प्रांती गेले. यावरी तिकडे जमा लष्कर ४० हजार व हशम एक लाख पंचवीस हजार जमाव जाहला आहे. पुढेही आणखी जमाव होतच आहे . ते प्रांतीचे कुल पुंडपाळेगार तमाम येऊन भेटले आहेती . जमेती पोख्त जाली आहे. पुढे तूर्त राजश्री केसो त्रिमल या प्रांती रवाना केले आहेती . त्याबरोबर संगीन स्वार पंधरा हजार व हशम २५ हजार देऊन रवाना केले आहेत . तेहि कोपल प्रांती तुंगभद्राच्या तिरी आले आहेत . खजिना ही एक लाख होन त्याबरोबर आहे . त्यास आणावयास राजश्री धनाजी जाधव , राजश्री संताजी घोरपडे, सेना पंच साहसी पाठविले आहेत . तेही आठ-पंधरा दिवशी येतील. तरी तुम्ही आपली खातरनिशा राखोन , स्वामींच्या पायाशी एकनिष्ठता करून, स्वामीकार्य साध्य होय ते गोष्ट करणे. गनिमांचा हिसाब काय आहे ? तुम्ही लोक जेव्हा मनावरी धरिता तेव्हा गनीम तो काय आहे ? गनिमाला तुम्ही लोकी केला आहे . ते तुम्हीच लोक या राज्याची पोटतिडीक धरिता , तेव्हा औरंगजेबाची हिसाब धरीत नाही . ऐसे बरे समजून लिहिल्याप्रमाणे वर्तणूक करणे. औरंगजेबाने महाराष्ट्र लोक आहेती त्यास मुसलमान करावे ऐसे केले आहे . त्याप्रो मुसलमान केले. रा नेतोजी व साबाजी घाटगे व जानोजी राजे, व कित्येक ब्राह्मणही या प्रांतीचे बाटविले . दुसरे मतलब ही केले आहेत . तिकडून तमाम मराठे लोक होते ते आपल्या जमावानशी आम्हांकडे येताती. हल्ली राजश्री हणमंतराऊ निंबाळकर व सटवाजी निंबाळकर व माने व सरदार आले आहेती . दुसरे ही कित्येक येताती . असे गनिमाचे लष्कर आटोन हुजूर जमा होत आहे . ईश्वर करितो तरी फत्तेच आहे . लिहल्याप्रमाणे हिंमती धरणे" (**खंड १५**–३४७ व ३४८). परंतु अशा आणीबाणीच्या वेळी मराठ्यांना वतनाची लालूच कशी लागली होती ते पुढील कागदात दिसून येईल : "बाजी सरजेराव जेधे देशमुख यास राजाज्ञा ऐसीजे (५ मे १६९०). नाईकजी जेधे त्यानी हुजूर येऊन विदित की आपल्या वतनाच्या हक्काची मुक्ररता दिवाणातून करून दिली . तेणे करून आपली हैराणगी जाहली. अन्नवस्त्राची विपत्ती जाहली. औरंगजेबाने स्वामीच्या राज्यावरी चाल केली . स्वामी कर्नाटक प्रांती गेले ; आम्ही वतनदार लोक एकनिष्ठ सेवा करून दाखवावी म्हणून किल्ले विचित्रगड गनिमापासून घेतला. देश सोडविला . पुढेही जमाव करून गड कोट व देश गनिमापासून घेऊ. परंतु स्वामींनी कृपाळू घेऊन पूर्वीचे हक्क चालविले पाहिजेत म्हणून विदित केले . त्यावरून हक्क व इनाम गाव तुम्हास देवविले असत. तर्क मजकूरचे गाव लावणी करून दस्त आकार होत जाईल त्याप्रमाणे हक्काची माईन बसवून घेत जाणे. जाणिजे."]

[मोगलाच्या लुटमारीत मुलूख कसा हैराण होत असे व तसा झाला तरी देखील कामगार व प्रजा कशी आपुलकीने व स्वराज्याच्या प्रेमाने निष्ठा ठेवून लावणी संचणी करीत याचा नमुना म्हणून एका पत्रातील जरूर तितकाच मजकूर उद्धृत केला आहे : "२२ ऑगस्ट १६८५ ची सनद.....लखवालिंगप्पा देसाई मामले तोरगल यांनी विनंती केली की , गत वर्षी सुलतान तारा मोगल लष्करासमवेत येऊन कसबे मजकुरी मुक्काम करून घरे, वाडे व पेठ मोडून जाळून तलफ केली . त्या बराबरी गावात परम साक्षात देवस्थान होते तेही छिन्नभिन्न केले . थोर-थोर देवालये होती तीही मोडून तलफ केली होती. त्याकरिता गावात मरग सुटला. माणसे मरू लागली. रयत लोक व दिवाण लोक व वाणी वळुंज गावी राहेनासे जाहलेवरी, गावे हुगी घालून आवंतुक देवतांचे स्थापन केले . ग्रामदेवस्थानाच्या दिवसापासून पांढरी बसली . त्या दिवसाच्या स्थापनेच्या पुरातन स्थळेस मूर्ती होत्या त्या दुरात्मांनी विछिन्न केल्या , त्यांची स्थापना झाली पाहिजे . महाराज राजश्री महाराष्ट्र राजा आहे . देवस्थाने छिन्नभिन्न असो नये. या कारणे देवालये बांधावी . उरजा चालवावी . ह्यात आपण व स्वामी मिळोन जे कारणे ते करीत आहो . होता होईल ते करू . तूर्त नवलगुंदासारिखे गावात देवस्थान देवळे नाहीतसे झाले आहे . ऐसियास हुगी घालिते समयी श्रीदेवस्वामीची स्थापना करावी . देवळे, इमारती बांधाव्या. तूर्त मूर्ती स्थापना करून पूजा चालवावी . नित्य पुराण श्रवण चालवावे .....ऐसे वचन गुंतले आहे . ऐसीयास.....यास देऊन चालविले पाहिजे म्हणजे प्रति दिवशी पुराण श्रवण सांगतील. तेणे करून देवस्थानाची स्थापना होऊन शांत होईल. उरजाही चालेल. म्हणजे महाराज राजश्री छत्रपती साहेबास हे श्रेय येईल आणि आपणही वचन चालविले असे होऊन पुढे ही गावची आबाद मामुरी होईल . पुढे आवंतुक देवस्थान बांधणेस उरजा चालविणे ते चालविले पाहिजे . म्हणून विनंती केल्यावरी वस्तुता विचारमतेही पाहता , हिंदुकीची गोष्ट खेरीज , या कारणे सदरहूप्रमाणे चालविणे उचित आहे. उदंड खर्चवेच महाराजाचे दरबारात होऊन जातो, अगर पड जंगलही पडते. त्या परिस श्रीचे उरजे अर्पित राजगृहातून जरी वेच जाहला तरी ज्याचे नाव त्याचे पुण्ये महाराज राजश्री छत्रपतीसाहेबास श्रेय येईल . ऐसे पाहून श्रीचे उरजेबदल भट गोसावी यासी ...तुम्ही कारकून हक व इस्तकबील व नाडगीर कसबे मजकूर व ग्रामस्थ यांनी चालविणे ...ताजे सनदेचा उजुर न करणे ..." (**सनदा पत्रातील माहिती प्रकरण ५ वे**, पृष्ठे १६३-१६४).]

दक्षिणेमध्ये अतिशय भयानकपणे चाललेल्या युद्धाने एकंदर २० वर्षांच्या कालावधीत आहुती घेतली तिची मोजदाद केली तर मोगलांचे प्रतिवर्षी १ लक्ष सैनिक आणि बाजारबुणगे नाकाम आणि त्याच्या तिप्पट घोडे, हत्ती, उंट व बैल निकामी इतके नुकसान झाले . (**स्टोरिया**, भाग ४ , ९६) बादशाही छावणीत

कोणत्यातरी रोगाची साथ सारखीच पसरलेली असे आणि दररोज मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या ही अतिशय मोठी होती. अर्थिकदृष्ट्या पाहिले तरीदेखील दक्षिण देश साफ धुवून निघाला होता . "जमिनीमध्ये झाडेझुडपे यांचा पार विध्वंस झाला आणि पिकाशिवाय त्यांची रया गेली . या झाडांची आणि पिकांची जागा आता माणसे आणि जनावरे यांच्या हाडांनी घेतली . एकंदर प्रदेश इतका उद्ध्वस्त आणि निर्मनुष्य झाला होता की ३ –४ दिवसांच्या प्रवासात देखील वाटसरूला विस्तव किंवा [औरंगजेबाला त्याच्या राज्यकारभारात अपयश आले पण त्याबरोबरच त्याचे खाजगी जीवन प्रेमहीन आणि शुष्क असे होते . म्हातारपणामध्ये घरगुती वातावरणात जी शांतता , आनंद आणि साहचर्याचे प्रेम यांची जरुरी असते त्यांचा त्याच्या जीवनात पूर्णपणे अभाव होता . आपण आपल्या बापाला वागविले तसेच आपली मुले आपल्याला वागवतील ही भीती त्याच्या मनात होती. आपले डोळे मिटताच आपले तिन्ही मुलगे अखेरपर्यंत सिंहासन मिळविण्यासाठी रक्ताच्या नद्या बाहवतील याची त्याला खात्री होती . त्याला मृत्यू येण्याचे अगोदर काही वर्षे त्याच्या कुटुंबात मृत्यूने घाले घातले होते . त्याच्या अखेरच्या आजाराने अहमदनगर येथे १७०७ च्या जानेवारीच्या अखेरीला त्याला घेरले . त्यानंतर ५ -६ दिवस त्याला बरे वाटले . आपली दोन्ही मुले -आजम आणि कामबक्ष-यांना त्याने आपापल्या सुभेदारीवर पाठविले आणि त्याने दरबाराची कामे पाहावयास सुरुवात केली . मानवी शक्तीच्या पलीकडे असे कष्ट त्याच्या जीर्ण झालेल्या शरीराने भोगले होते . त्याला पुन्हा एकदा तापाने घेरले आणि २० फेब्रुवारी १७०७ रोजी शुक्रवारी सकाळी त्याच्यावर मृत्यूने झडप घातली.] उजेड कोठेही आढळून येत नसे."(**स्टोरिया, ४**, २५२)

(६) राजारामाच्या राज्यारोहणप्रसंगी हजर असलेले प्रतिष्ठित मराठा मंत्री आणि सेनापती

ज्यावेळी संभाजीच्या मुलांना रायगडच्या वेढ्यात कैद केले गेले आणि त्याच्या पाठीमागून गादीवर आलेल्या राजारामाला अतिशय निराशाजनक परिस्थितीत मोगलांपुढे पलायन करावे लागले ती परिस्थिती म्हणजे मराठ्यांवर कोसळलेले एक भयंकर राष्ट्रीय संकटच होते . परंतु मराठा जनतेत ज्या एका अलौकिक शक्तीचा वास होता त्या शक्तीने त्यांना वाचविले आणि त्यांचे स्वातंत्र्य त्यांना प्राप्त करून दिले . साहजिकच या कालावधीत राजाविना राज्य असलेल्या या देशांतील पुढाऱ्यांची ओळख करून घेणे हे अतिशय जरुरीचे आहे. १६८९ च्या अखेरीला मराठा राज्याचे आधारस्तंभ अशा ४ व्यक्ती होत्या. त्या म्हणजे **पेशवा** निळकंठ मोरेश्वर पिंगळे , **अमात्य** रामचंद्र निळकंठ बावडेकर , **सचिव** शंकराजी मल्हार आणि मुख्य **न्यायाधीश** निराजी रावजी याचा मुलगा प्रल्हाद. (**चिटणीस**, भाग २, ३९-४०) हा प्रल्हाद गोवळकोंड्याकडे मराठ्यांचा वकील म्हणून होता. या चौघांशिवाय आतापर्यंत मराठ्यांच्या राज्यांत दुय्यम स्थान भूषविलेल्या आणखी तीन व्यक्ती होत्या. त्यांनी आपले शहाणपण आणि धडाडी यांच्या जोरावर मराठ्यांच्या इतिहासात निर्माण झालेल्या या संकटकालात राज्याच्या पहिल्या प्रतीचे सेवक व जनतेमध्ये प्रिय असलेले पुढारी म्हणून मान मिळविला . त्या तिघांपैकी दोघेजण म्हणजे सेनापती पदासाठी एकमेकांबरोबर चढाओढ करणारे धनासिंग जाधव आणि संताजी घोरपडे व तिसरा परशुराम त्रिंबक . हा अखेर १७०१ मध्ये प्रतिनिधीच्या जागेवर विराजमान झाला (**चिटणीस**, भाग २ , ७१; **भारतवर्ष वर्ष क्र** . ३, पान ३१ –४०, **कैफियत** पान, १४६) [गादीवर येण्याच्या वेळी राजारामाची स्थिती आणि धोरण याची माहिती पुढे दिली आहे . संभाजीच्या कारकिर्दीच्या शेवटच्या वर्षी शिवाजीने मोठ्या हिकमतीने आणि शौर्याने उभारलेल्या मराठा राज्याचे तुकडे होणार की काय असे वाटू लागले . बरीच वर्षे अनेक मांडलिक, विशेषतः वाडीचे सावंत , बंड करून होते आणि त्यांचा पाडाव झालेला नव्हता . १६८८ च्या नोव्हेंबरमध्ये शिर्क्यांचे घराणे बंड करून उठले. त्यांना कवि कलशचा द्वेष करणाऱ्या संभाजीच्या हाती मराठी राज्य सुरक्षित राहणार नाही अशी खात्री बाळगून असलेल्या मंत्र्यांचा पाठिंबा होता. परंतु संभाजीने त्यांचा पराभव केला होता आणि प्रल्हाद निराजी आणि इतर अनेक प्रमुख अधिकाऱ्यांना तुरुंगात टाकले होते . परिणामी सर्व राज्यव्यवस्था कोलमडून पडली होती. (**जेधे शकावली**)

यानंतर दोनच महिन्यांनी ३ फेब्रुवारी १६८९ रोजी संभाजीला मोगलांनी पकडले . अनेक मराठी सरदारांनी ही इष्टापत्तीच मानली . ज्या उत्तर हिंदुस्थान्याने संभाजीवर मोहिनी टाकली होती तो कवि कलश आणि ज्याची चाकरी कोणत्याही देशभक्त आणि स्वत्व असलेल्या माणसाने केली नसती तो संभाजी राजा या दोघांनाही दैवाने एका फटक्याने ओढून नेले . (सर जदुनाथ सरकारनी केलेले हे विधान अतिशय विपर्यस्त आणि एकतर्फी आहे. या मताशी लेखक सहमत नाही. कोणताही स्वाभिमानी मराठी मनुष्य सरकारांच्या या विधानाचा धिःकारच करील.)

संभाजीला पकडल्याची बातमी ऐकताच रायगडचा किल्लेदार चांगोजी काटकर याने येसाजी कंक याच्या मदतीने राजारामाला कैदेतून बाहेर काढले , आणि ८ फेब्रुवारी रोजी त्याला सिंहासनावर बसविले . संभाजीने कैदेत टाकलेल्या सर्व अधिकाऱ्यांची मुक्तता करण्यात आली . संभाजीचा मुलगा शाहू हा केवळ ९ वर्षांचा होता . अशा परिस्थितीत राजमाता येसूबाई हिने राजारामाला मोठ्या सुज्ञपणे पाठिंबा दिला . ही वेळ

कलह करण्याची नव्हती कारण संभाजीला पकडण्याच्या अगोदरच डिसेंबर १६८८ मध्ये जुल्पीकारखानाच्या हाताखाली एक मोगल फौज रायगड जिंकण्यासाठी रवाना करण्यात आली होती.]

बादशहाचा कर्तृत्वान सेनापती जुल्पीकारखान याने फेब्रुवारी १६८९ मध्ये मराठ्यांची राजधानी रायगडला वेढा घातला . ११ ऑक्टोबरला रायगडचा पाडाव झाला . परंतु त्या अगोदर खून झालेल्या संभाजीच्या पाठीमागून नव्यानेच गादीवर आलेला राजाराम हा एका हिंदू बैराग्याच्या वेषात किल्ल्यावरून ५ एप्रिल रोजी निसटला आणि पन्हाळा येथे गेला . त्याला रामचंद्रपंत अमात्य याने असा सल्ला दिला की , दूरवर असलेल्या पूर्व कर्नाटकांत मराठ्यांनी आपल्या हालचाली सुरू केल्यास शत्रूची ताकद विभागली जाईल तर दक्षिण भारतातल्या पश्चिम विभागात आपले इतर अधिकारी मोगल सैन्याचा बराच मोठा भाग गुंतवून ठेवतील. असे केल्याने शत्रूवर आपण मोठा मात केल्यासारखे होईल . [मोगल मराठा संघर्षाच्या काळात रामचंद्रपंत अतिशय जागरूक होता आणि अहर्निश त्याची नजर चहुकडे कशी फिरत असे ते पुढील पत्रावरून दिसून येते। "खालील प्रांतात स्वाऱ्या करून मारून नेऊन बेगमी करावी , कोकणप्रांत राखावा. शत्रूची वर्दी ठेवून जपून वागावे ." दुसऱ्या एका पत्रात पुढीलप्रमाणे मजकूर आहे . "ते प्रांतात जाऊन पाळेगारीने मुलूख मारून राहू लागले . पाळेगारीने किल्ल्याचा वगैरे आश्रय करून झाडीत राहावे , तेथून मुलखात अंमल बसवावा घ्यावा, फिरून पळावे, फिरून येऊन प्रदेश काबीज करावा , पथकांतील लोकाची संख्या वाढवावी , या योगे राज्याची वृद्धी होऊ लागली ." वरील धोरणाचा परिणाम बादशहावर कसा झाला हे पुढील मजकूरावरून समजून येईल . "यास कसे जिंकावे ? ऐक्या मुलखात फौज आली म्हणून त्याजवर एकाची रवानगी करावी, तो दुसरीकडे जाऊन ठाणी घेतात, मुलूख मारितात; हे आदमी नव्हत, भूतखाना आहे." रामचंद्रपंताच्या प्रयत्नाने मावळ प्रांतातील सरदार बाजी सरजेराव जेधे व पासलकर व देशपांडे , मुठे-खोरे वगैरे जमीनदार त्याला सामील झाले . काही शंकराजी नारायण याला जाऊन मिळाले. एखादा सरदार फुटून मोगलाकडे गेल्याचे कळताच त्यास परत आणण्याचा उद्योग सारखाच चालूच होता. शत्रूस मिळणाऱ्या फितुरी लोकांना अत्यंत कडक शासन करावे असे मत रामचंद्रपंताने राजनितीत नोंदविले आहे . तो म्हणतो, "कोणी सेवक गनिमाकडे गेला तरी तो यत्ने करून हस्तगत होय ते गोष्ट करावी. कदाचित हातास न लागे तरी उपाये मारवा ; परत न ये असे झाले तरी त्याचे लोक गुलाम करावे , बायका बटकी कराव्या, त्यास ही विष-मारेकरी आदी करून हर प्रयत्ने तेथील तेथे मारवावा." मोगल-मराठा संघर्षात रामचंद्रपंताचे स्थान किती मोठे होते हे वरील मजकुरावरून दिसून येईल . रामचंद्रपंत अमात्य याने केलेल्या कामगिरीची आणखी माहिती पुढील कागदपत्रावरून दिसून येईल . खुद्द राजारामाने रामचंद्रपंतांविषयी पुढील उद्‌गार काढले आहेत, "पुढे औरंगजेब चालोन आले. संभाजी राजांवर सेना पाठविली. ते हस्तगत झाले. त्या उपरी राजाराम सिंहासनारूढ झाले असता औरंगजेबाने सक्ती करून संपूर्ण राज्य आक्रमावयाचा उद्योग केला , ते समयी तांब्राचे उठाण विशेष देखोन देशातील राज्यभार रामचंद्रपंतांवर येऊन राजाराम स्वार होऊन कर्नाटक प्राते चंजीस गेले . मागे पंतांनी सेनाभार मेळवून तांब्राच्या फौजा मारून चालविल्या. कित्येक देशदुर्ग ताब्रांक्रांत झाले होते ते पुन्हा हस्तगत करून , गेले राज्य संपादून वरचेवरी संतोष वार्ता चंजीस पाठवित गेले . त्यावरून पूर्वीचा मुज्रूचा हुद्दा त्यास सांगून दिवसेंदिवस कृपा विशेष केली . त्यांनी ही निष्ठापूर्वक वर्तोन स्वामीचे राज्य ताब्रांक्रांत जाले होते ते संपूर्ण यथापूर्व हस्तगत केले . चंजीस ताब्रांची जरब होऊन परिध पडला , त्या समयी देशातून कर्नाटकात सेना संभार पाठवून स्वामींचे संकट निरसन केले." खुद्द रामचंद्रपंताने आपल्या कारभाराचे व तत्कालिन परिस्थितीचे पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे , "हे राज्य ईश्वरदत्त, ईश्वर प्रसाद सामर्थ्ये या राज्याची अभिवृद्धी व्हावी असे समजून त्या विस्खलीत प्रसंगात बरी सुक्ष्म बुद्धी चालवून , जे सेवक बुद्धिमंत, कृतकर्मे होते त्यांचे मनोधारण व समाधाने केली . विचारबुद्धी हळूहळू वाढवून सर्वही उद्योग तत्पर केले . सकल प्रजाजन निःसंशयपणे स्वामीकार्यास सादर जाहले . औरंगजेबासारखा सबल शत्रू चालोन आला , त्याने या राज्यानिमित्त आपला संपूर्ण पराक्रम व अर्थ वैभवादी सर्व शक्ती वेचली , तथापि श्रीकृपेने सकळही निर्फळ जाहले ; परिणामी हतोद्यम होत्साता, पराङ्‌मुख होऊन यम लोकास गेला . (**स. प. पृ** १८६, ले. ३७)." रामचंद्रपंत अमात्य याने मराठा सरदारांनी केलेल्या कामगिरीची कदर करून माणसे कायमची कशी जोडली त्याचे उदाहरण पुढील सनदेतील मजकुरावरून आपल्याला दिसून येईल. या सनदेप्रमाणे संताजी घोरपडे याला मिरजेची देशमुखी राजारामाने रामचंद्रपंतांतर्फे दिली. "राजश्री संताजी घोरपडे, गोसावी यास, —अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्य , स्नेहांकित रामचंद्र नीलकंठ अमात्य आशीर्वाद . सुरू सन सल्लास तिसैन मय्या व अल्लफ . राजश्री छत्रपती स्वामी कर्नाटकात जातेसमयी तुम्हास या प्रांतात ठेवून गेले . त्यासमयी इकडे गलीमाची घाम -घुम बहुत होऊन, कुलदेशदुर्ग हस्तगत केली होती. ती गेली. राज्यांमध्ये काही अर्थ उरला नाही . कुलमराठे यांणी इमान खताकरून गलामाखडे गेले परंतु तुम्ही इमान खता न करिता राजश्रीच्या पायाशी बहुतच एकनिष्ठा धरून जमाव करून शेख निजाम व सर्जाखान व रणमस्तखान व जान निसारखान असे उमदे वजीर बुडविले . जागोजाग गलीमास कोट घालून नेस्तनाबूत केले आणि देश सोडविला. राज्य संरक्षणाच्या प्रसंगास असाधारण काम केले, औरंगजेबास धहशत लाविली. पुढे ही कित्येक स्वामीकार्याच्या ठायी हिम्मत धरिता. या करीता तुम्हावरी राजश्रीस्वामी संतोष होऊन मामले -मिरज कर्याती २२ बेवीस येथील देशमुख होते ते नेस्तनाबुद झाले, त्यांच्या वंशी कोणी नाही; त्याजे मुतालिक होते ते बळावून देशमुखीवतन खात होते , ते हि दुर्बुद्धि धरून गलीमाशी मिळून फिसालत केली, एकनिष्ठा धरून इकडे येऊन भेटले नाहीत म्हणून त्यांसी देशमुखी दूर करून तुम्हास अजरामरामत देशमुखी मामलेमजकुरची अवलाद अफलाद वतन करून दिली असे . पुत्रपौत्री चालवून देशमुखीचा हक्क लाजीमा व इनामत व इसाफतीचे गाव सालाबाद पहिले देशमुखास चालले असतील तेणेप्रमाणे खाऊन , वतनाचा मामला चालवून सुखरूप राहणे . तुम्हास देशमुखी नूतन करून अजरामरात दिली , म्हणून शेरणी तुमच्या माथा ५००० पाचहजार करार केले असत. यांचा वसूल हुजूर घेतला. कळावे [तारीख २९ जुलै १६९२]."

राज्यारोहणानंतरची राजारामाची परिस्थिती व त्याचे धोरण, १६८९

अशा तऱ्हेने शत्रूविरुद्ध या पुढील काळात कोणती कारवाई करावयाची याबद्दलची योजना सिद्ध

अनुक्रमणिका

झाली. या योजनेप्रमाणे असे ठरले की पूर्वेकडील कर्नाटकच्या प्रांतात शत्रूबरोबर सामना देण्यासाठी जिंजी येथे बरोबर सैन्य देऊन राजारामाला पाठवावे . त्याचप्रमाणे स्वराज्यातील एकंदर कारभारावर संपूर्ण ताबा अमात्य रामचंद्रपंत बावडेकर याचेकडे सोपविण्यात यावा , आणि त्याला **हुकमत पन्हा** अथवा सर्वाधिकारी ही पदवी देण्यात यावी . त्याने प्रथम आपले ठाणे विशाळगड येथे ठेवावे आणि नंतर परळी येथे हलवावे . अमात्याला सर्व तऱ्हेची मदत शंकराजी मल्हार सचिव आणि इतर नियुक्त केलेले अधिकारी यांनी करावी . स्वराज्यातील सर्व मुलकी आणि लष्करी अधिकाऱ्यांनी रामचंद्रपंताकडून आपले हुकूम घ्यावे आणि खुद्द ते राजाकडून आले आहेत असे समजून त्या हुकूमाची तामीली करावी . रामचंद्र पंताच्या अंगी संघटना आणि हुकूमत गाजविण्याची वृत्ती हे गुण प्रथमपासूनच होते . त्याने आपल्या स्वतःभोवती अतिशय कार्यक्षम अशा अधिकाऱ्यांची एक मालिकाच तयार केली आणि परस्परांविषयी मत्सरग्रस्त असणाऱ्या आणि आपापसात भांडणाऱ्या मराठा पुढाऱ्यांना गनिमी काव्याच्या युद्धतंत्राचे पुढारी बनवून संघटितपणे मोगलांविरुद्ध कारवाई करण्यासाठी तयार केले.

१ नोव्हेंबर १६८९ रोजी राजाराम हा जिंजी येथे येऊन पोहचला. [एका यादीनाम्यात रामारामाच्या हालचालीची पुढीलप्रमाणे हकीकत दिली आहे :

(४५) पिढी वजीर ४१ का सिवाजी राजे राजश्री राजाराम कर्नाटकात जाऊन प्रकट होऊन लस्कर जमाव केला व प्रांती राजश्री रामचंद्र पंडित व शंकराजी पं (डित) सरकारकून व संताजी घोरपडे सेनापती व धनाजी जाधवराऊ यांनी लस्कर जमाव करून चालीस हजार शाई मेलविली गडकोट मुलूक सोडविला नवेच राज्य पैदा केले. (**शि. सा. खंड ६, यादीनामे,** ७०)]

[राजारामाच्या पलायनासंबंधी पोर्तुगीज कागदपत्रात मिळणारी माहिती पुढे दिली आहे.

संभाजी छत्रपतीच्या मृत्यूनंतर राजाराम महाराज जिंजीस जात असता बेळगावहून बहादूरखान याने पोर्तुगेजास लिहून विनंती केली होती की रामराजा कर्नाटकास पळून जाणार असल्याची बातमी असल्यामुळे त्याच्या मार्गातील सर्व वाटा पोर्तुगेजांनी रोखून धराव्या व तो जर सापडला तर त्यास कैद करावा किंवा मारून टाकावा.

गोव्याच्या गव्हर्नराने तारीख १२ मे १६८९ च्या पत्रात नबाब बहादूरखान यास याविषयी लिहून कळविले की , आपल्या मुलुखामध्ये राजाराम आल्यास इकडून तो सुटून जाणार नाही अशी आपण व्यवस्था केली आहेच ! पण तो या बाजूस येईल असे आपणास वाटत नाही . ह्या गव्हर्नराने असे म्हटले आहे की तुम्ही खेम सावंत भोसले यास कुडाळ येथे पाठविणार हे कळल्यावर लगेच तुम्हास भेटण्यासाठी त्यास आपण आज्ञा केली होती. पण त्याची आई वारून अद्याप बारा दिवस झाले नसल्यामुळे त्याने तूर्त त्याचा पुतण्या बाबू देसाई व मंबा सावंत यास थोड्या सैन्यासह पुढे पाठविले असून तोही नंतर आपल्या भेटीस येईल. खेम सावंत ह्यावेळी बारदेशमध्ये राहात होता. तेथून तो मोगल सैन्याबरोबर कुडाळास जाऊन जून १६८९ च्या सुरुवातीस त्याने वांद्याचा किल्ला जिंकून घेतला . त्यामुळे मोगलांचा अमल कुडाळमध्ये चालू झाला . साखळी, डिचोली व मणेरी हे महाल ह्यापूर्वीच मोगलांच्या सत्तेखाली आले होते . साखळी व भीमगड किल्ला रक्षण करण्याचे काम मोगलांतर्फे यसाजी राणे हा साखळीचा राणा करीत होता, असे तारीख ११ एप्रिल १६८९ च्या एका पत्रावरून कळून येते. (**पोर्तुगीज-मराठे संबंध,** पान १२९)]

[राजारामाचे रायगडाहून प्रयाण व शाहूची कैद याबद्दलची साकी मुस्तैदखानाने दिलेली हकीकत पुढीलप्रमाणे आहे :

"या वर्षी (इ. स. १६८९) एक शुभ घटना घडली . रामा (राजाराम) बरोबर त्याचे बरेच सरदार होते , ते कैद झाले . त्याचा तपशील असा.

राजाराम हा संभाजीचा धाकटा भाऊ होता . संभाजीने त्याला कैदेत ठेवले होते . संभाजीच्या मृत्यूनंतर तो त्याच्या जागी मराठ्यांचा सरदार बनला. रायरी (रायगड) मध्ये त्याला सत्ता प्राप्त झाली. जुल्पीकारखानाने रायगडला वेढा घातला होता. वेढा कडक होऊ लागला होता. किल्ला मोगलांच्या हाती पडण्यापूर्वी रामने (राजारामने) बराग्याचा वेष घेतला आणि तो किल्ला सोडून पळून गेला. आपली प्रतिष्ठा, आपल्या भावाचा कबिला, आपल्या वाडवडिलांची अब्रू इत्यादी गोष्टींचा त्याने मुळीच विचार केला नाही.

कविता – बबी आं बेहमीयतराके हरगिज
नरख्वाहद दींद रुये नेकबख्ती
तन आसानी मजीद खिश्तनरा
जनो फर्जंद बगुजारद बसख्ती.

पाहा तो निर्लज्ज. चांगले भाग्य कधीच त्याच्या वाट्याला येणार नाही. त्याने फक्त स्वतःचे सुख पाहिले. बायकापोरांना त्याने संकटात लोटले.

हरकाऱ्यांच्या द्वारे ही बातमी खरी असल्याचे बादशहाला कळले . अब्दुल्लाखान बाऱ्हा हा , रुहुल्लाखान बख्शी हैद्राबादेस गेला असताना त्याचा नायब म्हणून काम करीत होता . यावेळी बादशहाने त्याची विजापूरचा सुभेदार म्हणून नेमणूक केली होती आणि तो विजापूर प्रांतातील दोन किल्ले जिंकून घेण्याच्या कामात गुंतला होता . बादशहाने त्याला आज्ञा केली की , राजाराम परागंदा होऊन त्या प्रांतात गेला असल्यास त्याला पकडून कैद करावे.

जासुदांच्या द्वारे अब्दुल्लाखान यास बातमी लागली की राजाराम हा बराच काळपर्यंत अज्ञातवासात होता . पण आता त्याच्याभोवती तीनशेच्या जवळ जवळ मातबर आणि प्रतिष्ठीत असे सरदार जमले आहेत . अब्दुल्लाखानाच्या मुक्कामापासून काही कोसांवरून प्रवास करीत तो बिदनूरच्या राणीच्या मुलखात दाखल झाला आहे.

ही बातमी ऐकताच अब्दुल्लाखानाने किल्ल्याच्या वेढ्याचे काम थांबविले आणि आपला मोठा मुलगा हसन अली (हाच पुढे सय्यद अब्दुला या नावाने मोगल साम्राज्याचा मुख्य प्रधान झाला) यास बिदनूरच्या दिशेने पाठविले.

स्वतः अब्दुल्लाखान याने तीन रात्री आणि तीन दिवस दौड केली . तो बिदनूर राज्याच्या हद्दीत दाखल झाला . तो सुभानगड किल्ल्याजवळ पोहचला. सुभानगड आणि त्याला लागून असलेला जरा हे किल्ले तुंगभद्रेच्या काठावर आहेत . नदीच्या पात्रात एक बेट होते . तेथे राजाराम आणि त्याचे साथीदार यांनी आश्रय घेतला होता . अब्दुल्लाखान हा रात्रीच्या वेळी त्यांच्यावर तुटून पडला . मोगलांच्या समशेरी शत्रूच्या रक्ताने न्हाऊन निघाल्या. शत्रूचे अनेक लोक मारले गेले. हिंदूराव यकोजी (संताजी घोरपडे याचा भाऊ) बहिर्जी, मानाजी घोरपडे इत्यादी मराठे सरदार कैद झाले. या धुमश्चक्रीत राजारामाने आपली शस्त्रे , वस्त्रे, पागोटे, पादत्राणे ही सगळी टाकून दिली आणि तो अशा प्रकारे निघून गेला की त्याचा कुणालाही पत्ता लागला नाही.

अब्दुल्लाखानाने फार मोठी कामगिरी बजाविली . पण त्याचे नशीब वाईट म्हटले पाहिजे . राजारामाला निसटून जाऊन देण्यात त्याच्याकडून हलगर्जीपणा झाला. बिदनूरच्या राणीनेही राजारामाला लपवून ठेवले आणि नंतर त्याला सुरक्षितपणे जाऊ दिले असले पाहिजे असा संशय सर्वत्र पसरला.

प्रथम बातमी आली की , राजारामाला पकडण्यात आले आहे . त्याला आणण्यासाठी बादशहाने हमीदुद्दीनखानाची नेमणूक केली . पण नंतर बातमी आली की, राजाराम पळून गेला असून त्याची माणसे कैद झाली आहेत . विजापूरचा किल्ले अर्क (राजवाड्याभोवतीचा तट) मध्ये त्यांना डांबून ठेवावे अशी बादशहाने आज्ञा केली.

बिदनूरच्या अस्वलीवर (राणी) चालून जाण्याची जान निसारखान यास आज्ञा करण्यात आली . बिदनूरचे राज्य उद्ध्वस्त करण्यासाठी भली मोठी फौज घेऊन जान निसारखान रवाना झाला . याच सुमारास सैतान संताजीने जान निसारखान , मतलबखान, शर्जाखान यांच्याबरोबर युद्धे करून याच्यावर जय मिळविले . राणीवरची मोगलांची मोहीम अयशस्वी झाली . तिच्याकडून दंड म्हणून थोडीशी रक्कम घेऊन ते प्रकरण मिटविण्यात आले.

संताजीच्या नशिबात अद्याप काही दिवस राहाण्याचे होते म्हणून तो मोगलांच्या तावडीतून वाचला.

आश्चर्याची गोष्ट ही की विजापूरच्या कैदखान्यातून हिंदूराव बहिर्जी आणि इतर काही इसम पळून गेले. कैदखाना इतका बंदिस्त होता की पहारेकऱ्याच्या संमतिशिवाय ते त्यातून पळून जाणे अशक्यच होय.

ही बातमी बादशहाला कळल्यावर त्याच्या आज्ञेने कैदेत राहिलेल्या ऐंशी इसमांना बादशहाकडे पाठविण्यात आले . तेथे त्यांचा वध करण्यात आला.

विजापूरच्या सुभेदारीवरून अब्दुल्लाखानाची बदली करण्यात येऊन त्याच्या जागी लष्करखान याची नेमणूक करण्यात आली . त्याचा मुलगा वजीहुद्दीन हा विजापूरचा किल्लेदार होता . फौजदारखान हा विजापूरचा कोतवाल होता . त्या दोघांच्या मन्सबी कमी करण्यात आल्या (जून १६८९).

संभाजी हाती सापडण्यापूर्वीच बादशहाने रायरी (रायगड) जिंकून घेण्यासाठी म्हणून एतिकादखान याची रवानगी केली होती . **मुहरम** महिन्याच्या पंधरा तारखेस (१९ ऑक्टोबर १६८९) एतिकादखान याने किल्ला जिंकून घेतला . संभाजी आणि राजाराम यांच्या आया , बायका, मुली आणि मुले ही सर्व मोगलांच्या हाती सापडली.

एतिकादखानाकडून किल्ला जिंकून घेतल्याचा वृत्तान्त , जुम्दतुल्मुल्क असदखान (एतिकादखानाचा बाप) याने बादशहापाशी सादर केला. बादशहाने याबदल जुम्दतुल्मुल्क असदखान यास खास खिलतीची वस्त्रे व जिगात (तुऱ्यासहित) देण्यात आली. लष्करात विजयाचे चौघडे वाजू लागले. सर्व सरदारांनी बादशहाचे नम्रतापूर्वक अभिनंदन करून नजरा पेश केल्या.

अनुक्रमणिका

सफर महिन्याच्या वीस तारखेस (२३ नोव्हेंबर १६८९) एतिकादखान याने बादशहाची भेट घेतली. त्याला तीन हजारी मनसबदार करण्यात आले. खिलतीची वस्त्रे, घोडा, धनुष्यबाण, रोख तीस हजार रुपये या वस्तू त्याला देण्यात येऊन त्याला जुल्पीकारखान बहादूर ही पदवी देण्यात आली.

संभाजीची आई (शिवाजीची बायको) आणि त्याची इतर बायकापोरे यांना अदबीने आणि मानसन्मानाने आणावे आणि गुलालबार (बादशाहाचे निवासस्थान) च्या आवारात त्यांचे तंबू देण्यात यावे अशी बादशाहाने आज्ञा केली. जुम्दतुल्मुल्क असदखान वजीर याच्या तळाजवळच राणी (येसूबाई) च्या तळाचा बाजार वसविण्यात आला. राणीचे नोकरचाकर आणि माणसे यांनी तेथे राहावे असे ठरले. सर्वांना वार्षिक वेतने मिळावीत अशी सोय करण्यात आली.

संभाजीचा नऊ वर्षांचा मुलगा शाहू याला सात हजारी आणि सात हजार स्वारांचा मनसबदार करण्यात आला. त्याला राजा ही पदवी देण्यात आली. खिलतीची वस्त्रे, रत्नजडित खंजीर, आरसी, घोडा, हत्ती ध्वज, नगारे नौबतीचा मान इत्यादि वस्तू त्याला देण्यात आल्या. त्याचे धाकटे भाऊ मदनसिंग आणि उध्दवसिंग (माधवसिंग) यांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे मनसबी वगैरे देण्यात येऊन त्यांनी आपली आई आणि आजी यांच्यापाशी राहावे अशी आज्ञा करण्यात आली. त्या सर्वांच्या कारखान्यांचा खर्च व्यवस्थितपणे चालावा म्हणून सरकारतर्फे कारभारी नेमण्यात आले.

(**मराठे व औरंगजेब**, श्री सेतुमाधवराव पगडी, ४३–४६)]. तेथील राज्यकारभार हरजी महाडीक याची विधवा स्त्री आणि मुलगा यांजकडे होता. त्याने तो राज्यकारभार त्यांची नाखुषी असतानाही त्यांना सोडावयास लावला. नंतर राजारामाने जिंजी येथे आपला पूर्ण दरबार भरविला, आणि राज्य करावयास लागणारी साधनसंपत्ती नसताना देखील त्याने राजाप्रमाणे कारभार करण्यास सुरुवात केली. पेशवा निळकंठ मोरेश्वर पिंगळे हा राजारामाबरोबर जिंजी येथे गेला होता. परंतु तेथे त्याला अतिशय दुय्यम दर्जाचे स्थान प्राप्त झाले. जिंजी येथे राजारामाचा प्रमुख सल्लागार प्रल्हाद निराजी हा होता. त्याच्या हाती राज्यकारभाराची प्रमुख सुत्रे होती. राजारामाने त्याला **प्रतिनिधी** हा अतिशय मोठा किताब दिला अशा तऱ्हेने प्रल्हाद निराजीला अष्टप्रधानांच्या पेक्षा वेगळे परंतु त्यांच्यापेक्षा मानाने अधिक असे एक आगळे स्थान प्राप्त झाले.

(७) इ. स. १६८९ मध्ये औरंगजेबाला प्राप्त झालेले विजय आणि त्याने स्वीकारलेले धोरण यांची हकीकत

राजाराम जेव्हा महाराष्ट्रातून पळून गेला त्यावेळी औरंगजेबाने मराठ्यांचे अनेक किल्ले जिंकून घेतले होते आणि इतर किल्ले द्रव्य अथवा फौजेच्या बळावर तो झपाट्याने जिंकीत चालला होता. महाराष्ट्राच्या अगदी उत्तरेकडे असलेले साल्हेर (२१ फेब्रुवारी १६८७) आणि त्रिंबक (८ जानेवारी १६८९), महाराष्ट्राच्या मध्यभागी असलेले सिंहगड (नोव्हेंबर १६८४) आणि राजगड (मे १६८९) हे किल्ले त्याने जिंकून घेतले होते. १६८९ हे वर्ष पुरे होण्याच्या अगोदर रायगड आणि पन्हाळा यांचाही पाडाव होणार होता. उत्तर कोकणात त्याचा अतिशय कर्तृत्ववान सुभेदार मातबरखान याने अनेक ठिकाणे जिंकून घेतली होती. फक्त मध्य आणि दक्षिण कोकण एवढाच भाग मराठ्यांच्या ताब्यांत राहिला होता. त्यांच्या राज्याच्या बहुतेक किनारपट्टीच्या भागावर मोगलांचे अधिराज्य चालू होते. कारण त्यांच्या ताब्यातील चौल हे बंदर मोगलांनी जिंकून घेतले होते. त्याचप्रमाणे त्यांच्या ताब्यातील पुरवठ्याचे बंदर उंदेरी हे सोडून देणे त्यांना प्राप्त झाले होते, आणि आपल्या नाविक दलाचे मुख्य ठिकाण आणखी दक्षिणेकडे म्हणजे घेरीया अथवा विजयदुर्ग इकडे हलविण्याची पाळी त्यांच्यावर आली होती.

इ. स. १६८९ या वर्षी मराठ्यांचे अनेक किल्ले सहजतया औरंगजेबाच्या हाती पडले. [१६८९ मध्ये बादशाही फौजांनी इतके किल्ले काबीज केले की त्या सर्वांची या ठिकाणी नावनिशी देणे अतिशय कठिण आहे. (**एम्. ए.**, ३११.) १६८९ या वर्षी मोगलांनी सर्व किल्ले घेतले. यांपैकी वाई उपविभागातील राजगड आणि तोरणा व त्याशिवाय प्रतापगड आणि रोहिडा हे किल्ले रामचंद्र आणि शंकराजी यांनी १६९० मध्ये जिंकून घेतले. (**जेधे श.**)] या वेळी औरंगजेबाचा एकमेव उद्देश त्याने जिंकलेल्या आदिलशाही आणि कुतुबशाही या राज्यांचा अतिशय सुपीक आणि विस्तृत प्रदेश आपल्या ताब्यात घेण्याचा होता. साहजिकच इ. स. १६८९, १६९० आणि १६९१ या ३ वर्षांत आपली साधनसामग्री दक्षिण देशाच्या

पश्चिमेकडील प्रदेशातले ओसाड किल्ले घेण्याच्या ऐवजी दक्षिण आणि पूर्व भागातील सपाटीचा प्रदेश आपल्या ताब्यात घेण्यासाठी उपयोगात आणली. [१६८९ च्या फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीला संभाजीला पकडल्यानंतर पुढील १० महिने (३ मार्च ते १८ डिसेंबर १६८९) औरंगजेबाने पुण्याच्या ईशान्येला कोरेगाव येथे घालविले . या कालावधीत जुल्पीकारखानाने रायगडचा किल्ला जिंकून घेतला (१९ ऑक्टोबर). संभाजीची सर्व कुटुंबीय मंडळी मोगलांच्या हाती पडली.

याचवेळी राजाराम जिंजीकडे पळून गेल्यामुळे मोगलांच्या विजयाची धार बोथट झाली . औरंगजेबाने जुल्पीकारखानाला त्याच्या पाठलागावर लगोलग रवाना केले . १६८९ मध्ये मोगलांची आणखी एक महत्त्वाची मोहीम म्हणजे रायचुरचा रुहुल्लाखानाने केलेला पाडाव . याशिवाय या वर्षातील आणखी घटना म्हणजे विजापूर आणि बेल्हारी या जिल्ह्यातून राजारामाचा तेथील अधिकाऱ्यांनी केलेला अयशस्वी पाठलाग आणि बेदनूरवर जाननिसारखान याने केलेली स्वारी. बेदनूरच्या राणीने राजारामाला आश्रय दिला होता. त्याला मोगलांच्या स्वाधीन करणे राणीला भाग पाडण्यासाठी ही स्वारी होती. परंतु संताजीने ही स्वारी उधळून लावली. (**एम्. ए.**, ३२९, ३३१, ३३३)]

(८) मराठ्यांची सरशी, १६९० च्या मे महिन्यात झालेला रुस्तुमखानाचा पाडाव आणि पन्हाळ्याचा वेढा यांची हकीकत

इ. स. १६९० मध्ये संभाजीचा वध झाल्यापासून मराठ्यांवर जे संकट कोसळले होते त्या परिस्थितीतून ते आपले डोके पुन्हा वर काढणार अशी चिन्हे दिसू लागली . २५ मे १६९० रोजी मराठ्यांना अतिशय भरघोस असा विजय मिळाला. मोगलांचा सेनापती रुस्तुमखान हा साताऱ्याच्या परिसरात आपला जनाना आणि फौजफाटा घेऊन भ्रमण करीत होता . सातारा किल्ला बादशहासाठी कसा काबीज करावा याची योजना तो आखीत होता. त्याच्यावर रामचंद्र, शंकराजी, सन्ता आणि धना हे मराठा पुढारी एकजुटीने तुटून पडले. या लढाईत खुद्द रुस्तुमखानाला अनेक जखमा झाल्या आणि तो आपल्या हत्तीवरून खाली पडला. मराठे त्याला कैद करून घेऊन गेले . मोगल सैन्यांपैकी १५०० सैनिक युद्धामध्ये ठार झाले . याचवेळी साताऱ्याच्या किल्ल्यांतील मराठ्यांच्या सेनापतीने मोगल सैन्यावर हल्ला केला आणि रुस्तुमखानाच्या जनान्याला घेऊन तो किल्ल्यामध्ये निघून गेला. **मोगल पन्हाळा जिंकतात व गमावतात** :- त्याशिवाय मराठ्यांच्या ताब्यात ४ हजार घोडे, ८ हत्ती आणि रूस्तुमखानाच्या सैन्याचे सर्व छावणीचे सामान आणि इतर सामानसुमान एवढी सामग्री आली . यानंतर १६ दिवसांनी दंडाची रक्कम म्हणून १ लाख रुपये देण्याचे कबूल करून रुस्तुमखानाने आपली सुटका करून घेतली. [रुस्तुमखानाच्या दोन बायका आणि दोन दुसरे मुलगे त्यांच्या छावणीची लूट चालली असताना पळून गेलेले होते . त्यांनी अंगावर फाटकेतुटके कपडे घातले होते . त्यांच्या काही अनुचरांनी त्यांना डोंगरांच्या रांगांच्या अगदी एका टोकाशी नेले . तेथे काही दिवस लपून राहिल्यावर भिकाऱ्याच्या वेशात ते करारगाव या बादशाही ठाण्याकडे गेले . (**ईश्वरदास**, १४१ अ-१४३ अ; **जेधे. श; एम् ए.**, ३३६. करारगाव म्हणजे कोरेगाव-साताऱ्याच्या पूर्वेस १० मैल अथवा कराड -साताऱ्याच्या दक्षिणेस ३० मैल यांपैकी कोणतेतरी गाव असावे.)

बादशहाने रुस्तुमखानावर ओढविलेली आपत्ती कळताच फिरोजजंग याला मोठे सैन्य देऊन साताऱ्यावर हल्ला करण्यासाठी आणि रुस्तुमखानाची सुटका करण्यासाठी पाठविले . सिद्दी अब्दुल कादिर हा त्याला जाऊन मिळण्यासाठी कूच करीत असतानाच रुपाजी भोसले याने त्याच्यावर हल्ला करून त्याला जखमी केले ; त्याची ५० माणसे ठार मारली आणि त्याची सर्व मालमत्ता लुटली . (**ईश्वरदास**, १४२ ब)] यानंतर रामचंद्र आणि शंकराजी यांनी प्रतापगड , रोहिडा, राजगड आणि तोरणा हे सुप्रसिद्ध किल्ले त्याच वर्षामध्ये जिंकून घेतले (**जे. श.; चिटणीस**, ५३) (१६९०). रायगडाचा पाडाव झाल्यानंतर पन्हाळ्यावरील मराठा शिबंदीचा धीर सुटला आणि त्यांनी डिसेंबरच्या सुमारास बादशाही फौजांना किल्ला लाच घेऊन देऊन टाकला. (**दिल.**, भाग २, ९७ ब, १११ ब; **ईश.**, १४० अ; **चिटणीस** भाग २, ३२) परंतु तेथे ठेवलेल्या मोगल शिबंदीने इतक्या निष्काळजीपणे किल्ल्याची देखभाल ठेवली की , १६९२ सालच्या मध्यास मराठ्यांनी परशुरामाच्या हाताखाली अचानकपणे हल्ला करून सहजपणे किल्ला परत जिंकून घेतला.

राजपुत्र मुईजुद्दीन याचा पन्हाळ्याला निष्फळ वेढा, १६९२–९४

अनुक्रमणिका

राजपुत्र मुईजुद्दीन याने १६९२ च्या ऑक्टोबर महिन्यात पन्हाळा किल्ल्याला वेढा दिला . जवळ जवळ १६९४ पर्यंत तो किल्ल्यासमोर ठाण मांडून बसला होता . परंतु त्यात त्याला यश आले नाही . १६९३ च्या ऑक्टोबर महिन्यात धना जाधव हा त्या ठिकाणी आला [अखबारात दिलेल्या हकिकतीप्रमाणे धनाजीबरोबर १० हजार फौज होती. परंतु मुइजुद्दीन याने पाठविलेल्या अहवालाप्रमाणे धनाजीबरोबर ४० हजार घोडेस्वार आणि असंख्य पायदळ होते . (**ईन्शा-ई-मधुराम,** पान ७०) वरील लढाईची हकिकत या अहवालात पुढीलप्रमाणे दिली आहे . ती इतकिशी विश्वासार्ह नाही . "लढाई चालू असताना तोफेचा एक गोळा परशुराम याला डोक्यात लागला आणि तो मरण पावला. यामुळे शत्रू भयभीत झाला. आमच्या सैनिकांनी त्यांच्यावर तलवारी आणि भाले यांनी हल्ला चढविला. बराच वेळ लढाई झाल्यानंतर शत्रूने पळ काढला . त्यांच्यापैकी अनेकजण नदीत बुडून मेले . अनेकांना ठार करण्यात आले . मेलेल्यांचे ढिगारे करण्यात आले . शत्रूचा सर्व तोफखाना, २००० भाले, तितक्याच बंदुका, अनेक घोडे आणि इतर सर्व मालमत्ता आमच्या हाती पडली."

दरम्यान बादशहाने राजपुत्राच्या मदतीसाठी फिरोजजंग आणि खानाजादखान यांना कुमक घेऊन जाण्याची आज्ञा केली . ते येत असल्याची बातमी कळताच मराठे पन्हाळ्याच्या आसमंतातून पांगले . धनाजी साताऱ्याच्या दिशेने निघाला . तो तेथे पोहोचण्याच्या अगोदर फिरोजजंगाच्या सैन्याच्या तो दृष्टीस आला . त्याने आपला मुलगा चिनकिलीचखान आणि रुस्तुमखान यांना त्याच्या पाठलागावर रवाना केले . त्यांनी धनाजीला कराड येथे गाठले. दोन्ही पक्षांत तुंबळ युद्ध झाले आणि मराठ्यांचा पराजय झाला. मराठ्यांचे आणि त्याचप्रमाणे मोगलांचे अतिशय नुकसान झाले. बादशहाने खेमसावंत त्याला राजपुत्रावर हल्ला करणाऱ्या मराठ्यांच्या मदतीला जाऊ नये अशी समज दिली . (**ईन्शा-ई-मधुराम,** पान ९७)] आणि मुईजुद्दीन याने पन्हाळा किल्ल्याबाहेर एका वर्षाच्या कालावधीत मोर्चे वगैरे उभारून जी कामगिरी केली होती तिचा त्याने परिणामकारकपणे विध्वंस केला . त्याने किल्ल्यावर रसद पोहोचवली आणि मोगलांनी एका वर्षामध्ये जे काही कमावले त्याची विल्हेवाट लावली . यानंतर किल्ल्याचा वेढा जवळ जवळ उठला असे म्हणण्यास काहीच हरकत नाही . केवळ बादशहाची फसवणूक करण्याच्या हेतूने राजपुत्राने वेढ्याचे काम अतिशय गलथानपणे पुढे चालविले.

१६९४ च्या मार्च महिन्यात बादशहाकडून परवानगी मिळाल्याचा फायदा घेऊन राजपुत्राने पन्हाळा किल्ल्यापासून कूच करण्यास सुरुवात केली . लुतफुल्लाखान आणि इतर अधिकारी यांना किल्ल्याच्या खाली ठाण मांडून बसण्याचे निश्चितपणे हुकूम होते . तरी देखील त्यांनी राजपुत्राबरोबर किल्ल्यापासून माघार घेण्यास सुरुवात केली . यानंतर राजपुत्र बेदारबख्त (राजपुत्र महमद आजम याचा मोठा मुलगा) याच्याकडे वेढ्याचे काम सोपविण्यात आले . त्याने ५ एप्रिल रोजी गलगली येथील बादशाही छावणीतून या कामगिरीवर रुजू होण्यासाठी कूच केले.

बेदारबख्तची पन्हाळ्यावर मोहीम, १६९४–९५

१६९६ या वर्षाच्या जानेवारी महिन्याच्या अखेरपर्यंत बेदारबख्त याने वेढ्याचे काम कसेबसे चालविले. याच सुमारास बादशाही सरदार कासीमखान आणि हिंमतखान यांजवर कोसळलेल्या आपत्तीमुळे बादशहाने राजपुत्राला दक्षिणेस बसवपाटण येथे रवाना करण्याचे ठरविले . वेढ्याच्या कामी त्याने फिरोजजंग याची नेमणूक केली . वेढ्याच्या कामात फिरोजजंगाकडून विशेष कामगिरी पार पडली नाही. प्रत्यक्षात पन्हाळा किल्ला जिंकून घेणे हे बादशहाच्या कोणत्याही विभागीय सेनादलाच्या आवाक्याबाहेरचे होते.

साताऱ्यानजीकच्या लुतफुल्लाच्या मोहिमा, १६९०

१६९० च्या मे महिन्यात रुस्तुमखानावर जे संकट कोसळले त्यामुळे उत्तर सातारा जिल्ह्याचा ताबा भरपूर सैन्यासहित घेण्याची बादशहाला निकड भासली . साताऱ्याच्या ईशान्येकडे २५ मैलांवर असलेल्या खटाव या ठिकाणाचा ठाणेदार म्हणून त्याने लुतफुल्लाखान याची आपल्या छावणीमधून रवानगी केली . ६

जुलै रोजी रात्र सरतासरता संता घोरपडे याने १० हजार घोडेस्वार आणि असंख्यात पायदळी सैनिक घेऊन त्याच्यावर अचानक हल्ला केला . त्यांच्यावर ते लांब असतानाच तोफांचा भडिमार करण्यात आल्यामुळे लुटीपासून छावणीचा बचाव झाला . यामुळे मराठे गांगरले परंतु त्यांचा नाश मात्र झाला नाही . त्यांनी पुन्हा आपल्या सैन्याची जमवाजमव केली आणि साताऱ्याच्या पूर्व भागात ते आणखी प्रचंड संख्येने जमा झाले. त्यांनी लुतफुल्लावर हल्ला केला परंतु स्वतः नुकसान सोसून देखील त्याने तो हल्ला परतवून लावला. [संताजीबरोबर झालेल्या लढाईत मोगलांची ६७ माणसे ठार आणि १७० जखमी झाली . मराठ्यांची ५०० माणसे ठार आणि १०० कैद झाली. मराठ्यांची बरीचशी सामग्री मोगलांच्या हाती पडली . परंतु मराठ्यांचा पूर्ण मोड झाला असे मात्र नव्हते . त्यांनी पुन्हा आपल्या फौजेची जमवाजमव केली आणि ते पश्चिम सातारा विभागात मोठ्या संख्येने जमा झाले . बादशहाच्या हुकूमावरून लुतफुल्ला त्या ठिकाणी दाखल झाला . रात्री त्याने पीलीव या खेड्यात मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी सकाळी संताजी, धनाजी, डफळे, मोरे आणि इतर मराठा सेनापतींच्या हाताखाली २० हजार घोडेस्वार आणि असंख्य पायदळ यांनी लुतफुल्ला याला घेरले. डफळेच्या हाताखाली १० हजार बंदुकची होते. त्यांनी मोगलांचे खूप नुकसान केले. दिवसभर लढाई चालली होती . मोगलांनी मराठ्यांचे सर्व हल्ले परतवून लावले . खुद्द लुतफुल्लाने त्याच्यावर संताजी आणि धनाजी यांनी केलेला हल्ला परतवून लावला . सूर्यास्तानंतर मराठ्यांनी माघार घेतली . त्यांची १००० माणसे ठार आणि अनेक जखमी झाली . मोगलांची २०० माणसे ठार आणि ३०० पेक्षा अधिक जखमी झाली. ही लढाई बहुधा १६९० मध्ये झाली असावी. (**ईन्शा-ई-मधुराम**)]

१६९० च्या अखेरपर्यंत आणखी नमूद करण्यासारखी कोणतीही घटना घडली नाही . हे वर्ष संपता संपता मोगलांच्या सैन्यात बारगिरी करणारे नेमा शिंदे , मांडकोजी पांढरे आणि नागोजी माने हे तिघे मराठा अधिकारी आपापल्या सैन्यासहित जिंजी येथे राजारामाला जाऊन मिळाले . [पुढील महिन्यात भोरचा देशमुख सर्जेराव जेधे मोगलांना येऊन मिळाला. त्याला मानाचा पोषाख देण्यात आला (**जेधे शका**.). नोव्हेंबरमध्ये वजीर असदखान याला कर्नुल आणि कडप्पा या जिल्ह्यांत भूतपूर्व आदिलशाही आणि कुतुबशाही अधिकाऱ्यांची तेथून हाकालपट्टी करण्यासाठी आणि मद्रास कर्नाटकात लढणाऱ्या मोगल फौजांची पिछाडी सुरक्षित करण्यासाठी रवाना करण्यात आले. तेथे त्याने अनेक किल्ले जिंकून घेतले. १६९१ च्या एप्रिल व मे महिन्यात बादशहाने मराठ्यांवर अनेक तुकड्या आपल्या अधिकाऱ्यांच्या हाताखाली रवाना केल्या . परंतु त्याला मुख्य काळजी वाटत होती ती बेरडांचा प्रमुख पीडीया नायक याची . जून १६९१ ते डिसेंबर १६९२ या अवधीत त्याने एका पाठोपाठ मोठ्या फौजा नावाजलेल्या सेनापतींच्या हाताखाली बेरड प्रदेशात रवाना केल्या . या कालावधीत सातारा जिल्ह्यात थोडीफार शांतता होती. परंतु रायबाग व हुकेरी या दरम्यानच्या प्रदेशात मराठ्यांचे हल्ले चालूच होते. (जून १६९१).]

१६९१ आणि १६९२ मधील हालचाली

१६९२ या वर्षी मराठ्यांनी पुन्हा एकदा उचल खाल्ली . युद्धाच्या अनेक क्षेत्रात त्यांना डोळ्यात भरण्यासारखे अनेक विजय मिळाले . त्यांपैकी एक म्हणजे मोगलांच्या हातातून त्यांनी पन्हाळ्याचा किल्ला परत जिंकून घेतला . साताऱ्याच्या ईशान्येस असलेल्या महादेवाच्या डोंगरात संताजी घोरपड्याची मुख्य छावणी होती. या आपल्या छावणीमधून पूर्वेकडे पसरलेल्या सपाट अशा विजापूरच्या मैदानी प्रदेशापर्यंत संताजी अतिशय जलद गतीने छापे घालीत असे . त्याच वेळी पश्चिम कानराच्या बेळगाव आणि धारवाड या जिल्ह्यांत मराठ्यांनी धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली. ८ ऑक्टोबरच्या सुमारास धना आणि संता यांनी ७ हजार सैनिकांसह बेळगावजवळील काही किल्ले जिंकून घेतल्याची आणि त्या शहरावर प्रत्यक्ष हल्ला केल्याची व त्याचप्रमाणे तेथील उभ्या पिकामध्ये आपली घोडी चरण्यासाठी सोडल्याची बातमी आली . यावर बादशहाने कानराच्या बंदोबस्ताची अधिक मजबुती केली . त्यासाठी त्याने हमीदउद्दीन खान याला बेळगावला पाठविले, मतलबखानाची धारवाडकडे रवानगी केली आणि विजापुरी कर्नाटक अथवा वायव्य म्हैसूर प्रांत या भागाचा फौजदार कासीमखान याला रसद पाठविली आणि बंकापूर व त्या नजीकच्या ठिकाणाचे रक्षण करण्याचा त्याला हुकूम दिला. डिसेंबर महिन्यात संता आणि धना हे दोघेजण जिंजीवरील मोगलांचा दबाव कमी करण्यासाठी बरेच मोठे सैन्य घेऊन मद्रासकडे गेले . साहजिकच काही काळपर्यंततरी महाराष्ट्रात नावाजलेले राष्ट्रीय पुढारी आणि कसलेले सैन्य यांचा अभाव होता . त्या कालावधीत युद्धक्षेत्राच्या पश्चिम भागात मोगल सैन्याला शांतता लाभली.

(९) संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव यांजबरोबरील मोगलांचा संघर्ष, १६९३–९४

अनुक्रमणिका

१६९३ हे वर्ष सरता सरता मराठ्यांच्या हालचालींनी पुन्हा पश्चिमेकडे उचल खाल्ली . अमृतराव निंबाळकराने मोगल प्रदेशावर हल्ला करण्यासाठी भीमा नदी ओलांडली . हिंमतखान त्याच्या पाठलागावर निघाला परंतु चपळ मराठा घोडेस्वारांना गाठण्यात त्याला यश आले नाही . त्याचवेळी धना , शंकराजी आणि इतर मराठे पुढारी पन्हाळा किल्ल्यासमोर ठाण मांडून बसलेल्या मोगल फौजांवर हल्ला चढवीत होते . संता घोरपडे हा जिंजीहून परत आला होता , आणि १६९३ च्या ऑक्टोबर महिन्यात त्याने स्वराज्यात मोगलांवर पुन्हा हल्ले सुरू केले होते . हिंमतखान त्याच्या पाठलागावर गेला . त्याने संता आणि त्याचे बेरड दोस्त यांच्यावर १४ नोव्हेंबर रोजी विक्रमहल्ली या गावाजवळ मोठा विजय मिळविला . (**अख.,** १९ नोव्हें). या विजयानंतर मोगल सेनापतींचे आपापसात भांडण झाले . हमीदउद्दीन आणि ख्वाजाखान यांनी पाठलाग करण्याचे सोडून दिले व शत्रूच्या पाठोपाठ जाण्याची कामगिरी एकट्या हिंमतखानावर सोडून ते गुलबर्ग्याकडे परतले . संताने आता विचारपूर्वक आपल्या सैन्याची विभागणी केली . ४००० स्वार त्याने अमृतरावाच्या हाताखाली वऱ्हाडवर हल्ला करण्यासाठी रवाना केले आणि स्वतः चौथ गोळा करण्यासाठी ६००० घोडेस्वार घेऊन मळखेडच्या दिशेने कूच केले . मोगल आणि मराठे यांच्यामध्ये अनेकवार निष्फळ चकमकी झाल्या. मराठ्यांचा पाठलाग मोगलांनी अनेक वेळा केला . परंतु या संघर्षामधून मोगलांच्या पदरी घवघवीत असे यश पडले नाही.

१६९५ च्या अखेरपर्यंतचे लहानसहान युद्धप्रसंग

१६९४ आणि १६९५ या दोन्ही वर्षांत जिकडेतिकडे मराठ्यांच्या टोळ्या जरी भ्रमण करीत होत्या , आणि साऱ्या पश्चिम दख्खनवर बेरड लोकांचा उपद्रव वाढला होता , तरी दोन्ही पक्षांकडून १६९५ च्या अखेरपर्यंत निर्णायक अथवा उल्लेखनीय अशी कामगिरी झाली नाही . या सुमारास संताने मोगलांचे दोन पहिल्या दर्जाचे सेनापती कासीमखान आणि हिंमतखान यांचा पराभव केला आणि त्यांना ठार मारले . [१६९५ च्या अखेरपर्यंत मोगल -मराठा हालचालींची हकीकत : २ ऑगस्ट १६९४ रोजी औरंगजेबाकडे बातमी आली की संताजी आणि धनाजी वारुगडच्या नजीक आहेत आणि त्यांनी महिमानगडला वेढा घालण्यासाठी फौजेची रवानगी केली आहे . त्यांना तेथून काढून लावण्याचा हुकूम एका मोगल तुकडीला देण्यात आला . दरम्यान बेदारबख्त याला बेळगावकडे रवाना करण्यात आले . राजपुत्राचा एक अधिकारी फत्तेजंग याने जून १६९४ मध्ये नरगुंदच्या किल्ल्याला वेढा दिला . त्याने केलेल्या हल्ल्याचा उपयोग न झाल्यामुळे त्याला वेढा उठवावा लागला . त्याच्या जागी राजपुत्राने राजा उदवतसिंग याची रवानगी केली . हा किल्ला पुढे मोगलांच्या ताब्यात आला असावा असे दिसते . कारण या किल्ल्याचा उल्लेख बातमी पत्रात बहादुर नगर या नावाने केलेला आढळतो . १६९४ आणि ९५ या दोन्ही वर्षांत मराठे आणि बेरड यांच्याबरोबर मोगलांच्या अनेक लढाया झाल्या . परंतु त्यांपैकी निर्णायक म्हणजे १६९५ च्या अखेरीला झालेली लढाई . या लढाईत संताजीने कासीमखान आणि हिम्मतखान या दोन नाणावलेल्या मोगल उमरावांचा पराभव करून त्यांना ठार मारले.

नोव्हेंबर १६९४ मध्ये मोगलांना सामील झालेल्या एका मराठा देशद्रोह्याला राष्ट्रीय वृत्तीच्या मराठा पुढाऱ्यांनी भयंकर शासन दिले . कारीचा किल्ला त्रिंबक नावाच्या किल्लेदाराच्या स्वाधीन होता . जुन्नरचा डोगे नावाचा एक रहिवासी मोगलांच्यावतीने कारी येथे आला . त्याने रायाजी बहुलकर याला लाच देऊन किल्ला ताब्यात घेतला . या हल्ल्यात डोगे याने त्रिंबक आणि मोरो नारायण यांना पकडले . त्रिंबकचे दुय्यम अधिकारी यादव आणि महादजी हे दोघे पळून गेले . १६९४ च्या अखेरीस शंकराजी नारायण याने कारीचा किल्ला घेण्याची तयारी केली . त्या प्रदेशातील अनेक किल्ल्यातून कारीला वेढा देण्यासाठी त्याने फौजेच्या तुकड्यांची रवानगी केली . डोगे याला सुरक्षिततेची हमी देण्यात आली . परंतु त्याने किल्ला सोडल्यावर त्याला पकडण्यात आले . नंतर खुद्द शंकराजी कारी येथे गेला आणि त्याने रायाजी बहुलकर याला शिक्षा लावून राजगड येथे कैदेत ठेवले. (**जेधे. श.**)

२६ नोव्हेंबर १६९४ मध्ये संताजी हा हैद्राबादच्या मुलखात असल्याची बातमी आली . त्यांच्या पाठलागावर हिम्मतखान हा होता. नंतर तो विजापूरकडे वळला . ३० नोव्हेंबर रोजी पानूर येथे त्याची आणि हिम्मतखानाची चकमक उडाली . संताजीला माघार घ्यावी लागली . त्याचा हिम्मतखानाने पाठलाग करून त्याला नळदुर्ग येथे गाठले . पुन्हा संताजीचा पराभव झाला . १ महिन्यानंतर संताजी पुन्हा रायचूर जिल्ह्यात आला . यावेळीही हिम्मतखानाने त्याला माघार घ्यावयास लावली. दोन्ही बाजूंचे खूप नुकसान झाले.

१६९५ च्या मे महिन्यात तो भोपाळगडच्या मार्गे महादेव डोंगरांच्या परिसरात आला . त्याचा एक अश्रित माधव नारायण मोगलांना जाऊन मिळाला. जुलै महिन्यात मराठ्यांनी मोगलांचे खटावचे ठाणे वेढले . तेथे हमीदउद्दीनखान याला पाठविण्यात आले . मराठ्यांनी त्याच्यावर मोठ्या

संख्येने हल्ला केला. बादशहाने त्याला कुमक रवाना केली. सप्टेंबर महिन्यात खानाने आपला एक अधिकारी फत्तेउल्ला याला चंदनवंदन किल्ल्याच्या पायथ्याची खेडी जाळून टाकण्यासाठी पाठविले . त्याच्या मदतीसाठी हमीदउद्दीनखान याने स्वतः चाल केली . मराठ्यांचा हल्ला परतवून लावण्यात आला. मोगलांनी किल्ल्याच्या पायथ्याजवळील खेडी जाळली . या सुमारास संताजीचा आणखी एक सेवक ५०० स्वारांनिशी मोगलांना येऊन मिळाला.]

१६९५ या वर्षाच्या अखेरपर्यंत हिंदुस्थानात मोगल आणि मराठे यांचा जो संघर्ष चालला होता त्याचे असे हे चित्रविचित्र स्वरूप होते . या संघर्षाला निव्वळ एक लष्करी प्रमेय इतकेच स्वरूप राहिले नव्हते , तर मोगल साम्राज्य एका बाजूला आणि स्वयंस्फूर्तीने लढणारे दक्षिणेतील लोक , त्यांचा सोशिकपणा व साधनसामग्रीचा उपयोग करण्याची हातोटी दुसऱ्या बाजूला यांची हा संघर्ष म्हणजे एक कसोटी होती .

[औरंगजेबाचा मुक्काम गलगलीस असताना इटालियन प्रवासी गॅमेली कारेरी हा प्रवास करीत गलगलीस आला . २१ मार्च १६९५ रोजी त्याने औरंगजेबाची गाठ घेतली. कारेरी हा गोव्याहून ४ मार्च १६९५ रोजी निघून फोंडा, साभ्राणी, हलियाळ, टिकला, हुन्नर, चिकोडी एडूर, कोडी, मुधोळ या मार्गाने म्हणजे कारवार आणि बेळगाव या जिल्ह्यांतून प्रवास करीत १७ मार्च १६९५ रोजी गलगलीस पोहोचला . कारेरीने आपल्या प्रवासाचे वर्णन केले आहे. त्यावरून औरंगजेबाच्या सैन्याची, सरदारांची आणि छावणीची कल्पना येते. कारेरीच्या प्रवासवर्णनाचा सारांश थोडक्यात असा—

छावणीचा घेर

मी १७ मार्च १६९५ रोजी गलगलीला पोहोचलो . मोगल लष्करात आग्र्याचा काही ख्रिस्ती शिपाई होते . त्यांनी माझी बडदास्त ठेवली . १८ मार्च रोजी मी ख्रिस्ती गोलंदाजांच्या तळावर गेलो . तेथे एक चर्च होते . गोव्याकडचे दोन पाद्री ते चर्च चालवीत . चर्चची इमारत मातीची होती . प्रार्थना आटोपल्यावर ख्रिस्ती कप्तान फ्रान्सिस बोर्जिया याने मला आपल्या घरी नेऊन माझा पाहुणचार केला . बोर्जियाचे घराणे व्हेनिसचे. पण खुद्द फ्रान्सिस बोर्जियाचा जन्म दिल्लीला झाला होता.

१९ मार्च रोजी मी गुलालबार (बादशहाच्या राहण्याची जागा) येथे गेलो बादशहाने त्यावेळी दरबार भरविला होता . पण त्या ठिकाणी इतकी गर्दी होती की , मी बादशहाला नीट पाहू शकलो नाही . बादशहा आणि राजपुत्र यांच्या तळाचा घेर तीन मैल होता . तळाभोवती भिंती आणि खंदक पसरले होते . बादशहाच्या या खास छावणीला तीन दरवाजे होते . त्यांपैकी एक दरवाजा जनानखान्याचा होता . बाकीचे दोन दरबाराच्या आणि सैन्याच्या येण्याजाण्यासाठी होते.

माझ्या अवलोकनात आले की , गलगलीच्या बादशाही छावणीत एकंदरीत साठ हजार घोडेस्वार आणि एक लाख पायदळ इतके सैन्य आहे. सामानाची ने-आण करण्यासाठी छावणीत पन्नास हजार उंट आणि तीन हजार हत्ती आहेत . सैन्यातील व्यापारी, नोकर-चाकर, बायका-माणसे, कामगार या सर्वांची संख्या प्रचंड आहे . छावणीतील एकंदर लोकसंख्या पाच लाख तरी भरेल . त्यामुळे छावणीला शहराचे स्वरूप प्राप्त झाले आहे. छावणीतील प्रत्येक मोठ्या अमीराचा स्वतःचा एक मोठा बाजार असून त्यात हरप्रकारच्या वस्तू मिळतात . असे बाजार अडीचशे आहेत. छावणीचा एकंदर घेर सुमारे तीस मैलांचा आहे.

सरंजामदार

बादशहाच्या अमीरांना स्वतःचे सैन्य बाळगावे लागते . त्यासाठी त्यांना काही तालुक्यांची किंवा जिल्ह्यांची उत्पन्ने लावून देण्यात येतात . काही अमीरांचे या जहागिरीतून उत्पन्न वर्षाला पंधरा लाखापर्यंत जाते . राजपुत्राचे उत्पन्न तर मासिक पंधरा लाख रुपयांचे आहे . ज्या अमीराने जितके सैन्य ठेवावयाचे त्यामानाने त्याला तितका सरंजाम देण्यात येतो . एखाद्या अमीरावर बादशहाची नाराजी झाली तर सगळा सरंजाम काढून घेण्यात येतो किंवा कामात कुचराई झाली तर तितका सरंजाम कमी करण्यात येतो . प्रत्येक अमीर आपल्या सैन्यापुरता स्वतंत्र आहे . तो केवळ बादशहाची आज्ञा पाळतो. बादशहाच्या गैरहजेरीत बादशहाचा वजीर, त्याला जुम्दतुल्मुल्क म्हणतात, त्याच्या तंत्राने गोष्टी चालतात.

बादशाही सैन्यात जितके घोडे हवेत तितके या देशात मिळत नसल्यामुळे परदेशांतील घोड्यांना बरीच मागणी आहे . इराण, अरबस्थान त्या देशातील घोडे येथे एक हजार किंवा दोन हजार रुपयांना एक अशा भावाने विकले जातात. कमीत-कमी किंमत चारशे रुपये म्हणावी लागेल.

छावणीतील हत्तीची संख्या प्रचंड आहे. त्यांना पोसण्याचा खर्चही काही कमी नाही. एका हत्तीला खाण्यास कमीत-कमी सत्तर शेर धान्य लागे. ऊस, हिरवी पाने ही वेगळीच . त्यामुळे प्रत्येक हत्तीवर रोजचा खर्च सात रुपये येई . बादशाही हत्तींची संख्या सगळ्या राज्यात मिळून तीन हजार येईल. याशिवाय तीन मोठ्या अमीरांकडे हत्तींचे दळ सोपविण्यात आले आहे . पाचशे हत्ती आणि त्यांची देखरेख करण्यासाठी दोनशे माणसे मिळून एकंदर सरंजामासाठी अमीरांना महिन्याला पाच लाख रुपयांचा तनखा जहागिरीच्या रूपाने देण्यात येतो . छावणीत या वेळी बादशहाचे असे पाचशे हत्ती होते. शहाजाद्यापाशी आणि अमीर-उमरावांपाशी अनुक्रमे चारशे आणि दोनशे असे हत्ती होते.

औरंगजेबाची मुलाखत

२१ मार्च रोजी मी बादशहाची गाठ घेतली . बादशहाच्या दरबारात आम्ही दाखल झालो . पहिल्या दालनात नौबती , नगारे, लांब कर्णे,

शिंगे इत्यादि वस्तू होत्या. दिवसा आणि रात्री ठराविक वेळेला छावणीत नौबती झडत असत . याच दालनात बादशहाचे ध्वज आणि इतर राजचिन्हे ठेवलेली होती. तेथून मी दुसऱ्या दालनात गेलो आणि नंतर बादशहाच्या तंबूत दाखल झालो.

बादशहा उंची आसनावर सोनेरी लोडांना टेकून बसला होता . तंबूत उंची आणि मूल्यवान कपड्यांची जाजमे अंथरली होती . मी जवळ जाऊन बादशहाला मोगल पद्धतीची कुर्निसात केली . दुभाषाच्या द्वारे त्याने माझी चौकशी केली . बादशहाला परदेशासंबंधी बरीच माहिती दिसली . हंगेरीत तुर्क आणि युरोपियन या राष्ट्रांत युद्धे चालली होती , त्यासंबंधी बादशहाने मला अनेक प्रश्न विचारले . मी कोण, युरोपमधील कोणत्या राष्ट्राचा? किती दिवसापासून प्रवासावर आहे ? या देशात येण्याचा हेतू काय ? याबद्दल मला त्याने विचारले . मी त्याची योग्य उत्तरे दिली . यानंतर बादशहाने मला रजा दिली. थोड्याच वेळाने तो बाहेर दरबारात आला.

बादशहाच्या हातात काठी असून तिच्यावर टेकून तो चालत असे . त्याचा पोशाख अगदी साधा आणि शुभ्र होता . डोक्याला पांढरे पागोटे होते. त्याच्याभोवती सोन्याची जाळी होती. पागोट्यात एक मोठा पाचू आणि चार लहान रत्ने लावली होती . त्याच्या कमरेला एक रेशमी शेला होता. कमरेला डाव्या बाजूस एक कट्यार लटकत होती . त्याच्या पायात मोगल पद्धतीचे चढाव होते . औरंगजेब बादशहा हा शरीराने किरकोळ आणि मध्यम उंचीचा होता. त्याचे नाक त्याच्या शरीराच्या मानाने काहीसे मोठे होते . वयोमानाप्रमाणे त्याचे शरीर वाकले होते . त्याचा वर्ण गव्हाळी असून त्याच्या चेहऱ्यावर त्याची गोल दाढी उठून दिसत असे . तो आपल्या आसनावर बसल्यावर खिदमतगारांनी त्याची ढाल -तलवार त्याला हातात दिली. ती त्याने आपल्या डाव्या बाजूस ठेवली.

न्यायदान

यानंतर फिर्यादीचे अर्ज पाहाण्याचे काम सुरू झाले . दाद मागणारा गरजू जवळ जाई . बादशहाचे दोन चिटणीस त्याचा अर्ज घेत आणि त्याचा मजकूर बादशहाला सांगून अर्ज बादशहाच्या हाती देत. बादशहा अर्जावर आपल्या हाताने हुकूम लिही. या वयात त्याला चष्मा लागत नसे, हे सर्व पाहून मला आश्चर्य वाटले . शहाजादे, शहाआलम, मुअज्जम आणि आजमशहा यांनी दोन वेळेस बादशहाला मुजरे केले . मुजऱ्याची पद्धत : अशी– शहाजादे आपले उजवे हात जमिनीला लावीत . नंतर हात आपल्या डोक्यावर आणि छातीवर ठेवीत आणि आपल्या जागेवर बसत . अमीर-उमरावांना तीन वेळा मुजरे करावे लागत.

बादशहा आपली छावणी हलवी तेव्हा प्रथम त्याचे तंबू आणि गोट जमविण्यासाठी सामान पाठवीत . ते एकशेतीस हत्ती , चौदाशे उंट आणि चारशे गाड्या यातून वाहून नेत . आठ हत्तीवर त्याची निरनिराळी आसने लादून नेत . बादशहा हत्तीवर स्वारी करी पण रस्ता धुळीचा असला तर तो पालखीतून प्रवास करी . मराठ्यांच्या युद्धाविषयी कारेरी म्हणतो , "मी गलगलीला असताना मोगलांनी जिंजीला वेढा घातलेला आहे असे मला कळले. सात वर्षांपासून हा वेढा चालला असून मोगलांचे तीस हजार घोडेस्वार आणि तितकेच पायदळ जिंजीसमोर गुंतले होते तरी किल्ला अद्याप मोगलांच्या हाती पडला नव्हता . बादशहाच्या प्रमुख अधिकाऱ्यांपैकी त्याने बक्षी [पेमास्टर जनरल], अदिल [न्यायसचिव], दिवाण आणि खानसामान [मुख्य खजिनदार] या हुद्देदारांचा उल्लेख केला आहे.

बादशहाच्या सैन्याविषयी तो म्हणतो , "त्याचे एकंदर सैन्य तीन लाख घोडेस्वार आणि चार लाख सैन्य आहे . त्यांपैकी साठ हजार सैन्य जिंजीच्या वेढ्यात गुंतले आहे . बारा हजार सैन्य बादशहाचा नातू बेदारबख्त याच्या नेतृत्वाखाली पन्हाळगडास वेढा घालून आहे . आणखी एका छावणीत सात हजार स्वार आणि पाच हजार पायदळ आहे. गलगलीच्या छावणीत साठ हजार स्वार आणि एक लाख पायदळ सैन्य आहे ." उरलेले सैन्य राज्याच्या निरनिराळ्या भागात तैनात आहे . तोफखान्यासंबंधी कारेरी म्हणतो, "भारी तोफा साठ ते सत्तर आहेत. तीनशे लहान तोफा उंटावर ठेवून वापरण्यात येतात. लहान तोफा पितळ्याच्या असून त्यांची संख्या पन्नास ते साठ आहे . या तोफा दोन घोड्यांच्या गाड्यांवरून वाहून नेतात . तोफखान्याची एकंदर व्यवस्था युरोपियन ख्रिस्ती लोकांकडे असून त्यात इंग्रज, पोर्तुगीच, डच, जर्मन, फ्रेंच या जमातीचे लोक आहेत. गोलंदाजांना प्रत्येकी दोनशे रुपये महिना पगार मिळतो."]

(१०) पूर्व कर्नाटक, त्याचे भौगोलिक विभाग आणि इतिहास यांची थोडक्यात माहिती

ज्याला पूर्व अथवा मद्रास कर्नाटक असे म्हणतात तो प्रदेश हा पश्चिम कर्नाटक अथवा मुंबई इलाख्याचा कानडी बोलणारा प्रदेश यापासून वेगळा आहे . या प्रदेशाच्या मर्यादा उत्तरेस १५ अंश अक्षांशापासून तो दक्षिणेस कावेरी नदीपर्यंत पसरलेल्या आहेत . १७ व्या शतकात पालार नदीने अथवा वेल्लोर ते सद्रसपर्यंत काढलेल्या एका कल्पित रेषेने या प्रदेशाचे बरोबर २ भाग पाडले होते . यापैकी एकाला हैद्राबादी कर्नाटक व दुसऱ्याला विजापुरी कर्नाटक या नावाने ओळखले जाते . या दोन्ही भागांची आणखी विभागणी बालाघाट आणि पाईनघाट अशी झालेली होती . हैद्राबादी कर्नाटकाच्या बालाघाटात सिद्धधौत , गंडीकोटा, गुट्टी, गरमकोंडा आणि कडप्पा यांचा समावेश होता , तर विजापुरी बालाघाटात सेरा आणि बंगलोर हे म्हैसूरचे जिल्हे व त्यांच्याशी संबंधित असलेल्या जमीनदारीचा समावेश होता . पाईनघाटात हैद्राबादी कर्नाटकाचा मुलूख समुद्रकिनाऱ्यावर गुंतूरपासून सद्रसपर्यंत पसरलेला होता , (पाहा **विल्कस्**,

भाग १ , १३४–१३६) तर विजापुरी पाईनघाट दक्षिणेकडे सद्रसपासून तंजावरपर्यंत पसरलेला होता . (सद्रस हे उत्तरेस १२॥ अंश अक्षांशावर आहे .) या प्रदेशात मोगलांनी जिंकलेल्या भागात अजून सुव्यवस्था प्रस्थापित झालेली नव्हती . बराचसा मुलूख बंडखोर पाळेगार अथवा तेथील स्थानिक जमीनदार यांच्या हातात होता आणि आदिलशहाच्या हातात तेथील काही किल्ले आणि त्यांच्या सभोवतालचा मुलूख एवढाच भाग होता. आदिलशहाची सत्ता ही प्रत्यक्षात त्यांच्या अधिकाऱ्यांच्या हातामध्ये होती व तसे म्हणावयास गेले तर हे सरदार जवळ जवळ स्वतंत्र होते . या परिस्थितीत शिवाजीच्या स्वारीमुळे आणि १६७७ –७८ साली त्याने हा प्रदेश जिंकून घेतल्यामुळे अधिकच गोंधळ निर्माण झाला . परिणामी दक्षिण अर्काट जिल्ह्यात (या जिल्ह्याची राजधानी जिंजी हे शहर होते .) मराठ्यांचे एक नवीन सरकार निर्माण झाले . नवीन जिंकलेल्या प्रदेशावर शिवाजीने रघुनाथ नारायण हणमंते याची सुभेदार म्हणून नेमणूक केली . संभाजी गादीवर आल्यानंतर त्याने या सुभेदाराला बडतर्फ करून कैदेत टाकले . **पूर्व कर्नाटकचा मराठा सुभेदार हरजी महाडीक** :- (१६८१ च्या जानेवारी महिन्याच्या सुरुवातीला) (**मद्रास डायरी**, ८ जानेवारी १६८१) त्याचे जागी संभाजीने आपल्या बहिणीचा नवरा हरजी महाडीक याची जिंजीच्या अधिकारावर नेमणूक केली परंतु व्यसनामध्ये संभाजी राजा हा आसक्त झाल्यामुळे आणि औरंगजेबाच्या खास हुकमतीखाली महाराष्ट्रावरील मोगलांचा दबाव वाढल्यामुळे दूरवर असलेल्या जिंजीच्या प्रांतावरील संभाजीची सत्ता कमी झाली व तेथील स्थानिक सुभेदार हा जवळजवळ सर्व सत्ताधीश झाला . हरजीने स्वतःला महाराजा ही पदवी धारण केली आणि जिंजी प्रांतामधून मिळणाऱ्या उत्पन्नाचा जादा विभाग त्याने रायगड येथील आपला सार्वभौम संभाजी यांच्याकडे पाठविण्याच्या कामी टंगळमंगळ करण्यास सुरुवात केली.

१६८६ च्या ऑक्टोबर महिन्यात संभाजीने १२ हजार घोडेस्वार देऊन केसो त्रिंबक पिंगळे याची वरील प्रदेशात रवानगी केली . वरवर त्याचा उद्देश कर्नाटक येथील शिबंदी मजबूत करण्याचा होता . परंतु गुप्तपणे त्याने केसो त्रिंबक याला बंडखोर हरजी महाडीक याला कैद करून बडतर्फ करण्याची आणि स्वतःच्या (संभाजीच्या) नावे जिंजीचे सरकार आपल्या ताब्यात घेण्याची आज्ञा दिलेली होती . (पाहा, **ऑर्मस् फ्रॅग.**, १५५) ११ फेब्रुवारी १६८७ रोजी केसो त्रिंबक हा जिंजीजवळ येऊन पोहोचला . परंतु त्याच्या मनातील आकांक्षा धुळीला मिळणार अशी स्पष्ट चिन्हे दिसत होती . कारण हरजीने जिंजीचा किल्ला संपूर्णपणे आपल्या ताब्यात घेतला होता आणि स्थानिक सैन्याची निष्ठा पूर्णपणे आपल्याकडे वळवून घेतली होती. आपला डाव हुकला आहे याची केसो त्रिंबक याला जाणीव झाली आणि त्याने जवळजवळ १८००० फौज घेऊन म्हैसूरमध्ये प्रवेश केला . परंतु येथेही त्याच्या हातून विशेष कामगिरी पार पडली नाही , आणि काही काळानंतरच तो जिंजीच्या जवळपास परतला.

(११) इ. स. १६८७ या वर्षी मोगल फौजांनी पूर्व कर्नाटकात जो प्रवेश केला त्याची हकीकत

गोवळकोंड्याचे राज्य जिंकल्यानंतर औरंगजेबाने शहाणपणाने कुतुबशाही राजवटीतील जुने अधिकारी त्यांच्या पूर्वीच्याच जागी काही काळपर्यंत अधिकारावर ठेवले . गोवळकोंड्याचा त्याला येऊन मिळाल्यापैकी ज्येष्ठ अमीर महमद इब्राहीम हा होता . औरंगजेबाने त्याला महाबतखान ही पदवी दिली , आणि त्याची हैद्राबादच्या सुभेदारीवर नेमणूक केली . महाबतखानाच्या अतिशय विश्वासातला अधिकारी महमद अलीबेग हा होता . त्याला औरंगजेबाने अली अस्करखान ही पदवी दिली , आणि त्याची नेमणूक कुतुबशाही कर्नाटकाचा फौजदार म्हणून केली . त्याच्या हाताखाली औरंगजेबाने चिंगलपेठ , कांजीवरम्, आणि पुनमाळी या ठिकाणी किल्लेदार आणि न्यायाधीश यांच्या नेमणुका केल्या . वरील अधिकाऱ्यांनी अतिशय नम्रतेचे धोरण स्वीकारून औरंगजेबाचे ठिकाणी सार्वभौम म्हणून आपली निष्ठा व्यक्त केली .

(ऑक्टोबर १६८७) (**ऑर्मस् फ्रॅग.,** १५७) परंतु औरंगजेबाने यानंतर थोड्याच कालावधीत आपला निर्णय बदलला. त्याने हैद्राबादच्या सुभेदारीवर महाबतखानाचे ऐवजी रुहुल्लाखान याची नेमणूक केली . अली अस्कर याच्या जागेवर त्याने कासीमखानाला नेमले . त्याला त्याने कर्नाटकच्या दिशेने चाल करून जाण्याचा हुकूम दिला , आणि तेथे असलेल्या मराठ्यांच्या फौजेविरुद्ध जोरदार कारवाई करण्यास सांगितले. (जानेवारी १६८८) (**मद्रास डायरी,** २२ नोव्हें.)

१६८८ मधील अनिर्णायक युद्ध : दोन्ही पक्षांनी केलेली देशाची लुटालूट

या सुमारास हरजी महाडीक याने आपल्या फौजेची रवानगी पालार नदीच्या उत्तरेस असलेल्या जुन्या गोवळकोंडा राज्यातील मुलूख लुटण्यासाठी आणि जिंकून घेण्यासाठी केली . या प्रदेशावर नुकतेच मोगलांचे अधिराज्य स्थापन झालेले होते. परंतु या मुलुखात अद्यापि पाहिजे तितक्या प्रमाणात मोगल सैन्य आलेले नव्हते. हरजी महाडीक याने वरील प्रदेशावर २००० घोडेस्वार , ५००० पायदळ आणि किल्ल्याच्या भिंती चढून जाण्यात पटाईत असलेले अनेक सैनिक व दोराच्या शिड्या यांसह चाल केली . या प्रदेशातील अनेक किल्ले आणि जवळजवळ शंभर गावे यांचा त्याने फारसा त्रास न पडता ताबा घेतला. २४ डिसेंबर रोजी अर्काटवर हल्ला करून मराठ्यांनी ते जिंकून घेतले . मराठे साऱ्या मुलूखभर पसरले. स्त्री किंवा पुरुष अथवा जातपात याची पर्वा न करता त्यांनी सर्वत्र लुटालूट आणि अत्याचार यांचा कहर केला . मराठ्यांच्या हल्ल्यापासून आपले जीवित आणि मालमत्ता सुरक्षित राहावी म्हणून कांजीवरम् येथील अनेक मोठमोठ्या ब्राह्मणांनी आपली बायकामुले यांच्यासह मद्रास येथे आसरा घेतला . (२७ डिसेंबर १६८७ ते १० जानेवारी १६८८). ११ जानेवारी रोजी मराठे अचानक कांजीवरममध्ये घुसले . त्यांनी शहरात लुटालूट केली , ५०० लोकांना ठार मारले, अनेक घरे उद्ध्वस्त केली, आणि भीतीने ग्रस्त झालेल्या नागरिकांना शहरातून पळून जाण्यास भाग पाडले . केसो त्रिंबक याने देखील आपल्या हाताखालील फौजेसह हरजीने स्वीकारलेल्या वरील फायदेशीर मार्गाचे अनुकरण केले . चितपाट आणि कावेरीपाक ही दोन शहरे जिंकून घेतल्यानंतर त्याने कांजीवरम् येथे आपली छावणी दिली. (जानेवारी १६८८) (**मद्रास डायरी**)

परंतु मराठ्यांनी कांजीवरम्चा घेतलेला ताबा हा अल्प काळापुरताचा ठरला . औरंगजेबाने पूर्वी गोवळकोंड्याच्या चाकरीत असलेल्या आपल्या चार सुप्रसिद्ध सेनानींना कर्नाटकच्या मैदानात ताबडतोब चाल करून जाण्याची आणि बादशाही पाठिराख्यांना मदत करण्याची आज्ञा दिली . हे चार सेनापती म्हणजे इस्माईलखान मखा, यच्चप्पा नायक, रुस्तुमखान आणि महमद सादिक हे होते. २५ फेब्रुवारी १६८८ रोजी हे अधिकारी कांजीवरम् येथे येऊन पोहोचले . (**मद्रास डायरी ; जे. श.**). मराठ्यांनी ते शहर खाली केले . मोगलांच्या आघाडीवरील सैन्याने त्यांचा पाठलाग केला आणि त्यांच्याबरोबर युद्ध केले . त्याचप्रमाणे त्यांनी वॉन्दिवॉश हे शहर आपल्या ताब्यात घेतले व तेथे आपली छावणी दिली ; तर इकडे मराठ्यांनी तेथून दक्षिणेकडे एक दिवसाच्या टप्प्यावर असलेल्या चितराट येथे आपला तळ दिला . दोन्ही बाजूंची मुख्य सैन्ये जवळजवळ एक वर्षभर परस्परावर नजर ठेवीत , याच परिस्थितीत समोरासमोर ठाण देऊन होती. दररोज त्यांच्या छावणीतून सैन्याच्या तुकड्या आणि रसद आणण्यासाठी सैनिकांची टोळकी बाहेर पाठविली जात . हे सैनिक कसलाही सारासार विचार न करता आजूबाजूच्या प्रदेशात लुटालूट करीत . इ. स. १६८६ मध्ये या प्रदेशात भयानक दुष्काळ पडला होता. त्या दुष्काळाच्या परिणामातून अजूनही तेथील प्रजाजन सावरले नव्हते. (**मद्रास डायरी ,** १९ ऑगस्ट , १६८६). त्यांच्यावर आता एकाऐवजी दोन दरोडेखोरांना तोंड देण्याची पाळी आली. परिणामी त्या जिल्ह्यातील व्यापाराचा नाश झाला , उधोगधंदे नष्ट झाले, धान्य आणि भुईमूग, करडई, मोहरी वगैरेंचा भयानक तुटवडा पडला . लोकांनी शेकडोंच्या संख्येने किनाऱ्यावरील

बंदिस्त युरोपियन वसाहतीचा एकमेव आधार म्हणून आसरा घेतला . [या वेळी जो गोंधळ उडाला होता त्याचा फायदा घेऊन मराठ्यांपासून कुडालोर हिसकावून घेण्याचा बेत वाली कुंडापुरमचा पूर्वीचा विजापुरी सुभेदार इब्राहीमखान लोदी याने केला . परंतु यातून काहीही निष्पन्न झाले नाही. हरजी महाडीक याने गोवळकोंड्याच्या सरहद्दी नजिकच्या प्रदेशावर हल्ला करण्यासाठी मोठी फौज देऊन रामजी कृष्ण याची रवानगी केली. परंतु त्याने तिकडे न जाता पाँदेचरी नजिकचा मुलूख लुटला आणि थोड्याच काळात २० हजार होन जमा केले . १६८८ मध्ये औरंगजेबाने हैद्राबाद कर्नाटकाच्या सुभेदारीत वारंवार बदल केले . प्रथम त्याने येत्तमतराव तिमप्पा याला कायम केले . परंतु नंतर एप्रिलमध्ये त्याने त्याला काढून त्याचे जागी जाननिस्सारखान यांची नेमणूक केली . ऑक्टोबरमध्ये सुभेदारीवर त्याने अस्कर अली याची नेमणूक केली . जानेवारी १६८९ मध्ये तो आपल्या अधिकारावर आला . तोपर्यंत सुभेदारीचे काम महमद सादिक याने पाहिले . (**मद्रास डायरी,** २५ ऑक्टोबर १६८८ , १ मे १६९०)]

१६८९ पर्यंत चाललेला कर्नाटकातील गोंधळ व अशांतता

१६८९ हे वर्ष देखील कर्नाटक प्रांताला पूर्वीच्या वर्षाइतकेच वाईट गेले . रस्त्यावरून रहदारीला धोका होता . मोगल आणि मराठे यांची सैन्ये दररोज आसमंतात लुटालूट करीत . कर्नाटकात निर्माण होणारा कापूस आणि इतर वस्तू , त्या प्रदेशात वारंवार चाललेली युद्धे आणि चोऱ्यामाऱ्या यांमुळे कुनीमेडू येथील इंग्लिश वखारीत निर्यातीकरता आणणे अशक्य झाले . १९ सप्टेंबर रोजी हरजी मरण पावला . त्याची बायको अंबिकाबाई (शिवाजीची मुलगी) हिने आपल्या अज्ञान मुलाच्यावतीने किल्ला आणि आजूबाजूचा प्रांत यांचा कारभार चालू ठेवला.

(१२) जिंजी येथे राजाराम

१ नोव्हेंबर १६८९ रोजी राजारामाच्या जिंजी येथील आगमनानंतर कर्नाटकप्रांतात अतिशय शांततापूर्ण असे स्थित्यंतर झाले . हरजीची विधवा स्त्री आणि तिचे ब्राह्मण सल्लागार यांनी ८ वर्षेपर्यंत जे अधिकार दडपून आपल्याकडे घेतले होते आणि स्थानिक बाबतीत ज्या स्वातंत्र्याचा उपभोग घेतला होता ते सोडून द्यावयाला त्यांच्या मनाची तयारी नव्हती . (**मेमॉयर्स ऑफ एफ् . मार्टिन**) परंतु राजारामाचे जे हक्क होते ते वादातीत आहेत याबद्दल शंकेला तिळमात्र जागा नव्हती . साहजिकच जिंजीचा कारभार त्याच्या हाती गेला. हरजीच्या मुलाला कैदेत टाकण्यात आले . त्याचप्रमाणे हरजीच्या विधवा स्त्रीकडून हरजीने इतकी वर्षेपर्यंत प्रांताचा जो कारभार केला त्याचे सर्व हिशेब सादर करण्याची मागणी करण्यात आली व तिला द्रव्य देणे भाग पाडण्यात आले. ३ लक्ष होन एवढी रक्कम देऊन तिला आणि संताजी भोसले याला एक लक्ष होन एवढी रक्कम देऊन तह करावा लागला . (**मद्रास डायरी,** ६ डिसेंबर, १६८९) राजारामाचा सर्वोच्च प्रतिनिधी प्रल्हाद निराजी याच्यासाठी प्रतिनिधीची नवीन जागा तयार करण्यात आली , तर निळो मोरेश्वर पिंगळे याला **पेशवा** अथवा **पंतप्रधान** या अधिकारावर चालू ठेवण्यात आले . "राजप्रतिनिधी प्रल्हाद निराजी याने राजारामाला विषयासक्तीच्या खाईंत लोटून दिले (**मार्टिन**) आणि गांजा आणि अफू ही सातत्याने त्याला चारून त्याला एक प्रकरच्या धुंदीत ठेवले . (**विल्क्स्,** भाग १ , १३३) यानंतर त्याने सर्वोत्तम सत्ता आपल्या हाती घेतली व हरजीच्या कारकिर्दीत ज्या ब्राह्मणांनी आपली तुंबडी भरली होती त्यांना जप्तीची भिती घालून त्यांच्याकडून पैसा आणि मालमत्ता ही बाहेर काढली."

जिंजी येथील मराठा सरकारचे लुटमारीचे धोरण : युरोपियन व्यापाऱ्यांबरोबरील त्यांचे संबंध

परंतु कर्नाटक प्रांतातील पूर्वीच्या अधिकाऱ्यांकडून अशा तऱ्हेने पैशाचा अपहार केल्यानंतरही मराठ्यांच्या राज्यकारभारात जे अर्थिक संकट निर्माण झाले होते त्यामुळे जमा आणि खर्च यामधील वाढत जाणारी फारकत भरून निघाली नाही . जिंजी येथे असलेल्या अधिकाऱ्यांनी पूर्व किनाऱ्यावरील युरोपियन

वसाहतीतून पैसा उभा करण्याचे प्रयत्न चालविले . तेथे असलेल्या श्रीमंत व्यापाऱ्यांना ५००० किंवा १००० होन एवढी रक्कम देखील कर्जाऊ देण्याची गळ घालण्यात आली . राजारामाचे आगमन झाल्यानंतर फ्रेंच आणि डच वखारवाल्यांनी मराठा अधिकाऱ्यात परस्परांविरुद्ध कारस्थाने करण्याचे काम चालू ठेवले . अशा कारस्थानात पॉन्दिचरी येथे नव्याने स्थापन झालेल्या फ्रेंच वखारवाल्यांना हुसकावून लावण्यासाठी हुकूम काढण्याबद्दल डच लोकांना मोठी लाच देऊ करावी असे अनेक प्रकार घडून येऊ लागले . जिंजी येथील मंत्र्यांनी अशा तऱ्हेच्या गोष्टींना उत्तेजन दिले. डच अगर फ्रेंच यांच्याकडून जास्तीतजास्त पैसा कसा काढता येईल एवढ्या एकाच गोष्टीचा त्यांनी विचार केला . [जिंजी येथील मराठा सरकार आणि युरोपियन व्यापारी यांच्यामधील संबंधाची हकीकत पुढे दिली आहे : डिसेंबरच्या सुरुवातीला जिंजीच्या सुभेदाराने कुर्नामेडू येथील इंग्रज वखारदाराकडून ३००० होनांची मागणी केली. तशीच मागणी डच आणि फ्रेंच वखारदारांकडून करण्यात आली . यानंतर युरोपियन कंपन्यांना वखारीभोवती तटबंदी केल्याबद्दल ५००० होन दंड करण्यात आल्याचे सांगण्यात आले . आपण आपला सर्व पैसा राजारामाला दिला असल्याने आणि आमच्या जहागिरी टिकविण्याची आम्हाला जरुरी असल्यामुळे आम्ही पैसे मागत आहोत असे मराठ्यांचे अधिकारी सांगत . (**मद्रास डायरी,** ४ जानेवारी १६९०) यानंतर मद्रासच्या गव्हर्नरकडे मराठ्यांनी दारूगोळ्यांची मागणी केली . मोगलांना न दुखावण्याच्या हेतूने इंग्रजांनी ती अमान्य केली . १४ मार्च रोजी पुन्हा राजारामाने किनारपट्टीला भेट दिली. या भेटीनिमित्त पुन्हा एकदा मराठ्यांनी पैशाची वसुली केली यानंतर मराठ्यांनी तेवेन पट्टमचा किल्ला विकावयास काढला . फ्रेंच आणि इंग्रज या दोघांनीही आपापले भाव सांगितले . अखेर इंग्रजांनी तो किल्ला १ ,०८,१५० रुपयांत विकत घेतला . किल्ल्याभोवतालची बंदुकीच्या एका गोळीच्या फेरीइतकी जमीन इंग्रजांना मिळावयाची होती . मराठ्यांना फसविण्याकरिता इंग्रज गव्हर्नरने मद्रासकडून त्यांच्या उत्तम तोफा येईतोपर्यंत किल्ल्याचा ताबा न घेण्याचे ठरविले . परंतु मराठ्यांनी इंग्रजांवर मात केली आणि पुढे किल्ला देण्याचे नाकारले . कंपनीच्या अध्यक्षाने यावर चिडून उद्‌गार काढले की मराठ्यांना लाच दिल्यास एका किंवा अनेक माणसांनाही ते दहा वेळा किल्ला विकतील . (**मद्रास डायरी,** २१ जुलै). पुढे जेव्हा मराठ्यांनी किल्ला इंग्रजांच्या स्वाधीन केला तेव्हा ठरलेल्या अटींप्रमाणे एक खेडे इंग्रजांकडे जावयाचे होते परंतु डचांनी त्यावर हक्क सांगितला, आणि इंग्रजांकडून अधिक पैसे लाटण्यासाठी मराठ्यांनी डचांच्या मागणीला पाठिंबा दिला.

डचांनी पाँदिचेरी येथील फ्रेंच वसाहत उठविण्यासाठी राजारामाच्या दरबारात खूप प्रयत्न केले . मोगल आणि मराठे यांच्या युद्धाचा संभव ओळखून पाँदिचेरीभोवती तटबंदी उभारण्याची परवानगी मार्टिन याने हरजी महाडीक राजे यांच्याकडून ९ जानेवारी १६८९ रोजी मिळविली होती.

राजाराम हा कर्नाटकात आल्यावर मार्टिन याने आपला प्रतिनिधी जर्मेन याला जिंजी येथे पाठविले . राजारामाने एका फर्मानातर्फे फ्रेंचांचे अधिकार कायम केले . राजाराम आल्यानंतर डच आणि फ्रेंच यांनी मराठा मंत्र्यांकडे परस्परांविरुद्ध आपली कारस्थाने सुरू केली . अधिक पैसा मिळविण्यासाठी मराठा मंत्र्यांनी या कारस्थानांना उत्तेजन दिले . सुरुवातीला (१६९०) डचांना अपयश आले . कारण फ्रेंचांनी राजारामाला १२६०० रुपये १८ टक्के व्याजाने देऊ केले . परंतु १६९३ मध्ये डचांनी फ्रेन्चांवर मात केली आणि राजारामाच्या परवानगीने पाँदिचेरीचा कबजा घेतला .]

१६९० मधील मोहीम :- १६९० च्या जानेवारी महिन्यात मोगलांच्या बाजूला तात्पुरता का होईना पण धक्का बसला याचे कारण नुकत्याच मोगलांच्या चाकरीत घेतलेल्या जुन्या हैद्राबादच्या स्थानिक अधिकाऱ्यांनी केलेले बंड हे होय. या बंडामध्ये महंमद सादिक, यचप्पा नायक आणि इस्माईल मखा हे अधिकारी सामील होते. बादशहाच्या पूर्वीच्या नोकरांना आपल्या जागी नेमण्यात येईल आणि आपल्यावर बेकार राहण्याची अथवा हलक्या दर्जाच्या अधिकारावर राहण्याची पाळी येईल या समजुतीने त्यांनी मोगलांची चाकरी सोडली. राजारामाबरोबर त्यांनी करार केला आणि आजुबाजूचा मुलूख बळकावून तेथून त्यांनी वसूल गोळा करण्यास सुरुवात केली. मद्रासापासून कुनीमेडूपर्यंतच्या बादशाही अधिकाऱ्यांवर त्यांनी निर्णायकपणे मात केली. त्यांचा त्यांनी पराभव केला व त्यांना किनाऱ्यावरील युरोपियन वसाहतीकडे पळून जाण्यास भाग पाडले. (एप्रिल) या बंडाचा बिमोड मोगल फौजेचा सरसेनापती म्हणून जुल्पीकारखानाचे ऑगस्टमध्ये कांजीवरम् येथे आणि सप्टेंबरच्या सुरुवातीला जिंजीच्या परिसरात मोगल सैन्याचा सरसेनापती म्हणून आगमन झाल्यानंतर झाला. (**दिल.,** भाग २, ९८ ब; **मद्रास डायरी,** १ आणि २२ सप्टेंबर १६९०)

आता मात्र लष्करी परिस्थितीत एकाएकी बदल झाला . मराठ्यांच्या लुटारू टोळ्यांना मोगल फौजांनी हाकलून लावले आणि खुद्द राजारामाच्या मुलुखावर स्वारी करण्याचा मोगल फौजांनी घाट घातला यामुळे भयभीत होऊन राजारामाने जिंजीचा त्याग केला आणि आपला मित्र तंजावरचा राजा याच्याजवळ दक्षिण कर्नाटकात त्याने अधिक सुरक्षित ठिकाणी आसरा घेतला . जिंजीपासून समुद्रापर्यंत पसरलेल्या देशाची दैन्यावस्था मात्र अजून संपली नाही . कारण दोन्ही पक्षातील अधिकारी आणि

बाजारबुणगे यांनी त्या प्रांतात लुटालूट करण्याचे काम चालूच ठेवले . त्या प्रदेशातील स्थानिक प्रजेने आसऱ्यासाठी आणखी दक्षिणेकडे तंजावरच्या मुलखात किंवा किनाऱ्यावर असलेल्या युरोपियन वखारीत आपल्या बायकामुलांसह पळून जाऊन आसरा घेतला.

(१३) जिंजीच्या वेढ्याची सुरुवात

जिंजी किल्ल्याचे वर्णन

जिंजीचा दुर्गम किल्ला हा एकंदरपणे राजगिरी , कृष्णगिरी आणि चंद्रयानदुर्ग या तीन मजबूत तटबंदीने वेष्टिलेल्या किल्ल्यांपासून बनलेला आहे . या तीन किल्ल्यांना जोडणारी एक मजबूत गोलाकार तटबंदी असून हे तीन किल्ले म्हणजे एक ओबडधोबड असा प्रचंड त्रिकोणच झाला आहे . हा त्रिकोण म्हणजेच जिंजीचा किल्ला . या किल्ल्याचा घेर जवळजवळ ३ मैल एवढा आहे . ज्या डोंगरावर हा किल्ला बांधलेला आहे ते डोंगर चढावयास कठीण, खडकाळ असे असून त्यांच्यावर जागोजाग इतक्या प्रचंड दरडी पसरलेल्या आहेत की डोंगर चढून जाणे म्हणजे जवळजवळ अशक्यप्राय आहे . वरील तिन्ही किल्ले एकावर एक अशा बांधलेल्या दगडी भिंतींच्या तटबंदीनी वेष्टिलेले असून त्यांवर जागोजाग बुरुज आहेत . तटबंदीमध्ये ठिकठिकाणी तोफांसाठी जंगी खिडक्या असून मध्येमध्ये बंदुकांतून मारा करण्यासाठी फटी आहेत. या भिंतींची एकसंधता काही ठिकाणी अतिशय अरुंद पण मजबूत असलेल्या अशा दरवाजांनी छेदलेली आहे. अशा तऱ्हेने संरक्षणाची अतिशय मजबूत व्यवस्था असलेल्या या किल्ल्यावरील हे दरवाजे जवळ जवळ ६० फूट रुंद असलेल्या आणि दगडांनी बांधलेल्या अशा तटांनी जोडलेले आहेत . या तटापलीकडे ८० फूट रुंद असलेला खंदक आहे. अशा ह्या तीन डोंगरांवर बालेकिल्ले बांधलेले आहेत.

किल्ल्याला एकंदर ३ दरवाजे आहेत . पहिला दरवाजा उत्तरेकडील भिंतीत असून त्याला आता वेल्लोर अथवा अर्काट दरवाजा असे म्हणतात . १७ व्या शतकात हा दरवाजा त्रिनोमालीकडील दरवाजा या नावाने ओळखला जाई . दुसरा दरवाजा पूर्वेच्या दिशेने आहे . त्याला हल्ली पॉन्दिचरी दरवाजा असे म्हणतात. १७ व्या शतकात किल्ल्यात प्रवेश करण्यासाठी हाच मुख्य दरवाजा होता. या दरवाजाच्या थोड्या पश्चिमेला चंद्रयान आणि राजगिरी यांना जोडणाऱ्या भिंती मागील बाजूकडील असलेला एक छोटासा दरवाजा आहे . याला हिंदुस्थानातील लोक सैतान दरी या नावाने ओळखतात . (पाहा **एस. अर्काट मॅन्युअल**)

जुल्पीकारखान हा १६९० वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीला जिंजी येथे येऊन पोहोचला . परंतु तो किल्ल्यासमोर नुसता तळ टाकून बसला . त्याच्याजवळ जी छोटी फौज होती त्या फौजेच्या मदतीच्या साहाय्याने ने किल्ल्यांमिळून एकसंघ झालेल्या जिंजीसारख्या प्रचंड किल्ल्याला वेढा घालणे केवळ अशक्यप्राय होते. त्यांच्याजवळ भारी तोफाही नव्हत्या आणि गोळ्यांचा भडिमार करता येईल एवढा दारुगोळाही नव्हता. त्याचप्रमाणे किल्ल्याची संपूर्ण नाकेबंदी करणे हे त्याच्या शक्तिपलीकडचे असल्यामुळे किल्ल्यामध्ये रसदीचा जो पुरवठा होत होता त्याला प्रतिबंध करणे त्याला शक्य झाले नाही . त्याचप्रमाणे मराठे आता त्यांना बसलेल्या पहिल्या आघातामुळे निर्माण झालेल्या गोंधळातून सावरले होते . त्यांनी जुल्पीकारखानाला अव्याहतपणे संत्रस्त करण्याचे काम सुरू केले . त्यानंतरच्या फेब्रुवारी महिन्यात राजाराम जिंजीला परतला.

एप्रिलनंतर मोगलांचे जे लष्करी वर्चस्व होते ते झपाट्याने कमी होत गेले , तर छावणीभोवती सतत गस्त घालणाऱ्या मराठ्यांच्या सैनिकी टोळ्यांच्या हालचालींनी त्यांच्या छावणीतील धान्यपुरवठा थांबला . [यावेळी त्याच्याबरोबर आलेले अनेक दक्षिणी **मनसबदार** त्याला सोडून शत्रूला जाऊन मिळाले . या सुमारास सय्यद लष्करखान हा छावणीत दाखल झाला. त्याने बादशहाकडून द्रव्य आणि कडप्पा जिल्ह्यातून धान्यसामुग्री आणली . यामुळे वेढा घालून बसलेल्या मोगल सैन्याला दिलासा मिळाला. जुल्पीकारखानाने बादशहाला पत्र लिहून कळविले की शत्रूने सर्व बाजूंनी त्याला वेढले आहे आणि त्याची रसद तोडली आहे . त्याने असेही कळविले की त्याला रसदीची आणि कुमकेची अतिशय तातडीची गरज आहे . (**दिल;** भाग २ , ९९ ब ; **एम्. ए.,** ३५२)] त्यामुळे जुल्पीकारखानाने आपल्याला ताबडतोब रसदीची पाठवणी करण्यात यावी असा निरोप रवाना केला . जुल्पीकारखानाला मदत करण्यासाठी त्याचा बाप वजीर असदखान याला आणि राजपुत्र कामबक्ष या दोघांना मोठ्या फौजेसहित वाकीनखेड्याहून जिंजीकडे रवाना करण्यात आले . (**एम्. ए.,** ३५५ , ३४४; **दिल.,** १०३ अ). ते १६ डिसेंबर १६९१ रोजी जिंजी येथे येऊन पोहोचले . [परंतु असदखानाने कोणतीही हालचाल न करता अनेक महिने फुकट घालविले . अनेक वेळा त्याने आपल्या मुलाच्या भेटीला जाण्याची इच्छा प्रकट केली होती . परंतु आता त्याचा मुलगा अडचणीत सापडला असताना त्याच्या मदतीला जाण्याचे तो नाव काढीत नव्हता . अनेकदा मराठ्यांच्या विरुद्ध लढताना अपयश आलेल्या सेनापतींची त्याने निर्भत्सना केली होती आणि अशी बढाई मारली होती की एकदा बादशहाने माझ्यावर कामगिरी सोपवावी म्हणजे त्याला खरा तुर्क काय असतो ते समजेल. असदखानाचे हे उद्गार बादशहाच्या कानावर पोहोचले होते . त्याची ह्यावेळची अस्वस्थता पाहिल्यावर बादशहा आपल्या ग्रंथपालाकडे पाहून उद्गारला , "आता त्याचा तुर्की बाणा संपला आहे " बादशहाचे हे उद्गार असदखानाला कळविण्यात आले . (**एम्. ए.,** ३५३, **रुक्कातमाधल** पत्र क्र. १५३)

बादशहाकडून अशा तऱ्हेचे बोचणी घेणारे पत्र आल्यावर असदखानाने कूच करण्यासाठी जारीने तयारी सुरू केली . ४ ऑक्टोबर रोजी राजपुत्र कडप्पा येथे पोहोचला आणि तेथून दोघांनी जिंजीकडे कूच केले. १६ डिसेंबर १६९१ रोजी ते दोघेजण जिंजी येथे पोहोचले. (**एम्.ए.,** ३५५, ३४४; **दिल,** १०३ अ—१०५ ब)]

वेढा देऊन बसलेल्या मोगल सैन्याची १६९१ मधील तंग परिस्थिती

दरम्यान जुल्पीकारखानाने जिंजीच्या आपल्या अपयशी हल्ल्याचे काम सोडले , आणि त्यापेक्षा अधिक फायदेशीर अशा दक्षिण कर्नाटक , तंजावर आणि त्रिचनापल्ली येथील जमीनदारांकडून खंडणी वसूल करण्याच्या कामाला तो लागला . अशा तऱ्हेने १६९१ हे वर्षे बादशाही फौजांना कोणताही निर्णायक विजय मिळाल्यावाचून गेले.

राजपुत्र आणि वजीर यांनी आणलेल्या मदतीमुळे जरी मोगलांच्या सामर्थ्यात प्रचंड भर पडली होती, तरीदेखील पुढील वर्षी कोणतेही घवघवीत यश मोगलांच्या पदरी पडले नाही . बादशहाच्या चाकरीमध्ये परत येण्याबद्दल इस्माईलखान मखा याचे मन वळविण्यात आले आणि तो आपल्या फौजेसह जुल्पीकारखानाच्या छावणीत येऊन दाखल झाला . त्याच्या फौजेतील या वाढीमुळे जुल्फीकारखानाने १६९२ मध्ये जिंजीच्या वेढ्याला पुन्हा सुरुवात केली . सुरुवातीला त्याने काही काळ आपले मोर्चे बदलले . परंतु नंतर त्याने चंद्रयान दूर्ग जिंकून घेण्याचे आपले उद्दिष्ट कायम केले आणि त्या दुर्गाच्या दिशेने त्याने मोर्चे बांधण्यास सुरुवात केली . या किल्ल्यावर व त्याचप्रमाणे पॉन्दिचेरी दरवाजावर त्याने आता भडिमार सुरू केला. परंतु त्याचे हे प्रयत्न म्हणजे निव्वळ एक देखावा होता , आणि त्याची जाणीव आजुबाजूच्या प्रदेशात पूर्णपणे होती. [असदखान आणि राजपुत्र यांची छावणी जुल्पीकारखानाच्या छावणीपासून ३ मैलांवर उत्तरदरवाजापलीकडे होती . इस्माईलखान आणि इतर स्थानिक अधिकारी यांची नियुक्ती किल्ल्याच्या वायव्येला असलेल्या एका ठाण्यावर करण्यात आली होती. प्रत्येक मोगल छावणीभोवती संरक्षणासाठी म्हणून एक भिंत उभारण्यात आली होती. सैतानदरी दरवाजाची नाकेबंदी करता आली नव्हती. त्यामुळे किल्ल्यामधील लोक आत बाहेर ये -जा करीत. काकरखानाच्या हाताखालील तुकडी वेतावलमच्या जंगलाच्या बाजूने रसद जाऊ नये यावर लक्ष ठेवी . परंतु या कामी त्याला यश आले नाही.

मराठ्यांनी कृष्णागिरीच्या बाजूने राजपुत्राच्या छावणीवर हल्ले चढविले . तेव्हा जुल्पीकारखानाने त्या बाजूला अधिक रक्षकांची योजना केली. एके रात्री ५००० मराठा फौजेने किल्ल्याबाहेर पडून मोगलांवर हल्ला केला . परंतु हा हल्ला मोगल सैन्याने एकत्रितपणे लढवून परतवून लावला. त्यामुळे जुल्पीकारखानाने राजपुत्राची छावणी नजीक आणली. यानंतर त्याने चंद्रायण दुर्गापर्यंत खंदक खणत नेले आणि त्या टेकडीवर व

पाँदिचेरी दरवाजावर तोफांचा भडिमार सुरू केला . (**दिल.,** १०५ ब –१०६ अ) परंतु जुल्पीकारखानाच्या या चढाईत काहीही दम नव्हता याची आजूबाजूच्या सर्वांना जाणीव होती.]

१६९२ मधील वेढ्याची हकीकत

इ. स. १६९२ साली पावसाळ्यात मोगल छावणीमध्ये असलेल्या परिस्थितीचे वर्णन छावणीत हजर असलेल्या एकाने पुढीलप्रमाणे दिले आहे : "मुसळधार पावसाच्या सरीवर सरी कोसळत होत्या . अन्नधान्य महागले होते. लागोपाठ अनेक रात्री आणि दिवस शिपायांना खंदकात घालवावे लागत असल्यामुळे त्यांना भयंकर यातना सहन कराव्या लागत होत्या . मोगल छावणीला एखाद्या प्रचंड तळ्याचे स्वरूप आले होते ." (**दिल.,** १०६ ब)

(१४) इ. स. १६९२ साली अलीमर्दानखान आणि इस्माईलखान यांना संता घोरपडे व धना जाधव पकडतात त्याची हकीकत

हिवाळ्यामध्ये मोगलांची परिस्थिती भयंकर शोचनीय झाली . डिसेंबरच्या सुरुवातीला राजारामाचा मुख्य प्रतिनिधी रामचंद्र याने पश्चिम हिंदुस्थानात उभारलेली तीस हजार किंवा अधिक असलेल्या घोडेस्वारांची एक तुकडी पूर्व कर्नाटकात धनासिंग जाधव आणि संता घोरपडे या सुप्रसिद्ध सेनापतींच्या हाताखाली येऊन दाखल झाली.

नव्याने येऊन दाखल झालेल्या या मराठा घोडदळाचा पहिला ओघ कांजीवरम् जिल्ह्यावर येऊन कोसळला. या दरोडेखोरांनी निर्माण केलेल्या दहशतीमुळे तेथील नागरिकांनी भयचकित होऊन मद्रासमध्ये दूरवर आसऱ्यासाठी पळ काढला . जेव्हा संताच्या हाताखालील तुकडी कावेरीपाक येथे येऊन पोहोचली तेव्हा कांजीवरम्चा मोगल फौजदार त्याला तोंड देण्यासाठी बाहेर पडला . मराठ्यांच्या सैन्याची संख्या केवढी प्रचंड होती याची कल्पना त्याला आली नाही. संताच्या फौजेने त्याच्या छोट्याशा सैन्याला चहूकडून वेढले, आणि खानाला १५०० घोडे आणि ६ हत्ती यांच्यासह काबीज केले . त्याच्या फौजेची सर्व मालमत्ता आणि सामुग्री लुटण्यात आली (१३ डिसेंबर). खानाला जिंजी येथे नेण्यात आले. तेथे एक लाख होन एवढी मोठी खंडणी भरून त्याने आपली सुटका करून घेतली . (**मद्रास डायरी,** १३, १७ आणि २३ डिसें . १६९२ आणि ४ ऑगस्ट १६९३; **दिल.,** १०८ ब; **जेधे श.**)

धना जाधव याच्या हाताखाली असलेल्या मराठ्यांच्या दुसऱ्या तुकडीने जिंजीभोवतालच्या वेढ्याच्या छावणीवर हल्ले केले . शत्रू संख्येने आपल्यापेक्षा अतिशय प्रबळ आहे याची जुल्पीकारखानाला जाणीव झाली आणि त्याने छावणीबाहेरील आपल्या ठाण्यांना मुख्य सैन्यास येऊन मिळण्याचा हुकूम केला . इस्माईलखानाची नियुक्ती किल्ल्याच्या पश्चिमेला झाली होती आणि त्यामुळे त्याला मोठे अंतर तोडून यावयाचे होते. किल्ल्यामध्ये मराठ्यांचे जे साथीदार होते त्यांच्या मदतीने मराठ्यांनी खानाला अडविले . आपल्यापेक्षा संख्येने १० पट अधिक असलेल्या शत्रूबरोबर खानाने शौर्याने झुंज दिली . परंतु खान जखमी झाला. ५०० घोडे आणि २ हत्ती यांसह त्याला कैद करण्यात आले . कैदी म्हणून त्याची रवानगी जिंजीकडे करण्यात आली. (**एम्, ए.,** ३५७; **दिल.,** १०७ अ ; **मद्रास डायरी,** ९ जाने . १६९३). विजयी मराठ्यांच्या सैन्याने ताबडतोब हैद्राबाद कर्नाटकवर आपली अधिसत्ता स्थापन झाल्याचे जाहीर केले.

(१५) राजपुत्र कामबक्ष याची मराठ्यांबरोबर कारस्थाने आणि त्याला झालेली अटक याची हकीकत

मराठ्यांनी आपल्या हालचालींना पुन्हा केलेली सुरुवात व आजूबाजूच्या प्रदेशात त्यांनी स्थापन केलेले आपले प्रभुत्व यामुळे मोगलांच्या छावणीत धान्याचा मुक्त आणि भरपूर पुरवठा होण्याचा थांबला . त्याचप्रमाणे बादशहाच्या दरबारातून येणाऱ्या पत्रांची आवकजावकही थांबली . जिंजीच्या बाहेर असलेल्या मोगल सैन्यावर आता वेढ्यात पडण्याची पाळी आली . त्यांच्या आपापसातील भांडणामुळे त्यांची परिस्थिती ही अधिकच धोकादायक झाली . राजपुत्र कामबक्ष हा एक मूर्ख तरुण मनुष्य होता . त्याची गणना बापाच्या म्हातारवयातील एखाद्या फुकट गेलेल्या मुलासारखी होती . आपल्या भावनांना लगाम घालण्याचे शिक्षण त्याला देण्यात आलेले नव्हते . त्याच्या डोक्यातील विचित्र कल्पना व त्याच्या सभोवतालच्या तरुण आणि कुचकामी खुशमस्कऱ्यांनी दिलेला सल्ला यामुळे त्याचे डोके सदा फिरून गेलेले असे . त्याचा हितकर्ता वयोवृद्ध आणि सरकार दरबारी मान्यता असलेला वजीर असदखान याला दुखविण्याची पाळी कामबक्षाने आणली. काही बेजबाबदार आणि माथेफिरू लोकांच्या मध्यस्थीने त्याने राजारामाबरोबर गुप्तपणे पत्रव्यवहार सुरु केला . मराठ्यांनी राजपुत्राच्या मूर्खपणाच्या वागणुकीला उत्तेजन दिले व कावेबाजपणे आणखी कुटिल कल्पनांच्या आहारी जाण्यास त्याला चिथावणी दिली . जुल्पीकारखानाला लवकरच राजपुत्राची गुपिते कळली आणि त्याने राजपुत्रावर अतिशय काळजीपूर्वक देखरेख ठेवण्यासाठी बादशहाची संमती मिळविली . १६९२ च्या डिसेंबरमध्ये संता आणि धना यांचे आगमन झाल्यामुळे काही आठवडे बादशहाचा दरबार आणि मोगलांची छावणी यांमधील दळणवळण पूर्णपणे थांबले.

परिणामी छावणीमध्ये घबराट पसरविणाऱ्या अफवांचा एकच सुळसुळाट झाला . कोणी अशी बातमी आणली की औरंगजेब हा मरण पावला असून त्याच्या जागी सिंहासनावर शहा आलम याची स्थापना झाली आहे. ह्या अफवा ऐकून आपली परिस्थिती अतिशय भयंकर झाली आहे अशी कामबक्ष याची समजूत झाली . असद आणि जुल्पीकार हे त्याचे शत्रू होते . साहजिकच नवीन बादशहाची मर्जी संपादन करण्यासाठी ते आपल्याला साखळदंडाने कैद करून शहा आलमकडे पाठवतील असे त्याला वाटले . यातून त्याला आशेचा एकच किरण दिसला आणि त्याबाबत त्याच्या सेवकांनी त्याला ग्वाही दिली . तो म्हणजे राजारामाबरोबर संधी करणे , एखाद्या काळोख्या रात्री आपल्या मुलाबाळांसहित किल्ल्यावर पळून जाणे आणि नंतर मराठ्यांच्या मदतीने दिल्लीचे सिंहासन जिंकून घेण्याचा प्रयत्न करणे हा होय.

जुल्पीकारखान वेढ्याचे मोर्चापासून माघार घेतो

असदखानाच्या हेरांनी कामबक्षाच्या कारस्थानाची सविस्तर बातमी त्याला दिली . त्यावर असदखान आणि जुल्पीकारखान यानी बादशाही फौजेनील प्रमुख अधिकाऱ्यांबरोबर या प्रश्नाबाबत चर्चा केली. त्यांनी एकमताने असा सल्ला दिला की राजपुत्रावर सक्त नजर ठेवण्यात यावी , मोगल सैन्याने मोर्चे सोडून द्यावे आणि सर्व सैन्य पिछाडीच्या बाजूला एकत्रित करावे.

वेढा घातलेल्या मोर्च्यापासून माघार घेताना मोगल सैन्याला भयंकर युद्धाला तोंड द्यावे लागले . जुल्पीकारखानाने आपल्या मोठ्या तोफा प्रचंड दारुगोळा ठासून उडवून दिल्या (**मद्रास डायरी ,** ३० जानेवारी १६९३) आणि होत्या त्याच ठिकाणावर त्याने त्या सोडल्या . मुख्य छावणी ही त्याच्या तळापासून पाठीमागे ४ मैल अंतरावर होती . किल्ल्यावरील शिबंदीने मोगल सैन्यावर छापा घातला आणि धना जाधव याच्या हाताखाली असलेल्या देशबांधवांना ते जाऊन मिळाले . त्यांनी सर्व बाजूंनी मोगल सैन्याची गळचेपी केली. बादशाही सैन्याने ४०० स्वार , ४०० घोडे आणि ८ हत्ती गमावले . दिवस संपता संपता ते

असदखानाच्या छावणीपाशी येऊन पोहोचले. (**एम्. ए.,** ३५८; **दिल.,** १०७ ब)

या ठिकाणी असदखान आणि जुल्पीकारखान आपल्याला भेटावयाला येतील तेव्हा त्यांना पकडण्याचा आणि साऱ्या सत्तेची सूत्रे आपल्या हाती घेण्याचा बेत राजपुत्राने आपल्या मूर्ख सहकाऱ्यांच्या बरोबर आखला होता, परंतु हा कट इतर कटांसारखाच बाहेर फुटला होता. दिवसभराच्या लढण्याने आणि काळज्यांमुळे संत्रस्त झालेला जुल्पीकारखान हा रात्रीच्या वेळी आपल्या बापाच्या छावणीपाशी येऊन पोहोचला. तेथे त्याला या नवीन कटाची बातमी लागली . त्याबरोबर त्या दोघांनी अतिशय जलदपणे असा निर्णय घेतला की साऱ्या फौजेची सुरक्षितता आणि त्याचप्रमाणे बादशहाच्या नावाचा दबदबा राखावयाचा असेल तर राजपुत्राला अशा तऱ्हेच्या गोष्टी करता येणार नाहीत अशी काही तरी व्यवस्था केली पाहिजे - म्हणजे त्याला कैद केले पाहिजे . हा निर्णय घेतल्याबरोबर त्या दोघांनी कामबक्षाला कैद करण्यासाठी त्याच्या छावणीकडे कूच केले.

कामबक्षाला कैद केले जाते

वजीर असदखान याच्या अंगाची संतापाने लाहीलाही झालेली होती . त्याने राजपुत्राची कडक शब्दांत निर्भर्त्सना केली . "तू नाचणारणीचा मुलगा आहेस , माणसांवर राज्य करण्यास अथवा लढाईमध्ये नेतृत्व करण्यास तू नालायक आहेस ," असे राजपुत्राला बोलून तो पुढे म्हणाला , "तू हे जे काही केले आहेस त्याचा अर्थ तरी काय आहे ? तू स्वतःची नामुष्की करून घेतलेली आहेस , इतकेच नव्हे तर माझ्या पांढऱ्या केसालाही काळिमा आणलेला आहेस ." राजपुत्राला कैद करून असदखानाच्या तंबूकडे नेण्यात आले. तेथे त्याला अतिशय सन्मानाने वागवण्यात आले . (**दिल.,** १०८ अ) अशा तऱ्हेने अधिकाराच्या एकसूत्रिपणाची अंमलबजावणी करण्यात आल्यामुळे मोगल सैन्याची विनाशापासून मुक्तता झाली.

या सुमारास अली मर्दानखानावरील आपल्या दुर्दम्य विजयामुळे आणि कांजीवरम् जिल्ह्यात निर्वेधपणे लूट करण्यास मिळाल्यामुळे विजयोन्मादाने उत्साहीत झालेला संताजी घोरपडे हा आता जिंजी येथे येऊन पोहोचला . त्याने आपली सर्व बुद्धिमत्ता आणि सामर्थ्य जुल्पीकारखानाविरुद्ध पणास लावले . दररोज दोन्ही पक्षात युद्धाला तोंड लागले . शत्रूजवळ २० हजारांपेक्षा अधिक सैनिक होते तर बादशाही सैन्य संख्येने अतिशय लहान असून त्यांपैकी बरेचसे सैन्य राजपुत्र आणि छावणी यांच्या बंदोबस्तात गुंतलेले होते. कामबक्षाची फौजही नाराज होती आणि छावणीचे रक्षण करण्यासाठी देखील ते आपल्या तंबूतून कधीही बाहेर पडत नसत . युद्धाचा सारा भार हा जुल्पीकारखानावर आणि इतर काही मनसबदारांवर पडला. त्यांच्यापाशी असलेल्या स्वारांची संख्या फक्त २ हजार होती . (**दिल.,** १०८ब; **एम्. ए.,** ३५८).

(१६) जुल्पीकारखानाच्या छावणीत पडलेला दुष्काळ आणि त्याने जिंजीहून वॉन्दिवॉशकडे घेतलेली माघार

जुल्पीकारखान वॉन्दिवॉशहून धान्य आणतो

मोगल सैन्याला आता जवळ जवळ पूर्णपणे वेढा पडला होता. दुष्काळ हा जणू काही त्यांचा भयंकर शत्रू बनला होता . काही दिवसातच टंचाईने इतके उग्र स्वरूप धारण केले की छावणीत धान्याची पूर्णपणे

वाण पडली . अशा परिस्थितीत जुल्पीकारखान हा स्वतः जिंजीच्या ईशान्येस २४ मैलांवर असलेल्या वॉन्दिवॉशहून धान्य आणण्यासाठी स्वतःच्या तुकडीला घेऊन छावणीच्या बाहेर पडला तो जेव्हा परत येण्यासाठी निघाला तेव्हा (५ जानेवारी १६९३) संताजीने तेथून १० मैलांवर दक्षिणेकडे असलेल्या देसूर या गावी २० हजार सैनिकांना बरोबर घेऊन त्याची वाट अडविली . त्याने जुल्पीकारखानाच्या सैन्याला वेढले. मोगलांनी मोठ्या शर्थीने झुंज दिली , आणि रात्री ते देसूर किल्ल्याच्या आश्रयाला येऊन पोहोचले . दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांनी जेव्हा परत कूच करण्यास सुरुवात केली तेव्हा मराठ्यांनी मोठ्या संख्येने रणांगणात सैन्य आणले , व मोगलांवर निकराचा हल्ला चढविला . परंतु दलपत बुंदेला याने जीवावर उदार होऊन मोठ्या शौर्याची लढत दिली. आणि मराठ्यांना माघार घेण्यास भाग पाडले. दलपत बुंदेला याने अशा तऱ्हेने जुल्पीकारच्या तुकडीला वाचविले, आणि परिणामी जिंजीसमोर असलेल्या मोगल छावणीची सुटका केली . (**दिल.,** १०९ ब) परंतु जुल्पीकारखानाने इतकी प्रचंड किंमत देऊन आणलेले धान्य हे मोठ्या संख्येने असलेल्या मोगल सैन्याला आणि छावणीतील बाजारबुणग्यांना एकदम कमी पडले . उपासमार होत असलेल्या बादशाही सैनिकांची परिस्थिती आणखीनच खालावली . "प्रत्येक दिवशी सकाळपासून संध्याकाळपर्यंत मराठे हे आमच्या छावणीभोवती जमत आणि आपल्या सामर्थ्याचे प्रदर्शन करीत . छावणीतील लहान मोठी सर्व मंडळी ही अतिशय संत्रस्त अवस्थेत आणि खिन्न मनस्थितीत होती."

असदखानाने अशा परिस्थितीत राजारामाबरोबर गुप्तपणे तहाची बोलणी सुरू केली आणि वॉन्दिवॉशपर्यंत सुरक्षितपणे आपल्याला माघार घेऊ दिल्यास लाच म्हणून भरपूर रक्कम राजारामाला देण्याचे त्याने कबूल केले . राजारामाने या गोष्टीला आपली अनुमती दिली . इकडे आपण माघार घेऊ नये असे राव दलपत जुल्पीकारखानाच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न करीत होता . आपण माघार घेतल्यास अखेर निष्कारण नामुष्कीची पाळी येईल असेही त्याने जुल्पीकारखानाला सांगितले . जुल्पीकार अशा तऱ्हेने द्विधा मनस्थितीत असताना माघार घेण्याचा निर्णय घेण्यावाचून त्याला दुसरा मार्ग उरला नाही . कारण त्याच्या तोफखान्यावरील सैनिकांनी आपापले सामानसुमान मालवाहू जनावरांवर लादले , छावणी सोडली आणि जुल्पीकारखानाला निरोप पाठविला की , आम्ही छावणीत भुकेने मरत असल्यामुळे वॉन्दिवॉशकडे निघून जात आहोत . जुल्पीकारखानापुढे राजपुत्राला घेऊन दुपारच्या वेळी छावणी सोडून जाण्यावाचून दुसरा पर्याय उरला नाही . बराच काळपर्यंत उपासमार झाल्यामुळे छावणीतील बहुतेक सर्व घोडी , उंट आणि इतर मालवाहू जनावरे ही मृत्युमुखी पडली होती . छावणीतील बहुतेकांनी आपापल्या सामानसुमानाला आगी लावून दिल्या . बादशहाचे आणि अमीरउमरावांचे बरेचसे सामानसुमान पाठीमागे टाकून देण्यात आले . जेव्हा मोगल फौजेने छावणीतून बाहेर कूच केले , तेव्हा त्याच्या पिछाडीवरील सैनिकांप्रमाणेच जणू काही १००० मराठे घोडेस्वार त्यांच्या पाठीशी लागले, आणि त्यांनी फौजेतील लोकांचे सामानसुमान लुटून फस्त केले . बरोबर ३ दिवसांनी म्हणजे २२ अथवा २३ जानेवारी १६९३ च्या सुमारास बादशाही फौज वॉन्दिवॉशला पोहोचली . १० दिवसानंतर अलीमर्दानखानाच्या ऐवजी कांजीवरम् येथे नव्याने नेमणूक झालेला फौजदार कासीमखान हा कडप्याहून भरपूर रसद व सुसज्ज सेना घेऊन येत आहे अशी बातमी आली. संता घोरपड्याने त्याला वाटेत अडविण्याचा प्रयत्न केला. त्याने कासीमवर हल्ला केला आणि त्याला असे काही पेचात पकडले की त्याने कांजीवरम् येथील देवळाच्या मोठ्या आवारात आपल्याला कोंडून घेतले. दुसऱ्या दिवशी जुल्पीकार त्याच्या मदतीला आला . त्याने मराठ्यांना हाकलून लावले आणि कासीमखानाबरोबर तो वॉन्दिवॉशला गेला . **कामबक्ष आणि असदखान यांना बादशहाने दिलेली वागणूक** :- (७ फेब्रुवारी) पुन्हा एकदा मोगल छावणीत अन्नधान्याची रेलचेल झाली . त्याचप्रमाणे शाही दरबारातून बादशहा अजून हयात असल्याची व त्याची तब्येत चांगली असल्याची बातम्या देणारी पत्रे ही छावणीत आल्याने मोगल सैनिकांना आणखी दिलासा मिळाल्यासारखे झाले . जुल्पीकारने जिंजीवर हल्ला करण्याचा

आपला बेत तात्पुरता सोडून दिला व ४ महिने (फेब्रुवारी-मे १६९३) आपला मुक्काम त्याने वॉन्दिवॉश येथे केला. कामबक्षाविषयी बादशहाकडून काय आज्ञा येतात याबद्दल वाट पाहात त्याला बसावे लागले . दरम्यान कामबक्षाला बरोबर घेऊन असदखान हा ११ जून रोजी गलगली येथे बादशाही छावणीत येऊन पोहोचला. कामबक्षाची बहीण जीनतउन्नीसा हिच्या मध्यस्थीने त्याची आणि बादशहाची भेट जनानखान्यात घडवून आणण्यात आली. [कामबक्ष याला कैद केल्यानंतर त्याच्या जीवनात झालेल्या घडामोडींची हकीकत पुढे दिली आहे : आपण जी कारवाई केली त्याचा बादशहावर काय परिणाम होणार याबद्दल असदखान आणि जुल्पीकारखान यांना अतिशय दहशत वाटली . बादशहा आपल्या सेनापतींवर भयंकर संतापल्याच्या वावड्या छावणीत पसरल्या. वांदिवॉश येथील छावणीत अशी बातमी पसरली की बादशहाने असदखानाला शिक्षा केल्यामुळे त्याने विष घेऊन आत्महत्या केली आहे.

औरंगजेबाने प्रथम असा हुकूम केला की असदखानाने राजपुत्राला आपल्या समक्ष घेऊन यावे . जिंजी येथे त्याचे जे सामान लुटले गेले आहे ते त्याला बदलून देण्याचा हुकूमही त्याने केला . जुल्पीकार आणि त्याचे अधिकारी यांच्याबद्दल मात्र त्याने कोणताही हुकूम त्यावेळी काढला नाही. (**दिल.,** १११ ब). याचवेळी जिंजी येथील फौजेच्या पिछाडीचे रक्षण व्हावे म्हणून त्याने राजपुत्र आजम याला कडप्पा येथे पाठविले . यानंतर कासीमखान हा वांदिवॉश येथे आला. त्यामुळे पूर्व कर्नाटकापासून ते बादशहाच्या छावणीपर्यंत मोगलांचे दळणवळण सुरक्षित झाले.

असदखान हा सागर येथे पोहोचल्यावर त्याला तेथेच थांबण्याचा आणि राजपुत्राला एकटाच गलगली येथे पाठविण्याचा हुकूम दिला . आपण त्याच्यावर नाराज झालेलो आहोत हे बादशहाने असदखानाच्या नजरेस आणून दिले . राजपुत्राची जी मालमत्ता लुटली गेली होती त्याबद्दल त्याने असदखानावर मोठी रक्कम कर म्हणून लादली . बऱ्याच दिवसांनी म्हणजे ८ जानेवारी १६८४ रोजी त्याने असदखानाला आपल्या भेटीला येण्याची परवानगी दिली. तो भेटीला आल्यानंतर मुल्तफतखानाच्या मध्यस्थीने बादशहाने त्याला क्षमा केली . कामबक्ष ११ जून रोजी गलगली येथे पोहोचला. तेथे त्याची बहीण जिनत उन्नीसा हिच्या मध्यस्थीने बादशहाने त्याची गाठ घेतली . (**एम्. ए.,** ३५९). या भेटीच्या वेळी त्याने बादशहाजवळ आपल्या वागणुकीचे समर्थन करण्याचा प्रयत्न केला . अर्थात बादशहाला मनुष्य -स्वभावाची पारख असल्यामुळे त्याने राजपुत्राच्या बोलण्यावर विश्वास ठेवला नाही . (**दिल.,** ११२ अ). कासीमखानाने आणलेल्या रसदीचा उपयोग जुल्पीकारखानाने मोगल सत्ता प्रस्थापित करण्याकडे केला. त्याच्या माघारीमुळे आजूबाजूच्या जमीनदारांनी बंड करून मोगलांची रसद लुटली होती . त्यांना शासन करून तो वांदिवॉश येथे परतला. (**दिल.,** १११ अ आणि ११२ ब)]

(१७) १६९३–१६९४ या कालावधीत कर्नाटकमधील हालचाली

मद्रासच्या अक्षांशापासून तो पोर्टोनोव्होपर्यंत पसरलेला पूर्व कर्नाटकचा प्रदेश हा त्यावेळी वेगवेगळ्या अधिकाऱ्यांच्या अधिपत्याखाली होता . त्यांची आपापसात वारंवार भांडणे होत . हे अधिकारी म्हणजे (१) तेथील स्थानिक हिंदू संस्थानिक आणि विजयनगरचे सुभेदार यांच्यातर्फे काम पाहणारे अधिकारी; विजापूर आणि गोवळकोंडा या राज्याच्या सुलतानांच्या विजयी सैन्याकडून या अधिकाऱ्यांचा पूर्णपणे बिमोड कधीच झालेला नव्हता . (२) मोगलांनी नुकत्याच जिंकलेल्या विजापूर आणि गोवळकोंडा या राज्यांचे अधिकारी ; मोगलांचे प्रभुत्व मान्य करणे यासारखी दुसरी घृणास्पद गोष्ट त्यांच्या दृष्टीने दुसरी कोणतीच नव्हती आणि (३) या मुलखात घुसलेले व शिवाजी आणि व्यंकोजी यांच्या घराण्यातर्फे हक्क सांगणारे मराठे ; यांपैकी पहिल्या अधिकाऱ्यांच्या वर्गात यच्चप्पा नायक हा मोडत होता . त्याच्या वाडवडिलांनी वेल्लोरच्या पश्चिमेस २६ मैलांवर असलेला सातगडचा किल्ला वरंगळचा राजा प्रतापरुद्र याच्याकडून मिळविला होता . (**दिल.,** ११६ अ) एके काळी या लोकांनी गोवळकोंड्याच्या शिबंदीचे अधिपत्य केले होते. जेव्हा राजाराम जिंजीला पोहोचला तेव्हा यच्चप्पा त्याला जाऊन मिळाला . मार्च १६९३ मध्ये त्याने राजारामाला सोडले , सातगडचा किल्ला पुन्हा जिंकून घेतला व पूर्वेकडे आपल्या राज्याची वाढ करण्यास सुरुवात केली. वर्ष संपता संपता जुल्पीकारखानाने त्याला आपल्या बाजूला वळवून घेतले , आणि बादशहाकडून त्याच्यासाठी ६ हजारांची **मनसब** मिळविली . (**दिल.,** ११२ ब ; **मद्रास डायरी ,** २० फेब्रु . १६९४)

गोवळकोंड्याचा भूतपूर्व सेनापती व तेथील स्थानिक जमीनदार इस्माईलखान मखा याने मोगलांना मनःपूर्वक साहाय्य केले . मार्च महिन्यात संताजी घोरपड्याने त्रिचनापल्लीला वेढा दिला . लवकरच तेथे

राजाराम स्वतः येऊन पोहोचला. तेथून तो आपला चुलतभाऊ आणि साहाय्यकर्ता तंजावरचा दुसरा शहाजी याच्या भेटीस गेला . (मे १६९३) परंतु या सुमारास मराठ्यांच्या अधिकारी वर्गात भांडणे निर्माण झाली . संताजीच्या तापट स्वभावाची झळ इतरांना सहन झाली नाही . परिणामी रागारागात तो महाराष्ट्राकडे निघून गेला. त्याच्या जागी धनाजीची सेनापतीपदावर नियुक्ती करण्यात आली. (**जेधे शका**.)

तंजावरच्या राजाविरुद्ध मोगलांचे विजय, १६९४

१६९४ च्या फेब्रुवारी महिन्यात जुल्पीकारने दक्षिण अर्काटचा जिल्हा जिंकून घेण्यासाठी कूच केले . त्याच्या वतीने दलपतरावाच्या बुंदेला शिपायांनी पॉन्दिचेरीच्या उत्तरेस १८ मैलांवर असलेल्या पेरूमुक्कल या किल्ल्यावर हल्ला केला (**दिल.,** भाग २ . ११२ ब) तेथून त्याने पॉन्दिचेरी आणि इतर युरोपीयन वखारीच्या मार्गे तंजावरच्या दिशेने पूर्व किनाऱ्यावरून कूच केले. दक्षिण अर्काट जिल्ह्यातील अनेक किल्ले त्याने जिंकून घेतले आणि फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीला कुडालोरला वळसा घालून तो पुढे गेला. जेव्हा १६९४ च्या मार्च महिन्यात मोगल सेनापती आपल्या सैन्यासहीत तंजावरनजिक येऊन पोहोचला तेव्हा प्रतिकार करून काहीही उपयोग होणार नाही याबद्दल महाराजा शहाजी याची खात्री पटली . कारण त्याचा शत्रू त्रिचनापल्लीचा नायक हा मोगलांना जाऊन मिळाला . साहजिकच शहाजीला शरण जाण्याशिवाय दुसरा मार्ग उरला नाही . २२ मे रोजी त्याने शरणागतीचे पत्र लिहून असे कळविले की यापुढे आपण एखाद्या निष्ठावान मांडलिकाप्रमाणे बादशहाच्या आज्ञाचे पालन करू, कोणत्याही प्रकारे राजारामाला मदत करणार नाही, मोगल सरकारला दर वर्षी ३० लक्ष रुपयांची खंडणी देऊ , व पालमकोटा, सितन्नुर आणि तुंगानुर हे किल्ले त्यांच्या आजूबाजूच्या मुलुखासह आणि त्याजबरोबर इतर काही ठिकाणे मोगलांच्या स्वाधीन करू.

परंतु राजारामाने पालमकोट्याचा किल्ला व्यंकाजीकडे गहाण ठेवला होता . तो राजारामाने स्वतःसाठी बळकावून घेतला . त्यामुळे जुल्पीकारला किल्ल्याला वेढा देणे भाग पडले . ६ दिवसानंतर किल्ल्याच्या शिबंदीने शरणागती दिली. त्यानंतर मोगल सैन्य वॉन्दिवॉश येथील आपल्या मुख्य छावणीकडे परतले. सप्टेंबर महिन्यात त्यांनी पुन्हा एकदा जिंजीवर हल्ला चढविला . याच महिन्यात जुल्पीकारने दरबारात एकाएकी यच्चप्पाला अटक केले , आणि त्याच्यावर विद्रोहाचा आरोप ठेवून त्याचा शिरच्छेद केला. (**दिल.** भाग २. ११६ अ)

(१८) जुल्पीकारखानाच्या इ. स. १६९५ मधील हालचाली आणि त्याच्या अडचणी

जुल्पीकारखानाने १६९४ हे वर्ष संपता संपता जिंजीचा वेढा पुन्हा सुरू केला . परंतु हा वेढा म्हणजे बादशहाच्या डोळ्यांत धूळ फेकण्यासाठी त्याने केलेला एक बनाव होता . जुल्पीकारखानाने बादशहाबरोबर विद्रोह करून मराठ्यांशी जे संगनमत केले होते , त्या गोष्टीला सर्वदूर कुप्रसिद्धी मिळालेली होती . जिंजीच्या वेढ्याच्या सुरुवातीला आणि विषेशतः वेढा संपताना त्याचे राजारामाबरोबर जे संगनमत झाले होते ते आता वृद्ध झालेला औरंगजेब मरण पावणार आणि त्याच्या पाठीमागून त्याच्या मुलांमध्ये यादवी युध्दे माजणार या अपेक्षेवर आधारलेले होते . "आपल्या स्वतःच्या फायद्यासाठी व सुखासाठी युद्धक्षेत्रातील आपल्या कारवाया जास्तीत जास्त लांबविण्याची सेनाधिकाऱ्यांची प्रथाच आहे . [ऑक्टोबर १६९४ मध्ये जुल्पीकारखानाने एकाएकी वांदिवॉशमधून कूच केले आणि जिंजीच्या पश्चिमेस ४२ मैलांवर असलेल्या चनगमान किल्ल्यापाशी मुक्काम केला . मराठे त्याच्या छावणीभोवती धिरट्या घालून दररोज छावणीत लुटालूट करीत होते . मोगल घोडेस्वार आजुबाजूच्या प्रदेशात लुटालूट करून तेथील लोकांना हैराण करीत होते . या सुमारास जुल्पीकार आणि त्याचे प्रमुख अधिकारी -दाऊदखान पन्नी, किशोरसिंग हाडा आणि दलपतराव बुंदेला यांच्यामध्ये मतभेद निर्माण झाले. लोकांमध्ये अशी बातमी पसरली होती की या अधिकाऱ्यांचा खानाला पकडून बादशहाकडे पाठविण्याचा बेत आहे . आणखी एक बातमी पसरली होती की खानाने राजारामाकडे १० उंटांवर लादून रुपये रवाना केले आहेत . त्याचप्रमाणे आणखीही एक बातमी होती

की मराठ्यांनी पाण्याच्या टाक्यांत विष कालवल्यामुळे खूप माणसे मृत्युमुखी पडलेली आहेत . (**मद्रास डायरी ,** १० नोव्हें . १६९४) यानंतर मराठ्यांपासून २, ३ किल्ले खानाने घेतले आणि बादशहाने पाठविलेली ३ लाखांची रक्कम घेऊन डिसेंबर १६९४ च्या अखेरीला त्याने साद्दमकडे कूच केले.] (**दिल.,** १२३ अ आणि १०६. अ; **मनूची**, भाग ३. २७१)

१६९५ साली मोगलांच्या हातून विशेष म्हणण्यासारखे असे काहीही घडले नाही . उलट वर्षभर त्यांच्या छावणीत धान्याचा जो तुटवडा पडला होता त्यामुळे त्यांच्या हालअपेष्टा अधिकच वाढल्या . आक्टोबर महिन्यात वेल्लोरला वेढा देण्यात आला . परंतु अनेक वर्षेपर्यंत हा वेढा चालू राहिला . (अखेर १४ ऑगस्ट १७०२ रोजी वेल्लोरचा पाडाव झाला.)

(१९) १६९६ या वर्षीच्या जुल्पीकारखानाच्या हालचाली

डिसेंबरच्या अखेरीला धना जाधव हा वेल्लोरनजीक आला तेव्हा जुल्पीकारने वेढा उठविला आणि आपले छावणीचे सामानसुमान व कबिला अर्काटकडे रवाना करून तो युद्धासाठी सज्ज झाला . मार्च १६९६ मध्ये संता घोरपडे हा देखील त्या ठिकाणी येऊन दाखल झाला . मराठा सैन्याच्या तुकड्या देशात सर्वदूर पसरल्या. बादशाही सैन्य संख्येने अतिशय कमकुवत झाले होते . साहजिकच इतक्या ठिकाणांचे संरक्षण करणे त्यांना जमेना . (**मद्रास डायरी ,** २० जाने . १६७६) तेव्हा जुल्पीकारने शहाणपणा करून आपल्या फौजा एकत्रित केल्या . परंतु १६९६ या वर्षभर द्रव्याच्या अभावी त्यांच्या हालचालींना पायबंद बसला . आपल्या दुर्बलतेची जाणीव असल्यामुळे त्याने अर्काटच्या किल्ल्यात बचावात्मक प्रतिकार करण्याचे धोरण स्वीकारण्याचे ठरविले. परस्परांनी एकमेकांच्या वाटेला जावयाचे नाही , अशा तऱ्हेचा गुप्त मनसुबा दोन्ही पक्षांत झालेला होता . त्यामुळे मराठे नेहमीच्या सवयीप्रमाणे जुल्पीकारखानाच्या छावणीभोवती घिरट्या घालीत राहिले . नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यात संताने मध्य म्हैसूरमध्ये प्रवेश केला . बादशहाच्या हुकमाप्रमाणे जुल्पीकार त्याच्या पाठलागावर तिकडे गेला . त्या ठिकाणी राजपुत्र बेदारबख्त याच्याबरोबर त्याने सहकार्य केले. तुंगभद्रेच्या पलीकडे मराठ्यांना हाकलून लावण्यासाठी वायव्येच्या दिशेने राजपुत्र त्या प्रांतात येऊन पोहोचला होता . या दोन्ही मोगल फौजांचा मिलाफ बंगलोरच्या उत्तरेस ७५ मैलांवर असलेल्या पेणुकोंडा येथे झाला. युद्धकलेत चपळ असलेल्या मराठ्यांनी मोगलांबरोबर उघडउघड सामना न देता तेथून काढता पाय घेतला . १६९७ च्या फेब्रुवारी महिन्यात जुल्पीकार अर्काट येथे परतला . (**दिल.,** १२१ ब; **मद्रास डायरी**, ३१ डिसेंबर, १६९६)

(२०) जिंजीच्या वेढ्याची पुन्हा सुरुवात आणि किल्ल्याचा पाडाव

यानंतर पुन्हा एकदा तंजावर आणि दक्षिणेकडील इतर ठिकाणे येथून खंडणी गोळा करण्यासाठी जुल्पीकारखानाने अर्काटहून कूच केले . इ. स. १६९७ च्या पावसाळ्यात छावणीसाठी म्हणून तो वॉन्दिवॉशला परतला. त्याच्या नशिबाने धना आणि संताजी यांच्यामध्ये जी कटुता आणि अखेरचे भांडण निर्माण झाले होते त्यामुळे मराठ्यांची बाजू अतिशय कमकुवत झालेली होती . राजारामाने या कलहात धनाजीची बाजू घेतली . परिणामी मराठ्यांमध्ये त्यांच्या आपापसातील विनाशाला कारण होणारे असे भयानक युद्ध जुंपले . अखेर धनाजीचा त्याच्या प्रतिस्पर्ध्याने पराजय केला , आणि महाराष्ट्रात त्याची हकालपट्टी केली. (मे १६९६) १६९७ वर्षाच्या नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीला जुल्पीकारने नव्या जोमाने जिंजीचा वेढा पुन्हा सुरू केला . [मराठ्यांमध्येही यावेळी फारशी एकी दिसून आली नाही . प्रत्येक जण स्वतःला सरदार म्हणवून घेऊ लागला आणि लुटालूट करण्यासाठी बाहेर पडू लागला. (**दिल.,** १२२ अ; **जेधे. श.**)

मोगलांप्रमाणेच राजारामाला देखील पैशांची गरज होती . ऑगस्टमध्ये त्याने आपला मुलगा कर्ण याला जुल्पीकारखानाकडे पाठविले

आणि काही अटींवर तह करण्याची आपली तयारी दाखविली . परंतु औरंगजेब आता हट्टास पेटला होता . त्याने वरील अटी झिडकारल्या आणि विलंब न लावता जिंजी काबीज करण्याची निर्णायक आज्ञा त्याने जुल्पीकारखानाला दिली . म्हणून खानाने ऑक्टोबर महिन्याच्या मध्यास कर्णाला राजारामाकडे रवाना केले.] (**दिल.,** १२२ ब; **जेधे शका., मद्रास डायरी,** २६ आक्टो.)

जुल्पीकारने स्वतः उत्तरेच्या बाजूला असलेल्या दरवाजाकडे आपला तळ दिला . रामसिंग हाडा याने सैतानदरीच्या विरुद्ध दिशेला आपले मोर्चे उभे केले , तर जिंजीच्या दक्षिणेला अर्ध्या मैलावर चिखलीदुर्गाच्या समोर दाऊदखान पन्नी याने आपली छावणी दिली. दाऊदखान पन्नी याने अतिशय जवळून बेगुमानपणे हल्ला चढवून एका दिवसात चिखलीदुर्ग जिंकून घेतला . नंतर तो खुद्द जिंजीला आला आणि दक्षिणेकडील चंद्रयान गडाच्या समोर त्याने आपले मोर्चे उभे केले . जर जुल्पीकारच्या मनात असते तर दुसऱ्या दिवशी त्याला सबंध किल्ला काबीज करता आला असता . परंतु त्याचे गुप्त धोरण आपली फौज एकत्रित ठेवण्यासाठी वेढ्याचे काम शक्य तितके लांबविणे , पगाराच्या रूपाने मिळणाऱ्या द्रव्याचा उपभोग घेणे, आणि दुसऱ्या एकाद्या मोहिमेवर जावे लागून त्यातून जे कष्ट भोगावे लागतील ते टाळणे हे होते . त्याने आपल्या वर्तनाने आपल्याकडून होत असलेले हल्ले हे केवळ बनावाच्या स्वरूपाचे आहेत याबद्दल मराठ्यांची खात्री करून दिली. याचा परिणाम असा झाला की वेढ्याचे काम आणखी दोन महिने रेंगाळले . (**विल्क्स,** भाग १. १३३).

राजारामाचे पलायन

अखेर परिस्थिती अशी निर्माण झाली की जुल्पीकारला बादशहाकडून अपमान होणे आणि शिक्षा होणे हे टाळावयाचे असल्यास किल्ला ताबडतोब जिंकून घेणे अत्यावश्यक झाले. त्याने राजारामाकडे वेळीच सूचना पाठविली आणि राजाराम आपल्या प्रमुख अधिकाऱ्यासह वेल्लोर येथे पळून गेला . परंतु त्याने आपली बायका-मुले जिंजी येथे ठेवली . त्यानंतर जुल्पीकारने किल्ल्यावर हल्ला करण्यासाठी हुकूम दिला . दलपतरावाने कृष्णगिरीच्या उत्तरेकडील तटावरून चढून जाण्यात यश मिळविले आणि घनघोर युद्धानंतर त्याने बाहेरचा किल्ला जिंकून घेतला. किल्ल्यावरील शिबंदी त्यामुळे काळाकोट या बालेकिल्ल्यात शिरली . त्याच गोंधळात त्यांच्याबरोबर दलपतराव बुंदेला याची माणसे शिरली आणि त्यांनी किल्ल्याचा ताबा घेतला. उरलेल्या मराठा सैनिकांनी राजगिरी या सर्वांत उंच किल्ल्याचा आसरा घेतला . दरम्यान दाऊदखानाने चंद्रयान दुर्गात प्रवेश मिळविला , आणि जिंजीचे आतल्या भागातील सपाट मैदान म्हणजेच खुद्द जिंजी शहरामधून कृष्णगिरीच्या दिशेने आगेकूच केले. तेथील रहिवासी कृष्णगिरीच्या शिखरावर गेले. परंतु तेथे सुरक्षितता न वाटल्यामुळे त्यांनी शरणागती दिली . बादशाही सैनिकांच्या हाती घोडे , उंट आणि इतर अनेक वस्तू लुटीच्या रूपाने पडल्या . (८ जानेवारी १६९८) राजारामाची बायका मुले असलेल्या राजगिरीला आता वेढा देण्यात आला. परंतु त्यांची परिस्थिती निराशाजनक होती. राजगिरीच्या पायथ्याशी असलेल्या एका खोल दरीला , लाकडाच्या शिड्या लावून , रामसिंग हाडा यांने पार केले आणि तो राजगिरीच्या शिखरावर जाऊन पोहोचला. राजारामाच्या कुटुंबियांना सुरक्षिततेचे अभिवचन देण्यात आले. त्याच्या ४ बायका, ३ मुलगे आणि २ मुली ही किल्ल्याबाहेर आली. त्यांना सन्मानपूर्वक बंदिवासात ठेवण्यात आले. राजारामाच्या दुसऱ्या एका पत्नीने बंदिवास टाळण्यासाठी आत्महत्या केली . खाली असलेल्या भयंकर खोल दरीत तिने किल्लयाच्या शिखरावरून उडी घेतली . किल्लयामध्ये जवळ जवळ ४००० पुरुष , बायका व मुले मोगलांच्या हाती पडली . परंतु फारच थोडे लढाऊ सैनिक त्यांच्या हाती मिळाले . (**दिल.,** १२४)

बादशहाकडून जुल्पीकारखानाला नुस्रतजंग ही पदवी मिळाली . जिंजीहून तो वॉन्दिवॉश येथील

आपल्या तळाकडे परतला. तेथून त्याने राजारामाचा वेल्लोरपासून गुरमकोंड्यापर्यंत पाठलाग केला . परंतु राजाराम हा बऱ्याच अगोदर तेथून निसटला असल्यामुळे फेब्रुवारी महिन्यात सुखरूपपणे विशाळगड येथे येऊन पोहोचला. अशा तऱ्हेने जिंजीला इतक्या काळपर्यंत बादशहाने वेढा घालून जे काही मिळविले होते ते सर्व पाण्यात गेले, कारण पिंजऱ्यातून पक्षी उडून गेला होता.

(२१) कासीमखानाचा संताजीकडून पराभव आणि इ. स. १६९५ मध्ये दोड्डेरी येथे मृत्यू

१६९५ च्या आक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्यात मराठ्यांच्या अधिकाऱ्यांनी नेहमीप्रमाणे दक्षिणेतील मोगलांच्या ताब्यातील अनेक भागांत आक्रमण केले होते. संताजी हा विजापूर जिल्ह्यात लुटालूट करण्यात गुंतला होता . नोव्हेंबरच्या सुरुवातीला हिम्मतखानाच्या हाताखालील एका मोगल तुकडीने कृष्णेच्या दक्षिणेकडे त्याचा निरर्थक पाठलाग केला . आपण लुटीमध्ये मिळवलेली प्रचंड संपत्ती वायव्य म्हैसूरमध्ये असलेल्या आपल्या जहागिरीच्या गावी ठेवावी या उद्देशाने संताजीने दक्षिणेकडे मोर्चा वळविला.

कासीमखानाची संताजीविरुद्ध चाल

त्यावेळी औरंगजेबाचा मुक्काम इस्लामपुरी येथे होता . त्याने हल्लेखोरांना अटकाव करण्याची कासीमखानाला आज्ञा दिली. त्याच्या मदतीसाठी त्याने आपल्या छावणीतून एक सैनिकांची तुकडी रवाना केली. या तुकडीबरोबर त्याने आपल्या हाताखालील उच्च पदस्थ तरुण अधिकाऱ्यांचा समावेश केला होता . या अधिकाऱ्यांमध्ये पुढील काळात दिवाणाचे पद मिळालेला खानाजादखान हा होता . जरी या तुकडीत फक्त ४८०० सैनिक होते तरी ही तुकडी अतिशय कुशल अशा निवडक सैनिकांची होती . त्यात बादशहाच्या रक्षक आणि खाजगी दलातील सैनिक व त्याचप्रमाणे आठवड्याच्या वेगवेगळ्या दिवशी बादशहाच्या छावणीभोवती पहारा देण्यासाठी नियुक्त केलेल्या उमरावांच्या तुकड्यांतील सैनिक होते . मराठे ज्या मार्गावरून जातील त्या अपेक्षिलेल्या मार्गापासून अंदाजे १२ मैलांवर ही तुकडी कासीमखानाला जाऊन मिळाली. काही अंतरावर संता हा घिरट्या घालीत होता . शत्रूच्या हालचाली आणि शत्रूने मांडलेले आपले ठाण याबद्दल जेव्हा त्याच्या कानावर आले तेव्हा झपाट्याने कूच करीत तो त्यांच्यानजीक येऊन पोहोचला . त्याने अतिशय कौशल्याने मोगलांच्या नाशाची एक योजना तयार केली . मोगल अधिकाऱ्यांची सुखासीनता आणि विचारहीनता यामुळे संताजीने रचलेल्या व्यूहाला कल्पनातीत यश मिळाले . दरबारातून आपल्या मदतीला जे भारीभारी अमीरउमराव येत होते त्यांचे स्वागत करण्यासाठी कासीमखानाने आदरातिथ्याची आणि पाहुणचाराची एकच धमाल केली , आणि मराठ्यांच्या बरोबर मोठ्या कौशल्याने युद्ध खेळण्यासाठी कोणत्याही सेनानीला लागणारे साधे आणि हलकेफुलके युद्धसाहित्य यांचा त्याने त्याग केला .

कासीमखानाचा पराभव :- आपल्या हाताखालील सैनिकांची मांडणी करण्यात व आपल्याजवळील ३ वेगळ्या आणि विखुरलेल्या तुकड्यांना विशिष्ट जागा घेण्यात संताजीने अलौकिक असे युद्धचातुर्य दाखविले. त्यामुळे त्याच्या हाताखालील तुकड्यांच्या हालचाली ठरलेल्या वेळाबरहुकूम आणि त्याने अपेक्षिलेल्या त्यांच्या आपापसातील सहकार्यानुसार झाल्या . त्याने आपल्या सैनिकांची विभागणी ३ तुकड्यांत केली. एका तुकडीला त्याने मोगल छावणी लुटण्यासाठी पाठविले , दुसरीची रवानगी त्याने शत्रूबरोबर लढण्यासाठी केली आणि तिसऱ्या तुकडीला जरूर त्यावेळी उपयोगात आणण्यासाठी म्हणून राखून ठेवले. याच वेळी चितळदुर्गचा जमीनदार बरमप्पा नायक हा मराठ्यांच्या हाती पडणाऱ्या लुटीत भाग मिळेल म्हणून मराठ्यांना येऊन मिळाला . परिणामी मोगलांची शत्रूने सर्व बाजूने कोंडी केली , आणि दळणवळणाची सर्व साधने शत्रूने तोडून टाकली. (**एम्. ए.,** ३७५; **दिल.,** ११७ ब)

अनुक्रमणिका

कासीमखानाचे दोड्डेरीकडे पलायन

सूर्योदयानंतर १॥ तासाने २० नोव्हेंबरच्या सुमाराला मराठ्यांची एक तुकडी कासीमखानाच्या आघाडीवरील तंबूवर तुटून पडली . हे तंबू मुख्य तळापासून ६ मैलांवर होते . त्यांनी रखवालदार आणि नोकरचाकर यांना ठार मारले आणि जखमी केले . त्यांना नेता येतील एवढ्या वस्तू त्यांनी बरोबर नेल्या व मोठमोठ्या तंबूंना आगी लावल्या . ही बातमी कासीमखानाला कळताच तो मराठ्यांनी हल्ला केलेल्या जागी ताबडतोब येण्यास निघाला . तो दोन मैल गेला नाही तोच शत्रूची दुसरी एक तुकडी आघाडीसमोर आली आणि युद्धाला सुरुवात झाली. शत्रूची संख्या मोगलांपेक्षा खूपच अधिक होती. त्यांच्या सैन्यांत कालापियादा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या बंदूकधारी शिपायांची एक तुकडी होती . अतिशय नेमबाज आणि शूर म्हणून त्यांची साऱ्या दक्षिणेत ख्याती होती . वरील तुकडीशिवाय मराठ्यांच्या सैन्यात मोठ्या संख्येने घोडदळाचा समावेश होता. हे घोडेस्वार अतिशय चपळ होते . दोन्ही पक्षांत घनघोर युद्ध झाले , व दोन्हीकडील अनेक सैनिक मारले गेले . त्या क्षणी संताने राखीव म्हणून ठेवलेली तुकडी मोगलांनी पाठीमागे ठेवलेल्या छावणीवर आणि सामानसुमानावर तुटून पडली , आणि त्यांनी सर्व काही लुटून नेले . लढाई ऐन रंगात असताना कासीम आणि खानाजाद यांच्या कानावर ही बातमी गेली , आणि ते दोघेजण हादरून गेले. त्यांनी परस्परांशी विचारविनिमय केला आणि दोड्डेरीच्या दिशेने दोघांनी माघार घेतली . (**दिल.,** ११८ अ) दोड्डेरी येथे किल्ला होता आणि किल्ल्यावरील धान्यपुरवठा मर्यादित होता . साहजिकच किल्ल्यामधील बादशाही शिबंदीने नव्याने येणाऱ्या मोगल सैनिकांना पाहून किल्ल्याचे दरवाजे बंद केले . दोन्ही खानांना किल्ल्याबाहेर छावणी करावी लागली . त्यातच रात्र दाटली , आणि शत्रूने त्यांना पूर्णपणे वेढले . ३ दिवसपर्यंत प्रत्यक्ष न लढता मराठे मोगल सैन्याच्या समीप येत . तोपर्यंत बरमप्पा नायकाने हजारोंच्या संख्येने पाठवलेले सैनिक मराठ्यांना येऊन मिळाले. त्यांनी या संधीचा फायदा घेतला आणि चौथ्या दिवशी मोगल छावणीवर हल्ला चढविला. बादशाही तोफखान्याचा दारुगोळा यापूर्वीच मराठ्यांनी त्यांच्या छावणीत लुटला होता, आणि सैनिकांनी आपल्याबरोबर जो दारुगोळा नेला होता तो आता संपून गेला होता . काही तासपर्यंत मोगलांनी आपल्या प्रयत्नांची शिकस्त केली परंतु त्यांचे प्रयत्न व्यर्थ गेले . अखेर निराशेने रणभूमीवर ते बसून राहिले . मराठ्यांच्या सैन्यातील कॅनरीज बंदूकधाऱ्या सैनिकांना अगतिक झालेले मोगल शिपाई म्हणजे त्यांच्या नेमबाजीला एक खाद्य मिळाले . मोगलांनी माघार घेतली तेव्हा आणि दोड्डेरी येथील तलावाच्या काठावर व त्याचप्रमाणे दोन्ही छावण्यात मोगलांच्या एकंदर सैन्यांपैकी ⅓ सैन्य पूर्णपणे गारद झाले.

नंतर दोघा मोगल सेनापतींनी आपल्या सैनिकांना दैवाधीन सोडले आणि गुपचूपपणे किल्ल्यात प्रवेश करून आपला जीव वाचविला. मुसलमान सैनिकांसमोर आता पूर्णपणे उपासमारीचा प्रसंग ओढवला. कासीमखान हा पहिल्या प्रतीचा गांजेकस होता. त्याला गांजा न मिळाल्यामुळे तिसऱ्या दिवशी मृत्यू आला . (काहीजणांनी मात्र असा संशय प्रगट केला की शत्रूच्या हातून होणारी मानहानी आणि बादशहाकडून होणारी निर्भर्त्सना टाळण्यासाठी त्याने आत्महत्या केली.)

दोड्डेरी येथील मोगल सेनेची शरणागती

ज्यावेळी किल्ल्यामधील धान्याचा साठा पूर्णपणे संपला आणि पाणी दुर्मिळ आणि घाणेरडे झाले , तेव्हा खानाजादखान हा आपल्याला काही मदत येईल याबाबत पूर्णपणे निराश झाला . त्याने आपला

दिवाण आणि बादशाही फौजेतील एक दक्षिणी अधिकारी शरणागतीची याचना करण्यासाठी संताकडे रवाना केला . खंडणीची रक्कम २० लाख रुपये इतकी ठरविण्यात आली . अगतिक झालेल्या मोगल सैन्याजवळील रोख रक्कम, इतर वस्तू, हिरेमाणके, घोडे आणि हत्ती ही मराठ्यांच्या ताब्यात देण्याचे कबूल करण्यात आले. यावेळी किल्ल्यात प्रवेश केल्याला मोगल सैन्याला १३ दिवस होऊन गेलेले होते . अशा परिस्थितीत दुःखात पिडलेले आणि विपन्नावस्थेला पोहोचल्यामुळे निराश झालेले उर्वरित मोगल सैन्य किल्ल्याबाहेर पडले. एका बाजूने शत्रूने त्यांना भाकरी दिली , आणि दुसऱ्या बाजूने त्यांना पाणी दिले . २ दिवस विश्रांती घेतल्यानंतर मराठा सैनिकांची एक तुकडी बरोबर घेऊन खानाजादखान हा दरबाराकडे जाण्यासाठी निघाला. त्याने सर्व काही गमावले होते . [कासीमखानावर जो भयानक प्रसंग ओढवला होता त्याची खबर बादशहाला तेथून २८० मैलांवर असलेल्या इस्लामपुरी येथे कळली . त्याने ताबडतोब आपल्याकडून हमीदुद्दीनखानाला आणि हैद्राबादेहून रुस्तम दिलखान याला त्याच्या मदतीसाठी पाठविले . अडोनी येथे ते दोघे एकत्रित झाले . पण खानाजादखानासाठी काही करण्याची वेळ निघून गेली होती. त्यामुळे त्याला भेटण्यावाचून ते काहीही करू शकले नाहीत . अडोनी येथे तेथील अधिकारी आणि रहिवासी यांच्याकडून सक्तीने वसूल करण्यात आलेल्या भेटी आणि दंड यांच्या साहाय्याने खानाजादखानाच्या सैन्याला कपडेलत्ते आणि इतर सामान पुरविण्यात आले . (**एम्. ए.,** ३७९. या घटनेबाबत अखबारात (**वर्ष** ३७,) निराळा मजकूर आहे.)]

(२२) बसवपट्टण येथे संता हिम्मतखानाला ठार मारतो

मोगल सैन्यावर अशा तऱ्हेने प्रहार केल्यानंतर एक महिन्याच्या आत संताजीने दुसरा आणि तितकाच प्रचंड असा विजय हिम्मतखान बहादूर याला ठार मारून मिळवला. कासीमखानाबरोबर सहकार्य करण्यासाठी म्हणून त्याचा नियुक्ती करण्यात आलेली होती . सैन्य अतिशय थोडे असल्यामुळे त्याने दोड्डेरीच्या पश्चिमेस ४० मैलांवर बसवपट्टण येथे आसरा घेतला होता . २० जानेवारी १६९६ रोजी दहा हजार घोडेस्वार आणि जवळजवळ तितकेच पायदळ घेऊन संता हा हिम्मतखानाच्या आश्रयाच्या जागेसमोर येऊन उभा ठाकला . त्याच्या सैन्यातील दक्षिणेमधे नेमबाजीबद्दल प्रसिद्ध असलेल्या कर्नाटकी पायदळी बंदूकधाऱ्यांनी एका टेकडीवर आपल्या जागा घेतल्या . आपल्याबरोबर अतिशय थोडे सैनिक घेऊन हिम्मतखानाने त्यांच्यावर हल्ला करण्यासाठी कूच केले. वरील टेकडीवरून त्याने त्यांची हकालपट्टी केली. परंतु आपला हत्ती घेऊन तो संताजी उभा असलेल्या जागेकडे चाल करून जात असताना एकाएकी त्याच्या कपाळावर बंदुकीची गोळी लागून तो ठार झाला . काही दिवसांनंतर हिम्मतखानाचे लुटलेले सर्व सामानसुमान घेऊन मराठे तेथून निघून गेले. (**अखबारात**)

बसवपट्टणला कुमक

२८ जानेवारी रोजी हिम्मतखानाचा मृत्यू आणि बसवपट्टणच्या किल्ल्यात संताजीने त्याच्या सैन्याची केलेली नाकेबंदी, ह्या दोन बातम्या बादशहाला कळल्या . यावर म्हैसूर प्रांताच्या वायव्य भागात सैन्याची जमवाजमव करण्याचे आणि परिस्थिती काबूत आणण्याचे अतिशय कसोशीचे प्रयत्न मोगलांनी केले . बसवपट्टणच्या मदतीला जाण्यासाठी एक फेब्रुवारीला हमीदउद्दीनखान याने कूच केले . तेथून तो २० मैलांवर असतानाच २६ फेब्रुवारी रोजी संताने त्याच्यावर हल्ला केला . परंतु मराठ्यांचा पराभव करण्यात आला, आणि त्यांची त्या विभागातून हकालपट्टी करण्यात आली . त्याचप्रमाणे बसवपट्टण येथेही मदत पोहोचविण्यात आली. [मराठ्यांच्या पराभवानंतर संताजीने खर्गदुर्ग (?) कडे पळ काढला. विजयी हमीदुद्दीनखानाने मृतसैनिकांचे दफन करण्यासाठी आणि जखमी सैनिकांची देखभाल करण्यासाठी तेथे २ , ३ दिवस मुक्काम केला आणि नंतर बसवपट्टणकडे कूच केले . काही दिवसांनंतर संताजी पुन्हा बसवपट्टण येथे आला . त्याबरोबर हमीदुद्दीनखानाने किल्ल्यातून बाहेर पडून मराठ्यांचा हल्ला परतवून लावला आणि त्यांची बरीचशी शस्त्रसामग्री लुटून घेतली. या विजयाच्या बातम्या जेव्हा बादशहाला मिळाल्या तेव्हा त्याने भर दरबारात खानाची स्तुती केली आणि जुल्पीकारखानाला कळविले की खरा योद्धा कशा तऱ्हेने लढतो त्याचे हे उदाहरण आहे. (**अखबारात**)]

अनुक्रमणिका

(२३) १६९६ मध्ये बादशाही बाजूकडून झालेल्या लष्करी व्यवस्थेची हकीकत

जानेवारी संपता संपता राजपुत्र बेदारबख्त याला पन्हाळ्याहून बसवपट्टणकडे कूच करण्याचा हुकूम करण्यात आला. काही आठवड्यांतच तो तेथे येऊन पोहोचला. काही काळ त्याने तेथे मुक्काम केला. तेथून वेळोवेळी त्या जिल्ह्यातील जमीनदारांना जरब लावण्यासाठी त्याने आपल्याजवळील सैनिकांची रवानगी केली. १६ मे रोजी चितळदुर्गचा बरमप्पा नायक याने राजपुत्राची येऊन भेट घेतली आणि आपण एकनिष्ठ राहू असे अभिवचन दिले. राजपुत्र महमद आजम याची बादशहाच्या इस्लामपूर येथील छावणीतून तेथून उत्तरेस ९० मैलांवर असलेल्या पेडगाव ऊर्फ बहादूरगड येथे फेब्रुवारी १६९६ मध्ये रवानगी करण्यात आलेली होती. ३ वर्षांनंतर मिरज येथे बादशहाने त्याला आपल्याजवळ बोलावीपर्यंत पेडगाव हेच त्याच्या छावणीचे मुख्य ठिकाण राहिले.

मार्च १६९७ मध्ये संताजी घोरपडे हा पूर्व किनाऱ्यावरून सातारा जिल्ह्यात परतला. त्याच्याविरुद्ध फिरोजजंग याची रवानगी करण्यात आली. परंतु मराठा सेनापतीमध्ये यादवी युद्ध सुरू झाल्यामुळे १६९७ या वर्षाच्या पूर्वार्धात मराठ्यांची शक्ती कमकुवत झाली.

(२४) संता घोरपडे आणि धना जाधव यांच्यामधील यादवी युद्ध; संताचा मृत्यू

वर उल्लेखिलेल्या दोन पहिल्या प्रतीच्या मोगल सेनापतींवर संताला जो नावाजलेला विजय मिळालेला होता त्याने धुंद होऊन संता हा मार्च १६९६ मध्ये राजारामाला भेटण्यासाठी जिंजी येथे गेला. त्याने सेनापतीपद आपल्याला देण्यात यावे अशी मागणी राजारामाकडे केली असावी असे दिसते. त्यासाठी त्याने धनाजीच्या पदरी जे फारच थोडे यश पडले होते त्याची त्याला मिळालेल्या एकाहून एक आणि अद्भुत अशा विजयांबरोबर तुलना केली. परंतु त्याचा उद्धट स्वभाव, तामसी वृत्ती आणि दुसऱ्याला तुच्छ लेखण्याची प्रवृत्ती यामुळे जिंजी दरबारला आपला अपमान झाला आहे असे वाटले. परिणामी १६९६ च्या मे महिन्यात दरबारात उघड उघड भांडण उद्भवले (**जेधे शका**.). राजारामाने धनाची बाजू घेतली. अमृतराव निंबाळकराला त्याने आपल्या सैन्याच्या आघाडीवर नेमले आणि आपल्या बंडखोर सेनापतीवर त्याने हल्ला चढविला. परंतु पुन्हा एकदा संताच्या कुशलतेला विजयश्रीने माळ घातली. धनाचा पराभव झाला, आणि त्याला एकाएकी पश्चिम हिंदुस्थानात त्याच्या मुलखाकडे जाणे भाग पडले. अमृतराव रणांगणावर ठार झाला. (**जेधे शका**.) [त्या लढाईचे अतिशय उत्तम वर्णन **मासिरी आलमगिरी** या ग्रंथात दिलेले आहे : "जिंजीच्या वाटेवर त्या नतद्रष्ट संताजीला धनाजीबरोबर त्यांच्या जुन्या भांडणापायी युद्ध करावे लागले. धनाजी त्यावेळी राजारामाला जिंजी येथे घेऊन जात होता. या युद्धात संताजीचा विजय झाला. धनाजीचा दुय्यम आणि नागोजीचा मेहुणा अमृतराव याला संताजीने हत्तीच्या पायाखाली दिले. त्याने राजारामाला पकडले परंतु धनाजीने पळ काढला. दुसऱ्या दिवशी संताजी आपले दोन्ही हात बांधून राजारामासमोर आला आणि म्हणाला "मी अजूनही तुमचा एकनिष्ठ सेवक आहे. मी उद्धटपणे वागलो याचे कारण धनाजीला सेनापती करून त्याच्या मदतीने जिंजीला जाण्याचा तुमचा बेत होता म्हणून. आता तुम्ही मला जो हुकूम कराल त्याप्रमाणे मी वागेन." इतके बोलून त्याने राजारामाला मुक्त केले आणि त्याला घेऊन तो जिंजी येथे गेला. (४०१)"

यापेक्षा अधिक बिनचूक असे वर्णन भीमसेन याने केले आहे. तो म्हणतो "संता घोरपडे आणि धना जाधव यांच्यामध्ये भांडण झाले. धनाने राजारामाची खात्री केली की संताजीने वाजवीपेक्षा अधिक सत्ता हस्तगत केली आहे आणि अंगी शिपाईगिरी असल्यामुळे स्वतंत्र राज्य स्थापन करण्याचा त्याचा प्रयत्न आहे. अशा परिस्थितीत संताजीला ठार करणे जरूर आहे. यानंतर राजाराम आणि धना यांनी मोठे सैन्य जमविले आणि अमृतराव निंबाळकर याला आघाडीवर ठेवून त्यांनी संताजीवर हल्ला चढविला. अमृतरावाला संताजीच्या माणसांनी ठार केले. यामधूनच यादवी युद्धाला प्रारंभ झाला." (**दिल.**, भाग २, १२२ अ)]

त्यानंतर अनेक महिने संता याने पूर्व कर्नाटकात धुमाकूळ घातला आणि अखेर १६९७ च्या मार्च

महिन्यात तो मायदेशी परतला . तेथे त्याच्यामध्ये आणि धनामध्ये भयानक रणसंग्राम सुरू झाला . महाराष्ट्रातील अधिकाऱ्यांनी या लढ्यामध्ये संता अथवा धना यांच्यापैकी कोणानाकोणाची बाजू घेतली . १६९७ च्या मार्च महिन्यात दोघांमध्ये सातारा जिल्ह्यात युद्धाला तोंड लागले . परंतु आता दैवाने संताजीकडे पाठ फिरविली होती . त्याच्या स्वभावातील कडकपणा आणि अरेरावी यामुळे त्याचे अधिकारी विटून गेले होते. त्यांच्यापैकी बहुतेक जण त्याला सोडून धनाजीकडे गेले , तर उरलेले ठार मारले गेले अथवा जखमी झाले. अशा तऱ्हेने सर्वस्व नाहिसा झालेला आणि सैन्याने एकटा टाकलेला असा संता बरोबर केवळ काही अनुयायी घेऊन रणांगणातून म्हसवडकडे पळाला . ज्या अमृतरावाला त्याने मारले होते त्याच्या बायकोचा भाऊ नागोजी माने याचे हे गाव होते . नागोजीने संताला काही दिवसपर्यंत निवारा आणि अन्नधान्य दिले आणि नंतर त्याला सुरक्षितपणे जाऊ दिले, परंतु त्याची बायको राधाबाई हिच्या मनातील सुडाच्या भावनेचा वन्ही अजून धगधगत होता . तिने आपल्या हयात असलेल्या भावाला संताजीच्या मागावर पाठवले . पाठलाग करणाऱ्यांनी संताजीला जेव्हा गाठले तेव्हा अतिशय थकून गेल्यामुळे संताजी हा सातारा जिल्ह्या - तील शंभू महादेवाच्या डोंगराजवळील एका ओढ्यात स्नान करीत होता . अशा तऱ्हेच्या अगतिक अवस्थेत असताना म्हसवडहून आलेली मंडळी त्याच्यावर घसरली आणि त्यांनी त्याचा शिरच्छेद केला (जून १६९७) [संताजीला ठार मारल्यानंतर त्याचे धडावेगळे केलेले मस्तक नागोजी मान्याने आपल्या बैठकीच्या पाठीमागे असलेल्या खोगिरीत टाकले . वाटेमध्ये खोगिरीचे तोंड सैल झाले आणि त्यातून मस्तक खाली पडले . संताजीच्या पाठलागावर फिरोजजंग याचे हेर तेथील डोंगराळ भागात हिंडत असताना त्यांना ते मस्तक सापडले . त्यांनी ते मस्तक संताजीचे आहे असे ओळखून फिरोजजंग याच्याकडे रवाना केले . त्याने ते बादशहाकडे पाठविले. सर्व बादशाही छावणीत आणि दक्षिणेतील काही शहरात संताजीच्या मस्तकाचे जाहीर प्रदर्शन केले गेले . (**एम्. ए.,** ४०१, ४०२; **जेधे. श., के. के.,** भाग २, ४४७–४४८; **दिल.,** ११२ अ)]

[संताजीच्या मृत्यूसंबंधाने खाफीखानाने पुढीलप्रमाणे उद्‌गार काढले आहेत :

संताजीचा मृत्यू ही या वर्षी बादशहाच्या नशिबाने एक चांगली घटना घडून आली . दुष्ट संताजीची पाळेमुळे खणून निघाली आणि तो नरकात प्रविष्ट झाला. त्या नालायक कुत्र्याच्या मारल्या जाण्याबद्दल भिन्नभिन्न हकीकती आहेत . पण त्यावेळी लष्करात हजर असलेल्या विश्वसनीय लोकांकडून जे ऐकण्यात आले ते लिहीत आहे. (पान ४४५)

दुष्ट संताजीचा उच्छाद कमालीचा वाढला . त्याचा आणि इतर शत्रूंचा पाडाव करण्यासाठी , गाजिउद्दीनखान बहादुर फिरोजजंग हा विजापुरापासून चार –पांच मजलांवर मुक्काम करून होता . त्याचा मुलगा किलीचखान हा बादशाही फौजेभोवती घिरट्या घालणाऱ्या गनिमीचा बंदोबस्त करण्यासाठी, आपल्याबरोबर सैन्य आणि उमदे सरदार घेऊन बाहेर पडला होता . त्या काळात त्याचे आणि त्याच्या बापाचे आपापसात बरे नव्हते. म्हणून किलीचखान हा बादशहाकडे परतला . बापाकडे जाण्याची त्याची इच्छा नव्हती . फिरोजजंगपाशी दिलेरखान ऊर्फ अब्दुरौफ विजापुरी याचा भाऊ दिलेरखान आणि लुत्फुल्लाखान हेच राहिले . त्याच्या भाऊबंदांपैकी सगळे किलीचखानाबरोबर निघून गेले . याच सुमारास बातमी आली की नालायक संताजी घोरपडे हा पंचवीस हजार फौजेनिशी आठ –नऊ कोसांवर आला आहे. भले भले नामांकित वीर संताजीचे नाव ऐकताच घाबरून जात . त्यांचे अवसान गळून जाई . गाजिउद्दीन याचा चेहरा पांढरा फटक पडला . त्याच्यापाशी फौज थोडी होती . त्याने आपण संताजीवर चालून जातो असा पुकारा केला. पुढील मजल नीट करून आपला गोट तिकडे हलविण्यासाठी त्याने एका अधिकाऱ्याची (मीर मंजिल) नेमणूक केली, आणि त्याने स्वतः आडवाटेने विजापूरचा रस्ता धरला . तो विजापुरापासून आठ -नऊ कोसांवर आला, तोच त्याच्या हेरांनी खालील बातमी आणली.

(पान ४४६) संताजी आणि धनाजी यांच्यात मतभेद निर्माण झाले होते . ते दोघे आपल्याला सेनापती म्हणवीत . धनाजी जाधव याला खानदानीच्या मराठे सरदारांत प्रमुख समजत. संताजी आणि इतर मराठे सरदार पाहता, धनाजी जाधव हा बादशाही सरदारांशी चांगले संबंध ठेवी. त्याची वागणूक शिष्टपणाची आणि योग्य असे . संताजीला धनाजीवर वरचढपणा हवा होता . ते दोघे एकमेकांचा नाश करण्यास टपलेले असत . इतरांच्या मानाने संताजी हा शिक्षा करण्यात अत्यंत कडक समजला जात असे . लहान-सहान अपराधांबद्दल तो हत्तीच्या पायाखाली देण्याची शिक्षा देई. अनेक मराठे सरदार त्याच्याविरुद्ध होते . त्याचा मोड करण्यासाठी त्यांनी धनाजीबरोबर गुप्त पत्रव्यवहार केला आणि ते त्याला मिळाले होते . हणमंतराव नावाचा एक प्रसिद्ध सरदार होता. त्याला धनाजीने इशारा दिला. संताजीचे सरदार धनाजीला मिळाले होतेच. हणमंतरावाने धनाजीच्या सूचनेप्रमाणे संताजीवर हल्ला केला . धनाजीची फौजही त्यांच्याबरोबर होती . संताजीची फौज मोडली . त्याचे सामानसुमान बाजारबुणगेही लुटली . त्याचे बरेच स्वार राऊत हणमंतरावाला येऊन मिळाले . संताजीची अनेक माणसे जखमी अगर मृत झाली . संताजी असहाय होऊन डोंगराळ भागात असलेल्या आपल्या घराकडे निघाला.

ही बातमी पसरताच फिरोजजंगच्या सैन्यात विलक्षण आनंद पसरला . संताजीचा पाठलाग करण्याचा गाजिउद्दीनखान बहादुर फिरोजजंग याने विचार केला. त्याने आपल्या सहकाऱ्यांबरोबर सल्लामसलत केली . याच सुमारास बादशहाने त्याला स्वदस्तुरचे पत्र धाडले , त्यात लिहिले होते ते असे–

अनुक्रमणिका

मराठे सरदारांच्या आपापसातील भांडणांवरून असे दिसते की , दुष्ट संताजी लवकरच आपल्या कर्माची शिक्षा पावेल . तर तुम्ही त्याचा पाठलाग करून त्या दुष्टाचा नाश करण्याचा प्रयत्न करा . म्हणजे त्याचे श्रेय तुम्हाला मिळून तुमचे नाव काळाच्या पानावर नोंदले जाईल आणि शत्रू एकत्र येऊ शकणार नाही.

(पान ४४७–४८) बादशहाचा हुकूम मिळताच फिरोजजंग आपल्याजवळ होती ती फौज घेऊन दुष्ट संताजीच्या पाठलागास निघाला . एकीकडून बादशाही फौज आणि दुसरीकडून धनाजी जाधवची फौज याप्रमाणे त्या सावजाला मृत्यूच्या जाळ्यात पकडण्यात आले . संताजीची फौज मोडली.

संताजीची आणि त्याच्या सैन्याची फारकत झाली . नागो म्यान (माने) नावाचा एक मोठा सरदार होता . काही दिवस बादशाही चाकरीत राहून तो परत आपल्या लोकांकडे गेला होता . तो त्या भागात राहात होता . काही वर्षांपूर्वी संताजीने त्याच्या भावाला हत्तीच्या पायी दिले होते . त्यामुळे संताजी आणि नागोजी यांच्यात भयंकर हाडवैर होते . त्यात नागोजीच्या बायकोने त्याला साथ दिली . त्याने आपल्या माणसांना बरोबर घेऊन संताजीचा पाठलाग केला . तो त्याच्या ठिकाणावर पोहोचला . त्यावेळी थकून आणि असहाय्य बनून संताजी एका ओढ्यावर आंघोळ करत होता. त्याने गाफील संताजीवर हल्ली करून त्याला ठार मारले आणि त्याचे डोके एका तोबऱ्यात घातले . त्याने तोबरा घोड्याला बांधला . आपल्या बायकोपाशी किंवा काहीच्या मते धनाजी जाधवापाशी तो ते डोके घेऊन निघाला . वाटेत तोबरा निसटून जमिनीवर पडला . फिरोजजंगाचे स्वार आणि हरकारे संताजीचा पाठलाग करीत त्या डोंगराळ भागात फिरत होते . संताजीचे डोके असलेला तोबरा त्यांच्या हाती पडला . त्यांनी संताजीचे शिर ओळखले . लुत्फुल्लाखान हा फिरोजजंगच्या हरावलीला (आघाडीच्या तुकडीवर) होता. संताजीचे डोके त्याच्याकडे नेण्यात आले . लुत्फुल्लाखानाने ते फिरोजजंगाकडे आणले . परमेश्वरानेच ही फत्ते आपणास दिली म्हणून ते परस्परांचे अभिनंदन करू लागले . आनंदसूचक नगारे वाजविण्यात आले . नंतर ख्वाजाबाबा तुरानी याजबरोबर संताजीचे डोके बादशहाकडे पाठविण्यात आले . बादशहाने त्या काफराचे डोके नजरेखाली घातले . परमेश्वराकडून ही देणगी मिळाल्याबद्दल बादशहाने त्याचे आभार मानले . नगारे–नौबती वाजविण्याची त्याने आज्ञा दिली . ख्वाजाबाबाला खुशखबरखान अशी पदवी देण्यात आली . बादशहाने आज्ञा केली की , संताजीचे डोके लष्करातून आणि दक्षिणच्या काही शहरांतून मिरवावे. या प्रकरणाबद्दल इतरही काही आख्यायिका आहेत. खरे काय ते परमेश्वर जाणे.

(मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध , ३६–३९, श्री. सेतुमाधवराव पगडी)].

संताजीची व्यक्तिरेखा

संताजीच्या अंगी फार मोठ्या प्रदेशात इतस्ततः पसरलेले मोठे सैन्य अथवा सैन्याच्या अनेक तुकड्या हाताळण्याचे जन्मतःच कसब होते . त्याचप्रमाणे शत्रूने आखलेल्या योजना आणि शत्रूची एकंदर परिस्थिती यामध्ये होणाऱ्या प्रत्येक बदलांचा ताबडतोब फायदा घेण्याच्या दृष्टीने आपले डावपेच बदलणे आणि मोठ्या प्रमाणावर संघटित हालचाली करणे यामध्ये त्याचा हात धरणारा कोणी नव्हता . त्याच्या सैन्याच्या जलद गतीने होणाऱ्या हालचाली आणि त्याच्या हुकमाप्रमाणे वेळाबरहुकूम त्यांच्या आज्ञांचे दुय्यम अधिकाऱ्यांकडून केले जाणारे पालन यावरच त्याच्या डावपेचांच्या यशाचे मर्म साठवलेले होते . म्हणूनच त्याने आपल्या अधिकाऱ्यांवर आज्ञांचे कटाक्षाने पालन करण्याचे बंधन टाकलेले होते व त्याचप्रमाणे अतिशय कडक शिक्षा करून स्वतःच्या सैन्यामध्ये शिस्तीचे कठोर पालन होईल याची खबरदारी त्याने घेतलेली होती. याचा परिणाम असा झाला की बहुतेक मराठा सरदार त्याचे शत्रू बनले.

सर्व हयातभर परस्परांचे शत्रुत्व करणारे संता आणि धना हे सैन्याचे नैसर्गिक पुढारी आणि अतिशय उच्च प्रतीचे कर्तृत्व, धाडस आणि हालचाल करण्याचे कसब अंगी असलेले संघटक होते . असे जरी असले, तरी त्यांचे स्वभाव मात्र परस्परांपासून विभिन्न होते. धनाची युद्धनीती ही एखाद्या सभ्य माणसासारखी होती. त्याच्या यशामध्ये नम्रता होती . पराभुतावर तो दया दाखवत असे . त्याचे वर्तन आणि बोलणेचालणे यात विनम्र भाव असे . स्वतःवर संयम राखण्यात त्याचा हातखंडा होता . त्याचप्रमाणे त्याला दूरदृष्टी असून एखाद्या मुत्सद्याप्रमाणे योजना आखण्याचे उत्कृष्ट कसब त्याच्या अंगी होते . त्याच्याबरोबर उघडउघड सामन्यात ज्या दुर्दैवी मुसलमान सेनापतींची गाठ पडली त्यांच्याबरोबर त्याने जे सभ्यपणाचे वर्तन केले त्याबद्दल मुसलमान इतिहासकारांनी देखील त्याची स्तुती केली आहे . त्याशिवाय अनेक वर्षांपर्यंत त्याने

अतिशय निःस्वार्थीपणे आपल्या देशाची सेवा केली . याउलट धनाशी तुलना करता संताजी घोरपडे हा संस्कृती किंवा उदारपणा अंगी नसलेला एक रानवट माणूस होता . आपले विकार काबूत ठेवणे अथवा भविष्यकाळात काय घटना घडून येतील याचा विचार करण्याची ताकद त्याच्या अंगी नव्हती . [संताजी हा आपल्यापासून १६ ते १८ मैल अंतरावर येऊन ठेपला आहे अशी बातमी लागताच औरंगजेबाचा पहिल्या प्रतीचा सेनापती फिरोजजंग याची भयाने गाळण उडाली. त्याने अशी खोटी बातमी पसरविली की आपण स्वतः संताजीला विरोध करण्यासाठी चाल करून जाणार आहोत . एवढ्यावर न थांबता ज्या मार्गाने चाल करून जाणार त्या मार्गाची साफसफाई करण्यासाठी त्याने अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आणि आपले मुक्कामाचे तंबू पुढे पाठवून दिले. परंतु नंतर मात्र तो वळणावळणाच्या मार्गाने विजापूरच्या दिशेने पळून गेला . (**के. के.**, भाग २, ४४६) संताजीने मोगल अधिकाऱ्यात कशी दहशत बसविली होती याचे हे एक उत्कृष्ट उदाहरण आहे .] त्याच्या परिचयात येणाऱ्या सर्वांना धाकधपटशा दाखवणे त्याला आवडत असे , आणि यामध्ये प्रत्यक्ष त्याच्या राजाचाही समावेश होता . त्याने कोणावर दया दाखविली नाही किंवा कोणाकडून दयेची अपेक्षाही केली नाही . त्याचा स्वभावच असा विचित्र होता की दुसऱ्या कोणाबरोबर सहकार्याच्या भावनेने वागणे त्याच्या कुवतीबाहेरचे होते . त्याचप्रमाणे राष्ट्रकार्यापुढे आपल्या मनातील इच्छा आणि आकांक्षा तुच्छ मानण्याइतका देशाभिमानही त्याच्या अंगी नव्हता . त्यामुळे मराठ्यांच्या राजकीय इतिहासावर अथवा औरंगजेबाच्या मोहिमेचे महाराष्ट्रावर जे परिणाम झाले त्यांच्यावर त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा कुठेच उमटला नाही . अंतरिक्षात भटकणाऱ्या एखाद्या एकाकी उल्केप्रमाणे संताजी घोरपडे हा दक्षिणरूपी आकाशात नुसता चमकून गेला.

(२५) राजारामाचे स्वगृही आगमन आणि १६९८–९९ मधील त्याच्या हालचाली

१६९७ या वर्षाच्या उत्तरार्धात विशेष नमूद करण्यासारखी कोणतीही घटना झाल्याचे दिसत नाही . फक्त भीमा नदीला १९ जुलै रोजी प्रचंड पूर येऊन पेडगाव आणि इस्लामपुरी येथील मोगलांच्या छावण्या वाहून गेल्या आणि तेथे भयानक दुःख आणि नाश यांचा हलकल्लोळ माजला . परंतु पुढील वर्षाच्या जानेवारी महिन्यात मोगलांनी जिंजीचा पाडाव केला. राजाराम तेथून पळून गेला आणि पुढील महिन्यात महाराष्ट्रात विशाळगड येथे जाऊन पोहोचला. राजाराम स्वगृही पोहोचल्यानंतर ताबडतोब मराठ्यांनी काही अनपेक्षित कारवाया केल्या असल्याचे संभवत नाही . जिंजीचा पाडाव झाल्यामुळे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी राजारामाला बराचसा कालावधी लागला असावा असे दिसते . या सुमारास त्याच्या काही अनुयायांनी निराश होऊन त्याची नोकरी सोडली व ते मोगलांना जाऊन मिळाले.

१६९९ या वर्षाच्या सुरुवातीला राजाराम हा कोकणची पाहणी करण्यासाठी म्हणून बाहेर पडला . आपल्या सर्व किल्ल्यांना त्याने भेटी दिल्या , आणि जूनच्या अखेरीला तो सातारा येथे परतला . खानदेश आणि वऱ्हाड यांच्यावर मोठ्या प्रमाणात हल्ले करण्याची योजना त्याने आखली , आणि २६ आक्टोबरच्या सुमारास तो साताऱ्याच्या किल्ल्यातून बाहेर पडला.

राजारामाची अखेरची मोहीम

या किल्ल्याला प्रथम वेढा देण्याचा औरंगजेबाचा बेत बाहेर फुटला असावा असे दिसते . कारण १९ आक्टोबर रोजी बादशहा इस्लामपुरीहून निघाल्यावर राजारामाने ताबडतोब आपली बायका -मुले साताऱ्याहून खेळण्याला हलवली , आणि तो स्वतः बादशहाच्या हाती पडू नये म्हणून २६ आक्टोबरला सातारा किल्ला सोडून निघून गेला . धना जाधव, रामचंद्र, दादो मल्हार आणि इतर सेनापती हे ७ हजार पायदळ घेऊन चंदनवंदनच्या किल्ल्यांपर्यंत त्याला पोहोचविण्यासाठी गेले . तेथे त्याने ३ दिवस मुक्काम केला. आणि नंतर तो साताऱ्याच्या मार्गाने निघाला.

अनुक्रमणिका

यावर बादशहाने ताबडतोब बेदारबख्त याला शत्रूच्या या फौजेचा पाठलाग करून पराभव करण्याचा तातडीचा हुकूम पाठविला . परिण्ड्याच्या किल्ल्याच्या पलीकडे ४ मैलांवर बेदारबख्त याने मराठ्यांना गाठले. दोन्ही पक्षांत अतिशय भयंकर असे रणकंदन झाले, आणि मराठ्यांचा मोड झाला. त्यांना अहमदनगरच्या दिशेने हाकलून देण्यात आले (१३ किंवा १४ नोव्हेंबर). २६ डिसेंबर रोजी राजाराम सातारा किल्ल्याजवळील बादशाही छावणीपासून ३० मैलांवर आल्याची आणि तेथून विशाळगडाकडे जाण्याचा बेत करीत असल्याची बातमी आली . राजारामाचा वऱ्हाडवर हल्ला करण्याचा बेत हाणून पाडण्यात आला . [राजारामाचा जो पराभव झाला त्याचे बरेचसे श्रेय भीमसेन जुल्पीकारखानाला देतो . तो लिहितो "बरीच मोठी फौज घेऊन लुटालूट करण्याच्या हेतूने राजारामाने बादशाही मुलखात प्रवेश केला . त्याला प्रतिकार करण्यासाठी बेदारबक्त याची नियुक्ती करण्यात आली होती . जुल्पीकारखानाकडे शत्रूच्या पाठलागाचे काम देण्यात आलेले होते . खानबहादूर याने आपले सामानसुमान सोलापूर येथे ठेवले आणि चारठाणा येथे तो राजपुत्राला भेटला. तेथून त्याने राजारामाच्या पाठलागासाठी कूच केले. ही बातमी राजारामाला कळताच त्याने पलायन केले. परंड्याच्या मार्गे त्याने तमरणी येथे भीमा नदी ओलांडली , आणि तो स्वराज्याकडे निघाला . धना आणि इतर काही अधिकारी यांना इस्लामपुरीवर हल्ला करण्यासाठी पाठविले . मराठा फौज तेथे मोठ्या संख्येने गोळा झाली ..... जुल्पीकारखानासमोर त्यांना पळ काढावा लागला ... त्यांचा वसंतगडनजीक पराभव करण्यात आला . (**दिल.**, भाग २. १२९)] परंतु कृष्णा सावंत याच्या हाताखाली मराठ्यांच्या एका तुकडीने धामोणी जवळील गावे लुटली आणि तेथून मराठे परत आले . मराठ्यांच्या फौजांनी नर्मदा नदी ओलांडण्याचा हा पहिलाच प्रसंग (**दिल.**, १२९ अ).

दरम्यान मराठ्यांच्या इतर तुकड्यांबरोबर मोगल सैन्याच्या चकमकी उडाल्या. ९ जानेवारी १७०० रोजी नुश्रतजंग (जुल्पीकार) याने मसुरच्या पलीकडे धना, राणोजी घोरपडे आणि हणमंतराव याच्याबरोबर युद्ध केले आणि त्यांचा पराभव केला . मराठ्यांची ५०० माणसे या चकमकीत गारद झाली . यानंतर काही दिवसांनी धनाजीने खानापूर येथील मोगल ठाण्यावर हल्ला केला आणि तेथील मोगल अधिकारी आवजी अढाळ याला पकडून नेले.

दरम्यान बादशहाचा साताऱ्याचा वेढा चालूच राहिला, आणि सातारा किल्ल्याच्या परिसरात मोगल आक्रमक आणि मराठ्यांच्या सेना यांच्यामध्ये अनेक चकमकी उडाल्या. [२७ डिसेंबर १६९९ रोजी हणमंतरावाने वेढ्याच्या छावणीपासून केवळ ४ मैल अंतरावर इखलासखानाच्या हाताखालील एका टेहेळ्या तुकडीवर हल्ला केला . त्याने खान, त्याचा मुलगा महमदयार आणि इतर अनेक सैनिकांना ठार मारले. या तुकडीजवळील हत्ती आणि इतर सामानसुमान वगैरे हणमंतरावाने लुटून नेले. (**अखबारात**)]

(२६) राजारामाचा मृत्यू आणि ताराबाईचे धोरण

दोन मार्च १७०० रोजी राजारामाला सिंहगडावर तापाने मृत्यू आला . मोगल प्रदेशावर त्याने केलेल्या हल्ल्यामुळे आणि मोगलांनी केलेल्या त्याच्या सक्त पाठलागामुळे त्याला जी दगदग झाली , त्यामुळेच त्याला बहुधा हा ताप आला असावा . या वेळी त्याची बायका -मुले ही विशाळगडच्या किल्ल्यावर होती. राजारामाच्या मृत्यूनंतर त्याचा आवडता औरस मुलगा कर्ण याला त्याच्या मंत्र्यांनी धना जाधव याच्या मदतीने ताबडतोब राज्याभिषेक केला. परंतु ३ आठवड्यांतच तो देवीच्या आजाराने मरण पावला . यानंतर त्याला ताराबाईपासून झालेल्या त्याच्या औरस मुलाला पश्चिमेचा राज्यप्रतिनिधी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रामचंद्राच्या पाठिंब्याने ३ रा शिवाजी म्हणून गादीवर बसविण्यात आले . मराठ्यांच्या दरबारात आता राजारामाच्या विधवा स्त्रिया – ताराबाई (तिसऱ्या शिवाजीची आई) आणि राजसबाई (दुसऱ्या संभाजीची आई)– यांच्यामध्ये यादवी युद्ध पेटले. प्रत्येकीने आपआपल्या मुलाचा पक्ष घेतला आणि राज्याचे अधिकारी आणि सेनापती यांच्यामध्ये पडलेल्या दोन तटांनी अनुक्रमे प्रत्येकीला पाठिंबा दिला . परंतु राजारामाची मोठी स्त्री ताराबाई ही अतिशय कर्तृत्ववान आणि उमेदीची होती . सरतेशेवटी तिलाच

राज्यामधील सार्वभौम सत्ता प्राप्त झाली.

आपल्या नवऱ्याच्या मृत्यूची बातमी ऐकल्यावर ताराबाईने ताबडतोब बादशहाकडे आपण शरण आलो आहोत असे दर्शवणारे पत्र पाठवले . त्यामध्ये तिने राजारामाचा कायदेशीर मुलगा तिसरा शिवाजी याच्यासाठी ७ हजारी **मनसब** आणि दक्षिणेवरचे देशमुखीचे अधिकार मागितले . या पत्रात तिने असे सुचविले की आपली विनंती मान्य झाल्यास मोगलांना ७ किल्ले देण्यास आणि दक्षिणेच्या मोगल सुभेदाराच्या हाताखाली चाकरी करण्यासाठी आपण तयार आहोत . (**अख.,** १२ मार्च १७००). औरंगजेबाने ही विनंती फेटाळून लावली. मे महिन्याच्या अखेरीला रामचंद्राचा प्रतिनिधी रामजी पंडित आणि परशुरामाचा प्रतिनिधी आबाजी यांनी राजपुत्र आजम याची गाठ घेतली. बादशहापाशी राजारामाच्या मुलाला अभयपत्र देण्यासाठी त्याने रदबदली करावा अशी त्या दोघांनी त्याला गळ घातली . असे अभयपत्र दिले गेल्यास आपण अनेक किल्ले मोगलांच्या स्वाधीन करू , असेही त्यानी आजम याला सांगितले . परंतु मराठ्यांनी दिलेली ही आश्वासने निव्वळ ढोंगीपणाची असावी असे दिसते आणि म्हणून त्यामधून काहीही निष्पन्न झाले नाही.

(२७) कोकणमधील युद्ध, १६८९–१७०४

कोकणचा प्रदेश, त्याचे विशेष आणि विभाग

सुरतेकडून दक्षिणेकडे जाताना प्रवाशाला लागोपाठ पश्चिमघाटाची डोंगराची रांग आणि अरबी समुद्र यांच्यामध्ये असलेले लांबच लांब किनारपट्टीचे भाग पुढीलप्रमाणे आढळून येतात . (१) कोळवण अथवा तुटला फुटलेला प्रदेश . यामध्ये जव्हार आणि धरमपूर या संस्थानांमध्ये असलेल्या रानवट कोळी जातीच्या लोकांची वस्ती आहे . (२) उत्तर कोकण म्हणजेच हल्लीचे ठाणे आणि कुलाबा जिल्हे . हा भाग घाटाच्या पूर्वेला असलेल्या नाशिक आणि पुणे या जिल्ह्यांना समांतर आहे आणि (३) दक्षिण कोकण म्हणजेच हल्लीचा रत्नागिरी जिल्हा. हा रत्नागिरी जिल्हा डोंगरांच्या रांगांच्या पलीकडे असलेल्या दक्षिणेच्या पठारामधील सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यांना समांतर असा आहे . रत्नागिरीच्या अगदी दक्षिण टोकाला वेंगुर्ल्यानजीक समुद्रकिनारा हा ठिकठिकाणी तुटलेला आहे आणि या ठिकाणी वाडीचे सावंत या अती प्राचीन मराठा घराण्याचा प्रदेश आहे . १७ व्या शतकात हे घराणे कुडाळचे देसाई या नावाने प्रसिद्ध होते . याच्या अगदी दक्षिणेला पोर्तुगीजांच्या ताब्यातील गोव्याचा प्रांत आहे . याच्या आणखी दक्षिणेला कारवार जिल्हा असलेला समुद्रपट्टीवरील कानरा प्रांत व पूर्वेकडे बऱ्याच दूर अंतर्भागामध्ये म्हैसूरच्या पठाराकडे वाट नेणारी सोन्दा आणि बेदनुर ही संस्थाने आहेत.

धरमपूरच्या उत्तरेस काही मैलांवर असलेल्या नंदूरबार शहरानजीक पश्चिम घाटमाथ्यामध्ये जे एक खिंडार आहे त्यामधून किनारपट्टीच्या भागामधून आलेले कोणतेही आक्रमक सैन्य खानदेश आणि वऱ्हाड या संपन्न प्रांतात सहज प्रवेश करू शकत असे. याउलट उत्तरेकडे सुरत किंवा पूर्वेकडे बागलाण यांत लुटालूट करावयाची झाल्यास कोळवणचा सोईस्कर असा तळ म्हणून उपयोग करता येत असे . त्याचप्रमाणे बागलाणातून दक्षिणेकडे चान्दोरचे डोंगर ओलांडल्यानंतर नाशिक जिल्ह्यात सैन्यासह घुसणे सहज शक्य होत असे.

शिवाजीच्या अंमलाखालील कोकणचा इतिहास

शिवाजीने १६५७ आणि १६६२ या दरम्यान कोकण आणि १६७० आणि १६७३ या दरम्यान कोळी लोकांचा प्रदेश असा मुलूख जिंकून घेतला होता . त्याच्या मृत्यूनंतर १६८२ आणि १६८३ या दोन वर्षांत मोगलांनी उत्तर कोकणावर स्वारी केली होती , आणि त्या प्रांताची राजधानी कल्याण या शहराचा तात्पुरता ताबा घेतला होता. परंतु यामध्ये त्यांचा उद्देश तेथील ठिकाणाची नासधूस आणि जाळपोळ करणे हा असून ती कायमची आपल्या ताब्यात ठेवण्याचा नव्हता . **मोगलांची कोकणवर पहिली मोहीम , १६८२** :- १६८३ च्या डिसेंबर महिन्यात मराठ्यांनी पुन्हा एकदा कल्याणचा ताबा घेतला आणि पुढील ५ वर्षे कोकण प्रांतावर आपला अनिर्बंध ताबा ठेवला . अर्थात या कालावधीत त्यांच्या ताब्यातील किनारपट्टीवरील खेड्यात सिद्दी लोकांचे हल्ले होत ही गोष्ट वेगळी . या प्रांतात मोगलांची अधिसत्ता स्थापन होण्यास १६८९ मध्ये सुरुवात झाली, [मोगलांच्या कोकणातील पहिल्या स्वारीची हकीकत (१६८२) पुढे दिली आहे : नाशिक आणि पुणे हे जिल्हे मोगलांच्या ताब्यात होते . जुन्नर येथून मोगलांचा सेनापती हसनअलीखान हा ठाणे जिह्यात उतरला आणि त्याने जानेवारीच्या अखेरीला कल्याणमध्ये प्रवेश केला . त्याच्याजवळ जवळ जवळ ३५००० सैन्य होते . वाटेत त्याने मराठ्यांची अनेक खेडी जाळली . मोगलांच्या या चढाईमुळे संभाजीने जंजिऱ्याचा वेढा सोडून आपल्या मुलखातील डोंगरी किल्ल्याकडे पळ काढला . मे महिन्यात पश्चिम किनाऱ्यावरील पावसापासून आपल्या घोडदळाचा बचाव व्हावा म्हणून हसनअलीखानाने ठाणे जिल्ह्यातून माघार घेतली . एप्रिल आणि मे महिन्यात मोगल सैन्य रामसेजच्या निष्फळ वेढ्यात गुंतले होते . हा वेढा सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये उठविण्यात आला . नोव्हेंबरच्या अखेरीला रणमस्तखानाने माहजे घाटातून पुन्हा कोकणात चाल केली . (**दिल.,** भाग १ . १७८) त्याने कल्याण शहर पुन्हा ताब्यात घेतले . त्याचा प्रतिकार करण्यासाठी संभाजीने रूपा भोसले , केसो पिंगळे आणि निळो पिंगळे यांची रवानगी केली. मोगल आणि मराठे यांच्यामध्ये अनेक लढाया झाल्या. एप्रिल १६८३ मध्ये रुहुल्लाखानाने कोळवण घाटातून उतरून रणमस्तखानाला मदत पोहोचविली. यानंतर बादशहाच्या हुकुमावरून मोगलांनी कोकणातून माघार घेतली . माघार घेताना रूपाजी भोसले याची टिटवाळा येथे मोगल सैन्याबरोबर गाठ पडली . झालेल्या चकमकीत पद्मसिंग या रजपूत अधिकाऱ्याला त्याने पकडले . नंतर पद्मसिंग आणि इतर मोठे अधिकारी यांना रूपाजीने ठार मारले. (**जेधे. शका., दिल.,** भाग १, १७२–१७३)

परंतु कल्याणचा ताबा जरी मोगलांच्याकडे होता तरी सर्व कोकण किंवा ठाणे जिल्हा त्यांच्या ताब्यात नव्हता . कल्याण आणि भिवंडी ही शहरे व आजूबाजूचा थोडा मुलूख सोडल्यास बाकी सर्व प्रांत मराठ्यांच्या ताब्यात होता कारण एवढा मोठा प्रदेश ताब्यात ठेवण्यास मोगल सैन्य अपुरे होते. जून १६८३ मध्ये शहाबुद्दीनखान याला बादशहाने बोलाविले . पावसाळा संपताच त्याने मोहिमेला सुरुवात केली आणि पुण्याचा ताबा घेतला. २७ डिसेंबर रोजी त्याने कुलाबा जिह्यातील निजामपूर हे ठाणे लुटले . राजपुत्र आजम याची नेमणूक नोव्हेंबरमध्ये नाशिक येथे करण्यात आली.

यानंतरच्या काळात मराठ्यांनी कोकणचा पुन्हा ताबा घेतला . त्यांनी कल्याण जिंकून वसई आणि दमण यामधील सर्व पोर्तुगीज खेडी लुटली. किनाऱ्यावरील प्रदेशावर सिद्दीचे हल्ले होत होते हे खरे परंतु आतील प्रदेशावर मराठ्यांची संपूर्ण सत्ता होती यात काहीच वाद नाही . १६८५ च्या अखेरीस मराठे आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये मोगलांविरुद्ध परस्पर मदतीचा करार झाला . येथील किल्ले त्यांनी दुरुस्त केले आणि सुरक्षिततेसाठी बहुतेक मराठा सरदारांनी आपली बायकामुले तेथे ठेवली.

१६८५ च्या जानेवारी महिन्यात शहाबुद्दीनखानाने बोरघाट ओलांडून गोरगोलीपर्यंत मजल मारली , परंतु कवि कलशने त्याचा हल्ला परतविला (**जे. एस्.**) १६८४ व पुढील तीन वर्षे मोगलांचे सर्व सैन्य विजापूर आणि गोवळकोंडा जिंकून घेण्यात गुंतले होते . साहजिकच कोकणचा ताबा घेण्यास त्यांना सैन्य पाठविता आले नाही . वरील दोन्ही राज्यांचा पाडाव झाल्यावर मोगलांना ही संधी मिळाली . यादवी युद्धाने ग्रासलेल्या मराठ्यांच्या राज्यात प्रचंड संख्येने आक्रमण करण्यास मोगल सैन्य मोकळे झाले .] आणि ती देखील एका कर्तृत्ववान स्थानिक अधिकाऱ्याकडून. हा अधिकारी म्हणजे मातबरखान हा होय . मातबरखान हा अरबांच्या नवायत जमातीतील सय्यद असून बऱ्याच काळपर्यंत कल्याणमध्ये स्थायिक झालेला होता . **मराठे कोकण जिंकून घेतात** :- त्याची जेव्हा नाशिक जिल्ह्याचा ठाणेदार म्हणून नियुक्ती झाली तेव्हा तो १६८८ च्या सुमारास पहिल्या प्रथम आपली धाडसीवृत्ती आणि दूरदृष्टी यांच्यायोगे प्रसिद्धीस आला . त्याने स्थानिक डोंगर भागात राहणाऱ्या लोकांची भरती करून एक सुसज्ज सेनादल तयार केले , आसपासच्या भागातील अनेक जमीनदारांना आपल्या बाजूला वळवून घेतले आणि मराठ्यांचे अनेक किल्ले शस्त्रबलाच्या जोरावर अथवा लाच देऊन आपल्या ताब्यात घेतले . **मातबरखानाचे नाशिक जिल्ह्यातील विजय** :- ते म्हणजे पट्टा (विश्रामगड), कुलंग, त्रिंबक (हा किल्ला ८ जानेवारी १६८९ रोजी त्याने जिंकला) आणि इतर अनेक लहानसहान किल्ले. याप्रमाणे विजय प्राप्त झाल्यानंतर या मोगल सेनापतीने घाटमाथा ओलांडला , आणि संभाजीचा पाडाव झाल्यानंतर तो कोकणात उतरला . या प्रांतामध्ये त्याने कल्याण (२७ मार्च), प्रबळ, कर्नाळा, दुगड, माणिकगड, आणि अखेर माहुली (ऑगस्ट) हे किल्ले जिंकून घेतले . अशा तऱ्हेने कोळी

लोकांच्या देशापासून दक्षिणेकडे मुंबईच्या अक्षांशापर्यंत पसरलेला उत्तर कोकणचा सर्व प्रदेश बादशाही अमलाखाली गेला. **उत्तर कोकणवर मोगलांचा ताबा** :- २० वर्षांपासून असलेल्या मराठ्यांच्या सत्तेमुळे आणि वारंवार चाललेल्या युद्धामुळे त्या जिल्ह्याच्या बहुतेक भागाचा विध्वंस झाला होता. मातबरखानाने या प्रदेशावर बादशाही अंमल बसविला, तेथे सुव्यवस्था प्रस्थापित केली आणि त्या प्रदेशातील शेती आणि सुबत्ता यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी तेथे शेतकऱ्यांच्या वसाहती स्थापन केल्या.

या यशस्वी मोहिमानंतर मातबरखान हा कल्याणला परतला (१६९०). काही वर्षे तेथे त्याने अतिशय शांततेत घालविली आणि या काळात त्या ठिकाणी त्याने सुभेदाराचा भव्य प्रासाद, एक मोठा दरबारासाठी दिवाणखाना, एक मशीद, तुर्की पद्धतीचे स्नानगृह, एक द्वारमंडप, एक बाग आणि तलाव आणि कारंजे यांनी युक्त असलेला एक वाडा यांची बांधणी करून शहराला सुशोभित केले. त्याचप्रमाणे त्याने इतरही पुष्कळ बांधकामे केली. कल्याण शहरात मातबरखानाने आपल्या पत्नीच्या स्मरणार्थ ज्या भव्य कबरीची बांधणी केली तिला एक लक्ष रुपये खर्च आला. [मातबरखानाच्या नाशिक जिल्ह्यातील विजयाची हकीकत पुढे दिली आहे : मातबरखानाची नेमणूक प्रथम नाशिक जिह्यात ठाणेदारीच्या जागेवर झाली होती. तेथे असताना त्याने डोंगरी जमातींची सैन्यात भरती केली व पट्टा आणि इतर किल्ल्याभोवती असलेल्या जमीनदारांना आपल्याकडे वळविले. प्रथम त्याने तरबीयतखानावर राग धरून असलेला एक मराठा अधिकारी हरजीजाखरे याला पट्टा ऊर्फ विश्रामगड घेण्यासाठी पाठविले. प्रथम या मोहिमेस तरबीयतखानाच्या विरोधामुळे यश आले नाही. पुढे १६८७ च्या अखेरीस नाशिक जिल्ह्यावर मातबरखानाची नेमणूक झाली तेव्हा त्याने पुन्हा एकदा पट्टा किल्ला घेण्यासाठी फौजेची रवानगी केली. १७ जानेवारी १६८८ रोजी मोगलांनी किल्ला जिंकून घेतला. या कामगिरीबद्दल बादशहाने मातबरखानाच्या मनसबीत ५०० ची वाढ केली. यानंतर मातबरखानाने आपले लक्ष कुलंग आणि शेजारील बाबहर, तबाका आणि रतनगड या किल्ल्यांकडे वळविले. कुंलग किल्ला जिंकून घेणे जवळ जवळ अशक्य होते. तेव्हा मोगलांनी कुलंगच्या किल्लेदाराची बायकामुले असलेला प्रबळचा किल्ला जिंकून घेतला. तेव्हा कुलंगच्या किल्लेदाराने किल्ला स्वाधीन केला. त्यानंतर उंधाकावनी, हरीश, त्रिंगलवाडी, मदनगड आणि मुरदंत हे किल्ले मोगलांनी जिंकून घेतले. यानंतर त्रिंबकच्या किल्ल्याला त्यांनी वेढा दिला. किल्ल्याचा वेढा जास्त काळ चालू राहिल्यास मराठ्यांचे हल्ले इतर ठिकाणी होतील या कारणास्तव मातबरखानाने लाच देऊन ८ जानेवारी १६८९ रोजी किल्ला ताब्यात घेतला. तेलंगराव आणि शामराज हे संभाजीचे नामवंत अधिकारी किल्लेदारीच्या लष्करी आणि मुलकी अधिकारावर होते. मातबरखानाने लाच म्हणून आतापर्यंत १ लाख २० हजार खर्च केले होते. त्यापैकी फारच थोडी रक्कम बादशहाने मातबरखानाला दिली.

यानंतर मातबरखान कोकणात उतरला. प्रथम त्याने माहुली किल्ल्याकडे चाल केली. १७ एप्रिल १६८९ रोजी तो माहुलीपासून ९ मैलांवर खर्डी येथे पोहोचला. खर्डी आणि माहुली यांच्यामधील एक घाट मराठ्यांनी रोखून धरला होता परंतु मातबरखानाने त्यांना माघार घ्यावयास लावली. माहुलीसारख्या किल्ल्याला वेढा देण्यास लागणारे सैन्य हे मातबरखानापाशी नव्हते. त्यासाठी त्याने औरंगजेबाला कळविले आणि माहुलीपासून परत फिरून त्याने दुगडला वेढा दिला. माहुलीच्या वेढ्यासाठी ५ ते ६ हजार सैन्य आणि भरपूर द्रव्य लागणार होते म्हणून त्याने लाच देऊन किल्ला घेण्याचे ठरविले. किल्ल्याचा हवालदार द्वारकोजी याच्याबरोबर त्याने नरसो महाडिक याच्यातर्फे बोलणी सुरू केली आणि त्याला मोगल फौजेमध्ये मोठी मनसब मिळवून देण्याचे वचन दिले. वरील आशयाचे पत्र बादशहाकडून आपल्याला मिळावे अशी द्वारकोजीने मागणी केली. तसे पत्र २८ जुलै १६८९ रोजी मातबरखानाकडे आले. माहुली घेण्याचे बेत याप्रमाणे चालले असताना १७ जुलै रोजी रघुजी आणि काकाजी ह्या मातबरखानाच्या अधिकाऱ्यांनी प्रबळ किल्ला जिंकून घेतला. यानंतर मातबरखानाने कर्नाळा, मुकुटगड, मलंगगड, चंदेरी, खातूडा, माणिकगड, सांकिया आणि दुगड. हे किल्ले घेतले. माहुलीच्या पाडावाबरोबर सर्व उत्तर कोकण आणि ऑक्टोबर १६८९ मध्ये रायगडचा पाडाव झाल्यानंतर दक्षिण कोकण मोगल अधिपत्याखाली आले. मातबरखानाच्या या विजयामुळे मोगल सत्तेला या भागात एक आगळी कळा प्राप्त झाली. त्याच्या खाजगी चिटणिसाने लिहिले आहे, "खानाने शिवाजीने घेतलेल्या किल्ल्यापैकी ५० किल्ले जिंकून घेतले. त्याने औरंगाबादपासून समुद्रकिनाऱ्यापर्यंतचा सर्व भाग बादशाही अमलाखाली आणला. कल्याणचे ठाणे आणि उत्तर कोकणामधील इतर परगणे मराठी अमलाखाली २० वर्षांमध्ये उद्ध्वस्त होऊन गेले होते. ते त्याने जिंकून घेतले, त्यांची मजबूती केली, शेतीला उत्तेजन दिले आणि मोठमोठे राजवाडे, बागा, कालवे वगैरेची उभारणी केली" (**कारनामा**, ३-५)

या तऱ्हेने जवळ जवळ वर्षभर मोहीम केल्यानंतर १६९० मध्ये मातबरखान कल्याणला परतला. कल्याण येथे त्याने सुभेदाराचा राजवाडा, स्वतःच्या राहण्यासाठी हवेली, एक अतिशय सुंदर असे कारंजे असलेले मोठे तळे बांधून शहर सुशोभित केले. बारहा या खेड्यात त्याने एक किल्ला बांधला आणि त्याचप्रमाणे सार्वजनिक समारंभासाठी एक दिवाणखानाही बांधला. येथे त्याच्या पत्नीचा वयाच्या ५६ व्या वर्षी मृत्यू झाला. सन्याळा नावाच्या तलावाशेजारी तिचे दफन करण्यात आले. तेथे त्याने १ लक्ष रुपये खर्च करून अतिशय सुंदर अशी कबर बांधली. (वरील सर्व हकीकत जेठमल याचा ग्रंथ **कारनामा** (**आय. ओ. एल. हस्तलिखित**) याच्यावर आधारलेली आहे.)]

मराठे पुन्हा डोके वर काढतात

अनुक्रमणिका

परंतु १६९३ या वर्षाच्या सुरुवातीला मराठ्यांनी आपल्या सामर्थ्याची पुन्हा उभारणी केली. परिणामी मोगलांच्या अधिसत्तेचा ऱ्हास झाला आणि त्यांना बचावाच्या धोरणाचा स्वीकार करणे भाग पडले . मराठ्यांच्या सैन्याच्या तुकड्या मोगलांच्या मुलुखावर छापे घालू लागल्या आणि बादशाही सैनिकांनी नुकतेच हस्तगत केलेले किल्ले परत जिंकून घेण्याचा पवित्रा त्यांनी टाकला . आपल्या आक्रमक पवित्र्यांची आखणी करण्याकरता कोकणच्या प्रदेशाचा एक उत्कृष्ट तळ म्हणून त्यांना उपयोग झाला . कारण त्यांची आघाडी दूरवर पसरलेल्या पश्चिम घाटाने जणू काही भिंतच उभारून सुरक्षित राखली तर कोकणपट्टीच्या पूर्व सीमेत शत्रू आक्रमण करण्याच्या उद्देशाने उतरला असताना मराठ्यांशी मित्रत्वाचे संबंध राखून असलेल्या पोर्तुगीजांच्या पश्चिम किनाऱ्यावर पसरलेल्या मुलखाने त्यांच्या लढाईत गुंतलेल्या शूर शिपायांच्या बायकांना आणि मुलांना अतिशय सुरक्षित असा आसरा दिला . मराठ्यांनी स्थानिक पोर्तुगीज गव्हर्नरला लाच देऊन आपलासा केले आणि पोर्तुगीजांनी आपल्याला आसरा द्यावा आणि उत्तर कोकणातील आपले किल्ले आणि खेडोपाडीचा मुलूख यांना रसद पोहोचती करावी याबद्दल त्यांचे मन वळविले.

वसई येथील पोर्तुगीजांवर मोगलांचे हल्ले

वरील कारणामुळे मातबरखानाने पोर्तुगीजांच्या उत्तरेकडील प्रदेशांवर (म्हणजे वसई आणि दमण) हल्ला चढविला, शत्रूच्या प्रजाजनांना त्याने कैद केले आणि त्याच्या सैन्याच्या तुकड्यांचा पराभव केला . सरतेशेवटी गोव्याच्या व्हॉइसरायने बादशहाला शरण जाऊन आणि त्याच्याकडे भेटीचे नजराणे पाठवून तह केला.

मातबरखानाची अखेरची वर्षे

मातबरखानाने आपल्या ताब्यातील प्रदेशाची जी दक्षतापूर्वक काळजी घेतली , राज्यकारभारात त्याने ज्या कडक शिस्तीने कुशलता राखली आणि बादशाही सत्ता उचलून धरण्यासाठी दक्षिणेकडे जंजिऱ्याच्या शिद्याने केलेल्या लष्करी कारवायांमध्ये त्याला जी मदत केली वगैरे सर्व गोष्टींची अनेक उदाहरणे औरंगजेबाच्या दरबाराच्या बातमी पत्रात आढळतात . १७०४ या वर्षाच्या फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीला बादशहाचा हा कर्तृत्ववान आणि विश्वासू अधिकारी मरण पावला. [मातबरखानाच्या आणखी काही मोहिमांची हकीकत पुढे दिली आहे : सिद्धगड हा मराठ्यांचा एक मोक्याचा किल्ला होता . मातबरखानाने गोमाजी आणि इतर मावळे यांना किल्ल्यावर हल्ला करण्यासाठी उद्युक्त केले . ६ महिन्यानंतर त्यांनी २० ऑक्टोबर १६९३ रोजी त्यानी किल्ला अचानक हल्ला करून जिंकून घेतला . ही बातमी ऐकल्यावर राजमाचीहून खंडोजी कदम आणि दामाजी नारायण यांनी सिद्धगडला वेढा दिला परंतु मातबरखानाने काकाजी आणि रावतमल झाला यांना सैन्य देऊन सिद्धगडकडे रवाना केले आणि मराठ्यांचा वेढा उठविला . दरम्यान मराठे -मोगल यांच्या संघर्षात पोर्तुगीजांचा प्रवेश झाला . त्यांनी मराठ्यांना मदत करण्यास सुरुवात केली. त्यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीबद्दल मातबरखानाने पुढीलप्रमाणे उद्गार काढले आहेत, "मी या मुलखात गेली चार वर्षे आहे. पहिल्या वर्षी हा मुलूख सोडून गेलेल्या रयतेला परत बोलावून मी कोकणातील ६०० खेडी पुन्हा वसविली . दुसऱ्या वर्षी पोर्तुगीजांनी मराठा अधिकाऱ्यांच्या कुटुंबियांना आसरा दिला आणि वैकुंठगड या किल्ल्यावर हल्ला करण्याला मदत केली . तिसऱ्या वर्षी त्यांनी कर्नाळा किल्ला जिंकून घेतला व राजारामाच्या ताब्यातील किल्ल्यांकडे रसद पाठविली . परिणामी आमची सर्व रयत पोर्तुगीज मुलुखात पळून गेली . मराठ्यांनी पट्टा घेतल्यामुळे त्यांना आणखीनच जोर चढला. साष्टी येथील पोर्तुगीजांच्या सेनापतीने शामजी मोरोदेव या राजारामाच्या अधिकाऱ्याला बोलवणे पाठविले आणि तो खान्देरीहून आल्यावर त्याला आणि त्याच्या १५०० सैनिकांना ठाणे येथे आसरा दिला आणि माहुलीच्या किल्ल्यावर आणि भिवंडीवर हल्ला करण्याचे कामी मदत करण्याचे त्यांना वचन दिले."

अशा परिस्थितीत मातबरखानाने शत्रूला हालचाल करण्यास सवड न देता पोर्तुगीजांच्या ताब्यातील कोकणावर हल्ला केला , आणि तेथे असलेल्या शत्रूच्या बायका -मुलांना कैद केले . पोर्तुगीजांनी प्रतिकार केला परंतु त्यांचा मोड करण्यात आला . मोगलांनी त्यांचा वसईच्या किल्ल्यापर्यंत पाठलाग केला , किल्ल्याबाहेर असलेल्या चर्चला आग लावली आणि बहादूरपूरा येथे मुक्काम केला . तेथून त्यांनी बादशहाकडे मदतीची मागणी केली. (पाहा, **खाफीखान,** भाग २. ४०२–४०३) मातबरखानाने बादशहाला कळविले की मराठ्यांचा नाश करावयाचा असेल तर पोर्तुगीजांना येथून हाकलून देणे जरूर आहे.

अनुक्रमणिका

पोर्तुगीजांच्या या अडचणीचा फायदा त्यांच्या उरण येथील प्रदेशातील रहिवाशांनी घेतला . उरण येथे तीन ठिकाणी भरपूर मोती मिळत असत. त्याची वाच्यता पोर्तुगीजांनी कोणाजवळही केली नव्हती . विशेषतः दक्षिणेतील सुलतानांपासून त्यांनी ही गोष्ट गुप्त ठेविली होती . या साठ्याची बातमी मोगलांना देण्यात आली. परिणामी गोव्याच्या पोर्तुगीज गव्हर्नरने औरंगजेबाला शरणागतीचे एक पत्र पाठविले . युरोपियन व्यापारी आणि दरबारातील मातबरखानाच्या शत्रूंनी बादशहापाशी त्यांची रदबदली केली . बादशहाने ताबडतोब पोर्तुगीजांबरोबर चाललेले युद्ध थांबविण्याचा मातबरखानाला हुकूम केला . मातबरखानाने केलेल्या विरोधाचा काहीही उपयोग झाला नाही . बादशहाकडे कोकणामधून जी बातमीपत्रे जात त्यामध्ये मातबरखान ज्या कुशलतेने राज्यकारभार करीत असे किंवा चांगले अधिकारी पाठबिण्याबद्दल बादशहाला लिहीत असे त्याची नोंद आपल्याला आढळते . मातबरखानाने आपल्या सर्व मोहिमांत जंजिऱ्याचा सिद्दी याकुत याची मदत घेतली . दक्षिणेकडे जाण्याचे मार्ग त्याने रोखून धरल्यामुळे दक्षिण महाराष्ट्रातील बादशहाच्या मोहिमात त्याची अप्रत्यक्षपणे मदत झाली . १३ फेब्रुवारी १७०४ रोजी तो मरण पावला . आपल्या कर्तबगारीच्या आणि गुणांच्या बळावरच त्याने बादशहाचा विश्वास संपादन केला, आणि मोठ्या मानाची जागा संपादन केली.]

●●●

अनुक्रमणिका

प्रकरण सोळावे
औरंगजेबाच्या जीवनातील अखेरचे पर्व

(१) मराठ्यांच्या शासनाचे १६८९ ते १६९९ या कालखंडामधील धोरण

रामचन्द्र निळकंठकडे पश्चिम महाराष्ट्राचे राजप्रतिनिधित्व १६८९–१६९७

संभाजीच्या मृत्यूनंतर मराठ्यांचा राजा म्हणून राज्याभिषेक झालेला राजाराम याने मद्रासच्या किनाऱ्याकडे पलायन केले (जुलै, १६८९) तेव्हा महाराष्ट्र देशाच्या कारभाराची सूत्रे त्याच्या मंत्र्यांच्या हाती सोपविली गेली. पश्चिम महाराष्ट्र देशाचा राजप्रतिनिधी म्हणून रामचन्द्र निळकंठ याची नियुक्ती करण्यात आली आणि त्याला हुकमतपन्हा हा किताब देण्यात आला . त्याने जवळ जवळ राजाशिवाय राज्य अशी परिस्थिती असलेल्या महाराष्ट्र देशाच्या भवितव्याची वाटचाल मोठ्या शहाणपणाने आणि कौशल्याने घडवून आणली. त्याने मोगलांची प्रगती रोखून धरली , मोगल प्रदेशावर मोठ्या प्रमाणात हल्ले करण्याची योजना आखली, आपल्या जिंजी येथे वास करून असलेल्या धन्याकडे वारंवार रसद पोहोचती केली आणि नियमांचे बंधन न मानणाऱ्या आणि परस्परांविषयी मत्सराची भावना मनात बाळगून असणाऱ्या मराठा सेनाधिकाऱ्यांतील शांततेचे वातावरण रोखून धरले.

राजारामाचे धोरण आणि जिंजी येथील त्याचे वास्तव्य

राजाराम हा स्वभावतःच दुर्बल मनोवृत्तीचा होता . त्यामध्ये तो कर्नाटकात गेल्यावर आणखी व्यसनाधीनता आणि दुर्वर्तन यांची भर पडली . त्याची परिस्थितीच अशी होती की तिने त्याला कमकुवत बनविले. तो राजा होता पण त्याच्याजवळ त्याचे स्वतःचे असे सैन्य नव्हते किंवा खजिनाही नव्हता अथवा त्याची सत्ता अनिर्बंधपणे मानणारे असे त्याचे प्रजाजनही नव्हते . कोणताही मराठा शिलेदार त्याच्याजवळ १००० किंवा ५०० स्वारांचे देखील पथक बाळगून असल्यास तो आपल्या नामधारी राजाला आपल्या नोकरी करण्याबद्दलच्या अटी बेगुमानपणे सांगू शकत असे . साहजिकच राजारामाने अतिशय मुक्त हस्ताने पदव्या आणि शत्रूच्या ताब्यामधील प्रदेशावरील अधिकारपत्रे यांची खैर खैरात केली . सर्व मराठे सरदार जिंजी येथे जाऊन राजारामाकडे रुजू झाले . त्याने त्यांना पदव्या आणि लष्करी मनसबी बहाल केल्या आणि निरनिराळ्या जिल्ह्यांच्या सनदाही त्यांच्या नावे करून दिल्या . या मुलखात त्यांनी जावे , लूटालूट करावी आणि चौथाई लादावी असे हुकूम त्यांना देण्यात आले . ज्या वेळी राजारामाचे सारे राज्य डबघाईला येत असल्याची परिस्थिती निर्माण झाली होती अशा वेळी त्याने राज्यातील अधिकारपदे आणि पदव्या एकाच वेळी दोनदोन व्यक्तींवर सोपविल्या , यावरून त्याच्या राजकीय दिवाळखोरीची सहज कल्पना येईल . आपले गर्विष्ठ आणि स्वार्थी अधिकारी नाराज होतील असे काहीही करण्याची त्याची हिंमत नव्हती . राजारामाच्या ११ वर्षांच्या छोट्याशा कारकिर्दीत सेनापतीपद (लष्कराचा प्रमुख) हे पाच वेळा बदलण्यात आले. त्याशिवाय एकाच वेळी पाच अधिकाऱ्यांना सेनाप्रमुख याच अर्थाची पण वेगवेगळी पदचिन्हे देण्यात आली होती आणि सेनापतीपदाची ध्वजचिन्हे आणि इतर पदविभूषणे ग्रहण करण्याचा अधिकार वरील सर्वांना देण्यात आला होता (**चिटणीस**, भाग २, ४०–४१).

गनिमीकाव्याची मराठा युद्धपद्धती

अनुक्रमणिका

परंतु सत्तेचे झालेले हे विकेन्द्रीकरण महाराष्ट्रामधील तत्कालीन परिस्थितीला अतिशय अनुरूप असेच होते. प्रत्येक मराठा अधिकारी आपल्या मर्जीला चाहेल त्याप्रमाणे शत्रूबरोबर गनिमी युद्ध खेळत होता आणि मोगली मुलखात भयानक विध्वंस आणि अंदाधुंदी घडवून आणीत होता . आपल्या प्रदेशातील कोणत्या ठिकाणी शत्रूबरोबर मुकाबला करण्यासाठी फळी उभी करावी किंवा शत्रूवर हल्ला करण्यासाठी त्याची कमकुवत जागा कोठे शोधून काढावी ह्या गोष्टीबाबत काय करावे हेच बादशाही अधिकाऱ्यांना कळेनासे झाले. अतिशय चपळ असलेल्या मराठा सैनिकांच्या तुकड्या मोठमोठ्या अंतरापर्यंत चाल करून जात आणि यत्किंचितही अपेक्षा न केलेल्या जागी हल्ले चढवीत आणि अशा तऱ्हेने भटकणाऱ्या मराठा सैनिकांच्या तुकड्या असंख्यात होत्या . याचा परिणाम असा झाला की साऱ्या दक्षिणेत सर्वदूर अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले. या वेळी मराठ्यांनी मोगलांबरोबर समोरासमोर हातघाईचे युद्ध करण्याचे बुद्ध्याच टाळले. पावसाळी महिन्यांत त्यांच्या छावण्या, जिथे सहसा कोणी जात नसे अशा आणि अतिशय दुर्गम अशा असलेल्या ठिकाणी असत . त्यांच्या भ्रमण करणाऱ्या टोळ्या वर्षभर कधीच एकत्र नसत तर ऑक्टोबर ते एप्रिल हा सहा महिन्यांचा मोहिमांचा काळ संपल्यानंतर इतस्ततः आपापल्या ठिकाणी विखुरत.

मराठे मुत्सद्दी आणि सेनापती यामधील परस्पर वैरभाव : पक्षोपपक्षांची स्थापना

महाराष्ट्रामध्ये आणि त्याचप्रमाणे जिंजी येथील दरबारामध्ये असलेल्या मराठा मंत्र्यात परस्परांबद्दल विद्वेषाची भावना होती . परशुराम त्रिंबक याने आपला स्वतःचा असा एक पक्ष तयार केला आणि त्याने संताजी घोरपडे याला आपल्या बाजूकडे वळवून घेतले . याचा साहजिकतया परिणाम असा झाला की धनासिंग जाधव याचा रामचंद्र (पन्त अमात्य) याने पाठपुरावा केला. संताजीच्या वागण्यामधील उद्धटपणाने कमाल मर्यादा गाठली आणि त्याचे वागणे असह्य झाले . पश्चिम महाराष्ट्रामधील राजप्रतिनिधीला तो जुमानीना किंवा त्याने अंगीकारलेल्या राष्ट्राला हितकारक असलेल्या अशा एखाद्या चढाईच्या योजनेत तो सहकार्यही देईना . याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे इ . स. १६९३ मध्ये रामचंद्रपंताने पन्हाळा किल्ल्यावर रसद पोहोचविण्याची आखलेली योजना हे होते . असे करण्याऐवजी संताजी स्वतःसाठी एखादी स्वतंत्र जहागिरी जिंकून घेण्याकडेच आपली शक्ती खर्च करी . म्हणून संताजीला सेनापतीपदावरून बडतर्फ करण्यासाठी रामचन्द्रपंत अमात्याला राजारामाची संमती मिळवावी लागली . त्यानंतर दुसरा एक मंत्री शंकराजी मल्हार याने संताजीला आपल्या कृपाछत्राखाली घेतले . (**जेधे श**.) बंडखोर मनोवृत्तीचा आणि स्वार्थी असलेला दुसरा एक अतिबलाढ्य सेनापती म्हणजे नेमाजी शिंदे हा होय . ह्या अडचणींना रामचन्द्रपंत अमात्याने त्याला जमेल तितक्या कणखरपणे तोंड दिले आणि एकंदर विचार करता या कामगिरीत तो बराचसा यशस्वी झाला असे म्हणण्यास काहीच हरकत नाही . संता घोरपडे आणि धना जाधव यांच्यामधील वैमनस्यामुळे १६९६ मध्ये मराठी राज्यावर यादवी युद्धाचे संकट कोसळले . त्या दोघांमध्ये तीन वेळा युद्धप्रसंग ओढवला. जून १६९७ मध्ये संताचा खून झाला आणि परिणामी त्याचा मुलगा राणोजी आणि भाऊ बहर्जी ऊर्फ हिंदूराव यांच्यामध्ये आणि धनाजीच्या पक्षपात्यांमध्ये भयानक वैमनस्याची आग पेटली. दोन्ही पक्षांमध्ये समझोता घडून येण्यासाठी फार काळ जावा लागला . परंतु मराठ्यांमध्ये आपापसात उद्भवलेल्या या अंतर्गत फुटाफुटीमुळे मोगलांना स्वस्थता अशी फारच थोडी लाभली.

रामचन्द्रपंत अमात्याने दक्षिण कोकण आणि दमण या पोर्तुगीजांच्या ताब्यातील प्रदेशात लढणाऱ्या मराठा अधिकाऱ्यांच्या कुटुंबियांना आसरा देण्याची कामगिरी मोठ्या कौशल्याने पार पाडली . वरील प्रदेशात अजून मोगल सैन्याने धडक मारलेली नव्हती . त्याचप्रमाणे औरंगजेबाच्या आक्रमणापासून

अजूनपर्यंत मुक्त असलेल्या बेरड लोकांच्या प्रदेशात आणि म्हैसूरच्या वायव्य भागातील मुलखात लढणाऱ्या मराठा अधिकाऱ्यांच्या बायकामुलांनादेखील त्याने तितक्याच कौशल्याने संरक्षण दिले.

(२) राजमाता म्हणून ताराबाईने केलेला राज्यकारभार; मराठ्यांच्या राज्यातील अंतर्गत संघर्ष

२ मार्च १७०० रोजी राजारामाचा मृत्यू झाला आणि त्यानंतर तीनच आठवड्यांच्या कारकिर्दीनंतर त्याचा औरस मुलगा कर्ण हा मरण पावला . तेव्हा ताराबाईने आपला औरस मुलगा शिवाजी याला राज्याभिषेक केला. शिवाजी त्या वेळी जेमतेम दहा वर्षांचा होता . ताराबाईने परशुराम त्रिंबकच्या मदतीने राज्यकारभार करावयास सुरुवात केली. परिणामी मराठा राज्यात दुसरे एक राजमंडळ अस्तित्वात आले . आता महाराष्ट्रातील जनतेला मार्गदर्शन करणारी अत्युच्च शक्ती म्हणजे एकटादुकटा मंत्री नव्हती तर ते स्थान राजमाता राणी ताराबाई मोहिते हिला प्राप्त झाले होते . राजारामाचा मृत्यू, त्याच्यानंतर गादीवर कोणी यावयाचे याबाबत निर्माण झालेला संघर्ष आणि १६९९ ते १७०१ या दरम्यानच्या काळात औरंगजेबाला लागोपाठ मिळत गेलेले विजय यामुळे मराठ्यांच्या राज्यावर जे भयानक संकट कोसळले होते त्यातून तिच्या अंगी असलेले असामान्य राज्यकारभार करण्याचे कौशल्य आणि तिचे बलदंड व्यक्तिमत्त्व या गुणांनी मराठी राज्याला निभावून नेले . उघड उघड मराठ्यांच्याबद्दल द्वेषबुद्धी बाळगणारा फारशी इतिहासकार खाफीखान याला देखील नाईलाजाने का होईना परंतु तिचे शहाणपण , तिच्या अंगचे धाडस, राज्यकारभारामधील तिचे कौशल्य आणि सैन्यामधील तिची लोकप्रियता याबद्दल चांगले उद्‌गार काढावे लागले. "ताराबाईच्या मार्गदर्शनाखाली मराठ्यांच्या हालचाली दिवसेंदिवस वाढतच चालल्या . तिने एकंदर सर्व बाबींची सूत्रे आपल्या हाती घेतली . उदाहरणार्थ सेनापतीच्या नेमणुका आणि बदल्या , देशातील जमिनीची मशागत आणि मोगलांच्या मुलखात हल्ले करण्याच्या योजना , वगैरे. तिने दक्षिणेतील मोगलांच्या सहा सुभ्यांत फार काय तर माळ्यव्यातील सिरोंज आणि मन्दसोरपर्यंतच्या त्यांच्या मुलखात सैन्य पाठवून देश उद्‌ध्वस्त करण्याची अशी काही व्यवस्था केली आणि आपल्या अधिकाऱ्यांची मने आपल्या अंगच्या गुणांनी अशा प्रकारे जिंकून घेतली की औरंगजेबाने आपल्या कारकिर्दीच्या अखेरीपर्यंत मराठ्यांच्या सत्तेला नेस्तनाबूत करण्याच्या केलेल्या सर्व प्रयत्नांना अपयश आले." (**के. के.**, भाग २. ५१६)

राजारामाचा मृत्यू झाल्यानंतर लगेच परशुराम त्रिंबक हा त्या सुमारास सातारा येथे असलेल्या मंत्र्यांबद्दल वाटणाऱ्या मत्सराने आपल्या स्वतःच्या परळीच्या किल्ल्यातून बाहेर पडला आणि मोगलांना जाऊन मिळण्याची त्याने तयारी दाखविली . परंतु ताराबाईने या अतिशय कर्तबगार अशा अधिकाऱ्याला प्रतिनिधी पदावर नियुक्त करून त्याच्यावर आपला संपूर्ण विश्वास टाकून त्याला आपल्या बाजूला वळवून घेण्यात यश मिळविले. परंतु अतिशय प्रखर अशा संघर्षानंतरच ताराबाईला आपले वर्चस्व स्थापन करता आले. काही सेनानींनी तिच्या आज्ञांचे पालन केले तर काहींनी तिची अवज्ञा केली . (**चिटणीस**, भाग २. ७२) राजारामाची धाकटी बायको राजसबाई हिने आपला मुलगा संभाजी (दुसरा) याला राजपदावर बसवून ताराबाईशी भांडण करण्यास आणि आपला स्वतंत्र पक्ष उभारण्यास सुरुवात केली . मराठा पुढाऱ्यांमध्ये आणखी एक तिसरा पक्ष निर्माण झाला होता . त्यांना छत्रपती शिवाजीच्या वारसांच्या थोरल्या शाखेतल्या शाहूला सिंहासनावर बसवून राष्ट्रीय ऐक्य साधावयाचे होते. राजघराण्याबाबतच्या या भांडणात मराठा सेनानींच्या विशेषतः धना जाधव आणि संता घोरपडे आणि त्यांचे अनुयायी यांच्यातील वैयक्तिक हेव्यादाव्यामुळे निर्माण झालेल्या गुंतागुंतीच्या परिस्थितीची भर पडून ही भांडणे अधिकच विकोपाला गेली .

[मराठे सरदारात यावेळी जी भांडणे चालली होती त्याची हकीकत पुढे दिली आहे . १६९७ मध्ये धना जाधवाने संता घोरपडे याचा पराभव केल्यानंतर संताजीचा मुलगा राणोजी आणि भाऊ बहिर्जी यांनी धनाजीबरोबर वैर धरले . १७०० च्या डिसेंबर महिन्याच्या अखेरीला इस्लामपुरीपासून १०, १२ मैलांवर दोन्ही पक्षांमध्ये युद्ध झाले. या युद्धात दोहो बाजूंचे अतिशय नुकसान झाले. कृष्णा मल्हार याने धनाजीची बाजू

घेतली. या लढाईत घोरपड्यांचा पराभव होऊन त्यांनी आहिरवाडीकडे पळ काढला . यानंतर ३ आठवड्यांनी (१६ जानेवारी १७०१) बातमी आली की राणोजी याचा मुक्काम जगजीवनी येथे असून धनाजीने केलेल्या पराभवाचा सूड घेण्याची योजना तो करीत आहे.

११ सप्टेंबर १७०१ रोजी बादशहाकडे बातमी आली की नीरा नदीच्या डाव्या तीरावर धना आणि हणमंत निंबाळकर यांच्यामध्ये फाचुनी येथे (जेजुरी अथवा चिंचोळी?) लढाई झाली असून या लढाईत धनाने हणमंत याला कैद केले आहे. (**अखबारात**)

यानंतर काही काळाने धनाजीने राणोजीची फिरोजाबाद येथे भेट घेतली . यामध्ये त्याचा उद्देश पूर्वीची भांडणे मिटवण्याचा आणि पुढील कार्यक्रमासाठी दोस्ती घडवून आणण्याचा होता . (**दिल.**, १३०४) १७०१ च्या सप्टेंबरमध्ये राणोजी आणि बहिर्जी यांनी आणि १७०३ च्या जुलैमध्ये धनाजीने मोगलांकडे त्यांच्या चाकरीत शिरण्याबाबत बोलणी लावली . परंतु ही सर्व बोलणी अप्रामाणिकपणाची व स्वपक्षीयांकडून दडपण आल्यामुळे त्यामधून सुटका करून घेण्यासाठी होती. साहजिकच त्यातून काही निष्पन्न झाले नाही.]

(३) शाहूचे कैदेतील जीवन, १६८९–१७०७; मोगलांचे मराठा पक्षपाती

ज्यावेळी ऑक्टोबर १६८९ मध्ये रायगडचा पाडाव झाला त्यावेळी संभाजीचा ७ वर्षे वयाचा थोरला मुलगा शाहू हा मोगलांचा कैदी झाला होता . त्याला बादशहाच्या तंबूजवळ आणि गुलालबार या नावाने ओळखल्या जाणाऱ्या शाही कबिल्याच्या परिसरात ठेवण्यात आलेले होते . (**एम्. ए.**, ३३२) बादशहाकडून त्याला जरी ममतेने वागविले जात होते तरी त्याच्यावर अतिशय सक्त पाहारा ठेवण्यात येत असे . त्याच्याबरोबर त्याची आई येसूबाई आणि सावत्रभाऊ मदनसिंग आणि मधुसिंग हे होते.

इ. स. १७०० मध्ये शाहूला भयंकर तापाने पछाडले . या आजाराने त्याचे मन आणि शरीर पुढील सर्व आयुष्यभर कमकुवत करून ठेवले असे दिसते . त्याच्या आजारीपणाबद्दलची हकीकत अखबारात पुढीलप्रमाणे दिली आहे : राजा शाहू हा २६ ऑगस्ट रोजी बादशहाच्या भेटीला आला आणि त्याने बादशहाला मुजरा केला . बादशहाने त्याच्याकडे निरखून पाहिले आणि उद्गार काढले की 'तुझ्या चेहेऱ्याचा रंग पार पिवळा पडून गेला आहे . याचे कारण काय बरे आहे .' यावर खोजा हफीज अंबर याने उत्तर दिले की 'राजा शाहू शिजविलेली डाळ , चपाती, अगर भात काहीही खात नाही तर फक्त गोड पदार्थाचे सेवन करतो . याचे कारण त्याने असे सांगितले की हिंदूंनी तुरुंगात शिजविलेले अन्न खाणे हे निषिद्ध मानले आहे आणि मी स्वतःला कैदी समजतो.'

यानंतर दिवसेंदिवस औरंगजेबाच्या भोवतालची परिस्थिती अधिकाधिक बिकट होऊ लागली आणि दक्षिणेतील गुंतावळ सुटण्याची चिन्हे दिसेनात. तेव्हा त्याने शाहूला पुढे करून मराठा सेनानींबरोबर होणारे संघर्ष मिटविण्यासाठी बेत आखण्यास सुरुवात केली . पहिल्या प्रथम त्याने ९ मे १७०३ रोजी शाहूचे मन मुसलमान धर्म स्वीकारण्यासाठी वळवावे म्हणून हमीदुद्दीनखानाला पाठविले . त्याची अशी समजूत झाली की त्याच्या कारकिर्दीत इतर बऱ्याच हिंदू राज्यांच्या वारस राजपुत्रांना धर्मपरिवर्तन करण्याचा जो मोह पडला त्याचा शाहूवर परिणाम होईल . (**अखबारात**) परंतु शाहूने अशा तऱ्हेने धर्मभ्रष्ट होण्यास पूर्णपणे नकार दिला. यानंतर बादशहाने शाहूला सोडण्याची तयारी दाखवून मराठ्यांच्यामध्ये दुफळी माजविण्याचा प्रयत्न केला . शाहूच्या सुटकेच्या अटी राजपुत्र कामबक्ष याच्या मध्यस्थिने प्रमुख मराठा सेनानीबरोबर होणाऱ्या तहान्वये ठरविल्या जावयाच्या होत्या . या प्रमुख मराठा पुढाऱ्यांबरोबर संपर्क साधण्यासाठी आणि त्यांची मने आपलीशी करण्यासाठी तंजावरचा राजा व्यंकोजी भोसले याचा मुलगा रायभान याला बादशहाने आपल्या चाकरीत घेतले आणि त्याला सहा हजारी मनसबदारी दिली . रायभान याला शाहूच्या भेटीसाठी १० जुलै १७०३ रोजी पाठविण्यात आले. परंतु ही कारवाई फसली. याबाबत भीमसेन सक्सेनाने परखडपणे पुढील उद्गार काढले आहेत , "राजपुत्राने वारंवार आपल्यातर्फे माणसे धनाकडे पाठविली . परंतु परिस्थिती अशी होती की मराठे अजून पूर्णपणे नामशेष झाले नव्हते आणि सारा दक्षिण देश अतिशय

लज्जतदारपणे तयार केलेल्या शिऱ्याप्रमाणे आयता त्यांच्या घशात पडला होता . असे असताना तह करण्याची त्यांना काय जरूर होती ?... परिणामी राजपुत्राचे वकील पदरी निराशा घेऊन परतले आणि राजा शाहूला पुन्हा एकदा गुलालबारमध्ये कडेकोट बंदोबस्तात ठेवण्यात आले .[या वाटाघाटीसंबंधी अधिक तपशीलवार माहिती खाफीखान याने दिलेली आहे. (**के. के.**, भाग २, ५२०) ती पुढीलप्रमाणे आहे : सर्व मराठा सरदारांच्या वतीने धना जाधव याने तहाच्या अटी सुचविल्या . त्यात त्याने कळविले की बादशहाने ताराबाईच्या सर्व प्रमुख अधिकाऱ्यांना सुरक्षिततेची फर्माने पाठवावी आणि त्यांना बोलवावे. ते आल्यानंतर कामबक्ष याने राजा शाहूबरोबर जाऊन बादशाही छावणीच्या पुढे १० मैलांवर त्यांची गाठ घ्यावी . प्रथम मराठे सरदार शाहूची गाठ घेतील आणि नंतर कामबक्ष त्यांना बादशहाकडे घेऊन जाईल . बादशहाने अशी ८० फर्माने लिहिण्याचा हुकूम दिला . परंतु नंतर मराठ्यांच्या फसवेपणावर विश्वास न बसल्याने त्याने वरील योजना फेटाळून लावली . या वाटाघाटीत कामबक्षातर्फे मध्यस्थाचे काम करणारा सुलतान हुसेन याला लढत लढत मराठ्यांच्याकडून बादशाही छावणीकडे यावे लागले.

२९ नोव्हेंबर १७०३ रोजी शाहूचे लग्न बहादूरजीच्या मुलीशी करण्याचे निश्चित झाले . त्यानुसार आपल्या जहागिरीच्या गावाहून लग्नासाठी मुलीला दरबारात आणण्याची आज्ञा बहादूरजी याला देण्यात आली . (**अख.**, २९ नोव्हें. १७०३; **एम. ए.**, ४८२). जानेवारी १७०४ मध्ये राजारामाच्या पकडलेल्या २ मुलींचे लग्न अनुक्रमे समशेर बेग आणि देवगडचा राजा नेकनाम यांच्याबरोबर लावण्यात आले . त्याचप्रमाणे संभाजीच्या मुलीचा विवाह सिकंदर आदिलशहा याचा मुलगा महमद मुहीउद्दीन याच्याबरोबर लावण्यात आला . (**एम. ए.**, ४८०–४८२; **अख.**, २४–२५ जाने. १७०४) ५ फेब्रुवारी १७०४ रोजी बादशहाकडे अशी बातमी आली की राजारामाचा मुलगा , त्याची आई आणि त्यांच्या ५ दासी यांना एका गुलामाने विषप्रयोग केला असून दासी या मेलेल्या आहेत आणि राजपुत्र आणि त्याची आई मृतावस्थेत आहेत (**अखबारात**)]

औरंगजेबाला आपण अगदी अगतिक परिस्थितीत पडलो आहो असे वाटले . इ. स. १७०७ या त्याच्या हयातीच्या अखेरच्या वर्षी त्याने मराठ्यांबरोबर समझोता करण्याचा आणखी एक प्रयत्न केला . त्याने शाहूची रवानगी आपल्या स्वतःच्या छावणीतून २५ जानेवारी रोजी नुस्रतजंग याच्या छावणीत केली . रायभानची नियुक्तीही नुस्रतजंगाच्या लवाजम्याकडे करण्यात आली . बादशहाला अशी आशा वाटली की शाहूच्या सुटकेची आपण किंमत दिल्यास रायभानला मराठा सेनापतींची मने बादशहाबरोबर तह करण्यासाठी वळविणे शक्य होईल . नुस्रतजंगाने मराठा सेनापतींना स्नेहपर खलिते धाडले आणि त्यांना मोगल छावणीत येऊन राजा शाहूला मिळण्याचे आवाहन केले . परंतु यामधून काहीही निष्पन्न झाले नाही . मराठ्यांमध्ये पुन्हा एकदा यादवीयुद्धाने पेट घेतला होता आणि ताराबाईला बंदिस्त करण्याचा व तिचे सर्व बेत उधळून टाकण्याचा राजसबाईचा प्रयत्न चालला होता . परंतु या दुहीचा फायदा घेण्याची आणि या भांडणात शाहूला गुंतवून मराठ्यांमध्ये आणखी फूट पाडण्याची बादशहाची जी आशा होती तिला मात्र अपयश आले. (**दिल.**, भाग २, १५४ ब, १५५ अ; **एम. ए.**, ५११) औरंगजेबाच्या मृत्यूनंतरच आग्ऱ्याकडे कूच करून जाणाऱ्या राजपुत्र आजमने शाहूच्या दक्षिणेकडे पलायन करून जाण्याच्या बेतास मूक संमती दिली. (**दिल.**, भाग २, १६३ अ)

औरंगजेबाच्या चाकरीतील सुप्रसिद्ध मराठे सरदार

औरंगजेबाबरोबर चाललेल्या या संघर्षात महाराष्ट्रातील सर्वच प्रमुख मराठा घराणी राष्ट्राच्या अस्तित्वासाठी झगडणाऱ्या पक्षाच्या बाजूने होती ही गोष्ट खरी नाही . त्यांच्यापैकी अनेकांनी वेगवेगळ्या कारणांसाठी मोगलांची चाकरी केली . ज्या घराण्यात छत्रपती शिवाजीराजांच्या आईचा जन्म झाला त्या सिंदखेडच्या जाधवरावांचे घराणे लखुजी जाधवरावाचा खून झाल्यानंतर शहाजहानच्या कारकिर्दीच्या अगदी सुरुवातीला (१६३०) मोगल सेनादलात दाखल झाले . (**अब्दुल हमीद , आय. ए., ३०८–३१०**) त्यांच्या अनेक पिढ्यांनी मोगल घराण्याची सेवाचाकरी केली .[बादशहाला जाऊन मिळालेल्या अनेक मराठा सरदारांपैकी चंद्रराव मोरे यांच्या कुटुंबियांपैकी एकाचाही उल्लेख मोगलांच्या अधिकृत दफ्तरात मिळत नाही . परंतु जयसिंगाच्या पत्रावरून आपल्याला असे कळून येते की मोरे कुटुंबांपैकी काहीजण १६६५ मध्ये बादशहाला जाऊन मिळाले होते . परंतु मोगलांबरोबर चाललेल्या लढ्यात ते पुन्हा मराठ्यांकडे आले असावे अथवा कालांतराने त्यांचा नामनिर्देशही केला जाईनासा झाला असे दिसते . १६९३ मध्ये मोगलांनी पन्हाळ्याला वेढा घातला असताना माधोरामने मुईजुद्दीनची जी पत्रे लिहिली त्यात मोगलांचा विरोधक म्हणून एका मोरे कुटुंबियांचा उल्लेख आहे . नोव्हेंबर १६९४ मध्ये शहाबंदरचा मोगल किल्लेदार आणि चंद्रराव मोऱ्यांचा मुलगा व्यंकट याला मराठ्यांनी पकडले . या घटनेमुळे बादशहाने हजारी मनसबदारीवरून

त्याची बडतर्फी केली. (**अखबारात**)] राजारामाची आई सोयराबाई हिचा ज्या घराण्यात जन्म झाला त्या घराण्यातील कान्होजी शिर्के आणि त्याचे मुलगे यांचा संभाजीने उच्छाद मांडला तेव्हा ते बादशहाकडे आश्रयार्थ पळून गेले होते. त्यांना बादशहाने मोठ्या मनसबी दिल्या . शिर्के आणि त्याचप्रमाणे म्हसवडचा ठाणेदार आणि १६९४ पासून मोगलांचा पक्षपाती बनलेला नागोजी माने हे दोघेजण मोगलांबरोबर कायम एकनिष्ठ राहिले आणि त्यांनी मोगलांची फार काळपर्यंत आणि बहुमोल अशी सेवाचाकरी केली . या दोघांशिवाय मोगलांच्या चाकरीला वाहिलेले आणखी तिघे एकनिष्ठ मराठा सरदार म्हणजे खानापूरचा ठाणेदार आवजी अढाळ (याला २३ जानेवारी १७०० रोजी मराठ्यांनी कैद केले), खटावचा ठाणेदार रामचन्द्र (हा आपल्या ठाण्याचा बचाव करत असताना १८ ऑगस्ट १७०० रोजी मारला गेला) आणि एक वेळ काशीगावचा ठाणेदार असलेला बहर्जी पांढरे. (**अखबारात**)

वर उल्लेखिलेल्या मराठा सरदाराव्यतिरिक्त मोगलांच्या चाकरीत असलेला आणखी एक मराठा सरदार म्हणजे सटवाजी डफळे . याचे जीवन विविध प्रसंगांनी भरलेले आहे . हे घराणे आदिलशाही सुलतानांच्या कारकिर्दीत उमरावपद भूषवीत होते . आदिलशाही घराण्याचा पाडाव झाल्यावर त्यांनी विजेत्या मोगलांच्याकडे आपली सेवा रुजू केली. सटवाजीचा मुलगा बाजी चव्हाण डफळे याने साताऱ्याच्या वेढ्याचे प्रसंगी (१३ एप्रिल १७००) चढाई करणाऱ्या तुकडीचे नेतृत्व करून शूर वीराप्रमाणे लढता लढता प्राणार्पण केले. खुद्द सटवाजीने १६९५ च्या पूर्वीच मोगलांच्या पक्षाचा त्याग केला होता आणि बादशाही मुलखावर सतत हल्ले चालू ठेवले होते . (**एम्. ए.**, ४०६ आणि **अख.**) परंतु तो पुन्हा ऑगस्ट १७०१ मध्ये बादशहाच्या चाकरीत रुजू झाला . त्याला बादशहाने पंचहजारी मनसबदार केला आणि साताऱ्याच्या वेढ्याचे प्रसंगी कामी आलेल्या त्याच्या मुलाने दाखविलेल्या शौर्याबद्दल बक्षिसी म्हणून त्याला जतची जहागिरी दिली. [नोव्हेंबरमध्ये सटबाजी डफळे याला मराठे सरदारांना बादशहाकडे आणण्याच्या कामावर नियुक्त करण्यात आले (**अख.**, १ नोव्हें. १७०१). सटवाजी डफळे हा मराठ्यांबरोबर गुप्तपणे कारस्थाने करतो म्हणून बादशहा त्याच्यावर नेहमी अविश्वास दाखवीत असे . परंतु त्याची तडकाफडकी हकालपट्टी करण्याइतका तो क्षुल्लक नव्हता . दरबारी बातमीपत्रात त्याचा उल्लेख वारंवार आढळतो . जुलै १७०६ मध्ये इस्लामपुरी येथे सटवाजी मरण पावला. (**एम. ए.**, ५१६)

अमृतराव निंबाळकराने प्रथम मोगलांची चाकरी पत्करली. परंतु नंतर तो संताजीला येऊन मिळाला. (**अख.**, २३ आणि २४ ऑक्टो., २१ नोव्हे. १६९३) यानंतर २ वर्षांनी तो परत मोगलांकडे आला . परंतु तो लगेच राजारामाला येऊन मिळाला . कारण मे १६९६ मध्ये धनाजीच्या संताजीबरोबर झालेल्या युद्धात तो मारला गेला. (**जेधे श.**)

शिवाजीचा जावई अचलोजी हा फेब्रुवारी १६८६ मध्ये औरंगजेबाला मिळाला.

मार्च १६९४ पर्यंत तो मोगलांच्या चाकरीत होता . (**एम. ए.**, २७१; **अख.**, १३ मार्च १६९४) माधोजी नारायण याचा उल्लेख शिवाजीच्या चुलत्याचा मुलगा असा आढळतो. तो नोव्हेंबर १६९४ मध्ये आपला मुलगा आणि पुतणे यांना घेऊन मोगलांकडे आला . १७०४ मध्ये बुधपाच गाव या गावाचा तो मोगल **ठाणेदार** असल्याचा उल्लेख येतो (**एम. ए.**, ४८०; **अख.**, २४ जून)

मोगलांना बऱ्याच उशिरा येऊन मिळणारा सरदार म्हणजे तंजावरच्या व्यंकोजीराजाचा मुलगा रायभान . हा १९ जून १७०३ रोजी मोगलांना येऊन मिळाला तेव्हा त्याला ६ हजारी **मनसबदार** करण्यात आले. प्रथम त्याला शाहूची सुटका करण्यासाठी मराठा सेनापतींबरोबर तहाच्या वाटाघाटी करण्यासाठी नेमण्यात आले . या वाटाघाटी फसल्या परंतु त्याने बादशहाची अखेरपर्यंत चाकरी केली आणि १७०६ मध्ये नुस्रतजंग याच्या हुकुमावरून त्याने मराठा पुढाऱ्यांबरोबर वाटाघाटीचा पुन्हा एकदा प्रयत्न केला. (**दिल.**, १४५ ब, १५४ ब; **अख.**) मोगलांना येऊन मिळालेल्या इतर मराठा सरदारांमध्ये कान्होजी खोपडे (**जेधे श.**, **अख.** ५ जाने. १७०१), रावजगदेव (**अख.**, ११ मे १६९५), मानाजी (**अख.**, डिसें. १६९४) आणि सातारा किल्ल्याचा किल्लेदार सुभानजी व त्याचा मुलगा (१७००) यांचा उल्लेख करावा लागेल . चिटणीसांच्या बखरीमध्ये पिसाळांच्या कुटुंबाचा उल्लेख येतो. परंतु फारशी कागदपत्रांत त्यांचा उल्लेख येत नाही.]

हजारो मावळे अथवा मराठ्यांचे पहाडी सैनिक औरंगजेबाच्या चाकरीत होते . परंतु मोगलांच्या बाजूला मराठ्यांचे जे भाडोत्री सेनादल होते त्याचा तसा बघावयाला गेले तर एवढाच फायदा होता की त्यांच्यापासून होणाऱ्या उपद्रवाला आपोआप आळा बसत असे. त्यांच्या हजेरीमुळे मोगल सैन्याच्या ताकदीत

फारशी काही भर पडली नव्हती. याचे कारण एक म्हणजे मोगल सैन्यातील कायम सैनिकाशी तुलना करता मराठा सैनिकाजवळील युद्धोपयोगी सामग्री आणि हत्यारे ही अतिशय कमी दर्जाची होती . (**दिल**., भाग २, १४६६) आणि शिवाय जरी मोगलांकडून त्यांना पगार चुकता होत असे तरी ते त्यांच्या बाजूने लढण्यात कुचराई करीत आणि त्यांचे अधिकारी वारंवार आपला पक्ष बदलीत.

(४) औरंगजेबाचा साताऱ्याला वेढा

१९ ऑक्टोबर १६९९ रोजी औरंगजेबाने इस्लामपुरी येथील आपली छावणी सोडली आणि मराठ्यांचे दुर्गम किल्ले जिंकून घेण्याचा आपल्या मोहिमेवर तो निघाला . त्याच्या आयुष्याची पुढील सहा वर्षे या मोहिमेपायी गेली . एकापाठोपाठ एक असे त्याने सातारा , परळी, विशाळगड (खेळणा), कोंडाणा (सिंहगड), रायगड आणि तोरणा हे सुप्रसिद्ध किल्ले आणि त्याचप्रमाणे थोड्याफार कमी महत्त्वाची अशी आणखी पाच ठिकाणे जिंकून घेतली . परंतु या ठिकाणी ही गोष्ट लक्षात ठेवण्याजोगी आहे की एक तोरण्याचा अपवाद सोडल्यास इतर कोणताही किल्ला त्याने हल्ला करून जिंकून घेतला नाही . सर्व किल्ले काही कालावधी लोटल्यावर बादशहाच्या स्वाधीन झाले आणि प्रत्येक किल्ल्यासाठी त्याला विशिष्ट किंमत मोजावी लागली. किल्ल्यावरील शिबंदीला त्यांच्या कपड्यालत्त्यानिशी आणि इतर सामानसुमानासह बाहेर जाऊ देण्यात आले आणि मोगलांना प्रतिकार करण्याचे थांबविल्याबद्दल किल्लेदारांना भारीपैकी बक्षिसी देण्यात आली.

इस्लामपुरी सोडताना औरंगजेबाने केलेली व्यवस्था

इस्लामपुरी येथील छावणीत औरंगजेबाने आपली बेगम उदेपुरी आणि तिचा मुलगा कामबक्ष , त्याचप्रमाणे आपली मुलगी जिनत उन्निसा या कुटुंबियांना सर्व वरकड सामानसुमान आणि गरज नसलेली अधिकारी मंडळी आणि त्याचप्रमाणे सैन्यातील शिपाई व बाजारबुणगे यांच्या बायकामंडळींना ठेवले . या छावणीच्या संरक्षणाबाबतचे सर्व अधिकार वजीर असदखान याजकडे सुपूर्द करण्यात येऊन त्याच्या दिमतीला जरूर तेवढे सैन्य देण्यात आले. किल्ल्यांना वेढा घालणाऱ्या औरंगजेबाच्या सैन्याभोवती घिरट्या घालीत फिरणाऱ्या अगर इस्लामपुरी येथील मुख्य छावणीवर हल्ला करण्याच्या उद्देशाने चाल करून जाणाऱ्या मराठ्यांच्या जंगी पलटणीबरोबर दौड करीत मुकाबला करण्याची कामगिरी जुल्पिकार ऊर्फ नुस्रतजंग या सेनानीवर सोपविण्यात आली. (**एम्. ए**., ४०८, ४०९; **दिल**., भाग २, १२९ अ)

इस्लामपुरीहून कूच करून बादशहा नोव्हेंबरमध्ये साताऱ्याच्या दक्षिणेस २१ मैलांवर असलेल्या मसूर येथे पोहोचला. मसूरच्या नैर्ऋत्येस ६ मैलांवर वसंतगड किल्ला होता . तेथील शिबंदीने भयभीत होऊन किल्ला खाली केला . बादशाही फौजांनी तारीख २५ रोजी किल्ल्यात प्रवेश केला . भावी काळातील मोहिमेच्या यशाचे सुचिन्ह निदर्शक म्हणून बादशहाने या विजयाप्रीत्यर्थ किल्ल्याचे नाव "विजयाची किल्ली" (किलिद इ फतह) असे ठेवले (**एम्. ए**., ४११).

साताऱ्यासमोर आणि आजूबाजूला झालेल्या लढाया

तेथून निघून बादशाही फौजा ८ डिसेंबर रोजी सातारा किल्ल्यासमोर येऊन धडकल्या . किल्ल्याच्या तटबंदीच्या उत्तरेला दीड मैलावर असलेल्या करंजा या खेडेगावी बादशहाने मुक्काम केला .

तेथून जवळच मोगलसैन्य, सैन्याबरोबर असलेले बाजारबुणगे आणि वाहतुकीची जनावरे यांची एकठ्ठा पाच मैलांचा परिध व्यापून असलेली छावणी पसरली होती . मराठा हल्लेखोरांपासून संरक्षण मिळावे म्हणून या छावणीसभोवार भिंत बांधून काढण्यात आली होती . किल्ल्याच्या वेढ्याच्या कामाला ९ डिसेंबरपासून सुरुवात झाली. किल्ल्याभोवतालची जमीन खडकाळ असल्यामुळे चर खणण्याचे काम अतिशय सावकाश आणि त्रासदायक होऊन राहिले. किल्ल्यावरील शिबंदीने त्यांच्याजवळ असलेल्या सर्व तऱ्हेच्या शस्त्रास्त्रांचा अविरत भडिमार रात्रंदिवस मोगलांवर चालू ठेवला . परंतु किल्ल्याभोवती सर्व बाजूंनी चर खणून वेढा घालण्याचे काम अजून पूर्ण झालेले नव्हते . साहजिकच किल्ल्याचा वेढा संपेपर्यंत शत्रू हा निर्धोक किल्ल्यामधून बाहेर व किल्ल्याबाहेरून आत ये-जा करू शकत होता.

शत्रूने वारंवार मोगलांच्या छावणीवर हल्ला करण्याचे काम चालू ठेवले होते . परंतु हे सर्व हल्ले मोगलांनी थोडेफार नुकसान सोसून का होईना परतवून लावले . परंतु मोगलसैन्याला जो फार मोठा धोका निर्माण झाला तो मराठ्यांच्या इतस्ततः भ्रमण करणाऱ्या जंगी सैन्याकडून . कारण या सैन्याने साताऱ्याला वेढा घालून वसलेल्या मोगल सैन्याची दशा एखाद्या वेढा पडलेल्या शहराची जशी कोंडल्यागत अवस्था होते तशी करून टाकली . धनाजी जाधव , शंकराजी नारायण आणि शत्रूचे इतर सेनानी मोगलांच्या ताब्यातील मुलखात इतस्ततः पसरले आणि त्यांनी खेड्यापाड्यांवर हल्ला करण्याचे , मोगलांची ठाणी मारून काढण्याचे आणि धान्याची वाहतूक करणाराचे (वंजारी जमातीचे लोक) मार्ग रोखून धरण्याचे सत्र सुरू केले.[१९ डिसेंबर रोजी कराराबादचा फौजदार घोरीखान हा पकडला गेला . परंतु तीनच दिवसांनी मसूर जवळ हमीदउद्दीनखानाने त्याची सुटका केली. २७ रोजी छावणीपासून केवळ ४ मैलांवर हणमंतने इखलासखानावर हल्ला केला आणि तो , त्याचा मुलगा व इतर अनुयायी यांना ठार मारले. शत्रू छावणीभोवती सर्व बाजूंनी घिरट्या घालीत राहिला . १० जानेवारी १७०० रोजी नुस्रतजंग , बहरामंदखान आणि हमीदउद्दीन यांनी धना जाधव , हणमंत निंबाळकर आणि राणोजी घोरपडे यांच्यावर हल्ला केला . रहमतपूरपासून ६ मैलांवर घनघोर असे युद्ध झाले . या युद्धात मराठ्यांचा मोड झाला . बादशहाच्या आज्ञेवरून शत्रूच्या ठार झालेल्या ५०० सैनिकांच्या मुंडक्यांची रास करण्यात आली . २२ तारखेला धनाजीने खानापूरच्या ठाणेदाराला पकडले.

शत्रूच्या हालचालीमुळे छावणीमध्ये अन्नधान्य आणि वैरण येण्याची थांबली आणि परिणामी छावणीत दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली . खटावचा ठाणेदार त्याचप्रमाणे इतर काही स्थानिक अधिकाऱ्यांना छावणीमध्ये धान्य आणल्याबद्दल खूप बक्षिसी देण्यात आली . ३ फेब्रुवारी रोजी ८००० बैलांवर लादून छावणीमध्ये धान्य आणण्यात आले तेव्हा छावणीतील लोकांनी सुस्कारा टाकला.]

छापा घालून सातारा काबीज करण्यात मोगलांना आलेले अपयश

तरबियतखानाने मोठे कष्ट घेऊन २४ गज लांबीचा एक सुरुंग खणला आणि तो किल्ल्याच्या तटबंदीखालपर्यंत नेऊन पोहोचविला . परंतु किल्ल्याच्या तटबंदीला खिंडार पाडून हल्ला चढविणे परिणामकारक ठरणार नाही असा निर्णय घेण्यात आला . त्यानंतर २३ जानेवारी रोजी मोगल फौजेतील २००० मावळ्यांनी अचानक हल्ला करून तटाच्या भिंती चढून जाण्याचा प्रयत्न केला. पण हा प्रयत्न फसला. १३ एप्रिल रोजी २ सुरुंग उडविण्यात आले . पहिल्या सुरुंगाच्या स्फोटामुळे शिबंदीपैकी अनेकजण ठार झाले. कोसळलेल्या भिंतीच्या ढिगाऱ्याखाली किल्ल्याचा हवालदार प्रागजी प्रभू हा गाडला गेला परंतु त्याला ढिगाऱ्याखालून जिवंत बाहेर काढण्यात आले. दुसऱ्या सुरुंगाचा स्फोट बाहेरच्या बाजूस झाला. या स्फोटामुळे तटबंदीचा एक बुरूज कोसळला आणि तटबंदीच्या खाली हल्ला करण्यासाठी दाटीदाटीने एकत्रित झालेल्या मोगल सैन्यावर पडला . यामुळे मोगलांचे जवळजवळ २००० सैनिक कामी आले . या सुरुंगाच्या स्फोटामुळे किल्ल्याच्या भिंतीला २० गज रुंदीचे खिंडार पडले . बादशाही फौजेपैकी काही शूर सरदार, विशेषतः सटवाजी डफळे (भूतपूर्व विजापूर जिल्ह्यातील जत संस्थानचा संस्थापक) याचा मुलगा बाजी चव्हाण डफळे, तटबंदीवर चढून गेले आणि तेथून त्यांनी "तुम्ही सर्वजण वर चढून या. या ठिकाणी शत्रूचा ठावठिकाणा नाही" अशा आरोळ्या आपल्या बरोबरीच्या सरदार मंडळींना देण्यास सुरुवात केली .

परंतु कोणीही त्यांच्या पाठोपाठ गेले नाही . कारण वर उल्लेखिलेल्या स्फोटातून जे मोगल सैनिक वाचले होते ते त्यांच्यावर कोसळलेल्या आपत्तीने इतके विमनस्क आणि भयचकित झाले होते की त्यांना बाहेर येण्याचे अवसानच उरले नव्हते . दरम्यान मोगलांच्या अचानक हल्ल्यामुळे बावरून गेलेली शिबंदी जागरूक झाली. त्यांनी खिंडारापाशी धाव घेतली आणि आत घुसलेल्या मोगल सैनिकांनी कत्तल करून त्यांच्या आशेचा उजळलेला दीप विझवून टाकला.

साताऱ्याचा पाडाव

दरम्यान मार्च महिन्यात राजाराम मरण पावला होता . त्याचा मंत्री परशुराम याने मोगलांना शरण जाण्याचे ठरविले . तरबियतखानाने किल्ल्याची ७० गज भिंत उद्ध्वस्त करून टाकली होती आणि सुरुंगांच्या स्फोटामुळे शिबंदीपैकी ४०० जण ठार मारले गेले होते . या सर्व गोष्टी साताऱ्याचा किल्लेदार सुभानजी याने जेव्हा विचारात घेतल्या तेव्हा त्याचा धीर खचला आणि त्याने राजपुत्र आजम याच्या मध्यस्थीने बादशहाबरोबर किल्ल्याच्या शरणागतीच्या अटी पक्क्या केल्या . २१ एप्रिल रोजी त्याने बादशाही निशाण किल्ल्याच्या तटावर रोवले आणि दुसऱ्या दिवशी शिबंदीसह बाहेर पडून त्याने किल्ला मोगलांच्या हवाली केला . राजपुत्र महमद आजम याच्या सन्मानार्थ किल्ल्याचे नाव बदलून आजमतारा असे नाव ठेवण्यात आले . [१३ एप्रिलला २ सुरुंग उडविण्यात आले . पहिल्या सुरुंगाने साताऱ्याच्या किल्ल्याचा हवालदार प्रागजी प्रभू हा मातीत गाडला गेला. त्याला जिवंत बाहेर काढण्यात आले . दुसरा सुरुंग उडाला तेव्हा किल्ल्याचा एक बुरूज कोसळून खाली जमलेल्या मोगल सैन्यावर पडून त्यामध्ये २००० मोगल ठार झाले . या स्फोटामुळे किल्ल्याच्या भिंतीला २० गज एवढे खिंडार पडले . त्यावेळी बाजी चव्हाण डफळे हा तटावर चढून गेला आणि त्याने आपल्या सैनिकांना भिंत चढून येण्यासाठी आवाहन केले . परंतु त्याच्या पाठोपाठ कोणीही आले नाही . दरम्यान किल्ल्यावरील शिबंदी सावध झाली आणि तटबंदीला पडलेल्या खिंडारापाशी जाऊन त्यांनी बाजी चव्हाण याला ठार मारले . वरील स्फोटामुळे तोफ चढविण्यासाठी उभारण्यात आलेला दमदमा कोसळून पडला होता . ठार झालेल्या मोगल सैन्यात ५०० मावळे सैनिक होते . त्यामुळे दुःखी झालेल्या इतर मावळ्यांनी दमदम्याला आग लावून दिली. परिणामी मोगलांनी वेढ्यासाठी उभे केलेले मोर्चे भस्मसात् झाले. (**एम. ए.**, ४१९)

दरम्यान मार्च महिन्यात राजाराम मरण पावला होता . त्याचा मंत्री परशुराम याने मोगलांना आपण शरण येऊ असे कळविले . किल्ल्यावरील ४०० शिबंदी गारद झाली होती . या सर्व गोष्टी विचारात घेऊन साताऱ्याचा सुभेदार सुभानजी याने राजपुत्र आजमच्या मध्यस्थीने किल्ला बादशहाच्या स्वाधीन केला . २१ एप्रिल रोजी त्याने मोगलांचे निशाण किल्ल्यावर लावले आणि दुसऱ्या दिवशी किल्ला खाली केला . सुभानजीला ५ हजारी **मनसबदारी** देण्यात आली. त्याचे नातेवाईक आणि अनुयायी यांनाही मोगल सैन्यात सामील करून घेण्यात आले . (**एम. ए.**, ४१०, ४२०; **अखबारात**, वर्षे ४३ आणि ४४; **अहकाम**, ७१)]

(५) मोगल परळीचा किल्ला जिंकून घेतात

परळीला वेढा

यानंतर लवकरच मोगलांनी साताऱ्याच्या पश्चिमेस ६ मैलांवर असलेल्या परळीच्या किल्ल्याला वेढा घालण्यासाठी मोर्चे उभारले . हा किल्ला म्हणजे शिवाजीचे गुरु स्वामी रामदास यांचे अधिष्ठान होते . शत्रू जेव्हा साताऱ्याच्या किल्ल्याला वेढा घालून बसला होता तेव्हा ह्या किल्ल्यावरून मराठ्यांच्या राज्यकारभाराची सूत्रे हलत असत . मराठ्यांच्या राज्याचा प्रमुख महसूल अधिकारी परशुराम हा होता . साताऱ्याचा झालेला पाडाव आणि राजारामाचा मृत्यू यानंतरदेखील त्याच्या हाताखालील दुय्यम अधिकाऱ्यांनी मोगलांना प्रतिकार चालूच ठेवला.

मुसळधार पाऊस आणि धान्य व दाणागोटा यांची टंचाई यामुळे मोगलांचे भयानक नुकसान झाले . परंतु या गोष्टींची तमा न बाळगता औरंगजेबाने निर्धाराने वेढ्याचे काम चालूच ठेवले . सरतेशेवटी परळीच्या

किल्लेदाराबरोबर काही अटी ठरविण्यात आल्या आणि त्याने लाच घेऊन ९ जून रोजी किल्ला खाली केला .

[परळीचा किल्ला विजापूरकडे असताना तेथे एक मशीद बांधण्यात आलेली होती. ती मशीद अगदी मोडकळीस आलेली होती. या मशिदीची दुरुस्ती करण्यात आली आणि तिचा उपयोग नमाज पडण्यासाठी करण्यात येऊ लागला . शिवाजीच्या कारकीर्दीत एक देऊळ बांधण्यात आले होते , त्याचा नाश करण्यात आला . याबाबत बादशहाचा इतिहासकार लिहितो ते असे , "सत्याचे आगमन होते आणि त्या बरोबर असत्य नाहीसे होते या कुराणातल्या ओळीची अशा तऱ्हेने प्रचीती आली ." परळीच्या किल्ल्याला नवरसतारा असे नवीन नाव देण्यात आले . (**एम. ए.**, ४२८; **हमीदुद्दिन-अहकाम** १७)]

[सातारा व परळी या किल्ल्यांच्या पाडावाची खाफीखानाने पुढीलप्रमाणे हकीकत दिली आहे :

परळीच्या किल्ल्यावर परशुराम नावाचा कारभारी होता . साताऱ्याहून परळीचा किल्ला सात कोसांच्या अंतरावर आहे . त्या प्रांताची व्यवस्था नालायक आणि ज्याचा शेवट वाईट झाला अशा रामराजातर्फे (राजाराम) परशुरामाकडे होती. रामराजाच्या मृत्यूची बातमी कळताच त्याचा धीर खचला (२० मार्च १७००). त्याने किल्लेदाराशी सल्लामसलत न करताच किल्ल्यातून बाहेर पडून मोगलांची गाठ घेतली . परळीच्या किल्लेदाराचाही यामुळे धीर गळाला . त्यानेही आपल्याला मालमत्ता आणि प्राण याचे अभय द्यावे म्हणून बोलणे चालविले . साताऱ्याच्या किल्ल्याचा एक तट उडून गेला होता . किल्ल्यातील बरेच लोक (स्फोटामुळे) जळून मेले होते. त्यात रामराजाच्या मृत्यूची बातमी आली . यामुळे साताऱ्याचा किल्लेदार सुभानजी याला कळून चुकले की , याचा शेवट काही चांगला होणार नाही . परळीच्या किल्लेदाराशी त्याचे शत्रुत्वही होते . सुभानजी हा शहाजादा महंमद आझम याच्या मार्फतीने बादशहापाशी रुजू झाला . त्याने विनंती केली , "मला प्राण आणि अब्रू यांचे अभय मिळावे . परळीच्या किल्लेदाराला माफी देण्यात येऊ नये. हे मान्य झाल्यास साताऱ्याच्या किल्ला मी हवाली करण्यास तयार आहे . इतकेच नव्हे तर अल्पावधीत परळीचा किल्ला बादशहाकरिता जिंकून देईन."

सुभानजीची विनंती मान्य करण्यात आली.

त्या वर्षीच्या **जिल्कात** महिन्याच्या तेरा तारखेस बादशहाने साताऱ्याच्या किल्ल्याच्या किल्ल्या हाती घेतल्या . (ता. २१ एप्रिल, १७००). किल्ल्यातून तीन हजारांच्या वर स्त्री -पुरुष बाहेर पडले . विजयाची शहादणे वाजू लागली आणि रीतीप्रमाणे लोकांनी विजयाचा आनंद मानला . सुभानजीला हात बांधून बादशहासमोर नेण्यात आले . त्याला माफी देण्यात आली . त्याचे हात सोडण्याची आज्ञा झाली . सुभानजीला पाच हजारी आणि दोन हजारी स्वारांची मन्सब देण्यात आली . हत्ती, घोडे, जडावाचा खंजीर, ध्वज आणि नगाऱ्याचा मान हे त्याला देण्यात येऊन शिवाय वीस हजार रुपये नगद त्याला देण्यात आले.

साताऱ्याचा किल्ला घेतल्यानंतर बादशहाने परळीच्या वेढ्याकडे लक्ष दिले. (पान ४७१)

परळीचा किल्लेदार आपल्याला अभय मिळत नाही म्हणून निराश झाला होता . त्याचे लोक निराश होऊन त्याच्याकडे परत आले . परळीचा किल्ला साताऱ्यापेक्षाही मोठा आहे. किल्लेदाराने किल्ला लढविण्याची तयारी करून तट आणि बुरूज यांचा त्याने बंदोबस्त केला.

किल्ल्याच्या वेढ्यात शूर वीरांनी विशेषतः वीरश्रेष्ठ फत्तेउल्लाखान याने जी उत्कृष्ट कामगिरी केली आणि जे साहस दाखवले त्याचा तपशील देणे म्हणजे वर्णन लांबेल. सारांश, जिल्हेज महिन्याच्या दहा तारखेस किल्ल्यावर हल्ला करण्यात आला . त्यात अनेक लोक ठार झाले (४ जून १७००). फत्तेउल्लाखान, तरबियतखान आणि इतर अधिकारी यांच्या श्रमसाहसामुळे किल्ल्यातील लोकांची स्थिती फारच अडचणीची झाली . पण पाऊस रात्रंदिवस पडत होता. पाच महिनेपर्यंत त्या भागात एक क्षणाचीही उसंत न देता सारखा पाऊस पडत असतो . मराठे मुंग्या आणि टोळ याप्रमाणे प्रचंड संख्येने बादशाही सैन्याभोवती घिरट्या घालीत . त्यांनी भोवतालचा प्रदेश उद्ध्वस्त करून टाकला . त्यामुळे रसद आणि गवत लष्करात येणे बंद झाले . त्यात ओढ्यांना पूर आल्यामुळे रसद बंद झाली . बादशाही फौजेची स्थिती अत्यंत कठीण झाली . खाण्यापिण्याचे जिन्नस मिळेनासे झाले. माणसे आणि जनावरे कमालीची हैराण झाली . ती इतकी की , कुणालाच हालचाल करण्याची शक्ती राहिली नाही . एकीकडे महर्गता तर दुसरीकडे पैशाची टंचाई . कोणी एका दमडीला अमृत विकतो म्हटले तरी कोणी विकत घेण्यास तयार झाले नसते . पावसाच्या थेंबाचे मोती झाले असते तरी लोकांपाशी एक दमडी नव्हती आणि धान्याचा एक कण नव्हता म्हणून तिकडे कोणी ढुंकूनही पाहिले नसते.

मोगली सैन्याची कमालीची दुर्दशा

सांगण्याचा मुद्दा हा की , दिवसेंदिवस चंगळ वाढत होती , पण कशाची? तर दुष्काळाची! माणसे काय, घोडे काय आणि गुरेढोरे काय , कुणाच्याही अंगावर मांस म्हणून राहिले नाही . यामुळे किल्ल्यावरील लोक वेळोवेळी बाहेर पडून बेडरपणे हल्ला करीत . पण फत्तेउल्लाच्या लागोपाठ हल्ल्यामुळे किल्ल्यातील लोकांचा धीर खचला आणि त्यांनी अभयाची याचना केली . दीड महिन्याच्या वेढ्यानंतर **मुहरम** महिन्याच्या सुरुवातीस किल्ला जिंकून घेण्यात आला (९ जून १७००). किल्ल्यातील माणसे आपले सामान -सुमान घेऊन निघून गेली . अमीर-उमरावांनी बादशहाचे अभिनंदन केले. दोन्ही किल्ल्यातून (सातारा आणि परळी) विजापुरच्या बादशहाने बांधलेल्या मशिदी होत्या. त्यांची नासधूस काफरानी केली होती. त्या पुन्हा बांधण्याचा हुकूम झाला. साताऱ्याच्या किल्ल्याला आझमतारा आणि परळीच्या किल्ल्याला नौरसतारा हे नाव देण्यात आले . किल्लेदाराच्या नेमणुका करण्यात आल्या.]

बादशाही फौजांचे हाल

अनुक्रमणिका

या दोन वेढ्यांमुळे बादशाही सैन्यामधील माणसे , घोडी आणि वाहतुकीची जनावरे यांची अतोनात हानी झालेली होती . खजिना रिता पडला होता आणि सैनिकांचा पगार तीन वर्षांपासून थकल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची पाळी आलेली होती. त्यामध्ये मे महिन्याच्या सुरुवातीला अतिशय मुसळधार आणि अनपेक्षित असा पाऊस सुरू झाला आणि ही संतत धार जुलै महिन्याच्या अखेरीपर्यंत टिकली . २१ जून रोजी भूषणगडाकडे बादशाही सैन्याच्या परतीच्या प्रवासाला सुरुवात झाली आणि जणूकाही या बदलामुळेच की काय अगोदरच संकटाने ग्रस्त झालेल्या सैनिकांच्या अडचणीत भर पडली . वेढ्याचे काम चालू असताना मोगलांच्या फौजेतील वाहतूक करणारी बहुतेक सर्व जनावरे गारद झाली होती . जे काही थोडेफार गाड्याचे बैल आणि हत्ती बचावले होते त्याचे फक्त अस्थी आणि चर्म शिल्लक राहिले होते . बादशहा आणि त्याचे अमीर -उमराव यांच्या एकंदर मालमत्तेपैकी फारच थोडा भाग या दुर्बल जनावरांना आणि हमालांना वाहून नेता आला . उरलेली मालमत्ता एक किल्ल्यात तरी ठेवावी लागली किंवा जाळून तरी टाकावी लागली . बादशाही सैन्यातील बड्या बड्या आणि थोर थोर अमीर -उमरावांना मैलोगणती अंतर चिखलातून पायी तुडवत जावे लागले . (**एम. ए.**, ४२९; **के. के.**, भाग २, ४७२-७३; **दिल.**, भाग २, १३३६) एक मजल मारून झाल्यानंतर पाठीमागून रेंगाळत येणाऱ्यांना मुख्य सैन्याबरोबर मिळता यावे म्हणून दोन दिवसांसाठी छावणी देण्यात येई . एक दिवसाच्या मजलीत जेमतेम तीन मैलांचे अंतर पार करण्यात येत असे . त्यावेळी कृष्णा नदीला प्रचंड पूर आला होता , इतका की ह्या तीरावरून पलीकडला तीर दृष्टीस पडणे अशक्य होऊन गेले होते. पाण्याने दुथडी भरून वाहणाऱ्या नदीतून इतके प्रचंड सैन्य पार करून जाण्याचे कामी अनेक अडचणी निर्माण झाल्या . माणसांना पैलतीरावर घेऊन जाण्यासाठी फक्त सात मोडक्या-तोडक्या आणि कशीतरी डागडुजी करून तयार ठेवलेल्या मचव्यांची सोय होती . त्यामध्ये जागा मिळविण्यासाठी माणसामध्ये भांडणे लागून ती हमरीतुमरीवर येत . बादशाही फौज २५ जुलै रोजी भूषणगडाजवळ येऊन पोहोचली. ४५ मैलांचे अंतर तोडून जाण्यास फौजेला एकंदर ३५ दिवस लागले . या ठिकाणी एक महिनाभर मुक्काम करण्यात आला . तेथून बादशाही फौज ३६ मैलांवर माण नदीच्या काठी असलेल्या खवासपूर येथे हलविण्यात आली (३० ऑगस्ट १७००). बादशाही फौजांनी माण नदीच्या दोन्ही तीरांवर आणि इतकेच नव्हे तर नदीच्या कोरड्या पात्रातदेखील आपल्या राहुट्या ठोकल्या . **खवासपूर येथील बादशाही छावणीत पूर** :- परंतु १ आक्टोबर रोजी रात्री छावणीतील मंडळी गाढ झोपेत असताना आजूबाजूच्या टेकड्यांवर पडलेल्या मुसळधार आणि अनपेक्षित पावसाने पाण्याच्या प्रचंड लोंढ्याची लाट नदीच्या पात्रात एकाएकी घुसली . या लाटेच्या तडाख्याने नदी दुथडी भरून वाहू लागली आणि नदीच्या पलीकडे असलेल्या मैदानात पाणी पसरले . अनेक माणसे आणि जनावरे पाण्याच्या सोसाट्याच्या ओघात वाहून गेली आणि उरलेल्या अनेकांची चीजवस्तू नाहीशी होऊन ते नंगेफकीर बनले . या मंडळीत अमीर -उमरावांचा देखील समावेश होता . बादशाही छावणीतील सर्व तंबू आणि इतर मालमत्ता याची अमाप हानी झाली. (**एम. ए.**, ४३१; **के. के.**, भाग २, ४७५).

मध्यरात्र होण्याच्या थोड्या आधी जेव्हा छावणीत प्रथम पुराचा लोट कोसळला तेव्हा साऱ्या सैन्यात मोठमोठ्याने एकच आरडाओरडा सुरू झाला . मराठे अचानक छावणीत घुसले अशी बादशहाची कल्पना झाली आणि तो दचकून उठला . परंतु कशाला तरी त्याचा पाय अडखळून तो पडला आणि त्यामुळे त्याचा उजवा गुढगा निखळला. फौजेतील हकिमांना गुढगा खोवणीत बरोबर बसविता आला नाही आणि परिणामी बादशहाचा पाय मरेपर्यंत पंगूच राहिला . 'आपला पूर्वज जगज्जेता लंगडा तैमूर याच्यापासून आपल्याला मिळालेला हा वारसा आहे' असे सांगून दरबारातील खुषमस्करे बादशहाचे सांत्वन करीत असत . (**के. के.**, ४७६; **स्टोरिआ**, भाग ३ २५५; **दिल.**, **भाग** २, १३४ अ)

अनुक्रमणिका

परंतु फौजेची पुनर्रचना करून तिला सामर्थ्यवान बनविण्यासाठी बादशहाने अतोनात प्रयत्न केले . उत्तर हिंदुस्थानातील प्रांतिक सुभेदारांना आज्ञा देण्यात आल्या की त्यांनी प्रत्येक प्रांतात सशक्त जवानांची भरती करावी आणि उत्तम घोडी खरेदावी आणि दोहोंची रवानगी दक्षिणेत करावी . या आज्ञेनुसार २००० घोडे काबुलमध्ये खरेदी करण्यात आले आणि २००० घोड्यांची स्थानिक बाजारामध्ये खरेदी करण्यात आली. त्याशिवाय इतर प्रांतांतून ताज्या दमाच्या घोड्यांची खरेदी करण्यात आली ती वेगळीच.

बादशाही सैन्यावर संकटांची ही जी परंपरा कोसळली होती तिचा मराठ्यांनी आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी भरपूर उपयोग करून घेतला . मोगली मुलखांत त्यांचे नेहमीचे हल्ले चालू राहिलेच पण त्याशिवाय हणमंतराव निंबाळकराने १८ ऑगस्ट १७०० रोजी खटावचे ठाणे मारले आणि तेथील रामचन्द्र नावाचा मोगलातर्फेचा मराठा अधिकारी होता त्याला ठार मारले . बेरडांचा प्रमुख पिड नाईक याने विजापूर जिल्ह्यात सर्वदूर आपली ठाणी वसविली आणि चौथाईची वसुली केली तर मराठ्यांनी विजापूर शहराबाहेर असलेल्या शहापूर तळ्यापर्यंत मजल मारून लुटालूट केली. (अंदाजे १५ नोव्हेंबर). विजापूरच्या आग्नेयेस ३० मैलांवर असलेल्या बागेवाडीचा मोगल ठाणेदार राणोजी घोरपड्याने ठार मारला आणि बागेवाडीचे आणि त्याशिवाय विजापूर शहराच्या ईशान्येस असलेले इंडीचे अशी दोन ठाणी त्याने मारून काढली . [(**मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध**, ४९–५१)

१६ डिसेंबर १७०० रोजी छावणी मोडून कूच करण्यात आले . जानेवारी १७०१ मध्ये बादशाही फौज मिरज येथे पोहोचली . २९ जानेवारी ते २७ फेब्रुवारी हा **रमजान**चा उपवासाचा महिना बादशहाने मिरज येथे घालविला . या ठिकाणी प्रांतांच्या सुभेदारांनी भरती केलेले सैन्य आणि इतर सामग्री छावणीत येऊन दाखल झाली . मिरज मुक्कामी बादशहाचा बक्षी मुखलीसखान हा ३ जानेवारी रोजी मरण पावला . त्याला मिरज येथील सय्यद शम्सुउद्दीन याच्या कबरीभोवती असलेल्या बागेत पुरण्यात आले. (**एम्. ए.**, ४३४)]

(६) इ. स. १७०१ मधील पन्हाळा किल्ल्याचा वेढा

यानंतर बादशाही हल्ल्याचा रोख पन्हाळा किल्ल्याच्या दिशेने होता . बादशहा त्याठिकाणी ९ मार्च १७०१ रोजी येऊन पोहोचला . पन्हाळ्याचा किल्ला आणि त्याला लागूनच असलेला पावनगडचा किल्ला या दोन्ही किल्ल्यांसभोवार त्याने जवळ जवळ १४ मैल लांबीचे मोगल सैन्याच्या मोर्चांचे कडे उभे केले . नुस्रतजंगाच्या हाताखाली फिरत्या सैनिकांच एक सेनाविभाग देण्यात आला आणि "ज्या ज्या ठिकाणी मराठे आपले डोके वर काढतील त्या त्या ठिकाणी त्यांना जरब बसविण्याची " आज्ञा त्याला देण्यात आली. परंतु पन्हाळ्याच्या डोंगराळ भागात सुरुंग पेरण्याच्या कामाची प्रगती या कारणपरत्वेच अतिशय सावकाश होत होती आणि भयाने धडकी भरविणाऱ्या पावसाळ्याची चाहूल लागलेली होती . त्याशिवाय बादशहाचे दोन नामवंत सेनानी नुस्रतजंग आणि फिरोजजंग यांच्यामधील स्पर्धेने इतके विकृत स्वरूप धारण केलेले होते की दोघा सेनानींना एकाच प्रदेशातील कामगिरी पार पाडावयास सांगणे मुष्कील होऊन बसले होते . या विद्वेषाच्या वातावरणात तरबियतखान आणि फतुल्लाखान यांच्या संबंधात निर्माण झालेल्या भयंकर कटुतेची भर पडली आणि परिस्थिती आणखी बिकट करण्यासाठी म्हणूनच की काय मोगल फौजेतील सर्वसाधारणपणे जुन्या पिढीतील गणले गेलेले अधिकारी आणि आपल्या कर्तबगारीने नव्यानेच पुढे येणारा गुजरातेचा महमद मुराद यांच्यामध्ये वैमनस्याची भावना निर्माण झाली . बादशाही सेनानींमध्ये निर्माण झालेल्या या परस्पराविरुद्धच्या वैमनस्याच्या भावनेमुळे त्यांच्यामध्ये खऱ्याखुऱ्या सहकार्याची भावना निर्माण करणे अशक्य होऊन बसले परस्परांचे पाय ओढण्याचे त्यांचे उद्योग चालत . साहजिकच बादशहाने आखलेल्या योजनांना तडा जाई आणि वेढ्याचे काम रेंगाळत जाई . (**के. के.**, ४८८; **एम्. ए.**, ४५७) जेव्हा तरबियतखानाला किल्ल्यावर हल्ला चढविण्यासाठी सज्ज होण्याचा हुकूम देण्यात आला तेव्हा मोठ्या

कुत्सितपणे त्याने उद्‌गार काढले की , हल्ला करण्यासाठी लागणारी सर्व तयारी पूर्ण झाली आहे . आता ज्याने आपल्या शौर्याने लढाईचे मैदान गाजविले आहे त्या महमद मुरादला किल्ल्यावर आम्ही जेव्हा हल्ला चढवू तेव्हा फक्त आमचा पाठपुरावा करण्याचा हुकूम द्या . [पन्हाळ्याचा वेढा चालू असताना झालेल्या काही घटनांची हकीकत पुढे दिली आहे . बादशहाने फतेउल्लाखान याला औरंगाबादेहून बोलाविले आणि कामबक्षाच्या मोर्चापासून सुरुंग खोदण्याची आज्ञा केली . अतिशय मेहेनत करून त्याने आपले काम पुरे केले . तरबीयतखानानेही आपल्या कामाचा सपाटा चालू ठेवला . परंतु परस्परांमधील द्वेषामुळे त्यांच्यामध्ये सहकार्य अशक्य झाले आणि परिणामी बादशहाच्या बेतावर पाणी पडून किल्ल्याचा वेढा लांबला (**के. के.**, ४८८; **एम्. ए.**, ४३७).

याच वेळी गुजराथमधील गोध्रा या गावाचा फौजदार महमद मुराद हा ५०० घोडेस्वार घेऊन छावणीत दाखल झाला . गुजराथ प्रांताच्या सुभेदाराने कुचराई केली होती त्यामुळे बादशहाची मुरादवर मर्जी बसली आणि त्याने त्याच्याकडे पावनगडावर हल्ला करण्याचे काम सोपविले . (**के. के.**, ४७८, ४८५) पन्हाळा आणि पावनगड यांच्यामध्ये एक छोटीशी टेकडी आहे . एक दिवस शत्रूची काही माणसे मोगल छावणीतील बाहेर चरणारी गुरे पळवून नेण्यासाठी आली असताना मुरादने त्यांचा या टेकडीवर पाठलाग केला . टेकडीच्या माथ्यावर त्याने मोगलांचे निशाण लावले आणि बादशहाकडे तेथील मोर्चे मजबूत करण्यासाठी साधनसामग्रीची मागणी केली . बादशहाने स्वतः रुहुल्ला आणि हमीदउद्दीन यांना मुरादच्या मदतीला जाण्याची आज्ञा केली. ते दोघेजण टेकडीच्या पायथ्याशी गेले आणि त्यांनी त्याला कळविले की अशक्य गोष्टीच्या फंदात तू पडलेला आहेस आणि तुला मदत पाठविणे आम्हाला जमणार नाही. तुला जर तेथे मोर्चे पक्के करावयाचे असतील तर ते काम तुला कोणत्याही मदतीशिवाय करावे लागेल . नाहीतर बादशहाला कळवून तू खाली निघून ये . मुरादने आपली जागा सोडण्यास नकार दिला तेव्हा वरील दोघांनी त्याला कळविले की तुझे दुय्यम म्हणून आम्ही वागावे असे तुला वाटते काय ? तरबीयतखानाने आणि इतर सेनापतींनी केलेल्या कामगिरीवर बोळा पडावा अशी तुझी इच्छा आहे काय? यानंतर रुहुल्लाने बादशहाला कळविले की टेकडी ताब्यात ठेवणे अशक्य आहे आणि शत्रूने रात्री हल्ला केल्यास भयंकर संकट कोसळेल . परिणामी बादशहाने मुरादला दोष दिला . बादशहाच्या दरबारातील मुरादची स्तुती करणारी इतर मंडळीही आता बादशहाचीच री ओढू लागली .] (**के. के.** ४८५–४८९) अशा तऱ्हेच्या भावनेने औरंगजेबाच्या सेनापतींची मने पेटलेली असताना औरंगजेबाने केलेले सारे प्रयत्न धुळीला मिळणे अगदी स्वाभाविक होते . अशा परिस्थितीत किल्ल्याचा वेढा दोन महिने रेंगाळला परंतु मोगलांच्या पदरात विजयश्री लवकर माळ घालेल असे कोणतेच चिन्ह दिसेना . पावसाळ्याला सुरुवात होण्याच्या अगोदर पन्हाळा किल्ला आपल्या हाती यावा म्हणून पन्हाळ्याचा किल्लेदार त्रिंबक याला मोठी रक्कम लाच म्हणून देण्यात आली . **लाच देऊन मोगल पन्हाळा घेतात** :- त्याने २८ मे १७०१ रोजी किल्ला मोगलांच्या हवाली केला. पन्हाळा किल्ल्याचा वेढा उठविण्यासाठी मराठ्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. धनाजी जाधव, राणोजी घोरपडे, रामचन्द्र आणि कृष्णाजी मल्हार हे त्यांचे सेनापती वेढा देऊन बसलेल्या मोगल छावणीभोवती घिरट्या घालत आणि वैरण आणण्यासाठी गेलेली पथके आणि दाणागोटा घेऊन येणारे तांडे यांना मारून काढीत . नुस्रतजंग आणि हुमीदुद्दिन यांनी आपल्या फिरत्या सैनिकांच्या तुकड्या बरोबर घेऊन इतस्ततः दौड करणाऱ्या मराठ्यांचा पाठलाग करून त्यांना गाठण्याची निरर्थक शर्थ केली. त्यांच्याबरोबर वरील मोगल सेनानींच्या घनघोर लढाया देखील झाल्या पण कोणतीच लढाई निर्णायक अशी झाली नाही .[पन्हाळ्याचा वेढा चालू असताना वेढ्याचा दबाव कमी करण्यासाठी मराठ्यांनी केलेल्या कारवायांची हकीकत पुढे दिली आहे. २३ जानेवारी रोजी धना जाधव छावणीपासून दोन मैलांवर आला . दिवसभर युद्ध चालू राहिले. दोन्ही बाजूंचे खूप नुकसान झाले. दरम्यान नुस्रतजंग पन्हाळ्याहून येत असल्याची बातमी धनाजीला लागली . धनाजीने ४ मैल माघार घेतली . त्याचा पाठलाग हमीदउद्दीन याने केला परंतु मराठ्यांनी त्याला पाठीवर घेत छावणीपासून २२ मैलांवर नेले . त्यानंतर लागोपाठ दोन दिवस दोन्ही फौजात घनघोर युद्ध झाले. त्यानंतर धनाजीने माघार घेतली आणि मोगल सेनापती छावणीकडे परतला. (**अखबारात** आणि **दिल.**, १३४ ब)

धनाजीचा पाठलाग नुस्रतजंग याने केला . धनाचा हल्ला खानाने परतविला . यानंतर धनाजीने कृष्ण मल्हार याला १० हजार घोडेस्वार देऊन पन्हाळ्यानजिकच्या हमरस्त्यावर हल्ला करण्यासाठी रवाना केले . धनाजीने मोगलांचा तोफखाना अडविण्याचा प्रयत्न केला तर कृष्ण मल्हार याने खटावच्या ठाण्यावर हल्ला केला . इकडे रामचंद्र आणि दादो मल्हार हे सिद्दीयाकूत याला तोंड देण्यासाठी कोकणात उतरले . यानंतर काही काळाने रामचंद्र पन्हाळा किल्ल्यावर रसद पोहोचविण्यासाठी २००० फौज घेऊन जात असताना नुस्रतजंगाने त्याच्यावर हल्ला केला , परंतु रामचंद्राने किल्ल्यात प्रवेश करण्यात यश मिळविले . पन्हाळ्याचा पाडाव होण्यापूर्वी धनाजीचा सर्व दूर असा पाठलाग नुस्रतजंग याने केला त्यामध्ये त्याने आपली पुष्कळ माणसे गमावली . २० एप्रिल रोजी बातमी आली की राणोजी हा २० हजार फौज घेऊन किल्ल्याकडे चाल करून येत आहे आणि बहर्जी याला बादशाही फौजांनी कैद केलेले आहे. या सुमारास धनाजीने सिंहगडमध्ये फक्त ४०० सैनिक घेऊन मुक्काम केला आणि आपले १५ हजारांचे मुख्य सैन्य त्याने दादो मल्हार याच्या हाताखाली मोगल मुलखात छापा घालण्यासाठी पाठविले.]

[पन्हाळगडच्या मोहिमेची मासिरी आलमगिरीच्या कर्त्याने दिलेली हकीकत पुढीलप्रमाणे आहे :

औरंगजेबाचा चरित्रकार साकी मुस्तैदखान हा या मोहिमेवर हजर होता . तो लिहितो (४३४ ते ४६३) "त्याच दिवशी (नऊ मार्च) मी हाफिज कवीच्या कविता संग्रहातून शकुन पाहिला. मी ग्रंथ उघडला तो माझी दृष्टी खालील ओळींवर पडली.

अनुक्रमणिका

दिले के गैबनुमाईद नामे जम दारद
ज खातमे के दमे गुम शवद चे गम दारद.

(डोळ्यांना न दिसणाऱ्या गोष्टीची अंतस्थ हृदयाला अनुभूती होते . हे हृदय म्हणजे सर्व विश्वाचे प्रतिबिंब ज्यात दिसून येईल असा सम्राट जमशीदचा पेला होय. मग एखादी अंगठी काही काळ नजरआड झाली तर त्याचे दुःख काय म्हणून करावे ?)

वास्तविक पाहता , भाग्याच्या या अंगठीवर (पन्हाळगड) नेहमीच मुसलमान बादशहाचीच नावे कोरलेली असत . (मुसलमानाच्या ताब्यात हा किल्ला असे) शिवाजीने विजापूरच्या आदिलशाही अधिकाऱ्यांकडून हा किल्ला जिंकून घेतला.

त्यानंतर दक्षिण प्रांतातून सर्व बंडे मोडण्यात आली आणि काफरांच्या वर्चस्वातून दक्षिण मोकळी करण्यात आली . शहाजादा आजमच्या प्रयत्नांनी हा किल्ला बादशहाच्या ताब्यात आला . पण किल्लेदाराने भ्याडपणा आणि गफलत ही दाखविली आणि किल्ल्यातील शिबंदी काफराप्रमाणे वागली त्यामुळे तो सैतान काफर आणि कुटिल असा संभाजी (काफरबच्चा इफरियातनज्नात हरबी जदाये खदीयत निहाद संभाचे शक्की) याने तो किल्ला पुन्हा जिंकून घेतला. धन्य परमेश्वराची (अल्हमदुलिललाह). बादशहाने पुन्हा तो जिंकून घेतला.

सारांश खान नुस्रतजंग (जुल्फीकारखान) यास बादशहाने आज्ञा केली की "जेथे जेथे म्हणून चोर (शत्रू, मराठे) डोके वर काढतील तेथे तुम्ही बिनधोकपणे त्याच्यावर चालून जावे आणि त्याची डोकी उडवावी.

शहाजादा वालातबार हा आणि इतर प्रबळ पथके ही पुढे चालली . काही तुकड्यांना किल्ल्याच्या पलीकडे तळ देण्याची आज्ञा करण्यात आली. दोन्ही किल्ले (पन्हाळगड आणि पावनगड) मिळून सात कोसांवर घेर आहे . मोगलांच्या सेनासमुद्राने दोन्ही किल्ल्यांना वेढले . तरबियतखानाच्या नेतृत्वाखाली किल्ल्यापर्यंत मोर्चे नेण्यात आले. विजांचा वर्षाव करणाऱ्या तोफा शत्रूंना होरपळून काढू लागल्या.

थोड्याच काळात किल्ल्याचे पाच बुरूज निम्म्या उंचीपर्यंत उडविण्यात आले . त्या कुशल आणि धैर्यशाली सरदाराने (तरबियतखान) खडकाळ जमीन खणून डोंगरापर्यंत बोळ तयार केला . त्याने याबाबतीत इतकी उत्कृष्ट कामगिरी केली की , ती पाहून लोकांना एकीकडे आश्चर्य वाटले तर दुसरीकडे त्यांना मोठा आनंद झाला . (तफरूज व तआज्जुब) त्याने जमिनीच्या आत काही साखळ्यांच्या लांबीचे भुयार तयार केले . त्यांतून एकाच वेळी तीन सशस्त्र माणसे जाऊ शकत . काही अंतरावर त्याने एक आश्रयस्थान बांधले . त्यांत एकाच वेळी वीस माणसे बसू शकत . त्यात वारा आणि प्रकाश येण्यासाठी चहूकडे खिडक्या काढण्यात आल्या होत्या . या निवाऱ्याच्या जागेत तरबियतखानाने तोफखान्याचे शिपाई बसविले...तेच भुयार पुढे सरकवीत बुरुजापर्यंत नेण्यात आले . या बुरुजावर मोगलांच्या तोफा मारा करीत होत्या . बुरुजाचा खालचा भाग खणून इतका पोकळ केला होता की खालील पोकळीत मोगलांचे एक पथक पहारा देत असे , आणि त्यांना शत्रूचे हातगोळे किंवा बंदुकीचे गोळे याचा काही उपसर्ग पोहोचत नसे. तरबियतखानाने ते भुयार तसेच पुढे सरकवून तटाखालून किल्ल्याच्या आत नेले.

सगळे काम पार पाडण्यात विलंब लागला. पावसाळा अगदी जवळ घेऊन ठेपला. या प्रदेशात फार पाऊस पडतो. ओलांडण्यास अवघड अशा नद्या प्रांतात आहेत. रसद येऊन पोहोचण्यात भयंकर त्रास होतो. त्यामुळे हा प्रदेश छावणी करण्यास योग्य नाही.

फत्तेउल्लाखान हा आपल्या सैनिक शिपायांना आणि सहकाऱ्यांना ताजेतवाने करावे म्हणून आरामशीर असलेल्या औरंगाबाद शहरी गेला होता. तो या सुमारास बादशहापाशी हजर झाला . त्याला बादशहाने पुढील कामावर नेमले . किल्ल्याच्या दुसऱ्या बाजूस शहाजाद्याचा तळ होता तिकडून फतेउल्लाखान आणि मुनीमखान यांनी दुसरा खंदक खणीत किल्ल्याकडे आणावा असे ठरले . त्याचे नेतृत्व शहाजाद्याकडे (कामबक्ष) होते. फतेउल्लाखानाने एक महिन्याच्या आत खडक खणून ती जमीन भुसभुशीत केली आणि बोळ तयार करून तो तटाच्या भिंतीपर्यंत नेला . ते काम इतके उत्कृष्ट झाले की ते पाहून मती कुंठित व्हावी.

किल्ल्यातील लोकांची अशी स्थिती झाली की युद्धाच्या ज्वाळांनी त्यांची घरेदारे नष्ट होऊ लागली . त्यांची स्थिती फार हलाखीची झाली. पण मोर्चे आणि भुयारे खणीत आणण्यात मोगलांनी दाखविलेली चिकाटी त्यांनी पाहिली . मोगलांचे युद्धकौशल्य शत्रूच्या मनावर ठसले . आपला सर्वनाश होणार याची त्यांना खात्री पटली . एकीकडून तरबियतखान हा त्यांची घरेदारे आकाशात उडविण्याच्या तयारीत होता . तर दुसरीकडे फत्तेउल्लाखान त्यांची निवासस्थाने मातीत मिळवू पाहात होता . महमंद मुरादखान आणि त्याचे साथीदार , आणि शहाजादा कामबक्ष , त्याचा बक्षी खाजा महमद हे पावनगडच्या भिंती आणि बुरूज उडविण्याच्या बेतात होते . मोगल सैन्याने शत्रूला पळून जाण्यास वाट ठेविली नाही . आलमगीर बादशहा असा आहे की पाऊस असो की इतर अडचणी असोत तो आपल्या निर्धारापासून ढळणार नाही , आणि हे मोगल सैन्य असे आहे की आपले काम तडीस नेल्याशिवाय राहात नाही.

न गर्दानद अकील अज काविशे इल्मास रूइ खुद.
दमे शमशिर माहे ईद बाशद नाम जो थांरा.

[हिरा आपल्याला कापीत आहे म्हणून अकील (लाल रंगाचे एक रत्न) थोडेच आपले तोंड फिरवते; महत्त्वाकांक्षी वीराने तलवारीचे पाते पाहिले की इदेचा चांद पाहिल्याचा आनंद होतो.]

अनुक्रमणिका

सारांश या सर्व घटना पाहून शत्रूचे धाबे दणाणले . आपल्या अब्रुरक्षणासाठी शरण गेल्याशिवाय गत्यंतर नाही हे त्यांना दिसून आले . तरबियतखानाच्या मध्यस्थीने अभय मागण्यासाठी त्यांची माणसे शहाजाद्यापाशी (वालातबार) आणि बादशहाजाद्यापाशी (कामबक्ष) आली. ते दोघेजण म्हणजे मूर्तिमंत दयाच जणू. किल्ल्यातील काही हजार पीडितांवर दया दाखवून त्यांनी त्याच्यासंबंधी बादशहापाशी रदबदली केली . धन्य परमेश्वराची, शहाजाद्यांची रदबदली बादशहाने मान्य केली , आणि शत्रूचे अपराध माफ केले . पन्हाळगडचा किल्लेदार त्र्यंबक याला जीवदान मिळाले. आपल्या मालमत्तेसहीत किल्ला सोडून जाण्याची त्याला परवानगी मिळाली.

मुहरम महिन्याच्या पहिल्या तारखेस (अठ्ठावीस मे इ. स. १७०१) पन्हाळगड आणि पावनगडचे हे दोन्ही किल्ले बादशाच्या साम्राज्यात समाविष्ट झाले. पन्हाळगडचे नाव नबीशाहदुर्ग ठेवण्यात आले. इस्माईलखान मखा यास नबीशाह दुर्गाचा फौजदार म्हणून नेमण्यात आले.

(मराठे व औरंगजेब, श्री. सेतुमाधवराव पगडी, ९६–९९)]

पन्हाळा किल्ल्याचा पाडाव झाल्यावर २९ मे १७०१ रोजी औरंगजेबाने पन्हाळा किल्ल्याच्या परिसरातून आपला मुक्काम हलविला आणि साताऱ्याच्या पूर्वेस २५ मैलांवर आणि येरला नदीच्या डाव्या तीरावर असलेल्या सुरक्षित आणि अधिक सुपीक असलेल्या खटाव प्रांतात त्याने छावणी टाकण्यासाठी कूच केले. त्याने आपला मुक्काम जरी झपाट्याने हलविला तरी जितक्या लवकर त्याने तो प्रदेश सोडावयास पाहिजे होता तितक्या लवकर त्याने तो सोडला नाही. एक प्रचंड वादळ त्याच्या छावणीवरून घोंगावत गेले आणि "एकाद्या कागदाच्या कपट्याप्रमाणे छावणीतील तंबू आणि झोपड्या या वादळाने उडवून दिल्या . राजे आणि रंक यांना एकसारखेपणेच उन्हात बसावे लागले . बुरखाधारी स्त्रियांना सर्वसामान्य जनांच्या दृष्टीचे लक्ष्य होणे भाग पडले." (**के. के.**, ४९०; **अख.**)

फतुल्लाखानाला या सुमारास फार मोठी बढती देण्यात आली आणि बहादूर हा किताबही त्याला देण्यात आला. त्याची रवानगी खटावच्या वायव्येस असलेला वर्धनगडचा किल्ला आणि आसमंतात असलेले चंदन, नंदगिरी आणि वंदन हे किल्ले जिंकून घेण्यासाठी करण्यात आली.

(७) खेळणा किल्ल्याचा वेढा

खेळण्याकडे कूच

बादशहाने यानंतर खेळणा ऊर्फ विशाळगड हा किल्ला जिंकून घेण्यासाठी कूच केले . हा किल्ला समुद्रसपाटीपासून ३५०० फूट उंच असलेल्या सह्याद्रीच्या डोंगरांच्या रांगेतील एका उंच शिखरावर बांधलेला आहे. पन्हाळा किल्ल्याच्या पश्चिमेस ३० मैलांवर हा किल्ला असून त्याच्या पश्चिमेस पसरलेला कोकण देशाच्या सपाटीचा प्रदेश या किल्ल्यावरून दृष्टिपथात येतो . या भागातील हवा अतिशय थंड आणि पावसाळी अशी आहे . १७ व्या शतकामध्ये या भागातील डोंगर , गर्द झाडी , घनदाट झाडेझुडपे यांनी आच्छादलेले होते. या किल्ल्याला पोहोचण्याचा अतिशय सोपा मार्ग किल्ल्यापासून उत्तरेस असलेल्या आंबाघाटातून आहे. ह्या घाटाचे कोल्हापुराहून अंतर ३५ मैल असून घाट कोल्हापूरच्या वायव्य दिशेला आहे. खिंडीकडे पोहोचण्याचा जो आठ मैलांचा रस्ता होता तो तुट्याफुट्या जमिनीचा असून अतिशय कठीण होता. त्या काळी चाकावर चालणारी वाहने जाऊ शकतील असा रस्ता तेथे नव्हता . तेथील चढ आणि उतार हे इतके कठीण होते आणि रस्ता इतका अरुंद होता की घोडे सुद्धा तेथून सहजतया अथवा सुरक्षितपणे जाऊ शकत नसत.

७ नोव्हेंबर १७११ रोजी बादशहाने वर्धनगडचा किल्ला सोडला आणि १२ मजलांच्या कुचीनंतर तो मलकापूर येथे येऊन पोहोचला . येथे त्याने एक आठवडाभर मुक्काम केला आणि रस्त्याचे बांधकाम

करणाऱ्यांची रस्ता तयार करण्यासाठी रवानगी केली . हा रस्ता तयार झाला परंतु सैन्याला कूच करून जाण्यासाठी सुलभ पडेल अशा तऱ्हेने आंबाघाटातील रस्त्याची दुरुस्ती होणे जरूर होते . ही प्रचंड कामगिरी फतुल्लाखानाने एका आठवड्याच्या अविश्रान्त मेहनतीनंतर रस्ता बांधणारे कामगार आणि दगडफोडे यांच्या साहाय्याने पार पाडली . त्यानंतर २६ डिसेंबर रोजी वेढ्याचे काम सुरू करण्यासाठी असदखानाची रवानगी करण्यात आली . १६ जानेवारी १७०२ रोजी बादशहाचा शामियाना खेळण्याच्या किल्ल्यापासून १ मैलावर उभा करण्यात आला . आंबाघाट पार करताना आणि किल्ल्याच्या पायथ्याशी बादशहाची छावणी व इतर छावणीचे सामानसुमान आणताना त्याच्या सेवकांचे भयंकर हाल आणि अतोनात नुकसान झाले.

फतुल्लाखानाने केलेली प्रयत्नांची शर्थ; खेळण्याचा पाडाव

किल्ल्याचा वेढा जवळ जवळ पाच महिनेपर्यंत रेंगाळला (जानेवारी-जून १७०२) या कालावधीत नुस्रतजंगाने आपल्या हाताखालील फिरत्या सैनिकांच्या पलटणींना बरोबर घेऊन वऱ्हाड आणि तेलंगणामध्ये जवळ जवळ ६००० मैल मराठ्यांच्या मैदानी सैनिकांच्या तुकड्यांचा पाठलाग केला . (पाहा, **दिल**., १२९ अ—१३८ ब, १४१ अ) मराठ्यांबरोबर त्याची १९ जंगी युध्दे झाली , त्याशिवाय असंख्य बारीक सारीक चकमकी झाल्या त्या वेगळ्या खेळणा किल्ल्याच्या मजबूत दगडाच्या बांधलेल्या तटबंदीवर मोगल तोफखान्याने निरर्थक सतत गोळाबारी केली . या गोळाबारीने बुरुजाचे काही दगड ढासळले एवढेच पण विजय मिळविण्याच्या दृष्टीने मोगलांचे एक पाऊल देखील पुढे पडले नाही . याउलट किल्ल्यावरील शिबंदीच्या दगडफेक करणाऱ्या यंत्रांनी पुढेपुढे सरकणाऱ्या मोगल मोर्चांवर मोठमोठ्या दगडांची बरसात केली. रात्रीच्या वेळी किल्ल्यावरील मराठा शिबंदीने मोगलांच्या ठाण्यावर हल्ले देखील केले . किल्ल्याच्या उत्तरेच्या बाजूकडून हल्ला करण्याचे फतुल्लाखान तुराणी याने केलेले सर्व भगीरथ प्रयत्न किल्ल्याच्या अजिंक्य तटबंदीसमोर वाया गेले . [खेळणा किल्ल्याच्या वेढ्यात खरे म्हटले तर फत्तेउल्लाखान यानेच मर्दुमकी दाखविली होती . तो वयाने औरंगजेबाएवढा असून जातीने त्याच्यासारखाच तुराणी होता . साहजिकच स्पष्ट बोलण्यात बादशहासारखीच त्याला कोणाचीही भीती वाटत नसे. त्याच्या जखमांची शुश्रूषा चाललेली असताना बादशहाने त्याच्याकडे एका खोजाला पाठवून त्याच्याकरवी निष्कारण संकटात बेदरकारपणे उडी घेतल्याबद्दल त्याला दोष लावला . त्यावर खानाने उत्तर पाठविले की "बादशहाला कळवा जेव्हा सुज्ञ मनुष्य वयाच्या ८० किंवा ९० या वर्षात पदार्पण करतो तेव्हा त्याची बुद्धी मंदावते आणि त्याच्या पाची इंद्रियांची शक्ती क्षीण होते . मी शिपाई गडी आहे आणि म्हणून सुज्ञ माणसाशी माझी तुलना होऊ शकत नाही . साहजिकच माझ्या जन्माच्यावेळी मी जसा बेदरकार होतो तसाच आजही आहे ." (**के. के**., ४९८)] किल्ल्याच्या कोकणी अथवा पश्चिम दरवाजाच्या बाजूने किल्ल्यावर हल्ला चढविण्याच्या मोगल प्रयत्नांना देखील फारसे यश आले नाही. या ठिकाणी महमद अमीनखान याने या दरवाजासमोर असलेल्या दगडांनी बांधून मजबूत केलेल्या टेकडीवर ४ मार्च रोजी हल्ला चढविला होता . त्याचप्रमाणे ह्या दरवाजाचे रक्षण करणारा रेवणी बुरूज याच्यावरही त्याने हल्ला केला होता . महमद अमीनखानाच्या ऐवजी आता बेदारवख्त याची नेमणूक झालेली होती. त्याने अंबरचा तरुण राजा जयसिंग याच्या हाताखाली असलेल्या सेनाविभागासह रेवणी बुरुजावर २७ एप्रिल रोजी हल्ला चढविला आणि रेवणी बुरूज काबीज केला . या हल्ल्यात मोगलांचे अतोनात नुकसान झाले . यानंतरची हल्ल्याची दिशा म्हणजे काबीज केलेल्या जागेपर्यंत आपल्या मोठ्या तोफा ओढून नेणे हे होते . या तोफांच्या साहाय्याने किल्ल्याचा कोकणी दरवाजा तोफखान्याच्या माऱ्याने मोगलांना उद्ध्वस्त करता आला असता.

मोगल सैन्याने आपले सर्व सामर्थ्य या दरवाजासमोर एकवटले होते . परंतु त्यांच्या दुर्दैवाने मुंबईच्या किनाऱ्यावरील भयानक पावसाने त्यांना आता झोडपून काढण्यास सुरुवात केली . विशाळगडचा किल्लेदार परशुराम याने बेदारबख्त याच्यापासून मोठी लाच घेतली आणि ४ जून रोजी राजपुत्राचे निशाण

त्याने किल्ल्याच्या बुरुजावर लावले . ७ जून रोजी रात्री [विशाळगडच्या मोहिमेची साकी मुस्तैदखानाने दिलेली हकीकत पुढीलप्रमाणे आहे :

खेळण्याच्या किल्ल्यासंबंधी लिहिण्यास बसणे म्हणजे पोरखेळ नाही . त्याचे लहान -मोठे तपशील देणे आवश्यक आहे . खेळण्याची सांगोपांग माहिती देण्याचा प्रयत्न करावा तर प्राण कंठाशी येतात . बेहिमतीचा मनुष्य अशा प्रचंड कामाला हात घालू शकत नाही . आपल्या अल्पस्वल्प प्रयत्नाच्या आधारावर तो शिखर कसे गाठू शकेल ?

खेळणा किल्ला म्हणजे मूर्तिमंत कष्ट आणि संकटे . तो घेण्याची कल्पना जरी केली तरी प्राण कासावीस होतात . उंच डोंगर म्हणजे त्याच्यासमोर धुळीत बसण्याच्या योग्यतेचा आणि आकाशाने उंचीच्या बाबतीत त्याच्यासमोर भिकारी म्हणून उभे राहावे असा खेळण्याचा किल्ला . शरीरात घर करून राहिलेला रोग निघणे जसे कठीण तशीच खेळणा जिंकून घेण्याची कल्पनाही कठीण होय.

पण म्हणतात ना , प्रत्येक प्रश्नाला उत्तर , प्रत्येक कोड्याला उलगडा आणि प्रत्येक संकेताचा अर्थ , ही होऊ शकतात . प्रत्येक कठीण प्रश्न सोडविण्याकरिताच जणू परमेश्वराने आलमगीर बादशहाला निर्माण केले आहे . यात दैवी योजना हीच होती की प्रजेला संकटापासून संरक्षण मिळावे आणि दुष्टांचे निर्दालन व्हावे.

तो गगनचुंबी पर्वत (खेळणा) जिंकून घेण्याच्या उद्देशाने **जमादिलाखर** महिन्याच्या सोळा तारखेस (७ नोव्हेंबर १७०१) सादिकगडाहून कूच केले. बारा टप्प्यात प्रवास पूर्ण करून तो मलकापूर येथे पोहचला . तेथून पुढे अंबाघाटापर्यंतचा रस्ता आक्रमण्यास अतिशय अवघड होता . म्हणून बादशहाने मलकापूरला एक आठवडा मुक्काम केला.

नबीशाहदुर्गाहून निघताना बादशहाने शहाजादा बेदारबख्त यास पावसाळा काढण्यासाठी हुक्केरी गोकाकच्या भागात रवाना केले होते . त्याने अल्पावधीत काफरांचे अनेक किल्ले जिंकून घेतले. बादशहाच्या आज्ञेने तो खेळणा पाहण्यासाठी बोरगावच्या वाटेने बादशहापाशी आला. वाटेत त्याने गावे आणि वाड्या जाळल्या . मलकापूर मुक्कामी त्याने बादशहाची गाठ घेतली . अकाली पावसामुळे या मुक्कामी काही दिवस मोगल सैन्याचे अनेक प्रकारचे हाल (ब अनबाए तआब) झाले. शेवटी फत्तेउल्लाखानाच्या प्रयत्नांनी घाटाचा रस्ता साफ करण्यात आला आहे अशी बातमी आली . पुढील चार कोसांचा रस्ता फार भयंकर आहे , या बातमीने मोगल सैन्यात भयंकर घबराहट निर्माण झाली होती . पण तो इतक्या सहजपणे आक्रमण्यात आला की त्याची कल्पनाही करवत नाही. मोगल सैन्य आपल्या सर्व सामग्रीसहीत निश्चितपणे तो रस्ता पार करून गेले.

रजब महिन्याच्या १६ तारखेस (६ डिसेंबर १७०१) डोंगराच्या पायथ्यापाशी मोगल छावणी कायम करण्यात आली . ती जागा प्रशस्त आणि छावणी करण्यास योग्य होती . तेथून खेळण्याचा किल्ला साडेतीन कोसांवर आहे . इतके प्रचंड लष्कर आणि तेही इतक्या लवाजम्यासहीत यापूर्वी दोन -तीन वेळेपेक्षा जास्त असे या भागातून कधीच गेले नव्हते . मोगल सैन्याच्या घोड्याच्या टापाखाली या प्रदेशातले पुंड लोक चिरडले गेले.

खेळण्याच्या मोहिमेत जी संकटे कोसळली आणि जे भयंकर प्रसंग ओढवले त्यांचे वर्णन करणे अशक्य आहे . डोंगराळ भागात काटेरी जंगले आणि प्रवेश करण्यास अशक्य अशी घोर अरण्ये आहेत . सर्व आकाश पालथे घालणारा तो सूर्य . पण त्यालासुद्धा या अरण्याकडे पाहण्याचे धाडस करवत नाही. प्रचंड वृक्ष, काफराप्रमाणे ठिकठिकाणी आपल्या माना उंच करून उभे आहेत . त्यांच्या फांद्या एकमेकांत इतक्या अडकल्या आहेत की त्यातून मुंगीसुद्धा अतिशय कष्टानेच जाऊ शकेल . बरे, त्या अरण्यात कुठे एवढीशी वाट असली तरी ती इतकी अरुंद आहे , की त्यातून पायी चालणारा मनुष्य मोठ्या कष्टानेच जाऊ शकेल . जागजागी प्रचंड दरडी आणि खोल खड्डे या प्रदेशात आढळतात . कठीण पत्थरांचे प्रचंड खडक येथे जागजागी आहेत. या सर्व अडचणी दूर करण्याचे काम फत्तेउल्लाखान यास सांगण्यात आले . त्याच्या देखरेखीखाली बेलदार, पाथरवट आणि जंगल झाडे तोडणारे लोक त्यांनी एका आठवड्यात उत्कृष्ट कामगिरी केली . ती पाहून मन थक्क होते. डोंगर जरी समोर आले तरी त्यांनी ते वाटेतून हटविले. खोल खड्डे किंवा उंच चढ आढळले की ते नीट करून रस्ता व्यवस्थित करण्यात येई . अडथळा आणणारे प्रचंड वृक्ष तोडून टाकण्यात आले आणि कचऱ्याप्रमाणे त्यांना साफ करण्यात आले. रस्ता इतका उत्तम आणि प्रशस्त करण्यात आला की, त्यावरून एकाच वेळी शंभर स्वार अगदी आरामात जाऊ शकत. फत्तेउल्लाखानाची शत्रूबरोबर रोज युद्धे होत. (२३ डिसेंबर १७०१) **शाबान** महिन्याच्या तीन तारखेस बादशहाने त्याला एक खास बाणांचा भाता दिला . मोगल सैन्य मुख्य प्रधान (मक्षरुलम हाम) जुम्दतुल्मुल्क असदखान याच्या नेतृत्वाखाली निघाले . असदखानाबरोबर हमीदुद्दीनखान बहादूर , मुनीमखान, इखलासखान आणि राजा जयसिंग हे होते . या सैन्याचे मार्गदर्शन करून किल्ल्याला वेढा घालण्याचे काम त्याच्याकडे देण्यात आले.

शाबान महिन्याच्या सहा तारखेस (२६ डिसेंबर १७०१) जुम्दतुत्मुल्क असदखान यास अमीरूल उमरा ही पदवी , एक रत्नजडित खंजीर आणि चार हजार अश्रफ्या देण्यात येऊन त्याचा गौरव करण्यात आला . यानंतर त्याने बादशहाचा निरोप घेतला . त्याच दिवशी फत्तेउल्लाखान , हमीदुद्दीनखान, मुनीमखान आणि इतर धाडसी वीर पुढे कूच करून खिंडीत घुसले. त्यावेळी अद्याप उजाडले नव्हते. किल्ल्याच्या जवळ एक टेकडी होती. तेथे आपला तोफखाना ठेवावा असे फतेऊल्लाखान याने ठरविले होते. तेथे दुष्ट काफरांनी बुरूज आणि तट बांधून संरक्षणाचे ठाणे कायम केले होते. फत्तेउल्लाखानाने त्याच्यावर हल्ला केला. हमीदुद्दीनखान बहादुर याला फत्तेउल्लाखानाने डावी फळी सांभाळण्यासाठी नेमले . तो स्वतः उजव्या फळीच्या तोंडाशी उभा राहिला.

मोगलांनी डोंगरातून रस्ता साफ करून आपली बाजू मजबूत केली होती . त्यामुळे पहिल्याच दिवशी शत्रूचा मारा थंड झाला होता. आणि आता फत्तेउल्लाखानाने तेरा चवदा शूर वीरांना बरोबर घेऊन शत्रूवर हल्ला करून अनेकांना ठार मारले. हे पाहून गनीम घाबरले. पळून जाण्याशिवाय

अनुक्रमणिका

त्यांना दुसरा उपाय राहिला नाही . टेकड्यांवरून उड्या मारून ते किल्ल्याकडे पळून जाऊ पाहात होते . पण मोगलांनी किल्ल्याच्या वाटेवर बंदुकचीचे (जजायर अंदाजान) ठेवले होते. ती वाट बंद झालेली पाहून गनीम जंगलात पळाले आणि झाडाझाडातून लपून बसले . या अवधीत मोगलांच्या इतर तुकड्या त्या जागी पोहोचल्या, शत्रूच्या बहुतेक सैनिकांना गिरफ्तार करण्यात आले. फत्तेउल्लाखानाने त्यांच्या कंबरांना घोडे बांधून त्यांना कड्यावरून खाली लोटून दिले.

अदूर दृष्टीच्या लोकांना वाटत होते की हे काम अवघड असून ते पूर्ण करण्यास बराच काळ लागेल . पण परमेश्वराची कृपा आणि बादशहाचे भाग्य यामुळे अल्पावधीतच फत्तेउल्लाखानाचा हेतू तडीस गेला . त्या ठिकाणी ठाण मांडून राहणे हाच विजयाचा संकेत होय असे त्याने ठरविले. मोगलांनी तेथे आपले तंबू दिले.

फत्तेउल्लाखानाच्या कामगिरीची हकीकत संध्याकाळच्या सुमारास बादशहाला कळली . फत्तेउल्लाखानाच्या मन्सबीत दोनशेची वाढ करण्यात येऊन त्याला एक ध्वज आणि एक रत्नजडित खंजीर या वस्तू देण्यात आल्या . हमीदुद्दीनखान बहादूर यास एक कट्यार देण्यात आली . मुनीमखानाचा घोडा मारला गेला होता . त्याला सोनेरी साज असलेला उमदा अरबी घोडा देण्यात आला . याशिवाय बादशहाच्या खास मुदपाकखान्यातील अन्न त्याच्याकडे पाठविण्यात आले. फत्तेउल्लाखानाच्या आप्तेष्टांना (बिरादरी) योग्य त्या बढत्या देण्यात आल्या.

रात्री मोर्चे कायम करण्याचे काम चालू झाले . तेथून किल्ल्यात बंदुकीचा मारा करता येत असे . मोगलांनी दुसऱ्या दिवशी त्या टेकड्या ताब्यात घेतल्या . त्याच्यावर मोठ्या तोफा चढविण्यात आल्या . त्यांचा मारा झाल्यास शत्रूची घरेदारे उद्ध्वस्त करता येत होती आणि शत्रूला होरपळून काढणे शक्य होते.

यानंतर मोगलांनी भुयारे खणून ती किल्ल्याच्या आत नेण्याचे काम सुरू केले . थोड्याच काळात या कामात इतकी प्रगती झाली की त्यातून घोडे जाऊ शकण्याइतकी वाट तयार करण्यात आली. ते पाहून बादशहाला फार आनंद झाला.

शाबान महिन्याच्या बावीस तारखेस (११ जानेवारी १७०२) मोर्चे पाहण्यास आणि किल्ल्याचे निरीक्षण करण्यासाठी बादशहा बाहेर पडला. मोर्चे पुढे नेण्याची त्याने आज्ञा केली . आपल्या सैन्याला उत्तेजन मिळून काम लवकर पार पाडावे या हेतूने बादशहाने आपला मुक्काम हलविला आणि **शाबान** महिन्याच्या सत्तावीस तारखेस (१६ जानेवारी १७०२) त्याने किल्ल्यापासून अर्ध्या कोसावर असलेल्या मैदानात आपला तंबू दिला.

विशाळगडचा वेढा.

शहाजादा बेदारबख्त याला सैन्याच्या छावणीभोवती गस्त घालण्याच्या कामावर नेमण्यात आले होते . आता बादशहाने त्याला नबीशहादुर्गा (पन्हाळगड) कडे पाठविले (१९ जानेवारी १७०२). त्या भागाचा बंदोबस्त करण्याचे काम त्याला देण्यात आले.

महमद अमीनखान (निजामुल्मुल्काचा चुलता) हा **सदरुस्सुदूर** (न्यायखात्याचा मुख्य) होता. त्याच्या मन्सबीत दोनशेची वाढ करण्यात आली, आणि त्याला एक ध्वज देण्यात आला . त्याने अंबाघाटावरून तळ कोकणात उतरावे , तिकडून किल्ल्याच्या कोकण दरवाजापर्यंतचा सर्व प्रदेश उद्ध्वस्त करवा, आणि किल्ल्याला मिळणाऱ्या सर्व वाटा बंद कराव्या ही कामे महमद अमीनखान यास देण्यात आली.

बादशहाच्या आज्ञेने तरबियतखान हा अंबाघाटाच्या तोंडाशी बसला . महमद अमीनखान कोकणात उतरला . त्या प्रदेशातील गावे आणि वाड्या ही त्याने जाळून फस्त केली . अनेक माणसे आणि गुरेढोरे यांना तो धरून घेऊन आला . नंतर त्याने कोकणी दरवाजाकडची वाट बंद करण्याची व्यवस्था केली.

फत्तेउल्लाखानाने लहान मोठ्या तोफा एकत्र केल्या . त्यानंतर त्याने एक बोळ , किल्ल्याच्या प्रवेशद्वारासमोर बुरूज होता , त्याच्यामागे असलेल्या खंदकापर्यंत तयार करीत नेला.

किल्ल्यातील लोक क्षणाचीही विश्रांती न घेता रात्रंदिवस तोफा , बंदुका इत्यादींचा सतत मारा करीत होते . बोळ तयार करण्यात मोगलांची हरप्रकारची माणसे झटत होती. मराठ्यांच्या माऱ्यांनी मोगलांची अनेक माणसे ठार झाली . पण मोगल निर्धाराने आपले काम चालू ठेवीत होते.

त्यांना कशाचीही पर्वा नव्हती . तुम्हाला आम्ही सुरक्षित जागा देऊ असे त्यांना शत्रू किंवा मित्र यांनी सांगितले असते , तर त्याकरिता बाजरीचा एक दाणाही खर्च करण्याची त्यांची तयारी नव्हती.

गनिमाने किल्ल्याच्या दरवाजापासून रेवणीच्या बुरुजापर्यंत गुप्त रस्ता तयार केला होता . त्या वाटेने ते बुरूजावर येत आणि तेथून मोगलांचा प्रतिकार करीत . फत्तेउल्लाखान हा पुढे होऊन जिन्याच्या वाटेने बुरुजावर चढण्याची तयारी करीत आहे ते त्यांनी पाहिले . त्याबरोबर त्यांची गाळण उडाली . भुयारातून मोगलांनी शिड्या वर चढवून त्या तटाच्या भिंतीखालपर्यंत आणल्या होत्या . मराठ्यांनी त्या उद्ध्वस्त करून टाकल्या. मग मोगलांनी कजाण्याच्या (उंटाचे हौदे) शिड्या तयार केल्या . कजाण्यावर त्यांनी फळ्या घातल्या , आणि शिड्या चढविण्याचे काम त्यांनी सुरू केले. आता मी महमद अमीनखान याच्या कामगिरीचे वर्णन करतो . त्याने माचाळचा डोंगर ओलांडला आणि किल्ल्याच्या दरवाजासमोर

अनुक्रमणिका

रेवणी बुरूज होता , त्याच्याजवळच असलेल्या टेकडीपाशी तो पोहोचला . ती टेकडी शत्रूच्या ताब्यात होती . त्यांनी तेथे तट वगैरे बांधून ती जागा मजबूत केली होती. तटाच्या भोवती त्यांनी खंदक खणले होते.

त्यामुळे त्या भागाने पुढे सरकण्यात मोगलांना अडचणी येऊ लागल्या . (मुद्दते पर्दाये सऊ वत नकाघे चेहेरा पेशरफ्ते कार बुद) बराच काळपर्यंत मोगलांच्या काम चालू ठेवण्याच्या चेहऱ्यावर संकटांचा पडदा पडला होता.

पण शेवटी **शव्वाल** महिन्याच्या पंधरा तारखेस (४ मार्च १७७२) महमद अमीनखान याने निधड्या छातीच्या वीरासहित त्या टेकडीवर हल्ला करून ती ताब्यात घेतली. शत्रूला त्याने रेवणी (किल्ल्याच्या दरवाज्याला संरक्षण मिळावे म्हणून बांधलेला बुरूज) पर्यंत पिटाळीत नेले. आता कोकणी दरवाजातून शत्रूची आवकजावक बंद पडली. शत्रूचे अनेक लोक मारले गेले.

महमद अमीनखानाच्या शौर्याची हकीकत ऐकून बादशहाने त्याला बहादूर ही पदवी , एक तलवार, खिलती वस्त्रे आणि गौरवाचे फर्मान या वस्तू बहाल केल्या . महमद अमीनखानाच्या सहकाऱ्यांना मन्सबीच्या बढत्या , हत्ती, घोडे, तलवारी, कट्यारी, खिलतीची वस्त्रे इत्यादी वस्तू देण्यात आल्या.

बादशहाची दूरदृष्टी काय वर्णावी ! इतरांना समजण्यास वेळ लागेल पण बादशहाला एक नजरेत गोष्टी उमगतात . कोणतेही काम पार पाडण्यास इतरांना खूप कष्ट करावे लागतात पण बादशहा ते एका दमात पार पाडतात.

शहाजादा बेदारबख्त यास नबीशहा दुर्गा (पन्हाळगड) हून बोलावून घेण्याचे बादशहाने ठरविले . त्याप्रमाणे तो आला . बादशहाने योजना केली ती ही : बेदारबख्त याचे सैन्य , राजा जयसिंग आणि त्याचे सैन्य , मोर्चाचा प्रमुख रक्षक फतेउल्लाखान बहादूर , दंड राजपुरीचा अधिकारी याकूतखान याने पाठविलेले काही हजार पायदळ सैन्य , या सर्वांनी मिळून कोकणी दरवाजाच्या मार्गाने किल्ला जिंकून घेण्याचा प्रयत्न करावा.

त्याप्रमाणे मोगल त्या दिशेने मोर्चे नेण्याच्या कामी झटू लागले , आणि तोफांचा मारा करून तट आणि बुरूज पाडून टाकण्याच्या उद्योगाला लागले. महमद अमीनखान बहादूर हा आजारी पडल्यामुळे बादशहाने त्याला आपल्यापाशी बोलावून घेतले.

फतेउल्लाखानाने जिवापाड मेहनत केली . बुरुजाच्या मध्यापर्यंत त्याने फळ्यांनी बांधलेले कजावे (उंटांचे हौदे) चढविले. किल्ल्याच्या प्रत्येक दरवाजापर्यंत त्याने बोळ बांधीत नेले. पण काही केल्या काम पार पडेना.

कविता :— सब्जा बर संग नरवीदचे गुस्हा बारान रा.

दगडावर हिरवळ उगवली नाही तर त्यात पावसाचा काय बरे दोष आहे ?

मोगलांनी हरप्रकारे प्रयत्न केले पण कार्य तडीस जाण्याची चिन्हे दिसेनात . मोगलांच्या दोन जबरदस्त तोफा होत्या . एकीचे नाव शेर दहान (व्याघ्रमुखी) आणि दुसरीचे नाव कडक बिजली. एकेका तोफेच्या माऱ्याने मोठमोठ्या डोंगराचा पाया हलून गेला असता . पण किल्ल्यावर या तोफांचा मारा करण्यात आला तेव्हा बुरुजाचे फक्त काही दगडच ढासळले इतकेच . मराठे मोगलावर रात्रंदिवस बंदुकी, तोफा, मतवाले इत्यादींचा मारा करीत. त्यात त्यांनी एक क्षणही हात आखडते घेतले नाहीत आणि मतवाल्यांचे (दगडाचे आणि इतर असे मोठे गोळे) वजन तरी किती ? एक शंभर मण वजनाचा तर दुसरा दोनशे मण वजनाचा. अशा गोळ्यांचा मारा सारखा चालू होता.

मराठ्यांनी अनेक वेळा मोगलांच्या मोर्चावर रात्रीचे हल्ले चढविले. फतेउल्लाखानाने जातीने त्यांचा प्रतिकार केला.

एके दिवशी फतेउल्लाखान हा कामकऱ्यांच्या बरोबर बुरुजावर धाबे (कजाळ्यांना फळ्या ठोकून बंदिस्त त्यांच्या शिड्या बनविणे) तयार करण्याच्या कामात गुंतला होता . इतक्यात वरून एक मोठा धोंडा येऊन फळ्यावर आदळला . त्या आघाताने ती फळी तुटली आणि फतेउल्लाखानाच्या डोक्यावर धोंडा पडला . फतेउल्लाखान हा दरडीवरून खाली घसरला . वाटेत एक कजावा होता . त्याला तो थांबला . फतेउल्लाखानाच्या कमरेला आणि इतर अवयवांना जबर मार बसला.

फतेउल्लाखान हा एक महिनाभर अंथरुणाला खिळला होता . त्यानंतर बरा होऊन तो बादशहाच्या भेटीस गेला . बादशहाने त्याला एक शिरपेच दिला. नंतर तो परत आपल्या कामावर गेला.

दुसऱ्या बुरुजाकडून हल्ल्याची तयारी करावी अशा विचारात तो होता . इतक्यात शहाजादा बेदारबख्त याच्या प्रयत्नाने मोगलांनी **जिल्हज** महिन्याच्या दहा तारखेस (२७ एप्रिल १७०२) रेवणीचा बुरूज हस्तगत केला. बुरूज हाती येणे म्हणजे किल्ला हाती येण्यासारखेच होते . हा बुरूज जिंकून घेण्यात राजा जयसिंग आणि त्याचे रजपूत यांनी मोठी मर्दुमकी गाजवली.

सारांश सर्वांच्या प्रयत्नांनी , परमेश्वराच्या कृपेने आणि बादशहाच्या भाग्याने हा जय मिळाला . किल्ला हाती येण्याची ही प्रस्तावना समजली पाहिजे.

अनुक्रमणिका

शत्रूचे सैन्य प्रचंड होते . पण मोगलांनी रेवणीचा बुरूज जिंकून घेतल्यावर त्यांच्यात खळबळ माजली . आता विशाळगडचा किल्ला आपल्या हाती पडणार अशी मोगलांची खात्री झाली . बादशहाचे हे भाग्य पाहून काळानेही आश्चर्याने तोंडात बोटे घातली आणि आकाशाचे डोळे आश्चर्याने विस्फारित झाले ते तसेच राहिले.

शहाजादा बेदारबख्त याला जडावाचा शिरपेच देण्यात आला . राजा जयसिंग याची मनसब पाचशेंनी आणि दोन हजार स्वारांनी वाढविण्यात आली . इतर वीरांनाही योग्य त्या बढत्या देण्यात आल्या . सैफुल्लाखानाचा मुलगा असदुल्लाखान हा तडक प्रवास करून बातम्या आणण्यात फार कुशल होता. त्याला सैफुल्लाखान ही पदवी देण्यात आली.

बादशहाने शहाजादा बेदारबख्त यास आज्ञा केली की किल्ल्याच्या दरवाजावर तोफाचा मारा करून तो तोडून टाकावा . फतेउल्लाखानाने ज्या दरवाजासमोर मोर्चे लाविले होते तो पाहता हा दरवाजा काही इतका मजबूत नव्हता.

पण, त्या भयंकर पावसाचे मी कसे वर्णन करू . एका दोअस्पा स्वाराप्रमाणे (ज्या स्वारापाशी मांडीखालच्या घोड्याच्या बरोबर आणखी एक घोडा असतो एक थकला तर दुसऱ्यावर स्वारी करता येते . त्याला दोअस्पा म्हणत.) पाऊस भरधाव आणि बेलगाम धावत येत होता . दहा-दहा आणि वीस-वीस दिवस अहोरात्र पावसाचा वर्षाव होत असे. कुणाला डोळे उघडण्याची अगर डोके वर काढण्याची सोय नव्हती.

पण इतके असूनही मोगल वीर किल्ल्याच्या दोन्ही बाजूचे मोर्चे तीव्र गतीने पुढे नेण्याच्या कामात गुंतले होते . त्यांना गनिमाची भीती वाटत नव्हती. पावसाचीही त्यांनी पर्वा बाळगली नाही.

फतेउल्लाखानाचा बेत फसला होता . त्याने तयार केलेले धाबे (बीळ आणि शिड्या) उद्ध्वस्त झाले होते. आता वाटेल ते होवो, जोराचा हल्ला करावा अशा विचारात तो होता.

ही आपल्या सर्वनाशाची तयारी होय हे परशुराम (किल्ल्यावरील अधिकारी) याला समजून चुकले . आपल्या काही विनंत्या मान्य कराव्यात म्हणजे मी किल्ला हवाली करतो असे त्याने काही ब्राह्मण कारभाऱ्यांच्या करवी शहजादा बेदारबख्त याजकडे निरोप पाठविला . काही दिवस वाटाघाटीत गेले. यात बादशहाने बख्शी रुहुल्लाखान आणि फजायलखान (बूयूतातचा व्यवस्थापक) त्यांना बोलणी करण्यासाठी नेमिले होते. शेवटी सर्वांनी सुरक्षितपणे किल्ल्यातून बाहेर पडावे, त्यांना काही इजा करण्यात येणार नाही ही एकच अट बादशहाने मान्य केली.

मुहरम महिन्याच्या १९ तारखेस (चार जून १७०२) किल्लेदाराने बख्शी रुहुल्लाखान आणि शहाजादा बेदारबख्त यांचे झेंडे आपल्या हातांनी किल्ल्यावर लाविले . **मुहरम** महिन्याच्या बावीस तारखेस (सात जून १७०२) तो (किल्लेदार) रात्रीच्या अंधारात किल्ल्याच्या बाहेर पडला . दयाळू बादशहाच्या आज्ञेमुळे त्याला कुणीच अडविले नाही.

फतेहशुद खेळणा (खेळणा सर झाला) या वाक्यावरून किल्ला जिंकण्याचे वर्ष निघते . बादशहाने कुराण उघडून पाहिले . त्यात सखरलना (धन्य परमेश्वराची त्याने हा जय मिळवून दिला) हे शब्द त्याला आढळले. किल्ल्याला सखरलना हे नाव देण्यात आले.

या प्रदेशाची आणि येथील डोंगरांची जितकी स्तुती करावी तितकी थोडीच आहे . जिकडे दृष्टी पडावी तिकडे हिरवी राने आणि फुलझाडे याशिवाय काही दिसत नाही . परमेश्वराच्या सृष्टीचे निरीक्षण करणाऱ्यांना असे सुंदर आणि एका विशाल उपवनासम असलेले असे मनोहारी दृश्य इतरत्र कोठेच आढळणार नाही . ज्याच्या सुगंधाने मेंदू तर्र होणार नाही असे एकही फूल येथे आढळत नाही . या भागातील एकेका बीजातून उत्पन्न होणाऱ्या धान्यांनी आणि फळाफुलांनी अनेक देशांतून व शहरांतून वसूल होणार नाही इतकी संपत्ती लाभते . या देशातील कणन् कण आकर्षक आणि रमणीय आहे.

धन्य बादशहाची. त्यांना अशा रमणीय प्रदेशाचा लाभ झाला.

मुहरम महिन्याच्या २५ तारखेस (दहा जून १७०२) फतेउल्लाखानाने तयार केलेल्या मोर्चाच्या वाटेने बादशहा किल्ला बघण्यास गेले . जाबितखान याची किल्लेदार म्हणून नेमणूक करण्यात आली. त्याच्याबरोबर बरीच साधनसामग्री (रसद, शस्त्रास्त्रे, सैन्य) किल्ल्यात ठेवण्यात आली. किल्ला मजबूत आहे पण इतर किल्ले पाहता या किल्ल्यात इमारती , बागा, हौद इत्यादी विशेष नाहीत आणि ज्या आहेत त्यात पाहण्यासारखे काही नाही. पण हा किल्ला सरहद्दीवर आहे . हा किल्ला ताब्यात आल्यामुळे बालाघाट आणि पाईनघाट , तळकोकण हे साम्राज्याला जोडले गेले आणि बादशहाच्या प्रत्येक कार्यात असंख्य हेतू दडलेले असतात . हे सगळे लक्षात घेता हा किल्ला हातात येणे म्हणजे फार मोठा विजय प्राप्त झाला असे मानण्यात आले.

दुसऱ्या दिवशी बादशहाने शहाजादा बेदारबख्त यास एक लाख रुपये बक्षीस म्हणून दिले आणि त्याला हुकेरी व रायबाग या भागांत छावणी घालण्यासाठी म्हणून पाठवून दिले . फतेउल्लाखान यास आलमगीरशाही ही पदवी आणि एक रत्नजडित जेगा (तुरा) ही देण्यात आली . रुहुल्लाखान आणि हमीदुद्दीनखान यांस प्रत्येकी दोनशे स्वारांच्या मन्सबीची बढती देण्यात आली . खानाजादखान हा बादशहाच्या निकट असे . त्याच्या मन्सबीत पाचशेची वाढ करण्यात येऊन त्याला एक हत्ती बक्षीस देण्यात आला . मुनीमखान यास हत्तीखान्याचा **दारोगा** म्हणून नेमण्यात आले होते. त्याला एक हजारीची **मनसब** देण्यात आली होती . पण महमद अमीनखान याच्या मदतीस तो वेळेवर न गेल्यामुळे त्याची नेमणूक रद्द

अनुक्रमणिका

करण्यात येऊन त्याची **मनसब** दोनशेनी कमी करण्यात आली . ती जागा हमीदुद्दीनखान यास देण्यात येऊन त्याची मनसब पाचशेनी वाढविण्यात आली. मला (साकी मुस्तैदखान-लेखक) अनेक हुद्दे होते. बादशहाची गुप्त आणि तातडीची पत्रे मीच लिहीत असे . आता मला नजारत खात्याच्या मुन्शीचेही काम देण्यात आले. वाकेन विसाचे माझे काम माझा मुलगा हाफिज महमद मुहसिन यास देण्यात आले.

मुहरम महिन्याच्या पंचवीस तारखेस (१० जून १७०२) बादशहा आपल्या सैन्यासहीत विशाळगडाहून निघून बहादुरगडाकडे (अहमदनगर जिल्हा, भीमा नदीच्या काठावरचे पेडगाव) रवाना झाला.

(मराठे व औरंगजेब, श्री. सेतुमाधवराव पगडी, १००—१०९)]

[विशाळगडाच्या वेढ्याची हकीकत खाफीखानाने पुढीलप्रमाणे दिली आहे :—

औरंगजेबाच्या राज्यकारभाराचे पंचेचाळिसावे वर्ष . **जमादिलाखर** महिन्याच्या सोळा तारखेस , खेळणा किल्ला (विशाळगड) जिंकून घेण्यासाठी बादशहा आपल्या सैन्यासहीत पाचगावहून निघाला (ऑक्टोबर १७०१). प्रथमपासून शेवटपर्यंत प्रवास भयंकर संकटांनी भरला होता . रस्ते दुर्गम आणि अडचणीचे होते . वाटेत दाट जंगले होती. त्यात विषारी वृक्ष होते, अरण्ये काटेरी होती. हवापाणी अत्यंत वाईट होते. या प्रवासात बादशाही सैन्याला जे भयंकर हाल सोसावे लागले त्याचे तपशीलवार वर्णन मी केले तर वाचकांच्या कोमल मनाला दुःख होईल , म्हणून सारांशाने सांगतो. बादशाही सैन्यानें दोन दिवसांत संपणारी मजल बारा दिवसांत आक्रमिली . यानंतर, त्या भागात अंबाघाट हा प्रसिद्ध होता , तेथे बादशाही सैन्य पोहोचले. तेथे अंबाघाटावरून पुढे कूच करण्याचा बादशहाने हुकूम दिला . राजपुत्र बेदारबख्त यास गोकाकच्या भागाकडे शत्रूंचा बिमोड करण्यास पाठविण्यात आले होते . त्यांची घरेदारे आणि निवासस्थाने उद्ध्वस्त करून तो या ठिकाणी बादशहाला भेटला . या सुमारास अकाली पावसामुळे इतका चिखल झाला की, कुणालाही एका तंबूतून दुसऱ्या तंबूत जाणे कठीण होऊन बसले; मग प्रवास करण्याची गोष्ट तर दूरच राहो.

महिन्याचे काम आठ दिवसांत.

घाटाचा रस्ता दुरुस्त करण्यासाठी बादशहाने फतेउल्लाखान यास नेमले . रजब महिन्याच्या मध्यात बादशाहा खेळण्याच्या पायथ्याशी पोहचला (६ डिसेंबर १७०१). तेथून खेळण्याच्या किल्ला सात मैलांवर होता . बादशहाने मुक्काम केला ती जागा विविध प्रकारच्या फुलझाडांनी युक्त होती. तेथून पुढे घाटाचा रस्ता दुरुस्त करण्यास त्याने फतेउल्लाखान यास आज्ञा केली. डोंगरातून रस्ता काढणे, झाडे पाडून खिंडारे बुजविणे आणि रस्ता बांधणे ही कामे करावयाची होती . मराठ्यांच्या टोळ्या डोंगरदऱ्यांतून आणि झाडाझुडपांच्या आश्रयाने मोगलांवर सारखे हल्ले करीत ; त्यांना परतवून लावण्याचे काम फतेउल्लाखानाला करावे लागे . दुसरीकडे रस्ता तयार करण्याचेही काम त्याला पाहावे लागे . पण त्या अनुभवी माणसाने, दिलेले काम पार पाडले . एका महिन्यात व्हावयाचे काम त्याने एका आठवड्यात पार पाडले . एका वेळी शंभर स्वार जाऊ शकतील असा रस्ता तयार करण्यात आला. जुम्दतुल्मुल्क असदखान यास बादशहाने **अमीरुल उमरा** ही पदवी, चार हजार आश्रफ्या, आणि जडावाचा खंजीर या वस्तू दिल्या. हमीदुद्दीन खानबहादूर, मुनीमखान, फतेउल्लाखान, बहादूर राजा जयसिंह या अनुभवी सरदारांना बादशहाने मानसन्मान , बक्षिसे इत्यादी देऊन किल्ल्याला वेढा घालण्यासाठी पुढे पाठविले (२६ डिसेंबर १७०१). सैन्याच्या आघाडीला फत्तेउल्लाखान आणि हमीदुद्दीनखान हे होते , ते दरीत घुसले. दमदमे बांधणे आणि त्यावर तोफा चढविणे इत्यादी गोष्टीस अनुकूल असलेल्या माऱ्याच्या जागा फतेउल्लाखानाने निवडल्या होत्या . त्या ठिकाणी ठाणी स्थापण्यात आली होती.

'काफर नरकात गेले.'

काफरांनी (मराठ्यांनी) ठाण्यावर हल्ले केले. ती ताब्यात घेतली आणि तेथे आपले मोर्चे कायम केले . दरीच्या तोंडाशी चार-पाच हजार मराठे जमले होते . डोंगराच्या आड आणि झाडाझुडपात दडून , ते मोगलांवर गोळ्यांचा आणि दगडांचा वर्षाव करू लागले . फतेउल्लाखानाने शूर वीरांना बरोबर घेऊन त्यांच्यावर निकराने हल्ला केला , आणि आपल्या तलवारीचे पाणी दाखवून अनेकांना परलोकी पाठविले . मोगलांचे अनेक सैनिक मृत्युमुखी पडले . मराठ्यांची स्थिती अतिशय कठीण झाली . ते पळून गेले . कित्येकांनी डोंगराच्या कड्यावरून खाली उड्या टाकल्या , त्यामुळे ते मरण पावले . (बजहन्नम वासल गर्दीदंद -नरकात गेले.) शत्रूपैकी कित्येकांना कैद करण्यात आले . त्या दिवशी मोगल वीरांना एक क्षणाचीही उसंत मिळाली नाही . फतेउल्लाखानाने जातीने पुढे होऊन शौर्य गाजविले . हे घवघवीत यश (फतेहनुमायान) ऐकून बादशहाने फतेउल्लाखानाच्या मन्सबीत दोनशे स्वारांची वाढ केली. त्याला ध्वज आणि जडावाचा खंजीर ही देण्यात आली. हमीदुद्दीनखानाला कट्यार देण्यात आली. मुनिमखानाचा घोडा मेला होता. त्याला सोनेरी साजाने युक्त असलेला घोडा बक्षीस म्हणून देण्यात आला . फत्तेउल्लाखानाच्या विनंतीवरून त्याच्या जमातीच्या मन्सबदारांच्या मन्सबीत त्यांच्या योग्यतेनुरूप बढती देण्यात आली.

मराठे झोपेतून दचकून उठत!

शाबान महिन्यात मोगल वीरांनी किल्ल्याभोवती ठिकठिकाणी मोर्चे कायम केले (जानेवारी १७०२). किल्ल्यापर्यन्त छत बांधून एक बोळ (कुचाये सलामत) तयार करण्याच्या कामी मोगल झटू लागले . सुरूंग खणणे, शत्रूंवर वेळोवेळी हल्ला करून त्यांचा निकाल लावणे इत्यादी कामे फत्तेउल्लाखानाने इतक्या निकराने आणि चिकाटीने या वेढ्यात पार पडली की , त्यांचे वर्णन थोडक्यात करणे जमणार नाही , म्हणून सारांशाने सांगतो. फत्तेउल्लाखानाच्या प्रयत्नाने सुरक्षित आणि बंदिस्त असा बोळ तयार करण्यात आला . जमिनीखाली ती एक आकर्षक असलेली इमारतच बनविल्यासारखे झाले. त्यात ठिकठिकाणी वारा येण्याकरिता गवाक्षे तयार करण्यात आली होती . माऱ्याच्या जागा ठिकठिकाणी तयार करण्यात आल्या. मराठ्यांवर वेळोवेळी त्या ठिकाणांहून हल्ले करून त्यांचा पाडाव करता येऊ लागला . मोगल मराठ्यांना ठार करीत , त्यांची डोकी गवताने

अनुक्रमणिका

भरून काढीत आणि पकडलेल्यांच्या गळ्यात फळांप्रमाणे ती डोकी लटकावीत . त्या दुष्टांना (मराठ्यांना) फतेउल्लाखानाच्या नावानेच धडकी भरे . त्याने कायम केलेल्या मोर्चावर हल्ला करण्याची हिंमत होईना . फत्तेउल्लाखानाच्या नावाने ते झोपेतून दचकून उठत . स्वतः बादशहा स्वार होऊन फतेउल्लाखानाने तयार केलेले बोळ आणि मोर्चे पाहण्यास आला . त्याने फतेउल्लाखानाचे कौतुक केले . बादशहाचा तळ साडेतीन कोसांवर होता . तेथून निघून किल्ल्यापासून अर्ध्या कोसावर तळ देण्याचे बादशहाने ठरविले . पण या सात मैलांच्या प्रवासात बादशाही फौजेचे अत्यंत हाल झाले . काही हजार जनावरे आणि अनेक माणसे दरी ओलांडताना मरण पावली . माणसांची आणि जनावरांची त्या दरीत इतकी काही गर्दी झाली की , चेंगरा-चेंगरीनेच अनेक माणसे आणि जनावरे चिरडून मेली . मराठे चहूकडून हल्ले करीत , ठार मारीत आणि लोकांची शस्त्रास्त्रे लुटून नेत . दहा दिवसात बादशाही सैन्य किल्ल्यापासून अर्ध्या कोसावर आले (१६ जानेवारी १७०२). सैन्याच्या चंदावलाची पथके (पिछाडी) आणि प्रचंड साधनसामग्री ही मागे राहिली होती, ती मोठ्या कष्टाने काही दिवसांनी पोहोचली. वाटेत त्यांचे अतिशय हाल झाले. प्राणहानी आणि सामग्रीची हानी निम्मी तरी झाली. असंख्य नवीन आणि जुने तंबू आणि इतर सामान तळावर आणणे कठीण झाले . एकतर ते वाहून आणण्यास साधन नव्हते . दुसरे म्हणजे गनिमांचे (मराठे) हल्ले सारखे होत होते . शेवटी तंबू आणि इतर सामान यांना आगीने पेटवून दऱ्यात टाकून देण्यात आले . हेतू हा की , ते काफरांच्या (मराठ्यांच्या) कामी पडू नये . सारांश, माणसांची आणि सामानाची आणि अब्रूची भयंकर हानी झाली . जे झाले ते झाले आणि जे हाल भोगावयाचे ते भोगून झाले (आंचे गुजिश्त गुजिश्त व आंचे कशीदंद कशीदंद).

आगीतून फुफाट्यात!

मोगल सैन्य त्या भयंकर प्रवासातून सुरक्षित आले ते किल्ल्यावरील तोफांच्या आणि भयंकर गोळ्यांच्या संकटरूपी माऱ्यात सापडले . शहाजादा बेदारबख्त याची बनीशाहदुर्ग (पन्हाळ) कडे रवानगी करण्यात आली . तेथपर्यंत मराठे पसरले होते . त्यांना मोडून काढणे आणि पन्हाळ्याचे मराठ्यांच्या हल्ल्यांपासून संरक्षण करणे ही कामे बादशहाने बेदारबख्ताकडे लावून दिली . त्याने तेथे ठाण मांडून राहावे आणि मराठ्यांकडून खेळण्याला (विशाळगड) कोणत्याही प्रकारची मदत मिळणार नाही अशी तजवीज करावी म्हणून बेदारबख्ताला बजावण्यात आले . महमद अमीनखान हा त्या काळी सदुस्सुदूरच्या हुद्यावर होता . त्याने मोगल फौज घेऊन अंबाघाटाखाली उतरावे आणि काफरांना (मराठ्यांना) तिकडून येणारी रसद बंद करावी आणि उलट धान्य आणणाऱ्या वंजाऱ्यांना संरक्षण देऊन बादशाही छावणीत रसद पोहोचेल असे करावे अशी कामे महमद अमीनखान यास सांगण्यात आली . त्याप्रमाणे तो अंबाघाटाखाली उतरला . त्याने दुष्टांची (मराठ्यांची) घरे-दारे उद्ध्वस्त केली. अनेकांना ठार मारले. कित्येकांना कैद केले आणि त्यांची गुरे -ढोरे जप्त केली. या कामात त्याने निर्धार दाखविला . आपल्या कामगिरीत त्याने मुळीच कसूर केली नाही. त्या भागात नालायक (बद फरजाम) मराठ्यांचे त्याने नावही शिल्लक ठेवले नाही . तरबियतखानालाही याच कामावर नेमण्यात आले होते. त्यानेही मराठ्यांना मारण्यात (काफरकुशी) डोळ्यात भरण्यासारखी कामगिरी केली . (तरद्दुदहाये नुमायान) प्रतापी योद्धा फत्तेउल्लाखान बहादूर याच्या कामगिरीबद्दल काही ओळी लिहितो . किल्ल्याच्या पायथ्यापर्यंत फत्तेउल्लाखानाने सुरक्षित बोळ तयार केला . डोंगर इतका उंच होता की, त्याचा पाया आणि टोकंही दिसत नव्हती . तेथपर्यंत पोहोचता येईल ही कल्पनाच कठीण वाटत होती . उथळ आणि मत्सरी लोक फत्तेउल्लाखानाच्या प्रयत्नाला हसत . किल्ल्यावरून सतत आगीचा वर्षाव होत असे . पण साधनसामग्री जमवून ती तेथे व्यवस्थितपणे उभारणे या कामात फत्तेउल्लाखानाने भयंकर परिश्रम केले . कवड्या (खरमुहरा) मजुरी म्हणून द्यायच्या त्या जागी त्याने सोन्याची नाणी दिली . रात्रंदिवस तो त्या ठिकाणी हजर राही . कधी कधी तो स्वतः हातात फावडे , कुदळी, हातोडे ही अवजारे घेऊन कामगारांच्या बरोबर काम करी . इराणचे डोंगर कोरणारा सुप्रसिद्ध फरहाद जर असता तर त्यानेही फत्तेउल्लाखानाला धन्य धन्य म्हटले असते . शेवटी बोळ (नकब) दरवाजापर्यंत नेण्यात आला. पण तोपर्यंत या कामात इतकी माणसे जमा झाली की, त्यांची गणती करणे कठीण आहे. हीच स्थिती दमदमे बांधणे, ते वर उठविणे, दगड-मातीच्या असंख्य टोपल्या वर वाहून नेणे इत्यादी कामाच्या वेळी झाली . पण माणसे आणि जनावरे ही सारखी खपत होती . त्यांनी किल्ल्यासमोर दमदमे , चौक्या, लाकडी ओटे इत्यादी तयार केले. यामुळे किल्ल्यातील लोकांचा धीर सुटला.

तुराण्यांचा अब्रूचा रक्षक!

विश्वासू लोकांकडून मला जी हकीकत कळली ती देत आहे . एके दिवशी दमदम्याकरिता लागणाऱ्या लाकडी बैठकी आणि इतर सामान दोराने बांधून डोंगरावर चढविण्याचे काम चालू होते . फत्तेउल्लाखान त्या ठिकाणी हजर होता. त्या वेळी वरून एक प्रचंड शिला , शंभर मण वजनाची तरी, किंवा डोंगरच म्हणाना , घरंगळत येऊन लाकडाचा प्रचंड फळा , सामानाने भरलेला वर नेण्यात येत होता त्यावर आदळली . लाकडी फळा चक्काचूर झाला. फत्तेऊल्लाखान फळ्याच्या लाकडी बैठकीला धरून उभा होता . त्याच्यावर फळ्याचा तुकडा येऊन आदळला . त्याच्या डोक्याला आणि पायाला भयंकर मार लागला . लाकडी बैठकीसह (कजावा) तो खाली खोल दरीत फेकला गेला . त्या वेळी लष्करात विलक्षण हाहाकार झाला. तो मेलाच असे समजून बादशहाला वर्दी देण्यात आली . पण फत्तेउल्लाचे आयुष्य अद्याप शिल्लक होते . लाकडी बैठक घरंगळत खाली गेली ती एका जुन्या आणि भरपूर फांद्या असलेल्या झाडाला जाऊन अडकली . फत्तेउल्लाखानाने त्या बैठकीला घट्ट धरून ठेवले होते . तोही तसाच अडकून राहिला. लगेच माणसे त्याच्या मदतीला धावली आणि त्यांनी त्याला त्या विलक्षण संकटातून सोडविले . त्याला डोक्यावर, कमरेवर आणि इतर अवयवांवर दगडामुळे आणि इतर प्रकारे इतका मार बसला होता की , तो बराच काळपर्यंत बेशुद्धावस्थेत होता . तो शुद्धीवर आल्यावर त्याच्यावर इलाज सुरू झाला. बादशहापाशी असलेली खास औषधे त्याला देण्यात आली. फत्तेउल्लाखान एक महिन्यापर्यंत बिछान्यावर पडून होता. इराणी आणि तुराणी त्याचा मत्सर करीत . त्यांना या प्रकाराने आनंद झाला . फत्तेउल्लाखान बरा होऊन बादशहापाशी मुजरा करण्यास आला . बादशहाने त्याची स्तुती केली आणि त्याला जडावाचा शिरपेच बक्षीस दिला. बादशहाने म्हटले, “तुझ्यामुळे तुराण्यांची अब्रू राहिली.”

नालायक गनीम—मराठे

एके रात्री नालायक गनिमांनी (मराठे) मोठ्या संख्येने फत्तेऊल्लाखानाच्या मोर्चावर चहूकडून हल्ला चढविला . मोर्चावर असलेले सर्व मोगल आणि इतर शिपाई मारले गेले अगर जखमी झाले . फत्तेऊल्लाखान चवताळलेल्या वाघाप्रमाणे (शेरे गरान) शत्रूवर चालून गेला . आपल्या

हाताने त्याने काहींना ठार केले . मग मराठे पळून गेले . शिद्दी याकूतखान याने वेढ्याच्या कामासाठी लागणारी सामग्री बरोबर देऊन दोन हजार पायदळ शिपाई पाठविले होते . त्यांना फत्तेऊल्लाखानापाशी तैनात करण्यात आले . शहाजादा बेदारबख्त हा बनीशाहदुर्ग (पन्हाळा) येथे होता. त्याला बोलावून घेण्यात आले . महमद अमीनखान याने मराठ्यांचा बिमोड (काफरकुशी) करण्यात आणि रसद पोहोचविण्यात उत्कृष्ट कामगिरी बजावली होती. त्याच्या मन्सबीत दोनशे स्वारांची वाढ करण्यात आली . त्याला हत्ती आणि घोडा बक्षीस म्हणून देण्यात आले . याशिवाय बादशहाने फर्मानाच्या द्वारे त्याचे कौतुक केले . त्याच्या साथीदारांनाही त्यांच्या योग्यतेप्रमाणे मन्सबी वाढविण्यात येऊन त्यांना बादशहाला भेटण्यासाठी बोलविण्यात आले.

बादशहाच्या राज्यकारभाराचे सेहेचाळिसावे वर्ष, १११३ **हिजरी**

फत्तेउल्लाखानाने वेढ्याच्या कामी रुस्तुमप्रमाणे साहस दाखविले . सुरूंग लावणे, सुरक्षित बोळ तयार करणे , दमदमे आणि बुरूज उभे करणे, इत्यादी कामात त्याने अविश्रांत श्रम घेतले , पण त्याला आपल्या कर्तृत्वाचा अभिमान होता . त्याच्यामुळे जय झाला असे घडून येऊ नये असे इतर सरदारांना वाटत होते. त्याने केलेल्या कामगिरीचा तपशीलवार उल्लेख करण्यात येत नसे . त्याला विजयाचे श्रेय मिळू नये अशी त्यांची इच्छा होती. **जिल्हज** महिन्याची सुरुवात (२७ एप्रिल १७०२). राजा जयसिंह (सवाई जयसिंह) हा तरुण होता. शहाजाद्याची पथके आपल्या सैन्याबरोबर घेऊन त्याने किल्ल्यावर हल्ला केला . किल्ल्यावर गोळ्यांचा, दगडांचा आणि इतर शस्त्रांचा सारखा वर्षाव होत होता . शहाजाद्याची माणसे आणि जयसिंगाचे रजपूत फार मोठ्या संख्येत मारले गेले . किल्ल्याच्या समोरचा कोट (रेवनी) काबीज करण्यात आला . बादशहाच्या निकटवर्तियांनी किल्ला आता फत्ते होणार अशी त्याला शुभ सूचना देऊन मुजरे केले . राजा जयसिंग हा पंधराशेचा मन्सबदार होता त्यात पाचशेची वाढ करण्यात आली. शहाजाद्याला जडावाचा शिरपेच देण्यात आला.

इस्लामखानाचा मुलगा अब्दुलरहमानखान हा रजा घेऊन मक्केच्या यात्रेला गेला होता. तो या सुमारास परत आला. त्याला तृतीय **बख्शी** म्हणून नेमण्यात आले. सैफुल्लाखानाचा मुलगा असदुल्लाखान याची **मन्सब** काही कारणाने काढून घेऊन त्याला घरी बसविण्यात आले. त्याला आता पाचशेची **मन्सब** देण्यात आली . खेळण्याचा किल्लेदार परशुराम याच्याशी त्याने बोलणी चालू केली . परशुरामाने किल्ला हवाली करण्यासंबंधी भलत्याच अटी घातल्या होत्या . या बोलण्यात असदुल्लाखान याने बरीच मेहनत घेतली म्हणून त्याची **मन्सब** वाढविण्यात आली . बापाची पदवी त्याला देण्यात येऊन त्याला मीरबहर हा हुद्दा देण्यात आला.

पैसा पेरण्याची विजयश्री!

बादशहाने शहाजादा बेदारबख्त यास आज्ञा केली की , शेरदहान तोफ, कडकबिजली वगैरे लहानमोठ्या तोफा, रेवनीच्या (कोट) आत नेण्यात याव्या आणि तेथून किल्ल्याच्या तटावर भडिमार करावा . आपल्याला प्रथम किल्ल्यात प्रवेश मिळावा म्हणून फत्तेउल्लाखानाने खूप धडपड केली. आपल्याला किल्ल्याचे श्रेय मिळावे म्हणून प्रत्येक सरदार धडपड करू लागला. किल्लेदाराला हवी तितकी रक्कम चारण्यास प्रत्येकजण तयार होऊन किल्लेदाराशी बोलणी करू लागला . फत्तेउल्लाखानाने अपार मेहनत केली होती . रात्रंदिवस पाऊस पडत होता तरी फत्तेउल्लाखानाने किल्ल्यासमोरील प्रदेश मोकळा करणे, किल्ल्यापर्यंत सुरक्षित बोळ तयार करीत नेणे वगैरे कामात अमाप पैसा खर्च केला होता . त्याची सर्व मेहनत व्यर्थ गेली. रेवनी (कोट) हातातून गेल्यामुळे किल्लेदार परशुराम याचा धीर गळाला होता . त्याने शहाजादा बेदारबख्त याच्या मार्फतीने कसूर माफीची विनंती करून आपल्या काही अटी कळविल्या . पण त्याच्या मागण्या भलत्याच असल्यामुळे त्या कबूल झाल्या नाहीत . रुहुल्लाखान बख्शी आणि बुयूतात (कारखाने) चा अधिकारी फजायलखान हे किल्ल्यात गेले. त्यांनी किल्लेदाराची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. पण काही उपयोग झाला नाही. शहाजाद्याने कबूल केले होते त्यापेक्षा जास्त रक्कम तो किल्लेदाराला देईना . पण जी गोष्ट जाहीर झाली ती ही की , शहाजादा आणि त्याचे कारभारी यांनी गुप्तपणे किल्लेदाराला भली मोठी रक्कम दिली . असे ठरले की, किल्लेदाराने आपल्या माणसांसहित बाहेर येऊन भेटावे . सहा महिन्यांपेक्षा अधिक वेढा चालला होता (जानेवारी १७०२ ते जून १७०२). **मुहरम** महिन्याची एकोणीस तारीख होती . परशुरामाने विनंती केली की , त्या दिवशी आपण शहाजादा आणि रुहुल्लाखान यांची निशाणे लावणार आहोत . बादशाही सैन्यांपैकी कोणीही निशाणाच्या बरोबर येता कामा नये . परशुराम स्वतः किल्ल्याबाहेर आला. त्याने निशाणे हातात घेतली व नगारेनौबतीच्या गजरात ती किल्ल्यावर चढविली . (४ जून १७०२) त्याने अभय मागितले. रात्री (७ जून) आपली सगळी माणसे आणि शक्य तितके सामान घेऊन तो किल्ल्यातून निघून गेला . किल्ल्यात शेकडो मराठे होते. पण दयाळू बादशहाच्या हुकमाने त्यांना कोणीही अडथळा केला नाही . ते किल्ल्यातून बाहेर पडून निघून गेले . बादशाही लष्करात विजयाची शहाजणे वाजू लागली. **'फतेह शुद किलाए खेलना '** या ओळीत विजयाची तारीख निघते . ही ओळ बादशहाला पसंत पडली . किल्ल्यावर निशाण चढले त्यावेळी बादशहा कुराण पठण करीत होता. त्यात सखरलना हा शब्द आढळला तेच नाव खेळणा किल्ल्याला देण्यात आले .] शिबंदीने किल्ला खाली केला. (**एम्. ए.**, ४५७; **मनूची**, भाग ३, ४१९)

खेळण्यावरून परतताना मोगलांचे झालेले हाल, १७०२

खेळण्याच्या किल्ल्यावरून मोगल सैन्य जेव्हा परत फिरले तेव्हा त्यांचे अतोनात हाल झाले . किल्ला पडल्यानंतर तीन दिवसांच्या आतच १० जून रोजी बादशहाने घाईघाईने किल्ल्याच्या परिसरातून आपला मुक्काम हलविला. परंतु विषुववृत्तावर ज्या सोसाट्याने पाऊस पडतो त्याने आता थैमान घालण्यास सुरुवात केली. अशा हवेमध्ये त्या भयंकर आंबा घाटातून आपली सारी छावणी परत नेताना मोगल सैन्याला

अपरंपार कष्ट सहन करावे लागले . "या वाटेवरून सैन्यातील उंटांना पाऊल उचलणेही अशक्य झाले . सैन्यातील हत्ती गाढवाप्रमाणे तेथे झालेल्या चिखलात बुडू लागले . जे काही सामानसुमान वाहून नेण्यात आले ते फक्त हमालांच्या डोक्यावरूनच ." (**एम. ए.**, ४६३; **दिल.**, १४२ ब) दरम्यान वाटेत असलेल्या एका नाल्याला अचानक पूर आला , आणि त्याचे पाणी शर्यतीच्या घोड्यासारखे सोसाट्याने वाहू लागले . परिणामी बादशहाच्या सैन्याचे दोन भाग झाले आणि सैन्यातील अनेकजणांना जलसमाधी मिळाली . अशाचतऱ्हेने दुथडी भरून वाहणाऱ्या नाल्यांनी बादशाही सैन्याचा परतीचा मार्ग तीन ठिकाणी छेदून काढला. धान्याचा भाव रुपयाला एक शेर असा झाला. एकाकी पडलेल्या "छावणीमध्ये चारा आणि जळाऊ लाकूड जणू काही नजर चुकीने आले की काय असे मानण्याइतकी परिस्थिती निर्माण झाली ." राहण्यासाठी तंबू नसल्याने किंवा बदलण्यासारखे कपडे जवळ नसल्याने सैन्यातील अनेक माणसे मुसळधार पडणाऱ्या पावसात थंडीमुळे गारठून मरण पावली . (**एम्. ए.**, ४६४–४६६; के. **के.**, ५०३–५०५)." ही माघार चालू असताना काही ठिकाणी खुद्द बादशहासाठी छोटासा तंबू उभारण्यात येई . तेवढ्यापुरतेच मोगलांच्या छावणीचे स्वरूप राहिले.

अशा अवस्थेत ३० मैल पार करून जाण्यास २८ दिवसांचा अवधी घेतल्यानंतर अतिशय विपन्नावस्थेत असलेले मोगलांचे सैन्य पन्हाळ्यानजीक येऊन पोहोचले. (१७ जुलै १७०२)

अखेर १३ नोव्हेंबर १७०२ रोजी मोगल सैन्य भीमा नदीच्या उत्तर किनाऱ्यावर असलेल्या बहादूरगड अथवा पेडगाव येथे येऊन पोहोचले.

(८) कोंडाणा (सिंहगड), राजगड आणि तोरणा या किल्ल्यांच्या वेढ्याची हकीकत

कोंडाण्याचा वेढा, १७०३

पेडगाव येथे फक्त १८ दिवसांचा मुक्काम केल्यानंतर बादशहाने दोन डिसेंबर रोजी कोंडाणा (सिंहगड) किल्ला काबीज करण्यासाठी कूच केले . तेथे तो २७ डिसेंबर रोजी पोहोचला . बादशहाचा जनाना, कचेऱ्या आणि दफ्तरखाना व त्याचप्रमाणे जड सामानसुमान वगैरे इस्लामपुरी येथील मुख्य छावणीमधून बहादूरगड येथे हलविण्यात आले . त्याचप्रमाणे इस्लामपुरीचे ठिकाण हे नुस्रतजंग याच्या छावणीचे ठाणे म्हणून मुक्रर करण्यात आले . बेदारबख्त याची रवानगी औरंगाबाद येथे सुभेदारीच्या अधिकारावर करण्यात आली . त्यानंतर लगेच (फेब्रुवारी १७०३) त्याच्याकडे खानदेशच्या सुभेदारीचे अधिकार वरील सुभेदारीव्यतिरिक्त सोपविण्यात आले. (**एम्. ए.**, ४६१, ४३१, ४७०) कोंडाण्याच्या वेढ्याचे काम सुरू झाले . परंतु वेढा देऊन बसलेल्या मोगल सैनिकांमध्ये कोणत्याही तऱ्हेचा उत्साह राहिलेला नव्हता. अशा तऱ्हेने निष्क्रियतेत तीन महिन्यांचा अवधी फुकट गेला . पावसाळ्याचे दिवस जवळ येऊ घातले होते. यावेळी देखील बादशहाच्या अधिकाऱ्यांनी कोंडाण्याच्या किल्लेदाराला भरभक्कम लाच देऊन ८ एप्रिल १७०३ रोजी किल्ल्याचा ताबा आपल्याकडे घेतला. (**के. के.**, ५१०; **दिल.**, १४५ अ)

कोंडाण्याहून एका आठवड्याच्या आत (१ मे) मोगल सैन्य पुण्याला परत फिरले . पुण्याच्या परिसरात मोगल सैन्याने जवळ जवळ सात महिने घालविले , १७०२ मध्ये पडलेल्या मुसळधार पावसानंतर १७०३-१७०४ ह्या वर्षी अवर्षण पडले. याचा परिणाम असा झाला की साऱ्या महाराष्ट्रात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आणि दुष्काळाबरोबरच रोगराईचाही उद्‌भव झाला . गरीब-गुरिबांचा वर्ग मोठ्या संख्येने

अवर्षण, दुष्काळ आणि रोगराई यांच्या तडाख्यात सापडून नाहीसा झाला . मनूचीने दुष्काळ आणि रोगराई यामुळे मेलेल्यांची संख्या २० लाख एवढी दिलेली आहे.

राजगड आणि तोरणा यांचा पाडाव, १७०४

पुण्याच्या परिसरातून मोगल सैन्याने कूच केले आणि १८ दिवसानंतर ते राजगड येथे पोहोचले . २ डिसेंबर १७०३ रोजी त्यांनी वेढ्याच्या कामाला सुरुवात केली . सतत दोन महिन्यांपर्यंत त्यांनी किल्ल्यावर तोफांचा भडिमार चालू ठेवला . ६ फेब्रुवारी १७०४ रोजी किल्ल्याचा पहिला दरवाजा त्यांनी हल्ला करून जिंकून घेतला. किल्ल्यावरील शिबंदीने किल्ल्याच्या बाले किल्ल्याचा आसरा घेतला . शिबंदीचे अधिकारी फिरंगोजी आणि हमानजी हे दोघेजण होते . त्यांनी त्यानंतरचे १० दिवस मोगल सैन्याला कडवा प्रतिकार चालू ठेवला. सरते शेवटी किल्लेदाराने मोगलांबरोबर तह केला , किल्ल्याच्या बुरुजावर बादशाही निशाण लावले आणि १६ फेब्रुवारीच्या रात्री किल्ल्यावरून तो पळून गेला. (**एम. ए.**, ४८४–४८५; **के. के.**, ५१३)

यानंतर औरंगजेबाने राजगडपासून ८ मैलांवर असलेल्या तोरण्याच्या किल्ल्याला २३ फेब्रुवारी रोजी वेढा दिला . १० मार्च रोजी रात्री अमानउल्लाखान फक्त २३ मावळ्यांना बरोबर घेऊन दोरांच्या शिड्यांच्या साहाय्याने किल्ल्याची तटबंदी गुपचूपपणे चढून गेला . वर गेल्यावर त्याने आपल्या जवळील शिंगे फुंकली आणि शत्रूवर हल्ला चढविला . शिबंदीपैकी ज्यांनी प्रतिकार केला त्यांना कंठस्नान घालण्यात आले. उरलेल्यांनी किल्ल्यावरून पळ काढला आणि दयेची याचना केली . लाच न देता बळाच्या जोरावर औरंगजेबाने काबीज केलेला मराठ्यांचा हा एकमेव किल्ला होय . (**एम्. ए**, ४८७; **के. के.**, ५२१–५२३)
[मोगलांनी राजगड आणि तोरणा किल्ले जिंकल्याची हकीकत मासिरी आलमगिरीच्या लेखकाने पुढीलप्रमाणे दिली आहे :–

रजब महिन्याच्या चोवीस तारखेस म्हणजे तीन डिसेंबर १७०२ रोजी मोगल सैन्य कोंडाण्याचा किल्ला सर करण्याच्या उद्देशाने बहादूरगडाहून निघाले. शाबान महिन्याच्या अठरा तारखेस म्हणजे सत्तावीस डिसेंबर १७०२ रोजी ते कोंडाण्याच्या पायथ्याशी पोहोचले.

बादशहाने आज्ञा केली की वीरांनी तोफखान्याचा प्रमुख तरबीयतखान याच्या नेतृत्वाखाली डोंगरावर चढावे आणि शत्रूंला आगीच्या माऱ्याने होरपळून काढावे. किल्ल्याच्या बुरुजासमोर एक टेकडी होती . तरबीयतखानाने तीवर तोफा चढविल्या . काही दिवस त्याने तोफांचा मारा केला आणि शत्रूचे तट, बुरूज आणि घरेदारे उद्ध्वस्त केली, आणि त्यांना हाकलून लाविले. **जिल्हज** महिन्याच्या दोन तारखेस म्हणजे आठ एप्रिल १७०३ रोजी कोंडाणा सर झाला. त्याचे नाव बक्षिंदाबक्ष ठेवण्यात आले.

वास्तविक पाहता तो किल्ला इतका मजबूत आहे की परमेश्वरानेच तो मिळवून द्यावा , नाहीतर कितीही प्रयत्न करा, तो सर होणे शक्यच नाही.

पावसाळा जवळ आला होता आणि मार्गात असंख्य अडथळे होते . ते दूर सारून प्रवास करणे मोठे अवघड होते . राजगड किल्ला जिंकून घ्यावा अशी बादशहाची इच्छा होती . म्हणून त्याने असे ठरविले की , पावसाळा पुणे ऊर्फ मुहियाबाद येथे घालवावा . पावसाळा संपल्यावर राजगडाकडे कूच करणे सुलभ होईल असा अंदाज होता.

बादशहाने **जिल्हज** महिन्याच्या अठरा तारखेस (चोवीस एप्रिल १७०३) मुहियाबाद पुणे या स्थळाकडे कूच केले . तो पुण्याला **जिल्हज** महिन्याच्या पंचवीस तारखेस (एक मे १७०३) पोहोचला.

बादशहा पुण्यात सहा महिने आणि अठरा दिवस होता . अवर्षणामुळे धान्याचा दुष्काळ पडला . अनेक गरीब लोक त्यामुळे मृत्युमुखी पडले. अनेक दुबळी माणसे शोक करू लागली. चणे, गहू आणि तांदूळ फार कष्टाने मिळत. बादशाही लष्करातील धान्याचा बाजार (शहागंज) तर गरीबगुरिबांच्या आक्रोशांनी भरून गेला होता.

पण एक वेळ काळ आपला बेत बदलेल पण बादशहा आपल्या निर्धारापासून हटणार नाहीत.

रजब महिन्याच्या बारा तारखेस (१० नोव्हेंबर १७०३ रोजी) मोगल सैन्य राजगड जिंकून घेण्यासाठी पुण्यातून बाहेर पडले .) राजगडच्या अलीकडे चार कोसांवर एक डोंगराचा घाट आहे . हा डोंगर म्हणजे गगनचुंबी आहे . त्या घाटाचा रस्ता नीट करण्यासाठी माणसे दोन

महिन्यांपासून खपत होती. पण जमिनीवरच्या माणसांची दृष्टी आकाशापर्यंत (डोंगराच्या टोकापर्यंत) कशी पोहोचावी आणि आकाशातील प्राण्यांचे हात जमिनीपर्यंत कसे पोहोचावे? या वाटेवर भयंकर चढउतार होते. तो मार्ग आक्रमण्यास मोगल सैन्याला अपार कष्ट पडले. सात दिवसांत सैन्याने तो घाट ओलांडला. आणखी एक मजल मारून **रजब** महिन्याच्या तीस तारखेस (अठ्ठावीस नोव्हेंबर १७०३ रोजी) ते सैन्य राजगडच्या पायथ्याशी असलेल्या अरुंद मैदानात पोहोचले.

मागच्या काळात आदिलशाही सुलतानांच्या ताब्यात हा किल्ला होता. शिवाजीला या किल्ल्याचा ताबा मिळाला. त्याने या किल्ल्याच्या भोवती तीन तट बांधले. ते तट म्हणजे तीन किल्लेच म्हटले पाहिजेत. कोकण घाटाच्या माथ्याकडे सुटेली व पदमावत हे किल्ले आहेत. तळकोकणच्या बाजूने सेजोली हा किल्ला आहे. शिवाजीने भक्कम तटबंदी करून इतरांना हा किल्ला जिंकून घेणे अशक्य करून सोडले.

शाबान महिन्याच्या चार तारखेस (दोन डिसेंबर १७०३ रोजी) बादशहाने आज्ञा केली की हमीदुद्दीनखान बहादूर याच्या नेतृत्वाखाली आणि **मीर आतिश** (तोफखान्याचा अधिकारी) तरबियतखान याच्या मार्गदर्शनाखाली मोगल सैन्याने किल्ला जिंकून घेण्यास झटावे. पदमावत किल्ल्याच्या बाजूने ते दोघे सेनापती पुढे सरकले. किल्ल्याच्या लहान दरवाजापासून डोंगराच्या टोकापर्यंत दोन मजबूत तट बांधले होते. त्यांचा आकार सोंडेसारखा असल्यामुळे त्यांना सोंड म्हणत. शिवाजीने याप्रमाणे त्या तटांची रचना केली होती. या तटांच्या खाली भयंकर दऱ्या आहेत. तेथून माणसे जाणे अशक्य आहे. ते दोन्ही तट जेथे एक होतात त्या स्थळाच्या समोर दोघा सेनापतींनी एका टेकडीवर युद्धास आवश्यक असणारे सामान चढविले.

किल्ल्याचा बुरूज तीस गज उंच होता म्हणून उभय सरदारांनी त्या टेकडीवर एक दमदमा (तोफा ठेवण्याची उंच जागा) बांधला. आता तो किल्ल्याच्या तटाएवढा उंच झाला.

शव्वाल महिन्याच्या बारा तारखेस (सहा फेब्रुवारी १७०४) मोगल सैनिक बुरुजावर चढले आणि बाहेरील भिंतीच्या आत घुसले. शत्रू त्यांचा प्रतिकार करण्यासाठी आले होते. त्यांना पिटाळून त्यांनी परत किल्ल्यात कोंडले. मोगलांनी बुरुजावर ठाण मांडले. किल्ल्यातील लोकांनी तोफा, बंदुकी, बाण आणि दगडधोंडे यांचा सतत वर्षाव करण्यास कमी केले नाही. मोगलांना आसरा नव्हता त्यामुळे त्यांच्यापैकी अनेक लोक ठार झाले.

मोगलांचा निर्धार, त्यांचे जिवावर उदार होऊन लढणे, त्यांचे सैन्य आणि शक्ती पाहून किल्ल्यातील लोकांचा धीर सुटला. त्यांचे किल्लेदार फिरौनजी आणि हामानजी यांनी तहाची बोलणी करण्यासाठी आपली माणसे, बख्शी रुहुल्लाखान याच्या तळावर पाठविली. रुहुल्लाखानाच्या मध्यस्थीमुळे बादशहाने आज्ञा केली की निःशस्त्र होऊन शत्रूंनी किल्ल्यातून निघून जावे.

शव्वाल महिन्याच्या एकवीस तारखेस (सोळा फेब्रुवारी १७०४) किल्लेदारांनी आपल्या हातानी मोगलांचा झेंडा किल्ल्यावर चढविला आणि ते अपयश आणि सर्वनाश पत्करून गेले. मोगलांच्या छावणीत विजयाचे चौघडे झडू लागले. बख्शी रुहुल्लाखान आणि हमीदुद्दीनखान -बहादुर व इतर सरदार हे त्याच दिवशी किल्ल्याच्या प्रवेशद्वारातून आत शिरले आणि चारी किल्ल्यांच्या विजयाचा जयघोष आकाशात शिरला. शत्रूंना किल्ल्याच्या बाहेर काढण्यात आले.

हमीदुद्दीनखान बहादूर यास यापूर्वी साडेतीन हजारी मनसबदार करण्यात आले होते, आता त्याला नौबतीचा मान देण्यात आला. किल्ला जिंकून घेतल्याबद्दल तरबियतखान यास पाचशेची बढती देण्यात येऊन साडेतीन हजारी मन्सबदार करण्यात आले. रुहुल्लाखान हा साडेतीन हजारी मन्सबदार होता. त्याला एक मूल्यवान असा रत्नजडित शिरपेच देण्यात आला. किल्ल्याचे नाव नबीशाहगड हे ठेवण्यात आले.

तोरण्याकडे मोगल सैन्य

तोरण्याचा किल्ला हा राजगडापासून चार कोसावर आहे. **शव्वाल** महिन्याच्या अठ्ठावीस तारखेस (तेवीस फेब्रुवारी १७०४) मोगल सैन्याने तोरण्याच्या जवळ छावणी दिली. बादशहाने किल्ल्याला वेढा घालण्याची आज्ञा दिली. तरबियतखानाने किल्ल्याच्या दरवाजासमोर मोर्चे नेण्याची खटपट सुरू केली. दुसरीकडे महमद अमीन खानबहादूर याने किल्ल्यातून बाहेर पडण्याच्या वाटा रोखून धरल्या. मोगल चौकी पाहऱ्यांच्या माणसांनी किल्ला चहूकडून वेढला.

पण किल्ल्याच्या टोकापर्यंत मोगलांचे हात पोहोचणे कठीण होते. बादशहाच्या भाग्याने हा अवघड वेढा सुलभ रीतीने सुटला.

अल्लावर्दीखान जाफरचा नातू अमानुल्लाखान हा त्या शूर घराण्यातही अतिशय शूर आणि निधड्या छातीचा माणूस म्हणून नावाजला होता. **जिल्काद** महिन्याच्या पंधरा तारखेस (दहा मार्च १७०४) बादशहाला एकूणनव्वदावे वर्ष (चांद्रमान) लागले. त्या रात्री अमानुल्लाखानाने काही मावळ्यांना तयार केले. त्यापैकी एकजण जिवावर उदार होऊन तटावर चढला. तटाला त्याने एक भक्कम दोर बांधला. आणि मग वीस पंचवीस माणसे दोराच्या साहाय्याने तट चढून गेली आणि किल्ल्यात दाखल झाली. त्यांनी मारामारीला सुरुवात केली. अमानुल्लाखान आणि त्याचा भाऊ अताउल्लाखान आणि इतर काही माणसे जिवावर उदार होऊन त्यांच्या पाठोपाठ पोहोचली. हमीदुद्दीनखान बहादूर हा चहूकडे टेहळणी करीत हिंडत होता. त्यात त्याला ही हकीकत कळली त्यानेही कमरेला दोर बांधून तटावरून किल्ल्यात प्रवेश केला. गनीम प्रतिकारार्थ धावले. त्यांना ठार मारण्यात आले. त्यापैकी वाचलेले लोक किल्ल्याच्या आतील बाजूस गेले आणि त्यांनी तेथील दरवाजा बंद केला. वास्तविक पाहता हे मोठे अवघड काम होते. पण निधड्या छातीच्या वीराशी लढण्याची कुणाला ताकद आहे? किल्ल्यातील लोक निराधार होऊन शरण आले. निःशस्त्र होऊन त्यांनी

अनुक्रमणिका

किल्ल्याबाहेर निघून जावे अशी बादशहाने आज्ञा केली. किल्ल्याचे नाव फुतुहूल्गैब (दैवी विजय) असे ठेवण्यात आले.

खानबहादूर हमीदुद्दीन यास खिलतीची वस्त्रे , फतेपेच (तुरा) आणि बादशहाच्या खास पोशाखखान्यातील दुशाल या भेटी देण्यात आल्या. अमानुल्लाखानाला पाचशे (जात-स्वतःचा सरंजाम) ची बढती देण्यात येऊन त्याला दीड हजारी मन्सबदार करण्यात आले . इतरांना त्यांच्या योग्यतेनुसार बढत्या देण्यात आल्या.

या संकटमय प्रदेशात पावसाळा सुरू झाला की लोकांचा सर्वनाश झाला असे समजावे . म्हणून बादशहाने जुन्नरच्या प्रदेशात छावणी करण्याचे ठरविले. **जिल्काद** महिन्याच्या वीस तारखेस (पंधरा मार्च १७०४) बादशहाने जुन्नरकडे कूच केले.

जिल्हज महिन्याच्या तेवीस तारखेस (सतरा एप्रिल १७०४) बादशहाने खेड येथे छावणी केली. खेडचे नाव मसुदाबाद ठेवण्यात आले.

मुहरम महिन्याच्या पंधरा तारखेस बक्षी रुहुल्लाखान हा तरुण वयात मरण पावला.

"खेड येथे बादशहाचा मुक्काम साडेसात महिनेपर्यंत होता . त्यानंतर तो तेथून वाकिनखेड्याच्या (सुरपूर तालुका गुलबर्गा जिल्हा) मोहिमेवर रवाना झाला."]

तोरण्याहून बादशहाची छावणी चाकणच्या उत्तरेस ७ मैलांवर असलेल्या खेड येथे आली . या ठिकाणी १७ एप्रिल ते २१ ऑक्टोबर १७०४ असा सहा महिन्यांपर्यंत बादशहाने मुक्काम केला. या ठिकाणाहून बादशहाने बेरड लोकांच्या राजधानीचे ठिकाण वाकीनखेडा येथे जाण्यासाठी २२ ऑक्टोबर रोजी कूच केले. या ठिकाणी ८ फेब्रुवारी १७०५ रोजी साडेतीन महिन्यांची अतिशय सावकाशपणे कूच केल्यानंतर बादशहा पोहोचला. वाकीनखेड्याला बादशहाने ताबडतोब वेढा दिला . औरंगजेबाच्या हयातीतील ही शेवटचीच मोहीम. [१७०१ ते १७०६ च्या दरम्यानच्या मराठ्यांच्या हालचालींची पोर्तुगीज कागदपत्रात मिळणारी माहिती पुढे दिली आहे ;

दिनांक २२ फेब्रुवारी १७०१ च्या पत्रात चौलचा पोर्तुगीज किल्लेदार लिहितो , "रामचंद्रपंताच्या नेतृत्वाखाली वीस हजार मराठ्यांनी दंड्याच्या सिद्दी याकूतखानाच्या प्रदेशावर हल्ला केला व तेथे लूट व जाळपोळ केली . कोर्लई (**मोरो**) च्या गावातही शिरून ते असेच करणार होते . पण कोरल्याच्या कॅप्टनने त्यावर मारा केला . त्यामुळे ते तेथून घाईने गेले . सिद्दीच्या प्रदेशामध्ये मराठे एक महिना होते . ते परत गेल्यावर सिद्दीने कुलाब्याच्या किल्ल्यास मोठ्या आरमाराने वेढा घातला व आग्र्यांची तेथे असलेली पन्नास लढाऊ गलबते (**गाल्व्हेटाज्**) पकडून नेली. कुलाब्याच्या किल्ल्यास खुष्कीनेही वेढा घालण्यासाठी सिद्दीने सैन्य पाठविले. हे सैन्य नदीपलीकडे जाण्यास त्याने मजपाशी जहाजे मागितली व ती मी दिली."

सन १७०२ तील ऑक्टोबरात राजारामाच्या सैन्याने मोगलांकडून फोंडे ऊर्फ अंत्रूज महाल घेऊन तेथील मर्दनगडास वेढा घातला . ह्यावेळी मोगलास संवदेकराने सैन्याची मदत केली व गोवेकराने दारुगोळा पुरविला . गोव्याच्या बिरजई कायतानु द मेलु द कास्यु आपल्या तारीख ६ जानेवारी १७०३ च्या पत्रात म्हणतो "मराठ्यांनी फोंडे घेतले , पण तेथील किल्ला अद्याप मोगल लढवीत आहेत . धान्याच्या अभावामुळे मोगलास लवकरच हा किल्ला सोडावा लागेल ." अशा बिकट परिस्थितीत मोगलांनी खेम सावंत भोसल्याची मदत मागितली व गोवेकराने असे करण्यास सावंतास प्रोत्साहन दिले. त्यानुसार कुडाळकर देसाई फोंड्यावर ससैन्य जाऊन त्याने तेथील मर्दनगड हस्तगत केला . पण तो स्वतःच्या ताब्यात ठेवला, त्याने मोगलाकडे तो दिला नाही!

सन १७०५ मध्ये जूनच्या सुरुवातीस खेम सावंत याकडून मर्दनगड किल्ला मोगलानी परत घेतला . त्या सालच्या जुलैमध्ये खेम सावंत आणि गोवेकर यांची लढाई जुंपली व फिरंग्यांनी सरदेसायांचे आमोणे व वळवई येथील किल्ले जमीनदोस्त केले . आमोणे येथील युद्धात दोन मारीया उर्सुल द आब्रेव द आलेन्कास्त्री (**द मारीया उर्सुल द आब्रेव द आलेंकास्त्री**) ह्या पुरुषवेशधारी ब्राझिलियन महिलेने गाजविली.

पुढील डिसेंबरमध्ये खेम सावंत याचा डिचोलीचा किल्ला विरजईने जिंकून घेऊन मोडून टाकला . डिचोलीमध्ये व शहरापासून तीन कोसांपर्यंत त्याने जाळपोळ केली. डिचोली येथे आपण एकसुद्धा इमारत ठेविली नाही , अशी विरजईने फुशारकी मारली आहे ! कायतानु द भेलु द कास्यु याने लिहिले आहे की खेम सावंत हा प्रतिशिवाजी होऊ नये ह्याकरिता त्याचे अशा रितीने आपणास गर्वहरण करावे लागले !

सन १७०६ मध्ये फोंडे (अंचूज) महाल येथील किल्ल्यासह मोंगलांनी संबदकरास देण्याचा करार केला व त्याबद्दल दरसाली ऐशी हजार रुपये त्याने मोगल बादशहास द्यावे , असे ठरविण्यात आले. संवदेच्या राजास हा प्रदेश मिळावा ह्यासाठी विरजईने खटपट केली , कारण गोव्याच्या सीमेशेजारी एखादे बलिष्ठ राज्य असणे पोर्तुगीजास नको होते व ह्या कारणाने त्यास संवदेकर हा चांगला शेजारी वाटत होता.

(पोर्तुगीज-मराठे संबंध, पाने १३४–१३५)]

(९) बेरड लोक, त्यांचा देश आणि त्यांचा राजा यांची हकीकत

अनुक्रमणिका

विजापूर शहराच्या पूर्वेस पसरलेला आणि भीमा आणि कृष्णा या दोन नद्यांनी वेढलेला प्रदेश म्हणजे बेरड लोकांची मायभूमी होय . बेरड लोक हे जातीने मूळचे कॅनरीज . यांना धेड असे म्हणत असत . त्यांची गणना हिंदू जमातीच्या अतिशय खालच्या वर्गांपैकी एक अशी केली जात असे . हे लोक स्वभावाने अतिशय कणखर आणि सशक्त समजले जात . रानटी अवस्थेच्या ते फारसे पुढे गेलेले नव्हते . असे जरी असले तरी हिंदू समाजातील तथाकथित पुढारलेल्या वर्गाप्रमाणे त्यांनी आपल्या स्वाभिमानाची धार यत्किंचितही कमी होऊ दिलेली नव्हती . ते मेंढराची सागुती , गाईचे मांस , डुकराचे मांस , पाळलेल्या कोंबड्या वगैरे भक्षण करीत आणि अतिशय मद्यपानही करीत . दिसायला सावळे , मर्दानी आणि मध्यम उंचीचे , गोल चेहरा , सपाट गाल , पातळ ओठ आणि लांबसडक कुरळे केस असलेले बेरड जमातीचे लोक वाटेल तितके कष्ट आणि श्रम लीलया सहन करीत असत . परंतु त्यांच्यामध्ये एखाद्या ठिकाणी स्थानिक होऊन विशिष्ट उद्योगधंदे किंवा शांततामय सहजीवन जगण्याची वृत्ती बाणलेली नव्हती . कुटुंब प्रमुख आणि वंशपरंपरेने प्रमुख पद मिळविलेल्या पुढाऱ्याकडून अमलात आणले जाणारे न्यायाधिकार या योगे संघटित असलेल्या त्यांच्या जीवनात कडक शिस्त आणि एकोपाही आपोआपच येत असत . १७ व्या आणि १८ व्या शतकात दक्षिण हिंदुस्थानात या जमातीतूनच अतिशय सातत्याने आणि नियमितपणे बंदूकधारी शिपायांचा पुरवठा होत गेला. लढाईमध्ये त्यांचे शौर्य आणि शरीराला होणाऱ्या जखमा आणि मृत्यू यांना कःपदार्थ मानण्याची त्यांची वृत्तीही त्यांच्या रात्रीचे हल्ले चढविणे आणि शत्रूला अचानक घेरावा घालणे यामधील त्यांच्या कौशल्याइतकीच अलौकिक होती . अतिशय बिनचूकपणे जनावरे चोरण्यात हातखंडा असलेल्या या जमातीकडून अशा तऱ्हेच्या कौशल्याची अपेक्षा केल्यास त्यात काहीच चूक नव्हते . त्यांच्या बेरड या नावावर कोटी करून समकालीन फारशी इतिहासकारांनी त्यांचा उल्लेख बेडर (निर्भय) असा केलेला आहे . (**के. के.**, भाग २, ५२४; **दिल.**, भाग २, १५० ब. **मेडोज टेलर्स स्टोरी ऑफ माय लाईफ**, १४४, २१०–२१३)

शोरापूर येथील नायक घराणे

बेडर जमातीची जन्मभूमी म्हैसूर ही होती . तेथून त्यांनी रायपूरच्या दुआबात आगेकूच केली आणि त्यानंतर ते तेथून पुढे उत्तरेकडे कृष्णा आणि भीमा नदीच्या देखील पलीकडे पसरलेल्या प्रदेशात शिरले . कृष्णा आणि भीमा या नद्यांच्या बेचंगळात असलेल्या शोरापूरचा बेरड नायक अथवा प्रमुख याचे अगदी सुरुवातीचे राजधानीचे शहर सागर हे होते . सागर हे विजापूर शहराच्या पूर्वेस ७२ मैलांवर आहे . इ. स. १६८७ मध्ये मोगलांनी या शहराचा पाडाव केल्यानंतर बेरड नायकांनी सागरच्या नैर्ऋत्येस बारा मैलांवर वाकीनखेडा येथे आपली नवीन राजधानी स्थापन केली . औरंगजेबबादशहाची कारकीर्द संपतासंपता हा किल्लाही बेरड नायकापासून जिंकून घेण्यात आला . तेव्हा त्याने आपले राजधानीचे ठिकाण वाकीनखेडा हे ज्या टेकड्यांच्या रांगांत वसले होते त्याच टेकड्यांच्या पूर्वाभिमुख असलेल्या आणि वाकीनखेड्यापासून ४ मैलांवर असलेल्या शोरापूर येथे हलविले . इ. स. १६८७ मध्ये त्यांनी मोगलांना जी शरणागती दिली त्यामध्ये त्यांनी आपले सर्व राज्य गमावले . आता बंडखोरी करणे , डोंगरांवर नव्या मजबूत किल्ल्यांची बांधणी करणे , मराठ्यांच्या पावलावर पाऊल ठेवून आणि नंतर त्यांच्याबरोबर संगनमत करून आसमंतातील मोगली प्रदेशाची लूट करणे याखेरीज दुसरा कोणताच मार्ग बेरड नायकांना उरला नाही . सागरचा पाडाव झाल्यानंतर अनेक वर्षे अतिशय चपळाईने निसटणाऱ्या परंतु अतिशय चिवट अशा बेरड घोडेस्वारांच्या टोळ्यांनी कुलबर्गा जिल्ह्यात सातत्याने बंडखोरी माजविली होती आणि लमाणांच्या तांड्याचे रस्ते अडवून ठेवले होते. (**अखबारात**)

१६८७ नंतरचे पीडिया नायकाचे जीवन

बेरडांचा राजा पामनायक (कारकीर्द १६७८ ते १६८८) याचा पुतण्या आणि दत्तक वारस पेद्दा पीडिया नायक, याने १६८३ मध्ये औरंगजेबाची भेट घेतली होती. औरंगजेबाने बादशाही फौजेत त्या वेळीच त्याची नेमणूक केलेली होती . सागर मोगलांनी जिंकून घेतल्यानंतर आणि त्याच्या चुलत्याचा मृत्यू झाल्यानंतर पीडिया नायकाने वाकीनखेड्याची तटबंदी मजबूत केली आणि सैन्यउभारणीच्या कामाला तो लागला. त्याने आपल्या जमातीतील १२ ,००० अतिशय उत्कृष्ट असे बंदूकची आपल्या हाताखाली जमविले आणि आपले युद्धोपयोगी सामान आणि तोफखाना यात सातत्याने भर टाकली.

पीडियाविरुद्ध मोगलांच्या सुरुवातीच्या आक्रमक हालचाली

कुलबर्गा जिल्ह्यामध्ये पीडिया नायकाने जी दरोडेखोरी चालविली होती तिने इतके गंभीर स्वरूप धारण केले की त्याकडे दुर्लक्ष करणे मोगलांच्या दृष्टीने धोकादायक होते . सरतेशेवटी २७ मे १६९१ रोजी बादशहाने आपला मुलगा कामबक्ष याला बहरामंदखानाच्या बरोबर वाकीनखेड्यावर हल्ला करण्यासाठी विजापूरहून रवाना केले. २० जुलै रोजी राजपुत्राची रवानगी मद्रास कर्नाटककडे करण्यात आली , आणि बेरडांविरुद्धच्या मोहिमेची जबाबदारी रुहुल्लाखान याजवर सोपविण्यात आली. (**एम. ए.**, ३३९–४०, ३४४, ३५४–५५; **दिल**., भाग २ , १०२ ब). रुहल्लाखानाला बेरडांवर जय मिळविणे शक्य झाले नाही . त्याच्या मोर्चेबंदीवर दोन वेळा बेरडांनी हल्ला केला आणि ती उद्ध्वस्त करून टाकली . मोगलांचा नामवंत सरदार रणमस्तखान आणि त्याशिवाय इतर अनेक मोगल सैनिक या हल्ल्यात ठार मारले गेले . (अधिक माहितीसाठी पाहा. **एम. ए.**, २३५) परिणामी रुहुल्लाखानाने बेरडांबरोबर वाटाघाटी सुरू केल्या . त्याला बेरडांनी भरपूर लाच चारली आणि बेसावध केले . (**दिल**., भाग २., १०३ अ; **एम. ए.**, ४९१). १८ डिसेंबर १६९१ रोजी रुहुल्लाखानाला मोकळे करण्यासाठी आजमची रवानगी करण्यात आली . आजमने तेथे एक वर्षभर तळ दिला , शत्रूचा मुलूख उद्ध्वस्त केला आणि बेरडांच्या हालचालींना पायबंद घातला . त्यानंतर पीडिया नायक हा शरण आला , त्याने राजपुत्राकडे दयेची याचना केली , त्याला दोन लक्ष रुपयांची बक्षिसी दिली आणि बादशहाला सात लक्ष रुपयांची खंडणी देऊन तह केला . परंतु डिसेंबर १६९२ मध्ये बादशहाने सागर येथून आजमला हलविले . या घटनेनंतर पीडिया नायकाने आपले जुने दरोडेखोरीचे सत्र आणि जबरदस्तीकरून जमिनी बळकाविण्याचा उद्योग सुरू केला. १६९६ च्या एप्रिल महिन्यात फिरोजजंग याला जेव्हा त्याच्याविरुद्ध पाठविण्यात आले तेव्हा त्याने त्याच्यावर आपल्या पूर्वीच्याच चतुराईच्या मंत्राचा प्रयोग केला, आणि खंडणी म्हणून नऊ लक्ष रुपये देण्याचे कबूल करून विनाशापासून आपला बचाव केला. (**एम. ए.**, ३४५, ४९२; **के. के**, भाग २, ५२६).

(१०) औरंगजेब वाकीनखेडा जिंकून घेतो, १७०५

पीडिया नायकाविरुद्ध औरंगजेबाची कूच

अखेर १७०४ हे वर्ष संपतासंपता मराठ्यांचे लहान मोठे सर्व किल्ले काबीज केल्यानंतर बादशहाने आपले लक्ष वाकीनखेड्याकडे वळविले , आणि ८ फेब्रुवारी १७०५ रोजी त्याने वाकीनखेड्याचा वेढा सुरू केला.

अनुक्रमणिका

किल्ल्याच्या दरवाजाच्या समोर दक्षिणेकडे असलेल्या मैदानात तलवरगेरा नावाचे खेडे आहे . या खेड्याभोवती मातीची भिंत असून किल्ल्यावरील शिबंदीला दाणागोट्याचा पुरवठा करणारी बाजारपेठ त्या खेड्यात होती. या खेड्याला लागूनच घेडपुरा नावाचे एक खेडे होते. या खेड्यात गवताच्या झोपड्या असून तेथे सर्वसामान्य बेरडांच्या कुटुंबाची वस्ती होती . तेथून हे बेरड आजुबाजूला असलेल्या जमिनीची मशागत करीत. त्या ठिकाणी लोकवस्ती असलेल्या या तीनच जागा होत्या . परंतु किल्ल्याच्या अगदी जवळ पूर्वेला आणि उत्तरेला बऱ्याचशा टेकड्या होत्या . किल्ल्याला वेढा देणाऱ्यांना या टेकड्यांचा फार मोठा उपयोग होण्यासारखा होता . यापैकी एका टेकडीला तेथील लाल मातीवरून लालटेकडी असे नाव होते . या टेकडीवरून वाकीनखेडा किल्ल्याचा बराचसा भाग माऱ्याच्या कक्षेत येत असे . साहजिकच किल्ल्याच्या संरक्षणाच्या दृष्टीने या टेकडीचे स्थान अतिशय महत्त्वाचे होते . किल्ल्यासभोवार पसरलेल्या या उंच उंच टेकड्या मजबूत तटबंदी बांधून किंवा त्यावर ठाणे ठेवून त्यांचे संरक्षण करण्याचा विचार बेरडांनी केलेला नव्हता.

वाकीनखेडा किल्ल्याचे सामर्थ्य हे त्या किल्ल्याचे नैसर्गिक स्थान किंवा कृत्रिमरित्या किल्ल्याला तटबंदी करून आणलेल्या मजबुतीत नव्हते , तर त्या किल्ल्यावरील शिबंदीचे धाडस आणि संख्या , त्याच्या बंदुकीतून गोळ्यांचा होणारा अचूक वर्षाव आणि किल्ल्यावरील तोफा , अग्निबाण आणि दारूगोळ्याचा साठा यामध्ये होते (किल्ल्याच्या वर्णनासाठी पाहा , **दिल**., भाग २, १५३ अ. **एम्. ए**., ४९९, **मेडोज टेलर**, १२३; **फ्रेमरोझ जंग** याचे **शोरापूर**).

किल्ल्याचा वेढा सुरू झाल्यानंतर अनेक आठवड्यांपर्यंत मोगलांच्या प्रयत्नांना कोणतेही यश आले नाही. प्रत्येक दिवशी शत्रू किल्ल्याबाहेर पडत असे आणि बादशाही फौजांवर हल्ला चढवित असे . किल्ल्याच्या बुरूजांवरून तोफखान्याचा अविरत भडिमार मोगल सैन्यावर होत असे . (**एम. ए.**, ४९८). साहजिकच मोगलांना आपले मोर्चे पुढे नेणे किंवा किल्ल्यावरील तोफांच्या माऱ्यात हे मोर्चे येत असल्याने त्यांची निगा जारी राखणे हे अशक्य होऊन बसले होते . (वेढ्यासाठी पाहा , **एम. ए.**, ४९८-५००; **दिल**., भाग २, १५३ अ; **के. के**., ५२७-५३८)

एके दिवशी सकाळी मोगलांचे सेनापती किल्ल्याच्या संरक्षण फळीत कुठेतरी कच्चे दुवे असतील याची पाहणी करत होते . तेव्हा त्यांनी अचानक लाल टेकडीवर हल्ला चढविला , बेरड बंदूकची टेकडीच्या माथ्यावर होते त्यांना हाकलून काढले आणि टेकडी आपल्या ताब्यात घेतली . परंतु अतिशय उंच आणि खडकाळ असलेल्या त्या टेकडीवर कायम ठाण मांडून बसणे मोगलांना जमणे शक्य नव्हते . बेरडांनी ताबडतोब आपल्या पायदळाच्या तीन मोठ्या तुकड्या मोगलांवर रवाना केल्या . त्यांनी माश्या आणि टोळ यांच्या धाडीप्रमाणे सारी टेकडी व्यापून टाकली . टेकडीच्या माथ्यावर अगतिक अवस्थेत एकत्रित झालेल्या बादशाही फौजांवर त्यांनी आपल्या बंदुकांचा अचूक मारा केला आणि खालून त्यांच्यावर वर्मी लागेल अशी दगडफेक केली. फार मोठे नुकसान सोसून सरतेशेवटी मोगलांना टेकडी सोडून देणे भाग पडले.

मोगल लाल टेकडी घेतात आणि गमावतात

मोगल फौजांच्या मोर्चेबंदीला लाल टेकडी आणि तलवरगेरा या गावाच्या समोर असलेली टेकडी यामध्ये असलेल्या एका ठिकाणाहून सुरुवात झालेली होती . लाल टेकडीवरून येणाऱ्या शत्रूच्या हल्ल्यापासून संरक्षण व्हावे म्हणून मोगलांनी आपली एक चौकी लाल टेकडी आणि वर उल्लेखिलेले मोर्चे

यामध्ये महमद अमीनखानाच्या हाताखाली स्थापन केली होती. तलवरगेरा खेड्याच्या समोर असलेली एक टेकडी कामबक्ष याने ताब्यात घेतली होती आणि तेथून नजीकच असलेला एक उंचवटा बकखानाने व्यापला होता.

मराठ्यांचे आगमन

परंतु २६ मार्च रोजी ५ ते ६ हजार मराठा घोडेस्वारांची एक तुकडी धनाजी जाधव आणि संताजी घोरपडे याचा भाऊ हिंदुराव यांच्या हाताखाली किल्ल्यामधील आपल्या बेरड दोस्तांच्या मदतीसाठी दाखल झाली. याचे कारण किल्ल्यामध्ये अनेक मराठा सेनापतींच्या बायकामुलांनी आश्रय घेतलेला होता . किल्ल्यामधून आपल्या बायका मंडळींना सुरक्षितपणे दुसऱ्या गावी हलविणे हे मराठ्यांचे पहिले काम होते . नवीन आलेल्या फौजेतील मुख्य विभागाने किल्ल्यासमोर वेढा घालून बसलेल्या मोगल छावणीवर हल्ला करण्याचा खोटा आभास निर्माण केला . या कामी त्यांना किल्ल्यांच्या तटबंदीवरून मोगल फौजांवर शिबंदीने प्रचंड भडिमार करून मदत केली . हे चालू असताना दोन हजार निवडक शिपायांच्या एका तुकडीने आपल्या बायका आणि मुले वाकीनखेडा किल्ल्याच्या पाठीमागील दरवाजाने बाहेर काढली . त्यांना त्यांनी अतिशय चपळ अशा घोड्यावर बसविले आणि तेथून पलायन केले . त्यांच्या पिछाडीचे संरक्षण किल्ल्यामधून बाहेर पडलेल्या पायदळाच्या एका तुकडीने केले.

आपल्या राजधानीच्या संरक्षणाच्या कामी जोपर्यंत मराठे मदत करतील तो पर्यंत त्यांना दररोज हजारो रुपये द्रव्यसाहाय्य देण्याचे पीडियाने कबूल केलेले होते. मराठ्यांनी किल्ल्याच्या आसमंतात मुक्काम केला, आणि तेथून मोगलांवर वारंवार हल्ले चढविले. त्याचा परिणाम असा झाला की आता मोगल सैन्याला वेढा पडण्याची पाळी आली. त्यांच्या सर्व हालचाली थंडावल्या आणि फक्त छावणी मधलेच व्यवहार करणे त्यांना शक्य झाले . चारा आणि अन्नधान्य यांचा छावणीत अतिशय तुटवडा पडला . बादशहाने आपल्या अधिकाऱ्यांची अतिशय सख्त कानउघाडणी केली. परंतु त्याचा काहीही परिणाम झाला नाही. (**दिल**., भाग २, १५० ब)

पीडिया नायकाने तहाची चालू केलेली फसवी बोलणी

पीडिया नायकाने आता बादशहाकडे शरणागती देण्यासंबंधीची बोलणी चालू केली . परंतु त्यामध्ये त्याचा खरा उद्देश वेळ काढणे आणि जवळ आणि लांब असलेल्या आपल्या दोस्तांकडून भरपूर कुमक मागविणे हा होता.

दरम्यान, अब्दुलघनी नावाच्या खोटे बोलण्यात पटाईत असलेल्या एका काश्मिरी फिरत्या विक्रेत्याने बादशहाच्या बातमी खात्याच्या प्रमुखाकडे (हिदायत केश) पीडिया नायकाकडून तहाबाबतचे एक पत्र आणले . या पत्राला औरंगजेबाने अनुकूल असे उत्तर पाठविले . यानंतर पीडियाने आपला भाऊ सोमसिंग याला मोगल छावणीत पाठविले . त्याने किल्ला देण्याची तयारी दाखविली आणि असा प्रस्ताव मांडला की आपल्या भावाला जमीनदारी , बेरड जमातीचे प्रमुखपद आणि **मनसब** देण्यात यावी. सोमसिंग हा मोगल छावणीत राहिला आणि त्याने पीडिया नायकाला वेड लागले आहे आणि तो मराठ्यांबरोबर पळून गेलेला आहे अशी एक गप्प उठवून दिली. वरील काश्मिरी विक्रेत्याने नंतर बेरड प्रमुखाच्या आईकडून ह्याच गोष्टीचा पुनरूच्चार करणारा एक निरोप आणला आणि अशी याचना केली की बादशहाने सोमसिंगाला आता

परत पाठवावे कारण सात दिवसांतच किल्ला खाली करण्यात येणार आहे . बादशहाने या गोष्टीला आपली संमती दिली आणि युद्धाला विराम दिला. (**एम. ए**, ५०२)

आणि त्यानंतर सगळ्याच गोष्टींचा एकदम स्फोट झाला . कारण ही सर्व घटना म्हणजे मोठा बनाव होता. पीडिया हा अजून जिवंत होता , त्याला काहीही झालेले नव्हते आणि तो किल्ल्यातच होता . त्याने किल्ला मोगलांच्या हवाली करण्याचे नाकारले आणि पुन्हा आपले हल्ले सुरू केले . बादशहा रागाने आणि मानहानीने अगदी वेडापिसा झाला.

नुस्रतजंगाच्या आक्रमक हालचाली

दरम्यान औरंगजेबाने आपल्या सर्व उत्तमोत्तम सेनापतींना त्यांच्या मोहिमावरून परत बोलाविले . नुस्रतजंग हा २७ मार्च रोजी आला . (**अखबारात**) दुसऱ्या दिवशीच तो लाल टेकडीच्या डोंगरावर चाल करून गेला. वेढ्याच्या सुरुवातीला या टेकडीवरून मोगलांची उचलबांगडी करण्यात आलेली होती. त्याचे सैनिक टेकडी चढून वर गेले , आणि शत्रूला त्यांनी हाकलून काढले . शत्रूच्या सैनिकांनी तलवरगेरा या टेकडीच्या पायथ्याशी असलेल्या खेड्याचा आश्रय घेतला , आणि खेड्याभोवती असलेल्या मातीच्या भिंतीच्या आडोशाने मोगलांवर आपल्या बंदुका चालविण्यास सुरुवात केली . लाल टेकडीवरील हल्ल्यात आणि खेड्याच्या बाहेर अनेक रजपूत सैनिक ठार मारले गेले . परंतु नुस्रतजंगाने दलपत बुंदेला याला शेजारीच असलेल्या एका टेकडीवर चाल करून जाण्याची आज्ञा केली . ही टेकडी अजूनही शत्रूच्या ताब्यात होती. ह्याही टेकडीवरून बेरडांनी पळ काढला आणि पेडपूरा या खेड्यात ते लपून बसले . या दिवशी दलपतरावाच्या हत्तीला २१ बंदुकांच्या गोळ्या आणि एक अग्निबाण लागला . एखाद्या मगरीच्या कातड्याप्रमाणे नुस्रतजंगाच्या निशाणांची बंदुकीच्या गोळ्यांनी चाळण झाली होती. त्याचे दोन भाऊ जखमी झाले होते आणि एक मारला गेला होता . नुस्रतजंगाच्या फौजेच्या मध्यभागी आणि पिछाडीला अतोनात मनुष्यहानी झालेली होती. (**दिल.**, भाग २, १५२ अ) परंतु भिंतीजवळ इतका रक्तपात केल्यानंतर त्याच्या हातात आलेली जागा त्याने सोडली नाही . काही दिवस गेल्यानंतर नुस्रतजंगाने डोंगराच्या कडेकडेला असलेल्या विहिरी जिंकून घेतल्या . या विहिरींचा उपयोग शत्रू पाण्यासाठी करीत असे . तारीख २७ एप्रिल रोजी त्याने तलवरगेरा या खेड्यावर हल्ला चढविला . बादशाही सैनिकांनी खेड्याच्या पेठेत प्रवेश केला . ज्यांनी प्रतिकार केला त्यांना ठार करण्यात आले. उरलेले पळून गेले.

बेरड वाकीनखेडा खाली करतात

बेरड लोकांना आता असे आढळून आले की यापुढे मोगलांशी लढण्यात स्वतःचा नाश ओढवून घेण्यासारखे आहे . परिणामी पीडिया नायक हा किल्ल्याच्या पाठीमागील दरवाजाने त्यांच्या संकट काळातील भागीदार जे मराठे त्यांच्याबरोबर रात्रीच्या वेळी पळून गेला . जेव्हा अंधार पडला आणि किल्ल्यामधून येणारा गोळीबाराचा आवाज थांबला तेव्हा काही मोगल सैनिकांनी किल्ल्यात प्रवेश केला . तेव्हा सर्व किल्ला खाली केला गेल्याचे त्यांना आढळून आले . यानंतर जी परिस्थिती निर्माण झाली तिचे वर्णन भयंकर गोंधळ, लुटालूट आणि जाळपोळ या शब्दानी करावे लागले . किल्ला रिकामा केला जात आहे ही बातमी बाहेर पडताच सरकारचे अधिकारी किल्ल्यावर जाऊन आणि तेथील मालमत्ता ताब्यात घेण्याच्या आतच लूट मिळेल या आशेने छावणीतील बाजारबुणगे, सर्वसामान्य शिपाई आणि बदमाष यांनी किल्ल्यावर घुसण्याची एकच गर्दी केली . किल्ल्यावरील घरांची छपरे अजून जळत होती . ती आग एका दारूच्या

कोठाराकडे पसरली. त्या बरोबर एक प्रचंड स्फोट झाला आणि अनेक लोक त्या स्फोटात फेकले गेले . (**दिल.**, भाग २, १५३ अ). यानंतर दोन-तीन दिवसांनी आणखी एका दारूच्या कोठाराचा स्फोट झाला . वाकीनखेड्याचा किल्ला औरंगजेबाने घेतला खरा , परंतु किल्ल्याचा किल्लेदार मात्र पळून गेला आणि विजेत्या मोगलांना त्रास देण्यासाठी जिवंत राहिला . अशा तऱ्हेने औरंगजेबाने तीन महिन्यांपर्यंत घेतलेले सर्व श्रम फुकट गेले.

(११) औरंगजेबाच्या युद्धांनी देशाची झालेली नासधूस : सर्वदूर निर्माण झालेली अशांतता

सोळाव्या शतकाच्या शेवटी अकबराने स्थापन केलेले आणि शहाजहान बादशहाने जागतिक कीर्ती आणि वैभव याप्रत पोहोचविलेले प्रचंड साम्राज्य अतिशय भयानक अशा उतरत्या कळेला लागले . साम्राज्याचा कारभार, संस्कृती, आर्थिक जीवन, लष्करी सामर्थ्य आणि सामाजिक संघटना ही जणू काही समूळ नाश आणि अंतिम विसर्जनाच्या अवस्थेकडे धाव घेत आहेत अशी परिस्थिती निर्माण झाली. सतराव्या शतकाच्या शेवटच्या पंचवीस वर्षांत युद्धामुळे साम्राज्याचे जे भौतिक नुकसान झाले ते अतिशय भयानक होते. दक्षिणेचा संपूर्ण नाश झालेला होता . औरंगजेबाचा समकालीन युरोपीय लेखक मनूची याने पुढीलप्रमाणे नोंद केलेली आहे ,—— 'औरंगजेबाने अहमदनगरकडे माघार घेतली . त्याच्या पाठीमागे या प्रांतातील जमिनी वृक्षावाचून ओसाड आणि पीकपाण्यावाचून शुष्क होऊन गेल्या होत्या . त्यांची जागा आता मनुष्यप्राणी आणि जनावरे यांच्या हाडांनी घेतली होती . त्याच्या फौजेमध्ये दरवर्षी जवळजवळ एक लाखाच्या वर माणसे मरत असत . इतर प्राणी, ओझी वाहून नेणारे बैल , उंट, हत्ती वगैरे मृत होण्याऱ्या प्राण्यांची संख्या जवळ -जवळ तीन लाखांवर भरत असे ..... दक्षिणेच्या प्रांतात १७०२ ते १७०४ या दरम्यानच्या काळात पटकी आणि दुष्काळ यांनी धुमाकूळ घातला . या दोन वर्षांत जवळजवळ वीस लाखांवर माणसे मृत झाली". (**स्टोरिया**, भाग २, २५२—२९६)

मराठ्यांच्या आक्रमणाचे दक्षिणेमधील सर्वव्यापी स्वरूप

वाकीनखेड्याच्या परिसरातून औरंगजेबाने जेव्हा उत्तरेकडे माघार घेण्यास सुरुवात केली तेव्हा विजयाने धुंद झालेले मराठे ५० ते ६० हजारांच्या प्रचंड संख्येने त्याचा पाठलाग करू लागले . बादशाही सैन्याच्या ते केवळ काही मैलच पाठीमागे राहात , सैन्याचा धान्यपुरवठा आणि पाठीमागे रेंगाळणारे सैन्य यांना ते मारून काढीत आणि पुष्कळदा खुद्द बादशाही छावणीत घुसण्यापर्यंत देखील त्यांची मजल जाई.

औरंगजेबाच्या छावणीत भीमसेन सक्सेना हा लेखक होता. याबाबत तो असे लिहितो,— "मराठे हे सगळ्या मोगल साम्राज्यात संपूर्णपणे वरचढ बनले आणि त्यांनी सगळीकडचे रस्ते बंद केले . चोऱ्यामाऱ्या करून त्यांनी आपली दारिद्र्यातून सुटका करून घेतली आणि भरपूर संपत्ती मिळविली. मी असे ऐकले आहे की प्रत्येक आठवड्यात ते मेवामिठाई आणि पैसा धर्माखातर दान करीत आणि त्यांच्या दृष्टीने त्यांच्या विश्वाला जगविणारा असा जो बादशहा औरंगजेब त्याला दीर्घायुष्य प्राप्त होवो अशी प्रार्थना करीत . धान्याच्या किंमती अधिकाधिक वाढत गेल्या ; विशेषतः बादशहाच्या छावणीमध्ये भुकेमुळे प्रचंड संख्येने माणसे प्राणास मुकली, आणि छावणीत अनेक तऱ्हेच्या बेकायदेशीर प्रथा आणि जुलूमजबरदस्तीचे प्रकार यांना उत आला . औरंगजेबबादशहा हा गादीवर आल्या दिवसापासून एकही दिवस शहरात राहिलेला नव्हता. सारख्या चाललेल्या लढाया आणि अतिशय खडतर अशी कुच हेच जीवन त्याने पसंत केले होते . याचा परिणाम असा झाला की त्याच्या छावणीतील लहान मोठ्या सर्वांनी बराच काळपर्यंत झालेला विरह

सहन न होऊन आपल्या कुटुंबियांना छावणीमध्ये बोलाविले , आणि ही मंडळी छावणीतच राहू लागली . अशा तऱ्हेने छावणीतल्या वस्तीतच एक नवीन पिढी जन्मास आली . तेथेच ते बाल्यावस्थेतून तारुण्यात गेले, तारुण्यातून ते वृद्धावस्थेत गेले आणि वृद्धावस्था संपल्यानंतर देवदूताच्या विश्वात जाण्यासाठी जो प्रवास करावा लागतो त्यासाठी त्यांनी आपल्या कमरा कसल्या . साऱ्या हयातीत त्यांनी घर म्हणजे काय ते बघितले नाही. या जगामध्ये राहुटी खेरीज दुसरी एकही निवासाची जागा नाही एवढीच फक्त जाणीव त्यांना होती. (**दिल**., भाग २, १४१ अ) जेव्हा-जेव्हा मराठे एखाद्या प्रांतावर स्वारी करीत तेव्हा तेव्हा ते प्रत्येक परगण्यातून त्यांना मनाला येईल तेवढा पैसा वसूल करीत आणि उभी असलेली पिके आपल्या घोड्यांना खावयाला लावीत अथवा त्यांच्या पायाखाली तुडवीत . त्यांच्या पाठलागावर बादशाही फौज जेव्हा येई तेव्हा ज्यावेळी नवीन पीक उभे राही तेव्हाच त्यांना दाणागोटा मिळे . देशामध्ये राज्यकारभाराची कोणतीच नावनिशाणी राहिली नव्हती ..... सारा प्रदेश उद्ध्वस्त होऊन गेला होता . **मोगल सरकारच्या दिवाळखोरीची कारणे** :- शेतकऱ्यांनी शेती करणे सोडून दिले आहे. जहागिरदारांना आपल्या जहागिरीतून एक पैचा देखील वसूल मिळत नाही . मराठ्यांच्या सरकारची आपल्या अधिकाऱ्यांना पगार देण्याची पद्धती जवळ-जवळ नाहीशी झालेली होती. साहजिकच मराठा राज्याचे नोकर हे आजूबाजूच्या प्रदेशात लुटालूट करून आपला उदरनिर्वाह करीत आणि लुटीपैकी थोडासा भाग आपल्या राजाला देत." शत्रूची दरोडेखोरी आणि मोगल अधिकाऱ्यांच्या जहागिरीपासून मिळणाऱ्या उत्पन्नात खंड पडल्याने जे परिणाम झाले त्यामध्ये बराच काळ पडलेल्या दुष्काळाने अधिकच भयानकता निर्माण झाली . **दुष्काळ आणि वारंवार निर्माण झालेली अन्नटंचाई** :- यामुळे "धान्याच्या ज्या किमती वाढल्या आणि जहागिरीचा जो समूळ नाश झाला त्यांचा परिणाम मोगल सैन्याची स्थिती अधिकच बिकट होण्यात झाला . या उलट मराठ्यांनी चोऱ्या आणि दरोडेखोरी यांचा जो उच्छाद मांडला त्यामुळे त्यांच्या साधनसामग्रीत भर पडली . त्यांनी हैद्राबाद , विजापूर, औरंगाबाद आणि बुरहाणपूर यासारख्या तटबंदी असलेल्या शहरांवरही हल्ले चढविले."

राज्यकारभार आणि सार्वजनिक शांतता ही पार मोडकळीस आल्याने एक प्रकारचे दुष्ट वर्तुळ निर्माण झाले आणि परिस्थिती अधिकच बिघडली . याबाबत भीमसेन सक्सेना याने अतिशय परखडपणे पुढील उद्गार काढले आहेत . तो म्हणतो, "मनसबदाराच्या हाताखाली अतिशय कमी संख्येने सैनिक असल्यामुळे जहागिरी म्हणून देण्यात आलेल्या प्रदेशावर ताबा मिळविणे त्यांना अशक्य होऊन बसले . स्थानिक जमीनदार यांचे बळ दिवसेंदिवस वाढत गेले . ते मराठ्यांना जाऊन मिळाले व त्यांनी सैन्य जमा करण्यास सुरुवात केली आणि बादशाही मुलखात होणाऱ्या जुलूमजबरदस्तीत अधिकच भर घातली.....सर्व बादशाही मुलूख जसा जहागिरीच्या स्वरूपात मोगल जहागिरदारांमध्ये देण्यात आला होता, त्याचप्रमाणे मराठ्यांनी देखील सगळ्या साम्राज्याची वाटणी आपल्या सेनापतीमध्ये केली होती . परिणामी एका राज्यावर दोन वेगवेगळे जहागिरदार पोसण्याची जबाबदारी येऊन पडली . अशा तऱ्हेने दोन्हीकडून वसूल केला जाऊ लागल्यामुळे शेतकऱ्यांनी शस्त्रास्त्रे आणि घोडे जमा करून ते मराठ्यांना जाऊन मिळाले." (**दिल**., भाग २, १३९ अ, १४० अ) अनेक मोगल जहागिरदारांना दारिद्र्याची आच लागल्यामुळे स्वतःचे पोट भरण्यासाठी त्यांनी निरपराध आणि राजनिष्ठ अशा शेतकऱ्यांना लुटण्यास सुरुवात केली आणि त्यांच्यापैकी काहीजण मराठा हल्लेखोरांबरोबर भागी करून राहिले.

(१२) मराठ्यांची दरोडेखोरी आणि युद्ध करण्याची पद्धती

मराठ्यांनी आपल्या दरोडेखोरी करण्याच्या पद्धतीला एक विशिष्ट स्वरूप दिलेले होते . "जेथे-जेथे हे हल्लेखोर जात असत त्या ठिकाणचा वसूल जमा करण्याच्या कामी ते लागत . अतिशय शांतपणे त्या

ठिकाणी ते आपली बायका व मुले यांच्यासह महिनेच्या महिने आणि वर्षे देखील घालवीत . त्यांनी आपापसात बादशाही परगणे वाटून घेतले आणि बादशाही पद्धतीचेच अनुकरण करून आपले स्वतःचे **सुभेदार**, **कमावीसदार** (वसूल गोळा करणारे अधिकारी) आणि **राहदार** (रस्त्याचे रक्षण करणारे अधिकारी) वगैरे अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या. त्यांचा सुभेदार हा सैनिकांच्या पलटणीचा अधिकारी असे. जेव्हा एखादा मोठा तांडा येत असल्याचे त्याच्या कानावर येई तेव्हा तो जवळजवळ सात हजार घोडेस्वारांना बरोबर घेऊन त्या तांड्याला गाठत असे आणि तो तांडा लुटून फस्त करीत असे . मराठ्यांनी सगळीकडे चौथाईची वसुली करण्यासाठी आपले **कमावीसदार** नेमले . जेव्हा एखादा सामर्थ्यवान जमीनदार अथवा बादशाही फौजदार कमावीसदाराला प्रतिकार करी आणि वसुली करण्यास प्रतिबंधी करी त्यावेळी मराठ्यांचा सुभेदार त्याच्या मदतीसाठी येत असे , त्या ठिकाणाला वेढा घालीत असे आणि तेथील वस्ती उद्ध्वस्त करीत असे . मराठ्यांनी नेमलेल्या राहदाराचे काम पुढीलप्रमाणे असे —जेव्हा एखाद्या व्यापाऱ्याला मराठ्यांकडून कोणत्याही तऱ्हेचा त्रास न होता प्रवास करावयाचा असेल तेव्हा **राहदार** त्याच्याकडून प्रत्येक गाडी किंवा बैल यांच्या पोटी काही पैसा घेत असे आणि मग त्यांच्यासाठी रस्ता मोकळा ठेवला जाई . (बादशाही फौजदार जी जकातवसुली करीत त्याच्या तिप्पट अगर चौपट ही रक्कम असे). प्रत्येक सुभ्यामध्ये मराठ्यांनी एक अथवा दोन लहान किल्ले बांधले होते . या किल्ल्यामध्ये ते वेळ प्रसंगी आसरा घेत आणि आजूबाजूच्या प्रदेशांवर हल्ला करण्यासाठी या किल्ल्यामधून ते बाहेर पडत असत." (**के. के.**, भाग २, ५१७—५१८).

मराठ्यांची साधनसामग्री आणि क्लृप्त्या यामध्ये झालेले बदल

साऱ्या दक्षिणेमध्ये आणि उत्तर हिंदुस्थानच्या काही भागामध्ये मराठ्यांचा एकंदर परिस्थितीवरती पूर्णपणे काबू होता . मोगल अधिकारी हे अगतिक बनले आणि बचावात्मक धोरण स्वीकारण्याची पाळी त्यांच्यावर आली. मराठ्यांची सत्ता याप्रमाणे जसजशी वाढत गेली त्याप्रमाणे त्यांच्या डावपेचात बदल पडत गेला. शिवाजी आणि संभाजी यांच्या काळातल्याप्रमाणे ते केवळ तोडा आणि पळा असे करणारे लुटारू किंवा निव्वळ ज्यांना काहीही संरक्षण नाही अशा व्यापाऱ्यांना आणि खेडुतांना लुटून मोगल सैन्य येत आहे अशी चाहूल लागताच पळून जाणारे भुरटे चोर उरले नव्हते . तर याउलट मनुचीने इ . स. १७०४ मध्ये अवलोकन केल्याप्रमाणे , "हे मराठ्यांचे पुढारी आणि त्यांच्या हाताखालील सैनिक हल्लीच्या दिवसांत अतिशय आत्मविश्वासाने आपल्या हालचाली करतात. याचे कारण त्यांनी मोगल सेनापतींना जेरिस आणले आहे आणि त्यांच्यामध्ये दहशतीचे वातावरण निर्माण केले आहे . सध्या त्यांच्याजवळ तोफखाना , बंदुका, धनुष्ये आणि बाण ही हत्यारे असून , त्यांचे सर्व सामानसुमान आणि राहुट्या नेण्यासाठी त्यांच्याजवळ हत्ती आणि उंटदेखील आहेत. थोडक्यात म्हणावयाचे झाल्यास त्यांच्याजवळील सामग्री ही मोगलांप्रमाणेच आहे. इतकेच नव्हे तर त्यांच्या हालचाली देखील मोगल फौजांप्रमाणे आहेत." (**स्टोरिया**, भाग ३, ५०५).

देशाच्या अंतर्गत राज्यकारभारात औरंगजेबाच्या शासनयंत्रणेची जी दुरावस्था झालेली होती तिचे स्वरूपही अगदी ठळकपणे दिसून येत होते . बादशहाचे अधिकारी अकार्यक्षम आणि सुधारण्याच्या पलीकडे असे लाचखाऊ बनलेले होते . त्याचप्रमाणे बादशहाच्या आज्ञा न जुमानता स्थानिक सुभेदारांनी बादशहाने मना केलेल्या , रयतेकडून वसूल केल्या जाणाऱ्या सर्व कराची , पुन्हा अंमलबजावणी सुरू केली होती . बादशहाच्या वृद्धापकाळात दूरदूरच्या प्रांतातील अधिकारी उघडउघड त्याची अवज्ञा करू लागले होते . (**स्टोरिया**, भाग ४, १००) परिणामी राज्यकारभारातील सर्व कुशलता नाहीशी झालेली होती.

अनुक्रमणिका

(१३) औरंगजेबाची अहमदनगरकडे माघार, १७०५

औरंगजेब देवापूर येथे छावणी करतो, १७०५

वाकीणखेडा जिंकून घेतल्यानंतर लगेच [२७ एप्रिल १७०५]. बादशहाने आपली छावणी देवापूर येथे हलविली . कृष्णेच्या काठी हिरव्यागार अशा प्रदेशात औरंगजेब देवापूर येथे वसलेले हे खेडे किल्ल्यापासून दक्षिणेस आठ मैलांवर आहे .[देवापूर येथे बादशहाचे शिपाई व छावणीतील बाजारबुणगे यांना भरपूर विश्रान्ती मिळाली. (**एम. ए.**, ५०६). लढाईमुळे उद्ध्वस्त झालेल्या जिल्ह्यांचे पुनर्वसन करण्यात आले . चिनकिलिचखानाच्या हाताखाली देण्यात आलेल्या तुकडीने लुटालूट करणाऱ्या टोळ्यांचा बंदोबस्त केला . शेतकऱ्यांना आश्वासन देऊन शेती करण्यासाठी परत बोलविण्यात आले . वाकिनखेडा येथील किल्ल्याच्या भिंती मजबूत करण्यात आल्या. बादशहाचा खोजा खाजा मसूद याने तेथे नवीन मशीद बांधली.

पावसाळ्यात मराठ्यांनी कोंडाणा किल्ला पुन्हा जिंकून घेतला . किल्ला घेण्यासाठी हमीदुद्दीनखान याची रवानगी करण्यात आली . परंतु तो किल्ल्याभोवती नुसता फेरफटका घेऊन परतला . १७०६ च्या जानेवारी महिन्याच्या अखेरीस नुस्रतजंग याला किल्ला घेण्यासाठी हुकूम देण्यात आला. त्याने किल्ल्याची नाकेबंदी केली आणि एक महिन्याच्या अवधीत किल्ला जिंकून घेतला . (**एम. ए.**, ५०८–५१२; **दिल.**, भाग २, १५५ ब).] येथे पोहोचल्यावर वृद्धावस्थेमुळे [बादशहाचे वय चांद्रमासाप्रमाणे या वेळी ९० वर्षांचे होते .] आणि अविरत श्रमामुळे बादशहा अतिशय आजारी पडला.

देवापूर येथील औरंगजेबाचे आजारपण

या घटनेमुळे बादशहाच्या छावणीतील सर्वांना निराशेने घेरले . पहिल्या प्रथम त्याने अतिशय धैर्याने रोगाचा प्रतिकार केला . काही दिवस निव्वळ मनोधैर्याच्या जोरावर त्याने नेहमीप्रमाणे कामकाज पाहिले इतकेच नव्हे तर आपण जिवंत आहोत हे लोकांना दाखवून देण्यासाठी तो आपल्या शयनगृहाच्या खिडकीतून बाहेर डोकावत असे . परंतु या कामाचा ताण पडून त्याचा आजार अधिकच बळावला . अखेर वेदनांनी त्याच्या शरीराला इतके पछाडले की पुष्कळदा त्याची शुद्धबुद्ध देखील हरपत असे . औरंगजेबाचा मृत्यू झाला आहे आणि त्याच्या मुलांत युद्धांना सुरुवात झालेली आहे यासंबंधीच्या बेफाट वदन्ता सर्वत्र पसरल्या.

अशा परिस्थितीत बादशहाने १० ते १२ दिवस काढले . नंतर त्याच्या शरीर प्रकृतीत हळूहळू सुधारणा होऊ लागली . परंतु त्याच्या अंगात अजून खूप अशक्तता होती . या सुमारास एके दिवशी त्याला यातना अगदी असह्य झाल्यावर तो शेखगंज याच्या खालील कविता गुणगुणला.

> ज्यावेळी तुम्ही तुमच्या ८० व्या किंवा ९० व्या वर्षांत पदार्पण करता ,
> त्यावेळी काळाच्या हस्ते तुम्हाला अनेक दणके बसलेले असतील ; जेव्हा
> ती आयुर्मर्यादा ओलांडून तुम्ही शंभरीच्या घरात पोहोचता तेव्हा मृत्यू हा
> तुमचा आयुष्याचा बुरखा पांघरून तुमच्याकडे येईल.

बादशाही छावणीचे अहमदनगरकडे कूच, १७०६

आजारी बादशहाच्या बिछान्याजवळ शुश्रूषा करण्यासाठी अमीरखान हा होता . त्याने वेदनाग्रस्त बादशहाचे पुढील शब्दाने सांत्वन करण्याचा प्रयत्न केला , "बादशहा सलामत, परमेश्वर तुम्हाला शांतता प्राप्त करून देऊ दे ! आपण ज्या कविता मला म्हणून दाखविल्या त्या पुढील कवितेला प्रस्तावना म्हणून

शेखगंज याने लिहिल्या. तर मग तुम्ही नेहमीच आनंदी राहणे हे अधिक चांगले , कारण जर तुम्ही आनंदी असला तर तुम्ही परमेश्वराची याद करू शकता!"

२३ ऑक्टोबर १७०५ रोजी औरंगजेबाने देवापूर येथील आपली छावणी मोडली आणि पालखीत बसून त्याने उत्तरेच्या दिशेने कूच केले . अतिशय हळू टप्प्याप्प्यांनी प्रवास करत २० जानेवारी १७०६ रोजी तो अहमदनगर येथे जवळजवळ २३ वर्षांच्या कालावधीनंतर पोहोचला . बरोबर २३ वर्षांपूर्वी याच ठिकाणाहून त्याने आपल्या दक्षिण जिंकून घेण्याच्या मोहिमेस सुरुवात केलेली होती . अहमदनगर ही आपल्या पृथ्वीवरील प्रवासांची इतिश्री आहे असे त्याने जाहीर केले . [राजपुत्र महमद आजम हा २५ मार्च रोजी अहमदनगर येथे येऊन पोहोचला. बादशहाने स्वतःपाशी आपल्याला येऊ द्यावे यासाठी त्याने बादशहाची खूप मनधरणी केली. परंतु बादशहाने तशी परवानगी देण्याचे नाकारले . आपल्या म्हातारपणात आणि आजारपणात शहाजहानच्या जे नशिबी आले तसे आपल्या महत्त्वाकांक्षी मुलांकडून आपले होऊ नये ही भावना औरंगजेबाच्या मनात जागरूक होती (**के. के.**, भाग २, ५४१). त्याचप्रमाणे दुबळ्या कामबक्षाला कशाचीही चाड न बाळगणारा आपला मुलगा जो आजम याच्यापासून दूर ठेवण्याची त्याची इच्छा होती . अखेर आजमने वारंवार केलेल्या विनंतीला बळी पडून त्याने त्याला जवळ येण्याची परवानगी दिली . त्याच्या जागी बेदारबख्त याची तात्पुरती नेमणूक करण्यात आली . माळव्यावर खान आलम आणि खानदेशवर नजाबतखान यांच्या नेमणुका करण्यात आल्या. चिनकिलिचखान याची विजापूरवर झालेली नेमणूक कायम करण्यात आली (**एम. ए.**, ५१२)] (**के. के.**, भाग २, ५४१; **अहकाम** ५६)

(१४) दुःख आणि निराशा यांनी भरलेली औरंगजेबाच्या जीवनातील शेवटची वर्षे

[औरंगजेबाच्या दक्षिणेतील मोहिमेच्या अखेरच्या काळात त्याचे कसे हाल झाले याचे अतिशय उत्तम वर्णन मनूची याने पुढीलप्रमाणे दिले आहे . "सन १७०४ मध्ये दाऊदखान पन्नी अडोनीच्या सुभ्यावर जात असता , मराठ्यांनी त्याच्यावर छापा घातला . तेव्हा त्याने मराठ्यास सात लक्ष रुपये भरून आपला बचाव केला . बादशहाच्या फौजेत इतकी अव्यवस्था होती की , बंडखोर पठाण समशेरखान यास पकडण्यासाठी बारा हजारांचा रीसाला त्याने रवाना केला . त्यापैकी सातशेबावन्न पडले, तेव्हा समशेरखानाचे डोके हाती आले. इतके वर्षे औरंगजेब मराठ्यांना जिंकण्याचा उद्योग करीत आहे , त्याच्या बाजूस दरसाल एक लाख माणसे, आणि हत्ती, घोडे, बैल, उंट वगैरे जनावरे दरसाल तीन लाख मरण पावली . एवढ्या अफाट राज्यात आज स्थिती अशी आहे की, मोठमोठ्या सरदारांसुद्धा उपास करण्याची पाळी येते . त्यांची बायकामुले पुष्कळदा रस्त्यातून पोटासाठी भिक्षा मागतात . मोठ-मोठ्या सरदारांच्या बायकांच्या अंगावर एक लांब चादरीपेक्षा दुसरे काही एक नसते.

"दक्षिणेत इ. स. १७०२ पासून १७०४ पर्यंत पाऊस पडला नाही ; आणि प्लेग सुरू होता . या कारणांनी या दोन वर्षांत वीस लाखांवर लोक मेले. आई-बापांना पोटासाठी मुले विकण्याची पाळी आली . दर मुलास आठ किंवा चार आणे देऊन सुद्धा त्यास विकत घेण्यास कोणी मिळत नसे. कोकणासारख्या अवघड ठिकाणी बादशहाच्या फौजा जाऊ लागल्या , म्हणजे केव्हा केव्हा लष्करी अधिकाऱ्यावर असा प्रसंग येई की स्वतः पीठ घेऊन कोणाच्या घरी जावे, आणि दोन रुपये मजुरी देऊन तेवढ्याची भाकरी भाजून द्यावी. नोकराचाकरांना तर झाडाचा पाला मिळाला म्हणजे भाग्य. गेल्या पंचवीस वर्षांत बादशहाला किती खर्च लागला , आणि त्याची किती माणसे गेली , याची गणतीच नाही . पण यामुळे बादशहाच्या अंतःकरणास यत्किंचित द्रव आला नाही . एखादे वेळी पुष्कळ माणसे मरून नुकसान झाल्याची बातमी आली , म्हणजे तो जवळच्या मंडळीस म्हणे , "असा संहार होतो तेव्हाच तैमूरलंगासारखी कीर्ती मिळते."

"खेळण्याचा वेढा चालू असताना मराठ्यांनी बुरहाणपुरावर हल्ला करून तेथील मोगल अधिकाऱ्यास पकडले आणि सर्व शहर लुटले . या अधिकाऱ्याने दंड भरून आपली सुटका करून घेतली . त्याचप्रमाणे लगेच गोवळकोंड्यावर स्वारी करून तेथूनही पुष्कळ लूट मराठ्यांनी आणली . मराठ्यांचे किल्ले काबीज केल्याची फुशारकी मारून बादशहाकडून बक्षिसे मिळवावी , म्हणून कित्येक मोगल अधिकाऱ्यांनी मराठ्यांस पैसे भरून थोडा वेळ पावेतो काही किल्ले काबीज केले . इ. स. १७०४ च्या जानेवारीत मराठे सरदारांनी विजापूरच्या हद्दीत शिरून भरपूर लूट केली ; आणि सर्व भागांतून चौथाईचा वसूल चोपून घेतला. लगेच त्यांनी त्या स्वारीत पूर्व किनाऱ्यापावेतोच्या प्रदेशात शिरून चौथाई वसूल केली.

"मराठ्यांच्या स्वाऱ्या त्यांना अतिशयच फायदेशीर होऊ लागल्या . मोगलांच्या हद्दीत त्यांनी पाय ठेवल्याबरोबर बादशहाचे अधिकारी त्यांच्याकडे माणसे पाठवून काय रक्कम पाहिजे ती ठरवितात . मागितल्याप्रमाणे रक्कम मिळाली तर बरे , नाही तर लगेच सर्वत्र जाळपोळ सुरू होते . हल्ली मराठ्यांचा राजा सर्व शक्तिमान आहे . त्याच्याजवळ एक लाख स्वार जय्यत तयार आहेत . अशा फौजेनिशी तो मोगल बादशहाशी झगडण्यास मुळीच कचरत नाही. पूर्वी जसा औरंगजेब इतर राजांस धाक दाखवी, तसा धाक हल्ली मराठ्यांचा राजा सर्वांस दाखवीत आहे.

"दहा-वीस वर्षांत सर्व हिंदुस्थानचे राज्य काबीज करण्याची ताकद इतक्या वर्षांच्या मेहनतीने व अनुभवाने मराठ्यांच्या अंगी आली होती. शौर्य व पराक्रमी माणसे व साहित्य सर्व भरपूर होते ; पण कायदा व शिस्त लावणारा नेता त्यास नव्हता . अव्यस्थितपणा हा मराठ्यांचा स्वभाव बनला. चालुक्यांचे वेळेपासून अद्याप पावेतो त्यांच्या या स्वभावाचे प्रदर्शन इतिहासात पदोपदी आढळते."

इ. स. १७०५ मधील घटनाबाबत लिहिताना मनूची म्हणतो , "इ. स. १७०५ मध्ये मराठ्यांचे मोठमोठे प्रमुख सरदार धनाजी जाधव , नेमाजी शिंदे, दादो मल्हार, रंभाजी निंबाळकर वगैरे. चाळीस हजार स्वारांनिशी मोठी दौड करीत झपाट्याने सुरतेवर गेले आणि तेथून भडोचपर्यंत

सर्व मुलूख त्यांनी लुटला . त्याजवर नजरअलिखान व ख्वाजा हमीद हे दोन मुसलमान सरदार सहा हजार फौजेनिशी चालून गेले . मराठ्यांनी त्यांच्या फौजेचा फन्ना उडविला त्या दोघांस कैद केले आणि आठ लाख रुपये दंड घेऊन त्यास सोडीले . विनू मांड म्हणून खानदेशातला एक कलाल, जवळ चोरांचा तांडा जमवून प्रांतात दरोडे घालू लागला . त्यानेच मराठ्यांना लुटीची लालूच दाखवून गुजराथेवर स्वाऱ्या करण्याची भर दिली. गुजराथच्या वरील स्वारीत बडोद्याचा फौजदार नजरअली व धनाजी जाधव यांची मोठी लढाई नर्मदेच्या पूर्वकाठी राजपिंपळ्याजवळ रतनपूर येथे झाली (४ मार्च १७०६). तीत मुसलमानाचा फारच नाश झाला. जीव बचावून कित्येक भडोच येथे आले आणि धनाजीने अपरंपार लूट जमवून महाराष्ट्रात आणली. गुजराथ प्रांत हा बादशहाचा समृद्ध प्रदेश मराठ्यांनी उद्ध्वस्त केल्यामुळे औरंगजेबाचे राज्य संपल्यासारखेच झाले ." मराठ्यांच्या या कारवायांना बादशहाला आळा घालता येईना . इतकेच काय परंतु मराठ्यांची लुटालूट देखील त्याला मुळीच बंद करता येईना . याबाबत मनूची म्हणतो, "त्यांनी जिकडेतिकडे आपला कायमचा अंमल बसवण्यास सुरुवात केली. जो जो मुलूख त्यांचे हाती लागे, त्यात बादशाही अमलाप्रमाणे आपला अंमल सुरू करून **सुभेदार, कमाविसदार, राहदार** वगैरे अधिकारी त्यांनी नेमिले . सुभेदाराच्या ताब्यात सर्व फौज असावयाची. एखादे लमाण बादशहाकडे येत आहे, अशी बातमी लागताच, सुभेदार सहा-सात हजार लोक बरोबर घेऊन त्यावर हल्ला करीत व ते लमाण लुटून आणीत. सुभेदार आपले **कमाविसदार चौथाई** वगैरे गोळा करण्याकरिता पाठवी; आणि **जमीनदार** व **फौजदार** वगैरे अधिकारी **चौथाई** देण्यास हरकत करीत त्या ठिकाणी तो स्वतः जाऊन शहरे व गाव जमीनदोस्त करून कमाविसदाराचा पाठपुरावा करी . राहदाराकडे दस्तुरी नाक्यावर बसून गाड्या व जनावरे यांजपासून कर घेण्याचे काम होते . याप्रमाणे दक्षिणेतून गुजराथेत अहमदाबादेपर्यंत आणि माळव्यात उज्जयिनीपर्यंत मराठ्यांनी आपला दरारा बसविला ." बादशहाच्या शेवटच्या दिवसांची मनुचीने दिलेली माहिती चित्तवेधक आहे . त्यावरून मोगल कारभाराची कल्पना येते आणि एका सत्ताधारी व्यक्तीच्या हेकेखोरपणामुळे राष्ट्राचा इतिहास कसा बदलतो हे आपल्याला समजू शकते . "बादशहा अहमदनगरास येत असताना त्याची मुलगी व बेगमा यांनी विनंती केली . की, "राजधानी सोडून आज तीस वर्षे आपण रानावनात हिंडत आहो ; आपण नाना संकटे सोसली ; आम्ही लहानाच्या म्हाताऱ्या झालो ; तर मेहरबानी करून आम्हास आग्र्यास जाऊ द्या ; म्हणजे तेथे आम्हास कोणी पकडू शकणार नाही, आम्ही सुखाने व अब्रूने तरी मरू." बादशहाने यावर उत्तर दिले, "तुम्ही काही एक फिकीर करू नका. तुमच्या संरक्षणाची सर्व तजवीज दोन वर्षांपूर्वी मी करून ठेविली आहे."

बादशहाच्या छावणीचे वर्णन करताना मनुची लिहतो , "त्याच्या छावणीइतकी घाणेरडी जागा पृथ्वीवर दुसरी नसेल . दररोज असंख्य माणसे व जनावरे मरून एकच घाण सुटलेली असते. जनावरांप्रमाणेच मेलेल्या माणसांना दोरी बांधून ओढून नेतात, आणि अंगावर असेल नसेल ते सर्व बूचाडून जवळ कोठे खाडा दिसेल , त्यात टाकून देतात. कोल्ह्या-कुत्र्यांची मात्र चैन असते. किती वेळा तरी मला बादशहाच्या छावणीजवळ नाक धरताधरता पुरेवाट झाली; आणि कितीकदा मला उलट्या झाल्या. माश्या तर इतक्या असतात की काही खाण्याची म्हणून सोय नाही. प्रवासी लोकास पहिला मोठा धाक मराठ्यांचा. पण मराठ्यांच्या हातून सुटावे, तो बादशहाचे जकात लुबाडणारे अधिकारी काय कमी आहेत ! कोणाजवळ काही द्रव्य आहे असा सुगावा लागला म्हणजे पुरे . ते खुशाल सर्वस्व हरण करून, प्रवाशांना मारून पुरून टाकतात. अशी ही या साधू बादशहाची राज्यव्यवस्था आहे."

"एकदा बादशहाने जुल्फिकारखानास मराठ्यांवर पाठविताना कानमंत्र सांगितला तो असा : हे पहा शत्रूशी प्रसंग पडला असता कपट, खोटे बोलणे, धरसोड, खोट्या शपथा इत्यादी वाटेल तो प्रकार प्रसंगानुसार उपयोगात आणण्यास कमी करू नकोस . नाही नाही त्या युक्त्या व लबाड्या योजित जा. पण हातात घेतलेल्या कामात यश मिळाल्याशिवाय राहू नको."

"एकसारखा लढाईचा विषय बादशहाचे मनात घोळत असतो . पालखीत बसून कूच करीत असताना तो तलवार म्यानातून काढून वरचेवर ती पुसतो, उगाच थोडीशी इकडेतिकडे परसतो, पुन्हा परत ठेवतो. धनुष्यबाणाचेही असेच करतो. येणे करून तो लोकास दाखवितो की, मी अजून वाटेल तशी लढाई करण्यास तयार आहे . वृद्धावस्थेने त्याचे शरीर साफ दुणून गेलेले आहे. डोके अगदी छातीवर पडलेले दिसते, आणि त्याची ती पांढरी स्वच्छ दाढी छाती फोडून बाहेर येत आहे असे वाटते. कोणी काही अर्ज करण्यास आला की सावकाश वर मान करून तो ऐकण्यास त्यास किती तरी वेळ लागतो; नंतर असा जबाब तो देतो की पुन्हा जास्त प्रश्न करण्याचे कारणच राहू नये . जवळ असताना त्याचे अंमलदार त्याचे हुकूम ऐकल्यासारखे करतात; जरा दूर गेले की बयादा सांगू लागतात, अडचणी दाखवितात, बादशहाजवळच्या मंडळीस लाच भरतात आणि मन मानेल तसे वागतात. लोक आपले हुकूम मानीत नाहीत हे बादशहास ठाऊक, म्हणूनच तो स्वतः लढाईवर गेला. सदा सर्वकाळ ईशचिंतनात निमग्न आहोत असे तो दाखवितो . रमजानच्या उपवासात जमिनीवर डोके टेकून सारखे चोवीस -चोवीस तास भजन म्हणत असतो . मग राणी उदयपुरी जवळ जाऊन त्यास उठविते, तेव्हा राग आल्यासारखे दाखवून म्हणतो, "माझ्या परमानंदात तुम्ही व्यत्यय का आणता? मला आता इहलोकाचे सुख पुरे झाले.' अशा वर्तनाने भोळ्याभाबड्याच्या चित्तास वाटू लागते, की बादशहा खरोखर मोठा सत्पुरुष आहे."

"अहमदनगरास आल्यावर बादशहास अतिपस्तावा झाला . आपण कशाला ह्या मराठ्यांच्या युद्धात पडलो , असे त्यास होऊन गेले . दिल्लीस निघून जावे तर दक्षिणचा सर्वच प्रदेश हातचा जाणार ; आणि इतक्या वर्षांचे श्रम व खर्च सर्व फुकट जातो म्हणून त्यास दक्षिण देश सोडता येईना. मुले नातू पणतू मिळून वीस -पंचवीस वर्षांवरचे निदान सतरा असामी त्याच्या कुटुंबात आहेत . नातवांच्या दाढ्या पिकू लागल्या आहेत . बादशहा मरतो केव्हा आणि आपण राज्य घेतो केव्हा अशी प्रत्येकास विवंचना लागलेली आहे . पण या मराठे लोकांस जिंकून बादशहाच्या मनास समाधान देण्याचे सामर्थ्य एकात देखील नाही. मराठे तर बेसुमार दांडगाई करू लागले आहेत. एक टोळी दिल्लीवर; तर दुसरी बंगल्यात, ओरिसा, डाक्का, राजमहालकडे: तिसरी कर्नाटकावर, तर चौथी सुरतेवर, असा सारखा धुमाकूळ चालला आहे. इ. स. १७०६ मध्ये त्यांनी सुरत, भडोच व गण देवी ही शहरे लुटली . कोणत्याही प्रदेशात ते नाहीत अशी जागाच उरली नाही . आजम व कामबक्ष हे दोन मुलगे बादशहाच्या मरणाची वाट पाहात जवळ टपून बसले आहेत . त्याची धास्ती बादशहास अहोरात्र लागलेली आहे . आपली फौज त्यास मिळेल म्हणून बादशहा फौजेस नेहमी लांबलांबच्या प्रांतात पाठवून आपण बहुतेक सडाच राहतो. अहमदनगरास तो एकदा अतिशय आजारी पडला, तेव्हा तो मेल्याची गप्प उठली; आणि मग जो काय गोंधळ सर्व राज्यात उडाला तो काही विचारू नये. खरोखरी मेल्यावर पुढे काय होणार हे त्यास जिवंतपणी डोळ्यासमोर दिसू लागले. लोकास शांत करण्यासाठी, उठवत नव्हते तरी, गाद्या, तक्के, वगैरे लावून पुष्कळ असामींनी सर्व बाजूंनी धरून त्यास दरबारात आणले , आणि

मंगलवाद्ये सुरू केली, म्हणून तो जिवंत आहे, इतकी तरी लोकांची खात्री झाली; या प्रसंगी डोळ्यात आसवे आणून, त्याने भावी विपत्तिबद्दल अत्यंत दुःख दाखविले, आणि परमेश्वर माझे डोळे का मिटीत नाही, असा आक्रोश करून तो म्हणाला, "काल रात्री पैगंबराने मला दर्शन देऊन सांगितले, 'बाबा तुझे मरण इतक्यात नाही अजून तीस वर्षे तुला जगावयाचे आहे!' कोण ही माझी दुर्दशा मरणास सुद्धा मी महाग झालो काय!" हे भाषण ऐकून लोकांची खात्री झाली की, बादशहा अजून पुष्कळ वर्षे वाचणार आहे. पुन्हा आपल्या मरणाची गडबड उडू नये, म्हणून हा सगळा खटाटोप. ढोंगाची इतकी हुबेहूब बतावणी दुसऱ्या कोणास साधली नव्हती!"

"अहमदनगरास पोहोचल्यावर आपले इतिवृत्त संपले, असे बादशहाला वाटू लागले. आपला कायमचा मुक्काम येथेच होणार अशी त्याची खात्री झाली. आजमशहा त्याच्या जवळ होता. राज्याच्या पुढील व्यवस्थेविषयी बादशहाच्या मनात विचार चालू होते. पाटणा येथे आजमशहाचा मुलगा आजीम उश्शान हा बादशहाचे प्रीतीतला होता; तसेच कामबक्षावरही त्याचे विशेष प्रेम होते. आजमशहास छावणीतले बहुतेक सरदार अनुकूल असून तो कामबक्षाची नालस्ती करण्यात दंग होता. बादशहा हा प्रकार जाणून होता, व कामबक्षाचा सांभाळ करण्याविषयी त्याने सुलतान हुसेन ऊर्फ मीर मलंग यास आज्ञा केली. कामबक्षही थोड्या वेळाने बादशहाच्या छावणीत आला. आजमशहाने त्याने काही वाकडे करू नये, म्हणून बादशहाने कामबक्षाला मोठ्या इतमामासह विजापुरास पाठविले; आणि आजमशहासही माळव्यात घालवून दिले. आपण आता थोड्या वेळाने मरणार अशी खात्री होताच बादशहाने वजीर असदखान याला जवळ बोलाविले; आणि त्याजकडून खजिना खोलवून फौजेचा चढलेला सर्व पगार आपल्या समक्ष देऊन टाकला. मरणसमयी तो बोलला, 'मी आता सुखाने मरणार; कारण मुसलमानी धर्माच्या शत्रूचा नाश करण्यात मी कसूर केली नाही, एवढे तरी लोक माझ्याविषयी खात्रीने म्हणतील.'

"वडील मुलगा शहाआलम याने आपल्या पश्चात राज्यावर यावे, अशी व्यवस्था करण्याविषयी जवळच्यांनी त्यास आग्रह केला असता, तो म्हणाला, 'मी कोण त्यास नेमणार; परमेश्वराच्या हातची ही गोष्ट आहे.' दोन प्रहरानंतर दोन तासांनी बादशहाचे प्राणोत्क्रमण झाले."]

औरंगजेबाच्या आयुष्यातील अखेरची वर्षे ही कल्पनातीत अशा दुःखाने भरलेली होती. राजकीय क्षेत्रात त्याला असे दिसून आले की साऱ्या हिंदुस्थानावर न्यायाने आणि कणखरपणे राज्य करण्यासाठी त्याने हयातभर जे प्रयत्न केले त्याची परिणती साऱ्या साम्राज्यात जिकडेतिकडे बेबंदशाही आणि फाटाफूट होण्यात झाली होती. आता त्याच्या वृद्धापकाळात औरंगजेबाच्या हृदयाला अबोल अशी एकाकीपणाची भावना दहशत घालून राहिली. एकामागून एक त्याचे सगळे जुनेजुने अमीरउमराव मृत झाले होते. त्याचा एकमेव वैयक्तिक मित्र आणि ज्याने आपल्या तारुण्याची जोपासना ज्या पिढीमध्ये केली होती त्या पिढीमधील एकच व्यक्ती आता शिल्लक राहिली होती, आणि ती म्हणजे त्याचा वजीर असदखान आणि हा देखील औरंगजेबाहून वयाने ५ वर्षांनी लहान होता. जेव्हाजेव्हा वार्धक्याने वाकलेला बादशहा दरबारात आपल्या भोवती बसलेल्यांवर नजर टाकीत असे तेव्हातेव्हा त्याच्या नजरेस जी मंडळी पडत त्यामधे वयाने लहान, धास्तावलेले, खुषामतखोर, जबाबदारी घेण्यास टाळाटाळ करणारे, खरे सांगावयास घाबरणारे आणि वैयक्तिक महत्त्वाकांक्षा आणि परस्परांविषयी मत्सर यासारख्या नीच वृत्तीत राहून सदा सर्वकाळ कारस्थाने करणारे असे होते. औरंगजेबाच्या अंगी जो अतिशय भयानक कणखरपणा होता त्यामुळे त्याच्या पुढेपुढे करणाऱ्या व्यक्तीच्या अंगातील धाडस हे साफ गारठून जात असे. जगातला आनंद आणि दुःख या भावना ज्याला ठाऊक नव्हत्या, जगातील माणसांची दुर्बलता आणि असहायता यांची ज्याला जाणीव नव्हती, ज्याच्या अंगात साध्या माणुसकीचा अवशेषही सापडणे कठीण होते, आणि जो या जगात राहात असे परंतु जेथे तो असून नसल्यासारखा होता, अशा औरंगजेबाबद्दल कोणाही ब्यक्तीला हा कोणीतरी अतिमानवी जगातला आहे असे वाटत असे आणि प्रत्येकजण त्याच्याजवळ जाण्यास दबकत असे. राज्याच्या कारभाराच्या मनाला सतावणाऱ्या कटकटीतून मुक्त झाल्यावर बादशहाचे एकमेव सोबती म्हणजे त्याची मुलगी जिनतउन्नीसा; हिचे देखील वय झालेले होते; त्याची दुसरी जोडीदारीण म्हणजे त्याची शेवटची बायको उदयपुरी. औरंगजेबाच्या या बायकोचा स्वभाव एखाद्या खालच्या जातीच्या क्रूर प्राण्यासारखा होता. हिचा मुलगा कामबक्ष याने आपल्याविषयी स्वभावाने आणि मूर्खपणाच्या आहारी जाऊन केलेल्या बेफाट वागणुकीमुळे आपल्या बापाच्या मनावर फार मोठा प्रहार केला होता.

औरंगजेबाचा अंतःकाळ आता जवळ आलेला होता. अशा परिस्थितीत त्याच्या नजीकची माणसे जेव्हा मरण पावू लागली तेव्हा त्याच्या कौटुंबिक जीवनात भयानक अंधःकार पसरल्यासारखे झाले. त्याची

अतिशय लाडकी सून जहानजेब बानू ही गुजराथमध्ये १७०५ च्या मार्च महिन्यात मरण पावली . त्याचा बंडखोर मुलगा अकबर हा परदेशामध्ये अज्ञातवासात असताना १७०४ मध्ये मरण पावला होता . त्याच्याही अगोदर त्याची अतिशय प्रतिभावान आणि उकृष्ट कवियित्री असलेली मुलगी जेबउन्नीसा हिने आपल्या आयुष्याचे अखेरचे दिवस मोजीत दिल्लीच्या तुरुंगात १७०२ मध्ये आपले प्राण सोडले होते . आणि आता त्याचे अनेक भाऊ आणि बहिणी यांच्यामधून जिवंत राहिलेली एकुलती एक गोहरआराबेगम ही १७०६ मध्ये मरण पावली. तिच्या मृत्यूची बातमी ऐकल्यानंतर पुन्हापुन्हा त्याच्या तोंडातून असहायतेने दुःखाने भरलेले पुढील उद्‌गार निघाले, "ती आणि मी अशी फक्त दोघच शहाजहानच्या मुलांपैकी जिवंत राहिलो होतो ." (**एम्. ए.**, ५१३) १७०६ च्या मे महिन्यात त्याची मुलगी मेहेरउन्नीसा आणि तिचा नवरा म्हणजे मुरादचा मुलगा इजीदबक्ष या दोघांचा दिल्ली येथे एकाच वेळी मृत्यू झाला. त्याच्यापुढील महिन्यात अकबराचा मुलगा बुलंद अख्तर हा मरण पावला . १७०७ मध्ये त्याचा स्वतःचा मृत्यू होण्याच्या अगोदर त्याची दोन नातवंडे मरण पावली. दिवसेंदिवस खचत जाणाऱ्या बादशहाबद्दल अनुकंपा वाटल्याने त्याच्या वजिरांनी ही बातमी त्याच्यापासून लपवून ठेवली.

(१५) मराठ्यांनी बादशाही मुलखात घातलेला धुमाकूळ, १७०६–१७०७

औरंगजेबाने जेव्हा अहमदनगर येथे जाण्यासाठी कूच केले तेव्हा सगळीकडे अंदाधुंदी आणि विध्वंस यांचे साम्राज्य पसरलेले होते . परंतु त्याने घेतलेल्या या माघारीमुळे त्याच्या सैन्याला विश्रांती लाभली नाही, किंवा मोगल साम्राज्यात शांततेचे वातावरणही निर्माण झाले नाही . १७०६ च्या एप्रिल अथवा मे महिन्यात मराठ्यांचे एक प्रचंड सैन्य त्यांच्या सर्व सेनापतींच्या हाताखाली बादशाही छावणीपासून ४ मैलांवर येऊन धडकले आणि त्यांनी छावणीला धोका निर्माण केला . औरंगजेबाने खानइआलम आणि इतर अधिकाऱ्यांना मराठ्यांच्यावर रवाना केले. बराच काळपर्यंत आणि अतिशय घनघोर युद्ध झाल्यानंतर त्यांना मराठ्यांचा हल्ला आजूबाजूच्या प्रदेशातून परतवून लावण्यात यश मिळाले. (**दिल.**, भाग २, १५५ ब)

गुजराथमध्ये देखील बादशाही फौजांवर भयानक संकटाची परंपरा कोसळली . इनुमांड नावाचा पूर्वी एक खानदेशात दारू गाळण्याचा धंदा करणारा होता. त्याने आता दरोडेखोरीचा धंदा सुरू केला आणि मराठ्यांच्या सेनापतीबरोबर तो संधान बांधून राहिला . त्याने धना जाधव आणि त्याची फौज यांना पाचारण केले आणि १७०६ च्या मार्च महिन्यात अतिशय मोठे असलेले आणि व्यापाराचे मध्यवर्ती ठिकाण म्हणून नावाजलेले बडोदा शहर त्याने लुटून फस्त केले . त्या ठिकाणचा फौजदार नजरअली याचा मराठ्यांनी पराभव केला आणि त्याच्या माणसासहित त्याला पकडले. (**दिल.**, भाग २, १५६ ब)

त्याचप्रमाणे धनाजी जाधव आणि मराठ्यांचे इतर सेनापती यांच्या हाताखाली मराठ्यांच्या तुकड्यांनी पुन्हा पुन्हा औरंगाबादच्या प्रांतात मुलुखगिरी केली आणि तो प्रांत वारंवार उद्‌ध्वस्त केला . [औरंगाबाद जिल्ह्यात धुमाकूळ घालणाऱ्या मराठ्यांवर चाल करून जाण्याची त्याने नुस्रतजंग याला आज्ञा केली . मे १७०६ मध्ये त्याने अहमदनगर सोडले आणि तीसगावच्या दिशेने कूच केले . मराठ्यांचा पाठलाग करीत तो बीडपर्यंत पोहोचला . मराठे धर्मपुरी घाट, परळी, औसा, तुळजापूर आणि परेंडा या मार्गांने महादेवाच्या डोंगरात पळाले . नुस्रतजंग बादशाही छावणीकडे परतला. दरम्यान धनाजी जाधव मिरजेकडे आल्याची बातमी आली तेव्हा त्याला पुन्हा धनाजी जाधवावर पाठविण्यात आले. धनाजीने कृष्णा नदी ओलांडली आणि पावसाळा आल्यामुळे खानाने मिरजेपासून २४ मैलांवर मुक्काम केला . मराठ्यांच्या पाठलागाच्या धामधुमीत खानाच्या फौजेतील बहुतेक घोडे आणि मालवाहू जनावरे गारद झाली होती . पावसाळ्यात देखील खानाच्या छावणीत धान्य आणि चारा यांचा तुटवडा पडला होता . सैन्यातील शिपाई या परिस्थितीला पूर्णपणे कंटाळून गेले होते. (**दिल.**, भाग २, १५६ ब–१५७ अ; **एम्. ए.**, ५१५).]

१७०६ मध्ये मराठ्यांना मिळालेले नेत्रदीपक विजय

अनुक्रमणिका

जुलैमध्ये मराठ्यांनी वाकीणखेड्याच्या आसपास ज्या हालचाली केल्या त्यामुळे त्या प्रदेशातून त्यांना हुसकावून लावण्यासाठी तरबीयतखानाला त्या प्रदेशात धाडणे बादशहाला भाग पाडले . (**एम्. ए.**, ५१६) दोन्ही कर्नाटकाची किल्ली असे ज्या शहराचे वर्णन करता येईल ते पेणूकोंडा हे शहर तेथील मोगल किल्लेदाराला लाच देऊन पीडिया बेरड याने हिंदुरावाशी संगनमत करून आपल्या ताब्यात घेतले . (**दिल.**, भाग २ , १५६ ब ; **स्टोरिया**, भाग ४ , २४९–२५१) अनेक महिने बादशहाकडून पगाराची थकबाकी राहिल्यामुळे या किल्लेदाराची उपासमार होत होती . पेणूकोंडा यासारखा महत्त्वाचा किल्ला ताब्यात आल्यामुळे मराठ्यांना अतिशय हुरूप आला आणि विजापुरी कर्नाटकचे पठार असा ज्या प्रदेशाचा उल्लेख केला जातो त्याची राजधानी सेरा या शहराकडे त्यांनी आपला मोर्चा वळविला . १७०४ च्या जून महिन्यात यापूर्वी त्यांनी या जिल्ह्याच्या आसपास लुटालूट केलेली होती . कर्नाटकचा फौजदार दाऊदखान याने काही काळानंतर पेणूकोंडा परत जिंकून घेतले . बादशाही दरबारचा एक अधिकारी सियादतखान याला बंदुकीच्या गोळ्यांनी दोन्ही डोळ्यांमध्ये जखमा झाल्या . त्याला मराठ्यांनी कैद केले आणि दंडादाखल रक्कम भरून सुटका करून घेण्याची अट त्यांनी त्याच्यावर लादली . याच सुमारास मराठ्यांनी बादशाही किल्लेदारापासून वसंतगडचा किल्ला जिंकून घेतला. (**दिल.**, भाग २, १५६ ब)

१७०६ च्या सप्टेंबरमध्ये पावसाळा संपल्यावर मराठ्यांच्या हालचालींना पुन्हा दसपट वेगाने सुरुवात झाली. धना जाधव याने वऱ्हाड व खानदेश या मोगल साम्राज्याच्या जुन्या प्रदेशात आता मुसंडी मारली . परंतु नुस्रतजंग याने मिरज येथील आपली छावणी सोडून त्याला विजापूरच्या बाजूने पिटाळले आणि तेथून कृष्णा नदीच्या पलीकडे त्याचा पाठलाग केला. औरंगाबादहून बादशाही छावणीकडे येणारा लमाणांचा एक मोठा तांडा अहमदनगरपासून २४ मैलांवर चांदा येथे लुटून फस्त करण्यात आला . [डिसेंबर १७०६ मध्ये विजापूरचा सुभेदार चिनाकिलीचखान याला औरंगजेबाने दरबारात हजर होण्याचा हुकूम दिला . तेव्हा नुस्रतजंग याने मिरजेहून कूच केले आणि विजापुरच्या सभोवारच्या प्रदेशाच्या संरक्षणाची व्यवस्था केली . या सुमाराला ताराबाईने बहिर्जी घोरपडे याला कैद करण्यासाठी धनाची जाधव याची रवानगी केली. घोरपड्याने कुरकल किल्ल्याचा आसरा घेतला . धनाजीने त्याची सर्व मालमत्ता आणि जनावरे काबीज करून किल्ल्याला वेढा दिला . यावर बहिर्जीने नुस्रतजंग याच्याकडे मदतीची मागणी केली आणि मदत मिळाल्यास बादशाही चाकरीत शिरण्याचे कबूल केले . या विनंतीनुसार नुस्रतजंग धनाजीवर हल्ला करण्यासाठी भीमा आणि रायचूरदोआब ओलांडून तुंगभद्रा नदीच्या किनाऱ्यावर आला . ही बातमी कळताच धनाजीने म्हैसूरकडे पळ काढला. अशा तऱ्हेने संकटातून मुक्तता झाल्यावर बहिर्जीने सिंदूरकडे कूच केले आणि नुस्रतजंग याच्याकडे येण्याचे टाळले . (**दिल.**, भाग २, १५८)]. (**दिल.**, भाग २, १५७)

(१६) औरंगजेबाचे अखेरचे दिवस

कामबक्षला ठार करण्याचा आजमचा कट

अशा तऱ्हेने बादशहाच्या फौजांभोवती संकटांची परंपरा दाटून येत असताना , त्याच्या छावणीतील अंतस्थ भानगडींनी अनिष्टसूचक असे स्वरूप धारण केले . महमदआजम याची महत्त्वाकांक्षा आणि त्याच्या अंगी असलेला अमर्याद गर्विष्ठपणा यांनी बादशहानंतर त्याच्या आपल्यालाच राज्य मिळावे या अभिलाषेत भर घातली. ही इच्छा तडीस जावी यासाठी त्याच्याआड येणाऱ्या सर्व प्रतिस्पर्ध्यांची वाट लावण्याची देखील त्याची तयारी झालेली होती . म्हणून त्याने शहाआलमचा कर्तबगार मुलगा अजीमउश्शान याच्याविषयी बादशहाच्या मनात काळेबेरे भरवून दिले , इतकेच नव्हे तर त्याने त्याची पाटण्याच्या सुभेदारीच्या अधिकारावरून परत बोलावणी करण्यात येईल अशी तजवीज केली . त्याचप्रमाणे त्याने मुख्य वजीर असदखान आणि इतर उमराव यांना आपल्या बाजूला वळवून घेतले . नंतर तो कामबक्ष याच्यावर एकाएकी हल्ला करून त्याला ठार मारण्याच्या संधीची वाट बघू लागला . दिवसेंदिवस आजमची कामबक्षाविरुद्ध

शत्रूत्व निदर्शक जी कारस्थाने होत होती त्यांचे स्वरूप अगदी उघडउघड असे दिसू लागले . या कारणास्तव बादशहाने अतिशय शूर आणि विश्वासू अशा सुलतान हुसेन ऊर्फ मिरमलंग याची कामबक्षाच्या फौजेचा पगार वाटणारा अधिकारी म्हणून नेमणूक केली . त्याचप्रमाणे कामबक्ष याचे संरक्षण करण्याची जबाबदारीही त्याने त्याच्यावर टाकली.

औरंगजेबाने आपल्या मुलांची दूरवर केलेली पाठवणी

हल्ली बादशहाला ग्लानी आणि प्रकृती नादुरुस्त होणे हे नित्याचेच झाले होते . १७०७ च्या फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीला पुन्हा एकदा याच प्रकाराची पुनरावृत्ती झाली. तात्पुरते का होईना त्याला यातून बरे वाटले. त्याने नेहमीप्रमाणे दरबार भरविण्यास आणि राज्यकारभार पाहण्यास सुरुवात केली . परंतु या वेळी मात्र त्याला असे कळून चुकले की आता आपली अखेर काही फार काळ दूर टाकता येणार नाही . त्याला असे दिसून आले की छावणीमधील शांतता आणि तेथे जमलेल्या असंख्यात लोकांची सुरक्षितता यांना आजमच्या दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या उतावळ्या स्वभावापासून आणि त्याच्या जबरी महत्त्वाकांक्षेपासून भयंकर धोका आहे . कारण कोणत्याही दिवशी या गोष्टीचा भडका उडेल याचा नेम नाही . म्हणून त्याने कामबक्ष याची विजापूरचा सुभेदार म्हणून नेमणूक केली , आणि मोठी फौज बरोबर देऊन ९ फेब्रुवारी रोजी त्याने त्याला त्याच्या सुभेदारीवर रवाना केले . त्यानंतर चारच दिवसांनी (१३ फेब्रुवारी) महमद आजम याला माळव्याच्या सुभेदारीवर पाठविण्यात आले . आजम हा स्वभावाने अतिशय कपटी होता . आपल्या बापाचा मृत्यू नजीक आला आहे हे त्याने ओळखले होते आणि म्हणून अतिशय सावकाश कूच करीत दर दिवसाआड मुक्काम करत तो माळव्याकडे निघाला.

त्याच्याजवळ असलेल्या त्याच्या मुलांपैकी शेवटच्याला आपल्या जवळून दूर पाठविल्यानंतर चार दिवसांनी त्या वृद्ध आणि जराजर्जर झालेल्या बादशहाला भयंकर तापाने घेरले . परंतु तीन दिवसांपर्यंत अतिशय हेकेखोरपणे त्याने दरबारामध्ये येण्याचा आग्रह धरला . त्याचप्रमाणे सबंध दिवसातून पाच वेळा प्रार्थनेसाठी जमलेल्या समूहाबरोबर नमाज पढण्याचा त्याने हट्ट घेतला आणि तो पुरा केला . या दिवसामध्ये तो पुष्कळदा भविष्यसूचक अशा पुढील कवितांचे पठन करी—

एका निमिषात, एका क्षणांत, एका निश्वासांत
या साऱ्या जगाच्या स्थितीत बदल पडतो.

त्याच्या जीवनातल्या या शेवटच्या कालखंडात त्याने आपले मुलगे आजम आणि कामबक्ष यांना दोन अतिशय हृदयद्रावक अशी पत्रे लिहिली . (पत्रातील मजकूरासाठी पुढील पुरवणी पाहा .) त्यांनी आपापसामध्ये बंधुभाव , शांतता आणि संयम यांनी भरलेले स्नेहपूर्ण वातावरण निर्माण करावे अशी त्याने त्यांची विनवणी या पत्रान्वये केली . त्याचप्रमाणे जगातल्या साऱ्या ऐहिक गोष्टींचा पोकळ डौल त्याने वरील पत्रात त्यांना उघड करून दाखविला.

२० फेब्रुवारी १७०७ रोजी (तो दिवस शुक्रवारचा होता .) सकाळी औरंगजेब हा आपल्या शय्यागृहातून बाहेर आला . त्याने नित्याप्रमाणे आपली सकाळची प्रार्थना म्हटली . नंतर त्याने माळेचा जप करण्यास सुरुवात केली आणि तोंडाने इस्लाम धर्माचे सारसर्वस्व ज्यामध्ये साठविलेले आहे ते कुराणातील कवन म्हणजे परमेश्वर हा एकरूपच आहे आणि महमद हा त्याचा प्रेषित आहे हे म्हणण्यास सुरुवात केली .

हळूहळू त्याची शुद्धबुद्ध हरपू लागली . त्याला श्वास घेणे जड जाऊ लागले , परंतु औरंगजेबाच्या अजिंक्य अशा आत्मतेजाचे त्याच्या शरीराच्या नैसर्गिक दुर्बलतेवर इतके असामान्य प्रभुत्व होते की जवळजवळ आठ वाजेपर्यंत त्याच्या हाताची बोटे माळेच्या मण्यावर फिरत होती आणि त्याच्या ओठांतून कालिमाचा जयघोष तुटकपणे का होईना बाहेर पडत होता . आठ वाजल्यानंतर औरंगजेबाचे प्राण त्याच्या देहाला सोडून गेले . मुसलमान धर्माप्रमाणे शुक्रवारचा दिवस हा विश्रांतीचा दिवस असतो . त्या दिवशी आपल्याला मृत्यू यावा अशी त्याची फार दिवसापासूनची इच्छा होती . आपल्या एका निष्ठावान सेवकाची ही मागणी त्या दयाळू परमेश्वराने प्रसन्न मनाने देऊन टाकली. (**एम. ए.**, ५२१; **के. के** भाग २, ५४९)

औरंगजेबाचे दफन

तारीख २२ रोजी महमद आजम हा छावणीत दाखल झाला . आपल्या बापाच्या मृत्युबद्दलचा दुखवटा पाळून आणि आपली बहीण जिनतउन्नीसा बेगम हिचे सांत्वन केल्यावर त्याने औरंगजेबाचा मृत देह वाहून नेणाऱ्या मिरवणुकीबरोबर काही काळ भाग घेतला . त्यानंतर त्याने आपल्या बापाचा मृत देह दौलताबादजवळ असलेल्या खुलदाबाद येथे सुप्रसिद्ध अवलिया शेख जैनुद्दीन याच्या कबरस्थानाशेजारी मुद्दाम तयार करण्यात आलेल्या बंदिस्त अशा जागी दफन करण्यासाठी रवाना केला.

एकाचा अपवाद सोडल्यास अतिशय असामान्य अशा मोगल सम्राटामध्ये जो विलक्षण असामान्य होता त्या औरंगजेबाच्या कबरीचे आता जे अवशेष शिल्लक राहिलेले आहेत ते म्हणजे एक अगदी साधी ठेंगणी अशी कबर. या कबरीला खालच्या बाजूला संगमरवरी पृष्ठभागही नाही किंवा कबरीवर घुमट देखील नाही. जे काही आहे ते म्हणजे त्या कबरीला आच्छादून टाकणारी जी शिला आहे , त्या शिलेमध्ये असलेल्या हिरव्यागार अशा वनस्पतीची वाढ व्हावी यासाठी मातीने भरलेले असे एक कुंड . या कबरीचे हे स्वरूप पाहिल्यानंतर ही कबर म्हणजे दिल्लीच्या बाहेर असलेल्या औरंगजेबाच्या बहिणीची म्हणजे जहानआराबेगमची जी कबर आहे तिचीच ही नक्कल आहे असे वाटते.

पुरवणी

औरंगजेबाचे आजमला अखेरचे पत्र
“परमेश्वर तुझे संरक्षण करो.

“आता मला वार्धक्य आले आहे आणि माझ्या अंगातील दुर्बलता दिवसेंदिवस वाढत आहे . माझी सगळी गात्रे शिथिल झाली आहेत . मी या जगात एकटा आलो आणि या जगातून मी एकटाच निघून जात आहे. मी कोण आहे आणि मी जे काही केले आहे ते माझे मलाच कळत नाही . माझ्या आयुष्यातले जे दिवस खडतर कष्टाशिवाय मी घालवले त्यांनी माझ्या मनात ज्या काही आठवणी ठेवल्या आहेत त्या फक्त विषादाच्या. माझ्या साऱ्या जीवनात मी माझ्या राज्यावर सच्चेपणाने राज्य केले नाही किंवा माझ्या राज्यात जे शेतकरी आहेत त्याची कधी प्रेमाने काळजी घेतली नाही.

“इतके अनमोल असलेले हे जीवन सारे सारे कसे व्यर्थ गेले आहे . तो विश्वाचा नियंता प्रत्यक्ष माझ्या घरामध्ये होता. परंतु त्याचे वैभव माझ्या धुंदीने काळ्या झालेल्या नजरेला दिसू शकले नाही . जीवन हे चिरकाल राहात नाही ; गेलेल्या दिवसाची नावनिशाणीदेखील आपल्याला आढळत नाही ; आणि

भविष्यकाळाकडे बघितले तर आशेचा एक किरणदेखील डोळ्याला दिसत नाही.

"माझ्या शरीरातला ताप निघून गेला आहे आणि आता जे काही राहिले ते म्हणजे निव्वळ कातडी आणि हाडामासाचा सांगाडा . विजापूरला गेलेला माझा मुलगा कामबक्ष माझ्याजवळ आहे . आणि तू तर त्याच्यापेक्षाही माझ्या अधिक जवळ आहेस . माझा प्रिय शहाआलम हा तर तुम्हा सर्वांहून अधिक दूर आहे . त्या थोर परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे माझा नातू महमद अजीम हा बंगालमधून हिंदुस्थान जवळ येऊन ठेपला आहे.

"त्या थोर परमेशापासून दूर जाण्याचे ठरविल्यापासून माझी स्थिती पाऱ्याप्रमाणे धास्तावून बिचकल्यागत झाली आहे आणि माझ्याप्रमाणेच माझ्या साऱ्या शिपाईगड्यांमध्ये असहायतेची , घबराटीची आणि संत्रस्ततेची भावना निर्माण झालेली आहे . आपल्या सर्वांचा तो रक्षणकर्ता देवाधिदेव आता आपल्यामध्ये आहे असे त्यांना बिलकुल वाटत नाही. या जगामध्ये येताना मी आपल्याबरोबर काहीही घेऊन आलो नाही पण येथून जाताना मात्र माझ्या पापाची फळे मी बरोबर घेऊन जात आहे . माझ्यावर कोणत्या शिक्षेची कुऱ्हाड कोसळणार आहे हे माझे मलाच कळत नाही . त्या परमेश्वराची कृपादृष्टी आणि दयाळूपणा याबद्दल मला जरी खूप मोठी आशा असली तरी देखील माझ्या हातून जी काही कृत्ये घडली त्यामुळे अस्वस्थता माझी पाठ सोडीत नाही . जेव्हा मी स्वतः माझ्यापासून दूर जात आहे तेव्हा माझे म्हणता येईल असे कोण बरे राहणार आहे? (कविता)

वाऱ्याची दिशा कोणतीही असो
माझे तारू मी आता पाण्यावर सोडणार

"जरी तो जगन्नियंता त्यानेच निर्माण केलेल्या प्राणिमात्राचे संरक्षण करील तरी देखील त्या बाह्य जगाच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास मला असे वाटते की त्या परमेश्वराची लेकरे आणि मुसलमान यांचा अन्याय्यपणे वध होणार नाही या गोष्टीकडे लक्ष देणे हे माझ्या मुलाचे कर्तव्य आहे."

"माझा नातू बहादूर (बेदारबख्त) याला माझे शेवटचे आशीर्वाद तू सांग . हे जग सोडून जाण्याची माझी वेळ झाली असताना माझ्या दृष्टीला तो दिसत नाही . त्याला भेटण्याची माझी इच्छा अजून अतृप्तच राहिली आहे. बेगमेला अतिशय दुःख झाले आहे हे मला दिसू शकते . परंतु परमेश्वराची सत्ता ही साऱ्यांच्या हृदयावर चालते. निराशेशिवाय अदूर दृष्टीला दुसरी अशी कोणती बरे फळे येणार.

"नमस्कार, आम्ही येतो! नमस्कार, आम्ही येतो! नमस्कार, आम्ही येतो!"
(**ब्रिटीश म्युझिअम ॲडिशनल** २६२४०)

औरंगजेबाचे कामबक्ष याला अखेरचे पत्र

माझ्या केवळ हृदयाच्याच जागी असलेल्या माझ्या मुला ! ज्या वेळी माझ्या हातामध्ये सत्ता होती तेव्हा मी परमेश्वरी इच्छेला शरण जा असा सल्ला दिला आणि मानवीशक्तीच्या पलीकडे माझ्या प्रयत्नांची पराकाष्ठा केली. परंतु परमेश्वराची इच्छा वेगळी होती आणि माझे कोणीही ऐकले नाही , आणि आता मी मृत्यूच्या मार्गावर आहे. त्यामुळे त्यातून चांगले निष्पन्न होणे आता कठीण आहे . माझ्या आयुष्यात मी ज्यांना

ज्यांना भोगावयाला लावले आणि मी जी पापे केली ती मी आता माझ्याबरोबर घेऊन जाणार आहे . या जगामध्ये येताना मी एकटा आलो आणि आता जाताना एवढा मोठा प्रचंड तांडा बरोबर घेऊन जात आहे . ही मोठी आश्वर्यजनक गोष्ट नाही का ? जेव्हा जेव्हा मी आजूबाजूला दृष्टी टाकतो तेव्हा माझ्या दृष्टिसमोर परमेश्वराव्यतिरिक्त या तांड्याचे मार्गदर्शन करणारी दुसरी व्यक्तीच येत नाही . मला आलेली मानसिक ग्लानी आणि अखेरीला माझे कोणते हाल होणार आहेत यासंबंधी मला वाटणारी भिती याचे कारण म्हणजे माझी फौज आणि माझ्या छावणीबरोबर असलेली इतर माणसे यांच्याबद्दल मला वाटणारी काळजी हेच आहे. जरी तो परमेश्वर त्यानेच निर्माण केलेल्या प्रजाजनांचे रक्षण करील याची मला खात्री असली तरीदेखील मुसलमान आणि माझे सर्व मुलगे यांचे ते एक जरूर कर्तव्य आहे ते मी समजतो . ज्या वेळी मी सामर्थ्यशाली होतो त्या वेळी त्या सर्वांचे संरक्षण करणे मला शक्य झाले नाही आणि आता तर माझी स्वतःची काळजी घेण्याची ताकद मला राहिली नाही. माझ्या सर्व गात्रांनी हालचाल करण्याचे आता नाकारले आहे. माझ्याकडून जो श्वास टाकला जातो तो पुन्हा परतून येईल की नाही याची मला खात्री वाटत नाही . माझ्या अशा परिस्थितीत एक प्रार्थना करण्यावाचून दुसरा कोणता मार्ग मला उरला आहे . तुझी आई उदयपुरी बेगम हिने माझ्या आजारपणात माझी शुश्रूषा केली . माझ्याबरोबर परलोकात येण्याची तिची इच्छा आहे . तुला आणि तुझ्या सर्व मुलाबाळांना मी त्या परमेश्वराच्या स्वाधीन करतो . माझे मन आता भितीने धास्तावून गेलेले आहे. मी आता तुझी शेवटची रजा घेतो...या नश्वर जगातील सारी माणसे एकजात लबाड असतात. (नमुना म्हणून ते गहू दाखवतील परंतु प्रत्यक्ष देताना मात्र तुमच्या पदरात ते जव टाकतील .) आपल्या इमानीपणाचा आधार घेऊन कोणतीही गोष्ट करण्याचे धाडस त्यांच्या हातून होणार नाही . कोणतेही काम करावयाचे झाल्यास ते केवळ इशाऱ्याने आणि संकेताने झाले पाहिजे . दाराशुको याने आपल्या परीने केलेली तजवीज ही सदोष होती आणि म्हणूनच त्याला त्याच्या ध्येयाप्रत पोहोचणे शक्य झाले नाही . त्याने आपल्या सेवकगणांचे पगार पूर्वी होते त्यापेक्षाही अधिक वाढविले परंतु ज्यावेळी त्याला गरज भासली त्यावेळी त्यांच्याकडून मिळणारी चाकरी ही मात्र कमीकमी होत गेली . म्हणूनच त्याला सुख कधीच मिळाले नाही. माझा असा सल्ला आहे की तुमचे अंथरूण पाहूनच तुम्ही आपले हातपाय पसरा.

"माझ्या मनात तुला जे काही सांगावयाचे होते ते आता सांगून झाले आहे आणि आता मी तुझी रजा घेतो. शेतकरी आणि इतर प्रजाजन यांचा निष्कारण नाश होणार नाही आणि मुसलमानांचा वध होणार नाही या गोष्टीकडे तू स्वतः जातीने लक्ष दे . असे न झाल्यास या अपराधाची शिक्षा भोगण्याची पाळी माझ्यावर येईल." (**इंडिया ऑफिसमधील हस्तलिखित** १३४४, **फोलिओ** २६ अ).

औरंगजेबाचे अखेरचे मृत्युपत्र.

(इंडिया ऑफिसच्या ग्रंथालयातील हस्तलिखित १३४४ , फोलिओ ४९ ब मधून हे मृत्युपत्र औरंगजेबाने स्वतःच्या हाताने लिहून आपल्या मृत्युशय्येवरील उशीच्या खाली ठेवलेले होते असे मानले जाते.)

"माझ्या साऱ्या जीवनात मी अगतिक होतो आणि अगतिक म्हणूनच या जगाचा मी निरोप घेत आहे. माझ्या मुलांपैकी ज्याच्या भाग्यामध्ये माझ्या साम्राज्याचा सम्राट होण्याचे असेल त्याने जर का कामबक्ष हा त्याला दिलेल्या विजापूर आणि हैद्राबाद या प्रांतांचे अधिपत्य आपल्याला मिळाले म्हणून समाधान मानण्यास तयार असेल तर त्याला नवीन सम्राटाने कोणताही उपद्रव देऊ नये . माझ्या मते असदखानासारखा वजीर नाही आणि यापुढे कधी होईल असेही मला वाटत नाही . दक्षिणेचा दिवाण

दियानतखान याची योग्यता इतर सर्व बादशाही नोकरांपेक्षा अधिक आहे असे मी समजतो . माझ्या हयातीत साम्राज्याची विभागणी करण्याची जी योजना मी आखली होती ती जर महमद आजम शहा याला मान्य असली तर खऱ्याखुऱ्या भक्तिभावाने त्यासाठी त्याची विनवणी करा . असे झाल्यास सैन्यामध्ये निष्कारण युद्धाची ठिणगी पडणार नाही आणि मानवजातीची होणारी कत्तल थांबेल . माझ्या पिढीजात नोकरांना बडतर्फ करू नका किंवा त्यांचा जाणूनबुजून छळ देखील करू नका . दिल्लीच्या सिंहासनावर जो कोणी येईल त्याच्याकडे आग्रा आणि दिल्ली या दोन सुभ्यांपैकी एकाचा ताबा जावा , आणि जो कोणी या दोहोंपैकी पहिल्या सुभ्याचा ताबा घेण्याचे कबूल करील त्याच्याकडे जुन्या साम्राज्यातले आग्रा , माळवा, गुजरात आणि अजमीर हे सुभे आणि या सुभ्यांच्या अंतर्गत असलेले चकला व त्याचप्रमाणे दक्षिणचे चार सुभे म्हणजे खानदेश, वऱ्हाड, औरंगाबाद आणि बिदर व त्या सुभ्यातील बंदरे या सर्वांचा ताबा जाईल आणि जो कोणी दुसऱ्या सुभ्यांचा म्हणजे दिल्लीचा ताबा घेण्यास मान्यता देईल त्याच्याकडे दिल्ली , पंजाब, काबूल, मुलतान, तट्टा, काश्मीर, बंगाल, ओरिसा, बिहार, अलाहाबाद आणि औध या जुन्या साम्राज्यातील अकरा सुभ्यांचे सरकार जाईल." (फ्रेजरच्या **नादिरशहा** या ग्रंथात, पाने ३६—३७ याबद्दलचे दुसरे अर्थबोधन दिलेले आहे . याबाबत आयर्विनच्या **लेटर मोगलस्** खंड १ पान ६ मधील मजकूर पाहा.)

औरंगजेबाचे तथाकथित असे दुसरे एक मृत्युपत्र **अहकाम-इ आलमगिरी** या ग्रंथात आढळते . या ग्रंथाचा कर्ता हमीदउद्दीनखान बहादूर आहे असे मानले जाते . (मूळ मजकूरातील भाग ८ आणि भाषांतर मी प्रसिद्ध केलेले आहे) हे मृत्युपत्र पुढे दिल्याप्रमाणे आहे.

"त्या परमेश्वराची धन्य असो . त्या परमेश्वराचे जे सेवक पापमुक्त झालेले आहेत आणि ज्यांनी त्याची चाकरी करून त्याला संतुष्ट केले आहे, त्या सर्वांचे मी अभिष्ट चिंतितो.

माझ्या अखेरच्या मृत्युपत्रान्वये आणि संकल्पान्वये मला काही बोधपर सूचना द्यावयाच्या आहेत : पहिली,— अन्यायाच्या खोल गर्तेत रुतलेला असा जो मी त्या माझ्या वतीने हसनच्या (परमेश्वर त्याला शांती देवो) पवित्र कबरीवर कापडाचे आच्छादन टाका . कारण पापाच्या खोल कर्दमात बुडालेल्या ज्या व्यक्ती आहेत त्यांना त्या दया आणि क्षमा यांचा जणू काही सागरच असलेल्या त्या परमेश्वराकडे आधार घेण्यावाचून स्वतःचे संरक्षण करण्याचा दुसरा कोणता मार्ग आहे . मी सांगितलेले हे पवित्र कार्य सिद्धीस नेण्याची सर्व साधने माझा उमद्या स्वभावाचा मुलगा राजपुत्र अलीजा (आजम) याच्याजवळ आहेत ; ती त्याच्या जवळून घ्या.

दुसरी,— मी विणलेल्या टोप्यांच्या किमतीपैकी चार रुपये आणि दोन आणे हे **महालदार** आश्याबेग याच्याजवळ आहेत. त्याच्या जवळून ही रक्कम घेऊन तिचा उपयोग या असहाय अशा दुबळ्या जिवाच्या कफनासाठी खर्च करा. कुराणाची मी जी नक्कल केली आहे त्याचा मेहेनताना म्हणून मिळालेले ३०५ रुपये हे माझ्या पिशवीत आहेत. ते माझ्यासाठी वैयक्तिक रक्कम म्हणून खर्च करावेत. माझे ज्या दिवशी देहावसान होईल त्या दिवशी फकिरांना ते वाटून टाकावेत . कुराणाची नक्कल केल्यामुळे जे द्रव्य मिळते ते शिया पंथी लोक आदराच्या भावनेतून बघत असल्यामुळे ती रक्कम माझे कफन आणि इतर जरुरीच्या गोष्टी यांवर खर्च करू नये.

तिसरी,— वरील गोष्टीशिवाय उरलेल्या ज्या काही जरुरीच्या गोष्टी लागतील त्या राजपुत्र अलीजा याच्या प्रतिनिधीकडून घ्या . कारण माझ्या मुलामध्ये तोच सर्वांत जवळचा वारस आहे आणि माझ्या

दफनाच्या वेळी जे काही योग्य अथवा अयोग्य मृत्युसंस्कार करावयाचे असतील त्याची सर्व जबाबदारी त्याच्यावरच आहे. ते जे काही संस्कार केले जातील त्याचा बरे वाईटपणा माझ्यावर नाही . कारण मेलेली माणसे ही जिवंत माणसाच्या लहरीवरच अवलंबून असतात.

चौथी,— मी मृत झाल्यानंतर माझे दफन उघड्या मस्तकाने करा . कारण पापाने नाश पावलेल्या प्रत्येक व्यक्तीला जर का त्या परमेश्वरासमोर उघड्या मस्तकाने नेले तर ती व्यक्ती त्याच्या दयेला पात्र ठरते.

पाचवी,— माझ्या तिरडीवरील शवपेटिका गाजी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पांढऱ्या शुभ्र अशा खरखरीत कापडाने झाकून टाका . त्याचप्रमाणे शवपेटिकेवर छत उभारणे , त्याचप्रमाणे शवपेटिकेची मिरवणूक वाजतगाजत नेणे आणि मौलूद नावाचा पैगंबरच्या जन्मासंबंधीचा जो समारंभ आहे तो विधिपूर्वक पाळणे वगैरे प्रकार करण्याचे टाळा.

सहावी,— माझ्यानंतर जो कोणी गादीवर येईल त्याचे आद्य कर्तव्य म्हणजे दक्षिणेच्या रानावनात आणि दऱ्याखोऱ्यात या पापी औरंगजेबाबरोबर भटकतभटकत दिवस घालविलेले परंतु आता ज्यांची स्थिती अनुकंपनीय झालेली आहे त्या माझ्या सेवकांना दयाळूपणे वागवणे असे मी मानतो . त्यांच्या हातून जरी उघडपणे दिसणारा एखादा अपराध झालेला दिसला तरी त्या अपराधाची परतफेड उदात्तपणे त्यांना क्षमा करून आणि त्या अपराध्यांकडे मोठ्या मनाने दुर्लक्ष करून करावी अशी माझी त्याला विनंती आहे.

सातवी,— कारकून म्हणून (मुत्सद्दी) काम करण्यास पर्शियन लोकांवाचून अधिक चांगले असे लोक नाहीत. त्याचप्रमाणे लढाईमध्ये देखील हुमायून बादशहाच्या काळापासून आणि हल्लीच्या काळात देखील त्यांच्यापैकी कोणीही रणांगणाला पाठ दाखवून परत फिरला नाही किंवा घट्ट रोवलेले त्याचे पाय हे कधी भितीने थरथरले नाहीत. त्याचप्रमाणे आपल्या धन्याची अवज्ञा करणे किंवा त्याचा विश्वासघात करणे अशा तऱ्हेच्या पापाचे धनी ते एकदाही झालेले नाहीत . परंतु आपल्याला अधिक सन्मानाने वागवावे असा आग्रह जेव्हा ते धरतात तेव्हा त्यांच्याजवळ मिळतेजुळते घेण्याचे काम हे अतिशय कठीण होऊन जाते . काहीही करून तुला त्याच्याबरोबर सलोखा राखणे जरूर आहे आणि त्यासाठी जरूर तर युक्त्या प्रयुक्त्यांचा अवलंब करणे तुला प्राप्त आहे.

आठवी,— तुराणी जमातीचे लोक हे शिपाई पेशाचे आहेत. शत्रूवर चाल करून जाणे, हल्ला करणे, रात्रीचा घाला घालणे आणि शत्रूला कैद करणे या कामामध्ये ते अतिशय तरबेज आहेत. घनघोर युद्ध चालू असतानादेखील त्यांना माघार घेण्याची आज्ञा केली तर त्यांच्या मनात संशय येत नाही , ते निराश होत नाहीत किंवा त्यांना त्याबद्दल मानखंडनाही वाटत नाही ; दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास याचा अर्थ "ज्यावेळी बाण पाठीमागे खेचला जातो तेव्हा ;" त्याचप्रमाणे हिंदुस्थानी लोकामध्ये अंगात मुरलेला जो मूर्खपणा भरला आहे त्यापासून ते शेकडो योजने मागे आहेत . कारण हे हिंदुस्थानी लोक म्हणजे लढाई चालली असताना आपले मस्तक देतील परंतु आपली जागा कधी सोडणार नाहीत . यासाठी म्हणून या जमातीच्या लोकांवर तू सर्व प्रकारे मानसन्मानाची खैरखैरात कर . कारण असे अनेक प्रसंग येतील की ज्यावेळी इतर कोणत्याही जमातीचे लोक तुझ्या उपयोगी पडणार नाहीत तेव्हा हेच लोक तुझी जरूर ती चाकरी करतील.

अनुक्रमणिका

नववी,— बारहाचे सय्यद हे आशिर्वादाला पात्र आहेत. त्यांची तू कुराणातल्या वचनाप्रमाणे म्हणजे, "पैगंबराचे जे जवळचे नातेवाईक आहेत त्यांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे वागवा," संभावना कर. त्यांचा सन्मान करण्यात आणि त्यांच्यावर लोभ दाखविण्यात तू आपले पाऊल केव्हाही मागे घेऊ नको कारण कुराणातल्या उक्तिप्रमाणे म्हणजे "माझे तुम्हाला असे सांगणे आहे की माझे जे बांधव आहेत त्यांच्यावर तुम्ही प्रेम करा . याच्याशिवाय तुम्ही आणखी दुसऱ्या कोणत्याही पद्धतीने माझी परतफेड करावी असे मी म्हणणार नाही." कारण सय्यदांच्या कुटुंबावर प्रेम करणे म्हणजे पैगंबराचा भक्तिभाव करण्यासारखे आहे . त्यांच्याबद्दल आदरभाव दाखविण्यात तुमच्याकडून कोणत्याही तऱ्हेची कमतरता होता कामा नये . तुमच्या ह्या वागणुकीचे फल तुम्हाला इहलोकात आणि परलोकात देखील मिळेल . तरी देखील बारहाच्या सय्यदांबरोबरील वागणुकीत तुम्ही अतिशय जागृत राहा . तुमच्या मनामध्ये त्यांच्याबद्दलच्या प्रेमात कधीही कमीपणा येऊ देऊ नका . परंतु बाह्य वागणुकीत मात्र त्यांच्या अधिकारात वाढ करू नका . कारण राज्यकारभारात तुमचा भागीदार हा जर खंबीर असला तर लौकरच त्याला राज्यात स्वतःसाठी काहीतरी बळकावून घेण्याची इच्छा होते . तुम्ही राज्यकारभाराची सूत्रे थोडी देखील त्याना त्यांच्या हातात घेऊ दिलीत तरी त्याचा अखेर परिणाम तुमच्या स्वतःच्या मानहानीत होईल.

दहावी,— शक्यतोवर देशाच्या राज्यकर्त्याने आपल्या राज्यात दूरवर हिंडल्यावाचून राहू नये . एका जागी राहण्याचे त्याने टाळावे . कदाचित एका ठिकाणी राहिल्यामुळे त्याला वर वर आपल्याला स्वास्थ्य मिळत आहे असे वाटेल परंतु प्रत्यक्षात मात्र त्याचा परिणाम त्याच्यावर हजारो संकटे आणि बलामती कोसळण्यात होईल.

अकरावी,— तुमच्या मुलांवर कधीही विश्वास टाकू नका किंवा तुमच्या हयातीत त्यांना कधीही जवळकीच्या नात्याने वागणूक देऊ नका. त्याचे कारण असे की जर का शहाजहान बादशहाने दाराशुकोला अशा तऱ्हेने वागविले नसते तर त्याच्या आयुष्याचा शेवट इतका दुःखदायक कधीच झाला नसता. "राजाचा शब्द हा वंद्य असतो" ही उक्ती नेहमी डोळ्यासमोर ठेवून वागा.

बारावी,— राज्याचे जे प्रमुख आधारस्तंभ असतात त्यांना राज्यामधील बातम्यांची नेहमी खडानखडा माहिती पाहिजे . एका क्षणाचा दाखविलेला निष्काळजीपणा हा वर्षानुवर्षे सहन कराव्या लागणाऱ्या मानहानीला कारणीभूत ठरतो . तो दुष्ट शिवा हा माझ्या निष्काळजीपणामुळे पळून गेला . परिणामी मला माझ्या आयुष्याच्या अंतापर्यंत मराठ्यांविरुद्ध खडतर असा लढा द्यावा लागला.

बारा हा आकडा आकड्यांमध्ये शुभसूचक आहे . मी माझ्या सूचनांची समाप्ती बारा उपदेश देऊन केलेली आहे. (कवन) यामधून तू जर धडा शिकलास तर तुझ्या चातुर्याची वाहवा होईल . परंतु यामधून शिकवण घेण्यास तू जर निष्काळजीपणा दाखविलास तर मात्र तुझ्यावर अरेरे ! वाईट झाले ! असे म्हणण्याची पाळी येईल. [मासिरी आलमगिरीच्या ग्रंथकर्त्याने औरंगजेबाचे जे वर्णन केले आहे ते पुढीलप्रमाणे :—

बादशहाचा जात्या स्वभावच असा की, तो प्रत्येक धार्मिक कर्तव्याचे अत्यंत कसोशीने पालन करी. तो इस्लाम धर्मातील सुन्नी जमातीच्या **हनफी** (इमाम अबु हनीफ या प्रसिद्ध धर्मशास्त्रज्ञाच्या शिकवणीच्या) पंथाचा अनुयायी होता . इस्लाम धर्माची पाच महान तत्त्वे **नमाज**, **रोजा** (उपवास), **जकवा** (दानधर्म), **हज** (मक्केची यात्रा) आणि **तिलावते कुराण** म्हणजे कुराण पठण ही आहेत . त्याचे कसोशीने पालन व्हावे आणि त्यांचा प्रसार व्हावा याकरिता त्याने शक्य तितके परिश्रम केले . तो सदा परमेश्वराच्या नामस्मरणात, कुराण पठणात आणि इतर प्रकारच्या प्रार्थनांत निमग्न राहात असे . तो नेहमी **बावजू** (शुचिर्भूत) राहात असे . धर्मशास्त्राप्रमाणे रोज जितके नमाज पढणे आवश्यक ते तो मशिदीत किंवा मशिदीबाहेर, जमातीने (सांघिक) पढत असे. प्रत्येक धर्मविधी तो अत्यंत विनम्रभावाने पार पाडी . प्रत्येक महिन्याच्या तेरा , चौदा आणि पंधरा तारखेस (प्रतिपदेच्या चंद्रापासून) तो कडक उपवास करी . त्याचप्रमाणे प्रत्येक आठवड्यात सोमवार , गुरुवार आणि शुक्रवार या दिवशी पण तो उपवास करी. शुक्रवारची नमाज तो जुम्मा मशिदीत जमातीबरोबर पढत असे.

अनुक्रमणिका

महत्त्वाच्या सणाच्या रात्री तो जाग्रणात घालवी . परमेश्वरकृपेने त्याने धर्म आणि राज्य यांच्या ज्योती खूप प्रकाशमय केल्या . त्याला धर्मसंशोधनाची अतिशय आवड होती . यामुळे तो रात्रीच्या वेळी आपल्या शाही मशिदीच्या इमारतीत धर्मशास्त्रज्ञ आणि परमेश्वर भक्त यांजबरोबर धर्मावर चर्चा करीत असे . एकांतात असताना तो कधी **मसनदीवर** बसत नसे . राज्यावर येण्यापूर्वी तो आपल्या उत्पन्नाचा शेकडा अडीच भाग धर्मशास्त्राने घालून दिलेल्या नियमाप्रमाणे **जकवा** (दानधर्म) म्हणून देई. त्यात कोणत्याही नियमांची टाळाटाळ होत नसे. गादीवर आल्यानंतर त्याने जकवाच्या खर्चात भर घातली . त्याच्या खासगी खर्चाकरिता दिल्ली जवळची काही खेडी व दोन तीन समृद्ध महालही लावून देण्यात आली होती . त्या उत्पन्नाचा जकवाही तो नियमाप्रमाणे देत असे. आपली मुले पण **जकवा** देतात किंवा नाहीत याची तो खात्री करून घेत असे.

रमजानच्या पुण्यमासात तो **रोजे** (उपवास) ठेवी, आणि मध्यरात्रीपर्यंत तो **नमाज** आणि जपजाप्य यात निमग्न राही . या काळात तो धर्मनिष्ठांच्या बरोबर कुराणाचे पठण करी. हा प्रकार त्याच्या आयुष्याच्या शेवटपर्यंत चालू होता . **मुहरम** महिन्याचा दहावा दिवस तो मशिदीत राहून सारखी प्रार्थना करण्यात घालवी.

आपल्याला मक्केची यात्रा घडावी याची त्याला अतिशय तळमळ होती . पण अनेक कारणांनी ती इच्छा फलद्रूप होऊ शकली नाही . तरी त्याचे प्रायश्चित म्हणून मक्केला जाणाऱ्या यात्रेकरूंवर त्याने इतका पैसा खर्च केला की , त्याला स्वतः यात्रा केल्याचे पुण्य लाभले असे म्हणता येईल . आपल्या कारकिर्दीत काही काळपर्यंत दरवर्षी आणि नंतर दोन -तीन वर्षांतून एकदा , मक्का व मदिना या शहरांतून राहणाऱ्या साधुसंतांना तो भल्यामोठ्या रक्कमा पाठवीत असे . त्याने रोजमुरा देऊन अनेक माणसे मक्का व मदिना येथे ठेवली होती . त्यांची कामे म्हणजे नेमाने काब्याची प्रदक्षिणा करणे, पैगंबराच्या समाधीचे दर्शन घेणे , जपजाप्य करणे ही होती. बादशहाने स्वतः आपल्या हाताने कुराणाच्या दोन प्रती लिहून काढल्या होत्या. त्या मदिना येथे पैगंबराच्या समाधीला अर्पण करण्यात आल्या होत्या. त्या प्रतीच्या पठणाचे कामही बादशहाने नेमलेल्या माणसांकडे असे.

विद्वान नीतिमान् अशा आदर्श मनुष्यात जे गुण आवश्यक आहेत हे सर्व या दैवी संपदेनेयुक्त असलेल्या बादशहात एकवटलेले होते . समजू लागण्याच्या वयापासून बादशहाने धर्मविहित गोष्टी कोणत्या आणि निषिद्ध कोणत्या याची पूर्ण माहिती करून घेतली होती . त्याचा इंद्रियनिग्रह दांडगा होता . धर्माने परवानगी दिलेल्या सुखाचाच तो उपभोग घेई . आपल्या विवाहित स्त्रियांना सोडून त्याने इतर (धर्माने निषिद्ध) स्त्रियांशी कधीही व्यवहार केला नाही . अनेक पट्टीचे गवई आणि संगीत -वाद्ये वाजविणारे कुशल कलावंत त्याच्या दरबारात होते . आपल्या कारकिर्दीच्या सुरुवातीस तो मधूनमधून गाणेबजावणे ऐकत असे . तो संगीताचा उत्तम तज्ज्ञ होता . पण निषिद्ध गोष्टी नकोत म्हणून त्याने पुढेपुढे संगीत ऐकणे अजिबात सोडून दिले.

गवई, वाद्यवादक आणि इतर कलावंत यांपैकी ज्यांनी ज्यांनी म्हणून पश्चात्ताप पावून आपले धंदे सोडून दिले त्यांना बादशहाने इनाम - जमिनी, रोजमुरे वगैरे देऊन संतुष्ट केले.

मिर्जा मुकर्रमखान सफवी हा संगीताचा मोठा तज्ज्ञ होता . त्याने एकदा बादशाहाला विचारले , "**शुरुद** (संगीत) यासंबंधी आपले काय मत आहे?"

यावर बादशाहा म्हणाला, "धर्मशास्त्राप्रमाणे संगीत '**मुबाह**' आहे."

यावर मुकर्रमखानाने विचारले , "मग संगीताला **मजामीरची** (तबला, पखवाज, तंबोरा, बासरी इत्यादी वाद्ये) जोड हवी. त्याशिवाय, विशेषतः पखवाजाच्या साथीशिवाय मला संगीत ऐकावेसे वाटत नाही . पण वाद्ये ही धर्मशास्त्रात निषिद्ध आहेत म्हणून मी संगीतच ऐकणे सोडून दिले."

धर्माने निषिद्ध मानलेली वस्त्रे बादशाहा कधीच वापरीत नसे (उदाहरणार्थ- निवळ रेशमाची वस्त्रे). त्याने सोन्या -चांदीची पात्रे कधीच वापरली नाहीत. त्याच्या बैठकीत चहाडी , चुगली, हेवेदावे इत्यादींनीयुक्त असलेले अशिष्ट अगर अभद्र शब्द कधीच उच्चारले जात नसत . फार काय, दरबारी लोकांना सक्त ताकीद होती की, बोलताना अगर वाचताना एखादा अशिष्ट शब्द आला तर त्याऐवजी चांगल्या शब्दाचा वापर करावा.

बादशहाच्या दरबारात कुणाही दाद मागणाऱ्यांना मज्जाव नसे . दिवसातून दोन-तीन वेळा तो न्यायालयात उभा राहून न्यायदान करीत असे. दाद मागणारे हजर होत . त्यांची गाऱ्हाणी तो मोकळेपणाने ऐके . आपली गाऱ्हाणी मांडण्यात ते अतिशयोक्ती करीत . कधी ते वाद घालीत किंवा तावातावाने बोलत. कधी कधी त्यांची वागणूक विचित्र होई . पण यामुळे तो कधीही रागावत नसे . त्याच्या कपाळाला आठ्या पडलेल्या कुणी पाहिल्या नाहीत. फिर्यादीच्या उद्धटपणाला आळा घालावा अशी दरबारी लोकांनी पुष्कळदा विनंती केली . पण बादशहा म्हणे, अशी गाऱ्हाणी ऐकून संयमाची सवय लागते."

ज्यात सार्वजनिक कल्याण नाही अशी एकही गोष्ट बादशहाच्या हातून घडली नाही . दिल्लीच्या परिसरातून वेश्यांची हकालपट्टी करण्यात आली. अशा प्रकारच्या आज्ञा प्रांताप्रांतांतून लागू करण्यात आल्या . सार्वजनिक नीतिमत्तेवर देखरेख ठेवण्याचे (**इहतिसाब**, अधिकारी **मुहतसिब**) काम त्याचे अधिकारी मोठ्या कसोशीने करीत.

एवढे मोठे साम्राज्य पण बादशहाने कोणतीही शिक्षा करावयाची ती तो **शारियतला** (इस्लामी धर्मशास्त्र) अनुसरूनच करीत असे. केवळ क्रोधाला बळी पडून किंवा संयम सोडून त्याने कुणाचाही वध करण्याची आज्ञा केली नाही . आणि असे करण्याची त्याच्या अधिकाऱ्यांपैकी कुणालाही

अनुक्रमणिका

हिंमत झाली नाही.

बादशहा हा गुणग्राहक होता . तो सय्यद , शेख, धर्मपंडित, विद्वान् यांचा आदर करी . बादशहाच्या निष्ठापूर्ण प्रयत्नाने इस्लामला या देशात विलक्षण बळ प्राप्त झाले आहे जे यापूर्वी कोणत्याही बादशहाच्या कारकिर्दीत झाले नव्हते.

बादशहाने आपल्या लेखणीच्या एका फटकाऱ्याने हिंदु-कारकुनांना आणि कारभाऱ्यांना बडतर्फ केले. **(व हुनूदे अहले कलम यक कमल अज अमल माजूला गश्ता बंदूद .)** काफरांची सर्व प्रचंड देवळे आणि मंदिरे पाडून टाकण्यात आली अगर निकामी करण्यात आली **(व जमी माबिदे कुफफार व बुतकदहाई अजीम आं अशरार मुनहदम व मुन्दरस गश्ता).** अदूर दृष्टीच्या लोकांना हे अवघड काम (देवळे उद्ध्वस्त करणे) कसे पार पडेल असे वाटत होते. पण बादशहाने ते काम करून दाखविल्याने लोक आश्चर्यचकित झाले . **(अक्ले जाहर बीनान अज पैशरक्ते चुनीकारे दुश्वार मतहय्यर बूद.)**

देवळांच्या जागी भव्य मशिदी बांधण्यात आल्या . मुसलमान होण्यासाठी अनेक काफर बादशहाकडे येत , त्यांना बादशहा स्वतः इस्लाम धर्माची दीक्षा देत असे आणि त्यांना खिलतीची वस्त्रे आणि इतर वस्तू देऊन त्यांना सफल करी.

आपल्या कारकिर्दीच्या मध्यात त्याने धर्मशास्त्रास अनुसरून हिंदूंच्यांवर **जिझिया** कर बसविण्याचे ठरविले. त्याप्रमाणे हा कर साम्राज्यात लागू झाला. ही अत्युत्तम गोष्ट या पूर्वी हिदुस्थानात कधीच घडली नव्हती . बादशहाच्या काळात हिंदूंची जितकी विटंबना झाली तितकी या पूर्वी कधीच झाली नाही. **(व हुनूद बई हद मुहान न बुदा अंद).** दानधर्म, पवित्र कामे यांवर आणि लोकांना रोजीने वगैरे देण्याच्या कामावर जितका खर्च बादशहाच्या काळात झाला त्याच्या एकदशांश सुद्धा पूर्वीच्या बादशहाच्या काळांत झाला नाही . **रमजान** महिन्यात तो साठहजार रुपये आणि इतर महिन्यांत त्यापेक्षा कमी असा तो दानधर्म करी. अनाथ अपंगासाठी त्याने **(बलगुरखाना)** दिल्लीत आणि राज्यातील इतर ठिकाणी अन्नछत्रे उघडली. प्रवाशांकरिता जेथे सराया आणि धर्मशाळा नव्हत्या तेथे त्याने त्या उभ्या केल्या . राज्यातील मशिदीची दुरुस्ती सरकारी खर्चाने करण्यात येई आणि मशिदीचे **इमाम** (नमाज पठविणारा), **मोझ्झन** (प्रार्थनेची हाक देणारा) आणि **खतीब** (प्रार्थनेनंतर प्रवचन करणारा) यांच्या नेमणुका सरकारी खर्चाने करण्यात येत. यावर अगणित पैसा खर्च होत असे . राज्याच्या सर्व शहरांतून आणि इतर भागांतून त्याने मौलवी , विद्वान् इत्यादींना आणि त्यांनी चालविलेल्या शाळांना वृत्ती, इनामे आणि वेतने चालू केली. विद्यार्थ्यांना योग्य अशा शिष्यवृत्त्या देण्यात येऊन त्यांच्या पोटापाण्याची सोय करण्यात आली.

हनफी सुन्नी पंथाप्रमाणे लोकांनी आचरण करावे अशी बादशहाची इच्छा होती . या पंथातील व्यवहार , धर्मशास्त्रासंबंधीचे न्यायनिवाडे आणि धर्मशास्त्रज्ञांनी व्यक्त केलेली मते **फिका** म्हणजे धर्मग्रंथ यातून आढळतात . पण त्यातून परस्परविरोधी निर्णयांची गल्लत झाली होती . काही निर्णय आधाराविना करण्यात आले होते . काजी आणि मुफ्ती यांच्या अनेक निर्णयातून मतभेद आढळून येत . मुख्य गोष्ट म्हणजे हे सर्व निर्णय निरनिराळ्या ग्रंथांतून विखुरलेले होते. ही सर्व पुस्तके एकत्र उपलब्ध होतील आणि लोकांना **फिका** (ज्यूरिसप्रुडन्स-व्यवहार धर्मशास्त्र) वर प्रभुत्व मिळू शकेल याची खात्री नव्हती. म्हणून बादशहाने इस्लामी धर्मशास्त्रज्ञांचे मंडळ नेमले . त्यांनी बादशाही ग्रंथालयांतून असलेल्या आवश्यक ग्रंथांचा अभ्यास करावयाचा, मुफ्तींनी दिलेले न्यायनिवाडे तपासावयाचे आणि त्यानंतर सर्व एकत्र आणून एकाच ग्रंथात समाविष्ट करावयाचे अशी आज्ञा देण्यात आली . असे झाले म्हणजे निरनिराळ्या प्रकरणांबद्दल देण्यात आलेले निकाल एकत्र पाहण्याची सर्वांस सोय होईल . या कामासाठी बादशहाने विद्वानांचे जे मंडळ नेमले त्याचे अध्यक्षपद शेख निजाम या सुप्रसिद्ध धर्मशास्त्रज्ञाला देण्यात आले . मंडळाच्या कामावर असलेल्या सर्व विद्वानांना चांगले पगार देण्यात आले . या कामावर एकंदरीत दोन लाख रुपये खर्च झाला . मंडळाने जो ग्रंथ तयार केला त्याचे नाव **'फत्तावाये आलमगिरी'** हे ठेवण्यात आले. हा ग्रंथ निर्माण झाल्याने लोकांना याच विषयावरील इतर ग्रंथ वाचण्याची आवश्यकता राहिली नाही.

बादशहाने सार्वजनिक हितासाठी ज्या अनेक योजना केल्या त्यातील मुख्य या होत :— त्याने अन्नधान्यावरील कर माफ केला . रस्त्यावरील वाहतुकीचा कर **(राहदारी)** रद्द केला. कापड आणि इतर जिन्नस यांवर कर घेत ते काढून टाकण्यात आले . तंबाखूच्या कराचे बरेच उत्पन्न येत असे पण चोरटी तंबाखू बाळगल्याचे निमित्त करून अधिकारी , स्त्रियांची भयंकर विटंबना करीत. म्हणून बादशहाने तंबाखूवरील कर माफ केला. त्याने काही कर , खास मुसलमानांसाठी माफ केले . ते आणि वर निर्देशिलेले कर यांचे उत्पन्न वर्षाला तीस लाखांच्यावर होई . ते सर्व माफ करण्यात आले.

आणखी एक पद्धत चालू असे . बादशाही मन्सबदारांचे वडील , आजे किंवा इतर आप्त यांजकडून सरकारांत काही देणे निघत असल्यास, ती रक्कम मन्सबदारांच्या पगारातून वळती करून घेण्यात येत असे . यामुळे बरीच रक्कम सरकारात जमा होई . बादशहाने ही पद्धत बंद केली. कोणीही अमीर-उमराव वारला की त्याची मालमत्ता जप्त करण्याची पद्धत होती — मग तो सरकारचा देणेदार असो की नसो. पण बादशहाने आज्ञा केली की , सरकारचे देणे नसेल तर अशी मालमत्ता जप्त न करता वारसाच्या हवाली करण्यात यावी . पूर्वीच्या पद्धतीचा वारसांना अतिशय त्रास होत असे.

बादशहाने प्रांतोप्रांती आज्ञा पाठविल्या की, जे कर वसूल करावयाचे ते **शरियतला** म्हणजे धर्मशास्त्राला अनुसरून असले पाहिजे.

बादशहाने गादीवर येण्यापूर्वी आणि गादीवर आल्यानंतर जी युद्धे केली त्यांची वर्णने या ग्रंथात जागोजाग आली आहेत . या ठिकाणी बादशहाच्या असामान्य निर्धाराची एक लहानशी हकीकत देतो . बादशहा बाल्ख राज्याच्या मोहिमेवर होता . बाल्खाचा अमीर अब्दुल अजीज हा चालून आला. त्याच्या असंख्य फौजेने मोगल सैन्याला पूर्णपणे वेढले . युद्ध मोठे निकराचे झाले . युद्धाच्या ऐन धामधुमीत नमाजाची वेळ झाली . बादशहा आपल्या स्वारीवरून खाली उतरला आणि भोवतालचे लोक नको नको म्हणत असताना त्याने अतिशय निर्धाराने जमातीबरोबर नमाज

अनुक्रमणिका

अदा केली.

अब्दुल अजीजखानास ह्याची बातमी लागली . या घटनेने तो प्रभावित झाला , आणि मदत परमेश्वराकडून मिळते ही कुराणाची म्हण सार्थ झाली . अब्दुल अजीजखानाने म्हटले , "अशा माणसाबरोबर लढणे म्हणजे आपला सर्वनाश करून घेणे होय ." असे म्हणून त्याने युद्ध थांबविले.

बादशहा आवडीने खालील ग्रंथांचे सारखे परिशीलन करी . कुराणावरील भाष्ये **हरीस** म्हणजे पैगंबराच्या आख्यायिका , **फिका** म्हणजे व्यवहार धर्मावरील ग्रंथ , इमाम महमद गजाली याचे ग्रंथ , शेख शर्फ याह्या , शेख जैनुद्दीन , कुतुबमुहीयुद्दीन शीराजी यांच्या ग्रंथातील निवडक भाग आणि अशाच प्रकारचे काही ग्रंथ . बादशहाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे त्याला कुराण मुखोद्गत येत होते . गादीवर येण्यापूर्वी कुराण पाठकांचे ऐकून त्याला कुराणातील काही प्रकरणे पाठ झाली होती . पण चिकाटीचे प्रयत्न करून त्याने समग्र कुराण मुखोद्गत केले ते गादीवर आल्यानंतर होय . **हिजरी** १०७१ (इ. स. १६६१) मध्ये त्याने कुराण पाठ करण्यास सुरुवात केली. **हिजरी** १०७८ पर्यंत (इ. स. १६६८) त्याला सगळे कुराण मुखोद्गत झाले.

बादशहाचे हस्ताक्षर फारच चांगले होते. **तो नस्ख** पद्धतीचे लेखन करी. त्याने **नस्ख** शैलीत कुराणाच्या दोन प्रती आपल्या हाताने लिहून काढल्या. त्यांच्या बांधणीवर सात हजार रुपये खर्च झाला. त्या प्रती त्याने मदिनेला पाठविल्या.

नस्तालिख आणि **शिकस्ता** या दोन्ही पद्धतीचे त्याचे हस्ताक्षर फार उत्तम , होते. पत्रव्यवहार आणि इतर गद्य लेखन यावर बादशहाचे पूर्ण प्रभुत्व होते. कुराणातील एक वचन आहे की , "मूर्ख लोक कवीच्या मागे लागतात ." बादशहाला निरर्थक कविता आवडत नसत . मग स्वतःच्या स्तुतिपर केलेल्या कवितांची गोष्टच बोलावयास नको. पण नितीची शिकवण देणाऱ्या कवितांची त्याला आवड होती. उदाहरणार्थ :

न कर्द बहरे रजाई खुदाये इज्जोजल
न चश्म सूये गजाल व न गोश सूये गजल.

परमेश्वराला संतुष्ट करावे या हेतूने मी **गजाल** (मृगनयना) कडे दृष्टिक्षेप केला नाही किंवा **गजल** (कविता) कडे कान दिले नाहीत.

या अद्वितीय बादशहाच्या सर्व गुणाचे वर्णन करणे अशक्य आहे.]

[बादशहाच्या अखेरीच्या वर्षांची भीमसेनाने दिलेली हकीकत पुढीलप्रमाणे आहे :—

बादशहाने बहादुरगडहून अहमदनगरकडे प्रयाण केले . (१४ जानेवारी १७०६) तो २० जानेवारी रोजी अहमदनगरास पोहोचला . या ६ दिवसांच्या प्रवासात मराठ्यांनी बादशाही सैन्यावर धाडसी आक्रमणे केली . त्याचा मोड करा म्हणून बादशहाने हमीदुद्दीनखान बहादूर यास आज्ञा केली. पण तो अननुभवी होता. त्याने आपले सरदार आणि अधिकारी यांना मराठ्यांशी लढण्यासाठी म्हणून पाठविले . मराठ्यांनी मोगलांचे हे सैन्य किती कुचकामी आहे हे पाहिले . ते मोगलांवर तुटून पडले . त्यांनी अनेक मोगलांना मारले आणि कित्येकांना धरून नेले . त्यांनी अनेक घोडी पण धरून नेली. मराठ्यांची दुसरी तुकडी मोगलांच्या बाजारबुणग्यावर आली आणि इतर सामानावर हल्ले करीत होती . त्याच वेळी बादशहा आपल्या सिंहासनवजा उघड्या पालखीतून जात असताना त्यांना दिसला . बादशहाबद्दल आदराची भावना म्हणून मराठे लांबून त्याला पाहात राहिले . मराठे असे वागले हे बादशहाचे भाग्यच म्हणले पाहिजे.

(ग्रंथकर्त्याचा) माझा चुलतभाऊ हरराय, त्याचा मुलगा मकरंदराय, मकरंदरायचा मुलगा दीपकराय, दीपकरायला या सुमारास मुलगा झाला त्याचे नाव जीवनराय ठेवण्यात आले.

बादशहा अहमदनगरला पोहोचला. (२० जानेवारी १७०६)

बादशहाने जुल्फिकारखान नुस्रतजंग आणि तरबियतखान मीर आतिश यास कोंडाणा जिंकून घेण्यासाठी पाठविले , आणि तो स्वतः अहमदनगरास मुक्काम करून राहिला. धनाजी जाधव, नेमाजी शिंदे, दादो मल्हार, संताजी मराठा, रंभाजी निंबाळकर, रामा व दमाजी (?) थोरात हे सर्व एकत्र होऊन बादशहाच्या छावणीवर चाल करून आले . पण त्यांचा बेत सिद्धीस गेला नाही . त्यांच्याशी लढण्यासाठी बादशाही सैन्ये छावणीतून बाहेर पडली. खानजमान फत्तेहजंग (शेख निजाम मुकरबखान) याचा मुलगा खानेआलम हा सहा हजारी मन्सबदार होता . त्याच्यापाशी कसलेले सैन्य होते. त्याने मराठ्यांचा मोड केला. नाहीतर छावणीतील बादशाही अमीरांच्याने त्या कडव्या लोकांचा काय प्रतिकार झाला असता हे कुणालाही कळून येईल. मराठे पळून गेले.

नुस्रतजंग जुल्फीकारखान याने कोंडाण्याला वेढा घातला . त्याने किल्ल्यातील लोकांवर कठीण प्रसंग आणला . किल्ल्यात रसदेची टंचाई झाली. त्यामुळे किल्ल्यातील लोकांनी तहाचे बोलणे सुरू केले . रामसिंग लाल याच्या मध्यस्थीने वाटाघाटी होऊन किल्ल्यातील लोक सुरक्षितपणे किल्ल्यातून निघून गेले . **जिल्हेज** महिन्यात (३ फेब्रुवारी १७०६ ते ४ मार्च १७०६ या काळात) कोंडाण्याचा किल्ला मोगलांच्या हाती आला. मागे बादशहाने याच महिन्यात हा किल्ला जिंकून घेतला होता . किल्ल्यावर पाण्याची शंभराच्या वर टाकी होती (किंवा झरे होते). मकसूदखान रोजभागी आणि त्याची दोन मुले यांना तेथील किल्लेदार म्हणून नेमण्यात आले . रसद आणि इतर सामग्री यांची किल्ल्यात काही नीट

व्यवस्था करण्यात आली नाही. दख्खनचे किल्ले जिंकून घेण्यात आले; पण त्यातून युद्धसामग्री आणि रसद यांचा साठा (मोगलांनी) केला नाही.

शहाजादा आज़म हा गुजरातेहून बादशहाच्या भेटीस आला (२५ मार्च १७०६). अलीमर्दानखान (शहाजहानच्या काळातील सरदार) याचा मुलगा इब्राहिमखान हा काश्मीरचा सुभेदार होता. त्याची बदली गुजरातच्या सुभ्यावर झाली. तो येऊन काम पाहू लागेपर्यंत शहाजादा बेदारबख्त याने गुजरातेचा बंदोबस्त करावा अशी बादशहाने आज्ञा केली.

दुर्गादास राठोड हा पाटणा येथे फौजदार म्हणून होता. मोगलांविषयी त्याला संशय येऊन तो तेथून पळून गेला.

एनुमांद (?) नावाचा खानदेशात एक कलाल (दारूचा व्यापार करणारा) होता. दैवाने त्याला साथ दिली. त्याने काही संपत्ती आणि माणसे गोळा केली, आणि तो वाटमारी करू लागला. त्याने व्यापारी तळावर हल्ले सुरू केले. मोगल ठाणेदारांना त्याने हाकलवून लावले आणि तो मराठे सरदारांना जाऊन मिळाला. गुजरातेचा सुभेदार शहाजादा आजम हा बादशहाकडे आला होता. गुजरात प्रांत रिकामा आहे हे पाहून त्यांनी बडोद्याचे समृद्ध शहर लुटले. गुजरातेचा माजी सुभेदार शुजाअतखान याचा मुलगा नजरअलीखान हा तेथे फौजदार होता. तो सैन्य घेऊन लढण्यासाठी म्हणून आला, पण त्याचा पराजय होऊन तो आणि इतर मोगल अधिकारी मराठ्यांच्या हाती सापडले (४ मार्च १७०६). इफ्तिकारखान मामुरी याचा मुलगा मुख्लिसखान, महमद ताहिर हैद्राबादी आणि ज्या जिल्ह्याचे इतर फौजदार हे पळून भडोच गावी आश्रयासाठी म्हणून गेले. मराठ्यांनी अमाप संपत्ती लुटली आणि ती घेऊन ते निघून गेले. गोपाळसिंग चंद्रावत याने मोगलांशी विरोध पत्करला होता. तोही मराठ्यांच्या बरोबर होता. शहाजादा बेदारबख्त यास मराठ्यांचा मोड करण्याची बादशहाने आज्ञा केली.

औरंगाबादेच्या भोवतीही मराठ्यांनी विलक्षण उच्छाद मांडला. उत्तरेत मुल्तान आणि ठट्ठा या प्रांतांतील जमीनदारांनी डोके वर काढले. शहाजादा महमद मुआज़म याचा मुलगा महमद मुईजुद्दीन याने त्यांच्याशी निर्धाराने लढून त्यांचा मोड केला.

बादशहाने माळव्याच्या सुभ्यावर खाने आलम आणि बुरहाणपूरच्या सुभ्यावर नजाबतखान अशा नेमणुका केल्या.

बादशहाने नुस्रतजंग जुल्फिकारखान आणि फिरोजजंग (निमामुल्मुल्काचा बाप) यास आज्ञा केली की, मराठे औरंगाबादेच्या प्रांतात पसरले आहेत. त्यांचा मोड करावा. फिरोजजंगाची हद्द (वऱ्हाडच्या सुभ्याची) मेहकरपर्यंत म्हणजे औरंगाबादेहून जवळ होती, पण तो मराठ्यांवर चाल करून येऊ शकला नाही. नुस्रतजंग जुल्फिकारखान हा अहमदनगर जवळ आला. त्याने आपले बाजारबुणगे आणि जड सामान बादशाही छावणीत ठेविले आणि तो मराठ्यांच्या विरुद्ध चाल करून गेला. घाटाच्या पायथ्याशी असलेल्या तिसगाव या ठिकाणी तो पोहोचला. तेथे त्याला कळले की, मराठे हे औरंगाबादेहून निघून गोदावरीच्या काठावर पोहोचले आहेत, आणि त्यांच्यापासून दहा कोसावर शहागड येथे फिरोजजंग हा मुक्काम करून आहे. नुस्रतजंग जुल्फिकारखान हा मराठ्यांच्या पाठलागावर निघून खान फिरोजजंग याच्या फौजदारी अमलाखाली असलेल्या नेर या परगण्यास पोहोचला. तेथे त्याला कळले की, धनाजी जाधव व इतर मराठे हे परळी वैजनाथच्या बाजूने निघून गेले असून त्यांनी धर्मपुरीचा घाट ओलांडला आहे. नुस्रतजंग जुल्फिकारखान याजपाशी सैन्य थोडे आणि शत्रूचे बळ जास्त; पण त्याची पर्वा न करता जुल्फिकारखान त्यांच्या पाठीशी लागला. मराठ्यांना हे कळल्यावर ते रात्रंदिवस मजला मारीत औसा, तुळजापूर, परंडा या गावावरून पुढे गेले आणि मोठ्या कष्टाने भीमापार झाले. जुल्फिकारखान हा भीमेच्या काठी पोहोचला; पण तेथे मराठ्यांचा मागमूसही नव्हता. पावसाळा जवळ आला होता (१७०६). म्हणून तेथून निघून जुल्फिकारखान हा अहमदनगर येथे बादशहाला येऊन भेटला. भीमापार झालेल्या मराठ्यांचा मोड करण्याचे काम त्यालाच देण्यात आले. या धावपळीच्या मोहिमेत, धान्याच्या आणि चाऱ्याच्या टंचाईमुळे घोडे आणि सामान वाहून नेणारी जनावरे ह्यांची भयंकर हानी झाली.

बादशहाच्या आज्ञेप्रमाणे जुल्फिकारखान हा मिरजेला पोहोचला धनाजी जाधव त्याच दिशेने निघून गेला होता. मराठे कृष्णापार झाले.

बादशहाला कळविण्यात आले की, पिडनाईक बेरड आणि हिंदुराव घोरपडे यांनी विजापुरी कर्नाटकात असलेला पेणूकोंड्याचा किल्ला जिंकून घेतला आहे. तेथील किल्लेदार मराठ्यांच्या हाती कैद झाला.

वसंतगडचा किल्ला बादशहाने जिंकून घेतला होता (इ. स. १६९९) आणि त्याचे नाव **कलीदेफत्तह** (यशाची किल्ली) असे ठेवले होते. तो या सुमारास (इ. स. १७०६) मराठ्यांनी परत जिंकून घेतला.

बादशहाच्या आज्ञेने दाऊदखान (पन्नी) याने पेणूकोंडा परत जिंकून घेतला. बादशहासमोर अर्जी ठेवण्याचा दारोगा सियादतखान हा मराठ्यांच्या कैदेत सापडला होता. त्याने खंडणी भरून आपली सुटका करून घेतली आणि तो बादशाही छावणीत पोहोचला. बंदुकीच्या गोळ्यांनी आणि बाणांनी त्याचे दोन्ही डोळे जाया होऊन तो पूर्णपणे आंधळा बनला होता.

पावसाळा आला (१७०६) म्हणून नुस्रतजंग जुल्फिकारखान हा मिरजेपासून बारा कोसावर मुक्काम करून राहिला. धान्याची भयंकर टंचाई झाली. आणि मोगल सैन्याची अतिशय दुर्दशा झाली. जुल्फिकारखानाच्या सैन्यातील स्थिती पाहता, ते मजबूत आणि ताजेतवाने होते. पण त्यांचीही स्थिती अत्यंत हलाखीची झाली. जुल्फिकारखानाच्या सैन्याला रसद मिळणे अत्यंत कठीण झाले.

शहाजहान बादशहाने कंधारच्या मोहिमेवर पहिल्याने दाराशुकोहची आणि दुसऱ्या वेळी औरंगजेब याची रवानगी केली. त्यावेळी त्याच्या सैन्याला दोन वर्षांचा पगार आगाऊ दिला होता, आणि दोन वर्षे सैन्याला पुरेल इतका रसदेचा साठा सैन्याबरोबर दिला होता. आणि आता पाहा, कृष्णा नदीपासून अहमदनगर हे लांब का आहे पण तेथून जुल्फिकारखानाच्या सैन्याला रसद मिळणे शक्य झाले नाही. शहाजहानाच्या वेळी एक

अनुक्रमणिका

राण्याची (उदयपूर) आणि दुसरी बाल्ख प्रांतावरील अशा दोनच मोहिमा झाल्या . आता तर बादशहाचे सर्व आयुष्य मोहिमा करण्यातच संपत आहे . शहाजहान बादशहा आठवड्यातून एक दिवस न्यायदानाचे काम करी , तरी दाद मागणाऱ्याची गर्दी होत नसे , इतके त्यावेळी लोक पापभीरू आणि सत्यनिष्ठ असत. पण आता पाहा आलमगीर बादशहा दिवसातून दोनदा न्यायदानाचे काम करतात, आणि दर खेपेस दाद मागणाऱ्यांची सारखी गर्दी लागलेली असते.

राव दलपतला बढती मिळून त्याला तीन हजारी आणि तीन हजार स्वारांचा मन्सबदार करण्यात आले.

पावसाळा संपला . धनाजी जाधवाने बादशाही मुलखावर आक्रमणे करण्याचा बेत केला . जुल्फिकारखान त्याचा पाठलाग करीत निघाला. मग मराठे विजापूर प्रांतात पसरले. जुल्फिकारखानाने कृष्णा नदीच्या काठापर्यंत त्यांचा पाठलाग केला.

गुलबर्ग्यापासून चौदा कोसांवर आलूरचा किल्ला आहे . तो फिरोजजंगाच्या हद्दीत होता . बेरडांनी तो किल्ला जिंकून घेतला . बादशहाने त्यावर तरबियतखान यास तिकडे पाठविले. त्याने किल्ला परत जिंकून घेतला.

बादशहाचा मुलगा महमद अकबर हा इराणात होता . तो वारला अशी बातमी आली . त्याचा मुलगा बुलंद अख्तर हा बादशहाच्या छावणीत होता तोही वारला.

मुल्ला अहमद विजापुरीचा भाऊ मुखलिसखान याचा मुलगा जैनुद्दीन अलीखान हा कोकण आणि नाशिक येथे फौजदार होता . तो बादशहाला भेटण्यास आला . नंतर तो बादशहाचा निरोप घेऊन परत गेला . वाटेत मराठ्यांनी त्याच्यावर हल्ला केला . या चकमकीत जैमुद्दीन अलीखान यास जखमा झाल्या. अत्यंत कष्टाने तो गुल्शनाबाद नाशिक येथे पोहोचला.

औरंगाबादेहून बादशहाच्या छावणीसाठी खजिना, घोडे, उंट इत्यादी प्रचंड सामग्री येत होती. अहमदनगरपासून बारा कोसांवर पांदा या मुक्कामी मराठ्यांनी त्याच्यावर हल्ला करून ही सामग्री पूर्णपणे लुटली. घोडे, उंट, खजिना, सारांश सर्व मालमत्ता मराठ्यांच्या हाती पडली. शाहराह म्हणजे राजमार्ग. मराठ्यांनी ते नाव बदलून राहजर म्हणजे सुवर्णाचा मार्ग असे ठेवले . कारण राजमार्गावरून जाणारी संपत्ती त्यांच्या हाती आयती लागत असे. सारांश कुणाचीच दाद ना फिर्याद अशी स्थिती झाली.

विजापूरचा सुभेदार चिनकिलीचखान (निजामुल्मुल्क) यास बादशहाने बोलावणे पाठविले (डिसेंबर १७०६). फिरोजजंग (निजामुल्मुल्काचा बाप) याच्या पाशी मातबर फौज होती. याशिवाय त्याच्यापाशी नामांकित सरदार होते. म्हणून मराठे त्याच्या वाटेला कधीही जात नसत. ते इतर जहागिरदारांच्या कारभाऱ्यांना धरून ठेवीत आणि मागील वर्षाची बाकी त्यांच्याकडून मागत . कागदपत्रावरून जो हिशेब निघेल तो मारहाण करून वसूल करीत.

चंपत बुंदेल्याचा मुलगा छत्रसाल याजबद्दल फिरोजजंग याने बादशहापाशी शिफारस केली . त्यावरून बादशहाने छत्रसाल यास क्षमा करून त्याला चार हजारांची मन्सब दिली . छत्रसालाच्या मुलांनाही मन्सबी देण्यात आल्या . बादशहाच्या आज्ञेने राव दल्पतने आपला मुलगा नारायणसिंग यास आपल्या संस्थानाची व्यवस्था करण्यास म्हणून उत्तरेस पाठविले . मी (ग्रंथकर्ता भीमसेन) पण माझा मुलगा शंभुनाथ यास देशी पाठविले.

जुल्फिकारखान हा मिरजेहून निघाला . तेथून तो कुडची पंज बिबी या गावी पोहोचला . तेथे त्याने नदी ओलांडली , गोकाकच्या किल्ल्याला लागून असलेला शिखलचा परगणा त्याने उजवीकडून सोडला आणि परगण्याच्या डावीकडून निघून तो मुधोळ (घोरपड्यांचे) वरून निघाला आणि घटप्रभेच्या काठावर त्याने आपला तळ दिला . नंतर अब्दुल करीम मियाना विजापुरी याचे बागलकोट या गावावरून तो कृष्णा नदीच्या काठावर आला. विजापूरहून सुभेदार (चिनकिलीचखान) अद्याप आला नव्हता. किल्ल्यात धान्यही नव्हते. त्यामुळे जुल्फिकारखान तेथेच काही काळ थांबला.

इतक्यात बातमी आली की, बादशहाने शहाजादा कामबक्ष यास विजापुरचा सुभेदार म्हणून नेमून त्याच्या मन्सबीत वाढ केली. **जिलकात** महिन्याच्या १७ तारखेस (९ फेब्रुवारी १७०७) कामबक्ष याने विजापूरकडे जाण्यासाठी म्हणून बादशहाचा निरोप घेतला . त्यावेळी बादशहाच्या डोळ्यातून अश्रू आले. गुलालाबारेहून शहाजाद्याच्या छावणीपर्यंत शहाजणे वाजवीत कामबक्षला निरोप द्यावा अशी बादशहाने आज्ञा केली.

बादशहाचा दुसरा मुलगा शहाजादा आझम यास त्याच महिन्याच्या २१ तारखेस (१३ फेब्रुवारी १७०७) माळव्याच्या सुभेदारीवर रवाना करण्यात आले.

राजारामाची बायको (ताराबाई) हिचा आपल्या नवऱ्यापेक्षाही अधिक दरारा होता. तिने आज्ञा केल्यावरून धनाजी जाधवने घोरपडे यास कैद करण्याचे ठरविले . अघोनीपासून दहा कोसांवर कोडकल (कुपगल) हे गाव आहे . तेथील किल्ल्याचा हिंदुराव याने आश्रय घेतला . धनाजी आणि हिंदुराव यांच्या युद्धास तोंड लागले . धनाजीने हिंदुरावाची सर्व मालमत्ता लुटली . त्याचे हत्ती, घोडे, इत्यादी संपत्ती धनाजीच्या ताब्यात आली. धनाजीने हिंदुरावाच्या किल्ल्याला वेढा दिला . हिंदुराव याने आपला एक वकील नुस्रतजंग जुल्फिकारखान याजकडे पाठवून मला मदत करा, म्हणजे मी तुम्हाला येऊन मिळतो असे त्याला सांगितले. त्याप्रमाणे जुल्फिकारखान निघाला, त्याने कृष्णा ओलांडली, आणि सिंदतुर (जिल्हा रायचूर) येथे आपले जड सामान टाकून देऊन तो मराठ्यांचा मोड करण्यासाठी म्हणून तुंगभद्रेच्या काठावर येऊन पोहोचला . तो येत आहे हे ऐकून

अनुक्रमणिका

धनाजीने हिंदुरावाबरोबर युद्ध करण्याचे सोडून दिले आणि तो तेथून निघून गेला . त्यानंतर हिंदुराव हा किल्ल्यातून निघून सोंडूरकडे निघून गेला . जुल्फिकारखानाकडे येण्याचे त्याने टाळले.

धनाजी जाधव हा श्रीरंगपट्टण आणि बिदनूर या प्रांताकडे निघून गेला. तेथे राण्यांचे राज्य आहे. त्यांना मुले, पुरुष नातेवाईक असले तरी सत्ता राण्यांच्या हातात आहे . कोणीही त्यांच्या आज्ञेचे उल्लंघन करीत नाही . जुल्फिकारखान हा सिंधनूरला परत आला आणि तेथे ठेवलेले बाजारबुणगे आणि जड सामान त्याने आपल्याबरोबर घेतले.

यापूर्वी काही दिवसांपासून बादशहाची तब्येत (प्रकृती) बिघडली होती. दोन-तीन दिवस मोठ्या काळजीत गेले . निरनिराळ्या अफवा उठू लागल्या. खरे काय ते जाणून घेण्याची सर्वांना काळजी लागली.

काही दिवसांनी औरंगजेब बादशहाचा मृत्यू झाला . त्याकाळात पृथ्वीवर एक क्रांतीच झाली . **हिजरी ११११८ जिल्काद** महिन्याच्या २८ तारखेस शुक्रवार पहाटेपासून तीन तास संपल्यावर (२० फेब्रुवारी १७०७) बादशहाचा मृत्यू झाला.]

[औरंगजेब बादशहाच्या मृत्यूबाबत पुढीलप्रमाणे हकीकत आपल्याला यादीनाम्यात आढळते :

(४६) पिढी पातशा ऐरगशहा पातशहा दक्षण सुरू करून माघारे अहमदनगरास गेले सन सबा मया अलफ सन हजार १११६ जुलूस वाला सन छ २८ जिलहेज अमवाशा माघ मास वद्य पक्ष शके १६२८ व्यये सवछा घटिका १४ देह ठेविला मयेत जाले त्यावरी छ १ मोहरम अजमशाहा यास अहमद (न) गरचे मुकामी बेगम व असदखान दिवाण व तमाम वजिरानी अणून तख्तमुबारखी दिल्ली कामबकस यांस विजापूर तख्त पेसजी जिल सुभानी यानी पाठविले असे.

(४७) श्री यादिनामा स्वस्ति श्री शके १६२८ व्ययनाम संवत्सरे माघ वद्य आमवाशा बुधवार छ २८ जिलकाद सन हजार १११६ हे दिवशी तीन प्रहर तीन घटिका जालियावरी नवरमशाहा पादशाहा अहमदानगरी दुनयातून स्वार झाहले सन जुलूस वाला पनास सु॥ सबा मया अलफ.

[यापुढे 'सन सबा मया १६' पासून 'सबा आसर ३६' पर्यंत क्रमाने सुहूर व फसली साले लिहिली आहेत.]

या साठी जी कोण कोणी पातशाही केली त्याची नावे बाहदूरशहा.

(४८) यादिदास्त हजरत जिल सुभानी अवरगजेब पातशहा तख्त जाहानाबाद उरूफ दिली हस्तनापूर यासि देवझा जाली शके १६२८ व्ययनाम संवछरे माघ वद्य अमावाशा सुक्रवार छ २८ जिल्हेज दिवसा घटी १४ दर जागा (अहमदानगर) मृत पावले त्यावरी अजमाशा वैजापुरी होते तेथून येऊन दाखल जाले असदखान दिवाण पुढे जाऊन घेऊन आले तिसरे रोजी छ १ मोहरम आदिलवारी अजमाशा लस्करात तख्ती बैसले . (**शि. सा**. खंड ६, **यादीनामे** ७०-७१)]

[औरंगजेबाच्या अखेरच्या दिवसांची हकीकत मासिरे आलमगिरीच्या लेखकाने पुढीलप्रमाणे दिली आहे :

औरंगजेब बादशहाने २७ एप्रिल १७०५ रोजी वाकिणखेड्याचा किल्ला जिंकून घेतल्यावर तेथून तीन कोसांवर असलेल्या देवापूर या गावी आपली छावणी केली. औरंगजेबाचा चरित्रकार साकी मुस्तैदखान हा यावेळी बादशहाच्या छावणीत हजर होता. तो म्हणतो.

देवापूर हे मोठे रमणीय स्थळ होते.

सैन्यातील लोकांना तेथे खरीखुरी विश्रांती लाभली आणि तीही बादशहाच्या कृपेमुळेच होय . बादशहाच्या त्या मुक्कामात भोवतालच्या प्रदेशातून खंडण्या वसूल करण्यात येऊन बादशहाकडे दाखल करण्यात आल्या . परागंदा झालेली रयत आपापल्या स्थळांना परत आली . शेतीची कामे पुन्हा चालू झाली. पुंडाना शिक्षा करण्यात आल्या.

खाजा मसूद महली याच्या देखरेखीखाली वाकिणखेड्याचा किल्ला मजबूत असा बांधण्यात येऊन तेथे एक सुंदर मशीद उभारण्यात आली. याबद्दल खाजा मसूदला मसूदखान ही पदवी देण्यात आली.

याच सुमारास बख्शिंदाबख्शचा किल्ला (सिंहगड) हा किल्लेदाराच्या अवसान -घातकीपणामुळे आणि नालायक गनिमांच्या लबाडीमुळे त्यांच्या (गनिमांच्या, मराठ्यांच्या) ताब्यात गेला. बादशहाने हमीददुद्दीन खानबहादूर आणि तरबियतखान बहादूर यांना सैन्य देऊन तिकडे रवाना केले. सैन्यातील सरदारांना मन्सबीच्या बढत्या देण्यात आल्या आणि सैन्याबरोबर खजिना देण्यात येऊन त्यांना (सिंहगडाकडे) रवाना करण्यात आले. बादशहा आजारी पडतात—

काळ हा चंचल आहे . उत्तम आरोग्याबरोबर आजार असावयाचाच . प्रिय गोष्टीबरोबर अप्रिय , आणि कोमलतेबरोबर काठीण्य ही असतातच. सैन्य आरामात विश्रांती घेत होते, तोच बादशहा आजारी पडला, या बातमीने मोगल सैन्यात विलक्षण हाहाकार उडाला.

अनुक्रमणिका

बादशहाची इच्छाशक्ती दांडगी होती . त्याने सुरुवातीसुरुवातीस आजाराचा आपल्यावर प्रभाव पडू दिला नाही , त्याने काम करण्याचे थांबविले नाही. पूर्वेच्या क्षितिजावर सूर्यबिंब दिसावे तसा तो न्यायालयाच्या खिडकीतून आपला चेहरा दाखवीत असे . राज्यकारभाराची कामे अर्ज्या आणि विनंत्या यांच्याद्वारे त्याच्या समोर ठेवण्यात येत. त्यावर तो आपल्या स्वहस्ताने योग्य ती उत्तरे लिहीत असे.

पण यानंतर मात्र त्याची प्रकृती फारच बिघडली. अशक्तपणामुळे बादशहामधून मधून बेशुद्ध पडू लागला. बादशहाचे विपरीत होऊन देश आणि इस्लामी जमात यांचा सर्वनाश होण्याचा रंग दिसू लागला . लोकांना अशा जीवनापेक्षा मृत्यू बरा असे वाटू लागले . पण मृत्यू तरी यावाना . मोगल लष्करात विलक्षण गोंधळ उडाला (शोरि-शेअजीम). लष्करात तऱ्हेतऱ्हेच्या भयंकर अफवा पसरू लागल्या. हीन प्रवृत्तीच्या लोकांनी पाहिले की त्या भयंकर देशात (बेडरांच्या मुलखात) शत्रू योग्य संधीची वाट पाहात आहेत . चहूकडून मोगलांवर तुटून पडावे या विचारात ते आहेत . हे पाहून हलकट आणि हीन लोकांच्या मनात दंगेधोपे करण्याचे विचार खेळू लागले.

ही परिस्थिति दहा-बारा दिवस चालू होती. नंतर परमेश्वराने सर्व जनतेवर कृपा केली. घाबरलेल्या लोकांच्या शरीरात आशेचे वारे खेळू लागले. बादशहाची प्रकृती सुधारली. त्यामुळे जगात सर्वांना हायसे वाटले. युद्धप्रिय शत्रू आणि दुष्प्रवृत्तीचे लोक यांच्या आशा नष्ट झाल्या.

अमीरखानाने खालील हकीगत सांगितली आहे :

"एके दिवशी बादशहाला कमालीची अशक्तता आली. अगदी क्षीण आवाजात त्याने खालील ओळी म्हटल्या.

बहश्ताद व नव्वद चूं दर रसीदी

बसा सख्ती के अज दौरां कशीदी

व अज आंजा ब सद मंजिल रसानी

बुबद मर्गे ब सूख जिंदगानी

आयुष्यात तुम्ही ऐंशी किंवा नव्वद वर्षांच्या घरात पोचेपर्यंत तुम्ही काळाचे तीव्र तडाखे अनुभवले असाल . त्यानंतर तुम्ही शंभराच्या घरात आलात की मृत्युच जीवनाचा आकार धारण करून येईल."

माझ्या कानावर बादशहाचे हे शब्द पडले . मी त्याच क्षणी म्हटले "हजरत सलामत, कवि शेखगंज यांनी या ओळी लिहिल्या खऱ्या पण या ओळींचा नीट अर्थ समजावा म्हणून त्यांनी या दोन ओळी म्हटल्या आहेत.

पस आं बेहत्तर के खुदरा शाद दारी

दरां शादी खुदारा याद दारी

आणि म्हणून तू संतुष्ट रहावे आणि त्या संतोषात परमेश्वराची आठवण ठेवावी हेच योग्य होय."

यावर बादशहा म्हणाले, "त्या ओळी पुन्हा म्हण बरे ". मी त्या म्हटल्या. बादशहाने पुन्हा पुन्हा त्या ओळी माझ्याकडून म्हणवून घेतल्या . नंतर बादशहा म्हणाले, "मला त्या ओळी लिहून दे." मी ओळी लिहून दिल्या. बादशहा त्या ओळी बराच वेळपर्यंत वाचीत होते.

अनाथांचा दीनदयाळ परमेश्वर याने बादशहाला आरोग्य दिले . दुसऱ्या दिवशी बादशहा न्यायालयात येऊन बसले . बादशहाला पाहून लोकांच्या जीवात जीव आला. बादशहा मला म्हणाले "तुझ्या ओळींनी मला आरोग्य लाभले आणि माझी गेलेली शक्ती परत आली."

बादशहाच्या औषधोपचारात हकीम हाजिकखान याने जे कौशल्य दाखविले ते पाहून प्राचीन काळच्या हकिमांची आठवण झाली . धन्य धन्य परमेश्वराची . हकिमाच्या कामगिरीचा मोबदला म्हणून त्याची सुवर्णतुला करण्यात आली . त्याला एक शिरपेच बहाल करण्यात आला . औषधाच्या उपयोगाने बादशहाला चांगलाच लाभ झाला . विजापूरचा सुभेदार चिनकिलीचखान बहादूर बादशहा आजारी पडल्याचे ऐकून घाबरून बादशहापाशी आला होता. प्रकृती बरी झाल्यावर बादशहाने त्याला आपल्या सुभ्याच्या रक्षणासाठी परत पाठविले.

रजब महिन्याच्या सोळा तारखेस (तेवीस ऑक्टोबर १७०५) बादशहा पालखीच्या स्वारीतून बहादूरगडाकडे रवाना झाला . **रजब** आणि **शाबान** हे दोन्ही महिने प्रवासात गेले.

रमजान महिन्याच्या पहिल्या तारखेस सहा डिसेंबर १७०५ रोजी बादशाही लष्कर बहादूरगडास पोहोचले.

बख्शिंदाबख्श (सिंहगड) घेण्यासाठी ज्या अधिकाऱ्यांना नेमले होते ते किल्ल्याभोवती नुसती प्रदक्षिणा घालून आणि किल्ला घेण्याचे काम

अनुक्रमणिका

पुढे ढकलून आले होते . रहबख्शखेडा (वाकिणखेडा) जिंकून घेतल्यानंतर जुल्फिकारखान नुस्रतजंग यास मराठ्यांचा पाठलाग करण्यासाठी औरंगाबादेकडे पाठविण्यात आले होते. त्याला बोलावून घेण्यात आले. त्याप्रमाणे तो बहादूरगडास येऊन बादशहाला भेटला.

अहमदनगरला जाण्यास निघतेवेळी बादशहाने नुस्रतजंग जुल्फिकारखान यास बाख्शिंदाबख्श (सिंहगड) जिंकून घेण्यासाठी पाठविले. त्या भागाचा अधिकारी तरबियतखान हा बादशहाच्या आज्ञेने जुल्फिकारखान नुस्रतजंग यास जाऊन सामील झाला . संभाजीचा मुलगा शाहू हा बादशहाजवळ गुलालबारमध्ये राहात होता . त्याला काही कारणांनी नुस्रतजंग जुल्फिकारखान याजबरोबर रवाना करण्यात आले . त्याचा तंबू जुल्फिकारखानाच्या तंबूपाशी लावण्यात आला. शाहूला खास खिलतीची वस्त्रे आणि इद्राज (अलंकार) ही देण्यात आली.

बादशहाने अहमदनगर सोडून त्याला बावीस वर्षे लोटली होती . आता तो **शव्वाल** महिन्याच्या सोळा तारखेस (वीस जानेवारी १७०६) अहमदनगरला परत आला. (बहादूरगडाहून तो (२३ जानेवारी १९ शव्वाला) रवाना झाला अशी मासिरीत नोंद आहे. ती तारीख चुकलेली दिसते.)

जिल्हज महिन्याच्या सतरा तारखेस (२१ मार्च १७०६) बातमी आली की जुल्फिकारखान नुस्रतजंग याने बख्शिंदाबख्श (सिंहगड) परत जिंकून घेतला असून किल्ल्यातील लोकांना निःशस्त्र करून आणि त्यांचे सामानसुमान काढून घेऊन त्यांना हाकलून लावण्यात आले . गुजरातचा सुभेदार शहाजादा आज्जम याने बादशहाची प्रकृती बिघडली हे ऐकून छावणीत येण्याची परवानगी मागितली होती . ती त्याला देण्यात आली . तो येऊन जिल्हज महिन्याच्या एकवीस तारखेस (पंचवीस मार्च १७०६) बादशहास भेटला.

बातमी आली की, बादशहाची धाकटी बहिण गौहरआरा बेगम हिचा दिल्ली येथे मृत्यू झाला. ती बातमी ऐकून बादशहा पुन्हापुन्हा म्हणाला की "शहाजहान बादशहाच्या मुलांपैकी आम्ही दोघेच राहिलो होतो."

जहां अय् बिरदर त मांद बकस

दिल अंदर जहान आफरी बंद ब बस

"हे बंधो, या जगात शेवटपर्यंत कोणी राहात नाही म्हणून परमेश्वराच्या ठायी चित्त स्थिर कर."

अहमदनगरला बादशहा परत येऊन (वीस जानेवारी १७०६) एक वर्ष झाले . एक वेळ अशी येते की परमेश्वराच्या इच्छेने मानवाला आपले ऐषआराम विसरून शोकाची वस्त्रे अंगावर घ्यावी लागतात. अशा वेळी कमी निर्धाराच्या माणसांवर दुःखाचा डोंगर कोसळतो. आपला पोशिंदा या जगातून नाहीसा झाला हे पाहून माणसांची हृदये दुःखपूर्ण आणि नेत्र अश्रुपूर्ण होतात . असाच प्रसंग या वेळी लोकांवर ओढवला आणि तो म्हणजे औरंगजेब बादशहाचा मृत्यू होय.

काफरांच्या ताब्यातून दख्खन जिंकून अनेक किल्ले ताब्यात आणल्यानंतर बादशहा अहमदनगरास आला . काळ विचित्र आहे. उदयाच्या मागे अस्त आणि जीवनाच्या मागे मृत्यू हे लागलेले आहेत . **शव्वाल** महिन्याच्या (२६ डिसेंबर १७०६ ते २३ जानेवारी १७०७) अखेरीस बादशहा भयंकर आजारी पडला . त्यामुळे सर्व लहान थोरांचे धाबे दणाणले . पण प्रजेला अजून काही दिवस आराम मिळावा आणि काही राजकारणे निकालात निघावी अशी परमेश्वरी योजना होती . बादशहाची प्रकृती सुधारली. आपल्या नेहमीच्या सवयीप्रमाणे बादशहा काही वेळा न्यायकचेरीत आला, त्याने काम केले.

या काळात त्याने शहाजादा आज्जम यास माळव्याच्या सुभ्यावर पाठविले. शहाजादा कामबख्श हा विजापूरच्या सुभ्यावर रवाना झाला.

पण बादशहाची प्रकृती सुधारून चार पाच दिवस झाले असतील तोच त्याची तब्येत पुन्हा बिघडली . त्याला भयंकर ज्वर येऊ लागला. पण बादशहाची इच्छाशक्ती कमालीची होती . तीन दिवसपर्यन्त त्याने नमाज वगैरे धार्मिक कृत्ये नेमाने केली . तो न्यायकचेरीत येई. सामुदायिक नमाजात तो भाग घेई. धार्मिक कर्तव्याची एकही बाब त्याने टळू दिली नाही. या काळात त्याच्या तोंडून खालील ओळी नेहमी बाहेर पडत.

बयक लहजा बयक साअत बयक दम

दिगरगूं मी शवद अहवाले आलम

एका क्षणांत, एका दमात, निमिषमात्रात जगाची उलथापालथ होते.

गुरवारच्या दिवशी दुपारी हमीदुद्दीनखान बहादूर याने अर्जी पेश केली की "बादशहावरून एक हत्ती तसद्दुक (ओवाळून टाकणे) करावा. हत्तीची किंमत चार हजार रुपये होते . ती काजी मुल्ला हैदर याजकडे गरीबगुरिबात वाटण्यासाठी म्हणून देण्यात यावी . बादशहाने अर्जी मान्य केली. अर्जीवर सही करताना बादशहा अत्यंत अशक्त झाला होता . त्या स्थितीतही त्याने अर्जीवर लिहिले की "या खाकसाराला (क्षुद्र, मातीसमान) लवकर पहिल्या टप्प्यावर पोहोचविण्यात यावे"

शुक्रवारी सकाळी **जिल्काद** महिन्याची अठ्ठावीस तारीख. (वीस फेब्रुवारी १७०७) बादशहा सकाळची प्रार्थना पढण्यास बाहेर आला आणि

नंतर आपल्या निजण्याच्या खोलीत गेला . तो सारखा परमेश्वराचे नामस्मरण करीत होता . त्याला कमालीची अशक्तता आली होती . मधूनमधून त्याची शुद्ध जात होती. श्वासोछवास अवघड होत होता. तरी त्याची बोटे स्मरणीवरून फिरत होती आणि तोंडातून शब्द बाहेर पडत होते. 'लाइलाह इल्लील्लाह' एक परमेश्वरावाचून दुसरे दैवत नाही . दिवसाला एक प्रहर झाला . तो दिवस शुक्रवार होता . आपल्याला शुक्रवारी मरण यावे असे बादशहा नेहमी म्हणे. ती त्याची इच्छा पूर्ण झाली. त्याच दिवशी बादशहाचा आत्मा या नश्वर देहाला सोडून जन्नत (स्वर्गलोक) कडे निघून गेला.

या भयंकर घटनेमुळे काळाने शोकवस्त्रे परिधान केली. सर्व लहानथोर शोकसागरात बुडाले. जगाच्या शिरावरील कृपाछत्र नाहीसे झाले. या जगातून एक तेजस्वी सूर्य नाहीसा झाला . ऐन माध्यान्ह समयी जगाच्या वाटेला शोकसंध्या आली . लोकांच्या सुखरूपी धान्याच्या राशीवर संकटाची वीज पडून सर्व काही दग्ध होऊन गेले. 'इनलिल्लाह व इनलियाह' रजिउन आम्ही परमेश्वराकडून आलो आणि परमेश्वराकडे परत जातो.

महमद इखलास कैशने खालील हकीकत मला सांगितली :

"शुक्रवारच्या (बादशहाच्या मृत्यूच्या) आदल्या रात्री मी आणि इनायतुल्ला खान पुढे वाढून ठेवलेल्या घटनेच्या (बादशहाच्या मृत्यूच्या) कल्पनेने अत्यंत शोकग्रस्त झालो होतो . कविश्रेष्ठ हाफिज याचा कवितासंग्रह जवळ होता . भविष्याची खूण काही मिळते का हे पाहण्यासाठी आम्ही तो दीवान (कवितासंग्रह) उघडला तो आम्हाला हाफिजच्या खालील ओळी दृष्टीस पडल्या.

ताज मैखाना व मै नामोनिशा रव्वाहबूद

सरे मन खाके रहे पीरेमुगां रव्वाहबूद

वर जमिनेके निशाने कफे पाये तू बूद

सालेहा सिज्दाये साहबनजरान रव्वाहद बूद

वर सरे तुरबते मा चूं गुजरी हिंमत रव्वाह

के जियारत गाहे रिंदाने जहां रव्वाहद बूद

जोपर्यन्त मद्य (परमेश्वर भक्ती) मद्यालय (जग) यांचे अस्तित्व राहील -तोपर्यन्त माझे मस्तक साकीच्या मार्गात धुळीसारखे पडून राहील. ज्या जमिनीवर तुझी पदचिन्हे उमटलेली असतील तेथे ऋषिमुनी वर्षोनुवर्षे माथे टेकून प्रार्थना करीत राहतील . माझ्या थडग्यावरून तू जाशील तर तुला संतोषाचा लाभ होऊ दे . कारण माझे थडगे म्हणजे जगातील मद्यप्यांना (परमेश्वर भक्तांना) पूजास्थान होऊन रहाणार आहे. या ओळी वाचून आमची मने निराशेने व्याकूळ झाली. ती सारी रात्र आम्ही दुःखपूर्ण स्थितीत घालविली.

दुसऱ्या दिवशी सकाळी एक प्रहर (तीन तास) दिवस वर आला असता जे होणार ते झाले (बादशहाचा मृत्यू झाला). त्याच रात्री आम्ही (मी आणि इनायतुल्ला) पुन्हा एकत्र बसलो . लष्कराचा काजी मुल्लाहैदर हा आमच्याकडे आला . आम्ही आदल्या रात्री हाफिजच्या ग्रंथातून शकून पाहिल्याची हकीगत त्याला सांगितली . पण हाफिजच्या त्या ओळी आम्ही आठवू लागलो , तो काही केल्या त्या आठवेनात . आम्ही ग्रंथालयातून पुस्तके मागविली पण पुस्तके बांधून ठेवली होती . ती हाती आली नाहीत . आमची बैठक संपली. रात्री झोपेत स्वप्न पडले . मी एका कबरीजवळून चाललो होतो. पाहतो तो काय, की हजरत (औरंगजेब बादशहा) कबरीतून उभे आहेत. त्यांचे अर्धे शरीर बाहेर आहे . ते मला म्हणत आहेत "तू—विसरलेल्या ओळी या आहेत."

"माझ्या कबरीवरून तुम्ही जेव्हा जाल तेव्हा माझी कबर म्हणजे जगातील मद्यप्यांना (परमेश्वर भक्तांना) पूजास्थान बनेल. हा विचार मनात आणून संतुष्ट व्हा."

हरगिज न मीरद आंके दिलश जिंदा शुद ब इष्क
सिब्त अस्त बर जरीदाये आलम दवामे मा.

परमेश्वर भक्तीने ज्याचे हृदय भरून गेले आहे , तो कधीच मरत नाही . कधीच पुसला जाणार नाही . असा माझा ठसा जगावर उमटला आहे.]

●●●

अनुक्रमणिका

प्रकरण सतरावे
उत्तर हिंदुस्थानातील घडामोडींची हकीकत

(१) मारवाडमध्ये चाललेले त्रिदशवार्षिक युद्ध

जून १६८१ मध्ये औरंगजेब बादशहाने महाराण्याबरोबर कसाबसा तह करून जातीने दक्षिणेकडे प्रयाण केले. त्यावेळी मेवाडपुरते रजपुतांबरोबरील युद्ध संपुष्टात आले परंतु सबंध मारवाडबरोबर मोगलांचे युद्ध संपले असे मात्र झाले नाही . राठोडांच्या प्रदेशातील प्रमुख शहरे आणि युद्धातले डावपेच करण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या काही जागा बादशाही फौजांच्या ताब्यातच होत्या . तरी देखील देशाभिमानी राठोडांनी औरंगजेबाबरोबर युद्ध परिस्थिती चालूच ठेवली . त्यांनी देशातील डोंगरपठारे आणि रानेवने व्यापली आणि जेव्हा संधी मिळेल तेव्हा ते मैदानावर मुक्काम करून असलेल्या मोगल फौजांवर चाल करून येत, त्यांचे व्यापारी तांडे आणि मार्गदर्शन करणाऱ्या तुकड्या कापून काढीत आणि सुसज्ज नसलेली मोगल ठाणी काबीज करीत. साहजिकच बादशाही फौजांचे संरक्षण असल्याखेरीज जमिनीची मशागत करणे किंवा रस्त्यावर वाहतूक करणे हे अशक्य होऊन गेले . परिणामी मारवाडमध्ये दुष्काळाने कायमचे ठाण मांडले असल्यास त्यात काहीच नवल नाही. त्या काळी असलेल्या परिस्थितीचे वर्णन करताना एका राठोड कवीने असे म्हटले आहे की गेल्या काही वर्षांत "जमिनीची साफसफाई करण्याचे कामी तलवार आणि रोगराई यांनी हातमिळवणी केलेली आहे."

मारवाडमध्ये चाललेल्या या अखंड लढायांत आणि एका बाजूने जिंकलेली ठिकाणे दुसऱ्या बाजूने पुन्हापुन्हा जिंकून घेण्यात जवळ जवळ एका पिढीइतका कालावधी गेला . परंतु सतत युद्धामुळे उद्ध्वस्त झालेल्या एका रखरखीत वाळवंटाने भरलेल्या छोट्या प्रांताच्या नैसर्गिक संपत्तीपेक्षा एका साम्राज्याची साधनसामग्री ही निश्चितच वरचढ होती. जर का मोगल साम्राज्याची सर्व साधनसामग्री बादशहा दक्षिणेतील अतिशय आणीबाणीच्या युद्धप्रसंगात गुंतून गेल्यामुळे विनाश पावली नसती तर राठोडांकडून राष्ट्रीय पातळीवर मोगलांना होणारा प्रतिकार हा दिवसेंदिवस कमी होत गेला असता आणि अखेर फार काळ चाललेल्या संघर्षामुळे संपुष्टात आला असता . महाराष्ट्रामधील लष्करी परिस्थितीचे परिणाम जोधपूरमधल्या परिस्थितीवर झाले . यामुळे म्हणूनच की काय औरंगजेबाच्या मृत्यूनंतर लगेच राठोड देशाभिमान्यांना अंतिम यशाने माळ घातली आणि त्यांच्या लष्करी प्रमुखांना वंशपरंपरा त्यांच्याकडे चालत आलेल्या राज्यपदाचा लाभ करून देणे शक्य झाले.

१६८१—१७०७ या २७ वर्षांच्या मारवाडच्या इतिहासाचे तीन निश्चित असे कालखंड पडतात . पहिला कालखंड १६८१ ते १६८७. याचा उल्लेख लोकांचे युद्ध म्हणून करावा लागेल कारण या कालखंडात त्यांचा राजा हा लहान होता आणि त्यांचा राष्ट्रीय पुढारी दुर्गादास हा दक्षिणेमध्ये होता . राठोड जनतेने वेगवेगळ्या पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखाली टोळ्या -टोळ्यांनी मोगलांशी लढा दिला . हा लढा त्यांनी कोणत्याही तऱ्हेची केंद्रीय सत्ता अस्तित्वात नसताना दिला आणि जिथे जिथे आणि मिळेल तेथे मोगलांवर हल्ला करणे याखेरीज त्यांच्याकडे कोणत्याही तऱ्हेची अशी सर्वानुमते ठरलेली योजना नव्हती . अशा तऱ्हेने विस्कळीतपणे चाललेल्या या राठोड आणि मोगल यांच्या संघर्षात राठोडांचे शौर्य आणि स्वामिभक्ती यांची अनेक उदाहरणे दिसून आली. परंतु लष्करीदृष्ट्या या युद्धाचे दूरगामी असे परिणाम झाले नाहीत. परिणाम झाला तो एवढाच की मोगल सैन्य नेहमी धास्तावलेले असे राहिले आणि मारवाडचा मोगलांनी आपल्याकडे

ठेवलेला ताबा हा त्यांना आर्थिकदृष्ट्या विनाशकारक ठरला . युद्धाच्या त्या घटकेला राठोडांना एकही सामुदायिक पुढारी नव्हता हे त्यांच्या दृष्टीने अतिशय फायद्याचे झाले . कारण राठोडांच्या सर्व टोळ्या एका बाजूला आणि उत्तम शस्त्रांनी व चांगल्या तऱ्हेने संघटित असलेले बादशाही सैन्य दुसऱ्या बाजूला , अशा या दोन पक्षांत जर घनघोर रणधुमाळी माजली असती तर त्याचा परिणाम राठोडांचा निर्णायक पराभव होण्यात झाला असता. इतकेच नव्हे तर आणखी एका पिढीच्या कालखंडापुरता तरी राठोडांना आपले डोके वर काढण्यास अवधी मिळाला नसता . याउलट गनिमीकाव्याच्या युद्धाचा अवलंब करून त्यांनी मोगलांना दमविले आणि अशातऱ्हेने त्यांची कमी संख्या आणि हलक्या प्रतीची साधनसामग्री यामुळे त्यांच्या होणाऱ्या हानीची धार त्यांनी बोथट केली.

युद्धाच्या दुसऱ्या पर्वाला १६८७ मध्ये सुरुवात झाली . या वर्षी दुर्गादास दक्षिणेतून परतला आणि अजितसिंगाने आपला अज्ञातवास सोडला . सुरुवातीला राठोडांना अतिशय नेत्रदीपक असे यश मिळाले . बुंदीच्या हाडा घराण्याची मदत मिळाल्यामुळे त्यांनी मारवाडच्या मैदानी प्रदेशांतून मोगलांची हाकालपट्टी केली आणि आपल्या प्रदेशाच्या सीमा ओलांडून त्यांनी पलीकडील प्रदेशांत मुसंडी मारली . त्यांनी १६८७ मध्ये मलपूरा आणि पूरमंडल या शहरांवर हल्ले केले . १६९० मध्ये त्यांनी अजमीरच्या सुभेदाराचा देखील पराभव केला आणि खुद्द मेवाडात आणि दिल्लीच्या पश्चिमेकडील प्रदेश यात नासधूस केली . परंतु त्यांना त्यांचा स्वतःचा देश मात्र मोगलांच्या ताब्यांतून परत मिळविणे शक्य झाले नाही . १६८७ या वर्षी ज्या वेळी दुर्गादास आणि अजितसिंग यांनी राष्ट्रप्रेमाने एकत्र आलेल्या फौजेचे अधिपत्य स्वीकारले , त्याच वर्षी बादशहाच्या वतीने शुजातखान नावाचा अतिशय कर्तबगार आणि धडाडीचा अधिकारी जोधपूरचा सुभेदार म्हणून बदलून आला . आपल्या चौदा वर्षांच्या कारकिर्दीत मोगलांचे मारवाडवरील अधिपत्य कायम राखण्यात त्याने यश मिळविले.

मारवाडवरील शुजातखानाची सुभेदारी, १६८७–१७०१

१६८१–१६८६ मधील संघर्ष

मारवाडच्या फौजदारीशिवाय शुजातखानाकडे गुजराथची सुभेदारी होती . तो आपल्या हाताखालील फौजी शिपायांची संख्या आपल्या मनसबीनुसार पूर्ण ठेवीत असे आणि लष्करी हालचाली करण्यात तो अतिशय चलाख आणि चपळ होता . वर्षातले सहा महिने (किंवा कधी -कधी आठ महिने देखील) तो मारवाडमध्ये घालवीत असे आणि उरलेले सहा महिने गुजराथमध्ये . साहजिकच ज्या वेळी युद्धाचा प्रसंग येई त्या वेळी राठोडांना पायबंद घालण्यात तो यशस्वी होई . त्याचप्रमाणे जेव्हा वेळ पडेल तेव्हा तो त्यांच्याबरोबर समझोता करी . जर का त्यांनी राजमार्गावर व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांना त्रास दिला नाही तर सर्वप्रकारच्या मालावर जी बादशाही जकात गोळा केली जात असे त्याच्या ¼ त्यांना देण्याच्या अटीवर दोन्ही पक्षांत हा सलोखा होत असे . (१६८८) चौथाईचा आणखी एक प्रकार असे या गोष्टीचे वर्णन करण्यास काहीच हरकत नाही.

९ जुलै १७०१ रोजी शुजातखान मरण पावला . त्याच्या जागी राजपुत्र महमद आजम याची नेमणूक झाली. त्याने अजितबरोबर पुन्हा युद्ध सुरू केले. या युद्धाबरोबर रजपुतांच्या स्वातंत्र्ययुद्धाचे तिसरे पर्व सुरू झाले. या युद्धात भयानक रक्तपात झाला . दोन्ही पक्षांना अनेक वेळा पराभव पत्करावे लागले . परिणामी मारवाडची लूट करण्याचे जे बादशाही धोरण होते त्या धोरणाचा पार बिमोड झाला आणि कालांतराने

मारवाडवर वंशपरंपरेने राज्य करणाऱ्या घराण्याकडे मारवाडचा अखेर ताबा आला. (१७०७)

मोगलांनी मारवाडचे राजधानीचे शहर आणि इतर शहरे आपल्या ताब्यात घेतल्यावर राठोडांनी डोंगरांचा आणि अगदी एका बाजूला असलेल्या कानाकोपऱ्याचा आधार घेतला . परंतु त्यांच्या इतस्ततः भटकणाऱ्या लष्करी टोळ्यांकडून मारवाडच्या खुल्या राहिलेल्या मैदानी प्रदेशांवर हल्ले होतच राहिले . या टोळ्या आणि मारवाडात तळ देऊन राहिलेल्या मोगली फौजा यांच्यामध्ये जी युद्धे होत ती या मोगल ठाण्यांपैकी या अगर त्या ठाण्याच्या नजीक होत . कोणत्या तरी एका पक्षाला आळीपाळीने विजयश्री माळ घालीत असे. त्या वेळी मारवाडात जी परिस्थिती होती तिचे वर्णन अतिशय उत्कृष्ट अशा शब्दांत कवी करणीदान याने केले आहे . ते असे. "सूर्यास्त होण्याच्या अगोदर एक तास मारूचा प्रत्येक दरवाजा बंद केला जाई. मुसलमानांच्या ताब्यात मोक्याची मजबूत ठाणी होती. परंतु मैदानी प्रदेशावर हुकूम पाळले जात ते मात्र अजितचे. मारवाडच्या रस्त्यातून आता रहदारी अशक्य झाली होती."

(२) मारवाडमध्ये पुन्हा दुर्गादास, १६८७–१६९८

१६८७ मध्ये दुर्गादास हा महाराष्ट्रातून परत आल्यावर राठोडांच्या हालचालींना एकप्रकारचे प्रोत्साहन मिळाले. आणि याच सुमारास त्यांचे नशीब म्हणूनच की काय त्यांना एका पराक्रमी अशा मित्राचा पाठिंबा मिळाला. दुर्जनसाल हाडा हा बुंदी राज्याचा एक प्रमुख मांडलीक होता. त्याचा प्रमुख अनिरुद्धसिंग याने त्याचा अपमान केला . अनिरुद्धसिंग हा औरंगजेबाचा एकनिष्ठ जहागिरदार आणि सेनापती होता . वरील गोष्टीमुळे चिडून जाऊन दुर्जनसाल याने आपले नातेवाईक आणि अनुयायी यांना सशस्त्र केले आणि बुंदीचा किल्ला अचानक हल्ला करून आपल्या ताब्यात घेतला . तेथून तो मारवाडमध्ये आला . त्याने राठोडांचा एक पुढारी मुकुंदसिंग चंपावत याच्या बहिणीशी लग्न केले आणि राठोडांच्या राष्ट्रीय सैन्यात हाडाजमातीच्या आपल्या एक हजार घोडेस्वारांची भर घालून त्यांच्या सैन्याला मजबुती आणली.

अशातऱ्हेने राठोड आणि हाडा यांनी एकत्र येऊन मारवाडमधील बहुतेक मोगल ठाणी मारून काढली, किंवा तेथील मोगल सैनिकांना हाकलून दिले . त्याचप्रमाणे उत्तरेकडे पसरलेल्या बादशाही मुलखात त्यांनी मोठ्या धाडसाने हल्ले केले आणि प्रत्यक्ष मोगल साम्राज्याच्या राजधानीचे शहर दिल्ली धोक्यात आणले.

इ. स. १६९० मध्ये दुर्गादासाला फार मोठा असा विजय मिळाला . अजमीरचा नवा सुभेदार सफीखान हा मारवाडच्या सरहद्दीवर ठाण देऊन बसला होता . त्याचा त्याने युद्धामध्ये पूर्ण पराजय केला आणि अजमीरच्या दिशेने त्याला माघार घेणे भाग पाडले . मारवाडचा जो भाग मोगलांच्या ताब्यात होता त्यामध्ये लुटालूट करणे आणि आपल्या अनुयायांत तो वाटून देणे या गोष्टी त्याने चालू ठेवल्या आणि रस्त्याने जाणाऱ्या प्रवाशांमध्ये त्याने दहशतीचे वातावरण निर्माण केले. परिस्थितीने अशातऱ्हेचे उग्र स्वरूप धारण केल्यामुळे शुजातखान हा परत आला . त्याने अनेक रजपूत प्रमुखांना मोठ्या मुत्सद्देगिरीने आपल्या बाजूला वळवून घेतले आणि बादशहाच्या बाजूने लढण्याबद्दल त्यांच्यात उत्साह निर्माण केला . (अधिक माहितीसाठी पाहा **मिरत इ अहमदी**, ३४३)

दुर्गादासाकडून औरंगजेबाच्या नातीची पाठवणी, १६९५

औरंगजेबाचा मुलगा अकबर हा १६८१ मध्ये पळून गेल्यापासून त्याची मुलगी सफियत उन्नीसा हिला राठोडांनी आश्रय दिलेला होता . तिला परत मिळविण्याबाबत औरंगजेब अतिशय उत्सुक होता . १६९२ मध्ये या संबंधात वाटाघाटी झाल्या होत्या परंतु त्या अयशस्वी ठरल्या होत्या . त्या पुन्हा १६९४ मध्ये सुरू करण्यात आल्या . या वाटाघाटी करण्याचे काम कर्तबगार आणि सुज्ञ अशा शुजातखानाकडे देण्यात आले. या कामासाठी त्याने आपला मध्यस्थ म्हणून ईश्वरदास या पाटण येथील नागर ब्राह्मण कुळातील इतिहासकाराची नियुक्ती केली . (पाटण हे गायकवाडांच्या प्रदेशात मोडते .) ईश्वरदास हा पूर्वी जोधपूर येथे महसूल गोळा करणारा अधिकारी म्हणून होता.

ईश्वरदासाने दुर्गादासाकडे वारंवार संधान बांधले. त्यावर दुर्गादासाने त्याचा प्रमुख आणि तो स्वतः यांच्या वतीने काही अटींवर समझोत्याला मान्यता दिली आणि अकबराची मुलगी बादशहाकडे परत करण्याचे मान्य केले. ईश्वरदास हा राजकन्येला बरोबर घेऊन बादशाही दरबाराकडे निघाला. बादशहाला असे वाटले संस्कृतीपासून दूर असलेल्या आणि ज्या ठिकाणी कोणीही जाऊ शकणार नाही अशा ठिकाणी असलेल्या हिंदु राज्यामध्ये अकबराच्या मुलीला इस्लाम धर्माच्या ज्या नीतिशिक्षणाची जरूर होती ते मिळालेले असणे शक्य नाही . म्हणून राजकन्येचे आगमन झाल्यावर बादशहाने तिच्याकरता ताबडतोब एखाद्या धर्म शिक्षिकेची नेमणूक व्हावी अशी आज्ञा केली . परंतु बेगमेने त्याला असे सांगितले की तिच्या सुखसोयीबाबत दुर्गादास इतका जागरूक राहिला होता की तिच्यासाठी त्याने अजमीरहून एका मुसलमान शिक्षिकेची नेमणूक केलेली होती. तिच्या मार्गदर्शनाखाली राजकन्येने कुराणाचा अभ्यास अगोदरच केलेला होता आणि ते तिने मुखोद्गत केले होते.

या गोष्टीमुळे औरंगजेबाची दुर्गादासाच्या निष्ठेबद्दल खात्री पटली आणि त्यामुळे दुर्गादासाचे मागील सर्व अपराध विसरण्याची त्याच्या मनाने तयारी दाखविली.

अकबराच्या मुलाची औरंगजेबाकडे पाठवणी व दुर्गादासाची शरणागती, १६९८

यानंतरची गोष्ट म्हणजे राठोडांच्या ताब्यातील अकबराचा मुलगा बुलंद अख्तर याला परत मिळविणे ही होती. परंतु ही गोष्ट साध्य होण्यास जवळ जवळ दोन वर्षांचा कालावधी लागला . याला कारण असे झाले की दुर्गादासाने जोधपूर अजितसिंगाला देण्यात यावे असा हट्ट धरला तर औरंगजेबाची इच्छा जसवंतसिंगाच्या वारसांना मारवाडचा थोडासा भाग देऊन त्यांचे समाधान करण्याची होती.

परंतु अजितसिंगाची परिस्थिती आता अतिशय निराशेची आणि दुःखाची अशी झाली होती . ओसाड अशा रानावनात लपत -छपत राहण्याचा , मोगलांच्या पाठलागाने सतत धास्तावलेल्या मनस्थितीत राहण्याचा आणि जगातील सारी दुःखे सतत भोगण्याचा त्याला आता कंटाळा आला होता . या गोष्टींचा विचार करून १६९८ मध्ये दुर्गादासाने आपल्या मागण्या थोड्या कमी केल्या . अजितसिंगाला बादशहाने क्षमा केली, आणि त्याला बादशाही फौजेत मनसब दिली . त्याशिवाय झालोद, साचोड आणि शिवना हे परगणे त्याला जहागिरीदाखल दिले, आणि या परगण्यांवर फौजदार म्हणून त्याची नेमणूक केली. (**मिरत**, ३५९).

दुर्गादासाने बुलंद अख्तर याला बादशाही दरबारात पोहोचते केले . त्या वेळी बादशाही छावणी भीमा नदीच्या काठावर इस्लामपुरी येथे होती . (१६९८) राजघराण्यातल्या या गरीब बिचाऱ्या राजपुत्राचे

जन्मापासूनचे सारे आयुष्य रानटी अशा रजपूत शेतकऱ्यांमध्ये गेले होते . त्याने ना शहर पाहिले होते की दरबार. त्याचप्रमाणे एखाद्या सुसंस्कृत अशा माणसाबरोबर त्याचा संभाषणाचा योगही कधी आला नव्हता . शिष्टाचारपूर्ण अशी हिंदुस्थानी भाषाही त्याला अवगत नव्हती. एका बादशहाचा नातू फक्त राजस्थानी बोली भाषा बोलू शकतो याचा औरंगजेबाला मोठा धक्का बसला आणि त्याच्या दरबारातील मंडळीही विस्मयचकित झाली . एखाद्या खेडवळ तरुणाला अतिशय मोठ्या आणि भरभराटलेल्या अशा शहरात आणल्यानंतर त्याची जशी संभ्रमित अवस्था व्हावी त्याप्रमाणे बुलंद अख्तर हा दरबारात आल्यानंतर बुजून गेला. त्याशिवाय त्याने आपले जे आयुष्य रजपूत देशभक्तांच्या संगतीत घालवले त्यामध्ये त्याला अशी शिकवण देण्यात आली होती की औरंगजेब हा एक राक्षस असून त्याच्या बापाचा आणि त्याच्या साऱ्या कुटुंबाचा तो एक प्रखर असा शत्रू आहे , आणि आता परिस्थिती अशी होती की त्याच्या जन्मापासून त्याचे जे रक्षणकर्ते होते त्यांच्यापासून त्याला दूर ओढून नेले जात होते , आणि त्याच्या बालपणापासून त्याचे मित्र असलेल्या व्यक्तींपासून त्याची ताटातूट करण्यात येऊन नेमक्या त्याच औरंगजेबाच्या हवाली त्याला करण्यात येत होते. अशा परिस्थितीत एक शब्दही न उच्चारता आपण जणू त्या गावचेच नाही अशा तऱ्हेची बतावणी करणे हा शहाणपणाचा मार्ग आहे असा विचार त्याने केला . परंतु हळूहळू त्याला शिक्षण देण्यात आले आणि त्याला सुसंस्कृत करण्यात आले . परिणामी खुद्द बादशहाच्या अगदी जवळ , बादशहाच्या एका सही शिक्क्याचा अधिकारी म्हणून दरबारात त्याची नेमणूक करण्यात आली . दुर्गादासाने केलेल्या कामगिरीबद्दल त्याला तीन हजारी मनसबदार करण्यात आले आणि पाटण्याच्या फौजदारीवर त्याची नेमणूक करण्यात आली.

(३) अजित आणि दुर्गादास, १७०१–१७०७

दुर्गादासाबरोबर हा जो समेट झाला तो १६९८ च्या मे महिन्यात . परंतु १७०१-२ या वर्षी दुर्गादास हा पुन्हा दुसऱ्यांदा बंड करण्यास उद्युक्त झाला . खरे पाहिले तर दुर्गादास आणि अजितसिंग या दोघांना मोगल सरकारविषयी कधीच विश्वास वाटला नव्हता आणि म्हणून मोगल दरबारातील राजकारणापासून ते नेहमी हातभर दूरच राहिले . गुजराथेचा नवीन सुभेदार राजपुत्र महमद आजमशहा याला औरंगजेबाने आज्ञा केली की जर शक्य झाले तर तू दुर्गादासाला दरबारात पाठव नाहीतर त्याला तिथेच ठार मार . तसे झाल्यास अजितसिंग आणि इतर राठोड यांना दुर्गादासाकडून चेतावणी मिळण्याचे बंद होईल . (**मिरत**, ३६६, ३६७; **अख.**, ४६)

महमद आजमने आपले राजधानीचे शहर अहमदाबाद येथे दुर्गादासाला भेटीसाठी बोलावले . त्याला ताबडतोब घेऊन जाण्यासाठी राजदुतांची जी सारखी रीघ लागली त्यामुळे दुर्गादासाच्या मनातील संशय बळावला आणि जेव्हा राजपुत्राने आपल्या सैन्याला शस्त्रे देऊन एकत्र येण्याचा हुकूम केला आहे अशा बातम्या जेव्हा त्याच्या कानावर आल्या तेव्हा त्याच्या संशयाचे भीतीमध्ये रूपान्तर झाले. त्यामुळे दुर्गादासाने आपले तंबू आणि इतर सामानसुमान यांना आग लावली , आणि आपल्या सर्व अनुयायांना बरोबर घेऊन ताबडतोब तो जलद गतीने मारवाडकडे कूच करून गेला . [दुर्गादासाचा पाठलाग मोगल सैन्याच्या एका तुकडीने केला . पाटणच्या रस्त्यावर मोगल घोडेस्वारांनी त्यांना गाठले . दुर्गादासाचा नातू ऐन उमेदीत होता . तो दुर्गादासाला म्हणाला , "अंगावर जखम झाल्याखेरीज रणांगण सोडणे ही लाजिरवाणी गोष्ट आहे. तुम्ही पुढे निघून जा आणि मी शत्रूचा मार्ग रोखून धरतो." त्याप्रमाणे त्याने मोगल फौजांना तोंड दिले. झालेल्या लढाईत तो ठार मारला गेला. मोगल सैन्यातील सफदरखानाचा मुलगा आणि महमद अश्राफ घुणी हे दोघेजण जखमी झाले . याचा फायदा घेऊन दुर्गादास तेथून ६० मैलांवर असलेल्या एका या ठिकाणी पोहोचला . पाठलाग करणाऱ्या मोगल फौजेने लढाई झालेल्या ठिकाणावरच मुक्काम केला. रात्र संपता संपता दुर्गादासाने पुन्हा कूच केले आणि तो पाटणला पोहोचला . त्याने आपल्या बायकामुलांना बरोबर घेतले, आणि पाटण सोडून त्याने मारवाडमधील थेराडकडे कूच केले . बादशाही फौजा पाटणला पोहोचल्यावर त्यांनी दुर्गादासाच्या कोतवालाला ठार मारले, आणि दुर्गादासाचा पाठलाग करण्याचे काम थांबविले . (**मिरात**, ३६८–३६९) या लढाईचा मनूचीने दिलेला वृतांत अतिशय चुकीचा

असून वस्तुस्थितीशी विसंगत असा आहे. या लढाईची त्याने दिलेली तारीख १७०५ ही देखील चुकीची आहे. (पाहा **मनूची**, भाग ४, २४३)]

राठोडांचा पुन्हा उठाव आणि त्यांचे अंतिम यश

जेव्हा दुर्गादास साम्राज्याचा शत्रू म्हणून मारवाडमध्ये परतला तेव्हा उघडउघड बंड पुकारून अजितसिंग त्याला येऊन मिळाला. (१७०२) त्याने मोगलांवर काही हल्लेही चढवले. (**मिरत** ३७३) परंतु त्या दोघांच्या हालचालींचा मोगलांवर कसलाही परिणाम झाला नाही, आणि त्यांच्या हातून विशेष अशी कोणतीही कामगिरी पार पडली नाही. मारवाडचा संपूर्णतया आर्थिक ऱ्हास झाला. जवळ जवळ पाव शतक गनिमीकाव्याचे युद्ध लढल्यानंतर सर्व राठोड टोळीवाल्यांना लढाईबाबतच्या एक प्रकारच्या थकव्याने घेरले होते. या संकटग्रस्त परिस्थितीत आणखी भर घालण्यासाठी म्हणूनच की काय आता अजित आणि दुर्गादास यांच्यामध्ये बेबनाव निर्माण झाला. (**कालीमत-इ-त**. ७४ अ, ३० अ) या परिस्थितीचा फायदा घेण्यात बादशहाने बिलकूल दिरंगाई दाखविली नाही. अजित हा अतिशय उतावळ्या स्वभावाचा आणि स्वभावानेही हेकेखोर असा होता. दुर्गादास आपल्या शहाणपणाने राजदरबारावर जे वजन राखून होता आणि त्याच्या जमातीमध्ये त्याला जी लोकप्रियता होती त्याचा त्याला नेहमीच मत्सर वाटे. ज्या वेळेला सारी परिस्थितीच औरंगजेबावर उलटू पाहात होती त्या वेळी राठोड पुढाऱ्यांमध्ये जी अंतस्थ भांडणे सुरू झाली त्याचा परिणाम औरंगजेबाचे बेत सिद्धीस जाण्यासाठी मदत होण्यात झाला. अजितसिंगाला त्याच्या राज्याबाहेर आणि राजधानीबाहेर आणखी पाच वर्षे ठेवणे त्यामुळे बादशहाला शक्य झाले. इ. स. १७०४ मध्ये औरंगजेबाला त्याच्याविरुद्ध शत्रूचे जे प्रचंड सामर्थ्य उभे राहिले होते त्याला आपण तोंड देऊ शकणार नाही याची जाणीव झाली. परिणामी त्याने अजितबरोबर कसाबसा एक तह केला आणि त्याला मैरताची जहागिरी दिली. नोव्हेंबर १७०५ मध्ये दुर्गादासाला निरर्थक अशा स्वातंत्र्याची जोपासना करणे शक्य झाले नाही. त्याने राजपुत्र आजम याच्या मध्यस्थीने बादशहाला आपली शरणागती दिली. बादशहाने त्याला त्याची जुनी मनसब आणि गुजराथमधील जागा ही पुन्हा परत दिली.

नंतरचे वर्ष म्हणजे औरंगजेबाच्या कारकिर्दीचे शेवटचे वर्ष. त्या वर्षी मराठे हे गुजराथमध्ये घुसले आणि पाठोपाठ रतनपूर येथे मोगल सैन्याचा त्यांनी प्रचंड पराभव केला. याच सुमारास अजितसिंगाने पुन्हा तिसऱ्यांदा बंडाचा झेंडा उभारला. दुर्गादास हा मोगल छावणीतून पळून गेला. अजितसिंगाबरोबर त्याने संगनमत केले आणि थेराड आणि इतर ठिकाणी बंडखोरांना चेतावणी दिली. त्या वेळी गुजराथचा ताबा बेदारबख्त याच्याकडे होता. त्याने दुर्गादासाविरुद्ध फौज रवाना केली. दुर्गादास सुरतेच्या दक्षिणेकडे असलेल्या तुट्याफुट्या कोळी लोकांच्या प्रदेशात निघून गेला. (**मिरत**, ३९० व ३९४) काही काळ अजितसिंगाने मोगलांविरूद्ध उघड उघड बंड पुकारले होते. मोगलांच्या बाजूला असलेल्या नागोरच्या मुहक्कमसिंगाबरोबर त्याने द्रुगेरा येथे लढाई दिली. त्याचा त्याने पराभव केला. याचा परिणाम असा झाला की त्याचे सामर्थ्य आणि दबदबा यामध्ये भर पडली. (**मिरत**, ३९७). यानंतर लौकरच अहमदनगर येथे औरंगजेबाचा मृत्यू झाल्याची बातमी आली. ७ मार्च १७०७ रोजी अजितने जोधपूरवर चाल केली, शहराचा नायब फौजदार जफरकुली याची त्याने हाकालपट्टी केली आणि आपल्या बापाच्या राजधानीच्या शहराचा त्याने ताबा घेतला. मुहक्कमसिंग याने मैरता खाली केले होते आणि तो जखमी अवस्थेत नागोरला पळाला होता. सोजन आणि पाली ही ठिकाणे देखील अजितने परत मिळविली. जोधपूरचा किल्ला गंगाजल आणि तुळशीची पाने यांच्या सिंचनाने पवित्र करण्यात आला. (**मिरत** ३९७; **टॉड**, भाग २, प्र. ८) दुर्गादासाच्या आयुष्यातल्या महत्त्वाकांक्षेवर अशा तऱ्हेने यशाचा मुगुट चढला.

अनुक्रमणिका

(४) आग्र्याच्या जवळपास जाटांनी मांडलेला उच्छाद

१६७९ मध्ये औरंगजेबाने कधीही न संपणाऱ्या ज्या युद्धात आपल्याला गोवून घेतले होते आणि जी युध्दे त्याच्या मृत्यूपर्यंत चालू राहाणार होती त्याची प्रतिक्रिया लवकरच उत्तर हिंदुस्थानातल्या राजकीय परिस्थितीवर दिसून येऊ लागली. दक्षिणेतल्या युद्धामुळे द्रव्य आणि माणसे यांच्या ऱ्हासातून जी एक प्रचंड पोकळी निर्माण झाली होती , ती भरून काढण्यासाठी अगदी न चुकता दरवर्षी उत्तर हिंदुस्थानातील लोकांकडून कराच्या रूपाने वसूल केलेले द्रव्य आणि ऐन जवानीत असलेले रंगरूट यांची भरती करून ती पोकळी भरून काढण्याचा प्रयत्न औरंगजेबाकडून चालला होता . वर्षा पाठोपाठ वर्षे निघून चालली होती . परंतु बादशहा राजधानीला परतत नव्हता किंवा राजपुत्रांपैकी देखील कोणीही . नर्मदेच्या उत्तरेकडच्या साम्राज्यामधील जुने असे संपन्न प्रांत दुय्यम दर्जाच्या सरदारांच्या हाती सोपविण्यात आलेले होते . या सरदारांपाशी असलेले सैन्य देखील अपुरे होते . त्याच वेळी अतिशय दूरवर असलेल्या दक्षिणेकडे वारंवार जाणारे लमाणांचे मालवाहू लांबच लांब तांडे , बादशाही खजिना, सैन्यासाठी लागणारा दाणागोटा आणि अमीर-उमराव यांचा जनाना आणि मालमत्ता यांजबरोबर संरक्षणासाठी अतिशय थोडे सैनिक दिलेले असत. साहजिकच लुटारू जमातींना त्यांच्यावर हल्ला करण्याचा अनिवार्य मोह होणे स्वाभाविक होते . त्या काळातला दिल्लीहून आग्रा आणि घोलपूर येथे जाणारा आणि तेथून माळव्यातून दक्षिणेकडे जाणारा सुप्रसिद्ध राजमार्ग हा अतिशय शूर आणि कणखर अशा जाटांच्या मुलखातून जात होता . जाटांना काबूत ठेवणारी एकच शक्ती होती आणि ती म्हणजे प्रचंड सामर्थ्यातून निर्माण होणारी दहशत.

राजारामाच्या अधिपत्याखाली जाटांचा उठाव, १६८५–१६८८

इ. स. १६८५ मध्ये औरंगजेबाने दक्षिणेवर जे आक्रमण केले त्यामुळे निर्माण झालेल्या संधीचा फायदा जाटांच्या दोन नवीन पुढाऱ्यांनी घेतला . हे पुढारी म्हणजे सिनसाटी आणि सोगर येथील छोटेसे जमीनदार राजाराम आणि रामचेहरा हे होते . आपल्या जमातीतील लोकांना संघटनात्मक ऐक्य आणि समोरासमोर युध्द करण्याची कला या गोष्टींत शिक्षण देणारे ते पहिलेच पुढारी होते . त्याचा परिणाम असा झाला की प्रत्येक जाट शेतकरी हा तलवार आणि दंडा यांचा वापर करण्यात तरबेज झाला . त्यांची तुकड्यांमध्ये भरती करणे , त्यांना आपल्या अधिकाऱ्यांच्या आज्ञा पालन करण्यास शिकविणे आणि त्यांना शस्त्रांचा पुरवठा करणे म्हणजे एका सेनेची उभारणी झाल्यागतच होते. ज्या ठिकाणाहून शत्रुविरुद्ध कारवाई करता येईल, पराभूत झालेल्या आपल्या पुढाऱ्यांना आसरा देता येईल आणि लूट साठविण्यासाठी उपयोगी पडतील अशासाठी त्यांनी त्यांचे निवासस्थान असलेल्या निबिड अशा जंगलात लहान लहान गढ्या बांधल्या होत्या. या गढ्यांना त्यांनी चिखलाच्या भिंती बांधून इतकी मजबुती आणली होती की तोफांच्या भडिमाराला देखील त्यांनी तोंड दिले असते . त्यानंतर त्यांनी साम्राज्याच्या राजमार्गावर हल्ले करण्यास सुरुवात केली आणि आग्रा शहराच्या उपनगरापर्यंत त्यांनी धुमाकूळ घातला.

राजारामाच्या या अनिर्बंध हालचालींना आळा घालण्याचे आग्र्याचा सुभेदार सफीखान याला जमले नाही. जाटांच्या टोळ्यांनी रहदारीला रस्ते बंद केले आणि जिल्ह्यामधील अनेक खेडी लुटली . यानंतर राजारामाने अधिकच उद्धटपणा दाखविण्यास सुरुवात केली. त्याने घोलपूरजवळ सुप्रसिद्ध तुराणी लढवय्या आधारखान याच्यावर हल्ला करून त्याला ठार मारले . (**ईश्वरदास**, १६४ ब; **के. के.**, भाग २. ३९५) हा सरदार काबुलहून विजापूर येथील बादशहाच्या छावणीकडे निघाला होता . [जाट लोकांनी केलेल्या बंडाचे गांभीर्य औरंगजेबाने बऱ्याच पूर्वी ओळखले होते . या बंडाचा उपशम करण्यासाठी औरंगजेबाने १६८६ च्या मे महिन्यात आपला नामवंत सेनापती खानजहान कोकलताश जफरजंग याची रवानगी जाटांवर केली होती . (**एम्. ए.**, २७४) परंतु जाटांचा पुढारी राजाराम याला मिळालेले

विजय आणि खानजहानचा पराभव यामुळे बादशहा घाबरून गेला. डिसेंबर महिन्यात त्याने आपला मुलगा आजम याची जाटांच्या मुलखात रवानगी केली आणि लढाईची सूत्रे स्वतः हाती घेण्याचा त्याला हुकूम दिला . या हुकमानुसार राजपुत्राने कूच केले आणि तो बुऱ्हाणपूरपर्यंत पोहोचला . दरम्यान गोवळकोंड्याला वेढा देऊन बसलेल्या मोगल सैन्याची परिस्थिती अतिशय हालाखीची झाली होती आणि म्हणून बादशहाने या प्रसंगातून सोडवणूक होण्यासाठी आजमला ताबडतोब माघारी बोलाविले (जुलै १६८७).] डिसेंबर १६८७ मध्ये राजपुत्र बेदारबख्त याला जाटांच्या मुलखात चाललेल्या युद्धाचा संपूर्ण अधिकार देऊन पाठविण्यात आले.

परंतु राजपुत्र तेथे येण्याचे अगोदर जाटांच्या पुढाऱ्याने अधिकच धुमाकूळ घातला . १६८८ च्या सुरुवातीला त्याने हैद्राबादचा मीरइब्राहीम ऊर्फ महाबतखान हा पंजाब येथे आपल्या सुभेदारीचे अधिकार घेण्यासाठी चालला असताना त्याच्यावर हल्ला केला . त्यानंतर लौकरच सिकंदरा येथील अकबराची कबर त्याने लुटली आणि तेथील गालिचे , सोने आणि चांदी यांची भांडी , दिवे वगैरे सामान त्याने आपल्याबरोबर नेले आणि कबरीच्या इमारतीचे नुकसान केले . (**ईश्वरदास**, १३२ ब; **मनूची**, भाग २. ३२०) [या बाबत मनूचीने दिलेली हकीकत पुढीलप्रमाणे आहे. :

"कबरीच्या इमारतीला ब्राँझचे जे मोठे दरवाजे होते ते मोडून त्यांनी आपल्या लुटालुटीस सुरुवात केली . तेथे असलेले अतिशय मौल्यवान दगड आणि सोने आणि चांदी यांचे पत्रे त्यांनी चोरले . त्यांना नेता येणे जे शक्य नव्हते त्याचा त्यांनी नाश केला . अकबराची हाडे त्यांनी ओढून काढली आणि रागारागाने विस्तवात फेकून जाळून टाकली."]

जाट मुलखात आल्यावर बेदारबख्त याने मोगलांच्या लष्करी हालचालींमध्ये अधिक जोम निर्माण केला. दोन रजपूत जमातींमध्ये परस्पर विनाशी असे जे युद्ध चालले होते त्यामध्ये एका पक्षाच्या बाजूने राजाराम हा लढत होता . बंदुकीची गोळी लागून तो ४ जुलै १६८८ रोजी ठार मारला गेला . (**ईश्वरदास**, १३४ ब; **एम्. ए.**, २११).

राजा भूषणसिंगाकडून जाटांचा पाडाव, १६९०

अंबरचा (जटापूर) नवीन राजा भूषणसिंग कचवहा याला औरंगजेबाने मथुरेचा फौजदार नेमले . त्याच्याकडे त्याने जाटांचा पूर्ण उच्छाद करण्याची खास कामगिरी सोपविली . (**ईश.**, १३३ अ) आणि स्वतःकरता जहागीर म्हणून सिनसानी जिंकून घेण्यास त्याला सांगितले . बेदारबख्त आणि भूषणसिंग यांनी सिनसानीला वेढा दिला . परंतु जाट प्रदेशांतील जंगलातल्या या मोहिमेचा मोगल सैन्यावर असह्य ताण पडला. दाणागोटा आणि पाणी यांच्या तुटवड्यामुळे त्यांना अतिशय कष्ट सहन करावे लागले . परंतु वेढा घालणारे मोगल सैन्य निग्रहीपणे ठाण मांडून राहिले . १६९० च्या जानेवारी महिन्याच्या अखेरीला एक सुरुंग यशस्वीपणे उडविण्यात आला . त्यामुळे किल्ल्याच्या भिंतीला खिंडार पडले . त्याचा फायदा घेऊन मोगल किल्ल्यामध्ये घुसले. जवळ जवळ तीन तासपर्यंत त्या अगोदर जाटांनी प्रखर प्रतिकार केला आणि आपली पंधराशे माणसे गमावली . बादशाही सैन्यापैकी दोनशे सैनिक ठार झाले आणि सातशे रजपूत ठार मारले गेले अगर जखमी झाले . पुढील वर्षी (२१ मे १६९१). (पाहा **ईश.**, १३६ ब, १३७ अ; **एम.ए.**, ३३४; **अहकाम**, २६) राजा भूषणसिंग याने जाटांचा दुसरा मजबूत किल्ला सोगर हा अचानक हल्ला करून घेतला . (**ईश्वर.**, १३७ अ; आणि ब; **एम. ए.**, ३४०)

चौरमान जाटांचा उदय

या कारवायांचा असा परिणाम झाला की नवीन जाट पुढारी हे बादशाही सैनिकांना माहीत नसलेल्या अशा जाट प्रदेशाच्या कानाकोपऱ्यात दडून बसले . यामुळे जिल्ह्याला काही वर्षे शांततेचा लाभ

झाला. या कालावधीनंतर जाट लोकांमध्ये एक नवीन नेता उदयास आला . त्याचे नाव चौरमान असे होते . हा राजारामाचा भाऊ भज्ज याचा मुलगा . याच्याकडे संघटना चातुर्य आणि आलेल्या संधीचा फायदा घेण्याची कुवत होती . त्यामुळे त्याला एका नवीन घराण्याची स्थापना करण्यात यश आले . हे घराणे अजूनही भरतपूरवर राज्य करीत आहे . "त्याने आपल्या सैनिकांची संख्या वाढवली . इतकेच नव्हे तर त्यांच्यामध्ये त्याने बंदुकची आणि घोडेस्वारांची तुकडी यांची भर घालून त्यांच्या ताकदीत वाढ केली . लवकरच त्याने त्यांचा मोगलांविरुद्ध कारवाई करण्यासाठी उपयोग केला . त्याने बादशाही दरबारातल्या अनेक वजिरांना राजरस्त्यावर लुटले , इतकेच नव्हे तर साम्राज्याच्या प्रांतांतून बादशाही छावणीकडे जाणारा महसूल आणि जामदारखाना यांच्यावरही त्याने हल्ले चढविले " (**एफ्. आर. एम्, एस्**. ४१) परंतु चौरमान याच्या सत्तेचा हा जो विकास झाला तो औरंगजेबाच्या मृत्यूनंतरच . १७०४ च्या सुमारास त्याने मोगलांच्या ताब्यातून सिनसानी जिंकून घेतले . परंतु ९ ऑक्टोबर १७०५ मध्ये आग्र्याचा सुभेदार मुखत्यारखान याने ते पुन्हा दुसऱ्यांदा जाटांपासून हिसकावून घेतले. (**एम्. ए.**, ४९८; **अहकाम**, ७६).

(५) पहाडसिंग गौर आणि त्याची मुले यांनी माळव्यात केलेली धामधूम, १६८५

पहाडसिंग गौर हा पश्चिम बुंदेलखंडात असलेल्या इंद्राखीचा रजपूत जमीनदार होता . माळव्यामध्ये शहाबाद ढमढेरा येथे बादशहातर्फे तो फौजदार म्हणून काम करीत होता . शौर्यामध्ये त्याला दुसरी तोड नव्हती आणि जितका तो शूर होता तितकाच तो स्वभावाने अतिशय दिलदार होता . लालसिंग खीची (चौहान) याचा आणि बुंदीचा राजा अनिरुद्धसिंग हाडा यांच्यामध्ये जो कलह चालला होता त्यात त्याने लालसिंगाची बाजू घेतली. लालसिंग हा अनिरुद्धाचा मांडलिक होता . अनिरुद्ध हा अतिशय जुलमी होता . पहाडसिंगाने अनिरुद्धाचा पराभव केला , आणि लक्षावधी रुपये किमतीची त्याची छावणी आणि सामानसुमान त्याने लुटले (१६८५ च्या सुरुवातीला). त्यानंतर त्याने उघड उघड मोगल साम्राज्याबरोबर वैर पुकारले आणि माळव्यातील खेडी लुटण्यास सुरुवात केली . याच सुमारास त्या प्रांताचा कारभार राजपुत्र महमद आजम याच्याऐवजी त्याच्या दिवाणाचा पेशदस्त रायमुलूखचंद हा पाहात होता . त्याने बंडखोरावर हल्ला केला आणि त्याला ठार मारले . (डिसेंबर १६८५.) परंतु त्यामुळे बंडाचा उपशम न होता पहाडसिंगाचा मुलगा भगवंत याच्या नेतृत्वाखाली ते चालूच राहिले . त्याने क्रूर अशा शेतकऱ्यांचे एक मोठे सैन्य जमविले आणि ग्वाल्हेरच्या आजूबाजूचा प्रदेश लुटण्यास सुरुवात केली . सर्व रस्ते त्याने रहदारीला बंद करून टाकले. त्याच्या विरुद्ध आपली फौज घेऊन मुलूखचंद हा चाल करून गेला . अंत्रीजवळ दोन्ही फौजांत घनघोर युद्ध झाले. या युद्धात बादशाही फौजांचा मोड झाला आणि त्यांनी पळ काढला . परंतु गौड शिपायांनी मोगलांचे सर्व सामानसुमान, घोडे वगैरे लुटले आणि लूट सुरक्षित ठेवण्यासाठी ते आपल्या मुख्य छावणीकडे परतले. युद्धभूमीवर भगवंतसिंग हा जवळ जवळ एकाकी राहिला होता . त्याला काही मोगल अधिकाऱ्यांनी ठार मारले. (मार्च १६८६.) (**ईश.**, ९४ अ – ९७ अ; **एम्. ए.**, २६६, २७३)

परंतु यानंतर देखील माळव्यातील धामधूम थंडावली नाही . पहाडसिंगाचा आणखी एक मुलगा देवीसिंग हा छत्रसाल बुंदेला याला जाऊन मिळाला , आणि त्याने बादशाही मुलखात लुटालूट करण्यास आणि बुंदेल खंडातील लोकांना पीडा देण्यास सुरुवात केली . (**ईश**, ११९ ब) १६९० मध्ये पहाडसिंगाचा नातू गोपालसिंग याने मोठे सैन्य जमविले आणि इंद्राखीचा किल्ला जिंकून घेतला . हा किल्ला बहादुरीया जमातीचा प्रमुख भक्तवार याच्या ताब्यात होता . या बंडखोरावरील हल्ल्यात ग्वाल्हेरचा फौजदार सफ्दरखान हा ठार मारला गेला. (मे १६९०) (**ईश्वर**., १३५ ब, १३८ अ; **एम्. ए**., ३३५).

परंतु त्यानंतर दोनच वर्षांनी गौड बंडखोर हे बादशहाला शरण आले आणि बादशाही सैन्यात ते सामील झालेले आपल्याला आढळून येतात. (**अखबारात, वर्ष** ३६ व ३७)

(६) बिहारमधील गंगाराम याचे आणि माळव्यातील गोपालसिंग याचे बंड (अधिक माहितीसाठी पाहा : **स्ट्यूअर्टचे बंगाल**)

गंगाराम हा गुजराथचा एक गरीब नागर ब्राह्मण होता . तो खानजहान बहादूर याचा दिवाण होता . खानजहान बहादूर हा दक्षिणेत आपली कामगिरी पार पाडत असताना त्याच्या अलाहाबाद आणि बिहार येथील जहागिरीची व्यवस्था तो पाहात असे . या अप्रसिद्ध अशा हिंदू माणसाचा एकाएकी जो उदय झाला त्यामुळे इतर काही नोकरांवर खानाच्या मर्जीतून जाण्याचा प्रसंग आला . त्यामुळे ते गंगारामाचा मत्सराने द्वेष करू लागले. गंगाराम हा दक्षिणेत नव्हता. त्यामुळे या नोकरांनी गंगारामाला स्वतंत्र व्हायचे आहे आणि आपला स्वार्थ साधावयाचा आहे असे सांगून त्याच्याविषयी खानाचे मन कलुषीत केले . खानाने आपल्या दिवाणाला ताबडतोब पाचारण केले . हलक्या कानाच्या आपल्या अशा धन्याची गंगारामला घृणा वाटली आणि आपले जीवित आणि प्रतिष्ठा यांना धोका आहे असे वाटून त्याने बंडाचा मार्ग स्वीकारला . त्याने जवळ जवळ चार हजार शिपाई जमविले, बिहार शहर लुटले आणि पुढे चाल करून त्याने पाटण्याला वेढा दिला . त्याने राजपुत्र अकबर नावाच्या एका तोतयाला पुढे केले आणि त्याच्या नेतृत्वाखाली एकत्र होण्याचा आदेश लोकांना दिला. (मार्च १६८१). परंतु पाटण्यासारखे तटबंदी असलेले शहर काबीज करण्याचे कौशल्य अथवा साधनसामग्री त्याच्याजवळ नव्हती . साहजिकच त्याने आजूबाजूची खेडी लुटण्याचा किफायतशीर उद्योग स्वीकारला. दरम्यान पाटण्याच्या सुभेदाराने स्वतःला किल्ल्यात कोंडून घेतले . अखेर ढाक्का आणि बनारस येथून बादशाही रसद येऊन पोहोचली आणि पाटण्याचा वेढा त्यांनी उठवला . यानंतर काही काळाने गंगाराम माळव्यात शिरला आणि तेथील रजपूत बंडखोरांबरोबर संगनमत करून त्याने सिरोज लुटले. (ऑक्टोबर १६८४) (**ऑर्म्स, एम्. एस**. १२६ ब) यानंतर काही काळाने तो उज्जैन, येथे मरण पावला. (**दिल**., भाग १. १७ ब)

दक्षिणेमध्ये बादशहाच्या सैन्यात माळव्यातील रामपुऱ्याचा जमीनदार राव गोपालसिंग चंद्रावत हा मनसबदार होता . त्याने आपला मुलगा रतनसिंग याला आपल्या जहागिरीची व्यवस्था बघण्यासाठी माळव्याकडे पाठविले होते . रतनसिंग स्वभावाने दुष्ट होता . त्याने मुसलमान धर्म स्वीकारला आणि बादशहापासून त्याच्या वडिलोपार्जित जहागिरीची सनद मिळविली . या जहागिरीला इस्लामपुरा हे नाव नव्याने देण्यात आले. ही बातमी गोपालसिंग याला कळताच त्याने मोगल सैन्य सोडले आणि तो आपल्या जहागिरीकडे परतला. तेथे गेल्यावर त्याने रामपुरा परत मिळविण्यासाठी सैन्याची जमवाजमव करण्याचा प्रयत्न केला. (जून १७००) परंतु माळव्याच्या सुभेदाराने त्याचा हा प्रयत्न हाणून पाडला . (**दिल**., भाग २. १३० अ; **अख**.) सरतेशेवटी निराश होऊन गोपालसिंग याने बादशहाला शरणागती दिली . त्याची नेमणूक कौलासचा फौजदार म्हणून करण्यात आली . (हैद्राबाद) (**दिल**., १४५ ब; **अख**.) १७०६ च्या सुरुवातीला त्याला कौलासच्या फौजदारीवरून काढून टाकण्यात आले . त्यामुळे त्याच्यावर अतिशय गरिबीची परिस्थिती ओढवली. नोकरीचे साधन म्हणून तो मराठ्यांना जाऊन मिळाला . (**दिल**; १५५ अ) आणि त्या वर्षाच्या मार्च महिन्यात मराठ्यांनी बडोद्याची जी लूट केली तीत तो सामील झाला. (**दिल**. १५६ अ.)

(७) बंगाल प्रांताबरोबर इंग्रजांचा व्यापार

इंग्रज राष्ट्राने आपली पहिली व्यापारी वखार [अधिक माहितीसाठी पाहा : **विल्सन्सचे अर्ली ॲनाल्स ऑफ दी इंग्लिश इन बंगाल , खंड १.**] सुरत येथे १६१२ मध्ये स्थापन केली . खुष्कीच्या मार्गाने त्यांनी आग्रा आणि दिल्ली या शहरांबरोबर आपला व्यापार चालू ठेवला . आग्र्याहून त्यांनी बिहारमधील पाटणा येथे व्यापार करण्याचे १६२० आणि १६३२ मध्ये दोन वेळा प्रयत्न केले . परंतु सुरतहून खुष्कीच्या मार्गाने माल वाहून नेण्याचा खर्च हा अंदाजाबाहेर होता . विशेषतः सोरामिठासारखा वजनदार पदार्थ वाहून नेणे हे फार खर्चाचे होते . साहजिकच ही योजना इंग्रजांनी मोठ्या शहाणपणाने रद्दबादल केली . या सुमारास गोवळकोंडा राज्यातील मसुलीपट्टम या बंदरात इंग्रजांचा एक व्यापारी प्रतिनिधी होता.

इ. स. १६३३ मध्ये बालासोर येथे आणि कटकच्या आग्नेयेस पंचवीस मैलांवर हरिहरपूर येथे इंग्रजांनी आपल्या वखारी स्थापन केल्या . त्यानंतर काही काळाने १६४० मध्ये इंग्रजांनी मद्रास येथे फोर्ट सेंट जॉर्ज याच्या बांधणीचे काम सुरू केले . हा किल्ला ज्या जमिनीवर बांधण्यात आला होता ती जमीन विजयनगर घराण्याच्या एका हिंदू राजाकडून विकत घेण्यात आली होती . अशातऱ्हेने "इंग्रजांनी हिंदुस्थानात आपले पहिले स्वतंत्र असे ठाणे स्थापन केले ." परंतु हे ठाणे मोगल साम्राज्याच्या सरहद्दीबाहेर होते. इ. स. १६५१ मध्ये इंग्रजांनी बंगालमध्ये कलकत्त्याच्या उत्तरेला २४ मैलांवर गंगेच्या काठी हुगळी येथे आपले पहिले व्यापारी ठाणे स्थापन केले. तेथून ज्या वस्तू ते निर्यात करीत त्यामध्ये सोरामीठ , रेशीम आणि साखर या वस्तू प्रमुख होत्या. यांपैकी सोरामीठ हे पाटण्याच्या उत्तरेला असलेल्या सिंधिया अथवा लालगंज येथून बोटीतून आणले जात असे . त्या वेळी बंगालचा सुभेदार राजपुत्र शुजा हा होता . त्याने इंग्रजांना बंगालमध्ये व्यापार करण्याची एक सनद दिली. (निशाण) या सनदीप्रमाणे सर्व तऱ्हेच्या जकाती आणि इतर देणी ही त्यांना माफ करण्यात आली . त्यापोटी त्यांनी सालिना ३००० रुपये द्यावे असे ठरले . (१६५१) युरोपकडे बंगालमधील माल घेऊन जाण्यासाठी मालाची चढउतार करणारे एक बंदर म्हणून बालासोर हे ठिकाण अनेक वर्षे उपयोगात आणले गेले.

इ. स. १६५८ मध्ये इंग्लंडच्या गृहखात्याने हिंदुस्थानातील इंग्लिश कारखान्यांची पुनर्रचना केली . कंपनीच्या सर्व वखारींचे स्थान सुरतेचा अध्यक्ष आणि तेथील कौन्सिल यांना दुय्यम दर्जाचे ठरविले गेले . त्याशिवाय मद्रास आणि हुगळी येथे मुख्य प्रतिनिधीचे कार्यालय नियुक्त करण्यात आले होते.

बंगालबरोबरील इंग्रजांच्या व्यापाराची झालेली वाढ

१६५८ च्या सुमारास बंगालबरोबरचा इंग्रजांचा व्यापार अतिशय भरभराटीत होता . कच्चा रेशमाचा पुरवठा भरपूर होता. वेगवेगळ्या तऱ्हेची आणि अतिशय सुबक अशी टॅफेटा रेशमी कापडे मुबलक प्रमाणात उपलब्ध होती. सोरामीठ हे अतिशय स्वस्त आणि चांगल्या दर्जाचे मिळत होते . इंग्लंडमधून सोने आणि चांदी हिंदुस्थानात पाठविली जात होती, त्यांची उचल हिंदुस्थानातील लोकांकडून जलद होत होती.

इ. स. १६६१ मध्ये हिंदुस्थानातील इंग्रज वखारींच्या कारभारामध्ये आणखी बदल करण्यात आले . बंगालमधील सर्व कारखाने ह्यांना मद्रास प्रांताच्या खालोखाल दर्जा देण्यात आला आणि मद्रास प्रांताचा दर्जा सुरतेच्या बरोबरीने करण्यात आला . बंगालचा व्यापार जलद वाढतच गेला . १६६८ मध्ये कंपनीने बंगाल प्रांतातून ३४००० पौंडांचा माल निर्यात केला . १६७५ मध्ये या मालाची किंमत ८५ हजार पौंडांपर्यंत वाढली. इ. स. १६७७ मध्ये ती एक लक्ष पौंड झाली आणि १६८० मध्ये ती दीड लाख पौंडांवर गेली . दुय्यम दर्जाच्या वखारी १६६८ मध्ये डाक्का येथे आणि १६७६ मध्ये मालडा येथे उघडण्यात आल्या . स्थानिक

उत्पादन होणाऱ्या वस्तू इंग्रज खरेदी करीतच परंतु त्याशिवाय बंगालमध्ये ते जे रेशमाचे कापड खरेदी करीत त्याच्या रंगाचा दर्जा सुधारण्यासाठी ते युरोपीयन रंगाऱ्यांना बंगालमध्ये पाठवीत असत . त्याशिवाय हुगळीहून गंगेच्या पात्रातून जहाजे समुद्रात नेण्याकरीता म्हणून इ . स. १६६८ मध्ये त्यांनी बंगाल पायलट सर्हिस सुरू केली. बंगालच्या उपसागरातून गंगा नदीच्या पात्रामध्ये पहिले ब्रिटिश जहाज १६७९ मध्ये गेले.

(८) बंगालमधील इंग्रज व्यापारी आणि मोगल अधिकारी यांच्यामध्ये निर्माण झालेला संघर्ष

दरम्यान स्थानिक मोगल अधिकाऱ्यांनी बंगाल प्रांतामध्ये जी बेकायदेशीर वसुली चालविली होती आणि त्यांच्याकडून जे अडथळे निर्माण केले जात होते त्याचा परिणाम त्यांच्यामध्ये आणि इंग्रज व्यापाऱ्यांमध्ये निर्माण झालेले मतभेद विकोपाला जाण्यात झाला . हुगळी येथील स्थानिक मोगल अधिकाऱ्यांनी कंपनीच्या बोटी अडविण्याचे आणि कंपनीचा माल जप्त करण्याचे आपले सत्र चालू ठेवले . आपल्याला जकातीची माफी मिळावी म्हणून इंग्रज प्रतिनिधी ; ह्यूजेस याने अनेक वेळा शायस्ताखानाला मोठी रक्कम देऊ केली परंतु त्याचा काहीही उपयोग झाला नाही . सरते शेवटी इंग्रज व्यापाऱ्यांचा होता नव्हता तो संयम सुटला, आणि त्यांनी ताकदीच्या बळावर स्वतःचे संरक्षण करण्याचे आणि हिंदुस्थानातील राजकर्त्यांबरोबरचे संबंध तोडण्याचे ठरविले . त्याचप्रमाणे त्यांनी हिंदुस्थानच्या किनाऱ्यावरील काही मोक्याच्या जागा ताब्यात घेऊन त्या जागांना तटबंदी करून आपला व्यापार वरील प्रकारच्या उपद्रवापासून सुरक्षित करण्याचा निश्चय केला . इंग्रज आणि मोगल यामध्ये झालेल्या या युद्धाला सुरुवात १६८६ मध्ये झाली.

इंग्रज व्यापाऱ्यांच्या मोगल सरकारच्या स्थानिक अधिकाऱ्यांविरुद्ध पुढील तीन तक्रारी होत्या.

(१) मोगल अधिकारी ज्या वस्तूंची आयात होत असे त्या वस्तूंवर वार्षिक ३००० रुपयांच्या ठोक रकमेची जकात घेण्याच्या ऐवजी त्या वस्तूंच्या किमतीप्रमाणे जकातीची मागणी करीत . इंग्रज व्यापाऱ्यांच्या म्हणण्याप्रमाणे राजपुत्र शुजा हा बंगालचा सुभेदार असताना या रकमेची नियमाप्रमाणे गणती करण्यात आलेली होती . त्याचप्रमाणे वेळोवेळी जकातीचे दर वाढवले जातात अशीही इंग्रजांची तक्रार होती . इंग्रजांनी असाही दावा मांडला की १५ मार्च १६८० रोजी औरंगजेबाने त्यांना जे फर्मान दिले होते त्यानुसार सुरत येथे त्यांनी ३ ½ टक्के एकत्रित अशी जकात भरल्यावर त्यांना जकात आणि इतर कर दिल्याशिवाय मोगल साम्राज्याच्या कोणत्याही भागात मालाची आयात करण्याचा आणि पूर्णाधिकाराने व्यापार करण्याचा अधिकार होता.

(२) इंग्रजांची दुसरी तक्रार रहदारी (अंतर्गत ने -आण करण्याबद्दल किंवा रस्त्याची राखण केल्याबद्दल जकात), बक्षिशी (पेशकश) लेखनिकाचा मोबदला, आणि फर्माइश (सुभेदाराच्या हुकमानुसार तयार मालाचा पुरवठा करणे . या मालाबद्दल किंमत आकारण्याची प्रथा नव्हती .) यांच्या रूपाने स्थानिक मोगल अधिकारी त्यांना वाटेल तसे हप्ते गोळा करीत त्याबाबत होती.

(३) इंग्रजांची तिसरी तक्रार शायस्ताखान आणि राजपुत्र अजीम उश्शान यांच्यासारख्या मोठ्या अधिकाऱ्यांनी जी एक प्रथा घालून दिली होती आणि जिचे अनुकरण अनेकदा फौजदारांसारखे स्थानिक अधिकारीही करीत असत त्याबद्दल. ही प्रथा म्हणजे मालाची खोकी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणाकडे जात असताना वाटेत उघडणे आणि त्यातील वस्तू बाजारातील किमतीपेक्षा अतिशय कमी किमतीला

त्यांच्या लहरीला येईल त्या किमतीला विकत घेणे . काही काही सुभेदारांनी विशेषतः अजीम उश्शान याने अशातऱ्हेच्या वस्तू कमी किमती लावून आपल्या ताब्यात घ्यावयाच्या आणि त्या वस्तू बाजारामध्ये त्यांच्या नेहमीच्या किमतीला विकून मधला नफा पदरात पाडून घेऊन आपल्या संपत्तीत भर घालण्याचा प्रयत्न केला. या पद्धतीला सौदा-इ-खास असे म्हणत असत.

व्यापारी मालावरील जकातीबाबतचे मोगल कायदे-कानून

१० एप्रिल १६६५ रोजी औरंगजेबाने एक हुकूमनामा काढून असे जाहीर केले की साम्राज्याच्या सर्व प्रांतांत जकातीचे दोन सारखे दर यापुढे वसूल केले जातील . ते म्हणजे २½ टक्के मुसलमानांसाठी आणि ५ टक्के हिंदूंसाठी . हिंदूंकडून मोगल सरकार ज्या पद्धतीने जिझिया कर वसूल करीत असे त्याप्रमाणे युरोपियन लोकांच्यावर दरडोई जिझिया किती प्रमाणात आणि कसा लादावा हे ठरविणे मोगल सरकारला कठीण गेले असे दिसते. परिणामी यामधून त्यांनी जो मध्यम मार्ग शोधून काढला त्यानुसार त्यांनी जिझिया कराचे रूपांतर युरोपियन लोकांकडून ज्या वस्तू येत असत त्यावरील आयात कर वाढवून केले . अशातऱ्हेने वाढविलेला आयात कर हा ३½ टक्के असा होता.

बंगालमधल्या इंग्रजांनी पुढील दोन प्रकारचे जे दावे मांडले होते ते कोणत्याही निकषावर तपासून बघितले असता खोटे आणि अग्राह्य असे होते . हे दावे म्हणजे (१) १६५१ मध्ये शुजाने सवलत दिल्याप्रमाणे वार्षिक ३००० रुपये देऊन आयात होणाऱ्या मालाच्या प्रत्यक्ष किमतीवरील जकात टाळणे आणि (२) १६८० च्या औरंगजेबाच्या फर्मानानुसार सुरत येथे जकात देऊन हिंदुस्थानच्या इतर कोठल्याही भागात अनिर्बंध व्यापार करणे हे होते.

मोगल सरकारची भूमिका

शुजा हा एक केवळ प्रांतिक सुभेदार होता . त्याच्या सुभेदारीच्या कारकिर्दीत त्याच्या मनाला येईल त्याप्रमाणे त्याच्या मर्जीतील कोणत्याही व्यापारी गटाला तो सोप्या अटींवर व्यापार करू देऊ शकत होता . परंतु त्याने बहाल केलेले अधिकार (निशाण) हे बादशहाने मान्य केल्याखेरीज आणि त्याचे रूपान्तर बादशाही फर्मानात झाल्याखेरीज त्याच्यानंतर सुभेदारीवर येणाऱ्या अधिकाऱ्यावर बंधनकारक नव्हते . त्याचप्रमाणे इंग्रजांनी औरंगजेबाच्या १६८० च्या फर्मानाचा जो अर्थ लावला होता तोही तितकाच चुकीचा होता. सुरत बंदरात उतरलेल्या मालावर भरलेल्या जकातीच्या योगे , कल्पनाशक्तीला कितीही ताण दिला तरी चीनमधून सुरतेच्या बंदरातून नव्हे तर परस्पर बंगालमध्ये येणाऱ्या मालावरील जकात रद्द होऊ शकते हे मनाला पटण्यासारखे नव्हते आणि म्हणून अशा मालावर सुरतेला जकात भरली जाणे हे ही अशक्य होते. [१६३७ आणि १६५० या दोन वर्षांतील औरंगजेबाची फर्माने त्याचप्रमाणे १६५१ आणि १६५६ मधील शुजाने दिलेली निशाणे व त्याचप्रमाणे १६६० मध्ये मिर जुम्ला याने दिलेला परवाना या सर्वांच्या तंतोतंत अटी **हिस्टरी ऑफ औरंगजेब** ग्रंथाच्या ५ व्या खंडात दिलेल्या आहेत . (आवृत्ती दुसरी, पाने २९०–२९१) सर विल्यम फॉस्टर याने इंग्रजांचा दावा हा निरुपयोगी होता हे मान्य केले आहे.]

बादशाही आज्ञेविरुद्ध मोगल अधिकाऱ्यांकडून होणारी सक्तीची वसुली

इंग्रजाचे दुसरे आणि तिसरे गाऱ्हाणे जे होते त्याबाबत आपल्याला असे म्हणता येईल की ज्या वसुलीबद्दल इंग्रजांनी तक्रार केलेली होती ती वसुली औरंगजेबाने अगोदरच बेकायदेशीरच ठरवलेली होती आणि जी वसुली गोळा केली जात होती ती त्याच्या आज्ञांचे उल्लंघन करून . त्याच्या कारकिर्दीच्या दुसऱ्या

वर्षात त्याने रहदारी रद्द केली होती , तर बळजबरीने वसूल केली जाणारी बक्षिसी आणि इतर स्वीकारल्या जाणाऱ्या देणग्या ह्यांचा २९ एप्रिल १६७३ रोजी औरंगजेबाने जो एक सार्वत्रिक वटहुकूम अदवाब रद्द करण्यासाठी काढला होता त्यामध्ये धिःक्कार केलेला होता . त्याचप्रमाणे औरंगजेबाचा नातू अजीम उश्शान याने आपल्या खाजगी व्यापारासाठी माल जप्त करण्याची जी प्रथा पाडली होती त्याची हकीकत औरंगजेबाच्या कानावर गेल्यावर (अंदाजे १७०३ मध्ये) त्याने या गोष्टीचा अतिशय कडकपणे निषेध केला होता. परंतु स्थानिक अधिकाऱ्यांकडून जे व्यापारी पीडले गेले होते त्यांच्या संकटांचे निराकरण फारच क्वचित प्रसंगी होत असे , आणि तेसुद्धा ज्या वेळी दक्षिणेमध्ये अतिशय दूरवर असलेल्या वृद्ध बादशहाच्या कानावर अशा व्यापाऱ्यांची गाऱ्हाणी पडत असत तेव्हा हे निराकारण होई ते निव्वळ कागदी हुकुमाच्या रूपाने.

ज्या समाजामध्ये लोकांत उत्साहाची वाण होती आणि ज्यांना खाजगी जीवनात काय किंवा सार्वजनिक जीवनात काय ज्या प्रत्येक व्यक्तीच्या हातात सत्ता असेल त्या व्यक्तीपुढे अगतिकपणे नमण्याची सवय झालेली होती त्या समाजात राज्यकारभाराची शुचिता असणे अशक्य होते. बादशहाला सर्व गोष्टींकडे लक्ष देणे कठीण होते. त्याचप्रमाणे त्याने सर्व दूर स्वतः हजर राहणे ही अशक्य गोष्ट होती . त्याला आपल्या सर्व गोष्टी प्रतिनिधींमार्फत करून घ्याव्या लागत आणि या पदावर असलेल्या माणसांच्या ठिकाणी औरंगजेबाइतका प्रामाणिकपणा नव्हता किंवा त्याला त्याच्या प्रजेबद्दल वाटणारी आत्मीयताही नव्हती.

(९) इंग्रजांचे बंगालमध्ये औरंगजेबाबरोबर युद्ध, १६८६–१६८९.

कासीम बझार (बंगाल) मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या वखारीचा मुख्य अधिकारी बॉब चरनॉक हा होता. त्याच्याविरुद्ध आणि त्याच्या सहअधिकाऱ्यांविरुद्ध हिंदुस्थानी व्यापारी आणि दलाल यांनी मोठ्या रकमेचा दावा मांडला. हे व्यापारी आणि दलाल कंपनीनेच नेमलेले होते . कासीम बझार येथील हिंदुस्थानी न्यायाधीशाने वरील अधिकाऱ्यांवर ४३००० रुपयांचा हुकूमनामा काढला . (१६८४–८५) चरनॉक याने या हुकूमनाम्याप्रमाणे वागण्याचे नाकारले . परिणामी मोगल फौजांनी त्याच्या वखारीवर हल्ला करून ती ताब्यात घेतली. (ऑगस्ट १६८५) परंतु पुढील वर्षाच्या एप्रिल महिन्यात तो हुगळी येथे पळून गेला , आणि बंगालमधील इंग्रजांच्या कारभाराची सूत्रे त्याने आपल्या हाती घेतली . यानंतर सहाच महिन्यांनी युद्धाला सुरुवात झाली.

इंग्रजांकडून हुगळीची धुळदाण, १६८६

२८ ऑक्टोबर १६८६ रोजी तीन इंग्रज शिपायांनी मोगलांच्या ताब्यातील हुगळी शहराच्या बाजारपेठेत तेथील स्थानिक मोगल फौजदाराने काढलेल्या वटहुकूमाचा भंग करून शिरण्याचा प्रयत्न केला. त्यात ते तिघेजण जखमी झाले . त्यांना कैद करून फौजदाराकडे नेण्यात आले . गोलघाटजवळील इंग्रज वखारीतून कॅप्टन लेस्ली याने त्यांना सोडविण्याकरिता आगेकूच करून हल्ला करण्याचा प्रयत्न केला . परंतु हा हल्ला परतविण्यात आला . या हल्ल्यात इंग्रजांचे अतिशय नुकसान झाले . इंग्रजांची प्रगती थोपविण्यासाठी इंग्रजवखारीभोवती असलेल्या शाकारलेल्या झोपड्यांना आगी लावण्यात आल्या . परंतु नदीपासून तीन मैलांवर असलेल्या इंग्रजांच्या छावणीतून थोड्याच वेळात रसद घेऊन सैनिक आले . त्यांनी आगेकूच केली आणि फौजदाराचे घर व त्याच्या पलीकडे शहराचा जो भाग होता त्यात लुटालूट केली आणि त्याला आग लावली . संध्याकाळच्या सुमारास इंग्रजांची जहाजे नदीमधून शहरापर्यंत आली , त्यांनी

मोगलांचे एक जहाज काबीज केले आणि "जवळ जवळ त्या रात्रभर आणि दुसऱ्या दिवशी सतत तोफांचा भडिमार आणि गोळीबार चालू ठेवला आणि समोर जे जे आले त्याचा त्यांनी विध्वंस करून सर्वत्र लुटालूट केली." हुगळीचा फौजदार वेषांतर करून पळून गेला. हिंदुस्थानी शिपायांपैकी ६० शिपाई मारले गेले आणि ४०० ते ५०० घरे आणि त्याचबरोबर शेकडोंच्या संख्येने तराफे आणि पाडाव यांची जाळपोळ झाली.

इंग्रजांनी हुगळी लुटल्याची हकीकत जेव्हा शायस्ताखानाच्या कानावर गेली तेव्हा त्याने सार्वजनिक शांततेचा भंग करणाऱ्या या इंग्रज बंडखोरांचा बंदोबस्त करण्याचे ठरविले . हुगळी येथे त्याने घोडदळाच्या तुकड्या मोठ्या संख्येने रवाना केल्या . पाटणा येथील इंग्रज वखार ताब्यात घेण्याची त्याने आज्ञा केली. २० डिसेंबर रोजी इंग्रजांनी आपल्या मालमत्तेसहीत हुगळीमधून माघार घेतली आणि नदीच्या खाली २४ मैलांवर सतनाती (हल्लीचे कलकत्ता) येथे त्यांनी आपली छावणी केली.

इंग्रजांकडून युद्धाची पुन्हा सुरुवात आणि हिजलीचा पाडाव, १६८७

१६८७ च्या फेब्रुवारी महिन्यात युद्धाला परत सुरुवात झाली . इंग्रजांनी मतिया बुरुजाजवळ असलेले बादशाही मिठाचे कोठार जाळले आणि नंतर ठाणा येथील किल्ल्यावर हल्ले चढविले . (कलकत्ता शहराच्या नैर्ऋत्येला हल्लीचे गार्डन रीच) नदीच्या ओघात त्यांनी आपली लढाऊ जहाजे तशीच पुढे हाकारली आणि मेदीनीपूर जिल्ह्याच्या (कान्ताई पोटविभाग) पूर्व किनाऱ्यावर असलेले हिजली हे बेट आपल्या ताब्यात घेतले. हे बेट म्हणजे अतिशय दलदलीमुळे भयानक हिवतापाचे आगरच होते . परंतु फळे, धान्य आणि शिकारी पक्षी आणि प्राणी यांची तिथे रेलचेल होती इतकेच नव्हे तर समुद्राच्या पाण्याची वाफ करून मीठ तयार करण्याचा तिथे एक कारखाना होता . या ठिकाणी बंगालच्या उपसागरातील इंग्रजांचे जमिनीवरील व आरमारी दलातील सर्व सैन्य एकत्रित झाले . पुढील मार्च महिन्यात बालासोर येथे इंग्रजांचे १७० सैनिक आणि खलाशी उतरले , त्यांनी मोगलांचा किल्ला ताब्यात घेतला आणि जुने आणि नवीन बालासोर म्हणून ओळखली जाणारी दोन गावे दोन दिवसपर्यंत लुटालूट करून जाळून टाकली . तेथील धक्क्यामधील जितकी म्हणून हिंदुस्थानी जहाजे होती ती देखील त्यांनी जाळली आणि राजपुत्र आजम व शायस्ताखान यांच्या मालकीची दोन जहाजे बक्षिसीदाखल आपल्या ताब्यात घेतली.

१६८७ च्या मे महिन्याच्या मध्याला शायस्ताखानाचा एक दुय्यम अमलदार अबदुस समद हा इंग्रजांची हकालपट्टी करण्यासाठी १२००० फौज घेऊन हिजली येथे आला . इंग्रजांची माणसे जमिनीवर आणि जहाजांवर रोगराईने दररोज गारद होत होती. ते दोन महिने म्हणजे मार्च आणि एप्रिल अतिशय जीव घेणारे असे होते. त्यांच्याजवळची अन्नसामग्री आता संपत आलेली होती . दरम्यान त्यांची भयंकर नुकसानी झालेली होती. त्यांचे २०० सैनिक ठार झाले होते आणि जे १०० जगले होते त्यांची आजारीपणाने दैना उडाली होती. त्यांच्या ४० अधिकाऱ्यांपैकी आता केवळ पाचच उरले होते . ११ जून रोजी इंग्रजांनी नौबती वाजवीत आणि आपले झेंडे फडकवीत ठेवत हिजलीच्या किल्ल्यातून माघार घेतली . बरोबर त्यांनी आपला दारूगोळा आणि तोफखानाही नेला . १६ ऑगस्ट रोजी शायस्ताखानाने इंग्रजांकडे एक खलिता पाठविला आणि इंग्रजांनी नुकतीच जी जबरीची कृत्ये केली होती त्याबद्दल त्यांचा निषेध केला . परंतु त्याने इंग्रजांना कलकत्त्याच्या दक्षिणेस वीस मैलांवर उलूबेरीया येथे किल्ला बांधण्याची आणि हुगळी येथे पुन्हा व्यापार करण्याची परवानगी दिली. परिणामी सप्टेंबर १६८७ मध्ये चरनॉक हा आपल्या जहाजासहित परतला आणि सतनाती येथे येऊन थांबला.

अनुक्रमणिका

बालासोर येथे इग्रजांचे अत्याचार, १६८८

पुढील वर्षी चरनॉकच्या ऐवजी बंगालमध्ये प्रतिनिधी म्हणून कॅप्टन हिथ हा इंग्लंडमधून दाखल झाला. त्याने खुद्द बंगालमधून माघार घेण्याचे ठरविले आणि नोव्हेंबर १६८८ मध्ये सतनाती येथून आपली सर्व माणसे व कंपनीची मालमत्ता घेऊन तो जहाजासहित परत फिरला . त्यानंतर कॅप्टन हिथ याने २९ नोव्हेंबर रोजी ३०० शिपाई घेऊन जुन्या बालासोरच्या अगदी पूर्व टोकाला पॉइंट ऑफसँड या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मोगलांच्या एका तटबंदीने मजबूत केलेल्या जागेवर हल्ला केला . तेथील सर्व तोफांचा व वेगवेगळ्या गोष्टींचा साठा त्याने आपल्या ताब्यात घेतला . दुसऱ्या दिवशी त्याने पश्चिमेच्या दिशेने आणखी आतमध्ये असलेले नवे बालासोर जिंकून घेतले . या ठिकाणी त्याने भयानक अत्याचार केले . ख्रिश्चन आणि बिगर ख्रिश्चन यांचा स्त्री आणि पुरुष असा भेदभाव न करता त्याने छळ केला . १८ जानेवारी १६८९ रोजी तो छाटगावसमोर येऊन दाखल झाला . हा किल्ला मोगल अधिकाऱ्यांपासून जिंकून घ्यावा आणि बंगालमध्ये व्यापार करण्यासाठी इंग्रजांना एक सुरक्षित आणि स्वतंत्र तळ स्थापन करण्याची जी इच्छा होती त्यामध्ये त्या किल्ल्याचे रूपांतर करण्याची त्याने योजना आखली . परंतु कंपनीच्या युद्ध मंडळाने या मूर्खपणाच्या योजनेपासून त्याला परावृत केले . अखेर बंगालमधील आपल्या सर्व योजनांवर पाणी सोडून हिथ हा अतिशय उद्विग्न मनःस्थितीत १७ फेब्रुवारी रोजी मद्रासकडे समुद्रमार्गे निघून गेला.

मोगलांबरोबर इंग्रजांच्या वाटाघाटी

इंग्रजांच्या या उघड -उघड शत्रुत्व निदर्शक कृत्याची हकीकत औरंगजेबाच्या कानावर गेल्यानंतर त्याने सर्व इंग्रजांना अटक करण्याचा , मोगल साम्राज्यातील त्यांच्या सर्व वखारी ताब्यात घेण्याचा आणि त्यांच्याबरोबर व्यापार अथवा इतर कोणताही व्यवहार करण्यास बंदी घालणारा हुकूम ताबडतोब जारी केला. परंतु इंग्रजांची समुद्रावर अमर्याद सत्ता होती . मक्केकडे जाणारी यात्रेकरूंची जहाजे अडविण्याची ताकद त्यांच्याकडे होती . इंग्रजांबरोबर व्यापाराला बंदी घातल्याने जकातीपासून मिळणाऱ्या पैशाचे नुकसान बादशहाला सोसावे लागणार होते . त्याची तीव्रता देखील कमी नव्हती . त्यामुळे काही काळानंतर इंग्रजाबरोबर समझोता करण्याकडे त्याचा कल झुकला. १६८९ च्या मे महिन्यात इब्राहीमखानाची बंगालचा सुभेदार म्हणून नेमणूक झाली. खानाची न्यायी आणि शांत प्रवृत्तीचा मनुष्य अशी ख्याती होती. इंग्रजांबरोबर मैत्री करण्याकडे त्याचा रोख होता . त्याने मद्रासला पत्र लिहून इंग्लिश कारखानदारांना बंगालमध्ये परत येण्याबद्दल लिहिले. अखेर फेब्रुवारी १६९० मध्ये पश्चिम किनाऱ्यावरील युद्धाबाबत मोगल सरकार आणि इंग्रज यांच्यामध्ये एकदाचा तह झाला . **व्यापाराबाबत इंग्रजांना बादशहाकडून पुन्हा परवानगी , १६९०** :- २२ फेब्रुवारी १६९० रोजी औरंगजेबाने पुढीलप्रमाणे लिहिले . "सुरतेच्या इंग्रजांनी नम्रतेने भरलेला आणि शरणागती निदर्शक असा अर्ज सादर केला ...त्यांनी बादशहाला दंड म्हणून १५०००० रुपये भेट देण्याचे कबूल केले . त्याचप्रमाणे पूर्वीइतक्या बेदरकारपणे आपण वागणार नाही याचीही त्यांनी कबुली दिली . बादशहाने कृपावंत होऊन त्यांचे अपराध माफ केलेले आहेत आणि पूर्वीप्रमाणेच त्यांनी व्यापार करावा , या गोष्टीला त्याने आपली अनुमती दिलेली आहे." इंग्रजांबरोबर हा जो समेट झाला त्यानंतर २३ एप्रिल १६९० मध्ये बादशहाने इब्राहीमखान याला लिहून असे कळविले की , इंग्रजांना कोणत्याही तऱ्हेचा अधिक त्रास न देता पूर्वीप्रमाणेच बंगालमध्ये मुक्तपणे व्यापार करण्याची मुभा द्यावी. (**स्टयूअर्टचे बंगाल, ॲपे**. ६ व ७)

यानंतर मद्रासहून चरनॉक हा २४ ऑगस्ट रोजी पुन्हा एकदा सतनाती येथे प्रतिनिधी म्हणून दाखल झाला. ही घटना म्हणजे कलकत्त्याची स्थापना आणि उत्तर हिंदुस्थानातील ब्रिटिशांच्या वर्चस्वाची सुरुवात

असेच म्हणावे लागेल . १० फेब्रुवारी १६९१ रोजी बंगालच्या दिवाणाला बादशहाचा अमीरउल उमरा याने एक शाही फर्मान रवाना केले . त्यामध्ये त्याने अशी आज्ञा केली की सर्व जकाती आणि इतर कर यांच्याऐवजी इंग्रजांनी सालिना ३००० रुपये द्यावे आणि त्यांना बंगाल प्रांतात कसलाही उपद्रव होऊ न देता व्यापार करण्याची मुभा द्यावी. (**स्ट्यूअर्टचे बंगाल ॲपे.** ८ व ९)

(१०) पश्चिम किनाऱ्यावर इंग्रजांचे मोगलांबरोबर युद्ध

बंगालप्रमाणेच हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर देखील इंग्रज व्यापाऱ्यांना मोगल सरकारच्या स्थानिक अधिकाऱ्यांपासून त्यांच्या कारभारात होणारा हस्तक्षेप , त्यांच्याकडून केली जाणारी जबरदस्ती आणि त्यांचा पैशाबद्दलचा हव्यास यांचा त्रास होत होता . बादशहा या गोष्टींना आळा घालू शकत नव्हता . त्याशिवाय १६८० मध्ये मोगल अधिकाऱ्यांनी इंग्रजांकडून जिझिया कराच्या रूपाने एक टक्का अधिक जकातीची मागणी केली. यामुळे इंग्रजांना द्यावी लागणारी रक्कम सालिना २०,००० रुपये इतकी भरत होती. (**आर्म्स एम् . एस**. ११६, बॉंबे लेटर रिसिव्ड) साहजिकच दोन्ही पक्षांत तणातणी वाढत गेली . या गोष्टीबाबत ईस्ट इंडिया कंपनीचे स्थानिक प्रतिनिधी उपाययोजना करण्यात असमर्थ ठरले.

त्या वेळी लंडन येथील कंपनीचा अध्यक्ष सर ज्योशीया चाईल्ड हा होता . स्वभावाने तो अतिशय तापट होता आणि त्याची वृत्ती अतिशय बाणेदार होती . त्याने अतिशय खणखणीत आणि स्वतंत्र धोरण स्वीकारण्याचा आणि जरूर पडल्यास मोगल साम्राज्याविरूद्ध जशास तसे या न्यायाने वागण्याचा निश्चय केला. अशातऱ्हेचे धोरण अमलात आणण्यासाठी तीन गोष्टींची जरुरी होती . त्या म्हणजे (१) सुरत येथील इंग्रज वखार काढून घेणे . कारण या वखारीचे वर्णन मुर्खांचे नंदनवन असे केलेले होते . (२) हिंदुस्थानचे द्वार असा ज्या मुंबई शहराचा उल्लेख केला जात असे तेथे कंपनीचा सर्व व्यापार आणि अधिकारीवर्ग एकत्रित करणे. याचे कारण सुरतेला कंपनीच्या नोकरांना जी अपमानास्पद वागणूक दिली जात होती आणि त्यांच्यावर जे असह्य असे निर्बंध लादले गेले होते त्यामधून वरील गोष्टींमुळे त्याची सोडवणूक झाली असती. आणि (३) मोगल साम्राज्यामध्ये इंग्रजांच्या व्यापाराला जो त्रास दिला जात होता त्याचा बदला म्हणून समुद्रावरील हिंदुस्थानच्या मालवाहू नौकांना पकडून आपल्या ताब्यात ठेवणे.

त्या सुमारास हिंदुस्थानातील कंपनीच्या सर्व वखारींचा सर्वाधिकारी आणि प्रमुख संचालक हा सर जॉन चाईल्ड हा होता . तो अतिशय कमकुवत मनाचा आणि अकार्यक्षम असा होता . इंग्लंडमधून आलेल्या हुकमानुसार त्याने मुंबईला जाण्यासाठी २५ एप्रिल १६८७ रोजी सुरत सोडले . यामध्ये त्याचा उद्देश मोगलांच्या कचाट्यातून सुटण्याचा होता . यामुळे सुरतेच्या मोगल सुभेदाराची अशी समजूत झाली की इंग्रज लढाईची तयारी करीत आहेत . म्हणून त्याने इंग्रजांच्या वखारीभोवती शिपायांचा वेढा दिला . याचा परिणाम असा झाला की सुरतेच्या सल्लागार मंडळाचा प्रमुख बेन्जामिन हॅरीस आणि त्याचा दुय्यम अधिकारी सॅम्युएल ॲन्सले या दोघांना वखारीबाहेर पडणे अशक्य होऊन गेले.

सर जॉन चाईल्डकडून युद्धाला सुरुवात व शरणागती, १६८८–८९

अखेर ९ ऑक्टोबर १६८८ रोजी सर जॉन चाईल्ड हा स्वालीसमोर आरमार घेऊन दाखल झाला आणि त्याने सुरतेच्या सुभेदाराकडे इंग्रजांच्या तक्रारी सांगणारा एक खलिता पाठविला . त्यामध्ये त्याने त्यापूर्वी झालेल्या नुकसानीबद्दल भरपाईची मागणी केलेली होती . त्याचप्रमाणे इंग्रजांचे पूर्वीचे अधिकार

कायम करणारा आणि त्यामध्ये वाढ करणारा असा नवीन अधिकारनामा देण्याची मागणी केलेली होती . याला जाब म्हणून सुरतेच्या सुभेदाराने इंग्रजांबरोबर शत्रुत्वाची घोषणा केली आणि इंग्रज कारखानदार आणि त्यांचे हिंदुस्थानी दलाल यांना ताबडतोब अटकेत टाकले . त्याशिवाय त्याने इंग्रजांच्या वखारीवर पहारा बसविला आणि चाईल्ड याला पकडण्यासाठी स्वाली येथे फौजेची रवानगी केली . परंतु चाईल्ड हा पळून गेला . आणि त्याने सुरतेच्या खालच्या बाजूस असलेल्या नदीच्या मुखापाशी मोगलांची नाकेबंदी करून त्याच्याविरुद्ध करण्यात आलेल्या कारवाईचा सूड घेतला . नंतर त्याने आपले आरमार किनाऱ्याच्या बाजूने दक्षिणेकडे हाकारले आणि कसलाही भेदाभेद न करता वाटेत सापडतील ती सर्वतऱ्हेची हिंदुस्थानी जहाजे काबीज केली.

वरील गोष्टीला मोगल सरकारने जे उत्तर दिले ते सुरत येथे ज्या इंग्रजांना कैदेत ठेवले होते त्यांच्या हातापायात बेड्या ठोकूनच . अशातऱ्हेच्या भयानक परिस्थितीत त्यांना जवळ जवळ सोळा महिने ठेवण्यात आले. (डिसेंबर १६८८—एप्रिल १६९०. **अँडरसन**, २४३) याच सुमारास मोगलांचा नौ -सेनापती जंजिऱ्याचा सिद्दी याने मुंबईवर हल्ला चढविला (मे १६८९) आणि मुंबई बेटावर आपली फौज उतरवून त्याने बेटाचा आजूबाजूचा प्रदेश आपल्या ताब्यात घेतला . इंग्रजांच्या शिबंदीला मुंबईच्या किल्ल्यात हाकलून लावण्यात आले आणि किल्ल्याला वेढा देण्यात आला . दररोज वेढा देणाऱ्या मुसलमानांची संख्या वाढतच गेली. निरुपाय होऊन मुंबईचा गव्हर्नर चाईल्ड याने औरंगजेबाकडे जी . वेल्डन आणि अब्राहम नॅव्हॅरो या दोघांचे एक शिष्टमंडळ रवाना केले , (१० डिसेंबर १८८९) आणि त्यांच्या तर्फे औरंगजेबाकडे सपशेल माफीची याचना केली . २५ डिसेंबर १६८९ रोजी औरंगजेबाने एक हुकूम काढून इंग्रजांना माफ केल्याचे जाहीर केले. इंग्रजांना हिंदुस्थानातील व्यापारात त्यांचे पूर्वीचे स्थान देण्यात आले . त्याबाबत एक अट बादशहाने घातली आणि ती म्हणजे इंग्रजांनी दीड लक्ष रुपयांचा दंड द्यावा आणि हिंदुस्थानी जहाजांमधून जप्त केलेल्या सर्व वस्तू परत द्याव्या . (**राईट**, १३०—१५३) [इ. स. १६९१, १६९२ आणि १६९३ या वर्षी इंग्रजांची परिस्थिती पहिल्यासारखीच संकटग्रस्त अशी राहिली . याला कारणे व्यापारातील मंदी , भांडवलातील कमतरता , उपटसुंभ इंग्रज व्यापाऱ्यांनी घातलेला धुमाकूळ आणि मुंबईकर इंग्रजांमध्ये निर्माण झालेली दुही ही होती . १६९४ च्या सुरुवातीला मुंबईचा गव्हर्नर आणि पश्चिम हिंदुस्थानातील प्रमुख प्रतिनिधी म्हणून सर जॉन गेअर हा हिंदुस्थानात आला . याच वर्षी सुरतेच्या वखारीचा प्रमुख म्हणून मे महिन्यात अध्यक्ष हॅरिस याच्या जागी ॲन्सले याची नेमणूक झाली (**राईट**, १५३).

यानंतर हिंदुस्थानच्या राजकीय परिस्थितीत आमूलाग्र बदल होईल अशी एक नवीन घटना घडून आली . मोगल साम्राज्यामधील इंग्रजांचे पुढील सहा वर्षांमधील अस्तित्व या एका घटनेमुळे प्रभावित केले गेले . ही परिस्थिती निर्माण होण्याला कारण म्हणजे हिंदी महासागरात युरोपियन चाच्यांनी मांडलेला उच्छाद हे होय.]

(११) हिंदी समुद्रावरील १७ व्या शतकात चाचेगिरी करणारे युरोपियन चाचे

१५ व्या शतकाच्या अखेरीला वास्को -द-गामा हा हिंदुस्थानात आला त्यावेळेपासूनच युरोपियन लोकांच्या चाचेगिरीला हिंदी महासागरात सुरुवात झाली . या चाचेगिरीबाबत ख्रिश्चन देशांत कोणत्याही तऱ्हेची नापसंती दर्शविली गेली नाही . सर्व जातींचे आणि सर्व देशांचे व्यापारी आणि धाडसी लोक युरोपमधून १६ व्या आणि १७ व्या शतकात हिंदी महासागरात मोठ्या संख्येने आले . जसजसा भारतातील व्यापार वाढत गेला त्या प्रमाणात निरनिराळ्या राष्ट्रांकडून होणाऱ्या चाचेगिरीत वाढ होत गेली.

१६३५ मध्ये इंग्लंडचा राजा चार्ल्स पहिला याने परवाना दिलेल्या जहाजाचा कप्तान कॉब याने तांबड्या समुद्राच्या मुखाजवळ मोगलांची दोन जहाजे लुटली . त्यांपैकी एका जहाजाजवळ सुरतेच्या वखारीचा परवाना होता . १६३८ मध्ये त्याच इंग्लंडच्या राजाकडून मिळालेल्या परवान्यांच्या आधारे सर

विल्यम कोर्टीन याने चार जहाजे रवाना केली . त्यांनी भारतीय जहाजांना लुटले आणि जहाजांवरील खलाशांचे अतिशय हाल केले . इंग्रजांच्या या दुष्टपणाच्या कृत्याबद्दल सुरत येथील ईस्ट इंडिया कंपनीच्या सुरत येथील निरपराध सेवकांना दोन महिनेपर्यंत तुरुंगात ठेवण्यात आले . आणि दंडादाखल १ लक्ष ७० , ००० रुपयांची रक्कम भरण्यात आल्यानंतरच त्यांची सुटका करण्यात आली . (**बिडुल्फस् पिरेटस् ऑफ मलबार**, २–६)

१७ व्या शतकाच्या उत्तरार्धात वरील चाच्यांपेक्षाही बेदरकार आणि कायद्याला न जुमानणाऱ्या अशा दरोडेखोरांचे पूर्वेकडे आगमन झाले आणि त्यांनी हिंदीमहासागरात आपल्या हालचाली पसरविण्यास सुरुवात केली. सर्वसाधारणपणे ते आपली चाचेगिरी एकेकट्या जहाजातूनच करीत आणि प्रत्येक राष्ट्राचे जहाज ते लुटीत असत . "या चाचेगिरीमध्ये मुख्यतः इंग्लिश लोकांचा भरणा होता . यामध्ये अतिशय कुप्रसिद्ध असलेल्यांमध्ये आणि त्यांच्यापेक्षा थोडी कमी प्रसिद्धी असलेल्यांबरोबर चाचेगिरी करणारे टीच , एव्हेरी, कीड, रॉबर्टस्, इंग्लंड आणि ट्यू हे होते . रॉबर्टस्ने एकट्यानेच तीन वर्षांत जवळ जवळ ४०० व्यापारी जहाजांचा नाश केला असे म्हटले जात असे . कायदा त्यांच्यावर हात टाकू शकत नव्हता किंवा ते शिक्षेपासून मुक्त होते याचे मुख्य कारण त्यांना आपण शासन करावे असे कोणालाच वाटत नव्हते . किनाऱ्यावर असलेले त्यांचे दोस्त हे त्यांच्या गरजा पुरवीत . इतकेच नव्हे तर संपत्तीने भरलेली आणि म्हणून लुटण्यायोग्य जहाजे कोणती आहेत अथवा कोणती जहाजे सशस्त्र आहेत आणि म्हणून टाळली पाहिजेत याबद्दलची सर्व माहिती ते त्यांना पुरवीत . मोठ्या जागांवर असलेले अधिकारी त्यांच्या कृत्यांकडे दुर्लक्ष करीत आणि या गोष्टींचा त्यांना भरपूर फायदा मिळे . चाचेगिरी करणाऱ्यांमध्ये बहुसंख्य चाचे हे इंग्लिश होते . इतकेच नव्हे तर दुसऱ्या राष्ट्रांचे चाचेगिरी करणारे कप्तान हे पुष्कळदा इंग्रजांच्या निशाणाखाली आपली चाचेगिरी करीत असत . स्थानिक अधिकाऱ्यांना बदमाष कोणते आणि प्रामाणिक व्यापारी कोणते हे जाणणे अशक्य होई आणि साहजिकच ते ईस्ट इंडिया कंपनीच्या नोकरांना चाचे लोकांच्या दुष्कृत्याबद्दल जबाबदार धरीत असत." (**पिरेटस् ऑफ मलबार**, ८–१०)

इंग्रज चाच्यांनी केलेले अत्याचार

१६८८ मध्ये इंग्लिश निशाण लावून जाणाऱ्या दोन जहाजांनी काही गलबते पकडली . त्यावर ६ लाख रुपयांचा माल होता. पुढील वर्षी वेस्ट इंडीजमधून भटकेगिरी करणारे अनेक चाचे हिंदी महासागरात येऊन दाखल झाले आणि त्यांनी मलबारच्या किनाऱ्यावर उच्छाद मांडण्यास सुरुवात केली . त्यांची जहाजे तांबडे किंवा काळे निशाण लावीत आणि हिंदुस्थानी आणि युरोपियन जहाजे भेदभाव न करता ते लुटीत . (**मद्रास डायरी**) वरील चाच्यांशिवाय इराणच्या आखातात तांबड्या समुद्राच्या मुखाजवळ , मोन्झॅबिकच्या खाडीत इतर युरोपियन राष्ट्रातील चाचेगिरी करणारे लोक होते आणि त्याशिवाय काही आचेनच्या सुमात्रा जवळपास चाचेगिरी करत. [भर समुद्रात लुटालूट करणारे चाचे आणि तत्सम इतर दरोडेखोर हे आपल्या लुटारू जहाजावर इंग्रजांचे निशाण लावीत. साहजिकच इंग्रजांना त्यांच्या लुटालुटीबद्दल जबाबदार धरले जाई . १६९१ च्या ऑगस्ट महिन्यात अब्दुलगफूर याच्या मालकीचे एक जहाज सुरतेजवळ चाच्यांनी लुटले. या जहाजावर ९ लक्ष रुपये होते. ही बातमी कळल्यावर मोगल सरकारने सुरतेच्या इंग्रज वखारीवर पहारा बसविला आणि हिदुस्थानातील त्यांच्या व्यापाराला बंदी केली. परंतु जहाजावरील एका चाच्याला पकडण्यात आले तेव्हा तो डेन असल्याचे कळले. परिणामी इंग्रजांच्या व्यापारावरील बंदी उठविण्यात आली. (**बिडुल्फ**, १३)]

गंज-ई-सवाईची लूट, १६९५

या चाच्यांमध्ये सुप्रसिद्ध असलेला चाचा हेनरी ब्रिजमन हा होता . तो स्वतःला एव्होरी म्हणून घेत

असे. त्यावेळी स्पेनच्या सरकारने भाड्याने घेतलेल्या एका इंग्लिश जहाजाचा दुय्यम तांडेल म्हणून तो काम करीत होता. त्याने ३० मे १६९४ रोजी जहाजाच्या कप्तानाला आणि इतर अधिकाऱ्यांना निशःस्त्र करून बंदिस्त केले आणि जहाजाला फॅन्सी हे नवे नाव दिले. त्याने आता चाचेगिरी सुरू केली. त्याच्या जहाजावर ४६ तोफा आणि १५० लढाऊ खलाशी होते . एडनच्या आखातात त्याने मोठमोठ्या जहाजांवर हल्ले चढवून ती काबीज केली . आणि सप्टेंबर १६९५ मध्ये सोकोत्राच्या नजीक फत्ते महमदी हे अब्दुल गफुर नावाच्या सुरतेच्या श्रीमंत व्यापाऱ्याचे किमती मालाने भरलेले जहाज काबीज केले . यानंतर काही दिवसांनी त्याने आपल्या चाचेगिरीच्या जीवनातील विजयाचे उच्च शिखर गाठले आणि ते म्हणजे मोगल बादशहाच्या मालकीचे आणि सुरत बंदरातील अतिशय मोठे समजले जाणारे जहाज गंज -ई-सवाई हे काबीज केले . (**बिडुल्फ**, १६-२५) दरवर्षी हे जहाज मोखा आणि जिद्दी येथे मक्केला जाणाऱ्या हिंदुस्थानी यात्रेकरूंना घेऊन व अरबस्थानामध्ये हिंदुस्थानी माल विकण्यासाठी लादून जात असे . या जहाजावर ८० तोफा आणि ४०० बंदुका होत्या. परंतु जहाजाचा कप्तान महमद इब्राहीम हा भेकड होता. (**के. के.**, भाग २. ४२२)

इब्राहीम हा मोख्याहून परतत होता. मुंबई आणि दमण याच्या दरम्यान त्याच्यावर फॅन्सी, दुसरे एक चाचेगिरी करणारे जहाज आणि दुसऱ्या दोन बोटी यांनी हल्ला केला . युरोपियन जहाजातून त्याच्यावर तोफांचा झालेला भडिमार हा अतिशय परिणामकारक होता . थोड्याच अवकाशात मोगलांच्या जहाजावरील २५ शिपाई ठार आणि २० जखमी झाले . गंज-इ-सवाई या जहाजावरील एका तोफेचा स्फोट झाला. त्यामुळे जहाजाला आग लागली आणि बोटीवरील खलाशांपैकी अनेकजण ठार झाले अथवा भाजले गेले. हिंदुस्थानी खलाशांचे लक्ष या वेळी जहाजाला लागलेल्या आगीकडे व ती विझविण्याकडे होते . अशा वेळी सर्व बाजूंनी जहाजावर चाचे लोक चढून आले . जहाजावरील खलाशांनी त्यांना कोणताच प्रतिकार केला नाही. जहाजाच्या कप्तानाने आपल्या जवळील तलवारी मोरवा येथे खरेदी केलेल्या तुर्की गुलाम स्त्रियांच्या हाती दिल्या . त्याने त्या स्त्रियांना आता पुरुषांसारखे लढण्यास सांगितले आणि तो स्वतः जहाजाच्या खालच्या बाजूस असलेल्या एका खोलीत लपून बसला (**खाफीखान**)

जवळजवळ तीन दिवसपर्यंत चाच्यांनी ते जहाज सावकाशपणे लुटले . जहाजावर सय्यद आणि इतर खानदानी कुटुंबातल्या स्त्रिया होत्या . या स्त्रियांची वरील चाच्यांनी अब्रू लुटली . त्यांच्यापैकी अनेकजणींनी आत्महत्या केली. त्यानंतर एव्होरी ते दुर्दैवी जहाज सोडून निघून गेला . ते जहाज त्यावरील खलाशांनी १२ सप्टेंबर रोजी सुरतेला नेले . जहाजावरील प्रवाशांचे सर्वस्व लुटण्यात आलेले होते . त्यांनी जेव्हा त्यांच्यावर झालेल्या अत्याचारांची आणि त्यांचे सर्वस्व लुटण्यात आल्याची भयानक कहाणी कथन केली त्यावेळी मुसलमान धर्माच्या अनुयायांचा हा जो छळ करण्यात आला होता त्यामुळे सुरतेच्या लोकांचा राग अनावर झाला . मुंबईशी संबंधित असलेल्या इंग्रजांनीच हा हल्ला केला असावा असा आरोप जहाजावरील लोकांनी केला. (**सुरत गव्हर्नर्स् लेटर टू कोर्ट**, आय्, ओ. एल्. नं. २६)

सुरतेच्या इंग्रज वखारदारांची कैद, १६९५–१६९६

त्यावेळी सुरतेचा सुभेदार एतिमादखान हा होता . त्याचा इंग्रजांबरोबर स्नेह होता . त्याच्या प्रामाणिकपणाला आणि स्वभावातल्या चांगुलपणाला तोड नव्हती . आजूबाजूला लोकांकडून हाकाटी होत असताना त्याने आपले डोके थंड ठेवले आणि धर्मवेड्या मुसलमानांकडून स्थानिक इंग्रजांची जी कत्तल झाली असती ती त्याने आपल्या समजुतदारपणाच्या धोरणाने टाळून त्यांचा बचाव केला . त्याने आपला दुय्यम अधिकारी अशूर बेग याला फौजी शिपायांची एक तुकडी देऊन १४ सप्टेंबर रोजी इंग्रजांच्या वखारीचा

ताबा घेण्यास आणि बादशहाचे आज्ञापत्र येईपर्यंत तेथील व्यापाऱ्यांना बंदिस्त करण्यासाठी म्हणून रवाना केले. स्वाली आणि भडोच येथील इंग्रज व्यापाऱ्यांची वरीलप्रमाणेच गत झाली . त्यांचा व्यापार पूर्णपणे थांबविण्यात आला. **(मद्रास डायरी)** [एतिमादखान याने योजलेल्या या कडक उपाययोजनेमुळे कैद्यांचे आणखी भयानक हाल होण्याचे टळले. याबाबत ॲन्सले पुढीलप्रमाणे लिहितो : "एकंदर माजलेल्या गोंधळात आमच्यावर ठेवण्यात आलेला पहारेकरी आमचे रक्षण करण्यास असमर्थ होता. कारण तेथे जमा झालेला जो एकंदर घोळका होता त्यांनी आमच्याविरुद्ध उठाव करून आमच्या प्राणांचीच मागणी केली . तिथे जमलेल्या जमावाने जो पवित्रा घेतला होता त्याला विरोध करण्यात गव्हर्नरचे प्राणच धोक्यात आले होते . एकदा-दोनदा तर त्यांनी त्याच्या घरावरच हल्ला करण्याचा निश्चय केला . मुसलमानांनी गव्हर्नरला काफर म्हणण्याचेच तेवढे बाकी ठेवले . त्यांनी असे उद्‌गार काढले की या शहरातील वातावरण इतके गढूळलेले आहे की अन्यायाचे परिमार्जन झाल्याखेरीज परमेश्वराला मान्य होईल अशी प्रार्थना करणे देखील शक्य होणार नाही." (**राईट**, १६४, १६९)]

सुरतेच्या इंग्लिश नियामक मंडळाचा अध्यक्ष ॲन्सले हा होता . मोगलांच्या कैदेत असताना त्याने अविरत प्रयत्न करून सुरतेचा सुभेदार , औरंगजेबाच्या छावणीतील इंग्रजांचे प्रतिनिधी आणि मित्र आणि त्याचप्रमाणे खुद्द बादशहा आणि त्याचे वजीर यांच्याकडे अर्जी रवाना केल्या . या अर्जीमध्ये त्याने कंपनीचे नोकर हे पूर्णपणे निरपराध आहेत असे प्रतिपादन केले आणि त्यांची सुटका करण्यात यावी अशी मागणी केली. मुंबईचा गव्हर्नर सर जॉन गेयर यानेही वरीलप्रमाणे कारवाई केली . त्याने एतिमादखान आणि बादशहा यांना पत्रे लिहिली. त्यात त्याने आपल्या देशबांधवांना अटक केल्याबद्दल निषेध प्रकट केला होता आणि न्यायाची मागणी केली होती. "आम्ही व्यापारी आहोत चाचेगिरी करणारे नाही" असे त्याने प्रतिपादले होते. (पाहा **आय्. ओ. एल्., एम्एस्**. १५०; **राईटस् ॲन्सले ऑफ सुरत** प्र. ८—११)

(१२) युरोपियन व्यापाराबाबत औरंगजेबाचे धोरण

आपला धर्म आणि मोगल साम्राज्याचे निशाण यांच्याविरुद्ध इंग्रजांनी हा जो उघड उघड बेदरकारपणे अपराध केला होता त्याचा औरंगजेबाला अतिशय संताप आला . परंतु भावना विवशतेने हेलावून न जाण्याइतका समंजसपणा त्याच्या अंगी होता . इतर सर्व गोष्टींपेक्षाही त्याला सर्वांत निकड कशाची वाटत होती ती मक्केला यात्रेकरू घेऊन जाणाऱ्या जहाजांना युरोपियन लोकांच्या लढाऊ जहाजांचे संरक्षण मिळविण्याची. त्याने जो युरोपियन लोकांच्या व्यापारावर मनाई हुकूम लादला होता तो आपले हे उद्दिष्ट परिणामकारकरित्या परंतु सहजपणे साध्य करून घेण्यासाठी इंग्रजांवर दडपण आणावे म्हणून . [या संबंधात औरंगजेबाने पुढीलप्रमाणे लिहिले आहे : "**मीर आतीश** याने तोफखान्यातील फिरंग्याजवळ अशी चौकशी करावी की चाचेगिरी करणाऱ्यांना कसे शासन करता येईल आणि मक्केला जाणारे प्रवासी आणि व्यापारी यांचा समुद्राचा मार्ग खुला कसा ठेवता येईल ? याकरिता मैत्री आणि सामोपचार हा मार्ग स्वीकारावा किंवा बळाचा उपयोग करावा ?" पुढील पत्रात तो असे लिहितो "अमानतखानाला असे लिहून कळवा की मक्केकडे जाणारे यात्रेकरू आणि व्यापारी यांची वाट सुरक्षित राखण्यासाठी तू प्रयत्नांची पराकाष्ठा कर . त्याचप्रमाणे फिरंग्यांमध्ये एकजूट नाही. त्यांच्यापैकी कोणातरी एकाची तू मदत घे , आणि सुरतेला जमा होणाऱ्या जकातीचा दहावा हिस्सा त्यांना दे म्हणजे ते चाचेगिरी करणाऱ्यांना शिक्षा लावतील ." (**कालीमत-ई-त.** पाने, १३३ अ आणि ८१ अ)] (**कालीमत-ई-त.** पाने १३३ अ व ८१ अ)

डच लोकांनी हिंदी महासागरातून चाचे लोकांचे निर्मूलन करण्याचा आणि अरबस्थानला जाणाऱ्या यात्रेकरूंच्या संरक्षणाची जबाबदारी घेण्याचा आपला मसुदा सादर केला . या कामगिरीच्या बदली विना जकातीशिवाय मोगल साम्राज्यामध्ये व्यापार करण्याचा एकमेव अधिकार देण्यात यावा अशी मागणी त्यांनी केली. बादशहाने या मागणीचा स्वीकार करण्यास नकार दिला. त्याच वेळी ॲन्सले याने मोगल सरकारला लिहून कळविले की अरबी समुद्रात जाणाऱ्या हिंदुस्थानी जहाजांना आपली संरक्षण देण्याची तयारी आहे अथवा त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी आपण आपल्यावर घेऊ . त्यासाठी मोगलांनी दरवर्षी इंग्रजांना चार लक्ष रुपये द्यावे. बादशहाने संरक्षण देणाऱ्या प्रत्येक जहाजाप्रीत्यर्थ किती पैसे द्यावयाचे याबद्दल घासाघीस केली. जाऊन येऊन जो खर्च संरक्षण देण्यामध्ये येणार होता त्याच्या निम्मी रक्कम देऊ केली. अखेर ॲन्सले

याने अशा तऱ्हेचे संरक्षण देण्याबाबतच्या करारनाम्यावर सही केली आणि २७ जून १६९६ रोजी सर्व इंग्लिश कैद्यांना मोकळे करण्यात आले. (**मद्रास डायरी**, ३१ आक्टोबर १६९६)

कॅप्टन कीडची चाचेगिरी, १६९७

१६९६ मध्ये इंग्लिश उमरावांच्या एका मंडळाने ॲडव्हेन्चर नावाचे एक जहाज फ्रेच लोकांच्या विरुद्ध लढाऊ गलबत म्हणून उपयोगात आणण्यासाठी आणि त्याच वेळी हिंदी महासागरातील चाचे लोकांचा नाश करण्यासाठी म्हणून तयार केले . या जहाजावर तीस तोफा बसवून त्याला मजबुती आणण्यात आली होती. या जहाजाचा कप्तान विल्यम कीड हा होता . "एक अतिशय बलाढ्य चाचा म्हणून भविष्य काळात पुढे येण्याचे आणि इंग्लंडची प्रतिष्ठा धुळीला मिळविण्याचे कृत्य त्याच्या हातून होणार असल्याचे भाकीत त्या वेळीच करण्यात आले होते ." १६९७ च्या सुरुवातीला तो कालिकतच्या जवळपास आला आणि त्याने चाचेगिरीच्या जीवनाला सुरुवात केली. त्याने जे दरोडे घातले त्याचे वर्णन तो निर्लज्जपणे इंग्लंडच्या बादशहाने अधिकार दिल्यामुळे केलेल्या फायदेशीर लढाऊ कारवाया असे करीत असे . कीडला जे यश मिळाले त्यामुळे अनेक विचलित मनःस्थितीत असलेले इंग्रज खलाशी त्यांच्या पक्षात येऊन सामील झाले. "एखाद्या उत्तम आरमारी लढवय्याच्या कुशलतेने कॅप्टन कीड याने आपल्या हाताखालील सेनेची विभागणी" करून हिंदी महासागरावर प्रभुत्व मिळविले. मादागास्करमधील एका तळावरून तो आपल्याला लागणारा दारूगोळा आणि इतर साधनसामुग्री करून घेई . "एकंदर गोळाबेरीज केल्यानंतर असे दिसून आले असते की कॅप्टन कीडच्या आरमारात १२० तोफा होत्या . या आरमारावरील एकंदर खलाशांची संख्या ३०० पेक्षा कमी नव्हती . हे सर्व युरोपियन होते आणि त्यांच्यामधील बहुसंख्य इंग्रज होते ." (**राईट**, २००–१)

ईस्ट इंडिया कंपनीच्या अनेक जहाजांना त्याने हस्तगत केले इतकेच नव्हेतर २ फेब्रुवारी १६९८ रोजी त्याने क्वेडामर्चन्ट नावाचे ४०० टन वजनाचे बंगालकडून सुरतेकडे चाललेले जहाज काबीज केले . हे जहाज मोगल साम्राज्याचा एक बलाढ्य उमराव मुखलीसखान याच्या मालकीचे असून त्यावर ४ लक्ष रुपयांचा किमती माल भरला होता . १६९८ हे वर्ष संपतासंपता चिव्हर्स नावाच्या एका डच चाच्याने जिद्दा आणि सुरत येथील एक व्यापारी हसन हमीदान याच्या मालकीचे १४ लक्ष रुपये किमतीचा माल भरलेले एक उकृष्ट जहाज काबीज केले.

सुरतेच्या इंग्रजांची पुन्हा कैद, १६९९

सुरतेच्या इंग्रज व्यापाऱ्यांनाही फार काळपर्यंत त्याच्या तडाख्यातून सुटणे अशक्य होते . सुरतेचा समंजस आणि प्रामाणिक सुभेदार एतिमादखान हा १६९७ च्या फेब्रुवारीमध्ये मृत झाला होता . त्याच्यानंतर सुभेदारीवर अमानतखान याची नेमणूक झाली होती . अमानतखान हा अतिशय लोभी आणि उलट्या काळजाचा हुकूमशहा होता . "चाचेगिरी करणारे लोक हे इंग्रज नव्हते अशी ग्वाही देण्यात काहीच अर्थ नव्हता. कारण तेथील विश्वासू अशा खलाशांनी चाचेगिरी करणाऱ्या जहाजावरील अनेक इंग्लिश खलाशी हे पूर्वी ईस्ट इंडिया कंपनीच्या नोकरीत असल्याचे ठासूनपणे सांगितले ." २६ डिसेंबर १६९८ रोजी मोगल सुभेदाराने सुरतेच्या वखारीला वेढा दिला आणि ॲन्सले याला निर्वाणीचा खलिता पाठविला . त्यात त्याने अशी मागणी केली होती की बादशहाने हुकूम दिल्याप्रमाणे चाचे लोकांपासून समुद्रावर संरक्षण देण्याची हमी त्याने द्यावी किंवा दहा दिवसांच्या आत देश सोडून निघून जावे . डच आणि फ्रेंच यांनादेखील अशाच

तऱ्हेची वागणूक देण्यात आली . दरम्यान परकीयांच्या वखारी भर वस्तीपासून वेगळ्या करण्यात आल्या आणि ज्या हिंदुस्थानी लोकांनी त्यांच्याबरोबर संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला , त्यांना सुभेदाराच्या हुकूमावरून बांधून ठेवण्याची आणि फटके मारण्याची शिक्षा देण्यात आली . ऑगस्ट १६९८ मध्ये बादशहाकडून एक हुकूम आला . त्या हुकुमाप्रमाणे समुद्रावर जे जे नुकसान होईल त्याबद्दल इंग्रज , फ्रेंच आणि डच यांना जबाबदार धरण्यात येणार होते आणि वरील राष्ट्रांनी एकंदर नुकसानभरपाई म्हणून १४ लक्ष रुपये द्यावे, असा सांगोवा वरील हुकमात आला होता.

सरतेशेवटी इंग्रज, फ्रेंच आणि डच या तिघांनी एकत्र येऊन चाचेगिरीचा बंदोबस्त करण्याचे कबूल केले. त्याचप्रमाणे यापुढे होणारे सर्व नुकसान आपण तिघे मिळून भरून देऊ अशा तऱ्हेच्या करारनाम्यावर त्यांनी सह्या केल्या . वरील करारनामा हाती पडताच मोगल साम्राज्यामध्ये युरोपियन व्यापारावर बंदी घालणारा काढलेला हुकूम औरंगजेबाने पाठीमागे घेतला . त्याने सुरतेच्या सुभेदाराला त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे त्याने तडजोड करावी असेही लिहून कळविले . वरील करारनाम्याच्या अटींप्रमाणे डच हे मक्केला जाणाऱ्या उतारूंना संरक्षण देत आणि तांबड्या समुद्राच्या प्रवेशद्वारापाशी गस्त घालीत . त्याशिवाय सुरतेच्या सुभेदाराला ते ७ लक्ष रुपये देत . इंग्रज हे ३० हजार रुपये देत आणि दक्षिण हिंदी महासागरात गस्त घालीत. वरील दोहोंप्रमाणेच फ्रेंचही अशाच तऱ्हेची रक्कम देत आणि इराणच्या आखाताचा बंदोबस्त राखीत (मार्च १६९९). (**मद्रास डायरी**, २५ एप्रिल १६९९; **राईट**; २३२–२३९; **अँडरसन**, ३११)

नवीन इंग्लिश कंपनी आणि सर नॉरिस याची वकिलात

८ एप्रिल १६९९ रोजी एका नवीन इंग्रज कंपनीची सुरत येथे स्थापना झाली . या कंपनीचे अध्यक्षस्थान सर निकोलस् वेट यांच्याकडे होते . नवीन कंपनीच्या हितसंबंधाचे रक्षण व्हावे म्हणून इंग्लंडहून इंग्लंडच्या राजाचा वकिल या नात्याने सर विल्यम नॉरिस याला मोगल दरबाराकडे रवाना करण्यात आले . त्याने औरंगजेबाची पन्हाळ्याला वेढा घालून बसलेल्या मोगल सैन्याच्या छावणीत भेट घेतली (एप्रिल १७०१). दोन्ही सरकारांमध्ये भेटीची देवाणघेवाण झाली . ही वकिलात नॉरिस याला अतिशय महागात पडली होती . त्यासाठी त्याचे जवळजवळ सोळा महिने खर्च पडले होते (२७ जानेवारी १७०१–१८ एप्रिल १७०२). या गोष्टी लक्षात घेता नॉरिसच्या पदरात मात्र काहीच पडले नाही . (**मिशन ऑफ नॉरिस**; **राईट**, २६३–२७०; **अखबारात** ४ एप्रिल , २८ मे, १ जून १७०१ ; **स्टोरीया**, भाग ३ , २९८–३०७.) नवीन कंपनीच्या वखारीसाठी फर्मान पाहिजे असल्यास त्याची किंमत म्हणून औरंगजेबाने अशी मागणी केली की इंग्रजांनी समुद्रावरील सर्व चाचे लोकांचा आपण नायनाट करू असे आश्वासन द्यावे . ही कामगिरी अशक्य कोटीमधील आहे याची नॉरिसला इथेच जाणीव झाली.

दरम्यान फेब्रुवारी १७०१ मध्ये सर जॉन गेअर याला सुरत येथे अमानतखान याने पकडून कैदेत टाकले होते. याबद्दलचे कारस्थान वेट याने सुरतेच्या मोगल बातमीदाराला पैसे चारून केले होते आणि गेअर याला पकडण्यात यावे अशा तऱ्हेचा हुकूम त्याने औरंगजेबाकडून मिळविला होता . गरीब बिचाऱ्या गेअरला जवळजवळ सहा वर्षे तुरुंगात डांबून ठेवण्यात आले होते . अधून मधून त्याला जी काही मोकळीक देण्यात येईल तेवढ्याचपुरते स्वातंत्र्य त्याला मिळे . जानेवारी १७०२ रोजी काढण्यात आलेल्या माहितीपत्रकानुसार सुरतेला एकंदर १०९ कैदी होते . त्यामध्ये कंपनीचे २१ इंग्रज अधिकारी .....आणि १५ खलाशी होते. सुरतेच्या सुभेदाराच्या लहरीप्रमाणे त्यांच्या कैदेचा कठोरपणा कमी -अधिक होई. (**राईट**, २६०–२८२)

२८ ऑगस्ट १७०३ रोजी सुरतेच्या अब्दुलगफूर आणि कासीमभाई या दोघांची जहाजे मोरव्याहून परत येत असताना सुरतेजवळ चाच्यांनी पकडली . या भयानक दरोड्याची बातमी सुरतेला ३१ ऑगस्ट रोजी पोहोचली . त्याबरोबर सुरतेचा सुभेदार इतिबारखान याने युरोपियन कंपन्यांच्या सर्व हिंदुस्थानी दलालांना पकडले . त्याने कंपन्यांच्या सर्व वखारींची नाकेबंदी केली . त्यांचा अन्नपुरवठा आणि बाहेरील जगाबरोबरील त्यांचे दळणवळण तोडून टाकले . जुन्या इंग्लिश कंपनीचे दलाल विठ्ठल आणि केशव पारेख यांच्याकडून सुरतेच्या सुभेदाराने ३ लाख रुपये सक्तीने वसूल करून घेतले आणि आणखी ३ लाख रुपयांची वसुली बळजबरीने त्याने डच लोकांच्या दलालांकडून केली . असे करण्यामध्ये सुरतेच्या सुभेदाराने त्याच्या अगोदरचा सुभेदार अमानतखान याने फेब्रुवारी १६९९ मध्ये युरोपियन लोकांकडून जे तारणरूपी करार पत्र करून घेतले होते त्यांचीच अमलबजावणी केली होती , कारण या करारनाम्याप्रमाणे चाचे लोकांकडून हिंदुस्थानी जहाजांचे जे नुकसान होणार होते त्याची जबाबदारी वरील ३ युरोपियन राष्ट्रांनी घेतली होती. औरंगजेबाच्या कानावर जेव्हा ही गोष्ट गेली तेव्हा त्याने इतिबारखानाच्या कृतीबद्दल नापसंती प्रगट केली आणि फेब्रुवारी १६९९ मध्ये जबरदस्तीने जो करारनामा करून घेण्यात आला होता तो रद्दबादल केला.

परंतु प्रत्यक्षात बघितले तर युरोपियनांना शांततेने जिणे जगणे कठीण होऊन बसले होते . सर जॉन गेअर आणि त्याचे सदस्य मंडळ यांची कैद चालूच राहिली . या कैदेत त्यांना थोडे फार स्वातंत्र्य मिळे . ही कैद जुलै १७०४ रोजी मोगल दरबारातून आलेल्या ताज्या हुकमानुसार होती . याचा वचपा म्हणून डच लोकांनी मक्केहून हिंदुस्थानी यात्रेकरूंना परत घेऊन येणारे एक अतिशय समृद्ध असे जहाज काबीज करून घेतले. या यात्रेकरूंमध्ये औरंगजेबाचा मुख्य काजी अब्दुल वहाब याचा मुलगा नुरुलहक् आणि फक्रऊल् इस्लाम हे दोघेजण होते . त्यांच्या चारित्र्याच्या शुचितेबद्दल आणि त्यांच्या उच्च कुळाबद्दल औरंगजेबाच्या मनात त्या दोघांविषयी अतिशय पूज्य भावना वसत होती. “त्यांना कोणत्याही तऱ्हेची वाईट वागणूक न देता डच लोकांनी सुरतेच्या सुभेदाराकडे निरोप पाठवून त्याने त्यांच्याकडून बळजबरी करून जे द्रव्य घेतले होते ते परत करण्याविषयी त्याला कळविले . हे द्रव्य मिळताच आपण जहाज परत करू असाही निरोप त्याने दिला.” (**स्टोरीया**, भाग ४, ६२–६३) आपण आरमारी बाबतीत किती दुबळे आहोत याची जाणीव अखेर औरंगजेबाला झाली आणि आपल्या प्रजाजनांना जर का मक्केचा प्रवास करणे असेल तर युरोपियन लोकांना बिनशर्त शरण जाण्याखेरीज दुसरा मार्ग नाही याचीही त्याला खात्री पटली . त्याने वरील दोघा आदरणीय विभुतींची आणि त्याचप्रमाणे इतरांची सुटका करून आणण्याचा हुकूम नजाबतखानाला दिला . त्यासाठी काहीही अटी स्वीकाराव्या लागल्या तरी चालेल असेही त्याने त्याला कळविले. त्याचप्रमाणे यापुढे युरोपियन लोकांकडून नुकसान भरपाई देण्याबद्दलचा करारनामा न करण्याविषयी त्याला ताकीद दिली . (**इनायतुल्ला याचे अहकाम**, १७ अ)

●●●

अनुक्रमणिका

प्रकरण अठरावे

औरंगजेबाच्या कारकिर्दीतील काही प्रांतांसंबंधीची हकीकत

(१) बंगाल : बंगालची नैसर्गिक संपत्ती आणि मोगल राजवटीतील शांततेच्या काळात झालेला बंगाल प्रांताचा विकास

मोगल साम्राज्याच्या सर्व प्रांतांमध्ये निसर्गाने बंगाल प्रांतावर साधन -सामग्रीची मुक्त हस्ताने खैर खैरात केली होती. [औरंगजेबाच्या कारकिर्दीतील मोगल साम्राज्याच्या प्रत्येक सुभ्याचा इतिहास याठिकाणी देणे शक्य नाही किंवा त्याची आवश्यकताही नाही . ज्या प्रांतातील घडामोडींना बादशाही राजकारणात महत्त्व प्राप्त झाले , त्या प्रांताचा इतिहास केवळ देणे एवढेच इतिहासकाराचे काम आहे .] बंगाल प्रांतात विपुलतेने जो पाऊस पडतो त्यामुळे कृत्रिमरित्या कालवे काढण्याचे श्रम घेण्याची गरज भासत नाही. तेथील असंख्य नद्या आणि विपुलतेने मच्छी असलेले तलाव व त्याचप्रमाणे फळांनी भरलेल्या फळबागा यामुळे तेथील शेतीपासून निर्माण होणाऱ्या धान्याच्या पुरवठ्यात भर घातल्यागत होत असे . या प्रांतातील हवा तेवढी अतिशय वाईट होती आणि औरंगजेबाने हा प्रांत म्हणजे अन्नाने भरलेला नरक असे जे त्याचे थोडक्यात वर्णन केले होते ते अगदी यथार्थ होते . अशा तऱ्हेचा देश संपत्ती आणि लोकसंख्या यांनी समृद्ध व्हावयाचा तर केवळ शांततेचीच आवश्यकता आहे . ही शांतता सबंध १७ व्या शतकात मोगल साम्राज्याने बंगाल प्रांताला दिली होती . इतकेच नव्हे तर त्याबरोबर चांगला राज्यकारभारही दिला होता.

मोगलांच्या ताब्यात गेल्याने बंगालचा झालेला लाभ

१६ व्या शतकात मात्र बंगालमध्ये अनावस्था आणि नाश यांचे विदारक दृश्य दिसून आले . याचे कारण बंगाल प्रांतामध्ये मोगलांच्या आक्रमणामुळे जे सातत्याने युद्ध चालले होते आणि बंगालमधील स्वतंत्र सुलतानी राजवटीचा नाश आणि छकले झाली होती यामध्येच आपल्याला दिसून येईल . बंगाल प्रांतामध्ये राजकीय उलाढालीमुळे संपत्ती आणि संस्कृती यांचा जो विध्वंस झाला होता त्यामुळे लोकांच्या दुःखाने परिसीमा गाठली होती. जुन्या समाजपद्धतीचा झालेला नाश आणि अंतर्गत ऱ्हास यामध्ये अकबराने बंगाल प्रांत जिंकून घेतला ही घटना त्या प्रांताला एखाद्या शुभशकुनाप्रमाणे होती. परंतु अकबराच्या कारकिर्दीतील बंगालमधील मोगलसत्ता म्हणजे स्थिर झालेल्या राज्यकारभारासारखी नसून तिला फौजेने एखादा प्रदेश व्यापल्यासारखे स्वरूप होते. बंगालमध्ये यापूर्वी छोटेछोटे स्वतंत्र अफगाण राजेरजवाडे आणि राज्याधिकार चालवणारे हिंदू जमीनदार होते . त्यांच्याकडून अकबराच्या मोगल सुभेदारांना वरवरचा आज्ञाधारकपणा दाखविला जात होता, त्यावरच त्यांना समाधान मानावे लागत होते. बादशहाचे सुभेदार त्यांच्याकडून फक्त खंडणी गोळा करीत . परंतु प्रांताच्या राजधानीच्या भोवतालचा प्रदेश आणि त्यांचे दुय्यम अधिकारी जे फौजदार असत त्यांच्या ताब्यात लष्करी डावपेचांच्या दृष्टीने जी महत्त्वाची शहरे होती , ती सोडल्यास बंगालमधील जनतेवर प्रत्यक्ष बादशाही राज्यकारभार वरील सुभेदारांना प्रस्थापित करता आला नाही . पूर्वीचे जे अनेक जमीनदार होते त्यांच्या हाताखालील अतिशय मोठ्या परंतु अनियमित अशा फौजांच्या तुकड्या तेवढ्यापुरत्या का होईना शांत राहिल्या परंतु त्यांचा नाश मात्र झाला नाही . बादशहाच्या सत्तेत कुठे तरी दुर्बलपणा निर्माण होईल किंवा दिल्ली येथे काही तरी भयानक संकट कोसळेल या संधीची वाट बघत आणि त्या संधीचा फायदा घेऊन पुन्हा एकदा आपले स्वातंत्र्य कसे प्रस्थापित करता येईल याची प्रतीक्षा करत ते राहिले . **सतराव्या शतकात बंगालला लाभलेली शांतता** :- जहांगीर गादीवर आल्यानंतर

अनुक्रमणिका

बंगालचा नवीन सुभेदार म्हणून इस्लामखान याची नेमणूक झाली . मे १६०८ ते ११ ऑगस्ट १६१३ अशी जवळजवळ सव्वापाच वर्षेपर्यंत त्याने बंगाल प्रांताचा राज्यकारभार केला . इस्लामखान हा अतिशय महत्त्वाकांक्षी, कार्यकुशल आणि उत्साही अशा उमरावांपैकी होता. त्याने अनेक मोहिमा करून बंगालमधील सर्व स्वतंत्र जमीनदारांचा उच्छाद केला आणि मैमनसिंग, सिल्हट आणि ओरिसा येथील उर्वरित पठाणांच्या सत्तेची पाळेमुळे खणून काढली . अशा रीतीने त्याने सर्व बंगाल प्रांतावर मोगल राजसत्ता आणि प्रत्यक्ष बादशाही अंमल बसविण्यात यश मिळविले . त्यानंतर बंगाल प्रांताला जवळ जवळ १५० वर्षे अव्याहत अशी अंतर्गत शांतता प्राप्त झाली . या काळात बंगालची संपत्ती आणि लोकसंख्या यांना पुन्हा पूर्वीची भरभराट प्राप्त झाली, व्यापारामध्ये अतिशय झपाट्याने वाढ झाली, उद्योगधंद्यांचा विकास झाला आणि वैष्णव पंथीय लोकांच्या हातामध्ये स्वतंत्र अशा वाङ्मयाची अभिनव वृद्धी झाली . सुरुवातीला आराकानी लोक आणि नंतर त्यांचे गुमास्ते छटगावचे पोर्तुगीज चाचे यांनी पूर्व बंगालच्या नदीच्या काठावरील जिल्ह्यांमध्ये अतिशय उच्छाद मांडला , परंतु औरंगजेबाच्या कारकिर्दीच्या सुरुवातीला (१६६६) शायस्ताखानाने या चाच्यांचा समूळ नाश केला . या शतकाच्या मध्यानंतर इंग्रज आणि डच यांच्या व्यापाराची कल्पनेबाहेर अशी वाढ झाली. त्यांच्या वखारी आणि माल खरेदी करण्याकरिता त्यांनी ज्या संस्था स्थापन केल्या त्यामुळे देशातील उत्पादन आणि संपत्ती यांची वाढ होण्यास उत्तेजन दिले गेले . [औरंगजेब गादीवर आला त्यावेळी बंगालमधील परिस्थिती अतिशय वाईट होती . तिचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे : १६४९ ते १६५८ या काळात शुजा हा बंगालचा सुभेदार होता . त्याचा कारभार गैदीपणाचा होता. तो जेव्हा वारसाहक्काच्या युद्धासाठी गेला तेव्हा प्रांतात अंतर्गत अशांतता माजली आणि परकीयांच्या स्वाऱ्या झाल्या . त्यानंतर मालडा जिल्ह्यात त्याच्या आणि औरंगजेबाच्या फौजांचे युद्ध झाले . याचा परिणाम असा झाला की राज्यकारभारात ढिलाई आली आणि लाचलुचपत वाढली. वरिष्ठ अधिकारी युद्धासाठी प्रांतातून गेल्यामुळे राज्यकारभारावर कोणाचाच ताबा राहिला नाही . या सर्व गोष्टींमुळे बंगालमध्ये दारिद्र्य आणि दुःख यांनी जनता हवालदील झाली . अव्यवस्था, जबरदस्ती यांनी धुमाकूळ घातला . पीडलेल्यांची दाद घेणारा कोणीही उरला नाही . ह्या परिस्थितीचे अतिशय यथातथ्य वर्णन शहाबुद्दीन तालिश याने आपल्या आठवणीच्या ग्रंथात दिले आहे . "मनसबदारांना ज्या जहागिरी देण्यात आल्या होत्या त्या अनेक परगण्यांत होत्या . जमीनमहसूल गोळा करणारे अनेकजण या पद्धतीमुळे निर्माण झाल्यामुळे शेतकऱ्यांवर अन्याय होऊ लागला आणि खेडीच्या खेडी नाश पावली . हा महसूल गोळा करण्यात पैशाचा अपव्यय झाला . एकाच ठिकाणी दोन मालक असण्याची ही पद्धती वाईट होती . मिरजुम्ला याने आपल्या जहागिरीत जी माणसे नेमली होती ती धर्मनिष्ठ असून त्यांच्यापैकी काहीजणांना बादशहाकडून फर्मान मिळालेले होते. यांच्याकडे करमुक्त जमिनी होत्या अथवा त्या त्यांच्याकडे निवृत्ती वेतनासारख्या होत्या . बादशाही जमिनीत अशा तऱ्हेचे अधिकार असलेल्या ज्या व्यक्ती होत्या किंवा जे जहागीरदारांचे खंडकरी होते त्या सर्वांची वतने सद्रने रद्दबादल केली आणि असा हुकूम काढला की त्यांनी सर्वांनी जमिनीची मशागत करावी आणि त्यांच्या ताब्यात असलेल्या जमिनीपोटी महसूल भरावा . या हुकमाची अंमलबजावणी करताना वरील वतनदारांवर कसलीही दयामाया दाखविण्यात आली नाही . परिणामी जमिनी ओस पडल्या आणि जमीनदार भुकेकंगाल बनले ." (**कन्टिन्यूएशन**, पान, ११८)

लोकांचे आणखी हाल होण्याचे कारण म्हणजे प्रांताच्या संरक्षणाची दुर्बलता . १६६० च्या अगोदर जी अंदाधुदी झाली त्यामध्ये नाविकदलाकडे दुर्लक्ष झाले . "राजपुत्र शुजा हा जेव्हा बंगालचा सुभेदार होता तेव्हा आरमाराच्या खर्चाकरता लावून दिलेल्या खेड्यातील वसूल करताना सरकारी अधिकाऱ्यांनी केलेल्या जुलमामुळे त्या खेड्यांचा नाश झाला . जहागिरी किंवा रोख पगार मिळणारे नाविक अधिकारी आणि कामगार दरिद्री झाले . मिरजुम्लाने आसामवर केलेल्या मोहिमेत अनेक नाविक अधिकारी दगावले . मिरजुम्ला जेव्हा मरण पावला तेव्हा मोगल आरमाराचा जवळ जवळ नाश झाला असून थोडीफार मोडकीतोडकी जहाजे शिल्लक होती ." (**कन्टिन्यूएशन**, पान, ११३ अ) नाविकदलाची अशा तऱ्हेची अवस्था झाल्यामुळे छटगाव येथील पोर्तुगीज चाच्यांनी उच्छाद मांडला आणि नौखाली , बरीसाल आणि खुद्द डाक्का हे नदीलगतचे प्रदेश त्यांनी पद्धतशीरपणे उद्ध्वस्त केले.]

(२) औरंगजेबाच्या कारकिर्दीतील बंगालचे सुभेदार

शायस्ताखानाची कारकीर्द

शायस्ताखानाची बंगालवरील सुभेदारीची कारकीर्द १४ वर्षेपर्यंत झाली शायस्ताखानाची कारकीर्द (१६६४–१६७७). एकाच प्रांतामध्ये एवढ्या मोठ्या कालावधीच्या कारकिर्दीत त्याने प्रथम बंगालमधील नद्या आणि किनारपट्टी यांवरील वाहतूक सुरक्षित केली . यासाठी त्याने छटगाव येथील चाचे लोकांच्या अड्ड्यांचा नाश केला , चाचेगिरी करणाऱ्या फिरंग्यांना त्याने आपल्या बाजूला वळवून घेतले आणि डाक्क्याजवळ त्यांची वसाहत केली . बंगाल प्रांतावरील त्याची अंतर्गत राज्यव्यवस्था ही तितकीच सौम्य

आणि हितकारी होती . कारभाराची सूत्रे हाती घेतल्यावर त्याने जुन्या खंड नसलेल्या जमिनी सरकारने आपल्याकडे घेण्याची सुरू झालेली पद्धती ताबडतोब बंद केली मीर जुम्ला याच्या मृत्यूनंतरच्या मधल्या कालावधीत ही पद्धत स्थानिक अधिकाऱ्यांनी सुरू केलेली होती . (**तालिशचे कन्टिन्यूएशन**, पाने ११८ अ–१२१ अ)

न्यायदान करण्यासाठी तो दररोज जाहीर दरबार भरवीत असे आणि लोकांवर झालेले अन्याय ताबडतोब दूर करीत असे . आपले हे अतिशय महत्त्वाचे कर्तव्य आहे असे तो मानीत असे . त्याने खरेदी आणि विक्री करण्याबाबत पुन्हा पहिल्यासारखे स्वातंत्र्य दिले आणि त्याच्या पूर्वीच्या अधिकाऱ्यांनी बेकायदेशीरपणे जे दोन कर वसूल करण्याचा पायंडा पाडला होता , ते कर त्याने रद्द केले . हे कर म्हणजे एक, व्यापारी आणि प्रवासी यांच्या उत्पन्नावर $^{१}/_{४०}$ कर (जकात) आणि दोन , प्रत्येक तऱ्हेचा कारागीर आणि व्यापारी यांच्यावर लादलेली जकात . या दुसऱ्या करापासून खुद्द त्याच्या जहागिरीत सालिना १५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळत असे . त्याने शस्त्रसामर्थ्याच्या जोरावर बंगालमध्ये बऱ्याच काळपर्यंत जी शांतता निर्माण केली होती त्याचा त्याने अतिशय चांगल्या तऱ्हेने उपयोग केला . बंगालचे राजधानीचे शहर डाक्का येथे त्याने उत्तम इमारती बांधून ते सुशोभित केले . त्याचप्रमाणे साऱ्या देशभर त्याने सराया बांधल्या . सारांश सनातन जमान्यातला शायस्ताखान हा एक अतिशय उदारवृत्तीचा उमराव होता असेच म्हणावे लागेल . जानेवारी १६८० मध्ये शायस्ताखानाला बंगालमध्ये परत पाठविण्यात आले . बंगालमधील त्याच्या सुभेदाराची दुसरी कारकीर्द ९ वर्षे म्हणजे १६८० पासून १६८८ पर्यंत झाली . या कारकिर्दीचा उल्लेखनीय विशेष म्हणजे इंग्रजांच्या ईस्ट इंडिया कंपनीबरोबर झालेले युद्ध . याचे वर्णन यापूर्वी आलेले आहे . सर्वसाधारणपणे असा लौकिक पसरला की शायस्ताखानाच्या बंगालवरील सुभेदारीच्या काळात तांदळाचा भाव रुपयाला ८ मण येवढा होता . त्या काळात तांदळाची निर्यात होत नसे . अशा परिस्थितीत डाक्का आणि बरिसाल यासारख्या तांदूळ उत्पादनाच्या बाबतीत अद्वितीय असलेल्या ठिकाणी ही गोष्ट असंभवनीय आहे असे समजण्याचे कारण नाही.

इब्राहीमखानाचा गैदी कारभार

इब्राहीमखान हा जून १६८९ मध्ये सुभेदार म्हणून बंगालमध्ये आला . तो वयाने बराच मोठा असून , वृत्तीने संयमी आणि बैठ्या सवयीचा होता . पुस्तकाचे त्याला अतिशय प्रेम होते . कृतीच्या बाबतीत त्याच्या अंगी निष्क्रियता होती तर एखादी गोष्ट धडाडीने पार पाडण्याचे सामर्थ्य त्याच्या अंगी नव्हते . साहजिकच परिस्थितीवर त्याचा यत्किंचितही काबू राहिला नाही . परिणामी प्रांताचा सर्व राज्यकारभार मोडून पडला , आणि प्रत्येकजण मन मानेल तसा वागू लागला . इब्राहीमखान हा स्वतः न्याय देत असे . लाचखाऊपणा आणि लहरीपणा यापासून तो स्वतः अलिप्त होता . त्याने शेती आणि व्यापार यांना उत्तेजन दिले . (**रियाझ**, २३१) बंगालमध्ये सुभेदार म्हणून आल्यानंतर त्याने प्रथम जी गोष्ट केली ती म्हणजे इंग्रजांबरोबर तह केला आणि बंगालमध्ये पुन्हा वसाहत करण्याबद्दल त्यांचे मन वळविले (पत्र, ता. २ जुलै १६८९ **मद्रास डायरी** मधील ७ ऑक्टोबर रोजी नोंदलेले).

शोव्हासिंग आणि रहीमखान यांचे बंड

परंतु १७ व्या शतकाच्या अखेरीस बंगालमध्ये पुस्तकातले किडे बनून राहणाऱ्या व्यक्तींना जागा नव्हती. इब्राहीमखानाने राज्यकारभारामध्ये जे शैथिल्य आणले होते आणि राज्यकारभारातील लष्करी

बाण्याच्या वृत्तीचा जो लोप केला होता त्या संधीचा फायदा बंगाल प्रांतामधील गुंड लोकांनी घेतला . मेदिनीपूर जिल्ह्यातील छेटोबरडा येथील जमीनदार शोव्हासिंग याने बंड पुकारले आणि ओरिसामधील पठाण लोकांचा पुढारी रहीमखान याच्याशी संगनमत करून , त्याचा शेजारी राजा कृष्णराम याच्या जमिनीत लुटालूट करण्यास सुरुवात केली . राजा कृष्णराम हा बरद्वान जिल्ह्यातील शेतकरी सेनापती होता. कृष्णराम याने थोडी फौज बरोबर घेऊन बंडखोरांविरुद्ध चाल केली . परंतु त्याचा पराभव करण्यात येऊन त्याला ठार मारण्यात आले . त्याची बायको , त्याच्या मुली आणि त्याची सर्व मालमत्ता आणि त्याचप्रमाणे खुद्द बरद्वान शहर बंडखोरांनी काबीज केले . पश्चिम बंगालचा फौजदार नुरुल्लाखान याने भित्रेपणाने हुगळीच्या किल्ल्यात आपल्याला बंद करून घेतले . थोड्याच कालावधीत बंडखोरांनी तेथे त्याची नाकेबंदी केली. रात्रीच्या वेळी तो केवळ जिवानिशी किल्ल्याच्या बाहेर निसटला , परंतु त्याची सर्व संपती आणि किल्ला शोव्हासिंग याच्या हाती पडली .[अधिक माहितीसाठी पाहा : (सलिमुल्लाह याचे **तारीख-द-बंगला; रियाझ;** स्ट्यूअर्ट याचे **बंगाल;** ऑर्म्स, **एमएस**. ११९)]

बंडाचा उद्‌भव झाल्यावर बंगालमधील तिन्ही युरोपियन राष्ट्रांनी आपल्या मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी हिंदुस्थानी शिपायांची भरती केली . त्याचप्रमाणे कलकत्ता, चंद्रनगर आणि चिनसुरा येथील आपल्या वसाहतीभोवती तटबंदी बांधण्याची परवानगी त्यांनी सुभेदारापासून मिळविली . बंगालमध्ये जी सार्वत्रिक अशांतता पसरली होती त्यामध्ये वरील तिन्ही ठिकाणे म्हणजे निर्वासितांची एकमेव आश्रयस्थाने बनली. चिनसुरा येथील डचांनी ऑगस्ट महिन्यात मोगल सरकारला हुगळीचा किल्ला परत मिळवून दिला.

रहीमखान व शोव्हासिंगाचे मोगलांबरोबर युद्ध

शोव्हासिंगाने पुढील कारवाई केली , ती अशी : त्याने रहीमखानाला आपल्या फौजेचा मुख्य भाग बरोबर देऊन नडीया आणि मुर्शिदाबाद ही दोन समृद्ध शहरे जिंकून घेण्यासाठी पाठविले आणि तो स्वतः बरद्वान येथील आपल्या मुख्य तळाकडे परतला . येथे राजा कृष्णराम याच्या एका मुलीने त्याला भोसकून ठार मारले . बंडखोरांच्या सैन्याने रहीम याला आपला प्रमुख केले . त्याने रहीमशहा ही पदवी घेऊन स्वतःला राज्याभिषेक करून घेतला . या वेळेपर्यंत गंगेच्या पश्चिमेकडील सर्ब बंगाल बंडखोरांच्या ताब्यात गेला होता. परंतु इब्राहीमखान हा यावेळी ढाक्का येथे काहीही न करता निष्क्रियपणे बसून होता . रहीमच्या सैन्याची संख्या आता दहा हजार घोडेस्वार आणि साठ हजार पायदळ इतकी वाढली होती . त्याने मुर्शिदाबाद, मालडा आणि राजमहाल ही समृद्ध शहरे लुटून उद्‌ध्वस्त केली.

या बंडाची आणि बंडखोरांच्या हालचालीची हकीकत व इब्राहीमखानाचा निष्काळजीपणा या गोष्टी कानावर पडताच बादशहाने त्याला ताबडतोब बंगालच्या सुभेदारीवरून बडतर्फ केले व त्याच्या जागी आपला नातू अजीम उश्शान याची १६९७ सालच्या मध्यावर नेमणूक केली . (**एम. ए.**, ३८७) त्या वेळेला राजपुत्र हा दक्षिणेमध्ये होता . तो येईतोपर्यंत इब्राहीमखानाचा मुलगा आणि बरद्वानचा फौजदार झबरदस्तखान याने राजमहाल आणि मालडा ही ठिकाणे परत जिंकून घेतली . त्यानंतर त्याने भगवान गोला येथील बंडखोरांच्या छावणीवर हल्ला केला आणि दोन दिवसांच्या युद्धानंतर ते ठिकाण जिंकून घेतले. (मे १६९७) त्यानंतर लागोपाठ रहीम याची मुर्शिदाबाद आणि बरद्वान येथून जंगलामध्ये हाकालपट्टी करण्यात आली.

नोव्हेंबर महिन्यात राजपुत्र बरद्वान येथे आला . तेथे तो बरेच महिनेपर्यंत मुक्काम करून होता . या

सुमारास झबरदस्तखान हा बंगाल प्रांतातून निघून गेला होता . त्यामुळे बंडखोरांनी पुन्हा डोके वर काढले आणि सगळीकडे धामधूम उडवून दिली . रहीमखानाने नडीया आणि हुगळी या जिल्ह्यांत लुटालूट केली आणि नंतर तो बादशाही फौजेशी सामना देण्यासाठी बरद्वाननजीक आला . तेथे त्याने राजपुत्राचा मुख्य वजीर रव्वाजा अन्वर याला विश्वासघाताने मुलाखतीत ठार मारले आणि नंतर त्याने बादशाही फौजेवर उतावीळपणे हल्ला केला. परंतु या हल्ल्यात तो मारला गेला . (**अख.**, **११**, सप्टें. १६९८) बंडखोरांचे पुढारी अशातऱ्हेने नाहीसे झाल्यावर बंडखोरांच्या सैन्याची वाताहात लागली.

बंगालवरील मुर्शिदकुलीखानाची सुभेदारी

बादशहाच्या दरबारात महमद हादी या नावाचा एक अतिशय हुशार अर्थवेत्ता होता . त्याच्याकडे हैद्राबादची दिवाणी होती. बादशहाने त्याची नेमणूक बंगालचा दिवाण म्हणून केली . त्याला कारतलबखान ही पदवी देखील देण्यात आली . (नोव्हेंबर १७००) काही काळानंतर त्याची नेमणूक ओरिसाचा सुभेदार म्हणून करण्यात आली . (जानेवारी १७०३) त्याला यावेळी मुर्शिद कुलीखान हा किताब देण्यात आला . "बंगालच्या नवीन दिवाणाने अतिशय शहाणपणाने केलेल्या राज्यकारभारामुळे बंगाल प्रांताची फार मोठी भरभराट झाली. मुर्शिद कुलीखानाचा आपले अधिकारी नेमण्याबाबत अतिशय कटाक्ष असे . त्यांच्यातर्फे तो जमिनीची करधारणेची कुवत आणि जकातीपासून येणाऱ्या उत्पन्नाचा आकडा याबाबतची पुरेपूर माहिती मिळवी. मुर्शिद कुलीखानाने सारावसुलीचे काम आपल्या हाती घेतले . जमीनदार आणि जहागिरदार यांच्याकडून जी पैशाची अफरातफर होते तिला त्याने आळा घातला आणि वार्षिक महसुलाच्या उत्पन्नात भर घातली." (**ग्लॅडविन.**)

मुर्शिद कुलीखानाने महसुलाच्या बाबतीत अजीम उश्शान याला कोणत्याही तऱ्हेने हस्तक्षेप करू दिला नाही. राजपुत्राने मूर्खपणाने काही सैनिकांना बंड करून उठवून देण्याचा आणि दिवाणाचा खून करण्याचा बेत रचला. परंतु मुर्शिद कुलीखानाची प्रसंगावधानता, साहस आणि चातुर्य यामुळे त्याला बंडाचा बिमोड करण्यात यश आले. परंतु यापुढे आपल्या जीवावर अशा तऱ्हेचा प्रयत्न पुन्हा होऊ नये म्हणून मुर्शिद कुलीखानाने जमाबंदीचे आपले खाते इ . स. १७०३ मध्ये डाक्क्याहून हलविले . डाक्का येथे सुभेदार म्हणून राजपुत्राचे निवासस्थान होते . डाक्क्याहून हे खाते त्याने गंगा नदीच्या किनाऱ्यावर मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या मक्सूदाबाद नावाच्या खेड्यात नेले . या खेड्याचे नाव बदलून त्याने ते आपल्या नावावरून मुर्शिदाबाद असे ठेवले . १८ व्या शतकाची जवळ जवळ ५० वर्षे मुर्शिदाबाद बंगालची राजधानी म्हणून गाजणार होती. या प्रसंगाची हकीकत औरंगजेबाच्या कानावर जाताच त्याला अतिशय संताप आला . त्याने राजपुत्राला बिहारमध्ये जाण्याचा हुकूम केला . १७०३ च्या जानेवारी महिन्यात बिहारचा राज्यकारभार राजपुत्राकडे सोपविण्यात आला होता . यानंतरची तीन वर्षे (१७०४–१७०७) अजीम हा पाटणा येथे राहिला. या शहराचे नाव त्याच्या नावावरून अजीमाबाद असे ठेवण्यास बादशहाने परवानगी दिली . (**अहकाम**, ११६ ब)

बंगाल प्रांतामधून वसूल होणाऱ्या ज्यादा महसुलाची मोठी रक्कम मुर्शिद कुलीखान बादशहाकडे वारंवार पाठवीत असे . मराठ्यांच्या बरोबर चाललेल्या अविरत संघर्षामुळे बादशहाच्या खजिन्यामध्ये होणाऱ्या द्रव्यसंचयाचे इतर मार्ग पार धुपून गेले होते . साहजिकच मुर्शिद कुलीखानाकडून अशा वेळी बादशहाला मिळणारा पैसा म्हणजे त्याला एखाद्या पर्वणीसारखा वाटे . आपल्यावर एखाद्या अतिशय शिस्तप्रिय आणि सामर्थ्यवान माणसाचे राज्य आहे अशी भावना लोकांमध्ये मुर्शिद कुलीखानाच्या

कारकिर्दीमध्ये निर्माण झाली . तो आपल्या स्वतःच्या हस्तकांकरवी महसूल वसूल करवीत असे . त्यामुळे मध्यस्थ आणि जमीनदार हे जो फायदा काढीत तितक्या रकमेची बचत होऊ लागली . मुर्शिद कुलीखानाचे हुकूम हे इतके निरंकुश असत की त्याच्यासमोर आल्यावर अगदी शिरजोर असलेल्या व्यक्तीचाही थरकाप होत असे. परिणामी त्याच्या आज्ञा अतिशय काटेकोरपणे पाळल्या जात . आठवड्यातले दोन दिवस तो स्वतः न्यायदानाचे काम करी . त्याचे निर्णय अतिशय निःपक्षपातीपणाचे असत . त्याची अंमलबजावणी तो इतक्या कडकपणे करीत असे की कोणाचीही जुलूम जबरदस्ती करण्याची प्राज्ञा होत नसे. (**ग्लॅडविन**).

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर काही वर्षांनी त्याची नेमणूक बंगालचा सुभेदार म्हणून करण्यात आली. या सुमारास दिल्लीमधील बादशाही सरकार डबघाईस येऊन निःशेष होण्याच्या बेतात आले होते . परिणामी लौकरच मुर्शिद कुलीखान हा बंगालमध्ये स्वतंत्र सत्ताधीश बनला . त्याच्या अधिपत्याखाली बंगालमध्ये शांततेचे आणि आश्चर्यकारक अशा प्रगतीचे युग सुरू झाले . त्याच्यामागून राज्यकारभारावर आलेल्या नालायक राज्यकर्त्यांच्या हातून घडलेल्या मूर्खपणाच्या गोष्टी आणि गुन्हे यामुळेच या युगात जो काही खंड पडला असेल तेवढाच. (**एम. यू.**, भाग ३. ७५१)

(३) माळवा आणि मोगल कालखंडातील त्या प्रांताचे महत्त्वपूर्ण स्थान

मोगलांच्या ताब्यातील माळवा प्रांताचा विस्तार यमुना आणि नर्मदा या नद्यांच्या मधोमध दक्षिणोत्तर झालेला होता. माळव्याच्या पश्चिमेला चंबळच्या पलीकडे रजपुताना होता आणि पूर्वेस बुंदेलखंड होता . बेटवा नदी माळवा आणि बुंदेलखंड यांच्यामधील सरहद्द होती . या प्रांताच्या लोकसंख्येचा विशेष म्हणजे रजपूत लोक होते . यांची विभागणी असंख्य लहान -लहान कुळांमध्ये किंवा सुप्रसिद्ध कुळांच्या छोट्याशा शाखांमध्ये झालेली होती . खुद्द रजपुतान्यामधील वेगवेगळ्या जमातींच्या संघटित राज्यांप्रमाणे हे रजपूत सुसंघटित नव्हते. माळव्यामध्ये रजपुतांशिवाय इतर जमातींच्या लोकांचीही वस्ती होती . उदा. जाट; हे लोक माळव्याच्या उत्तर विभागात पसरलेले होते . त्याचप्रमाणे गोंड लोकांच्या जमातीची वस्ती मोठ्या संख्येने माळव्याच्या दक्षिण आणि आग्नेयेस पसरली होती . त्याशिवाय प्रामुख्याने अफगाणी मुसलमान दुसरीकडून येऊन माळव्याच्या काही विशिष्ट भागात स्थायिक झाले होते . त्यांची संख्याही काही कमी नव्हती. या सर्व जमातींशी तुलना करता रजपुतांची संख्या आणि महत्त्व इतके काही प्राधान्यपूर्ण नव्हते की ज्यामुळे वर उल्लेखिलेल्या जमातींना तुच्छतेने लेखता आले असते . माळव्यातील अविकसित आणि संख्येने मोठ्या प्रमाणात असलेल्या जमाती ह्या प्रांताच्या कानाकोपऱ्यात वस्तीपासून दूर आणि डोंगर व जंगली प्रदेश यात राहात होत्या.

माळव्याची शेती अतिशय संपन्न अशा अवस्थेत होती . अफू, ऊस, द्राक्षे, कलिंगडे आणि विड्याची पाने यांसारखी वरच्या दर्जाची पिके माळव्यामध्ये मोठ्या प्रमाणात पिकविली जात . त्याशिवाय माळव्यातील घनदाट जंगली प्रदेश हत्तीचे कळप सहज छपून जातील इतके मोठे होते . उद्योगधंद्याच्या बाबतीत मोगल सुभ्यांमध्ये गुजराथच्या खालोखाल माळव्याचाच क्रमांक होता. मोगलांच्या काळात माळव्याचे महत्त्व वाढले याचे कारण आग्रा आणि दिल्ली ह्या उत्तरेच्या राजधान्यांच्या शहरांतून दक्षिणेकडे जाणारे सर्व लष्करीदृष्ट्या महत्त्वाचे मोठे रस्ते या प्रांतामधून जात.

माळव्यामध्ये बहुसंख्य लोक हिंदू होते. त्यामध्ये कणखर अशा रजपुतांचा भरणा होता. औरंगजेबाने देवळे फोडण्याचे आणि हिंदूवर दरडोई कर लादण्याचे जे धोरण स्वीकारले होते ते सपशेल शरणागती

स्वीकारून हिंदुप्रजाजन सहन करतील याची सुतराम शक्यता नव्हती . आपल्या धर्माची जी पूजास्थाने त्यांचे रक्षण करण्या करिता अनेकदा तेथील हिंदूंनी इस्लामच्या हस्तकांबरोबर प्रखर लढा दिला होता . परंतु एकंदरीत पाहता औरंगजेबाच्या कारकिर्दीच्या पूर्वार्धात माळव्यामध्ये जे दंगे -धोपे झाले ते लहान प्रमाणावर होते आणि त्यांची व्याप्ती काही थोड्या प्रदेशांपुरतीच मर्यादित होती . छत्रसाल बुंदेला आणि भक्त बुलंद गोंड यांनी केलेले हल्ले सोडल्यास १७ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत जवळ जवळ माळव्यात शांतता होती आणि कोणतीही विशेष घटना न होता माळव्याचा राज्यकारभार व्यवस्थित हाकला गेला . परंतु राजाराम जिंजीहून स्वदेशी परतल्यावर जी एक चळवळ सुरू झाली त्यामुळे ५० वर्षांच्या आत -बाहेरच माळवा प्रांताच्या राजकीय इतिहासाचे स्वरूप पूर्णपणे पालटणार होते.

(४) मराठ्यांचे माळव्यामध्ये हल्ले, १६९९—१७०६

माळव्यात मराठ्यांचा शिरकाव

१६९९ च्या नोव्हेंबर महिन्यात कृष्णा सावंत याच्या अधिपत्याखाली मराठ्यांच्या एका तुकडीने नर्मदा नदी पहिल्या प्रथम पार केली , आणि धामुनीच्या परिसरापर्यंत त्यांनी माळव्यामध्ये आक्रमण केले . मराठ्यांनी अशा तऱ्हेने माळव्याचा जो मार्ग खुला केला तो पुन्हा कधीच बंद झाला नाही . सरते शेवटी १८ व्या शतकाच्या मध्यावर माळवा प्रांताचा मराठ्यांनी यथाक्रमाने ताबा घेतला . जानेवारी १७०३ मध्ये मराठ्यांनी पुन्हा एकदा नर्मदा नदी ओलांडली आणि उज्जैन शहराच्या आसमंतापर्यंत मोठी धामधूम उडवून दिली. **नेमाजी शिंदे याचे माळव्यात हल्ले , १७०३** :- १७०३ च्या ऑक्टोबर मध्ये नेमाजी शिंदे हा वऱ्हाडात घुसला. वऱ्हाडमध्ये त्यावेळी फिरोजजंगाच्या वतीने रुस्तुमखान हा नायब सुभेदार होता . त्याचा त्याने पराभव करून त्याला कैद केले . त्यानंतर त्याने होशंगाबाद जिल्ह्यावर हल्ला चढविला आणि नर्मदा नदी ओलांडून छत्रसालाने बोलाविल्यामुळे त्याने माळव्यात आगेकूच केले . अनेक खेडी आणि शहरे यात लुटालूट केल्यावर त्याने सिरोंजला वेढा दिला . परंतु फिरोजजंग दुसऱ्या एका मराठा फौजेचा पाठलाग करीत वऱ्हाडमध्ये शिरला होता . तो हलकी युद्धसामग्री घेऊन घाईघाईने हल्लेखोरांच्या मागावर निघाला आणि त्याने त्यांना सिरोज येथे गाठले . नोव्हेंबरच्या मध्याच्या सुमारास त्याने त्यांच्यावर हल्ला चढविला . नेमाजी शिंदे घोड्यावर बसून पळून गेला . हल्लेखोरांपैकी अनेक मराठे आणि त्यांचे स्थानिक रजपूत आणि अफगाण दोस्त हे ह्या हल्ल्यात मारले गेले अथवा जखमी झाले . रुस्तुमचे सैनिक आणि त्याच्या सैन्यातील जनावरे यांना नेमाजी आपल्याबरोबर ओढून नेत होता त्यांची सुटका करण्यात आली.

फिरोजजंग त्याला मिळालेल्या यशानंतर स्वस्थ बसला नाही . १७०४ च्या फेब्रुवारी महिन्यात त्याने अचानक नेमाजी शिंदे यांच्या फौजेवर हल्ला केला . नेमाजी शिंदे याची फौज धामुनीच्या जंगलात बेसावध अवस्थेत होती . नेमाजीच्या फौजेपैकी अनेकांना ठार मारण्यात आले . बरीचशी लूट परत मिळविण्यात आली. मोगलांचेही अतिशय नुकसान झाले. (**अखबारात**, १६ मार्च).

बेदारबख्त याची माळव्याची सुभेदारी, १७०४—१७०६

मोगलांना हा विजय म्हणजे फार मोठ्या सोडवणुकीसारखा वाटला . वऱ्हाडमधील मराठ्यांच्या धामधुमीमुळे बातमी लिहिणाऱ्याचे अहवाल आणि सरकारी खलिते हे जवळ जवळ चार -पाच महिने नर्मदा नदीच्या काठीच अडकून पडले . फिरोजजंगाचे साहस आणि त्याची लष्करी कारवाई यामुळे नुकतीच ज्या

भयंकर संकटातून माळव्याची सुटका झाली होती त्याचा परिणाम असा झाला की परिस्थितीच्या गांभीर्याची जाणीव औरंगजेबाच्या मनाला पुरेपूर झाली . त्या सुमारास औरंगाबाद आणि खानदेश या प्रांताचा सुभेदार म्हणून राजपुत्र बेदारबख्त हा काम पाहात होता . तो साहसी आणि अतिशय निष्णात असा सेनानी होता . त्याची नेमणूक ३ ऑगस्ट १७०४ रोजी माळव्याचा सुभेदार म्हणून करण्यात आली . मार्च १७०६ पर्यंत त्याने सुभेदार म्हणून माळव्याचा कारभार केला . त्यासुमारास गुजराथमध्ये ताडतोब कूच करून जाण्यासंबंधी व त्या प्रांताच्या संरक्षणाची जबाबदारी घेण्याचा हुकूम त्याला मिळाला . (पाहा : **अख**., ११, १४, २०, २४, मार्च, १७०४; **एम. ए.**, ४८१–४८३, ४९६, ४९८, ५१२)

अशांततेचा देशातील परिस्थितीवर झालेला परिणाम

राजपुत्राचा खास मर्जीतला सेनानी जयपूरचा नवा राजा तरुण आणि शूर असा सवाई जयसिंग हा होता. त्याने राजपुत्राच्या नजरेत भरेल इतक्या मनःपूर्वक जी चाकरी केली होती त्यामुळे राजपुत्राचे त्याच्याविषयी अतिशय चांगले मत झालेले होते.

माळव्यामध्ये धामधूम उडविण्याऱ्या बंडखोरांमध्ये नसीरी अफगाण, गोपाळसिंग चंद्रावत, सिरोंजचा गोपाळ चौधरी , अब्बास अफगाण आणि उमर पठाण हे होते . तसेच बघितले तर औरंगजेबाच्या कारकिर्दीच्या अखेरीस माळव्यामधील शांततेचा भंग करणारे इतके बंडखोर होते की त्यांची गणती करता येणेच कठीण होते . "मराठे, बुंदेले लोक आणि अफगाण यांची चाकरी सुटल्यामुळे ते प्रांतामध्ये जिकडे तिकडे धुमाकूळ घालीत आहेत ." (१७०४) यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे. "खानदेशचा प्रांत हा पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे —माळव्याचाही संपूर्ण नाश झाला आहे ,—या दोन्हीही प्रांतांत थोडी फार वस्तीच आता शिल्लक राहिली आहे." (**इनायत**, १५ अ, ६१ अ)

(५) छत्रसाल बुंदेला याचे पूर्वायुष्य

छत्रप्रकाश छत्रसाल बुंदेला हा चंपतराय बुंदेला याचा चौथा मुलगा (**एम्. यू.**, भाग २ . ५१०–५१२); याचा जन्म इ . स. १६५० मध्ये झाला . जवळ जवळ ५० वर्षे त्याने मोगल सरकारला अतिशय यशस्वीपणे तोंड दिले . या कालावधीत त्याने आपल्या प्रांतात सारखी धामधूम उडवून दिली , माळव्यावर आक्रमण केले आणि अखेर पूर्व माळव्यामध्ये आपले स्वतःचे असे राज्य स्थापून पन्ना येथे आपली राजधानी केली. त्याला जवळ जवळ ८१ वर्षांचे आयुष्य लाभले आणि १७३१ मध्ये त्याचा मृत्यू झाला.

छत्रसालचे वडील चंपतराय याचे सारे जीवन बादशाहीविरुद्ध झगडण्यात गेले . त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलाची स्थिती अतिशय अगतिक झाली . छत्रसाल आणि त्याचा मोठा भाऊ अंगद यांना जयसिंगाने प्रथम आपल्या फौजेत नोकरी दिली . त्यावेळी त्याचे शिवाजीबरोबर युद्ध चालू होते . (१६५५) त्यानंतर त्यांनी दाखविलेल्या अप्रतिम शौर्यामुळे पुढील ऑगस्ट महिन्यात त्यांना बादशाही मनसबदारी देऊन त्यांचा गौरव करण्यात आला . (छत्रसाल याला तीन हजारी आणि अंगद याला हजारी मनसबदारी देण्यात आली.)

या नंतर छत्रसाल याला दिलेरखानाने मोगलांच्या देवगडवरील हल्ल्यात पाठविले . परंतु तरुण छत्रसालाची अशी भावना झाली की आपल्या कामगिरीचे व्हावे तसे चीज होत नाही . इतकेच नव्हे तर

आपल्या दुर्दम्य महत्त्वाकांक्षेला मोगल सैन्यातील दुय्यम सेनाधिकाऱ्यांचे अधिकार पुरेसा वाव देत नाहीत याबद्दलही त्याची खात्री पटली . त्याची आणि शिवाजीची गाठ पडली होती . शिवाजीचे अनुकरण करून आपणही तसेच साहसपूर्ण आणि स्वतंत्र जीवन जगावे अशा स्वप्नामध्ये तो गुंग झाला.

छत्रसालाची स्वातंत्र्यप्राप्तीची ईर्षा

परंतु मराठ्यांच्या राजाने त्याला आपल्या राज्यात जाण्याचा सल्ला दिला आणि मोगल फौजेचे लक्ष विचलित व्हावे म्हणून औरंगजेबाविरुद्ध तेथील लोकांमध्ये बंडखोर वृत्ती निर्माण करण्यासाठी त्याच्या वैयक्तिक वजनाचा त्याने उपयोग करावा असा विचार शिवाजीने प्रकट केला . मायदेशी परतल्यावर छत्रसालाने सामर्थ्यवान अशा मोगल साम्राज्यावर प्रहार करण्यास सुरुवात केली.

इ. स. १६७० मध्ये औरंगजेबाने हिंदूंच्या देवळाचा नाश करण्याचे जे धोरण स्वीकारले त्यामुळे छत्रसालाला जी एक संधी मिळाली तिचा त्याने ताबडतोब उपयोग करून घेतला . बुंदेलखंड आणि शेजारचा माळवा प्रांत येथील हिंदु प्रजाजनांनी आपल्या देवदेवतांच्या आश्रयस्थानाचा बचाव करण्यासाठी म्हणून हातात शस्त्रे घेतली . मोगल बादशहाला ज्याप्रमाणे चंपतरायाने बेदरकारपणे तोंड दिले आणि त्यांच्या धर्माचे संरक्षण केले , तशाच तऱ्हेची कृती पुन्हा प्रत्यक्षात उतरविणारा धाडसी पुढारी त्यावेळी लोकांना पाहिजे होता. साहजिकच हिंदुधर्म आणि क्षत्रियांची प्रतिष्ठा यांचा कैवारी म्हणून छत्रसालाचा गौरव करण्यात आला. औरंगजेबाशी निष्ठा बाळगून राहणाऱ्या ओर्च्छा संस्थानचा बुंदेला राजा सुजनसिंग याने देखील छत्रसालाची स्तुती करणारा आणि अभिष्ठचिंतन करणारा गुप्त संदेश रवाना केला.

(६) मोगलसरकारबरोबर छत्रसालाचा झालेला संघर्ष

"छत्रसालाची जी प्रगती चाललेली होती त्याची बातमी बुंदेला लोकांच्या कानाला सुखावह भासत होती." (१६७१) बंडखोरांनी छत्रसालाला आपला पुढारी आणि सर्व बुंदेले यांचा राजा म्हणून निवडले . त्याच्या सैन्यात फक्त ३३५ माणसे होती . परंतु लौकरच त्याला मोठ्या प्रमाणात कुमक येऊन मिळाली . त्याच्या अधिपत्याखाली आपल्याला लुटालूट करता येईल या आशेने बुंदेला जमातीतील लष्करी बाण्याचे शिपाई मोठ्या संख्येने त्याच्याभोवती जमा झाले . त्यांच्यामध्ये विशेषतः चंपतरायाच्या दरोडेखोरीच्या जीवनातील अनेक सैनिकांचा भरणा होता . आपल्या नवीन जीवनाच्या पूर्वार्धात छत्रसालाने आपल्या हल्ल्यांचा रोख धामुनी जिल्हा आणि जिल्ह्याच्या पश्चिमेस ६५ मैलांवर असलेले सिरोंजचे समृद्ध शहर यावरच ठेवला होता. एकामागून एक वर्षे त्याने या दोन विभागांतील खेडी लुटून उद्ध्वस्त केली . धामुनी जिल्ह्यावर जे जे मोगल फौजदार आले त्यांनी छत्रसालाचा प्रतिकार केला . परंतु त्यांच्यापैकी कोणालाही म्हणण्यासारखे यश प्राप्त झाले नाही.

थोड्याच काळात छत्रसाल याला जे वारंवार विजय मिळत गेले त्यामुळे ज्यांची मने हेलकावे खात होती त्यांनी मनाचा त्याला जाऊन मिळण्याविषयी ठाम निश्चय केला . इतर अनेक लहानसहान नायक त्याला सामील झाले . इतकेच नव्हे तर बुंदी संस्थानाची गादी बळकाविणारा दुर्जनसाल हाडा यानेही बुंदेलखंडाच्या बंडखोरांबरोबर हातमिळवणी केली . ज्या ठिकाणाहून आपल्याला प्रमाणित महसूलाच्या ¼ रक्कम (चौथाई) धमकावणी देऊन का होईना मिळत असे त्या ठिकाणाची लुटालूट न करण्याची मराठ्यांची जी पद्धती होती तिचाच अवलंब छत्रसाल याने केला . जसजसा औरंगजेब दक्षिणेतल्या लढाईत

अधिकाधिक गुंतत गेला , त्याप्रमाणात छत्रसालाने अधिक नेत्रदीपक विजय मिळविले . या विजयामध्ये कालींजर आणि धामुनी यांचा पाडाव व भिल्सा या शहराची लूट यांचा उल्लेख केला पाहिजे . तो करीत असलेल्या स्वाऱ्यांची व्याप्ती वाढतच गेली . यमुनेपासून रजपुतान्याच्या हद्दीपर्यंत आणि नर्मदा नदी यांच्यामध्ये पसरलेला सबंध माळवा म्हणजे त्याला जणू काही शिकारीच्या कुरणागतच झाले होते . थोडक्याच काळात छत्रसाल म्हणजे त्या प्रदेशातील कायद्याला न जुमानता वागणाऱ्या बंडखोर लोकांचे केंद्रस्थान बनला.

छत्रसालाचे पुढील जीवन व त्याला प्राप्त झालेले विजय

१६९९ च्या मार्च महिन्यात रानोदचा [सिरोंजच्या उत्तरेस ७० मैलांवर] फौजदार शेर अफकनखान हा त्याच्या विरुद्ध चाल करून गेला आणि त्याच्यावर त्याने सूरज माऊ येथे हल्ला चढविला . घनघोर लढाईनंतर छत्रसाल हा किल्ल्यात पळून गेला . किल्ल्याला खानाने वेढा दिला . परंतु या वेढ्यातूनही छत्रसाल निसटून गेला . या मानहानीचा सूड पुढील वर्षी छत्रसालाने घेतला . २४ एप्रिल १७०० रोजी शेर अफकनखान याने झूना आणि बरना नजीक छत्रसालवर हल्ला केला . छत्रसालाची ७०० माणसे त्याने ठार मारली आणि खुद्द छत्रसालाला जखमी करून त्याची उरलेली फौज त्याने उधळून लावली परंतु या लढाईत बंदुकीचा गोळा लागून खान ठार झाला. (**अख.**, १२ व २१ मे १७००)

इ. स. १७०५ मध्ये अनिवार्य अशा छत्रसाल बुंदेलाबरोबर तह करण्याविषयी फिरोजजंग याने बादशहाचे मन वळविले . छत्रसाल याला चारहजारी मोगल उमराव करण्यात आले . त्याने बादशहाची दक्षिणेमध्ये भेट घ्यावी त्याबाबत त्याचे मन वळविण्यात आले . दक्षिणेत जवळ जवळ दीड वर्षेपर्यंत तो शांततेने राहिला आणि नंतर औरंजेबाचा मृत्यू झाल्यावर स्वतंत्रतेचे आपले जीवन जगण्यासाठी तो मायदेशी परतला. [मूळ फारशी आणि मराठी कागदपत्रांवर आधारलेला छत्रसालच्या पुढील जीवनाचा संपूर्ण इतिहास माझ्या आयर्विनच्या **लेटर मोगल्स** या ग्रंथाच्या आवृत्तीमध्ये (भाग २. २२७–२४१), आणि डॉ. रघुवीरसिंग यांच्या **मालवा इन ट्रॅन्झिशन** या ग्रंथात दिला आहे .] (**दिल.**, १५७ व भाग १; **एम. यू.** भाग २. ५१२)

(७) गोंडाचे राज्य आणि त्यांचे मोगलांबरोबरचे संबंध

ज्याला आपण गोंडवन असे म्हणतो त्या प्रदेशाने हल्लीच्या मध्यप्रांताचा बराचसा भाग व्यापलेला आहे. विंध्य पर्वताच्या रांगेच्या दोन्ही बाजूला हा प्रदेश पसरलेला आहे . या विभागाच्या उत्तरेकडील अर्ध्या भागात १६ व्या शतकात गढा येथील गोंड राजाने एका सामर्थ्यशाली राज्याची स्थापना केली . परंतु अकबराच्या सेनापतींनी या राज्याचे तुकडे तुकडे केले आणि गढा आणि चौरागड ही त्या राज्याच्या राजधानीची शहरे लुटली . यानंतरच्या गढ्याच्या राजांनी चौरागड येथून राज्य केले . परंतु त्यांचे सामर्थ्य क्षीण झाले होते आणि त्यांच्या ताब्यातील प्रदेश खूपच कमी झाला होता . १७ व्या शतकाच्या मध्यावर हे गोंडाचे राज्य अतिशय झपाट्याने काळाच्या उदरात विलीन झाले.

या सुमारास गोंडामधील कर्तेपण हे देवगडच्या राजाकडे गेले . देवगडचे राज्य हे गोंडवनाच्या मध्यभागी आणि नर्मदा नदीच्या दक्षिणेला पसरलेले होते . देवगडच्या दक्षिणेला अंदाजे २५ मैलांवर दुसऱ्या एका गोंडराजाची राजधानी चांदा हे शहर होते . या गोंडराजाचे देवगडच्या राजाबरोबर कायमचे शत्रुत्व होते आणि दोन्ही राज्यांमध्ये अतिशय स्पर्धा होती . औरंगजेबाच्या कारकिर्दीत ही दोनच गोंड राज्ये अशी

होती की त्यांना राजकीयदृष्ट्या महत्त्व होते . त्यांनी जमा केलेली संपत्ती , त्यांच्या जवळील हत्तीचे कळप आणि त्यांच्याच राज्यातील खाणीतून मिळालेल्या रत्नांचा त्यांच्या जवळील साठा या सर्व गोष्टींचा मोगल सरकारला मोह पडला, आणि त्या आपल्याला मिळाव्यात अशी हाव त्यांना सुटली . १६३७ मध्ये दक्षिणेतील लष्करी हालचालीतून मोकळे झालेले मोगल सैन्य गोंडवनात घुसले आणि त्यांनी तेथील स्थानिक प्रमुखांपासून खंडणी गोळा केली . त्यावेळी देवगडचा राजा कुकिया , याचे राजधानीचे शहर नागपूर यावर या मोगल सैन्याने हल्ला केला . कुकियाने वार्षिक खंडणी देण्याचे वचन दिल्यावर नागपूरचा किल्ला त्याच्या परत स्वाधीन करण्यात आला.

गोंडांच्या मोगलांबरोबरील सुरुवातीच्या संबंधाची हकीकत

परंतु देवगडच्या राजाकडून मिळणाऱ्या खंडणीची बरीच बाकी राहिली . परिणामी १६५५ मध्ये मोगल सैन्याने देवगडच्या प्रदेशात चाल केली आणि देवगडचा राजा केसरीसिंग याला संपूर्ण शरणागती देण्यास भाग पाडले . १६६६ च्या अखेरीस देवगडकडील बाकीची रक्कम १५ लाख एवढी झाली . जानेवारी १६६७ मध्ये दिलेरखानाच्या हाताखालील एका बादशाही फौजेने गोंडवनामध्ये कूच केले . **देवगड आणि चांदा यांवरील मोगलांचे आक्रमण** :- चांद्याचा राजा मानजी मालार (**आलमगीरनामा**, पा. १०२२) हा वृत्तीने बंडखोर होता आणि त्याच्या हातून अत्याचाराची अनेक कृत्ये झालेली होती . परंतु फेब्रुवारी १६६७ मध्ये मादुरा येथे त्याच्या सरहद्दीवर मोगल सैन्य जेव्हा येऊन पोहोचले तेव्हा त्याने आपली शरणागती दिली आणि युद्धखर्च म्हणून १ कोट रुपये देण्याचे आणि वार्षिक खंडणी म्हणून सालिना २ लक्ष रुपये देण्याचे कबूल केले . दिलेरखान त्याठिकाणी जवळ जवळ दोन महिने राहिला आणि चांद्याच्या राजाने कबूल केलेल्या खंडणीपैकी ७७ लक्ष रुपये वसूल केले. (पाहा: **आलमगीरनामा**, १०२२—१०२७)

चांद्याचा नंतरचा इतिहास, १६६७—१७०१

त्यावेळी कुकसिंग (**आलमगीरनामा**, पा. १०२७) हा देवगडचा राजा होता . चांद्याच्या राजावर जो प्रसंग कोसळला त्यामुळे त्याला दहशत बसली . त्याने अतिशय लीनतेने दिलेरखानाची भेट घेतली . दंड म्हणून त्याने ३ लक्ष रुपये देण्याचे आणि ठराविक मुदतीत १८ लक्ष रुपये देण्याचे कबूल केले . परंतु दिलेल्या वचनाला तो जागला नाही . म्हणून १६६९ च्या ऑगस्ट महिन्यात दिलेरखानाने त्याच्यावर पुन्हा स्वारी केली . यावेळी मोगलांनी देवगडचा ताबा घेतला . दिलेरखानाने राजाकडे देवगडचे राज्य पुन्हा सोपविले. परंतु त्याची किंमत म्हणून देवगडच्या राजाला आपल्या सर्व कुटुंबियासहीत (दोन भाऊ आणि एक बहीण) मुसलमानी धर्माचा स्वीकार करावा लागला . (**अख**., ९ मे १६७० ; **एम्. ए**., २७३) २९ मार्च रोजी दिलेरखानाने दक्षिणेकडे जाण्यासाठी नागपूरहून कूच केले . (**अख**., २० एप्रिल १६७० ; **एम. ए.**, १०२)

मोहाला बळी पडून देवगडच्या गोंड राजाने जरी आपला धर्म बदलला तरी त्यामुळे त्याची वृत्ती मात्र बदलली नाही . त्याची बंडखोरी चालूच राहिली . १६८६ च्या मार्च महिन्यात देवगडच्या गादीवर अधिकार सांगणाऱ्या एका राजपुत्राने इस्लामचा स्वीकार केला. त्याला राजा बख्त बुलंद हा किताब देण्यात आला आणि त्याबरोबर देवगडचे राज्यही देण्यात आले . (**एम्. ए.**, २७३) त्याने आपल्या कारकिर्दीत देवगडचे राज्य , सामर्थ्य, आणि सुबत्ता यांची मोठ्या प्रमाणात वाढ केली . औरंगजेबाच्या कारकिर्दीच्या अखेरच्या वर्षात त्याने औरंगजेबाला जास्तीत जास्त त्रास दिला.

अनुक्रमणिका

१६८३ च्या ऑक्टोबर महिन्यात चांद्याचा राजा रामसिंग याला पदच्युत करण्यात आले आणि त्याच्या जागी किशनसिंग याला गादीवर बसविण्यात आले . परंतु रामसिंग याने आपल्या प्रतिस्पर्ध्याला राज्याचा ताबा देण्यास विरोध केला . परिणामी इतिकादखानाच्या हाताखाली मोगल सैन्याच्या एका तुकडीने त्याच्या राजधानीच्या शहरात २ नोव्हेंबर १६८४ रोजी प्रवेश केला आणि किशनसिंगाला गादीवर बसविले. या राजानंतर त्याचा मोठा मुलगा वीरसिंग हा जुलै १६९६ मध्ये गादीवर आला . ऑगस्ट १७०० मध्ये बादशहाने त्याला आपल्या छावणीमध्ये येण्याचा हुकूम दिला . कारण त्याच्या खंडणीची बरीच बाकी थकली होती. २७ एप्रिल १७०१ रोजी तो बादशहाच्या फौजेत येऊन पोहचला आणि त्याने एक लक्ष रुपये वऱ्हाडच्या खजिन्यात भरले. (पाहा : **एम. ए.**, २१६, २३९, २५०; **अख.**, १२ जाने. १६९३, १२ मे १६९५, ९ एप्रि. १६९६, २२ ऑगस्ट १६९६, १६ मार्च १७०१)

(८) देवगडचा गोंड राजा बख्त बुलंद हा आपले स्वातंत्र्य पुकारतो

जून १६९१ मध्ये बख्त बुलंद याला बादशहाने गादीवरून काढले . देवगडच्या सिंहासनावर त्याने दिनदार नावाच्या एका मुसलमान गोंड माणसाला बसविले . काही वर्षांपर्यंत बख्त बुलंद याच्यावर अतिशय सख्त नजर ठेवण्यात आली . त्यानंतर आपण यापुढे अतिशय चांगले वागू अशा तऱ्हेचे आश्वासन त्याने देऊन आपले स्वातंत्र्य पुन्हा परत मिळविले . (ऑगस्ट १६९५) यावर औरंगजेबाने पुढीलप्रमाणे उद्‌गार काढले. "तो केव्हाही पळून जाईल , त्याच्यावर लक्ष ठेवा ." त्यानंतर लौकरच देवगडमध्ये गडबडीला सुरुवात झाली. दिनदार हा बादशाही सत्तेला जुमानिनासा झाला. मोगलांच्या एका तुकडीने चांद्याचा राजा किशनसिंग याच्या साहाय्याने देवगड काबीज केले आणि दिनदार याला पळवून लावले . (मार्च १६९६) किशनसिंग याचा दुसरा मुलगा करणसिंग याने मुसलमान धर्माचा स्वीकार केला आणि देवगडचे राज्य प्राप्त करून घेतले. त्याला राजा नेकनाम असे नाव देण्यात आले . आपले राज्य आपल्याला परत मिळेल याबद्दलची सगळी आशा बख्त बुलंद याने सोडून दिली . परंतु आपण जर थोडी तडफ दाखविली तर आपल्याला राज्य मिळविण्याची संधी प्राप्त होईल आणि म्हणून आपल्या नशिबाचा फासा टाकून यश मिळते की काय याची परीक्षा बघावी असे त्याला वाटले . कारण याच वर्षी (१६९६) देवगड आणि चांदा या दोन्ही राज्यांचे राज्यकर्ते बदलले होते आणि हे राजे म्हणजे पोरसवदा तरुण होते . म्हणून बख्त बुलंद हा बादशाही सैन्यामधून निसटला आणि देवगडला परतला . तेथे गेल्यानंतर त्याने बंडाचे निशाण उभारले . त्यामध्ये त्याने आपल्या स्वभावातील आग्रहीपणा हिकमत आणि यश संपादन करून घेण्याची वृत्ती , हे गुण प्रकट केले. बादशहाला अतिशय संताप आला परंतु तो संताप निरर्थक होता . संतापाच्या भरात बादशहाने त्याचे नाव बख्त बुलंद (भाग्यवान) हे बदलून नगुन बख्त (कमनशिबी) हे ठेवण्याचा हुकूम दिला . (**के. के.**, भाग २. ४६१; **अख.**) बख्त बुलंद याने फार मोठ्या प्रदेशांत धामधूम उडवून दिली. त्याच्या बंडखोरीचा पहिला तडाखा जवळच्याच वऱ्हाडला बसला . फिरोजजंगाच्या सैन्याच्या एका तुकडीने बख्त बुलंद याचा पराभव केला , आणि देवगड काबीज केले . (जून १६९९) पाडाव झालेल्या आपल्या राजधानीतून बख्त बुलंद याने पलायन केले आणि प्रचंड सैन्य घेऊन त्याने माळव्यात प्रवेश केला . नंतर त्याने गढ्याचे राज्य पादाक्रांत केले आणि गढ्याचा राजा नरेंद्र शहा याला त्याच्या पूर्वापार सिंहासनावर बसविले . (जुलै) (**अख.**, २, ६ व १२ जुलै, ५ ऑगस्ट १६९९).

जुलैमध्ये बख्त बुलंद याने ३०००० रुपये छत्रसाल याजकडे पाठविले आणि सुप्रसिद्ध अशा बुंदेला बंदुकधारी शिपायांची एक तुकडी स्वतःसाठी भरती करण्याची त्याला विनंती केली . ऑक्टोबर महिन्यात

त्याने सातारा किल्ल्यामध्ये राजारामाकडे आपले दोन वकील रवाना केले होते . त्याला त्याने देवगड येथे येण्याची विनंती केली. त्याला असे वाटले की राजाराम हा देवगडकडे आल्यास औरंगजेबाच्या पिछाडीवर धामधूम माजवून त्याचे लक्ष विचलित करता येईल , परंतु राजारामाच्या सेनापतींनी त्याला सल्ला दिल्यावरून त्याने हे आमंत्रण नाकारले . (**अख**., १८ ऑगस्ट, २५ ऑक्टो.) १७०१ च्या मार्च महिन्याच्या सुरुवातीला बख्त बुलंद आणि त्याचा चुलता जामगढचा जमीनदार नवलशहा यांनी मराठ्यांशी संगनमत करून ४००० घोडेस्वार आणि १२००० पायदळ इतकी फौज जमा करून वऱ्हाडचा सुभेदार अली मर्दानखान याच्यावर हल्ला केला . परंतु त्यात त्याचा पराभव झाला आणि त्यांची पुष्कळ माणसे मारली गेली. या चकमकीत नवलशहा मारला गेला आणि बख्त बुलंद जखमी झाला. (**अख**., १६ मार्च) १७०३ च्या फेब्रुवारी महिन्यात उज्जैन येथे अब्बास याच्या नेतृत्वाखाली आणि १७०४ च्या जानेवारी महिन्यात सय्यद अब्दुल कादीर याच्या नेतृत्वाखाली बंडांचा उद्‌भव झाला . हे दोघेजण बख्त बुलंद याचे मुसलमान दोस्त होते.

बख्त बुलंदच्या कारकिर्दीतील देवगडची भरभराट

"वैनगंगा आणि कनहान या नद्यांच्या मध्ये देवगडच्या दक्षिणेस पसरलेल्या अतिशय सुपीक जमिनीचा बख्त बुलंद याच्या कारकिर्दीत हळूहळू विकास होत गेला . गोंडाच्याच बरोबरीने हिंदू आणि मुसलमान शेतकरी यांना त्या जमिनीवर स्थायिक होण्यासाठी उत्तेजन देण्यात आले . कालांतराने या सर्व प्रदेशांची अतिशय भरभराट झाली (**आयर चाटेरटन , स्टोरी ऑफ गोंडवन** , ४६). सर्व बाजूकडून गोंडवनाकडे उद्योगी लोकांची रीघ लागली . अनेक खेडी आणि शहरे यांची स्थापना झाली . शेती, उद्योगधंदे आणि व्यापार यामध्ये बरीच प्रगती झाली . औरंगजेबाच्या मृत्यूनंतर देवगडच्या बख्त बुलंद याने आपल्या राज्याच्या सीमा वाढविल्या . नरेंद्र शहाने त्याला सेवनी जिल्हा तोडून दिला . बख्त बुलंद याने खेडल्याचे अति प्राचीन आणि ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे असे गोंड संस्थानही आपल्या राज्यात सामील केले. बख्त बुलंद याच्यानंतर चांद सुलतान हा गादीवर आला. १७३९ मध्ये त्याचा मृत्यू झाल्यानंतर देवगड राज्याचे वैभव लयाला गेले. नागपूरकर भोसल्यांनी गोंडाचे राज्य खालसा केले.

(९) मोगल अमलाखालील काश्मीरमधील परिस्थिती

मोगल बादशहा काश्मीर प्रांताला केवळ चैन करण्याचे एक ठिकाण एवढीच किंमत देत . तेथील लोकांची परिस्थिती सुधारण्याचा अथवा तेथल्या प्रदेशाची भरभराट करण्याचा कोणताही प्रयत्न त्यांनी केला नाही . काश्मीरमधील सर्वसाधारण जनता अतिशय भयंकर अशा अज्ञानाच्या आणि दारिद्र्याच्या खाईत पिचत होती . खेड्यात राहणाऱ्या अनेक रहिवाशांची परिस्थिती रानटी अवस्थेत असणाऱ्या माणसासारखी होती आणि त्यांच्यापैकी अनेकजण कपड्याच्या अभावी उघडे बोडके फिरत असत. थंडीच्या दिवसांत शरीराला ऊब आणण्यासाठी ते आपल्या अंगाभोवती एखादी घोंगडी गुंडाळत. लांब पल्ले, रस्त्यांचा अभाव यामुळे बाहेरून धान्याची आयात करणे अशक्य होत असे . त्यामुळे अन्नपुरवठ्याच्या बाबतीत काश्मीरमधील प्रत्येक खोऱ्यात लोकांना स्वयंपूर्ण व्हावे लागे . जेव्हा पूर अथवा प्रचंड हिमवृष्टी यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे दळणवळणाची साधने बंद पडत , तेव्हा दुष्काळामुळे हजारोंच्या संख्येने तेथील रहिवाशी अगतिकपणे मृत्युमुखी पडत असत. काश्मीरचा प्रांत सुधारलेल्या जगापासून एकाकी असा होता. वाहतुकीच्या अडचणीमुळे तेथे निर्माण होणाऱ्या वस्तूंचा व्यापार करणे अतिशय खर्चाचे होत असे . प्रांतामध्ये कोणत्याही स्थनिक उद्योगधंद्याचा अभाव होता . काश्मीरी शाली बनविण्याची मक्तेदारीही सरकारकडे

होती आणि लोकांना जे काही मिळे ते म्हणजे सरकारी कारखान्यात काम केल्याबद्दल मिळणारे दैनिक वेतन. काश्मीरमध्ये जो उत्तम कागद तयार होत असे तो दरबारात वापरला जाई आणि ज्या तऱ्हेचा तो पाहिजे असेल तसाच बनविला जाई . (पाहा : **तारीख–इ–अझमी, आय. ओ. एल., एम एस.,** १४२९; **राजतरंगिनी,** भाग २. १८–३८)

काश्मिरी जनतेचे अज्ञान व दारिद्र्य

संस्कृतीच्या बाबतीत काश्मीरमधील लोक इतके मागासलेले होते की औरंगजेबाच्या कारकिर्दीची अखेर होईपर्यंत काश्मीरमधील वरच्या वर्गाच्या लोकांना बादशाही नोकरीत मनसबदार म्हणून नेमणूक करण्यास अयोग्य समजले जाई. कागदपत्रावरून आपल्याला असे कळते की अगदी उशिरा उशिरा म्हणजे १६९९ मध्ये काश्मीरच्या त्या वेळच्या सुभेदाराने काश्मीरच्या लोकांना मनसबदार म्हणून नेमण्याविषयी औरंगजेबाचे मन वळविले. बादशाही साम्राज्यात काश्मिरी हिंदूंना कोणत्याही अधिकारावर नेमण्यात आले नाही. त्या प्रांतातील सर्वसाधारण मुसलमानांविषयी बोलावयाचे झाल्यास ते जर खेडूत असले तर असंस्कृत रानटी लोक म्हणून त्यांचा तिरस्कार करण्यात येई. जर का ते शहरात राहणारे असले तर खोटे खुशामतखोर आणि भेकड लांडीलबाडी करणारे अशी त्याची संभावना करण्यात येई. त्याचा परिणाम असा झाला की मोगलांच्या ताब्यातील हिंदुस्थानात कोणाही गोडबोल्या बदमाशाची हा काश्मिरी आहे अशी हेटाळणी करण्यात येई. काश्मिरी लोकांचे अज्ञान, त्यांची गरिबी आणि तत्कालीन समाजाची सरंजामी पद्धतीवर झालेली संघटना या गोष्टींमुळे काश्मीरमधील बहुसंख्य समाजाची वृत्ती गुलामगिरीची बनली. कदाचित् काश्मिरी लोक आपल्या स्त्रिया आणि मुली यांच्या अब्रूचा जो सौदा करीत त्याला वरील परिस्थितीच कारणीभूत झाली असावी.

काश्मिरी जनतेतील भोळेपणा व पंथापंथांमधील कलह

काश्मिरी लोकांच्या अज्ञानाइतकाच त्यांचा धर्मभोळेपणा तीव्र होता. काश्मिरच्या मनाला आनंद देणाऱ्या सुंदर वातावरणात मुसलमानी अवलिये आणि त्यांचे शिष्य यांचा ऐतखाऊ असा एक मोठा वर्ग निर्माण झाला आणि त्यांनी लोकांच्या भोळेपणाचा भरपूर फायदा घेतला. काश्मीरच्या शहरामध्ये शिया आणि सुन्नी यांच्यामध्ये पंथभेदातून जो कडवटपणा निर्माण झाला होता त्यामुळे भयानक दंगे आणि कधीकधी यादवी युद्धेही होत. ज्यावेळी सुभेदार हा कोणत्याही पक्षाची बाजू घेत नसे त्यावेळी सुभेदाराचे लष्करी सामर्थ्यच स्थानिक लोकांमध्ये शस्त्रसंधी निर्माण करण्यात यशस्वी ठरत असे. विरोधी पंथांच्या वैयक्तिक सभासदांत जी भांडणे होत त्यांचे रूपांतर त्वरित बहुजन समाजाचे दंगे होण्यात होई. राजधानीतील सुन्नी लोकांच्या टोळ्या काजींनी केलेल्या बेफाम भाषणामुळे खवळून उठत, शिया वस्तीमध्ये लुटालूट आणि जाळपोळ करीत आणि जो शिया मनुष्य त्यांच्या हाती सापडे त्याची कत्तल करीत. पुष्कळदा राजधानीतील रस्त्यामध्ये सशस्त्र बंडखोर आणि सरकारी लष्कर यांच्यामध्ये हातघाईच्या लढाया होत. जर का सुन्नी लोकांना संशय आला की ज्या शिया माणसाला त्यांना ठार मारावयाचे आहे त्याला सुभेदाराकडून आसरा दिला जात आहे तर खुद्द सुभेदाराचे निवासस्थान देखील सुन्नी लोकांच्या टोळ्या आणि त्यांचे शिपाई यांच्या तडाख्यातून सुरक्षित राहील अशी शाश्वती नसे.

श्रीनगरमधील लोकांचे कष्टमय जीवन

काश्मीरमधील खेडूत म्हणजे अर्धनग्न अडाणी लोक होते . त्यांचे जीवन म्हणजे भयंकर दारिद्र्य , अज्ञान आणि ओंगळपणा यांनी भरलेले होते . शहरवासियांचे जिणे त्यांच्यापेक्षा फारसे बरे होते असेही म्हणता येणार नाही . तेथील तळ्यांना अचानक आणि भयानक असे जे पूर येत त्यामुळे त्यांना नदी अथवा तळे यांच्या कडेला उंचवट्यावर असलेले जे चिंचोळे असे मैदान असे त्यावर आपली घरे बांधणे भाग पडत असे. त्याचप्रमाणे तेथे वारंवार जे भूकंप होत त्यामुळे त्यांना आपली घरे अतिशय हलक्या अशा लाकडी सामान-सुमानाने बांधणे जरुरीचे होऊन जाई . काश्मीरमध्ये जी अतिशय थंडी पडे त्यामुळे प्रत्येक घरामध्ये दिवस-रात्र विस्तवाची जरूर भासे . या कारण-परंपरेचा नैसर्गिक परिणाम असा झाला की तेथील वस्तीत वारंवार आगी लागत. जेव्हा असा आगीचा डोंब उसळे, तेव्हा शहराच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत ही आग पसरे आणि या आगीत लाकूड आणि गवत यांनी बांधलेली आणि दाटीदाटीने माणसे असलेली खोपटी जळून भस्मसात होत.

(१०) औरंगजेबाचे काश्मीरमधील सुभेदार आणि त्याच्या कारकिर्दीत घडलेल्या गोष्टी

औरंगजेबाच्या कारकीर्दीत एकंदर ४८ वर्षांत काश्मीरमध्ये १२ सुभेदार नेमले गेले . एकामागून एक झालेल्या या सुभेदारांच्या राज्यकारभार करण्याच्या पद्धतीच्या वैचित्र्याप्रमाणेच काश्मीर प्रांताच्या जीवनात वैचित्र्य निर्माण झाले. या सुभेदारांपैकी इतिमादखान आणि फाझिलखान यांनी अतिशय शहाणपणाने आणि बुद्धिचातुर्यामुळे येणाऱ्या कुशलतेने न्यायदानाचे काम केले तर सैफखान वगैरेंनी बेकायदेशीरपणे लोकांकडून जो पैसा उकळण्यात येत असे त्यामध्ये स्वतःची तुंबडी भरण्यासाठी नवीन नवीन हिकमती उपयोगात आणल्या.

औरंगजेबाच्या एकंदर ५० वर्षांच्या कारकिर्दीत नैसर्गिक आपत्तींची जी एक मालिकाच लागली त्यामध्ये दोन धरणीकंप (जून १६६९ आणि १६८१), राजधानीमध्ये लागलेल्या दोन प्रचंड आगी (१६७३ आणि १६७८), एक पूर (१६८१) आणि एक दुष्काळ (१६८८) यांचा समावेश करावा लागेल . काश्मीरच्या इतिहासातील या कालखंडातील एक उल्लेखनीय घटना म्हणजे १६६३ मध्ये औरंगजेबाने शाही इतमामाने या प्रांतातून केलेला प्रवास ही होय . याचे अतिशय उत्कृष्ट वर्णन (याची तारीख मात्र बर्नियरने चुकीची दिली आहे .) आणि त्याचप्रमाणे मोठा तिबेट औरंगजेबाने जिंकून घेतला आणि ज्या तिबेटच्या राजाचा उल्लेख पर्शियन इतिहासात दलदाल नमजाल असा येतो आणि ज्याने मुसलमान धर्माचा स्वीकार केला त्यासंबंधीची सर्व हकीकत बर्नियर याने दिलेली आहे.

इ. स. १६८४ मध्ये ज्याला अतिशय भयानक म्हणता येईल अशा तऱ्हेचा लढा शिया आणि सुन्नी यांच्यामध्ये झाला. श्रीनगर शहराचा हसनाबाद हा एक भाग होता . या भागात शिया लोकांचे प्राबल्य होते . त्यामध्ये राहणाऱ्या अबदुस शकुर आणि त्याची मुले यांनी सादिक नावाच्या एका सुन्नी इसमाला काही दुखापत केली होती . त्यांच्यामधील भांडणाचे रूपांतर कायमच्या शत्रुत्वात झाले . या कलहामध्ये वरील शियांनी जाहीररित्या काही गोष्टी केल्या आणि पहिल्या तीन खलिफांच्या स्मृतीचा अपमान करणारे असे काही उद्‌गार काढले . (शिया धर्मशास्त्राप्रमाणे हे तिन्ही खलिफा म्हणजे उपरे होते .) वरील गुन्हा करणाऱ्यांनी काश्मीरचा सुभेदार इब्राहीमखान याच्याकडे आसरा घेतला. दरम्यान काजीमहमद युसूफ याने सात्त्विक संतापाने शहरातील लोकांना चिथावणी दिली . या लोकांनी हसनाबाद विभागाला आग लावली . या दंगलीत सुभेदाराचा मुलगा फिदाईखान याने हसनाबादमधील लोकांना पाठिंबा दिला तर लोकांच्या जमावाला तिबेटमधून नुकत्याच परतलेल्या काबुली अधिकाऱ्यांनी आणि स्थानिक मनसबदारांनी पाठिंबा

दिला. या जमावाने फिदाईखानाला प्रतिकार केला. दोन्ही बाजूंकडील अनेकजण ठार आणि जखमी झाले. जमावाने भयानक संतापाने दंगलीला सुरुवात केली.

या दंगलीमध्ये इब्राहीमखान याचा पाडाव झाल्यामुळे त्याने अखेर अबदुस शकुर आणि इतर अपराधी शियांना काजीच्या हवाली केले . काजीने शकुर आणि त्याचे दोन मुलगे व त्याचा एक एक जावई यांना धर्मात सांगितलेल्या शिक्षेप्रमाणे ठार मारले . शहरामध्ये आता सुन्नी दंगेखोरांचे वर्चस्व होते . त्यांनी शहराच्या मुफ्तीचे-तो जरी पंथाने सुन्नी होता तरी — घर लुटून उद्ध्वस्त केले . शिया पंथियांच्या धर्मगुरू बाबा कासीम हा होता . त्याला भर रस्त्यावर धरण्यात आले , आणि त्याची मानखंडना करून त्याचा वध करण्यात आला. यानंतर फिदाईखान हा स्वतः घोड्यावर बसून बाहेर आला आणि त्याने सुन्नी लोकांचा स्थानिक पुढारी आणि त्याच्याबरोबर असलेल्या जमावांपैकी अनेकजणांना ठार मारले . दरम्यान शेख बका बाबा याने आणखी एक लोकांचा घोळका जमविला आणि इब्राहीमखानाच्या वाड्याला त्यांनी आग लावली . त्यावर सुभेदाराने बका बाबा, काजी, बातमी लिहिणारे, काश्मीर प्रांताचा बक्षी आणि राजधानीमधील प्रमुख मंडळी यांना पकडून अटकेत ठेवले . या सक्त कारवाईमुळे लोकांमध्ये दहशत बसून त्यांनी शरणागती दिली. या घटनांची हकीकत औरंगजेबाच्या कानावर गेल्यानंतर त्याने इब्राहीमखान याला सुभेदारीच्या अधिकारावरून दूर केले, आणि ज्या सुन्नी लोकांना पकडण्यात आले होते त्यांची सुटका करण्याचा हुकूम दिला. (**अझमी**, १३१६—१३२६).

पैगंबराच्या अवशेषांचे काश्मीरमध्ये आगमन

१६९८—९९ च्या सुमाराला अशी घटना घडून आली की जिच्यामुळे मुसलमान लोकांच्या धर्मभावनांना वाजवीपेक्षा अधिक असे उधाण आले. ही घटना म्हणजे मुसलमान धर्माचा प्रेषित महमद पैगंबर याचा मानला जाणारा केस काश्मीरमध्ये आणला गेला ही होय . हा केस ख्वाजा नुरुद्दीन याने विजापूर येथे मिळविला होता. त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या मृत देहाबरोबर या केसाची रवानगी काश्मीरमध्ये करण्यात आली होती. यावेळी राजधानीतील सर्व मुस्लिम प्रजाजन हे रस्त्यावर आणि मोकळ्या जागी या केसाचे दर्शन घेण्यासाठी आणि या पवित्र अवशेषाला स्पर्श करण्यासाठी मोठ्या संख्येने जमा झाले.

काश्मिरी लोकांचा धर्मभोळेपणा

काश्मिरी लोकांचा फाजील धर्मभोळेपणा दाखविणारा आणखी एक प्रसंग १६९२ च्या मे महिन्यात घडून आला. हा महिना म्हणजे मुसलमानांचा उपवासाचा महिना होता. (**रमजान**) या महिन्यात मीर हुसेन नावाचा थोडी फार प्रसिद्धी मिळविलेला एक मनुष्य काश्मीरमध्ये आला. तो तख्त-ई-सुलेमान या टेकडीवर मुक्काम करून राहिला . याठिकाणी त्याने मठी स्थापन केली . रमजानच्या महिन्यात त्याने या सणानिमित्त फार मोठ्या रोषणाईची तयारी केली . श्रीनगरमधील बहुतेक सर्व लोक याठिकाणी सहल आणि तेथील निसर्गरम्य वनश्री बघण्यासाठी म्हणून तेथे गेले. दिवसाच्या तिसऱ्या प्रहरी पाऊस, वारा, विजांचा चमचमाट आणि ढगांचा गडगडाट यांचा भयंकर कल्लोळ होऊन इतके प्रचंड तुफान निर्माण झाले की जणू काही एखाद्या काळोखी रात्रीप्रमाणे सारे शहर काळोखामध्ये बुडून गेले . काही काळपर्यंत असाच मीट्ट काळोख राहिला आणि नंतर सूर्य मावळला आहे अशा समजुतीने लोकांनी आपला दिवसाचा उपवास सोडला . परंतु दोन-तीन तासानंतर वादळ शमले व सूर्य आकाशामध्ये पुन्हा दिसू लागला . परिणामी आपण बनविले गेलो आणि अपमानीत झालो असे लोकांना वाटले . कारण रमजानच्या महिन्यात दिवसा काहीही खाणे

याच्यापेक्षा दुसरे मोठे पाप नाही , अशी मुसलमानांची समजूत असते . काश्मीरच्या राजधानीमधील लहान आणि थोर सर्व लोकांनी ही जी अनैसर्गिक घटना घडून आली , त्याला कारण त्या टेकडीवरील पाखंडी फकिराने केलेली जादू असे दिले . या घटनेची ही मीमांसा पाहिल्यावर काश्मिरी लोकांची बुद्धिमता आणि त्यांचे शिक्षण यामुळेच ते असे कारण देऊ शकले याची खात्री पटते . धर्माचा संरक्षण कर्ता आणि सत्य जाणणारा असा जो बादशहा त्याने वरील कारणमीमांसेवर विश्वास ठेवला आणि त्या जादुगाराची हकालपट्टी करण्याचा हुकूम दिला.

(११) गुजराथ, भौगोलिकदृष्ट्या गुजराथचे महत्त्व आणि गुजराथमधील लोकसंख्येची विविधता

गुजराथची संपत्ती ही मुख्यतः तेथील हस्तव्यवसाय आणि व्यापार यांवर अवलंबून होती . गुजराथमधील हस्तव्यवसायाचा विकास हा तेथील चार भिंतींच्या आड भरभराटलेली शहरे आणि त्यांच्याच आश्रयाने वाढणाऱ्या खेडोपाड्यांवर अवलंबून होता. व्यापाराच्या बाबतीत सांगावयाचे झाल्यास तेथील हिंदू आणि मुसलमान या प्रजाजनांच्या अंगामध्ये हिंदुस्थानातील इतर लोकांच्या बरोबर तुलना करता एक निसर्गदत्त अशी देणगी होती ; इतकेच नव्हे तर गुजराथचे व्यापाराच्या बाबतीतले स्थान हे निश्चितपणे अपवादात्मक होते आणि त्यामुळे गुजराथला एक मोक्याचे स्थान प्राप्त झाले होते . खानदेश, वऱ्हाड, माळवा आणि उत्तर हिंदुस्थानातील संपन्न अशा जिल्ह्यांत निर्माण होणारा सर्व माल इतर देशांत पाठवावयाचा झाल्यास गुजराथच्या सरहद्दीतूनच न्यावा लागे . या प्रांताच्या किनाऱ्यावर हिंदुस्थानातील अतिशय मोठी बंदरे होती . त्यापैकी भडोच हे हिंदू कालखंडातील होते आणि सुरत हे मुसलमान कालखंडातील होते . साहजिकच हिंदुस्थानाबाहेरील मुसलमान जगाबरोबर मोगलकाळामध्ये संपर्क साधावयाचा झाल्यास गुजराथचा उल्लेख याबाबत एक प्रमुख प्रवेशद्वार म्हणून करावा लागेल . सुरतेमधून अरबस्तानामधील पवित्र शहरांमध्ये मुसलमान यात्रेकरूंच्या झुंडीच्या झुंडी आणि नजफ आणि करबला येथील पवित्र स्थानांकडे शिया पंथांच्या अनुयायांचे असंख्य गट जात असत. इराण, अरबस्तान, तुर्कस्तान, इजिप्त, झांजिबार आणि त्याचप्रमाणे खुरासाण व बार्बरी येथील प्रवासी , व्यापारी, विद्वान, नशिबाची परीक्षा बघणारे, आणि राजकीय निर्वासित हे हिंदुस्थानात गुजराथच्या बंदरातूनच प्रवेश करीत असत . त्यासाठी ते समुद्रावरच्या थोड्या पल्ल्याच्या , आरामशीर, स्वस्त आणि सर्वसाधारणपणे सुरक्षित असलेल्या मार्गाचा अवलंब करीत त्यामुळे सुलैमान आणि हिंदुकुश पर्वतांच्या रांगांमधून येणाऱ्या खुष्कीच्या मार्गाकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले.

गुजराथला भौगोलिकदृष्ट्या हे जे महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते त्यामुळे गुजराथच्या लोकसंख्येत संमिश्रपणा निर्माण झाला आणि बऱ्याच पुरातन कालापासून तेथील लोकसंख्येत परकियांची सरमिसळ झाली. यामध्ये अग्निपूजक इराणी लोकांचा आणि त्याचप्रमाणे इस्माईलिया या नावाने ओळखले जाणारे मुसलमान पाखंडी व त्याचप्रमाणे महदवी या नावाने ओळखले जाणारे नवमतवादी यांचा प्रामुख्याने भरणा होता; वर उल्लेखिलेले इस्माईलिया पंथाचे लोक बोहोरा या नावाने ओळखले जात. वर उल्लेखिलेल्या जमाती आणि त्याशिवाय गुजराथमध्ये वसाहतीसाठी आलेल्या इतर जाती आणि घराणी यांच्या समवेत मोगल येण्याचे अगोदर गुजराथवर ज्यांनी संपूर्ण प्रभुत्व गाजविले होते अशा मुसलमान टोळ्यांपैकी उर्वरित राहिलेले लोक यांनी गुजराथ प्रांताच्या जातियतेच्या मुखवट्याला असाधारण असे विविधतेचे रूप प्राप्त करून दिले . हिंदूंच्या बाबतीत म्हणावयाचे झाल्यास त्यांच्या लोकसंख्येत वरील परिस्थितीत मुसलमानामध्ये जो काही थोडाफार एकजिनसीपणा आढळून येईल तितकाही आढळून येत नसे . १७ व्या शतकामध्ये गुजराथच्या अगदी हद्दीलगतच्या प्रदेशात अनेक मागासलेल्या जमातीचे लोक राहात होते .

त्यांचा तोपर्यंत संस्कृती किंवा नियमित राजकीय जीवनाशी संबंध आलेला नव्हता . या मागासलेल्या लोकांमध्ये दक्षिणेकडील कोळी, आग्नेयेला असलेल्या बागलाणातील भिल्ल, गुजराथच्या पूर्व सरहद्दीवरील रानटी रजपूत आणि रजपूत आहोत असे भासवणारे इतर लोक , सर्व प्रांतभर इतस्ततः विखुरलेले लुटारू, ग्राशिया जमातीचे लोक आणि त्याशिवाय पश्चिमेकडे वसाहत करून असलेले काठीया जमातींचे लोक यांचा समावेश करता येईल . हे सर्व लोक म्हणजे देशाच्या शांततेला कायमचा धोका देणारे होते असेच म्हणावे लागेल. औरंगजेबाच्या कारकिर्दीत यांच्यामध्ये आणखी एका दंगेखोर जमातीची भर पडली . ही जमात म्हणजे मराठे लोकांची होती. यांनीच अखेर मोगली सत्तेचा गुजरात प्रांतातून पूर्ण उच्छाद केला.

(१२) औरंगजेबाच्या कारकिर्दीतील गुजराथचे सुभेदार

औरंगजेबाच्या ५० वर्षांच्या राजवटीत गुजराथेवर एकंदर बारा सुभेदारांची कारकीर्द झाली . त्यापैकी महाबतखान (६ वर्षे, १६६२—१६६८), महमद अमीनखान (१० वर्षे, १६७२—१६८२), शुजातखान (१७ वर्षे, १६८४—१७०१), आणि राजपुत्र महमद आजम (४ वर्षे, १७०१-१७०५) यांची कारकीर्द सर्वांत जास्त झाली. उरलेल्या १३ वर्षांत एकंदर ८ सुभेदार झाले.

मध्ययुगीन कालखंडात भयानक दुष्काळाबद्दल गुजराथची ख्याती होती . याबाबतीत औरंगजेबाच्या कारकिर्दीत फारशी सुधारणा झाली असे म्हणता येणार नाही . १६८१, १६८४, १६९०-९१, १६९५-९६, आणि १६९८ या वर्षांत गुजराथमध्ये दुष्काळ पडल्याची माहिती आहे . १६८१ मध्ये गुजराथच्या राजधानीत अन्नासाठी दंगे झाले . १६९६ मध्ये गुजराथमध्ये जे अवर्षण पडले ते इतके भयानक होते की , "पाटण जोधपूरपर्यंत पाण्याचा एक थेंब किंवा गवताची एक पाती देखील दिसणे अशक्य होऊन गेले . (**मिरात**, ३१७, ३५४) या नैसर्गिक आपत्तीत भर म्हणूनच की काय रोगराईने अनेक शहरात धुमाकूळ घातला इतकेच नव्हे तर कित्येक वर्षापर्यंत निरनिराळे रोग शहरा -शहरांमध्ये ठाण मांडून बसले (**मिरात**, ३५२; **इंग्लिश एफ्. आर्.**) गुजराथवर सार्वजनिकदृष्ट्या उल्लेखनीय असे जे अशान्ततेचे प्रसंग ओढवले त्यामध्ये पुढील घटनेचा आपल्याला उल्लेख करावा लागेल . ती घटना म्हणजे १६८० मध्ये गुजराथेच्या ईशान्येकडून रजपुतान्यामधील युद्ध गुजराथमध्ये पसरले , त्यावेळी महाराणा राजसिंग याचा मुलगा भीमसिंग याने वडनगर, विशालनगर आणि इतर संपन्न शहरे यांवर हल्ला केला . ही होय [भीमसिंगाने पुष्कळ लूट मिळविली आणि तो परतला. राठोडांच्या प्रमुखाने इदर जिंकून घेतले परंतु पुढे मोगलांनी त्याचा पराभव करून त्याला ठार मारले . (**मिरात**., ३११) याच सुमारास दाराशुकोच्या एका तोतयाने विरमगाम उपविभागात बंडखोरांची एक टोळी जमविली (१६६३) आणि कोळी लोकांना चिथावून देऊन सबंध मुलखात धुमाकूळ घातला . पुढे गुजराथचा सुभेदार महाबतखान याने त्याचा मोड केला . (**मिरात**., २६९) गुजराथमध्ये असलेल्या श्रासिया जमातीच्या लोकांनी राजमार्गावर दरोडेखोरी केल्याचे उल्लेखही आढळतात. (**मिरात**., ३२१; **अख**.)]

(१३) गुजराथेवर मराठ्यांचे आक्रमण, १७०६

मराठ्यांनी गुजराथमधील बादशाही फौजांवर जो भयंकर प्रसंग ओढवून आणला तो १७०६ च्या सुरुवातीला, म्हणजे २५ नोव्हेंबर १७०५ रोजी राजपुत्र आजम अहमदाबादेहून निघून गेला आणि ३० जुलै १७०६ रोजी बेदारबख्त याचे तेथे आगमन झाले त्या कालावधीत . धनाजी जाधव याच्या हाताखालील मराठी फौजांनी त्यावेळी गुजराथ प्रांताच्या संरक्षणाची जी दुर्दशा झाली होती त्या परिस्थितीचा फायदा घेतला. राजपीपला या जिल्ह्यातील मोगलांच्या दोन तुकड्यांचा धनाजीने एका पाठोपाठ संपूर्णपणे मोड केला. या दोन्ही तुकड्यांचे सेनापती सफ्दरखान बाबी आणि नजरअलीखान यांना कैद करण्यात आले आणि सुटकेसाठी त्यांच्याकडून जबर खंडणी मागण्यात आली . त्यांच्या छावण्या लुटण्यात आल्या . या

संघर्षात अनेक मुसलमान ठार झाले अथवा कैद केले गेले. ही घटना १५ मार्च १७०६ रोजी घडली.

जेव्हा गुजराथेचा नायब सुभेदार अबदुल हमीदखान हा दुसरी फौज घेऊन स्वतः दाखल झाला तेव्हा त्याच्या छोट्याशा फौजेला विजयाने धुंद झालेल्या मराठ्यांनी बाबा पियाराच्या उताराजवळ वेढले . नायब सुभेदार आणि त्याच्या बरोबरील फौजेतील सर्व अधिकाऱ्यांना कैद करण्यात आले आणि त्यांचे सर्व सामानसुमान आणि छावणी लुटण्यात आली . त्यानंतर मराठ्यांनी आजूबाजूच्या प्रदेशातून चौथाई वसूल केली आणि जी शहरे आणि खेडी यांनी ती देण्यास नकार केला त्यात त्यांनी लुटालूट केली . या अशांततेचा कोळी लोकांनी फायदा घेतला . त्यांनी बंड केले आणि , दोन दिवसपर्यंत व्यापारासाठी प्रसिद्ध असलेले संपन्न असे बडोदा शहर लुटले. (**मिरात**., ३७८-३८८; **दिल**., भाग २, १५६ अ; **स्टोरिया**., भाग ४, २४६.)

(१४) बोहोरा आणि खोजा पंथी लोकांचा धार्मिक छळ

इस्माईलिया पंथाचा कुतुब नावाचा एक धर्मगुरू होता . औरंगजेबाच्या कारकिर्दीच्या सुरुवातीला त्याला औरंगजेबाच्या हुकूमावरून ठार मारण्यात आले . कुतुबच्या मृत्यूनंतर त्याचा वारस आणि इस्माईलिया पंथाचा प्रमुख खानजी हा झाला . त्याने मुसलमानांचे या पाखंडी मताच्या बाजूने गुप्तपणे परिवर्तन करण्यासाठी बारा गुप्त दूत पाठविले आहेत अशी बातमी १७०५ मध्ये औरंगजेबाला मिळाली . त्याने या बारा दूतांना आणि त्या जमातीच्या आणखी काही विशिष्ट लोकांना बंदिस्त करण्यात यावे असा हुकूम दिला. त्याचप्रमाणे या सर्व लोकांना त्यांनी जमा केलेला पैसा व त्यांच्या धर्माचे तत्त्वज्ञान सांगणारी साठापेक्षा अधिक पुस्तके यासहीत अतिशय काळजीपूर्वक रवाना करण्यात यावे अशीही आज्ञा त्याने दिली . औरंगजेबाच्या या हुकूमाची अमलबजावणी झाली . त्याबरोबरच प्रत्येक खेडे आणि शहर यामध्ये बोहोरा जमातीची मुले आणि अशिक्षित लोक यांना सुन्नी शिकवण आणि रीतिरिवाज यांचे शिक्षण देण्यासाठी सरकारतर्फे सनातनवृत्तीच्या अशा शिक्षकांच्या नेमणुका करण्यात आल्या . औरंगजेबाच्या कारकिर्दीच्या सुरुवातीलाच बोहोरा लोकांच्या मशिदीचे परिवर्तन सुन्नी वहिवाटदारीत करण्यात आले होते . (**मिरात.**, ३७६-३७८; **अख.**, २७१ ब)

भडोचमधील खोजा पंथियाचे बंड, १६८५

या पंथियांची आणखी एक शाखा होती . त्यांना काठीयावाडमध्ये खोजा असे म्हणत आणि गुजराथमध्ये मुमीन किंवा मेहता असे म्हणत यांच्यापैकी बहुतेकजण हिंदू असून त्यांना सय्यद इमामउद्दीन नावाच्या फकिराने मुसलमान धर्माची दीक्षा दिली होती . याची कबर अहमदाबादेपासून नऊ मैलांवर करमाट येथे आहे . ही कबर म्हणजे त्यांचे मुख्य पूजास्थान होते . एखाद्या मूर्तीची ज्याप्रमाणे पूजा करावी त्याप्रमाणे खोजा लोक आपल्या धर्मगुरूचा आदरसत्कार करीत , त्याच्या पायाचे चुंबन घेत आणि त्याच्या पावलावर सोने आणि चांदी यांचा ढीग करीत . हे सर्व चालले असताना तो स्वतः एका पडद्याआड एखाद्या बादशहाच्या थाटाने बसत असे . खोजा मुमीन पंथाचे हे लोक आपल्या धर्मगुरूच्या उदरनिर्वाहासाठी आपल्या वार्षिक उत्पन्नाचा $^{१}/_{१०}$ भाग नियमितपणे आपणहून कराच्या रूपाने देत . औरंगजेबाने या लोकांचा धर्मगुरू सय्यद शाहजी याला कैद करण्याचा हुकूम दिला . परंतु त्याला औरंगजेबाकडे नेत असताना त्याने विष खाऊन आत्महत्या केली . त्याला १२ वर्षांचा एक मुलगा होता . त्याची रवानगी औरंगजेबाकडे करण्यात आली. ह्याचा परिणाम असा झाला की गुजराथेमधील त्याचे सर्व अनुयायी गुजराथेच्या सुभेदाराने आपल्या धर्मगुरूचा वध केला म्हणून त्याचा सूड उगविण्यासाठी बंड करून उठले . त्यांनी युद्ध केले व

भडोचच्या फौजदाराला ठार मारून ते शहर जिंकून घेतले . जवळजवळ ४००० च्या जमावाने शहर आपल्या ताब्यात ठेवले (ऑक्टोबर १६८५). गुजराथेच्या सुभेदाराने बराच काळ वेढा दिल्यानंतर भडोचचा किल्ला त्याच्या ताब्यात आला . त्याने किल्ल्यामध्ये असलेल्या सर्व धर्मवेड्या लोकांची कत्तल केली . (पाहा. **मिरात**., ३३७–३३९; **एफ् आर्. सुरत**, ९२, **सुरत टू जे. किंग**, ३० ऑक्टोबर १६८५).

●●●

प्रकरण एकोणिसावे

औरंगजेबाचे व्यक्तिमत्त्व आणि त्याच्या राजवटीचे झालेले परिणाम

(१) हिंदुस्थानच्या भरभराटीचे मूळ कारण म्हणजे हिंदुस्थानात नांदत असलेली शांतता

औरंगजेब ज्यावेळी दिल्लीच्या सिंहासनावर आला त्यावेळी मोगल साम्राज्याची अतिशय भरभराट झालेली होती आणि मोगल साम्राज्याच्या सामर्थ्याने पराकोटी गाठलेली होती अशा तऱ्हेचे मत बाहेरच्या निरीक्षकांनी प्रकट केलेले आहे. दूरदूरच्या देशांमध्ये हिंदुस्थानचा उल्लेख करताना हिंदुस्थानमधील संपत्ती ही त्यामध्ये नेहमीच अभिप्रेत असे . त्याचप्रमाणे ज्यांना व्हर्सेलीसच्या राजदरबारातील अफाट वैभव पाहण्याची सवय झालेली होती त्यांचे डोळे देखील मोगल बादशहाच्या दरबारातील थाटमाटाने दिपून गेलेले होते. औरंगजेब हा स्वतः कुशल असा कारभारी आणि अनुभवी सेनापती होता. साधेपणाच्या बाबतीत तो अतिशय कर्मठ होता . त्याचे खाजगी जीवन अतिशय शुचिर्भूत होते . तारुण्याच्या ऐन भरात आणि मनाच्या निग्रही अवस्थेत त्याच्याकडे वारसाहक्काने या प्रचंड ऐश्वर्याला मार्गदर्शन करण्याची जबाबदारी आली होती. साहजिकच लोकांना अशी आशा वाटली की औरंगजेबाच्या कारकिर्दीत मोगल साम्राज्य कल्पनातीत अशा गौरवाची उंची गाठेल, पण प्रत्यक्षात मात्र औरंगजेबाच्या अतिशय मोठ्या आणि परिश्रमी अशा कारकिर्दीचा शेवट सर्वनाश व दुर्दशा यात झाला . या अतिशय विचित्र अशा घटनेची कारणे कोणती याचा शोध घेणे हे इतिहासकाराचे कर्तव्य आहे.

हिंदुस्थानची हवा ही अतिशय सुखकर, दमट अशी असून तेथील जमीन ही अतिशय सुपीक आहे. निसर्गाने अतिशय मुक्त हस्ताने आपल्या संपत्तीची खैरात तेथे केलेली आहे. त्यामुळे शत्रुत्त्वाच्या मनोवृत्तीने वागणारा मनुष्यप्राणी आणि जनावरे आणि त्याचप्रमाणे वादळी हवा आणि तीव्र उन्हाळा यामुळे होणारे नुकसान निसर्ग सहजतया भरून काढीत असे. अशातऱ्हेच्या वातावरणात इतर कोणत्याही देशापेक्षा अधिक प्रमाणात सुव्यवस्था हे तेथील राष्ट्रीय जीवनाचे मूलभूत असे अंग होते . देशांतर्गत आपली प्रगती व्हावी याबद्दलची आत्मीयता आणि देशाबाहेर शांततेची परिस्थिती अशातऱ्हेचे वातावरण मिळाल्यास भारतीय लोक हे संपत्ती, सामर्थ्य आणि संस्कृती यांच्या बाबतीत असामान्य प्रगती घडवून आणू शकतात . या प्रगतीच्या वेगाशी फक्त एका गोष्टीशी तुलना होऊ शकते आणि ती गोष्ट म्हणजे पहिल्या पावसाच्या सरीनंतर ज्या मनाला स्तिमित करणाऱ्या वेगाने या देशातील झाडाझुडपांची वाढ होते ही होय . अकबर, त्याचा मुलगा आणि नातू यांच्या जवळ -जवळ शंभर वर्षांच्या अतिशय खंबीर आणि सुज्ञ अशा राज्यकारभारामुळे हिंदुस्थानच्या अधिक संपन्न आणि वस्तीने गजबजलेल्या अशा अर्ध्या भागामध्ये वरील प्रकारची प्रगती होण्यासाठी लागणारी शांतता आणि प्रेरणा दिली गेली . दुसऱ्या पानिपतच्या युद्धानंतर मोगलांना जे शेकडो विजय मिळाले त्यामुळे हिंदुस्थानातील जनतेची अशी समजूत झालेली होती की मोगल सामर्थ्य हे कधीही पाडाव न होणारे आहे आणि मोगल साम्राज्याच्या मुलखाची एकता ही अभंग आहे. शिवाजीने पहिल्या प्रथम या समजुतीला जबर धक्का दिला . ज्यासाठी मोगल साम्राज्याची हिंदुस्थानला आवश्यकता आहे म्हणून नेहमी समर्थन केले जात असे, ती गोष्ट म्हणजे हिंदुस्थानात नांदणारी शांतता — ही शांतता हिंदुस्थानामध्ये औरंगजेबाच्या मृत्यूच्या वेळी पूर्णपणे नाहीशी झालेली होती.

हिंदुस्थानसारख्या प्रामुख्याने शेतीप्रधान असलेल्या देशात राष्ट्रीय संपत्तीचे एकमेव मूळ म्हणजे जमीन कसणारे शेतकरी हे होत . प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे राष्ट्रातील जमीनच केवळ वार्षिक राष्ट्रीय

भांडवलात भर घालू शकते . देशातील कारागीर हा देखील आपल्या मालाच्या विक्रीसाठी शेतकरी आणि जमिनीपासून मिळणाऱ्या महसुलामुळे श्रीमंत झालेल्या व्यक्ती यांच्यावर अवलंबून असतो आणि जर का शेतकऱ्याजवळ त्यांना पुरून उरणारा धान्याचा साठा नसल्यास वरील कारागिरांनी निर्माण केलेल्या वस्तू ते विकत घेऊ शकत नाहीत . म्हणून हिंदुस्थानात शेतकऱ्याचा नाश झाल्यास त्याचा अर्थ शेती न करणाऱ्या वर्गाचाही नाश असा केला जात असल्यास त्यात नवल नाही . 'Pauvres paysans pauvre royaume' या म्हणीची सत्यता फ्रान्सपेक्षाही हिंदुस्थानात अधिक तीव्रतेने प्रत्ययास येते . सार्वजनिक शांतता आणि मालमत्तेची सुरक्षितता यांची केवळ शेतकरी आणि कारागीर यांनाच गरज आहे असे नाही तर दूरदूरच्या अंतरावर आपल्या जवळील माल वाहून नेणारा आणि आपल्या वस्तूंसाठी किफायतशीर बाजार मिळण्याच्या अगोदर मोठ्या रकमेची कर्जे देणारा व्यापारी यालाही त्या शांततेची गरज आहे . तसाच विचार केला तर शेतकऱ्याच्या उत्पादनातून जी बचत होते त्यामधूनच संपत्तीचा संचय होऊ शकतो . ज्या ज्या गोष्टींमुळे शेतकऱ्यांची उत्पादनशक्ती कमी होते किंवा ज्यामुळे त्याच्या मालमत्तेच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाल्याने त्याच्या मनातील काटकसरीच्या भावनेचा नाश होतो , त्या सर्व गोष्टी राष्ट्रीय भांडवलाची वाढ होण्यात आडकाठी निर्माण करतात व त्या देशाच्या आर्थिक क्षमतेला धोका निर्माण करतात . हिंदुस्थानात अस्वास्थ्य किंवा सार्वजनिक असुरक्षिततेची परिस्थिती निर्माण झाल्यास तिचे वर कथन केल्याप्रमाणे सर्वव्यापी आणि चिरस्थायी होणारे असे हे परिणाम आहेत . औरंगजेबाची कारकीर्द म्हणजे या घटनेची सत्यता पटविणारे एक उल्लेखनीय असे उदाहरण आहे.

(२) औरंगजेबाच्या कारकिर्दीतील सतत झालेल्या युद्धांनी आर्थिक क्षमतेला लागलेली ओहोटी

औरंगजेबाच्या कारकिर्दीत जवळ जवळ पंचवीस वर्षे दक्षिणेमध्ये युद्ध चालले होते . यामुळे हिंदुस्थानच्या आर्थिक स्वास्थ्यामध्ये जो बिघाड झाला त्याचे स्वरूप अतिशय भयानक असे होते . इतकेच नव्हे तर त्यामुळे झालेले परिणाम हे अतिशय दूरगामी आणि फार काळपर्यंत टिकणारे असे होते . बादशाही फौजांकडून होणाऱ्या लष्करी हालचाली , विशेषतः बादशाही सैन्याने दिलेले अनेक वेढ्यांचे प्रसंग , यामुळे जंगले आणि माळराने यांचा पूर्ण नाश झाला . मोगल सैन्याची संख्या प्रचंड होती . अधिकृत कागदपत्रात ही संख्या १ लाख ७० हजार एवढी दिलेली आहे . या लढाऊ सैनिकांबरोबर जवळ जवळ दहापट बिनलढाऊ माणसे होती. याचा परिणाम असा झाला को जिथे जिथे हे सैन्य गेले तिथे तिथे हिरवेगार म्हणून जे काही होते त्या सर्वांचा त्यांनी लौकरच फन्ना पाडला . यात आणखी भर म्हणूनच की काय हल्ला करणारे मराठे , त्यांना जे वाहून नेता येणे शक्य नसे त्या सर्वांचा नाश करीत आपल्या घोड्यांची गुजराण ते उभ्या असलेल्या पिकांवर करीत . त्याचप्रमाणे घरे -दारे आणि हलविता येणार नाही अशी मालमत्ता ते जाळून टाकीत . साहजिकच आपल्या शेवटच्या मोहिमेनंतर १७०५ मध्ये औरंगजेबाने माघार घेतली , त्यावेळी सबंध देशात दिसणारे दृश्य अतिशय भयानक अशा नाशाचे होते यात काहीच आश्चर्य नाही . "या प्रांतातील दूरवर पसरलेल्या प्रदेशात औरंगजेबाने जे काही ठेवले ते म्हणजे वृक्षहीन अशी माळराने आणि पिके नसल्यामुळे ओसाड वाटणारी शेते . त्यांच्या जागी दृष्टीस पडणाऱ्या वस्तू म्हणजे माणसे आणि जनावरे यांच्या हाडांचे ढिगारे." (**स्टोरीया.**, भाग ४, २५२) वृक्ष संपत्तीचा झालेला हा संपूर्ण आणि अतिशय मोठ्या प्रमाणावरील नाश याचा तेथील शेतीवर अतिशय घातक असा परिणाम झाला . अविरत चाललेल्या या युद्धांनी साम्राज्याची इतकी भयानक आर्थिक ओढाताण झाली की सरकार इतकेच खाजगी जमीनदार हे भिकारी बनले. काळाच्या ओघात दुर्दशेप्रत पोहोचलेल्या इमारती आणि रस्ते यांची डागडुजी करण्याची कुवत देखील त्यांच्यात राहिली नाही.

अनुक्रमणिका

जबरीची कैद , वेठीची सक्त मजुरी आणि उपासमार यामुळेच केवळ मेहनतीचे काम करणाऱ्या लोकांचे हाल झाले असे नाही तर ह्या मोहिमा चालू असताना वारंवार रोगराईचा जो डोंब उसळत असे त्यामुळेही या वर्गाचे अतोनात हाल झाले . प्रत्यक्ष बादशहाच्या छावणीत देखील , जेथे अधिक सुखसोयी , सुरक्षितता आणि सुसंस्कृतपणा यांची अपेक्षा होती, तेथे प्रत्येक वर्षी दक्षिणेमधील युद्धामुळे जवळ जवळ एक लक्ष माणसे आणि घोडे , बैल, उंट आणि हत्ती मिळून तीन लक्ष प्राणी यांची हानी इतके भयानक नुकसान होत असे . (**स्टोरीया**, भाग ४ , ९६) १६८७ मध्ये गोवळकोंड्याच्या वेढ्याच्या वेळी दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली. "हैद्राबाद शहरामध्ये घरे -दारे, शहरातून वाहणारी नदी आणि मैदान ही सर्व प्रेतांनी भरून गेलेली होती . अगदी अशीच परिस्थिती बादशाही छावणीत होती .....मैलोमैल केवळ प्रेतांच्या ढिगाऱ्यावरच नजर पडत असे . धो धो पडणाऱ्या पावसामुळे शरीरावरील मांस आणि कातडी ही धुऊन जात.....काही महिन्यांनंतर जेव्हा पाऊस थांबे तेव्हा दूर अंतरावरून बघितल्यास हाडांच्या ढिगाऱ्याचा पांढुरकेपणा हा जणू काही बर्फाच्छादित टेकड्यांसारखा वाटे ." (**एम. ए.**, २९२) आतापर्यंत ज्या प्रदेशांत शांतता आणि सुबत्ता याचे साम्राज्य नांदत होते त्या प्रदेशांत देखील असाच भयानक हाहाःकार माजला. भीमसेन या लेखकाने पूर्वकर्नाटकमधील या परिस्थितीचे वर्णन काटेकोरपणे केलेले आहे . तो म्हणतो, "विजापूर, गोवळकोंडा आणि तेलंग घराण्यांचा ह्या देशावर जेव्हा अंमल होता तेव्हा या देशात मोठ्या प्रमाणावर शेती केली जाई . परंतु आता ह्या प्रदेशातून बादशाही फौजांची आगेकूच झाल्यामुळे त्यामधील अनेक ठिकाणांचे रूपान्तर निव्वळ ओसाड अरण्यात झालेले आहे . या प्रदेशांतून आक्रमण करून जात असताना बादशाही फौजांकडून तेथील लोकांवर भयानक अत्याचार केले गेले आणि त्यांना असह्य यातना भोगाव्या लागल्या ." अशाच तऱ्हेची परिस्थिती वऱ्हाडमध्ये असल्याचे वर्णन भीमसेन याने केलेले आहे. (**दिल.**, भाग २, ११४ अ, १३६ ब)

रोगराई आणि नैसर्गिक आपत्ती

इ. स. १६८८ मध्ये विजापूरमध्ये गाठीच्या भयंकर रोगाने अतिशय उच्छाद केला. जवळ जवळ तीन महिन्यांच्या कालावधीत या रोगाने एक लाखाच्यावर माणसे मेली असावी असा अंदाज केला जातो . (**एम. ए.**, ३२८) अशाच तऱ्हेचा रोग १६९४ च्या ऑगस्ट महिन्यात राजपुत्र आजम याच्या छावणीत उद्‌भवला होता अशी नोंद आपल्या वाचनात येते . (**अख.**, २९ ऑगस्ट) सुरत येथील इंग्लिश कारखानदारांनी केलेल्या नोंदीप्रमाणे १६९४ आणि १६९६ या वर्षांत पश्चिम हिंदुस्थानात सर्वत्र अशाच तऱ्हेच्या भयानक रोगाने धुमाकूळ घातला होता . यामध्ये जवळ जवळ ९५००० माणसे मृत्युमुखी पडली . याबाबतचे एकच उदाहरण घ्यावयाचे म्हटल्यास १७०२ ते १७०४ या कालावधीत अवर्षण आणि गाठीचा रोग यांनी २० लक्ष माणसांचा बळी घेतला . (**स्टोरीया.**, भाग ४ , ९६) त्याशिवाय १८ व्या शतकाच्या सुरुवातीला दक्षिणेमध्ये रोगराई आणि पूर, अवर्षण, वाजवीपेक्षा जास्त पाऊस आणि अनियमित पाऊस यांसारख्या भयंकर नैसर्गिक आपत्तींनी वारंवार धुमाकूळ घातला . त्यामुळे आक्रमण करणारे मोगल आणि स्थानिक लोक यांच्या हालअपेष्टांत आणखीनच भर पडली आणि यामुळे लोकसंख्येमध्ये आणखी घट झाली . जवळ जवळ एका पिढीच्या कालावधी इतक्या कालखंडावर युद्ध चालल्यामुळे कोठल्याही तऱ्हेची बचत झाली नाही , इतकेच नव्हे तर सर्वसाधारण लोकांमधील प्रतिकारशक्ती देखील नाहीशी झाली. त्यांनी जे जे म्हणून उत्पादन केले होते किंवा ज्याचा त्यांनी साठा केला होता ते सर्व दोन्ही बाजूंच्या हल्लेखोरांनी साफ लुटून नेले . साहजिकच जेव्हा दुष्काळ अथवा अवर्षण ओढवले , तेव्हा शेतकरी आणि जमीन नसलेले कामगार हे किडी व मुंग्या यांच्याप्रमाणे असाहाय्य परिस्थितीत विनाश पावले . बादशाही छावणीत अन्नधान्याची कमतरता ही कायमचे ठाण देऊन बसली . पुष्कळदा या परिस्थितीचे रूपांतर दुष्कळात होई . हिंदुस्थानच्या पुष्कळ भागांत

धान्याची जी अतोनात स्वस्ताई होती ती जाऊन तिचा केवळ आभास स्पप्नसृष्टीगत शिल्लक राहिला . (**दिल**., भाग २, १४६ अ.)

(३) व्यापार आणि उद्योगधंदे , यांची युद्धे , अशांतता आणि सरकारी अधिकाऱ्यांकडून होणारी पिळवणूक यामुळे झालेली नुकसानी

हिंदुस्थानामध्ये अनेक ठिकाणी शांतता नसल्यामुळे किंवा शेतीला सुरक्षितता नसल्यामुळे उपासमार आणि गांजवणूक यांनी संत्रस्त झालेल्या शेतकऱ्यांनी उपजीविकेचा मार्ग म्हणून हमरस्त्यावर दरोडेखोरीचा धंदा स्वीकारला . दक्षिणेमध्ये त्यांनी शस्त्रास्त्रे आणि घोडेस्वार जमविले आणि मराठ्यांना त्यांच्या मोगल मुलखावरील हल्ल्यांत सामील होण्याचा उपक्रम त्यांनी सुरू केला . त्याचप्रमाणे गावोगाव बंडखोरांच्या टोळ्या संघटित करण्यात आल्या. त्या अनेकजणांना चाकरी देत आणि खेडुतांमध्ये जे अधिक हिंमतवान असत त्यांना ते वैभव आणि संपत्ती याचे प्रलोभन दाखवीत . दुर्दैवाने ग्रासलेल्या या पाव शतकात दक्षिणेमध्ये व्यापाराचा जवळ जवळ लोप झाला . मजबूत संरक्षण बरोबर असल्याखेरीज लमाणांचे तांडे नर्मदेच्या दक्षिणेकडे प्रवास करू शकत नसत . साहजिकच त्यांना अनेक महिनेपर्यंत वाटेमध्ये असलेल्या मजबूत तटबंदी घातलेल्या शहरामध्ये राहावे लागे , आणि त्यानंतर दक्षिणेकडे ज्या गावी त्यांना जावयाचे असेल त्या ठिकाणी सुरक्षितपणे जाण्याची संधी मिळण्याइतकी परिस्थिती निर्माण होई . इतकेच काय तर खुद्द बादशाही टपाल आणि बादशहाला भोजनासाठी लागणाऱ्या फळांच्या करंड्या ह्या मराठ्यांनी नर्मदेच्या पलीकडील रस्त्यावर जो धुमाकूळ घातला होता त्यामुळे नर्मदेच्या काठी ५ महिने अडकून पडल्याच्या हकीकती इतिहासकारांनी कथन केलेल्या आपण वाचतो.

वरील परिस्थिती सोडल्यास ज्या ठिकाणी युद्धाचा धुमाकूळ चाललेला नव्हता (बंगालप्रमाणे) त्या ठिकाणी मध्यवर्ती सरकारची सत्ता कमकुवत झाली . याचा परिणाम असा झाला की प्रांतिक सुभेदार बादशाही सरकाराकडून येणारे मनाई हुकूम झिडकारून लावण्याइतके उद्दाम बनले . इतकेच नव्हे तर व्यापाऱ्यांना अतिशय कमी किमतीला त्यांच्याजवळील माल विकण्यास भाग पाडून आणि तो उघड बाजारात अधिक किमतीला विकून व त्याचप्रमाणे व्यापारी आणि कारागीर यांच्याकडून कायद्याने मना केलेला अबवाब नावाचा कर वसूल करून भरपूर पैसा स्वतःसाठी गोळा करण्यापर्यंत त्यांची मजल गेली होती. (अधिक हकीकतीसाठी **मुघल ॲडमिनिस्ट्रेशन** ह्या माझ्या पुस्तकाचे प्रकरण तीन पाहा .). अंतर्गत सुरक्षिततेचा अभाव आणि दूर अंतरावर खरेदी करण्याची अशक्यता यामुळे तटबंदीने वेढलेली शहरे सोडल्यास इतर सर्वत्र कला आणि हस्तव्यवसाय यांचा लोप झाला . त्याचप्रमाणे खेडेगावातील उद्योगधंदे आणि उद्योगधंद्यावर उपजीविका करणारे लोक यांचा तर जवळ जवळ समूळ नाश झाला . उदाहरणार्थ मद्रासच्या किनाऱ्यावर फार मोठ्या संख्येने विणकर लोक वस्ती करून होते . कर्नाटकसाठी मोगल आणि मराठे यांच्यामध्ये जो संघर्ष चालला होता , (१६९०–१६९८) त्यामुळे त्यांची परिस्थिती इतकी अस्थिर झाली होती की युरोपकडे जाणाऱ्या जहाजांवर भरपूर कापड लादणे हे तेथील इंग्रज आणि फ्रेंच वखारदारांना जवळ जवळ अशक्यप्राय होऊन गेले . अशा तऱ्हेने हिंदुस्थानच्या अतिशय भयानक अशा आर्थिक अवनतीला सुरुवात झाली . याचा परिणाम हिंदुस्थानच्या राष्ट्रीय भांडवलात खोट येण्यात झाला . इतकेच नव्हे तर तेथील लोकांमधील यांत्रिक कुशलता आणि संस्कृतीचा आदर्श यांचा दर्जा अतिशय झपाट्याने खालावला. त्याचप्रमाणे सर्व देशात अतिशय दूरवर कला आणि सुसंस्कृत राहणीही नाहीशी झाली.

अनुक्रमणिका

शेतकऱ्यांची छळणूक करणाऱ्या आणखी काही शक्ती

पुष्कळ वेळा मोगल शिपाई मोहिमेवर कूच करून जात असताना उभी पिके पायाखाली तुडवीत . ज्या शेतकऱ्यांचे यामुळे नुकसान होत असे त्याबद्दल त्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी बादशहाने एक खास अधिकारी वर्ग निर्माण केला होता . (पायमली-इ-जराइत) तरी देखील बादशहाच्या आर्थिक अडचणीमुळे लोकांच्या दृष्टीने या अतिशय उपकारक अशा सरकारी नियमांची कधीच दखल घेतली जात नसे. परंतु शेतकरी लोकांच्यावर ज्यांच्याकडून अतिशय जुलूम जबरदस्ती होत असे , तो वर्ग म्हणजे मुख्य फौजेच्या पाठोपाठ येणारे बाजारबुणगे. यामध्ये ज्यांचे वर्गीकरण करता येणार नाही अशा असंख्य चाकरांचा एक वर्ग, रोज मजुरी करणारे कामगार , दरवेशी आणि औरंगजेबाच्या तंबूच्या फिरत्या शहराच्या पाठोपाठ येणारे, अशा तऱ्हेच्या गर्दीच्या निमित्ताने एकत्र आलेल्या समुहांत आपल्याला काही तरी प्राप्ती होईल अशी आशा बाळगून आलेले उडाणटप्पू लोक यांचा समावेश होता . यामध्ये प्रमुख म्हणजे फौजेच्या उपयोगासाठी आपल्या जनावरांचा उपयोग करून देणारे , जवळ उंट बाळगणारे बलुची आणि नोकरीच्या शोधार्थ भटकणारे आगापिछा नसलेले अफगाण हे लोक लुटालूट करीत आणि येथील स्थानिक लोकांना अतिशय निर्दयपणे झोडपीत. या काळात वंजारा जमातीचे लोक पुष्कळ वेळा ५००० माणसांच्या गटाने फिरत असत . हे लोक धान्याचा व्यापार करीत . प्रत्येकाबरोबर धान्याने लादलेले दोन बैल असत . त्यांना आपल्या संख्याबळाच्या सामर्थ्याची जाणीव असे आणि लहानसहान सरकारी अधिकाऱ्यांबद्दल त्यांच्या मनात अतिशय तुच्छतेची भावना असे . परिणामी ते अनेकदा रस्त्याच्या कडेला वस्ती करून राहणाऱ्या लोकांना लुटीत आणि शेतामधील उभी पिके कसल्याही शिक्षेची भिती न बाळगता आपल्या गुरांना खायला घालीत . त्याचप्रमाणे सरकारी खलिते , हेरांनी पाठविलेल्या बातम्या आणि बादशहाला नजर करण्यासाठी म्हणून पाठविण्यात आलेल्या फळांच्या करंड्या घेऊन जाणारे बादशाही हरकारे (याला गुजराथेत मेवराह असे म्हणत.) हे देखील ते ज्या खेड्यातून जात असत तेथील लोकांना लुटीत असत . मराठ्यांच्या पाठोपाठ लुटालूट करण्यासाठी म्हणून बेरड आणि पेंढारी हे देखील मैदानात उतरले . यांचा उल्लेख निव्वळ दरोडेखोर आणि लुटारू म्हणूनच करावा लागेल.

यानंतर, बदलून गेलेले आणि नवीन येणारे एकाच खेड्याचे जे प्रतिस्पर्धी जहागीरदार होते त्यांच्या जमिनीचा कारभार पाहणाऱ्या दिवाणांची या लुटारू लोकांच्या वर्गात भर घालावी लागेल . जमिनीच्या धाऱ्याची कधीही न संपणारी बाकी अजून वसूल व्हावयाची आहे , या मिषाखाली बदलून जाणाऱ्या जहागीरदाराचे बाकी वसूल करणारे हे दिवाण ते खेडे सोडून जावयाच्या अगोदर शेतकऱ्याला जितके पिळून काढता येईल तितके काढीत असत . इतकेच नव्हे तर बदलून आलेला जहागीरदार आपल्या अधिकारावर रुजू झाल्यानंतर देखील काही महिने त्या खेड्यातच मुक्काम करून राहात असे , आणि नवीन बदलून आलेला अधिकारी आपली स्वतःची उपासमार होऊ नये म्हणून अर्धमेल्या झालेल्या शेतकऱ्यांना आपल्या आर्थिक वसुलीरूपी जात्यातून भरडून काढीत असे.

(४) मोगल सरकारची दिवाळखोरी (कर्जबाजारीपणा)

इंग्रजांनी हिंदुस्थान जो जिंकून घेतला तो एका झटक्यासरशी नसून पायरीपायरीने घेतला . त्यांनी याबाबत जी प्रगती केली तिचे स्वरूप अविरत अशा परिश्रमांच्या फलश्रुतीचे नव्हते , तर हिंदुस्थानात ब्रिटिश सरकारतर्फे ज्या व्हाईसरायांच्या नेमणुका झाल्या त्यांच्या कर्तृत्वाचे , हिंदुस्थानवरील ब्रिटिश लोकांचे स्वामित्व हे फल होते . याबाबत विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे प्रत्येक आक्रमकवृत्तीच्या व्हाईसरायची

कारकीर्द संपल्यानंतर त्याच्या जागी नेमणूक झालेला व्हाईसराय हा ब्रिटिशांच्या दृष्टीने फायद्यात पडणाऱ्या आणि म्हणून काटकसरीच्या अशा संपूर्णतया तटस्थतेच्या धोरणाचा कट्टर पुरस्कर्ता असे . क्लाईव्ह आणि व्हॅन्सिटार्ट यांच्या लढायांमुळे निर्माण झालेली आर्थिक पोकळी भरून काढणारा वॉरन हेस्टिंग्जसारखा एखादा व्हाईसराय निघे आणि तो वेलस्लीसारख्या एखाद्या लष्करीदृष्ट्या आक्रमक धोरण स्वीकारणाऱ्या व्हाईसरायच्या धोरणाला पोषक अशी भूमिका निर्माण करी . त्याचप्रमाणे वेलस्लीच्या आक्रमणाच्या बेदरकार धोरणामुळे कंपनी सरकारचे जे दिवाळे वाजले होते त्या दिवाळखोरीची भरपाई बार्लो किंवा मिटों यांच्यासारखा अतिशय धिमेपणाचे धोरण स्वीकारणारा व्हाईसराय करी . मार्क्विस ऑफ हेस्ट्रिंग्ज आणि अर्ल ऑफ अहर्मस्ट यांच्या शत्रुत्वाच्या धोरणामुळे कंपनीच्या तिजोरीवर जी धाड पडत असे त्यामुळे होणारे नुकसान बेन्टिकसारखा शांततामय धोरणाचा पुरस्कार करणारा व्हाईसराय भरून काढी . औरंगजेबाच्या बाबतीत तसे म्हणता येणार नाही . १६७९ पासून म्हणजे मारवाडच्या राज्यावर त्याने स्वारीला सुरुवात केल्यापासून त्याची कारकीर्द म्हणजे एका कधीही न संपणाऱ्या युद्धासारखी झाली होती . ज्यामुळे त्याच्या प्रजेला उसंत घेण्यास सवड मिळेल , युद्धामुळे झालेली नुकसानी भरून काढता येईल आणि पुढील युद्धे लढण्यासाठी साधनसामग्रीची जुळवाजुळव करता येईल अशा शांततेच्या आणि काटकसरीच्या मध्यंतराची किती जरुरी आहे याची त्याला कधीच जाणीव झाली नाही . त्याच्या कारकिर्दीला सुरुवात झाल्याबरोबर चालू महसुलापासून येणारे उत्पन्न संपून गेले . त्याचप्रमाणे हिंदूंवर १६७९ मध्ये जो नवीन कर बसविण्यात आला होता त्यापासून मिळणारे उत्पन्नही यात संपले . (**के. के.**, भाग २. २७८, ३७८) इतकेच नव्हे तर त्याच्या वाडवडिलांनी आग्र्याच्या आणि दिल्लीच्या किल्ल्यातील तळघरात ज्या संपत्तीचा संचय करून ठेवला त्या संपत्तीची आहुती या युद्धामध्ये पडली. (**के. के.**, ४११; **स्टोरीया**, भाग २. २५५)

अशातऱ्हेने मोगल साम्राज्याचे शिलकी संपत्तीचे जे अखेरचे साठे होते तेही रिकामे झाले . अशा परिस्थितीत सरकारवर उघडउघड दिवाळखोरीची परिस्थिती येणे हे अगदी अपरिहार्य होते . लष्करातील शिपाई आणि त्याचप्रमाणे मुलकी अधिकारी यांचे पगार जवळ जवळ तीन वर्षेपर्यंत थकले . पगार न मिळल्यामुळे उपासमार झाल्याने आणि स्थानिक वाण्याकडे पत नाहीशी झाल्यामुळे चिडून गेलेले शिपाई व अधिकारी पुष्कळ वेळा बादशाही दरबारात तमाशा करीत , आणि पुष्कळ वेळा त्यांच्या सेनापतीचा व्यवहार बघणारा जो मुनीम असे त्याला शिवीगाळ करीत अथवा बडवून काढीत. शत्रूच्या फौजेतील अधिकारी आणि प्रत्येक किल्ल्यावरील किल्लेदार यांनी आपला पक्ष सोडून मोगलांना येऊन मिळावे आणि किल्ला मोगलांच्या स्वाधीन करावा यासाठी त्यांचे मन वळवावे म्हणून बादशाही सरकार द्रव्य आणि बादशाही सैन्यात अधिकाराच्या जागा देण्यासंबंधी वाटेल तशी उतावळेपणाची वचने देत असे . या सर्व वचनांची परिपूर्ती करणे हे मानवी प्रयत्नांच्या पलीकडचे होते . याचा परिणाम असा झाला की साम्राज्यातील सर्व जमीन ही सैन्यामध्ये भरमसाठ भरती केल्या गेलेल्या अधिकाऱ्यांची बाकी देण्यासाठी ज्या एकंदर जहागिरींची जरुरी होती, त्याची भरपाई करण्यास अपुरी पडली . (हमीदउद्दीन याचे **अहकाम**, ५७) ज्यावेळी पगाराऐवजी जमिनी देण्याबाबतच्या उताऱ्यांची बादशाही अधिलेखा विभागाकडून मोजदाद केली जाई , तेव्हा अनेक वर्षेपर्यंत त्याबाबतचे काढलेले हुकूम हे कागदावरच राहात , कारण जी खेडी एखाद्याच्या नावाने करून दिलेली असत ती प्रत्यक्ष त्याच्या ताब्यात देणे हे अशक्य होऊन बसे . जहागिरी देण्यासंबंधीचा हुकूम आणि त्या जहागिरीचा त्या व्यक्तीला मिळणारा ताबा यामध्ये इतका काळ जाई की तेव्हा लोक असे कुत्सिपणे म्हणत की ती जहागिरी मिळेपर्यंत एखाद्या मुलाचे वय वाढून त्याला दाढी देखील येईल . (**के. के.,** भाग २. ३७९) मराठ्यांचा एखादा छोटासा किल्ला घ्यावयाचा म्हटले तरी किल्लेदाराला लाच म्हणून देण्यासाठी ४५ हजार रुपयांची रोख रक्कम लागत असे , आणि या दराने मराठ्यांचे सगळे किल्ले घ्यावयाचे झाल्यास बादशहाला आशा करण्यास कसलीच जागा नव्हती , आणि तरी देखील बादशहा हटवादीपणाने मोठ्या

रक्कमेची लाच भरून अथवा वेढा घालून मराठ्यांचे एका पाठोपाठ एक किल्ले काबीज करीत चालला . वेढा घालून त्याने जे किल्ले जिंकून घेतले त्यासाठी त्याला यापेक्षा दसपट किंमत अधिक द्यावी लागली . (**के. के.**, भाग २. ५०३)

परिणामी दक्षिणेमधील मोगल सैन्याचे मनोधैर्य पार खचून गेले . कधीही न संपणारे आणि निरर्थक असे युद्ध लढावे लागल्यामुळे मोगल सैन्यातील शिपाई अतिशय थकून गेले . (**ॲनेक्डोट्स्**, ११). ["वाळवंटे आणि जंगल यामधून सतत कूच करून जावे लागल्यामुळे माझे अधिकारी माझ्या मरणाची वाट पाहतात ."] परंतु औरंगजेब कोणत्याही प्रकारचा विरोध सहन करण्याच्या अथवा मित्रत्वाचा सल्ला ऐकण्याच्या परिस्थितीत नव्हता . औरंगजेबाचा मुख्य अमीर -उल्-उमरा असदखान हा होता . त्याने बादशहाला अशी सूचना करण्याचे धाडस केले की आता विजापूर आणि गोवळकोंडा ही राज्ये काबीज करण्यात आलेली आहेत. आपल्याला त्यामुळे कोणतेही अधिक काम करण्याचे उरले नाही आणि म्हणून आपल्याला दिल्लीला परतण्यास काहीच हरकत नाही . यावर औरंगजेबाने अतिशय उपरोधाने त्याची कडक शब्दांत हजेरी घेतली आणि तो म्हणाला , "तुझ्यासारख्या माझ्या सुज्ञ अशा नाणावलेल्या सेवकाने अशा तऱ्हेची विनंती करावी याचे मला मोठे आश्चर्य वाटते. जोपर्यंत या मर्त्य शरीरात श्वास घेण्याची शक्ती आहे तोपर्यंत या शरीराची काबाडकष्टातून सुटका नाही. (**हमीदउद्दीन याचे अहकाम** , ४६) बादशहाच्या अनुयायांची पिढी जन्माला येऊन वाढली आणि आश्चर्य असे की त्यांच्यापैकी कोणीही शहरामध्ये प्रवेश केला नव्हता किंवा विटा किंवा दगड यांनी बांधलेल्या घरात वास्तव्य केले नव्हते, तर एका छावणीमधून दुसऱ्या छावणीकडे जाण्यासाठी कूच करण्यामध्ये त्यांनी आपले सारे आयुष्य तंबूत घालवले . (**दिल.**, भाग २. १४१ अ) रजपूत शिपायांनी अशी तक्रार केली की पुढील पिढीमध्ये त्यांची जमात साम्राज्याची सेवा -चाकरी करू शकणार नाही , कारण त्यांना त्यांचे सारे आयुष्य दक्षिणेतल्या मोहिमांत घालवावे लागले असून आपल्या मायदेशी जाण्यास आणि मुलाबाळांना जन्म देऊन वाढविण्यास वेळच मिळाला नाही . घरी जाण्याच्या ओढीने अतिशय व्याकुळ झालेल्या दक्षिणेमधील एका सरदाराने आपली बदली दिल्लीला व्हावी म्हणून बादशहाला १ लक्ष रुपयांची लाच देऊ केली . (**एम. यू.**, भाग १. ४५७).

(५) राज्यकारभाराला लागलेली उतरती कळा आणि सार्वजनिक अशान्ततेची निर्माण झालेली परिस्थिती

खर्चात झालेली भयानक वाढ आणि सातत्याने दक्षिणेमध्ये चाललेले युद्ध , या दोन गोष्टींचा उत्तर हिंदुस्थानातील परिस्थितीवर अतिशय विपरित असा परिणाम झाला . साम्राज्यातील जुने, अतिशय समृद्ध आणि शांततेचे वातावरण असलेले आणि जेथे राजकीयदृष्ट्या स्थैर्याचे वातावरण असलेले प्रांत हे त्यातील संपत्ती, मनुष्यबळ आणि बुद्धिमान वर्ग पार नाहीसे झाल्यामुळे कळाहीन बनले. त्या प्रांतामधील उत्तम उत्तम शिपाई, उच्च पदावर असलेले अधिकारी आणि तेथे जमा झालेला महसूल या सर्वांची रवानगी दक्षिणेमध्ये करण्यात आली . उत्तर हिंदुस्थानातील सुभ्यांचा कारभार करण्यासाठी दुय्यम अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यात आल्या.

सुभेदारांचे दारिद्र्य आणि दुर्बळता

परंतु त्यांच्याजवळ ठेवण्यात आलेली फौज ही इतकी लहान होती आणि त्यासाठी नेमून दिलेले उत्पन्न हे इतके अपुरे होते की ज्या तऱ्हेने हुकमत गाजवणे जरूर होते तशी गाजवणे त्यांना शक्य झाले नाही. सर्व प्रकारच्या कायद्यांना न जुमानणाऱ्या बंडखोरांनी उत्तरेमध्ये आणि त्याचप्रमाणे दक्षिणेमध्ये आपले

डोके वर काढले . अर्थात या बंडाळीचा अधिक जोर कारणपरत्वे उत्तर हिंदुस्थानमध्ये दक्षिणेपेक्षा अधिक होता. मोगल सत्ता हिंदुस्थानात दृढ होण्याच्या अगोदर ज्यांच्या वाडवडिलांनी तिथे राज्य केले असे प्रतिष्ठित जमीनदार , अनेक जिल्ह्यांमध्ये विशेषतः बंगाल , जौनपूर, माळवा, अलाहाबाद, आणि उत्तर ओरिसा येथे स्थायिक झालेली आणि हिंदुस्थानमधील आपल्या गत साम्राज्यांच्या आठवणीची स्वप्ने पाहणारी अफगाण घराणी , औरंगजेबाच्या हुकुमाने बडतर्फ झालेल्या राजघराण्यातील आपल्या मुलुखावर ताबा सांगणारे वारसदार , आग्र्याच्या पश्चिमेकडील जाट शेतकरी आणि दिल्लीच्या नैर्ऋत्येकडील मेवाती यांच्यासारख्या बंडखोर टोळ्या , अवध येथील बाईस व दक्षिण बिहारमधील उज्जयिनीस यासारखे चळवळे रजपूत खेडुत वगैरे सर्वजण सरकारी अमलाविरुद्ध बंड करून उठले आणि आपल्या दुर्बळ अशा शेजाऱ्यावर हात टाकण्यास त्यांनी सुरुवात केली . स्थानिक सुभेदाराला या परिस्थितीबरोबर मुकाबला करता येणे अशक्य झाले. कारण त्यांच्या जबाबदारीच्या मानाने कागदोपत्री त्यांच्या नावावर असलेली रक्कमही कमी होती. इतकेच नव्हे तर या रकमेत प्रत्यक्षामध्ये अतिशय झपाट्याने घट पडत होती . सर्वसाधारण जे अशांततेचे वातावरण पसरले होते त्यामुळे साहजिकच शेतकऱ्यांकडून वसूल केल्या जाणाऱ्या खंडात घट पडण्यास सुरुवात झाली. शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय नाशकारक आणि म्हणून भविष्यकाळात राज्याच्या दृष्टीनेही धोक्याची अशी मोगल जहागिरीच्या प्रत्यक्ष कारभाराची जी पद्धती होती त्यापेक्षा अधिक वाईट अशी पद्धत कल्पनेतही नजरेसमोर आणणे अशक्य आहे . विरोधी जहागिरदाराचे प्रतिनिधी अथवा त्याच जहागिरदाराचे एका पाठोपाठ नेमले गेलेले प्रतिनिधी यांच्याकडून रयतेची बेगुमान लुटालूट होण्यात या पद्धतीचा अखेर शेवट झाला . "एखादी जहागीर पुढील वर्षी त्याच अधिकाऱ्याकडे राहील अशी आशा बाळगण्यास काहीही जागा नाही . जेव्हा एखादा जहागिरदार जहागिरीवर आपला महसूल जमा करणार अधिकारी पाठवी , त्यावेळी तो त्याच्याकडून कर्जाच्या रूपाने रक्कम आगाऊ घेत असे . हा अधिकारी खेड्यामध्ये आल्यावर त्याला अशी भीती वाटे की आपल्यापेक्षा जहागिरदाराला अधिक रक्कम कर्ज म्हणून देणारा एखादा दुसरा माणूस आपल्या पाठोपाठ आपल्या जागेवर येईल आणि म्हणून सर्व तऱ्हेच्या जुलूम - जबरदस्तीच्या उपायांचा अवलंब करून तो खंडाची वसुली करण्यास का -कू करत नसे . याचा परिणाम असा झाला की शेतकऱ्याने शेती करण्याचे सोडून दिले . त्यामुळे जहागिर दारांना एका दिडकीचाही वसूल मिळत नसे." (**दिल**., भाग २ , १३९ अ -१४० अ) अशाच तऱ्हेचे नुकसान करणारे धोरण महसूल वसूल करण्याच्या बाबतीत बादशाही जमिनीबाबतही पाळण्यात येत असे . (याबाबत अधिक माहितीसाठी **स्टडीज इन मुघल इंडिया** या पुस्तकात पाहा : पान २२३)

अशातऱ्हेने कधीही उकल न होणारी अशी गुंतागुंतीची परिस्थिती निर्माण झाली . राजकीयदृष्ट्या अव्यवस्था होतीच आणि त्यात भर म्हणून की काय जमीनमहसुलाची पद्धतीही चुकीची होती . यामुळे परिणाम असा झाला की जहागिरीपासून येणारे उत्पन्न कमी कमी होत गेले . उत्पन्नात घट पडल्यामुळे सुभेदारांना आपल्या मनसबीत असलेल्या शिपायांची संख्या कमी करणे भाग पडले . सुभेदारांच्या सशस्त्र सैनिकांच्या संख्येत अशातऱ्हेने घट पडल्यामुळे लोकांमधील कायदा न जुमानण्याच्या वृत्तीला अधिकाअधिक उत्तेजन मिळत गेले . यापासून शेतकऱ्यांच्या परिस्थितीमध्ये आणखीन बिघाड झाला आणि जमिनीपासून येणारे उत्पन्न कमी झाले.

रजपूत लोकांचा आणि तसे पाहिले तर स्वतःला क्षत्रिय जातीचे आहोत असे म्हणवून घेणाऱ्या सर्व हिंदूंचा लढाई हा एकमेव व्यवसाय होता . उत्तर हिंदुस्थानमध्ये मोगलांच्या आमदानीत जे शांततेचे वातावरण निर्माण झाले त्यामुळे पश्चिमेकडे असलेल्या सरहद्दीपलीकडील प्रदेशांत किंवा अजूनही मोगली अमलाखाली न आलेल्या दक्षिणेमधील प्रदेशांत चाकरी हीच त्यांच्या दृष्टीने एकुलती एक संधी होती .

बादशाही छत्राखाली रजपूत लोक हे मध्य आशिया आणि कंदाहारमध्ये लढले होते. जरी काबूलचा समावेश औरंगजेबाच्या साम्राज्यात होत होता तरी देखील त्याच्या कारकिर्दीत मोगल लष्करी कारवाया या सीमेच्या आतील भागापुरत्याच मर्यादित राहिल्या . दक्षिणेतील उरलेल्या दोन शाह्या देखील औरंगजेबाने आपल्या राज्याला जोडल्यामुळे रजपुतांमध्ये दोन वेगवेगळ्या कारणांमुळे बेकारीची परिस्थिती उद्‌भवली . पहिले कारण म्हणजे मोगल साम्राज्यात समाविष्ट करून घेतलेल्या शाह्यांचे जे धनी नसलेले असे जे स्थानिक सैन्य होते त्यांना आपल्याकडे नोकरी देण्याची औरंगजेबाला निकड भासली . दुसरे कारण म्हणजे जिंकून घेण्यासाठी आता फारच थोडा प्रदेश शिल्लक उरला होता . अशा परिस्थितीत महत्त्वाकांक्षा बाळगून असलेल्या रजपूत घराण्यातील वारस हे आपल्या वडिलोपार्जित जहागिरी मिळविण्यासाठी आपल्या देशबांधवाबरोबर लढणे , दरोडेखोरीचा माग स्वीकारणे किंवा स्वधर्माचा त्याग औरंगजेबाकडून जहागिरदारी मिळण्याच्या आशेने करणे येवढ्याच गोष्टी करू शकत होते.

(६) औरंगजेबाच्या अमदानीत भारतीय संस्कृतीचा झालेला ऱ्हास, त्याची कारणे आणि लक्षणे

औरंगजेबाच्या कारकिर्दीत मध्ययुगीन भारतीय संस्कृतीची जी अवनती झाली ती आपल्याला त्या वेळी ज्या उत्तमोत्तम कला अस्तित्वात होत्या त्यांच्या झालेल्य ऱ्हासात दिसते . इतकेच नव्हे तर त्यांच्यापेक्षाही अधिक प्रमाणात बौद्धिकदृष्ट्या हीन प्रतीच्या प्रजेची जी नवनिर्मिती झाली त्यात दिसून येते . १७ वे शतक जसजसे पुढे सरकू लागले त्याबरोबर अकबर आणि शहाजहान यांच्या काळातील मर्दानी ऐतिहासिक वातावरणात वाढलेली , स्वत्वाच्या दृष्टीने बघितले असता स्वतंत्र बाणेदारपणाची वृत्ती दाखवणारी आणि अधिक जबाबदारी व अधिक सामर्थ्य यांच्या जाणिवेच्या वातावरणात शिकून तयार झालेली अशी जुनी उमराव घराणी हळूहळू नामशेष झाली. त्यांची जागा छावणीमध्ये आणि दरबारात दुय्यम दर्जाच्या माणसांनी घेतली . ह्यांच्याविषयी देखील औरंगजेबाच्या मनात संशय असल्यामुळे त्यांना संशयी औरंगजेबाने जी साधनसामग्री पुरविली होती ती अतिशय कमकुवत होती . ही माणसे जबाबदारीची कामे पार पाडण्यात आणि धडाडीने एखादे काम हाती घेण्यास धजत नसत . आपले हितसंबंध साधण्यासाठी ते एकाच मार्गाचा अवलंब करीत आणि तो मार्ग म्हणजे खुशामतगिरी करण्याचा (**दिल**., भाग २, १५०ब). औरंगजेबाला फार मोठे आयुष्य लाभले . या त्याच्या जीवनात त्याला फार मोठा अनुभव लाभला आणि त्याच्याजवळ प्रचंड माहितीचा साठा तयार झाला . याचा परिणाम असा झाला की बौद्धिकदृष्ट्या तरुण पिढी ही त्याच्यापुढे खुजट बनली. वाढत्या वयाबरोबर त्याच्या स्वभावातील स्वयंपूर्णता आणि हेकेखोरपणा वाढतच गेला. अखेर वेळ अशी आली की कोणालाही त्याला विरोध करण्याचे धाडस होईना . इतकेच नव्हे तर त्याला प्रामाणिकपणाचा सल्ला देणे अथवा कटूसत्य सांगणे सर्वांना अशक्य होऊन बसले . दूरच्या दक्षिण प्रदेशात सातत्याने चाललेले युद्ध आणि छावणीतील खडतर जीवन यामुळे आराम कसा तो कोणाला ठाऊक नव्हता. परिणामी अमीरउमरावांची जी वैभवशाली संस्कृती होती तिचा ऱ्हास झाला . समाजाला सुधारणेचे जे वळण मिळत असे , ते सर्वसाधारणपणे या अमीरउमरावांच्याकडूनच . त्यामुळे जेव्हा या संस्कृतीचाच ऱ्हास झाला तेव्हा हिंदुस्थानातील बुद्धिजीवी वर्गाची पातळीही हळूहळू खालच्या दर्जाला जाऊन पोहोचली . याचे अतिशय उत्कृष्ट उदाहरण म्हणजे जो समाज पूर्वी नीतिमान् फैजीची प्रवचने ऐकण्यात अत्यानंद मानीत असे तोच समाज आता जफर जटाली या गावंढळ माणसाच्या रटाळ बोलण्यात आनंद मानू लागला.

१८ व्या शतकातील हिंदुस्थानच्या परिस्थितीचे भयानक चित्र

अनुक्रमणिका

राज्यकर्ता जो वर्ग होता त्याचा जो नैतिक अधःपात झाला होता त्याला पुरावा म्हणून पुढील उदाहरणे देता येतील . त्या काळामधील वृद्ध माणसांमध्ये निराशावादाचे प्रमाण वाढत होते , आणि हा निराशावाद त्या काळातील पत्रे आणि दंतकथा यांमध्ये , इतकेच नव्हे तर विचारवंत इतिहासकारांच्या ग्रंथांमध्ये देखील दृश्यमान होत होता . सर्वसाधारणपणे अशी समजूत आहे की पौरस्त्य लोकांना भूतकाळ म्हणजे सुवर्णयुग होऊन गेले अशी कल्पना करण्याची आणि म्हणून हल्लीच्या पिढीकडे त्या सुवर्णयुगातील पूर्वजांचे हे लोक म्हणजे अधोगतीला पोहोचलेले वारस आहेत असे तुच्छतापूर्वक लेखण्याची सवय आहे . परंतु वर उल्लेखिलेला निराशावाद हा इतका दृढमूल होता आणि प्रामाणिक होता की या सवयीचेच एक उदाहरण म्हणून त्याच्याकडे दुर्लक्ष करता येणे कठीण होते . हिंदुस्थानातील जीवनाच्या घडीला जे अतिशय भयानक असे वाईट वळण लागत होते त्यामुळे भीमसेन आणि खाफीखान यांच्यासारखे इतिहासकार देखील स्तिमित झाले , आणि चिंतनशील होऊन त्यांनी अकबर आणि शहाजहान यांच्या काळात होऊन गेलेल्या व्यक्तींचे गुण आणि गौरव यांची तुलना सद्यःपरिस्थितीबरोबर करण्यास सुरुवात केली. [**दिल.**, भाग २ . १३९ अ , १४६ अ , १५७ अ ; **के. के.**, भाग २ , ५५०.] इतकेच नव्हे तर भविष्यकाळामध्ये कोणत्या भयानक घटना घडणार आहेत याच्या जाणिवेने अतिशय विषण्ण होऊन आपले मस्तक हालवीत आणि आपल्या मृत्यूनंतर सगळीकडे प्रलय होणार अशी भविष्यवाणी वर्तवीत असलेल्या वृद्ध झालेल्या औरंगजेबाचे वर्णन केलेले आपल्याला इतिहासात आढळते . (**ॲनेक्डोटस्**, भाग २). याबाबत येणारा काळ हा काळाकुट्ट आहे असे म्हणणाऱ्या निराशवाद्यांना सादुल्लाखानाने उत्तर दिले . तो म्हणतो , "कोणत्याही काळात योग्यता नसलेली माणसे नसतात असे नाही . ज्या गोष्टीची जरूर आहे ती म्हणजे त्यांना शोधून काढून, त्यांना प्रेमाने आपलेसे करून , त्यांच्याकडून आपले काम करून घेणाऱ्या आणि अशा अधिकाऱ्यांविरुद्ध आपमतलबी माणसे जे काही बोलतात त्याकडे कानाडोळा करणाऱ्या अतिशय सुज्ञ अशा धन्याची आहे ." (**रुक्कात.**, **क्र.** ४६) परंतु औरंगजेबाच्या कारकिर्दीच्या अखेरच्या वर्षांत ह्या अतिशय मौल्यवान अशा तत्त्वाचा पाठपुरावा केला गेला नाही , आणि औरंगजेबाच्या वारसांनी तर ह्या तत्त्वाला साफ मूठमाती दिली . बुद्धिमान् माणसाला त्याच्या आवडीप्रमाणे त्या काळात पुढे येण्याचे सर्व मार्ग बंद झाले होते. सरकारची चाकरी म्हणजे एक अतिशय पूजनीय अशी ठेव आहे हा विचार लोकांच्या मनातून पूर्णपणे गेला होता , आणि त्याजागी सरकारी चाकरी म्हणजे धर्मभ्रष्ट माणसाला , खुशामतखोराला, नुसताच भपकेबाज पोशाख करून पुढे पुढे करणाऱ्या नखरेबाज माणसाला , बादशहाचे जे नातेवाईक असतील त्यांना आणि सरकार दरबारी मानसन्मान पावलेली जी घराणी असतील त्यांमधील वारसांना खूष करण्याचे एक साधन आहे असे मानले जात असे . औरंगजेबाच्या कारकिर्दीत धर्मांधता आणि दृष्टीचा संकुचितपणा , आणि त्यानंतरच्या काळातील मोगल बादशहांच्या कारकिर्दीत दुर्गुण आणि आळशीपणा यांनी जो धुमाकूळ घातला होता त्यामुळे साम्राज्याच्या राज्यकारभाराची धुळदाण झाली आणि अधोगतीला जाणाऱ्या मोगल साम्राज्याने हिंदुस्थानातील लोकांना आपल्याबरोबर नाशाच्या गर्तेकडे खेचून नेले.

(७) मोगल साम्राज्यातील अमीरउमरावांचा झालेला नैतिक अधःपात

त्या काळामध्ये हा जो नैतिक ऱ्हास झाला होता तो प्रामुख्याने त्या काळच्या अमीरउमरावांत दिसून येत होता ; याचे झालेले परिणाम मात्र अतिशय अपायकारक असे होते . १७ व्या शतकाच्या अखेरच्या वर्षांतील मोगल राज्यातल्या पिढीजाद उमरावांचे वर्तन अतिशय गर्हणीय होते . मत्सराच्या अतिशय क्षुद्र भावनेने त्यांनी राज्यकारभारातील उत्तमोत्तम जागा भरण्यासाठी निवड केलेल्या सामान्य थरातील लोकांचा आणि त्यासाठी उमरावपद देण्यात आलेल्या व्यक्तींचा अपमान केला , आणि इतकेच नव्हे तर अशा नवीन माणसांनी पुढे येऊ नये असे प्रयत्न देखील त्यांनी केले . त्यांच्या दृष्टीने विचार केला तर अशा

कामाच्या बाबतीत ते अगदी कुचकामी बनले होते . मोगल अमीरउमरावांचा कसा नैतिक अधःपात झाला होता याचे आपल्याला एक अतिशय सार्थ उदाहरण मिळते . मुख्य वजिराचा नातू मिर्जा तफख्खुर हा होता . हा दिल्ली येथील आपल्या वाड्यातून आपल्या बंडखोर गुंडांच्या बरोबर बाहेर पडत असे , बाजारातील दुकाने लुटीत असे , नदीवर जाणाऱ्या अथवा पालखीमधून हमरस्त्यावरून जाणाऱ्या हिंदु स्त्रियांना पळवून नेत असे आणि त्यांची अब्रू लुटीत असे . अशा बंडखोर माणसाला कडक शिक्षा करील असा एकही कणखर वृत्तीचा न्यायाधीश नव्हता किंवा अशा गुन्ह्यांना आळा घालील असे रक्षक दलही नव्हते . "जेव्हा जेव्हा अशा तऱ्हेची घटना घडल्याचे बादशहाच्या नजरेस अधिकृत वार्ताहाराकडून किंवा नवीन वसाहतवाल्यांकडून आणून दिले जाई तेव्हा तेव्हा बादशहा मुख्य वजीराकडे ही गोष्ट सोपवी आणि स्वतः काहीही न करता स्वस्थ बसे." (**हमीदउद्दनि याचे अहकाम,** ४८; **एम्. यू.**, भाग १, ३२०).

अतिशय समृद्ध अशा प्रांतातील सुपीक जमिनीपासून मिळणारे जास्त उत्पन्न हे मोगल अमीरउमरावांच्या खजिन्यात गडप होऊन जाई आणि परिणामी मध्य आशिया किंवा इराण येथील सुलतानांना देखील स्वप्नात दिसले नसेल एवढे वैभव भोगण्याचे त्यांच्या भाग्यात येई . म्हणून दिल्ली येथील घराघरांमध्ये अमीरउमरावी बडेजावाचा अतिरेक झाला . त्यांच्यापैकी अनेकजणांची अंतःपुरे अनेक जातीच्या, बुद्धिमत्तेच्या आणि स्वभावाच्या स्त्रियांनी भरलेली असत . या स्त्रियांची संख्याही फार मोठी असे . मुसलमानी कायद्याप्रमाणे लग्नबाह्यसंबंधापासून झालेल्या मुलांना लग्नापासून झालेल्या मुलांइतकेच वडिलोपार्जित मालमत्तेत अधिकार असत. त्याचप्रमाणे समाजामधील त्यांचे स्थान कोणत्याही प्रकारे निकृष्ट दर्जाचे नसे. कायदेशीरपणे लग्न झालेल्या स्त्रियांची मुले देखील नको असलेल्या वयामध्ये जनानखान्यात त्यांच्या दृष्टीस पडणाऱ्या आणि त्यांच्या कानी पडणाऱ्या दुर्गुणांशी परिचित होत असत . तर याउलट त्याच घरामध्ये राहणाऱ्या परंतु त्यांचे तारुण्य आणि त्यांचे सौंदर्य यांच्यामुळे (जरी अशा स्त्रिया हलक्या कुळातल्या असल्या अथवा त्यांचे वर्तन सवंग असले तरी देखील) त्यांना प्राप्त झालेले वैभव आणि वजन यामुळे वर उल्लेखिलेल्या मुलांच्या आयांचा त्या उघड उघड अपमान करीत असत . साहजिकच अनेक विवाह केलेल्या माणसाच्या गर्दी असलेल्या जनानखान्यात आपल्याला कॉर्नेलियाचे धीरोदत्त चारित्र्य आणि भव्य धीरोदात्तपणा सापडणे कठीण होते , आणि ज्या आयांमध्ये कॉर्नेलियासारख्या स्त्रिया नव्हत्या तेथे त्यांच्या मुलांमध्ये ग्रच्छीसारखे मुलगे सापडणेही दुरापास्त होते.

मोगल उमरावांच्या मुलांना दिले जाणारे दुष्ट शिक्षण

मोगल अमीरउमरावांच्या मुलांना चांगले शिक्षण नव्हते किंवा प्रत्यक्ष जीवनात उपयोग होईल अशी शिकवणही नव्हती. त्यांचे त्यांच्या घरातील खोजे आणि नोकराणी यांच्याकडून वाजवीपेक्षा फाजील असे लाड होत. जन्म झाल्यापासून तारुण्यात पाऊल टाकीपर्यंत पूर्णपणे बंदिस्त असे जीवन त्यांच्या वाट्याला येत असे. इतकेच नव्हे तर त्यांच्या जीवनामध्ये जे जे काही अडथळे निर्माण होत असत ते सर्व त्यांच्या अनुचरांकडून दूर केले जात असत . अतिशय लहान वयात दुर्गुणांशी परिचित जरी ते झाले असले आणि सुखाचा उपभोग घेतल्यामुळे त्यांच्या अंगामधील रगीची धार बोथट झाली असली तरीदेखील त्यांना स्वतःच्या संपत्तीबाबत आणि परमेश्वराने त्यांना ज्या कुळात जन्माला घातले होते त्याच्या उच्चतेबाबत अतिशय रोमांचकारी कल्पनांची शिकवण त्यांच्या मनात भरवून दिली जाई . त्यांचे घरगुती शिक्षक म्हणजे अगतिकांचा एक वर्ग होता. त्यांच्या विद्यार्थ्यांची संमती असल्याखेरीज कोणतीही चांगली गोष्ट करण्यास ते असमर्थ होते . त्याचप्रमाणे जनानखान्यातील स्त्रियांच्या पाठिंब्यामुळे खोजे लोकांकडून अपमान करून घेण्याचे त्यांच्या नशिबी होते . त्यांच्या शिष्यांकडून अपमान करून घेण्याचे प्रसंग त्यांच्यावर अनेकदा येत .

या सर्वांमधून एकच मार्ग त्यांच्यासमोर उरे आणि तो म्हणजे निरर्थक असलेली अशी ही नोकरी सोडून देणे अथवा स्वतःच्या अंगात भ्याड आणि दरबारातील लुच्चे लोकांमध्ये ज्या अवकळा असत त्या मुरवून घेणे हा होय. त्या काळच्या मोगल सरदार घराण्यातील मुलांना ज्या ठिकाणी आयुष्यातल्या मुक्त देवाण आणि घेवाण या तत्त्वांची शिकवण दिली जाते अशा सार्वजनिक शाळांमधील शिक्षणाचा गंध नव्हता ; अशा शाळांमध्ये स्वभाव कणखर बनतो आणि त्याच वेळी स्वभावातील वेडेवाकडे गुण नाहीसे होतात . याशिवाय शिस्तबद्ध अशा सैन्यामध्ये अधिकारी होण्याच्या दृष्टीने जे कवायती शिक्षण दिले जाते आणि हितावह अशी शिस्त शिकविली जाते त्याचाही या सरदार घराण्यातील मुलांवर संस्कार नसे . साहजिकच त्या काळामध्ये नैतिकदृष्ट्या जो अधःपात झाला त्याची गती अतिशय वेगवान होती आणि ती रोखण्यास कोणीही समर्थ ठरले नाही . या अमीरउमरावांचे बहुतेक सर्व मुलगे इतकेच नव्हे तर शहाअलम आणि कामबक्ष हे औरंगजेबाचे मुलगे सुधारणेच्या पलीकडे गेलेले होते. औरंगजेब त्यांना उपदेशाचे धडे देतादेता थकून गेला परंतु या उपदेशाचा त्यांच्यावर कसलाच परिणाम झाला नाही . अखेर अतिशय निराश होऊन औरंगजेबाने पुढीलप्रमाणे उद्‌गार काढले . "सारखे बोलून बोलून मी आता बडबड्या झालो आहे ; परंतु माझ्या शब्दांपासून तुमच्यापैकी कोणीही कसलाही अर्थबोध घेतला नाही." (**रुक्कात**, क्र. २).

समाजात बोकाळलेले दोष

स्त्री-पुरुषामधील संबंधाबाबत अनिर्बंध व बेलगाम वागणूक आणि गुप्तपणे दारू पिणे आणि जुगार खेळणे हे दुर्गुण त्या काळच्या अमीरउमरावांमध्ये प्रकर्षाने वास करीत होते . परिणामी या सरदार घराण्यांपैकी आणि मध्यम वर्गातील कुटुंबांपैकी अनेकजणांचे जीवन समलिंगी संभोगाच्या अवगुणांमुळे दूषित झालेले होते. इतकेच काय परंतु या दुर्गुणापासून त्या काळचे तथाकथित म्हणविले जाणारे साधुसंत आणि फकीर सुटले नव्हते . औरंगजेबाने घातलेले सर्व निर्बंध आणि त्याने सार्वजनिक नीतिमत्तेचे पालन केले जावे म्हणून नेमलेल्या मुद्रण नियामक अधिकाऱ्यांनी केलेली प्रयत्नांची कोशिश ही दारूच्या व्यसनापासून मोगल अमीरउमरावांना रोखून धरण्यात यशस्वी होऊ शकली नाही . समकालीन लेखकांनी लिहिलेले जे वृत्तान्त उपलब्ध आहेत त्यामध्ये आपल्याला या उमरावांच्या छांदिष्ट सुखोपभोगांचे आणि त्यांच्या तऱ्हेवाईक लहरीपणाचे अनेक नमुने वाचावयास मिळतात . (**मनूची**, भाग ४, २५४–२५५, २६२; **विल्कस् म्हैसूर**, भाग १, १३३ व १४०; **मद्रास डायरी**)

(८) तत्कालीन लोकांमधील धर्मभोळेपणा

त्या काळात समाजातील सर्व थरांतील लोक हे अतिशय मूर्खपणाच्या धर्मभोळेपणाच्या कल्पना उराशी जोंबाळून होते . श्रीमंत आणि त्याचप्रमाणे गरीब लोकांच्या जीवनातील प्रत्येक घटनेवर फलज्योतिषाचा पगडा असे. हिंदूंइतकीच मुसलमानांमध्ये देखील जुन्या अवशेषांची पूजा करण्याची पद्धती सर्वप्रमाण होती. जणू काही एखाद्या देवतेचेच निदर्शक आहे अशा आविर्भावात कट्टर स्वभावाचा औरंगजेब महमद पैगंबराच्या (असर-इ शरीफ) तथाकथित पायाच्या ठशाभोवती आणि केसाभोवती प्रदक्षिणा घालीत असे आणि या अवशेषांची पूजा करीत असे . या अवशेषांकडे पाहण्याचा औरंगजेबाचा दृष्टिकोन आणि दगडावर उमटलेल्या विष्णूच्या पदचिन्हाची हिंदूंकडून केली जाणारी पूजा यामधील भेदाभेद सांगणे अतिशय कठीण आहे. अतिशय अतिरेकाला गेलेल्या आणि खालच्या दर्जाला पोहोचलेल्या व्यक्तिपूजनाने समाजाच्या नीतीचा पूर्णपणे ऱ्हास झाला. हिंदू आणि शीख यांच्याकडून त्यांचे गुरू आणि महंत भजले जाऊ लागले. इतकेच काय परंतु या दोन पंथांतील व्यक्तींबरोबर मुसलमानदेखील साधुसंत आणि धर्माच्या

नावाने भीक मागणारे याचक यांच्या भजनी लागले आणि या लोकांनी काही तरी चमत्कार करावा आणि आपल्याला गंडे दोरे , मंत्र-तंत्र आणि जडीबुटीची औषधे द्यावीत म्हणून त्यांना आग्रह करू लागले . अशातऱ्हेच्या वस्तूंमध्ये आणि परिस नावाच्या धातूमध्ये लुच्च्या जादूगारांनी व्यापार करून अमाप पैसा जमा केला. सामान्य माणसांनी आणि त्याचप्रमाणे सरदार -दरकदारांनी अशा तऱ्हेच्या भंपक जादूगारांना आश्रय दिला. किमया हे निश्चित असे शास्त्र आहे असे त्यावेळी मानले जाई . अतिशय उच्चाधिकारावर असलेल्या आणि सुशिक्षित अशा व्यक्ती या शास्त्रामध्ये पारंगत असलेल्या अध्यापकांना आधार देत आणि उत्तेजनही देत. इतकेच नव्हे तर त्यांच्यापैकी पुष्कळजण त्यांना बादशहाकडे नेण्याचे धाडसही दाखवीत.

या विषयाची जी दुसरी आणि अतिशय काळीकुट्ट अशी बाजू होती तिचेही दाखले आपल्याला कमी प्रमाणात मिळत नाहीत. सोने आणि अमृत यांच्या हव्यासाची आपली लालसा पुरी करण्यासाठी माणसांचे बळी दिल्याच्या हकीगती तत्कालीन कागदपत्रात आपल्या वाचनात येतात . तसे पाहिले तर नरमेध हा कायद्यामध्ये गुन्हा होता आणि ज्या ज्या ठिकाणी नरमेघ केल्याचे आढळून येई तिथे अपराध्यांना कडक शिक्षा केली जाई . (**के. के.**, भाग २ , ५४२) आपल्या रोग्यांना बरे करण्यासाठी अनेक मुसलमान हकीम माणसांच्या चरबीचा उपयोग करीत . (**स्टोरिया**., भाग २ , २१०) हिंदू लोकांमध्ये जो धमभोळेपणा होता त्याचे अतिशय उत्कृष्ट उदाहरण म्हणजे हिंदू लोकांकडून मोठे बाहू असलेल्या व्यक्तीची ते हनुमान या वानर देवतेचे अवतार आहेत म्हणून केली जाणारी पूजा हे होय . समाजातील सर्व थरांच्या लोकांमध्ये हे जे अज्ञान आणि अभिमानीपणा होता त्याचा नैसर्गिक परिणाम म्हणूनच की काय त्यांना सर्व परकीयांबद्दल तिरस्कार वाटत असे. तोफा ओतणाऱ्या, गोलंदाजीत प्रवीण असलेल्या आणि वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या काही युरोपियन लोकांना समाजातील श्रीमंत लोकांनी आधार दिला होता , ही गोष्ट जरी खरी असली तरी या गोष्टीला मुख्य कारण म्हणजे युरोपियन लोकांमध्ये जे वरच्या दर्जाचे कसब होते ते त्यांनी स्वतःच्या डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहिलेले होते . युरोपियन लोकांची चैनीची जी साधने होती ती मोठ्या उत्कंठेने विकत घेतली जात. परंतु एकाही हिंदुस्थानी अमीराकडून अथवा विद्वानाकडून मात्र युरोपीय भाषा , कला अथवा लष्करी पद्धती शिकून घेण्याचा कोणताही प्रयत्न झाला नाही. [मोगल दरबारामध्ये जे युरोपियन भेटीसाठी येत त्यांच्यासाठी दुभाषांचे काम आर्मेनियन अथवा फारसी भाषा जाणणाऱ्या युरोपियन लोकांकडून केले जाई . औरंगजेबाच्या पत्रसंग्रहात फक्त एकाच मुसलमानाचा (मोतमदखान) उल्लेख इंग्रजी भाषा जाणणारा असा येतो . गोव्याच्या मुलखांतले काही पोर्तुगीज भाषा जाणणारे शेणवी ब्राह्मण मुंबई येथील इंग्रजांसाठी मराठी कागदपत्राचे पोर्तुगीज भाषेत भाषान्तर करीत . मद्रास येथील इंग्लिश आणि फ्रेंच वखारीत ब्राह्मण दुभाषांची नेमणूक केली जात असे. या दुभाषांना त्यांच्या धन्याच्या भाषेशिवाय मूर म्हणजे फारसी भाषाही येत असे.]

त्या काळामध्ये गुलामांचा सुकाळ झाला होता. याचा परिणाम असा झाला की भारतीय समाजातील नैतिक आणि बौद्धिक मूल्यांची धारणा ही अतिशय खालच्या दर्जाला जाऊन पोहोचली . युद्धामध्ये कैदी झालेले युद्धकैदी आणि रसातळाला पोहोचल्यामुळे गुलाम झालेल्या कुटुंबातील माणसे यांच्याशिवाय आईबाप दुष्काळाच्या काळात पैसा मिळविण्यासाठी अथवा कर्जाच्या फेडीसाठी म्हणून आपल्या घरातील स्त्री-पुरुषांना विकत. साहजिकच गुलामांच्या संख्येत भर पडे. कर्जाची फेड ज्या ऋणकोला करता येत नसे त्याला त्याच्या कुटुंबियांसहीत त्याच्या धनकोने मागणी केल्यास विकले जाई . हिंदू आणि त्याचप्रमाणे मुसलमान यांच्यामध्ये फार पुरातन कालापासून चालत आलेली आणि कायद्याने मान्य केलेली ही पद्धती होती. काही विशिष्ट प्रकारचा गुन्हा करणाऱ्या गुन्हेगारांना शिक्षा करण्याचा एक प्रकार म्हणजे त्यांना गुलाम बनविणे आणि त्यांची सार्वजनिकरीत्या विक्री करणे हा होता . पेशव्यांच्या रोजनिशीमध्ये अशा वर्गाच्या स्त्री - गुलामांची विक्री झाल्याचा उल्लेख आहे . १९ व्या शतकाच्या पहिल्या पंचवीस वर्षांत ब्रिटिशांच्या ताब्यातील पुर्निया जिल्ह्यात या गुलामगिरीच्या पद्धतीचे अवशेष शिल्लक राहिलेले आपल्याला आढळतात . (पाहा: **मार्टिन याचे ईस्टर्न इंडिया**) पुष्कळदा लोक आपल्या मुलांना खच्ची करीत आणि त्यांना विकत . जरी

अतिशय कणखरपणे औरंगजेबाने या गुन्ह्याचा धिःकार केला होता तरीदेखील ओरिसा आणि सिलहट या प्रांतांची या गुन्ह्याबद्दल कुप्रसिद्धी होती.

(९) सरकारी अधिकाऱ्यांमधील लाचखाऊपणा; अधिकारी जगातील जीवन आणि नीतिमत्ता

सुशिक्षित मध्यम वर्गात मूठभर वैद्यकीचा व्यवसाय करणारे आणि भिक्षुकीच्या धंद्यातील उच्च वर्णीय कुटुंबे सोडल्यास संपूर्णतया अधिकारी लोकांचाच भरणा होता . व्यापारी आणि जमीनदारांचा छोटासा वर्ग यांच्यामध्ये अनेकजण असे होते की संपत्तीच्या दृष्टीने पाहता ते मध्यम वर्गातच मोडले गेले असते . परंतु शिक्षणामध्ये त्यांची मध्यम वर्गाशी बरोबरी होऊ शकली नसती . त्याचप्रमाणे या वर्गाने मध्यम वर्गासारखी वाङ्मयाबद्दलही कधी आस्था दाखविलेली नव्हती . मोगलकालीन मुलकी आणि लष्करी कारभार हा मोठ्या संख्येने असलेल्या कारकून आणि हिशेबनीस यांच्याच केवळ मदतीने चालविणे शक्य होते . १७ व्या शतकातील ईस्ट इंडिया कंपनीच्या वखारीतील लेखनिकांइतकाच त्यांचा अधिकृत पगार हा अतिशय कमी होता.

इंग्लंडमधील ट्युडर आणि स्टुअर्ट घराण्यातील काळामध्ये सरकार दरबारी आपले काम करून घेण्यासाठी कोणत्याही माणसाला अधिकृत चिरीमिरी अथवा बक्षिसी जबरीने देण्यास लावण्याची पद्धत जितकी सार्वत्रिक आणि सर्वमान्य अशी होती तितकीच ती मोगल काळातही होती . त्याशिवाय वरच्या दर्जापासून तो खालच्या दर्जापर्यंतचे सर्व अधिकारी अनावश्यक असलेली मेहेरबानी दाखविण्यासाठी किंवा खऱ्या न्यायाचा मार्ग सोडून आडमार्गाने जाण्यासाठी लाच घेत . इतके असले तरीदेखील सर्वसाधारण समाजामध्ये अधिकाऱ्यांमधील लाचलुचपत ही अनैतिक मानली जाई आणि म्हणूनच असे लाचलुचपतीचे प्रकार अतिशय गुप्तपणे केले जात . औरंगजेबाच्या कारकिर्दीत देखील असे अनेक अधिकारी होते की लाचलुचपत घेण्याच्या प्रकाराचा त्यांना संपर्कही झालेला नव्हता . (**के. के.**, भाग २, २६१, ३७४-३८२) परंतु उच्च पदावर असलेल्या व्यक्तींनी बक्षिसी घेणे इतकेच नव्हे तर तिची जबरदस्ती करणे ही गोष्ट सर्वमान्य मानली जाई आणि जाहीररीत्या अशा गोष्टीची कबुली दिली जात असे . [नूरजहानचा बाप हा जेव्हा जहांगीरच्या कारकिर्दीत मुख्य वजीर होता तेव्हा निर्लज्जपणे तो बक्षिशीची मागणी करी . त्याचप्रमाणे औरंगजेबाच्या कारकिर्दीच्या पूर्वार्धात वजिराच्या अधिकारावर असलेला जाफरखान हा देखील बाक्षिशी मागण्यात पटाईत होता . दक्षिणेमधील लढाईची सुत्रे आपल्याकडे ठेवावी म्हणून औरंगजेबाचे मन वळविण्याकरिता जयसिंगाने ३० हजारांची थैली वजिराला देऊ केली होती . अगदी क्षुल्लक अशी अधिकाराची जागा मिळविण्यासाठी अगर कायम राखण्यासाठी दरबारामधील प्रत्येक व्यक्तीला जी लाच द्यावी लागे त्याबद्दल सुप्रसिद्ध इतिहासकार भीमसेन सक्सेना याने आपल्याला वाटणारा तिरस्कार व्यक्त केला आहे . भरपूर लाच घेऊन काजी लोकांनी अमाप पैसा मिळविला . यामध्ये अतिशय कुप्रसिद्ध असलेला काजी म्हणजे अब्बदुल वहाब हा होता . अशा तऱ्हेने पैसा मिळविणाऱ्या अधिकाऱ्यांचा आणखी एक वर्ग म्हणजे सद्र हा होय .] प्रत्यक्ष बादशहादेखील या गोष्टींपासून मुक्त नव्हता . आपल्याला मोठी पदवी मिळावी अशी आकांक्षा बाळगणाऱ्या एका उमेदवाराला औरंगजेब असे म्हणाला की , "तुझ्या बापाने आपल्या पदवीला अलीफ हा शब्द लावण्यासाठी आणि आपल्याला अमीरखान हा किताब मिळविण्यासाठी शहाजहान बादशहाला एक लक्ष रुपये दिले. अशा परिस्थितीत तुला मी जी पदवी देत आहे त्यासाठी तू मला काय देशील ?" (**एम्. ए.**, ४८९).

त्या काळी मंत्री आणि दरबारामध्ये वजन बाळगून असलेल्या व्यक्तींना बादशहाबरोबर खाजगीमध्ये संभाषण करण्याची संधी मिळत असे . या संधीचा ते आपले काम व्हावे या हेतूने आपल्या अर्जदारासंबंधी बादशहाजवळ त्याचे काम व्हावे म्हणून काहीतरी बोलत असत आणि अशा तऱ्हेने भरपूर पैसा आपल्या पदरात पाडून घेत. याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे बादशहाच्या खाजगी दिमतीला असताना २ ½ वर्षांच्या कालावधीत काबीलखानाने जवळजवळ बारा लक्ष रुपयांची रोख रक्कम जमा केली . (**एम्. ए.**, १९१)

अनुक्रमणिका

त्याशिवाय इतर अनेक मौल्यवान वस्तू आणि एक नवे घर त्याने स्वतःसाठी मिळविले ते वेगळेच . बादशहाच्या खाजगीतील अधिकाऱ्यांना द्रव्य आणि देणग्या देऊन विकत घेतले जाई आणि त्यांना अशा वस्तूंची लाच दिली जाई . याची कारणे मात्र अनेक असत . पुष्कळवेळा या व्यक्तींनी दरबारातील अधिकऱ्यांना दिलेले संरक्षण काढून घ्यावे अथवा अशा व्यक्तींच्या अंगातील असलेल्या उणिवा झाकून टाकाव्या, किंवा त्यांच्यावतीने बादशहाजवळ रदबदली करावी आणि त्यांच्या गैरहजेरीत दरबारातील त्यांच्या हितसंबंधावर सर्वसाधारणपणे नजर ठेवावी म्हणून अशा तऱ्हेची लाच दिली जाई . अशा तऱ्हेच्या दडपणाचे प्रकार बादशहापासून ते थेट शेतकऱ्यांपर्यंत चालत असत . समाजातील प्रत्येक गट आपल्या खालील गटापासून त्या गटाला त्याच्या वरच्या गटातील लोकांना जी बक्षिसी द्यावी लागे ती उकळून घेण्याचा प्रयत्न करीत असे या जबरदस्तीच्या प्रकारातले अखेरचे भक्ष्य म्हणजे जमीन कसणारा शेतकरी आणि व्यापारी वर्ग हे होते.

दुय्यम दर्जाचा अधिकारी वर्ग, त्यांचे जीवन व चारित्र्य

दरबारातील कायस्थ आणि खत्री जमातीच्या कारकुनांमध्ये मद्यसेवनाची सवय फार मोठ्या प्रमाणावर होती. तितकीच ती लष्करातील रजपुत शिपायांमध्येही होती . कुराणातील कायद्याप्रमाणे दारू पिण्याला प्रतिबंध होता. तरी देखील लष्करी आणि मुलकी अधिकारावर असलेले मुसलमान उमराव आणि अधिकारी दारूच्या व्यसनाधीन होते . विशेषतः तुर्की लोक दारू पिण्याबद्दल कुप्रसिद्ध होते . स्थानिक अधिकारी वर्गाला त्यांच्या घरादारापासून फार दूर अंतरावर कामासाठी जावे लागत असल्यामुळे ते कामाच्याच ठिकाणी तेथील धंदेवाईक स्त्रियांना आपल्या छोट्याशा जनानखान्यात बाळगीत . १९ व्या शतकात रेल्वेच्या झालेल्या प्रगतीमुळे अंतराचा प्रश्न नाहीसा झाला . त्याचप्रमाणे इंग्रज राजवटीतील शिक्षण आणि धार्मिक ईश्वरवादी चळवळीमुळे ज्या नैतिक सुधारणा झाल्या त्यांनीच वरील प्रकारचा जो सार्वजनिक अधःपात झाला होता त्याला पायबंद घातला . हिंदू आणि मुसलमान या दोघांचा जो एक कारकूनी वर्ग होता त्यांच्यामध्ये त्यांना करावी लागणारी कामे आणि त्यांचे हितसंबंध , शिक्षण आणि ध्येये , त्यांचे सामाजिक जीवन इतकेच काय परंतु दुर्गुण यांच्यामधील समानता यामुळे त्यांच्यामध्ये एक तऱ्हेच्या बंधुत्वाचे नाते निर्माण झालेले होते . अधिकाऱ्यांचे एक स्वतंत्र असे जग निर्माण झालेले होते . या आपल्या जगात प्रवेश करणाऱ्याबाबत त्यांच्या मनात अतिशय तीव्र अशा द्वेषाची आणि तिरस्काराची भावना होती . अधिकाराच्या ज्या काही जागा होत्या त्या कारकून हिशेब -तपासनीस यांच्या जुन्या घराण्यातील व्यक्तींसाठी राखून ठेवल्या जाव्यात अशी अपेक्षा असे . एखादा राज्याचा अधिकारी त्या अधिकारावर वंशपरंपरागत तत्त्वाच्या जोरावर आला नसून जर का त्याची नियुक्ती सर्वसामान्य दर्जाच्या माणसामधून झाली असेल तर अधोगतीला जाणाऱ्या रोमन प्रजासत्ताकातील आधकारी जगातल्या Novum homo प्रमाणे त्याचा तिरस्कार केला जाई. साम्राज्यातील उच्च अधिकारावर असलेल्या अमीरउमरावांपासून अगदी खालच्या दर्जापर्यंत असलेल्या कारकुनापर्यंत अशा तऱ्हेचा दृष्टिकोन सर्वत्र होता.

(१०) सर्वसामान्य लोकांच्या जीवनातील पवित्रता आणि निर्भेळ आनंद

वर वर्णन केलेले मोगलकालीन हिंदुस्थानातील समाजजीवनाचे चित्र दिसावयाला अतिशय भयानक वाटते. परंतु जर का आपण या समाजजीवनाची दुसरी काही अंगे विचारात घेतली नाहीत तर हे चित्र अपुरे आणि म्हणून सत्य परिस्थिती न सांगणारे असे मानावे लागेल . हिंदुस्थानामधील लक्षावधी लोकांचे घरगुती जीवन हे अतिशय पवित्र होते , आणि त्यामध्ये दैनंदिन जीवनामधील आमोद आणि आनंद

यांची उणीव नव्हती हे मान्य करणे आपल्याला भाग पडेल . रोमन साम्राज्याच्या अखेरच्या काळात तेथील समाजाची जी अधोगती झाली होती त्यामुळे ते साम्राज्य विनाशाच्या खाईकडे खेचले गेले . परंतु भारतीय लोकांच्या जीवनामध्ये वर उल्लेखिलेली ही जी शुचिता होती तिनेच या नाशाच्या खाईपासून त्यांचा बचाव केला. त्या काळातील लोकांच्या तोंडी असलेली अनेक गाणी , पोवाडे आणि गोष्टी आपल्याजवळ आज उपलब्ध आहेत. आपल्याला असे दिसून येईल की या लोकगीतांनी दुःखाने भारावलेल्या मानवी मनाला शांतता दिली , धीर गंभीर असा संयम शिकविला आणि अशिक्षितपणामुळे कणखर बनलेल्या हृदयात मानवतेचे पाझर निर्माण केले . आजच्या हिंदुस्थानातील बहुसंख्य हिंदी भाषा बोलणाऱ्या प्रांतातील प्रत्येक हिंदू माणसाच्या घरात ज्याचे पठण केले जाते आणि खूप मोठी लोकसंख्या असलेल्या मोठमोठ्या शहरात दर वर्षी ज्याचे प्रयोग मोठ्या आवडीने केले जातात ते महाकवी तुळशीदासाचे महाकाव्य जे रामायण , त्या रामायणाने त्या काळच्या हिंदुस्थानातील लक्षावधी लोकांची मने आपल्या कर्तव्याबद्दलचे प्रेम , पौरुषत्व आणि स्वार्थत्यागाची प्रेरणाशक्ती यांनी भरून टाकले आणि त्यांना त्यांच्या सामाजिक आणि खाजगी जीवनात शहाणपणाचे धडे शिकविले.

बंगाल, तिरहुत, ओरिसा, आसाम, आणि काही इतर भागांत यापूर्वी अतिशय उत्तम परंतु मर्दानी अशी तांत्रिक पूजेअर्चेची आणि प्राणिपूजेची पद्धती रूढ होती . परंतु शंकर देव आणि चैतन्य यांनी तेथील लोकांना जो वैष्णववाद शिकवला त्याने या पद्धतीतील तीव्रता कमी केली आणि अतिशय विलक्षण अशी सौम्यता आणि कळकळ तेथील लोकांच्या मनामध्ये निर्माण केली . १७ वे शतक म्हणजे या नव्या वैष्णववादाच्या विस्ताराचे एक अतिशय मोठे असे कालखंड होते . ख्रिश्चन धर्मातील चळवळीच्या पुनरुत्थापनाच्या काळात ज्याप्रमाणे अतिशय कळकळीची अशी वैयक्तिक निष्ठा दिसून आली ती या काळात प्रामुख्याने होती. त्याचप्रमाणे लहान मुले आणि अपंग अशांबद्दल ममता , संस्कृत आणि त्याकालीन लोकांची असलेली बोलभाषा यामध्ये निर्माण झालेले उदंड साहित्य आणि समाजातील सर्व थरांच्या दैनंदिन जीवनात गायन आणि नाच आणि त्याचप्रमाणे अतिशय कोमल अशा अद्भूत रम्य भावनेचा नव्याने झालेला विकास या गोष्टी म्हणजे १७ व्या शतकाचा एक विशेष असे मानावे लागेल . त्याचप्रमाणे १७ व्या शतकातील या वैष्णववादाने समाजातील निरनिराळ्या थरांत जे अंतर होते ते नाहीसे केले आणि त्याचप्रमाणे या वैष्णववादाने अध्यात्मिक जीवनात समानतेच्या तत्त्वाची स्थापना केली . लोकमान्य अशा धार्मिक वाङ्मयाव्यतिरिक्त हिंदुस्थानच्या अनेक भागांत बहुजन समाजाने लोकगीतांची आपल्या जवळ मिळवणी जुळवणी केली होती याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे पंजाबमधील रांझा आणि हिर याचे गुणगान करणारे काव्य हे होय . हे काव्य अगदी हृदयाला जाऊन भिडत असे आणि दैनंदिन जीवनात त्यांना दडपून टाकणाऱ्या अशा अतिरिक्त श्रमांचे आणि राजकीय हुकूमशाहीचे जे भयानक जोखड त्यांच्या मानेवर बसले होते त्यांतून काही काळ तरी मुक्त करून हे काव्य आनंदाचा आस्वाद त्यांना देत असे . दक्षिण आणि त्याचप्रमाणे उत्तरेकडे हिंदुस्थानच्या सर्वदूर भागात धर्मोपदेश , व्याख्याने आणि वाङ्मय यांची जागा सगळीकडे लोकप्रिय असलेल्या कीर्तनाने घेतली . ह्या कीर्तनाचे स्वरूप म्हणजे धार्मिक गोष्टींचे काव्याच्या रूपात सामूहिक गायन असे होते . हे कीर्तन चालू असताना त्यामध्ये अधूनमधून गाण्याचाही समावेश होई . त्या काळच्या हिंदी भाषिक मुसलमानांना वगळल्यास इतर मुसलमानांसाठी सर्वसाधारण जनतेला समजू शकेल असे मातृभाषेतील धार्मिक काव्य नव्हते . परंतु निरनिराळ्या फकिरांच्या कबरी ज्या ठिकाणी होत्या तेथे ते वार्षिक ऊरुस भरवीत . दूरदूरच्या अंतरावरून यात्रेकरू हजारोंच्या संख्येने या उरुसांसाठी हजर राहात. याप्रसंगी मोठी जत्रा भरत असे आणि सर्व धर्मांचे स्त्री आणि पुरुष या यात्रांकडे आकृष्ट होत . त्याचप्रमाणे मोठमोठ्या शहरात राहणारी स्त्रीपुरुष मंडळी वरील यात्रांशिवाय उपनगरात असलेल्या फकिरांच्या कबरी भोवताली असलेल्या बागबगीच्यात साप्ताहिक सहलीसाठी जात असत . अशा संधीचा

उपयोग धर्मासंबंधी आत्मीयता दाखविण्याच्या ऐवजी मौजमजा करण्यासाठी केला जाई . याचा परिणाम असा झाला की सर्वत्र अनीती बोकाळली . यावर उपाय म्हणून औरंगजेबाने त्याच्यापूर्वी होऊन गेलेल्या फिरोजशहा तुघलगाप्रमाणे वरील प्रथा बंद करण्यासंबंधीचे हुकूम काढले . परंतु ही प्रथा इतकी लोकप्रिय होती की तिचा बिमोड होऊ शकला नाही . (**स्टोरिया**, भाग ४ . २०५) याचे कारण हिंदुस्थानातील खेड्यांमधील लोकांच्या जीवनातील एकमेव आनंद म्हणजे अधूनमधून भरणाऱ्या या जत्रांना भेट देणे यांत होता. अशा यात्रेला जाण्यासाठी अगर वरील जत्रांना भेट देण्यासाठी स्त्री आणि पुरुष ही अतिशय उत्कंठित असत. अजमेर, कुलबर्गा, निजामउद्दीनअवलिया आणि बुरहाणपूर ही मुसलमानांची तर मथुरा , अलाहाबाद, बनारस, नाशिक, मदुरा आणि तंजावर ही हिंदूंची यात्रांची प्रमुख ठिकाणे होती . अशी ठिकाणे म्हणजे संस्कृतीचा फैलाव करणारी आणि बौद्धिक क्षितिजाचा संकुचितपणा आणि प्रांतिक वेगळेपणाची वृत्ती मोडून काढणारी केंद्रस्थाने होती असेच म्हणावे लागेल.

(११) औरंगजेबाचे स्वभावचित्र

मध्ययुगीन जगात आणि विशेषतः त्यातल्या त्यात हिंदुस्थानात लोकांच्या सुखाबाबतची जबाबदारी राजावर आहे असे मानले जाई आणि त्याला कारणही तसेच होते . कारण राजा हा परमेश्वराचा पृथ्वीवरील प्रतिनिधी होता. त्याच्याकडे अमर्याद आणि अनिर्बंध असे अधिकार बहाल केलेले असत आणि देशातील जमिनीच्या मालमत्तेबाबतचे सर्व अधिकार त्याच्या आधीन असत , असे मानले जाई . साहजिकच जेव्हा औरंगजेबाच्या कारर्किदीच्या अखेरीला सर्वच गोष्टींबाबत फासे उलटे पडू लागले तेव्हा सार्वजनिक शांतता आणि साम्राज्य यांच्या नाशांची कारणमीमांसा शोधून काढण्यासाठी समकालीन इतिहासकार हे औरंगजेबाच्या स्वभावाची विचक्षणा करण्याच्या पाठी लागले . (**दिल.**, भाग २ , १६६ ब ; **कॅरॅक्टर स्केच** , १५९ अ—१६० ब; भाग १, **के. के.**, भाग २. ५५०; **ए. एन.**, १०७०—१०९६; **एम. ए.**, ५२५—५३३).

औरंगजेबाच्या अंगात विलक्षण असे शौर्य वास करीत होते . औरंगजेबाच्या नालायक अशा पंतवंडांच्या काळापर्यंत तैमूरलंगाच्या घराण्यातील सर्व व्यक्तींच्या अंगी वयक्तिक शूरपणा होता . परंतु औरंगजेबाच्या अंगी या गुणांबरोबर स्वभावातील थंडपणा आणि मतलबी व स्वार्थी वृत्ती यांचा मिलाफ झालेला होता. अशा तऱ्हेचा स्वभाव म्हणजे उत्तर युरोपातील जमातींच्या स्वभावाचे खास विशेष असतो , अशी शिकवण आपल्याला देण्यात आली आहे . त्याच्या अंगी जे असामान्य धारिष्ट होते त्याचा भरपूर पुरावा त्याने आपल्या वयाच्या १५ व्या वर्षांपासून , की जेव्हा त्याने कोणीही बरोबर नसताना एका चवताळलेल्या हत्तीशी सामना दिला , तो त्याच्या वयाच्या ८७ व्या वर्षांपर्यंत की ज्यावर्षी वाकिणखेडा किल्ल्याला जेव्हा मोगलांनी वेढा दिला तेव्हा वेढ्याच्या मोर्चात ठाण देऊन उभा राहीपर्यंत दिलेला आहे . त्याचा त्याच्या स्वभावावर असलेला विलक्षण संयम , अतिशय भयानक अशा संकटात सापडल्यावर देखील उत्तेजनपर शब्द बोलण्याची त्याला साधलेली किमया आणि धर्मत आणि खाजवा येथे मृत्यूशी त्याने बेदरकारपणे दिलेली झुंज या गोष्टी हिंदुस्थानच्या इतिहासात अतिशय मानाचे स्थान औरंगजेबाला देऊन गेल्या आहेत.

औरंगजेबाची विद्वत्ता आणि चतुरस्त्र तयारी

औरंगजेबाच्या अंगी अतिशय असामान्य असे धारिष्ट आणि धीमेपणा होता . त्याशिवाय त्याने आपल्या जीवनाचे ध्येय म्हणून अतिशय संकटांनी भरलेले आणि संकटमय असे राजेपण स्वीकारले होते . इतकेच नव्हे आत्मविश्वास , आत्मज्ञान आणि आत्मसंयम हे गुण आपल्या अंगी बाणवून त्याने

सार्वभौमपदाला लायक होण्यासाठी स्वतःची तयारी केली होती . शहाजहान बादशहाच्या इतर मुलांशी तुलना करताना औरंगजेब हा बहुश्रुत आणि तोलूनमापून बोलणारा विद्वान होता . त्याने आपल्या आयुष्याची अखेर होईपर्यंत पुस्तकांविषयी आपले प्रेम कायम ठेवले होते . औरंगजेबाने आपल्या स्वतःच्या हाताने कुराणाच्या अनेक प्रती लिहून काढल्या ही गोष्ट म्हणजे जरी आपण एखाद्या अतिउत्साही माणसाने घेतलेले यांत्रिक श्रम असे मानले तरीदेखील आपल्याला ही गोष्ट विसरता येणार नाही की औरंगजेबासारख्या कामात गुंतलेल्या बादशहाच्या वाट्याला अतिशय थोडे असे विश्रामाचे क्षण येत आणि त्यातील काही काळ तो न्यायतत्त्वशास्त्र आणि धर्मशास्त्र यांवरील अरबी भाषेतील पुस्तके वाचण्यात व एखाद्या निरुद्योगी पुस्तकांच्या शौकिनांच्या विकारवशतेने **नेहय्या, अहिया उल्उलूम** आणि **दिवाण-ई-सैब** यांसारख्या पुस्तकांची अतिशय दुर्मिळ अशी हस्तलिखिते धुंडाळण्यात मोठ्या आवडीने घालवीत असे . त्याचा अफाट पत्रव्यवहार बघितल्यानंतर फारशी काव्य आणि अरबी भाषेतील धार्मिक वाङ्मय यावरील त्याचे असामान्य प्रभुत्व सिद्ध होते कारण त्याने लिहिलेले प्रत्येक पत्र सजविण्यासाठी त्याची लेखणी योग्य असे , उतारे देण्यास नेहमी सज्ज असे . अरबी आणि फारशी या भाषांव्यतिरिक्त औरंगजेब तुर्की आणि हिंदी या भाषा अस्खलितपणे बोलत असे . त्याने घेतलेल्या पुढाकारामुळे आणि दिलेल्या राजाश्रयामुळे मुसलमानी कायद्यावर हिंदुस्थानमध्ये तयार झालेला अतिशय महत्त्वाचा असा सारग्रंथ आपल्याला उपलब्ध आहे . या ग्रंथाचे नाव **फतवा-ई-आलमगिरी** हे अतिशय यथार्थ आहे . याच्यामुळे हिंदुस्थानामध्ये मुसलमानी न्यायशास्त्र अतिशय सोप्या भाषेत आणि निश्चित अर्थाचे असे तयार झाले . (**ए. एन्**., १०८६– ८७; **एम्. ए**., ५३०)

पुस्तकांचा अभ्यास करण्याव्यतिरिक्त औरंगजेबाने लहानपणापासूनच आपले बोलणे आणि कृती आणि त्याचप्रमाणे दुसऱ्याबरोबर युक्तीबाजपणे वागण्याची कला यावरील संयम आत्मसात केला होता . राजपुत्र असल्यापासून त्याने दाखविलेले व्यवहारचातुर्य , शहाणपणा आणि विनम्रता या गुणांनी त्याने आपल्या बापाच्या दरबारातील अतिशय श्रेष्ठ अशा अमिरांना आपलेसे केले होते . इतकेच नव्हे तर सिंहासनावर आल्यानंतर देखील त्याच्या अंगी हे गुण अशा काही प्रकर्षाने प्रकट झाले की त्याच्या राज्यांतील नागरिकाच्या अंगी देखील हे गुण असामान्य असे वाटले असते . साहजिकच त्याच्या समकालिनांनी त्याचे वर्णन "बादशाही पोषाखात वावरणारा एक दरवेश ," असे केले यात काहीच आश्चर्य नाही. (**एम्. ए.**, ३३४).

औरंगजेबाचा उद्योगीपणा, नैतिक शुचिता आणि राहणीचा साधेपणा

त्याचे खाजगी जीवन —म्हणजे पोषाख, अन्न आणि करमणूक — हे अतिशय साधे होते . परंतु त्यांत एक प्रकारचा नेटकेपणा होता . कोणत्याही दुर्गुणांची बाधा त्याला झालेली नव्हती . इतकेच काय तर निरुद्योगी श्रीमंतांची वरवर निरागस वाटणारी जी करमणुकीची साधने होती त्यांच्यापासूनही तो अलिप्त होता. कुराणाप्रमाणे मुसलमानाला चार [औरंगजेबाची बेगम दिलरस बानू ही १६५७ मध्ये मरण पावली . नवाबबाई हिने १६६० नंतर दिल्ली येथे हद्दपारीमध्ये आपले उर्वरित आयुष्य घालविले . औरंगाबादी बेगम ही १६८५ मध्ये तिचा मृत्यू होईपर्यंत त्याच्याजवळच राहात होती असे दिसते. राहता राहिली उदयपुरी बेगम . तिच्याबरोबर त्याचा विवाह १६६० मध्ये झाला . औरंगाबादी बेगमच्या मृत्यूनंतर त्याच्या कारकिर्दीच्या उत्तरार्धात उदयपुरी हीच त्याची एकमेव सोबतीण होती .] बायका करता येतात. परंतु त्याच्या विवाहित स्त्रियांची संख्या ही तितकीदेखील नव्हती. त्याच्या विवाहित स्त्रियांबरोबर त्याचे वर्तन अतिशय कटाक्षाने विश्वासाचे होते . ज्या मिष्टान्नाच्या सेवनात त्याला विशेष स्वाद वाटे , ते म्हणजे कॉरिडू नावाचे आंबट फळ आणि खारडाली नावाचा एक तऱ्हेचा चघळण्याचा पदार्थ . बादशहाची ही आवड पाहिल्यानंतर वाचक हा स्मित हास्य करण्यास शिकेल . राज्यकारभार करण्यात अपार कष्ट घेण्याची त्याची जी तयारी असे ती अतिशय

आश्चर्यकारक होती. दररोज आणि कधीकधी दिवसांतून दोनदा तो नियमितपणे दरबार भरवी . बुधवारी तो खटल्याचे निकाल देई. त्याशिवाय पत्रे आणि अर्ज यांवर तो आपल्या हाताने आज्ञा लिही व सरकार दरबारी येणाऱ्या पत्रांची उत्तरे तो स्वतःच्या भाषेत लिहून घेण्यास सांगे . नागरिकांच्या समोर बादशहा जो दरबार भरवी त्याचे वर्णन गेमेली कॅरेरी या इटालियन शरीरशास्त्रज्ञाने पुढीलप्रमाणे केले आहे (२१ मार्च १६९५) "तो उंचीने ठेंगणा असा होता , त्याचे नाक मोठे होते , चणीने तो बारीक होता आणि वयामुळे तो वाकलेला होता. त्याच्या कातडीचा रंग हा तपकिरी हिरवा असा होता आणि त्यामुळे त्याची पांढरी शुभ्र अशी दाढी अधिकच उठावदार दिसे..... त्याच्याकडे कामा निमित्ताने येणाऱ्यांचे अर्ज तो चष्म्याशिवाय पाहून त्यावर स्वतःच्या हाताने शेरे मारी . ते पाहून मला त्याचे अतिशय कौतुक वाटे , त्याच्या चेहऱ्यावर जे स्मित हास्य पसरलेले असे त्यावरून आणि त्याच्या हसऱ्या चेहऱ्यावरून तो आपल्या या कामावर अतिशय खूष होता , असे वाटते." (**चर्चिलस् व्हॉएजेस**, भाग ४, २२२)

मुसलमान इतिहासकारांनी औरंगजेबाविषयी लिहिताना असे लिहिले आहे की जरी त्याचा मृत्यू त्याच्या वयाच्या ९० व्या वर्षी झाला, तरी त्याच्या आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत त्याचा त्याच्या मनावरील ताबा कायम होता आणि त्याचे मनःसामर्थ्य कायम होते . त्याची स्मरणशक्ती अतिशय आश्चर्यकारक होती : "एकदा पाहिलेला चेहरा किंवा एकदा ऐकलेला शब्द तो कधीही विसरत नसे ." त्याच्या अखेरीपर्यंत त्याच्या शरीराच्या सर्व अवयवांमध्ये पहिल्या इतकाच जोम होता. याला अपवाद म्हणजे वार्धक्यामुळे त्याच्या कानात जो बहिरेपणा आला होता तो आणि दुसरे म्हणजे उजव्या पायाने तो थोडासा लंगडत असे हा . त्याच्यामधील दुसरा दोष म्हणजे त्याच्या उजव्या पायाचा सांधा एकदा चुकून निखळला होता , त्याच्यावर त्याच्या हकिमाने जी चुकीची उपाययोजना केली त्यामुळे होय.

(१२) औरंगजेबाच्या बोकांडीस बसलेले सत्तेच्या केंद्रीकरणाच्या पापाचे भूत आणि या गोष्टीचे राज्यकारभारावर झालेले अनर्थावह परिणाम

परंतु साऱ्या आयुष्यभर औरंगजेबाने स्वतः सिद्ध होण्याचे केलेले हे प्रयत्न आणि त्याने अंगात बाणवलेले अफाट सामर्थ्य या दोन्ही गोष्टी एका अर्थाने त्याच्या नाशास कारणीभूत ठरल्या आणि याला कारण म्हणजे या गोष्टींनी साहजिकपणे त्याच्या मनात आत्मविश्वास आणि दुसऱ्याबद्दल अविश्वास या भावना निर्माण केल्या . इतकेच नव्हे तर त्याच्या कल्पनेप्रमाणे प्रत्येक गोष्ट उच्च कोटीच्या पूर्णतावस्थेला पोहोचली गेली आहे, हे पाहण्याचा त्याच्या मनामध्ये एक तऱ्हेचा असीम असा हव्यास निर्माण झाला . याचा परिणाम असा झाला की राज्यकारभार आणि लढाया यांच्या प्रत्येक अंगोपांगाबाबत जातीने हुकूम देण्याची आणि देखरेख करण्याची तीव्र इच्छा त्याच्या मनात निर्माण झाली . राज्याच्या मुख्य पदावर असलेल्या व्यक्तींकडून राज्यकारभारामध्ये होणाऱ्या या वाजवीपेक्षा जास्त हस्तक्षेपामुळे त्याचे सुभेदार , सेनापती आणि अतिशय दूरच्या जिल्ह्यामध्ये असलेले अधिकारी हे कायमचे जणू काही त्याच्या पालकत्वाखाली असल्यासारखे राहिले. याचा परिणाम असा झाला की त्यांच्यामधील जबाबदारीच्या जाणिवेचा पूर्णपणे नाश झाला. स्वयंकर्तृत्व आणि बदलत्या परिस्थितीबरोबर झपाट्याने सामावून घेण्याची कुवत या गोष्टींचा विकास त्यांच्या मनामध्ये निर्माण होणे अशक्य झाले . त्यांची स्थिती राजधानीमधून जणू काही हुकूमरूपी दोरी खेचल्यावर धन्याच्या तालावर पावले टाकणाऱ्या आणि त्याच्या आज्ञेप्रमाणे कृती करणाऱ्या निर्जीव बाहुल्यांप्रमाणे मरगळून गेल्यासारखी झाली. हिंदुस्थानासारख्या अतिशय विशाल आणि विभिन्न स्वरूपाच्या साम्राज्यामध्ये राज्यकारभारात अधोगती घडवून आणण्यासाठी याच्यापेक्षा अधिक खात्रीच्या अशा दुसऱ्या साधनाची जरुरी नव्हती . अतिशय हिम्मतवान , अत्यंत बुद्धिमान आणि उत्साही असे जे अधिकारी होते ,

त्यांना वारंवार बंधने घातली गेल्यामुळे आणि त्यांच्या उत्साहावर नेहमी विरजण घातले गेल्यामुळे उदासीन अशा अकार्यक्षमतेत जाणूनबुजून लोटल्यासारखी त्यांची परिस्थिती झाली . वयोवृद्ध असे अमीरउमराव मरण पावल्यामुळे औरंगजेबाच्या मंत्रिमंडळातून स्पष्ट वक्ते व जबाबदार सल्लागार नाहीसे झाले आणि टिलसिटची परमावधी झाल्यानंतर पहिल्या नेपोलियनची जी अवस्था झाली तीच औरंगजेबाची त्याच्या अखेरच्या आयुष्यात झाली . कोणीही विरोध केलेला त्याला खपत नसे . त्याचप्रमाणे न रुचणारे असे सत्य कोणी सांगितले तर ते ऐकण्याची त्याची तयारी नसे . आपल्या अखेरच्या दिवसांत त्याने आपल्या स्वभावात गोडबोल्या खुशामतखोरांचा आणि त्याच्या स्वतःच्याच आवाजाचे प्रतिध्वनी काढणाऱ्या डामडौली लोकांचा भरणा केला . त्याचे मंत्री म्हणजे त्याच्या हुकमाची कसलीही कुरकूर न करता नोंद करणारे साधेसुधे कारकून बनले.

अशा तऱ्हेने राज्य करणाऱ्या बादशहाला राजकीयदृष्ट्या अथवा राज्यकारभाराच्या दृष्टिकोनातून अलौकिक शक्ती असलेली एक व्यक्ती अशी उपाधी देता येणार नाही . त्याचा अंगचा विशेष म्हणजे त्याचा प्रामाणिकपणा आणि मोठ्या कष्टाने का होईना परंतु सातत्याने उद्योग करीत राहण्याचा त्याचा स्वभाव . एखादे नवीन धोरण प्रत्यक्षात अमलात आणणारा राजकीय मुत्सद्दी आणि भविष्यकाळात जन्मास येणाऱ्या पिढीचे जीवन आणि विचारसरणी या गोष्टींची आखणी एखाद्या भविष्य सांगणाऱ्या व्यक्तीच्या दूरदृष्टीप्रमाणे अगोदरच करण्यासाठी कायदेकानू करणारा थोर राजकारणी पुरुष म्हणून औरंगजेबाची गणना निश्चितच करता आली नसती . त्याची लायकी फार तर एखाद्या कसबी विभागाचा प्रमुख म्हणून नियुक्त केली जाण्याएवढीच होती . याबाबत आपल्याला अकबराचे नाव घेता येईल . कारण जरी तो निरक्षर आणि पुष्कळसा तापट स्वभावाचा होता तरी देखील हिंदुस्थानामधील मोगल सम्राटांमध्ये अलौकिक व्यक्तिमत्त्व असलेला अकबर हा एकमेव होता हे आपणास कबूल करावे लागेल.

आपले कर्तव्य काय याबाबतच्या संकुचित ध्येयाने त्याची मनोवृत्ती सदा पछाडलेली असे . त्याचप्रमाणे आपल्या स्वभावाच्या खऱ्या मर्यादा काय आहेत याविषयी तो पूर्णपणे अज्ञानात होता . याचा परिणाम असा झाला की औरंगजेब केवळ साधुसंतांना शोभून दिसेल अशी तपस्या प्रत्यक्ष आचरणात आणीत असे आणि स्वतःला अनेकदा कमी लेखीत असे . इतकेच नव्हे तर मुसलमानी धर्माने घालून दिलेल्या अनेक उपचारांचे अतिशय काटेकोरपणे आणि भाविकपणे तो पालन करीत असे . औरंगजेबाच्या या मानभावीपणाच्या वर्तनाचा उगम त्याच्या स्वभावातील राजकीय कावेबाजपणातून झाला असल्याची मनूचीने जी मीमांसा केली आहे ती अर्थात बरोबर नाही . त्याच्या अशा तऱ्हेच्या वागणुकीमुळे त्याच्या प्रजेपैकी जे मुसलमान होते त्यांना तो एखाद्या ध्येयवादाने भारलेल्या आदर्श व्यक्तिगत वाटला असल्यास नवल नाही . औरंगजेब म्हणजे चमत्कार करणारा अवलिया अशी लोकांची समजूत झाली . (आलमगीर जींदा पीर !) त्याने देखील आपल्या वागणुकीने अशा तऱ्हेच्या कल्पनेला आपली पुष्टी दिली . (**स्टोरीया**., भाग २. १९; भाग ३. २५९) साहजिकच औरंगजेबाच्या अंगी अनेक गुणांचा समुच्चय होता हे मान्य करून देखील राजकीयदृष्ट्या औरंगजेबाला पूर्णपणे अपयश आले हे आपल्याला कबूल करावे लागेल . परंतु त्याच्या कारकिर्दीच्या अपयशाचे कारण केवळ त्याचा वैयक्तिक स्वभाव हे नसून या अपयशाची कारणे अधिक खोलवर रुजलेली होती . मोगल साम्राज्याच्या अधोगतीला फक्त औरंगजेबच कारणीभूत होता , हे जरी खरे नसले तरी मोगल साम्राज्याची अधोगती टळावी म्हणून त्याने काहीही केले नाही , याउलट अतिशय कडक अशा ईश्वरसत्ताक राज्यपद्धतीवर आधारलेल्या देशामध्ये नेहमीच हजर असलेल्या ज्या नाशकारी शक्ती असतात त्यांना औरंगजेबाने जाणूनबुजून आपली आक्रमकवृत्ती दाखविण्यास उद्युक्त केले. कारण स्वभावतः औरंगजेब हा अतिशय प्रतिगामी असा मनुष्य होता आणि सुधारणेचा भोक्ता

असलेला मुत्सद्दी म्हणून त्याची निश्चितच गणना करता आली नसती . वर उल्लेखिलेल्या या शक्ती कोणत्या याचे आता मी विश्लेषण करतो.

(१३) मोगल सरकारचे खरे स्वरूप आणि उद्दिष्ट

मोगल साम्राज्याने हिंदुस्थानचे अनेक मार्गांनी हित साधले . परंतु राष्ट्र म्हणून लोकांना एकत्र आणण्यात ते अपयशी ठरले. इतकेच नव्हे तर अतिशय सामर्थ्यवान आणि अविनाशी अशा राज्याची निर्मिती देखील त्याच्याकडून होऊ शकली नाही . ताजमहाल किंवा मयूरसिंहासनामधील चकाकणारी रत्ने आणि सोने या गोष्टी जरी आपल्या नजरेसमोर असल्या तरी मोगलकालीन हिंदुस्थानात माणसाला अधम समजण्यात येत असे , या गोष्टींकडे आपल्याला डोळेझाक करता येणार नाही . ज्या वेळी सर्वसामान्य लोकांवर हुकमत गाजविणारा हा एखादा अमीर अथवा उच्चपदस्थ अधिकारी किंवा जमीनदार असे तेव्हा त्याच्या अधिपत्याखालील लोकांना कसलेही आर्थिक स्वातंत्र्य आणि त्याचप्रमाणे न्यायाची वागणूक अथवा वैयक्तिक स्वातंत्र्याबाबतचे कसलेही सुसाध्य असे अधिकार नसत . राजकीय अधिकार मिळण्याची कल्पना त्याच्या स्वप्नात देखील येण्यासारखी नव्हती . सारे राष्ट्र म्हणजे एखाद्या मानवी मेंढरापेक्षा अधिक दर्जाचे होते असे म्हणता येणार नाही , आणि राज्यातील अमीरउमरावांची स्थिती एखाद्या समर्थ आणि हुशार अशा बादशहाच्या हाताखालील उमरावांपेक्षा अधिक दर्जाची नव्हती. त्यांना निश्चित असे घटनात्मक स्थान नव्हते कारण त्या काळच्या सरकारी यंत्रणेच्या कल्पनेत घटनेला कोणतेही स्थानच नव्हते . इतकेच नव्हे तर , त्यांची जी स्थावर मिळकत असे तीवरही त्यांचा संपूर्ण अधिकार नसे . सिंहासनावर जो हुकूमशहा असे त्याच्या मर्जीवर सर्व काही अवलंबून राही . त्या काळच्या सरकारचे वर्णन करावयाचे झाल्यास असेच म्हणावे लागेल की हे सरकार म्हणजे क्रांती अथवा क्रांतीची भीती यामुळे किंचित नमलेले परंतु जुलमी असे राज्य होते. साऱ्या देशाची साधनसामग्री आणि सारे सामर्थ्य यांच्याकडून एका दरबाराची निर्मिती होते , या दरबाराचा मध्यबिंदू म्हणजे राजघराण्यातील राजपुत्र आणि सगळीकडून जमविलेल्या या जीवनातून झालेली अंतिम निर्मिती म्हणजे साम्राज्याच्या सार्वभौमाची स्वयंपूर्णता.

इतर देशांतील अनियंत्रित राजसत्तांप्रमाणे मोगल हिंदुस्थानात देखील अतिशय कर्तृत्ववान अशा सार्वभौमाच्या अमलाखालील सर्वसाधारण जनतेला मिळणारे सुख हे अस्थिर होते . कारण हे सुख केवळ एका व्यक्तीच्या चारित्र्यावर अवलंबून असे . 'मोगल अमलाखाली शिक्षणाची आणि अध्यापनाची जी पद्धती होती ती पद्धत होतकरू अशा राज्याच्या वारसांची एकसारखी अशी परंपरा निर्माण करण्यात पूर्णपणे अयशस्वी ठरली..... राजपुत्र वयात येऊ लागल्यानंतर प्रतिस्पर्धी असलेल्या अंतःपुरांतील स्त्रियांच्या मत्सरामुळे त्यांना राजधानीमध्ये चालू असलेल्या राजकारणाच्या डावपेचात प्रामुख्याने भाग घेणे जवळ जवळ मना केल्यासारखे होऊन बसे ..... एखाद्या राजपुत्राने जर का राज्याच्या कारभारात व्यवस्थितपणे भाग घेतला तर तो सम्राटाविरुद्ध कारस्थान करीत असल्याचा संशय त्याच्यावर घेतला जाई..... ज्या राजपद्धतीमध्ये सिंहासनावर असलेल्या बादशहाच्या अंगातील दुष्टपणा अथवा अकार्यक्षमता याबाबतचा पडताळा पाहण्याची जबाबदारी त्या राज्याच्या मंत्रिमंडळावर पडते , अशा राज्यपद्धतीतच वंशपरंपरेच्या वारसाहक्काने गादीवर हक्क सांगण्याची जी प्रथा असते ती थोड्याफार अंशाने का होईना चालू शकते ." "अशा तऱ्हेच्या मंत्रिमंडळाची संघटना मोगलांच्या हातून कधीच होऊ शकली नाही. प्रत्यक्ष परिस्थितीत मोगल बादशहांना त्यांच्या दरबारात जमलेल्या साहसी मंडळींच्या जमावावर मदतीसाठी अवलंबून राहणे भाग पडे ..... अशा लोकांचे मुख्य काम म्हणजे मंत्रिमंडळाच्या स्वरूपात बादशहाला सल्ला देणे हे कधीच नसे, तर प्रामुख्येकरून त्याची खुशामत करण्याचे होते..... वंशपरंपरेने

चालत येणाऱ्या सरदार घराण्याच्या वाढीला उत्तेजन देण्याचे मोगलांच्या साम्राज्यवादी सत्तेचे कधीच धोरण नव्हते, असे या ठिकाणी नमूद करावे लागेल." (**क्रुक्सचे नॉर्थ वेस्टर्न प्रॉव्हिन्सेस** १०२-१०४)

इस्लामच्या धर्मसिद्धान्ताप्रमाणे मुसलमानी सरकारचे स्वरूप हे लष्करी राजवटीसारखे असते . इस्लामी राज्यांतील जनता म्हणजे इस्लाम धर्माचे विश्वासू शिपाई आणि बादशहा (खलिफा) म्हणजे त्या शिपायांचा सेनानी होय. अशा सैन्यामध्ये खाजगी शिपायांप्रमाणे अधिकाऱ्यांना देखील मुख्य पुढाऱ्यांकडून जे हुकूम येत त्याचे कारण विचारणे किंवा पुढाऱ्यांकडून उत्तराची मागणी करणे हे संमत नव्हते . खलिफा म्हणजे बादशहा हा परमेश्वराची पडछाया आहे (जील सुभानी) आणि परमेश्वराच्या दरबारात 'का किंवा कसे' हे प्रश्नच उद्‌भवत नाहीत . साहजिकच या तत्त्वाप्रमाणे बादशहाच्या दरबारात देखील असे प्रश्न उद्‌भवण्याचे कारण नसते . बादशहाचा दरबार म्हणजे परमेश्वरी दरबाराचा एक नमुना असतो (नमुना–इ– दरबारी–इ–इलाही). मुसलमानी सरकारच्या मूलभूत तत्त्वाप्रमाणे हिंदू आणि इतर पाखंडी मतांच्या लोकांची गणती ही राष्ट्राच्या परिहाराच्या बाहेर करावयाची असते . परंतु तरी देखील राष्ट्रातील प्रमुख पंथाचे जे लोक म्हणजे मुसलमान त्यांची गणना ही एखाद्या संघटित अशा राष्ट्रामध्ये करता आली नसती . लष्करी बंधनाने बांधले गेल्यामुळे त्यांच्यामध्ये एक तऱ्हेचे बंधुत्वाचे नाते निर्माण झालेले होते आणि त्यांची स्थिती कायम छावणी असलेल्या लष्करी शिपायांसारखी होती.

(१४) हिंदू आणि मुसलमान यांचे सर्वसाधारण जीवन आणि त्यांची ध्येये यांमधील भेदामुळे दोन्ही जमातीत संपूर्ण एकीकरण होण्याची अशक्यता

मुसलमानी राज्यशास्त्राच्या मूलभूत तत्त्वाप्रमाणे अल्पसंख्य जमातींना कोणतेही राजकीय अधिकार असू शकत नाहीत ; त्याचप्रमाणे सारे राष्ट्र एका प्रमुख पंथामध्ये विलीन होऊन जाणे हे जरुरीचे असते . आणि सर्व तऱ्हेच्या विभिन्न श्रद्धा , मते आणि जीवनप्रणाली यांचा नाश करून संप्रदाय आणि सामाजिक जीवन याबाबतीत समानधर्मी अशा एका जमातीची निर्मिती या तत्त्वाप्रमाणे होणे आवश्यक असते . अशा तऱ्हेच्या परिस्थितीमध्ये केवळ राजकीय पार्श्वभूमी आणि सिद्धान्त यांमधून राष्ट्राच्या निर्मितीची कल्पना केवळ असंभवनीय आणि अशक्यप्राय होती . ही अतिशय दुष्ट परिस्थिती आणखी विकोपाला गेली . याला कारण म्हणजे हिंदुस्थानातील राजकीयदृष्ट्या दडपला गेलेला वर्ग किंवा अधिकृतरित्या अल्पसंख्य असलेल्यांचा वर्ग जो होता त्याचे संख्येच्या दृष्टीने बहुमत होते. इतकेच नव्हे तर लोकसंख्येमधील जो प्रमुख पंथ होता त्याबरोबर त्याचे प्रमाण एकास तीन असे होते . त्याबरोबरच हा वर्ग आर्थिक दृष्टिकोनातून पाहिल्यास अधिक लायक , भांडवल आणि संपत्तीचे उत्पादन करण्यासाठी जी शक्ती लागते त्याबाबत अधिक सामर्थ्यवान आणि बौद्धिक किंवा शारीरिक कुवतीच्या संबंधात कोणत्याही प्रकारे कमी दर्जाचा नव्हता.

ध्येयवाद आणि जीवन या दोन्ही बाबतीत हे दोन वर्ग दोन ध्रुवांप्रमाणे विरुद्ध दिशेला असल्याने अनेक शतकांचा कालावधी लोटल्यानंतर देखील ह्या दोन वर्गांमध्ये संपूर्ण एकीकरण होणे शक्य झाले नाही. हिंदू मनुष्य हा स्वभावाने एकलकोंडा , सहनशील आणि पारमार्थिक वृत्तीचा आहे . त्याचे जीवनातले सर्वोच्च ध्येय म्हणजे आत्मज्ञानाचा अनुभव , स्वतःच्या प्रयत्नाने आत्मसाधना आणि आत्मोन्नती यांचा लाभ , खाजगी जीवनात ईश्वरनिष्ठा आणि एकांतवासात उग्र तपस्या हे होय . त्याच्या दृष्टीने या इहलोकात जन्म म्हणजे एक दुर्दैव आणि त्याच्या अवतीभोवती वावरणारे त्यांचे देशबांधव म्हणजे त्याचे जे खरे उद्दिष्ट आहे त्यापासून त्याच्या मनाला विमनस्क करणारे असे अनेक विघ्नासमान असलेले प्राणी होत . जीवनात त्याला

खरी मोक्षप्राप्ती मिळवावयाची म्हणजे त्यासाठी परमेश्वराने मानवाला बहाल केलेल्या सुखसाधनांचा उपभोग हा नसून त्या सुखसाधनांचा त्याग हा आहे. त्याचप्रमाणे ही मोक्षप्राप्ती आपल्या मनातील भावनांच्या सुखकारक अविष्काराने होत नसून त्या भावना दडपून टाकल्याने होत असते. याउलट मुसलमान व्यक्तीचे जीवन बघितल्यास त्याला फक्त एकाच गोष्टीची शिकवण देण्यात आलेली असते आणि ती म्हणजे तो दुसरा तिसरा कोणीही नसून इस्लामच्या लढाऊ सामर्थ्याच्या संघटनेतील एक शिपाई आहे ही होय. त्याचप्रमाणे त्याने नेहमी आपल्या धर्मबांधवाच्या बरोबर एकत्र जमून परमेश्वराची प्रार्थना करणे हे त्याच्यावर बंधनकारक असते. त्याने प्रत्यक्ष धर्मयुद्धात भाग घेऊन किंवा धर्माच्या प्रसारासाठी व समाजातल्या इतर व्यक्तींमधील पाखंडीपणाचा नाश करण्यासाठी प्रत्यक्षात मेहनत घेऊन आपल्या धर्मावरील आपल्या अपार निष्ठेचा पुरावा सादर करणे हे अत्यावश्यक असते. प्रत्येक मुसलमान व्यक्ती ही मुसलमान धर्माप्रमाणे धर्मप्रचारक असते आणि मुस्लिम धर्माप्रमाणे कोणीही मुसलमान आपल्या शेजाऱ्याच्या आत्मिक स्वास्थ्याबाबत बेफिकीर राहू शकत नाही. एवढेच नव्हे तर त्याच्या आधीन असलेल्या शारीरिक आणि अध्यात्मिक अशा सर्व साधनांच्या उपयोगाने इतरांची मुक्ती घडवून आणण्यासंबंधी त्याचे जे कर्तव्य आहे त्याबाबत त्याने सदासर्वकाळ दक्ष राहिले पाहिजे. त्यानंतर पुन्हा इस्लाम धर्म उघडउघड अशी ग्वाही देण्याचे धारिष्ट दाखवतो आणि ती म्हणजे आपण या पृथ्वीवर आहोत ते आपल्या दृष्टीने अतिशय चांगले आहे, आणि परमेश्वराने सच्चा धर्माच्या अनुयायांना हे जग जे बहाल केले आहे ते त्यांच्या सुखोपभोगासाठी वारसा म्हणूनच.

हिंदुंबरोबर तुलना करता मुसलमानांमध्ये व्यावहारिक दृष्टिकोन आणि सामाजिक एकात्मता ही अधिक प्रकर्षाने दिसून येतात. मुसलमान जमातीतील या त्यांच्या विशेष गुणांमुळे त्यांच्याकडून वाङ्मयाचा अपवाद वगळता कला आणि संस्कृती यांच्या विकासास फार मोठ्या प्रमाणावर हातभार लावला गेला. मुसलमानांचे जीवनाचा आनंद उपभोगण्याचे प्रकार हे अधिक विविध आणि मनोहारी असे आहेत. याउलट मोगलांच्या काळातील हिंदू सरदार आणि दरकदार यांच्याकडे पाहिल्यास त्यांनी जे काही केले ते फक्त मुसलमान अमीरउमरावांचे अतिशय ओबडधोबड अनुकरण. मुसलमान समाजातील भिकारी वर्ग आणि मेहनतीचे काम करणारा मजूर वर्ग यांचा अपवाद सोडल्यास सर्वसाधारण मुसलमान हा अधिक सुसंस्कृत आणि उच्च प्रतीच्या राहणीमानाला सरावलेला असतो. याउलट हिंदू समाजातील तदनुरूप वर्ग हा जरी श्रीमंत असला तरी अधिक आडमुठा आणि संस्कृतीच्या बाबतीत उणा असा आहे. तथापि हिंदुजमातीतील खालच्या थरामधील वर्ग हे मुसलमान समाजातील त्याच प्रतीच्या वर्गाबरोबर तुलना करता निश्चितपणे अधिक स्वच्छ आणि बुद्धिमत्तेत उजवे आहेत.

(१५) औरंगजेबाच्या अमलाखाली हिंदूंची जी स्थिती होती तिचे वर्णन राजकीयदृष्ट्या दडपलेले आणि मानभंगामुळे हिनत्व पावलेले असे जे केले जाते त्याची मीमांसा

औरंगजेबाच्या अमलाखाली खाण्यापिण्याविषयीचे जे निर्बंध होते, त्याचप्रमाणे धर्माबाबतचे सिद्धान्त आणि धार्मिक विधी याबाबतचे मतभेद, तसेच आंतरजातीय विवाहांना प्रतिबंध करणारे कायदेकानू या गोष्टी जरी सोडून दिल्या तरी हिंदू आणि मुसलमान यांच्या जीवनविषयक दृष्टिकोनात उत्तर –दक्षिण ध्रुवाइतकी तफावत होती. त्यामुळे दोन जमातींमध्ये संपूर्ण एकीकरण आणि दृढतेची भावना निर्माण होणे जवळ जवळ अशक्य होऊन गेले. यात आणखी भर म्हणून पुराणमतवादी अशा मुसलमानी अमलाखाली कुराणाच्या तत्त्वाप्रमाणे जो राज्यकारभार अस्तित्वात होता त्यामुळे हिंदुंना जीवन जगणे अशक्य होऊन गेले. औरंगजेबाचे वर्णन करावयाचे झाल्यास नीतिमत्तेच्या आणि धर्माच्या बाबतीत अतिशय कळकळीचा

असेच करावे लागेल . परमेश्वराचा या पृथ्वीवरील पहिला सेवक या नात्याने आपली अमुक अमुक कर्तव्ये आहेत असे मानून कोणाचीही भीती अथवा लोभ न बाळगता ती कर्तव्ये पार पाडण्यात औरंगजेब स्वतःला धन्य मानीत असे . साहजिकच कुराणाच्या वचनाप्रमाणे जी राजनीती होती तिची तात्त्विकदृष्ट्या प्रत्यक्ष व्यवहारात परिपूर्ती करणारा एक सम्राट म्हणून औरंगजेबाच्या कारकिर्दीचे एक उत्कृष्ट दाखला म्हणून उदाहरण आपल्याला द्यावे लागेल . त्याने हिंदू धर्माची शिकवण सांगणारे जे अनेक संप्रदाय होते ते मोडून टाकले. हिंदूंच्या पूजेची जी देवस्थाने होती त्यांचा त्याने विध्वंस केला . हिंदू तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी ज्या यात्रा भरत त्याला त्याने बंदी घातली . सर्वसाधारण जीवनात हिंदूंचे स्थान हे अतिशय कमी प्रतीचे आहे हे दर्शविणारी निशाणी त्यांना आपल्या अंगावर बाळगावी लागत असे आणि त्याशिवाय राज्यातील हिंदूप्रजेवर एकतऱ्हेचा खास आर्थिक बोजा लादण्यात येई . याच पुस्तकातील सातव्या प्रकरणामध्ये पाहिल्याप्रमाणे राज्यामधील सर्व नोकरीधंद्यांची दारे हिंदूंना बंद केलेली होती.

याप्रमाणे औरंगजेबाच्या कारकिर्दीत हिंदूंना फक्त एकाच तऱ्हेचे जीवन जगण्याचा अधिकार होता . जीवनात माणसाला मिळणाऱ्या अनेक संधी आणि निसर्गनियमानुसार त्याच्याकडून होणारे उद्योग यांचा मुक्तपणे उपयोग केल्याने जे ज्ञान प्राप्त होते त्यापासून मिळणारी बुद्धीची प्रगल्भता , धर्मतत्त्वांच्या विचारामुळे मनाला मिळणारे समाधान आणि शांती , समाज म्हणून एकत्र येणे आणि संपत्तीचा सामुहिकरित्या उपभोग घेणे आणि सर्वांत अधिक म्हणजे त्यामधून होणारी आत्मविश्वासाची निष्पत्ती या सर्व गोष्टी हिरावून घेण्यात आलेल्या आहेत असे जीवन जगण्याचे त्यांच्या नशिबी आले होते . थोडक्यात हे जीवन म्हणजे वारंवार समाजात इतरांकडून मानहानी केली जाण्याचे प्रसंग आणि राजकीयदृष्ट्या त्यांना भोगावे लागणारे दुर्बल जीवन यांचा एक उत्कृष्ट नमुना होते . जोपर्यंत तो हिंदू म्हणून जीवन जगत होता तोपर्यंत त्याला स्वर्ग आणि पृथ्वी ही सारख्याच तऱ्हेने बंद होती . साहजिकच औरंगजेबाच्या कारकिर्दीचा परिणाम हिंदूंना बंडाळी आणि अशांतता माजविण्यास सतत चेतावणी देण्यात झाला इतकेच नव्हे तर त्यांची बुद्धिमत्ता, त्यांची संघटनाशक्ती आणि त्यांची आर्थिक साधनसामग्री यांच्याबाबत अधोगतीची परिस्थिती निर्माण करण्यात झाला . मोगल साम्राज्यातील एकंदर लोकसंख्येच्या दोन तृतीयांशापेक्षा हिंदूंची लोकसंख्या अधिक होती . साहजिकच हिंदूंवर अशा तऱ्हेची हलाखीची परिस्थिती ओढवल्यामुळे एकंदर राज्य कमकुवत झाले असल्यास त्यात काही नवल नाही.

(१६) हिंदुस्थानातील मुसलमानांची अवनती आणि तिची कारणमीमांसा

साम्राज्यातील लोकसंख्येपैकी जे मुसलमान प्रजाजन होते त्यांचीही वरील प्रकारच्या राजकीय चाकोरीत भरभराट झाली नाही . त्याचे कारण मात्र अतिशय वेगळे होते . तुर्की लोक हे केवळ शिपाईगडी . इतर कोणत्याही गोष्टीत त्यांना स्वारस्य नव्हते . त्यांच्या पौरुषत्वाचा विकास म्हणजे त्या जमातीतून साहजिकतया उभारण्यात आलेली सैनिक संघटना यातूनच होत असे आणि जीवनातला त्यांचा एकमेव उद्योग म्हणजे त्यांना असलेले लढाईचे व्यसन . सर्वसामान्यपणे असा नियम आहे की खड्या सैन्याला घरगुती जीवनाचा सातत्याने उपभोग घेण्यापासून साहजिकतया प्रतिबंध केला जातो . तथाकथित मोगलांमध्ये प्रत्यक्ष राज्याची सूत्रे ज्या जमातीच्या हाती होती ती जमात म्हणजे तुर्की लोकांचीच . याचा परिणाम असा झाला की मोगलकालीन हिंदुस्थानात मुसलमान समाजात अनेक वेळा आपल्याला समाजातील व्यक्तींच्या नागरी जीवनात लष्करी छावणीतील जीवनाची छाप पडलेली दिसून येत असे . याचे कारण असे होते की त्यांच्या सरकारची संघटना ही पूर्णपणे लष्करी तत्त्वावर झालेली होती आणि लष्करातील शिपाई हेच समाजाची धारणा घडवून आणण्यात कारणीभूत होते आणि समाजाला उठाव

देण्याचे कार्य करण्याचे काम त्यांच्याकडेच जणू काही सोपविलेले होते.

हिंदुस्थानमधील मुसलमान धर्माचे जे सच्चे अनुयायी होते त्यांची वैशिष्ट्यपूर्ण अशी जी परिस्थिती होती त्यामुळे मुसलमानांचा बौद्धिक पातळीवर अपकर्ष झपाट्याने होण्यास मदत झाली . ज्यांनी हिंदुस्थानला आपले कायमचे निवासस्थान म्हणून मानले होते त्यांच्यापैकी अनेकजण जातीने हिंदुस्थानी होते. इतकेच नव्हे तर त्यांच्यापैकी सर्व त्यांच्या बाह्य स्वरूपात , त्यांच्या विचारसरणीत , त्यांच्या आचारविचारात आणि त्यांच्या चालिरितीत पूर्णपणे हिंदुस्थानी बनलेले होते . इतके असून देखील धर्माचे शिक्षण देणारे त्यांचे जे धर्मगुरू होते , ते त्यांना स्फूर्तीसाठी प्राचीन अरबस्तानच्या संस्कृतीकडे डोळे लावून बसण्यास सांगत, आणि हेच धर्मगुरू त्यांच्या बुद्धीला खाद्य मिळावे म्हणून शेकडो वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या महमद पैगंबराच्या काळातील वातावरणाशी एकरूप होऊन जाण्याचा प्रयत्न करीत . त्याचप्रमाणे त्यांच्या धर्माची भाषाही अरबी असणे हे अगदी जरुरीचे होते . पण त्याबाबत उल्लेखनीय गोष्ट अशी होती की हिंदुस्थानामधील मुसलमान लोकांत शंभरामधील जेमतेम एकाला देखील ही भाषा पूर्णपणे अवगत होती असे म्हणता आले नसते . प्रत्यक्षात त्यांची सांस्कृतिक भाषा मात्र फारशी होती . त्यांच्यापैकी काहीजण ही भाषा मोठ्या कष्टाने शिकत . याचा परिणाम असा होई की बोलताना या भाषेचा ते अतिशय अशुद्धपणे उपयोग करीत आणि हास्याला आणि ज्यांची जन्मजात भाषा फारशी आहे अशा लोकांच्या कुत्सित उद्‌गाराला ते पात्र होत. अठरावे शतक उजाडून बराच काळ लोटल्यानंतर देखील वाङ्मयीन कारणासाठी हिंदी मुसलमान देशी भाषेचा उपयोग करणे हे स्वतःच्या दृष्टीने कमीपणाचे समजत . याचा परिणाम असा झाला की या पंथापैकी जे बहुसंख्य होते त्यांच्या स्वतःच्या अशा वाङ्मयाची निष्पती बिलकुल झाली नाही . त्यांच्या शिक्षणामध्ये अनेक अडथळे निर्माण झाले . ज्यांना फारशी भाषेचा मुक्तपणे उपयोग करता येत असे अशा काहीजणांचा अपवाद सोडून दिल्यास त्यांच्या जीवनातल्या बौद्धिक सुखापासून मिळणाऱ्या आनंदाला ते पारखे झाले . पुढे सरकणाऱ्या काळाबरोबर ज्या जिवंत धार्मिक वाङ्मयाची निर्मिती होते तीदेखील त्यांच्याकडून होऊ शकली नाही . सबंध समाजात संस्कृतीचा फैलाव होण्यासाठी किंवा सर्वसाधारण अज्ञानाचे निर्मूलन होण्यासाठी हिंदुस्थानी प्रेमगीते अथवा भक्तिविषयक गाणी आणि फारशी भाषेतील सूफी काव्य ही पुरेशी साधने होती असे म्हणता येणार नाही.

या सर्व गोष्टींचा परिणाम असा झाला की प्रत्येक कट्टर मुसलमानाच्या मनात आपण हिंदुस्थानातील आहोत पण हिंदुस्थानचे नाही ही भावना घर करून राहिली . त्याला अशी शिकवण देण्यात आली की या आपल्या मायभूमीमध्ये तो आपले घर करून तिला आपले असे म्हणू शकत नाही . या मायभूमीला आपले मानण्याची त्याची हिम्मत नव्हती . कारण तसे केल्यास त्याच्या आत्म्याचा नाश झाला असता . या देशाच्या परंपरागत रूढी, या देशाची भाषा आणि या देशाच्या संस्कृतीची विविध अंगे यांची जोपासना तो आपल्या हृदयापाशी करू शकत नव्हता . या गोष्टी त्याला आपल्या म्हणून पाहिजे असतील तर त्यांची आवक त्याने इराण आणि अरेबिया या देशांमधून करणे जरूर होते . इतकेच नव्हे तर येथील मुलकी आणि फौजदारी कायदादेखील बगदाद किंवा कायरो येथील न्यायाधिशांनी दिलेले निकाल आणि कायदेपंडितांचे लिखाण यांच्यावर आधारभूत असा प्रमाणित मानला जाण्याचे बंधन होते . हिंदुस्थानातील मुसलमान हा बौद्धिकदृष्ट्या एखाद्या परकियाप्रमाणे होता . त्याच्या अवतीभोवती जी परिस्थिती होती त्या परिस्थितीशी मिळतेजुळते घेणे त्याला कधीच जमले नाही. नागरी जीवन आणि समाजातील व्यक्ती यांची वागणूक आणि परस्परसंबंध कसे असावे याबाबत मार्गदर्शन करणारी कुराणातील अभिवचने ही शेकडो वर्षांपूर्वी बनविण्यात आली होती आणि ती केवळ भटक्या लोकांच्या समाज पद्धतीला उपयोगी पडतील अशी होती . अकबरासारख्या विचारवंताने याबाबत अशी भूमिका मांडली की अशा तऱ्हेचे कायदेकानू हे १६ व्या किंवा

१७ व्या शतकात राहणाऱ्या हिंदुस्थानसारख्या देशातील लोकांवर आणि ज्यांचा अरबस्थानातील लोकांचा सांस्कृतिक वा इतर दृष्ट्या कसलाही संबंध नसताना बंधनकारक असावेत यासारखी हास्यास्पद अशी दुसरी कोणतीही गोष्ट नाही.

याप्रमाणे अतिशय अवास्तव आणि पूर्णपणे परकीय अशा ध्येयवादावर नैसर्गिक प्रवृत्तीच्या धर्माविरुद्ध अवलंबून राहिल्यामुळे तत्कालीन समाजात एकतऱ्हेची बौद्धिक पोकळी निर्माण झाली . यामुळे हिंदुस्थानी मुसलमानांचा मानसिक आणि सामाजिक विकास रोखून धरला गेला . इतकेच नव्हे तर अतिशय विषारी वल्लीरूपी अशा विचारांची वाढ होण्यास जी मनोवृत्ती लागते त्या मनोवृत्तीची जोपासना त्यांच्यामध्ये अतिशय सहजतया झाली . प्रत्येक व्यक्तीच्या मनात आपला स्वतःचा असा धर्मभाव असावा आणि त्याचप्रमाणे जिवंत अशा धार्मिक विचारसरणीचे पाठबळ आपणाला असावे अशी एक अविरत परंतु सुप्त अशी जी मनोवांच्छा असते तिचे समाधान अरबी भाषेतील एखाद्या पुस्तकाची घोकंपट्टी करून (हिफ्ज-इ-कलम-उल्ला) अथवा दिवसातून पाच वेळा सार्वजनिक ठिकाणी जमून (जमाइत) तीच तीच नमाज पढण्याची शारीरिक कंटाळवाणी कवायत करून होत नसते . याचा परिणाम असा झाला की आजूबाजूच्या परिसरात वास्तव्य करून राहणारे आणि ज्यांच्या जीवनाभोवती चमत्काराची गुंफण गुंफली गेली आहे असे अवलिये आणि भूतकाळात होऊन गेलेल्या सुप्रसिद्ध अवलियांच्या कबरीची देखभाल ठेवण्यासाठी नियुक्त केलेले त्या अवलियांचे द्रव्यासाठी हपापलेले शिष्यगण यांच्याकडे आपल्याला मोक्ष मिळावा अशी तीव्रतेने आशा बाळगून असलेल्या व्यक्ती साहजिकच वळत. हे अवलिये आणि दुसऱ्या प्रकारात उल्लेखिलेला त्यांचा शिष्यगण म्हणजे चमत्कार करण्यासाठी जी शक्ती लागते त्या शक्तीचे प्रचंड भांडवल असलेल्या व्यक्ती या दृष्टिकोनातून लोक त्यांच्याकडे पाहात.

कुराण आणि सुन्नी पंथाचे धर्मविषयक कायदे ज्यांनी निर्माण केले ते सेमेटीक लोक यांचे जातीय वैशिष्ट्यही हिंदुस्थानी लोकांबरोबर तुलना करता मूलभूतपणे विभिन्न आहे . हा जो जातिवाचक असा मूलभूत फरक अरबी आणि भारतीय लोकांमध्ये आहे त्याच्यावर केवळ भारतीयांच्या एका ठोकळ गटाने अरबी लोकांचा धर्म स्वीकारला, या प्रत्यक्ष परिस्थितीमुळे मात होऊ शकत नाही. हिंदुस्थानामधील इस्लाम धर्माचा विचार करावयाचा झाल्यास इस्लामच्या प्रगतीमधील हे अडथळे कधीही उल्लंघता येण्यासारखे नव्हते.

(१७) हिंदू समाजाची झालेली अवनती आणि हिंदू समाजातील मूलभूत असलेला कमकुवतपणा

मध्ययुगीन हिंदुस्थानातील हिंदूंबाबत बोलावयाचे झाल्यास त्यांच्या समाजातील दृश्य हे तितकेच दुर्दैवी असे होते. एखाद्या स्वतंत्र राष्ट्राची अथवा एखाद्या दृढ भावनेच्या धाग्याने बांधल्या गेलेल्या पंथाची घडण देखील हिंदू समाजामध्ये होऊ शकत नव्हती . हिंदू समाज हा परस्परांशी फटकून वागणाऱ्या अनेक जातींमध्ये विभागला गेलेला होता . मौजीबंधनासंबंधाचे आणि वैदिक मंत्र म्हणण्याबद्दलचे अधिकार , त्याचप्रमाणे सार्वजनिक विहिरी आणि देवळे यांत प्रवेश करण्यासंबंधीचे हक्क , त्याशिवाय स्पृश्यता आणि दक्षिण हिंदुस्थानातील जवळीकता या गोष्टींवरून हिंदू समाजातील जाती -जातींमध्ये अतिशय दीर्घद्वेषी अशी भांडणे होती. साहजिकच मुसलमान समाजामध्ये ज्या तऱ्हेची एकात्मता वास करत होती तशा तऱ्हेची एकात्मता हिंदू समाजाच्या बाबतीत कल्पिणे जवळ जवळ अशक्यप्राय होते . पुढे सरकणाऱ्या काळाबरोबर आणि त्याबरोबर आलेल्या संपन्नतेबरोबर हिंदुसमाजातील हे फरक अधिकच तीव्र बनत गेले . जातींची वाढ ही परस्पर मिलाफाबरोबर होत असते. मुसलमानी अमलाखाली अंतर्गत शक्तींची जी हालचाल चालू होती

त्याचा परिणाम असा झाला की समाजामध्ये नवीन नवीन उपजातींची उपपत्ती झपाट्याने होत गेली . यामुळे हिंदू समाजाची आणखी विभागणी झाली आणि तो पूर्वीपेक्षाही दुबळा बनत गेला.

हिंदू लोकांची अशातऱ्हेच्या परिस्थितीतून सुधारणा करण्यासाठी ज्या तऱ्हेच्या देशाभिमानी अथवा अभिजात अशा उपाध्ये वर्गाची जी जरुरी होती तशा तऱ्हेचा वर्ग त्या काळी निर्माण झाला नाही ज्या तऱ्हेची विभक्तपणाची वृत्ती हिंदू समाजात वास करत असते तितक्याच प्रकर्षाने ही वृत्ती हिंदूंच्या धर्मात वास करून होती. आणि तसे बघितले तर मोक्षाबद्दलच्या हिंदू लोकांच्या कल्पनेची जी मूलतत्त्वे आहेत त्या तत्त्वांना संघटित उपाध्यायांचा वर्ग अथवा राज्यप्रणीत धर्म यांचा निश्चितच विरोध होता . वाट चुकलेल्या धनगराच्या पाठीमागे धावणारी वाट चुकलेली मेंढरे ही विषयासक्त आणि ढोंगी लोकांचे भक्ष बनल्यास त्यात आश्चर्य वाटावयाचे काहीच कारण नाही . त्या काळी अतिशय खालच्या प्रतीला पोहोचलेली मानव पूजेची प्रथा अस्तित्वात होती. ही प्रथा विशेषतः वल्लभाचार्य , कार्तभाज आणि गुरूला प्रमाण मानणाऱ्या इतर पंथांमध्ये प्रामुख्याने दिसून येत असे . त्याचप्रमाणे देवदासी किंवा मुरळ्या यांच्या वर्तनातून आणि लंपटपणाचा स्थायिभाव गुप्तपणे बाळगणारे असे जे इतर पंथांतील लोक यांच्यामुळे अनीतिमत्ता अतिशय बोकाळली होती. या गोष्टी जरी आपण दृष्टिआड केल्या आणि लक्षावधी लोकांच्याकडून सर्वसामान्य व्यवहाराप्रमाणे होणारी मूर्तिपूजा विचारात घेतली तरी देखील आपल्याला काही विलक्षण अशा गोष्टी नजरेत आल्या असत्या. आपल्याला असे दिसून आले असते की सर्वसामान्य माणसाप्रमाणे भोजन करणाऱ्या , निद्रा घेणाऱ्या किंवा दरवर्षी सात दिवस तापाने जगन्नाथाप्रमाणे आजारी पडणाऱ्या अशा परमेश्वराच्या ठिकाणी उपाध्ये लोक भक्तांना रत करून त्यांची बौद्धिक पातळी अतिशय हीन दर्जाला नेत आहेत. इतकेच काय तर या उपाध्येवर्गाने जो परमेश्वर सर्वसामान्य जनांच्या समोर उभा केला होता तो कामेच्छू बनून इतक्या तऱ्हेच्या रंगविलासात मग्न झालेला असे की ज्याचा अयोध्येच्या नबाबानेही हेवा करावा किंवा एखाद्या कुतुबशहानेही आपल्या जनानखान्यात त्याचे अनुकरण करावे . हिंदू धर्मामध्ये जा सुधारणा शक्य होती ती नियमित अशा हिंदूदेवस्थानांच्या आचारविचारांच्या कक्षेबाहेर राहणाऱ्या सर्वसामान्य जनांमध्ये . हा समाज ज्यांना आपण नवमतवादी किंवा जुन्या आचारविचारांना निषिद्ध मानणाऱ्या अशा अनेक लहान लहान पंथांतून निर्माण झाला होता. या पंथातील लोक इहलोकातील आपल्या सर्व वस्तूंचा त्याग करण्यास आणि सत्याचा मार्ग अनुसरण्यास तयार होते . परंतु याही पंथांत त्यांची स्थापना झाल्यानंतरच्या पहिल्या एक अथवा दोन पिढ्यांचा अपवाद वगळता आडमुठ्या अशा गुरुपूजेचे प्रस्थ माजले आणि त्यांची पार अधोगती झाली.

(१८) हिंदुस्थानामधील हिंदू आणि मुसलमान यांचे एकत्रित जीवन ; दोन्ही जमातीत कधी -मधी निर्माण झालेला एकोपा, त्यांच्यातील सुप्त वैमनस्य आणि त्यांच्यामध्ये उडालेले संघर्ष

वर उल्लेखिलेल्या सर्व गोष्टी जरी खऱ्या असल्या तरी देखील असे काही विशिष्ट बिंदू होते की , ज्या ठिकाणी हिंदू आणि मुसलमान समाज यांच्यामध्ये हातमिळवणी होत असे . दोन्ही धर्मांकडून जे खरे आदर्श ठेवले गेले होते त्यांच्यामध्ये पूर्णपणे साम्य होते आणि ते आदर्श म्हणजे त्या एकमेव अशा जगाचे नियंत्रण करणाऱ्या परमेश्वराची पूजा , इहलोकी मिळणाऱ्या सर्व सुखांपासून अभोगी राहण्यावर दोन्ही धर्मांचा असलेला कटाक्ष आणि सर्वसामान्य प्राणिमात्रांच्या ठिकाणी दाखविला जाणारा दयाभाव हे होत . परंतु दोन्ही धर्मांमध्ये धर्मांध असलेले लोक आणि सर्वसामान्य जनताजनार्दन हे दोन वर्ग इतक्या प्रभावी अशा विचारप्रणालीप्रत कधीच पोहोचू शकले नाहीत . आपल्या स्वतःच्या अंगातील चमत्कार करण्याची शक्ती दाखविणे अथवा स्वतःच्या शरीराला पीडा देऊन ते झिजविण्यासारखी सनसनाटी कृत्ये करणारे मुसलमान

फकीर हे अनेकदा हिंदुराजेरजवाडे आणि सर्वसामान्य प्रजा यांच्या आराधनेचे स्थान बनत . त्याचप्रमाणे सूफी पंथाच्या तत्त्वज्ञानाने दोन्ही पंथांच्या लोकांना मैत्रीच्या दृढ भावनेने जवळ आणले होते . ज्या व्यक्तींना सूफी धर्माची तत्त्वे खरोखर समजलेली होती त्यांच्या दृष्टीने सूफी धर्माचे तत्त्वज्ञान म्हणजे एकतऱ्हेचा ज्वलंत असा सांप्रदायी मार्ग नव्हता . त्या ज्ञानापासून त्यांना मिळणाऱ्या आनंदाचे स्वरूप हे केवळ भावना आणि बुद्धिमत्ता यांच्या संयोगापासून मिळणाऱ्या आनंदाचे निदर्शक होते . सूफी पंथाच्या तत्त्वज्ञानाने समाजातील काही विशिष्ट वर्गांतील लोकांच्याच मनाची पकड घेतली होती . हा वर्ग सुशिक्षित आणि सरकारी नोकरी करणारे अधिकारी यांच्यापुरता मर्यादित होता.

माणसामाणसांमधील जागतिक विश्वबंधुत्वाची भावना आणि गूढ सर्वेश्वरवाद यासारख्या भव्य कल्पना या सर्वसामान्य माणसाच्या आवाक्याबाहेरील होत्या आणि त्या तो कधीच समजून घेऊ शकला नाही. तत्त्वज्ञान शिकविणाऱ्या व्यक्तींपेक्षा सर्वसामान्य माणसाच्या हृदयावर माथेफिरू आणि धर्मवेड्या व्यक्तींकडून सांगितल्या जाणाऱ्या शिकवणुकीचा पगडा हा अधिक होता. हिंदु आणि मुसलमान किंवा शिया आणि सुन्नी यांच्यामध्ये धुमश्चक्री उडाल्यानंतर प्रत्येक लहानलहान वस्तीमधील समाजातील खालच्या वर्गातील माणसे परस्परांबरोबर मिळतेजुळते घेत. या ठिकाणी एक गोष्ट नमूद करण्याजोगी आहे आणि ती ही की, अशा तऱ्हेचे संघर्ष जेव्हा जेव्हा उडत तेव्हा तेव्हा सरकारी शक्ती या नेहमीच हटवादीपणाचा आधार घेणाऱ्या सनातन पंथाचीच नेहमी बाजू घेत . असे करताना त्यांनी प्रत्येक पंथाच्या मर्यादा , त्या पंथाचे अनुकरण करणाऱ्यांचे अधिकार आणि त्यांच्यावरील बंधने ही एका विशिष्ट आधारावर सर्वानुमते मान्य केली. कालान्तराने या सर्व गोष्टींना सर्वसामान्य रूढींना जे पावित्र्य प्राप्त होते ते मिळाले . याप्रमाणे त्या काळात प्रत्येक पंथाचे लोक त्यांनी निर्माण केलेल्या संकुचित अशा विश्वाच्या मर्यादेत गुण्यागोविंदाने राहू लागले. परंतु जोपर्यंत तत्कालीन स्थानिक समाजाला स्थैर्य होते , तोपर्यंतच धार्मिकदृष्ट्या दोन्ही जमातींमध्ये हा जो समझोता झाला होता तो टिकून राहिला . दोन्ही समाजांतील लोकांच्या भावनेची जी ताकद होती त्यामध्ये थोडा जरी सापेक्ष बदल झाला, जर का बाहेरून आलेल्या एखाद्या कर्मठ उद्योगी अशा धर्मोपदेशकाने त्या ठिकाणाला भेट दिली अथवा सिंहासनावर नव्यानेच आलेला बादशाहा हा जर धर्मांध असला तर सर्वसामान्य जनतेच्या भावनांचा निद्रिस्त असलेला ज्वालामुखी भयंकर अशा त्वेषाने उफाळून उग्र स्वरूप धारण करी . याची अनेक उदाहरणे आपल्याला देता येतील . उदाहरणार्थ इ. स. १६८५ मध्ये श्रीनगर येथे शिया मुसलमानांची झालेली कत्तल, औरंगजेबाकडून हिंदूंच्या देवळांचा झालेला विध्वंस आणि भ्रष्टाचार, माळव्यातील रजपुतांनी जिझिया कर गोळा करणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यांच्या दाढ्यांचे उपटून काढलेले केस, आणि आपल्या धर्मावरील होणाऱ्या अत्याचारांनी चिडून गेल्यामुळे पुष्कळ धैर्यवान राठोड आणि मराठा राजेरजवाड्यांनी मशिदींचा विध्वंस करून उगवलेला सूड वगैरे . तात्पर्य औरंगजेबाच्या कारकिर्दीत हिंदू आणि मुसलमान यांची एकत्र वस्ती असलेल्या ठिकाणी हिंदुस्थानी समाजाची परिस्थिती अस्थिर असलेल्या अशा समतोलपणासारखी होती.

(१९) प्रगतिशील होण्यासाठी ज्या मनोधैर्याची आवश्यकता लागते तिचा हिंदुस्थानी लोकांमधील अभाव आणि परिणामी त्यांची झालेली अवनती

अखेर आपल्याला असे म्हणावे लागेल की मोगल कालखंडातील हिंदू आणि मुसलमानांसहित सर्व भारतीय लोक हे प्रगतीच्या दृष्टिकोनातून अचल असे होते , आपल्या पूर्वजांच्या शहाणपणाची भक्तिभावाने पूजा करण्याची त्यांची वृत्ती होती , आणि आधुनिक जग हे सर्वदृष्ट्या वाईट आहे असे मानण्याचा त्यांचा कल होता. साहजिकच त्या काळामध्ये जे काही नवीन प्रयोग झाले आणि जी काही मुक्त विचारप्रणाली

अस्तित्वात आली त्याकडे पाहण्याची त्यांची दृष्टी अगदी वेगळी होती . समाजामध्ये वंशपरंपरा चालत आलेली जी काही पवित्र बंधने आणि रूढी होत्या त्यांना दुष्टपणाने आव्हान देण्याचा हा प्रयत्न आहे म्हणून त्यांनी वरील गोष्टींचा धिक्कार केला. इतकेच नव्हे तर पुराणकालीन ऋषिमुनींच्या अंगी जी विद्वत्ता होती त्या विद्वतेविरुद्ध आपले क्षुल्लक ज्ञान हिरिरीने उभे करण्याचा तो एक उद्धट प्रयत्न आहे असे म्हणण्यापर्यंतही त्यांची मजल गेली होती . अकबराच्या मृत्युबरोबरच हिंदुस्थानमधील प्रगतिशील असा जो ध्येयवाद होता त्याचा अस्त झाला. त्यानंतर भारतीय संस्कृतीचे जे स्वरूप राहिले त्यामधील गतिमानता नष्ट झाली होती . अशा तऱ्हेच्या संस्कृतीत कसल्याही तऱ्हेची सुधारणा घडवून आणणे हे अशक्य असल्यामुळे अशा संस्कृतीचा ऱ्हास होणे हे अटळ होते.

"इस्लाम धर्मामधील जो ताठरपणा होता त्यामुळे इस्लाम धर्मपंथियांना बहुतेक देशांत विशिष्ट मर्यादेपर्यंत यश मिळविणे शक्य झाले . त्या मर्यादेपर्यंत आल्यानंतर त्यांची प्रगती थांबली . परंतु या जिवंत विश्वात प्रगती हा जीवनाचा मूलभूत सिद्धान्त आहे . इकडे युरोपची अतिशय धिमेपणाने पण निश्चितपणे प्रगती होत असताना त्याबरोबर तुलना करता गतिमान नसलेल्या अशा पौर्वात्य देशांचे पाऊल मात्र मागे पडत होते. इतकेच नव्हे तर प्रत्येक मागे पडणाऱ्या वर्षाबरोबर ज्ञानसंघटना , संचय केलेली साधनसंपत्ती आणि बौद्धिक गुणांच्या जोरावर आत्मसात केलेले सामर्थ्य या बाबतीत युरोप आणि आशिया यांमधील अंतर वाढत चाललेले होते. याचा परिणाम असा झाला की आशिया खंडातील लोकांना युरोपियन लोकांबरोबर स्पर्धा करणे आणि त्यात टिकून राहणे हे अधिकाधिक दुर्घट होत गेले . युरोपियन राष्ट्रांनी आफ्रिका आणि आशिया या दोन खंडांवर जे अटळ असे प्रभुत्व संपादन केले त्याचा एक भाग म्हणजे इंग्रजांनी मोगल साम्राज्याचा केलेला पाडाव असे म्हटल्यास ते चुकीचे ठरणार नाही . ही वस्तुस्थिती दुसऱ्या शब्दांत सांगावयाची झाल्यास असे म्हणावे लागेल की , ज्याप्रमाणे आपल्या भारतीय समाजात पुढारीपण संपादन करण्यासाठी साहसपूर्ण अशा कुटुंबातील व्यक्ती सातत्याने स्वतःच्या समाधानात सुख मानणाऱ्या विशिष्ट तऱ्हेच्या गुंगीत असलेल्या व्यक्तींना बाजूला सारून त्यांची जागा स्वतः भरून काढतात त्या न्यायानुसार वरील घटना म्हणजे प्रगतिशील जमातीच्या लोकांनी कर्मठ आणि जुने उराशी बाळगून बसलेल्या जमातीतील लोकांना बाजूला सारून त्यांची जागा आपण घेतल्यासारखेच होते ." (पाहा माझे **मुघल ॲडमिनिस्ट्रेशन** हे पुस्तक, **प्रकरण** १५, ११)

(२०) औरंगजेबाच्या कारकिर्दीचे महत्त्व : भारतीय राष्ट्रीयत्वाची उभारणी कशी करता येईल याबद्दल चर्चा

औरंगजेबाच्या अतिशय मोठ्या आणि ५० वर्षांच्या कालावधीवर पसरलेल्या या परिश्रमाने भरलेल्या कारकिर्दीचा सखोल अभ्यास केल्यावर एक सत्य आपल्या मनाला अगदी जाऊन भिडते . जर का अंतर्गत शांतता आणि बाहेरून होणाऱ्या हल्ल्यांविरुद्ध संरक्षण करण्याची हिम्मत असलेल्या अशा राष्ट्राची जोपासना हिंदुस्थानात व्हावयाची असेल किंवा या देशाच्या आर्थिक साधनसामग्रीचा विकास व्हावयाचा असेल आणि या देशातील कला आणि शास्त्र यांची अभिवृद्धी व्हावयाची असेल तर हिंदुस्थानातून हिंदू धर्म आणि मुसलमान धर्म हे प्रथम नामशेष झाले पाहिजेत आणि पुन्हा त्यांचे हिंदुस्थानात पुनरुज्जीवन झाले पाहिजे . त्याचप्रमाणे अतिशय कडक अशी तपस्या आणि अतिशय कठोर अशा जागत्या पाहऱ्यांतून या दोन्ही धर्मांची तत्त्वे तावूनसुलाखून निघणे अवश्य आहे . इतकेच नव्हे तर बुद्धी आणि शास्त्र यांच्या प्रभावाखाली या दोन्ही धर्मांची शुद्धी होणे आणि त्यांना नवे स्वरूप प्राप्त होणे हे अतिशय अवश्य आहे . इस्लामचा अशा तऱ्हेने पुनर्जन्म होणे हे अशक्य नाही . या गोष्टीची प्रचीती आपल्याला आधुनिक कालखंडात स्मिर्ना देश जिंकून

घेणाऱ्या जेत्याने आणून दिलेली आहे . गाजीमुस्तफा केमालपाशा याने असे सिद्ध करून दाखविले आहे की विसाव्या शतकातले अती बलाढ्य असे मुसलमानी राज्य हे आपल्या घटनेला निधर्मी बनवू शकते , अनेक पत्नीत्वाची चाल आणि स्त्रियांच्या नशिबी असलेला गुलामगिरीतील एकांतवास नष्ट करू शकते , आपल्या देशातील सर्व पंथांच्या लोकांना राजकीय समानता बहाल करू शकते आणि इतके केल्यानंतर देखील ही इस्लामची भूमी असण्याच्या त्या राष्ट्राच्या भूमिकेला कोणताही बाध येऊ शकत नाही.

औरंगजेबाने अशा तऱ्हेचा ध्येयवाद प्रत्यक्ष कृतीत आणण्याचा प्रयत्न कधीच केला नाही . या ध्येयवादाच्या पूर्तीसाठी ज्या गोष्टींची आवश्यकता होती , त्या गोष्टी त्याच्या साम्राज्यात होत्या . त्याच्या साम्राज्यातील प्रजा अतिशय संमिश्र अशा लोकसंख्येची बनलेली होती , सारा भारत देश त्याच्या पायाशी नतमस्तक होऊन पडलेला होता आणि अधाशीपणे त्याच्या साम्राज्याचा घास गिळण्यासाठी त्याला कुणीही युरोपियन प्रतिस्पर्धी नव्हते. अशा तऱ्हेने परिस्थिती अनुरूप असताना औरंगजेबाने वरील ध्येयवाद प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला नाहीच तर त्याने जाणूनबुजून अकबराने ज्या राष्ट्रीय आणि सयुक्तिक धोरणाचा पाठपुरावा करण्याच्या प्रथेला सुरुवात केली होती तिला खो घातला.

इतिहासाचे जर योग्य दृष्टिकोनातून वाचन केले तर आपल्याला असे दिसून येईल की इतिहास म्हणजे परमेश्वराने जे काही करावयाचे ठरविले असते त्याचे समर्थन आहे आणि योग्य वेळी एखाद्या मोठ्या कार्याची परिपूर्ती झाल्याचे अविष्करण आहे . औरंगजेबासारख्या की ज्याची गणना आदर्श अशा मुसलमान सम्राटामध्ये करता येईल अशा बादशाहाला जीवनामध्ये अपयश आले . ज्यावेळी तो सिंहासनावर अधिष्ठित झाला त्यावेळी सर्व तऱ्हेच्या अनुरूप परिस्थितीचा त्याला फायदा मिळालेला होता . त्याची गणना आचार - विचारामध्ये नेकीचा म्हणून करता आली असती . सम्राटाला पाहिजे अशा शिक्षणाचा लाभ त्याला झाला होता. अशा परिस्थितीत त्याला आलेले अपयश म्हणजे एका चिरंतन अशा सत्याचा जगाकडून मिळणारा अतिशय स्वच्छ -स्वच्छ असा पुरावा आहे . हे सत्य म्हणजे कोणतेही साम्राज्य हे मोठे किंवा चिरकाल टिकणारे असू शकत नाही —जर का त्या साम्राज्याच्या प्रजाजनांच्या अंगी मोठेपणा नसेल तर — आणि कोणत्याही लोकांच्या अंगी हा मोठेपणा येणार नाही की जे लोक सारखे अधिकार आणि जीवनातील सारख्या संधी आहेत अशा लोकांच्या एका सुसंघटित अशा राष्ट्राची निर्मिती करण्यास शिकत नाहीत . असे राष्ट्र जर निर्माण झालेच तर हे राष्ट्र असे पाहिजे की त्या राष्ट्राची निर्मिती करणारे जे महत्त्वाचे घटक असतात त्यामध्ये एकजिनसीपणा आहे आणि जीवनातील आणि जीवनातल्या विचारसरणीतील ती मूलभूत तत्त्वे आहेत त्याबाबत अशा राष्ट्रामध्ये पूर्णपणे एकवाक्यता आहे आणि तरी देखील बारीकसारीक गोष्टी आणि खाजगी जीवन याबाबत जे वैयक्तिक मतभेद असतात ते मात्र कोणत्याही तऱ्हेची बंधने न घालता सहिष्णुपणे ज्या राष्ट्रामध्ये सहन केले जातात . इतकेच नव्हे तर ज्या ठिकाणी जातीय स्वातंत्र्याचा पाया म्हणून वैयक्तिक स्वातंत्र्याची गणना महत्त्व पूर्णपणे केली जाते — त्याचप्रमाणे हे राष्ट्र असे पाहिजे की ज्याच्या राज्यकारभाराचा उद्देश हा कोणत्याही विशिष्ट मठाचे किंवा विशिष्ट भावनाविशेषांचे हितसंबंध न पाहता केवळ राष्ट्रीय हितसंबंधाचे पालनपोषण आणि जपणूक करणे हा असतो . त्याचप्रमाणे या राष्ट्रातील समाजाची संघटना अशी असते की जिच्याकडून कसल्याही तऱ्हेची भीती न बाळगता , अतिशय अविरतपणे आणि कसलीही बंधने न ठेवता ज्ञानाची संपादना केली जाते . अशा तऱ्हेच्या चांगुलपणाच्या आणि सत्याच्या स्वच्छ प्रकाशरूपी वातावरणात भारतीय राष्ट्रीयत्वाची वाढ होण्याइतकी आणि या राष्ट्रीयत्वाला पूर्णावस्थेप्रत नेण्याइतकी परिस्थिती निर्माण होऊ शकते.

●●●

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

प्रकरण विसावे

औरंगजेबाचे साम्राज्य : त्याची साधनसामग्री, व्यापार आणि राज्यकारभाराची पद्धती

(१) मोगल साम्राज्य : त्याची व्याप्ती आणि वार्षिक वसूल

१७०७ मध्ये औरंगजेबाचा ज्या वेळी मृत्यू झाला तेव्हा त्याच्या साम्राज्याचे २१ सुभे अथवा स्वतंत्र प्रांत होते. त्यांपैकी १४ हिंदुस्थान अथवा उत्तर भारतात होते , ६ दक्षिणेत होते आणि एक काबूल हा ज्याला हल्ली अफगाणिस्तान म्हणतात त्यात होता. त्यांची नावे पुढीलप्रमाणे :

(१) हिंदुस्थानमधील सुभे –आग्रा, अजमीर , अलाहाबाद, बंगाल, बिहार, दिल्ली, गुजराथ, काश्मीर, लाहोर, माळवा, मुलतान, ओरिसा, औघ आणि थत्ता किंवा सिंध.

(२) दक्षिणेचे सुभे –खानदेश, वऱ्हाड, औरंगाबाद (जुने अहमदनगर), बीदर (जुने तेलंगण), विजापूर आणि हैद्राबाद . शंभर वर्षापूर्वी म्हणजे अकबराच्या कारकिर्दीच्या अखेरीला (१६०५) मोगल साम्राज्याने हिंदुस्थानचे सर्व चौदा सुभे आणि दक्षिणेच्या प्रांतापैकी फक्त पहिले दोन व्यापलेले होते . कारण अकबराने हमदनगरचे राज्य खालसा केले होते ते केवळ नावालाच होते . कंदहार अथवा दक्षिण अफगाणिस्तान या सुभ्याची फार पूर्वीपासूनच मोगल साम्राज्याचा एक सुभा म्हणून सरकारी कागदपत्रांत नोंद झालेली होती . परंतु ही नोंद देखील केवळ नावापुरतीच होती . कारण या प्रांताची पर्शिया आणि दिल्लीच्या सुलतानांमध्ये वारंवार अदलाबदल होत असे . अखेर इ . स . १६४९ मध्ये मोगलांनी हा प्रांत कायमचा गमाविला . ज्यावेळी इतरत्र अतिशय भरभराटीची परिस्थिती होती त्यावेळी हा प्रांत म्हणजे अतिशय ओसाड म्हणून उत्पन्नाच्या दृष्टीने गणला जाई आणि या प्रांताचा ताबा फायद्याऐवजी तोट्यात पडे . नादिरशहाने इ. स. १७३९ साली काबूल अथवा उत्तर अफगाणिस्तान आपल्या राज्याला जोडीपर्यंत त्याचा ताबा मोगल बादशहाकडे होता . या प्रांताचे उत्पन्न अकबर बादशहाच्या कारकिर्दीत जेमतेम वीस लक्ष रुपयांचे होते . औरंगजेबाच्या कारकिर्दीत हे उत्पन्न ४० लाखांवर गेले . परंतु यापैकी खूपशा उत्पन्नाची अनेकदा वसुली देखील होत नसे . म्हणून या प्रकरणामध्ये आपण जी चर्चा करणार आहोत , त्यामधून अफगाणिस्तानच्या या दोन प्रांतांबाबतची चर्चा आपण वगळू.

औरंगजेबाच्या अमलाखालील मोगल साम्राज्यात उत्तरेकडील काश्मीर आणि हिंदुकुश पर्वताच्या दक्षिणेकडील सर्व अफगणिस्तान मोडत असे . नैर्ऋत्य दिशेला गजनी शहराच्या दक्षिणेस ३६ मैलांवर एक रेषा कल्पिल्यास ती मोगल साम्राज्य आणि पर्शियन साम्राज्य यांना विभागणारी एक रेषा असे मानता येईल . पश्चिम किनाऱ्यावर तत्त्वतः या साम्राज्याची व्याप्ती उत्तरेच्या सरहद्दीपर्यंत म्हणजे गोव्यापर्यंत आणि अंतर्भागात बेळगाव (मुंबई-कर्नाटक अथवा कॅनरा) आणि तुंगभद्रा नदीपर्यंत होती . त्याच्या पलीकडे या साम्राज्याची सीमा पश्चिमेकडून पूर्वेकडे पसरलेली होती , आणि ती म्हैसूरच्या मध्यातून पश्चिमेकडून पूर्वेकडे नेहमी बदलणाऱ्या आणि सदासर्वकाळ वादग्रस्त असणाऱ्या अशा रेषेशी समान्तर होती . आग्नेयेकडे ही सीमा तंजावरच्या उत्तरेस कोलेरुन नदीच्या प्रवाहात जणू काही उतरल्यागत वाटत होती . अगदी ईशान्येला गौहत्तीच्या पश्चिमेला असलेली मोनास ही नदी मोगल साम्राज्य आणि आसामचे स्वतंत्र राज्य यांना विभागणारी रेषा होती . परंतु एक गोष्ट नेहमी ध्यानात ठेवण्याजोगी आहे आणि ती म्हणजे ही की

नैर्ऋत्य, दक्षिण आणि आग्नेय दिशेला म्हणजे साम्राज्याच्या महाराष्ट्र , कर्नाटक; म्हैसूर आणि पूर्व कर्नाटक या प्रदेशांत बादशाही सत्ता आणि सामर्थ्य यांचे स्वरूप विवाद्य आणि संदिग्ध असे होते. या प्रदेशातील जवळ जवळ सर्व ठिकाणच्या अधिकाऱ्यांना दोन धन्यांच्या हुकमांची अंमलबजावणी करावी लागे . याचा अर्थ तेथील राज्यकारभाराचे स्वरूप दो अमली होते . या गोष्टीची इंग्रज आणि फ्रेंच वखारदारांनी अतिशय अवहेलना निदर्शक अशी आपल्या दप्तरात नोंद केली आहे.

अफगाणिस्तान वगळल्यास अकबराच्या कारकिर्दीत मोगल साम्राज्याचा एकंदर महसूल १३ कोट आणि २१ लक्ष रुपये होता . औरंगजेबाच्या अमलाखाली हा वसूल ३३ कोटी आणि २५ लक्षांवर गेला . ही रक्कम म्हणजे राज्यातील जमिनीपासून सरकारकडून अपेक्षित असलेल्या उत्पन्नाची कमाल अथवा प्रमाणित मर्यादा होती. परंतु या रकमेची पूर्णपणे वसुली कधीच झाली नाही , आणि प्रत्यक्षात वसूल होणारी रक्कम सरकारकडून अपेक्षिल्या गेलेल्या रकमेपेक्षा खूपच कमी असे . वर दिलेली रक्कम ही केवळ जमिनीपासून मिळणाऱ्या महसुलाच्या बरोबरीइतकी होती आणि या रकमेत जकात (मुसलमानांच्या वार्षिक उत्पन्नाच्या $^{१}/_{४०}$ इतका कर. या करापासून मिळणारे उत्पन्न फक्त धार्मिक परोपकारावर खर्च करावयाचे होते .) आणि जिझिया यासारख्या करांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा समावेश नव्हता . अनेक करांपासून सरकारला जे उत्पन्न मिळत असे त्याचे जे प्रमाण होते त्याची स्थूलमानाने कल्पना औरंगजेबाच्या कारकिर्दीतील गुजराथ प्रांताच्या उत्पन्नाच्या आकड्यांवरून येईल :- जमिनीचा महसूल ११३ लाख रुपये , जिझिया ५ लक्ष रुपये , फक्त सुरत बंदरातील जकात करापासून मिळणारे वार्षिक उत्पन्न १२ लाख रुपये . (औरंगजेबाच्या कारकिर्दीच्या अखेरीला मसूलीपट्टम आणि हुबळी ही दोन बंदरे सोडल्यास साम्राज्याच्या इतर बंदरांमधून होणारा व्यापार अतिशय क्षुल्लक असा होता .) लष्करी जहागीर आणि बादशहाच्या खाजगीतील जमिनी (खालसा, शरीफ) मिळून एकंदर जमिनी किती होत्या याची कल्पना पुढील आकडेवारीवरून येईल (circa १६९०) : जहागिरीखाली असलेल्या जमीन महसुलाची आकारणी २७ .६४ कोटी आणि खालसा जमिनीची आकारणी ५.८१ कोटी रुपये. (या जमिनीत साऱ्या साम्राज्यामधील जमिनीचा समावेश होता.)

(२) साम्राज्याचा अधिकारी उमराव वर्ग

सरकारचा मुलकी आणि लष्करी कारभार हा सैन्यदलात नोंद असलेल्या अधिकाऱ्यांकरवी केला जात असे. या अधिकाऱ्यांची अनुक्रमाने वर्गवारी (मनसब) लावलेली असे. या अधिकाऱ्यांमध्ये २० हजार घोडेस्वारांची मनसब असलेल्या अधिकाऱ्यांपासून फक्त वीस घोडेस्वारांची मनसब असलेल्या अधिकाऱ्यांचा समावेश असे . अर्थात वीस हजार घोडेस्वारांची मनसब ही नाममात्र असे . आणखी एक गोष्ट नमूद करण्यासारखी आहे आणि ती म्हणजे अकबराच्या कारकिर्दीत सर्वांत कमी मनसब ही दहा घोडेस्वारांची होती. या अधिकाऱ्यांमध्ये जे अधिकारी ३ हजारी किंवा त्यापेक्षा अधिक मनसब असलेले होते त्यांना उमरा - इ-आजम किंवा उमदत उल् मुल्क किंवा उमदा असे म्हणत. ज्यांची मनसब ५०० आणि २५०० जात या मध्ये होती त्यांना फक्त उमरा या नावाने संबोधिले जाई . ज्यांची मनसब ५०० घोडेस्वारांच्या पेक्षा (नाममात्र) कमी असे त्यांना मनसबदार अथवा अधिकारी असे संबोधिले जाई.

अधिकाऱ्याचा दर्जा	त्यांची संख्या	वर्ष
उमरा-इ-आजम		
(तीन हजार आणि अधिक	६३	१५९६

मनसब असलेल्या राजपुत्र	११२	१६२०
वगैरेंचा समावेश असलेल्या	९९	१६४७
अधिकाऱ्यांचा वर्ग)	—	१६९०
उमरा आणि मनसबदार मिळून असलेल्या	१८०३	१५९६
अधिकाऱ्यांची कुल संख्या	२९४५	१६२०
	८०००	१६४७
	१४४४९	१६९०

वरील आकडेवारीवरून आपल्याला असे दिसून येईल की औरंगजेबाच्या कारकिर्दीत लष्करी अधिकाऱ्यांच्या संख्येत अतिशय अवास्तव अशी वाढ झालेली होती आणि त्यामुळे सरकारी तिजोरीवर अतिशय मोठा असा आर्थिक बोजा पडला होता.

औरंगजेबाच्या हुकमतीखाली एकंदर १४४४९ मनसबदार होते . त्यांपैकी ७००० जहागिरदार होते आणि ७४५० नकदी (ज्यांना रोख पगार देण्यात येई असे) होते. म्हणजे जहागिरदार आणि नकदी यांचे प्रमाण एकंदर मनसबदारांच्या संख्येच्या संबंधात निम्मे निम्मे होते . या मनसबदारांचे त्यांच्या हाताखालील सैनिकांचा पगार धरून वार्षिक वेतन आणि इतर भत्ते खालीलप्रमाणे होते . प्रत्येक श्रेणीतील पहिल्या दर्जाच्या अधिकाऱ्यांचाच पुढील आकडेवारीत समावेश आहे.

७ हजारी.....३½ लक्ष रुपये.
५ हजारी.....२½ लक्ष रुपये.
१ हजारी.....½ लाख रुपये.
२० सैनिकांचा मनसबदार.....१ हजार रुपये.

शहाजहान बादशहाच्या कारकिर्दीत प्रत्येक श्रेणीच्या मनसबदाराची जेवढी मनसब असे त्याच्या चौथ्या हिश्शाने या सैनिकांची संख्या असावी असा नियम होता.

इ. स. १६४७ मध्ये साम्राज्याच्या एकंदर सेनादलाची संख्या पुढीलप्रमाणे होती.

सैन्यात भरती करण्यासाठी आणि डाग देण्यासाठी भरती केलेल्या घोडेस्वारांची संख्या—२ लाख.

मनसबदार—८ हजार
अहदी आणि बर्कन्दाज—७ हजार

तबीनान अथवा राजपुत्राचे अतिरिक्त असलेले घोडेस्वार , उमरा आणि मनसबदार —१ लक्ष ८५ हजार.

पायदळ, बंदूकची, गोलंदाज आणि अग्निबाण फेकणारे—४० हजार.

अनुक्रमणिका

औरंगजेबाने यानंतर ज्या आणखी लढाया सुरू केल्या आणि दक्षिणेमध्ये साम्राज्याला जो प्रदेश जोडला त्यामुळे वरील फौजेच्या संख्येमध्ये अधिकच भर पडली. याचा परिणाम असा झाला की सैन्यावरील खर्चाचा इतका प्रचंड बोजा तिजोरी वर पडला की त्यामुळे साम्राज्याची आर्थिक घडी पुन्हा दुरुस्त न होण्याइतकी कोसळली.

बर्नियर या प्रवाशाने मोगल साम्राज्यात प्रचलित असलेल्या एका रूढीचे अतिशय रानटी आणि फार प्राचीन असे वर्णन केले आहे आणि ती म्हणजे सरकारी सेवेमध्ये असलेला कोणताही मनुष्य आपले कर्तव्य बजावीत असताना जर मरण पावला तर बादशहाला त्याची सर्व मालमत्ता जप्त करण्याचा जो अधिकार होता ही होय . दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास सरकारी अमीरउमरावांमध्ये वंशपरंपरागत चालत येणारी अशी कसल्याही तऱ्हेची मालमत्ता नव्हती , तर चाकरीमधील उमराव मरण पावल्यानंतर त्याची सर्व संपत्ती आणि घरेदारे यांचा बादशहाकडून नेहमी ताबा घेतला जाई आणि त्यांच्या मुलांना त्याच्या मर्जीला येईल त्याप्रमाणे तो बक्षिशी देत असे . आपल्या बापाच्या उर्वरित मालमत्तेवर त्यांचा कोणत्याही तऱ्हेचा कायदेशीर अधिकार नसे . राज्याच्या आणि भारतीय संस्कृतीच्या दृष्टीने या गोष्टीचे अतिशय भयानक असे परिणाम झाले . मोगल सरदार हे सतत अतिशय ख्यालीखुशालीत राहात आणि आपले सर्वस्व चैन करण्यामध्ये उधळून टाकीत . कारण आपण आपल्या कुटुंबियांकरता काहीही ठेवू शकत नाही आणि आपल्या काटकसरीचा फायदा एकट्या बादशहाला मिळणार आहे याची त्याला पूर्णपणे जाणीव असे . त्याचप्रमाणे अमीर–उमराव यांचे वैभव कायम राहील याबद्दल काहीच शाश्वती नसल्यामुळे खाजगीरित्या भांडवलाचा जो समुच्चय होतो त्यावर आळा बसला अणि राष्ट्राची आर्थिक प्रगती ज्या भांडवलाच्या उपलब्धतेवर अवलंबून असते त्या प्रगतीत अडथळे निर्माण झाले . त्याचप्रमाणे संस्कृती आणि सुशिक्षितावस्था यांचा सर्वसाधारण दर्जा खालावला . कारण मोगल साम्राज्याखालील प्रत्येक पिढीला त्याच्या पूर्वजांनी जे काही मिळविले होते आणि जी प्रगती साध्य केली होती त्यापासून फायदा होण्याऐवजी त्यांना अगदी खालच्या दर्जापासून समाजातील उच्च श्रेणीच्या वर्गापर्यंत पोहोचण्यासाठी अतिशय काबाडकष्ट करावे लागत.

जहागिरी खालसा करण्याची ही जी पद्धती होती तिचे राजकीयदृष्ट्या भयानक असे परिणाम झाले. यापैकी एक म्हणजे अनियंत्रित राजकीय सत्तेवर एका अतिशय प्रखर अशा भावनेतून निर्माण होणाऱ्या प्रतिरोधाला हिंदुस्थानामध्ये वाव मिळाला नाही. हा प्रतिरोध म्हणजे स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे वंशपरंपरागत चालत आलेले अमीरउमरावांचे मंडळ असे त्याकडून होई असे आपल्याला म्हणता येईल . असे मंडळ जेव्हा अस्तित्वात असते त्यावेळी अशा मंडळाचे स्थान आणि संपत्ती ही कोणत्या एका पिढीमध्ये बादशहाच्या मर्जीवर अवलंबून नसते , आणि म्हणून साहजिकच असे मंडळ कोणत्याही बादशहाने राज्यकारभारात जुलूम केल्यास या जुलमाला ते कोणत्याही तऱ्हेची भीती न बाळगता प्रतिकार करू शकते. वरील पद्धतीचा दुसरा परिणाम झाला तो असा : या पद्धतीने मोगल अमीरउमराव यांची स्थिती निव्वळ आपल्या स्वार्थाकरिता लढणाऱ्या एखाद्या लुटारूंच्या टोळी सारखी झाली . देशावर परकीय आक्रमण झाले किंवा वारसा हक्कासाठी प्रत्येक वेळी जी युद्धे होत त्यामध्ये ज्या बाजूला जय मिळण्याची शक्यता निर्माण होई त्या बाजूला कसलाही विचार न करता जाऊन मिळण्याची या मोगल अमीरउमरावांची केव्हाही तयारी असे. कारण त्यांना या गोष्टीची पूर्ण जाणीव होती की त्यांच्या जमिनी आणि इतकेच नव्हे तर त्यांची खाजगी मालमत्ता ही त्यांचीच राहील याबद्दल कायदेशीररीत्या काहीच शाश्वती नव्हती , आणि या गोष्टी त्यांच्याजवळ टिकणे हे संपूर्णतया ज्याच्या हातात प्रत्यक्ष सत्ता आहे अशा बादशहाच्या केवळ मर्जीवरच अवलंबून आहे . मध्ययुगीन हिंदुस्थानात एका बाजूला समाजाच्या अगदी वरच्या थरावर असलेला

अतिसामर्थ्यवान बादशहा आणि दुसऱ्या बाजूला समाजाच्या अगदी खालच्या थराला असलेले असंख्य असे गरीब शेतकरी आणि कामगार यांच्यामध्ये एखाद्या भिंतीप्रमाणे कणखरपणे उभा राहील असा अतिशय सामर्थ्यवान असा व्यापारीवर्ग किंवा स्वतंत्र वृत्तीने जगणारी अमीरउमराव मंडळी यांचा संपूर्णपणे अभाव होता. साहजिकच अशा तऱ्हेचे सरकार हे अस्थिर आणि सदोष असले तर त्यात काहीच नवल नाही.

(३) उद्योगधंदे आणि व्यापार

अतिशय मोठ्या प्रमाणावर आणि अनेक प्रकारच्या वस्तूंचे आपल्या राज्याच्या मालकीच्या कारखान्यांत उत्पादन करणारे मोगल सरकार म्हणजे एकप्रकारे कारखानदारच होते असे म्हणावे लागेल . याबद्दलची अतिशय संगतवार अशी माहिती मी माझ्या **मुघल ॲडमिनिस्ट्रेशन** या पुस्तकाच्या राज्याच्या मालकीचे उद्योगधंदे या दहाव्या प्रकरणात वर्णन करून सांगितली आहे . निरनिराळ्या प्रांतांतील खाजगी उद्योगधंद्यांची माहिती मी माझ्या **इंडिया ऑफ औरंगजेब** या पुस्तकात वेगळी अशी तपशीलवार सांगितलेली आहे. मोगलकालीन परराष्ट्रीय व्यापार हा अगदी कमी होता . साहजिकच मोगल साम्राज्याच्या अर्थव्यवस्थेत परराष्ट्रीय व्यापाराचे स्थान अतिशय दुय्यम दर्जाचे होते . वर्षाकाठी परदेशातून आलेल्या मालावरील जकातीचे उत्पन्न तीस लक्ष रुपयांपेक्षा कमी होते . याउलट राज्याच्या जमीनमहसुलाचे येणारे वार्षिक उत्पन्न वरील रकमेच्या जवळ -जवळ एकशे अकरा पटीने अधिक होते . बर्नियर याने या बाबतीत अतिशय सूक्ष्म का निरीक्षण करून पुढालप्रमाणे विधान केले आहे. “ज्या देशाच्या व्यापाराची उलाढाल अशा प्रकारे होते त्या व्यापारात युरोपमध्ये आपल्याला जी यशस्विता आणि चपळाई दिसून येते ती प्रत्ययास येणे या ठिकाणी कठीण आहे. क्वचित् एखाद्या ठिकाणी जेथे व्यापाऱ्याला उच्च श्रेणीच्या लष्करी अधिकाऱ्यांकडून संरक्षण मिळत असे, तेथे अतिशय मोठ्या प्रमाणावर व्यापारी उलाढाल करण्याचे धारिष्ट होण्याची शक्यता असे; परंतु अशा परिस्थितीतदेखील या व्यापाऱ्याची स्थिती त्याच्या रक्षणकर्त्याच्या गुलामापेक्षा अधिक नसे . कारण ह्या रक्षणकर्त्याला त्या व्यापाऱ्याला संरक्षणाची हमी दिल्याबद्दलची किंमत म्हणून वाटेल त्या अटी लादण्याचा अधिकार होता.”

इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीच्या पहिल्या साठ वर्षांच्या (१६१२–१६७२) व्यापारी राजवटीत कंपनीने निर्यात केलेल्या भारतीय वस्तूंच्या किमतीची वार्षिक सरासरी ही १ लक्ष पौंडांहून (८ लक्ष रुपये) अधिक नव्हती. (१६८१ मध्ये हीच सरासरी एकट्या बंगालपुरतीच २ लक्ष ३० हजार पौंडांइतकी झाली.) या सुमारास डच कंपनीचा हिंदुस्थान बरोबरील व्यापार हा जवळ जवळ इंग्लिश कंपनीच्या व्यापाराइतकाच होता तर पोर्तुगीजांचा व्यापार हा मात्र निश्चितपणे याहीपेक्षा कमी होता . एतद्देशीय व्यापाऱ्यांच्या हातात फार मोठ्या प्रमाणावर सागरी व्यापार होता . हे सिद्ध करणारा कोणताही पुरावा उपलब्ध नाही , परंतु पर्शिया, तुर्कस्थान आणि काही अंशी तिबेट या देशांबरोबर मात्र थोड्याफार प्रमाणात व्यापार हा खुष्कीच्या मार्गाने चालूच राहिला. वस्तुस्थिती अशी होती की त्या काळी हिंदुस्थानातील लोकांना काही बहुमोल धातू आणि श्रीमंत लोक ज्या काही थोड्याफार चैनीच्या वस्तू वापरीत त्या सोडून दिल्यास आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या मार्गाने फारच थोड्या वस्तूंची आयात करण्याचा प्रसंग येई . या ज्या काही वस्तू आयात केल्या जात त्यांची किंमत कापडापासून बनविलेल्या वस्तूंची निर्यात आणि त्यांच्या जोडीला मिरी , तीळ आणि सोरा मीठ वगैरे तऱ्हेतऱ्हेचा कच्चा माल यांची निर्यात करून वळती केली जाई . आर्थिकदृष्ट्या अशातऱ्हेने हिंदुस्थान हा जवळ जवळ स्वयंपूर्ण होता (**जी. जे. हॅमिल्टन**, ३२–३३).

मोगल सरकारकडून वसूल केल्या जाणाऱ्या आयातकराचे प्रमाण अतिशय कमी होते . ह्या आयात कराचे प्रमाण वस्तूंच्या किमतीच्या ३ ½ टक्के एवढे होते आणि यापैकी एक टक्का जिझिया कराच्या रूपाने सरकारी तिजोरीत जमा होई . यावरून एक गोष्ट सिद्ध होते आणि ती म्हणजे मोगल सरकारची परराष्ट्रीय व्यापाराला उत्तेजन देण्याची सर्वसाधारणपणे इच्छा होती . त्याचप्रमाणे प्रतिबंधक असे आयात कर लादून एतद्देशीय कारखानदारांना संरक्षण देण्याचा प्रयत्न करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता : सरकार–दरबारी वापरल्या जाणाऱ्या चैनीच्या वस्तू आणि बहुमोल अशा धातूंचा पुरवठा होणारे एक राजमान्य साधन म्हणून दिल्लीच्या सरकारने परराष्ट्रीय व्यापार सम्मत केला असावा असे दिसते. (**जी. जे. हॅमिल्टन,** २०)

१७ व्या शतकाच्या पहिल्या ५० वर्षांत इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीचा पूर्वेकडील देशांबरोबरचा व्यापार हा प्रामुख्याने पाच तऱ्हेच्या वस्तूंबाबतच्या आयातीनिर्यातीपुरता मर्यादित होता . इंग्रजी बाजारपेठांत ज्या वस्तूंना प्रामुख्याने मागणी होती त्या वस्तू म्हणजे आर्ची पेलागो आणि स्पाईस बेटे ह्यांमधील मसाल्याचे पदार्थ, पर्शियामधील कच्चे रेशीम, आणि हिंदुस्थानामधील सोरा मीठ आणि नीळ ह्या होत . याशिवाय बऱ्याच प्रमाणात उत्तम दर्जाचे कापसाचे कापड , आणि थोड्याफार प्रमाणात तयार मालाच्या रेशमाच्या वस्तू यांची आयात इंग्लंडमध्ये केली जाई ही गोष्ट निर्विवाद होती . परंतु कंपनीकडून कापसापासून तयार होणाऱ्या वस्तूंची जी खरेदी होत असे ती इंग्लंडमध्ये आयात करण्यासाठी बव्हंशी केली जात नसे , परंतु हा माल विशेषतः दूर पूर्वेच्या आणि पर्शियाच्या बाजारपेठांसाठी होत असे . तसेच प्रत्यक्ष वस्तुस्थितीत परराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये हिंदुस्थानकडे कापसापासून तयार करण्यात येणाऱ्या वस्तूंच्याबाबत जवळ जवळ मक्तेदारी होती. परंतु रेशमाच्या वस्तूंबाबत मात्र हिंदुस्थानचा मोठा प्रमाणावर निर्यात व्यापार होता असे म्हणता येणार नाही . इंग्लंडमध्ये कच्चे रेशीम प्रामुख्याने पर्शिया आणि चीन या देशांमधून आयात होई , तर १७ व्या शतकाच्या पहिल्या ५० वर्षांत इंग्लंडमध्ये आयात केल्या जाणाऱ्या तयार रेशमी वस्तूंपैकी बरीच टक्के आयात ही चीनमधूनच होत असे. (**जी. जे. हॅमिल्टन,** ३१–३२)

मोगल काळामध्ये हिंदुस्थानात आयात होणाऱ्या मुख्य वस्तू म्हणजे धातूच्या स्वरूपात चांदी आणि सोने आणि थोड्या -फार कमी प्रमाणात तांबे आणि शिसे या होत्या . आपण जगातल्या इतर देशांवर या धातूंसाठी जवळ जवळ पूर्णपणे अवलंबून होतो . ही स्थिती लोखंड आणि पोलाद याबाबत मात्र नव्हती . तरीदेखील हे दोन धातू हलके म्हणून आयात केले जात . उच्च प्रतीच्या लोकरी कापडासाठी आपल्या देशाकडून युरोपमधून आणि त्यातल्या त्यात फ्रान्सकडून आयात केली जाई . युरोपकडूनच आपल्याला अशा तऱ्हेच्या कापडाचा प्रामुख्याने पुरवठा होत असे. इतर तऱ्हेचे लोकरी कापड (अरबी सकरलात, शेंदरी रंगाचे कापड) व रुंद पन्ह्याचे कापड यांची भरपूर प्रमाणात आयात केली जाई , आणि अशा कापडाचा हिंदुस्थानामधील मुख्य खप हा राजदरबारी आणि श्रीमंत लोक यांमध्येच होत असे . या खालोखालच्या किमती वस्तूंत घोड्यांची गणना करावी लागेल . अतिशय मोठ्या प्रमाणावर घोड्यांची आयात ही जहाजांतून पर्शियन आखातामधून होई आणि खुष्कीच्या मार्गाने खुरासाण , मध्य आशिया आणि काबूल येथून हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीकडून होई . डोंगराळ भागांत उपयोगी पडणारी तट्टे (यांना टंगन अथवा गुंट असे म्हणत .) यांची आयात तिबेट आणि भूतान या पूर्व हिमालयातील राज्यांतून बंगाल , कूच बिहार, मोरंग आणि अवध या प्रांतांमधून होई . हिवाळ्यामध्ये ताजी फळे आणि सबंध वर्षभर सुकी फळे यांचा फार मोठ्या प्रमाणावर उत्तर हिंदुस्थानामध्ये खप होई . या फळांची आयात मध्य आशिया , अफगाणिस्तान आणि पर्शिया यांमधून होई . लवंगा, जायफळ, दालचिनी, आणि वेलदोडा वगैरे मसाल्याचे सामान स्पाईस बेटांतून डच लोकांकडून पुरवले जाई . या पदार्थांच्या पुरवठ्याबाबत या बेटांची पूर्णपणे मक्तेदारी होती . कस्तुरी आणि चिनी मातीची भांडी यांसारख्या चैनीच्या वस्तू चीनमधून , बेहेरीन (पर्शियन आखात) आणि

सिलोन येथून मोती, पेगू आणि सिलोन येथून हत्ती, अमेरिकेतून उच्च प्रतीची तंबाखू, युरोपमधून दारूसाठी लागणारी काचेची भांडी आणि चित्ताकर्षक वस्तू , आणि ॲबिसिनियामधून गुलाम याप्रमाणे आयात केली जाई. परंतु या वस्तूंची फार मोठी किंमत आणि या वस्तूंचा मर्यादित प्रमाणात केला जाणारा वापर यामुळे यांची आयात अतिशय थोड्या प्रमाणावर केली जात असे. त्याशिवाय हिंदुस्थानातील स्थानिक राजेरजवाडे यांना एकाएकी गरज लागल्यास युरोपियन कंपन्या त्यांना वारंवार थोड्या प्रमाणात तोफखाना आणि दारुगोळा विकीत. परंतु या वस्तूंमध्ये नियमित व्यापार होता असे मात्र म्हणता येणार नाही . आणि तसेच बघितले तर हा होणारा व्यापार अतिशय गुप्तपणे होत असे आणि त्याचे स्वरूप बेकायदेशीर होते . त्याचप्रमाणे अतिशय लहान प्रमाणावर असा वाहतुकीचा ओघ प्रथम अवधमार्गे आणि नंतर पाटण्याच्या मार्गे हिंदुस्थानात हिमालयाच्या बाजूकडील प्रदेशातून प्रवेश करीत असे. यामध्ये असलेले व्यापारी खेचरे आणि मेंढ्या यांवर लादून हिंदुस्थानातील लोकांच्यासाठी छोट्या प्रमाणात सोने , तांबे, कस्तुरी आणि पंखे किंवा चवऱ्या तयार करण्यासाठी याक गाईच्या शेपट्या आणीत . त्याशिवाय अधिक असलेली डोंगराळ प्रदेशांतील खेचरे देखील आणीत. वरील वस्तू हिंदुस्थानात विकल्यानंतर ते बरोबर मीठ , कापूस, आणि काचेच्या वस्तू घेऊन जात. युरोपियन कागद हा सुरुवातीला पोर्तुगीज आणि नंतर डच आयात करीत. तरी देखील तो पोर्तुगाल पेपर या नावाने ओळखला जाई . या कागदाचा फार मोठया प्रमाणावर उपयोग दक्षिणेतल्या स्वतंत्र सुलतानांकडून केला जात असे. परंतु मोगल बादशहाच्या स्वतःच्या मालकीचे अतिशय उत्तम अशा तऱ्हेचा कागद निर्माण करणारे कारखाने काश्मीर आणि इतर ठिकाणी होते . या कारखान्यांत तयार होणारा कागद युरोपात इंडिया पेपर म्हणून ओळखला जाई . दरबारातल्या या गरजेशिवाय इतर लहानसहान सरकारी बाबींसाठी आणि खाजगी व्यक्तींना लागणारा कागद हा काघजी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मुसलमान कारखानदारांकडून तयार होऊन पुरवला जाई. हे कारखानदार हे प्रत्येक शहरामध्ये आपले कारखाने उभारीत . प्रत्येक प्रांताच्या राजधानीच्या शेजारी या कारखानदारांची खास अशी उपनगरे असत. त्यांना पुरे असे म्हणत.

मोगल काळातील आपल्याकडून निर्यात होणारा महत्त्वाचा माल म्हणजे सर्वसामान्य असे कापसापासून बनविण्यात आलेले कापड . या कापडाला कॅलिकोज असे म्हणत . हे कापड साधे अथवा छापील (चीट) असे. या कापडाचा फार मोठा खप इंडियन आर्चीपेलागो येथे होत असे. १७ व्या शतकाच्या अखेरीला इंग्लंडमध्येही या कापडाचा खप वाढला. याशिवाय हिंदुस्थानातून निर्यात होणाऱ्या वस्तू म्हणजे मलमल अथवा अतिशय सुरेख असे तलम कापड आणि सोरा मीठ , नीळ, रेशीम, मिरी आणि त्याशिवाय अन्न शिजविताना लागणारे मसाल्याचे इतर पदार्थ, असा कच्चा माल, या होत्या. वरील वस्तूंशिवाय छोट्या प्रमाणात पांढरी साखर हुगळीहून निर्यात होई . हिरे आणि माणके यांची निर्यात मसुलीपट्टमहून , बंगाल आणि मद्रासमधून गुलामांची आणि मेणबत्तीच्या वाती तयार करण्यासाठी कापसाच्या धाग्याची निर्यात इंग्लंडकडे होई. १७ व्या शतकाच्या अखेरीला रेशमी टाफेटा आणि जरीचे कापड यांनी अतिशय मोठ्या प्रमाणावर निर्यात होऊ लागली. त्याचप्रमाणे इंग्लिश कंपनीने बंगालमध्ये केलेल्या प्रयत्नामुळे रेशमी कापड रंगविण्याच्या आणि विणण्याच्या कामात निश्चितच उल्लेखनीय अशी सुधारणा घडून आली . मसुलीपट्टमपासून पाँदिचेरीपर्यंतचा मद्रास प्रांताचा संपूर्ण किनारा आणि त्याच्या खालोखाल परंतु तुलनात्मकदृष्ट्या फार मागे असलेला कर्नाटक किंवा हुबळीपासून कारवारपर्यंतचा प्रदेश म्हणजे हिंदुस्थानातील कापड गिरण्यांच्या उत्पादनाच्या बाबतीत जास्तीत जास्त उच्चांक गाठलेला असा एक भाग बनला; परंतु गोवळकोंड्याच्या कुतुबशाही घराण्याचा ऱ्हास झाल्यानंतर जी युद्धांची परंपरा सुरू झाली आणि त्याबरोबरच मराठ्यांच्या सत्तेचा जो उदय झाला त्यामुळे या प्रदेशाचा पूर्णपणे विध्वंस झाला व १८ व्या शतकाच्या सुरुवातीला कापडाच्या उत्पादनाच्या बाबतचे प्राधान्य हे बंगाल प्रांताकडे गेले.

अनुक्रमणिका

(४) राज्यकारभाराची पद्धती

मुसलमानी राज्याचे स्वरूप हे तत्त्वतः लष्करी राजवटीसारखे होते . हे राज्य आपल्या अस्तित्वासाठी देखील बादशहाच्या अनिर्बंध अशा सत्तेवर अवलंबून होते . मुस्लिम सुलतान हा लढाईच्या वेळी मुसलमान धर्माच्या कट्टर अनुयायांचा उच्चत्तम असा सेनानायक होता . त्याला सल्ला देणारे असे सल्लागार मंत्रिमंडळ शिस्तवार असे अस्तित्वात नव्हते . बादशहाच्या खालोखाल उच्च प्रतीचे अधिकारपद हे वजीर किंवा दिवाण याचे होते . मंत्रिमंडळातील इतर मंत्री हे कोणत्याही प्रकारे विचार केल्यास त्याचे सहकारी नव्हते. इतकेच काय परंतु त्यांचे स्थान हे त्याच्याबरोबर तुलना करता निश्चितपणे दुय्यम दर्जाचे होते. अनेक महत्त्वाच्या प्रश्नांवर बादशहा आणि वजीर हे मिळून निर्णय घेत आणि याबाबतची कसलीही माहिती इतर वजिरांना लागत नसे . इतके असले तरीदेखील वजीर काय किंवा मंत्रिमंडळातील इतर कोणताही मंत्री काय हे बादशहाच्या इच्छेवर बंधन घालू शकत नसत . त्यांचे अधिकार टिकून राहणे हे बादशहाच्या लहरीवर पूर्णपणे अवलंबून असे. साहजिकच विसाव्या शतकात त्याला आपण मंत्रिमंडळ म्हणू शकतो. अशातऱ्हेच्या मंत्रिमंडळाची रचना त्यांच्याकडून कधीच होऊ शकली नाही . निव्वळ सिद्धान्तापुरते बोलावयाचे म्हटल्यास प्रत्येक मुसलमान सम्राट हा चर्च आणि त्याप्रमाणेच राज्य यांच्या प्रमुखपदी असे . इतकंच काय परंतु त्याच्या प्रजाजनांच्या दृष्टीने बादशहा हा त्या कालखंडापुरता त्यांचा खलिफा असे.

मोगल प्रशासनाची प्रमुख खाती पुढीलप्रमाणे होती. :—

(१) खजिना आणि महसूल (हे खाते दिवाण अथवा मुख्याधिकारी याच्या हाताखाली असे.)

(२) बादशाही घरदार (हे खाते खान -इ सामान अथवा उच्च पदस्थ कारभारी याच्या हाताखाली असे.)

(३) वेतन आणि हिशेब याबाबतचा अधिकारी (हे खाते बक्षी अथवा पगारवाटप करणारा अधिकारी याच्या हाताखाली असे.)

(४) धर्माबाबतचे कायदेकानून (हे खाते काजींचा काजी याच्या हाताखाली असे.)

(५) धार्मिक देणग्या आणि दानधर्म (हे खाते सद्र अधिकाऱ्यांचा मुख्य सद्र याच्या हाताखाली असे.)

(६) सार्वजनिक नितीमत्तेचे नियंत्रण करणारे खाते (हे खाते मुहतसीब या अधिकाऱ्याच्या हाताखाली असे.)

या खात्यापेक्षा दुय्यम दर्जाची परंतु दर्जाने मात्र स्वतंत्र विभागासारखीच अशी खाती पुढीलप्रमाणे होती :—

(७) तोफखाना (या खात्याचा प्रमुख मीर आतिश हा असे) आणि

(८) बातमी आणि टपाल खाते (या खात्याचा अधिकारी डाकचौकीचा दारोगा हा असे).

महसुलाबाबतचे सर्व कागदपत्र आणि राज्यातील प्रांत व लढाईत गुंतलेल्या सेनेचे अधिकारी यांजकडून पाठविले गेलेले सर्व खलिते हे बादशाही दिवाणाच्या नावे सादर होत . जमीनमहसुलाची वसुली वा आकारणी याबाबतच्या सर्व प्रश्नांबाबत निर्णय हे दिवाणाच्या अधिकार कक्षेखाली येत . त्याचप्रमाणे सर्व प्रांतांवरचे दिवाण यांच्या नेमणुका त्याच्याकडूनच होत आणि त्यांच्यावर त्याचीच हुकमत चाले . त्याचप्रमाणे देण्याबाबतच्या सर्व हुकमांवर त्याचीच सही लागे . बादशहाच्या मनात असलेल्या गोष्टी इतरांना निवेदन करण्यासाठी तो स्वतःच्या नावाने "हुकमांवरून" (हस्ब उल हुक्म) या संज्ञेखाली पत्रे लिहीत असे . त्याचप्रमाणे कधी कधी राज्यातील महत्त्वाच्या व्यक्तींना आणि परदेशीय सुलतानांना बादशहाकडून जाणाऱ्या पत्रांचा मसुदा तो तयार करी.

मोगल काळात मुलकी आणि लष्करी अधिकारी हे दोघेही मनसबदार असत . या सर्व अधिकाऱ्यांच्या पगाराच्या देयकांचा हिशेब आणि त्यांचे वेतन या बाबतचे अधिकार बक्षी या अधिकाऱ्याचे होते. युद्धावर असणाऱ्या सैन्याच्या बाबतीत पगाराच्या देयकांतील रकमेची वाटणी ही त्याच्याच खात्यातर्फे केली जाई . औरंगजेबाच्या कारकिर्दीच्या अखेरीला मोगल साम्राज्याचा विस्तार अतोनात वाढला . तेव्हा एक मुख्य बक्षी आणि त्याच्या हाताखाली तीन मदतनीस अशा जागा निर्माण करण्यात आल्या . मुख्य बक्षी याला पहिला बक्षी असे संबोधले जाई आणि त्याच्या तीन मदतनीसांना अनुक्रमे दुसरा , तिसरा आणि चौथा बक्षी असे संबोधले जाई . लढाईवर असलेल्या प्रत्येक सैन्याच्या तुकडीवर त्या मोहिमेपुरती एखाद्या सेनापतीची नेमणूक केली जाई . मोगल साम्राज्याच्या कालखंडात अनेक वेळेला अधिकाऱ्यांचा उल्लेख सिपाह सालार अथवा सेनाप्रमुख या हुद्द्याने केलेला आपल्याला आढळतो . परंतु प्रत्यक्षात मात्र हा हुद्दा केवळ मानाचा किताब होता आणि कोणत्याही प्रसंगी या अधिकाऱ्याकडे सबंध मोगल सैन्याचे नेतृत्व नव्हते . फक्त बादशहा हाच मोगल सैन्याचा सर सेनापती होता.

खान-इ-सामान अथवा उच्च पदस्थ अधिकारी हा बादशहाच्या घरादारासंबंधीचे जे खाते होते त्याचा प्रमुख अधिकारी होता . बादशहाच्या खाजगीतल्या सर्व चाकरांवर त्याची हुकमत चाले . बादशहाचा दैनंदिन खर्च , त्याचे भोजन , त्याच्या सामानसुमानाची कोठी वगैरे बाबींवर तो देखरेख करी आणि बादशहाच्या प्रवासात तो नेहमी त्याच्याबरोबर असे . राज्याच्या मालकीचे उद्योगधंदे अथवा कारखाने यांची व्यवस्था आणि त्यांची देणी या बाबतचा सर्व कारभार खान-इ-सामान हाच बघत असे.

तात्त्विकदृष्ट्या बघितल्यास साम्राज्यामध्ये बादशहाकडे सरन्यायाधीशपदाचे अधिकार होते. प्रत्येक बुधवारी तो स्वतः खास अधिकारात न्यायनिवाड्याचे काम पाही. परंतु त्याने भरविलेल्या अदालतीचे स्वरूप हे प्रथमच ज्या न्यायालयात खटला ऐकला जातो अशा न्यायालयाचे नसून ज्याठिकाणी फिर्यादीला अखेरचे अपील करता येते अशा उच्च न्यायसभेचे होते . बहुतेक सर्व मुलकी कज्जांमध्ये आणि मुसलमांनाच्या सर्व फौजदारी खटल्यांमध्ये काजी हा प्रमुख न्यायाधीश असे . या खटल्यांचा निकाल तो मुसलमानी कायद्याप्रमाणे देई . या कामी त्याला मुक्ती या अधिकाऱ्याची मदत होई . न्यायतत्त्व शास्त्रावरील अरबी भाषेतील पुस्तके वाचल्यानंतर खटल्यावर प्रकाश टाकणाऱ्या कायद्याचे गोषवाऱ्यात्मक स्वरूप हा अधिकारी काजीला सादर करी. यानंतर काजी हा खटल्याबाबतचा आपला निकाल सांगत असे.

सर्व अदालतीचा जो मुख्य काजी असे त्याला काजी -उल्-कजात असे म्हणत . तो नेहमी

बादशहाबरोबर राहात असे . प्रत्येक प्रांतातील शहरे आणि मोठी खेडी येथील स्थानिक काजी यांच्या नेमणुका आणि बडतर्फी याबाबतचे सर्व अधिकार त्याच्याकडे असत.

राज्याचा प्रमुख सद्र याला सद्र -उस-सदुर असे म्हणत . बादशहा आणि राजपुत्र यांच्याकडून राज्यातील धर्मनिष्ठ माणसे, विद्वान, आणि मशिदी आणि दर्गे यांत राहणारे फकीर याच्या उदरनिर्वाहाकरता ज्या जमिनींच्या देणग्या दिल्या जात त्याबाबत देखरेख करणे आणि न्यायनिवाडा करणे हे काम मुख्य सद्र या अधिकाऱ्याचे असे . अशा तऱ्हेने ज्या जमिनी बक्षिशीदाखल दिल्या जात त्यांचा उपयोग योग्य कारणासाठी केला जात आहे किंवा नाही हे पाहणे हे त्याचे काम असे. त्याचप्रमाणे बक्षिसपत्रे मिळावी म्हणून जे नवीन अर्ज येत त्यांची छाननी करण्याचे कामही त्याचेच होते . त्याचप्रमाणे तो बादशहाचा देणगी अथवा दान देणारा अधिकारी होता आणि राज्याचा जो धर्मादाय निधी होता तो वाटण्याचे कामही त्याच्याकडे होते. प्रत्येक प्रांतांमधील सद्र या अधिकाऱ्यांच्या नेमणुका आणि त्यांच्यावर देखरेख करण्याचे कामही त्याचेच होते.

मुहतसीब या अधिकाऱ्याचे काम कुराणाने घालून दिलेल्या नियमानुसार सर्वसामान्य माणसाचे जीवन व्यतित केले जात आहे किंवा नाही याची सख्तपणे देखभाल करण्याचे होते . त्याचप्रमाणे गाळून शुद्ध केलेली दारू, भांग आणि धुंदी आणणारी इतर पेये, पिण्याच्या सवयी, जुगार आणि जाहीररित्या किंवा धंदा म्हणून अनीतिमत्तेची वागणूक यांचा महंमद पैगंबराच्या आज्ञांची अम्मलबजावणी करण्यासाठी म्हणून परिहार करणे वगैरे गोष्टी त्याच्या कर्तव्यक्षेत्रात मोडत असत . याशिवाय पाखंडी मतांचा पुरस्कार करणारे, मुसलमान धर्माचा प्रेषित महंमद पैगंबर याची निंदा करणारे आणि रमजान महिन्यात उपवास करणे अथवा दररोज पाच वेळा नमाज पढणे याकडे दुर्लक्ष करणारे अशा सर्वांना शिक्षा करणे हे देखील मुहतसीब या अधिकाऱ्याच्या अधिकारकक्षेत येत असे . त्याचप्रमाणे वरील गोष्टींशिवाय नव्याने बांधण्यात आलेल्या देवळांचा नाश करण्याचे कामही त्याच्यावर सोपविण्यात आलेले होते.

मोगल साम्राज्याच्या प्रांतांतील राज्यकारभार करणारी जी संघटना होती ती संघटना म्हणजे केंद्रीय सरकारची हुबेहूब प्रतिकृती होती . प्रांतिक सरकारचे अधिकारी म्हणजे गव्हर्नर (सरकार दरबारी त्याला नजीम असे म्हणत आणि लोकांतरात तो सुबाह दार म्हणून ओळखला जाई.), दिवाण, बक्षी, काजी, सद्र, बुयुतात (या अधिकाऱ्याचे काम सरकारी मालमत्तेची देखभाल करणे हे असून तो सरकारतर्फे अधिकृत विश्वस्त म्हणून काम पाही .) आणि मुहतसीब हे होते . खान इ सामान हा अधिकारी प्रांतिक राज्यकारभारात नव्हता. प्रत्येक सुबाहदार आपापल्या ताब्यातील मुलखामध्ये जणूकाही आपण बादशहाच आहोत असे समजून वागण्याचा प्रयत्न करी.

प्रत्येक प्रांताचा राज्यकारभार हा त्या -त्या प्रांताच्या मुख्य शहरांमध्ये केंद्रित झालेला होता . प्रांतामधील प्रमुख ठिकाणी अथवा पोटविभागामध्ये शांतता राखण्यासाठी , बंडखोर आणि अन्यायाने वागणारे यांना शासन करण्यासाठी आणि महसूल जमा केला जात असताना विरोध झाल्यास मदत करण्यासाठी म्हणून फौजदाराच्या दर्जाचे अधिकारी असत . खेड्या-पाड्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जात असे आणि अनेकदा स्वायत्त असलेले असे छोटे विभाग किंवा खेडेगावी जमात म्हणून ओळखली जाणारी खेडी, वगैरेंचा राज्यकारभार कारभार करणारे अधिकारी कमी आहेत या कारणास्तव किंवा खेड्यांचे शासनातील स्थान हे गर्हणीय आहे या भावनेने हा त्यांच्यावरच सोपविण्यात येई . केंद्रीय अथवा प्रांतिक सरकारांकडून खेड्यांच्या कारभारात कोणतीही ढवळाढवळ होत नसे.

अनुक्रमणिका

मोठमोठ्या शहरांत कोतवाल अथवा प्रमुख पोलीस अमलदार हा अधिकार , कायदा आणि सुव्यवस्था यांची अमलबजावणी करीत असे. परंतु या कामाव्यतिरिक्त त्याला आधुनिक नगरपालिकांची जी अनेक कामे आहेत ती पार पाडावी लागत . त्याचप्रमाणे वजने आणि किमती याबाबत व्यापारपेठांवर नियंत्रण ठेवावे लागे आणि नीतिमत्तेबाबत कुराणाचे जे काही नियम होते त्यांचे पालन होण्याबाबत दक्षता घ्यावी लागे.

राज्याच्या निरनिराळ्या भागांत ज्या काही घटना होत त्याबद्दलची सर्व माहिती मध्यवर्ती सरकार हे सार्वजनिक आणि खाजगी हेर व बातमीदार यांच्यातर्फे मिळवीत असे . या हेर आणि बातमीदाराचे एकंदर चार वर्ग होते ते म्हणजे वाकाईनवीस , स्वानीह निगर, खुफीयानवीस (गुप्तपणे पत्रलेखन करणारे) आणि हरकारा (हेर आणि जासूद) हे होत . यांचे काम नियमितपणे योग्य कालावधी गेल्यानंतर अहवाल पाठविण्याचे होते . प्रत्येक सरकारी खात्याला एक लावून दिलेला वार्ताहर अथवा रोजनिशी लिहणारा संलग्न केलेला असे . पोस्टमास्टर जनरल अथवा दारोगा -इ-दाकचौकी या अधिकाऱ्यातर्फे राज्यातून येणारे सर्व अहवाल बादशहाकडे पोहोचत.

बादशहाने वेळोवेळी काढलेल्या प्रतिबंधनात्मक हुकमांना न जुमानता अनेक स्थानिक अधिकारी आणि सुबाहदार देखील वेगवेगळ्या मिषाने आणि अनेक प्रकाराखाली सर्व तऱ्हेचे कारागीर , व्यापारी, कामगार आणि सर्वसामान्य प्रजाजन यांचेकडून बेकायदेशीर करांची जबरीने वसुली करीत . (या करांना अबवाब असे म्हणत .) माझ्या **मुघल ॲडमिनिस्ट्रेशन** या पुस्तकाच्या पाचव्या प्रकरणात अशा तऱ्हेच्या ६७ करांची यादी विवरणात्मक टीपांसहीत दिलेली आहे . प्रांतिक सुभेदारांची आणखी एका मार्गाने अन्याय करण्याची रीत होती, आणि ती म्हणजे व्यापारी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी माल पाठवीत असताना वाटेतच तो जप्त करणे , त्या मालाची अपुरी किंमत देणे अथवा त्याबद्दल एक दिडकीही किंमत म्हणून न देणे आणि अशा तऱ्हेने जप्त केलेला माल खुल्या बाजारामध्ये मिळेल तो फायदा घेऊन विकणे अथवा आपल्या स्वतःच्या उपयोगासाठी या मालातील निवडक वस्तूंचा अपहार करणे ही होय . अशा तऱ्हेने सुभेदार जेव्हा माल विकीत त्या पद्धतीला इंग्रज व्यापारी बाजारावर माल लादण्याची पद्धती असे नाव देत असत. या पद्धतीला एखादा खंबीर आणि जागरूक असा बादशहाच आळा घालू शकत असे.

●●●

अनुक्रमणिका

सूची [श्री. म. ह. रानडे व श्री. ज्ञा. कृ. खिलारे, संशोधन अधिकारी, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, यांनी ही सूची तयार केली आहे.]

पृष्ठे

अ

अकबर, राजपुत्र

औरंगजेबाचा मुलगा

इराणला प्रस्थान, (१६८७)

कंदहार काबीज (१५९४)

चितोड येथे छावणी

पलायन

पराभव

मारवाडात भ्रमण

मोगल मुलुखावर हल्ला, (१६८६)

मृत्यु, (१७०४)

राज्याभिषेक (१६८१)

संभाजीशी भेट (१६८१)

अकलूज

औरंगजेबाचे वास्तव्य (१६८८)

दिलेरखानाचा मुक्काम

मोंगलांचा वेढा

अका खुसराव

विजापूरचा वजीर

अर्काट

मराठ्यांनी जिंकले,

अकीलखान

इतिहासकार

अर्घदाब नदी

अचमलखान

आफ्रिडी लोकांचा पुढारी

अंजदीव बेट

पोर्तुगिजांनी काबीज केले
अजमेर
मोगल ठाणे
अजितसिंग
जसवंतसिंगाचा मुलगा
जोधपूरवर हल्ला
बंड
मैरतची जहागिरी
अजितसिंग राणा
जोधपूर येथे
विजयी स्वागत
अजीम उश्श्यान
औरंगजेबाचा नातू
बंगालचा सुभेदार,
अर्जुन
शीखांचा पाचवा गुरू
अर्जुनसिंग गौर
अण्णाजी दत्तो
मराठा सेनानी
वध
संभाजीकडून अटक
अदोनी किल्ला
अघारखान
तुर्की सरदार
अफजलखान
विजापूर सरदार
प्रतापगडावर वध
मोंगलांवर हल्ले
शिवाजीवर स्वारी
अब्बास (दुसरा)
इराणचा शहा
अबुदन नबी

मथुरेचा फौजदार

अब्दुल अजिजखान

नजरमहमदचा मुलगा

औरंगजेबाच्या सैन्यावर

हल्ला

शिवनेरीचा किल्लेदार

अब्दुल कादीर

कोंडाणा जिंकला

अब्दुल्लाखान

काशघरचा राजा

अब्दुल महमद

अली आदिलशहाचा वजीर

अब्दुल रज्जाक लारी

(मुस्तफाखान)

अबुल हसन

सेना सारंग

अब्दुल्ला कुतुबशहा

गोवळकोंड्याचा सुलतान

मृत्यू (१६७२)

अब्दुन नबी

अबुल फजल

अबुल फत्त

शायस्तखानाचा मुलगा

अबुल हसन

गोवळकोंड्याचा सुलतान

दौलताबाद येथे बंदिवास

शिवाजीशी भेट

अब्दुल हमीदखान

गुजरातचा नायब सुभेदार

अमानतखान

सुरतेचा सुभेदार

अमीरखान

औरंगजेबाचा सेवक

अमीर महमद इब्राहीम

हैद्राबादचा सुभेदार

अमीर मुल्ला अहमद

विजापुरी सरदार

अमृतसर

अलकनंदा नदी

अल्बुकर्क मॅन्युअल

पोर्तुगिजांचा वकील

अलावर्दीखान

शुजाचा सेनापती

अली आदिलशहा

विजापूरी सुलतान

अली अदिलशहा (दुसरा)

विजापुरी सुलतान

अली कुलीखान

मोगल सेनानी

अली नकी

मुरादचा महसूलमंत्री

अली मर्दानखान

औरंगजेबाचा अधिकारी

अलीयाबाद

दिलेरखानाचे आगमन

अस्करखान

महमद अलिबेगची पदवी

अस्करन

जसवंतसिंगाचा मंत्री

असदखान

औरंगजेबाचा वजीर

विशाळगडास वेढा

अहमदखान

विजापुरी उमराव

अहमदनगर
औरंगजेबाचे आगमन
औरंगजेबाचा मृत्यू (१७०७)
मराठ्यांनी किल्ला जिंकला
मोगलांचा ताबा, (१६००)
संभाजीच्या बायकोचा बंदिवास
अहमदाबाद
आजमचे प्रयाण (१७०५)
दाराचे आगमन
मसूदचे प्रयाण (१६५८)
अहिवंत किल्ला
मराठ्यांनी जिंकला

आ

आकण्णा
मादण्णाचा भाऊ
कुतुबशहाचा वजीर
मृत्यू
आग्रा
औरंगजेबाचे आगमन
जहानआराचे वास्तव्य
पाडाव (१६५८)
महमद सुलतानचा वेढा
शहाजहानचे निधन
शिवाजीचे आगमन (१६६६)
आघारखान
आजम, राजपुत्र
औरंगजेबाचा मुलगा
आदिलशाहीच्या मोहिमेवर
चितोडवर नेमणूक
विजापूर वेढ्याचा प्रमुख
बेरडांचा पाडाव
माळव्याचा सुभेदार

गुजरातचा सुभेदार

आजमखान

औरंगजेबाचा सेनानी

आजमतारा

सातारा किल्लाचे नवे नाव

आदाब इ आलमगिरी

औरंगजेबाची पत्रे

आनंदपूर

तेघबहादूरचे

वास्तव्य

आनंदराव

शिवाजीचा सेनानी

साल्हेरवर हल्ला

आपटा

सिद्दीने जाळले (१६८१)

आलमगीरनामा

अहवाल

आवजी आढाळ

मोगलाचा मराठा सरदार

खानापूरचा ठाणेदार

धनाजीकडून कैद

इ

इखलासखान

साल्हेरला वेढा

इजीदखान

मुरादचा मुलगा

इतिबारखान

सुरतेचा सुभेदार

इतुमांड

बडोदा लुटले (१७०६)

इमायतखान

सुरतेचा किल्लेदार

इफ्तीकारखान

औरंगजेबाचा खासगी कारभारी

धर्मत लढाईत पराभव

इब्न हुसेन

मोगल सेनासारंग

छटगाव किल्ला जिंकला

इब्राहिमखान

काश्मीरचा सुभेदार

इर्बता

पोर्तुगिजांची माघार

इब्राहिमखान

बंगालचा सुभेदार (१६८९)

इमतियाजगड

अदोनीच्या किल्ल्याचे नवे नाव

इरजखान

औरंगजेबाचा अधिकारी

इस्फहान

अकबराचे आगमन (१६८८)

इसा बेग (मुखलिसखान)

औरंगजेबाचा वकील

इस्माइल

मोगल अधिकारी

इस्माइलखान मरवा

औरंगजेबाचा सेनानी

इस्लामखान

माळव्याचा सुभेदार

मृत्यु

इस्लामखान

बंगालचा सुभेदार

इस्लामपुरी (ब्रह्मपुरी)

मोगल छावणी

औरंगजेबाचा मुक्काम (१६९५)

औरंगजेबाचे निर्गमन
कामबक्षाचा मुक्काम
मोगल छावणी पुरात वाहून गेली, (१६९७)
इस्लामाबाद
छटगावचे नवे नाव
इस्लामाबाद
मथुरेचे नवे नाव
इंडी
मोगल ठाणे
शारजाखानाचा हल्ला
इंद्रमणी
ढमढेराचा राजा
इंद्रसिंग राठोड
नागोरचा प्रमुख

उ

उज्जैन
औरंगजेबाचे आगमन
जसवंतसिंगाचे आगमन
उदगीर किल्ला
मोगलांनी जिंकला (१६३६)
उदयपूर
मोगलांनी जिंकले
उदयपुरी महल
औरंगजेबाची बायको
उदयभान
कोंडाण्याचा किल्लेदार
उंबरखिंड

ए

एतीकादखान
असदखानाचा मुलगा
रायगड जिंकला (१६८९)
एतीमादखान

सुरतेचा सुभेदार
मृत्यू (१६९७)
काश्मीरचा सुभेदार

ओ

ओच्छा
मोगलांकडून काबीज

औ

औरंगाबाद
औरंगजेबाचे आगमन
औरंगजेबाचे उत्तरेकडे
प्रयाण
औरंगजेबाचे गोवळकोंडा
स्वारीवर प्रयाण (१६५६)
जयसिंगाचे आगमन
मिर जुम्लाचे आगमन,
मुआज्जमचे आगमन
मोगल ठाणे
शहाआलमचे आगमन
औरंगाबादी महल
औरंगजेबाची बायको
औसा किल्ला
मोगलांनी जिंकला (१६३६)

अं

अंगद
छत्रसाल बुंदेलचा भाऊ
अंतूर
अंबा घाट
अंबिकाबाई
हरजीची बायको

क

कर्ण
राजारामचा मुलगा

कर्णफुली नदी
कंदाहार किल्ला
औरंगजेबाचा वेढा (१६५२ मे)
कमळवीर
राजपूत ठाणे
करंजा बेट
पोर्तुगिजांनी जिंकले
कर्नाळा किल्ला
करणसिंग
किशनसिंगचा मुलगा
करपा खिंड
कॅरेरी
युरोपियन प्रवासी
कलगाव
कल्याण
मराठ्यांनी जिंकले (१६८३)
मातबर खानाचे आगमन, (१६९०)
शिवाजीने जिंकले, (१६५७ ऑक्टो.)
कल्याणी किल्ला
औरंगजेबाने जिंकला,
कवी कलश
संभाजीचा सल्लागार
कोरेगाव येथे हत्या,
काजी हैदर
शिवाजीचा मुन्शी
कांजीवरम्
केसो त्रिंबकची छावणी
मराठ्यांकडून लूट
काबीलखान
औरंगजेबाचा सचिव
कामबक्ष, राजपुत्र
औरंगजेबाचा मुलगा

विजापूर सुभेदारीवर नेमणूक (१७०७ फेबु.)
मृत्यू (१७०९)
कामीलखान
अटकचा फौजदार
कार्तलबखान
महमद हादीची पदवी
कोकणवर स्वारी
शिवाजीकडून पराभव
कारंजा
प्रतापरावाकडून लूट
कावेरीपाक
मराठ्यांनी जिंकले
काशी
मराठा सेनानी
कासीमखान
कर्नाटकचा फौजदार,
दोड्डेरीकडे पलायन
धर्मत लढाईत पराभव,
मृत्यू
संताजीकडून पराभव
किरतपूर
गुरू गोविंदचा मृत्यू
किलीचखान
पहिल्या निजामाचा आजोबा
किलीद इ फतह
वसंतगडचे नवे नाव
किल्ले
अदोनी
अहमदनगर,
अहिवंत
आग्रा
उदगीर,

औसा
कर्नाळा
कल्याणी,
कोंडाणा (सिंहगड),
कुभीकुंडा
कुळंग
कंदाहार
ग्वाल्हेर
गोवळकोंडा,
गंडीकोटा
चाकण
चंदनवंदन
छटगाव
जराथा
जिंजी
जोधपूर
जंजीरा
झांशी
त्रिंबक
तोरणा
दुगड
देवगाव
देसूर
दोड्डेरी
दौलताबाद
धारूर
नूरगड
पट्टा
पन्हाळा
परळी
परंडा
प्रबळगड

अनुक्रमणिका

प्रतापगड
पालमकोटा
पालमाऊ
पावनगड
पेणू कोंडा
पुरंदर
पेरु मुक्कल
फोंडा
बसवपट्टण
बहादूरगड
बाल्ख
बिदर
बुंदी,
बेळगाव
भडोच
भाक्कर
भूषणगड
भोपाळगड
मळखेड
माणिकगड
माहुली
मुंबई
मुल्हेर
मंगळवेढा
राजगड
रामसेज
रायगड
रुद्रमाळ (वज्रगड)
रोहिडा
लोहगड
वर्धनगड
वसंतगड

वाकीनखेडा
विजापूर
विशाळगड
वेल्लोर
शिवनेरी
सलीमगड
सातगड
सातारा
साल्हेर
सिनसानी
सिमलागड
सिरा
हिजली
हुगळी
किशनसिंग
चांद्याचा गोंड राजा
कुकसिंग
देवगडचा गोंड राजा
कुकिया
देवगडचा गोंड राजा
कुडाळ
शाह आलमकडून जाळपोळ
कुतुबशहा
महमद अमीनला कैद
शरणागती
कुरेशी दाऊदखान
औरंगजेबाचा अधिकारी
कुलबर्गा
मोगल ठाणे
कुशी नदी
कुहीर
कुभीकुंडा किल्ला

दाऊदखानाने जिंकला
कुलंग किल्ला
मातबरखानाने जिंकला
केशवराय देवालय, मथुरा
केसरीसिंग
देवगडचा राजा
केसो त्रिंबक
कोरडे रघुनाथ बल्लाळ
शिवाजीचा अधिकारी
कोरा
मिर जुम्लाचे आगमन
कोरेगाव
औरंगजेबाचे वास्तव्य, (१६८९ मार्च-डिसे.)
संभाजीची हत्या
कोंडाणा किल्ला (सिंहगड पाहा)
कृष्णराय राजा
बरद्वान येथील शेतकऱ्यांचा
सेनापती
कृष्णा नदी
कृष्णाजी भास्कर
अफजलखानाचा वकील
कृष्णाजी मल्हार
कृष्णा सावंत
माळव्यावर आक्रमण (१६९९)

ख

खटाव
मोगल ठाणे
खवासखान
विजापूर सेनानी
बहलोलखानाकडून हत्या
खवासपूर
मोगल छावणी

खलील उल्लाखान

औरंगजेबाचा सेनानी

पंजाब सुभ्याचा सुभेदार

खाजवा

शुजाचा मुक्काम

ख्वाजा अन्वर

मुख्य वजीर

ख्वाजा कमाल अफगाण

छाटनगरचा जमीनदार

ख्वाजाखान

खान जमान

मोगल सेनापती

खान इ आलम

खान इ जहान

मोगल सेनापती

खान इ दौरान

मोगल सेगापती

देवगडवर स्वारी

खानजहान बहादूरखान

दक्षिणेचा मोगल सुभेदार

खान महमद

विजापूरचा वजीर

मोगलांवर हल्ले

खान बहादूर फिरोजजंग

शहाबुद्दीनची पदवी

खानाजादखान

दिवाण

मराठ्यांवर हल्ले

शरणागती

खानापूर

मोगल ठाणे

खाफीखान

इतिहासकार
खिरजखान पन्नी
बहलोलखानाचा सल्लागार
खिंड
करपा
खैबर
जगदालक
जिलवाडा
देववारी
देवराइ
देवसुरी
पिर पंजाल
बोलन
भैरव
खुलदाबाद
औरंगजेबाचे दफन
खुशहालखान खाटक
टोळीवाल्यांचा नेता
खेड
औरंगजेबाची छावणी
खेम सावंत
कुडाळचा राजा
खेळणा किल्ला (विशाळगड पाहा)
खैबर खिंड

ग

गजपूर
मोगल ठाणे
गजापूर घाट
बाजीप्रभूची मोंगलांशी लढाई
गरगाव
मोगल ठाणे
गलगली

औरंगजेबाची छावणी (१६९२-१६९५),
गदाधरसिंग
अहोमांचा अधिपती
गाजीउद्दीखान बहादूर फिरोजजंग
गालिब
परेंडाचा किल्लेदार
ग्वाल्हेर
मुरादचा वध (१६६१ डिसे.)
शुकोची हत्या
गुजर प्रतापराव
शिवाजीचा सेनानी
कारंजाची लूट
साल्हेरवर हल्ला
हुबळीची लूट
गुलबर्गा
गुलालबार
मोगल कबिला
गेमेली कॅरेरी
इटालियन शरीरशास्त्रज्ञ
गोकला
तिलपतचा जमीनदार
गोगी
दिलेरखानाचे आगमन
गोदावरी नदी
गोपालसिंग चंद्रावत
कैलासचा फौजदार
गोवळकोंडा
औरंगजेबाचा वेढा
औरंगजेबाकडून पाडाव (१६८७ सप्टें.)
गोवा
संभाजीचा हल्ला
गोविंदराय

शीखांचा दहावा गुरू
नांदेड येथे वध (१७०८)
गोहर आरा बेगम
औरंगजेबाची मुलगी
गोहत्ती
गदाधरने जिंकले
गौर पहाडसिंग
ढमढेराचा फौजदार
गौर भीमसिंग
रजपूत नेता
गंगा नदी
गंगाराम
खानजहानचा दिवाण
गंडमनु
आघारखानाचा मुक्काम
गडंब नदी
गंडावी
शिवाजीचे आगमन (१६६४ जाने.)

घ

घोरपडे राणोजी
संताजीचा मुलगा
इंडी ठाण्यावर हल्ला
मसूरजवळ जुल्पीकार–
खानाशी लढाई
मोंगलांवर हल्ले
घोरपडे संताजी
मराठा सेनापती
कांजीवरमची लूट
त्रिचनापल्लीस वेढा
मोंगलांवर हल्ले (१६९३)
वध (१६९७)
सातारा जिल्ह्यात आगमन (१६९७)

हिमतखानाचा पराभव

च

चक्रध्वज

अहोमांचा राजा

चाकण किल्ला

शायस्ताखानाने जिंकला

चाकोरा नदी

चितपाट

चिमणाजी बापू

शिवाजीचा सेवक

चितोड

अकबराची छावणी

औरंगजेबाची भेट

चोपडा

मराठ्यांनी लुटले

चौकी मिर्दापूर

शुज्याचे ठाणे

चौरमान

जाटांचा पुढारी

चौरागड

गोंडाची राजधानी

चौल

मराठ्यांचा हल्ला

मोगलांनी जिंकले.

चंदन-वंदन किल्ला

चंबळ नदी

चांदा

गोंडाची राजधानी

चांदोर

चिंतामण देवालय, अहमदाबाद

छ

छत्रसाल बुंदेला

चंपतरायचा मुलगा
अफकनखानाकडून पराभव
मृत्यू (१७३१)
सिरोजमध्ये लूट
छत्रसाल हाडा
राजपूत नेता
छटगाव किल्ला
मोगलांचा वेढा

ज

जगदालक खिंड
जफरकुली
जोधपूरचा फौजदार
जयसिंग
अंबरचा राजा
जयसिंग मिर्झा राजा
औरंगजेबाचा हिंदू सेनापती
दक्षिणेचा मोगल सुभेदार
वज्रगड जिंकला
विजापूरवर स्वारी (१६६५ नोव्हें.)
शिवाजीशी भेट (१६६५ जून)
मृत्यू (१६६७)
जयसिंग महाराणा
राजसिंगचा मुलगा
जराथा किल्ला
जहांगीर
शहाजहानचा वडील
जहानजेब बेगम (जानी बेगम)
आजमची बायको
मृत्यू
जहानआरा
शहाजहानची मुलगी
आग्रा किल्ल्यात

औरंगजेबाशी भेट
जयध्वज
गुरगावचा राजा
जव्हार
मोरोपंतांनी जिंकले
जसवंतसिंग महाराजा
मारवाडचा राजा
दिलेरखानाचा पाठलाग
धर्मतच्या लढाईत पराभव
पुण्यात मुक्काम
माळव्याचा सुभेदार
मृत्यू
जाधव धनाजी
मराठी सेनापती
खानापूर ठाण्यावर
हल्ला
गुजरातवर हल्ला
जिंजी येथील मोगल
छावणीवर हल्ला,
सेनापतीपदावर नियुक्ती,
संभाजीकडून पराभव,
जाधवराव
दक्षिण नासिक
जिल्हाचा सुभेदार
जानी सायबा
अब्दुल्ला कुतुबशहाची बायको
जॉन चाइल्ड, सर
इंग्रज कंपनीचा हिंदुस्थानातील प्रमुख
जामरुद
जसवंतसिंगाचा मृत्यू
जालना
शिवाजीने काबीज केले

जावळी
मोरे घराण्याचे मुख्य ठिकाण
जिजाबाई
शिवाजीची आई
राजप्रतिनिधी
शहाजीशी विवाह
जिनत उन्नीसा बेगम
औरंगजेबाची मुलगी
इस्लामपुरी छावणीत
वास्तव्य
मृत्यू (१७२१)
जिनत उल
बादशहा बेगमने बांधलेली मशीद (१७००)
जियाउद्दीन महमद
अकबराबरोबर इराणला प्रयाण
जिंजी
असदखानाचे आगमन
झुल्पीकारखानाचा वेढा (१६९७)
नासिर महमदखानाचे
मुख्य ठाणे
मुस्तफाखानाचा वेढा (१६४८)
मोगलांचा हल्ला
राजारामाचे आगमन (१६८९)
संभाजीचे आगमन (१६९६)
जिलवाडा खिंड
जीवा महल
शिवाजीचा सेवक
जुन्नर
मराठ्यांचा वेढा (१६७८)
जुबदत्त उन्निसा
दिलरसबानूची मुलगी
जुल्पीकारखान (नुस्रतजंग)

औरंगजेबाचा सेनानी
जिंजीस वेढा
पालमकोटला वेढा
रायगडला वेढा (१६८९)
वॉन्दिवॉशला आगमन (१६९७)
सरसेनापती म्हणून नेमणूक
संभाजीचा पाठलाग
जेब उन्निसा
औरंगजेबाची मुलगी
जैनउल आबिदिन
शुजाचा मुलगा
जॉन गेअर, सर
जैनाबादी (हिराबाई)
औरंगजेबाची प्रेयसी
जोधपूर
ज्योशिया चाइल्ड, सर
इंग्रज कंपनीचा प्रमुख
जंजीरा किल्ला

ट

टिटवाळा
रुपाजीचा मोंगलांवर हल्ला
टंडा
शुजाची छावणी
टॅव्हरनियर
युरोपियन प्रवासी

ड

डाक्का
इब्राहीमखानाचे वास्तव्य

त

तट्टा
दाराचे आगमन
तरबियतखान

मुलतानचा सुभेदार
पन्हाळ्याला वेढा
साताऱ्याला वेढा
तहव्वूरखान
अजमेरचा फौजदार
हत्या
तलवंडी (नानकाना)
नानकचे जन्मस्थान
ताजमहाल
तापी नदी
तारापूर
संभाजीकडून जाळपोळ (१६८३)
ताराबाई
राजारामाची बायको
तिरुमलवाडी
शिवाजी-व्यंकोजी भेट
तुकाबाई
शहाजीची बायको
तुळजापूर
तुंगभद्रा नदी
तेघ बहादूर
हर गोविंदचा मुलगा
तोरणा किल्ला
औरंगजेबाने जिंकला
मराठ्यांनी जिंकला (१६९०)

त्र

त्रिचनापल्ली
संभाजीचा वेढा
त्रिंबक
पन्हाळ्याचा किल्लेदार
त्रिंबक किल्ला
औरंगजेबाने जिंकला (१६८९)

मराठ्यांनी जिंकला
मातबरखानाने जिंकला (१६८९)
त्रिंबक परशुराम
प्रतिनिधी

द

दत्ता त्रिंबक
मराठा अधिकारी
दयालदास
अर्थमंत्री
दाऊदखान
कर्नाटकचा फौजदार
दाऊदखान
बिहारचा सुभेदार
पालमाऊवर हल्ला
दाऊदखान पन्नी
दादाजी कोंडदेव
शिवाजीचा गुरू
मृत्यू (१६४७)
दादार
शुजाचे आगमन
दारा शुको
शहाजहानचा मुलगा
औरंगजेबाशी लढाई

कैद
खून
गुजरातकडे पलायन
दिल्लीमध्ये धिंड
मुलतानकडे पलायन
समूहगड लढाईत पराभव
सिविस्तानमध्ये आगमन
दिपालपूर
मुरादचे आगमन
दिलरसबानू बेगम
औरंगजेबाची पट्टराणी
दिल्ली
औरंगजेबाची स्वारी
जहानआरा बेगमची कबर
दाराची धिंड
तेघबहादूर कैदेत
राठोडांचा हल्ला
सुलेमानचे कैदेत आगमन
दिलेरखान
औरंगजेबाचा सेनापती
उत्तरेकडे पलायन
कुकसिंगवर स्वारी
गोवळकोंडा मोहिमेवर
दक्षिणेचा सुभेदार
पुणे जिंकले (१७६१)
पुरंदरला वेढा
भोपाळगड जिंकला (१६७५ एप्रिल)
मसूदविरुद्ध मोहीम
विजापूरवर मोहीम
संभाजीची बायको व
बहिणीस कैद
सागरवर हल्ला
साल्हेरला वेढा
दुगड किल्ला
मातबरखानाने जिंकला (१६८९)

अनुक्रमणिका

दुर्जनसाल हाडा
बुंदीराज्याचा मांडलीक
दुर्गादास
राठोडचा पुढारी
कोकणात पलायन
मोगल छावणीतून पलायन
देवगड
गोंडाची राजधानी
औरंगजेबाची छावणी
मोगलांनी जिंकले
देवराई खिंड
देवसुरी खिंड
देवापूर
औरंगजेबाची छावणी (१७०५)
औरंगजेबाचे आजारपण
देववारी खिंड
देसूर किल्ला
दोगची
महमद सुलतानचे ठाणे
मीर जुम्लाचा तळ
दोड्डेरी किल्ला
दौलताबाद
अहमदनरची राजधानी
मीर जुम्लाची कैद
दंडा
संभाजीचे आगमन (१६८१)

ध

धरणगाव
इंग्लिश वखारीवर शिवाजीचा
हल्ला
मराठ्यांनी लुटले
हंबीररावाचा हल्ला

धर्मत
जसवंत सिंगाची छावणी
मुरादचा मुक्काम
लढाई,
धापुनी
मोगलांकडून काबीज
धारूर
आजमने काबीज केले
धुळखेड
धैरतखान
तोफखान्याचा प्रमुख
घोलपूर
दाराचे आगमन

न

नजरअली
बडोद्याचा फौजदार
नजर महमदखान
बुखारीचा राजा
नदिरा बानू
दाराची बायको
नद्या
अर्घदाब
अलकनंदा
ब्रह्मपुत्रा
बियास
कर्णफुली
कुशी
कृष्णा
गोदावरी
गंगा
गडंब
गंभीरा

चाकोरा
चंबळ
नर्मदा
नीरा
तापी
तुंगभद्रा
पाताळगंगा
पंजशीर
फेनी
भीमा
महानंदा
माण
मोनास
येरळा
वारुणा
सतलज
सिंधू
सीना
नर्मदा नदी
नरनौळ
सतनाम्याकडून लूट
नशीपूर
शुजाचा तळ
नळदूर्ग
नाईक बहर्जी
शिवाजीचा गुप्तहेर
नागपूर
मोंगलांचा हल्ला
नादोल
अकबराचे आगमन
नासिर महमदखान
सुभेदार

नासिरीखान
औरंगजेबाचा अधिकारी
नांदेड
गोविंदसिंगाचे आगमन (१७०७)
निजामशहा
अहमदनगरचा सुलतान
निंबाळकर अमृतराव
निंबाळकर हणमंतराव
निराजी रावजी
शिवाजीचा मुख्य न्यायाधीश
नीरा नदी
नीमतखान
नेकनाम राजा
किशनसिंगची पदवी
नेकनामखान
बागलाणचा फौजदार
नुश्क ए दिलकुशा
भीमसेन बऱ्हाणपुरीचा ग्रंथ
नुरगड किल्ला
नुस्रतखान
औरंगजेबाचा सेनानी
धनाजीचा पाठलाग,
पन्हाळ्यास वेढा
वाकीनखेड्यावर हल्ला
नुस्रतजंग
जुल्फीकारखानाची पदवी
नूरमंजिल
आग्रा येथील बाग

प

पट्टण
ईश्वरदास नागरचे वास्तव्य
पट्टा किल्ला

मातबरखानाने जिंकला
पन्ना
छत्रसाल बुंदेलाची राजधानी
पन्हाळा किल्ला
औरंगजेबाने जिंकला (१७०१ मे)
परशुरामाने जिंकला (१६९२)
मुइद्दीनचा वेढा (१६९२)
शिवाजीने काबीज केला (१६७३)
संभाजीची कैद
सिद्दी जोहारचा वेढा
परशुराम
विशाळगडचा किल्लेदार
परळी किल्ला
औरंगजेबाने जिंकला
मोंगलाकडून पाडाव (१७००)
परंडा किल्ला
प्रतापगड किल्ला
अफजलखानाचा वध
मराठ्यांनी जिंकला (१६९०)
शिवाजीने बांधला
शिवाजी अफजलखान भेट
प्राण नारायण
कुचबिहारचा राजा
प्रबळगड किल्ला
मातबरखानाने जिंकला (१६८९)
प्रल्हाद निराजी
मराठ्यांचा वकील
राजारामचा प्रतिनिधी
संभाजीकडून कैद
पादशाहनामा
अहवाल
पामनायक

बेरडांचा राजा
पारनेर
महाबतखानाचे आगमन
पालकर नेताजी
मराठा सेनापती
विजापूर छावणीवर हल्ला
विजापूर स्वारीवर
पाचाड
शहाबुद्दीनचा हल्ला
पाताळगंगा नदी
पालमकोट किल्ला
राजारामने जिंकला
पालमाऊ किल्ला
पाली (पाच्छापूर)
संभाजी-अकबर भेट (१६८१)
पावनगड
औरंगजेबाचा वेढा
पांढरे बहर्जी
मोंगलांचा मराठा सरदार
पांढरे मांडकोजी
मोंगलांचा मराठा अधिकारी
पिडनायक
बेरडांचा पुढारी
पीडिया बेरड
पेणूकोंडा काबीज केले
वाकीन खेड्यातून पलायन
पीर पंजाल खिंड
पिंगळे मोरो त्रिंबक
खानदेशमध्ये लूट
जव्हार जिंकले
पिंगळे निळकंठ मोरेश्वर
पंतप्रधान

जिंजीस आगमन
संभाजीकडून कैद
पुणे
दिलेरखानाने काबीज केले (१६७१)
मोगलांचे आगमन (१७०२)
शायस्ताखानाचा
मुक्काम, (१६६० मे)
पुरंदर किल्ला
जयसिंगाचा वेढा
मोगलांनी जिंकला
शिवाजीचा ताबा
पूरमंडल
पूरहुनर
जहानआराची सावत्र बहीण
पृथ्वीसिंग
श्रीनगरचा राजा
पेडगाव (बहादूरगड)
बहादूरखानाचे कारभाराचे मुख्य ठिकाण
मोगल छावणी
संभाजीचे कैदेत वास्तव्य
पेडुपीलम
शिवाजीचे आगमन
पेद्दापिडीया नायक
पामनायकाचा पुतण्या
पेणूकोंडा
पीडिया बेरडाचा ताबा
मोगलांचे आगमन
पेरु मुक्कल किल्ला
पेशावर
औरंगजेबाचा मुक्काम
प्रेम नारायण
गोंडराजा

पोलादखान

आग्र्याचा शिबंदी प्रमुख

पंजशीर नदी

पंताजी गोपीनाथ

शिवाजीचा वकील

फ

फतवा-इ-आलमगिरी

फतुल्लाखान

साल्हेरचा किल्लेदार

फरहादखान

सेनानी

फलटण

मोंगलांनी जिंकले

फाजलखान

अफजलखानाचा मुलगा

फाझिलखान

काश्मीरचा सुभेदार

फिदाइखान

फिरोजजंग

औरंगजेबाचा सेनानी

आदोणीवर हल्ला

देवगड जिंकले (१६९९)

पन्हाळ्याला वेढा

फिरोजजंग

शारजाखानाचा चिटणीस

फुतुहात-इ-आलमगिरी

ईश्वरदास नागरचा ग्रंथ

फेनी नदी

फोंडा किल्ला

शिवाजीने जिंकला (१६७५ जुलै)

ब

बख्त बुलंद

देवगडचा मुसलमान राजा
अलीमर्दानखानाचा पराभव
गादीवरून पदच्युत (१६९१)
फिरोजजंगकडून पराभव
बख्तियारखान
मलिक जीवनची पदवी
बडी साहेबा
महमद आदिलशहाची बायको
बद्रुन्निसा
औरंगजेबाची मुलगी
बनारस
महमद शुजाचे आगमन
विश्वनाथ मंदिर
बर्नियार, डॉ.
युरोपियन प्रवासी लेखक
बलूजपूर
बरमप्पा नायक
चितळदूर्गचा जमीनदार
बसवपट्टण
बहरोज
खर्गपूरचा राजा
बहलोलखान
विजापूरचा प्रतिनिधी
खवासखानाचा वध
गोवळकोंडा मोहिमेवर
मृत्यू (१६७७)
ब्रह्मपुत्रा नदी
ब्रह्मपुरी (इस्लामपुरी पाहा)
बहर्जी बोहरा
सुरतेचा व्यापारी
बहर्जी हिंदुराव
संभाजीचा भाऊ

बहलोलखान (अबदुल करीम)

विजापूरचा सेनापती

बहादूरखान

औरंगजेबाचा सेनापती

गुजराथचा सुभेदार

दक्षिणेचा सुभेदार

नळदूर्गवर ताबा

मराठ्यांशी लढाई

बहादूरगड (पेडगाव पाहा)

बहादूर पुरा

बुरहानपूरचे उपनगर

मराठ्यांनी लुटले

बहादूरशहा (पहिला)

औरंगजेबाचा मुलगा

बागेवाडी

मोगल ठाणे

बाजी चव्हाण डफळे

सखाजीचा मुलगा

सातारा किल्ल्यावर हल्ला

बाजी प्रभु देशपांडे

शिवाजीचा सेनानी

बांदा

अकबराचे वास्तव्य

शहाआलमकडून जाळपोळ,

बाबर

मोगल बादशहा

बाबा नानक

हिंदु धर्मसुधारक

बॉब चॅरनॉक

कासीमबझार वखारीचा प्रमुख

बाभूळगाव

खानजहानचा मुक्काम

बारग्गी
दिलेरखानाचे आगमन
बालासोर
इंग्रजांनी वखार स्थापली (१६३३)
बाल्ख, प्रांत
बावडेकर रामचंद्र निळकंठ
अमात्य
बाळाजी आवजी प्रभू
संभाजीकडून वध (१६८१)
बिचोलीम
अकबराचा मुक्काम
शहाआलमने जिंकले (१६८४)
बिदर किल्ला
औरंगजेबाने जिंकला
बियास नदी
बिरबल राजा
बीड
जयसिंगाचा मुक्काम
बीदर
औरंगजेबाची भेट (१६८६ आक्टो.)
बुऱ्हाणपूर
औरंगजेबाचा मुक्काम
औरंगजेबाचे आगमन (१६५८ फेब्रु.)
औरंगजेबाचे आगमन (१६८१ नोव्हे.)
जयसिंगाचा मृत्यू (१६६७),
बुलंद अख्तर
अकबराचा मुलगा
बुलंद अख्तर
शुजाचा मुलगा
बुदाक बेग
शहा अब्बासचा अधिकारी
बुंदेला चंपतराय

बुंदेला दलपतराय
सेनानी
जिंजीचा ताबा
बुंदेला देवीसिंग
सेनानी
बुंदी किल्ला
दुर्जनसालने जिंकला
बुजुर्ग उमेदखान
शायस्ताखानाचा मुलगा
बेगम हौज
आजमची छावणी
दिलेरखानाची छावणी
बेंडाल
जहाजाचा कप्तान
बेन्जामिन हॅरिस
सुरतेच्या सल्लागार
मंडळाचा प्रमुख
बेदारबख्त राजपुत्र
महमद आजमचा मुलगा
औरंगाबाद सुभेदारीवर
नेमणूक,
मराठ्यांवर विजय
माळव्याचा सुभेदार
विशाळगडावर हल्ला,
सिनसानीला वेढा,
बेळगाव किल्ला
आजमने जिंकला
बोलन खिंड

भ

भगवंतसिंग
भडोच किल्ला
भवानी देवी, प्रतापगड

भाक्कर किल्ला

भागजी प्रभु

सातारा किल्ल्याचा सुभेदार

भागु

युसुफजाइ टोळ्यांचा पुढारी

भावनाथ

प्राण नारायणचा वजीर

भिवंडी

शिवाजीने काबीज केले (१६५७ आक्टो.)

भीमसिंग

राजसिंगचा मुलगा

भीमसिंग

सिसोदियाचा राजा

भीमसेन सक्सेना

इतिहासकार

भीमा नदी

भूज

दाराचे आगमन

भूम

जयसिंगाचा मुक्काम

भूषणगड

मोगलांचा वेढा (१७०० जून)

भूषणसिंग

मथुरेचा फौजदार

भैरवखिंड

भोपाळगड

दिलेरखानाने जिंकला (१६७९ एप्रिल)

भोसले खेळोजी

शहाजीचा चुलतभाऊ

भोसले मानाजी

मराठा सेनानी

भोसले व्यंकोजी

तंजावरचा राजा
शिवाजीशी भेट
भोसले शहाजी
मालोजीचा मोठा मुलगा
जन्म (१५९४)
नामधारी निजामशाहीची
स्थापना
मोगलास शरण
मुक्तता

म

मऊव्वाजुद्दीन
मुरादचा किताब
मकाजी आनंदराव
शिवाजीचा सेनानी
मथुरा
औरंगजेबाचा मुक्काम
मथुरापूर
मोगल ठाणे
मनूची
इतिहासकार
मलकापूर
अकबराचे वास्तव्य
औरंगजेबाचा मुक्काम
मलपुरा
मलिक अंबर
निजामशहाचा प्रतिनिधी
मृत्यू
मलिक इ मैदान
सुप्रसिद्ध तोफ
मलिक जीवन
दादारचा जमीनदार
मस्कत

अकबराचे वास्तव्य
मसुमा बजार
मीर जुम्लाचा तळ
मसुली पट्टम
गोवळकोंड्याचे बंदर
मसूर
औरंगजेबाचे आगमन
मसूद
वजीर
महमद अकबर
औरंगजेबाचा मुलगा
औरंगजेबाविरुद्ध बंड
मारवाडवर स्वारी
मृत्यू (१७०४)
महमद आदिलशहा
विजापूरचा सुलतान
मृत्यू (१६५६)
महमद अमीन
मीर जुम्लाचा मुलगा
गुजरातचा सुभेदार
विशाळगडावर हल्ला
महमद अमीनखान
सरदार
महमद अलीबेग
महाबतखानाचा अधिकारी
महमद इब्राहीम
उमराव
महमद ताहिर
दिवाण
महमद मुरादबेग
औरंगजेबाचा सेनानी
महमद मुरादबक्ष

शहाजहानचा मुलगा
महमद शुजा
शहाजहानचा मुलगा
बंगाल प्रांताचा सुभेदार
मुंगीरकडे पलायन
राज्याभिषेक
महमद राज
जयसिंगाचा मुलगा
महमद सादिक
औरंजेबाचा सेनानी
बंडात सामील
कांजीवरम् येथे आगमन
महमद सुलतान
औरंगजेबाचा मुलगा
आग्रा किल्ल्याला वेढा
गोवळकोंड्यावर स्वारी
दारावर हल्ला
दोगची येथे आगमन
मृत्यू (१६७६)
लग्न
शुजाकडे पलायन
महमुदाबाद
मीर जुम्लाचे ठाणे
महमद हादी
बंगालचा दिवाण
महानंदा नदी
म्हसवड
संभाजीचे आगमन
महाबतखान
औरंगजेबाचा सेनानी
गुजरातचा सुभेदार
दक्षिणेचा सुभेदार

विजापूर सेनेवर विजय
सुभेदारीवरून बडतर्फ
मळखेड
खानजहानची छावणी
माण नदी
माणिकगड
मातबरखान
औरंगजेबाचा सेनापती
उत्तर कोकणावर ताबा
मराठ्यांचे किल्ले जिंकले
मृत्यू (१७०४)
मादण्णा पंडित
गोवळकोंड्याचा वजीर
वध (१६८६)
मानजी मालार
चांद्याचा राजा
माने नागोजी
म्हसवडचा ठाणेदार
माल्डा
मीर जुम्लाचा मुक्काम
मालुसरे तानाजी
कोंडाण्यावर हल्ला
मासूम
इतिहासकार
माहुली किल्ला
मातबरखानाने जिंकला (१६८९)
शिवाजीने जिंकला (१६५८)
मासिरी आलमगिरी
औरंगजेबाचा इतिहास
मिर्जा जान बेग
शुजाचा सेनापती
मिरखान

खलीलुल्लाचा मुलगा

मिरज

नुस्रतजंगाची छावणी

मिर जुम्ला (महमद सैद)

अब्दुल्ला कुतुबशहाचा

मुख्य प्रधान

कैद

डाक्क्याकडे प्रयाण

गंडीकोट किल्ला जिंकला

गोवळकोंड्यास आगमन

दिल्ली येथे आगमन

परंड्यावर हल्ला

बंगालचा सुभेदार

मृत्यू

राजमहल काबीज

शुजावर हल्ले

मिहीर उन्नीसा

औरंगजेबाची मुलगी

मिर लुतफुल्ला शिराजी

गोहत्तीचा सुभेदार

मीर इब्राहीम (महाबतखान)

मीर खलाल

औरंगजेबाच्या मावशीचा नवरा

मीर महमद हाशीम

औरंगजेबाचा गुरू

मुआज्जम, राजपुत्र

औरंगजेबाचा मुलगा

अकबराचा पाठलाग

दक्षिणेचा सुभेदार

देवराइस आगमन

मुकर्रबखान

शेख निजामची पदवी

मुकुंदसिंग हाडा
राठोडांचा पुढारी
मख्यत्यारखान
आग्र्याचा सुभेदार
मुंगीर
शुजाचा मुक्काम
मुमताजमहाल
शहाजहानची बायको
मुंबई किल्ला
सिद्दीचा हल्ला (१६९८)
मुलतान
दाराचे पलायन
मुलतफखान
मुल्ला अहमद
ठाणे जिल्ह्याचा सुभेदार
मुल्ला सलीह
औरंगजेबाचा शिक्षक
मुल्हेर किल्ला
मोंगलांनी जिंकला
मोरोपंतांनी जिंकला
मुरादबक्ष, राजपुत्र
दक्षिणेचा सुभेदार
बाल्ख प्रांतावर आक्रमण
ग्वाल्हेर तुरुंगात मृत्यू (१६६१)
राज्याभिषेक
रामसिंगवर हल्ला
मुरारबाजी
पुरंदरचा किल्लेदार
मृत्यू
दिलेरखानावर हल्ला
मुर्शीद कुलीखान
(महमद हादी)

औरंगजेबाचा दिवाण
जमीन महसूल सुधारणा
तोफखान्याचा प्रमुख
बंगालचा सुभेदार
मुर्शीदाबाद
मक्सूदाबादचे नवे नाव
मुस्तफाखान
विजापूर सेनानी
मेलगिरी पंडित
संभाजीचा दिवाण
मैरता
दाराचे आगमन
मोनास नदी
मोरे चंद्रराव
मराठा सरदार
मोरो त्रिंबक
मराठा सेनानी
कैद
मुल्हेर जिंकले
विजापूर छावणीवर हल्ला
मोहिते हंबीरराव
शिवाजीचा सेनापती
मंगळवेढा
जयसिंगाचे आगमन
मोगलांचा वेढा
शारजाखानाचे आगमन

य

यच्चप्पा नायक
सेनानी
सातगड किल्ला जिंकला
युवानच्चांग
चिनी प्रवासी

येरळा नदी
येसूबाई
संभाजीची बायको
वंगण्णा (रुस्तमराव)
अकण्णाचा पुतण्या

र

रघुनाथपंत
शिवाजीचा वकील
रतनपूर
रतनसिंग राठोड
धर्मत लढाईत मृत्यू
रबिया उद दौरानी
दिलरसबानू बेगमची पदवी
रणअंदाजखान
औरंगजेबाचा अधिकारी
रणदुल्लाखान
विजापूरचा सेनानी
रणमस्तखान
औरंगजेबाचा सेनानी
कल्याण जिंकले
मराठ्यांवर हल्ले
रस्तुमराव
अकबराचा पुतण्या
रहमत उन्निसा (नबाबबाई)
औरंगजेबाची बायको
रसुलपूर
राजगड
औरंगजेबाने जिंकला (१६८९)
औरंगजेबाने जिंकला (१७०६)
मराठ्यांनी जिंकला (१६९०)
शिवाजीने बांधला
राजमहाल

बंगालची राजधानी
औरंगजेबाने काबीज केले
जुल्फीकारखानाचा तळ
शुजाचा मुक्काम
राजरूप राजा
राजसबाई
राजारामाची बायको
राजासिंग महाराणा
रजपूत पुढारी
मृत्यू (१६८०)
राजा प्रताप चेरो
मोगल मनसबदार
राजाराम
जाटांचा पुढारी
आघारखानाचा वध
मृत्यू (१६८८)
राजाराम, छत्रपति
शिवाजीचा धाकटा मुलगा
जिंजीस आगमन
जिंजीहून पलायन
राज्याभिषेक (१६८९)
विशाळगडावर आगमन
सातारा येथे आगमन
सिंहगडावर मृत्यू (१७००)
राधाबाई
अमृतराव निंबाळकरची बायको
रामघाट
रामचेहरा
सोगर येथील जमीनदार
रामजी पंडित
रामचंद्रचा प्रतिनिधी
रामदास स्वामी

शिवाजीचा गुरू
रामदू
खानजहानचे आगमन
रामसेज किल्ला
राम शेणवी
दुभाषा
रामसिंग
चांद्याचा राजा
रामसिंग हाडा
रामसिंग
जयसिंगाचा मुलगा
गोहत्तीला वेढा
रामसिंग राठोड
रजपुत नेता
रायभान
व्यंकोजीचा मुलगा
रायगड
औरंगजेबाने जिंकला
एतीकादखानाचा वेढा
कवी कलशचे वास्तव्य
जुल्फीकारखानाकडून पाडाव (१६८९)
शिवाजीने जिंकला
शिवाजीचा राज्यभिषेक
संभाजीने काबीज केला (१६८०)
रायसिंग सिसोदिया
धर्मत लढाईतून पलायन
रॉयल एशियाटिक सोसायटी
ग्रथांलय, लंडन
राव कर्ण
बिकानेरचा राजा
रिचर्ड केगवीन, कॅप्टन
रुद्रमाळ किल्ला (वज्रगड पाहा)

रुहुल्लाखान
हैदराबादचा सुभेदार
रुस्तुमखान
औरंगजेबाचा सेनानी
मराठ्यांकडून कैद
रुस्तुमखान
दाराचा सेनापती
रुस्तुमखान
वऱ्हाडचा नायब सुभेदार
रोशनआरा, राजकन्या
रोहिडा
मराठ्यांनी जिंकला (१६९०)
रंगमती
रायासिंगाचे आगमन

ल

लतीफ उल अखबार
लतीफखानाचा ग्रंथ
लालमहाल
शिवाजीचे पुण्यातील घर
लालसिंग खीची
अनिरुद्धाचा मांडलीक
लाहोर
जहांगीरचा दरबार
औरंगजेबाचे निर्गमन (१६६३ मे)
दाराचे आगमन (१६५८ जुलै)
लोदीखान
कोकणचा सुभेदार
लोहगड किल्ला
लुतफुल्लाखान
खटावचा सुभेदार

व

वर्धनगड किल्ला

वशरा
अबुदन नबीचा हल्ला
वसई
संभाजीकडून लूट
वसंतगड
औरंगजेबाने जिंकला
मराठ्यांनी जिंकला
वाई
औरंगजेबाची छावणी
वाकीनखेडा
बेरड नायकची
राजधानी
वॉन्दिवॉश
मोगल छावणी
वार फुकन
वारणा नदी
वालीकांडपुरम
विक्रमशहा
जव्हारचा कोळी राजा
विलकिनीस थॉमस
इंग्रजांचा वकील
विजापूर
औरगजेबाचे आगमन (१६८८ मे)
औरंगजेबाचे आगमन (१६९० जाने.)
औरंगजेबाचे आगमन (१६९५)
खवासखानाची कैद
मोंगलाचे स्वागत
विशाळगड (खेळणा)
औरंगजेबाने जिंकला
राजारामाचे आगमन (१६९७)
शिवाजीचे आगमन
विरभान

सतनाम पंथाचा संस्थापक
विश्वनाथ मंदीर, बनारस
विल्यम नॉरीस, सर
इंग्रज वकील
वीरसिंग देव
और्च्छाचा बुंदेला राजा
वीरसिंग देवालय, ओर्च्छा
वेंर्गुला
अकबराचे आगमन
वेल्लोर
मोंगलांचा वेढा
शिवाजीकडून पाडाव (१६७८)
वैजीपुरा
औरंगाबादचे उपनगर
व्यंकोजी दत्ता
शिवाजीचा सेनानी

श

शहा अब्बास
कंदाहार काबीज केले (१६२३)
शहा आलम
औरंगजेबाचा मुलगा
कोकणावर स्वारी (१६८३)
दक्षिणेचा सुभेदार
बिचोलीम जिंकले
बंदीवास
शहा जहान
औरंगजेबाचा वडील
आग्रा किल्ल्यात कैद
कंदाहार जिंकले (१६३८)
दक्षिणेवर मोहीम
मृत्यू (१६६६)
शहाजी (दुसरा)

राजारामाचा चुलत भाऊ
शहानवाजखान
औरंगजेबाचा सासरा
कैद
शहाबाजखान
सुरतेची लूट
शहाबुद्दीन खान
कोकणावर स्वारी (१६८५)
रामशेज किल्ल्याला वेढा
शायस्ताखान
दक्षिणेचा सुभेदार
पुण्यात मुक्काम
बंगालचा सुभेदार
शिवाजीविरुद्ध मोहीम (१६६०)
शिवाजीकडून हल्ला
शारजाखान (सय्यद मखदूम)
विजापूर सेनापती
शाहू राजा
संभाजीचा मुलगा
एतीकादखानाकडून कैद
गुलालबार येथे कैदेत
शिवनेरी किल्ला
शिवाजीचे जन्मस्थान
शिवराम गौर
राजपूत नेता
शिवाजी, छत्रपति
शहाजीचा मुलगा
अफजलखानाचा वध
अहिवंत किल्ला जिंकला
आग्र्याहून सुटका (१६६६)
उत्तर हिंदुस्थानाकडे (१६६६ मे)
कल्याण व भिवंडी काबीज (१६५७)

जयसिंगाची भेट (१६६५ जून)
जालना लुटले
जावळीवर हल्ला (१६५६ जाने)
जुन्नर लुटले
तिरुमलवाडी येथे व्यंकोजीशी भेट
पन्हाळा काबीज (१६७३ मार्च)
पेडगाव येथील मोगल छावणीवर हल्ला
मृत्यू (१६८० एप्रिल)
राज्याभिषेक (१६७४ जून)
विजापूर प्रदेशात लूट
राजगडावर आगमन (१६६६ नोव्हें.)
शायस्तानखानावर हल्ला
सातारा किल्ला जिंकला (१६७३ जुलै)
सुरतेच्या मोहिमेवर (१६६४ जाने.)
सुरतेची लूट (१६७० आक्टो.)
हैद्राबादला भेट
शिवाजी (दुसरा)
संभाजीचा मुलगा
शिवाजी (तिसरा)
ताराबाईचा मुलगा
शिर्के कान्होजी
शिंदे नेमाजी
मोगलाचा मराठा अधिकारी
फिरोजजंगकडून पराभव
वऱ्हाडवर हल्ला
शुजा राजपुत्र
औरंगजेबाचा भाऊ
खाजचा लढाईत पराभव
डाक्क्यास आगमन
बंगालचा सुभेदार
मीर जुम्लावर हल्ला
मृत्यू

अनुक्रमणिका

राजमहाल जिंकले
शुजातखान
गुजरातचा सुभेदार (१६८४-१७०१)
मृत्यू
शेख उल इस्लाम
न्यायाधीश
शेख निजाम
कुतुबशहाचा उमराव
शेख मीनहाज
कटवाल्यांचा पुढारी
शेख मीर
औरंगजेबाचा सेनानी
दाराचा पाठलाग
शेरखान लोदी
सुभेदार
शेर अफकनखान
रानोदचा फौजदार
छत्रसालवर हल्ला
शोरापूर
बेरड नायकाची राजधानी
शंकराजी मल्हार
मंत्री
शंभु महादेव डोंगर

स

सक्कर
दाराचे पलायन
सखाजी डफळे
मोगल मराठा सरदार
सातारा किलल्यावर हल्ला
स्ट्रेनशाम, मास्टर
सुरतेतील वखारीचा बचाव
सतनाती (कलकत्ता)

इंग्रजांची छावणी
चॅरनॉकचे आगमन
सतलज नदी
सफदरखान
मोगल सेनापती
सफीशकनखान
औरंगजेबाचा सेनापती
सफीखान
अजमेरचा सेनापती
समर्कंद
तिमूरची राजधानी
समुहगड
औरंगजेबाची छावणी
सय्यद अब्दुल्लाखान
विजापूरचा सेनापती
सय्यद अहमद
अब्दुल्लाचा जावई
सय्यद आलम
शुजाचा सेनापती
सय्यद घैरतखान
पंजाब सुभ्याचा अधिकारी
सय्यद बंडा
अफझलखानाचा सेवक
सय्यद मुजफ्फर
अब्दुल्लाचा सेनापती
सय्यद हसन अलीखान
कल्याण काबीज केले
सरफराजखान
मंगळवेढ्याचा फौजदार
सरुमा
अब्दुल्ला कुतुबशहाची बायको
सलाबतखान

तोफखान्याचा प्रमुख
सलीमगड
जेबुन्निसाचा बंदिवास
सवाई जयसिंग
जयपूरचा राजा
साखरपे
अकबराचे आगमन
सागर
बेरड नायकाची राजधानी
मोगलाकडून पाडाव
सातगड किल्ला
सातारा
औरंगजेबाचा वेढा
शिवाजीने काबीज केला (१६७३ जुलै)
सादुल्लाखान
कंदहारला वेढा
साल्हेर किल्ला
औरंगजेबाने जिंकला (१६८७ फेब्रु.)
मराठ्यांचा वेढा
सासवड
जयसिंगाचा लष्करी तळ
साहिबजी
अमिरखानाची बायको
सिकंदर
अलि आदिलशहाचा मुलगा
सिकंदरखान
फत्तेजंगचा भाऊ
सिकंदरा
अकबराची कबर
सिद्दी
मोगलाचा नौसेनापती
मुम्बईवर हल्ला (१६८९ मे)

सिद्दी जोहार (सलाबतखान)
पन्हाळ्याला वेढा
सिद्दी दिलावर
कल्याणीचा किल्लेदार
सिद्दी मर्जन
बिदरचा किल्लेदार
सिद्दी मसूद
विजापूरचा सेनानी
आदिलशहास मदत
शरणागती
सिद्दी मिश्री
सिद्दी हलाल
उत्तर नासिक जिल्ह्याचा
ठाणेदार
सिदोजी निंबाळकर
मराठा सरदार
सिद्धौत
मिर जुम्लाने जिंकले
सिनसानी किल्ला
बेदारबख्तचा वेढा
सिपाहार शुको
दाराचा मुलगा
सिमला गड
मिर जुम्लाने काबीज केला
सिदायतखान
मोगल अधिकारी
सिरा किल्ला
अफजलखानाचा वेढा
सिरोज
नेमाजी शिंदेचा वेढा
सिरोही
शहाबुद्दीनखानाचे प्रयाण

अनुक्रमणिका

सिंधू नदी
सिंहगड (कोंडाणा)
औरंगजेबाने जिंकला (१६८४ नोव्हें.)
तानाजीचा मृत्यू
सीना नदी
सुरत
इंग्रज कंपनीची स्थापना (१६९९ एप्रिल)
वखारीची स्थापना (१६१२)
शहाबाजकडून लूट
शिवाजीकडून लूट
सुरजगड
सुलेमान शुकोचा मुक्काम
सुलतानपूर
जयसिंगाची छावणी
सुलतान हुसेन (मिर मलंग)
कामबक्षाचा अधिकारी
सुलेमान शुको
दाराचा मुलगा
ग्वाल्हेर येथे हत्या
सूर्यप्रकाशराव
मादण्णाची पदवी
सेलगुर
शिवाजाचे आगमन,
सोगर किल्ला
भूषणसिंगने जिंकला
सोजात
अकबराची छावणी
सोनदीप
अबुलहसनचा हल्ला
सोनाजी
शिवाजीचा वकील
सोमनाथ देवालय

अनुक्रमणिका

सोमसिंग
पिडिया नायकाचा भाऊ
सोलापूर
औरंगजेबाचा मुक्काम (१६८६ जून)
सोयराबाई
राजारामाची आई
संभाजीकडून वध (१६८१ आक्टो.)
संगमेश्वर
संभाजीची कैद
संग्रण
शीखांचा विजय
संभाजी, छत्रपती
शिवाजीचा मुलगा
अकबराची पाली येथे भेट (१६८१)
औरंगजेबाकडून कैद (१६८९)
करंजा जिंकले
करवाल्यांचा वध (१६८१)
कोरेगाव येथे हत्या
गोव्यावर हल्ला
दिलेरखानाच्या छावणीतून
पलायन
मनसबदार
पन्हाळा येथे कैदेत
पन्हाळा जिंकला
पोर्तुगिजावर हल्ला (१६८३)
शिर्क्यांचा पराभव
शिवाजीबरोबर आगऱ्यास
सिद्दीवर स्वारी (१६८१)
सिंहासनारोहन (१६८१)
संभाजी (दुसरा)
राजारामाचा मुलगा
संभाजी कावजी

शिवाजीचा सेवक
संपगाव
शहाआलमने जिंकले

ह

हणमंते रघुनाथ नारायण
हमीद उद्दीन
हरकिसन
शीखांचा गुरू
हरगोविंद (१६०६-४५)
अर्जुनचा मुलगा
हरजी महाडिक
संभाजीचा मेव्हुणा
जिंजीच्या अधिकारावर नेमणूक
मृत्यू, (१६८९)
हरीहरपूर
इंग्रजांनी वखार स्थापली (१६३३)
हसम अलीखान
औरंगजेबाचा सेनानी
गोकलचा पराभव
रजपुतावर हल्ला
हसन अबदाल
औरंगजेबाचे आगमन (१६७४ जून)
हसन हमीदान
सुरतेचा व्यापारी
हयातबक्ष बेगम
अब्दुल्लाची आई
हाजी सैद बेगम
सुरतेचा व्यापारी
हिजली किल्ला
हिम्मतखान बहादूर
संताजीकडून पराभव
संभाजीवर विजय (१६९३)

मृत्यू
हिरोजी फर्जंद
शिवाजीचा सावत्र भाऊ
संभाजीकडून वध (१६८१)
हुकमत पन्हा
रामचंद्र निळकंठ यांची पदवी
हुगळी
इंग्रजांचे व्यापारी ठाणे
इंग्रजांकडून लूट
डचाकडून पाडाव
नुरुल्लाखानाचा आश्रय
हुबळी
प्रतापरावांनी लुटले
हुसेनसागर तलाव, हैदाबाद
हुसेनशहा
निजामशाहीचा शेवटचा राजा
ह्युजेस
इंग्रज प्रतिनिधी
हेन्री गॅरी, कॅप्टन
इंग्रज वकील
हैद्राबाद
औरंगजेबाचा प्रवेश
कुतुबशहाची राजधानी
मोगलांचा ताबा (१६८७)
शिवाजीचे शाही स्वागत
शिवाजीची भेट (१६७७)

अनुक्रमणिका